00196992

00196992

Digitized with financial assistance from
Shri Brihad Bhartiya Samaj
on 11 March, 2020

23 cm.
8 VIII 496
08/3/2017

॥ श्री ॥

विविधज्ञानविस्तार.

A MONTHLY MAGAZINE
OF
MARATHI LITERATURE
FOR
Ladies & Gentlemen.

(कुलस्त्रिया व गृहस्थ यांकरितां.)

पुस्तक ४६ वें.

मुंबईंत
" श्रीलक्ष्मी-नारायण " छापखान्यांत छापिलें.
डिसेंबर १९१५.

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका.

Mar 891.46 V.IV|V.I 198…

लेखानुक्रमणिका.

श्रीगोविंद-भाष्य. १०३
आठवें महाराष्ट्र-साहित्यसंमेलन, मुंबई. २८,६५,७३
आधुनिक व जुनी, आणि सयमक व निर्यमक कविता. ११५
आमची सर्वांगी प्रगति होण्यास कोणत्या तऱ्हेच्या नव्या वाङ्मयाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. १७१
आंग्लांमध्यें गीर्वाणविषयक जागृति. ३३
कविता.
आठव्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनास– ७१
उषःसूक्तावलि. ९६
कवि-कुसुम. १३६
कर्यास पाचारण. ८८
गीतोद्भव. १२८
नवयुग. २४
निर्यमक कवितेचा अर्ज १२३
पूर्वकवि-प्रशस्ति. २७
प्रेम-संदेश. ५४
फुलांतील मधुकरास. १५२
मृत्युस्तोत्र. ९८
कविता १५४
१९१५ सालीं भरणाऱ्या साहित्य–संमेलनास संदेश. २३
गेल्या पंचवीस वर्षांतील नाटकांचें संक्षिप्त परीक्षण व त्यांच्या प्रगतीचे उपाय. १०५
गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी कादंबऱ्या. १५३
धर्माच्या वाङ्मयाची आवश्यकता. १४१
नवीन पुस्तकें. ८१
पत्रव्यवहार. १०१
पुस्तकपरीक्षा–अभिनवकाव्यमाला. ५१
,, टिळकांची कविता. १७
प्राचीन आर्यांचें अंकगणित–विषयक ज्ञान. ९७
बिचाऱ्या बहिष्कृत देशी भाषा ! २५
मराठी मासिकें, त्यांची सांप्रतची स्थिति व ती सुधारण्याची दिशा. १२९
मराठी भाषेंतील पाठ्यांच्या पारिभाषिक पाठभेदांत एकवाक्यता होईल काय ? ३९
मराठी साहित्य व ख्रिया. १३५
महाराष्ट्र कवितेचें आधुनिक स्वरूप. ५
महाराष्ट्र वाङ्मयाच्या अभिवृद्धीचे कांहीं उपाय. १३९
महाराष्ट्र–साहित्य–संमेलन व अधिकारी वर्ग. ८७
रासायनिक परिभाषा. २९,६१,१०४
लखनौ येथील पांचवें हिंदी साहित्यसंमेलन. १०
[illegible] आणि त्याची उत्क्रांति. ५५,८९
वैदिक धर्माच्या पांच मुख्य शाखा. ९३
बंगीय साहित्यपरिषदेचें बरद्वान येथील आठवें साहित्य–संमेलन. ४९
शांत बायकोवरील कवन. १०२
सचित्र मासिकांस एक सूचना. १४५
साहित्यपत्रिकेचें पहिलें वर्ष. १
सांप्रतच्या नाट्यवाङ्मयाची स्थिति. १६५

लेखकानुक्रमणिका.

(गद्यलेखक.)

सौ. कमलाबाईसाहेब किबे.
,, गंगूबाई खेडकर.
डॉ. श्रीधर व्यं. केतकर, पीएच्. डी.
रा. रा. श्रीनिवास नारायण कर्नाटकी.
,, गणेश स. जोशी.
,, गोविंद महादेव भिडे.
,, गोविंद सीताराम सांपळे.
,, गो. ब. माफोडे.
प्रो. गो. स. आपटे.
,, गं. गो. कानिटकर, एम्. ए.
रा. रा. दामोदर गणेश पाध्ये, एम. ए.
,, दा. ना. लिमये, बी. एस्सी.
,, नानासाहेब शिंदे.
,, नारायण कृष्ण वैद्य.
,, महाराष्ट्र नाटक मंडळींतील एक नट.
,, रामचंद्र भिकाजी जोशी.
,, रामचंद्र हयग्रीव मणूरकर.
,, लक्ष्मण गणेश साठे, एम्. ए.
,, ल. य. पुरोहित.
,, विनायक सदाशिव वाकसकर.
,, वि. सी. सरवटे.
,, विठ्ठल गणेश ताम्हणकर.
रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम्. ए.

(पद्यलेखक).

रा.रा. आनंदराव कु. टेकाडे.
,, आनंदीरमण.
,, केशव मा. सोनाळकर.
,, "गिरीश."
,, सोनकर.
,, नारायण के. बेहेरे.
,, "महाराष्ट्रिय."
,, विठ्ठल भगवंत लेंभे.
,, विनायक अनंत ओतुरकर.
,, साहू द. उजगरे.
,, सुमंत.

THE ASIATIC SOCIETY OF [illegible]
TOWN HALL, MUMBAI 400 001.

विविधज्ञानविस्तार, पुस्तक ४६ वें,

यांत आलेल्या विषयांची अनुक्रमणिका.

श्रीकृष्णचरित्र आणि रा. वाकसकर. ३५३

अलीकडील नाटकें. २९३

उन्नतर देशाभिमान पाहिजे. ४२९

उदच् व अवाच्. ३२

एका सरकारी कामगाराच्या रोजनिशींतील उतारे. ४१,८१,१९९,३०५

कविता.

श्रीशारदावंदन. ३२७,३९७

आधुनिक साहित्यकक्कुठार. ४०५

ईशकुलझुल. ३७१

करुणगति. २६८

कविता व जीवनकलह. २०८

काव्यमंजूषा. ११२

गंगातीरावर. ११९

गंगाधर रामचंद्र मोगरे (कै.) १३०,३५९

गोपाळ कृष्ण गोखले (कै.) १३०,२५१,२५२,२५५

ध्वजारोपण. २५४

प्रवासी काव्य वाचल्यानंतर. ४३५

प्रेमाचें अद्वैत. ३६०

महाकाव्य. ३९०

महाराष्ट्र वाग्देवतार्पित पुष्पांजली. ४१६

मैत्रिणीस पत्र. १९२

यंदांचा हिवाळा. १२९

विश्वगुणादर्श—परिशिष्ट. ३४५

विश्वतरंग. ३६

शारदास्तवन. ४१६

सप्रातक कविता. ३९

सरस्वतीभक्तांस. ३९८

स्वागतम्. ३९७

गिरिशिखरावर भेट. २६९

गेल्या पंचवीस वर्षांतील नाटकें, त्यांचे गुणदोष व प्रगतीचे उपाय. ३७७

गोपाळ कृष्ण गोखले (कै.) २०९

चित्ररेखन. २७२

तार्ईस ! ४३९

दादोबाचें आत्मचरित्र व मराठी गद्यग्रंथांचा उदय. [illegible]

नवीन ग्रंथकारांस उत्तेजन देण्याचे मार्ग. २९०

नवीन होतकरू लेखकांना उत्तेजन देण्याचे मार्ग. ४१९

पत्रव्यवहार—श्रीधरस्वामींचा मरण शक. १८९

पुनश्च रावणाची लंका. १६

पुस्तकपरीक्षा—श्रीकृष्णचरित्र २५४

" 'केवळ स्वार्थापायीं.' १७,६९

" ग्रहगणित. ९७

" 'परमार्थविचारमाला.' ३६१

" मराठे आणि मोंगल. १४२

" युरोपमध्यें कार्यकारणवादाचा उदय व प्रभाव. ४१७

" वार्षिक इतिवृत्त, भा. इ. सं. मंडळ, शके १८३५. १३७

" सुख आणि शांति. १६१

पूर्वीच्या काळचे अलंकार. ५१

प्रतिष्ठान म्हणजे काबूल नव्हे. ३७

प्रतिष्ठान म्हणजे पैठण कीं काबूल ? १२१,१५६

प्राचीन व अर्वाचीन कविता. ३२८

प्राचीन व अर्वाचीन मराठ्यांचें स्वभावैक्य. ३७२

ब्रिटिश साम्राज्याचा उदय. १३५,२०१

भाषांतरित, रूपांतरित व स्वतंत्र ग्रंथ आणि ग्रंथकार. १९३

भूल पडली, भान हरपलें, कीं भ्रम झाला ? ८७

भ्रम कसला ? विकारवशता ! १५३

मराठी मासिकांतील गोष्टी व कादंबऱ्या. २९४

मराठी मासिकें, त्यांचें स्वरूप व सुधारणेच्या दिशा. ३१३

महाराष्ट्र वाङ्मयाची अभिवृद्धि. २८९

मातोश्री. ३३

मानवी दीर्घायुष्य. ३७५

मुहूर्तमार्तंड व नारायणभट. १५९

युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमांत देशी भाषांचा समावेश. २८१

कै. रावसाहेब रानडे यांच्या कांहीं आठवणी.	१
राष्ट्रीय सभा.	४४१
राष्ट्रीय सभा आणि स्वराज्य.	४९१
वाङ्मयवृद्धीची उपाययोजना.	३३८
" व्याध."	१७९
सध्यांचीं मासिकें पुस्तकें, त्यांचें स्वरूप व सुधारणेच्या दिशा.	३९९
समाजचित्र.	११३
सर विल्यम जोन्स आणि त्यांची ह्या देशांतील कामगिरी	४३७
सूर्य-चंद्र-वंशी क्षत्रियांचा वेदांतील भाग.	२५७
हल्लींच्या तरुण पिढीच्या शरीरसंपत्तीच्या ऱ्हासाचीं कारणें व तो थांबविण्याचे उपाय.	८०,१२१

लेखकांची वर्णानुक्रमवार सूचि.

(गद्यलेखक).

श्री. सौ. कमलाबाईसाहेब किबे.
रा. रा. श्रीनिवास नारायण कर्नाटकी.
,, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एल.एल्. बी.
,, अनंत नारायण पंडित.
,, अनंत वामन बर्वे.
,, आणा बावाजी लठ्ठे, एम्. ए.
रा. ब. काशीनाथ नारायण साने, बी. ए.
रा. रा. गणेश सदाशिव भाटे, एम्. ए.
,, गणेश रघुनाथ अभ्यंकर, बी.ए., एल् एल्. बी.
,, ग. भा. गानू, बी. ए.
,, गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.
,, गंगाधर गोविंद कानेटकर, एम्. ए.
रा. ब. चिंतामण विनायक वैद्य, एम.ए., एलएल., बी.
रा. रा. दामोदर कृष्ण करंदीकर, एल्एल्. बी.
,, नारायण गोविंद चाफेकर, बी.ए., एल् एल्.बी.
,, नारायण महादेव भिडे, बी. ए.
,, नारायण हरी आपटे.
रा. रा. निळकंठ बळवंत भवाळकर, बी. ए., बी. एल्.
,, बाळकृष्ण आत्माराम गुप्ते.
सरदार रा. ब. माधवराव विनायक किबे, एम्. ए.
रा. रा. रामचंद्र भिकाजी जोशी.
,, रामचंद्र मोरेश्वर साने, बी. ए.
,, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.
,, लक्ष्मण विसाजी वैद्य.
,, वाग्भट नारायण देशपांडे, बी. ए.
प्रो. वामन गोविंद काळे, एम्. ए.
रा. रा. वामन चिंतामण तवकर, बी. ए.
,, वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.
,, वासुदेव दत्तात्रय गुळवणी.
,, विठ्ठल वामन हडप.
,, विनायक सदाशिव वाकसकर.
रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम्. ए.
रा. रा. शिवराम एकनाथ भारदे.
प्रो. हरि रामचंद्र दिवेकर, एम. ए.
रा. रा. हणमंत वा. अत्रे.

(पद्यलेखक).

सौ. लक्ष्मीतनया.
,, शान्ता.
,, शालिनी.
रा. रा. आनंदराव कृष्णाजी टेकाडे.
,, आनंदीरमण.
,, ए. पां. रेंदाळकर.
,, केशव विश्वास फणसे, बी. ए.
,, गजानन गोपाळ जोशी.
,, गणेश जनार्दन आगाशे, बी. ए.
,, गोविंद पांडुरंग देवधर, एलएल. बी.
,, गोविन्दानुज.
,, जगन्नाथ वामन हर्षे.
,, दत्तात्रय अनंत आपटे.
,, नारायण महादेव भिडे, बी. ए.
,, विष्णु बाळकृष्ण कुळकर्णी.
,, सुमंत.

१९१६ जानेवारीपासून सातवें वर्ष सुरू.

अधिक पृष्ठें. वर्षारंभ जानेवारी]

उद्यान.

अधिक पृष्ठें. [वा. व. ट. हा. रु. २

संपादक

ग. वि. कुळकर्णी.

जानेवारी १९१६ पासून उद्यानाच्या विविधतेकडे विशेष लक्ष्य पुरविण्यांत येणार असून, त्यांत आठ पृष्ठेंही अधिक वाढण्यांत येणार आहेत. प्रत्येक अंकांत एक बोधप्रद चरित्र, मनोरंजक गोष्टी, निबंध, कविता, पुस्तकपरीक्षण, विचारलहरी, चालू कादंबरी इत्यादि विषय येतील. शिवाय.

भिकारीण:— १९१६ सालच्या नव्या वर्गणीदारांना भेटी–दाखलें देण्यांत येणारी ही एका हतभागिनीची करुणकहाणी श्री. शिवराम यांनीं लिहिलेली असून तिला, श्री. सौ. यशोदाबाइ भट यांनीं सुंदर प्रस्तावना जोडली आहे.

धूर्त मनुष्याच्या भुलथापामुळें भोळ्या स्त्रियांचें कसें मातेरें होतें याचें फारच करुणरसपूर्ण चित्र प्रस्तुत कादंबरींत वाचावयास मिळेल.

राजर्षि:— वंग साहित्यसम्राट रवींद्रनाथ टागोर यांची ही अप्रतिम कादंबरी प्रसिद्ध लेखक श्री. दत्तात्रय माधवराव कुळकर्णी यांनीं मराठींत आणली असून ती उद्यानांतून येत्या जानेवारीपासून क्रमशः प्रसिद्ध होणार आहे. रवींद्रनाथांच्या कादंबऱ्यांनीं रसिकांस कसें वेड लाविलें आहे हें निराळें सांगावयास नकोच.

श्री. दिवाकर:— केसरींतील ' नाट्यछटा ' व मनोरंजनांतील ' कारकून ' ' सोरेच–ह्यः ह्यः ' वगैरे चटकदार व अगदींच नवीन धर्तीचे लेख लिहिणारे श्री. दिवाकर हे आपल्या छटा उद्यानच्या प्रत्येक अंकांत देणार आहेत. समाजांत चालणाऱ्या अनर्थावह गोष्टींचें दिग्दर्शन नाट्यछटेंत इतक्या मार्मिकतेनें केलेलें असतें कीं त्या प्रत्येक छटेचें प्रतिबिंब वाचकांच्या मनावर चिरंतन टिकतें.

हृदयनिवेदन:— सर्वमान्य जर्मन कवि गटे यानें लिहिलेल्या ' Sorrows of Werter ' या अप्रतिम पत्रसमुच्चयाचें उत्कृष्ट रूपांतर. मनाची समरसता करून प्रत्येकाच्या नेत्रांतून अश्रू गाळणारें हें सुंदर 'निवेदन' श्री. भग्नहृदय यांनीं खास उद्यानासाठीं लिहिलें आहे.

याशिवाय अनंततनय, श्रीधर, रणदिवे, गिरीश, अरविंद, टेकाडे इत्यादि प्रसिद्ध कवि आणि सहकारी कृष्ण, नाथमाधव, सौ. यशोदाबाई भट, कुमारी मानकर, बी. ए., सौ. लक्ष्मीबाई साठ्ये इत्यादि लेखक लेखिकांनीं उद्यानास शक्य तितकें सजविण्याचें अभिवचन दिलें आहे.

म्यानेजर—उद्यान, गिरगांव मुंबई.

विविधज्ञानविस्तार पुस्तकालयांत मिळणाऱ्या पुस्तकांची यादी.

विष्णु मोरेश्वर महाजनी, एम्. ए. कृत—

कुसुमांजलि, (स्फुट कविता.) ...	०	४	०
स्वतःचा प्रयत्न. ...	०	३	०

(कै.) बजाबा रामचन्द्र प्रधानकृत—

सद्गुणी ब'.	०	४	०
दान गोष्टी.	०	४	०

गणेश जर्नादन आगाशे, बी. ए. कृत—

बाल–शिक्षण.	०	३	०
सुंदरेची संक्रांत.	०	१	६

(कै.) वामन दाजी ओककृत—

थोरले माधवराव पेशवे यांचा मृत्यु (काव्य)		६	०
नानक—चरित्र	०	३	०
गणपतिनिधनविलाप (कविता) ...	०	२	०
काव्यमाधुर्य (कविता. दुसरी आवृत्ति)	०	७	०

शिवराम सीताराम वागळे, बी. ए., एल्. एल, बी, कृत—

ब्रिटिश राज्यव्यवस्था (दुसरी आवृत्ति)	०	८	०
बेकनचे निबन्ध (आ० दुसरी) ...	०	१२	०
चातुर्य आणि मनोरंजन.	०	५	०
सटवाजीराव ढमाले (फार्स) ...	०	४	०
महाराष्ट्र काव्यमकरंद.	०	५	०

(कै.) रामचंद्र भिकाजी गुंजीकरकृत—

मोचनगड (दुसरी आवृत्ति) ...	०	१२	०
महाराष्ट्र भाषेची लेखनशुद्धि ...	०	२	०
सुबोध व्याकरण	०	४	०
सरस्वतीमंडळ.	१	८	०

(कै.) गणेश भिकाजी गुंजीकर, बी. ए. कृत—

स्वपराक्रम.	०	४	०
व्हिक्टोरिया महाराणीचें चरित्र. ...	०	३	०
जुळ्या बहिणी. (एक हृदयद्रावक गोष्ट)	०	२	०
कुटुंबवत्सल.	०	२	०
दानता	०	१	६
बालविवाह.	०	१	०

डा० सर **भालचंद्र कृष्ण भाटवडेकर**कृत—

अबलासंजीवन	१	०	०
सार्वजनिक आरोग्य	०	१२	०

(कै.) आनंदराव सखाराम बर्वे, बी. ए. कृत—

हिंमतबहादर नाटक (Hamlet)	१	०	०
ठगाची जबानी	२	८	०

महादेव थ्यंकटेश लेले, बी. ए., एल्. सी. ई. कृत

मालतीमाधवसार व विचार. ...	०	१०	०
श्रीमहावीरचरितसार व विचार ...	०	१०	०
उत्तमरामचरितसार व विचार ...	०	१०	०
मुद्राराक्षससार व विचार.	०	१०	०
मालविकाग्निमित्रसार व विचार ...	०	८	०
विक्रमोर्वशीयसार व विचार ...	०	६	०
शाकुंतलसार व विचार	०	१२	०
वेणीसंहारसार व विचार	०	१२	०
शिवछत्रपतीचें चरित्र (चिटणीसकृत)	१	०	०
गृहिणीकंठभूषण (डा० सखाराम-कृत)	०	१२	०
अकबरकाव्य (गो० बा० कानिटकरकृत)	०	८	०
धोमम‌हाबळेश्वरवर्णन (उदासकृत)	०	८	०
मोहना नाटक. (Lady Loyns)	०	०	८
भ्रांतिकृत चमत्कार (Comedy of Errors)	०	६	०
तीन गोष्टी. (बेलसरेकृत)	०	४	०
गीतार्थसार (कै० वा. आ. मोडककृत)	०	४	०
अभिनवकादंबरी (कविता मोगरेकृत)	०	४	०
मोगऱ्याचीं फुलें (कविता) गुच्छ १	०	६	०
” ” गुच्छ २	०	६	०
करण वाघेला (सबंध १६ भाग)...	२	०	०
चार चरित्रात्मक लेख	०	६	०
अबूचा पहाड	०	२	०
कै. गो. कृ. गोखले यांचें चरित्र ...	०	६	०
ब्रिटिश लोकांचा जिवनक्रम व चारित्र्य	१	८	०
वैद्य यांचे निबंध आणि भाषणें ...	०	८	०

या पुस्तकांच्या संबंधानें पत्रव्यवहार करणें तो मुंबईत, फणसवाडींत, अग्निहोत्र्याच्या वाड्यासमोर " म्यानेजर विविधज्ञानविस्तार " या पत्त्यावर करावा. अगर ठाकुरद्वार पोस्टाजवळ श्री लक्ष्मीनारायण छापखान्यांत म्यानेजर यांस भेटावें.

ॐ नमः श्रीगणेशाय.

आर्यवनौषधालय मुर्डी.

मदनामृतसंजीवनी

अत्यंत पौष्टिक, मनोल्लाहक, कान्तिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक-

कस्तुरिप्रवालादि अनेक वनस्पतिमिश्र अद्भुत गुटिका.

शारिरिक सौख्याचा खरा लाभ करून घेणें असेल तर, या गुटिकांसारखें अन्य औषध नाहीं. यांच्या सेवनानें कडकी, जीर्णज्वर, अशक्तता, मानसिकदुर्बलता, अनेक वातरोग, उदररोग, वाळंतरोग व मूळव्याध, नेत्रविकार, कटिशूल, इ. इ. अनेक विकार या गुटिकांपासून त्वरित बरे होतात. कांति व बुद्धि वाढून अंगांत भरपूर शक्ति येते. शरिरांतील रक्त व धातूची वृद्धि होऊन सर्व प्रकारें संसारसुखाचा खरा लाभ होतो. वरील सर्व विकार जाऊन शरीर जोमदार होण्याला या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं. गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांचे वर घेणारास सर्व पोष्ट खर्च माफ. त्याचे आंत घेणारास निराळा पोष्ट खर्च पडेल.

दर—३५ गोळ्यांस १ रु. ७५ गो. २ रु., १६५ गो. ४ रु., २७५ गो. ६ रु., ५५० गो. १० रु.

अपूर्व नेत्रांजन.

यानें सारा, फुलें, वडस, खुपऱ्या, कांचबिंदु, इ. इ. नेत्रसंबंध सर्व विकार फार त्वरित जाऊन दृष्टि तीव्र होते. डबीस १ रुपया.

उष्णवात.

मलबद्धता, ढेंकरा येणें, पोटांत केव्हां आग अथवा थंडी होणें, चमका मारणें, कधीं छातींत धडधडणें अपचन, पोट फुगणें, कधीं अन्न थोडें व कधीं जास्त खपणें, केव्हां ग्लानि व केव्हां थोडी हुषारी वाटणें लघवी कडत अथवा पिंवळी अगर तांबडी असणें, अगर कधीं थोडी व कधीं जास्त होणें, मधून मधून मस्तक तापणें-दुखणें, तसेंच कधीं निद्रा साफ न येणें तर कधीं जास्त असणें, क्वचित भोंवळ उद्भवणें, डोळे त्रासून तापणें व कधीं जड होणें, कधीं हात व पाय यांस तप्तता किंवा सर्दी होणें, हें सर्व किंवा यांतील कांहीं विकार उष्णवातानें उद्भवतात. ते आमच्या गोळ्या व तेल यांनीं अगदीं जलद बरे होतात. ४० गोळ्यांचे डबीस २ रु., व तेलाची बाटली १ रु. एकूण किं. ३ रु.

औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. यांशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसवें, तेलें आणि सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनुपानकर्दो सोबत. टपाल खर्च वेगळा पडेल. माल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य,

पत्ता—मु० मुर्डी, पोष्ट दाभोळ, जि० रत्नागिरी.

आर्यमहौषधालय मु० पो० आजर्ले.

कोंकणप्रांतांतील अगदी ताज्या व शुद्ध वनस्पतींची जगत्प्रसिद्धरामबाण औषधें.

पूर्ण रक्तशोधक, अत्यंत पौष्टिक, चित्तोत्साहक, बुद्धिकांतिवर्धक, सुवर्णमाक्षिक -मौक्तिक-कस्तुरी, प्रवालादिमिश्रित अपूर्व गुटिका.

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग. संधिवातादि अनेक वातरोग, कावकी, नेत्रविकार, कटिशूल, इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग तावडतोब दुरुस्त होऊन चित्तोत्साहबुद्धि आणि कीर्ति वाढते, अंगात परिपूर्ण शक्ति येते; शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्मान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिज्ञेचें औषध होय. यामुळें याचे लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून अधिक घेणारास टपालखर्च माफ. त्यांच्या आंत घेणारास ट.ख. वेगळा ४ आणेप डेल. ३२ गो० १ रु०; ७० गो०२ रु०; १६० गो० ४ रु०; २६० गो० ६ रु० आणि ५२० गो. १० रुपये.

थंडगार नेत्रांजन—यानें वडस, धारा, फुलें, खुपऱ्या, बिंदुकाच वगैरे डोळ्यांचे एकंदर विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. डबीस १॥ रुपया.

कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल—यानें कानांचे सर्व प्रकारचे व्रण आणि तत्संबंधीं इतर विकार त्वरित बरे होतात. बाटलीस १ रुपया.

दंतरक्षक पूड—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काळ दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. डबी ६ आ.

गजकर्ण, खरूज, नायटे इ. विकार ३ दिवसांत बरे होतात ड. ६ आ.

विंचवाचें विष—हें औषध चोळतांच उतरतें. तें ४० मनुष्यांस पुरतें. ड. ८ आणे

हिमज्वरावर वस्ताद औषध—पाळीनें इंडी ताप तीन दिवसांतच बरें करितें. डबीस १ रु.

पटकी व इतर जुलाब-दोन तीन गोळ्यांनीं अगदीं जलद बरें होतात. ड. १ रु.

सुरंगी, मालती, कल्हार, राजविलास, लक्ष्मीविलास, पुष्पराज इ० बादशाही अति उंची उत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरें सुगंधी अत्तरें आणि केशांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें पूर्ण खात्रीची माफक दरानें मिळतील.

सूचनाः-वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्याचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला म्हणून त्याचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. ढोंगी लोकांच्या बनावट औषधाविषयीं ग्राहकांनीं फार सावध असावें. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं, प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री विवलकर, वैद्य.

मु० पो० आंजर्ले, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका.

वर्ष २.] [अंक १.

साहित्यपत्रिकेचें पहिलें वर्ष.

साहित्य परिषदेनें सुरू केलेल्या साहित्य-पत्रिकेचे प्रास्ताविक अंक धरून आतांपर्यंत सतरा अंक प्रसिद्ध झाले. पत्रिकेच्या धोरणाचें स्वरूप प्रास्ताविक अंकांत वर्णिलें आहेच. तें लक्षांत ठेवूनच आतांपर्यंतची कामगिरी तिच्या चालकांनीं बजाविली हें स्पष्ट लिहितांना मला आनंद वाटतो. कारण येथें आत्मस्तुतीस फारसा वाव नाहीं. माझे लेख इतर लेखांच्या मानानें फार थोडे आहेत, व मोलानेंही ते उणे आहेत.

२. लेखकांची यादी वाचीत असतां कै. रा.रा. विनायक कोंडदेव ओक यांचें नांव वाचतांच ऊर भरून येतें. साध्या मराठी गद्याचा नाथ असें उपपद त्यांस जोडिल्यास साजेल. बहुतेक अव्वल इंग्रजी झाली तेव्हांच आंग्ल सुबोध ग्रंथांतील मध्यम स्थितींतल्या लोकांच्या अभिमत विचारांची व कल्पनांची सरणी, प्रसिद्ध ऐतिहासिक पुरुषांचीं चरित्रें, प्रेक्षणीय स्थलें, शास्त्रांतील नवीन शोध, इत्यादि विषयांची माहिती मराठी वाचकांस करून देण्याचा त्यानीं विडा उचलिला. एखादा कर्मठ ब्राह्मण स्नान संध्यादि नित्य कर्में केल्यावांचून दिवस विसंबत नाहीं तद्वत् विनायकराव मराठींत कांहीं ना कांहीं लेख—कविता—लिहिल्यावांचून दिवस जाऊं देत नसावे असें माझें अनुमान, त्यांनीं वेळोवेळीं पुस्तकें, मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांत लेख अव्याहत प्रसिद्ध केले त्यावरून होतें. रा. ना. कृ. वैद्यांनीं 'बालसारस्वत' या लेखांत कै. ओकांची तशीच कै. ह. कृ. दामले यांची स्तुति केली आहे ती मला संमत आहे. ओकांसारखा जबरदस्त लेखक महाराष्ट्रांतून नाहींसा झाला ह्मणून कोणाला खेद वाटणार नाहीं ! तेजाच्या प्रचंड झोतानें दिपविणारें एखादें शेंडे नक्षत्र दोन चार दिवस नेत्रांना दिसतें, पण शीतल सौम्य प्रकाशानें सतत रिझविणारा चंद्र आकाशांत एकच खुलतो ! असे चंद्रमे विनायकरावांच्या मागून सारस्वतक्षितिजावर कधीं दिसूं लागतील ?

३. गेल्या वर्षांत पत्रिकेंत त्यांच्या हातचे दोन लेख आले आहेत: १ सरकारी कोशांची आवृत्ति, २ सुबोध व्याकरणाची आवश्यकता. दोन्ही विषय त्यांचे आवडते होते, व वेळीं अवेळीं त्यांचा ते उच्चार करीत. पण सरकाराच्या तोंडाकडे बघून हें कार्य होणार नाहीं, ही खूणगांठ आपण बांधिली पाहिजे. हिंदी-प्रचारिणी सभेनें हिंदी कोश रचण्याचें काम हातीं घेऊन त्याचे सुंदर पांच भाग प्रसिद्धही केले ! आपल्या महाराष्ट्रांत रा. रा. रानडे यांनीं स्वतःच्या हिमतीवर English-Marathi Dic-

tionary of the Nineteenth Century हा कोश काढिला, व त्याची वाखाणणी Dr. Grierson सारख्या अनेकभाषाकोविदानें-विशेषतः हिंदीच्या पंडितानें केली; अठराव्या शतकांत Dr. Johnson यांनीं गरीबीचे हाल सोशीत असतांही, सरकारच्या आश्रयाची वाट न पाहतां, एका लब्धप्रतिष्ठ अहंमन्य सरदाराच्या चाटूक्तींस भीक न घालितां, आपल्या स्वतःच्या परिश्रमावर विश्वास ठेवून इंग्लिश भाषेचा पहिला कोश रचिला; या गोष्टी लक्षांत ठेवून आपण स्वतः हें काम हातीं घेतलें पाहिजे. साहित्य-संमेलनाचा सुप्रसंग या कामास उचित नाहीं असें कोण ह्मणेल ? दामल्यांच्या शास्त्रीय व्याकरणाकडे विद्वानांचें व सामान्यजनांचें जावें तितकें लक्ष गेलें नाहीं, अशी शंका येते. न जाणों त्याचा अवजडपणाच त्याच्या विस्तृत प्रसारास बाधक होत असेल ! पण कै. दामल्यांनीं कितीतरी परिश्रम केले ! येत्या साहित्य-संमेलनांत त्या पुण्य मूर्तीचें दर्शन आह्मांस होणार नाहीं हें आमचें दुर्भाग्य ! अपघातानें त्यांचा अंत व्हावा हें जास्तच शोकावह !

४. कै. बळवंतराव कमळाकर हे ग्वाल्हेरकडे होते. ते चिकित्सक होते. त्यांचे कांहीं लेख वऱ्हाडांतील ज्ञानसंग्रहांत आले होते. साहित्य-पत्रिकेंतील 'चित्रकाव्य' हा त्यांचा लेख वाचकीय आहे. विठ्ठल कवीच्या चित्रकाव्याची त्यांस माहिती नव्हती असें वाटतें. वामन, रामजोशी, मोरोपंत यांच्या काव्यांत चित्रकवितेचीं पुष्कळ उदाहरणें सांपडतील. कै. भास्कर दामोदर पाळंदे यांनीं देखील आपल्या पद्यमालेच्या (भक्तिसुधेच्या ?) प्रथमावृत्तींत एक छत्रबंध घातला होता ! चित्रकवितेचा नवा अवतार मुळामुठेच्या कांठीं पुण्यनगरींत, व कृष्णातीरीं सांगलींत झाला आहे, तर अनलंकृत वाणीचा अवतार समुद्रतीरीं चौहाटावर होऊं पाहत आहे.

५. साहित्यपत्रिकेचे गेल्या वर्षाचे अंक चाळितां दिसून येईल कीं एकंदर लेखांचा विषय साहित्यचर्चा होता. या लेखांत प्रथम स्थान कोणाला द्यावें हें सांगणें कठीण. पण डा. व प्रो. गुणे यांचा "मराठी कवितेच्या पूर्वीच्या व हल्लींच्या स्थितीविषयीं तुलनात्मक प्रासंगिक विचार," हा लेख वाचनीय व मननीय आहे यांत संशय नाहीं. बंगाल्यांत लेखी (?) भाषा व बोलती भाषा यांत अत्यंत फरक झाला आहे; उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांची लेखी भाषा फारशी व आरबी यांनीं गच्च भरलेली; हिंदूंची लेखी भाषा संस्कृत शब्दांनीं मढविलेली; व दोघांचीही व्यवहारभाषा प्रायः नांवाप्रमाणें उर्दू ! असा प्रकार झाला आहे. प्रो. गुणे यांनीं आपलें अस्त्र आधुनिक कवींवरच सोडिलें आहे, पण तें अस्त्र बऱ्याच वर्तमानपत्रांच्या संपादकांवर जाऊन पडण्याचा संभव आहे; निदान तशी तयारी त्यांनीं अगोदरच करून ठेविली आहे. प्रो. गुण्यांची इशारत ते घेतील काय ?

६. "महाराष्ट्रकवितेचें आधुनिक स्वरूप" हे चार लेख प्रो. गुण्यांच्या लेखांबरोबरच वाचावे. यांत बऱ्याच ग्राह्य सूचना आहेत.

७. रा. वासुदेवराव आपटे यांनीं कलकत्त्याच्या साहित्यसंमेलनांतील निरनिराळ्या शाखांच्या अध्यक्षांच्या भाषणांचें सार दिलें आहे. रा. रा. दत्तात्रय माधवराव कुळकर्णी यांनीं काशी येथील नागरीप्रचारिणी सभेची कामगिरी वर्णिली आहे. दुसऱ्या गुजराथी साहित्य परि-

षदेंत वाचलेल्या कांहीं निबंधांचें सार संपादकांनीं दिलें आहे, त्यावरून इतर प्रांतांत देशीभाषांची वृद्धि व संस्कृति करण्याकरितां काय काय खटपट होत आहे हें कळून येईल. द्राविड परिषदांची हकीकत कोठेंही आली नाहीं! चालू सालांत कोणी ती देईल काय? तशीच ऊर्दू संमेलनाचीही हकीगत आली पाहिजे.

८. रा. ना.कृ. वैद्यांचा लेख—'बालसारस्वत'- यांतील बऱ्याच सूचना विचार करण्यासारख्या आहेत.ज्योतिःशास्त्र परिभाषेचा कोश एकावर्षांत पुरा झाला. हें काम बरें झालें. गागाभट्ट, योगवासिष्ठ, दयाळनाथ, रामजोशी यांच्या संबंधाची ऐतिहासिक किंवा दंतकथेची माहिती टीकारूप कसास लावण्यास सुरुवात झाली. कांहीं शब्दांच्या व्युत्पत्तीसंबंधानें दोन हात झाले,त्यावरून निष्कर्ष पुष्कळांस पटला असेल कीं, मराठींतले शब्द केवळ गीर्वाण भाषेंतून आले नाहींत; तर फारशी, अरबी, कानडी, यांतूनही आले आहेत, व या परभाषांचें अध्ययन तिच्या विशिष्ट अध्ययनास हितावहच होईल.

९. रा.रा. रामभाऊ जोशांच्या लेखांत देशभाषांचा उच्च अभ्यासक्रमांत समावेश करूं ह्मटलें असतां कोणत्या व्यावहारिक अडचणी उत्पन्न होतील, व त्या कशा वालवितां येतील याचा विचार केला आहे. या विषयासंबंधानें या वर्षी कांहीं चर्चा झाली नाहीं.उलट म्याट्रिकमध्यें देशभाषेंत परीक्षा यूनिव्हर्सिटीमार्फत होते असे, ती आतां बंद केली, आणि देशभाषांचें अवश्य ज्ञान उमेदवारांनीं करून घेतलें आहे अशा अर्थाची हमी हेडमास्तरांनीं घेतली ह्मणजे युनिव्हर्सिटीनें खोल पाण्यांत न जाण्याचा निश्चय केला आहे. पण इंग्लिश भाषेच्या ज्ञानासंबंधें ठराव निराळाच. येथें हमी पुरत नाहीं; स्वतंत्र परीक्षाही पुरत नाहीं. त्या परीक्षेंत खंडशः पास झालें पाहिजे. याहूनही खडतर उपायांची योजना करण्याच्या सूचना होत आहेत. पण उपाय सकृद्दर्शनींच अपायरूप—रोगापेक्षांही दुर्धर भासतात! पोक्त विचार करण्याची अवश्यकताच दृढ भासूं लागली नाहीं! युनिव्हर्सिटीच्या विद्यमान फेलोजमध्यें एखादा रानडे, एखादा मोडक असूं नयें का?

१०. साहित्यपत्रिकेचा बराच भाग पाठविलेल्या पुस्तकांवरील अभिप्रायांनीं घेतला आहे. पुढील ग्रंथांवर अभिप्राय देण्यांत आले:—१ महामाया, २ विद्यासाधन, ३ छंदोमंजरी, ४ शब्दशूर,५ इलियडचें कविताबद्ध भाषांतर, ६ महाराष्ट्राचा ऐतिहासिक भूगोल, ७ श्रीशंकराचार्यचरित्रसारामृत.

ऐतिहासिक भूगोलांतील माहिती बरीच चुकली आहे.इतर पुस्तकांवरील अभिप्राय चांगले आहेत. समग्र इलियडचें भाषांतर सुबोध मराठींत बहुतेक बिनचुक उतरणें ही कामगिरी लहान नाहीं.

११. यांशिवाय कांहीं स्फुट कविता आहेत. त्या अगदीं टाकाऊ नाहींत! साहित्यपरिषदेनें, सरकारानें आपल्या कचेऱ्यांतून वगैरे मोडीचें उच्चाटन केलें हें बरोबर नाहीं, मोडीची पुनः संस्थापना करण्यांत यावी, अशा अर्थाचा ठराव मागील साहित्यसंमेलनप्रसंगीं जाहीर सभेंत सर्वांनुमतें पास केला होता. त्यास अनुसरून साहित्यपरिषदेनें मुद्देसूद अर्ज सरकारास केला. पण त्याचा जबाब जसा येईल असें वाटलें होतें तसाच आला. सरकारी अधिकाऱ्यांचें विद्यमान मंडल पूर्ण ज्ञानी असतें, पुरी चौकशी केल्यावांचून तें कधीं ठराव करीत नाहीं, त्यांच्या हातून कधीं चूक होत नाहीं, हे अबाधित सिद्धांत खोडून टाकण्याची प्राज्ञा कोणाला?- विशेषतः सोवळ्या मंडळाबाहेरच्या कोणास आहे?—फळाची अपेक्षा न करितां काम कर-

ण्याचें श्रेय बिनसरकारी इसमांच्या पदरीं अनायासें पडत आहे.

१२. येथपर्यंत पत्रिकेनें चाकरी काय बजाविली हें सांगितलें. मनाप्रमाणें झाली नाहीं, करितां आली नाहीं—हें खरें खरें सांगून मोकळें व्हावें हें बरें! आतां वाचक संपादकास ह्मणतील,—"कामांत चुकूर, मागतो मुशारा, लाज फजितखोरा, कांहीं नाहीं!" मान खालीं घालून निमूटपणें ऐकून घेण्याची पाळी आली खरी ! पण !-पण !—धनी पाठीवर मारितो, पोटावर मारित नाहीं ! पण येथें तर अक्षयीं एकादशी व त्यांत महाशिवरात्र पाहुणी येऊन होतें नव्हतें तें घेऊन गेली ! दिवस कंठावे तरी कसे !

१३. ज्या ज्या गृहस्थांनीं साहित्यपत्रिकेकरितां लेख लिहून पाठविले, त्या सर्वांचे आभार माझ्या मुखें--नव्हे टांकाच्या मुखें-साहित्य परिषद् मानिते. हे लेख बिनमोल होते—दोन्ही चांगल्या अर्थीं ! लाभावर दृष्टि न ठेवतां आपल्या आईचें संगोपन-आपल्या प्रिय जन्मभूमीचा उद्धार—आपल्या देशबांधवांशीं प्रेमालाप—करितां येणें हें काय थोडें? आपल्या परदेशबांधवांबरोबर खऱ्या धर्माची जागृति करणें, नीतीची द्वाही फिरविणें, सात्विक प्रेम, समदृष्टि, न्यायबुद्धि यांचें संकुचित क्षेत्र वाढविणें, ईश्वरावरील प्रेमळ भक्तीस खाजें देणें, तात्पर्य, परार्थ—साधन हा स्वार्थसाधनाचाच दुसरा पण श्रेयान् प्रकार समजणें, या उच्च भावनांस थारा लेखनांतही मिळतो. तेव्हां जी पत्रिका द्रव्यलाभ न देतां एवढा थोर, उच्चतर लाभ करून घेण्याची संधी प्रत्येक मायीच्या सुपुत्रास देते, तिचें दीर्घायु कोण सपुत्र चिंतणार नाहीं ?—तिच्या पथ्यपाण्याची कोण सोय लावणार नाहीं ?-कोण तिजकारितां झीज सोसणार नाहीं ? अशा सुपुत्रांची संख्या दिवसानुदिवस वाढत जाणार, ह्मणून त्यांच्या सोयीकारितां कोणालाही आपला लेख स्वीकारिला नाहीं ह्मणून हिरमुसलें तोंड करून परत जाण्याची पाळी येऊं नये या कारितां, परिषदेच्या चालकांनीं पत्रिकेंत यंदापासून चार पृष्ठांची भर घालण्याचा ठराव केला आहे. आकार वाढविला, त्या मानानें तिचें ठाणमान, सौंदर्यही वाढविलें पाहिजे. ही वाढलेली आपली जबाबदारी लेखकांनीं पूर्ण ओळखावी, अशी त्यांस सविनय प्रार्थना आहे. दुसऱ्या वर्षाची पत्रिका पहिलीपेक्षां सर्वांगसुंदर निघावी, अशी सर्वांनी हाव धरून ती पुरविण्याकरितां तसेच परिश्रम केले पाहिजेत. परिश्रमावांचून कोणत्याही चिजेला मोल येत नाहीं. इतक्या लेखकांशीं लेखद्वारें ओळख झाली हा मला स्वतःला केवढा तरी लाभ झाला! बहुतेकांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ येत्या साहित्यसंमेलनप्रसंगीं होईल, अशी हुरूप धरितों.

तात्पर्य, पत्रिका पाहिजे असल्यास तिच्या पोटापाण्याची व्यवस्था उत्तम ठेविली पाहिजे. हा साहित्यसंमेलनापुढें येणारा पहिला प्रश्न. तो ज्या मानानें सुटेल, त्या मानानें साहित्यपरिषदेची कामगिरी उरकेल, व त्याच मानानें पत्रिका लोकांच्या आदरास पात्र होईल. स्वार्थत्याग करावा हें खरें, पण उपदेश करणारांनीं आपल्या आचरणांत त्याचा धडा घातला पाहिजे. प्रसंग जवळ आला आहे, तेव्हां ह्मणतां येईल—हा सूर्य,- जयद्रथ !—कोण हार खातो पाहूं या.

१३. हें नवें वर्ष साहित्य परिषदेस, तिच्या चालकांस व तिची पाठ राखणाऱ्यांस ईश्वराच्या दयेनें सुखावह होवो एवढी प्रार्थना करून वाचकांची रजा घेतों.

अकोलें,
२१-१—१५

वि. मो. महाजनि.

[लि. आ. वि.]

"महाराष्ट्र कवितेचें आधुनिक स्वरूप."

[लेखांक ५.]

सदरहू लेखांत बंगाली कविता उच्च दर्जाची निपजण्यास वंग कवींनीं कोणतें धोरण स्वीकारिलें आहे ह्याचा थोडासा परिचय करून देण्याचा आरंभीं हेतु होता. पण मराठी वाचकांना बंगाली कवितेचें स्वारस्य व माधुर्य पुरतेपणीं समजावून देण्यास ' पत्रिके ' चे बरेच अंक खर्ची घालावे लागतील; व तसें करणें स्थलाभावामुळें थोडेंसें गैरसोईचें आहे. असो; मागील लेखांत काव्याचा प्रतिपाद्य विषय कोणता असावा ह्यासंबंधानें संक्षिप्त विचार येऊन गेलेच आहेत. ह्याचें विस्तृत विवरण करण्यापूर्वी, लेखांक दोनमध्यें अभिवचन दिल्याप्रमाणें, काव्याच्या खऱ्या प्रकारांपैकीं कोणते प्रकार प्राचीन व अर्वाचीन काव्यांत दिसून येतात हें पाहूं. कदाचित् ह्या विवेचनाचे ओघांत कित्येकांच्या आवडत्या कवींवर थोडासा दोषारोप येण्याचा संभव आहे, तर कांहींच्या टीकेस पात्र झालेल्या कवींना चांगुलपणाचा मानही मिळणें असंभवनीय नाहीं. कसेंही असो; महाराष्ट्र कवितेचा आस्थापूर्वक अभ्यास करीत असतांना प्रत्येक ठळक मराठी कवींसंबधानें व एकंदरींत महाराष्ट्र कवितेसंबंधानें माझें जें अनुकूल प्रतिकूल मत झालें, तें थोडक्यांत सांगण्याचा इरादा आहे.

मराठी भाषेच्या आद्य कवीचा ज्यास मान आहे त्या मुकुंदराजापासून तों रामजोशी, अनंतफंदी वगैरे रसिकमान्य कवित्रयींपर्यंत मराठी कवितेचा इतिहास पाहणाऱ्यास महाराष्ट्रकाव्यवधूची निरनिराळी उत्क्रांतिपूर्ण शोभा दिसून येईल. त्याचप्रमाणें सूक्ष्मदृष्टि वाचकांस आपण कवितेच्या निरनिराळ्या अवस्थांचा अनुभव घेत आहों कीं काय, असेंही वाटूं लागेल. वाङ्मयाचा यथाशास्त्र अभ्यास करणाऱ्यास भाषा व विचार ह्यांचें उत्क्रमण कसकसें होत गेलें, ह्या दृष्टीनें काव्यग्रंथांचें अध्ययन किती मनोरंजक आहे हें समजून आलेंच असेल. परंतु सहजासहजीं भाषेच्या निरनिराळ्या सौंदर्याचा परिचय करून घेणाऱ्या सामान्य वाचकांस सुद्धां कवितेचें वाचन उपयुक्त आहे ह्यांत शंका नाहीं. उत्कृष्ट व तीक्ष्ण बुद्धिमत्ता, सूक्ष्म व व्यापक विद्वत्ता, गुणदोषस्थलें अचूक हुडकून काढतां येण्याजोगी अत्यंत रसिकता असणाऱ्या वाचकांचा वर्ग सोडून दिला, तरी कोणत्याही कवीच्या अभिप्रेत अर्थाशीं स्थूलरीतीनें तादात्म्य होण्याइतका प्रयत्न सामान्य वाचकांसुद्धां फारसा जड जाणार नाहीं. व अशा रीतीनें त्यांच्यामध्यें स्वाभाविक काव्यगति उत्पन्न होऊन कवितेकडे पाहण्याची वास्तविक दृष्टि त्यांना लाभल्यासारखें होईल. हा इतका अनावश्यक वाटणारा मुद्दा जोरानें वाचकवर्गापुढे मांडण्याचें कारण, एकाद्या अस्सल प्रतिभावान् कवीच्या प्रासादिक मुखांतून खळाळीसरशीं निघालेल्या श्रेष्ठ कवितेच्या अजबखान्यांत काय काय चमत्कृतिजनक चिजा भरलेल्या आहेत त्यांचें ठोकळ तरी ज्ञान त्यांना व्हावें. बाकी सत्कृतीच्या अंतरंगांत पुरतेपणीं

प्रवेश होण्यास तुकाराम महाराजांनीं ह्मटल्या-प्रमाणें ॥ तेथें पाहिजे जातीचे ॥ येर गबाळाचें काम नाहीं ॥ असाच मनुष्य पाहिजे. तरी पण एवढ्यावरून सर्वसामान्य वाचकांनीं कोणत्याही प्रकारें निराश होण्याचें कारण नाहीं. ॥ आकाश-अंत न कळोनिहि अंतरीक्षीं ॥ आकाश आक्र-मिति शक्त्यनुसार पक्षी ॥ या दृष्टांत–न्यायानें यथाशक्ति काव्यसागरांत तळापर्यंत जरी नाहीं, तरी जाववेल तितकी आंत बुडी मारल्यास तेवढ्यानें सुद्धां काव्यानंदाची सात्विक उपलब्धि होऊन, वाचकांच्या चेहऱ्यावर एकप्रकारचें प्रसन्नतेचें तेज झळकूं लागेल ह्यांत शंका नाहीं.

असो; आतां मराठी भाषेच्या आद्य कवीपासून तों आधुनिक सयमकवादी, निर्यमकवादी, गान-काव्यवादी व नाविन्यवादी कविवर्यांपर्यंत ठळक कवींच्या कवितेचा थोडक्यांत समाचार घेऊं. मुकुंदराज हे कवि मराठी वाङ्मयाचा सशास्त्र अभ्यास करणाऱ्या जिज्ञासु वाचक-वर्गास जरी अत्यंत प्रिय असले, तरी आधुनिक काव्यव्याख्येप्रमाणें त्यांच्या पद्यबद्ध रचनेस काव्य ह्मणावें कीं नाहीं, ह्याचीच शंका वाटते. अगोदर विषय अध्यात्माचा, ह्मणजे सामान्य जनास तो सहजासहजीं आकलन होण्यास कठीण व रुक्ष. विषयप्रतिपादनाची शैली वाचकांची मनोवृत्ति गुंग होऊन जाईल अशी चटकदार आहे ह्मणावें, तर तसेंही कोठें दिसून येत नाहीं. हा दोष ह्मणजे सर्वस्वी कवीचा आहे असें ह्मणतां येणार नाहीं. कारण, तत्का-लीन कार्यकर्तृत्वाप्रमाणें व त्यावेळच्या समा-जाच्या मनोरचनेनुरूप जें काम करावयाचें होतें तें मुकुंदरायांनीं केलें. आधुनिक कवींना किंवा वाङ्मयाची तपश्चर्या करणाऱ्या जिज्ञासु वाचकवर्गास मुकुंदराजांच्या काव्यांत काय पहा-वयाचें असेल, तर तें महाराष्ट्र भाषेचें शैशव. सदर कवि हे जुन्या काळांतील असल्यानें या-पेक्षां त्यांच्या कवितेंतून दुसरा गुण मिळण्याची वाचकवर्गानें अपेक्षा करूं नये. कारण ‘ घट-पटादि खटपट ’ हाच गुण त्यांच्या काव्यांतून कोणा सुपीक मेंदूनें काढल्यास तो सरसहा आधुनिक वाचकवर्गास अनुकरणीय वाटेल किंवा सह्य होईल असें वाटत नाहीं. मुकुंदरायांचे ‘विवेकसिंधु’ व ‘ परमामृत’ असे दोन ग्रंथ वेदांती लोकांमध्यें व प्रबुद्ध भाविकांमध्यें विशेष प्रसिद्ध आहेत. जिज्ञासु वाचकांनीं सवडीप्रमाणें हे दोन ग्रंथ वाचून टाकावे. आतां सामाजिक किंवा राष्ट्रीय दृष्टीनें मुकुंदरायांचा रामदास व ब्रह्मेंद्रस्वामी यांसारखा फारसा जरी उपयोग झाला नाहीं असें वाटतें, तरी जैत्रपाळ राजास त्यांनीं ज्ञानोपदेश केला, ही एक त्यावेळच्या दृष्टीनें महत्त्वाची कामगिरी त्यांनीं केली असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां हे आद्यकवि व त्यांची शैशवावस्थेंतली कविता सोडून देऊन विचार करूं लागलों, तर महाराष्ट्रभाषेच्या नयनरुचिर-बाल्यदशेंत वाढलेली अशी अव्याजमनोहर ज्ञाने-श्वरांची रसाळ, प्रेमळ व निर्मळ कविता स्वच्छंद विहार करीत असलेली दृष्टीस पडते. आज ज्या ज्या ठिकाणीं मराठी भाषेचा प्रसार आहे, जेथें जेथें मराठी भाषेला विशेष प्राधान्य आहे, त्या त्या ठिकाणीं ज्ञानेश्वरांची ‘ज्ञानेश्वरी’ नाहीं किंवा त्या ग्रंथाला महत्त्व नाहीं असें सहसा व्हावयाचेंच नाहीं. वाङ्मयदृष्टीनें व राष्ट्रीय दृष्टीनें सुद्धां ज्ञानेश्वरांचें–त्यांच्या ज्ञानेश्वरीचें–

कार्य अत्यंत नांवाजण्याजोगें झालें असें मोठ्या आनंदानें कबूल करणें भाग पडतें. तुकाराम महाराजांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें--

॥ ज्ञानदेवें घातिला पाया । उभारिलें देवालया ॥

महाराष्ट्र भागवत धर्माचा सुयशस्वी व चिरकाल पाया रचण्याचें अत्यंत जोखमीचें, अवघड, आवश्यक व पवित्र कार्य ज्ञानेश्वरानीं केलें. हें अत्यंत महत्त्वाचें राष्ट्रीय कार्य सोडून दिलें, तरी वाङ्मयदृष्ट्या जी बहुमोल कामगिरी ज्ञानदेवानीं केली, ती तर अप्रतिम होय. ज्ञानेश्वरांच्या वेळीं जरी हल्लींसारखा कादंबऱ्यांचा सुकाळ नव्हता, तरी उत्कृष्ट विषयप्रतिपादनशैलीमुळें त्यांची ज्ञानेश्वरी उत्तम कादंबरीप्रमाणें मनोरम व चित्तवेधक झाली आहे. आधुनिक ज्ञानलवदुर्विदग्ध नूतन लेखक किंवा कवि यांच्याप्रमाणें त्यांच्या ग्रंथांत स्वभाषेचा उसना अभिमान नसून, ज्या ज्या ठिकाणीं आपल्या भाषेसंबंधानें त्यांना प्रसंगिक विवेचन करावें लागलें, त्या त्या ठिकाणीं एखाद्या प्रेमी मनुष्याचें आपल्या प्रेमविषयाशीं जसें तादात्म्य अथवा तन्मयत्व होतें, तसेंच त्यांचें सर्व प्रेम एकवटून स्वाभिमानानें ते महाराष्ट्र भाषेशीं समरस झालेले दिसून येतात. कर्णकटु व गहन वेदांताला अत्यंत सुबोध स्वरूप जर कोणीं आरंभीं दिलें असेल, तर तें ज्ञानेश्वरांनींच होय. जुन्या काळांतील महाराष्ट्र वाचकानें अभिमान बाळगण्याजोगा जर कोणता सरस ग्रंथ असेल तर तो 'ज्ञानेश्वरी'च होय. खऱ्या अंतःस्फूर्तीनें हा ग्रंथ ज्ञानेश्वरांच्या लेखणींतून उतरला असल्यानें कोणत्याही ठिकाणीं कृत्रिमतेला थारा मिळालेला दिसून येत नाहीं. अंधानुकरणीं, व नवें तेवढेंच चांगलें असा दुरभिमान उराशीं बाळगणाऱ्या, वाचकांना सुद्धां ज्ञानेश्वरीच्या वाचनानें आनंद व त्यापासून महाराष्ट्र कवितेचें अध्ययन करण्यास उत्साह वाटेल यांत शंका नाहीं. वाचकांची जी जी इच्छा असेल ती सफल होण्याचें सामर्थ्य अद्भुतरम्य, प्रतिभावान् व अत्यंत प्रासादिक ज्ञानेश्वरींत आहे, एवढें सांगण्यापलीकडे आमच्या कृत्रिम लेखणीनें ज्ञानेश्वरींची यथार्थ गुणमीमांसा जास्त ती काय होणार? व्यवसायबाहुल्यामुळें ज्यांना ग्रंथावलोकनास मुबलक वेळ मिळत नाहीं, अशांनीं सुद्धां सवडींत सवड व वेळांत वेळ काढून ज्ञानेश्वरीचा एकादा अध्याय तरी निवळ अंध भाविक बुद्धीनें न वाचतां थोड्याशा चिकित्सक बुद्धीनें पाहण्याचें श्रेय घ्यावें. कांहीं आटपशीर वाचकांना ज्ञानेश्वरीच्या उपमादृष्टांताचा पाल्हाळ थोडासा निरर्थक व कंटाळवाणा वाटेल. परंतु हा पाल्हाळ करण्यांत मूळ कवींचा हेतु कोणता आहे हें जर ते लक्षपूर्वक पाहतील, तर त्यांचा ज्ञानेश्वरावरचा असलेला थोडासा तरी रोष नष्ट होईल अशी माझी खात्री आहे. भाषेच्या संबंधानें विचार केल्यास, विवेकसिंधूपेक्षां ती जास्त सुबोध किंवा सरस आहे, असें म्हणतां येणार नाहीं; परंतु विचारांचें उत्क्रमण मात्र ज्ञानेश्वरींत चांगलें दिसून येतें.

आतां मराठी कवितेचीं कांहीं अवस्थांतरें वगळून आपण नामदेवादि कवींचा विचार न करतां एकदम सोळाव्या शतकांतील एका अनुभवी कवीकडे वळूं. मधल्या कवींचा किंवा त्यांच्या कवितेचा विचार न करण्याचें कारण, तुकारामबोवांप्रमाणें किंवा अशाच एखाद्या प्रतिभावान् कवीप्रमाणें राष्ट्रीय व वाङ्मयदृष्ट्या त्यांचा

उपयोग आपल्या देशास नांव घेण्याजोगा झालेला नाही. भाषेच्या दृष्टीनें तुकाराममहाराजांची अकृत्रिम, निर्मळ व प्रासादिक कविता मधल्या स्थितींत आहे असें ह्मणतां येतें. परंतु सर्व प्रकारचे विचार, सर्व प्रकारच्या कल्पना, सर्व प्रकारच्या भावना व सर्व प्रकारचे सहजोद्गार, परिणतावस्थेस व उत्कृष्ट स्थितीप्रत गेलेले कोणास पहावयाचे असतील व त्यावरून तत्कालीन परिस्थिति आणि त्यांतच समाविष्ट झालेलें तुकारामबोवांच्या चारित्र्याचें मजेदार चित्र कोणास पहावयाचें असेल, तर त्यानें तुकारामबोवांच्या काव्यसुधार्णवांतच बुडी मारली पाहिजे. खरे लोकनायक व खरे राष्ट्रीय कवि असें ज्यांना अभिमानानें ह्मणतां येईल, त्यांतच तुकाराम बोवांचा समावेश केला पाहिजे. महाराष्ट्रभाषेच्या अस्तित्वापर्यंत तरी कोणाही मराठ्यास तुकाराममहाराजांचें विस्मरण होणार नाहीं. ज्ञानेश्वरापेक्षां सुद्धां तुकाराममहाराजांस एका दृष्टीनें अधिक मान देण्याचें कारण व त्यांचें महत्त्व महाराष्ट्रांत जास्त प्रस्थापित होण्याचें कारण, महाराष्ट्रसमाजाला त्यांनीं कर्तव्याची ओळख करून देऊन व्यवहार व वेदान्त यांची उत्कृष्ट सांगड घालून दिली हें होय. तुकाराममहाराजांच्या वाणींत जें अपूर्व ओज, जें अद्वितीय तेज, प्रगट झालेलें दिसून येतें, तें स्वानुभवज्ञानाचें आहे. आध्यात्मिकदृष्ट्या ज्ञानेश्वर व तुकाराम हे सारख्याच योग्यतेचे आहेत, परंतु प्रत्येकाची वैयक्तिक परिस्थिति भिन्न असल्यामुळें दोघांच्या कृतींमध्यें साहजिकच थोडासा भेदभाव दिसून येतो. ज्ञानेश्वर आजन्म ब्रह्मचारी. निसर्गतःच त्यांचें व्यावहारिक अनुभवाकडे दुर्लक्ष व संसाराचा तिटकारा. अशा व्यवहारपराङ्मुखी पुरुषाकडून प्रपंचांत मुरलेल्या समाजास त्यांच्याच वळणाप्रमाणें, त्यांना रुचेल व विचारास सहज पटेल असें, पारमार्थिक शिक्षण मिळणें अशक्य आहे. तरी पण जरी ते नैष्ठिक ब्रह्मचारी ह्मणून संसारानुभवी होते तरी त्यांच्या वेदान्तांत मात्र व्यवहाराचे जागजागीं योग्य अनुभव आले आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तुकाराममहाराजांची सर्वच गोष्ट निराळी. संसारांतील विविध प्रसंगांचा कटु अनुभव घेऊन ते वैराग्यमेरूवर आरूढ झालेले. अर्थात् जेथें जेथें त्यांना संसारी जनांवर कोरडे ओढण्याचा व त्यांना ताळ्यावर आणण्यासाठीं उपदेश करण्याचा प्रसंग आलेला आहे, तेथें तेथें त्यांचे विचार व्यवहाराशीं किती संलग्न झालेले दिसून येत आहेत बरें ? स्वकर्तव्याविषयीं दिशाभूल झालेल्या संसारिक जीवास योग्य व्यावहारिक दृष्टांतांनींच त्यांनीं ठिकठिकाणीं अंजन घातलें आहे. यामुळेंच चटकन तुकारामबोवांचा उपदेश आपल्याला रुचतो. थोड्याशा निराळ्या भाषेंत विचार केल्यास व कल्पनेची अदलाबदल केल्यास असें ह्मणतां येईल कीं, तुकारामबोवांचा वेदान्त प्रवृत्तिपर आहे. त्यांत निवृत्तीची दाट परंतु गूढ पेरणी झाली आहे. आणि भगवद्गीतेचे महाराष्ट्रभाष्यकार श्रीज्ञानदेव यांचा वेदान्त निवृत्तिपर असून, त्यांत व्यवहाराची जागोजाग सौम्य व दाट पेरणी झाली आहे. एकंदरींत वाङ्मयदृष्ट्या व राष्ट्रीयदृष्ट्या तुकारामबोवांची कामगिरी महत्त्वाची, चिरस्थाई व अभिमान बाळगण्याजोगी झाली आहे, यांत संशय नाहीं. आतां

स्वयंस्फुरित कविताशक्तीच्या अवतारत्रयीपैकीं राहतां राहिले रामदास. सुप्रसिद्ध काव्येतिहास-संशोधक रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे ह्यांनीं आपल्या 'संकीर्ण लेखसंग्रहां'त रामदासांच्या कवितेसंबंधानें लिहितांना, समर्थांचा दासबोध हा ग्रंथ काव्य नव्हे, असें ह्मटलें आहे. वास्तविक विसूभाऊंच्या विरुद्ध एकादें मत प्रसिद्ध करणें ह्मणजे तें अनाधिकाराचें द्योतक आहे असें वाटण्याचा संभव आहे. परंतु एवढ्यापुरते त्यांचे विचार मला पसंत नसल्यानें, मला जें काय वाटतें तें मी प्रांजलपणें लिहीत आहें. सर्वसाधारण कवितेची व्याख्या ह्मणजे 'सरस शब्दप्रबंध' अशी आहे. जें ऐकल्यानें मनाच्या वृत्ति प्रसन्न होऊन वर्ण्य प्रसंग आपल्या पुढेंच घडत आहेत कीं काय असें वाटूं लागतें, तो शब्दप्रबंध व ती गद्यपद्यरचना काव्य होय, अशी गुरुवर्य चिपळूणकरांनीं सुद्धां मागील प्रसिद्ध साहित्यशास्त्रकारांच्या काव्यव्याख्येचा निष्कर्ष काढून व्याख्या तयार केली आहे. मग ह्या व्याख्येप्रमाणें पाहिल्यास रामदासांचा **दासबोध** काव्यग्रंथ नव्हे, असें ह्मणण्याचें धारिष्ट कोणाला होईल काय ? घरोघरीं दासबोध इतका पूज्य होण्याला कारण, अंतःकरणावर परिणाम करणारा व डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा त्यांतील बहारीचा उपदेश, हेंच नव्हे काय ? उपरिनिर्दिष्ट काव्यचंडोलड्यापेक्षांसुद्धां श्रीसमर्थ रामदासांची योग्यता कांहीं निराळी आहे. पारतंत्र्यांत मुरलेल्या व कर्तव्यभ्रष्ट झालेल्या हिंदु समाजांत स्वस्थितीचें ज्ञान उत्पन्न करून त्यांना कार्यक्षम व सर्वतोपरी राष्ट्रीय व्यवहारधुरा वाहण्यास समर्थ करण्याची महत्त्वाची कामगिरी रामदासांनीं केली. त्यावेळीं अज्ञानांधकारांत चांचडपणाच्या व स्वाभिमानशून्य झालेल्या समाजांत नवचैतन्य उत्पन्न करणारा श्रीसमर्थांसारखा राष्ट्रीय महापुरुष पाहिजेच होता. ज्ञानेश्वर, नामदेवांसारखी एकांगीच कामगिरी जर रामदासांकडून झाली असती तर समर्थ इतके लोकप्रिय व त्यांचें नांव सर्वतोमुखीं होण्याचें कारण नव्हतें. पण त्यांची कामगिरी बहुविधांगी झाली आहे. धर्माची विसकटलेली घडी त्यांनीं नीट बसविलीच; परंतु त्याबरोबर त्यांनीं इहलोकचा व्यवहार कसा उत्कृष्ट रीतीनें संभाळतां येईल, याचेंही ज्ञान निद्रावश समाजाला करून दिलें. महाराष्ट्र पातशाही स्थापन करण्याचा जो मान शिवाजीस आहे, तोच मान थोड्याशा निराळ्या दृष्टीनें श्री समर्थ रामदासांस आहे. उलटपक्षीं श्री समर्थांच्या उपदेशाची प्रेरणा किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांची मदत जर शिवाजी महाराजांना झाली नसती, तर आज जो महाराष्ट्र पादशाहीच्या वैभवाचा थोडासा अवशेष कांहीं ठिकाणीं दिसून येतो, तो दिसला असता कीं नाहीं ह्याचीच शंका वाटते. व्यावहारिक सद्बोधाची उत्तमता व परिणतता ह्यांचा अपूर्व संयोग कोठें दिसून येत असेल, तर तो 'दासबोधा'तच होय. निराशांना आशेचा किरण दाखविणारा, दिशाभूलांना योग्य मार्ग सांगणारा, निरुत्साहांना उत्साहभरित करणारा, व संशयी लोकांमध्यें निश्चयाचें बीं पेरणारा असा हा 'दासबोध' आहे; आणि तो आपल्यास उपयोगी व मन व्यापून सोडणारा आहे. ह्मणूनच त्यास बिनदिक्कत काव्य या सदराखालीं घालण्यास कांहीं हरकत नाहीं. असो. माझ्या मतें खरें,

उत्कृष्ट व राष्ट्रोपयोगी असे कवि म्हटले म्हणजे तुकाराम व रामदास हेच होत. अंशतः ज्ञानेश्वर हेही या मालिकेंत बसण्यास योग्य आहेत. मुक्तेश्वरांची गणना सुद्धां प्रतिभावान् कर्त्यांमध्यें करण्यास कांहीं हरकत येईल, असें नाहीं; पण राष्ट्रीयदृष्ट्या त्यांची किंमत फारशी नसल्यानें त्यांना रामदास व तुकाराम यांच्याइतके गुण देतां येणार नाहींत. लेखांक २ मध्यें सदर कवींच्या काव्यासंबंधानें संक्षेपतः विचार येऊन गेले आहेत; तरी काव्याच्या प्रतिपाद्य विषय-स्वरूपाचा योग्य तो विचार करण्यास व त्यासंबंधीं आधुनिक कविवर्यांना निर्बंध घालण्यास प्राक्कालीन कविवर्यांच्या काव्याचा विस्तृत विचार करणें उपयुक्त होईल, म्हणून हा इतका विस्तार करणें भाग पडत आहे. मुक्तेश्वरां-संबंधीं—त्यांच्या काव्यासंबंधीं—इतकेंच सांगतां येईल कीं, त्यांची वर्णनशैली अद्भुतरम्य, मनोहर व चटकदार आहे. श्रीधराचा सहजपणा, एकनाथाचा रसाळपणा, नामदेवाचा मधुरपणा, त्यांत नसून एक प्रकारची अद्भुतरमणीयता त्यांत दिसून येते. वर्ण्यप्रसंगाच्या हुबेहुब देखाव्यानें वाचकांना भारून टाकण्याचें अद्भुत तेज मात्र मुक्तेश्वराचे काव्यांत इतकें उत्कटत्वानें झळकलेलें दिसून येतें कीं, 'मुक्तेश्वरा'सारखा दुसरा कवि मुक्तेश्वरच असें त्यांना वेळोवेळीं वाटूं लागतें.

लखनौ येथील पांचवें हिंदी-साहित्यसंमेलन.

"है भव्य भारत ही हमारी मातृभूमी हरी भरी। हिंदी हमारी राष्ट्रभाषा और लिपि है नागरी॥"

मैथिलीशरण गुप्त.

प्रसंगवशात् मला ह्या प्रांतांत कांहीं दिवस राहण्याचा योग आला, व ह्याच सुमारास लखनौ येथें 'हिंदीचें पांचवें साहित्य संमेलन' भरलें. त्या वेळीं तेथें जाण्याबद्दल माझ्या कांहीं साहित्यप्रेमी मित्रांनीं आग्रह केल्यावरून मी तेथें गेलों होतों. त्या प्रसंगीं ज्या गोष्टी माझ्या पाहण्यांत आल्या, त्या महाराष्ट्राला कळणें राष्ट्रीयदृष्ट्या इष्ट वाटल्यावरून पुढील लेख लिहिला आहे.

संमेलनाचें अधिवेशन ता. २६, २७ व २८ नवंबरला तीन दिवस झालें. ह्यावेळीं वर पंजाबपासून खालीं मध्यप्रांतापर्यंत निरनिराळ्या हिंदी भाषा बोलणाऱ्या प्रांतांतून सुमारें ६०० प्रतिनिधि एकत्र झाले होते. त्यामध्यें तुरळक बंगाली व महाराष्ट्रीयही दिसत होते. प्रतिनिधींची जेवण्याची व राहण्याची व्यवस्था स्वागतकारिणी सभेनें अप्रतिम ठेवलेली होती. खुद्द लखनौला मुसलमानांची लोकसंख्या शेंकडा ९०।९५ पर्यंत असून समाजावर त्यांचें प्राबल्यही विशेष आहे. ह्याशिवाय संमेलनाचे दिवस हे मोहरमच्या सणाचे असून, त्या दिवसांत हिंदूंचें एखादें विशेष कार्य करणें बरेंच अडचणीचें व धोक्याचें असतें. इतकें असतांही संमेलनाच्या चालकांनीं प्रतिनिधींच्या राहण्यासंबंधी वगैरेच्या व्यवस्थेंत उत्तम दक्षता ठेवली, व संमेलनाचें एकंदर कार्य निर्विघ्नपणें

पार पाडलें, ह्यांत त्यांचा उत्साह व व्यवस्थाचातुर्य दोन्ही उत्तम प्रकारें प्रतीत होतात.

ह्या प्रांतीं येणाराला प्रथमदर्शनींच ही गोष्ट विशेष दिसते कीं, येथील हिंदुसमाज आपला हिंदुपणा बहुतेक विसरून गेला आहे. मुसलमानांचें राज्य फार दिवस राहिल्यामुळें, येथील हिंदूंच्या रीतीभातींत, वस्त्रप्रावरणांत, लिहिण्याबोलण्यांत सर्वदूर अहले इस्लामचें वर्चस्व दिसून येतें. आतां आतांपर्यंत सर्व हिंदूंचें प्राथमिक शिक्षण उर्दुद्वारा होत असे; व अजूनही साधारणतः बहुतेकांस देवनागरी लिहिणें किंवा संस्कृतमिश्रित हिंदी समजणें जड जातें. ही स्थिति ध्यानांत घेतली ह्मणजे हिंदी साहित्यसंमेलनाच्या कार्याचें महत्त्व नीटपणें लक्षांत येईल. संमेलनाला हिंदु सुशिक्षित समाज जागा करण्यापासून कामाला आरंभ करावयाचा होता; व तो जागृत झाल्यानंतर, आपली हिंदी ह्मणून एक स्वतंत्र भाषा आहे, तिची देवनागरी ह्मणून एक लिपि आहे, हें त्यास समजावून द्यावयाचें होतें; तिच्या द्वारें आपले व्यवहार नीटपणें चालूं शकतात अशी त्या समाजाची खात्री करून द्यावयाची होती; व सरते शेवटीं तिच्याविषयीं त्यांच्या मनांत प्रेम उत्पन्न करून द्यावयाचें होतें. संमेलनानें गेल्या चार वर्षांत हें कार्य पुष्कळ अंशानें पार पाडलें आहे. हल्लीं बहुतेक सुशिक्षित हिंदूंस हिंदी व देवनागरी आपलीशी वाटूं लागली आहे. पुष्कळ लोक ती शिकूं लागले आहेत. पुष्कळ खासगी शाळांत हिंदीद्वारा प्राथमिक शिक्षण दिलें जाऊं लागलें आहे; हिंदीचें वाङ्मय वाढतें आहे; थोडक्यांत, हिंदुसमाजाला हिंदीविषयीं कळकळ वाटावयास लागून, तिची सर्व प्रकारानें उन्नति करण्याकरितां तो झटूं लागला आहे.

वरील प्रयत्नाबरोबरच हिंदी ही सर्व भरतखंडाची राष्ट्रभाषा मानली जावी; हिंदुस्थानांतील फार मोठ्या भागाची ती मातृभाषा आहे; उत्तरेस काश्मीरपासून दक्षिणेस मद्रासपर्यंत बहुतेक सर्व ठिकाणीं ती थोड्याफार प्रमाणानें सर्व लोक समजतात; ती सांप्रतही प्रौढ असून, तिचें शब्दभांडार मनाचे निरनिराळे धर्म व शास्त्रांचीं निरनिराळीं प्रमेयें व्यक्त करण्यास, हिंदुस्थानांतल्या इतर भाषांहून कमी समर्थ नाहीं; ह्याकरितां जर हिंदुस्थानाला कोणची एक सर्वसामान्य भाषा (*Lingua Franca*) होणें असेल तर ती हिंदीच होण्यास योग्य आहे, ही गोष्ट एकंदर हिंदुस्थानांतील सुशिक्षितांपुढें मांडून त्यांच्या अंतःकरणांत बिंबवून द्यावयाचें कार्य संमेलनास करावयाचें आहे.

थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे संमेलनाचे दोन उद्देश आहेत. मातृभाषा ह्या दृष्टीनें हिंदीची वृद्धि करावयाची, हा एक; व तिच्या योग्यतेकडे लक्ष देऊन सर्व हिंदुस्थानानें ती राष्ट्रभाषा मानावी असा प्रयत्न करणें, हा दुसरा. आजकाल सर्वत्र हिंदी राष्ट्रभाषा असावी ह्मणून जो अनुकूल ग्रह दिसूं लागला आहे त्यावरून संमेलनाचे दुसरें उद्दिष्टही साध्य होण्यास फार काल लागेल असें वाटत नाहीं.

संमेलनाच्या कामास, वर सांगितल्याप्रमाणें, ता० २६ नवंबरला दुपारीं प्रारंभ झाला. प्रथमतः 'वंदे मातरं' व कांहीं वैदिक मंत्रांचें गायन झाल्यानंतर, स्वागतकारिणी कमिटीचे सभापति **राजा रामपालसिंह** सी. आय. ई.

ह्यांचें भाषण झालें. हिंदीची सरकारांतून सांप्रत होत असलेली अवहेलना त्यांनीं आपल्या प्रस्तुत भाषणांत मुद्देसूदपणानें रेखाटली आहे. हिंदी बोलणाऱ्या प्रांतांपैकीं एकट्या **संयुक्त** प्रांताची लोकवस्ती सुमारें ४ कोटी ८० लक्ष असून, त्यांपैकीं चार कोट अडतीस लक्ष हिंदी बोलणारे हिंदु आहेत. अशी स्थिति असतांही प्राथमिक शिक्षणाकरितां सामान्य भाषा सरकारनें हिंदी न मानतां उर्दु मानली आहे! सर्व सरकारी कचेऱ्या व कोर्टांची भाषा उर्दु आहे. नुकत्याच एका कमिटीनें हिंदी ही मृतभाषा आहे असें सुद्धां ह्मणावयास कमी केलेलें नाहीं! असो. ह्याप्रमाणें वर्तमान स्थिति वर्णून, ती सुधारण्याकरतां चाललेले प्रयत्न, व त्यांत लखनौ ज्या भागांत आहे त्या 'औध' नें केलेलें काम, ह्यांचें राजासाहेबांनीं दिग्दर्शन केलें; व सरते शेवटीं हिंदीची मातृभाषा ह्या दृष्टीनें कळकळ बाळगून उन्नति करण्याविषयीं सभासदांची विनंती करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

नंतर **श्रीधर पाठक** ह्मणून हिंदीचे एक नांवाजलेले कवि व लेखक अध्यक्ष निवडण्यांत आले. त्यांनीं ह्या प्रसंगीं केलेलें भाषण दोन तीन दृष्टींनीं विशेष मननीय आहे. हिंदीची वर्तमान दशा, तिच्या उन्नतीविषयीं चाललेले प्रयत्न व त्यांत हिंदी ग्रंथकारांपुढें असलेलें ध्येय, हीं त्यावरून दृग्गोचर होतात. लोकजागृति करून राष्ट्राची उन्नति करण्यास साहित्यासारखें दुसरें साधन नाहीं. करितां तें हातीं घेऊन संसारांतील प्रत्येक विषयांत त्याची व्याप्ति होईल असा प्रयत्न करणें हें पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे. ह्या सर्वमान्य सूत्रांचें प्रथमतः विवेचन करून, अध्यक्षांनीं नंतर हिंदीसाहित्याचीं कविता, नाटक, उपन्यास (कादंबरी) वगैरे अंगांची उन्नति कोणत्या दिशेनें व कशा प्रकारें केली पाहिजे ह्याचें वर्णन केलें. त्यांतील एक दोन सूचना आह्मांस महाराष्ट्राच्या दृष्टीनेंही उपयुक्त वाटतात. कवितेसंबंधांत त्यांची एक सूचना अशी आहे कीं, आपलीं पुराणें, इतिहास वगैरे पाहून, त्यांतून मनास थक्क करून सोडणारे, उच्च वृत्ति उद्दीपित करणारे, व स्वाभिमान जागृत करणारे असे प्रसंग निवडून त्यांचें एक महाकाव्य रचिलें जावें. महाराष्ट्रांतही असें एखादें काव्य निर्माण होण्याची विशेष अवश्यकता आहे.

अध्यक्षांची जी दुसरी सूचना आम्हांस उपयुक्त वाटली ती ही कीं, संसारांतील विविध व्यवहारांस अनुलक्षून, लहान लहान सुंदर व उपदेशपूर्ण दृष्टांतांची एक हारावलि ग्रथन केली जावी. अध्यक्षांच्या सूचनेचा अर्थ आह्मांस असा वाटला कीं, जगांतील निरनिराळीं नीतितत्त्वें उत्तम प्रकारें मनावर ठसतील, असा लहान लहान दृष्टांतांचा Youth's Noble Path किंवा Moral Tales यांच्या धर्तीवर एक ग्रंथ रचला जावा. महाराष्ट्रांतही अशा ग्रंथाची अजून उणीव आहे.

सर्व जगांतील निरनिराळ्या जातींच्या चांगल्या चांगल्या गुणांच्या वर्णनाचें "विश्वगुणादर्श' नांवाचें पुस्तक तयार केलें जावें ह्मणून अध्यक्षांची आणखी एक सूचना होती. तीही विचार करण्यासारखी आहे.

हिंदी साहित्य हें सर्व भरतखंडाचें राष्ट्रीय साहित्य करण्याचें उदात्त ध्येय अध्यक्षांनीं हिंदी

ग्रंथकारांपुढें ठेवलेलें आहे. ग्रंथकारांनीं स्वतः देशभक्तीनें प्रेरित होऊन जेणेंकरून विविध जाती व धर्मपंथ सामान्य राष्ट्रप्रेमानें संबद्ध होतील, असें साहित्य निर्माण करावयास लागलें पाहिजे. ह्याच दृष्टीनें कवींनीं आपल्या प्रतिभेनें भाषेचा 'विकास' करण्यास झटलें पाहिजे, असा सुंदर उपदेश त्यांनीं हिंदी साहित्यसेवकांस केला आहे.

ह्यानंतर गेल्या वर्षांत प्रसिद्ध झालेल्या कांहीं मिश्रबंधुविनोद, भारीभ्रम, विकासवाद, प्रियप्रवास, भारत भारती इ० गद्य व पद्य ग्रंथांचें अध्यक्षांनीं थोडक्यांत समालोचन केलें. ह्या ग्रंथांपैकीं मिश्रबंधुविनोद नांवाचा ग्रंथ विशेष महत्त्वाचा आहे. ह्याचीं सुमारें १२०० पानें असून त्यांत आजपर्यंत झालेल्या हिंदीकवींपैकीं सुमारें चार हजार कवींचा थोडक्यांत वृत्तांत देऊन, त्यांच्या कवितेचीं उदाहरणें दिलीं आहेत. हा ग्रंथ वरवरही चाळून पाहाणारास, हिंदीची योग्यता, तिचें कविताभांडार, तिची अर्थक्षमता हीं मनावर बिंबल्याशिवाय राहणार नाहीं.

सरतेशेवटीं हिंदीची उन्नति करण्याकरितां एक तर ती नवीन व्याकरण रचून नियमबद्ध केली पाहिजे, व दुसरें मुख्यत्वें संस्कृताचा आश्रय घेऊन ती वाढविली पाहिजे, अशी सूचना करून अध्यक्षांनीं आपलें भाषण संपविलें.

नित्य नवीन प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांपैकीं कित्येक ग्रंथ समाजाच्या एकंदर उन्नतीस हानिकारक असतात. अशा प्रकारच्या पुस्तकांचें वेळींच समालोचन करून समाजास त्यांची खरी किंमत कळवून देणें हें संमेलनाचें कर्तव्य असून त्या दृष्टीनें, संमेलनातर्फे जी मासिकपत्रिका काढली जाते तींत पुस्तकांचें परीक्षण वक्तशीर केलें जाऊं लागलें पाहिजे, ह्मणून अध्यक्षांनीं एक इशारत केली आहे. आपल्या महाराष्ट्रसाहित्य-संमेलनांतही अशाच प्रकारची चर्चा झाल्याचें स्मरतें. परंतु साहित्यपत्रिकेंत अजून पुस्तक-परीक्षण विशेषसें दिसूं लागलें नाहीं.

संमेलनाच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीं सभेंत बरेच ठराव मंजूर करण्यांत आले. त्यांपैकीं, नोटा व नाणीं ह्यांवर नागरी लिपींत किंमत लिहिली जावी, प्राथमिक शिक्षणाचा माध्यम (medium) हिंदी केली जावी, हिंदीच्या टेक्स्ट बुक कमिटींत हिंदी पंडित नेमले जावे, विश्वविद्यालयाच्या उच्च परीक्षांतून हिंदी दुय्यम भाषा ह्मणून घेण्याची परवानगी असावी, हिंदी युनिव्हर्सिटींत हिंदीच्या द्वारें शिक्षण दिलें जावें, हे ठराव महत्त्वाचे होते. संमेलन किंवा संमेलनाची प्रतिरूप अशी जी स्थायी साहित्य-सभा तिचें प्रत्यक्ष व्यावहारिक कार्य हल्लीं दोन स्वरूपांचें आहे. एक हें कीं, मोठमोठ्या गांवांतून सभेच्या शाखा स्थापून त्याद्वारें तेथील लोकांत नागरी लिपीचा व हिंदीचा प्रसार करावयाचा. वकील लोकांचीं मनें वळवून कोर्टांतून नागरी-लिपींतून मुकदम्मे, अर्ज वगैरे देण्याची व्यवस्था करावयाची; थोडक्यांत, हिंदीच्या प्रसाराची चळवळ सुरू ठेवावयाची. स्थायी साहित्यसभेनें ह्या कामासाठीं एक फंड कायम केला असून त्यांतून दोन फिरते उपदेशक नेमलेले आहेत. हल्लीं कोर्टांतून अर्जी लिहणारे उमेदवार बहुधा उर्दु जाणणारे असतात; व नागरी लिपींत अर्ज देऊं नये ह्मणून जरी प्रतिबंध नाहीं, तरी बहुतेक सर्व अर्ज

उर्दूतच दिले जातात. नागरी लिपींत अर्ज लिहूं इच्छिणारांची सोय व्हावी ह्मणून स्थायीसभेनें आपल्या खर्चानें नागरी लिपि जाणणारे उमेदवार कांहीं मोठमोठ्या गांवांच्या कचेऱ्यांतून ठेवण्याची व्यवस्था केली आहे. ठिकठिकाणच्या वकिलांचीं मनें नागरी लिपींत काम करण्याविषयीं वळविण्याचाही सभेनें बराच उद्योग केला आहे, व प्रसंगीं अशा वकिलांस आपल्या खर्चानें नागरी जाणणारा कारकूनही सभेनें दिलेला आहे. नागरी लिपीच्या प्रचाराचें काम संमेलनाच्या वेळींही बरेंच झालें. कानपूर, बांस, बरेली, वगैरे गांवच्या पुष्कळ प्रसिद्ध वकिलांनीं आपलें सर्व काम नागरींत करण्याची संमेलनासमोर प्रतिज्ञा केली. बरेच जमीनदार, तालुकदार, व्यापारी, सावकार, वगैरेनींही आपले हिशोब वगैरे सर्व नागरींतच ठेवण्याचा निश्चय जाहिर केला. ह्यावेळीं संमेलनांत सर्वदूर एक विलक्षण उत्साह दिसत होता. ठिकठिकाणचे प्रतिनिधि, वकील, सावकार, पुढें येऊन वरप्रमाणें प्रतिज्ञा करीत होते; व लोक टाळ्यांनीं आपली संमति प्रकट करीत होते. कांही प्रमुख वकील अशी प्रतिज्ञा करण्यास कांहींसे साशंक होते; परंतु श्रोत्यांपैकीं कांहींनीं औपरोधिक बोलून त्यांस तशी प्रतिज्ञा करण्यास भाग पडलें. एकदां लोकमत एखाद्या कार्यास अनुकूल झालें कीं तें कार्य किती लवकर सफल होऊं लागतें ह्याचा प्रत्यय ह्यावेळीं येत होता. बांदा येथील एका प्रसिद्ध वकिलाच्या कारकुनानें गेल्या वर्षांत सुमारें तीन हजार अर्ज नागरी लिपींत लिहून कोर्टांत दाखल केले, ह्मणून संमेलनानें त्यास एक रुप्याचें कलमदान नजर केलें.

स्थायी सभेचें दुसरें कार्य ह्मणजे हिंदी साहित्य परीक्षांची सुरवात हें होय. हल्लीं ह्या परीक्षा तीन कायम केल्या असून, त्यांपैकीं प्रथम परीक्षा संमेलनाच्या आधीं दोन महिने घेतली गेली होती. तिचा निकाल संमेलनांत ऐकविला जाऊन पहिल्या नंबरच्या विद्यार्थ्यास एक सोन्याचें व एक चांदीचें पदक देण्यांत आलें. सदर परीक्षांचा हेतु अर्थातच हिंदीच्या अभ्यासास उत्तेजन देणें हा आहे. अलाहाबादचे प्रो. रामदास गौड एम्. ए. ह्यांजकडे सदर परीक्षांची व्यवस्था आहे. ह्या गृहस्थांनीं सदर परीक्षा काढण्याचा हेतु, गेल्या वर्षीं घेतलेल्या परीक्षेचें धोरण, व पुढील वर्षीच्या परीक्षांचे विषय वगैरेविषयींचा रिपोर्ट संमेलनांत वाचला, त्यावेळीं, सदर परीक्षांतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां बक्षिसें व पदकें ह्यांचा श्रोत्यांकडून नुस्ता वर्षाव झाला. ह्या परीक्षा सरकारी नसून व्यवहारांत त्यांच्यापासून आर्थिक फायदा तादृश्य नाहीं. ह्याकरितां अशा प्रकारचीं पदकें व बक्षिसें ठेविलीं गेलीं हें फार योग्य झालें. हिंदीविषयीं प्रेम कसें वाढत चाललें आहे ह्याचेंही पण हें द्योतक आहे.

हिंदीमध्यें शब्दाच्या लिंगांविषयीं हल्लीं बराच घोंटाळा आहे; त्याचप्रमाणें क्रियापदाचें लिंग कर्त्याप्रमाणें राहावें किंवा कर्माप्रमाणें राहावें ह्याविषयींही फार प्रयोगभेद आहेत. ह्या दोन्ही अंगांचा विचार करून नियमरचना करण्याकरितां संमेलनानें एक कमिटी नेमली आहे. हिंदीचें एक विश्वसनीय शास्त्रीय व्याकरण रचण्याकरितां गेल्या वर्षीं संमेलनानें पं० कामता प्रसाद गुरु ह्या गृहस्थाची योजना केली होती. तेंही काम बरेंच मार्गाला लागलें आहे.

हिंदीच्या वरील कार्यांची व आपल्या संमेलनानें केलेल्या कार्यांची तुलना केली असतां बराच बोधपर धडा मिळेल असें वाटतें.

संमेलनाच्या कार्यांत मधून मधून विषयांस उचित अशा कविता व पदें ह्मणण्याची व्यवस्था केली होती. यामुळें बराच वेळ बसून कंटाळलेल्या श्रोत्यांचे श्रम दूर होऊन, त्यांच्यांत एक प्रकारचा नवीन उत्साह उत्पन्न होत असे. आपल्या संमेलनांत अशीच व्यवस्था केल्यास ठीक होईल.

संमेलनाची हकीकत लिहितांना त्यावेळीं घडलेली एक गोष्ट सांगितल्याशिवाय राहवत नाहीं, गोष्ट फार महत्त्वाची नाहीं. पण तीवरून ज्यास खरोखर राष्ट्रकार्याची कळकळ वाटत आहे त्याचें वर्तन कसें असतें हें दिसतें. वाचकांपैकीं पुष्कळांस माहित असेल कीं, आचाराविचारांत अधिकांश मुसलमान झालेल्या येथील हिंदूंची कांहीं कालापूर्वी जेव्हां जागृति झाली, व मुसलमानी वर्चस्वाविरुद्ध प्रतिक्रिया सुरु झाली, तेव्हां ह्या प्रतिक्रियेचें पहिलें फळ आर्यसमाजाची स्थापना झाली हें होय. सदर समाज जरी वैदिक आहे, तरी सनातनधर्मापैकीं पुष्कळ मतें त्यांस मान्य नाहींत. कालांतरानें वरील प्रतिक्रिया जास्त जोराची होऊन सनातन धर्माच्या पुनरुज्जीवनाविषयीं चळवळ सुरू झाली. हल्लीं येथील समाजांत आर्यसमाजी व सनातनधर्मी अशीं दोन मतें असून, त्यांचा आपसांत बराच तीव्र विरोध आहे. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीं एका आर्यसमाजी गृहस्थानें, दुसऱ्या विषयावर बोलतां बोलतां, मध्येंच अशी सूचना सभेपुढें मांडली कीं सदर संमलेनास 'हिंदीसंमेलन' न ह्मणतां 'आर्यसंमेलन' ह्मणावें. सदर सूचना सभेपुढें येतांच सर्वदूर 'हो हो' 'नाहीं नाहीं' ची एकच गडबड उडाली. बहुजनसमाजास आर्यसमाजाची व त्याबरोबरच 'आर्य' शब्दाची एक प्रकारची चीड आल्यासारखें झालेलें आहे. ह्मणून ते लोक 'नाहीं नाहीं' असा एकच गिल्ला करूं लागले. उलट, आर्यसमाजींना आर्य शब्दाची तितकीच आवड असल्यामुळें, ते आर्य शब्द ठेवा, आर्य शब्द ठेवा, ह्मणून ओरडूं लागले. जास्ती कमी प्रसंग येतो कीं काय असें वाटूं लागलें. इतक्यांत आर्यसमाजाचे अग्रणी, गुरुकुलाचे संस्थापक, महात्मा मुनशीराम ह्यांचे चिरंजीव श्री हरिश्चंद्रजी विद्यालंकार हे पुढें आले. आर्यसमाजी लोकांना विनंती करून त्यांनीं स्तब्ध केलें, व व्यासपीठावर उभे राहून ते बोलूं लागले. ते ह्मणाले कीं, "स्वतः माझे वडील 'आर्य' शब्दाचे पूर्ण पक्षपाती आहेत, व त्यांनीं ह्या शब्दाचा प्रयोग व्हावा ह्मणून पुष्कळ खटपट केली आहे. माझें स्वतःचें मत हा शब्द घालावा असें आहे. परंतु आज हिंदुस्थानच्या सौभाग्यानें इतका मोठा समाज सहकार्य करण्यास एकत्र झाला आहे, त्यावेळीं जर नुस्त्या नांवाकरितां, नुस्त्या नांवांतील एका शब्दाकरितां, आम्ही फूट पडूं दिली, तर मला अत्यंत दुःख होईल. हा वाद सोडा. ज्यांस 'आर्य' शब्द बरा वाटत असेल त्यांनीं तो शब्द घालावा. परंतु कार्यांत विघ्न येऊं देऊं नये. हल्लीं आम्हांस ऐक्याची अत्यंत जरूरी आहे. ह्मणून सोडा, हा वादच सोडून द्या!" थोड्या वेळानें सर्वत्र शांतता होऊन कार्यास पुनः सुरवात झाली.

संमेलनाचे तिसरे दिवशीं साहित्यसभेच्या फंडाची जाहिर-विनंती केली गेली, व नगर्दी

देणगी किंवा अभिवचनपत्रें गोळा करण्यांत आलीं. सुमारें ५०० रुपये नगदी एकत्र होऊन, सुमारें ३००० चीं अभिवचनें मिळालीं.

संमेलनानें प्रतिनिधींकरतां 'हरिश्चंद्र' नामक हिंदी नाटकाचा प्रयोग करविला होता. प्रयोग करणारी मंडळी धंदेवाईक नसून, केवळ हिंदीच्या प्रेमामुळें हा प्रयोग तिनें केला होता.

संमेलनानें ह्या दिवसांतच एक साहित्यप्रदर्शिनीही खोलली होती. हींत जुने अप्रकाशित हिंदी ग्रंथ, प्रसिद्ध हिंदी काव्यांतील प्रसंगांचीं चित्रें, वगैरे हिंदी साहित्याविषयीं प्रेम वाढविणाऱ्या वस्तु ठेवल्या होत्या.

ह्याप्रमाणें संमेलनाचे चालक इकडील प्रांतांत लोकजागृति करून हिंदीविषयीं त्यांचें प्रेम वाढवीत आहेत, व त्याबरोबरच हिंदीची चारी अंगांनीं उन्नति करून ती राष्ट्रभाषा होण्यास जास्त जास्त योग्य करीत आहेत.एकराष्ट्रत्वाला एकभाषा आवश्यक असून, ती भाषा सांप्रत हिंदीशिवाय अन्य होऊं शकत नाहीं, ह्याकरितां हिंदीच्या उन्नतीच्या ह्या प्रयत्नाबद्दल संमेलनचालकांचें सर्व हिंदुस्थान ऋणी आहे. विशेषतः बाबू श्यामसुंदरदास, ज्यांनीं ह्या कार्याचा मूळ पाया घालून तें ह्या स्थितीला आणलें; बाबू पुरुषोत्तमदास तंदन, जे संमेलनाचे आज दोन तीन वर्षे कायमचे चिटणीस असून त्यासाठीं अविश्रांत श्रम करीत आहेत; व स्वामी सत्यदेव, ज्यांनीं ह्या कार्यास आपणा स्वतःस वाहून घेतलें आहे; ह्यांचे ह्या बाबतींत विशेष उपकार आहेत. ईश्वर करो व त्यांच्या प्रयत्नांस लवकरच पूर्ण यश येवो.

महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे चालकांस आमची अशी सूचना आहे कीं हिंदी साहित्य सभेशीं महाराष्ट्र-साहित्य-सभेचा संबंध जोडण्याचा त्यांनीं प्रयत्न करावा. अशा प्रकारच्या संबंधापासून होणारे फायदे स्पष्ट आहेत. दोन्ही सभांचें कार्य एकाच स्वरूपाचें असल्यामुळें, परस्परांचा अनुभव परस्परांस कळल्यानें बराच उपयोग होणार आहे. पुष्कळ कार्यें दोघांनीं मिळूनही करतां येण्यासारखीं आहेत. उदाहरणार्थ, शास्त्रीय परिभाषा ठरविण्याचें काम, विश्वकोश तयार करण्याचें काम, अशीं कामें दोघांनीं मिळून केल्यास पुष्कळ श्रम व काळ वांचणारा आहे. ह्याशिवाय दोन्ही सभांना सरकारकडून जें कार्य करून घ्यावयाचें आहे, तें दोघांनीं मिळून केल्यास लवकर साध्य होण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, प्राथमिक शिक्षण मातृभाषेच्या द्वारें दिलें जावें, अशासारखे ठराव जर दोन्ही सभांनीं मिळून सरकारकडे पाठविले तर त्यांचें वजन वाढणारें आहे. हिंदी सभेच्या चालकांशीं ह्या संबंधांत आमचें जें बोलणें झालें त्यावरून ते असा संबंध जोडण्यास अनुकूल असल्याचें दिसून आलें. तरी येत्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या वेळीं इकडील कांहीं प्रमुख चालकांस बोलाविलें जाऊन सदर विषयाची चर्चा केल्यास बराच लाभ होईल असें आह्मांस वाटतें.

वि. सि. सरवटे.

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका.

वर्ष २.] [अंक २.

पुस्तकपरीक्षा.—"टिळकांची कविता."

१. रे. नारायण वामन टिळक यांची कविता खंडशः वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांतून येत होती, व तिनें आपली खरी योग्यता रसिकांच्या चित्ताचा वेध करून स्थापिलीही होती. परंतु स्फुट लघुकाव्यांचा परिणाम फटाक्यांच्या "फट्" प्रमाणें क्षणिक होई; व तेजही त्याच्यासारखेंच क्षणिक!

२. संग्रहित केलेल्या स्फुट काव्यांचा परिणाम चिरकालीन होईल, अशा खऱ्या समजुतीनें रे. टिळकांचे एक शिष्य व भक्त यांनीं तीं काव्यें एकत्र छापण्याचा उपक्रम केला आहे. एकंदर काव्यांचे पुष्कळ खंड होतील, त्यांपैकीं हा पहिला आहे. या खंडाचे तेरा गुच्छ आहेत, व विषय ८७ आहेत. संपादकांनीं एक स्तुतिपर प्रस्तावना जोडिली आहे, व तिला खऱ्या मार्मिकपणाची जोड असली पाहिजे ह्मणून रा. रा. न. चिं. केळकर यांनीं उपोद्घात लिहिला आहे. या दोन प्रस्तावना अपरिचित वाचकांना टिळकांची ओळख करून देण्याचें काम चांगलें करितील.

३. टिळक हे कवि आहेत, प्रतिभावान् कवि आहेत, याबद्दल शंका नको. त्यांचा माझा दाट परिचय नाहीं. वऱ्हाडांत ते कांहीं वर्षें मास्तर होते. पुढें नागपुरास बुट्टींच्या आश्रयानें राहिले. तेथें त्यांनीं संस्कृत ग्रंथांचें परिशीलन केलें व ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली. ते हल्लीं नगरास अमेरिकन मिशन शाळेंत शिक्षक आहेत. कवीचें पूर्वीचें चरित्र समजलें, ह्मणजे त्याचा प्रकाश त्याच्या काव्यावर पडतो. असा प्रकाश ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम, वामन, मोरोपंत, रामजोशी, अनंतफंदी या मराठी कवींच्या कृतींवर; Milton, Dryden, Pope, Wordsworth, Tennyson, Byron, Browning इत्यादि आंग्लकवींच्या काव्यांवर, व त्या त्या राष्ट्रांतील इतर कवींच्या काव्यांवर पडला आहे. तेव्हां टिळकांच्या या कल्याणानें टिळकांचें चरित्र या खंडाच्या आरंभीं घातलें असतें, तर टिळकांची क्वचित् गूढ कविता विशद झाली असती व वाचकांची जिज्ञासाही समाधान पावती. असो.

४. चरित्राभावीं या खंडांतील काव्यांवरून टिळकांच्या जीवितकर्तव्याचें, स्वभावाचें, मनोवृत्तींचें व मतांचें स्वरूप काय आहे, तें पाहूं.

५ टिळक आपण कवि आहों, असें समजतात इतकेंच नाहीं, तर आपले बोल ईश्वराचीं निःश्वसितें समजतात.

कारण कवनें नच माझीं
नच तुमचीं—मी गातो जीं—
हीं निःश्वसितें
कोण सोडितें
मम हृदयीं तें
विचारुनी, भिउनी त्याला
पुढें करा मग कर अपुला ॥ पृ० १८

कवि मागल्या पद्यांत टीकाकारांस विनवितात, " तुमचा कर कितीही कोमल असला तरी माझीं कवनें तयानें स्पर्शणें मला कधींही सहन होणें नाहीं—याहून जीव गेला बरा !"—शेवटल्या पद्यांत विनवितात—" वंदा, निंदा परि दुरुनी, पवित्र ही कवितारमणी—× × नका शिवूं मम कवनाला!" वंदा, वाटेल तर निंदा, पण कवितेला शिवूं नका ! स्तुतिनिंदेपरती शिवाशिव कोणती हें लक्षांत येत नाहीं. कांहीं असो. " यस्य निःश्वसितं वेदाः " हें आप्तवाक्य झुगारून ज्यांनीं वेदांना धिक्कारिलें, त्यांनींच स्वतःच्या वाणीला ईश्वराचें निःश्वसित म्हणावें, हें वेदांच्या अनादराचें पारिपत्य तर नसेल ना ! पण कविता कितीही पवित्र असो, ती प्रसिद्ध झाली म्हणजे चारचौघांत वापरूं लागली—बाजारांत आली;—व बाजारांत शिवाशिवीचा दोष नाहीं हें प्रसिद्ध आहे. तेव्हां शिवाशिवीची भीति रे० टिळक यांची अजून राहिली आहे, याचा विस्मय वाटतो. खरें पाहतां ही शब्दांची भूल आहे. शब्द अर्थाला पोषक असतात, तसेंच अर्थाला हिणवितातही, याचा हा एक मासला आहे. कवितेला पवित्र रमणीची उपमा दिल्यावर पवित्र रमणीच्या निर्बंधकारक गुणाचा (अवगुणाचा ?) अध्यारोप कवितेवर करणें निर्गतिक झालें, व कवि घोटाळ्यांत पडले ! एखाद्या आडमुठ्या कवीस कोणी म्हणेल,-"शिवाशिवाची तुम्हांला इतकी भीति, तर तुमची कविता उत्तर हिंदुस्थानांतल्याप्रमाणें अक्षयीं पडद्यांत राहूं द्या; बाहेर कशाला येऊं देतां ? " यावर कवि काय उत्तर देतील ?

६. टिळक हे केवळ प्रतिभावान् कवि नाहींत—यांच्या काव्यांचा उद्देश केवळ लोकरंजन नव्हे;-किंवा सामोपचारानें अथवा कोरडे मारून लोकांना बोध करणें हा उच्चतर उद्देश खरा—पण तोही नव्हे. तो त्यांच्या काव्यांत आहे, पण गौण आहे. मुख्य उद्देश हा कीं, आडरानानें जें जग चाललें आहे, त्याची दिशाभूल झाली आहे, त्याला **स्वतःचा अनुभव सांगून** उच्चतम ध्येयांची कल्पना करितां यावी. कवि लोकमतानें वेडे असतात—त्यांना लोक कधीं छळतातही—त्यांना पोळतात—जाळतात;—पण चमत्कार हा कीं छळकर्त्यांची पुढचीच पिढी जाळलेल्या कवीच्या अस्थि गोळा करून त्यांवर समाधि बांधितात, व त्यांच्या नांवानें भजन करितात. ज्ञानदेव, तुकाराम, एकनाथ यांचीं चरित्रें या तत्त्वाचा ऐतिहासिक पुरावा देतात. लोक भजन करूनच राहत नाहींत—त्यांनीं दाखविलेला मार्गही हळूहळू पत्करितात. तात्पर्य, कवींचीं स्वप्नें दृश्य स्वरूप घेतात. या स्वप्नांना भक्त ध्येयें असें नांव देतात, व त्या पिढींतले सामान्य लोक त्यांस " अकरणीय " " दुष्कर " " वेडगळ " कल्पनांच्या सदरांत ढकलतात. श्रीरामाला गगनांतील चंद्र कोणाला आणून देतां येईना, पण बालहृदय ओळखणाऱ्या कौसल्येनें आरशांत चंद्राचें प्रति-

चित्र दाखवून रामाचें समाधान केलें! याप्रमाणेंच याहूनही दुष्कर कृत्य घडून आल्याचें आपण पुष्कळदां पाहतों. एका मुत्सद्यानें चांदोबा म्हटलेली कल्पना—चार पांच वर्षांच्या आंतच दुसऱ्या मुत्सद्यास नामरूप देऊन पदरांत घ्या असें म्हणण्याची पाळी आली! ही आपल्या अनुभवांतली गोष्ट! हा कोणाचा प्रभाव? ध्येयाचा? लोक ह्मणतात स्वप्नें यांचा! तात्पर्य, वेडेपीर ह्मटलेले कवि राष्ट्राचा पुढचा मार्ग आंखून ठेवितात—तो साफसूफ करून आक्रमण्याजोगा करणें हें मुत्सद्याचें काम!

७. कवि मार्गदर्शक होत. त्यांचे प्रायः दोन वर्ग असतात. एक शांत व एक रागीट. शाकुंतलांतील मारीच व दुर्वास, रामाचा गुरु वसिष्ठ व हरिश्चंद्रास छळणारा चंडकौशिक, शिवाजीचे गुरु रामदास व पहिल्या बाजीरावाचे गुरु ब्रम्हेंद्रस्वामी, या जोड्या या वर्गाचे उत्तम मासले होत. एकनाथ शांतिमूर्ति, तर तुकारामांत दोन्ही प्रकार आईच्या प्रमाणें एकवटलेले! आई मारते व मागून जवळही करिते. दोन्ही प्रकार वात्सल्यमूलकच! टिळक हे शांत वर्गांत मोडतील. त्यांच्या शांतीचा—आत्मनिवेदनाचा उत्तम मासला "वनवासी फूल" या काव्यांत आहे. किती तरी विरक्त फुलांनीं आपल्या देशांत वनवास पत्करिला आहे. निवृत्ति परमसुखाची प्राप्ति—ब्रह्मानंदाचें दार उघडणारी किल्ली—हा समज सर्वत्र पसरला आहे. खरी निवृत्ति वनवासांत नाहीं—संसारांतील सद्धर्माच्या, जयाच्या प्रवृत्तींत आहे, हें तत्त्व अंजारून गोंजारून वनवासी फुलाच्या हृदयांत बिंबविलें, हें टिळकांच्या प्रतिभेचें द्योतक. या तत्त्वाचेंच समर्थन करणारीं या खंडांत बरींच काव्यें आहेत. यासंबंधानें "माझी भार्या," "सुशीला" हीं वाचकांनीं अवश्य वाचावीं. सुशीला अति सुंदर, विदुषी, शहाणी, पण विद्येच्या गर्वानें नाडली. तिला ताळ्यावर आणण्याला तिचा आजार व त्या आजारांत तिनें धिक्कारिलेल्या प्रेमाकांक्षी तरुणाची शुश्रुषा, व त्या आजारांत तिचें सौंदर्य नष्ट झालें तरी त्या तरुणाच्या प्रेमाची निश्चलता, हीं कारणें उपयोगी पडलीं. असे प्रसंग संसारांत घडत नाहींत असें नाहीं; व कवींनींही आपल्या ग्रंथांत अशा प्रसंगांची योजना केली आहे. Dickens ची कादंबरी Bleak House हींत असाच प्रसंग वर्णिला आहे. Robert Browning चें प्रेम आपल्या भावी पत्नीवर आजारानेंच बसून त्या प्रेमानें त्यांचा विवाह लोकैषणा संभाळून घडवून आणिला. पण हे प्रसंग ईश्वर मुद्दाम घडवून आणितो, आपल्या प्रेमपात्रांवर प्रेम वर्षितो, ही खिस्तीधर्मांतील काल्व्हिनिस्ट पंथाला मान्य असलेली कल्पना अमेरिकन मिशनमधील पूज्य गुरूस व कवीस मान्य आहे, हें पाहून मला चमत्कार वाटला. नुक्ताच अमेरिकेंतील एका शहरांत आगगाडीच्या स्टेशनाजवळ राहणाऱ्या हमालाचा लहान मुलगा खेळत खेळत रुळांवरून पलीकडे जात असतां गाडीखालीं सांपडून चिरडून मेला, त्याच्या प्रेतविधींत एका तरुण पाद्र्यानें पूर्वापार रूढीस अनुसरून मुलाच्या आईबापांचें असें समाधान केलें:—"देवाच्या मनांत आलें, त्यानें तुमचा पुत्र नेला! ज्यानें दिला त्यानें नेला! तुम्ही कष्टी कां होतां"?—त्या तरुण पाद्र्याच्याजवळ पोक्त वयाचा, काळ्याचे क्वचित् क्वचित्

पांढरे केश झालेला दुसरा एक पाद्री श्मशान-भूमीस त्याच्या बरोबर गेला, तेव्हां मार्गांत त्यानें वरील भाषणाचा निषेध करून म्हटलें,—" हा काय आरोप ईश्वरावर तुह्मीं आणिला ? ईश्वर असें म्हणतो काय कीं आगगाडीचा रस्ता बंदोबस्तानें राखूं नका—हमालांचीं घरें रस्त्याजवळच बांधा ?-रस्त्याला कुंपण किंवा तारा घालूं नका ?—आईबापांला ह्मणतो काय कीं लहान मुलाला एकटें सोडा ?—त्याला संभाळण्याला कोणी जवळ राहूं नका ? मनुष्याच्या आपलपोटेपणावर पांघरूण घालून त्याच्या परिणामांचें खापर ईश्वरावर फोडावें हा कोठला न्याय?" तरुण पाद्री पुष्कळ वेळ सचिंत बसला आणि शेवटीं म्हणाला, " तुमचें ह्मणणें मला पटलें. हीं कर्मे देवाचीं (of God) नव्हत, सोनदेवाचीं (of Gold) आहेत." पाद्री स्कॉच असावा असें दिसतें. ह्मणून God व Gold यांवर उच्चारश्लेषात्मक टीका झाली. जो मानवी हितकर्ता परमेश्वर " न मे द्वेष्योरित न प्रियः" असें ठासून म्हणणारा, तो आजार मुद्दाम आणितो,—ही कल्पना उच्चधर्माला मान्य असूं नये; भौतिक शास्त्राला तर मान्य नाहींच नाहीं. ती मान्य असती तर अनेक रोगप्रतिबंधक—रोगशामक—रोगनिवारक उपाय शोधून काढण्यांत शास्त्रज्ञांनीं आपलीं आयुष्यें खर्ची घातलीं नसतीं. ही कल्पना पूर्वकालीन आहे, तिचा शिंतोडा कवीवर उडाला, चिकटून राहिला, व या रूपानें आतां प्रगट झाला ! ही कल्पना निर्मूल करणें ध्येय धरून टिळक एखादें काव्य लिहितील काय ?

८. " माझी भार्या, " आणि दुसरीं कांहीं काव्यें यांत उत्तम गृहाचें व भार्येचें चित्र काढिलें आहे. गृहासंबंधीं दिंड्या रा० रा० केळकरांनीं उपोद्घतांत दिल्या आहेतच. भार्येचें चित्र बहुतेक कालिदासाच्या " गृहिणी सचिवः" या प्रसिद्ध श्लोकाचा अनुवाद आहे. भार्या ही माझी दासी नव्हे, बरोबरीची आहे, असें कवि निक्षून सांगतात. पण त्यांची भार्या आपणांस भिकारीण म्हणून घेते; तिला कवीनें उत्तर दिलें आहे तें प्रेमळ; प्रोत्साहक व अत्यंत विनीत आहे. (पृष्ठ ४). मला फार आवडलें, उतरून घेण्याला सवड नाहीं. ' स्त्रीपुरुष' या काव्यांत (पृष्ठ २११) कवि म्हणतात, स्त्रीपुरुष मिळून एकच बीज, ऑक्सिजन व हायड्रोजन हे दोन वायु मिळून झालेलें पाणी जसें एकच तद्वत्. जें राष्ट्र हें खोटें म्हणेल तें पतित ! (तेव्हां हिंदुस्थान पतित झालेंच!) " नर नारी जगिं बरोबरी हीं चढती, कोसळती ! " ही ओळ वाचून कोणाला Tennyson कवीचे उद्गार—

They rise or fall together

यांची आठवण होणार नाहीं ? स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीनें आणून सोडावें, हें कवीच्या उत्तम ध्येयांपैकीं एक आहे. तें सामाजिक सुधारकांचेंही ध्येय आहे. स्त्रीशिक्षणार्थ कॉलेजें हायस्कुलें स्थापणें, थोरपणीं त्यांचीं लग्नें करणें, ऋतुप्राप्ति ही विवाहास बाधक न होऊं देणें, पुनर्विवाहाची सवलत ठेवणें, हुंड्यांचा निषेध करणें, इत्यादि सुधारणा या ध्येयाचींच निरनिराळीं अंगें होत.

९. टिळक शांत मार्गदर्शकांच्या वर्गांत मोडतात ह्मणून वर ह्मटलें, तेव्हां त्यांचीं ध्येयें अति उच्च असलीं तरी तीं आजच अमलांत आणतां येतील, असें त्यांचें मत नाहीं. या सुधारणा हळूहळूच होतात, होतील, असें सृष्टींतील दाखले देऊन जहाल सुधारकांचें ते समाधान करूं पाहतात. पण जहालांच्या पोतडींत क्षणांत विध्वंस करणारे पृथ्वीवरील भूकंप, जलप्रलय, वायुप्रलय, अग्निप्रलय, आकाशांगणांत तारांचा सन्निपात, तेजाचा प्रशम, उल्कांचा दाह, उल्काप्रपात हीं नाहींत काय (?), मानवव्यवहारांत पूर्वी भारतयुद्ध, हल्लींच्या काळांत आंग्ल–जर्मन युद्ध, परशुरामाचें निःक्षत्र-पृथ्वीकरण, यादवी, इंग्लंडांतील "गुलाबाचीं ? युद्धें," जर्मनींतील धर्मयुद्धें व तीस वर्षांचें युद्ध, बार्थालाम्यूची कत्तल, इन्क्विझिशनचीं शहारा उठविणारीं कर्में, शिद्दी गुलामांचा व्यापार, इत्यादि थोडीं का कर्में कुशाग्र सद्वृत्तीच्या माणसास उद्वेग करणारीं आहेत ? हीं उदाहरणें पुढें केल्यावर टिळक काय उत्तर देतील ?

१०. "ब्राह्मण आणि महार" या काव्यांत गुणकर्मांवरून मनुष्याची योग्यता ठरते, जन्मावरून ठरत नाहीं, असें ह्मटलें आहे. हें ध्येय वरील ध्येयांतच अंतर्गत होतें.

११. टिळक यांचें निःसीम प्रेम सृष्टीच्या बहुरूप व्यापारांवर, तिच्या गिरींवर, नद्यांवर, विशेषतः फुलांवर, आहे. चिखलांत फूल जन्म घेतें, ही गोष्ट टिळकांना फार वेधली. खिस्ताचे उद्गार कीं "मी आजाऱ्यांना बरें करायाला आलों आहें, स्वस्थांना बरें करायाला आलों नाहीं," त्यांची आठवण होते. टिळकांना खिस्ताप्रमाणेंच मुलांची आवड फार–(सातव्या गुच्छांतील काव्यें पहा. पृष्ठ ११०–११५.) "लेंकराची जिज्ञासा" पुरविणारे किती आईबाप–नव्हे किती गुरु—हिंदुस्थानांत आहेत ? शिक्षकाचे गुण पुढील श्लोकांत दिले आहेत:—

> जरि असेल रसज्ञपणा पुरा
> जरि परोपकृतीच मनोहरा,
> जरि असे चतुरत्व, तरी मुला
> शिकविण्यास मछंद नसे भला.

हे उद्गार खऱ्या गुरूच्या तोंडांतूनच निघतील! शिकविण्याची हौस ही परोपकृतींत कदाचित् घालितां येईल. शिष्यावरील प्रेमास टिळक रसज्ञपणांत घालण्याला तयार आहेत काय ? अनुभव उलट पुरावा देईल. उत्तम प्रकृति असणें, हा गुरूचा अवश्य गुण, त्यास कोठें तरी स्थळ दिलें पाहिजे.

१२. टिळक संगीताचे चहाते, भोक्ते आहेत—पण त्यांना सात्त्विक संगीत पाहिजे. पक्ष्यांचें मधुर गाणें, आलाफ–प्रपातांचा मधुर रव, सरितांच्या लहरींचें लास्य–हीं त्यांना प्रिय आहेत. ज्याला फुलें आवडत नाहींत, संगीत समजत नाहीं किंवा आवडत नाहीं, तो जुन्या एका श्लोकाप्रमाणें 'मुक्तांत किंवा पशूंत' मोडिला जाईल. कवि माणसांतून प्रायः उठतो; पण त्याची फुलांवरील किंवा संगीतावरील भक्ति उडत नाहीं—उलट तीच सात्त्विक भक्ति ईश्वरभक्तींत परिणत होते. त्याप्रमाणें टिळकांची भक्ति ईश्वरभक्तींत परिणत झाली आहे. खिस्ती धर्मावरील पद्यांचा संग्रह निराळ्या खंडांत होणार आहे, तेव्हां या खंडांतील पद्यांत ती इतकी अभिव्यक्त नाहीं. रा० रा० केळकरांनीं टिळकांच्या या गोपनविधीचें अभिनंदन केलें आहे, तें टिळकांस मानवेल कीं नाहीं याचा संशय आहे. शिवाय हा गोपनविधी कोणाकरितां करायाचा ? खिस्ती लोकांकरितां अर्थात् नव्हे. मराठी जाणणाऱ्या हिंदु व मुसलमानांकरितां म्हणावा, तर रे० टिळक खिस्ती झाल्याला आज कितीक वर्षें झालीं ? तेव्हां

टिळकांची कविता वाचायाला जो घेईल, तो ख्रिस्तीमताचा निर्देश वाचण्यास तयार असलाच पाहिजे. या पन्नास वर्षांत भिन्न धर्ममतांविषयीं जी सहिष्णुता महाराष्ट्रांत वाढली आहे, ती सर्वांस भूषणावह आहे. व ती घडवून आणण्याचें श्रेय दोन्ही पक्षांस आहे. ख्रिस्तीधर्मोपदेशक हिंदुधर्माविषयीं पूर्वीप्रमाणें निरर्गल प्रलाप करीत नाहींत-हिंदु त्यांचा छळ करीत नाहींत. ख्रिस्तोपदेशक भगवद्गीता, उपनिषदें वाचतात. हिंदु The Holy Bible वाचतात. ख्रिस्तीलोक तुकारामादि साधुसंतांस मान देतात. हिंदु ख्रिस्त, सेंट पॉल यांस पूज्य समजतात,—त्यांचीं कांहीं मतें त्यांस संमत नसलीं तरी.

१३. ही पूर्वस्थिति कळल्यावर टिळकांची कविता महाराष्ट्रांत प्रिय कां झाली याचें कारण उमगेल. त्यांनीं हिंदुधर्माची कधीं नालस्ती केली नाहीं, ख्रिस्ताच्या कळपांत लोकांना ओढण्याकरितां विशेष प्रयत्न केलेसे मला ठाऊक नाहींत, व त्यांनीं गर्ह्य प्रयत्न केल्याची गोष्ट कधींच माझ्या कानावर आली नाहीं. त्यांचे मित्र हिंदूंत पुष्कळ आहेत. त्यांचे आप्तही पूर्वधर्मांत आहेत. मानवजातीवर ज्याचें निःसीम प्रेम, त्याचें हिंदूंवर व हिंदुस्थान जी त्याची जन्मभू तिजवर कां नसावें? 'प्रिय हिंदुस्ताना'वरील कविता (पृ० २२१) चेतनोद्दीपक आहेत. टिळकांना स्वातंत्र्य प्रिय आहे, पण तें स्वातंत्र्य ग्रेटब्रिटनच्याच तंत्रानें, त्याच्या अमलांत राजनिष्ठ राहून मिळायाचें आहे, एवढ्याकरितां ईश्वरी नेमानें हा योगायुग जुळून आला आहे, असें त्यांचें मत नेमस्त सुधारकांचे अग्रणी कै० न्यायमूर्ति रानडे यांच्या पक्षाच्या मताप्रमाणें आहे. लोकांना जागृत करण्याला टिळकांनीं रणशिंग फुंकिलें आहे. त्यांत (पृ० १९८) "मी परिस्थितीपेक्षां मोठा आहें! माझ्यापुढें काळाच्या, दैवाच्या, दुःखांच्या गमज्या चालणार नाहींत. हें नवयुग आलें—माझें मन प्रसन्न झालें. ह्मणून त्याचा मी जयजयकार करितों. हे राष्ट्रा! नव्या युगाचें नवेपण तूं हस्तगत करून घेशील, तर निपुणांनाही तूं जिंकशील—असें भाकित मी तुला वजावितों—" असे आशीर्वाद—आशावाद घुमविले आहेत.

१४. नवेपण मिळविण्याची साधनसंपत्ति—"मेलेले कोण" (पृ० २०९) "सदा तरुण" (पृ २१५) व मागील "खरे पुढारी," "सेवा," "लोकमित्र," "सहकारिता" (पृ० १८९-१९५) यांत सांगितली आहे. "सेवे" तील—

प्रेमविधी ईश्वर, ही जगती
सेवक यांचा, खरी त्रिमूर्ति!
इच्यापुढें मी दास नाचतों, वाजवुनी पांवा—
परहितसाधन अन्न गणीती,।
परहितचिंतन ही विश्रांति।
जन सेवक ते, अन्य धरीती चोर तयां नांवा—

यांत टिळकांच्या जीवितकर्तव्याचें, स्वभावाचें, मनोवृत्तींचें व मतांचें स्पष्ट प्रतिबिंब पडलें आहे, तेव्हां माझा लेख या वेच्यांचा अनुवाद समजावा.

१५. टिळकांच्या कवितेंतील प्रसादाचें व मनोवृत्तींच्या सहृदयत्वाचें विवरण रा. रा. केळकर यांनीं उत्तम प्रकारें केलें आहे. त्याबद्दल विशेष लिहावें असें वाटत नाहीं. रा. रा. केळकरांचें मत सर्वांस ग्राह्य होईल.

१६. टिळकांची प्रतिभा आतां परिणत झाली आहे, महाकाव्य करण्याची त्यांची तयारी पूर्ण झाली आहे, तेव्हां मिल्टन कवीप्रमाणें ते एखादें भक्तिरसप्रधान महाकाव्य रचण्यास आरंभ करितील काय? एखादें महाकाव्य त्यांच्या प्रासादिक वाणींतून निघालें म्हणजे आधुनिक कवींचे जे दोष रा० रा० केळकरांनीं दाखविले, त्यांस मग जागा राहणार नाहीं!

वि० मो० महाजनि.

१९१५ सालीं भरणाऱ्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनास संदेश.

'होळीच्या दिवसांत कां भरवितां साहित्य-संमलेन ?'
तुह्मां प्रश्न कुणी असा जर पुसे, सांगा तयालागुन—
गोष्टी कांहिं नरी गचाळ कविता होती प्रसिद्धा जरी
त्यांची रासहि पेटवूं जमवुनी, होळी करूं साजरी. १
शृंगारी प्रणयांत रंगुनि सदा ये वीट त्याचा पुरा
राष्ट्राचा नच वाङ्मयेंहि असल्या उद्धार होणें जरा;
या होळींतच आळसास अमुच्या फेंकोनि देऊं त्वरें
मात्सर्या विसरून युक्त करणी लागूं कराया बरें ! २
केल्यानें करणी जगीं नर बने प्रत्यक्ष नारायण !
कांहीं ना करितां परास हंसुनी लाभे कुणा कां धन?
मंत्राची अनुभूति घेउनि अम्हीं सेवूं स्वभाषेप्रत
वाढेना जल घालतां जगिं; अशी वेली कुणा माहित? ३
'सारें निर्मल पश्चिमेस'—असली बुद्धी धरोनी कुणी
पूर्वेच्या मुखमंडलास बघती त्यां ती दिसे डाकिणी !
सारासार विचार नीट करुनी सौंदर्य या, पारखा—
आहे तेथ, तसेंच देश अमुचा नाहीं तया पारखा ! ४
ये नेत्रांवर दीप्तिचें पटल जें काढून टाकूं तया
आहे आर्यपरंपरेंत भरला तो अर्थ जाणावया
धर्मांची धरुं कासही मग फिरूं सृष्टींत साऱ्या सुखें
जी जी सुंदरता दिसेल अपणा पाहूं तिला कौतुकें ! ५
देऊं हो निजवाङ्मया मुबकना ठेवून ऐशी मती
राष्ट्राला बल दे अशाच कविता, गाणें बरें संप्रती
राष्ट्रीयत्वनिदर्शकाच निपजो भाषेंत कादंबऱ्या
पाश्चात्त्या प्रणयी कथा निपजल्या आहेत त्या हो पुऱ्या ! ६
झाली वाङ्मयवृद्धि ही हळुहळू पर्वा धरीना कुणी
आठांची मधुबाळ गोड गमते वृद्धाहि कुब्जेहुनी !
वारा मंजुळ वाहतांच सुखवी, जाई करी तल्लिन,
गुंगे चित्त तसें सदा श्रवुनियां साधेंच संकीर्तन ! ७
'थंडीचे दिन संपले' वच वदे होळी अम्हांलागुन
'भाषादुर्दिन संपले' वच वदो साहित्यसंमेलन !
आहे दूर वसंतही तरि किती आनंद आशेमुळें
भाषागौरवकाल दूर दिसतां मच्चित्त वेडावलें ! ८

नारायण केशव बेहरे.

नवयुग.

—०—

[सहज एके दिवशीं कवि आपल्या चित्रकार मित्राकडे गेला होता. तेथें त्यानें ' नवयुग ' नांवाचें चित्र पाहिलें. त्या चित्रांत कोणी एक स्त्री एका उद्यानांत शिलातलावर बसून आपल्या बालिकेस लिहावयास शिकवीत आहे, असा देखावा होता. तो देखावा पाहून कवीनें पुढील उद्गार काढिले आहेत.]

श्लोक.

आला हा उदयाचलीं दिनकर, प्राशी तमोजीवन,
ध्वांतभ्रष्ट जगत् सुवर्ण-सलिल-स्नानें दिसे पावन;
हर्षोत्फुल्ल–सुमान्विता-तरुलता-सद्गंध मोही जनां,
सानंद द्विज-गान मंजु वितरी विश्रांतरा चेतना. १

मांगल्यैकनिधान या उपवनीं ही कोण दिव्यांगना–
बालाहस्त धरूनि तीस शिकवी शुद्धांतरें लेखना ?
गाढध्वांतरता स्वहिंद–दुहिता पाहोनि वाग्देवता,
ज्ञानी त्या बनवावया मज गमे आली असावी स्वतां ! २

विद्यादेवि ! तशाच आर्यदुहिता जात्या स्त्रिया कोमल,
सत्स्त्री कोण ह्मणेल जाति अपुली व्हावी सदा दुर्बल ?
कन्या सर्व भविष्य-राष्ट्रजननी, उत्कर्ष यत्तत्करीं;
ध्वांतीं त्या त्यजणें न इष्ट ह्मणुनी ये निम्न वाक्सुंदरी. ३

विद्या पूज्य, नर प्रशंसुनि तिला घेती करोनी वश,
राष्ट्रोत्कर्ष करी समस्त विषयां ती देउनि सद्यश;
नारी ही असुनी सदैव भुवनीं तल्लाभ व्हावा नरा,
तज्जाति-प्रसवा किमर्थ विमुखा ? हा न्याय नोहे बरा ! ४

शुद्धांतःकरणं जनीं विहरते अव्यंग वाक्सुंदरी,
द्यावा आर्यसुतां प्रसाद निज हें वाटे तदीयांतरीं;
तद्धेतू सकलां कळो ह्मणुनि तीं ' कन्येस सच्छिक्षण–
माता अर्पित ' चित्त हें नवयुगीं ठेवी स्वयें रेखुन; ५

कोणाचा करि नाल्प मत्सर कधीं, सर्वांस होते वश,
बुद्धि ज्ञान विवर्धुनी बहु कला-कार्यांत देते यश.
कर्तव्यक्षम आर्यदेहज कथा सांगोनि सर्वां जनां,
लोकीं संस्कृत त्यापरीस करि ही सप्रेम विद्यांगना; ६

ही सर्वोन्नति-हेतु, शुद्ध-हृदया, सद्बुद्धिदा देवता,
हीची ओळख द्या करूनि नर हो ! नारी-गणां तत्वतां;
स्वाणे त्या दिनरात्र कष्ट करुनी संसार हाकारिती,
तत्संगीं भवजाल कष्टकर तें भासेल ना त्यांप्रती; ७

नारी क्षुद्र न, तत्प्रभाव भुवनीं अत्यंत चेतोहर,
संसारा निजवर्तनें करितसे स्वर्गापरी सुंदर.
वैदेही रघुनंदना, द्रुपदजा धर्मार्जुना नंदद्‌ा
झाल्या पूर्ण वनीं, अशी कृति करी स्त्री ही हरी आपदा; ८
जात्या ही निरुपद्रवी, मृदुमना, प्रेमामृताचा झरा,
सर्वैश्वर्य-सुखैकमूल, जननी कर्तव्यदक्षांतरा.
बालां शिक्षक ती, सुबोध करुनी दावी तयां सत्पथ,
उत्कर्षा चढवी समस्त करुनी अज्ञानबंध श्लथ; ९
राष्ट्राचें सदसद् तिच्या जर करीं या तीस विद्यामृत-
तीच्यापासुनि नित्य या ' नवयुगीं ' लाभेल बालांप्रत,
बालें तींच सुविद्य होउनि पुढें होतील कर्ते नर,
उत्कृष्ट स्थिति केविं या ' नवयुगा ' येणार ना सत्वर ? १०

"आनंदीरमण."

बिचाऱ्या बहिष्कृत देशी भाषा !

देशीभाषांचा विश्वविद्यापीठाच्या अभ्यास-क्रमांत समावेश करण्याच्या संबंधाचा एक लहानसा लेख मीं गेल्या वर्षाच्या 'साहित्यपत्रिके'च्या एका अंकांत लिहिला होता. तत्संबंधानें कांहीं विचार होईल, अशी बरीचशी आशा वाटत होती, पण ती अगदींच फुकट गेली ! वार्षिक आढाव्यांत **रा० ब० महाजनि** यांनीं त्या लेखाचा थोडक्यांत उल्लेख केला आहे, इतकेंच. लौकरच साहित्यसंमेलन होणार आहे, त्याच्या कार्यक्रमांत या विषयाला स्थळ मिळेलसें वाटत होतें, पण तिकडूनही निराशाच झाली.* असा प्रकार पाहून, हा विषय केवळ टाकाऊ असून, मी उगाच याविषयीं वटवट करितों कीं काय, असें माझें मलाच वाटलें. परंतु **रा० ब० महाजनि** यांना तरी तसें वाटत नाहीं असें बघून, पुन्हां एकदां चार ओळी लिहिण्यास उत्तेजन आलें. गेलीं पांच वर्षें युनिव्हर्सिटीच्या परीक्षांच्या विषयांत सारखें परिवर्तन होत आहे. अगदीं अलीकडे दोन चार महिन्यांत सुद्धां कित्येक नवीन फेर-फार झाले. परंतु या विषयाचा विचार कोणाही मराठी किंवा गुजराथी विद्वान् फेलोच्या मनांत कसा येत नाहीं ? नुकताच फर्ग्युसन कॉलेजाच्या त्रैमासिकाचा अंक प्रसिद्ध झाला, त्यांत एका विद्वान् गृहस्थांनीं नवीन संस्कृत विद्याक्रम जो सुरू व्हावयाचें घाटत आहे, त्यांत कोणते कोणते विषय असावे, याची थोडी चर्चा केली

*निराशेचें कारण नाहीं. निबंधांसाठीं नेमिलेले विषय प्रसिद्ध झाले आहेतः चर्चेसाठीं आणि ठरावांसाठीं निराळेच विषय आहेत. ते योग्यवेळीं कार्यक्रमांत दाखल करण्यांत येतील. —संपादक.

आहे. या गृहस्थांनीं त्या विषयामध्यें संस्कृत भाषेबरोबर तुलनेच्या साठीं **जर्मन** भाषेचा अभ्यास घालण्याची शिफारस केली आहे, पण देशी भाषांचें नांव नाहीं ! तेव्हां आमच्या सुशिक्षितांना आपल्या देशीभाषा ह्मणून कांहीं वस्तु आहे हें देखील ठाऊक नाहीं कीं काय हरी जाणे ! परीक्षांच्या या नवीन घडामोडींत देशीभाषांचा थोडक्या वर्षांपूर्वीं नुकत्याच सुरू झालेल्या अभ्यासाची कशी वाताहत लागली, हें **रा० ब० महाजनि** यांनीं आपल्या लेखांत सांगितलेंच आहे. यंदां भरणाऱ्या साहित्यसंमेलनाच्या वेळीं ह्या विषयाला नुस्तें स्थानच नव्हे, तर मुख्य स्थान मिळावें, आणि मराठी व गुजराथी सभासद मंडळींना ह्या विषयाकडे आपण कां लक्ष देत नाहीं असें हटकून विचारावें, असें मी मुद्दाम सुचवितों. देशीभाषा विद्याक्रमांत घालावयास काय अडचणी येण्यासारख्या वाटत आहेत, आणि त्यांचें निराकरण कसें करावें, हें मीं मागील लेखांत सुचविलेंच आहे. तूर्ततूर्त बी. ए. च्या ऐच्छिक भाषाविषयांत देशी भाषांना स्थान मिळालें, तरी पुष्कळ मिळविली. या व्यवस्थेला वस्तुतः कोणाचा अडथळा येण्याचा संभव नाहीं. आणखी एका कारणासाठीं आपल्या युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत देशीभाषा पाहिजे आहेत. अलीकडे बऱ्याच महाराष्ट्र आणि गुजराथी विद्यार्थिनी कॉलेजामध्यें शिकत आहेत. त्यांची संख्या प्रतिवर्षीं वाढत आहे. स्त्रियांच्या उच्च शिक्षणास उत्तेजन यावयासाठीं त्यांचा अभ्यासक्रम थोडा तरी सुलभ होईल तर बरें. संस्कृत भाषा हा विषय कॉलेजामध्यें तरी मुलींना शिकावयास कठीण आहे. त्याबद्दल मुलींपुरत्या, ऐच्छिक पद्धतीनें, मराठी आणि गुजराथी भाषा नेमल्या, तर त्यांचेवर फार मोठे उपकार होतील. अशा तऱ्हेची व्यवस्था कलकत्ता युनिव्हर्सिटीमध्यें फार वर्षांपासून आहे, आणि तीपासून तिकडील विद्यार्थिनींना फार फायदा झाला आहे. आमच्या इकडल्या मुलींना असा फायदा करून घेण्याची गरज आहे, असें उघड दिसतें. कारण संस्कृत जड जातें, झेंपत नाहीं, म्हणून पुष्कळ मुली फ्रेंच घेतात. कांहींनीं पाली भाषा घेतल्याचें मला ठाऊक आहे. पुण्याच्या मुलींच्या हायस्कुलामध्यें तर कांहीं हिंदुमुलींनीं आपली स्वतांची संस्कृत भाषा कठीण ह्मणून ती टाकून हीब्रू भाषा घेतली आहे ! वास्तविक आमच्या मुलींना फ्रेंच, हीब्रू यांचा, आणि—आपली झाली तरी पालीचा—काय उपयोग ? तेव्हां कॉलेजांतून शिकूं इच्छिणाऱ्या मुलींसाठीं देशीभाषा घेतल्या तरी चालतील, अशी व्यवस्था अगदीं अवश्य व्हावयास हवी आहे. अजून तरी आमच्या मराठी आणि गुजराथी फेलो मंडळींचें इकडे लक्ष जाईल, अशी मी आशा करितों. हा विषय विचार करण्यासारखा नाहीं, अगदीं टाकाऊ आहे, असें जरी या मंडळींपैकीं कोणी ठरवून टाकील, तरी बरें होईल. मग पुनःपुन्हां याची चर्चाच नको !

रा. भि. जोशी.

पूर्व–कविप्रशस्ति.

[**श्री सयाजीनंदलहरी** अथवा **मराठीभाषेचा महिमा** ह्मणून एक सुंदर लघुकाव्य रा. रा. रामराव मार्तंड भांबुरकर, बडोदें, यांनीं प्रसिद्ध केलें आहे. (किं. २ आणे.) त्यांतील पुढील आर्यांमध्यें महाराष्ट्रीय जुन्या कर्त्रींची प्रशंसा थोडक्यांत सुरेख साधली आहे.]

द्रव्याचा-कीर्तीचा आशालेशहि कवी न बाळगिती ।
प्राकृतजन ताराया बोधप्रद सुरस काव्य ते रचिती. १

आद्यमुकवि राष्ट्राचा मुकुंद अर्पी सुकाव्य शिष्याला ।
नामें विवेकसिंधू, पठतां जें परम बोध मनुजाला. २

[1]बल्लाळजाधवात्मज स्वधर्मतत्पर जयंतपाळातें ।
ज्ञानोपदेशयोगें [2]मुकुंद गुरुशिष्य हें जडवि नातें. ३

परमामृत हा दुसरा ग्रंथ सुगम ज्यांत निगममायेचें ।
जीवात्माऐक्याचें वेदांचें पूर्ण कथन मुक्तीचें. ४

मुकुंदकविकृत पद्यें सुलभार्थी पदरहस्य उमजावें ।
'[3]मी सासुऱ्यां [4]उबगलें मज [5]माहेरा अहो तुह्मी न्यावें.'

रामानंदी [6]विठ्ठल तत्सुत हे ज्ञानदेव दिव्य कवि ।
तद्गुरु निवृत्तिनाथें[7] केलें त्या मग्न अमृतानुभवीं.[8] ६

श्रीज्ञानदेव कवि हे स्वराष्ट्र–भाषाग्रणी वरदमूर्ती ।
कीर्ती सोज्वल ज्याची वाणी पठतां सदा चढे स्फूर्ती. ७

एकोनविंशती[9] वय अल्प असुनि वाक्प्रभुत्व गाजविलें।
प्राकृतगीताबोधें[10] कविनें अजरामरत्व मेळविलें. ८

निजराष्ट्रवाङ्मयावरि[11] उत्तम संस्कार पुण्यवाणीचा ।
झाला प्रसाद कविचा महिमा गाती अगाध करणीचा. ९

१ बल्लाळजाधवानें शके १११४ मध्यें देवगडास गादी स्थापिली. २ मुकुंदराय यांनीं शके ११३३ मध्यें जयंतपाळास ज्ञानाचा उपदेश केला. ३ मुकुंदरायांच्या साध्या कवितेचें उदाहरण. ४ त्रिविधतापयुक्त प्रपंचरूपी सासरला कंटाळलें, गांजलें. ५ मुक्तीचें धाम. ६ विठ्ठलपंत हे रामानंदाचे शिष्य व ज्ञानदेवाचे वडील. ७ ज्ञानोबाचे वडील बंधु व गुरु. ८ अमृतानुभव नांवाचा वेदांतपर ग्रंथ. ९ ज्ञानोबा हे शके ११९३ मध्यें जन्मले व शके १२१२ मध्यें त्यांनीं ज्ञानेश्वरी संपूर्ण केली; त्यावेळीं त्यांचें वय अवघें १९ वर्षांचें होतें. १० ज्ञानेश्वरी. ११ महाराष्ट्र वाङ्मयावर.

श्रीमद्भगवद्गीता साक्षात्संस्कृतसरस्वती जननी ।
ज्ञानरहस्यें मंडित करिते निष्कामकर्मबोध जनीं. १०

श्रीज्ञानदेवगीता ब्रह्मानंदप्रबोधिनी टीका ।
परमामृतसुखवटिका भवभयपीडानिवारिणी गुटिका.

ज्ञानेश्वरी सुधा हें आदिस्थान स्वराष्ट्रभाषेचें ।
विद्यापीठीं भूषण साधन सायुज्य परममुक्तीचें. १२

ज्ञानेश्वरी त्रिपथगा[1] कर्मानुसरण–उपासना–ज्ञानें ।
ज्ञानार्णवीं जनातें नेई करिते विमुक्त विज्ञानें. १३

परिपालनें प्रजांच्या परमपदा जेंवि पावती नृपती ।
भावार्थदीपिकेनें[2] सकलां मिळते अखंड सुखशांती. १४

चोखामेळा अंत्यज, नरहरि सोनार, सांवता माळी, ।
श्रीनामदेव शिंपी, गोरा कुंभार सर्व समकाली. १५

श्रीचांगदेव मुक्ता, धन्य जनी, रोहिदास, भक्तवर ।
सोपान, बोधला, हे जगदुद्धारार्थ सर्व वाग्वीर. १६

ब्राह्मण अंत्यज सर्वहि गीतापठनीं कुणी न भेद धरी।
गीताब्दनादतोषें[3] द्विजें[4] निजकृति[5] रम्य मग मयूर[6] करी.

लंकापुरींत शोधी आणी लिपि मोडि आणि शिल्पकला।
हेमाद्रिकोशकर्ता लेखक हेमाडपंत कुशल भला. १८

भजनललितहरिकीर्तन [7]अभंग शतकोटि नामदेव करी
पद्यसमुच्चय अल्पचि उरला हें तरि सुदैव कीं भारी. १९

परमज्ञानविरक्ता मुक्ता ती चांगदेव भक्तातें ।
बोधीः-"मुक्तिस्तव धरिं सद्गुरुच्या त्या पवित्र कास्मेतें."

१ गंगा. २ ज्ञानेश्वरी. ३ गीतारूप मेघाच्या नादाच्या आनंदानें. ४ पक्षी, अथवा ब्राम्हण. ५ आपली पिसाऱ्याची कृति, अथवा ग्रंथ. ६ मोर, अथवा मोरोपंत. ७ लिहित करण्याचा प्रघात नामदेवाच्या वेळीं पडला. ८ काळाच्या तडाक्यांतून कांहीं अभंग टिकले हें आपलें सुदैवच म्हणावयाचें !

ज्ञानेश्वरी विवेचन-धर्मोन्नति भक्त एकनाथ करी ।
अद्वैताची महती वाढवि विभ्रम सदैव सर्व हरी. २१
भागवताचें केलें वेषांतर सुरस एकनाथानें ।
वेदवचन तुकयानें छळिलें ज्या व्यर्थ निंद्य कुजनानें.२२
कविवर समर्थ सद्गुरु बोध करी शिवनृपा सुनीतीचा।
ज्ञानबळानें देई प्रसाद सकलांस दासबोधाचा. २३
स्वार्थत्यागी सज्जन परोपकारार्थ देह झिजवीती ।
वंद्या अथवा निंदा, नेटानें इष्ट निज सफल करिती.२४
प्राकृत भारतवर्णन पदलालित्यें सुबोध कवनानें ।
प्रेमें मुक्तेश्वर करि श्रीधरही पांडवप्रतापानें. २५
सुश्लोकें ज्ञानांजन [1]जनरंजनें [2]वामनें सुरस केलें।
प्रेमळ महीपतीनें संतांचे भक्तिभाव वाढविले. २६
रसभरित करुणरसयुत पोवाडे त्या [3]प्रभाकरें रचिले।
कर्णमधुरहृदयंगम कटावपटु अमृतराय कवि झाले.२७

१ यथार्थदीपिका नांवाच्या ग्रंथानें. २ भामाविलास वगैरे प्रकरणांनीं. ३ प्रभाकर दातार हा पोवाडे करणाऱ्या सर्व कवींत अग्रणी होता(शके १८९१-१७६५).

स्वापत्यां शिकवावें पतिव्रता सत्कुलीन युवतीनें ।
कवितेनें स्वगुणानें बोधावें जन सदा सुनीतीनें. २८
ज्ञानेश्वरादि अस्तंगत होतां [1]वाग्रवीहि मावळले।
योद्धे महारथी ते शूर तसे वीर शीघ्र कीं लपले. २९
श्रीमंत [2]पेशवे जे गतवैभव सुखविलासरत झाले ।
होनाजि रामजोशी डफतुंतुणिं रसिकरंजनीं रमले.३०
ईश्वरभक्तीवांचुनि मुक्ति न मिळते जशी मुमुक्षूला।
भाषाभिवृद्धिविरहित उन्नतिची आस फुकट मनुजाला.
कविवर चॉसर पोपहि[3] तैसे हे राष्ट्रवाङ्मयेंद्र कवी
श्रीज्ञानदेव पंतहि[4]समर्थवाग्यश[5] दिगंत चिर मिरवी.

१ सूर्याप्रमाणें तेजस्वी वाक्पति. २ पेशवाईच्या उत्तरार्धांत क्षुद्र विकारांनीं जसें क्षात्रतेज मंदावलें तसें लावण्या—तमाशांत गर्क झालेलें ब्रम्हतेजही मळलें. ३ आङ्ग्ल भाषेचे विख्यात कवि. ४ मोरोपंताच्या वेळीं पुष्कळ कवि झाले. पण त्यांच्या एकट्यांच्या वाणीचा मराठी भाषेवर पुष्कळ संस्कार झाला. ५ श्रीसमर्थ रामदास यांच्या प्रसादवाणीचा राजकीय व सामाजिक परिस्थितीवर अत्यंत परिणाम झाला.

विनंतीपत्र.

आठवें महाराष्ट्र-साहित्यसंमेलन.

[वेळ बदलली.]

हें संमेलन मुंबईत फेब्रुवारीअखेर शिमग्याच्या सुट्टींत भरण्याचें ठरून त्याप्रमाणें जाहिर करण्यांतही आलें. परंतु बऱ्याच ठिकाणीं-विशेषतः नागपुर वऱ्हाडप्रांतीं—शिमग्याची फक्त एक दिवसच रजा असल्यामुळें,ही वेळा संमेलनास हजर राहूं इच्छिणारांस सोईची पडणार नाहीं, म्हणून संमेलन मे महिन्यांत भरवावें , अशा पुष्कळशा सूचना खासगी आणि वर्तमानपत्रांतून आल्या. त्यांचा विचार करून परिषदेच्या कार्यकारी मंडळानें संमेलन मे महिन्याचे सुट्टींत भरविण्याचें मुक्रर केलें आहे. नक्की दिवस संमेलनाची स्वागत कमेटी ठरवील आणि मागाहून प्रसिद्ध करील.

संमेलनांत निबंधांसाठीं नेमिलेले विषय लेखकवर्गास पत्रद्वारें आणि वर्तमानपत्रांतून कळविण्यांत आले आहेत. ज्या कोणास कळले नसतील त्यांनीं ते चिटणिसांस लिहून मागवावे.

ज्यांनीं संमेलनासाठीं निबंध लिहिण्याचें कबूल केलें आहे, आणि ज्यांना यानंतर लिहिण्याची इच्छा होईल, त्यांनीं अगाऊ कळवून निबंध मार्चअखेर खालील पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

८१, फणसवाडी, काळबादेवी पोस्ट,
मुंबई, ता. १५ फेब्रुवारी १९१५.

रामकृष्ण र. मोरमकर,
वासुदेव गो. आपटे,
चिटणीस, म. सा. परिषद.

रासायनिक परिभाषा.

[१.]

Absorb शोषणें.
Absorbent शोषक.
Absorption शोषण.
Absorptimeter शोषणमापक.
Acid अम्ल.
Acidification अम्लीकरण; अम्लीभवन.
Acidify अम्लयुक्त करणें.
Acidimeter अम्लमापक.
Acidimetry अम्लमापन.
Acidity अम्लत्व.
Acidulate अम्लयुक्त करणें.
Acrid कडु; उग्र; झोंबणारा.
Act -ची क्रिया होणें.
Action परिणाम; क्रिया.
Adapter संयोजक.
Affinity आवड; प्रीति.
Agent क्रिया घडवून आणणारा.
Alchemy किमिया.
Alchemist किमियागार.
Alcohol मद्यसार.
Alcoholisation मद्यसारसंयोजन.
Alcoholometer मद्यसारमापक.
Alkali आल्केली.
,,—fixed दृढ आल्केली.
,,—vegetable उद्भिज आल्केली.
,,—volatile चपल आल्केली.
Alltrope दुसरें रूप.
Alltroism } बहुरूपत्व.
Alltropy }
Alloy मिश्रधातु; २, धातूंशीं मिश्र करणें.
Amalgam पारदमेल.
Amorphous अनियताकृति.
Analysis पृथक्करण.
Anhydride निरुदक n.
Anhydrous निर्जल.
Animal charcoal हाडांचा कोळसा.
Anion ऋण अतिपरमाणु.
Antichlor हरिननाशक.
Apparatus उपकरणें.
Aqua Fortis तीव्रजल; नत्रिकाम्ल.
Aqua Regia जलराज.
Aqueous पाण्यांत केलेला.
Aspirator वायुकर्षक n.
Assay परीक्षा.
Atmolysis वायुविश्लेषण.
Atom परमाणु.
Atomic heat परमाणु-ताप.
— Theory परमाणुवाद.
— weight परमाणु-गुरुत्व.
Base भस्म.
Basicity भास्मिकता.
Basin वाटी.
Beaker पंचपात्र.
Bell—jar हंडी.
Bell—metal कांसें.
Bi-basic द्वैभास्मिक.
Binary द्विमूलक; दोन मूलतत्त्वें मिळून झालेला.
Bitumen शिलाजतु.
Blast furnace वाऱ्याची भट्टी.
Bleaching विरंजन.
— powder विरंजन चूर्ण.
Blowpipe फुंकनळी.
Bone-black हाडांचा कोळसा.
Borax साहागा; सवागी.
Bronze कांसें.
Burettle अंशांकित नळी.
Cast-iron ओतीव लोखंड; बीड.
Catalysis योगवाही क्रिया.
Catalytic योगवाहक.
Cation धन अतिपरमाणु.
Caustic दाहक.

Chemical affinity रासायनिक प्रीति.
„ change रासायनिक परिमाण.
„ Combination रासायनिक संयोग.
Chemical compound (रासायनिक) संयुक्त पदार्थ.
„ equation „ समीकरण.
„ formula रूपलिपि; सारणी.
„ Symbol चिन्ह.
Cinnahar रससिंदूर.
Coal दगडी कोळसा.
Colloid निराकृत्ति; अनियमिताकृति.
Combination by volume-Law of } आकारमान-संयोगाचा नियम.
Combustion ज्वलनक्रिया.
Componnd salts मिश्र क्षार.
Concentrated निविष्ट.
Concentration निवेशन.
Condensation सांद्रीकरण; सांद्रीभवन.
Condenser शीतक.
Constituent घटक; घटकावयव.
Conservation अविनाशित्व.
Constant proption —Law of } नियत प्रमाणाचा नियम.
Constant comqosition —Law of } नियत घटनेचा नियम.
Crucible मूस.
Crystal स्फटिक.
Crystalline रवेदार; स्फटिकाकृति.
Crystallisation स्फटिकीकरण; स्फटिकीभवन.
Crystalloid स्फटिकाकृति.
Cylinder वायुपात्र.
Decant नितारणें, नियळणें.
Decomposition पृथग्भवन, विगटन.
Decripitation तडतडणें.
Deflagrating spoon दाहनी.
Dehydrate पाणी काढून टाकणें.
Dehydrated विजल.
Debydrogenate निरुज्ज करणें.
Deliquesce पाणी शोषून घेणें.
Dessicator जलशोषक.
Dibasic द्वैभास्मिक.
Diffusion संप्रसारण.
Dialysis द्विविश्लेषण.
Diluent विलयन.
Dilute विलीन; जलमिश्रित.
Dimorphous द्विरूपी.
Dissociation विघटन.
Distiliation ऊर्ध्वपातन.
Divabut द्विशक्तिक.
Efflorscence प्रस्फोटन.
Efflorescent प्रस्फोटनशील.
Elective affinity संयोगप्रीति.
Electrolysis वैद्युत पृथक्करण.
Electrolyte वैद्युत पृथक्करणयोग्य पदार्थ.
Element मूल तत्त्व.
Empyreal air अग्निवायु. हें नांव शील साहेबानें प्राणवायूस दिलें होतें.
Emulsion अवलेह.
Enamel मिना.
Equivalence तुल्यशक्तिकता.
Equivalent तुल्यशक्तिक.
Endiometer वायुमापक.
Fermentation विपाक; अंबवणें; आंबणें.
Filings कीस.
Filter गाळणें.
Filtrate गाळलेला द्रव.
Fire-damp दलदल्या वायु.
Flask चंबू.
Flux द्रावक.
Formula रूपलिपि; सारणी.
„ Empirical सरल सारणी.
„ Graphic घटनादर्शक सारणी.
Formula Molecular अणुसारणी.
Fractional भागिक.
Funnel गाळणी, कुपेरें.
Furnace भट्टी.

Galvanized जस्त चढविलेलें.
Graduated अंशांकित.
Granular दाणेदार.
Granulated चुरा केलेलें.
Gravimetric भारविशिष्ट.
Halogen लवणजन.
Haloid लवण-जनोत्पादित.
Hard कठिन.
Heptad } सप्तशक्तिक.
Heptuvalent }
Hexad } षट्च्छक्तिक.
Hexvalent }
Homologous समश्रेणिक; समपद.
,, Series समपदांतर श्रेणि.
Homology समश्रेणिकता.
Hydracid उज्जनाम्ल.
Hygroscopic जलशोषक.
Hypothesis उपन्यास.
Incrustation पुट.
Innert उदासीन.
Inter-atomic परमाण्वान्तरिक.
,, Molecular अण्वान्तरिक.
Ions अतिपरमाणु.
Isinglass सरस.
Isomeric समघटक; समावयव.
Isomerism समघटकत्व, समावयवत्व.
Isomorphous समाकृति.
Jasper सुर्यकान्त.
Lime-water चुन्याची निवळी.
Litharge मुर्दाड शिंग.
Lunar caustic सौम्य दाहक.
Marsh gas दलदल्या वायु.
Mechanical Mixture मिश्रण.
Mica अभ्रक.
Micro-organisms सूक्ष्म जंतु.
Molecule अणु.
Molecular weight अणुगुरुत्व.
Monatomic एक-परमाणुक.
Mordant दंशक (पकडणारा-पक्का करणारा.)
Multiple proportion } गुणघठनेचा
-Law of } नियम.
Neutral उदासीन.
Neutralize निर्वीर्य करणें.
Nitre सोरा; यवक्षार.
Non-metal अधातु.
Occlasion आशोषण.
Oxiclution प्राणीकरण.
Pneumatic trough वायुकोशक.
Precipitate सांका.
Proportion—constant नियत प्रमाण.
,, Multiple गुणक प्रमाण.
,, Reciprocal परस्पर प्रमाण.
Qualitative analysis गुणविश्लेषण.
Quantitative ,, भारविश्लेषण.
Radicle मूलक; समूह.
Re-action क्रिया.
Red lead शेंदूर.
Reduction हरण-क्रिया.
Retort भभका; बकयन्त्र; सरपोस.
Sal-ammoniac नवसागर.
Salt क्षार.
Salt—acid साम्लक्षार; अम्लगुण क्षार.
,,—basic सभस्म क्षार.
,,—normal पुर्ण क्षार.
,,—neutral निर्वीर्य क्षार.
Salt—petre सोरा.
Saturated संतृप्त.
Silica वाळू.
Smelting रस करणें.
Soap—stone शंखजिरें.
Solder डांक; डांक करणें.
Solubility द्राव्यता.
Soluble द्राव्य.
Solute द्राव्य पदार्थ.
Solution द्रव.
Solvent द्रावक.

Spatula विलेपनी.
Stand आलंब.
Starch पिष्ट.
Strong acid जालीम अम्ल.
Symbol चिन्ह.
Synthesis संश्लेषण.
Test-tube नलिका.
Tripod stand तिवई; तिपायी.
Trough पाण्याची दोण; कुंडी.
Ultimate Analysis पूर्ण विश्लेषण.
Unstable अस्थिर.
Valency शक्ति.
Volatile चपल.
Voltameter वैद्युत-विश्लेषक.
Volumetric analysis राशिसंश्लेषण.
White lead सफेदा.
Wrought iron लोखंड.

[2]

Acetum सिरका.
Acetylene दारिलीन.
Alum-ammonia अमोनियाची तुरटी.
Aluminate स्फटित.
Aluminite स्फटायित.
Aluminium स्फट.
Alum-stone खानिज तुरटी.
Ammonia अमेनिया.
Antimony अंजन.
Argon आर्गन.
Arge itiferrous रौप्ययुक्त.
Arsenate तालित.
Arsenic ताल.
,, acid तालिक अम्ल.
Arsenious तालस अम्ल.
Arsenite तालायित.
Arseniuretted Hydrogen } तालसंयुक्त उज्जन.
Barium बेरियम.
Beryllium विदुर.
Bi-carbonate अपूर्ण-(अल्प) कर्बोनित.
Bismuth बिस्मथ.
Boric acid टंकिक अम्ल.
Boron टंक.
Bromic acid ब्रमिक अम्ल.
Bromine ब्रम.
Cadmium कादमियम.
Cæsium सीजियम.
Calcination भस्मीकरण.
Calcium खटिक.
Carbamic acid कर्बमिक अम्ल.
Carbamide कर्बमिद.
Carbon कर्बन.
Carburetted कर्बयुक्त.
Cerium सिरियम.
Chlorate हरित.
Chloric acid हरिक अम्ल.
Chlorine हरिन.
Chloriodide हरिनैलिद.
Chlorosulphonic acid हरिगन्धनाम्ल.
Chromate क्रोमित.
Chromium क्रोम.
Chrome-alum क्रोमची तुरटी.
Cobult कोबल्ट.
Copper ताम्र.
Copper Sulphate मोरचूद.
Corrosive Sublimate रसपुष्प, पारदपरिहरित.
Didymium डिडीमियम.
Di-oxide द्वि प्राणिद.
Di-Sulphide द्विगंधिद.
Di—thionic acid द्विगन्धकाणुकाम्ल.
Erbium ऐर्बयम.
Ferrate लोहित.
Fluo—borate प्लव टंकित.
Fluoride प्लविद.
Fluorine प्लव.
Fluor—phosphorus acid प्लव स्फुरस अम्ल.
Gallium गालियम.
Germanium जर्मानियम.

[अपूर्ण.]

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका.

वर्ष २.] [अंक ३-४.

आंध्रांमध्यें गीर्वाणविषयक जागृति.

[डॉ० श्रीधर व्यंकटेश केतकर. Ph. D.]

आंध्र उर्फ तेलगू लोक आपल्यामागें फार आहेत असा आपला समज आहे. कांहीं अंशीं तो समज खरा देखील आहे. तथापि गेल्या दशकांत त्यांच्यामध्यें जी एक विलक्षण जागृति झाली आहे तिची कल्पना देखील आपणांस नसेल. त्या जागृतीचें स्वरूप अंशत: तरी महाराष्ट्रीयांच्या नजरेस यावें या हेतूनें हा लेख लिहीत आहें.

आंध्रांमध्यें जी राष्ट्रीयजागृति झाली तिला कांहीं अंशीं इतर भाग कारणीभूत आहेत. उदाहरणार्थ, आंध्रांमधील कित्येक प्रमुख लेखक महाराष्ट्रीय अगर निदान महाराष्ट्रभाषाभिज्ञ आहेत. शिवाय स्वदेशी चळवळीच्या प्रसंगीं बिपिनचंद्र पाल यांनीं ज्यावेळेस व्याख्यानें द्यावयास सुरवात केली त्यावेळेस त्यांच्या व्याख्यानांचा आंध्र तरुणांच्या मनावर सुपरिणाम झाला. स्वदेशी चळवळीच्या वेळीं जी ज्योत पेटली गेली ती अजून तितकी उज्ज्वलित नसली तरी अधिक कार्यकारी आहे. स्वदेशी चळवळ ही चंद्रजोतीप्रमाणें स्वदेशाभिमाचा एकदम मोठा प्रकाश पाडून विझून गेली. सध्यांचा आंध्रांचा स्वदेशाभिमान सतत कार्य करणाऱ्या मंदाग्नीप्रमाणें आहे.

सध्यां आंध्रांमध्यें जी राष्ट्रीय जागृति दिसून येत आहे ती सर्वांगी आहे.

राजकीय बाबतींत तरुण आंध्रांची वृत्ति राष्ट्रीयपक्षास अधिक अनुकूल प्रकारची आहे. गेल्या मद्रासच्या कांग्रेसमध्यें दोन्ही पक्षांमध्यें समेट होऊन कांग्रेसनें देशकार्यास लागावें या बुद्धीनें, आणि आपल्या विचाराचें कांग्रेसवर वजन पाडण्याच्या इच्छेनें, ते मद्रासेस आले होते, व त्यांच्या इच्छेस फल आलें नाहीं म्हणून स्वाभाविकच त्यांस वाईट वाटलें.

औद्योगिक बाबतींत आंध्रांची चळवळ अजून चालू आहे. स्वदेशी चळवळीच्या प्रसंगीं राष्ट्रीय पद्धतीनें शिक्षण देण्याकरितां त्यांनीं मच्छलीपट्टण येथें शाळा सुरू केली. ती शाळा अजून चालू आहे, व तिच्यांत भाषाविषयक शिक्षण आणि औद्योगिक शिक्षण दोन्ही देत असतात. आज त्या शाळेंत सुमारें दोनशें विद्यार्थी शिकत आहेत.

वाङ्मयासारखें राष्ट्रवृद्धीस अत्यंत महत्त्वाचें करण आंध्रांनीं उपेक्षिलेलें नाहीं. याबाबतींत त्यांचे प्रयत्न फारच निकराचे होत आहेत. त्यांचा कांहीं वृत्तांत या लेखांत देण्याचा इरादा आहे.

वाङ्मय सुधारावयाचें, तें अधिक धनाढ्य करावयाचें, एवढेंच केवळ नाहीं, तर, ज्या भाषेंत वाङ्मय निर्माण करावयाचें ती भाषाच सुधारणें शक्य आहे किंवा नाहीं या प्रश्नाकडे देखील त्यांचे लक्ष वेधलें आहे.

या सर्व गोष्टींपेक्षां एक अत्यंत महत्त्वाची चळवळ आंध्रांनीं अंगीकारिली आहे. आणि ती चळवळ म्हटली म्हणजे "आंध्र मूव्हमेंट" होय. या चळवळीचा उद्देश तेलगूभाषा बोलणाऱ्या लोकांचा निराळा प्रांत व्हावा आणि तेलगूभाषेंतून उच्च तऱ्हेचें शिक्षण देण्यांत यावें हा आहे. "आंध्र" हा निराळा प्रांत व्हावा यासाठीं लोकमतामध्यें जागृति अधिक करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. सध्यां तामिळ लोक या सर्व प्रयत्नांच्या विरुद्ध आहेत. महाराष्ट्रांतील जुन्या मृतकल्प पिढीस तरी भाषानुसार देशाचे विभाग पाडावेत या कल्पनेचें महत्त्व कोठें कळत आहे?

"आंध्रोद्यमनु" ऊर्फ "आन्ध्र मूव्हमेंट"चा व्यक्त हेतु कांहीं आंध्र हा स्वतंत्र राजकीय विभाग करावा असा नाहीं. त्यांचा व्यक्त उद्देश आन्ध्रांचें हितसंवर्धन करावें एवढाच आहे. तथापि ही चळवळ करणारांमध्यें आंध्र हें स्वतंत्र राष्ट्रक बनवावें आणि आन्ध्र भाषेस उन्नतीस आणावें ही कल्पना त्यांच्या हृदयाशीं आहे.

आतां आंध्रांच्या स्वगीर्वाणोत्कर्षासाठीं काय काय प्रयत्न चालले आहेत तिकडे वळूं.

तेलगु गद्यलेखकांचा अग्रणी म्हटला म्हणजे राजमहेंद्रीचा **वीरेश लिंगम् पंतलु** होय. हे गृहस्थ तेलगु पंडित म्हणून प्रख्यात आहेत, आणि या गृहस्थाइतका प्रचंड तेलगु लेखक सर्व आंध्र देशांत नाहीं. यांनीं लहान लहान प्रहसनें तर अगणित लिहिलीं आहेत. वीरेशलिंगम् हे मूळचे लिंगायत होते आणि नंतर ब्राह्मो बनले. येथील सुधारणपक्षाचे देखील हेच अग्रणी आणि वादविवादांतील लढवय्ये होत. स्त्रियांमध्यें वाचनाचा प्रसार करण्यासाठीं यांनीं तर अविश्रांत श्रम केले आहेत. यांचें एक सविस्तर आत्मचरित्र 'विज्ञानचंद्रिका मंडळी' लवकरच छापून प्रसिद्ध करणार आहे.

तेलगु भाषेंत एकच दैनिक आहे. तें आंध्रपत्रिका होय. हें मद्रास येथें निघतें.

तेलगु साप्ताहिकें बरींच आहेत. त्यांत मच्छलीपट्टण येथील "कृष्णा पत्रिका" हें अत्यंत महत्त्वाचें होय. तेलगु भाषेंत राजकीय विषयांवर अनेक प्रकारचे लेख लिहून या पत्रानें तेलगू भाषा ही राजकीय प्रश्नांवर वादविवाद करण्याची भाषा बनविली, असें त्या पत्राच्या चहात्यांचें म्हणणें आहे.

तेलगू भाषेंतील प्रमुख मासिक म्हटलें म्हणजे मच्छलीपट्टण येथील 'आंध्रभारती' हें होय.

तेलगु संपादकवर्गामध्यें स्त्रियाही आहेत. त्यांनीं दोन तेलगु मासिकें चालविलीं आहेत. कोकोनाडा येथें प्रसिद्ध होणाऱ्या दोन मासिकांच्या संपादिका दोघी ब्राह्मण स्त्रिया आहेत. "हिंदुसुंदरी" हें मासिक श्रीमती बालांत्रपु शेषम्मा ह्या चालवितात. "सावित्री" या मासिकाच्या संपादिकेचें नांव काळजीपूर्वक वाचा. तें पुलुगुर्ती लक्ष्मीनर सिमांबा असें आहे.

तेलगू आणि द्रविड देशांत धंदेवाल्या नाटककंपन्या नाहींत. कांहीं घटकाभर करम-

गूक म्हणून नट बनणाऱ्या अम्याचुअर्सच्या 'सभा' आहेत. त्यांत बल्लारीची 'सरसविनोदिनी सभा' आणि मद्रासची ' सुगुणविलास सभा ' या प्रख्यात आहेत. 'सरसविनोदिनी सभे'चे अध्यक्ष रावबहादूर गौड नावांचे महाराष्ट्रीय गृहस्थ आहेत. या सभेच्या चालकांस चांगलें नाटक करण्यांत 'महाराष्ट्रा'च्याही पुढें जाण्याची आकांक्षा आहे.

खासगी सभांकडून थोडेंबहुत नवीन नाटक-रचनेस उत्तेजन दिलें जातें.

तेलगू गीर्वाणाच्या उन्नतीसाठीं अनेक संस्था निघाल्या आहेत, त्यांत 'विज्ञान—चंद्रिका मंडळी' आणि 'आन्ध्र साहित्य परिषद्' या प्रमुख होत.

विज्ञानचंद्रिका मंडळी.

(The Telugu Athenaeum.)

ही संस्था पांच माणसांनीं १९०६ सालीं गंतुर येथें एकत्र जमून उत्पन्न केली. या संस्थेचा उद्देश पाश्चात्य ज्ञान देशी भाषेतून स्वजनांत पसरवावें हा होता. या संस्थेनें पहिल्या प्रथम अब्राहाम लिंकन याचें चरित्र प्रसिद्ध केलें. या संस्थेच्या उत्पादकांस आपण कोणत्या मोठ्या कार्यास प्रारंभ करीत आहों याची कल्पनाही नव्हती. अजमासापेक्षां अधिक यश कधीं कधीं येत असतें त्याचें हें एक उदाहरण आहे.

ह्या संस्थेचें मुख्य कार्यालय पहिलीं दोन वर्षे हैदराबाद येथें तेथील कैलासवासी मनसबदार आर. व्ही. रंगराव यांच्या घरीं होतें. १९०८ सालीं तें मद्रास येथें आलें आणि मद्रास येथें डा० लक्ष्मीपति चिंताद्रिपेंठ यांच्या कार्यकारित्वाखालीं ही संस्था चालू आहे.

या संस्थेनें आजपर्यंत तेत्रीस पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्यांपैकीं बारा शास्त्रीय विषयांवर आहेत, पांच ऐतिहासिक आहेत, चार चरित्रविषयक आहेत,आणि दोन ऐतिहासिक कादंबऱ्या आहेत. या संस्थेचे संपादक राजमान्य राजश्री के. व्ही. लक्ष्मणराव यांचें शिक्षण नागपूर येथें झालें. पूर्वी हे मराठींत लिहीत असत. आतां त्यांनीं स्वभाषेत ग्रंथरचनेस सुरवात केली आहे, आणि महाराष्ट्राचा इतिहास आणि महाराष्ट्रीय कल्पना यांचा प्रसार करण्यांत बराच पुढाकार घेतला आहे.

या मंडळीच्या ग्रंथांचा प्रसार चांगल्या जोरानें होत आहे असें दिसतें. मद्रास युनिव्हर्सिटी, शिक्षणखातें यांनीं या मंडळीच्या ग्रंथांस प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणें आश्रय दिला आहे. या मंडळीच्या ऐतिहासिक ग्रंथांस जरी सरकारानें उत्तेजन दिलें नाहीं तरी शिक्षक या मंडळीचे ग्रंथ विकत घेतो. यांच्या पुस्तकांच्या खपाकडे पाहिलें तरी यांच्या कार्याची उपयुक्तता लक्षांत येईल.

या मंडळीचे २७०० कायमचे वर्गणीदार आहेत, आणि यामुळें पुस्तकाच्या तीन तीन हजार प्रती काढून अल्प किमतीनें त्या देण्यास यांस परवडतें. यांच्या शास्त्रीय विषयांवरील लिहिलेल्या पुस्तकांच्या तर प्रत्येकीं नऊ हजारपर्यंत प्रती छापल्या गेल्या आहेत !

या मंडळीचें आणखी एक महत्त्वाचें कार्य म्हटलें म्हणजे या संस्थेनें चालविलेल्या परीक्षा होत,

म्याट्रिक पास न झालेल्या स्त्रीपुरुषांस या परिक्षेस बसतां येतें. ही संस्था तीन विषयांत परीक्षा घेते आणि डिप्लोमा देते. हे तीन विषय म्हटले म्हणजे–१ वाङ्मय, २ इतिहास, आणि ३ भौतिक शास्त्रें हे होत. या परीक्षा वीस ठिकाणीं घेतल्या जातात, आणि सुमारें पांचशें रुपयांचीं बक्षिसें परीक्षेत अगर विविध विषयांत जे वर येतील त्यांस दिलीं जातात. पहिलीं तीन वर्षे मिळून एकंदर ४०६ उमेदवार बसले; आणि त्यांपैकीं ११२ पास होऊन त्यांस "योग्यता-पत्रमु" मिळालें. सरकारनें या परीक्षा उघडपणें मान्य केल्या नाहींत. तथापि अप्रत्यक्षपणें त्यांस मान्यता मिळत आहे. आज शिक्षकांची, आणि विशेषतः स्त्रीशिक्षकांची चणचण भासत आहे. आणि ज्यांस या परीक्षेचें " पत्रमु " मिळालें असेल त्यांस ज्या स्त्रियांस कांहींच उपकरण नसेल त्यांपेक्षां पसंत केलें जातें.

या परीक्षांसाठीं अभ्यास करण्याची इच्छा स्त्रियांमध्यें वाढत आहे, आणि आजपर्यंतच्या कांहीं बक्षीस मिळविणाऱ्या उमेदवारांमध्यें देखील स्त्रियांचीं नांवें आढळतात.

आंध्रविज्ञान सर्वस्वमु.

(Telugu Encyclopaedia.)

या कामास सुरवात 'विज्ञानचंद्रिका मंडळी'-पैकीं कांहीं मंडळीकडून झाली आहे.

" विज्ञानचंद्रिका मंडळी " या संस्थेचा उद्देश जनहिताचा आहे. तथापि " आंध्र विज्ञान सर्वस्वमु" हा ग्रंथ केवळ व्यापारी पद्धतीनें बाहेर पडावयाचा आहे. या ग्रंथाचे फक्त सहा भाग बाहेर पडले आहेत; चार भाग अजून बाहेर पडावयाचेच आहेत. या ग्रंथाचे चार संपादक आहेत आणि सुमारें ८० लेखक आहेत. इतक्या थोडक्या साहित्यानें "सायक्लोपिडिआ" उत्तम ग्रंथ होणें शक्य नाहीं. तथापि मध्यम प्रकारचा तरी ग्रंथ हा होईल अशी संपादकांची अटकळ आहे. सध्यां या ग्रंथास सातशें वर्गणीदार झाले आहेत. संपादकांचें असें म्हणणें आहे कीं "प्रारंभींचा आणि अनेक अडचणींतून बाहेर पडलेला हा ग्रंथ जरी सदोष असला तरी यापेक्षां अधिक चांगला ग्रंथ निर्माण व्हावा म्हणून आगाऊ तयारी या दृष्टीनें तरी तो उपयुक्त होईल; आणि सामान्य वाचकांस तो चांगलाच उपयोगी होईल यांत शंका नाहीं. संशोधकास आणि उच्चप्रकारच्या अभ्यासकांस आमचा ग्रंथ उपयोगी पडेल यांत शंका नाहीं."

'विज्ञानचंद्रिका मंडळी'च्या कार्याचें महत्त्व तिनेंच केलेल्या कार्यांत केवळ नाहीं; तर, तिला प्रतिस्पर्धी संस्था जवळ जवळ वीस निघाल्या आहेत, आणि त्या ग्रंथरचनेस आणि ग्रंथ-प्रसारास उत्तेजन देत आहेत, या बाबतींत आहे.

आंध्र साहित्यपरिषद्.

(The Telugu Academy)

ही संस्था रा० जयंतिरामय्या पंतलु (गुंतूर जिल्ह्याच्या कलेक्टराचे परसनल असिस्टंट) यांच्या आरंभयत्नानें आणि यांच्या आणि इतर तेलगू उत्साही लोकांच्या परिश्रमानें अस्तित्वांत आली. या संस्थेचा द्रव्यनिधि आज सुमारें चाळीस हजार रुपये झाला आहे. या संस्थेच्या कार्यांतील विशेष येणेंप्रमाणें:—

तेलगू भाषेंत ग्राम्य आणि ग्रांथिक असे दोन प्रकार आहेत. मराठी भाषेंत लिहिण्याची भाषा आणि बोलण्याची भाषा यांत अंतर आहेच, तथापि हें अंतर फारसें नाहीं. तेलगू भाषेंत हें अंतर अधिक आहे. यासाठीं तेलगू ग्राम्य भाषा अधिक प्रचारांत आणावी या संबंधानें कांहीं लोकांची खटपट सुरू झाली आणि त्यांपैकीं कांहीं लोकांनीं मद्रास युनिव्हर्सिटींत खटपट करून ग्राम्यभाषेंत तेलगू निबंध लिहावयास हरकत नाहीं असा ठराव पास करून घेतला. त्यामुळें फारच चळवळ उडाली. या चळवळीच्या प्रसंगीं हा प्रश्न आंध्र साहित्यपरिषदेनें हातीं घेतला. या परिषदेच्या सभेस दोन्ही पक्षांचे लोक आले होते, आणि यावेळेस वादविवाद फार जोराचा झाला. 'ग्रांथिक तेलगू'वाल्या मंडळीस ग्राम्य तेलगू-मंडळींच्या मतास कांहीं अधिक मान द्यावा लागला, आणि कांहीं नियम बहुमतानें पास झाले. ते नियम येणेंप्रमाणें:—

१. गद्य लेखांत दोन स्वतंत्र शद्बांचे संधि करणें ऐच्छिक ठेवावें. संस्कृतप्रमाणें दोन स्वतंत्र शद्ब जोडलेच पाहिजेत असें नाहीं.

२. तेलगू भाषेंत दोन प्रकारचे 'र' आहेत. गद्य लेखांत या दोन प्रकारच्या 'र' मधील भेद ठेवलाच पाहिजे असें नाहीं.

३. अर्धानुस्वार वैकल्पिक ठेवावा. अर्धानुस्वाराचें उदाहरण म्हटलें म्हणजे 'गांवांत' हें होय. "ग्रामान्त' हें पूर्णानुस्वाराचें उदाहरण आहे.

४. प्रचलित म्हणींमध्यें शद्बांचें ग्राम्य रूप आलें तरी तें ग्रंथांत म्हणींबरोबर येण्यास हरकत नाहीं.

या साहित्यपरिषदेचें दुसरें एक मोठें महत्त्वाचें काम म्हटलें म्हणजे तेलगू भाषेचा कोश तयार करण्याची खटपट होय. या तेलगू कोशास सरकारानें वीस हजार रुपयांचा मदत देऊं केली. तथापि आंध्रपरिषदेनें त्या मदतीच्या स्वीकार केला नाहीं. या नकाराचीं तीन कारणें मुख्य आहेत. पहिलें कारण म्हटलें म्हणजे, कोशास लागणारा सर्व पैसा 'पिठापुर'च्या राजानें द्यावयाचा कबूल केला आहे. दुसरें एक कारण म्हटलें म्हणजे, सरकारी मदतीबरोबर सरकारचा हातही आंत शिरेल काय ही लोकांस धास्ती वाटली; आणि तिसरें कारण म्हटलें म्हणजे, सरकार तेलगू शब्दांचा अर्थ इंग्रजींत द्यावयास लावील असेंही कांहीं लोकांस वाटलें. आंध्रसाहित्य-परिषदेंत अशीही कांहीं मंडळी होती कीं, त्यांच्या मतें, सरकारची मदत खुशाल घ्यावी पण सरकाराला फाजील ढवळाढवळ मात्र करूं देऊं नये; त्या बाबतींत पूर्णपणें खंबीर राहावें.

आंध्र साहित्यपरिषदेचें आणखी एक महत्त्वाचें कार्य म्हटलें म्हणजे मासिकप्रकाशन होय. या मासिकांत इतिहासाचें साहित्य म्हणजे "शासनां"चा संग्रह प्रसिद्ध होत आहे.

आतां आंध्रांच्या कार्याची आणि आपल्या कार्याची, त्यांनीं आपणांपेक्षां अधिक काय केलें हें पाहण्याकरितां तुलना करूं. सर्वतऱ्हेनें तुलना करण्यांत अर्थ नाहीं. कारण पुष्कळ

बाबतींत आंध्र हे मागसलेले आहेत हें आपणांस दिसून येईल. उदाहरणार्थ, आंध्रांमध्यें केसरीसारखें पत्र, किंवा मनोरंजन आणि चित्रमय जगत् यांसारखीं मासिकें नाहींत आंध्रांमध्यें देशी भाषेंत चालविलेलें दैनिक एकच आहे आणि तें देखील नवीन आहे. 'आंध्रपत्रिका' हें दैनिक स्वयंशक्तीनें चाललें नसून " अमृतांजन " या औषधाच्या साह्यानें चाललें आहे! आंध्रामध्यें सर्व हिंदुस्थानावर परिणाम घडविणारे तेजस्वी पुरुष झाले नाहींत. आपणांकडे रानडे, गोखले, आणि टिळक हीं नांवें देतां येतील. तथापि कांहीं बाबतींत आंध्र हे आपल्यापुढें आहेत हें खास.

उदाहरणार्थ " तेलगू एनसायक्लोपिडिया" त्यांच्यांत उद्भवत आहे. तेलगू भाषेचा यथाशास्त्र कोश घडविण्याचें कार्य सुरू झालें आहे; आणि त्या कामास लागणारी मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे द्रव्यनिधि, त्याची देखील सोय त्यांनीं लावली आहे. या दोन्ही गोष्टींस आपल्याकडे सुरुवातही झालेली नाहीं.

आपणांकडे वाङ्मयविषयक बाबतींत पुढारीपण नाहीं. लेखकवर्गांपैकीं प्रसिद्ध मंडळीनें राजकीय चळवळींत पडून पक्षविषयक द्वेष आणि सरकारी अधिकाऱ्यांची अवकृपा हीं मिळविलीं आहेत. रा. राजवाडे यांच्यासारखे राजकीय चळवळींत न पडणारे गृहस्थ आपल्या पुढारी लेखकवर्गामध्यें देखील आहेत. तथापि व्यक्तिविशिष्टत्वामुळें त्यांच्याकडून पुढारीपण होणें कठीण होत आहे.

आंध्रांमधील आणखी एक विशेष प्रगति म्हटली म्हणजे एका खासगी संस्थेनें स्वतः परीक्षा घ्यावयास सुरवात करून त्यांचें महत्त्व स्थापन केलें ही होय. या बाबतींत तर आपण त्यांच्या अगदींच मागें आहों.

अलीकडेसच तथापि उत्साहानें काम करणाऱ्या या राष्ट्राचें कार्य महाराष्ट्रीयांनीं विचार करण्याजोगें आहे.

मराठी भाषेंतील पाढ्यांच्या पारिभाषिक पाठभेदांत एकवाक्यता होईल काय?

आवश्यकता. महाराष्ट्रांत पाढ्यांच्या वाचणीचे व्यक्तिभेदाप्रमाणें निरनिराळे पाठभेद आहेत, ही गोष्ट लक्षांत येण्यासाठीं मोठे प्रयास करण्याचें कारण नाहीं. कोणत्याही पांच पंचवीस मराठी भाषा बोलणारांस ही पाढ्यांची वाचणी शब्दांनीं कागदावर व्यक्त करण्यास सांगितलें असतां वरील गोष्ट सहज प्रत्ययास येईल. या परिभाषेच्या बाबतींत प्रांतभेदाचा प्रश्न उपस्थितच होत नाहीं. कारण, अमुक एका प्रांतांत अमुकच प्रकारचा पाठभेद जारी आहे, असें म्हणण्यास आधार नाहीं. अर्थात् हा प्रांतभेदाचा प्रश्न नसून व्यक्तिभेदाचा प्रश्न आहे अशीच माझी समजूत आहे.

पाढ्यांची परिभाषा वापरण्याचा ज्यांना हरहमेश प्रसंग येतो, अशा मुंबईंतील मराठी शिक्षकवर्गांत मिसळण्याचा प्रसंग या निबंधकारास आला होता. त्या प्रसंगीं बऱ्याच शिक्षकांनीं आपल्या हातीं लिहून दिलेली पाढ्यांची परिभाषा या लेखकाचे संग्रहीं आहे. प्रत्येक पाढ्यांत जरी दहाच अंक असतात, तरी कोणत्याही एका शिक्षकानें लिहिलेल्या या दहाचे दहा अंकांची परिभाषा दुसऱ्याचे परिभाषेशीं तंतोतंत जुळत नाहीं. ही स्थिति पालटून सर्व महाराष्ट्रांत पाढ्यांची परिभाषा एकच करितां येईल काय ? या प्रश्नाचा या निबंधांत विचार कर्तव्य आहे.

या बाबतींत कोणी असा पूर्वपक्ष करील कीं, असला प्रश्न उपस्थित करण्याचीच अगोदर आवश्यकता काय आहे ? कोणी कसाही कां पाढा म्हणेना ? ४ आणि ८ यांचा गुणाकार ३२, ही गोष्ट चार अठ्ठे ३२, चार अठ्ठें ३२, चारा आठीं ३२, चारा आठी ३२, ८ चोक ३२, यांपैकीं कोणत्याही परिभाषेनें कां व्यक्त करीना ? ४ आणि ८ यांचा गुणाकार ३२, एवढी गोष्ट कोणत्याही पाठभेदानें जर समजते आहे, तर परिभाषेच्या पाठांतील एकवाक्यतेसाठीं कोठें अडलें आहे ?

या प्रकारच्या पूर्वपक्षाला मी असा उलट प्रश्न करीन कीं, आमचे पूर्वज (यांचे नमुने अद्याप कोठें कोठें वृद्ध माणसांत आढळतात) पूर्वी खादीची बाराबंदी, एक जाड्याभरड्या सुताचें भलें मोठें पागोटें, दाभणकांठी धोतरवजा उपरणें व चवाळी पंचा याप्रमाणें कपडे वापरीत असत. या कपड्यांवर त्यांचा नसे का निर्वाह होत ? आम्हांलाच आतां नवेनवे तऱ्हेतऱ्हेचे कपडे कशाला? त्यांशिवाय आमचें नाहीं का चालणार? या प्रश्नावर असें उत्तर मिळालें कीं, पूर्वीची परिस्थिति व आतांची परिस्थिति यांत फार अंतर आहे. सुधारलेल्या राष्ट्रांशीं आमचा आतां संबंध आला आहे. त्या लोकांत मिसळावयाचें तर त्यांना आमचा तिरस्कार वाटणार नाहीं, असा पोषाख आम्हीं केला पाहिजे, इत्यादि कारणें या बाबतींत दाखविण्यांत येतात; व तीं सयुक्तिकही आहेत. पुरुषांप्रमाणें स्त्रियांचेही पोषाखांत वरील कारणानेंच फेरफार करणें आवश्यक वाटतें. आमच्या भाषेच्याही पोषाखांत याच कारणानें नीटनेटकेपणा व शोभिवंतपणा यावा आणि जगांतील सुधारलेल्या भाषांच्या बरोबरीनें तिला मान मिळावा यासाठीं आम्ही म्हणत नाहीं काय ? महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचा जन्मही आमच्या मातृभाषेचें बाह्यांतरंग नीटनेटकें, सुशोभित व उपयुक्त करण्याकरितांच नाहीं काय ?

सारांश, बदलणाऱ्या परिस्थितीप्रमाणें व वाढत्या ज्ञानाप्रमाणें पूर्वीच्या कित्येक गोष्टींचें भावडें व अनियामक स्वरूप बदलून त्यांना नीटस व व्यवस्थित रूप देण्याचे आमचे प्रयत्न चालले आहेत व असेच सतत चालू राहतील. व तसे ते चालू आहेत तोंपर्यंतच आमचा समाज, आमची भाषा, आमचें राष्ट्र जिवंत आहे असें म्हणतां येईल. या सर्व गोष्टि जर खऱ्या आहेत, तर मराठी भाषेंतील पाढ्यांच्या परिभाषेला तिच्या हल्लींच्या भावड्या व अनियमित स्वरूपाऐवजी नीटनेटकें व नियमबद्ध स्वरूप देतां आलें तर तें हवें, असेंच म्हटलें पाहिजे.

मराठींत पाढ्यांच्या परिभाषेचें स्वरूप किती भावडें आहे ही गोष्ट खालीं दिलेल्या

प्रस्तावना.

पाठभेदांच्या यादीवरून दिसून येईल. ही स्थिति पालटून या परिभाषेला कांहीं तरी शिष्टसंमत असें व्यवस्थित स्वरूप यावें अशी माझी उत्कट इच्छा आहे. या पाठभेदांपैकीं 'एं'कारान्त, 'ए'कारान्त व 'अ'कारान्त एवढेच पाठभेद एकवाक्यतेचे दृष्टीनें विचारांत घेण्यासारखे दिसत असल्यामुळें, तेवढ्यांचाच या निबंधांत ऊहापोह केला आहे.

एकें–एकें.
दुणें–दुणे.
त्रीक–त्रिक–त्रिके.
चोक.
पंचे–पाचीं–पांचा–पांचीं–पाचा.
सक–सख–सकं–साक.
सतें–सत्तें–सातीं–साता–सत्ते–साते.
आटें–आठीं–अटे–आहीं–आठी–अठें–आठे.
नवें–नव्वें–नवे–नव्वे.
दाहा–दाहें–दहावें–दाहीं–दाहे.

पाढ्यांचे परिभाषेच्या पाठभेदांसंबंधानें केवळ वरवर पहाणारांकडून असा पूर्वपक्ष करण्यांत येईल कीं, पाढ्यांचे पारिभाषिक पाठभेद फारच कमी महत्त्वाचे आहेत. कोंकण प्रांतांत बऱ्याच शब्दांवर अनुस्वार देऊन बोलण्याची चाल आहे, तर देशावर तेच शब्द अनुस्वार गाळून बोलण्याचा प्रघात आहे. जसें, ऊंस,ऊस.भाषाकोविदांत या अनुस्वारांचे बाबतींत पूर्वी मोठीं रणें माजलीं होतीं व अमुकच पक्ष खरा असा सिद्धांत अद्यापपर्यंतही झालेला नाहीं. पाढ्यांचे बाबतींत हा अनुस्वारांचाच प्रश्न उपस्थित करण्याचा तुमचा विचार दिसतो. या बाबतींत एकवाक्यता होणें शक्य नाहीं. खेरीज एकाच अर्थाचे शब्द कोंकणांत व देशावर अक्षरांच्या फरकानेंही वापरण्यांत येतात. जसें, पायरी, पायंडी. पहिला देशावर व उत्तर कोंकणांत व दुसरा दक्षिण कोंकणांत वापरतात. याप्रमाणें निरनिराळ्या प्रांतांत बोलण्याचे भाषेत जरी निरनिराळे प्रयोग रूढ असले, तरी ग्रंथ लिहितांना देशावरील विशेषतः पुण्याच्या शब्दप्रचारांस अग्र मान देण्याचा परिपाठ आहे. अर्थात् पाढ्यांचे बाबतींतही याप्रमाणेंच करण्यास काय हरकत आहे ? सारांश, पाढ्यांचे बाबतींत अनुस्वारांचा वाद उपस्थित करणें ठीक नाहीं. बोलतांना कोणी कसेंही बोलो; ही परिभाषा लिहिण्याचा जेथें प्रसंग येईल, तेथें पूर्वपरिपाठाप्रमाणें पुण्याचा पाठभेद मान्य करावा.

याजवर माझें असें म्हणणें आहे कीं, पाढ्यांच्या परिभाषेचा विचार करितांना अनुस्वारांचा विचार करणें जरी जरूर आहे, तरी वरील प्रकारचा अनुस्वार-वाद या बाबींत उत्पन्न होत नाहीं. तसेंच कोंकण व देश असा प्रांतविषयक वादही या प्रश्नासंबंधीं उपस्थित होत नाहीं. ऊंस असा अनुस्वारयुक्त उच्चार केला काय अथवा ऊस असा अनुस्वाररहित उच्चार केला काय, त्या दोन्हीं शब्दांनीं होणारा अर्थबोध अगदीं तंतोतंत तोच होतो.व्याकरणदृष्ट्या दोन्ही शब्द नामें असून त्यांच्या रूपांत होणारा विकार एकाच सामान्य नियमानें होतो. पायरी व पायंडी या शब्दद्वयाचेंही असेंच आहे.पाढ्यांच्या पाठभेदांसंबंधीं मात्र असा प्रकार होत नाहीं. अनुस्वारयुक्त पाठ ग्राह्य धरावयाचा तर त्या शब्दांचा जो अर्थ होतो तोच अर्थ अनुस्वाररहित पाठाचा–निदान व्याकरणदृष्ट्या तरी–होणें शक्य नाहीं. या गोष्टीचा उलगडा पुढील विवेचनांत होईलच.

पाढ्यांच्या पारिभाषिक पाठभेदांचा विचार करितांना परिभाषेच्या बाह्यांगास नीटनेटकें व नियमबद्ध करणें या गोष्टीकडे जसें लक्ष दिलें पाहिजे, तसच त्या परिभाषेच्या अंतरंगाकडे–उपयुक्ततेकडेही लक्ष दिलें पाहिजे. ही उपयुक्तता अर्थात् शिक्षणविषयकच असणार व त्यामुळें या प्रश्नाचा विचार भाषेच्या दृष्टीनें व शिक्षणविषयक असा दोन बाजूंनीं केला आहे.

पाढ्यांच्या परिभाषेच्या बाह्यांगाचा विचार करितांना मागें जी मीं पाठभेदांची

बाह्यांगविचार.

यादी दिली आहे ती फार उपयोगी पडेल. त्या यादीकडे पाहिलें असतां या पाठभेदांचे बाबतींत जी बेबंदशाही दिसून येते,तशी मराठी भाषेंत इतरत्र कोठेंही आढळणार नाहीं. ही बेबंदशाही सहेतुक अथवा प्रांतविषयक आहे अशी माझी समजूत नाहीं. आपण जे शब्द उच्चारतों त्यांच्या वास्तविक अर्थाच्या सार्वत्रिक

गैरसमजाचाच हा परिणाम आहे. जगांतील जिवंत व सुधारलेल्या भाषांत शब्दांच्या रूपांवरून अथवा वाक्यांतील त्यांच्या जागेवरून त्यांच्या अर्थाचा बरोबर बोध होतो. मराठी भाषा जिवंत आहे. आम्ही सुधारलेले लोक ती बोलतों यावरून तीही सुधारलेली असणें जरूर आहे. मराठी भाषेंत मुख्यत्वें-करून शब्दांच्या रूपांवरूनच त्यांच्या अर्थाचा यथार्थ बोध होतो.

पाढ्यांच्या परिभाषेंत जे अंकविषयक शब्द आहेत ते सर्व एकाच अर्थानें वापरले जातात. अर्थात् त्या सर्वांचीं रूपेंही एकाच नियमाला अनुसरून असलीं पाहिजेत. या दृष्टीनें पाठभेदांच्या यादीकडे पाहिलें तर कांहीं शब्द ‘ ए ’ कारान्त, कांहीं ‘एं’ कारान्त, कांहीं ‘अ’ कारान्त, कांहीं ‘आ’ कारान्त, कांहीं ‘ अं ’ कारान्त, कांहीं ‘ इ ’ कारान्त, तर कांहीं ‘ ई ’ कारान्त, असा सर्वच घोंटाळा दिसून येतो. ही स्थिति बदलणें इष्ट आहे, असेंच कोणाही मराठी भाषाभिमान्यास वाटेल. व त्याप्रमाणें या पाठभेदांत एकवाक्यता करण्याची आवश्यकता शिक्षणविषयक संस्थांस अलीकडे भासूं लागली आहे. परंतु विशेष खोल विचार न करितां शक्य तितक्या शब्दांचीं ‘एं’कारान्त रूपें रूढ करण्याकडे प्रवृत्ति दिसून येत आहे. हीं ‘ एं ’कारान्त रूपें तृतीया विभक्तीच्या ‘एं’प्रत्ययानें झालीं आहेत असें या पक्षाचें म्हणणें आहे. या तृतीयान्त रूपांपुढें ‘ गुणिले ’ असा शब्द अध्याहृत घेऊन त्या परिभाषेचा अर्थ करावा लागतो. हा युक्तिवाद घटकाभर वादाकरितां कबूल करावयाचा असें म्हटलें तरी **त्रीक, चोक व सक** या शब्दांचीं रूपें या नियमाखालीं येत नाहींत. या रूपांबद्दल त्रीकें, चोकें, सकें अशीं रूपें रूढ करावीं असें वरील पक्षाचेंही म्हणणें नाहीं.

सारांश, ‘ एं ’कारवादी पक्षाचा युक्तिवाद कबूल करावयाचा तर दहा शब्दांपैकीं तीन शब्द अपवाद म्हणून ‘अ’कारान्त राहतातच. भाषाविषयक गोष्टींत केवळ बहुमताचें तत्त्व लागू करून चालत नाहीं. सर्वांचें एकमत ज्या मार्गानें होईल तो मार्गच स्वीकारावा लागतो. अर्थात् अपवाद म्हणून जे शब्द ‘एं’कारवादी पक्ष ‘अ’कारान्त राहूं देतो—नव्हे तसें करणें त्यास भागच पडतें—त्या तीन शद्वांचीच छाननी करून त्यांचा हट्ट सकारण आहे कीं कसें हें पाहणें इष्ट आहे.

त्रीक, चोक व सक या त्रयींचा हट्ट सकारण असून बाकीच्या सात शद्वांचीं रूपें ‘ एं ’कारान्ताऐवजीं ‘ए-’ कारान्त केलीं म्हणजे सर्व दहांचे दहा शद्वांस एकच नियम लागून त्यांचीं रूपें नियमबद्ध होऊन फारच सुबोध होतात, हें मी पुढें दाखविणार आहें.

मागें जी पाढ्यांच्या पारिभाषिक पाठभेदांची यादी दिली आहे, तिजवरून अगदीं वरवर पहाणारासही असें दिसून येईल कीं, सर्व पाठांस **चोक** हा शब्द काय तो अगदीं सामान्य आहे. त्याच्या खालोखाल **त्रीक** व **सक** हे शब्द सर्व पाठांस सामान्य म्हणण्यास हरकत नाहीं. ‘एं’ कारवादी पक्षानेंही हे तीन शब्द अकारान्तच ग्राह्य ठरविले आहेत, व मलाही तेच ग्राह्य वाटतात. परंतु त्या शब्दांचीं ‘अ’कारान्त रूपें अपवादात्मक न ठरवितां त्या रूपांवरूनच या परिभाषेच्या बाबतींत नियम ठरवितां येतो ही गोष्ट मला सिद्ध करावयाची आहे.

पाढ्यांच्या परिभाषेची उपपत्ति.

संस्कृतांतील **त्रिक, चतुष्क व षट्क** या समुदायवाचक नामांचा व **त्रीक, चोक व सक** या पाढयांच्या परिभाषेंत येणाऱ्या शब्दांचा जनकजन्यसंबंध असला पाहिजे असें उघड उघड दिसतें. या तीन्ही मराठी शब्दांच्या अंतीं ‘क’ आहे. संस्कृत मूळ शब्दांचे अंतींही ‘क’च आहे. मूळच्या संस्कृत शब्दांतील ‘क’ प्राकृत शब्दांत कायम केव्हां रहातो व त्याचा लोप केव्हां होतो, यासंबंधानें प्रसिद्ध व्याकरणकार **वररुचि** यांच्या **प्राकृतप्रकाश** ग्रंथांतील द्वितीय परिच्छेदाचीं पहिलीं दोन सूत्रें मार्गदर्शक होतात. अयुक्तस्यानादौ ॥१॥ कगजतदपयवां प्रायोलोपः ॥२॥ हीं तीं दोन सूत्रें होत. मूळ संस्कृत शब्दांवरून प्राकृत भाषांतील शब्द व त्यांवरून हल्लींच्या प्रचलित भाषांतील शब्द यांची व्युत्पत्ति ठरविण्यास वररुचि व हेमचंद्र यांचे ग्रंथ आधारभूत असे मानलेले आहेत. वररुचि हा त्यांतले त्यांत प्राचीन आहे. शब्दारंभीं नसणाऱ्या व एकाकी व्यंजनांचा उल्लेख पहिल्या सूत्रांत आहे. दुसऱ्या सूत्रांत अशीं कांहीं व्यंजनें देऊन त्यांचा प्राकृतांत बहुधा लोप होतो,

असा नियम सांगितला आहे. या दुसऱ्या सूत्रांत जीं व्यंजनें प्रायः लोप पावतात म्हणून सांगितलें आहे त्यांत 'क'चा निर्देश अगदीं आरंभींच झालेला आहे.

त्रिक या मूळच्या संस्कृत शब्दांतील 'क' अनादि व अयुक्त या दोन्हीं सदरांत येणारा असल्यामुळे त्याचा प्राकृतांत लोप व्हावा. परंतु हा लोप वैकल्पिक असल्यामुळें या ठिकाणीं मूळचा 'क' च प्राकृतांत व मराठींत कायम राहिला. इतकेंच नव्हे तर सगळा शब्दच कायम राहून फक्त **त्रिकबद्दल त्रीक** असा दीर्घोच्चारित शब्द मराठींतील पाढ्यांत आला. **चतुष्क** व **षट्क** या शब्दांतील 'क' जरी आद्य नाहीं, तरी तो एकाकी नसल्यामुळें त्याचा लोप प्राकृतांत होत नाहीं. अर्थात् मराठींतील **चोक** व **सक** या शब्दांत मूळचें संस्कृत 'क' व्यंजन कायम राहिलें. चतुष्क या शब्दांतील 'तु' बद्दल प्राकृतांत 'ओ' होतो (व. रु.प्र.प.सू. ९) व 'ष' चा लोप होऊन 'क'चें द्वित्व होतें (व. रु. त्रि. प. सू. ५०।५१). या आधारें चतुष्क याबद्दल चोक्क–चोक या परंपरेनें मराठींत **चोक** हा शब्द आला. षट्क या शब्दांतील '**ष**' बद्दल प्राकृतांत '**स**' होतो (व. रु. द्वि. प. सू.४३) व '**ट**' चा लोप होऊन 'क'-चे द्वित्व होतें (व.रु.त्रि.प.सू.५०।५१).षट्क–सक्क--सक या परंपरेनें मराठींत **सक** हा शद्ब आला आहे.

सारांश, **त्रीक,चोक** व **सक** हे पाढयांत येणारे शब्द मूळच्या संस्कृत त्रिक, चतुष्क,षट्क या समुदायवाचक नामांपासून निघाले आहेत ही गोष्ट स्पष्ट दिसते.आजपर्यंत या गोष्टींकडे कोणाचेंही लक्ष गेलें नाहीं, यावरून पाढयांचे परिभाषेकडे आजपर्यंत किती दुर्लक्ष झालें आहे हें दिसून येतें. त्रीक, चोक व सक या शब्दांचीं रूपें अनुस्वारपद्धतीनें दुर्बोध झाल्याबरोबर तीं नियमास अपवाद ठरविलीं जावीं ही खरोखरच मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. त्रीक, चोक व सक हे शब्द संस्कृतांतील समुदायवाचक नामांपासून निघाले असून तेहीं आपल्या जनकांप्रमाणेंच मराठींत समुदायवाचक नामें समजलें जावे. अकारान्त पुल्लिंगी नामांचें एकवचन व बहुवचन **दोन्ही** सारखीच असतात. दोन'त्रीक, ' चार 'चोक,' आठ 'सक' या प्रयोगांत त्रीक, चोक व सक हीं समुदायविशिष्ट नामांचीं अनेकवचनी रूपें आहेत; आणि दोन,चार,आठ हे शब्द त्यांचीं अनुक्रमें विशेषणें आहेत. या व्युत्पत्तीचे दृष्टीनें 'एं' कारवादी पक्षानें अपवादक म्हणून ठरविलेलीं तीन्ही **अकारान्त** रूपें अगदीं नियमबद्ध असून त्यांचा **अकारान्त** रहाण्याचा निसर्गसिद्ध हक्कच आहे; व त्याचसाठीं ते शब्द आपलीं स्वाभाविक रूपें न सोडण्याचा हट्ट धरीत आहेत असें दिसतें.

आतां **त्रीक,चोक** व **सक** यांचें इतर सात शब्दांशीं बंधुत्वाचें नातें आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. हें नातें मी पुढें सिद्ध करून दाखविणार आहें. तें मराठी भाषाभिज्ञांस पटलें म्हणजे हा पाढ्यांच्या परिभाषेचा प्रश्न सुटला असेंच समजलें पाहिजे. मागील पाठभेदांचे यादींत बाकीच्या सात शब्दांचे जे निरनिराळे पाठभेद दिले आहेत, त्यांपैकीं 'एं'कारान्त व 'ए'कारान्त हे दोनच पाठभेद विचारांत घेण्यासारखे आहेत, असें मागें सांगितलेंच आहे. 'एं' कारान्त रूपें स्वीकारावीं, असा पूर्वपक्ष झाला आहे. 'ए'कारान्त रूपें स्वीकारावीं असा उत्तरपक्ष मला करावयाचा आहे.

'ए'कारन्त रूपें मान्य केल्यास पाढयांच्या परिभाषेंतील दाही रूपें एकाच नियमानें बद्ध होतात. **एके,दुणे, पंचे,सत्ते,अट्ठे,नव्वे व दाहे** हीं एकारान्त रूपें **त्रीक, चोक व सक** या रूपांप्रमाणेंच समुदायवाचक बहुवचनी रूपें आहेत.तीं **एका,दुणा,पंचा,सत्ता,अट्ठा, नव्वा, दहा** या **आकारान्त** एकवचनी पुल्लिंगी नामांपासून झालेलीं आहेत. **दुणा** या शब्दाखेरीज बाकीचे हे **आकारान्त** शब्द संस्कृतांतील संख्याविशिष्ट समुदायवाचक **क** प्रत्ययान्त शब्दांपासूनच निघाले आहेत. त्यांची व्युत्पत्ति खालीं दाखविली आहे.

संस्कृत.	**प्राकृत.**	**मराठी.**
एकक.	एकअ.	एका.
पंचक.	पंचअ.	पंचा.
सप्तक.	{ सत्तअ / सातअ }	{ सत्ता. / साता. }
अष्टक.	{ अट्ठअ / आठअ }	{ अट्ठा. / आठा. }
नवक.	नवअ.	नव्वा.
दशक.	दसक-दहअ	दहा.

या मूळच्या साही संस्कृत शब्दांतील शेवटच्या **क्** चा प्राकृतांत व मराठींत लोप होतो. (व. रु.द्वि. प. सू.

१-२). सप्तक व अष्टक यांतील त व ष्ट यांचे बद्दल त्त व ट्ट होतात(व. रु.त्रि.प.सू ५०।५१).अथवा त व ठ असे एकटे वर्ण राहून त्यांच्या मागील अक्षर दीर्घ होतें. याला वररुचीचा आधार जरी नाहीं,तरी त्याच्या मागून झालेले हेमचंद्रादि टीकाकार व व्याकरणकार यांचा आधार आहे. दशक यांतील 'श' चा 'स' व 'स' चा 'ह' याप्रमाणें फेरफार होऊन दहा असा शब्द मराठींत आला आहे. (व.रु. द्वि. प. सू. ४३-४४) एकक, पंचक व नवक या शब्दांतील कचा लोप होऊन एका, पंचा व नव्वा असे शब्द झाले आहेत.

दुणा हा शब्द मात्र द्विक या समुदायवाचक शब्दापासून निघालेला दिसत नाहीं. द्विगुण या शब्दापासून दुणा (विशेषण) व दुणावणें (क्रियापद) हे शब्द झालेले आहेत. " आळशा दुणें काम " व " दुणावे कीं देतां " या म्हणींत ते शब्द आलेले आहेत. दुणा या शब्दाचा मूळचा दुप्पट असा अर्थ आहे. तोच शब्द पाढ्यांत 'दोहोंचा समुदाय' या अर्थानें आलेला दिसतो.

वरील विवेचनावरून ही गोष्ट स्पष्ट दिसून येते कीं, पाढ्यांतील परिभाषेंत त्रीक, चोक व सक या शब्दांखेरीज बाकीच्या सात शब्दांचीं रूपें अनुस्वाररहित ह्मणजे फक्त 'ए' कारान्त वापरल्यानें पाढ्यांतील दाही शब्दांचीं रूपें व्युत्पत्तिदृष्ट्या व मराठी भाषेच्या दृष्टीनें नियमबद्ध व सुबोध होऊन सर्व पाठांची एकवाक्यता सहज होते. कोणताही शब्द दुर्बोध अतएव अपवादात्मक रहात नाहीं. या ठिकाणीं सानुस्वार पक्ष अथवा अनुस्वाररहित पक्ष, तसेंच प्रांतभेद, यांपैकीं कोणत्याही प्रकारच्या भेदांस जागाच नाहीं.

तीस पाढ्यांत ज्याप्रमाणें एके, दुणे वगैरे दहा शब्द येतात, त्याचप्रमाणें अकरक्यांत अकरे, बारे, याप्रमाणें विसपर्यंत पुढचे दहा शब्द येतात. या रूपांचाही विचार कर्तव्य आहे. हे शब्दही 'एं' कारान्त व 'ए' कारान्त असे दोन्ही तऱ्हेनें म्हणण्याची रूढि आहे. या दहा शब्दांत अपवादात्मक असें कोणतेंच रूप नाहीं. संस्कृतांत अकरापासून पुढील अंकाबद्दल समुदायविशिष्ट अशीं स्वतंत्र नांवें नसावीं असें वाटतें. इंग्रजीप्रमाणेंच संख्यावाचक नांवांचाच

अकरक्यांतील परिभाषा.

समुदायार्थींही उपयोग केला जात असे असें दिसतें. परंतु मराठी भाषेनें या बाबतींत आपलें विशिष्टत्व सिद्ध केलें आहे. एक ते दहा या अंकांच्या समुदायवाचक रूपांच्या बहुमतानें असा सामान्य नियम निघाला कीं, **संख्यावाचक अकारान्त शब्दांचा समुदायार्थीं उपयोग करतांना त्यांबद्दल आकारान्त रूपें होतात.** हाच नियम अकरापासून नव्याण्णवांपर्यंतच्या सर्व अंकांस मराठी भाषेनें लागू केलेला दिसतो. दहा ते अठरापर्यंतचे संख्यावाचक शब्द मूळचे आकारान्त असल्यानें त्यांचीं समुदायवाचक एकवचनी रूपें मुळचींच राहून बहुवचनी रूपें मात्र आकारान्त पुल्लिंगी नामांच्या सामान्य नियमाप्रमाणें 'ए'कारान्त होतात. एकोणीस ते नव्याण्णवपर्यंतचे सर्व संख्यावाचक शब्द अकारान्तच आहेत. त्यांचीं समुदायार्थी एकवचनीं रूपें आकारान्त होतात व बहुवचनीं 'ए' कारान्त होतात. जसें, अकरा-अकरे, विसा-विसे, छत्तिसा-छत्तिसे, इत्यादि. शंभर या संख्यावाचक शब्दासाठीं शें असा समुदायार्थीं स्वतंत्र शब्द वापरण्याची रुढी आहेच.

सर्व शंभर अंकांचीं मीं जीं समुदायविशिष्ट एकवचनी रूपें मागें सुचविलीं आहेत, त्यांबद्दल पाढ्यांतच शंभरांपुढील दोनशें पर्यंतच्या अंकांच्या वाचणींत आधार आहे. ही वाचणी "अंकानां वामतो गतिः" या संस्कृत पद्धतीला अनुसरून आहे खरी, परंतु ती पद्धत उचलतांनाही, मराठी भाषेनें त्या पद्धतींत आपलेपणा ह्मणून कांहीं विशिष्ट योजना केली आहे असें दिसून येतें. शें हा शब्द संस्कृत शतम् या शब्दापासून निघाला असून तो समुदायवाचक अर्थानेंच वापरला जातो.पाढ्यांत येणाऱ्या शंभरांपुढील दोनशेंपर्यंतच्या अंकांच्या वाचणींत,शें या शब्दाचाच उपयोग करण्यांत येतो. जसें, सोळोदर-शें, अठरोदर-शें, विसा-शें, साठा-शें, शाण्णवा-शें. हे सर्व शब्द आपले नेहमींचे प्रचारांतील आहेत. या शब्दांत शें हा शब्द जसा समुदायवाचक एकवचनी नाम ह्मणून वापरला आहे, त्याप्रमाणें सोळा, अठरा, विसा, साठा व शाण्णवा हे शब्दही अनुक्रमें सोळा, अठरा,वीस,साठ व शाण्णव या संख्यावाचक शब्दांबद्दल समुदायवाचक एकवचनी

नामें म्हणून वापरले आहेत. अठरापर्यंत अठरा हीं समुदायवाचक एकवचनी रूपें व शें, यांमध्यें संस्कृतांतील अधिक या अर्थी उत्तर या शब्दाचें 'उद्र' असें अपभ्रष्टरूप येतें. अर्थात् मराठींत संख्यावाचक शब्दांपासून समुदायवाचक शब्द कसे निघतात, याबद्दल मीं जो नियम सांगितला त्याला शंभर अंकांत कोठेंही अपवाद आढळून येत नाहीं.

ही माझी विचारसरणी जर बरोबर असेल— ती तशी आहे असें माझी मनोदेवता मला सांगते—तर अकरा, चौदा, विसा, छत्तिसा इत्यादि समुदायवाचक नामांचीं 'ए' कारान्त बहुवचनी रूपें ओघानेंच प्राप्त होतात; व अकरक्यांत अंकेपासून विसेपर्यंत येणाऱ्या शब्दांचा तसेंच तीस पाढ्यांत येणाऱ्या एके, दुणे, पंचे, दाहे वगैरे शब्दांचा समुदायवाचक पाठच प्राह्य ठरतो. पाढ्यांच्या परिभाषेचा विचार करितांना ओघानेंच मराठींत शंभर अंकांचीं संख्यावाचक व समुदायवाचक नांवें अगदीं निरनिराळीं आहेत ही गोष्ट सिद्ध होते.

इतर पुरावा. तीस पाढ्यांतील एके, दुणे इत्यादि दहा रूपें व अकरक्यांत येणारीं अकरे, बारे इत्यादि दुसरीं दहा रूपें, समुदायवाचक अनेकवचनी रूपें आहेत, या माझ्या विधानाला मराठी भाषेंत इतरत्र दुजोरा मिळतो कीं नाहीं हेंही पाहिलें पाहिजे.

इस्पिकांचे पत्त्यांत एक ते दहा ठिपके असलेलीं पानें असतात. त्या एकेका पत्त्यावरील ठिपक्यांच्या संख्येवरून प्रत्येक पत्त्याला एकेक समुदायविशिष्ट नांव मिळालेलें आहे. दुव्वा—दुरी, तिव्वा—तिरी, व चव्वा या तीन नांवांखेरीज बाकीचीं एक्का, पंजा, छक्का, सत्ता, अठ्ठा, नव्वा, दह्या, हीं नांवें व पाढ्यांत येणारे एका, पंचा, सक, सत्ता, अठ्ठा, नव्वा व दहा हे शब्द यांमधील साम्य माझे विधानाला पुष्टि आणीत नाहीं असें कोण म्हणूं शकेल? दुव्वा, तिव्वा, चव्वा, हीं पत्त्यांचीं नांवें हीं दुव्वोदर—शें, तिव्वोदर—शें, चव्वोदर—शें, या पाढ्यांतील वाचणींत येतात व तेथें तीं समुदायवाचक अर्थानेंच आलेलीं आहेत. पत्त्यांतील नांवांची उपपत्तीही संस्कृतांतील क प्रत्ययान्त समुदायवाचक शब्दांशींच नेऊन भिडविली पाहिजे. **पंचा** व **विसा** हे शब्द मराठी भाषेंत समुदायार्थी रूढ आहेत. विशेषतः फळें मोजण्यासाठीं पंचा व गवत वगैरेंच्या गुंड्या मोजण्यासाठीं विसा या शब्दांचा उपयोग करतात. कोठें कोठें विसा हा शब्द स्त्रीलिंगी समजून त्याचें बहुवचन विसा असेंच ठेवतात.

सोंगट्या खेळणारे लोक अकरे, बारे अशीं बहुवचनी रूपें अकरांचीं व बारांचीं दानें एकाद्याला बरवर पडूं लागलीं म्हणजे वापरतात. बायकांत अकरा अकरा वातींच्या जुड्यांना अक्रीं असें नपुंसकलिंगी बहुवचनी रूप वापरतात.

तुलनात्मक दृष्टीनें गुजराथी भाषेंतील पाढ्यांच्या परिभाषेचा विचार करितांही समुदायवाचक पाठच प्राह्य ठरतो. अहमदाबाद ट्रेनिंग कॉलेजचे माजी प्रिन्सिपाल **रा.ब.त्रिवेदी** यांची या बाबतींतील साक्ष फार महत्त्वाची आहे. ते लिहितात कीं, पहिल्या दहा पाढ्यांत जे परिभाषिक शब्द वापरले जातात, त्यांचा अर्थ **समुदायवाचकच** आहे. एकुं, दु, तरी, चोकुं, पंचुं, छक, सत्तुं, अठ्ठुं, नवुं आणि दान अशीं समुदायवाचक **एकवचनी** रूपें पाढ्यांत येतात. यांपैकीं पंचुं, सत्तु अठ्ठुं, नवुं, यांचीं पचां, सतां, अठां, नवां, अशीं बहुवचनी रूपेंही पाढ्यांत येतात. गुजराथी प्राथमिक शाळांतील शिक्षकवर्गाला या पारिभाषिक शब्दांचा समुदायवाचक अर्थच माहित असून, मुलांना पाढे समजावून देतांना त्याच अर्थाचा ते उपयोग करितात.

येथपर्यंत पाढ्यांच्या परिभाषेचा समुदायवाचक अथवा अनुस्वाररहित पाठच व्युत्पत्तिदृष्ट्या व भाषेचा नीटनेटकेपणा आणि नियमबद्धता यांच्या दृष्टीनें शिष्टसंमत होणें आवश्यक आहे हें, मला वाटतें, मीं सिद्ध केलें आहे.

अंतरंग. आतांपर्यंत या विषयाचा भाषाविषयक खरा परंतु केवळ बाह्यांगाचे दृष्टीनेंच विचार केला आहे. यापुढें अंतरंगाचाही विचार करणें जरूर आहे. हा विचार पूर्वसंस्कार व शिक्षणसौकर्य या दोन दृष्टींनीं केला पाहिजे. त्यांतल्या त्यांत अगदीं लहान मुलांचा पाढ्यांशीं निकट संबंध येत असल्यामुळें, त्यांना हा विषय जर मीं सुचविलेल्या अनुस्वाररहित पाठानें सुलभ व मनोरंजक परंतु व्यावहारिक व बौद्धिक वळणाचे दृष्टींनीं अधिक हितावह करून दाखवितां आला,

तर शिक्षणविषयक गोष्टीला अधिक महत्त्व देऊन पूर्व संस्कारांना कमी महत्त्व दिलें पाहिजे.

यापुढें मीं सिद्ध केलेल्या अनुस्वाररहित पाठाला **समुदायवाचक** पाठ म्हणूं व यापूर्वी एकवाक्यता करण्यासाठीं जो पाठ प्रचारांत आणण्याचा प्रयत्न झालेला आहे अथवा होत आहे, त्या पाठाला **तृतीयान्त पाठ** असें म्हणूं. केवळ बाह्यांगाचे दृष्टीनें विचार केला तर तृतीयान्त पाठाऐवजीं समुदायवाचक पाठच स्वीकारावा असें कोणाचेंही मत होण्याचा संभव आहे. परंतु तो स्वीकारल्यामुळें पाढयांच्या परिभाषेच्या अर्थावर होणारा परिणाम कबूल करण्यास मन साहजिकपणें धजत नाहीं. तेथें पूर्वसंस्कार आडवा येतो. पूर्वसंस्काराचा पगडा इतका जबरदस्त आहे कीं, तृतीयान्त पाठ कितीही लंगडा असला, तरी त्याचेकडे मन ओढतें. एवढ्याच बाबतींत काय ती तृतीयान्त पाठाची आपल्या प्रतिस्पर्ध्यावर ताण आहे.

समुदायवाचक पाठ व तदनुषंगानें प्राप्त होणारा पाढ्यांचे परिभाषेचा अर्थ स्वीकारल्यानें पाढ्यांसारखा रूक्ष विषयही लहान मुलांस मनोरंजक रीतीनें शिकवितां येतो. या पाठाचा माझे दृष्टीनें सर्वांत मोठा फायदा हाच आहे. या मनोरंजक रीतीनें शिकविण्याचे पद्धतीला **वस्तुदर्शन पद्धति** म्हणतात. हीच पद्धति आज जगांतील सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत प्रचलित आहे. पाढ्यांचें शिक्षण ह्मणजे कांहीं केवळ स्मरणशक्ति वाढविण्याचें शिक्षण नव्हे.पाढयांचें शिक्षण ह्मणजे वस्तुतः गणितविषयाचें शिक्षण आहे या बाबतींत **प्रो. विश्वनाथ बळवंत नाईक**, एम्. ए., गणितविषयाचे अध्यापक, फर्ग्यूसन कॉलेज, पुणें, यांची साक्ष सर्वांस पटण्यासारखी आहे. ते या पाढ्यांचे बाबतींत लिहितात:-" अंकगणित शिकविण्याचे जे अनेक हेतु आहेत, त्यांत मुलांस विचार करण्याची संवय लावणें हा एक प्रमुख हेतु आहे. पाढ्यांचीं सूत्रें अथवा नियमांच्या मालिका केवळ पाठ करून घेऊन हा उद्देश कधींही सिद्धीस जाणार नाहीं. अंक व पाढे शिकविण्याच्या जुन्या पद्धतींत संख्या व तद्बोधित वस्तु यांची प्रथमपासून फारकतच झालेली असते. त्यामुळें बराच काळ लोटेपर्यंत मुलांस त्यांचा बरोबर कल्पनचा येत नाहीं. अंकगणिताचें खरें मर्म कळण्यास प्रत्येक संख्येचा तद्बोधित वस्तूंशीं संबंध ठेविला पाहिजे... हा विषय आरंभापासूनच सशास्त्रपद्धतीनें शिकविल्यामुळें त्यांत कोणत्याही प्रकारें काठिण्य येईल अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. उलट, ही पद्धति मुलांस सुखकारक होते, असा अनुभव आहे. ......

... रा. रा. ताम्हणकर यांनीं......सध्यां उपयोगांत असलेल्या अंकांची परीभाषा व पाढयांची म्हणणी यांचा अधिक सोयकर असा अर्थही प्रसविला आहे. हल्लीं प्रचारांत असलेल्या अर्थाशीं रा. रा. ताम्हणकरांनीं दिलेला अर्थ जरी कांहींसा विसंगत भासला, तरी तो भाषेच्या दृष्टीनें पहातां आपणांस अगदींच अपरिचित नसून त्यापासून परिभाषेच्या प्रयोगांत अधिक साधेपणाच आलेला आहे. उदाहरणार्थ, पाढयांतील एकें दुणें, सत्तें, अठ्ठे, इत्यादि पदांच्या स्वरूपांत किंचित् फरक करून त्यांचीं समुच्चयवाचक नावें बनविलीं आहेत. **यांत जर पूर्वपरंपरागत अर्थाचा थोडासा भंग होत असेल, तर तो माझ्या मतें क्षम्य आहे. कारण त्यापासून पाढ्यांच्या ह्मणण्यांत साधेपणा, सारखेपणा व सुगमता हींच साधलीं आहेत.** " प्रो. नाईक यांनीं समुदायवाचक पाठाचे वतीनें दिलेली साक्ष या पाठाची शिक्षणविषयक उपयुक्तता सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

पाढे शिकविण्याचे बाबतींत शिक्षणखात्यानेंही वरील तत्त्वेंच मान्य केलीं आहेत; व कोठें कोठें या तत्त्वांस अनुसरून पाढे शिकविण्याचा प्रयत्न करण्यांतही येत आहे. परंतु तृतीयान्त पाठानें या पद्धतीला जितकी मदत मिळावी तितकी मिळत नाहीं. उदाहरणार्थ, आपण "५ चोक २०" हा शब्दसमुदायच घेऊं. वस्तुदर्शनाचे पद्धतीनें या शब्दांची समजूत देण्यासाठीं कोणत्याही २० वस्तु घेऊन त्यांचे चार **पांचपांचांचे समुदाय**-राशी-करतात व **पांच वस्तूंचा गट चार वेळां घेतला ह्मणजे वीस होतात,** अशी समजूत देतात. केवळ संख्येची कल्पना व संख्याविशिष्ट समुदायाची कल्पना अशा दोन निरनिराळ्या कल्पना येथें मुलांना सांगण्यांत येतात. परंतु या दोन निरनिराळ्या कल्पना निरनिराळ्या शब्दांनीं व्यक्त करण्याची अद्यापपर्यंत सोय नसल्यानें पांच वस्तूंच्या समुदायाची कल्पना पांच या

संख्याबोधक शब्दानेंच व्यक्त करावी लागते. तसेंच मुलांच्या डोळ्यापुढें ४ राशि अथवा पदार्थ दिसत असतां सरळ **४ पदार्थ** असें न म्हणतां **तो पदार्थ चोक** म्हणजे **४ वेळां** आहे,असें द्राविडी प्राणायामानें म्हणावें लागतें;अर्थात् तसें करणें लहान मुलांस फारच अवघड पडतें. खेरीज चोक वगैरे शब्द व्यवहारांत या अर्थानें केव्हांच वापरले जात नाहींत.

समुदायवाचक पाठानें "५ चोक २०" या प्रयोगाची समजूत देण्यासाठीं २० वस्तु घेऊन त्यांच्या चारचारांच्या पांच राशी कराव्या लागतात.त्या एकेका राशीचें समुदायविशिष्ट नांव **चोक** असें आहे. अर्थात् मुलांस प्रत्यक्ष दिसणाऱ्या पांच राशींना–वस्तूंना ते पांच चोक आहेत, असें मुलांचें मुलांस सहज म्हणतां येतें व तोच पाढा होतो. दुणे, त्रीक व चोक या तीन शब्दांखेरीज एके, पंचे इत्यादि शब्द पत्ते खेळतांना नेहेमीं मुलांचें कानावरून जात असतात. अर्थात् वस्तुदर्शनपद्धतीनें मुलांस पाढ्यांची समजूत देण्यास समुदायवाचक पाठच अत्यंत सोयीचा आहे असें म्हणावें लागतें.

समुदायवाचक पाठ व तदनुषंगिक पाढयांच्या परिभाषेचा अर्थ स्वीकारणें हें लहान मुलांचे दृष्टीनें आणखी एका बाबतींत फारच फायद्याचें आहे. पाढे तोंडपाठ करणें हें कांहीं मोक्षाचें साधन नव्हे. तर पाढे तोंडपाठ करण्यानें स्मरणशक्तीचे वाढीबरोबर **व्यवहारांतील हिशेब लवकर करण्यास मदत व्हावी, हा एक व्यावहारिक हेतु आहे.** कोणताही हिशेब पाढयांचे भाषेंत आणतां आला म्हणजे स्मरणशक्तीचे साहाय्यानें त्या हिशेबाचें उत्तर देणें कठीण नाहीं. परंतु सर्वसाधारण लहान मुलांस जी गोष्ट अत्यंत कठीण जाते ती हिशेब पाढ्यांचे भाषेंत आणणें ही होय. हीच गोष्ट शिकविणें शिक्षकांनाही फार कठीण जातें. व याचसाठीं बहुधा पहिलीं दोन तीन वर्षे हिशेबच शिकविले जात नाहींत, व पुढेंही बहुधा मुलांचें मुलांनाच या बाबतींत आपलें मार्गदर्शक व्हावें लागतें. अर्थात् बऱ्याच मुलांना हिशेब करण्याचा मोठा बाऊ वाटतो. पाढयांच्या परिभाषेचा समुदायवाचक पाठ व तदनुषंगिक अर्थ यांच्या मदतीनें हें हिशेबांचें काम शिक्षकांस व विद्यार्थ्यांस फार सोपें जातें.

तोंडचे हिशेबांत पाढयांच्या दृष्टीनें **सरळ व उलट** असे दोन प्रकार मानण्यांत येतात. दोन्ही प्रकारचे हिशेब करण्याचे कामीं समुदायवाचक पाठच अधिक सोयीचा आहे. **उलट** प्रकारचे हिशेब **सरळ** प्रकारच्या हिशेबांपेक्षां शिकविण्यास व शिकण्यास फार कठीण असतात, असा बहुधा सर्व शिक्षकांचा अनुभव आहे. अर्थात् **उलट** प्रकारचे हिशेब समुदायवाचक पाठानें शिकविणें व शिकणें अधिक सोपें जातें, हीं गोष्ट सिद्ध केली म्हणजे **सरळ** प्रकारचे हिशेबांबद्दल निराळें कांहींच सांगावयास नको. आठ चोक किती ? बारा सक किती ? असल्या प्रश्नांत ज्या हिशेबांचें पर्यवसान होतें, त्या हिशेबांस **सरळ हिशेब** म्हणतात. यांनाच मिळवणीचे अथवा गुणाकाराचे हिशेब म्हणतां येईल. ज्या हिशेबांचें पर्यवसान किती चोक ३२ ? किती सक ७२ ? असल्या प्रश्नांत होतें, त्यांना **उलट हिशेब** म्हणतात. यांनाच वजाबाकीचे अथवा भागाकाराचे हिशेब म्हणतां येईल.

आतां उलट प्रकारांत मोडणारे कांहीं हिशेब जुन्या व नव्या पद्धतींनीं कसे करितां येतात हें दाखविलें म्हणजे दोहोंपैकीं अधिक सयुक्तिक व सोपी पद्धत कोणती याचा निर्णय कोणालाही करितां येईल.

येथें एक गोष्ट मात्र पक्की लक्षांत ठेविली पाहिजे. ती ही कीं,कोणत्याही पाढयास अनुसरून तोंडचे हिशेब करण्यास शिकविण्यापूर्वी तो पाढा मुलांस अगदीं मुखोद्गत असला पाहिजे; व शिक्षकांनीं या बाबतींत जें शिकवावयाचें तें फक्त कोणताही हिशेब पाढयांच्या परिभाषेंत **एकदम** कसा आणावयाचा एवढेंच. **तसें करितांना पाढा आरंभापासून आठवण्याची आवश्यकता बिलकुल राहूं नये.**

खालील हिशेबांची जुन्या पद्धतीची समजूत रा.रा. काळे यांच्या "बालगणितशिक्षण" पुस्तकांतून घेतली आहे. ही समजूत जशीच्या तशी देतां यावी यासाठीं हिशेबही अर्थात् त्या पुस्तकांतूनच घेतले आहेत. **हिशेब १.** २४ गुंजा आहेत. त्यांचे ६।६ गुंजांचा १।१ असे वांटे केले. तर किती वांटे होतील ?

या हिशेबाची समजूत जुन्या पद्धतीनें खालील प्रमाणें देतातः–"सहा गुंजांचा १ वांटा काढला म्हणजे सहा एकें सहा गुंजा खपतील." 'सहा गुंजांचा दुसरा वांटा काढला " म्हणजे 'सहा दुणे बारा' गुंजा खप-

तील. " सहा गुंजांचा तिसरा वांटा काढला म्हणजे 'सहा त्रीक अठरा ' गुंजा खपतील " आणि " सहा गुंजाचा चवथा वांटा काढला म्हणजे ' सहा चोक चोवीस ' गुंजा खपतील. " चवथ्या वांट्याला सगळ्या गुंजा खपतील. यावरून सहा सहा गुंजांचा एक असे चोवीस गुंजांचे वांटे केले तर चार होतील. " जुन्या पद्धतीप्रमाणें या हिशेबाचें उत्तर शेवटीं ' सहा चोक चोवीस ' असा पाढा म्हणून द्यावयाचें आहे. परंतु या रीतीनें समजूत देतांना हा शेवटचा प्रश्न एकदम मुलांचे दृष्टीपुढें उभा न रहातां सहाचा पाढा आरंभापासून २४ हा अंक त्यांत येईपर्यंत म्हणावा लागतो. अर्थात् तोंडच्या हिशेबांचे समजुतीची वर जी कसोटी दिली आहे तिला ही समजूत पटत नाहीं.

समुयवाचक पद्धतीनें मी हाच हिशेब पुढीलप्रमाणें समजावून देईनः—" सहा गुंजांचा एक वांटा करा. या ६ गुंजांच्या एका राशीला काय म्हणतात ? उ. १ सक. २४ गुंजांत किती सक आहेत ? किती सक २४ ? उ. ४ सक. जितके सक तितके वांटे. म्हणून ४ वांटे हें उत्तर. "

या पद्धतीनें **सक** हा पाढ्यांतील पारिभाषिक शब्द मुलांचे दृष्टीपुढें एकदम उभा करितां आल्यामुळें किती सक २४ ? असा एकच प्रश्न विचारून या हिशेबाचें उत्तर देण्यास शिकविणें फारच सोपें जातें.

हिशेब २. ३२ गुंजांचे आठ वांटे केले. तर एकेक वांटा किती किती गुंजांचा होईल ?

या हिशेबाची समजूत जुन्या पद्धतीनें खालीलप्रमाणें देतातः—बत्तीस गुंजांचे ८ वांटे करावयाचे आहेत, म्हणून दरवेळेस ८।८ गुंजा बत्तीस गुंजांतून काढिल्या पाहिजेत. आतां " आठ गुंजा एकदां काढल्या म्हणजे ' आठ एके आठ ' गुंजा खपतील. " "आठ गुंजा दुसऱ्यानें काढल्या म्हणजे ' आठ दुणे सोळा ' गुंजा खपतील. " " आठ गुंजा तिसऱ्यानें काढल्या म्हणजे 'आठ त्रीक चोवीस' गुंजा खपतील." व "आठ गुंजा चवथ्यानें काढल्या म्हणजे 'आठ चोक बत्तीस ' गुंजा खपतील." "यावरून ३२ गुंजांतून ८।८ गुंजा ४ वेळां काढितां येतात. म्हणून ३२ गुंजाचे ८ वांटे केले तर, एकेक वांटा ४।४ गुंजाचा होईल. " ही शेवटची समजूत तर केवळ भाषेवरून पहातां मोठ्या माणसांसही सहज समजण्यासारखी नाहीं. मग लहान मुलांस ती कशी समजेल ? वादाकरितां ही समजूत झाली असें मानिलें तरी या हिशेबाचें उत्तर 'आठ चोक ३२' असें एकदम देतां येण्यासाठीं **चोक** हा पारिभाषिक शब्द एकदम आठवण्यास कांहींच मार्ग नाहीं. आठाचा पाढा आरंभापासून ३२ या अंकापर्यंत म्हटल्याखेरीज मुळींच भागत नाहीं. अर्थात ही समजूत तोंडचे हिशेबांचे समजुतीच्या कसोटीस उतरत नाहीं असेंच म्हणावें लागतें.

समुदायवाचक पद्धतीनें या हिशेबाची पुढीलप्रमाणें समजूत देतां येतेः—३२ गुंजांचे ८ वांटे करावयाचे. १।१ वाट्यांत १।१ गुंज जर घातली तर ८ वांटे मिळून किती गुंजा होतील? उ. ८ गुंजा होतात. ८ गुंजांच्या १ राशीला काय म्हणतात ? उ. १ अड्डा. गुंजांचा १ अड्डा असला म्हणजे १।१ वांट्यांत १।१ गुंज असते. ३२ गुंजांत किती अड्डे आहेत ? किती अड्डे ३२ ? उ. ४ अड्डे. जितके अड्डे तितक्याच गुंजा १।१ वाट्यांत. म्हणून १।१ वांटा ४।४ गुंजांचा हें उत्तर.

याही हिशेबांत **अड्डे** हा पारिभाषिक शब्द मुलांचे लक्षांत एकदम आणून देतां येतो. व त्यांना ४ अड्डे किती ? असा एकच प्रश्न सुचवून एकदम उत्तर देण्यास मदत करितां येते.

हे दोन्ही हिशेब दहा पाढ्यांचे मर्यादेंतील झाले. आतां या मर्यादे पुढील १।२ हिशेब घेऊन हा विषय आटोपता घ्यावयाचा आहे.

हिशेब ३. ७८ त ६ किती वेळां आहेत ? या हिशेबाचें जुन्या पद्धतीनें उत्तर देण्यासाठीं वेळांचा सूचक असा शब्द मुलांना आठवला पाहिजे. परंतु या हिशेबाची समजूत " बालगणितशिक्षण " पुस्तकांत अशी दिली आहेः—" एकदां सहा असले म्हणजे ' एक साहें सहा ' होतात " " दोनदां सहा असले म्हणजे ' बे सक बारा ' होतात, " " तीनदां सहा असले म्हणजे ' तीन सक अठरा ' होतात, " इत्यादि, 'तेरादां' सहा असले म्हणजे 'तेरा सक अठ्याहत्तर' " होतात येथपर्यंत म्हणवावें. "

तृतीयान्त पाठाप्रमाणें **सक** म्हणजे सहावेळां, अर्थात् " तेरा सक " म्हणजे "१३ सहा वेळां " असा अर्थ होतो. **गणितशास्त्रदृष्ट्या** याचाच अर्थ " ६ तेरा वेळां"असा होतो ही गोष्ट जरी खरी आहे, तरी **भाषेच्या दृष्टीनें** व लहान मुलांची समजुतीची ताकद पहातां एकाच शब्दाचे दोन परस्परविरोधी अर्थ करणें इष्ट नाहीं. खेरीज येथें " एक साहें सहा " येथपासून पाढा आठवावा लागतो. एकदम उत्तर देतां येत नाहीं.

समुदायवाचक पाठानें हा पाढा पुढीलप्रमाणें समजावून देतां येतोः—एक वेळां ६ घे. या सहाच्या १ राशीला काय म्हणतात ? उ. १ सक एक वेळां ६ म्हणजे १ सक. ७८ त किती सक आहेत ? किती सक ७८ ? उ. १३ सक ७८. म्हणजेच ७८ त १३ वेळां ६ आहेत. **हिशेब ४.** हाच हिशेब ७८ त १३ किती

वेळां आहेत? असा बदलला तरी जुन्या पद्धतीप्रमाणें १३ सक ७८ असेंच उत्तर देण्यास शिकविलें जाईल व तें १३ चा पाढा अगदीं आरंभापासून आठवूनच द्यावें लागेल. एकदम देतां येणार नाहीं.

समुदायवाचक पद्धतीनें १ वेळां १३ म्हणजे १ तेरा ७८ त **तेरे** किती आहेत? किती **तेरे** ७८? उत्तर, ६ तेरे ७८. म्हणजेच ७८ त १३ **सहा वेळां** आहेत. या थोड्याशा उदाहरणांवरून समंजस माणसांची समुदायवाचक पाठाच्या शिक्षणविषयक व व्यावहारिक उपयुक्ततेबद्दल खात्री होईल, असा मला पूर्ण भरंवसा आहे.

उपसंहार. मराठी भाषेंत पाढयांच्या परिभाषेचे जे अनेक पाठ प्रचारांत आहेत त्यांचें मूळ प्रांतभेदांत नसून केवळ व्यक्तिभेदांत, म्हणजेच या परिभाषेच्या भाषाविषयक योग्य अर्थाबद्दलच्या गैरसमजुतींत आहे असें स्पष्टपणें नजरेस येईल. भाषेच्या बाह्यांगाचे दृष्टीनें पहातां ही पाठभेदांतील अराजकता केव्हांही इष्ट नाहीं. हा पाठभेदांचा वाद कोकण व देश यांमधील केवळ अनुस्वारविषयक वाद नसून व्युत्पत्तिदृष्ट्या या पाठांची योग्य छाननी करणें अवश्य आहे.

व्युत्पत्तिदृष्ट्या पाढयांत येणारे दहा पारिभाषिक शब्द संस्कृतांतील संख्याविशिष्ट **समुदायवाचक** शब्दांपासून निघाले असून द्विगुण या एका शब्दाखेरीज बाकी नऊही संस्कृत शद्ब 'क' प्रत्ययान्त आहेत. वररुचि व हेमचंद्र या प्राकृत व्याकरणकारांनीं जे जे नियम या बाबतींत दिले आहेत त्या नियमांप्रमाणें मुळच्या संस्कृत शब्दांत फरक होत जाऊन अखेर पाढयांतील पारिभाषिक शब्द मूळ संस्कृत शब्दांप्रमाणें समुदायवाचक नामें मानणें अधिक योग्य होईल हें मीं मागें सिद्ध केलेंच आहे. असें केलें असतां या पाठांतील अराजकता नाहींशी होऊन त्यांस नियमबद्ध रूप प्राप्त होतें व पाढयांच्या परिभाषेच्या अनेक पाठभेदांत एकवाक्यता सहज होते. प्रांतभेद व अनुस्वारवाद असले शुष्कवाद आपोआप मिटतात. त्यांना थाराच मिळत नाहीं. मीं सिद्ध केलेली व्युत्पत्ति व तदनुषंगिक समुदायवाचक पाठ ही शिष्टसंमत ठरलीं म्हणजे अनुस्वारयुक्त पाठास जागाच रहात नाहीं.

समुदायवाचक पाठांत येणारे शब्द शंभरांपुढील दोनशेंपर्यंतचे अंक पाढयांत म्हणतांनाही वापरण्यांत येतात, हें मीं एकोदर-शें, सत्तोदर-शें, विसा-शें वगैरे शब्दांच्या विचारांत दाखवून दिलें आहे. अशा रीतीनें पाढयांतले पाढयांत परंतु निराळ्या रीतीनीं या समुदायवाचक पाठांस दुजोरा मिळतो. इतकेंच नव्हे, तर भाषेंत इतरत्रही हेच समुदायकवाचक शब्द वापरण्यांत येतात ही गोष्ट पस्यांचीं नांवें, पंचा, विसा अकरे, बारे वगैरे शब्दांच्या व्यवहारांतील उपयोगावरून उघड होते. उलट पक्षीं, तृतीयान्त पाठाप्रमाणें वापरण्यांत येणारे शब्द व्यवहारांत इतरत्र कोठेंच वापरण्यांत आलेले दृष्टीस पडत नाहींत. गुजराथींतही पाढयांचे पारिभाषिक शब्द समुदायवाचक अर्थानेंच वापरतात.

गणितविषय सुधारलेल्या व अनुभवसिद्ध अशा शास्त्रीय पद्धतीनें अगदीं आरंभापासून शिकविण्यास समुदायवाचक पाठ फारच सोयीचा आहे याबद्दल प्रसिद्ध गणितशास्त्रज्ञ प्रो. नाईक यांचा हवाला सादर केलाच आहे. त्यावरून शास्त्रीय दृष्टीनेंही समुदायवाचक पाठच ग्राह्य ठरतो.

शिक्षणविषयक व व्यावहारिक अशा दोन्ही दृष्टींनीं पाढयांचा मुख्य उपयोग म्हणजे तोंडचे हिशेब करणें हा आहे. या बाबतींतही शिक्षक व विद्यार्थी या दोघांनाही समुदायवाचक पाठाचाच अधिक चांगला उपयोग होतो हें मीं सिद्ध केलें आहे.

समुदायवाचक पाठ स्वीकारल्यानें ओघानेंच प्राप्त होणारे थोडेसे फरक अमलांत आणण्याचे कामीं **पूर्वसंस्काराचीच** काय ती अडचण येण्याचा संभव आहे. समुदायवाचक अर्थानें "दुणेचा" पाढा "त्रिकाचा पाढा" याप्रमाणें सर्व पाढे आरंभापासूनच **राजरोसपणें** शिकविण्याची आवश्यकता समुदायवाचक पाठानें प्राप्त होते. परंतु हीच आवश्यकता "बालगणितशिक्षण"कारांनीं अन्य रीतीनें आपल्या पुस्तकांत सुचविली असून पुष्कळ शाळांतून याच दुणेच्या व त्रिकाच्या पाढयांची कवाईत करवून घेण्यांत येते. नुसती कवाईत न करितां हेच पाढे विशिष्ट हेतूनें राजरोसपणें शिकवावे लागतील एवढाच काय तो फरक समुदायवाचक पाठ स्वीकारल्यानें करावा लागेल.

पाढयांची समजूत देतांना पारिभाषिक शब्दांचा समुदायवाचक अर्थ सांगण्यास पूर्वसंस्कारामुळें शिक्षकांचें मन धजावणार नाहीं असें म्हणावें तर दहा पुढील पाढयांच्या मदतीनें हिशेब शिकवितांना शिक्षकांना स्वतःला न कळत तेंच करावें लागत आहे त्याची वाट काय?

सारांश, पाढयांच्या परिभाषेचा समुदायवाचक पाठ केवळ एकवाक्यतेचे दृष्टीनें नव्हे तर व्युत्पत्ति, गणितशास्त्र, शिक्षणपद्धति व व्यवहार या सर्व दृष्टींनीं तृतीयान्त पाठापेक्षां अधिक सोयीचा ठरत असतां त्याचा स्वीकार करण्याच्या आड येण्याइतकें सामर्थ्य पूर्वसंस्कार-विषयक अडचणींत नाहीं असेंच म्हणावें लागतें.

विठ्ठल गणेश ताम्हणकर.

वंगीय साहित्यपरिषदेचें बरद्वान येथील

आठवें–साहित्यसंमेलन.

मातृप्रेम ज्याप्रमाणें अवर्णनीय व अनुपमेय असतें, त्याप्रमाणेंच मातृभूमीवर व मातृभाषेवर तिच्या खऱ्या भक्ताचें प्रेम असतें. आणि असे मातृभाषेच्या साहित्याविषयीं मनःपूर्वक झटणारे भक्त राष्ट्रांत जसजसे वाढत जातील, तसतसें राष्ट्र लवकरच उदयास येणार अशी आशा बाळगण्यास मुळींच हरकत नाहीं. स्थिर बुद्धीनें जरा विश्वाच्या प्राचीन कालावर नजर टाकल्यास, ज्यांच्या अस्तित्वाविषयींही संदेह होता अशीं राष्ट्रें फक्त वाङ्मयाच्या जोरावर हां हां ह्मणतां पुढें सरसावलेलीं आहेत असें आपणांस आढळून येईल. महत्त्वाकांक्षेशिवाय उन्नति नाहीं, स्फुर्तीशिवाय महत्त्वाकांक्षा नाहीं, आणि वाङ्मयाशिवाय स्फुर्ति नाहीं. हृदय हलवून सोडून कर्तव्याची जागृति वाङ्मयच करतें. वाङ्मय निर्बलास राक्षसी बल देतें. वाङ्मय निर्जीव प्राण्यांत चेतना उत्पन्न करतें. राष्ट्र कितीही अवाढव्य असो, त्यांत कितीही फाटाफूट असो, कितीही जातिभेद असो, निरनिराळे धर्म असोत, व्यक्तींचीं भिन्न भिन्न मतें असोत, वाङ्मय त्या सर्वांस एक करील. वाङ्मयरज्जूनें सर्व राष्ट्र एकत्र बांधलें जाईल. एकमेकांच्या अंतःकरणांचा वाङ्मय मिलाफ करून देईल. वाङ्मयाच्या तेजस्वी ग्वाहीनें राष्ट्रांतील सर्व व्यक्ति एकमेकांस "भाऊ भाऊ" ह्मणून मिठ्या मारतील. सर्व हृदयें एकत्र होऊन वाङ्मय राष्ट्रास "एकहृदयी" बनवील. मातृभाषेतील साहित्य हें राष्ट्राचें तेज आहे. निर्जीव राष्ट्रास सजीव करणारी वाङ्मय ही संजीवनी आहे.

अलीकडे हिंदुस्थानांत या महत्त्वाच्या गोष्टीकडे बरेच जणांचें लक्ष वेधलेलें दिसून येत आहे. याचें ताजें प्रत्यंतर ह्मणजे नुकतेंच बरद्वान येथें भरलेलें **वंगीय साहित्य–संमेलन** हें होय. बंगालमध्यें आजपर्यंत हजारों समारंभ झाले असतील; नानातऱ्हेचे उत्सव झाले असतील. मोठमोठ्या विभूतींचें अत्यंत उत्साहानें वंगदेशीयांनीं स्वागत केलें असेल. कालीमातेच्या देवालयांत शेंकडो वेळां सर्व बंगाली अंतःकरणें एकवटलीं असतील. कॉलेज स्केअरमध्यें प्रेमानें बेहोष होऊन स्वदेशीचा जयजयकार केला असेल. "आपण भाऊ भाऊ" ह्मणून आनंदानें रक्षाबंधनें केलीं असतील. पण आपल्या मातृभाषेकरितां परवां बरद्वान येथें आपल्या वंगबंधूंनीं केलेला उत्साह अगदींच अपूर्व होता. बंगालमध्यें उत्पन्न झालेली जागृती आजपर्यंत इतक्या स्पष्ट रीतीनें पूर्वीं क्वचितच दृष्टीस पडली असेल. संमेलनाच्या कार्यकारी मंडळीनें भीत भीत-अतिशय सढळ हातानें–सातशें प्रतिनिधींची अपेक्षा केली होती. आपले भाईबंद मातृभाषेवरच्या प्रेमानें किती वेडावून गेले आहेत याची त्यांस कल्पनाही झाली नसावीशी दिसते. अपेक्षा केलेल्याच्या दुप्पट ह्मणजे १४५० प्रतिनिधि सर्व बंगाल प्रांतांतून आपल्या मातृभाषेच्या सेवेकरितां बरद्वान येथील सरस्वती-उत्सवाच्या मंदिरांत जमले होते. प्रेक्षक तर काय 'हजार' या संख्येनेंच मोजावयास पाहिजे होते. भाषा व साहित्य यांच्या सेवेकरितां इतका लोकसमूह जमलेला हा बहुतेक आर्यावर्तांत पहिलाच प्रसंग असेल. भाषा व साहित्य हीं दोन राष्ट्रीय जीवितांत ओजस्विता उत्पन्न करणारीं महत्त्वाचीं साधनें आहेत, हें तत्त्व बंगाली हृदयांत पूर्ण बिंबलें आहे असें स्पष्ट दिसत होतें. सुशिक्षित समा-

ज्यांच्या अंतःकरणांत आपल्या मातृभाषेच्या सारस्वताविषयीं उत्पन्न झालेलें हें प्रेम भावी उन्नतीचें निदर्शक नाहीं असें कोण ह्मणेल? हें प्रेम अंतःकरणापासून आहे व तें चिरकाल टिकणारें आहे ह्याची खात्री ज्यांनीं त्यावेळचा लोकांचा तो अपूर्व उत्साह पाहिला असेल त्यांना पटल्यावांचून राहिली नसेल.त्या तीन दिवसांत बरद्वान हें साहित्यसेवकांनीं अगदीं फुलून गेलें होतें. मातृभाषेच्या आणि देशाच्या साहित्यपूजनाकरितां बरद्वान येथील सरस्वतीमंदिरांत भक्तीनें वेडे होऊन अगणित उपासक जमलेले होते. या प्रसंगास विशेष महत्त्व येण्यासारखी एक मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे खुद्द बरद्वान संस्थानाधिपति हे स्वतः सरस्वती देवीचे निस्सीम उपासक व प्रामाणिक सेवक आहेत ही होय. महाराजांची साहित्याविषयीं कळकळ जगजाहीर आहे. त्यांना स्वतःला त्या प्रसंगीं अत्यंत उत्साह वाटत असून दुसऱ्यांच्या अंतःकरणांतही ते आपल्या कृत्यानें जोम आणीत होते. बरद्वानचें हें **साहित्यसंमेलन**—सरस्वती देवीचा हा अपूर्व उत्सव—साहित्यउपासकांचा हा अवर्णनीय मेळा—मातृभाषेच्या वाढदिवसाचा गोड समारंभ—पाहाण्याची ज्यांनीं संधि दवडली असेल, त्यांनीं देशांत उत्पन्न झालेल्या जागृतीचा एक अवर्णनीय मासला पाहण्याची संधि गमावली असें म्हटलें पाहिजे. यावेळीं सुशिक्षित समाजामध्येंच फक्त उत्साह दिसून येत होता असें नव्हतें; तर "साहित्य" म्हणजे काय—तें कशाबरोबर तोंडीं लावतात—हें सुद्धां ज्यांस माहित नव्हतें असे हमाल—कुली—लोकही विलक्षण उत्साहानें—पैशाचा लोभ न धरतां—अत्यानंदानें—जणूं काय स्वतःच्या घरचें लग्नच आहे अशा भावनेनें—प्रतिनिधींचीं व इतर वाङ्मयसेवकांचीं कामें करीत असत. लोकांच्या उत्साहाला साजेल असेंच अध्यक्षांचें कळकळीचें भाषण झालें. संमेलनाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर—"बरद्वान—साहित्य—संमेलनाचे प्रतिनिधि" आपआपल्या ठिकाणीं परत गेले. पण परत जातांना प्रत्येकाचें अंतःकरण देशाच्या भावी प्रगतीबद्दलच्या आशेनें व आनंदानें उचंबळून आलें होतें.

महाराष्ट्रीय यावरून कांहीं बोध घेतील काय? वंगबंधूंनीं आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावलें. वाङ्मयसेवेकरितां हजारो बांधव—सर्व जातींचे—सर्वमतांचे—बरद्वान येथें जमले होते. **हेंच उदाहरण** ता० १६–१७–१८ मे रोजीं मुंबईस भरणाऱ्या **आठव्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या वेळीं महाराष्ट्र पुढें ठेवील काय**? आपल्या कर्तव्यनिष्ठेविषयीं महाराष्ट्रीयांना एक प्रकारचा अभिमान आहे. तो खरा करून दाखविण्याची ही सुसंधि महाराष्ट्रीयांनीं दवडूं नये. नानाप्रकारच्या 'माला' काढून साहित्यसेवा होत नाहीं. महाराष्ट्र वाङ्मयाविषयीं ज्यांना खरी कळकळ असेल त्यांना हा प्रसंग फार मोलाचा आहे. मराठी वाङ्मयाची खरी स्थिति काय आहे, ती कितपत श्रेयस्कर आहे, कोणत्या दिशेनें वाङ्मय सुधारण्याचे प्रयत्न केले पाहिजेत, वगैरे सर्व गोष्टींचा उघड सर्व साहित्यसेवकांच्या समोर खल करण्याची ही वेळ आहे. श्रीमंत **सर बाळासाहेब पटवर्धन** यांच्या अध्यक्षतेखालीं हें संमेलन भरण्याचा अपूर्व योग जुळून आला आहे.

आपल्या मातृभाषेवरचें प्रेम व्यक्त करण्याची व आपल्यास शक्य तितकी या प्रसंगीं साहित्यसेवा करावयाची संधि महाराष्ट्रीय समाज दवडणार नाहीं, अशी आह्मांस भरपूर आशा आहे.

पुस्तकपरीक्षा.

अभिनवकाव्यमाला, भाग दुसरा.

(रा. रा. नारायण महादेव भिडे, बी.ए.)

आधुनिक काव्यांची माला गुंफण्याचा जो स्तुत्य उद्योग 'शारदाप्रसादमंडला'नें आपले हातीं घेतला आहे त्याबद्दल कोणासही अभिमान व आनंद वाटणारा आहे. मालेंतील पहिला मणि वे. सं. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं मोठ्या श्रमानें व कुशलतेनें गुंफून दुसरा मणि गुंफण्याकरितां ती रे. नारायण रावजी टिळक यांच्या स्वाधीन केली. रे. टिळकांनींही सर्व अडचणी बाजूस ठेवून मालेच्या दुसऱ्या भागाची 'देणगी' आज कित्येक दिवसांनीं कां होईना पण महाराष्ट्रास सादर केली, याबद्दल आह्मी त्यांचें अगोदर प्रेमानें अभिनंदन करितों. दोन्हीही भाग गुंफणारे महाराष्ट्रीय प्रसिद्ध कवीच आहेत. तेव्हां मालाकारांच्या कौशल्याबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. तथापि दुसरा भाग कसा तरी निघाला आहे एवढें मात्र कष्टानें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. 'कसा तरी' ह्मणण्याचें कारण हें कीं, काव्यमालेच्या पहिल्या भागाशीं प्रस्तुतचा भाग तोलून पाहतां पहिला दुसऱ्यापेक्षां सरस ठरेल. कदाचित् पहिल्या मालाकारापुढें बरीच मोठी सामुग्री होती, अर्थात् त्यांत निवडानिवड करून घेतां येईल असा बराच माल होता. परंतु दुसऱ्यापुढें पहिल्यांतील शिल्लक राहिलेला माल असल्यामुळें त्याची निवड तितकी अस्सल झाली नसेल; किंवा अन्य व्यवसायांमुळें बराच अवधि लोटल्यामुळें, आपले हातून मंडळाचें काम होत नाहीं असें वाटून, मालाकारानें पुढें पडलेल्या मालाची विशेष चिकित्सा न करतां घाईघाईनें तो एकत्र केला असेल. कारण कोणतेंही असो, पण आमच्या कल्पनेप्रमाणें प्रस्तुतचा गुच्छ दाही दिशा दरवळून टाकील इतका खास सुवासिक नाहीं. तथापि येथें हें अवश्य सांगितलें पाहिजे कीं—दुर्दैवानें पहिलें कारण खरें असल्यास—माला गुंफण्याचें काम कांहीं काळ येथेंच थांबविलेलें बरें असें कोणासही वाटेल. कसलीं तरी फुलें जमवून त्यांचा हार बनविला तर त्यांच्या चित्रविचित्र रंगानें घटकाभर डोळ्यांची करमणूक होईल हें खरें. परंतु आन्तर गुणांच्या योगानें मनास जो आल्हाद व्हावयाचा तो मात्र येथें मिळावयाचा नाहीं. तेव्हां असला रंगीबेरंगी हार गुंफण्यापेक्षां चांगलीं फुलें मिळेपर्यंत तो तहकूब ठेवणें हें कोणाही मालाकारास कमीपणा आणणारें नाहीं खास. आतां दुसरें कारण खरें असल्यास मग मात्र पुढील फुलें गुंफण्याचें आनंददायक काम अंगावर घेण्यास कोणासही उमेद येणारी आहे. आमच्या मतें पहिल्यापेक्षां दुसरेंच कारण सयुक्तिक आहे. तेव्हां मागील गुंफणींत काय दोष घडले आहेत, त्यांकडे गुंफण्याच्या भरांत नवीन मालाकाराचें कदाचित् दुर्लक्ष होईल एवढ्याकरितां हातीं आलेल्या काव्यमालेच्या दुसऱ्या भागाचें परीक्षण करण्याचें काम आह्मीं पतकरलें आहे.

या पुस्तकांतील पहिला व मुख्य दोष ह्मटला ह्मणजे, कवीच्या व्यक्तीची दडवणूक हा होय.

नुकत्याच उदयास येत असलेल्या एखाद्या अज्ञात कवीची कृति वाचणें निराळें व व्यक्तिगत ओळख झाल्यावर त्याची कविता वाचणें निराळें. कर्त्याची व्यक्तिगत ओळख झाल्यानें त्याच्या कृतींत जो एक विशिष्टपणा दृग्गोचर होतो त्याला त्याच्या गोषामुळें वाचकांना मुकावें लागतें. खुद्द कवि-संपादकांचीं धर्मादि विषयांवरील मतें अज्ञात असतील तर त्यांच्या काव्यांत कित्येक स्थळांतील मर्म जाणणें दुर्बोध झालें असतें. शिवाय, एखादा कवि आपल्या कवितेमुळें बराच प्रसिद्धीस आला, तर त्यासंबंधाची माहिती मिळविण्याची आकांक्षा वाचकांचे ठिकाणीं उत्पन्न होणें साहजिक आहे. ॲडिसननें आपल्या 'स्पेक्टेटर' पत्राच्या पहिल्या अंकांत नमूद केलें आहे कीं, पुस्तकाचा कर्ता काळा आहे कीं गोरा आहे, मंद आहे कीं तडफ आहे, विवाहित आहे कीं ब्रह्मचारी आहे, वगैरे हकीकत कळल्यावांचून वाचकांचें मन पुस्तका-कडे क्वचितच लागतें. इतक्या खोल माहितीची जरी अपेक्षा धरली नाहीं, तरी निदान कवीचें नांव, धंदा, ठिकाण व त्याचे दुसरे ग्रंथ, एवढ्या गोष्टी तरी वाचकांस हव्याशा वाटतात. जोंपर्यंत कवि अप्रसिद्ध असतो तोंपर्यंत त्याच्या तोंडावरील बुरख्याच्या आंत पाहण्याची कोणास फारशी उत्कंठा लागत नाहीं. परंतु प्रसिद्धीस आल्यावर मात्र त्या बुरख्या-आड काय आहे हें समजून घेण्याची जिज्ञासा उत्पन्न होते, व ती तृप्त न झाल्यामुळें वाचकांस हिरमुष्टी व्हावें लागतें. मग काव्यमालेसारख्या ग्रंथांत त्याची कृति चमकूनही ग्रंथकार मात्र तसाच पडद्यांत गुप्त राहवा या शालीनतेचें मोठें आश्चर्य वाटतें. गुलदस्तांत राहण्याचें तसेंच कांहीं कारण असल्यास त्याबद्दल कोणास कांहीं दोष देतां येणार नाहीं; व अशा कवीच्या काव्यांतील स्वारस्यास मुकणें ही गोष्टही वाचक-वृंद नाइलाजानें पतकरीत असतो. परंतु ज्यांना तसें राहण्याचें कांहीं अपरिहार्य कारण नाहीं, व ज्यांचें नांव कानीं पडल्यास आनंद होईल इतके जे परिचित झाले आहेत, अशांच्या सुद्धां मुखावरील पडदा दूर होऊं नये याचें वाईट वाटतें. प्राचीन कवींचें संशोधन चाललें असतां एखादें क्षुल्लक माहितीचें चिटोरेंसुद्धां आपल्या आनंदांत भर टाकतें, व त्या योगानें आणखी कांहीं माहिती मिळण्याची जाणीव तीव्रपणें उत्पन्न होते. ग्रंथकाराविषयीं वाचक इतके उत्सुक असतांना ज्यांची माहिती आज सहज मिळ-ण्यासारखी आहे, किंवा जी प्रत्यक्ष ठाऊक आहे, ती न देतां वाचकांचा रसभंग कां करावा हें समजणें कठीण आहे. मग कदाचित् सर्व गोष्टींची माहिती झाली तर पुढील शोधकांस कांहींच काम राहणार नाहीं या दूरदर्शी धोर-णानें कवींचीं नांवें अज्ञात ठेविलीं असल्यास न कळे!

या मुद्द्यावर विशेष जोर देण्याचें कारण एवढेंच कीं, मालेच्या पहिल्या भागांत संपादकानें दोघांच कवींची ओळख बुरख्यांतून करून दिली आहे. परंतु दुसऱ्यांत त्याची चौपट झाली आहे. याप्रमाणानें पुढील तिसऱ्या किंवा चौथ्या भागांत सर्व बुरखेवालेच पुढे येतील अशी भीति वाटते. ज्यांना मालेमध्यें प्रवेश करून घेऊन गुप्तच राहावेंसें वाटतें त्यांना धिटाई येण्यापुरता अवसर द्यावा, उगीच त्यांना खेचून आणण्यांत अर्थ नाहीं, असें पुढील संपा-दकांस आमचें विनयपूर्वक मागणें आहे.

दुसरा दोष ह्मटला ह्मणजे त्यांतील निवडीचा होय. वास्तविक अभिनवकाव्यमालेसारख्या ग्रंथांतून कवीचें नांव दिसणें ह्मणजे एकप्रकारें महाराष्ट्र-वाङ्मयांतील त्याच्या चिरस्थायीपणाचें चिन्ह होय.ज्यानें आपल्या पुष्पांनीं रसिक जनतेचें चित्त आकर्षून घेतलें आहे, त्याच महाभाग कवींचें नांव मालेसारख्या पुस्तकांत शोभतें. अभिनवकाव्यमालेचे खंड म्हणजे काव्यप्रकाशनाचीं बाडें नव्हेत कीं त्यांत कोणत्याही कवीचा समावेश व्हावा. पूर्णविकसित पुष्पांमध्यें अर्धविकसित कुसुमें व मुकुलित कलिका मिसळून त्यांचें ' संमेलन ' करणें—किंवा खुद्द संपादकांचे शब्दांत बोलावयाचें म्हणजे—गुलाबाच्या खांद्याशीं खांदा भिडवून कोन्हाटीनें उभें राहण यांत वैचित्र्यामुळें जरी शोभा आली तरी ती दोन विषम वस्तु एकत्रित केल्यानें जी शोभा येते त्याप्रमाणें होय. अर्धविकसित कुसुमांना विकसित पुष्पाचें स्वरूप दिल्यानें त्यांच्या ठिकाणीं अकालपरिणतत्व मात्र दिसूं लागतें; व हें तर केव्हांही हितावह नाहीं. या बाबतींत आमचा कटाक्ष वयादि गोष्टींवर नसून कवीच्या आन्तर गुणांकडे आहे.

तिसरा ह्मणून कमी प्रतीचा नसलेला मुद्दा ह्मटला म्हणजे कविकृतीची अत्यंत अल्पपरिचितता हा होय. पहिल्या भागांत १८ कवि दिसतात तर दुसऱ्यांत ते ३१ आहेत. कवींची संख्या जवळ जवळ दुपटीवर गेल्यामुळें त्यांच्या काव्यांतील उताऱ्यांचें प्रमाण व्यस्त पडलें आहे. त्यामुळें कवीचा अल्पसा परिचय होतो न होतो तोंच त्याला आपली जागा पुढील कवीकरितां रिकामी करावी लागत आहे.या कारणानें कवि व वाचक या दोघांचाही विरस झाल्यावांचून राहत नाहीं.पहिल्या भागांतील आरंभींचा संथपणा या भागांत नाहीं. परंतु त्यांतील शेवटीं शेवटीं उडालेली धांदल मात्र यांत पदोपदीं दृष्टीस पडत आहे. पहिल्या भागांत अर्धं ओळख झालेल्या सौ. लक्ष्मीबाई टिळक या कवयित्रीचा परिचय मात्र या दुसऱ्या भागांतील एकाच परंतु बहारीच्या उताऱ्यानें जास्त होत आहे. विनायक जनार्दन करंदीकर—किंवा 'विनायक' या नांवानेंच ज्यांची फार प्रसिद्धि आहे त्या कवीची ओळख प्रस्तुत भागांत कांहींच पटत नाहीं. यांचीं पौराणिक व ऐतिहासिक गीतें गोड व स्फूर्तिकारक असून इतकीं प्रिय आहेत कीं कित्येकांच्या मुखांतून तीं ऐकण्याचा प्रस्तुत लेखकास प्रसंग आला तेव्हां त्यास तीं अत्यंत हृदयंगम वाटलीं. तीं येथें दिसत नाहींत. तसेंच आंग्लकवि वर्डस्वर्थ याच्या We are seven किंवा Lucy Grey या कवितेप्रमाणें शोभणाऱ्या रा.दत्तात्रय अनंत आपटे ऊर्फ 'अनंततनय' यांच्या 'तूंही भिकारीण' किंवा 'तर मग मी देवाची' यांसारख्या सोप्या, सरळ व चटका लावणाऱ्या गीतांचा आढळ येथें होत नाहीं. अशा रीतीनें आणखीही कांहीं उदाहरणें दाखवितां येतील.

यावरून महाराष्ट्रांतील आधुनिक उत्कृष्ट कवितेचा संग्रह अजून संपुष्टांत आला नाहीं हें समजून येईल. दोन्ही भागांतील कवि सोडले, तरी कुंटे, मुझुमदार, प्रधान वगैरे कवि अद्याप मालाकाराची वाट पाहतच आहेत !

आतां अभिनवकाव्यमालेच्या या दुसऱ्या भागाकडे दोषैकदृष्टीनें बघितलें तरी त्यांतील

उज्ज्वल गुण दृष्टीआड होणें शक्य नाहीं. शिवाय अशा गुणांचा संग्रहही यांत बराच विपुल आहे; इतका कीं स्थलसंकोचामुळें आह्मांस त्याचा नुसता नामनिर्देशही करतां येत नाहीं. तथापि चंद्रशेखराचा 'वसंतमाधव,' विनायकाचा 'सुवास,' बी. (Bee) ची 'कमळा,' अनंततनयाचें 'फूल,' गोविंदाग्रजाचा 'राजहंस,' 'मुरली,' रेंदाळकराचें 'प्रबोधन,' बालकवीचा 'अरुण,' सौ. लक्ष्मीबाई टिळक यांची 'पतिपत्नी,' 'तसेंच,' 'मृत्युभय,' 'विपत्र आम्रवृक्ष,' 'फुलपाखरूं,' 'सीताविलाप' वगैरे कवितांचा उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. हे सर्व उत्कृष्ट कवितेचे मासलेच होत. प्रत्यक्ष वाचल्यावांचून त्यांतील सगळा रसास्वाद घेतां येणें शक्य नाहीं. व हातांत ताकद असतांना दुसऱ्यानें भरविल्यास कोणाचेंही समाधान होत नाहीं.

असो. सांप्रत रे. टिळक हे एका महाकाव्याच्या गडबडींत आहेत. तथापि सवड काढून अभिनवकाव्यमालेच्या रूपानें त्यांनीं आह्मांस महाराष्ट्र कवींचा जो अल्प परिचय करून दिला आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानून व—

'मम नको मानुं तूं राग, प्रेमला !'

असें त्यानींच उध्दृत केलेल्या 'अनंततनया'च्या शब्दांनीं विनवून, पुढील गुच्छाची वाट पाहत आह्मी हें परीक्षण येथेंच संपवितों.

"प्रेम-संदेश."

The longer I live and the more I see
Of the struggle of souls toward the heights above
The stronger this truth comes home to me
That the univsrse rests on the shoulders of love.
Ella Wheeler Wilcox.

कुणी वदो मातें कांहीं ॥ पर्वा मज त्याची नाहीं ॥
जनतेला शिकवायाची ॥ हाव नसे मजला साची ॥
प्रतिबिंबित जें तत्व मनीं ॥ हो, मी तें कथणार जनीं ॥
अप्रिय वा प्रिय जनतेला ॥ विचार हा नच शिवे मला ॥
सत्य कधीं अप्रिय होतें ! ॥ असत्य भुलवी जनतेतें ॥
कृत्रिमतेच्या बाजारीं ॥ निसर्गता ठरते चोरी ! ॥
मोह परी हा निमिषाचा ॥ अन्ति विजय हो सत्याचा !॥

पवित्र हृदयाच्या वृत्ती ॥
निज तेजें जगतीं खुलती ॥
वाढ तयांची खुंटविणें ॥
खून निसर्गाचा करणें ! ॥

* * *

" निसर्ग निर्मित प्रेम जनीं ॥ नसे," वदो वदणार कुणी ॥
असत्यता त्याच्या वचनीं ॥ हृदय तयाचें दावि जनीं ॥
स्वार्थरहित सत्प्रेम कसें ? ॥ निंदक हंसुनि पुसो ऐसें॥
स्वार्थाची अवशिष्ट पुटें ॥ बघुनि जिथें सत्प्रेम विटे ॥
त्या हृदया सत्प्रेमाची ॥ ओळख मग व्हावी कैंची ? ॥
हृदयाच्या पापी वृत्ती ॥ प्रेमाची करिती माती ! ॥

ईशांशासम सत्प्रेम ॥
जीवरसीं गेलें विरुन ॥
अहंपणें ईशत्व दडे ॥
सत्प्रेमाहि स्वार्थी चिरडे ॥

दिव्यतेज सत्प्रेमाचें ॥ ज्या हृदयीं संतत नाचे ॥
अवमानो जनता त्यातें ॥ भूषवि तो परि वसुधेतें ॥

* * *

स्वर्गाचा संदेश नवा ॥ वसुंधरेनें परिसावा ॥

स्वार्थी प्रेमाची रजनी ॥
जाइल आतां लोपोनी ॥
सत्प्रेमाची "प्रभात" ही ॥
निज तेजें दिपवील मही ॥

के. मा. सोनाळकर.

वाङ्मय आणि त्याची उत्क्रांति.

(रा. रा. दा. ना. लिमये, बी. एस् सी.)

लेखाचा विषय.

१. प्रस्तुत लेखांत वाङ्मय म्हणजे काय, त्याची उत्पत्ति कशी झाली, वाङ्मयाचें बीं रुजल्यानंतर त्याचा वृक्ष कसा बनला, त्याला शाखापल्लवादि कसकसे फुटले, भूमीच्या भिन्नत्वावर व परिस्थितिपवनाच्या स्थितीवर शाखापल्लवांचा जोम कसा अवलंबून राहिला, व यामुळें या वृक्षाचें सामान्य स्वरूप व आकार हीं कशीं ठरलीं गेलीं, इत्यादि मुद्दयांचें सामान्यत्वेंकरून विवेचन करण्याचें ठरविलें आहे. अर्थात् वाङ्मयविस्ताराचें ऐतिहासिक सूक्ष्म निरीक्षण हाच प्रस्तुत लेखाचा विषय आहे. कोणत्याही एका भाषेंतील वाङ्मयाचें विशेष असें वाचन प्रस्तुत लेखकानें केलें नसल्यामुळें, सदरहू विवेचन विशिष्ट अशा एकाद्या भाषेसंबंधानें असणार आहे असें नाहीं; तर मानसशास्त्रदृष्ट्या व ऐतिहासिकदृष्ट्या सामान्य सिद्धांत काय निघतात एवढेंच पहाणें हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

वाङ्मय या शब्दाचा अर्थ इंग्लिशमधील (Literature)—ललित वाङ्मय—या शब्दाशीं समानार्थक असा वापरून संकुचित करण्याची पद्धत पडली आहे. परंतु अशा तऱ्हेचा अर्थसंकोच सामान्य विवेचनात्मक प्रस्तुत लेखास कोणत्याही रीतीनें इष्ट किंवा सोयीचा नसल्यामुळें, वाङ्मय शब्द त्याच्या गीर्वाणशब्दशः अर्थानेंच वापरला जाणार आहे. अशा तऱ्हेच्या बिकट विषयावर एका अननुभाविक व वाङ्मयपरिशीलनाची जोड न मिळालेल्या अशा लेखकानें लेख लिहिण्याचा प्रयत्न करावा हें धाष्टर्याचें तर खरेंच. प्रस्तुत प्रयत्नामुळें एकाद्या विद्वान्, कसलेल्या व अनुभविक लेखकास सदरहू विषयावर वाचनीय व मननीय कृति निर्माण करण्याची बुद्धि झाल्यास प्रस्तुत लेखकास धन्यता वाटणार आहे; व हें धाष्टर्य तरी या उद्देशानेंच केलें आहे.

विषयपूर्ततेसाठीं मूळ विषयाच्या अनुरोधानें वाङ्मयाचें वर्गीकरण कसें करतां येईल, हेंही प्रस्तुत लेखांत पाहण्याचें ठरविलें आहे.

वाङ्मय आणि त्याच्या श्रेष्ठत्वाचें रहस्य.

२. वाङ्मय (वाचेचें बनलेलें) हें सर्वस्वीं विचारनिदर्शनात्मकच होय. विचारांचें असह्य ओझें झालें म्हणजे तें ओझें जरा कमी करण्यासाठीं दाबलेली अंतःशक्ति वाचेच्या स्वरूपानें उद्भवते. अर्थात् स्वसमाधान हाच वाचेचा उद्देश होय. वाचेचें अर्थपूर्णत्व, गांभीर्य हीं स्वाभाविकच अंतःशक्तीच्या दाबावर अवलंबून असतात. क्रिया व प्रतिक्रिया हीं समान असलीं पाहिजेत अशी स्थिति असल्यामुळें, अंतःशक्तीवर जितक्या जोराचा दाब पडेल त्या मानानें वाचारूप प्रतिक्रियाही जोराची राहते. अर्थपूर्ण वाङ्मय तयार करणाऱ्यास स्वाभाविकच बरीचशी शक्ति खर्च करावी लागते. आपोआप, सहजासहजीं कोणतीही गोष्ट उत्पन्न होत नाहीं.

वरील विवेचनावरून एवढी गोष्ट स्पष्ट होईल कीं, कोणत्याही विषयावर लिहावयाचें म्हटलें म्हणजे, एक तर त्या विषयाशीं अगदीं तद्रूप बनून गेलें पाहिजे; आपल्या बुद्धीचा लय सर्वस्वीं त्या विषयाशीं केला पाहिजे; व अशा रीतीनें आपलें शक्तिसर्वस्व त्या विषयाकडे खर्च केलें पाहिजे. खरोखरी तद्रूपता हेंच वाङ्मयाच्या श्रेष्ठत्वाचें रहस्य होय; एवढेंच काय, तर कोणत्याही कृतीच्या उत्कृष्टपणाचें तेंच रहस्य होय. वाङ्मयाच्या इतिहासक्रमाकडे लक्ष पुरविण्यापूर्वी त्याची श्रेष्ठता कशी ठरविली जाते याकडे वाचकांनीं नीट लक्ष पुरविणें जरूर आहे.

असो, तेव्हां वाङ्मयाच्या उत्क्रांतीचा इतिहास म्हणजे खरोखरीं विचारोत्क्रमणाचाच इतिहास होय. वस्तुनिरीक्षण, सृष्टीचा देखावा हेच विचारांचे उत्पादक होत. अर्थात् मानवी विचारांच्या कलानें सृष्टीच्या देखाव्यांकडे धांव घ्यावी अशी स्थिति यायला, समाजांत किंवा कुलसंघांत अशा तऱ्हेचा फुरसतीचा वेळ कांहीं लोकांना मिळायाला, समाजाला किंवा त्या कुलसंघाला साधारण स्थैर्याची स्थिति आली असली पाहिजे हें उघड आहे. अत्यंत परिश्रमाशिवाय व

साधारण सुव्यवस्थित अशा रीतीनें त्या समाजांतील लोकांचें पोषण वगैरे होत असलें पाहिजे; एवढेंच नव्हे, तर अत्यावश्यक असलेल्या शारीरिक सुखाच्या अत्यंत निकडीच्या साधनांनाही पण ते पारखे नसले पाहिजेत. असो. अशा तऱ्हेनें फुरसत मिळून जेव्हां

वाङ्मयाची उत्पत्ति कशी झाली?

सृष्टीच्या अपरंपार स्वरूपाकडे या अगदीं पुरातन वाग्वीरांचें लक्ष वळलें, तेव्हां तिच्या विशालत्वामुळें ते बावरून गेले असल्यास नवल नाहीं. सृष्टीच्या अद्भुत जादूनें भारलेले हे वाग्वीर अहंभाव सर्वस्वीं विसरून गेले; त्याच्या सर्व वृत्ति सृष्टीच्या अद्भुतत्वाशीं (प्रत्यक्ष सृष्टीशीं नव्हे) एकजीव झाल्या, व मनुष्याच्या पामरत्वाचें निदर्शन, व सृष्टीचें नानाविध तऱ्हांनीं निर्दोष व चेतोहर वर्णन ज्यांत आहे, असे नितांत व निष्कलंक काव्यमय उद्गार त्यांच्या जागृत होऊं घातलेल्या-उमलूं लागलेल्या-हृत्कमलांतून उमटले. कदाचित् इतकी निष्कलंक, इतकी स्वतंत्र, निर्व्याज, स्वाभाविक, व मन प्रसन्न करून टाकणारी कविता यानंतर केव्हांही निर्माण झाली नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति केल्यासारखें होईल, असें वाटत नाहीं. अर्थात् अंतःशक्तीच्या जागृतीखेरीज वरील काव्यौघाचा कोणताही हेतु नव्हता. सृष्टिक्रमाची कोणत्याही रीतीनें उपपत्ति लावायाची असा या नितांत काव्यमय काव्यौघाचा उद्देश नव्हता. सृष्टीच्या घडामोडींकडे,

नृत्यात्मक वाङ्मय कसें निर्माण झालें व त्याचें स्वरूप काय होतें?

तिच्या अद्भुत देखाव्याकडे व व्यापारांकडे मनानें आपला लय लावावा, त्यांच्या स्वाभाविक तालबद्धतेशीं आपला ताल जुळवावा, याजसाठीं, जणोंकाय अंतःशक्तीला जागृत करण्यासाठीं, तिला नादावून सोडण्यासाठीं, वरील काव्यांच्या लकेऱ्या गगनभर उचंबळल्या होत्या. एकंदरीत या अगदीं प्राथमिक वाक्स्रवणामध्यें सृष्टीचें साकल्यानें वर्णन केलें होतें. सृष्टीची सुरम्यता, अद्भुतता, सृष्टींतील रोजच्या व वर्षांत घडून येणाऱ्या घडामोडींचें निर्व्याज वर्णन, व प्रसन्नकारक व सर्वसत्ताधारी सृष्टिदेवीच्या प्रार्थनापर मंत्र, हेंच वस्तुतः वरील काव्यौघाचे विषय होते; व हा काव्यौघ प्रभाशाली सृष्टीच्या नितांत मनोवेधक व अद्भुत देखाव्यांशीं केवळ मनोवृत्तीचें तादात्म्य होऊनच निर्माण झालेला होता. कारण, बुद्धीचा राहो परंतु बुद्धीच्या आधीं प्रादुर्भूत होणाऱ्या कल्पनाशक्तीचाही उद्भव या प्राथमिक वाग्वीरांचे ठायीं झाला नव्हता. परंतु जरा विस्तारानें वर वर्णन केल्याप्रमाणें, वरील

कल्पनात्मक वाङ्मयाची उत्पत्ति, व त्याचें स्वरूप.

काव्यौघामुळें प्रत्यक्ष सृष्टीच्या नानाविध व्यापारांकडेच जेव्हां लक्ष वळलें, अफाट अद्भुत सृष्टीच्या विशालत्वावरून प्रत्यक्ष सृष्टीशींच जेव्हां विचारक्रम येऊन थडकला, तेव्हां अर्थातच सृष्टीच्या नानाविध व्यापारांचा एकसमयावच्छेदेंकरून विचार करणें शक्य राहिलें नाहीं.

परंतु सृष्टीचें अपार वैभव, तिचें अद्भुत सामर्थ्य, यांमुळें सर्वस्वीं बावरली गेली असल्यामुळें, विचारशक्तीला शुद्ध व स्वच्छ स्वरूप कांहीं येऊं शकलें नाहीं. कारण कोणत्याही गोष्टीचें यथातथ आकलन होण्यास मन सर्वस्वीं निर्विकार, निर्हेतुक असें बनावें लागतें; त्या गोष्टींमध्यें दिसून येणाऱ्या घडामोडी आपल्याकरितां होतात ही भावना अजीबाद सोडून द्यावी लागते; व ज्या त्या घडामोडीचें कारण तिच्यांतच शोधायाला लागणें जरूर असतें; अर्थात् मन असें निर्विकार बनायाला त्याला स्थैर्य यावें लागतें; वृत्तीचा जोर जरा मोडावा लागतो. परंतु ज्या स्थितीचा आपण विचार करीत आहों, त्या स्थितींत असें होणें शक्य नव्हतें. शिवाय सृष्टींत ज्या कांहीं बऱ्यावाईट घडामोडी घडतात त्या मनुष्यप्राण्याकरितांच घडतात अशीच अहंभावविशिष्ट कल्पना होणें हें स्वाभाविक होतें. कारण, आपल्या क्षुद्रत्वाची कल्पना मनुष्यप्राण्याला रुचणें अशक्य आहे. वरील कारणामुळें सृष्टीचें भीषण स्वरूप दिसल्यास सृष्टि आपणांवर क्रुद्ध झाली, व तेंच तिचें प्रसन्न स्वरूप दिसल्यास तिची आपणांवर मर्जी झाली, अशा तऱ्हेचे आरोप सृष्टिव्यापारांवर करण्यांत येऊं लागले. एकंदरींत सृष्टीवर मानवी मनोविकृतींचा आरोप होऊन, प्रत्येक सृष्टिक्रमाचें कल्पनामय

चित्र रेखाटलें गेलें. प्रत्येक सृष्टिव्यापाराची देवता मानली गेली, व मनुष्यप्राणि ज्याप्रमाणें पसान्याचा शोकी आहे तशीच स्थिति या देवतांचीही पण समजली गेली. त्या त्या सृष्टिव्यापारानुरूप कल्पनामय गोष्टींचें जाळें त्या त्या सृष्टिव्यापाराच्या अधिष्ठित देवतेभोंवतीं गुंतण्यांत आलें. युद्धकारणकुशल, तेजस्वी व शत्रूंवर मोठा विजय संपादन करणारे कुलसंघाचे नेतेही देवांश म्हणून गणले गेले. यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. वरील देवतांच्या वर्णनात्मक वाङ्मयांत, या शूर योद्धयांचीं व त्यांच्या प्रतापांचींही वर्णनें घुसडलीं गेलीं असल्यास त्यांत नवल नाहीं. कारण, कुलपुरुषांचेठायीं इतकी निष्ठा कांहीं कांहीं ज्ञातींत आजही दृष्टीस पडते. अशा रीतीनें गाथा (myths) निर्माण झाल्या व गाथासंग्रह (mythology) बनला गेला. वरील विवेचनावरून वाचकाच्या हें सहज लक्षांत येईल कीं रसिकवरांची तृष्णा संतृप्त करणारें नवरसात्मक काव्य कांहीं पहिल्याप्रथम निर्माण होऊं शकलें नाहीं. अर्थात् या नवरसांपैकीं अद्भुत रसानेंच पहिली भाघाडी मारली, एवढेंच नव्हे तर आतांपर्यंत वर्णन केलेल्या वाङ्मययुगांत त्याचेंच प्राधान्य राहिलें.

गाथाशास्त्राची उत्पत्ति.

अर्थात् याही वाङ्मयांत वीर, रौद्र, भयानक,—क्वचित् करुण व शृंगार हे भाव कांहीं ठिकाणीं उमटले असल्यास त्यांत नवल नाहीं. हास्यरसपरिपोषक विनोद मात्र वरील वाङ्मयांत उमटणें अगदीं अशक्य होतें.

कल्पनात्मक वाङ्मयांतील रसपोषण.

३. असो, कालवशात् विचारशक्तीला स्थैर्य येऊं लागलें. जड व चैतन्य यांमधील ढोबळ फरक स्पष्ट लक्षांत भरूं लागला, व मानवी अंतःशक्तीची जसजसी जाणीव पटली तसतसी वस्तु (things) व वस्तुसंबंध (Relative ties in things) यांच्याशीं निर्विकार तद्रूपता होणें शक्य झालें; व अशा रीतीनें बुद्धीचा, निर्विकार विचारशक्तीचा उद्भव झाला. स्वाभाविकतःच जीं राष्ट्रें–(वाङ्मय या स्थितीला येऊं लागण्याच्या सुमारास नगरराष्ट्रांचा (city-states) उद्भव झाला होता असें दिसतें)—साधारण सुसंपन्न होतीं. जेथें थोड्याशा श्रमानेंच सार्दिवेतेची प्रसन्नता सहज संपादन करतां येण्यासारखी होती, ज्या राष्ट्रांतील, समाजघटकांत व कुटुंबघटकांत सहज तेढ व आस्थिरता उत्पन्न करण्याइतकी जीवनकलहाची तीव्रता संभवत नव्हती, अशा राष्ट्रांनीं सामाजिक, राजकीय व कौटुंबिक प्रश्नांकडे अगदीं प्रथमतःच लक्ष वळविलें नाहीं हें स्वाभाविकच होय. अशा तऱ्हेच्या सुसंपन्न राष्ट्रांतील बुद्धिमान् पुरुषांनीं आपली बुद्धि अंतर्मुख करून, मानवी अंतःशक्तीच्या परीक्षणाकडे लावली. अर्थात् एकदां बुद्धीची जागृति झाल्यानंतर तिनें आपलें लक्ष अमुक एका विषयाकडेच लावावें, इतर विषयांकडे अगदीं लावूं नये ही गोष्ट सर्वथैव अशक्य होय. उघडच सृष्टिनियमानुसार, प्रथमतः व विशेषेंकरून, भरतखंडासारख्या सुसंपन्न राष्ट्रांतील बुद्धिमान पुरुष आत्मज्ञानाकडे वळले; म्हणजे इतर विषयांकडे त्यांचें लक्ष यापुढें बिलकूल लागलें नाहीं असें नव्हे. ज्या देशांत जीवनकलहाची तीव्रता जरा विशेष होती अशा देशांत, सामाजिक व राजकीय बाबींच्या विचारांनाच विशेष प्राधान्य आलें; व राजा आणि प्रजा, पुरुष व स्त्री, समाज व व्यक्ति वगैरे दुकलींच्या हक्काचें व हितसंबंधाचें विवेचन हेच विचाराचे मुख्य विषय बनून गेले. अशा रीतीनें आत्मज्ञानविषयक, नैतिक, सामाजिक, राजकीय व व्यावहारिक शास्त्रांची उत्पत्ति झाली.

बुद्धिविशिष्ट वाङ्मयाची उत्पत्ति.

पौर्वात्य व पाश्चात्य राष्ट्रांचे या बाबींतील विशेष.

व्याकरणशास्त्र, छंदशास्त्र, काव्यशास्त्र, नाट्यशास्त्र अशांसारखीं शब्दविचारात्मक व कल्पनाविचारात्मक शास्त्रें हीं साहजिकच या स्थितींत उद्भवण्यासारखीं नव्हतीं. हीं शास्त्रें अर्थात् काव्य व नाटक यांच्या उत्पत्तीनंतरच उद्भवलीं; व काव्य व नाटक यांची उत्पत्ति, केवळ मनोरंजनात्मक वाङ्मयाची उत्पत्ति, ही अद्याप लांबचीच गोष्ट होती.

व्याकरणादि शास्त्रांची उत्पत्ति.

आतां भौतिकशास्त्रासंबंधानें पहावयाचें. पहिल्याप्रथम विचारास घेतलीं गेलेलीं भौतिक शास्त्रें म्हटलीं

ह्मणजे ज्योतिषशास्त्र व वैद्यशास्त्र हीं होत. हींच शास्त्रें प्रथम कां घेतलीं जावीं याजबद्दल वाचकांस आपल्या बुद्धीस फारसा ताण द्यावा लागेल असें वाटत नाहीं. अर्थात् उपयुक्तता व मनोवेधकता हींच या स्थितीचीं कारण होत. गणितशास्त्र, प्राणिशास्त्र व इतर सृष्टिशास्त्रेंही पण यथाक्रम उत्पन्न झालीं.

भौतिकशास्त्रांचा उद्भव.

भौतिकशास्त्रांच्या मनोवेधकत्वाकडे पाहतां, व शास्त्रें या नात्यानें, इतरांपेक्षां तीं जास्त प्रत्यक्ष (Direct) आहेत हें लक्षांत घेऊन, वरवर विचार करणारास भौतिक शास्त्रें हीं अप्रत्यक्ष (Indirect) अशा समाजशास्त्र, राजधर्मशास्त्र, नीतिशास्त्र, मानसशास्त्र वगैरेंच्या नंतर बुद्धीचे विषय व्हावीं हें आश्चर्यकारक वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. अर्थात् हीं शास्त्रें फार तर आज दोन शतकांतच उद्भवलेलीं किंवा जोरावलेलीं आहेत हें उघड आहे. परंतु थोडासा विचार केला तर असें दिसून येईल कीं, भौतिकशास्त्रांचा अगदीं प्रत्यक्ष, सहसा नजरेंत उतरणारा व अत्यंत उपयोगी जेवढा भाग होता, ज्याकडे दृष्टि वळविल्याशिवाय व्यवहार सुरळितपणें चालणें शक्य नव्हतें, अशा भागांचें पर्यालोचन झाल्यानंतर, भौतिक शास्त्रांचें मनोवेधकत्व बुद्धिमान प्रथम-वाग्वीरांचे दृष्टीनें कांहीं एक उरलें नाहीं. एकंदर भौतिकशास्त्रें आपल्या पूर्वस्थितींत शास्त्रें नव्हतीं तर कला, भौतिककला होती. हें वाचकांच्या लक्षांत येईल.

भौतिक शास्त्रांच्या उत्पत्तीचा क्रम, आणि तीं अप्रत्यक्ष शास्त्रांनंतर कां निर्माण झालीं ?

अर्थात् सृष्टीच्या वक्रदृष्टीनें घेरलेल्या, अत्यंत परिश्रमाखेरीज कोणतीही गोष्ट प्राप्त करून घेणें अशक्य अशी परिस्थिति असलेल्या, परंतु ज्ञानजागृति जेथें झाली आहे, बुद्धीच्या अंकुरामुळें नवीन जोम, नवीन तेज संचरलें आहे, अशा देशांतच भौतिकशास्त्रांचा उदय व्हावा हें सृष्टिक्रमानुसारच होय. आश्चर्याची गोष्ट ही कीं अशा भौतिकशास्त्रांच्या–अननुरूप बाह्य परिस्थितीपासून मनुष्यसुखाचीं साधनें निर्माण करणें हाच मूळ उद्देश असलेल्या शास्त्रांच्या

पाश्चात्य राष्ट्रें व भौतिकशास्त्रें.

उदयास सर्वतोपरी अनुकूल स्थिति असूनसुद्धां, हीं शास्त्रें विशेष जोरानें अशीं इतक्या उशीरां (१९ व्या शतकांत) पुढें आलीं. परंतु या शास्त्रांच्या वाढीचा इतिहास म्हणजे धर्मसमजुती व शास्त्र यांजमधील कलहाचा इतिहास होय. ही गोष्ट लक्षांत घेतां, व धर्मसमजुती नाहींशा करणें, हाडींमांशीं खिळलेले पिढ्यान पिढ्या चालत आलेले संस्कार नाहींतसे करणें, हें किती बिकट काम आहे याची कल्पना केली असतां, शास्त्रीय विषय इतक्या उशीरां जोरावावेत यांत फारसें आश्चर्य नाहीं असें वाचकांस सहज दिसून येईल. अर्थात् रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र हीं शास्त्रें ज्योतिषशास्त्र, गणितशास्त्र, यंत्रशास्त्र, व सृष्टिशास्त्र या शास्त्रांनंतर उद्भवावीं हें साहजिकच होय. अर्थात् कोणत्या गोष्टीकडे मनुष्याचें मन पहिल्या प्रथम जाईल हें त्या विषयाचें स्वाभाविक मनोवेधकत्व व प्रत्यक्ष चटकन नजरेंत भरण्यासारखी उपयुक्तता या दोन गोष्टींवरूनच विशेषेंकरून ठरविलें जातें. रसायनशास्त्र हें मुळीं सृष्टिशास्त्राच्या सर्वमान्य तत्त्वावरच उभारलें गेलें आहे, म्हणून तें साहजिकपणेंच सृष्टिशास्त्राच्या (Natural Philosophy) मागून उद्भवलें. प्राणिशास्त्राची प्रत्यक्ष उपयुक्तता भासमान होण्यासारखी नसल्यामुळें तें उशीरां उद्भवलें. असो. अशा रीतीनें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शास्त्रांची उत्पत्ति झाली.

४. सध्यां आपण ज्या युगांत वावरत आहोंत (विसावें शतक) त्याला भौतिकशास्त्रांच्या प्राधान्यानें युग गणावयास कांहीं एक हरकत नाहीं. भौतिकशास्त्रांमुळेंच निगामी (Inductive) परीक्षणपद्धति किंवा विघटनात्मक परीक्षणपद्धति यांना विशेष जोर आला. राजनीतिशास्त्र, ऐतिहासिक तत्त्वज्ञान (Philosophy of history), समाजशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र वगैरे सर्व शास्त्रांना, भौतिक शास्त्रांच्या वाढीनें एका तऱ्हेची अपूर्व चेतना स्फुर्ली गेली हें कोणालाही कबूल करावें लागेल. आत्मज्ञानशास्त्र हें ज्याप्रमाणें पौर्वात्य जगाचा विशेष आहे, त्याप्रमाणेंच भौतिकशास्त्रें हा पाश्चात्य जगाचा विशेष होय.

एथवर शास्त्रीय वाङ्मयाचें जें विवेचन झालें, त्याचा ओघ जर नीटपणें लक्षांत घेतला तर सर्व शास्त्रांची उत्पत्ति वांङ्मयाच्या विशिष्ट अशा युगांत—ज्याला द्यावयाचेंच तर शास्त्रीय वाङ्मयाचें युग असें नांव

देतां येईल—होऊं शकली नाहीं हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. कारण, वरती सांगितल्याप्रमाणें, व्याकरणशास्त्र, छंदःशास्त्र, नाट्यशास्त्र वगैरे शास्त्रांचा उद्भव बराच उशीरां म्हणजे मनोरंजक वाङ्मयाच्या उत्पत्तीनंतर झाला. एवढेंच काय तर जगाचे डोळे दिपवून टाकणारीं भौतिकशास्त्रेंही पण पुष्कळच उशीरां उद्भवलीं, हें वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

सर्व शास्त्रें वाङ्मयाच्या विशिष्ट अशा एका युगांत निर्माण झालीं नाहींत.

५. एथवर वाङ्मयाच्या ज्या प्रकारांचें विवेचन झालें, त्यांचा सर्वांचा मूळ उद्देश एकच होता. वस्तु व वस्तुसंबंध यांचें ज्ञान करून घ्यायचें, सृष्टिनियमांचें सूक्ष्म निरीक्षण करून सृष्टिक्रमाची उपपत्ति लावायची, हाच अर्थात् तो उद्देश होय. थोडया विचारांतीं या प्रकारांसंबंधें असलेला आणखी एक विशेषही वाचकांच्या सहज लक्षांत येण्यासारखा आहे; व तो म्हटला म्हणजे, या सर्व तऱ्हांमध्यें, मानवी मनाची फक्त एकेकच बाजू पूर्णपणें उमटली होती हा होय, हे वाङ्मयप्रकार एक तर केवळ वृत्त्यात्मक, किंवा सर्वस्वी कल्पनात्मक, अगर पूर्णपणें बुद्धिविशिष्ट असे होते. वृत्त्यात्मक वाङ्मयामध्यें वाणी रसाळ, साधी व अकृत्रिम अशीच उमटली. कल्पनात्मक वाङ्मयामध्यें वागौघाची खळाळीच फार होती. विचाराचें क्षेत्र विस्तृत असल्यामुळें शब्दौघही बेसुमारच निपजला. अर्थात् भाषेचा अकृत्रिमपणा मात्र याही वाङ्मयांत कायम राहिला. राहितां राहिल्या अखेरच्या तऱ्हेमध्यें, म्हणजे बुद्धिविशिष्ट वाङ्मयामध्यें सुद्धां भाषेचा साधेपणा कायम राहिला. परंतु विचारक्षेत्र मर्यादलें गेल्यामुळें–कारण निर्विकार तद्रूपतेखेरीज त्या त्या विषयाचें यथासांग आकलन होणें अशक्य असल्यामुळें–बुद्धिविशिष्ट युगाला प्रारंभ झाल्याबरोबर पृथक्पृथक् विचार करण्याची पद्धत साहजिक अंगीकारली गेली.शब्दौघही कल्पनात्मक वांग्मयाप्रमाणें उचंबळणारा, भराऱ्या मारणारा असा राहिला नाहीं. अर्थात् क्षेत्र मर्यादित झाल्यामुळें, परंतु विचारांची गंभीरता (Depth) वाढल्यामुळें, विचाराच्या कल्पनात्मक स्थितींत स्वाभाविक असलेली खळबळ नाहींशी झाली व शब्दौघ प्रशांत असा वाहूं लागून त्याचा स्वैर विहार पार मावळून त्याच्या गतीला इष्ट वळण लागलें. बुद्धिविशिष्ट वाङ्मयाचेठायीं भासमान होणाऱ्या रुक्षतेचें कारण तरी हा मर्यादित शब्दौघच होय. अर्थात् वाणीचें गांभीर्य व अर्थपूर्णत्व हे बौद्धिक वांङ्मयाचे विशेष होत. बुद्धीला वृत्तिप्राधान्याची, कार्यक्षमतेमुळें प्राप्त होणाऱ्या अनुभवाची, अगर विविधज्ञानपटुत्वाची जोड मिळाल्यास मात्र शब्दश्रवण जोरदार, तेजस्वी व अर्थपूर्ण असें निपजतें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

वृत्त्यात्मक, कल्पनात्मक व बुध्दिविशिष्ट वाङ्मयप्रकारांचे भाषापद्धतीसंबंधें (Style) विशेष.

बुद्धिविशिष्ट वाङ्मय निपजण्याच्या सुमारास समाजाला स्थैर्य येऊं लागलें होतें, राष्ट्राला स्वास्थ्याचे दिवस मिळूं लागले होते, हें वरती दाखविलेंच आहे.कालवशात् ही स्वस्थता जसजशी बळावत चालली, राष्ट्रांतील बुद्धिमान् पुरुषांच्या कर्तबगारीमुळें भौतिककलांची जसजशी वाढ होऊं लागली, नयनमनोहर व श्रुतिमनोहर चीजा जसजशा निर्माण होऊं लागल्या, सुखाच्या स्वाभाविक व कृत्रिम साधनांची वाढ होऊन मन त्यांत रंगूं लागलें, तेव्हां प्रत्यक्ष सृष्टिशोधनाकडे, वस्तु व वस्तुसंबंध यांचें ज्ञान करून घेऊन त्याचा व्यावहारिक उपयोग करून घेण्याकडे, लागलेली बुद्धि वस्तुसौंदर्यावर भुलून जाऊं लागली. पूर्वी कल्पनात्मक वाङ्मयावस्थेंत सृष्टिव्यापारांवर असलेल्या ठशासारखाच, परंतु बुद्धीची मदत असल्यामुळें ज्ञानयुक्त व सयुक्तिक असा रमणीयत्वाचा ठसा सृष्टिव्यापारांवर येऊन बसला. एकंदरींत बुद्धीला कल्पनाशक्तीची जोड मिळाली, व वस्तुसौंदर्याबरोबरच शब्दसौंदर्य, अथचमत्कृति वगैरेंकडे साहजिक लक्ष पुरवूं जाऊं लागलें. कल्पनेला बुद्धीची जोड मिळालेली असल्यामुळें नानाविध मनोभाव प्रकट झाले असतां होणाऱ्या बाह्य व अंतःचेष्टांकडे आजपर्यंत केलें गेलेलें दुर्लक्ष्य नाहींसें झालें. अशा रीतीनें आतांपर्यंत पडून राहिलेल्या

ललितवाङ्मयाची उत्पत्ति कशी झाली ?

ललितवाङ्मयाचे विशेष.

शृंगार, हास्य वगैरे रसांची उन्नतावस्था येण्याचा समय समीप आला. शब्दचमत्कृति व अर्थ-चमत्कृति यांजकडे स्वाभाविक लक्ष पुरवूं जाऊं लागल्यामुळें विनोदपूर्ण वाङ्मयही उद्भवलें. एकंदरींत अशा तऱ्हेनें रसिकवरांना मान्य असलेलें ललित वाङ्मय (literature) उद्भवलें. वाङ्मयाच्या संकुचित अर्थांत गर्भित असलेलें हें वाङ्मय म्हणजे, सामान्यतः काव्य, सुरस गोष्टी, नाटकें, सुभाषितें, कादंबऱ्या वगैरेंचें होय. यांमध्यें नाटकें व विशेषतः कादंबऱ्या या अनुक्रमानें मागाहून निपजल्या. नाटक व कादंबऱ्या तयार करण्यास संविधानक रचण्याचें चातुर्य लागतें, व गुंफिलेल्या पात्रांचा सामान्य अनुभवही लागतो. गोष्टी रचणाऱ्याला इतकी तयारी लागत नाहीं. उलट त्यांच्याकरवीं इष्ट परिणाम लवकर घडवून आणणें शक्य असतें.

ललितवाङ्मयाचे प्रकार; सुरस गोष्टींची व नाटकांची उत्पत्ति.

त्यांच्या रचनेंत साधेपणा व सरळपणा विशेष असून, अर्थसौंदर्य व कल्पनासौंदर्य हीं त्यांच्यांत अत्यंत सुलभ रीतीनें साधतां येतात. अशा कारणांमुळें ललित वाङ्मयांत सुरस गोष्टींनीं अघाडी मारली असल्यास त्यांत नवल नाहीं. नाटकांची रचना गोष्टींवरूनच झाली. नाटकें हा अनुक्रमानें कादंबऱ्यांचा अगोदरचा ललित वाङ्मयामधील प्रकार असला तरी, रचनाचातुर्याच्या दृष्टीनें, ग्रंथकर्तृत्वाच्या दृष्टीनें, नाटकें हींच कादंबऱ्यांपेक्षां श्रेष्ठ ठरतील. कारण नाटककर्त्याला दृश्य काव्य करावयाचें असतें, पात्रविशेषांची सयुक्तिक व बिनचूक मांडणी व्हावी यासाठीं त्यांच्या अंतर्बाह्य स्वरूपाचा त्याला अनुभव पाहिजे असतो; शिवाय भाषाप्रभुत्वही कादंबरीकारापेक्षां त्याचे ठिकाणीं जास्त असावें लागतें.

कादंबऱ्या या नाटकांच्या मागून निर्माण होण्याचें कारण असें कीं त्यांची कल्पनाच एकदम येणें शक्य नाहीं. एकच लांबचलांब गोष्टीपेक्षां बारिक बारिक पण रसाळ व परिणामकारी लहान लहान गोष्टींचा संग्रहच कोणाला झाला तरी आवडणार. नाटक झालें तरी तें दृश्य काव्य असल्यामुळेंच, त्यामध्यें एकच गोष्ट गुंफली गेली असली तरी, तें मनाला आल्हाददायक वाटतें. परंतु कादंबऱ्यांना हीही गोष्ट शक्य नाहीं. परंतु कादंबरींत मानवी स्वभावाचें यथासांग परिपोषण करणें शक्य असल्यामुळें, वर्णनांची चंगळ करतां येणें शक्य असल्यामुळें, ललितवाङ्मयाचा हाही प्रकार रूढ होऊं लागला.

कादंबऱ्या नाटकांच्या मागून उद्भवल्या.

वरवर विचार करणाऱ्याला सुद्धां कादंबऱ्या व नाटकें या एकाच तऱ्हेच्या, केवळ एकच मांडीच्या नसतात हें सहज लक्षांत येईल. अर्थात् एकाद्या वीर-पुरुषाचें आदर्शभूत चरित्र हाच नाटकाचा प्रथम विषय व्हावा हें स्वाभाविक होतें. नायक, नायिका धीरोदात्त स्वभावाचींच दाखविण्याकडे प्रथम कल होता. जगांतील प्रत्यक्ष व्यवहार, कांहीं भीषण गोष्टी, प्रत्यक्ष परि-स्थितिनिदर्शनात्मक बाबी नाटकांत गोवाव्या ही अगदीं पहिली कल्पना नव्हती. त्याप्रमाणेंच हास्यो-त्पादक प्रहसनेंही कांहीं पहिल्याप्रथम निर्माण होऊं शकलीं नाहींत; कारण चांगलीं हेतुपूर्ण व परिणामकारक प्रहसनें रचणें हें बरेंच जबाबदारीचें काम आहे. असो, एकंदरींत वीर-वर्णनात्मक, ऐतिहासिक व सामाजिक अशीं नाटकाच्या निरनिराळ्या प्रकारांच्या उत्पत्तीचा सोपानपरंपरा कादंबऱ्यांच्या प्रकारांनाही सर्वस्वीं लागू पडते. अगदीं प्रथमावस्थेंतील कादंबऱ्या म्हणजे एकाद्या पुरुषाच्या कर्तबगारीचीच वर्णनें अशा स्वरूपाच्या होत्या; ऐतिहासिक कादंबऱ्यांना लवकरच सुरवात झाली. कादंबऱ्यांची यानंतरची अवस्था म्हटली म्हणजे एकाद्या कुटुंबाचा किंवा व्यक्तिसंग्रहाचा इतिहास अशा स्वरूपाची होती. स्वभावपरिपोषण, मानवीवृत्तींचीं रसभरित वर्णनें वगैरे गुण हे याच कादंबरीप्रकाराचे विशेष होत; व यामुळेंच कादंबऱ्यांचा हा प्रकार विशेष चित्ताकर्षक व परिणामकारी होतो. सामाजिक व तात्विक कादंबऱ्या ही यापुढली अवस्था होय. तात्विक कादंबऱ्या हा अगदीं अलीकडला प्रकार असून, यांत केवळ आधारादाखल एकादी गोष्ट घेऊन तिच्या अनुषंगानें निरनिराळ्या सृष्टिव्या-पारांसंबंधीं आपल्या कल्पना लेखक भरकटीत असतो. गुप्तपोलिसांच्या करामतींचीं वर्णनें हा एक आणखी प्रकार अलीकडे अलीकडे उद्भवला असून कॉनन् डॉइल् (Conan Doyle) सारखे विद्वान व अनुभवशीर लेखक या कार्यास तयार झाल्यामुळें या कादंबरीप्रकाराला एका तऱ्हेचें महत्त्वही पण आलें आहे.

नाटक व कादंबऱ्या यांचे निरनिराळे प्रकार.

[अपूर्ण]

रासायनिक परिभाषा.

[१२ पृष्ठावरून पुढें चालू.]

Gold स्वर्ण.
Graphite ग्राफाइट.
Helium हेलियम.
Hexathionic षड्गन्धकाणुक.
Holmium होल्मियम.
Hydrate उज्जित.
Hydride उज्जिद.
Hydriod acid उज्जनैलिक अम्ल.
Hydrogen उज्जन.
Hydrogenium हायड्रोजीनियम.
Hydronide उज्ज-प्राणिद.
Hypo उप. हा उपसर्ग बहुतकरून अम्लांच्या नांवांला लागतो. व तो त्या अम्लांत कमी प्राणवायु आहे असें दाखवितो. जसें:—
Hyponitrous उपनत्रस अम्ल. यांत nitrous acid नत्रस अम्ल यापेक्षां कमी अम्लजन असतो.
Indium इन्दियम.
Iodine नैल.
Iridium इरिडियम.
Iron लोह.
Iron Sulphate हिराकस.
Krypton क्रिप्तन.
Lanthanum लांथानम.
Lead सीस.
Lithium लिथियम.
Magnesium माग्निशियम.
Manganese मांगानीज याचें तद्धित प्रत्यय लावावयाचे पूर्वी मांगन् असें रूप करावें. जसें:—Manganate मांगनित.
Mercury पारद.
Meta मित.
Molybdate मोलिब्दित.
Molybdenum मोलिब्डीनम (मोलिब्द.) सं. रूप.
Monoxide एक-प्राणिद.
Neodymium न्योदिमम.
Neon न्योन.
Nickel निकल.
Nickel curbouyl निकल कर्बिल.
Niobate न्योबित.
Niobite न्योबाइत.
Niobium न्योबियम. (न्योब्.)
Nitrate नत्रित.
Nitride नत्रिद.
Nitrite नत्राइत.
Nitrogen नत्र.
Nitrosyl Chloride नत्रल हरिद.
Ortho ऋजु.
Osmium ओसमियम.
Oxide प्राणिद.
Oxi-acid प्राणजाम्ल.
Oxychloride प्राणहरिद.
Oxy-gen प्राण.
Oxyhydrogen flame प्राणोज्जनाचा दिवा.
Oxymuriatic acid प्राणलवणजनक अम्ल.
Ozone ओझोन.
Palladium पालेडियम.
Per परि.-जसें Perchlorate परिहरित.
Phosphate स्फुरित.
Phosphide स्फुरिद.
Phosphine स्फुरीन.
Phosphite स्फुरायित.
Phosphonium bromide } स्फुरोज्ज ब्रमिद.
Phosphoretted Hydrogen स्फुरोज्ज.
Phosphorose Phosphoric स्फुरस्फुरिक.
Phosphorus स्फुर.
Phosphoryl स्फुरील.
Platinum प्लातिनम.
Plumbic acid सीसिक अम्ल.
Polymeride बहुपरिमाणी समावयव.
Potassium पाव.

Praseo-dymium प्रेसोदिमियम.
Pyro मध्य.
Radium रेडियम.
Rhodium -ऱ्होडियम.
Rubidium रुबिडियम.
Ruthenium रुथेनियम.
Samarium समेरियम.
Scandium स्कांदियम.
Selenic acid सेलेनिक अम्ल.
Selenium सेलेनियम.
Silicon सिक (सिकता=वाळू यापासून.)
Silver रजत.
Siliver nitrate काडीखार.
Sodium सिंधु.
Stanuate वंगित.
Strontium स्त्रानशियम.
Sulphamate गन्धमित.
Sulphate गन्धिद.
Sulphite गन्धायित.
Sulphydrate गन्धोज्जित.
Sulphur गन्धक.
Sulphuretted Hydrogen उज्जगंधिद.
Sulphuric acid गंधाक्कि अम्ल.
Sulphuryl गंधिल.
Sulphydric उज्जगंधाम्ल.
Tantalum तातालम.
Tellurium तल्युरियम.
Terbium टर्बियम.
Thallium थालियम.
Thionyl गंधिल.
Thorium थोरियम.
Thullium थूलियम.
Tin वंग.
Titanium टिटानियम
Thiosulphuric गंध गंधकिक.
Tungsten टंगस्टन.
Uranium युरेनियम.
Vanadute वनेदित.
Vanadium वनेदियम.
Xenon जीवन.
Ytterbium इर्तबियम.
Yttrium इत्रियम.
Zinc जस्त.
Zirconium जिरकोनियम.

(3)

A. } अ किंवा अन; जसें anhydride
An } अनार्द्र.
Bi } द्वि --जसें Bi basic द्विभास्मिक.
Di } dionide द्विप्राणिद.
Bi—अल्प, अपुर्ण, ज्यावेळी अम्लापैकीं संपूर्ण उज्जन न जातां क्षार तयार झालेला असतो त्यावेळीं. जसें:—bi carbonate अल्प कर्बनित.
Hypo उप. जसें Hypophosphate उपस्फुरित.
Meta मित. Metaphosphate मितस्फुरित,
Ortho ऋजु. Arthophosphate ऋजुस्फुरित.
Per परि. Peroxide परिप्राणिद.
Poly बहु. Polyatomic बहुण्विक.
Proto प्रति. Protosulphate प्रतिगंधित.
Pyro मध्य. Pyrophosphate मध्यस्फुरित.
Sesqui एकार्ध. Sesqui-oxide एकार्ध प्राणिद
Sub अधि. Subchloride अधि–हरिद.
Super अति. Superphosphate अतिस्फुरित.
Tetra चतुर. Tetraoxide चतुःप्राणिद.

(4.)

-Ate इत. Corbonate कर्बनित.
-Ation करण. Oxidation प्राणीकरण.
-et एत. Sulphuret गन्धेत.
-Ic इक. Nitric नत्रिक.
-Ide इद. Chloride हरिद.
-Ine इन. Amine अमिन.
-Ite आयित. Arsenite ताल्रायित.
-Myl इल. Chromyl क्रोमिल.
-Oid कल्प. Alkaloid आल्कलिकल्प.
-Ous अस. Ferrous लोहस.

(5)

सेंद्रिय रसायनशास्त्रांत–

Ortho आसन्न (" उदीन " मधील जवळ जवळचे उज्जन–परमाणु दाखविण्यासाठीं.

Meta मित (एक सोडून पलीकडचा परमाणु दाखविण्यासाठीं.)

Para पर (समोरासमोरचा उज्जन परमाणु दाखविण्यासाठीं.)

(6)

Methane मिथुन.
Ethane इथून.
Propane मेदुन.
Butane दधुन.
Pentane पञ्चुन.
Hexane षडुन.

याचप्रमाणें सप्तुन अष्टुन नवुन वगैरे.

Methylene मिथिलीन.
Ethylene इथिलीन वगैरे, वरच्याप्रमाणें.
Acetylene दारिलीन.
Allylene लशिलीन.
Crotolene क्रोटिलिन.
Valenylene बालिलीन.

" Yl " प्रत्ययांत मूलकांस " इल " प्रत्यय लावला आहे. जसें मिथिल, मिथिलील, पंचिल हे अनुक्रमें मिथुन, मिथिलीन व पंचुन यांपासून मूलवाचक शब्द तयार केले आहेत.

Acetaldehyde दारिल प्रायोज्जिल.
Acetate दार्वित.
Acetic acid दार्वम्ल.
Acetic amide दार्वामिद.
Acetic Fermentation आम्लाविपाक.
Acetyl Urea दारिल मौत्र.
Acetylidene दारिलिडिन.
Acroline तीव्र प्राणिन.
Acrylie acid तीव्रप्राणाम्ल.
Adipic acid आयानाम्ल.
Alcohol अल्कल.
Aldehyde प्रायोज्जिल.
Alkyl उत्कर्ब.
Allyl लशिल.
Amido group } अमिल.
Amyl } अमिल.
Arabic acid गोंदाम्ल.
Arabine गोंदिन.
Arabinose गोंद शर्करा.
Assymetric Carbon atom असंमित कर्बन परमाणु.
Assymetry असंमिति.
Benzene उदीन.
Biuret द्विमुत्रेत.
Bromoform ब्रमपुत्तिक.
Butyric acid घृताम्ल; दधिजाम्ल.
Butyryl दधिलिल.
Cacao दुर्गन्ध.
Cacodyl दुर्गन्धिल.
Caffeine बुंदीन.
Caffinic acid बुंदाम्ल.
Camphoric acid कर्पुराम्ल.
Capric acid अजाम्ल.
Caramal दग्ध शर्करा.
Carbamic acid कर्बमिक अम्ल.
Carbinal कर्बनल.
Carbohydrate कर्बोज्जित.
Carbonyl कर्बिल.
Carboxyl कर्बप्राणिल.
Cartilaqe कूर्चा.
Casein किलीट.
Cell पेशी.
Cellulose काष्ठतंतु.
Cerotic acid सिक्थिनाम्ल.
Cerotin सिक्थिन.
Ceryl alcohol सिक्थिक अल्कल.
Chloral हरल.
Chlorophyl हरपर्णिल.
Chloroform हरपुत्तिक.
Choleslerene पित्तवपीन.
Choline पित्तिल.
Chyle पक्करस.
Chyme आम.
Chondrin कूर्चिन.

Citric acid जंबीराम्ल.
Collodion संलेप.
Collodion cotton संलेप कार्पास.
Creatine असिल.
Cyanate निलित.
Cyanic acid निलाम्ल.
Cyanojen निला.
Cyanuric acid निलिरिकाम्ल.
Dextrine खळ.
Dextro सव्य.
Dextrose द्राक्ष शर्करा.
Diatomic द्विमुल्य.
Diastase मध्यस्त.
Diazo acetic acid द्विनत्र दार्वम्ल.
Dihydric द्विमूल्य.
Diketone द्विकितन.
Epichlorhydrin अपिहरोज्जिन.
Ester संयुक्त ईथर.
Ether ईथर.
Fatty acids चर्बीची अम्लें.
Ferment विपाकोत्तेजक पदार्थ.
Formamide पुत्तिकामिद.
Formic acid पुत्तिकाम्ल.
Fractional भागिक.
Franctose फलशर्करा.
Fulminic acid स्फुर्जाम्ल.
Galactose दुग्ध शर्करा.
Gastric juice जाठर.
Glucose द्राक्षशर्करा; मधुशर्करा.
Glue सरस.
Gluten गव्हाचा चीक.
Glycocol स्वकलक.
Glycol स्वकल. (?)
Glyaxal स्वकलल (?)
Hemin अस्रिम.
Hematin अस्रिनिन.
Hemoqglobin अस्रग्गोलिय.
Hippuric acid अश्वमूत्राम्ल.
Hydrazine उम्नत्रिन.
Hydroryl उत्प्राणिल.
Hydrozone उम्नत्र.
Inverted sugar विपर्यस्त शर्करा.
Iodoform नैलपुत्तिक.
Iso तुल्य.
Isomeride समघटक.
Ketone कितन.
Lactamide दुग्धामिद.
Lactate दुग्धित.
Lactic fermentation दुग्धविपाक.
Lactone दुग्धक.
Lactose दुग्ध शर्करा.
Levo वाम.
Levulose फलशर्करा.
Lignin काष्ठद्रव्य.
Lignose काष्ठतंतु.
Malic acid रेवस अम्ल. (?)
Malic acid रेवस अम्ल. (?)
Meleic acid रविस अम्ल. (?)
Malonic acid कलिंगाम्ल.
Mareaptan गांधिक अल्कल.
Margaric acid मंजराम्ल (मंजर Barl) (?)
Margarin मंजरिन.
Malatose पिष्ट शर्करा; यव शर्करा.
Metamerism तुल्यपरिणाम तुल्यरूपत्व.
Myristic acid जातिपत्राम्ल.
Mucus membranc कफजनक अंतस्त्वचा.
Naphthelene नखतर्लान.
Naphtha नखतेल.
Neurine खसिन.
Nitro नत्रिल.
Nitroso नत्राल.
Olefine तैलवर्ग.
Organised fetment सजीव विपाकोत्तेजक.
Oxalic acid अंबुश्यम्ल.
Oxalate अंबुतित.
Oxy प्राणज जसे oxy acid प्राणजाम्ल.
Palmitic acid तालाम्ल.
Palmitin तालिन.
Pancreas पलग्रंथी.

[अपूर्ण.]

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका.

वर्ष २] [अंक ५.

आठवें महाराष्ट्र-साहित्य-संमेलन.

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाची आठवी बैठक मुंबई येथें " श्रीमाधवबाग " नांवाच्या शुभकार्यसमारंभास वाहिलेल्या रमणीय व पवित्र स्थलांतील सुंदर व विस्तृत दिवाणखान्यांत, रविवार, सोमवार व मंगळवार, ता० १६, १७ व १८ मे, ह्या दिवशीं कर्तृत्व, जागृति आणि सुजनता इत्यादि अनेक गुणांनीं लोकादरास पात्र झालेल्या **श्रीमंत सर गंगाधरराव** ऊर्फ **बाळासाहेब पटवर्धन**, के. सी. आय्. ई., मिरज संस्थानचे अधिपति, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं योग्य थाटमाटानें भरली होती. ती सर्व दृष्टींनीं यशस्वी झाली, आणि योजिलेला कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडून सदरहू बैठकीचे योगें महाराष्ट्र वाङ्मयाच्या प्रगतीचें पवित्र कार्य बऱ्याच पाउलांनीं पुढें गेलें, असें सामान्यतः सार्वत्रिक झालेलें व बहुतेक वर्तमानपत्रांत—ज्यांनीं न्यूनें व व्यंग्यें काढून गालबोट लावण्याचा प्रकार प्रेमातिरेकामुळें किंवा इतर अस्पृहणीय मनःप्रेरणांनीं केला त्या वर्तमानपत्रांत देखील—प्रदर्शित झालेलें लोकमत " साहित्य-पत्रिके"त नमूद करण्याचा सुयोग आल्याबद्दल अत्यानंद वाटतो. हा आनंद विशेष वाटण्याचें कारण, " साहित्यपत्रिका " आणि ' साहित्य-संमेलनाची आठवी बैठक ' ह्या दोहींचेंही जननीत्व आणि धातृत्व १९१२ सालीं अकोलें येथें भरलेल्या चिरस्मरणीय सातव्या बैठकींत जन्मास आलेल्या नियमबद्ध, सुसंघटित आणि कायम स्वरूपाच्या साहित्यपरिषद् ह्या संस्थेकडे असल्याकारणानें, " पत्रिका " व आठवी बैठक यांच्यांत सहोदरत्वाचें नातें आहे, व लहान बहिणीच्या उत्कर्षाचें वडील भगिनीस कौतुक वाटलेंच पाहिजे, हें होय. गेल्या वर्षी घडलेल्या अनेक गोष्टींवरून, साहित्यपरिषद्, पत्रिका व यंदाची संमेलनाची बैठक—व पुढील होणाऱ्या बैठकी—ह्यांचें स्निग्ध संबंध जुळून नव्यानें बनलेलें कुटुंब चिरकाल एक व अविभक्त राहील, आणि तेणेंकरून मुख्य कुलस्वामिनी जी आमची परमप्रिय महाराष्ट्र भाषा, हिच्या साम्राज्याची सत्ता आणि ऐश्वर्य उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जातील, अशी आशा बांधण्यास सबळ कारणें आहेत, असें मानण्यास हरकत नाहीं. निदान संमेलनाची आठवी बैठक तरी अपेक्षेच्या पलीकडे यशस्वी झाली ही गोष्ट खरी. यश येण्याच्या मार्गांत अडचणी बऱ्याच होत्या. उमरावती येथें भरणार होती त्या सामाजिक परिषदेच्या आड येऊं नये ह्मणून ज्या मे महिन्यांत संमेलनाची बैठक मुंबईत भरविण्याचें मुक्रर करणें भाग पडलें, त्या महिन्यांत वऱ्हाड नागपूरकडील लोकांस

मुंबईस येणें सोईवार होतें हें खरें. पण बाकीच्या लोकधुरीणांची—विशेषत: मुंबईतील पुढारी मंडळीची—ओढ मे महिन्याच्या सुट्टींत मुंबई-कडे नसून लोणावळें, खंडाळा, महाबळेश्वर इत्यादि थंड हवेच्या, किंवा पुण्यासारख्या अनेक कारणांनीं मनोवेधक असणाऱ्या स्थळांकडे असते. यंदां तर अनेक कारणांनीं पुण्याची लोहचुंबकता विशेष आकर्षक होती. शिवाय मुंबई शहरांतील लोकांमधील आणि लोकांच्या व्यवसाय-ध्येयांमधील विविधता ही नेहेमींची अडचण आहेच. तथापि, ह्या सर्व अडचणींचा परिहार होऊन संमेलनाच्या बैठकींनीं सुयश संपादिलें. तीन दिवसांच्या चारी बैठकींत स्वागत कमेटीचे सभासद व प्रतिनिधि मिळून ४०० पासून ५०० पर्यंत गृहस्थ व तितकेच प्रेक्षक हजर होते. इतर ठिकाणांप्रमाणें मुंबईतील महाराष्ट्रजन-समाजांतही पक्षभेद, जातिभेद वगैरे आहेतच. पण ह्या प्रसंगीं हे सर्व भेद विसरले जाऊन सर्व वर्गांतील देशाभिमानी पुढारी सहानुभूतिपूर्वक संमेलनास हजर होते. मुंबईच्या बाहेरची पाहुणे मंडळी बरीच होती, व त्यांत नांवाजलेले लेखक व ग्रंथकार आणि त्याचप्रमाणें समाजांतील उच्च पदवीस विराजित करणारे थोर गृहस्थ थोडे नव्हते. कुलस्त्रियांची संख्या फारशी नव्हती, पण ज्यांनीं आपल्या आगमनानें समारंभास सौभाग्यमंगलता दिली त्यांत प्रतिभावान् विदुषी-रत्नें होतीं; आणि त्यांचीं भाषणेंही अति उच्च दर्जाचीं झालीं, असें येथील एका पत्रांत म्हटलें आहे त्यांत पुष्कळ तथ्यांश आहे. कोणाचीं नांवें घ्यावीं व कोणाचीं "इत्यादि" ह्या शब्दांत समाविष्ट करावीं ह्याचा निर्णय करणें नाजुक असल्याकारणानें व सर्व नांवांचा उल्लेख संमेलनाच्या रिपोर्टांत प्रसिद्ध होणार असल्याकारणानें येथें नामनिर्देश करण्याचें मुद्दाम वर्जिलें आहे. सभेंत साऱ्या महाराष्ट्राचें व उत्तरहिंदुस्थानांतील मराठ्यांच्या "वसाहती"चें प्रतिनिधित्व देण्यास योग्य असे गृहस्थ व कुलस्त्रिया पुष्कळ होत्या यांत संशय नाहीं. कार्यक्रम निर्विघ्नपणें सिद्धीस गेला, तथापि त्यांत उत्साहशून्य शांतपणाचें अविच्छिन्न साम्राज्य नव्हतें, आणि सजीवता व जोम दाखविणाऱ्या आणि स्फूर्ति आणणाऱ्या अशा चकमकी दोन तीन ठरावांविषयीं झाल्या, ही एक आनंदाचीच गोष्ट मानिली पाहिजे. कै. रानडे नेहेमीं ह्मणत कीं मृतवत् शांततेपेक्षां लोकमतरूपी समुद्रांत तुफान असलेलेंच पुष्कळदां अधिक श्रेयस्कर असतें; मात्र तुफानाची मजल प्रगतीचें जहाज फोडून बुडविण्यापर्यंत जाऊं नये म्हणजे झालें.

संमेलनाचा उल्लेख करतांना स्वागत—मंडळानें पहिल्या दिवशीं संमेलनास जोडून पण स्वतंत्र स्वरूपाचा असा शिवजयंतीचा उत्सव, योग्य रीतीनें, महाराष्ट्र साहित्यभक्तांत पूज्य गुरुवर्यांचे पदाला पोहोंचलेल्या रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा केला. या प्रसंगीं महाराजांनीं उपक्रम केलेल्या राजव्यवहारकोशासंबंधीं अध्यक्षांनीं कळकळीचें भाषण केलें, रा. ब. जोशी यांनीं शिवाजीच्या क्षत्रिय—वंशाची मूळपीठिका दिली, व नंतर ज्या मावळे सरदारांस एकत्र करून महाराजांनीं आपलें अप्रतिहत प्रगतीचें निशाण उभारिलें त्यांच्या परिस्थितीसंबंधीं रा० गोविंदराव सरदेसाई यांनीं ऐतिहा-

सिकदृष्ट्या अत्यंत मनोरंजक व महत्त्वाचा लेख वाचला, ह्या गोष्टींचा निर्देश करणें अवश्य आहे. ह्या समारंभानें संमेलनाच्या आठव्या बैठकीस विशेष शोभा आली व ज्याप्रमाणें सांप्रतच्या युद्धासंबंधींचा ठराव कार्यक्रमांत समाविष्ट करण्यानें, त्याचप्रमाणें जयंतीसमारंभानें देखील, संमेलनाच्या चालकांची कर्तव्य-जागृति आणि शांत पण समतोल व सुदृढ अशी अंतःकरणप्रवृत्ति ह्या दृष्टोत्पत्तीस आल्या यांत संशय नाहीं. पुढील संमेलनाच्या बैठकी शिवजयंतीच्या वेळीं होण्याचें ठरलें तर जयंतीचा समारंभ संमेलनांत कायमचा समाविष्ट करण्यास हरकत दिसत नाहीं. कारण शिवाजी महाराजांचा दिग्विजय आणि महाराष्ट्र भाषेचा उत्कर्षारंभ ह्यांचा संबंध एकशरीरी व एकजीवी असाच आहे. जयंतीचा उत्सव सा. सं. च्या स्वागत–मंडळातर्फे होणार हें जाहीर करतांना ह्या संबंधाचा उल्लेख कशासाठीं केला हें येथील एका अपशकुनी शिव्यागाळींस वाहिलेल्या वर्तमानपत्रास गूढ कोडें होऊन बसलें ! कोणत्याही अभिनव योजनेची यथार्थता सांगणें हें सुजनतेचें लक्षण आहे. त्याची जाणीव ह्या संपादकास अर्थात् नसावी.

साहित्यसंमेलनाच्या आठव्या बैठकीविषयीं गौरवपर शब्द वर लिहिले त्याचा उद्देश समारंभांत अद्वितीय अपूर्वता होती किंवा सर्वांगसंपूर्णतेची सीमा झाली असें ह्मणण्याचा किंवा ध्वनित करण्याचा नाहीं. न्यूनें आणि व्यंगें होतींच; आणि पुढील बैठकींत सुधारणा झाल्या पाहिजेत अशा अनेक गोष्टीही दृष्टीस आल्या. परंतु आठव्या संमेलनाविषयीं जी एक गोष्ट रा. ब. महाजनि यांनीं मे महिन्याच्या "नवयुगा"च्या अंकांतील आपल्या सदरहू विषयावरील विचारपूर्ण व मनोवेधक लेखांत मोठ्या मार्मिकतेनें प्रधान ह्मणून नमूद केली आहे तिचें माहात्म्य कधींही विसरतां कामा नये. ही गोष्ट म्हणजे वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें, यंदाच्या साहित्यसंमेलनाच्या बैठकीचें चालकत्व एखाद्या तात्कालिक संघटित झालेल्या व कार्यसमाप्ति झाल्याबरोबरच विसर्जन पावणाऱ्या निसर्गतःच अल्पायुषी असलेल्या मंडळीकडे नव्हतें, तर चिरस्थायी होण्यासाठीं सुव्यवस्थित झालेल्या **साहित्यपरिषद्** ह्या जबाबदार संस्थेकडे होतें, ही होय. साहित्यसंमेलनें भरविण्याची जबाबदारी आणि वर्षारंभापासून वर्षसमाप्तीपर्यंत महाराष्ट्र भाषा व महाराष्ट्र साहित्य ह्यांच्या हिताहिताच्या गोष्टींविषयीं काळजी बाळगण्याची व तत्प्रीत्यर्थ उचित उपाय योजण्याची त्याहूनही अधिक महत्त्वाची कामगिरी ह्या परिषदेकडे सोंपविण्यांत आली आहे. तदनुसार, परिषदेच्या कार्यकारी मंडळानें मोडी लिपीसंबंधें सरकाराकडे अर्ज पाठविणें वगैरे कामें (तीं असावीं तितकीं विस्तृत नव्हतीं ही गोष्ट शोचनीय होय) केलीं, "साहित्यपत्रिका" प्रसिद्ध होण्याविषयींची अल्पारंभी पण सुयोजित म्हणून आशाजनक अशी व्यवस्था केली, आणि शेवटीं संमेलनाची आठवी बैठक भरविण्याची योग्य तजवीज केली. बैठकीचें स्थळ, काळ आणि अध्यक्ष होण्याविषयीं कोणास विनंती करावयाची त्याचा निर्णय, संमेलनांत वाचण्यासाठीं निबंध, कविता वगैरे कोणत्या विषयांवर याव्या त्याचा

निश्चय, व त्यासंबंधीं निमंत्रण धाडणें व कार्यक्रमाचें स्थूल स्वरूप ठरविणें वगैरे सर्व पूर्वयोजना परिषदेच्या कार्यकारी मंडळानेंच केल्या. परंतु, संमेलनाच्या बैठकीच्या व्यवस्थापकांचें क्षेत्र विस्तृत व विविध लोकांच्या प्रतिनिधींनीं बनलेलें असें असणें हें इष्ट दिसल्यावरून परिषदेच्या कार्यकारी मंडळानें नवीन मंडळी जोडीला घेऊन तशा तऱ्हेची स्वागत कमिटी अस्तित्वांत आणून पुढील सर्व व्यवस्था तिचे हातांत दिली. इतर बाबींतील मतभेद, पक्षभेद, जातिभेद इत्यादि विघातक गोष्टींस मातृभाषासेवनाच्या पवित्र कार्यीं लवही अवकाश द्यावयाचा नाहीं, हें ध्येय लक्षांत ठेवून मुंबईंतील सर्व पुढारी गृहस्थांस स्वागत–मंडळांत येण्याविषयीं विनंती केली गेली, व तिला अनुकूल असेंच उत्तर मिळालें. संघटित स्वागत मंडळीनें संमेलनाचा सर्व कार्यभार आपल्या शिरीं मोठ्या आनंदानें घेऊन सोत्साह व निरलसतेनें यशस्वी केला व मातृभाषेच्या सेवेच्या पवित्र कार्यीं मुंबईंतील महाराष्ट्रीय जनसमाजांत पूर्ण ऐक्य व सहानुभूति आहे हें दाखविलें; ह्याबद्दल साहित्यपरिषदेचें कार्यकारी मंडळ त्या सर्वांचा मोठ्या आनंदानें आभार मानतें.

साहित्य–परिषदेच्या हातीं नेतृत्व होतें आणि स्वागत सभेच्या कार्यकारी मंडळामध्यें तशीच कर्तृत्वशक्ति होती, ह्मणून आठव्या साहित्यसंमेलनाच्या कारभारांत अथपासून इतिपर्यंत शिस्त आणि सुव्यवस्था असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत होतें. निसर्गतः संमोहक अशा राजकीय विषयांविषयीं चर्चा करणाऱ्या कांग्रेससारख्या सभांत, किंवा पक्षाभिमान अथवा धर्मजात्यादि विषयींचा अभिमान यांचा विशेष प्रभाव असणाऱ्या कान्फरन्समध्यें, किंवा एखाद्या विशिष्ट त्वेषोत्पादक राजकीय अथवा सामाजिक प्रश्नासंबंधीं क्षुब्ध अंतःकरणांतील विचार ओतण्यासाठीं जमलेल्या सभेमध्यें, किंवा एखाद्या साधारण गोष्टीसंबंधानें जमलेल्या सभेंत देखील, व्यक्तिमाहात्म्यानें जो उत्साहातिरेक व जी मनोविकारांची प्रज्वलितता दृष्टीस पडते, ती आठव्या साहित्यसंमेलनांत नव्हती अशी टीका झाली आहे. ह्या टीकेचें खरें इंगित प्रतिपक्षांतील लोकांनीं पुढाकार घेऊन केलेल्या गोष्टींत यश मिळविलें म्हणजे कित्येक क्षुद्रमनस्कांस होणारा ‘ तडफडाट’ हें होय हें खरें, तथापि वरील टीकेंत बरेंच तथ्य आहे हें आम्हांस मान्य आहे. परंतु, हा चालकांचा दोष नव्हे; त्याचें मूळ मातृभाषेविषयीं आपल्या समाजांत अद्यापिही असलेली अनास्था आणि मनःशिथिलता ह्यांत आहे. शिवाय, अद्वितीय उत्साहाचे ऐवजीं ज्या सुव्यवस्थिततेचें आणि शिस्तीचें साम्राज्य संमेलनांत दिसून आलें आणि मातृभाषेच्या सेवेचे कार्यीं पक्षभेद व जातिवर्गादिविषयींचा वृथाभिमान सोडून देण्याविषयींची जी धीरोदार मनःप्रवृत्ति, कांहीं थोड्या दुराराध्य व्यक्ति सोडून देतां, बाकी सर्वांनीं दाखविली त्या सर्वांचें मूल्य कमी नव्हतें, ही गोष्ट विसरतां कामा नये. इष्ट तो उत्साहही, नेटानें परिश्रम करीत गेल्यास, कालावकाशानें परिणत झालाच पाहिजे. तो परिणत होण्यासाठीं साहित्यपरिषदेचें संवर्धन करण्याचें काम सर्व महाराष्ट्रां-

तील—महाराष्ट्र भाषा बोलली जाते त्या सर्व स्थलांतील—समाजाचें आहे. राजकीय गोष्टींत आमची उन्नति होण्यासाठीं जें महत्त्व कांग्रेसला आहे, व कांग्रेसला यशस्वी करण्यासाठीं जशी 'ऑल इंडिया कांग्रेस कमिटी' जरूर आहे, तद्वतच महाराष्ट्र भाषेच्या उत्कर्षासाठीं साहित्यसंमेलनें हवींत; आणि संमेलनें यशस्वी होण्यासाठीं साहित्य परिषदेची भरभराट घडवून आणिली पाहिजे. परिषदेचे सभासद होऊन तिला साह्य देण्याविषयीं सर्व महाराष्ट्रीय धुरीणांस ह्या ठिकाणीं विनंती करणें अस्थानीं होणार नाहीं अशी आशा आहे. दूर राहून प्रत्यक्ष किंवा एखाद्या कजाग शिखंडीस पुढें करून शिवीगाळ करीत राहण्यांतच ज्यांना अभिमान वाटतो, त्यांना कोणची विनंती करावी हें ठरविणें कठीण आहे. कदाचित् ह्या शिवीगाळीनेंच सुज्ञजनांत कर्तव्यजागृति होण्यास मदत व्हावी असा ईश्वरी संकेत असेल.

मातृभाषेच्या साह्यार्थ या, म्हणून सर्व महाराष्ट्रीयांस विनंती करावयाची, तर त्यांत आमचे राजेरजवाडे व सरदार यांस प्राधान्येंकरून समाविष्ट केलेंच पाहिजे. ते आमच्या समाजाचे धुरीण होत, व त्यांपैकीं कित्येक खरे मुगुटमणि आहेत. देवी सरस्वतीची उपासना करण्याचें व सरस्वतीभक्तांचा उचित परामर्ष घेण्याचें त्यांचें ब्रीद पुरातन काळापासून चालत आलेलें आहे. ह्या परंपरेला अनुसरूनच श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड ह्यांनीं साहित्य-संमेलनाची सहावी बैठक आपल्या आश्रयाखालीं बडोदें शहरीं भरविली. त्याच परंपरेला अनुसरून आठव्या साहित्य-संमेलनाचे चालकांनीं सर्व राजेरजवाड्यांस सन्मानपूर्वक निमंत्रण केलें होतें, आणि अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयीं श्रीमंत सर गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन यांस विनंती केली. श्रीमंतांनीं ती मान्य करून संमेलनास अभिनव माहात्म्य दिलें, याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे. श्रीमंतांच्या अध्यक्षतेनें महाराष्ट्र साहित्याच्या उत्कर्षासाठीं प्रयत्न करण्याच्या कार्याला आणि त्यास वाहिलेल्या संस्थांना किती उन्नत पद आणि किती राष्ट्रीयता प्राप्त झाली आहे हें दूरदृष्टि सुज्ञांस सांगावयास नको. श्रीमंतांच्या भाषणावर प्रतिकूल टीका करणारांना ह्या गोष्टीचें मुळींच भान राहिलें नाहीं, असें ह्मणावें लागतें. आणि ही प्रतिकूल टीकाही साधार होती असें ह्मणतां येत नाहीं. सर्व वर्गांच्या अध्यक्षांचें भाषण अमक्याच तऱ्हेचें असलें पाहिजे असें आपणच नक्की ठरवून, मग त्याच धोरणास आदिदैवत बनवून, पक्षांध होऊन न्यूनैकदृष्टीनें जहालीजहाल टीका करणें यांत अत्यंत गर्हणीय अशी मनाची अनुदारता आहे. आमच्या मतें श्रीमंतांच्या भाषणांतील त्यांचा विनय व सौजन्य दाखविणारा जो भाग होता त्यानें त्यास शोभविलें. महाराष्ट्र कवींच्या कृतींतील भक्तिरसपरिप्लुततेची त्यांनीं जी मीमांसा केली, तींतील रसिकता व मार्मिकता उच्च दर्जाचीच होती. नेहेमींच्या धर्तीवरचें भाषण श्रीमंतांस तयार करतां आलें नसतें असें नाहीं. एखादें पांडित्य-प्रदर्शक भाषण त्यांस लिहवूनही घेतां येणें कठीण नव्हतें; परंतु कृत्रिमतेचे मार्ग सोडून महाराष्ट्र भाषेवरील आपलें स्वतःचें प्रेम किती आहे व तींतील वाङ्मयाचें अध्ययन आपण किती

आस्थेनें करितों, हें निर्व्याजपणें त्यांनीं आपल्या भाषणानें दाखविलें व मातृभाषाव्यासंगाचा एक चांगला व्यावहारिक धडा पुष्कळांस शिकविला, ह्याबद्दल त्यांचें अभिनंदनच केलें पाहिजे.

महाराष्ट्र भाषेची सध्यांची स्थिति कशी आहे, वाङ्मयाची वृद्धि सध्यां कोणत्या रीतीनें होत आहे, व खरी प्रगति होण्यासाठीं पुढील कार्यक्रम कोणता योजिला पाहिजे, ह्याविषयींचें विवेचन—जें कित्येकांच्या मतें अध्यक्षांचे भाषणांत असावयास पाहिजे होतें, तें—संमेलनाच्या बैठकींत पसार झालेल्या ठरावांत आणि त्यासाठीं मुद्दाम लिहून धाडलेल्या कांहीं निबंधांत होतें. पसार झालेले ठराव पुढें दिले आहेत व त्यांवरील भाषणें आणि वर निर्दिष्ट केलेले निबंध संमेलनाचा रिपोर्ट लौकरच तयार करण्याचा विचार आहे, त्यांत प्रसिद्ध होतील. त्याविषयीं विशेष चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु त्यांकडे विहंगम दृष्टीनें अवलोकन करून सार द्यावयाचें तर, महाराष्ट्र भाषेची प्रगति होत आहे, परंतु पुष्कळ सुधारणा झाल्या पाहिजेत, व कांहीं तरी उच्च ध्येय मनांत घेऊन त्या धोरणानें वाङ्मयाची वृद्धि व्हावी असें सामान्यतः झालेलें मत संमेलनानें नमूद केलें आहे, असें ह्मणतां येईल. संमेलनासाठीं लिहून आलेल्या निबंधांत अलीकडील बहुतेक कादंबऱ्या व नाटकें आणि बरींच मासिकें यांविषयीं प्रतिकूल अभिप्राय प्रकट केला होता; आणि निर्यमक कविता इ० पूर्वपरंपरेच्या विघातक क्रांतींचा निषेध केला होता. त्यांतील विचार श्रोतृमंडळास बरेच अंशीं पसंत पडत होते, असें दिसत होतें. नव्या वाङ्मयांत स्वच्छंदतेचा अतिरेक होऊन समाजाची सदभिरुचि बिघडत आहे त्यासाठीं उपाय योजिले पाहिजेत असें संमेलनास वाटलें, आणि म्हणूनच संमेलनानें आठवा ठराव—नव्या वाङ्मयाचें निष्पक्षपातानें परीक्षण करणारें अधिकारयुक्त विद्वन्मंडळ नेमून त्यांची टीका वेळोवेळीं प्रसिद्ध केली जाण्याविषयींचा ठराव—उत्साहानें पसार केला. या ठरावाच्या जोडीस प्रतिभासंपन्न व असाधारण सेवा करणाऱ्या ग्रंथकारांचा सार्वजनिक बहुमान करण्याची सुसंघटित व्यवस्था असावी, असा नववा ठराव, आणि परलोकवासी झालेल्या गुणवान् अशा आधुनिक काळांतील सुप्रसिद्ध ग्रंथकारांची व कर्तीचीं चरित्रें प्रसिद्ध करावीं व त्यांच्या लेखांच्या पुनरावृत्ति काढाव्या असा बारावा ठराव (इ) हे पसार केले गेले. आमच्या वाङ्मयानें पूर्वकालीं संपादन केलेले कोणतेही विजय वृथैव सोडून देऊं नयेत हें तत्त्व निर्यमक कवितेच्या निषेधाच्या मुळाशीं आणि मोडी लिपीसंबंधींच्या चवथ्या ठरावाच्या मुळाशीं होतें. कोणच्या तऱ्हेचें वाङ्मय सध्यां विशेष निकडीचें आहे याविषयींचें आपलें मत संमेलनानें ठराव ७ व १२ यांत नमूद केलें आहे. पैकीं १२ (अ), १२ (आ) व १२ (उ)—भाषेचा कोश, कविचरित्रलेखमाला व भाषेचा इतिहास, या विषयांवरील ग्रंथांचें माहात्म्य किती आहे, याचें विशेष वर्णन करणें नको. पुढें ठेवावयाचें ध्येय ठराव ५ व ६ यांत नमूद केलें आहे. हें ध्येय म्हणजे देशांतील सर्व तऱ्हेचें शिक्षण "अ आ" पासून "एम्.ए." "एल् एल्. डी."-पर्यंत देशी भाषेच्या द्वारें दिलें जावें, हें होय. या ध्येयाविषयीं मतभेद होण्याचा संभव नाहीं.

परंतु तें साध्य करण्याच्या मार्गासंबंधीं प्रगतीचा रथ कसा तयार करावयाचा, याविषयीं मतभेदास जागा आहे. अगोदर दुय्यम तऱ्हेच्या शाळांत व आर्ट्स् कॉलेजमध्यें शिकविण्यास योग्य असे ग्रंथ तयार व्हावे, कीं सर्व शिक्षण देशी भाषांमधून दिलें जावें अशी व्यवस्था प्रथम सक्तीनें अमलांत आणावी आणि उचित ग्रंथ निर्माण होणें हें काळावर, परिस्थितीवर, मागणी आणि पुरवठा या अर्थशास्त्रीय तत्त्वाच्या अमलावर सोंपवावें—हा मुख्य वादाचा विषय होय. युरोप खंडांतील देशी भाषांची प्रगति होऊन लॅटिन व ग्रीक यांची, सध्यां इंग्रजी भाषेस हिंदुस्थानांत आहे अशा पदवीपासून, उचलबांगडी झाली, ती वर सांगितलेल्या मार्गांपैकीं द्वितीय मार्गाचे अवलंबनानें झाली, असें ह्मणण्यास इतिहासाचा आधार आहे. देशी भाषांची उन्नति सर्वांसच पाहिजे; परंतु ती उन्नति साधतांना पाश्चात्य ज्ञानभांडार देशांत वाढलें जाण्याच्या क्रियेंत कोणत्याही रीतीचा प्रतिरोध येऊं नये असें सर्व सुज्ञांचें मत झालें पाहिजे. ठराव १० वा—सर्व देशी भाषांस एकच लिपि असावी आणि कोणची तरी एक देशी भाषा द्वितीय भाषा ह्मणून सर्व शाळांत देखील शिकविली जावी—या ठरावाचें खरें मर्म पुरें लक्षांत न आल्यामुळें बराच वादविवाद झाला. शिक्षणक्रमांतील द्वितीय भाषेचा हा मान हिंदी भाषेस मिळावा कीं नाहीं, याबद्दल मतभेदास जागा असेल. परंतु, ठरावांत ग्रथित केलेलें मुख्य तत्त्व सर्वांस मान्य असावें असें आहे. आमच्या देशांतील सर्व देशी भाषांची उन्नति व्हावी आणि त्याबरोबरच एकमेकांचे साधारण व्यवहारांतील विचार व त्याचप्रमाणें उच्च दर्जाचे वाङ्मयगत विचार एखाद्या देशी भाषेच्या द्वारेंच एकमेकांस कळण्याची व्यवस्था व्हावी, या ध्येयांतील राष्ट्रीयता व देशाभिमानता लक्षांत येण्यास फारसे प्रयास जरूर असूं नयेत.

मुंबई, ता. ३०।५।१५. दा. ग. पाध्ये.

आठव्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनास—

ग्रीष्मर्तुच्या अरुणकोमल पल्लवांनीं
नाना[1] सुवर्णरचनाऽन्वित तोरणांनीं
झाला प्रसन्न शुभ माधवबाग पाहे
साहित्य-मंगल-सुमेलन जेथ आहे. १

प्रेमोद्गमें अलिकुलें नव मल्लिकेला
गुंजारवें कथिति रम्य वसंत गेला
छायातरु स्वघनपल्लवदोलनानें
मंदानिलें करिति गार निदाघ[2] जाणें. २

गेला वसंत, परि मंद मरंदपाना
गुंजारवें हुडकिती अलि कुंज नाना
कारंजियावरुनि गार तुषार वारा—
सोडी, करी टवटवीत निकुंज सारा. ३

लाटांसवें धवल सागर खेळताहे
अंकीं जिच्या, रसविदांवर[1] लोळताहे
मुंबापुरी, रसवती जनरंजनार्ते
बोलावि ते सकल आर्य कवीश्वरांतें. ४

१ सोन्याचे अक्षरांनीं भूषित केलेले पडदे, तोरणें वगैरे. २ उष्मा.

१ रस (पक्षीं) पाणी जाणण्यांत श्रेष्ठ. पाण्याचा सांठा, पक्षीं रसिकांत श्रेष्ठ.

एकीकडे पुरपथीं जयशब्द होई
एकीकडे श्रवणमंगल घोष पाहीं
एकीकडे क्षणरवासह मंगलोऽशी
ध्याया स्त्रिया चमकती नव पुण्यराशी ! ५

ऐशा स्थळीं नवल हें—मज—बोलवावें !
कैसें न हो शिर अहा ! मग हें लवावें ?
सत्कार्य हें, सुजनरंजन चालवावें
काव्यप्रबंध रचुनी वय घालवावें. ६

भोक्ते तुह्मी श्रवणमंगल भारतीचे
ज्ञाते प्रसन्न रससंगत वर्णनाचे
त्रैलोक्यभूषणमणि, श्रुतिगीत--शास्त्री
नाना कवीश्वर गुणज्ञ सुशील मंत्री. ७

जेथें प्रसिद्ध कविंचीं कवनें रसाळें
त्यांच्यापुढें र, ट, प, हें मम काय चाले ?
हे बोबडे मधुर मंजुळ बालबोल
हे तूमचे श्रवण आजि करोत लोल. ८

सारे रसज्ञ कविमंडल, सभ्य, थोर
गाया अहा ! धडधडे उर यांसमोर
ने सुंदरि स्वकविते मम आजि ओझें
सभ्यांपुढें उतरिं, यावरि दैव माझें. ९

आहेत हे रसिक पंडितवर्य आर्ये !
हे धर्मशास्त्रकुशल प्रतिदेव सारे
तूं कन्यका ह्मणविशी कविकेसरीची
भीतेस काय खल निंदक शूकरासी ? १०

नाहीं सुवर्ण, सदलंकृति गे कशाची
आह्मां अकिंचनगृहीं तुज ठाउकेची !

योजूनियां सुगुणें रीति रसप्रबंधें
ओजें, प्रसादें, गुणरंजन शालिनी घे. ११

ठावी तुला चरण-मंजिर-रंगलीला
संगीत मंजु रचना तुज चांगलीला
गे थोर कोण ?-कवि कीं कविता ? कळेना
आतां स्वयेंचि पुस सुंदरि या जनांना ! १२

छंदप्रबंध रससंगतमंजुवाणी
गावोनियां पुरविं तूं कविची शिराणी
काव्यें करोत कवि, तद्रसमाधुरीचा
भोक्ता रसज्ञ, पति ज्यापरि कामिनीचा. १३

लीला कलंकरहिता रससौरभींची
आल्हाद दे सहृदय प्रिय वाचकांशी.
न्यायीं प्रसन्न सुमसौरभ दूर देशीं
कोणी दिली शपथ बंधु सुमारुतांशीं ? १४

माझी रसाळ रसना रसिकांसमोर
नाचो ह्मणे, रसद जेविं घनासमोर;
अंगीकृत व्रत असें जनरंजनाचें
आलें फळा, सुकृत हें तुमच्या पदांचें ! १५

आतां स्वयें करुनि वंदन या सभेसी
त्यां अर्पिलें रसिक हो कवितावधूसी
आनंदवो सतत रंजनशालिनी ही
तेणेंचि हा कुशल विठ्ठल धन्य होई. १६

१५।५।१५ विठ्ठल भगवंत लेंभे.

१ संमेलनचा जयजयकार. २ माधवबागेंतील-माधवमंदिरांतील मंगलवाद्यें. ३ मंगलकर आशीर्वाद. ४ उत्तम वर्ण, (पक्षीं) सोनें. ५ काव्यालंकार, (पक्षीं) दागिने.

१ काव्यगुण. २ गौडी, शूरसेनी काव्यरीति (जनरीति). ३ काव्याचा ओज (जोर). ४ काव्यप्रसाद (स्वच्छपणा). ५ पक्षाचे चरण, (पक्षीं) पाद. ६ पेंजण. ७ वृत्तरचना. ८रसाच्या संगतीनें मंजु झालेली वाणी. ९ जसा कामिनीचा भोक्ता तिचा पति, तसा काव्याचा भोक्ता रसिक. १० रसाचे परिमळाची कलंकरहित लीला. ११ नेण्यास. १२ वायु हा गंधबन्धु म्हणून प्रसिद्ध आहे.

आठवें

महाराष्ट्र-साहित्य-संमेलन, मुंबई.

[रविवार, सोमवार, मंगळवार-तारीख १६, १७, १८, मे १९१५.]

दिवस पहिला,-रविवार ता. १६ मे. दुपारीं १ वाजतां.

१. गायन.—ईशस्तुति आणि स्वागत.

२. भाषण—सर भालचंद्र कृष्ण, नाईट, अध्यक्ष स्वागत कमिटी, यांचें.

३. अध्यक्ष—श्रीमंत सर गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन, के. सी. आय्. ई., यांस स्थानापन्न होण्याविषयीं विनंती.

सूचकः—रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम्. ए.
अनुमोदकः—ले. क. कान्होबा रणछोडदास कीर्तिकर.
समर्थकः—डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख, एम्. डी.

यानंतर सहानुभूतिपर आलेल्या तारांचा आणि पत्रांचा नामनिर्देश करण्यांत आला. श्रीमंत गायकवाड सरकार, मि. दादाभाई नौरोजी, रामदुर्ग संस्थानचे अधिपति, बडोद्याचे दिवाण मि. व्ही. पी. माधवराव, यांचीं पत्रें वाचण्यांत आलीं. रा. बाळ गंगाधर टिळक यांनीं प्रकृतीच्या कारणानें संमेलनाच्या आमंत्रणाचा स्वीकार करतां येत नाहीं असें आपल्या लेखामार्फत कळवून, अजून प्रसिद्ध न झालेल्या आपल्या गीतारहस्याची एक प्रत आगाऊ मुद्दाम बांधवून संमेलनास भेटीदाखल पाठविली असल्याचें जाहीर करण्यांत आलें.

४. अध्यक्षांचें भाषण.

५. ठराव पहिलाः—

लहान लहान राष्ट्रांना स्वतंत्रतेनें राहण्याचा हक्क आहे, आणि राष्ट्रीय व्यवहारांत आश्वासनें, तहनामे आणि करार यांचें माहात्म्य अविच्छिन्न आहे, इत्यादि उदात्त तत्त्वें स्थापित करण्यासाठींच ग्रेट ब्रिटन आणि त्याचीं दोस्त राष्ट्रें हीं सांप्रतचें युरोपखंडांतलें युद्ध चालवीत आहेत, असें आपलें मत ही सभा नमूद करते, आणि त्यांस संपूर्ण यश येवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करते; त्याचप्रमाणें सदरहू लढाईत जर्मनी आणि ऑस्ट्रिया या देशांनीं निरपराधी मनुष्यांचे प्राण घेणें, गांवें आणि शहरें उध्वस्त करणें, अपरिहार्य युद्धाची उग्रता कमी करण्यासाठीं मान्य गणिलेल्या धर्मयुद्धाचे निर्बंधांचा धिक्कार करणें, आणि विशेषतः कलाकुशलतेचीं निवासस्थानें, देवालयें, विद्यालयें आणि सरस्वतीपीठें यांचा नाश करणें, इत्यादि जे मनुष्यजातीच्या संस्कृतीस काळिमा आणणारे अत्याचार करण्याचे प्रकार कायम ठेविले आहेत त्यांचा ही सभा तिरस्कारपूर्वक निषेध करते. ब्रिटिश व दोस्त राष्ट्रांच्या आणि खास हिंदुस्थानांतून गेलेल्या, रणक्षेत्रीं लढणाऱ्या, शूर सैनिकांस-" तुम्ही मनुष्यसंस्कृतीचे रक्षणार्थ लढत आहां म्हणून ही सभा तुमचें अंतःकरणपूर्वक गौरव करिते, व तुम्हांस यश येवो अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करिते."- असा निरोप ही सभा योग्य अधिकाऱ्यांमार्फत धाडते.

सूचक-रा. दामोदर गणेश पाध्ये. एम्. ए.
अनुमोदक—रा. काशीनाथ रामकृष्ण कोरगांवकर, बी. ए., एलएल्. बी.
समर्थक—रा. हरि नारायण आपटे.
,, सौ० गंगुबाई खेडकर.

६. ठराव दुसरा.—

संमेलनापुढें कोणते ठराव आणावयाचे ते ठरविण्याचें काम खालीं दिलेल्या गृहस्थांच्या कमिटीकडे सोंपविण्यांत येत आहेः—

अध्यक्ष-श्री० बाळासाहेब पटवर्धन.
सर भालचंद्र कृष्ण.
रा. हरि नारायण आपटे.
ले. क. कीर्तिकर.

रा. ब. विष्णु मो. महाजनि.
डॉ. मोरेश्वर गो. देशमुख.
प्रो. चिंतामण गंगाधर भानू.
श्री. सरदार रा. ब. माधवराव किबे.
रा. नरसिंह चिंतामण केळकर.
रा. गोविंद वासुदेव कानिटकर.
रे० नारायण वामन टिळक.
रा. गणेश कृष्ण आगाशे.
रा. दामोदर गणेश पाध्ये.
रा. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे.
रा. काशीनाथ रामकृष्ण कोरगांवकर.
रा. हरिश्चंद्र रा. तालचेरकर.
रा. गोविंद सखाराम सरदेसाई.
रा. ब. पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी.
रा. कृष्णाजी केशव गोखले.
रा. मंगेश कमळाजी नाडकर्णी.
रा. जनार्दन सखाराम कुडाळकर.
डॉ. गोपाळ रामचंद्र तांबे.
रा. दामोदर सावळाराम यंदे.
रा. विष्णु रघुनाथ लेले.
श्री. सौ० कमळाबाईसाहेब किबे.
श्री. सौ० गंगुबाई खेडकर.
श्री. सौ० काशीबाई कानिटकर.
प्रो. विष्णु गोविंद विजापुरकर.
रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.
रा. गिरिराव अण्णा जहागिरदार.
रा. सदाशिव खंडो आळतेकर.

व

म. सा. परिषदेचे सर्व सभासद.

सूचक–शेट तुकाराम जावजी.

अनुमोदक—रा. गो. स. सरदेसाई.

[**दिवस दुसरा**—सोमवार १७ मे. प्रातःकाळीं स्टँ. टा. ७॥ ते १०, व सायंकाळीं ३॥ ते ६.]

१. गायनः—ईशस्तुति, श्रीशारदास्तवन.

२. ठराव तिसराः—

कै. विनायक कोंडदेव ओक, कै. गंगाधर रामचंद्र मोगरे, कै. मोरो केशव दामले, एम्.ए., कै. त्र्यंबक गुरुनाथ काळे आणि कै. शांताराम अनंत देसाई, एम्. ए. एलएल. बी. ह्या सुप्रसिद्ध महाराष्ट्र-साहित्य-भक्तांच्या, आणि शिक्षणप्रसारासाठीं अविश्रांत परिश्रम करणारे कै.ना. गोपाळ कृष्ण गोखले बी.ए.,सी. आय. ई. ह्यांच्या, मृत्यूबद्दल ही सभा आपलें दुःख प्रदर्शित करिते, आणि मराठी भाषेची त्यांनीं केलेली सेवा फार महत्त्वाची होती असें आपलें मत नमूद करिते.

सूचक–रा. गोविंद वासुदेव कानिटकर, बी. ए., एलएल. बी.

अनुमोदक–रा. श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर, एम्. ए., एलएल. बी.

समर्थक–सौ. काशीबाई कानिटकर.

या ठरावांत दुसरे दिवशीं नुकतेच प. लो. वा. झालेले केसरीचे दुय्यम संपादक आणि भारतीय युद्ध व भारतीय उपकथा या पुस्तकांचे कर्ते, रा. दत्तात्रय गोपाळ लिमये, बी. ए., यांचें नांव सामील करण्यांत आलें.

३. संमेलनासाठीं लिहून आलेले निबंध.

संक्षेपक–रा. आत्माराम हरि खेर, बी. ए.

४. ठराव चवथाः—

मोडी लिपि ही पुरातन काळापासून चालत आलेली, लोकप्रिय आणि महाराष्ट्रांतील सर्व व्यवहारांत पूर्णपणें प्रचलित अशी असल्याकारणानें, ती मुंबई इलाख्यांतील बऱ्याच सरकारी आफिसांत वापरली जाऊं नये असा जो सरकारी हुकूम झाला आहे तो रद्द करावा अशी ह्या सभेची सरकारास नम्रपणें विनंती आहे. ह्यासंबंधीं साहित्य-परिषदेच्या कार्यकारी मंडळाकडून सरकाराकडे अर्ज गेला त्यास प्रतिकूल उत्तर आलें. तथापि संमेलनाचे वतीनें पुनः एक अर्ज सरकाराकडे पाठवावा असें ह्या सभेस इष्ट वाटतें. तरी तिचे तर्फे नवा अर्ज तयार करून धाडावा अशी खालीं नांवें दिलेल्या गृहस्थांच्या कमिटीला तिची विनंती आहे:-

रा. दामोदर गणेश पाध्ये, एम्. ए.
रा. सदाशिव खंडो आळतेकर, एलूएल. बी.
रा. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, एलएल. बी.
रा. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.
सूचक---रा. गिरिराव अण्णा जहागिरदार.
अनुमोदक--रा. विष्णु रघुनाथ लेले.
समर्थक--रा. मंगेश क. नाडकर्णी, एलएल. बी.

५. संमेलनासाठीं लिहून आलेले निबंध.
संक्षेपक-रा. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

६. ठराव पांचवा:—.

हिंदुस्थानच्या शाळांतील व युनिव्हर्सिटीच्या आर्ट्स शाखेच्या सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमांत देशी भाषा हा विषय अवश्य विषयांपैकीं असून त्यांत इतर महत्त्वाच्या विषयांप्रमाणें परीक्षा युनिव्हर्सिटीनें घ्याव्या असें या सभेचें मत आहे.

सूचक-रा हरि नारायण आपटे.
अनुमोदक-रा. नारायण केशव बेहेरे, बी.एस्सी.
समर्थक-रा. कृष्णराव अर्जुन केळुसकर.

७. संमेलनासाठीं लिहून आलेले निबंध.
संक्षेपक-रा. वासुदेव गो० आपटे, आणि
रा. चिंतामण नीलकंठ जोशी, एम. ए.

८. ठराव सहावा:-

दुय्यम शिक्षणाच्या सर्व विद्यालयांतून दिलें जाणारें शिक्षण देशी भाषेच्याद्वारें दिलें जावें असें या सभेचें मत आहे

सूचक—रा. हरि नारायण आपटे.
अनुमोदक—प्रो. महादेव रामचंद्र परांजपे,एम्.ए.
समर्थक—प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर, एम्.ए.
,, श्री. सौ. काशीबाई कानिटकर.

९. ठराव सातवा:-

मुलांमुलींच्या शिक्षणाच्या कामीं उपयोगीं पडेल असें विशिष्ट वाङ्मय तयार करण्याचा उपक्रम व्हावा असें या सभेचें मत आहे.

सूचक--रा. गजानन भास्कर वैद्य, बी.ए.
अनुमोदक--रा. वासुदेव गोविंद आपटे.
समर्थक--रा. नारायण केशव बेहेरे.

१०. संमेलनासाठीं आलेल्या कविता.
निर्देशक-रा. मा. रा. र. मोरमकर.

११. ठराव आठवा:—

वेळोवेळीं नवीन प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाचें निःपक्षपातानें परीक्षण करून त्यावर अधिकारयुक्त मंडळीचा अभिप्राय वेळोवेळीं प्रसिद्ध होणें अवश्य आहे, आणि त्यासाठीं साहित्यपरिषदेच्या कार्यकारी मंडळीनें एक स्वास कमिटी नेमावी असें या सभेचें मत आहे.

सूचक—रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि.
अनुमोदक--रा. गोविंद सखाराम सरदेसाई.
समर्थक—रा. गिरिराव अण्णा जहागिरदार.
,, रा. वाग्भट नारायण देशपांडे, बी. ए.

१२ संमेलनासाठीं लि. आ. निबंध-
संक्षेपक--रा. विठ्ठल शिवाजी नाडकर्णी.

१३. ठराव नववा:—

ज्या प्रतिभासंपन्न महाराष्ट्र ग्रंथकारांनीं आणि कवींनीं वाङ्मयाची विशेष सेवा करून असाधारण कीर्ति मिळविली असेल, त्यांचा सार्वजनिक रीतीनें बहुमान करण्याची कांहीं तरी सुसंघटित व्यवस्था असावी असें ह्या सभेचें मत आहे व यासंबंधीं कांहीं तरी सुयुक्तिक योजना साहित्यपरिषदेच्या कार्यकारी मंडळीनें पुढील संमेलनापुढें विचारार्थ मांडावी.

सूचक---डॉ. गोपाळ रामचंद्र तांबे.
अनुमोदक—रा. रामराव बाळकृष्ण कीर्तिकर
समर्थक—रे. नारायण वामन टिळक.

या ठरावाचें समर्थन करतांना रे. टिळक यांनीं नेटिव्ह ख्रिश्चियन असोशिएशनच्या वतीनें, संमेलनास आलेल्या प्रतिनिधींस उद्देशून लिहिलेला एक कळकळीचा 'संदेश' वाचून दाखविला.

सार्वजनिकरीत्या ग्रंथकारांचा बहुमान करण्याची योजना पसंत होऊन त्यांस सुवर्णपदक वगैरे देण्याचें ठरल्यास त्यासाठीं आपण दरवर्षी १०० रुपये देण्यास कबूल असल्याचें डॉ० तांबे यांनीं सांगितलें. त्याचप्रमाणें परिषदेच्या कार्यकारी मंडळीच्या आणि आपल्या विचारें नेमलेल्या विषयावर उत्तम काव्य करणारास, १०० रुपयांचे बक्षीस देण्याचें 'काव्यरत्नवलि' कर्ते रा. फडणीस यांनीं जाहीर केलें.

[**दिवस तिसरा**–मंगळवार ता. १८ मे. प्रातःकाळीं स्टँ. ७॥ ते ११ वाजेपर्यंत.]

१. गायनः—ईशस्तुति.

२. ठराव दहावाः—

देशी वाङ्मयाची उन्नति, विद्येचा प्रसार आणि सामाजिक प्रगति ह्या सर्व दृष्टींनीं विचार करतां खालीं नमूद केलेल्या सुधारणा होणें इष्ट आहे असें ह्या सभेचें मत आहे.—

(अ) सर्व देशी भाषा एकाच लिपींत लिहिण्याचा प्रघात सुरू व्हावा. ह्या कामाला देवनागरी लिपि सर्वथैव योग्य आहे.

(आ) कोणती तरी एक देशी भाषा देशांतील सर्व प्रांतांतील शाळांत, इंग्रजी भाषा आणि त्या त्या प्रांताची विशिष्ट भाषा यांखेरीज तिसरी भाषा म्हणून, साधारण व्यवहारास उपयोगी पडेल इतकी तरी शिकविली जावी. या कामाला हिंदी भाषा योग्य आहे.

सूचक-श्री. सरदार रा. ब. माधवराव किबे.
अनुमोदक-रायसाहेब डॉ. सरजूप्रसाद.
समर्थक-रा. महादेव राजाराम बोडस, एम्. ए., एल्.एल्. बी.

३. संमेलनासाठीं लि. आ. निबंध.
संक्षेपक- **प्रो. शामराव रा. धराधर,** एम्. ए.

४. ठराव अकरावाः—

महाराष्ट्रांत, आणि त्याचप्रमाणें मराठी मातृभाषा असलेला लोकसमूह ज्या प्रांतांत किंवा एतद्देशीय संस्थानांत कायमची वस्ती करून राहिला आहे तेथें, साहित्यपरिषदेच्या पोटसंस्था किंवा भगिनी-संस्था, प्रत्येक जिल्हानिहाय निदान एक तरी अशा, स्थापिल्या जाव्या आणि प्रत्येकीच्या जोडीला एक एक महाराष्ट्र ग्रंथसंग्रहालय असावें, असें ह्या सभेचें मत आहे.

सूचक-रा. दामोदर सावळाराम यंदे.
अनुमोदक-प्रो. गोविंद सदाशिव आपटे.

५. ठराव बारावाः—

साहित्यपरिषदेनें खालील कामें हातीं घ्यावीं असें ह्या परिषदेचें मत आहे.

(अ) महाराष्ट्र भाषेचा (जुन्या आणि नव्या) सर्वांगसंपूर्ण कोश अधिकारयुक्त रीतीनें सरकारच्या आश्रयानें तयार करविणें.

(आ) जुन्या महाराष्ट्र कवींचें संक्षिप्त चरित्र देऊन, त्यांच्या कवितांतील निवडक वेंचे घेऊन एक पुस्तकमाला तयार करणें.

(इ) आधुनिक काळांतील सुप्रसिद्ध ग्रंथकार व कवि परलोकवासी झाले आहेत त्यांचें संक्षिप्त चरित्र प्रसिद्ध करणें व त्यांच्या लेखांच्या समग्र अथवा संक्षिप्त पुनरावृत्ति काढणें.

(ई) सर्व शिक्षण मातृभाषांतून दिलें जावें हें ध्येय उत्तम रीतीनें साध्य होण्यासाठीं देशी भाषेंत उच्च शिक्षणास योग्य असे शास्त्रीय विषयांवर ग्रंथ लिहून प्रसिद्ध करणें.

(उ) मराठी भाषेचा एक चांगला इतिहास तयार करविणें. मराठी भाषेची उन्नति आजपर्यंत कसकशी होत गेली, मराठी भाषेंत आजपर्यंत कोणकोणते ग्रंथ झाले, त्या त्या वेळीं समाजाची काय स्थिति होती व या ग्रंथांनीं समाजाला कोणतें वळण लाविलें, याचें विस्तृत वर्णन त्यांत असावें.

सूचक-रा. श्रीकंठ नीलकंठ चाफेकर.
अनुमोदक-रा. त्रिंबक आप्पाजी कुळकर्णी, बी.ए.
समर्थक-कु. कृष्णाबाई ठाकुर, एम्. ए.

५ निबंधवाचन व भाषण.—विविध विषय.

(अ) मराठी साहित्य व स्त्रिया—
श्री. सौ. कमळाबाई किबे.

(आ) धर्मविषयक वाङ्मयाची आवश्यकता—
श्री. सौ. गंगूबाई खेडकर.

(इ) कै. दादोबा पांडुरंग यांचें आत्मचरित्र—
रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

७. ठराव तेरावाः—

वर सांगितलेलीं कामें आणि महाराष्ट्र वाङ्मयाच्या उन्नतीसाठीं इष्ट असे अन्य तऱ्हेचे उपाय योजिण्यास

साहित्यपरिषद् समर्थ व्हावी म्हणून द्रव्यनिधि जमा करणें अत्यावश्यक आहे. तरी या कामीं राजेरजवाडे व महाराष्ट्रभाषाभिमानी इतर धनिक आणि उदार गृहस्थ यांनीं सढळ हातानें साह्य द्यावें अशी हें संमेलन त्यांस विनंती करिते.

सूचक—रा. रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी.ए.
अनुमोदक—डॉ. विष्णु गोविंद चिपळूणकर.

८. ठराव चवदावाः—

आठव्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनांत पसार झालेल्या ठरावांपैकीं सरकार व युनिव्हर्सिटी यांच्या-संबंधाचे ठराव त्यांच्याकडे योग्य रीतीनें धाडण्याची व्यवस्था करण्याचा अधिकार स्वा. क. चे कार्यकारी मंडळास ही सभा देते.

सूचक—रा. नारायण रंगनाथ अळेकर, एल्एल्. बी.
अनुमोदक—रा. गोपाळ अनंत ओगले, बी. ए.

९ ठराव पंधरावाः—आभार मानण्याचा.

१. स्वयंसेवक व गायक मंडळी.
२. स्कूल्स कमिटी.
३. आर्यन एज्यु. सोसायटी.
४. माधवबागचे मालक.
५. मराठी ग्रंथसंग्रहालय.
६. लक्ष्मीनारायण प्रेसचे मालक.
७. इंदुप्रकाशादि वर्तमानपत्रें.

सूचक—रा. सा. रा. र. मोरमकर.
अनुमोदक—रा. वासुदेव वामन ठाकूर, बी. ए.

१०. ठराव सोळावाः—

अध्यक्ष श्रीमंत मिरजकर यांनीं या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारून तीस आपलें ऋणी केलें, याबद्दल ती त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानिते.

सूचक—रा. दामोदर गणेश पाध्ये, एम्. ए.
अनुमोदक—रा. जिवाजी कृष्ण परूळकर.

यानंतर रा. विष्णु बाळाजी कुळकर्णी कल्लोळकर यांच्या सूचनेवरून, आणि रा. विष्णु रघुनाथ लेले, सोलापुर, यांचें तीस अनुमोदन मिळून, प्रतिनिधींच्या सुखार्थ संमेलनाच्या स्वागत मंडळीनें केलेल्या व्यवस्थे-बद्दल त्यांचे आभार मानण्यांत आले. आणि राष्ट्रगीत म्हणण्यांत आल्यावर आणि अध्यक्षांच्या गळ्यांत पुष्पहार घालण्यांत आल्यावर सभा बरखास्त करण्यांत आली.

निबंध.

निरनिराळ्या १० विषयांवर निबंध आगाऊ माग-विण्यांत आले होते. त्यांपैकीं ८ विषयांवर निबंध आले. ते येणेंप्रमाणेंः—

विषय १. "गेल्या २५ वर्षांतील कादंबऱ्या, त्यांचे गुणदोष व त्यांच्या प्रगतीचे उपाय.

(अ) साध्या, ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्या.

(ब) स्वकपोलकल्पित, भाषांतररूप, अथवा रूपांतरस्वरूपी कादंबऱ्या."

निबंधलेखक—

रा. नारायण कृष्ण वैद्य, इंदूर.

विषय २. "वरील कादंबऱ्यांप्रमाणेंच नाटकां-संबंधानें."

निबंधलेखक—

१ रा. वाग्भट नारायण देशपांडे, बी. ए.
२ ,, विनायक सदाशिव वाकसकर, बडोदें.
३ ,, जी. के. बोडस, महाराष्ट्र नाटक मंडळी.

विषय ३. "तसेंच अलीकडील मासिकांत, ग्रंथ-मालांत वगैरे येणाऱ्या लहान मोठ्या गोष्टी, कादंबऱ्या वगैरे संबंधानें."

निबंधलेखक—

रा. गणेश भास्कर गानू, बी. ए., रत्नागिरी.

विषय ४. "आधुनिक आणि जुनी, व सयमक आणि निर्यमक कविता."

निबंधलेखक—

१ रा. नारायण महादेव भिडे, बी. ए., भोर.
२ ,, दत्तात्रय माधवराव कुळकर्णी, तुळजापुरकर.
३ ,, लक्ष्मीकांत यशवंत पुरोहित, मिरज.

विषय ५. " सध्याचीं मासिक पुस्तकें, त्यांचें स्वरूप व सुधारणेच्या दिशा. "

निबंधलेखक—

१ रा. नारायण गोविंद चापेकर, बी. ए., एल्‌एल्. बी., सबजज्ज, धुळें.
२ ,, रामकृष्ण दामोदर रामेकर, एलएल्.बी.
३ ,, गणेश रंगनाथ दंडवते, बडोदें.
४ ,, खंडो रामचंद्र कुळकर्णी, इसलामपुर.
५ ,, अनंत नारायण पंडित, फलटण.
६ ,, रामचंद्र रघुनाथ जोशी, जी. बी. व्ही. सी., दक्षिण हैदराबाद.
७ ,, शिकंदरलाल अतार, वांई.
८ ,, आर. व्ही. मुंगी, संगमनेर.
९ ,, गोविंद महादेव भिडे, वकील, अमळनेर.
१० ,, के. आर. राजापुरकर ("सीतानंदन"), अहमदनगर.
११ ,, महादेव गणेश गोरे, मधुकरकर्ते, दादर.

विषय ६. " अलीकडील गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें वगैरे ग्रंथांत शृंगार अथवा इतर कोणत्याही रसाचा अश्लाघ्य अतिरेक होऊन लोकाभिरुचि बिघडत आहे काय ? "

निबंधलेखक—

रा. अनंत वामन बर्वे, पुणें.

विषय ७. " गेल्या पांच वर्षांतील वाङ्मयाचें परीक्षण, समवायानें अथवा पृथक्शः."

[निबंध आलेला नाहीं.]

विषय ८. "सांप्रतचे वाङ्मयाचा समाजावर घडणारा परिणाम. सर्वांगी प्रगति होण्यास कोणत्या तऱ्हेच्या नव्या वाङ्मयाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे ?"

निबंधलेखक—

१ डा० रामचंद्र शंकर किबे, एल्. एम्. अँड एस्.
२ रा. दामोदर कृष्ण करंदीकर, एल्‌एल्. बी., दापोली.
३ ,, धुंडिराज गणेश बापट, पांचवड.
४ ,, गजानन सदाशिव जोशी, फलटण.
५ ,, केशव हरि पौडवाल, मुंबई.
६ ,, मठस्थ गणेश रामचंद्रशर्मा, खानापुर.
७ ,, नारायण हरि आपटे, सातारा.
८ ,, गोविंद बळवंत बाकळे, सोलापुर.
९ ,, विठ्ठल वामन हडप, देवगड.
१० ,, के. रा. सातफळे, देवली.

विषय ९. 'ग्रंथकार, ग्रंथप्रकाशक व ग्रंथ विकणारे यांचेमध्यें, आणि वर्तमानपत्रकार व मासिकें यांचे संपादक यांचेमध्यें, अधिक निकट संबंध व परस्पर-सहकारित्व कसें साधावें ? "

[निबंध आलेला नाहीं.]

विषय १० " नवीन ग्रंथकारांस उत्तेजन देण्याचे मार्ग."

१ रा. रा. हरि रामचंद्र पिटके, नागपुर.
२ ,, बी. व्ही. कड्डू, सातारा.
४ ,, विठ्ठल वामन हडप, देवगड.
५ ,, भीमराव खंडेराव कोराळे, मुंबई.
६ ,, गोपाळ बळवंत प्रधान, क्यासलरॉक.

हे निबंध सबंध वाचणें शक्य नसल्यामुळें संमेलनाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशीं त्यांचा सारांश वाचण्यांत आला; कांहीं निबंधांतून उतारेही वाचण्यांत आले.

यांपैकीं कांहीं निबंध समग्र, व कांहीं सारांशरूपानें " विविधज्ञानविस्तार आणि महाराष्ट्र साहित्य पत्रिका " या मासिकांतून प्रसिद्ध करून, मागून ते संमेलनाच्या रिपोर्टांत सामील केले जातील.

या निबंधांशिवाय अनाहूत विषयांवरही कांहीं निबंध आले होते. ते येणेंप्रमाणें:—

१ " दादोबांचें आत्मचरित्र व मराठी गद्यग्रंथांचा उदय. "

लेखक—रा. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, पुणें.

२ " मराठी साहित्य व स्त्रिया. "
लें० श्री. सौ. कमलाबाई साहेब किबे, इंदूर.
३ " धर्मविषयक वाङ्मयाची आवश्यकता. "
लें० सौ० गंगूबाई खेडकर, पुणें.
४ ' साहित्य-संमेलनास संदेश." नेटिव्ह ख्रिश्चियन असोसियेशनकडून.
लें० रेव्ह. नारायण वामन टिळक, अहमदनगर.
५ "भारतीय तत्त्वविचार."
लें० रा. गणेश गोपाळ जोशी, मालेगांव.
६ " साहित्यशास्त्राचें उज्ज्वल स्वरूप. "
लें० रा. सुंदरराव रामचंद्र धुरंधर, मुंबई.
७ युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमांत देशी भाषांचा समावेश.
लें० रा. रामचंद्र भिकाजी जोशी, पुणें.
८ " टैपांची सुधारणा."
लें० रा. गोविंद बळवंत बाकळे, सोलापुर.
९ " नाट्यछटा "–
लें० रा. शंकर काशिनाथ गर्गे, पुणें.
१० "महाराष्ट्र वाङ्मयाच्या अभिवृद्धीचे उपाय."
प्रो० गोविंद स० आपटे.

यांचीही व्यवस्था वरील निबंधांप्रमाणेंच करण्याचें योजिलें आहे.

कविता.

निरंकुश कवींना आपल्या आवडत्या विषयांवर कविता लिहिण्यासाठीं आव्हान केल्याप्रमाणें, पुढील कविता आल्या. त्यांचा संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीं उल्लेख करण्यांत येऊन त्यांपैकीं कांहींतून नमुन्यासाठीं थोडे उतारेही वाचण्यांत आले.

१ " आधुनिक रुक्कुठार"—
रा. जगन्नाथ वामन हर्षे, हातकलंगडा.
२ " विश्वगुणादर्शपरिशिष्ट "—
"महाराष्ट्रीय," राजापुर.
३ " सरस्वतीभक्तांस "—
रा. आनंदराव कृष्णाजी टेकाडे, नागपुर.
४ " स्वागतम् "
५ " श्रीशारदावंदन "
६ "प्रेम कीं कर्तव्य"?
(४–६) रा. दत्तात्रय अनंत आपटे, पुणें.
७ "श्रीशारदावंदन"—
रा. विष्णु बाबाजी कुळकर्णी, कल्लोळकर.
८ " फुलांतील मधुकरास"–
रा. शंकर केशव कानेटकर, पुणें.
९ "नियमक कवितेचे उद्गार"–
रा. केशव विश्वास फणसे, सिहोरा, सी. पी.
१० "चंडोल–" अरविंद " सातारा."
११ (१) "कवि," (२) "गीतोद्भव," (३) "महाकाव्य"–रा. ' सुमंत ' कवि.
१२ "महाराष्ट्र वाग्देवीस पुष्पांजलि"–
रा. महादेव भिमाजी कुळकर्णी, धांदरफळ.
१३ "तापसी"–'शालिनी ' इंदूर.
१४ "ही कलिका–मि. शाहू द. उजगरे, मुंबई."
१५ "काव्यकुसुम"–रा. विनायक अनंत ओतुरकर, इंदूर.
१६ "आठव्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनास विनंती"–
रा. रा विठ्ठल भगवंत लेंभे, पुणें.

१७ "अभिनंदन."–दादर येथील सोमवंशी क्षत्रिय पाठारे मित्रसमाजातर्फे, समाजाचे चिटणीस रा. रा. शांताराम जनार्दन पाठारे यांजकडून. यांत ' महाराष्ट्र साहित्याचा जयजयकार असो,' हें आशीर्वचन चरणांच्या आद्याक्षरांत ग्रथित केलें आहे.

यांपैकीं बऱ्याचशा कविता चांगल्या आहेत, आणि त्या साहित्यपत्रिकेंत आणि संमेलनाच्या रिपोर्टांत छापल्या जातील.

उपाहार-समारंभ.

मंगळवारीं संध्याकाळी सर मंगळदास नथूभाई यांच्या गिरगांवांतील बंगल्याच्या विस्तृत आणि हरितूर्ण पटांगणांत स्वागत कमिटीनें संमेलनास आलेल्या प्रतिनिधींसाठीं थाटाचा उपहारसमारंभ केला. समारंभाचे अखेर, जमलेल्या मंडळीस साहित्यपरिषदेचे सभासद होण्यासाठीं स्वागतमंडळाचे एक उपाध्यक्ष रा. रा. दामोदर गणेश पाध्ये यांनीं कळकळीनें विनंती केली; आणि किशनगडचे दिवाण, दिवाणबहादुर कृष्णराव लक्ष्मण पावगसकर, एम्. ए., रा. रा. गणेश केशव मावळंकर, बी. ए., एल्.एल्. बी, अमदाबाद, आणि रा.रा. दामोदर केशव ओक, बी. ए., सुपरिटेंडंट नार्मलस्कूल, नागपुर, हे नियमाप्रमाणें रकम भरून परिषदेचे **तहाहयात सभासद** झाल्याचें जाहीर केलें.

स्वागत कमेटीचे अध्यक्ष सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, नाइट, यांनीं निमंत्रणास मान देऊन आलेल्या पाहुण्या मंडळीचे आभार मानिले.

म. सा. परिषदेची सभा.

पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं १९।५।१५ महाराष्ट्रसाहित्यपरिषदेच्या सभासदांची सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या गिरगांव-चर्नीरोडवरील बंगल्यांत सभा भरली.

अध्यक्षस्थानीं परिषदेचे अध्यक्ष रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि हे होते. अकोल्यास १९१२ च्या आक्टोबरअखेर झालेल्या संमेलनापासून आज तागाइत सभेकडून झालेल्या कामाचा रिपोर्ट परिषदेचे चिटणीस यांनीं वाचला. त्यावरून मुंबई ब्यांकिंग कंपनीकडे ठेव म्हणून असलेल्या ६०० रुपयांखेरीज परिषदेजवळ २०५ रुपये शिलक आहेत असें दिसून आलें. रिपोर्ट रीतीप्रमाणें मंजूर झाल्यावर, नियमांची सुधारणा करण्यासाठीं ५ असामींची कमिटी नेमण्यांत येऊन, येत्या वर्षासाठीं पुढील कार्यकारी-मंडळ निवडण्यांत आलें.

अध्यक्ष.

रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि, एम्. ए.,

उपाध्यक्ष.

डा. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, नाइट, एल्. एम्.
डा. मोरेश्वर गोपाळ देशमूख, एम्. डी., बी. एस् सी.
रा. रा. दामोदर गणेश पाध्ये, एम्. ए.
,, हरि नारायण आपटे.
" रघुनाथ पांडुरंग करंदीकर.

सभासद.

रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी, बी. ए., एल्.एल्. बी.
रा.रा. अच्युत सिताराम साठे, एम्. ए., बी. एल्.
" रामचंद्र विष्णु महाजनि, बी. ए., एल् एल्. बी.
,, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. " "
,, नरसिंह चिंतामण केळकर. " "
,, लक्ष्मण गणेश शास्त्री लेले.
प्रो. चिंतामण गंगाधर भानु, बी. ए.
रा.रा. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.
,, विष्णु रघुनाथ लेले.
" निळकंठ पांडुरंग पाटणकर, बी.ए. एल्.एल्.बी.
" गणेश कृष्ण चितळे " "
" गोविंद रामचंद्र ओक. " "
" रामचंद्र नरसिंह रणसिंग.
" पांडुरंग वामन काणे, एम्. ए. एल् एल्. एम्.
डा. आर. व्ही. खेडकर, एम्. डी., एफ्.आर.सी.एस्.
रा. रा. गोपाळ कृष्ण देवधर, एम्. ए.
" दामोदर सावळाराम यंदे.
" तुकाराम जावजी चौधरी, जे. पी.
" रामराव बाळकृष्ण कीर्तिकर
" काशिनाथ रघुनाथमित्र.

चिटणीस.

रा. सा. रामकृष्ण रघुनाथ मोरमकर.
रा. रा. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

खजीनदार—रा. रा. भास्कर महादेव पंडित, बी. ए.

हिसेबतपासनीस.—रा. रा. यशवंत वेष्णु मैने.

हिंदमातेचे सुपुत्र

प. वा. नामदार गोपाळ कृष्ण गोखले.

जन्म ९ मे १८६६.] [मृत्यु १९ फेब्रुवारी १९१५.

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका.

वर्ष २.] [अंक ६.

नवीन पुस्तकें.

[साभार स्वीकार आणि अभिप्राय.]

[१]

भा. इ. सं. मंडळाचें शके १८३५ चें इतिवृत्त.

१. भारत–इतिहास–संशोधक मंडळाचें शके १८३५ सालचें इतिवृत्त मंडळाचे चिटणीस सरदार मेहेंदळे यांजकडून आमचेकडे अभिप्रायासाठीं आलें आहे. महाराष्ट्रामध्यें ज्या अनेक मंडळ्या निरनिराळ्या कार्यासाठीं निघाल्या आहेत त्यांत ह्या मंडळाची प्रमुखत्वानें गणना केली पाहिजे. ह्या मंडळानें स्वीकृत केलेलें कार्य अत्यंत महत्त्वाचें असून तें मोठ्या उत्साहानें व नेटानें चाललें आहे हें पाहून आम्हांला फार संतोष होतो. ह्या मंडळाच्या कार्याचा विस्तार फार मोठा असून मंडळासाठीं काम करणारीं विद्वान् माणसें जितकीं जास्त मिळतील तितकीं पाहिजेच आहेत. मंडळासंबंधानें जनसमूहांत आदर वाढत चाललेला आहे व लवकरच मंडळाला कायमचें व मोठें स्वरूप प्राप्त होईल अशी नुकतीच त्याची वार्षिक सभा झाली त्यावेळीं वर्गणीचे आंकडे पडले त्यावरून आशा वाटते.

इतिवृत्ताचीं बारीक टाइपाचीं ४७६ पानें असून तीं विविध प्रकारच्या माहितीनें अगदीं गच्च भरलेलीं आहेत. शिवाय आरंभीं चार पानें अनुक्रमणिका व शेवटीं ३३ पानांची सूची आहे. सूचीमुळें ग्रंथाची उपयुक्तता फार वाढली आहे. एकंदर लेखांक १०१ आहेत व लेखक नऊ आहेत; ते येणेंप्रमाणें:–द. वि. आपटे, गो. का. चांदोरकर, शं. श्री. देव, पां. न. पटवर्धन, द. वा. पोतदार, म. गो. फडणीस, गं. ना. मुजूमदार, वा. दा. मुंडले, वि. का. राजवाडे हे होत. ह्या नऊ विद्वानांतून रा. राजवाडे, रा. देव, रा. चांदोरकर, रा. पोतदार, रा. आपटे, रा. पटवर्धन, व रा. मुजूमदार यांचेच लेख पुष्कळ आहेत. लेखांत वैचित्र्य आहे. संस्कृत वाङ्मय, प्राचीन संस्कृत व मराठी शिलालेख, शब्दांच्या व्युत्पत्ति, मराठ्यांच्या इतिहासाचीं टिपणें, कवि व कविता याविषयीं माहिती वगैरे अनेक विषय आहेत. दहावीस ओळींपासून तों दहाबारा पानें इतका लांब लेख आहेत. एव्हढ्या प्रचंड लेखसंग्रहांत मतभेदाला जागा असणें शक्य आहे. उदाहरणार्थ, रा. राजवाडे यांनीं दिलेली गुजराथ (पान २३६) शब्दाची व्युत्पत्ति त्याचप्रमाणें 'मयु' व Manes हे एकच होत (पान २३७) व तुषार (पान २३९) आणि Tochari हे

एकच अशा प्रकारचीं जीं विधानें केलेलीं आहेत, त्याला उच्चारसादृश्यापलीकडे कांहीं जास्त आधार रा. राजवाडे यांनीं दिलेला नाहीं. अशा रीतीनें केवळ वर्णसादृश्य किंवा उच्चारसादृश्यावरून ऐतिहासिक दृष्ट्या देशांचें, लोकांचें किंवा स्थलांचें अभिन्नत्व ठरवूं गेल्यास पुष्कळ चमत्कार होतील. मग दानव म्हणजे Danes असेंही ह्मणण्यास हरकत येणार नाहीं !! राजवाड्यांचा लेखांक ९ (कल्यारंभ व भारतीय युद्ध) यामध्येंही अनेक मुद्दे केवळ रा. राजवाडे ह्मणतात म्हणून तसे आहेत असें धरावें लागतें ! रा. राजवाडे यांनीं 'आसन्मघासु मुनयः' ह्या श्लोकांतील 'युधिष्ठिरे नृपतौ' ह्याचा अर्थ युधिष्ठिराच्या वंशांतील शेवटचा राजा असा केला आहे व अशा रीतीनें वराहाच्या श्लोकानें जो परम्परागत भारतीय युद्धाच्या कालगणनेला विशेष येतो तो दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. रा. राजवाडे अशी प्रौढी मारतात कीं, आजपर्यंतचे सर्व शोधक बुचकळ्यांत पडले पण आपण काढलेल्या युक्तीनें तो सर्व बुचकळा नाहींसा झाला. रा. राजवाडे विद्वान् आहेत, उद्योगी व व्यासंगी आहेत. त्यांच्या स्वार्थत्यागाचें आह्मांला कौतुक वाटतें. परंतु विद्वत्तेबरोबर जो विनय सहज येतो असें सुभाषितांत वगैरे सांगितलेलें आहे, त्याला रा. राजवाडे अपवाद आहेत असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. 'युधिष्ठिरे नृपतौ' ह्याचा युधिष्ठिराच्या वंशांतील एक राजा (शेवटला) असा जो अर्थ राजवाडे करितात तो बरोबर नाहीं असें त्याच श्लोकांत प्रमाण आहे. युधिष्ठिर नृप (मग तो कुन्तीपुत्र युधिष्ठिर असो किंवा त्याचा वंशज असो) पृथ्वीचें राज्य करीत असतां सप्तर्षि मघा नक्षत्रांत होते असें ह्या श्लोकांत ह्मटलें आहे. परीक्षितीच्या काळीं सप्तर्षि मघा नक्षत्रांत होते असें मत्स्यपुराणांतील वचन रा. राजवाड्यांनींच पान ४४१ वर दिलें आहे. ह्मणजे कुन्तीसुत युधिष्ठिराचे काळींही सप्तर्षि मघा नक्षत्रांत होते. दर शंभर वर्षांनीं सप्तर्षि एकएक नक्षत्र पुढें जातात अशी कल्पना होती.[1] जर परीक्षितीच्या काळीं सप्तर्षि मघा नक्षत्रांत होते तर त्यानंतर ६०० वर्षांनीं (राजवाडे यांचे अर्थाप्रमाणें) झालेल्या युधिष्ठिराचे वंशांतील शेवटच्या राजाचे कारकिर्दींतही ते मघा नक्षत्रांच कसे येतील? याचें समाधान रा. राजवाडे करतील काय? ह्मणून युधिष्ठिर नृपतीच्या काळीं सप्तर्षि मघा नक्षत्रांत होते ह्या ह्मणण्यानें वराहाला अभिप्रेत जो युधिष्ठिर तो पंचपांडवांपैकींच होय. त्याचा ६५३ वर्षांनीं झालेला वंशज नव्हे, असें धरलें पाहिजे. शिवाय, युधिष्ठिर वंशांतील शेवटचा राजा कलियुगानंतर ६५३ वर्षांनीं झाला असा स्वतंत्र पुरावा रा. राजवाडे यांजजवळ कांहीं असल्यास त्यांनीं पुढें आणावा. त्याचप्रमाणें 'मघायुक्ता' ह्या पदाचा भलताच ओढाताण करून अर्थ केला आहे. त्यांत दूरान्वय होतो; 'आसन् मघासु' याचा अर्थ 'दहाव्या शतकांत' सप्तर्षि होते असा करून पुनः तें दहावें शतक कोठून तर प्रतीपापासून असें वायुपुराणांतलें वचन गर्गवराहाला अध्याहृत ध्यावयाला राजवाड्यांनीं लाविलें आहे. ही

१ 'एकैकस्मिन्नृक्षे शतं शतं ते चरन्ति ऋक्षाणाम्। प्रागुत्तरतश्चैते सदोदयाः ससाध्विकाः'॥ बृहत्संहिता अ. १३-१४. (रत्नागिरि) Edition of Mr. Athalye.

सर्व लटपट कशाकरितां तर परंपरागत कलियुगारंभ व भारतीय युद्धकाळ खरा करून दाखविण्याकरितां. रा. राजवाडे यांचा कोटिक्रम निदान आह्मांला तरी पसंत नाहीं. ह्या ठिकाणीं ह्याहून विस्तृत टीका करतां येत नाहीं.

मंडळाचे चिटणिसांना इतिवृत्त छापण्यासंबंधानें एक नम्र सूचना करावीशी वाटते. ती अमलांत शक्य असल्यास ते आणतीलच. इतिवृत्तामध्यें स्वतंत्र अग्रलेखाचे स्वरूपाचे लेख व त्रोटक टिपणें, जुनी कविता वगैरे सर्वच अव्यवस्थित रीतीनें समाविष्ट केलेलें आहे तसें करूं नये. तर विलायतेच्या रॉयल एशिॲटिक सोसायटीच्या जर्नलप्रमाणें प्रथम मोठे व स्वतंत्र लेख, नंतर पुढें त्रोटक लेख, नंतर पुस्तकपरीक्षा वगैरे असा क्रम असावा. आतां छापण्याचें काम वर्षभर चालत असल्यामुळें असें करणें शक्य नसल्यास वार्षिक इतिवृत्ताचे चार भाग करून प्रत्येक त्रैमासिक वृत्तांत वरीलप्रमाणें अनुक्रम लावावा.

मुकुन्दमुनींचें महाभाष्य.

२. भारतेतिहाससंशोधक मंडळानें मुकुन्दमुनींचा 'महाभाष्य' ह्या नांवाचा संस्कृत ग्रंथ प्रकाशित केला आहे. त्याची एक प्रत आमचेकडे अभिप्रायासाठीं आली आहे. हा ग्रंथ संस्कृत भाषेंत असल्यामुळें त्याचें विस्तृत परीक्षण करण्याचा विचार नाही. मराठींत 'विवेकसिन्धु' हा सर्वमान्य ग्रन्थ लिहिणारे जे मुकुन्दराज त्यांचाच हा ग्रन्थ आहे ह्या दृष्टीनें 'महाभाष्य' ह्या ग्रंथाचें विशेष महत्त्व आहे. ह्या ग्रन्थामध्यें आलेल्या उल्लेखांवरून मुकुन्दमुनींचे गुरु श्रीरामनाथ ह्मणून होते असें दिसतें. ग्रन्थाचे शेवटीं जो श्लोक छापला आहे, तो अशुद्ध असावा असें वाटतें. 'एवं विज्ञापितः सन्नवनतशिरसा जित्यापलेन धीमान्सद्यःकृत्वा हि तस्मै सकरुणहृदयः श्रीमुकुन्दो मुनीन्द्रः ॥' ह्या ठिकाणीं 'जित्यापलेन' हें अशुद्ध आहे. वृत्ताला जमत नाहीं म्हणून जित्यपालेन असें वाचावें असें वाटतें. हा जित्यपाल कोण? देवगडच्या यादवांतील जैत्रपाल तोच जित्यपाल नव्हे ना? असा प्रश्न करावासा वाटतो. ह्या ग्रन्थांत अद्वैतमताचे सिद्धान्त सुलभ भाषेंत थोडक्यांत सांगितलेले आहेत. हें पुस्तक प्रकाशित करून भा. इ. सं. मंडळानें एका प्राचीन मराठी ग्रन्थकारासंबन्धानें असलेल्या माहितींत भर टाकिली आहे.

दासोपंतांचा ग्रंथराज.

३. थोड्याच वर्षांपूर्वी महाराष्ट्राला अपरिचित असलेले महाकवि **दासोपंत** यांचा **ग्रन्थराज** हा ग्रंथ भा. इ. सं. मंडळानें प्रसिद्ध केला आहे. हा ग्रन्थ परमार्थपर असून दासोपंतांच्या सर्व ग्रंथांचें केवळ सार आहे. ह्या ग्रंथाचीं एकंदर आठ प्रकरणें आहेत; गुरुशिष्यलक्षण, बन्धमोक्ष, भजनवैराग्य, महावाक्यविवरण, भावनाखण्डण, सर्वत्राभेददर्शन, साधनयोग, जीवन्मुक्तदशा. ग्रन्थाची भाषा रसाळ असून जोरदार आहे. हा ग्रंथ वाचीत असतांना समर्थांच्या दासबोधाची पदोपदीं आठवण होते. ह्या ग्रंथांत मराठी भाषेचा ऐतिहासिकदृष्ट्या अभ्यास करणारांना पुष्कळ महत्त्वाचीं अशीं रूपें आढळतील.

स्फुट प्रकरणें.

४. भा. इ. सं. मडळाकडून आलेल्या तिसऱ्या ग्रंथांत, तुकाराममहाराजांच्या निर्याणाचे अभंग,

श्रीएकनाथकृत गीतासार, पूर्णानन्दकृत गीतासार, रत्नाकराचा उपदेशरत्नाकर, राऊळपुराण व जनीजनार्दनाचा निर्विकल्पग्रंथ अशीं सहा स्फुट प्रकरणें आहेत. हीं सर्व प्रकरणें वाचनीय आहेत. यांतील दोन प्रकरणें (पहिलें व पांचवें) खेरीज करून बाकीचीं वेदान्तपर आहेत.

हे ग्रन्थ पाठविल्याबद्दल भारतइतिहाससंशोधक मंडळाचे आह्मी आभारी आहों.

[२]

युरोपचा प्रवास.

१. या नांवाचें पुस्तक रा. रा. दत्तात्रय नारायण मुजुमदार, बी. ए., एल्एल्. बी.; निसबत बडोदें सरकार यांनीं प्रसिद्ध केलें आहे. श्रीमंत सयाजी महाराज यांच्या प्रसादानें थांस यूरोपांत जाण्याचा प्रसंग आला. यांत विशेष हा होता कीं त्यांनीं आपल्याबरोबर वृद्ध पित्यास व तरुण पत्नीस नेलें. युरोपांतील प्रवासाची जोड विद्यालयांतील पुस्तकी ज्ञानास अवश्य आहे, हा समज श्रीमंत व सरदार लोकांत व सामान्य वर्गांतील गरीब विद्यार्थ्यांतही वाढत आहे, हें भावी उन्नतीचें निदर्शक आहे.

रा. रा. मुजुमदारांस सरकारी हुकूम असा होता कीं, रोजची हकीकत लिहून काढून हुजुराकडे रवाना व्हावी. त्या अन्वयें युरोपांतील सहा सात महिन्यांच्या प्रवासाची 'रोजनिशी' या रूपानें या ग्रंथाची रचना झाली आहे. यांतील रमणीय, व्यापारधंद्यांचीं–विद्येचीं–कलाकौशल्यांचीं शहरें, हवेचीं ठिकाणें, यांचें वर्णन बरेंच बोधप्रद आहे. मधून मधून लोकांचे आचार, विचार, विहार यांतील भेदांचें दिग्दर्शनही झालें आहे. पश्चिम देशांतील लोक आपल्या पुढें स्वच्छतेंत, करारीपणांत, व्यवस्थेंत, टापटिपींत, सहनशीलतेंत, ज्ञानांत, व कलाकौशल्याच्या प्रगतींत किती तरी पुढें गेले आहेत, हा विचार बहुतेक प्रत्येक पृष्ठ वाचतांना मनास एका अर्थीं झोंबतो. आपण किती दिवस–किती वर्षें–मागें राहणार? आपली खटपट किती अल्प? असे निराशेचे उद्गार तोंडांतूनही निघाल्यावांचून राहत नाहींत. यूरोपच्या भौतिक सुधारणेचें ज्ञान आपणांत पसरल्यावांचून आपली धडगत नाहीं. तें ज्ञान सामान्य विद्या–शिक्षण–सार्वत्रिक झाल्यावांचून लभ्य व्हावयाचें नाहीं. हीं सत्यें श्री. सयाजी महाराजांच्या मनांत पक्कीं बिंबून, तीं प्रजेस कळविण्याचे व तिची सुधारणा करण्याचे नाना मार्ग आज किती तरी वर्षें ते काढीत आहेत. हे मार्ग ते यावज्जीव चालवितील व पुढील पिढ्यांस उदाहरण घालून ठेवितील! श्री. सयाजी महाराजांचें हें उदाहरण हिंदी सरकार किती वर्षें डोळ्यांआड ठेवणार?

युरोपांत प्रथम जाणाऱ्या लोकांच्या उपयोगी पडेल अशी माहिती–सामानसुमान, भाडें, गाईड (मार्गदर्शक–दुभाष्ये), आगबोटी, आगगाड्या, हॉटेल, प्रवासांतील सोई गैरसोई, मार्ग–यांसंबंधानें या ग्रंथांत बरीच आहे. ती वाचकांनीं वाटल्यास मुळांतून करून घ्यावी. कांहीं ठिकाणीं स्थळांचे वगैरे फोटो दिले आहेत. व ग्रंथारंभीं प्रवासस्थळांचा नकाशा घातला आहे. हा ग्रंथ प्रवासवृत्तांत मोडेल. सरदाराचा वाङ्मयाचा प्रथम यत्न ह्मणून त्याचें अभिनंदन करणें योग्य आहे.

स्मरणी.

२. या नांवाचें लघु करुणकाव्य प्रो. नारायण केशव बेहरे यांनीं आपल्या मृत प्रियपत्नीच्या आदरानें लिहिलें. या काव्याची प्रस्तावना रे. नारायण वामन टिळक यांनीं लिहिली आहे, तींत याचें यथार्थ अभिनंदन केलें आहे. हें काव्य वाचून जगन्नाथरायांच्या करुणालहरीची साहजिक आठवण होते. पण "करुण" शोकपर, "स्मरणी" पत्नीच्या सहवासांत लाधलेल्या आनंदाची— अन्योन्यप्रेमव्यवहारांची—कहाणी आहे. आनंद पुष्कळ वर्षांचा—एका क्षणांत मृत्यु अपहरून नेतोसा असतोः परंतु सहृदयाच्या मनांत तो यावज्जीव—न जाणों मरणोत्तरही—राहतो. प्रेम मृत्यूला जिंकतें, म्हणतात त्याचा अर्थ हा. या काव्यांत प्रो. बेहऱ्यांचें पत्नीवर किती प्रेम होतें, तिजविषयीं किती आदर होता, तिच्या लाभाच्या हर्षभरांत त्यांस काव्यस्फूर्ति कशी झाली, व भीषण परिस्थितीची उग्रता कशी ओसरली—हें कळून येईल. परिस्थितीचा उलगडा करून घेण्याचें धाष्टर्य कोणीही सहृदय वाचक करणार नाहीं—व आह्मीही करीत नाहीं. ही खानगी रहस्यें—हीं निरंतर स्वसंवेद्यच होतः व अविभाज्य होत. विभागिलीं असतां दुःखें सुसह होतात, हा न्याय सर्व दुःखांस लागू पडत नाहीं. भावी अपत्याची पत्रिका मातेनें प्रेमभरांत वर्तविली, त्या बाळकाच्या जन्मादिकाची शुभवार्ता ऐकण्याची वाचकांस कितीही आतुरता असली तरी रहस्यभेदाच्या भीतीनें त्यांनीं ती दाबलीच पाहिजे.

प्रो. बेहरे यांच्या काव्याचें अभिनंदन शब्दांनीं करणें औपचारिक वाटेलः सहृदय वाचनानेंच त्याचें खरें अभिनंदन होईल. या काव्यांतील प्रसाद उत्तम आहे, क्लिष्टता कोठेंही नाहीं तेव्हां वाचकांस आग्रहपूर्वक विनंती आहे कीं, "तुह्मी एकदां वाचाच."

मराठी मासिक पुस्तकें.

३. या नांवाचा ३४ पृष्ठांचा निबंध रा.रा. माधव श्रीहरि अणे, बी.ए., एल्एल्.बी., यांनीं लिहिलेला गेल्या साहित्यसंमेलनप्रसंगीं सभासदांस देण्यांत आला. रा.रा. अणे यांनीं हा निबंध विचारगांभीर्यानें लिहिला आहे. यांतील कांहीं मतें पुष्कळांस नापसंत पडतील तरी बाकीचीं सर्वांना ग्राह्य वाटतील. क्वचित् त्यांचें एकदेशीयत्व व एकांगित्व जास्त व्यक्त झालें आहे. नामनिर्देशांतही करणाचे व अकरणाचे द्विविध दोष दृष्टीस पडतात. तरी एकंदरींत हा निबंध वाचण्यालायक आहे. त्यांत दाखविलेल्या दोषांचें मासिक पुस्तकांचे चालक शांतपणें विचार करितील, व ते दोष खरे आहेत अशी खातरी झाल्यास ते काढून टाकण्याच्या प्रयत्नास लागतील अशी उमेद आहे. पण हें सांगणें अवश्य आहे कीं, सुसंस्कृत उदाहरण उपदेशापेक्षां मनांत जास्त ठसतें, या न्यायानें पाश्चात्य देशांतील मासिक पुस्तकांचें अनुकरण करणारीं अवतरलेलीं नवीन उत्साही बालकें वृद्धांतही आपल्या उत्साहाचा अंश संचरवितील अशी खातरी आहे.

गोपाळगीत.

४. या नांवाची पुष्पभेट उद्यान मासिकाकडून साहित्यभक्तांस आली, तिचा आदरपूर्वक स्वीकार करितों. हें गीत रा.रा. माधव दामोदर

आळतेकर, बी. ए., यांनीं गाईलें आहे. विषय कै. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनानें झालेला शोक. हा आर्यावृत्तांत गोविला आहे. यांत गोपाळरावांचे उद्योग–त्यांचें या जगांतील कार्य–त्यांची आस्था–यांचें वर्णन आहे. त्यांच्या विरहानें दुःखित झालेल्या थोर थोर पुरुषांच्या नांवांचाही उल्लेख केला आहे. निंदकांच्या आक्षेपांचें दिग्दर्शन आहे. ही विभूति हिंदुस्थानास आणखी कांहीं वर्षें लाभली असती, तर पुष्कळ कार्य झालें असतें! पण निराशेचे उद्गार काढण्याचा हा प्रसंग नव्हे. जें कार्य एखाद्या वीरानें–सेनानायकानें–केलें तें एका पदातीस होणार नाहीं, तरी संघशक्तीनें होण्याजोगें आहे. हा धडा जर्मन लोक पक्का शिकले आहेत. व तो वळवीत असतां असंख्य पदातींचा न्हासही पत्करितात. शत्रूपासून हितबोध घ्यावा अशी राजानीति आहे. रा. रा. आळतेकरांनीं हा बोध केला असता, तर बरें झालें असतें.

उत्तम काव्यांत गोपाळगीताची गणना करतां येणार नाहीं. परंतु तें एकदा वाचण्यालायक आहे. कांहीं आर्यांत शोकप्रवाह अडखळत गेला आहे तरी एकंदरींत तो गंभीर व शांत आहे.

कविता.

मृत्युस्तोत्र.

साक्या.

कीर्तिसखीचें मंदिर असुनी बंद जरी तद्द्वार ।
उघडायाची कळ तुजपाशीं, कीं तूंच उघडणार ॥ १ ॥
सदा भिववितें लज्जा, तिजला कोंडुनि घालायाचें ।
बळ तव हातीं, तुजविण जगतीं नाहीं चालायाचें ॥२॥
जी जी चाले चढाओढ त्या प्रत्येकीला सीमा ।
तूंच घालिसी, कारभार तो असे तुझा निःसीमा ! ॥३॥
महासागरीं प्रवात सुटुनी तडफडती जे जीव ।
विश्रांतिस्थळ त्यांस दाविसी, तुलाच येते कींव ॥४॥
दुःखें पीडुनि शोकानें जे होती व्याकुळ भारी ।
सेवा त्यांची करिसी, त्यांना तूंच खरा परिहारी ॥५॥
मायबापसुतबंधुभगिनि वा स्त्री कुणीच ज्यां नाहीं ।
सखा अशांचा तूं, तव ठायीं नातीं सारीं कांहीं ॥६॥
पदीं शृंखला साहुनि भोगी बंदिवास जो प्राणी ।
मुक्त करुनि तूं त्यास पाजिसी स्वातंत्र्याचें पाणी ॥७॥
दिवस संपतां सूर्याच्या जी आड येतसे छाया ।
ती तव माया, मूढ तियेला भिऊन जाती वाया ॥८॥
धांवुनि, धांवुनि, धांवुनि अंतीं प्राप्त होय जें स्थैर्य ।
शांतिप्रद तें तुझें रूप, का खचवील कधीं धैर्य ? ॥९॥
येत जीवनस्वप्ना मागुनि जागृति जी मृतिनाम ।
ती तूं असशी, सदैव दिसशी सुज्ञ जना सुखधाम॥१०॥

सुमंत.

सुभाषित–प्रशंसा.

आर्या.

गीत सुभाषित अथवा लीला नवयुवतिच्याहि निष्कपट ॥
मन भेदिती न ज्यांचें योगी अथवा पशूच ते निपट॥१॥

संसारकटुतरूचीं दोन फळें अमृता अशीं गोड ॥
सद्रस सुभाषिताचा आणि सदा संतसज्जनीं जोड ॥२॥

जल अन्न सुभाषित हीं रत्नें या भूवरी अहो तीन ॥
पाषाणखंडमात्रा रत्न म्हणे मूढ एक मतिहीन ॥ ३ ॥

पाषाण शर्करा ते म्लानमुखी द्राक्षवेलही होते ॥
होउनि सुभाषितरसापुढतीं भीता सुधा पळे होते ॥४॥

श्लोक.

यातें न विकृति घडे निरसत्व ये ना
हा सेवितां बहुजनेंहि उणा पडे ना ।
दे स्वाद तृप्ति निरसी जडता अपायीं
नामें सुभाषितरसोऽन्यरसातिशायी ॥ ५ ॥

कंठीं हारहि कंकणें करिं नग श्रोत्रीं शिरीं मंडणें
वस्त्रेंही परिधान दिव्य करणें हा भार कीं वाहणें ।
मानूं अक्षय तेंच मंडण नरा तेणेंचही शोभणें
तेजें जें दिपवी 'सुभाषित' शरदचंद्रादिचीं कीरणें ॥६॥

चोनकर.

महाराष्ट्र-साहित्य-संमेलन व अधिकारी वर्ग.

गेल्या मे महिन्यांत भरलेल्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनांत पसार झालेल्या ठरावांपैकीं कांहीं ठराव सरकार व इतर अधिकाऱ्यांकडे पाठवावे असें ठरलें होतें. त्याप्रमाणें ते अध्यक्षांचे सहीनें पाठविले गेले. प्रत्युत्तरें आलीं तीं खालीं दिलीं आहेत:—

युरोपांतील युद्धाविषयींचा ठराव.

ह्या ठरावाची नक्कल मुंबईचे नामदार गव्हर्नर साहेब यांस सादर करण्याविषयींचें पत्र त्यांच्या प्रायव्हेट सेक्रेटरीकडे धाडून तो व्हाईसराय साहेब व रणक्षेत्रीं लढणाऱ्या हिंदी सैनिकांकडे धाडिला जावा अशी विनंती केली होती. त्याचें उत्तर आलें तें असें.

DEAR SIRS,

I am to acknowledge with thanks the receipt of your letter dated the 18th instant communicating a copy of a resolution passsd at the Eighth Session of the Maharashtra Sahitya Sammelan and to say that it has been forwarded to the proper quarter. (*22nd June.*)

[भाषांतर-महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाच्या आठव्या बैठकींत पसार झालेला एक ठराव धाडणारें आपलें ता. १८ मिनह्रचें (जून) पत्र पोहोंचल्याचें साभार कळवितों. सदरहू ठराव उचित ठिकाणीं पाठविण्यांत आले आहेत.] (२२ जून.)

दुय्यम दर्जाचें शिक्षण देशी भाषेंत देण्याविषयींचे व एकलिपीवरचे ठराव.

ह्या ठरावांची नक्कल मुंबई इलाख्याचे डायरेक्टर ऑफ पब्लिक् इन्स्ट्रक्शन यांजकडे धाडिली होती. पत्राचें उत्तर आलें तें असें:—

Sir,

I have the honour to acknowledge your letter of the 18th June, 1915, forwarding copies of two Resolutions, and to say that while unable to agree that **all** instruction imparted in **all** Secondary Schools should be imparted through the medium of the vernaculars, I have done my utmost to secure that as much of it as possible should be so imparted ; vide the instructions embodied in Schedule D of the Grant-in-aid Code.

2. With regard to the second resolution the matter rests mainly with the mass of Indians who send their children to Secondary Schools. If the time ever comes when the majority of Marathi, Gujarati, Kanarese, Sindhi and Urdu—speaking parents of this Presidency agree that their children should be taught the Devanagari Script and the Hindi language, no doubt the Educational Department will co-operate. (*29th June.*)

[भाषांतर—दोन ठराव धाडणारें आपलें १८ जून १९१५ तारखेचें पत्र पोहोंचलें. उत्तरीं कळवितों कीं, **सर्व** दुय्यम दर्जाच्या शिक्षण देणाऱ्या शाळांतलि **सर्व** शिक्षण देशी भाषांच्या द्वारें दिलें जावें हें मत जरी मला मान्य करतां येत नाहीं तरी

त्या शिक्षणापैकीं होईल तितकें शिक्षण तशा रीतीनें दिलें जावें अशा विषयीं मी शक्य तितकें सर्व केलें आहे. (ग्रांट-इन-कोड, परिशिष्ट डी, यांतील नियम पहावे.) दुसऱ्या ठरावा संबंधी प्रश्नाचा निर्णय दुय्यम शिक्षणाच्या शाळेंत मुलें बाळें धाडणाऱ्या हिंदी प्रजांच्या हातांतच मुख्यत्वें करून आहे. आपल्या मुलांबाळांस देवनागरी लिपी आणि हिंदी भाषा शिकवावी असें मराठी, गुजराती, कानडी व सिंधी भाषा बोलणाऱ्या ह्या (मुंबई) इलाख्यांतील आईबाप पालक वगैरे लोकांत बहुमत होण्याची वेळ जर कधीं काळीं येईल तर सरकारी शिक्षणखातें निःसंशय त्या बाबतींत सहकारित्व करील.] (२९ जून.)

मोडी लिपीविषयींचा ठराव.

ह्या ठरावाची नक्कल मुंबई सरकारच्या रेव्हेन्यू खात्याचे सेक्रेटरी यांजकडे धाडण्यांत आली होती. उत्तर आलें तें असें.

SIR,

With reference to your letter dated 18th June 1915, regarding the adoption of the Balbodh script in all offices in the districts of the Central Division, I am directed to refer you to the reply given in Government letter No. 10126, dated 8th November 1913, to a previous representation on the subject from the Parishad, and to state that Government see no reason to reconsider the orders passed by them in the matter. (*20 June.*)

[भाषांतर—मध्यभागांतील सर्व जिल्ह्यांतील सर्व ऑफिसांत बाळबोध लिपी सुरू केल्याविषयीं आपलें ता. १८ जून १९१५ चें पत्र आलें त्याविषयीं मला हुकूम झाला त्याप्रमाणें तुम्हास उत्तरादाखल, साहित्य परिषदेमार्फत याच विषयासंबंधीं पूर्वी आलेल्या विनंतीपत्रास सरकारी पत्र नं. १०१२६-८ नोव्हेंबर १९१३ चा जबाब धाडला गेला त्याचा हवाला देण्यांत येत आहे. ह्यासंबंधीं सरकारनें काढलेल्या हुकुमनाम्यांत फेरफार करण्यास त्यांस कांहीं कारणें दिसत नाहींत.] (२० जुलई.)

कविता.

कवीस पाचारण.

हें ताराकुल, अंबर हें, अरुण निजकरें
हा रत्नाकर वीचींहीं, चंद्र निजशरें
सुरलोकिं योग्य, भूवरि नच वास तव बरा
हे सकल कविसि वदति असें गमत अंतरा ।।ध्रु०।।
आकाश ह्मणे लागिं पथा धैर्य धरि मनीं
तुज जाणें अति दूर असे वदत दिनमणी
जों उदधि ह्मणे प्रेम-पाश तोडिं सत्वरी
तों इन्दु ह्मणे सुखकर तें स्थल किती तरी
करितील मान सुरवर तव वदति तारका
शिवतें न लवहि दुःख, वसति सौख्यदायका
आव्हान असें करिति मुदें सकल आदरें
हें परिसोनी कवि चित्तीं बहुत बावरे

(२)

परि त्याचें मन वदत तया भवच हा बरा
या ठायिं सकल वांछित तें लाधनें नरा
तूं गेलासी भुलुनि तिथें तद्वचां जरी
तुज होइल कां लाभ खचित शोधि अंतरीं
त्या सुरपतिचे अतुल वैभवास पाहुनी
दिपतील तुझे नयन गमे मजसि त्या क्षणीं
सौंदर्यखनी तेथिल त्या अमर-कामिनी
हरतील तुझें हृदय गड्या ! मोह दावुनी
वाढेल तदां मीच असे कुणि जगांत या
होशील अहंमन्य बहू सोडुनी नया
जाईल तुझी वामपथीं मति न जाणतां
मग विसरशील कर्तव्या जाण तत्वतां

(३)

यासाठिं तुला हित कथितों ऐकशिल जरी
तरि काव्यकुंजिं रमुनि सतत शिणविं वैखरी
तूं दावित जा अखिलजना काव्यमाधुरी
जगदीश सदा गाउनियां प्रीतिनें हरी
रे ! उपजवुनी विपुल दया तद्-हृदंतरीं
तो स्वर्गच तूं आणिशील खचित भूवरीं.

आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

वाङ्मय आणि त्याची उत्क्रांति.

(एप्रीलच्या अंकावरून समाप्त.)

ललितवाङ्मयाच्या अत्यंत महत्त्वाच्या अंगाचें ह्मणजे काव्याचें अद्याप विवेचन करावयाचें राहिलें आहे, हें रसिकवर विसरले नसतीलच. अगदीं प्रथमारंभीं ज्या वाण्यौघाचें वर्णन करण्यांत आलें होतें, तो जरी पूर्णपणें काव्यमय असला, तरी त्याची गणना ललितवाङ्मयांत होऊं शकत नाहीं. रसिकवरांचें मन रंजविण्याकरितां तो काव्यौघ कांहीं निर्माण झाला नव्हता हें त्याच वेळेस स्पष्ट करण्यांत आलें होतें.

वृत्त्यात्मक वाङ्मय व काव्य यांजमधील फरक. काव्याचे विशेष; कवींचे प्रकार.

असो. तर वाचकांनीं त्या वाण्यौघाचा, आतां ज्या प्रकारच्या काव्याचें आपण खालीं विवेचन करणार आहों त्या काव्याशीं, घोटाळा न करण्याची खबरदारी घ्यावी. तो वाण्यौघ केवळ वृत्त्यात्मक असल्यामुळें वाणी त्यावेळेस थाटलेली व नखरेबाज अशी नव्हती. परंतु आतांचा हा काव्यौघ वृत्ति, कल्पना व बुद्धि या तिहींच्या मिलाफानें उद्भवला होता. अर्थात् वृत्तिप्राधान्य हें कवीचें लक्षणच होय. वृत्तींच्या ओलाव्याशिवाय बुद्धीला स्वाभाविक असलेली रूक्षता घालविणें अशक्य आहे. गोष्टी लिहिणाऱ्याला किंवा कादंबरी रचणाऱ्याला वृत्तिप्राधान्य इतकें आवश्यक नाहीं, किंवा तें मुळीं नसलें तरी चालण्यासारखें आहे. परंतु कवीची स्थिति मात्र तशी नाहीं. वर्णन परिणामकारक होण्यास, वाणी तेजस्वी, रसाळ, प्रतिभाशाली बनण्यास, वृत्तींची मदत बुद्धीस व कल्पनाशक्तीस अवश्य आहे. अर्थात् वृत्तींचें विशेष प्राधान्य असलेला कवि विनोदपूर्ण कविता मात्र लिहूं शकणार नाहीं हें उघड आहे. एकंदरींत बुद्धि, कल्पना व वृत्ति या त्रयींपैकीं कशाचें विशेष प्राधान्य आहे, या गोष्टीवर कवींचेही प्रकार करतां येतील. वृत्तींच्या प्राधान्यानें वाणी मृदु, रसाळ व परिणामकारक अशी निपजेल. कल्पनाप्राधान्य असल्यास वाणीची खळाळीच फार राहील. बुद्धिवैशिष्ट्य असल्यास अर्थपूर्णता, विनोद हीं साधलीं जाऊन भाषा वृत्तींची मदत असल्यामुळें परिणामकारक निपजेल. कविवृंदांत विशेष चमकणारे व विद्वान् रसिकवरांच्याही सर्वस्वीं पसंतीस उतरणारे कवि या अखेरच्या प्रकारचेच ह्मणजे बुद्धिविशिष्ट कवि होत. कालिदास, शेक्सपिअर, मिल्टन्, गटे वगैरे कवि या प्रकारचेच होत. वृत्तिप्रधान कवींमध्यें भवभूति, कौपर, शेले वगैरेंची गणना होईल असें वाटतें. कल्पनाप्रधान कवींचीं तितकीं उदाहरणें देतां येण्यासारखीं नाहींत. रघुनाथपंडित, बायरन् वगैरे कवि कदाचित् उदाहरणें म्हणून होऊं शकतील. अर्थात् प्रसंगानुसारसुद्धां या तिहींपैकीं कोणत्या तरी एका गोष्टीचें प्राधान्य कवीचे ठिकाणीं संभवेल; आणि म्हणूनच कवींच्या वर्गीकरणाचा प्रश्न वाटतो तितका सोपा नाहीं. प्रस्तुत लेखकाला काव्यनाटकादि वाङ्मयाच्या वाचनाचा फारच थोडा अनुभव असल्यामुळें या बाबतींत आतांपर्यंत केलेलींच विधानें किंचित् धार्ष्ट्याचीं होणें संभवनीय आहे हें समजून यासंबंधानें जास्त कांहीं लिहिणें त्यास शक्य नाहीं.

एकाद्या व्यक्तिविशेषाचें किंवा व्यक्तिविशेषसंग्रहाचें वर्णन हाच कवितेचा प्रथम विषय होता. मानवी मनोविकृतीचें स्वरूपचित्र, सृष्टिवैचित्र्याचें रसभरित वर्णन वगैरे गोष्टी काव्यांत व्यक्तिविशेषाच्या वर्णनानुरोधेंच या स्थितींत साधल्या जात होत्या. कविप्रतिभा उज्ज्वल असल्यामुळें एकच रसभरित कथानक घेऊन सर्व काव्यसौंदर्य त्यांतच उमटविणें कवीस सोईचें वाटण्यासारखें होतें.

फुटकळ काव्यांची उत्पत्ति.

परंतु कविप्रतिभेची—वृत्तिप्राधान्याची—दीप्ति जसजशी कमी होऊं लागली, तसतशी फुटकळ काव्यें लिहिण्याची आवश्यकता भासूं लागली. एकाच कथानकांत उत्कृष्ट व सर्व-सारखी कविता लिहितां येणें अडचणीचें होऊं लागलें, व प्रसंगानुसार लिहिलीं गेलेलीं फुटकळ काव्यें प्रकट होऊं लागलीं. या पुढचा काव्येतिहासाचा काल म्हणजे कवितेच्या अधोगतीचाच काल होय.

काव्याची अधोगति.

यापूर्वी भक्तांना स्वभावतः पावणाऱ्या काव्यदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठीं आतां नवससायास करण्यांत येऊं लागले; व यामुळें—अशा संकुचित दृष्टीमुळें—कोपाविष्ट होऊन काव्यदेवीनें याचकांचें नांव सोडलें. असो. सांगावयाचा भाग एवढाच कीं, कवितेच्या या अधोगतीच्या कालांत प्रतिभेचा संपूर्ण लोप होऊन निव्वळ कृत्रिम पोशाख घालून देवीला सजविण्याची पद्धत पडूं लागल्याबरोबर कवितादेवीनें दुसरा मार्ग पतकरिला.

ललितवाङ्मय पुष्कळांस कां आवडतें ?

वाङ्मयाच्या सर्व प्रकारांत विशेष वाचला जाणारा, बहुजनसमाजास रुचणारा, व नानाविध लेखकवर ज्या प्रकाराची मनोभावें सेवा करतात असा वाङ्मयप्रकार ह्मटला ह्मणजे ललितवाङ्मयाचाच होय. प्रत्यक्ष मानवी मनाच्या आंदोलनांचें वर्णन, व तस्मात् साम्यभावामुळें उत्पन्न होणारें साहजिक प्रेम, वाचीत असतांना स्थिरात्मिका विचारशक्तीला फारसा ताण न पडल्यामुळें स्वाभाविक टिकणारा मनाचा उत्साह, व भाषासौष्टवामुळें—हें कां व कसें साधतें याचें वर्णन वर करण्यांत आलेंच आहे—स्वभावतः होणारें मनोरंजन, या बाबींमुळें ललितवाङ्मय बहुतेकांना प्रिय होतें. बुद्धि, वृत्ति व कल्पना या तिहींच्या मिलाफामुळें उत्पन्न झालेलें असल्यामुळें, स्वाभाविकपणेंच हें वाङ्मय पुष्कळांस रिझवितें. अर्थात् बुद्धीचा मिलाफ असल्यामुळें हें वाङ्मय सर्वस्वी मनोरंजनाप्रीत्यर्थ लिहिलें जातें असें नाहीं, तर लेखकाला भासमान होणाऱ्या सृष्टीचें व सृष्टिक्रमाचें स्वरूपचित्र रेखाटणें हा लेखकाचा मूळ उद्देश असतो. अज्ञ जन व लहान मुलें यांना स्वभावतः **कांहीं** तरी अद्भुत गोष्टींचें वर्णन ज्यांत आहे

रुचिभिन्नता व आवडनावड.

अशा प्रकारचें ललितवाङ्मय आवडतें; तेंच शिक्षणाचा संस्कार ज्यांच्यावर झाला आहे अशा लोकांस जर वरील प्रकारचें ललितवाङ्मय वाचावयास दिलें तर भाकडकथा म्हणून त्यांची टवाळी केल्याशिवाय ते कधींही रहाणार नाहींत. उलट पक्षीं शिक्षणसंस्कृतांस स्वाभाविक रुचणाऱ्या सुसंगत व सुव्यवस्थित गोष्टी अज्ञ जनांस तितक्या मनोरंजक वाटणार नाहींत. असो. वरील विवेचनावरून ललितवाङ्मयांत सुद्धां रुचिभिन्नतेमुळें निरनिराळ्या प्रकारची आवडनावड कशी उत्पन्न होते हें यावरून दिसून येईल. आपला अमुक अमुक ग्रंथकार मोठा आवडता आहे असें जें पुष्कळ वाचक म्हणतांना दृष्टीस पडतात त्याचें कारण ही आवडनावडच होय. साम्यभावाचें वर्णन दृष्टीस पडल्यामुळें उत्पन्न होणाऱ्या गुदगुल्या हेंच या आवडीनावडीचें आदिकारण होय. आवडीनावडीचें हें तत्त्व अर्थात् वाङ्मयाच्या सर्वच प्रकारांना व प्रकारविशेषांना लागू करतां येईल हें उघड आहे, व यामुळेंच कांहीं कांहीं लोकांना ललितवाङ्मयाचा मनस्वी कंटाळा येतो.

६. असो. वाङ्मयाच्या एका अत्यंत उदात्त, उज्ज्वल व पवित्र प्रकाराकडे आपली दृष्टि आपणांला वळवावयाची आहे. हा प्रकार ह्मटला म्हणजे सर्वात्मभावविशिष्ट किंवा प्रासादिक वाङ्मय हा होय. ललितवाङ्मयाभिमानी या प्रकाराचें स्वतंत्र

प्रासादिक वाङ्मयाची उत्पत्ति ललित वाङ्मयाच्या अगोदर झाली.

अस्तित्व कदाचित् कबूल करणार नाहींत व या वाङ्मयप्रकाराची गणना काव्यांत—कारण हें वाङ्मय बहुशः काव्यमय असतें—करण्याचा आग्रह धरतील. परंतु या वाङ्मयाची प्रथमोत्पत्ति ललितवाङ्मयाच्या अगोदरची आहे. बुद्धिजागृतीमुळें सृष्टिक्रमाचें निरीक्षण करून, त्याप्रमाणें आपल्या चित्स्वरूपाची जाणीव करून घेऊन, आपणच सर्वशक्ति परमेश्वर आहों असा अनुभव ज्या विभूतींनीं करून घेतला, व ज्यामुळें अहंकाराचा त्यांनीं सर्वस्वीं त्याग केला, अशा त्या सर्वस्वी पूज्य पुरुषश्रेष्ठांचे ग्रंथ ह्मणजे केवल ज्ञानभांडागारच होत. खरी तद्रूपता व वाणीचें खरें ज्ञानयुक्त स्वाभाविकत्व फक्त प्रासादिक लेखकांच्याच ठायीं संभवतें. ग्रंथ लिहून झाल्यानंतर आपण हें लिहिलें असा उत्पन्न होणारा अहंभाव यांचे ठिकाणीं बिलकूल नसतो. कीर्तिलालसा किंवा द्रव्यार्जन असले

प्रासादिक वाङ्मयासंबंधानें भवभूतीच्या ह्मणण्याचा अनुवाद.

मनोभाव यांना कधींही लिहावयास लावीत नाहींत. सृष्टीशीं, अंतरात्म्याच्या चिच्छक्तीशीं, या प्रकारच्या लेखकांचें पूर्ण तादात्म्य झालें असल्यामुळें या लेखकांची वाणी

अत्यंत मनोहर, अत्यंत परिणामकारी व अत्यंत अर्थपूर्ण अशीच उद्भवते. महाकवि भवभूति या वंदनीय लेखकवरांचें खालीलप्रमाणें वर्णन करतो. "ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ।" भवभूतीच्याच वरील कबुलीवरून सामान्य लेखकांपासून प्रासादिक लेखक वेगळे कां गणावयाचे तें समजून येईल.

बुद्धिविशिष्ट व प्रासादिक या वाङ्मयप्रकारांतील तफावत.

बुद्धिविशिष्ट वाङ्मयाचें विवेचन करतेवेळीं भरतखंडांतील धीमंतांनीं आपल्या अंतःशक्तीकडेच आपला लय कां लावला याचें विवेचन आम्हीं केलेंच आहे. ज्ञानप्राप्तीचे कामीं पृथक्करणात्मक विचारशक्तीचा–बुद्धीचा–उपयोग होऊं लागल्यामुळें मनाचें समाधान करण्याजोगी ज्ञाननिष्पत्ति तरी होऊं लागली. पण असें समाधान होऊं लागल्याबरोबर, बुद्धीच्या विजयामुळें केल्या गेलेल्या व स्वतःस वाटणाऱ्या कौतुकामुळें, लेखकवृंदाचे मनांत अहंभाव उत्पन्न होऊं लागला. वृत्त्यात्मक वाङ्मयाचे काळीं अहंभावाला थाराच नव्हता. कल्पनात्मक वाङ्मयावस्थेंत नुसती ज्ञानलालसाच प्रदीप्त होती; परंतु ही लालसा शमविण्यासाठीं निर्विकार प्रयत्नांना सुरवात होणें अद्याप लांबचेंच होतें. शिवाय हें वर स्पष्ट केलेंच आहे कीं, समाजस्थैर्याची स्थिति आल्याशिवाय बुद्धिविशिष्ट वाङ्मय कांहीं उद्भवलें नाहीं; आणि म्हणूनच युद्धनैपुण्य हाच कल्पनात्मक वाङ्मययुगांत शेखीचा विषय होता. असो. वरील विवेचनावरून अहंभाव बराच कालपर्यंत आत्मज्ञानाचे कामीं कसा आड आला हें दिसून येईल. या बाबतींत जीं निरनिराळीं मतें स्थापन झालीं त्याचें कारण तरी वरील अहंभावच होय. परंतु बुद्धीला सुद्धां ज्ञानाचा एक विषय करून कांहीं महात्म्यांनीं अंतर्ज्ञान करून घेतलें, व अशा रितीनें अहंभावाचा निकाल केल्यानंतरच प्रासादिक वाङ्मय उत्पन्न झालें. अशा प्रकारें लय लावून सर्वात्मशक्तीचा अनुभव घेतल्यानंतर, वेदांततत्त्वें, मनुष्याच्या यशापयशाचीं व व्यवहारांत वागण्याचीं तत्त्वें, सामान्य जनांनाही सुलभ व्हावीं, स्त्रीपुरुष, आबालवृद्ध, सुशिक्षित, अशिक्षित या सर्वांच्या पचनीं पडणें या तत्त्वांना शक्य व्हावें, म्हणूनच रामायणमहाभारतादि ग्रंथांची उत्पत्ति झाली. एकंदरींत बुद्धिविशिष्ट वाङ्मयाच्या लगेच मागाहून हें वाङ्मय प्रथमतः निर्माण झालें. या वाङ्मयाचें श्रेष्ठत्व व मनोहारित्व यांचें जितकें वर्णन करावें तितकें थोडेंच होणार आहे. भौतिक शास्त्रांचें ज्ञान जर वगळलें तर आजही "जें महाभारतांत नाहीं तें जगांत नाहीं" असें म्हणण्यांत फारशी अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. असो. अशा तऱ्हेच्या प्रासादिक लेखकांची मालिका निर्माण करण्याचा मान एकट्या भरतभूसच आहे ही मोठ्या अभिमानाची गोष्ट होय. तुकाराम, रामदास, ज्ञानदेव, एकनाथ, महात्मा तुलसीदास, स्वामी रामतीर्थ, स्वामी विवेकानंद वगैरे थोर पुरुष हे प्रासादिक लेखक व वक्ते या नात्यानें आबालवृद्धांस ठाऊक आहेत.

७. वाङ्मयाच्या सर्व प्रकारांचें एथवर विवेचन झालें. इतिहास, प्रवासवृत्तें वगैरे वाङ्मयाचा अंतर्भाव प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें वर वर्णन केलेल्या कोणत्या तरी वाङ्मयप्रकारांत करतां येण्यासारखा आहे. यांना स्वतंत्र प्रकार (आठवणीमुळें निर्माण झालेलें वाङ्मय) जर गणावयाचें, तर शिक्षणोपयोगी वाङ्मयालाही स्वतंत्र प्रकार गणावा लागेल. निदान सध्यां तरी या वाङ्मयाचें महत्त्व वाढतें आहे, व उत्तरोत्तर तें जास्तच वाढेल हें उघड आहे. परंतु असल्या किरकोळ बाबींकडे लक्ष पुरविण्याची प्रस्तुत आपणांस जरूर नाहीं.

वाङ्मयाचें वर्गीकरण व वाङ्मयप्रकारांचा उत्पत्तिक्रम.

असो. आतांपर्यंत केलेल्या ऐतिहासिक विवेचनावरून मानसशास्त्रदृष्ट्या वाङ्मयाचे स्वाभाविकतःच कसे पोटभेद पडतात हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. खरोखरी या बाबतींत विशेष असें कांहीं आपण पाहणार आहों असें नाहीं. वृत्त्यात्मक, कल्पनात्मक, बुद्धिविशिष्ट, प्रासादिक अगर सर्वात्मभावविशिष्ट व ललित असे वाङ्मयाचे सहा विभाग पडत असून, ते वर दिलेल्या अनुक्रमानेंच उद्भवले हें वर सिद्ध केलेंच आहे.

पुनर्जागृतीनंतरसुद्धां सर्व ठिकाणीं कल्पनात्मक किंवा अद्भुतरमसंयुक्त, बुद्धिविशिष्ट व ललित हे वाङ्मय-

प्रकार याच अनुक्रमानें प्रकट झाल्याचें दिसून येईल. कारण या स्थितींत वृत्तींकडून कल्पनेला चेतना नको असते; तर बाह्य परिस्थितीमुळें ही चेतना आपोआपच मिळते. या स्थितींत समाजस्थैर्य आधींच उद्भवलें असल्यामुळें वृत्त्यात्मक त्याप्रमाणेंच कल्पनात्मक वाङ्मय प्रकार फारसा जोर धरूं शकत नाहींत; व बुद्धिविशिष्ट व ललित हे वाङ्मयप्रकार लवकरच बळावतात.

वाङ्मयप्रकारांचा पुनर्जागृत राष्ट्रांमधील उत्पत्तिक्रम.

यूरपमध्यें प्राचीनकालीं ग्रीस व रोम या राष्ट्रांत निर्माण झालेल्या वाङ्मयास या लेखांत निर्दिष्ट केलेला वाङ्मयक्रम सर्वतोपरी लागू पडेल. यूरपचें अर्वाचीन वाङ्मय, यूरपचें पुनरुज्जीवन झाल्यानंतर निर्माण झालें असल्यामुळें, उपरिनिर्दिष्ट पुनर्जागृत राष्ट्रांना लागू पडणारा क्रम या राष्ट्रांतील वाङ्मयप्रकारांतही आढळून येईल. बाह्य परिस्थितीनें अतिशय जोराची चेतना दिली असल्यामुळें, समाजस्थैर्याची स्थिति अगोदरच आली असल्यामुळें, व छापण्याची कला यापूर्वीच उत्पन्न झाली असल्यामुळें, शास्त्रीय व ललित वाङ्मय यांच्या उत्पत्तींमध्यें मोठासा कालावधि यूरपमध्यें लोटला नाहीं; एवढेंच नव्हे, तर ललित वाङ्मयाचे प्रकारही भराभर उन्नतावस्थेला आले. छापण्याची कला आतां तर बरीच पूर्णत्वास आली असल्यामुळें, कला या नात्यानें तिच्यावर उपजीविका करणारेच वर्ग तेवढे उत्पन्न होऊन राहिले नसून, छापण्याकरितां साहित्य पुरवून द्रव्यार्जन करणाऱ्यांचेही वर्ग आज शतक दोन शतकांपासून उपस्थित झाले आहेत; एवढेंच नव्हे, तर सकारण वा निष्कारण महत्त्वही पण त्यांच्या वांट्यास आलें आहे. छापण्याच्या कलेमुळें सर्वच प्रकारें वाङ्मयाभिवृद्धीस मदत मिळाली आहे हें कोणालाही नाकबूल करतां यावयाचें नाहीं.

पाश्चात्य वाङ्मय.

भरतखंडासंबंधें जर पाहावयाचें तर या लेखांत आंखलेला वाङ्मयाचा इतिहासक्रम पूर्णपणें लागू पडतो हें स्पष्ट होईल. हिंदुस्थानांत खऱ्या ब्राह्मणांचा,-त्यागी व प्रज्ञ असल्यामुळें सामर्थ्यशील व राष्ट्राचें शील कायम राखण्याची मोठी जबाबदारी पतकरून ज्ञानार्जनाला वाहिलेले लोक निर्माण करण्यास खरे लायक अशा गुरूंचा—लोप झाल्यानंतर मात्र, केवळ प्रासादिक वाङ्मयाखेरीज कोणतेंही वाङ्मय विशेष अनुकूल परिस्थितीशिवाय—स्वराज्य व स्वधर्म असल्यामुळें विद्वान् लोकांचा परामर्ष घेण्यासारखी स्थिति*असल्याशिवाय—निर्माण होऊं शकलें नाहीं. हिंदुस्थानच्या प्राचीन वाङ्मयाबद्दल हिंदुस्थानची कोणीही तारीफच करील. प्रासादिक वाङ्मय हा एकट्या भरतभूचाच विशेष होय. ललितवाङ्मयांत सुद्धां ज्या देशानें भास, कालिदास, भवभूति, बाणभट्ट, भर्तृहरि, राजा शूद्रक, गुणाढ्य, विष्णुशर्मा, जगन्नाथराय यांच्यासारखे लेखकशिरोमणि व कविमुकुटमणि पैदा केले, त्या देशाला हिणावण्याची ताकद धरणें व्यर्थ होय. बुद्धिविशिष्ट वाङ्मयांत सुद्धां हिंदुस्थानची प्रगति बरीच होती यांत तिलप्राय संशय नाहीं. परंतु इतर सर्व शास्त्रांचा पाया घालणाऱ्या व सर्व प्रकारच्या वाङ्मयांत जगांतील कोणत्याही देशांतील वाङ्मयाशीं बरोबरी करण्यास समर्थ असलेल्या दयित आर्यभूला भौतिक शास्त्रांच्या बाबतींत आपला कमीपणा सर्वस्वीं कबूल केलाच पाहिजे. अर्थात् भौतिक कलांचा पाया घालण्याचा मान जरी हिंदुस्थानचाच असला तरी भौतिक शास्त्रांच्या बाबतींत हिंदुस्थाननें अगदींच अनभिज्ञतेचें व निष्काळजीपणाचें धोरण स्वीकारिलें होतें हें अगदीं उघड आहे. आजचें युग केवळ भौतिक शास्त्रांच्या कार्यकर्तृत्वाचें युग असल्यामुळें, राष्ट्रांच्या पोटापाण्याचा—राष्ट्रांच्या जीविताशेचा—प्रश्न भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाशीं पुराच खिळल्यामुळें, या बाबतींत दुर्लक्ष करून आतां मात्र चालावयाचें

वाङ्मयप्रकारांत भरतभूची प्रगति.

भौतिक शास्त्रांच्या बाबतींत हिंदुस्थानचा निष्काळजीपणा.

* विजयानगरच्या व यादव घराण्याच्या इतिहासाकडे लक्ष पुरविल्यास वरील विधानाची सत्यता पटेल.

नाहीं. यूरपला आपल्या प्रासादिक वाङ्मयाचा लाभ मिळावा व हिंदुस्थाननेंही यूरपच्या शास्त्रीय ज्ञानाचें वांटेकरी व्हावें या हेतूनेंच, दैवी योजनेनें हिंदुस्थान शास्त्रीय व यांत्रिक ज्ञानांत यूरपमध्यें अग्रोसर अस-

आंग्लसत्तेमुळें हिंदी राष्ट्राचें पुनरुज्जीवन.

लेल्या इंग्लंड देशाशीं जोडलें गेलें आहे. आंग्लसत्तेमुळें भरतभूस जे स्वास्थ्याचे दिवस लाभले, शिक्षणप्रसारामुळें जी ज्ञानलालसा वाढली, त्यामुळें हिंदुस्थानच्या वाङ्मयाची पुनर्जागृति होऊं लागून, या जागृतीची मजल बरीच पुढें येऊन ठेपली आहे. अशा स्थितींत भौतिक शास्त्रांचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची, त्यांचा

उपसंहार.

व्यवहारांत उपयोग करावयास लागून, त्यांत व्यावहारिक नैपुण्य व श्रेष्ठत्व मिळविण्याची शक्ति भारतवासीयांत संचरविण्याबद्दल त्या जगन्नियंत्या, चित्स्वरूप प्रभूची मनोभावें प्रार्थना करून, आम्ही या विषयाची रजा घेतों.

दा. ना. लिमये.

वैदिक धर्माच्या पांच मुख्य शाखा.

१. भगवान् बादरायण व्यास यांनीं आपलीं वेदांतसूत्रें उपनिषदांच्या आधारानें रचिलीं हें सर्वविश्रुत आहे. वस्तुतः वेद—ऋक्, यजु, साम व अथर्व—असे चार असून प्रत्येकाचे संहिता, ब्राह्मण व उपनिषदें असे तीन तीन भाग आहेत. अर्थात् उपनिषदें हीं श्रुतींमध्येंच अन्तर्भूत होत असल्यामुळें वेदान्तप्रणीत धर्म हा "वैदिक धर्म" या संज्ञेनेंच प्रसिद्ध आहे. तेव्हां याच अर्थी मथाळ्यांतील "वैदिक धर्म" शब्दाचा उपयोग केला आहे हें सांगणें नकोच.

२. वेदान्तशास्त्राचे मुख्य आधारभूत ग्रंथ ह्मणजे उपनिषदें, ब्रह्मसूत्रें व भगवद्गीता हे होत. यांनाच कोणी कोणी प्रस्थानत्रयी ह्मणतात. आपल्या भरतखंडांत आजपर्यंत जे मोठमोठे धर्मसंस्थापक थोर पुरुष होऊन गेले त्यांनीं सदरील प्रस्थानत्रयीवर निरनिराळीं भाष्यें लिहिलेलीं असून त्यामुळेंच त्यांना "आचार्य" ही संज्ञा प्राप्त झाली आहे. वेदान्तशास्त्राच्या मूलभूत तत्त्वांसंबंधानें निरनिराळ्या आचार्यांमध्यें एकवाक्यता असली तरी "व्यक्ति तितक्या प्रकृति" या न्यायानें त्यांच्यांत दृष्टिभेद असणें शक्य आहे. त्यालाच अनुसरून त्यांनीं पूर्वोक्त मूलतत्त्वांचें आपापल्या दृष्टीनें पर्यालोचन करून निरनिराळीं मतें प्रतिपादन केलेलीं आहेत. व त्या मतांला अनुसरून निरनिराळे संप्रदाय अगर शाखा त्या त्या आचार्यांच्या नांवानें आपल्या देशांत आजमितीस चालू आहेत. त्यांपैकीं मुख्य संप्रदाय म्हटले म्हणजे चार आहेतः शंकराचार्यांचा मायावादी अद्वैत संप्रदाय, रामानुजाचार्यांचा परिणामवादी विशिष्टाद्वैत संप्रदाय, मध्वाचार्यांचा तारतम्यवादी द्वैत संप्रदाय, व वल्लभाचार्यांचा ब्रह्मवादी केवलाद्वैत संप्रदाय. याप्रमाणें वेदान्त धर्माचे चार संप्रदाय ऊर्फ शाखा प्रसिद्ध आहेत. तरी हल्लीं उपलब्ध झालेल्या माहितीवरून पाहतां असें दिसतें कीं, आपल्या देशाच्या निरनिराळ्या भागांत वरीलपेक्षांही अधिक 'आचार्य' संज्ञक पुरुष आज

होऊन गेले असून त्यांचे त्यांचे तितके संप्रदाय अगर शाखा आज चालू आहेत असें प्रसिद्ध झालें आहे. या विषयावर मद्रासेकडील कोणी मि. टि. एस्. नारायण शास्त्री, बी.ए.,बी.एल्., या नांवाच्या विद्वान् गृहस्थांनीं "इंडियन रिव्ह्यू" च्या मेच्या अंकांत एक फार वाचनीय लेख लिहिला आहे. त्याच लेखाचा आधार घेऊन पुढील चार ओळी लिहीत आहें. मि. नारायण शास्त्री यांनीं दिलेली माहिती त्रोटकच असून त्यांना ज्या ग्रंथांत ती माहिती मिळाली त्यांचा त्यांनीं उल्लेखही केलेला नाहीं. तथापि दिलेली माहिती साधार असली पाहिजे हें उघड आहे.

३. आपल्या हिंदुस्थान देशांतील सर्व धर्मविषयक वाङ्मयाचें निरीक्षण केल्यास असें आढळून येतें कीं, देशाच्या निरनिराळ्या भागांत वेदान्तप्रणीत धर्माच्या आज अकरा शाखा ऊर्फ संप्रदाय आहेत. प्रत्येक शाखेचे एकएक आचार्य होऊन गेले असून त्यांनीं भगवान् नारायण व्यासकृत वेदान्तसूत्रांवर निरनिराळीं भाष्यें लिहिलेलीं आहेत. कोणकोणत्या आचार्यांनीं कोणकोणत्या शाखा स्थापन केल्या व त्यांनीं कोणकोणतीं भाष्यें लिहिलीं, हें पुढील यादीवरून स्पष्ट होईल.

पहिलें—श्रीशंकरभगवत्पादाचार्य अगर आदिशंकराचार्यविरचित शारीरक भाष्यः हें भाष्य अद्वैतपर असून तें अशेषहिंदुस्थान देशांत ब्रह्मसूत्रांच्या विशदीकरणार्थ आधारभूत म्हणून मानलें जातें. त्याचप्रमाणें शंकराचार्यांच्या कालापासून तों आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं म्हणून वेदान्त विषयावर उत्तमोत्तम ग्रंथ लिहिले आहेत ते बहुतेक सगळे याच (अद्वैत) शाखेचे अनुयायी होत.

दुसरें—भगवत्विज्ञानभिक्षु ऊर्फ विज्ञानमित्रकृत ब्रम्हसूत्रभाष्यः हें भाष्य विशिष्टाद्वैतपर असून तें केवळ विष्णूलाच अगर शिवालाच प्राधान्य देऊन लिहिलेलें नाहीं. ह्मणजे तें (unsectarian) विशिष्टदेवताप्राधान्यहीन आहे.

तिसरें—श्रीकंठ शिवाचार्यकृत ब्रम्हमीमांसाभाष्यः हेंही विशिष्टाद्वैतपरच आहे. पण त्यांत शिवालाच प्राधान्य दिलेलें आहे. ह्मणजे त्याला शैव विशिष्टाद्वैतपर भाष्य ह्मणतां येईल.

चवथें—भगवत् रामानुजाचार्यांचें श्रीभाष्यः हेंही विशिष्टाद्वैतपरच आहे. पण त्यांत विष्णूला प्राधान्य दिलेलें आहे. म्हणजे त्याला वैष्णव विशिष्टाद्वैतपर भाष्य म्हणतां येईल.

पांचवें—बलदेवाचार्यकृत वेदान्तसूत्रभाष्य ऊर्फ गोविंदभाष्यः हें शंकराचार्यांच्या अद्वैत संप्रदायाच्याही बाजूचें नाहीं व रामानुजाचार्यांच्या विशिष्टाद्वैत संप्रदायाच्याही बाजूचें नाहीं-तर जवळ जवळ मध्यवर्ती धोरणाचें आहे.

सहावें—श्रीभास्कराचार्यकृत ब्रह्मसूत्रभाष्यः हें द्वैतपर भाष्य असून (नं. २ कडे सांगितल्याप्रमाणें) विशिष्टदेवताप्राधान्यहीन (unsectarian) आहे.

सातवें—श्रीकराचार्य ऊर्फ श्रीपतिआचार्यकृत ब्रम्हसूत्रभाष्यः यालाच श्रीकरभाष्य असेंही म्हणतात. हें शिवप्रधान द्वैतपर भाष्य आहे.

आठवें—श्रीमध्वाचार्यकृत ब्रह्मसूत्रभाष्य ऊर्फ द्वैतभाष्यः ही विष्णुप्रधान द्वैतशाखा होय.

नववें—श्रीवल्लभाचार्यकृत अनुभाष्यः हा शुद्धाद्वैत संप्रदाय होय.

दहावें—श्रीनिंबार्काचार्यकृत ब्रह्मसूत्रभाष्यः यालाच "वेदान्तपारिजातसौरभ" असें दुसरें नांव आहे. हा द्वैताद्वैत संप्रदाय होय.

अकरावें—श्रीशुकभगवत्पादाचार्यकृत शुकभाष्यः यालाच "सर्ववेदान्तसारमीमांसाभाष्य" म्हणतात. या भाष्याचें धोरण श्रीमत् भागवतपुराणांत प्रतिपादिलेल्या भक्तिमार्गास अनुसरून असल्यामुळें त्यास "भागवतधर्म"पर ह्मणतां येईल.

४. वरील अकरा शाखांपैकीं फक्त पांच काय त्या मुख्य व अतएव महत्त्वाच्या शाखा आहेत. त्या ह्याः– (१) शंकराचार्यांची अद्वैत शाखा: (२) श्रीकंठ शिवाचार्यांची शिवप्रधान विशिष्टाद्वैत शाखा; (३) रामानुजाचार्यांची विष्णुप्रधान विशिष्टाद्वैत शाखा; (४) श्रीकराचार्यांची शिवप्रधान द्वैत शाखा; व (५) मध्वाचार्यांची विष्णुप्रधान द्वैत शाखा. ह्यांपैकीं शंकराचार्य हे इसवी सनापूर्वी सहाव्या (जन्म ५०९ B.C.) शतकांत होऊन गेले. श्रीकंठ हे इसवी सनाच्या आठव्या शतकांत झाले. मि. नारायण शास्त्री यांचे म्हणणें असें आहे कीं, शंकराचार्य हे वर सांगितल्याप्रमाणें इसवीसनापूर्वी सहाव्या* शतकांत झाले व त्यांचे पासून ३८ व्या पिढीचे त्यांच्याच गादीवरचे आचार्य जे दुसरे शंकराचार्य ते इ. स. ७८८ सालीं जन्मले. हे देखील चांगले विद्वान् होते. व सामान्यतः यांनाच आदि शंकराचार्य मानण्यांत येत असतें. पण ती चूक आहे. श्रीकंठ (शिवाचार्य) हे या दुसऱ्या शंकराचार्यांचे समकालीन होते. असो. रामानुजाचार्य हे इ. स. च्या ११ व्या शतकांत झाले (जन्म इ. स. १०१७); श्रीकराचार्य हे इ. स. च्या अकराव्या शतकांत झाले: (जन्म इ. स. १०७२); आणि श्रीमन्मध्वाचार्य हे इ. स. च्या १२ व्या शतकांत झाले (जन्म इ. स. ११९९).

५. याप्रमाणें मि. नारायण शास्त्री यांच्या इंग्रजी लेखाचें सार आहे. लेख अंमळ याहीपेक्षां विस्तृत हवा होता. पण त्याला उपाय नाहीं. त्यांच्या लेखांतील माहिती नवीन व महत्त्वाची—अतएव मनोरंजक–वाटली म्हणून ती वि. ज्ञा. विस्ताराच्या द्वारें आज दिली आहे.

"श्रीनिवास."

* ऐकाहून अधिक शंकराचार्य झाले असें कित्येक वेळां ऐकतों. पण त्याला आधार काय हें समजत नाहीं. तशांतून ब्रम्हसूत्रावर शारीरक भाष्य लिहिणारे शंकराचार्य तेच इसवी सनाच्या आठव्या शतकांत होऊन गेलेले शंकराचार्य अशी आजपर्यंतची सार्वत्रिक समजूत आहे. परंतु मि. नारायण शास्त्री यांच्या लेखावरून आतां उघडच दिसत आहे कीं, शारीरक भाष्यकार ऊर्फ अद्वैतसिद्धांतप्रवर्तक ह्मणून प्रसिद्ध असलेले आद्य शंकराचार्य हे इ. स. पूर्वी सहाव्या शतकांत झाले व त्यांचेपासून ३८ व्या पिढीचे दुसरे शंकराचार्य हे इ. स. च्या आठव्या शतकांत झाले. असो. मि. नारायण शास्त्री यांनीं आधारभूत ग्रंथांचा उल्लेख केला असता तर बरें होतें. "श्री."

कविता.

उषःसूक्तावलि.

(' जाऊं कामाला० ' या चालीवर.)

उचलुनि घे मजला । विनवूं आतां किति तुजला ॥ध्रु०॥

टाकुनि मजला कोठें जाया झाली तुज घाई । आतां ।
अपराध असा काय जाहला माझा गे आई ! ॥ १ ॥

बाळ धाकुटें रडतां कोणी टाकुनि का जाई । जगतीं ।
उचलुनि घेती; तूं तों माझी प्रत्यक्षचि आई ॥ २ ॥

कार्यापुरती वेळ न उरतो घेउनि रमवाया । मुलें हीं ।
किंवा ऐसा काळ वेंचणें वाटे तुज वायां ॥ ३ ॥

या सूर्यानें घेउनि फिरशी सारें आकाश । प्रतिदिनीं ।
खेळायाला त्याच्या संगें तुजला अवकाश ॥ ४ ॥

नीज न घेतां या चंद्रासह करिशी तूं खेळ । रात्रीं ।
वयस्क असुनी त्याला घ्याया आहे तुज वेळ ॥ ५ ॥

गगनकन्यका तुझी लाडकी आहे का फार । आई ।
सजवाया तिस अलंकृतींचा घालिसि वरि भार ॥ ६ ॥

कितीक वेळां स्वस्थ बसुनियां विहगाचें गान । ऐकसी ।
या बालाला कां न उचलिसी करवाया पान ॥ ७ ॥

उड्या मारितो तुझ्या कडेवर बसुनी सागर हा ।सदोदित।
क्षणभरि त्याला खालीं ठेवुनि या बालास पहा ॥ ८ ॥

त्याला घेतां अंगावरती भिजली असशील । सगळी ।
बालांसाठीं कष्ट सोसणें मातेचें शील ॥ ९ ॥

खेळवितां त्वां पुनःपुन्हां कां हे घन ओरडती । मधुनियां ।
उच्छृंखल बहु तेणें सारे भूमीवरि पडती ॥ १० ॥

स्थूलदेहही तुवां न धरिले पर्वत हे काय । उचलुनी ।
चालायाला कोठें त्यांला दिधले त्वां पाय ॥ ११ ॥

त्रिभुवन सारें धुंडित हिंडे निशिदिनिं हा वात । न खळतां ।
तूं तों बसशी स्वस्थ राहुनी कौतुक तें बघत ॥ १२ ॥

किती पाडिले तुझे लाडके तरुवर वातानें । खेळतां ।
उन्मत्तपणें विपिनीं फिरतां गात बसे गानें ॥ १३ ॥

क्षुद्रजंतु बहु अदृश्य जगतीं आह्मां मनुजांला । जे कीं ।
त्या सर्वांला खेळविसी तूं विस्मय हा मजला ॥ १४ ॥

मन रमवाया तुवां ठेविले निर्मुनियां खेळ । येथें ।
वारंवार न तुजशीं येतां जावा कीं वेळ ॥ १५ ॥

खेळ खेळती भावंडें हीं कोलाहल त्यांचा । ऐकुनी ।
परतुनि आलों तुजशीं त्यांतुनि निर्बल मी साचा ॥ १६ ॥

बलिष्ठता परि नको नको ती खेळाया खेळ । नको मज ।
खेळावांचुनि सुखें तुझ्याशीं जाइल कीं वेळ ॥ १७ ॥

बागुलबोवा दिसतां वाटे भीति मनीं फार । मजला ।
आर्त होउनी तुझिया चरणीं घालितसें भार ॥ १८ ॥

प्रेमें उचलुनि पापा घेतां होइल आनंद । मजला ।
त्या आनंदीं देइन सोडुनि विश्वाचा छंद ॥ १९ ॥

एकवेळ तरि उचलुनि मजला करवीं स्तनपान ।लवकरी।
निर्भय होउनि आनंदें मग गाइन मी गान ॥ २० ॥

आजपासुनी खरें सांगतों न करीं मी खोडी । कधीही ।
हृदयीं जडली आहे तुझिया प्रेमाची मज गोडी ॥ २१ ॥

दयार्द्र होउनि जरी कवणही घेई उचलोनी । मजला ।
नको नको परि मला स्पर्श तो प्रेमावांचोनी । २२ ॥

स्तन्य मिळाया काय करावी मातेची सेवा । बालकें ।
यत्नावांचुनि पान्हा आणि प्रेमाचा ठेवा ॥ २३ ॥

कुरवाळुनि मज कधीं सांगसी गोष्टी प्रेमानें । मजशीं ।
आर्त होउनी पहात बसलें वाट तुझें तानें ॥ २४ ॥

" महाराष्ट्रिय."

जाहिराती.

उत्कृष्ट चरित्रें. मार्मिक पुस्तक-परीक्षण, चटकदार गोष्टी.

वर्षारंभ जुलै

उद्यान.

व. ट. सह फक्त २ रु

गंभीर विविधविषय प्रतिभासंपन्न कविता निर्दोष, हास्यरस.

शिवाय दोनअडीचशें पानाचें एक उत्तम पुस्तक बक्षीस. चालू सालच्या नव्या वर्गणीदारांना मृण्मयी पृष्ठें २०० फक्त आठ आणे.

पत्ता:—**म्यानेजर—उद्यान गिरगांव मुंबई.**

चातुर्मासांत

प्रत्येकाच्या घरीं अवश्य लागणारें पुतक.

पृ. = १५ ट. खर्च माफ.

चातुर्मासपूजासंग्रह.

आवृत्ति २ री.

किं. ६८

ह्या पुस्तकांत आरंभीं पूजाविधीची सशास्त्र माहिती—**वटसावित्रीपासून तुलसीविवाहापर्यंत**-चातुर्मासांतल्या सर्व देवांच्या १८ पूजा सोप्या मराठी विवेचनासह दिल्या आहेत. ज्यास मराठी वाचतां येतें असा प्रत्येक इसम, **स्त्री व पुरुष**, ह्याच्या मदतीनें चातुर्मासांतलें देवकृत्य स्वत: यथासांग करूं शकेल. भटजीकरितां अडून बसण्याचें कारण राहणार नाहीं. देवाच्या सेवेसाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहून वेळेचा अपव्यय करणें चांगलें नाहीं ! एक प्रत मागवून अनुभव पहा.

मठस्थ गणेश रामचंद्र शर्मा.

पोष्ट—खानापूर जि०—बेळगांव.

नवीन पुस्तक

अबूचा पहाड.

लेखक—गणेश रघुनाथ अभ्यंकर बी. ए. एल्. एल्. बी. अबूचा पहाड हें स्थळ राजपुताना गुजराथ प्रांतांत हवेसाठीं प्रसिद्ध आहे. शिवाय येथें सुंदर जैन मंदिरें असल्यामुळें जैनांसच नव्हे पण जैनांशिवाय इतर लोकांसही हें स्थळ दर्शनीय झालें आहे.

पुस्तकांत वर्णन केलेल्या ठिकाणांची माहिती होण्याकरितां सोबत नकाशा जोडला आहे. किंमत दोन आणे. अडीज आण्यांच्या तिकीटा पाठवून पुस्तक मागविल्यास व्ही. पी. खर्च पडणार नाहीं.

अनंत आत्माराम मोरमकर,

४०२, ठाकुरद्वार, मुंबई.

चंद्रिका.

पृष्ठें ४८ क्राउन सोळापेजी.

वा. वर्गणी टं. सह दोन रुपये.

१९१५ एप्रील पासून वरील नांवांचें **मासिक** आह्मीं सुरू केलें असून प्रत्येक अंक बहारीचा निघाला आहे. यांत पानचट गोष्टीस जागा न देतां उत्तम उत्तम लेख व कविता प्रसिद्ध होत असतात. वर्ष अखेर कादंबरी बक्षीस.

पत्ता:-म्यानेजर -चंद्रिका,

४०२, ठाकुरद्वार, मुंबई.

ॐ नमः श्रीगणेशाय.

आर्यवनौषधालय मुर्डी.

मदनामृतसंजीवनी

अत्यंत पौष्टिक, मनोत्साहक, कान्तिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक-

कस्तुरिप्रवालादि अनेक वनस्पतिमिश्र अद्भुत गुटिका.

शारिरिक सौख्याचा खरा लाभ करून घेणें असेल तर, या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं. यांच्या सेवनानें कडकी, जीर्णज्वर, अशक्तता, मानसिकदुर्बलता, अनेक वातरोग, प्रदररोग, बाळंतरोग, मूळव्याध, नेत्रविकार, कटिशूल, इ. इ. अनेक विकार या गुटिकांपासून त्वरित बरे होतात. कांति व बुद्धि वाढून अंगांत भरपूर शक्ति येते. शरिरांतील रक्त व धातूची वृद्धि होऊन सर्व प्रकारें संसारसुखाचा खरा लाभ होतो. वरील सर्व विकार जाऊन शरीर जोमदार होण्याला या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं. गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांचे वर घेणारास सर्व पोष्ट खर्च माफ. त्याचे आंत घेणारास निराळा पोष्ट खर्च पडेल.

दर—३५ गोळ्यांस १ रु. ७५ गो. २ रु., १६५ गो. ४ रु., २७५ गो. ६ रु., ५५० गो. १० रु.

अपूर्व नेत्रांजन.

यानें सारा, फुलें, वडस, खुपऱ्या, कांचबिंदु, इ. इ. नेत्रसंबंध सर्व विकार फार त्वरित जाऊन दृष्टि तीव्र होते. डबीस १ रुपया.

उष्णवात.

मलबद्धता, ढेंकरा येणें, पोटांत केव्हां आग अथवा थंडी होणें, चमका मारणें कधीं छातींत धडधडणें, अपचन, पोट फुगणें, कधीं अन्न थोडें व कधीं जास्त खपणें, केव्हां ग्लानि व केव्हां थोडी हुषारी वाटणें, लघवी कढत अथवा पिंवळी अगर तांबडी असणें, अगर कधीं थोडी व कधीं जास्त होणें, मधून मधून मस्तक तापणें-दुखणें, तसेंच कधीं निद्रा साफ न येणें तर कधीं जास्त असणें, क्वचित भोंवळ उद्भवणें, डोळे त्रासून तापणें व कधीं जड होणें, कधीं हात व पाय यांस तप्तता किंवा सर्दी होणें, हें सर्व किंवा यांतील कांहीं विकार उष्णवातानें उद्भवतात. ते आमच्या गोळ्या व तेल यांनीं अगदीं जलद बरे होतात. ४० गोळ्यांचे डबीस २ रु., व तेलाची बाटली १ रु. एकूण किं. ३ रु.

औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत. यांशिवाय मोटमोठ्या रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसवें, तेलें आणि सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनुपानखर्डा सोबत. टपाल खर्च वेगळा पडेल. माल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य,

पत्ता—मु० मुर्डी, पोष्ट हर्णै, जि० रत्नागिरी.

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका.
वर्ष २.] [अंक ७-८-९.

प्राचीन आर्यांचें अंकगणित-विषयक ज्ञान.*

[१.]

"संस्कृत वाङ्मय" नामक आपल्या पुस्तकांत प्रो. ए. ए. मॅक्डॉनेल म्हणतात:— "शास्त्रासंबंधीं तर युरोपखंड हिंदुस्थानचें अत्यंत ऋणी आहे. पहिली गोष्ट ही कीं, सर्व जगांत ज्यांचा उपयोग होत आहे, तीं संख्याचिन्हें— म्हणजे अंक—हिंदूंनीं शोधून काढिलीं. या आंकड्यांवर अवलंबून असणारी जी दशांश-पद्धति तिचा केवळ गणितशास्त्रावरच नव्हे तर सर्व मानवसंस्कृतीवर जो परिणाम झाला आहे, त्याचें अनुमान करणें अशक्य होय."

या अंकांचा उगम कोठून झाला याविषयीं बराच मतभेद आहे. परंतु ख्रिस्ती शकाच्या दुसऱ्या शतकांत हिंदु लोक त्यांचा उपयोग करीत, असें मानण्याला पुरावा आहे. नानाघाट येथें सांपडलेल्या शिलालेखावरून असें दाखवितां येतें कीं, अंकांचा प्रचार त्याकाळीं हिंदु लोकांत होता. तो काळ म्हणजे ख्रिस्ती शकापूर्वी २०० हा होय.† इ. स. पूर्वी २५६ या वर्षी 'मायनर रॉक'वर खोदलेल्या अशोकाच्या अनुशासनांमध्यें अंकांचा उपयोग केलेला आढळतो.

ख्रिस्ती शकाच्या पहिल्या शतकांतही लेण्यांतील शिलालेखांतसुद्धां अंकांचा उपयोग केलेला आढळतो. इ. स. ३२९ च्या कुलभवी येथील शिलालेखावर काळाची नोंद अंकांना स्थानिक किंमत देऊनच केली आहे. डब्ल्यु. डब्ल्यु. राउस बॉल हे आपल्या गणितशास्त्राच्या इतिहासावरील ग्रंथांत म्हणतात कीं, "अंकांनीं संख्या मांडण्याची पद्धति इ. स. च्या पांचव्या शतकाच्या शेवटीं हिंदुस्थानांत पहिल्यानें प्रचारांत आली, असें मानण्याला आधार आहे." ही पद्धति कोणीं प्रचारांत आणिली, किंवा वरील विधान कशाच्या आधारावर केलें आहे, याविषयीं ते कांहींच लिहीत नाहींत.

अरबांनीं थोडा फेरफार करून देवनागरी अंक घेतले. स्पॅनिश अरबांनीं आरंभीं शून्याचा धिक्कार केला खरा. परंतु त्यामुळें फारच गैरसोय होऊं लागली, म्हणून त्यांना तें अखेरीस घ्यावें लागलें. स्पेन किंवा बार्बरी देशांतून पुढें अरबी अंकांचा पश्चिम युरोपांत प्रवेश झाला.

दशांशाच्या रीतीनें संख्या मांडण्याच्या पद्धतीचा उगम हिंदुस्थानांतच झाला; आणि एकं-

* प्रो. नलिनबिहारी मित्र, एम्. ए., यांच्या Ancient Hindu's Knowledge of Arithmetic या लेखावरून. 'मॉडर्न रिव्हयू,' जून १९१५.

† रॉ. ए. सो. चें जर्नल, १८८२; सर ई. सी. बेली.

दर गणितशास्त्रीय शोध जेवढे झाले आहेत, त्या सर्वांत मानवी ज्ञानाच्या प्रगतीला याचाच विशेष उपयोग झाला आहे. डब्ल्यु. आर्. स्मिथ् हे आपल्या 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका*'-मध्यें लिहितात कीं, "आमची प्रस्तुतची दशांशपद्धति सर्वस्वीं हिंदुस्थानांतच उगम पावली असें खात्रीपूर्वक सांगतां येतें." इ०स० ४७६ या वर्षी आर्यभट्टाचा जन्म झाला. त्याला दशांशपद्धतीची चांगली माहिती होती, हें वर्गमूळ काढण्याचा त्यानें जो पुढील नियम सांगितला, त्यावरून स्पष्ट होतें.

भागात् हरेदवर्गान्नित्यं द्विगुणेन वर्गमूलेन ।
वर्गात् वर्गे शुद्ध लब्धं स्थानान्तरे मूलम् ॥

म्हणजे—जर वर्गांतून, (पूर्वीच शोधून काढलेल्या वर्गमूळाच्या भागाचा) वर्ग वजा केला, व नंतर बाकीला जर त्या भागाच्या दुप्पटीनें भागिलें, तर जो भागाकार येईल तें पुढच्या स्थानांतील वर्गमूळ होय. रोडेट, टेलर, कोलब्रूक, कॅजोरी व दुसऱ्याही अनेक प्राच्य विद्याप्रवीण विद्वानांचें देखील असेंच मत आहे. आर्यभट्ट एकोणीस संख्यास्थानांचा उल्लेख करितो.

ब्रह्मगुप्ताला (इ. स. ५९८–६६०) हे अंक व दशांशपद्धति माहीत होती, हें त्याच्या लेखांवरून स्पष्टच आहे. मद्रासेंतील पौर्वात्य हस्तलेखसंग्रहालयांत एका ब्रह्मसिद्धान्त (हा साकल्यसंहितेचा भाग आहे) नामक ग्रंथाची एक प्रत आहे. त्यांत दशांशपद्धतीनेंच संख्या मांडून दाखविल्या आहेत. पंडित सुधाकर द्विवेदीच्या मतें, विष्णुधर्मोत्तर-पुराणाचाच भाग असलेला जो ब्रह्मसिध्दान्त ग्रंथ त्याशीं आपण लिहिलेले ज्योतिःशास्त्रावरील ग्रंथ संबध्द आहेत, असें आर्यभट्ट व ब्रह्मगुप्त हे दोघेही मानितात. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. परंतु मद्रास येथील संग्रहालयांतील ग्रंथ व त्याच नांवाचा हा ब्रह्मसिध्दान्त ग्रंथ हे दोन्ही एकच आहेत, असें मानण्याला साधन नाहीं.

भास्कराचार्यानें आपल्या लीलावती ग्रंथाचा एक भाग दशांशपद्धतीच्या विवरणाला खर्ची घातला आहे. ज्या ग्रंथांतून वर उतारा घेतला आहे, त्याच ग्रंथांत मि. बॉल 'लीलावती' विषयीं असें म्हणतातः—"दशांशाचें पद्धतशीर विवेचन ज्यांत आढळतें असा हाच पहिला प्राचीन ग्रंथ होय."

अंकांच्या मूळच्या किंमतीहून भिन्न अशी त्यांची स्थानिक किंमत मानिल्यानें साहजिकच शून्याची कल्पना सुचते. संस्कृत भाषेंत शून्य शब्दाचा अर्थ 'अभाव' असा होतो. यावरूनच हें उघड होतें कीं, एकाद्या संख्येंतील ज्या स्थानीं मूळ किंमतीचा कोणताही आंकडा ठेवतां येत नाहीं, परंतु जें स्थान भरणें अवश्य आहे, तें स्थान भरण्यासाठीं सहजच शून्याची कल्पना निघाली. शून्याशीं ज्यांचा संबंध येतो, अशा उदाहरणांत शून्याऐवजीं दुसऱ्या कोणत्या तरी चिन्हाचा उपयोग सोयीसाठीं करावाच लागतो. हें लक्षांत घेतलें, तर वरील अनुमानाला आणखी बळकटी येते. महावीराच्या गणितसारसंग्रहाच्या व भास्कराचार्यांच्या लीलावतीच्या पहिल्याच प्रकरणांत, तसेंच ब्रह्मगुप्ताच्या ग्रंथांतही, शून्यविषयक अंकगणितकोष्टकें दिलीं आहेत, त्यांवरूनही पण तेंच अनुमान निघतें.

* आवृत्ति ११, 'न्युमरल्स्'वरील लेख पहा.

स्थानिक किंमतीची पद्धति हिंदुलोकांपासून अरब लोकांनीं घेतली. इ. स. ७७३ या वर्षांच्या पहिल्यानें आरब लोक या पद्धतीचा उपयोग करूं लागले, एवढें मात्र खात्रीपूर्वक सांगतां येतें. याच वर्षी एका हिंदु वकीलानें ज्योतिषशास्त्रविषयक कांहीं कोष्टकें बगदादला नेलीं. खलीफ वालीदाच्या (सन ७०५–७१५) वेळेस अरबांना मूळाक्षरांहून भिन्न असे स्वतंत्र अंक माहीत नव्हते.

कलीफ अल् मानून नामक ग्रंथसंग्रहालयाचा चिटणीस व खुरासानचा सुप्रसिध्द गणिती जो महंमद इब्न मुसा अबू जाफर अल् ख्वारिझमी (इ. स. ८१३–८३३) त्याच्या 'अल्जीब्र वी ई मुकाबला ' नामक पुस्तकानें बीजगणित युरोपांत पहिल्या प्रथम प्रचारांत आणलें. असें म्हणतात कीं, हा अफगाणिस्थानांत व बहुधा हिंदुस्थानांतही आला होता; आणि जेव्हां तो स्वदेशीं परत गेला (इ.स.८३०) तेव्हां त्यानें ब्रह्मगुप्ताच्या पुस्तकाच्या आधारानें बीजगणितावर एक व अंकगणितावर एक असे दोन ग्रंथ रचिले. बीजगणितावर अरबांनीं व मध्ययुगीन युरोपियन लोकांनीं जे पुढें ग्रंथ लिहिले त्या सर्वांस मुख्य आधार याच ग्रंथाचा होता, असें म्हटलें असतां वाजवीच होईल.

दशांशपद्धतीची माहिती युरोपियन गणितशास्त्रज्ञांना स्पेनमधल्या मूर लोकांकडून इ०स०च्या अकरा व बारा या शतकांत झाली; आणि स्पेनमधूनच युरोपांत चहूंकडे तिचें ज्ञान पसरलें. परंतु हें मात्र पक्कें कीं, त्यावेळीं या पद्धतीचा सार्वत्रिक प्रसार झाला नव्हता. १२०२ ह्या वर्षी लिओनार्दो नांवाच्या एका इटालियन व्यापाऱ्यानें " अल्जिब्र एट् अल् मुकाबला " नांवाचा बीजगणितावर एक ग्रंथ लिहून अरबी अंक व हिंदूलोकांची गणनापद्धति युरोपांत चालू केली. याचें शिक्षण बार्बरींत झालें; व तेथेंच त्याला अरबी संख्यापद्धतीची व महंमद मुसाच्या बीजगणितावरील ग्रंथाची माहिती झाली. चौदाव्या शतकाच्या आरंभीं अथवा मध्यांत गणितशास्त्रज्ञांना व इतालियन व्यापाऱ्यांना या पध्दतीचा चांगलाच परिचय झाला होता.

एका इंग्रज लेखकानें असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे कीं, अंकांच्या स्थानिक किंमतीची माहिती आरब लोकांना हिंदूंपासून झाली असा जो समज आहे, तो चुकीचा आहे. * आपलें म्हणणें सिद्ध करण्याकरितां या धाडसी गृहस्थानें जाणून बुजून असें गृहीत धरलें आहे कीं, स्थानिक किंमतीच्या पद्धतीनें ज्यांत कालगणना केली आहे, असे दहाव्या शतकापूर्वीचे सर्व शिलालेख मुळीं बनावटच आहेत. या गृहीत गोष्टीवर, व अरब लोक हिंदु लोकांजवळून कांहींही शिकले नाहींत यावर, त्यानें आपल्या म्हणण्याचा पाया रचिला आहे. अनेक अरबी व युरोपियन लेखकांचा उलट पुरावा असतांही विसाव्या शतकांत पहिल्या प्रथमच असें धाडसी विधान करण्यांत आलें. प्रख्यात इतिहासकार एल् मसूदी असें म्हणतो कीं, पहिले नऊ अंक हिंदु लोकांनींच शोधून काढले. अल्बिरूनी म्हणतो, " आपण ज्यांचा उपयोग करतों ते अंक हिंदु लोकांच्या अंकांच्या सुंदर आकारा-

* या विषयासंबंधीं प्रो. नलिन बिहारी मित्र निराळ्या लेखांत विचार करणार आहेत.

वरूनच निघालेले आहेत." बेली* म्हणतो, " अगदीं प्राचीन काळापासून सर्व ग्रंथकार एकमतानें असें म्हणत आले आहेत कीं, दशांशपद्धति व तिच्याशीं संबद्ध असलेलीं चिह्नें हीं हिंदूंनींच शोधून काढलीं. ग्रीक लोकांची व त्यांनीं शोधून काढलेल्या अंकांची अरबी ग्रंथकारांस माहिती नव्हती म्हणून ते असें म्हणतात, असें मात्र कोणीं समजूं नये." मौलवी महंमद झकउल्ला, डॉक्टर ऑफ लिटरेचर व अलाहाबाद येथील सेन्ट्रल मूर कॉलेजांतील माजी अध्यापक, आपल्या "अजैबुल हिसाब" नामक पुस्तकांत म्हणतात, " अरबस्थानांतील सर्व विद्वान् लोक, उदा० खलिफा मन्सूर, महमद बिन् इब्राहिम उल्फिरोजी, महमद बिन् मुसा अल्ख्वारिझमि व मासुदी आणि सर्व इतिहासकार यांचें, गणितशास्त्रांतील अंक हिंदूनींच शोधून काढले, व आम्ही ते त्यांच्याचजवळून शिकलों, याबद्दल पूर्ण ऐक्य आहे. आरब लोकांना पूर्वीपासूनच जर अंकांची माहिती असती, तर हिंदु लोक हे आमचे या विषयाचे गुरु आहेत, असें त्यांनीं कृतज्ञतापूर्वक कां कबूल केलें असतें? असेंही पण दिसत नाहीं कीं, पूर्वी शिकलेले अंक ते विसरून गेले व हिंदु लोकांपासून हे अंक ते नवीन शिकले. कारण अंक हे इतके उपयोगी व आवश्यक आहेत कीं, ते विसरणें शक्यच नाहीं." (पृ.१९) सुविख्यात इतिहासकार, कादंबरीकार, वृत्तपत्रकार व केरो येथील " अल् हिलाल " पत्राचे संपादक, शिवाय "अरबी भाषेचा इतिहास," " मुसलमानी संस्कृतीचा इतिहास, " इ० इ० ग्रंथांचे कर्ते प. लो. वा. जी. झैदान हे आपल्या " अल्फिलासफट् अल् लुगुवयत् वललफज" नामक ग्रंथांत (पृ.११६–११८) लिहितात:— "सर्व सुधारलेलें जग या अंकांचा उपयोग करतें व यांना आरबी अंक असें म्हणतात. याचें कारण असें कीं, फार प्राचीन काळीं अरब लोक हिंदु लोकांपासून हे अंक शिकले. यांची विशिष्ट खूण म्हणजे शून्य होय. एकपासून नऊपर्यंत प्रत्येक अंकाची एक विशिष्ट खूण आहे; परंतु एकाचे दहा करावयाचे असल्यास त्यावर एक शून्य ठेवलें म्हणजे झालें. शंभर करावयाचे असल्यास त्यावर दोन शून्यें ठेवावीं. याप्रमाणें अगणित संख्या साधतां येते. हिजरी शकाच्या दुसऱ्या शतकांत आरब लोक हिंदु लोकांपासून जें जें कांहीं शिकले, म्हणजे खगोलविद्या, फलज्योतिष इ०, त्याबरोबरच ते हे अंकही पण शिकले, ही गोष्ट प्रमाणासिद्ध आहे. अनेक अधिकारी विद्वानांचेंही असेंच मत आहे कीं, इ० स० ७७३ या वर्षी कांहीं हिंदु लोक जेव्हां बगदादला गेले होते, तेव्हां त्यांनीं आपल्या बरोबर ज्योतिःशास्त्रविषयक कोष्टकेंही नेलीं होतीं. गणितशास्त्राचा पहिला मुसलमान ग्रंथकार म्हटला म्हणजे ९व्या शतकांतील अबू जाफर महंमद अल्ख्वारिझमि हा होय. नंतर या शास्त्राचा प्रसार मुसलमानांच्या न्यायपीठांत झाला. युरोपियन लोक " अल्ख्वारिझमि " नांवाच्या ग्रंथावरून अरबांपासूनच पहिल्यानें बाराव्या शतकांत गणित शिकले. ग्रंथकाराच्या नांवावरूनच हें नांव त्या ग्रंथास पडलें. अशा रीतीनें हे हिंदुलोकांचे अंक सर्व युरोपांत पसरले. अरबांपासून हे अंक शिकले म्हणून युरो-

* रॉ. ए. सो. जर्नल, व्हॉ. १५, पृ० १९.

पियन लोक त्यांस अरबी अंक म्हणतात. परंतु सर्व इतिहासकारांची याविषयीं एकवाक्यता आहे कीं, सर्व युरोपभर हल्लीं जे अंक प्रचारांत आहेत ते अरबांपासून घेतलेले आहेत, व अरब लोकांनीं ते हिंदुलोकांपासून घेतलेले आहेत."

ग्रीक लोकांप्रमाणें हिंदुलोकांनीं गणिताचा उपयोग फक्त ज्ञेय संख्यांतच केला, असें नाहीं. ही गोष्ट हॅन्केलनें म्हटल्याप्रमाणें फार महत्त्वाची आहे. कारण, हिचा गणितशास्त्राच्या प्रगतीला फारच उपयोग झाला आहे. हिंदु लोकांच्या गणितशास्त्राविषयीं बोलतांना डी मॉर्गन म्हणतात—" ग्रीक लोकांच्या कोणत्याही अंकगणनेच्या पद्धतीपेक्षां हिंदुलोकांची अंकगणनापद्धति फारच श्रेष्ठ आहे."

हिंदुलोकांच्या अंकगणिताविषयीं कांहीं विद्वान् लोकांचीं मतें आम्ही खालीं देतों.

" सर्व जगांत प्रचलित असलेल्या अंकांचे व दशांशपद्धतीचे शोधक या दृष्टीनें पाहतां भारतीय लोक प्राचीन काळीं महान् गणिती होते यांत तिळप्राय शंका नाहीं.***संख्यांची हवी ती पट करणें व वर्गमूळ वा घनमूळ शोधून काढणें, ही त्या काळच्या भारतीय गणितशास्त्रज्ञांना फारच साधी गोष्ट वाटे.*"

" हिंदुलोकांचें अंकगणित म्हणजे आपण सध्यां ज्याचा उपयोग करतों तें. हिंदुलोकांपासून तें अरबांनीं घेतलें; व आरबांमार्फत तें युरोपांत आलें.†"

गो० ब० मा०

* इं. गॅ. ऑफ इंडिया, व्हॉ. २, पृ० २६१.

† डी मॉर्गन, पेनि सायक्लोपिडिया, व्हॉ. २६, पृ० ३२३, बीजगणितावरील लेख पहा.

पत्रव्यवहार.

वि. वि. फेब्रुवारी १९१५ च्या साहित्यपत्रिकेचा अंक पाहिला. त्यासंबंधानें जिज्ञासेनें पुढील दोन ओळी आपले विद्वान् वाचकांपुढें ठेवण्यासाठीं पाठविल्या आहेत, त्यांस स्थळ मिळावें.

१. पत्रिकेच्या पृ. २७ वरील टीपेंत–'महाराष्ट्र आद्य कवि मुकुंदराय साधु यांनीं, शके ११३३ मध्यें जयंतपाळ राजास ज्ञानोपदेश केला, असें म्हटलें आहे. पण इति. संशो. राजवाडे यांनीं' सरस्वतीमंदिर' त्रैमा. वर्ष ६, अंक १ (चैत्र शके १८२८) यांत मुकुंदरायाचा काल ११६०–१२६० दिला आहे.

कै.रघुनाथ शास्त्री गोडबोले यांचे भारतवर्षीय अर्वाचीन कोशांत, मुकुंदराय शके ११३३ त विद्यमान होते, असा उल्लेख आहे. तेव्हां यांत खरा काल कोणता? याचा खुलासा विद्वद्वर्य राजवाडे किंवा आपल्या विद्वान् वाचकांपैकीं कोणी करितील, अशी आशा आहे.

२. त्याच पृष्ठापुढील (२८ वे) पृष्ठांत–टीपेंत–प्रभाकर दातार कवीचा शक १८९१–१७६५ दिला आहे. तो लेखकप्रमाद दिसतो. १६९१–१७६५ असावयास पाहिजे. दुरुस्ती व्हावी.

आणखी एक माझी फार दिवसांची जिज्ञासा आपले वाचकांपुढें ठेवितों, ती:—

पंढरीच्या श्रीविठ्ठलाच्या १ राई व २ रखुमाई अशा दोन राण्यांपैकीं रखुमाई ही रुक्मिणी हें उघड आहे. पण ' राई ' ही कोण ? ' राधा ' या नांवाचा ' राई ' अपभ्रंश झाला असावा, असा तर्क केलेला नुकताच कोठेंसा वाचिला.पण तो समाधानकारक वाटत नाहीं. पद्मसेन नामक राजानें आपली राई नांवाची कन्या श्रीविठ्ठलास अर्पण केली, अशी कथा पद्मपुराणांत आहे, असें वेंगुर्लें येथील एका गृहस्थानें सांगितलें होतें. म्हणून तपास करितां, व्यंकटेशसमाचार छापखान्यांतील प्रतींत ही कथा आढळली नाहीं. दुसरे कोठचे प्रतींत असेल तर नकळे. हरिदास, वारकरी वगैरेकडे बरींच वर्षे शोध करीत आहें; पण समाधानकारक उत्तर मिळत नाहीं.

आपल्या बहुश्रुत व शोधक वाचकांपैकीं कोणी खुलासा करितील, अशी आशा आहे.

श्रावण कृ. ३ भृगुवार शके १८३७, } गोविंद मोतीराम सांपळे, बंदर राजापूर.

वांझ बायकोवरील कवन.

(लेखक—मेजर नानासाहेब शिंदे, बडोदा आर्मी.)

जुलई महिन्याच्या विविधज्ञानविस्तारामध्यें रा.रा. पांगारकर यांनीं, मुंबईच्या साहित्यसंमेलनांत "दादोबांचें आत्मचरित्र व मराठी गद्य-ग्रंथांचा उदय" नांवाचा वाचलेला लेख प्रसिद्ध करण्यांत आला आहे. हा लेख मी वाचीत असतां, दादोबांच्या आई, वांझ बायकांवरील कवन, त्यांस म्हणून दाखवीत असत, म्हणून वाचण्यांत आलें. या कवनापैकीं कांहीं त्रोटक ओळी सदरहू लेखांत दिलेल्या आहेत. फुट-नोट मध्यें रा. रा. पांगारकर म्हणतात कीं:— "मला वाटतें, हें होनाजी बाळाचें कवन असावें. त्याचा पुष्कळ वर्षांपासून शोध करितों, परंतु त्या कवनाचा आतां कोठेंच थांग लागत नाहीं. असलीं कवनें मनुष्यस्वभाववर्णनपर असल्यानें फार गोड व सरस समजलीं पाहिजेत. तीं नाहींशीं होणें खेदाची गोष्ट आहे." हें वाचल्यावर, अशाच प्रकारचें एक कवन सरासरी वीस वर्षांपूर्वी मीं ऐकल्याचें मला आठवलें. यासंबंधीं ज्यास्त विचार करितां व पुसतपास करितां, असें कवन रिसाल्यांतील आमचे एका म्हाताऱ्या ऑर्डलीस येत होतें, असें समजलें. हा म्हातारा स्वार जरी अक्षर-शून्य होता, तरी एक प्रकारचा साधारण कवीच होता. यानें पुष्कळ कवनें रचलेलीं होतीं व तो तीं आम्हांस व आमचे मित्रमंडळीस नेहमीं म्हणून दाखवीत असे. हा स्वार मयत झालेला आहे, परंतु याचीं कांहीं कवनें याचे मित्रमंडळीस येत आहेत. त्यांपैकीं एका-कडून खालील कवन म्हणवून घेऊन तें मी यासोबत पाठवीत आहें.

बारा वर्षें झालीं न्हानाला, सुक्षम माझी देही ॥
तेव्हांपासून मला पुत्र होत नाहीं, आतां करूं गत कांहीं ॥
शेजारणी पाजारणी नांदती, खुशाल आपल्या ठायीं ॥
मुलें लेंकरें घेऊन कडेवर, पती आपला समजावी ॥
त्याकडे पाहतें मी मनांत झुरतें, होते जीवाची लाही ॥
मी देवाची द्वाड करंटी, मला पुत्र कां नाहीं ॥
मला न्हाण आलें कोणे घटकेवर, कोणे इवर्शांचे पायीं ॥
असें वाटतें जीव हा घ्यावा, सोडुन सर्व इंता ही ॥
कधीं होईन मी लेंकुरवाळी, पाव मला भगवंता ॥
न्हाण आल्यापुन पुत्र होईना, मला लागली चिंता ॥
कधीं होईन— ॥

अर्धे रात्रीं फेडून वस्त्र, म्हसनवाटा मी पुजला ॥
बाळंतिणीची कंवटी भारून, आणली मी घराला ॥
शेजारणीच्या द्वारांत न्हाहलें, या रात्रींसमयाला ॥
खालीं उतरून कंवटी पुजली, उंबरा म्यां सारवला ॥
पिंपळ मुंजासहीत पूजला, दोष लाविला त्याला ॥
+ + + + कपड्यामध्यें, त्याला गुंडाळून ठेवीला ॥
शेजारणीची मोरी पुजली, पुत्र होता तीजला ॥
बाळोत्याचा पदर फाडूनी, त्याचा घात मीं केला ॥
देव देवरुषी उदंड पाहिले, नाहीं त्याशी गणता ॥
कधीं होईन मी लेंकुरवाळी, पाव मला भगवंता ॥
न्हाण आल्यापुन पुत्र होईना, मला लागली चिंता ॥
कधीं होईन— ॥

कानफाटयांनीं गंडा दिला, शनिवाराचे दिवशीं ॥
आमस पुणव साधुनी, बांधिला मीं आपल्या वेणीशीं ॥
मारुतीचा शेंदूर काढून, पूजला वेशीपाशीं ॥
बारा सिवा भारुनी आणला, आग्या वेताळासी ॥
साती आसरा सहित म्हशासुर, वश केला मी त्यासी ॥
जाणाई जोगाई पूजीली, पावेना नवसासी ॥
सासू माझी मजला म्हणते, तूं जन्म-अपेशी ॥
भ्रतार माझा नांव ठेवितो, तूं जन्माची दोषी ॥
कधीं मला पावेल परमेश्वर, मी राहीन पोटीशी ॥

उपाय करतां जीव हा थकला, काय करूं संचितार्शी ॥
कधीं होईन मी लेंकुरवाळी, पाव मला भगवंता ॥
न्हाण आल्यापुन पुत्र होईना, मला लागली चिंता ॥
कधीं होईन- ॥
संचिताचा ठेवा सखेबाई, हा कोणाशी घ्यावा ॥
पहिले जन्मीं फल प्राप्त असेल तर,या जन्मामध्यें घ्यावा
सोडुनि अहंता, पुज भगवंता, नित्य करावी सेवा ॥
नाथनिरंजन गुरुलाल म्हणे, यांचा पेला प्यावा ॥
आधि शक्ती प्रसन्न सभेमध्यें, नित्य नवा छंद गावा ॥
अनंतफंदीचा छंद ऐकुनी, दर्दी घेती धांवा ॥
म्हणे **मारुती** तुरेवाल्याला, शब्दामध्यें हटवावा ॥
हरदासाच्या पोरी हुशार हो, दे सोडुन सारी अहंता ॥
कधीं होईन मी लेंकुरवाळी, पाव मला भगवंता ॥
न्हाण आल्यापुन पुत्र होईना, मला लागली चिंता ॥
कधीं होईन- ॥

टीप—मारुती ऊर्फ बापू शिंदा, हें कवन रचणाऱ्या ऑर्डलीचें नांव होय. या कवनामध्यें रा. पांगारकर यांच्या म्हणण्याप्रमाणें वांझ बायकांचें स्वभाववर्णन बरेंच आहे. एका अक्षरशून्य स्वारानें हें रचलेलें आहे व त्यानें म्हटल्याप्रमाणें, बायकांनीं ढोंग, धतुरे करण्याचें सोडून, भगवंताची नित्य जर सेवा केली, तर तोच त्यांना कधीं तरी लेंकुरवाळी करील. आमच्या अशिक्षित स्त्रिया या कवनापासून कांहीं बोध घेतील काय ?

श्रीगोविंदभाष्य.*

गेल्या जुलै महिन्याच्या "महाराष्ट्र-साहित्य-पत्रिके"मध्यें "वैदिक धर्माच्या पांच मुख्य शाखा" हा लेख प्रसिद्ध झाला असून, त्यांत श्रीबलदेवाचार्यकृत 'गोविंदभाष्या'चा उल्लेख करण्यांत आला आहे. तें भाष्य ह्याच सुमारास मला पाहावयास मिळालें; म्हणून तत्संबंधीं माहिती अगदीं थोडक्यांत येथें देत आहें.

बंगाल्यांतील प्रसिद्ध अवतारी पुरुष श्रीकृष्णचैतन्य यांच्या संप्रदायांतील थोर विद्वान् पुरुषांपैकीं भाष्यकार श्रीबलदेवाचार्य हे एक होऊन गेले. पत्रिकेंतल्या लेखकांनीं गोविंदभाष्य अद्वैती अगर विशिष्टाद्वैती संप्रदायाचें नाहीं, तर जवळ जवळ मध्यवर्ती धोरणाचें आहे, असें म्हटलें आहे. परंतु भाष्याची मूळपीठिका आणि भाष्यकारांचा संप्रदाय पाहतां तें द्वैतसंप्रदायपरिपोषक भाष्य आहे,असें दिसून येतें.

बलदेवाचार्य हे चैतन्यसंप्रदायी असून, श्रीकृष्णचैतन्य ऊर्फ गौरांग महाप्रभूंनीं श्रीमन्मध्वसंप्रदायाचाच प्रचार केलेला आहे. त्यांची गुरुपरंपरा देखील श्रीमन्मध्वाचार्यांपासून प्रसिद्ध आहे, हें खालील श्लोकांवरून स्पष्टपणें कळून येतें. हा श्लोक बलदेवाचार्यकृत प्रमेयरत्नावली नामक ग्रंथांतून येथें घेतला आहे.

तत्र स्वगुरुपरंपरा यथा—

"श्रीकृष्णब्रह्मदेवर्षिबादरायणसंज्ञकान्
श्रीमध्वश्रीपद्मनाभश्रीमन्नृहरिमाधवान् ।
अक्षोभ्यजयतीर्थश्रीज्ञानसिंधुदयानिधीन्
श्रीविद्यानिधिराजेन्द्रजयधर्मान् क्रमाद्वयम् ॥
पुरुषोत्तमब्रह्मण्यव्यासतीर्थांश्च संस्तुमः
ततो लक्ष्मीपतिं श्रीमन्माधवेंद्रं च भक्तितः ।
तच्छिष्यान् श्रीश्वराद्वैतनित्यानंदान्जगद्गुरून्
देवमीश्वरशिष्यं श्रीचैतन्यं च भजामहे ॥
श्रीकृष्णप्रेमदानेन येन निस्तारितं जगत् ॥
भाष्यमेतद्विरचितं बलदेवेन धीमता ।
श्रीगोविंदनिदेशेन गोविंदाख्यामगात्ततः ॥"

यावरून, श्रीगोविंदा (श्रीकृष्णपरमात्म्या)च्या आज्ञेवरून हें भाष्य लिहिलें गेलें म्हणून

* ही माहिती प्रयाग येथील 'पाणिनी कार्यालया'मार्फत प्रसिद्ध झालेल्या "The Sacred Books of the Hindus, Vol. V" या ग्रंथाच्या आधारानें लिहिली आहे.

त्यास 'गोविंदभाष्य' असें नांव मिळालें, असें दिसतें. ह्या गोविंदभाष्याची टीकाही श्रीबलदेवाचार्यांनीं लिहिलेली आहे. तिला " सूक्ष्म टीका" असें म्हणतात.

उत्तरोत्तर वेदांतज्ञानाविषयीं लोकांत उदासीनता वाढूं लागल्यामुळें, पूर्वाचार्यांच्या गहन आणि विस्तृत भाष्यांचें अध्ययन आणि अध्यापन होईनासें झालें; म्हणून प्रकृत सारभूत भाष्य लिहिलें असल्याचें ग्रंथारंभीं खुद्द श्रीबलदेवाचार्यांनीं सांगितलें आहे. ह्यां भाष्यांत (१) श्रीहरि सर्वोत्तम आहे, (२) तो आम्नायैकवेद्य आहे, (३) जगत् सत्य आहे, (४) भेद सत्य आहे, (५) जीव नित्य आहे, (६) जीवांत तारतम्यभाव आहे, (७) ईशसाक्षात्कार हा मोक्ष होय, (८) भक्ति (माहात्म्यज्ञानपूर्वक स्नेह) हें मोक्षाचें साधन आहे, आणि (९) प्रत्यक्ष, अनुमान व शाब्द हीं तीन प्रमाणें आहेत, ह्या मुख्य सिद्धांतांचें उद्घाटन केलेलें आहे. हे सिद्धांत ग्रथित केलेला एक श्लोकही श्रीचैतन्यसंप्रदायांत प्रसिद्ध असून, तो " प्रमेयरत्नावली "च्या आरंभींच बलदेवाचार्यांनीं उद्धृत केला आहे. तो हा—

" श्रीमध्वप्राहविष्णुं परतममखिलाम्नायवेद्यं च विश्वम्
सत्यं भेदं च जीवान् हरिचरणजुषस्तारतम्यं च तेषाम् ।
मोक्षं विष्ण्वंघ्रिलाभं तदमलभजनं तस्य हेतुं प्रमाणम्
प्रत्यक्षादित्रयञ्चेत्युपदिशति हरिः कृष्णचैतन्यचंद्रः ॥"

दक्षिणेंतील श्रीमन्मध्वसंप्रदायी ग्रंथांतही हींच तत्त्वें ग्रथित केलेला एक श्लोक प्रसिद्ध आहे, तो असाः—

" श्रीमन्मध्वमते हरिः परतरः सत्यं जगत् तत्त्वतो
भेदो जीवगणा हरेरनुचरा नीचोच्चभावं गताः ।
मुक्तिर्नैजसुखानुभूतिरमला भक्तिश्च तत्साधनम्
ह्यक्षादित्रितयं प्रमाणमखिलाम्नायैकवेद्यो हरिः ॥ "

हे दोन्ही श्लोक अगदीं सारखे आहेत. यावरून बंगाल्यांतील श्रीकृष्णचैतन्यांचा वैष्णवसंप्रदाय आणि दक्षिणेंतील श्रीमन्मध्वसंप्रदाय हे एकच आहेत, याविषयीं संशय राहात नाहीं.

रामचंद्र हयग्रीव मणूरकर.

रासायनिक परिभाषा.

(६४ पृष्ठावरून समाप्त.)

Papsin पचक (?)
Peptone पचकट (?)
Piperic acid मरीचाम्ल.
Piperidine मरीचिन.
Propyl मेदिल.
Proximate analysis स्थूल पृथक्करण.
Racemic acid गुच्छाम्ल.
Radical मूलकः
Residue शेष.
Rotatory Power ह्रारक शक्ति.
Saccharate शर्करित.
Saccharin शर्करिन.
Saccharose इक्षुशर्करा.
Saponification सजीभवन.
Serum रक्तोदक.
Starch पिष्ट; सत्त्व.
Stearic acid वपाम्ल.
Stearin वपिन.
Substitution आदेश.
Substitution products आदिष्ट पदार्थ.
Succinic acid अंबराम्ल (?)
Sulphone गन्धन.
Tartaric acid द्राक्षाम्ल.
Thio acids गान्धिक अम्लें.
Thio cyanic acid गन्धनिलिकाम्ल.
Urea मौत्र.
Ureide मौत्रिद.
Uric acid मूत्राम्ल.
Valeric acid बलकाम्ल (?)
Vasculose काष्ठद्रव्य.
Venous Fermentation मधविपाक.
Yeast खमीर.

गेल्या पंचवीस वर्षांतील नाटकांचें संक्षिप्त परीक्षण व त्यांच्या प्रगतीचे उपाय.

[लेखक—रा. विनायक सदाशिव वाकसकर.]

देवानामिदमामनन्ति मुनयः कान्तं क्रतुं चाक्षुषं । रुद्रेणेदमुमाकृतव्यतिकरे स्वाङ्गे विभक्तं द्विधा ॥
त्रैगुण्योद्भवमत्रलोकचरितं नानारसं दृश्यते । नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रम् ।

आर्य नाटकाचें प्राचीनत्व.

१. वैद्यशास्त्र, नीतिशास्त्र, लिपिशास्त्र, ज्योतिःशास्त्र, गणितशास्त्र इत्यादि शास्त्रांचा उगम ज्याप्रमाणें आमच्या या आर्यभूमींतच झालेला आहे त्याचप्रमाणें नाट्यशास्त्राचा उगमही याच भरतखंडांत प्रथम झालेला आहे. म्हणजे भारतीय हे आदिकवि आहेत इतकेंच नव्हे तर ते आदिनाटककारही आहेत. पाश्चात्त्य देशांत ही नाटककला इसवी सनाच्या चौदाव्या शतकानंतर कुठें रूपरंगास येऊं लागली असें दिसतें. नाहीं म्हणावयाला ग्रीस देश या विधानास अपवाद ठरेल. परंतु ग्रीक राष्ट्राचा आदिकवि जो होमर तो खरोखरीं ग्रीस देशांतील नसून एशियामायनरमधील रहिवासी होता. त्याचें जन्मस्थान स्मर्ना हें होय. हा इ. स. च्या पूर्वी सुमारें सातव्या शतकांतील कवि होय. तात्पर्य, होमरसंबंधाचा मान देखील ग्रीस राष्ट्रास मिळत नाहीं. दुसरें, होमरच्या अस्तित्वाविषयींही विद्वान् लोकांस बलवत्तर संशय आहेच. आणखीही एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे, ती ही कीं, ग्रीक हे फार नीतिभ्रष्ट लोक होते. त्यांचें स्वातंत्र्य नष्ट होण्यासही त्यांचे विलास आणि त्यांची नीतिभ्रष्टताच कारणीभूत झाली. त्यांच्या नाटकांतूनही व्यभिचारच प्रामुख्येंकरून दिसतो. ग्रीक लोकांचा भ्रष्टाचार इतली देशास सुद्धां भोंवला, असें मॅक्समुलरांचेंच म्हणणें आहे.* आतां यावर अशी एक शंका येण्याचा संभव आहे कीं, हिंदुस्थानांतील प्राचीनतम म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'मृच्छकटिक' नाटकांतील नायिका ही कोण होती? ही वसंतसेना चारुदत्ताची लग्नाची बायको होती काय? आतां ही शंका बरोबर आहे असें धरून आपण तिचा विचार करूं. ग्रीक रंगभूमीवरील एस्किलसचें 'ॲगामेमॉनन' † नांवाचें प्रख्यात नाटक व आपलें हें 'मृच्छकटिक' नाटक यांची तुलना संक्षेपतः करूं. मृच्छकटिक नाटकांत फक्त चारुदत्त हा वसंतसेनेवर लुब्ध झाल्याचें दार्शविलें आहे. चारुदत्ताच्या बायकोचें पातिव्रत्य व पावित्र्य, त्याच्या मुलाचें मातृपितृप्रेम, हीं आर्यदेशास साजण्यासारखींच चित्रित केलेलीं आहेत. त्यांत तिळभरदेखील नांव ठेवण्यास जागा नाहीं. परंतु हा प्रकार 'ॲगामेम्नॉन'मध्यें नाहीं, इतकेंच नव्हे, परंतु याच्या उलट प्रकारच त्यांत दृग्गोचर होतो.

भारतीय नाट्यशास्त्रकार.

२. 'नाटक' हा शब्द 'नट' शब्दापासून झालेला आहे. म्हणजे जो आपले विचार आविर्भावांनीं, अंगविक्षेपांनीं अगर काहीं सांकेतिक चिन्हांनीं स्पष्ट करून सांगतो तो नट. गायन आणि नृत्य या ललितकला आमच्या देशांत फारच प्राचीन कालापासून चालू आहेत. ऋग्वेदांत या गाननृत्यांचा उल्लेख शेंकडो ठिकाणीं आहे; मनुस्मृतींत 'नट' शब्दाचा उल्लेख आहे.

* "Roman frugality and gravity, Roman civilization and patriotism, Roman purity and piety, were driven away by Greek luxury and levity, Greek intriguing and self-seeking, Greek vice and infidelity."

(*Science of Language, Vol. I. page 113.*)

† याचें संविधानक असें आहे कीं, 'ॲगामेम्नॉन' यानें ट्रॉय जिंकिल्यावर तो ग्रीस देशांत परत आला. तेव्हां त्याच्या बायकोनें, इगिस्थिस् नांवाच्या आपल्या जाराच्या नादानें, ॲगामेम्नॉन यास ठार मारिलें. पुढें तिच्या मुलानें आपल्या या जारिणी आईस ठार मारिलें. इ.

'नृत्यवादित्रकुशला राक्षसेन्द्रभुजांकगा'

असें रामायणांतही वर्णन आहे. महाभारतांत तर अर्जुन हा बृहन्नडेच्या वेषानें विराटाच्या नृत्यशाळेंत कुलस्त्रियांस या ललितकला शिकवीत असल्याचें सर्वश्रुत आहेच. भागवतांतील रासक्रीडा व हरिवंशांतील रंभाभिसार नाटक हीं कोणास अपरिचित नाहींत. आपल्याकडील नाट्यशास्त्राची परंपरा खालीं दिल्याप्रमाणें प्रसिद्ध आहे.

१ ब्रम्हदेव.
|
२ भरत.
|
३ धनंजय.
|
४ भोज.
|
५ मम्मट.
|
६ विश्वनाथ.
|
७ शार्ङ्गदेव.

ही परंपरा गुरुशिष्यांची नाहीं. यांतील पहिल्याशिवाय बाकीच्यांचे काल भिन्न भिन्न आहेत; व त्या त्या कालीं त्यांनीं आपआपले ग्रंथ लिहून नाट्यशास्त्राची उन्नति केलेली आहे. भरतमुनि हा नाट्यशास्त्राचा आद्यप्रवर्तक दिसतो. परंतु त्याच्यापूर्वी नाट्यशास्त्रावर सर्वमान्य असा एकादा ग्रंथ नव्हता असें मुळींच नाहीं. पाणिनीच्या पूर्वी ज्याप्रमाणें व्याडि वगैरे व्याकरणकार होते, किंवा सायनाचार्यांच्या पूर्वी रावणादि वेदभाष्यकार होते, त्याप्रमाणेंच भरताच्या पूर्वींही बृहस्पति नांवाचा कोणी एक ग्रंथकार होता, असें भरतानेंच म्हटलेलें आहे. या प्राचीनतम लेखकांचे ग्रंथ मात्र आतां उपलब्ध नाहींत. भरताचा काल नक्की सांगतां येत नाहीं. तत्रापि तो कालिदासापूर्वी होऊन गेला हें—

मुनिना भरतेन यः प्रयोगः।

या विक्रमोर्वशीयांतील उक्तीवरून स्पष्टच होतें. शेवटला जो शार्ङ्गदेव हा बहुधा इसवी सनाच्या पंधराव्या शतकांतील असावा असें अनुमान करण्यास पुष्कळ आधार आहेत.

नाटकाचा हेतु, विषय व काल.

३. नाटक करण्याचें मुख्य कारण जनमनोरञ्जन हें होय. एकाद्या आनंदोत्सवप्रसंगीं सामान्य जनांचें मनोरंजन करण्यासाठींच हे नाटकाचे प्रयोग पूर्वी केले जात असें मृच्छकटिकावरून दिसतें; मालविकाग्निमित्र हें वसंतोत्सवानिमित्त केल्याचें त्यांतच लिहिलेलें आहे. विक्रमोर्वशींत ग्रीष्मऋतूचा उल्लेख असून शाकुन्तलांतही 'ग्रीष्मसमयमधिकृत्य गीयताम्' असा स्पष्ट निर्देश आहे. वेणीसंहारांत शरद् ऋतूचा उल्लेख आहे. तात्पर्य, अमुक वेळीं नाटक करावें व अमुक वेळीं करूं नये असा मुळींच निर्बंध नाहीं. कोणत्याही उत्सवसमयीं सामान्य जनसमूहाचें रंजन व्हावें एवढा मात्र त्यांत हेतु असतो. अर्थात् अशा रीतीनें जें नाटक व्हावयाचें तें सामान्यजनांसही सहज समजण्याजोगें व म्हणूनच सोप्या भाषेंतच लिहिलेलें असलें पाहिजे; त्यांतील कल्पना गंभीर व उदात्त पाहिजेत; तें नीतिविषयक असावयास पाहिजे; व याविरुद्ध जें असेल तें नाटक ग्राह्य नव्हे हें उघड आहे. नाना रसांनीं परिपूरित व सुखदुःखांनीं युक्त असें जें मानवी चरित तेंच नाटक, अशी नाटकाची व्याख्या भरतांनीं केलेली आहे. यावरून हें उघडच होतें कीं, नाटकांत अमूक विषय असावेत व अमूक असूं नयेत असाही कवीला निर्बंध घातलेला नाहीं. ज्याप्रमाणें या जगद्रूपी रंगभूमीवर अनेक प्रकारचे व्यवहार चाललेले असतात त्याचप्रमाणें ते नाटकांतील रंगभूमीवरही चालावेत; मात्र त्यांत वाईट गोष्टींचा अंतर्भाव होऊं नये. सामाजिक, धार्मिक, नैतिक, राजकीय इत्यादि विषयांचें विवेचन नाटकांत होण्यास मुळींच हरकत नाहीं. त्यांत नीतीचें पोषण व्हावें, दुष्टांचें दमन व्हावें, सुष्टांचा उत्कर्ष व्हावा. क्रोध, प्रसाद, शोक, शाप, युद्ध, राज्यभ्रंश, मरण, विवाह इत्यादि गोष्टी नाटकांत असूं नयेत असा निर्बंधही केलेला आहे. भरतानें सांगितलेले सर्वच नियम सार्वकालिक आहेत असें मुळींच नाहीं; किंबहुना कालिदासादिकांनींही ते पाळिले असल्याचें दिसत नाहीं. तत्रापि देशकालवर्तमानानुसार जेवढे ग्राह्य म्हणून वाटतील तेवढे घेऊन नाटक बसविण्यास कोणासही केव्हांही अडचण भासणार नाहीं. नाटकांत पात्रें किती असावींत ? त्यांची वाक्सरणी कशी

असावी ? नृत्यगायन कोणत्या प्रकारचें असावें ? वगैरे-बद्दलही भरतानें चांगलाच ऊह केलेला आहे.

सशास्त्र टीकेची आवश्यकता.

४. वरील अल्प विवेचनाचा सूक्ष्मतः विचार केला तर असें आढळून येईल - कीं, नाट्यकलेची आपणाकडेस जी उत्क्रांति झालली आहे ती कांहीं राजे महाराजांच्या आश्रयानेंच झालेली आहे असें मुळींच नाहीं. विद्वान् लोकांनीं स्वयमेव तिला आपणा स्वतःस तनुमनोधनेंकरून वाहून घेऊन तिची उन्नति केलेली आहे. आपल्याकडील सर्वच शास्त्रें जर अरण्यवासी ऋषींच्या आश्रमांत वृद्धिंगत झालेलीं आहेत तर मग ही नाट्यकला तरी अपवाद कां असावी ! हल्लीं इंग्रज सरकाराच्या राज्यव्यवस्थेंत इतर सर्व गोष्टींप्रमाणें इकडेस प्रसिद्ध होणाऱ्या सर्व पुस्तकांचेंही कसून परीक्षण करण्यांत येतें. या परीक्षणांत नाटकांच्या पुस्तकांचाही अन्तर्भाव होतो, हें खरें; परंतु हें जें परीक्षण होतें तें म्हणजे पुस्तकांतील प्रतिपादित विषयांची अगर शास्त्रांची उन्नति कोणत्या रीतीनें होईल, हल्लीं चालू असलेली उन्नति खरोखर उन्नति आहे कीं अवनति आहे, हें पाहण्यासाठीं होत नाहीं. पाश्चात्य देशांत अशी स्थिति नाहीं. यूरोपांतील बहुतेक देशांत नाटकांचें परीक्षण करण्यास व त्यासंबंधानें विचार करण्यास सरकारांतूनच एक मंडळ नेमिलेलें असतें. परंतु या सर्वांपेक्षां अमेरिकेची व्यवस्था अधिक उत्तम व अधिक स्पृहणीय आहे. तेथील प्रोफेसर चार्ल्स् स्प्रेग स्मिथ नांवाच्या एका वजनदार इसमानें इ. स. १८९७ सालीं, केवळ नाटयकलेचा उत्कर्ष व्हावा एवढयाच हेतूनें, कांहीं सूचना करून एक मंडळ नेमिलेलें आहे. व तें मंडळ हें काम बिनबोभाट रीतीनें करीत आहे, अशा रीतीची कांहीं व्यवस्था इकडेस व्हावी या हेतूनें किर्लोस्कर संगीत मंडळीनें सुमारें पांच सहा वर्षांपूर्वी कांहींसा प्रयत्न केल्याचें आठवतें. परंतु तो प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं असें अनुमान आहे. वस्तुतः नाटक हा विषय असा आहे कीं, विद्वान् व मर्मज्ञ लोकांनीं त्याचा बारकाईनें विचार करणें आवश्यक आहे; व असें जर न होईल तर ते आपल्या कर्तव्यास पारखे झाले असेंच म्हणावें लागेल. कारण, नाटकाचा हेतु कांहीं नुसतेंच जनमनोरंजन करणें हा नाहीं. जनमनोरंजन ही आनुषंगिक गोष्ट आहे. कडू औषध ग्रहण करण्यास जशी खडीसाखर, किंवा परमेशाचें भक्तिपुरःसर चिन्तन करण्यास वीणा मृदंग पेटी, तसेंच कोणत्याही प्रकारचें उदात्त शिक्षण जनसमूहास देण्यास हें नाटक आहे. म्हणजे त्याचा प्रधान हेतु शिक्षण आहे, रंजन हा नव्हे. तेव्हां असल्या महत्त्वाच्या शिक्षणविषयक संस्थांकडेस विद्वानांनीं दुर्लक्ष करून कसें चालेल ? अलीकडेस प्रसिद्ध होणाऱ्या नाटकांवर वर्तमानपत्रांतून कांहीं टीका येत असतात, हें खरें. परंतु या टीकांचा प्रधान हेतु–त्यांतील तत्त्वांच्या उच्चनीचपणापेक्षां— ग्रंथकाराच्या व्यक्तिविषयक गुणदोषांचें विवेचन करण्याचाच असतो. मराठी भाषेमध्यें नेहमीं प्रसिद्ध होत असलेल्या नाटकांवर वस्तुतः जेवढी टीका व्हावयास पाहिजे तेवढी होत नाहीं असें म्हटलें तर तें कांहीं गैर नाहीं. संवर्धक व विनाशक अशी दोन प्रकारची टीका असते. प्रसिद्ध होत असलेल्या टीका बहुशः दुसऱ्या कोटींतील असतात. अलीकडे बहुतेक टीकाकारांचा जवळ जवळ असा समज झालेला दिसतो कीं एकाद्या नाटकाचें परीक्षण करावयाचें म्हणजे त्यांतील दोषस्थलें दाखविलीं म्हणजे आटोपलें. रशियन तत्त्ववेत्ता टॉल्स्टॉय याची शेक्स्पीयरवरील टीकाही जवळ जवळ अशाच प्रकारची आहे. आपल्याकडील अर्वाचीन टीकांत दोषाविष्करण मात्र भरपूर होतें; कित्येक वेळां अतिशयोक्तीचेंही होतें. याला प्रत्यंतर पुरावा पाहिजे असल्यास रा. मराठे–ठोसरांची 'नाट्यकलारुकुठार' ही प्रसिद्ध व पुष्कळांनीं प्रशंसिलेली कृति पाहावी. सर्वसाधारण व सर्वसंमत गुण असल्यास त्यांचा नाममात्रेंकरून निर्देश केला तरी चालतो. परंतु जेव्हां एकाद्या कवीची कल्पना नितान्तमनोहर असते; त्याचें रचनाचातुर्य, शब्दसौष्ठव, रसपरिपाक, प्रसादमाधुर्य, सुन्दर कवित्व, काव्यतन्मयत्व, अर्थचमत्कृतिजनक भाषाकोविदत्व हीं असाधारण असतात; त्याचें अर्थगांभीर्य विचारणीय असतें; तेव्हां या गुणसन्निपाताचा नुसताच उच्चार करून भागत नाहीं. कारण टीका जी लिहावयाची असते ती कांहीं फक्त ग्रंथकारानेंच वाचावी म्हणून लिहावयाची नसते; ग्रंथकाराची नुसती निन्दा किंवा नुसती स्तुति करण्याच्या हेतूनें ती प्रकट करावयाची नसते; ग्रंथकार होऊं इच्छिणाऱ्या लोकांसाठींही ती प्रसिद्धीस आणा-

वयाची नसते; तर, ज्या कृतींचा परिणाम सामान्य-जनसमूहावर देखील पुष्कळ अंशानें व्हावयाचा असतो; किंवा ज्या कृतींचा परिणाम स्वदेशावरही बरा किंवा वाईट होण्याचा पुष्कळसा संभव असतो, त्या कृतींचें परीक्षण विहंगमदृष्टीनें होणें हें विद्वज्जनसमूहास कमी-पणा आणणारें आहे. आतां दगडापेक्षां वीट मऊ या न्यायानें जेथें कांहींच होत नसतें तेथें कांहीं तरी होऊं लागलें ही समाधान वाटण्याजोगी गोष्ट आहे, असें कोणी म्हणेल तर खुशाल म्हणो! परंतु एकादा मनुष्य नोकरी करण्यास लागल्यावर त्याला बढती मिळविण्याची अशी इच्छा असते, किंवा धनिक लोकांची संपत्ति वाढविण्याची आकांक्षा उत्तरोत्तर जशी वृद्धिंगतच होत जाते, तशीच देशांतील कोण-त्याही कलाकौशल्याच्या उत्कर्षाबद्दल तत्रस्थ लोकांची महत्त्वाकांक्षा नेहमीं जागृत राहणें हें त्या देशाच्या भावी उत्कर्षाचेंही पूर्वचिह्नच होय. द्रव्यार्जनेच्छूस जर कोणी असें म्हणेल कीं, 'पूर्वी तुला कांहींच मिळत नव्हतें त्यापेक्षां आतां दहा रुपये दरमाहा मिळतो हें पुष्कळच चांगलें आहे. तेव्हां तूं यांतच समाधान मानिलें पाहिजे.' हें म्हणणें जितकें अनुचित व अनुदार आहे, तितकेंच वरील 'दगडापेक्षां वीट मऊ' हा न्यायही नाट्यकलेवरील टीकेसंबंधानें अनुचित व अनुदार आहे. तात्पर्य, सशास्त्र व प्रमाणबद्ध टीका होणें हें अत्यंत आवश्यक आहे.

नाट्यानुकूल काल व प्रख्यात नाटककार.

५. कोणतेंही राष्ट्र उदयोन्मुख असलें अगर सर्वस्वी पतित असलें, तरच मात्र ललितकला प्रगट होत नाहीं. ज्याप्रमाणें नदीच्या मुखाजवळ किंवा उगमाजवळ जलक्रीडा फारशी सुखद होत नाहीं, किंवा ज्याप्रमाणें मुमुक्षु आणि सिद्ध या अवस्था इतर जीवांच्या उप-योगी पडण्याच्या स्थितींत नसतात, अथवा ज्याप्रमाणें ब्रह्मचर्य आणि संन्यास हे आश्रम संसाराविषयीं उदासीन असतात, त्याचप्रमाणें राष्ट्राची उदयोन्मुखता आणि पतितावस्था हीं ललितकलेस निरुपयोगी होत. 'सुलेह्मान जर महम्मदाकडेस जात नाहीं तर मह-म्मदानें सुलेमानाकडेस जावें'—या न्यायानें, राष्ट्र ललितकलेकडे न जातां प्रत्यक्ष ललितकला जरी राष्ट्राच्या अशा स्थितींत त्याजकडेस गेली तरीही तिचें बीज तेथें रुजणार नाहीं. कारण, त्यावेळीं राष्ट्र युद्धमग्न किंवा विलासमग्न असणार. अशा वेळीं बिचाऱ्या नाटकाला विचारतो कोण? आपल्याकडे जयदेवा-पर्यंत या कलेची भरभराट दिसते. पुढें साधारणतः तीनचारशें वर्षांत कोणीहीं नाटककार अथवा ग्रंथ-कर्ता झालेला दिसत नाहीं. ज्ञानेश्वर, एकनाथ, नाम-देव, तुकाराम, रामदास यांच्या ग्रंथांतून नाटकास तर जणूं बहिष्कारच घातलेला दिसतो. त्यानंतरचे कवि मुक्तेश्वर, रघुनाथपंडित, वामनपण्डित आणि मोरोपंत यांनीही नाटकासंबंधानें औदासीन्यच स्वीकार-रिलेलें दिसतें. कवित्व आणि नाटकरचनाचातुर्य हे गुण साधारणतः भिन्न भिन्न असतात, अशा अर्थाचें एक इंग्रजी वाक्य आहे. तें या कविवर्यांस लागू पडेल कीं काय अशी भीति वाटते. नाहीं म्हणावयाला मोरोपंतांनीं आपल्या 'रामरीतीं'त स्वतःचा नाटकासं-बंधाचा (काव्य या दृष्टीनें) आदर व्यक्त केला आहे.* इतर कवींनीं तर 'काव्यालापांश्च वर्जयेत्' हें सूत्र अखण्ड उराशीं बाळगिलेलें दिसतें. पन्तकालीन समाजही नाटकास अनुकूल नसावा, असें पंतांच्या टी-केवरूनच वाटतें. आतां आपण आपल्या प्राचीन ग्रंथांचा व इतर देशांच्या इतिहासाचा विचार केला तरीही हेंच तत्त्व प्रस्थापित होतें. भारत व रामायण हे दोन सुंदर ग्रंथ पाहा. मोठमोठीं युद्धें, भयंकर रक्तपात व अगणित जीवसंहार झाल्यावर पुढें पुष्कळ वर्षांनीं हीं सुंदर रत्नें अस्तित्वांत आलीं. होमर हा ग्रीक कवि जरी धरिला तरी त्याचें काव्यही ग्रीस देशांत शान्तता प्रस्थापित झाल्यानंतरच रचिलें गेलें. ग्रीक लोकांचें पारसीकांशीं दीर्घकालपर्यंत तुमुल युद्ध होऊन गेल्या-वरच तेथें नाटककार जन्मास आले. इंग्लंडच्या इतिहासांतही आपणांस असेंच आढळतें. 'वॉर्स ऑफ दि रोझिस'च्या (म्हणजे आपसांतीलच युद्धा)नंतरच्या कालांतच प्रख्यात शेक्स्पीयर उदयास आला. अगदीं अलीकडील म्हणजे रामजोश्यांचा काल घ्या. त्यावेळीं

---

*धातूंत जसें हाटक, नाटक वर सर्व सुप्रबंधांत
तें अरसिकांत संप्रति निष्फळसें मुकुर जेंवि अंधांत ॥
रस न समजती, म्हणविति रसिक, म्हणुनि
चित्त बहुत हळहळतें
जें तन्निंदक भाषण होतें कर्णांत तप्त हळहळ तें ॥
थोरांहीं स्तविले कवि, तन्निन्दा तिळहि सोसवत नाहीं
भज सुरस ग्रंथांही, वृत्तिपरा जेंवि सोस वतनांहीं ॥

नाटकें जरी नाहीं तरी तमाशे लोकप्रिय झाले होते असें दिसतें. हा कालही बऱ्याच शांततेचा होता. पन्त व जोशीबुवा हे समकालीनच कवि; व म्हणूनच कालानुसार दोघांचाही या ललितकलेकडेस कमीअधिक प्रमाणानें कां होईना पण ओढा होता. असो.

आपल्याकडेस प्रथम संस्कृत नाटकांचीं मराठींत भाषान्तरें केलीं परशुरामपन्त तात्या गोडबोल्यांनीं. परंतु आद्य महाराष्ट्रीय नाटककार मात्र ते नव्हत. ती पदवी सांगलीच्या विष्णुपंत भाव्यांकडेसच जाते. परंतु ते तरी पौराणिक नाटकेंच करीत असत. नाट्यकलेला व्यवस्थित रूप असें अण्णासाहेब किर्लोसकरांनींच दिलें; व तेंच हल्लीं जवळ जवळ अस्तित्वांत आहे. अलीकडील प्रसिद्ध नाटककार म्हणजे रा. देवल, रा. कोल्हटकर, रा. खाडिलकर, रा. केळकर, रा. जोशी, रा. बर्वे, रा. छापखाने, रा. वासुदेवशास्त्री खरे, रा. गडकरी, रा. टिपणीस, सौ. गिरिजाबाई केळकर, श्रुतिबोधकर्ते रा. कोल्हटकर, रा. आपटे, रा. ठोसर, रा. नेवाळकर, रा. काणे, रा. शिंत्रे, रा. वरेरकर, रा. फाटक इत्यादि अनेक आहेत. यांशिवाय रंजित-रंजक-नाटक-मालेसारख्या कित्येक मालांनीं अनेक नाटकें प्रसिद्धीस आणलीं आहेत. या सर्वांचें सशास्त्र परीक्षण करूं म्हटलें तर तो निराळा एक ग्रंथच होईल. म्हणून या निबंधांत उत्तम नाटक कसें असतें, अगर उत्तम नाटक कशास म्हणावें, याचें विवेचन करून त्या कसोटीस जीं नाटकें उतरतील तीं उत्तम, हें दर्शविण्यासाठीं एकाद्या प्रसिद्ध नाटकाचें गुणदोष-विवेचन लिहूं * व बाकीच्या कांहीं नाटकांचें विहंगमदृष्टीनें परीक्षण करूं. असें केल्याशिवाय प्रस्तुतचा निबंध आटोपशीर व मनोरंजक होणार नाहीं. असो.

नाटक कसें असावें ?

६. नाटकांतील मुख्य गोष्ट म्हणजे कथानक ही होय. हें कथानक देशकालानुसार असें असलें पाहिजे. 'अललल डुर्र'चीं नाटकें कंटाळवाणीं वाटण्यास त्यांतील कथानक देशकालाला अनुरूप असें नव्हतें, हेंच मुख्य कारण होय. कथानकाचें संविधानक आश्चर्योत्पादक असलें पाहिजे. नेहमीं प्रचारांत होणाऱ्या गोष्टी नाटकांत सांगण्यांत फारसें महत्त्व नाहीं; किंबहुना त्या योगें नाटक बेचव होतें. उदाहरण, जेवण, स्नान, विवाह इत्यादि. असले प्रवेश जर नाटकांत घातले तर त्या प्रवेशांतील नीरसपणा एकाद्या नटाला हास्योत्पादक अभिनय करून भरून काढावा लागतो. याला उदाहरण हवें असल्यास त्राटिका नाटकांतील जेवणाचा प्रवेश ज्यांनीं पाहिला असेल त्यांनीं तो आठवावा. भारतनाट्यशास्त्रांत यासंबंधीं फारच खोल व मार्मिकरीतीनें विचार केलेला आहे. चावणें, बोचकरणें, चुंबन घेणें इत्यादि गोष्टी नाटकांत वर्ज कराव्यात; कारण हे प्रकार कदाचित् नित्यव्यवहारांतील नसले तरी ग्राम्य आहेत. कित्येक वेळां प्रासंगिक गोष्टींवर नाटकें रचण्यांत येतात. हें जरी वाईट नाहीं तरी अशीं नाटकें दीर्घकालजीवी असत नाहींत. स्त्रियांना पार्लमेंटांत निवडून येण्याचे हक्क पाहिजेत ही गोष्ट जोंपर्यंत बहुजनसमाजास माहित असेल, तोंपर्यंतच 'बायकांचें बंड' हें नाटक पाहण्यांत व वाचण्यांत मौज वाटेल. बालावृद्धविवाह अगदीं बंद झाल्यावर किंवा ते नामशेष झाल्यावर 'शारदा' नाटकाची महती वाटणार नाहीं. प्राचीन संस्कृत नाटकें आज जीं अस्तित्वांत आहेत त्यांच्या कर्त्यांनीं कांहीं एवढींच नाटकें लिहिलीं असतील हें संभवत नाहीं. कदाचित् कांहीं हलगरजीपणानें नाहींशींही झालीं असतील. परंतु तीं किंवा त्यांपैकीं पुष्कळशीं नीरस वाटूं लागलीं असलीं पाहिजेत, व म्हणूनच त्यांचें अध्ययनअध्यापन बंद पडलें असेल. कण्वांनीं शकुंतलस ती सासरीं जातांना केलेला उपदेश प्रत्येक सहृदय माणसाचे डोळ्यांतून केव्हांहीं टिपेंच पाडील, व चारुदत्तानें फांशीं जातेवेळीं काढिलेले उद्गार रसिकास रडावयास लावितील, याचें कारण त्या उद्गारांतील मर्म देशकालवर्तमानानुसार केव्हांही बदलणार नाहीं. हल्लींच्या नाटककर्त्यांनीं, आपली कृति चिरंजीवी व्हावी अशी इच्छा असल्यास, तिच्यांतील तत्त्वें आणि प्रसंग अगदीं उच्चतर व उदात्त असेच घालावयास पाहिजेत. आणखी दोनशें वर्षांनीं हल्लींच्या नाटकांपैकीं किती राहतील, या या प्रश्नास 'जवळ जवळ एकही राहणार नाहीं' हें उत्तर निरुपायानें द्यावें लागेल. यावरून चालू प्रसंगावर नाटकें मुळींच लिहूं नयेत असें नव्हे. परंतु

---

* प्रस्तुत निबंध मर्यादेबाहेर भारीच वाढल्यानें हें परीक्षण निराळ्याच स्वतंत्र निबंधांत देण्याचें योजिलें आहे.

नाटककर्त्यांनीं आपली प्रतिभा जी खर्चीं घालावयाची ती थोडासा पोक्त व खोल विचार करून जर खर्ची घातली तर तिचा विशेष उपयोग होणार आहे. वाद-विषयक गोष्टी नाटकांत आणूं नयेत असें कित्येकांचें मत आहे. परंतु तें जर ग्राह्य धरिलें तर मग, प्रो. भाटे म्हणतात त्याप्रमाणें, खरोखरीच गणिताशिवाय नाटकाला योग्य असा एकही विषय राहणार नाहीं. कारण वाद नाहीं असा गणिताशिवाय दुसरा विषयच नाहीं. असो. नाटककार स्वतः नट असला तर उत्तमच. परंतु तसें नसलें तर त्याला नाट्यशास्त्राचें उत्कृष्ट ज्ञान पाहिजे; तो बहुश्रुत असला पाहिजे; त्याची अवलोकनशक्ति दांडगी असावयास पाहिजे; तो प्रतिभासंपन्न असावा; तो भाषाकोविद असावा–म्हणजे त्याला अनेकप्रकारच्या भाषा येत असल्या पाहिजेत. तसें नसलें तर तो सर्व पात्रांच्या तोंडीं एकच भाषा घालितो. याला उदाहरण रा. खाडिलकरांचा अकबर हें होय. किंबहुना खाडिलकरांच्या सर्वच नाटकांत सर्वही पात्रें शुद्ध कोंकणस्थी भाषा बोलतात. आणि रा. श्री. कृ. कोल्हटकरांच्या सर्व नाटकांत सर्वच पात्रें कोट्या करितात. या योगानें रसहानि होते. अशीं नाटकें वाचीत अगर पाहत असतां आपण निरनिराळ्या भूमिकांचीं भाषणें वाचीत आहोंत अगर ऐकत आहोंत असें न वाटतां तीं एकाच मनुष्याचीं निरनिराळ्या वेषांतील भाषणें आहेत असें वाटतें. शब्दांवरील कोट्या निसर्गतः गोडच असतात. त्यांतून रा. श्री. कृ. कोल्हटकरांच्या तर फारच उत्कृष्ट असतात हें खरें आहे. परंतु जेव्हां ते, जर्मन लोकांनीं अँटवर्पवर तोफांचा भडिमार केला त्याप्रमाणें, कोट्यांचा आणि उपमांचा भडिमार सुरू करितात तेव्हां मात्र त्या कोट्यांचा व उपमांचा कंटाळा येतो; इतकेंच नव्हे पण केव्हां केव्हां किळसही येते.

'बुद्धिं नवनवोन्मेषशालिनीं प्रतिभां विदुः ।'

हें प्रतिभेचें लक्षण रा. कोल्हटकरांना पुष्कळ अंशांनीं लागू पडतें हें खरें आहे. परंतु कोटया करणें हें अन्तःकरणाच्या प्रसन्नतेचें लक्षण आहे, हें ते विसरतात. व म्हणून कोल्हटकरांचीं पात्रें क्रोधांत, उद्विग्नतेंत, निराशेंत व करुणेंतही कोटया करितात. यायोगें प्रेक्षकांच्या मनावर अनुकूल रसाचें प्रतिबिंब उठत नाहीं. श्रुतिबोधकर्त्या कोल्हटकरांना टीका-आगळें लिहिण्याची संवय आहे. एकच वाक्य अनेक प्रकारांनीं ते लिहितात. यायोगें त्यांचें भाषाप्रभुत्व दिसतें,परंतु प्रेक्षकाला मात्र निराश व्हावें लागतें.याचें प्रत्यंतर त्यांच्या विवेकानंद नाटकांत कोणासही आढळून येईल;इतकेंच काय पण नाटकाच्या नांवावरून ज्या मजकुराची वाचक अपेक्षा करितात तो मजकूरही त्यांना त्यांत मिळणार नाहीं. मृच्छकटिकांत ज्याप्रमाणें मातीच्या गाड्याचा जवळ जवळ कांहींच संबंध नाहीं, व गुप्तमंजूषमध्यें मंजूषेचा कांहींच उपयोग नाहीं, त्याचप्रमाणें या 'विवेकानंदां'तही विवेकानंद हे पात्र अगदींच गौण किंबहुना निरुपयोगी आहे. असो. पात्राला योग्य अशीच भाषा नाटकांत घालावयाला पाहिजे. हल्लींच्या नाटकांवर असा एक आक्षेप आहे कीं, हीं नाटकें नटांसाठीं होत आहेत; नाटकांसाठीं कांहीं नट हल्लीं तयार होत नाहींत. हा आक्षेप खरा आहे. परंतु तूर्तच्या स्थितींत तरी याला कांहींच उपाय नाहीं.

पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः।शिलालिनो नटाः । कर्मंद कृशाश्वादिभिः कृशाश्विनो नटाः ॥

या सूत्रावरून असें स्पष्ट दिसतें कीं, पूर्वीं शिलालीं, कृशाश्व इत्यादि नटाचार्यांनीं नट तयार करण्याच्या शाळाच घातलेल्या होत्या. अशा तऱ्हेची जर आज कांहींच व्यवस्था नाहीं तर नटांसाठीं नाटकें तयार करण्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं. अशी स्थिति असल्यामुळेंच प्रस्तुतच्या चांगल्या चांगल्या नाटककारांसही नाटकांतील भाषा एकच प्रकारची ठेवावी लागते कीं काय हें मात्र समजत नाहीं. विशेषतः नाटकांतील भाषा साधी, श्रवणमनोहर व सहजस्फूर्तीची असावयास पाहिजे. अशा तऱ्हेच्या भाषेचा मासला रा. हरिभाऊ आपट्यांच्या 'संत सखूबाई' नाटकांत पाहण्यास मिळतो. या नाटकांतील विशेषतः बायकांच्या तोंडीं घातलेली भाषा अत्यंत हृदयंगम आहे. खुद्द बायकांनाही बायकांची भाषा इतकी उत्तम साधत नाहीं. याचें प्रत्यंतर 'पुरुषांच्या बंडां'त पाहावें. तात्पर्य, नाटकांतील भाषा नेहमीं सुगम, मधुर आणि प्रसादपूर्ण असावयास पाहिजे. नाटकांतील पद्यही याच मासल्याचें उतरलें पाहिजे. रा. कोल्हटकर आणि रा. खाडिलकर या दोनही प्रसिद्ध कवींची काव्यरचना

अत्यंत क्लिष्ट असते, अशी जी ओरड आहे ती पुष्कळ अंशांनीं खरी आहे. नवीन नवीन चाली, प्रगल्भ कल्पना, उदात्त विचार इत्यादि गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून पद्यांत आणावयाच्या असल्यामुळें ही पद्यरचना अवघड झाली आहे, असें त्यांच्या पक्षपातीयांचें म्हणणें आहे. परंतु या म्हणण्यानें समाधान होत नाहीं. संस्कृत भाषेमध्यें अपरपर्याय शब्द पुष्कळ असतात. परंतु त्यांतही कांहीं असे आहेत कीं, ते फक्त कोशांतच राहण्याच्या लायकीचे आहेत. असले शब्द मुद्दाम पद्यांत घालण्याची काय आवश्यकता आहे ? जाड्या जाड्या कल्पना लोकांस समजावून सांगण्यासाठीं जाडे जाडे शब्दच योजिले पाहिजेत ही समजूत चुकीची आहे. या म्हणण्याची यथार्थता पाहणें असल्यास वामन पंडितांची 'यथार्थदीपिका' वाचावी. वेदान्ताएवढा गहन विषय कोणताही नाहीं. परंतु तो सुद्धां जर सुगमतेनें समजावून देतां येतो तर अर्वाचीन कवींच्या कल्पनाच कां समजावून सांगतां येऊं नयेत ? निदान खाडिलकरकोल्हटकरांच्या कल्पना तरी सुगमतेनें सांगतां एतील येवढें खास.

काव्यं यशसेऽर्थकृते
व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।

ही काव्याची मम्मटांनीं केकेली फलश्रुतीची व्याख्या. ही व्याख्या उपर्युक्त कवींच्या काव्याला लागू होत नाहीं. याचें कारण विशेषतः त्यांतील काठिन्य हेंच होय. दुसरें, संगीत नाटक म्हटलें कीं, त्यांत शेंपन्नास पदें असावयास पाहिजेत असा हल्लींच्या नाटककारांचा समज झालेला दिसतो. हा समज कशानें झाला आहे हें कळत नाहीं. हा समज इतका बळावला आहे कीं, जें एकदा गद्यांत सांगितलेलें असतें तेंच पुनः पद्यांतही सांगण्यांत येतें ! ही पद्धति फारशी प्रशंसनीय नाहीं. नाटकांत पद्य किती असावें व गद्य किती असावें हें सांगणें जरी कठीण आहे, तरी साधारणतः एकाददुसऱ्या उत्तम गाणाऱ्या पात्रास फक्त पद्यें असावींत. व बाकीच्या सर्व पात्रांना गद्यच ठेविलें तर कांहीं हरकत येईलसें वाटत नाहीं. व अशीं नाटकें लोकप्रियही विशेष होतील. मिल्टनची कीर्ति जशी ॲडिसननें उज्ज्वल केली, किंवा शेक्सपीअरला जसें गॅरिकनें प्रसिद्धीस आणिलें, तसेंच अशीं नाटकें उदयास आणण्यासही एकादा ॲडिसन किंवा एकादा गॅरिक उत्पन्न होईल. मात्र नाटकांतील संविधानक केव्हांही असभ्य असूं नये. नाहीं तर दुसऱ्या चार्लसच्या कारकीर्दीतील ड्रायडन वगैरे नाटककारांच्या कृतींचा जो दुष्परिणाम झाला त्याचीच पुनरावृत्ति होण्याचा समय यावयाचा. असो. ढुंढधारीसारखीं, वर्तमानकालीन एकाद्या विशिष्ट व्यक्तीला उद्देशून, केव्हांही नाटकें रचूं नयेत. कारण अशा नाटकांचे चांगले व वाईट असे दोनही प्रकारचे परिणाम व्हावयाचे. इ. स. १५२७ मध्यें आठव्या हेन्री राजावर असेंच एक नाटक रचिलें होतें. व सॉक्रेटीसवरील नाटक तर पुष्कळांना ठाऊकच आहे. एकाद्या व्यक्तीच्या विरुद्ध लोकमत तयार करण्यास असलीं नाटकें पुष्कळ अंशांनीं उपयोगी पडतात. परंतु नैतिकदृष्ट्या असें होणें गर्ह्य होय. साधारणतः लोकाभिरुचीकडेस पाहून जर नाटकें लिहीत गेलें तर नाटककारास कीर्ति मिळून पैसाही प्राप्त होतो. खुद्द शेक्सपीअरही खासदाराचा सरदार या नाटकांवरच झाला. एका अर्वाचीन प्रसिद्ध नाटककाराच्या कृतीच्या मोबदल्याचा खटला न्यायमंदिरापर्यंत गेला होता(?)हें पुष्कळांस आठवत असेल. त्यावरून नाटककारास भरभक्कम मोबदला मिळतो याजबद्दल मुळींच शंका नाहीं. परंतु विद्वान् मनुष्यानें निव्वळ पैशाच्या भरीस पडून लोकरंजन करावें हें त्याचें कर्तव्य नव्हे. आपल्या टांकसाळींतून एकादें तरी नाटक चिरंजीवी निघावें अशी इच्छा अहर्निश पुढें ठेवून त्यानें नाटक रचण्याचा क्रम चालू ठेवावा. शाकुंतल नाटक लिहितांना कालिदासाच्या स्वप्नींही आलें नसेल कीं, पुढें १७८९ सालीं एक गौरकाय या नाटकाचें आंग्ल भाषेंत भाषांतर करील ! तात्पर्य, प्रतिभासंपन्न काव्य केव्हांही गोडच लागतें. कित्येक वेळां भिन्नराष्ट्रीय व भिन्नकालीन कवींचे काव्यांत पुष्कळशा गोष्टींचें साम्य असतें. याला उत्कृष्ट उदाहरण म्हणजे भवभूतीचें 'मालतीमाधव' व शेक्सपीअरचें 'रोमिओ ॲण्ड ज्यूलिएट' हें होय. एकांतील माधव व दुसऱ्यांतील रोमियो, एकांतील मालती व दुसऱ्यांतील ज्यूलिएट, एकांतील कामंदकी व दुसऱ्यांतील फ्रायर, एकांतील मंदन व दुसऱ्यांतील पारिस, या पात्रांतील विलक्षण

साम्य फारच आश्चर्यजनक आहे. या नाटकांतील कथानकांचें भिन्नत्व हें-देशकालपरत्वें कविकल्पनांचे खेळ होत. तात्पर्य एवढेंच कीं, अंतःस्फूर्तीच्या कल्पना अगर काव्य हीं कोणत्याही देशांतील कवीस सारखींच सुचतात. हॅम्लेटमध्यें जसें नाटकांत नाटक आहे तसेंच उत्तररामचरितांतही नाटकांत नाटक आहे, हें दुसरें प्रमाणही माझ्या वरील म्हणण्यास दुजोरा आणितें.

वर्तमानकालीन नाटकांतील गुणदोष.

७. नाटकांतील संगीत कसें असावें ?–म्हणजे नाटकांतील पदें कोणत्या रागदारीचीं असावींत ? हा प्रश्न तज्ज्ञांचा आहे.* तत्रापि प्रत्येक नाटक आनन्दपर्यवसायीच असलें पाहिजे हा जो आपला प्राचीन नियम तो कालमानपरत्वें आतां मोडला तर त्यांत विशेषसें गैर आहे असें मुळींच वाटत नाहीं. व श्रोत्यांच्या मनावर अनुकूल ग्रह उत्पन्न होण्यास दुःखपर्यवसायी नाटक जेवढें उपयुक्त आहे तेवढें दुसरें कोणतेंच नाहीं. शारदेचें लग्न खरोखरच वृद्ध श्रीमंताबरोबर केलें असतें व पुढें वैधव्याची विपत्ति तिजवर आणून प्रेक्षकांचीं हृदयें हालवून सोडिलीं असतीं, तर बालावृद्धविवाहाला विरुद्ध असें लोकमत तयार झालें असतें. रा. गडकऱ्यांचें प्रेमसंन्यास नाटक दुःखपर्यवसायी आहे परंतु त्यांतील विचार व भाषा इतकी गंभीर व क्वचित् प्रसंगीं इतकी काव्यमय आणि म्हणूनच क्लिष्ट झालेली आहे कीं, साधारणजनसमूहास तें नाटक कंटाळवाणेंच होईल. नाटक या दृष्टीनें तें निःसंशय चांगलें साधलें आहे. परंतु तें अत्यंत क्लिष्ट झाल्यानें लोकशिक्षण हा जो नाटकाचा मुख्य हेतु तो कांहीं त्यानें साधला जाणार नाहीं. रा. टिपणिसांचीं नाटकें अलीकडेस रंगभूमीवर त्यांच्या स्वतःच्याच कंपनीकडून चमकूं लागलीं आहेत. रा. टिपणिसांचें 'राधामाधव' हें नाटक आहे कीं तमाशा आहे हेंच कळत नाहीं. राधेची भक्ति अव्यभिचारिणी होती हें सिद्ध करण्यास लंबोदरबुवांच्या व्यभिचाराचें यथास्थित वर्णन करण्याची काय आवश्यकता होती, हें ग्रंथकारच सांगूं शकतील. लछमनाची ग्राम्य भाषा व लंबोदराचे अश्लील उद्गार यांनीं सभ्यतेचा केलेला खून पाहून प्रत्येक सभ्याच्या मनाला उद्विग्नताच वाटेल. ढोंगी गुरूंचें हें यथार्थ चित्र आहे हें खरें, परंतु कृष्णकालीं असे गुरु होते काय ? रा. टिपणीस आपल्या टीकाकारांना पूर्वदेव म्हणतात, असें त्यांच्या 'कमले' च्या प्रस्तावनेवरून दिसतें. परंतु अशा रीतीनें बोटें मोडिल्यानें ते स्वतः देवप्रिय

* भारतनाट्यसमाजाच्या सहाव्या संमेलनाच्या हकीकतींत मुंबईचे प्रसिद्ध गवई पंडित विष्णु पलुसकर यांचा एक निबंध प्रसिद्ध झालेला आहे. त्यांतील संगीतासंबंधींचा महत्त्वाचा भाग खालीं देतों. संगीत नाटककारांनीं शक्य असल्यास व योग्य वाटल्यास त्याचा उपयोग करावा:—

"......पुष्कळ नाटककारांना गायनकलेचें तादृश ज्ञान नसतें......गायन हें ध्वनिरूप आहे. व दिवसाच्या निरनिराळ्या वेळीं ज्याप्रमाणें ध्वनीमध्यें माधुर्य, मृदुता अथवा काठिन्य येतें त्याचप्रमाणें गाण्यामध्येंही ध्वनीचे हे विकार आपल्या नजरेस पडत असतात......कांहीं कांहीं राग ठराविक वेळीं व ठराविक स्थळींच गावयाचे असतात. नाहीं तर त्यांचें माधुर्य कमी होऊन बेरंग होतो. झिंझोटी, जिल्हा, काफी, पिलू वगैरे राग जरी वाटेल तेव्हां म्हटले असतां चालतात, तथापि नाटकाच्या प्रारंभींच नांदीला ते योग्य नाहींत. प्रारंभ गंभीर व उदात्त पदांनीं केला असतां प्रेक्षकांवर छाप पडून नाटकाला रंग येतो. म्हणून अशा वेळीं, हमीर, भूप, कल्याण, पूर्वी, यमन, छायानट असे राग असावे, व ताल चौताल असावा. नाटकांतील मध्यभागीं केदार, कानडा, शंकरा, मालकंस असे राग आणावे. असावरी किंवा मांड ह्या रागांत शृंगारयुक्त पदें नसावींत. गायनांतील या खुब्या, व निरनिराळ्या रागांचे सूर, ताना व वेळा ह्यांचें ज्ञान खुद्द नाटककारांसच नसलें तर नट कितीही संगीत असला तरीही त्याचें संगीत ज्ञान तेथें फिकेंच पडणार ! व नाटकांतील रंगाचा बेरंग होणार ! ! म्हणून खऱ्या नाटककारानें ह्या सर्व गोष्टी लक्षांत आणून नाटक तयार केलें तर त्यामुळें संगीत नाटकामध्यें पुष्कळच सुधारणा होईल.

संगीत नाटकें मर्मज्ञांस बेचव लागण्याचें...एक कारण असें आहे कीं, त्यांमध्यें अलीकडे पारशी व गुजराथी चालींवर बरींच पदें घालण्यांत येतात."

होतात हें त्यांच्या लक्षांत नाहीं. रा. टिपणिसांच्या एकाही नाटकांत प्रतिभा नाहीं, काव्य नाहीं व रसपरिपोषही नाहीं. मग आहे तरी काय ?—असें कोणी विचारील तर त्याला उत्तर एवढेंच कीं, शिळ्या कल्पना, उष्ट्या कोट्या आणि किळसवाणा पाणचटपणा एवढेंच त्यांत आहे. शौर्याचें वर्णन म्हणजे ऐरावतास चीत करणें, ही रा. टिपणिसांची कल्पना. त्यांचा भीष्म, आणि त्यांच्या राधेचा नवरा यःकश्चित् अनया गवळी, हे दोघेही बिचाऱ्या ऐरावतास किंवा तत्तुल्य हत्तीस लोळवितात. हें पाहून ऐरावत म्हणजे गाईचें वासरूं, म्हशीचें पारडूं, घोडीचें शिंगरू, कीं बकरीचें कोंकरूं, यांपैकीं आहे तरी काय असा प्रश्न उपस्थित होतो. असो. याचेंच नांव प्रतिभेचा अभाव. इतरांनीं केलेलीं नाटकें पाठ करून जर खरोखरीच सर्वांना नाटकें रचितां येणें शक्य असतें तर कालिदासभवभूत्यादि कवींची प्रतिष्ठाच राहिली नसती, व जागजागीं थॅकरे-ड्यूमसारखे ग्रंथकार झळकूं लागले असते. रा. टिपणिसांना करुण रस उत्तम साधतो यांत शंका नाहीं. रा. खाडिलकर आणि रा. कोल्हटकर यांच्या नाटकांतील दुर्बोधत्व वजा केलें व काव्यांत प्रसाद आणिला तर पहिल्यास साध्या कथानकाबद्दल व दुसऱ्यास गुंतागुंतीच्या व रहस्यमय कथानकाबद्दल अनुक्रमें अर्वाचीन काळचे कालिदास व शेक्स्पीअर या पदव्या साजतील; किंवा वेळीं अवेळीं आपल्या विद्वत्तेचें प्रदर्शन करून नाटकांतील पात्राकडून संविधानकचातुर्याची—म्हणजे अप्रत्यक्षरीतीनें आपल्याच चातुर्याची—तारीफ करविणें हे प्रकार रा. कोल्हटकरांच्या नाटकांत दृग्गोचर होत असल्यानें त्यांस कदाचित् भवभूतीचीही उपमा साजेल. तात्पर्य, प्रस्तुत काळीं हे दोनही नाटककार उत्तमांत मोडणारे असून ते आपल्या कृतीही अहमहमिकेनें पुढें आणीत आहेत. ऐतिहासिक नाटकाचा उत्तम आदर्श रा. केळकरांचें 'तोतयाचें बंड' हा होय. ऐतिहासिक नाटक कसें असावें ? ऐतिहासिक व्यक्तींचा दरजा नाटकांत कोणता असावा ? इतिहास व कल्पना यांचें कितपत मिश्रण असावें ? काल्पनिक गोष्टींना किती वाव असावा ? स्थलकालादिकांचे नियम कोणत्या रीतीनें अमलांत आणावेत ? इत्यादि गोष्टींचें सांगोपांग विवरण करीत बसण्यापेक्षां 'ऐतिहासिक नाटक तोतयाच्या बंडासारखें लिहावें' एवढेंच जर सांगितलें तर तें पुरे होईल असें वाटतें. आज अस्तित्वांत असणाऱ्या कोणत्याही नाटकाच्या मानानें हें नाटक अधिक दीर्घायुषी होईल. या नाटकांतील पात्रांची भाषा, त्यांचे विचार व त्यांचीं संभाषणें अत्यंत मनोज्ञ आहेत. नाहीं तर 'राक्षसी महत्त्वाकांक्षे'कडेस पहा ! जिकडे तिकडे रौद्र रसाची रेलचेल उडवून दिली आहे. त्यांत रेखाटलेले स्त्रियांचे स्वभाव हे पुरुषी बायकांचे तर काय पण राक्षसी स्त्रियांचे म्हणून देखील शोभावयाचे नाहींत. पार्शी कंपन्यांचीं 'खूब सूरत बाला (बला ?),' 'जालिम टूलिया' व आपल्यांतील 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' हीं एकाच प्रकारचीं नाटकें.या प्रत्येकांत रंगभूमीवर पांच सात खून होतात. पडद्यांत किती होतात त्याची गणतीच नाहीं. व त्यामुळेंच हीं नाटकें कंटाळवाणीं, नीरस व रूक्ष वाटतात. स्वभाववैचित्र्य हें नाटकाचें जें एक मुख्य अंग असतें तें यांत मुळींच दृग्गोचर होत नाहीं.सगळ्याच पात्रांचे स्वभाव एकाच सांचांतून ओतलेले पाहिले म्हणजे 'टका शेर भाजी, टका शेर खाजा' या म्हणीची आठवण होते. यानंतर खरे शास्त्रीबोवांच्या 'तारामण्डळा'कडेस दृष्टि फिरवावी. शास्त्रीबोवांसारख्या पूज्य व्यक्तींच्या कृतीवर टीका करण्याची यत्किंचितही योग्यता प्रस्तुत लेखकास नाहीं. तथापि त्या कृतींतील वीर रसाच्या जोडीला शृंगाराची थोडी अधिक भर घातली असती तर बरें होतें अशी माझी अल्प समजूत आहे. असो.

भाषांतरित नाटकें.

८. आतां आपण थोडासा भाषांतरित नाटकांचा विचार करूं. हल्लीं मोहनतारा, कन्यापरीक्षण, कमला, त्राटिका इत्यादि जीं नाटकें दिसतात तीं रूपांतरवजा भाषांतराचीं उदाहरणें आहेत. म्हणजे हीं धड भाषांतरेंही नाहींत व रूपांतरेंही नाहींत. 'कमले'सारखीं नाटकें तर संपूर्णपणें पाश्चात्य समाजाचीं चित्रें होत. अशा नाटकांनीं जनमनोरञ्जनही नाहीं, व शिक्षण तर नाहींच नाहीं. तात्पर्य, भाषांतर व रूपान्तर यांची खिचडी करूं नये. एक भाषान्तर तर भाषांतर किंवा रूपान्तर तर रूपान्तरच असावें. म्हणजे प्रेक्षकांचा अगर वाच-

कांचा घोंटाळा तरी उडणार नाहीं. रूपान्तर हें भाषांतरापेक्षां अधिक अवघड आहे. भाषान्तरांत रूपान्तराएवढे कष्ट नाहींत. आणि म्हणूनच रूपान्तरकाराला स्वयंप्रतिभेची आवश्यकता आहे. असल्या रूपान्तराचा मासला पाहणें असल्यास 'केवळस्वार्थापार्यी' ही कादंबरी वाचावी.लोणी आणि तूप, बर्फ आणि पाणी,किंवा पाडास आलेलें फळ आणि पूर्ण पक्व फळ, यांत जेवढें अंतर असतें तेवढेंच 'स्वतंत्र' आणि 'रूपान्तर' यांत आहे. ज्याला रूपान्तर उत्तम साधलें तो लवकरच स्वतंत्र ग्रंथरचना करूं शकतो. परन्तु आजला उत्तम रूपान्तर तर काय, भाषान्तर देखील नीट होत नाहीं. म्हणून माझी एक अशी अल्प समजूत आहे कीं, भाषान्तरकारांनीं निर्भेळ भाषान्तरच करावें, त्यांत रूपान्तराची भेसळ करूं नये. हें सर्व मी इंग्रजींतून मराठींत भाषान्तरित झालेल्या नाटकांबद्दलच लिहीत आहें हें वाचकांनीं विसरूं नये. तात्पर्य काय कीं, शुद्ध भाषान्तरित असें नाटक आजला एकही नाहीं असें जर लिहिलें तर ती अतिशयोक्ति होईलसें वाटत नाहीं. जी भाषान्तराची स्थिति तीच जवळ जवळ रूपान्तराचीही आहे. तेव्हां त्याजबद्दल विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं.

नाटकांचे नियम कोणी ठरवावेत ?

९. येथपर्यंत प्रस्तुत विषयाचें मी यथामति संक्षेपतः विवेचन केलें. वस्तुतः प्रस्तुत विषय अत्यंत गहन आहे. त्याचें दहावीस पानांत सांगोपांग विवेचन होणें शक्य नाहीं; व तें एकट्याचें कामही नाहीं. या विषयाची स्वतंत्र मंडळानेंच चर्चा करावयास पाहिजे. तसें होईपर्यंत प्रस्तुत निबंधांतील सूचनांसारख्या सूचना फारशा ग्राह्य होणार नाहींत. कारण साधक बाधक प्रमाणांनीं जी गोष्ट शेवटीं सिद्धांतवत् ठरेल तिच्यांत व एकट्यानें केलेल्या सूचनांत भेद हा असणारच. प्रत्येकाच्या सूचना प्रत्येक नाटककार अमलांत आणूं लागला तर त्याची स्थिति 'एक म्हातारा गृहस्थ व त्याचा बैल' या गोष्टींतील म्हाताऱ्याप्रमाणेंच व्हावयाची. म्हणून नाट्यसंमेलनांत अगर इतर प्रसंगीं फुरसतीप्रमाणें तज्ज्ञांची एक मंडळी नेमून हें काम शांतपणें व सप्रमाण ऊहापोह करून कांहीं मुद्दे नक्की ठरवावेत, म्हणजे नवीन होतकरू नाटककारास ते मार्गदर्शक होऊन राष्ट्रासही फायदेशीर झाल्यावांचून राहणार नाहींत. व असे पद्धतशीर प्रयत्न झाल्यावांचून या निबंधासारखे निबंध म्हणजे धुळीवरील सारवणाप्रमाणें होत.

सज्जन-प्रार्थना.

१०. एकादें नाटक लिहिणें, व तें नाटक लोकप्रिय होणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. मनुष्य कांहीं सर्वज्ञ नसल्यानें त्याच्या कृतींत चुका या असणारच.

सर्वज्ञता नास्ति शिवं विना क्वचित् ।

हें प्रसिद्धच आहे. प्रस्तुत छोटयाशा निबंधांत जी प्रत्येकाच्या कृतीवर टीका केलेली आहे, ती म्हणजे प्रस्तुत लेखक सर्वज्ञ आहे, अगर नाटक लिहिण्यांत त्याचा हातखंडा आहे, अशा समजुतीनें मुळींच केलेली नाहीं. किंबहुना प्रस्तुत लेखकाची खात्री आहे कीं, जर त्यानें एकादें नाटक लिहिण्याचा प्रयत्न केला तर तें नाटक आज अस्तित्वांत असलेल्या कोणत्याही नाटकाची बरोबरी करूं शकेल, असें मुळींच उतरणार नाहीं. साधारण मनुष्याच्या बुद्धीला एकदम समजून येणारे दोषच त्यानें दाखविले आहेत, व ते सद्बुद्धीनें दाखविले आहेत; त्यांत वैय्यक्तिक असा कोणाचा कसल्याही प्रकारचा संबंध नाहीं. उलट, सर्व सरस्वतीभक्तांना तो पूज्यच समजतो. एवढी गोष्ट ध्यानांत ठेवून सर्व सज्जन त्याला क्षमा करितील अशी आशा प्रकट करून तो वाचकांची रजा घेतो.

आधुनिक व जुनी, आणि समयक व निर्यमक कविता.

[लेखकः—रा. लक्ष्मीकांत यशवंत पुरोहित.]

मराठी भाषेविषयीं ज्यांस थोडी तरी कळकळ वाटते, त्यांस वरील विषयाचें महत्त्व किती आहे हें सांगावयास नको. कोणत्याही वाङ्मयाचे गद्य व पद्य असे दोन विभाग सकृद्दर्शनीं पडतात. त्या दोन विभागांपैकीं गद्य विभागांत ललितवाङ्मयापेक्षां इतर वाङ्मय अधिक असतें. परंतु पद्य विभाग हा सर्वस्वी ललितवाङ्मयासच वाहिलेला असतो. भाषेचा बरे-वाईटपणा त्या भाषेंतील ललितवाङ्मयावरून जसा ठरवितां येतो तसा तो इतर वाङ्मयावरून ठरवितां येत नाहीं. ह्यामुळें पद्यविभागास भाषेंत फारच महत्त्वाचें स्थान द्यावें लागतें. आपल्या मराठी भाषेंत हें पद्यविभागांतील वाङ्मय नवें व जुनें असें दोन प्रकारचें आहे. इंग्रजी भाषेचें ज्ञान इकडे प्रसृत होण्यापूर्वी झालेली काव्यरचना ही जुनी काव्यरचना होय; व इंग्रजी ग्रंथांच्या, विशेषतः आंग्ल कवितेच्या, परिचयानंतर केलेली काव्यरचना ही आधुनिक कविता होय. साम्प्रतच्या मराठी भाषेच्या अभिमानी वाचकवर्गांत रुचिवैचित्र्याप्रमाणें जुन्या व नव्या कवितेच्या बरेवाईटपणाबद्दल बराच मतभेद दृष्टीस पडतो. कोणास जुनी अगर जुन्या धर्तीवर रचलेली कविता आवडते, तर कोणास नवी कविता पसंत पडते. हा मतभेद वाढतां वाढतां इतका वाढला आहे कीं, मराठी वाचकांत नव्या व जुन्या कवितेच्या कैवाऱ्यांचा एक एक स्वतंत्र पक्षच बनला असून, दोघांसही एकमेकांच्या मताबद्दल फारसा आदर वाटत नाहीं. दोन्ही पक्षांत चांगले चांगले कवि व कसलेले लेखक असल्यामुळें दोघांच्या वादानें वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने भरले व मासिक पुस्तकांचीं पृष्ठेंच्या पृष्ठें अडलीं; तरी कोणताच पक्ष अद्यापि दुसऱ्यास हार गेलेला नाहीं. अशा स्थितींत कोणी अधिकारी व तज्ज्ञ सद्गृहस्थांनीं, विशेषतः साहित्य-संमेलनांतील विद्वान् सभासदांनीं, ह्या वादाचा अखेरचा निकाल लाविला पाहिजे, तरच हा वाद मिटेल. दोन्ही पक्षांचीं साधक बाधक मतें लक्षांत घेऊन, दोघांचा समेट होणें शक्य असल्यास तो कोणत्या रीतीनें शक्य आहे व मराठी कवितेस सर्वसंमत असें कोणतें स्वरूप देणें अवश्य आहे हें ठरविण्याचें काम बरेंच बिकट असलें तरी अशक्य कोटींतील खास नाहीं. ह्याकरितां त्या दिशेनें प्रयत्न सुरू करणें हें आजकालच्या विद्वान् गृहस्थांचें कर्तव्यच झालें आहे, व तें करण्यास आजच्या प्रसंगीं जमलेल्या विद्वान् मंडळींनीं सुरवात केली आहे, हें चालू सालीं ह्या विषयावर निबंध मागविण्यांत आले आहेत, यावरून स्पष्ट दिसतें. अशा प्रसंगीं ह्या विषयासंबंधीं आपलें मत काय आहे, हें संमेलनांतील विद्वान् सभासदांस कळविणें हें प्रत्येक महाराष्ट्रभाषाभिमान्याचें कर्तव्य आहे अशी प्रस्तुत लेखकाची भावना असल्यामुळें, स्वतः कवि अगर लेखक नसतांही, त्यानें आपले विचार विद्वज्जनांपुढें मांडण्याचें आज धाडस केलें आहे.

स्वतः कवि अगर लेखक नसलेल्या मनुष्यानें अशा विषयाची चर्चा करणें म्हणजे अव्यापारेषु व्यापार करणें आहे ही गोष्ट प्रस्तुत लेखकास नाकबूल नाहीं. 'मग त्यानें हा खटाटोप कां आरंभिला?' असा कोणीं प्रश्न केल्यास त्याचें उत्तर येथें आगाऊ देण्यास हरकत नाहीं. लेखक व कवि हे भाषेचे जनिते होत. भाषा सुंदर शब्दांनीं व विचारांनीं मनोवेधक करणें हें त्यांचे आधीन आहे, तेव्हां प्रस्तुतसारख्या कार्यांत अग्रपूजेचा मान त्यांना मिळावा हें रास्तच आहे. त्यांच्या मागून रसिक वाचकांची पाळी येते. योग्यतेनें हे कवीपेक्षां तिळभर देखील कमी नसतात. कवीच्या कृतीची योग्यरीतीनें परीक्षा करून तीमधील गुणदोषांचें विवेचन करण्याचें काम ह्यांचें असल्याकारणानें प्रसंगीं भाषाप्रभु लेखकांपेक्षांही यांचा अधिकार मोठा असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु ह्या दोहोंपेक्षांही निराळा असा सामान्य वाचकांचा म्हणून तिसरा एक वर्ग आहे. वाग्देवीच्या राज्यांत ह्या वर्गास कांहीं अधिकार नसला तरी, ह्यांचें आराधन योग्य प्रकारानें

करील तोच तिच्या कृपेस खरा पात्र झाला आहे असें समजलें जातें.ज्या राज्यांतील खालच्या दर्जातील लोक सुस्थितींत असतील तें राज्य चांगलें असें ज्याप्रमाणें आपण समजतों, प्रजांचें कार्य साधून राजाची मर्जी संभाळणारा अधिकारी ज्याप्रमाणें खरा हुशार गणला जातो, त्याचप्रमाणें आपल्या चातुर्यानें निवळ रसिकांचेंच नव्हे तर सामान्य जनांचेंही चित्त आकर्षून घेणारा कवि अथवा लेखक उत्तम ठरतो. असा हा तिसरा वर्ग आहे. राज्याच्या व्यवस्थेंत ज्याप्रमाणें खालच्या वर्गांतील लोकांस आपापल्या गरजा सरकारास कळविण्याची मुभा असते, त्याचप्रमाणें वाग्देवीच्या राज्यांत सामान्य वाचकांस देखील आपणास काय पाहिजे तें अधिकाऱ्यांस कळविण्याची परवानगी असावयास पाहिजे. ही परवानगी आहेच असें धरून चालण्यास कांहीं हरकत नाहीं, व ह्याच भावनेनें, सामान्य वाचकांचें प्रस्तुत विषयासंबंधीं काय म्हणणें आहे, तें प्रस्तुत निबंधांत सादर करण्याचा लेखकाचा इरादा आहे.

विवेचनाच्या सोयीसाठीं, मथळ्यांतील विषयाचे दोन भाग पाडणें जरूर आहे. 'आधुनिक व जुनी कविता' हा एक भाग आणि 'समयक व निर्यमक कविता' हा दुसरा. ह्या दोन्ही भागांचा परस्परांशीं तादृश संबंध नाहीं. पहिल्या भागांत कवितेच्या अंतरंगाचा विचार होतो व दुसऱ्यांत तिच्या बहिरंगाचा विचार होतो. या दोहोंपैकीं जास्त महत्त्वाचा असलेला व अनुक्रमानें पहिला असा जो पहिला भाग त्याचाच येथें आधीं विचार करूं.

मराठी जुन्या व नव्या कवितेविषयीं थोडक्यांत बोलावयाचें झाल्यास, पहिली संस्कृतानुकारिणी व दुसरी आंग्लभाषानुकारिणी आहे, असें सामान्यतः म्हणतां येईल.'जुने कवि बहुतेक सर्व संत असल्यामुळें सर्व जुनी कविता वैराग्यपर अतएव नीरस आहे.अवतारचरित्रांचें वर्णन असलेली अशी जेवढी कविता आहे तींत मात्र थोडेंसें रसवैचित्र्य आहे.बाकी सर्व कविता एकसारखी. निवळ वैराग्यपर काय, भक्तिपर काय, किंवा चरित्रवर्णनपर काय, सर्व जुनी कविता म्हणजे संस्कृत ग्रंथांचें प्राकृतांत केलेलें रूपान्तरच होय, ह्यामुळें जुन्या कवितेंत स्वातंत्र्य असें कोठेंच दृष्टीस पडत नाहीं.' असे जुन्या कवितेवर तिच्या प्रतिपक्षीयांचे आक्षेप आहेत. उलट पक्षीं '.नवी कविता भारदस्त नसते, नव्या कवितेसाठीं विषयांची निवड योग्यरीतीनें केलेली नसते' इत्यादि आक्षेप नव्या कवितेवरही घेतले जातात. वादविवादांतील हे कोटिक्रम आतां सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत. थोरांच्या ह्या कोटिक्रमाच्या भानगडींत न पडतां स्पष्टपणें बोलावयाचें म्हणजे, सामान्य वाचकांस जुन्या कवितेइतकी नवी कविता पसंत पडत नाहीं असें म्हणणें भाग आहे. याचीं कारणें थोडक्यांत खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

[१.]जुने कवि बहुतेक सारे संतवर्गांतील असल्यामुळें, त्यांच्याविषयीं सामान्य जनांच्या मनांत आदरयुक्त प्रेम असतें. संस्कृतासारख्या अवघड भाषेंत गुप्त असलेलीं वेदांताचीं प्रमेयें, रसाळ चरित्रें, प्रेमळ उपदेशरत्नें, लोकांच्या-आम्हां सामान्य जनांच्या-सहज हातीं येऊन त्यांचा उद्धार व्हावा, एवढ्यासाठीं रात्रंदिवस श्रम करून, पंडितांच्या प्रबळ विरोधास न जुमानितां, ज्यांनीं आपल्या रसाळ वाणीनें प्राकृत भाषेंत ग्रंथभांडार निर्माण केलें, त्या संतांविषयीं आदरबुद्धि योग्य रीतीनें प्रकट करणें म्हणजे त्यांच्या ग्रंथांचें अध्ययन करणें होय, अशी सामान्य वाचकांची भावना असते.

[२.] चरित्रवर्णनांत शृंगारवीरकरुणादि रसांस परिपोषक असे हजारों प्रसंग आहेत. त्यांचें हृदयास हालवून सोडण्यासारखें रसाळ परंतु सुबोध वर्णन जुन्या मराठी कवींनीं केलें आहे. तें वाचलें असतां काव्यवाचनापासून होणाऱ्या आल्हादाचा आस्वाद वाचकांस घेण्यास सांपडतो एवढेंच नव्हे, तर भगवच्चरित्रपठण करण्याचें पुण्यही सहजीं त्यांच्या पदरीं पडतें. अशा रीतीनें 'एक पंथ दो काज' ह्या न्यायानें ही जुनी कविता वाचणें वाचकांस प्रिय वाटतें. भगवच्चरित्राचें पठण करावें अशी भागवतधर्माची शिकवण आहे, तीही ह्याच हेतूनें. श्रीकृष्णाच्या चरित्रांतील लहानसहान प्रसंगांवर-विशेषतः बाललीलेवर-केलेलीं प्रेमळ गाणीं, आमच्या अशिक्षित बायाबापड्या देखील मोठ्या भक्तीनें म्हणत असतात, तें ह्याच भावनेनें. येथें जातां जातां हेंही सांगितलें पाहिजे कीं, श्रीकृष्णाच्या खोड्या, त्याची दृष्ट, वगैरेचें बरें-

चर्से काल्पनिक पण प्रेमळ वर्णन केलेलीं अशीं पुष्कळ गाणीं, शाळेंतील शिक्षणाचा गंध नसतांही, स्त्रियांनींच रचलेलीं असतात. असो. तात्पर्य काय कीं, 'इतर भाकडकथा ऐकण्यावाचण्यापेक्षां, विविध रसांनीं युक्त अशीं भगवंताचीं व त्याच्या विविधभक्तांचीं चरित्रें वाचलीं तर मुक्तीचा लाभ होईल' ही भागवतधर्माची शिकवण, आमची नैसर्गिक धर्मप्रवणता, व संत कवींची रसाळ कविता, ह्या त्रिवेणी संगमांतून बाहेर निघण्याची सामान्य वाचकांस इच्छाच होत नाहीं.

[३.] कीर्तनादि प्रसंगीं ही कविता आबालवृद्धांच्या कानावर येत असल्यामुळें ती त्यांच्या विशेष परिचयाची झाली; इतकी कीं, 'बोले तैसा चाले,' 'निश्चयाचें बळ' वगैरे तुकोबांच्या अभंगाचे चरण, 'भक्तिविना वश नोहे,' 'विश्वास खळीं न बरा' इत्यादि मयूरपंतांच्या कवितेंतील चरण, हे म्हणींच्या रूपानें भाषेंत सर्वतोमुखीं झालेले आहेत.

[४.] इंग्रेजी भाषेचा परिचय झाल्यानंतर, तिकडे कांहीं वर्षांपूर्वी उपस्थित झालेल्या 'पोप हा कवि होता कीं नाहीं' ह्या प्रश्नाचा अनुवाद करून 'मोरोपंत कवि होता कीं नाहीं' असा प्रश्न इकडेही कांहीं आंग्लविद्याविभूषित विद्वानांनीं उपस्थित केला होता. एका भाषेंतील ग्रंथाचें दुसऱ्या भाषेंत रूपांतर करणें हें कदाचित् दोन्ही भाषांवरील प्रभुत्वाचें द्योतक असेल, परंतु ती कवित्वाची खूण नव्हे, असें ह्या मंडळींचें म्हणणें होतें. अशा दृष्टीनें पाहिल्यास बहुतेक मराठी कवि 'कवि' ह्या पदवीस पात्र ठरले नसते. परंतु त्याच सुमारास कै० विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं, आपल्या सणसणीत पण विनोदप्रचुर भाषेनें, निबंधमालेमध्यें ह्या प्रश्नाची सांगोपांग चर्चा केली, आणि प्रतिपक्षीयांचे सर्व आक्षेप खोडून काढून 'मोरोपंत हा कवि होता' असा सिद्धांत प्रस्थापित केला. त्यामुळें एकंदर जुन्या कवितेविषयीं सामान्य जनांच्या मनांत असलेला आदर अधिक वाढला. तुकारामाच्या अभंगांचें इंग्रेजींत भाषांतर झालें व त्याची वहावा झाली ही गोष्ट देखील हा आदर वाढविण्यास कारणीभूत झाली.

वरील कारणांमुळें जुनी कविता सामान्य वाचकांस अधिक आवडते, व ह्या कारणांचा बहुतांशीं अभाव असल्यामुळें नवीन कवितेवर त्यांचें प्रेम जडत नाहीं; आणि 'महाराष्ट्र कविपरंपरा। खंड न पडला तिला जरा। उणीव रसिकांचीच परी। आज भासते खरोखरी।' अशी तक्रार करण्याचा आधुनिक कविवर्यांस प्रसंग येतो. श्रीसमर्थांनीं म्हटल्याप्रमाणें कवींचा अधिकार फार मोठा आहे. ते फक्त शब्दसृष्टीचे ईश्वरच नाहींत, तर ते आम्हांसारख्या सामान्य जनांचे मार्गदर्शक व उपदेशक आहेत. एखाद्या खुषमस्कऱ्याप्रमाणें वाचकांस हंसविण्याचें अगर त्यांचें मनोरंजन करण्याचेंच त्यांचें काम नसून, त्यांना 'शहाणे करून सोडण्याचें' ही त्यांचें काम आहे. अर्थात् त्याप्रमाणें समाजास गुरुस्थानीं असलेल्या कवींची माहिती आपणांस व्हावी अशी वाचकांची इच्छा असणें साहजिक आहे. परंतु हल्लींच्या कविवर्गापैकीं फारच थोडी मंडळी आपल्या खऱ्या नांवानें वावरतात. कोणाचा तरी अग्रज, अनुज, सुत, रमण अशा नांवांनीं अगर सरस्वतीमुकुटरत्न, सरस्वतीकंठाभरण वगैरे अभिमानदर्शक पदव्यांनीं मात्र ह्यांची लोकांस ओळख असते. ह्या कारणानें ह्या कवींच्या स्वतःच्या चारित्र्याचें लोकांवर वजन पडणें अशक्य असतें. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्' ह्या न्यायानें 'उपदेशकाच्या स्वतःच्या चरित्राशीं वाचकांस काय करावयाचें आहे? त्याचें म्हणणें ग्राह्य दिसल्यास त्याप्रमाणें वागावें' असें यावर कोणी म्हणतील. परंतु तें बरोबर नाहीं. स्वतः क्रियाशून्य असलेल्या मनुष्याच्या वाचाळपणापेक्षां 'आधीं केलें मग सांगीतलें' असें म्हणणाऱ्याचा एक शब्द देखील समाजाच्या मनावर अधिक परिणाम करितो. मद्यप्याच्या मद्यपाननिषेधावरील व्याख्यानापेक्षां मद्यास स्पर्श न करणाऱ्या गृहस्थाचें नुसतें दर्शन देखील जास्त परिणामकारी होतें. असो. तात्पर्य, कवींचा समाजाशीं प्रत्यक्ष परिचय नसणें हें नव्या कवितेचा प्रसार न होण्याच्या अनेक कारणांपैकीं एक मुख्य कारण होय.

आतां खुद्द कवितेचा विचार केल्यास तिकडूनही फारसा उपयोग होत नाहीं. आधीं नवी कविता बहुतेक सर्व लहान असते. श्लोक असल्यास दहापांच, कडवीं असल्यास दोन अगर तीन, ह्यापेक्षां मोठी कविता क्वचितच दृष्टीस पडते. असल्या काव्याच्या

अंगीं चिरस्थायित्व नसतें. असली लहान कविता, तिच्या अंगीं तसेच अद्भुत गुण असल्याखेरीज, चिरस्थायी होणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ, गोविंदाग्रजांची 'मुरली' अगर 'विचार.' पहिलीचा विषय आध्यात्मिक असून त्यास प्रेमसंवादाचें रूप दिलें आहे, व दुसरीचा विषय क्षुल्लक दिसला तरी त्यास तात्त्विक स्वरूप दिलें आहे. अशा रीतीनें परस्परांशीं सर्वथा विसदृश असल्या तरी ह्या दोन्ही कविता मनोहर झाल्या आहेत. अशा रीतीच्या कविता मागें पडणें अशक्य आहे, हें खरें. परंतु कालाच्या प्रवाहांत जड वस्तु तेवढ्या तळाशीं राहून बारीकसारीक वस्तु पार वाहून विस्मृतींत गडप होतील ह्यांत संशय नाहीं.

वर सांगितलेल्या प्रकारच्या कांहीं थोड्या चांगल्या कविता वगळल्यास बाकीची आधुनिक कविता साधारणच असते. सृष्टिवर्णनात्मक, तात्त्विक व शृंगारिक असे ह्या कवितेचे स्थूलमानानें तीन विभाग पडतात. पहिला, सृष्टिवर्णनात्मक कविता. जुन्या कवितेंत ह्या रीतीची कविता मुळींच नाहीं असा पुष्कळांचा आक्षेप आहे. संस्कृत कवितेंत सृष्टिवर्णनात्मक भाग पुष्कळ आहेत. वेदांतील उषा वगैरेचीं सूक्तें वगळलीं तरी, रामायणांतील व भारतांतील सृष्टिवर्णनाचे उतारे वाटतील तेवढे काढितां येतील. ऐहिक विषयांचें वर्णन करणें हा जुन्या मराठी कवींचा प्रधान हेतु नसल्यामुळें त्या कवितेंत मात्र सृष्टिवर्णन बेतानेंच आढळतें. असें असलें तरी, सृष्टिनिरीक्षण अथवा सृष्टिसौंदर्याशीं परिचय ह्या बाबतींत जुने कवि आधुनिक कवींपेक्षां तिळभरसुद्धां कमी नव्हते असें मानण्यास जागा आहे. सूर्योदय, सूर्यास्त, नदीचा पूर, वगैरेचे दृष्टांत दिलेले ज्ञानेश्वरींत पुष्कळ आढळतात. परंतु एकंदरींत पाश्चात्यांच्या कवितेप्रमाणें सृष्टिवर्णन जुन्या मराठी कवितेंत नाहीं हें निर्विवाद आहे. त्या पद्धतीवर आपलेकडे सृष्टिवर्णनात्मक कविता होणें इष्ट आहे ह्यांत संशय नाहीं. तथापि त्रोटक वर्णनापेक्षां एखाद्या कथाभागांत हें सृष्टिवर्णन आल्यास तें जास्त चिरस्थायी होईल असें वाटतें; कारण कथानुसंधानानें केलेलें सृष्टिवर्णन ध्यानांत राहण्यास सुलभ वाटतें.

ज्या कवितेंत अत्यंत खोल तात्त्विक विचार गूढ भाषेंत लिहिलेले असतात, त्या कवितेस उद्देशून 'तात्त्विक कविता' या शब्दाची या ठिकाणीं योजना केली आहे. 'कांद्याच्या अणीवर बसले तीन गांव, दोन ओसाड एक वसेचिना' असलीं कूटें,—ज्यांचा अर्थ 'सद्गुरूवांचूनि कळेचिना'—ज्याप्रमाणें जुन्या कवितेंत आढळतात, त्याच मासल्याची ही कविता असते. 'झपूर्झा' अथवा 'टला ट रीला री' ह्या कवितांसारख्या कांहीं कवितांस खरोखरी कांहीं अर्थ असेल कीं नाहीं याचीच आम्हांसारख्यांस शंका येते. अशा कवितांचा अर्थ 'विदुर्नान्ये तु मादृशाः' असेंच मल्लिनाथांच्या शब्दांनीं म्हणणें बरें. तत्त्वज्ञानरूपी आकाशांतील ह्या आपल्या भराऱ्या सामान्य वाचकांच्या बुद्धिरूपी दृष्टीच्या पलीकडे आहेत अशी जाणीव खुद्द कवींस देखील असते. परंतु 'तान्प्रति नैष यत्नः' हें उत्तर देऊन ते अशा वाचकांस स्वस्थ बसावयास लावितात. 'तुम्ही कोणी माझ्या नादीं लागूं नका,' 'मी वेडा आहें' असें हे आम्हांस वरचेवर बजावितात, व कांहीं प्रसंगीं आम्हांस सज्ञान करणें हें आपलें काम आहे हें विसरून ते आमच्यावर तीव्र वाग्वेत्राचाही उपयोग करावयास मागें पुढें पाहात नाहींत. ह्या कारणानें मुलांस धडा समजावून न सांगतां त्यांस झोडपीत सुटणारा मास्तर जितका विद्यार्थ्यांस तितकेच हे आम्हांस प्रिय होतात. संस्कृत ग्रंथभांडाराचीं कुलुपें तोडून त्यांतील सुविचाररत्नें आम्हां सामान्य जनांस वांटून देणारे, 'सकळांच्या पायां दंडवत' घालून कळकळीनें आम्हांस उपदेश करणारे, क्वचित् तीव्र शब्द वापरावेच लागले तर 'जग तरी आम्हां देव। परि हे निंदितों स्वभाव। येतो हिताचा कळवळा' असा अप्रत्यक्ष रीतीनें त्याबद्दल खेद प्रदर्शित करणारे, 'श्रोतीं क्षमा केली पाहिजे' म्हणून सांगणारे आमचे जुने कवि, आणि हे नवे कवि ह्यांची तुलना केल्यास त्यांमध्यें केवढा फरक दृष्टीस पडतो बरें! 'स्वप्राणांनीं तुतारी फुंकून' समाजास जागृत करण्याची इच्छा धरून जर क्वचित् एखाद्यानें 'ग्रोफणीनें' 'हाणाहाण' केली तर खपेल; पण नुसती हाणाहाण खपणार नाहीं. ज्या आमच्या समाजांत अद्याप शेंकडा ८० ।९० लोक निरक्षर आहेत त्या समाजांत ह्या जातीच्या कवितेपासून तादृश कांहीं उपयोग होण्याचा संभव नाहीं. लोकांची अभिरुचि बिघडली असेल तर ती अवश्य सुधारली पाहिजे, परंतु त्यांनीं

लोकांच्या मनोवृत्ति विनाकारण दुखविल्याच पाहिजेत असें नाहीं. ह्या तात्त्विक कवितेचा आणखी एक प्रकार आहे. तिच्यांत कवि ब्रह्मात्मभावाची प्रौढी मारीत असतो. 'करणें कांहीं उरलें नाहीं प्राप्य प्राप्त जाहलें' असें कवि सर्वांस बजावीत असतात. वैराग्याची खूण पूर्णपणें बाणल्यावर, आत्मानुभवाची प्राप्ति झाल्यावर, कदाचित् जी प्रौढी अधिकारी पुरुषानें मारली तर शोभेल, ती संसारसागरांत गटंगळ्या खाणाऱ्या कवीनें मारणें म्हणजे लहान तोंडीं मोठा घांस घेणें होय असें वाटूं लागतें. 'सर्व विश्वापेक्षांही मी मोठा आहें,' 'सर्वत्र आनंद भरलेला आहे' वगैरे सारखे उद्गार नेहमीं काढणें म्हणजे त्या शब्दांची किंमत कमी करणें होय. साहित्यसम्राटाची यथार्थ पदवी पावलेल्या डॉ. रवींद्रनाथांच्या गीतांजलींत, सत्यस्वरूप आपणांस कळावें ह्यासाठीं कवीच्या मनास लागलेली तळमळ स्पष्टपणें दृष्टीस पडते. ईश्वराचा अनुग्रह नसो, पण त्यानें शिक्षा केली तरी देखील ती आनंदानें सहन करण्याची आपली तयारी असल्याचें ज्याप्रमाणें डॉ. रवीन्द्रनाथांनीं कबूल केलें आहे; ईश्वरास सर्वस्व अर्पण करण्यास चुकलों ह्याचें आपणांस वाईट वाटत असल्याचें ज्याप्रमाणें त्यांनीं जाहीर केलें आहे; संसारपाशांतून सोडविण्याची ईश्वरापाशीं प्रार्थना करीत असतां, कदाचित् ही आपली प्रार्थना अमान्य तर होणार नाहींना अशी मनास भीति वाटते असें लिहून मनुष्याची संसारावरील आसक्ति जशी त्यांनीं व्यक्त केली आहे; त्या प्रकारची खरी तळमळ आपल्यास लागल्याचें कितीसे आधुनिक कवि कबूल करितात बरें ? नाहीं म्हणावयास रा. सा. कानिटकरांच्या कवितेंत मात्र अशी तीव्र इच्छा व्यक्त केलेली आढळते. बाकी जनकराजास शोभेल अशी प्रौढी मारणारेच कवि पुष्कळ आढळतात. असली कविता आम्हां सामान्यजनांस मार्गदर्शकत्वाचे कामीं निरुपयोगीच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. 'झपूर्झा' पेक्षां समजण्यास मात्र ही कविता सुलभ असते, ह्यामुळें तिच्याविषयीं फारसा अनादर कोणी दाखवीत नाहींत.

तिसरा विभाग शृंगाररसात्मक कवितेचा. सध्यांच्या काळीं ह्या शृंगारिक वाङ्मयास ऊत आलेला दिसतो. आधींच बिघडलेली लोकाभिरुचि असल्या वाङ्मयाच्या प्रसारानें अधिकाधिक बिघडत चालली आहे, व लोकांच्या मागणीप्रमाणें असलें वाङ्मय तितक्याच झपाट्यानें निर्माण होत आहे. विचारी लोक ह्यास केव्हां आळा घालणार असतील ते घालोत. कवींनीं तरी ह्या बाबतींत आतां आंखडता हात घ्यावा हें बरें. ह्या जातीची कविता मासिकांतून तूर्त पुष्कळच प्रसिद्ध होत आहे. विक्रमोर्वशींत ज्याप्रमाणें विरही नायकास जिकडे तिकडे प्रियाच दिसते, त्याप्रमाणें ह्या कवींस जिकडे तिकडे शृंगारिक विचारच दिसतात. अंतःकरणांत पवित्र विचार उत्पन्न करणाऱ्या उषःकालाचें वर्णन करितांना देखील 'प्रीतिच्या शालूचें फडकें' फडकावयाचेंच ! थकल्याभागलेल्या मनास विश्रांतिदायक मनोहर सायंकाळचें वर्णन वाचतांना कोणी तरी कोणाच्या तरी अंगावर गुलाल उधळलेला, अथवा कोणाच्या तरी चुंबनानें कोणाच्या तरी कपोलांवर उमटलेली लाली सांपडावयाचीच ! श्रीकृष्णाच्या लीला वर्णन करणाऱ्या भागवतकारांनीं वाचकांस पावलोंपावलीं बजाविलेलें असतें कीं, 'बाबांनो ! श्रीकृष्णांनीं केलेल्या ह्या क्रीडा विषयेच्छेनें केल्या नाहींत. पूर्णकाम परमेश्वरास त्या गोष्टीची जरूर नव्हती. फक्त विषयी जनांचें चित्त आपल्या चरित्राकडे ओढून घेण्यासाठीं त्यांनीं रासक्रीडेसारख्या गोष्टी केल्या.' असें आहे तरी त्या वर्णनास नाकें मुरडणारे सोंवळे लोक ह्या जातीची कविता थांबविण्याचें कसें मनांत आणीत नाहींत ह्याचें आश्चर्य वाटतें. 'लहानशी पिशवी चमड्याची-(किती भारदस्त शब्द हा ! ह्यापेक्षां 'लेदरची' म्हटलें असतें तर त्या शब्दाचे वर्ण तरी मृदु होते.) गळ्यांत घालुनि डौलानें' फिरणारा टपालवाला भेटला कीं त्यापाशीं प्रियेच्या पत्राची याचना ! दुसरा ध्यास नाहीं. प्रियेच्या नेत्रांच्या जागीं तारका अगर तारकांच्या जागीं प्रियेचे नेत्र बसवावेत, 'प्रेमवेडा' झाल्यामुळें वाटेल तें बोलावें, असा ह्या कवींचा उद्योग असतो. कित्येक कवितेंत तर ह्या वर्णनाचा इतका अतिरेक होतो कीं ती कविता चार सभ्य स्त्रीपुरुषांच्या समाजांत वाचण्याची देखील लाज वाटावी. 'नीज नीज लाडके' हें कीं असेंच कांहीं नांव असलेल्या कवितेंत 'लावुनी गाल गालातें वा नीज सुखानें देवी,'

'हृदयाला हृदयें मिळुनी जावीं' वगैरे शब्दांनीं ज्या गोष्टी पवित्र एकांतांतच होतात त्यांचें विस्तृत वर्णन करून कवींनीं चवाठ्यावर मांडलें आहे, व असली कविता मुलामुलींच्या हातीं जाण्यास योग्य अशा मासिकांत प्रसिद्ध होत असते.

शृंगारिक कवितेचे पुरस्कर्ते एवढ्यावरच थांबते तरी असो. याच्याही पुढें जाऊन पवित्र भगिनीप्रेम असलेल्या स्त्रीपुरुषांस देखील अशा चेष्टा करावयास कांहींनीं परवानगी दिली आहे. श्री॰युत रेंदाळकरांनीं 'मोहिनी' नामक काव्यांत नायक चंद्रचूड व त्याचें भगिनीप्रमाणें पवित्र प्रेम जीवर होतें ती नायिका मोहिनी, ह्या दोघांस 'लावुनि गाल गाल भिडवुनी– (नुसतें स्पर्शवुनि नव्हे !!) हृदया हृदय विमोहें (विशेष मोहानें कीं विगत मोहानें ?)' एकांतीं बसण्यास परवानगी दिली आहे. नायिका पतीच्या वक्षःस्थळीं शिर ठेवून एकांतीं निजली असतां त्या ठिकाणीं नायकास पाठवून त्याच्या हातानें तिला जागी केली आहे; व जागी होतांच तिचेकडून नायकास 'सोत्कंठ' आलिंगन देवविलें आहे ! व ह्या त्यांच्या कृत्याविषयीं कोणीं नापसंती व्यक्त केल्यास तो पापी, त्याचें मन घाणेरडें, असे शिव्याशापही त्यास देऊन टाकिले आहेत!! प्रस्तावनेंत, चौदा वर्षें रामचंद्र व सीता यांच्या सहवासांत राहून सीतेच्या नूपुरांखेरीज इतर अलंकार न ओळखतां येणाऱ्या लक्ष्मणास वेडगळांत काढणाऱ्या कवींची पवित्र प्रेमाची ही व्याख्या रसिकांस पसंत पडत असली तरी आम्हांसारख्या सामान्य वाचकांस ती आवडत नाहीं. मेरी कॉरेलीसारख्या विदुषी विवाहसंबंध देखील निवळ शारीरिक सौंदर्यास भुलून न होतां 'आंतरः कोपि हेतुः' अशा अनिर्वचनीय अंतर्गत प्रेमानें व्हावेत व त्यांत कामोपभोग अगदीं गौण असावा असें आपल्या ग्रंथांतून प्रतिपादीत असतां, इकडे आमचे कवि पवित्र बंधुभगिनीप्रेमानें आकृष्ट झालेल्या स्त्रीपुरुषांच्या शारीरिक चेष्टांचें वर्णन करण्यांतच धन्यता मानीत आहेत हें आमचें दुर्दैव होय. असो. असली कविता केव्हांही आमचेसारख्या साध्याभोळ्या मंडळीस आवडणें कठीण आहे.

येथवर 'हें नको तें नको' म्हटल्यावर मग 'पाहिजे काय ?' हें सांगण्याची जबाबदारी लेखकावर ओघानेंच येते. ह्याकरितां तें थोडक्यांत सांगून, अजमासाबाहेर लांबलेला हा पहिला भाग आटोपता घेऊं.

वर सांगितलेंच आहे कीं जुन्या कवींनीं आमच्या संस्कृत ग्रंथांतील सर्व तऱ्हेचे विचार आपल्या मराठी कवितेंत गोंविले, त्याप्रमाणें आमचे आधुनिक कवि जर पाश्चात्य वाङ्मयांतील सुंदर विचाररत्नें आपल्या सुंदर भाषेनें मराठींत आणितील तर तें आम्हांस नकोसें नाहीं. त्याचप्रमाणें, पाश्चात्य पद्धतीनें विचार ग्रथित केलेल्या स्वतंत्र कविताही निर्माण झाल्यास भाषेस शोभा येईल. परंतु भाषेच्या दुर्दैवानें गद्यांत अथवा पद्यांत ह्या रूपांतराची मजल प्रेमकथांच्या पुढें गेलेली आढळत नाहीं. इंग्रजी कवींची स्वदेशभक्ति, त्यांचे अंगीं असलेला स्वाभिमान, त्यांच्या कवितेंत दिसून येणारी ओजस्विता, ह्या त्यांच्या सद्गुणांस आपल्या कवितेंत आणण्याचा नवीन कवींनीं जरूर प्रयत्न करावा. Britons असें आपणांस म्हणविण्यांत, Brittania चीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत, त्यांना केवढी प्रौढी वाटते ! इतिहासांतील प्रसिद्ध व्यक्तींच्या चरित्रांतील निरनिराळ्या प्रसंगांवर केलेल्या त्यांच्याकडे कविता आहेत. तेंच आमचेकडे पहा. सबंध हिंदुस्थानचा तर राहोच पण एकट्या महाराष्ट्राचा उपलब्ध असलेला इतिहास घेतला तरी त्यांत सुप्रसिद्ध मुत्सद्दी, योद्धे, पतिव्रता व शूर स्त्रिया, किती तरी सांपडतील. त्यांपैकीं कितीकांच्या चरित्रांवर आधुनिक कवींनीं काव्यें केलीं आहेत? ह्या इतिहासास कादंबरीलेखकांनीं थोडा थोडा हात लाविला आहे. परंतु कवींनीं तिकडे ढुंकून देखील पाहिलेलें दिसत नाहीं. फार कशाला? आपल्या मायदेशाचें स्तुतिस्तोत्र कितीशा कवींनीं गायिलें आहे? मध्यंतरीं बंगाल्यांतील चळवळींच्या लाटेबरोबर इकडे आलेल्या बंगाली 'वंदे मातरं' चें मोडकेंतोडकें रूपांतर एवढीच काय ती भरतभूमीच्या स्तुतिपर कविता दिसते. ह्यासाठीं एकंदर कविवर्यांस आमची अशी प्रार्थना आहे कीं, 'महाराज ! हें आलस्य पुरे. कै. 'केशवसुतां'नीं ज्याप्रमाणें तुतारी फुंकली त्याप्रमाणें तुम्हीही तुताऱ्या फुंका, व समाजास जागृत करा. सतारबीन यांसारखीं चैनीचीं वाद्यें–तुमचीं युवकयुवतींचीं गाणीं–आतां पुरे झालीं. आमच्या जुन्या कवींनीं आध्यात्मिक वाङ्मय निर्माण करून समाजजागृति केली, तुम्ही ती ऐतिहासिक वाङ्मयानें करा.

शाहिरांच्या पोवाड्यांहून उच्च दर्जाच्या कवितेस आतां इतिहासानें सुशोभित करा. ऐतिहासिक महापुरुषांचें काव्यवर्णन केल्यास त्या महापुरुषांचें व कवींचेंही नांव अजरामर होईल, व लोकशिक्षणाचें पुण्य पदरीं पडेल; असा यांत तिहेरी फायदा आहे. रामायणमहाभारतामुळें वाल्मीकि, व्यास यांचीं नांवें अजरामर झालीं नाहींत काय? त्याचप्रमाणें तुमचींही होतील. काव्यरचनेस अनुकूल अशी शृंगार, वीर वगैरे रसांचा परिपोष होण्यासारखी सामुग्री आमच्या इतिहासांत भरपूर आहे. तिचा उपयोग करा, आणि उत्तमोत्तम ऐतिहासिक काव्यें अहमहमिकेनें निर्माण करा, म्हणजे तुमची कविता निःसंशय लोकप्रिय व लोकोपयोगी होईल. ही विनंती सत्कवि मान्य करोत. येथवर पहिला भाग झाला.

यमकांचा प्रश्न गौण असला तरी अगदींच टाकाऊ नाहीं. इंग्रेजीत व संस्कृतांत निर्यमक कविता असते म्हणून मराठींत ती असलीच पाहिजे असें नाहीं. प्रत्येक भाषेला तिचें स्वतःचें असें विशेष लक्षण असतें. तसें मराठीचें यमक हें विशेष लक्षण आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. लहानसान म्हणींत देखील हीं यमकें दृष्टीस पडतात. लहान मुलांमुलींच्या अर्थशून्य गाण्यांत, 'अमडक चमडक डामाडु डामाडुचा पंचाडुं'त देखील हें यमक प्रामुख्यानें दृष्टीस पडतें. इतर भाषेंतील विचार आमच्या भाषेनें उसने घेतले, संस्कृतासारख्या भाषेंतील पुष्कळ शब्दांचा जरी आमच्या भाषेंत आम्हांस अंतर्भाव करणें भाग पडलें, तरी हें यमकाचें विशिष्ट लक्षणरूप स्वातंत्र्य आम्हीं अजीबात नामशेष होऊं द्यावें हें रास्त नाहीं. ही एक गोष्ट झाली.

दुसरी गोष्ट अशी कीं, यमक हा एक शब्दालंकार आहे. एका अर्थी गद्यांतील विचार छंदोबद्ध करणें हाही शब्दालंकारच होय. जें कर्णमाधुर्य छंदोबद्ध वर्णरचनेनें साधावयाचें असतें, त्यास यमकासारख्या अलंकारांनीं मदत होते. अर्थात् अशी मदत जितकी मिळेल तितकी मिळवावी हें प्रशस्त होय. सुंदर स्त्री अलंकारांवांचून देखील शोभते, म्हणून ज्याप्रमाणें सुंदर स्त्रियांस—कोपागारात निजलेल्या कैकयीप्रमाणें—मुक्तकेशा मलिनांबरा ठेवणें बरोबर नाहीं, त्याचप्रमाणें विचार सुंदर असले म्हणून ते कर्णकटु शब्दांनींच व्यक्त केले पाहिजेत, असा आग्रह धरणें योग्य नाहीं. मोरोपंतांचीं कांहीं आर्यार्धें, उ० काचस्मृतिरपि तापासि मैवं प्रलपात्र भूभुजः सदसि। ब्रूयात्क्षमी गभीरोसीति बत युधिष्ठिरं प्रभुं को न ॥ अशीं निवळ संस्कृतांत असल्यामुळें प्राकृत वाचकांस दुर्बोध असतात म्हणून साधी कविता करावयाची, ह्या सदिच्छेचा अतिरेक झाल्यामुळें केलेले 'सदॉर मोठा बहिर्जी,' 'भल्या जाड मीशा भले लठ्ठ दंड' हे, अथवा 'बोंबाबोंब' यासारखे शब्दप्रयोग ज्याप्रमाणें रम्य वाटत नाहींत, त्याचप्रमाणें 'वंशी नादनटी' ह्या कवितेंतील यमकाच्या वामनाच्या 'टी पाटर्या' झोडून कंटाळा आला म्हणून अगदीं निर्यमक कविता कानांस गोड लागेल असें नाहीं. विसर्ग, अनुस्वार, प्रत्यय, संधिनियम, यांच्या प्राचुर्यामुळें संस्कृत भाषेंत समयक कविता फारशी शक्य नसली तरी, शब्दालंकाराची हौस संस्कृत कवितेंत थोडी थोडकी दिसते असें नाहीं. क्षेमेंद्र नांवाच्या कवीनें 'औचित्य-विचार-चर्चा' नांवाचें एक प्रकरण लिहून, त्यांत कोणता रस वर्णन करीत असतां कोणता छंद योजावा याबद्दलचे नियम घालून दिले आहेत. त्याचप्रमाणें छत्रबंध, नागबंध, वगैरे बंध, एकाक्षरी, द्व्यक्षरी वगैरे कविता, संस्कृताइतक्या दुसऱ्या कोणत्याही भाषेंत सांपडणार नाहींत. असे अलंकार करण्याच्या नादांत अर्थहानि होतां कामा नये, हें कवीनें ध्यानांत ठेविलें म्हणजे कवितेस गौणत्व येत नाहीं. यमकें नकोत म्हणणाऱ्या कवींचा मुख्य भर काय तो ह्याच मुद्द्यावर विशेष असतो. त्यांना वाटतें यमकें करण्यानें कवीस बंधन होतें, व त्यामुळें त्याच्या वाग्वधूस स्वैरपणें विहार करतां येत नाहीं. परंतु असें म्हणणें चुकीचें आहे. सर्व चरणभर यमकें थोडींच साधावयाचीं असतात! शेवटच्या एका अक्षरापुरती काय ती नड. बाकी एकंदर चरण वाग्वधूच्या विहारास मोकळाच असतो; शिवाय गद्यांतून पद्यांत विचारांचें परिवर्तन करणें हें नव्हे का बंधन? जेव्हां एक बंधन पत्करिलें तेव्हांपासून अडचणीला सुरवात झालीच. त्याचप्रमाणें एकाच वृत्तांत चार चरण तयार करणें हेंही बंधन नव्हे काय? एकादा चरण स्रग्धरेंत तर दुसरा वसंततिलकेंत, अशी स्वैर रचना कां करीत नाहीं? हें काय थोडें त्रासदायक आहे? आणि खरें म्हटलें तर असल्या अडचणींतून पार पडून समाधानकारक काम करून दाखविणें यांतच खरी मौज आहे. ज्यांना सरळ मार्गच पाहिजे

असेल त्यांस गद्य बापडें मोकळेंच आहे. यमकांसारखीं आणखी कांहीं बंधनें निर्माण करून त्यांतूनही पार पडेल तोच कर्तबगार रचनाकार. मोरोपंतांनीं अशीं किती तरी बंधनें निर्माण करून त्या सर्वांतून पार पडून दाखवून वाचकांकडून शाबास म्हणवून घेतलें आहे. 'दामरामायणां'तील हाराची कल्पना, 'परंतुरामायणां'-तील 'परंतु' या शब्दाचा उपयोग प्रत्येक आर्येंत झालाच पाहिजे अशी तिची रचना करण्याची शैली, 'निरोष्ठ रामायणां'तील सर्व वर्ण निरोष्ठ योजण्याची हातोटी, ह्या गोष्टी कवीच्या रचनाचातुर्याची साक्ष देतात. हें चातुर्य आपआपल्यापरी जितकें दाखवितां येईल तितकें दाखवावें हें उत्तम. पण दुसऱ्यानें दाखविलेलें पाहून 'उंः त्यांत काय आहे!' अशी त्याची अवज्ञा करणें अगर 'आंबट द्राक्षांच्या' न्यायाप्रमाणें तें वाईटच आहे असें म्हणणें हें मात्र चांगलें नाहीं. नुसते विचार व्यक्त करावयाचे ते ओबड धोबड भाषेंत देखील व्यक्त करतां येतात. 'सत्यं वद,' 'धर्मं चर' अशांसारखीं सूत्रमय वचनें धर्माचा व सदाचाराचा उपदेश करीत असतां, तोच उपदेश ज्यांत गर्भित आहे अशीं नाटकें अगर इतर कल्पित पुस्तकें कां रचावींत? त्याच रीतीनें एखाद्या काव्याचें तात्पर्य काढिल्यास तें चार ओळींत सांगतां येण्यासारखें असतें, असें असतांही त्याचा केवढा विस्तार त्यांत केलेला असतो? हें सर्व ज्या हेतूनें करावयाचें तोच हेतु यमकादि बंधनें निर्माण करण्यांत आहे, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. गोधड्या पांघरून शीतनिवारण होतें, म्हणून शालजोड्या पांघरायाच्या कोणीं टाकिल्या आहेत काय? म्हणून कोणी असा प्रश्न करितो काय कीं, 'काय हो! शीतनिवारणास जरीच्या कांठांची व नकशीची काय आवश्यकता आहे?' मग असला विसंगत प्रश्न कवितेच्या बाबदींतच कां पुढें यावा? तात्पर्य, मनुष्य अलंकारप्रिय असल्यामुळें ज्या जातीचे अलंकार मिळतील त्या जातीच्या अलंकारांनीं आपल्या आवडत्या वस्तु सुशोभित करणें हें कोणासच वेडेपणाचें वाटत नाहीं. ह्याच न्याय सुंदर विचारास सुंदर शब्द व कर्णमनोहर रचना यांची जोड देण्यांत आहे.

यमकांनीं ध्वनिसादृश्य उत्पन्न होतें हा एक त्यांचा गुण आहे. गायनांत ज्याप्रमाणें गवयानें कितीही ताना मारिल्या, परंतु निघालेल्या स्वरापाशीं परत येतांना चूक केली तर जसा गाण्याचा विरस होतो, त्याचप्रमाणें चरणाच्या शेवटीं तेंच अक्षर न आल्यास विरस होतो. कविता ही गेय आहे. अर्थशून्य 'तोम् दरदरतानोम्' सारखे शब्द देखील निरनिराळ्या रागांत अगर चालींत म्हटल्यास त्यायोगें मनास आनंद वाटतो; मग सार्थ शब्द अर्थास अनुरूप चालींवर म्हणतांना ऐकावयास आनंददायक होणार नाहींत काय? तात्पर्य, श्रवणसुखाच्या दृष्टीनें जी गायनांत अस्ताईची, तालांत समेची, तीच कवितेंत यमकांची किंमत आहे. गवई कितीही उत्तम असला तरी ज्याप्रमाणें ठेक्याशिवाय गाण्यास रंग चढत नाहीं, त्याप्रमाणें यमकरूपी ठेक्याशिवाय काव्य गोड लागत नाहीं.

आणखी एका दृष्टीनेंही यमकांची जरूरी भासते. समजा, एकानें एक कमान काढिली. तिचें एक अंग एका तऱ्हेचें व दुसरें दुसऱ्या तऱ्हेचें काढिलें, तर ती कमान चांगली दिसेल काय? नाहीं. तिच्या दोन्ही (डावी व उजवी) बाजू एकसारख्या पाहिजेत. तसेंच कांहींसें यमकांचें आहे.

काव्य ही वाचकांस मेजवानी आहे. निव्वळ क्षुधाशांति ही मेजवानी नव्हे. मेजवानीस उत्तम पक्वान्नें रसनातुष्टीकरितां, उदबत्त्यांचा घमघमाट घ्राणेंद्रियाकरितां, रांगोळ्यादिकांचा थाटमाट नेत्रांकरितां, वाजंत्र्यांचे मंजुळ स्वर कानांकरितां, शीतळ उट्या व वाळ्याच्या पंख्याचा वारा तापनिवारणाकरितां, अशा रीतीनें सर्व इंद्रियांसाठीं एकसमयावच्छेदेंकरून सुखप्राप्ति करून देणारी सामग्री पाहिजे. क्षुधाशांति शिळ्या भाकरीनें देखील होते. तरी जसे हे अवांतर पदार्थ मेजवानीस अवश्य वाटतात, त्याचप्रमाणें, काव्यांत सर्व उत्तमोत्तम गुणांचा मिलाफ पाहिजे. हें कशाला, तें कशाला, असें म्हणणें अरसिकपणाचें दर्शक होय. उत्तम कविकल्पना, सुंदर कर्णमनोहर शब्द, गोड चाली, यमकें, सर्व कांहीं पाहिजे.

सारांश, नव्या कवितेंत ऐतिहासिक काव्यांची भर पडावी, व रचनेंत यमकांचा कंटाळा करूं नये, अशी लेखकाची,—सामान्य वाचकवर्गांतील एकाची,—विद्वज्जनांस नम्र प्रार्थना आहे. ती ते मान्य करोत, व अधिक उण्या शब्दाबद्दल त्यास क्षमा करोत.

नियमक कवितेचा अर्ज.

[शार्दूलविक्रीडित]

सारे सुज्ञ रसज्ञ आज जमलां साहित्यसंमेलनीं ।
युष्मद्दृष्टिसमोर निर्यमक मी आहें उभी या स्थळीं ॥
सांगा सत्य तरी विशोभित खरी मी वाटतें का परी ।
ऐकाया तुमचा विचार बहु मी उत्कंठ आहें अजी. १

प्रासांचा मज त्रास तो न गमतो, ते होति कीं ऐच्छिक।
होताती मज शृंखलाचि यमकें आवश्यकत्वास्तव ॥
इच्छेनें मज वाटतील जितके जे जे बरे दागिने ।
ते ते घेइन, कां विशिष्ट नार्गि ते अत्याग्रहा दाविती ? २

गीर्वाणी जननी मदीय यमकांवांचूनि रम्या दिसे ।
कां मी मात्र असुंदरा अरुचिरा वाटे रसज्ञां जनां ॥
दोषी लेश नसेचि निर्यमकता, कर्णांस दोषी गणा ।
रूढिग्रस्त समस्त लोक म्हणुनी ते दूषिताती मला. ३

केका संस्कृतवेष देउनि पहा ती केविं रूपान्तरें, ।
एकीला यमकें, दुजीस नलगे आवश्यकीं कां बरें ? ॥
कानांला सवई अनिष्ट जडल्या त्या पाहिल्यावीण कीं।
कां रीती नव दूषितां बसवुनी रूढी जुनी मस्तकीं ? ४

अंबाडा वरिती स्त्रिया त्यजुनियां वेणीस चक्राकृती ।
घेती सुंदर पोलका बघुनियां चोळी त्रपेला थिटी ॥
लेणें नाजुक घालती त्यजुनियां त्या लठ्ठ गोटांप्रती ।
सारासारविचार मीच मग कां दावूं नये संप्रतीं ? ५

जैशा सांप्रत सांखळया न रुचती बायांस त्या बोजड ।
तैशी ही यमकावलीहि चरणीं माझ्या रुते संतत ॥
जाणा ज्यापरि जोडवीं, यमकही एकाक्षरी त्यापरी,।
पादान्ता करितात हीन कधिं तीं दोन्हीहि थोडें तरी. ६

जैशा कर्मठ बायका निशिदिनीं प्राणाधिकालंकृती ।
सोसानें जड सांखळयाहि सहती, कीं जोडवीं घालिती ॥
तैशा रूढिवशा विवेकविधुरा कांहीं कवींच्या मतीं।
सोसानें गतिरोधकारि यमकां अत्याग्रहें सेविती. ७

पाशांनीं यमकांचिया मुकतसे सद्वृत्त सुश्लोकही ।
वैदर्भी शुभ रीतिला, गुणरसा, कीं रम्य अर्थाप्रती ॥
पुण्यश्लोक सुवृत्त जेविं मुकला तो अक्षपाशोद्यमीं ।
वैदर्भी दयितेप्रती, निजसुखा, संपन्न राज्याप्रती. ८

होत्यें आजवरी अनाथ विजनीं, त्या एकनाथें परी—
धैर्यें शीघ्र सनाथ कीं करुनियां प्रेमें जनीं आणिली ॥
नागेशादिकही मदीय असती ते पाठिराखे जगीं ।
माझे भक्त न होति काय आजि ह्या साहित्यसंमेलनीं ? ९

होतीं व्यर्थ अवाळुतुल्य यमकें श्रीमम्मटाच्या मतें ।
शस्त्रें जेविं अवाळु, तेविं यमकें नाशा सुदीर्घोद्यमें ॥
तैं होईल निकोप देह मम हा, आत्मा प्रसादें युत, ।
तैं नैसर्गिक कल्पना-रसवती मोहीन सर्वांप्रत. १०

कानीं लागुनि लागुनी सयमका ती मत्सपत्नी पहा ।
नेत्रीं नाचुनि नाचुनी निशिदिनीं ही भूषणीं गर्विता ॥
लोकांचें मन मद्विरुद्ध विटवी अद्यापि ही दुःसहा ।
बाह्यांगास हिच्या भुलूनि मुकती अंतःसुखा माझिया. ११

माझ्या शैशविं तेविं नृत्यसमयीं संगीतकीं शोभलीं ।
माझीं सुंदर नूपुरें सुयमकें स्वाभीष्टकाळीं भलीं ॥
आतां तीं शिशुनूपुरें मम पुरे, घ्या मोद अर्थें रसें ।
स्त्रीतें प्रौढ वयांत नूपुरझणत्कार त्रपा देतसे. १२

हो एकाक्षरि नित्य हें यमक का होवो अनेकाक्षरी ।
हो सौवर्ण, तथापि बंधनचि हें स्वातंत्र्यनाशा करी ॥
नाणी विघ्न समुन्नतीत, समजा तेंची बरें बंधन ।
शोभा निर्यमकांत त्यांसचि दिसे जे रूढिरान्ध्यंध न. १३

कांहीं लोक जसे सदैव करिती स्त्रीपारतंत्र्यस्तुती ।
तैशी ही यमकाख्यबंधनतुती वाटे मला संप्रती ॥
होती आपण दास, ठेविति सदा दास्यामधें स्वस्त्रिया।
सांगूं काय मलाहि पाहति अजी दास्यांत ठेवावया ! १४

निर्भूषा युवती सुरेख तरि हो सुज्ञीं तिचा आदर ।
आहें निर्यमका तशी, तरि मला कां मानितीं ना बुध ॥
जाणा निर्यमका तशी सयमका, उत्कृष्ट दोघी जरी ।
लेणें ऐच्छिक जाहल्या यमक हें मानेल एकाक्षरी. १५

माझी शक्ति सुयोग्यता न बघतां निंदाल मातें जरी ।
माझे भक्तहि निंदितील तुमची ती एकदेशी रुची ॥
व्हा न्यायी, कविता.बघा अयमका अन्यांचिया भूवरी ।
दास्यातें यमकांचिया न करितां ठेवा रुची ती शुची. १६

नाहीं आधुनिकांस शक्ति यमकीं, मानूं नका अल्पही ।
दीर्घेंही यमकें असाध्य न तयां, वार्ता लघूंची किती ॥
माझी हो सहजा गती न विकला,ओघा न यो विघ्न वा ।
अंतःसुंदरतेकडे जन वळो. सदैव हे [illegible]

झाला नियमकांस यद्यपि अजी आरंभ थोडा तरी, ।
भावी अभ्युदयास सूचवितसे उद्योग हा चांगला ॥
या उत्साह अशा कवीस नितराम् सोडूनि मिथ्याग्रहा ।
हा सारस्वत मार्ग मी क्रमिन तैं वेगें अविघ्नें पदें. १८

विद्यासागर सुज्ञ तोहि चुकला, तत्रापि मागाहुनी ।
मायकेलें मधुसूदनें वळविला माझ्याकडे तो क्षणीं ॥
होते अन्य विरुद्ध तेहि वळले, तैसे वळा सत्वरें ।
जो तेथें इतिहास तोच इकडे होणार जाणा खरें. १९

* * *

शार्दूलीं युवती बसूनि करिती लीला जशा क्रीडनीं ।
या क्रीडोत तशा मदीय कविता साहित्यसंमेलनीं ॥
प्रीतिप्रेरित युक्तियुक्त अशि हीं शार्दूलविक्रीडितें ।
वेगें तुष्ट करोत सुज्ञहृदयें, हृष्टी मनें लज्जितें. २०

के. वि. फणसे.

मराठी साहित्य व स्त्रिया.

(लेखिका—श्री० सौ० कमलाबाई किबे.)

मध्यमवर्गातील माणसांला कष्टकारक कामें करतांना दिवस केव्हां निघून जातो तें कळत देखील नाहीं. कांहीं वेळ सांपडलाच तर जात्याच आमच्या लोकांत वाचनाची अभिरुचि कमी, आणि पुस्तकें खरेदी करून वाचण्याची बुद्धि तर मुळींच नाहीं. फुकट पुस्तक मिळालें, तर त्याच्याकडेही एकदम दृष्टि जाणें कठीणच. कारण वेळ असतो कुठें आम्हांला वाचावयास? काम करतां करतां जीव नकोसा होतो. जरा विश्रान्ति घ्यावी म्हटलें तर वेळ नाहीं. पुस्तकें वाचावीं तरी केव्हां? वाचावीं तर तींही जवळ हवींत कीं नकोत? तीं विकत घ्यावीं तर पैशाचा अभाव. मागावीं तर कोणी देत नाहींत. लायब्ररींत शोधावीं तर मराठी पुस्तकांचा विशेष भरणा असलेल्या लायब्ऱ्यांचाच दुष्काळ. वाचक नाहींत म्हणून प्रसिद्ध होणारीं पुस्तकें रद्दीच्या भावानें विकावीं लागतात, म्हणून छापखानेवाल्यांची व बुकडेपोवाल्यांची ओरड. यांत सत्यांश नाहीं असें नाहीं. केव्हां केव्हां एकादें विशिष्ट पुस्तक फुकट मिळालें, तर मात्र वाचनाची हौस अनावर. पण अशा ठिकाणीं पुस्तक जसेंच्या तसें परत झालें अशीं उदाहरणें क्वचित्. अधिकाची आशा करणें म्हणजे वाळूच्या मैदानांत सुंदर गृह बांधण्यासारखेंच हास्यास्पद होय. भारतवासीयांनो! प्रत्येक स्थितींत शान्तता धरा—भविष्यकाल खास उत्तम येणार त्यावर विश्वास ठेवून सध्यां कोणत्याही चळवळींत न पडतां घोरत पडा—एकाद्या नशेबाजाप्रमाणें भविष्यकालच्या सुखस्वप्नामध्यें गुंग होऊन रहा—म्हणजे काम करण्याला तुम्हाला नवा उत्साह व नवी स्फूर्ति येईल! मग, या सर्वांचें मुख्य साधन जें वाचन त्याची तुमची स्वप्नींही गांठ कां नसेना! जगांतील अनेक विषयांनीं पूर्ण भरलेलें तें पुस्तकही तुमची उत्सुकतेनें व आशाळभूत दृष्टीनें वाट पाहात असतें. पण तें बाहेरून निर्जीव दिसणारें जिवंत पुस्तक तुम्हांला घरबसल्या नानातऱ्हेची माहिती हवी तेव्हां द्यावयास तयार असतें. हवी तेव्हां हव्या त्या गोष्टीसंबंधीं माहिती पुरविण्याचें काम त्या

बिचाऱ्या पुस्तकाच्या अंगवळणीं पडलेलें असतें; व तें चोखपणानें तें बजावतेंही. त्याला आळस कधीं शिवत नाहीं. वाचकानें दुर्लक्ष केलें तरी त्याचा तें तिरस्कार न करतां प्रेमळ व मोहक दृष्टीनें तें जवळून जाणाऱ्या माणसाकडेही बघत असतें; व कोणीं त्याचा स्वीकार केला तर त्याविषयीं त्याच्या मनांत केवढा आदर, केवढी सहानुभूति उत्पन्न होईल ! त्या पुस्तकामध्यें भरलेलें अपार व अगाध ज्ञानभांडार तें पुस्तक आपणास देण्यास तयार असतां त्याला दूर लोटणें म्हणजे केवढी शरमेची गोष्ट आहे ! म्हणजे कल्पवृक्षाखालीं बसून दरिद्री तो दरिद्रीच. प्रवाशाला अल्पकाल छाया देणारें इतर झाडांप्रमाणें हेंही एक झाड आहे, एवढेंच त्या माणसाला वाटणार. अगदीं वरच्याप्रमाणें आमच्या समाजाची स्थिति आहे. शिवाय त्याला योग्य दिशेनें वळण लावणारे उत्तम लेखकही कमीच आहेत. असें म्हणण्याचें मी धाडस करतें खरें, पण याबद्दल मला आपण क्षमा कराल अशी आशा आहे. अलीकडे कुठें वाचनाभिरुचि थोडी उत्पन्न झालेली आपल्या समाजांत दिसते. अशा वेळीं प्रत्येक स्त्रीपुरुषांचे हातीं पडणारें साहित्य वरिष्ठ दर्जाचें असावयास पाहिजे. तें योग्य नसल्यास समाजाच्या बाल्यकालींच त्याला वाईट वळण लागून त्याची हानि व्हावयाची. ही हानि न होऊं देण्याची जबाबदारी या परिषदेच्या प्रत्येक प्रतिनिधीवर आहे. हें जबाबदारीचें कर्तव्य त्यांनीं विकार सोडून न्यायबुद्धीनें, एकोप्यानें व पुढील पिढ्यांचें कल्याण करण्याच्या उद्देशानें बजाविलें पाहिजे. स्त्रियांच्या हातीं द्यावयाचीं पुस्तकें विशेषत: त्यांच्या मनोविकारांला वळण लागेल, त्यांचें मन सुसंस्कृत होईल, अशींच असलीं पाहिजेत; व अशाविषयीं वेळींच काळजी घेतली पाहिजे. कारण प्रत्येक पुस्तकाचा आपल्या मनावर कांहीं तरी ठसा उमटतोच. चांगल्याचा चांगला तर वाइटाचा वाईट. स्त्रियांच्या जात्याच कोमल अंत:करणावर हा ठसा तर ताबडतोब उमटतो. जर एकाद्या नामांकित ग्रंथकारानें स्त्रियांनीं वाचावयाच्या पुस्तकांची निवड करून त्यांची याद प्रसिद्ध केली तर त्याचे महाराष्ट्रीय स्त्रीसमाजावर अगणित उपकार होतील. हें काम कालावधीवर टाकणें हानिकारक आहे. समाजाचा मुख्य आधार स्त्रिया आहेत. त्यांची सर्वांगसुधारणा करण्याचें काम परिषदेचें आहे. तें तिचें मुख्य कर्तव्य आहे.

दर वर्षीं इतकीं पुस्तकें प्रसिद्ध होतात, मासिकें निघतात, त्यांचें नियमानें वाचन करणाऱ्या स्त्रिया आपल्या समाजांत किती आढळतील ? ही स्थिति चांगली नाहीं. सर्व पुस्तकें एकदम वाचणें अशक्य आहे, हें मी जाणून आहें. पण त्यांतल्या त्यांत सवड काढून वाचल्यास त्यांपैकीं बरींच वाचतां येतील. आपल्या शिक्षणानें फुगून जाऊन, मराठींत वाचण्यासारखें आहे काय ?—असें म्हणून केवळ इंग्रजी नॉव्हेल्सच वाचण्यांत दंग झालेल्या स्त्रिया मराठींतील उत्तमोत्तम ग्रंथरत्नांना मुकतात, ही मोठी कींव करण्याजोगी गोष्ट आहे. क्षुद्र शिक्षणानें व कोत्या विचारांनीं फुगून जाणाऱ्या असल्या आम्ही स्त्रिया आमच्या कोमल अर्भकांना आदर्शभूत अशा माता होणार, ही

केवढी शोचनीय गोष्ट आहे! या गोष्टीवर इतका जोर देण्याचें कारण असें कीं, एका प्रमुख संस्थेंतील एका शिक्षकिणीला मीं एकदां प्रश्न केला, " आपल्या शाळेंत मुख्य मुख्य धार्मिक ग्रंथांचें वाचन चालतें काय ?" यावर त्या बाईंचें चटकन् उत्तर आलें. "इतर विषय व संस्थेचें काम करून वेळ मिळेल तेव्हां असले ग्रंथ वाचावयाचे." हें उत्तर ऐकून मी स्तब्धच राहिलें. मला तें पसंतच पडेना. मी तिच्याकडे आश्चर्यानें पाहातच राहिलें. ज्या शिक्षकिणींना धर्माविषयीं एवढा आदर त्या मुलींना धार्मिक शिक्षण कसचें देणार ? श्रद्धेनें नाहीं तरी सुंदर पुस्तकें म्हणून जरी रामायण व महाभारत हे ग्रंथ वाचले, तरी पुष्कळच फायदा होणार आहे. सुशिक्षित स्त्रियाच जर या राष्ट्रीय ग्रंथांची इतकी हेळसांड करूं लागल्या, तर बिचाऱ्या अशिक्षित स्त्रियांविषयीं तर बोलावयासच नको. पुराणाचा जसा तिटकाराच. तेव्हां तोही मार्ग बंदच. असा राष्ट्रीय गुणांचा ज्या स्त्रियांत अभाव त्या स्त्रियांच्या मुलांत तरी ते गुण कसे येणार ? मग त्यांच्यांत मातृभाषेची सेवा करण्याची इच्छा उत्पन्न व्हावी कशी ? तर असें न करतां लहान मुलांच्या मनांत मातृभाषेविषयीं प्रेम उत्पन्न केलें पाहिजे. रा. वासुदेव गोविंद आपट्यांचीं पुस्तकें प्रथम मुलांकडून वाचविलीं पाहिजेत; नंतर लिमयांचीं, नंतर द्रविडांचीं, व त्यानंतर मुलें वयांत आल्यावर त्यांजकडून समग्र रामायण व महाभारत हे ग्रंथ वाचविले पाहिजेत; म्हणजे समाजाचा घटक या नात्यानें व्यक्तीला लागणारे, व्यवहारांत नित्य उपयोगी पडणारे, व सबंध राष्ट्राच्या कामीं येणारे सर्व गुण मुलांत आपोआप बाणतील. उत्तर-हिंदुस्थानांतील प्रत्येक सुशिक्षित स्त्री तुलसीकृत रामायण मोठ्या भक्तीनें वाचते. इतकेंच नव्हे, तर तें वाचतां यावें म्हणून कित्येक स्त्रिया लिहावयास व वाचावयास शिकतात. केवढा त्यांचा हा त्या ग्रंथाविषयींचा आदर ! त्यांच्याबद्दल सानंद अभिमान व आपल्याबद्दल—स्वतःबद्दल—वीरप्रसू महाराष्ट्रस्त्रियांबद्दल—साश्चर्य खेद वाटल्यावांचून राहत नाहीं. यापुढें तरी ही हेळसांड बंद करा अशी माझी माझ्या भगिनीवर्गास सविनय प्रार्थना आहे. पांचवा वेद म्हणून गणल्या गेलेल्या महाभारताला यापुढें तरी विसरूं नका.

कांहीं वर्षांपूर्वीं मोरोपंताचें चरित्र प्रसिद्ध झालें. त्याची भाषा प्रेमळ, सरस व मधुर आहे. रा. पांगारकरांनीं हें चरित्र प्रसिद्ध करून महाराष्ट्रावर अगणित उपकार करून ठेवले आहेत. हें पुस्तक एकदां वाचावयास घेतलें तर दुसऱ्या कशांत चित्त लागत नाहीं. मोरोपंतांच्या आर्यांतील मनोहर अर्थवैचित्र्य एकदम लक्षांत येत नाहीं. पण बराच वेळ विचार केला तर त्यांतील गूढार्थ उकलतो. शेक्सपीयरचीं काव्यें तोंडपाठ म्हणतां येतात म्हणून आपल्याला प्रौढी वाटते, पण मयूरतुकारामादि साधुवर्यांच्या आर्यकृतींकडे आपली नजरही फिरकत नाहीं. सुधारणेच्या भपकेबाज नांवावर आडमार्गानें जाणाऱ्या या लोकांना वेळींच मार्गावर आणलें पाहिजे. नाहीं तर ते अवनतीच्या दरींत पडून त्याचा दोष दुसऱ्यावर ढकलणार. तर अशी संधीच त्यांना आपण देऊं नये.

सारांश हा कीं, राष्ट्रीय वाङ्मयाचें वाचन म्हणजे एक नित्यक्रमांतील कर्तव्य असें सम-

जून तें करीत राहिलें पाहिजे; व दुसऱ्याकडू-नही करविलें पाहिजे. सुंदर विचारांनीं भरलेलें पुस्तक म्हणजे जगांतील असंख्य रत्नांहून-ही अधिक मोलवान् अशी वस्तु आहे. मुबलक पैसा असला तर अनेक रत्नें मिळतील; शूर सैनिकांच्या साह्यानें सम्राट्पदही मिळवितां येईल; विपत्काल धैर्यानें सहन करवेल. पण प्रतिभासंपन्न ग्रंथकाराची प्रतिभा वाचकांच्या अभावीं एकदां का जर जागच्या जागीं जिरून गेली, तर ती मात्र पुन्हां केव्हांही मिळावयाची नाहीं.

मातृभाषेची वृद्धि व्हावी म्हणून प्रत्येकानें द्रव्यद्वारा, लेखनद्वारा जसें शक्य असेल तसें साहाय्य करणें अवश्य आहे. तें त्यानें मनापासून केलें पाहिजे.

रा. आजगांवकरांची कविचरित्रमाला वाच-नीय आहे. त्यांतील जनाबाई, गोणाबाई, राजाबाई, मिराबाई इ० कवयित्रींच्या चरित्रांत आपणास मनन करण्यासारखें पुष्कळ आढळेल. धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक मंडळीनें प्रसिद्ध केलेल्या बहिणाबाईच्या अभंगांवरून आपल्या समाजांत स्त्रीशिक्षणाचें बीज किती जुन्या काळापासून रुजलेलें आहे हें ध्यानांत येईल. त्यावेळच्या स्त्रिया नांवानें जरी सुशिक्षितांत मोडत नव्हत्या, तरी मनानें व अंतःकरणानें त्या खरोखरच प्रगल्भ व पवित्र होत्या. त्यांचीं हृदयंगम काव्यें वाचल्यावरही त्यांना अशिक्षित म्हणणें म्हणजे स्वतःचें अज्ञान प्रकट करणें होय. आजकालच्या सारख्या त्यांच्या वेळीं शाळा नव्हत्या हें खरें, पण त्यांचें शिक्षण हल्लींच्या शाळा कॉलेजांहूनही श्रेष्ठ प्रतीच्या शाळांत झालेलें होतें. त्यांच्याविषयीं प्रेम, कळकळ व आस्था बाळगणाऱ्या गृहशाळेंतील शिक्षकांच्या सतत सहवासांत त्यांना पावलोपावलीं शिक्षण मिळत असे.

धुळ्याची सत्कार्योत्तेजक मंडळी महाराष्ट्राची जी कामगिरी बजावीत आहे, तिजबद्दल त्यानें आपली सहानुभूति प्रकट करून तिच्या चाल-कांला द्विगुणित उत्साहानें काम करण्यास उत्तेजन दिलें पाहिजे. त्यांच्या पुस्तकां-बद्दल वर्तमानपत्रांत अगर मासिकांत वेळो-वेळीं अभिप्राय प्रकट केले पाहिजे. पुस्तकें न वाचतां त्यांत काय असणार?—असा वितंडवाद करीत बसण्यांत त्याचा दोष ग्रंथ-काराकडे न जातां वाचकांकडे येतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. वाचक अभिज्ञ नसेल तर त्याला पुस्तकाच्या गुणावगुणाविषयीं परीक्षा कशी करतां येणार? हल्लींच्या प्रसिद्ध स्त्रीपुरुषांविषयींची जशी बारीक सारीक माहिती मिळविण्याची इच्छा सुशिक्षितांत दिसते, तशी जुन्या पुराण्या पुरुषांविषयीं दिसत नाहीं, हें आश्चर्य होय. आपणास सुशिक्षित म्हणवून घेण्याची जर आवड आहे तर आपलें शिक्षण सर्वांगीं परिपूर्ण पाहिजे. एरवीं आपल्या शिक्षणाचा समाजास काय उपयोग? नुसत्या भपकेबाज नांवानें समाज चकित होण्याचे दिवस आतां गेले. समाज आतां खडबडून जागा झाला आहे. आजपावेतों जरी त्याला निजून राहण्याची वाईट संवय लागलेली होती तरी ती झुगारून देण्याचा आतां तो प्रयत्न करूं लागला आहे.

त्याचप्रमाणें मराठींत बोलत असतां मध्येंच इंग्लिश शब्द वापरण्याची आपल्यांतील पुष्कळांना सवय असते. यायोगानें भाषेचें हित न होतां अहित मात्र होत आहे. ही संवय अलीकडे सुशिक्षित स्त्रियांतही शिरूं पाहत आहे. हें चांगलें लक्षण नव्हे. माझें म्हणणें इतकेंच कीं, भाषण करावयाचें तें एकाच भाषेत—म्हणजे मराठींत किंवा इंग्रजींतच केवळ करावें. एकींत दुसरीची भेसळ करूं नये. हें करणें कठीण नाहीं. फक्त इच्छा पाहिजे. तात्पर्य हें कीं, आपली मातृभाषा शुद्ध राहील, तिची योग्य वाढ होईल, असा प्रयत्न प्रत्येकानें केला पाहिजे. आपल्या भाषेची आपल्यालाच कळकळ, आस्था, अभिमान पाहिजे. हीं असल्यावर तिची उन्नति तेव्हांच होईल. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर सबंध परिस्थितीचाही ओघ बदलण्याचें सामर्थ्य एका व्यक्तीच्या अंगीं असल्याचें जर आपण पाहतों, तर मातृभाषेची सेवा करण्यास आपण इतकी मंडळी तत्पर असतां तिच्या उन्नतीचें काम कठीण आहे असें कोण म्हणेल ? उच्चवर्गांतील लोक या कामीं अगदींच उदासीन दिसतात. त्याचें कारण काय असेल तें असो. पण त्यांना संमेलन म्हणजे काय, तें कशासाठीं भरतें, वगैरे अगदीं साध्या गोष्टीचीही माहिती नसते. ही स्थिति पालटली पाहिजे. उत्तम कवि, उत्तम लेखक, उत्तम निबंधकार, उत्तम ग्रंथकार, उत्तम नाट्यकार, उत्तम तत्त्ववेत्ते इत्यादिकांची माहिती लहानापासून थोरापर्यंत सर्वांना ज्यावेळीं होईल तो दिवस खराखरा भाग्याचा समजला जाईल. एका श्रेष्ठ घराण्यांतील स्त्रीचें अखिल जगास काव्यरंगांत दंग करणाऱ्या कविसम्राट् रवींद्रनाथाविषयींचें अज्ञान पाहून तर मला आश्चर्य वाटलें. लक्ष्मीनें सरस्वतीला इतकें दूर लोटलें असेल अशी माझी कल्पनाही नव्हती. विजेचा धक्का बसावा त्याप्रमाणें माझी स्थिति झाली. असो.

सरतेशेवटीं मातृभाषेची अंतःकरणापासून सेवा करण्याविषयीं सर्वांची प्रार्थना करून, व अधिकउणा शब्द माझ्या तोंडून निघाला असल्यास तो कोणा व्यक्तीला उद्देशून निघालेला नाहीं, म्हणून त्याचा कोणी विषाद मानणार नाहीं अशी आशा बाळगून, मी आपणा सर्व बंधु-भगिनींची रजा घेतें.

गीतोद्भव.

(कवि—'सुमंत.')

स्वप्न मला जें पडतें ।
सहजीं स्वप्न मला जें पडतें ।
दिवसां रात्रीं सांजसकाळीं ।
त्यांत गीत बघ हें सांपडतें ! ॥

स्वप्न असे तें मधुर सुधामय ।
दुःख लोपुनी होय सुखोदय ।
धीर बनें मी गभीर निर्भय ।
शांत स्थिति ती बहु आवडते ॥

स्वप्न मला जें पडतें । सहजीं० ।

काल च्या ज्या लीला असती ।
स्वप्नीं साऱ्या अंधुक दिसती ।
गीताचीही तेथचि वसती ।
तेथुनि तें मम हृदया जडतें ॥
स्वप्न मला जें पडतें । सहजीं ०॥

वायूच्या मृदु लहरी जेवीं ।
गीताचे स्वर असती तेवीं ।
व्यक्त करी ते अंतर्देवी ! ।
वाणी केवळ ही बडबडते ॥
स्वप्न मला जें पडतें । सहजीं० ॥

मराठी मासिकें, त्यांची सांप्रतची स्थिति, व ती सुधारण्याची दिशा.

[लेखक—रा. गोविंद महादेव भिडे, वकील.]

इंग्रजी सारस्वताच्या संघट्टनाबरोबर हिंदी वाङ्मयाला जें अपूर्व चलन मिळालें, त्याला आमची महाराष्ट्रभाषा अपवाद नव्हती. पश्चिमेचें वारें लागतांच तिच्यांतही चैतन्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, व त्या काळास शक्य तितकीं त्याचीं फळें निपजूं लागलीं. तीं फळें म्हणजे मराठींतील ग्रंथ, मासिकें व वृत्तपत्रें हीं होत. अपरंपार आदर्शभूत भाषेच्या मानानें आमची भाषा निर्धन होती. तींतील साहित्य तुटपुंजें होतें. तेव्हां या चैतन्याचा जोर जितका दिसावा तितका पाहिल्यानें दिसत नव्हता. त्या काळांत परकीयांचें मराठी भाषेकडे जितकें लक्ष होतें, तितकें सुद्धां तिच्या पुत्रांचें नव्हतें. एवढेंच काय, पण तिच्यावर निर्माल्यतेचा छाप तिच्या कित्येक पुत्रांकडून बसला होता. अनुकंपा उत्पन्न करणारी ही स्थिति १९ व्या शतकार्धापर्यंत चालू होती. पुढें मात्र सुदैवानें ती बदलली. पूर्वीचें चैतन्य जोरास लागलें. या कालांत कांहीं किरकोळ ग्रंथ निघाले होते. ते तितक्याच योग्यतेचे असल्यामुळें क्षणिक ठरले. सांप्रत त्या ग्रंथांचा मागमूसही नाहीं. मराठी गद्यास नुकतीच सुरुवात झाली होती. व्याकरणाचें बंधन नसल्यामुळें तिच्यांत नेमकपणा आला नव्हता. मराठींत १८५० च्या पूर्वी जीं थोडीशीं मासिकें अगर पत्रें जन्मास आलीं, त्यांपैकीं 'ज्ञानप्रकाश' काय तें अजून अस्तित्वांत आहे. बाकीच्यांची नामनिर्देशावांचून कांहींही माहिती नाहीं. बाळशास्त्री जांभेकर यांचें 'त्रैमासिक ज्ञानदर्शन' एका काळीं अतिशय प्रसिद्ध व लोकप्रिय होतें. परंतु त्याचें नुसतें दर्शनही आज दुष्प्राप्य झालें आहे. ही स्थिति थोड्या फार प्रमाणानें आणखी दहा पंधरा वर्षे टिकली. तथापि हा काळ अगदींच फुकट गेला असें मात्र नाहीं. कारण पुढील कामगिरीची पूर्वतयारी याच काळांत होत होती. १८६१ त 'पुणें पाठशाला' आपले पाठ देऊं लागली, तर १८६८ त 'विस्तारा'नें आपल्या विविध ज्ञानाचें भांडार खुलें केलें. या काळांतील वाङ्मय स्वतंत्र स्वरूपाचें नसून बहुतेक परक्यावर पोसलेलें होतें. इंग्रजींतील जें काय ज्ञान मिळे, तें मराठी भाषेच्या द्वारें प्रगट होत होतें. जी धाटणी जांभेकर यांच्या मासिकांत सुरू झाली, तिचाच केवळ अनुवाद पुढील मासिकेंही कित्येक वर्षे करीत होतीं. सामान्य जनतेला रुचेल व पचेल असें वाङ्मय या पुस्तकांत दिसत नव्हतें. भूगर्भशास्त्र, नीतिशास्त्र, अर्थशास्त्र, वगैरे गहन विषयांवरील इंग्रजींतील ज्ञान मराठींत आणीत असत. हे विषय त्या काळच्या जनतेच्या पचनीं पडतील असे नव्हते. व ज्यांना इंग्रजी समजे, त्यांना ते विषय मूळांतून वाचणें आवडे. याकारणानें मासिकांचे संपादक हुशार व विद्वान् असूनही त्यांचा उपयोग ज्ञानाचा प्रसार करण्याचे कामीं जितका व्हावयास पाहिजे होता तितका झाला नाहीं. 'विस्तारां'त मात्र हे विषय येऊन शिवाय मनोरंजनाचें साधन म्हणून संस्कृत नाटकांचीं व परकीय कादंबऱ्यांचीं भाषांतरें येत होतीं. ही स्थिति शालापत्रकांत कांहीं अंशानें सुधारली. थोरल्या चिपळूणकर शास्त्रीबोवांचीं ॲडिसनच्या लहान लहान निबंधांचीं भाषांतरें त्यांत येत असत. परंतु तीं इतकीं सुरस आहेत कीं, आपण भाषांतर न वाचतां मूळच वाचीत आहोंत असा भास होतो. मराठी रासेलस याच मासिकांतून बाहेर पडलें. १८७४ त निबंधमाला प्रगट होऊन पहिल्यानेंच 'मराठी भाषेचा इतिहास' सांगूं लागली. इतर मासिकांप्रमाणें यांत निरनिराळ्या विद्वानांचे लेख येत नसत. केवळ संपादककरितांच ती निर्माण झाली होती. तिच्यांतील निबंध मेकॉलेच्या निबंधांप्रमाणें चटकदार व गोड असून निर्भीड आहेत. भाषासरणी तर इतकी शुद्ध व प्रौढ आहे कीं मराठींतील गद्याच्या जननीचा मान तिच्याकडे जात आहे. अलीकडच्या काळांत मराठीला उच्च वाङ्मयाचा कित्ता जर कोणीं दिला असेल, तर तो निबंधमालेनें होय. मालेंत सर्व विषयांचा, विशेषतः वाङ्मयाचा, समावेश झालेला आहे. ॲडिसननें तत्कालीन सामाजिक विषयांवर निबंध लिहिल्यामुळें त्यांतील प्रासंगिक महत्त्व जरी कमी झालें तरी वाङ्मयाच्या दृष्टीनें ते निबंध इंग्रजी भाषेला आज भूषण होऊन बसले आहेत. त्याचप्रमाणें मालेंतील 'मोरोपंताची कविता' यांसारखे निबंध जरी प्रासंगिक महत्त्वाचे होते तरी आज ते उच्च वाङ्मयांत मोडत आहेत. याचें कारण त्यांतील भाषाशैली होय. सात वर्षे खपून जी माला [illegible]

केली तिचा आमोद चारी दिशांस दरवळत आहे; किंबहुना कर्त्यांची ती एक अक्षय स्मारकच झाली आहे. शालापत्रकांत चार वर्षे व निबंधमालेंत सात वर्षे वाङ्मय व देशस्थिति यांवर जे लेख आले त्यांनीं मराठी भाषेवर झालेले उपकार अनंत आहेत. परंतु त्यांपासून याहूनही जो मोठा फायदा झाला तो हा कीं नानाविध लोकांच्या ज्या कांहीं चुकीच्या समजुती झाल्या होत्या त्या बदलल्या व त्यांच्या विचारास नवें वळण लागलें. मालेच्या नंतर चार वर्षांनीं म्हणजे १८७८च्या सुरवातीस 'काव्येतिहाससंग्रह' जुन्या बखरी व संस्कृत आणि मराठींतील प्राचीन कवितांचीं बाडें यांचा संग्रह करण्यास अवतरला. काव्येतिहाससंग्रहाच्या अगोदर कांहीं वर्षे मराठी कविता छापण्याचें काम माधव चंद्रोबा यांच्या 'सर्वसंग्रहा'नें हातीं घेतलें होतें, परंतु तो प्रयत्न मध्यंतरीं तसाच थंडावला; व प्राचीन वाङ्मय तसेंच अप्रकाशित राहिलें. तेंच प्रकाशनाचें काम आतां काव्येतिहाससंग्रहानें सुरू केलें. वेदांचें प्रकाशन करण्याकरितां १८७६ त 'वेदार्थयत्न' सुरू झाला. अशा रीतीनें या काळांत मराठींतील विशिष्ट वाङ्मयाचीं पुस्तकें निघाल्यानें मराठी साहित्याच्या पूर्वतयारीला बराच रंग आला होता. ज्या प्रोत्साहन देण्याच्या कार्याकरितां मालाकारानें माला गुंफण्याचें काम अंगीकारिलें होतें, तें बऱ्याच अंशानें सिद्धीस गेल्यामुळें माला पूर्ण करून मालाकार दुसऱ्या व्यवसायाकडे वळले. निबंधमालेच्या समाप्तीनंतर तीन वर्षांनीं म्हणजे १८८३ मध्यें 'निबंधचंद्रिका' त्याच कामाकरितां पुढें सरसावली. परंतु उपेक्षावशात् तिला त्यांत यश मिळालें नाहीं. तेव्हां संपादकानें म्हटल्याप्रमाणें तिला 'मनोरंजनरूपी नळकंड्यांत' कोंबल्यानें तिच्यांतून ललित व उच्च असें दोन्ही प्रकारचें वाङ्मय निघूं लागलें. या नवीन पुष्टीमुळें त्या मासिकानें कांहीं वर्षे तरी पुढें टिकाव धरला. १८८१ मध्यें 'बालबोध' निघाला.त्यांत चरित्रें,कविता, व शास्त्रीय विषय सोप्या व सरळ भाषेंत येत असतात. हें पुस्तक बालवाचकांकरितां बोधात्मक असल्यामुळें त्यांतील विचारसरणी एकांगी असते. ज्यांची आयुर्मर्यादा वर्षाच्या वर गेली नाहीं, अशीं कित्येक मासिकें या सुमारास जन्मास आलीं. मासिकांप्रमाणें बऱ्याच वृत्तपत्रांचाही उदय याच वेळीं झाला. परंतु त्यांच्या उत्कर्षाबरोबर मासिकांच्या धोरणांत मात्र बदल पडत चालला. या कालपर्यंतच्या मासिकांत भाषांतर केलेले किंवा स्वतंत्र तात्त्विक विषय येत असत. आतां त्यांत करमणुकीचे विषय शिरूं लागले; व नुसत्या तात्त्विक विषयांचा मक्ता वर्तमानपत्रांनीं घेतला. १८९१ त रा. आपटयांनीं मासिकांच्या धोरणाचें साप्ताहिक 'करमणूक' पत्र काढलें, तर १८९६ सालीं 'मासिक मनोरंजनास' सुरवात झाली. या दोघांचा ललितवाङ्मयाकरितांच जन्म झाला होता. 'काव्येतिहाससंग्रह' जाऊन त्याचें अर्धेमुर्धे काम 'काव्यसंग्रह' भागवूं लागला. १८९० मध्यें आधुनिक कविवर्गाकरितां 'काव्यरत्नावली,' व स्त्रियांना शिक्षण देण्याकरितां 'स्त्रीशिक्षणचंद्रिका' प्रगट झाल्या. सर्व प्रकारच्या तात्त्विक, शास्त्रीय व ऐतिहासिक स्वतंत्र व भाषांतरित ग्रंथांकरितां करवीर प्रान्तीं १८९४ सालीं 'ग्रंथमाला' जन्मास आली. केवळ परकीय ग्रंथांचें भाषांतर करण्याकरितां 'भाषांतर' सरसावलें. ऐतिहासिक व टीकात्मक लेखांकरितां 'सरस्वतीमंदिर' निघालें. याशिवाय 'श्रीमयूरकवि,' 'सुविचारसमागम,' 'विद्याविनोद' वगैरे किती तरी मासिकें कांहीं काळ आपलें कर्तव्य करून गेलीं. या मासिकांत राजकीय विषयांना स्थलावकाश मिळत नसल्यामुळें, 'विश्ववृत्त' लवकरच 'ग्रंथमाले' सह बंद होण्याकरितां १९०६ त सुरू झालें. १९०७–१९०८ हीं वर्षे आणीबाणीचीं होतीं व तीं मराठी वाङ्मयास परागतीचीं ठरलीं. राजकीय विषय वाङ्मयाच्या कक्षेबाहेर पडूं लागला. देशांतील घडामोडींत चांगल्या मासिकांची आहुती पडूं लागली. परंतु पुढें लवकरच ती उणीव सव्याज भरून निघाली. एकामागून एक जन्मास येण्याची जणूं काय मासिकांमध्यें चढाओढ लागली, त्या गर्दीतच पुष्पांच्या व पैशाच्या मालांनीं आपला शिरकाव करून घेतला. १८ व्या शतकांत झालेल्या इंग्लंडमधील 'सप्तवार्षिक युद्धा'च्या वेळीं आज नवीन कोणती लढाई जिंकली, म्हणून सकाळीं उठल्याबरोबर प्रत्येकजण पृच्छा करी. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतही–आज कोणतें वाङ्मयिक बालक जन्मलें-याची प्रत्यहीं पृच्छा करण्याची पाळी आली आहे. अशा रीतीनें मराठी वाङ्मयाची समृद्धि जोरानें

होत असून, त्याबद्दल चहूंकडे जारीनें प्रयत्न चाललेले दिसत आहेत. तेव्हां प्रत्येक मराठी भाषेच्या अभिमान्याला त्याचें कौतुक वाटल्यास फारसें नवल नाहीं.

परंतु ही पहिली कौतुकाची लाट ओसरल्यावर त्या समृद्धीकडे जरा बारकाईनें पाहिल्यास ही विलक्षण वाढ उन्नतिपर आहे कीं अवनतीचीं दुश्चिह्नें आहेत, याच बुचकळ्यांत वाचक पडत असतो; व अखेरीस हें खरें पाणी नसून केवळ वरील फेंस आहे याचा प्रत्यय येऊन त्याची क्षणार्द्धांत निराशा झाल्यावांचून राहत नाहीं. ग्रंथसंग्रहाची ही खरी भरती नसून केवळ फुगवटी आहे याची त्यास खात्री पटते. कारण प्रतिदिवशीं ग्रंथांची संख्या यद्यपि वाढत्या प्रमाणांत आहे, तथापि संख्येच्या मानानें त्यांच्या अंतर्गुणाचा विकास झालेला दिसत नाहीं. किंबहुना तो भरींव गुण सांप्रत व्यस्त प्रमाणांत दिसत आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, त्वचारोगानें लठ्ठ झालेला माणूस जसा बाहेरून भक्कम दिसतो, परंतु आंतून सर्व शरीर पोखरलेलें असतें, तशीच स्थिति आमच्या वाङ्मयाची थोड्या फार अंशानें झाली आहे. तें संख्येनें इतकें वाढत आहे कीं, गुणांची योग्यता जर संख्येवर अवलंबून असती, तर पूर्वीच्या काळापेक्षां हाच काळ श्रेष्ठ ठरला असता. परंतु जोंपर्यंत तसें होत नाहीं, तोंपर्यंत या गुणहीन ग्रांथिक वाढीचा कोणासही एवढा अभिमान वाटणार नाहीं. अशा स्थितींत असलें पोंचट वाङ्मय निपजविणाऱ्या 'माला' व मासिकांचा कोणास 'सुळसुळाट' वाटला तर त्यांत आश्चर्य नाहीं. वाङ्मयाची उन्नति करणारे हरिभाऊ आपटे यांनीं ठरविलेले 'राशीभवन' व 'विकसन' हे जे दोन मार्ग आहेत, त्यांपैकीं पहिला आमच्या वाङ्मयांत बाहेरून पाहणारास तरी भरपूर दिसत आहे. परंतु ती रास आंतून पोकळ आहे किंवा भरींव आहे हें सांगणें मात्र कठीण पडेल. पूर्वीपेक्षां सांप्रत 'राशीभवन' जास्त प्रमाणांत होत आहे, याचें वास्तविक कारण वाङ्मयाबद्दलचा कळकळीचा आटोकाट प्रयत्न नसून मुद्रणकलेची सुलभता हें होय. पूर्वीसुद्धां सध्यांप्रमाणें चांगल्याबरोबर वाईट निपजत नव्हतें असें नाहीं, परंतु त्या काळीं केवळ चांगल्यासच प्रकाशनाचा मान मिळत असल्यामुळें, छापलेलें तेवढें चांगलें असा सहज समज झाला होता. परंतु आतां तो मनु पालटला. प्रत्येक सरस-नीरस कृति प्रकाशित होऊं लागल्यामुळें, सध्यां 'राशीभवन' जास्त प्रमाणांत दिसत आहे एवढ्यावरूनच वाङ्मयाची उन्नति होत आहे, असें खात्रीनें सांगवणार नाहीं. याला कारणें कोणी कांहीं देवोत, परंतु एवढें खरें कीं, वाङ्मयाचे निस्सीम भक्त अजून फारसे नाहींत. केवळ पाटल्यावर काळें करणारेच फार !

तथापि येथें हें अवश्य सांगितलें पाहिजे कीं, आमचा रोख वाङ्मयाच्या सर्व शाखांवर नसून अलीकडे मासिकांतून किंवा मालांतून जें वाङ्मय प्रतिमासीं बाहेर पडत आहे, त्यावर आहे. तथापि अशा अवनत काळांतही कित्येक भारदस्त मासिकांनीं आपलें उदात्त धोरण ठेवून जी वाङ्मयिक सेवा चालविली आहे, ती अमोलिक आहे यांत संशय नाहीं. परंतु कांहींतून ललित किंवा विदग्ध वाङ्मयाच्या नांवाखालीं जें अप्रगल्भ बेचव लिखाण येत आहे, तो प्रकार मात्र जितका लवकर बंद होईल तितकें चांगलें. अशानें वाचक व नवीन लेखक या दोघांचीही दिशाभूल होत आहे. ललितवाङ्मयाचा मुख्य उपयोग म्हटला म्हणजे सामान्य अप्रबुद्ध लोकांना वाङ्मयाची रुचि लावावयाची. त्यांतील आकर्षक शक्ति इतकी मोठी आहे कीं, 'आळशी लोकांची मिजास संभाळूनही त्यांना ज्ञानाच्या मार्गास ओढण्यास तें समर्थ आहे.' अशा परिणामकारक वाङ्मयाची हेळसांड केल्यानें व तें अकुशल माणसांचे हातीं पडल्यानें, त्याचा परिणाम समाजास अहितकारी होणें अपरिहार्य आहे. ज्यांचीं मनें अगोदरच शिक्षणानें व विचारानें संस्कृत झालीं आहेत, त्यांच्या मनावर असल्या बेचव वाङ्मयाचा अनिष्ट परिणाम घडणार नाहीं हें खरें; परंतु ज्यांचीं मनें अजून तयार व्हावयाचीं आहेत, व ज्यांना विचार करण्याची संवय नाहीं, त्यांच्या डोळ्यांखालून असलें वाङ्मय निःशंकपणें घालविलें तर त्यांच्या मनावर त्याचा अनिष्ट परिणाम घडून आल्यावांचून राहणार नाहीं. एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें, वाङ्मय हें दुधारी शस्त्र आहे. त्याचा इष्ट किंवा अनिष्ट परिणाम घडवून आणणें हें तें शस्त्र वापरणाराच्या हुशारीवर अवलंबून असतें. मासिककारांनीं केवळ हौसेची दृष्टि बाजूस ठेवून आपणांवरील योग्य जबाबदारी

ओळखल्यास व तदनुरूप क्रम चालू ठेवल्यास त्यांच्या हातून वाङ्मयाची खरीखुरी सेवा झाल्यासारखें होईल. नाहीं तर बेजबाबदारपणानें वागूं लागल्यास समाजांतील मूठभर व्यक्तींना तरी अनीतीचा पाठ घालून दिल्याचें पाप त्यांच्या पदरीं पडेल.शिवाय अधम प्रतीच्या वाङ्मयाची चटक एकदां समाजास जडली व तें त्याच्या मासांत व रक्तांत भिनून गेलें, म्हणजे त्यापासून त्याला परावृत्त करणें कठीण—कित्येक प्रसंगीं तर अशक्यही—होऊन जाईल. वाङ्मय व समाज यांच्यामध्यें असलेल्या कार्यकारणसंबंधाचा विचार करीत असतांना दोन्हीं प्रकारचीं मतें पुढें येतात. वाङ्मय हें जर समाजाचें विशिष्ट काळचें सर्वांगीण चित्र, तर ज्या प्रकारचा समाज असेल त्याप्रकारचें चित्र वाङ्मयांत उमटलेलें दिसेल. जें मत व जी रुचि समाजांत वावरत आहे, तें मत व ती रुचि यांच्या अनुरोधानें वाङ्मय निर्माण होतें.अशा रीतीनें वाङ्मयाची घडण सर्वस्वी समाजाचे हातीं आहे, म्हणून समाज हा वाङ्मयाचें कारण होय. इकडे दुसरा पक्ष असें प्रतिपादितो कीं, वाङ्मय हें इतकें लेचेंपिचें नाहीं कीं, समाजाच्या प्रत्येक लहरीबरोबर त्याचा रंग बदलत जावा. समाज हा मूळचा रानटी स्थितींतील. त्याची जी सांप्रत उन्नतावस्था दिसत आहे ती केवळ कांहीं श्रेष्ठ व्यक्तींनीं निर्माण केलेल्या वाङ्मयाचेंच फळ होय. इंग्रेजी राष्ट्र आज जें वाघासारखें आहे तें इंग्रेजी विद्या ‘ वाघिणीचें दूध ’ आहे म्हणून. तसेंच १८ व्या शतकाच्या अखेरीस फ्रान्समध्यें जी भयंकर यादवी माजली, तिला कारणही मूळ तेथील वाङ्मय झालें. तेव्हां वाङ्मयाकडे केव्हांही समाजाचें नेतृत्व येणार. अशा स्थितींत कार्यकारणभावाचा निश्चय करणें तत्त्वतः जरी दुर्घट असलें, तरी, समाजोन्नति अगर राष्ट्रोन्नति होण्यास प्रथम वाङ्मयच कारणीभूत होतें हें इतिहास सांगूं शकेल. वाङ्मय अशा प्रकारें उन्नतीचें बीज असतांना तें अनधिकारी माणसांचे हातीं न पडेल अशी काळजी घेणें जरूरीचें आहे.सध्यां देशाला कोणत्या गरजा आहेत हें अजमावून तदनुरूप वाङ्मयाची योजना करावयाची हें खरोखर अधिकारी माणसांवांचून होणें नाहीं.नाहीं तर अडाणी वैद्यांप्रमाणें दुखणें एक व त्यावरील औषधाची योजना निराळी असें होईल. योग्य परीक्षेनंतर जें वाङ्मय तयार होतें, तें चिरस्थायी स्वरूपाचें असतें, व असें वाङ्मय निर्माण झाल्यावांचून त्या देशाला स्थिरता येत नाहीं. परंतु तें कांहीं सहजासहजीं उत्पन्न होत नाहीं. त्यास दीर्घ परिश्रमाची, सूक्ष्म अवलोकनाची, व सतत विचाराची जरूरी आहे. अन्य व्यवसाय नाहीं म्हणून किंवा दुसऱ्याच्या भिडेखातर वाङ्मयाची सेवा पत्करली तर वेठीस धरलेल्या मजुराप्रमाणें स्थिति व्हावयाची. त्या ठिकाणीं अंतःकरणांतील खरी कळकळ राहत नाहीं, व म्हणून कशाची जरूरी आहे याची जाणीव न झाल्यामुळें मनुष्य केवळ गतानुगतिकतेच्या ओघास लागतो.

अशा दृष्टीनें पाहूं जातां आज मासिक पुस्तकांच्या द्वारें जें वाङ्मय निपजत आहे, त्यांतील कितीं तरी अल्पभाग वरील कसोटीस टिकेल. सध्यां मासिकांची संख्या चाळीसांहून कमी नाहीं आहे. तथापि त्यांतील केवळ उच्च प्रकारच्या वाङ्मयास वाहिलेलीं अशीं मासिकें बोटांवर मोजतां येण्यासारखीं आहेत. कांहींत वाङ्मयिक व करमणुकीचे विषय येत असतात; व बरींच केवळ करमणूकीस वाहिलेलीं आहेत. सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विषय वरील उच्च मासिकांतून मधून मधून दृष्टीस पडतात. राजकिय विषयाचें मात्र त्यांत नांव सुद्धां नसतें. कांहीं मासिकांनीं तर 'राजकीय विषयाचा विटाळ आमच्या पुस्तकांत मुळींच होणार नाहीं,' अशी शपथच घेऊन, आपला अपूर्व सोंवळेपणा जगजाहिर केला आहे. एकंदरीनें राजकीय विषयाला बहुतेक सर्वांनींच बहिष्कार घातलेला दिसत आहे. पूर्वींच्या ‘ निबंधचंद्रिका’ व ‘विश्ववृत्त ’ यांनीं या बाबतींत बरीच प्रगति दाखविली होती. परंतु लोकांच्या अनास्थेमुळें म्हणा किंवा हा गहन विषय आकलन करतां येईल इतका प्रौढपणा अजून मराठीच्या अंगीं आला नव्हता म्हणून म्हणा, तीं पुस्तकें लवकरच बंद पडलीं व राजकीय विषय वृत्तपत्रांकरितांच आहे, मासिकांकरितां नव्हे, असेंच बहुतेक ठरल्यासारखें झालें. मराठीला वृत्तपत्रांत आलेले राजकीय विषय जर झेपतात, तर मासिकांतील कां झेपूं नयेत ? तेव्हां या उदासीन वृत्तीचें दुसऱ्यापेक्षां पहिलें कारण सबळ दिसतें.

आतां कोणी असें प्रतिपादितात कीं, राजकीय विषय जर वृत्तपत्रांत असतो, किंबहुना जर त्याच-

करितां त्यांचा जन्म आहे, तर तोच विषय मासिकांतही आल्यानें चर्वितचर्वण मात्र होणार. परंतु अशांना खरोखर मासिकें व वृत्तपत्रें यांतील भेद ठाऊक नाहीं, असें म्हटल्यास हरकत नाहीं. मासिकें हीं वृत्तपत्रें व ग्रंथ यांना जोडणारा दुवा आहे. वृत्तपत्रें ज्या विषयाची त्रोटक माहिती करून देतात, तो विषय मासिकांतून साधक बाधक प्रमाणें देऊन जास्त स्पष्ट केलेला असतो. वृत्तपत्रांतील लेख तात्कालिक स्फूर्तीचे असल्यामुळें त्यांत चुका होण्याचा संभव आहे, परंतु मासिकांची स्थिति याहून निराळी आहे. त्यांत येणारे लेख बरेच विस्तृत असतात. वर्तमानपत्रांना सगळ्या जगांतील विषयांचा ऊहापोह करावा लागत असल्यामुळें, त्यांत विशिष्ट वाङ्मयाच्या सर्वांगांची चर्चा करण्यास स्थळ व वेळ मिळत नाहीं; व कदाचित् मिळालाच तर ती चर्चा संक्षेपानें करावी लागते. मासिकें मात्र एकाद्या विषयाचें सर्व दिशेनें यथास्थितपणें विवेचन करण्याचें काम करतात. शिवाय वर्तमानपत्रें वास्तविक बातमी सांगण्याकरितां निघालीं असल्यानें त्यांना सद्यःप्राप्त असे विषय ताबडतोबीनें द्यावे लागतात. कांहीं कालानें त्या विषयावर नवा प्रकाश पडून त्याचा काय परिणाम होतो, हें पाहण्यास त्यांना फुरसत मिळत नाहीं. परंतु मासिकांत तो विषय यावयाचा म्हणजे सर्व दृष्टीनें त्याची पाहणी करून मग विचारपूर्वक लिहिलेला असतो. वृत्तपत्रें क्वचित् प्रसंगीं विकारवश होतात, परंतु मासिकांना सदैव विचारवंत असावें लागतें. वर्तमानपत्रांतील लेख क्षणिक स्वरूपाचे, तर मासिकांतील चिरकाल टिकणारे असतात. वाङ्मयांत सामावतील असे विषय जरी केव्हां केव्हां पहिल्यांत आले तरी त्यांचा उद्देश वाङ्मयसेवा हा नव्हे. परंतु मासिकांच्या पुढें वाङ्मयवृद्धि हा एकच प्रधान हेतु असतो. तेव्हां वर्तमानपत्रांत अमुक विषय येतो म्हणून तो मासिकांत नको असें म्हणणें सयुक्तिक नाहीं. स्वमतसमर्थन ही वर्तमानपत्राची दृष्टि असल्यानें त्यांत विषयाचें विवेचक व सांगोपांग विवरण करावयास तितका अवसर नसतो. विषयाचें पुरेसें आकलन होण्याकरितां वृत्तपत्रांपेक्षां मासिकांचाच जास्त उपयोग होतो. या कारणानें राजकीय विषयाचा अंतर्भाव मासिकांतून झाला पाहिजे. विचारी लोकांचें लक्ष नेहमीं राजकारणांत असल्यामुळें त्यांना तो विषय प्रिय असतो. अर्थात् ज्या मासिक पुस्तकांतून राजकीय विषय नाहीं, त्यांना त्यांचा पाठिंबा मिळत नाहीं; व विचारी लोकांचा जर पाठिंबा नसेल तर त्या मासिकांचें जनतेवर वजनही पडत नाहीं. शिवाय सामान्य जनतेला त्या विषयाचें सांगोपांग ज्ञान न मिळाल्यामुळें, ती त्याविषयीं उदासीन राहते. सध्यां महाराष्ट्रांत राजकीय बाबतींत उदासीनपणा धरण्याची जी घातुक संवय जडत आहे, त्याचा तरी दोष मासिक पुस्तकांच्या त्या विषयावरील बहिष्कारावर पडतो. राजकीय बाबींवांचून भाषाशोधन, ऐतिहासिक व शास्त्रीय चर्चा, पुस्तकपरीक्षण, लोकशिक्षण इत्यादि देशिक व भाषिक विषय मधून मधून त्यांमध्यें येत असतात. परंतु ते फार अल्प प्रमाणांत असतात. त्यासंबंधीं सध्यांपेक्षां जास्त चर्चा झाली पाहिजे.

आतां शेवटीं बऱ्याच मासिकांच्या वाटणीस आलेली बाब म्हणजे ललितवाङ्मय ही होय. या प्रकारांतही समाधान करण्यासारखी स्थिति नाहीं आहे. याचें कारण मागें सांगितल्याप्रमाणें या बड्या नांवाखालीं जें लिखाण येतें तें नीरस असतें. रुचिवैचित्र्याचें तर नांव नाहीं. गोष्टींचा इंग्रेजींतून उगम असल्यामुळें समाजांत कधींही न आढळणाऱ्या व्यक्तींचें दर्शन त्यांमधून होत असतें. युरोपीय समाजाच्या ज्या कांहीं विशिष्ट भावना आहेत, त्यांचें आरोपण तद्भिन्न अशा हिंदी समाजावर निःशंकपणें होत असल्यामुळें हें कोणत्या समाजाचें धेडगुजरी चित्र आहे, हें समजणें कठीण होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, युरोपीय व्यक्तीनें धोतर नेसून व पागोटें घालून हिंदूचा वेष धारण केल्यानें आपण जन्मापासून हिंदूच आहोंत असें खोटें भासविण्याच्या दोषास ती पात्र होत आहे. अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या गोष्टींविषयीं लिहितांना एकानें थट्टेनें म्हटलें आहे कीं ' इंग्रेजी गोष्टींतील लिली व जॉन हे लीला व जनार्दनपंत या नांवानें मराठींत रूपांतर पावतात ! ' इंग्रेजी नांवें व पोषाख बदलून मराठी नांवें व पोशाख दिले कीं झाली गोष्ट तयार. ही कृति म्हणजे अनुकरणाची परमावधि होय. ही स्थिति खरोखर शोचनीय आहे. येथें दुसरा दोष म्हटला म्हणजे वैचित्र्याचा अभाव. दोन गोष्टींमधील अभिन्नता एखादे वेळीं इतकी दिसून येते कीं, स्थळांची

व पात्रांचीं नांवें बदलून तीच गोष्ट पुन्हां लिहिली आहे कीं काय असा संशय येतो. ज्याप्रमाणें आजीबाईनें सांगितलेल्या प्रत्येक गोष्टींत राजा व त्याच्या एक आवडती व एक नावडती अशा दोन सवती सवती राण्या यावयाच्याच, त्याप्रमाणें सध्यांच्या गोष्टींत एक युवा व त्यांवर अनुरक्त झालेली एक युवती, त्यांच्या प्रेमसंबंधांत आलेलीं संकटें. व शेवटीं दोघांचें मीलन, इतके प्रसंग यावयाचे. अशा रीतीनें साऱ्या गोष्टी एकाच ठशांतून निघाल्यामुळें एकादी एक गोष्ट वाचली म्हणजे बऱ्याच गोष्टी वाचल्याचें पुण्य अनायासें संपादितां येतें. हा अनुभव पुष्कळांना येत असेल. वस्तुत: ललितवाङ्मयाचा उपयोग हलका नाहीं आहे. राष्ट्रीय शील बनविण्याचे कामीं जर कोणाची सार्वत्रिक व सहज मदत होत असेल तर ती प्रथम याच वाङ्मयाकडून होय. मनोरंजकता हेंच ध्येय पुष्कळ वाचकांच्या पुढें असल्यानें त्यांचीं उडी असल्या भागावर फार असते. त्यामुळें त्यांतील दोष काढून टाकण्याचा उपाय अगोदर पाहिला पाहिजे.

असो. एकंदरीनें पाहतां 'वर्तमानपत्रांत गेल्या आठ दहा वर्षांत जशी सुधारणा झाली व दिवसानुदिवस होत आहे, तशी मासिक पुस्तकांसंबंधानें झालेली नाहीं.' हें जें मालाकारांनीं मालेच्या सुरवातीस म्हटलें आहे त्याचाच अनुवाद अजूनही करावा लागत आहे. आंग्ल मासिकांशीं संख्येनें आपली बरोबरी करण्यास मराठी मासिकें जितकीं झटत आहेत तितकीं जर अंतर्गुणांत बरोबरी करण्यास झटतील तर एक महत्त्वाचें कार्य केल्यासारखें होईल. सध्यांच्या स्थितींत परदेशांतील मासिक पुस्तकांपर्यंत दूरवर नजर जरी पोंचली नाहीं, तरी हिंदुस्थानांतील मासिकांचें ध्येय धरण्यास हरकत नाहीं. 'इंडिअन रिव्ह्यु,' 'माडर्न रिव्ह्यु' वगैरे भारदस्त मासिकांचा दर्जा आज सगळ्या हिंदी समाजांत महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानांतील अनेकविध महत्त्वाच्या प्रश्नांचें विवरण त्यांतून नित्य येत असतें. बंगाली मासिकांचीही या दिशेनें बरीच सुधारणा झाली आहे. 'प्रवासी,' 'साहित्य,' 'बंगदर्शन,' हीं मासिकें आज बंगालमध्यें उच्च दर्जाचीं म्हणून नावांजलेलीं आहेत. हिंदी वाङ्मयांतील 'सरस्वती' उच्च वाङ्मयाची अधिष्ठात्री आहे. हीं सर्व मासिकें महाराष्ट्रास अनुकरणीय आहेत. तथापि महाराष्ट्राच्या या निराशाजनक काळांतही आशेचे कांहीं कण सांपडत आहेत. वाङ्मयाचें कंकण बांधलेलें 'विविधज्ञानविस्तार' व 'लोकशिक्षण;' प्रत्यहीं नवीन नवीन सुधारणा करून अंतर्गत ध्येय व बाह्य वेष या दोन्ही बाबतींत विलायतेंतील सचित्र मासिकांची बरोबरी करण्याचें ध्येय दृष्टीसमोर ठेवणारी 'मनोरंजन-नवयुगा'ची जोडी; राष्ट्रीय मासिक म्हणून नाणावलेलें 'चित्रमय जगत्'; यांच्या अमूल्य सेवेबद्दल येथें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. 'श्रुतिबोध,' 'महाराष्ट्र कवि,' 'इतिहाससंग्रह' यांसारखीं जीं मासिकें विशिष्ट वाङ्मयाकरितां जन्म पावलीं आहेत, त्यांचा अंतर्भाव मासिक पुस्तकांत केला नाहीं, तरी फारशी हरकत येणार नाहीं. कारण त्यांचा उद्देश तें वाङ्मय ग्रंथांचे रूपानें छापून काढण्याचाच असतो. केवळ सवड व सोय या दृष्टीनें त्यांना मासिक पुस्तकाचा आकार व रूप प्राप्त झालेलें असतें. तेव्हां त्यांबद्दल येथें विवेचन करण्याचें कारण नाहीं.

मराठी मासिकें प्रगतीच्या शर्यतींत इतर देशांच्या मानानें कां मागें पडलीं याचा विचार केला तर असें आढळून येईल कीं, मासिककारांकडे त्याबद्दल जितका दोष येऊं शकतो, तितका किंवा त्याहून जास्त दोष मराठी समाजाकडे जात आहे. मराठी भाषेविषयींचा अनादर सुशिक्षित समाजांत पंचवीस वर्षांच्या पूर्वी इतका जरी नाहीं, तथापि अजून तो समूळ नाहींसा झाला आहे असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. मराठीकडे दुर्लक्ष करून आजन्म इंग्रजींतच लेख लिहिणारे महाराष्ट्रांत अजून किती तरी सांपडतील. जें प्रेम व जी कळकळ आमच्या वंगबंधूंना बंगाली भाषेबद्दल वाटत आहे, तें प्रेम व ती कळकळ आम्हां महाराष्ट्रीयांत दिसत नाहीं. सुशिक्षित लेखक इंग्रजींतच लिहितात. मग मराठी भाषा साधारण बुद्धीच्या लोकांच्या हातीं पडली तर तो दोष त्यांचा नसून तिचे पुत्र असून जे तिला पारखे झाले आहेत त्यांचा आहे. सुशिक्षितांनीं मराठी वाङ्मय आपल्या हातीं घेतल्यास व तिची आजन्म सेवा करीत राहिल्यास त्या भाषेची सुधारणा होण्यास फारसा विलंब लागणार नाहीं.

वरील मासिकांशिवाय कांहीं मासिकें विशिष्ट वर्गाकरितां निघालीं आहेत. लहान लहान मुलामुलीं-

करितां जीं चार पांच मासिकें आहेत त्यांत 'आनंद' हें सर्वांना प्रिय झालेलें मासिक आहे. स्त्रियांकरितां एक मासिक पुस्तक आहे. पण त्याचें संपादकत्व बंगालींतील प्रमाणें कोणा स्त्रीकडे नसून पुरुषाकडे आहे. ज्ञातीपुरती उन्नति करणारीं जीं मासिकें आहेत, त्यांचें उद्देश्यक्षेत्र संकुचित असल्यामुळें वाङ्मयाचे कामीं त्यांचा उपयोग होणें नाहीं. केव्हां केव्हां त्यांचें परस्परांशीं इतकें अनुदार वर्तन असतें कीं हीं मासिकें राष्ट्रीय उच्च भावना प्रसृत करण्यापेक्षां मूळच्या ज्ञातिविषयक संकुचित भावना दृढ करण्यासच जणूं काय भूतलावर अवतरलीं आहेत असा संशय उत्पन्न होतो. असल्या बाबतींत दिवसेंदिवस अनिवार वाढ होत गेल्यास महाराष्ट्रांतील ' अठरा पगड !' जातीं-प्रमाणें ' अठरा पगड ' मासिकें वावरूं लागतील !

विद्यमान मासिकांबद्दल एवढें सांगितल्यानंतर मासिक पुस्तकें कशा प्रकारचीं असावींत असा साहजिक प्रश्न पुढें उभा राहतो. मनोरंजकता हें तर मासिकांचें प्रारंभींचें ध्येय पाहिजे; पण त्या शब्दाचा अर्थ मात्र रूढार्थाप्रमाणे संकुचित न करतां अधिक व्यापक व उदात्त केला पाहिजे. पुस्तकांतही मनोरंजकता आण-ण्यासाठीं त्यांत बहुश्रुतपणाची आवश्यकता आहे. या गुणाच्या योगानें तें मासिक सर्वांना सारखें प्रिय होतें. ज्ञानाची लालसा लावावयास पहिल्या गुणाचा उपयोग होतो तर ती अनेकविध करण्यास दुसऱ्याचा होतो.नानाप्रकारच्या शास्त्रांवरील जाडे ग्रंथ वाचण्याचा धीर वाचकांना पहिल्यानें होत नाहीं, व झालाच तर ते ग्रंथ पुढें कंटाळवाणेही होतात.अशा शास्त्रीय ग्रंथांची अभिरुचि उत्पन्न करण्याचें काम मासिकपुस्तकांचेंच आहे. तेव्हां वरील दोन्ही गुणांवांचून हें जबाबदारीचें काम योग्य रीतीनें बजावणें त्यांना अशक्य होईल. मासिकांनीं तो विषय संकलित स्वरूपानें सहज मौजेंत समजावून दिला तर मूळ ग्रंथ वाचण्याकडे वाचकांची प्रवृत्ति होईल. ज्या विषयांच्या चर्चेपासून नैतिक व सांपत्तिक उत्कर्षाचा मार्ग स्पष्ट होण्याजोगा आहे असे विषय; ऐतिहासिक, शास्त्रीय, सामाजिक, वाङ्मयिक व शिक्षणविषयक तात्त्विक निबंध; तसेंच प्रवासवर्णनें, औद्योगिक व व्यापारी विषय इतक्यांचा त्यांत समा-वेश झाला पाहिजे. त्यांत राजकीय विषय येणें किती महत्त्वाचें व जरुरीचें आहे याविषयीं मागें लिहिलेंच आहे. ग्रंथपरीक्षणास त्यांत वाव मिळाला पाहिजे. कारण त्या योगानें भाषेंत जे नवीन नवीन ग्रंथ उदयास येतात, त्यांची ओळख व त्यांतील गुणदोषांचें विवेचन झाल्यानें वाचकांची फसवणूक न होतां त्या ग्रंथांची खरी किंमत कळून चुकते. याशिवाय परकीय मासिकां-तून जे चांगले चांगलें विषय येत असतात, त्यांतून भाषांतरित उतारे महत्वाच्या मानानें कमी अधिक आले पाहिजेत. कारण त्या योगानें परकीयांत कोण-कोणत्या विषयांची चर्चा चालू आहे हें समजतें. कांहीं प्रसंगीं तर त्याचा उपयोग मार्गदर्शकासारखा होत असतो. अशा प्रकारच्या ' साहित्यचर्चे'चा उपक्रम विविधज्ञानविस्तारानें सुरू केला होता. पण तो पुढें बंद पडला. वाचकवर्ग बहुश्रुत करण्याकरितां जगां-तील प्रचलित विषयांचें सुद्धां थोडक्यांत समालोचन आलें पाहिजे . ' नवयुगा'ची ' जगांतील घडामोड' देण्याची पद्धत प्रशंसनीय आहे.एकंदरीनें मासिक पुस्तकें वाङ्मयाच्या विस्तीर्ण भव्य प्रासादाचें शोभिवंत प्रवे-शद्वार झालीं पाहिजेत. त्या द्वारांतून जाण्याचा अनि-वार मोह सगळ्यांना सुटला पाहिजे. व आंत शिर-ल्यावर त्या प्रासादाचें सर्व बाजूंनीं दर्शनही झालें पाहिजे.

येथवर आम्हीं मराठींतील मूळच्या मासिक पुस्त-कांचा त्रोटक इतिहास सांगून त्यांच्या सांप्रतच्या स्थितीचें वर्णन केलें आहे. व शेवटीं त्यांचें सामान्य स्वरूप व धोरण हीं कोणत्या प्रकारचीं असावींत याचें दिग्दर्शन केलें आहे. मराठीसारस्वतरूपी नदीचा कांहीं विशिष्ट काळांत संकोच होऊन तिचा गतिनिरोध झाल्यासारखा भासला तरी शेवटीं तिची प्रगतिच होत आहे हें त्यावरून स्थूळ रीतीनें समजून येईल. मराठींत कांहीं काळ जरी एकसारखे प्रतिध्वनींच ऐकूं आले तरी त्यांत केव्हां केव्हां मूळ ध्वनीं-चेही सूर मिसळत आहेत. मराठी भाषेचा उत्कर्ष होत आहे कीं अपकर्ष होत आहे यासंबंधानें विवेचन करण्याचा काळ मागेंच लोटला. ती उत्कर्षो-न्मुख आहे ही गोष्ट आज निर्विवाद आहे. हा तिचा उत्कर्ष सर्वांगांनीं होऊं लागला आहे. त्याचा प्रत्यय हल्लींचीं मराठी मासिकें या एकाच अंगाची कांहीं वर्षांपूर्वीच्या मासिकांशीं तुलना केल्यानें सहज येणार आहे.तथापि मराठी भाषेसंबंधीं स्वाभिमानाची ज्योत तिच्या प्रत्येक सत्पुत्राच्या अंतर्यामीं पेटून ते तिचीं अपुरीं अंगें पूर्ण करण्याला जेव्हां एकनिष्ठपणें प्रवृत्त होतील, तोच [illegible]

कवि-कुसुम.

[साकी.]

सहज एकदां उपवनिं गेलों हृत्तापा शमवाया,
रमवाया निज चंचल मन वा सृष्टिसवेंही गाया. १
वसंतऋतुच्या ध्वजा विमुकल्या नानाविध रंगांच्या
वृक्षलतांच्या पल्लवरूपें फडकत होत्या साच्या. २
पल्लववेष्टित वृक्षस्कंधीं बैसुनि आनंदानें
खगगण झोंके घेत मजेनें गाई सुस्वर गाणें. ३
दिनोदयीं वा संध्याकालीं दिनपति श्री सूर्याला
तरुशाखाहस्तें वनदेवी अर्पित पर्णफुलांला. ४
तेणें भूतल कुसुमित होई, सौगंधिकहि तसेंच
देवी म्हणती जणुं रसिकातें—वेंचतोस किति वेंच ! ५
पाहुनि ऐशा वनदेवींच्या अनुपम विविध विलासा
प्रेमभरानें कवणाचें मन पावेल न उल्हासा ! ६
अरसिकातें रसिक बनवि जें, रसिका काय करील ?
पूर्णचंद्र तो जसा सागरा प्रेमोर्मीनें भरिल ! ७
काव्योदधितिल अनंत काव्यें प्रगट जाहलीं कैशीं ?
चंद्रसागरा, रविकमलाला, ठाउक आहे खाशी. ८
प्रेमाकर्षित करणें धर्मेचि हा कीं प्रिय विषयाचा
कळो न कळो अम्हां तत्त्व हें, व्यापक चराचराला. ९
दिव्य अशा ह्या स्वर्गिय प्रेमें विश्व असे भरलेलें
त्यावांचुनियां अखिल भूतलीं एकहि स्थल नच उरलें. १०
प्रेमांतुनि हें विश्व प्रगटलें, प्रेमीं सुस्थित झालें
प्रेमातचि हें मिळेल अंतीं, प्रेमरूप असलेलें. ११
प्रेमाचा—ह्या अखंड अविचल अनंतशा प्रेमाचा—
अनुभव घेई भाग्यशालि जो, प्रेमपूर्ण हृदयाचा. १२
प्रेमि जनास्तव प्रेमकथन हें, इतरां काय कळेल ?
पात्र ज्यास जो तेंच तयाला, तदितर काय मिळेल? १३
देव-भक्त, कवि-सृष्टि, ऐशा प्रेमळ जोडि जगांत
प्रेमैक्यें जें हृदयनिवेदन, तेंच काव्य वदतात. १४
प्रेमध्वनि तो तेथिल मिपजवि सुंदर काव्य जगांत,
काव्य प्रेमा प्रगटवि; ऐसे खेळति ते उभयांत. १५
काव्य कळेना, प्रेम कळेना, ज्याला कांहि कळेना
बसलों होतों असा पिशापरि, उठवित तरंग नाना. १६
मत्सान्निधशा गुलाबवृक्षीं पुष्प एक फुललेलें
वायुसवें जें खेळत होतें, सौंदर्यें भरलेलें. १७
आकाशांतिल दिव्य तारका, तींच फुलेंही झालीं
स्वर्गिय तैशा भूलोकींच्या सौंदर्यें तीं नटलीं. १८
पाहुनि ऐशा सुंदर सुमना मन्मन मोहित झालें
खुडुनि स्वकरें बहुप्रेमानें हृदयीं धारण केलें. १९
स्वार्थाचा हा मोह अनावर ठाउक कीं सकळांला;
होतें सुम तें सुखांत अपुलें, अदयें खुडिलें त्याला ! २०
घेउनि मग तें गृहा चाललों मोठ्या आनंदानें
सुमन मला बहु सुखवित होतें अपुल्या सौगंधानें. २१
पुष्पें अपुला सुवास देती, पक्षी मंजुळ गाती;
चित्तवृत्ति हो प्रसन्न तेणें, प्रेमाचीं हीं नातीं. २२
गृहा पातलों सुमासहित मी, ठेवियलें बहु जपुनी
मधुगंधें परि प्रगट जाहलें, राहिल कां कधिं लपुनी? २३
सत्य, प्रेमा, सौंदर्यादिक हे सद्गुण जेथें असती
असो कुठें ते, हुडकुनि काढिल त्याला मानवजाती. २४
उंच नभीं नक्षत्रें तैशीं अथांग सागरिं रत्नें
लपलीं होतीं परि प्रगटलीं केवळ मनुजप्रयत्नें. २५
पाहुनि कुसुमा प्रेम पसरलें सर्वत्राचि भुवनांत
नवल वाटतें बालकही त्या प्रेमें घे हस्तांत. २६
फुलें मुलें हीं समान, ज्यांचीं प्रेमळ निर्मळ हृदयें
परस्परांची जोडी जमली प्रेमाकर्षणन्यायें. २७
असो सुमन तें केवळ स्वगुणें सर्वांना प्रिय झालें—
झालें होतें असें म्हणाया भाग पाडिलें काळें ! २८
सर्वांचें आवडतें सुम तें ठेवियलें बहु जपुनी
प्रभातकालीं पाहुं लागलों, गेलें सुमन सुकोनी. २९
प्रफुल्लता ती, सुवर्ण तैसा, सौगंधही तसाच
सौंदर्यादिक सर्व तयांतिल लुप्त जाहलें साच. ३०
कोठुनि आले होते गुण ते, कोठें नाश जहाले
आले गेले उगीच कां मग श्रमित बिचारे झाले ! ३१
हाय विधे! तूं अदय असासि किति-खेळ कसा तुज रुचला
बहु चातुर्यें सृजिलें सुम जें तेंच बिघडण्या सजला ! ३२

केवळ सत्ताबलें समजसी त्रिभुवनिं मीच शहाणा.
नित्य विघडिशी सुंदर वस्तू चढोनियां अभिमाना. ३३
सुंदर पुष्पें किती सुकविलीं लोळविलीं भूभागीं
मानवरत्नें होमियलीं तूं कालानलीं अभागी. ३४
बहुकाळाचा असससि विधे तूं वृद्धदशा तुज आली
बरें वोखटें कळे न तुजला मंद दृष्टि तव झाली. ३५
तुझा अदय कर जिथें न फिरला एकहि स्थल नच ऐसें
निजहस्तें जें रचिलें प्रेमें तेंच विघडिलें कैसें ? ३६
सुंदर सुम हें नाश पावलें बघतां बघतां दृष्टीं
अदय काल हा अशीच नाशिल सर्व चराचर सृष्टी.३७
कालमुखांतिल भक्ष्य विश्व हें तेथें काय उरेल ?
एकामागुनि एक गिळिल तो, सागरिं लवण विरेल.३८
कवे ! उगा कां धडपडसी तूं अपुल्या जिविताशेनें
केव्हां नकळे मुखांत जाशिल उघडियले काळानें ! ३९
ज्यासाठीं तूं चिंता करिसी रात्रंदीन मनांत
तें स्वजीवित वा स्वजनाचें आहे काय अनंत ? ४०
जिविताशेला जिथें न थारा वैभव-आशा कसली ?
प्रचंडानलीं वृक्ष न उरती उरतिल कां तृणवल्ली ? ४१
मग कां उगिचचि जिविताशेच्या लागुनियां नादाला
तदर्थ करणें धनसंचयशा नानाविध कर्माला ? ४२
कोठुनि आलें जीवित हें मम जाइल कुठें लयाला ?
येई जाई काय तयांतिल हेतु कळे न कुणाला. ४३
गूढ तत्त्व हें कुणा न कळलें कळेल कां कधिं पुढतीं ?
धुंडधुंडुनी त्याला श्रमली अखिलहि मानव-जाती. ४४
ज्यासाठीं ही कीर्ती धन वा स्वजनादिक प्रिय वाटे
जीवित तें आमुचें न शाश्वत जाइल कवणा वाटे. ४५
अखंड जगुं हें जीवित अमुचें समजुनियां अभिमानें
वागत आलों, परी कथियलें क्षणभंगुर सुमनानें. ४६
सुंदर सुम तें शुष्क पाहुनी दुःख होय अनिवार
असेंच अमुचें जीवित कधिंतरि कालमुखीं जाणार.४७
सुगंध, शोभा, सुबोध तैसा देउनि बा प्रिय सुमना !
धन्य जाहला आज खरोखर उपकृति तव वदवेना.४८
जिवित-तत्त्व हें काय असें बा कळेल कां मज सुमना !
तूंच मांडिलें कोडें पुढतीं, कोणाला उमजेना ! ४९
सुमा अससि तूं पवित्र लोकीं, परोपकारी तैसा
शुद्ध अससि बा ! अम्हांसारिखा लिप्त न ह्या दंभासा !५०
सहज लिलेनें प्रगट जाहला, कालवशें सुकलास
हर्ष-शोक ह्या दुःख-द्वंद्वा लवमात्र न शिवलास. ५१
खचित गड्या तुज ठाउक आहे कोडें हें जिविताचें
कृपा करोनी कथन करीं तें सुधामधुरशा वाचे ! ५२
कुसुमस्पर्शें, कुसुमचिंतनें, कुसुमातें बघण्यानें
मन्मन सुममय होउनि वदलें सुमनाच्या भाषेनें. ५३
सुममय होतां समान झालों, भेद न कांहीं उरला
नवल काय मग प्रेमळ सुम तें सस्मित वदलें मजला:५४
कवे ! अससि तूं प्रेमळ तैसा सदय हृदय तव बा हें
परदुःखें जो दुःखित विरळा ठाउक सकळां आहे. ५५
आजवरी किति सुंदर सुमनें गेलीं व्यर्थ सुकोनी
दुःख कुणाला झालें अथवा क्षणजीवित ये कळुनी. ५६
पाहुनि मजला दुःखित तव हें मृदु मानस कळवळलें
हळहळलें बहु मत्प्रेमानें, केवळ मत्सम झालें. ५७
प्रेमतत्त्व तूं वदसी जें कीं सत्य सत्य तें आहे
तेंच वदवितें शुष्क सुमा मज सांप्रत तुजशीं बा हे.५८
प्रेमरहित ती दृष्टि जयांची शुष्क सुमन मी त्यांचें
प्रेमळ दृष्टी मला जिववितें, चैतन्यचि प्रेमाचें. ५९
जिवलग आपण स्नेही जमलों प्रेमें एकचि झालों
परस्परांचें हृद्गत बोलूं, द्वैतभाव निज हरलों. ६०
केवळ सुम मी क्षुल्लक लोकीं विवेक मजला कैंचा ?
ईशदयें परि ठाउक जें जें कथितों, तूं प्रेमाचा. ६१
मत्प्रेमानें वेडा झाला विवेक कांहिं न उरला
म्हणुनि गड्या तूं सृष्टिकमाला निंदियलें काळाला. ६२
शुद्धापासुनि निर्मियलें जग शुद्धरूप हें त्याचें
अहंकृति-दोषें मलिन भासतें शुद्धहि जरि तें साचें. ६३
दिसेल जग हें पाहूं तैसें शुद्ध मलिन अपणाला
दोष न त्यांत तयाचा कांहीं बोलचि हा दृष्टीला. ६४
अव्यक्तांतुनि व्यक्त जाहलों केवळ ईशेच्छेनें
तिथेंच आतां विलीन होउनि जाइन मी प्रेमानें. ६५
मला न वाटे जीवित माझें आहे तें ईशाचें
तोच तयाचा प्रेरक चालक व्यर्थ अहंपण अमुचें. ६६
माता तात धनी अमुचा तो बंधु स्वजनादिकही
तोच आमुचें जीवन लोकीं, त्यावांचुनि जग नाहीं.६७
सृजिलें तेणें विश्वभुवन हें मोठ्या कौशल्यानें
रची, विघडवी तोच खरोखर, कारण त्याचें जाण. ६८

तद्-इच्छेनें प्राप्त जाहलें जीवित जें अपणाला
अहंकृति-दोषें मलिन न व्हावें आवडतें हें त्याला. ६९

कृपा तयाची दिधलें तेणें शुद्ध सरळ जीवन हें
तदर्थ केवळ रक्षण करणें उचित आपणां आहे. ७०

बरें वोखटें असो कसेंही त्याला तें प्रिय आहे
बळें ओढुनी ओझें स्वशिरीं दुःख करावें कां हें ! ७१

व्यक्त करो वा खुशाल त्यातें मिळवो अव्यक्तांत
करो तयाला हवें तसें तो काय बिघडतें त्यांत. ७२

उत्पादक कीं तोच तयाचा तें तन्निर्मित साचें
त्याचें त्यासचि अर्पण करणें होइल खचित सुखाचें. ७३

नदी सागरा मिळोनि जाइल, रश्मी श्रीसूर्यातें
जणूं चंद्रिका तारापतितें एकपणें कीं मिळते. ७४

जीवन अमुचें मिळेल तसें समरस तें होईल
कोण कुशल मग समर्थ लोकीं ! भिन्नपणें निवडील ? ७५

नित्यामाजीं नित्य मिसळलें, काय उरे मृत्यूला
जन्म-मृत्यु सुख-दुःख द्वंद्वें केवळ अहंपणाला. ७६

निजात्मबोधें दृष्टि उजळतां विश्वहि शुद्ध दिसेल
शुद्ध जिवित हें रमेल तेथें शुद्धानंद मिळेल. ७७

असार जग हें कवे ! तेधवां सारपूर्ण होईल
विश्वगूढ हें यथार्थ तेव्हां स्वानुभवा येईल. ७८

म्हणुनि गड्या तुज खचित सांगतों उदास तूं नच होई
क्षणजीवित मज पाहुनि कां रे ! पडसि निराशा-डोहीं? ७९

अहंपणाचें क्षणजीवित तें अर्पण करिं ईशाला
चिरंजीव तूं होशिल तेणें वरिशिल आनंदाला. ८०

तुला न केवळ तुझ्यापासुनी मिळेल तो इतरांला
जोडाया जणुं भू-स्वर्गातें दुवाच होशिल मधला. ८१

धैर्योत्साहें स्वकर्म करणें हाच जगीं पुरुषार्थ
वदले भगवान् कृष्ण अर्जुना हाच असे परमार्थ. ८२

भीतीनें वा नैराश्यानें स्वकर्म जो सोडील
तोच पतित नर जाण अंतरीं, काळ तया ग्रासील. ८३

अहंपणातें, सुखदुःखातें विसरुनि कर्म करावें
घडेल जें जें तसेंच सारें प्रभुपदिं तें अर्पावें. ८४

जेथुनि आलों जाऊं तेथें तोच विसांवा अमुचा
समर्थ होइल केंवि कथाया तन्निर्मितशी वाचा. ८५

वदुनी ऐसें मत्प्रिय सुम तें स्तब्ध जाहलें फिरुनी
किती विनविलें परि नच बोले जणुं कीं साधक मौनी. ८६

धन्य ! धन्य ! तूं सुमना होसी मूर्तिच पावित्र्याची
ईशसमर्पित जीवित तूझें, सरिता सद्बोधाची. ८७

धन्य क्षण हा मम जिविताचा, आलों सरित्तटाकीं
तप्ततनू मी न्हालों येथें, सकल मनोमल टाकीं. ८८

बोधामृत हें प्राशन करितां तळमळ सर्वहि हरली
पुरलें भयचिंतादिक मानसिं सुखद शांति अवतरली. ८९

ठेविन तुजला मम गृहिं जपुनी, बोध तुझा हृदयांत
'कविकुसुमां'च्या सुंदर पात्रें वांटिन ही रसिकांत. ९०

सुमनें दिधलें बोधामृत जें देतों तें रसिकांला
मलिन जाहल्या रसिकांकित मी, व्हावें पात्र क्षमेला ! ९१

विनायक अनंत ओतूरकर.

महाराष्ट्र-वाङ्मयाच्या अभिवृद्धीचे कांहीं उपाय.

(लेखक-प्रो॰ गोविंद सदाशिव आपटे, एम्. ए., बी. एस्सी.)

१. मराठी भाषेचा प्रसार करणें, तिला उच्च श्रेणीवर नेऊन पोहोंचविणें, व तिच्या प्रभावानें इतरांच्या मनांत तिजविषयीं आदर उत्पन्न करणें, हे आपल्या भाषाभिवृद्धीचे उपाय आहेत. हे उद्देश तडीस जाण्याकरितां जो तो आपापल्यापरी प्रयत्न करतोच आहे. परंतु कधीं कधीं ध्यानीं मनीं नसतां तेच आपले प्रयत्न आपल्या इष्ट हेतूच्या आड येतात. एकदां पुढें टाकिलेलें पाऊल परत घेणें हें भेकडपणाचें लक्षण जाणून तें पाऊल कांट्यावर पडलें असलें तरी आपला हट्ट, मुंगळ्याच्या चिकाटीप्रमाणें, सोडण्यास आपण तयार नसतों. अशा प्रकारचीं किती तरी उदाहरणें मासिकपुस्तकांतून व वर्तमानपत्रांतून उत्पन्न जाहलेल्या वादविवादांत दृष्टोत्पत्तीस येतात. एखाद्यानें आपले डोक्यांत आलेली कल्पना केवळ चिकित्सेकरितां म्हणून बाहेर काढून ती सरळ भावानें लोकांपुढें मांडावी; तों त्याला शेवटीं असें वाटण्याची वेळ येते कीं, मी कोणीकडून या भरीस पडलों! मनाची समता कायम ठेवून वादविवाद सुरू असला तर एक प्रकारचा आनंद होतो, व वादविवाद करणाराविषयीं आदर उत्पन्न होतो. अशा वादविवादानें वाङ्मयांत एक प्रकारची भर पडते. याप्रमाणें तडीस गेलेले वादविवाद फार थोडे असतात. पुष्कळदां असें पाहण्यांत येतें कीं, प्रतिपक्षी केवळ आपले स्वभावानुरूप मूळच्या वादीवर कडक भाषेचा विनाकारण प्रयोग करीत असतो. कधीं कधीं तर नसता वाद उत्पन्न करतो, व वादीनें सरळपणानें दिलेलें उत्तर त्यास पसंत न होऊन वादी चिडल्याशिवाय त्याला समाधान वाटत नाहीं. कदाचित् असें म्हणतां येईल कीं, आवेशांत आलेल्या वादिप्रतिवादीस आपण विनाकारण उपरोधिक भाषा वापरीत आहों याचें भान न राहणें साहजिक आहे. कोणतेंही कारण असो, तरी अशा प्रसंगीं ज्या नियतकालिकांतून हा वाद छापला जातो, त्यांच्या संपादकांनीं मनांत आणिल्यास पुष्कळ सुधारणा होऊं शकेल. वादग्रस्त मुद्दयाचीं उत्तरें व प्रत्युत्तरें प्रसिद्ध करणें हें मुख्य काम असल्याकारणानें उपरोधिक व खोडसाळ मजकूर गाळून टाकण्यासंबंधीं आपला हक्क त्यांनीं बजाविल्यास त्या वादास पुढें जें घाणेरडें स्वरूप प्राप्त होतें, तें टाळतां येईल. व लेखकांचा वैय्यक्तिक मत्सर जो वाढल्या प्रमाणावर व्यक्त होत असतो, त्याला एक प्रकारचा आळा पडेल यांत संशय नाहीं.

२. परंतु कधीं कधीं त्या त्या मासिकाचा किंवा पत्राचा संपादकच जेव्हां प्रतिस्पर्धी असतो, तेव्हां मात्र या लागट व असभ्य भाषेच्या वाङ्मयाला ऊत येतो. त्याच्या हातीं पत्र किंवा मासिक असतें, व अशा प्रकारच्या मजकुरास यानंतर स्थळ मिळणार नाहीं असें त्यास कोणी दरडावणारा नसतो. मग वादीच्या मजकुरापैकीं आपल्यास इष्ट तेवढाच मजकूर छापून आपली मात्र मनसोक्त टीका छापण्यास त्यास मुभा असते. माझाच मुद्दा खरा आहे, असा वरचेवर पुकारा करण्यास त्याला सवड असते. यामुळें परिणाम असा होतो कीं, अशा मतानें तत्त्वशोधन मुळींच होत नाहीं. वादी मूग गिळून पुनः अशा अरेरावी मनुष्याच्या तोंडीं लागणें म्हणजे सभ्यपणास व साक्षरतेस अयोग्य आहे, अशी मनाशीं गांठ बांधून अपमान सोसण्यास तयार होतो. दुसऱ्या एखाद्या पत्राचा संपादक वादीचा पक्ष घेण्यास तयार जाहल्याशिवाय वादीला वाद पुढें चालविण्यास कांहींच उपाय नसतो. बहुधा अशा प्रकारचे वाद पावसाळी हवेंतील आम्रफलाप्रमाणें मध्येंच गळून जातात. अशा प्रकारच्या चाललेल्या वादाचा निषेध करणें हें इतर पत्रकारांनीं आपलें एक कर्तव्य समजावें एवढाच मला एक शक्यसा उपाय दिसतो; व तेवढ्यानेंही न भागल्यास आजच्यासारख्या सम्मेलनांत त्यांना थोडासा इशारा मिळावा म्हणजे अशा वादांचें स्वरूप सुधारत जाईल, असें मला वाटतें. अशा प्रकारच्या वादांचीं उदाहरणें येथें देणें मला इष्ट वाटत नाहीं. लेखी वादांना याप्रमाणें सभ्यतेचें वळण लागल्यास कित्येक अनोळखी लेखकांमध्यें उत्पन्न होणारा मत्सर कमी होऊन, जाहलेली चर्चा जास्त उपयोगाची होईल, व मातृभाषेची कांहीं तरी योग्य सेवा केलेसें होईल.

३. ज्याप्रमाणें शिष्टाचारास सोडून असणाऱ्या लेखांबद्दल नापसंती दर्शविणें इष्ट आहे, त्याप्रमाणेंच मातृभाषेची योग्य प्रकारें सेवा करणारांची प्रशंसा करणें व त्यांना उत्तेजन देणें हें आपल्यास उचित आहे. अशा तऱ्हेच्या लेखकांचीं नांवें व त्यांनीं लिहिलेले लेख व ग्रंथ यांचा उल्लेख अशा प्रकारच्या परिषदेंतून एखाद्या ठरावाच्या रूपानें होऊन त्या लेखकांचे आभार मानावे, असें मला वाटतें.

४. मराठी भाषेंत निरनिराळ्या विषयांवर जीं पुस्तकें लिहिलीं जातात, त्यांची उपयुक्तता वाढविण्याकरितां त्या पुस्तकांना सूची जोडलेली असावी अशी सूचना करणें मला जरूरीचें दिसतें. सरदेसाई यांनीं लिहिलेला 'हिंदुस्थानचा इतिहास,' 'आपटे घराण्याचा इतिहास,' 'माधवनिदान भाषांतर,' आठल्ये यांची सटीक 'ज्ञानेश्वरी,' या पुस्तकांचीं नांवें उदाहरणादाखल सांगतां येतील. रा. दीक्षित यांनीं केलेला

'भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास' हें पुस्तक फारच उपयुक्त आहे. तथापि त्याला जोडलेल्या सूची समाधानकारक नाहींत. शास्त्रीय विषयावर लिहिलेल्या पुस्तकांना सूची जोडल्याशिवाय तीं पुस्तकें प्रसिद्ध करण्यास योग्य जाहलीं आहेत, असें ग्रंथकारांनीं समजूं नये, एवढी एक त्यांना माझी सूचना आहे.

५. आपल्या भाषेचा उत्कर्ष होण्यास इतर भाषेंतील उत्तम उत्तम ग्रंथांचीं भाषांतरें व रूपांतरें प्रसिद्ध करणें हा एक श्रेष्ठ उपाय आहे. या धोरणानें प्रयत्न सुरूही आहेत. हिंदी भाषेंत **तुलसीकृत रामायण** हा जो एक भक्तिरसप्रचुर व प्रेमळ राष्ट्रग्रंथ आहे, त्या नमुन्यावर मराठी भाषेंतही एखाद्या कसलेल्या आधुनिक कवीकडून त्याच वृत्तांत रामायण लिहवावें, किंवा निरनिराळ्या कवींकडून तें लिहवून त्यांतून एखादें पसंत करून त्या कवींच्या श्रमाचा त्यांना मोबदला मिळावा, असें मी सुचवितों. हल्लीं लोकांची धर्मावरील श्रद्धा कमी होत चालली आहे, ती कायम राखण्यास व लोकांचे मनांत उदात्त नैतिक भाव उत्पन्न करण्यास मला हा एक योग्य उपाय दिसतो. तुलसीकृत रामायणाचे श्रोते किती प्रेमानें व तल्लीनतेनें पुराण ऐकत असतात व त्यांचे मनांत त्याच्या श्रवणानें प्रेमभाव कसा उत्पन्न होतो, हें ज्यांनीं पाहिलें असेल, त्यांना या म्हणण्याची सत्यता पटेल. तुलसीकृत रामायणाचें मराठींत गद्यात्मक भाषांतर जाहलें आहे; तथापि भक्तिरसानें ओथंबलेल्या व विनयादि गुणसंपन्न अशा कवीनें कोमल व गोड शब्दांनीं लिहिलेल्या काव्याची योग्यता त्यास येणें अशक्य आहे. शिवाय तुलसीकृत रामायण ज्या वृत्तांत लिहिलें आहे, तें चौपाई वृत्त यद्यपि मराठी भाषेंत नवीन आहे, तथापि मूळ रामायणाच्या साहचर्यानें तें दिंड्या, साक्या, किंवा ओंव्या यांपेक्षां जास्त लोकप्रिय होईल; शिवाय चौपाई व दोहे या वृत्तांचा मराठी काव्यांत प्रघात पडून पुढें रचिल्या जाणाऱ्या कविताकलापास एक नवीन प्रकारचें वळण लागून, काव्याविषयीं लोकांची अभिरुचि वाढेल, असें मला वाटतें.

६. याप्रमाणेंच 'Deserted Village' या कवितेच्या नमुन्यावर सरळ व सोप्या भाषेंत एखादी कविता एखाद्या प्रासादिक कवीनें लिहिल्यास मराठी वाङ्मयांत महत्त्वाची भर पडेल, व जन्मभूमीवरील महत्त्व, जुने स्नेहीसोबती व परिस्थिति यांची आठवण, बालमित्रांविषयीं साभिमान प्रेम, व वृद्धांविषयीं आदर, हे गुण तरुण पिढीच्या मनांत उत्पन्न होऊन ती कविता लहान मुलें मोठ्या आवडीनें म्हणतील. अशा प्रकारच्या प्रयत्नानें मराठी वाङ्मयाची योग्यता वाढेल हें निराळें सांगणें नकोच. 'विजनपुरी' म्हणून एक अशा प्रकारची कविता पूर्वीच रचली गेली आहे. तथापि खरी उणीव भरून काढण्यास तिच्यापेक्षां जास्त प्रसादयुक्त कवितेची जरूरी आहे, असें मला वाटतें.

७. "Encyclopædia Britannica" या कोशाच्या धर्तीवर मराठी भाषेंत एक विश्वकोश होणें फार इष्ट आहे. परंतु हें अवाढव्य काम कशा प्रकारें हातीं घ्यावें व तें खपविण्याबद्दल काय उपाय करावे, याविषयीं विचार करणें मी या संमेलनाकडे सोंपवितों.

८. मराठी भाषेच्या वाङ्मयासंबंधीं आणखी एक गोष्ट इष्ट वाटत आहे. ती ही कीं, महाराष्ट्र-साहित्यपरिषदेच्या ऑफिसांत मराठी भाषेंत रचलेल्या व रचल्या जाणाऱ्या सर्व पुस्तकांची व लेखांची यादी असावी व त्या ग्रंथांचा व लेखांचा थोडक्यांत लिहिलेला गोषवारा असावा. असें झाल्यानें कोणकोणते ग्रंथ रचिले गेले आहेत, व त्यांपैकीं कोणते उपलब्ध आहेत, याविषयीं एखाद्यास माहिती पाहिजे असल्यास ती त्याला सहज मिळूं शकेल. यामुळें पुष्कळ ग्रंथकारांचे श्रम वांचतील व त्यांच्या बऱ्याच अडचणी दूर होतील यांत शंका नाहीं.

९. शेवटीं आणखी अशी एक सूचना करणें मला इष्ट वाटतें कीं, जेथें मराठी भाषा अंशतः तरी प्रचारांत आहे अशा संस्थानांत या भाषेचा प्रसार होण्याकरितां व तिला त्या त्या राज्यांत उत्तेजन मिळण्याकरितां शक्य ते उपाय परिषदेनें करावे. इंदूर, ग्वाल्हेर, देवास, धार व बडोदा या ठिकाणीं डेप्युटेशनें पाठवून व अन्यतऱ्हेनें तेथील संस्थानिकांना विनंती करून त्या त्या संस्थानांतील मराठी भाषेच्या अभिवृद्धीच्या आड येणारीं कारणें दूर करण्याकरितां प्रयत्न करावा; व अशा संस्थानांचे अधिपतींची यंदांप्रमाणें अध्यक्षस्थानीं योजना करून त्यांच्या मनांत मराठी भाषेविषयीं प्रेम व आदर उत्पन्न करण्याची संधि या परिषदेनें दवडूं नये, अशी मी विनंती करितों.

असो. वर लिहिलेल्या सूचनांपैकीं ज्या कांहीं नवीन असतील त्यांचा हंसक्षीरन्यायानें विचार करावा, व ज्या पुनरुक्त असतील व पूर्वीच पसंत जाहल्या असतील, त्यांचा योग्यता तशा प्रकारची आहे असें जाणून त्यांचा स्वीकार करावा, अशी संमेलनास माझी नम्रपणें प्रार्थना आहे.

धर्माच्या वाङ्मयाची आवश्यकता.

(लेखक-सौ० गंगूबाई खेडकर.)

आपल्या हिंदुस्थानांत धर्माच्या पुस्तकांची किती उणीव आहे, व त्यापासून सामाजिक-दृष्ट्या किती तोटे होत आहेत, ह्याबद्दल माझे वेडेवांकडे विचार मी पुढील सहा मुद्दे घेऊन सांगतें.

पहिला मुद्दाः—**हिंदु लोक धर्मांतर कां करितात?**

आपल्या धर्माचें मुख्य पुस्तक म्हटलें म्हणजे वेद होय. त्याचें भाषांतर सध्यांच्या प्रचलित भाषांमध्यें पुस्तकरूपानें अझून झालेलें नाहीं. कुराण, बायबल वगैरे इतर धर्मांचीं भाषांतरें मराठी, गुजराथी वगैरे भाषांमध्यें झालेलीं आहेत; तसें आमच्या वेदाचें भाषांतर अद्याप न झाल्यामुळें, त्यांत काय सांगितलें आहे, हें आम्हांला मुळींच वाचण्यास मिळत नाहीं. आमच्या कांहीं पुराणांचीं भाषांतरें मराठींत झालेलीं आहेत; पण पुष्कळ संस्कृत शब्दांचे अर्थ तात्त्विकदृष्ट्या निरनिराळ्या तऱ्हेनें होतात, म्हणून त्यांचीं खरीं भाषांतरें जशीं झालीं पाहिजेत, तशीं अझून छापून बाहेर आलेलीं नाहींत. आपल्या पुराणांतील पुष्कळ गोष्टींमध्यें अश्लीलपणा दिसून येतो. कदाचित् त्या गोष्टींचा तात्त्विक अर्थ निराळा असून, तो भाषांतरकारांना साधला नसेल; तरी त्याचा फायदा केव्हां केव्हां ख्रिश्चन मिशनरी घेतात व कोंवळ्या मनाच्या लोकांना ते धर्मांतर करण्यास लावितात. नुकतेंच इंदुप्रकाशांत प्रतिवर्षीं किती हिंदु लोक धर्मांतर करितात, याची माहिती दिली होती; व त्यांत असें स्पष्ट दाखविलें होतें कीं, पुढें अशीच स्थिति राहिल्यास सुमारें पांच दहा वर्षांत बहुतेक अज्ञ हिंदु लोक मुसलमान किंवा ख्रिश्चन होतील. ही खरोखर शोचनीय स्थिति आहे. सांप्रतचा हिंदु धर्म पाहतां, तो केवळ घाईघाईनें थोडीं स्तोत्रें बडबडण्यांत, आठवड्यांतून किंवा महिन्यांतून एक दोन उपास करण्यांत व सण साजरे करण्यांत राहिला आहे. याचें कारण पाहतां असेंच सांपडतें कीं, हिंदु धर्माची संपूर्ण तात्त्विक, नैतिक व शास्त्रीय माहिती देणारीं पुस्तकें जेवढीं सोप्या भाषेंत असावींत तेवढीं नसून, त्यांची माहिती देणारे परिचारक अस्तित्वांत नाहींत. तसेंच धर्मगुरूंचें समाजावर जेवढें वजन असावें तेवढें मुळींच नाहीं. म्हणून अशी शोचनीय स्थिति हिंदुधर्माभिमानी लोकांनीं सुधारणें अत्यंत आवश्यक आहे. धर्माचा पाया बळकट असला म्हणजे राष्ट्राचीही बळकटी कायम राहते, व तोच ढासळला कीं राष्ट्र लयास जाऊं लागतें, असा सार्वत्रिक अनुभव आहे. धर्मभोळ्या माणसांनीं आजपर्यंत कसाबसा धर्म संभाळला आहे. तरी यापुढें भौतिक शास्त्रांचें ज्ञान जसजसें वाढत जाईल, तसतसें पौर्वात्य लोकांप्रमाणें धर्माकडे त्यांचें दुर्लक्ष होत जाईल. तेणेंकरून मत्सर, लोभ, दंभ, इत्यादि रिपूंचें वर्चस्व होऊन हिंदुस्थानांत शांतता राहणें कठीण जाईल, म्हणून धर्मोपदेशासाठीं स्वयंसेवकांनीं तयार होऊन आपल्या धर्माचें व राष्ट्राचें रक्षण केलें पाहिजे.

दुसरा मुद्दाः—**धर्माचा प्रसार करण्यांत येणाऱ्या अडचणी.**

आपल्या हिंदुस्थानांतील लोकसंख्या पाहतां ती ३३ कोटींपेक्षां अधिकच निघेल. त्यांत शिक्षितांचें अशिक्षितांशीं प्रमाण किती तरी अल्प आहे! पुन्हां लोक अनेक जातींनीं व धर्मपंथांनीं विभागलेले आहेत. अशा अज्ञ लोकांना धर्माची माहिती देणें फार कठीण काम आहे. तरी Servants of India सोसायटीच्या स्वयंसेवकांनीं हें काम हातीं घेऊन अनेक परिचारक नेमले तर तें साध्य होणें फारसें कठीण जाईल, असें मला वाटत नाहीं. जेवढे सुशिक्षित आहेत त्यांना धर्माची माहिती देण्यास पुरतशीं पुस्तकें पाहिजेत. ती अडचण दूर करण्यास दोन उपाय दिसतात. ते हेः—

पहिला उपायः—विलायतेंत व अमेरिकेंत पुस्तकें विकणाऱ्या मोठ्या व लहान कंपन्या, Circulating Libraries काढतात. ठिकठिकाणीं मोफत वाचनालयें काढून किंवा थोडीशी फी ठेवून सर्व पुस्तकांचा प्रसार गरीब लोकांत सारखा चालू ठेवतात. याशिवाय Government Circulating Libraries तिकडे अनेक आहेत. अशा सरकारी व खाजगी संस्था स्थापन झाल्या, तर धर्मपुस्तकांचा प्रसार लवकर होऊन लोकांना धर्माची माहिती मिळेल.

दुसरा उपायः—इकडील धनाढ्य लोकांनीं आपला पैसा देवळांत न उधळतां धर्मज्ञान देणारीं पुस्तकें छापून लोकांना धर्मज्ञान देणारा झरा त्यांनीं उत्पन्न केला पाहिजे. विलायतेंत Carnegie नांवाच्या धनाढ्य पुरुषानें अशा ज्ञानप्रसाराच्या सत्कार्यासाठीं लाखों रुपये दिलेले आहेत. त्याचें अनुकरण इकडील श्रीमंतांनीं अवश्य केलें पाहिजे. आमच्या राजेरजवाड्यांनीं व संस्थानिकांनीं एका जुटीनें हें कार्य हातीं घेतल्यास सहज होण्यासारखें आहे.

विलायतेंतील वर्तमानपत्रांची स्थिति पाहतां तेथें गरीबांना लेखनवाचनाचा नाद लाविण्यासाठीं त्यांना अनेक तऱ्हेनें उत्तेजन देण्यांत येतें. त्यांच्याकडून अनेक विषयांवर लेख लिहून मागवितात व त्यासाठीं त्यांना तेथें प्रत्यक्ष किंवा lotteryच्या (सोडतीच्या) रूपानें पैसे देतात. इकडील वर्तमानकार अशाप्रकारचें कसलेंही उत्तेजन देत नाहींत.

तिसरा मुद्दाः—**अनेक जातिभेद व धर्मपंथ.**

आमच्या धर्मप्रसारास मुख्य अडचणी म्हटल्या म्हणजे आमचे अनेक धर्मपंथ व अनेक जाति होत. जातिभेदापासून जितके तोटे आहेत, तितकेच फायदेही आहेत; म्हणून त्या विषयाची चर्चा करण्याचें येथें कारण नाहीं. तरी एवढें खरें आहे कीं, अनेक धर्मपंथांमुळें जातिभेदाला विशेष पुष्टि येते. म्हणून अनेक पंथांतील धर्म हे पुरातन वैदिक धर्माचीं अंगें आहेत व आपण एकाच धर्मवृक्षाचे अवयव आहोंत, असें जातिभेद मानणाऱ्या मनुष्यांच्या मनावर ठसवून दिलें पाहिजे. तेणेंकरून त्यांच्या मनांतील मत्सर व द्वैत नाहींसें होऊन तीं समभावानें वागतील. स्वधर्माची माहिती नसल्यामुळें, कधीं कधीं अज्ञानामुळें व तिरस्कारामुळें, कांहीं मनुष्यें धर्मांतर करण्यास देखील तयार होतात; याचें उदाहरण मीं एके ठिकाणीं वाचल्याचें मला आठवतें. तें असेंः—

एक हिंदु गरीब मनुष्य बरेच दिवस दुखणाईत असून, अत्यवस्थ झाला होता. तो आपल्याला खाण्यापिण्यास कांहीं आणून देण्यासाठीं जवळपास जाणाऱ्या माणसांचें आर्जव करी. परंतु जातीच्या दुजाभावामुळें कोणी त्याच्याकडे लक्ष देईना. शेवटीं जीवितरक्षणासाठीं त्यानें एका मुसलमानाच्या हातून अन्नसेवन केलें, आणि हिंदुसमाजाकडून कधींही पाळल्या न जाणाऱ्या अशा एकमेवाद्वितीयम् या विशाल तत्त्वाला व जातिभेदाला तिरस्कारानें झुगारून देऊन त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारला.

चवथा मुद्दाः—**मुलांचें धर्मशिक्षण.**

आपल्या मुलांना घरीं किंवा शाळेंतही कोणत्याही तऱ्हेनें आपल्या धर्माचें शिक्षण मिळत नाहीं. सणाच्या दिवशीं चांगले झकपक कपडे घालायचे, व गोडगोड चमचमीत पदार्थ पोटभर खावयाचे,एवढेंच त्यांना ठाऊक असतें. सुमारें शेंकडा ९९ मुलांना धर्माची माहिती नसल्यामुळें, त्यांच्या मनाची स्थिति चमत्कारिक झालेली असते. शिवाय आपल्या धर्मांत शैव, वैष्णव, शाक्त इत्यादि अनेक भेद असल्यामुळें, ते भेद कसे व कां झाले व त्या परस्परांमध्यें किती अंतर व साम्य आहे, हें त्यांना मुळींच कळत नाहीं. प्रत्येक बऱ्यावाईट कर्माचें फल प्रत्येकाला भोगावें लागतें, हें मुलांना माहीत नसल्यामुळें, त्यांच्या मनावर कसलाही दाब नसतो. तेणेंकरून त्यांच्या हातून कमीजास्त चुका घडत असतात. एकंदरींत, धर्मासंबंधानें त्यांचीं मनें अज्ञ व नास्तिक असतात. आतांच्या पिढींतलीं तरुण मुलें हींच आपल्या हिंदुस्थानचे खांब आहेत. हिंदुस्थानची उन्नति, अवनति वगैरे सर्व त्यांच्यावर अवलंबून आहे. राष्ट्राचा सर्व पाया धर्मावरच अवलंबून असतो, म्हणून पुढील पिढीचीं मनें धार्मिक, भक्तिशील, पापभीरु व धर्माभिमानी बनविणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. म्हणून मुलांच्या धर्मशिक्षणासाठीं उपनिषदें, भगवद्गीता, योगवासिष्ठ वगैरे पुस्तकांचीं सोपीं भाषांतरें करवून तीं पुस्तकें त्यांच्याकडून शाळेंत किंवा घरीं वाचवून घेतलीं पाहिजेत. लहान मुलांना गोष्टी ऐकण्याचा व वाचण्याचा फार नाद असतो. म्हणून त्यांना गोष्टींच्या रूपानें धर्मशास्त्र व नीतिशास्त्र हीं शिकविलीं पाहिजेत. सांप्रतच्या पौराणिक गोष्टींपासून त्यांच्या मनावर व्हावा तसा उत्तम बोध होत नाहीं, म्हणून अशा पुस्तकांची फार उणीव आहे.

पांचवा मुद्दाः—**स्त्रियांचें धर्मशिक्षण.**

धर्माचें रक्षण आजपर्यंत बायकांनीं उपासतापास, पुराणकथाश्रवण, भूपाळ्या गाणीं गाणें, वगैरे तऱ्हेनें कसेंबसें केलें आहे. मुलींना शिक्षण देणें अत्यंत अवश्य आहे; परंतु मुलांसारख्याच जर पुढील मुली धर्मशिक्षणाच्या अभावानें धर्माकडे दुर्लक्ष करूं लागल्या, तर पुढील पिढ्यांना आयांपासून धर्माचें बाळकडू न मिळून, हिंदुस्थानांतून हिंदु धर्म नाहींसा होईल; म्हणून स्त्रियांना घरसंसाराचीं कामें करीत असतांना फावल्या वेळीं वाचण्यासाठीं व आपल्या मुलांना शिकविण्यासाठीं धर्माचीं सोपीं पुस्तकें पाहिजेत.

धर्मांची एकवाक्यताः—

स्त्रियांना सर्व धर्मांची त्रोटक माहिती दिली पाहिजे. म्हणजे सामाजिक उन्नतीला लागणारी सहनशीलता व प्रौढविचारशक्ति त्यांच्यामध्यें जागत राहून, धर्मपंथांमध्यें असलेला मत्सर

नाहींसा होईल. सामाजिक प्रगतीला सांप्रतच्या धर्मभोळ्या स्त्रियांकडून त्यांच्या अज्ञ समजुती-मुळें मोठा अडथळा येत असतो. सर्व धर्मांची साम्यता पाहून हा अडथळा बहुतेक नाहींसा होण्याचा संभव आहे. म्हणून सर्व धर्मांची एक-वाक्यता करणाऱ्या पुस्तकांची आवश्यकता आहे.

सहावा मुद्दाः—**अद्वैतधर्माचें श्रेष्ठत्व.**

सर्व धर्मांचीं तत्त्वें पाहतां त्यांचीं प्रधानतत्त्वें एकच आहेत. एकाच परमपुरुषापासून सर्वांची उत्पत्ति व त्यामध्येंच सर्वांचा लय होतो. हें तत्त्व समजावून देण्यासाठीं अनेक विभूति व अनेक अवतार उत्पन्न झाले. सर्वांची योग्यता खरें पाहिल्यास सारखीच होती. प्रत्येकानें समया-नुसार लोकांच्या उन्नतीला योग्य असा थोड्या निराळ्या तऱ्हेनें धर्माचा उपदेश केला. ह्याच भेदाचा फायदा घेऊन स्वार्थी लोकांनीं निर-निराळ्या धर्मांचें स्तोम व्यर्थ माजविलेलें आहे. याचा पुस्तकांमध्यें स्पष्ट उल्लेख केल्यास धर्मां-तील दुजेपणा नाहींसा होऊन जगांत बरीच शांतता नांदेल. अर्वाचीन धर्मांमध्यें अवतारी महत्त्व फार माजविलेलें आहे; परंतु हे अवतारी पुरुष देखील दैवाच्या चक्रांतून सुटलेले नव्हते. त्यांनाही देहादि बंधनें व त्यांपासून होणाऱ्या व्यथा होत होत्या; म्हणून त्यांच्या नादीं फारसा काल न घालवितां सत्य व अनंत असा जो आपला ब्रह्मरूपी आत्मा त्यामध्येंच लीन होऊन खरी शांति व खरें सुख मिळवावें; हा जो आपल्याला वेदांत उद्देश केला आहे तोच सर्वांत श्रेष्ठ आहे. त्याचें महत्त्व शास्त्रीय दृष्टीनें विद्वानांनीं मांडलें म्हणजे अज्ञ हिंदु लोकांच्या मनांतील गोंधळ बराचसा शांत होऊन हिंदु-समाजाचा पुष्कळ फायदा होणार आहे.

पाश्चिमात्य विद्वानांना अलीकडे आपल्या अद्वैत तत्त्वांची पुष्कळ गोडी लागली आहे. तर अशा पुस्तकांपासून तिकडील लोकांचेंही हित होऊन जगांत शांतता नांदण्याचा बराच संभव आहे.

सारांश, हिंदुस्थानांत अनेक धर्मग्रंथांतील पौराणिक कथांची तात्त्विकदृष्ट्या एकवाक्यता करणाऱ्या तसेंच हिंदु धर्मांतील अद्वैततत्त्वाचें महत्त्व दाखविणाऱ्या पुस्तकांची अत्यंत आवश्य-कता आहे.

या वरील सहा मुद्द्यांत, आपल्यामध्यें धर्म-पुस्तकांची आवश्यकता कोणत्या प्रकारें आहे व तीं कोणत्या तऱ्हेनें लिहिलीं गेलीं पाहिजेत, याचें विवेचन मीं माझ्या अल्पमतीप्रमाणें थोड-क्यांत केलें आहे. याचा विचार या विद्वत्सभेंत पूर्णपणें होईल अशी मला आशा आहे.

आर्यमहौषधालय मु० पो० आजर्ले.

कोकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्धरामबाण औषधें.

पूर्ण रक्तशोधक, अत्यंत पौष्टिक, चित्तोत्साहक, बुद्धिकांतिवर्धक, सुवर्णमाक्षिक -मौक्तिक-कस्तुरी, प्रवालादिमिश्रत अपूर्व गुटिका.

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग. संधिवातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूल, इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग ताबडतोब दुरुस्त होऊन चित्तात्सोहबुद्धि आणि कीर्ति वाढते, अंगात परिपूर्ण शक्ति येते; शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्मान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिज्ञेचें औषध होय. यामुळें याचे लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून अधिक घेणारास टपालखर्च माफ. त्यांच्या आंत घेणारास ट.ख. वेगळा ४ आणेप डेल. ३२ गो० १ रु०; ७० गो०२ रु०; १६० गो० ४ रु०; २६० गो० ६ रु० आणि ५२० गो. १० रुपये.

थंडगार नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदुकाच वगैरे डोळ्यांचे एकंदर विकार ताबडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. डबीस १॥ रुपया.

कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल—यानें कानांचे सर्व प्रकारचे व्रण आणि तत्संबंधीं इतर विकार त्वरित बरे होतात. बाटलीस १ रुपया.

दंतरक्षक पूड—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काळ दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. डबी ६ आ.

गजकर्ण, खरूज, नायटे इ. विकार ३ दिवसांत बरे होतात ड. ६ आं.

विंचवाचें विष—हें औषध चोळतांच उतरतें. तें ४० मनुष्यांस पुरतें. ड. ८ आणे

हिमज्वरावर वस्ताद औषध—पाळीचे हट्टी ताप तीन दिवसांतच बरें करितें. डबीस १ रु.

पटकी व इतर जुलाब-दोन तीन गोळ्यांनीं अगदीं जलद बरें होतात. ड. १ रु.

सुरंगी, मालती, कल्हार, राजविलास, लक्ष्मीविलास, पुष्पराज इ० बादशाही अति उंची उत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरें सुगंधी अत्तरें आणि केशांस लावण्याची हरएक प्रकारचीं सुवासिक तैलें पूर्ण खात्रीचीं माफक दरानें मिळतील.

सूचनाः—वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्याचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला म्हणून त्याचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. ढोंगी लोकांच्या बनावट औषधाविषयीं ग्राहकांनीं फार सावध असावें. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं, प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.

मु० पो० आंजर्ले, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

ॐ नमः श्रीगणेशाय.

आर्यवनौषधालय मुर्डी.

मदनामृतसंजीवनी

अत्यंत पौष्टिक, मनोत्साहक, कान्तिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक-

कस्तुरिप्रवालादि अनेक वनस्पतिमिश्र अद्भुत गुटिका.

शारिरिक सौख्याचा खरा लाभ करून घेणें असेल तर, या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं. यांच्या सेवनानें कडकी, जीर्णज्वर, अशक्तता, मानसिकदुर्बलता, अनेक वातरोग, प्रदररोग, बाळंतरोग मूळव्याध, नेत्रविकार, कटिशूल, इ. इ. अनेक विकार या गुटिकांपासून त्वरित बरे होतात. कांति व बुद्धि वाढून अंगांत भरपूर शक्ति येते. शरिरांतील रक्त व धातूची वृद्धि होऊन सर्व प्रकारें संसारसुखाचा खरा लाभ होतो. वरील सर्व विकार जाऊन शरीर जोमदार होण्याला या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं, गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांचे वर घेणारास सर्व पोष्ट खर्च माफ. त्याचे आंत घेणारास निराळा पोष्ट खर्च पडेल.

दर—३५ गोळ्यांस १ रु. ७५ गो. २ रु., १६५ गो. ४ रु., २७५ गो. ६ रु., ५५० गो. १० रु.

अपूर्व नेत्रांजन.

यानें सारा, फुलें, वडस, खुपऱ्या, कांचबिंदु, इ. इ. नेत्रसंबंध सर्व विकार फार त्वरित जाऊन दृष्टि तीव्र होते. डबीस १ रुपया.

उष्णवात.

मलबद्धता, ढेकरा येणें, पोटांत केव्हां आग अथवा थंडी होणें, चमका मारणें, कधीं छातींत धडधडण अपचन, पोट फुगणें, कधीं अन्न थोडें व कधीं जास्त खपणें, केव्हां ग्लानि व केव्हां थोडी हुषारी वाटणें लघवी कढत अथवा पिंवळी अगर तांबडी असणें, अगर कधीं थोडी व कधीं जास्त होणें, मधून मधून मस्तक तापणें दुखणें, तसेंच कधीं निद्रा साफ न येणें तर कधीं जास्त असणें, क्वचित भोंवळ उद्भवणें, डोळे त्रासून तापणें व कधीं जड होणें, कधीं हात व पाय यांस तप्तता किंवा सर्दी होणें, हें सर्व किंवा यांतील कांहीं विकार उष्णवातानें उद्भवतात. ते आमच्या गोळ्या व तेल यांनीं अगदीं जलद बरे होतात. ४० गोळ्यांचे डबीस २ रु., व तेलाची वाटली १ रु. एकूण किं ३ रु.

औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सार्टिफिकिट आहेत, यांशिवाय मोटमोठ्या रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसवें, तेलें आणि सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनुपानखर्डा सोबत. टपाल खर्च वेगळा पडेल. माल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य,

पत्ता——मु० मुर्डी, पोष्ट हर्णे, जि० रत्नागिरी.

महाराष्ट्र-साहित्य-पत्रिका.

वर्ष २.] [अंक १०-११.

सचित्र मासिकांस एक सूचना.

" अप्रियस्य च पथ्यस्य श्रोता वक्ता च दुर्लभः । "

पुस्तकांतून काय, किंवा वर्तमानपत्रें, मासिकें वगैरे नियतकालिकांतून काय, चित्रें देऊन त्यांना विभूषित करण्याची आलीकडे बरीच चाल पडली आहे. इतर बाबतींतल्याप्रमाणें पाश्चात्य लोक आपल्या फार पुढें आहेत. तथापि नवयुग, मनोरंजन, प्रभात, चित्रमयजगत् वगैरे मासिकांतून प्रसिद्ध होणारीं चित्रें पाहिलीं म्हणजे या कामीं आमच्या मासिकांनीं बरीच प्रगति केली आहे असें दिसून येतें, व आज नाहीं उद्यां आपण या बाबतींत पाश्चात्यांच्या तोडीचें कौशल्य दाखवूं अशी उमेदही उत्पन्न होते. पण चित्रें देणें ही गोष्ट रूढिमान्य (fashionable) म्हणून तीं दिलींच पाहिजेत, किंवा चित्रें देणें सुधारणेचें चिन्ह आहे, व चित्रें नसणें हें अडाणी, मागसलेल्या स्थितीचें दर्शक आहे, अशी समजूत करून घेऊन चित्रें देणें हें निराळें; व चित्रें दिल्यापासून कांहीं विशेष प्रकारचा उपयोग किंवा आनंद प्राप्त होतो, म्हणून तीं देणें हें निराळें. केवळ पहिल्या हेतूनें चित्रें देणाऱ्या मासिकांसंबंधानें अर्थातच आम्हांस कांहीं बोलावयाचें नाहीं. कारण तीं बोलून चालून फॅशनचीं भक्त असणार; पण जर कांहीं विशिष्ट उपयोगाकरितां चित्रें देण्यांत येत असतील तर तो उद्देश सफल होत आहे कीं नाहीं हें पाहणें आपलें कर्तव्य होय.

आमच्या मतें पुस्तकांत किंवा मासिकांत चित्रें देण्याचे उद्देश दोनः—(१) पहिला उद्देश निवळ **औपयोगिक** (Utilitarian) आहे. वस्तु प्रत्यक्ष पाहणें हा सर्वांत उत्तम मार्ग. त्यानें जशी तिची कल्पना येईल किंवा मनावर ठसा उमटेल तसा तिचें चित्र किंवा फोटो पाहून कधीं येणार नाहीं; व नुसतें वर्णन वाचून किंवा ऐकून तर नाहींच नाहीं. ताजमहाल प्रत्यक्ष पाहणें निराळें व त्याचें नुसतें चित्र किंवा मॉडेल पाहणें, किंवा फक्त शाब्दिक वर्णन ऐकणें वेगळें. एका डुरकणीसरशीं सर्व रान थरारून सोडणाऱ्या वनकेसरीचें प्रत्यक्ष दर्शन कोणीकडे, व त्याचा हुबेहूब करून ठेवलेला पुतळा किंवा काढलेलें चित्र कोणीकडे ! प्रस्तुत चालू असलेल्या महायुद्धांत चर कसे खणलेले असतात, मशीन गन (उल्हाटयंत्र) कशी असते, विमानें कशीं कामें करितात, टार्पेडो (मत्स्यास्त्र), सब्मरीन (जलांतःसंचारी नौका) वगैरे पदार्थ आहेत तरी काय, याची कल्पना चित्रमय वर्णनें वाचूनही आम्हांस कशी बेताचीच असते हें पाहिलें

म्हणजे वस्तु प्रत्यक्ष पाहणें व तिच्या छायेवर काम भागवून घेणें यांत किती तफावत आहे हें चांगलें लक्षांत येईल. पण सर्वच गोष्टी प्रत्यक्ष पाहण्याची हांव धरून कसें चालणार? कांहीं नसल्यापेक्षां थोडें, अर्धवट ज्ञानसुद्धां बरें. दूध मिळालें नाहीं तर मी ताकसुद्धां पिणार नाहीं असा आग्रह धरणें मूर्खपणाचें होईल. म्हणून चित्रांच्या साहाय्यानें अदृष्ट वस्तूंची शक्य तितकी कल्पना देण्याची मनुष्याची सारखी धडपड चालली असते हें योग्यच आहे. ताजमहालाचें दर्शन फार थोड्या लोकांच्या नशीबीं असणार; पण त्याच्या सुंदर प्रतिकृतिद्वारा आपणाला त्याच्या अप्रतिम सौंदर्याची व वास्तुकलेची बरीच कल्पना येते. निदान त्याचें वर्णन अधिक चांगलें समजण्याची पात्रता तरी येते हें खचित. अलेक्झांडर, नेपोलियन, शिवाजी, नाना फडणवीस यांच्या तसबिरा किंवा पुतळे जर नसते तर आम्हांस त्यांच्या स्वरूपाची अजीबात कल्पना आली नसती; व इतिहासप्रसिद्ध पुरुषांचीं वर्णनें वाचतांनां, ते कसे दिसत असतील, त्यांच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून त्यांच्या स्वभावाविषयीं अगर कर्तृत्वाविषयीं, कांहीं अंदाज करतां येत असेल काय, वगैरे प्रकारच्या साहजिक रीतीनें उद्भवणाऱ्या जिज्ञासेचें अंशतः सुद्धां समाधान आपणास करतां आलें नसतें. अशा तऱ्हेचें समाधान चित्रकलेच्या विलक्षण प्रगतीमुळें आपल्यास आलीकडे पुष्कळ मिळूं शकतें व ह्या कामीं मराठी मासिकांनीं आपली जबाबदारी ओळखून आपले लेख चित्रांनीं जास्त विशद व मोहक करण्याची योग्य खटपट चालविली आहे, याबद्दल तीं स्तुतीस पात्र आहेत.

(२) दुसरा उद्देश ललितकलांविषयीं अभिरुचि उत्पन्न करणें हा होय. रमणीय वस्तूंचें सौंदर्य कशांत असतें हें समजून देण, नैसर्गिक किंवा मनुष्यनिर्मित सौंदर्यानें जो एक विलक्षण स्वसंवेद्य व निरपेक्ष आनंद प्राप्त होतो तो अनुभविण्याची पात्रता अंगीं आणणें,— थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जिला रसिकता, सहृदयता, सदभिरुचि असें म्हणण्यांत येतें ती निर्माण करणें, हाही चित्रकलेचा एक महत्त्वाचा उपयोग आहे, व म्हणूनच उदार शिक्षणांत चित्रकलेचा अंतर्भाव करण्यांत येतो. याही दृष्टीनें आपल्या मासिकांनीं थोडीबहुत प्रगति केली आहे ही समाधानाची गोष्ट आहे.

तथापि या बाबतींत अद्याप व्हावी तितकी सुधारणा दिसून येत नाहीं ही गोष्ट नाकबूल करतां येत नाहीं. ललितकलांच्या दृष्टीनें छायाचित्रांना (Photographs) कांहींच महत्त्व नाहीं असें नाहीं. उत्कृष्ट फोटो घेणें ह्याला सुद्धां चित्रकलेचें मार्मिक ज्ञान लागतें; व वस्तूची हुबेहूब प्रतिमा आपल्यापुढें उभी करणें हें काम पुष्कळवेळां स्वतंत्र चित्रांपेक्षां फोटोच जास्त चांगलें करतील. पण कांहीं झालें तरी ग्रंथरचनेंत भाषांतरांचा जो दर्जा, तोच चित्रकलेंत फोटोचा. स्वतंत्र ग्रंथरचना करणें, व तीही उच्च प्रतीची, हें खऱ्या विद्वत्तेचें व प्रतिभेचें दर्शक समजलें जाणार; व उत्कृष्ट भाषांतर हें उपयुक्ततेच्या दृष्टीनें कितीही जरूर असलें तरी त्यानें कर्त्याची योग्यता कमीच ठरणार. या दृष्टीनें पाहतां नवयुगानें व मनोरंजनानें जी थोडीबहुत चित्रकलेची सेवा केली आहे तीबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. कारण एकादा स्वतंत्र

विषय घेऊन त्यावर स्वतःच्या कल्पनेनें नवीन चित्रें (Designs) निर्माण करणारे जे हाताच्या बोटावर मोजतां येणारे चित्रकार (Artists) आहेत त्यांच्या सुबक प्रतिकृति देण्याचा उपक्रम प्रथम मनोरंजनानें केला, व नंतर त्याच्या नवीन बाळसेदार भावंडानें—नवयुगानें—तोच क्रम स्वीकारून आपल्या वडील भावावर ताण केली. पण अशा प्रकारचीं चित्रें अर्थात् दोन्ही मासिकांत अगदीं क्वचितच येतात, व याचें कारणही उघड आहे. एक तर चांगले चित्रकार फार दुर्मिळ आहेत. दुसरें असें कीं, उत्तम चित्रकारांचीं चित्रें मिळालीं तरी तीं सुबक छापणें हें कांहीं सामान्य काम नव्हे. त्याला फार जय्यत साधनसामग्री लागते. रंगीत चित्रांना तर हें विशेषच लागू आहे. व निदान हल्लींच्या लढाईमुळें आलेल्या विलक्षण महागाईच्या दिवसांत चांगल्या संपन्न मासिकांनाही हें काम झेंपणें कठिण होत चाललें आहे. छपाईच्या साधनांची सवंगाई, उत्कृष्ट चित्रकारांची विपुलता, यांवरच स्वतंत्र चित्ररचना व चित्रप्रकाशन अवलंबून असणार; व म्हणूनच या बाबतींत आमच्या मासिकांस फारसा दोष लावतां येत नाहीं.

तथापि तीं अजीबात दोषमुक्त ठरतील असें मात्र मानतां येत नाहीं. उत्कृष्ट कारागीर कमी किंवा महाग म्हणून स्वतंत्र चित्रें देतां येत नाहींत असें जरी मानिलें, तरी ज्या प्रकारचीं चित्रें देण्याची सोय आजमितीस आहे त्याच प्रकारच्या चित्रांत सुबकपणा, स्पष्ट व उठावदार छपाई वगैरे गुण तरी नेहमीं दिसून येतात काय ? शिवाय, स्वतंत्र रचना जर गचाळ प्रतीचीच मिळत असेल तर ती घेण्यांत फायदा तरी काय ? आम्हीं म्हणतों याचें उत्कृष्ट उदाहरण 'चित्रमयजगतां'तून व चित्रशाळेंतून प्रसिद्ध होणाऱ्या इतर पुस्तकांतून दिलेलीं स्वतंत्र व छायाचित्रें हीं आहेत. चित्रमयजगतांतून प्रसिद्ध होणाऱ्या चित्रांच्या उपयुक्ततेसंबंधीं आमचें मत एकंदरीनें बरेंच चांगलें आहे; त्यांत उपयुक्त माहितीनें भरलेले लेख जसे पुष्कळ असतात तशीं त्यांना अनुरूप अशीं चित्रें देऊन ते लेख विशद व चित्ताकर्षक करण्याची खटपटही बरीच केलेली असते, हें खरें आहे. पण कै. परमपूज्य विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं काढलेली व आजमितीस फार भरभराटींत असलेली **चित्रशाळा** ही महाराष्ट्रांतील या प्रकारची सर्वांत जुनी संस्था असून चित्रकलेच्या दृष्टीनें **सर्वांत मागें आहे,** असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. चित्रशाळेंतील रंगीत चित्रें तर अगदींच टाकाऊ असतात; व कोणतेंही पुस्तक असो, त्यांत चित्रेंही असलींच पाहिजेत—मग तीं कितीही गचाळ असोत—असा चित्रशाळेचा बाणाच दिसतो. उदाहरणार्थ चित्रशाळेनें प्रकाशित केलेलीं रा. खाडिलकरांचीं व इतरांचीं नाटकें; व "दुर्दैवी रंगू," "न्याय कीं अन्याय" यांसारख्या कादंबऱ्या, किंवा भारतीय युद्ध, कृष्णचरित्र वगैरे उपयुक्त ग्रंथ घ्या. या सर्वांत चित्रें आहेत, पण तीं कां घातलीं आहेत हें समजणें कठिण आहे. नाटकांतून आलीकडे नटांचे **फोटो** देण्याची वहिवाट पडली आहे, यामुळें चित्रशाळेचें खरें कौशल्य नाटकांतील चित्रांत दिसून येत नाहीं. पण कादंबऱ्यांतून किंवा 'भारतीय युद्धा'सारख्या

पुस्तकांतून ही सोय नाहीं. तेथें प्रसंगानुरूप स्वतंत्र चित्रें घातल्यावांचून गत्यंतर नसतें. तशीं चित्रें जर चांगलीं असतील तर त्यांनीं पुस्तकांतील मजकुरावर प्रकाश पडून कथानकांतील वेगवेगळ्या पात्रांच्या स्वभावाची व प्रसंगांची स्पष्ट कल्पना येण्यास मदत होते. पण तीं जर गचाळ असतील तर यांपैकीं एकही उद्देश साध्य न होतां, त्या गचाळ चित्रांनीं एक प्रकारचा कंटाळा व तिरस्कार मात्र उत्पन्न होतो. अप्रतिम लावण्यसंपन्न **दमयंती** व पुण्यश्लोक वीर **नळ** यांच्या भेटीच्या चित्रांत जर एक रांकट, मिशाळ, स्त्रीवेषधारी पुरुष व त्याच्या समोर एकादा हुजऱ्यासारखा दिसणारा दुसरा एक माणूस नजरेस पडला तर आपणास कितीसा आनंद होईल बरें ? चित्रशाळेंतून प्रसिद्ध होणारीं बहुतेक स्वतंत्र चित्रें (Designs) याच मासल्याचीं असतात असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. असलीं निरुपयोगी व डोळ्यांना आनंद देण्याऐवजीं डोळ्यांत खुपणारीं चित्रें देऊन पुस्तकांची किंमत वाढविण्यापेक्षां तीं नसलेलीं काय वाईट ? पण नाहीं चित्रशाळेंतील पुस्तक, मग तें चित्रांशिवाय कसें चालेल ? यामुळें बिचाऱ्या ग्राहकांना हीं **सचित्र** (कां विचित्र ?) पुस्तकें खरेदी करण्यांत विनाकारण चट्टा बसतो. चित्रें नसतीं तर चित्रशाळेनें प्रसिद्ध केलेलीं नाटकें फार झालें तर आठ आणे किमतींत मिळूं शकलीं असतीं. पण आजमितीस नाटक म्हटलें कीं कमींत कमी बारा आणे ही किंमत ठरून गेलीशी दिसते ! अशा रीतीनें गचाळ चित्रें वाचकांच्या माथीं मारून पुस्तकें महाग करणें हा वाङ्मयाच्या राज्यांतील एक मोठा जुलूम आहे असें आम्हांस वाटतें. नाटकांत चित्रें असलींच पाहिजेत, व तीं अमुक एका संख्येच्या वर असलींच पाहिजेत, असा ग्रह करून घेतल्यामुळें केव्हां केव्हां कसे विचित्र प्रसंग येतात याचें एक नमुनेदार उदाहरण "वासंतिका" नाटक होय. इतर नाटकांत निदान प्रसिद्ध नटांचे विशिष्टप्रसंगदर्शक फोटो तरी असतात. पण यांत तशा प्रकारचे फोटो मिळूं शकले नाहींत असें दिसतें. म्हणून काय झालें ? चित्रांची संख्या कमी करावयाची (व अर्थात् किंमत कमी करावयाची) कीं काय ? छे छे: ! तसलें पाप **चित्रशाळे**च्या व्यवस्थापकांच्या हातून कसें व्हावें ? त्यांनीं दोनतीन फोटोग्राफांच्या जोडीला पांच चार Designs घालून चित्रांची भरती करून टाकली; व एका चित्रांत नायिकेचा चेहरा एक तऱ्हेचा, तर दुसऱ्यांत अगदीं भिन्न तऱ्हेचा, आणि तिसऱ्यांत त्याहून भिन्न, असा चमत्कार वाचकांस दाखविला आहे ! असल्या पंचमेळ खिचडीनें जें वैचित्र्य उत्पन्न झालें आहे त्यांबद्दल वाचकांनीं खरोखरच चित्रशाळेचे आभारी असलें पाहिजे !

'निवळ **फॅशन**करितां' चित्रें देण्याचा हा दुष्परिणाम आहे असें आम्हांस वाटतें. या बाबतींत दुसराही एक महत्त्वाचा दोष आम्हांस दिसतो, तो हा कीं, **चित्रें देण्याला योग्य प्रसंग कोणता याविषयींच्या तारतम्याचा अभाव.** मासिक पुस्तकांतून सर्व प्रकारचे विषय येतात, तेव्हां उपयुक्ततेच्या किंवा सौंदर्याच्या दृष्टीनें चित्रांच्या विषयाची निवड करण्याला त्यांना खूब अवकाश असतो. पण ज्या

विषयांत चित्रें जरूर असलीं पाहिजेत त्यांत तीं न देतां निष्कारण व कंटाळवाणीं चित्रें मात्र भरपूर देणें हें फार दोषार्ह आहे. निवळ सृष्टींतील अद्भुत व रम्य देखावे आपल्या वाचकांस दाखवावयाचे असें मनांत आणलें तरीहि कधीं न संपण्याइतकी साधनसामग्री आजमितीस उपलब्ध आहे. पृथ्वीच्या पाठीवर किती प्रकारचे लोक, किती प्रकारचीं वेषभूषणें, चालीरीति, युद्धपद्धति व शस्त्रास्त्रें वगैरे आहेत; जमिनीवर, पाण्यांत व हवेंत फिरणारे कितीतरी असंख्य व अमित प्रकारचे प्राणी आहेत; कितीक प्रकारच्या वनस्पति आहेत; आकाशस्थ गोलांचें अनंतत्व व मनोरमत्व कसें विलक्षण आहे याची जर वाचकांना कल्पना आणून द्यावयाची असेल; भौतिक सुधारणेनें मनुष्याचें सामर्थ्य आजमितीस कसें वाढलें आहे व त्याच्या सुखाच्या साधनांत किती भर पडली आहे, पण त्याबरोबरच प्राणनाशक साधनांची वाढही कशी सपाट्यानें झाली आहे, याचें विशद वर्णन करावयाचें असेल; पाश्चात्य देशांतील वैज्ञानिक, राजकीय, ललितकलाविषयक उन्नतीचें यथार्थ ज्ञान जर सुलभ करावयाचें असेल;तर चित्रांचा उपयोग जरूर केला पाहिजे, व केवळ इंग्रजी पुस्तकांतून प्रसिद्ध होणाऱ्या चित्रांची नक्कल केली तरी आमच्या मासिकांना आपल्या आलेख्यसामग्रींत विविधता व रम्यता वाटेल तितकी आणतां येईल. अशी स्थिति असतां निष्कारण, निरुपयोगी चित्रांनीं मासिकांची जागा अडविणें व त्या चित्रांना येणारा खर्च वाचकांवर लादून मासिकें महाग करणें सर्वथैव गैर होय. आम्ही म्हणतों या प्रकारचीं निरुपयोगी चित्रें बहुतेक सचित्र मासिकांत—विशेषेंकरून चित्रमयजगत् व मनोरंजन या दोन मासिकांत—फार दृष्टीस पडतात.उदाहरणार्थ चित्रमयजगतांतील खालील प्रसंगांचीं चित्रें पहा. गोंव्याकडील सरदार व्हायकाउंट पेडने यांच्या "भाग्यशाली" मुलाच्या मुंजीवर त्यांच्या एका आश्रितानें कांहीं स्तुतिपर कविता केल्या; त्या कविता, व त्या मुंजींतील सर्व प्रसंगांचे मोठमोठे पानभर फोटोग्राफ छापून चित्रमयजगतानें पुरवणीदाखल आपल्या वाचकांस नजर केले आहेत. सौंदर्याच्या किंवा उपयुक्ततेच्या कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी हे सर्व फोटो छापण्याचें आम्हांस कांहींच प्रयोजन दिसत नाहीं. व्हायकाउंट पेडने हे एक मोठे जहागीरदार आहेत, म्हणून त्यांचा फोटो पाहण्याची कदाचित् कांहीं लोकांस तरी जिज्ञासा होईल. पण त्यांच्या चिरंजीवांच्या मुंजीला आलेले सर्व पाहुणे,भटभिक्षुक, कार्याला मदत करणारे त्यांचे नौकर चाकर व व्यवस्थापक मंडळी, यांपैकीं प्रत्येकाचा चेहरा पाहण्याची चित्रमयजगत्च्या वाचकांस जिज्ञासा असेल अशी आमची कल्पना होत नाहीं. फार तर व्हायकाउंटसाहेबांच्या आश्रितांस व चाहत्यांस हे फोटो पाहून आनंद झाला असेल; पण इतरांना अत्यंत नीरस वाटणारें हें काव्य व असले फोटो देऊन 'चित्रमयजगता'नें आपली जागा कां अडवावी याचें बऱ्याच लोकांस कोडें पडेल असें आम्हांस वाटतें. प्रस्तुत चित्रसमूह केवळ पुरवणीदाखल असल्यामुळें त्यानें वाचकांचें काय खर्च होतें ?—असें कदाचित् म्हणतां येईल. पण शिंदे सरकारांच्या द्वितीय विवाहसमारंभाची

" व्यवस्थापकमंडळी, " फलटण येथील युवराजांच्या लग्नांतील "श्रीमंत राजेसाहेब पत्नींत समाचार घेण्यास आले त्या वेळचा देखावा," " व समाचार घेऊन गेल्यानंतरचा देखावा " वगैरे चित्रांसंबंधानें वरील सबब कांहीं सांगतां येणार नाहीं. या देखाव्यांनीं खुद्द श्रीमंत किंवा त्यांचे आश्रित यांखेरीज इतर कोणास आनंद झाला असेल हें समजणें कठिण आहे. त्याचप्रमाणें मनोरंजनाचीही स्थिति आहे. फलाणे राजेसाहेबांच्या मुलीच्या लग्नांत युरोपीयन पाहुण्यांस दिलेल्या मेजवानीचा देखावा; अमुक साहेबांनीं तमुक इमारतीच्या पायाचा दगड बसविला त्यावेळचा देखावा; वगैरे सारखे मनोरंजक व बोधप्रद देखावे देण्यांत, किंवा " नामदेवसमाजोन्नतिपरिषद्," " जैन शरीरसुधारणेच्छु बाणेकरी, " " मेहेरबान पोलिसकमिशनरसाहेब यांचा पदवीदानसमारंभ," " स्टूडंट्स सोशल ड्रॅमॅटिक क्लब " वगैरे समाजांतील व सभांतील सर्व मंडळीचे ग्रूपचे फोटो छापून समाजसेवा करण्याचे कामीं वरील दोन मासिकांपैकीं कोणास अग्रपूजेचा मान द्यावा हें ठरविणें अंमळ कठिणच जाईल. या बाबतींत सर्वांत कमी दोषार्ह ' ' नवयुग " आहे, व एकंदरीनें चित्रांची चांगली निवड, सुबक छपाई वगैरे कामांत या मासिकानें जी विशेष चतुरस्रता दाखविली आहे तीबद्दल त्याची तारीफ करणें अगत्याचें आहे. वाटेल त्या संस्थानिकाचें किंवा इनामदाराचें केवळ तो श्रीमंत (किंवा त्याच्याकडून कांहीं आश्रय मिळतो) एवढ्यासाठींच चित्रांत प्रदर्शन करणें, ही गोष्ट श्रेयस्कर नाहीं. हा केवळ लुब्रेपणाचा, खुशामतीचा प्रकार आहे. जी गोष्ट श्रीमंत राजेरजवाड्यांची तीच संस्थांची. जातीजातींच्या उन्नत्यर्थ समाज स्थापून खटपट करणें, व त्यांना मासिकांनीं उत्तेजन देणें यांत कांहीं गैर नाहीं; व अशा संस्थांना प्राणभूत असलेल्या एखाद्या धुरीणाचें चित्र देणें हेंही आवश्यक समजण्यास हरकत नाहीं. पण त्यांपैकीं प्रत्येक व्यक्तीचा चेहरा वाचकांच्या नजरेखालीं घालण्यापासून लाभ काय ? गतकालीन किंवा सांप्रतच्या कर्त्या व प्रसिद्ध व्यक्तींचें निदान चित्रद्वारा दर्शन घ्यावें अशी इच्छा होणें साहजिक आहे. पण एखाद्या समाजाचा मेंबर होण्याबरोबर अनेक लोकांच्या दर्शनाला पात्र होतां येणें हें मात्र केवळ मासिकपुस्तकांच्या कृपेचें फळ होय.

पाश्चात्य मासिकांतूनही अशा निरर्थक चित्रांची रेलचेल असते हें आम्हांस कबूल आहे. व म्हणून आमच्या मासिकांस पाश्चात्य मासिकांच्या बरोबरीस आणावयाचें असल्यास अशा तऱ्हेचीं चित्रें दिलीं पाहिजेत, अशी कांहीं मासिकांच्या संपादकांनीं आपली समजूत करून घेतली असावीसें दिसतें. पण हा निवळ भ्रम होय. पाश्चात्यांचें अंध अनुकरण याही बाबतींत करणें हें सर्वथा अश्लाघ्य होय. त्यांच्याकडून घेण्यासारख्या इतर पुष्कळ गोष्टी आहेत. शिवाय दुसरें असें कीं त्यांच्या यःकश्चित् जाहिरातींतल्या चित्रांइतकीं सुबक चित्रें आमच्या नांवाजलेल्या चित्रकारांच्या चित्रांतही क्वचितच आढळतात. अशा स्थितींत उपयुक्ततेच्या व कलेच्या दृष्टीनें पाहिजे तितकीं चित्रें देऊन मग निरुपयोगी व केवळ खुशामती अथवा फॅशने-

बल चित्रें देणें त्यांना शक्य असतें. पण दहापांच चित्रें देतांना नाकीं नव येणाऱ्या आमच्या सचित्र मासिकांनीं त्यांचा कित्ता उचलणें म्हणजे चित्रांचा जो थोडाबहुत उपयोग होण्यासारखा असेल तोही दवडण्यासारखें आहे.

वरील टीकेनें कोणी आपला गैरसमज करून घेऊं नये अशी आमची विनंती आहे. मराठी मासिकांनीं सर्वांगसुंदर व्हावें अशा सदिच्छेनें वरील दोन शब्द लिहिले आहेत. कांहीं मासिकांनीं या बाबतींत थोडक्या कालांत चांगला लौकिक संपादन केला आहे तो आम्हांस मान्य आहे. तथापि अद्याप कांहीं ठळक दोष आहेत; व त्यांपैकीं कांहीं परिस्थितीचा परिणाम नसून संपादकांच्या हयगयीचा परिणाम आहेत असें आम्हांस वाटतें, म्हणून वरील दोन शब्द लिहिले आहेत. गैरसमजुतीला जागा न राहावी म्हणून वरील मजकुराचा सारांश थोडक्यांत देतों:—

(१) शक्य तितकें स्वतंत्र चित्रांस स्थान देऊन चित्रकलेस उत्तेजन द्यावें; पण गचाळ स्वतंत्र चित्रें देण्यापेक्षां मुळींच नसलेलीं बरीं. त्यापेक्षां सुबक रीतीनें छापलेले फोटोग्राफ देणें फार बरें.

(२) चित्रें देण्यांत उपयुक्ततेकडे लक्ष असावें. उपयुक्तता अर्थात् दोन प्रकारची; (अ) विषयविशदीकरणाऱ्याच्या दृष्टीनें, (ब) कलेच्या दृष्टीनें. या दोन्हीं दृष्टींनीं निरुपयोगी चित्रांस मासिकांत स्थान नसावें हें बरें. केवळ कांहीं बड्या लोकांची अथवा आपल्यास प्रिय असलेल्या संस्थांची खुशामत वा बडेजाव माजविणेच्या कामीं चित्रकलेचा उपयोग होऊं नये. योग्य विषयाच्या अभावीं, चित्रें दिलींच पाहिजेत असा विनाकारण समज करून घेऊन, कसलीं तरी चित्रें देऊन मासिकांची जागा अडविणें श्रेयस्कर नाहीं.

जातां जातां आम्हांस एक सूचना करावीशी वाटते. मुंबईस दरसाल एक चित्रकलेचें प्रदर्शन भरत असतें. त्यांत आपल्या इकडील नामांकित चित्रकारांचीं किती तरी चित्रें ठेवण्यांत येत असतात. पण आमच्या मासिकांपैकीं एकदोन वेळ मनोरंजनानें व पांचचार वेळां नवयुगानें तेवढीं यांपैकीं कांहीं नांवाजलेलीं चित्रें छापलेलीं आम्हांस आठवतात. मुंबईच्या आर्टस्कूल मधून चित्रकलेंत निष्णात होऊन बाहेर पडलेल्या चित्रकारांना लोकांच्या नजरेसमोर आणण्याची व अशा तऱ्हेनें देशी चित्रकलेला उत्तेजन देण्याची ही संधी आमचा संपादकवर्ग कां साधीत नाहीं कोण जाणे! यामुळें मुंबई-बाहेरील पुष्कळ लोकांस मुंबईस अशा तऱ्हेचें प्रदर्शन भरत असतें ही गोष्ट माहीतही नसते. तर या बाबतींत ते अधिक लक्ष घालतील अशी आशा आहे. पौरस्त्य व पाश्चात्य चित्रकलेचे नमुने, हिंदुस्थानांतील प्राचीन व अर्वाचीन चित्रकलेचे व शिल्पकलेचे मासले, वगैरे देऊन त्यासंबंधीं कोणा तज्ज्ञांकडून विवेचनपर निबंध जर मासिकांनीं दिले तर वाङ्मयाची व कलेची फार महत्त्वाची सेवा त्यांचे हातून होईल.

"फुलांतील मधुकरास–"

[कवि–'**गिरीश.**']

[वर्षाऋतूमध्यें एकदां रात्रभर पाऊस पडला, व सकाळीं सुंदर, स्वच्छ कोवळें ऊन पडलें. त्यावेळीं एका रम्य वनांत मी हिंडावयास गेलों असतां सृष्टीची ती अनुपमेय शोभा पाहून तेथेंच गुंग झालों, व पुढें त्या नादांत तेथील खळखळ वहाणाऱ्या ओढ्याच्या कांठच्या फुलझाडांचीं फुलें गोळा करीत पुढें चाललों; तों एका सुंदर कोमल फुलांत रात्रभर अडकल्यामुळें, फुलांतच—पण पावसानें मेलेला असा—एक भुंगा आढळला. तथापि तें फूल मात्र त्याला पोटाशीं धरून प्रेमाश्रु ढाळीत त्या दुःखमय संसारांत हंसतच आहेसें वाटलें.]

धन्य धन्य ! तूं सुकुमारा । निज जीवित करिशी भ्रमरा ॥
येउनि या नव रम्य वनीं । विकसित पुष्पांवरि बसुनी ॥
मधु मधु-लोलुप होवोनीं । चिर जीवनकर्मीं रमुनी ॥
पुरोगतीच्या नव लहरी । प्रेमाच्या जलसिंधुवरी ॥
सेवुनि, गुंग विहारांत । मृत होसी गाणें गात ॥
गाउनि गीतें । चैतन्याचे तें । उद्यानातें ॥
देउनि, हो पुष्पागारीं । रत; सुख सेवित संसारीं ॥

दंवबिंदूंच्या अश्रुततीं । तुजवर ढाळी फूल किती ॥
तव हृदयांतिल गोड हंसें । पुष्पमुखीं सुंदर विलसे ॥
"–दुःखाचें जीवन गोड । निर्मी सौख्याचे मोड"– ॥
हें गाणें कथिलें त्यातें । तरि करि कां तें हास्यातें ॥
दशदिशांपरी । त्याच्या लहरी । पसरुनी परी ॥
प्रतिध्वनीनें उमटविती । हृदयीं तव संगीत-तति. *

(२)

"संसार जगीं 'असारता', । 'फोलपणा', वदते जनता ॥
रहस्य त्याचें बिनमोल । रुजवि नरा ! परि हृदिं खोल ॥
कर्तृत्वानें गोडपणा । ये साऱ्या संसारांना ॥
प्रेमाची मिळतां जोड । सर्व होइ गोडचि गोड ॥
निज गानाची । निज हृदयाची । कर्तृत्वाची ॥
संगमता एकत्वांत । विरते, मिळते प्रेमांत ॥
ब्रह्मांडाचीं मग रानें । दुमदुमतिल सारीं गानें ॥
आकाशाच्या पटावरी । लिहितिल कुणि कृत्यें सारीं ॥
अंबरिंच्या उद्यानांत । तारकमणि कोणी रचित ॥
काळाच्या भालावरती । जुळवितील नांवें तीं तीं ॥
चिर लकलकती । हंसतीं फुलतीं । तेजोमय तीं ॥
सर्व जगातें मग कथिती । कर्तृत्वाच्या या रीती ॥

जीव मग विरे प्रेमांत । गोड गोड गाणें गात ॥
'प्रेमकृती' जीवित-सार । जीवाचा मग संसार ॥
संसाराची असारता । स्पर्श करी कीं मग चित्ता ॥
सानुराग होतां जीव । फुलतें तें हृद्राजीव ॥
वृत्ति फुलोनी । मंगल गाणीं । झरती त्यांतुनी ॥
विरती मग एकत्वांत । प्रेमाच्या साम्राज्यांत ॥"

(३)

हीच हीच ना तव रीती । नेई जी दिव्य प्रान्तीं ॥
सुंदर गाणें जीवाचें । हेंच तुझें ना प्रेमाचें ।
त्या गाण्याचे पडसाद । घालिति मम हृदयीं साद ॥
कथण्या 'जीवन–गान' फुला ! । जीव काय तूं वेंचियला ?॥
तरीच तुजसीं । सुम हृदयासीं । मृतदेहासी ॥
रात्रंदिन धरुनी बसलें । प्रेमाचे खेळचि सगळे ।

प्रेम–द्रुय हृदयांतील । निनाद भरला वानें खोल ॥
सार्थकता तरि सुमनाला । वाटुनि करितें हास्याला ।
दुःखाचा निज संसार । सुखमय करि, काढुनि सार ॥
गुणाकर्षणीं जग सारें । ओढि बळें जीवित सारें ॥
आत्मा तव तें । न कळे मातें । फूल कोणतें– ॥
–तूं वा तें ? दोघे 'फूल-' । कविहृदयीं परि चिरकाल. ॥

*कविता (२) मधील सर्व

गेल्या २५ वर्षांतल्या मराठी कादंबऱ्या.

[लेखक-रा. नारायण कृष्ण वैद्य.]

"There is no more searching test of the vitality of a people than the revelation in art-plastic, literary, musical-of their inward being. A national art is a self-revelation where no concealment is possible."

'The Message of the East.'

—*Dr A. K. Coomarswamy.*

(प्रास्ताविक.)

आपल्या इकडच्या पुराणकारांच्या कल्पनेप्रमाणें कृत, त्रेता, द्वापर व कली असे कल्पाचे चार विभाग मानलेले असून त्यांपैकीं प्रत्येक युगाचे धर्म निरनिराळे सांगितलेले आहेत. ह्या कल्पनेच्या मुळाशीं, सृष्टीच्या घडामोडीचें स्वरूप सदासर्वकाळ एकाच रूपांत चालल्यास तिच्या निरनिराळ्या अंगांची वाढ सुरळीतपणें न होतां उत्पत्ति, स्थिति व लय या ज्या तीन अवस्था त्यांच्या कार्यकारित्वांत बाध न यावा व एकंदरींत अनवस्था न व्हावी म्हणून भौतिकसृष्टींत होणाऱ्या फेरफारांबरोबरच माणसानेंही आपल्या वर्तनांत फेरबदल करावयाला हवा, किंबहुना तो होणारच, असें पर्यायानें सुचविण्याचा हेतु दिसतो. जणूं काय सृष्टिदेवी माणसाला म्हणत आहे कीं, मी जो अनादिकालापासून खेळाचा डाव मांडलेला आहे, त्यांत तुम्ही जे खेळणार गडी आहांत ते दक्षपणानें वागा; जर कां गाफील राहिलांत, तर त्याचें प्रायश्चित्त तुम्हांला मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

ह्या सृष्टींत होणारे अंतर्बाह्य फेरफार हे जगत्-स्थितिकारणानुरोधानें होत असल्याचें वर सांगितलें. पण हे होणारे फेरबदल एकंदर विश्वाच्या सुस्थितीच्या धोरणानें चाललेले असल्याकारणानें रहाटगाडग्यांच्या चक्रांत वर दिसणारें गाडगें जसें क्षणमात्रांत अधोगतीला लागलेलें दिसतें, त्याचप्रमाणें मानवी सृष्टींतही कांहीं लोक भाग्याच्या शिखरावर बसलेले, तर कित्येक विपद्गर्तेत धडपडत असलेले दृष्टीस पडतात. राष्ट्राच्या होणाऱ्या उदयास्ताची मीमांसा अशा रीतीनें करतां येते, व इतिहासांत ज्या अनेक घडामोडी झालेल्या आपल्या नजरेस पडतात त्यांचें बीज तरी याच ईश्वरी योजनेंत दृग्गोचर होतें. रा. सा. रानडे हे इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन देशांत झालेल्या संगमाला ईश्वरीसूत्र (Divine Dispensation) म्हणून जें म्हणत तें याच अर्थानें कीं, ही जी योजना घडून आली तींत परमेश्वराचा चांगला हेतु असून त्यापासून उभय देशांलाही परस्परांपासून फायदा व्हावा.

ह्या घडलेल्या फेरफारांपासून विचार व आचार ह्यांमध्यें जी क्रांति घडून आली, तिचें एकंदरींत धोरण जर आपण पाहूं गेलों तर समाजांच्या निरनिराळ्या अंगांत दिसून येणारी दुर्बलता दूर करावी हें होय. होणाऱ्या प्रयत्नांत केव्हां हें धोरण गुप्तरूपानें वास करीत असेल, तर केव्हां तें अगदीं स्पष्टपणें डोळ्यांसमोर असेल. दोन भिन्न व्यक्ति जवळ आल्या म्हणजे ज्याप्रमाणें उभयतांवर एकमेकांचा परिणाम प्रायः झाल्याशिवाय राहत नाहीं, त्याचप्रमाणें इंग्लंड व हिंदुस्थान ह्या उभय देशांचा मिलाफ झाल्यानें परस्परांचा परस्परांवर पीरणाम झाला, व हिंदुस्थानाला खरें खरें आत्मज्ञान होण्याचा प्रसंग मिळाला. त्यापासून उद्भवलेली कार्यपरंपरा ही आपल्या डोळ्यांसमोर असून कांहीं गोष्टींचा खराखुरा निर्णय हा भावी इतिहासाचा विषय आहे.

ह्या सहवासाचें पहिलें फल म्हणजे आमचें साऱ्या जगाशीं सुरू झालेलें दळणवळण हें होय. व्यापार, शिक्षण किंवा देशपर्यटन ह्या निमित्तानें नवखंड पृथ्वी व दहावें खंड 'काशी' ही जी आमची संकुचित कल्पना ती नाहींशी होऊन जगाच्या खऱ्या स्वरूपाची आम्हांस ओळख पटली. आंग्लभाषेच्या द्वारानें सर्व जगांतील वाङ्मयांतले उत्कृष्ट विचार आज आम्हांस उपलब्ध झाल्या कारणानें आमचे पूर्वग्रह आम्ही विचारनिकषावर घासून पाहूं लागलों.

अद्वैतासारख्या श्रेष्ठ सिद्धांताला नव्या दृष्टीनें चालना मिळाली. व्यक्तींचीं व समाजाचीं विकल झालेली अंगें सदृढ होण्यास ज्ञानासारखी दिव्यौषधि दुसरी नाहीं ही गोष्ट निदर्शनास आली. सारांश, लोकशिक्षणाचा विषय हा अत्यंत महत्त्वाचा किंबहुना सर्व सुधारणांचा जीवनाधार आहे असें प्रत्ययास आलें व प्रस्तुत शतकाचा तो महामंत्र बनला.

नव्या परिस्थितीबरोबर इष्टहेतु साध्य करून घेण्याच्या साधनांतही फेदबदल झाला. ज्याप्रमाणें पाश्चात्यांच्या समागमापासून आम्ही नवीन ध्येय उचललें त्याचप्रमाणें पूर्वीच्या व आतांच्या साधनांतही फेरबदल झाला. वर्तमानपत्रें व कादंबऱ्या हीं एकोणिसाव्या शतकाचीं विशिष्ट लक्षणें समजतात. या दोन अस्त्रांच्या साह्यानें कर्तृत्ववान लेखकांनीं गेल्या शतकांत युरोपखंडांत अशी क्रांति घडवून आणली कीं तिच्यापुढें मोठमोठ्या धेंडांना देखील तिच्यापुढें मान वाकविणें भाग पडलें. लोकशिक्षणाच्या कामीं युरोपांत या दोन अस्त्रांचा झालेला उपयोग पाहून आपल्याइकडेही इतर गोष्टींबरोबर त्यांचा प्रचार सुरू झाला. शिक्षण, समाजव्यवस्था, धार्मिकस्थिति, इतिहासप्रेम, पूर्वपरंपरेची जागृति, स्वाभिमान, निःस्वार्थ बुद्धीनें लोकहिताविषयीं खटपट करण्याची बुद्धि वगैरे कोणताही प्रश्न असो, त्याचा खल करावयाला व त्याचें महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवायला यासारखें दुसरें सुलभ साधनच नाहीं. त्यांतही वर्तमानपत्रापेक्षां कादंबरीच्या अंगीं मोहकता व चिरस्थायीपणा हे गुण अधिक असल्याकारणानें तिचें महत्त्व जास्त होय. पूर्वीपेक्षां आजला कादंबरीचें क्षेत्र कितीतरी विस्तृत झालेलें आढळेल. ज्याप्रमाणें सृष्टिदेवी अनेक रूपांनीं नटलेली आपण पाहतों, त्याचप्रमाणें आजला कादंबरीही भिन्नभिन्न रूपांत नटलेली आपणांस दिसते. केव्हां कुलवधूप्रमाणें एकांतांत मनोरंजन करतांना तर कधीं मनोवृत्ति बहकलेल्या स्थितींत असतां प्रेमळ मातेप्रमाणें हितबोध करीत असलेली अशी ती दिसेल. कधीं शांत, उदात्त व गंभीर, तर कधीं रंगेल, विनोदपूर्ण, व व्यावहारिक विषयांत निमग्न झालेली, अशा अनेक वृत्ति तिच्यांत भरलेल्या आहेत. प्रतिभासंपन्न व कर्तृत्ववान लेखकाच्या हातीं पडली कीं तिचें खरें तेज झळकूं लागतें.

केव्हांही काय, बहुजनसमाज हा फारसा विचारक्षम नसतो. उपनिषदांतील तत्त्वचिंतनाचे विचार कितीही उच्च असले तरी त्याचा सामान्य माणसांना काय उपयोग? हे विचार सर्वांना पूज्य वाटतील; पण ते वाचून समजावून घेण्याचा उद्योग किती जणांच्या हातून होईल? साधारण स्त्रिया, वैश्य, शूद्र इत्यादि अर्धशिक्षित वर्गाला बुद्धिग्राह्य व आकर्षक असा वाङ्मयाचा प्रकार म्हणजे मनोरंजक कादंबऱ्याच होत. जें काम एकेकाळीं आपल्या इकडे पुराणें करीत होतीं तें काम करण्याची आज कादंबरीची महत्त्वाकांक्षा आहे. समाजांत अशिक्षित व अर्धशिक्षितांचा भरणाच सध्या जास्त असल्यानें साहजिकच लेखकांचा भर कादंबरीवर जास्त आहे. सामान्यजनसमूहाला उच्च ध्येयाची ओळख करून द्यावयाला हा मार्ग फार सोयीचा आहे.

ज्याप्रमाणें गणित, ज्योतिष, वैद्यक वगैरे गोष्टींच्या उत्पत्तीचा मान आर्यावर्ताकडेस आहे, त्याचप्रमाणें सायंकाळच्यावेळीं पश्चिमेकडून पूर्वभागीं परावृत्त होणाऱ्या सौम्य व मनोहर अशा सूर्यकिरणांसारखा कादंबरीचा ओघ जरी परावृत्त होत असलेला दिसत आहे, तरी एका कालीं कल्पित कथांचें निवासस्थान आर्यावर्तांतच होतें. छंदोबद्ध वाणींतल्या रामायणमहाभारतादि प्राचीन महाकथा जरी एकीकडे सारल्या, तरी भागीरथीनदीच्या तीरावर पाटलीपुत्र नगरांत विष्णुशर्म्यानें तेथील राजपुत्रांना राजनीतीचें शिक्षण देण्यासाठीं म्हणून ज्या गोष्टी २००० वर्षांपूर्वी सांगितल्या त्या, किंवा बुद्धाच्या जातककथा, कथासरित्सागर ग्रंथाला आधारभूत म्हणून मानलेल्या मूळ पैशाची भाषेंतील गुणाढ्यकृत 'बृहत्कथा,' वगैरे ग्रंथांना आधुनिक कादंबऱ्यांच्या पितृत्वाचा मान द्यावा लागेल.

ह्या कल्पित कथांचा प्रवेश प्रथम पुश्तो भाषेच्याद्वारें व पुढें आरबी भाषेच्याद्वारें यूरोपांत झाला. या संबंधांत बॅरन डी सोसे, होरेस हेमन्स वइल्सन, प्रो. हर्शेल वगैरे पाश्चात्य शोधकांचे लेख वाचण्यासारखे आहेत. याप्रमाणें पश्चिमेकडल्या कल्पित कथांना साह्य करण्याचा मान जरी आर्यवर्ताकडे असला, तरी स्वतः हिंदुस्थानांत बाणभट्टाच्या मुलानें आपल्या पित्यास ग्रंथपूर्तिरूप जें तिलोदक दिलें त्यानंतर, म्हणजे सरा-

सरी १२ व्या शतकानंतर, कादंबरीचा ओघ कोरडा ठणठणींत पडलेला दिसतो. पण तीच पश्चिमेकडे दृष्टि वळविली तर केवढा चमत्कार दृष्टोस पडतो ! एकट्या एकोणिसाव्या शतकांतलीच नाममालिका पाहिली म्हणजे छाती दडपून जाते. स्कॉट, डिकन्स, थॅकरे, जॉर्ज मेरिडिथ, रुडयार्ड किप्लिंग, स्टीव्हन्स, थॉमस हार्डी वगैरे बुद्धिमान पुरुषांनीं आपल्या कर्तबगारीनें स्वभाषेचें नांव अजरामर करून ठेविलें, इतकेंच नव्हे तर आपल्या काल्पनिक सृष्टीच्या प्रभावानें वाचकांच्या चित्तवृत्ति अशा भारून टाकल्या कीं त्यांच्या एकंदर चारित्र्यावर या वाचनाचा कायमचा परिणाम राहील. व त्यांच्यांतल्या स्कॉट, डिकन्स, रुसो, टॉलस्टॉय, यांसारख्या प्रतिभासंपन्न लेखकांनीं तर आपली कामगिरी इतक्या खुबीनें केलेली आहे कीं उच्च कल्पना, उदात्त ध्येय जें लेखकानें आपल्या कल्पित पात्रांच्या रूपानें वाचकांसमोर मांडलें आहे तें वाचकांच्या रक्तांत भिनलें असतांही वाचकांना आपल्या स्वतःच्या मनोभावना कशा बनताहेत व कोण बनवितो आहे याचा स्पष्ट बोध होऊं नये.

परंतु भावना जागृत करावयाच्या म्हणजे हें सामर्थ्य कलेचें आहे. गायन, वादन, चित्रकला, शिल्पकला, नाट्य, वक्तृत्व इत्यादि विदग्धकलांप्रमाणेंच कादंबरी हीही एक विदग्धकला आहे; व उदय, उत्कर्ष, ऱ्हास ह्यांचें नियम इतर कलांप्रमाणेंच ह्यांनाही लागू आहेत. जेव्हां राष्ट्राच्या वृत्ति सुप्त झालेल्या असतील, जेव्हां समाजांतल्या कर्त्या व नेत्या पुरुषांवर मोहनिद्रेचें आवरण पडलें असेल, तेव्हां इतर लोकांत कर्तृत्वाचा उदय व्हावयाचा कसा? व यदाकदाचित् झालाच तर त्या कर्तबगार लोकांच्या गुणाचें चीज करणार तरी कोण? मनोवृत्ति खळबळून जाण्याचे प्रसंग आले नाहींत तोंपर्यंत खऱ्या काव्याचा-खऱ्या कलेचा उद्भव होणें शक्य नाहीं. असे प्रसंग व्यक्तीवर येवोत किंवा समाजावर येवोत, ते आले असतां त्यांत खऱ्या स्फूर्तीचा जन्म होऊन तीपासून उद्भवलेल्या कार्याला बाकीचा समाज माना डोलवूं लागतो. ह्या गोष्टीच्या समर्थनार्थ इतिहासांत अनेक दाखले सांपडतील.

पण नुसत्या प्रतिभेनेंच कार्यभाग होत नाहीं. त्याला कलेच्या अंगांच्या माहितीची जोड असणेंही अवश्य आहे. तानसेनासारख्या प्रतिगंधर्व अशा गायकाला देखील, आपल्या कंठांतून रागरागिण्यांचे गोड सूर काढून त्यायोगानें श्रोत्यांच्या वृत्ति तन्मय करतां येण्यापूर्वी, आपल्या वस्तादजीला कितीतरी चिलिमा भरून द्याव्या लागल्या असतील! एकलव्यासारख्या किरातधनुर्धराला प्रत्यक्ष आचार्य द्रोणानें शिकविण्याचें नाकारलें तरी त्या आचार्यांची प्रतिमा तयार करून तिजपासून शस्त्रास्त्रविद्या ग्रहण करण्याकरितां एकचित्तानें त्याला किती कालपर्यंत तरी तपश्चर्या करावी लागली! सारांश, प्रतिभा असली तरी अंगप्रत्यंगांची माहिती असणें अत्यंत अवश्य आहे. या हेतूनें गेल्या २५ वर्षांतल्या कादंबरीग्रंथांचें पर्यालोचन करण्यापूर्वी कादंबरीरचनेच्या अंगांचा स्थूल विचार करणें इष्ट आहे; म्हणजे उपपत्ति व तिचा प्रत्यक्ष होत असलेला उपयोग या दोन्हीं गोष्टींचा विचार केल्यासारखें होईल. शेवटीं कादंबरीकाराचें ध्येय काय असावयाला हवें हें सांगून निबंधसमाप्ति करणें बरें.*

[विषयप्रवेश.]

गेल्या पंचवीस वर्षांत झालेल्या मराठी कादंबरीग्रंथांचा विचार करूं लागलें म्हणजे सकृद्दर्शनींच रा. हरिभाऊ आपट्यांचें नांव डोळ्यांसमोर उभें राहतें. हरिभाऊंच्यापूर्वी मराठी कादंबऱ्यांची स्थिति किती दीन होती हें समजावयाला पूर्वेतिहासाचें विहंगमदृष्ट्या अवलोकन केलें पाहिजे. आरंभाआरंभाला वेताळ पंचविशी, शुकबहात्तरी, पंचोपाख्यान, वगैरे संस्कृतांतल्या गोष्टींच्या पुस्तकांचीं भाषांतरें, तसेंच मोठ्या शास्त्रीबुवांच्या 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी,' छत्र्यांचा 'बाळमित्र,' हीं इंग्रजींतून केलेलीं भाषांतराचीं पुस्तकें, कांहीं खाजगी रीतीनें तर कांहीं शाळाखात्याच्या आश्रयानें, प्रसिद्ध झालीं. बाबा गोखल्यांचा 'राजा मदन' हाही याच वेळीं प्रसिद्धीस आला. रा.सा. रानड्यांनीं ग्रंथपरीक्षणासाठीं १८५४ पर्यंतचा मराठीचा पहिला काल घेतला आहे, त्यांत अशाप्रकारें मनोरंजक गोष्टींचीं एकंदर ३० पुस्तकें प्रसिद्ध झाल्याचें सांगितलें आहे. मनोरंजनासं-

* निबंधाची मर्यादा फार वाढल्याकारणानें कादंबरीलेखनाच्या षडंगांचा व कादंबरीकाराच्या ध्येयाचा हे दोन भाग इतर प्रसंगाकरितां राखून ठेवणें भाग पडलें.

बंधांत लोकांची जुन्या पौराणिक कथांवरच तहान भागत असल्याकारणानें या कालांत वरच्यासारख्या पुस्तकांवरच काम भागलें.

त्यानंतर मंजुघोषा, विश्वासराव, वसंतकोकिला वगैरे रिसबुडांचीं पुस्तकें प्रसिद्धीला येऊं लागलीं. पूर्वींच्या पुस्तकांपेक्षां ह्या पुस्तकांच्या पद्धतींत फरक पडलेला होता. राजा विक्रमासारख्या राजपुरुषाची जागा इतर रंगेल राजपुत्रांनीं बळकावली. ह्या राजपुत्रांची व एखाद्या लावण्यवती राजकन्येची दृष्टादृष्ट व्हावयाची, एखाद्या दासीमार्फत आपसांत त्यांची गांठ पडून गांधर्वविधीनें पाणिग्रह व्हावयाचा, पुढें उभयतां अनपेक्षित संकटांत सांपडून त्यांतून राजपुत्र आपल्या पराक्रमाच्या जोरावर पार पडावयाचा, व राजकन्येला त्या संकटांतून सोडवून—

"उपरागांते शशिनः समुपगता रोहिणीयोगम्" ह्याप्रमाणें त्या उभयतांचा योग ग्रहणमुक्त चंद्ररोहिणीप्रमाणें व्हावयाचा.

अगदीं पूर्वींसारख्या संस्कृत भाषांतरांचीं पुस्तकें नसलीं तरी पण रिसबूडप्रभृति कादंबरीलेखकांचा थाट संस्कृत पद्धतीवरच होता. मोठमोठ्या लोकांच्या गोष्टी, इंद्रनीलमणि, पाचु, हिरे, मोत्यें वगैरे रत्नांची लयलूट, उभयतांचें अप्रतिम लावण्य, सर्वगुणसंपन्नता, व कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् अशी अजब शक्ति ह्या अमानुष गुणांच्या साहचर्यांत व लेखनपद्धतींत सारा संस्कृतपद्धतीचा झोंक. उदाहरणार्थ, 'वसंतासही संतत उसंत देणारीं वसंत–माधव हीं सहा अक्षरें तिचे कर्णरंध्रद्वारें शिरून आंतील शुद्धिकंदास जागृत अवस्था देतीं झालीं.' अशा रीतीनें आपलें शब्दपाटव मंजुघोषाकारानें दाखविलें आहे. प्रासानुप्रासांची सारखी गर्दी लावून दिलेली; फौजेंतल्या शिपायाप्रमाणें शब्दांचे प्रास अनुप्रास सारखे खाड खाड आवाज करीत चालले आहेत; संभवनीयता किंवा वस्तुस्थिति इकडे विशेष लक्ष देण्याचें प्रयोजन ग्रंथकारांना दिसलें नाहीं. पण ह्याबद्दल त्यावेळच्या ग्रंथकारांना दोष देण्यांत विशेष अर्थ नाहीं. कारण, त्यावेळच्या लोकाभिरुचीला आवडतील अशाच प्रकारचे ग्रंथ त्यांनीं लिहिले होते. दोष जर द्यावयाचाच असेल तर, कित्येक शतकांपूर्वींपासून आमच्या काव्याभिरुचीला जें एक कृत्रिमतेचें वाईट वळण लागलें होतें त्याला दोष देणें उचित होईल. यावेळीं रसापेक्षां ध्वनीकडे लोकांचें लक्ष विशेष होतें.

दुसरी गोष्ट, ह्या लोकांपुढें असलेली साधनसामुग्री पाहतां त्यांनीं बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांची तारीफच केली पाहिजे. कारण कीं त्यांनीं जर ग्रंथरचना करण्याचे परिश्रम घेऊन लोकांत वाचनाची अभिरुचि उत्पन्न केली नसती तर, न जाणों, आणखी किती वर्षेपर्यंत तरी ग्रंथप्रसाराचें काम दिरंगाईवर पडलें असतें. मुलगा आपल्या परिश्रमानें नांवारूपास कितीही चढला तरी त्याच्या आईबापांनीं त्याला शिक्षण देण्यासाठीं केलेले परिश्रम व सोसलेली झीज हीं दृष्टीआड करतां येत नाहींत. त्याप्रमाणें रिसबूडपंथाच्या ह्या अद्भुत कादंबऱ्यांची गोष्ट आहे.

शिक्षणाचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडूं लागलें. इंग्रजी शिक्षण मिळालेल्या वाचकवर्गाची संख्या दिवसेंदिवस वाढूं लागली. त्यांच्या डोळ्यांपुढें पाश्चात्य भाषेंतील उत्कृष्ट वाङ्मय पसरलेलें असल्याकारणानें ह्या काऊ–चिऊच्या गोष्टींनीं त्यांचें समाधान होणें शक्य नव्हतें. त्याचप्रमाणें ज्यांना शेंडा ना बुडखा अशा ह्या विलक्षण व अद्भुत गोष्टींचाही त्यांना कंटाळा येऊं लागला. त्यांना खऱ्या व्यवहाराचें वास्तविक स्वरूप दाखविणाऱ्या कादंबऱ्या हव्याशा वाटूं लागल्या; व वाचकांतील ह्या विचारक्रांतीचा परिणाम पुढें निघण्याऱ्या ग्रंथांवरही होऊं लागला.

पण कोणतीही क्रांति झाली तरी ती एकदम घडून येत नसते. दिसावयाला घडामोडी आकस्मिक घडलेल्या दिसतात; पण त्यांची पूर्व तयारी कित्येक दिवस अगोदरपासून चाललेली असते. फक्त होणारा स्फोट मात्र एकदम झालेला दिसतो, इतकेंच कायतें. ज्याप्रमाणें एकादा रोग बाहेर पडण्यापूर्वी त्या विकृतीला पोषक अशा अनेक गोष्टी कांहीं दिवस आधींपासून तयार होत असतात, व मग त्या रोगाचें दुर्धररूप एकदम दृग्गोचर होतें, त्याचप्रमाणें 'वस्तुस्थितिदर्शक कादंबऱ्या' म्हणून ज्यांला म्हणतात त्या कादंबऱ्या व्हावयाला प्रारंभ जरी पुढें झाला तरी त्यांची पूर्व तयारी बऱ्याच आधींपासून होत होती.

रिसबूडपंथाचा बडेजाव कांहीं दिवस झाल्यावर लोकांना त्याचा वीट यावयाला लागला. कारण लग्न-कार्यांत सारखीं गोडगोड पक्वान्नें खाल्ल्यावर मग गोड पदार्थ अगदीं डोळ्यासमोर नकोसे होतात; त्याचप्रमाणें ह्या भरगची शृंगाराच्या कादंबऱ्या पाहून लोक कंटाळूं लागले; व त्याऐवजीं विचित्रपुरी, मुक्तामाला यांसारख्या अर्धवट अद्भुत-वास्तव अशा मिश्र-पद्धतीच्या कादंबऱ्या पुढें येऊं लागल्या. त्यांत वस्तु-स्थितीचें चित्र मधूनमधून दिसूं लागलें.

कादंबरीलेखकांच्या या शोचनीय दिशेकडे विद्वान् लोकांचें लक्ष जाऊन कादंबरीकारांना व नाट्यलेख-कांना वळण लावण्याच्या उद्देशानें रा. ब. काशीनाथ बाळकृष्ण मराठे ह्यांनीं आपला सुप्रसिद्ध ' नाव्हेल व नाटकें ' ह्यावरचा निबंध प्रसिद्ध केला.

रा. ब. मराठे ह्यांचा निबंध म्हणजे एक प्रकारें नव्या धर्तीवरील मनोरंजक ग्रंथांचें जरीपटका निशा-णच म्हटलें पाहिजे. ह्या निबंधाच्याद्वारें एकप्रकारें अतिशयोक्तिप्रचुर अशा ग्रंथरचनेस आळा बसला. हा वेळपर्यंत वाटेल त्यानें ' नॉव्हेल ' लिहावें ! स्वक-पोलकल्पित म्हणून म्हणविलेल्या ग्रंथांत आपल्या कलेविषयीं गाढ अज्ञान, वाटेल ती भाषा, वाटेल त्या कल्पना, इत्यादि प्रकारांची रेलचेल झाली होती. व ह्या स्थितीला प्रतिबंध करावयाचा झाला तर चुका कोठें होतात हें कळणें इष्ट होतें. व तें काम त्यावेळच्या दृष्टी-पुरतें तरी वर निर्दिष्ट केलेल्या निबंधानें चांगल्या प्रकारें केलें.

ह्यानंतर थोड्याच काळांत दोन प्रतिभाशाली पुरुष महाराष्ट्रांत उदयास आले; व त्यांनीं आपल्या कर्तब-गारीनें महाराष्ट्रसमाजाला निराळें वळण लावलें. त्या प्रसंगाकडे आतां वळलें पाहिजे.

इंग्रजी शिक्षणाच्या योगानें महाराष्ट्रांतल्या लोकांच्या विचारांत क्रांति होऊन मराठी वाङ्मयाला जें स्वतंत्र देशाभिमानाचें स्वरूप प्राप्त झालें त्याचें उत्कृष्ट उदा-हरण ' निबंधमाला ' हें होय. विष्णुशास्त्र्यांची निबंध-लेखनाची कल्पना हीच स्वतः आंग्लभाषेच्या व्यासं-गाचें फल होय. विद्यावनांत स्वेच्छेनें विहार करतांना ज्या नानाप्रकारच्या सुवासिक पुष्पांनीं स्वतःच्या चित्त-वृत्ति आकर्षित झाल्या त्या पुष्पांच्या परिमलाचा उपभोग एकट्यानेंच न घेतां आपल्या देशबंधूंची आठवण ठेवून त्यांजकरितां त्या पुष्पांची माला ग्रथन करून त्यांच्या गळ्यांत शास्त्रीबुवांनीं घातली. ॲडिसन, मेकॉले, बर्क वगैरे इंग्रजींतल्या नामांकित ग्रंथकाराच्या उत्कृष्ट निबंधांचा कित्ता पुढें ठेवून त्याप्रमाणें आपल्या दुबळ्या मराठी भाषेला सुसंपन्न करून आपलें मातृभाषे-वरचें प्रेम त्यांनीं व्यक्त केलें, व तद्द्वारा आपल्या देश-बांधवांना एक नवा कित्ता घालून दिला. त्याशिवाय निरनिराळ्या इंग्रजी कल्पना निबंधमालेंत पसरलेल्या आहेत. इतिहासप्रेम, देशाभिमान, टीकापद्धति, आपल्या देशबांधवांत विद्येचा प्रसार,ह्या साऱ्या कल्प-नांचा उगम कोठें होता ? मोरोपंताच्या कवितेचें पुन-रुज्जीवन करणारे रसिकशिरोमणि परशुरापंत तात्या व शास्त्रीबुवा ह्या दोघांच्या अंतःकरणांत त्या कवि-श्रेष्ठाविषयीं सारखाच आदर असतां दोघांच्या पद्धतींत केवढी तफावत ? नव्या प्रकारचे संस्कार झाल्याशिवाय शास्त्रीबुवांच्या हातून ' संस्कृत कविपंचका ' सारखी कृति निर्माण झाली असती काय ? नोकरीवर पाणी सोडून ' न्यू-इंग्लिशस्कूल ' काढण्याची कल्पना त्यांना इतकी हृदयंगम वाटली असती काय ? 'चित्रशाळा' स्थापन करून आपल्या जीर्ण झालेल्या-रसातळास जाऊं पाहणाऱ्या-ललितकलेचा पुनरुद्धार करण्याचा विचार त्यांच्या मनांत आला असता काय ? त्यांचा ' केसरी ' व ' मराठा ' कोठें असता ? हा सारा प्रभाव इंग्रेजी विद्येचा व पाश्चात्यांच्या संसर्गाचा नव्हे तर कशाचा ? देशाभिमानाच्या,राष्ट्रोत्कर्षाच्या,व लोक-कल्याणाच्या ह्या कल्पनांच्या मूळाशीं, इंग्लंडच्या इतिहासाचे, युरोपांतील थोर पुरुषांचे, व अमेरिकेंतील सुधारणांचे विचार इंग्रेजी भाषेंतून शास्त्रीबुवांना वाचावयास मिळत, ही गोष्ट होय.

छोट्या शास्त्रीबुवांप्रमाणेंच त्या काळांत दुसरा प्रतिभाशाली पुरुष बळवंतराव पांडुरंग उर्फ अण्णासाहेब किर्लोसकर हा झाला.अण्णाच्या पूर्वीपासूनच लोकांच्या नाटकाविषयींच्या कल्पनांत फेरबदल व्हावयास सुरुवात झाली होती. कॉलेजांतून जीं जुनीं संस्कृत नाटकें नेमलीं जात तीं वाचून, व विशेषतः शेक्सपियरचीं नाटकें वाचून व आंग्लनटांचें प्रयोगनैपुण्य पाहून, लोकांना आपल्या इकडच्या " तकड-थोम"चा साह-

जिकच कंटाळा येऊं लागला. हळूहळू नव्या धर्तीवर मराठी नाटकांची रचनाही होऊं लागली. कीर्तन्यांचा 'जयपाळ' व 'माधवराव,' बजाबांचा 'भ्रांतिकृत चमत्कार,' आण्णासाहेब महाजनि यांची 'तारा' (Cymbeline), छोट्या कीर्तन्यांचें टेंपेस्ट (Tempest) हीं ह्या नव्या अभिरुचीचीं फळें होत.

कॉलेजांतील विद्यार्थी मंडळी मधून मधून नाटय-प्रयोग करून दाखवूं लागली;व त्या प्रयोगासाठीं नव्या धर्तीवर नाट्यरचना होऊं लागली. जुन्या कवींच्या प्रख्यात नाटकांचे प्रयोगही होत.उदाहरणार्थ, 'कालिदास एलफिन्स्टन सोसैटी' म्हणून एक मंडळी त्यावेळीं होती,तिनें अभिज्ञानशाकुंतलाचा प्रयोग फार चांगल्या प्रकारें केल्याचें ऐकण्यांत येतें. ह्याप्रमाणें सुशिक्षित मंडळीचा नाटकांत प्रवेश झाल्या कारणानें नाटय-कलेवर त्याचा बराच परिणाम झाला, व अण्णाच्या संगीत नाटकांच्या जाहीरपत्रकावर कित्येक पदवी-धरांच्या सह्या झळकूं लागल्या. इतकेंच नव्हे तर 'नाटकें करावींत कीं करूं नयेत?' ह्यासारख्या प्रश्नाची भवति न भवति करून नाटकें करावींत असा निकाल देण्यांत शास्त्रीबुवांना किंचितही दिक्कत वाटली नाहीं. हा सारा आंग्ल शिक्षणाचा व संस्कृतीचा प्रभाव नव्हता तर कशाचा? जुन्या शास्त्रीमंडळीनें नटाला शास्त्रबाह्य समजून वाळींत टाकलेला; स्त्रीवेषधारी पुरुष-नटाचें दर्शन झालें तर शास्त्रीबुवांना सचैल स्नान-करण्याची पाळी यावयाची! त्यांच्या तोंडून नाटय-कलेचा उत्कर्ष होवो अशा प्रकारचें आशीर्वचन बाहेर कसें पडावयाचें? शास्त्रीबुवांच्या लेखांमुळें देशीभाषेंतून लिहिण्याकडे नव्या शिकलेल्या मंडळीचें लक्ष लागलें; व अण्णाच्या संगीत नाटकांमुळें लोकांचें नाटकांकडे व एकंदरींत मनोरंजक ग्रंथांकडे दिवसेंदिवस जास्त लक्ष लागूं लागलें.

अण्णाची 'रंगदेवते'ची उपासना सुरू होण्याच्या थोड्या कालापूर्वी, म्हणजे सन १८७९ सालीं, शंकर मोरो रानडे ह्यांच्या 'नाटयकथार्णवा'चा जन्म झाला. शंकररावजींच्या 'शिलादित्य व मथुरे'मुळें मनोरंजन होण्यास निव्वळ अद्‌भुताची व अतिशयोक्तीचीच अव-श्यकता आहे असें नाहीं, तर साधारण प्रतीच्या लोकांच्या चरित्रांतूनही प्रसंग निवडून कारागीर लोकांना आपलें कसब दाखवून लोकांच्या मनावर छाप बसवितां येते हें लोकांच्या प्रत्ययास आणलें. याचा परिणाम असा झाला कीं, अद्भुत कादंबऱ्यांचें पाऊल मागें पडून वस्तुस्थितिनिदर्शक कादंबऱ्यांचें पाऊल पुढें पुढें पडूं लागण्याची जी प्रवृत्ति यापूर्वी अल्प प्रमाणावर दिसूं लागली होती तिला बळकटी मिळाली.

यानंतरच्या पुढच्या १० वर्षांत, करमणूक पत्र जन्मास येईपर्यंत, लेखकांचा भर जास्त जास्त वस्तु-स्थितिदर्शक कादंबऱ्यांवर होता. ह्याच काळांत कादंबरीकलापांतून रेनॉल्डसच्या कादंबऱ्या, बापटां चा छत्रपति संभाजी, नागपूरकरांचा 'जुना राजवाडा', 'सुशील यमुना', पाटलांच्या सेमिरामिस, चंद्रगुप्त, पुण्यग्रामरहस्य वगैरे ऐतिहासिक व सामाजिक कादं-बऱ्या प्रसिद्ध झाल्या.मनोरंजन व निबंधचंद्रिका यांच्या-द्वारें गणपतराव, खरी कीं खोटी, ह्या गोष्टीही ह्याच काळांत प्रसिद्ध झाल्या. काशीताईंचा 'रंगराव' व पुणेंवैभवांतून प्रसिद्ध झालेली 'मधली स्थिति' ह्या गोष्टीही तेव्हांच्याच.

हरिभाऊंच्या कादंबऱ्या.

'करमणूक' पत्र जन्मास येण्यापूर्वी हरिभाऊंच्या ११२ कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या होत्या. उदाहरणार्थ 'गणपतराव' ही मनोरंजन आणि निबंधचंद्रिकेंतून प्रसिद्ध व्हावयास सुरुवात झाली. शेवटीं 'मनोरंजन आणि निबंधचंद्रिके'च्या इतिश्रीबरोबर ती कादंबरीही अर्धवट राहिली ही गोष्ट निराळी. याशिवाय त्यांची 'मधली स्थिति' पुणेंवैभव पत्रांतून प्रसिद्ध झाली. ह्या कादंबरीच्या प्रसिद्धीबरोबरच हरिभाऊंची कादंबरी-कार या नात्यानें प्रसिद्धि व्हावयाला सुरुवात झाली होती. कांकीं तोंपर्यंत प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांपेक्षां हिचा थाटच कांहीं निराळा होता. 'आजकालच्या गोष्टी' ह्या सदराखालीं जी पुस्तकमालिका लिहि-ण्यांचा हरिभाऊंचा संकल्प होता तोच मुळीं अपूर्व होता. तसेंच पाहूं गेलें तर, मधून मधून 'पुण्यग्राम-रहस्यां'सारख्या सद्यःस्थितिदर्शक कादंबऱ्या ह्याच्या-पूर्वी प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यांत अर्थात् पुणें शहरां-तील स्थितीचें चित्र रेखाटलेलें होतें. हरिभाऊंच्या 'मधल्या स्थिती' प्रमाणेंच ही कादंबरीही स्वतंत्र

लिहिलेली होती; पण ह्या पुस्तकापेक्षां प्रसंग निवडण्याचें चातुर्य, वर्णन करण्याची शैली, सुबोध भाषापद्धति, जनसमूहाला आवडेल अशा रीतीनें बेमालूम केलेली कादंबरीची मांडणी, ह्या गुणांत 'मधली स्थिती' पूर्व पुस्तकापेक्षां जास्त सरस असल्यानें हें पुस्तक आबालवृद्धांस प्रिय झालें. विशेष मौज ही कीं या पुस्तकाचा कर्ता हा सुधारलेल्या मतांचा आहे याचा संशय देखील वाचकांना येण्यासारखा नव्हता. 'मधल्या स्थिती'त दिलेल्या क्लबाचें वर्णन, गरीब बिचाऱ्या सरस्वतीबाईचा झालेला छळ, नारोपंताच्या कुटुंबाची दिलेली हकीगत, अंबुताईच्या मृत्यूचें ऱ्हदयद्रावक वर्णन व तिच्या नवऱ्याचें तिच्याशीं असलेलें पशुतुल्य वर्तन, ह्यांपैकीं कोणताही प्रसंग वाचून किती वाचकांना अटकळ करितां येईल कीं या पुस्तकाचा लेखक सुधारक मताचा असावा ? ' मधली स्थिति ' प्रथम पुणेवैभवासारख्या कट्टया सनातनधर्माभिमानी पत्रांतून प्रसिद्ध झाली.ह्या पत्रानें सुधारकांचे जे बगलबच्च्या, हुंडीबाग वगैरे तीन भेद केले होते, त्याला चकवून हरिभाऊंनीं जो हा नवा सुधारकांचा प्रकार काढला त्याला वैभवकारांनीं कोणतें नांव दिलें असतें नकळे !

सामाजिक कादंबऱ्या.

पाश्चात्य शिक्षणामुळें जी विचारक्रांति झाली तींत समाजसुधारणेचा प्रश्न विशेष महत्त्वाचा होता. दोन्ही समाजस्थितींत व्यक्त होणारा फरक पाहून आपल्या हीन स्थितीचें मूळ आपल्या चालीरीतींत असलें पाहिजे असा कित्येकांचा ग्रह होऊन त्याप्रमाणें इष्ट त्या सुधारणा घडवून आणण्याच्या प्रयत्नास ते लागले. हिंदुसमाजव्यवस्था फार प्राचीनकाळापासून चालत आली असल्या कारणानें सुधारणाप्रिय मंडळींत कडाक्याचा वाद सुरू झाला व पुराणवादी व प्रत्येक पक्षाचे लोक आपआपली बाजू मांडण्यासाठीं कालमानानुरुप नव्या साधनांचा उपयोग करूं लागले.

सन १८७० सालीं शंकराचार्यांसमोर दोन्ही पक्षांची सभा भरून झालेला पुनर्विवाहासंबंधाचा वादविवाद, मलबारी शेटजींच्या भगीरथ प्रयत्नांनीं पास झालेला संमति-वयाचा कायदा, पुण्याचें फीमेल हायस्कूल उघडण्याच्या वेळीं झालेली चळवळ, हीं उदाहरणें या दोन्ही पक्षांत झालेल्या चकमकीचीं उदाहरणें होत. आपल्या अधोगतीचें मूळ सर्वस्वी आपल्या राजकीय परिस्थितींत आहे, तेव्हां राजकीय गोष्टींशिवाय इतर भानगडींत आपण पडूं नये असें मानणारा एक पक्ष होता; व त्याबरोबरच निवळ राजकीय गोष्टींकडे लक्ष देऊन आपल्या समाजांत चालू असलेल्या अनन्वित अन्यायांकडे डोळेझांक करणें हा शुद्ध आत्मघात होय, असें मानणारा दुसरा एक समाजसुधारकांचा वर्ग होता; व ह्यामुळेंच 'आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक ?' हा वाद उत्पन्न झाला. सारांश, ज्याप्रमाणें बधिर झालेल्या शरीराच्या भागावर विजेच्या बॅटरीचा प्रयोग केला असतां त्या निर्जीव झालेल्या भागांत पुन्हा चलनवलन सुरू होतें,त्याचप्रमाणें इंग्रजी विद्येचा आमच्या समाजस्थितीवर व विचारांवर परिणाम झाला, व त्यायोगें आम्हांला चांगलीच जागृति मिळाली.

ह्या विचारप्रवाहाचा प्रभाव कादंबरीक्षेत्रावर होणें अपरिहार्य होतें. ज्यावेळीं लोकमताच्या वातावरणांत क्षुब्धता उत्पन्न झाली त्यावेळीं सामान्य लोकांच्या मनावर आपल्या तत्त्वांचा जास्त ठसा उमटावा या हेतूनें अशा प्रश्नांनीं नाट्यकलेचा आश्रय धरला. इंग्रेजी विद्येच्या पाठीस लागून ज्यांनीं आपल्या शरीराची राखरांगोळी करून घेतली, संसारांत झगडण्यास लागणाऱ्या सामर्थ्याची पर्वा केली नाहीं, गृहसौख्यावर पाणी सोडलें, अशा काडी-पेहेलवानांची टर उडविण्याच्या हेतूनें ' मोर एल. एल. बी प्रहसन' जन्माला आलें; स्त्रियांना शिक्षण दिल्यास त्यांच्या नैसर्गिक मनोवृत्तींचा लोप होऊन त्या स्वेच्छाचारी होतील अशी ज्या लोकांना भीति वाटली त्यांनीं ' तरुणीशिक्षणनाटिका ' लिहिली; स्त्रियांना पुनर्विवाहाची मोकळीक मिळाल्यास त्या स्वच्छंदानुवर्ती होतील असें ज्यांच्या मनानें घेतलें त्यांनीं 'स्वैर-सकेशा नाटिका' लिहिली; कोंवळ्या १०–१२ वर्षांच्या पोरीबरोबर घोडनवऱ्यानें बाशिंग बांधण्याचें धाडस करण्याचा जो प्रकार राजरोस समाजांत चालू आहे तो पाहून ज्याचें मन द्रवलें त्याच्या हातून " शारदा " निर्माण झाली.

जुन्या पक्षाचीं मतें याप्रमाणें नाटकाच्या द्वारें लोकांच्या करमणुकीचा विषय बनल्याचें पाहून सुधा-

रणा–पक्षाच्या लोकांतही या कामीं नव्या अस्त्रविद्येचा उपयोग करून घेण्याची इच्छा साहजिक उत्पन्न झाली. आगरकरासारख्या जोरदार, करारी, खऱ्या कळकळीच्या व बाणेदार लेखकानें आपल्या लेखणीच्या बळावर महाराष्ट्र खळबळून टाकलें होतें हें खरें. पण फार दिवसांच्या रूढ झालेल्या समजुती, कित्येक पिढया उतरत आलेले व मूलबद्ध झालेले दुराग्रह नाहींसे करावयाचें काम एकटया आगरकरांच्या लेखणीनें भागण्यासारखें नव्हतें. त्याला तीक्ष्ण वाक्शल्याऐवजीं लोकांच्या पोटांत शिरून, त्यांच्या अंतःकरणाला पीळ पाडून, कोमलवृत्ति जागृत करून कार्य साधणारा लेखक पाहिजे होता. ती कामगिरी हरिभाऊंकडे आली. हरिभाऊंचा 'गणपतराव,' 'पण लक्षांत घेतो,' 'भयंकर दिव्य' वगैरे सामाजिक कादंबऱ्या ह्याच भावनेनें जन्मास आल्या; किंबहुना त्यांच्या 'करमणूक' पत्राचा मूळ उद्देश असाच होता असें वाचल्याचें स्मरतें.

अविभक्त कुटुंबांत वागण्याऱ्या व्यक्तीचा कांहीं कांहीं ठिकाणीं होणारा चुराडा, गरीब व सुशील अशा पत्नीशीं अमानुष वर्तन करणाऱ्या नवऱ्याला समाजांत खुशाल उजळ माथ्यानें वावरतां येण्याजोगी अन्यायमूलक स्थिति, कित्येक लोकांची दांभिकता, व त्यापायीं अनाथ व असहाय अशा अबलांची होत असलेली विटंबना, वगैरे गोष्टींच्या बाबतींत होत असलेलें समाजाचें बेफिकीरीचें वर्तन इतक्या खूबीनें, कळकळीनें हरिभाऊंनी रंगविलें आहे कीं, त्यांच्या कादंबऱ्यांतलीं कित्येक प्रकरणें वाचीत असतां वाचकांच्या वृत्ति अनावर होऊन त्यांच्या तोंडून साहाजिकपणें असे उद्गार निघतात कीं, ह्या साऱ्या गोष्टी खऱ्या, पण लक्षांत कोण घेतो ?

ऐतिहासिक कादंबऱ्या.

मनुष्याचें लक्ष समाजस्थितीकडे वळलें कीं मग तो प्रस्तुत स्थितीपुरताच विचार न करितां हळूच आपली परंपरा काय आहे ती शोधावयाला लागतो. इंग्रजीनंतरच्या पहिल्या पिढींतला दिग्भ्रम जसजसा नाहींसा होऊं लागला, तसतसें लोकांचें लक्ष आपल्या पूर्वेतिहासाकडे वळूं लागलें. महाराष्ट्राचा इतिहास व पूर्वपरंपरा हीं अनेक तऱ्हेनें उज्ज्वल व प्रोत्साहक असल्या कारणानें आंग्लविद्याभिनिविष्ट लोकांना आपल्या पूर्वपराक्रमांची आठवण जनसमाजाला करून देऊन कर्तव्यस्फूर्तीची प्रेरणा करणें अत्यंत इष्ट वाटूं लागलें. नव्या परस्थितीमुळें व एकोणिसाव्या शतकाच्या आरंभींच्या नीतिभ्रष्ट स्थितीमुळें लोकांत कोणत्याही प्रकारचा उत्साह राहिलेला नव्हता, व त्यांची मनःस्थिति हताश व अनन्यगतिक अशी झालेली होती.

हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध होण्यापूर्वी विदग्ध वाङ्मयांत असे कांहीं प्रयत्न झाले होते. परंतु त्या लेखकांना आपल्या कलेच्या अंगाचें ज्ञान कितपत होतें हें पाहावयाचें असल्यास नारायणराव पेशव्यांच्या मृत्यूचा फार्स, अफझुलखानाच्या मृत्यूचा फार्स, या नांवावरूनही ठरवितां येण्याजोगें आहे.

शंकर मोरो रानडयांचें 'शिलादित्य,' पाटलांचीं सेमीरामीस व चंद्रगुप्त,व बापटांचें बाजीरावाचें चरित्र हीं एकीकडे ठेविलीं, तरी त्यांचा 'संभाजी,' गोडबोल्यांचा 'अनाथ पांडुरंग' ह्या ग्रंथांचा प्रमुखत्वानें उल्लेख करतां येईल.

पैकीं 'अनाथपांडुरंग' हें 'पांडुरंग हरि' ह्या इंग्रेजींतलि पुस्तकाचें भाषांतर असून त्यांत मूळ इंग्रज लेखकानें पुष्कळ ठिकाणीं अज्ञानामुळें किंवा दुराग्रहवश होऊन गेल्या शतकाच्या आरंभींच्या हिंदुसमाजस्थितिसंबंधांत जीं निराधार विधानें केलीं होतीं, त्यांचें जशाचें तसें मराठींत भाषांतर केलें असल्यानें ह्या पुस्तकाची शुद्ध भाषेच्या पलीकडे फारशी किंमत वाटत नाहीं.

'शिलादित्य' नाट्यकथार्णवांत अपूर्णच राहिला. पाटलांचीं दोन्ही पुस्तकें त्या कालच्या स्थितीच्या दृष्टीनें वाखाणण्याजोगीं आहेत.

बापटांच्या संभाजीखेरीज त्यांचें "पाणिपतची मोहीम' हें आणखी एक पुस्तक निर्देश करण्याजोगें आहे. बापटांना संस्थानांत राहून मिळालेला अनुभव, त्यांचें मराठी भाषासौष्ठव व श्रीधरासारख्या महाराष्ट्र कवीवरचा त्यांचा व्यासंग, या योगानें ऐतिहासिक प्रसंगाच्या वर्णनांत त्यांचा हातखंडा दिसून येतो. परंतु ऐतिहासिक दृष्टि किंवा मनुष्यस्वभावाचें खोल व मार्मिक ज्ञान त्यांच्या ग्रंथांत दिसून येत नाहीं.

पानिपतच्या संस्मरणीय प्रसंगावर रा.ब. वैद्य यांनीं नुकतीच लिहिलेली ऐतिहासिक कादंबरी " दुर्दैवी रंगू" ही एक मराठी भाषेला अपूर्व जोड म्हटली पाहिजे.

ऐतिहासिक कादंबरीचे तीन प्रकार नागेशराव बापट, हरिभाऊ आपटे, व रा. ब. वैद्य ह्यांच्या ग्रंथांतून दिसून येणारे आहेत. बापटांच्या ग्रंथांत ठिकठिकाणीं ऐतिहासिक गोष्टींचा केलेला विपर्यास व गौण कार्यभाग असलेल्या व्यक्तींना दिलेलें प्राधान्य, इत्यादि दोषांमुळेंच रा. ब. वैद्यांनीं पुनः त्याच विषयावर कादंबरी लिहिण्याचें काम हातीं घेतलें असावें. रा. ब. च्या संस्कृतकाव्यरसिकतेची छाप 'दुर्दैवी रंगू'च्या आरंभींच्या वर्णनांत ठिकठिकाणीं दिसून येते. संस्कृत कवींच्या धर्तीवर वर्णन करण्याच्या भरांत कांहीं ठिकाणीं समयोचित सभ्यतेचा किंचित् भंग झाल्याचा भास वाचकांना झाल्यावांचून राहणार नाहीं.ऐतिहासिक प्रसंगाला दुसऱ्या कथानकाचें कोंदण बसविण्याचा नामांकित कादंबरीकारांचा जो क्रम त्याचा रा. ब. नीं प्रस्तुत ग्रंथांत अवलंब केलेला आहे. परंतु इतिहास व कथानक ह्यांचा सांधा बेमालुम बसल्याचा भास होत नाहीं.

हरिभाऊंनीं मराठ्यांच्या इतिहासांतला अत्यंत सोज्ज्वल असा जो शिवरायाच्या चरित्राचा भाग त्याचें संकीर्तन 'उषःकाल,' 'सूर्योदय,' 'माध्यान्ह' व 'गड आला पण सिंह गेला ' ह्या कादंबऱ्यांच्या द्वारें केलें आहे. हरिभाऊंच्या लेखणींत इतकी मोहकता आहे कीं, ज्यांनीं म्हणून 'गड आला' हें पुस्तक वाचलें असेल–व विशेषतः त्यांतील तानाजीच्या पतनाचें वर्णन पुनःपुनः वाचलें असेल, त्यांच्या मनावर अज्ञानदास शाहिराच्या 'शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दानें ऐकावा ' ह्या शब्दांचें माहात्म्य ठसल्यावांचून राहणार नाहीं. ऐतिहासिक कसोटी लावून पाहणाऱ्या टीकाकारांच्या हृदयाला या पुस्तकाचें वाचन क्षणमात्र चटका लाविल्याशिवाय व त्यांना त्यांच्या मूळ हेतूचा विसर पाडल्याशिवाय राहणार नाहीं असा आमचा समज आहे. तथापि अत्यंत बहारीच्या प्रसंगास पाहून किंवा वाचूनही अंतःकरणाला पीळ न पडणारे हरीचे लाल नसतील म्हणून कोणीं म्हणावें ?

भाषांतर व रूपांतर.

मराठींतल्या कादंबरीग्रंथांत स्वतंत्र कादंबऱ्या फार थोड्या आहेत. भाषांतर किंवा रूपांतर केलेल्या अशाच जास्त. अलीअलीकडे मात्र स्वतंत्र ग्रंथलेखनाकडे जास्त ओढा वळण्याचीं चिन्हें दिसताहेत; आणि एकंदरींत आज असलेल्या आपल्या साधनसामुग्रीकडे पाहतां आम्हांला पुढें पाऊल टाकणें अत्यंत अवश्य आहे. परंतु तसें करण्यापूर्वी चांगली तयारी करण्याकडे जो दुर्लक्ष करण्याचा लेखकांचा प्रघात आहे तो मात्र कार्यसाधक नव्हे, तर उलट कार्यविघातक आहे, इतकें येथें सुचवून ठेवणें इष्ट दिसतें.

स्वतंत्र ग्रंथांच्या वाढीबरोबरच परभाषेंतील उत्तम ग्रंथांचीं भाषांतरेंही होणें वाङ्मयाभिवृद्धीच्या दृष्टीनें इष्ट आहे. शेक्स्पीयरच्या ग्रंथांचें देशी भाषेंत भाषांतर झाल्यानें त्या भाषेला पुष्टी मिळणार नाहीं असें कोण म्हणेल ? त्याचप्रमाणें डॉनक्विक्झो, मोलियरचे विनोदात्मक ग्रंथ, डँटीचें (Divine Comedy) डिव्हाईन कॉमेडी, प्लुटार्कचीं चरित्रें, गटेचें 'फॉस्ट' ह्या ग्रंथांचीं भाषांतरें मराठींत झाल्यास त्यांपासून मराठी भाषेला किती शोभा येणारी आहे ! परंतु हें असलें अवजड काम हातीं घ्यावयाला तशीच साहित्यानुरागी व अनुभविक मंडळी तयार व्हावयास पाहिजे. असल्या ग्रंथांना वाचक कितीसे मिळतील असा प्रश्न कदाचित् निघेल, व तो अगदींच अप्रस्तुत आहे असेंही म्हणतां येणार नाहीं. तरीही ही गोष्ट खरी कीं, हळूहळू मराठी वाचकवर्गांत उच्चप्रतीचा विद्याव्यासंग करण्याची आवड उत्पन्न होण्याचीं शुभ चिन्हें दिसूं लागलीं आहेत. अशा लोकांना या भाषांतरांपासून फार मदत होईल एवढेंच नव्हे, तर, चांगल्या विचारांची भर पडल्या कारणानें त्याचा प्रभाव नूतन ग्रंथवृद्धीवरही झाल्यावांचून राहणार नाहीं.

तात्पर्य, भाषांतरासाठीं घेतलेल्या ग्रंथांची निवड करतांना विशेष धोरण ठेविलें पाहिजे. पण आज मितीला वाटेल त्या ग्रंथांचीं भाषांतरें देशी भाषांतून करण्याचा सपाटा लेखकांनीं चालविला आहे. त्या योगानें बरेचसे वायफळ ग्रंथ मात्र बाहेर पडतांना दिसतात, व ग्रंथांची संख्या वाढलेली दिसते; पण

गुणांच्या दृष्टीनें पाहतां मराठी ग्रंथसंग्रहास त्यापासून विशेषसा फायदा मिळत नाहीं.

कादंबऱ्यांचीं भाषांतरें करण्याच्या कामीं फार अडचणी आहेत. नामांकित कादंबरीकाराच्या ग्रंथाचें भाषांतर करावयाचें झाल्यास त्यास तशाच योग्यतेचा मनुष्य जर मिळेल तर तें काम नीटपणें पार पडेल. व असा माणूस दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्यापेक्षां स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याचेंच काम अधिक पसंत करील. शिवाय उभय देशांतील लोकाचार व चालीरीति यांत भिन्नता असल्याकारणानें लोकांच्या पसंतीला तो ग्रंथ पडणार नाहीं. परंतु ज्याअर्थी भिन्न भिन्न समाजांच्या चालीरीतींचें ज्ञान झाल्याशिवाय खरी मानसिक उन्नतावस्था होणें शक्य नाहीं व जगाच्या चित्रविचित्र स्वरूपाचें ज्ञान होणार नाहीं, त्याअर्थी रूपांतर करण्याच्या भानगडींत पडण्यापेक्षां भाषांतर करणें बरें. त्या योगानें मूळांतील ग्रंथकाराचा आशय तरी समजतो. नाहीं तर धड ना ह्या समाजाचें धड ना त्या समाजाचें असे गंगाजम्नी प्रकार पाहून त्या कृतीला हास्यास्पद स्वरूप मात्र प्राप्त होतें. ह्याला उदाहरण म्हणून आपण Hamlet नाटकाच्या मराठींतल्या दोन प्रतिकृतींचें घेऊं. विकारविलसित व हिंमतबहादर हीं दोन्ही या नाटकाचीं रूपांतरें नांवाजलेल्या, अनुभवी व रसिक अशा गृहस्थांनींच केलेलीं आहेत, व तीं चांगल्या पुस्तकांत मोडणारीं आहेत. पण हीं पुस्तकें वाचतांना ह्या भिन्न परिस्थितीचा परिणाम ह्या लेखकांना सर्वस्वीं टाळतां येणें कसें अशक्य झालें, हें ज्यानें हीं पुस्तकें काळजीपूर्वक वाचलीं असतील त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

विकारविलसितकारांनीं आपल्यापरी पराकाष्ठेची काळजी घेऊन शेक्सपीयरचें ह्द्गत मराठी भाषेंत उतरण्याचा प्रयत्न केला आहे. तरी वाचकांच्या अभिरुचीकडे पाहून नांवें बदलल्यामुळें व आंग्लसमाज व हिंदुसमाज यांच्या चालीरीतींत भिन्नता असल्यामुळें ती आपल्या प्रतिकृतींत त्यांना घालवितां आली नाहीं. उदाहरणार्थ मल्लिका (Ophelia) व तीव्रजव (Polonious) ह्यांचा भाषणप्रसंग घ्या. हिंदुसमाजांत आपल्या तरुण मुलीला 'कांगे, तुझें त्याच्यावर मन बसलें आहे का?' म्हणून प्रत्यक्षपणें विचारणारे व मुलीला तिच्या प्रियकराची भोगलालसा अनिवार झाल्याकारणानें वेड लागल्याचा अनुवाद करून तिला राजाकडे घेऊन जाणारे बाप कितीसे निघतील? असे बरेच प्रसंग या नाटकांत दाखवितां येतील.

हिंमतबहादरासारख्या रूपांतराकडे वळून पाहिलें तरी तोच प्रकार दिसतो. पाचव्या अंकांत अंबेच्या (Ophelia) अंत्यविधीची तयारी करीत असतांना काटर्यांपैकीं एका गृहस्थाला श्मशानभूमीवरच एक छक्कड म्हणण्याची तलफ लागते. हा देखावा महाराष्ट्रांतील श्मशानभूमीवर साधारणतः असंभाव्य कोटींतीलच म्हणावयाचा. दहन होणाऱ्या चितेवर विडी शिलगावून आपली तलफ भागविणारे कांहीं फक्कड गृहस्थ क्वचित् दृष्टीस पडतात, नाहीं असें नाहीं; पण लावणीच्या प्रसादाचा हा भाग महाराष्ट्रांत अपूर्व होय अशी माझी समजूत आहे.

याहून निराळें असें 'केवळ स्वार्थापायीं' या कादंबरीचेंही उदाहरण घेतां येईल. बद्रीनाथपंडितासारख्या उत्तरदेशीय, पंधराव्या शतकांतील पंडितानें आपल्या कन्येला प्रौढावस्थेपर्यंत अविवाहित स्थितींत ठेवणें व पुरातनवस्तूंचा संग्रह करून ठेवणें ही गोष्ट म्हणजे कल्पनातीत प्रसंग होय.

यावरून परकीय भाषेंतील कादंबरीचें रूपांतर करणें झालें तर तें करणाराची स्थिति किती चमत्कारिक होते, व लेखकाच्या परिश्रमाचें चीज कां होत नाहीं, तें दिसून येईल.

इतर कादंबरीकार.

ग्रंथसंख्येच्या दृष्टीनें रा. नाथ माधव ह्यांचा नंबर बराच वरती लागतो. ह्यांनीं आजपावेतों १०।१५ लहान मोठ्या कादंबऱ्या लिहिलेल्या असून ह्या विशिष्ट शाखेच्या व्यासंगाला त्यांनीं आपणास वाहून घेतल्याचें दिसतें. त्यांच्या कादंबऱ्यांमधून वैचित्र्य राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांची 'श्रीनिवासराव' ही कादंबरी शास्त्रीय विषयाला मनोरंजक स्वरूप दिल्याचें उदाहरण आहे. 'सांवळ्या तांडेल' यांसारख्या कादंबरीचा प्रकार

त्यांनीं मराठींत नव्यानेंच सुरू केलेला दिसतो. इंग्रजींत Naval Stories म्हणून आरमारविषयक गोष्टींचा जो एक निराळा प्रकार दिसतो त्या धर्तीवर शिवाजीमहाराजांच्या आरमाराची हकीगत देण्याचा यांत यत्न केलेला आहे. त्यांच्या बऱ्याच कादंबऱ्या सामाजिक विषयांवर आहेत. उदाहरणार्थ ' विहंगवृंद.' ह्या कादंबरींत बसुबिलाच्या चळवळीचें प्रतिबिंब दिलेलें असून ' गृहदशेचें चित्र ' यांत मध्यम स्थितींतल्या एका दुर्दैवी गृहस्थाची हकीगत दिलेली आहे.

ह्यांच्याचप्रमाणें दुसरे होतकरू कादंबरीकार रा. बाळकृष्ण संतुराम गडकरी, बी. ए. आणि साताऱ्चे रा. नारायण हरि आपटे हे होत. गडकऱ्यांची 'पुष्पमाला', 'तसेंच सुधारणेचा मध्यकाल' यांत लेखकाची कल्पकता, मनुष्यस्वभावनिरीक्षण आणि पात्रानुकूल भाषणशैली, हे गुण चांगले दिसून येतात. आपट्यांचीं 'कर्मगति,' 'भुरळ,' वगैरे बरींच पुस्तकें लोकांपुढें असून ह्यांच्या डोळ्यांसमोर उच्च ध्येय असल्याचें दिसून येतें.

रा. दामले ह्यांच्या ' जग हें त्रिविध आहे ' व ' न्याय कीं अन्याय ' ह्या दोन कादंबऱ्या प्रथम 'चित्रमयजगतां'तून क्रमशः प्रसिद्ध झाल्या असून पुढें चित्रशाळेतून पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्रिगुणात्मक सृष्टीची रचना आपल्याला कशी पाहावयास सांपडते ह्याचें अल्प प्रमाणावर काढलेलें चित्र पहिल्या कादंबरींत असून, लबाड लोकांच्या उलाढालींत भाबड्या लोकांची कशी दैना होते वगैरे प्रकाराचें व त्यांकांच्या व्यवहाराचें चित्र दाखवून, लबाडांच्या मौजा शेवटपर्यंत कशा चालतात, पापभीरू माणसाला आपत्तींत कसे दिवस घालवावे लागतात, तें यांत दाखविलें आहे; व यावरून मनुष्याच्या पुढें उद्भवणारा नेहमींचा प्रश्न -'हा न्याय कीं अन्याय?'हा त्यांनीं आपल्या कादंबरीचा विषय बनविलेला आहे. रा. दामल्यांनीं आपल्या पहिल्या कादंबरींतून आंग्ल व संस्कृत कवींच्या उक्ति मधून मधून दिल्या असल्या कारणानें, (विशिष्ट प्रसंग सोडून दिल्यास) त्यांच्या कृतीस विशेष शोभा आलेली आहे.

या काव्यशास्त्रविनोदचर्चेच्या दृष्टीनें वामनराव जोशी यांच्या, मासिकमनोरंजनांतून क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या, ' रागिणी ' कादंबरीचा नामनिर्देश करणें उचित आहे. ग्रंथ पुरा प्रसिद्ध न झाल्याकारणानें त्यावर मत देणें जरी धाडसाचें मानलें, तरी रा. जोशी यांनीं मराठी कादंबरीची नवीन तऱ्हा सुरू केली आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कोणतेंही प्रकरण जरी उघडून वाचूं लागलों तरी लेखकाच्या सुसंस्कृत व तार्किक बुद्धीचा संगम तींत पाहावयास मिळतो व त्यांच्या उत्कृष्ट व्यासंगाची साक्ष पटते. मनोरंजनाच्या भांडारांतल्या आणखी दोन कादंबऱ्यांची या ठिकाणीं आठवण होते; एक वासुदेवराव आपट्यांची ' दुःखाअंतीं सुख ' व दुसरी रा. विनायकराव जोशी यांची 'केवळ स्वार्थापायीं.'

' दुःखाअंतीं सुख ' ह्या कादंबरींत पतीच्या मरणानंतर कुलीन, अब्रूदार, परंतु मध्यम स्थितीच्या ब्राह्मणकुटुंबांतली स्त्री आपत्कालच्या प्रसंगांत आपली कुटुंबसंरक्षणाची व अपत्यशिक्षणाची जोखमीची कामगिरी कशी चोख रीतीनें करिते ह्याचें मोठें हृदयंगम चित्र वठविलें आहे. त्यांतही माधुकरी मागून विद्याभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गर्दीच्या वगैरे वर्णनाचे प्रसंग हुबेहुब रंगविले असल्यानें पुस्तक वाचल्यानंतर कांहीं कालपावेतों त्या प्रसंगाचा चटका मनावर राहातो; व या बाबतींत हरिभाऊंच्या ' जग हें असें आहे' ह्या कादंबरीची आठवण होते.

' केवळ स्वार्थापायीं ' ही कादंबरी Romola चें रूपांतर आहे ही गोष्ट एकीकडे ठेवली तर, मराठींत तिला बऱ्याच वरच्या दर्जाची जागा द्यावी लागते. जॉर्ज इलियटच्या उत्कृष्ट बुद्धिमत्तेचा फायदा विनायकरावजींना घ्यावयास सांपडला ही गोष्ट जरी खरी, व निव्वळ ऐतिहासिक आधाराच्या दृष्टीनें कसाला लावून पाहिलें असतां या पुस्तकांत विसंगतता वगैरे वैगुण्यें दिसतात, तरी माधवस्वामीच्या मठांतलीं प्रवचनें, शांता व माधवस्वामी यांच्यामध्यें उडालेला खटका, व शांता नवऱ्यापासून पराङ्मुख होऊन विजयनगर सोडून निघाली असतां तिच्या मनाची झालेली स्थिति, वगैरे प्रसंग मराठींत अपूर्व आहेत; व त्यांची वाचकांना लौकर विस्मृति होईलसें वाटत नाहीं.

हा भाग आटोपता घेण्यापूर्वी रा. गोखले ह्यांच्या ' आजपासून पन्नास वर्षांनंतर' व ' स्वर्गीय प्रेम ' ह्या

दोन पुस्तकांविषयीं दोन शब्द सांगणें इष्ट दिसतें. रा. गोखले ह्यांच्या पहिल्या पुस्तकाची रचना पाहून डार्विनच्या 'सुटलेल्या दुव्याची' (Missing Link) आठवण होते. अर्ध वानर व अर्ध मनुष्य अशी विचित्राकृति पाहून ज्याप्रमाणें प्रेक्षकाला हंसूं आल्यावांचून राहणार नाहीं, त्याप्रमाणें ह्या गंगाजन्नी पुस्तकाचा प्रकार होतो. त्यापेक्षां त्यांचें 'स्वर्गीय प्रेम' जास्त सरस उतरलें आहे. रूपांतरकारांना ज्या अनेक अडचणींशीं झगडावें लागतें त्याचा ऊहापोह इतरत्र केला असल्यानें ह्या ठिकाणीं इतकेंच पुरे.

येथवर दिलेल्या हकीगतीवरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, मराठी कादंबऱ्यांत हलुहलु फेरबदल होत आहे. हा बदल अंतर्बाह्य दोन्ही प्रकारचा होत आहे. परंतु ज्याप्रमाणें गुलाबाच्या झाडावर उमलणारी कलिका ही पूर्णपणें विकास पावून पाहणाऱ्याच्या मनाला आल्हादवीत नाहीं तोंपर्यंत तिचा शनैः शनैः होणारा विकास एकदम लक्षांत येत नाहीं, त्याचप्रमाणें कादंबरीच्या निरनिराळ्या अवयवांना येणारें सुरुचिर रमणीयत्व पूर्ण यौवनाचा विकास होईपर्यंत नजरेंत भरणारें नाहीं. ज्या अर्थी विद्वान्, बुद्धिमान्, व रसिक अशा लेखकांचें लक्ष दिवसेंदिवस या शाखेकडे वेधूं लागलें आहे, त्या अर्थी लौकरच महाराष्ट्रवाङ्मयाला चांगले दिवस येतील अशी उमेद बाळगण्याला कांहीं हरकत नाहीं.

कविता.

कवि.-[पद.]

तो देव लाडका रसिकाचा ।
कविराया ! अससी तूं साचा ॥ ध्रु० ॥
तीं सदैव गासी नव गाणीं ।
मति खुलवी अमरा तव वाणी ! ॥
तुजसम श्रेष्ठतर ना प्राणी ।
अज्ञात गूढरव मुखिं आणी
स्थिर तव दृष्टि ।
गिळुनी सृष्टि ।
करि रसवृष्टि ! ।
जो धाता त्या सुरलोकाचा ।
कविराया ! अससी तूं साचा ॥ १ ॥

चंडोल दिनाचें तेज कथी ।
चक्रांग निशीचें तिमिर मथी ॥
दिनरात्र नसे मुळिं तुझ्या पथीं ।
तूं गासी बसुनी दिव्य रथीं ॥
तव गीताचा ।
ध्वनि जगताचा ।
दर्पण त्याचा—
जो प्रकाशरवि चिरविभवाचा
कविराया ! अससी तूं साचा ॥ २ ॥

"सुमंत."

ही कलिका–[पद.]

आईच्या पदराआड । दुग्धपान करितां गोड ।
मधेंच सहजस्फूर्तीनें । डोकावुनि पाही तान्हें ।
तशीच ही कलिका बाई ! । लीला करिते सुखदायी. १

ही कोमलतेची मूर्ति । सौन्दर्याची परिपूर्ति ! ।
सारल्याचें उपमान । मांगल्याचें अभिधान ! ।
पाहुनि गगनींच्या तारा । लाजुन लपल्या भरा भरा ! २

रात्र सर्व गेली सरुनी । आशीर्वच द्विज देवोनी ।
लहरी अभिनव तेजाच्या ।चुंबुनि द्विज रिझविति साच्या ।
उषा-देवता प्रेमाची-। हांसुनि हास्य दिवें याची ! ३

या कलिकेला वनराई । प्रेमानें गाणीं गाई ! ।
ऐकुनि तीं मंजुल गीतें । विहंगगण झाले गाते ! ।
देण्या उत्तेजन त्यांहीं । तरुराजी डोले बाई ! । ४

होतों आधिंच मनिं धालों । प्रेमरसें उन्मन झालों ! ।
तशांत ही हृदयंगमता ।–छे ! छे ! मूर्तिमती कविता ।
बघुनी जें स्फुरलें गाणें । गाइयलें तेंच मुखानें ! ५

शाहू द. उजगरे.

सांप्रतच्या नाट्यवाङ्मयाची स्थिति.

[लेखक—महाराष्ट्रनाटकमंडळींतील एक नट.]

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते । नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ॥

कालिदास.

वरील श्लोकांत गोविलेलें तत्त्व प्रत्येक नाट्यलेखकानें आपल्या समोर नित्य आर्दशवत् ठेविलें पाहिजे. आपली कृति विवक्षित समाजांत अगर विवक्षित माणसांसमोर यावयाची नसून भिन्नरुचीच्या आणि भिन्नप्रकृतीच्या बहुजनसमाजांत आपल्या कृतीचें प्रदर्शन व्हावयाचें असतें हें लक्षांत ठेवून, बहुजनसमाजास आपली नाट्यकृति मान्य होईल व त्यांजकडून आपला गौरव होऊन नाटयवाङ्मयभांडारांत भर टाकल्याचें श्रेय आपणांस मिळेल अशा तऱ्हेचें उच्च ध्येय सदोदित पुढें ठेवून प्रत्येक नाटककारानें नाटयरचना केली पाहिजे.

गेल्या पंधरा वर्षांत निरनिराळया नव्या लेखकांकडून विविध कथानकांवर लिहिलेलीं अनेक संगीत व गद्य नाटकें महाराष्ट्ररंगभूमीवर आलीं आहेत. या लेखांत त्यांचें पृथक् पृथक् परीक्षण न करतां समवायानें त्यांचें गुणदोषविवेचन करण्याचें योजिलें आहे. प्रथम नाटकाचें महत्त्व कळवून नंतर मुख्य विषयाकडे वळूं. 'काव्येषु नाटकं रम्यं.' सुशिक्षित अशिक्षित, श्रीमंत गरीब, स्त्री पुरुष, बाल वृद्ध वगैरे सर्व प्राण्यांना एकसमयावच्छेदेंकरून आनंद देऊन सुशिक्षण देणारें या रम्य काव्याखेरीज—नाटकाखेरीज—अन्य साधन नाहीं. आणि म्हणूनच कविवर्य मोरोपंतासारख्या उज्ज्वल विकाराच्या रसिकानें 'धातूंत असें हाटक नाटकवर तेंवि सुप्रबंधांत' असें नाटकाचें अभिनंदन केलें आहे.

काव्याचे जे प्रकार रूढ आहेत, त्यांत कादंबऱ्या, कविता व नाटकें हीं येतात. यांतील पहिले दोन प्रकार श्राव्यकाव्यांत गणिले आहेत; आणि नाटक हें श्राव्य व दृश्य मिळून उभयात्मक काव्यांत गणिलें जातें. कादंबऱ्या व कविता नुसत्या ऐकण्याच्याच उपयोगीं पडतात. परंतु नाटकांत ऐकण्याबरोबर पाहण्याचाही भाग विशेष असतो. म्हणून त्यास दृश्यश्राव्य असें सार्थ नामाभिधान आहे. शिवाय कादंबऱ्या व कविता साक्षर लोकांस समजतात. पण नाटकें साक्षर व निरक्षर दोन्ही वर्गांना चांगलीं समजतात. आणि म्हणूनच काव्यांतील पहिल्या दोन प्रकारांपेक्षां नाटकाचें महत्त्व अधिक आहे.

नाटकें हीं जगांतील उत्तमोत्तम काव्यरत्नांचीं भांडारें होत. पृथ्वीवरील कोणत्याही देशांतील नामांकित कवींचीं काव्यें त्या त्या कवींच्या नाटकांतूनच आढळून येतात; कारण काव्याचें आणि नाट्याचें नेहमीं साहचर्य असतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. इंग्रजी भाषेंतील शेक्सपियर, ड्रायडन्, बेन्जॉन्सन्, गोल्डस्मिथ् इत्यादि कवि त्यांच्या उत्तमोत्तम नाट्यग्रंथांवरूनच प्रसिद्ध आहेत. तसेंच ॲडिसन्, टेनिसन्, जॉन्सन् वगैरेंनींसुद्धां बरींच नाटकें लिहिलीं आहेत. जर्मनींतील शिलर आणि गेटी हे नामांकित कवि आपल्या नाटकांवरूनच प्रसिद्धीस आले. इटलींतील सुप्रसिद्ध कवि डॅन्टे यानें आपलें काव्य नाटकाच्या पोषाखानेंच सजविलें आहे, हें आंग्लभाषाकोविदांस श्रुतच आहे. आपल्याकडील प्राचीन कविवर्य कालिदास व भवभूति जे इतके जगन्मान्य झाले व ज्यांनीं कविकुलमुकुटमणि अशी पदवी संपादिली त्याला कारण त्यांचीं शाकुन्तल आणि उत्तररामचरित हीं नाटकेंच होत. एवढ्या उदाहरणांवरून आपणा सर्वांच्या ध्यानांत येऊन चुकलेंच असेल कीं, जगावरील कोणत्याही देशांतील काव्य त्यांच्या नाटकांतून आढळतें आणि त्या देशांतील कवि त्यांच्या सुप्रसिद्ध नाटकांवरूनच ओळखले जातात. यावरून काव्याचें आणि नाट्याचें साहचर्य असतें या आमच्या म्हणण्याची सार्थकता प्रत्ययास येईल व नाट्यप्रबंधाची योग्यता किती उच्च प्रकारची

आहे हेंही समजून येईल. असो; आतां आपण प्रस्तुतच्या मुख्य विषयाकडे वळूंया.

प्रचलित नाटकांपैकीं अमुक एक चांगलें आणि अमुक एक वाईट हें ठरविणें फार कठीण आहे. कारण, बहुजनसमाजांत विवक्षित प्रकारची अभिरुचि कायम नसल्यामुळें एका ठिकाणीं पसंत पडलेलें नाटक दुसरे ठिकाणीं पसंत पडेलच असा नेम नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वी कै० अण्णासाहेब किर्लोस्करांच्या शाकुन्तल, सौभद्राला तमाशा म्हणणारे लोक होते, व आतां त्याच नाटककारास देव्हाऱ्यांत बसवून त्याची पूजा करणारेही लोक आहेत. तीच स्थिति सांप्रतकालीन नाटकांची झाली आहे. कोणी देवलांच्या नाटकावर खूष, तर कोणी कोल्हटकरांचे भक्त, कोणी तर राण्यांचे पोवाडे गाणारे, आणि कित्येक तर या सर्वांनाच नांवें ठेवणारे! अशा प्रकारची चमत्कारिक लोकाभिरुचि झाल्यामुळें व लोकाभिरुचींत एकवाक्यता नसल्या कारणानें अमुक एक प्रकारचीं नाटकें समाजास मान्य आहेत असें अनुमान करणें सर्वस्वीं अशक्य होय. साखरेची रुचि गोड, तिखटाची तिखट व मिठाची खारट हें स्वयमेव ठरलेलें आहे. म्हणजे हे जिन्नस इंग्लंडांत असले, अमेरिकेंत गेले, अगर हिंदुस्थानांतच राहिले, तरी त्यांची रुचि जशी इतक्या स्थानांतरानें तिळभरही बदलत नाहीं, तशी गोष्ट नाटकाच्या रुचीची नाहीं. कारण, नाटकाची अभिरुचि भिन्न काळीं व भिन्न ठिकाणीं भिन्नप्रकारची अनुभवास येते. तेव्हां यावरून नाटकांची योग्यता रुचिपरत्वें ठरेल ती खरी. तथापि सध्यांचे काळीं कोणत्या प्रकारची अभिरुचि समाजांत रूढ आहे आणि तिची युक्तायुक्तता कोणत्या प्रमाणानें आहे हें पुढें थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न करूं.

नाटकाचा उद्देश केवळ मनोरंजन करणें एवढाच नसून "To kill two brids with one stone" या इंग्रजी म्हणीप्रमाणें, नाटकापासून मनोरंजनाबरोबर लोकशिक्षणही साधावयाचें असतें, हें कोणींही नाटककारानें केव्हांही विसरतां कामा नये. अलीकडील कांहीं लेखकांनीं केवळ मनोरंजन करणें हाच प्रधान हेतु डोळ्यापुढें ठेवल्यासारखा दिसतो. नाटकांत अश्लील थट्टामस्करीचे प्रसंग घालावे, स्थलकालविपर्यास करून खुशाल लोकरुचि बिघडवावी, बीभत्स रसाचीं स्थळें आणावीं, कुठें अमानुष कृत्यांचें वर्णन करून भयानक रस उत्पन्न करावा, अस्वाभाविक व मनुष्यस्वभावाविरुद्ध प्रसंग नाटकांत आणावेत, म्हणजे लोक आश्चर्यानें गुंग होऊन जातात, ते लेखकाची वाहवा करतात, नाटक पाहण्यास प्रेक्षकांच्या उड्यांवर उड्या पडतात, आणि आपणांस चापून पैसे मिळतात! असें ध्येय पुढें ठेवून पुष्कळ लेखकांनीं हाच मार्ग पत्करला आहे. याचें ताजें डोळ्यांसमोरील ढोबळ उदाहरण म्हणजे 'राक्षसी महत्वाकांक्षा' हें नाटक होय. परंतु इकडली तिकडली चोराचोरी करून लोकांच्या क्षणैकमनोवृत्तीस पटतील अशीं नाटकें रचणें हें खऱ्या व विचारी नाटककाराचें कर्तव्य नव्हे. मनोरंजन हें नाटककाराचें काम आहे खरें, तथापि त्याहून दुसरी तितकीच महत्वाची कामगिरी त्यास करावयाची असते. नाटक हें खऱ्याखुऱ्या संसाराचें चित्र असावयास पाहिजे. नाटकापासून समाजांतील चालीरीतींचें संपूर्ण ज्ञान झालें पाहिजे. मानवी स्वभावाचें, मनोवृत्तींचें व त्यांच्या संमिश्र मिलाफाचें आणि त्यायोगें होणाऱ्या मनुष्याच्या वर्तनाचें स्पष्ट प्रतिबिंब नाटकांत दिसलें पाहिजे. सारांश, नाटकाच्या प्रेक्षणानें, वाचनानें व मननानें मनुष्याच्या मनोवृत्ति उज्ज्वल आणि उदार झाल्या पाहिजेत, मनुष्यास बहुश्रुतपणा आला पाहिजे, त्याची नैतिक प्रगति झाली पाहिजे, आणि त्यास व्यवहारज्ञान मिळालें पाहिजे. हेंच खऱ्या नाटककाराचें उच्चतर ध्येय होय. आणि हें ध्येय साधण्याकरितां निरनिराळ्या समाजांचीं चित्रें आणि मानवी स्वभावाचीं यथार्थ रूपें नाटककारानें रेखाटलीं पाहिजेत. आज सर्व सुधारलेल्या जगांत शेक्स्पियरला व कालिदासाला जें अग्रस्थान मिळालें आहे, तें त्यांचीं नाटकें निवळ मनोरंजक आहेत म्हणून नव्हे, तर त्यांचीं नाटकें मनोरंजक असूनही तीं ज्ञानाचा आदर्श आणि व्यवहारचातुर्याचा प्रत्यक्ष रत्नाकर आहेत म्हणून. एकंदरींत प्राचीन कवींप्रमाणें उच्च ध्येयाला साजतील अशींच नाटकें अर्वाचीन नाट्यलेखकांनीं लिहावीं हें श्रेयस्कर आहे.

आपणांकडे नाटकांचे चार प्रकार उपलब्ध आहेत. पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक आणि काल्पनिक. यांपैकीं गेल्या पंधरा वर्षांत पहिल्या दोन प्रकारचींच

नाटकें रंगभूमीवर विशेष आलीं आहेत. विलायतेंत ऐतिहासिक व सामाजिक नाटकांचीच संख्या जास्त आहे.पौराणिक नाटकें तिकडे फारच क्वचित्.–किंबहुना मुळींच नाहींत, असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं. तिकडील नाटककार लोकाभिरुचीप्रमाणें नाटकें लिहीत असतात; आणि सामाजिक चळवळीचें हुबेहुब चित्र ज्या नाटकांत उत्कृष्ट वठविलें असेल तें नाटक आणि त्या नाटकाचा कर्ता हे लोकादरास पात्र होतात, आणि त्यांची समाजांत वाहवा होते. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे शेक्स्पियरचें होय. शेक्स्पियरच्या प्रत्येक नाटकांत तद्देशीय समाजाच्या वर्तमानकालीन परिस्थितीचें हुबेहुब प्रतिबिंब दाखविलेलें असतें; व याच कारणानें त्याची कीर्ति अजरामर झाली आहे. आपल्याकडे झालेल्या सामाजिक नाटकांत जो एक मोठा दोष दिसून येतो तो हाच कीं, आपलीं सामाजिक नाटकें एतद्देशीय समाजाचीं निदर्शक नसून त्यांत पाश्चात्य समाजाची पदोपदीं जाणीव झाल्यावांचून राहत नाहीं. यामुळें प्रेक्षकांची दिशाभूल होऊन प्रेक्षक मात्र निष्कारण बुचकळ्यांत पडतात.

कविकुलमुकुटमणि कालिदास आणि भवभूति हे आमचे संस्कृत कवि आणि शेक्स्पीयर वगैरे नामांकित पाश्चात्य कवि यांचीं नाटकें यावच्चंद्रदिवाकरौ पृथ्वीवर प्रकाशित राहण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, त्यांचीं संविधानकें निवडण्याची हातोटी अवर्णनीय असे. त्याचप्रमाणें लोकचरितांचें स्पष्टास्पष्ट दर्शन, सृष्ट्यादि वर्णनें,काव्यालंकार व श्लेष प्रसाद इत्यादि गुण त्यांच्यामध्यें ओतप्रोत भरलेले होते. आंग्लकवि शेक्स्पियरच्या नुसतें कथानक निवडण्याच्या अप्रतिम गुणाविषयीं जॉन्सननें एके ठिकाणीं असे उद्गार काढले आहेतः–"Shaksepeare has no heroes; his scenes are occupied only by men, who act and speak as the reader thinks that he should himself have spoken or acted on the same occasion...........Shakespeare approximates the remote and familiarizes the wonderful; the event which he represents will not happen, but if it were possible, its effects would probably be such as he has assigned." यावरून नाटकाचें नुसतें कथानक निवडण्याचें महत्त्व किती आहे हें कळून येईल.

आलीकडे आपणांत नवीन कसलेल्या आणि विद्वान् लेखकांचें लक्ष नाटकें लिहिण्याकडे लागल्याकारणानें पूर्वीप्रमाणें नाटकांचीं कथानकें Romantic करण्याचें खूळ नाहींसें होऊं लागलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. नाटकाचें बहिरंगच मोहक करण्याचे भानगडींत न पडतां अंतरंगही सुबक करण्याचें ध्येय कांहीं नाटककारांनीं ठेवल्यामुळें त्यांचीं नाटकें बहुजनसमाजास मान्य होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. त्यांतल्या त्यांत इंग्रजी नाटकांचीं भाषांतरें आपणाकडे होऊं लागल्यापासून व पाश्चात्यांचा सहवास अधिकाधिक होऊं लागल्याकारणानें एक नवीनच प्रकार आमच्या नाटकांत दृश्यमान होऊं लागला आहे. इकडील एकादें पौराणिक अथवा ऐतिहासिक संविधानक घेऊन त्यावर विलायती समाजाचा पोषाख चढवावयाचा. अशा विसंगित प्रकारामुळें लोकरंजन तिळभरसुद्धां न होतां उलट नाटककारांचा तिरस्कार मात्र वाटूं लागतो; व अशा करण्यानें लोकांची नसती फसवणूक केल्याचा आरोप नाटककारावर शाबीत होतो.दोनतीन वर्षांपूर्वी कलकत्त्यास एका कंपनीनें एक पौराणिक खेळ करून दाखविला होता. त्या नाटकांत एक असा प्रसंग होता कीं, राधाकृष्ण खुर्चीवर बसून समोर टेबलावर चहाचे कप ठेविले होते आणि त्या दोघांचें चहापान चाललें होतें! असा रंगभूमीवर प्रकार दिसतांच प्रेक्षकांनीं हुश् हुश् करून तो खेळ तिथल्या तिथें बंद करविला; आणि त्या मंडळीला व नाटककाराला लौकरच कलकत्ता सोडणें भाग पडलें. पौराणिक व्यक्तींना रंगभूमीवर आणून त्यांची अशा रीतीनें विटंबना केल्यानें त्यांच्या विषयींची आदर बुद्धि नाहींशी होते आणि नाटकाचा हेतु साध्य होत नाहीं. याविषयीं ठाण्यास झालेल्या मराठीग्रंथसंग्रहाचे वार्षिकोत्सवाचे प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें गुरुवर्य महाजनि यांचें जें भाषण झालें त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, "साधुसंतांचीं नाटकें हल्लीं लोक-

प्रिय झालीं आहेत. संतांच्या चरित्रांतले दोष या नाटकांतही आहेत. म्हणजे ऐतिहासिक गोष्टी, दंतकथा, अद्भुत चमत्कार, असंभाव्य व अविश्वसनीय गोष्टी, यांची त्यांत इतकी गर्दी आहे कीं, संतांच्या चरित्रापासून ज्या उदात्त कल्पना व्हावयाच्या, जी निष्कामभक्ति, कार्य म्हणून करावयाची बुद्धि व्हावयाची, त्या कल्पना, ती भक्ति, ती बुद्धि उत्पन्न न होतां संतांविषयीं भलता ग्रह उत्पन्न होण्याचा संभव आहे, असें मला वाटतें. भक्ति आंधळी व अजाण न व्हावी, तिचें आणि ज्ञानाचें ऐक्य झालें पाहिजे." गुरुवर्य महाजनींचा हा बोध आधुनिक नाटककारांनीं अवश्य ध्यानांत ठेवावा, अशा योग्यतेचा तो आहे. पूर्वींच्या नाटकांमधील उच्च प्रतीचा शृंगार, प्रौढ विनोद, हृदयंगम कल्पना, प्रगल्भ विचार, रसपोषक सुसंबद्धता, इत्यादि उत्तमोत्तम गुणांचा हल्लींच्या नाटकांत पूर्ण अभाव झाला असून, ग्राम्य विनोद, उत्तान व बीभत्स शृंगार, कोते विचार, भिकार कल्पना, या दुर्गुणांची मात्र रेलचेल चालू नाटकांत दृष्टोत्पत्तीस येते. हे सर्व दुर्गुण गद्य नाटकांपेक्षां संगीत नाटकांतच विशेष आढळून येतात. कै० अण्णासाहेब किर्लोस्कर, पांडोबा वाईकर यांच्या वेळचें तें शास्त्रोक्त संगीत नामशेष झालें असून पारशी धांगडधिंग्याचीं पद्यें हल्लीं फार बोकाळलीं आहेत, व पूर्वींचें संगीत औषधालाही महाग झालें आहे. हल्लींच्या संगीत नाटकांत शृंगार हा प्रधान रस असून त्यांत प्राचीन नाट्याचार्यांच्या अगर प्राचीन नाट्यग्रंथ रचणारांच्या मान्यतेस पात्र अशा प्रकारच्या शृंगाराचा परिपोष न होतां केवळ छवाळपणा असतो. एकंदरींत संगीत नाटकास हल्लीं लागत चाललेलें वळण घातुक असून सभ्य स्त्रीपुरुषांना आणि विद्यार्थ्यांना असले प्रयोग दाखविणें फार धोक्याचें झालें आहे. जगन्मान्य तत्त्ववेत्ता प्लेटो यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, "ज्यांच्याकडे स्वदेशहिताची जबाबदारी असते त्यांनीं देशांतील संगीतावर सक्त नजर ठेवली पाहिजे. कारण, मर्यादेचें व कायद्याचें उल्लंघन कोणाचेही लक्षांत न येतां करमणुकीच्या रूपानें प्रथमतः या संगीताचे द्वारें होऊं लागतें. अमर्यादपणा अथवा उच्छृंखलपणा यांचा या द्वारानें मनांत प्रथम शिरकाव होतो; आणि मग हलुहलू रीतभात आणि वागणूक यांतही त्यांचे परिणाम दृष्टीस पडूं लागतात." प्लेटोचे हे विचार देशांतील सुधारणावादी व देशकार्यार्थ झटणाऱ्या लोकांनीं अवश्य ध्यानांत ठेवावे, व देशांतील संगीतावर पूर्ण नजर ठेवावी.

आतांपर्यंत सामाजिक, पौराणिक व ऐतिहासिक नाटकांविषयीं झालें. आतां, सध्यांच्या काल्पनिक नाटकांकडे वळूं.

काल्पनिक नाटकें लिहिणारे लेखक हल्लीं खंडीभर झाले आहेत. या नाटकांतून अतिशयोक्तीचा भाग फार असतो. काल्पनिक नाटकांत वाटेल त्या कल्पना वाटेल त्या ठिकाणीं स्थळ काळ न पाहतां बेलाशक दडपून दिलेल्या असतात. त्याचप्रमाणें, उत्तान शृंगार, ग्राम्य विनोद, गौण प्रसंग, अद्भुतवर्णनें, अस्वाभाविक कल्पना हीं इतकीं असतात कीं, या नाटकांचे प्रयोग पाहात असतां प्रेक्षकांना स्वतःच्या मनोवृत्ति या गर्हणीय विषयापासून अलिप्त ठेवणें भाग पडतें. शिवाय, काल्पनिक नाटकांत विप्रलंभ शृंगारापेक्षां संभोगशृंगाराचींच स्थळें फार असतात. अशा शृंगारिक प्रसंगांच्या नित्यदर्शनानें अल्पवयस्क व अप्रबुद्ध मुलांमुलींवर शारीरिक आणि मानसिक अनिष्ट परिणाम होऊन अल्पवयांत तीं बिघडण्याचा संभव असतो. याविषयीं धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले यांचें भारतनाट्यसमाजाच्या ७ व्या संमेलनाचे वेळीं एक भाषण झालें. त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, "शृंगाराचेंच प्राधान्य ज्या नाटकांत असेल अशा नाटकांना कधींही विवेकी प्रेक्षकांनीं जातां उपयोगी नाहीं. तसेंच कौमार्यावस्थेंत अहितकारक ठरणाऱ्या मनोवृत्ति क्षुब्ध करून टाकणारीं जीं नाटकें असतील, तीं नाटकें ब्रह्मचर्यावस्थेंत असलेल्या आपल्या मुलांच्या व लेकीसुनांच्या कधींही दृष्टीस पडूं न देण्याची खबरदारी विशेषतः सुशिक्षित लोकांनीं घेणें अवश्य आहे." तेव्हां अशा तऱ्हेचे शृंगाराचे प्रसंग नाटकांत क्वचित् घालावे. त्यांचा अतिरेक होऊं नये. साखर प्रमाणशीर खाल्ली तर त्यापासून फायदा होतो. पण तीच जर बेसुमार खाल्ली तर तिचे अनिष्ट परिणाम खात्रीनें भोगावे लागणार. तीच गोष्ट नाटकांतील रसांची आहे. नाटकांतील सर्व रस प्रमाणबद्ध असतील तर त्यापासून इष्ट परिणामच घडून येतील, हें उघड आहे. यासाठीं कोणत्याही रसाचा अतिरेक होऊं न देतां सर्वांची

सारखी जुळणी करण्यास नाटककारांना शिकलें पाहिजे. सर्व रस एके ठिकाणीं प्रमाणशीर घालण्याची विलक्षण हातोटी एकट्या शेक्स्पिअरलाच उत्कृष्ट साधली होती, हें त्याचीं सर्व नाटकें ज्यानें विचारपूर्वक वाचलीं आहेत व त्यांचा अंतःकरणपूर्वक विचार केला आहे, त्यालाच फक्त समजणार आहे. काल्पनिक नाटकांतील हास्यरसही इतका बेचव असतो कीं, त्याच्या योगानें सामान्य जनांचें कदाचित् तात्पुरतें समाधान होईल. पण जे खरे विद्वान् व रसिक आहेत त्यांना या हास्यरसापासून बिलकूल समाधान न होतां एक नवीनच तिरस्काररस मात्र उत्पन्न होण्याचा विशेष संभव असतो, हें निश्चित समजावें. परंतु कांहीं तरी वेडगळ रचना करून सामान्य अडाणी लोकांना संतोषविणारीं नाटकें लिहिलीं म्हणजे आपण नाट्यकलेची व समाजाची उत्तम प्रकारें सेवा केली असें कांहीं आधुनिक नाटककारांना वाटतें, आणि अशा नाट्यरचनेनें कविकौशल्याची परमावधि झाली अशी त्यांची वेडी समजूत असते. काल्पनिक नाटकाचें संविधानक अगदीं ठराविक असतें. एक नायक, एक नायिका आणि एक व्हिलन् (Villain) हीं तीन पात्रें असलीं म्हणजे काल्पनिक नाटकाचें बहुतेक काम भागतें. त्या नायकावर अनेक संकटपरंपरा दाखवावयाची; व्हिलनचें नायिकेवर प्रेम असावयाचें, पण नायिका त्याचा धिःकार करीत असावयाची; नायकनायिकांची ताटातूट; व्हिलनकडून नायिकेची विटंबना; शेवटीं मुख्य नायकाचे हातून व्हिलनचा खून आणि सर्वत्र आनंदीआनंद !-इत्यादि भाग काल्पनिक नाटकांत बहुधा असावयाचाच.

आलीकडे ज्यानें उठावें त्यानें नाटक लिहावें असें झाल्याकारणानें नुसती नाटकांची संख्या शेंकड्यानें वाढली आहे. व त्यामुळें वरवर पाहणारांस नाट्यवाङ्मयाची सध्यां उन्नति होत आहे असें वाटतें. पण त्यानें जरा सूक्ष्म निरीक्षण केलें म्हणजे त्याच्या भ्रमाचा भोंपळा ताबडतोब फुटतो. दरसाल इतकीं नाटकें उत्पन्न होत आहेत खरीं, पण त्यांत नाट्यवाङ्मयाची उन्नति करणारीं अशीं नाटकें ' सिंधूंत बिंदु ' या न्यायानें आढळून येतात. तेव्हां अशीं भाराभर निरुपयोगी नाटकें निर्माण होण्यापेक्षां नाट्यवाङ्मयास भूषणभूत अशीं नाटकें कमी प्रमाणांत उत्पन्न झालीं तरी हरकत नाहीं. परंतु उच्चध्येयास साजतील अशींच नाटकें लिहिण्याकडे आपल्या बुद्धीचा, वेळेचा आणि चातुर्याचा उपयोग आधुनिक नाट्यलेखकांनीं केला तर तें सर्वोत्कृष्ट होईल, असें आम्हांस वाटतें.

असो; आतां नाटकलेखकाचे अंगीं कोणकोणते गुण हवेत याविषयीं थोडेंसें सांगून मी हा विषय पुरा करतों. प्रत्येक नाटककाराचे अंगांत खालील गुण असणें जरूर आहे. नाटककार बहुश्रुत पाहिजे. त्याची अवलोकनशक्ति तीव्र पाहिजे. त्याला विविध विषयांचें ज्ञान हवें. तो प्रतिभावान् पाहिजे. भाषा त्याचे स्वाधीन असणें जरूर आहे;-म्हणजे त्या त्या भूमिकांच्या योग्यतेनुरूप त्यांस भाषारचना करतां आली पाहिजे. त्याला नाट्यशास्त्राचें ज्ञान अवश्य आहे. शिवाय तो उत्तम नट असावा, निदान त्यानें पुष्कळसे नाटकप्रयोग तरी पाहिलेले असावेत. कै० अण्णासाहेब किर्लोस्कर, रा. देवल, रा. कोल्हटकर, रा. खाडिलकर, रा. केळकर, यांचीं नाटकें लोकादरास विशेष पात्र होण्याचें मुख्य कारण, त्यांनीं नाट्यशास्त्राचा अभ्यास केला आहे. त्यांनीं अनेक नाट्यप्रयोग अवलोकन केले आहेत. पहिले दोघे कवि तर उत्तम नट म्हणून प्रसिद्ध आहेत. अशा कारणांनींच त्यांचीं नाटकें विशेष लोकप्रिय झालीं आहेत.

नाटक लिहितांना कवीनें दोन तत्त्वें आदर्शवत् आपल्यासमोर ठेवावयाचीं असतात. तीं तत्त्वें म्हणजे एक मनोरंजन आणि दुसरें लोकशिक्षण हीं होत. म्हणजे आपली नाट्यकृति पाहात असतां प्रेक्षकांचें मनोरंजन होऊन शिवाय त्यांना शिक्षण देण्याचें मोठ्या महत्त्वाचें दुसरें कर्तव्य कवीस करावयाचें असतें हें विसरतां कामा नये. कित्येक लेखकांची अशी समजूत असते कीं, कोणीकडून लोकांचें मनोरंजन झालें म्हणजे आपलें कार्य संपलें. पण त्यामुळें सदरहू नाटककारांचीं नाटकें वर सांगितलेल्या दुसऱ्या तत्त्वाच्या अभावीं ' Failure ' झाल्याखेरीज राहात नाहींत. मनोरंजक रीतीनें लोकशिक्षण देण्याचें या नाटकाखेरीज अन्य साधन नाहीं. याकरितां नाटक कसें असावें हें सांगतांना भरतमहामुनि आपल्या नाट्यशास्त्रांत म्हणतात-

" दिसावया प्रियरूप । अंतरीं बोध अमूप ।
मधुस्निग्ध जैसे अपूप । सुप्रसिद्ध सूपशास्त्रीं ॥ १ ॥
सत्कर्मातें प्रवर्तक । होय सद्भावदर्शक ।
अपूर्वची वेद एक । नाट्याख्य हा पांचवा ॥ २ ॥"

यावरून असें सिद्ध होतें कीं, नाटकाचा मुख्य उद्देश मनोरंजन करणें हा नसून लोकशिक्षण देणें हा आहे. युनिव्हर्सिट्या, कॉलेजें, वर्तमानपत्रें, धर्मगुरु, व्याख्यानें इत्यादि जीं लोकशिक्षणाचीं साधनें आहेत त्यां सर्वांत नाटकाचें महत्त्व अधिक आहे. श्राव्यापेक्षां दृश्यापासून मनोवृत्तींवर अधिक जोराचा व तात्काळ परिणाम होतो. याचें प्रत्यंतर संस्कृत कवि भवभूति आणि पाश्चात्य कवि शेक्स्पियर यांनीं आपल्या उत्तररामचरितांत आणि हॅम्लेट नाटकांत उत्कृष्ट दाखविलें आहे.

उत्तररामचरिताचे सातवे अंकांत वाल्मीकीच्या आश्रमांत रंगभूमि तयार केलेली असून खुद्द श्रीरामचंद्र आपल्या पुत्रांसह प्रेक्षकस्थानीं विराजमान झाले होते. स्वतः वाल्मीकींनीं रचलेला नाट्यप्रयोग व्हावयाचा होता. त्याची सर्व व्यवस्था लक्ष्मणाकडे होती. प्रयोग खुद्द श्रीरामचंद्र व सीतादेवी यांच्या संबंधाचा होता. कथाभागांत गंगा व पृथ्वी या प्रगट होऊन त्यांचें व सीतादेवीचें संभाषण होतें. त्या संभाषणांत रामचंद्राची निंदा व सीतेच्या पातिव्रत्याची प्रशंसा वगैरे गोष्टींचें निदर्शन होऊन गंगा व पृथ्वी शोकविव्हल झालेल्या सीतेस घेऊन अंतरिक्षांत जातात. हा प्रयोग इतका उत्कृष्ट वठतो कीं, ' आर्य नाटकमिदम् ' असा इशारा लक्ष्मण वारंवार देत असतांही करुणरसभरित होऊन श्रीरामचंद्र मूर्च्छित पडतात ! इतका त्या दृश्यप्रसंगाचा परिणाम रामचंद्रावर झाला. तसाच दुसरा प्रसंग हॅम्लेट नाटकांत आहे. या नाटकाचे तिसऱ्या अंकांत एक उपनाटक आहे. या उपनाटकांत, राजा बागेंत निजला असतां त्याचा भाऊ वज्रमना त्या राजाच्या कानांत विष ओततो आणि भावजयीस पळवून नेतो, असा एक प्रवेश आहे. हा प्रसंग रंगभूमीवर चालला असतांना प्रेक्षकस्थानीं बसलेल्या हॅम्लेटच्या चुलत्याच्या वृत्तींत चलबिचल होऊन तो नाटकप्रयोग बंद करण्यास सांगून घाईघाईनें व रागानें निघून जातो. अशा प्रकारें आपल्या बापाच्या खुनाची शाबिती नाटकप्रयोगाचे द्वारें हॅम्लेटच्या हस्तें शेक्स्पियरनें चतुराईनें घडवून आणली आहे. या दोन सुप्रसिद्ध उदाहरणांवरून प्रत्यक्ष पाहण्याचा परिणाम ऐकण्यापेक्षां अधिक लौकर होतो, या आमच्या म्हणण्याची सत्यता दिसून येईल. सारांश, ऐकींव गोष्टींपेक्षां प्रत्यक्ष गोष्टींच्या परिणामाविषयीं मनुष्य साशंक राहात नाहीं. आणि ' कानांत आणि डोळ्यांत अंतर असतें ' या म्हणीचें तात्पर्य तरी हेंच आहे. म्हणून श्राव्यकाव्यापेक्षां नाटक हें दृश्यकाव्य असल्यामुळें त्याच्या योगानें लोकशिक्षणास फार मदत होते. इंग्लंडांतील शेक्स्पियर, जर्मनींतील शिलर, फ्रॉन्समधील रॉसिन, इटलींतील आल्फेरी इत्यादि नाटककार त्या त्या देशांतील त्या त्या काळच्या लोकस्थितीचे उत्तम निदर्शक आहेत. त्यांचीं नाटकें रसपरिप्लुत व स्वदेशाभिमानपूर्ण अशीं आहेत, हें कोणीही सुज्ञ कबूल करील. म्हणूनच युनिव्हर्सिट्या, कॉलेजें वगैरे शिक्षणविषयक संस्थांत शेक्स्पियरचींच आणि कालिदासभवभुतींचीच नाटकें अंतर्भूत केलेलीं असतात. यावरून नाटकें हीं लोकशिक्षणप्रसारक आहेत, आणि नाटकांचे प्रेक्षणानें, वाचनानें व मननानें मनुष्याची मानसिक, नैतिक, सामाजिक व राष्ट्रीय उन्नति होऊं शकते, हें सर्व राष्ट्रांच्या निदर्शनास आलें आहे. या सर्व गोष्टी होतकरू नाटककारांनीं ध्यानांत ठेवून आपली कृति केवळ मनोरंजकच करण्याचे भानगडींत पडूं नये. तीं अगदींच मनोरंजक नसावी असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु लोकशिक्षणाकडे मुख्य दृष्टि ठेवून त्याच्या पुष्टीसाठीं मनोरंजनाची ठिकठिकाणीं झाक दिसली पाहिजे. नाटकें हीं नुसतीं शिक्षणविषयकही असून चालत नाहीं. त्याच्या जोडीस मनोरंजन हें पाहिजेच.कारण मनोरंजनद्वारा लोकशिक्षण देण्याची नाटकांत खुबी आहे. उत्तररामचरितासारखें सर्वोत्कृष्ट व सद्बोधदर्शक नाटक रंगभूमीवर अतिशय कंटाळवाणें वाटतें याचें कारण त्यांत मनोरंजक भाग मुळींच नाहीं. यास्तव नाटक हें निवळ मनोरंजकही नसावें आणि निवळ लोकशिक्षणरूपही नसावें. तर या दोहोंच्या संमिश्र मिलाफाचें तें द्योतक असावें. आतां प्रत्येक नाटकांतील आवश्यक गुण सामान्यतः सांगून मी हा निबंध पुरा करतों.

नाटक हें पंचगुणयुक्त पाहिजे. तें असें—

गुण १.—नाटकाचें सांविधानक सद्यःस्थितीचें आणि देशकालानुरूप असलें पाहिजे.

गुण २.—तें बहुजनसमाजास पसंत पडण्यासारखें मनोरंजक पाहिजे.

गुण ३.—त्यांतील भूमिकांच्या परिस्थितीप्रमाणें त्यांची भाषासरणी आणि वाक्यरचना असली पाहिजे.

गुण ४.—त्यांत एक मुख्य रस असून त्याच्या पुष्टीकरणार्थ इतर रसांचा संयोग झाला पाहिजे.

गुण ५.—आणि तें बोधरूप व सद्भावप्रवर्तक असें असलें पाहिजे.

हे पांच गुण प्रत्येक नाटककारानें हृदयाशीं बाळगून आपल्या कृतींत आणण्याचा अवश्य प्रयत्न करावा, म्हणजे सहज त्यांचीं नाटकें लोकादरास पात्र होतील आणि नाट्यवाङ्मयांत भर टाकल्याचें व नाट्यकलेची उन्नति केल्याचें थोडें तरी त्यांना श्रेय मिळेल, आणि अशा तऱ्हेनें वाङ्मयसेवा केल्याचेंही त्यांना पुण्य लागेल.

सर्वांगी प्रगति होण्यास कोणत्या तऱ्हेच्या नव्या वाङ्मयाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे?

[लेखक-रा. गजानन सदाशिव जोशी, अप्रेंटिस इंजिनियर.]

सध्यां समाजांत विशेषेंकरून खपणाऱ्या पुस्तकांचें वर्गीकरण केल्यास त्यांचे खालील प्रकार दिसून येतील:—

पहिला वर्ग.—मनोरंजक अशा सामाजिक अगर इतर कादंबऱ्या, नाटकें, कथा, उपकथा इत्यादि ललित वाङ्मय.

दुसरा वर्ग—वेदान्ती वाङ्मय. ह्यांत पुराणांचीं भाषांतरें, जुने भक्तिप्रद ग्रंथ, उपनिषदें व इतर वेदांचीं भाषांतरें व आधुनिक वेदांती लोक—म्हणजे विवेकानंद, थियॉसॉफी व आपल्या इकडचे खास वेदान्ती—ह्यांचे ग्रंथ ह्यांचा समावेश होतो.

तिसरा वर्ग.—म्हणजे वर्तमानपत्रांतून वेळोवेळीं प्रचलित विषयासंबंधीं प्रसिद्ध होणारे लेख.

अशा तीन जातींच्या पुस्तकांचा समाजांत सध्यां बराच खप आहे.

इतकें सांगितल्यानंतर आतां समाजांत असलेल्या सामान्य दोषांकडे वळलें पाहिजे; आणि हें काम जरा विस्तारानें करणें इष्ट आहे; कारण रोगाचें निदान जितक्या बारकाईनें केलें जाईल, व दोषांच्या अंगाउपांगांचा विचार जितक्या सूक्ष्म रीतीनें होईल तितक्या रीतीनें चिकित्सेला मदत होणार आहे.

पहिल्या वर्गांतील वाङ्मयवाचकांत दिसून येणारा मोठा ठळक दोष म्हटला म्हणजे ऐदी शृंगारप्रियता व रिकामटेकडें फॅशनदास्य. शृंगारप्रियतेस ऐदी म्हणण्याचें कारण हें कीं, चालू असलेल्या समाजांतील आमच्या रीतीभाती प्रणयाला (Romance) फारशी जागा ठेवित नसल्यामुळें, आमच्या ह्या वर्गाला काल्पनिक प्रीतिपात्रें बनवून त्यांच्या काल्पनिक प्रेमाचे गोडवे गावे लागतात. ह्या वर्गाची प्रणयप्रियता इतकी बोकाळली आहे कीं, त्याला कल्पित प्रियेच्या आराधनेशिवाय इतर कांहीं उद्योग ब्रह्मदेवानें मनुष्याच्या मागें लावलेले असतील ह्याचें भानही नसतें! राष्ट्राला बरेच महत्त्वाचे उद्योग करावयाचे असतात व त्यांतील प्रणयासंबंधींच तेवढा कांहीं सर्वांत मोठासा महत्त्वाचा उद्योग नव्हे, ही गोष्ट त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. दुसरी गोष्ट फॅशन—दास्य; म्हणजे अमुक तऱ्हेनेंच सुशिक्षित मनुष्यानें राहिलें पाहिजे,-डोकें नाहींच राखिलें तरि निदान दाढी तरी वाढू देतां कामा नये, बाजारांत स्वतः जाऊन विशेषशी चौकशी न केली पाहिजे, काटकसर करणें म्हणजे कमीपणा आहे, जुन्या गोष्टी, जुने खेळ, व जुने पेहेराव हे त्याज्य समजावे, इत्यादि तऱ्हेच्या ज्या कल्पना आलीकडील कॉलेजमधून बाहेर पडणाऱ्या मंडळींत दिसून येतात त्यांचा समावेश मी

ह्या सदरांत करतों. वरील दोहींचा उगम पाश्चात्यांच्या अंध अनुकरणांत आहे हें निराळें सांगणें नकोच.

वरील तऱ्हेच्या कल्पनांनीं नव्या लोकांत, व पूर्वापार चालत आलेल्या वेदान्ती मतांनीं एकंदर इतर वर्गांत, काम करण्याची हौस अगदींच कमी कमी दिसून येत आहे. पोटापुरता अगदीं आवश्यक असा उद्योगधंदा केल्यावर इतर वेळ कोणत्या तरी उपयुक्त कारणीं लावण्याची प्रवृत्ति कोठेंच फारशी दिसून येत नाहीं. ही प्रवृत्ति सर्वत्र दिसून आली पाहिजे. पण सध्यां पाहावें तों एकाद्या शास्त्राकडे किंवा कलेकडे आपला रिकामा वेळ वेंचणारे लोक अगदींच विरळा दिसतात. उद्योग, नेहमीं उद्योग करीत राहिलें पाहिजे, हें कर्मरहस्य पाश्चात्यांच्या उदाहरणानें आम्हांस जितकें कळावयास पाहिजे तितकें कळलेलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल.काम करण्याची हौस कोणासच नाहीं.उद्योग नको. आपलें राष्ट्रविषयक कर्तव्य काय ह्याची जाणीव नाहीं. जगांतील राष्ट्रमालिकेंत आपल्या राष्ट्राचा कितवा नंबर लागेल ह्याबद्दल मुळीं विचारच नाहीं, मग वाईट वाटावयाची तर गोष्टच नको; आणि ह्याचाच अर्थ त्यांच्यांत खरा देशाभिमान नाहीं. जगांतील राष्ट्रें पुढें कशानें गेलीं ह्याचा विचार नसल्यानें, ज्या शास्त्रांच्या मदतीनें त्या राष्ट्रांनीं आपला फायदा करून घेतला, त्या शास्त्रांची पुसतपास करण्याचीही कोणास इच्छा होत नाहीं. मेंदू खर्च करण्याची इतकी यातायात व श्रम पाहिजेत कोणाला? ईझी चेअरवर बसून सुखासीन वाङ्मय वाचण्यांत जन्म घालविणारांच्या मनांत मेहनत करण्यास लावणाऱ्या कर्तव्याची आठवण होते कशाला?

नाटकें, कादंबऱ्या व नवलकथा वाचण्याची लोकांत जी इतकी आवड उत्पन्न झालेली आहे ती केवळ मनोरंजनापुरती. त्यांत राष्ट्रीयत्वाची भावना नाहीं. आपण वाचतों ती कथा भाषांतर आहे कीं मूळ आहे ह्याचा विचार कोणी करीत नाहीं. स्वतंत्र ग्रंथ निर्माण करणाऱ्या आपल्या खास लेखकांचें कौतुक करून त्यांचे ग्रंथ थोडे महागाईनेंही घेण्यास वाचक तयार झाल्याशिवाय स्वतंत्र लेखक निपजणार कसे? नुसतीं भाषांतरें लिहून जें मिळणार तेंच—कदाचित् त्याहून कमी—मेहनतीनें स्वतंत्र ग्रंथ लिहिला असतां मिळणार असें ठरल्यावर आपलें डोकें खर्च करण्याची बुद्धि होणार कोणाला? आणि हेंच कारण आमच्या मराठींत सध्यां जिकडे पाहावें तिकडे भाषांतरावर तडाखा, अशी स्थिति असण्याचें होय. कादंबऱ्यादिक पहिल्या प्रकारच्या वाङ्मयांसंबंधींच ही गोष्ट खरी आहे असें नसून दुसऱ्या वर्गांतही तीच स्थिति दिसून येते. आमचा वेदान्त विवेकानंद, रामतीर्थ, अभेदानंद इत्यादिकांच्या भाषांतरांनीं भरून गेलेला आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं भाषांतरें मुळींच नकोत. कितीही उत्कृष्ट ग्रंथ स्वभाषेंत स्वतंत्र असे लिहिले गेले तरी परभाषेंत असें कांहीं तरी वाङ्मय राहणारच कीं जें आपल्या घरीं आणण्याचा आपल्याला मोह उत्पन्न होईल. पण शेक्स्पीअर आम्हीं उत्पन्न केला हा अभिमान कोणीकडे?—आणि शेक्सपिअरच्या सर्व नाटकांचीं चार निरनिराळीं भाषांतरें आम्हीं आपल्या भाषेंत केलीं आहेत, हा अभिमान कोणीकडे?

'रवीन्द्रनाथ टागोर बंगाली आहे' असें म्हणणाऱ्या बंगाली गृहस्थाच्या अन्तःकरणाची तुलना 'आम्ही गीतांजलीचें भाषांतर नुकतेंच मराठींत केलें आहे' असें सांगणाऱ्या महाराष्ट्रीयाच्या अन्तःकरणाशीं काय करावी! रामदासाबद्दल मराठ्यांस जितका अभिमान वाटेल तितका सबंध 'दासबोधा'चें सरस भाषांतर करणाऱ्या गुजराथ्यालाही वाटणार नाहीं, मग इतरांची काय कथा? माझिनीनें आपला देश स्वतंत्र केला व शिवाजीनेंही आपला देश स्वतंत्र केला; म्हणून मराठे शिवाजीस जो मान देतील तो इटलींतील लोक त्यास देणार नाहींत; व इटलीचे लोक माझिनीस जो मान देतील तो तेथें शिवाजीला मिळणार नाहीं. साहजिकच आहे.

आणि असें आहे ह्यांत कांहीं वावगें नाहीं.नाहीं तर कित्येक खुशालचेंडू तत्त्ववेत्तेपणाचा आव आणून वरील स्वाभिमानाला दुरभिमानाचें नांव देतील. आम्हांला उत्तम ग्रंथ वाचायला मिळाले म्हणजे झालें; मग तीं भाषांतरें असोत, किंवा ते परभाषेंत लिहिलेले ग्रंथ असोत. चांगले खेळ आम्हांला खेळायला मिळत असल्यावर मग ते परदेशी आहेत कीं अस्मद्देशीय आहेत ह्याचा विचार करण्याची आम्हांला जरूर नाहीं, असें म्हणावयाला आमच्यांतील बरेच लोक

मुळींच कचणार नाहींत हें मला माहित आहे, आणि म्हणून थोडें विस्तारानें त्यासंबंधीं लिहिणें भाग पडत आहे.

अहो! राष्ट्रमालिकेंत जर आपल्याला राष्ट्र म्हणून जगणें असेल—नुसतें कसें तरी जगणें नव्हे, तर प्रतिष्ठितपणें मिरवावयाचें असेल—तर मग नेहमीं दुसऱ्यांच्या उष्ट्या पत्रावळी चाखून कसें होणार? कल्पना करा कीं, आमच्या मराठी लेखकांनीं नुसतीं भाषांतरेंच करण्याचा सपाटा चालू ठेवला; आणि उद्यां हिंदुस्थानांतीलच सर्व भाषापंडितांची एक सभा भरली आहे, त्या ठिकाणीं, महाराष्ट्राबाहेरचे इतर लोक आमचा हा इतिहासकार, आमचा हा कादंबरीकार, आमचा हा कवि, आमचा हा शास्त्रज्ञ, अशा तऱ्हेनें एकमेकांकडे बोट करून सांगूं लागले असतां त्यावेळीं आम्हीं महाराष्ट्रीयांनीं—हे सर्व आमचेच, कारण ह्या सर्वांचीं आम्हीं भाषांतरें केलीं आहेत—असें सांगणें म्हणजे किती लज्जास्पद गोष्ट होईल बरें?

नेहमीं दुसऱ्याच्या श्रीमंतीवर मिरवणें हें जसें समाजांत हलकेपणाचें आहे त्याचप्रमाणें राष्ट्राराष्ट्राच्या संबंधांतही एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर कल्पना व विचार ह्याकरितां नेहमीं अवलंबून राहणें हें त्या राष्ट्राला कमीपणाचें आहे. तेंच आपले असे कांहीं खासे विचार व कल्पना जगापुढें मांडल्यानंतर, मग त्यांच्याही कल्पना काय आहेत त्या पाहणें ह्यांत फारच मोठेपणा आहे. श्रीमंतश्रीमंतांच्या मैत्रीत ते एकमेकांचें उसनें घेतात; पण उसनें घेतांना आपणही त्याच्या असेच फिरून कधीं उपयोगी पडूं अशी जाणीव असल्यानें त्याच्या मनाला हलकेपणा वाटत नाहीं. चोरी ही कव्हांही हलकेपणाचीच:आणि दुसऱ्याला कांहींएक मोबदला न देतां—आर्थिक मोबदला कित्येक ठिकाणीं देणें व बहुतेक ठिकाणीं नुसत्या परवानगीनेंच काम भागविणें हे खरे मोबदले नव्हेत—त्यांच्या कल्पना व विचार भाषांतरद्वारा आपले करून घेणें हीही चोरीच होय.तेव्हां मुख्य सांगावयाचें म्हणजे असें कीं, जगांतील नुसत्या उत्तम वाङ्मयानेंच—तें त्या त्या भाषेंत वाचून आपली तहान भागविणें तर नाहींच चालणार—त्याचें भाषांतर करून खूष होऊन चालणार नाहीं; तर स्वतंत्रपणें आपलें वाङ्मयही त्याच तोडीचें करण्याचें ध्येय पुढें ठेविलें पाहिजे. आणि अशी गोष्ट साध्य झाल्यास आपल्या समाजांत केवळ पुस्तकी ज्ञान न वाढतां अनुभवाचें ज्ञान फैलावण्यास मदत होईल. म्हणून स्वतंत्र ग्रंथकार निर्माण होण्याकरितां स्वतःस थोडी तोशीस लावून घेण्यासही तयार होऊन वाचकवर्गानें कोठें स्वतंत्र विचार व कल्पना यांचा अंकुर दिसला तर त्याचें कौतुक करण्यास तयार असलें पाहिजे.

उद्योग नको आणि आपलें राष्ट्रविषयक कर्तव्य काय ह्याची जाणीव नाहीं म्हणून वर म्हटलें. त्यासंबंधीं किंचित् अधिक विस्तारानें लिहिलें पाहिजे. वर सांगितलेंच आहे कीं राष्ट्रमालिकेंत आपल्या राष्ट्राला एक प्रमुख स्थान देण्याचा प्रयत्न करणें हें राष्ट्रांतील प्रत्येक अवयवाचें कर्तव्य आहे. पण हें कर्तव्य ओळखून त्याप्रमाणें वागण्याची तयारी कोठेंच दिसत नाहीं. दुसरी यत्ता झाली तिसरी, तिसरीनंतर चौथी, अशा तऱ्हेनें वरवर जात मॅट्रिकच्या खडकामधून तारूं निभावून गेल्यास मग कॉलेजमध्यें शिरावयाचें—आणि नंतर बी. ए. झाल्यानंतर नोकरी शोधावयास लागावयाचें. मॅट्रिकच्या खडकावरच तारूं फुटलें तर शाळेंतील शिक्षणक्रम संपविल्याबद्दल शिफारसपत्र मिळविण्याचा प्रयत्न करावयाचा व तो साधल्यास कोठें तरी १५–२० ची नोकरी धरावयाची, असा आमच्या मध्यमवर्गांतील लोकांचा वर्तनक्रम आहे. ह्याबद्दल त्याला फारशीं नांवेंही ठेवतां येणार नाहींत; कारण पोटाची सोय ही नेहमीं प्रथम पाहावी लागते. पण ज्यांना कांहीं अंशानें तरी पोटाची काळजी नाहीं अशा वर्गांचीही हीच स्थिति. 'तेवढेच १२–१५ रुपये पुरत. स्वस्थ घरीं बसण्यापेक्षां हें काय वाईट?' इत्यादि तऱ्हेची विचारसरणी होण्याचें कारण काय? तर ह्याहून अधिक महत्त्वाचें कर्तव्य आपणांस आहे ह्याची जाणीवच नाहीं. बरें, जे बुद्धिमान् लोक पोटाकरितां नोकरी किंवा इतर व्यवसाय करतात ते तरी आपला रिकामा वेळ कांहीं सत्कार्यीं लावतात काय? मुळींच नाहीं! ह्याचें कारण, *आपणास पुष्कळ करावयाचें आहे याचीच त्यांना जाणीव नसते.*

आळस, स्वाभिमानाची कमतरता, उच्च ध्येयाची कल्पना नसणें, ह्या तऱ्हेच्या दोषांबरोबर अंधश्रद्धा

हाही एक दोष आमच्यांत मुरलेला दिसतो. हा दुर्गुण नुसत्या जुन्या लोकांत किंवा दुसऱ्या वर्गांतील वाङ्मय वाचणाऱ्या लोकांतच आहे असें नव्हे; तर, पहिल्या वर्गाच्या वाचकांतही तो आढळून येतो. दुसऱ्या वर्गाचें वाङ्मय सध्यां जें फारसें फैलावत आहे, त्याचें मुख्य कारण अंधश्रद्धा. कोणीं उठावें व सांगावें 'मी हिमालयांत गेलों होतो;' तें खरें मानावें व लिहावें एखादें पुस्तक त्यासंबंधीं ! थिआसफीचें वाङ्मय, भक्तिमार्गाचें वाङ्मय, व इतरही कांहीं वेदान्त-वाङ्मय, ह्या सर्वांच्या पायाशीं फाजील अंधश्रद्धा आहे. श्रद्धा पाहिजे; शास्त्र शास्त्र म्हणून जें म्हणतात तीही एकप्रकारची श्रद्धाच आहे. पण ह्या श्रद्धेचा पाया शुद्ध व भरींव पाहिजे. त्याबद्दल जितकी काळजी घेतली पाहिजे तितकी न घेतल्यामुळें पुष्कळ वेळां हानि होते. ह्या वर्गाच्या अंधश्रद्धेचें ह्याहून येथें अधिक विवेचन करण्याची जरूर नाहीं, कारण तें सर्वांस परिचित आहे.

दुसऱ्या वर्गांतील लोक–म्हणजे आमचा (सु) शिक्षित वर्ग–ह्यांच्यांतही अंधश्रद्धा आहे म्हणून मीं म्हटलें तर तें पुष्कळांना खरेंसुद्धां वाटणार नाहीं. आपल्या जुन्या पुराणांत किंवा संतांच्या ग्रंथांत ग्रथित केलेले चमत्कार व तत्सदृश आतांही घडत असल्याबद्दल सांगितले जाणारे चमत्कार खरे मानण्याची प्रवृत्ति हा जर अंधश्रद्धेचाच एक भाग असेल तर इंग्रजी ग्रंथांतून जें जें दिसेल तें तें एकदम ग्रहण करणें हाही एक अंधश्रद्धेचाच भाग आहे. कांहीं दिवसांपूर्वी इंग्रजी वैद्यकाला पथ्य करण्यापासून रोग्याला कांहीं फायदा होतो किंवा नाहीं याची माहिती नव्हती. त्याच परिस्थितींत तयार झालेल्या आमच्या डॉक्टरांनींही इंग्रजी औषधांना पथ्य लागत नाहीं असा पुकारा करून सोडला ! अझून देखील अशी समजूत कोठें कोठें दिसून येते. आतां हा तरी आंधळाच विश्वास. कारण आमच्या ह्या डॉक्टरवर्गाचें खरें कर्तव्य असें होतें कीं, त्यांनीं पथ्यापासून फायदा होतो किंवा नाहीं, होतो असें वैद्यांचें म्हणणें आहे तर तो कितपत होतो, ह्याचें बारकाईनें निरीक्षण करून इंग्रजी वैद्यकांत त्यांनीं ही दुरुस्ती करावयास पाहिजे होती. असें त्यांनीं केलें असतें तर जें आज इंग्रजी वैद्यकांत झालें आहे तें ह्यापूर्वीं झालें असतें, आणि त्याचें श्रेय अगदीं फुकटाफुकटी आमच्या डॉक्टरवर्गाला मिळालें असतें. पण असें होणार कसें ? अझून देखील एखाद्या उद्योगी डॉक्टराला काम करण्याचेंच मनांत असल्यास केवढा प्रांत आहे ! देशी व इंग्रजी औषधांचा सारखा उपयोग करून कोणत्या रोगांत देशी औषधें इंग्रजी औषधांपेक्षां अधिक व अचुक उपयोगीं पडतात, कोणत्या रोगांत दोहोंचा सारखाच उपयोग होतो, व कोणत्या ठिकाणीं इंग्रजीं औषधेंच अधिक गुणावह होतात, हें ठरविलें असतां शास्त्राची केवढी प्रगति झाल्यासारखें होईल ! पण हें होणार कसें ? इंग्रजी औषधेंच सर्वस्वीं सर्व रोगांवर चांगलीं असलीं पाहिजेत अशी जर मुळांत अंधश्रद्धा असली तर पुढें पाय उचलावा कसा ?

अशी जर अंधश्रद्धा नसती, आणि नव्या डॉक्टरांच्या मनांत व जुन्या वैद्यांच्या मनांत परस्परांबद्दल सहानुभूति असती, तर, आज कोठें तरी उभयतांची एकादी सभा अस्तित्वांत येऊन त्यांत केवळ शास्त्राच्या वर्धनाकरितां परस्परांनीं आपले अनुभव सांगून सत्य काय आहे ह्याचा निर्णय करण्याची तजवीज केली असती. पण अशी सभा आज कोठेंही दिसत नाहीं. कारण अंधविश्वासामुळें नव्या जुन्यांत परस्परसहानुभूति नाहीं. प्रत्येक वर्ग म्हणतो, दुसरा अडाणी व मूर्ख आहे; त्याच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं; माझें त्याच्याशिवाय कांहीं अडणार नाहीं. एका वर्गाचें दुसऱ्याशिवाय ठीक चालेल हें कांहीं अंशीं खरें आहे; पण दोघांनीं परस्परसहानुभूतिपूर्वक चालल्याशिवाय राष्ट्राचें अडतें आहे त्याची वाट काय ? दोन वर्गांच्या ऐवजीं कोणताही एकच वर्ग असता तरी राष्ट्राचें म्हणजे सर्वस्वीं नुकसान झालें असतें असें नाहीं; पण कांहीं कारणांनीं कां होईना, हे दोन वर्ग आहेत, आणि ह्यांतील कोणत्याही एका वर्गाला दुसरा वर्ग एकदम नाहींसा करतां येणें शक्य नाहीं. इतक्या गोष्टी स्पष्ट असल्यावर ह्या दोन्ही वर्गांनीं परस्परसहानुभूतीनें वागून उभयतांच्या मदतीनें राष्ट्रकार्य पुढें ढकललें पाहिजे. पण तसें होत नाहीं. भटाभिक्षुकांना व शास्त्र्यांना कांहीं येत नाहीं, त्यांच्या समजुती अडाणी आहेत, असें म्हटल्यानें (तसे ते खरोखरच असतील

तर) ते शाहणे होणार नाहींत; मात्र वाईट शब्दांमुळें त्यांना राग येणार. तेंच त्यांना चुचकारून घेऊन उभयतांच्या सामान्य हिताचें काम शोधून काढून तें दोघांनीं करणें, ह्यांत कोणाचा दुराग्रह असल्यास तो निघून जाईल, व कांहीं तरी काम हातून होईल.

येथपर्यंत रोगाचें निदान झालें. दोष कळल्यानंतर औषधयोजना करण्यास मुळींच अडचण पडत नाहीं. वाङ्मयाच्या बाबतींत उपाययोजना आतां उघडच आहे. वर निर्दिष्ट केलेले दोष समाजाच्या निदर्शनास वारंवार आणण्याचा सर्व तऱ्हांनीं प्रयत्न करणें, हे दोष ज्या कारणांमुळें उत्पन्न झालेले आहेत तीं कारणें नाहींशीं करणारें वाङ्मय उत्पन्न करणें, इत्यादि प्रकार ओघानेंच येतात.

या सर्व रोगांवरचें एक मुख्य औषध म्हणजे लोकांत शास्त्रज्ञान पसरविणें; आणि हें समाजाच्या सर्व अवयवांत मुरून जाण्याकरितां, वाङ्मयाच्या सर्व तऱ्हांनीं–म्हणजे काव्य, नाटकें, कादंबऱ्या, इतिहास इत्यादि विविध प्रकारांनीं–वारंवार लोकांपुढें मांडलें पाहिजे. औषध एकच, पण रोगाच्या लक्षणाप्रमाणें अनुपान बदललें म्हणजे झालें. त्याचप्रमाणें शास्त्र हें औषध अनुपानपरत्वें वरील सर्व दोषांवर लागू पडेल. आमच्या समाजांतील आळसाचा दोष गेला पाहिजे काय? तर मग शास्त्रज्ञ लोकांचीं चरित्रें विस्तारानें लोकांपुढें मांडा !एकेक शास्त्राची वृद्धि करण्याकरितां त्याच्या जनकाला अहोरात्र कशी खटपट करावी लागली,–खरोखर बारा बारा तास मेहनत–इतकेंच नव्हे तर आपलें जीवितही कसें धोक्यांत घालावें लागलें–हें नीट रीतीनें समाजापुढें मांडा. क्लोरोफार्मचे उपयोग समजून घेण्याकरितां, होमिओपाथीचे शोध लावण्याकरितां, फार कशाला, विमानांची आतां झाली आहे इतकीच वाढ करण्याकरितां, त्या त्या शास्त्रज्ञांनीं आपल्या जीविताची कांहींएक काळजी न बाळगतां कशी खटपट केली, यांचा मनोरंक इतिहास अजून आमच्या वाङ्मयांत नाहीं. आमच्या लोकांत अंध–श्रद्धा आहे काय ? हरकत नाहीं; ज्या शास्त्राच्या वाढीनें युरोपीय देशांत अंधश्रद्धेचे निरनिराळे प्रकारचे चेटुक, भुतेंखेतें, नानाविध चमत्कार करणारे बैरागी गोसावी किंवा योगी इत्यादिकांचा आपोआप नाश झाला, त्या शास्त्रांच्या वाढीचा नुसता इतिहास व त्यांचा वरील परिणाम ही आपल्या लोकांपुढें मांडा ! आपलें राष्ट्रसंबंधीं ध्येय काय हें माहित नसणारे, रिकाम्या वेळाला चांगलासा व्यवसाय न सांपडल्यामुळें चकाट्या पिटणारे, असे आपल्यांत लोक आहेत काय ? तर मग शास्त्रांच्या वाढीनें युरोपखंडांतील राष्ट्रांचा कसा अपरिमित फायदा झाला आहे हें त्यांस दाखवा ! व केवळ शास्त्राचा अभ्यास करणें हें, एकदा त्याची गोडी लागल्यावर, किती मनोरंजक आहे आणि त्यांत कांहीं यश मिळाल्यास किती श्रेयस्कर आहे हेंही लोकांच्या निदर्शनास आणा !

शास्त्रज्ञानाची आवश्यकता किती आहे हें आज नव्यानें सांगावयास नको, व तें सांगण्याचें हें स्थळही नव्हे.पण शास्त्रज्ञान कोणत्या तऱ्हेनें दिलें पाहिजे ह्याबद्दल मात्र या ठिकाणी किंचित् लिहिलें असतां वावगें होणार नाहीं. आजपर्यंत शास्त्रीय वाङ्मय उत्पन्न करण्याचे विशेष जोराचे दोन प्रयत्न झाले: एक रा. दाभोळकरांनीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ, व दुसरे 'ग्रंथमालें'तून प्रसिद्ध झालेले ग्रंथ. मला वाटतें,त्यांचा व्हावा तितका उपयोग झालेला नाहीं. ह्यांच्या अनेक कारणांपैकीं प्रमुख अशीं कारणें हीं कीं, आधीं ते ग्रंथच अवघड अशा स्वरूपांत मांडले गेले आहेत. ज्या शास्त्राची मुळींच माहिती नाहीं अशांना त्या शास्त्रांत केवळ प्रवेश करून देण्याच्या हेतूनेंच प्रथम ग्रंथ तयार झाले पाहिजेत. दुसरें, हे ग्रंथ जितक्या लोकांच्या हातीं पडावयास पाहिजे होते तितक्यांच्या हातीं पडले नाहींत; म्हणजे ह्यांची व्हावी तितकी प्रसिद्धि झाली नाहीं. पहिल्या ग्रंथांसंबंधीं तर उघडच असें कारण कीं, तीं पुस्तकें तीन तीन चार चार रुपयांचीं एकदम प्रसिद्ध होत. अर्थात् अशा तऱ्हेच्या वाङ्मयाला इतके पैसे खर्च करण्यास आमचा वाचकवर्ग तयार नाहीं. ग्रंथमालेसंबंधीं तरी पुष्कळसें असेंच; कारण सामान्यवाचकवर्गाला आवडेल असा मजकूर त्यांत थोडाच होता. माझ्या मतें सामान्य वाचकवर्गाची जेथें उडी पडत आहे अशा तऱ्हेच्या मासिक पुस्तकांतूनच शास्त्रांचे धडे दिले पाहिजेत. अलीकडे हळू हळू तसें

होतही आहे; पण त्याकडे अधिक व्यवस्थेनें लक्ष दिलें पाहिजे. दुसरें, कादंबऱ्यादिक गोष्टींतूनही युरोपियन समाजाची खरी स्थिति, त्यांचा खरा कर्मयोग, व शास्त्रज्ञान मिळविण्यांत केलेला आत्मयज्ञ ह्यांचीं वर्णनें आलीं पाहिजेत. आमच्या एका वर्गाला वेदान्त आवडतो आहे?—तर मग पाश्चात्य शास्त्रज्ञ तत्त्वज्ञानासंबंधीं किती चाल चालून गेलेले आहेत हें दाखवून, तत्त्वज्ञानासही शास्त्र कसें आवश्यक आहे हें त्यांच्या मनावर ठसविलें पाहिजे. द्वैत व अद्वैत ह्यांचाच काथ्याकूट करणारे लोक असले तर त्यांना हरबर्ट स्पेन्सर व जर्मन शास्त्रज्ञ हेकेल इत्यादि लोक द्वैताद्वैतासंबंधीं शास्त्राध्ययनानें काय कल्पना करितात हें सांगितलें पाहिजे. तात्पर्य, मिशनरी कावा केला पाहिजे. कादंबऱ्या लोक वाचतात काय?—तर मग आम्ही आपलें शास्त्र कादंबरीरूपानें सांगूं. तत्त्वज्ञान पाहिजे? हरकत नाहीं. आम्ही शास्त्राचें तत्त्वज्ञान सांगूं. लोक शास्त्रांचे स्वतंत्र ग्रंथ घेण्यास कांकूं करतात? तरी हरकत नाहीं, आम्ही आपलें शास्त्र मासिकांतूनच पढवूं. अशा तऱ्हेनें तयारी करून चाललें पाहिजे.

शास्त्राबरोबर उपरि निर्दिष्ट दोष नाहींसें करणारें वाङ्मय उत्पन्न करणें, हाही मार्ग अर्थात् अवलंबिला पाहिजेच. पण नुसत्या वाङ्मयानें मात्र सर्व भागणार नाहीं. नुसत्या तोंडच्या वाफेनेंच काय होणार? दोषच दाखवावयाचे असतील तर त्याला इतके तरी श्रम कशाला! हे दोष स्वतःतून ज्यांनीं नाहींसे केले अशा कर्तव्यदक्ष पुरुषांपैकीं स्वतःच्या उदाहरणानें कित्ता घालण्यास एखादा पुरुष पुढें आल्यानें जेवढें काम होईल तेवढें भाराभर पुस्तकें लिहिण्यानें होणार नाहीं. 'आधीं केलें मग बोलिलें' असे लोक पाहिजेत. असे लोक हें स्वतःच जिवंत वाङ्मय आहेत. त्यांना बोलण्याची व लिहिण्याची जरूरी नाहीं. असे लोक नाहींत म्हणूनच वाङ्मय नाहीं, आणि असे लोक उत्पन्न झाल्यावर सर्व बाजूंनीं परिपूर्ण असें वाङ्मय तेव्हांच तयार होईल. वाङ्मयानें काय पुरुष तयार होणार? पुरुष वाङ्मय करितील. आमच्या भाषेंत शास्त्रीय वाङ्मय नाहीं. साहजिकच आहे. शास्त्राकरितां अविश्रांत श्रम करणारा असा पुरुष कोठें आहे? आमच्या कवितांत व कादंबऱ्यांत काल्पनिक प्रेमाच्या थैथयाटाशिवाय कांहीं दिसून येत नाहीं; पण तिकडे बंगालचे कवि आपल्या कवितांतून राष्ट्रीय ध्येयें गातात. आमच्या कवींच्या हृदयांत मात्र प्रेम व्यतिरिक्त गोष्टींस थारा नाहीं आहे. जेथें विहिरींतच शुकशुकाट तेथें पोहऱ्यांत काय येणार! सर्वांगी प्रगति होण्यास वाङ्मय कसलें तयार करतां! असें वाङ्मय तयार करणारे पुरुष उत्पन्न झाल्यावर मग त्या वेळेला प्रगति ही गोष्ट होऊन गेलेली असणार. दरिद्री लोकांचें वाङ्मय श्रीमंत असणार नाहीं. सांगावयाचें सार इतकेंच कीं आदर्शभूत असे पुरुष उत्पन्न होऊन त्यांनींच वाङ्मय तयार करण्याच्या नादास लागावें, इतरांनीं त्या नादांत पडूं नये.

सरते शेवटीं फिरून इतकेंच सांगावयाचें कीं, जोंपर्यंत प्रत्यक्ष भोंदू किंवा अज्ञ गुरूंच्या नादीं अंधपणानें शेकडो लोक लागत आहेत; जोंपर्यंत शृंगारप्रियता इतकी बोकाळली आहे कीं स्त्रीसहवासाहून अधिक कर्तव्य कांहीं असूं शकतें ह्याची कल्पनाही आमच्यांतील बऱ्याच सुशिक्षितांससुद्धां उरत नाहीं; जोंपर्यंत रिकाम्या फॅशनखालीं आमच्यांतील आधींच अर्धशिक्षित अशी मंडळी आपल्या अल्प धनाचा व उत्साहाचा खुशाल व्यय करतात; जोंपर्यंत चालू घटकेपेक्षां पुढें पाहण्याची कोणाची इच्छा नाहीं व सामान्य उंचीपेक्षां अधिक भरारी मारण्याची कोणाचीच तयारी नाहीं; जोंपर्यंत राष्ट्रमालिकेंत आपलें राष्ट्र व आपले लोक कोणत्या पायरीवर बसतील ह्याची अहर्निश काळजी बाळगण्याची जरूरीच आम्हांस भासत नाहीं; तोंपर्यंत आमची सर्वांगी प्रगति कोठली आली आहे? तोंपर्यंत मराठी वाङ्मयाचें काम संपणार कसें? तोंपर्यंत प्रगतिप्रिय लोकांना स्वस्थता मिळणार कोठून?

आर्यमहौषधालय मु० पो० आजर्ले.

कोंकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्धरामबाण औषधें.

पूर्ण रक्तशोधक, अत्यंत पौष्टिक, चित्तोत्साहक, बुद्धिकांतिवर्धक, सुवर्णमाक्षिक -मौक्तिक-कस्तुरी, प्रवालादिमिश्रत अपूर्व गुटिका.

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग. संधिवातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूल, इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग तावडतोब दुरुस्त होऊन चित्तोत्साहबुद्धि आणि कीर्ति वाढते, अंगात परिपूर्ण शक्ति येते; शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्मान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिज्ञेचें औषध होय. यामुळें याचे लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून अधिक घेणारास टपालखर्च माफ. त्यांच्या आंत घेणारास ट.ख. वेगळा ४ आणेप डेल. ३२ गो० १ रु०; ७० गो०२ रु०; १६० गो० ४ रु०; २६० गो० ६ रु० आणि ५२० गो. १० रुपये.

थंडगार नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुले, खुपऱ्या, बिंदुकाच वगैरे डोळ्यांचे एकंदर विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. डबीस १॥ रुपया.

कर्णस्त्रावनाशक अप्रतिम तैल—यानें कानांचे सर्व प्रकारचे व्रण आणि तत्संबंधीं इतर विकार त्वरित बरे होतात. बाटलीस १ रुपया.

दंतरक्षक पूड—ही दांत व हिरडया यांचे सर्व विकार तत्काळ दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. डबी ६ आ.

गजकर्ण, खरूज, नायटे इ. विकार ३ दिवसांत बरे होतात रु. ६ आ.

विंचवाचें विष—हें औषध चोळतांच उतरतें. तें ४० मनुष्यांस पुरतें. रु. ८ आणे

हिमज्वरावर वस्ताद औषध—पाळीचे हटी ताप तीन दिवसांतच बरें करितें. डबीस १ रु.

पटकी व इतर जुलाब-दोन तीन गोळ्यांनीं अगदीं जलद बरें होतात. रु. १ रु.

सुरंगी, मालती, कल्हार, राजविलास, लक्ष्मीविलास, पुष्पराज इ० बादशाही अति उंची उत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरें सुगंधी अत्तरें आणि केशांस लावण्याची हरएक प्रकारचीं सुवासिक तैलें पूर्ण खात्रीचीं माफक दरानें मिळतील.

सूचना:-वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्याचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला म्हणून त्याचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. ढोंगी लोकांच्या बनावट औषधाविषयीं ग्राहकांनीं फार सावध असावें. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं, प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री बिवलकर, वैद्य.

मु० पो० आंजर्ले, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

ॐ नमः श्रीगणेशाय.

आर्यवनौषधालय मुर्डी.

मदनामृतसंजीवनी

अत्यंत पौष्टिक, मनोत्साहक, कान्तिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक-

कस्तुरिप्रवालादि अनेक वनस्पतिमिश्र अद्भुत गुटिका.

शारिरिक सौख्याच खरा लाभ करून घेणें असेल तर, या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं. यांच्या सेवनानें कडकी, जीर्णज्वर, अशक्तता, मानसिकदुर्बलता, अनेक वातरोग, प्रदररोग, बाळंतरोग मूळव्याध, नेत्रविकार, कटिशूल, इ. इ. अनेक विकार या गुटिकांपासून त्वरित बरे होतात. कांति व बुद्धि वाढून अंगांत भरपूर शक्ति येते. शरिरांतील रक्त व धातूची वृद्धि होऊन सर्व प्रकारें संसारसुखाचा खरा लाभ होतो. वरील सर्व विकार जाऊन शरीर जोमदार होण्याला या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं, गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांचे वर घेणारास सर्व पोष्ट खर्च माफ. त्याचे आंत घेणारास निराळा पोष्ट खर्च पडेल.

दर—३५ गोळ्यांस १ रु. ७५ गो. २ रु., १६५ गो. ४ रु., २७५ गो. ६ रु., ५५० गो. १० रु.

अपूर्व नेत्रांजन.

यानें सारा, फुलें, वडस, खुपऱ्या, कांचबिंदु, इ. इ. नेत्रसंबंध सर्व विकार फार त्वरित जाऊन दृष्टि तीव्र होते. डबीस १ रुपया.

उष्णवात.

मलबद्धता, ढेंकरा येणें, पोटांत केव्हां आग अथवा थंडी होणें, चमका मारणें, कधीं छातींत धडधडण अपचन, पोट फुगणें, कधीं अन्न थोडें व कधीं जास्त खपणें, केव्हां ग्लानि व केव्हां थोडी हुषारी वाटणें लघवी कढत अथवा पिंवळी अगर तांबडी असणें, अगर कधीं थोडी व कधीं जास्त होणें, मधून मधून मस्तक तापणें दुखणें, तसेंच कधीं निद्रा साफ न येणें तर कधीं जास्त असणें, क्वचित भोंवळ उद्भवणें, डोळे त्रासून तापणें व कधीं जड होणें, कधीं हात व पाय यांस तप्तता किंवा सर्दी होणें, हें सर्व किंवा यांतील कांहीं विकार उष्णवातानें उद्भवतात. ते आमच्या गोळ्या व तेल यांनीं अगदीं जलद बरे होतात. ४० गोळयांचे डबीस २ रु., व तेलाची बाटली १ रु. एकूण किं. ३ रु.

औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिट आहेत. यांशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसवें, तेलें आणि सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनुपानखर्डा सोबत. टपाल खर्च वेगळा पडेल. माल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य,

पत्ता—मु० मुर्डी, पोष्ट हर्णै, जि० रत्नागिरी.

तिसाव्या राष्ट्रीय सभेच्या

अधिवेशनाचे अध्यक्ष
सर सत्येंद्रप्रसन्न सिंह.

स्वागत मंडळाचे चेअरमन
ना. दिनशा एदलजी वाच्छा.

आश्रयदात्यांस विनंती.

हा अंक हातीं देऊन आम्ही आमच्या आश्रयदात्यांच्या ऋणांतून या वर्षापुरते मोकळे झालों. आतां ज्यांच्याकडून चालू सालची वर्गणी आली आहे, त्यांचेकडे पुढील महिन्याचा, म्हणजे जानेवारीचा अंक, दरसालच्या वहिवाटीप्रमाणें व्ही. पी. नें पाठवून, १९१६ सालची वर्गणी वसूल केली जाईल. तरी आश्रयदात्यांनीं कृपा करून त्याचा स्वीकार करावा अशी विनंती आहे. तसें करण्यास ज्यांस सवड नसेल, त्यांनीं त्याप्रमाणें आम्हांस आगाऊ कळवावें. म्हणजे व्ही.पी.चा खर्च फुकट जाणार नाहीं. **विस्तारानें** आजपर्यंत यथाशक्ति केलेल्या कामगिरीकडे लक्ष देऊन आमचे प्रस्तुतचे आश्रयदाते यापुढेंही त्याजवर पूर्ववत् प्रेम ठेवतील आणि आपल्या मित्रमंडळींपैकीं कांहींना तरी त्याचे ग्राहक बनविण्याचा प्रयत्न करितील अशी आशा प्रदर्शित करितों.

व्यवस्थापक.

श्री.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक १.

कै. रावसाहेब रानडे यांच्या कांहीं आठवणी.

श्रीमती रमाबाई साहेब रानडे यांचें उत्कृष्ट पुस्तक " आमच्या आयुष्यांतील कांहीं आठवणी " हें १९१० सालीं प्रसिद्ध झाल्यावर १९१३ फेब्रुवारीच्या विविधज्ञानविस्ताराच्या अंकांत रा. वासुदेव वामन ठाकूर यांनीं एक लेख प्रसिद्ध केला व त्याची एक प्रत त्यांनीं कृपा करून मजकडे पाठविली. तेव्हांपासून या विषयावर कांहीं तरी लिहावें असें माझ्या मनांत होतें. परंतु कांहीं कारणांनीं तो योग आजपर्यंत जुळून आला नाहीं. रावसाहेबांशीं निकट संबंध असणारे माझे स्नेही कै. शिवराम हरि साठे यांच्याशीं कांहीं आठवणींविषयीं समक्ष बोलावें असें माझ्या मनांत होतें. पण तसाही योगायोग जमला नाहीं, व शिवराम हरि हे कांहीं दिवसांपूर्वी निवर्तले. रावसाहेबांचा सहवास कोणच्या ना कोणत्या तरी कारणानें महाराष्ट्रांतील अनेक पुरुषांस झाला असल्यामुळें त्यांच्या संबंधाच्या वेगवेगळ्या गोष्टी पुष्कळांच्या स्मरणांत असतील असा संभव आहे. परंतु त्यांच्याशीं निकट संबंध असणारे लोक दिवसें दिवस नाहींसे होत चालल्यामुळें या संबंधाच उद्योग दिरंगाईवर टाकणें इष्ट नाहीं असें वाटल्यावरून आज त्याबद्दल चार शब्द लिहीत आहें.

रावसाहेबांचें चरित्र ह्मणजे १८७१–७२ पासूनचा, मुख्यतः महाराष्ट्राचा व परंपरेनें सर्व देशाचा, सर्व बाजूंचा तीस वर्षांचा इतिहास होय. रावसाहेबांचें चरित्र लिहिणारानें खाजगी पत्रव्यवहार जुळविण्याचा उद्योग केला पाहिजे हें तर खरेंच, परंतु या तीस वर्षांतील वर्तमानपत्रांच्या फायलीही पण चाळल्या पाहिजेत: विशेषतः रावसाहेबांची सार्वजनिक चळवळ २० वर्षें पुण्यांत अव्याहत चालली होती, त्या काळांतील ज्ञानप्रकाश पत्राच्या फायली तरी अवश्य चाळल्या पाहिजेत. ज्ञानप्रकाश पत्राचें नांव मुख्यतः लिहिण्याचें कारण असें कीं, रावसाहेबांच्या पक्षाचें हें पत्र मुख होतें, व त्या पत्राविषयीं त्यांचें एक प्रकारचें विशेष प्रेम होतें,

पर्वतीच्या पंचांच्या कामावर एके प्रकारें लोकमताचा दाब पडावा, अशा स्थानिक कारणांनीं जरी "सार्वजनिक सभे"चा उदय झाला तरी या सभेस सार्वजनिक स्वरूप देण्याचें श्रेय रावसाहेबांस आहे. या सभेच्या चालकांपैकीं जरी रावसाहेब प्रमुख होते तरी सभेच्या वतीनें साहेब लोकांशीं मिळून मिसळून बोलणारा व प्रत्यक्ष वादविवादांत लोकमताची बाजू सरकारी अधिकाऱ्यांच्या पुढें उत्कृष्ट रीतीनें मांडणारा असा मनुष्य नसल्यामुळें सभेविषयीं युरोपियन अधिकाऱ्यांच्या मनांत अढी होती. पुण्याहून रावसाहेबांची बदली वगैरे गोष्टी होण्याचें खरें कारण ही अढीच होय. १८७९ सालीं मे महिन्यांत स्त्रियांचा वक्तृत्वसमारंभ पहिल्यानेंच पुण्यास झाला, व त्याच रात्रीं बुधवार व विश्रामबाग या दोन्ही वाड्यांस आगी लागल्या. आग लावणारांचा शोध करण्याच्या कामीं रावसाहेबांनीं चांगली मदत केली. तथापि त्यांच्याविषयींची अढी कांहीं फारशी कमी झाली नाहीं. त्या वेळेस पुण्यास वासुदेव बळवंताच्या बंडाच्या व हरी रामोशाच्या दरोड्यांच्या इतक्या कंड्या पिकत असत कीं, अधिकारिवर्गाची मनोवृत्ति मोठी साशंक झालेली दिसे. आगीच्या नंतर शनवारवाड्यापुढें लष्कर आणून ठेवणें व ब्यांकेचा कडेकोट बंदोबस्त करणें वगैरे प्रकार ज्यांनीं पाहिले आहेत त्यांना त्या वेळच्या क्षुब्ध झालेल्या वातावरणाची चांगली कल्पना असेल. रावसाहेब रानड्यांची उचलबांगडी १८२७ च्या रेग्युलेशनखालीं होणार, त्यांच्या घराचा झाडा घेणार, वगैरे अनेक कंड्या त्या वेळीं पुण्यास पिकत असत. त्या वेळचें मुंबईसरकार ह्मणून ज्या व्यक्ति होत्या त्यांचें भान जरी ठिकाणावर नसलें तरी त्या वेळचे कलेक्टर मि. नॉर्मन हे बरेच थंड डोक्याचे असल्यामुळें, पुण्यावर किंवा रावसाहेबांवर झाले त्यापेक्षां अधिक वाईट परिणाम न होण्याचें श्रेय त्यांस दिलें पाहिजे, असा सर्वत्र समज होता.

रावसाहेब सरकारी नोकर, शिवाय स्वभावतः लाजाळू, व त्यांची राहणीही साहेब लोकांत मिळण्यामिसळण्यासारखी नव्हती. तेव्हां गैरसमज दूर होण्यास जितकें सलोख्याचें दळणवळण असावें तितकें साहेब लोकांत त्यांचें नव्हतें. दिल्लीस दरबार १८७७ सालीं झाला, व राणीसरकारानीं 'बादशाहीण' असा किताब धारण केला. त्या वेळीं पुण्याहून दिल्लीस सार्वजनिक सभेचें जें डेप्युटेशन गेलें होतें, त्याबरोबर कै० सीताराम हरि चिपळूणकर यांस तरतरीत, हुशार, व इंग्रजी चांगला जाणणारा गृहस्थ ह्मणून नेलें होतें. त्या वेळीं दिल्लीस गेलेल्या मंडळींत कै. गणेश वासुदेव जोशी, शिवराम हरि साठे, व केरोपंत नाना छत्रे वगैरे मंडळी होती. सार्वजनिक सभेचें इंग्रजी त्रैमासिक पुस्तक १८७८ च्या जुलै महिन्यांत निघालें व त्याचे एडिटर ह्मणून सीतारामपंत चिपळूणकर यांची नेमणूक झाली. सीतारामपंत चिपळूणकर यांचा सार्वजनिक सभेशीं अशा रीतीनें हळू हळू संबंध जुळत जात चालल्यावर १८८० पासून त्यांचें युरोपियन लोकांत जाणेंयेणें व दळणवळण विशेष रीतीनें होऊं लागलें. सीतारामपंत हे प्रचलित राजकारणांत चांगले वाकबगार, इंग्रजी चांगलें लिहिणारे व निस्पृह असे गृहस्थ होते. त्यांची राहणीही साहेब लोकांत मिळ-

ण्यामिसळण्यासारखी व सलगी होण्यासारखी होती. १८८० पासून पुढें सभेविषयीं व तिच्या चालकांविषयीं साहेब लोकांतञ्ञ पूर्वींचा प्रतिकूळ ग्रह नष्ट होऊन तिच्याविषयीं एक प्रकारें जो आदर वाटूं लागला त्याचें श्रेय बऱ्याच अंशीं सीतारामपंत चिपळूणकर यांस दिलें पाहिजे. रावसाहेबांचे ते राजकीय कामांत उजवा हात होते असें ह्मटलें तरी चालेल. आठवड्यांतून पांच चार दिवस तरी साहेब लोकांच्या भेटी घेण्यांत त्यांचे मोडत असत. भेटींची हकीकत रावसाहेब यांस त्याच रात्रीं किंवा दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांचे घरीं जाऊन सांगण्याची सीतारामपंतांची पद्धत असे. सीतारामपंत यांचा सार्वजनिक विषयांवर पण खाजगी रीतीचा पत्रव्यवहार अधिकारी व बिनअधिकारी अशा लोकांशीं फार चालत असे. सीतारामपंतांस सर्व पत्रव्यवहार पाकिटासुद्धां जपून ठेवण्याची संवय होती. एवढेंच नव्हे तर त्यांनीं स्वतः पाठविलेल्या कित्येक पत्रव्यवहाराच्या नकलाही ते करून ठेवीत असत. पील, मेल्व्हिल, कार्डो, क्रॉफर्ड, वेडरबर्न, वर्डस्वर्थ, वालिंजर, कर्कहॅम, ह्यूम, लॉर्ड रॅन्डाल्फ चर्चिल, जव्हेरिलाल उमियाशंकर याज्ञिक, वगैरे अनेक मंडळींशीं सार्वजनिक कामीं झालेला पत्रव्यवहार त्या त्या वेळीं उत्पन्न झालेल्या राजकीय बाबींसंबंधानें महत्त्वाचा होता. हा सर्व पत्रव्यवहार उपलब्ध झाल्यास राजकीय बाबतींत उपयुक्त अशी पुष्कळ सामुग्री मिळणारी आहे. परंतु प्लेगच्या धामधुमींत तो पत्रव्यवहार कोठें नाहींसा झाला त्याचा तपास मला लागला नाहीं. सीतारामपंतांचे चिरंजीव राजश्री पुरुषोत्तम सीताराम हे एम्. ए., एल्एल्. बी. झालेले वऱ्हाडांत वकिली करीत आहेत. परंतु ते लहान असतांनाच सीतारामपंत वारले. यामुळें त्यांनाही तो पत्रव्यवहार माहीत असण्याचा संभव नाहीं. तथापि तो पत्रव्यवहार जर मिळाला तर पुष्कळ माहिती मिळेल याबद्दल शंका नाहीं. रावसाहेबांच्या सल्ल्यानें व त्यांच्या देखरेखीखालीं चाललेलें काम कशा प्रकारचें होतें हें त्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट होईल. रावसाहेब यांचेकडे हा पत्रव्यवहार फारसा सांपडणार नाहीं. कारण सीतारामपंत रावसाहेबांकडे पत्रें पाठवीत नसत तर तीं स्वतः जाऊन वाचून दाखवून परत आणीत असत. मी एकदां सीतारामपंतांस विचारलें कीं, पत्रें वाचून दाखविण्यास तुह्मीं स्वतः कां जातां ? तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, रावसाहेबांच्या येथला दरबार खुला आहे, कोणाचें पत्र कोणाच्या हातीं जाईल याचा नेम नाहीं, ह्मणून मीं असें करतों.

सार्वजनिक कामीं केवळ कार्यावर दृष्टि ठेवणें ही मनोवृत्ति नेहेमीं असावी लागते; परंतु व्यक्तिविषयक स्वभावास चिकटून असणाऱ्या अहंकारादि दोषानें या वृत्तींत बदल होतो. प्रत्येक कार्यकर्त्या मनुष्याचा त्याच्या मगदुराप्रमाणें उपयोग करून घेणें ही रावसाहेबांची नेहेमीं दृष्टि असे. तो मनुष्य कसा आहे, त्याचे दोष काय आहेत, याकडे लक्ष न देतां, त्याचे गुण काय आहेत, व लोककार्यांत त्याचा संग्रह कसा होईल, हें ते पाहात असत. कै. महादेव बल्लाळ नामजोशी हे खटपटी व हुशार गृहस्थ सार्वजनिक कामांत पडणारे होते. 'किरण' नांवाचा छापखाना कोतवालचावडीच्या ठिकाणीं असे, व तेथें

'किरण' नांवाचें पत्रही निघत असे. या संस्थेचे चालक नामजोशी होते. लिटन साहेबांच्या प्रेस-ॲक्टास तें पत्र बळी पडलें व पुढें कारखाना मोडला. नामजोशी फार डबघाईस आले. कित्येकांचा नामजोशांविषयी यामुळें गैरसमज झालेला होता. नामजोशी हे नेटानें काम करणारे असल्यामुळें त्यांनीं आपल्या पडत्या काळांतही 'डेक्कन स्टार'नांवाचें इंग्रजी पत्र चालविलें होतें. नामजोशांना तुह्मी हाताशीं कां धरतां ?—असें रावसाहेब यांस खाजगी पत्रांतून त्यांच्या कित्येक बडया स्नेह्यांनीं लिहिलेलें मला माहीत आहे. रावसाहेबांनें या सर्वांस एकच उत्तर असे कीं, नामजोशांचे अंगांत जें एक प्रकारचें पाणी आहे व काम करण्याची धमक आहे,त्या गोष्टींचा फायदा सार्वजनिक कामीं करून घेण्यास काय हरकत आहे ? मनुष्याकडे न पाहतां कार्याकडे पाहावें असें ते नेहमीं ह्मणत असत;व ही मनोवृत्ति त्यांच्यांत अत्युत्कट रीतीनें वसत असल्यामुळेंच त्यांच्या हातून अनेक चळवळी व पुष्कळ कार्यें झालीं.

रावसाहेबांची मनोवृत्ति क्षुब्ध झालेली क्वचितच दृष्टीस पडे. महाराज सयाजीराव गायकवाड यांस मानपत्र देण्याच्या कामीं झालेला प्रकार मात्र असा झाला कीं,त्यांची वृत्ति या वेळीं कांहीं थोडा वेळ क्षुब्ध झालेली दिसली. महाराजांस हिराबागेंत मानपत्र द्यावयाचें होतें. त्याचा मसुदा रावसाहेबांनीं तयार केला. महाराजांचे नायब दिवाण कै. विनायकराव कीर्तने होते. कीर्तने हे रावसाहेबांचे लहानपणापासून अत्यंत स्नेही होते. सार्वजनिक सभेचे चेअरमन कै. रावबहादूर नूलकर यांना तो मसुदा पाहून असें वाटलें कीं, विनायकरावांचे मित्रधर्मामुळें रावसाहेबांनीं अधिक स्तुति केली आहे. रावसाहेबांना ही टीका ऐकून वाईट वाटलें, व ते सीतारामपंतांस ह्मणाले कीं, तुमचें मानपत्र तुह्मांस वाटेल तसें लिहा; मला कांहीं त्याबद्दल कर्तव्य नाहीं. दुसरे दिवशीं मानपत्र द्यावयाचें. आदले रात्रीं ही गोष्ट आठ नवाचे सुमारास झाली. तेव्हां आतां या दोघां प्रस्थांमधील तंटा मिटवावा कोणीं अशी पंचाईत पडली. शेवटीं सीतारामपंत व शिवरामपंत हे दोघे रावसाहेबांचे स्नेही कै. शंकर पांडुरंग पंडित यांचेकडे रात्रीं १०–११ वाजतां गेले. शंकररावांच्या मध्यस्थीनें दुसऱ्या दिवशीं सकाळीं काळ्या हौदाजवळील उकिडव्यांच्या वाड्यांत सीतारामपंत राहत होते तेथें नूलकर, रानडे, शंकर पांडुरंग, गंगाराम भाऊ वगैरे मंडळी जमून शेवटीं सीतारापंत जो मसुदा करतील तो सर्वांना मान्य असावा असें ठरलें, व तें वादळ मिटलें. या मानपत्राचेच वेळीं झालेल्या प्रकाराबद्दल लीवॉर्नरसाहेबांनीं शंकररावांच्या संबंधानें कागाळी केल्यामुळें पुढें शंकररावांस प्रायश्चित्त भोगावें लागलें, ती हकीकत श्रीमती रमाबाईसाहेबांच्या पुस्तकांत आहे.

कै. सीतारामपंत चिपळूणकरांची योग्यता व त्यांची उपयुक्तता रावसाहेब पूर्ण जाणून असत. फॉरेस्टच्या जुलुमाबद्दल एक लहानसें इंग्रजी चोपडें लाल भडक पुठ्याचें व सरकारची कानउघाडणी कडक भाषेंत केलेलें असें प्रसिद्ध झालें. राष्ट्रीय सभेचे जनक ह्यूम यांनीं तें प्रसिद्ध केलें, व त्यांस वेडरबर्न व वर्डस्वर्थ यांची मदत होती अशी समजूत आहे. या

पुस्तकानें युरोपियन लोकांत व सरकारी अधिकाऱ्यांत खूपच चळवळ उडून गेली व सरकारनें फॉरेस्ट कमिशन नेमलें. त्या कमिशनपुढें ठाण्याच्या जंगल कमिटीच्या वतीनें सेक्रेटरी ह्मणून सीतारामपंत काम करीत असत. तें काम त्यांनीं अति उत्कृष्ट रीतीनें केलें अशाबद्दल रावसाहेबांनीं सिमल्याहून त्यांस पत्र पाठविलें. रावसाहेब त्या वेळीं फिनॅन्सकमिटीसंबंधानें सिमल्यास गेले होते. सितारामपंतांचा व कमिशनचे अध्यक्ष व्हायडल् साहेबांचा अति स्नेह जुळला होता. सीतारामपंतांनीं कमिशनच्या रिपोर्टास संमति द्यावी अशी व्हायडल् साहेबांची इच्छा होती. पण सीतारामपंतांनीं आपली बाजू न सोडतां सुमारें ३०-४० पानें निबंध लिहून तो कमिशनपुढें सादर केला. सीतारामपंतांत हा गुण विशेष असे कीं, ते साहेब लोकांशीं मिळून मिसळून कितीही वागले तरी आपला मुद्दा न सोडतां ते अत्यंत निस्पृहपणानें वागत असत. क्राफर्डसाहेबांचा व त्यांचा संबंध सार्वजनिक कामींच घडून आला. क्राफर्डकडून ' सार्वजनिक ' सभेस सीतारामपंतांच्या स्नेहामुळें वेळोवेळीं मदतही मिळाली. अशा स्थितींत क्राफर्डवर प्रसंग आल्याबरोबर त्यांचा स्नेह सोडणें ह्मणजे " ताज्या घोड्यावरच्या गोमाशीं " प्रमाणें वागणें होय, असें वाटल्यावरून सीतारामपंतांनीं क्रॉफर्डकडचें जाणेंयेणें सोडलें नाहीं. सार्वजनिक सभेच्या मंडळीपैकीं कित्येकांचे भाऊबंद व स्नेही लांच देणाऱ्या मंडळींत होते, त्यांना सीतारामपंतांचें करणें आवडेना ह्मणून, सीतारामपंतांनीं १८८९ सालीं सभेच्या सेक्रेटरीचा राजीनामा दिला. या राजीनाम्यानंतर सीतारामपंतांचें अर्थातच साहेब लोकांत जाणेंयेणें कमी झालें. मि. कर्कहॅम यांनीं सीतारामपंतांस पाठविलेल्या या प्रसंगींच्या एका पत्रांत असें ह्मटलें होतें कीं, क्रॉफर्डप्रकरणांत लहानमोठ्या शेंकडो लोकांच्या अंगास कांहीं ना कांहीं तरी डागाचा ठिपका लागलेला दिसतो, पण क्रॉफर्डसारख्या माणसाशीं निकटसंबंध असून तूं धुतल्या तांदुळाप्रमाणें स्वच्छ राहिलास ही मोठी प्रशंसनीय गोष्ट आहे! क्रॉफर्डचा एजंट हणमंतराव यास शिक्षा झाल्यावर तुरुंगांत असतांना त्यानें दिलेल्या कबुलीजबाबाचें जें मोठें थोरलें बाड छापलेलें आहे व त्यांत जीं लहानमोठीं पुष्कळ नांवें हणमंतराव ओकला आहे, ती नांवनिशी वाचली ह्मणजे कर्कहॅम साहेबांचें ह्मणणें किती यथार्थ होतें हें स्पष्ट दिसतें. क्राफर्डसारखा परीस हातांत, व घरची पैशासंबंधानें ओढगस्त स्थिति, अशा स्थितींत सीतारामपंतांसारखा निर्लेपपणानें वागणारा माणूस क्वचितच सांपडेल. ह्मणूनच सीतारामपंतांसंबंधानें बोलतांना रावसाहेब " Rare common sense, sound judgment and unflinching honesty." अशीं विशेषणें लावीत असत. सीतारामपंतांसारखीं निस्पृह माणसें मिळणें कठीण असें असल्यामुळें, रावसाहेबांस त्यांच्या सार्वजनिक सभेशीं तुटलेल्या संबंधाबद्दल वाईट वाटत असे. सरकारी अधिकाऱ्यांशीं सीतारामपंतांची सलगी असल्यामुळें त्यांचा उपयोग कसा होत असे व ते कसे वागत असत याविषयीं 'केसरी' पत्राच्या १८९७ च्या डिसेंबरापासून १८९८ चे जूनपर्यंतच्या अंकांत माझीं दोनतीन विस्तृत पत्रें प्रसिद्ध झालीं

आहेत, व त्यांत बराचसा मजकूर आला आहे. ह्मणून त्याच त्याच गोष्टींची पुनरुक्ति करून हा लेख मी लांबवीत नाहीं. राज्यकर्ते व आपण यांच्यांत असणारें अंतर गैरसमजानें अधिक वाढूं नये अशी तजवीज ठेवणें हें राजकीय कामांत पडणाऱ्यास जरूर आहे अशा मताचे रावसाहेब व चिपळूणकर असल्यामुळें रावसाहेबांच्या संमतीनें चिपळूणकर आपला बराचसा वेळ साहेबांच्या भेटी घेण्यांत घालवीत असत. पुणें म्युनिसिपालिटींत २० सभासद निवडलेले व अध्यक्ष निवडलेला; व २० सभासदांपैकीं ४ सभासद सुशिक्षितांच्या तर्फे निवडलेले, असा दुहेरी हक्क स्थानिक स्वराज्याच्या प्रारंभीं मिळाला याचें कारण, चिपळूणकरांनीं महाबळेश्वरास जाऊन खटपट केली व अधिकारी लोकांशीं त्यांची सलगी होती, हेंच होय.

हल्लीं राजकीय कामांत जहाल व मवाळ असे जे भेद आहेत तसे त्या वेळीं नव्हते—ह्मणजे हल्लीं इतक्या स्पष्टपणें नव्हते. त्यांचा उगम झाला नव्हता असें मात्र नाहीं. केसरी व मराठा या पत्रांच्या जन्माच्या आधींही त्यांचा उगम कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या **निबंधमालेनें** केला होता. "पूर्वीच्या पिढींतील मंडळीची चळवळ ह्मणजे शिळोप्याच्या वेळचीं कामें, स्वहितत्याग करून देशकल्याणास वाहून घेतलेली ती मंडळी नव्हत; लोककल्याणाचें खरें कंकण ज्यांनीं स्वहितत्याग केला त्यांनींच आपल्या हातीं बांधलें आहे, इतरांची फारशी प्रतिष्ठा नाहीं;" अशा कल्पना त्या वेळीं होत्या व या कल्पनेनेंच रावसाहेबांची किंवा त्यांच्या अनुयायांची निंदा मधूनमधून स्पष्ट किंवा अस्पष्ट शब्दांनीं होत असे. कै. आगरकरांच्या लेखणींतून केसरींत "झोंपाळ्यावरचें शहाणपण," "सार्वजनिक सभा, चिपळूणकर व ज्ञानप्रकाश ह्मणजे पिता, पुत्र व पवित्र आत्मा" अशीं जीं निंदाव्यंजक वाक्यें येत, त्यांचा उगम वर सांगितलेल्या कल्पनेंतच होता. तथापि पुण्यांतील राजकीय वातावरणांत दोन तट स्पष्टपणानें झाले नव्हते. रावसाहेब हेच २० वर्षे 'पुण्याचे अनभिषिक्त राजे' असे मानले जात असत. सामाजिक विषयांत लढालढया होत असत, परंतु राजकीय विषयांत बहुधा रावसाहेबांच्याच तंत्रानें सर्व कारभार चालला होता. १८९१ सालीं पुण्यास जी प्रांतिक सभा भरली तिचा अध्यक्ष कोण असावा याविषयीं मोठा वाद पडला. त्या वेळीं तडजोडीनें सातारा जिल्ह्यांतील गोविंदराव लिमये या नांवाच्या वृद्ध वकिलांस अध्यक्ष नेमून तंटा मिटविला. रावसाहेब तेव्हां पुण्यांत नव्हते, महाबळेश्वरीं होते. परंतु त्यांचें सारें लक्ष पुण्याकडे नेहमीं असे. हा तंटा मिटल्याबद्दल त्यांस समाधान वाटलें व त्यांनीं त्याबद्दल आपल्या मंडळीचें अभिनंदनही केलें. मवाळ व जहाल हे भेदाभेद उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. आजचे जहाल उद्यांचे मवाळ अशी स्थिति कालांतरानें उत्पन्न होणारी आहे. जे जहाल ह्मणून हल्लीं मानले जातात त्यांनाही मवाळ, कोटींत घालणारे आज कित्येक ज्वलज्जहाल उत्पन्न झाले आहेत. पोपकवीनें ह्मटल्याप्रमाणें:—

We call our fathers fools so wise we grow;
Our wiser sons will no duobt think us so.

याप्रमाणें पुढच्यांनीं मागच्यांस वेडे ह्मणण्याचा

क्रम चालूच आहे. एका पिढीपेक्षां दुसऱ्या पिढीचे विचार व धांव हीं पुढें असतात, व असें असणें हें एका अर्थी चळवळीचें लक्षण आहे. तरुण मंडळींत उतावळेपणाचा दोष, तर वृद्ध मंडळींत फाजील थंडपणा. यामुळें प्रत्येकांत गुणाबरोबर दोषही चिकटलेला असणार. गुणाधिक्य होऊन दोषाचा अंश कमी व्हावा अशी खबरदारी नेहमीं घेतली पाहिजे. मतभेद प्रामाणिकपणें कितीही असला तरी चालेल; पण मत्सर नसावा. व्यक्तिविषयक मत्सरानें सार्वजनिक कामांत फार नाश होतो.

तंजावर प्रांतांतील महाराष्ट्रीय लोकांचें व आपल्याकडील महाराष्ट्रीयांचें दळणवळण असावें अशाविषयीं रावसाहेबांची खटपट होती. त्या प्रांतांत स्थापन झालेल्या 'मराठा असोसिएशन'शीं दळणवळण ठेवण्याकरतां पुण्यास एक संस्था स्थापन करावी असा उद्योग १८९० सालीं चालला होता. तंजोरकडील व्यंकट स्वामीराव यांनीं यासंबंधानें खटपट चालविली होती व मद्रासच्या "हिंदु" पत्राची त्यांस मदत होती. आपले देशबंधु दूर अंतरावर गेल्यामुळें ते आपणास पारखे झाले अशी स्थिति प्राप्त झाली आहे, त्यांचें व आपलें एकीकरण हल्लींच्या दिवसांत करणें इष्ट आहे, व दळणवळणाचे मार्ग सुलभ झाल्यामुळें व राष्ट्रीय भावना वाढल्यामुळें तें शक्य आहे, असें वाटल्यावरून त्यासंबंधानें उद्योग चालला होता. या उद्योगास फारसें फळ अद्याप आलेलें नाहीं, तरी मधून मधून असे प्रयत्न चालू आहेत. माझे मित्र रा. बंडोपंत भाजेकर, हायकोर्ट वकील, यांचे मनांतून ही गोष्ट करण्याचें फार होतें, व दोन तीन वर्षांपूर्वी त्यांनीं या गोष्टीचा उपक्रमही केला होता.

ई. स. १८९० सालीं डेक्कनकॉलेजची फी वाढविण्याची योजना झाली त्या वेळीं शिक्षणाच्या कामीं खर्च वाढूं नये व गरीब विद्यार्थ्यांवर फीचा फार बोजा पडूं नये याकरितां ठिकठिकाणीं सभा भरवून अर्ज पाठविण्याविषयीं खटपट रावसाहेबांनीं केली होती. स्वतः रावसाहेब जरी अनेक परीक्षांत उत्तम रीतीनें उत्तीर्ण झाले होते तरी अति कडक रीतीनें विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांची कत्तल उडावी असें रावसाहेबांस वाटत नसे. हायकोर्टांतून घेतल्या जाणाऱ्या वकिलीच्या व मुनसफीच्या परीक्षेंत विद्यार्थ्यांचें पसार होण्याचें प्रमाण अत्यंत कमी आहे ही गोष्ट त्यांस पंसत नसे. ज्या वेळीं ते हायकोर्टांत गेले व या परीक्षांचे अध्यक्ष झाले त्यावेळीं त्यांच्या कारकीर्दींतील वरील परीक्षांचे निकाल फार सढळपणानें होत होते. देशीभाषांचा युनिव्हर्सिटींत शिरकाव होण्याच्या कामीं रावसाहेबांनीं केलेले दीर्घ प्रयत्न सर्वविश्रुत असल्यामुळें त्यासंबंधीं विशेष लिहिण्याचें कारण नाहीं.

रावसाहेब हे उन्हाळ्यांत बहुधा थंड ठिकाणीं हवा खाण्यास जात नसत. कारण मे महिना ह्मणजे पुण्यांतील सार्वजनिक उत्सवांचा अगदीं हंगाम. वक्तृत्वोत्तेजक सभा, वसंतव्याख्यानमाला वगैरे समारंभांस रावसाहेब नेहेमीं हजर असत, एवढेंच नव्हे तर व्याख्यात्यांचे वार ठरविणें, त्यांचे विषय ठरविणें, वगैरे कामेंही त्यांसच करावीं लागत. अगदीं बारक्यासारक्या गोष्टीपासून तों मोठ्या गोष्टीपर्यंत त्यांचें सारखें लक्ष असे. परगांवीं गेले तरी देखील तेथून पुण्यांतील होणाऱ्या चळवळींविषयीं सारखा पत्रव्यव-

हार होत असे व सूत्रचालकाचें काम ते करीत असत. थंड हवेवर गेले तरी त्यांचा सारखा व्यासंग कधींही थांबला नाहीं. १८९३ सालीं ते आजारीपणामुळें अशक्त झाले व लोणावळ्याला गेले तरी तेथें डीसेंट्रलाइझेशन-सारख्या प्रश्नावर आंकडेमोडी सारखी चालली होती.

मुंबईच्या पहिल्या कॉंग्रेसच्या वेळीं ह्मणजे १८८५ सालीं फारच थोडी मंडळी होती. सुमारें ७५ जण जमले होते. डब्ल्यू. सी. बानर्जी अध्यक्ष होते. इंडियाकौंसिलचे प्रश्नावर चर्चा चालली तींत कांहीं चूक होत होती. रानडे हे डेलिगेटांच्या मागें चार हातांवर खुर्चीवर बसले होते; परंतु वादविवादांत चूक होते असें पाहि-ल्यावर ते उठून मंडळींत आले व त्यांनीं थोडेंसें भाषण केलें. आपण डेलिगेट नव्हे, प्रेक्षक आहों, असला भेदाभेद त्यांच्या लक्षांतही राहिला नाहीं. सार्वजनिक विषयांशीं त्यांचें तादात्म्यच इतकें असे कीं, कृत्रिम भेदाकडे त्यांचें लक्षच जात नसे. ते राष्ट्रीय सभेस हजर राहत इत-केंच नव्हे, तर पहिल्या पहिल्यानें त्यांचें बिऱ्हाडही सर्व मंडळींत असे, जेवण वगैरेही ते रामरग-ड्यांत करीत असत, व सर्व मंडळीशीं मिळून मिसळून वागत.

रावसाहेबांच्या वृत्तीच्या साधेपणाच्या अनेक गोष्टी आहेत. गवतवाल्यास लकडीपुलावर भारे उचलून देणें, किंवा कोणा हेलकरणीचा धक्का लागून पागोटें पडल्यास तें मुकाट्यानें उचलून डोकीस घालणें, अशा अनेक गोष्टी त्या वेळच्या मंडळीस माहीत आहेत. स्मॉल-कॉज कोर्टाचे जज्ज असतांना एकदां असा प्रकार झाला कीं, कोर्टांत गडबड फार होऊं लागली तेव्हां शिपायास त्यांनीं गडबड बंद करण्यास सांगितलें. स्मॉलकॉजकोर्ट ह्मणजे बोलून चालून बाजार. अशा ठिकाणीं गर्दी फार होते व गडबडही अतिशय चालते. रावसाहेबांनीं दोन तीन वेळां सांगितलें तरी गडबड थांबेना. तेव्हां थोड्या त्रासिकपणानें पुनः ते शिपायास बोलले. शिपाई ह्मणाला, "मदन श्रीकृष्णजींच्या वेळेस अशी गडबड होत नव्हती, पण आपल्या वेळेस ती फार होते, त्यास मी काय करूं?" वकील-मंडळींपैकीं एक वृद्ध वकील त्यास रागें भरले व असें बोलूं नये असें त्यास ह्मणाले. तो शिपाई कोर्ट उठतांना रावसाहेबांची माफी मागण्यास व पायां पडण्यास गेला. पण दुपारीं झालेला प्रकार रावसाहेबांच्या गांवींही नव्हता! स्पेशल जज्ज अस-तांना कितीक गरीब बायाबापड्या त्यांच्या घरीं येत व कोठें उतरण्याची सोय नसली ह्मणजे त्यांच्या देवडीवरच उतरत. हा प्रकार नेहेमीं घडत असे. हायकोर्ट जज्ज झाल्यावर एके दिवशीं रात्रीं आठां-च्या सुमारास खंबाला हिलवरील बंगल्यांत ते व मी असे दोघेच गोष्टी बोलत बसलों होतों. तित-क्यांत एक मनुष्य आला व त्यानें रावसाहेबांचे पाय धरले. रावसाहेबांनीं त्यास कोण कोठला असें विचारलें तेव्हां त्यानें सांगितलें कीं, आपण कर्नाटकांतले आहों व आपलें अपील हायकोर्टांत आहे, पण वकील आपणास सांगतात कीं बॅरिस्टर दे, तर कसें करूं? असें तो विचारूं लागला. त्याला शांतपणें उत्तर मिळालें कीं, 'वकील तुझ्या हिताचेंच सांगत असतील. तसें कर जा.'

रावसाहेबांचें रोजचें टपाल भाराभर असाव-याचें. मोठमोठ्या सार्वजनिक बाबतींविष-

यांच्या पत्रव्यवहारापासून तों अगदीं क्षुल्लक बाबींच्या पत्रव्यवहारापर्यंत त्यांचें लक्ष असे. सर्व पत्रांचीं उत्तरें हीं पाठवावयाचींच. एका तालुक्याच्या गांवच्या वर्तमानपत्रास ज्ञानप्रकाश मोबदला जात नसे त्याची कुरकुर रावसाहेबांकडे आली; व त्यांनीं तें आलेलें पत्र मजकडे निकालाकरतां पाठवून दिलें! वर्तमानपत्रांचाही टपालांत मोठा भरणा असे. जिल्ह्यांतील, तालुक्यांतील व लहान गांवांतील मराठी वर्तमानपत्रें बहुतेक येत असत. तीं उघडून त्यांवरून रावसाहेबांचा डोळा फिरत असे. अगदीं भिकार गांवच्या वर्तमानपत्रांत पाहाण्यासारखें आपणास काय असावयाचें?—असें मीं एकदां त्यांना ह्मटलें.तेव्हां रावसाहेब ह्मणाले, ही तुमची चूक आहे. ठिकठिकाणचीं पत्रें स्थानिक विषयांची चर्चा कशी करतात, त्यांच्या विचारांस कितपत प्रौढपणा आला आहे, दिवसेंदिवस लिहिण्यांत सुधारणा होत आहे कीं नाहीं, वगैरे गोष्टी समजण्यास हीं पत्रें चाळलींच पाहिजेत. कोणीं आपल्याविरुद्ध लिहिलें असलें तरी तें वाचावयाचें अशी त्यांची पद्धत होती. पुण्यास फीमेल हायस्कूल स्थापन झालें तेव्हां—आतां आमचा धर्म बुडणार, पुरुष बिघडलेच आहेत, धर्म काय तो बायकांत राहिला होता तोही नाहींसा होणार, अशा टीका कित्येक पत्रांत येत असत. धारवाडवृत्तांत असें लिहिलें होतें कीं, यंदांच्या मंगळागौरी आतां बहुतेक शेवटच्याच होतील! तो मजकूर वाचून रावसाहेबांस हसूं कोसळलें व त्यांनीं ती टीका मला दाखविली. पुणेंवैभव पत्रांत रावसाहेबांविषयीं व्यक्तिविषयक एक टीका आली होती. रावसाहेब यांस एकनाथ साधूची उपमा कोणीं दिली होती त्यावर 'पुणेंवैभवा'नें एकनाथमहाराजांच्या कुटुंबाची गोष्ट दिली होती. रावसाहेबांना ही टीका वाचून एक प्रकारचें हसूं आलें. पुण्याचा चवचालपणा वक्तृत्वोत्तेजक सभेंत व कधीं कधीं वसंतव्याख्यानमालेंत दृष्टीस पडे. कित्येक मंडळींना हा चवचालपणा पाहून फार वाईट वाटे. व कित्येकांची कातडी इतकी नाजूक होती कीं, थोडीशी प्रतिकूल टीका झाली कीं ते रुसून बसावयाचे. रावसाहेबांचें तसें नसे. ताज्या व नव्या रक्तांत थोडाबहुत हूडपणा असणें स्वाभाविक आहे असें ते नेहेमीं ह्मणत. अनुकूल असो किंवा प्रतिकूल असो,टीका होणें, चर्चा होणें ह्मणजे विचारजागृतीचें लक्षण आहे, हालचाल व चळवळ ह्मणजे जीवंतपणा आहे, व आमचेकडे तसा जीवंतपणा पाहिजे, असें त्यांस वाटे. सार्वजनिक विषयांविषयीं औदासीन्य असण्यापेक्षां प्रतिकूल टीका असलेली पत्करली असें ते ह्मणत. आमच्या राष्ट्राच्या डोळ्यांवर अनेक शतकांची आलेली झांपड दूर होत चालल्याचें तें लक्षण आहे असें त्यांचें मत असे. व्यक्तिविषयक प्रतिकूल टीकेकडे फारसें लक्ष न देणें असा त्यांचा नेहमींचा क्रम असे.कन्सेंट बिलाच्या वेळीं पुण्यास सुधारक व पुराणमतानुयायी-किंवा ज्यांना दुर्धारक अशी संज्ञा देण्यांत येत असे—याच्यांत बराच कडाक्याचा वादविवाद सुरू होता. या वेळीं रावसाहेबांच्या हेतूसंबंधानें प्रतिकूल टीका केसरी पत्रांत आली. रावसाहेबाचे हेतु अत्यंत पवित्र असावयाचे अशी त्यांच्या अनुयायांची पूर्ण समजूत असल्यामुळें रावसाहेबांच्या हेतू-

विषयीं कोणी नांवें ठेवणें हें त्यांस अगदीं खपत नसे. पुण्यास वाळेकरांच्या वाड्यांत 'युनियन क्लब' या नांवाची संस्था होती व या संस्थेत संध्याकाळीं करमणुकीकरितां मंडळी जमत असे. केसरींत वर निर्दिष्ट केलेला मजकूर आल्यावर एके दिवशीं संध्याकाळीं रा. गोपाळ कृष्ण गोखले व रा. बाळ गंगाधर टिळक यांच्यांत त्या लेखाबद्दल कडाक्याचा वाद चालला. रावबहादुर भिडे, रावबहादुर सोहनी व दुसरी दहावीस मंडळी गोखल्यांच्या बाजूस होऊन सर्व अगदीं टिळकांच्यावर रागावल्यासारखी दिसत होती, व वादविवाद खूप जोराचा चालला होता. बळवंतरावजींचा आवाज मोठा पहाडी व ते बोलण्यांत दहावीस मंडळीस दाद देणारे नव्हते. ज्ञानप्रकाश पत्रांत बळवंतरावजींविरुद्ध कांहीं लेख आला होता ह्मणून त्याचें उसनें केसरीनें फेडलें, असें बळवंतरावजींचें ह्मणणें होतें. असा जोराचा वाद चालला असतां रावसाहेब रानडे आले. ते आल्याचें कोणास समजलें नाहीं; कारण मंडळी वादाच्या भरांत गढून गेली होती. ते येऊन बसल्यावर गोपाळरावांस त्यांनीं ह्मटलें कीं, क्लबांत असा व्यक्तिविषयक वाद तुह्मी करतां कां? बळवंतरावजींनीं ज्या व्यक्तींविषयीं लिहिलें त्या व्यक्तीचा व बळवंतरावांचा आपसांतला हा विषय असून त्याबद्दल दहावीस मंडळींत चर्चा कशाला? शिवाय बळवंतरावजींनीं जे उद्गार काढले ते विकाराच्या भरांत निघाले असतील. शांतपणें विचार केला तर बळवंतरावजींचेंही तसें मत नसेल असें असलें ह्मणजे झालें. रावसाहेबांच्या तोंडून हे शब्द शांतपणें निघाल्याबरोबर गोपाळराव व बळवंतराव यांच्या रागाचा पारा जो १८० अंशापर्यंत चढला होता तो एकदम ० अंशावर आला. व जिकडेतिकडे सामसूम झालें!

पुण्यास कोणीही परका मनुष्य आला व तो कोणच्याही विषयांत जरी पारंगत असला तरीही त्याच्याशीं दोन हात करण्यास व त्यास सामना देण्यास रानडे व कुंटे ही जोडी पुण्याचें नांव राखणारी होती. मिशन हायस्कूलचे प्रिन्सिपॉल बोमंट साहेब हे या जोडीस उद्देशून नेहेमीं असें ह्मणत असत कीं, 'Ranade and Kunte are the two guns of Poona!' रानड्यांचा नानाविध विषयांचा व्यासंग व बहुश्रुतपणा इतका जबर असे कीं, त्यांचें भाषण ऐकण्यास नेहेमीं श्रोतृवृंद उत्सुक असावयाचा. डॉ. पेन्टिकॉस्ट या नांवाचा एक प्रसिद्ध वक्ता ख्रिस्ती धर्मावर व्याख्यानें देण्यास अमेरिकेंतून आला होता व त्याचीं व्याख्यानें कित्येक दिवस सारखीं आनंदोद्भव थिएटरांत होत होतीं. रावसाहेब त्या सर्व व्याख्यानांस नियमानें जात असत. शेवटच्या दिवशीं रावसाहेबांचें उत्तरादाखल ह्मणून जें भाषण झालें तें ऐकण्यास युरोपियन स्त्रीपुरुषांची व इतर मंडळींची फार गर्दी झाली होती; व त्या वेळीं त्यांनीं केलेलें भाषण इंग्रजींत ज्ञानप्रकाशांत छापलेलें असून त्याचें मराठी भाषांतर कै. कृष्णाजी परशुराम गाडगीळ या विद्वान् गृहस्थांनीं केलेलें ज्ञानप्रकाशांत छापलेलें आहे.

नाट्य, ललितकला वगैरे विषयांची गोडी रावसाहेबांस फारशी नव्हती. एज्युकेशन कमिशन पुण्यास आलें त्या वेळीं किर्लोस्कर संगीत मंडळींचें नाटक मुद्दाम डॉ. हंटर साहेब व इतर

कमिशनचे सभासद यांजकरतां आप्पा बळवंताच्या थिएटरांत करविलें होतें. त्या दिवशीं कांहीं वेळ रावसाहेब नाटकास आलेले पाहिले. याशिवाय रावसाहेब कधीं नाटकास गेल्याचें ऐकण्यांत किंवा पाहण्यांत नाहीं. रावसाहेब स्वतःचा फोटो काढण्यासही नाखूष असत. कायदेकौन्सिलांत त्यांची प्रथम नेमणूक झाली त्या वेळीं त्यांस हिराबागेंत मेजवानी दिली. त्यांना नकळत त्यांचा पोषाक त्यांचे घरून आणून ठेवला होता, व शेट दोराबजी यांच्या येथून कॅमेराही हळूच आणून ठेवला होता. जेवणखाण होऊन पानसुपारी खाल्ल्यावर घरीं जाण्याकरतां ते माडीवरून खालीं उतरूं लागले तेव्हां त्यांस खालीं मंडळींनीं गांठून फोटो काढून घेतला ! हाच त्यांचा पहिला फोटो असावा असें मला वाटतें.

रावसाहेबांचें अक्षर वाचण्यास कठिण; व त्यांतूनही ते झपाट्यानें लिहीत असत त्यामुळें तें अधिकच दुर्बोध होत असे. त्यांनीं लिहिलेला मजकूर छापल्यावर त्याचीं प्रुफें त्यांजकडे गेलीं ह्मणजे त्यांत ते इतके शोध घालीत असत कीं प्रुफाच्या बाजूची मोकळी जागा बहुतेक सगळी गिचमिड होऊन जात असे. ही त्यांची बलिहरण घालण्याची खोड आह्मांस माहीत असल्यामुळें शेवटचें प्रुफ आह्मी बहुधा त्यांचेकडे धाडीत नसूं! कारण प्रुफ पाठविलें कीं चिताड होऊनच परत यावयाचें असा आपला नियमच ! कै. केरोपंत नाना छत्रे यांच्याविषयीं रावसाहेबांचा फार आदर असे. ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालेला नानांवरील इंग्रजी मृत्युलेख रावसाहेबांच्याच हातचा होता.

शेतकी खात्याचे स्पेशल जज्ज असतांना रावसाहेबांस पुणें, सातारा, नगर व सोलापूर या जिल्ह्यांतून फिरावें लागे. तेव्हां ठिकठिकाणीं सार्वजनिक संस्था काय आहेत, नवीन उद्योगधंदे काय चालतात वगैरेंची माहिती रावसाहेब मिळवीत असत. त्या प्रांताचा कोणी मनुष्य भेटला तर त्यांसंबंधीं प्रश्न करण्यासही ते चुकत नसत. पुण्याहून १८९४ सालीं मी बार्शीस वकिली करण्यास आलों. त्यानंतर लवकरच एकदां रावसाहेबांची व माझी गांठ पडली. तेव्हां त्यांनीं मला असा प्रश्न केला कीं, बार्शीस तेलाची गिरणी होती ती कां बंद पडली ? मी प्रश्न ऐकून शरमल्यासारखा झालों, व नवीनच बार्शीस गेलों असल्यामुळें मला कांहीं माहिती नाहीं असें सांगितलें. आपल्या देशस्थितीविषयीं त्यांचे विचार सारखे चालू असत. मल्हारराव महाराजांच्या वेळीं बडोद्यास जें मोठें विषप्रयोगाचें प्रकरण झालें त्या वेळीं आपल्यांतील कित्येक बडी ह्मणवणारी मंडळी डिटेक्टिवांचें काम करीत असत, अशाविषयीं एकदां बोलण्यांत उल्लेख निघाला तेव्हां मला माहीत नसलेली अशी माहिती त्यांच्या तोंडून समजली. त्याविषयीं विस्तारपूर्वक लिहिण्याचें कांहीं कारण नाहीं किंवा नामनिर्देश करण्यांतही कांहीं फायदा नाहीं. परंतु असल्या माणसांविषयीं त्यांना मनांतून किती तिटकारा वाटत असे हें त्यांच्या भाषणावरून स्पष्ट दिसलें. पुण्याच्या मंडळीचा व पुण्याचा अभिमान रावसाहेबांस फार असे. १८८७सालीं मद्रासला कॉंग्रेस झाली त्या वेळीं बोलणारांत आपली पुण्याकडली मंडळी असावी ह्मणून रावसाहेबांनीं तरुणतरुण मंडळीस उत्साह

देऊन पुढें केलें होतें. तरुण मंडळीस शाबासकी देऊन, त्यांच्याशीं गोड बोलून, त्या कामांत त्यांस हुरूप आणावा अशी त्यांची वागणूक असे. एका वर्षी वक्तृत्वसमारंभास कांहीं महत्वाच्या विषयावर रावसाहेबांचें शेवटचें भाषण झालें. तें भाषण होतां होईल तितकें त्यांच्याच शब्दांत ज्ञानप्रकाशांत सुमारें नऊ दहा कॉलम प्रसिद्ध झालें. त्या वेळीं वक्तृत्वसभेचा मी एक सेक्रेटरी होतों. माझे जोडीदार सेक्रेटरी त्या समारंभास पुण्यास नव्हते. ह्मणून समारंभाची सर्व व्यवस्था मला एकट्यास करावी लागली. त्या वेळचे वक्तृत्वसभारंभ ह्मणजे पुण्यांतील एक मोठी विशेष गोष्ट असे; पुष्कळ मोठा विद्वान् श्रोतृसमुदाय एकठिकाणीं जमलेला असा देखावा या समारंभांत जितका पाहवयाला सांपडे तितका इतर क्वचितच दृष्टीस पडे. तिसऱ्या मजल्यावर बसणारी मंडळी वक्ता जरा कोठें चुकला कीं घंटा वाजविण्यास व ओरड करण्यास एका पायावर तयार, अशी स्थिति असे! या समारंभास आनंदोद्भव थिएटरांत इतकी गर्दी होत असे कीं कित्येकांस जागा न मिळून परत जावें लागे. रावसाहेबांचें भाषण ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झाल्यावर त्यांनीं मला ह्मटलें कीं, 'तुह्मी तर त्या दिवशीं समारंभाचे व्यवस्थेंत सारखे गुंतलेले होतां, तुह्मांस नोट्स घेतांना वगैरे मीं कांहीं पाहिलें नाहीं. असें असतांना माझें भाषण इतकें चांगल्या रीतीनें ज्ञानप्रकाशांत कसें आलें?' मी त्यांस ह्मटलें कीं, 'आपलें भाषण चाललेलें मी ऐकत होतों व आठवणीनें तें लिहून काढून छापलें आहे.' यावर रावसाहेब ह्मणाले कीं, 'तुह्मांस तर मग आतां रिपोर्टर-जनरल असाच किताब दिला पाहिजे!' असो. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, काम करणारास प्रोत्साहन देऊन अधिक उमेद आणण्याची रावसाहेबांची नेहेमीं हातोटी असे. रावसाहेबांचे विचार गंभीर, वाचन दांडगें, तरी त्यांच्याशीं बोलतांना किंवा त्यांच्या सहवासांत असतांना रूक्षपणा वाटत नसे. भाषणांत मधून मधून विनोद करण्याची त्यांस संवय होती. क्लबांत आले ह्मणजे मंडळीला वर्तमानपत्रांत काय नवें जुनें आहे असें बहुधा त्यांनीं विचारावयाचें, व त्यांत कांहीं विशेष असलें तर चर्चा चालावयाची. एकदां वर्तमानपत्रांत विलायतेंतील इंडिया ऑफिसमधल्या शेगड्या पेटविणाऱ्या मोलकरणींसंबंधानें कांहीं तार प्रसिद्ध झाली होती. रावसाहेबांनीं आल्यावर नेहेमींप्रमाणें प्रश्न केला. तेव्हां अण्णासाहेब भिडे यांनीं तारेंतला आशय नीट वाचला नसल्यामुळें ते ह्मणाले कीं, तरुण मोलकरणी इंडिया आफिसांतल्या शेगड्यांवर नेमावयाच्या असें प्रसिद्ध झालें आहे! रावसाहेब हंसून ह्मणाले कीं, असें असेल तर यापुढें इंडिया ऑफिसांत आपल्यासारखीं वृद्ध माणसेंच नेमावीं लागतील!

पुण्याच्या ग्रामण्यप्रकरणाची हकीकत श्रीमती रमाबाईच्या पुस्तकांत आली आहे, व त्या वेळेस ज्ञानप्रकाशांतही या हकीकतीविषयीं पुष्कळ लेख प्रसिद्ध झाले आहेत. कै. अण्णासाहेब भिडे हे फार भोळसर स्वभावाचे सज्जन गृहस्थ असत. पंचहौद मिशनच्या चहाच्या कपबशांचा खर्च कै. गोपाळराव जोशी यांनीं अण्णासाहेबांकडून करविला होता. ही गोष्ट रावसाहेब यांस माहीत नव्हती. ती मजकडून त्यांस समजली. तितक्यांत अण्णासाहेब आले,

व रावसाहेबांनीं त्यांसही विचारलें. अण्णासाहेबांनीं तोंड लहान करून, होय, गोपाळरावांनीं खर्च मजकडून घेतला, असें सांगितलें. तेव्हां रावसाहेब अण्णासाहेबांस ह्मणाले कीं, "गोपाळराव जोशास कांहीं कायमचा उद्योगधंदा नाहीं, 'रिकामा न्हावी कुडाला तुंबड्या लावी' अशी या गोपाळरावाची स्थिति आहे. तेव्हा त्याच्याशीं सावधगिरीनें वागत चला असें मीं तुह्मांस कित्येक वेळां सांगितलें आहे. असो. त्याच्या तडाक्यांत सगळेच सांपडलों हें कांहीं ठीक झालें नाहीं." अण्णासाहेब भिड्यांच्या घरीं एके वेळीं बोलणें चाललें असतांना, आपली मंडळी चोरून मारून हॉटेलमध्यें किंवा रिफ्रेशमेंट रूममध्यें चहा घेतात, परंतु उघड रीतीनें तसा चहा घेण्यास मंडळी तयार होतील कीं काय, असा विषय निघाला होता. त्या वेळीं गोपाळराव जोशी तेथें होते. अण्णासाहेब भिडे ह्मणाले कीं, 'उघड चहा घेण्यास काय हरकत आहे ? मी आपल्या येथें खर्च करवून खिस्त्याकडचा चहा करवतों व मंडळीस बोलावतों.' हें बोलणें झाल्यावर कित्येक महिन्यांनीं पंचहौद मिशनच्या मिशनऱ्यांकडून इव्हिनिंगपार्टीकरितां व भाषणसमारंभाकरितां पुण्यांतल्या मंडळीस आमंत्रणें गेलीं. हा योगायोग गोपाळरावांनीं घडवून आणला होता, व या ठिकाणीं मंडळीस चहा द्यावयाचा असेंही ठरविलें होतें. हा समारंभ झाल्यावर, चहाच्या कपबशांच्या बिलाचे पैसे काढा- कारण आपण मागें तसें ह्मणाला होतां- असें गोपाळराव अण्णासाहेबांस ह्मणाले. व अण्णासाहेबांचा भोळसट स्वभाव असल्यामुळें यांतील डावपेंच न समजून अण्णासाहेबांनीं पैसे दिले. याच्यानंतर मिशनरी मंडळी असें ह्मणूं लागली कीं, आह्मांला पर्वतीच्या वरण्या कां मिळूं नयेत ! रावसाहेबांनीं स्वतः चहा घेतला नव्हता. पण आपण मंडळी मिशनरी लोकांच्या कचाट्यांत सांपडलों व यांत डाव होता हें त्यांस समजल्यावर ग्रामण्य करणाऱ्या मंडळीपैकीं कै. गोविंदराव गद्रे वकील यांस ते ह्मणाले कीं-आमच्या चुकीबद्दल, ह्मणजे मिशनरी यांचे डावपेचांत आह्मी बेचाळीस जण सांपडलों याजबद्दल, लहानसहान प्रायश्चित्तास आह्मी कबूल होऊं. पण तासे मर्फे लावून आमच्या मंडळीची धिंड काढण्याचें जें तुमच्या मंडळीचें धोरण दिसतें त्यास मात्र विरोध होईल. ग्रामण्य-प्रकरण बरेंच माजलें, दोन्ही पक्षांचे मनोविकार बरेच उचंबळले, दोन्ही पक्षांत मधून मधून आपसांत फुटाफूट होत होती, व वाग्युद्धाचे मोरे एकमेकांवर सारखे चालू असत. परंतु अशा खवळलेल्या वातावरणांत सुद्धां प्रतिपक्षाविषयीं अनुदार उद्गार किंवा एकेरी भाषा रावसाहेब कधींही वापरीत नसत. आमचे मंडळीचा विशेष कटाक्ष श्रीमंत बाळासाहेब नातूंवर असे. परंतु रावसाहेब बाळासाहेबांच्या अपरोक्ष बोलतांना सुद्धां कधींही एकेरीनें बोललेलें मला आठवत नाहीं. रावसाहेबांचा मनावर व जिव्हेवर जो एक प्रकारचा दाब असे व मनोविकारांचें दमन करण्याची त्यांस जी सवय होती तीं लोकोत्तर होतीं. श्रीमंत बाळासाहेबांनीं मजजवळ कित्येकदां काढलेले उद्गार मला स्मरतात कीं, रावसाहेबांचीं सामाजिक मतें जर जुन्या मंडळींशीं जुळतीं असतीं तर देवमामलेदारांप्रमाणें देवमुनसफ

ह्मणून साधुकोटींत त्यांची गणना करून त्यांचे खरोखर देव्हारे सामान्य लोकांनीं माजवले असते! इतका त्यांचा स्वभाव शांत व सोशीक आहे! ग्रामण्य-प्रकरणांत बेचाळिसांच्या तर्फेनें शंकराचार्यांच्या प्रतिनिधीपुढें आपली बाजू मांडण्यास रा. बळवंतरावजी टिळकांसारखे वादविवादपटु व विद्वान् गृहस्थ लाभले याबद्दल रावसाहेब एकदां बोलतांना ह्मणाले कीं, बळवंतरावजी बेचाळिसांत आहेत हें आपलें भाग्यच समजावयाचें. जर ते यांत नसते व उलटपक्षांत असते तर आपणास भांग्यामारुतीवरून जातांना लोकांनीं खडे मारले असतें, इतका लोकमताचा क्षोभ झाला असता. रावसाहेबांनीं प्रायश्चित्त घेतल्यावर त्यांस जुन्या व नव्या पक्षाकडून जीं नांवें ठेवण्यांत आलीं व त्यांच्यावर जो सारखा भडिमार चालला, त्यांतून त्यांचा बचाव केसरींतून ज्या निबंधांतून केला आहे ते निबंध पाहिले ह्मणजे बळवंतरावजींची तरफदारी करण्याची हातोटी किती सफाईची व जोरदार असते हें स्पष्ट दिसेल. ग्रामण्यप्रकरण पूर्ण मिटण्याचे पूर्वी 'सुधारक' पत्रांत टिळकांच्या विरुद्ध लेख आला होता. टिळकांनीं आगरकरांच्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद करावी, त्यावांचून गत्यंतर नाहीं, इतक्या थरावर गोष्टी येऊन ठेपल्या. तेव्हां रावसाहेब व शिवरामपंत साठे यांनीं टिळक व आगरकर या दोघांच्याकडे जाऊन आपसांत हें खटलें मिटवलें व गोपाळराव आगरकरांनीं "बोलणें फोल झालें, डोलणें वायां गेलें" असें सुधारकांत लिहून आपला लेख परत घेतला.

आपल्या शेतकरी लोकांची स्थिति सुधारण्यास शेतकी पेढ्या निघण्याची अत्यंत अवश्यकता आहे असें रावसाहेबांस वाटत होतें. नमुन्यादाखल अशी पेढी सासवडास काढण्याकरितां रावसाहेब हे कै. सरदार विजयरंगम् अय्या मुदलियार वगैरे मंडळीस घेऊन गेले होते. मुंबई-सरकार व हिंदुस्थानसरकार यांची या योजनेस जरी अनुकूलता मिळाली तरी स्टेटसेक्रेटरीनें ती योजना फेटाळून दिल्यामुळें हा प्रयत्न जागच्या-जागीं राहिला. जी गोष्ट १८८३ सालीं सरकारास मान्य झाली नाहीं ती १९०४ सालीं पतपेढ्यांचा कायदा करून सरकारानें अमलांत आणली! ह्मणजे लोकांच्या मागणीच्या मागें सरकार २० वर्षें असतें असें सरकारानें पर्यायानें आपल्या कृतीनें दाखविलें आहे.

श्रीमती रमाबाईसाहेबांच्या पुस्तकाच्या ५२-५३ पानांवर जी हकीकत दिली आहे ती १८७४-७५ च्या सुमाराची नसावी असें वाटतें. तेव्हां सीतारामपंत सभेचे सेक्रेटरी नव्हते. लॉर्ड लिटन साहेबांच्या कारकीर्दींत दडपशाही करण्याचें जें धोरण होतें त्याला अनुलक्षून ज्ञानप्रकाशांत White Mogal ह्मणून एक इंग्रजी लेख आला होता. याबद्दल सरकारांत बरीच चर्चा झाली. ज्ञानप्रकाशांत लिहिणारी मंडळी निरनिराळी होती. परंतु कै. दामोदर विद्याधर गोखले यांचें नांव पुढें असे. दामुअण्णा हे बेटावर जज्ज-कोर्टांत नोकर असत. वर सांगितलेला लेख प्रसिद्ध झाल्यावर दामुअण्णास नोकरी सोडावी लागली. या सुमारास भाव्यांच्या धर्मशाळेंत—ह्मणजे बारामतीकरांचा वाडा जेथें ज्ञानप्रकाश होता त्याच्या समोरच्या धर्मशाळेंत—उत्तर दुहिं-

स्थानांतले कांहीं डिटेक्टिव आले होते, परंतु त्यांचा खरपूस समाचार पुणेकर मंडळींनीं घेतला. ही गोष्ट १८७४—७५ ची नसून १८७७—७८ची असावी असें वाटतें. श्रीमती रमाबाई साहेबांच्या पुस्तकांत पान १४९ यांत रावसाहेबांचे घरीं जेवणावळ झाली, व त्या जेवणावळीचा नकाशा वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाला, ह्मणून जो उल्लेख आहे तो प्रसंग वऱ्हाडांतले वकील रा. मोरोपंत जोशी पहिल्यानें विलायतेस जाऊन आले त्या वेळीं त्यांस दिलेल्या मेजवानीसंबंधाचा असावा असें वाटतें.

रानडयांचा स्वभाव तडजोडीचा व मिटतें घेण्याचा असल्यामुळें कधीं कधीं त्यांचें वर्तन कित्येकांस दुटप्पी वाटे. पण त्यांचा हेतु सार्वजनिक हिताशिवाय दुसरा कोणचाही नसे. फाटेपर्यंत ओढावयाचें नाहीं ही त्यांची नेहेमींची हातोटी असे. १८९५ सालीं पुण्यास कॉंग्रेसच्या मंडपांत सामाजिक परिषद् भरवूं नये याबद्दल जें रण माजलें होतें त्यांत शेवटपर्यंत दोन्ही पक्षांची मंडळी झुंजत होती. पण अखेर रानड्यांनीं सामाजिक परिषदेकरितां निराळा मंडप उभारून तंटा मिटविला.

ज्ञानप्रकाश पत्राशीं १८८३ पासून १८९३ पर्यंत माझा एडिटर या नात्यानें संबंध होता. त्यामुळें मला स्वतांस माहीत असलेल्या व विश्वसनीय मंडळीकडून ऐकिलेल्या गोष्टी मला ज्या आठवल्या त्या मीं या लेखांत नमूद केल्या आहेत. वरील मजकुरांत ओघानें ज्या व्यक्तींचा संबंध आला त्या व्यक्तींचा नामनिर्देश करण्यांत कोणाचीही निंदा करण्याचा माझा हेतु नाहीं. थोर बुद्धिमत्ता, सतत उद्योग, देशस्थितीविषयीं अहर्निश निदिध्यास, शांत व गंभीर स्वभाव, अचल ईश्वरनिष्ठा, वगैरे अनेक गुणसमुच्चयानें युक्त अशीं रावसाहेबांसारखीं माणसें रोज निपजतात असें नाहीं. शतकांत एखादी व्यक्ति रावसाहेबांसारखी उत्पन्न होणार. असें जरी आहे तरी प्रत्येकानें अशा विभूतींच्या चरित्रापासून आपणास घेववेल तेवढा धडा घेऊन देशकल्याणाच्या कामास उद्युक्त व्हावें, तरच अशा चरित्रांच्या प्रसिद्धीपासून फायदा झाला असें ह्मणतां येईल, इतकें सांगून मी हा लेख पुरा करतों.

रामचंद्र मोरेश्वर साने.

पुनश्च रावणाची लंका.

(रा० ब० वैद्य यांस प्रत्युत्तर.)

विविधज्ञानविस्ताराच्या गेल्या अंकांत सुप्रसिद्ध विद्वान व संक्षिप्त रामायणाचे व महाभारताचे रचियिते रा. रा. चिं. वि. वैद्य यांनीं रावणाच्या लंकेविषयीं मीं जें अनुमान केलें आहे त्यासंबंधानें विरोधी विचार प्रदर्शित केले आहेत. त्यांचीं व माझीं प्रमाणें किंवा कारणें लोकांपुढें आहेतच. परंतु रा. रा. वैद्य यांच्या लेखांत माझ्या कांहीं प्रमाणांकडे दुर्लक्ष झालें आहे. माझ्या लेखांत कांहीं संदिग्धता राहिली असल्यानें असें झालें असावें असें समजून मी थोडासा खुलासा करीत आहें.

विंध्याच्या उत्तरेस लागूनच किष्किंधा असली पाहिजे यास मी तीन आधार दाखविले असून रा. वैद्य एकाचाच विचार करितात, असें कां? एक आधार सुग्रीवानें किष्किंधेहून शोधास निघालेल्या वानरांस दक्षिणेस विंध्य पर्वत सांगितला. यासच पुष्टी देणारा दुसरा आधार असा कीं, सीताशोधार्थ किष्किंधेहून दक्षिणेकडे जाणाऱ्या टोळीनें पहिल्या प्रथम विंध्या पर्वत शोधण्यास आरंभ केला. व तिसरा आधार, रामायणांत चित्रकूटापासून किष्किंधेपर्यंत जें योजनांत अंतर दिलें आहे तें होय. माझ्या मतें हा आधार सर्वांत महत्त्वाचा आहे. याच्या अनुरोधानेंही त्या नगरीचें स्थान विंध्याद्रीचे उत्तरेस व चित्रकूटाचे दक्षिणेस येतें. लंकेच्या व तिच्या नामसादृश्यावर माझा मुळींच जोर नसून तो आहे असें रा. वैद्य समजतात! याप्रमाणें किष्किंधेचें स्थान नियत झाल्यावर तेथून लंकेच्या स्थानाचा विचार करावयाचा. ४–५० यांतील वर्णनावरून हल्लींचे मानलेले किष्किंधेच्या स्थानापासून दक्षिणसमुद्रापर्यंतचा सर्व प्रदेश एका महिन्यांत या टोळीनें पाहून टाकला असें अनुमान संभवनीय नाहीं, हा विचार या प्रकरणांत मुख्य आहे.

आतां भूवर्णनाविषयीं पाहतां, त्यांत रामायणाच्या निरनिराळ्या आवृत्त्या होत असतांना बरेंच कमीजास्त झालें असावें असें मला वाटतें. त्यांतील भारतवर्षांतील देशविभागाचा क्रम बरोबर आहे, व त्या पलीकडील तसा नाहीं, असें मी ह्मटलेंच आहे. या वर्णनांत चित्रकूट--विंध्यांतर्गत प्रदेशांतील शोण नदीस मिळणाऱ्या महीनदीसारख्या लहान नदीचा उल्लेख आहे त्यावरून व त्यांतील योजनांनीं अंतर रामायणांत नमूद केलें असल्यावरून, या प्रदेशाविषयीं ग्रंथकर्त्यास माहिती विशेष होती व हा त्यांतील अत्यंत जुना भाग आहे, अशीं अनुमानें निघतात. कांहीं प्रतींत एक गोदावरी नदी किष्किंधेच्या पूर्वेस व दुसरी दक्षिणेस असल्याचा उल्लेख आहे, व मी उद्धृत केलेल्या श्लोकांत विंध्याच्या दक्षिणेस एकीचा उल्लेख असून दंडकारण्यांत तिचा शोध करण्यास सांगितलें आहे. दंडकारण्य चित्रकूटाच्या अगदीं दक्षिणेस असल्याचें ह्मटलें आहे. तेव्हां ४-४१–११ हा श्लोक त्यांतील गोदावरीची आठवण देण्याकरितां मुद्दाम येथें घातला असें मला वाटतें. हें भूवर्णन, मी किष्किंधेची कायम केलेली जागा लक्षांत आणली ह्मणजे, टीकाकारांचें त्यासंबंधींचें मतही मला प्रतिकूल नाहीं.

रा. वैद्य जें लंकेचे स्थान मानतात त्याविरुद्ध पाश्चात्य पंडितांचे आक्षेपही माझ्याच अनुमानाला पुष्टी देतात.

यावर विंध्याविषयींचा उल्लेख प्रबल मानावयाचा कीं सागराविषयींचा, हा विचार करणें वाचकांकडे आहे.

मा० वि० किबे.

पुस्तकपरीक्षा.

"केवळ स्वार्थापार्यी."

(१) प्रास्ताविक. (२) रूपांतर. (३) तीन प्रकार. (४) भाषांतर व रूपांतर. (५) प्रतिकृति. (६) 'नाऽमूलं लिख्यते किंचित्।' (७) "केवळ स्वार्थापार्यी" (८) ऐतिहासिक कादंबरी. (कालविपर्यास). (९) इतर विपर्यास. (१०) विसंगत वर्णनें. (११) प्रतिकृति. (१२) सारांश. (१३) "निरंकुशाः कवयः" (१४) प्रतिकृति न साधण्याचें कारण. (१५) भाषांतराचे मासले. (१६) जॉर्ज ईलियट. (१७) उपसंहार.

प्रास्ताविक.

"केवळ स्वार्गापार्यी" ही कादंबरी रा. रा. विनायक रामचंद्र जोशी, बी.ए. यांनीं लिहिली आहे. रा. जोशी यांची वाचकांना आह्मी ओळख करून देण्याची जरूरी आहे असें नाहीं. "सुधारक" पत्राचे बरींच वर्षे चालक, व अलीकडे कांहीं वर्षे युनिव्हर्सिटींत मराठीचे परीक्षक, ह्मणून त्यांचें नांव पुष्कळांना माहीत झालें आहे. ते अनुभवलेले लेखक आहेत. पण कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न नवीनच असल्यामुळें आंग्लवाङ्मयांतल्या एका सुप्रसिद्ध लेखकाचा त्यांनीं आसरा घेतला, हें योग्यच आहे. "जॉर्ज ईलियट" च्या कृति पसंत करण्याचें कारण, व स्वतःच्या प्रयत्नाविषयीं आवश्यक माहिती, रा. जोशी यांनीं प्रस्तावनेंत सांगितली आहे. ते ह्मणतातः– "मराठी भाषेंत सामान्यतः उपलब्ध आहेत त्यांपेक्षां अंमळ निराळ्या प्रकारची ही कादंबरी आह्मी वाचकांना सादर करीत आहों." 'जॉर्ज इलियट' हें सांकेतिक नाम धारण करणाऱ्या सुप्रसिद्ध इंग्लिश ग्रंथकर्त्रीच्या "रोमोला" नामक ग्रंथाची ही प्रतिकृति आहे. "जॉर्ज इलियट" यांचे ग्रंथ गोष्टींच्या रूपानें लिहिले असले, तरी तत्त्वज्ञानासंबंधीं अनेक मननीय सिद्धांतांवरील तीं व्याख्यानेंच आहेत; आणि तशा दृष्टीनेंच त्यांचें अध्ययन विद्यार्थ्यांनीं अवश्य केलें पाहिजे. विशेषतः रोमोला हें पुस्तक तत्त्वज्ञान या विषयाच्या विशदीकरणार्थ वाचावयाला पाहिजे, अशी शिफारस येथील डेक्कन कॉलेजचे माजी प्रिन्सिपाल डॉ. सेल्बी हे करीत असत. येथील 'दक्षिणा, प्राइझ कमिटी'नें, बहुधा त्यांच्याच शिफारशीवरून, रोमोलाचें मराठी भाषांतर करण्यासाठीं बक्षिस ठेविलें होतें; परंतु त्यासाठीं कोणी प्रयत्न केला असल्याचें दिसून येत नाहीं.

"जॉर्ज इलियट यांचा हा ग्रंथ, त्याचें मोहकत्व कमी होऊं न देतां, मराठी वाचकांच्या हातीं द्यावा, अशा इच्छेनें हा प्रयत्न केला आहे. हा वाचकांना रुचला तर याच दिशेनें आणखी कित्येक ग्रंथांचीं रूपांतरें करण्यास उत्तेजन येईल." (पान १३)...........

"शेवटीं महाराष्ट्र वाङ्मयाची ही यथामति केलेली वेडी-वांकडी सेवा सहृदय वाचकवृंद गोड करून घेवो, अशी प्रार्थना करून" (पान १६) प्रस्तावना पुरी केली आहे.

आतां प्रथम रूपांतर म्हणजे काय, प्रतिकृति म्हणजे काय, तें पाहूं.

रूपांतर.

रूपांतर ह्मणजे दुसरें रूप. पण दुसरें रूप ह्मणजे काय असें कोणीं विचारल्यास त्याचें समाधान करणें सोपें नाहीं. बरें, तसें करणें सोपें नाहीं ह्मणून प्रयत्न सोडून द्यावा तर रूपांतर कशाला ह्मणावयाचें, त्याचें लक्षण काय, याचा निर्णय होत नाहीं; आणि निर्णय झाला नाहीं तर रूपांतराचें परीक्षण अवघड होऊन बसतें. ह्मणून अशा प्रश्नाचा निर्णय जरी नाहीं तरी त्यांचा खल अवश्य झाला पाहिजे. त्याशिवाय परीक्षण करणाऱ्याला आपलें ह्मणणें सयुक्तिक आहे असें दाखवितां येणार नाहीं, व तें सयुक्तिक असल्याशिवाय त्याला परीक्षण हें नांव शोभणार नाहीं; स्तुति किंवा निंदा, फार झालें तर दोहोंचीं सरमिसळ, असें त्याला ह्मणावें लागेल.

रूप.

आतां रूप कशाला ह्मणतात तें पाहूं. दिसतें तें रूप, हें उघड आहे. व पारदर्शक वस्तूशिवाय इतरांसंब-

धानें " बाहेर दिसणारें, बाहेर दिसतें तें " रूप असें ह्मणतां येईल. दिसण्याची क्रिया मुख्यत्वेंकरून वर्णावर अवलंबून असते. उदाहरणार्थ, अंधारांत काळी वस्तु दिसत नाहीं, पण पांढरी थोडी तरी दिसते. तसेंच हिरव्या गवतांत हिरवी वस्तु किंवा हिरवा प्राणी सहसा दिसत नाहीं. रंगांत रंग मिसळून जातो. सैन्यामध्यें खाकी रंगाचे कपडे व त्याच रंगाच्या तोफा व गाड्या ठेवण्याचें कारण, त्या उघड्या मैदानांत एकदम दृष्टीस पडूं नयेत हेंच आहे. लढाऊ गलबतांचा राखी रंग देखील समुद्रांत लवकर ओळखतां येऊं नये ह्मणून पसंत केलेला असतो. समान वर्णाच्या किंवा एकमेकांत लपणाऱ्या रंगाच्या वस्तु किंवा प्राणी प्रथमदर्शनीं जरी दृष्टीस पडलीं नाहींत तरी जवळून निरखून पाहिल्यास ओळखतां येतात, याचें कारण त्यांचा आकार किंवा आकृति निराळी असते हें आहे. वर्ण जरी सारखा असला तरी आकृति निराळी असल्यामुळें वस्तूचें किंवा प्राण्याचें निराळें " रूप " आहे हें ध्यानांत येतें. ह्मणून " वर्ण व आकृति " मिळून " रूप " बनतें असें मानण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

" दुसरें रूप " असें ह्मटलें, कीं तें पहिल्याशीं सदृश असलें पाहिजे व त्याहून भिन्नही असलें पाहिजे. पहिल्याशीं सादृश्य नसेल तर त्याला त्याचें " रूप " ह्मणतां येणार नाहीं; एक निराळी " वस्तु " म्हणावें लागेल. आणि भिन्नत्व जर नसेल तर त्याला " रूप " न म्हणतां " प्रतिमा " म्हणावें लागेल. म्हणूनच रूपांतर म्हणजे फेरफार असें प्रथमदर्शनीं वाटतें. पण एकाला दुसऱ्याचें " रूपांतर " म्हणावयाचें असल्यास त्यांत दुसऱ्याशीं सादृश्यही पाहिजे व भिन्नत्वही पाहिजे हें उघड आहे.

" सादृश्य व भिन्नत्व " हीं एके ठिकाणीं तीन तऱ्हांनीं असूं शकतील. पण त्यांचें एकमेकांशीं प्रमाण मात्र एकच राहणार नाहीं.

(१) आंत सारखें व वरून निराळें;

(२) आंत निराळें व वरून सारखें;

(३) आंत आणि बाहेर कांहींसें सारखें व कांहींसें निराळें.

" आंत व बाहेर " हा भेद मूर्त पदार्थांना लागू आहे. तो कलांना कसा लागू होईल. ? कोरींव आणि घडींव-Plastic-खेरीज करून इतर सर्व कलांमध्यें अमूर्ताचा विलास विशेष दिसतो. तेव्हां मूर्त वस्तूंना युक्त असणारा भेद अमूर्तांना लागू करणें अशक्य आहे असें प्रथम वाटण्याचा संभव आहे. पण अर्थाचे दोन प्रकार आहेत. एक शब्दशः व दुसरा लाक्षणिक. मूर्त वस्तूंना " आंत व बाहेर " यांचा शब्दशः अर्थ लागू झाला तर अमूर्तांना लाक्षणिक अर्थ लागू पडतो. त्यांच्या संबंधानें " आंत " हा शब्द रहस्य, इंगित किंवा मर्म, असें सुचवील; व " बाहेर " हा आनुषंगिक किंवा गौण असें सुचवील. हा लाक्षणिक अर्थ ध्यानांत धरला ह्मणजे वाङ्मयाला किंवा इतर कोणत्याही अमूर्ताच्या विलसनाला " आंत व बाहेर " हा भेद लागू करण्यास अडचण वाटणार नाहीं.

तीन प्रकार.

आतां सादृश्य आणि भिन्नत्व यांच्या एकत्र आश्रयाच्या वर सांगितलेल्या तीन प्रकारांकडे वळूं.

(१) एकाद्या चित्राचा-वर्णलेखनाचा-बिनरंगी फोटो हें याचें एक उदाहरण आहे. बिनरंगी ह्मणण्याचें कारण, आतां रंगित फोटो घेण्याची कला अवगत झाली आहे.

एकाद्यानें देशी पोषाखाच्या ऐवजीं परदेशी घातला कीं त्याचें रूप पालटतें. अशा रूपाच्या फेरफाराला याच सदरांत घालावें लागेल. पोषाखानें रूप पालटतें हें प्रत्येकाला माहीत आहे. वाङ्मयांतलें उदाहरण ह्मणजे भाषांतर हें होय. कथानक कायम ठेवून, मर्म कायम ठेवून, अर्थहानि न होऊं देतां, भाषा बदलली कीं त्याला भाषांतर ह्मणतात. कोणत्याही दोन्ही भाषा अगदीं सारख्या नाहींत. शिवाय भाषा अनेक आहेत. देश, काल, परिस्थिति, समाज, संस्कृति यांत फेर आहेत. तेव्हां मूळ जरी कायम ठेविलें तरी विदेशी पोषाख घातल्यानें जितकें रूप पालटतें तितका तरी निदान बाहेरून फरक भाषांतरांत पडतो. ह्मणून या दृष्टीनें विचार केला तर भाषांतर हें एक प्रकारचें रूपांतरच आहे असें दिसतें. शिवाय, भाषांतर करतांना नुसत्या भाषेच्या बदलाशिवाय कधीं कधीं काव्याचें गद्य असा बदल करावा लागतो, निदान

तसा करितात. उदाहरणार्थ, ऋग्वेद, महाभारत, रामायण, ईलियड, ओडिस्सी इत्यादींचीं गद्यांतली भाषांतरें.

एकाच भाषेंत होणारीं, व या सदरांत येण्यासारखीं, रूपांतराचीं दुसरीं उदाहरणें ह्मणजे गोष्टींचीं, कथांचीं, कादंबऱ्यांचीं बनविलेलीं नाटकें हीं होत. कथानक कायम राहिल्यामुळें नाटकांत त्याचें रूपांतर जरी झालें तरी तें मुळाशीं आंतून सारखें व बाहेरून निराळें असें होतें. या प्रकारांत भिन्नत्वापेक्षां सादृश्य अधिक प्रत्ययास येतें.

(२) 'आंत निराळें व वरून सारखें' याचें व्यवहारांतलें उदाहरण ह्मणजे वेषांतर हें आहे. पोषाख व वेष या दोहोंनीं जर रूप पालटतें तर त्यांत भेद कोणता असें विचारल्यास, वेषांत पोषाखापेक्षां बदल जास्त होतो हें त्याचें उत्तर आहे. कपड्याशिवाय इतर पुष्कळ फेरफार केला तरच वेषांतर होतें. बहुरूपी व त्याचीं नाना सोंगें हीं याचीं चांगलीं उदाहरणें आहेत. किती तरी आयास करून, कौशल्य लढवून, त्याला बतावणी करावी लागते, वरून साम्य आणावें लागतें. त्याचें स्वतःचें रूप कायमच असतें; पण आवाज, बोलण्याची लकब, चालण्याची ढब, अवयवांचे विक्षेप यांत फेरबदल करून तो वेषांतर करतो, रूप पालटतो. नट व त्यांचे अनेक "पार्ट" हे याचेच चांगले मासले आहेत. एकदां दोन प्रसिद्ध नटांच्या गांठी पडल्या. नाट्यकलेबद्दल प्रश्न निघाला. तेव्हां त्यांपैकीं एकानें दारू पिऊन झिंगणाऱ्या माणसाचें सोंग करून दाखविलें व दुसऱ्याला विचारिलें "कां, कसें काय वठलें?" त्यानें उत्तर दिले, "सगळें ठीक होतें. पण तुझे पाय झिंगणाऱ्या माणसाप्रमाणें पडत नव्हते-Your legs were not drunk." एकूण काय कीं कोणाला आपलें अंतर्याम बदलतां येत नाहीं, कातडें बदलतां येत नाहीं; तें निराळेंच राहतें. म्हणून सोंगाप्रमाणें ढोंग करावें लागतें. वेष, पार्ट हे निवळ नकलेचे प्रकार आहेत. राजाचा 'पार्ट' कितीही चांगला वठला तरी नाटकांतला राजा व खरोखरीचा राजा यांतला फरक जाणत्यांना तेव्हांच समजतो. म्हणून नटाला-रूप बदलणाराला-अनुभव, निरीक्षण, कल्पनाशक्ति यांच्या साहाय्यानें जो वेष घ्यावयाचा असेल त्यासारखें तितका वेळ तरी बनण्याची, तद्रूप होण्याची, शिकस्त करावी लागते. ही बतावणी चांगली किंवा वाईट होणें अर्थात् ती करणाऱ्याच्या कौशल्यावर, लायकीवर, अवलंबून असणार हें उघड आहे. दरेकाला सर्व प्रकारचे "पार्ट" शोभत नाहींत. कांहीं स्त्रीपार्टी असतात तर कांहीं पुरुषपार्टी असतात; कांहींना विनोदी पार्ट शोभतो तर कांहींना गंभीर शोभतो. एकूण काय कीं पार्ट शोभण्यास देखील एक प्रकारची उपजत तयारी लागते.

ज्याप्रमाणें प्रत्येकाला नट होतां येत नाहीं त्याप्रमाणें प्रत्येकाला रूपांतर करणेंही साधत नाहीं. त्याला कांहींतरी आंगचें, उपजत असावें लागतें. नक्कल करण्याची कला साधावी लागते. तसेंच ज्याप्रमाणें एकाला सर्व प्रकारचीं सोंगें शोभत नाहींत त्याप्रमाणें एकाला सर्व कृतींचें रूपांतर साधत नाहीं. उदाहरणार्थ, शिद्याचें सोंग आणावयाचें असेल तर नुसता काळा कळकट रंग, रांठ बुरणुसी केंस, बटबटीत डोळे, पांढरे शुभ्र दांत एवढ्यानेंच भागावयाचें नाहीं. लठ्ठ ओंठ व निमुळता चेहरा हे अवश्य पाहिजेत. पण असा मनुष्य शिद्याव्यतिरिक्त क्वचितच असतो. यास्तव साधारण त्याच्यासारखा दिसणारा जो माणूस असेल त्यालाच तो पार्ट साधेल; कारण त्याच्यांतच पाहिजे तशी लायकी आढळेल. जी स्थिति नाट्यकलेची तीच किंवा तशीच वाङ्मयाची. कांहींना कादंबरी साधते तर कांहींना लहानसहान गोष्टी, कांहींना नाटक तर कांहींना साधी कथा, कांहींना काव्य तर कांहींना गद्य.

"मारून मुटकून" ग्रंथकार होणाऱ्यांना एखाद्या कथानकाचा आधार घेऊन त्याची बरीवाईट नक्कल केल्याशिवाय सुटका नाहीं. अंतःस्फूर्ति जेथें नाहीं, उमाळा जेथें नाहीं, तेथें ओढून ताणून चंद्रबळ आणावें लागतें. उदाहरणार्थ, गाण्याचें अंग नसलेल्या माणसानें जरी उत्तम गवयी ठेवला, उत्तम वाद्य विकत घेतलें, दिवसभर कंठशोष केला, वाद्य दमविलें, तरी त्याला गाणेंही येणार नाहीं व बजावणेंही येणार

नाहीं. कारण नुसत्या परिश्रमानें कोणतीही कला साध्य होत नाहीं. आणि वाङ्मय ही एक कला आहे. रूपांतर करितांना मूळ कथानकांत फेरफार किती करावयाला पाहिजे, कां करावयाला पाहिजे, कुठें व कसा केला पाहिजे, किती केल्यास शोभेल, पदरचें कुठें, कसें व किती घालावें, हें बरोबर समजण्याला मूळाचें मर्म ओळखितां आलें पाहिजे; स्वतंत्र विचार करण्याची शक्ति पाहिजे, धमक पाहिजे; कल्पनाशक्ति सतेज पाहिजे. त्यांच्या अभावीं, मूळ कथानकाचें रहस्य न समजल्यामुळें, अनुकरण करितां येत नाहीं, नक्कलच करावी लागते. यास्तव बहुतेक सर्व रूपांतरांना–मूळाशीं बाहेरून सारखीं पण आंतून निराळीं–असें मानावें लागतें. गोष्टीला गोष्ट,कादंबरीला कादंबरी, नाटकाला नाटक,प्रकरणाला प्रकरण, पात्राला पात्र, प्रसंगाला प्रसंग असें जरी रूपांतर करितांना केलें तरी तेवढ्यावरून मूळाशीं साम्य कायम ठेवितां येतें असा कांहीं नियम नाहीं. मूळांतल्या प्रकरणाचें,पात्रांचें, प्रसंगांचें,प्रयोजन काय तें लक्षांत आल्यावांचून, लक्ष्यांत ठेविल्यावांचून " कॉपी टु कॉपी अँड माशी टु माशी " या विद्यार्थ्यांच्या ह्मणीप्रमाणें रूपांतरांची गत होते.

(३) "आंत निराळें व वरून सारखें" या दुसऱ्या सदरांत बहुतेक सर्व रूपांतरांचा समावेश कां करावा, आंत बाहेर कांहींसें सारखें व कांहींसें निराळें या तिसऱ्या सदरांत कां करूं नये, अशी शंका खचित येईल. व ती अयोग्य आहे असें ह्मणतां येणार नाहीं.

रूपांतरांचा समावेश दुसऱ्या व तिसऱ्या या दोन्ही सदरांत होईल हें आह्मांला नाकबूल नाहीं. एवढेंच नव्हे तर रूपांतराचा अर्थ संदिग्ध असल्यामुळें, त्याचे तीन निराळे प्रकार दाखविण्याचा आह्मी येथें प्रयत्न केला आहे. आणि बहुतेक सर्व रूपांतरें दुसऱ्या सदरांत येतात असें आमचें ह्मणणें आहे. कारण तिसऱ्या सदरांत घालण्याच्या योग्यतेचीं रूपांतरें फार थोड्यांना साधतात असें वाङ्मयाच्या इतिहासावरून सिद्ध होतें. शिवाय असलीं रूपांतरें व स्वतंत्र कृति यांमध्यें फरक थोडा असतो. लिहावयाला शिकतांना ज्याप्रमाणें प्रथम अक्षरओळख, मग कित्ता गिरविणें, मग पुस्त्या लिहिणें व हात घटल्यानंतर, धीर झाल्यानंतर करावयाची असल्यास फर्डेशाही, असें पायरीपायरीनें मुलांना जावें लागतें, त्याप्रमाणें होतकरू लेखकांना आधीं वाचनाचा संचय, नंतर नमुनेदार ग्रंथांचें वारंवार परिशीलन, नंतर भाषांतर किंवा रूपांतर, व सरते शेवटीं जुळल्यास स्वतंत्र कृति, असा क्रम अनुसरावा लागतो. भाषांतर व विशेषेंकरून रूपांतर ही स्वतंत्र कृतीची पूर्व तयारी आहे. ह्मणून रूपांतरांना, त्यांच्या तीन प्रकारांना कुबड्यांची किंवा पांगुळ गाड्याची उपमा द्यावी लागते. ज्याला चालतां येत असेल, ज्याला आपल्या पायांनीं मजल मारण्याची उमेद असेल,तो असल्या साधनांचा उपयोग करण्याचें फारसें मनांत आणीत नाहीं. कुबड्या व पांगुळगाडा हीं दोन्ही चालण्याचीं साधनें आहेत. पण दुसऱ्याचा उपयोग शिकविण्यापुरताच आहे आणि पहिल्याचा भार वाहण्याचा आहे. दुसरें वाढत्या शक्तीचें द्योतक आहे तर पहिलें व्यंगाचें दर्शक आहे.

भाषांतर व रूपांतर.

आतां भाषांतर व रूपांतर, म्हणजे पहिला व दुसरा प्रकार, यांत वाङ्मयाच्या दृष्टीनें श्रेष्ठ कोणतें ह्या प्रश्नाचा निकाल नुसत्या वादानें न करितां निरनिराळ्या वाङ्मयांचे जे इतिहास प्रसिद्ध झाले आहेत त्यांना अनुसरून व्हावयाला पाहिजे. तसें न केल्यास निवळ मताभिमानाला ऊत येऊन वाटतील तसे सोयीचे सिद्धांत बाहेर पडूं लागतील. वाङ्मयाच्या इतिहासाकडे पाहिलें तर भाषांतराचें कार्य परदेशाच्या, परभाषेच्या,भिन्न संस्कृतीच्या वाङ्मयांतल्या निवडक कृतींचे नमुने तयार करण्याचें आहे असें दिसतें. चित्रकला व मूर्तिकला यांमध्यें प्रसिद्ध कृतींचे जसे नमुने करून संग्रहालयांत ठेवितात तसे मूळाचे नमुने तयार करणें, प्रतिमा तयार करणें, हें भाषांतराचें काम दिसतें. ज्याला अनुकरण करावयाचें असेल, ज्याची तशी पात्रता असेल त्याला बहुमोल मदत होते, त्याच्या प्रतिभेला चालन मिळतें. दुसऱ्या प्रकारच्या रूपांतरांचा नामशेष तरी वाङ्मयाच्या इतिहासांत सांपडतो कीं नाहीं याची वानवाच आहे. पुस्त्या लिहिण्याचा उपयोग जसा स्वतंत्र लिहितां येण्यापुरताच आहे, तशीं स्वतंत्र रचना करण्यास शिकण्यासाठीं असलीं रूपांतरें आहेत.

प्रतिकृति.

आतां प्रश्न राहिला तिसऱ्या प्रकारच्या रूपांतराचा. असलीं रूपांतरें आणि स्वतंत्र कृति यांमध्यें थोडा फरक असतो असें वर सांगितलेंच आहे. मूळाशीं जोंपर्यंत साम्य ओळखतां येतें तोंपर्यंत त्याला रूपांतर ह्मणावयाचें; तें नाहींसें झालें ह्मणजे स्वतंत्र कृति असें ह्मणावयाचें. उदाहरणार्थ, डिकन्स याच्या ग्रंथावर प्रथम स्मॉलेट या कादंबरीकाराची छाया पडलेली दिसत असे. स्मॉलेटच्या कादंबऱ्यांशीं डिकन्सच्या कथानकांचें प्रथम साम्य दिसत असे. पण रचनेचा सराव झाल्यावर, प्रतिभेला पुरतें चालन मिळाल्यावर, ही पहिली छाप दिसेनाशी झाली. तसेंच फील्डिंगच्या कादंबऱ्यांशीं थॅकरेच्या कृतींचें प्रथम साम्य दिसतें. पण तें थॅकरे कसून तयार झाल्यानंतर नाहींसें होतें. स्कॉटच्या कादंबऱ्यांचें अनुकरण ड्यूमा (Dumas) यानें केलें व त्या दोघांचें व्हिक्टर ह्यूगो यानें केलें. पण त्यांनीं मूळाचें रहस्य समजून फक्त त्या पद्धतीचें अनुकरण केलें. स्कॉटच्या दृष्टीनें ते पाहावयाला शिकले. स्कॉटची दृष्टि जरी त्यांनीं स्वतःला आणण्याचा सायास केला तरी त्यांनीं आपल्या डोळ्यांचा उपयोग केला. स्कॉटनें पाहिलें, वर्णिलें, तेंच यांनीं केलें असें झालें नाहीं. जेथें निराळें दिसलें तेथें त्यांनीं निराळें दाखविण्यास अनमान केलें नाहीं. ह्मणून स्कॉटपासून जरी ते ऐतिहासिक कादंबरीची कला शिकले तरी लवकरच त्यांनीं स्वतंत्र कृति करून दाखविली. गद्य सोडून काव्याचें उदाहरण घ्यावयाचें असल्यास, इंग्लिश कवि बायरन् व त्याचे युरोपांतले अनुकर्ते यांचें उदाहरण घेतां येईल. बायरनचीं काव्यें वाचून ज्यांना रचनेची स्फूर्ति झाली त्यांनीं प्रथम जरी त्याचा कित्ता गिरविण्याचा प्रयत्न केला, तरी नंतर फक्त त्याची वृत्ति त्यांच्या मनांत बाणली होती. त्यांनीं नक्कल करण्याचा प्रयत्न केला नाहीं. ज्यांनीं केला असेल त्यांचीं नांवें देखील आतां सांगणें कठीण जाईल. जगाचा तिटकारा, किंबहुना वीट, जगांतल्या अन्यायाचा निषेध, रूढीचा धिक्कार, व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार, अंतःकरणांत उठलेल्या कल्होळाचा मनुष्यापासून दूर एकांतांत राहून निसर्गाच्या सान्निध्यानें उपशम करण्याचा प्रयत्न, आणि अंतरंगांत उद्भवणाऱ्या नाना तरंगांचा, नाना विचारांचा, निःशंकपणें काव्यरूपानें उच्चार, अशी बायरन कवीची वृत्ति झालेली होती. अशी वृत्ति ज्यांची झाली त्यांना बायरनचें अनुकरण साधलें, त्यांना स्वतंत्र कृति साधली. हाइन (Heine) आणि म्युस्से (Alfred de Musset)-एक जर्मन व दुसरा फ्रेंच-हे बायरनचे अनुकर्ते प्रसिद्ध आहेत. त्यांच्या काव्यांची किंमत मात्र बायरनच्या काव्यांवर अवलंबून नाहीं. ती स्वतंत्र आहे. सारांश काय कीं वाङ्मयाच्या दृष्टीनें दुसऱ्या प्रकारच्या रूपांतरापेक्षां पहिल्या प्रकारचें भाषांतर अधिक किंमतीचें ठरतें. तिसऱ्या प्रकारचें रूपांतर फार थोड्यांना साधतें, आणि स्वतंत्र कृतींत व त्यांत फरक थोडा असतो. पण तिसऱ्या प्रकारचें रूपांतर देखील अपुरत्या वाढीचें द्योतक आहे. वाढ पूर्ण झाली, बुद्धि परिणत झाली, कल्पनेचा विकास पूर्ण झाला, कीं कृतीमध्यें विशिष्टपणा येतो. ती स्वतंत्र आहे असें ह्मणावें लागतें.

"नाऽमूलं लिख्यते किंचित्."

वास्तव स्वतंत्र कृति कशाला ह्मणावयाची असा एक आक्षेप आहे. पण तो अस्थानीं आहे असें थोड्या विचाराअंतीं दिसून येईल. सुवासिक, सुंदर फुलें सृष्टींत अनेक आहेत. त्यांत मधाचा अंश असतो. पण तो फक्त मधमाशीलाच काढतां येतो. दुसऱ्या माशांना काढतां येत नाहीं. फुलावर मधमाशी बसते, फुलपाखरूं पण बसतें. फुलपाखरानें मध दिलेला कोणाच्याही ऐकिवांत नाहीं. भ्रमर फुलाभोंवतीं गुंजारव करितो, मधाचा आस्वाद घेतो; पण इतरांना तो त्याला चाखवितां येत नाहीं. फुलांची निवड व रसांचें मिश्रण यांची किमिया फक्त मधमाशीलाच लाधलेली दिसते. ही किमिया समजून घेण्यासाठीं ज्या ज्या फुलावर मधमाशी बसली त्या त्या फुलांचा शोध अशक्य जरी असला तरी लागला अशी एक वेळ कल्पना केली, तरी कोणत्या फुलाचा किती अंश मधांत उतरला हें कोणाला तरी सांगतां येईल काय ? बरें सांगतां आलें नाहीं ह्मणून मधाची गोडी कमी होते काय ? नाना फुलांच्या रसांचें एक विशिष्ट मिश्रण म्हणजे मध असें जरी सर्वांना ठाऊक असलें तरी त्यामुळें मधाची किंमत नाहींशी होते काय ? याचें

कारण फुलांची निवड व रसांचें मिश्रण हीं मधमाशांनाच साधतात; इतरांना साधत नाहींत. माणसांनादेखील साधत नाहींत. अशीच स्थिति वाङ्मयांतल्या स्वतंत्र कृतींची आहे. कालिदासानें शाकुंतलाचें कथानक महाभारतांतून घेतलें, उर्वशीची कथा शतपथ ब्राम्हणांत सांपडते, म्हणून **शाकुंतल** किंवा **विक्रमोर्वशी** याला स्वतंत्र कृति म्हणतां येणार नाहीं काय ? शकुंतलेची व उर्वशीची गोष्ट शेंकडो जणांनीं वाचली असेल. पण एकट्या कालिदासालाच ह्या गोष्टी खुलवून त्यांचीं नाटकें करतां आलीं, बाकीच्यांना जुळलें नाहीं, हें उघड आहे. प्रसिद्ध कादंबरीकार ड्यूमा यांचें एक उदाहरण घेऊं. त्याचा एक मित्र असे, व तो प्रथम गोष्टी लिहून तयार करीत असे. गोष्ट लिहून झाली कीं ती ड्यूमा हातांत घेत असे, आणि ती वाचतांना कोठें दुरुस्ती तर कोठें फेरफार, कोठें वगळणें तर कोठें पदरची भर घालणें, असें करीत असे. पण याचा एकंदर परिणाम पाहवा तर एक निराळीच व खुलून दिसणारी गोष्ट तयार होत असे. ड्यूमानें केलेले फेरफार वगैरे त्याच्या मित्राला सुचण्यासारखे अर्थात् नसत. रंग सातच आहेत. त्यांची कशी तरी मिसळ प्रत्येकाला करतां येते. असें असून चित्रकार थोडे कां ? याचें मुख्य कारण निवड व मिसळ व मिसळीचें प्रमाण हीं कांहीं विशिष्ट व्यक्तींनाच साधतात. जी स्थिति वर्णलेखनाची–चित्रकलेची–तीच किंवा तशीच शब्दलेखनाची–वाङ्मयाची. कथानक दुसरीकडे सांपडतें, एवढ्यावरूनच कृति स्वतंत्र नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं. कथानक कुठलेंही असो, त्याचें दुसऱ्याशीं कमी अधिक साम्य पण असो, त्यांत विशिष्टपणा असला कीं पुरे आहे. विशिष्टपणा हें स्वतंत्र कृतीचें लक्षण आहे.

आतां नीरस स्वतंत्र कृतींपेक्षां रूपांतर चांगलें कीं वाईट हा प्रश्न निरर्थक आहे. कारण नीरस कृतींचा वाङ्मयांत समावेश होत नाहीं.

भाषांतराला धोपट मार्ग असें मानण्याची कांहीं जणांची प्रवृत्ति दिसते. वाङ्मयांत उत्तम भाषांतरें किती थोडीं सांपडतात तें पाहिलें ह्मणजे असली समजूत निराधार वाटेल. जशा भाषा अनेक आहेत तशीं वाङ्मयें अनेक आहेत. पण जितक्या भाषा तितकीं वाङ्मयें असें मात्र होत नाहीं. जगाच्या आदरास पात्र होणारीं वाङ्मयें थोडीं असतात. अशा वाङ्मयांतले नमुनेदार ग्रंथ स्वभाषेंत उपलब्ध करण्याचा प्रयत्न सुधारलेल्या देशांत सुरू असतो. ह्मणून भाषांतराचा उपयोग नेहमीं होत असतो. मूळ किंवा भाषांतर याच्या प्रेरणेनें रूपांतरें होऊं लागतात. तीं होतां होतां स्वतंत्र कृति एकाद्याला साधते. रूपांतरांचा लोप होऊन स्वतंत्र कृतींची वाङ्मयांत भर पडते.

भाषांतराला धोपटमार्ग न म्हणतां दुसऱ्या प्रकारच्या रूपांतरांना तें नांव खचित शोभेल. मूळाचा अर्थ स्वभाषेंत उतरविण्यास अडचण येऊं लागली, अतिशय कष्ट पडूं लागले कीं करा गोळाबेरीज, ह्मणजे झालें रूपांतर! अर्थशः भाषांतर करण्याचा सायास असल्या रूपांतराच्या साहाय्यानें चुकवितां येतो.

“ केवळ स्वार्थापायीं. ”

“ केवळ स्वार्थापायीं ” ही कादंबरी “रोमोला”ची प्रतिकृति आहे असें रा. जोशी यांचें ह्मणणें आहे. प्रतिकृतीला तिसऱ्या प्रकारचें रूपांतर म्हणतां येईल. तिसऱ्या प्रकारचें रूपांतर म्हणजे मूळाशीं आंत बाहेर थोडेंसें साम्य व थोडासा फरक असें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां प्रतिकृति ह्याचा स्वतंत्र कृतीच्या खालोखाल कृति असा अर्थ करितां येईल. यास्तव “ केवळ स्वार्थापायीं ” या कादंबरीचें, रोमोलाची प्रतिकृति, व चवदाव्या शतकांतल्या विजयनगरासंबंधी एक ऐतिहासिक कादंबरी, अशा दोन दृष्टींनीं परीक्षण करावयाला पाहिजे.

प्रतिकृति व ऐतिहासिक कादंबरी ह्या दोन्ही एकाच कथानकानें साधणें कितपत शक्य आहे हा प्रश्न सध्यां बाजूला ठेवूं, आणि ऐतिहासिक कादंबरी या दृष्टीनें “ केवळ स्वार्थापायीं ” ह्या कथानकाचें परीक्षण करूं. कारण “ विजयनगरच्या इतिहासाचा समजून उमजून कोठेंही विपर्यास केलेला नाहीं. तथापि क्वचित् प्रसंगीं तसा झाला असल्यास ऐतिहासिक कादंबरीला असलेल्या निसर्गसिद्ध हक्काचें त्यानें उल्लंघन झालें, असें मानण्याचें कारण नाहीं.–”

असें रा. जोशी यांनीं प्रस्तावनेंत आश्वासन दिलें आहे. ऐतिहासिक कादंबरीला असलेले निसर्गसिद्ध हक्क कोणते तें रा. जोशी यांनीं दर्शविलेलें नाहीं. कारण तसें करणें अप्रासंगिक झालें असतें. पण दुसऱ्या कोणीही हे हक्क कोणते आहेत त्याचें दिग्दर्शन देखील केलेलें आमच्या पाहण्यांत नाहीं. "निरंकुशाः कवयः" असें एक सुप्रसिद्ध वचन आहे; त्याचाच अनुवाद निसर्गसिद्ध हक्क असा केलेला दिसतो. तेव्हां रा. जोशी यांची प्रस्तुत कादंबरी तपासून त्यांच्या समजुतीप्रमाणें ऐतिहासिक कादंबरीचे निसर्गसिद्ध हक्क कोणते ते पाहणें व " निरंकुशाः कवयः" या वचनाचा अर्थ तसा होतो कीं काय तें ठरविणें जरूर आहे.

ऐतिहासिक कादंबरी.

ऐतिहासिक कादंबरीमध्यें कथानक कोणत्या काळचें आहे तें स्पष्ट समजणें आवश्यक आहे हें उघड आहे. तेव्हां " केवळ स्वार्थोपायीं " याचा काळ कोणता तें पाहूं.

" देवगिरीच्या चिंधड्या उडाल्या, आणि तेथील हतभागी राजाचा शोककारक अंत झाला. तो प्रसंग माझ्या दुर्दैवानें माझ्या नजरेस पडला आहे. " (प्रकरण चवथें, पान ४६) अशी स्वतःसंबंधी माहिती नायकानें–माधवानें–पंडित बदरीनाथ यांना दिली आहे. "१३१८ सालीं मुबारिकानें देवगिरीवर पुनः हल्ला करून तेथील दुर्दैवी हरपालदेव या राजास जिवंतपणीं सोलून ठार केलें"......(प्रकरण पहिलें, पान १९) अशी माहिती रा. जोशी यांनींच दिली आहे. यावरून असें दिसतें कीं, माधव हा सन १३१८ सालीं कमींत कमी पांच वर्षांचा असला पाहिजे. पांचापेक्षां कमी वय होतें असें ह्मणावें तर प्रसंगांची आठवण ठेवण्याची त्याची शक्ति फार विलक्षण होती असें मानावें लागेल. आतां विजयनगराची स्थापना सन १३३६ सालाच्या सुमारास झाली. कारण १३४० सालांतला हरिहराच्या नांवाचा एक शिलालेख उपलब्ध आहे, असें स्यूएल यांनीं आपल्या पुस्तकांत सांगितलें आहे. Chapter II, p. 16, "A Forgotten Empire." ह्मणजे विजयनगराच्या स्थापनेच्या वेळीं माधव हा निदान २३ वर्षांचा होता असें दिसतें. " मी येथें आलों तो पुरा तेवीस वर्षांचा देखील नव्हतों. आतां मी अठ्ठावीस वर्षांचा झालों, मला अनुभव पुष्कळ आला आहे–" (प्रकरण सदतिसावें, पान ३०९). या वाक्याशीं आमच्या अनुमानाची मेळ पडतो; आणि त्याला " विजयनगरची स्थापना होऊन आपल्या कथानकाच्या वेळीं फार थोडीं वर्षें लोटलीं होतीं" (प्रकरण पांचवें, पान ६१) या वाक्यानें कांहींशी बळकटी येते. यावरून कथानकाचा काळ सन १३३६ पासून १३४१ सुमारचा ठरतो. पण पहिल्याच प्रकरणांत " आपल्या कथानकाचा काल चवदाव्या शतकाच्या अखेरचा आहे " (पान २१) असें निश्चयात्मक वाक्य आहे. आतां चवदाव्या शतकाची अखेर ह्मणजे सन १३७५ पासून १४०० पर्यंतचा काळ असें ठरतें. माधवाच्या ह्मणण्याप्रमाणें कथानकाचा काल १३३६ पासून १३४१ होतो तर वर दिलेल्या वाक्यानें तो १३७५ पासून १४०० पर्यंतचा होतो. दुसरा काल खरा मानला तर माधवाचें वय कमींतकमी ५२ वर्षांचें होईल, तेवीस होणार नाहीं. पहिला खरा मानावा तर चवदाव्या शतकाच्या अखेरचा काल चूक आहे, व वाक्य निरर्थक ठरतें. बरें, कथानकांतल्या इतर वर्णनांवरून, प्रसंगांवरून, व्यक्तींवरून काल ठरविण्याचा प्रयत्न करावा तर उलगडा न होतां गोंधळ अधिक होतो. कसा तें पाहूं. " शके १३९८ सालच्या श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारीं विजयनगरच्या पूर्व बाजूस तुंगभद्रेच्या कांठावरील पुरातन 'विरूपाक्षस्वामींच्या' देवळांत......षोडशोपचार पूजा... ......सुरू झाली होती." असें दुसऱ्या प्रकरणाच्या आरंभींच वर्णन आहे. शके १३९८ ह्मणजे सन १४७६ हें साल येतें. १४७६ साल ह्मणजे चवदाव्या शतकाच्या अखेरीचा काल नसून पंधराव्या शतकाच्या अखेरीचा काल ठरतो. १३९८ च्या ऐवजीं १२९८ पाहिजे असें मानावें तर पंडित बदरीनाथ यांच्या घराण्याचें तिसऱ्या प्रकरणांतलें वर्णन निराधार ठरतें. "पंडित बदरीनाथ यांचें घराणें पहिल्यापासून मोठें पराक्रमी आणि सुप्रसिद्ध होतें. त्याचा प्रभाव केवळ युद्धांतच नव्हे, तर व्यापारांतही वेळोवेळीं दिसून येत असे. या कुटुंबांतील मोठमोठे योद्धे रणांगणावर पराक्रम गाजवून नांव कमावून गेले, आणि त्यांनीं अनेक

जहागिरी नेमणुका मिळविल्या, लूट मिळविली, सरकारची जोखमीची कामगिरी बजाविली, इतकेंच नाहीं तर त्या काळच्या धामधुमींत यांनीं व्यापाराच्या मोठमोठ्या घडामोडी केल्या........................
......तात्पर्य, एकवेळ या कुटुंबांत सर्व प्रकारचे कर्ते पुरुष निर्माण झाले होते, आणि संपत्तिही अलोट होती; परंतु थोडक्याच काळानें कांहीं राजकीय घडामोडींनीं, कांहीं व्यापारांत माघार आल्यानें, आणि कांहीं कुटुंबांतील कलहांनीं, यांचें वैभव आतां बहुतेक नामशेष झालें होतें. तें कुटुंब आतां विभक्त होऊन त्याचीं पांचपंचवीस वेगवेगळीं कुटुंबें झालीं होतीं. ....अशा प्रकारें त्या कुटुंबाची वाताहत झाली होती. तरी त्यांतील पुष्कळ लोक अद्यापि श्रीमान् व वजनदार होते. कांहीं बरेच खालावलेले आणि कित्येक तर दरिद्री झाले होते." (पान ३२.) शके १२९८ ह्मणजे सन १३७६ हें साल येतें. सन १३७६ सालीं विजयनगराची स्थापना होऊन फक्त ४० वर्षें झालीं होतीं. व त्या अवधींत पांचपंचवीस कुटुंबें होणें शक्य नाहीं. बदरीनाथांच्या कुटुंबाचें वर्णन सार्थ आहे असें मानावयाचें असल्यास शके १३९८ ह्मणजे सन १४७६ साल हेंच कथारंभाचें वर्ष ठरतें. पण सन १४७६ सालीं कथानकाचा आरंभ धरला तर माधव तेवीस वर्षांच्या ऐवजीं १६३ वर्षांचा होतो! कारण १३१८ सालीं देवगिरीच्या चिंधड्या झालेल्या त्याच्या नजरेस पडल्या आहेत. (प्रकरण चवथें, पान ४६). बरें, माधवाच्या वयाचा प्रश्न बाजूस ठेविला, त्यानें कांहीं तरी माहिती सांगितली असें थोडा वेळ समजलें, तर सन १४७६ सालाबद्दल दुसरी एक अडचण उभी राहते. "हंपीमठ" नांवाच्या बाराव्या प्रकरणांत त्या मठाचे आद्य संस्थापक माधवतीर्थस्वामी अथवा माधवमुनि यांची थोडीशी माहिती दिली आहे, ती याप्रमाणें:"या माधवमुनींच्या प्रसादानें विजयनगरच्या राज्याची स्थापना करण्यापासून तों तें राज्य भरभराटीला येईपर्यंत सर्व व्यवहार मोठ्या अकल्पितपणें उत्तम रीतीनें पार पडले होते. निरनिराळे तीन बलाढ्य आणि पराक्रमी राजे यांच्या हयातींत विजयनगरच्या गादीवर आले, ते सर्व यांचा यथोचित सत्कार करीत आले, आणि स्वामीही वेळोवेळीं त्यांना उत्तम सल्ला देत आले.......................आतां हे पहिले स्वामी समाधिस्थ होऊन कांहीं महिने लोटले होते. स्वामींचे बंधु सायनाचार्य राज्यांत मुख्य प्रधानकीचें काम पहात असत; परंतु त्यांना स्वामींच्या मागें पीठावर न बसवितां, स्वामींच्या एका पट्टशिष्याचीं योजना त्यांच्या जागीं झाली होती. त्यांना दुसरे माधवतीर्थ स्वामी म्हणण्याचा प्रघात असे." (पान १०९—१०). या माहितीवरून काल ठरवूं लागल्यास असें दिसेल कीं, कंप आणि संगम हे दोन राजे हिशोबांत धरले तर माधवतीर्थांची हयात सन १३५६ च्या सुमारास संपते. हे दोन राजे अप्रसिद्ध म्हणून वगळले तर ती सन १३९९ अखेर संपते. पण सन १३८७ हा सायणाचार्यांचा निधनकाल मानला आहे, आणि सायणाचार्य राज्यांत मुख्य प्रधानकीचें काम पाहात असत असें वर्णन केलें आहे; तेव्हां सन १३५५ पासून १३८७ पर्यंतचा काळ ठरतो. कारण सायणाचार्य संगमाचे प्रधान होते, व संगम सन १३५६ सालीं राज्यपदावर होता. (Sewel, pp. 28 & 404) इतक्यावरच गोंधळ संपला असें मात्र होत नाहीं. "विजापूर, कलबुर्गा, गोवळकोंडा, अहमदनगर येथील मुसलमानी अमलांतील हिंदु वकील स्वामींचे—दुसऱ्या माधवतीर्थांचे—शिष्य झाले होते, आणि मुसलमान बादशहांनीं स्वामींच्या संस्थानाला देणग्या पाठविणें, कुशल समाचाराचे खलिते पाठविणें, आणि ते एक अवलिया आहेत असें समजून त्यांना मान देणें वगैरे प्रघात जारीनें सुरू झाले होते." (पान १११) असें हंपीमठ याच प्रकरणांत ह्मटलें आहे. विजापुर, अहमदनगर, गोवळकोंडा हीं राज्यें कलबुर्ग्याचा बहामनी अंमल शाबूद असेपर्यंत स्वतंत्र झालीं नव्हतीं. सन १४६९ मध्यें युसुफ आदिलशहा बहामनी सुलतानाचा गुलाम होता, व तो पुढें येऊं लागला होता. स्वतंत्र राज्य स्थापण्यास प्रथम त्यानें सुरवात केली, व १४८९ पासून १५१० पावेतों राज्य केलें. अहमदनगरच्या पहिल्या सुलतानाची कारकीर्द १४९० ते १५०८ पर्यंतची होती. गोंवळकोंड्याच्या पहिल्या सुलतानानें १५१२ पासून १५४३ पर्यंत राज्य केलें. (Sewel, pp 480-9-10). ह्मणून वर दिलेल्या वर्णनाचा इतिहासाशीं

मेळ पाडतां येत नाहीं.कारण सायणाचार्य व दुसरे माधवतीर्थ यांची आयुर्मर्यादा भलतीकडेच वाढवावी लागते. सायणाचार्य १३८७ मध्यें निवर्तले असतांना त्यांना कर्मांत कमी १४८९ पर्यंत जिवंत ठेवावें लागतें.

विजापूर, अहमदनगर, गोवळकोंडा हीं नांवें नजरचुकीनें घातलीं असें म्हणतां येत नाहीं; कारण विजापूरच्या बादशहाला विजयनगरांत आणला आहे व विजापूरचा उल्लेख अनेक ठिकाणीं केला आहे."विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर येथील बादशहांनीं पाठविलेल्या हिंदु वकिलांचा हा लवाजमा आहे." (पान ६६) असा'महानवमी'उत्सव ह्या पांचव्या प्रकरणांत स्पष्ट उल्लेख आहे. शिवाय त्याच प्रकरणांत पुढील वाक्य आहे:-"गोव्याचे फिरंगी दरसाल हजारों अरबी आणि इराणी घोडे दाभोळेस आणि गोव्यास आणतात. ते आपणास विकत मिळावे, म्हणून या बादशहांच्या आणि आमच्या दरसाल झटापटी होतात. यंदाच्या सालीं गोव्याच्या फिरंग्यांशीं संधान बांधून एकूण एक घोडा मिळविण्याचा आचार्यांचा व्यूह आहे. पहावें पुढें काय होतें तें."(पान ६७). हे आचार्य म्हणजे सायणाचार्य दिसतात. फिरंगी -पोर्तुगीझ-हिंदुस्थानांत आले त्यावेळीं(१४९८)-त्यांना मरून १११ वर्षे झालीं होतीं, आणि गोवें पोर्तुगीझ लोकांनीं सन १५१० सालापूर्वी काबीजही केलें नव्हतें.

आतां आणखी दोन प्रकरणांकडे थोडेंसें लक्ष पुरवून कथानकाची कालमर्यादा ठरविण्याचा खटाटोप बंद करूं.

"राज्यक्रान्ति" ह्या नांवाचें चवदावें प्रकरण आहे. त्याच्या सुरवातीलाच "माधव विजयनगरास येऊन एक वर्ष पुरें झालें नाहीं, तोंच विजयनगरच्या राज्यव्यवस्थेंत एक महत्वाची क्रान्ति घडून आली" असें एक वाक्य आहे. "राजांचे विश्वासघातानें खून करून राजघराण्यांतील दुसऱ्या एकायानें राज्यपद बळकवावें हा प्रकार या अवधींत-गेल्या पन्नास वर्षांत-दोन तीन वेळां झाला," अशीही माहिती दिली आहे. यावरून तरी कथानकाचा काळ ठरवितां येतो कीं नाहीं तें पाहूं. शके १३९८ ह्मणजे सन १४७६, व १३९८ हा आंकडा चुकून पडला असें मानावें तर शके १२९८ ह्मणजे सन १३७६ होतो. सन १३७६ किंवा सन १४७६ सालीं माधव विजयनगरास आला (प्रकरण दुसरें, पानें २२-३०), तेव्हां चवदाव्या प्रकरणांतली राज्यक्रांति सन १३७७ किंवा १४७७ सालाच्या सुमारास घडून आली. शिवाय गेल्या पन्नास वर्षांत असे प्रकार दोन तीन वेळां झाले याचा अर्थ असा होतो कीं, सन १३२७ पासून १३७७ पर्यंत, किंवा सन १४२७ पासून १४७७ पर्यंत, दोन तीन वेळां राज्यक्रान्ति झाली.पण१३२७सालीं विजयनगराची राज्यस्थापनाच झाली नव्हती तर राज्यक्रान्ति होणार कोठून? वास्तव शके १२९८ हें साल चूक असून शके १३९८-सन १४७६ साल-हें बरोबर असावें असें दिसतें.

अखेरच्या राजाचें नांव पाद्यराय व राज्य बळकावणाऱ्याचें नांव नरसिंह असें सांगितलें आहे. पाद्यराय हें नांव प्रौढ देवराय याच्या बदलीं घातलें आहेसें दिसतें. शिलालेखावरून तो १४७६-७७ सालीं गादीवर होता असें दिसतें (Sewel, p. 404). त्याचे मुलगे विरूपाक्ष व राजशेखर हे होते. "विरूपाक्ष अंमळ हूड आहे,तामसी आहे; पण दिलदारही तसाच आहे त्याला तर्क,अलंकार आणि राजनीति मीं शिकविली.माझ्याशीं तर त्याचें आचरण अगदीं विनयशीलपणाचें होतें. निदान मी तरी तो वाईट असें म्हणणार नाहीं!" (प्रकरण चवथें, पान ५६.)-अशी गदाधर शास्त्री यांनीं माहिती दिली आहे. नरसिंहानें १४९०च्या सुमारास राज्य बळकावलें असें स्युएल साहेबांचें अनुमान आहे. (p. 404) यावरून कथानकाचा काळ सन १४७६ पासून १४९० पर्यंतचा आहे असें दिसतें. पण हा काळ मानला तर "विजापूरचा बादशाहा म्हणजे विजयनगरचा पिढीजाद शत्रु, तथापि या वेळीं तो मित्र ह्मणून विजयनगरास आला होता." (पान १३५) ही माहिती निराधार ठरते. विजापूरच्या सुलतानाला विजयनगरचा पिढीजाद शत्रु असें ह्मणतां येत नाहीं. कारण १४८९ त आदिलशाहानें स्वतंत्र राज्य स्थापिलें, व त्याच सुमारास नरसिंहानें राज्य बळकाविलें. विजयनगरचे पिढीजाद शत्रु बहामनी सुलतान होते, व त्यांपैकीं एक विजयनगरला पहिल्या देवरायाच्या कारकीर्दीत आला होता. पहिल्या देवरायाची कारकीर्द सन १४०६ पासून १४१९ पर्यंत

होती. या सुलतानाचें नांव फिरूझशहा असें होतें, आणि त्याला, देवराय हिंदु असून त्यानें आपली मुलगी दिली होती. (Sewel, p.60) बहामनी सुलतानाच्या ऐवजीं विजापूरचा बादशहा अशी चूक झालेली दिसते,व जी गोष्ट १४०६ च्या सुमारास घडली ती १४८९ नंतर घडली अशी दुसरी एक चूक उघड होते. विजापूरचा बादशहा विजयनगराला मित्र किंवा शत्रु म्हणून १५६५ सालच्यापूर्वी कधीं आलाच नाहीं असें इतिहासावरून दिसतें.

पण कथानकाचा काल १४७६ पासून१४९० सालच्या सुमाराचा आहे असें मानण्यास निदान चार अडचणी पुढें येतातः-(१) माधवाच्या म्हणण्याप्रमाणें कथानकाची मर्यादा पांच वर्षांची ठरते. (पान ३०९). (२) फिरंग्यांनीं गोवें १५१० मध्यें घेतलें, तेव्हां त्यांच्यापासून आरबी घोडे १४९० त विकत घेणें शक्य नव्हतें. १४९० सालीं ते हिंदुस्थानांत आले देखील नव्हते. (३) " आपल्या कथानकाचा काल चवदाव्या शतकाच्या अखेरचा आहे " (पान २१) असें स्पष्ट विधान पहिल्या प्रकरणांत आहे. (४) " विजयनगरची स्थापना होऊन आपल्या कथानकाच्या वेळीं फार थोडीं वर्षे लोटलीं होतीं " (पान ६१) असें आणखी एक विधान आहे.

आतां 'महानवमी उत्सव' हें प्रकरण वाचूं लागलें कीं १४७६-१४९० हाही काल चूक आहे असें दिसतें.विजयनगरांतल्या देवालयांची नामावळी देतांना विठ्ठलस्वामी, कृष्णस्वामी, व उग्र नरसिंहाची मूर्ति, हीं नांवें सांगितलीं आहेत. पण स्युएल साहेबांचें पुस्तक वाचून पाहिलें म्हणजे असें दिसतें कीं, विठ्ठलस्वामीचें देवालय बांधावयाला कृष्णदेव रायानें सुरवात केली, व त्याचे मागून अच्युत व सदाशिव या राजांनीं बांधकाम सुरू ठेविलें, आणि १५६५ मध्यें विजयनगर उध्वस्त झाल्यामुळें देवळाचें काम अपुरतें राहिलें (p. 163). तसेंच कृष्णस्वामीचें देवालय कृष्णदेवरायानें सन १५१३ सालांत बांधलें व सन १५२८ सालीं उग्रनरसिंहाची प्रचंड मूर्ति तयार करविली. अशी वास्तविक स्थिति असून "महानवमी" या प्रकरणांत-'हीं सर्व देवालयें त्या काळीं भरभराटींत होतीं.यांतील पुष्कळ देवालयांना मोठमोठीं उत्पन्नें असत, त्यामुळें देवस्थानाची व्यवस्था एकाद्या संस्थानाप्रमाणें चालत असे'(पान६२) इत्यादि वर्णन आहे. 'त्या काळीं' याचा अर्थ विजयनगराच्या स्थापनेनंतर फार थोडीं वर्षे असा आहे. हें ध्यानांत आलें म्हणजे रूपांतरकारांनीं कालविपर्यास केला आहे असें न म्हणतां त्यांनीं नुसता धुमाकूळ माजविला आहे असें म्हणणें भाग पडतें. कारण कथानकाचे तीन काळ होतात. एक चवदाव्या शतकाची अखेर, दुसरा पंधराव्या शतकाची अखेर, व तिसरा सोळाव्या शतकाचा पहिला अर्ध.

इतर विपर्यास.

हा विपर्यास-किंबहुना धुमाकूळ-क्षम्य आहे असें थोडा वेळ मानिलें तरी दुसरे अनेक विपर्यास या ग्रंथांत दृष्टोत्पत्तीस येतात. ते विपर्यास कोणते आहेत तें पाहणें आतां अवश्य आहे.

(१) "सुमारें ५०० वर्षांपूर्वी, म्हणजे ज्या काळीं ही गोष्ट घडली तेव्हां, बालविवाहाची चाल आपल्यामध्यें बहुतेक नव्हती असें म्हटलें तरी चालेल. मुसलमानी अमलांत ही चाल जोरानें प्रचारांत आली असें कित्येक म्हणतात.तें जरी सर्वस्वी खरें नसलें,तरी त्या विधानांत सत्याचा अंश बराच आहे. पौराणिक काळांत बालविवाह झाल्याचीं कित्येक उदाहरणें आहेत; परंतु बहुतेक मुलींचीं प्रौढ वयांतच लग्नें होत, असें सिद्ध करण्यास त्यापेक्षां पुष्कळ जास्त उदाहरणें आहेत. विजयनगरचें राज्य अद्यापि स्वतंत्र होतें. त्याजवर मुसलमानांच्या चालीरीतींचा, किंवा त्यांच्या भीतीचा पगडा अद्यापि बसलेला नव्हता; यामुळें शांताबाई अद्यापि कौमार्यावस्थेंतच होती. प्राचीन काळीं प्रौढविवाहाचा प्रघात सुरू असल्यामुळें मुलास अथवा मुलीस आपल्या विवाहाच्या बाबतींत हल्लींप्रमाणें मौन धरावें लागत नसे. त्याबद्दल बोलणें म्हणजे विनयाचें उल्लंघन करणें, असें कोणास वाटत नसे..." इत्यादि (पान. ४१-४२). बालविवाहाची चाल आपल्यामध्यें म्हणजे कोणामध्यें, दक्षिणी ब्राह्मणांत कीं द्राविडी ब्राह्मणांत तें स्पष्ट नाहीं. कारण बदरीनाथ व शांताबाई द्राविडी आहेत असें वर्णन आहे. माधव मात्र महाराष्ट्रीय आहे. चवदावें शतक म्हणजे

पौराणिक काळ समजावयाचा कीं वैदिक तें समजत नाहीं. पौराणिक काळांत बालविवाहाचीं किल्येक उदाहरणें आहेत, व बहुतेक मुलींची प्रौढ वयांतच लग्नें होत या विधानाला बिलकूल आधार नाही. हें विधान सिद्ध करण्यास जीं उदाहरणें असतील तीं रा. जोशी यांनीं स्वतंत्र निबंधाच्या रूपानें अवश्य प्रसिद्ध करावींत. तोंपर्यंत स्मृतिग्रंथांत जे उल्लेख आहेत ते खरे मानून चालणें व बालविवाहाची चाल बरीच जुनी आहे असें म्हणणें भाग आहे.

(अ.)त्रिंशद्वर्षोद्वहेत्कन्यां हृद्यां द्वादशवार्षिकीम्।
त्र्यष्टवर्षोऽष्टवर्षां वा धर्मे सीदति सत्वरः ॥

(ब.) प्राप्ते तु द्वादशे वर्षे यदा कन्या न दीयते।
-अंगिरा.

(क.)गौरी ददन्नाकपृष्ठं वैकुंण्ठं रोहिणीं ददत्।
कन्यां ददद्ब्रह्मलोकं रौरवं तु रजस्वलाम् ॥
-पराशर माधवोद्धृत मरीचिवचनम्

(ड.)अष्टवर्षा भवेद्गौरी नववर्षा तु रोहिणी।
दशवर्षा भवेत्कन्या अतउर्ध्वं रजस्वला ॥
-कश्यपः

(ख)त्रिंशद्वर्षो दशाब्दांतु भार्यां विन्देत नग्निकाम्
एकविंशतिवर्षो वा सप्तवर्षामवाप्नुयात् ॥
-बृहस्पति.

याशिवाय मनुस्मृतींत चार पांच उल्लेख आहेत. रा. जोशी यांनीं J. C. Ghose यांच्या Hindu Law ह्या पुस्तकांतला विवाहासंबंधींचा भाग व Indian Social Reform या पुस्तकांतला आनंदाचार्लू यांचा लेख हे पुनः एकवार पहावेत, म्हणजे पौराणिक काळीं बहुतेक मुलींचे विवाह प्रौढपणीं होत असत हें म्हणणें किती भ्रमकारक आहे तें त्यांना समजेल. निवळ रूपांतराच्या सोयीसाठीं, किंवा बालविवाह सुधारकांना संमत नाहीं म्हणून, इतिहासाची ओढाताण करणें इष्ट नाहीं. बालविवाहाची चाल जुनी आहे म्हणून प्रौढविवाहासारख्या सुधारणेला कमीपणा येतो असें कोणालाही वाटण्याचें कारण नाहीं. सुधारणेचा पाया न्याय हा आहे, रूढि हा नाहीं, हें स्वतः सुधारकांनीं विसरतां कामा नये. इतिहासाचा विपर्यास करून सुधारणेच्या कार्यास कधींही बळकटी यावयाची नाहीं.

(२.) "दरबारी मंडळीला मेजवानीचाही बेत होता. अशा प्रसंगीं विजयनगरांत त्या काळीं देखील मद्यपानाचा प्रघात जारीनें सुरू होता. इराणांतून आलेले मोलवान मद्यांचे बुंदे अशा प्रसंगीं खुले करून त्यांचा यथेच्छ आस्वाद घेण्याचा शिष्टाचारच बनला होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं."(पान २१८) मद्यपान करण्याचा शिष्टाचारच बनला होता, या विधानाला रा. जोशी यांच्यापाशीं काय पुरावा आहे तें आम्हांला माहीत नाहीं. आह्मांला असला पुरावा आढळला नाहीं. या मेजवानीनंतरच्या मद्यपानाच्या प्रसंगीं सायणाचार्यांना हजर ठेविलें आहे. त्यांच्याकडून मद्यप्राशन जरी करविलेलें नाहीं तरी अशा वेळीं सायणाचार्यांसारख्या महापंडिताला हजर ठेवणें हें फार अनुचित आहे युरोपांत मद्यप्राशनाला मुभा आहे, इतकेंच नव्हे तर मोठमोठ्या प्रसंगीं सभ्य गृहस्थ देखील मद्य घेतात. पण हिंदुधर्मांत त्याला निषेध आहे. असें असून रूपांतराच्या सोयीसाठीं सायणाचार्यांना अशा मंडळीच्या सोबतींत ठेवणें ह्मणजे त्यांची नालस्ती करण्यासारखें आहे. सायणाचार्यांबद्दल, त्यांच्या विद्वत्तेबद्दल, नव्याजुन्यांना, सर्वांना आदर वाटतो. ह्मणून त्यांच्यावर असा आरोप करण्यापूर्वी कांहीं तरी बळकट आधार पाहिजे होता. तसा रा. जोशी यांच्याजवळ आहे, असें आह्मांला वाटत नाहीं. इतिहासप्रसिद्ध व्यक्तींबद्दल फार जपून विधानें केलीं पाहिजेत हें उघड आहे.

(३.)याचप्रमाणें माधवाचार्यांचें वर्णन इतिहासाला सोडून आहे. माधवाचार्य यांना माधवमुनि किंवा माधवतीर्थ असें नांव दिलें आहे. हे विद्यारण्यस्वामी या नांवानें प्रसिद्ध आहेत. ते शृंगेरीच्या पीठावर अधिष्ठित झाले होते. त्यांची विद्वत्ता नांवाला अनुरूप होती. त्यांचा 'पंचदशी' हा ग्रंथ विश्रुत आहे. असें असून "पहिल्या माधव मुनींना अद्वैतमत संमत नसे, यामुळें या शहरांत असलेल्या शंकराचार्यांच्या पीठावरील स्वामींचें आणि त्यांचें कधीं नीटसें जुळत नसे" (पान १११) ही माहिती कोणत्या आधारानें दिली आहे कोण जाणे. पंचदशीकाराला अद्वैतमत संमत नव्हतें हें जरा विलक्षण दिसतें. आणि जे स्वतः शृंगेरीच्या पीठावर बसले त्यांचें व विजयनगर शहरांतल्या शंकरा-

चार्यांच्या पीठावरील स्वामींचें जुळत नसे-ह्मणजे विद्यारण्य स्वामींचे या काल्पनिक पीठावरील स्वामींशीं जुळत नसे असा अर्थ होतो. विजयनगर शहरांत शंकराचार्यांचा मठ नव्हता. एक मठ जो होता त्याला हंपीमठ हें नांव कथानकांत दिलें आहे. शिवाय माधवाचार्यापेक्षां—विद्यारण्यस्वामींपेक्षां, पंचदशीकारांपेक्षां, दुसरे माधवतीर्थ हे काल्पनिक स्वामी " वादविवादांत अंमळ अधिक तरतरीत व प्रवीण होते—" (पान १११) असें ह्मटलें आहे. रूपांतराकरितां असें करण्याची जरूरी होती हें दाखविणें सोपें नाहीं. " पहिल्या माधव मुनींना अद्वैतमत संमत नसे—" या वाक्यावरून माधवाचार्य व द्वैतमताचे पुरस्कर्ते मध्वाचार्य यांच्या नांवाचा घोंटाळा झाला आहे कीं काय असें वाटूं लागतें. पण, एक तर, मध्वाचार्यांच्या वेळीं विजयनगर नव्हतें; व दुसरें, त्यांना सायनाचार्य या नांवाचे बंधु नव्हते. ह्मणून माधवाचार्यांचें वर्णन इतिहासाला अगदीं सोडून आहे हें उघड होतें.

(४) बद्रीनाथांचें वर्णन करितांना त्यांनीं महाप्रयासानें एक पुस्तकसंग्रह व एक वस्तुसंग्रह तयार केला होता असें ह्मटलें आहे. हिंदुस्थानांत पुस्तकांचा पोथ्यांचा संग्रह विद्याव्यासंगी लोक करीत असत हें प्रसिद्ध आहे. पण पोथ्यांशिवाय इतर पुराणवस्तूंचा-मूर्ति, पुतळे, शिलालेख यांचा-संग्रह कोणी करीत असल्याचें आमच्या वाचण्यांत किंवा ऐकिवांत नाहीं. गतकालाविषयींची माहिती मिळविण्याची खटपट कोणी केल्यास ती धर्मशास्त्र व व्यवहारशास्त्र एवढ्यांपुरतीच असे; इतर बाबतींत फारशी कळकळ नसे ह्मणून, आणि काळ फार धामधुमीचा होता ह्मणून,पुराण वस्तूंचे जुने संग्रह हिंदुस्थानांत आढळत नाहींत. युरोपांत जसें पंधराव्या शतकांत विद्यांचें पुनरुज्जीवन झालें त्यासारखें हिंदुस्थानांत मागच्या शतकापासून " उद्बोधन " (Awakening) मोठ्या प्रमाणावर सुरू झालें आहे. हल्लीं देखील खासगी पुस्तकांचा संग्रह करणारे थोडे आहेत; मग पुतळे, मूर्ति, शिलालेख यांची गोष्ट तर बाजूलाच राहूं द्या !

चवदाव्या, किंवा पंधराव्या, किंवा सोळाव्या शतकांत—कथानकाचा काल यांपैकीं कोणताही मानिला तरी—जें मुसलमानांच्या येण्यानें, त्यांच्या संस्कृतीच्या प्रभावामुळें उद्बोधन झालें तें, धर्माच्या बाबतींत व आचारविचारांत झालें. त्यामुळें सर्व विद्यांना चालन मिळालें नाहीं, नवी दृष्टि फारशी आली नाहीं, ह्मणून युरोपांत झाल्याप्रमाणें आमच्या इकडे विद्यांचें पुनरुज्जीवन झालें नाहीं. वर ह्मटल्याप्रमाणें तें हल्लीं सुरू आहे असें ह्मटल्यास चालेल. एकूण काय बद्रीनाथांनीं पुस्तकांशिवाय–पोथ्यांशिवाय--इतर पुराणवस्तूंचा संग्रह करणें संभवनीय नव्हतें. शिवाय त्यांचा पुस्तकसंग्रह कागदांवर होता असें ह्मटलें आहे. " प्रथम त्याची–ग्रंथाची--जाडी किती हें त्यानें-बद्रीनाथानें पाहिलें आणि त्याच्या कागदाचा गुळगुळीतपणा अद्यापि कायम आहे किंवा कोठें कसर लागली आहे...इ०"(पान ३६)पण त्या काळीं विजयनगरांत कागद उपयोगांत आणूं लागले नव्हते. Conti या नांवाचा एक प्रवासी पंधराव्या शतकांत १४२०-१ हिंदुस्थानांत आला होता. त्यानें विजयनगर पाहिलें होतें. तो आपल्या प्रवासवर्णनांत ह्मणतो. The inhabitants of Cambay alone use paper, all other Indians write on the leaves of trees " (Sewel. p. 87) यावरून विजयनगरांत ताडपत्राचा उपयोग करीत असत हें उघड दिसतें. तेव्हां बद्रीनाथाला कागदाचा गुळगुळीतपणा हातांनीं पाहतां येणें शक्यच नव्हतें. "मूलं नास्ति कुतः शाखाः"अशी स्थिति होती.

(५) पोर्तुगीज प्रवासी फर्नाओ नूनिझ याच्या बखरीवरून विजयनगराच्या इतिहासाची माहिती घेतली आहे, असें प्रस्तावनेंत ह्मटलें आहे. पण त्याच बखरींत " for in this country they do not put Brahmans to death but only inflict some punishment so that they remain alive. (Sewel, p. 361) असा स्पष्ट उल्लेख असून देखील रूपांतरकारांनीं सोयीखातर गदाधर शास्त्री या ब्राह्मणाला हत्तीच्या पायीं दिलें आहे ! " हत्तीच्या पायाशीं " हें चाळिसावें प्रकरण पहा. गदाधरशास्त्र्याचा अपराध कृष्णदेवराय याचा मुख्य प्रधान साळुव तिम्म याच्या अपराधापेक्षां अधिक गंभीर स्वरूपाचा नव्हता. कृष्णदेवरायानें १५०९ पासून १५-३० पर्यंत राज्य केलें. त्याला एकच मुलगा होता. या

युवराजाला विष घालून साळुव तिम्म यानें अपघातानें मारलें असून राजानें फक्त त्याची निर्भत्सना करून वस्त्रें काढून घेतलीं, व त्याला आणि त्याच्या मुलांना कैदेंत टाकलें. पुढें एक पळून गेला व त्यानें बंडाचें निशाण उभारलें. त्याला पकडण्याला बरेच प्रयास पडले. असें असून देखील त्याला पाडाव करून पकडल्यानंतर बापलेकांचे कृष्णदेवरायानें फक्त डोळे काढण्याचा हुकूम केला. त्यांचा जीव घेण्याचें त्यानें मनांत आणलें नाहीं. निदान आणिलें असल्यास तसा हुकुम केला नाहीं. जी शिक्षा कृष्णदेवरायासारख्या बलाढ्य व प्रतापी राजाला देतां आली नाहीं, किंवा त्यानें दिली नाहीं, ती शिक्षा रूपांतरकारांनीं गदाधर शास्त्री या ब्राह्मणाला बेधडक दिली आहे, इतकेंच नव्हे तर ती अंमलांत ही आणून दाखविली आहे!

(६) " विजयनगरांतील एक दंगा " या प्रकरणांत रूपांतरकारांनीं मठावर गोळीबार करविला आहे. ज्या शहरांत किती जरी मोठा अपराध केला तरी ब्राह्मणाला देहान्त शिक्षा होत नसे त्या शहरांत चवदाव्या किंवा सोळाव्या शतकांत हिंदुधर्माचे लोक मठावर हल्ला करितील हें शक्य दिसत नाहीं. शिवाय शस्त्राकरितां दारूचा उपयोग त्याकाळीं होत होता कीं नाहीं याची शंकाच आहे. उडणारी दारू युद्धांत प्रचारांत नव्हती व बंदुकाही माहीत नव्हत्या, असें रायचूरच्या वेढ्याच्या हकीकतीवरून दिसतें. रायचूरचा किल्ला कृष्णदेवरायानें सन १५२० सालीं घेतला' किल्ला सर करण्यांत पोर्तुगीझ लोकांची त्याला बरीच मदत झाली. या पोर्तुगीझ लोकांनीं आपल्या बंदुकांनीं तटावर कोणी माणूस दिसला कीं त्याला गोळीनें पाडून मुसलमानांना दहशत बसविली. बंदुकांचा उपयोग जर सर्वांना माहीत असता तर कृष्णदेवरायाच्या हिंदुसैन्यानें व विजापूरच्या सुलतानाच्या मुसलमान सैन्यानें त्या शस्त्रांचा उपयोग केला नसता काय?

आतां हे विपर्यास बाजूला सोडून विसंगत वर्णनांकडे वळूं.

[विसंगत वर्णनें.]

आशांकुराचा उद्गम. (पान ५७)

(१)" हें घराणें माधवमुनींनीं हातीं धरिलें. पांच पन्नास वर्षांत हें भव्य शहर एका रानांत उठविलें, गोदावरीच्या मुखापर्यंत सर्व दक्षिणेंत आपला अंमल प्रस्थापित केला,............................"

महानवमी उत्सव. (पान ६३.)

कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व भाग आतां रामेश्वरापर्यंत त्याच्या स्वाधीन झालेला होता. "

कृष्णा आणि गोदावरी यांच्या मुखामधील प्रदेश बराच मोठा व सुपीक आहे. तो पहिल्यानें विजयनगरच्या ताब्यांत होता व मग गेला,असें झालें नाहीं. सोळाव्या शतकापर्यंत ह्या मुलखावर त्या शहराचा ताबा नव्हता असें ह्मटल्यास चालेल.

बंदीवान (पान १४४.)

(२) "इतक्यांत गळयांत एक तुटकी दोरी अडकविलेला एक वृद्ध मनुष्य उघडा बोडका त्या गर्दींतून पुढें धांवत आला."

माधवतीर्थांचें प्रवचन (पान १४८.)

" मेरुशाक्ष्यांच्या गळयांत तें जाड चऱ्हाट तसेंच लोंबत होतें. "

एक तुटकी दोरी—आणि जाड चऱ्हाट !

(पान १५१.)

(३) " घडा भरतांच तो आपलें सुदर्शन फेंकून दुष्टांना दंडिल्यावांचून रहात नाहीं. " माधवतीर्थ शंकरभक्त आहेत, प्रवचन पंपापति स्वामीच्या देवालयांत आहे, ह्या गोष्टी ध्यानांत न राहून शंकराला त्रिशूळाच्या ऐवजीं सुदर्शन हें शस्त्र दिलें आहे.

(पान १५३.)

(४) हे रावणकुंभकर्णादिहनना, हे कंसचाणूरमर्दना, भगवन् नरसिंहा........" हीं संबोधनें शंकराला शोभत नाहींत. त्यानें ते पराक्रमही केलेले नाहींत, आणि नरसिंह हें त्याचें नांवही नव्हे. शैव व वैष्णव यांचा लढा अजून देखील फारसा मिटलेला नाहीं; चवदाव्या, पंधराव्या किंवा सोळाव्या शतकांत एकादा शंकरभक्त आपल्या प्रार्थनेंत विष्णूच्या अवतारांचीं नांवें उच्चारील हें संभवनीय दिसत नाहीं.

ती दुसरी बायको. (पान २९५-६.)

(५) " काशिक्षेत्रस्थ श्री विश्वेश्वरासंनिध महाराजांचें कुशल चिंतून निवास करणाऱ्या समस्त ब्रह्मवृंदांनीं " विजयनगरच्या महारायाला लिहिलेल्या पत्रिकेंत खालील उपमा दिल्या आहेत. " गोपाल,

कृष्णानें गोवर्धन पर्वत करांगुलीनें उचलला, त्याप्रमाणें राजा! तूं ऋषिप्रणीत सनातन धर्माचा बोजा लीलेनें उचलीत आहेस. गोपालकृष्णाप्रमाणेंच तुझ्या अंतःपुरांत हजारों स्त्रिया तुझें दास्य करीत आहेत. तुझी शिरीषकुसुमाशीं स्पर्धा करणारी कृष्णच्छविहि तेंच सादृश्य दृढतर करीत आहे. तस्मात् राजराजेश्वर! तूं प्रत्यक्षच गोपाल कृष्ण अवतरला आहेस असें कोण ह्मणणार नाहीं?"

श्री काशीविश्वेश्वरासन्निध राहणारे ब्रह्मवृंद वैष्णव किंवा कृष्णभक्त असल्याशिवाय असल्या शेलक्या उपमा त्यांना सुचणार नाहींत. शिवाय विजयनगरच्या महारायाला—माधवानंदाला—बहिष्कृत करण्याचें पत्र काशी इतक्या दूरवर पल्ल्यावरून न पाठवितां कुंभकोणम्हून पाठविलें असतें तर साहाजिक दिसलें असतें. गोदावरीच्या मुलुखाला जशी काशी तसें खालच्या मुलुखाला कुंभकोणम्, हें रा. जोशी यांच्या ध्यानांत राहिलेलें दिसत नाहीं. शिवाय विजयनगर शहर व तेथले महाराय यांचा विद्यारण्यस्वामींमुळें शृंगेरीशीं विशेष संबंध होता शंकराचार्यांची जीं चार पीठें आहेत त्यांना मर्यादा आंखून दिलेल्या आहेत, त्यांचें अतिक्रमण पीठावरील स्वामी सहसा करीत नाहींत. माधवानंदाला जर बहिष्कार घालावयाचा होता तर शृंगेरीच्या स्वामींनीं तो घातल्यास विशेष शोभला असता. कारण "हंपीमठ" या प्रकरणांत "हल्लींचे स्वामी पहिल्या स्वामीपेक्षां वादविवादांत अंमळ अधिक तरतरीत व प्रवीण होते, यामुळें शृंगेरी पीठावरील आचार्यांचें, आणि त्यांच्या शिष्यांचें या नव्या माधवतीर्थ स्वामींशीं जास्तच पटेनासें झालें होतें." (पान १११) असें वर्णन रूपांतरकारांनीं केलें आहे.

विजयनगरच्या राजांना महाराज ह्मणत नसत, राय किंवा महाराय ह्मणत असत. त्यांना लिहिलेल्या पत्रिकेंत स्वकपोलकल्पित विशेषणांपेक्षां एकाद्या शिलालेखांतील उताऱ्यांतलीं विशेषणें दिलीं असतीं तर बरें झालें असतें. नरसिंह राज्यारूढ होण्यापूर्वीचा त्याच्यासंबंधींचा उतारा स्युएल यानीं आपल्या पुस्तकांत १०८ पानावर टीपेंत दिला आहे. तो जशाच्या तसा जरी दिला असता तरी काम भागलें असतें. "महामंडलेश्वर मेदिर्नाश्वर गंडन कट्टारि साळुव धरणावराह नरसिंहराय उदेयर" या उताऱ्यांत कुचेष्टेची झांक मारीत नाहीं. रा. जोशी यांनीं दिलेल्या उपमांत तशी झांक मारते यांत शंका नाहीं.

विजयनगरांतील एक दंगा (पान ३२९.)

(६) "या संधीला गुरुद्वादशी आली. त्या दिवशीं स्वामींचे सर्व शिष्य पंपापतीच्या देवालयांत सायंकाळीं तीर्थप्रसादासाठीं जमले." गुरुद्वादशी दत्तभक्त पाळतात, शंकरभक्त पाळीत नाहींत, अशी आमची समजूत आहे. द्वादशी, एकादशी ह्या तिथि शंकराच्या नव्हत, विष्णूच्या आहेत; व वैष्णवच त्या पाळितात. शंकराच्या देवालयांत गुरुद्वादशीचा प्रसाद आह्मी नव्यानेंच ऐकत आहें.

विवाहनिश्चय. (पान ९१)

(७) "आपली योग्यता प्रेम करण्यासारखी नाहीं असें आपल्याला कसें वाटलें? उलट माझीच योग्यता आपल्यापेक्षां फार कमी आहे, त्यामुळें आपण मला पदरांत घ्याल तर मी आपणाला मोठी नशीबवान समजेन.!" पदरांत घ्याल तर नशीबवान समजेन, हा भाग मूळांत नाहीं. रा. जोशी यांनीं तो पदरचा घातला आहे. मूळांत नसण्याचें कारण उघड आहे. रोमोला ही खरोखरच प्रौढविवाह रूढ असलेलेल्या देशांत, समाजांत, वाढलेली होती. रूपांतरांतली ब्राह्मणाची मुलगी शांता कथानकाच्या सोयीसाठीं मोठी वाढविली आहे. व तेवढ्याचकरितां प्रौढ विवाहाचा प्रघात होता असें प्रतिपादन केलें आहे. प्रौढ विवाह जेथें रूढ असतो तेथें सुशिक्षित व मानी स्त्रीच्या तोंडांतून असली फाजिल विनयाची, केविलवाणी उक्ति येत नाहीं. प्रत्येक स्त्रीनें लग्न केलेंच पाहिजे असा निबंध असणाऱ्या समाजांत पुरुषांची किंमत विनाकारण वाढते. "चरणाची दासी" होऊन धन्य वाटणाऱ्या एकाद्या कोंवळ्या पोरीच्या तोंडीं वर दिलेले उद्गार शोभतील.

(पान ९५)

तसेंच "तुझा माधवाशीं विवाह झाला तर तुला बरें वाटेल काय? तो तुझ्या मनास येतो होय?" असें बदरीनाथांनीं विचारलें." अशा वेळीं शांताबाईनें प्रत्यक्ष शब्दांनीं आपली पसंती व्यक्त न करितां नुसतें हंसून किंवा मान हालवून ती व्यक्त केली असती तर

स्वाभाविक झालें असतें; परंतु बाप अंध आहे, त्याला करपल्लवी, नेत्रपल्लवी किंवा त्यासारख्या तरुण कामिजनांच्या भाषा समजणें अशक्य आहे हें तिला माहीत होतें. येथपर्यंत ठीक आहे. पण लागलेंच पुढचें वाक्य गोंधळ उडवितें " शिवाय, लहानपणापासून तिला जें शिक्षण मिळालें होतें, त्यांत असल्या बाबतींत लाजण्याचा प्रघात आहे, हें ती शिकली नव्हती. " प्रौढपणीं लग्नें होणाऱ्या स्त्रियांत लहान पोरींप्रमाणें लाजण्याचा रिवाज असतो, असें सुचविणें विसंगत आहे. तसेंच भेटावयाला ' पुरुषमंडळी ' आली असतां पलायन करावयाचा रिवाज बालविवाह व पडदा या दोन चालींनीं पडलेला दिसतो. तेव्हां शांताबाईला जर बापाला भेटावयाला कोणी आल्यास त्याच्याजवळ हजर राहण्यांत धन्यता वाटत असे तर "तिला अद्यापि लौकिकाचें वारें फारसें लागलें नव्हतें " (पान ४४) असें म्हणण्याचा हेतु काय कोण जाणे. या विसंगत गोष्टीमुळें एवढें मात्र दिसतें कीं कथानकाच्या काळीं प्रौढविवाहाचीं पुष्कळ उदाहरणें असत असें जें रा. जोशी यांनीं म्हटलें आहे त्याला इतिहासाचा फारसा आधार नसून, फक्त रूपांतराच्या सोयीसाठीं त्यांनीं तसें म्हटलें आहे.

(८) संन्याशी आणि गोसावी एक समजून सर्वत्र घोंटाळा झाला आहे.

पंडित आणि त्यांची कन्या (पान ४०.)

" पण कारटा संन्यासी झाला, संन्यासी! उपास तापास, तीर्थयात्रा, देहदंड, पंचाग्निसाधन करणार! हात उंच करून वाळवून टाकणार, एका पायावर उभा राहून तपश्चर्या करणार, वर खिळे ठोकलेल्या शय्येवर निजणार, आणि परमेश्वराचा साक्षात्कार झाल्याशिवाय मागें हटणार नाहीं, आणि आपल्या आप्तांस भेटणार नाहीं म्हणतो! हा मूर्खा! ....

..................................या कार्ट्याला या गोसावड्यांनीं नादीं लाविला आणि त्याच्या आणि माझ्या जन्माचें वाटोळें केलें. अरे, संन्यास आणि योग हीं अर्वाचीन काळचीं मूढांनीं काढिलेलीं ढोंगें, हें तुला करूं नये, मग मजजवळ शिकलास तें काय? याच्या पूर्वीं हजारों वर्षें गेलीं तेव्हां नाहीं कोठें हीं ढोंगें पुढें आलीं?"

एवढा लांबलचक उतारा देण्याचें कारण इतकेंच कीं संन्यासी व गोसावी बैरागी यांचा रा. जोशी यांनीं केलेला गोंधळ वाचकांच्या नीट लक्षांत यावा. पंचाग्निसाधन करणें, हात वाळविणें, खिळ्याच्या बिछान्यावर निजणें,-बैरागी करतात.संन्यासी करतात असें आमच्या ऐकिवांत देखील नाहीं. संन्याशाला गोसावडा म्हणणें अगदीं गैर आहे. संन्यास आणि योग हीं अर्वाचीन काळचीं मूढांनीं काढिलेलीं ढोंगें असें म्हणणेंही गैरशिस्त आहे. बैरागी, गोसावी, अघोरी असल्या लोकांविषयीं पुष्कळजणांना आदर वाटत नाहीं. पण तसें संन्याशाबद्दल नाहीं. भांग गांजा अफू वगैरे मादक पदार्थांचें सेवन करण्याविषयीं त्यांची प्रसिद्धि नाहीं. (पान १२७) संन्याशांचें असें वर्णन करणें म्हणजे त्यांची नालस्ती करणें होय.

तसेंच संन्याशांत पंथ नाहींत. कारण गृहस्थाश्रमाप्रमाणें संन्यास हा एक आश्रम आहे. संन्याशांला मठही नाहींत. आद्य शंकराचार्यांनीं धर्मव्यवस्थेसाठीं चार पीठें स्थापन केलीं, त्यामुळें त्यांचे मठ आहेत. पण बाकीच्या संन्याशांना मठ नाहींत. सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेणाऱ्याला मठ कोठला? यास्तव "विजयनगरांत स्वमीच्या विरुद्ध पंथाचे दुसरे संन्यासी आणि दुसरे मठ होते" (पान ३२९) हें वर्णन कांहींसें चमत्कारिक भासतें.

उद्बोधानंद या संन्याशाच्या सामग्रीचें वर्णन करितांना "एक लहानशी गंगाजळीची गिंडी, एक चांदीची झारी, एक काळी कुबडी व जपाची माळ हे जिन्नस जवळच एका चौरंगावर ठेविले होते " (पान ११३) असें सांगितलें आहे. पण संन्याशाला अवश्य दंडकमंडलु वर्णनांत कोठेंही नाहींत. त्याच्याऐवजीं चांदीची झारी व काळी कुबडी दिली आहे! कुबडी रामदासांनीं ध्यानस्थ बसायला साधन म्हणून प्रचारांत आणिली हें रूपांतरकार विसरले असें दिसतें.

ती दुसरी बायको ! (पान २९६).

(९) माधवानंदांना बहिष्कृत करण्याचीं कारणें जीं श्री काशीश्वरासन्निध राहणाऱ्या ब्रह्मवृंदानीं दिलीं आहेत तीं आश्चर्यकारक आहेत यांत बिलकुल संशय नाहीं.

" तुझ्या राजधानींत माधवानंद अथवा माधवतीर्थ नांवाचा एक नामधारी संन्यासी आश्रयधर्माप्रमाणें वागत नाहीं, चांडाळादिकांनाही स्पर्श करितो, आणि संन्यासधर्माला निषिद्ध आचरण करितो, त्याला आह्मी बहिष्कृत केलें आहे, आणि तुह्मीही त्याला यथोचित शासन करावें.................." एकाच पत्रांत " तुझ्या " व " तुह्मी " एकाच व्यक्तीला लावणें विसंगत आहे, पण त्याच्याकडे विशेष लक्ष देण्याचें प्रयोजन नाहीं. बहिष्कारासाठीं जीं कारणें दाखविलीं आहेत तीं कोणालाही पटण्यासारखीं नाहींत. " आश्रमधर्माप्रमाणें वागत नाहीं " ह्मणजे काय ? कथानकानें त्याचा खुलासा होत नाहीं. "चांडालादिकांनाही स्पर्श करितो " ह्मणजे आश्रमधर्माचें उल्लंघन करितो असें ह्मणावें तर संन्याशाला स्पर्शास्पर्शाचे निर्बंध लागू नाहींत. संन्यास धर्माला निषिद्ध आचरण करितो तें कोणतें त्याचाही खुलासा होत नाहीं. बहिष्कृत करण्यास विशेष पात्र असें संन्याशाचें आचरण ह्मणजे स्त्रियांशीं सलगीनें वागणें हें होय. राजकीय बाबतींत मन घालणें हा गुन्हा मानिलेला नाहीं. असता तर खुद्द माधवाचार्यांना–विद्यारण्य स्वामींना–बहिष्कार घालावा लागला असता. माधवतीर्थ स्त्रियांशीं सलगी ठेवीत असत, मग ती खरोखर दोषार्ह असो कीं लोकांच्या दृष्टीनें असो, असें कथानकांत दाखविलें नाहीं. दुष्काळ पडला असतांना दयाधर्मानें प्रेरित होऊन गरीबगुरिबांना, चांडाळादिकांनाही संन्याशानें स्पर्श करणें हा गुन्हा आहे, हें वर्तन बहिष्कारास पात्र आहे, असें सनातन धर्माचे कट्टे पुरस्कर्ते देखील मानीत नाहींत. स्पर्शास्पर्शाचे, अन्नोदकाचे निर्बंध गृहस्थाश्रमी माणसाला लागू आहेत; संन्याशाला नाहींत. माधवाचार्यांच्या पाठीमागून माधवतीर्थ पीठावर बसले. तेव्हां गुरुप्रमाणें शिष्यही परमहंस, व परिव्राजक होते असें समजण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. संन्यासी व गोसावी यांचा घोंटाळा झाल्यामुळें, संन्याशाबद्दल भलभलतीं विधानें करण्याचा रूपांतरकारांवर प्रसंग आलेला दिसतो.

येथपर्यंत ऐतिहासिक कादंबरी या दृष्टीनें "केवळ स्वार्थापार्थी " या कथानकाचें विवेचन केलें. कारण " विजयनगरच्या इतिहासाचा समजून उमजून कोठेंही विपर्यास केलेला नाहीं " (प्रस्तावना पान १५) असें रा. जोशी यानीं आश्वासन दिलें आहे. तें आश्वासन पोकळ आहे असें आतांपर्यंतच्या विवेचनानें ठरतें. आतां " रोमाला " ची प्रतिकृति या दृष्टीनें या कादंबरीचें परीक्षण करणें अवश्य आहे.

[पुढील अंकांत संपूर्ण.]

उदच् व अवाच्.

[गेल्या महिन्याच्या 'साहित्यपत्रिकें'त 'उदच् आणि अवाच्' या दोन शब्दांवरून काय काय अनुमानें काढतां येतात तें रा. मोडक यांनीं आपल्या लेखांत दाखविलें होतें. त्या लेखास उद्देशून आमचे विद्वान मित्र रा. 'क्ष' यांनीं पुढील छोटासा लेख पाठविला आहे.—**संपादक**]

प्राच् व प्रत्यच् या दोन दिशांचीं नांवें सूर्याच्या गतीवरून जर पडलीं आहेत, तरी उदच् व अवाच् या दिशांचीं नांवें सूर्यावरूनच घेतलीं पाहिजेत; व तीं तशीं सहज निघतात. उत्तर गोलार्धांत राहणारे लोकांस सूर्य नेहमीं उत्तरेकडे उंच जातांना दिसतो व दाक्षिणायनांत दक्षिणेकडे निम्न गेलेला दिसतो; याजवरून हीं नांवें त्या त्या दिशांस पडलीं हें उघड आहे. यांचा संबंध निम्नोन्नत भूमीशीं नाहीं असें दिसतें. शिवाय, उत्तर ध्रुवाजवळ हीं नांवें तर अधिकच अन्वर्थक होतात. कारण तेथें सूर्य कित्येक महिने दक्षिणेच्या अगदीं खालीं जातो, व उगवल्यावर तो उत्तरेकडे जाऊन बराच वर येऊन कित्येक दिवस क्षितिजावरच राहतो. तात्पर्य, या शब्दांवरूनच अनुमान काढावयाचें तर तें उत्तरध्रुवाजवळील आर्यांच्या वसतिस्थानालाच अधिक बळकटी आणणारें आहे. "क्ष"

मातोश्री.

एकदां माडीवरील एका उघड्या खिडकी-जवळ एक **मातोश्री** एकटीच बसली होती. खालीं आंगणामध्यें बकुळीच्या झाडाखालीं मुलांच्या खेळण्याचा गोंगाट खिडकींतून आंत ऐकूं येत होता, व केव्हां केव्हां खिडकींतून दुपारच्या अर्धवट कोंबट वाऱ्याच्या लहरी मधून मधून आंत शिरत होत्या. मातोश्रीपुढें पाट असून त्यावर ती कांहीं निवडीत होती; जवळच बाजूला कांहीं अर्धवट बेतलेलीं व अर्धवट शिवलेलीं अशीं चिमकुलीं आंगडींटोपडीं अस्ताव्यस्त पडलीं होतीं; आणि मातोश्रीच्या मांडीशीं शिवलीलामृताची पोथी अर्धवट उघडलेली अशी होती. टिपतां टिपतां मातोश्रीचे डोळे जड पडत चालले, मुलांच्या खेळण्याचा धिंगाणा कमी जोरानें ऐकूं येऊं लागला, आणि मातोश्रीचा हातही पण अधिक मंदपणेंच टिपूं लागला. या सुमारास फुललेल्या बकुळीच्या वासानें लोभावलेल्या कित्येक मधमाशा घोंगावत घोंगावत खिडकींतून आंत शिरल्या व त्यांपैकीं कांहीं अर्धवट झोंपेची झांपड पडलेल्या मातोश्रीच्या तोंडाभोंवतीं घुमूं लागल्या. एका हातानें त्यांना वारीत आणि दुसऱ्या हाताच्या भारावर जरा भिंतीशीं टेंकून, हाताच्या आडोशानें डोळ्यांवरील उजेड कमी करून, मातोश्री झोंपेची झांपड कमी होईपर्यंत पाठीमागें आंगाचा भार टाकून कांहींशी स्वस्थपणें टेकली. अशा प्रकारें विश्रांति घेत असतां मुलांच्या धिंगाण्याचा आवाज हळू हळू कमी होत होत कित्येकदां तो मातोश्रीस स्वप्नसदृश भासूं लागला, व कांहीं वेळानें तर ऐकूंही येईनासा झाला. इतक्यांत तिच्या उदरांतला नववा गर्भ स्फुरण पावूं लागला. ह्मणून तिकडेस मातोश्रीचें चित्त लागलें असतांना व डोळ्यांवरची झांपड कायम असतां, मधमाशांचें तें तिच्या तोंडाभोंवतीं घोंगावणें सुरू असतांना, मातोश्रीला आपल्या स्मृतिपटावर एक विलक्षण चित्र दिसूं लागलें. तिला दिसलें कीं आपणाभोंवतीं घिरट्या घालणाऱ्या मधमाशा एकाएकीं वाढत वाढत माणसांसारख्या मोठ्या झाल्या, आणि आपणांभोंवतीं हिंडूं लागल्या ! त्यांतून एकजण हळूच मातोश्रीजवळ आली व ह्मणूं लागली, " बाई, बाळ निजल्या ठिकाणीं आपल्या कुशीस मला हात लावूं देतेस काय ? कारण त्याला स्पर्श केला असतां तो बाळ अगदीं माझ्यासारखा होईल."

मातोश्रीनें तिला तूं कोण असें विचारितां ती ह्मणाली, " आई, माझें नांव '**निरामय**;' माझी मेहेरबानी संपादन करणाराची शरीरसंपत्ति उत्कृष्ट राहून थकवा अगर शरीरक्लेश ह्मणजे काय हें त्याला ठाऊकही नसतें, त्याच्या वाऱ्याशींही ते उभे राहत नाहींत, व सारा जन्म त्याला उत्सवकाळाप्रमाणें आनंदाचा जातो."

इतक्यांत दुसरी पुढें सरसावली व ह्मणाली, "नाहीं; बाई, मलाच बाळाला स्पर्श करूं द्या; कारण मी '**धनद**' आहें. मी ज्याला शिवतों त्याला ऐहिक काळजी कधींही शिवत नाहीं. तो कधीं चिंतेनें ग्रस्त होत नाहीं, आणि मनांत आणील तर इतरांच्या श्रमांवर व कष्टांवर सदैव समृद्ध राहून तो सहज हवें तें प्राप्त करून घेईल. सारांश, त्याला कशाचीही न्यूनता भासणार नाहीं. " हें भाषण चाललें असतांना मातोश्रीच्या उदरांतला गर्भ अगदीं स्थिर होता.

तिसरी ह्मणाली, "बाई, मलाच शिवूं द्या ! माझें नांव '**कीर्ति**.' ज्याला ह्मणून मी एकदां आपला ह्मणत्यें, त्याची सर्व लोकांच्या नजरेंत भरेल अशा उच्च स्थानीं मी स्थापना करीत असत्यें. ती अशी कीं, तो मृत्युवश झाला तरी

त्याची स्मृति कायम राहावी, आणि युगानुयुगें त्याचें नांव जगांत दुमदुमत असावें. हें अमरत्व कांहीं थोडें नव्हे ! " हें भाषण ऐकत असतांना मातोश्रीचा श्वासोच्छ्वास अगदीं संथपणानें चालू होता, पण स्मृतिचित्रांत मात्र मधमाशा तिच्या अगदीं जवळ भिडूं पाहत होत्या.

एक ह्मणाली, "तुम्ही सारे दूर व्हा; मीच या बाळाला स्पर्श करितें. बाई, मला 'प्रेम' ह्मणतात. ज्याच्यावर माझी भक्ति जडते त्याला आपलें आयुष्य कधींही एकटें आक्रमण्याचा प्रसंग येत नाहीं. अत्यंत भयाण आणि दिङ्मूढ स्थितींत देखील विसाव्यास आधार असा त्याला दुसरा सोबती मिळतो, आणि सारें जग उलटलें तरीं 'आपण दोघे' असें ह्मणणारा दुसरा सहचारी त्याच्या पाठीशीं असतो." हें ऐकतांच आंतील गर्भ स्फुरूं लागला.

पण इतक्यांत दुसरी एक पुढें सरसावली. ती ह्मणाली, "मलाच शिवूं द्या, बाई ! माझें नांव 'वैदग्ध्य' आहे. जगांत आजपर्यंत ज्या आश्चर्यकारक गोष्टी झाल्या, त्या साऱ्या मी घडवूं शकतें. यशस्वी सैनिक, राज्यधुरंधर, अगर मुत्सद्दी यांना माझाच स्पर्श होतो. आपल्या समकालीन पंडितांत अग्रेसर ह्मणून नाणावलेले व जनसमुदायाला खुष ठेवणारे असे तत्कालीन अभिरुचीचे आदर्श ह्मणून नाणावलेले जे यशस्वी साहित्यसेवक, ते तरी माझ्याच कृपाकटाक्षांतले ! मला जर या बाळाला शिवूं द्याल, तर अपयशाची बाधा याला कधींही संभवणार नाहीं. "

त्या साऱ्या मधमाशा मातोश्रीच्या तोंडाभोंवतीं घोंगावत घिरट्या घालीत होत्या; व एखाद्या वेळेस तिला त्यांचा स्पर्शही होत होता. इतक्यांत स्मृतिपटावरील आलेख्यांत तिला असें दिसलें कीं, खोलींतल्या सभोंवतालच्या छायेमधून कोणी एक जण पुढें सरसावला. त्याचे गाल खोल गेलेले असून चेहऱ्यावर व्यग्रतेची झांक मारीत होती; आणि त्याच्या भालप्रदेशावरील रेखा स्पष्टपणें उमटलेल्या असून किंचित् हास्यामुळें ज्याचे अधरोष्ठ कंपित होत आहेत,— अशा प्रकारची ती मूर्ति होती. कांहीं एक न बोलतां त्यानें आपला हात पुढें केला; तेव्हां मातोश्री एकदम थरकल्या, व मागें सरकून 'तू कोण ?' असें त्याला विचारूं लागल्या. परंतु त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ह्मणून मातोश्री त्याच्या दृष्टीशीं दृष्टि भिडवून एकाग्र टक लावून त्याच्याकडे पाहूं लागल्या, व विचारूं लागल्या,—"कायरे बाबा ! तूं माझ्या बाळाला काय देशील ? शरीरस्वास्थ्य ? "

तो ह्मणाला, " बाई, मी ज्याला स्पर्श करितों त्याच्या रक्तांत सदैव सळसळणारा व मरेपर्यंत ज्याचा उपशम होत नाहीं असा एक प्रकारचा भडकलेला ज्वर खेळत असतो.

" त्याला संपत्ति देशील ?"

'नाहीं' ह्मणून त्यानें मान हालविली. " मीं स्पर्श करितों तो माणूस सुवर्ण उचलण्यास खालीं वांकतांक्षणीं वर आकाशांत आपल्या डोकीवर कांहीं दिव्य तेज चमकतांना त्याला दिसतें; आणि तें पाहण्यास ह्मणून वर मान करितो तोंच तें सुवर्ण त्याच्या हातांतून गळून पडतें, किंवा दुसरा एखादा येणारा जाणारा तें उचलून घेऊन जातो."

" कीर्ति तरी ?"

" बहुधा नाहींच; कारण माझ्या कृपेंतल्या माणसाचा जीवनक्रम ठरलेला असतो, व त्याला त्याच मार्गानें जावें लागतें. केव्हां केव्हां तो मार्ग त्याला अत्यंत उच्च पदावर नेतो आणि लागलींच एकदम तो (मार्ग) त्याला एखाद्या अवनत स्थळीं आणून सोडतो. तो मार्ग त्याला कोठेंही नेवो, तेथें त्याला जाणें अवश्यप्राप्त आहे. "

" प्रेम तरी–?"

" होय; तो नेहेमीं प्रेमाचा भुकेला राहील, पण तें त्याला प्राप्त मात्र होणें नाहीं. आपल्या अनन्य प्रेमाचें निधान तो हृदयाशीं कवटाळतो न कवटाळतो तोंच त्याला दूर एक अलौकिक तेजोवलय दृग्गोचर होऊं लागतें, आणि तिकडेस जाण्याचा ध्यास लागून त्यापुढें त्याला बाकीच्या साऱ्या गोष्टी नकोशा होतात. त्याचें प्रेमाचें निधान तिकडे त्याच्या समागमें येऊं शकत नाहीं; त्याला एकटेंच तिकडे जावें लागतें. आपलें प्रेमाचें निधान स्वाधीन करून हा त्याशीं रममाण होतो न होतो तोंच–' हें तुझें नव्हे; याचा त्वां त्यागच केला पाहिजे–' असा त्याला अशरीरिणी-आदेश झालाच ह्मणून समजावें. "

"निदान त्याला 'यश'तरी मिळेल काय?"– या मातोश्रीच्या प्रश्नावर ती छायामूर्ति ह्मणाली, "नाहीं; उलट त्याला अपयश येईल.कारण या शर्यतींत त्याच्याबरोबर धांवणारे दुसरे लोक आपलें ध्येय त्याच्यापूर्वींच पटकावतील. शिवाय हा मार्ग आक्रमीत असतांना त्याला अनेकदां अद्भुत प्रकाश दिसेल, व अलौकिक श्रुतिमधुर आलाप ऐकूं येतील; आणि या दर्शनश्रवणांमध्यें त्याचा बराच कालक्षेप होईल. या सर्वांहून अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट हीच कीं, बाकीच्या सर्वांना जेथें रखरखीत वाळवंट दिसतें तेथेंच याला सूर्यप्रकाशांत तळपणारा सुंदर समुद्र दिसेल, आणि पाचूची फरसबंदी केल्याप्रमाणें दिसणाऱ्या त्या उदधीच्या पृष्ठभागावर सूर्यनारायणाच्या सोनेरी रंगांत दुग्धधवल फेनराजींची रंगवल्लिका मिसळलेली दृष्टीपुढें सदैव झळकत राहील ! आणि त्यामधून अवतीर्ण झालेल्या श्रेष्ठ भूमिभागावरील पर्वतशिखरांच्या अग्रांवर मेरु-पर्वतावरील कांचनास लाजविणारें असें सुवर्ण त्याला तळपत असलेलें दिसेल ! "

यावर उत्कंठेनें मातोश्री ह्मणाल्या " आणि तें त्याला प्राप्त होईल ना ?"

त्या छायामूर्तीनें मातोश्रीच्या या प्रश्नास उत्तर दिलें नाहीं;केवळ किंचित् विलक्षणपणें हांसली मात्र.

मातोश्री पुन्हां त्याला उद्देशून ह्मणाली, " पण हें सारें सत्य ना ? "

तो ह्मणाला, "सत्य काय असतें?"हें ऐकतांच मातोश्री त्याच्या अर्धवट मिटलेल्या डोळ्यांकडे टक लावीत ह्मणाल्या,"करा तर मग बाळास स्पर्श !"

मातोश्रींची अनुमति मिळतांच ती छायामूर्ति किंचित् पुढें होऊन वांकली, व मातोश्रीच्या त्या गर्भस्थ बाळावर वरदहस्त ठेवून तिनें कांहीं आशीर्वचनांचा उच्चार केला. त्यांपैकीं–" आणि याचें फळ हेंच कीं, तूं आप्तकाम होशील; तुझें ध्येय तुला प्रत्यक्ष होईल,–" इतकेच शब्द मातोश्रीला ऐकूं आले.

आणि तो गर्भस्थ पिंड तत्क्षणीं रोमांचित झाला. परंतु मातोश्रीला गाढ झोंप लागून तिच्या समोरचें तें स्मृतिचित्र मावळलें, आणि गर्भस्थ बाळकाच्या अद्यापि न उमललेल्या डोळ्यापुढें तें उदय पावूं लागलें ! मातोश्रीच्या उदरांतला तो गर्भ विलक्षण स्वप्नसुख अनुभवीत होता ! त्याच्या अपरिपक्व मेंदूपुढें एक अद्भुत प्रकाश व्यक्त होत होता ! प्रकाशकलिकेच्या विकास-लक्ष्मीच्या शोभेची अद्यापि जाणीव नसणाऱ्या–व कदाचित् पुढेंही कदापि तें अभिज्ञान न होणाऱ्या–त्या पिंडास हें काय होतें हें कदाचित् प्रगट करितां आलें नसतें; पण त्याचें अस्तित्व मात्र तो खचित अनुभवीत होता.

आणि त्या गर्भाचे मनोरथ तत्क्षणीं परिपूर्ण झाले. कारण आतां तो जिज्ञासू नसून ज्ञानी झाला होता; व त्याची ध्येय, ध्याता, व ध्यान ही त्रिपुटी आतां एकरूप झाली होती !

[९. ५. १४.]

विश्वतरंग.

(चाल—'भूपती खरें ते'—)

हें विश्व प्रगटलें, सजलें, नटलें पाहीं
आनंदित वृत्ति, स्तंभित मन्मति होई ॥ १ ॥
कीं धवलकान्त हें निरुपम सुम वा भासे
जें अनंत ताराकलिकांहीं बहु विलसे ॥ २ ॥
कीं कल्पतरू हा प्रचंड वाटे फुलला
जो असंख्य अभिनव बहुविध पुष्पीं लवला ॥ ३ ॥
कीं गमे रम्य हें उपवन द्रुहिणीं रचिलें
जें रुचिरलतांहीं संसृतिरूपीं भरलें ॥ ४ ॥
कीं असे दिव्य हें मधु सर सरस रसाचें
ग्रहकमलपंक्ति ही जयांत हर्षें नाचे ॥ ५ ॥
कीं रत्नाकर हा अपार गहनहि मोठा
जो उडुगणमणिंचा अक्षय वाटे सांठा ॥ ६ ॥
कीं तुंगशैल गिरिराजचि वा हा होई
जो तारकशिखरीं भूषित होउनि राही ॥ ७ ॥
कीं, असे खचित हा अनन्य कंदुक विधिचा
जो जडित मौक्तिकीं, निधीच सुंदरतेचा ॥ ८ ॥
कीं काव्य निर्मिलें अनुपम ईशें अपुलें
रसिकान्तरनन्दनिं नित्य असे जें रतलें ॥ ९ ॥
कीं दर्प हराया वैभव हें प्रकटीलें
सामंत नृपतिही बघुनि जया मनिं विरले ॥ १० ॥
अज्ञेयकिरण कीं द्युतिमय विमलहि गमतें
जें रंगतरंगीं अगणित सुंदर दिसतें ॥ ११ ॥
कीं दीप दिव्य हा अद्भुत तेजें दिपतो
जो ईशपदाचा मार्ग सदा दावीतो ॥ १२ ॥
कीं खरीच नौका कालसागरीं तरते
जगदीशासंनिध जीवगणा जी नेते ॥ १३ ॥
कीं सत्य ग्रंथ हा उपदेशक गुरु सकलां
यच्चिंतनिं पावे मानव निर्वाणाला ॥ १४ ॥
या चला गडे हो ध्याऊं आपण त्याला
निजभक्तिजलें त्या सिंचुनि करुं प्रणतीला ॥ १५ ॥

इंदूर. "शालिनी"

प्रतिष्ठान ह्मणजे काबूल नव्हे.

'तुका ह्मणे कळे । परि होताती आंधळे ॥'

आपल्या गेल्या महिन्याच्या अंकांत रा. रा. वासुदेवराव आपटे यांनीं, **प्रतिष्ठान** ह्मणजे पैठण कीं काबूल?- ही शंका प्रदर्शित केली आहे. ही शंका रा. वासुदेवरावांस आली कशी याचेंच आधीं आश्चर्य वाटतें. आपल्या शंकेच्या समर्थनार्थ त्यांनीं जीं प्रमाणें सादर केलीं आहेत, तीं फारशीं भरींव आहेत असें निदान माझ्या अल्प मतीस तरी वाटत नाहीं. रा. वासुदेवरावांचे व्युत्पत्तिविषयक जे लेख हल्लीं **विस्तारांतून** प्रसिद्ध होत आहेत, त्यांवरून त्यांनीं अलीकडे फारशी भाषेचा अभ्यास आरंभिला आहेसें दिसतें. प्रस्तुत शंका येण्याचें कारण तरी अंशतः त्यांचा हा अभ्यास होय. रा० आपटे आपल्या लेखांत येणेंप्रमाणें लिहितातः-" पैठण यालाच दोन हजार वर्षांपूर्वी **प्रतिष्ठान** ह्मणत होते, असा कांहीं विश्वसनीय पुरावा माझ्या पाहण्यांत नाहीं. कोणी शोधकानें तो दाखविल्यास उपकार होइल." त्यांस उत्तरादाखल मीं जो हा लेख लिहिला आहे, तो केवळ त्यांच्यासाठींच होय, इतरांकरितां नव्हे; कारण इतरांस त्यांत नवें असें कांहींच सांपडणार नाहीं.

प्रतिष्ठान (प्रति+स्था) या शब्दाचा धात्वर्थ स्थिर राहणें, वसाहत करणें असा आहे. अर्थात् प्रतिष्ठान ह्मणजे आर्यांची वसाहत. प्राचीन काळीं प्रतिष्ठान नांवाचीं दोन शहरें होतीं. एक उत्तरहिंदुस्तानांत व दुसरें दक्षिणेंत. उत्तरहिंदुस्तानांतील प्रतिष्ठान जें पुरूरवस् राजाची राजधानी होतें त्यासच हल्लीं काबूल ह्मणतात, असा रा. आपट्यांचा सिद्धांत. गांधारदेश, काबूल शहर व स्वाट नदी यांचा काय बादरायण संबंध रा. आपट्यांनीं जोडून दिला आहे, त्याचा नीटसा बोध होत नाहीं. पुरूरवस् राजाची राजधानी निश्चित केली ह्मणजे दंडापूपिकन्यायानें रा. आपटयांचा सिद्धांत ढासळला असें ह्मणण्यास चिंता नाहीं.

जी **प्रतिष्ठान** नगरी पुरूरवस् राजाची राजधानी होती, ती प्रयागदेशांत गंगायमुना नद्यांच्या संगमावर होती. यास प्रमाण महाभारतांत आहे. तें असें:-

> देशे पुण्यतमे चैव महर्षिभिरभिष्टुते ॥
> राज्यं स कारयामास प्रयागे पृथिवीपतिः ॥
> उत्तरे जान्हवीतीरे प्रतिष्ठाने महायशाः ॥

महाभारतग्रंथाचें प्राचीनत्व रा. आपट्यांस कबूल असावेंसें वाटतें. कालांतरानें प्रयागदेशाचेंच नांव प्रतिष्ठानास प्राप्त होऊन त्याचें मूळचें नांव लुप्त झालेलें दिसतें.

कालिदासानें आपल्या विक्रमोर्वशीय नाटकांत **प्रतिष्ठाना**चा उल्लेख खालीं दिल्याप्रमाणें केला आहे:—

> चित्रलेखाः—सखी पश्य, पश्य, इदं भगवत्या भागीरथ्या यमुनासङ्गमपावनेषु सलिलेषु पुण्येष्वेव लोकयत इवात्मानं प्रतिष्ठानस्य शिखाभरणभूत मिव तस्य राजर्षेर्भवनमुपगते स्वः। वि. अं. २.

कालिदासाचा काल निश्चित झालेला नाहीं. तथापि कालिदास चंद्रगुप्ताचा समकालीन होता असें माझें ठाम मत झालेलें आहे. अर्थात् त्यास होऊन गेल्यास दोन हजारांवर वर्षें झालीं. उर्वशी ही गांधारदेशची अप्सरा होती,हा रा. आपटयांचा शोध अश्रुतपूर्व होय.

दक्षिणेंतील **प्रतिष्ठानाचें** प्राचीनत्वही दोन हजार वर्षांपूर्वींचें आहे. **सुत्तनिपात** या पालीग्रंथांत प्रतिष्ठानाचा उल्लेख आहे. हा ग्रंथ खिस्ती शकापूर्वी निदान तीनशें वर्षांचा आहे. अशोकाच्या एका शिलाशासनांत **पेटनिक** आणि **राष्टिक** या दोन लोकांचा व दुसऱ्या एका शिलालेखांत पेटनिक व आंध्र या दोन लोकांचा उल्लेख आहे. त्यावरून **पेटनिक** हे दक्षिणेंतील प्रतिष्ठानाचे ऊर्फ पैठणचे रहिवासी असावेत असा विद्वानांचा अभिप्राय आहे.

पेरिप्लुस (हें ग्रंथाचें नांव आहे, ग्रंथकाराचें नांव नव्हे!) हा ग्रंथ एका ग्रीक व्यापाऱ्यानें लिहिला असून ह्यांत व्यापारी माहिती भरपूर दिलेली आहे. हा ग्रंथ खिस्ती शकाच्या आरंभीं लिहिलेला आहे. या ग्रंथांत पैठणचा उल्लेख येणेंप्रमाणें आहे:-

Onyx (गोमेद) sent in vast quantities from Ozene (उज्जनी) and Paithan to Barugaza (भडोच) and thence exported to Egypt. Among the marts in the South country there are two of more particular importance–Paithan which lies south from Barugaza a distance of 20 days and Tagar, 10 days east of Paithan, the greatest city in the country. Their commodities are carried down on wagons to Barugaza along roads of extreme difficulty.

आतां दक्षिणेंतील पैठणशहरास पूर्वी प्रतिष्ठान अशी संज्ञा होती, हें दाखविलें ह्मणजे झालें. ब्रह्मांडपुराणांत प्रतिष्ठान क्षेत्राचा नामनिर्देश आहे, तो असाः–

यामः स्वस्वमधिष्ठानमत्र सूर्यः प्रतिष्ठितः॥
अस्मिन्स्थिते दिनकरे सुराःसर्वे प्रतिष्ठिताः ॥
सूर्यस्य च प्रतिष्ठानात् सुरवासे प्रतिष्ठिते ॥
प्रतिष्ठानं तु तत्क्षेत्रं सुराणामपि वल्लभम् ॥

या पौराणिक उल्लेखावरून प्रतिष्ठान हें मूळचें सूर्योपासकांचें क्षेत्र असावें. मग हे सूर्योपासक लोक **पारसीक** असोत वा अन्य जातीचे असोत. भगवान् बुद्धांचे **पुण्ण** आणि **बावरी** असे दोन ब्राह्मण शिष्य दक्षिणेंत होते. पुण्णाचें घरदार **सोपारा** येथें व बावरीचें **गोदावरीचे** तीरीं होतें. कदाचित् **बावरी** प्रतिष्ठानशहरींच राहत असावा. कालांतरानें **प्रतिष्ठान** (पइठण) हा सामान्य नगराचा वाचक शब्द झाला. **हेमचंद्र** आपल्या देशीनाममालेंत 'णगरम्मि पइठाणं' (पैठण ह्मणजे नगर) असें स्पष्ट ह्मणतो. कानडी भाषेंत **पट्टण** ह्मणजे शहर. जसें, **श्रीरंगपट्टण**, मच्छलीपट्टण; व **पल्ली** ह्मणजे खेडें: जसें, त्रिचनापल्ली, तिनिवेल्ली. नगरांतील वस्ती कायम राहणाऱ्या लोकांची व खेड्यांतील वस्ती उपरी लोकांची असते हें सांगणें नकोच.

पठाण लोक ह्मणजे प्रतिष्ठानचे रहिवासी ही व्युत्पत्ति हास्यास्पद होय. नीलकंठ ह्मणजे नाइल नदीच्या कांठीं राहणारा, मंडनमिश्र ह्मणजे मिसरदेशचा रहिवासी, अशी व्युत्पत्ति जर कोणी काढूं लागला तर त्याच्या तोंडाला हात कोणीं लावावा !

पठाण हा शब्द मूळचा **पेहतान** असा आहे. **पेहलवान** ह्मणजे मूळचा अस्सल पारशी. **पेहेलवी** ह्मणजे मूळची फारसी भाषा. पेहतान ह्मणजे पारशी व अरब यांच्या मिश्रविवाहसंबंधापासून उत्पन्न झालेली जात असा अर्थ असावा, असें मला वाटतें. आर्य व अनार्य याच्या मिश्रसंबंधापासून उत्पन्न झालेल्या लोकांस जसा **हिंदु** हा शब्द लावूं लागले तसाच हा प्रकार दिसतो.

'भारद्वाज.'

सयमक कविता.

[गेल्या अंकांतील रा. रेंदाळकर यांच्या निर्यमक कवितेस उत्तर.]

(१)

आला मच्छ्रवणीं तुझा कविवरा ! संपूर्ण आर्तस्वर,
टाहो फोडुनि बोलवीं न मजला आतां पुन्हां भूवर;
स्वानंदामृतपानदान मिळतें स्वर्गीं इथें सर्वदा,
येओनी करूं काय सन्निध तुझ्या ग्रासी जिथें आपदा ?

(२)

प्रेमें जैं फुकली 'तुतारि ' भुवनीं निर्भीड सत्यस्वनीं,
झाली नाल्प समर्थ सर्व गगनीं टाकावया व्यापुनी;
ब्रह्मांडा दम नव्य येइल कसा आतां मदीयागमीं ?
गुंतोनी पडतलि तीं ' हरपलीं श्रेयें ' हि माझीं तर्मीं[1] !

(३)

मत्काव्यीं रति पूर्ण पाहुनि तुझी मी होय आनंदित !
आभारी तव मी, असाच असुं दे त्वल्लोभ रे संतत;
अर्वाचीन कवींस हीन गणिसी,माझी करोनि स्तुति,
पाहोनी विपरीत भाव तव हा हो दुःख मातें अति !

(४)

वाग्देवीगृह, योग्य शब्दतरणी, नाना कला-जीवन,
विद्यासाधन, विश्वमंगलनिधी, द्वैतघ्न, दुष्टांजन,
प्रेमानंदनिधान हे कवि गुणी, चाले न त्यांवांचुनी,
आहे ज्ञात तुला कवे ! मग कवी दोषार्ह कैसे जनीं ?

(५)

येतें नाल्प यश स्ववृत्तसरणीं[2] संतप्त हो त्वन्मन,
मातें बोलविसी म्हणूनि कविंना देवोनि तूं दूषण !
आलों मी जरि तेथ गोष्ट तव ती सिद्धीस जाणार न,
चिंता प्रश्न करीं 'कुठें चुकत मी ?' तें शुद्ध तूं ठेवुन.

(६)

अर्वाचीन कवींमधें अभिनवा जादू पुरी कीं वसे,
तूतें नातुसरे कुणी म्हणुनि तूं उद्गारलासी असें—
" तूं[1] नाहींस इथें म्हणूनि डुलती
अत्यल्पबुद्धी कवी-
दर्पें बोलुनि वल्गना चकविती
सामान्य लोकां भवीं !"

(७)

पाहोनी विपरीत वृत्तरचना काव्यीं तुझ्या मन्मना
वाटे आदर नाल्प रे! मग रती वाटेल कैसी जनां?
देवी निर्यमकीं तुझी न रमवी, होते मला जाचक !
जात्या सुंदर योषिता; परि कशी हीनांशुकीं[2] मोहक?

(८)

ज्यां नाहीं कवितावधूस यमकांपासूनि केलें दुरी,
पाहीं दक्षपणें, पटेल तुजला सत्यस्थिती सत्वरी;
केव्हां इष्ट न काढणें युवतिचीं हीं बाह्यशीं भूषणें,
शोभा वाढविती तिची अधिक रे! हीं तोरड्या-कंकणें.

(९)

होतां ओळख आंग्लकाव्यवधुशीं वाटे तदा मन्मना
द्यावें एक विदेशि[3] भूषण तिला,हानी दिसे त्यांत ना.
दे. जैसा कधिं पोलका वितरितो भर्ता स्वभार्येप्रती,
ज्यानीं ठेव परी न सेवित सदा ती, कंचुकीं तद्रती.

---

१ केशवसुताच्या काव्याचे भोक्ते पुष्कळ आहेत, त्याचा गौरव अव्याहत चालू आहे,इतकें असून त्याच्या निधनानंतर या नऊ वर्षांत त्यांच्या अभिमान्यांकडून त्यांची सर्व कविता स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध होऊं नये, हें दुर्दैव होय ! असा भाव या कवितेंतून निघतो.
२ निर्यमक वृत्तरचनेंत.

१ हे उद्गार रेंदाळकरांचे आहेत. २ वस्त्रहीन म्ह० नग्न. ३ इंग्रजी सॉनेटच्या धर्तीवर चतुर्दशपदी. यांत पहिली तिसरी व दुसरी चवथी, किंवा पहिली चवथी व दुसरी तिसरी ओळ सारख्या यमकाची असते. अशा तऱ्हेच्या कांहीं कविता त्यांनीं प्रचारांत आणिल्या आहेत. पण याही श्रेयस्कर आहेत असें आमचें मत दिसत नाहीं. विषयवैचित्र्य म्हणून त्यांनीं हा प्रकार मराठींत आणिला. 'तुतारी,' 'हरपलें श्रेय,' 'झपूर्झा 'सारखीं त्याचीं स्फुट काव्यें पाहिल्यास हें सहज कळून येणार आहे. चतुर्दशपदीशिवाय अन्य काव्यें सयमकच आहेत.

(१०)

मुक्तेशें, मयुरें स्वकाव्यवधुला ज्या भूषणें भूषित
केलें, ती मजला सदा प्रिय गड्या ! सर्वांहि ती संमत;
पाहीं तूं परकीय काव्यवधुला, येईल ध्यानीं तदा,
ना त्या निर्यमका, तुझीच मग कां सृष्टिक्रमोच्छेददा?

(११)

आहे काल नवा, समस्त जग हें नाविन्यरूपें सजे,
'धीरांनीं पण निंद्य रूढिस पदीं
संचूर्णिलें पाहिजे.'
खोटें हें न परी कुमार्ग धरुनी श्रेयस्करा रूढि ही,
विध्वंसूनि करीशि कंपित पहा दर्पोक्तिनें ही मही!

(१२)

जाणे साक्षर लोक-संहति महा-राष्ट्रीं मनोरंजन,
वाटे तें मज ती सुयोधनसभा, नामें मनोभंजन!
पृष्ठ्यांतील तदीय कौरव[2] तुला दुःशासनाचेपरी
पांचाली-कवितावधूस हरण्या रे ! सोडिती भूवरी!

(१३)

देवीशीं नच सादरोक्ति वदतां उन्मत्तसा होउनी,
दर्पे ओढुनियां तदंचल करें गेलासि रे घेउनी !
येणें ना रुचलें तुझ्यासह तिला मार्गांत ठेंचाळली[3]
हट्टानें नच सोडिलेंस तिजला, नेलेंस इष्ट स्थळीं[4] ?

(१४)

येतां काव्यवधू सभेंत सकलां आनंद झाला किती !
ते तीच्याहि विटंबनेस अपुली देती पुरी संमती;
मार्गीं ती कितिदा पडे व्यथितशी जीर्णांशुकीं ती सती
प्रेमानें स्थिति दीन सर्वहि तिची ते मासिकीं[1] लेखिती!

(१५)

नाना पंडित हे नेपेथिति परी पर्वा न त्याची तुला !
होतो काय तदंत[2] सन्निध तुझ्या, ही भीति वाटे मला.
कृष्णाचे[3] कवितेवरी जर तुझी अत्यंत भक्ती सदा,
त्याच्या मागुनि जाइं, खास तुजला होईल ती इष्टदा.

(१६)

सध्यां जो कर टाकिला तिजवरी तो आंवरीं सत्वरी,
झाला हा इतुका पुरे छल गड्या!रे येइं ताळ्यावरी !
तीचें तें हारिलेंस भूषण, तिला आतां करीं अर्पण,
आनंदें मग ती करील न कशी स्वत्सन्निधीं गुंजन ?

(१७)

पत्नीला[4] विरहीं निरोप तव त्या देणार ही सुंदरी.
आशा, प्रेम, तसेंच वीर्य कविता ही देइ विश्वांतरीं.
जात्या प्रेमळ सुंदरी, अधिक त्यां भर्ता यदा भूषणें.
देतो, काव्य-वधू तशी सुखविते बोलोनी सद्भाषणें !

(१८)

"गाण्यानें कविच्या प्रभाव तुमचा
वर्धिष्णुता घेइल,
स्फूर्तीच्या तुमच्या पिढ्यांस पुढल्या
साक्ष[1] कव[1] होइल.[5] "
मद्वाणीसम पूर्ण वीर्य वसतें स्वत्देहिं ना संभ्रम,
लोकाचारविरुद्ध वर्तन परी देतें न सत्संगम !

केशव-सुताचा आत्मा.

---

१ ही ओळ रेंदाळकरांची आहे. २ गोविंदाग्रज, नागेश वगैरे. ३ श्लोकाचे चार चरण सयमक नसल्यामुळें चमत्कारिक वाटतें. कवितेचा एक एक चरण काव्य-वधूचा मार्ग कल्पिला आहे. ती त्या मार्गावरून निघाली असतां दुसऱ्या चरणाच्या शेवटीं ठेंचाळली. पुन्हां चवथ्या चरणावर ठेंचाळली. अशा तऱ्हेनें शेवटपर्यंत (काव्यविषय संपेपर्यंत) ठेंचाळत गेली. ह्मणजे प्रत्येक श्लोकांत पावलोपावलीं ठेंच लागून पडली. अशी कविता वाचतांना वाचक देखील ठेंचाळतो. ४ मनोरंजनाकडे अशा तऱ्हेची कविता छापण्यास पाठवून दिली.

१ ती मनोरंजनांत येईपर्यंत किती वेळां ठेंचाळली, हें वाचकांस कळत नसल्यामुळें मनोरंजनकारांनीं त्यांच्याकरितां ती छापून काढली, आणि तशीच पुढें छापूं लागले. २ यमकें गेलीं आणखी काय अंलकार जात कोण जाणे. ३ केशवसुताचें नाव. ४ रेंदाळ-करांच्या स्त्रीविषयक कविताच फार असतात, यावर येथें रोख आहे. ५ या केशवसुताच्याच पंक्ति आहेत.

श्री.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक २.

एका सरकारी कामगाराच्या रोजनिशींतील उतारे.

उद्धर्ता–टोमदेव.

उपोद्घात.

हे सरकारी कामगार माझे बंधूच होत. बहुत वर्षें झालीं, सरकारी कामासाठीं त्यांस पुणें वगैरे जिल्ह्यांत गांवोगांव फिरावें लागे. सरकारी काम आटोपल्यावर गांवांतील प्रमुख लोकांशीं संभाषण करण्याचा त्यांचा प्रघात असे. अर्थात् सरकारी कामाशीं ह्या संभाषणाचा कांहीं संबंध नसे. ह्या संभाषणांत लोकांचे रिवाज, त्यांची स्थिति, त्यांची कौटुंबिक रचना, त्यांचा किंवा त्यांच्या गांवाचा इतिहास, इत्यादिकांसंबंधानें विशेष गोष्टी कांहीं आढळांत आल्यास त्या व इतर विशेष गोष्टी त्यांच्या नजरेस पडल्या त्या, त्यांनीं आपल्या रोजनिशींत टिपून ठेविल्या आहेत.त्या विशेष गोष्टी, त्यांविषयीं त्यांचे विचार आणि सूचना वगैरे माहिती कधीं उपयोगी तर कधीं मौजेची, कधीं लोकस्थितिदर्शक तर कधीं ऐतिहासिक, कधीं स्थलवर्णनात्मक तर कधीं पौराणिक आणि दंतकथात्मक, कधीं उपदेशपर तर कधीं वाङ्मयात्मक, अशी नानाविध असल्यावरून ती त्यांचे रोजनिशींतून उद्धृत करून आपणांकडे पाठवीत आहें. ही माहिती मला जशी मनोरंजक आणि बोधप्रद वाटली तशीच आपल्या वाचकांसही वाटेल असें माझें अनुमान आहे. मात्र उतारे देणार ते अक्षरशः जसेच्या तसेच येतील अशी खबरदारी घेण्यांत येईल. कोठें कोठें अधिक माहिती खुलाशासाठीं किंवा दुरुस्तीसाठीं द्यावी लागल्यास, ती पृष्ठाच्या तळीं टिपांच्या रूपानें देण्याचें मीं योजिलें आहे. इतका उपोद्घात माझ्या मतें पुरे आहे.

टोमदेव .

१४ नोवेंबर.—अक्टोबर महिन्याच्या अखेरीस आमची बाहेर निघण्याची तयारी बहुतेक झालीच. निघण्याच्या आदल्या दिवशीं माझ्या मातुःश्रींनीं बरोबर जाणाऱ्या शिरस्तेदारांस व कारकुनांस मुद्दाम बोलावून आणून त्यांस मला जपण्याविषयीं सांगितलें. त्या म्हणाल्या, "इकडे पाहा, आमचे ०साहेब आजपर्यंत असे बाहेर कधींही गेले नाहींत. फिरतीवर जाण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग आहे. बाहेर पडलें ह्मणजे गांवोगांवीं जावें लागणार, नित्य नित्य हवापाणी बदलणार, आणि कामाच्या नादांत ते मागेंपुढें पाहणारे व प्रकृतीस जपणारे असे नाहींत. याकरितां त्यांस जपत जा. वाटा, मुक्कामाचीं ठिकाणें, उतरण्याच्या जागा, हें सर्व

तुह्मांस माहीत आहे, तसें त्यांस नाहीं. तेव्हां चांगल्या ठिकाणीं, चांगलें पाणी असेल तेथें उतरण्याची तजवीज ठेवीत जा. औषधपाण्याची वगैरे तजवीज मी करून सदोबांबरोबर देतें आहेंच, पण त्याबद्दलही तुम्ही चौकशी करीत जा. थंडीचे दिवस आलेच ह्मणावयाचे, तेव्हां विशेष जपलें पाहिजे. आतां नाताळच्या सुटीशिवाय तुह्मी परत येणार नाहीं ना ?" यावर शिरस्तेदारांनीं उत्तर दिलें, " आईसाहेब, आपण ०साहेबाविषयीं कांहीं काळजी करूं नका. आह्मी सोयीच्या ठिकाणींच उतरत जाऊं व त्यांच्या प्रकृतीस जपत जाऊं. आपण बिनघोर असा. नाताळच्या[1] आंत आह्मी बहुधा परत येऊं. पण तें साहेबांच्या मर्जीवर आहे." हें सर्व बोलणें मला सदोबानें दुसरे दिवशीं वाटेंत सांगितलें. मी ह्मटलें, "सदोबा, आईचें मुलांवर जें प्रेम असतें, त्याला उपमाही देतां येणें कठीण आहे!"

१५ नोवेंबर.—मी आपल्या नोकरांसह पुणें सोडून उरळी देवाची ता० हवेली येथें पोंचलों. तेथें बहिरोबाच्या देवळांत मुक्काम केला. देऊळ बऱ्या प्रकारचें इमारती आहे. सायंकाळीं मला ज्वर आला. हा 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' होत आहे, तेव्हां पुढें कसें होईल? असें मनांत आलें. लौकरच सदोबानें झणझणीत गवती चहा तयार केला. तो घेऊन पांघरूण घेऊन पडून राहिलों. रात्रीं सुमारें नऊ वाजतां कारकून मंडळीही येऊन पोंचली. त्यांस हें कळल्यावर ते चिंतातुर झाले, पण इतक्यांत मला घाम सुटूं लागला व सुमारें १०॥ वाजतां मला चांगली झोंप लागली. सकाळीं चांगलें बरें वाटलें, व पोशाक करून मी आपले कामावर निघून गेलों.

येथें देवळाच्या जवळच ओढा वाहात आहे. गांवासभोंवतीं बागाईत बरेंच आहे. येथील डाळिंबांची मोठी आल्या आहे. दाणा रंगानें पांढराच, पण फार गोड! येथील बहिरोबा हें मोठें जागृत दैवत आहे. सर्पदंश झाला असतां देवळास प्रदक्षिणा घालाव्या व देवाचा अंगारा लावावा ह्मणजे वीष उतरतें!

येथील रहिवासी विठूजी महादजी आडसूळ —जात माळी—हा धाकटया बाजीरावापाशीं हुजऱ्या होता. त्याचे वंशज विद्यमान आहेत. साखरोजी पिंजण, त्रिंबकजी डेंगळ्याचा जांवई, यानें पेशवाईंत जंबुसर, नासीक, वाडेंघोडें येथें मामल्याचीं कामें केलीं. महादजी हांडे हा घोड्यावर स्वारी करण्यांत मोठा सराईत होता; इतका कीं, तो दोन घोडे जुळून त्यांजवर स्वार होत असे! रांझेकर नांवाचें ब्राह्मणघराणेंही येथें आहे. त्यांचें उपनांव गोठे. ते श्री० पंतसचिवांचे कारभारी होते.त्यांस रांझें हें गांव इनाम आहेत. शिवाजी महाराजांचा पेशवा शामराजपंत रांझेकर त्याचे हे रांझेकर संबंधी आहेत काय?

ह्या गांवास 'उरळी देवाची' असें कां ह्मणतात? तर हा गांव थेऊर येथील श्रीचिंतामणीस इनाम* आहे. दुसरी उरळी हवेली तालुक्यांत आहे, तिला 'उरळी कांचन' असें नांव आहे.

१. सदोबा हा त्यांचा ब्राह्मण परिचारक.

* हें बरोबर नाहीं. हा उरळी गांव चिंचवडच्या देवांस इनाम आहे, म्हणून यास 'देवांची उरळी' असें म्हणतात.

दुपारीं फुरसुंगीस जाऊन सायंकाळीं परत मुक्कामास आलों. फुरसुंगी उरळीपासून सुमारें तीन मैल होईल. या गांवीं पूर्वीं शिलेदारी करणारीं अशीं मराठ्यांचीं घराणीं बरींच आहेत. त्यांत शितोळे, हरपळे ऊर्फ पवार, शेवाळे, कामथे, कुटे, चोरघडे, भाडळे, चंद हीं प्रमुख होत. पैकीं हरपळे अजूनही बडोद्यास लष्करी नोकरींत आहेत. राहाणे नांवाचे ब्राह्मणही काठेवाडांत शिलेदारी करीत असत ह्मणून समजतें.

हीं सर्व घराणीं पूर्वीं शेतकरी असून पुढें मराठी राज्याच्या अमदानींत शिलेदार झालीं. कालगतीनें त्यांच्या तरवारींचे फाळ होऊन व घोड्यांचे ठिकाणीं बैलजोड्या येऊन तीं पुन्हां शेतकरी बनलीं आहेत !

१७नोवेंबर.—आह्मीं पहांटेसच कूच करून दिवें ता० पुरंदर येथें मुक्कामास आलों. दिव्यास जातांना दिवेघाट चढावा लागला. सिंहगडापासून पूर्वेकडे जी डोंगराची ओळ जाते तींत तीन घाट आहेत. त्यांपैकीं हा तिसरा अगदीं पूर्वेकडे आहे. घाटाच्या माथ्यानजीकच दिवें गांव आहे. त्यावरून ह्या घाटास दिवेघाट[२] असें नांव पडलें आहे. घाट सुरेख बांधिला आहे. मी चालतच वर चढलों. दप्तराचे व सामानाचे खटारे मागून येत होते. घाटाच्या माथ्यावर एका झऱ्याजवळ बसून विश्रांति घेतली. हें पाणी विजेच्या तडाक्यानें उत्पन्न झालें ह्मणून सांगतात. घाटाच्या कामावरील सुपरवायझरानें ह्या पाण्यास लहानसें कुंड बांधिलें आहे. त्यामुळें पाणी पिण्याची मोठी सोय झाली आहे. पाणी कुंडांतून वाहात जाऊन खालीं दऱ्यांत पडतें. घाट चढून येणाऱ्या पान्थस्थांस ही जागा रम्य वाटावयाची, पण येथें झाडझूड कांहीं नाहीं. कुंड बांधणाराप्रमाणें झाडें लावण्याचें श्रेय कोणीं घेतल्यास हें स्थळ फार रम्य होईल, यांत संशय नाहीं. येथून दक्षिणेकडे पाहिलें ह्मणजे हवेली तालुक्याचा सुरेख देखावा लांबवर नजरेस येतो. माथ्यापासून दिव्याकडे उतार थोडा आहे. अर्थात् दिवें व त्याच्या भोंवतालचा प्रदेश हवेली तालुक्यापेक्षां अधिक उंच[३] आहे.

दिवें येथें भापकर नांवाचें एक मराठ्यांचें घराणें आहे, त्यास एक चाहूर जमीन शाहूमहाराजांनीं इनाम दिलेली आहे. कारण असें कीं, एकदां शाहूमहाराज शिकार करतां करतां दिव्याच्या रानांत आले; तेथें ते क्षुधातुर झाले असतां भापकराची बाई आळणभाकरी घेऊन आपल्या नवऱ्याकडे शेतावर जात होती. त्या बाईनें भुकेल्या महाराजांस ती आळणभाकरी खाण्यास देऊन त्यांची क्षुधा शांत केली. महाराजही तिच्या दादल्याच्या नांवें एक चाहूर जमिनीची सनद देऊन त्या कुटुंबाचे उतराई झाले[४].

२. " ह्यास दिवटे घाट " असेंही म्हणतात.

३. पुरंदर तालुक्याची उंची समुद्रपृष्ठापासून २८०० फूट आहे. ह्या दिवेघाटानेंच श्रीमंत बाजीराव पेशवे खडकीची लढाई बिघडलीसें पाहून पळाले.

४. ह्या प्रसंगासच उद्देशून श्री शिवकाव्यांत शाहूमहाराजांविषयीं खालीं लिहिल्याप्रमाणें म्हटलें आहे काय ?

" मृगाननुगतः शान्तः कदाचित्क्षुधितो नृपः ।
दधिभास्करिका-युक्तां काञ्चिद्योषां ददर्श सः ।
सद्यो नयन्तीं भर्त्रर्थमुवाच स नृपोत्तमः ।
क्षुधितायाद्य मे देहि भास्करीं दधिसंयुताम् ।
तथेति सा पुरस्तस्य स्थापयित्वाऽवसत्सती ।
भुक्त्वा पीत्वा स पानीयमिति तुष्टोऽब्रवीत्तदा ।
राजाहमस्मिसप्तारं याहि पत्या समन्विता ।

तसेंच टिळेकरें, जात माळी, हेही येथें राहतात. हे स्वामिभक्त चापाजी टिळेकर याचे भाऊबंद होत. चापाजीच्या वंशजांस मुंजवडी व येखतपूर हे गांव इनाम आहेत ह्मणून समजतें.

दिव्यास अंजिरांचे मळे बहुत आहेत.

तारीख १८ नोवेंबर.—सोनोरी हा गांव जवळच घाटास लागून आहे. हा तोफखानेवाले पानशे यांचा राहण्याचा मूळ गांव. तो त्यांस इनाम आहे. येथें पानशांचे मोठमोठे वाडे व ब्राह्मणांचीं ३०।३२ घरें आहेत. पण विशेष गोष्ट ही कीं, येथें एक लक्ष्मीनारायणाचें देवालय असून त्यांत गरुडावर आरूढ झालेली अशी लक्ष्मीनारायणाची मूर्ति आहे. अशा प्रकारें विष्णूची स्थापना केलेली मीं प्रथमच पाहिली. मूर्ति शुभ्र संगमरवरी पाषाणाच्या असून सुबक आहेत.

ह्याच गांवाच्या हद्दींत दिवेघाटाच्या पूर्वेस सोनोरी उर्फ मल्हारगड नांवाचा डोंगरी किल्ला आहे. तो पूर्वीं पानशांच्याच ताब्यांत होता. हा गड ह्या ओळींतील अत्युच्च शिखरावर बांधिलेला आहे. तो पाहावयाचें मनांत फार होतें, पण सरकारी कामामुळें सवड झाली नाहीं.

पानशांपैकीं प्रमुख मंडळीच्या भेटी झाल्या. आतां कोणास बंदूक मारतां येते काय, ह्मणून सहज प्रश्न केला. त्याचें उत्तर "कोणासही नाहीं," असें आलें ! नुकताच सरकारचा ठराव जुन्या थोर घराण्यांतील उमेदवारांस लष्करांत वरील दर्जाची नौकरी द्यावी ह्मणून झाला आहे, तोही, विचारून पाहातां, ह्या मंडळीस माहीत नव्हता. असो. आपल्या घराण्याची परंपरा हल्लींच्या काळींही ठेवतां येईल, आणि आपणांपैकीं कोणी जवान लष्करांत नवीन रुळीप्रमाणें जाईल तर मला आनंद होईल, असें सांगून त्यांची रजा घेतली. पण तरुण पानशे मंडळीचा कूपमंडूकपणा व गांवढळपणा पाहून मला फारशी आशा वाटली नाहीं. सुमारें साठ पाऊणशें वर्षांत एवढा फरक !

तिसरे प्रहरीं मुक्काम हलवून दिव्याच्या हद्दींतच जाधवांची वाडी आहे तेथें वस्तीस गेलों. हे जाधव पिलाजी जाधव ह्मणून जो बाजीराव बल्लाळ यांचा सरदार होता त्याचे

इत्युक्त्वा तां ययौ राजा सापि याता कृषिं निजाम्।
भर्त्रे सर्वं समाचख्यौ जातं यत्पथि तत्तदा ।
कृषीवलस्तया सार्धं ययौ सप्तारमाशु सः ।
प्रणम्य राजवर्यं तं स्थितस्तूष्णीं नृपाग्रतः ।
राजा तस्मै ग्राममेकं ददौ यावद्दिवाकरः ।
कृषीवलोऽतिसंतुष्टो ययौ निजनिकेतनम् ।
एवं राजा दातृवर्यस्तत्समः कः कलाविह ॥
८,४९–५५ ॥

५. टिळेकर हे मूळचे मुंजवडीचे रहिवासी, पण त्यांस मुंजवडी इनाम नाहीं. मुंजवडी कऱ्हा नदीचे कांठीं असून येखतपूर गांवास लागून आहे.

६. दिवें सरदार पुरंदरे यांस इनाम आहे.

७. भिवराव यशवंत व कृष्णाजी माधवराव पानशे यांनीं हा किल्ला १७७५ मध्यें बांधिला, आणि त्यास आपला कुलस्वामी जो मल्लारी त्याचें नांव दिलें.

८. मूळ संपादक यशवंतराव, व त्याचे तीन बंधु आणि सहा मुलगे, हे सर्व रणधुरंधर असून पेशव्यांच्या मोठमोठ्या मोहिमांत कामकाज करून व मर्दुमी गाजवून पतन पावले. नातू गणपतराव विश्वास यानें इंग्रजांशींही दोन हात १८१८ मध्यें केले. पण पुढें सर्वच मावळलें !

वंशज. ह्यांची दुसरी शाखा वाघोली ता० हवेली येथें राहते. वाडीस जाधवांचा चौरस आकृतीचा वाडा आहे. तो एक डोंगरी मध्यें घेऊन गढीसारखा मजबूत व उत्तराभिमुख असा बांधिला आहे. याचे दोन भाग आहेत. मूळचा वाडा डोंगरीच्या माथ्यावर दुमजली बांधला असून वाढविलेला वाडा त्याच्या खालीं दुमजलाच आहे वाढींव वाड्याचे तळमजल्यावर पुढील बाजूस (उत्तरेकडे) पुरुष लोक राहण्याच्या जागा व तिच्या डावे बाजूस कोठी व उजवेबाजूस चूलदान व त्या पलीकडे खाशांची प्रशस्त खोली आहे. दुसरे मजल्यावर पूर्व बाजूस जनानखाना व दक्षिणेस मुदपाकखाना आहे. खाशांच्या खोलीवरच यजमानीन बाईची खोली असून खाशांच्या खोलींतून वरील खोलींत जाण्यास जिना आहे. जनानखान्यांत उजेडासाठीं सुमारें दीड पुरुष उंचीवर झरोके ठेविलेले आहेत. ह्या वेळीं वाड्यांत बायका नसल्यामुळें जनानखाना कसा असतो तें पाहण्यास सांपडलें. वाढींववाड्यांतून मूळवाड्यांत जाणें ह्मणजे एक जिना चढून जावें लागते, तो तिसरा मजला ह्मणावयाचा. यांत पश्चिम बाजूस देवघर व त्यावर गच्ची, पूर्वेस बाळखणी असून तिजवरही गच्चीच. ह्या गच्च्यांवर चढून जावें तों त्यांच्या मधील मोकळ्या जागेंत पारिजातकांचीं झाडें व तुळसीवृंदावन वगैरे पाहून, माडीवर झाडें कशीं वाढलीं, याचें आश्चर्य वाटतें! ती मोकळी जागा ह्मणजे अर्थात् त्या टेंकडीचा माथा असून त्याच्या भोंवताली वाडा बांधीत आणिला आहे, असें मग ध्यानांत येतें.

वाड्यावरून भोंवतालचा प्रदेश लांबवर दृष्टिगोचर होतो. दक्षिणेस सासवड व पलीकडे पुरंदरचा उंच किल्ला व डोंगर व त्या डोंगराचे पूर्वपश्चिम पसरलेले दीर्घ बाहू, पश्चिमेस भोर संस्थानाच्या हद्दीवरील डोंगर, उत्तरेस वामनीभूत अशी दिवेघाटाच्या डोंगरांची ओळ, व पूर्वेस विस्तृत होत जाणारें व सपाट असें कऱ्हा नदीचें पाळें, हीं नजरेस येतात.

हा जाधवांचा वाडा व पानशांचा मल्हारगड हीं दोन दिवे घांटास रोखून धरणारीं मजबूत स्थळें आहेत.

चित्रकलेचे ज्ञान असतें, तर मला ह्या वाड्याचे चित्र काढतां आलें असतें! पण आतां साधा हातनकाशा काढूनच काम भागवायाचें लागत असल्याबद्दल मला वाईट वाटतें.

१९ नोवेंबर.–आज सासवडास मुक्कामास गेलों. सासवड कऱ्हा आणि चामळी ऊर्फ चामणी या नद्यांचे संगमानजीकच वसलेलें आहे. सासवड हें सरदार पुरंदरे यांचें मूळगांव. पुरंदऱ्यांचा अवाढव्य वाडा चिरेबंदी असून, तिन्ही बाजूंनीं बेलाग असा बांधिला आहे. तो पेशव्यांच्या शनवारवाड्यापेक्षां बहुत उंच व बळकट गढीवजा आहे. वाड्याची रचना जाधवांच्या वाड्याप्रमाणेंच आहे. चौक तीन आहेत, ते एकमेकांचे बाजूस आहेत; एका पाठीमागें एक असे नाहींत. बाजीराव पळत असतां वाडा

१. पिलाजीराव याचा मुलगा सटवाजीराव. सटवाजीस दोन मुलगे सुभानजी व जोत्याजी. ह्यांतील धाकटा जोत्याजी ह्यानें किंवा त्याचा मुलगा लाडोजी ह्यानें ही वाडी वसविली. दिव्याचे हद्दींत इनाम व मिराशी जमिनी जाधवांकडे अद्यापही आहेत. वडील घराणें वाघोलीस.

इंग्रजांशीं भांडला. शेवटीं फितुऱ्यानें पूर्वेकडून मोर्चा चालविण्यास सांगितलें, तेव्हां गोळा लागून सातवे दिवशीं वाडा खालीं आला ह्मणून सांगतात. पूर्व बाजूच्या भिंतीस खिंडार आहे व गोळे लागल्याच्या दुसऱ्याही निशाण्या आहेत.

सरदार पुरंदऱ्यांचे मूळ पुरुष अंबाजी त्र्यंबक यांचा आश्रय बाळाजी विश्वनाथ भट यांनीं केल्यावर त्यांचा उभयतांचा अकृत्रिम स्नेह वाढून दोघेही सेनापती धनाजी जाधव यांज-कडेस कारकून होऊन राहिले. पुढें पेशवाई पंत बाळाजीस मिळाल्यानंतर त्यांनीं अंबाजीपंतास आपले मुतालीक केलें. पेशव्यांनीं सासवड ही आपली राहण्याची जागा केली. येथें पेशव्यांचे दोन वाडे आहेत—एक गांवांत व दुसरा नदी पलीकडे. गांवांतील वाड्याचे दोन चौक मोडले. तिसरा शाबूद असून त्यांत सरकारी मराठी शाळा आहे. कऱ्हेपलीकडील वाड्याच्या रच-नेंत फेरफार करून त्यांत हल्लीं मामलतदार कचेरी भरते. बाळाजीपंत येथेंच वारले. पुण्यांत वाडा बांधिल्यावर पेशवे येथून जाऊन तेथें राहूं लागले.

सासवडास बहिरोबाचें ह्मणजे भैरवाचें मोठें देवालय आहे. देवास चौघडा असून ७५० रुपयांचें इनाम आहे.

कुंजिराचा वाडा.-पुरंदऱ्यांच्या मोठ्या वाड्या-नजीकच ह्याची उभारणी झाली. पण तो अपुरताच राहिलेला आहे. कुंजीर हा पुरंदऱ्यांचा लेंकवळा. तो त्यांच्या वाड्यांत वांटा मागूं लागला. त्यास वांटा मिळेना, ह्मणून शेजारींच वाडा बांधून "त्यावरून तुमच्या वाड्यावर लघुशंका करीन!" अशी प्रतिज्ञा करून आक-सानें ह्या वाड्यास त्यानें प्रारंभ केला!! पण वाडाच पुरा झाला नाहीं, तेव्हां बापड्याची ही प्रतिज्ञा पुरी कशी होणार? दैवाचे खेळ वि-चित्र आहेत!! हे कुंजीर ह्मणजे बाजीरावांचे प्रेमपात्र बाळोजी कुंजीर असावे.

कऱ्हा व चांबळी यांच्या संगमावर संगमेश्वर ह्मणून धनत्तर प्रासाद आहे. तसेंच जवळ वटेश्वरा-चेंही देवालय आहे. संगमेश्वराचे घाटाखालींच एक बांधीव कुंड असून संगमाचा प्रवाह त्यांतून वाहात जातो. जवळच ज्ञानदेवाचे धाकटे बंधु सोपानदेव यांची समाधी आहे. एकंदरीनें हें स्थळ रम्य आणि धर्मकर्माचरणास उत्तेजक असें आहे. येथेंच 'तरटी' नामक क्षुद्रपत्रजा झाडें आहेत, त्यांस 'कल्पवृक्ष' ह्मणतात! हें नदीतीर व त्यास लागून असलेली उद्यानपरंपरा ह्यांचा देखावा मोठा आनंदावह आहे. पेश-व्यांचा बाग हल्लीं १२०० रुपये मक्त्यानें माळी लोक पत्करतात.

सासवडची हवापाणी उत्तम, पण पाणी उन्हाळ्यांत तोट्याचें. येथील धोबीलोकांचें काम पुण्याच्या धोब्यांच्यावरही ताण करतें. याकरितां पुणें मुंबईचे चोखाळ लोक येथून कपडे धुवून नेतात! सासवडचे आंबेही फार प्रसिद्ध आहेत.

सासवडच्या सरदार पुरंदऱ्यांकडे जुन्या माहितीचे कागदांचीं दप्तरें बहुत असल्याचें कळतें. पण तीं मिळण्याची मारामार! जुने कागदपत्र कुजवून नाहींसे करण्यापेक्षां प्रसिद्ध केले तर इतिहासाच्या कामीं त्यांचा किती तरी उपयोग होईल. पण ह्या जुन्या घराण्यातील लोकांच्या मनांत ही गोष्ट येईल तो§ सुदिन!

§ अलीकडे रा० वि० का० राजवाडे यांनीं पुरं-दऱ्यांकडील एक बाड मोठ्या प्रयत्नानें मिळवून प्रसिद्ध केलें आहे. त्यांत बहुत उपयोगी अशी माहिती आहे.

ब्राह्मणांत पुरंदरे व ब्रह्मे ह्या घराण्यांचा भरणा विशेष आहे. पाटील जगताप आडनांवाचे आहेत.

सासवडास व पुरंदर किल्ल्यास श्री. नारायणराव यांच्या वधानंतर फारच महत्त्व आलें. श्री० गंगाबाई गरोदर असल्यावरून त्यांस पुरंदरावर पोंचविलें. सखाराम बापू व नाना फडणीस यांनीं राज्याचा कारभार येथूनच ७।८ वर्षें केला. पुरंदरचा पूर्व इतिहासही चमत्कारजनक आहे. तेव्हां तो गड पाहण्याचा आह्मीं बेत केला व तयारीही केली. पण इतक्यांत हवा पालटून २।३ दिवस पाऊसच पडूं लागला! त्यामुळें तो सर्व बेत तहकूब करून आह्मांस मुक्काम हलवून पुढें जावें लागलें. पुरंदर पाहण्याची ही संधी फुकट गेल्यामुळें मला फार वाईट वाटलें.

तारीख २७ नोवेंबर.—सासवडाहून चामळी व हिवरें येथें जाऊन आलों. चामळी चामळी नदीच्या कांठींच वसलें आहे. येथील थोर घराणें सरनाईक यांचें. हे पुरंदर किल्ल्याचेच सरनाईक[१०] मागें होते. त्यांच्या वाड्यांपैकीं एकांत ब्रह्मसमंधाची पीडा होते ह्मणून कळतें. ह्याचें कारण असें सांगतात कीं, पानशांनीं कर्नाटकांत एका द्राविडाचा वाडा लुटून मोडून आणिला, त्याच्या लांकूडकामापैकीं उपयोग सरनाइकांनीं हा वाडा बांधण्यांत केला. तो द्राविड ब्रह्मराक्षस होऊन वाड्यांत राहणारास उपद्रव करतो! हा वाडा ओसाड व पडका असा आहे. त्याच्या देवडीवरच आह्मीं दुपारीं जेवणाचें केलें. आवारांत एक नारळीचें झाड असून तिसरे प्रहरच्या वाऱ्यानें त्याच्या झावळ्या खडखड वाजत. हेंच बहुधा वाड्याच्या भुताळपणाचें कारण असावें!!

शेंडकर व कामथे हीं दोन मराठ्यांचीं घराणीं येथें नांदतात, अर्थात् तीं आतां कुणब्याचा धंदा करितात.

संभोंवतीं आंबराया व बागा नजरेस येतात. चामळीच्या पाण्याच्या विनियोगाचें हें फळ होय.

हिवरें हा गांव सखाराम भगवंत बोकील यांचा. पंताजी गोपिनाथही एथचे रहिवासी. पण ह्या दोघांचा कांहीं संबंध असल्याचें हल्लींच्या बोकील मंडळीस अवगत नाहीं. गोपिनाथपंतास हा गांव शिवाजीनें इनाम करून दिल्याबद्दलही कोणी सांगत नाहीं. ग्रांट डफ साहेबांचें ह्मणणें निराळें पडतें.

हिवऱ्यास गांवकुसूं असून आंत बहिरोबाचें देऊळ आहे. वेशीबाहेरच ओढ्यापलीकडे एक दगडी शिवमंदीर आहे. तें सखाराम बापूंनीं बांधिल्याचें लोक सांगतात. ह्या मंदिरास पाऊसकाळांतही जातां यावें ह्मणून आंबीलओढ्याच्या पुलासारखा दगडी पूल बांधला आहे. मंदिराचा घाट व बांधणी सुरेख आहे. पण त्याची निगा नीट ठेविल्याचें नजरेस येत नाहीं. पाकोळ्यांची घाण फार!

हिवऱ्या सभोंवतीही बागाईत बरेंच आहे.

२८ नोवेंबर.—कोडितास जाऊन परत सासवडास आलों. सरकारी कामाच्या घाईमुळें

१०. शिवाजीनें पुरंदर किल्ला घेतला तो नीळकंठराव सरनाईक किल्लेदाराच्या मुलांपासून. या मुलांस आपल्या सैन्यांत असाम्या देऊन वाढविलें. नीळकंठरावापासून दहावा पुरुष हल्लीं विद्यमान असून काशीक्षेत्रीं शिवगोविंद-धाम येथील व्यवस्था पाहतो.

येथें कांहीं संभाषण करण्यास झालें नाहीं. फक्त खुर्द व बुद्रुक अशीं दोन कोडितें कन्हा नदीच्या दोन्ही बाजूस वसलीं आहेत. त्यांचा, मधून नदी वाहात असल्यामुळें, देखावा मौजेचा दिसतो.

३० नोव्हेंबर.—येखतपूर हें गांव स्वामिभक्त चांपाजी टिळेकर याच्या वंशजांस इनाम[११] आहे. चांपाजीचा वध, तो नारायणराव पेशव्यांच्या अंगावर पडून त्यांचा बचाव करीत असतां, गाड्यांकडून झाला, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. चांपाजीचा नातू किंवा पणतू विद्यमान असल्याचें कळलें. परंतु कामाच्या घाईमुळें त्यांशीं ओळख करण्यास व बोलण्यास सांपडलें नाहीं, ही दिलगिरीची गोष्ट होय. येखतपूरही बागाइती गांव आहे.

बेलसर.—येथें एक चित्पावनांचें घराणें पाहून आश्चर्य वाटलें. घराण्याचें आडनांव शेखदार. शेखदार यांस एक गांव इनाम असल्याचेंही कळलें. रात्रौ बहिरोबाचे देवालयांत वस्ती केली. देऊळ यथातथाच. कन्हा नदी संनिधच वाहते. उद्यां प्रातःकाळींच कूच करून जेजुरीस जावयाचें असा बेत करून आह्मी झोपीं गेलों.

ता० १ दिसेंबर.—प्रातःकाळीं मुक्काम डाळून आह्मी जेजुरीस गेलों. देवळाचे कळस दुरून दिसूं लागले. जय म्हाळसाकांत मल्हारी! बिऱ्हाडाच्या ठिकाणीं बैठक घालून ठेवितात न ठेवितात, व मी खुर्चीवर बसण्यास जातों न जातों, तोंच चार पांच बायका जिना चढून बैठकीवर प्राप्त झाल्या! वळून पाहतों तों त्या घरती बायकांसारख्या दिसल्या नाहींत. कोण आहे?—ह्मणतांच त्यांनीं मुजरा केला. तेव्हां शिपायास दरडावून विचारलें कीं, यांना येथें कोणीं येऊं दिलें? त्यांस रस्ता दाखव! असें ह्मणतांच त्या जिन्याखालीं होऊन, 'आह्मी मुरळ्या आहों, देवाची सेवा करीत असतों, आपणांकडून कांहीं मिळावें ह्मणून मुजरा करण्यास आलों आहों—' असें त्यांतील एक ह्मणाली. त्यांस शिपायानें खालतीं घालविल्यावर त्यांस सांगून पाठविलें कीं, आमचा मुक्काम येथें बरेच दिवस होणार आहे. जाण्यापूर्वी तुह्मांस काय देणें तें देऊं. तुह्मीं पुन्हां आमचेकडे येण्याचें कारण नाहीं. असें ऐकिल्यावर त्या मुकाट्यानें गेल्या.

ह्या मुरळ्यांचें एथें मोठें बंड आहे. देवळांत व रस्त्यांतही यात्रेकरूंस त्या आडवितात व पैसे काढण्यासाठीं फार त्रास देतात, हें माझ्या कानावर पूर्वींच आलेलें होतें. त्यांस एकदां असें झाडून टाकिल्यावर त्या पुन्हां आमच्याकडे आल्या नाहींत, किंवा देवळांतही त्यांचें दर्शन आह्मांस झालें नाहीं! मुक्काम हालविण्यापूर्वीं त्या खालीं येऊन बसल्या होत्या. त्यांस आठ बारा आणे पाठवून दिल्यावर मुजरा करून त्या मुकाट्यानें चालत्या झाल्या. असो.

येथें खंडोबा दैवत मुख्य होय. यासच मल्हारी, म्हाळसाकांत, जेजुरीनाथ, मार्तंड,

११. प्रथम इनाम जुन्नर तालुक्यांत होतें तें सोईचें न पडे ह्मणून त्याचेऐवजीं सल्लास तिसैन मयाव अलफ (सन १७९१।९२) मध्यें येखतपूर इनाम करून दिलें. (सवाईमाधवरावाची रोजनिशी भाग १, पृष्ठ ६३.) टिळेकर हे मूळचे मुंजवडी येथील रहिवासी. मुंजवडी कऱ्हेचे कांठीं सासवडापासून थेट पूर्वेस ३॥ मैलांवर आहे. मुंजवडीस लागूनच येखतपूर आहे. पण मुंजवडी हा गांव टिळेकरांस इनाम नाहीं, असें शोधाअंतीं समजतें.

जीजाकांत इ० नांवें पडलीं आहेत. हा देव शिवाचा अवतार असून भक्तांस पीडा देणाऱ्या मणि आणि मल्ल ह्या दैत्यांचा संहार त्यानें केला. मल्लास मारिलें ह्मणून मल्लारी. त्याचें प्राकृतरूप मल्हारी. म्हाळसा (महालसा) ही त्याची पत्नी ह्मणून म्हाळसाकांत, खांडा नांवाचा खड्ग हातीं धरतो ह्मणून खांडेराव—खंडेराव, अशी या नांवांची व्युत्पत्ति आहे. खंडोबास बायका दोन, म्हाळसा वडील व बाणाई धाकटी.त्यांत म्हाळसा लिंगायित वाण्याची, व बाणाई धनगराची. दोघी सवतींचें पडेना, ह्मणून म्हाळसा देवळाच्या आंत व बाणाई देवळा बाहेर ठेविली आहे !

पुरंदरच्या डोंगरांच्या ओळीच्या शेवटास एका सखल टेंकडीवर खंडोबाचें किल्ल्यासारखें बांधिलेलें देवालय आहे. त्यास 'गड ' ह्मणतात. परंतु मुख्य स्थान कडेपठार ह्मणून त्याच टेंकडीस लागून नैर्ऋत्येस उंच पठार आहे त्यावर आहे. अशीं येथें दोन खंडोबाचीं देवालयें आहेत.

तारीख ३ दिसेंबर.—पहांटेस उठून आह्मी होळकरांचा तलाव उजवे बाजूस टाकून कडेपठाराकडे वळलों. चढाव बराच खर आहे. चढतांना आमची थोडी गाळणच उडाली.सुमारें दोन मैल चाळून गेल्यावर पठारावर पोंचलों. पठाराचें क्षेत्र सुमारें बारा तेरा एकर असावें. हें खंडोबाचें आदिस्थान, येथून भक्तांचे सोईसाठीं खालीं जेजुरीगडावर देव गेले. येथील देवालय लहानसेंच आहे. त्यांत एक मल्लारीचें व दुसरें म्हाळसा देवीचें अशीं दोन लिंगें आहेत. सांगतात कीं, एक कुणबी खणीत असतां त्याच्या कुदळीच्या घावानें जमिनींतून रक्त उसळून येऊं लागलें. तें पाहून तो चकित होऊन रक्त उसळण्याचें कारण काय, ह्मणून हलके हलके आणखी खणून पाहतो,तों देवाचीं दोन लिंगें त्याच्या दृष्टीस पडलीं ! म्हाळसा देवीच्या लिंगास कुदळ लागली होती, त्याची खूण अद्यापही दाखवितात. लिंगाच्या पाठीमागें वीरभद्र भल्या भक्कम मराठ्या वीरासारखा पोशाख केलेला उभा आहे. देवालयाजवळच एक चौकोनी टाकें आहे. त्यांतील पाणी खराब झालेलें होतें. पाण्याची सोय असती तर हा पठार हवा खाण्याचें उत्तम स्थळ झालें असतें. देवदर्शन घेऊन आह्मी जेजुरीच्या देवळाकडे उतरूं लागलों. सुमारें एक मैल उतरल्यावर गडावर आलों. हें देवालय अष्टकोनी चिरेबंदी किल्लेवजा आवारांत आहे. तेव्हां यास ' गड ' ह्मणतात तें अगदीं योग्य आहे. हें स्थल पाहून मनास आनंद होतो. तटावरून देखावा फार लांबचा नजरेस येतो. देवालयाचें तोंड पूर्वेकडे आहे. खंडोबाचें देऊळ लहानसेंच पण चिरेबंदी आहे. वर उंच शिखर विटबंदी आहे. शेजारींच पंचलिंगाचें देवालय आहे. मुख्य देवालयासमोर भलें मोठें कांसव सुमारें दहा बारा हात व्यासाचें आहे. तें पितळेच्या पत्र्यानें मढविलेलें आहे. येथेंच यात्रेकरू भंडार आणि खोबरें उधळितात. देवालयाच्या पायऱ्यांवर चांदीचा पत्रा चढविलेला आहे. गाभाऱ्यामध्यें कडेपठारावरील लिंगाप्रमाणेंच दोन लिंगें आहेत. त्यांच्या पश्चाद्भागीं उभा राहिलेला वीरभद्र ऊर्फ भैरव भल्या मोठ्या मराठ्याप्रमाणें पोशाक केलेला असा आहे. त्याचें पागोटें मराठेशाही असून

रंग पिवळा आहे. हातांत खांडा आहे. मल्लारी आणि म्हाळसा यांच्या चांदीच्या मूर्तीही आहेत. त्या सवाई माधवरावाच्या वेळीं देवास अर्पण केलेल्या आहेत; कारण नवस होता कीं, श्रीमंत गंगाबाईस पुत्र झाला असतां चांदीच्या मूर्ती करून वाहूं. मूर्तींची दुसरी एक जोडी आहे, ती सुवर्णाची. ती थोरले राजाराम महाराज यांनीं चंदीहून पाठविल्याचें सांगतात. मूर्ती फार सुरेख आहेत.

तटाच्या आंतील जागेस दगडी फरसबंदी सर्वत्र केलेली आहे. आणि तिच्या सभोंवतीं दगडी ओहऱ्या बांधल्या आहेत. ओहऱ्याचें काम खंडूजी–सुत मल्हारराव व तुकोजीराव होळकर यांनीं केलेलें आहे. उत्तरेकडील तट व ओहऱ्या मल्हाररावानें शके १६७८ मध्यें ह्मणजे इ० सन १७५६ मध्यें बांधिल्याचा लेख तटावर कोरला आहे.

देवाच्या समोर कांसवाच्या पूर्वेस नंदी असून त्याच्या मागें अगडबंब, शेंदरानें डवरलेला, असा मणिमल्ल दैत्य उभा आहे. त्याच्यामागें पूर्वद्वार आहे, तें सदा बंद केलेलें असतें. कारण सांगतात कीं, जुनी जेजुरी गडाच्या पूर्वेस होती, ती उठून उत्तर बाजूस आली! पण ह्या गोष्टीस बहूत वर्षें झालीं असावीं.

हल्लीं उत्तरेकडील दरवाजा हाच मुख्य दरवाजा झाला आहे. ह्या दरवाजानें बाहेर पडतांच डावे बाजूस यशवंतराव, हवालदार देवाचा, याची मूर्ति आहे. यशवंतरावाच्या वरच्या अंगास खडकांत सुमारें दोन इंच व्यासाचें एक भोंक आहे. त्यांतून काळे भुंगे निघून त्यांनीं देवालयाचा विध्वंस करण्यासाठीं चालून येणाऱ्या औरंगजेबाच्या मुसलमान शिपायांवर हल्ला करून त्यांस मागें हटविलें. ही देवाची करामत पाहून औरंगजेबानें देवाच्या क्रोधशमनार्थ सोन्याचा भुंगा करून देवास अर्पण केल्याचें सांगतात. ह्या भुंग्याचे पंख पाचूचे असून त्याला बोराएवढालीं मोत्यें बसविलीं होतीं, असेंही वृद्ध लोक सांगतात. तो भुंगा सुमारें ४० वर्षांपूर्वी कोळ्यांच्या दंग्यांत चोरीस गेला * !

यशवंतराव हवालदारास मागें टाकून खालीं उतरूं लागलें ह्मणजे पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंस दीपमाळा व मधून मधून दगडी कमानी, खालीं रस्त्यास मिळेपर्यंत, लागून गेल्या आहेत. अशामुळें हा पायऱ्यांचा जिना किंवा सोपानपरंपरा अत्यंत सुशोभित झाली आहे. यशवंतराव हवालदार सोडून पुढें जातांना हेगडे, प्रधान देवाचे, यांची विशाळ ‡ मूर्ति लागते. खालीं उभे राहून वळून पायऱ्यांकडे व वरील गडाकडे नजर फेंकिली ह्मणजे मनास आल्हाद होतो. पायऱ्यांच्या समोरच रस्त्याच्या बाजूनें एक दुकानांची रांग आहे. तेथें भंडार व खोबरें व इतर जिन्नस विकावयास ठेविलेले असतात.

४ दिसेंबर.–कोथळें व पारगांव येथें जाऊन आलों. कोथळें कऱ्हा नदीच्या कांठीं आहे. जगताप आडनांवाच्या मराठ्या घराण्यांचा येथें भरणा विशेष आहे. पाटिलकी त्यांजकडेसच. ह्मातारे पाटीलबोवा सांगतात कीं, जगताप पूर्वीं शिलेदारी करीत असत. जवळच धालेवाडी येथें सोमवती अमावास्येच्या दिवशीं

* राघू भांगऱ्याच्या बंडांत.

‡ हेगडे प्रधान हे म्हाळसादेवीचे बंधु.

जेजुरीनाथ मल्लारी पालखींत बसून कऱ्हानदीवर स्नानास मिरवत येतात. पारगांव हें एक सुरेखसें खेडें आहे. एथें कांहीं संपन्न ब्राह्मणांचीं घराणीं आहेत. मेमाणे ह्या अस्सल मराठे घराण्यांचा भरणा विशेष. पाटीलही तेच. साताऱ्याच्या महाराजांच्या पदरीं जामदार होतों ह्मणतात. बाजीराव पेशव्यांचेही जामदार होतों ह्मणून सांगतात. यशवंतराव पानशे यांचें कुटुंब येथील एका ब्राह्मण घराण्यांतील. ह्या बाईनें येथें रामचंद्राचें मंदिर बांधिलें, त्यांत मुरलीधरही स्थापिला आहे. शेजारीं अमलें येथें सरदार दरेकरांचे मोठमोठे वाडे असून त्यांस जहागीर असल्याचेंही सांगतात. अधिक माहितीची व कागदपत्राची चौकशी करतां लोक साशंक दिसले, ह्मणून अधिक शोध करण्याचें सोडून दिलें.

तारीख ५ दिसेंबर.—जेजुरी येथील मल्लारी-गौतमेश्वराचें देवालय पाहण्यास गेलों. मल्लारी ह्मणजे होळकर घराण्याचा मूळ पुरुष. मल्हारराव होळकर, व गौतमा ह्मणजे त्याची सर्वांत वडील पत्नी गौतमाबाई, ह्या उभयतांचें नांव देऊन त्यांचे दत्तक पुत्र तुकोजीराव होळकर यांनीं हें शिवालय बांधिलें. मंदिरासमोरच अवाढव्य पण प्रमाणशुद्ध घडलेला असा नंदी दृष्टीस पडतो. बसलेल्या नंदीची उंची सुमारें ६ फूट होईल, इतकी ही प्रतिमा मोठी आहे! असे मोठे नंदी दुसरे कोठें पाहण्यास मिळतील काय? एवढा मोठा व सुरेख नंदी, पण त्यावर छपरी नाहीं ! त्यास ऊन व पाऊस सोसावा लागतो !! त्यामुळें त्याच्या मधोमध भेग पडली आहे.

नंदीस उजवी घालून मंदिरांत शिरतांना त्याची साधीच पण सुबक बांधणी नजरेस येते. मंदिरावर बाहेरच्या बाजूसच लेख कोरलेला आहे, त्यांत लिहिलें आहे कीं, मल्हारजी-सुत तुकोजी होळकर यांनीं शके १७१२ मध्यें हें मंदिर बांधिलें. ह्यावरून तुकोजी हा अहल्याबाईनें आपला पुत्र न ह्मणवितां त्यास मल्हाररावाचा पुत्र असें मानिलें. आंतल्या बाजूस भव्य असा सभामंडप आहे. त्याची बांधणी एकंदर मंदिराप्रमाणें साधीच पण सुबक अशी आहे. चित्रें वेलपत्तींची गर्दी बिलकूल नाहीं; पण प्रत्येक भाग प्रमाणशुद्ध असल्यानें मनास आल्हाद होतो. मंदिर आंखणाराची व तें आंखणीप्रमाणें बांधणाऱ्या मेस्त्रीची दोघांचीही प्रशंसा करावी अशी याची मांडणी व उभारणी आहे. सभामंडपापलीकडे गाभारा. तेथें प्रकाश चांगला असून पिंडी स्पष्ट दिसते. पिंडीभोंवतीं संगमरवरी पाषाणाची चौकोनी मर्यादा केलेली आहे. पिंडीच्या मागें एका दगडी चबुत्र्यावर मल्हारराव व त्याच्या तीन पत्न्या यांच्या मूर्ती स्थापिल्या आहेत. पिंडीकडे तोंड करून उभें राहून डावीकडून उजवीकडे दृष्टि टाकिली ह्मणजे प्रथम गौतमाबाईची, नंतर मल्हाररावाची व त्याच्या डाव्या बाजूस धाकट्या बायका रखुमाबाई व बनुबाई यांच्या मूर्ती स्थापिल्या आहेत. गौतमाबाई पोक्त व वयस्क अशी दिसते. मल्हारराव वीरासन घालून बसलेला असून तांबडी चड्डी चढविलेला असा आहे, व त्याच्या हातीं तलवार आहे. वयानें मध्यम वयाचा दिसत असून त्याचा बांधा मदबूद व मूर्ति दिसण्यास भव्य अशी आहे. पोगोटें मराठेशाही असून

राजबिंड्याचीं भूषणें व पोशाख चढविला आहे. रखुमाबाई व बनूबाई ह्या सडपातळ असून अल्पवयी दिसतात. तिघीही मल्हाररावाबरोबर सती गेल्या ह्मणून समजतें. हे मल्लारीगौतमेश्वराचें मंदिर व गाभाऱ्यांतील पिंडी व त्या मागें बसविलेल्या ऐतिहासिक जनांच्या मूर्ती पाहून मनास आनंद होतो.

ह्या मंदिराच्या मागेंच लागून होळकरांचा तलाव आहे. तो चौकोनी आहे. हा तलावही तुकोजी होळकर यांनीं वरील मंदिराच्या पूर्वींच बांधिला. याचें क्षेत्र सुमारें २९।२६ बिघ्यांचें असावें. गांवाच्या वायव्येस हा तलाव असून उंचवट्यावर आहे, त्यामुळें त्याचें पाणी नळानें खालीं गांवांत नेऊन हौदांत सोडतां आलें आहे. तलावाच्या दक्षिणेस एक चांगला बाग आहे.

पेशव्यांचा तलाव.—हा जुन्या जेजुरीजवळ आहे. हा सुमारें ४०।४५ बिघे व्यापितो. वर्तुलाकार आहे. भोंवताली दगडाची भक्कम भिंत आहे. हा बाजीराव रघुनाथ यांनीं बांधिला. त्याचा उपयोग जित्रापास व्हावा ह्मणून जागोजाग पाणी घेण्यास मार्ग ठेविले आहेत. तलावाचें अवाढव्य काम पाहून मन थक्क होऊन जातें, व पूर्व काळींही शाहाणे एंजिनिअर होते अशी खात्री होते. हल्लीं युरोपियन पद्धतीनें शिकलेले एंजिनिअर यांनींही ह्या तलावाचें काम पाहून त्यापासून थोडेंबहूत शिकावें असें तें आहे, असें मला वाटतें. हल्लीं तलाव फुटून गेल्यामुळें आंत पाणी फारच थोडें राहतें. तळ्याच्याकांठीं गणपतीचें देवालय आहे.

मल्लारितीर्थ.—जवळच ह्या नांवाचें कुंड आहे. तेथें पतिपत्नी ह्मणजे जोडपें स्नान करतात. यात्रेकरू लोकांस हा स्नानविधि जोडप्यानें करावा लागतो.

जेजुरीची यात्रा वर्षांतून चारदां भरते. ती मार्गशीर्ष, पौष, माघ व चैत्र पौर्णिमेस भरते. वऱ्हाड, खानदेश व कोंकण येथूनही लोक येतात. यात्रेकरूंत मराठे लोकांचा भरणा फार ह्मणून समजतें. कोंकणांतून मच्छीमार कोळीही यात्रेस येतात. देवाचें दर्शन घेणें, नवस फेडणें, देवापुढील कांसवावर बेलभंडार उधळणें, वाघ्या मुरळ्यांचें जागरण (नाच व गायन) करणें, मल्लारितीर्थांत स्नान करणें, बकरा देणें, ब्राह्मणभोजन घालणें, वगैरे कृत्यें यात्रेकरूंस जातिपरत्वें करावीं लागतात. गुरवांचीं सुमारें ५०।६० व ब्राह्मण उपाध्यांचीं सुमारें ६०।७० घरें जेजुरीस आहेत. व्यापार बेताबाताचाच. म्युनिसिपालिटी आहे ती यात्रेकरूंवर बसविलेल्या करावर चालते. कर थोडा, मुलास ८।. मोठ्या माणसास ८॥- असा आहे. यात्रेमध्यें देवापुढें ज्या भेटी, देणग्या वगैरे येतील तें सर्व उत्पन्न देवाचें. त्याची व्यवस्था पंचमंडळीकडे आहे.

‘सवती—सवतीचें भांडण’ ह्या नांवाचें गाणें मुरळ्या ह्मणतात. त्यांत खंडोबाच्या दोन बायका म्हाळसा व बाणाई यांचा चुरशीचा संवाद आहे. तसेंच कडेपठारावरच्या मार्गावर दोन खूब मोठाल्या दगडी एकावर एक ठेविलेल्या अशा दृष्टीस पडतात. त्या सासवासुना असून त्यांच्या झगड्यांत शेवटीं सून सासूच्या उरावर बसली ह्मणून सांगतात ! ह्या भांडणाचेंही

गाणें जेजुरीस ऐकावयास मिळतें. दोन्ही मधील थोडासा ग्राम्य भाग आहे तो सोडून दिला तर त्यांत विनोद बराच आहे.

ता० ७ दिसेंबर.—सकाळींच पिसर्वे येथें गेलों. रस्ता खराब. येथें कोलते आडनांवाचे कुणबी आहेत. गांवांत सर्व तेच. याप्रमाणें पुष्कळ गांवें एकाच आडनांवाच्या कुटुंबांनीं भरलेलीं असतात. स्कॉटलंडांत क्लॅन (clan) असतात त्यासारखेंच थोंडेसें हें आहे. एका पुरुषानें पाटिलकीचें वतन वगैरे मिळवून गांवची वसाहत केल्यावर, त्याच्या घराण्याचा प्रजातंतु वाढत वाढत त्याचीं पुष्कळ कुटुम्बें झालीं असावीं. गांवांत परभुणे आडनांवाच्या ब्राह्मणांचीं घरें बरींच आहेत. त्याशिवाय दुसरें ब्राह्मण कुटुम्ब येथें नाहीं. शिंद्यांच्या फौजेंत कोलते शिलेदारी करीत असत. कांहीं कोलते दुसऱ्या बाजीरावाच्या पदरींही खिजमतगार किंवा हुजरे होते ह्मणून समजतें.

माळशिरस.-पिसर्व्याहून सायंकाळीं माळशिरसास वस्तीस गेलों. बसावयास घोडें असतें तर बरें झालें असतें. रस्ता इतका दगडाळ आहे कीं गाडींत बसून जाण्यानें माझें आंग आंबून गेलें !

हें धावडशीच्या स्वामींचे शिष्य भागवत यांस इनाम आहे. हल्लींच्या इनामदाराचें नांव गोपाळराव उर्फ रावसाहेब भागवत. ह्यांच्याजवळ धावडशीकर स्वामींची बखर आहे. ती वाचून पाहतां छापून प्रसिद्ध झालेल्या बखरीचीच हुबेहूब नक्कल आहे असें भासलें. धावडशीचे स्वामी येथें कधीं कधीं राहात असत.

येथील मराठे सर्व यादव आडनांवाचे. दुसऱ्या आडनांवाचें एखादें दुसरें घराणें असल्यास नकळे ! ब्राह्मण घराणीं अत्रे व बुरशे उपनांवाचीं आहेत.

तारिख ८ दिसेंबर.–माळशिरसच्या उत्तरेस सुमारें दीड मैलावर एका डोंगरीवर भुलेश्वर या नांवाचें देवालय आहे. तें पाहण्यास मी पहांटेसच गेलों. त्या देवळाचें काम फार जुनें व भव्य असें आहे. देवालयाचे दगडी खांब व भिंती यांवर भारतादि ग्रंथांत वर्णिलेले कथाभाग कोरले आहेत. देवालयाचे सर्व भाग या प्रकारें सुशोभित केलेले होते. पण त्या खोदींव मूर्ती औरंगजेबाच्या हुकुमानें जागोजाग छिन्नविच्छिन्न करून टाकिल्या आहेत ! एकही सबंध मूर्ती येथें सांपडावयाची नाहीं ! घारापुरींतील लेण्यांतल्या मूर्तींपेक्षां ह्या मूर्ती पुष्कळच लहान, पण सुबक आहेत. उत्तरेकडील भिंतीवर भारती युद्धाचीं खोदींव चित्रें आहेत. त्यांत भीम हत्तींस धरून आकाशांत फेंकीत आहे असें दाखविलें आहे. युद्धांतील रथ अगदींच साधे असे आहेत. हल्लीं तुळशीबागेंत किंवा इतरत्र काढिलेल्या चित्रांतील रथांशीं यांचें मुळींच साम्य नाहीं. इलियड पुस्तकांत प्राचीन ग्रीक योद्धयांच्या रथांचीं चित्रें असतात, त्यांशीं या रथाचें साम्य चांगलें जुळतें. रथी उभा राहून बाण सोडतो. त्याच्या डोकीवर छपरी, छत किंवा बसावयास, टेकावयास गाद्या लोडें वगैरे कांहींच नाहीं! सारथी बसलेला, रथी उभा, असे घोडे जुंपलेले रथ येथें कोरलेले आहेत. द्रौपदीस्वयंवराच्या वेळीं अर्जुन तप्त तैलांत खालीं पाहून यंत्रानें फिरणाऱ्या वरील मत्स्यनेत्राचा वेध करीत आहे,

तो देखावाही मोठा सुबक दिसतो. ह्या मूर्तींत पुरुष असोत कीं स्त्रिया असोत, त्यांचा उरोभाग अधिक उचललेला दिसतो. तो तेव्हां प्रत्यक्ष तसा नसावा. निदान हल्लीं तरी तसा नाहीं. दगडी जाळींतून सूर्यकिरण देवालयांत प्रवेश करितात. लहानशा जिन्यानें याच्या सभामंडपांतून देवालयांत प्रवेश करावा लागतो. जिन्याच्या दोन्ही भिंतींवर शिवगणांच्या मूर्ती आहेत. त्यांत गणेश आणि वीरभद्र प्रमुख आहेत. जिना चढून वर जातों तों सूर्योदय झाला व देवालयांत जिकडे तिकडे प्रकाश पडला! असें उत्तम प्राचीसाधन येथें केलेलें आहे. देवालयाच्या गाभाऱ्यांत गेलों तेथें पिंडींतील संगमरवरी बाणावर पितळी मुखवटा बसविलेला होता. तो मुखवटा व बाण काढल्यावर त्या खालीं लहानशी गर्ता आहे. तींत मुख्य तीन लिंगें आहेत. तीं तीन कोपऱ्यांत तीन टेंगळांच्या रूपाचीं असून ब्रह्मा, विष्णु, महेश्वर, या तिघांचीं आहेत. ह्या तिन्ही टेंगळांच्या मध्यें थोडेंसें पाणी सांचतें, तें फडक्यानें पुसून काढिलें तरी पुन्हां सांचतें ह्मणून सांगतात. तीन लिंगें कापुराचा तुकडा पेटवून मला दाखविलीं, नाहीं तर तीं दिसावयाचींच नाहींत!

हें प्राचीन देवालय कोणी कधीं बांधिलें त्याबद्दल दाखला मिळत नाहीं. दंतकथाही नाहीं. धावडशीकर स्वामींनीं देवालयाचा जिर्णोद्धार केल्याचें सांगतात. वरील शिखर व मनोरेही चुन्यानें त्यांनींच बांधिले ह्मणून समजतें. तसाच सभामंडपही स्वामींनींच बांधिला. त्यांची भुलेश्वरावर बहूत भक्ति होती असें दिसतें. ह्या देवालयाच्या बाजूस लहानसा मठ आहे, तेथें ते राहत असत. तसेंच भुईच्या खालीं एक गुहा आहे तेथें ते समाधी लावीत असत. ही गुहा हल्लीं पडून गेली आहे. तिच्या खालच्या अंगास डोंगराच्या पोटांत खोदलेलें एक पाण्याचें टाकें आहे. पण तेथें पाकोळ्यांची वस्ती झाली असल्यामुळें तेथें घाण येते. पाणीही बहुधा खराब झालेलें असावें.

येथें एक मारवाडी व एक चित्पावन ब्राह्मण देवाची सेवा करण्याकरितां राहिलेले आहेत. चित्पावन ब्राह्मण नेने हा गुहागराहून आलेला आहे.

मुख्य देवालय हल्लीं मोडकळीस येण्याच्या रंगास आलें आहे; विशेषतः त्याची पश्चिम बाजू. होळकर सरकारानें जीर्णोद्धारासाठीं चार हजार रुपये मंजूर केल्याचें कळतें. यवत व उरळी हीं दोन रेल्वे स्टेशनें येथून १॥ मैलांवर आहेत. तिकडून भुलेश्वरास येण्याचें सोपें, मात्र चढाव बराच आहे.

भुलेश्वरास जाऊन देवालयाचें शोधपूर्वक वर्णन लिहिण्याजोगतें हें स्थळ आहे. पण इकडे प्राचीन स्थळांची माहिती मिळविणारे (Antiquarians) यांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं.

[अपूर्ण.]

पूर्वीच्या काळचे अलंकार.

[या विषयावर ' साहित्य ' नांवाच्या बंगाली मासिक पुस्तकांत बाबू श्रीगिरीशचंद्र वेदांततीर्थ यांचा एक सुंदर लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्राचीन काळच्या स्त्रीपुरुषांच्या अंगावरल्या अलंकारांविषयीं बरीच उपयुक्त माहिती दिली असल्यामुळें, मराठी वाचकांसाठीं ती माहिती येथें संक्षेपानें देत आहें.

वा. गो. आपटे.]

रुचिवैचित्र्य, देशभेद व कालभेद यांच्यामुळें मनुष्याच्या विलासाच्या उपकरणांत भिन्नता येते. सध्यांच्या काळीं तरुण पुरुषाच्या अंगावर—हाताच्या बोटांत अंगठी, नाकावर चष्मा व खिशांत घड्याळ व सांखळी, याच्यापलीकडे कांहीं अलंकार बहुधा दिसत नाहींत. पण तेंच एखाद्या मारवाड्याकडे पहा. त्याच्या कमरेला चांदीचा करदोडा, गळ्यांत सोन्याचा गोफ, आणि हातांत सलकडें हीं बहुधा दिसतात.

पूर्वीच्या काळीं कित्येक अलंकार स्त्री व पुरुष या दोघांच्याही अंगावर दिसत. भरतमुनीच्या नाट्यशास्त्रावरून असें दिसतें कीं, १ आवेध्य, २ बंधनीय, ३ क्षेप्य, आणि ४ आरोप्य,असे अलंकाराचे चार प्रकार असत. पहिल्याचें उदाहरण कुंडल, दुसऱ्याचें कटिसूत्र व अंगद, तिसऱ्याचें नूपुर, व चवथ्याचें स्वर्णहार.

चूडामणि व मुकुट हीं शिरोभूषणें होतीं; कुंडल हें कर्णाभरण होतें. मुक्तावलि (मोत्यांचा कंठा), हर्षक, व सूत्र हीं कंठाभरणें होतीं; वटिका व अंगुलिमुद्रा हीं बोटांत धारण करीत; केयूर व अंगद हीं हाताच्या कोपऱ्याच्या वरच्या भागाचीं भूषणें होतीं; त्रिसर व हार हीं गळ्यांतलीं व स्तनमंडलावरचीं आभरणें होतीं; व तरल आणि सूत्रक हीं कटि भूषवीत असत. हे अलंकार स्त्रियांप्रमाणें पुरुषही धारण करीत.

देवता व राजस्त्रिया यांच्या कित्येक आभरणांचीं नांवें सांगतों:-शिखापाश, शिखाजाल, खंडपत्र, चूडामणि, मकरिका, मुक्ताजाल, गवाक्षि, कुंडल, खड्गपत्र, वेणीगुच्छ, दारक, ललाटतिलक, भ्रूर, कर्णिका, कर्णवलय, आपेश्रुक, रत्नखचित दंतपत्र, कर्णपूर, पत्रलेखा इ० या अलंकारांच्या आकृति कशा असत, व कोठें कोणता अलंकार घालीत, इत्यादि माहिती संपूर्णत्वानें मिळत नाहीं. तथापि प्राचीन काळच्या ज्या मूर्ति लेण्यांतून वगैरे पाहण्यास मिळतात, त्यांवरून कित्येक अलंकारांच्या आकृतींची कल्पना करतां येते; पण त्यांचीं नांवें त्यांवरून कळत नाहींत. त्यासाठीं व्याकरणांचें साह्य घेऊन कांहीं अलंकारांविषयींची माहिती पुढें दिली आहे.

रामायणांत हार, हेमसूत्र, रशना (कमरपट्टा) अंगद, केयूर, कुंडल, वलय (कंकण) वगैरे ठळक ठळक अलंकारांचीं नांवें आहेत. अंगदाला ' विचित्र ' व केयूराला ' शुभ ' अशीं विशेषणें लाविलेलीं आढळतात. त्याचप्रमाणें अंगद व कुंडल हे अलंकार सोन्याचे असत, अशीही माहिती मिळते.

मस्तकाभरण.—आतां अलंकारांचें वर्णन करतांना मस्तकापासून प्रारंभ करूं. सुप्रसिद्ध कोशकार अमरसिंह यानें अलंकारांच्या यादीला येथूनच प्रारंभ केला आहे. त्यानें दिलेल्या

यादींत स्त्रियांचे सीमांतांत (केसांच्या भांगांत) धारण करण्याचे अलंकार बालपाश्या व परितथ्या असे दिले आहेत. हे अलंकार बंगाल्यांत अद्यापही दृष्टीस पडतात. हे सोन्याचे असतात. हिंदुस्थानी स्त्रियांचे हेच अलंकार रुप्याचे केलेले असतात. ललाटाचे अलंकारांना पत्रपाश्या व ललाटिका अशीं नांवें होतीं. पत्रपाश्या या नांवावरून झाडांच्या पानांच्या आकाराचे ते असावे असें दिसतें. झाडांच्या लहान लहान पानांच्या समूहाचा डेख हा केंद्र समजून निरनिराळ्या दिशांना त्यांचीं अग्रें होतील अशा रीतीनें त्या अलंकाराची सुंदर रचना केली असे[1].

कर्णाभरणें.-अमरसिंहाच्या मतें याचे कुंडल व कर्णिका असे दोन प्रकार असत. कर्णिकेलाच तालपत्र असेंही दुसरें नांव होतें. हा अलंकार कानाच्या वरल्या भागीं घालीत. कुंडल खालच्या भागांत घालीत. हेमचंद्र ह्मणतो कीं, कुंडलाच्याच जागीं तालपत्र व आटंक हे अलंकार घालीत, व कानाच्या मागच्या बाजूस उत्क्षिप्तिका, कर्णांदु व बालिका हे अलंकार असत.

प्राचीन काळीं हल्लींच्या सारखे दोन्ही कानांत सारखे अलंकार न घालतां एकाच कानांत एखादा अलंकार घालण्याचाही प्रघात होता, असें दिसतें. बाणाच्या कादंबरींतलें चांडालकन्यकेचें वर्णन पहा. (' एककर्णा मुक्तदंतपत्रप्रभाधवलितकपोलमंडलाम् '.) अशा रीतीनें एका कानांत ताटंक, तर दुसऱ्यांत कुंडल, किंवा दुसरा एखादा अलंकार आपापल्या आवडीप्रमाणें घालीत. वासवदत्ता नाटिकेंत ताटंकाचा विशेष उल्लेख आला आहे[1].

बाणभट्टानें दिलेल्या दधीचिवर्णनांत त्रिकंटक नांवाच्या एका अलंकाराचें नांव आलेलें आहे, व कदंबाच्या कळ्यांप्रमाणें स्थूल अशीं दोन मोत्यें व त्यांच्यामध्यें भरकतमण्याचा लोलक मिळून हा अलंकार होत असें असें त्याचें वर्णन दिलें आहे.

भागवताच्या दशमस्कंधांत गोपींचें वर्णन करतांना ' जवलोलकुंडला ' असा शब्द आला आहे. यावरून हल्लीं मुलांच्या कानांतल्या डुलांप्रमाणें कुंडलांचा उपयोग त्यावेळीं करीत असत असें दिसतें. प्राचीन देवमूर्तींच्या कानांत कुंडलें दिसतात. त्यांचा आकार गोल असतो, व त्यांच्यांवर सुंदर कारागिरीचें काम केलेलें असतें. या कुंडलांत नानाप्रकारचीं सुंदर रत्नें बसवीत असले पाहिजेत. शिशुपालवधकाव्यांत कृष्णाच्या कुंडलांचें वर्णन आहे. त्यांत रत्नांचा

१ महाराष्ट्र स्त्रियांच्या केशाभरणांतही केतकी-(केवडा) च्या पत्रसमूहाची अशी रचना केलेली दिसते.-वा. गो. आ.

१. कानाला भोकें पाडून त्यांत मुलींना काप, बाळ्या व मुलांना भिकबाळी वगैरे अलंकार घालण्याची महाराष्ट्रीयांत चाल आहे. ही रानटीपणाची हौस आमच्यांत कोठून आली, याचें युरोपियन पंडितांना व त्यांच्या मतांच्या धोरणानें आपलीं मतें बनविणाऱ्या देशी पंडितांना, मोठें नवल वाटतें. पण याचें सयुक्तिक कारण सुश्रुतांत सांपडतें. तें असें कीं, "रक्षाभूषणनिमित्तं बालस्य कर्णौ विध्येते" (सूत्रस्थान, १६ वा अध्याय.) शरीररक्षणासाठीं औषधी मुळी वगैरे धारण करण्यासाठीं कानाला भोकें पाडण्याची चाल आरंभीं पडली, व मागून त्यांचा उपयोग अलंकारधारणाकडे होऊं लागला.-वा. गो. आ.

उल्लेख आहे. रामायणांत लंकेंतल्या स्त्रियांच्या वर्णनांत कुंडलांत हिरे बसविलेले होते असें ह्मटलें आहे. महाभारतांत दमयन्तीस्वयंवरासाठीं आलेल्या राजांच्या कानांत मणिकुंडलें होतीं, असें त्या वर्णनावरून दिसतें. त्याच ग्रंथांतल्या ऋष्यशृंगाच्या कथेंत त्याच्याकडे आलेल्या वेश्येचें जें वर्णन केलें आहे त्यांत ह्मटलें आहे कीं, तिचे कान चक्रवाक पक्ष्याप्रमाणें विचित्र अशा कुंडलांनीं झांकले होते.

कंठभूषणें.–कंठी वगैरे अलंकारांना ग्रैवेयक असें नांव होतें. किंचित् लंबमान अशा कंठाभरणाला ललन्तिका ह्मणत. ही सोन्याची असल्यास तिला प्रालंबिका व मोत्यांची असल्यास उरःसूत्रिका ह्मणत. हल्लीं लहान मुलांच्या गळ्यांत हासळी घालतात. आईबाप आपापल्या शक्तीप्रमाणें ही सोन्याची किंवा चांदीची करतात. ही हासळी घालण्याची चाल आधुनिक नाहीं, पुरातन काळापासून आलेली आहे. फरक इतकाच कीं, हल्लीं ही लहान मुलांच्याच गळ्यात घालतात, पूर्वीं मोठ्यांच्याही गळ्यांत असे.

हल्लीं स्त्रिया व पुरुष गळ्यांत सोन्याच्या, प्रवाळाच्या, तुलसीकाष्ठाच्या किंवा रुद्राक्षांच्या माळा घालतात. पूर्वीं माळा मस्तकावर धारण करीत असें दिसतें. ‘माल्यं मालास्रजौ मूर्ध्नि’ असें अमरकोशांत आहे. मेदिनीकोशावरून दिसतें कीं, या पुष्पमाला असत. पण वैदिक ग्रंथांत सुवर्णमालांचा उल्लेख सांपडतो. तांड्यमहाब्राह्मणांत यज्ञकर्त्या ऋत्विजांना देण्यांत येणाऱ्या अलंकारांचें वर्णन करतांना उद्गात्याला सुवर्णमाला द्यावी असें सांगितलें आहे. होत्याला रुक्म नांवाचा सुवर्णालंकार देत. गोभिलसूत्रांत स्रग्धारण (माला धारण करणें) विहित सांगितलें आहे. यावरील भाष्यांत ‘स्रजं पुष्पमाला शिरःप्रधानत्वादंगानां शिरस्यावध्नीत’ असें ह्मटलें आहे. यावरून गोभिलाच्या वेळीं पुष्पमाला शिरावर व ‘स्नात्वाऽलंकृत्या०’ इत्यादि वचनांवरून स्वर्णमाला कंठांत धारण करीत असें दिसतें. याकाळीं मालाधारणाचा उद्देश केवळ शोभा हा होता. पण पुढें वैष्णवांनीं त्याला धर्माचें स्वरूप देऊन तुळशीची काष्ठमाला धारण करण्याचा प्रघात घातला, हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे.

वैदिक युगांत वक्षःस्थलावर धारण करण्याचा निष्क नांवाचा एक अलंकार होता. याचा आकार कसा होता, तें कळत नाहीं. अमरसिंह त्याला उरोभूषण ह्मणतो. मेदिनीकोशांतही तसेंच आहे. ह्या दोन्ही कोशकारांनीं या अलंकाराला माला म्हटलेलें नाहीं. पण छांदोग्योपनिषदांत त्याला हार ह्मटलेलें आहे. (‘तमुह परःप्रत्युवाचाह हारे त्वाशूद्र’ इ०) वैदिकसृंका नांवाचा आणखी एक हारासारखाच अलंकार होता. धर्मराज यमानें प्रसन्न होऊन नचिकेत्यास अशा प्रकारचा एक अलंकार दिल्याविषयींचा उपनिषदांत उल्लेख आहे.

प्राचीन संस्कृतसाहित्यांत हाराविषयींचे उल्लेख फार आहेत. हे हार मोत्यांचेच असत. म्हणून त्यांना ‘मुक्तावलि’ म्हणत. हारांच्या सराला यष्टिलता म्हणत. हारांच्या सरांच्या संख्येवरून त्यांला निरनिराळीं नांवें होतीं. जसें—

शंभरपदरी हाराला देवच्छंदक, बत्तीस पदरी हाराला गुत्स, चोवीस पदर असल्यास गुत्सार्ध, चौतीस पदर असले तर त्यास गोस्तन, वीसपदरी हाराला माणवक व एकच पदर असला तर त्यास एकावलि म्हणत. पदर एकच पण त्यांत सात आठशें मोत्यें असलीं तर त्याला नक्षत्रमाला असें नांव देण्यांत येई. (अमरकोशावरची भानुजी दीक्षिताची टीका पहा.)

अर्वाचीन साहित्यांत देवंदक नांवाच्या हाराला शतेश्वरी म्हटलेलें आढळतें. इंदुच्छंद नांवाचा एक हार असे. हा देवांच्या गळ्यांत असे. याला एकहजार आठ पदर असत. विजयच्छंद हाराला त्याच्या निम्मे पदर असत. इंदुच्छंद हाराचें प्रमाण चार हात लांब, व विजयच्छंदाचें अर्धे ह्मणजे दोन हात लांब सांगितलें आहे. एकशेंआठ किंवा एक्यांयशीं पदर असून दोन हात लांब हार असेल,तर त्याला देवच्छंद असें नांव असे. चौसष्ट पदरी मोत्यांच्या हाराला अर्धहार व चवऱ्याण्णव पदरी हाराला रश्मिकलाप अशा संज्ञा असत. आठपदरी हाराला मंदर, पांच पदर असल्यास हारफलका, सत्तावीस पदरी व एक हात लांबीच्या हाराला नक्षत्रमाला, व एक हात लांबीच्या व सोन्याचे मणि आणि मोत्यें यांनीं युक्त अशा हाराला मणिसोपान अशीं नांवें होतीं. मणिसोपान हाराच्या मध्यभागीं जर सोन्याचा एक मोठा मणि असेल तर त्याला चाटुकार अशी संज्ञा असते. एकावलि हाराच्या मध्यभागीं असा मणि असला,तर त्याला यष्टि असें नांव देण्यांत येई.

विक्रमोर्वशी नाटकांत उर्वशीच्या एकावली हाराला वैजयंतिका म्हटलें आहे. भागवतांत श्रीकृष्णाच्या गळ्यांतल्या हाराला वैजयंती माला म्हटलेलें आढळतें. (दशमस्कंध). उर्वशीची वैजयंतिका व श्रीकृष्णाची वैजयंती या दोन्ही एकाच प्रकारच्या होत्या कीं निरनिराळ्या प्रकारच्या तें सांगतां येत नाहीं.

अंगुरीय.—अंगुरीय, अंगुलीय, अंगुलीयक व ऊर्मिका हीं नांवें एकाच अलंकाराचीं आहेत. या अलंकारावर नांवाचीं अक्षरें किंवा कांहीं चिन्ह असे. सध्यां या अलंकाराला मोहोर ह्मणतात. नंदअमात्य राक्षस याचा अंगुलिमुद्रा दुसऱ्याच्या हातांत गेल्यामुळेंच त्याचे सगळे बेत फसले ही मुद्राराक्षस नाटकांतली कथा सुप्रसिद्धच आहे. दुष्यंतानें शकुंतलेला दिलेली अंगुलीमुद्रा (अंगठी) शकुंतलेच्या दुःखाला कशी कारण झाली तें शाकुंतल नाटकांत दाखविलें आहे. कित्येकवेळां या अंगठींत विलापहारक असा खडा बसवीत, असें मालविकाग्निमित्र नाटकावरून दिसतें.

कटिभूषण.—स्त्रियांचें कटिभूषण व पुरुषांचें कटिभूषण यांना निरनिराळीं नांवें होतीं. स्त्रीकटिभूषणांचीं मेखला कांची, सप्तकी, रशना, व सारसेन अशीं नावें कोशकार देतात. कटिभूषणाला एकच पदर असला तर कांची, आठ असल्यास मेखला, सोळा असल्यास रशना, व पंचवीस असल्यास कलाप अशा संज्ञा असत. (भानुजी दीक्षिताची टीका पहा.) पुरुषांच्या कटिभूषणाला शृंखल ह्मणत. अमरसिंहानें सारसन हें नांव स्त्रियांच्या कटिभूषणांच्या यादींत जरी घातलें आहे तरी तें पुरुषांचेंही कटिभूषण असावें असें दिसतें. कारण शिशु-

पालवधकाव्यांत श्रीकृष्णानें कमरेला सारसन हें भूषण घातलें असल्याचें त्यांत वर्णन आहे. कादंबरींत मेखलाभरणांत झुण् झुण् शब्द करणाऱ्या रत्नमालांचाही समावेश केलेला आहे. सुबंधु कवीच्या वासवदत्ता नाटिकेंतही रसनेंत (कमरपट्टयांत) रत्नमाला असे, अशाविषयीं उल्लेख आहे. कालिदासानें रघुवंशांत ह्मटलें आहे—

> अर्धांचिता सत्वरमुत्थितायाः
> पदे पदे दुर्निमिते गलन्ती ।
> कस्याश्चिदासीद्रशना तदानीं—
> मंगुष्ठमूलार्पितसूत्रशेषा ॥

यावरून सोन्याच्या तारेंत मणि ओवून हा अलंकार केला असे असें दिसतें. जुन्या मूर्तीच्या कमरेलाही अशाच प्रकारचा सूत्रमणिसंयुक्त हा अलंकार दिसतो.*

पादाभरणें.—यांना पादांगद, तुलाकोटि, मंजीर, नूपुर, हंस, पादकटक, वगैरे कित्येक नांवें होतीं. हीं निरनिराळीं नांवें एकाच अलंकाराचीं होती कीं निरनिराळ्या प्रकारच्या अलंकारांचीं होतीं तें सांगतां येत नाहीं. या नांवांपैकीं नूरपु हें नांव विशेष प्रचारांत होतें असें दिसतें. संस्कृत साहित्यांत त्याचा उल्लेख वारंवार येतो. पण हा अलंकार कशाचा करीत तें मात्र कळत नाहीं. बाणभट्टाच्या कादंबरींत चांडालकन्यकेच्या पायांतल्या नूपुरांत मणि (रत्नें) बसविलेले असावेत एवढें कळतें. मणिमंजीर या मध्यमपदलोपी सामासिक शब्दावरूनही तोच अर्थ निघतो. तथापि या अलंकाराची आकृति कशा प्रकारची असे त्याचा उल्लेख कोठें आढळत नाहीं. हंसक या शब्दावरून त्या अलंकाराचा आकार हंसासारखा असेल असा तर्क करतां येतो. पण तो तर्कच, सिद्धांत नव्हे. कारण, हंसासारखा नाद करण्याच्या गुणावरूनही त्याला तें नांव मिळालें असल्याचा संभव आहे. कादंबरींत नूपुरांच्या शब्दानें हंसांचें मन आकर्षिलें गेलें असा एक उल्लेख आहे यावरून त्या दुसऱ्या तर्काला बळकटी येते.

बाहुभूषणें—केयूर व अंगद हे अलंकार बाहूच्या ऊर्ध्वभागीं घालण्याचे होते. ह्मणजे सध्यां जेथें बाजूबंद घालतात किंवा अनंत बांधतात तेथें (दंडाला) हे अलंकार घालीत. कादंबरींत शूद्रकराजाचें जें वर्णन आहे त्यांत शूद्रकानें दंडांत केयूर घातल्याचें सांगितलें आहे. केयूरावर कवीनें सर्पाची उत्प्रेक्षा केली आहे यावरून ते गोलाकार असावेत असें दिसतें.

मणगटांत धारण करण्याच्या अलंकारांना आवापक, पारिहार्य, कटक व वलय अशीं चार नांवें होतीं. मेघदूत काव्यांत शापग्रस्त विरही यक्षाच्या कृशतेमुळें त्याच्या हातांतलें स्वर्णवलय गळून पडल्यामुळें त्याचें मणगट रिक्त झालें होतें असें ह्मटलें आहे. ('कनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः'). शिशुपालवधकाव्यांत श्रीकृष्णाच्या वर्णनांत त्याचें वलय पद्मरागमणिखचित होतें असें ह्मटलें आहे. बाणभट्टाच्या कादंबरींत चांडालकन्यकेचें वलय रत्नखचित होतें असा उल्लेख आहे.

* सध्यांही मुलांच्या कमरेला घालण्यांत येणाऱ्या सोन्यारुप्याच्या करदोड्यांत सोन्यारुप्याची घुंगरें दृष्टीस पडतात.— वा. गो. आ.

बलयाच्या खालीं कंकण घालीत. याला सामान्यतः 'करभूषण' अशी संज्ञा असे. ('कंकणं करभूषणम्'-मनुष्यवर्ग). मध्ययुगांतल्या संस्कृतसाहित्यांत कंकणांचा उल्लेख वारंवार येतो. भवभूतीनें जानकीच्या हातांत कंकणच घातलेलें आहे. सीतापरिणयप्रसंगीं श्रीरामचंद्र कंकणमोचनार्थ अंतःपुरांत गेले असें सांगून कवीनें तत्कालीन रीतीचा परिचय करून दिला आहे. पण या प्रसंगींचें कंकण सोन्याचें असे किंवा हल्लींप्रमाणें सुताचें असे तें यावरून कळत नाहीं. मेदिनीकोशांत कंकण शब्दाचे करभूषण, मंडन व सूत्र हे तिन्ही अर्थ दिले आहेत.

अलीकडच्या काळांतल्या साहित्यांत चुड्यांचा (बांगड्यांचा) उल्लेख पुष्कळ ठिकाणीं येतो. बंगालच्या प्राचीन कवींच्या काव्यांत हे चुडे शंखाचे केलेले असून त्यांना काढण्याघालण्याच्या सोयीसाठीं खीळ असल्याचाही उल्लेख सांपडतो.*

*अद्याप बंगाल प्रदेशीं शंखाच्या बांगड्या वापरण्यांत आहेत. जुन्या मराठी वाङ्मयांत शंखाच्या बांगड्यांचा किंवा खीळदार बांगड्यांचा उल्लेख पाहण्यांत नाहीं.—वा. गो. आ.

नासिकाभूषण.—संस्कृतकवींनीं आपादमस्तक शरीराच्या निरनिराळ्या अवयवांवरील अलंकारांचें वर्णन केलें आहे. पण त्यांत नाकांतल्या अलंकाराचा कोठेंही उल्लेख नाहीं. यावरून नाकांत अलंकार घालण्याची चाल पूर्वींच्या काळीं नसावी असें वाटतें.‡

वासुदेव गोविंद आपटे.

‡नाकांत नथ, लवंग, किंवा लोलक वगैरे अलंकार घालण्याची चाल निःसंशय अलीकडची आहे, व ती मुसलमानांच्या काळावरून आलेली असावी असें दिसतें. मुसलमान जातीच्या स्त्रियांत, व जेथें मुसलमानांच्या अमलाचा प्रभाव विशेष होता त्या उत्तर हिंदुस्थानांत, सोन्याच्या तारेचें मोठें वेटाळें नथ म्हणून घालण्याचा प्रघात पुष्कळ जातींत आढळतो. नथ घालण्याचा प्रघात दक्षिणेंत मद्रास वगैरे प्रांतीं फारसा नाहीं, व जो थोडा क्वचित् आढळतो तो शेजारच्या महाराष्ट्रीय बंधूंच्या अनुकरणानें आलेला असण्याचा संभव आहे. तथापि यासंबंधानें निवळ तर्क करीत बसण्यापेक्षां कोणी शोधकानें प्राचीन द्राविडी वाङ्मयांत नासिकाभूषणासंबंधानें कोठें उल्लेख आहेत कीं काय तें पाहून, असल्यास ते प्रसिद्ध करावे अशी मी आग्रहपूर्वक सूचना करतों.—वा. गो. आ.

पुस्तकपरीक्षा.

"केवळ स्वार्थोपायी."

[मागील अंकावरून समाप्त.]

प्रतिकृति

"प्रतिकृति" ह्मणजे–मूळाशीं आंतबाहेर थोडेसें साम्य व थोडासा फरक–असें आह्मीं ह्मटलेंच आहे. त्याप्रमाणें करण्याचा रा० जोशी यांनीं आपल्याकडून होईल तितका प्रयत्न केला आहे. पण त्यांत त्यांना फारसें यश आलें नाहीं, असें आह्मांला मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. त्यांनीं मूळांतल्या प्रकरणाला प्रकरण, प्रसंगाला प्रसंग, पात्राला पात्र, असें करण्याचा प्रयत्न केला आहे. मूळांतल्या प्रकरणांचें प्रसंगांचें, पात्रांचें प्रयोजन काय तें त्यांच्या ध्यानांत फारसें राहिलें नाहीं, असें आह्मांला वाटतें. 'प्रथमग्रासे मक्षिकापातः" या वचनाप्रमाणें कादंबरीच्या सुरवातीपासून, पहिल्या प्रकरणापासून, रसभंग होण्यास सुरवात होते 'रोमोला' या कादंबरीच्या आरंभींचें प्रास्ताविक वर्णन (Proem) व रूपांतलें पहिलें प्रकरण हीं ताडून पाहावींत, ह्मणजे आमच्या ह्मणण्याची यथार्थता ध्यानांत येईल. या प्रास्ताविक वर्णनांत इतिहासाची शेकडों वर्षांची गति पाहून, घडामोड पाहून, विचारी माणसांच्या मनांत उठणारे तरंग, सुंदर रूपकांनीं प्रदर्शित केले आहेत. वर्णनाचा आशयही दोन ठिकाणीं ओघाओघानें सांगितला आहे.

(1) 'As our thought follows close in the slow wake of the dawn, we are impressed with the broad sameness of the human lot, which never alters in the main headings of its history-hunger and labour, seed-time and harvest, love and death.' (Proem, p. 1.)

(2) 'Go not down, good spirit! for the changes are great and the speech of the Florentines would sound a riddle in your ears...Only look at the sunlight and shadows on the grand walls......; look at the faces of the little children.........; look, if you will, into the churches and hear the same chants; see the same images as of old......; see upturned living faces, and lips moving to the old prayers for help. These things have not changed......(p. 7.)

हें सबंध प्रास्ताविक वर्णन खरोखर वाचनीय आहे. त्यांतले उतारे देणें ह्मणजेच रसहानि करण्यासारखें आहे. मनुष्यजातींत कालमानानें फरक जरी पडला तरी साम्य अगदीं नाहींसें होत नाहीं मनुष्यत्व कायम राहतें, हा मथितार्थ आहे; व याला अनुसरून पंधराव्या शतकांतलीं फ्लॉरेन्समधलीं माणसें कोणत्या प्रकारचीं असत तें सांगितलें आहे. रूपकें खुलवितांना ही सर्व माहिती दिल्यामुळें विरस झाला असें वाटत नाहीं, इतकेंच नव्हे, तर कथानक कशा प्रकारचें आहे, तें जाणण्याची उत्सुकता वाचकांच्या मनांत उत्पन्न होते. विद्यांचें "पुनरुज्जीवन" असें नांव ज्या चळवळीला देण्याचा रिवाज आहे, ती इटली देशांत प्रथम सुरू झाली. तिचीं कडू, गोड व नीरस फळें त्याच देशांत प्रथम लोकांच्या अनुभवाला आलीं. ग्रीक वाङ्मयाच्या अभ्यासानें डोळे दिपल्यामुळें रूढ मतांचा व आचारांचा उपहास होऊं लागला, धर्मबंधनें शिथिल झालीं, आणि विद्वत्ता व सदाचरण यांची फारकत होऊं लागली. निवळ पुस्तकी विद्येला मान मिळूं लागला. स्वार्थत्याग, झीज सोसणें, दयाधर्म पाळणें इत्यादि शिष्टसंमत आदिकर्तव्यांकडे दुर्लक्ष होऊं लागून सुखोपभोगांची लालसा वाढली. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे, ख्रिस्ती धर्मामुळें परलोकाकडे जें फाजील लक्ष लागलें होतें, तें ग्रीक वाङ्मयाच्या प्रभावानें इहलोकाकडे वळलें. परमार्थ इहलोकीं साधतां येतो, त्याला परलोकाची जरूरी नाहीं, अशी पुसट

पुसट समजूत लोकांची होऊं लागल्यामुळें, धर्मप्रसारार्थ निघालेले नाना पंथ, त्यांपैकीं कांहीं जणांनीं सुरू केलेले धर्मसुधारणेचे प्रयत्न, लोकांना अगदीं आवडतनासे झाले. धार्मिक बाबतींत उदासीन वृत्ति धारण करणाऱ्या विद्वानांना व स्वेच्छाचारी जरठ-तरुणांना धर्मसुधारणेची कळकळ बाळगणारे लोक वेड्या पीराप्रमाणें वाटूं लागले; इतकेंच नव्हे, तर त्यांच्याबद्दल द्वेषभाव उत्पन्न झाला. या विविध परिस्थितीचा चित्रपट तयार करण्याच्या उमेदीनें जॉर्ज ईलियटनें आपलें कथानक रचिलें. दोन सुंदर रूपकांनीं कथारंभाचा प्रस्ताव केला. आतां प्रतिकृतीकडे वळावें तर, कथानकाला अनुरूप प्रस्तावाच्या ऐवजीं एकाद्या शालोपयोगी इतिहासांतल्या प्रकरणाच्या धर्तीवर सुरवातीचें प्रकरण लिहिलें आहे. ऐतिहासिक कादंबरीमध्यें इतिहास ओघाओघानें आला पाहिजे; नाहीं तर इतिहास व ऐतिहासिक कथानक यांत फरक तो काय राहिला ? ऐतिहासिक कादंबरी याचा इतिहास+कादंबरी असा अर्थ होत नसून, कथानकाच्या साहाय्यानें खुलविलेला इतिहास, असा होतो.

'रोमोला'च्या पहिल्या चार प्रकरणांचें प्रयोजन असें आहे कीं, फ्लॉरेन्स शहरांतल्या लोकांची नेहमींची राहणी, नित्यव्यवहार, आचारविचार, समजुती, दुराग्रह, इत्यादींचें वाचकाला आकलन व्हावें. पहिल्या प्रकरणांत लोरेन्झोच्या मरणाच्या वार्तेनें फ्लॉरेन्स शहरांत राहणाऱ्यांच्या मनावर झालेला परिणाम बाजारांतल्या गप्पागोष्टींच्या रूपानें व्यक्त केला आहे. हें प्रकरण वाचतांनाच लोरेन्झोनंतर फ्लॉरेन्सची धडगत नाहीं, राजकीय उलाढाली होणार, आपसांतले द्वेष विकोपाला जाणार, असें ध्वनित होऊं लागतें. 'केवळ स्वार्थापायीं' या कादंबरीमध्यें एकही प्रकरण असें नाहीं कीं, ज्यावरून विजयनगरच्या लोकांची रोजची राहणी कशी होती, त्यांच्या कल्पना काय होत्या, त्यांचें एकमेकांशीं वागणें कसें होतें, इत्यादि आवश्यक गोष्टींचा बोध होईल. मूळांतला कथारंभ बाजारांत होता असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याच्या ऐवजीं रूपांतराचा आरंभ श्रावणांतल्या सोमवारीं शंकराच्या षोडशोपचार पूजेनें व जत्रेनें केला आहे. जत्रेच्या दिवशीं, उत्सवाचे दिवशीं, मनुष्यमात्राची वृत्ति नेहमींप्रमाणें असते काय ? नाहीं. ती विशेषेंकरून उल्हसित असते. चवदाव्या प्रकरणापर्यंत विजयनगरांत कांहीं गडबड असेल याची शंका देखील येत नाहीं.

फ्लॉरेन्समधल्या भानगडी सहज वाचकांना समजाव्यात अशा हेतूनें नेल्लो व त्याचें दुकान यांची योजना आहे. नेल्लो हा नापित आहे, व त्याचें दुकान ह्मणजे एक अड्डाच आहे असें ह्मटल्यास चालेल. नेल्लो याच्या दुकानीं नाना तऱ्हेचीं माणसें येत असल्यामुळें पंधराव्या शतकांतल्या फ्लॉरेन्समधल्या लोकांचा वाचकांना परिचय करून देण्याची उत्तम संधि मिळते. आणि त्या संधीचा जॉर्ज ईलियटनें पुरता उपयोग केला आहे, हें मूळ कथानक वाचतांना प्रत्ययास येतें. नेल्लो बहुश्रुत असल्यामुळें, व थोडासा विद्येचा संस्कार त्याला झाला असल्यामुळें, त्याचें संभाषण नेहमीं चित्ताकर्षक वाटतें. मूळांतल्या नायकाला-टीटोला-नेल्लोचा उपयोग पुष्कळ होतो. रूपांतरकारांनीं नापिताच्या दुकानाऐवजीं, इकडच्या परिस्थितीला अनुरूप, नीलकंठराय सुगंध्याचें दुकान योजिलें आहे, तें योग्यच आहे. पण रूपांतरांत सुगंध्याच्या दुकानीं अड्डा घालून विजयनगरच्या शहरवासीयांची वाचकांना कां ओळख करून दिली नाहीं कोण जाणे. सुगंध्याच्या दुकानाचा, मूळांतल्या नेल्लोच्या दुकानाप्रमाणें, उपयोग केला असता तर केवढी बहार झाली असती, व कथानकाला किती तरी शोभा आली असती! स्युएल साहेबांचें पुस्तक, India in the Fifteenth Century ह्या पुस्तकांतलीं प्रवासवर्णनें, व Hokluyts' Vayages, Vol. V यामधील CæsarFrederik यानें लिहिलेला वृत्तांत यांच्या आधारानें विजयनगर शहराचें, तेथील नागरिकांचें, त्यांच्या रीतरिवाजांचें, भरपूर वर्णन रा० जोशी यांना देतां आलें असतें. 'पंधराव्या शतकांतलें हिंदुस्थान' या पुस्तकांत अब्दर रझाक नांवाच्या इराणी वकिलानें लिहिलेलें विजयनगरचें वर्णन आहे. त्यांत विशेषतः महानवमीच्या उत्सवाचें सविस्तर वर्णन आहे. त्याचें नुसतें भाषांतर जरी केलें असतें, तरी कार्यभाग झाला असता. त्यांतले कांहीं उतारे स्युएल यांनीं आपल्या पुस्तकांत दिले आहेत. परीक्षण बरेंच लांबल्यामुळें सबंध वर्णनाचा उतारा येथें देणें

शक्य नाहीं. जिज्ञासूंनीं तें पुस्तक अवश्य वाचावें. असें सविस्तर वर्णन उपलब्ध असतांना तें बाजूला ठेवून प्रवाशांच्या उपयोगी असणाऱ्या पुस्तकांच्या (Guide-books)धर्तीवर एक त्रोटक'महानवमी' नांवाचें प्रकरण घातलें आहे. कदाचित् असा आक्षेप घेण्यांत येईल कीं, हीं सर्व प्रवासवर्णनें पंधराव्या व सोळाव्या शतकांतलीं आहेत; आणि कथानकाचा काळ तर चवदाव्या शतकाच्या अखेरचा मानला आहे. पण काळ जरी चवदाव्या शतकांतला मानिला तरी कथानकांतलीं वर्णनें पंधराव्या व सोळाव्या शतकांना कशीं लागू पडतात, तें आह्मीं वर दाखविलेंच आहे.'

मूळ कथानकांत 'A Learned Squabble' असें एक प्रकरण आहे.त्याचा हेतु एवढाच आहे कीं,ग्रीक वाङ्मयाच्या अभ्यासानें शब्दावडंबराला कसा तात्पुरता ऊत आला होता, राजकारणी पुरुषांना देखील पंडितांपुढें, विद्वानांपुढें, त्या काळीं मान कशी तुकवावी लागत होती, तें वाचकांच्या लक्षांत यावें. हें प्रकरण रूपांतरांत वगळलें आहे. युरोपप्रमाणें इकडे पंधराव्या किंवा सोळाव्या शतकांत विद्यांना चालन मिळालें नाहीं,हें खरें आहे.पण संस्कृत विद्येंतही A Learned Squabble या प्रकरणातल्यासारखे प्रकार दिसत असत.समस्यापूर्ति हा एक जुन्या पंडितांमध्यें आवडता प्रकार होता. त्यावरून ते एकाद्याच्या विद्येची कसोटी लावीत असत. समस्यापूर्तीनें मूळांतल्या प्रकरणाची प्रतिकृति करितां आली असती असें आह्मांला वाटतें.

"Peasant's Fair" या नांवाचें एक प्रकरण मूळ कथानकांत आहे. त्याच्या योगानें दोन हेतु साध्य झाले आहेत. एक तर त्या यात्रेचें, व यात्रेच्या अनुरोधानें शेतकऱ्यांच्या रिवाजांचें, नागरिकांच्या करमणुकीचें वर्णन; व दुसरा ह्मणजे टीटोचें अविचाराचें वर्तन व त्याचें वर्णन. हें अविचाराचें वर्तन ह्मणजे यात्रेंतल्या एका वेषधारी बिशपकडून त्यानें Tessa शीं लावून घेतलेलें लग्न हें होय. त्यानें प्रथम जरी अर्धवट थट्टेंत व अर्धवट कळकळीनें Tessa ला" तूं माझ्याशीं लग्न करतेस का ? " ह्मणून प्रश्न विचारला होता, तरी बिशपनें जेव्हां लटुपटूचें त्यांचें दोघांचें लग्न लाविलें, तेव्हां एका Tessa शिवाय बाकीच्या सर्वांना ही निवळ थट्टा आहे असें ठाऊक होतें. Tessa जेव्हां तो खरोखरीचा विवाह असें समजली, तेव्हां तिचें भ्रमनिरसन करण्याची आवश्यकता त्याला दिसूं लागली. पण असें वाटत असून देखील त्यानें त्याप्रमाणें केलें नाहीं याचीं कारणें, त्याचा स्वभाव, कशी तरी वेळ मारून नेण्याची त्याला लागत चाललेली खोड, हीं होत. मोठेपणाची हांव, थोडी देखील झीज न सोसण्याची प्रवृत्ति, वेळ मारून नेण्याकरितां सत्याचा अपलाप देखील करण्याची तयारी, क्षणिक सुखावर अतोनात आसक्ति, स्वार्थपरायणता, अशा विविध वृत्तींनीं त्याचा स्वभाव बनत चालला होता. अशा स्वभावाचा विकास जॉर्ज ईलियटला दाखवावयाचा असल्यामुळें लटुपटूच्या विवाहाचा प्रसंग योग्य होता.

लटुपटूच्या विवाहाऐवजीं रूपांतरांत खरोखरीचा गांधर्वविवाह करविला आहे. त्या काळीं असे विवाह संमत होते, रूढ होते, असें जरी मानिलें, तरी त्यामुळें माधवाचें कृत्य गर्हणीय कसें ठरतें कोण जाणे! दोन बायका करणें हा हिंदूंच्या दृष्टीनें गुन्हा नाहीं व दोषही नाहीं.ज्ञातिपरिवर्तन,ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांचा विवाह, ह्मणून तें कृत्य दोषास्पद असें ह्मणावें तर ही वर्णसंकराची अडचण " येथें ढोणाम्माच्या जातीच्या मुलीशीं एकाद्या ब्राह्मणालाही एक प्रकारचें लग्न लावितां येतें, आणि सर्व प्रकारचा व्यवहार नीट चालतो" (गांधर्वविवाह, पान १०६) असें सांगून दूर केली आहे. एका अडाणी निर्व्याज स्त्रीला फशीं पाडल्याचा आरोप जसा टीटोवर लागू होतो, तसा माधवावर लागू होत नाहीं. रूपांतराच्या सोयीसाठीं अशीं भलभलतीं विधानें करणें योग्य आहे असें कोणालाही वाटणार नाहीं. धर्माला संमत नाहींत असे वर्णसंकर सर्व काळीं, सर्व देशांत, सर्व समाजांत होतात;" आणि सर्व प्रकारचा व्यवहार नीट चालतो;" ह्मणून त्यांना गांधर्वविवाह ह्मणणें उचित नाहीं. असले विवाह विजयनगरांत होत असत, या विधानाकरितां, रूपांतरकारांना कोठें आधार सांपडला असेल तें आह्मांला समजत नाहीं. गांधर्वविवाह लावण्याऐवजीं मंजुळेला अंगवस्त्र बनविलें असतें, तर माधवाच्या हातून तें एक दोषार्ह कृत्य झालें असतें. इतकेंच

नव्हे, तर शांतेशीं लग्न होण्याचें नक्की ठरलें असतांना स्वतःच्या रहस्याचा स्फोट होईल, या भीतीनें त्यानें मंजुळेशीं व्यवहार ठेविला हें उघड झालें असतें. शांतेसारखें स्त्रीरत्न सोडून मंजुळेसारखी एक सुंदर बाहुली पसंत करण्याइतका तो गाजरपारखी नव्हता. त्याला आपल्या लपंडावाबद्दल मधून मधून पश्चात्ताप होत होता, पण खरें बोलण्याचें त्याला धैर्य होत नव्हतें. तो भ्याड होता, निढावलेला लफंगा नव्हता, हें स्पष्ट झालें असतें. बहुपत्नीकत्व जरी हिंदुधर्माला असंमत नसलें, तरी अंगवस्त्र ठेवणें धर्मानें व समाजानें हलकें मानिलें आहे. ह्मणून परिस्थितीला अनुरूप रूपांतरांत तसा फेरफार केला असता, तर इतिहासाचा विपर्यासही झाला नसता व टीटोच्या स्वभावाप्रमाणें माधवाचा स्वभाव आहे, त्याची तो प्रतिकृति आहे, हें तेव्हांच समजलें असतें. शिवाय बिचाऱ्या श्रीरंगाला कुंटण्या बनविण्याची जरूरी पडली नसती. मूळांतलें Bratti हें जरीपुराणावाल्याचें पात्र कोणीकडे व रूपांतरांतला फेरीवाला श्रीरंग कोणीकडे!

पहिल्या प्रकरणापासून तों नवव्या प्रकरणांत टीटोच्या स्वगत भाषणानें खरी स्थिति अगदीं स्पष्ट सांगेपर्यंत टीटो कांहीं तरी लपवितो आहे, त्याच्या वर्तनांत कांहीं तरी काळेंबेरें आहे, अशी भावना हळूहळू दृढ होऊं लागते. उदाहरणार्थ, (1) ...but if you took the jewels, I hope you buried him......(p. 9.) या Bratti च्या सहज उद्गारांनीं टीटो भेदरल्यासारखा होतो. (2) Your Christian Greek is of so easy a conscience that he would a make stepping-stone of his father's corpse" (p. 32) या नेल्लोच्या त्यालाच उद्देशून काढलेल्या व सर्वसाधारण उक्तीनें टीटो गोरामोरा होतो. (3) Five hundred ducats! Ah, more than a man's ransom! (p. 61) या बार्डोच्या उद्गारांनीं टीटो दचकतो. याप्रमाणें वाचकांचीं मनें हळूहळू तयार केल्यानंतर "A man's Ransom" या नवव्या प्रकरणांत टीटोच्या आत्मगत भाषणानें त्याच्या रहस्याचा स्फोट केला आहे; व त्या प्रकरणानंतर एकाद्या असाध्य रोगाला बळी पडणाऱ्या त्यानें खंगणाऱ्या शरीराप्रमाणें, टीटोचा स्वभाव विपरीत होत चालल्याचें वर्णन मूळांत आहे. एकदा अधःपात झाला कीं, पुन्हा पायावर उभें राहण्यास जबरदस्त त्याग करावा लागतो, त्याला असाधारण धैर्य लागतें, असें ध्वनित केलें आहे. एकदां लपंडाव केल्यामुळें, त्यापासून होणाऱ्या परिणामपरंपरेमुळें टीटोचा स्वभाव जसा विपरीत होत जातो, तसा बापलेकींना जगाचा अनुभव कमी असल्यामुळें, टीटोच्या बहिरंगाप्रमाणें अंतरंग सुरेख असावें असा लेकीचा ग्रह होऊन टीटोशीं जन्माची गांठ पडल्यामुळें,व नंतर टीटोच्या कर्तव्यपराङ्मुखतेमुळें बेबनाव सुरू झाल्याकारणानें रोमोलाचा स्वभाव तावून सुलाखून उज्ज्वल होत जातो, हें मूळ कथानकाचें मर्म आहे. रूपांतरांत हें कायम राहिलें नाहीं. रोमोलानें टीटोला कां पसंत केलें तें मूळांत The Old Man's Hope या प्रकरणात बर्नार्डो व रोमोला यांच्या संवादानें व्यक्त केलें आहे. Bernardo हंसत हंसत टोमणा मारतो:—........"but thou hast been as ready to believe in the first pair of bright eyes and the first soft words that have come within reach of thee, as if thou could'st say nothing by heart but Paternosters, like other Christian men's daughters. " तुझ्यासारख्या सुशिक्षित स्त्रीमध्यें आणि एकाद्या बालबोध अडाणी स्त्रीमध्यें अंतर तें काय, असा बरनार्डोच्या भाषणाचा रोंख आहे. या टोमण्याला रोमोला प्रत्युत्तर देतेः— "Now, god-father, as if it were only bright eyes and soft words that made me love Tito! You know better. You know I love my father and you because you are both good, and I love Tito too, because he is so good. I see it, I feel it, in every thing he says and does. And if he is handsome, too, why should I not love him the better for that? It seems to me, beauty is part of the finished lan-

guage by which goodness speaks." (Chapter 19, p. 168). शरीर जितकें मोहक तितकें मन किळसवाणें अशी टीटोची स्थिति आहे हें रोमोलाला समजतांच ती खडबडून जागी होते, व "Revelation" या प्रकरणांत आपल्या बापाचा संग्रह पैशाकरितां टीटोनें विकला, तो स्वतःच्या कर्तव्याला जागला नाहीं, हें पाहून वैतागून जाऊन Have you robbed somebody else who is not dead? Is that the reason you wear armour?" (p. 251) असा नवऱ्याला मर्मभेदक प्रश्न ती विचारते. नवऱ्याचा त्याग करून संन्यासवृत्ति धारण करण्याचा, 'नन्न' होण्याचा ती प्रयत्न करिते. रूपांतरांत शांतेनें माधवाला कां वरिलें याचा उल्लेख नाहीं; उलट मला आपल्या पदरांत घ्याल तर मी आपल्याला नशीबवान समजेन-असले एकाद्या निरक्षर बाहुलीला शोभणारे उद्गार तिच्याकडून काढविले आहेत. "श्रमनिरास" या रूपांतरांतल्या प्रकरणांत रोमोलानें टीटोला वैतागून मारिलेला टोमणा शांतेच्या तोंडीं विरूप करून घातला आहे. "पण तुह्मी असेंच दुसऱ्या एकाद्याला लुबाडलें आहे असें दिसतें; नाहीं तर तें चिलखत अंगांत घालावयाचें कारण काय?" (पान १९०). "जिवंत" हा मूळांतला शब्द वगळल्यामुळें टोमण्यांतली खोंच नाहींशी झाली आहे, हें तेव्हांच लक्षांत येईल."जिवंत"या विशेषणानें जसा Baldasarre कडे संदर्भ लागतो, तसा रूपांतरांत मेरुशास्त्र्याकडे लागला असता.

रोमोलाच्या संसारत्यागाच्या तयारीनें मूळांतला 'An arresting voice' हा कथाभाग अतिशय खुलला आहे. ह्मणून Romola व Savanarola यांच्या संवादानें कथानकाच्या सारसर्वस्वाचा आस्वाद घेतां येतो. Savanarola ह्मणतोः-

"You assert your freedom proudly, my daughter. But who is so base as the debtor that thinks himself free?" ......"And you are flying from your debts: the debt of a Florentine woman; the debt of a wife. You are turning your back on the lot that has been appointed for you—you are going to choose another. But can man or woman choose duties? No more than they can choose their birth-place or their father and mother. My daughter, you are fleeing from the presence of God into the wilderness." (p. 311).

"......I say again, man cannot choose his duties. You may choose to forsake your duties, and choose not to have the sorrow they bring. But you will go forth; and what will you find, my daughter? Sorrow without duty—bitter herbs, and no bread with them." (p. 313)......... "you may say 'I will forsake my husband,' but you cannot cease to be a wife" "......Come, my daughter, come back to your place!" (p. 316). या प्रकरणाची रूपांतरांत प्रतिकृति न उठतां, गोळाबेरीज झाली आहे. संसारत्यागाचा प्रयत्न सोडून परत फिरल्यामुळें, रोमोलाचा चरित्रक्रम बदलतो. या नव्या वृत्तीला पोषक असा प्रसंगही तिला लवकरच मिळतो. मूळांत तसा प्रसंग आहे ह्मणून कथानकांतही दाखविण्याचा प्रयत्न झाला आहे; पण त्यामुळें थोडासा विचित्र प्रकार झालेला दिसतो. कसा तो पाहूं.

Romola in her place या नांवाचें एक प्रकरण मूळांत आहे. त्याची प्रतिकृति "दुष्काळ" या प्रकरणानें करण्याचा रूपांतरकारांनीं प्रयत्न केला आहे.

फ्लॉरेन्स हें शहर समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेलें नाहीं. फ्लारेन्स शहराचें बंदर ह्मणजे पीसा हें होय. पण त्या शहराशीं फ्लॉरेन्सचें या-ह्मणजे कथानकाच्या-काळीं नीट नव्हतें. स्वतंत्र होण्याची त्याची धडपड चालली होती. फ्लॉरेन्स हें शहर व्यापारांत अग्रगण्य असल्यामुळें, जेनोवा, मिलन, व्हेनिस, या दुसऱ्या व्यापारी शहरांशीं त्याचें नीट नव्हतें. सॅव्हानरोलेचा

पगडा फ्लॉरेन्सवर बसला असल्यामुळें, पोपच्या सत्तेला आळा घालण्याच्या चळवळीला तेथें फार जोर आला होता. फ्रान्सच्या राजानें इटली देशावर स्वारी करून नेपल्सचें राज्य काबीज केलें होतें, व पोपची सत्ता मर्यादित करण्याच्या खटपटीला त्याचा पाठिंबा मिळणार होता; ह्मणून तो फ्रान्स देशाहून पुन्हां परत येण्यापूर्वीच त्याला विरोध करण्याकरितां पोपनें एक दोस्तमंडळ तयार केलें होतें, व परकीयांच्या स्वारीपासून स्वदेशाचा बचाव करण्याचा स्तुत्य हेतु फसवणुकीदाखल पुढें केला होता. या फसवणुकीला फ्लॉरेन्स शहर बळी पडलें नाहीं. स्वदेशाचा बचाव हें निवळ थोतांड आहे; आपली अनियंत्रित सत्ता अबाधित राखण्यासाठीं हा सारा पोपचा प्रयत्न आहे; आणि सत्तेचा दुरुपयोग, व पोपचा व इतरांचा दुराचार यांना आळा घालावयाचा असेल, धर्मशुद्धि करावयाची असेल तर फ्रान्ससारख्या बलाढ्य राष्ट्राची मदत घेणें जरूर आहे, हें फ्लॉरेन्सला पूर्णपणें कळून चुकलें होतें. ह्मणून पोप बोर्जिया यानें तयार केलेल्या "पवित्र संघांत"(Holy League) फ्लॉरेन्स सामील झालें नाहीं. सामील न झाल्यामुळें "पवित्र संघ" त्याच्यावर उलटला. एकीकडे पीसा बंदराची स्वतंत्र होण्याची धडपड व दुसरीकडे "पवित्र संघाची" दाणागोटा बंद करण्याची तयारी, असें झाल्यामुळें फ्लॉरेन्स शहरावर मोठी आपत्ति आली. दाणागोटा व माणसांची कुमक या दोहींसाठीं फ्रॉन्सकडे डोळे लावावे लागले. फ्रान्सहून त्याप्रमाणें गलबतें भरून आलीं व तीं लेघॉर्न बंदरांत माल व माणसें उतरणार होतीं. पण तसें त्यांना करूं न देण्याकरितां जेनोवा, व्हेनिस या शहरांचीं लढाऊ गलबतें तयार झालीं होतीं. इकडे शहरांत पाहावें तर आजूबाजूचे, तटाबाहेरचे, शेतकरी, व आसमंतांतल्या भागांतले भिक्षेकरी लोक हे सर्व शहरांत येऊं लागले होते. पण अशा आपत्तीच्या वेळीं देखील त्या शहराच्या अधिकाऱ्यांनीं कोणालाही मनाई केली नाहीं. पण या उदार धोरणानें धान्याची टंचाई अतोनात वाढली. तुरुंग उघडून कैदी देखील सोडून द्यावे लागले. कारण त्यांचें देखील पोषण करणें अधिकाऱ्यांना जड वाटूं लागलें. भुकेनें माणसें मरूं लागलीं. सांसर्गिक रोगांचा फैलाव झाला. सर्व लोक हवालदील झाले. अशा संकटांना तोंड देत असतांना, व एके दिवशीं शेवटचा उपाय ह्मणून जुन्या वहिवाटीप्रमाणें काढिलेली धार्मिक मिरवणूक देखील संपत आली असतांना, धान्याचीं गलबतें लेघॉर्न बंदराला लागल्याची, व ज्या वाऱ्याचे योगानें तीं बंदराला लागलीं त्याच वाऱ्याचे योगानें शत्रूचीं गलबतें दूर राहिल्याची, सुवार्ता अधिकाऱ्यांना व शहरवासीयांना मिळून दुष्काळाचा सुकाळ होतो, असें मूळांत वर्णन आहे. पण रूपांतरकारांनीं धान्याची महर्घता बाजूला ठेवून त्याच्या ऐवजीं हिंदुस्थानास परिचित असलेला दुष्काळ पाडला आहे. महर्घतेचें अवर्षण बनाविल्यामुळें एक अशी अडचण उभी झाली कीं, जसें धान्य आल्यामुळें किंवा खात्रीनें येणार असें कळल्यामुळें महर्घता नाहींशी झाली, तसें धान्य आल्यामुळें अवर्षणाचे भयंकर परिणाम बंद होण्यासारखे नाहींत. श्रावण अखेरपर्यंत जर पाऊस पडला नाहीं, तर नुसतें एक वेळ धान्य आणवून भागावयाचें नाहीं; पुन्हां पाऊस येईपर्यंत तजवीज करावी लागेल. श्रावणापर्यंत पावसाचा थेंब जर नव्हता, तर विजयनगरांत जे पाण्याचे कालवे आणिलेले होते, ते कोरडे पडले होते असें कोठेंही वर्णन नाहीं. इतकेंच नव्हे, तर हजारों शहरवासीयांना तुंगभद्रेवर अवभृथस्नानाला पाठविलेलें आहे ! तुंगभद्रेंत जर पाणी होतें, विजयनगरांत जर पाण्याचे कालवे होते, तर दुष्काळाचें उग्र स्वरूप लोकांना कसें जाणवलें कोण जाणे ! तुंगभद्रेस बंधारे आणि पूल बांधिले असून शहरांत नळाचें पाणी आणण्याची सोय केली होती (पान २१), असें रूपांतरकारांनीं पहिल्या प्रकारणांत सांगितलें आहे.

दुष्काळांचा—अवर्षणांचा—प्रतिकार व्हावा ह्मणून बंधाऱ्यांची व कालव्यांची योजना झालेली असते. असें असून तीं साधनें असतांना विजयनगरांत रूपांतरकारांनीं दुष्काळ पाडिला आहे. बरें, दुष्काळनिवारणाकरितां धान्य जें मागविलें आहे, तें गोदावरीच्या मुखाजवळून ! कृष्णेच्या मुखाजवळील सुपीक प्रांत सोडून इतकी दूरवर नजर रा० जोशी यांनीं कां फेंकिली आहे कोण जाणे ! कृष्णेच्या मुखाजवळील प्रदेशांत दुष्काळ कल्पिण्याची रूपांतरासाठीं देखील जरूर पडली नसती. गोदावरीच्या मुखापासून विजयनगरपर्यंत

पल्ला किती लांब आहे याची वास्तविक कल्पना हें प्रकरण लिहितेवेळीं रा० जोशांस झाली नसावी असें आह्मांला वाटतें. महर्घतेचें अवर्षण बनविल्यामुळें सर्वच घोंटाळा झाला आहे.

रोमोला व टीटो यांच्या खालोखाल बाल्दास्सार याचें पात्र आहे. याची विपन्नस्थिति वाचून जगन्नाथ-पंडितांच्या करुणविलासांतील—

सर्वेऽपि विस्मृतिपथं विषयाः प्रयाता
विद्यापि खेदकलिता विमुखीबभूव।

या उक्तीची आठवण होते. किंबहुना हा हृदय कळवळून सोडणारी उक्ति सार्थ करून दाखविणारी एक करुण-मूर्ति ह्मणजे बॉल्दास्सारचें पात्र असें ह्मटल्यास चालेल. No place for Repentance व The Black mark becomes magical हीं दोन प्रकरणें रसिकांनीं अवश्य वाचावीं, अशी आमची शिफारस आहे. प्रतिकृतीमध्यें फक्त पहिलें प्रकरण आहे, व दुसरें अजिबात गाळलें आहे. मूळाची आणि प्रतिकृतीची तुलना केल्यास मंजुळेशीं माधवाचा श्रीरंगाच्या मार्फतीनें गांधर्वविवाह लावण्यांत केवढी घोडचूक झाली आहे तें वाचकांच्या ध्यानांत येईल. टीटोचा स्वभाव हळूहळू बिघडत गेला. तो जात्या दुष्ट नव्हता, नीच नव्हता, त्याचें रोमोलावर खरोखरीचें प्रेम होतें, टेस्साशीं व्यवहार ठेवण्याचा त्याचा खरोखर हेतु नव्हता. पण एक वेळ लटुपटूचें लग्न लागलें तेव्हांपासून तो जो गुरफटल्यासारखा झाला तो पुन्हां मोकळा झाला नाहीं. "All the young ideal passion he had in him had been stirred by Romola and his fibre was too fine, his intellect too bright, for him to be tempted into the habits of a gross pleasure-seeker. But he had spun a web about himself and Tessa, which he felt incapable of breaking : ......and Tito could not yet be easy in c›mmitting a secret offence against his wedded love." (p. 263.)

या प्रकरणाची प्रतिकृति बरोबर वठली असती तर मूळांत जसा टीटो व बाल्दास्सार यांच्या स्वभावावर उत्तम प्रकाश पडतो त्याप्रमाणें माधव व मेरुशास्त्री यांच्यावर पडला असता. दुसरें प्रकरण अजिबात गाळल्यामुळें मेरुशास्त्र्याची दैन्यावस्था मूळांतल्याप्रमाणें वाचकांच्या प्रत्ययास येत नाहीं. मूळांतल्या प्रकरणाचें सार देणें आम्हांला योग्य वाटत नाहीं. तें सबंध प्रकरण वाचलें पाहिजे व त्या पात्राचें दैन्य कल्पनेनें थोडा वेळ अनुभविलें पाहिजे, म्हणजे आमच्या म्हणण्याची यथार्थता वाचकांना पटेल. (Romola ची आमची प्रत Blackwood & Sons च्या stereotyped Edition ची आहे. पानेंही त्या प्रतीचीं दिली आहेत. प्रकरणें सर्व सारखींच असणार.)

सारांश.

प्रत्येक प्रकरणाचें परीक्षण केल्यास या लेखाचा विस्तार भलतीकडे होईल. आणि आतांच लेख बराच लांबला असल्यामुळें आटपतें घेणें अवश्य आहे. आतांपर्यंत आह्मी दाखविलेल्या काल, स्थल व स्थिति या संबंधीं विपर्यास, विसंगत वर्णनें, यांवरून असें दिसेल कीं, " केवळ स्वार्थपायीं " ही ऐतिहासिक कादंबरी नाहीं. विजयनगरासंबंधींची एक ऐतिहासिक कादंबरी असें तिला ह्मणावें तर विजयनगरांत ज्या विशिष्ट चाली होत्या त्यांचा बिलकुल उल्लेख कथानकांत नाहीं. महानवमीच्या उत्सवाचें पूर्ण व रसभरित वर्णन उपलब्ध असून त्याच्या ऐवजीं एक त्रोटक व नीरस वर्णन केलें आहे.

विजयनगरच्या रायाला बारा हजार स्त्रिया असत, असें प्रवाशांच्या वर्णनांत आहे. स्वारी बाहेर निघाली ह्मणजे चार हजार घोड्यांवर, चार हजार मेण्यांत व चार हजार पादचारी असा थाट असे. राजवाड्यांत देखील जिकडे तिकडे " वेत्रवतींचा " जरी नव्हे तरी असिधारिणींचा सुळसुळाट असे. या बारा हजार स्त्रियांपैकीं चार हजारांशीं रायाच्या मृत्यूनंतर सती जाण्याचा करार असे. व तसें करण्यांत त्या मोठें भूषण समजत असत, असें वर्णन आहे. सतीची चाल फार प्रचारांत होती, व बहुतेक स्त्रिया सती जात असत, असें दिसतें. सती गेलेल्या स्त्रियांचीं नजरेनें पाहिलेलीं उदाहरणें व त्या वेळचा समारंभ यांचें वर्णन प्रवाशांनीं केलें आहे.

यांपैकीं कशाचेंही वर्णन "केवळ स्वार्थीपायीं" या कादंबरींत नाहीं.उलट शांतेच्या विधवा आत्याबाईला, सतीचा प्रचार असणाऱ्या काळांत, अंगावर दागिने घालावयाला लाविलें आहे! "विधवा स्त्रीला जेवढा डामडौल करितां येईल, तितका सर्व तिनें केला होता. तिनें अंगावर दागिनेही घातले होते. पंडित बदरीनाथ यांची ही दूरची बहीण होती." (पान ९२).

पात्रांचीं नांवें पाहावीं तर तीं देखील देशाला अनुरूप अशीं नाहींत. विजयनगरचें साम्राज्य ह्मणजे द्राविडी साम्राज्य असें ह्मटल्यास चालेल. कानडी, तेलगु, तामीळ या तीन भाषांचा त्यांत समावेश होत असे. बदरीनाथ हें नांव उत्तरेकडील आहे. दक्षिणेंत बहुतेक सर्व ब्राह्मणांना **आचार्य** असें ह्मणतात. स्त्रियांना अम्मा किंवा अम्मल ह्मणतात. तेव्हां बदरीनाथाचें घराणें विजयनगरांत पिढीजाद कसें होईल? बरें तसें होतें, उत्तर हिंदुस्थानांतून येऊन तें तेथें राहिलें होतें असें ह्मणावें, तर तसा उल्लेख नाहीं. अशीं घराणीं विजयनगरांत होतीं असा इतिहासांत आधार दिसत नाहीं. हें पंडितांचें घराणें होतें, इतकेंच नव्हे तर त्यांत लढवय्ये, मुत्सद्दी, व व्यापारीही होऊन गेले होते. या काल्पनिक घराण्याशिवाय, इतके गुण एकवटणारीं घराणीं चवदाव्या किंवा सोळाव्या शतकांत विजयनगरांत होतीं असा दाखला कोठें असल्यास आह्मांला त्याची वार्ता देखील नाहीं. मूळांत बार्डी हें इतिहासप्रसिद्ध घराणें आहे. त्यांत व्यापारी व मुत्सद्दी झाले होते. व पंधराव्या शतकांत विद्यांच्या पुनरुज्जीवनाची जी चळवळ जोरावली तिच्या प्रभावानें सर्व घराणीं थोडींबहुत सुसंस्कृत झालीं; त्यांत बार्डी होतें. बार्डी यांची एक पेढी होती. त्यांचा व्यापार मोठा होता. त्यांनीं इंग्लंडच्या राजाला, तिसऱ्या एडवर्डला, कर्ज दिलें होतें. त्या राजानें दिवाळें काढिल्यामुळें तें घराणें खालावलें होतें. बार्डीशिवाय दुसरीं पिढीजाद व्यापारी घराणीं फ्लॉरेन्समध्यें होतीं. मूळ कथानकाचा संबंध त्या शहराशीं आहे. प्रतिकृतीचा विजयनगराशीं आहे. मग फ्लॉरेन्समध्यें जर तशीं घराणीं होतीं, तर विजयनगरांत कां नसावींत?–अशा समजुतीनें बद्रीनाथाचें पिढीजाद घराणें कल्पिलें आहे असें दिसतें. शिवाय बद्रीनाथ हा द्राविडी ब्राह्मण स्वतःच्या मुलीचें नांव शांता कसें ठेवील? "राय" ही पदवी राजा व राजकुटुंब यांना योग्य असतांना, एका सुगंध्याला व एका चितान्याला कशी लावितां येईल? नीलकंठराय सुगंधी, चिन्नाराय चितारी यांनीं स्वतःच्या नांवापुढें "राय" ही संज्ञा जोडण्याचें विजयनगरांत कधींही मनांत आणलें नसतें. विजयनगरच्या अधिपतींना राय किंवा महाराय ह्मणण्याची वहिवाट असे. तसेंच आईचें नांव जर ढोणाम्मा तर मुलीचें मंजुळा कसें? मंजुळा हें नांव पुण्याकडचें आहे; विजयनगराकडे तें ऐकूं देखील येईल कीं नाहीं, याची शंकाच आहे.

त्या वेळचा पोषाख कसा असे हें कथानकावरून समजत नाहीं. हल्लींसारखा तो नव्हता हें खास. दर पिढीला पोषाखांत बहुतेक बदल झालेला आपण पाहतों, तर तीनचारशें वर्षांपूर्वी विजयनगरांत तो पुष्कळच निराळा असला पाहिजे.

विजयनगरासंबंधीं कादंबरी असें ह्मणावयाचें, आणि त्या शहराचें किंवा राजवाड्याचें पुरतें वर्णन देखील करावयाचें नाहीं, असें या कथानकांत झालें आहे. 'केवळ स्वार्थीपायीं' ही स्वतंत्र ऐतिहासिक कादंबरी नसून मूळाची प्रतिकृति आहे असें आह्मांला निक्षून सांगण्यांत येईल. पण ऐतिहासिक कादंबरी आणि प्रतिकृति एकाच कथानकानें साधणें शक्य दिसत नाहीं. दोन डगरींवर हात ठेवला ह्मणजे काय परिणाम होतो, तो आज नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं.

'निरंकुशाः कवयः।'

या वचनाचा अर्थ निसर्गसिद्ध हक्क असा कदाचित् केला असेल असें आह्मीं ह्मटलें आहे. सत्यासत्याचे, शक्याशक्याचे निर्बंध कवीला लागू नाहींत असें प्रतिपादन करणें ह्मणजे वाङ्मयांत निव्वळ बेबंदशाही माजविण्यासारखें आहे.

कवि हे "शब्दसृष्टीचे ईश्वर" असतील, पण यांनीं कोणतेही निर्बंध पाळण्याची जरूरी नाहीं असा मथितार्थ कोणालाही काढतां येणार नाहीं. "कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्" असा परमेश्वर देखील नियमानुसार चालतो; मग या "शब्दसृष्टीच्या ईश्वरांची" काय कथा! ऐतिहासिक कादंबरीला निसर्गसिद्ध हक्क आहेत, अशी

खुद्द जॉर्ज इलियटचा जर समजूत असती, तर तिला जिवापाड मेहनत करावी लागली नसती. 'रोमोला' ही कादंबरी लिहितांना तिला किती सायास पडले तें एका वाक्यावरून उघड होईल. "She began it, she said, as a young woman, and finished it as an old woman." (कथानकाला आरंभ करतेवेळीं तरुणपणाची हुशारी वाटत होती, पण संपवितांना वय झालेल्या माणसाचा थकवा आला होता.) निसर्गसिद्ध हक्कांचे थोतांड आमच्या इकडील लेखकांनीं माजविलें आहे. थोड्या श्रमानें लेखक, ग्रंथकार होणाऱ्यांचा तो एक तोडगा आहे. ऐतिहासिक कादंबरी लिहितांना किती विविध गोष्टींकडे लक्ष पुरवावें लागतें, किती सावधगिरी बाळगावी लागते, त्याची थोडी तरी कल्पना यावी म्हणून, व जाणून बुजून विजयनगरच्या इतिहासाचा विपर्यास केला नाहीं असें आश्वासन दिलें होतें म्हणून, त्या दृष्टीनें 'केवळ स्वार्थापायीं' चें विस्तृत परीक्षण करावें लागलें. नंतर रोमोलाची प्रतिकृति हें वर्णन कितीसें शोभेल, तें ठरविण्याचा प्रयत्न करावा लागला; आणि असें दिसूं लागलें कीं, मूळाची प्रतिकृति हें नांव तिला शोभणार नाहीं.

प्रतिकृति न साधण्याचें कारण.

प्रतिकृति न साधण्याचें मुख्य कारण आह्मांला असें दिसतें कीं, मूळांतल्या कथानकाचें, किंवा पात्रांचें इंगित रूपांतरकारांनीं नेहमीं ध्यानांत ठावलें नाहीं. उदाहरणें घेऊन पाहूं. जीं उदाहरणें वर दिलीं आहेत त्यांशिवाय दुसरीं देणें अवश्य आहे हें उघड आहे.

(१) A Man's Ransom या नांवाचें मूळांत एक प्रकरण आहे. त्याची प्रतिकृति "एका मोठ्या सरदाराची खंडणी" या नांवाच्या प्रकरणानें केली आहे! Ransom याचा अर्थ एका मोठ्या सरदाराची खंडणी कसा होतो कोण जाणे. कोशांत तसा अर्थ निघत नाहीं. Ransom ह्मणजे कोणत्याही कारणानें एकादा मनुष्य परतंत्र झाला असतां पुन्हां स्वतंत्र होण्याकरितां त्याला द्यावी लागणारी रोकड रक्कम. असें असून 'मोठ्या सरदाराची खंडणी' असा अर्थ करण्याचें प्रयोजन काय तें समजत नाहीं. मोठ्या सरदाराच्या खंडणीचा त्या प्रकरणाशीं कोणता संबंध लागतो, तें शेवटपर्यंत संदिग्ध राहतें. मूळांतलें स्वारस्य रूपांतरांत उतरत नाहीं. माधवाच्या स्वगत भाषणाचा बरोबर उलगडा होत नाहीं. कारण मेरुशास्त्री हे सरदार असल्याचें कोठेंच सांगितलें नाहीं.

(२) Bardo ला Friars चा फार तिटकारा वाटत असे. ह्मणून स्वतःचाच मुलगा डीनो जेव्हां त्यांना जाऊन मिळाला तेव्हां तो आपल्याला मेला, असें बार्डो समजत असे. मुलगा मेला असें कळलें तेव्हां देखील त्यानें आपले मनोविकार उघडपणें दाखविले नाहींत. बदरीनाथ यांनाही संन्याशी, गोसावी, बैरागी यांचा वीट असे. त्यांनींही मुलाशीं संबंध तोडला होता; "आणि अखेरीला इतक्या अल्पवयांत एकाद्या दुबळ्या पामराप्रमाणें मठांत जाऊन तो मरण पावला, ही त्यानें आणखी एक अवज्ञा केली असें पंडित बदरीनाथांना वाटलें; आणि मुलाच्या मरणानंतरही ते त्याच्यावर अधिकच रागावून गेले होते!" (पान १२२.) असें वर्णन करून पुन्हां "आणि ते दोघेही त्यांच्या और्ध्वदेहिक विधीला हजर राहिले. इतकेंच नाहीं, तर पंडित बदरीनाथांच्या मालकीच्या उघड्या जागेंत स्वामींची समाधि तयार करण्याचें ठरवून तेथें स्वामींच्या कलेवराला रीतीप्रमाणें समाधि देण्यांत आली." (पान १२२) संन्याशाचा वीट असणारा, मुलाचें तोंड न पाहणारा गृहस्थ असें करील हें संभवनीय दिसत नाहीं मूळांतला बार्डोचा करारी स्वभाव, त्याच्या मनांतला Friarsविषयींचा तिटकारा प्रतिकृतींत उतरला नाहीं हें उघड आहे.

(३) दिनू हा जर सर्वसंगपरित्याग करून घरांतून निघून गेला, तर तो "आतां अखेरच्या भेटीला ताई तुला आलें पाहिजे" (पान १००) असा रुद्राप्पाजवळ निरोप कसा सांगेल ? त्याची अंतकाळीं वृत्ति बदलली, त्याची चलबिचल झाली, असें होत नाहीं काय ? "He has adjured me to go and see him" (p. 118) असें मूळांत आहे. त्याचा अर्थ वर केल्याप्रमाणें होत नाहीं. त्याला आपला दृष्टांत सांगावयाचा होता ह्मणून त्यानें तिला भेटीला बोलाविलें होतें. अखेरच्या भेटीचें नांव देखील त्यांत नव्हतें. तसेंच बहिणीची गांठ पडतांच "ताई,

माझी ताई!" (पान ११४) असे उद्गार उद्बोधानंदाच्या तोंडीं घातले आहेत, ते अयोग्य आहेत. त्यामुळें या जगावरची आसक्ति व्यक्त होते. मूळांत असा प्रकार मुळींच नाहीं. हें रूपांतरकारांनीं पदरचें घालून विरस केला आहे. मूळांतले The Dying Message हें प्रकरण व प्रतिकृतींतलें 'हंपीमठ' हें प्रकरण हीं एकमेकाशीं ताडून पाहवीं ह्मणजे मूळांतलें मर्म कितीसें उतरलें आहे तें दिसेल.

(४) टीटोच्या स्वभावाचें बरोबर आकलन न झाल्यामुळें "वाममार्गाचें अवलंबन" या प्रकरणांत, मूळाची गोळाबेरीज देतांना एक महत्त्वाचें वाक्य गाळून टाकिलें आहे. त्यामुळें माधवाचा स्वभाव टीटोप्रमाणें हळू हळू बदलत गेलेला दिसत नाहीं. तो पहिल्यापासून दुष्ट होता असें वाटूं लागतें. वगळलेल्या वाक्यानें तशी भावना झाली नसती. 'He liked no one to suffer' (Tito's Dilemma, p. 101) हें वाक्य गाळलें आहे.

माधवाच्या संबंधानें महत्त्वाचें वाक्य गाळलें आहे तर शांतेच्याविषयीं पदरचें घालून तिचा स्वभाव पालटविला आहे. पान ४८ वरील नीलकंठरायाचें शांताबाईशीं जातांजातांचें भाषण पहा. सर्वकाळ विद्याव्यासंगांत काळ घालविणाऱ्या साध्या स्त्रीला चमेलीचें तेल पाठवून उपयोग काय? "आजपर्यंत तिच्या पित्याकडे जे जे ह्मणून पंडित, शास्त्री वगैरे आले, ते सर्व सामान्यतः उतारवयाचे, पिकलेल्या केंसांचे होते. तरुण लोक पंडित असूं शकणार नाहींत, असा तिच्या मनाचा ग्रह झालेला होता. तरुण पुरुषाचा सुंदर चेहरा आजपर्यंत तिनें आपल्या भावाचा मात्र पाहिला होता; पण त्या चेहऱ्यांत आणि पंडित माधवराय यांच्या चेहऱ्यांत पराकाष्ठेचें अंतर होतें." (पान ४४). अशा स्थितींत वाढलेल्या स्त्रीला चमेलीचें तेल पाठविणें किती अप्रयोजकपणाचें आहे तें उघड होईल.

"पदरांत घ्याल तर आपणाला मी मोठी नशीबवान समजेन" अशा प्रकारचे शांतेकडून उद्गार काढवून तिच्या मानी स्वभावाला कमीपणा आणला आहे. रोमोलापेक्षां शांता अधिक रडवी दाखविली आहे. मानी स्वभावाच्या स्त्रिया स्वतःचें दुःख बाहेर दाखवीत नाहींत, मग त्यांना रडें कोसळण्याचें बाजूलाच राहूं द्या.

(५) "महानवमी-उत्सव" या प्रकरणांत नीलकंठराय ह्मणतोः-" जाऊंद्या हो! असे संन्यासी लाखों आहेत. आणि तुह्मी तरी तो संन्यासी कोण ह्मणून विचारितां, हा काय चमत्कार? विजयनगरांतील एकून एक कावळा मला ओळखितां येईल." (पान ६५). संन्याशांना कावळ्याची उपमा देण्याचें प्रयोजन मूळ बघितल्याशिवाय ध्यानांत येत नाहीं. मूळांत नेल्लो ह्मणतो "One of the Frati Predicatori, you don't expect me to know the private history of the crows." Dominican friars चा पोषाख black mantle and white tunic असा असे. त्यामुळें नेल्लोनें त्यांना कावळ्याची उपमा दिली, व ती बरोबर लागू पडली. कारण पांढऱ्या कावळ्याची छाती व मान पांढरी व बाकीचा भाग काळा असतो. पण ही कावळ्याची उपमा संन्याशांना कशी लागू पडणार? मानभावी साधूंचा पोषाख काळा असतो. पण संन्याशांचा भगवा असतो. यावरून असें दिसतें कीं मूळांतल्या कावळ्यांच्या उपमेचा रोंख रा॰ जोशी यांच्या ध्यानांत आला नाहीं. त्यांनीं भाषांतर देखील न करितां मूळाची गोळाबेरीज दिली. पण त्यामुळें अर्थहानि झाली ह्यांत संशय नाहीं.

(६) "हत्तींच्या पायाशीं" हें प्रकरण मूळापेक्षां फार निराळें आहे. पण निराळें असलें तरी त्यापेक्षां किंवा निदान तितकें तरी सरस असावयाला पाहिजे होतें. पण तसें झालेलें नाहीं. गदाधरशास्त्र्यांना स्वतःची स्तुति गावयाला लावून त्यांच्या स्वभावाला कमीपणा आणिला आहे. मूळांतला बरनार्डो मानी, स्वतःच्या जिवाबद्दल बेपर्वा, व बिलकुल न डगमगणारा असा आहे. त्याच्या तोंडीं जार्जे ईलियटनें "It is but a short space of life that my fellow-citizens have taken from me." (The Scaffold, p. 433.) असे उचित उद्गार घातले आहेत. त्याच्या बदलीं गदाधरशास्त्र्यांना वल्गना करावयाला रूपांतरकारांनीं लाविलें आहे. ३२५ पानावरचें त्यांचें भाषण वाचून पाहावें. शिवाय बलभीम या हत्तीनें त्यांना ओळखिल्यामुळें त्यांच्यावर पाय दिला नाहीं, तो तसाच उभा राहिला. मग दुसरा

हत्ती आणिला–वगैरे भाग पदरचा घातला आहे. या प्रसंगानें रा. जोशी यांनीं कोणता कार्यभाग साधला तें आम्हांला समजत नाहीं. यापेक्षां मूळांतला साधा व गांभीर्यजनक भाग जास्त उचित आहे असें आम्हांला वाटतें.

भाषांतराचे मासले.

भाषांतर करण्यासारखीं सबंध प्रकरणें जरी नसलीं तरी पुष्कळसा तसा भाग मूळांत आहे. त्यापैकीं कांहीं आम्हीं ताडून पाहिला आहे. त्याचा येथें उल्लेख करणें जरूर आहे.

(१) "पंडित आणि त्यांची कन्या" या प्रकरणांतील ३७ पानावरील बद्रीनाथाचे उद्गार व Bardo याचे The Blind Scholar and his Daughter यांतले ४३ पानावरचे उद्गार ताडून पाहावेत, म्हणजे मूळाचें स्वारस्य प्रतिकृतींत कां उतरलें नाहीं तें समजेल.

(२) Tito's Dilemma हें प्रकरण व वाममार्गाचें अवलंबन हें प्रकरण–व विशेषतः प्रतिकृतींतल्या ८६ व ८७ पानांची मूळाशीं तुलना करून पाहावी.

(३) "The Prize is nearly grasped" या प्रकरणाचा शेवटचा पारेग्राफ व पान ९७ वरचा पारेग्राफ यांची तुलना करून पाहावी. त्यापैकीं एक वाक्य येथें मासल्यादाखल द्यावें असें आह्मांला वाटतें. "तिच्या अंगचा प्रेमळपणा तिच्या नजरेच्या मार्दवानेंच अनुभवाला येत आहे!" मूळांत "all the tenderness that spoke in her eyes" असें आहे.

(४) The Dying Message या प्रकरणांतील Fra Luca च्या भाषणाची व "हंपीमठ" यांतील उद्बोधानंदाच्या भाषणाची तुलना करून पाहावी. दोन वाक्यांचा अर्थ आम्हांला तरी समजला नाहीं. तीं मूळांत आम्हांला सांपडलीं नाहींत.

(A) "कोण हा विद्येचा दर्प, कोण ही जाणिवेची घमेंड" (पान ११६). "जाणिवेची घमेंड" म्हणजे काय? जाणीव=Consciousness असाच अर्थ करावयाचा ना?

(b) "बुद्धीशीं वैर करूं नको. नाहीं तर तुझा घात होईल!" (पान ११९). बुद्धीशीं वैर करूं नको म्हणजे काय? मूळांत ही कल्पना नाहीं अशी आमचा समजूत आहे.

(५) "तिच्या भावाच्या तोंडून निघालेलें प्रत्येक अक्षर तिच्या स्मृतिपटावर प्रज्वलित निखाऱ्या प्रमाणें भाजत राहिलें होतें." पान १२७. ......"her brother's words, which had burnt themselves into her memory as they were spoken" असें मूळांत आहे.

(६) "मनुष्याला वार्धक्यानें ग्रासिलें म्हणजे त्याच्या नजरेपुढें कधीं कधीं काळा ठिपका येत असतो, तो टाळणें अशक्य होऊन बसतें. तशी माधवाची स्थिति झाली होती." (पान १७९)"...... he should be prepared to see this face rise up continuously like the intermittent blotch that comes in diseased vision" असें मूळांत आहे.

(६) "पंडित माधव निर्घोर कसे?" या प्रकरणांतलें ३०७ व ३०८ पानांवरचें राजेसाहेबांचें भाषण मूळाशीं अवश्य ताडून पाहावें. मूळांत जे पंचांच्या मनांत विचार चालले होते असें आहे ते सर्व राजेसाहेबांच्या तोंडीं उघड भाषणांत घातले आहेत...." "पण त्यांच्या हातीं बक्षिसांची थैली देतांना ते त्यांच्या तोंडावर थुंकतात किंवा त्यांना वर एक लाथहि मारितात!" (पान ३०७) मोठ्या राजाच्या तोंडीं असले उद्गार बिलकुल शोभत नाहींत. तसें करण्याची जरूरीही नव्हती. मूळांतला साहजिकपणा व प्रतिकृतींतलें नाटकी राजाला शोभणारें भाषण हीं पाहून विस्मय वाटूं लागतो. "Why Tito was safe" हें मूळांतलें प्रकरण आहे. आमच्या प्रतींत ४१२ पानावर हा भाग आहे.

(७)"पाहिजे तर गदाधरशास्त्र्यांना जाऊन विचार" (पान ३१३) "But doubtless you would begin by winning the ear of Messer Bernardo del Nero" (A Final Understanding, p. 419).असें मुळांत आहे.

(८) "असल्या मनुष्याशीं स्त्रीधर्मानें वागून त्याशीं समरस बनावयाचें म्हणजे काय?" (पान३६०)

या वाक्यानें मात्र रूपांतरकारांनीं कमाल केली असें म्हटल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. मूळांत फक्त Union with this man! असा उद्गार आहे. (By a Street Lamp, p. 351) त्याचा साधेपणा, सभ्यपणा कोणीकडे आणि वर दिलेल्या मराठी वाक्याचा सूचकपणा कोणीकडे! असें भाषांतर करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें असें कोणालाही दाखवितां येणार नाहीं.

जार्ज ईलियट, १८१९–८१.

जार्ज ईलियटविषयीं, व तिच्या काळाविषयीं सविस्तर माहिती देण्याचा आमचा विचार होता. १८१९-८१ हा इंग्लंडमधला व युरोपमधला काळ फार महत्त्वाचा आहे. त्या अवधींत इंग्लंड जुन्याचें नवें झालें. आचारविचार, धर्ममतें, राहणी, दळणवळण, हीं सर्व त्या अवधींत बदललीं. व्यापार उद्योग वाढून शेतकी मागें पडली. जमीनदारांच्या ऐवजीं पैसेवाल्याचें महत्त्व वाढलें. गरीबगुरिबांकडे लक्ष जाऊं लागलें. लोकांच्या स्वभावात फरक पडला. याच अवधींत फ्रान्समध्यें तीनदां क्रान्ति होऊन शेवटीं तें प्रजासत्ताक झालें. प्रशियानें जर्मनीचें साम्राज्य उभारिलें. इटाली देश स्वतंत्र झाला. लोकसत्तेची चळवळ जोरावूं लागली. समाजशास्त्रांचा अभ्यास वाढला. अशा विविध परिस्थितीचा ठसा जार्ज ईलियटसारख्या प्रबुद्ध लेखकाच्या कृतींवर कसा उमटला होता तें पाहणें किती जरी बोधक असलें तरी हें परीक्षण फार लांबल्यामुळें तो प्रयत्न बाजूला ठेवणें भाग आहे.

तत्त्वज्ञानाचे पाठ शिकविण्याकरितां जार्ज ईलियटनें कादंबऱ्या लिहिल्या असें म्हणणें गैर आहे. " अर्थात् रम्य कथानक हें त्याच्या ग्रंथाचें मुख्य अंग नव्हे हें लक्षांत ठेविलें पाहिजे"(पान १३)असें सरसकट विधान करणें अप्रयोजकपणाचें आहे. थॅकरे, डिकन्स यांच्यासारख्यांनीं जो तिचा जयजयकार केला तो तिच्या व्याख्यानाकरितां नसून मनोरम आख्यानाकरितां होता. कथानक व विवेचन यांचें योग्य प्रमाण जोंपर्यंत तिला ठेवितां आलें तोंपर्यंत तिच्या कृतीला सर्वांनीं मानें डोलाविल्या. हें प्रमाण तिला पहिल्या चार ग्रंथांत ठेवितां आलें. Scenes of Clerical Life, Adam Bede, Mill on the Floss, Silas Marner यांची गणना जार्ज ईलियटच्या उत्तम कृतींमध्यें होते. बाकीच्या ग्रंथांत हें प्रमाण न राहिल्यामुळें आख्यानापेक्षां वेदान्त जास्त होऊं लागला. हा गुण नसून वास्तविक दोष आहे, आणि तो रोमोलांत प्रथम उघडकीस आला. रोमोला ही जॉर्ज ईलियटच्या उत्कृष्ट कृतींपैकीं एक असें कोणीही मानीत नाहींत. तिनें अतिशय मेहनत करून कथानक रचिल्यामुळें, त्यांत उत्कृष्ट प्रसंग अनेक आहेत. पण सबंध कादंबरी कंटाळवाणी आहे. रोमोला ही कादंबरी सन १८६३ सालीं प्रसिद्ध झाली. यानंतर लिहिलेले ग्रंथ "तत्त्वज्ञानासंबंधीं अनेक मननीय सिद्धांतावरील व्याख्यानें" आहेत.

यापेक्षां अधिक विस्तार करणें येथें शक्य नाहीं. जॉर्ज ईलयटसंबंधीं टीकात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत. लेस्ली स्टीफन यांनीं लिहिलेलें चरित्र प्रसिद्ध आहे. त्याकडे जिज्ञासूंचें लक्ष ओढून हा लेख संपविणें अवश्य आहे.

उपसंहार.

आतांपर्यंत केलेल्या विस्तृत विवेचनावरून असें दिसेल कीं "केवळ स्वार्थापायीं" या कृतीला रोमोलाची प्रतिकृति म्हणणें अशक्य आहे. ह्या कृतीला दुसऱ्या प्रकारचें रूपांतर, म्हणजे मूळाची बतावणी किंवा नक्कल असें म्हणतां येईल. कादंबरी लिहिण्याचा रा. जोशी यांचा हा पहिला प्रयत्न असल्यामुळें, व जॉर्ज ईलियटसारख्या प्रौढ लेखकाच्या कृतीची त्यांनीं निवड केल्यामुळें, रूपांतर करितांना अनेक चुका झाल्या आहेत असें आम्हांला वाटतें. प्रतिकृति आणि ऐतिहासिक कादंबरी ह्या दोन्ही एका कथानकांत साधण्याची हांव धरल्यामुळें एक देखील नीट साधली नाहीं असें दिसतें. राजपुतान्यासारख्या फारसा विश्वसनीय इतिहास उपलब्ध नसलेल्या व दंतकथांचें आगर असलेल्या प्रदेशांत कथानकाचा आरंभ केला असता म्हणजे मूळाची प्रतिकृति वठवितांना इतकी धांदल उडाली नसती. एकादा नाथ, एकादा सिंग, एकादी देवी, वाटेल तें शहर, फार अडचण येऊं लागल्यास जेसलमीर किंवा मेवाड हा प्रदेश, यांनीं बराच कार्यभाग झाला असता. राजपुताना, तेथलीं

राजघराणीं, जुने कोट, व डोंगर यांनीं पुष्कळ कादंबरीकारांचें पालनपोषण देखील झालें असेल; आणि हल्लींची स्थिति चालू राहिल्यास अजूनही होईल.

जॉर्ज ईलियटच्या कादंबरीच्या प्रतिकृतीसारखें अवघड काम हातीं घेतल्यामुळें रा. जोशी यांना अतोनात मेहनत पडली असली पाहिजे यांत शंका नाहीं. प्रकरणवार प्रतिकृति करीत गेल्यामुळें कदाचित् समग्र कृति एकवार पुरती तपासली नसावी असाही आमचा अंदाज आहे. कारण पुरती तपासली असती तर ठिकठिकाणीं सहज लक्षांत येण्यासारख्या चुका जशाच्या तशाच राहिल्या नसत्या. रूपांतराचें काम बरेंच घाईघाईनें झाल्याचीं चिन्हें कथानकांत दिसत आहेत. इतकी मेहनत करून सर्व फुकट झालें, असें ह्मणण्याचा आमचा रोंख आहे कीं काय असें कोणीं स्पष्ट विचारल्यास त्याचें उत्तर असें आहे कीं, रूपांतरकारांचा हा पहिला प्रयत्न असल्यामुळें पुस्त्या काढतांना हात बरोबर न घटल्यामुळें जशीं अक्षरें (कधीं कधीं संबध पुस्ती) वेडीं वांकडीं निघतात, तशी त्यांची स्थिति झाली आहे. अजून त्यांचा हात घटावयाचा आहे. तो घटल्यावर वेडेवांकडेपणा खात्रीनें निघून जाईल.

निव्वळ मराठी वाचकांना "केवळ स्वार्थापायीं" ही कादंबरी नव्या प्रकारची वाटेल यांत शंका नाहीं. नवऱ्याची मनोभावें पूजा न करितां त्याच्यांत माणुसकी असेपर्यंतच आपलें सर्वस्व अर्पण करणारी, त्याचा नीचपणा प्रत्ययास येतांच निर्भत्सना करणारी, संसारत्यागाला तयार होणारी, त्यागाची थोरवी समजतांच-संसाराचें मातेरें झालें असतांना देखील-परत फिरून स्वतःचें कर्तव्य बजावणारी, ज्या महात्म्यानें त्यागाची थोरवी तिला पटविली, तिला आपल्या कर्तव्यास जागविलें, ज्यानें तिला नवी दृष्टि दिली, ज्याला तिनें गुरुसमान मानिलें, त्या महात्म्याचें गदाधरशास्त्र्यासंबंधीं "नरोऽवा कुंजरोऽवा" असें वर्तन पाहून, महात्मा झाला तरी तो मनुष्यच आहे, सर्वगुणसंपन्न देव नव्हे, अशी खात्री पटून पुन्हां वैतागणारी, ब्राम्हणकन्या शांता महाराष्ट्रवाङ्मयांत अगदीं अपूर्व आहे यांत संशय नाहीं. अशा स्त्रीची मराठी वाचकवर्गाला ओळख करून दिल्याबद्दल रा. जोशी यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. मूळांतलें मुख्य पात्र **रोमोला** हें आहे. रूपांतराला "केवळ स्वार्थपायीं" असें जरी नांव दिलें तरी तेवढ्यानें **शांतेऐवजीं माधव** हा मुख्य पात्र होत नाहीं. मूळाप्रमाणें रूपांतरांतही शांता हेंच पात्र मुख्य दिसतें. नांव बदलून माधवाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न सफल झाला आहे असें आम्हांला वाटत नाहीं........."बेंथम, मिल्ल, स्पेन्सर प्रभृति विद्वानांच्या मतांचें खंडन या ग्रंथांत करण्याचा प्रयत्न आहे." (पान १४,) अशी भलतीच समजूत रा. जोशी यांनीं करून घेतली नसती तर आपल्या कृतीला "केवळ स्वार्थापायीं" असें नांव न देतां मूळाप्रमाणें नायिकेचें नांव दिलें असतें.

"केवळ स्वार्थापायीं" या कादंबरींतलीं, "वाममार्गाचें अवलंबन, गच्चीवरील मंडपाखालीं, वैराग्य, काय हा अविचार, शांताबाईच्या मनाची हुरहुर, पंपापतीच्या देवालयाच्या पारावर, अखेरची स्पष्टोक्ति, दिव्याखालीं अंधार, हीं आठ प्रकरणें व ३०० आणि ३२२ पानांवरील विचारतरंग, निवळ मराठी वाचकांना अगदीं नवीन व मनोवेधक वाटतील.

रा. जोशी यांच्यासारख्या अनुभवलेल्या लेखकानें आटोक्याबाहेरचें काम अंगावर घेतलें नसतें तर त्यांना अधिक यश मिळालें असतें हें उघड आहे. जार्ज ईलियटसारख्या प्रौढ व कांहींशा गहन लेखकाचीच निवड करावयाची होती तर अनुकरण करण्यास साधारणपणें सोप्या अशा Scenes of Clerical Life किंवा Silas Marner यांच्याकडे लक्ष वळविलें असतें तर बरें झालें असतें, अशी आमची समजूत आहे.

जेन ऑस्टिन, जॉर्ज ईलियट यांच्यासारख्यांची छाया मराठी कादंबऱ्यांवर पडूं लागली आहे हें एक मोठें सुचिन्ह आहे. परभाषेंतल्या कादंबऱ्यांवरचें मन उडून तें स्वभाषेंतल्या कादंबऱ्यांवर बसण्याची वेळ अजून दूर आहे. पण अनुभवलेल्या, कसलेल्या लेखकांनीं मनावर घेतल्यास, होतकरूंनीं पूर्व तयारी केल्यास, हात घटविल्यास, मराठी कादंबरीची दैन्यावस्था संपून तिच्या स्वतंत्र वाढीला सुरवात होईल. तो समय येईपर्यंत मराठी भाषेची, मराठी वाङ्मयाची "वेडीवांकडी" सेवा देखील आदरास पात्र आहे. सेवा करणाऱ्यांनीं तेवढ्यावरच समाधान मानूं नये म्हणजे झालें.

ग. स. भाटे.

हल्लींच्या तरुण पिढीच्या शरीरसंपत्तीच्या ऱ्हासाचीं कारणें व तो थांबविण्याचे उपाय.

[रा. रा. वामन चिंतामण तवकर, बी. ए. बडोदें.]

[सन १९०८ मध्यें श्री. महाराज सयाजीराव गायकवाड यांची स्वारी प्रो. माणिकराव यांची 'श्री जुम्मादादा व्यायामशाळा' पाहण्यास गेली होती. व्यायामशाळेची व्यवस्था, टापटीप व कसरतींचीं कामें पाहून श्रीमंत फार खूष झाले. संस्था पाहणें झाल्यावर श्रीमंतांनीं समयोचित भाषण करून विद्यार्थ्यांना त्यांनीं चालविलेल्या कामांत प्रोत्साहन दिलें; व वर नमूद केलेल्या विषयावर संस्थेंतील जो विद्यार्थी उत्तम निबंध लिहून पाठवील, त्याला पन्नास रुपयांचें बक्षिस देण्यांत येईल असें कळविलें. चांगल्या चांगल्या पुस्तकांतून गोषवारा काढून, तसेंच संस्थेच्या चालकांकडूनही विषयाला लागणारे विचार समजून घेऊन, सदरहू निबंध लिहून पाठवावा, असें श्रीमंतांनीं सांगितलें. त्याप्रमाणें संस्थेंतून गेलेल्या निबंधांतून माझा हा निबंध पसंत पडून तें पारितोषिक मला मिळालें. निबंधांत पुष्कळ ठिकाणीं प्रो. माणिकराव यांनीं मला सूचना केल्या, व त्यांच्याच त्या सूचनांनीं सदरहू पारितोषिक मी मिळविण्यास समर्थ झालों. —वा. चिं. तवकर.]

इंग्रजी शिक्षणापासून फायदे.

इंग्रजी शिक्षणामुळें आमचा अत्यंत मोठा फायदा झाला आहे, तो हा कीं, आह्मी कोण, आमची पूर्वस्थिति व योग्यता काय होती, व आमची सद्यःस्थिति काय आहे, आजकाल पाश्चात्य राष्ट्रें कशीं वैभव-शिखराला पोहोंचलीं आहेत; व आह्मी मात्र कसे सर्व रीतींनीं मागें राहिलों आहोंत, वगैरे विचार लोकांच्या मनांत येऊं लागले आहेत. त्यामुळें आमच्यामध्यें असणारी उणीव कोणत्या उपायानें भरून काढली पाहिजे, पाश्चात्यांच्या भरभराटीला कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या, इत्यादि गोष्टींचा विचार करून त्या साध्य करून घेण्याचा प्रयत्न करण्याची प्रवृत्ति दिसूं लागली आहे.

या प्रवृत्तीमुळें नवीं नवीं वृत्तपत्रें, मासिक पुस्तकें, निघूं लागून लोकमत जागृत झालें; कारखाने, गिरण्या, शाळा, कॉलेजें उत्पन्न झालीं; इंग्लंड, अमेरिका जपान वगैरे ठिकाणीं विद्यार्थी पाठवून उद्योगधंद्यास उत्तेजन देण्यांत आलें; राष्ट्रीय सभा उत्पन्न होऊन लोकांचे हक्क काय आहेत, हें सरकारास व लोकांस कळून आलें.

शरीरसंपत्तीकडे होत असलेलें दुर्लक्ष्य.

पण वरील सर्व चळवळी तडीस नेण्यास आमच्याजवळ पुरेशी शरीरसंपत्ति आहे किंवा नाहीं, याबद्दलचा आमच्या पुढारी वर्गाला प्रश्न सुचलेला नाहीं असें दिसतें; व जी आहे ती कायमची व शेवटपर्यंत टिकणारी आहे किंवा नाहीं याचाही त्यांनीं विचार केला आहे असें दिसत नाहीं. आमचे आजे, पणजे, पाऊणशें ऐशीं वर्षांपर्यंत शरीरानें चांगले दणकट असत ह्मणून आह्मी मोठ्या अभिमानानें सांगतों; परंतु आमची हल्लींची बी. ए. एम्. ए. मंडळी चाळीस पन्नाशीच्या सुमारास जाऊन पोहोंचतात न पोहोंचतात तोंच

यमाजीभास्कराकडून त्यांस पाचारण येतें ! पूर्वीच्या पिढींतल्या चाळिशी उलटलेल्या स्त्रीच्या अंगांत जी ताकद असे, ती हल्लींच्या पंचवीस वर्षांच्या तरुणामध्यें राहिली नाहीं. आमच्या तरुण पिढीमध्यें कोणी दम्याखोकल्याच्या आजारानें तर कोणी कफक्षयानें, कोणी संधीवातानें तर कोणी अजीर्णानें, आजारी पडलेले दिसतात. या सर्वांच्या मुळाशीं शोधूं गेल्यास शारीरिक संपत्तीचा अभाव, हेंच कारण आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. आपण पाश्चात्यांच्या स्थितीशीं आपल्या स्थितीची तुलना केली, तर ते आपल्यापेक्षां शरीरसंपत्तीनें किती तरी श्रेष्ठ आहेत हें कळून येईल. "आमचें जें तारुण्य तें त्यांचें पोरपण, आमचें मध्यम वय तें त्यांचें तारुण्य, व आमचें जें वार्द्धक्य तें त्यांचें वय, अशी वस्तुस्थिति आहे." वैभवशिखराला जीं राष्ट्रें पोहोंचलीं आहेत, त्यांच्या इतिहासाचें अवलोकन केलें असतां असें आढळून येईल कीं, शारीरिक संपत्तीमुळेंच त्या राष्ट्रांना आपली उन्नत्ति करून घेतां आली आहे. त्या लोकांचें यांप्रमाणें व्यायामाकडे अधिक लक्ष असतांही, अलीकडे त्यांच्यामध्यें शरीरसंपत्तीचा थोडासा ऱ्हास दिसूं लागतांच, त्यांच्यांतील मंडळीमध्यें मोठी गडबड उडून जाऊन वर्तमानपत्रद्वारा लेखांवर लेख निघूं लागले. गिब्ज्, गॉच्, रोलर, मुलर, बर्नार, मॅकफॅडन, झिस्को, पिंटर, बॅनन, स्वीस, लेम, ह्याकन स्मिथ, फ्रेचर, वगैरे मल्लविद्याविशारदांनीं अनेक मासिकांतून चर्चा करून, तसेंच शेंकडो व्याख्यानें देऊन, लोकांची शरीरसंपत्ति सुधारण्याचें श्रेय घेतलें. 'Our youth is dying out' म्हणून डॉ० सँडोनें लोकांमध्यें चळवळ उडवून दिली. गरीब लोकांचें आरोग्य कसें कायम राहावें, याबद्दल पुष्कळ पत्रांतून विवरण होऊन, तिकडे व्यायामाचे आखाडे निघाले. यावरून, जराशी कोठें उणीव भासूं लागतांच, ती भरून काढण्याला तेथील लोक कसे तत्पर असतात, याची खात्री पटते. आमच्याकडे तशी वस्तुस्थिति नाहीं. आमच्या तरुणांना वृद्धावस्था प्राप्त झाली आहे; वीस वीस, पंचवीस पंचवीस, वर्षांचे तरुण फिक्कट, अशक्त, रोगी, क्षयी दिसूं लागले आहेत; आमची शंभर वर्षांची आयुर्मर्यादा पन्नासांपर्यंत येऊन ठेपली आहे. अझून वीस वर्षांच्या मुलाला मिसरूडही फुटलेली दिसत नाहीं. शरीरसंपत्तीचा उत्कर्ष होण्याचीं स्थलें—कुस्त्यांचे आखाडे—कमी कमी होत चाललीं आहेत !

शरीरसंपत्तीचें महत्व.

सर्व पुरुषार्थांचें व पराक्रमाचें मुख्य साधन देह आहे. शरीरसंपत्ति चांगली असल्यावांचून कोणतीही गोष्ट साध्य होणें शक्य नाहीं. आपल्याला जरी हिची जरूरी वाटत नसली, तरी पण पुढच्या पिढीला जरूरी वाटण्याचा विशेष संभव आहे; व म्हणून आपल्याला आपलें शरीर चांगलें सुदृढ व निकोप ठेविलें पाहिजे. आज नवीन पिढींतले कित्येक होतकरू जवान आपल्या आईबापांना स्वतांस निःशक्त व रोगट उत्पन्न केल्याबद्दल शिव्याशाप देत असतील ! अगदीं मूर्ख मनुष्य ज्ञानी होणें शक्य आहे, तसेंच दरिद्री श्रीमंत—लक्षाधिपति होईल; परंतु विकलीन—तेजोहीन देह शरीरसंपत्तीनें समृद्ध होणार नाहीं. योद्ध्याजवळ शरीररूपी अस्त्र चांगलें सतेज असलें पाहिजे. गंजलेल्या तरवारीचा किंवा

शस्त्राचा जसा उपयोग होत नाहीं, तद्वतच, उपेक्षा केलेलें शरीर अगदीं निरुपयोगी आहे व तें भंगून पडावयाचेंच, हा सिद्धांत ठरलेला.

ज्या शरीरसंपत्तीकरितां युरोपियन लोक अहर्निश खपून राहिले आहेत, निरनिराळे व्यायामाचे प्रकार शोधून काढीत आहेत, नवीन नवीन तालमीच्या शाळा बांधीत आहेत, त्या शरीरसंपत्तीची हयगय आह्मी बुद्धिपुरःसर किती तरी करीत आहोंत ! पाहावें तों दिवसानुदिवस तालमीच्या नवीन शाळा स्थापन होण्याच्या ऐवजीं एक एक कमीकमीच होत चालल्या आहेत ! दंड, बैठका, लकडी, लठ, फिरंग वगैरे शारीरिक व शरीरसंरक्षक व्यायाम तर राहूंच द्या, पण नुसतें नमस्कार घालणें—ऐहिक व पारमार्थिकदृष्ट्या अत्यंत उपयोगी व पुण्यफलदायक-सुद्धां आमच्याच्यानें होत नाहीं ! एवढें जबरदस्त मोहपटल आह्मांवर येऊन पडलें आहे ! क्रिकेट, फुटबॉल, टेनिस् वगैरे खेळांच्या पद्धतीनें इंग्लिश लोक प्रत्यक्ष व उघड रीतीनें व्यायाम कसा करावा ह्मणून सुचवीत आहेत, तें तरी आमच्या मठ्ठ डोक्यांत उतरतें का ? या खेळांची आवड आपल्या लोकांस लागावी ह्मणून पाश्चिमात्य लोकांचा नेहमीं प्रयत्न चाललेला असतो. एका इंग्लिश लेखकानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, " ज्या दिवशीं आम्हां इंग्लिश लोकांची या खेळांवरील प्रीति कमी होईल, त्या दिवशीं आम्ही आमच्या शारीरिक संपत्तीचा ऱ्हास झाला असें समजूं."

लष्करी शिक्षणाचा अभाव.

लष्करांत आम्हांस अगदीं मज्जाव झालेला आहे. मोठमोठ्या ऑफिसरांच्या जागा—लेफट्नंट, कॅप्टन्, मेजर, कर्नल, वगैरे—आम्हां हिंदी लोकांस मिळत नाहींत. तेव्हां लष्करी शिक्षणाची गोडी लागून उत्तेजन मिळेल, अशी आशा करण्यास जागा राहिली नाहीं. लष्करी शिक्षणानें शारीरिक संपत्ति चांगली राहते. कारण तें शिक्षणच असें आहे कीं, शरीर उत्तम असल्यावांचून मनुष्य त्या कामास लायकच ठरत नाहीं.

चैन व विषयासक्तता.

शरीरसंपत्तीचा ऱ्हास होण्याला चैन व विषयासक्तता हें दुसरें कारण आहे. विषयाची गोडी आमच्या लोकांमध्यें, विशेषतः आमच्या नवीन पिढीमध्यें, ज्यास्त दिसून येते. प्राचीन कालच्या इतिहासाचें अवलोकन केलें असतां, लहानपणीं मौंजीबंधन झाल्यावर मुलाला बारा वर्षें गुरूच्या घरीं अध्ययन करावें लागत असे, असें दिसून येईल, अर्थात् योग्य ठिकाणीं तो सोंपला गेला असल्यामुळें व त्याचें मन उत्तरोत्तर सुसंस्कृत होत गेल्यामुळें, विषयाची कल्पना त्याला मुळींच शिवत नसे. हल्लींचें मन्वंतर तर अगदीं बदललें आहे. लोकांची धांव विषयसुखाकडे ज्यास्त ज्यास्त वळत चालली आहे. आमच्या तरुण पिढीचा तीन चतुर्थांश भाग चैन व ऐषआराम यांमध्यें मग्न आहे. त्यामुळें ब्रम्हदेवाला त्यांच्या विश्वोत्पादनाच्या कामांत पुष्कळच मदत झाली, व त्याचा परिणाम आमची प्रजा पंचवीस कोटीपासून पसतीस कोटींपर्यंत वाढली हा झाला !

घोड्यावर बसणें, शिकार करणें, हे व्यायाम तर राहिले नाहींतच; पण कुस्ती, दंड, बैठका, यांसारखे व्यायाम करण्याचीही आमची इच्छा राहिली नाहीं ! मग अंगांत असलेल्या कुवतेचा

उपयोग विषयासक्तीवांचून दुसऱ्या कोणत्या कामीं होणार ?

चैनीविषयीं पाहिलें, तर तीच स्थिति आढळून येईल. चहा, कॉफी, लेमोनेड, सोडावॉटर वगैरे जिनसांचीं उपहारगृहें एका रस्त्यावर पांच पंचवीस सांपडतील. तमाखू विडीवाल्यांच्या दुकानांना पण तेवढाच ऊत आला आहे. दारूच्या देशी व विलायती दुकानांना तोटा नाहीं. पुन्हां एवढीं सगळीं उपाहारगृहें, पान—तमाखूवाल्यांचीं दुकानें, दारूचे पिठे, वगैरे बिनबोभाट चाललीं आहेत !

हल्लींचें शिक्षण व दारिद्र्य.

हल्लींचें शिक्षण व दारिद्र्य हीं देखील ऱ्हासाचीं दुसरा कारणें आहेत. मानासिक शिक्षणाच्या मानानें शारीरिक शिक्षण आम्हांस मुळींच मिळत नाहीं; शक्तीच्या मानानें बुद्धीचा बोजा फार वाढला आहे. कित्येक असा आक्षेप आणतात कीं, बुद्धिवान् मनुष्य शक्तिवान् मनुष्याला जिंकतो. परंतु हें केव्हां घडतें?—शक्ति आणि बुद्धि या दोहोंमध्यें फार अंतर असेल तेव्हांच. जीं राष्ट्रें इतर राष्ट्रांशीं चढाओढींत वर आलीं आहेत, तीं मनगटांत जोर असल्याशिवाय आलेलीं नाहींत. पानिपतच्या लढाईंत हातघाईवर प्रसंग आला असतांना अफगाण लोक त्या घाईत धिप्पाड शरीरामुळें व सशक्त हड्डीमुळें विजयी झाले! तसेंच वॉटरलूच्या लढाईंत फ्रेंचांनीं इंग्लिश लोकांची शरीरसंपत्ति पाहून तोंडांत बोटेंच घातलीं ! यावरून बुद्धिबलापेक्षां शरीरबल अधिक पाहिजे हें सिद्ध होतें. **धर्माकरितां, मानासाठीं, सत्यास्तव, हाल अपेष्टा भोगणें; किंवा जीवितसंशयाचा प्रसंग आला असतां न डगमगणें; इष्ट वस्तु साध्य करून घेण्यासाठीं संकटें सोसणें; तसेंच आपलें स्वामित्व, स्वत्व, व स्वातंत्र्य राखण्याकरितां जिवावर उदार होणें; इत्यादि सद्गुण शरीरसंपत्तीपासून प्राप्त होतात.** हल्लींच्या शिक्षणपद्धतीनें जसा फायदा झाला आहे, तसा एक मोठा तोटाही झाला आहे; तो हा कीं, या शिक्षणपद्धतीमुळें शरीरसंपत्तीकडे आमचें फार दुर्लक्ष झालें. एका आंग्ल ग्रंथकारानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, "व्यायामाची हयगय करून उरावर पुस्तकें घेऊन रात्रंदिवस अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यास उत्तम मुलाचा नमुना म्हणून जेथले शिक्षक मोठ्या कौतुकानें व अभिमानानें सांगतात, अशा शाळा निदान इंग्लंडांत तरी आढळत नाहींत." यावरून ते लोक किती पद्धतशीर शिक्षण देतात याची कल्पना होते. अभ्यासक्रमाच्या जोपासनेला शरीर हेंच मुख्य साधन आहे. आजकाल विश्वविद्यालयांत पहिला नंबर पटकावणें, आणि एवढें केलें म्हणजे इतिकर्तव्यता झाली, अशी आमची समजूत झाली आहे; व त्यामुळेंच आपण शरीरसुखाला कायमचे मुकलों आहोंत. शरीरसुखाचें साधन गेल्यामुळें आपण कृश, निर्बळ, व त्यामुळें रागीट व त्रासिक बनलों आहोंत. विश्वविद्यालयाच्या चरकांतून पिळले जाऊन आमच्या संसारसुखाला आरंभ होतो न होतो, तोंच आह्मी या श्रेष्ठ व अमूल्य जीवितास मुकतों. समजत असून अविचारी, डोळे असून अंध, व कान असून बधिर, अशी आमची अवस्था झाली आहे; पाठीस कुबड आलें आहे; गाल बसून गेले आहेत; डोळे खोल

जात चालले व ते पुन्हां सतेज करण्यासाठीं फरामजीशेट,अगर दादाभाई पीरभाई आणि कंपनीकडून एक चष्मा ऊर्फ प्रतिडोळा नाकावर येऊन बसला आहे; मान तर गालांची व डोळ्यांची स्पर्धा सहन न झाल्यामुळें रुसून जाऊन बगळ्यासारखी पुढें आली आहे. हातपाय तर विचारावयासच नकोत; येथपर्यंत जरी स्थिति येऊन ठेपली आहे, तरी शरीराची बेपर्वाई करून आमचा अभ्यासक्रम व वाचन चालूच आहे. या लिहिण्याचा उद्देश, शरीरसंपत्तीसाठीं अभ्यासास अजीबात फांटा द्यावा, असा मात्र कोणीं समजूं नये. तर ज्या प्रमाणानें अभ्यासक्रम, तेवढ्या तरी प्रमाणानें शारीरिक शिक्षण असलें पाहिजे. या दोहोंची एक सांगड घातली तरच अभ्यासाचें व शरीरसंपत्तीचें सुख मिळणार आहे.

दारिद्र्य अठरा विश्वे सर्व देशभर पसरलें आहे.तशांत दुष्काळ पडून शेंकडो गरीब लोक अन्नास मोताद झाले. या दारिद्र्यामुळें लोकांना व विशेषत: शेतकरी वर्गाला एकवेळचें पोटभर अन्न सुद्धां मिळत नाहीं. साधारण चांगला पोटभर खुराक शरीरसंपत्ति चांगली ठेवण्याला पाहिजे आहे. याच्या अभावीं त्यांच्यांत युवावस्थेचा ताजा दम, धाडसीपणा, राकटपणा कोठून रहाणार ?

हातीं घेतलेलें काम शेवटास नेणें, नुसत्या एका शब्दानें दुसऱ्यास वांकावयास लावणें, एक निश्चय, करारीपणा, श्रोतृगणाचें मन पूर्णपणें ओढून घेणें, त्यांच्या मनांत स्वतःविषयीं आदर व पूज्यबुद्धि उत्पन्न करणें, इत्यादि गुण खऱ्या वीर्यापासून उत्पन्न होतात. कॉलेजच्या शिक्षणामध्यें शाकुंतल, मालतीमाधव, मेघदूत, कादंबरी, वगैरे शृंगारसप्रधान पुस्तकें विश्वविद्यालयानें नेमलीं आहेत. अशा पुस्तकांची चट लागली ह्मणजे दुसरीं तशींच पुस्तकें वाचण्याकडे मन धांव घेतें. रेनॉल्ड तर आमच्या युवकगणांचा जीवाधार होऊन राहिला आहे !

फाजील स्वातंत्र्य

दुसरी एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, ब्रह्मचर्य कायम राहण्याला मनाचा कांहीं दाब असावा लागतो तो, व तें मन काबूंत ठेवण्याला जो वाडवडिलांचा धाक लागतो तो, हे हल्लीं तसे असलेले दिसत नाहींत. इंग्रजी अभ्यासामुळें विद्यार्थ्यांचें फार फाजील महत्त्व वाढलें आहे. दोन चार परीक्षा दिल्या कीं मग घरांतील मंडळी साहजिकपणें त्याला मान देऊं लागतात; मग त्या बाळ्याचे कसेही विचार असोत. तो कितीही मठ्ठ डोक्याचा असला तरी त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांस तो करील तें प्रमाण असें वाटूं लागतें. पन्नास वर्षांपूर्वी, अंगांत धमक असल्याशिवाय मोठ्या नोकऱ्या मिळत नसत; व त्या मिळविण्यासाठीं फार परिश्रम करावे लागत असत. हल्लींचें स्थित्यंतर असें झालें आहे कीं, दोन परीक्षा दिल्या कीं झाला नोकरीला लायक. परीक्षांवर नोकरीचें मान अवलंबून राहिलें आहे, त्यामुळें अमुक परीक्षा दिल्या कीं लागलीच त्याची योग्यता ठरते, व त्याप्रमाणें त्यास साहजिकपणें मोठेपणा प्राप्त होतो. अर्थात् वडील मंडळीचा दाब त्या मुलावर राहत नाहीं; मग स्वच्छंदपणें वागण्याची

त्यास संवय लागते. बाळ्या ज्ञानानें जरी अधिक नसला, तरी परीक्षांनीं ज्यास्त असल्यामुळें बापाचें वजन त्याच्यावर पडत नाहीं. मग काय विचारतां ? घरांत पूर्ण मुभा, अगांत मुसमुसणारें तारुण्य, शृंगारादि पुस्तकांचें निरीक्षण, फाजील मानसिक श्रमांमुळें व सूक्ष्म कारणानेंही उद्दीपित होण्याजोगें मन, आणि त्यासर्वांबरोबर चहा, कॉफी, कोको वगैरे उत्तेजक पदार्थांचा आहार, इत्यादि गोष्टींमुळें तरूण दणकट जवानाचा क्षयी, रोगी, तेजोहीन जवान बनतो. ज्या वयांत शरीरशक्ति कमवावयाची, तें वय अशा फाजील मानसिक श्रमांमुळें तरूणांला जरठ बनवूं लागलें ! व याप्रमाणें जोरदार, शरीरसंपत्तिमान् पुरुषांचा ऱ्हास होऊं लागला.

उपाय.

आतापर्यंत शारीरिक संपत्तीच्या ऱ्हासाच्या कारणांचें विवेचन झालें. आतां त्यांचें निराकरण करण्यासाठीं कोणते उपाय योजणें इष्ट आहे याचा विचार करूं.

शारीरिक व्यायाम.

लष्करी—शिक्षणापासून प्राप्त होणारे गुण-शौर्य, बल, वीर्य, देशाभिमान, इत्यादि ज्या प्रकारच्या व्यवसायांपासून आपणांस प्राप्त करून घेतां येतील, त्या व्यवसायांकडे लक्ष लाविलें पाहिजे. शारीरिक व्यायाम म्हणजे घोड्यावर बसणें, पोहणें, कुस्ती, गदका फरी, मलखांब, लठ वगैरे कसरतींपासून वरील गुण प्राप्त करून घेतां येतील. काटकपणा, जुटीनें काम करण्याची संवय, स्वाभिमान, शौर्य, वगैरे गुण उपलब्ध करून घेण्याचे जे मार्ग आहेत ते कुस्ती, साठमाऱ्या, शिकार वगैरे प्रकारच्या सामन्यांपासून प्राप्त करून घेतां येतात. स्वावलंबनासारखा दुसरा सोपा मार्ग नाहीं, व तो साध्य करण्यासाठीं व्यायाम अवश्य पाहिजे. संकटें सोसल्यावांचून हुशारी, शहाणपण येत नाहीं. सोनाराच्या टाकीचे घांव सोसल्यावांचून देवपण येत नाहीं. संकटें आलीं ह्मणजे हळूहळू त्यांतून पार पडण्याचे उपाय आपोआप सुचतात.

लहान मुलांमध्यें व्यायामाची आवड उत्पन्न करणें.

लहानपणीं मुलांना शाळेंत पांच तास उगीच एकाच जागीं खिळून ठेवल्यानें त्यांच्या नैसर्गिक मनोवृत्ति दुर्बल होतात. त्यापेक्षां फक्त तीन तास शाळेंत ठेवून बाकी सारा दिवसभर खेळण्यानें, बागडण्यानें त्यांनां व्यायाम होऊन, व्यायामाच्या अंगभूत असणाऱ्या मनोवृत्ति व गुण त्यांच्यांत उत्पन्न होतात. मात्र त्यांच्या खेळण्याबागडण्यांत उनाडपणा मुळींच होऊं देतां कामा नये, एवढें पालकांनीं अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे. घराजवळच लहानसें पटांगण करून दर आठ दहा दिवशीं खेळण्याच्या शर्यती ठरवून खेळ करवावे, बक्षिसें वांटावीं. असें केल्यानें व्यायामाची गोडी लागून तीं मुलें पुढें सशक्त, धिप्पाड व मजबूत बनतात.

हल्लींचा आईबापांचा क्रम.

अशा प्रकारच्या व्यायामाची गोडी लहान मुलांमध्यें लागण्याला प्रत्येक आईबापानें झटलें पाहिजे. हल्लींचा क्रम असा आहे कीं, मुलगा पांच वर्षांचा पुरा झाला नाहीं तोंच त्याला शाळेंत घालतात, किंवा एकाद्या ताट्या पंतोजीच्या हवालीं करतात. मुलानें लौकर शिकावें म्हणून बाप जेवढी खटपट करीत

असतो, त्याच्या शतांश सुद्धा त्याच्या शरीराची काळजी तो वाहत नाहीं. हल्लींच्या बापांची उच्चतम महत्त्वाकांक्षा, "माझ्या गोंद्यानें बी. ए. एम्. ए. ची परीक्षा द्यावी व तेवढें करून एकाद्या प्रोफेसराची अगर ऑफिसरची जागा पटकावावी म्हणजे झालें"—एवढीच असलेली दृष्टीस पडते. बाळ्या इंग्रजींत ट, फ करूं लागला म्हणजे मोठें स्फुरण येऊन त्याचे दोहोंचे चार हात केव्हां होतील एवढी मोठी इच्छा बाळगणारे आईबाप त्याच्या शरीराची अगदींच उपेक्षा करतात. ज्या आईबापांना आपलीं मुलें जगांत नांवारूपास आणावयाचीं असतील, आपलीं मुलें पूर्ण सशक्त व ताकदवान बनून प्रसंगविशेषीं तोंडास तोंड देण्याइतकें सामर्थ्य त्यांचे अंगीं आणावें अशी इच्छा असेल, आणि आपलीं मुलें विश्वविद्यालयाच्या चढाओढींत जशीं पहिलीं यावींत तशींच तीं शरीरसामर्थ्यानें परिपूर्ण असावीं व क्षयी बनूं नयेत अशी काळजी वाटत असेल, त्या आईबापांनीं, त्या पालकांनीं आपल्या मुलांच्या शरीरसंपत्तीकडे पूर्ण अवधान दिलें पाहिजे, व त्यांना त्यासाठीं व्यायामशाळेंत लहानपणापासूनच पाठविण्याचा परिपाठ ठेविला पाहिजे. या दुनियादारीमध्यें जन्मास येऊन त्यांनीं फुकट मरूं नये, तर लोकप्रिय होऊन देशहित करतां करतां मरावें, अशी उच्चतम महत्त्वाकांक्षा अशा आईबापांनीं धरली पाहिजे.

व्यायामशाळा. प्रत्येक गांवांत, खेड्यापाड्यांत जसें एक सर्वमान्य देवालय असतें, तद्वत एक व्यायामशाळाही तेथें असली पाहिजे. त्या व्यायामशाळेंत सर्व प्रकारच्या कसरती असाव्यात. या व्यायामशाळेंत त्यांनीं आपल्या मुलांना नित्य व्यायाम करण्यास पाठविलें पाहिजे. अशा व्यायामशाळेच्या चालकावर, मुलें बिघडूं नयेत, तीं वाईट मार्गी लागूं नयेत, अशी पूर्ण मदार ठेवलेली असते. प्रथम आपलीं मुलें तालमींत पाठविण्यापूर्वी तेथल्या चालकाची चांगली माहिती करून घेतली पाहिजे; ती हीच कीं, तो निर्व्यसनी, निरभिमानी, उदार, प्रसंगावधानी, निर्भीड व हुशार आहे किंवा नाहीं, हें पाहिलें पाहिजे. असा चालक सद्गुणी व कसरतींत पूर्णपणें वाकब व पारंगत असला पाहिजे. ज्या अर्थी कोंवळ्या मनाच्या मुलांना त्याच्याजवळ सोंपवावयाचें असतें, त्या अर्थी आईबापांनीं अशा प्रकारचा शोध केलाच पाहिजे. हल्लीं कित्येक आखाड्यांत निशा करण्याची फार घातुक चकट् लागलेली दिसण्यांत येते. भांग गांजा पिऊन निशा करणाऱ्या चालकांना बहिष्कार घातला पाहिजे. तमाखूचें व्यसन असणाऱ्या चालकांपासून त्यांना दूर ठेविलें पाहिजे. तालमीमध्यें शिस्त, टापटीप व नम्रतेनें वागण्याची संवय असावी. सध्यांच्या परिस्थितींत लोकांची प्रवृत्ति इकडे लागण्यासाठीं आखाडा तसाच मजेदार, चित्ताकर्षक असावयास पाहिजे. यायोगें, लोकांचा नाटकगृहें, तमाशे इत्यादिकांकडे जो ओघ वळला आहे तो बंद करून त्यास व्यायामाच्या संस्थांकडे वळविलें पाहिजे.

(अपूर्ण.)

श्री.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक ३.

एका सरकारी कामगाराच्या रोजनिशींतील उतारे.

[२.]

उद्धर्ता.—टोमदेव.

ता० १० दिसेंबर.—जेजूरीहून वाल्यास-वाल्हें दोन ओढ्यांचे दरम्यान आहे. गांव बागाइती, बाहेरून दिसावयास सुरेख; परंतु आंत ब्राह्मणवस्ती असतांही घाणेरडा! म्युनिसिपालिटीसारखी कांहीं व्यवस्था असती तर बरें झालें असतें. गल्ल्या अरुंद आणि गुरांमाणसांचे सर्व व्यवहार त्यांतच! ओढ्याच्या पात्रांतही तोच प्रकार!! पूर्वेकडे टेंकडी आहे तिच्या माऱ्यांत हा गांव आहे. मागें रास्त्यांच्या जहागिरींत हा गांव होता.

पुर्वी वाल्या कोळी होता तो आपला वाटपाड्याचा धंदा येथेंच चालवी म्हणतात! पुढें तो वाल्मीकि ऋषी झाला. त्या वाल्मीकीची समाधी येथेंच आहे!! वाल्या कोळ्याचें गांव म्हणून वाल्हें!

येथील देशपांडे हे प्रमुख गृहस्थ आहेत. लोकलफंड कमिटीचे मेंबर आहेत. तसेंच देशमुखही प्रमुखांतच मोडतात. गोपाळराव देशमुख हे सुमारें ७८ वर्षे उमरीचे वृद्ध ब्राह्मण गृहस्थ आहेत. त्यांस मुद्दाम भेटलों. त्यांच्या संग्रहीं दादोजी कोंडदेवाचे कांहीं महजर आहेत. पण ते आज पाहावयास मिळाले नाहींत. पुण्याचे शितोळे देशमुख यांचे हे अजहत देशमुख (मुखत्यार). पाषाण व लोंवळें हीं गांवें शितोळ्यांस इनाम होतीं, व शितोळ्यांकडे महादजी शिंद्यांची मुलगी दिली होती, हल्लीं त्यांस ग्वालेरीस जहागीर आहे, वगैरे माहिती गोपाळराव सांगतात. जुने कागद उंटें भरून कौपर साहेबांनीं नेले, त्यामुळें आतां काय राहिलें आहे?—असे त्यांचे उद्गार निघाले. तथापि देशमुखांकडे कांहीं जुने कागद पाहण्यास मिळतील, असा अदमास आहे.

ता० १२ दिसेंबर.—पिंपरें—नीरानदीच्या कांठीं—ह्या गांवांत सर्व थोपटेच! यांपैकीं पूर्वी कांहीं घराणीं शिलेदारी करीत असत.

गुळुंचें.—निगडे आडनांवाचे मराठ्यांचा भरणा विशेष—निंबाळकरही येथील वतनदार म्हणवितात. विहिरीच्या पाण्यावर बागाईत बरेंच आहे. लोक सुखी व नीटनेटके दिसले. गुळुंच्याशेजारींच एक मैलावर टेंकडीवरील गुहेंत लहानसें बोलाई भवानीचें देवालय आहे.

ता० १३ दिसेंबर.—सायंकाळीं वीर येथें मुक्कामास गेलों. येथें एक सुंदरसा ओढा वाहात आहे. १०—१२ फुटी उंचीच्या खडकावरून वाहात खालीं पडत असल्यामुळें येथें छोटासा धबधबा झाला आहे. खडकावरून पडतो तेथें व पुढें एका ठिकाणीं असे लहानसे पाण्याचे डोह उत्पन्न झाले आहेत. चावडीवरून पाहतां पिंपळाचे व वडाचे विशाल वृक्ष, त्याच्या पलीकडून वाहात जाणारा ओढा, रामचंद्रजीचें मंदिर इत्यादिकांचा मनोरम देखावा नजरेस येतो. येथें म्हसकोबाचें तटबंदी देवालय असून त्यास सांजसकाळ वाजणारा चौघडा आहे. नीरेचा कालवा येथून दीड मैलावर बांधीत आहेत, पण हा गांव उंचावर असल्यामुळें कालव्याचा येथें उपयोग व्हावयाचा नाहीं. तथापि ओढ्याच्या पाण्यावर येथें बागाईत बरेंच होत असतें. येथें धुमाळ ह्यांचें संपन्न आणि वजनदार असें मराठे घराणें नांदत § आहे.

ता० १५ दिसेंबर.—परिंचें—सतत वाहणाऱ्या ओढ्याचें पाणी असल्यानें येथेंही बागाईत बरेंच आहे. जाधव हे मराठ्यांमध्यें मुख्य. परांजपे, रास्त्यांचे कारभारी, यांचें हें मूळगांव. यावरूनच त्यांस परिंचेकर ह्मणतात. ह्यांचा एक मोठा वाडा येथें † आहे.

ता. १७ दिसेंबर.—न्हावी येथील ओढ्यांत एक झरा आहे. त्याचें पाणी ओढ्यांतील पाण्यापेक्षां बरेंच गरम असतें. ह्यांतूनच मागें एकदां रक्त वाहूं लागलें होतें ह्मणून सांगतात! ह्या गांवांत सोनवणी मराठे यांचा भरणा आहे.

भोगवली.—येथें सर्व निगडेच आहेत.

किकवी.—हा गांव पुणें—सातारा रस्त्यावर आहे. येथें पेशव्यांनीं बांधिलेली टोलेजंग धर्मशाळा आहे. खाडिलकर उपनांवाचें चित्पावन घराणें येथें नांदत आहे.

ता. १८ दिसेंबर.—नसरापूर—पंतसचिव यांच्या मुलखांत शिवगंगेच्या कांठीं आहे. पुण्याहून सुमारें २१ मैल होईल. हें पंतांच्या राजगड तालुक्याचें ठाणें आहे. राममंदिर प्रशस्त असून त्यामागें पोफळी वगैरेचा बाग नदीच्या पाण्यावर तयार केला आहे. तेथें नदीचा व बागेचा देखावा पाहून कोंकणांतील पाटस्थळाची व त्यावर तयार झालेल्या आगरवाडीची आठवण होते. शेजारींच थोड्या अंतरावर बनेश्वर नांवाचें अत्यंत रम्य देवस्थान आहे. हें एका गर्द झाडींत असून, मंदिराच्या सभोंवतीं डोंगरींतून सतत वाहणारे झरे खेळविले आहेत. भुलेश्वराच्या लिंगाप्रमाणेंच येथेंही एका गर्तेमध्यें लिंगें असून तीं फूटभर पाण्यांत नेहमीं बुडालेलीं असतात. वर पिंडीमध्यें बाण

---

§ बाळाजी विश्वनाथ यांस घोड्यावर बसवून त्यांची चंद्रराव जाधवाच्या स्वारीपासून सुटका करणारे धुमाळ आणि जाधव घोडेस्वार होते. त्यांपैकीं धुमाळ हे येथील राहणारे व जाधव हे परिंचें येथील राहणारे.

† हल्लीं रास्त्यांचा कारभार परिंचेकरांकडे नाहीं.

बसविलेला आहे. पिंडीच्या भोंवतीं व भिंतींच्या कडांनीं देवालयांत व पायऱ्यांखालून देवालया-भोंवतीं बाहेर सगळीकडे पाणीच पाणी बांधीव पन्हळांतून वाहत आहे! उन्हाळे दिवसांत येथें कांहीं दिवस घालविण्यास मिळेल तर उत्तम. देवालयाच्या खालच्या बाजूनें शिवगंगा वाहात आहे. तिजमध्यें हें देवालयांतील व देवालया-बाहेरील पाणी शेवटीं जाऊन पडतें.

ता. १९ दिसेंबर.—शिवापूर—येथें जनोबा देशपांडे यांच्या घरीं बाजीराव रघुनाथ गेले असतां त्यांचें पागोटें वळचणीस लागलें. "कायरे जनोबा, तूं चांगलें मोठें घर कां बांधीत नाहींस?" म्हणून श्रीमंतांनीं प्रश्न केला. "आज्ञा झाल्यास बांधीन," असें जनोबानें उत्तर केलें. त्यावरून वाडा बांधण्याची आज्ञा झाली, व जनोबा देशपांडे यांचा दोन चौकांचा टोलेजंग दुमजली वाडा तयार झाला. हे जनोबा राव बाजीचे प्रियपात्रांपैकीं होते. पुढील चौकांतील दक्षिणच्या सोप्यांत राममंदिर आहे. पण दुसरे सोपे हल्लीं बटाटे, मिरच्या, आंबे सांठविण्यासाठीं देऊन देऊन खराब झाले आहेत. मुख्य वाड्याचा दुसरा मजला मात्र जणूं काय नुकताच बांधिला आहे असें वाटतें. दिवाणखान्यांत कारंजेंही बांधिलेलें आहे. सिंहगडाच्या डोंगरावरून जोराची झुळूक वाहते. त्याच्यायोगें दिवाणखाना हवाशीर झाला आहे. आम्हीं त्या दिवाणखान्यांतच तळ दिला होता.

शिवापूरचा बाग फार प्रसिद्ध आहे. बाग ह्मणजे आंबराई. येथें बैलगाड्यांचा उतरण्याचा तळ आहे. पुण्याहून साताऱ्याकडे जाणाऱ्या गाड्यांचा पहिला मुक्काम येथेंच व्हावयाचा. ह्या बागाचें नांव शाहाबाग. हा शाहाजी महाराज, शिवाजीचा पिता, यानें लाविला. कोणी चिरंजिवानें लाविल्याचें सांगतात, पण नांवावरून शाहाजीनेंच लाविला असावा असें दिसतें. दादोजी कोंडदेवानें बगरहुकमानें आंबा उचलल्याबद्दल आपला हात तोडण्यास सांगितलें होतें, पण लोकांच्या विनंतीवरून पुढें आंगरख्याची अस्तनी कापून लांडया अस्तनीच आंगरखा तो घालूं लागला; तो आंबा ह्याच बागांतील उचलला होता ह्मणून समजतें.

शिवापूर ही पेठ शिवाजीनें बसविली व तीस आपलें नांव दिलें. जवळच संभापुरा व राजारामपेठ हीं त्यानेंच बसविलीं. सारांश, हें स्थळ शिवाजीचें मोठें लाडकें होतें असें दिसतें. शाहाबाग, शिवापूर, संभापुरा व राजारामपेठ हीं शाहाजी, शिवाजी, संभाजी, व राजाराम ह्यांचीं स्मारकेंच आहेत ह्मणाना! हीं सर्व ठिकाणें खेड ऊर्फ खेडें बारें ह्या गांवांत मोडतात. शिवापूरच्या बागेंतील आंबे पुण्यास प्रसिद्ध आहेत. शाहाबागांत शिवाजीचा बंगला खेड गांवानजीकच होता म्हणून सांगतात.

शिवापुरास बांगड्या करण्याचा कारखाना आहे. जुन्या काचांचा रांधा करून बांगड्या तयार करितात. नवी कांच काचारी यांस तयार करतां येत नाहीं. कांचेचे फुगेही ते तयार करतात, पण ह्यापलीकडे त्यांची मति चालत नाहीं.

खेड शिवापूर ऊर्फ खेडेंबारें. देशपांड्याच्या वाड्यापासून सुमारें अर्ध्या मैलावर आहे. येथें ब्राह्मणांचीं सुमारें २०।२५ घरें असावीं. कोंडे आडनांवाच्या मराठे घराण्याकडे खेडची देश-

मुखी आहे. खेड येथें पाहण्याची मौज ही आहे कीं, गांव उंचवट्यावर असून भोंवतीं त्या उंचवट्यांतून पाण्याच्या झऱ्यांच्या धारा पडत असतात! पाणी चांगलें असून नेहमीं वाहात असतें. शिवापुरास पाण्याची गैरसोयच आहे, पण खेडास पाणी विपुल! हें खेड शिवापूर, व दुसरें खेड पुणें जिल्ह्यांत आहे तें खेड कडूस. शिवापूर व कडूस असें लिहून ह्या दोन खेडांचा भेद दर्शवावा लागतो. अशीं एकाच नांवाचीं दोन दोन व कधीं कधीं तीन तीनही गांवें ह्या जिल्ह्यांत आहेत.

ता० २० दिसेंबर.—कोंढणपूर—शिवापूरच्या पश्चिम बाजूस कोंढणपूर येथें तुकाई देवीचें स्थान आहे. तुकाईची जत्रा मार्गशीर्ष शु॥ १९ पासून वद्य ३० पर्यंत १५ दिवस चालू असते. पुष्कळ मराठ्या घराण्यांची ही देवी कुलस्वामिनी आहे. वऱ्हाड, नागपूर वगैरे लांब लांबच्या ठिकाणाहूनही यात्रा येते. यात्रेचा जमाव फार मोठा असतो. देवालय लहानच आहे, पण याचें माहात्म्य मोठें! कोंढणपुराचे पश्चिमेस जवळच कोंढाणागड आहे. येथील लोक सांगतात कीं, कोंढाण्यावर किंवा कोंढणपुरास कौंडण्यऋषींचा आश्रम होता! वाल्ह्यावरून वाल्हें तसें कौंडण्यावरून कोंढाणा!!

तुकाई व यमाई ह्या नांवांची व्युत्पत्ति मोठी विलक्षण अशी ऐकण्यांत आली. रावणानें सीतादेवीस चोरून नेल्यावर रामचंद्राची अवस्था फार शोचनीय झाली. वृक्षांस व वेलींस सीते! सीते! म्हणून तो आलिंगूं लागला! "अशा मानवी पुरुषाचें आपण ध्यान करतां हें मोठें आश्चर्य आहे," असें पार्वती महादेवास म्हणाली. महादेव शांतपणानें बोलले, "अपर्णे, तूं चुकते आहेस. तुला वाटतें तसा राम हा सामान्य पुरुष नव्हे." पण पार्वतीची खातरी होईना, म्हणून तिनें "तुमच्या रामास मोह पाडतें," अशी प्रतिज्ञा केली. लागलीच ती दंडकारण्यांत येऊन सीतेचें रूप घेऊन रामापुढें उभी राहिली, हंसूं लागली, ही मी येथें आहें, असें म्हणूं लागली. पण राम तिजकडे ढुंकूनही पाहीना! तेव्हां लक्ष्मणानें विनंती केली कीं, "सीतादेवी जवळ असतां आपण तिजकडे न पाहतां हा सीते हा सीते म्हणून वृक्षादिकांस कवळितां हें काय?" शेवटीं दोघांच्याही समाधानार्थ रामचंद्रानें त्या सीतारूप पार्वतीकडे पाहून म्हटलें, "ये मायी, तूं कां आयी? ये बये, तूं कां आलीस?" असें पार्वतीस ओळखून त्यानें आदरपूर्वक विचारलें. माते ये, तूं का आलीस?—असा प्रश्न करून तिची प्रतिज्ञा रामानें खोटी केली. पुढें 'ये माई' यावरून यमाई* व 'तूं कां आयी' यावरून तुकाई हीं नांवें देवीस पडलीं! व त्या नांवांनीं ती महाराष्ट्रांत वास करूं लागली!!

कोंडाणा किल्ल्याचा रामकडा यांतील एका लहानशा गुहेंत तुकाई देवी प्रथम होती. कोंढणपूरच्या देशमुखाची बायको तिच्या दर्शनास त्या एकांतस्थळीं नित्य जात असे. पण पुढें देशमुखास तें न आवडून त्यानें तो परिपाठ बंद केला. बाई तर देवीचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नास शिवेना! तिचा निश्चय आणि भक्ति पाहून तुकाई भवानी रामकड्यावरून कोंढण-

* यमाई देवी औंधकर प्रतिनिधी यांची कुलस्वामिनी होय.

पुरांत प्रकट * झाली !! तेव्हांपासून रामकडा विस्मरणांत पडून कोंढणपूर प्रसिद्धीस आलें.

कोंढणपूरच्या तुकाईचें दर्शन घेऊन तसेंच कोंढाणा ऊर्फ सिंहगड ह्या डोंगरी किल्ल्यावर आम्ही येथूनच चढलों. किल्ला सुमारें सतरा अठराशें फूट तळापासून उंच असावा. चढाव बराच कठिण, तरी पुण्याकडून डोणज्याकडील चढावापेक्षां सोपा आहे. तटबंदी जागोजाग पडलेली किंवा पडूं पाहणारी अशी झाली आहे. तटबंदीच्या आंतील पठाराचा घेर सुमारें एक कोस होईल. दरवाजे—उत्तरेकडील डोणज्याकडला तो डोणजदरवाजा व दक्षिणेकडील कल्याणदरवाजा—असे दोन आहेत. कल्याण नांवाचें खेडें गडाखालीं दक्षिणेस आहे, त्यावरून कल्याणदरवाजा हें नांव पडलें. तानाजी मालुसऱ्याचे मावळे लोक वर दोराच्या शिडीनें चढले ते कल्याण-बाजूनेंच.

समुद्रपृष्ठापासून ह्या गडाच्या माथ्याची उंची सुमारें ४३।४४ शें फूट आहे. त्यामुळेंच हल्लीं येथें हवा खाण्यासाठीं ५।६ बंगले बांधिलेले आहेत. त्यांत एक पुण्याच्या पदमजी घराण्याचा आहे. गडावर पाणी विपुल आहे. त्यांत देवटाक्याचें पाणी उत्कृष्टच आहे. टाकें उघडें असूनही पाणी नेहमीं थंडगार, स्वच्छ आणि पाचक असें आहे. स्वच्छ इतकें कीं, त्याच्या तळचा पदार्थ सहज स्पष्ट दिसतो!

शिवाजीनें हा किल्ला भेद करून हस्तगत केला व त्याचें नांव सिंहगड ठेविलें. कित्येक वेळीं तो येथेंच राही. शाहिस्तेखानावर पुणें येथें घाला घातला तो येथूनच. जयसिंग याच्यामार्फत तह झाला त्यांत हा गड मोंगलाकडे गेला. नंतर मोंगलापासून परत हा गड तानाजीनें घेतला. पण त्या हातघाईच्या लढाईंत तानाजी ठार झाला. 'गड आला पण सिंह गेला!' असें शिवाजीनें म्हटलें तें तानाजीसच उद्देशून ह्मटलें.

पुढें राजाराम येथेंच वारला. राजारामाची छत्री येथें लहानशीच पण सुबक अशी बांधिलेली आहे. शिवाजी ज्या बाणाची पूजा करीत असे व ज्याची राजारामही पुढें पूजा करूं लागला होता, त्या बाणाची स्थापना या छत्रींत केली आहे. हा बाण कितीदां तरी चोरीस गेला, तथापि नेणारांना तो जिरला नाहीं! तो त्यांस पुन्हा येथें आणून ठेवावा लागे म्हणून सांगतात. हा बाण सुमारें टीचभर लांब असून भुरकट रंगाचा आहे, व त्या सभोंवतीं शुभ्र जानवें ह्मणजे पट्टा आहे. पौर्णिमेस ह्या पट्ट्यांतून द्रव येतो ह्मणून सांगतात. छत्रीच्या बंदोबस्तासाठीं व उत्सवासाठीं बाराशें रुपयांचा गांव इनाम आहे.

ह्या किल्ल्याच्या उंच माथ्यावरून सभोंवतालच्या प्रदेशाचा देखावा अत्यंत मनोरम दिसतो. पश्चिमेकडून तोरणा व दक्षिणेकडून राजगड हे किल्ले दिसतात. राजगडचा पठार तोरण्याच्यापेक्षां प्रशस्त आहे असें नजरेस येतें. ईशान्येकडे पाहिलें ह्मणजे पुणें गर्द झाडींत गर्क झालेलें दिसतें. खडकवासल्याचा तलाव लांबच्या लांब

* मागें पृष्ठ ४९ पाहा. भक्तांचे सोईसाठीं खंडोबा कडेपठारावरून खालीं जेजुरीगडावर आले, असें तेथें वर्णन आहे. येथेंही देशमुखिणीच्या भक्तीसाठींच तुकाईभवानी कोंढणपुरास आल्याचें म्हटलें आहे.

पसरलेला असून सूर्यकिरणांनीं चमकतांना दिसतो.

गडावर चढलों त्या दिवशीं थंडी फार होती, त्यामुळें चढण्याचे व फिरण्याचे श्रम बिलकूल वाटले नाहींत. गडावरील देवटाकें हें तीर्थ आहे तेव्हां त्याच्या उदकानें स्नान करण्याविषयीं बरोबरील वृद्ध शिपायानें आग्रह केला. पण थंडी फार ह्मणून प्रथम मीं नाकारिलें. पण म्हातारा ऐकेना! त्यानें एका ब्राह्मणाकडून पाणी तापवून शेवटीं मला स्नान घातलेंच. पण त्यापासून कांहीं विकृति झाली नाहीं.

खालून धान्यादि सामग्री आणण्याची सोय केली व बरोबर मित्रमंडळी व पुस्तकें असलीं तर उन्हाळ्यांत फार सुखानें दिवस जातील. दूध व लांकडें यांची सोय कल्याण व डोणजें वगैरे गांवचे लोक करतात म्हणून समजतें.

ता० २१ दिसेंबर.—शिवापुराहून गराड्यास जाऊन आलों. गराडें हें पुरंदरच्या घेऱ्यांत आहे. वाट डोंगरांतून असल्यामुळें गाडीरस्ता नाहीं, ह्मणून घोड्यावर बसून गेलों. गराडयास चित्पावन ब्राह्मणांचीं बरींच घराणीं आहेत, त्यांत गोखल्यांचें घराणें प्रमुख दिसतें. ह्या गांवची हवा व पाणी चांगलें आहे. गणपतीचें देवालय लहानच पण सुरेख बांधिलेलें आहे.

ता० २२ दिसेंबर.—कोंढव्यास जाऊन पुढें कात्रजेस गेलों. कात्रज गांव भिकारीच आहे, पण येथील तलावामुळें गांवचें माहात्म्य आहे. बाळाजी बाजीराव यांनीं पुण्यास पाणी नेलें तें ह्या तलावांतील. तलाव एका खालीं एक असे दोन आहेत. चिरेबंदी प्रचंड बंधारे बांधून ते साधिले आहेत. तळ्यांत जिवंत झरे आहेतच; पण खेरीज पावसाचें पाणी आंत घेण्याची सोय चांगली केली आहे. तळ्यांतून पाणी खापरी नळांत घेऊन तें पुण्यास नेलें आहे. खापरी नळांतून पुरुषास चालत जातां येईल इतका तो उंच आहे! वाटेंत जागोजाग उच्छ्वास बांधले आहेत व वाटेंतील झऱ्यांचें पाणी आंत घेण्याची सोय केली आहे. खडकवासल्याचें पाणी पुण्यांत येण्यापूर्वीं शहराचा निर्वाह बहुतेक ह्या कात्रजेच्या पाण्यावरच होत असे. पण अलीकडे तळें ओहरून गेलें व गाळ काढून दुरुस्ती करण्याचें काम नीट होत नसल्यामुळें पाण्याचा तुटवडा पडूं लागला. जुन्या कामाच्या दुरुस्तीपेक्षां नवीन कामें करण्याची हौस हल्लीं अधिक दिसते. त्यांत खडकवासल्याचें धरणही तयार होऊन पाण्याचा मुबलक पुरवठा होऊं लागला. मग काय? कात्रज तलावाकडे कोण * पाहतो?

ता० २३ दिसेंबर.—कात्रजेहून पुण्यास परत आलों. येणेप्रमाणें हा माझा महिनासव्वा महिन्याचा प्रवास संपला.

---

* सन १८७७।७८ सालच्या दुष्काळांत ह्यांतील गाळ काढण्याची तजवीज झाली असती तर पाण्याचा पुरवठा वाढला असता. पण इंजिनीयरचा अभिप्राय निराळाच पडला. गाळ काढण्यास लागणाऱ्या खर्चांत मोठासा नवीन तलाव होईल, मग गाळ कशाला काढावा? अलीकडे रा० गणपतराव खरे नांवाच्या इंजिनीयरांनीं अगोठीच्या पावसाचें रेंदाड पाणी बाहेर लावून पुढील पावसाचें स्वच्छ पाणी ह्या तळ्यांत घेण्याची सोय कशी सुरेख केली आहे वगैरेबद्दल माहिती ज्ञानप्रकाशांत छापून प्रसिद्ध केली आहे, ती ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

भूल पडली, भान हरपलें, कीं भ्रम झाला ?

"हैयङ्गवीन जैसें सुरसिकरसनेपुढें न तेल टिके ।"—मोरोपंत.

मनोरंजनाचे 'वसन्त' अंकांत प्रसिद्ध झालेल्या, व त्या अंकाचे सौंदर्यास गालबोट झालेल्या, 'भीष्मांची भयंकर भूल' या माझ्या अडीच-पानी लेखाची खरी योग्यता दाखविण्यास्तव रा. विनायक सदाशिव वाकसकर यांनीं, प्रोफेसर गोखल्यांच्या 'दुर्योधनाच्या फिर्यादीं'त वकिली करून थकले असतां आपला अमूल्य वेळ खर्ची घातला, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. मजसारख्या अनधिकारी मनुष्यानें मनसोक्त निराधार विधानें केलेल्या लेखास उत्तर देण्याचा अनुग्रह ज्यांचे कारणानें रा. वाकसकरांनीं केला, त्या प्रोफेसर कानेटकरांचेही मजवर व महाराष्ट्रभाषाभिज्ञ सर्व पुराणप्रिय लोकांवर उपकार आहेत; कारण त्यांच्याच उत्तरानें रा. वाकसकरांसही माझा क्षुद्र लेख उत्तरार्ह वाटून त्यांनीं आपला अत्यंत योग्य लेख प्रसिद्ध केला.

रा. वाकसकरांचा लेख खरोखर वर्णनीय आहे. त्यावरून त्यांचें पुराणविषयक अगाध ज्ञान, त्यांची विवेचनपद्धति, दुसऱ्याचे दोष दाखवितांना मनाची समतोल ठेविलेली वृत्ति, हे गुण चांगलेच व्यक्त होतात. वास्तविक पाहतां त्यांचें खंडण वाचून मला गप्पच बसावयास पाहिजे होतें. पण तसें करणें इष्ट न वाटल्यामुळें हा छोटासा लेख लिहिण्याचें मी धाष्टर्य करीत आहें. लेखास आरंभ करण्यापूर्वी मला माझ्या एका भुलीबद्दल—चुकीबद्दल, अपराधाबद्दल, गुन्ह्याबद्दल ह्मणा—मला त्यांची व त्यांच्याबरोबरच माझा लेख वाचणारांची क्षमा मागावयाची आहे, व ती प्रथमच मागणें उचित आहे. कारण न जाणों कदाचित् रा. वाकसकर व वाचक पुढील लेख वाचून पुन्हां रागावले तर मग क्षमा मिळावयाची मारामार पडणार. सबब प्रथमच क्षमा मागणें बरें. **अंबेसंबंधीं माझ्या लेखांत जें मीं लिहिलें आहे, तें चूक आहे.** ही चूक कशी झाली याबद्दल मी कांहींही सांगूं इच्छित नाहीं. चूक झाली खरी व तिजबद्दल मी रा. वाकसकर यांजपुढें व अन्य वाचकवर्गापुढें पदर पसरून क्षमेची याचना करतों. मला दृढ आशा आहे कीं, ही क्षमा मला मिळेल. रा. **वाकसकरांचें पत्र मला मिळालें नाहीं.**

परंतु एवढी एक गोष्ट सोडून मी आपला कोणताही मुद्दा परत घेण्यास तयार नाहीं. माझे लेखाचा प्रतिपाद्य विषय अंबेची हकीगत नाहीं, व म्हणून ती खोटी ठरल्यानेंही माझें ह्मणणें खोटें ठरत नाहीं. परंतु रा. वाकसकर ही चूक सांपडतांच 'जितम्' 'जितम्' ह्मणून आनंदोर्मीबरोबर जरा वाहवत गेलेसे दिसतात. भीष्मांचे पुढें पौरवकुलाची अवनति झाली वा नाहीं, व ती होण्यास भीष्मांची प्रतिज्ञा निमित्तकारण तरी झाली वा नाहीं, हा प्रश्न आहे. व या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर रा. वाकसकरांस पावणेअकरा पानें खर्चूनही देतां आलें

नाहीं. भीष्मांचे पुढें पौरवकुलाची अवनति झाली हें निर्विवाद आहे, व कांहीं अंशीं या अवनतीस भीष्मांची प्रतिज्ञा कारण झाली हेंही पण यथार्थच आहे. या अवनतीस केवळ भीष्मांची प्रतिज्ञाच कारण नसल्यानें मी 'भूल' हा शब्द योजिला आहे. नाहीं तर मला 'भीष्मांचा घोर अपराध', 'भीष्मांनीं केलेला पौरवकुलाचा घात', इ. मथळे देतां आले नसते असें नाहीं. पण माझें मत तसें नसल्यानेंच मीं भूल शब्दाचा प्रयोग केला आहे. परंतु या भूल शब्दाचा बरोबर अर्थ न समजल्यामुळें रा. वाकसकरांसही भूल पडली, संतापातिरेकानें त्यांचें भान हरपलें, व या स्थितींतच माझ्या लेखांतील मुख्य विषय सोडून ते हवें तसें लिहीत सुटले. असो.

माझें म्हणणें हेंच आहे कीं, 'याच प्रतिज्ञेनें अखेर पौरवकुलाची अवनति केली, शुद्ध भरतवंशांत नियोगाचें बीज पेरिलें, व सरतेशेवटीं कौरवपांडवांच्या बरोबर सर्व भरतभूमीचा नाश करणारें महाभारत घडवून आणलें.' यांपैकीं पहिल्याच मुद्यावर रा. वाकसकरांनीं एक अक्षरही लिहिलें नाहीं. अर्थात् 'मौनं संमतिलक्षणम्' या न्यायानें ही गोष्ट तर त्यांस संमतच आहे. म्हणजे परंपरेनें भीष्मांची प्रतिज्ञा पौरवकुलाचे अवनतीस कारण झाली हें रा. वाकसकरांना मान्य आहे, व हें मानलें ह्मणजे भीष्मांची ही भूल झाली असें मानणें ओघानेंच प्राप्त होतें.

रा.वाकसकर ह्मणतातः—"भरतवंशाचें मूळचें नांव चंद्रवंश. भरत हा चन्द्रापासून बाविसावा पुरुष होय. भीष्म चन्द्रवंशांतील ज्या शाखेंत झाले त्या शाखेंत त्यांच्यापूर्वी नियोग नव्हता हें खरें, परंतु चंद्रवंशांत नियोगाची चाल भीष्माच्या पूर्वींच आली होती." म्हणजे भरतवंशांत नियोग नव्हता हें रा. वाकसकरांसही मान्य आहे. यावरून 'याच प्रतिज्ञेनें शुद्ध भरतवंशांत नियोगाचें बीज पेरिलें' हें माझें दुसरें वाक्यही रा. वाकसकरांस खोडितां आलें नाहीं हें उघड होतें. आतां आपण भरतवंशाचें मूळचें नांव चंद्रवंश देऊन त्यांत नियोग होता हें दाखविलें आहे. पण चंद्रवंशांत नियोग असला म्हणून तो पौरव वंशांत कसा येणार? असल्या प्रमाणानें तर हव्या त्या वंशांत हवी ती गोष्ट सिद्ध करून देतां येईल. कारण, सर्व वंश मूळचे मानव वंशांतील असल्याकारणानें वाटेल त्या जातींतील चाल वाटेल त्या जातींत होती असें ह्मणतां येईल. याच क्रमानें याच्याही थोडें पुढें गेल्यास, पशुधर्म मनुष्यांत होते व आहेत असें मानावें लागेल. कारण, पशु व मनुष्यें हीं एकाच परमेश्वरापासून जन्म पावलीं असल्यानें एकाच वंशांतलीं ह्मणतां येतील.सारांश,चंद्रवंशांतील आनववंशांत अथवा अन्य एकाद्या वंशांत नियोग होता असें सिद्ध केल्यानें नियोगविधि पौरववंशांत सिद्ध होत नाहीं;व ह्मणूनच 'याच प्रतिज्ञेनें शुद्ध भरतवंशांत नियोगाचें बीज पेरिलें,' हें ह्मणणेंही खोटें ठरत नाहीं. यापुढें शुद्ध शब्दाचा आपल्या स्वतःचे कल्पनेप्रमाणें अर्थ काढून व या मनःस्थितींत तोच अर्थ मलाही विवक्षित आहे असें समजून,रा.वाकसकर जें लिहीत सुटले आहेत त्याचा विचार करण्याची आवश्यकता दिसत नाहीं.कारण 'शुद्ध' शब्दानें तो अर्थ मला विवक्षित नसून, शुद्ध शब्दानें 'ज्यांत

नियोगाची चाल नव्हती ' एवढाच माझा विवक्षित अर्थ आहे.

'वृद्धापकाळीं झालेली संतति सबळ व दीर्घायुषी कशी होणार ?' या माझे प्रश्नास रा.वाकसकर यांनीं उत्तर देण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो तर हास्यास्पदच आहे.कोणीही वाचक आपण शेवटीं सार म्हणून मोठ्या टैपांत छापविलेला ' वार्धक्यांतील संततीचा निर्बलतेशीं बादरायण संबंध सुद्धां पोंचत नाहीं ' हा सारांश कबूल करील असें मला तरी वाटत नाहीं. याच संदर्भाच्या आरंभीं रा. वाकसकर म्हणतात कीं, ' संतति सबल अगर निर्बल उत्पन्न होणें हें पित्यापेक्षां मातेच्या शरीरप्रकृतीवर **अधिक** अवलंबून असतें. ' या वाक्यांत पर्यायानें वाकसकरांनींच कबूल केलें आहे कीं, **थोडें तरी** पित्याच्या शरीरप्रकृतीवर संतति निर्बल अगर सबल होणें अवलंबून आहे. असें असूनही शेवटीं आपणच मोठ्या टैपांत छापवितात कीं, या दोन गोष्टींचा **बादरायण संबंध सुद्धां नाहीं** ! येथें वदतो व्याघातः म्हणावें कीं काय ह्मणावें हेंच समजत नाहीं. असो. वृक्षाचें उदाहरण दिलेलें मनुष्यजातीस लागू पडत नाहीं. कारण. शंतनु कांहीं एखादें जुनाट झाड नव्हता. (कदाचित् रा. वाकसकरांचे मनानें लागू पडेलही. कारण झाड व मनुष्य दोन्ही एकाच ईश्वरवंशांतील आहेत !) संतति उत्तम होण्यास माता व पिता दोघेंही सारखींच सुदृढ पाहिजेत. पुढें कांहीं अपवादभूत उदाहरणें दिलीं आहेत. पण रा. वाकसकर ही गोष्ट विसरलेशी दिसतात, कीं अपवादानें नियम रद्द न होतां त्यास बळकटीच येते. पण तरीही

त्यांचीं अपवादभूत उदाहरणेंही पाहूं. प्रथम उदाहरण दीर्घतमा ऋषीचें. हें उदाहरण रा.वाकसकरांचें बरेंच आवडतें दिसतें, हा ऋषि माजलेल्या पोळाप्रमाणें भावाचे आश्रमांत स्त्रियांशीं वागूं लागल्यानें यास समुद्रांत फेंकून देण्यांत आलें होतें. सात दिवस समुद्रांत वाहत गेल्यावर हा बळिराजाचे हातून—बुडत असतां—काढला गेला. नंतर बळिराजाचे प्रार्थनेवरून या ' गोधर्मपरायण ' ऋषीनें त्याचे राणीचे ठिकाणीं संतानोत्पत्ति केली. माजलेल्या पोळाप्रमाणें वागण्याचें वय काय असतें याचा विचार न करितां निव्वळ 'वृद्ध' शब्दानेंच रा. वाकसकर चकले आहेत असें दिसतें. वृद्ध म्हटला कीं तो जरठच असला पाहिजे असें नाहीं. याचेही वयाचा हिशेब करून रा. वाकसकर प्रसिद्ध करतील तर इतिहास या दृष्टीनें पुराण वाचणारांवर त्यांचे अनंत उपकार होतील.जरी तो रा. वाकसकरांचे म्हणण्याप्रमाणें वृद्ध—ह्मणजे जरठ असला, तरी पण या ' गोधर्मनिष्ठ' व ' गोधर्मपरायण ' ऋषीचें उदाहरण अपवादात्मकच मानलें जाईल. आस्तिकऋषि सबळ आणि दीर्घायुषी होते हें दाखविलें गेलें नाहीं. शंकर निर्जरकोटींतले असल्यानें त्यांचें उदाहरण निरुपयोगी होय. अश्मक राजास उत्पन्न करणारे वसिष्ठ ऋषि गाधिज विश्वामित्राचे प्रतिस्पर्धी व त्रिशंकु हरिश्चंद्राचे समकालीनच वसिष्ठ असावे, अशी रा. वाकसकरांची समजूत दिसते. पण भीष्म, दुष्यन्त, भरत इत्यादिकांचा चंद्रापासून बोटें मोजून नंबर सांगणारेच रा. वाकसकर या ठिकाणींच बोटें घालण्यास कां चुकले तें कळत नाहीं. अश्मक राजा व हरि-

श्चन्द्र यांमध्यें रोहित, हरित, चञ्चु, विजय, रुसक, वृक, बाहु, सगर, असमंजस, अंशुमत्, दिलीप पहिला, भगीरथ, श्रुत, नाभाग, अंबरीष, सिंधुद्वीप, अयुतायु, ऋतुपर्ण, सर्वकाम, सुदास, व कल्माषपाद इतके राजे झाले. सबब वसिष्ठऋषि या सर्व राजांचे काळीं होते असें मानतांच यावयाचें नाहीं. कारण ओघानेंच रा. वाकसकरांनींच सांगून ठेविलें आहे कीं, महाभारतकाळींहीं आयुर्मर्यादा साधारणपणें शंभर वर्षांचीच होती. मीही एवढेंच सुचवितों कीं, मनुष्यप्राण्याची आयुर्मर्यादा ऋग्वेदकालापासूनच शंभर वर्षांची मानली गेली आहे. 'शतायुः पुरुषः' ही श्रुति सर्वांसच माहीत आहे. सबब अष्मकराजास उत्पन्न करणारे वसिष्ठ कोणते होते व त्यांची वयोमर्यादा काय होती हें ठरविल्यावांचून हें उदाहरण देणें व्यर्थच आहे. रामलक्ष्मणादि पराक्रमी बन्धु दशरथाचे सामर्थ्यानें पराक्रमी नव्हते हें सर्वविश्रुत आहे. सबब 'वृद्धापकाळीं झालेली संतति सबळ व दीर्घायुषी कशी होणार?' हा प्रश्न अजूनही कायम आहेच. व असल्या प्रश्नास अपवादभूत उदाहरणें देऊन वाटेस लावणें म्हणजे कांचनभटानें म्हटल्याप्रमाणें 'जरठपतिही किति बघति नातवंडा' ह्मणून समजूत करण्यासारखेंच आहे.

आतां रा. वाकसकरांचे मतानें माझे हातून वदतोव्याघाताची जी अक्षम्य चूक झाली आहे, तिजविषयीं विचार करूं. रा. वाकसकरांचे मतानें हस्तीपासून सतरावा पुरुष प्रतीप गंगाद्वारीं जप करीत बसला असतां गंगा स्त्रीरूप धारण करून त्याचे उजवे मांडीवर येऊन बसली, व तिनें प्रतीपाची स्त्री होण्याची आपली इच्छा दर्शविली. पण उजवे मांडीवर बसल्यामुळे प्रतीपानें तिला कन्या किंवा स्नुषा मानणें कबूल केलें,व आपल्या मुलासाठीं तिची मागणी केली. गंगेनें ती कबूल करून ती पुन्हां अदृश्य झाली. नंतर प्रतीपास शंतनु नांवाचा मुलगा झाला. मुलगा वयांत आल्यावर त्यास गंगेची हकीगत सांगून व राज्यभार त्याजवर सोंपवून प्रतीप वनांत गेला. नंतर एके दिवशीं शंतनु गंगातीरीं फिरत असतां त्याची व गंगेची गांठ पडली व त्यांचा विवाह झाला. येथें अशी शंका येते कीं,गंगेचें प्रतीपासमोर प्रकट होतांना काय वय होतें व नंतर शंतनूशीं लग्न करितांना काय वय होतें? या दोन्ही वयांत रा. वाकसकरांचे ह्मणण्याप्रमाणें अठरा वर्षांचें तरी अंतर होतें काय? ह्मणजे आपल्याहून वडील स्त्रीशीं शंतनूनें लग्न लाविलें होतें काय? या सर्व प्रश्नांचें उत्तर देतांना असेंच ह्मणावें लागेल कीं, ज्या वयांत गंगा प्रतीपास दिसली त्याच अथवा तसल्याच तरुण वयांत ती शंतनूस दिसली असावी.ह्मणजे या अठरा वर्षांचे कालांत तिच्या स्वरूपांत कांहीं फरक पडला नाहीं. या गोष्टीचा भाविकदृष्टीनें विचार करावयाचा म्हटला ह्मणजे असें ह्मटलें पाहिजे कीं, गंगा देवलोकीं असल्यामुळें तिला हवें तें स्वरूप धारण करतां येत होतें अथवा आपलें तारुण्य राखतां येत होतें. असो. पुढें गंगाशंतनु आठ मुलें होई तोंपर्यंत बरोबर राहिलीं. हा बरोबर राहण्याचा काळ महाभारतांत नक्की दिला नाहीं. पण असें लिहिलें आहे कीं—

'स राजा रतिसक्तत्वादुत्तमस्त्रीगुणैर्हृतः।
संवत्सरानृतून्मासान् बुबुधे न बहून्गतान्॥'

हा पुष्कळ संवत्सरांचा काळ रा. वाकसकर ८ च वर्षे मानीत आहेत. माझे मतानें हा काल कमींत कमी १६ वर्षांचा असावा, व शंतनूचें वय लग्नकाळीं २० वर्षांचें असावें. ह्मणजे गंगावियोगसमयीं शंतनु ३६ वर्षांचा असावा. असो. पण रा. वाकसकरांचे मताप्रमाणें थोड्या वेळाकरितां त्यास २५ वर्षांचा मानला तरी हरकत नाहीं. पुढें ३६ वर्षांनीं तो एकदां गंगातीरीं फिरत असतां त्याला गंगेचें पाणी कमी दिसलें व तो याचें कारण शोधीत असतां त्याला एक भव्य, सुंदर व देखणा कुमार दिसला. त्या कुमारानें तीक्ष्ण बाणांनीं गंगेचें पाणी आडविलें होतें. हा कुमार भीष्मच होता. येथें पुन्हां शंका अशी येते कीं, जरी भीष्मजन्मास ३६ वर्षे झालीं होतीं, तरी महाभारतकारांनीं येथें कुमार शब्दाची कां योजना केली व गंगेचें पाणी व्यर्थ अडवून धरण्याच्या पोरचेष्टेचें कां वर्णन केलें ? या वर्णनावरून तर असें वाटतें कीं, भीष्म ३६ वर्षांचे शंतनूस कौमार वयाचेच दिसले असावे. जर गंगेस १८ वर्षांत आपल्या स्वरूपांत अंतर पडूं देतां आलें नाहीं तर तिला भीष्माचेही स्वरूपांत १८ वर्षांचें अंतर पडूं न देतां येणें कठिण नव्हतें. सारांश काय, तर रा. वाकसकरांचे मताप्रमाणें ६१ वर्षांचे शंतनूस जेव्हां भीष्म मिळाले तेव्हां जरी त्यांचें वय ३६ वर्षांचें असलें तरी ते वयानें १८ वर्षांसारखेच दिसत होते; व ह्मणून रा. वाकसकरांचे मतानें जेव्हां भीष्म सदुसष्ट वर्षांचे होते तेव्हांही ते ४९ वर्षांचे पुरुषासारखेच दिसत असले पाहिजेत ! रा. वाकसकरांनीं लिहिलेल्या श्लोकांत भीष्मांचें उपहासपूर्वक वर्णन केलेलें आहे व ह्मणून तें तंतोतंत खरें असणें आवश्यक नाहीं. थट्टेनें एखाद्या स्त्रीस ‘ कोळशाहून काळी ’ ह्मटली ह्मणजे ती खरोखरच कोळशापेक्षां काळी नसते. साठ वर्षे वयाच्या पण बेचाळीस वर्षांच्या दिसणाऱ्या भीष्मास उद्देशून राजेलोकांनीं उपहासानें त्यांस ‘ वलीपलितधारणः ’ ह्मणणें अस्वाभाविक नाहीं; व रा. वाकसकरांनीं थोडा विचार केला असता ह्मणजे त्यांस सहज समजून आलें असतें कीं, हें वर्णन तंतोतंत खरें नसावें. आठ पोरें झालेला शंतनु जर ६५ वे वर्षी वलीपलितधारण ह्मणून कोठें लिहिला गेला नाहीं, तर ऊर्ध्वरेता ब्रह्मचारी, गंगेजवळ ३६ वर्षे राहिलेला भीष्म ६० वेच वर्षी खरोखर सुरकुत्या अंगावर पडलेला दिसणें शक्य नाहीं. साठ वर्षांचे वयांतच ज्याचे अंगावर सुरकुत्या पडल्या, तो पुरुष १२० वे वर्षी शौर्यानें काय लढणार हें उघडच दिसत आहे. बरें हेंही जाऊं दिलें, तरी रा.वाकसकरांचे ह्मणण्याप्रमाणें भीष्मांनीं सदुसष्टाव्या वर्षी लग्न करण्यास हरकत कोणची ? आठ पोरांच्या बापानें जर पांसष्टाव्या वर्षी लग्न करण्यांत भीष्मांस कांहीं दोष दिसला नाहीं, तर ऊर्ध्वरेता, स्त्रीसंगविरहित राहिलेल्या सदुसष्ट वर्षांचे भीष्मांस स्वतःचे विवाहाबद्दल तरी दोष कां दिसावा हें मजला समजत नाहीं. सार एवढेंच कीं, सत्यवतीविवाहाचे वेळेस शंतनु विवाह करण्यास जितका योग्य होता त्याहून भीष्म किती तरी पटीनें विवाहयोग्य होते; व म्हणूनच भीष्मांनीं त्यावेळीं विवाह केला असता तर बरें झालें असतें हें ह्मणणें वदतोव्याघात होत

नाहीं हें रा. वाकसकरांनीं खूप ध्यानांत ठेवावें. कारण, वास्तविक पाहिलें असतां, सत्यवतीविवाहाचे वेळेस शंतनूचें जें वय होतें त्याहून विचित्रवीर्याचे मृत्यूचे वेळेस भीष्मांचें वय कमी होतें, गंगेजवळ ३६ वर्षें राहिल्यानें व पुढेंही ब्रम्हचर्यव्रतानें राहिल्यानें भीष्म शंतनूपेक्षां किती तरी सबळ होते, व ह्मणूनच लग्नास अयोग्य नव्हते. पण जिंकलें—या भ्रमांत इतक्या गोष्टी सुचाव्या कशा ?

आतां चित्रांगदाचे निर्बलतेविषयीं विचार करूं. रा. वाकसकरांनीं उलट पक्षीं महाभारती युद्धांत अनेक मारले गेलेल्या तरुण वीरांचीं उदाहरणें दिलीं आहेत. जणूं चित्रांगद गंधर्वाशीं युद्ध ह्मणजे भारती संग्रामच होता ! रा. वाकसकर ह्मणतात कीं चित्रांगद नांवाच्या गंधर्वाशीं शंतनुपुत्र चित्रांगद सतत तीन वर्षें पर्यंत लढला व मारला गेला. रा. वाकसकरांचा सर्व भार निव्वळ शब्दांवरच दिसतो. शब्दार्थ सोडून इतरत्र त्यांनीं लक्ष दिलेलें दिसत नाहीं. 'समास्तिस्रः' चा अर्थ तीन वर्षेंच करण्यास रा. वाकसकरांजवळ कांहीं पुरावा आहे काय ? सतत तीन वर्षें युद्ध म्हणजे काय होतें याची रा. वाकसकरांस कल्पनाही दिसत नाहीं. महाभारतासारखीं प्रचण्ड युद्धें ज्यांत अनेक राजे मिळाले होते, युद्धाची जय्यत तयारी उभयपक्षीयांकडून झालेली होती, तींही जर कांहीं महिनेही सतत चाललीं नाहींत, तर एकट्या चित्रांगदाचें परके ठिकाणीं गंधर्वाबरोबर सतत तीन वर्षें युद्ध चालणें शक्य आहे कीं नाहीं याचा क्रोधावेशांत आलेल्या रा. वाकसकरांनीं विचार देखील केलेला दिसत नाहीं. समा शब्दाचे वर्ष, ऋतु, मास व दिन इतके अर्थ होतात, व यांपैकीं येथें दिवस हाच अर्थ योग्य वाटतो. कारण तीन महिने सुद्धां हस्तिनापुरीं भीष्मांस वर्तमान न कळतां चित्रांगदाशीं युद्ध होणें शक्य नाहीं; मग सतत तीन वर्षांची तर गोष्टच निराळी ! एक क्षणभर जरी विचार केला असता तरी ही गोष्ट रा. वाकसरांचे ध्यानांत आली असती व चित्रांगदाचे निर्बलतेविषयीं त्यांस संशय न राहता. पण विकारवश झाल्यावर इतका विचार होणार कसा ?

'नियोगविधीचा व नाशकारक युद्धाचा कार्यकारणभावसंबंध काय आहे ?' हें रा. वाकसकरांस कळत नाहीं. आणि तें कळणार कसें ? 'यत्र यत्र धूमस्तत्रतत्र वन्हिः' या कार्यकारणभावाखेरीज जर दुसरा कार्यकारणभाव रा. वाकसकरांस माहीतच नसेल तर त्यांस हा कार्यकारणसंबंध कळावा कसा ? एवढाच कार्यकारणभावसंबंध जाणणाऱ्या रा. वाकसकरांस जर कोणीं सांगितलें कीं, 'अमुक मनुष्य क्षयानें मेला,' तर हे त्यास लगेच ह्मणणार कीं, "क्षयाचा व मृत्यूचा कार्यकारणसंबंध काय आहे हें कळत नाहीं. अमुक मनुष्यासही क्षय झाला होता, पण तो मेला नाहीं. जर क्षयाचा परिणाम मृत्यु म्हणावा तर तोही मरावयास पाहिजे होता. छे ! क्षयानें मृत्यु शक्यच नाहीं. अहो, त्याचें आयुष्य संपलें म्हणून तो मेला." पण रा. वाकसकर जरी असें म्हणाले तरी "नैयायिकानां मलिनाम्बराणां जनिर्गतं रासभशङ्कयैव" या कोटींत नसणारे सर्व लोक जसें तो पुरुष क्षयानें मेला असेंच म्हणणार, तसेंच येथेंही ते असेंच ह्मणणार कीं, भीष्म-

प्रतिज्ञेनें नियोग करविला गेला; या व्यासनियोगाचे वेळीं विचित्रवीर्याचे स्त्रियांनीं डोळे मिटल्यानें अथवा पांढरें पडल्यानें, अंध व पंडु संतति उत्पन्न झाली; ज्येष्ठबंधु अंध असल्यामुळें पंडूस राज्य मिळालें; व म्हणूनच अंधाचे मुलांस वडील भावाचीं मुलें ह्मणून व पंडुपुत्रांस राजाचीं मुलें म्हणून राज्यावर हक्क सांगतां आला; व याच भांडणानें अखेर भारती युद्ध घडवून आणलें.

यावरून उघडच दिसत आहे कीं, या सर्व अनर्थपरंपरेच्या सांखळीचा प्रथम दुवा भीष्माची प्रतिज्ञाच आहे, व जर ही प्रतिज्ञा भीष्मानें केली नसती तर ही सर्व अनर्थपरंपरा वांचली असती. भीष्मांच्या ब्रह्मचर्याचें भविष्य खरें कसें मानलें जाणार ? कारण, वसूंची कथाच दोन निरनिराळ्या तऱ्हेनें सांगितली गेली आहे. आरंभाला वसु गंगेस भेटले असतां ते स्वतःची एक कथा सांगतात, व गंगा त्याच वसूंची गोष्ट सांगतांना वसूंनीं न सांगितलेल्या गोष्टी शंतनूस सांगते. तेव्हां अशा कथांवर खऱ्या म्हणून विश्वास कसा बसावा ? शिवाय जर भीष्मांस संतति व्हायचीच नव्हती, म्हणजे पौरववंश भीष्मांवरच खुंटणार होता, तर शंतनूस गंगा सोडून जातांच वंशवृद्धीकरितां लग्न करणें भागच होतें. असें त्यानें केलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर सत्यवती कामानें विद्ध झाल्यावरही, भीष्मानें दुःखाचें कारण विचारिलें असतां, ' तुला संतति होणार नाहीं, सबब मला लग्न केलें पाहिजे ' असेंही सांगितलें नाहीं. ऐसिहासिक दृष्टीनें पुराणांचा अभ्यास करावयाचा ह्मणजे पूर्वापरचा संबंध पहावा लागतो, नुसता श्लोकांचा अर्थ करून भागत नाहीं, हें मजसारख्या अनधिकारी पुरुषानें रा. वाकसकरांस सांगावयास नको. पुढें भीष्मातर्फे वकीलपत्र घेऊन बोलणारे रा. वाकसकर, भीष्मांस संतति झालीच असती यास प्रमाण विचारतात. निर्दोष व ब्रह्मचर्यव्रतानें राहिलेल्या भीष्मांस संतति झाली असती वा नाहीं यास प्रमाण विचारणें म्हणजे आपल्या अशीलाची स्तुति करणें खास नव्हे. प्रत्येक दोषरहित दंपतीस संतति झालीच पाहिजे हा सृष्टिनियम आहे, व हा पोटांत सल वा अन्य रोग असून पिंपळाचे पार झिजविणाऱ्या स्त्रियांचीं अथवा अनेक कुकर्मे करून दुष्ट झालेल्या संस्थानिकांचीं उदाहरणें देऊन खोडतां येणें शक्य नाहीं. भरतास संतति नव्हती हें ह्मणणें अगदींच खोटें आहे; व जेथें संतति उत्पन्न होण्याचा विचार केला आहे त्या ठिकाणीं तर हें उदाहरण अगदींच निरुपयोगी आहे. ज्या रा. वाकसकरांनीं दुसऱ्यास विसराळूपणाबद्दल नांवें ठेवावीं त्यांनींच विष्णुपुराणांतल्या ज्या अध्यायांतील ' भरतस्तु भरद्वाजं पुत्रं प्राप्य तदाब्रवीत् ' हा श्लोक लिहावा, त्याच अध्यायांतील ' भरतास्तिसृषु स्त्रीषु नव पुत्रानजीजनत् ' हाच श्लोक विसरावा हें आश्चर्य आहे. निर्दुष्ट व समानशील स्त्रीपुरुषांपासून संतति सदृश झालीच पाहिजे. वनस्पतिशास्त्रांतील उदाहरणें देऊन तद्विषयक ज्ञान प्रकट करणाऱ्या रा. वाकसकरांस ' आंब्यांचे झाडास लिंबोळ्या येत नाहींत ' हें उदाहरण देण्याची आवश्यकता नाहीं.

अंबेसंबधीं लिहिलेली रा. वाकसकरांची हकीगत सर्व खरी आहे व ही माझी चूक दाखविल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. यासंबंधी त्यांनीं मजविषयीं लिहिलेल्या सर्व गोष्टी

मला कबूल आहेत. पण मजविषयीं लिहितांना त्यांनीं इतर पदवीधर लोकांवर जे विनाकारण शिंतोडे उडविले आहेत, त्याबद्दल मला थोडें लिहिणें अवश्य आहे. जसल्या प्रौढीचे शब्द रा. वाकसकरांनीं वापरले आहेत, तसले उद्धत शब्द ज्यांचे पाठीवरील ज्ञानाची पिशवी रिकामीच लोंबत असते तसल्या अविनीत पदवीधरांनीं वापरले तर एक वेळ चालतील. पण ज्यांचे पाठीवरील ज्ञानाचें पोतें जड पोथ्यांचे वजनानें खचून भरलेलें आहे व त्या वजनानें ' विद्या ददाति विनयम् ' या न्यायानें जे विनीत झालेले आहेत, अशा रा. वाकसकरांस मात्र असले शब्द शोभत नाहींत. "मनुष्याः स्खलनशीलाः" ही गोष्ट रा. वाकसकरांनीं ध्यानांत ठेवावयास पाहिजे. मनुष्यस्वभावच असा आहे कीं,

' नरः सर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यति ।
आत्मनो बिल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यति ॥'

रा. वाकसकरांचेच लेखांत अशीं स्खलनें झालीं आहेत. उदाहरणार्थ, भरताविषयीं झालेली चूक वर दाखविलीच आहे. दुसरीही एक चूक रा. वाकसकरांचे हातून चुकून झाली आहे. पृ. ४२८ वर ते लिहितात " पुरु हा ययातीस देवयानीपासून झालेला तिसरा मुलगा. देवयानी ही शुक्राचार्य नांवाच्या ब्राम्हणाची कन्या. म्हणजे पुरू हा क्षत्रिय व ब्राम्हण यांच्या प्रतिलोमविवाहाची संतति होय. " कोठें छापलेल्या महाभारताच्या कोणत्या पर्वांतील कितव्या अध्यायांतील कोणत्या श्लोकाचे आधारानें हें विधान केलें आहे हें रा. वाकसकर सांगूं शकतील काय ? भारतांत तर असें लिहिलें आहे कीं

' ययातिर्देवयान्यां तु पुत्रावजनयन्नृपः ।
यदुं चतुर्वसुं चैव शक्रविष्णू इवापरौ ॥
तस्मादेव तु राजर्षेः शर्मिष्ठा वार्षपर्वणी ।
द्रुह्युं चानुंच पूरुंच त्रीन्कुमारानजीजनत् ॥ '

मी ही गोष्ट पूर्णपणें जाणून आहें कीं, पौराणिक राजांची संख्या मोजून मोजून सांगण्या इतक्या पुराणज्ञ वाकसकरांस पूरु हा शर्मिष्ठेचा मुलगा होता, देवयानीचा नव्हता, ही गोष्ट माहीतच नव्हे तर वर दिलेले श्लोक त्यांस तोंडपाठही बहुधा असतील. पण या गोष्टीवरून घेण्यासारखी गोष्ट इतकीच कीं, मनुष्याचे हातून चुकी होणें संभवनीय आहे. असो.

रा. वाकसकरांचे लेखास जें वेडेंवांकडें उत्तर द्यावयाचें होतें तें संपलें. पण लेख समाप्त करण्यापूर्वी एक गोष्ट लिहिल्याशिवाय राहवत नाहीं. रा. वाकसकरांचे लेखावरून ते चांगलेच पुराणज्ञ आहेत अशी कल्पना होते, व त्यांनीं ठिकठिकाणीं राजे लोकांचे नंबर मोजून आपला ऐतिहासिक दृष्टीनें केलेला पुराणाभ्यास दाखविलाही आहे. पण या गोष्टींत मला त्यांस इतकेंच सुचवावयाचें आहे कीं, असा अभ्यास नुसतें एक पुराण घेऊन व त्याचा अर्थ करून होत नाहीं; व असा केलेला अभ्यास शेवटीं अपुरा राहतो. असा अभ्यास तुलनात्मक पद्धतीनेंच करावा लागतो. उदाहरणार्थ रा. वाकसकरांनीं भीष्मांस चंद्रापासून पंचेचाळिसावा पुरुष म्हटलें आहे. पण तुलनात्मक पद्धतीनें पाहिलें असतां ही संख्या चूक आहे. आरंभास पुरूरव्याची आई इला व इक्ष्वाकु हीं समकालीन होतीं. पुढें इक्ष्वाकूचा नातू ककुत्स्थ याची कन्या ययातीचे वडील भावास दिली होती. सबब ययाति व ककुत्स्थपुत्र अनेनस् हे समकालीन असावेसें वाटतें. यापुढें पाहूं गेलें म्हणजे ययातीपासून चौदावा पुरुष

मतिनार (रंतिभार, रंतिनार इत्यादि नांवेंही कांहीं ठिकाणीं लिहिलीं आहेत, पण अधिक ठिकाणीं मतिनारच लिहिलें आहे.) याची मुलगी गौरी ही युवनाश्व द्वितीय या सूर्यवंशांतील राजाला दिल्याचें आढळतें. हा युवनाश्व अनेनस्‌पासून सोळावा पुरुष आहे. ह्मणजे याचा बाप असेनजित् व मतिनार समकालीन असले पाहिजेत, व त्यांचें तसें असणें स्वाभाविक आहे. प्रसेनजिताचा नातू व मतिनाराचा दौहित्र मांधाता यादववंशांतील शशबिन्दु नांवाचे चक्रवर्ती राजाचा जांवई होता. ह्मणजे शशबिंदु हा मतिनार व प्रसेनजित यांच्या एक पिढीपुढें होता व युवनाश्व द्वितीयाचा समकालीन होता. याप्रमाणें हा कालनिर्णय केल्यानंतर पुढें चलूं. पुढें मांधात्यापासून २१ वा पुरुष सगर यानें वैदर्भी नावाचे राजकन्येशीं लग्न लाविलें होतें. यादववंशांत विदर्भ नांवाचा पुरुष शशबिन्दूपासून २० पिढ्यांनंतर झाला. यावरूनही वैदर्भी याच विदर्भाची मुलगी अथवा नात असावी असें अनुमानानें सिद्ध होतें. याचे दोन वंशांतील ऋतुपर्ण व भीम हे दोन राजे नलाच्या कथेवरून समकालीन ठरतात. यावरूनही विदर्भ व सगर यांचे समकालीनत्वास बळकटी येते. ऋतुपर्ण व भीम, सगर व विदर्भानंतर ९ पिढ्या पुढें झाले. याप्रमाणें हीं दोन टोकें निश्चित केल्यानंतर दुष्यन्तकाल ठरवूं. दुष्यन्ताचा पणतू भूमन्यु (रा. वाकसकरांनीं लिहिलेला मन्यु) याचें लग्न दाशार्ह—कन्येशीं झालें होतें. हा दाशार्ह यादव वंशातील भीमराजाचे पूर्वीचा पांचवा पुरुष होय. यावरून असें ठरतें कीं, भूमन्यूचा बाप वितथ (हें भरतपुत्र भारद्वाजाचें क्षत्रिय नांव), दाशार्ह, व सूर्यवंशांतील ऋतुपर्णाचे पूर्वींचा ६ वा पुरुष भगीरथ, हे समकालीन असावे. भरताचीही एक स्त्री वैदर्भी नांवाची होती. ही वैदर्भी जर विदर्भ राजाची कन्याच मानली तर भरतास सगराचा समकालीन मानावा लागेल. परंतु सगर व भरत दोघेही चक्रवर्ती राजे असल्याकारणानें दोघेही समकालीन असणें शक्य नाहीं. सबब ही वैदर्भी विदर्भाची मुलगी नसून नात अथवा पणती असावी असें वाटतें; व सगर व भगीरथ या दोन चक्रवर्ती राजांचे मधील कालांत भरत झाला असावा. यावरून असें वाटतें कीं, भरत सूर्यवंशांतील अंशुमान् राजाचा समकालीन असावा, व दुष्यंत सगरपुत्र असमंजसाचा समकालीन असावा. असमंजस् हा मांधात्यापासून २२ वा पुरुष होय. पण पौरववंशांवळींत मांधातृसमकालीन मतिनार व दुष्यंत यांचेमध्यें दोनच राजांचीं नांवें आहेत. सूर्यवंशांतील व यादववंशांतील वीस पिढ्या होईपावेतों पौरववंशांत दोन अप्रसिद्ध राजांचें राज्य असणें असंभाव्य आहे. सबब असें अनुमान निघतें कीं, पौरवकुलाचा मध्यंतरीं राज्यविच्छेद झाला असावा व दुष्यंत राजानें पुन्हां त्याची राज्यस्थापना केली असावी. हें अनुमान दुसऱ्या एका गोष्टीवरून खरें असावेंसें वाटतें. मतिनारापासून भरतापर्यंतच्या २३ पिढ्यांचे काळांत, म्हणजे जवळ जवळ साडेचारशें वर्षांत, यादववंशांतील चैत्ररथ शशबिन्दु, सूर्यवंशांतील यौवनाश्व मांधाता, आनववंशांतील औशीनर शिबि, हैहयवंशातील कार्तवीर्य अर्जुन, दिष्टवंशांतील आविक्षित् मरुत्त, व सूर्यवंशांतील पुन्हां बाहुपुत्र सगर असे सहा चक्रवर्ती राजे होऊन गेले. या काळांत पौरवसत्ता वाढली नाहीं हें उघडच दिसतें व यावरून पौरव राजे

या कालांत बरेच निर्बल म्हणजे जवळ जवळ नामशेषच झाले असावेसे वाटतात. याशिवाय दुसरें प्रमाण असें कीं, कार्तवीर्य अर्जुनानंतर हैहयांनीं व तालजघांनीं दक्षिणेकडून व शक, यवन, कांबोज, पारद व पल्हव या लोकांनीं वायव्येकडून आर्यावर्तांत धुमाकूळ आरंभिला. यांतच परशुरामाचेही क्षत्रियनाशाची भर घातली ह्मणजे असें अनुमान निघतें कीं, हा काल अयोध्येचे पश्चिमेकडील भागास फारच अशांतिकारक गेला असावा. या शकादि लोकांनीं क्षत्रियांचा नाश करित करीत अयोध्येवरही स्वारी केली व बाहु राजास ठार मारिलें. यावरून असें वाटतें कीं वाटेंतीलही राज्यांचा,—यांत पौरवराज्यही एक होतें,—या लोकांनीं नाश केला असावा. पुढें बाहुपुत्र सगरानें, काशीराज प्रतर्दनाचे मदतीनें, या लोकांचा मोड केला व परत गादी मिळविली व याचे राज्यांत पुन्हां शांतता झाली. यानंतर दुष्यंत राजानें पुन्हां पौरवराज्य स्थापिलें असावें, व पौरववंशांतील वंशावळी लिहिणाऱ्यांनीं मतिनार पुत्र व दुष्यंत पिता यांची सांगड घालून दिली असावी असें वाटतें. यावरून वाचकांचे ध्यानांत आलेंच असेल कीं, दुष्यन्त रा. वाकसकरांनीं लिहिल्याप्रमाणें २२ वा पुरुष नसून जवळजवळ ४२ वा ४३ वा पुरुष असावा. असेच भीष्मही ४५ वे पुरुष नसुन जवळजवळ ९४—९५ वे पुरुष असावेत असें वाटतें. मतिनार व दुष्यंत यांचे काळांत जसा मध्यें मोठा खाडा पडला, तसाच तो अजमीढ व कुरुयांचेमध्यें पडला. पूर्वोक्तरीतीनें, म्हणजे तुलनेच्या आधारावर कालनिर्णायक व ऐतिहासिक दृष्टीनें, या पुराणसंबंधी अनधिकारी लेखकानें थोडासा पुराणाचा अभ्यास केला आहे व थोड्या दिवसानें याप्रमाणें कालनिर्णय करून आपला क्षुद्र प्रयत्न महाराष्ट्र वाचकांपुढें तो सादर करणार आहे. तरी याप्रसंगीं रा. वाकसकरांसारख्या पुराणज्ञ लोकांचे साहाय्याची त्यास पदोपदीं अपेक्षा पडेल. सबब माझी रा. वाकसकरांस नम्रपणें अशी प्रार्थना आहे कीं, 'रावणाचा वकील पुढें येऊन रामावर मंदोदरीहरणाचा आरोप आणील' या भीतीनें 'रामानें मंदोदरीहरण केलें नाहीं' याबद्दलच्या पुराव्यासाठीं रामायण धुंडून रामाचा वकील होण्यापेक्षां ज्या रामाची आपणांस वकीली करावयाची आहे, तो राम भाविक अथवा अंधश्रद्धायुक्त दृष्टि दूर करून केवळ ऐतिहासिक दृष्टीनें कसा होता, त्याचा काळ कोणता, त्याचे समकालीन यादव दूर करून द्विमीढ, उत्तर पांचाल, दक्षिण पांचाल, काशी, विदेह, दिष्ट, आनव इत्यादि वंशांत कोणकोणते राजे होते, त्यांचा परस्पर संबंध काय होता, इत्यादि गोष्टींची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला, तर ज्या पूज्य भरतभूमीबद्दल रा. वाकसकरांस इतकी हळहळ वाटत आहे, तिचे प्राचनिकाळचे अंधकारव्याप्त इतिहासावर थोडा तरी प्रकाश पाडण्याचें श्रेय त्यांस अवश्य मिळेल. कांहीं इंग्रज विद्वानांचें लक्ष या गोष्टींत वेधलें आहे; व जर आपण घाई केली नाहीं तर इतर गोष्टींप्रमाणें याही गोष्टींत ते आघाडी मारतील. एकदां त्यांचे दुराग्रह सुशिक्षित मंडळींत शिरले ह्मणजे त्यांस उपटून काढणें फारच कठिण जाईल.

सबब सरते शेवटीं रा. वाकसकरांस पुन्हां एकवार या दृष्टीनें पुराणपरीक्षण करण्यास सांगून, माझी अंबेविषयींची चूक दाखविल्याबद्दल त्यांचे आभार मानून, व प्रस्तुत लेख लिहिण्याच्या भरांत कांहीं अधिकउणें लिहिलें गेलें असल्यास त्याबद्दल क्षमा मागून, हा बराच लांबलेला लेख पुरा करतों. हरि रामचन्द्र दिवेकर.

पुस्तकपरीक्षा.

"ग्रहगणित."

हें पुस्तक रा. रा. वेंकटेश बापूजी केतकर यांनीं लिहिलें असून तें त्यांनीं आम्हांकडे अभिप्रायार्थ पाठविलें आहे. या अमूल्य भेटीबद्दल आह्मी कर्त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

रा. रा. केतकर यांची मराठी ग्रंथरचना जरी नवीनच असली तरी त्यांचा महाराष्ट्रीयांस परिचय करून देण्याचें कारण नाहीं. यांनीं संस्कृत भाषेंत 'ज्योतिर्गणित' नांवाचा सर्वोत्तम करणग्रंथ सन १८९८ सालीं प्रसिद्ध केला असून, त्याच्याच पुढील वर्षीं 'केतकी ग्रहगणित' नांवाचा ग्रहलाघवाच्या धर्तीवर लिहिलेला दुसराही एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. याशिवाय ते 'केतकी' नांवाचें पंचांगही काढीत असतात. या सर्व पुस्तकांवरून त्यांचें ज्योतिर्गणितविषयक मार्मिक ज्ञान व त्याच्या प्रसाराविषयींची अंतःकरणपूर्वक कळकळ हीं चांगल्या प्रकारें व्यक्त होतात. पूर्वोक्त दोन ग्रंथ संस्कृत भाषेंत रचण्याचा हेतु केवळ या विषयाचा हिंदुस्थानभर शक्य तितका प्रसार व्हावा हाच असावा. आजकाल ज्योतिषाविषयीं जी कांहीं थोडी बहुत आस्था हिंदुस्थानांत दिसून येते ती महाराष्ट्रांतल्याप्रमाणें त्याबाहेरही बहुधा जुन्या तऱ्हेच्या शास्त्र्यांत किंवा पंडितांत दिसून येते असें म्हटल्यास चालेल; व त्यांचें लक्ष्य वेधणें झाल्यास तें संस्कृत भाषेच्याच द्वारें विशेष सुलभ जावयाचें हें उघड आहे. या दळणवळणाच्या काळांत सर्व प्रांतांस व सर्व वर्गांस साधारण अशा भाषेची आवश्यकता दिवसेंदिवस अधिकाधिक भासूं लागली आहे. अशी भाषा सर्वसंमत होऊन सर्वत्र रूढ होणें कालावधीचा प्रश्न आहे. तोंपर्यंत दरबारी लोकांचें इंग्रजी, बकाली लोकांचें हिंदी किंवा उर्दू, आणि जुन्या पंडितांचें संस्कृत भाषा, हेंच विचारविनिमयाचें मुख्य साधन ह्मणून राहणार यांत संशय नाहीं; व तोंपर्यंत राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर इंग्रजींत भाषण करणाऱ्या महाराष्ट्रीय वक्त्यास किंवा सर्कशीच्या रंगणांत उर्दू कोटया करणाऱ्या महाराष्ट्रीय विदूषकास ज्याप्रमाणें स्वभाषेच्या औदासीन्याबद्दल दोष देणें रास्त होणार नाहीं, त्याप्रमाणें संस्कृत भाषेंत ज्योतिर्विषयक ग्रंथरचना करणाऱ्या ज्योतिष्यास दोष देणेंही रास्त होणार नाहीं. अशा प्रसंगीं परभाषेचा अवलंब योजकाच्या स्वभाषाविषयक औदासीन्याचा परिणाम नसून श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या परभाषाविषयक अज्ञानाचा असतो. शिवाय संस्कृत भाषा मराठीची माताच असल्यानें तिला मिळालेलें पोषण पर्यायानें मराठीसच मिळालें आहे असें मानण्यास हरकत नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं तें तसें मिळालेंही आहे, असें पुढील विवेचनावरून दिसून येईल. असो, उशीरानें का होईना, रा. रा. केतकरांनीं यापुढें मराठींत रचना करण्याचें मनांत आणिलें

आहे ही संतोषाची गोष्ट आहे; व त्यांनीं आरंभिलेल्या 'मराठी ज्योतिर्गणितपुस्तकावली'त प्रस्तुतप्रमाणें अत्यंत उपयुक्त पुस्तकें निर्माण होऊन मराठी वाङ्मयांत भासत असलेली या विषयावरील पुस्तकांची उणीव दूर होईल अशी आशा आहे.

आजपर्यंत प्रस्तुत पुस्तकाच्या तऱ्हेचा व कांहींसा तोडीचा एकच ग्रंथ मराठींत झाला. तो ग्रंथ **केरूनाना छत्रेकृत** 'ग्रहसाधनाचीं कोष्टकें' हा होय. प्रस्तुत ग्रंथांतल्याप्रमाणें त्याही ग्रंथांत ग्रहसाधनाच्या रीती विस्तरशः दिल्या असून त्यांवरून प्रस्तुत कालाच्या हजारों वर्षांपूर्वींचे किंवा नंतरचे ग्रह सूक्ष्मपणें साधितां येतात. कै. वा. जीवनराव चिटणिसांच्या ग्रहसाधनपुस्तकांत साधनाच्या रीती दिल्या नसून आयते साधलेले स्पष्ट ग्रहच दिले आहेत. मात्र ते शेंकडों वर्षांचे दिले नसून, भिन्नभिन्न ग्रहांच्या स्थानांची ज्या भिन्नभिन्न नियमित कालचक्रांत पुनरावृत्ति होते त्यांपैकीं चालू असलेलीं कालचक्रें घेऊन त्यांतील प्रत्येक वर्षांतील व प्रत्येक महिन्यांतील त्यांचीं स्थानें दिलीं आहेत; व मागील किंवा पुढील चक्रांतील स्थानें काढावयाचीं झाल्यास जे अल्पसंस्कार देणें अवश्य असतें, तेही दिले आहेत. यामुळें पुस्तकाचा विस्तार बराच कमी झाला आहे; परंतु सूक्ष्मता तितकी साधली नाहीं. साधारण सूक्ष्म ग्रह फार थोड्या श्रमानें साधण्यास मात्र हें पुस्तक फार उपयुक्त आहे यांत संशय नाहीं. असो.

केरोपंतांनीं आपल्या 'ग्रहसाधनाच्या कोष्टकां'त कालपरिमाणादाखल पाश्चात्य मानाचें सूक्ष्म वर्ष घेतलें नसून भारतीयांचें जुन्या मानाचें वर्षच घेतलें आहे; परंतु त्या अवधींतील ग्रहांच्या गति मात्र वास्तवच गणिल्या आहेत; अर्थात् अयनगतिही सूक्ष्मच धरिली आहे. त्यांनीं क्रांतिवृत्तीय आरंभस्थान सूर्यसिद्धांतावरून निघणारें—म्हणजे रेवतीयोगतारा—हें मानिलें आहे. हें स्थान सांप्रतकालीं प्रचलित असलेल्या मताच्या आरंभस्थानाच्या चार अंश मागें आहे. याप्रमाणें त्यांची कालगणना सूक्ष्म मानानें अशुद्ध अतएव कृत्रिम व स्थानगणना लौकिक मतास विरुद्ध असल्यामुळें त्यांचा ग्रंथ पारमार्थिक किंवा व्यावहारिक यांपैकीं कोणत्याही दृष्टीनें मान्य होण्यासारखा नव्हता.

आपण मूलभूत घेतलेल्या गोष्टी पुरातन असल्यामुळें त्यांस लोकमताकडून सहज मान मिळेल असें केरूनानांस वाटलें असावें. पण दूरदूरच्या ग्रहांची गति अचुकपणें अजमावणाऱ्या या विद्वद्वर्यास भोंवतालच्या लोकमताची प्रवृत्ति नीट ताडतां आली नाहीं असें म्हणावें लागतें. ज्योतिषाच्या काय किंवा इतर बाबतींत काय, लोक नेहमीं गतानुगतिक असतात खरे. पण त्यांजकडून ज्या गत गोष्टींचें अनुकरण होत असतें ती गोष्ट मात्र भूतभूत काळांतली नसून वर्तमानभूत काळांतीलच असावी लागते. प्राचीन ऋषींच्या वाक्यांपेक्षां बाबावाक्यच प्रमाण मानण्याकडे त्यांचा नेहमीं कल असतो. प्रचलित मताच्या विरुद्ध दिशेला जाऊन जी मोठी गैरसोय होण्यासारखी असते ती त्यांस साहजिकच नको असते. ही त्यांची स्थितिस्थापकता इतकी भक्कम असते कीं तिच्या जोरावर स्वतःच्या हलक्यासलक्या व स्वकीयांच्या

मोठ्या मोठ्या गैरसोई सोसण्यासही ते तयार असतात. या मनोदौर्बल्यास पूर्वाभिमान हें गोड नांव मिळालें म्हणजे तर तें अधिकच दृढमूल होऊन बसतें; व या प्रगतिपराङ्मुख म्याडांस आपला अवतार खरोखरच जुन्याच्या संरक्षणाकरितांच झाला आहे असें वाटूं लागतें. या मारून मुटकून बनलेल्या पुराणाभिमान्यांपुढें एखाद्या पुरातन ऋषीनें उपदेशिलेला परंतु हल्लीं रूढींत नसलेला मार्ग स्वीकारण्याचा प्रश्न आला ह्मणजे त्यांचें खरें स्वरूप बाहेर पडतें. केशवपन स्मृतिसंमत म्हणून स्त्रियांस नापिकांच्या स्वाधीन करणारे खंदे वीर पुनर्विवाह स्मृतिसंमत ह्मणून रूढींत आणण्याचा प्रयत्न करितील, किंवा जातिभेद वेदकालीन ह्मणून स्वीकरणीय असें कंठरवानें प्रतिपादणारे धर्मवीर अनुलोमविवाहही तितकाच पुरातन ह्मणून अंगीकरणीय समजतील, अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे. सारांश, केवळ आपल्या पूर्वजांना मान्य ह्मणूनच एकाद्या गोष्टीचा स्वीकार करणारा केरूनानांसारखा निर्भीड पुरुष विरळा. त्यांनीं सुचविलेल्या सुधारणांना इतरांचें पाठबळ मिळालें नाहीं याचें नवल वाटावयास नको.

परंतु या पूर्वाभिमान्यांच्या सहनशीलतेसही मर्यादा असते. परंपरागत चालीमुळें फारच गैरसोय होऊं लागली ह्मणजे त्यांस ती सोडून दुसरी एखादी सोइस्कर चाल घ्यावीशी वाटूं लागते. आपल्याइकडे आगगाड्या प्रथम सुरू झाल्या तेव्हां बैलगाड्यांच्या अभिमान्यांनीं कांहीं दिवस टिकाव धरिला असेल; पण जेव्हां त्यांना दोन वाहनांतला फरक तीव्रतेनें दिसूं लागला, तेव्हां साताऱ्यापासून पुण्यापर्यंतचा प्रवास तीन दिवसांत आटोपण्यापेक्षां काशीपर्यंतचा प्रवास दोन दिवसांत उरकून विटाळचंडाळाचें पातक भागीरथीच्या उदरांत सोडणें त्यांना प्रशस्त वाटूं लागलें. यावनी भाषेचा ओंठास स्पर्श न होऊं देणारे रूढीचे जाज्वल अभिमानी इंग्रजी विद्येपासून होणारी द्रव्यप्राप्ति दिसूं लागतांच आपल्या मुलांस इंग्रजी शाळांत पाठविण्यास तयार झाले. नवी चाल स्वीकारतांना एखादा स्मृतिकार ऋषि वेंठीस धरितां आला तर फारच उत्तम! पण जरी असा एखादा परोपकारी ऋषि वेळेवर हाताशीं नसला तरी त्याच्यासाठीं खोळंबण्याची त्यांना जरूर वाटत नाहीं. बाकी, श्रुतिस्मृतींच्या पोतडींत सर्व कांहीं आहे असा बाणा बाळगणारांना त्यांमधून चल्-चल् करीत लागेल तो शास्त्रार्थ काढण्यास केव्हांच प्रत्यवाय नसतो.

ज्योतिःशास्त्राच्या प्रगतीसही हाच नियम लागू पडतो. जोंपर्यंत जुन्या ग्रंथाचा दृक्प्रत्ययाशीं फारसा विरोध येत नाहीं तोंपर्यंत तो ग्रंथ प्रमाणभूत मानण्यांत येतो. पण तो विरोध तीव्र होऊं लागल्याबरोबर त्याची मान्यता कमी होऊं लागते. बरोबरच आहे; ज्योतिषग्रंथांवरून निघणाऱ्या विवाहमुहूर्तावर जर शुक्र अस्तंगत होऊं लागला, त्या ग्रंथांवर विश्वासून 'दे दान सुटे गिराण' इत्यादि घोष करीत भिकारी पळूं लागले असतांना चंद्र संपूर्ण कलांनीं प्रकाशूं लागला, सूर्याच्या रथास ज्योतिष्यांनीं दक्षिणेकडेच जाण्याचा इशारा केला असतांही त्यानें त्यांस न जुमानतां उत्तरेकडेच पळ काढिला, तर त्या ग्रंथांस व त्या ज्योतिष्यांस कोणता डोळस मान देईल?

केरूनानांनीं वर्षमान जुनेंच घेतल्यामुळें त्यासंबंधानें आक्षेप येण्यास जागाच नव्हती. परंतु त्यांनीं क्रांतिवृत्ताचें आरंभस्थान चार अंश मागें खेचल्याबरोबर पुराणाभिमान्यांची हांकाटी सुरू झाली. ज्याप्रमाणें लहानशी कळ दाबल्याबरोबर रंगभूमीवरील एका देखाव्या-ऐवजीं दुसरा अगदीं भिन्न देखावा दिसूं लागतो, किंवा भूपृष्ठाचा लहानसा पापुद्रा दबल्या-बरोबर भयंकर धरणीकंप होऊन सृष्टीच्या स्वरूपांत जमीनअस्मानाचें अंतर पडतें, त्याप्रमाणें केवळ चार अंशांच्या फेरफारानें पंचांगांत मोठाल्या घडामोडी व्हावयास लागल्या. रूढ व नवीन पंचांगांच्या संक्रांतींत ४—४ दिवसांचें, अधिक मासांमध्यें कित्येक महिन्यांचें, व क्षयमासांमध्यें कित्येक वर्षांचें अंतर पडूं लागलें. मेषसंक्रमणाचा अर्थच निराळा झाल्यामुळें दोघांच्या वर्षारंभांतही चार दिवसांचा फरक पडूं लागला. नक्षत्रांत व योगांतही भेद दिसूं लागला. याप्रमाणें या चार अंशांच्या विकारामुळें पंचांगाचीं पांचही अंगें खिळखिळीं होऊं लागलीं. इतकी मजल आल्यावर बाह्यतः पूर्वकालाचे, परंतु वस्तुतः रूढीचे दास असलेले ज्योतिषी त्यांनीं आजपर्यंत पूज्य मानिलेल्या सूर्यसिद्धांताकडे व त्या सिद्धांताच्या एकनिष्ठ सेवकाकडे करड्या नजरेनें पाहूं लागल्यास नवल नाहीं.

तात्त्विक दृष्टीनें विचार केल्यास, ज्याप्रमाणें रेखांतरसाधनासाठीं ग्रीनिच, पारिस, उज्जयिनी किंवा मुंबई यांपैकीं वाटेल तें स्थळ आरंभस्थान मानण्यास हरकत नाहीं, त्याप्रमाणें भोगसाधनार्थ सायन, निरयनचैत्र किंवा निरयनरैवत यांपैकीं कोणत्याही पक्षाचें आरंभस्थान स्वीकारण्यास प्रत्यवाय नसावा. अंतरिक्षांतील गति, अयनें, पर्वे, दर्श, दर्शनलोप, ग्रहणयुति वगैरे जे भगोलीय चमत्कार वास्तविक महत्त्वाचे आहेत ते सारे उच्चें, कक्षापात, संपात, ग्रह व नक्षत्रें यांच्या परस्परांपासूनच्या अंतरांवर अवलंबून असतात; व उदयास्त, शृंगोन्नति इत्यादि जे खगोलीय चमत्कार आहेत ते सर्व आकाशस्थ ज्योति व खगोलाचे क्षितिजादि भाग यांच्या परस्परांपासूनच्या अंतरांवर अवलंबून असतात. हीं अंतरें सर्व पक्षांच्या दृष्टींनीं सारखींच असतात. संक्रमणें, अधिकमास, क्षयमास, नक्षत्रें, योग, हीं कृत्रिम स्थानांवर व त्यांच्या योगावर अवलंबून असल्यामुळें त्यांमध्यें मात्र अंतर पडतें. पूर्वोक्त चमत्कारांची योग्यता स्वाभाविक व सार्वत्रिक असते, व उत्तरोक्त चमत्कारांची महती मानीव व एकदेशीय असते. 'ग्रहण लागलें' किंवा 'सूर्योदय झाला' या वाक्यांचा अर्थ पृथ्वीवर कोठेंही व केव्हांही पाहूं गेलें तरी एकच असावयाचा; त्यास देशकालांची मर्यादा मुळींच नसते. उलट पक्षीं 'या घटकेचें लग्न अमकें आहे', 'आज चंद्रनक्षत्र तमकें आहे', या वाक्यांचा बोध व्हावयास वक्त्याचा देश व मत हीं ज्ञात असावयास पाहिजेत.

परंपरागत आरंभस्थानास तात्त्विक महत्त्व नसलें तरी त्याजवर अवलंबून राहणाऱ्या चमत्कारांचा संबंध लौकिक अथवा धार्मिक समजुतींशीं निकटत्वानें जडल्यामुळें त्यास काल्पनिक महत्त्व मात्र बरेंच आलें आहे. संक्रांतीस किंवा अधिकमासीं जीं दानें किंवा जे उपवास

करावयाचे असतात ते त्या शब्दांचा अर्थ बदलल्यास पूर्वीइतक्या निष्ठेनें होणें शक्य नाहीं.इतकेंच नाहीं, तर नवीन अर्थाच्या त्या त्या प्रसंगीं धर्मनिष्ठ लोक ते प्रकार करावयास तयारही होणार नाहींत. रैवतपक्षाच्या संक्रांतीस किंवा अधिकमासीं दिलेल्या दानांनीं नरकाची जोड होणार नाहीं असें त्यांस कितीही समजावून सांगितलें तरी त्यांची समजूत व्हावयाची नाहीं. वडील, आजे, पणजे ज्या अर्थाच्या पर्वणीवर व्रतेंवैकल्यें करीत आले त्याच अर्थाच्या पर्वणीवर तीं करण्याचा त्यांचा कृतनिश्चय झालेला असतो; मग त्याचे पायीं स्वर्गाची न होतां नरकाची प्राप्ति झाली तरी बेहेत्तर! सूर्यसिद्धांतकाराच्या संगतींत स्वर्गांतील अमृतपान करण्यापेक्षां जवळच्या पूर्वजांच्या समागमांत नरकवासही त्यांस साहजिकच पत्करतो. जर तात्त्विकदृष्ट्या सर्व आरंभस्थानें सारख्याच योग्यतेचीं आहेत तर इतक्या दृढमूल समजुतींशीं संबद्ध असें आरंभस्थान झुगारून देण्यांत तरी काय लाभ होणार? उलट आपण स्वीकारलेली पद्धति प्रचारांत येण्यास लोकमताकडून विनाकारण अडथळा मात्र यावयाचा. या दृष्टीनें विचार केल्यास केरोपंतांनीं रेवतीयोगतारेस आरंभस्थान न मानितां चित्रानक्षत्रापासून षड्भांतरित असलेल्या बिंदूसच मानिलें असतें व वर्षमान जुनें घेण्यापेक्षां आधुनिक व सूक्ष्म घेतलें असतें, तर अधिक श्रेयस्कर होऊन त्यांच्या उत्तम ग्रंथास लोकमताकडूनही योग्य तो मान मिळाला असता असें वाटतें. जुन्या वर्षमानानें स्वीकृत आरंभस्थान प्रतिवर्षी हलके हलके पूर्वेकडे सरकत जावयाचें, त्यासही सूक्ष्म वर्ष अंगीकारिल्यानें प्रतिबंध झाला असता. ही आपत्ति टाळण्याकरितां केरोपंतांनीं जुन्या मानाच्या वर्षांत वास्तव गतिच घडतात असें धरिलें आहे.पण अशानें वर्षारंभ म्हणजे मेषसंक्रमणकाल हा प्रचलित अर्थ सूटून त्यास कृत्रिम अर्थ येतो; व असें होणें मुळींच इष्ट नाहीं. जुन्या वर्षमानापेक्षां आधुनिक सूक्ष्म वर्षमान ८ पळांनींच कमी असल्यामुळें दोन्ही वर्षमानांतील अंतर जुन्या ज्योतिष्यांच्या डोळ्यांत सलण्यासारखेंही नव्हतें. सूर्योदयाचा पूर्वक्षितिजाशीं जो संबंध तोच वर्षारंभाचा आरंभस्थानाशीं असतो. परंतु सूर्य क्षितिजाशीं संलग्न झालेला प्रत्येकास दिसतो, व तो आरंभस्थानीं आलेला कोणासही न दिसतां गणितानें काढावा लागतो. याप्रमाणें वर्षारंभाचा दृक्प्रत्यय येण्यासारखा नसल्यामुळेंही वर्षमान बदलणें कठिण गेलें नसतें. आरंभस्थान बदलल्यानें इतरही अनेक गोष्टी बदलून धार्मिक समजुतींस जसा धक्का बसतो तसाही येथें बसण्याचें कांहीं कारण नव्हतें. असो.

क्रांतिवृत्तीय आरंभस्थान व धार्मिक समजुती यांमध्यें जसा निकट संबंध आहे तसा कांहींसा महिन्यांचीं नांवें व ऋतु यांमध्येंही आहे; व महिन्यांचा व सणांचा संबंध असल्यामुळें सण व ऋतु यांमध्येंही आहे. परंतु अयनगतीमुळें कांहीं वर्षांनीं महिन्यांची व ऋतूंची फारकत झाली म्हणजे सणांची व ऋतूंचीही होणारच; आणि मग विशिष्ट ऋतूंत व्हावयाचे सण भलत्याच ऋतूंत साजरे करावयाचा प्रसंग यावयाचा. दसऱ्याची स्वारी श्रावणझडींत काढावयाची व दिवाळीचें चिरांगण मुसळधार पाव-

सांत प्रज्वलित ठेवावयाचें! वसंतपूजेचा थाट मार्गशीर्ष महिन्यांतील थंडीच्या कडाक्यांत उरकावा लागून ब्राह्मणांच्या कुडकुडणाऱ्या देहांस चंदनाची उटी फांसावी लागणार, व सर्दीमुळें सुजलेल्या घशांत थंडथंड पन्हें ओतावें लागणार! थंडीनें दांतखिळी बसलेल्या तोंडानें होलिकादेवीच्या नांवानें गजर करावयाची आपत्ति प्राप्त होणार, व श्रावणीचें भस्मलेपन हल्लींच्या धुळवडीच्या दिवसांत करावयाचा प्रसंग येणार! कोजागिरीचा सण अभ्राच्छादित आकाशाखालीं पार पाडावा लागून कोजागिरीचें दूध व दिवाळीचीं कडबोळीं आषाढांतील अजीर्णावर पचवावीं लागणार! असे एक कीं दोन, हजारों घोंटाळे निरयनमानाचें आरंभस्थान व महिने घेतल्यानें व्हावयाचे. ते टाळण्यास सायनमानाचा स्वीकार करणें हा एकच उपाय आहे, असें सायनपक्षाचें ह्मणणें असतें. या पक्षाच्या आक्षेपास उत्तर एवढेंच कीं, सायनमान घेतल्यानें ज्या अडचणी टळणार त्या कालांतरानें उपस्थित व्हावयाच्या आहेत, पण ज्या अडचणी येणार त्या आजच नडण्यासारख्या आहेत. हजारों वर्षांनीं उद्भवणाऱ्या गैरसोयी टाळण्याकरितां आजच स्वतःची गैरसोय करून घेणें हें कदाचित् आटोकाट दूरदृष्टीचें व पुढील पिढ्यांसंबंधानें कनवाळूपणाचेंही असेल, पण व्यवहाराच्या दृष्टीनें हातचें सोडून पळत्याच्या पाठीमागें लागण्यापेक्षां कमी असमंजसपणाचें नाहीं खास. शिवाय आज होणारी गैरसोय खात्रीची आहे, तर वर्षसहस्रांनीं होणारी अडचण अनिश्चित आहे. नुसत्या चार अंशांच्या पिछेहाटीनें किती अडचण होते हें आपण वर पाहिलेंच. अयनांशांइतक्या पीछेहाटीनें तिच्या कितीतरीपट अडचण उपस्थित होऊन, ज्याप्रमाणें १८ व्या शतकांत 'आमचे ११ दिवस आम्हांस परत द्या!' अशी इंग्लंड देशांत हाकाटी सुरू झाली होती तशाच प्रकारची इकडेही सुरू होईल. उलटपक्षीं अयनगतीमुळें होणारी महिन्यांची व ऋतूंची ताटातूट मुंगीच्या पावलानें व्हावयाची असल्यामुळें तिच्यामुळें मनाचा क्षोभ उडून जाण्याचा कधींच संभव नाहीं. दोन हजार वर्षांनीं ऋतूंत एका महिन्याचें अंतर पडावयाचें, व आठ हजार वर्षांनीं एका ऋतूचे सर्व महिने दुसऱ्या ऋतूच्या वांट्यास जावयाचे! इतक्या अवधींत आपल्या सणांत, किंबहुना सर्व चालीरीतींत केवढें स्थित्यंतर होईल याची कल्पनाही करवत नाहीं. वेदारंभकालास सुमारानें आठ हजार वर्षें झालीं असें मानण्यास हरकत नाहीं. तेव्हांच्या व आतांच्या चालीरीतींमध्यें जमीनअस्मानाची तफावत पडलेली दिसून येईल. तेव्हांचे महिनोंगणती टिकणारे यज्ञयाग, तेव्हांचे मांसाहारादि आचार, यांचा हल्लींच्या ब्राह्मणवर्गांत मागमूस तरी दिसून येतो काय? उलट हल्लींच्या सणांपैकीं किती सणांचा उगम वेदांत दाखवितां येईल? या प्रश्नास जर नकारार्थींच उत्तर दिलें पाहिजे, तर पुढील आठ हजार वर्षांत तरी आजचे सण जसेच्या तसेच राहतील असें म्हणण्यास काय आधार आहे? मागील कालांतल्यापेक्षां पुढील कालांत स्थित्यंतराचा वेग शतपटीनें शीघ्र राहणार हें निर्विवाद आहे. 'गेल्या शंभर वर्षांतच आपणांमध्यें किती फरक पडला आहे

याचा विचार केला म्हणजे या विधानाची सत्यता दिसून येईल. समुद्रपर्यटनाचा निषेध व सामान्य लोकांतील अज्ञान यांमुळें आपल्या चालीरीती कायम ठशांच्या होऊन बसल्या होत्या; त्यांस परदेशगमन व ज्ञानाचा प्रसार यांच्या योगानें विकारक्षमता येऊं लागली आहे. ब्राह्मणांमध्यें डोईवर शेंडीऐवजीं केंस ठेवण्याचा वाढता प्रघात व सोंवळ्याओंवळ्यासंबंधानें दिसून येणारें शैथिल्य या क्षुल्लक भासणाऱ्या गोष्टींवरूनही पुढील स्थित्यंतराचा कांहींसा अंदाज करितां येण्यासारखा आहे. मूर्तिपूजेविषयीं दिवसानुदिवस जें औदासीन्य वाढत चाललें आहे, त्यामुळें बऱ्याच सणांतील कर्मकांड संपुष्टांत येत चाललें आहे. शिमग्यासारख्या सणांतील बीभत्स प्रकारांना आळा बसूं लागला आहे. परदेशी मालाबद्दल अरुचि वाटूं लागल्यापासून दिवाळींतील फटाके मूकवृत्ति धरूं लागले आहेत. हल्लीं सणांचें महत्त्व पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्येंच विशेष आहे. पण स्त्रीशिक्षणामुळें तें बरेंच कमी होणार यांत संशय नाहीं. दोनचार शतकांतच आपल्या सणांचें स्वरूप बरेंच बदलून जाईल असा रंग दिसतो. त्यांपैकीं जे सण हल्लींच लयाच्या पंथास लागले आहेत ते नामशेष होऊन त्यांचे जागीं नवीन परिस्थितीस अनुरूप असे नवीन सण अस्तित्वांत येण्याचा संभव आहे. ज्या थोडया सणांचें भाग्य हल्लींच्याहून निराळे ऋतु पाहण्याचें असेल त्यांत त्या ऋतूंच्या मानानें थोडेफार फरकही करण्यांत येतील. परिस्थित्यनुरूप असे अनेक फेरफार आपल्या चालीरींतींत आजवर झालेले आहेत. श्राद्धांत मांसान्नाबद्दल माषान्न शिजूं लागलें, व मुंजीनंतर लागलीच सोडमुंज उरकण्यांत येऊं लागली, ती याच तडजोडीच्या प्रकारामुळें. सणांसंबंधानेंसुद्धां हीच तडजोड सुरू होईल. दसरा भर पावसाळ्यांत पडूं लागला तर गांवाची सीमा ओलांडण्याऐवजीं घरांतल्या घरांत खोल्यांच्या सीमोल्लंघनावर निर्वाह होऊं लागेल. वसंतपूजा मागें सरकत सरकत हिंवाळ्यांत पडल्यास ब्राह्मणांस उटीऐवजीं ऊर्णावस्त्रें देण्यांत येतील. कोजागिरी पौर्णिमा उन्हाळ्यांत येऊं लागल्यास आटीव दुधाबद्दल आईसक्रीम करण्यांत येऊं लागेल. कदाचित् तोंपर्यंत शास्त्रीय सुधारणा इतकी होईल कीं, सारे सण यत्किंचित्‌ही गैरसोय न होतां हल्लींच्या स्वरूपांत बिनबोभाट पार पाडतां येतील. सारांश, या बाबतींत अनिश्चितपणा इतका आहे कीं, आणखी चार हजार वर्षांनीं सण भलत्याच ऋतूंत येऊं लागून त्यांचें स्वारस्य निघून जाईल या भीतीनें सायनपक्ष स्वीकारणें, म्हणजे लाखों वर्षांनीं पृथ्वी सूर्यावर आदळणार या भीतीनें आतांपासूनच पाणी सांठविण्यासारखें होणार आहे. इतक्या वर्षांनीं घडणाऱ्या गैरसोयीबद्दल काळजी वाहण्याइतकी ज्या मनुष्याच्या अंगीं दूरदृष्टि असेल त्याच्या अंगीं आजपासून चोवीस हजार वर्षांनीं पुन्हां प्रत्येक सण योग्य ऋतूंत होऊं लागेल याबद्दल आनंद मानण्याइतका धीमेपणाही असला पाहिजे अशी अपेक्षा केल्यास वावगें होणार नाहीं.

रा. रा. केतकरांनीं रेवतीयोगतारा किंवा वसंतसंपात यांपैकीं एकासही क्रांतिवृत्ताचें आरंभस्थान न मानतां चित्रानक्षत्रापासून १८० अंशांच्या अंतरावर असलेल्या बिंदूस

मानिलें हें योग्यच झालें, असें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल अशी आशा आहे. त्यांनीं आपल्या ‘ ज्योतिर्गणितांत ’ निरयनचैत्रपक्षाप्रमाणें निरयनरैवतपक्षास अनुसरूनही ग्रहांचीं स्थानें काढण्याच्या रीती दिल्या आहेत; पण पुढील दोन पुस्तकांत त्या दिल्या नाहींत. असो. रा.रा. केतकरांनीं वर्षमान जुनें न घेतां सूक्ष्म घेतलें हेंही ठीकच झालें, हें वरील विवेचनावरून उघड होईल. वर्षमानानें एक महत्त्वाचें कालमान निश्चित होतें. आरंभस्थानाप्रमाणें आरंभकालही निश्चित केला पाहिजे. हा आरंभकाल ग्रंथकर्ता बहुधा आपल्या हयातींतीलच एखाद्या सोइस्कर वर्षाच्या आरंभास मानीत असतो. रा. रा. केतकरांनीं ‘ ज्योतिर्गणितां’त शके १८०० सालचा मेषसंक्रमणकाल आरंभकाल मानिला आहे;व ‘केतकीं’त व ‘ग्रहगणितां’ त त्या सालचा चैत्र शुद्ध प्रतिपदेचा उज्जयिनीचा मध्यम सूर्योदय आरंभकाल मानिला आहे.

आरंभकालानंतर इष्टकालापर्यंत लोटलेल्या अवधींतील ग्रहांच्या गति काढिल्या व त्यांत आरंभकालींचीं ग्रहस्थानें (यांस क्षेपक ह्मणतात) मिळविलीं म्हणजे मध्यम ग्रह तयार होतात. आतां हा लोटलेला अवधि काढण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग ह्मणजे आरंभकालानंतर इष्टकालापर्यंत किती सावन दिवस लोटले हें काढणें. या दिवसांच्या संख्येस अहर्गण ह्मणतात. दुसरा मार्ग अहर्गणाची संख्या वाढूं नये म्हणून स्वीकारण्यांत येतो. वर्षांच्या विशिष्ट संख्येस चक्र मानून व आरंभकालापासून लोटलेल्या वर्षांस त्या संख्येनें भागून गतचक्रसंख्या काढितात. अवशिष्ट वर्षांपासून सावन दिवस काढितात, व त्यांस अहर्गण म्हणतात. या अहर्गणापासून उत्पन्न होणाऱ्या ग्रहगतींत क्षेपक व गतचक्रांमधील गति मिळविली ह्मणजे मध्यम ग्रह तयार होतात.रा.रा.केतकरांनीं ह्या दुसऱ्या पद्धतीचा अंगीकार केला आहे. यामुळें त्यांच्या अहर्गणाची संख्या फार वाढत नाहीं. त्यांनीं आपल्या ‘ ज्योतिर्गणितां ’ त चक्र एका वर्षाचें मानिलें असल्यामुळें, त्यांतील अहर्गण एका वर्षाच्या सावन दिनांहून नेहमीं कमी असतो. ‘ केतकीं ’ त व ‘ ग्रहगणितां ’ त १९ वर्षांचें चक्र मानिलें आहे. त्यामुळें अहर्गण ६९४० पेक्षां कधीं वाढत नाहीं. या अवधींत २२८ सौरमास व २३५ चांद्रमास पडत असल्यामुळें, चांद्र व सौर मानांचा चांगला मेळ बसतो. हें चक्र १८ वर्षांच्या ग्रहणचक्रापेक्षां एक वर्षानेंच अधिक असल्यामुळें ग्रहणसंभव पाहण्यासही याचा उपयोग होतो.

अवशिष्ट वर्षांपासून अहर्गण साधितांना प्रथम त्यांपासून सौरमास, त्यांत अधिकमाससंख्या मिळवून त्यांपासून चांद्रमास, त्यांपासून इष्टसूर्योदयापर्यंतचा तिथिगण, व त्यापासून सावन दिवस म्हणजे अहर्गण करावा लागतो. ‘केतकीं’त सौरमासांपासून अधिकमास आणितांना त्यांत गतचक्रसंख्येचा पंचमांश मिळवावा असा नियम दिला आहे; तो ‘ ग्रहगणितां ’ त दिला नाहीं. परंतु तो न दिल्यामुळें जी कसर जमते तिजमुळें अधिकमाससंख्येंत अंतर पडण्यास सुमारें ३०००वर्षें लागावयाचीं. शिवाय अधिकमास सूर्यचंद्रांच्या स्पष्ट स्थितीवरूनच ठरवावयाचा असतो. ह्मणून तो संस्कार सोडल्यानें व्यवहारदृष्ट्या कांहीं हानि होत नाहीं.

'ग्रहगणिता'च्या पहिल्या कोष्टकांत प्रत्येक ग्रहाचा क्षेपक आणि चक्रांतील व अहर्गणांतील गति दिली आहे; व दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या कोष्टकांत गुरु व शनि यांच्या मोठ्या व लहान आकर्षणसंस्कारांची गति दिली आहे. या कोष्टकांवरून रविमध्यदृश्य मध्यम ग्रह तयार होतात. हे ग्रह मंदस्पष्ट करण्याकरितां त्यांचीं मध्यम केंद्रें काढावीं लागतात. 'केतकीं'त केंद्रसाधन करण्याकरितां मध्यम ग्रहांतून मंदोच्च वजा करावें लागतें; पण 'ज्योतिर्गणितां'तील व 'ग्रहगणितां'तील केंद्र मध्यम ग्रहांतून नीच वजा करून निघतें. 'ज्योतिर्गणितां'त हें केंद्र अंशांच्या रूपानें काढावयाचें नसून त्याची सावनदिवसांच्या रूपानें गति दिली आहे. बाकीच्या दोन ग्रंथांत केंद्रावरून मंदफलसंस्काराचें साधन दिलें असून मंदफलाचा मध्यम ग्रहास संस्कार केला ह्मणजे मंदस्पष्ट ग्रह सिद्ध होतो. परंतु 'ज्योतिर्गणितां'त प्रथम मध्यम ग्रह, त्यावरून केंद्र, त्यावरून मंदफल व त्यावरून मंदस्पष्ट ग्रह, इतकी भानगड करण्याऐवजीं प्रथम केंद्रदिवस, त्यांवरून स्पष्टकेंद्र (ह्मणजे मध्यमकेंद्र+ मंदफल) व त्यांत नीच मिळविलें म्हणजे मंदस्पष्ट ग्रह, असें साधन दिलें आहे. हें साधन पूर्वोक्त साधनापेक्षां आटपसर आहे. 'ग्रहगणिता'च्या पांचव्या कोष्टकांत ग्रहांच्या नीचांचे क्षेपक व गति दिल्या असून सातव्या कोष्टकांत मंदकेंद्रांच्या जोडीचीं मंद फलें दिलीं आहेत.

हा मंदस्पष्ट ग्रह कक्षावृत्तावरील झाला. त्यास क्रांतिवृत्तावरील रूप कक्षापरिणतिसंस्काराच्या साह्यानें द्यावयाचें असतें. त्याकरितां ग्रहाच्या कक्षापाताचें साधन आवश्यक असतें. 'ग्रहगणिता'च्या सहाव्या कोष्टकांत पातांचे क्षेपक व गति दिल्या आहेत. त्याच्या साह्यानें कक्षापात साधून, त्याच्या व रविमध्यदृश्य ग्रहाच्या अंतरावरून आठव्या कोष्टकाच्या साह्यानें कक्षापरिणतिसंस्कार काढावयाचा. तो कक्षावृत्तीय ग्रहास दिला म्हणजे क्रांतिवृत्तीय ग्रह येतो. 'ज्योतिर्गणितां'त हा संस्कार निराळा साधावयाचा नसून केंद्रदिवसांवरून येणारें स्पष्टकेंद्र या संस्कारानें युक्त असेंच असतें. त्या ग्रंथांत हा संस्कार हल्लींच्या पातस्थितीवरून साधिलेला आहे. कालांतरानें पातांत पडणाऱ्या फरकामुळें स्पष्टकेंद्रांत जो फरक पडतो तो २००० वर्षांत दोन कलांच्या आंतच असल्यामुळें उपेक्षणीय आहे. हा संस्कार लहान असल्यामुळें 'केतकीं'त मुळींच दिलेला नाहीं. 'ज्योतिर्गणितां'त व 'केतकीं'त पाताची गति विलोम दिली आहे; म्हणून शरसाधनासाठीं सपात ग्रह साधावा लागतो. 'ग्रहगणितां'त पाताची गति अनुलोम असल्यामुळें परिणति व शर साधण्याकरितां पातोन ग्रह घ्यावा लागतो. रविमध्य शर नवव्या कोष्टकानें साधितां येतात.

ग्रहांच्या परस्पराकर्षणामुळें त्यांच्या केंद्रच्युतींत व परममंदफलांत प्रत्येक शतकास फार थोडा फरक पडत असतो. त्यामुळें अर्थातच स्पष्ट केंद्रांत व मंदकर्णांतही अंतर पडतें. तें 'ज्योतिर्गणितां'त कालांतर म्हणून दिलें आहे; पण 'केतकीं'त व 'ग्रहगणितां'त अत्यंत अल्प म्हणून सोडून दिलें आहे.

क्रांतिवृत्तीय रविमध्यदृश्य ग्रह तयार झाला म्हणजे त्यापासून शीघ्रकेंद्र आणून, त्याच्या व

भूग्रहमंदकर्णांच्या साह्यानें भूमध्यदृश्य ग्रह काढावयाचा असतो. हा 'ग्रहगणितां'त दोन रीतींनीं काढिला आहे. पहिल्या रीतीनें काढावयास त्रिकोणमितीचें ज्ञान आवश्यक असतें. दुसऱ्या रीतीस त्याची जरूर नसते. पहिल्या रीतीनें निघणारा ग्रह सूक्ष्म व दुसऱ्या रीतीनें निघणारा ग्रह स्थूल असतो. केरोपंतांनीं आपल्या ग्रंथांत पहिलीचाच अवलंब केला आहे. या रीतींत ग्रह दीर्घवर्तुलांत फिरतो असें समजून पृथ्वीच्या व ग्रहाच्या स्पष्ट मंदकर्णांपासूनच शीघ्रफल काढावयाचें असतें. दुसऱ्या रीतींत प्रथम ग्रह वर्तुळांत फिरत आहे अशी कल्पना करून शीघ्रफल आणावयाचें असतें; व नंतर तो दीर्घवर्तुळांत फिरतो असें गृहीत धरल्यास त्या शीघ्रफलांत जी कसर पडते ती आणून, तिचा त्या शीघ्रफलास संस्कार द्यावयाचा असतो; म्हणजे प्रथम पृथ्वीच्या व ग्रहाच्या मध्यम मंदकर्णांपासून स्थूल शीघ्रफल काढून नंतर त्यास मंदकर्णशेषांमुळें (मंदकर्णशेष म्हणजे मध्यम व स्पष्ट मंदकर्णांमधील अंतर) पडणाऱ्या अंतराचा संस्कार द्यावयाचा असतो. येथें शीघ्रकेंद्रापासून उत्पन्न होणाऱ्या संस्कारास शीघ्रफल असें ह्मटलें आहे. परंतु त्या शब्दाचा केरोपंतांनीं व केतकरांनीं निरनिराळ्या अर्थीं उपयोग केला आहे. केरोपंतांनीं बुध व शुक्र या अंतर्वर्ती ग्रहांसंबंधानें तो शब्द इनांतर (ह्मणजे ग्रहाचें सूर्यापासूनचें अंतर) या अर्थीं योजिला असून, त्याचा संस्कार स्पष्ट रवीस दिला आहे; व मंगळ, गुरु व शनि या बहिर्वर्ती ग्रहांसबंधानें तो शब्द रविमध्यदृश्य व भूमध्यदृश्य ग्रहांमधील अंतर या अर्थीं योजिला असून, त्याचा संस्कार रविमध्यदृश्य ग्रहांस दिला आहे.* रा. रा. केतकारांनीं 'केतकीं'त व 'ग्रहगणितां'तील पूर्वोक्त रीतींत त्या शब्दाचा याच भिन्नाभिन्न अर्थीं उपयोग केलला आहे. दुसऱ्या रीतींत त्यांनीं त्याचा मुळींच उपयोग न करितां दोन्ही वर्गांच्या ग्रहांसंबंधानें इनांतर या एकाच शब्दाचा केला आहे; या इनांतराचा संस्कार अर्थातच मंदस्पष्ट ग्रहास करावयाचा नसून, स्पष्ट रवीस करावयाचा आहे. या रीतींत ग्रह वर्तुळांत फिरतो अशी कल्पना करून १३ व्या कोष्टकाच्या आधारें शीघ्रकेंद्र या उपकरणानें जें मध्यम इनांतर येतें त्यास स्पष्ट करण्याकरितां रा. रा. केतकरांनीं दीर्घवर्तुलीय नांवाचा एक संस्कार शोधून काढिला आहे. हा संस्कार दीर्घवर्तुलांशसंज्ञक एक राशि व एक गुणक यांच्या गुणाकारानें सिद्ध होतो. पूर्वोक्त राशि ग्रहस्थानीयकोणकोणिज्या व मध्यम शीघ्रकर्ण यांनीं घटित असून, तो शीघ्रकेंद्रावरून बाराव्या कोष्टकाच्या आधारानें काढितां येतो. उत्तरोक्त गुणक ह्मणजे ग्रहमंदकर्णशेष (अर्थात् दहाव्या कोष्टकाच्या आधारें निघणारा स्पष्ट ग्रहमंदकर्ण व मध्यम ग्रहमंदकर्ण यांची वजाबाकी) व समांतरसंज्ञक एक राशि यांचा योग. हा राशि ह्मणजे ग्रहमंदकर्ण भूमंदकर्णापेक्षां जितका लहान किंवा मोठा असेल त्या मानानें आंखूड किंवा लांब केलेला भूमंदकर्णशेषच असून, तो

* जुन्या भारतीय ग्रंथांत शीघ्रफलाचा अर्थ सर्व ग्रहांसंबंधानें एकच आहे. परंतु त्यांत मध्यम रवीसच मध्यम बुध व शुक्र मानिलें असल्यामुळें शीघ्रफलाचा संस्कार रवीसच देण्यांत येतो. हें शीघ्रफल ह्मणजे आधुनिक दृष्टीनें इनांतरच होय.

रविमंदकेंद्रावरून ११ व्या कोष्टकाच्या आधारें काढितां येतो. हें साधन अत्यंत चातुर्याचें असून, त्यावरून रा. रा. केतकरांची कल्पकता दिसून येते. यानें निघणाऱ्या स्पष्ट ग्रहांत एका कलेपेक्षां अधिक कसर राहात नाहीं. या साधनाचा उपयोग रा. रा. केतकरांनीं प्रथमतः 'ज्योतिर्गणितां'त केला. त्या ग्रंथांत वरील दोन रीतींपैकीं उत्तरोक्त रीतच दिली आहे. पण 'ग्रहगणितां'त दोन्ही रीती दिल्या आहेत. हा त्याचा एक विशेष आहे.

रविमध्यदृश्य शरास भूमध्यदृश्य करण्याकरितां मंदकर्ण व शीघ्रकर्ण यांची जरूर असते. उत्तरोक्त राशि १४ व्या कोष्टकाच्या साह्यानें निघतो. पण हा शीघ्रकर्ण शीघ्रकेंद्र या एकाच उपकरणावरून निघत असल्यामुळें मध्यम असतो. तो स्पष्ट करावयास पृथ्वी व ग्रह यांचे मंदकर्णशेष व त्यांच्या स्थानांजवळील कोणांच्या कोटिज्या यांची जरूर असते. पण भूमध्यदृश्य शर साधितांना स्पष्ट शीघ्रकर्णाबद्दल मध्यम शीघ्रकर्ण घेतल्यापासून त्यांत जी कसर पडते, ती एका कलेहून अधिक नसते; ह्मणून 'ग्रहगणितां'त मध्यम शीघ्रकर्णावरच निर्वाह केला आहे. 'ज्योतिर्गणितां'त मात्र ती कसरही सोडिली नाहीं.

'केतकीं'त ग्रहाची मंदस्पष्टगति त्याच्या मध्यम गतींत गतिमंदफल मिळवून काढिली आहे; परंतु अंतर्वर्ती ग्रहाची शीघ्रस्पष्टगति त्याचें शीघ्रगतिफल रवीच्या मंदस्पष्टगतींत मिळवून साधिली आहे; व बहिर्वर्ती ग्रहाची त्याचें शीघ्रगतिफल त्याच्याच मंदस्पष्टगतींत मिळवून साधिली आहे. हा पंक्तिप्रपंच 'केतकीं'त शीघ्रफलाचे अंतर्वर्ती व बहिर्वर्ती ग्रहसंबंधानें जे भिन्न अर्थ घेतले आहेत त्यांस धरूनच आहे. 'ज्योतिर्गणितां'त व 'ग्रहगणिता'च्या दुसऱ्या रीतींत सर्व ग्रहांस शीघ्रस्पष्ट करितांना इनांतरसंस्कारच सांगितलेला असल्यामुळें, त्यांतील गतिफल ह्मणजे दोन दिवसांच्या मध्यम इनांतरांमधील अंतरच असतें, व तें रविमध्यमगतींत मिळवावयाचें असतें. तें 'ग्रहगणिता'च्या १५व्या कोष्टकांत प्रत्येक ग्रहाचें दिलें आहे. ग्रहमंदफलाच्या न्यूनाधिक्यामुळें त्या गतिफलांत पडणाऱ्या अंतराची भरपाई करण्यासाठीं 'ज्योतिर्गणितां'त त्या गतिफलास स्पष्टमंदकेंद्रगति व मध्यमग्रहगति यांजपासून एक गुणक तयार केला आहे. 'केतकीं'त बुधेतर ग्रहांस गुणक दिलेला नाहीं; परंतु बुधाची कक्षाकेंद्रच्युति फार मोठी असल्यामुळें, त्याच्या गतिफलास रवि व बुध यांच्या मंदस्पष्ट व मध्यम गतींतील अंतरांपासून सिद्ध केलेला एक गुणक दिला आहे. 'ग्रहगणितां'तही बुधाची सूक्ष्म गति विवक्षित असल्यास, गतिफलास व वर्तुलांशांस दोन गुणक दिले असून, गुण्यगुणकांच्या गुणाकारांच्या योगानें स्पष्ट गतिफल आणिलें आहे. हे दोन्ही गुणक पंधराव्या कोष्टकाच्या उपकोष्टकाच्या आधारें मंदकेंद्राच्या साह्यानें निघतात. बुधेतर ग्रहांच्या गतिफलांस गुणक दिलेले नाहींत. या गतिसाधनांवरूनही रा. रा. केतकरांची कुशाग्र बुद्धि व कल्पकता हीं उत्तम रीतीनें निदर्शनास येतात.

इतर ग्रहांपेक्षां चंद्राचें गणित फार घोंटाळ्याचें असतें. चंद्र अत्यंत सूक्ष्म काढावयाचा असल्यास, मध्यम चंद्रास चाळिसांहून अधिक

संस्कार करावे लागतात. त्यांपैकीं केरोपंतांनीं वार्षिक, मंदफल, च्युति, तिथि व कक्षापरिणति हे पांच मोठे संस्कार दिले आहेत.रा.रा. केतकरांनीं 'केतकीं'त यांतील शेवटचे चार संस्कार दिले असून, 'ज्योतिर्गणितां'त त्यांनीं वरील पांच मोठे व अवांतर आठ लहान मिळून तेरा संस्कार दिले आहेत. त्यांपैकीं अकरा संस्कार 'ग्रहगणितां'त दिले आहेत.

केरोपंतांनीं मध्यम चंद्रशरास स्पष्ट करितांना एकच संस्कार सांगितला आहे.'केतकीं'त व 'ग्रहगणितां'तही हा एकच संस्कार दिला आहे. ज्योतिर्गणितां'त धनर्णत्वाच्या सोईसाठीं प्रथम चंद्राचें दक्षिण कदंबापासून अंतर आणून व त्यास आठ संस्कार देऊन, त्यापासून स्पष्ट शर साधिला आहे. हे संस्कार पर्यायानें मध्यम शरासच आहेत.

मध्यम चंद्रगति स्पष्ट करितांना केरोपंतांनीं मंदफल, च्युति व तिथि यांच्या जोडीच्या गतिफलांचे संस्कार सांगितले आहेत. हेच तीन संस्कार 'केतकीं'त, 'ग्रहगणितां'त व 'ज्योतिर्गणितां'त दिले आहेत.

चंद्रगणितांत संस्कारांची संख्या मोठी असल्यामुळें धनर्णत्वासंबंधानें घोंटाळा व्हावयाचा, तो होऊं नये म्हणून 'ज्योतिर्गणितां'त व 'ग्रहगणितां'त सर्व संस्कार नेहमीं धनच येतील अशी योजना केली आहे. म्हणजे प्रत्येक संस्कारांत योग्य स्थिरांक मिळवून सर्व स्थिरांकांची बेरीज मध्यम चंद्रांतून वजा केली आहे. 'ग्रहगणितां'त चंद्राचीं तीन गतिफलें दिलीं आहेत, हें वर आलेंच आहे. वास्तविक पाहतां या गतिफलांची बेरीज मध्यम गतींत मिळवावयाची. परंतु रा. रा. केतकरांनीं त्यांचे स्थिरांकच असे घेतले आहेत कीं त्यांची बेरीज मध्यम गतीइतकी व्हावी. यामुळें गतिफलांची बेरीज मध्यम गतींत मिळविण्याची यातायात टळली आहे. चंद्रशरास द्यावयाचा संस्कार एकच असल्यामुळें त्यासंबंधानें ही योजना केलेली नाहीं.

'ग्रहगणिता'च्या १७ व्या कोष्टकांत चंद्र, राहु व इतर उपकरणें यांची मध्यमगति दिली असून १८ व्या कोष्टकांत त्या उपकरणांवरून येणारे चंद्राचे संस्कार, चंद्रशर व त्याचा संस्कार हीं दिलीं आहेत. या कोष्टकास लघुसंस्कारांचें एक उपकोष्टक जोडिलें आहे. १९ व्या कोष्टकांत तीन उपकरणांवरून निघणारी चंद्राची दिनस्पष्टगति, त्या गतीवरून त्याचें बिंब व लंबन, व सूर्याच्या मंदकेंद्रावरून त्याची स्पष्टगति व बिंब हीं दिलीं आहेत. बिंबांचा व लंबनाचा उपयोग ग्रहणसाधनप्रसंगीं होतो. इतर ग्रहांचीं बिंबें व शुक्रमंगळांच्या कला व चकाकी हीं १६ व्या कोष्टकांत व त्याच्या उपकोष्टकांत दिलीं आहेत.

ग्रहांच्या भोगशरांवरून विषुवांश, विषुवकाल व स्पष्ट क्रांति आणावयाचीं असल्यास तीं २०वें, २१ वें, २२वें व २३वें या कोष्टकांच्या साह्यानें आणितां येतात. बाकीचीं चार कोष्टकें ग्रहणसाधनप्रसंगीं उपयोगीं पडतात.

केरोपंतांच्या 'ग्रहसाधनाच्या कोष्टकां'त व 'ज्योतिर्गणितां'त गति, संस्कार व फलें बहुधा उपकरणांच्या १–१ अंशाच्या अंतरानें दिलीं आहेत; व 'केतकीं'त १०–१० अंशांच्या अंतरानें दिलीं आहेत. 'ग्रहगणितां'तील कोष्टकांत तीं बहुधा ३–३ अंशांच्या अंतरानें दिलीं असल्यामुळें तीं पूर्वोक्त ग्रंथांतल्यापेक्षां किंचित्

स्थूल निघालीं तरी 'केतकीं'तल्यापेक्षां बरींच सूक्ष्म निघतात.

या पुस्तकाचे मुख्य दोन भाग केले आहेत. पहिल्या भागांत मुख्यत्वेंकरून साधनपद्धति दिली असून, दुसऱ्यांत उपपत्ति दिली आहे. पहिल्या भागांत विश्व, ग्रहमाला व पुस्तकलेखनाचा हेतु हीं दिल्यानंतर, ग्रहगणिताचे कालगणित व स्थानगणित असे दोन भाग व प्रत्येकाचे स्थिति आणि गति असे दोन पोटविभाग केले आहेत. नंतर कालस्थिति ह्मणजे आरंभकाल दिला असून, त्याचे मागाहून कालगतीसंबंधानें ह्मणजे चक्रांचें व अहर्गणाचें साधन दिलें आहे. तें केवळ तिथीवरूनच दिलें नसून, तारखेवरूनही दिलें आहे. यानंतर ग्रहस्थानगणिताचे मध्यमगणित, रविमध्यगणित व भूमध्यगणित असे तीन भाग केले असून क्रमानें त्या सर्वांच्या रीती दिल्या आहेत. यापुढें चंद्रगणित, विषुवांशक्रांतिसाधन, पंचांगगणित, चन्द्रग्रहणगणित हीं क्रमानें आलीं आहेत. यानंतर उपरिनिर्दिष्ट कोष्टकें दिलीं आहेत; व त्यामागोमाग ग्रहगणिताचे ध्रुवांक व सूर्यग्रहणगणित हीं दिलीं आहेत. वास्तविक पाहतां सूर्यग्रहणाचें गणित चन्द्रग्रहणगणितास लागूनच यावयास पाहिजे होतें; व ध्रुवांक दुसऱ्या भागांत ह्मणजे उपपत्तीखालीं येणें जरूर होतें. दुसऱ्या आवृत्तीचा सुयोग आल्यास, ग्रंथकर्त्यांनीं आह्मीं सुचविल्याप्रमाणें विषयांचा क्रम जरूर बदलावा. असो. पहिल्या भागांत दिलेल्या रीतींचें स्पष्टीकरण करण्याकरितां अनेक उदाहरणें व अनेक न्यास दिले आहेत; त्यांवरून त्या रीतींचा बोध होण्यास फार मदत होते. मधून मधून रीतींचीं समीकरणरूप सूत्रें दिलीं आहेत; त्यांनीं त्या रीती ध्यानांत राहण्यास चांगलें साह्य होतें.

दुसऱ्या भागांत पहिल्या भागांतील रीतींची उपपत्ति दिली आहे. हा भाग अत्यंत महत्त्वाचा असून, त्यामुळें या पुस्तकाची योग्यता केरोपतांच्या ग्रंथापेक्षां व केतकरांच्या 'ज्योतिर्गणिता'हूनही अधिक वाटावयास लागते. पूर्वोक्त ग्रंथांत उपपत्ति मुळींच दिलेली नाहीं. 'ज्योतिर्गणितां' त उपपत्तीची दिशा दाखवून कांहीं सारण्याही दिल्या आहेत; परंतु साग्र गणित दिलें नाहीं. तें या पुस्तकांत उत्तम रीतीनें दिलें आहे. यांतील उपपत्ति त्रिकोणमितीचें साधारण ज्ञान असणाऱ्या कोणाही वाचकास नीटपणें कळेल, अशा सुबोध रीतीनें तिची रचना झाली आहे. ती समजण्यास सोपें जावें ह्मणून पुस्तकाच्या शेवटीं आकृतिही दिल्या आहेत. या उपपत्तिरूप भागांतील परिणतिसंस्कार, मंदफल, मंदकर्ण, दीर्घवर्तुलीय संस्कार, ग्रहांची भूमध्यदिनगति, चंद्रबिंब, चंद्रग्रहण, सूर्यग्रहण यांची उपपत्ति काळजीपूर्वक वाचल्यास जिज्ञासूंस घेतलेल्या श्रमांचें सार्थक झाल्यासारखें वाटेल. या भागांत 'केतकीं'तील स्पष्टमंदकर्णानयन, शीघ्रकर्णानयन, भौमबुधांच्या शीघ्रफलांचें स्पष्टीकरण, बुधाचें स्पष्टतरगतिसाधन, केतकीपंचांगांतील बुधगतिफलगुणकसाधन वगैरेंची उपपत्तिही दिली असती, तर हा भाग आहे त्यापेक्षांही मनोरंजक झाला असता; व त्यानें कर्त्यांचे इतर ग्रंथ समजण्यास मदत झाली असती. क्वचित् उपपत्ति विशेष संक्षेपानें दिली असल्यामुळें दुर्बोध झाली आहे. उदाहरणार्थ, ११३ व्या पृष्ठावर

कक्षापरिणतिसंस्कार व परिणतिकोण यांची जात एक असल्याबद्दल विधान आहे. पूर्वोक्त कोण दोन पातळ्यांमधील व उत्तरोक्त कोण एका पातळींतील असल्यामुळें हें विधान वाचकांच्या चटकन् लक्षांत येत नाहीं. वर्तुलाची प्रच्छाया(Projection) दीर्घवर्तुलाकार असते, हा नियम जर तेथें दिला असता तर त्यांची नीट समजूत पडली असती. १२७ व्या पृष्ठावर 'ज्योतिर्गणितां'तील मंदकर्णशेषांचीं जीं अंतरें त्यांसच वर्तुलांशगुणक हें नांव दिलें आहे, असा मजकूर आहे. 'ज्योतिर्गणितां'तील मंदकर्णशेष काढून पाहतां ते वर्तुलांशगुणकांहून भिन्न दिसतात. येथें त्या मंदकर्णशेषांचा भाजक सांगावयाचा राहिला आहे असें दिसतें. क्वचित् एक राशि दुसऱ्याशीं सुमारानें तुल्य असतां, " सुमारानें " या अर्थाचा शब्द नसल्यामुळें पूर्णपणें तुल्य असल्याचा भास होतो. पण हे दोष फारच थोडे व लहान आहेत.

संस्कृत पारिभाषिक शब्दांचे इंग्रजी पर्याय कंसांत दाखविले आहेत, त्यामुळें एक मोठी सोय झाल्यासारखी आहे. परंतु भुजज्या, कोटिज्या वगैरे शब्दांबद्दल पाश्चात्य सांकेतिक चिन्हांचा व अक्षरांचा उपयोग केला आहे, हें आमच्या मतें ठीक झालें नाहीं. त्यामुळें मराठी भाषेंतील ग्रंथ या नात्यानें या ग्रंथाचें महत्त्व कांहींसें कमी झालें आहे, असें आह्मांस वाटतें.

उपपत्तीनंतर या पुस्तकांत खाल्डियन, चिनी, ग्रीक, हिंदी, मुसलमानी व युरोपीय ज्योतिःशास्त्राच्या प्रगतीचा संक्षिप्त इतिहास दिला आहे. तोही वाचकांस मनोरंजक वाटल्यावांचून राहाणार नाहीं. ज्यां मूळग्रंथावरून सूर्यसिद्धांताची रचना झाली, तो बाबिलोनहून इकडे आला असावा, असें रा. रा. केतकरांचें मत आहे. पुस्तकाच्या शेवटीं कर्त्यांनीं आपलें कुलवृत्त दिलें आहे. अखेरीस अधिकमास, क्षयमास, रेखांतर व अक्षांश, भुजांशांच्या जोडीच्या भुजज्या यांचीं तीन परिशिष्टें दिलीं आहेत. व सरतेशेवटीं आंग्लवाचकांकरितां पुस्तकांतील रीतींचें इंग्रजींत विवरण केलें आहे.

गणितग्रंथासारख्या पुस्तकांत अशुद्धें फार असावयाचीं, या नियमास हें पुस्तकही अपवाद नाहीं. कोष्टकांतील अंक बरोबर आहेत कीं नाहींत याची परीक्षा करण्याचें एक साधन कर्त्यांनीं ७६ व्या पृष्ठावर 'ग्रहगणिताचे ध्रुवांक' या सदराखालीं दिलें आहे. शिवाय बरींच अशुद्धें त्यांनीं शुद्धिपत्रांत दिलीं आहेत. तरीही कांहीं महत्त्वाचीं व ताबडतोब न उमगण्यासारखीं अशुद्धें राहिलींच आहेत. उदाहरणार्थ, ६७ व्या पृष्ठावर स्पष्टचंद्रास द्यावयाच्या लघुसंस्कारांचें कोष्टक आहे, त्यांतील सहावा संस्कार कलात्मक असतां 'अं' या अक्षरानें अंशात्मक दर्शविला आहे. अशा लहान चुकीमुळें ग्रहसाधनांत अनेक मोठ्या चुका होण्याचा संभव विशेष. पण ही चूक सुद्धां संस्काराच्या लघुत्ववर्णनानें दुरुस्त होण्यासारखी आहे.

हा ग्रंथ अनेक दृष्टींनीं अपूर्व झाला आहे, अशी आमच्याप्रमाणें वाचकांचीही खात्री होईल असा भरंवसा आहे. ज्यास त्रिकोणमितीचें ज्ञान आहे त्यास या ग्रंथावरून अत्यंत सूक्ष्म ग्रह काढितां येतीलच; पण ज्यास केवळ बेरीज, वजाबाकी,

गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, यांचेंच ज्ञान आहे, त्यासही या ग्रंथाच्या साह्यानें बरींच सूक्ष्म ग्रहस्थानें व ग्रहणेंही वर्तवितां येतील. शिवाय एका विषयावर इतकी सोपपत्तिक माहिती इतक्या पद्धतशीर रीतीनें संकलित केलेली आढळेल असे ग्रंथ मराठी भाषेंत फारच थोडे असतील. या ग्रंथाच्या नांवावरून यांत ज्या विषयांचें विवेचन असेल अशी प्रथम अटकळ होते त्यांच्या जोडीस दुसऱ्या कितीतरी विषयांचें यांत विवरण केलेलें सांपडेल। असे कांहीं ग्रंथ असतात कीं ज्यांच्या प्रकाशनानें भाषेच्या ग्रंथभांडारांत महत्त्वाची भर पडून वाङ्मयाची योग्यता वाढते. प्रस्तुत ग्रंथ अशा ग्रंथांपैकीं आहे असें म्हटल्यास आह्मांवर अतिशयोक्तीचा आरोप होण्याची भीति नाहीं. ज्योतिषावर इंग्रजी भाषेंत जे ग्रंथ आहेत त्यांच्या किंमतीकडे लक्ष देतां, या ग्रंथाची किंमत अत्यंत अल्प, ह्मणजे सारी दोन रुपये आहे. इतका बहुमोल ग्रंथ कर्त्यांनीं इतक्या अल्प मोलास विक्रीस ठेविला आहे, याचें कारण त्यांस त्याची योग्यता माहीत नाहीं हें नसून, त्यांचे अंगीं ज्योतिषाविषयीं जें प्रेम व त्याच्या प्रसाराविषयीं जी कळकळ आहे, ती होय. रा. रा. केतकरांनीं केवळ निमित्तापुरतें अल्प मोल लावून आपल्या कृतीचें जिज्ञासूस जें सालंकृत कन्यादान केलें आहे, तें केवळ त्या कृतीवरील त्यांच्या अकृत्रिम प्रेमानें व तिचें त्यांजकडून योग्य संगोपन व्हावें या इच्छेनें प्रेरित होऊनच केलें आहे. रा. रा. केतकरांस या काळचे **गणेश दैवज्ञ** म्हणावयास हरकत नाहीं. त्यांनीं एकच विषय हातीं घेऊन त्याजवर जे परिश्रम चालविले आहेत, ते एखाद्या योग्यास शोभण्यासारखे आहेत; व त्यांस त्यांत आजपर्यंत जें यश मिळालें आहे, तें त्या परिश्रमांचेंच फळ होय. त्यांनीं आजपर्यंत प्रसिद्ध केलेले ग्रंथ स्वतःच्या पदरास खार लावून घेऊन प्रसिद्ध केले आहेत. त्यांस समाजाकडून द्रव्यरूप उत्तेजन नको असून मान्यतारूप उत्तेजन पाहिजे आहे. असे दीर्घोद्योगी व विद्याव्यासंगी पुरुष अजून आपणांमध्यें आढळून येतात हें आपल्या भावी उन्नतीचें सुचिन्ह होय, व त्यांच्या गुणांची जोपासना करणें हें आपलें कर्तव्य आहे. त्या गुणांची उपेक्षा झाल्यास त्यांजकडे कमीपणा येणार नसून आपणांकडे येणार आहे; इतकेंच नाहीं, तर रा. रा. केतकरांच्या मनांतून 'चांद्री उपपत्ति'-सारखे जे ग्रंथ तयार करण्याचें घोळत आहे ते उत्तेजनाच्या अभावीं अप्रसिद्धच राहून त्यांच्या लाभास आपणांस मुकावें लागेल. उलटपक्षीं त्यांस योग्य तें उत्तेजन मिळत गेलें तर आपणांस त्यांच्या बुद्धिमत्तेचा फायदा मिळून इतरांसही अशा कठीण विषयांचें परिशीलन करण्यास हुरूप येईल. असें उत्तेजन मिळण्यांत या टीकेचा थोडाबहुत जरी उपयोग झाला तरी तिचें साफल्य झाल्यासारखें आह्मांस वाटेल.

काव्यमंजूषा.

गृहिणी.

चंद्रिका गगन शोभवी जशी,
मानसा कमलिनी, सती तशी
भूषवी स्वगृह हार्द–दीपिका;
सार्थ होय " गृहिणी गृहं " न कां ! १

राष्ट्र–बीज वसतें गृहांतरीं;
मातृ–मानस–पवित्रता वरी;
दुग्ध–मिश्र–हित पाजिते मुला;
धन्य माय ! गृहिणी खरी कुला ! २

मोह होय पतिच्या मनीं जरी
मिष्ट भाषण करी, तया हरी;
चित्त होय मृदु–पुष्प संपदीं,
वज्र कीं कठिण होय आपदीं. ३

वर्षती जननि–मेघ अंबरीं
बुद्धि–नीति शिशुच्या मनावरी;
शील–बीज हृदयांत वाढतें;
मानवी–जग फलास भोगितें. ४

ज्ञान–केंद्र जगिं मातृ–भूमिका;
तींत सुज्ञ, कवि जाहले न कां !
पूर्व–पश्चिम–धरेस पाहतां,
प्राज्ञ–कारण "जनी–सुशीलता !" ५

सूर्य हो गृहपती; सुत ग्रह–
तारका विधु पतिव्रता, गृह–
स्वर्ग होय, जरि नांदती सुखें.
संघ–शक्ति वळवी गृहीं सुखें. ६

तापसी पुरुष सुज्ञ; शालिनी—
स्त्री, विचार करि योग्य मानिनी;
पाळिती शम–दमांस अंतरीं,
नित्य देव वसतो तया घरीं. ७

पाझरे अखिल तत्त्व तद्गृहीं,
वाहती सुरस ओघ त्या महीं;
शांति–कांति गृहिणी–सखी असे;
तत्त्वविद् हृदय रंगतें तसें ! ८

माउली मधुर गान गाउनी
पाळणा हलवि हार्द दाउनी;
बालवृत्तिमय माय होतसे,
स्नेह–मूल गृह, पाहिं तूं, कसें ! ९

स्थूल–देह जशि वाढवी जनी,
सूक्ष्म त्यापरिच पाहि शोधुनी;
कल्पना नविन गुंफिते मनीं;
शब्द–सृष्टि तशि देइ मागुनी. १०

प्रीति हो सदन–भूत कीं लता;
मूळ–बीज "गृहिणी–सुशीलता;"
त्यावरी गुरु जलास सिंचिती;
त्या सुखास गणुं मंद मी किती ! ११

क्रांति होति नव आज ज्या जगीं
त्यास हो उगम मातृचित्रगीं;
स्नेह–रूप सरितौघ वाहती,
प्राज्ञ हा सु–रस नित्य चाखिती ! १२

१ प्रेम. २ माता

गजानन गोपाळ जोशी.

कवीचे विरहाश्रु !

विरह ऋतूनें सृष्टि व्यापिली, पानें पिवळीं होउनि गळलीं
पानें कसलीं ? गळलीं कुठलीं ?
तरू शोकानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें !
लता विरहानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें ! ।। १ ।।

सोसाट्याचा वायू सुटला, सडा फुलांचा जगता झाला
सडा कशाचा ? वायू कुठला ?
निसर्ग शोकानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें !
सृष्टि विरहानें ।। अश्रूंचीं..............! ।। २ ।।

कोण अंबरीं जमुनी आले, जलधारा या पाडुं लागले
जल तें कसलें ? पडतें कुठलें ?
मेघ दुःखानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें !
चपला विरहानें ।। अश्रूंचीं.......... ।। ३ ।।

शुद्ध–द्वितीया निशा उदेली, तारक मोत्यें नभीं पसरलीं !
मोत्यें कुठलीं ? नसति पसरलीं !
चन्द्र शोकानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें !
कान्ति विरहानें ।। अश्रूंचीं.......... ।। ४ ।।

कविरायानें काव्या रचिलें; प्रेम–हृदय तें त्यांत ओतलें;
काव्य कशाचें ? रचिलें कुठलें ?
शब्द रूपानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें !
स्फूर्ति विरहानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें ! ।।५।।

मीही असली कविता केली, केली कुठली? अपाप झाली;
शोक सागरीं मन्मति न्हाली !
सखी विरहानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें !
प्रतिभा विरहानें ।। अश्रूंचीं ढाळी सुमनें ! ।।६।।

—x•x—

गोविन्दानुज.

समाजचित्र, नंबर १.

" बालावृद्धविवाह. "

[लेखिका—श्री० सौ० कमळाबाईसाहेब किबे.]

सन १८९० तील गोष्ट. रात्रीं दहा साडेदहांचा सुमार असेल. नीलवर्ण आकाशांत रोहिणीपति चंद्र या पृथ्वीतलाकडे पाहून हंसत होता. त्याचें तें हास्य पाहून तारका आनंदानें पुलकित होत होत्या. चंद्राचे शीतल किरण पथिकाचे श्रम हरण करण्याचे प्रयत्न करीत होते. निशेच्या प्रियकर चंद्रम्याशीं प्रेमानें हितगुज करितां यावें म्हणून रोहिणीनें इतर तारकांना आज्ञा केली, व निरनिराळीं कार्ये वांटून ध्या म्हणून त्यांना बजाविलें; व त्या कामाला निघून जातांच अनायासें तिला एकांताची संधि मिळाली. त्या प्रेमळ संधीचा फायदा घेण्यास व त्यांचें तें प्रेमळ पतिपत्नीप्रेम पाहण्यास कांहीं चतुर तारका आसपास हजर होत्याच. पवित्र व शीतल चंद्र पाहून पृथ्वीनें या आपल्या लाडक्या पुत्राला दृष्ट लागेल म्हणूनच कीं काय, गालबोट लावावें त्याप्रमाणें ढगांचें गालबोट पाठवून दिलें. अशा सुंदर चांदण्यारात्रीं एका मोठ्या वाड्याच्या पुढील चौकांतील बागेंत दोघां गृहस्थांचें संभाषण सुरू होतें.

गणपतराव विचारपूर्ण दृष्टि करून जरा उदासीनतेनें ह्मणाले, " हें पहा, बाबुराव, तुम्ही म्हणतां विवाह करावा, पण माझ्या मनाला नाहीं वाटत त्यापासून सौख्य होईल असें. "

बाबुराव—" कां नाहीं होणार ? सुखाकरितां तर ही सर्व खटपट आहे. "

गणपत०—" अहो, पण माझें वय आज पंचेचाळीस वर्षांचें आहे. यापुढें मी संसार करणें म्हणजे मुर्खपणा आहे.—पण माझ्या या अलोट संपत्तीचा माझ्यामागें मालक कोण असें जेव्हां माझ्या मनांत येतें, तेव्हां मात्र अनेक अडचणी व काळज्या माझ्या डोळ्यांपुढें उभ्या राहतात. आपण माझे जिवलग मित्र म्हणून आग्रह करतां, तर मी हो म्हणतों.. "

यावर बाबुराव जरा ठांसून म्हणाले—" मित्र म्हणजे ! तुमचा माझा देह वेगळा, पण विचार एक असतात, हें सर्व लोकांना माहीत आहे. तर मला वाटतें, आपण आपले कारकून वामनराव यांना मुलीच्या शोधार्थ धाडा, व नक्की जमवून त्यांनीं पत्र धाडलें म्हणजे आपण तेथें जाऊं. लग्न येथें करण्याच्या खटपटीस पडूं नका. कारण आपल्यासारख्या बड्या गृहस्थाचें लग्न म्हणजे कोण खर्चाचा धडाका ! तेव्हां तें बाहेर गांवींच करणें बरें. "

याप्रमाणें उभयतांमध्यें वाटाघाट होऊन वामनरावांस बोलावण्यास एका नोकराला हुकूम मिळाला. पांच एक मिनिटांत वामनरावांची स्वारी आपल्या यजमानापुढें येऊन हजर झाली. बकाची ज्याप्रमाणें दृष्टि तीक्ष्ण असते त्याचप्रमाणें मोठ्या लोकांच्या येथील हुशार कारकून वर्गाची समजावी. त्यांची दृष्टि नम्रतेनें यजमानासमोर धरणीमातेकडे असते; पण तेवढ्यांतच सभोंवार निरीक्षणाचें कार्यही जारीनें सुरू असतें. असो, वामनराव हजर होतांच बाबुरावांनीं त्यांना पुढील कार्यक्रम नीट समजावून सांगितला, व त्याप्रमाणें त्याच रात्रीं मुंबई पुण्याकडे व त्यानंतर कोंकणपट्टीपर्यंत जाण्याच्या निश्चयानें वामनरावांनीं गांव सोडलें. कर्मधर्मसंयोगानें त्यांना पाचोऱ्यांत एक चौदा वर्षांची मुलगी आहे म्हणून शोध लागला, व त्याप्रमाणें त्यांनीं तेथेंच प्रथम मुक्काम केला. तेथें ती मुलगी पाहून तिच्या वडिलांजवळ आपल्या यजमानाची अलोट संपत्ति, त्यांचें रूप, गुण वगैरेंचें कांहीं तिखट मीठ लावून तर कांहीं पदरचें असें वर्णन तर त्यांनीं खूप वठविलें; व तें भपकेबाज भाषण ऐकून मुलीच्या बापानें एकदाचा होकार दिला. झालें. गणपतरावांचें शुभ—अथवा कोण जाणे अशुभ—मुहूर्तावर एकदांचें लग्न उरकून गेलें.

लग्नापुढील प्रकार सांगण्यापूर्वी गणपतरावांसंबंधानें थोडी माहिती वाचकांस सांगणें अप्रासंगिक होणार नाहीं.

गणपतराव इनामदारांचें घराणें फार पुरातन काळापासून श्रीमान म्हणून प्रसिद्ध होतें. इतर इनामदारांचीं घराणीं ज्याप्रमाणें आपण पाहतों त्याप्रमाणें गणपतरावांचा पोकळ डोलारा मुळींच नव्हता. त्यांचें इनामदारीचें उत्पन्न जवळ जवळ वर्षाला १५ हजारपर्यंत रोख येई. नाहीं तर इतर इनामदारांचें कागदी उत्पन्न हजारांचें पण प्रत्यक्ष स्थिति अगदीं उलट असते. गणपतरावजींच्या वेळेस त्यांची तिसरी पिढी होती, व आतांपर्यंत या घराण्याचें ठीक चालल्यामुळें द्रव्यसंचय चांगला झाला होता. गणपतरावांच्या वाड्यांत नोकरचाकरांची कमतरता मुळींच नव्हती. त्यांच्या सबंध वाड्यांत कमींतकमी पन्नास मंडळी होती. याशिवाय त्यांनीं आपल्या गरीब आप्तांनाही आश्रय दिला होता. एवढ्या वैभवाला कोणी तरी वारस पाहिजे म्हणून त्यांनीं विचाराला व सद्बुद्धीला एकीकडे लोटून तृतीय विवाह करण्याचा निश्चय तर केला. एकीकडे संततीची आशा तर दुसरीकडे द्रव्याचा व्यय कसा करावा ही अडचण, अशा दुहेरी संकटांना फार दिवस तोंड देण्याचें त्यांच्या जिवावर आलें;व त्यांनीं एका संकटाचें दोहोंचे चार हात करून निवारण केलें. पण दुसऱ्याला काय तोड ? पण या जगाकडे जरा सूक्ष्म अवलोकन केलें तर आश्चर्यानें मन थक्क होतें, व इतक्या कुशलतेनें सृष्टि उत्पन्न करणाऱ्या परमेश्वराच्या चातुर्यानें मन मूढ होतें. जगांतील बऱ्याच गोष्टींचा विचार केला तर सुख व दुःख, सुष्ट व दुष्ट, जय व पराजय, हीं एकामागून एक राहटगाडग्याप्रमाणें मनुष्याच्या जीवनाभोंवतीं फिरत असतात. त्यांचे असह्य तडाखे खात खात मनुष्यप्राणी आपली जीवितयात्रा पार पाडीत असतो. संकटकाळीं दुःखी मनुष्यास वेळ फार उशीरा जातो असें वाटतें, पण इतरांस तो रोजच्यांसारखाच वाटतो. आणि गोष्ट खरोखर अशीच आहे. समय आपलें कार्य नियमित रीतीनें करीत असतो. त्याच्या कर्तव्यांत केव्हांही बदल दिसत नाहीं. तो आपलें कर्तव्य धीमेपणानें करीतच राहतो.फरक काय तो आपल्या मनःस्थितीचा. मन आनंदांत असलें तर वेळ फार थोडा वाटतो; उलट, दुःखी असेल तर तो कंटाळवाणा वाटतो. अगदीं अशीच स्थिति गणपतरावांच्या मनाची झाली होती. त्यांना वाटे, आपण नूतन विवाह केला खरा. पण त्याचा परिणाम आपल्या घराण्याला जाचक तर होणार नाहीं ना ? आपल्याला जर पुत्रप्राप्ति झाली तर ठीक. नाहींतर लग्नाचा उद्देश कसा पार पडणार ? पुत्रप्राप्ति, पुत्रप्राप्ति हा निजध्यास त्यांना चिंतासागरांत गटंकळ्या खावयास लावी. हा विचारसागर प्रयत्नांनीं ओलांडला पाहिजे. गणपतरावांच्या पत्नीचें नांव सरस्वती होतें. त्यांचे माहेरचें नांव यमुना होतें. पण आतां त्या नांवाशीं आपल्याला काय कर्तव्य ? माहेरचें नांव देखील उच्चारणें सासरच्या माणसांना वाईट वाटतें का ? म्हणूनच तर नामकरणविधि विवाहाबरोबरच ठेवला नसेल ना ? किंवा पुढें पातिव्रत्य खडतर राखण्याकरितां पित्याच्या घरच्या नांवापासूनच अंतःकरण निर्विकार करण्यास शिकावें हा तर हेतु नसेल ना ? कांहीं असलें तरी रूढीप्रमाणें यमुनेचेंही लग्नांत नांव बदललें.

सरस्वतीबाई लग्न झाल्यांबरोबर हळुहळु गृहराज्यावर पतीच्या संमतीनें आपला अधिकार गाजवूं लागल्या, व पतिदेवतेला आपल्या पत्नीनें आपल्या कर्तव्यांतील भाग बराच स्वतःच दक्षतेनें हातीं घेतलेला पाहून प्रसन्नता वाटली. या व्यवहारप्रसिद्ध गोष्टी तर सुरळीत चालल्या. पण गणपतरावजींना या वृद्धतरुणीविवाहानें नसतीच काळजी आपण आपल्या जिवास लावून घेतली असें वाटूं लागलें. 'हा विवाह झाला खरा; पण आपली पत्नी कुलशीलसंपन्न निघाली तर बरें. पण जर का उलट प्रकार घडला तर मग सोळा आणे फजिती ! कारण दिवसेंदिवस माझी वृद्धावस्था माझ्यावर आपला अंमल अधिकाधिक बसवूं लागली आहे.उलट,पत्नीनें तारुण्यावस्थेच्या पहिल्या पायरीवर आतां कुठें पाऊल ठेवलें आहे. तिला मी पसंत कसा वाटणार ? खात्रीनें ती माझा मनःपूर्वक तिरस्कार करील असें मला वाटतें.' अशाप्रकारें त्यांच्या मनांत विचारक्रांति सुरू झाली.

लग्न होऊन आज जवळ जवळ आठवें वर्ष सुरू आहे. पूर्वींचे गणपतराव आतां पूर्ण वृद्धांमध्यें गणले जाऊं लागले. सरस्वतीबाईचीही आतां पोक्त स्त्रियांमध्यें गणना होऊं लागली. पण अद्याप पुत्रप्राप्ति झाली नव्हती. दोघेंही चिंतासागरांत बुडून गेलीं. यजमानांनीं वामनरावांना बोलावणें पाठविलें. वाचकहो,

वामनराव हे गणपतरावांचे दिवाण होते. ते फार दिवसांपासून–ह्मणजे सोळाव्या वर्षापासूनच इनामदारांच्या घरीं नोकर झाले. पण बरेच दिवस कारकुनींत रखडल्यावर हळू हळू ते यजमानाच्या पसंतीस उतरले, व लवकरच त्यांनीं कारभाऱ्याची जागा पटकावली. वामनरावांचा खरा संबंध काय होता हें वाड्यांतील फारच थोड्या जुन्या नोकरांखेरीज करून इतरांना माहीत नव्हतें. ते ह्मणत असत, वामनराव हे लहानपणापासून वाड्यांतच राहत असत. हे आठव्या वर्षीच मातृहीन झाले, व पुढें चार वर्षांनीं त्यांचे वडीलही वारले. तेव्हांपासून कांहीं दिवस ते नुसत्या जेवणावारींच इनामदारांच्या येथें होते. पण पुढें मग ते तेथेंच कारकुनीच्या जागेवर नेमले गेले. झालें. अंगच्या हुशारीनें त्यांनीं गणपतरावांना लवकरच आपल्या आधीन केलें. वामनराव देतील ती सल्ला गणपतराव मुकाट्यानें ऐकत. त्यांत नीति अनीतीविषयीं विचारच नसे. वामनरावाविषयीं पुढील सर्व गोष्टींचा उलगडा होण्यास एवढी माहिती पुरे आहे.

वामनराव येतांच एवढ्या अलोट संपत्तीला वारस उत्पन्न होत नाहीं याबद्दल देवाची निष्ठुरता व आपलें मानसिक दुःख त्यांनीं वामनरावांना सांगितलें. 'पुढें दत्तक घ्यावा किंवा आणखी कांहीं दिवस वाट पाहवी हें विचारण्याकरितां मी मुद्दाम तुम्हांला हाक मारली. माझी अशक्तता बरीच वाढली आहे, व डॉक्टरनेंही शरीरपरीक्षेवरून मला डायाबेटीस झाला असल्याचें सांगितलें आहे. तेव्हां आतां आमची अवस्था काय होणार? एवढ्याकरितां, तुम्ही कांहीं सल्ला सांगाल म्हणून, तुह्मांस बोलाविलें आहे.' हें एकून वामनराव थोडा विचार करून म्हणाले, " हें पहा, आपल्याला निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. योग असेल तर लवकरच पुत्रप्राप्ति होईल असें मला वाटतें. बाईसाहेबही विनाकारण काळजींत असतात, तर रिकाम्या वेळीं मी येऊन त्यांना संस्कृत शिकवीन–आपली संमती असेल तर. अहो, रिकामपणीं बसलें कीं वाईट विचार सुचतात. मनाला नेहमीं चांगल्या उद्योगांत गुंतविलें पाहिजे." " तर तुम्हीं खुशाल येऊन शिकवीत जा, ह्मणजे भगवद्गीता वगैरे संस्कृत वाचावयाची हिला माहिती होईल, व वाचनापासून हिच्या मनाला करमणूक वाटेल." असें गणपतराव म्हणाले.

याप्रमाणें सर्व व्यवस्था होऊन सरस्वतीबाईचे संस्कृतशिक्षणाला आरंभ झाला. पण सहा महिने शिकावयास लागून झाले असतील नसतील, इतक्यांतच गणपतरावांना कांहीं कुशंकांनीं पछाडलें. व एकदां ते सरस्वतीबाईंना म्हणालेही—" तूं जरी वामनरावांपाशीं शिकतेस तरी त्यांच्याशीं इतकें लघाळपणें बोलणें ठीक नाहीं. त्यावरून म्हणजे मी तुला वाईट समजतों अशांतली गोष्ट नाहीं. पण लोक काय म्हणतील इकडे नको का पाहायाला?" सरस्वतीबाईनें यावर उत्तर दिलें:—" आपणच ना मला उत्तेजन दिलें शिकवण्याकरितां? मग आतां कां बरें बोलतां? याचा विचार आधींच करावयास पाहिजे होता." यावर गणपतराव अगदीं निरुत्तर झाले. काय करतील बिचारे! बालावृद्धविवाहाचे परिणाम त्यांना डोळ्यांपुढें सिनेमोटोग्राफप्रमाणें दिसूं लागले. ते व्यग्र चित्तानें उठून बाहेर फिरावयास गेले. बागेंतील थंडगार बांकांनीं त्यांच्या हृदयांतील विचारही थंड पडले. आतां हा वामनरावाचा संबंध तोडावा कसा? बरें न तोडावा तर आपल्या डोळ्यांदेखत हे निंद्य प्रकार पाहावे कसे? कोणाची सल्ला घ्यावी, तर ही गोष्ट घडत आहे हें सांगणें म्हणजेच जाणून बुजून लोकनिंदेचे तडाके सहन करणें आहे. या चिंतेनें गणपतरावांची प्रकृति क्षीण होत चालली. पण त्यांच्या मनांतील यातना एका देवाशिवाय कोणाला कळणार आहेत? तो परमात्मा तरी काय करील? आपल्या अविचाराचीं फळें मनुष्याला भोगलींच पाहिजेत.

अशा मानसिक पीडेंत आणखी पांच वर्षें गेलीं. एके दिवशीं दुपारीं गणपतराव भोजन वगैरे उरकून आपल्या दिवाणखान्यांत आराम करीत होते. तोंच एक हुजऱ्या येऊन म्हणाला " मामासाहेब आले आहेत." मामासाहेबांचें नांव ऐकतांच गणपतराव एकदम उठून म्हणाले, " आण त्यांना आंत." त्यानें लगलीच जाऊन एका तरुण गृहस्थाला आंत आणिलें. त्यांना पाहून गणपतराव म्हणाले, "कसें काय, तब्यत बरी आहे? सर्व मंडळी खुशाल आहेत ना? तुमची बदली लटपटपूरला होणार होती तिचें काय झालें?" " होणार होती, पण अद्याप वेळ आहे. साहेब सध्यां रजेवर गेले आहेत. ते परत आल्यावर मग काय तें

ठरेल." वाचक हो, हे आलेले गृहस्थ सरस्वतीबाईंचे वडील बंधु होत. त्यांना प्रथम अपत्य झालें, व तोही मुलगा, म्हणून बारशाचें निमंत्रण देण्याकरितां ते आले होते. आणि गणपतरावांनीं जा म्हटलें तर सरस्वतीबाईंचाही जाण्याचा विचार होता. वामनरावांस बोलावण्यास रावसाहेबांनीं हुकूम केला. त्याप्रमाणें लवकरच वामनराव येऊन हजर झाले. भाऊ आल्याची हकीकत लवकरच सरस्वतीबाईंच्या कानीं गेली, व त्या दिवाणखान्यांत जाऊन पाहतात तर खरोखरच बंधुराज आले आहेत. आपणास आतां माहेरीं जाण्यास मिळणार या हर्षातिशयानें त्या नाचूं लागल्या. त्या लागल्याच खालीं आल्या, व ब्राह्मणाला चहाचें आधण ठेवण्याची ताकीद झाली. माहेरीं जाण्याचा त्यांनीं मनाशीं दृढ निश्चय केला, व गणपतराव एकांतांत भेटले म्हणजे त्यांचें मन वळविण्याचा त्यांनीं बेत केला. मध्यस्थी करण्याबद्दल वामनरावांना सुचविण्याचें त्यांनीं ठरविलें. जातांना सामानसुमान काय काय घ्यावयाचें याचा विचार त्या करूं लागल्या. आपल्या एका चुलत बहिणीकरितां त्यांनीं कांहीं खण—तिच्या मुलांकरितां कांहीं खेळ—व शेजारच्या बालमैत्रिणीकरितां एक पुण्याकडील हस्तीदंती फणी घ्यावयाची—याप्रमाणें त्यांचें मनोराज्य सुरू होतें. तो दिवस केव्हां मावळेल असें त्यांस झाले व त्या रात्रीची मार्गप्रतीक्षा करूं लागल्या. लवकरच सूर्य अस्ताला जाऊन थोडा वेळ झाला नाहीं तोंच निशादेवी आली व सरस्वतीबाईंचे इच्छित हेतु पूर्ण होण्याची शुभ घडी नजीक आली. रात्रीं भोजनादि सर्व उरकून गणपतराव आपल्या शयनमंदिरांत आले, व गणेशपुराणाची पोथी वाचूं लागले. थोड्या वेळांत शयनमंदिरांत सरस्वतीबाईंनीं प्रवेश केला. आज त्यांचा चेहरा रोजच्यापेक्षां जास्त आनंदी दिसत होता. आंत येतांच त्यांनीं खोलीचें दार बंद केलें, व रावसाहेब वाचीत असलेली पोथी त्या लक्ष लावून ऐकूं लागल्या. आज सिंदुरासुरानें आपल्या सामर्थ्यानें देवांला कसा त्रास दिला, हा अध्याय होता. चालू अध्याय पुरा करून गणपतराव पोथी गुंडाळणार तोंच पत्नीधर्माप्रमाणें तें काम सरस्वतीबाई करूं लागल्या. त्यांची पोथी गुंडाळून ठेवण्याच्या अगोदरच गणपतरावांनीं बोलण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, "सदाशिवराव भेटलेच असतील. मग काय विचार ठरला? जाण्याचें नक्की करणार का?" यावर सरस्वतीबाई म्हणाल्या—"न जाऊन कसें चालेल? दादाला राग नाहीं कां येणार? मी जर आतां गेलें नाहीं, तर सर्वजणांचा विरस होईल. बरें, जाण्याला हरकत कोणती?" 'हरकत' या शब्दावर जोर देऊन गणपतराव म्हणाले, "आजकालच्या काळाला अनुसरून बोलावयाचें म्हणजे 'हरकत' हा शब्दच मुळीं बदलावा लागेल. कारण ज्याच्या मनाला जसें योग्य वाटेल तसें त्यानें वागावें हें तर हल्लींच्या समाजांतील वाढत चाललेल्या सुधारणेचें तत्त्व आहे. पण माझें म्हणणें इतकेंच कीं, हल्लीं माझी प्रकृति नेहमीं अस्वस्थ राहते, म्हणून म्हणतों या वेळेस गेलां नाहीं तर धकण्यासारखें नाहीं का? तुम्ही याचा आपल्या मनाशीं नीट विचार करा. आणखी जास्त सल्ला हवी असेल तर तुमच्या वामनरावांचेंही मत घ्या या कामांत." 'तुमच्या वामनरावांचें' हे शब्द ऐकतांच सरस्वतीबाई रागानें लाल झाल्या. कसला तरी अपमानकारक विचार त्यांच्या हृदयाला टोंचूं लागला. त्या जरा रागानेंच म्हणाल्या, "'तुमचे वामनराव' असें टोंचून मला कशाला हिणवितां? आपणच सांगितलें म्हणून मी त्यांच्याशीं बोलूं लागल्यें. आणि त्यांच्याशीं मी बोलतें म्हणून आतां आपल्याला राग येतो. त्याला माझा काय बरें उपाय?" यावर ते जरा तिरस्कारदर्शक स्वरानें म्हणाले "हो, मी बोलायला सांगितलें. पण तूं जे तास तास त्यांच्याशीं एकांतांत घालवितेस ते देखील माझ्याच सांगण्यानें नव्हे? पण तुला याबद्दल बोलून आधींच माझ्या घराण्याला लागलेली काळोखी आतां थोडीच कमी होणार आहे! छेः! छेः! संततीकरितां वृद्धपणीं विवाह केल्याचें असेंच प्रायश्चित्त मिळावयास पाहिजे. चालू शिक्षा मला अगदी योग्य आहे. याबद्दल मी तक्रार करणेंच चूक आहे. कारण माझी तक्रार सध्यां अरण्यरुदनाप्रमाणेंच समजली पाहिजे. हर हर! काय ही माझी स्थिति! हा सर्व परिणाम कसला, तर अविचारानें मीं तृतीय विवाहास प्रवृत्त झालों याचा! असो, पण तुझ्याशीं ही चर्चा करून काय उपयोग? पण सांग तर खरें, मला तर वाटतें, माझ्या या अशक्त प्रकृतींत तूं जवळ नसणें चांगलें नाहीं." यावर सरस्व.

तीबाई म्हणाल्या" पण मी बरोबर पंधरा दिवसांनीं येईन. अगदीं आईनें आग्रह केला तरी दिखील राहणार नाहीं, हें मी आपल्याला खात्रीनें सांगतें.जर आपल्याला अगदीं थोडा सुद्धां तापबीप आला तरी मला तार करा. मी अगदीं ताबडतोब निघून येईन. मला नाहीं कां इकडल्याविषयीं काळजी ? उगीच कुशंका काढण्यांत अर्थ काय ? " यावर गणपतराव निराशेनें म्हणाले, " तर मग करा तयारी जाण्याची. उद्यां संध्याकाळच्या गाडीनेंच निघा. " झालें. पडत्या फळाची आज्ञा असें समजून सरस्वतीबाईनें नेहमींच्या परिपाठाप्रमाणें जुन्या लुगड्यांसह सर्व सामानाची बांधाबांधी केली. तें सामान बरेंच झालेलें पाहून गणपरावांच्या ओंठावर कांहीं शब्द आले होते, पण कसल्या तरी विचारानें ते गप्प बसले, व ठरल्याप्रमाणें सरवस्तीबाई माहेरीं निघून गेल्या. जातांना त्यांनी वामनरावांना सांगितलें कीं, " तिकडच्या प्रकृतीसंबंधानें चार दिवसांआड पत्र पाठवित जा बरें." यावर फार नम्रतेनें मान हालवून वामनराव लीनतेनें 'बरें' असें म्हणाले.

सरस्वतीबाईंना माहेरीं जाऊन आठ एक दिवस झाले. पण त्या गेल्यानंतर पांचवे दिवशींच गणपतरावांना थोडा ताप येऊं लागला. त्यांना वाटलें, सर्दी झाली म्हणून ताप आला असेल, उद्यां उतरून जाईल. मग व्यर्थ सरस्वतीबाईंना पत्र पाठवून घाबरविण्यांत काय अर्थ आहे ! वामनरावांचेंही मत तसेंच पडलें. पण त्यांत कांहीं अर्थ होता.तो कावेबाज मनुष्याशिवाय इतरांस कळणें कठीण आहे. यावेळेस इनामदारांच्या वाड्यांत विशेष भरंवशाचे असे कायते फक्त वामनरावच. आज गणपतरावांची प्रकृति नेहमींपेक्षां जास्त होती. म्हणजे आज सकाळपासून तापाचें प्रमाण वाढलें होतें, व त्यांना पूर्वीच्या दुखण्यापेक्षां या तापानें फारच अशक्तता वाटूं लागली. याबद्दल त्यांनीं वामनरावांना बोलून देखील दाखविलें. पण वामनराव कसले वस्ताद! त्यांनीं आपल्या गोड व मायावी भाषणानें लवकरच गणपतरावांचें समाधान केलें. " आपण विनाकारण भितां आहां. डॉक्टरचें औषध घेतलें कीं आपला ज्वर बरा होईल. उगीच भीति बाळगण्यांत अर्थ काय ? मी बाईसाहेबांना पत्र पाठविलें आहे. त्या उद्यां परवां बहुतकरून येतील. कारण त्यांना तरी आपल्या प्रकृतीची काळजी आहेच.आज त्यांस पुन्हां लिहितों."आज पत्र गेल्यावर परवां सरस्वतीबाई खास निघतील व त्यानंतर दोन दिवसांत येथें येऊन पोंचतील, असा गणपतरावांनीं आपल्या मनाशीं विचार केला व या सुखदायक विचारांनीं त्यांना जरा बरें वाटलें. त्या रात्रीं त्यांना झोंपही पण बरी आली. दुसरे दिवशीं त्यांनीं डाक आली का म्हणून नोकराला विचारलें, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, दिवाणजीपाशीं सर्व पत्रें दिलीं आहेत व ते तीं लवकरच आपल्याला आणून दाखवतील. इतकें बोलून नोकर निघून गेला; व थोड्या वेळानें वामनरावांनीं त्या खोलींत प्रवेश केला. त्यांना पाहतांच गणपतराव म्हणाले–" वामनराव, तिकडे तीन चार पत्रें पाठविलीं म्हणतां, पण त्यांचें अद्याप उत्तर नाहीं व येण्यास निघण्याचेंही लक्षण दिसत नाहीं. हा असा डांकेचा घोटाळा कां ? डांकेमध्यें नीट पत्र नेऊन मनुष्य टाकतो ना ? कीं तुम्हीच लिहीत नाहीं ? आहे तरी काय घोटाळा ? मला आतां कालची शक्ति आज वाटत नाहीं, व हिचें तर येण्याचें लक्षण दिसत नाहीं. आतां तार तरी करा." वामनरावांनीं चटदिशीं तारेचा फॉर्म आणला व रावसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें मजकूर लिहून त्यांनीं तो मनुष्याला देण्याचें निमित्त करून आपल्या खानगी खोलींत एका पेटींत ठेवला व आपल्या मनाशींच ते पुटपुटले, "ही तार मी बाईसाहेबांकडे रवाना करीन इतका काय मी वेडा आहें ? कधीं नाहीं. अशी सोन्यासारखी अमोल संधि मी फुकट जाऊं देणार नाहीं. या संधीचा फायदा मी घेतला तर माझें जन्माचें कल्याण होणार आहे. रावसाहेबांची (गणपतरावांना नोकर मंडळी ' रावसाहेब ' म्हणत) तर खात्री झाली कीं ही तार मीं पाठवून दिली. आणि शेवटपर्यंत ही त्यांची खात्री टिकेल असेंच मला वागलें पाहिजे. आज जर रावसाहेबांचे कोणी जवळचे नातेवाईक असते तर मला हा पुढील व्यूह रचतां आला नसता, व माझ्या स्वार्थांत व्यत्यय आला असता; आणखी आज हें मीं आरंभिलेलें कार्य इतक्या शिताफीनें पार पडलें नसतें. असो. आज रावसाहेबांच्या प्रकृतीचें मान जरा जास्तच आहे. पण डॉक्टरला आणण्यांत अर्थ नाहीं. फक्त बुडलच्या वेळेस

कोणा तरी वळणाच्या डॉक्टरला बोलावलें ह्मणजे झालें. पण आधींच मनोराज्य करण्यांत काय अर्थ ?"

असो. लिहावयाला वेळ लागेल इतक्या झपाट्यांत वरील विचार वामनरावांच्या मेंदूंतून निघून गेले. त्यांनीं जरा काळजीपूर्वक पुन्हा पेटीचें कुलुप तपासलें. तें बरोबर लागलेलें होतें. त्यांनीं जरा समाधानपूर्वक त्या पेटीकडे नजर फेकली, व ते रावसाहेबांच्या खोलीकडे वळले. नोकर-चाकरही वामनरावांच्या पसंतीचे-अर्थात् त्यांच्या तर्फेचे होते. यामुळें त्यांचें कारस्थान फुटण्याची भीति नव्हती. वामनराव रावसाहेबांच्या खोलींत आले. त्यावेळेस त्यांचा जरा डोळा लागला होता, व एक हुजऱ्या त्यांच्या पलंगाजवळ बसला होता. तो हे आंत आलेले पाहून उठला व बाहेर गेला. जातांना त्यानें अर्धा एक तास झोंप लागून झाली असें सांगितलें. वामनरावांनीं फक्त मान डोलवली, व आपण तेथेंच पलंगाजवळ बसले. त्यांना बसून दहा एक मिनिटें झालीं असतील नसतील इतक्यांत रावसाहेब जागे झाले, व वामनरावांना जरा भीतिद. शंक स्वरानें म्हणाले-" किती वेळ तरी मी निजलों होतों हो! या झोंपेनें मला बरें वाटण्याऐवजीं थकवाच वाटतो. मला थोडें तोंड धुण्यास पाणी मागवा, व नंतर थोडें दूध येऊं द्या."वामनरावांनीं नोकराला हांक मारिली व त्याला पाणी आणावयास सांगितलें, व आपण रावसाहेबांना जरा घाम आला होता तो पुसूं लागले. नोकरानें पाणी आणल्यावर तोंड धुवून रावसाहेबांनीं दूध घेतलें व त्यामुळें त्यांना जरा हुशारी आली. ते जरा गूढ विचारांत गढून गेल्यासारखे दिसले. थोडा वेळ विचार करून म्हणाले, " वामनराव, पुढला विचार आधींच करून ठेवलेला बरा. तर मला वाटतें, तुह्मी त्या मधुसूदन वकिलाकडे नोकर पाठवून त्यांना मी जरूर बोलावलें आहे ह्मणून सांगा. जा. जलदी मनुष्य जाऊं द्या. " वामनराव याच क्षणाची वाट पाहत होते. त्यांनीं मनुष्य पाठविला. थोड्याच वेळांत मधुसुदन वकील आले व रावसाहेबांनीं सांगितल्याप्रमाणें-अथवा वामनरावांच्या मर्जीप्रमाणें कागद तयार केला, व रीतीप्रमाणें सही वगैरे झाल्यावर तो त्यांनीं नीट तिजोरींत जपून ठेवला. ठेवतांना वामनरावांच्या तोंडावर आसुरी आनंद दिसत होता. झालें. त्याच रात्रीं रावसाहेबांची तब्यत बारावर दोन वाजतां फारच बिघडलीं व त्यांनीं आपण होऊनच सांगितलें कीं, "मला खालीं देवघरासमोर न्या व तेथें निजवा. आतां मी फार वेळ जगेन असें मला वाटत नाहीं. पण काय हो वामनराव, तारेचें उत्तर अद्यापही नाहींना आलें?"

" नाहीं आलें, पण येईल आतां उद्या सकाळीं-" असें मोघम उत्तर जरा अडखळतच वामनरावांनीं दिलें. पण त्याचा खरा अर्थ भोळ्या रावसाहेबांना कदाचित् स्वर्गांत गेल्यावर कळला तर कळेल. यानंतर रावसाहेबांना वायूचा झटका फार येऊं लागला, व त्या झटक्यांत "गाडी आली कां ? त्या आल्या का ? कुठें आहेत त्या ? " वगैरे पत्नीविषयींच त्यांचें भाषण चालू होतें. शेवटीं पहांटेस त्यांची वाचाच बसली, आणि श्वासोच्छ्वास दर क्षणागणिक आपली नश्वर जगांत राहण्याची नाखुषी दर्शवीत होता. अशा स्थितींत सकाळचे दहा वाजले. आतां खटकपूरची गाडी येण्याची वेळ होती. वामनरावांनीं तार न पाठवितां पत्र पाठविलें होतें. कारण तें उशिरां पोंचेल असा त्यांचा अंदाज होता; व तो खरा ठरला. पत्र पाहतांच सरस्वतीबाई निघाल्या बरोबर त्यांची आई,भाऊ आले होते.ते घरांत येऊन पोंचतांच रावसाहेबांकडे गेले, व तेथील प्रकार पाहून सर्व मंडळीचे हातपाय गळाले. स्त्रियांत तर एकच गोंधळ उडाला. सरस्वतीबाई खिन्नपणानें म्हणाल्या-"वामनराव, इतकी दशा होईपर्यंत तुह्मी मला कांहींच कळवूं नये का ? हें तुमच्या विश्वासूपणाला शोभतें ना ? हें विश्वासु नोकराचें कर्तव्य काय ? तुम्ही नोकर असून कांहीं नातेपणाचाही संबंध आहे हें तुम्ही विसरलां का ? पण तुम्हाला बोलून आतां काय फायदा ? मीच जर हट्ट घेऊन माहेरीं गेलें नसतें तर हा जन्माचा माझ्या तोंडाला लागलेला काळिमा कसा राहता ? माझीच चूक, तेव्हां तुम्हांला बोलण्यांत काय अर्थ ? " दुःखावेगांत सरस्वतीबाई याप्रमाणें बडबडत होत्या. त्यांनीं रावसाहेबांच्या तोंडाशीं तोंड नेलें व त्या केविलवाण्या स्वरानें म्हणाल्या—" बोला हो, माझ्याशीं दोन शब्द तरी बोला." पण याला उत्तर देण्याच्या इच्छेनेंच कीं काय त्या हाकेसरशीं ते एकदम खाकरले,घशांत कफाचा आवाज झाला, व त्यांनीं एक हृदयद्रावक किंकाळी फोडून प्राण सोडला.

झालें. सगळा ग्रंथ आटोपला. वामनरावांच्या राक्षसी कृत्याला प्रारंभ झाला. पुढील हृदयद्रावक हकीकत लिहिण्याचें आमच्या लेखणींत सामर्थ्य नाहीं. रावसाहेबांच्या क्रियेनंतर सरवस्तीबाईनीं वामनरावांला इस्टेटीविषयीं प्रश्न केला. पण त्यांनीं सांगितलें कीं रावसाहेबांनीं सर्व कांहीं लिहून ठेवलें आहे. नंतर चार चौघे प्रतिष्ठित लोकांसमोर मृत्युपत्राचें वाचन झालें. त्यांत सर्व हकीगत वामनरावांचे फायद्याची होती. पत्नीचे हक्क वामनरावांलाच दिले होते. त्यांच्या मर्जीनें व सल्ल्यानें तिनें इनामदारीचा कारभार पाहावा, असें एक त्यांत कलम होतें. तें वांचून मंडळीला फार आश्चर्य वाटलें व सरस्वतीबाईच्या माहेरच्या माणसांची पक्की खात्री झाली कीं, हें सर्व कारस्थान वामनरावांचें आहे. पण करतात काय ? मनांत चरफडणें, याशिवाय त्यांच्या हातीं आतां काय राहिलें होतें ?

असो. या गोष्टीपासून बराच बोध घेतां येण्यासारखा आहे. एक तर मोठ्या लोकांनीं आपल्याजवळ लोक ठेवावयाचे ते खात्रीचे, सद्वर्तनी आणि सुस्वभावी ठेवावे; आणि इतकें करूनही त्यांच्या सर्वस्वी आधीन न होण्याविषयीं जपावें. न जपल्यास वामनरावांसारखे मानवरूपी राक्षस कोणतेंच दुष्कृत्य करण्यास कचरणार नाहींत. रावसाहेबांसारख्या गृहस्थांनीं आपल्या उतारवयांत लग्न न करण्याची इच्छा बाळगणेंच योग्य आहे. नाहीं तर त्यांनीं अनुभविलेले प्रकार त्यांच्या वांट्याला येण्याचा संभव फार आहे. तसेंच सरस्वीतीबाईसारख्या तरुण स्त्रीच्या जन्माचें मातेरें करणाऱ्या वामनरावांसारख्या दुष्ट मानवराक्षसापासून समाजानें सतत दूर राहण्याचा यत्न केला पाहिजे.

गंगातीरावर—

[नगराज हिमाचलाच्या चरणप्रदेशीं रौप्यशृंखलेप्रमाणें शोभणाऱ्या श्रीगंगेच्या तीरावरील एका रमणीय उद्यानांत एक बाला फुलें तोडीत होती. त्या सुप्रसंगाचें हें अस्पष्ट रूपलेखन आहे.]

[दिंडी.]

अरुणरागें रंगल्या दिशा दाही
हास्य त्यांचें सर्वत्र भरुनि राही
मधुर-मंजुल-खगनादरसस्नात
तरुण लतिका सुमभार वर्षतात. १

भास्करोदय आसन्न पाहुनीयां
पळुनि गेल्या तारका लाजुनीयां
तात येतांच, प्रौढ जशा बाला
गृहीं शिरती आवरुनि मुग्ध लीला ! २

प्रभातानिल मृदु मंद शीत वाहे
तशी काननतरुराजि डोलताहे
विपिनदेवीचे ललित कंठहार
बालनिर्झरही करिति हे विहार ! ३

स्वर्णरसवर्षण करित अंशुमाली
प्रगट झाला हळुहळू उदयशैलीं
दिव्य तेजीं मेदिनी वृक्षवेली
तुंग गिरिमाला पूर्ण बुडुनि गेली ! ४

स्निग्ध गंभीर ध्वान सभोंवार
भरित, गंगा चालली शुभाकार
रत्नमंडित घेउनी उत्तरीय
जणों प्रमदा पतिनिकेतनीं जाय ! ५

मंजु गान प्रगटलें अप्सरांचें
ओघ वळले सुरविपिनसमीराचे
शरज्जोत्स्नारस एथ मूर्त होय
मधुर तारावलि जणों द्रवुनि जाय ! ६

हास्य सखिचें माझिया काय वाहे
रुचिर दिसती मोहाश्रु तिचे वा हे !
काव्यशुचिता मम जणों प्रगट झाली
मोहिनीची मोहिनी द्रवुनि गेली ! ७

विमलतेला विमलता द्यावयाला,
पवित्राला सुपवित्र करायाला,
व्योमधरणीसंयोगसाधना हें
धवल गंगेचें पुण्यसलिल वाहे ! ८

तीरवर्ती नवलता कुंजभागीं
मुग्ध बाला एकली शोभनांगी
मृदु स्वकरें विकसित प्रसूनांतें
तेथ होती तोडीत शांत चित्तें. ९

चारुवदना ती मूर्तिमती गंगा
आसमंतात् पसरिते स्मिततरंगा
तिच्या हास्योत्सवमोदतुषारांहीं
नव्य शोभा पातली स्थिरचरांही ! १०

विकच कुसुमांचा मृदुल रुचिर राशी
दिसे तनु तैशी तिची लोचनासी
दिव्य मार्दव, चारुता, मधुर हास्य
तिच्या देहीं सर्वत्र करित लास्य ! ११

कल्पलतिका ही मनुजरूपधारी
काय पुष्पश्री मूर्त मनोहारी
उषा किंवा जाहली प्रगट एथें
खचित आली तारका भूतलातें ! १२

हृदयलोभन ही काय असे आशा
भावना वा ये भरित सुखविकाशा
मनस्तिमिरध्वंसिनी इंदुकांति
काय अथवा प्रगटली ही प्रभातीं ? १३

हास्य जेथें पावलें हास्यतेला
जाय सौंदर्यहि तसें स्वाभिधेला
ललितललनालंकरण बालिका ती
होति विहरत तट–कुंजवन–प्रांतीं ! १४

दिव्य तेजोरस बाल भास्कराचा
मंद गानध्वनि गांग तरंगांचा
मंजु कूजित पसरिती विहगवृंद
विकच सुमनांचा सुटे मधुसुगंध. १५

केलि–केतन तें दिव्य वैभवाचें
स्थान सुरुचिर आनंदविलासांचें
जननभूमी मृदु मधुर भावनांची
प्रेमशांतीची हृदय विकासाची ! १६

तेथ घनपटलीं इंद्रचापरेखा
नील गगनीं रमणीय इंदुलेखा
प्रिया अथवा मम हृदंतरीं जैशी
अहा विलसे ती रूपमती तैशी ! १७

तिच्या स्पर्शें सुमभार वल्लरींना
तिच्या श्वासें सौरभ प्रसूनांना
किसलयांना मृदुलत्व सन्निधानें
नव्यता ये सर्वांस तत्स्मितानें! १८

रम्य विलसे तो हैमगिरी दूर
पुढें वाहे गंगौघ–शुभ्र–नीर
लताकुंजीं विहरते एथ बाला
गूढ ईशाची अतुल विभ्रममाला ! १९

होय संमेलन रुचिर चारुतेचें
परी विलसे साम्राज्य भिन्नतेचें
भिन्न दृष्टीनें भिन्न भावनेनें
दृष्टि इकडे धावते कौतुकानें ! २०

हैमगिरिला चारुत्व आज आलें
आणि अवचित तें तुच्छ अहो झालें !
दिव्य गंगा भासली लोचनास
गमे हीन क्षणभरें तद्विलास ! २१

पुष्पविकसनही मनोलोभनाला
मंद गंधानिल अबल आज झाला !
निसर्गा दे सौंदर्य अतुल बाला
स्वसौंदर्यें करि हीनकांति त्याला ! २२

हिच्या योगें सुरधुनी रम्य भासे
तुच्छ झाली तल्ललितगतिविलासें !
हिचा हास्योत्सव मधुर विलोकून
फुलें पर्णांतरीं बैसती लपून ! २३

श्यामलांबरिं चमकतां तारकांतें
उषा देवी वेचून जशी घेते
तशी अरुणप्रभ मृदुल करीं बाला
घेद्द तोडुनि उत्फुल्ल कुसुमजाला ! २४

—रेंदाळकर.

हल्लींच्या तरुण पिढीच्या शरीरसंपत्तीच्या ऱ्हासाचीं कारणें व तो थांबविण्याचा उपाय.

[रा. रा. वामन चिंतामण तवकर, बी. ए. बडोदें.]

(मागील अंकावरून समाप्त.)

तालमींचीं सम्मेलनें.

औद्योगिक व शेतकीचें प्रदर्शन भरवून उत्तम नमुन्याच्या पदार्थांना बक्षिसें देऊन जसें त्यांच्या मालकांना उत्तेजन देण्यांत येतें, तसें उत्तम शरीरसंपत्ति असलेल्या मुलांचीं प्रदर्शनें भरवून त्यांना शरीरसामर्थ्याबद्दल पारितोषक देऊन उत्तेजन कां देण्यांत येऊं नये? शेतकऱ्याला आपल्या शेतीची उत्तम प्रकारें मशागत करण्यासाठीं जशीं श्रेष्ठ प्रतीचीं आऊतें व अवजारें लागतात, तशीं, उत्तम नागरिक बनण्यासाठीं शेवटपर्यंत टिकाव धरणारीं शरीरें आज आम्हांस पाहिजे आहेत. राष्ट्रीयसभेबरोबर जसें औद्योगिक प्रदर्शन उघडलें जातें, तसें निरनिराळ्या तालमींचें सम्मेलन भरविण्यांत आलें पाहिजे, व जी तालीम श्रेष्ठ ठरेल तिला बक्षिसें, बिल्ले वगैरे देऊन तालमीच्या धंद्यास ऊर्जितावस्थेप्रत आणून पोंचविलें पाहिजे.

आजकालच्या शिष्यवृत्ति

स्कॉलरशिपा, बक्षिसें व मेडल्स ठेवून मानसिक शिक्षणाला जितकें उत्तेजन दिलें जात आहे, तितकेंच शारीरिक शिक्षणाकडे दुर्लक्ष केलें जात आहे. मॅट्रिक्, प्रीव्हिअस, इंटरमीजिएट, बी. ए., एम्. ए., वगैरे कॉलेजच्या परीक्षांमध्यें नव्या नव्या शिष्यवृत्ति ठेवल्या जाऊन विद्यार्थ्यांचें सर्व लक्ष तिकडे खेंचलें गेलें आहे. या मधाच्या बोटानें एकाच व्यासंगाकडे त्यांची चित्तवृत्ति वेधली, आणि परिणामीं त्यांचा मानसिक शक्तीवरच सर्व भार पडला, व व्यायामाच्या अभावीं शरीरशक्ति क्षीण होऊन, विद्यार्थीदशा संपल्यावर, कांहीं वेळ संसारसुख अनुभविलें नाहीं तोंच ही इहलोकची ते यात्रा संपवितात ! जात्याभिमानानें प्रेरित होऊन ज्ञातींतील संपत्तिवान पुरुषांनीं विश्वविद्यालयांत स्कॉलरशिपा ठेविल्या आहेत. एखादा जगन्नाथ शंकरशेट निघतो तो संस्कृतांत, इंग्रजींत अथवा रसायनशास्त्रांतील विषयांत देणगी देऊन जातो! अशा रीतीनें विद्यार्थ्यांचें मन मानसिक विकासाकडे ज्यास्त ओढलें जातें; पण साधारणपणें सर्व विषयांत उत्तीर्ण होऊन प्रकृतीनें सुदृढ निकोप निरोगी अशा विद्यार्थ्यासाठीं एकही देणगी ठेवली जात नाहीं ! सुशिक्षितवर्गाचें या गोष्टीकडे अजून लक्ष जात नाहीं ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा शरीरसंपत्तीनें श्रेष्ठ असलेल्या विद्यार्थ्याला एकादी दुसरी स्कॉलर्शिप कां नसावी ? अशा रीतीनें उत्तेजन देण्यांत आलें तर उत्तरोत्तर होणाऱ्या शारीरिक संपत्तीच्या ऱ्हासाला बराचसा आळा बसणार नाहीं काय ? हल्लींची स्कॉलर्शिपा

देण्याची पद्धत, विद्यार्थ्यांची शिक्षणाकडे गोडी वाढविणारी नसून केवळ वीस पंचवीस जणांना नादीं लावून त्यांची शरीरावस्था बिघडविण्यास कारण झाली आहे असें कां म्हणूं नये ? आणि या नादामुळें सध्यांची पिढी आयुर्मर्यादेनें कमी झाली हें ह्मणणें गैर आहे काय ? शरीराची हेळसांड करून युनिव्हर्सिटींत बी. ए. एम्. ए. च्या परीक्षांत पहिला नंबर पटकावणारा आमचा युवकगण वयाच्या पन्नासाव्या किंवा चाळिसाव्या वर्षापर्यंत सुद्धां पोहोंचूं शकत नाहीं ! त्यापेक्षां विश्वविद्यालयांतील थर्डक्लास विद्यार्थी-पण शरीरानें उत्तम असा—प्रसंगविशेषीं 'गुद्यास गुद्दा किंवा लाथेस लाथ' मारणारा, सुदृढ पण भक्कम असा बी. ए. आज आम्हांस पाहिजे.

ब्रम्हचर्य विद्यार्थ्यांचें आरोग्य उत्तम राहण्यासाठीं व शरीरांत जोम वाढविण्यासाठीं अत्यंत आवश्यक उपाय म्हटला म्हणजे ब्रम्हचर्य पाळणें हा होय. ब्रह्मचर्य दोन प्रकारचें असतें. शारीरिक व मानसिक. शारीरिक ब्रह्मचर्य मानसिक ब्रम्हचर्याइतकें दुर्घट नाहीं. शारीरिक ब्रम्हचर्य पाळण्याला मनाचा दाब असावा लागतो, व तो तसा असला ह्मणजे तसें ब्रम्हचर्य पाळणें सुलभ जातें. मानसिक ब्रह्मचर्याला सुविचारांचा पगडा अत्यंत अवश्य आहे—स्वप्नस्वप्नांतरीं सुद्धां मनांत कुविचार न येऊं देणें अवश्य आहे. कुविचार उत्पन्न झाले कीं मनावर दाब राहत नाहीं, व मग पापाचरण घडण्याला काय उशीर? कुविचाचारांचा उद्भव झाला कीं लागलींच कुशब्द उगम पावतात, आणि कुशब्द मग कु-गोष्टींना जन्म देतात. तेव्हां मानसिक ब्रम्हचर्याला सुविचारच अत्यंत आवश्यक आहेत. शरीर व मन यांची सांगड अशी घातली गेली आहे कीं, जर एकामध्यें कांहीं गोष्टींचा अभाव असला तर तो दुसऱ्यामध्यें असलाच पाहिजे. चांगलें मन तर चांगलें शरीर; वाईट मन असलें तर शरीरही वाईट असणार; अशक्त, रोगी मनुष्याचे विचारही तितकेच अपरिपक्व व अप्रगल्भ असणार; अशक्त मनुष्य पिरपिऱ्या बनतो व सुविचार त्याच्या डोक्यांत कायमचे टिकत नाहींत. मनुष्य सोळा वर्षांचा झाला ह्मणजे त्याच्या शरीरांत वीर्याचा संचय होऊं लागतो. वयाच्या पंचवीस वर्षांपर्यंत त्यानें अगदीं कडकडीत ब्रम्हचर्य पाळलें पाहिजे- ह्मणजे शरीरानें व मनानें तो ब्रह्मचारी असला पाहिजे. या वयाच्या आंत जर तो आचरणांत घसरला तर तो शेवटपर्यंत असाच घसरत जाणार असें खास समजावें. वाफ जशी जशी जोरानें दाबून धरावी, तसतशीं तिच्यापासून मोठमोठालीं कार्यें होतात. तीच गोष्ट वीर्याची आहे. वीर्याचा जोष आंवरून धरण्याइतकी शक्ति व ताकद असली ह्मणजे त्यापासून महत् प्रयासानें होणारीं कामें मनुष्य सहज घडवून आणतो **विपन्नावस्थेंत असतांना आपदांना न जुमानतां त्या स्थितींतून बाहेर निघण्यासाठीं प्रयत्न करीत राहणें; राष्ट्रकार्यासाठीं जिवावर उदार होऊन अंतिम ध्येय साधण्यासाठीं झुंजत राहणें; देशाभिमानानें प्रेरित होऊन कुटुंब, आप्तेष्ट, सोयरेधायरे या मंडळींच्या प्रेमपाशांत, मायामोहजालांत**

गुरफटून न घेतां त्यांना सोडून परदेशगमन करणें; व तेथें इष्ट गोष्ट साध्य करण्यासाठीं वाटेल त्या हालअपेष्टा सहन करणें; इत्यादि जोरदार शरीराचे आनुषंगिक गुण होत. खऱ्या वीर्याची व तारुण्याची खुमखुम असणाऱ्या पुरुषांच्या हातूनच राष्ट्रीय उलाढाली झाल्या आहेत. खऱ्या वीर्याचा आशय ज्यांच्यामध्यें नितान्तपणें वास करीत असतो, अशा सत्पुरुषांच्या सभोंवार एक अदृश्य, तेजोमय पटल असतें; या प्रभापटलाच्या योगानें महागर्विष्ट तामसी मनोवृत्तीचीं माणसें, अगदीं लीन होतात; कधीं काळीं ओळख नसतांही अशा महात्म्यांना आपण पाहिलें कीं लागलींच आपणांस त्यांच्याजवळ अक्षयीं असावेंसें वाटतें. त्यांचा शद्ब प्रमाण मानून ते सांगतील तें मान्य वाटूं लागतें; अशा सत्पुरुषांनीं आपणांस कांहीं तरी काम सांगावें, त्यायोगें तरी आपण धन्य होऊं, असें आपणांस वाटून आपण अहर्निश तशी खटपट करूं लागतों. श्री रामदास, शिवाजी, नेपोलियन, ज्युलियस सीझर इत्यादि महात्म्यांचीं चरित्रें अवलोकन केल्यानें वरील गोष्ट कशी यथार्थ आहे हें कळून येईल.

अश्लील शब्दोच्चार ब्रह्मचर्यविघातक आहेत.

लहानपणीं मुलांना अश्लील भाषण कधींही करूं देऊं नये, व त्यांच्या कानांवर तसले शब्द कधींही न पडूं देण्याची खबरदारी घ्यावी. हल्लींच्या मन्वतरांत पांच सहा जण एके ठिकाणीं जमले म्हणजे त्यांच्यामध्यें पाचकळपणाची जी सुरुवात होते ती कांहीं पुसूं नका! असले शद्ब व अशी थट्टा मुलांच्या कानीं आली ह्मणजे त्यांच्या मनाची वृत्ति बदलते; व त्यामुळें वीर्य तापून जाऊन तें पातळ होतें आणि मग तें निरनिराळ्या रूपानें बाहेर पडतें. अशा वीर्याचा अकालीं व्यय झाल्यानें शरीरांत रक्ताचा सांठा नाहींसा होत जातो. कोंवळें रोप वरून वरून रोज खुडून टाकलें तर ज्याप्रमाणें त्याची वाढ खुंटते व तें मग जळून जातें; त्याप्रमाणें रक्ताचा सांठा कमी झाल्यामुळें आयुष्याची वाढ खुंटून मनुष्य झडून जातो. सबब मन अत्यंत पवित्र व शुद्ध ठेवणें हें पहिलें कर्तव्यकर्म होय. मन पवित्र ठेवण्याला थट्टा, पाचकळपणा, अश्लील शब्दोच्चार, शृंगारिक पुस्तकें व कामोद्दीपन होईल अशा प्रकारचे पदार्थ यांपासून अगदीं अलिप्त राहिलें पाहिजे. आणि असें मन पवित्र राहिलें ह्मणजे ब्रम्हचर्य चांगलें राहील याबद्दल शंका नको.

गुप्त रोगांवरील औषधांच्या जाहिरातींचा वाढता खप हेंच शरीर संपत्तीच्या ऱ्हासाचें चिन्ह आहे.

कित्येक असा आक्षेप आणतील—" तुह्मी ह्मणतां तसा आमच्या शारीरिक संपत्तीचा ऱ्हास झालेला आम्हास तर बुवा दिसत नाहीं. आमच्यांतले पुष्कळ तरुण विद्यार्थी चांगले धडधाकट मजबूत दिसतात. " या आक्षेपाला एक साधें व सोपें उत्तर आहे. कृष्णशास्त्री विवलकर किंवा पेंडसे शास्त्री, मदनसंजीवनी घृतें तैलें वगैरेचे उत्पादक, अथवा धूतपापेश्वरमंदीरवासी वैद्यराजबुवा, किंवा काठेवाड, जामनगरचे नाजूक गुप्त रोगांवरचे अश्विनीकुमार, इत्यादिकांच्या जाहिराती वर्तमानपत्रांतून व मासिकांतून अद्यून कमी झालेल्या दिसत नाहींत.

उलट दिवसानुदिवस त्यांना लोकाश्रय ज्यास्त ज्यास्त मिळत चालला आहे! कोणतेंही नवीन वर्तमानपत्र अगर मासिकपुस्तक निघो, त्यांच्या संपादकाला पहिला आश्रय यांच्याकडून मिळावयाचा हें ठरलेलें ! यावरून हें स्पष्ट ध्वनित होतें कीं, कामवासनेला ऊत येत असून लोक चैनी, विषयी होत चालले आहेत ! हा शरीरसंपत्तीचा ऱ्हास नव्हे, तर काय ही तिची वृद्धि ह्मणावयाची ?

बाललग्नें. पूर्वी बाललग्नें बरींच प्रचारांत होतीं; आमच्या बापदादांचीं लग्नें दहाव्या किंवा बाराव्या वर्षींच होत होतीं. कित्येकांचें तर दहाव्या वर्षींच दुसरें लग्न लागावयाचें! अशी जरी प्रायः स्थिति होती तरी ते लोक हल्लींच्या प्रजेप्रमाणें बुळे, गैदी, छंदी, फंदी, क्षयी किंवा रोगी नव्हते. त्यांची नीति फार चांगली होती. जरी त्यांचा विवाहविधि लौकरच लहानपणीं व्हावयाचा, तरी तदनंतरचा व्यवहार योग्य वेळीं योग्य समयींच होई. प्रस्तुतकालीं जरी प्रौढविवाह सुरू झाले आहेत तरी विषयसुखावर उडी मात्र लौकर, अपरिपक्वदशेंतच पडत आहे. पुष्कळ चारगट बायका योग्य यौवन प्राप्त होण्याचे पूर्वींच वधुवरांना सुखशयनीं पाठवितात ! त्यामुळें कोंवळ्या, नाजुक वीर्याचा स्त्रीच्या अंगीं अकालीं प्रादुर्भाव झाल्यामुळें, तिच्यापासून होणारी संतति केवढी सुदृढ व सशक्त होणार हें दिसतेंच !

इकडे गुजराथेंत बाललग्नें फारच मातलीं होतीं. गुर्जर लोक आपल्या मुलांमुलींचीं लग्नें त्यांच्या वयाच्या पांचव्या व तिसऱ्या वर्षींच करीत असत. गर्भावस्थेंत असतांना देखील हीं आईबापें आपल्या अर्भकांचे विवाह करावयास चुकत नसत ! हीच चाल मग गुजराथ्यांचे शेजारी ब्राह्मण, प्रभू, मराठे वगैरे लोकांत डोकावूं लागली. तिला आळा बसला नसता तर मात्र हें बालविवाहाचें घोडकें केवढें बेफाम झालें असतें हें सांगतां येणें अशक्य आहे. **श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड, गुर्जराधिपति,** यांनीं याला लगाम घालून वळणावर आणलें ही अत्यंत आनंदाची व समाधानाची गोष्ट आहे. **श्रीमंतांनीं मुलींचीं बारा वर्षांच्या आंत व मुलांचीं वीस वर्षांपूर्वीं लग्नें करण्यांत येऊं नयेत असा ठराव पास केला.** या ठरावामुळें पुष्कळ बाललग्नें कमीं झालीं. कांहीं खप्पी लोकांना हा कायदा पसंत नसला तर त्यांनीं खुशाल गायकवाडी हद्दीच्या बाहेर जाऊन लग्नें करावीं. पण त्यांनीं दोन वर्षें गायकवाडीहद्दींत येऊं नये, असा निर्बंध करून टाकला. बारावें, नव्हे चौदावें किंवा सोळावें वर्ष मुलीच्या लग्नाला मुकरर केलें असतें तरी आमचा फायदाच होता. या कायद्यामुळें श्रीमंत महाराजसाहेब यांनीं आमचें अतिशय मोठें कल्याण केलें आहे.

स्त्रियांचें ब्रह्मचर्य पुरुषांनीं राखलें पाहिजे. हल्लीं मुलींना बाऱ्याव्या वर्षीं व मुलांना सोळाव्या वर्षीं जी तारुण्यावस्था प्राप्त होते तिचें कारण दोघांचा अशक्तपणा. मुलगी निरोगी, सुदृढ व मजबूत बांध्याची असेल तर तिला तिचें योग्य वय होण्याचे पूर्वीं कधींही ऋतु प्राप्त होणार नाहीं. मुलांप्रमाणें मुलींनींही ब्रह्मचर्य पाळणें अत्यंत जरुरीचें आहे. लग्न झाल्यावर निदान एक वर्षभर तरी स्त्रीपुरुषांनीं

संसारसुखापासून अलिप्त राहावें. सध्यां ज्याअर्थीं प्रौढविवाहाची पद्धत सुरू झाली आहे त्याअर्थीं ही एक वर्षाची मर्यादा कमी होणार नाहीं. तीन चार वर्षें तशींच काढलीं तर फारच उत्तम. परंतु हपापलेल्या तरुणांना ही मर्यादा फार असह्य होईल हें जाणून, त्यांना एक वर्ष काढणें जड जाणार नाहीं असें वाटल्यानें तेवढी मर्यादा सुचविली आहे. स्त्री मातृपदाला तिच्या विसाव्या वर्षीं योग्य होते. अशा स्त्रीपासून होणारी प्रजा चांगलीच निपजणार यांत संदेह नाहीं. तिची प्रकृति शेवटपर्यंत निकोप राहून, तिचीं मुलें सशक्त होऊन पुढें तीं लोमाकन्यतेस पात्र होतात. बाराव्या किंवा तेराव्या वर्षींच प्रसवणारी स्त्री पुढें केव्हांही निरोगी व सशक्त राहत नाहीं; व तिची प्रजा तिच्याचसारखी निपजते. हा तिचा अपराध आहे काय ? याचा पुरुषांनींच विचार केला पाहिजे. एका प्रसिद्ध अमेरिकन डॉक्टरानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं " A woman is naturally pure and innocent but man corrupts her." स्त्री जात्याच गरीब, शुद्ध आणि पवित्र अंतःकरणाची असते; तिच्या मनांत कामवासना केव्हांही पुरुषाइतकी बळावलेली नसते; परंतु पुरुष तिला बिघडावतो. तिचें मन उच्छृंखल करण्याला तोच कारण होतो.

शिक्षणाच्या पायीं जितका पैका खर्च होतो, त्याचा $\frac{1}{16}$ भाग सुद्धां शरीराच्या जोपासनेस खर्चला जात नाहीं!

आईबापांचे मुलांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ जितके पैसे खर्च होतात, तितक्या खर्चाच्या मानानें रुपयास अर्धा आण्याप्रमाणें सुद्धां त्यांच्या खाण्यापिण्याला खर्च होत नाहीं. शाळेंतील खर्च पुरा करतां करतां नाकीं नऊ येतात, तर त्यांच्या खाण्यापिण्याबद्दल जास्त पैका कोठून आणावा, हाही एक प्रश्न आहे. परंतु मनांत आणलें तर या दोन्ही खर्चाच्या बाबती पुऱ्या पाडतां येतील. शाळेची फी दिढी—दुपटीनें वाढली तर जशी ती कसेंही करून पुरी करितां येते, तसेंच, मुलांच्या शरीराची काळजी घेऊन अगदीं थोडे पैसे जरी त्यांच्या खानपानासाठीं वापरले तरी ते पुरे होऊन त्यांची शरीरसंपत्ति वाढते, व त्यांचें भविष्य सुधरतें. मुलांच्या व्यायामाची काळजी घेऊन जर तो त्यांच्याकडून अगदीं नियमित करून घेतला तर त्यांचें शरीर वाढण्यास कांहींच व्यत्यय येणार नाहीं. व्यायाम केल्याबरोबर त्याला नुसतें अर्धा शेर दूध पिणें बस्स आहे. साधारण स्थितींतल्या मनुष्याला एवढा खर्च अवघड जाणार नाहीं असें वाटतें. अगदींच गरीब स्थितींतल्या मनुष्यांना हा खर्च सोसण्याची ऐपत नसेल; पण त्यांची जाडीभरडी भाकर व झुणका त्यांना पुष्कळ उपयोगीं पडेल. मात्र त्यांनीं आपल्या मुलांकरवीं नियमित आहार व व्यायाम करून घेतला पाहिजे. आपण जेवढें खातों तेवढें पचन झालें म्हणजे पुरे. जाडीभरडी भाकर चांगली पचन झाली कीं तिचा परिणाम शरीरावर हटकून झालाच म्हणून समजावें. सुग्रास अन्न पचन झालें नाहीं तर त्या खाण्याचा कांहीं उपयोग नसून उलट तसलें अन्न मारक होतें. व्यायाम करावयाचा म्हटलें तर त्याला रांजणभर दूध व परातभर जिलब्या पाहिजेत, हें म्हणणें केवळ हास्यास्पद आहे. तेव्हां मुलांच्या शिक्षणाच्या वाढत्या खर्चाबरोबर त्यांच्या खानपानाची व्यवस्था करणें कधींही जड जाणार

नाहीं; तशी विचारपूस प्रत्येक आईबापानें अवश्यमेव केली पाहिजे.

आहार.

दुधासारखें पौष्टिक अन्न दुसरें कोणतेंही नाहीं. अन्नामध्यें गहूं, डाळ (उडदांची असल्यास उत्तम), तूप, दूध, तांदुळ, मीठ हे पदार्थ सेवनास चांगले पाचक असून शरीरास चांगली पुष्टी आणणारे आहेत. कोणी कोणी मांसाहाराचें सेवन करितात. व्यायाम झाल्याबरोबर निदान तीन चार चमचे दूध पिऊन मग जेवण जेवावें. लगाबगा येऊन, चावल्यावांचून बकाबक खाणें, व उभ्यानेंच घटाघट दूध पिणें हें तर अगदीं वर्ज्य करावें. तसेंच तेलकट, तिखट व मसाल्याच्या पदार्थांचा आहार सहसा केव्हांही करूं नये. हे पदार्थ उत्तेजक असल्यामुळें शरीरावर त्यांचा परिणाम फार घातुक होतो. साधा पण नियमित खुराक शरीरास चांगला हितावह आहे. ज्यांना सामर्थ्य आहे त्यांनीं आपल्या मुलांना इतर आहार देण्यापेक्षां दूधच द्यावें. त्यांनीं चांगली दुभती गाय पाळावी; तिला सरक्यांचें बाफणें खाऊं घालावें; तिला गांवांत कोठेंही अभक्ष्य भक्ष्य भक्षण करण्यास जाऊं देऊं नये. तिची तरतूद ठेवणारा माणूस तिची काळजी घेणारा असावा. अशा गाईचें धारोष्ण दूध शरीरास फारच माफक येऊन तें तजेलदार बनतें. धारोष्णासारखें पौष्टिक अन्न मिळालें ह्मणजे इतर पौष्टिक अन्नांची कांहींच जरूरी नाहीं. ह्मशीच्या दुधानें पोटांत वायु धरतो, तसें गाईचें नाहीं. तें पचविण्यास फार सोपें असतें. धारोष्ण मिळण्याची सोय होत नसल्यास, दूध चांगलें गाळून घेऊन तें नुसत्या अंगाऱ्यावर तापवावें. चांगलें तापून तयार झालें ह्मणजे प्यावें. पावसाळ्यांत हिरवा चारा खाऊन निघालेलें गाईचें दूध पचण्यास फार जड जातें. अशा दिवसांत दूध तापवितांना त्यांत दोन मिऱ्यें, थोडी सुंठ, दालचिनी, एक पिंपळी घालावी, व चांगलें उकळावें. ह्मणजे त्या सुंठमिऱ्यांच्या स्वाभाविक उष्णतेनें आपल्या पचनशक्तीस मदत होऊन तें अपाय करीत नाहीं.

शरीर पोषण होऊन अंगांत चापल्य व चलाखी येईल असा व्यायाम पाहिजे.

व्यायामाचे पुष्कळ प्रकार आहेत. परंतु ज्यायोगें शरीरपोषण होऊन अंगांत चापल्य व चलाखी येईल असा व्यायाम पाहिजे. नुसता गलेलठ्ठपणा काय उपयोगाचा? मुरमुऱ्याच्या थैल्याप्रमाणें गुबगुबीत शरीर बनवितां येईल, पण त्यापासून कांहींही फायदा नाहीं. उलटपक्षीं बोजडपणामुळें शरीर ताब्यांत न राहून समतोलपणा अगदीं ठेवतां येत नाहीं. पुष्कळ संस्थानिकांच्या पदरीं दोन रुपये, चार रुपये रोज रोजमुरा खाऊन असलेले पेहलवान आहेत; तसेंच या बडोद्यांतही आहेत. अलबत्ता ते ज्यास्त शक्तिवान असतात. ती त्यांची शक्ति साठमाऱ्या, किंवा सरकारी कुस्त्यांचें दंगल झालें म्हणजे तेथें दृष्टीस पडते. युक्तीवांचून नुसत्या शक्तीचा कांहीं उपयोग नाहीं. पूर्वींच्या इतिहासावरून पाहतां, असे पेहलवान मल्ल जवळ बाळगण्याचें कारण हेंच होतें कीं, प्रसंगविशेषीं त्या संस्थानिकांवर जिवावरचा प्रसंग आल्यास त्या मल्लांचा उपयोग होत असे. पण

त्यावेळीं ते मल्ल शक्ति व युक्ति या दोहोंनीं श्रेष्ठ असत. पूर्वीचे उस्ताद वेळ आली असतां हथियारबंद लोकांची फळी फोडून जाण्यास समर्थ होते; शस्त्ररहित असून ते शस्त्रानें सज्ज असलेल्या प्रतिस्पर्ध्याबरोबर लढून त्यांना चीत करीत. आजचे पेहलवान केवळ लठ्ठपणांत श्रेष्ठ होत चालले आहेत ! पहिल्यासारखे उस्ताद लोक आतां सांपडणें दुर्मिळ. पण आम्हां बडोदेकरांच्या थोड्याशा पुण्याईमुळे तसल्या श्रेष्ठप्रतीचे एक दोन उस्ताद आज बडोद्यांत हयात आहेत.काळाच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें व लोकांनाही आतां तेवढी त्यांची किंमत नसल्यामुळें ते हल्लीं विपन्नावस्थेंत पडले आहेत ! नुसते रोजमुरे खाऊन धष्टपुष्ट होणाऱ्या मल्लांपेक्षां असल्या उस्ताद लोकांची विशेष जरूरी आहे असें आह्मांस वाटतें. शरीरसंरक्षण करतां येईल अशा या व्यायामापासून शरीर तयार होऊन, संकटसमयीं जीवावरचे प्रसंग पार पाडतां येतात.

श्रीमंत महाराज साहेबांनीं प्रोबेशनर व मामलेदार दर्जाच्या आफिसरांस घोड्यावर बसण्याचा व्यायाम करण्यास पाडलेली फरज.

आमच्या महाराजसाहेबांनीं वहिवाटदार होऊं पाहणाऱ्या प्रोबेशनरांना व वहिवाटदार लोकांना घोड्यावर बसण्यास शिकण्याची फरज पाडली आहे. फार करून ग्राज्युएट मंडळी या जागेवर नेमण्यांत येत असतात. तेव्हां विश्वविद्यालयांतून ताऊनलासुन निघाल्यामुळें दुर्बळ झालेलीं त्यांचीं शरीरें पुनः सतेज करण्यासाठीं महाराजसाहेब यांनीं ही युक्ति काढली आहे असें दिसतें. घोड्यावर फेरफटका करीत राहिल्यामुळें रोज नियमित वेळीं त्यांना व्यायाम होऊं लागला. या स्तुत्य कृत्याबद्दल महाराजांचे जितके गुणानुवाद गावे तितके थोडेच होणार आहेत. या मंडळींना एखाद्यानें यदा कदाचित् शारीरिक व्यायाम घेण्यास सांगितलें असतें, तर तें यांना केव्हांही रुचलें नसतें. उलट त्यालाच यांनीं बोलबोलून निरुत्तर केलें असतें. जशी वरच्या दर्जाच्या लोकांना फरज पाडण्यांत आली आहे तशीच विद्यार्थीवर्गाला—उच्च प्रतीचें शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना—असा शारीरिक व्यायाम करण्याची फरज पाडण्यांत आली पाहिजे; त्यामुळें पुष्कळ निरोगी, ताकदवान शूर व हिंमतवान् विद्यार्थी निपजतील. दरमहिन्याला सगळ्या विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी सरकारी डॉक्टराकडून घेण्यांत यावी. तपासणींत ज्या विद्यार्थ्यांना कांहीं रोग असलेले कळण्यांत येईल, त्यांना सरकारी दवाखान्यांतून औषध देण्याची व्यवस्था व्हावी, व रोग जर संसर्गजन्य असतील तर त्या विद्यार्थ्यांना शाळेंत जाऊं देऊं नये; रोग बरे झाले म्हणजेच त्यांस शाळेंत येण्याची परवानगी द्यावी. कांहीं विद्यार्थ्यांना क्षयाची भावना आढळून आल्यास त्यांना तर शाळा साफ बंद करण्यांत यावी. अशा प्रकारचा बंदोबस्त जर महाराजसाहेबांकडून झाला तर खात्रीनें चार पांच वर्षांतच विद्यार्थ्यांची शरीरसंपत्ति सुधरून पुढें ते चांगले नागरिक बनतील.

शाळेंतील शिक्षणक्रमाबरोबर मुलांना मिलीटरी शिक्षण देण्यांत यावें. लष्करी शिक्षण आह्मांस मिळत नसल्यामुळें साहजिकपणें त्या

विषयाची गोडी आम्हांस लागत नाहीं. अस्तित्वांत असलेल्या तालीमशाळांतूनही तसें शिक्षण देण्यांत आल्यास विद्यार्थ्यांचा बराच मोठा फायदा होणार आहे. या शिक्षणानें एक मोठा फायदा हा होतो कीं विद्यार्थ्यांना एकजुटीनें काम करण्याची संवय लागते, व व्यायाम करणें एकलकोंडेवाणें वाटत नाहीं.

व्यायाम शाळांतून थोर पुरुषांचीं चित्रें असावींत.

व्यायामशाळांतून मोठमोठ्या नामांकित पुरुषांचे फोटो असावेत; पूर्वींच्या लोकांचे पुतळे असावेत; ग्रीक, रोमन योद्ध्यांचीं चित्रें असावींत; राम, रावण, भीम, जरासंध, कीचक, मारुति वगैरे बलवान् पुरुषांच्या तसबिरा असाव्यात. यावरून आपणास आपले पूर्वज कसे होते याची कल्पना येईल. श्रीमारुतिरायांची स्थापना बहुतेक कसरतशाळांतून असते, याचें कारण तरी हेंच कीं, शक्तिदेवीचा प्रसाद आपणावर व्हावा व निरंतर आपणास तिचें स्मरण व्हावें.

बडोद्यांतील तालमी.

या बडोद्यांत तालमीचे सतरा अठरा आखाडे आहेत. त्यांत सर्व कसरतींत पारंगत असलेले असे एक किंवा दोनच आखाडे सांपडतील. आजपर्यंत जीं जीं गुणी मनुष्यें होऊन गेलीं, तीं तीं या बडोद्यांत आल्याशिवाय राहिलीं नाहींत. कै. श्री. खंडेराव महाराज यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांतून—उत्तर हिंदुस्थानांतून—कसरतींमध्यें पूर्णपणें वाकब असलेले उस्ताद येथें येऊन गेले, त्यांचे वंशज कांहीं येथें हल्लीं आहेत. अशा गुणी, चतुर उस्तादांना बोलावून त्यांच्या देखरेखीखालीं महाराजांनीं या शहरांत तालमीचे निदान चार तरी आखाडे स्थापन केले तर लोकांना व्यायामाची गोडी लागून, त्यांची शरीरसंपत्ति उत्तम रीतीनें सुधरेल, व पुढची पिढी चांगली दिव्य, तेजःपुंज व बलवान् निघेल.

शेवटीं

शेवटीं, ज्याप्रमाणें सर्व प्रकारच्या धंद्यांस, उद्योगांस उत्तेजन देऊन ते ते धंदे, उद्योग, महाराजांनीं उर्जितावस्थेस आणले आहेत, त्याचप्रमाणें त्यांनीं आम्हांस—विद्यार्थीवर्गास—व्यायामाची गोडी लागण्यासाठीं अशा प्रकारच्या तालमींना उत्तेजन द्यावें, अशी प्रार्थना करितों.

महाराष्ट्र कविवर्य.



जन्म २१ जानेवारी १८५७] गंगाधर रामचंद्र मोगरे. [मृत्यु ११ मार्च १९१५.

यंदाचा हिंवाळा !

हिमर्तु न असा कधीं भरतभूमिला जाचला
कधीं न सुमनांसि तो निज करीं असा झोंबला ॥
तयें प्रळय मांडिला गमनकालिं या वत्सरीं
जणों भरतभून्नती न खपली तदीयान्तरीं. ॥ १ ॥

तयें प्रथम शोषिलें मधुर गोखले—पाटला
सुगन्धयुत ज्याचिया विबुध वानिती वाग्दला ॥
यशःपरिमलें जयें दशदिगन्तही व्यापिले
हिमर्तु-कर त्याचिया प्रथम काळिजा टोंचले. ॥ २ ॥

सुकोनि जंव पाटला न दिन वीसही लोटले
हिमें तंव दुज्या सुमीं स्वकर तीक्ष्ण ते रोविले ॥
सुवासिक सुकोमल स्फटिक-गौर जो मोगरा
विदग्ध मरहट्टवागुपवनांत जो साजरा. ॥ ३ ॥

यदीय कुसुमें नवीं उमलतां क्षणीं झेलिलीं
सहर्ष जनिं हुंगिलीं निजशिरावरी ठेविलीं ॥
सुवास न ढळे जरी दिसति आज कोमेजलीं
मनोहर "फुलें" अशीं ऋतुऋतूंत ज्यानें दिलीं. ॥ ४ ॥

असा मधुर मोगरा जणुं रसाळतेचा झरा
विनम्र अति लाजरा भजक शारदेचा खरा ।
जसा मणिगणीं हिरा, कविकुलीं तसा मोहरा
हिमा ! निवटुनी तुवां दुखविलें अह्मां पामरां ! ॥ ५ ॥

प्रसिद्ध बुध गोखले भरतमेदिनीसेवक
तसाच कवि मोगरे प्रथित शारदाराधक ॥
मनोज्ञ नव वाक्-सुमें बहु ज़यें जनांतें दिलीं
तथा निवटुनी हिमा ! स्थिर अकीर्ति त्वां जोडिली! ॥६॥

हिमा ! न महिमा तुझा उपवनें अशीं नाशितां
अमोघ सुखसाधनें अमुचिं यापरी हारितां ।
रडे भरतभू जशी रुचिर पाटळा शोषितां
तशीच मरहट्ट—वाक् मृदुल मोगरा नाडितां. ॥ ७ ॥

गणेश जनार्दन आगाशे.

प. वा. नामदार गोखले.

(श्लोक.)

एकाएकीं अहह ! घडला आर्यभूकार्यघात ।
विद्युद्वार्ता जनपदिं गमे घोर विद्युत्प्रपात ॥
झंझावातें तरु उपडिजे मोठमोठेहि जेंवी ।
या वार्तेनें हृदिं खचविले धैर्यशालीहि तेंवी. ॥ १ ॥
गेला सोडुनि हिंदसेवक जगा ईशाचिया सेवनीं ।
गेला नायक कर्मवीर, करुनी कीर्ती जगत्पावनी ॥
मुत्सद्दी, बहु धोरणी, बुधमणी, खंबीर जो वाग्मणी ।
झाला वास्तव राजमान्यहि तसा तो लोकमान्याग्रणी. ॥ २ ॥
राजांलाहि अलभ्य होय असला सन्मान ज्याला मिळे ।
सारें विश्व लहान थोर रडलें ज्याच्या वियोगामुळें ॥
सादिर्यां शततारकाहि रडल्या वर्षामिषें अंबरीं ।
तारा काय तदंजनाश्रुलिखिता ह्या वृत्तपत्रांतरीं. ॥ ३ ॥
गेला सारथि राजकीय रणिंचा गोपाळकृष्णापरी ।
हीना पांडुसुतापरी स्थिति घडे अस्मज्जनांची परी ॥
दादा तो अजि धर्मराजसम कीं अत्यंत खेदा वरी ।
सारे तेहि रथी तसे अतिरथी दुःखांत सर्वोपरी. ॥ ४ ॥
जाशी संतत आंग्लभूमिस, तसा त्या आफ्रिकेला जवें ।
संमानी तुज राजपक्ष बहु तो त्या लोकपक्षासवें ॥
कल्याणार्थ जनांचिया कथिशि तूं राजाप्रती वैखरी ।
शिष्टाई बहु शोभली तव तदा गोपाळकृष्णापरी. ॥ ५ ॥
होती स्पष्ट गिरा, तरी मधुरता नाहीं कमी जाहली ।
सावेशा तरि नम्रतेस्तव कधीं कोणा न ती बोंचली ॥
हाणी, कुंठित शत्रुला करि तरी, त्या कोप नाणी मुळीं ।
वाणी दिव्य तुझी सुधाच गमते क्षोणीतलीं लाभली. ॥ ६ ॥
होसी नाजुक फार तूं प्रकृतिनें, तेणें स्वकार्यें पुरीं–।
केल्यावांचुनिया मधेंच गमतें जासी सुरांचे पुरीं—॥
घ्याया औषध ! गांठुनी लवकरी ते देव धन्वंतरी ।
कार्यें संपाविण्या पुनर्जनन घे, ये कर्मभूमीवरी ! ॥ ७ ॥
प्रभूप्रती भजावया, गुरूप्रती नमावया ।
द्युलोकिं जाशि काय तूं तदीय मंत्र घ्यावया ? ॥
तिथें परी न राहिं फार, शीघ्र जन्म घे पुन्हा ।
न देशकार्य साधणें खरोखरी तुझ्याविना ! ॥ ८ ॥
सद्गुरूपरी सुशिष्य हा असे खरोखरी ।
जो करोनि देशकार्य थोर पुण्य आचरी ॥

१. ता. १९।२।१५ शततारकाकें: २. शततारकांच्या सांजन अश्रूंनीं लिहिलेल्या तारा (telegrams). ३. दादाभाई नौरोजी.

फार काय, जिंकि हा गुरूसही कृतीमुळें ।
विस्मृती तदीय पाडि जो महद्यशोबळें. ॥ ९ ॥
आंग्लभूमिमाजिं साक्ष दुःखितांकडून दे ।
श्रोतृसंघ चित्रतुल्य होय, हा यदा वदे ॥
जो इथेंहि कौंसिलांत गर्जुनी घनापरी ।
वावदूक मिष्टभाषि कर्झना उगा करी. ॥ १० ॥
अचेतन स्वदेश हा ह्मणोनि त्यांत जो सुधी ।
खपे सदैव घालितां अमूल्य जीवनौषधी ॥
स्वदेशराजकारणीं श्रमे न जो अणूपरी ।
जपोनियां विरोध जो नृप-प्रजा-हिता करी. ॥ ११ ॥
पडे दुरुक्ति वीज ती घडे कुशब्द वृष्टि कीं ।
न मेरुसा ढळे परी त्यजोनि जो क्षमा निकी ॥
* नमेरुतुल्य जो करी निजाश्रितांस सावली ।
भजोनि त्यास विश्वधी ह्मणून हर्ष पावली ॥ १२ ॥

विश्वीं ताण्या दिव्य सन्मान झाला । कार्यें याचीं मान्य झालीं जगाला ।
तेणें वाटे फार आशेस जागा । कित्ता ठेवा देशकार्यास लागा ! ॥ १३ ॥

(आर्या.)

सुख-मान-पराङ्मुख जो, ज्याची कर्तव्यरुचि अलौकिक ती ।
गुणरत्नकरंडक जो, ज्याच्यापासून वृद्धही शिकती. ॥ १४ ॥
तो हा भारतसेवक-समिति-जनक जाय जरि परत्रातें ।
तरि तद्यश इह भरलें सर्वत्र असेंचि बहुतर त्रातें. ॥ १५ ॥
थोर स्मारक याचें करा !'करा पूर्ण तूर्ण तत्कार्य ! ।
फेडा ऋण याचें अजि, व्हा याच्या तुल्य विश्व-सत्कार्य ! ॥ १६ ॥

प. वा. कविवर्य मोगरे.

(श्लोक)

गेला ! गेला ! अहह ! 'विविधज्ञानविस्तार'–भूषा ।
गेला ! गेला ! सुकुनि सुरभी वेल हा मोगऱ्याचा ॥
खुंटे आशा अजिं नवनव्या दिव्य पुष्पोद्भवाची ।
हा ! हा ! आतां परिमलकथा जाहली नष्ट साची ! ॥ १ ॥
आह्मां शोकांतुनि नच मिळे अल्पही जों विसावा ।
मागोमाग त्वरित दिन तों पातला हा विसावा ॥
गातां गातां करुणरस तो वीट आला कवीला ।
स्वर्गीं जाई द्रुत अजि मिळे मोगरे गोखल्यांला ! ॥ २ ॥
गेला तो शततारकांजवळ जैं निस्तेज दुःखी रवी ।
बैसोनी शशि अश्विनीवर तदा वार्ता जगा सूचवी ॥
शोकें संपवुनी अशौच पडला शय्येवरी तैं कवी ।
स्वर्गीं जाउनि शोक टाकुनि रमे गोपालकृष्णोत्सवीं ! ॥ ३ ॥

---

* नमेरु=छायातरु. १. कै. गोखल्यांनंतर मोगरे विसाव्या दिवशीं वारले.

भाषासेवक हा त्यजोनि जग हें, ईशाचिया चिंतनीं—
गेला नायक वीर सर्व कविंचा कीर्तीस विस्तारुनी ॥
होता जो बहु धोरणी, बुधमणी, कीं युक्तिवादाग्रणी ।
इंदूरादिनृपां, जनांसहि तसा जो मान्य झाला क्षणीं ! ॥ ४ ॥
ग्रीष्मीं भेटुनियां तुला, तुजसवें साहित्यसंमेलना—
प्रेमें पाहिन फार फार हृदयीं आल्या अशा कल्पना ॥
आतां रम्य तुझ्याविणें न मजला वाटेल मुंबापुरी ।
त्वत्संभाषणसौख्यलाभ मिळणें नाहीं पुन्हा यावरी ! ॥ ५ ॥
गेला ! प्रेमळ युक्तिवाद तुझिया संगेंचि गेला ! अतां ।
गेला रम्य विनोद तो तव दिवीं ! गेली तशी शुद्धता ! ॥
गेली ! मोहक जादु ती सरलता गेली ! कृतीची सवें ।
ती भाषाप्रभुता अलौकिक तुझी पाहूं कुठें सत्कवे ! ॥ ६ ॥
'आनंदी'–वरचे विचार अजुनी आनंद देती अती ।
'कन्यादान' हि घ्यावया रसिक ते सोल्हास कीं धांवती ॥
कोणा सुज्ञ 'सती' मतीस न पटे तो बोध तूझा क्षणीं ?
कोणाला न 'विलाप' ते रडवुनी आनंदविती मनीं ? ॥ ७ ॥
एके काळिंच उद्भवे तव मनीं वागर्थरूपी जुळें ।
साध्याही विषयास ये रुचिरता त्वत्काव्यशैलीमुळें ॥
त्वत्प्रौढाशय रम्य सर्व झळके काव्यीं प्रसादोज्ज्वलीं ।
अंगें सूक्ष्म पटीं, नदीहृदय वा जेंवी प्रसन्नीं जलीं ! ॥ ८ ॥
काव्यीं ते रिपनादि पूज्य पुजिले प्रेमादरानें जसे ।
फासेटादिक गाइले बहु जगत्कल्याणकर्ते तसे ॥
गांधींचा गुरु, थोर शिष्य आजि त्या श्री माधवाचा तसा ॥
मेथाचा प्रिय भक्त, शूर तिलकस्पर्धी त्वजीसी कसा ? ॥ ९ ॥
होसी नाजुक फार तूं प्रकृतिनें, तेणें स्वकार्यें पुरीं—
केल्यावांचुनियां मधेंच गमतें जासी सुरांचे पुरीं—।
घ्याया औषध! गांठुनी लवकरी ते देव–धन्वंतरी
कार्यें संपविण्या पुन्हा त्वरित ये या दिव्य मन्वंतरीं ! ॥ १० ॥

उपसंहार.

अविरत अशी एकें केली सदा रति भारतीं ।
अनुपम दुजा दावी लोकीं शुचि प्रतिभा-रती ॥
भरतधरणी–सेवा दोघे अशी करितां, पहा ।
प्रभु क्षणिं तयां स्वर्गीं नेई, जनां परि ताप हा ! ॥ १ ॥
एक 'ध्येय' धरी 'स्वराज्य' नितरां उद्योग ते स्वीकरी ।
दूजा 'ध्येय' धरोनियां 'सुकविता' साहित्यवृद्धी करी ॥
गीर्वाणी-कवि बोलला–'सुकविता यद्यस्ति राज्येन किं' ।
ध्येयें वाटति आर्यभूनरवरां दोन्हीहि आवश्यकीं ॥२॥

के. वि. फणसे.

प्रतिष्ठान ह्मणजे पैठण कीं काबूल ?

[टीकेस उत्तर.]

दिसेंबर १९१४ च्या वि. ज्ञा. विस्ताराच्या अंकांत, प्रतिष्ठान म्हणजे पैठण कीं काबूल ?— अशी जी शंका मीं वाचकांपुढें मांडली होती व प्रतिष्ठान हें पैठणच मानण्यास सबळ पुरावा असेल तर तो मांडण्याविषयीं त्यांस सविनय प्रार्थना केली होती, तिला उत्तर देतांना रा. ' भारद्वाज ' यांनीं प्रथमतःच मला ' आंधळेपणा'चा अहेर केला आहे. पण मी आंधळा असतों तर पैठणाला प्रतिष्ठान ह्मणण्यास कांहीं आधार आहे कीं काय हें शोधण्याच्या भानगडींत न पडतां, ' पीछेसे आई, आगे चली '—चा मार्ग स्वीकारला नसता काय ? ज्याअर्थीं आंधळेपणा माझे ठायीं नाहीं, त्याअर्थीं रा. भारद्वाजांचा अहेर आभारपूर्वक त्यांचा त्यांना मला परत करावा लागत आहे, याबद्दल त्यांनीं मला क्षमा करावी. या वादासंबंधानें लिहितांना 'इंदुप्रकाश ' कर्त्यांनीं स्वतः खंडनमंडनपर कांहीं पुरावा पुढें न आणितां ' मला बाई तिकडचंच ह्मणणं खरं दिसतं ' असा बाईलपणा दाखविला आहे. असल्या शुष्क अभिप्रायाकडे लक्ष देण्यांत कालक्षेप न करितां मी आतां रा. भारद्वाजांच्या टीकेकडे वळतों.

माझ्या मूळ लेखांत दोन मुद्दे होतेः—१, पैठणाला प्रतिष्ठान ह्मणण्यास कांहीं पुरावा आहे कीं नाहीं ? व २, काबुलला प्रतिष्ठान हें नांव होतें कीं नाहीं ? ' पठाण ' शब्दाची मी दिलेली व्युत्पत्ति दुसऱ्या मुद्दयाच्या विवेचनाला केवळ आनुषंगिक ह्मणून दिली होती. आतां माझ्या या दोन मुद्दयांचें खंडन रा. भारद्वाज यांच्या टीकेनें कसें काय होतें तें पाहूं.

रा. भारद्वाज ह्मणतात कीं, (१) 'सुत्तनिपात' ग्रंथांत प्रतिष्ठानाचा उल्लेख आहे; व (२) अशोकाच्या शिलाशासनांत पेटनिक आणि राष्ट्रिक या दोन लोकांचा आणि एका शिलालेखांत पेटनिक व आंध्र लोकांचा उल्लेख आहे. त्यावरून प्रतिष्ठान ह्मणजे पैठण हें सिद्ध होतें. माझ्या बुद्धीला हें खरोखर अगम्य आहे. रा. भारद्वाजांनीं दिलेल्या प्रमाणांत असें काय आहे, कीं त्यावरून **पैठण** हेंच प्रतिष्ठान ठरवितां येईल ? पहिल्या विधानावरून एवढें ठरतें कीं, प्रतिष्ठान हें प्राचीन नगर होतें. पण या नगराचा पैठणाशीं संबंध लावावयाचा तो दुसऱ्या विधानांतल्या पेटनिक या शब्दावरून कसा लावतां येईल ? पेटनिक हे लोक पैठणचे मानण्यास काय पुरावा आहे ? जरी पुरावा आहे हें गृहीत धरलें तरी प्रतिष्ठानाशीं त्यांचा संबंध कशावरून जोडावयाचा ? दोन निरनिराळ्या जागीं दोन निरनिराळ्या शब्दांचा उल्लेख आला एवढ्यावरूनच कीं काय ?

दक्षिणेंतील पैठणास प्रतिष्ठान अशी संज्ञा होती हें दाखविण्यासाठीं ब्रह्मांडपुराणांतला रा. भारद्वाज यांनीं जो उतारा दिला आहे,

त्यावरून प्रतिष्ठान नगरींत सूर्योपासक लोक राहत होते एवढें काय तें ठरतें. पण प्रतिष्ठान एवढेंच एक सूर्योपासकांचें स्थान त्या काळीं होतें काय? आणि असलें तरी त्यावरून प्रतिष्ठान ह्मणजे पैठण ही गोष्ट कशी सिद्ध होते? पैठणाची सूर्योपासनेबद्दलची प्रसिद्धि असलेली मला तरी ठाऊक नाहीं. रा. भारद्वाज चांगले डोळस आहेत. त्यांना कोठें दिसली असली तर त्यांनीं ती दाखवावी. यापुढें भगवान् बुद्धाचे दोन शिष्य पुण्ण व बावरी हे दक्षिणेंत असल्याचें सांगून पुण्णाचें घरदार सोपारा येथें व बावरीचें गोदातीरीं होतें, **कदाचित्** बावरी प्रतिष्ठान शहरींच **असावा**, असेंही रा. भारद्वाज ह्मणतात. पण या गोष्टीचा संबंध वादग्रस्त मुद्द्याशीं कितीसा येतो? आणि **कदाचित्** व **असावा** यांवरून प्रतिष्ठान हेंच पैठण **असलें पाहिजे** याची सिद्धि कशी होते हें रा. भारद्वाज यांसच ठाऊक!

यापुढें 'कालांतरानें प्रतिष्ठान हा शब्द सामान्य नगराचा वाचक झाला' ही गोष्ट रा. भारद्वाज स्वतः कबूल करतात; पण त्या नांवाचें पेटंट पैठणाकडेच ठेवण्याचा व काबूल वगैरे इतर कित्येक शहरांना तें अभिधान न लावूं देण्याचा दुराग्रहही तेच धरतात याला काय ह्मणावें तें कळत नाहीं. प्रतिष्ठान ही संज्ञा पैठणाला नव्हती किंवा काबुलालाच होती असें ठरावें, असा माझा बिलकुल आग्रह नाहीं. केवळ सत्यशोधनाच्याच दृष्टीनें मीं हा वाद उपस्थित केला आहे, आणि या वादाचा निर्णय अभिनिवेशानें नव्हे तर केवळ सत्यान्वेषणबुद्धीनें व तर्कशास्त्राच्याच पद्धतीनें ठरला पाहिजे असें माझें मत आहे. रा. भारद्वाज यांच्या तर्कपद्धतींतलीं जीं व्यंगें वर दाखविलीं आहेत व त्यांनीं जी भाषा वापरली आहे, तिजवरून त्यांचे ठायीं सत्यान्वेषणबुद्धीपेक्षां अभिनिवेशाचेंच प्राबल्य अधिक दिसतें, ही शोचनीय गोष्ट ह्मटली पाहिजे.

माझ्या लेखांतल्या मुख्य मुद्द्यासंबंधानें, ह्मणजे पैठण हेंच प्रतिष्ठान कीं काय यासंबंधानें, एवढें उत्तर पुरे आहे. आतां माझा गौण मुद्दा-ह्मणजे प्रतिष्ठान हें काबूल असावें—याविषयींच्या रा. भारद्वाजांच्या टीकेचा विचार करूं. प्रतिष्ठान ही पुरूरव्याची राजधानी होती ही गोष्ट आह्मां उभयतांसही कबूल आहे. रा. भारद्वाज ह्मणतात कीं, ही प्रतिष्ठान नगरी गंगायमुनांच्या संगमावर प्रयाग येथें होती, व त्याला ते महाभारताचा आधार दाखवितात. प्रतिष्ठान ह्मणजे दक्षिणेंतलें पैठण असा आग्रह धरणारे रा. भारद्वाज हेंच प्रतिष्ठान नगरी गंगायमुनांच्या संगमावर अर्थात् उत्तर हिंदुस्थानांत होती असेंही ह्मणतात, तेव्हां पैठण हें उत्तर हिंदुस्थानांत कधींपासून गेलें अशी शंका कोणालाही येईल. तिचें समाधान रा. भारद्वाज कोणत्या प्रकारें करतात तें पाहिलें पाहिजे. महाभारतांत सांगितल्याप्रमाणें प्रतिष्ठान ही पुरूरव्याची राजधानी होती तर त्या राजाचा गांधारदेशीय उर्वशीशीं संयोग कसा घडून आला ही शंका रा. भारद्वाजांस आली नाहीं, तरी चाणाक्ष वाचकांस आल्याशिवाय राहणार नाहीं. उर्वशी ही गांधारदेशची नव्हतीच, हा 'आपल्यांचा अश्रुतपूर्व शोध आहे,' असें रा.

भारद्वाज ह्मणतात. मी ह्मणतों हा 'अश्रुतपूर्व शोध'च खरोखर नाहीं. कारण, पुरूरव्याच्या घरीं जातांना उर्वशीनें दोन 'कोमललोमसंयुत' मेष नेले होते ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. गांधार-देशच्या स्त्रियांना मेष पाळण्याचा षोक अजूनही आहे, व खुद्द ऋग्वेदांतल्या (१.१२६.७) या ऋचेंत एक स्त्री आपल्या पतीला म्हणत आहे, 'सर्वहाम् अस्मि रोमशा गंधारीणां इवाविका' म्हणजे मी गंधारी (गंधार अथवा गांधार देशच्या) रमणीच्या मेषाप्रमाणें कोमलकेशयुक्त झाल्यें आहें. यावरून, व उर्वशी ही गंधर्वकन्या होती आणि गंधर्व ह्मणजे गंधार देशचे लोक या सर्वमान्य व्युत्पत्तीवरून, उर्वशीही गांधार-देशची होती याविषयीं कोणासही शंका राहणार नाहीं. आतां प्रश्न हा राहतो कीं, जर उर्वशी गांधार देशांत राहणारी व पुरूरवा प्रयाग येथें राहणारा होता, तर या दोघांचा संयोग कसा घडून आला ? माझ्या मतें महाभारताशीं विसंगतता न येतां व उर्वशी-पुरूरवा यांच्या-विषयींच्या कथेस बाध न येतां काबूल ही पुरूरव्याची राजधानी होऊं शकते.ती अशीः—काबूल ही पुरूरव्याची प्रथम राजधानी होती, पण पुढें त्याच्या राज्याचा विस्तार पूर्वेकडे गंगानदीच्या परतीरापर्यंत जेव्हां झाला, तेव्हां त्याला प्रयाग ही राजधानी करावी लागली. पूर्वीच्या आर्य राजांच्या राज्याचा विस्तार पश्चिमेकडून पूर्वेकडेस झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत.

आतां 'पठाण' शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधाचा रा. भारद्वाज यांचा आक्षेप राहिला. मीं दिलेली प्रतिष्ठान—पइट्ठान-पठाण ही व्युत्पत्ति रा. भार-द्वाज यांस हास्यास्पद वाटत असली तरी सुप्र-सिद्ध 'ग्रिम्स लॉ' नांवाचा जो व्युत्पत्तिशास्त्राचा नियम आहे त्या नियमानुसार ती झालेली आहे. रा. भारद्वाज यांना तें शास्त्र अवगत नसलें तर त्याला माझा नाइलाज आहे. शिवाय पठाण लोक पारशी व अरब यांच्या मिश्रविवाहापासून झालेली संतति आहे असें जें रा. भारद्वाज ह्मणतात त्याला काय आधार आहे तो त्यांनाच माहित !

वासुदेव गोविंद आपटे.

'ब्रिटिश साम्राज्याचा उदय.'

[रा. रा. आणा बाबाजी लठ्ठे. एम्. ए.]

विस्तारच्या दिसेंबरच्या अंकांत रा.ब.महाजनि यांचा माझ्या 'ब्रिटिश साम्राज्याचा उदय' या पुस्तकावरील अभिप्राय प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील एका मुद्दयासं-बंधानें दोन शब्द लिहिणें अवश्य आहे.

प्रसिद्ध इतिहासकारांच्या मताशीं वरील पुस्तकांत मीं जो विरोध प्रगट केला आहे त्याचें एक उदाहरण ह्मणून रा.ब. महाजनि यांनीं, देशी राज्यें खालसा करण्याच्या बाबतींत लॉर्ड डालहौसीनें स्वीकारिलेल्या धोरणाचें मीं जें समर्थन केलें आहे, त्याचा उल्लेख केला आहे. डाल-हौसीनें देशी राज्यें खालसा केलीं म्हणून ५७ सालचें बंड उत्पन्न झालें, अर्थातच हें डालहौसीचें धोरण चुकीचें होतें, असें रावबहादुरांचें मत दिसतें. यासंबंधानें सांगावयाचा पहिला मुद्दा हा आहे कीं, डालहौसीच्या धोरणापासून एका विशिष्ट वर्गांत जो असंतोष उत्पन्न झाला, त्याची रा. ब. महाजनि किंवा कित्येक इतिहा-सकार करितात ती कार्यकारणमीमांसा खरी धरिली तरी, ज्या मुद्दयावर मी त्या धोरणाचें समर्थन केलें आहे त्यास मुळींच बाध येणार नाहीं. ' हिंदुस्थानच्या साम्राज्या'चे बादशाह म्हणून इंग्लंडच्या राजांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना देशी राज्यांच्या कारभा-रांत जरूरीप्रमाणें हात घालतां येईल कीं नाहीं ? ब्रिटिश इंडियांतील प्रजेच्या हितानहिताची जशी इंग्लं-डवर जबाबदारी आहे तशीच ती ब्रिटिश साम्राज्यां-तील हिंदी संस्थानिकांच्या प्रजेबद्दलही इंग्लंड किंवा साम्राज्यसरकार यांजवर आहे कीं नाहीं? देशी राजांनीं तितका अन्याय केलाच तर त्यांचीं राज्यें खालसा

करण्यापर्यंत कोणताही उपाय साम्राज्यसरकारास जरूरीप्रमाणें अमलांत आणितां येईल कीं नाहीं ?—हा वरील पुस्तकांतील प्रश्न होता; व त्याचें उत्तर ' होय ' असें मीं दिलेलें आहे. या उत्तरावर तत्त्वतः कोणास वाद करिता येईल असें मला वाटत नाहीं. ज्यांना ही गोष्ट कबूल नसेल त्यांनीं साम्राज्य व मांडलिक राजे यांचे संबंध काय असतात हें जगाला नव्यानेंच शिकवावें लागेल. डालहौसीनें जीं राज्यें खालसा केलीं त्यांत अत्यंत अव्यवस्था झाली होती. इतकेंच नव्हे, तर डालहौसीच्या मतानें, दत्तकास परवानगी देऊन तीच अव्यवस्था चिरस्थायी करणें अन्यायाचें झालें असतें. म्हणजे तेथील राजांना संतति नव्हती, हें राज्यें खालसा करण्याचें कारण नसून, केवळ निमित्त मात्र होतें. खरें कारण इतकेंच होतें कीं, तेथील राजांच्या जुलमांनीं प्रजा गांजलेली असतां व सृष्टिक्रमाप्रमाणें या गांजणुकीच्या कारणासच खंड पडला असतां, कृत्रिम उपायांनीं तें कारण पुनः उपस्थित करणें डालहौसीला न्याय्य व सयुक्तिक वाटलें नाहीं. एखाद्या विशेष राज्याच्या बाबतींत डालहौसीचें हें मत चुकीचें होतें की काय, हा येथें प्रश्न नाहीं. राजकारणांतील सोयींच्या दृष्टीनें एखादें राज्य खालसा करणें इष्ट होतें कीं नाहीं, हाही येथें प्रश्न नाहीं. किंबहुना, ज्यांचीं राज्यें खालसा झालीं त्या राजांच्या, त्यांच्या आश्रितांच्या किंवा त्यांच्या वाग्जालाला बळी पडलेल्या बंडखोरांच्या दृष्टीनें डालहौसीनें चूक केली कीं कसें, हाही येथें मुद्दा नाहीं. याहीपेक्षां थोडें पुढें जाऊन मी असेंही कबूल करितों कीं, महाराणी व्हिक्टोरिया व तिचे सल्लागार प्रधान यांच्या मतानें दत्तकास परवानगी न देण्यांत डालहौसीची चूकच झाली असें असलें तरी, देशी राज्यांतील अन्यायास आळा घालण्यासाठीं जेथें व जेव्हां राज्य खालसा करणें हाच उपाय अवश्य आहे असें आढळून येईल तेथें त्या उपायाचा, डालहौसीप्रमाणेंच, स्वीकार करण्यास मुळींच हरकत नाहीं, ही गोष्ट कोणींही नाकबूल करणें शक्य नाहीं व न्यायाचेंही नाहीं. ही गोष्ट शक्य तेवढ्या गोड शब्दांनीं सरकार सांगो, किंबहुना ती दृष्टीआड ठेवण्याचाही हवा तेवढा यत्न मुत्सद्दी करोत, तीच डालहौसीच्या धोरणास पायाभूत होती व साम्राज्याच्या कल्पनेंतून ती कधींही काढून टाकितां यावयाची नाहीं. माझ्या पुस्तकांतील या विधानाचें खंडन करण्यासाठीं ५७ सालच्या बंडाचा जो उल्लेख रा. ब. नीं केला आहे तो त्या कामास पुरेसा आहे, असें दिसत नाहीं. कारण, एक तर, प्रस्तुत मुद्द्याचा मीं केलेला विचार देशी राज्यांतील प्रजाजनांच्या दृष्टीनें व साम्राज्यसरकारास असलेल्या तात्त्विक हक्काच्याच दृष्टीनें केला असून, त्याशीं या परिणामाचा संबंधच पोंचत नाहीं. ज्यांनीं बंड केलें ती नेटिव राजांची प्रजाच नव्हती. अर्थातच तीं राज्यें खालसा करणें वाजवी होतें कीं नाहीं, हें त्या बंडखोरांच्या दृष्टीनें ठरविणें रास्त नाहीं. खरोखर म्हटलें तर, धर्मभोळेपणाच्या कांहीं कल्पनांचा फायदा घेऊन स्वार्थदृष्टीच्या लोकांनीं शिपायांना फसविल्यामुळें त्यांनीं हें बंड केलें होतें. खालसा झालेल्या राज्यांवर वारसा सांगणाऱ्यांनीं, किंवा तीं खालसा झाल्यामुळें ज्यांची प्रत्यक्ष चंदी बंद झाली त्यांनीं, भोळसर व अज्ञान शिपायांच्या क्रोधाग्नींत तेल ओतलें आणि पेटलेल्या भडक्यांत स्वहिताची भाकर भाजून घेण्याचा त्यांनीं यत्न केला. शक्य तेथवर अशा तऱ्हेचा प्रसंग कोणताही मुत्सद्दी येऊं देणार नाहीं हें उघड आहे. पण, ५७ सालचें बंड आधारास घेऊन, साम्राज्याच्या अंगभूत असलेल्या राज्यें खालसा करण्याच्या हक्कास कोणी खो घालूं पाहील तर तें कोणीही कबूल करणार नाहीं. मल्हाररावांस पदच्युत करून, शिवाजीरावांना राजीनामा देणें भाग पाडून, व मणिपूर खालसा करून अलीकडच्या कालांतही सरकारानें याच आपल्या अधिकाराचा उपयोग करून दाखविला आहे. विशिष्ट वेळीं व विशिष्ट प्रसंगीं डालहौसीनें अमुक राज्य खालसा करणें योग्य होतें कीं नाहीं, याबद्दल मीं वरील पुस्तकांत कांहीं लिहिलेलें नाहीं. तत्त्वतः त्यानें ज्या हक्काच्या आधारावर राज्यें खालसा केलीं त्या हक्काचें मीं समर्थन केलें आहे; व त्यावर आक्षेप घेतला जात नाहीं तोंपर्यंत बंडाचा करण्यांत आलेला उल्लेख निष्कारण आहे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं असें मला वाटतें.

रा. ब. यांनीं माझ्या छोट्या पुस्तकाबद्दल लेख लिहिण्याची तसदी घेतली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. मात्र तो लेख त्यांनीं अधिक स्पष्ट शब्दांनीं लिहिला असता तर अधिक उपयोग झाला असता, हें येथें सांगणें अवश्य आहे. ऐतिहासिक दृष्टीनें इतिहास लिहिणें जरूर आहे. मात्र कोणीही स्वीकारिलेली दृष्टि विरुद्ध मताच्या मनुष्यास ऐतिहासिक नाहीं असें म्हणतां येईल, हें टीकाकारांनीं विसरतां कामा नये.

श्री.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक ४.

पुस्तकपरीक्षा.

[१]

वार्षिक इतिवृत्त, भा. इ. सं. मंडळ, शके १८३५.

मंडळाचें शके १८३५ सालचें इतिवृत्त नुकतेंच आमच्याकडे अभिप्रायार्थ आलें आहे. तें वाचून आमचा जो ग्रह झाला, आणि ह्या अत्यंत उपयुक्त राष्ट्रीय कामाची जी व्यवस्था असली पाहिजे असें आह्मांस वाटतें, त्याजबद्दल आह्मी आपला अभिप्राय आज अत्यंत कळकळीनें व सहानुभूतीनें व्यक्त करीत आहों. पूर्वीं कित्येक प्रसंगीं या विषयावर आह्मीं लिहिलेलें आहेच. आमचे अभिप्रायाची अपेक्षा ठेवून मंडळाचे चालक आमच्याकडे पुस्तकें पाठवितात याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानितों.

हल्लीं सभासदांची संख्या एक शेंकड्यावर आली आहे. ह्यावरूनच संस्थेबद्दल लोकांची आस्था व्यक्त होते. तथापि तेवढ्यानें मंडळाचें काम यथास्थित चाललें आहे असें ह्मणतां येत नाहीं. संस्था उपयोगी आहे याबद्दल आतां संशय राहिलेला नाहीं. वाद असेल तर तो कामाच्या पद्धतीविषयीं आहे. पुष्कळांच्या मनांत संस्थेच्या कामांत भाग घ्यावा असें आहे, आणि व्यवस्थेशीर काम चालेल तर सभासदांची संख्याही सहज वाढूं शकेल. यासंबंधांत आम्ही पुष्कळांशीं वादविवाद करून अनेक व्यक्तींचें मत मुद्दाम अजमावून पाहिलें. त्यावरून सामान्यत: मंडळाच्या कामाबद्दल जाणत्या मंडळींत जे आक्षेप आहेत त्यांचेंच आविष्करण आम्ही पुढें करीत आहों. कोणा एका विशिष्ट व्यक्तीचें हें मत नाहीं. चर्चा होऊन मंडळाचें काम सुव्यवस्थेस लागावें एवढाच आमच्या टीकेचा हेतु आहे.

१. विषयवर्गीकरण केलेलें नाहीं.

ह्या पुस्तकांत कांहीं थोडी माहिती विशेष मनोरंजक व बोधप्रद अशी बाहेर आली आहे; पण ती फारच अल्प आहे. या पुस्तकास एक लांबलचक सूची जोडिली आहे. आमच्या पूर्वींच्या अनेक सूचनांपैकीं निदान ही एक सूचना थोडीबहुत अंमलांत आलेली पाहून संतोष वाटतो. मात्र ह्यापलीकडे दुसऱ्या सुधारणा पुस्तकांत दिसत

नाहींत. मुख्यत: विषयांचें वर्गीकरण केलेलें नाहीं ही मोठी उणीव आहे. असे वर्ग पाडणें कठिण काम होतें असें वाटत नाहीं. सर्व काम छापण्यास तयार झाल्यावर त्याचे वर्ग सहज पाडतां आले असते. आमच्या मतें प्रस्तुत पुस्तकांत आलेल्या विषयांचे खालील वर्ग पाडतां येतील:—

१ संत, कवि, व काव्यें.
२ ताम्रपट व शिलालेख.
३ शब्दांच्या व्युत्पत्त्या.
४ लिपि व त्यांचे उगम.
५ लौकिक गाणीं व हातगे.
६ ऐतिहासिक कागद, सनदा, पत्रें, टाचणें, स्मरणवह्या वगैरे.
७ शंकास्थानें व चर्चात्मक प्रश्न.
८ प्राकृत वगैरे भाषांचे उगम.

सर्व विषय सर्वांस सारखे प्रिय नसतात. आवडीचा एकच विषय घेऊन त्याजवर मेहनत करणें श्रेयस्कर असतें. श्रमविभागाशिवाय काम चांगलें होत नाहीं. वास्तविक मंडळानें एव्हांशींच अतिविस्तृत विषयास हात घालावयास नको होता. ऐपत व काम करणारे वाढतील तसें उद्योगाचें क्षेत्र वाढवितां आलें असतें. हल्लीं Archæology, Anthropology वगैरे सर्वच विषय मंडळानें घेतले आहेत. त्यांच्या स्वतंत्र संस्थांकडे ते पाठविले असते तर बरें झालें असतें. तथापि ही मतभेदाची बाब सोडून दिली तरी, वर्षांत केलेल्या संग्रहाचे विषयवार भाग पाडून ते सर्व किंवा जरूर तितके निरनिराळ्या स्वतंत्र पुस्तकद्वारा छापले असते तर वाचकांची सोय होऊन कदाचित् पुस्तकांचा खपही बरा झाला असता. हल्लींच्या स्थितींत मंडळाचे सर्व वार्षिक वृत्तांत म्हणजे एक अठरा धान्यांचें कोडबोळें झालें आहे. मंडळाच्या कामाकडे लोकांचें दुर्लक्ष होण्याचें हें एक कारण आहे.

२. संशोधनाचे दोन मुख्य हेतु.

मंडळाच्या उद्योगाचा खरा उपयोग काय याजबद्दल जरा जास्त विचार करणें जरूर आहे. राष्ट्राची ऐतिहासिक सामुग्री कालाच्या मुखांतून बचावणें हा पहिला हेतु; आणि ह्या सामुग्रीचा राष्ट्रांतील लोकांनीं योग्य उपयोग करून राष्ट्रीयत्व संपादणें हा दुसरा हेतु. पहिल्यांत थोडे तज्ज्ञ लोक भाग घेऊं शकतील. परंतु दुसऱ्यांत सर्वांनींच भाग घेतला पाहिजे. पहिल्याहून दुसरा हेतु विशेष उच्चतर आहे. लोकशिक्षणाचें एक प्रधान अंग त्यांत आहे. ऐतिहासिक संशोधनाची (research) म्हणजे बाह्यसृष्टींत राष्ट्रीयत्व शोधून काढण्याची गोडी लोकांस लागली पाहिजे. यःकश्चित् गोष्टींत पुष्कळदां गूढ अर्थ व किती तरी इतिहास भरलेला असतो. पाश्चात्य लोकांस या विषयाची आवड असून शाळेंत असल्या वेळेपासून मुलांस तसें शिक्षण देण्याचा प्रघात आहे. शेक्स्पियरचें घर किंवा बसण्याची खुर्ची, मिल्टनचें झाड, नेपोलियनची गाडी, स्कॉट वगैरेंचे स्वहस्तलिखित ग्रंथ, अशा वस्तूंबद्दल तिकडे लोकांस विलक्षण आदर वाटतो. अशा लोकशिक्षणामुळेंच पाश्चात्य लोकांत आपल्या घराण्याचा, पूर्वजांचा किंवा जन्मभूमीचा अभिमान वसत आहे. अशा दृष्टीनें पाहतां मंडळाचें काम होईल तितकें लोकांत पसरलें पाहिजें आणि त्याजबद्दल त्यांच्या ठिकाणीं आस्था उत्पन्न झाली पाहिजे. हातीं आलेले कागद किंवा त्याजवरील चर्चा कशी-

बशी हलगरजीपणानें छापून काढिल्यानें वरील हेतु पार पडणार नाहींत. लोकांस ग्राह्य होतील अशा रीतीनेंच हे कागद पुढें आणले पाहिजेत. शिवाय, चाललेल्या क्रमानें ह्या कामाचा पार कधींही लागणार नाहीं. छपाईचा खर्च फुकट जाईल, छापलेले कागद लोक वाचणार नाहींत आणि हा एवढा खटाटोप निष्फळ होईल.

३. अव्यवस्थेचीं उदाहरणें.

ह्या अव्यवस्थितपणाचीं उदाहरणें सहज देतां येतील. पहिल्याच लेखांत तंजावरच्या सरस्वतीमहालाची हकीगत ३८ पानें दिलेली आहे. ती संक्षेपानें थोडक्यांत देतां आली असती. दप्तरवार माहिती दिलेली आहे, पण तिचें सार काय तें सांगितलेलें नाहीं. सर्व वाचकांस त्याची गोडी लागणें शक्य नाहीं. बहुतेक उतारे वेदान्तपर कवितेचे आहेत. ह्या संशोधकांस वेदान्ताबद्दल बेसुमार आदर वाटतो; आणि त्या आदराचे भरांत कित्येक उपयुक्त बाबती [आमच्या मतें] ते विसरतात. ह्या पहिल्याच लेखांत एक वाक्य असें आहे, "स. १७६५ पासून स. १८५० पर्यंत प्रकाशित झालेल्या २०००इंग्रजी ग्रंथांचा संग्रह ह्या सरस्वतीमहालांत आहे." हे इंग्रजी ग्रंथ कशा प्रकारचे आहेत, नुसते वाङ्मयात्मक आहेत कीं आपल्या देशांतील ऐतिहासिक माहितीचे जुने ग्रंथ त्यांत कांहीं आहेत, ह्याविषयीं चकार शब्द सांगितलेला नाहीं! 'देवानं पिय' (अंक २३) ह्या शब्दांचें भाषांतर व्हिन्सेंट स्मिथनें चुकीचें केलें असल्यास तिची दुरुस्ती शेवटच्या चार ओळींत केली आहे तितकी बस्स होती. त्याजवर चार पानें लिहावयास नको होतीं. पाश्चात्य विद्वानांस वेळीं अवेळीं नांवें ठेवण्याची खोड संशोधकांच्या विद्वत्तेस हीनत्व आणणारी आहे. ही खोड गेल्याशिवाय संशोधनाचें खरें काम त्यांचे हातून होणार नाहीं. अंक ८७ त स्मरणार्थ यादीचीं २०।२५ पानें छापलीं आहेत. त्यांत पेशवाईंतील अनेक प्रसंगांचे काल व मित्या दिलेल्या आहेत. ह्या सर्वच यादी न छापतां प्रचलित कालांच्या तफावती तेवढ्याच दिल्या असत्या म्हणजे भागलें असतें. अंजनवेल तालुक्याची वहिवाट (अंक ८५), शिवकालीन शास्त्री व पंडित(अंक ८१).वाकेनिस ठोसर (अंक ८२), वगैरे लेख वाचून सामान्य इसमास कांहीं एक बोध होत नाहीं. पेशवाईंतील जमीनमहसुलाच्या व कामकाजाच्या वगैरे बाबती त्यांत आल्या आहेत, त्यांचा निर्देश प्रस्तावनेंत अवश्य केला पाहिजे होता. तसेंच पुष्कळ ठिकाणीं समजुतीच्या व शब्दार्थाच्याही टीपा पाहिजेत,त्या नसल्यामुळें लेख दुर्बोध होतात. नुसते भाराभर लेख जसेच्या तसे दडपून दिल्यानें पूर्वी असलेला गोंधळ जास्तच वाढला आहे. सारांश काय कीं, सव्वापांचशें पानांचें हें अगडबंब पुस्तक निदान नऊदशांशानें तरी कमी करतां आलें असतें. लिहून आणलेले सर्वच कागद व त्याजवरील चर्चा छापण्याचें प्रयोजन नव्हतें. निरनिराळ्या विषयांचा थोडक्यांत उल्लेख पुरे झाला असता. लौकिक गाणीं, हातगे वगैरेंचा संग्रह,तसेंच ताम्रपट शिलालेखांचा संग्रह,साधारण भरपूर झाला म्हणजे,तो स्वतंत्र पुस्तकरूपानें छापावा. अशानें इतर लोकांत त्यांचा खपही विशेष होईल.वार्षिक वृत्तांतांत हे विषय अना-

ठायीं आहेत. एवढ्या पुस्तकास सहा रुपये किंमत देऊन जरूर नसलेले विषय विकत घेण्याची इच्छा फारच थोड्यांस होईल. आपल्या कामाचें ताबडतोब प्रदर्शन करण्याची हांव संशोधकांनीं धरूं नये. पुष्कळ वर्षें श्रम करून थोड्याच पण खऱ्या उपयोगाचा मजकूर बाहेर आणणें ह्यासच खरें संशोधन ह्मणतां येईल. हल्लींच्या हलगर्जीपणामुळें महाराष्ट्रेतिहासाच्या सामुग्रींत किती गोंधळ झालेला आहे हें वर वर पाहणारासही तेव्हांच कळून येतें. मंडळाच्या कामाची अव्यवस्थाच ह्या गोंधळास पुष्कळशी कारण आहे. एका पुस्तकाचा मागें प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांशीं पृष्ठांकांनीं वगैरे कधींही संबंध दाखविला जात नाहीं.

वास्तविक ऐतिहासिक संशोधन कसें करावें ही बाबतच मंडळाचे कामकरी मंडळीस कळलेली नाहीं, असें कष्टानें म्हणावें लागतें. एक अनुभविक संशोधक रा. देव ह्मणतात, (पृ. १६८) "आपल्या चिकित्सक बुद्धीस पटतील अशा प्रमाणांची विद्वान् लोक अलीकडे अपेक्षा करीत असतात. नुसत्या चरित्रांतील कथांवर विश्वास टाकण्याची त्यांची तयारी नसते." काय विद्वान् लोकांचा हट्ट पहा! एवढे श्रम करून आमचे संशोधक नाना तऱ्हेच्या कथा उघडकीस आणतात, त्यांजवर विश्वास टाकण्यास या बेट्या घरबसल्या विद्वान् लोकांचें काय जातें? ह्यावरून आपल्या संशोधकांची मनोवृत्ति व्यक्त होते. ह्या वृत्तीस जितका लवकर आळा बसेल तितका चांगला.

ऐतिहासिक संशोधनाचें काम सर्व राष्ट्रांतून होत आहे. पाश्चात्य राष्ट्रांची बरोबरी करण्यास आपण आज असमर्थ आहों. तत्राप होईल तितकें त्यांच्या पद्धतीचें अनुकरण करणें हेंच आपणास श्रेयस्कर आहे. विलायतेंत सर जॉर्ज बर्डवुड, मि. फॉर्स्टर वगैरेंनीं 'ईस्ट इंडिया कंपनी'चे कागद प्रसिद्ध केले आहेत, तीं पुस्तकें व त्यांतील प्रस्तावलेख आमच्या मंडळींनीं कित्यासारखे पुढें ठेवण्यास हरकत नाहीं. संगति जुळवून देण्यापलीकडे स्वतःच्या पदरचें ते फारसें सांगत नाहींत, किंवा वाचकांची दिशाभूल करीत नाहींत. आपल्या इकडे मिरजेचे खरे शास्त्रीबोवा हेंच काम आज कित्येक वर्षें नेटानें करीत आहेत. व्यवस्थितपणाच्या संबंधानें त्यांचीं पुस्तकें अत्यंत अनुकरणीय आहेत.

मंडळाचे चिटणीस लिहितात, "इतक्या सभासदांनीं आटोकाट प्रयत्न चालविले असतांही आपली प्रगति इतक्या मंद गतीनें व्हावी ह्याचें मला सखेद आश्चर्य वाटत आहे." त्यांस आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. बऱ्याच अंशीं हा त्यांच्या अव्यवस्थेचा परिणाम आहे. आज आपल्या लोकांपुढें शेंकडो कार्यें निकडीचीं उभीं आहेत, त्यांजबद्दल लोकांस आस्था किंवा कळकळ वाटत नाहीं. अशा स्थितींत लोकांपुढें आणावयाचीं कार्यफलें स्पृहणीय व ग्राह्य होतील अशींच असलीं पाहिजेत.

४. मंडळांतील वजनदार व तटस्थ सभासदांची जबाबदारी.

ह्या अव्यवस्थेचा दोष सर्वस्वी मंडळाच्या चालकांचा आहे असें आह्मी ह्मणत नाहीं. हरएक कामांत नानातऱ्हेच्या अडचणी येतात हें आह्मी जाणून आहों. स्वतःच्या पदरास खार लावून

अत्यंत कळकळीनें कित्येक गृहस्थांनीं ह्या सत्कृत्यास आपणांस वाहून घेतलें आहे, ही गोष्ट प्रशंसनीय आहे. परंतु एवढ्यानें काम भागत नाहीं. स्वार्थत्याग आणि कळकळ ह्यांजला चतुरस्रपणा व टापटीप यांची जोड अवश्य पाहिजे. शिवाय मंडळाच्या सभासदांपैकीं जाणत्या व वजनदार मंडळींनीं ह्या कामीं लक्ष घालून त्यास व्यवस्थेशीर पद्धत लावून दिली पाहिजे. खरें ह्मटलें तर अशा वजनदार गृहस्थांनीं ह्या बाबतींतील आपलें कर्तव्य ओळखावें ह्या उद्देशानेंच आजचें हें परीक्षण आम्हीं हातीं घेतलें. आपल्याकडे संस्था निघतात मुबलक, पण त्या व्यवस्थित चालत नाहींत. सर्वांच्या मतास मान देऊन व केवळ उद्देशावर दृष्टि ठेवून काम करण्याची बुद्धि पुष्कळांस नसते. आपणांस मतभेद सहन होत नाहीं. संस्थेची भिस्त सभासदांच्या ऐकमत्यावर नसते. एका कोणातरी मध्यवर्ती चालकावर सर्व भार असून त्याच्या ह्मणण्यास सर्वांनीं होकार द्यावयाचा, त्याविरुद्ध ब्र म्हणून काढावयाचा नाहीं, असा सामान्य प्रघात आहे. ही मुख्य व्यक्ति अनेक गुणांनीं योग्य असेल. विद्वत्ता, स्वार्थत्याग, उद्योग इत्यादि गुण तिच्या अंगीं भरपूर असतील. परंतु तेवढ्यावरून ती व्यक्ति सर्वगुणसंपन्न होत नाहीं. मनुष्यस्वभावाप्रमाणें हरएक व्यक्तीच्या ठिकाणीं गुणांबरोबर दोषही असावयाचे हें तत्त्व जे समजत नाहींत त्यांजकडून कोणतीही संस्था यशस्वी किंवा सर्वोपयोगी होत नाहीं. असाच कांहींसा प्रकार या इतिहास-मंडळाचा झाला आहे. पुष्कळ चर्चा व ओरड झाली तेव्हां चालकांनीं महाराष्ट्रांतील बऱ्याच पुढारी गृहस्थांचा तींत समावेश करून घेतला, आणि तिला बरेंच व्यापक व समंजस स्वरूप आल्यासारखें कांहीं वेळ वाटलें. आशा होती कीं या वजनदार मंडळींच्या वजनानें संस्थेचें स्वरूप बदलेल आणि कामाच्या पद्धतींत इष्ट फेरफार होतील. तसा फरक झाल्याचें चर्चाविषयक इतिवृत्तावरून दिसून येत नाहीं. कसें तें पहा.

ह्या वृत्तांतांत १०१ विषयांचें प्रतिपादन आहे. त्यांची संख्या व्यक्तिशः येणेंप्रमाणेंः—

रा. राजवाडे ३१; रा. चांदोरकर १९;
रा. पटवर्धन १८; रा. मुजुमदार १२;
रा. देव ११; रा. पोतदार ७; रा. मुंडले १;
रा. फडणीस १; रा. आपटे १.

—ह्मणजे संस्थेच्या मुख्य कामांत वरील नऊ असामींनींच भाग घेतला आहे, आणि त्यांपैकीं पहिले सहाच पुढाकारी आहेत असें म्हणण्यास चिंता नाहीं. वर्षांत पाक्षिक सभा २४ झाल्या त्यावेळीं हजर सभासदांचें सरासरी प्रमाण नऊ होतें. वरील कामकरी मंडळी बहुतेकांच्या परिचयाची असेल; आणि तशाच प्रकारचे दुसरे कित्येक सभासद चर्चेच्या वेळीं हजर असतील. अध्यक्ष रावबहादुर साने यांजकडून या वर्षी प्रत्यक्ष काम झालेलें दिसत नाहीं. किती सभांस ते हजर होते हेंही कळत नाहीं. प्रकृतीच्या वगैरे कारणानें त्यांजकडून काम होऊं शकलें नसेल. सवा पांचशें पानांच्या व सहा रुपये किंमतीच्या या पुस्तकांत कोणते विषय छापावे, ते कसे छापावे, त्यांत लोकोपयोगी भाग किती, इत्यादि गोष्टी ठरविण्यांत तरी अध्यक्षांचें अंग होतें कीं नाहीं ह्याची आम्हांस शंकाच आहे. कारण, ज्यांनीं 'काव्येतिहाससंग्रह' संपादिला, त्यांचे

देखरेखीखालीं इतकी अव्यवस्था असूं शकेल असें आम्हांस वाटत नाहीं.

रा. ब. महाजनि, रा. ब. वैद्य, रँ.परांजपे, प्रो. लिमये, रा. हरिभाऊ आपटे, रा. वासुदेवशास्त्री खरे, बॅ. जयकर, हायकोर्ट वकील घारपुरे, रा. न. चिं.केळकर, प्रो.विजापुरकर, रा.शि. म. परांजपे, प्रो. बळवंतराव ठाकोर, रा.र. पां. करंदीकर वगैरे अनेक वजनदार व विद्वान् गृहस्थ या संस्थेंत आहेत. अर्थात् मंडळाच्या कामाची जबाबदारी इतरांबरोबर ह्याही गृहस्थांवर येऊं शकते. प्रत्यक्ष काम करण्यास त्यांना फुरसत न झाली तरी मंडळाकडून होणाऱ्या कामाला या सर्व गृहस्थांची सम्मति आहे असा निदान अर्थ होतो. बँकांच्या संबंधानें डायरेक्टर्स किंवा शेयरहोल्डर्स् यांची जबाबदारी काय आहे हें आतां कायदा शिकवूं लागला आहे. त्याचप्रमाणें असल्या संस्थांची जबाबदारी जरी कायदा शिकवीत नसला तरी नैतिकदृष्ट्या ती कांहीं कमी नाहीं. एतदर्थ ह्या सर्व मंडळीस आह्मी असें विचारतों कीं, चाललेलें काम आपणांस पसंत आहे काय ? नसेल तर तें दुरुस्त करण्याचे प्रयत्न आपण कां करीत नाहीं ? सभांस हजर राहून, अगर निदान वार्षिक संमेलनाच्या वगैरे वेळीं मुद्दाम हा प्रश्न हातीं घेऊन, एकंदर कामाची दिशा व तत्संबंधीं नियम आपण एकवार कां ठरवून देत नाहीं ? वर्गणी भरली ह्मणजे आपलें कर्तव्य संपलें असेंच आपणास वाटतें काय ?

संस्थेंत काम करणारांशिवाय इतरांस या बाबतींत मत देण्याचा अधिकार नाहीं असें कदाचित् कोणास वाटेल. परंतु इतिहास ही बाबत सर्व महाराष्ट्राची आहे, आणि तिच्या सुधारणेची चर्चा करणें हें प्रत्येक महाराष्ट्रीयाचें कर्तव्य आहे. चिटणिसांनीं अभिप्रायार्थ पुस्तक आमच्याकडे पाठविलें यावरून या विषयाची सार्वजनिक चर्चा व्हावी असा त्यांचाही हेतु व्यक्त होतो. आह्मांस या विषयाची कळकळ विशेष वाटते ह्मणूनच त्यांत मन घालून व आस्थेनें श्रम करून आह्मी हे विचार प्रदर्शित केले आहेत. ही टीका आम्ही कुत्सित बुद्धीनें केलेली नाहीं. सर्वांच्या मदतीनें हें राष्ट्रीय कार्य सुव्यवस्थेस लागावें अशीच आमचीही इच्छा आहे. पुनः हा विषय हातीं घेण्याचा आह्मांस प्रसंग येईल त्यापूर्वी मंडळाकडून आमच्या वरील आक्षेपांचा यथायोग्य विचार होईल अशी आशा बाळगितों.

ऐतिहासिक सामुग्रीचे एकंदर ग्रंथ कोठें व काय किंमतीस विकत मिळतात, तें मंडळाच्या सर्व पुस्तकांच्या मलपृष्ठांवर छापल्यास वाचकांची मोठी सोय होईल. हल्लीं ही मोठी गैरसोय आहे.

चूकदुरुस्ती.—गेल्या अंकांत, 'ग्रहगणित' या पुस्तकाच्या परीक्षणांत, पृ. १०६, का. २, ओळ १७, येथे 'कोणकोणिज्या' या ऐवजीं 'कोणज्या' असें वाचावें. तसेंच पृ. १०९, का. २, ओळ ८ यांत 'उपपत्ति मुळींच दिलेली नाहीं' या ऐवजीं 'उपपत्ति मुळींच दिलेली नाहीं असें ह्मटल्यास चालेल.' असें वाचावें.

मराठे व मोंगल.

१. रा. रा. मुकुंदराव वामनराव बर्वे, बी. ए., इंदूर येथील स्मॉलकाज कोर्टाचे जज्ज, यांनीं 'मराठे व मोंगल' नांवाचें इंग्रजी स्वकृत पुस्तक आम्हांस पाठविलें त्याचा आम्ही सप्रेम स्वीकार करितों. वृत्ति संभाळून ग्रंथलेखनाचा व्यासंग रावसाहेबांनीं अखंड चालू ठेवला ही गोष्ट बुद्धिदार्ढ्याची द्योतक होय. एकोणिसाव्या शतकांत हिंदुलोकांत जे थोडेसे मुत्सद्दी होऊन गेले, त्यांत रावराजे सर दिनकरराव राजवाडे, के. सी. एस्. आय्., दिवाण ग्वालेर, हे अग्रगण्य होत. त्यांचा सर्व जन्म ग्वालेरच्या नौकरींत गेला असल्यामुळें ते महाराष्ट्राला जरा दूरच होते. पण त्यांचा कीर्तिपट लोकांच्या दृष्टीसमोरून कधींही हलला नाहीं. रा. बर्वे यांनीं त्यांचें सुंदर चरित्र प्रसिद्ध करून आपल्या मध्यहिंदुस्थानांतील जीवनयात्रेचें पारणें फेडलें. त्यानंतर प्रस्तुतचा निबंध लिहिला गेला. १९०२ सालीं हा निबंध " ग्वालेरच्या इतिहासाचें पूर्वनिरूपण" म्हणून प्रसिद्ध झाला होता असें प्रस्तावना सांगते, पण पुढें तो इतिहास तडीस गेला कीं नाहीं हें कळत नाहीं. सरकारी कामाच्या गर्दीमुळें महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याची आपली इच्छा अपुरी राहील अशी भीति रा. बर्वे यांनीं प्रस्तावनेंत नमूद केली आहे. परंतु हें देवऋण आहे, हें दिल्यावांचून सुटका नाहीं; आणि सांपडेल तितकी सवड काढून रा. बर्वे यांनीं त्यांतून मुक्त व्हावें अशी आमची त्यांस सप्रेम सूचना आहे. निदान तें न झाल्यास ग्वालेर इंदूरकडील महत्वाचे कागदपत्र, कुलपरंपरा, शकावळ्या, वंशावळ्या, दंतकथा, तहनामे, श्रेष्ठांचीं चरित्रें वगैरे देऊन तिकडील महाराष्ट्रवंशांचा इकडील भाऊबंदांना दृढ परिचय करून देण्याचें काम त्यांनीं सवडीनुसार पण सतत चालू ठेवावें. सरदार किबेसाहेबांची जोड जमल्यास फारच मौज होईल.

२. मराठ्यांची प्रगति एकजीवाची नव्हती, त्यांचें राजमंडळ संघटित नव्हतें, त्यांचें साम्राज्य कधीं झालें नाहीं, व झाल्यास पाणिपतनंतर खुरटलें, वगैरे कल्पनांचा—अनेक ग्रंथांच्या आधारानें—मूलच्छेद करण्याचा संकल्प ग्रंथकारांनीं प्रारंभींच व्यक्त केला आहे, आणि पाणिपतच्या लढाईनें मराठ्यांचें विशेष नुकसान झालें नाहीं हें दाखविण्याकरितां शेवटीं एक परिशिष्ट जोडलें आहे. इसवी सन १७६१ मध्यें पाणिपतला सव्वालाख बांगडी फुटली, पण पुढें दोन वर्षांतच अहमदशहा अब्दाली यानें श्रीमंत माधवरावांना नजराणा पाठविल्याचें सकौतुक वर्णन आहे. (पान १३३. इतिहाससंग्रह, पान ८४ वरील उतारा). शेवटीं एक परिशिष्ट दुसऱ्या बाजीरावाच्या चुका दाखविण्याकरितां जोडलें आहे. एकंदर १४० पानांचें हें पुस्तक संगतवार व भर माहितीचें असून टीपांनीं त्याची उपयुक्तता फारच वाढली आहे. पुष्कळ ठिकाणचा वृत्तांत मधून मधून विस्तृत करीत जावा, टीपा आणखी वाढवीत जाव्या, आणि दर पांच वर्षांनीं नवीन आवृत्ति काढीत

जाऊन हेंच पुस्तक जास्त महत्त्वाला आणीत जावें, असें आम्ही ग्रंथकारास सुचवितों. वस्तु सुंदर असली म्हणजे चित्तमोहन आपोआप होतें, पण त्याला अनुरूप आकाराची जोड पाहिजे. कै. रा. सा. रानडयांच्या इतिहासानंतर इंग्रजींत महाराष्ट्रलेखकानें लिहिलेलें हें पहिलें पुस्तक पंधरा वर्षांनंतर पाहावयाला सांपडलें, यामुळें या पुस्तकाचा मान विशेष आहे. पत्रें, याद्या, तवारिखा वगैरे इतिहास-साधनांची संगति जुळविण्याच्या कामीं रा. ब. साने, रा. खरे, रा. राजवाडे, रा. ब. पारसनीस वगैरे लेखकांचे अविश्रांत श्रम चालले आहेत; व भारत-इतिहास-संशोधक-मंडळामुळें त्या यत्नांना मूर्त स्वरूप येत चाललें आहे; पण सध्यांचा हिंदुस्थानचा बोल मराठींतून नसून इंग्रजींतून आहे, त्याचा खंड पडला तर पूर्वजांचें नांव बाकीच्या बिरादरींतून नष्ट होईल, ही भावना झालेले जे थोडे लोक आहेत त्यांत रा. रा. बर्वे हे आहेत, यामुळें आम्ही त्यांच्या कृतीला विशेष मान देतों.

३. या ग्रंथाचा सारांश देण्यापूर्वी आह्मी असें सुचवितों कीं, पुढील आवृत्तींतून प्याराग्राफांचा अंकानुक्रम देण्यांत यावा. टाईप, टीपा, वर्णन-विस्तार इत्यादि फेर केल्यानें ग्रंथाचीं पानें बदलतात, पण विभाग (प्याराग्राफ) बदलत नाहींत आणि आवृत्तिभेदांत देखील ग्रंथाची संगती कायम राहते. या चिमुकल्या ग्रंथाच्या जास्त आवृत्या निघाव्या या मंगलेच्छेमुळेंच ही सूचना आहे. *

अमरश्लोक शिवप्रभूनें स्थापिलेल्या, बाजीरावानें वाढविलेल्या आणि थोरल्या माधवप्रभूच्या नजरेखालीं टवटवलेल्या महाराष्ट्र साम्राज्यवृक्षाचा बीजारोप औरंगजेब पादशहाच्या निर्घृण क्रूरत्वामुळें झाला (पान. ३). पण त्याच्या अगोदर अखिल भारतवर्षाला अकबर आणि औरंगजेब या दोन सम्राटांच्या कृतीनें विशेष परिस्थिति प्राप्त झाली होती (पा. ४). सर्व धर्मांशीं समत्व ठेवल्यामुळें अकबर हिंदुधर्माचा संरक्षक झाला, जहांगिरानें त्याचेंच व्रत चालविलें, आणि शहाजहाननेंही तें मोडलें नाहीं. यांच्या परंपरेचा-व पर्यायानें आपला-नाश औरंगजेबानें केला (पा.४—९). या चवथ्या मोंगलाच्या वेळीं प्रमुख आर्यप्रभु जयसिंह (मृ. १६८८ इ०) व यशवंतसिंह (मृ. १६८१), व शिवाजी (मृ. १६८०) हे होते. त्याच्यानंतर पादशहाची परधर्मच्छलप्रवृत्ति बळावून त्यानें देवालयें, ज्ञानपीठें, साधुसंत, गोब्राम्हण यांचा उच्छेद आरंभिला. डोईपट्टी बसविली, शिखांचा गुरु गोविंदसिंह याच्या बापाला व मुलांना ठार मारिलें, काशीविश्वेश्वराचें मंदिर विध्वंसिलें, मथुराक्षेत्राचा भंग केला, सर्वस्वीं रावणराज्य आरंभिलें; नर्मदापार एकच हाहःकार झाला,

---

* इतिहासकार रा. रा. गोविंदराव सरदेसाई यांनाही आमची अशीच सूचना आहे. रा बर्व्यांच्या निबंधांतील संशयग्रस्त स्थळें पाहण्याकरितां आम्ही 'मोंगल रियासती ' च्या आमच्या नोटा पाहायला लागलों, पण त्यांत पहिल्या आवृत्तीचे पृष्ठांक दिले होते त्यांचा व आतांच्या पृष्ठांकांचा मेळच नाहीं. दुबार त्रास पडला. त्यांनीं चारपांच आवृत्त्या निघेपावेतों तरी प्यारे घालीत जावे, मग याहून मोठा ग्रंथ लिहिला जाईल तेव्हां ते बदलावे. आलीकडे जीं शास्त्रीय दर्जाचीं पुस्तकें इतरत्र प्रसिद्ध होत आहेत त्यांतून हाच मार्ग प्रशस्त समजला जातो. टीपा द्यावयाच्या त्याही पाना-खालच्या वेगळ्या न देतां प्याऱ्याखालच्या देत जाव्या.

आणि त्याचीच लाट दक्षिणेंत उसळली (पा. ९–२३). आर्त प्रजांच्या करुणागीतांनीं शिवराजाला स्फुरण चढलें. दादोजी कोंडदेवानें या प्रभूला पूर्ण देशभक्त बनविला होता. याचा अविधद्वेष प्रखर होता, पण त्यांत क्षुद्रता नव्हती. संतपरंपरेच्या संगीतानें या पुण्यभूमीमध्यें धर्मप्रेमाच्या पिकाचा सुकाळ झाला होता. ज्ञानदेवापासून तुकारामापर्यंतच्या तेजोगोलकांनीं अधमर्ध्वांत दूर पळवलें होतें. या धर्मसाम्राज्याची मूर्तध्वजा श्रीसमर्थ रामदास यांनीं फडकाविली. राष्ट्राची कर्मगंगा गढूळली होती ती स्वच्छ वाहूं लागली, चातुर्वर्ण्य एकजीव झालें, शिवप्रभूचें मंगलयश वाढत चाललें (पा. २३ ३८). या वेळीं राजा जयसिंहानें शिवाजीची व पातशहाची एकी करण्याचा घाट आणला, पण शिवाजीची साडेसहा सुभ्यांबद्दलची यथार्थ मागणी अदूरदृष्टि पादशहानें नाकारली. राजे कैदेंतून पळून आले, आणि पुढें मरेपावेतों यशस्वी राहिले. पुढें पादशहानें संभाजीचा वध केला (इ. १६९१), तें पाप संताजी–धनाजींनीं बादशहाला मरेपावेतों (इ. १७०७) भोगण्याला लावलें. त्याच्या फौजेंत ऐषआराम वाढला, आणि दखनी लोक पडले लोखंडी हड्डीचे; पाण्यावर काठी त्याप्रमाणें त्यांच्यावर कारवाई न चाले. [पा. ३८–५१.] रामराजे यांनीं छत्रसिंहासनाची आकांक्षा न धरितां वनवासापेक्षां खडतर असा जिंजीवास पत्करला, आणि वरती शीख जोरावले. बादशहानें यांची उपेक्षा करून गोवळकोंडा आणि विजापूर येथील आपल्याच गोतवाल्यांवर नजर फिरविली. तीं राज्यें लोपतांच मोंगल व मोंगलांचा काळ यांच्यांतला पडदा गळला. मोंगलांची गर्ता मराठ्यांनीं खणावी हाच ईश्वरी संकेत होता. (पा. ५८–६२).

४. येथून पुढें राजकवि भूखन याची शिवप्रशस्ती, झुलफिखारखानाच्या सल्ल्यानें झालेली शाहूराजाची मुक्तता व तेव्हांपासूनची मराठ्यांची आपसांतली दुही, साम्राज्यपिता शिवाजी याच्या कुळाला लागलेला क्षय, साम्राज्यभर्ता ब्राम्हण प्रभु बाळाजी विश्वनाथ याचा १७१४ पासून झालेला उदय, शरशापमंडन बाजीरावाच्या प्रतारवीचें तेज, बाळाजी बाजीरावाच्या वेळची भाग्यमध्यान्ह, पाणिपतचें दुष्टस्वप्न, महामनस्क माधवरावाचा दिग्विजय, नाना फडणीस इत्यादि बारभाईंची पुण्यसंपत्ति व अनन्यनिष्ठा, माधव सवाईच्या वेळीं सर्व देशाला घातलेली गवसण, राघोबाचा बिभीषणावतार, नाना व महादजी, इत्यादि गोष्टी 'नामूलं लिख्यते किंचित्' हें सूत्र ध्यानांत ठेवून रा. बर्वे यांनीं अनुष्टुभ्रीतीनें सांगितल्या आहेत. 'जबतक नाना तबतक पूना' या म्हणीची यथार्थता दाखविण्याकरितां त्यांनीं माधवसवाईच्या निधनानंतर शेवटला पडदा ओढला आहे* (पा.८३–८९).

* बाजीरावाची मध्यहिंदुस्थानांतील राजनीति निव्वळ लुटारूपणाची नसून संघटनापूर्ण होती हें दाखविण्याकरितां मालकमच्या ग्रंथाचा उतारा (पा.८६–९०) दिला आहे, तो बाजीरावाच्या वृत्तांताखालीं लहान ठशांनीं यायला पाहिजे होता. पाणिपतच्या युद्धाचें परिशिष्ट (पा. ९१–१३५) युक्तिवादमय आहे, पण या हातभर दाढीचीं खंडें करून बाळाजीपेशव्याच्या वृत्तांतात यावीं. तिसरें परिशिष्ट दुसऱ्या बाजीरावाबद्दल आहे. तें जरा दुर्गम आहे, वादग्रस्त आहे, मंगलप्रद नव्हे. पुढें गाळावें.

येणेंप्रमाणें वरील निबंधाचा त्रोटक सारांश आहे.

५. प्रस्तुत ग्रंथामध्यें कांहीं कांहीं विपर्यास दृष्टीस पडतात, त्यांची पुढें अवश्य सुधारणा व्हावी. पान ७४ मध्यें 'माजी पेशव्यांचे धाकटे बंधु माधवराव गादीवर बसले' असा उल्लेख आहे. माधवराव हे बाळाजीचे द्वितीय पुत्र व विश्वासरावाचे धाकटे बंधु. वरील उल्लेखाचे पूर्वी सर्व वर्णन बाळाजी पेशव्यांचेंच दिलेलें आहे. तेव्हां ही वरील चूक एकदम नजरेस येते. हा क्षुद्र दोष आहे आणि तो 'दुरुस्तीपत्रकां'त दुरुस्तही केला आहे. परंतु दुरुस्तीपत्र न पाहिलेल्या वाचकांना तो कसासाच वाटतो. पान ९ मध्यें राजा जयसिंह वारल्याचें वृत्त आहे. खालीं टीपेंत लिहिलें आहे कीं सदरहू राजानें जयपूर शहर वसविलें, आणि ज्योतिषशास्त्राची फारच प्रगति केली. परंतु ह्या गोष्टी या राजाच्या वेळच्या नसून पुढें दोन पिढ्यांनीं जो सवाई-जयसिंह अंबरच्या गादीवर बसला होता त्याच्या होत. [या संबंधानें 'टॉडचें राजस्थान' ह्या ग्रंथाचें पान १२०९ पहा.] या सवाई जयसिंहाचा राज्याभिषेक इ. स. १६९९ मध्यें झाला. त्यानें ४४ वर्षें राज्य केलें व इ. स. १७४३ मध्यें तो वारला. हा पहिल्या बाजीराव पेशव्यास अनुकूल होता असें टॉड् ह्मणतो. जयपुर अथवा जयनगर हें नांव मिर्झा जयसिंह ह्याचेमुळें पडलें नसून सवाई जयसिंहामुळें पडलेलें आहे. हा दुसरा राजा मुत्सद्दीपणांत ज्यास्त होता व मिर्झा राजा शूरत्वांत श्रेष्ठ होता. मिर्झा राजाच्या मृत्यूचें वर्णन टॉडचे ग्रंथाच्या १२०७ पानांत पाहावें.

६. औरंगजेबाचे वेळचीं जयसिंह व यशवंतसिंह या दोन प्रभूंचीं नांवें मुख्य दिलीं आहेत. परंतु या दोघांपेक्षां तत्कालीन इतिहासांत राणा राजसिंहाचें नांव विशेष झळकतें. औरंगजेबाशीं सर्वांत ज्यास्ती लढाया कोणीं केल्या असतील तर त्या राजसिंहानें होत. या राण्याची कारकीर्द मेवाडांत इ. स. १६५४ पासून १६८१ पर्यंत झाली; आणि शिवाजीनंतर थोड्याच दिवसांनीं हा राजा वारला. यानें चार वेळां बादशाही फौजांचा पराभव केला असून एकदां खुद्द बादशहास जीवदान दिलें होतें. याचें सविस्तर वर्णन टॉड्चे ग्रंथांत व सरदेसायांची 'मुसलमानी रियासत' भाग १८ यांत पाहावें. मध्यहिंदुस्थानांत त्यावेळीं छत्रसाल प्रमुखत्वानें पुढें येऊं पाहात होता, व त्याचाही नामनिर्देश होणें जरूर आहे. शिवाजीचें कूळ व शीख यांचें वर्णन ग्रंथकारानें यथोचित केलें आहे. राजसिंह उत्तरहिंदुस्थानांत जिवंत होता तोंपर्यंत औरंगजेबाची दक्षिणेंत येण्याची हिंमत झाली नव्हती. यशवंतसिंह व जयसिंह [मिर्झा] हे दोघे जरी बलिष्ठ होते तरी ते बादशाहीचे सेवक असल्यामुळें काबूल, बंगाल वगैरे दूरदेशीं त्यांचा जन्म गेला. परंतु राणा राजसिंह हा महाराणा प्रतापसिंह याचे नातवाचा नातू होता, व राणा प्रतापचे बहुतेक गुण याच्यांत वास करीत होते. प्रस्तुत निबंध जरी लहान आहे तरी या राजपुरुषाच्या वर्णनावांचून त्याला पूर्णता येऊं शकत नाहीं.

राणा यशवंतसिंह याचा मृत्यु इ.स. १६८१ मध्यें झाला असें टॉड् म्हणतो [पान. ८७९]; आणि १६७८ मध्यें झाला असें सरदेसाई

म्हणतात. [पान ७१२]. दोहोंपैकीं कोणचेंही साल खरें धरलें तरी मिर्झा राजाचे नंतर यशवंतसिंह निदान १० वर्षे जिवंत होता. कारण मिर्झा जयसिंह १६६८ मध्यें वारला. तेव्हां रा. बर्वे यांचें पान १० वरील वाक्य 'हा महाराजा यशवंतसिंह जयपुरचे सुप्रसिद्ध संस्थापकाबरोबरच वारला' हें कानाला कसेंसेंच लागतें. मिर्झा राजा जयपुरचा संस्थापक नव्हे हें वर लिहिलें आहेच.

७. या दोघांच्या मृत्यूनंतर बादशहाची धर्मच्छलप्रवृत्ति बळावली, असें पान ११ मध्यें म्हटलें आहे. १६६८ मध्यें जरी मिर्झा राजा वारला तरी राजसिंह, यशवंतसिंह, शिवाजी व शीख हे शिल्लक होतेच. तेव्हां बादशहा पदरच्या रजपूत सरदारांच्या धर्मश्रद्धेला फारसा जुमानीत होता असें दिसत नाहीं. पान ११ वरील टीपेमध्यें महात्मा दयानंद सरस्वतीच्या दीर्घ प्रयत्नांचें अमृतफळ मुसलमानी धर्मांत गेलेल्या रजपूतांच्या वंशजांचें हिंदूधर्मांत परावर्तन हें होय असें दिलें आहे, तें खरें आहे. कबीर व नानक यांच्यानंतर आर्यभूमीमध्यें नूतनपंथप्रचारक धर्मवीर म्हणजे राजा राममोहनराय व स्वामी दयानंद सरस्वती हेच होत. या उभयतांनींही नवा धर्मसंघ निर्माण केला. पण त्यांत दयानंद सरस्वतींचा संघ विशेष श्रेष्ठ व जोमदार आहे हें कोणालाही कबूल करावें लागेल. या पुरुषाबद्दल जो पूज्यभाव उत्तरेंत आहे तो महाराष्ट्रांत नाहीं, असें त्याच टीपेंत पुढें म्हटलें आहे. ज्या पुरुषानें परधर्मांत गुरफटलेल्या वासरांना आपल्या कळपांत येण्याची वाट दाखविली त्या महात्म्यासंबंधानें महाराष्ट्रांत पूज्यभाव नसल्यास तो स्वामीचा कमीपणा नव्हे; तें आमचें कमीपण होय. महाराष्ट्रांत जरी स्वामीचे नांवाचा विशेष गाजावाजा होत नसला तरी कै. विष्णुशास्त्र्यांखेरीज दुसऱ्या कोणीं त्यांचा कमीपणा दाखविलेला नाहीं. एका महान् धर्माचार्याबद्दल निष्कारण उद्वेगकारक असें हें वाक्य पुढील आवृत्तींत गाळलें जावें.

८. काशीविश्वेश्वराचे मंदिराचा विध्वंस १६६९ मध्यें झाला व मथुराक्षेत्र १६७० मध्यें भंगलें, तेथून पुढें नऊ वर्षांनीं ह्मणजे तारीख २ एप्रील १६७९ सालीं 'झिझिया' कर सुरू झाला. [सरदेसाई]. १६८० सालीं, राजसिंह वारल्यानंतर, त्याचे मेवाडकर वंशज स्वस्थच होते. बाकीच्याही राजघराण्यांतून विशेष चळवळ झाल्याचा दाखला तत्कालीन इतिहासांत दिसत नाहीं. यशवंतसिंहाच्या मृत्यूमुळें रजपूत लोकांत खळबळ उडाली असें रा. बर्वे ह्मणतात [पान १४]. पण ह्या चळवळीचें केंद्र–त्याचा सेनापति दुर्गादास व यशवंतसिंहाचे मुलांना आश्रय देणारा राणा राजसिंह हे दोघे होते. दुर्गादासानें बालराजा अजितसिंह याचें संरक्षण करून बादशहाचा पुत्र अकबर याला आपल्या पक्षाला फोडलें आणि उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत धुमाकूळ मांडला. या प्रसंगाचें विस्तृत वर्णन टॉडनें दिलें आहे. मराठ्यांत जसा संताजी घोरपडे तसा उत्तरेंत दुर्गादास. याचा नामनिर्देश पुढील आवृत्तींत रा. बर्वे यांनीं अवश्य करावा. अकरावे पानावर काशीच्या ब्राह्मणांचा छल १६६९ मध्यें झाल्याचा उल्लेख आहे; आणि पुढें नऊ पानें मजकूर लोटल्यावर एकोणीस व वीस या पानांत विश्वेश्वराचे

मंदिराचा उच्छेद व मथुराक्षेत्राचा भंग यांचा उल्लेख आहे. या शेवटल्या दोन गोष्टी १६६९ –१६७० याच सालीं झाल्या असल्यामुळें त्यांचा उल्लेख अकरावे पानाचे तेथेंच होणें इष्ट आहे.

९. पान तेवीस खालीं भूषणकवीचे ग्रंथाचा उल्लेख आहे, आणि त्याचे उतारे देतां येत नाहींत याबद्दल खेद प्रदर्शित केला आहे. परंतु पुढें पान बासष्ट व त्रेसष्ट यांत तीन श्लोकांचें भाषांतर दिलेलें आहे ! तेविसावे पानांतील टीप गाळावी, आणि बासष्ट व त्रेसष्ट पानांचा मजकूर पुढें टीपेंतच द्यावा. भूषण कवीचे ग्रंथ 'काशी नागरी-प्रचारिणी सभे'च्या मार्फत पंडित शामबिहारी व शुकबिहारी या बंधूनीं प्रसिद्ध केले आहेत. शिवराजभूषण, शिवाबावनी व छत्रसालदशक हे त्यांतले तीन इतिहासविषयक ग्रंथ आहेत. वाटल्यास पुढील आवृत्तींत त्यांतील कांहीं उज्ज्वल श्लोक भाषांतरासह टीपेंतून द्यावे.

काळ्यांचा 'जिजीवास,' बापटकृत दादोजी कोंडदेवाचें चरित्र, वगैरे ग्रंथ आधारभूत म्हणून टीपेंत त्यांचा उल्लेख आहे. पण असे ग्रंथ इतिहास नसून कादंबरीवजा निबंध असल्यामुळें त्यांच्यापेक्षां बखरींचा आधार असलेला बरा.

पान ५९ मध्यें काश्मिरी पंडितांना जबरदस्तीनें बाटविल्याबद्दल उल्लेख आहे. या मजकुराबद्दल कोठें तरी ग्रंथाधार असल्यास पुढील आवृत्तींत शोधक टीप द्यावी. नसल्यास गाळावा.

१०. अकबर व औरंगझेब यांची तुलना करून एक सद्गुणांचा पुतळा व दुसरा नररूपी राक्षस होता असें दाखविलें आहे. यासंबंधानें इतिहासज्ञांत तीव्र मतभेद पडेल ह्यांत शंका नाहीं. अकबरानें राजा मानसिंह यास विषप्रयोग करण्याचा यत्न केला होता [टॉड, पान १२०६]; फकीर व मुल्ला यांना उघड गुलाम म्हणून विकिलें [सरदेसाई, पान ५१८]; मुल्लांशीं वैर पडल्याबरोबर मशीदींचे तबेले केले (सरदेसाई, पान ५१३); हिंदु व खिश्चन या दोघांचे धर्म नष्ट करावे अशी त्याची पोटांतली बुद्धि होती; वगैरे त्याच्या श्रेष्ठ कीर्तीला विघातक अशा अनेक गोष्टी टॉड् व सरदेसाई यांच्या ग्रंथांतून आढळतील. अकबराला नवीन राज्य स्थापावयाचें होतें; औरंगजेबास पूर्वीचें मिळविलेलें होतें त्यांत कमी होऊं द्यावयाचें नव्हतें. यामुळें एकाला अंगीं होती त्यापेक्षां ज्यास्ती दया आणावी लागे व दुसऱ्याला अंगीं असेल त्यापेक्षां ज्यास्त क्रूरपण दाखवावें लागे. उभयतांच्या राजनीतीची तुलना करतांना हा सिद्धांत विसरतां कामा नये. हिंदूंचें साहाय्य घेऊन अफगाणांना चिरडणें ही मोंगल अकबराची मुख्य दिशा होती. अकबरानंतर शंभर वर्षांनीं एकजीव झालेल्या अफगाण, मोंगल, तार्तार इत्यादि मुसलमान जातींना एकजीव ठेवून यशवंतसिंह, राजसिंह, शिवाजी, गुरुगोविंद, दुर्गादास, इत्यादि प्रबळ हिंदुवीरांना व हिंदुत्वाचें चैतन्य वाढत चाललेल्या त्यांच्या अनुयायांना आळा घालायाचा-जमल्यास नायनाट करायाचा—ही दिशा औरंगजेबाची होती. बदललेल्या परिस्थितींत रा. बर्वे दाखवितात इतकी चुकीची ही दिशा होती असें ह्मणतां येत नाहीं. शिवाजीला दक्षिणेच्या साडेसहा सुभ्यांची सुभेदारी न देण्यांत औरंगजेबानें कोता विचार केला असें रा. बर्वे ३९व्या पानांत म्हणतात. आमच्या मतें असें केल्यानें बादशाहीचा अंत १५-२० वर्षें अगोदरच ओढवता. मनापासून आपले दास झालेले परंतु पोटाकरितां ज्यास्ती भाकरी मागणारे लोक यांना वाढविणें वेगळें, व आपल्या घराण्यावर नांगर फिरविण्याचा संकल्प केलेले अगर त्याकरितां अवतरलेले लोक अमृत पाजून पुष्ट करणें हें वेगळें.

इतिहासाचा खरा ओघ काय होता हें बादशहानें ताडलें. भवितव्यतेचा प्रचंड ओघ तो आडवा पडल्यामुळें थांबणारा नव्हता. पण सच्चा मुसलमान व खरा क्षत्रिय यांना शोभेल अशीच त्याची राजनीति होती असें आम्हांला वाटतें. अर्थात् धर्मवेडानें तो देवळें पाडी, गाई मारी, अथवा ओली रोटी विकी, या गोष्टींबद्दल आह्मी त्याला दोषच देतों. पण काळ समोर उभा राहिला ह्मणजे शिव्यांना बधत नाहीं, स्तोत्रें म्हटल्यानें माघारा फिरत नाहीं, हें त्यानें जाणलें होतेंसें दिसतें. त्याच्या धर्मवेडाच्या गोष्टींचा मुसलमानांच्या ऱ्हासाशीं विशेष संबंध होता असें आह्मांला वाटत नाहीं. संभाजीनें त्याच्या कुळाचा उपमर्द केला ह्मणून त्यानें संभाजीचा शिरच्छेद केला; परंतु शिवाजी सहा महिने कैदेंत असतांना त्यानें त्याला बोट लावलें नाहीं, आणि शाहूचें आपल्या सख्ख्या नातवाप्रमाणें परिपालन केलें, ह्या दोन गोष्टी इतिहासज्ञांनीं विसरूं नयेत. हा मुद्दा वादग्रस्त असल्यामुळें याचें जास्त विवेचन आम्ही ह्या निबंधांत करूं इच्छित नाहीं. विजापुर व गोवळकोंडा हीं दोन राज्यें मराठ्यांना पैसा पुरवीत, ही गोष्ट रा. बर्वे यांनींही कबूल केली आहे. परंतु त्यांच्या नाशामुळें मराठे व मोंगल यांच्यामधील पडदा गेला, असें रा. बर्वे ह्मणतात. आपल्या अमित्राचा मित्र तो आपला अमित्र हा राजनीतीचा स्पष्ट सिद्धांत आहे. तेव्हां हीं दोन राज्यें नष्ट करतांना पादशाहाची साम्राज्यलालसा किती होती, शियांना नष्ट करणें या धर्मवेडाचें अंग किती होतें, मराठ्यांना पाठीकडून शह देणें हा हेतु कितपत होता, आणि वरपंगी मित्रापेक्षां उघड शत्रु बरा हें तत्त्व त्याच्या मनावर कितपत बिंबलें होतें, ह्या सर्व मुद्द्यांचें वर्गीकरण करून मग या दोन राज्यांच्या नाशाबद्दलचा विचार केला पाहिजे. हा पुढें एखाद्या टीपेंत साधक बाधक प्रमाणें देऊन व्हावा. फार मनोरंजक व बोधप्रद होईल.

११. पान ६६ मध्यें धनाजी जाधवाचें नांव दिलें आहे. परशुराम त्रिंबक प्रतिनिधि व संताजी घोरपडे हीं दोन नांवें जोडलीं ह्मणजे या काळाच्या इतिहासाची सांगता झाली. येथें बाळाजी विश्वनाथाचा जो साभिमान उल्लेख केला आहे तो व पुढला बाजीरावाबद्दलचा हे दोन्ही यथार्थ आहेत. पेशव्यांना नांवें ठेवायचीं असा मनाचा निश्चय केलेल्या कित्येक लेखकांना वाटतें कीं बाजीरावानें दिल्लीकडे न जातां कर्नाटकाकडे बलिष्ठ व्हावयाला पाहिजे होतें, आणि श्रीपतराव प्रतिनिधीचा हा सल्ला मुत्सद्दीपणाचा होता. हे लेखक विसरतात कीं, बाजीरावाला छत्रपतीनें मनापासून आशीर्वाद आणि स्वमताचें पाठबळ दिलें. बाकी, सावकारांपुढें व शिलेदारांपुढें पैशाकरितां नाक घांसून कपाळाचें सालडें बाजीरावालाच काढावें लागलें. प्रतिनिधि, बारामतीकर नाईक सावकार, बाजीरावाच्या हातून युद्धांत मृत्यु पावलेला दाभाडे सेनापति, हे कर्नाटकांत जाऊन दिग्विजय लावते तर त्यांना शाहू महाराज अगर पेशवे यांपैकीं कोणीही आड येत नव्हतें. नादीरशाहावर स्वारी करण्याकरितां बाजीरावानें सर्व राजेरजवाड्यांना आमंत्रणें केलीं व फौज घेऊन स्वतः त्वरेनें नर्मदापार झाला, ही गोष्ट लहान भूषणाची नव्हे. एकंदरींत पाहतां सर रिचर्ड टेंपल, मुंबईचे माजी गव्हर्नर, यांनीं ह्मटल्याप्रमाणें—पहिले चार पेशवे हे पहिल्या चार मोंगलांप्रमाणेंच थोर पुरुष होते. (टेंपल यांचें India in 1880 व दुसरा एक ग्रंथ पुण्याच्या लायब्ररींत आहेत, त्यांतील एकांत आह्मी हा दाखला वाचल्याचें स्मरतें. रा. बर्वे यांनीं वाटल्यास शोधावा). पेशवाईचे हिंदु-

समाजावर किती उपकार झाले याचें विवेचन करण्याची ही वेळ नव्हे. रा. बर्वे यांनीं थोरल्या माधवरावांची व बारभाईंची कारकीर्द ही यथायोग्य वर्णिली आहे. त्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत रा. ब. पारसनीस व रा. राजवाडे या उभयतांचा नामनिर्देश केला आहे. पण या उभयतांनाही गुरुस्थानीं असलेले रा. खरे शास्त्री मिरजकर यांचा निर्देश नाहीं. रा.खऱ्यांचा **ऐतिहासिक लेख—संग्रह** हा इतिहासज्ञांना रत्नगर्भा आहे. त्यांतून एकच मुद्दा सुचवितों. नारायणरावाच्या कारकीर्दींत इतकी बेकी झाली असतां गर्भस्थ माधव-सवाईकरितां एवढी एकी कां झाली याचें पुष्कळांना आश्चर्य वाटतें. पण खऱ्यांच्या ग्रंथांवरून दिसतें कीं थोरल्या माधवरावांनीं मरतांना "मी पुन्हां नारायणरावच्या पोटीं येणार" असें सर्वांना बजावलें, व गंगाबाई मातोश्री माधव—सवाईंना प्रसवल्या तेव्हां थोरल्या प्रभूंनीं अंतकाळीं दिलेलें वचन खरें केलें; याबद्दल पटवर्धन आदिकरून सर्व सरदारांनीं संतोष व्यक्त केला आहे; तो खऱ्यांच्या पत्रांतून पहावा; तो वाचला म्हणजे तत्कालीन सरदारांच्या राजनिष्ठेचें बीज कळेल. माधवसवाई हा अवतारी पुरुष, ही पुष्कळांची भावना होती. इतिहासांत बालराजे बरेच झाले. शाहूछत्रपति सहा वर्षांचे होते, अकबरशहा पंधराचे, बाबर अकराचा, चवदावा लुई पांचव्या वर्षी तक्ताधिपति झाला, मेरिया थेरिसाचा मुलगा लाडिस्लास हा चाळिसाव्या दिवशीं गादीवर बसला. पण गर्भस्थ असतां ज्यांचा यशोदुदुंभि वाजला असा पौराणिक कथानकांतला प्रभु परीक्षिति, आणि ऐतिहासिक आधुनिक काळांतला माधव—सवाई. बारभाईंच्या सुदर्शनानें ज्या पुण्यश्लोकाचें गर्भस्थ असतां रक्षण केलें, त्याच्या कारकीर्दींत राज्याला अगोदरच कीड लागत चालली होती म्हणून ओरडणें हें मंदबुद्धीचें लक्षण आहे. ऐन उमेदीच्या काळांतच कृतांताची अमलध्वजा डोकावूं लागते. मोंगलांच्या अस्तकाळीं चोहोंकडेच कीड लागली होती, आणि सर्व भरतखंडावर अराजक झालें होतें. छत्रपति व पेशवे यांच्या कारकीर्दीनें जळत्या घरांतले कांहीं वासे वांचवले गेले, आणि शांततेच्या काळाचा फायदा घेण्याकरितां समाजघटना कायम राहिली. या मंगलमूर्तींचा श्रोत्रमनोहर पुण्यघोष केल्याबद्दल आम्ही रा. बर्वे यांचे आभार मानितों. सवाई माधवरावांच्या जन्माबद्दलची खऱ्यांच्या पुस्तकांतली गोष्ट त्यांनीं वाटल्यास द्यावी; मात्र अस्सल पत्रें उतरून द्यावीं.

१२. पानिपतचें परिशिष्ट मूळ ग्रंथांत संदर्भानें टीपा म्हणून द्यावें असें आम्हांला वाटतें. रघुनाथरावांनीं अबदल्लीचा पाडाव केला असता असें रा. बर्वे सुचवितात. पण रघुनाथरावांनीं पहिली मोहीम एक कोट कर्ज करून यशस्वी केली होती, आणि भाऊंची त्याबद्दलची टीका अवास्तव होती, असें म्हणणें कठीण आहे. पान १३० वर राघोबाचा विचार अबदल्लीवर स्वारी करण्याचा होता असें आहे, व खालीं पेशव्यांच्या बखरीचा आधार दिला आहे. आमच्याजवळ यावेळीं बखर नाहीं. कदाचित् रा. बर्व्यांनीं 'पानिपतचा मोबदला' या काल्पनिक नाटकाचें स्मरण होऊन ही टीप दिली असेल. याला बखरीचा आधार असेल तर त्याचा नामनिर्देश करून अस्सल अवतरणें पुढील आवृत्तींत टीपेंत द्यावीं. अबदल्लीचा पुष्कळ नाश झाला ही गोष्ट स्पष्ट आहे. कंदाहारचे यशस्वी घोडे निदान नर्मदेचें पाणी प्यावयाला पाहिजे होते, पण नाना पेशवा कूच दरकूच उत्तरेस येत आहे हें ऐकतांच त्यानें माघार घेतली असेल. तथापि त्याचें मिळवलेलें यश अतुल व अद्भुत होतें यांत शंका नाहीं. वाटाईनंतर

फ्रान्सवर पुन्हां हल्ला झाला नाहीं म्हणून त्या युद्धाचें यश कमी झालें असें थोडेंच. महाराष्ट्र पाणिपतनंतर पुन्हा सांवरलें, पण ही पुण्याई माधवप्रभूची. सव्वालाख बांगडी फुटून महाराष्ट्राचें पूर्व किल्बिष पाणिपतवर भस्म झालें यांत शंका नाहीं.

१३. पाणिपतच्या नाशाचीं कारणें रा. बर्वे देतात तीं अशीं (पा. १२१-१२८):—१. विश्वासरावाचा मृत्यु व भाऊसाहेबाचें हत्तीवरून खालीं उतरणें; २. मराठ्यांनीं पायदळावर विश्वास ज्यास्त ठेवला, त्यापेक्षां घोडेस्वारांवर भिस्त ज्यास्त ठेवायला पाहिजे होती; ३ त्यांनीं खंदक खणला व उपासमार करून घेतली; ४ मराठ्यांचे बाजारबुणगे जास्त होते. असाच प्रयत्न हिंदुस्थानकथारसांत कै. विनायक कोंडदेव ओक यांनीं केला होता, आणि त्यांत मराठ्यांच्या अपयशाचीं सात कारणें दिलीं होतीं. भाऊनानासारख्या भीष्मद्रोणांना ज्या कर्मसूत्रानें पाय अडखळून पाडलें त्यांत आम्हीं अनभ्यस्तांनीं मत देण्याचें धाडस न करावें हें बरें. तथापि वरच्या कारणांचा विचार करितां दुसरें तर अगदींच चूक आहे. अफगाण घोडेस्वारांच्या मानानें मराठी स्वार फार सुकुमार असत. मराठ्यांचे स्वार जास्त असूनही अफगाणांनीं गोविंदपंत बुंदेल्याचें शिर कापून नेलें होतें, आणि मराठी फौजेची कहीकबाड मारून उपासमार केली ती अफगाण स्वारांनीं, पायदळानें नव्हे. खंदक अजूनही खणतात, तेव्हां तिसऱ्या दोषालाही दोष म्हणतां येणें कठीण आहे. सुरजमल्ल जाट अथवा पेशवे धोत्रें बडवायला लावतील या भीतीनें नजीबखानाला अस्तनींत बाळगणाऱ्या मल्हारराव होळकरांनीं देखील या बाबतींत भाऊंना दोष दिलेला आढळत नाहीं. युद्धकलेचे अपरिचित आह्मी लेखक कोणत्या पुण्याईवर युद्धकलेंतले दोष दाखवितों परमेश्वर जाणे! बाजारबुणगे शेवटपर्यंत लोंचटासारखे राहिले होते हें स्पष्ट आहे, व त्यांना त्याचें प्रायश्चित्तही मिळालें. विश्वासरावाचा मृत्यु ही तर दैवरेषा होती; आणि भाऊ नंतर अश्वारूढ झाले ते केवळ विश्वासराव मेल्यामुळें नसून यशाची लाट पूर्णपणें फिरली म्हणून झाले. नुसता पुतण्याच्या मरणामुळें त्यांनीं अग्निप्रवेश केलेला नव्हे. हौसेनें बरोबर लेंकरूं आणलें तें गेलें, आणि शिवाय एवढी फौज बुडाली; तेव्हां त्यांनीं निर्वाणीचा उपाय करून आपला भाग्यरवि अखंडतेजस्वी राखिला. भाऊंच्या जिवावर दौलत अवलंबून नव्हती; मागें नाना होते, छत्रपति होते. भाऊनें मरतांना क्षात्रधर्माची शर्थ केली, याची साक्ष बखरी देतात. रणनवरे म्हणून ज्यांची ख्याति अशा इतर नरपुंगवांनीं हेंच केलें. वाटर्लूंत फौज नष्ट झाल्याबरोबर नेपोलियननें आपला घोडा शत्रूंच्या तोफांवर वळवला, पण मार्शल 'ने'नें त्याला मागें खेंचलें. वाशिंग्टननें एकट्यानें शत्रूवर चाल केलेली पाहून त्याची पळती फौज परतली, व तेव्हांपासून अमेरिकेचा भाग्यसूर्य बदलला. सीझर, शिकंदर, अकबर हे स्वतः गर्दीत शिरून लढल्याचीं उदाहरणें आहेत. वाशिंग्टनला एकटा पाहून जशी त्याची फौज परतली, तसे होळकर, गायकवाड परतते तर कदाचित् इतिहास बदलता. ते बचावले, पण जनकोजी, इब्राहिमखान, भाऊ यांच्यापेक्षां ते खात्रीनें शहाणे नव्हत.

१४. पान १०३ वर रा. बर्वे लिहितात कीं, दरबार-मंडपाचें रौप्य छत भाऊंनीं तोडलें, व त्याचीं नाणीं पाडून फौजेचा मुशाहिरा वांटला, या गोष्टीमुळें सुरजमल्ल रागावला, असें बखरकार ह्मणतात. आग्र्याच्या ताजमहालाच्या भिंतींतून लावलेलीं मोत्यें माणकें या जाटानें

पुढें खणून नेलीं असें तिकडील लोक सांगतात. याची शहानिशा आमच्यापेक्षां रा. बर्व्यांना जास्त लागेल. हें खरें असल्यास जाटाचें भाऊवर रुसणें म्हणजे शांतिपर्वांतील गृध्रगोमायुसंवादासारखेंच झालें. एका स्मशानांत गिधाडाचा अधिकार दिवसाचा व कोल्ह्याचा रात्रींचा होता. तिसऱ्या प्रहरीं एका बालकाचें प्रेत नातलगांनीं तेथें आणून टाकलें. तेव्हां गिधाड त्यांस ह्मणे, या नश्वर काष्ठाला सोडून तुम्ही आपल्या कामाला लागा, घरीं जा. कोल्हा तेथेंच बसून अश्रुमोचन करण्याचें महत्त्व सांगे. गिधाडाला वाटे, संध्याकाळच्या अगोदर लोक परत जातील तर प्रेताचा मालक मी; कोल्ह्याला वाटे कीं तोंपावेतों गिधाडाच्या तावडींतून प्रेत सुटल्यास पुढें मालक मी! शेवटीं आकाशस्थ जात असलेल्या ईश्वरपार्वतींनीं अमृतसेक करून बालक उठविलें, आणि शास्त्र जल्पणाऱ्या या दोघां वावदूकांची भूक अखंडची निवविली. या जाटानें ताजमहालसारख्या कबरींतून हिरेमाणकें खणून नेलीं असें आम्ही तद्देशीय लोकांकडून ऐकिलें आहे. खरें असल्यास जाटाला भारतांतली गोष्ट लागू पडते. नसल्यास त्याचा आत्मा आह्माला क्षमा करो.

१५. मजकुराच्या संगतीबद्दल व भाषेबद्दल प्रो. यदुनाथ सरकार यांनीं केलेल्या सूचना रा. बर्व्यांनीं लक्षांत ठेवाव्या. मुसलमानांच्या क्रूरतेबद्दल पदोपदीं वाक्यें व मर्मप्रहार आहेत तितके नकोत. अकबरानें तात्पुरत्या तडजोडी केल्या; पण त्याचे फांस उकलवितांना औरंगजेबाचे प्राणही पुरले नाहींत. या दुसऱ्या बादशाहाविषयीं लेखांत अधिक समता व पूज्यभाव पाहिजे असें आह्मांला वाटतें. पा. ६, ११, ४१ येथील टीपांत इस्लामी राजांवर सरसहा टीका केल्या आहेत, त्याना ग्रंथाधार दिले आहेत; पण सर्वच ग्रंथ वेदव्यासाचे नव्हेत. त्यांच्यावर विश्वास ठेवतांना आपणही सारासार विचार करायला हवा. तसल्या टीपाही नकोत, आणि पान १२, २०, ३५ याखालच्या टीपांतून दिलें आहे तसलें सारवणही नको. प्रस्तावनेच्या शेवटीं इस्मायलजी वकीलाच्या तोंडची बोहरे लोकांचा औरंगजेबानें छळ केल्याची साक्ष दिली आहे, तीही अप्रस्तुत आहे. पातशहाला इस्लामी धर्म राखायचा होता. त्या धर्मावरचीं बांडगुळें छाटायाचा त्यानें यत्न केला असल्यास त्याच्या युक्तायुक्ततेचा विचार तो व त्याचे मुल्ला यांनीं केला असेलच. धर्मधुरा ज्याच्या स्कंधावर असते त्याला अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो; आणि अखिलभारताच्या सार्वभौमाचें चित्रगुप्तत्व करतांना या त्रोटक गोष्टी जमेसच धरूं नयेत.

१६. हे बारीकसारीक भेद आम्हीं यथामति दाखविले, ते रा. बर्व्यांच्या चुका म्हणून नव्हत. पुष्कळ ठिकाणीं आमचीच विचारसरणी चुकली असेल. हा ग्रंथ पाहिजेच होता. तो याहून विस्तृत व साधार व कुशल होत जावा, ग्रंथकाराचें नांव वाढून त्यांनीं आपलें कार्यक्षेत्र व कीर्ति दोन्ही वाढवावीं; आणि पूर्वजांची कीर्तिच्छाया इतकी दाट व गर्द आहे कीं त्यांत कुठेंकुठें दोषनिदर्शनाचे कवडसे पडले तरी त्या छायेची थोरवी दुणावते व जाणवते या भावनेनेंच आह्मीं कांहीं सूचना केल्या आहेत. हें चिमुकलें पुस्तक आम्हांला आवडलें, पण या लेंकराची वाढ होऊन त्याच्याबद्दल युगव्यायतबाहु युवा दिसावयाला लागेल तेव्हांच प्रो. सरकारसारख्या लेखनधनुर्धरांचे डोळे निवतील. पुन्हां रा. बर्वे यांचें अभिनंदन करून अशींच इतर पुस्तकें व विशेषतः मध्य आर्यावर्ताचे अस्सल ऐतिहासिक लेख प्रसिद्ध करण्याबद्दल आह्मी त्यांना सुचवितों.

भ्रम कसला ? विकारवशता !

योग्य न दुग्धस्थानीं योजाया प्रिय हि शुद्ध तक्र तुला। मोरोपंत.

१. माझ्या पूर्वीच्या पावणेअकरा पानांच्या 'उद्धत' लेखाला उत्तर ह्मणून हा रा. दिवेकरांनीं विस्ताराच्या गेल्या अंकांत दहा पानांचा 'छोटासा' व विनम्र लेख लिहिला आहे. यांत प्रारंभींच रा. दिवेकर ह्मणतात,"....मी आपला कोणताही मुद्दा परत घेण्यास तयार नाहीं." वास्तविक पाहतां हें वाक्य वाचतांच पुढें वाद वाढविण्यांत काय अर्थ आहे असें मला वाटलें. कारण जेथें विकारास प्राधान्य असतें तेथें विचाराचें काय चालणार ? आपला कोणताही मुद्दा परत घ्यावयाचा नाहीं—याच दृढ प्रतिज्ञेनें रा. दिवेकर वादास प्रवृत्त झाले आहेत. तर मीही त्यांस नम्रपणें,"शूरोसि, कृतविद्योसि, दर्शनीयोसि" इतकेंच सांगून त्यांची रजा घेतों.

२. रा. दिवेकरांना या आपल्या लेखांत मुख्य मुद्दयाशिवाय इतर अनेक मुद्दे पुढें केले आहेत. त्या सर्वांना सांगोपांग उत्तर देण्यांत विशेष अर्थ नाहीं, व त्यापासून फायदाही नाहीं; ह्मणून मुख्य मुद्दयाबद्दल थोडेंसें स्पष्टीकरण करून बाकीच्यांचा संक्षेपतः विचार करूं.

३. पृष्ठ ८८ च्या आरंभीं 'भूल' शब्दाचा अर्थ समजावून सांगितला आहे. पण 'भयंकर' या विशेषणाची काय व्यवस्था लावावयाची हें सांगितलें नाहीं. " भीष्मांची भयंकर भूल" यांतील "भयंकर" ला फांटा मिळाला, यावरून आणखी कांहीं दिवसांनीं "भूल" शब्दालाही तो मिळेल असें मानण्यास पुष्कळ जागा आहे.

४. त्याच पृष्ठावरील खालील वाक्यसमुच्चयाची एकवाक्यता कशी करावयाची, हें रा. दिवेकर समजावून सांगतील काय ?

१"...कांहीं अंशीं" पौरव कुलाच्या "या अवनतीस भीष्मांची प्रतिज्ञा कारण झाली हेंही पण यथार्थच आहे......या अवनतीस केवळ भीष्मांची प्रतिज्ञाच कारण नसल्यानें मी 'भूल' हा शब्द योजिला आहे."

२" माझें म्हणणें हेंच कीं, याच प्रतिज्ञेनें अखेर पौरवकुलाची अवनति केली......व सर्व भरतभूमीचा नाश करणारें महाभारत घडवून आणिलें."

एकाच पृष्ठांत काय, पण एकाच रकान्यांत परस्परविरुद्ध मजकूर लिहिणारानें भारतांतील वसूच्या दोन ठिकाणच्या हकीकतींत किंचित् पण सकारण तफावत दिसतांच ती हकीकत अविश्वासार्ह ठरवावी हें आश्चर्य आहे. 'मनुष्याः स्खलनशीलाः' हेंच खरें.

५. माझ्या 'कार्यकारणभावसंबंधावर' रा. दिवेकर बरेच घसरले आहेत. परंतु थोडासा विचार केला म्हणजे असें वाटतें कीं, ते खरोखरीच या बाबतींत घसरले आहेत. प्रश्न असा आहे कीं, भीष्माची प्रतिज्ञा भारती युद्धास कारण झाली कीं काय ? याचा आपण विचार करूं. शंतनूनें जेव्हां पुनर्विवाह केला तेव्हां त्याचें वय कितीही असो, तो महत्त्वाचा प्रश्न नाहीं. तें वय पुत्रोत्पादनक्षम होतें यांत मुळींच संशय नाहीं. कारण, तसें जर तें नसतें तर दाशपतीनें सत्यवती त्याला दिलीही

नसती; व कदाचित् दिली असती तर भीष्मां-कडून तो असली घोर प्रतिज्ञाही करवून घेता ना. परंतु भीष्म निव्वळ कर्तव्य ह्मणून प्रतिज्ञा करि-तात व ती ऐकून दाशपति खूश होतो, यावरू-नच शंतनूस पुत्र होणें त्या वयांत शक्य होतें यांत मुळींच संशय नाहीं. आतां भीष्मांनीं, प्रतिज्ञा करितेवेळीं,फक्त दोनच गोष्टींचा विचार करणें शक्य होतें. एक, शंतनूस या वयांत संतति होणें शक्य आहे किंवा नाहीं. व दुसरी, संतति नच झाली तर भरतवंश कसा कायम ठेवावा? या दोनही गोष्टी त्यांनीं ह्मणजे भीष्मांनीं पूर्वेतिहासावरून अनुमित केल्या असल्या पाहि-जेत. वृद्धापकाळची संतति निर्बल व अल्पायु असते अशाबद्दल त्यांना एकही प्रमाण सांप-डलें नसेल. रा. दिवेकर आज देखील एकसुद्धां प्रमाण दाखवीत नाहींत; व आसपासच्या वृद्धा-पकाळच्या संततीकडेही पाहत नाहींत. असो. त्यांची इच्छा! भीष्मांना जेव्हां प्रत्यक्ष प्रमाणा-वरून असें दिसलें असेल कीं, वृद्धापकाळची संतति निर्बल व अल्पायु असलीच पाहिजे असा मुळींच नियम नाहीं, तेव्हां त्यांची पहिली अड-चण आपोआपच दूर झाली. आतां कदाचित् संतति नच झाली, किंवा होऊनही कांहीं कार-णांनीं न जगली, तर भरतवंशाची वाट काय? हा प्रश्न त्यांचे समोर उभा राहिला असेल. अर्थात् याही प्रश्नाचा विचार त्यांनीं पूर्वींच्या इतिहासा-वरूनच करावयास पाहिजे होता. व त्यांनीं निःसंशय तो केलाही असेल. आपल्याच दुसऱ्या एका शाखेंत नियोग झाला व ती शाखा कायम राहिली, सूर्यवंशांतही हाच प्रकार घडला व तोही वंश अस्तित्वांत राहिला, तेव्हां तसाच प्रसंग आला तर आपणही या सर्वमान्य नियोगाचें अवलंबन करवून वंश कायम ठेवूं असें त्यांनीं पूर्ण विचारानें आपल्या मनाशीं ठरवून ठेविलें असावें असेंच, नियोगापूर्वीं सत्यवतीशीं झालेल्या त्यांच्या स्पष्ट भाषणावरून, ठरविण्यास पुष्कळ जागा आहे. आतां नियोगसमयीं, ऋषीच्या तेजानें एक अंध होईल व दुसरी पांढरी फट-फटीत पडेल, या गोष्टींची भीष्मांना कल्पना करितां येणें शक्य होतें काय, याचा रा. दिवे-करांनीं शांतपणें विचार करावा व 'ही कल्पना करितां येणें शक्य होतें' असें जर त्यांना वाटलें तर त्यांनीं भीष्मांना खुशाल अपराधी ठरवावें. अंबिकेनें डोळे मिटणें व अंबालयेनें गलितधैर्य होणें या गोष्टी निव्वळ यदृच्छेनें झाल्या आहेत. कारण, पूर्वीं कोणत्याही नियोगसमयीं असा प्रकार घडला नव्हता. व ह्मणूनच त्याबद्दल भीष्मांस जबाबदार धरणें अन्यायाचें आहे.भीष्मां-च्या प्रतिज्ञेनें नियोग झाला हें खरें; पण नियो-गानें युद्ध झालें हें मात्र मुळींच खरें नाहीं, व म्हणूनच भीष्म त्याबद्दल मुळींच जबाबदार नाहींत. आतां एक गोष्ट मात्र रा. दिवेकरांस माहित असून भीष्मांस व इतरांसही अज्ञात होती व आहे. ती ही कीं, क्षय या रोगांत जशा पायऱ्या आहेत—ह्मणजे अमूक एका पायरी-पर्यंत क्षय गेला तर तो बरा होत नाहीं व तिच्या आंत असला तर बरा होण्याचा संभव असतो, तशाच नियोगांतही पायऱ्या आहेत. अमुक एका प्रकारचा नियोग झाला ह्मणजे होणारी संतति आपआपसांत भांडणार नाहीं व तसा न झाला तर ती भांडेल, इत्यादि अपूर्व माहिती रा. दिवेकरांस असावीसें दिसतें.

कदाचित् ह्या तौलनिक पद्धतीच्या अभ्यासाचा परिणाम असेल; व तेवढ्यामुळें भीष्मांस दोषी अगर गुन्हेगार ठरण्याचा प्रसंग येईल. एरव्हीं कोणत्याही तऱ्हेनें भीष्मांवर दोष लागू होत नाहीं. वंश कायम ठेवण्यास दत्तक घेण्याचाही एक मार्ग होता. भरतानें एक मुलगा दत्तक घेतला होता, दुःशासनासही दत्तक दिलें गेलें होतें, या गोष्टीसुद्धां भीष्मांना अवगत असल्या पाहिजेत. अर्थात् सारासार विचारानें, कल्पनेनें व तर्कानें जेवढ्या गोष्टींचा विचार करणें अवश्य होतें तेवढ्या सर्व गोष्टींचा भीष्मांनीं पूर्णपणें विचार करूनच आपली ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा केली होती व त्यांनीं ती आमरण अक्षरशः पाळिली. असो. मुख्य मुद्द्यासंबंधानें एवढें विवेचन तूर्त पुरें होईल असें वाटतें.

६. आतां आपण इतर मुद्द्यांपैकीं महत्त्वाच्या एकाच मुद्द्याचा संक्षेपतः विचार करूं. पृष्ठ ९२-वर चित्रांगदाच्या निर्बलतेविषयीं रा. दिवेकरांनीं विवेचन केलें आहे. चित्रांगदाचें गन्धर्वाशीं तीन वर्षेंपर्यंत सतत युद्ध झालें असें मीं पूर्वी ह्मटलें आहे. त्यावर रा. दिवेकर विचारतात, "सतत तीन वर्षें युद्ध ह्मणजे काय होतें याची रा. वाकसकरांस कल्पनाही दिसत नाहीं." खरेंच आहे. ज्या गोष्टीबद्दल भरपूर ऐतिहासिक पुरावा असतो किंवा इतर ऐतिहासिक प्रमाणांनीं जी गोष्ट सिद्ध होणें शक्य असतें त्या गोष्टीबद्दल कल्पना करणें किंवा तर्कवितर्क करीत बसणें मला आवडत नाहीं, त्याला माझा नाइलाज आहे. तौलनिक पद्धतीनें प्राचीन ग्रंथाचा विचार करणारानें निरनिराळ्या देशांच्या इतिहासाकडेस कां दुर्लक्ष करावें हें समजत नाहीं. इंग्लंडांतील 'शतवार्षिकी युद्ध' किंवा 'वार्स ऑफ दि रोझिस्' च्या लढायांत मुख्य योद्धा अव्वलपासून अखेरपर्यंत एकच असा नसल्यानें, हीं प्रमाणें रा. दिवेकर मानणार नाहींत. परंतु रा. दिवेकरांनीं शिकंदराच्या दिग्विजयाकडेस कां दुर्लक्ष करावें ? इंग्लंडाविरुद्ध नेपोलियननें सारखीं सोळा वर्षें धडपड केली तिकडेस कां कानाडोळा करावा ? आणि रोमचें साम्राज्य धुळीला मिळवून सर्व जगावर प्यूनिक साम्राज्य सतत सतरा वर्षें करणारा हॅमिल्कारचा पुत्र हॅनिबाल याचें क्षणभरही स्मरण कां करूं नये ? याचें कारण समजत नाहीं. शिकंदर, नेपोलियन आणि हॅनिबाल हे वृद्धापकाळची संतति नसल्यानें त्यांस असले पराक्रम करणें शक्य होतें, परंतु चित्रांगद ही वृद्धापकाळची संतति असल्यानें त्यांस तीन वर्षेंपर्यंत सतत युद्ध करणें शक्य नव्हतें, एवढेंच जर रा. दिवेकरांचें ह्मणणें असेल तर न जाणो. 'समा' शब्दाचा अर्थ 'वर्ष' असा मीं केला आहे, व याबद्दल

संवत्सरो वत्सरोऽब्दो हायनोऽस्त्री शरत्समाः ।

ही अमरांतील पंक्ति प्रसिद्धच आहे. आजपर्यंत महाभारताचीं जेवढीं ह्मणून भाषांतरें झालीं आहेत, तेवढ्या सर्वंही गद्यपद्यात्मक भाषांतरांत 'वर्ष' असाच या 'समा' शब्दाचा अर्थ केला आहे. याहून अधिक पुरावा तो काय पाहिजे ? 'समा' दिवसवाची वापरल्याचें उदाहरण रा. दिवेकरांनीं दिलें असतें तर बरें होतें. कोनाकोपऱ्यांतून व अप्रसिद्ध अर्थ काढून आपल्या सिद्धान्ताचें मंडन करूं इच्छिणारानें दुसऱ्यास

शब्दाच्या अर्थाकडेसच लक्ष दिल्याबद्दल नांवें ठेवावींत हें आश्चर्य होय. "समास्तिस्त्रो भवेद्रण:" हें पद ज्या श्लोकांत आहे त्याच्याच पुढचा श्लोक—

तस्मिन्विमर्दे तुमुले शस्त्रवर्षसमाकुले ।
मायाधिकोऽवधीद्वीरं गन्धर्वः कुरुसत्तमम् ॥९ ॥

आदिपर्व. अ. १०१.

असा आहे. यावरून धर्मयुद्धांत चित्रांगदापुढें गन्धर्व टिकला नाहीं हें स्पष्टच दिसतें. त्यानें कपटानें चित्रांगदाला मारिलें. घटोत्कचाच्या मायावी युद्धानें द्रोण, कृप, अश्वत्थामा यांच्यासारखे अद्वितीय वीरही जेरीला आल्याचें द्रोणपर्वांत लिहिलें आहे. व त्यावेळीं कर्ण जर नसता तर कौरवांचीं शंभरवर्षें त्याच दिवशीं पूर्ण होणार होतीं हेंही तेथें स्पष्टच दाखविलें आहे. तात्पर्य हेंच कीं, कपटापुढें बलाचें कांहीं चालत नाहीं, व चित्रांगद कपटानें मारिला गेला ह्मणून निर्बलही ठरत नाहीं. रा. दिवेकरांनीं या गोष्टीचा पुन: एकदां शांतपणें विचार करावा. चित्रांगदाचें गन्धर्वांशीं जें युद्ध झालें तें भीष्मांस न कळतां झालें, असें रा. दिवेकर ह्मणतात. पण याला कांहीं एक प्रमाण नाहीं. 'मनुष्या:स्खलनशीला:' याचें हें आणखी एक उदाहरण असावें. असो. चित्रांगद कसला पराक्रमी होता हें उपर्युक्त १०१ हा अध्याय सबंध वाचल्यास तेव्हांच खात्री होईल.

७.माझा पुराणांचा अभ्यास एकांगी आहे, तौलनिक पद्धतीचा नाहीं, अपूर्ण आहे, अन्धश्रद्धेचा आहे, इत्यादि जीं विधानें रा. दिवेकरांनीं मजबद्दल केलीं आहेत तीं मला सर्वस्वीं मान्य आहेत. पुरूच्या बाबतींत त्यांनीं जी माझी चुकी दाखविली आहे तीबद्दल मी त्यांचा आभारी आहें. ऐतिहासिक रीतीनें त्यांनीं जो पुराणांचा अभ्यास केला आहे तो स्तुत्य व नि:संशय अनुकरणीय आहे. रा. दिवेकरांनीं आपल्या लेखांत जी माझी स्तुति केली आहे तिला मी मुळींच पात्र नाहीं. त्यांना मनसोक्त विधानें ठोकून देण्याची जी संवय जडली आहे तिचा तो आणखी एक मासला आहे इतकें नम्रपणें सुचवून त्यांची व वाचकांचीही रजा घेतों.

विनायक सदाशिव वाकसकर.
महाराजा थिएटर जवळ, बडोदें.

प्रतिष्ठान म्हणजे पैठण कीं काबूल ?

तुका ह्मणे मज कळते चांचणी । बडबडाचि वाणी किंवा सत्य ॥

गेल्या मार्चच्या अंकांत माझ्या टीकेस उत्तरादाखल एक लेख रा. वासुदेवराव आपट्यांनीं लिहिला आहे. माझ्या टीकारूप लेखांतील पुरावा सबळ आहे कीं नाहीं हें ठरविण्याचा अधिकार रा. वासुदेवरावांचा नाहीं; तो मार्मिक वाचकांचा आहे. कुस्तींत कोण कोणास चीत करितो हें ठरविण्याचें काम प्रेक्षकांचें आहे, पहिलवानांचें नाहीं.

रा. वासुदेवरावांच्या मूळ लेखांतील मुद्द्यांचें अधिक विस्तरश: खंडन करण्यापूर्वी हें सांगणें जरूर आहे कीं, त्यांचा मूळ लेख सहस्रबुद्धेकृत **भारतस्थलादर्श** या पुस्तकांतून घेतलेला

आहे. याविषयीं कोणास शंका असल्यास त्यानें त्या पुस्तकाचें पान १०१ पहावें. आतां रा. वासुदेवराव यांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांच्या लेखांतील मुख्य मुद्दे दोन.

१. पैठणास प्रतिष्ठान ह्मणण्यास कांहीं पुरावा आहे कीं नाहीं.

रा. वासुदेवराव आपल्या मूळ लेखांत असें म्हणतातः—"कनिंगह्याम साहेबांच्या मतें **प्रतिष्ठान** नगरी काश्मीरांत होती (Cunningham's Ancient Geography of India, pp. 90-104)" मी वरील पुस्तकाचीं निर्दिष्ट पानें सुमारें तासभर चाळलीं, नंतर चष्मा लाविला, Magnifying glass चा उपयोग करून पाहिला. तरी मला वरील मत कोठें आढळलें नाहीं. पहिल्या मुद्दयांत वादाचा प्रश्न व्युपत्तीचा. रा. वासुदेवरावांचें म्हणणें असें आहे कीं, **काबूल** शहराचें जुनें नांव **आर्तोस्पान.** हा **ऊर्ध्वस्थान** शब्दाचा अपभ्रंश. **अर्तोस्पान** शहरालाच कित्येक ग्रंथांत **पोर्तोस्पान** ह्मटल्याचाही उल्लेख आहे. **पोर्तस्थान** हा संस्कृत **प्रतिष्ठान** शब्दाचा अपभ्रंश यवनलोकांनीं उच्चारसौकर्यार्थ केलेला दिसतो. **प्रतिष्ठान** याचा अपभ्रंश ग्रिम्सलॉ (Grimm's Law) प्रमाणें **'पइष्ठान'** असा होतो व त्यापासून पायठान व पठाण हीं अपभ्रष्ट रूपें झालीं असलीं पाहिजेत इ. इ. हा रा. आपट्यांचा पूर्वपक्ष. यावर माझा उत्तरपक्ष येणेंप्रमाणेंः—ही तर्काची इमारत बहुतेक कनिंगह्याम साहेबांनीं उभारली आहे. तिजवर कळस मात्र रा. आपट्यांनीं **प्रतिष्ठित** केला आहे. अर्तोस्पान याचा अपभ्रंश ऊर्ध्वस्थान हाच सर्वसमंत नाहीं. या अपभ्रंशास Conjectural etymology असं मार्टिननें स्पष्ट ह्मटलें आहे. पुष्टु भाषेंत पोर्त शब्दाचा अर्थ ऊर्ध्व (उंच)असेल; पण 'स्पान' याचें 'स्थान कसें झालें, हें रा. वासुदेवरावांनीं मुळींच दाखविलें नाहीं. हिंदुस्तान, अफगाणिस्तान, बलुचिस्तान, तुर्कस्तान, अरबस्तान या सर्व शब्दांत जर 'स्तान' हा शब्द स्पष्ट आहे, तर अर्तोस्पान याच शब्दांत त्याचें ' स्पान ' असें रूपांतर कां झालें ? माझ्या मतें 'स्पान' हा शब्द मूळचा संस्कृत नसावा. **इस्पहान** शब्दांत हें रूप जर आढळतें तर तें मूळचें अन्य भाषेंतील असलें पाहिजे. 'पोर्तोस्पान' हा **प्रतिष्ठान** शब्दाचा अपभ्रंश असा रा. आपट्यांचा कुतर्क. त्याच्या समर्थनार्थ त्यांनीं **ग्रिम्स लॉ**चा भयंकर बागुलबुवा मला दाखविला आहे. मला व्युत्पत्तिशास्त्र अवगत नाहीं हें खरें. रा. आपट्यांची बुद्धि त्या शास्त्रांत किती अंकुठित आहे हें त्यांनीं सिद्ध केलेल्या 'शाबास'वगैरे शब्दांच्या व्युत्पत्तीवरून वाचकांस विदितच आहे.रा.वासुदेवरावांच्या कर्णपथावरून ग्रिम्स लॉ हा शब्द मात्र गेलेला दिसतो; पण त्याचें तत्त्व त्यांस मुळींच कळलेलें नाहीं, असें ह्मणावें लागतें.प्रसिद्ध जर्मन भाषापंडित जेकब ग्रिम यानें अनेक भाषांचें अध्ययन करून असा एक ठोकळ नियम ठरविला आहे कीं, शब्द एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत जातांना त्यांच्या व्यंजनांत कांहीं विशिष्ट नियमानें फेरफार होतो. उदाहरणार्थ, 'प' चा 'फ' व 'ट' चा 'द' होतो; जसें लाटिन 'प्याटर' याचें इंग्रजींत 'फादर' असें रूप होतें. व्यंजनाचा अजी लोप होण्यासंबंधाचा ग्रिमचा नियम

निदान मला तरी माहीत नाहीं. प्रतिष्ठानाचा पइष्टान असा अपभ्रंश होतो, परंतु तो करण्यास भूमध्यसमुद्र ओलांडून जाण्याची अवश्यकता नाहीं. प्राकृत व्याकरणकारांनीं हा नियम दिलेला आहे. प्रतिज्ञा याचा अपभ्रंश जर पइज्जा-पैज असा होतो, तर प्रतिष्ठानाचा पइट्ठाण—पैठण असा होण्यास काय अडचण आहे ? रा. आपट्यांस जें मोठें कोडें पडलें तें हें दिसतें कीं, 'स्थान' याचा अपभ्रंश 'ठाण' असा व्हावा तो 'ठण' असा कसा झाला ? म्हणून 'पठाण' हा सरळ अपभ्रंश त्यांना दिसतो. परंतु स्थान याचा अपभ्रंश दोन्ही तऱ्हेनें होतो. उदाहणार्थ, ग्रामस्थान–गांवठाण; मल्लस्थान—मलठण.

२. आतां **पठाण** शब्दाच्या व्युत्पत्तीचा प्रश्न राहिला. रा. वासुदेवरावांच्या डोक्यांत जी व्युत्पत्ति आली ती त्यांनीं यत्किंचितही विचार किंवा ग्रंथावलोकन न करितां ठोकून दिली आहे. थोडीशी तसदी घेऊन अफगाणिस्तानावरील एखादा तरी ग्रंथ त्यांनीं वाचला असता तर प्रतिकूल टीकेस त्यांनीं आपल्यास पात्र करून घेतलें नसतें. Races of Afghanistan या नांवाचें पुस्तक एका इंग्रज ग्रंथकारानें लिहिलें आहे. त्यांत तो पठाणांच्या संबंधानें येणेंप्रमाणें लिहितोः—

"The term Pathan is not a native word at all. It is the Hindustani form of the native word Pukhtana and Pukhtana is the proper petronaimic of the people inhabiting the country called Puktankhwa. In the time of Herodotus, four centuries before our era, this very country was called Pactiya and its natives Pactiyans."

सारांश, पखतन–पेहतन–पठाण हा माझा तर्क बऱ्याच अंशानें सयुक्तिक आहे असें सुज्ञ वाचकांस दिसून येईल. पेटनिक हे लोक पैठणचे मानण्यास काय पुरावा आहे ? असा प्रश्न रा. वासुदेवराव करितात. यास उत्तर एवढेंच कीं, पोर्टास्पानाचा प्रतिष्ठानाशीं संबंध जुळवून देण्यास त्यांनीं जो पुरावा पुढें केला आहे, त्यापेक्षां पेटनिकाचा प्रतिष्ठानाशीं संबंध जुळविण्यास छत्तीस गुण पुरावा आहे. डा. भांडारकर व प्रसिद्ध फ्रेंच भाषापंडित सेनार्ट या दोघांचा अभिप्राय अनुकूल आहे. गंधर्व म्हणजे गांधार देशचे लोक, हा आणखी एक विचित्र शोध रा. वासुदेवरावांच्या लेखणींतून अचानक बाहेर पडला आहे. ही व्युत्पत्ति कोणत्या पंडितानें केव्हां ठरविली, तीस मान्यता कोण कोणीं दिली, ही माहिती जर रा. आपटे प्रसिद्ध करतील तर उत्तम होईल. गंधर्वयोनि मनुष्ययोनीच्या वर देवयोनींपैकीं आहे असें अमरकोशकार स्पष्ट म्हणतो. खेचर, नभश्चर असे पर्यायवाचक शब्द गंधर्वार्थी योजिलेले आढळतात. ऊर्वशी, रंभा, मेनका यांना स्वर्वेश्या, म्हणजे स्वर्गलोकींच्या नायकिणी असें स्पष्ट म्हटलें आहे. वेदांत गांधार व गंधर्व हे शब्द पृथक् योजलेले आहेत. इतका पुरावा विरुद्ध असून केवळ आपल्या कुतर्कांचें मंडन करण्याच्या भरीस पडून असलें धाष्ट्यांचें विधान रा. वासुदेवरावांनीं केलें आहे.

यापुढें प्रस्तुत विषयावर ज्यास्त कांहीं लिहिण्याची माझी इच्छा नाहीं. या वादांत कोणाचें म्हणणें खरें आहे याचा निर्णय करण्याचें काम मी सुज्ञ वाचकांवरच संपवितों.

भारद्वाज.

मुहूर्तमार्तंड व नारायणभट्ट.

(पुढील पत्रव्यवहार आमच्याकडे प्रसिद्धीसाठीं आला आहे.)

रा. रा. मुमुक्षुकर्ते यांसः—

कृ. सा. न. वि. वि. मराठी भाषेंतील सर्वोत्कृष्ट मासिक पुस्तक **विविधज्ञानविस्तार** हें नांवाप्रमाणें ज्ञानप्रसाराचें काम मुकाट्यानें करीत आहे. परंतु चालकांचे व विद्वान् लेखकांचे परिश्रम जाणून आमच्यांतील धनिक व सुशिक्षित लोकांकडून त्याला भरपूर आश्रय मिळत नसावा असें वाटतें. ही स्थिति इष्ट नव्हे, प्रत्येक मराठी वाचकानें एकवार तरी याचें अवलोकन करावें अशी विनंती आहे. असो.

विविधज्ञानविस्तारच्या डिसेंबर १९१४ च्या नुकत्याच हातीं आलेल्या अंकांत सुप्रसिद्ध इतिहासकार रा. रा. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए., यांचा " गागाभट्टाचें घराणें " हा माहितीनें अपूर्व असा लेख आला आहे. कै. रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्या "हिंदु लॉ " नांवाच्या इंग्लिश ग्रंथाच्या प्रस्तावनेंतील माहितीवरून हा लेख आपण लिहिला असें रा. सरदेसाई यांनीं आरंभीं लिहिलें आहे. गागाभट्टाचे प्रपितामह नारायणभट्ट यांचें त्रोटक चरित्र यांत दिलें आहे. त्यांतील एक वाक्य संशयात्मक वाटतें तें असें:—

" नारायणभट्ट हा मोठा मीमांसक होता. त्याचे बारा ग्रंथ 'मार्तंड' या संज्ञेनें प्रसिद्ध आहेत. त्यांतील मुहूर्तमार्तंड शके १४९३ म्हणजे सन १५७१ त लिहिला, असा उल्लेख आहे. "

महाराष्ट्रांतील सर्वप्रसिद्ध ग्रंथ नारायण दैवज्ञकृत ' मुहूर्तमार्तंड ' हा १४९३ (त्र्यंकेंद्र प्रमिते वर्षे) शकांत माघमासी म्हणजे इसवी सन १५७२ च्या फेब्रुवारींत समाप्त केला आहे. ' प्रयोगरत्न'कार नारायणभट्ट यांचा मुहूर्तमार्तंडाशीं कांहीं संबंध नाहीं, फक्त नामसादृश्य आहे. एक नारायणभट्ट व दुसरा नारायण दैवज्ञ. नारायणभट्ट यांचें वास्तव्य श्रीक्षेत्र काशी येथें होतें व नारायण दैवज्ञ हे दौलताबादेनजीक " टापरगांव " आहे तेथें राहणारे होते. यांचा मातुलवंश विद्यमान आहे.

नारायणभट्टाचे १२ ग्रंथ ' मार्तंड ' संज्ञेनें प्रसिद्ध असलेले कोणकोणते हेंही कळलें पाहिजे. 'प्रयोगरत्ना'चे आरंभीं ग्रंथकार लिहितातः—

भट्टरामेश्वरसुतो भट्टनारायणः सुधीः ॥ प्रयोगरत्नं कुरुते काश्यां विश्वेशतुष्टये २ १ ॥

'मुहूर्तमार्तंड' कार आपलें कुलवृत्त सांगतात.— श्रीमत् कौशिकपावनो हरिपदद्वंद्वार्पितात्मा हरिस्तज्जोऽनंत इलासुरोचितगुणो नारायणस्तत्सुतः ॥ ख्यातं देवगिरेः शिवालयमुदक् तस्मादुदक् टापरग्रामस्तद्वसंति मुहूर्तभवनो मार्तंडमत्राकरोत् ॥ १६० ॥ नारायण दैवज्ञ यजुर्वेदी वाजसनेयी माध्यंदिन व नारायणभट्ट ऋग्वेदी आश्वलायनशाखोत्पन्न, गोत्र कौशिक व विश्वामित्र. मार्तंडकाराचे पूर्वज ' सासमणूर ' गांवीं होते. ते स्वतः टापरगांवीं होते. नारायणभट्टांचा वंशवृक्षः—

गोविंदभट्ट (सुमारें इ. स. १४५०)
|
रामेश्वरभट्ट
|
नारायणभट्ट इ. स. १५१४

मुहूर्तमार्तंडकार यांचा वंशवृक्षः—

हरि
|
अनंत
|
नारायण.

नारायण दैवज्ञाचा पुत्र गंगाधर यानें शके १५०९-मध्यें मनोरमा नांवाची टीका ग्रहलाघवावर केली आहे, असें कै० शंकर बाळकृष्ण दीक्षितकृत भारतीय ज्योतिःशास्त्राचा इतिहास, पृष्ठ२७७यांत लिहिलें आहे.

नाम—गोत्राचे साम्यानें भास झाला असावा. यावरून कै० मंडलिकांचे ग्रंथावरून केलेलें विधान शोधाभावीं शब्दशः ग्रहण करतां येणार नाहीं असें माझ्या अल्पमतीस वाटतें. बारा मार्तंड ग्रंथांची व इतर बारा ग्रंथांची माहिती सविस्तर प्रसिद्ध व्हावी. काशीक्षेत्रस्थ नारायण भट्टाचा 'मुहूर्तमार्तंड' ग्रंथ दुसरा एखादा असल्यास तो पाहून मला परमानंद होईल व त्याचें श्रेय रा. रा. सरदेसाई यांनाच येईल. 'बालादपि सुभाषितं ग्राह्यम्.' क. लो. हे विनंती.

आपला सेवक,

मु. सोळांकूर, स्टेट कोल्हापूर, ता. ८।१।१५ } वासुदेव दत्तात्रय गुळवणी.

[वरील पत्र पुणें येथील 'मुमुक्षु' पत्रांत ता. २१।१।१५ चें अंकांत प्रसिद्ध झालें आहे.]

[२]

रा. रा. वासुदेव दत्तात्रय गुळवणी मु० सोळांकूर यांस विनंति विशेष ता. २१।१।१९१५ च्या 'मुमुक्षु' पत्रांत 'नारायण भट्टा' च्या ग्रंथांसंबंधानें छापलेलें पत्र माझें पाहण्यांत आलें. 'मुहूर्तमार्तंड' ग्रंथाबद्दल आपल्याप्रमाणेंच मलाही संशय आला होता. कै० मंडलिक ह्यांच्या 'हिंदु लॉ' पुस्तकांत नाना प्रकारच्या निबंधांच्या व ग्रंथकारांच्या याद्या छापिलेल्या आहेत. त्यांत 'नारायणभट्ट' व 'नारायण दैवज्ञ' असा स्पष्ट खुलासा नसल्यामुळें माझेच लिहिण्यांत चुकी झाली असावी असें मला वाटतें. कारण मंडलिकांनीं भट्ट घराण्याची वेगळी हकीकत दिली आहे, तींत नारायण भट्टाचें नांवावर 'मुहूर्तमार्तंड' हा ग्रंथ त्यांनीं दाखविलेला नाहीं.

ह्या संबंधानें भट्टघराण्याचे प्रस्तुत वंशज विद्वद्वर्य पंडित कान्तानाथ भट्ट (मुख्योध्यापक, पाठशाळा मिर्झापूर) ह्यांजला पत्र लिहून भट्ट घराण्याची हकीकत मीं मागविली होती. त्याप्रमाणें त्यांनीं स्वतः रचून छापविलेलें 'भट्टवंश काव्य' नामक संस्कृत पुस्तक कृपा करून नुकतेंच मजकडे पाठविलें, त्यांत नारायणभट्टांच्या ग्रंथांची यादी खालील पद्यांत दिली आहे:—

"व्यधात् भवाब्ध्युत्तरणैकसेतून् ग्रंथानिमानाप्तसमस्त कामः ॥
प्रयोगरत्नं च विधानरत्नं सद्वृत्तरत्नाकरमंजुटीकाम् ।
चकार विद्वानथ गृत्यसूत्रवृत्त्याव्हयं गृह्यसुकर्मसि
तदा स काशीमृतमोक्षनिर्णयं चकार विद्वाद्धितगृह्यसागरम् ॥
जनोपकाराय सतां विभूतयो न स्वार्थसिद्धया इति शास्त्रनिर्णयः ॥
नो त्रिस्थलीसेतुमुखाः प्रसिद्धा ग्रंथा नवा प्रागुदिता भवेयुः ॥

ह्यावरून मुहूर्तमार्तंड ग्रंथ नारायण भट्टाचा नव्हे व मार्तंडसंज्ञक बारा ग्रंथही त्यांनीं लिहिलेले नाहींत हें उघड आहे.

अशा कामांत प्रत्येकास हातभार लावणें जरूर असून आपण चुकीची दुरुस्ती केली हें प्रशंसनीय आहे. मात्र चूक दाखविली ती 'विविधज्ञान विस्तारां'-तच दाखविली असती तर बरें होतें. मुमुक्षूंतील पत्र माझ्या पाहण्यांत येण्याचा संभव नव्हता. विस्तारकर्त्यांनीं सांगितल्यावरून तपास केला. कळावें लो. क. ही विनंती.

गोविंद सखाराम सरदेसाई.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक ५.

पुस्तकपरीक्षा.

'सुख आणि शांति.'

महाराष्ट्राला विशेष परिचित असलेले विद्वान् लेखक रा. रा. महादेव हरि मोडक यांनीं इंग्लंडमधील सुप्रसिद्ध ग्रंथकार **सर जॉन लबक्** यांच्या 'पीस् अँड हॅपिनेस्' नामक ग्रंथाच्या आधारानें मराठी भाषेंत शब्दस्थानविपर्यास करून 'सुख आणि शांति' या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. शुक्रनीतींत म्हटल्याप्रमाणें

"सुखार्थाः सर्वभूतानां मताः सर्वाः प्रवृत्तयः"

प्राणिमात्राची प्रवृत्ति सुखाकडे असते. तेव्हां ह्या सुखाच्या शोधार्थ आजपर्यंत अनेकांनीं प्रयत्न केले आहेत. ह्या सहजवृत्तीला अनसरून लबक् साहेबांनींही सुख कशांत आहे हें पाहण्याची खटपट केली. सुख कशानें लाधेल, ही तळमळ कोणालाही चैन पडूं देत नाहीं. ह्या लोकामध्यें जे अत्यंत मूढ असतात किंवा ज्याना अतींद्रियशक्ति प्राप्त झाली आहे, असे द्विविध जन मात्र आनंदी असतात. बाकीच्या लोकांच्या दैवांत प्रायः क्लेशच भोगण्याचें दिसतें.

"यश्च मूढतमो लोके यश्च बुद्धेः परंगतः
तावुभौ सुखमेधेते क्लिश्यत्यंतरितो जनः ॥"

असें भागवतकारांनीं ह्मटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. या भूतलावरील बहुतेकांचा समावेश अंतरित जनांतच होत असल्यामुळें सुखाची इच्छा असूनही सुख प्राप्त होत नाहीं म्हणून कोणालाही शांति लाभत नाहीं. या दृष्टीनें विचार करतां सदरहू ग्रंथ प्रत्येकानें वाचून त्याचें मनन करणें किती अगत्याचें आहे याची कोणालाही कल्पना करितां येईल.

ग्रंथकर्त्यांनीं प्रथम सुखाचें स्वरूप वर्णन करून नंतर तें कशानें प्राप्त होईल, कोणत्या गोष्टींनीं त्याला व्यत्यय येणार नाहीं, याचा विचार केला आहे. असा विचार करीत असतां त्यांनीं असा सिद्धांत काढला आहे कीं, व्यक्तिमात्राला सुख मिळण्यापूर्वी सर्व जगांत शान्ति नांदत असली पाहिजे; व मनुष्य धार्मिक आणि ब्रम्हानिष्ठ असून त्याच्यावर शिक्षणाचा परिणाम झाला असेल, त्याचें शरीर आणि मन जोरदार व निर्मल असेल, त्याच्या ठिकाणीं संतोष नांदत असेल, अंतःकरणांत सदयता वसत असेल, स्निग्ध जनांचा सहवास घडेल आणि निसर्गावर त्याचें प्रेम बसेल, तर त्या मनुष्याला सुख प्राप्त होण्यास अडचण पडणार नाहीं. मात्र महत्त्वाकांक्षेनें ग्रस्त होतां कामा नये, श्रीमंतीच्या मदानें उल्लू होऊन जातां कामा नये, व आपत्ति ह्या सदय परमेश्वरानें आपल्या हितार्थच आपल्याकडे पाठवून दिल्या आहेत असें समजून चाललें पाहिजे. ह्याशिवाय माणसांत थोडी चतुरता असली ह्मणजे त्याच्या सुखराशींत आणखीही भर पडल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या विवेचनपद्धतीला अनुसरून ग्रंथकर्त्यांनीं साहजिकच त्या विषयाचे अठरा निरनिराळे भाग केले आहेत. त्यांचा क्रम येणेंप्रमाणें:—

(१) सुख, (२) शरीर, (३) मन, (४) आत्मरक्षा, (५) संतोष, (६) आपत्ति, (७) सद्-

यता, (८) शिक्षण, (९) शत्रु मित्र, (१०) श्रीमंती, (११) सृष्टीची भीषणता, (१२) सृष्टिप्रेम, (१३) सद्यःकाल, (१४) वैदग्ध्य, (१५)राष्ट्रांची शांति, (१६) चित्तस्वास्थ्य) १७) धर्म, आणि (१८) ब्रह्मविद्या.

प्रस्तुत ग्रंथ हा, प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, लबक् साहेबांच्या इंग्रजी ग्रंथाचें निव्वळ भाषांतर नसून केवळ त्या ग्रंथाचा आधार घेऊन लिहिलेला आहे हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. व याचा प्रत्यय–म्हणजे हा स्वतंत्र ग्रंथ आहे अशाबद्दलची खात्री–ह्या ग्रंथांत संस्कृत व मराठी ग्रंथांतून जीं अवतरणें घेतलेलीं आहेत, त्यांवरून सहज पटण्याजोगी आहे. ह्या ग्रंथांत एकंदर ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, ऐतरेय ब्राम्हण, नारायणोपनिषद्, तैतिरीय श्रुति, छांदोग्य, कठोपनिषद्, मण्डुकोपनिषद्, मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, रामायण, भारत, भागवत, भगवद्गीता, अवधूतगीता, वैशेषिक दर्शन, वृद्धचाणक्य, पंचदशी, शतश्लोकी, विवेकचूडामणि, स्वात्मसौख्य, प्रश्नोत्तरमालिका, योगरत्नाकर, मोहमुद्गर, वराहमिहिर, अष्टोत्तरी, शौनक, रसगंगाधर, वाग्भट, पुष्पदंत, हितोपदेश, शाकुंतल, भर्तृहरि; व सारावली, कुमारसंभव, उत्तररामचरित्र, रघुवंश, भावप्रकाश, मालविकाग्निमित्र, पंचतत्र, किरातार्जुन, मृच्छकटिक, सुभाषित, ठाकूराणी; त्याचप्रमाणें ज्ञानदेव, तुकाराम वामन, रामदास, मोरोपंत, रामजोशी, सुंदरदास, किर्लोसकर, हरिकवि, गोडबोले, गोरखनाथ, विठोबाअण्णा, शीलनाथ, कबीर, इत्यादि ग्रन्थकारांच्या चौसष्ठ निरनिराळ्या ग्रंथांतून भरपूर उतारे घेऊन शिवाय ग्रंथकाराच्या स्वकृत कविताही सदरहू पुस्तकांत विपुल घातलेल्या आहेत. अशा ग्रंथाला परोच्छिष्ट ह्मणणें निःसंशय अन्यायाचें होईल. ह्मणून लबक् साहेबांच्या ग्रंथावरून जरी ग्रंथकर्त्याला प्रेरणा झाली असली, तरी रा. मोडक यांचा हा स्वतंत्रच ग्रंथ आहे, असें आम्ही मानतों.

ह्या ग्रंथाची भाषा शुद्ध व प्रसादयुक्त असून त्यामध्यें ग्रंथकर्त्यांनीं पांच पन्नास मराठी म्हणींचा उल्लेख केलेला आहे. त्यावरून ग्रंथकर्त्यांचें मराठी भाषेवरील प्रभुत्व उत्तम प्रकारें सिद्ध होतें. मराठी भाषेचा अभ्यास करणारापुढें ह्या सर्व म्हणी संकलित करून ठेविल्या तर त्याला त्यांचा पुष्कळ उपयोग होईल असा आम्हांस भरंवसा असल्यानें आह्मी त्या मुद्दाम एकत्र करून खालीं देत आहोंत. ह्मणी:–(१) आचरट खाणें आणि मसणांत जाणें, (२) भुकी तो सुखी, (३) भुके राखे चौथा कोन, तेरा रोग घरघर रोवे, (४) अति सर्वत्र वर्जयेत्, (५) बाळातें जन्म काळा, (६) नदी नारी व्यापारी । गर्जना करिती दिवस चारी, (७) सबसे जीव प्यारा है, (८) चार महिन्यांचा उन्हाळा आणि घटकेचा पावसाळा, (९) आजा मेला आणि नातू झाला, (१०) बरें करावें आणि वाटेवर ठेवावें, (११) भित्यापाठीं ब्रम्हराक्षस, (१२) हिंमत मर्दा तो मदत खुदा, (१३) कांव्याचा नायटा करणें, (१४) पशाचें पायलीवर नेणें, (१५) हिंवाळा भोगी, पावसाळा रोगी आणि उन्हाळा जोगी, (१६) अल्ला जो बुरा करता है वो भलेके वास्ते करता है, (१७) शिंक्याचें तुटलें आणि बोक्याचें फावलें, (१८) जशाशीं तसें (न्याय), (१९) प्रेम द्यावें आणि प्रेम घ्यावें, (२०) कृति तसें फळ (न्याय), (२१) जोडा घालणारानें अनवाणी चालणाराकडे पाहावें, घोड्यावर बसणाराकडे पाहूं नये, (२२) धर्म करतां कर्म उभें राहतें, (२३) निमाज पढावयास जावें तों मशीद गळ्यांत यावी, / (२४) एकदां खावें पण शहरांत राहावें, (२५) दोन्ही डोळे शेजारीं । भेट नाहीं संसारीं, (२६) सेवकाम्रे पुरातने, (२७) गळां नाहीं सरी आणि सुखें निद्रा करी, (२८) गर्द्धोका माल अक्कलमंदोंका खुराक, (२९) दुरून डोंगर साजरे, (३०) अतिपरिचयादवज्ञा, (३१) सबसे चूप भली, (३२) झाड सत्यभामेचे घरीं आणि फुलें रुक्मिणीचे घरीं, (३३) हत्तीचे पायांत सर्वांचे पाय, (३४) दादा अंगें वहिनी सोयरी, (३५) नवसानें मागितलें आणि मुळावर आलें, (३६) चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रम्हपदीं नाचे, (३७) रागा रागा भीक मागा, (३८) जें न देखे रवि तें देखे कवि, (३९) जात शेती नाहीं तर माती, (४०) ज्याचें कुडें त्याचेच पुढें, (४१) देहया गुरु कीं शिक्या गुरु, (४२) कां बाई रोड, तिला गांवाची ओढ.

याप्रमाणें संस्कृत व मराठी सूक्तींच्या अध्ययनानें विद्यार्थ्यांचा मराठीभाषामंदिरांत बराच प्रवेश होईल

यांत शंका नाहीं. उत्कृष्ट व शुद्ध भाषेचे मासले कोणास पाहणें असतील तर ते या पुस्तकांत असंख्य सांपडतील. संस्कृत भाषेंत प्रावीण्य संपादन केलेल्या ग्रंथकारांना संस्कृताचा ज्यांत गंध नाहीं असें झोंकदार मराठी उत्तम प्रकारानें लिहितां यावें ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. कांहीं वाक्यें आम्ही वेंचून येथें देतों, त्यावरून आमचे म्हणण्याची यथार्थता वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

" कित्येक माणसांचा स्वभावच असा असतो कीं इवल्या तिवल्या गोष्टींला तीं असें बाळसें आणून दाखवितात कीं राईचा केवळ डोंगर करून सोडतात. "

"ठरीव पुस्तकें व घोकंपट्टी यांच्या पायीं विद्यार्थ्यांचे ठिकाणीं हरभासपणा येत नाहीं, त्याचा दिल खुलत नाहीं. यामुळें शाळा संपण्यापूर्वीच मुलाला विद्येचें अवढणें पडत येतें. व ती संपली कीं तिकडे पुन्हां तोंडच करीत नाहीं. "

" झोळ्या मास्तर उपयोगी नाहीं, आणि मेण्याही फुकटच समजावा."

" एकानें जावें विनोदानें बोलायाला, तें दुसऱ्यानें धरावें खरेंखुरें, आणि म्हणतात तशी मस्करीची कुस्करी होऊन अंतीं विपट पडावें, असा चमत्कार होतो."

निव्वळ मराठी लिहिण्यांत ग्रंथकर्त्यांचा जसा हातखंडा आहे, त्याचप्रमाणें योग्य दृष्टांत व उपमा यांच्या साहाय्यानें वक्तृत्वपूर्ण व परिणामकारक भाषाही त्यांस सहज लिहितां येते.

" मानवी सुंदरीचें रूप पाहून प्रसंगीं दुर्विकार जागृत होतात. पण ह्या रूपावलोकनानें कुविचार उलटे नष्ट होतात, आणि या सृष्टिसुंदरीची अगाध सत्ता, हृदयंगम प्रेमळता, व अखंडपरकार्यतत्परता हीं पाहिलीं म्हणजे असा कांहीं पूज्यभाव उत्पन्न होतो कीं सत्त्वपरीक्षणार्थ आलेले त्रिमूर्ति जसे बाळ होऊन अनसूया सतीच्या पायाशीं लोळूं लागले त्याचप्रमाणें ह्या दिव्य रमणीचे आपण बाल होऊन तिचे अंकावर क्रीडत रहावें असेंच वाटतें. "

" मुंबई सारख्या शहरांत जेथें अल्पप्राप्तीचे कुटुंबास नाकपुडी एवढे खोलींत संसार करावा लागतो-" ह्या वाक्यांत नाकपुडी हा शब्द इतका खुबीदार योजिला आहे कीं, त्यामुळें मुंबईच्या लहानशा जागेची कल्पना अगदीं बरोबर होते. तसेंच "कांहीं लेखक दुःखाचे नांवानें जी कांहीं ओरड करितात ती कांहीं बेसुमार ! हे फक्त मिळवणीच जाणतात व वजाबाकी ओळखतिच नाहींत. केवळ दुःखाचे क्षण हिशोबांत धरतात व ओरडतात. पण त्यांत सुखाचा हिशोब वजा देत नाहींत."

ग्रंथकर्त्यांनीं खारींचें व भुजंगाचें केलेलें वर्णन इतकें बहारीचें वठलें आहे कीं,त्यांतील विचार परगत असले तरी त्या वर्णनाची भाषा वाचून वाचक क्षणभर मानच डोलवूं लागतो.

" या खारीसारखा सुबक, आनंदी आणि गमतीचा दुसरा प्राणीच नसेल. अति हूड असून अत्यंत निरुपद्रव. खाण्यापिण्यांतही कोणा जीवाची प्राणहानि नाहीं. मांजराचे पिलासारखी खेळकर परंतु निर्दय नाहीं, शाखामृगाहूनही (वानराहूनही) अधिक चलाख, पाखरापेक्षां मनोहर आणि तजेलदार, आणि वनदेवतेचें आवडतें खेळणेंच. असली ही लुकलुक डोळ्यांची गोजिरवाणी मूर्ति एका वृक्षशाखेवरून दुसरीवर जाते, तेव्हां विजेची चपळाई कमी असा भास होतो. तिच्या गति तरी किती विचित्र ! क्षणांत टुणकन् उडी मारील, क्षणांत तीरासारखी धांवत जाईल, क्षणांत मध्येंच मुरडेल, त्याचा कांहीं नेमच नाहीं. सारी लहर आहे ! हरिणाहून चपळ, वाघाहून अधिक टिपण झोंकणार. देहांत सरळपणा पहाल तर मुळींच नाहीं, पण जिनगरी बाहुलीपेक्षां अधिक मोहक आणि सावरीचे कापसापेक्षां गुळगुळीत. अंगीं ऐट किती, मुरड किती, नखरा किती आणि वात्रटपणा तरी किती ! पळांत तुमचे मागें धावेल, पळांत दृष्टीआड लपेल, पळांत वर डुकली उचलून तुम्हांला हेरील. क्षणांत प्रियसखीप्रमाणें हळूच कान देऊन चोरून ऐकत बसेल. कोण खेळाडू, कोण धूर्त, कोण दिमाखदार, किती रंगाढंगाची ! छे, छे, मला वाटतें स्वर्गींची अप्सराच हें मुरकेदार छोटें छबेलें रूप घेऊन बाळगोपाळांच्या मौजेकरितां भूलोकीं अवतीर्ण झाली आहे. "

विषमूर्ति भुजंगाचेंही याच कुशल लेखकानें असेंच मौजदार चित्र रेखाटलें आहे-"ओहो ! तो

पहा, वितळलेल्या रुप्याचा छोटासा ओघळ जमिनीवरून चालला आहे. चालला आहे कशाचा ? वाहतो आहे. कारण, ह्या चालण्यांत यत्न किंवा कष्ट कसे ते नाहींत. गति किती गमतीची ! चपळ असून शांत. पाण्याची लाट कीं वाऱ्याची झुळूक ! पुनः लाट म्हणावी तर गर्जत नाहीं; ओघ ह्मणावा तर धबधबा नाहीं. सर्व शरीर एका वेळीं गतींत असूनही कांहीं भाग या कलावर झुकलेला, कांहीं उलट कलावर, निमे सरळ पुढल्या झोंकावर व निमे मागें मुरडलेला. तथापि कोणत्याही भागाला फाजील संकोच नाहीं, फाजील ताण नाहीं. सर्व शरीर सारखें एक तोलांत चाललेलें. गोंगाट नाहीं, बोभाट नाहीं. टिकल्यांच्या चंद्रहाराचा सर घसरतो आहे, कीं सुबक बुंदक्यांचा गळपट्टा पडला आहे, कांहीं ओळखत नाहीं. रेशमाहून मृदु, कदलीगर्भाहून शीतळ, पुष्पहाराहून सुखतर स्पर्श. पण या सौम्यपणाला फसूं नका. दाढेंत जिवंत मृत्यु उभा आहे. थोडें वाटेस जा, म्हणजे समजेल चंद्रहार कीं कट्यार, आणि गळपट्टा कीं गळा उतरणारा पट्टा आहे तो ! रुपेरी पाण्याचा ओघळ आतां नव्हे. आतां झाली विषाची लाट.गवताचे गर्दींतून हा विषारी बाण सणाणतो आहे. क्रोधानें इतका दुमडला आहे कीं, श्वास घ्यावयाला फुरसुत नाहीं. नुसता फणकारा चालला आहे. आतां त्याला शीत नाहीं, उष्ण नाहीं. पुष्पांचें मृदुत्व जाऊन पाषाणाचें कठोरपण उभें राहिलें आहे. अखिल ब्रम्हांडांतील क्रूरता, दुष्टपणा, हिंस्रता एकवटून तुमचे पुढें स्वारी खडी आहे. तिचे आटोक्यांत या, कीं स्वर्गद्वाराचीच भेट ! बरें, देहांत वळवळ तरी किती ! वांदरापेक्षां वृक्षारोहणांत तलख, माशापेक्षां जलतरणांत सराईत, रोहीपेक्षां टिपण टाकण्यांत तरबेज, जेठीपेक्षां पीळदार, आणि वाघोबांनाही पाणी पाजण्याला समर्थ, असलें हें प्रकरण आहे. अशाला माझा दुरून नमस्कार असो."

वरील उताऱ्यांवरून ग्रंथकाराचें भाषानैपुण्य किती आहे हें सांगणें नको. पण आणखी एक गोष्ट आम्हांला सांगितल्याशिवाय राहवत नाहीं, ती ही कीं, उत्कृष्ट भाषा लिहिणारांचेही दोन वर्ग आहेत, असें आमचें ठाम मत आहे. विदग्ध वाङ्मयाच्या अभ्यासानें, नामांकित ग्रंथकारांच्या ग्रंथांच्या परिशीलनानें मनुष्य उत्कृष्ट भाषा लिहूं शकेल. आलंकारिक शब्दांचा संग्रह केला असतां साधारण लेखकाला विद्वत्तादर्शक लेख बनवितां येतात. तथापि अशा लेखकांच्या हातून भाषेची अगोदरच पडलेली सीमा वाढविली जात नाहीं. परंतु दुसरे कांहीं लेखक असे शब्दप्रयोग करतात कीं, त्या योगानें भाषेच्या चतुःसीमा पुढें ढकलल्या जातात. ह्या दुसऱ्या वर्गांत रा. मोडक मोडतात हें म्हणण्यास आम्हांस मोठा आनंद वाटतो. असो. ग्रंथकर्त्यांनीं सुभाषिताचा हार आपल्या वाचकांना गळ्यांत घालून उत्तम मराठी भाषेचा गुच्छ त्यांचे हातीं दिला आहे. त्याबद्दल वाचकवर्ग ग्रंथकर्त्यांचा अत्यंत ऋणी असणें अगदा स्वाभाविक आहे.

येथपर्यंत या ग्रंथाविषयीं जें कांहीं आह्मांला चांगलें दिसलें तें आम्हीं अगदीं मोकळ्या मनानें कबूल केलें आहे. पण भाषा सोडून आंतील विचार कसोटीला लावले असतां मात्र मतभेद होण्यास जागा आहे. व तत्त्वज्ञानावरील शास्त्रीय ग्रंथमालेंत ह्या पुस्तकाचा रिघाव होईल असें आमची मनोदेवता आह्मांस सांगत नाहीं. विचारांबद्दल प्रायः जरी लबक् साहेब जबाबदार असले तरी त्यामुळें ग्रंथकर्त्यावरची जबाबदारी कमी होते असें आह्मांस वाटत नाहीं. रा. मोडक यांचा पाश्चात्य व पौरस्त्य दोन्ही तत्त्वज्ञान्यांशीं चांगला परिचय असल्यामुळें उसन्या विचारांवर व्यापार करण्याची आवश्यकता रा.मोडक ह्यांस होती असें आम्हांस वाटत नाहीं.ग्रंथकार विद्वान् आहेत, स्वतः विचार करण्याची धमक त्यांचे अंगांत आहे, ह्याबद्दल आमची खातरी असल्यामुळेंच रा. मोडक यांस आम्ही या बाबतींत दोष देऊं इच्छीत आहों.

प्रथमतःच, शरीर, मन इत्यादि प्रकरणें ज्या अनुक्रमानें घातलेलीं आहेत, तो अनुक्रमही पद्धतशीर नाहीं, हें वरवर पाहणारासही दिसून येईल. सुखाला कारणीभूत ह्मणून ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या एकाच अनुक्रमानें येणें रास्त होतें. ज्याप्रमाणें शरीर, निर्मल अंतःकरण आणि शिक्षणसंस्कार हीं सुखाला कारणीभूत आहेत त्याप्रमाणें आरुरुक्षा आणि आपात्ति हीं सुखाला विघातक आहेत. यास्तव शरीर, मन सदयता आणि शिक्षण ह्यांच्या मध्येंच आरुरुक्षा

आणि आपत्ति हीं प्रकरणें घालणें दोषास्पद आहे. आमच्या मतें विषयांचा अनुक्रम येणेंप्रमाणें पाहिजे होताः– (१) सुख. (२) धर्म. (३) ब्रह्मविद्या. (४) राष्ट्रांची शांति. (५) चित्तस्वास्थ्य. (६) शरीर. (७) मन. (८) संतोष. (९) सदयता. (१०) शिक्षण. (११) मित्र. (१२) सृष्टिप्रेम. (१३) वैदग्ध्य. (१४) आरुरुक्षा. (१५) आपत्ति. (१६) श्रीमंती. (१७) सृष्टीची भीषणता. आणि (१८) सद्यःकाल.

आतां प्रत्येक प्रकरणांत काय सांगितलें आहे याचा थोडक्यांत विचार करूं. पहिलें प्रकरण–

सुख

ह्या प्रकरणांत ग्रंथकर्त्यांनीं सुख प्राप्त करून देणाऱ्या साधनांचा आढावा घेतला आहे. प्रथमतः, सुख हें परावलंबी नसून आत्मावलंबी आहे असें सांगून पुढील सर्व प्रकरणांचें थोडक्यांत सार दिलें आहे. म्हणजे मनोजय, मर्यादित तृष्णा, सुसंगति, उद्योगप्रवणता, सत्यावलंबन, इत्यादि सुखसाधनांचा विचार करून पापाचरण, अविवेकप्रेरित कृत्यें इत्यादि सुखप्रतिबंधक गोष्टींचें विवेचन केलेलें आहे. प्रकरणाच्या आरंभींच सुखप्राप्तीच्या कामीं सर्वांना सारखेच लागू पडतील असे सामान्य नियम घालणें शक्य नाहीं, असें ग्रंथकार सांगतात. पण अखेरीस सुखसाधनाची कर्मफलत्यागरूपी गुरुकिल्ली वाचकांच्या स्वाधीन करून पुढें जातात! आमच्या मतें सुख आणि शांति यांचा परस्परसंबंध काय व त्यांचें वास्तविक स्वरूप काय याचा ऊहापोह ह्या प्रकरणांत विशेष करावयास पाहिजे होता. ह्या व्यवहारामध्यें सर्व सुखें इंद्रिय आणि विषय ह्यांच्या संयोगानें प्राप्त होणारीं असल्यामुळें ह्या ऐहिक सुखांचा वेदांतांत विस्तरशः ज्याचा विचार केला आहे, अशा ब्रम्हसुखाचा अभिन्नभाव दाखविण्याचा प्रयत्न भ्रममूलक आहे असें आह्मांस वाटतें. ब्रह्मानंदाला निर्व्यापार मनाची सहजस्थिति कारणीभूत असते. व्यवहारांत आपल्याला असा अनुभव येतो कीं, एखादी गोष्ट करावयाची म्हणून ठरलें म्हणजे इष्टवस्तुप्राप्त्यर्थ मनाचे व्यापार सुरू होतात. त्या वेळेस मन उद्दीप्त झालेलें असतें. इष्टवस्तुलाभ होतांच मनाचे व्यापारही शांत होतात आणि तत्क्षणींच मनुष्याला सुखाचा अनुभव येतो. ह्यामुळें सुख आणि शांति ह्यांमध्यें कार्यकारणभाव मानणें भाग पडतें. निष्क्रिय अगर व्यापारविरहित ज्याचें मन असेल असा माणूस संसारांत राहण्यास अगदीं नालायक बनतो; तेव्हां सुख हें आत्मनिष्ठ आहे ही वेदांत्यांची व्याख्या ऐहिक सुखाला कशी लागू पडते हें आम्हांला समजत नाहीं. 'सर्वं परवशं दुःखं । सर्वमात्मवशं सुखं ॥' हें मनूचें म्हणणें व्यापक अर्थानें न घेतां मर्यादित अर्थानेंच घेतलें पाहिजे. ज्वरयुक्त माणसाला साखर कडू लागते; चिंताग्रस्त माणसावर सुस्वर गायनाचा विपरीत परिणाम होतो; वगैरे उदाहरणांनीं सुख हें विषयाधीन नाहीं असें सिद्ध करण्याचा पुष्कळांचा प्रयत्न असतो हें आह्मांला ठाऊक आहे. परंतु साखरेंतच गोडी असती तर ती मनुष्याला कोणत्याही अवस्थेंत गोडच लागावयाला पाहिजे, हें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. साखरेंत गोडी नसून ती माझे रसनेंद्रियांत आहे, हें जर अक्षरशः खरें असेल तर कडू पदार्थही मधुर लागावयाला पाहिजे. पण तसें जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत पदार्थांची मधुरता जी आपणांला भासते ती इंद्रियपदार्थसंयोगजन्य आहे असेंच म्हटलें पाहिजे.

समाधिस्थ योगिजनांना ब्रम्हानंदाचा अनुभव कसा प्राप्त होतो त्याबद्दल अनुभवाच्या अभावीं आह्मांला कांहींच म्हणतां येत नाहीं. तथापि व्यावहारिक सुख हें मात्र इंद्रिय आणि विषय यांच्या संयोगानेंच होणारें आहे. युरोपखंडांतील लोकांच्या नैतिक कल्पनांचा इतिहास लेकी साहेबांनीं लिहिला आहे, त्यांतत्यांनीं म्हटल्याप्रमाणें सुख हें मानीव आहे, ही गोष्ट अंशतः खरी आहे. साहेब लिहितात– Happiness is a condition of feelings and not of circumstances, and its one essential is the exclusion of painful and harassing doubts. आतां सुख जसा मनाचा धर्म आहे, त्याचप्रमाणें दुःख हाही मनाचाच धर्म होय. सर्व गोष्टींची अनुकूलता असतां मनुष्य सुखी असेलच असा नियम नाहीं हें जसें खरें, तद्वतच सर्वतोपरी कष्टमय स्थिति असतां त्या मनुष्याला सुख झालेंच पाहिजे असें म्हणण्याचें धाडस आमच्यानें करवत नाहीं. सुख हा कांहीं दुःखाचा

अभाव नाहीं; म्हणून दुःखाभावीं मनुष्य सुखी असलाच पाहिजे असें म्हणतां येत नाहीं. उकीरड्यावर बसून परोच्छिष्ठ खाण्याचा प्रसंग, येणाऱ्या जाणाऱ्याकडून होणारा लत्ताप्रहार, व उनाडटप्पूंकडून केली जाणारी टवाळकी या गोष्टी ज्याच्या सुखाला कारणीभूत होत असतील तो पुरुष धन्य होय. अशा स्थितींतही मनुष्य आनंदी असूं शकणार नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु ह्या जगाबद्दल ज्याच्या अंतःकरणांत पूर्ण विरक्तता बिंबली आहे असाच मनुष्य अशा स्थितींत आनंदी असूं शकेल. पण अशा निष्क्रिय माणसाला जगाशीं कांहीं कर्तव्य नसल्यामुळें जगालाही त्याचे आनंदाची फारशी चिकित्सा करण्याचे भानगडींत पडण्याची जरुरी नाहीं. समाजहितार्थ झटणाऱ्या पुरुषांची समाजाकडून हेटाळणी केली गेली व परमेश्वराकडून त्याच्या उद्दिष्टकार्यसिद्धीला साहाय्य झालें नाहीं, तर त्या माणसास आनंद कसा व्हावा, ह्याची आम्हांस कल्पनाही होत नाहीं.

शिवाय सुखासुखांतही फरक आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. इंद्रियांपासून मनाला होणारें सुखदुःख हें मनाला स्वतंत्र मार्गानें होणाऱ्या सुखदुःखापासून भिन्न आहे. विस्तवावर पाय ठेविला असतां तो भाजणार व तद्द्वारा मनाला दुःखच होणार. जेथें मनाशिवाय इतर इंद्रियांचा संबंध येत नाहीं, तेथें मात्र सुख दुःख आपल्या आधीन ठेवण्याचें सामर्थ्य मनांत असतें. ग्रंथकर्त्यांनींच पुढें कबूली दिल्याप्रमाणें आयुष्यांत व्याधि, शोक व दुःख यांचे प्रसंग येणारच. मग हे प्रसंगच जर येणार तर मनुष्य दुःखीही होणार हें उघड आहे. फार तर विवेकानें दुःख दुःख म्हणून सुज्ञ मनुष्य रडत बसणार नाहीं; पण तेवढ्यामुळें तो सुखी असेल असें मात्र होत नाहीं. मनानें घेतलेली गोष्ट पुरी झाली म्हणजे मन शांत होतें व नंतर सुखाचा अनुभव येतो, या आमच्या म्हणण्यांत जर कांहीं सत्याचा अंश असेल तर ऐहिक व पारमार्थिक सुखांतील फरक प्रत्येकानें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. हें भिन्नत्व दृष्टीआड केल्यानें पुष्कळांचा गोंधळ होतो व त्याप्रमाणें ग्रंथकर्त्यांचाही झाला आहे असें पुढील वाक्यावरून दिसतें. " शांतस्थिति सर्वथा स्पृहणीय आहे. तरीही कर्तव्याला रजा देऊन ती मिळवूं पाहणें प्रशस्त नाहीं." शांतस्थितीं जर सर्वथा स्पृहणीय आहे तर कर्तव्यासही रजा देऊन ती प्राप्त कां करून घेऊं नये? यास सयुक्तिक कारण सांगतां येणार नाहीं. आणि कर्तव्याला रजा देणें शक्य नसेल तर शांतस्थितीचे इतके गोडवे गाऊन तरी उपयोग काय? आमच्या मतें माणसाच्या पाठीमागें कर्तव्य हें लागलेंच आहे. तें त्याला कधींही सुटणें शक्य नाहीं. व्यक्तीचा समाजाशीं कांहीं संबंध राहाणार नाहीं तेव्हां मात्र त्याला कदाचित् कांहीं कर्तव्य उरणार नाहीं. अशा ह्या वैय्यक्तिक सुखाचा विचार प्राचीन वेदांत्यांनीं केला आहे, व अद्यापही पुष्कळ लोक त्यांचाच अनुवाद करीत बसले आहेत. माझा कोणाशीं संबंध नाहीं अशा भावनेनें संसारापासून अलिप्त राहून निरुपाधिक सुखाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न आजपर्यंत पुष्कळांनीं केला आणि त्यामध्यें त्यांना यशही आलें असेल ह्यांत संशय नाहीं. परंतु समाजाचा व माझा कायमचा संबंध जखडला गेला आहे; किंबहुना, परमेश्वरानें समाजाच्या उपयोगी पडण्याकरितांच मला जन्मास घातलें आहे ही गोष्ट एकदां मान्य झाली, म्हणजे वैय्यक्तिक सुख प्राप्त करून घेण्याचा मला हक्कच पोहोंचत नाहीं. समाजाकरितां माझा जन्म आहे असें निश्चित झालें म्हणजे मनुष्याला निष्क्रिय राहतां येत नाहीं; परहितरत असणें हें त्याचें व्रतच बनलें. मनुष्य अशा प्रकारचें कर्तव्य बजावीत असतां त्याला त्याच्या कार्यांत अपयश आलें तरी वाईट वाटण्याचें फारसें कारण राहत नाहीं. कारण, तो स्वतःकरितां कोणतीच गोष्ट करीत नसतो. ह्या जगांत मनुष्याला वारंवार असंतुष्ट होण्याचे प्रसंग येतात त्याचें कारण, बहुतवेळां सर्व जग माझेकरितां परमेश्वरानें निर्माण केलें आहे अशा समजुतीनें तो वागत असतो हें होय. सर्वांनीं माझ्या सुखार्थ झटावें असें वाटून जर त्याप्रमाणें कोणी वागलें नाहीं तर अर्थातच मनाला उद्विग्नता येते. परंतु जग माझ्याकरितां नसून मी जगाकरितां आहें अशी का एकदां उत्कटी भावना दृढ झाली म्हणजे कितीही अपयश आलें तरी उद्विग्नतेची तीव्रता स्वार्थप्रेरित क्रियेच्या प्रसंगीं जितकी होईल तिच्याहून कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्यामुळेंच फलाबरची आसक्ति सोडून कर्मे करीत जा म्हणून भगवंतांनीं अर्जु-

नाला उपदेश केला आहे. माझ्याकरितांच जर माझी क्रिया असली, तर फलाची अपेक्षा मीं कां करूं नये हें समजणें सोपें नाहीं; व फलाची अपेक्षाच जर करावयाची नाहीं तर माणसाच्या हातून क्रिया तरी कशी घडावी, हें समजणें दुर्घट आहे. म्हणून ज्या कर्माच्या फलाचा त्याग करण्याविषयीं कृष्णांनीं अर्जुनाला पुनः पुनः आग्रहपूर्वक सांगितलेलें आहे तें कर्म सामाजिक होय, वैय्यक्तिक नव्हे. श्रीकृष्णाचे मनांतील हा आशय वैय्यक्तिक सुखाच्या मागें लागणारांच्या ध्यानीं येऊं नये हें साहजिकच आहे. माझ्या स्वतःकरितां मला कांहींच करावयाचें नसल्यामुळें माझ्या हातून घडणाऱ्या क्रियेचें फळही मला मिळणार नाहीं हें उघड आहे. म्हणून त्या मानानें सुखदुःख दोन्हीही माझ्या मनाला व्यथित करूं शकत नाहींत. तथापि ही गोष्ट विसरतां कामा नये कीं, आपलें सामाजिक कर्तव्य बजावीत असतां तें फलद्रूप झालें नाहीं तर मनुष्याला कदाचित् दुःख होणार नाहीं. परंतु सुख अगर आनंद होईलच हें संभवत नाहीं. कै. नामदार गोखले यांचेंच आपण उदाहरण घेऊं. त्यांनीं आपली सर्व हयात राष्ट्रहितार्थ घालविली याविषयीं मतभेद नाहीं. त्यांनीं आरंभिलेलें कार्य तडीस गेलें नाहीं, किंवा ते जिवंत असूनही त्यांच्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडून आल्या नाहींत, अशी कल्पना केली तर त्यांच्या मनाची स्थिति काय झाली असती? आपलें कर्तव्य केल्यामुळेंच ते सुखी अगर आनंदी असते असें आह्मांस वाटत नाहीं. उलट त्यांच्या मनाला थोडी उद्विग्नता आली असती. आतां स्वतःच्या सुखार्थ प्रयत्न करीत असतां तें न प्राप्त झाल्यामुळें होणारें दुःख अगदीं ग्राम्य; तेंच परहितार्थ झटत असतां प्राप्त झालेलें दुःख अधिक उच्च दर्जाचें.असा ह्या दोन दुःखांत फरक आहे. शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें म्हणजे एक राजस दुःख व दुसरें सात्त्विक होय.जी गोष्ट दुःखाची तीच सुखाची. ना. गोखल्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या देशबांधवांना मोठमोठ्या हुद्द्याच्या जागा मिळाल्या असत्या तर त्यांना सुख अगर आनंद वाटल्याशिवाय कधींही राहिला नसता; अर्थात् हें सात्त्विक सुख होय. आमच्या म्हणण्याचा निष्कर्ष इतकाच कीं, वेदांत्यांचें निरुपाधिक वैय्यक्तिक सुख हें आत्मवश असेल. परंतु आमच्या समाजसेवकांचें सुख परावलंबी अगर परतंत्रच असणार. लोकहितार्थ आपल्याकडून होईल तितकी क्रिया केलीच पाहिजे. (" To work is an indispensable duty in a social man"-Rousseau.) आणि अशी क्रिया करीत असतां सुखदुःखाचाही अनुभव क्रियावानाला येणारच. परंतु त्या क्रियेचा भोक्ता तो प्रत्यक्ष नसल्यामुळें सुख सोज्वळ होतें व दुःख असह्य होत नाहीं.

रा. मोडक ह्यांनीं समाजाशीं विलग्न असलेल्या माणसाला सुख कसें प्राप्त होईल ह्याच दृष्टीनें विशेषतः विचार केलेला दिसतो. व त्याला अनुसरून आपण आपल्या मित्रांची चांगली निवड करावी, फार हांव धरूं नये, वगैरे गोष्टी त्यांनीं सांगितलेल्या योग्यच आहेत. त्यांतही त्यांनीं सत्य हें सुखाला कारणीभूत आहे असा निर्विवाद सिद्धांत काढिला आहे. परंतु नल आणि हरिश्चंद्र ह्यांचीं उदाहरणें ज्याला माहीत असतील, त्याला ह्या विधानाची सत्यता असत्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. आपण पुष्कळ सत्यनिष्ठ असलों तरी आपल्या भोंवतालचे लोक जर कृतघ्न, दुष्ट व पापी असतील तर त्या सत्यनिष्ठाच्या वांट्याला सुखाचा लवही येणार नाहीं.

ह्याच प्रकरणांत ओघानें दैववादाचाही निर्णय झाला आहे. दैववादी "काय करावें. माझें दैव !" असें ह्मणतो. ह्याचा अर्थ ग्रंथकर्त्यांनीं व्याकरणाचे नियम लावून मोठा विलक्षण केला आहे. परंतु त्याचा उमज आह्मांला अजूनही पडला नाहीं. माझें दैव ह्या दोन शब्दांत जन्यजनकभाव आहे. मी दैवाचा स्वामी असतां दैवाला कां भ्यावें असें रा. मोडक विचारतात. आणि प्राक्कर्माचें फळ इहजन्मीं भोगलेंच पाहिजे असें हेच ग्रंथकार आह्मांला दुसरीकडे कंठरवानें सांगतात. (पान २४)—हें त्यांचें दुसरें ह्मणणें जर खरें असेल, व तें तसें आहे ह्यांत शंका नाहीं, तर माझें प्राक्कर्म स्वामी असून इहजन्मीं त्या कर्माचा मी केवळ सेवक आहें, असेंच होत नाहीं काय?

शरीर.

सुखाचा विचार करीत असतां जीवाच्या बरोबरच उदयास आलेलें जें शरीर अगर ज्या शरीरद्वारा

जीव प्रकट होतो त्या शरीराकडे प्रथम लक्ष देणें साहाजिक आहे. भारतांत ह्मटलें आहे, " मृतकल्पही रोगिणः " जे सदा रोगी, ह्मणजे ज्यांचें शरीर सदा रोगग्रस्त असतें, अशीं माणसें मेल्यासारखींच समजावीं. अशा माणसांना सुख कसें लाभावें ? शरीर निरोगी असल्यास अनेक दुःखांचे प्रसंगच दूर पळतात, हा अभावरूपी लाभ होतो इतकेंच नव्हे; तर पूर्ण सुखाचा अनुभव येण्यास सुदृढ शरीराची अत्यंत अवश्यकता आहे. ग्रंथकर्त्यांनीं ह्या शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचीं अजब कार्ये चित्ताकर्षक भाषेंत खुलवून सांगून, हें विलक्षण बनविलेलें शरीर एका क्षणांत मृतकाष्ठ होऊन पडतें, हा आसुरी प्रकार पाहून विधात्याचें अपांडित्य भर्तृहरीच्या शब्दांत निवेदन केलें आहे तें असें:–

> सृजति तावदशेषगुणाकरं
> पुरुषरत्नमलंकरणं भुवः ।
> तदपि तत्क्षणभंगि करोतिचे–
> दहह कष्टमपंडितता विधेः ॥ १ ॥

ह्यानंतर जीवापासून शरीराचें भिन्नत्व प्रतिपादून शरीर आत्म्याचें भोगायतन असल्यामुळें जपून वापरलें पाहिजे म्हणून सांगितलें आहे. व त्यापुढें शरीर चांगलें न राहण्याचीं कारणें दिलीं आहेत, तीं मनन करण्यासारखीं आहेत. बेसुमार अन्नसेवन, श्रमातिरेक, विषयलोलुपता, अस्वच्छता, अस्वस्थचित्त, सुजननशास्त्राविषयीं अज्ञान, मोकळ्या हवेची टंचाई आणि मद्यसेवन इतक्या गोष्टी आरोग्यनाशक आहेत. आमच्या मतें ह्या प्रकरणांत आक्षेपार्ह कांहीं नसून सर्वच विचारणीय आहे. तथापि विद्यमान पिढीचा कमकुवतपणा, अकालीं येणारा मृत्यु, नवीन जन्मास आलेल्या मुलांतील मृत्यूचें भयंकर प्रमाण,-इत्यादि गोष्टींचा विचार करतां कोणाचेंही मन विदारून जातें. ही स्थिति फार भयंकर आहे, व हें गाडें असेंच चाललें तर राष्ट्राची उन्नति केव्हांही होणें शक्य नाहीं. म्हणून ह्या गोष्टी घडवून आणणाऱ्या कारणांचा खल ग्रंथकर्त्यांनीं विशेष केला असता तर आम्हांस बरें वाटलें असतें. हल्लीं समाजाची घडी बिघडल्यामुळें व कांहीं परिहार्य तर कांहीं अपरिहार्य अशा कारणसमुच्चयानें मनुष्याला शरीरस्वास्थ्य मिळणें दुर्लभ झालें आहे. अज्ञानामुळें विषयलोलुपता बोकाळली आहे व दारिद्र्यामुळें समाजांतील कांहीं लोकांस मोकळ्या स्वच्छ हवेचा योग म्हणजे कपिलाषष्ठीचाच होऊन बसला आहे. विशिष्ट कल्पना रूढ झाल्यामुळें आमच्यांतील कांहीं वर्गांतील स्त्रियांना साऱ्या जन्मांत स्वच्छ खुल्या हवेचा स्पर्शही होत नाही हें पाहून अंतःकरण विव्हळ होतें, व त्यांच्या अकालीन मृत्यूबद्दल आश्चर्य न वाटतां आम्ही हिंदुस्थानांतील माणसें इतकीं वर्षें तरी कशीं जगतों याचाच अचंबा वाटतो. त्याचप्रमाणें स्त्रीसंग व संतानोत्पत्ति ह्याविषयीं सर्वांमध्यें जें अक्षम्य अज्ञान वसत आहे त्याचे दुष्परिणाम चालू पिढीला भोगावे लागत आहेत, ह्या गोष्टीकडे समाजाचें बिलकूल लक्ष्य गेलेलें दिसत नाहीं. आणि ह्मणूनच रा. मोडक ह्यांनीं ह्या विषयाचा नुसता नामनिर्देश करून तो सोडून द्यावयास नको होता. एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें देशामध्यें अमक्यानें यावें व अमक्यानें येऊं नये अशाबद्दल कानू आहेत. पण ह्या जगामध्यें कोणी यावें व कोणी येऊं नये अशाविषयीं मात्र सर्वच बेदाद आहे. ही फारच चमत्कारिक स्थिति आहे. शरीरदौर्बल्याविषयीं सर्वत्र उदासीनता असल्यामुळें ज्या नानाविध कारणांनीं चालू पिढींतील मंडळींचीं शरीरें निर्वीर्य होत चाललीं त्यापैकीं एकाचीही छाननी आजवर एकानेंही केलेली नाहीं. तथापि रा. मोडकांच्या ह्या प्रकरणांतील लेखानें सदरहू गोष्टीकडे लोकांचें लक्ष वेधेल यांत संशय नाहीं.

मन.

शरीरानंतर सर्वेंद्रियपती जें मन त्यालाच सुखसाधनांत प्राधान्य मिळणें रास्त आहे. उघडच आहे कीं, पापी व अस्वच्छ मन ह्यांपासूनच बरींचशीं दुःखें उद्भवतात. विशेषतः मागें सांगितल्याप्रमाणें सुख व दुःख हे मनाचे धर्म असल्यामुळें कित्येक वेळां नसल्या ठिकाणीं मनाला दुःख दिसतें, तर इतर कित्येक प्रसंगीं आपल्याच घाणेरड्या कृत्यांनीं मन निरर्थक दुःख निर्माण करतें. यामुळें शरीराहून मन थोर आहे हें ग्रंथकर्त्यांचें म्हणणें कोणालाही पटण्यासारखें आहे. शरीर सुदृढ आहे, कांतियुक्त आहे, तथापि अंतरंग जर

निर्मल नसेल तर देवीभागवतांतील वचनाप्रमाणें (निर्मलं नमनो यावत् तावत् सर्वं निरर्थकं) सर्व व्यर्थ आहे. याचें कारण असें आहे की चांगलें शरीर मन अगर आत्मा सुसंस्कृत करतें असें नाहीं, परंतु निष्कलंक मन मात्र शरीर चांगलें बनण्यास कारणीभूत होतें. ('Good body does not improve the soul but a good soul improves the body'-*Plato*). आरंभींच हें सांगणें जरूर आहे कीं, लेखकांनीं ह्या प्रकरणांत मन आणि आत्मा हे शब्द एकाच अर्थी योजिले आहेत. संसार हा कष्टमय आहे, मृत्यु कांहींना सुखावह तर कांहींना कष्टमय भासतो, लहानपणींच कोंवळ्या मनांवर संस्कार करावा, आईबाप मुलांसंबंधानें आपली जबाबदारी ओळखीत नाहींत, इत्यादी गोष्टी सांगून लेखकाची लेखणी स्त्रियांच्या सौंदर्यावर जणूं काय लुब्ध होऊन तेथेंच विराम पावलेली दिसते. ज्या गोष्टींचा प्रस्तुत विषयाशीं अर्थाअर्थी संबंध दिसत नाहीं अशा गोष्टींचें विवेचन कां केलें आहे हें समजणें कठीण आहे. तथापि संतानोत्सवार्थ पेढे वांटणाऱ्या आमच्या आईबापांना आपल्यावर कांहीं जबाबदारी आहे याची रतीभरही जाणीव नाहीं, ही गोष्ट रा. मोडकांप्रमाणें आम्हीही आईबापांच्या नजरेस आणितों. गुलहौसी लोकांचे केवळ स्त्रियांच्या बाह्यसौंदर्याला भुलून निघालेले उद्गार ग्रंथकर्त्यांनीं दिले आहेत, त्यापेक्षां ह्या संसारामध्यें स्त्रीचें स्थान व तिचें महत्त्व किती आहे ह्याचा थोडा ज्यास्त विचार करावयास पाहिजे होता असें आम्हांला वाटतें. स्त्रीची खरी योग्यता तिच्या बाह्य सौंदर्यावर नसून तिच्या उपयुक्ततेवरच जास्त आहे. " मनुष्याचें आयुष्य स्त्रीविना आरंभीं असहाय, तरुणपणीं सुखविरहीत, आणि अखेरीस असमाधानयुक्त होतें. " असें एका फ्रेंच ग्रंथकर्त्रीचें म्हणणें आहे तें कोण खोटें म्हणेल ? (Without woman life of a man would be without aid at the beginning of it, without pleasure in the middle of it, and without solace at the end.—*Madam D. Hondetot.*) स्त्रीसौंदर्य एकीकडे राहो. परंतु स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या मनोरचनेंत भिन्नता आहे कीं नाहीं हा प्रश्न विचाराई आहे. ह्या बाबतींत युरोपियन नीतिमत्तेच्या इतिहासांत लेके साहेबांनीं स्त्रियांबद्दल जो आपला अभिप्राय दिलेला आहे तो आह्मांला पसंत असल्यामुळें तो आम्ही खालीं देतों.

Morally, I think the general superiority of women over men is unquestionable. If we take the somewhat coarse and inadequate creterion of police statisties,we find that while the male and female populations are nearly the same in numbers, the crimes committed by men are usually rather more than 5 times as numerous as those committed by women, and although it may be justly observed that men as the stronger sex, and the sex upon whom the burden of supporting the family is thrown, have more temptations than women. It must be remembered, on the other hand, that extreme poverty which verges upon starvation is most common among women whose means of livelihood are most restricted and whose earnings are smallest and most precarious. Self-sacrifice is the most conspicuous element of a virtuous and religious character and it is certainly far less common among men than among women whose whole times are usually spent in yielding to the will and consulting the pleasures of others. There are two great departments of virtue:—the impulsive or that which springs spontaneously from the emotions, and the deliberative or that which is performed in obedience to the sense of

duty; and in both of the-e women are superior to men. Their sensibility is greater, they are more chaste both in thought and action, more tender to the erring, more compaosionate to the suffering, more affectionate to all about them. We find entire times spent in daily persistent self-denial, in the patient endurance of countless trials, that they are in general more addicted to petty forms of vanity, jealousy, spitefulness and ambition, and they are inferior to men in active courage. In the courage of endurance they are commonly superior, but their passive courage is not so much fortititude which bears and defies as resignation which bears and bends. In the ethics of intellect they are decidedly inferior. Women very rarely love truth and hate vehemently those who differ from them. They are little capable of impartiality or of doubt. Their thinking is chiefly a mode of feeling. They do not perceive qualifiying circumstances. Men lean most to justice, women to mercy. Their religious or devotional realizations are incontestably more vivid. While a father is most moved by the death of a child in his presence, a mother generally feels most the death of a child in some distant land.

Physically, men have the indisputable superiority in strength and women in beauty. Intellectually a certain inferiority of female sex can hardly be denied. Women are more occupied with particular instances than with general principles.

अर्थः-पुरुषांपेक्षां स्त्रिया सामान्यतः अधिक नीतिमान् असतात ही गोष्ट कोणत्याही देशांतील गुन्हेगारांचें रजिस्टर पाहिलें असतां सहज सिद्ध करून दाखवितां येण्यासारखी आहे. जगामध्यें साधारणपणें पुरुषांइतकी स्त्रियांची संख्या असतां कोणत्याही तुरुंगांत जा, त्या तुरुंगाचा फारच थोडा भाग स्त्री गुन्हेगारांनीं अडवलेला तुमचे दृष्टीस पडेल. आपल्या सुखावर पाणी सोडणें हा सद्गुणी व धार्मिक मनुष्यांत मोठा गुण मानला जातो. ह्या दृष्टीनेंही पाहतां हा गुण पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें विशेष आढळून येतो. दुसऱ्याचें सुख साधण्यांत आणि दुसऱ्याचे इच्छेनुरूप वागण्यांत स्त्रिया आपला सारा जन्म खर्च करितात. सद्गुणांतही दोन तऱ्हा आहेत. कांहीं माणसें स्वयंस्फूर्तीनेंच कोणतीही चांगली गोष्ट करण्यास एकदम तयार होतात, तर दुसरीं कांहीं माणसें विवेकोत्तर कर्तव्य म्हणूनच करीत असतात. ह्या दोन्ही प्रकारच्या गुणांत पुरुषांपेक्षां स्त्रियांचेंच श्रेष्ठत्व ठरण्यासारखें आहे. निर्मल विचार व शुद्ध आचरण ह्यांतही स्त्रिया पुरुषांच्याच पुढें आहेत. अपराध्याकडे सदय दृष्टीनें पाहणें, पीडितांविषयीं विशेष कनवाळूपणा वाटणें, आणि भोंवतालच्या सर्वांवर प्रेम करणें हेही स्त्रियांचे विशिष्ट गुण होत. आपल्या सुखाकडे बिलकूल लक्ष न देऊन असंख्य आपत्ति आल्या तरी त्या निमुटपणें सोसण्यांत स्त्रिया आपला सारा जन्म खर्ची घालतात. उलट, थोडासा छनछोकपणा, कांहींशी आढ्यता, मत्सर, अदेखाई, महत्त्वाकांक्षा, इत्यादि कित्येक किरकोळ दुर्गुणही त्यांचे ठिकाणीं असतात. आणि धिटाईत तर पुरुष स्त्रियांना कधींच हार जाणार नाहींत. त्या फार सहनशील असतात; परंतु त्यांच्यांत धैर्याची उणीव असते. म्हणजे आलेल्या संकटास तोंड देण्याचें त्यांच्यांत अवसान नसतें. संकटांपुढें त्या हात टेकतात. बुद्धिमत्तेतही त्यांचा नंबर पुरुषांच्याखालींच लागेल. सत्यावर स्त्रियांचें प्रेम बेताचेंच असतें आणि त्यांच्याशीं न जुळणाऱ्या माणसांचा त्यांच्या अंतःकरणांत प्रज्ज्वलित द्वेष वसत असतो. त्या नेहमीं संशयानें पछाडलेल्या असून मनाचा समतोलपणा त्यांच्या ठिकाणीं क्वचितच दिसून

येईल. विचार करण्याची त्यांना संवय नसते. त्यांच्या मनाला जें वाटेल तो त्यांचा विवेक. त्यांना सर्व बाजूंनीं विचार करितां येत नाहीं.पुरुष न्यायी असतात तर स्त्रिया दयाळू असतात. त्यांची धर्मश्रद्धा आणि त्यांचा भाविकपणा पुरुषांपेक्षां निःसंशय अधिक उज्ज्वल असतो. डोळ्यांसमोर मेलेलें मूल पाहून बापाला फार वाईट वाटतें,परंतु दूर देशांत मूल मेलेलें ऐकून आई अधिक दुःखी होते. स्त्रियांहून पुरुषांचें शरीरबल अधिक हें निर्विवाद आहे. परंतु सौंदर्यांत पुरुषांना स्त्रिया मागें टाकतात हेंही तितकेंच निर्विवाद आहे. पुरुषांची दृष्टि सामान्य तत्त्वांवरून ढळत नाहीं; पण स्त्रियांचें लक्ष्य बारिकसारिक गोष्टींतच वेधलेलें असतें.

ह्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या स्वभावांतील जन्मोत्तर संस्कारांनीं न बदलणारा भेद प्रत्येकानें लक्षांत बाळगिला पाहिजे.रा. मोडक ह्यांनीं अशा दृष्टीनें ह्याविषयीं जास्त विवेचन करण्यास पाहिजे होतें.

आरुरुक्षा.

शरीर आणि मन या चौथ्या प्रकरणांत ग्रंथकर्त्यांनीं उदयेच्छेचा विचार केलेला आहे. उदयाची इच्छा सुखाला कारणीभूत आहे काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर आरंभीं तर ग्रंथकर्त्यांनीं छाती ठोकून दिलें आहे. " असेल आमचा हरी तर देईल खाटल्यावरी " हें ह्मणणें नादानपणाचें आहे असें आपल्या वाचकांस बजावून, बळेंच करणी करून लक्ष्मी ओढून आणावी, ह्या सुज्ञ वचनाची त्यांना आठवण करून दिली आहे. आम्हांला ग्रंथकर्त्यांचा हा उपदेश अक्षरशः कबूल आहे. परंतु ते म्हणतात तशा प्रकारचें सुख असल्या प्रकारची हांव धरून कसें प्राप्त होणार ह्याचा मात्र उलगडा होत नाहीं. कारण पुढें त्यांनींच " ज्याला शांत आणि सुयंत्र असा जीवितक्रम पसंत असेल त्यानें व्याप फार माजवूं नये " असें सांगितलें आहे. ह्या दोन सिद्धांतांचा मेळ कसा घालावा ह्याबद्दल वाचक बुचकळ्यांत पडतो. परस्परविरुद्ध तत्त्वांचा संग्रह या ग्रंथांत जागोजाग दिसून येतो, हा या ग्रंथाचा मोठा दोष आहे. आरंभीं उदयेच्छोला बरेंच उचलून धरून अखेर ग्रंथकर्त्यांनीं तिचे पायच मोडून टाकिले आहेत. न्यायानें द्रव्यार्जन करून समकालीन राष्ट्रबंधूंची मान्यता संपादण्यापलीकडे आकांक्षेची मजल नेऊं नये असा इशारा देऊन अखेरीस ज्यांना शांत व सुयंत्र असा जिवितक्रम प्रिय असेल त्यांनीं व्याप फार माजवूं नये, असें त्यांचें आपल्या वाचकांस निक्षून सांगणें आहे. तदनंतर मध्ययुगीन पंडितांच्या शुष्क वादांचा उल्लेख करून गेल्या शतकांत झालेल्या ज्ञानाच्या वाढीचें वर्णन पाणीदार शब्दांनीं केलें आहे. तथापि न जाणों वाचक कदाचित् भलतीकडेच झुकतील असा संशय येऊन भौतिक उन्नतीपेक्षां आत्मोन्नत्ति अधिक थोर असें युरोपांतच विशेष लक्षांत ठेवण्यालायक तत्त्व अनपेक्षित ठिकाणीं लोकांपुढें मांडिलें आहे. ज्या देशांतील लोकांस पोटभर अन्न खाण्यास मिळत नाहीं त्यांना आत्मिक उन्नतीच्या गोष्टी पटणें जरा कठीणच पडेल.

संतोष.

ह्यापुढें संतोष–प्रकरणांत, संसारांत सुख नाहीं, आयुष्य कष्टप्रद आहे, इत्यादि प्रकारानें संसाराची निष्फलता मनावर ठसवून ज्याला संसारांत राहणेंच असेल त्याच्या कुटुंबांतील माणसें चांगलीं असतील तरच त्याला सुख प्राप्त होतें असें सांगून, उद्योग कसा करावा ह्याविषयींचें मर्म ग्रन्थकर्त्यांनीं व्यक्त केलें आहे. ते ह्मणतात, उद्योगाची खरी रीत ह्मटली ह्मणजे अशी कीं, कोणत्याही कामीं आपल्या प्रयत्नाची आपण शिकस्त करून सोडावी, मग शान्तपणें फलाची अपेक्षा करीत स्वस्थ राहावें. शान्तिसुखाचा नाश होईल ह्या भीतीनें मर्यादित व्याप करण्यास सांगणाऱ्या ग्रन्थकारांना लगेच उद्योगाची पराकाष्ठा करण्याविषयींचा आग्रह करण्याचा विसंगतपणा कसा दिसला नाहीं हा चमत्कार आहे. त्याचप्रमाणें फलाची इच्छा न करण्याविषयीं अगोदरच ज्यांनीं इशारत दिली आहे त्यांना तरी फलाची अपेक्षा करीत राहण्याचा उपदेश करणें शक्य नाहीं. उत्तरोत्तर वाढत चाललेल्या छानछोकीबद्दल ग्रन्थकर्त्यांना वाईट वाटणें स्वाभाविक आहे. पण ह्या प्रकरणांत हें विवेचन अप्रस्तुत आहे असें आम्हांस वाटतें. संतोषानें व्यक्तिसुख लाभत असलें तथापि राष्ट्रोन्नतीचें मूळ असंतुष्टतेंत आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. जगाचा मी ऋणी आहें अशी भावना नसणाऱ्या सदासंतुष्ट माणसाच्या हातून कोणतीही क्रिया घड-

णार नाहीं. असा कर्तव्यशून्य माणूस या पृथ्वीवर जन्मास तरी कां यावा हें समजणें दुरापास्त आहे.

आपत्ति.

सुखसाधनांमध्यें संकटांचा समावेश करण्याचें धाडस कोणी करील असें वाटत नाहीं. तथापि आपत्ति सुखविध्वंसक असल्यामुळें त्यांचा विचार करणें ओघासच येतें. आपत्तींतही मनुष्य सुखीच असतो अशी लौकिकी भाषा कानावर वारंवार पडते, नाहीं असें नाहीं. तथापि शास्त्रीयदृष्ट्या या भाषेचें समर्थन करणें म्हणजे व्यर्थ शीण होय. आत्मव्यतिरिक्त इतर वस्तूंपासून जर मनुष्याला सुख होतें तर तदभावीं सुखाचा अभाव असणें स्वाभाविकच होय. "आत्मन्येवात्मना तुष्ट" अशा लोकांच्या निरुपाधिक आनंदाचा येथें विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु, अनुपमेय सृष्टिसौंदर्यापासून जर एखाद्या रसिकाला खरा आनंद होत असेल तर तोच सृष्टिप्रदेश अकल्पित कारणांनीं रुक्ष झालेला पाहून त्याचें हृदय क्षणभर आर्त झाल्यावाचून कसें राहणार ? तात्पर्य, मनुष्याच्या मनोजयानें आपत्तीपासून जरी त्यास दुःख होणार नाहीं तरी सुख होणें संभवनीय नाहीं.

ग्रंथकर्त्यांनीं संकटांचे सहा वर्ग केले आहेतः (१) सूचनार्थ, (२) परीक्षार्थ, (३) काल्पनिक, (४) स्वकृत, (५) दंडार्थक, (६) आच्छन्न. ग्रंथकाराचें म्हणणें जगांत जें दुःख येतें तें आगामि संकटांचें परिहारसूचक असतें, व एकाचें दुःख दुसऱ्याच्या सुखाला कारणीभूत होतें. यांत दुसऱ्याच्या सुखार्थ परमेश्वर तिसऱ्याला विपत्तींत पाडतो याचें समर्थन कसें करावें हें आम्हांला समजत नाहीं. आपल्या हातून चूक झाली म्हणजे त्या चुकीचें प्रायश्चित्त आपणांस भोगलें पाहिजे व ती चूक भावी महान् अनर्थ टाळण्याला कारणीभूत होईल हेंही खोटें नाहीं. पण अशा चुका अज्ञानानेंच होतात. सबब अशा संकटांना सूचनार्थ म्हणण्यापेक्षां अज्ञानोत्पन्न ह्मणणें अधिक योग्य होईल.

कांहीं संकटें परमेश्वर मनुष्याची परीक्षा पाहण्याकरितां पाठवीत असतो. आपत्कालीं खऱ्या गुणांची पारख होते; आणि म्हणूनच त्या माणसाचा कीर्तिभानु अधिकच तेजःपुंज होतो. या ह्मणण्याच्या सत्यार्थ इतिहासांतून पुष्कळ उदाहरणें देतां येतील हें जरी खरें असलें तरी अशीं संकटें धाडण्यांत परमेश्वराचा हेतु सदयच असतो हें ग्रंथकाराचें विधान आह्मांस त्यांच्याप्रमाणें "उघड" दिसत नाहीं. उलट चांगल्या माणसांवर आलेल्या अवचित संकटांवरून परमेश्वराचें दयालुत्व सिद्ध होण्याऐवजीं अशाही प्रसंगीं परमेश्वर सदय आहे असें म्हणणारांचा आग्रह मात्र उघड दिसतो. हरिश्चंद्र आणि नल या राजांच्या आपत्तींचीं हृदयद्रावक वर्णनें वाचलीं ह्मणजे परमेश्वरानें आपली सदयता लोकनिदर्शनास आणण्याकरितां इतके जालीम उपाय योजावे किंवा नाहीं याचा निर्णय करणें कठीण जाईल. हें परमेश्वराचें करणें कदाचित् न्यायाचें असेल, पण ते निःसंशय दयाळूपणाचें म्हणतां येणार नाहीं. कोणत्याही क्रियेचे सुष्टदुष्ट परिणाम होत असतात, परंतु तो हेतुच मनांत ठेवून ती क्रिया झाली पाहिजे हें म्हणणें सर्वथा वाजवी दिसत नाहीं. सर्व गांव जळून खाक झाला म्हणजे हवा स्वच्छ होते, रोगाचें बीज राहात नाहीं, व सरकारास नवीन शहररचना करण्याची संधि प्राप्त होते, म्हणून त्या सबबीवर गांव अग्निमुखीं देण्यास कोणी प्रवृत्त होणार नाहीं.

मनुष्यावर जीं असंख्य संकटें ओढवतात, त्यांपैकीं पुष्कळ स्वकृत असतात, हें ग्रंथकर्त्याचें म्हणणें प्रत्येकानें लक्षांत बाळगण्याजोगें आहे. खरें पाहिलें तर परिहार्य आणि अपरिहार्य, असे संकटांचे दोनच भाग करावयास पाहिजे होते. कैसरनें जर आज लढाई उत्पन्न केली नसती तर त्यांना चिंतातुर असण्याचें कारण पडलें नसतें. शारीरिक व मानसिक क्लेश आपण केलेल्या चुकयांमुळें आपणांस भोगावे लागतात. अग्नीवर पाय ठेवला असतां तो भाजलाच पाहिजे. अर्थात् पाय भाजणें हा अग्नीवर पाऊल टाकण्याचा परिणाम झाला. ह्यालाच दंडार्थक संकट म्हणावयाचें.

कांहीं संकटें फणसासारखीं असतात. म्हणजे बाहेरून कांटेरी असलीं तरी आंत सर्व मधुरताच असावयाची. हिंवाळ्यांत थंडीचा किती जरी बाह्यतः त्रास वाटला तरी एकंदरींत हिमकाल मनुष्याच्या प्रकृतीला सुखावहच होतो. असल्या प्रकारच्या संकटांना ग्रंथकार आच्छन्न संकटें ह्मणतात.

आपत्तींचें वर्गीकरण शास्त्रीय नाहीं हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. मुख्य दोष म्हटला म्हणजे परकृत संकटांचा उल्लेखही या प्रकरणांत केलेला नाहीं. अशीं संकटें अपरिहार्य संकटांच्या सदरांत आम्हीं घालतों. आपण आपल्याकडून निर्दोष राहून तद्द्वारां येणाऱ्या संकटांचा परिहार केला तरी इतरांनीं केलेल्या कृत्यांचे दुष्परिणाम आपणांवर वारंवार घडत असतात, ते आपणांला कांहीं केलें तरी टाळतां येणें शक्य नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांना आज गहूं खाण्यास मिळत नाहींत असें झालें आहे. हें पांच हजार कोसांवर लोकांनीं केलेल्या कृत्यांचें फळ होय. एकाच्या निष्काळजीपणामुळें लागलेल्या आगीनें त्याचेंच घर जळतें असें नाहीं, तर, इतरांचींही जळतात. त्यास त्या इतरांनीं काय करावें? हाकलणारांच्या मूर्खपणानें दोन आगगाड्यांची टक्कर होऊन हजारों लोक मृत्युमुखीं पडतात हा कोणाचा अपराध म्हणावा? प्रथम या देशांत कोणी तरी एकानेंच परदेशांतून प्लेगचें बीज आणलें. पण या रोगास आजपर्यंत जे लाखों लोक बळी पडले त्या बिचाऱ्यांनीं कोणता गुन्हा केला होता, कीं त्यांना मरण आलें ही योग्य शिक्षा झाली असें म्हणतां येईल? भारतीयुद्धाचे वेळीं एका दुर्योधनाच्या राज्यतृष्णेमुळें अगणित प्राणहानि झाली. त्यावेळीं त्या लोकांनीं काय पाप केलें म्हणून सांगतां येईल? सारांश, या जगांत दुसऱ्याच्या कृतीनें ओढवलेल्या संकटांना तोंड देणें अशक्य आहे.

ह्याशिवाय दैवी संकटें म्हणून एक तिसरा संकटांचा वर्ग पाडतां येईल. भूकंप, ज्वालामुखी पर्वत, क्षुब्ध समुद्र इत्यादिकांपासून होणाऱ्या अनर्थांचा समावेश या वर्गांत करितां येण्यासारखा आहे. याप्रमाणें स्वकृत, परकृत व दैवी असे तीन वर्ग आपत्तींचे पाडणें अधिक सयुक्तिक झालें असतें. जागच्यावर कांहीं नसून संकटाची कल्पना करून उगाच बाऊ, बाऊ, म्हणून भेदरून जाणारे लोक असतात. त्यांच्या या काल्पनिक संकटांचा समावेश स्वकृत वर्गांत करण्यास हरकत दिसत नाहीं.

सदयता.

मनुष्य कितीही विद्वान असो, त्याच्या अंतःकरणांत जर दयेचा पाझर नसेल तर त्याच्या त्या विद्वत्तेची कांहीं किंमत नाहीं. महीपतीनें म्हटल्याप्रमाणें "भूत दयेविण होटीं ज्ञान वटवट कासयां?" अर्थात् अशा उन्नतर सद्गुणाचा समावेश सुखसाधनांत केला हें सयुक्तिकच आहे. कोणत्याही मनुष्याशीं—मग त्यानें आपला महान अपराध कां केलेला असेना—आपण सदयतेनें व क्षमाशीलतेनें त्याच्याशीं वागावें, दुसऱ्याचे दोषच पाहूं नयेत. म्हणजे आपल्या चित्ताच्या स्वास्थ्याची हानि होण्याचा संभव कमी. कोणत्याही गोष्टींचा सर्वांगीं विचार झाला म्हणजे ती बहुधा क्षम्यच वाटते, व क्रोधाचें कारणच उरत नाहीं. अपात्रीं दान देऊं नये, कारण, वर्तनानें अपात्र आहे तो दयेलाही अपात्र आहे. नेहमीं शुभ बोलावें व सर्वांवर प्रेमाचा वर्षाव करावा, इत्यादि. ह्या प्रकरणांतील प्रमेयें प्रत्येकानें आपल्यापुढें सतत वागविलीं पाहिजेत. परंतु त्यांतल्या त्यांत ग्रंथकर्त्याचें एक विधान अत्यंत महत्त्वाचें असून तिकडे प्रत्येकाचें लक्ष्य वेधणें अवश्य आहे. रा. मोडक सांगतात, दुसऱ्यावर नेहमीं उपकार करीत असावें, कारण मनुष्य प्रत्येकाचा ऋणी आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं, सर्व जगाचें ऋण आपल्या डोक्यावर आहे ह्याचा विचार कोणाच्या डोक्याला शिवत नाहीं. आगगाडींत, आगबोटींत आपण बसून लांबलांबचा प्रवास करितों. अल्प कालांत आपलें म्हणणें दूरस्थ माणसांस कळवितां येतें. असंख्य लोकांनीं बनविलेल्या नानाविध पदार्थांनीं आपण आपल्या मनाची हौस पुरवून घेतों. किंबहुना आपलें जीवित, आपली सर्व चैन, आपली सर्व मौज दुसऱ्यावर चालली आहे, ह्याचा विचार केला म्हणजे आपण दुसऱ्याकरितां कांहीं केलें तर त्याला परोपकार तरी कसा म्हणावा हें समजत नाहीं. आमच्या मतें परोपकार हा शब्दच भाषेंत असावयास नको होता. ज्या ज्या वेळेस दुसऱ्याच्या उपयोगीं पडून आपण त्याच्यावर उपकार करितों असें आपणांस वाटतें तेव्हां तेव्हां वस्तुतः आपण परोपकार करीत नसून आपण दुसऱ्याचें कर्जच फेडीत आहोंत असें समजलें पाहिजे. असे अनेक प्रसंग आहेत कीं, ज्याच्या कृतीचा फायदा आपणास मिळतो त्याच्या उपयोगीं पुन्हां पडण्याची संधीच आपणास मिळत नाहीं. अशा प्रसंगीं त्याच्या उपकाराचें कर्ज फेडणें म्हणजे जगांतील दुसऱ्या माणसांच्या उपयोगीं पडणें हा एकच मार्ग खुला रहातो.

शिक्षण.

शरीरापेक्षां मनाची थोरवी अधिक आहे. थोर मन असल्यानें वृत्ति सदा आनंदी असते, हें आपणांस ग्रंथकर्त्यांनीं अगोदरच सांगून ठेविलें आहे. परंतु सर्वांचीं मनें उपजतच सारखीं नसल्यामुळें मनावर संस्कार घडावे लागतात. व हें कार्य शिक्षणाच्याच योगानें सिद्धीस जातें. म्हणून सुखप्राप्तीवरील विवेचनांत शिक्षणाला अग्रस्थान देणें अगत्याचें आहे. ज्या संस्कारांनीं पशूचा मनुष्य बनतो त्यांस शिक्षण म्हणावें, ही रा. मोडक यांनीं केलेली व्याख्या निर्दोष आहे. ईश्वर आपणांस पाहतो आहे ही भावना असल्याशिवाय मनुष्य सद्वृत्त निपजणें दुर्घट कर्म आहे. म्हणून धार्मिक शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करून प्रचलित शिक्षणपद्धतींतील दोष रा. मोडक यांनीं मोठ्या मार्मिकतेनें व बहुतेकांना मान्य होतील अशा तऱ्हेनें सांगितले आहेत. " आमचे शिक्षणपद्धतींत जबरदस्त दोष हा आहे कीं, तिच्या योगानें विद्यार्थ्यांची जिज्ञासा, शोधकदृष्टि किंवा ज्ञानतृष्णा हीं उत्तरोत्तर वृद्धिंगत न होत जातां उलटीं मंदावत जातात. " ही टीका आम्हांस अक्षरशः मान्य आहे. चालू शिक्षणानें पशूचा मनुष्य बनण्याऐवजीं मनुष्याचा पशू बनतो हें मात्र खास. मुलांची कोणत्या तरी विशिष्ट विषयाकडे उपजतच प्रवीणता असते, म्हणून त्याच विषयाचा अभ्यास त्याच्याकडून करवावा, ह्या ग्रंथकर्त्यांच्या हाकाटीकडे सरकारचें व लोकांचें लक्ष जाईल तो सुदीन. जन्मास आलेलें प्रत्येक मूल बी. ए. च झालें पाहिजे अशी जणुंकाय आजपर्यंत विद्याखात्याची सक्ती होती असा भास होतो. ह्या असमंजसपणाच्या धोरणानें हिंदुस्थानांतील लाखों मुलें फुकट गेलीं आहेत.ह्याकरितां उत्कर्षेच्छु राष्ट्राला शिक्षणाच्या बाबतींत सर्व प्रकारच्या सोयी करून देणें हें सरकारचें व लोकांचें आद्य कर्तव्य आहे. विद्यार्थ्याला एकाच विषयाचें ज्ञान देण्यापेक्षां, एका विषयाचें पूर्ण ज्ञान देऊन इतर सर्व विषयांचीं मूलभूत तत्त्वें त्याला अवगत करून यावीं हेंही ग्रंथकारांचें म्हणणें सयुक्तिक दिसतें.

परकी भाषेंतून हल्लीं शिक्षण दिलें जात असल्यामुळें त्याचे किती अनिष्ट परिणाम होतात ह्याचा विचार ग्रंथकर्त्यांनीं केलेला नाहीं. फाजील श्रम पडून विषयही मुलाला नीट समजत नाहीं, हा या पद्धतीचा मुख्य दोष आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक शास्त्राचीं मूलभूत तत्त्वें विद्यार्थ्यांना व्याख्यानांच्याद्वारें शिकविल्यास पुष्कळ विषय थोडक्या वेळांत व मुलांवर फार बोजा न पडतां शिकवितां येतील. परंतु ह्या गोष्टीकडे विद्याधिकाऱ्यांचें मुळींच लक्ष गेलेलें दिसत नाहीं. सांप्रत शाळांत व कॉलेजांत लहानसहान गोष्टींस फाजील महत्त्व दिल्यामुळें विषयाचें मुख्यांग मुलांचे मनावर ठसत नाहीं. अर्थातच ह्या प्रकारानें मुलांच्या मनावर शिक्षणाचा इष्ट परिणाम होत नाहीं.ह्यांत विशेष आश्चर्य वाटण्याचें प्रयोजन नाहीं.

शिक्षणविषयक प्लेटोचे खालील उद्गार विचार करण्यासारखे आहेत. Education is virtue from youth upwards, which makes a man early pursue the ideal perfection of citizenship and teaches him how rightly to rule and how to obey. This is the only training which would be characterised as education. That other sort of training which aims at the acquisition of wealth or bodily strength or more clever. ness apart from intilligence and justice as mean and illiberal and is not worthy to be called education at all.

लबक साहेबांनीं इंग्लंडमधील शिक्षणपद्धतींतील दोष दाखविले आहेत ते आमच्याकडेही अक्षरशः लागू पडतात. ते रा. मोडक ह्यांच्याच शब्दांत आह्मी येथें देतों.

" लबक ह्मणतो, विश्वविद्यालयाचा शिक्का मिरविणारांत मला असे विद्वान आढळले आहेत कीं, त्यांना चंद्राला क्षयवृद्धि कां असते हें माहीत नाहीं; व पोंवळीं हा किडा आहे, व्हेल हा मासा आहे आणि वाघूळ हा पक्षी आहे असें ते समजतात. इंग्लंड हें आजपर्यंत अनेक वेळां जलमग्न झालें आहे, हें त्यांना खरें वाटत नाहीं. आणि हें जग होऊन काय तीं ६००० वर्षेच

झालीं, असें ते मानतात. असल्या खुळ्यांना विद्वान् कोणीं म्हणावें? बरें, व्यवहारज्ञान? तेंही भोपळ्या एवढें! मंडईत भाजीवाली माळीण चटदिशीं गंडे जुळवील तर यांना पाटी लेखण पाहिजे. "

शत्रुमित्र.

सुखसाधनांत उत्तम मित्राची गणना करणें रास्त आहे. परंतु ग्रंथकर्त्यांनीं ह्या प्रकरणांत जीं प्रमेयें वाचकांपुढें मांडलीं आहेत त्यावरून पाहतां खोल विचार करून हें प्रकरण लिहिलें असावें असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें विवेचनपद्धतही सशास्त्र आहे असें दिसत नाहीं. ज्यानें मीठ खाल्लें त्याशीं दगलबाजी करूं नये हें सर्वथा उचित आहे. पण आपल्यावर दुसऱ्याचे जे उपकार झाले आहेत त्या उपकारांच्या स्मृतीनें त्यांच्याशीं दगलबाजी करणें रास्त होत नाहीं. ह्या गोष्टीशीं स्नेहाचा संबंध कसा पोंचतो हें समजणें कठीण आहे. तसेंच शहाण्यानें स्नेह्याशीं वाद मांडूं नये असें ग्रंथकार सांगतात, पण तें कां कोण जाणें. पुढें, ज्याला स्नेही नसेल त्यानें वनश्रीवर प्रेम धरावें असा उपदेश ग्रंथकर्त्यांनीं वाचकांना केलेला आहे. परंतु स्नेह्याची जागा वनश्रीकडून भरली जाईल असें म्हणणें म्हणजे निर्जीव–सजीवांचा स्नेह होतो असें म्हणण्यासारखेंच आहे. ह्यापेक्षां ॲरिस्टॉटलनें ह्या विषयावर लिहिलेला निबंध ज्याला ह्याचा अभ्यास करावयाचा असेल त्यानें अवश्य वाचावा अशी आमची शिफारस आहे. स्नेही एकच असावा अशी कैद नाहीं, हेंही म्हणणें आम्हांस पसंत नाहीं.आम्ही ह्याच विषयावर विविधज्ञानविस्तार (पु.४१,अंक१) मध्यें स्वतंत्र निबंध लिहिला असल्यामुळें येथें त्यासंबंधीं ज्यास्त ऊहापोह करूं इच्छित नाहीं.

श्रीमंती.

ग्रंथकर्त्यांची सुखाची मीमांसा चुकली असल्यामुळें श्रीमंतीला दूषण देतांनाही ग्रंथकार बरेच बहावलेले दिसतात. नाहीं, तर सुतारकाम बरें, पण, अमेरिकेचें प्रेसिडेंट होणें चांगलें नाहीं, हें वाक्य त्यांच्या लेखणींतून उतरलें नसतें. हिंदुस्थानांत आज सगळेच सुतार किंवा त्याच्याहीखालचे मडकीं बनविणार बनले आहेत. तेव्हां येथील लोकांसारखें आनंदी लोक साऱ्या दुनियेंत आढळणार नाहींत, अशी ग्रंथकर्त्यांची समजूत आहे कीं काय नकळे. पैशाबद्दल तळमळ नसावी हें म्हणणें कोणासही मान्य होईल, परंतु आनंदाला श्रीमंती कारणीभूत होत नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. रा. मोडक यांनींच म्हटल्याप्रमाणें, श्रीमंत असून त्याचे अंगीं दानशूरता, उपभोगांत नेमस्तपणा, दीर्घदृष्टि, इंद्रियदमन व आणखी बरेच सद्गुण असतील, तर त्याला श्रीमंती सुखावह होईल. असें जर आहे तर श्रीमंती असूनही उपरिनिर्दिष्ट सद्गुण आंगीं येतील असा उपदेश केलेला बरा. नाहीं तर समुद्रांत एखादवेळ आगबोट बुडते म्हणून आगबोटींत न बसणेंच बरें असें म्हणण्याइतकेंच तें वेडेपणाचें होईल.श्रीमंतीचें भेसूर स्वरूप आजपर्यंत पुष्कळांनीं रेखाटलें आहे. आतां तिचें हृदयंगमत्वच रेखाटणारीं माणसें पाहिजे आहेत. दुसऱ्यावर उपकार करण्याची संधि धनवानाला जितकी येईल तशी; अठराविश्वे–दरिद्र्याला कशी मिळावी? जितका मनुष्य थोर व श्रीमंत तितका तो अधिक परस्वाधीन होतो."The greater one becomes the less can he have his own way" हें नेपोलियनचें म्हणणें ध्यानांत ठेवून तदनुसार जर मोठीं माणसें वागतील तर मोठें होण्यांतच सार्थक आहे यांत संशय नाहीं. व्यासवाल्मिकींनीं जितकें दुःखहरण केलें आहे तितकें श्रीमंत माणसांकडून होणें शक्य नाहीं हेंही म्हणणें एकांगीच दिसतें. हें स्पष्ट करण्यासाठीं फार लांब जावयास नको.अँड्र्यु कार्नेगीच्या औदार्यानें आज कितीतरी लोकांना सुखाचा लाभ होत आहे! परदुःखहरणास दया आणि दुसऱ्याची जाण ह्यांच्या जोडगोळीशिवाय द्रव्य व्यर्थ आहे. पण द्रव्य नसेल तर नुसत्या शाब्दिक सहानुभूतीनें क्षुधिताची क्षुधा कशी निवारण होणार? द्रव्यापासून शहाण्याला सुख होतें हेंच रा. मोडकांचें म्हणणें विशेष ग्राह्य दिसतें. बाकी द्रव्य संपादन करण्यास दगदग करावी लागते, द्रव्यापासून दुर्व्यसनें जडतात व अधःपात होतो, वगैरे विधानें एकदेशी होत. मी द्रव्य संपादन करितों तें लोकांकरितां आहे, वस्तुतः या जगांत माझ्याकरितां कांहींच करावयाचें नाहीं, समाजाच्या हिताकरितां परमेश्वरानें मला जन्मास घातलें आहे, हा उपदेश जर मुलांच्या मनावर लहानपणापासून उमटेल तर श्रीमंतीबद्दल विलाप करण्याचा असा प्रसंगच कोणाला येणार नाहीं.

सृष्टीची भीषणता. सृष्टिप्रेम.

ह्या दोन प्रकरणांत ग्रंथकर्त्यानें आमच्या पूर्वजांमध्यें सृष्ट्यावलोकन व सृष्टिप्रेम उत्तम होतें असें सोदाहरण सिद्ध केलें आहे. रा. मोडक यांची वर्णनात्मक शक्ति किती अवर्णनीय व अनुपम आहे हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल.

" अंतरिक्षाचाही हाच प्रकार. जे प्रेक्षावान् असतील अशांना अंतरिक्ष म्हणजे विस्मय, कौतुक व आनंद यांचें एक अक्षय्य निधानच आहे. दिवसास चंडरश्मीचें तें सर्वातिशायी, भास्वर, शुक्ल तेज आणि वैभव पाहून डोळे थकच होतात. पुढें संध्यासमय येऊन दिनमणि अस्ताचलचूडावलंम्बी झाले, म्हणजे तें दृष्टिक्षम होऊन त्यास अधिकच रमणीयता येते. बरें, अल्पावकाशानें ते साफ दृष्टिआड होत आहेत, तों शीतरश्मि निशानाथ आपल्या असंख्य चमकदार सहचारिणींसह गगनांगणांत आविर्भूत होऊन आपल्या शरीरनिर्वापक जोत्स्नेनें सर्व जगत् भरून काढितात ! तेव्हां तर असें वाटतें कीं, दिनमणीच्या कारकीर्दीतली मौज हिजपुढें कांहींच नाहीं. निखिलनेत्रानंदन, विश्वतापहरण अमृतांशु नभोमंडलांत उदित झालेला पाहून कविगण आणि प्रेमीजन यांना तर काय होतें तें होतें. आईला जसें नव्या नवसांच्या आपल्या लाडक्याला पाहून यावर काय शृंगार चढवूं आणि कोणते अलंकार घालूं असें वाटतें, तसें कविगणांना या आनंदकंदाला कोणती उपमा द्यावी आणि कोणती न द्यावी असें होऊन जातें. आणि मग त्या उल्हासभरांत कोणी हा दिग्वधूंचा क्रीडाकंदुक, कोणी स्वर्गंगेंतील राजहंस, कोणी ताराहारांतील मध्यमणि, कोणी शृंगाररक्षामणि इत्यादि रूपकें त्याजवर करितात. प्रेमीजनांना वाटतें कीं, या सुधाकराचें राज्य आहे तों असेल नसेल ती चैन करून घेऊं. असा हा चंद्रोदय निरुपम सुखदायी आहे. "

सद्यःकाल.

सद्यःकालाचा आणि सुखाचा कसा संबंध पोहोंचतो हें एक मोठें कोडेंच आहे. तथापि सद्यःकाल ह्या सदराखालीं रा. मोडक ह्यांनीं सर्वसंमत होणाऱ्या गोष्टी सांगितल्या आहेत. आयुष्य अनिश्चित असल्यामुळें शहाण्यानें उद्यांवर विश्वास न ठेवून आजच काय करणें तें करावें; मनुष्य जन्म दुर्मिळ आहे असें सतत ध्यानांत बाळगून दूर दृष्टीनें व निश्चयानें माणसानें चालावें.

वैदग्ध्य.

मनुष्य कितीही पुस्तकी विद्वान असला तरी पण त्याच्या अंगीं चातुर्य नसेल तर त्याच्या विद्वत्तेचा व्यवहारांत कांहीं उपयोग होणार नाहीं. म्हणून वैदग्ध्याची ऊर्फ चातुर्याची थोरवी, प्रत्येक काम मागचा पुढचा विचार करूनै करावें, वगैरे नेहमींच्या बहुमान्य गोष्टी सांगून रा. मोडकांनीं अखेरीस एक मोठा सिद्धांत काढला आहे. त्यांत मात्र मतभेद होण्याचा संभव आहे. ते लिहितात, सन्मार्ग कोणता हें प्रत्येकानें आपल्या आत्मारामाला पुसत जावें. तो कधींही फसावयाचा नाहीं व दुसऱ्याचें ऐकावयाचा नाहीं. थोराचा आत्माराम चोरी हें दुष्कृत्य आहे असेंच बेमुर्वत त्याला सांगतो. इतका तो स्पष्टवक्ता आहे. इ० आम्हांस तर ही उक्ति फाजील व्यापक दिसते. पुण्य कोणतें, पाप कोणतें, धर्म कोणता, अधर्म कोणता, तसेंच कर्तव्य कोणतें, अकर्तव्य कोणतें, हें जर प्रत्येकाला अंतराकडून बिनचूक समजण्याजोगें असतें, तर जगामध्यें वादग्रस्त गोष्ट म्हणून कोणतीही झाली नसती. दुष्ट व ढोंगी लोक बाजूला सोडले तरी, प्रामाणिक मतभेद ज्यांचा कित्येक गोष्टींसंबंधानें होतो अशीं असंख्य माणसें दृष्टीस पडतात. अनेक जन्मांच्या मलीन संस्कारांनीं ज्यांचा आत्माराम मलीनच बनला आहे त्या आत्मारामामध्यें चांगलें आणि वाईट हें ठरवण्याची शक्ति नष्ट होते असें आम्हांस वाटतें. रा. मोडकांनींच दिलेलें चोराचें उदाहरण वस्तुस्थितीला अनुसरून आहे असें आम्हांला वाटत नाहीं. पिढयानुपिढया ज्यांच्या कुळांत दरवडे घालून दुसऱ्याची संपत्ति हरण करण्याचा संप्रदाय आहे अशा दरवडेखोरांना आपल्या कृत्यांबद्दल यत्किंचितही वाईट न वाटतां उलट भूषणच वाटतें, असा अनुभव आहे. दरवडे घालणें हें आपलें पवित्रकर्म आहे असेंच हे लोक मानतात, व असल्या ह्या पवित्र (!) कार्यांत ते आपल्या मुलांनाही तरबेज करतात.

राष्ट्राची शान्ति.

युरोपांतील वर्तमान युद्धप्रसंगामुळें ' राष्ट्रांची शान्ति ' हा निबंध विशेष बोधप्रद होण्यासारखा आहे. सर्व

राष्ट्रांनीं आपआपलीं शस्त्रास्त्रें, आयुधें वगैरे युद्धसामुग्रीला जलसमाधि दिल्याशिवाय मधून मधून असेच युद्धाचे प्रसंग येऊन गरीबांच्या प्राणांची, वित्ताची व स्वास्थ्याची हानि झाल्याशिवाय राहणार नाहीं.

चित्तस्वास्थ्य.

या सदाराखालीं पूर्वींच सांगितलेल्या गोष्टींची द्विरुक्तता झाल्यामुळें विशेष लिहिण्यासारखें कांहीं नाहीं. वास्तविक पाहतां हें प्रकरण निराळें कां घातलें हें आह्मांस समजत नाहीं. तथापि या प्रकरणांत जातांजातां या विषयाकडे आम्हीं ज्या दृष्टीनें पाहतों त्याच दृष्टीनें रा. मोडक यांनीं ह्याविषयाचें विवेचन केलें आहे हें पाहून आम्हांस आनंद होणें स्वाभाविक आहे.

" जे कोणी स्वहितार्थच झटत असतात अशांचे यत्न विफल झाले असतां त्यांना फार वाईट वाटतें. परंतु परहितार्थ जे झटतात त्यांची गोष्ट वेगळी आहे. त्यांना यश आलें तर दुहेरी सुख होतें व प्रसंगीं न आलें तरी आपस्वार्थ्याइतका खेद होत नाहीं."

चित्तस्वास्थ्याची अगर सुखाची गुरुकिल्ली रा.मोडक यांना अखेरीस सांपडली हें बरें झालें. हीच किल्ली त्यांच्या हातीं अगोदर लागली असती, अथवा या गोष्टीचें यथार्थ महत्त्व त्यांच्या लक्षांत आलें असतें, तर त्यांचें विवेचन निराळ्या धर्तीवर गेलें असतें अशी आम्हांस खात्री वाटते. मनुष्याला कर्म हें चुकत नाहीं एवढेंच नव्हे तर कर्म करण्याकरितांच ईश्वरानें मनुष्याला निर्माण केलें आहे; व कर्म करणें तें आत्मसुखासाठीं नसून समाजाकरितां करावयाचें असतें अशा भावनेनें प्रेरित झालेल्या मनुष्याला दुःखी कष्टी होण्याचे प्रसंग येत नाहींत, व त्याचें चित्तस्वास्थ्यही ढळत नाहीं.

धर्म व ब्रह्मविद्या.

लबक साहेबांच्या ग्रंथाशीं ज्यांचा संबंध नाहीं अशीं धर्म व ब्रम्हविद्या हीं दोन प्रकरणें ग्रंथकर्त्यांनीं स्वतंत्र लिहिलीं आहेत. ग्रंथकर्ते हे विश्वविद्यालयाचे पदवीधर असून आर्यधर्मावर त्यांची निःसीम भक्ति आहे. हें जर मेकॉले साहेबांच्या स्वर्गस्थ आत्म्याला कळण्याचा कांहीं मार्ग असेल तर असे धर्मनिष्ठ पदवीधर हिंदुस्थानांत अद्यापि निपजत आहेत हें ऐकून अगर वाचून निराशेनें त्यांच्या मनाची काय स्थिति होईल याची कल्पनाच केली पाहिजे. कारण, इंग्लिश शिक्षणामुळें थोडक्याच अवधींत सर्व भारतवर्षीय लोक ख्रिस्ताचे अनुयायी होतील असें त्यांनीं भाकीत करून ठेविलें होतें.

" The effect of this (English) Education on the Hindoos is prodigious- No Hindoo who had received an English Education ever remains sincerely attached to his religion. Some continue to prefer it as a matter of policy, but many profess themselves pure Diess. Some embrace Christianity. It is my firm belief that if our plans of Education are follwed up, there will not be a single idolator among the respectable classes in Bengal, thirty years hence.

Life of Macaulay.

रा. मोडक यांचें धर्मावरील व्याख्यान फारच बोधप्रद असून संग्रहणीय आहे. धर्म हा ईश्वरप्रणीत पाहिजे. मनुष्याचा तेथें अधिकारच नाहीं. ह्मणून परमात्म्यानें भिन्न भिन्न देशांत भिन्न भिन्न कालीं अपेक्षेनुरूप अवतार घेऊन मनुष्यांत धर्मस्थापना केली आहे, हें मानवजातीचें मोठेंच भाग्य होय, असें रा. मोडक यांचें मत आहे.

वेदः स्मृतिः सदाचारः । स्वस्य च प्रियमात्मनः ॥
एतश्चतुर्विधं प्राहुः । साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥

असें धर्माचें लक्षण मनूच्या शब्दांत त्यांनीं दिलें आहे. पुढें अंतरंग व बहिरंग असे दोन धर्माचे निराळे भाग करून " आचारः प्रभवोधर्मः " असें त्यांनीं बहिरंगाचें व्याख्यान केलें आहे. व पुनः एकदां मनूच्याच शब्दांत भूतलावरील कोणत्याही लोकांना सारखींच लागू पडतील अशीं धर्माचीं मूलभूत तत्त्वें, " अहिंसा सत्यमस्तेयं । शौचमिंद्रियनिग्रहः ॥ एतत्सामासिकं धर्मं । चातुर्वर्ण्ये ब्रवीन्मनुः ॥ देऊन या प्रत्येक तत्त्वाचें उद्घाटन विस्तरशः केलें आहे. व त्यांनीं जो शेवटीं निष्कर्ष काढिला आहे त्याच्याशीं आमचें पूर्ण ऐक्य आहे. या प्रकारच्या या " पांचही अहिंसांचें या भूतलावरील प्रत्येक मनुष्य जर यथाशास्त्र अवलंबन करील तर आम्हांस वाढतें पृथ्वीवरील निम्मे दुःखराशी नाहींशीच होईल, " " शेवटली धर्माज्ञा

म्हणजे 'इंद्रिय निग्रह.' कोणी सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करील तर त्यास असें आढळून येईल कीं, मानवी व्यवहारांतील हजारों अनर्थ इंद्रियांच्या अनिग्रहामुळेंच उद्भवतात."

आमचा ग्रंथकर्त्यांशीं मतभेद आहे तो त्यांनीं केलेल्या मनूच्या श्लोकाच्या अर्थाबद्दल होय. आमच्या मतें वेद, स्मृति, सदाचार व आपली सदसद्विवेकबुद्धी हीं चार धर्मांचीं उगमस्थानें असून तीं प्रत्येकीं स्वतंत्र आहेत. विष्णुपुराणांतही मनूप्रमाणेंच धर्माची व्याख्या केली आहे. व ह्या व्यापक लक्षणामुळेंच आर्य धर्माचा लोप अद्यापि झाला नाहीं, अशी आमची समजूत आहे. इतर–धर्मीयांना त्यांच्या धर्माचा उगम त्यांच्या त्यांच्या वेदांत ह्मणजे धर्मपुस्तकांतच असावयाचा. परंतु कोणताही धर्मसंस्थापक त्या त्या कालाच्या अपेक्षानुरूप धर्माज्ञा करून ठेवतो. परंतु हें कालचक्र सदा फिरतें असल्यामुळें, एका काळाला उपयोगी पडणारे नियम अन्यकाळीं निरुपयोगी होतात व अशामुळें रिकामी झालेली जागा दुसऱ्या कशानें तरी भरून काढणें अवश्य पडतें. परंतु तसें करण्याला इतर कांहीं साधन नसल्यामुळें धर्मग्रंथ वाण्याच्या दुकानांत नेऊन टाकण्याच्या किंमतीचेच होतात. व जाणून बुजून धर्मविरुद्ध आचरण करण्याचे प्रसंग येत गेल्यामुळें धर्मावरील श्रद्धा उत्तरोत्तर लय पावते. आर्य धर्माची गोष्ट याहून निराळी आहे. सदाचार म्हणजे चांगल्या लोकांनीं घालून दिलेला आचार हा धर्मस्थानापन्न होऊन बसल्यामुळें आर्यधर्मांतील रहस्य नेहमीं दृढमूल राहतें. वेद, स्मृति, श्रेष्ठ लोकांचें वर्तन व आपली मनोदेवता ह्या चार गोष्टींचा विचार करून प्रत्येकानें प्रसंग पडेल तेव्हां धर्म कोणता व अधर्म कोणता याचा निर्णय केला पाहिजे. एक दोन उदाहरणें घेऊन हें अधिक स्पष्ट करितां येईल. परदेशगमन स्मृतिकारांना मान्य नसलें तरी सांप्रत काळीं तें केल्याशिवाय कोणासही गत्यंतर नाहीं; व हल्लीं आमच्यांतील श्रेष्ठांचा तो सर्वसंमत आचार होऊन बसला आहे. अशा वेळीं वेद आणि स्मृति एकीकडे ठेवून सदाचार व "स्वस्यच प्रियमात्मनः" ह्याखालीं परधर्मीयांच्या देशांत जाऊन येणारांचें वर्तन धर्मबाह्य नाहीं असेंच ठरविलें पाहिजे. दुसरें उदाहरण आपण पुनर्विवाहाचें घेऊं. शास्त्रांत जरी पुनर्विवाहाला मनाई असली तरी समाजांतील सच्छील माणसांना विधवाविवाह मान्य होऊं लागेल व त्यांपैकीं आचारसंपन्न माणसें–धर्मलंड मात्र नव्हेत–स्वतः विधवाविवाह प्रचारांत आणतील, तेव्हां तें कृत्य मनूच्या व्याख्येप्रमाणें धर्मबाह्य ह्मणतां येणार नाहीं. "म्हणून वेद आणि स्मृति या उभयांस धरून, कालानुसार ज्ञात्यांनीं घातलेले परिपाठ, व वैकल्पिक पक्ष असतां आपणांस हितकर असा पक्ष, ह्या चार गोष्टींचा धर्मांत समावेश आहे." ह्यामध्यें ह्या 'उभयांस धरून' व 'वैकल्पिक पक्ष असतां' हे शब्द मूळांत नसतां ग्रंथकर्त्यांनीं आपण होऊन घातलेले आहेत. यामुळें धर्माची व्याख्या निष्कारण संकुचित झाली आहे. ह्या श्लोकाचा प्राचीन टीकाकारांनीं रा. मोडकांप्रमाणेंच अर्थ केला आहे हें आम्हांस माहीत आहे. परंतु प्राचीन टीकाकारांचें ज्ञानक्षेत्र हल्लींइतकें विस्तृत नसल्यामुळें त्यांच्या हातून अशी चूक होणें शक्य आहे. पण सांप्रत कोणच्याही शास्त्रांत तुलनात्मक पद्धतीचा अंगिकार जगन्मान्य झाला असून रा. मोडकांनीं तो कां झुगारून द्यावा हें समजत नाहीं. शिवाय अर्थ करण्याचे जे कायद्यांत नियम आहेत ते पाहिले असतांही, कारण नसतां, जे शब्द मुळांत नाहींत ते तेथें घुसडून देण्याचा अधिकार कोणास आहे असें आह्मांस वाटत नाहीं. ह्यावर जितकें लिहावें तितकें थोडेंच असल्यामुळें आटोपतेंच घेणें शहाणपणाचें आहे. फक्त ही अर्थ करण्याची पद्धत आह्मांस मान्य नाहीं एवढें येथें नमूद केलें ह्मणजे पुरे.

ह्याप्रमाणें सदर ग्रंथासंबंधानें आम्हीं सविस्तर निरीक्षण केलें आहे. ग्रन्थांत अनेक विषय आल्यामुळें त्यांसंबंधीं मतभेद होणें एका अर्थी अपरिहार्यच आहे. तथापि हा ग्रन्थ वाचणारास बहुश्रुत करून सोडील ह्यांत संदेह नाहीं. सदरहु पुस्तक शाळांत आणि कॉलेजांत विद्यार्थ्यांच्या हातीं देण्यास सर्वथा योग्य आहे. पुस्तकाचें बहिरंगही मनोरम आहे. चालू पिढींत काय उणीवा आहेत व त्या दूर कशा करतां येतील ह्या एका दृष्टीनें रा. मोडक यांनी आपला ग्रन्थ लिहिला असता, तर त्यांची दिशाभूल झाली नसती. पण त्यांनीं आपल्यापुढें निराळेंच ध्येय ठेवल्यामुळें ह्यापेक्षां सरस ग्रंथ उतरणें शक्यच नव्हतें.

ना. गो. चापेकर.

" व्याध. " [उपनिषत्काळांतली एक कथा.]

हिमालयाच्या पायथ्याशीं जीं अनेक दऱ्या खोरीं आहेत, त्यांपैकीं एकांत अत्यंत प्राचीन काळीं एक व्याध राहत असे. तो आसपासच्या वनांतलीं रानपांखरें धरून आपली उपजीविका करीत असे. एकदां नेहेमींप्रमाणें पांखरें धरण्यासाठीं तो खांद्यावर जाळें टाकून रानांत गेला असतां त्याला मार्गांत एक विस्तीर्ण व रमणीय सरोवर लागलें. तेव्हां तेथेंच पक्षी सांपडतील असें स्थळ शोधून व त्याठिकाणीं आपलें जाळें पसरून जवळच वेतस व कुश यांचीं बेटें वाढलीं होतीं त्यांच्या आड शिकारीची मार्ग-प्रतीक्षा करीत तो व्याध दडून बसला. अशा प्रकारें पाळतीवर असतांना आपल्या मस्तकावर कसलीशी विशाल छाया पडल्याचा त्याला भास होऊन, लगेच सरोवराच्या पृष्ठभागावर कोणाचेंसें प्रतिबिंब पडलेलें त्याला दिसलें. तें कोणाचें असावें म्हणून वर मान करून तो पाहतो तों तें बिंब एकाएकीं अदृश्य झालें !

परंतु व्याधाची बिंबदर्शनाची इच्छा अशा विलक्षण तऱ्हेनें जागृत झाली, आणि ती बळावत अनावर व्हावयास लागली, कीं त्याला दुसरें कांहीं सुचेनासें झालें ! तो अगदीं वेडा होऊन बिंब नाहीं तर प्रतिबिंब तरी पुन्हां एकवार दिसावें म्हणून दिवसभर रानोमाळ हिंडूं लागला, व सरोवराच्या भोंवतीं घिरट्या घालून घालून त्यानें आपले प्राण कंठाशीं आणले. अखेरीस अगदीं दिसेनासें झालें तेव्हां मोठ्या नाखुशीनें त्यानें आपलें जाळें गोळा केलें, व तसाच रिकाम्या हातानें घरीं परत आला. तेथेंही त्याच्या मनाला आराम वाटेना व पालट-लेल्या चित्तवृत्तीचा अम्मल किंचितही कमी होण्याचा रंग दिसेना. त्यानें बहुतेक मौनच स्वीकारलें; व तेव्हांपासून तो रात्रंदिवस कोणत्या तरी मोठ्या चिंतेंत गढल्यासारखा दिसे. भयामुळें घरचीं माणसें त्याच्यासमोर जाण्यास धजत नसत. एखाद्या वेळेस त्याच्या विशेष लोभांतल्या सोबत्यानें कांहीं प्रश्न विचारण्याचा घाट घातलाच तर तो तिरसटासारखा तेथून उठून जाई. व दूर एका बाजूस एकलकोंड्या-सारखा सारा वेळ विचारांत मग्न राही.

कांहीं काळानें त्या व्याधाचा एक अत्यंत जिवलग मित्र त्याच्या भेटीस आला. विचारपूस केल्यावरून त्याच्याजवळ मात्र व्याधानें आपलें मन मोकळें केलें. तो म्हणाला, " आजपर्यंत कोणीही कधीं न पाहिलेली वस्तु मी नुकतीच पाहिली. परवां सकाळीं एका सरोवराच्या कांठीं पांखरें धरण्यासाठीं मी जाळें पसरून बसलों असतां अत्यंत धवल व तेजः पुंज असे आपले रजताचे पिसारे ज्यानें पसरले आहेत, व ज्याची कांति सुवर्णासारखी तळपत आहे असा श्रुतकीर्ति " ऋतंभर " सुपर्ण राजहंस मी निरभ्र अशा नीलवर्ण आकाशांत संचरतांना पाहिला. वास्तविकपणें मी प्रत्यक्ष पाहिला असें न म्हणतां त्याचें पाण्यांत पडलेलें प्रतिबिंब मला क्षणमात्रच दिसलें, असेंच खरें. पण तेव्हांपासून माझें चित्त अगदीं बहकल्यासारखें झालें आहे व तो सुंदर चित्ततस्कर हंस प्राप्त करून घेण्याखेरीज आतां दुसरें कोणतेंही कर्तव्य नाहीं असें माझ्या मनानें पक्कें घेतलें आहे."

हें ऐकून किंचित् हांसून त्याचा मित्र म्हणाला— "छित् ! वेडा कुठला ! कांहीं तरी उन्हाच्या तिरपेमुळें तुझ्या डोळ्यांना भास झाला असेल; किंवा सूर्य-तेजानें तळपणारी तरंगमाला मंद वायूमुळें कंपित होऊन ती तुझ्या उन्हानें व्याकुळ झालेल्या दृष्टीस क्षणभर पक्षाकृति दिसली असेल. कदाचित् हा तुझ्या अति शहाणपणाचा घरोत्कची बाजारही असेल. यांत कांहींच अर्थ नसून दोनचार दिवसांत तुझें भणभणलेलें डोकें पुन्हां ताळ्यावर आल्यावर मग तुझें तुलाच त्याचें हसूं येईल !"

परंतु असे अनेक " दोन चार " दिवस गेले, तरी त्या व्याधाचें चित्त ठिकाणावर येईना. त्या पक्ष्याच्या शोधार्थ त्यानें अनेक अरण्यें, सरोवरें, आणि दऱ्याखोरीं पालथीं घातलीं, पण त्याला त्या

हिरण्यगर्भ सुपर्णाचा थांग लागेना. त्या हंसासाठीं तो व्याध इतका वेडा बनला कीं त्या दिवसापासून त्यानें इतर पक्षी धरणें अजीबात सोडून दिलें; कारण ऋतंभर सुपर्ण हंसाशिवाय इतरांशीं त्यास कांहींच प्रयोजन नव्हतें !

इकडे या व्याधाला होतें तरी काय याबद्दल त्याच्या सोबत्यांत चर्चा सुरू झाली. त्याला वेड लागलें आहे असें एकाचें मत पडलें; दुसऱ्यास तें सारें ढोंग वाटून कोणीही आजपर्यंत प्रत्यक्ष न पाहिलेला हंस आपण पाहिला अशी गप्प उठवून देऊन हा व्याध आपलें प्रस्थ माजवीत आहे, अशी आपली बालंबाल खात्री आहे, असें त्यानें सांगितलें. अशा तऱ्हेचा जंगी मतभेद पडला तरी एकंदरींत याउप्पर या व्याधाची सोबत ठीक नाहीं आणि साऱ्यांनीं त्याचें नांवच सोडून द्यावें, याबद्दल मात्र सर्वांचें एकमत झालें. त्यामुळें तो व्याध अर्थात् एकटाच राहूं लागला.

एकदां मध्यरात्रीच्या सुमारास तो व्याध खिन्नपणें इतस्ततः भ्रमण करीत असतां त्याला अकस्मात् एक भव्य वृद्ध पुरुष आपल्या समोर उभा असलेला दिसला. तेव्हां नम्रपणें त्याला प्रणाम करून आपण कोण अशी व्याधानें पृच्छा केली. वृद्धानें सांगितलें, "माझें नांव 'विवेक' आहे. पण कित्येक मला 'प्राज्ञ' या नांवानेंही ओळखतात. मी याच अरण्यांत राहणारा खरा, परंतु अनेक दुःखांचा आस्वाद घेतल्याखेरीज येथील रहिवासी लोकांना माझें दर्शन होत नसतें. आधीं त्यांची दृष्टि दुःखाश्रूंनीं निवळावी लागते आणि अनुभवाच्या प्रखर अग्नींत त्यांचीं मनें शुद्ध व्हावीं लागतात. इतकें झालें तरी मी प्रत्येकाशीं ज्याच्या त्याच्या अधिकारानुरूपच हितगुज करीत असतों."

हें ऐकतांच व्याधालाही आपली काहणी त्याच्या कानावर घालावी असें वाटलें, व अत्यंत व्याकुळ होऊन आर्तपणें तो म्हणाला, " महाराज, याच प्रदेशांत आपला सारा काळ गेला आहे, तर मग आकाशांत उडतांना जो चमत्कारिक व अद्भुत हंस मी पाहिला तो कोठला हें आपण सहजच सांगूं शकाल यांत संशय नाहीं. मला सर्व लोक भ्रमिष्ट म्हणतात, व मला कांहीं तरी मिथ्याभास झाला आहे अशाप्रकारची ते माझी समजूत घालूं पाहतात. तरीही मी तो पक्षी खास पाहिला आहे असें अद्यापि माझ्या मनानें घेतलें आहे. तेव्हां यांतील खरा प्रकार कोणता हें ठाऊक असल्यास आपण कृपा करून सांगावें.'

किंचित् हंसून त्या वृद्ध पुरुषानें म्हटलें, "व्याधा ! त्वां जो पक्षी पाहिलास तो सत्यलोकीं असणारा वेदविश्रुत ऋतंभर नामक " सुपर्ण " हंस होय, यांत शंका नाहीं. या दुर्लभ पक्ष्याचें दर्शन ज्यांना होतें त्यांच्या मनाचें स्थैर्य नाहींसें होतें, आणि ते आमरण त्या हंसाच्याच प्राप्तीचा ध्यास धरून बसतात. " हें ऐकून व्याधानें त्या पक्ष्याचें निवासस्थान त्या पुरुषास विचारतां, या नव्या प्रश्नाचें कांहींच उत्तर न देतां "याचें उत्तर मिळण्याइतका अनुभव तुला अद्यापि आला नाहीं" असें पुटपुटत तो तेथून तडक पुढें चालता झाला !

तो पुरुष असा एकाएकीं निघून गेल्यामुळें व्याध कांहींवेळ अगदीं स्तंभित झाला. पण थोड्या वेळानें त्यानें आपल्या वक्षस्थलावरणांतून "मनोरथ" नामक सूत्रवेष्टनी बाहेर काढली, व त्यावर "वासना" सूत्रें गुंडाळून त्याचें साऱ्या रात्रभर बसून त्यानें एक जाळें विणलें. सकाळच्या प्रहरीं ती अद्भुत वागुरा व्याधानें जमिनीवर पसरून त्यावर कोणतेसे दाणे फेंकले. हे दाणे "श्रद्धा" नामक धान्याचे असून पांढऱ्या पोकळ फुग्यासारखा त्यांचा आकार होता, आणि त्यावर भार पडला म्हणजे ते पटापट फुटून आंतून पिंगट भुकणी बाहेर उधळली जात असे. हे दाणे व्याधाला त्याच्या वृद्ध पित्यानें मरतांना दिले होते व ते आजपर्यंत त्यानें फार काळजीपूर्वक आपल्या उराशीं बाळगून जतन करून ठेवले होते. अशा तऱ्हेनें तें अद्भुत जाळें पसरून व त्यावर दाणे फेंकून पुढें काय प्रकार होतो हें पाहत व्याध तेथेंच बसला. कांहीं वेळानें स्निग्ध व मसृण नेत्र असणारा आणि अत्यंत गोजिरवाणा असा एक शुभ्र रंगाचा पक्षी त्या जाळ्यांत अडकला. त्याचा कंठ मंजुळ असून " पितृ-देवता, पितृ-देवता " अशा प्रकारचे कोणचेसे बोल तो काढीत होता. इत-

त्यांत दुसरा एक पक्षी सांपडला; तो काळ्या वर्णाचा असून त्याच्या पिसाऱ्यावर विलक्षण दुर्ज्ञेय अशी चमक होती. त्याचे विशाल डोळे प्रत्येकाच्या हृदयाशीं भिडणारे असून तो " अमर " याच एका शब्दाचें कूजन करीत होता. व्याधानें ते दोन्ही पक्षी आपल्या जवळ घेतले, व ते मनोहर पक्षी खचीत ऋतंभर सुपर्णाच्या जातीचे असावेत असें त्याला वाटलें. कांहीं वेळानें तिसरा एक हिरव्या व सोनेरी रंगाचा पक्षी त्याच जाळ्यांत अडकला. याचा स्वर जरा कर्कशच असून तो "जन्मकर्मफल–स्वर्ग" अशा आशयाचे शब्द उच्चारीत होता. व्याधानें त्याच्याकडे पाहत ' इतका सुरेख नसलास तरी तूं अगदीं बेढबही नाहींस ' असें ह्मणत त्यालाही पकडलें. समोरचे दाणे संपेपर्यंत आणखीही बरेच दुसरे उज्वल वर्णाचे व मधुर स्वराचे पक्षी त्याच्या जाळ्यांत सांपडले. व्याधानें ते सारे गोळा करून " सद्यः पंथ " नामक एक भक्कम लोखंडी पिंजरा तयार करून त्यांत त्या सर्वांना बंदोबस्तानें ठेवलें.

लवकरच या पक्ष्यांबद्दलची कीर्ति दिगंतीं पसरून त्यांना पाहण्यासाठीं दूरवरच्या लोकांच्या झुंडीच्याझुंडी लोटूं लागल्या, व जो तो त्या व्याधाची तारीफ करूं लागला. कोणी व्याधाच्या भाग्याची तर कोणी त्या पक्ष्यांच्या लावण्याची वाखाणणी करावी; व पुष्कळ जण तर त्यांच्या श्रुतिसुभग गाण्यांच्या लकेरींनींच तल्लीन होऊन जात असत. परंतु हे पक्षी आले कोठून व त्यांना पकडलें तरी कसें, याबद्दल मात्र कोणीच चवकशी करीना ! व्याधालाही इतरांप्रमाणेंच आनंद झाला होता, व ऋतंभर हंस यांतच असला पाहिजे अशी त्यानें मनाशीं पक्की खूणगांठ बांधून आपण एके वेळीं पाहिलेला तो भव्य पांढरा शुभ्र पिसारा या पक्ष्यांपैकीं कोणास फुटतो याची मार्गप्रतीक्षा करूं लागला. पण तो पिसारा कांहीं कोणासही फुटेना, व व्याध मात्र त्या निराशेमुळें दिवसेंदिवस उदास व निस्तेज होत चालला. तो पुन्हां पहिल्यासारखा एकलकोंडा बनून मनांतल्या मनांत झुरूं लागला, आणि जुनी वासना पुन्हां प्रज्वलित झाल्यामुळें तो घटकानुघटका एकांतस्थळीं कालक्रमणा करूं लागला. अशा स्थितींत असतां पुन्हां एकदां त्याची व " विवेका"ची अचानक गांठ पडली. तेव्हां व्याधानें इतका वेळ आपण काय केलें तें सांगून तो त्या वृद्धास दुसरा कांहीं उपाय असल्यास पुसूं लागला. व्याधाचें तें सारें निराशाव्यंजक पण हृदय पिळवटून निघालेले निर्वाणीचे उद्गार ऐकून " विवेक " ह्मणाला, "बाबा, आजपर्यंत या 'ऋतंभर' सुपर्णाला पकडण्यासाठीं तूं केलेले प्रयत्न पुष्कळांनीं करून पाहिले. तुझ्यासारखेंच जाळें तयार करून त्यांत तो सांपडावा ह्मणून त्यांनीं अंध श्रद्धाबीजाचें आमिष लावून पाहिलें, पण अशा कोणालाही तो अद्यापि सांपडला नाहीं. हा हंस अंधश्रद्धाबीजांचा भोक्ता नाहीं, याचे पाय वासनासूत्रावरणांत गुंतत नाहींत, आणि खरें ह्मणशील तर या प्रदेशांतल्या दऱ्याखोऱ्यांतली हवाही पण त्याला मानवत नाहीं. त्वां जे पक्षी पकडले आहेत, व जे तुझ्या ह्मणण्यावरून खरेच गोजिरवाणे व मनोहर असावेत, ते खात्रीनें " अलीक " जातीचेच पक्षी असावेत, आणि ऋतंभर हंस तर यांच्या वाऱ्यासही उभे राहत नाहींत ! "

हें ऐकून व्याधास अधिकच वाईट वाटून हृदयास पिळवटून टाकणारा हा अभिलाष पूर्ण होण्याचा दुसरा एखादा उपाय असल्यास सांगण्याबद्दल तो विवेकाला विनवूं लागला. तेव्हां सकृप होऊन 'विवेक 'ह्मणाला, "वत्सा ऐक; अभिलषित वस्तूच्या शोधार्थ त्वां भारी नेटानें व मनोभावानें खटपट करून तिचा पिच्छा सोडला नाहींस, व तिच्या प्राप्तीसाठीं त्वां जी ही कष्टमय तपस्या केलीस, व असह्य क्लेश सहन केलेस त्यायोगानें तूं खरोखरी मला असलेली माहिति जाणण्यास सर्वस्वी योग्य झाला आहेस, यांत शंका नाहीं. परंतु बाबा रे ! जो सत्यलोकीं वास्तव्य असलेल्या " ऋतंभर " सुपर्ण हंसाच्या शिकारीची महत्त्वाकांक्षा हृदयाशीं धरतो त्याची मृगयापद्धति कांहीं वेगळीच असते. त्याला हीं अंधश्रद्धेचीं वन्य तृणें माजलेलीं आडरानें व दऱ्याखोरीं सर्वथा वर्ज्य असून मूढ विश्वासाचा वासही त्याला कुपथ्य आहे. ही उपासना अत्यंत क्लेशकारक असून तेथें निरालंब शून्याशीं नित्य झुंझावें लागतें. अत्यंताभाव व निग्रह यांच्या प्रांतांत प्राणधारणा करण्यासाठीं तहान पिऊन तहान भाग-

वावी, भूक खाऊन पोट भरावें, आणि थंडी नेसून व ऊन पांघरून पावसाच्या निवाऱ्यांत इंद्रियनिरोधाच्या सहवासांत त्याला युगानुयुगें गुजराण करावी लागते ! कालांतरानें अंतर्दृष्टि निवळल्यावर त्या उपासकाला मृत्यूबरोबर नित्य नवो लढाई करीत करीत प्रकाशोज्ज्वल सूर्यलोकीं गमन करावें लागतें. तेथें अति विकट चढणीचे परमार्थाचे पर्वत लागतात, आणि ते चढून गेल्यानंतरच सत्यलोकाची सीमा जवळ होते. ”

“ तेथें पोंहचल्यावर तरी मग तो हंस सहज हस्तगत होतो काय ? ” असा मध्येंच व्याधानें प्रश्न केला. त्यावर त्या म्हाताऱ्यानें नकारार्थी नुसती मान हालविली व म्हणाला, “ अरे ! तेथेंही तो पक्षी नुसता दिसणार देखील नाहीं; मग हस्तगत होणें दूरच ! तूं म्हणतोस तसें युग उगवण्यास अद्यापि पुष्कळ अवकाश आहे. ”

“ तर मग मला या मार्गांत यश येण्याचें कांहींच साधन नाहीं काय ?” असा व्याधाचा अत्यंत आर्त व दीनवाण्या स्वरांतला प्रश्न ऐकून “विवेका”नें त्याचें समाधान करण्यास सुरुवात केली. तो ह्मणाला, “ बाबा रे, तूं अगदींच निराश होऊं नकोस. माझ्या माहितीप्रमाणें कांहीं लोक हा पर्वत चढून वर गेले आहेत. दुर्गम व भयाण कडयाकपाटांतून वाट काढीत वर डोंगरसपाटी गांठून पुढें मजल मारल्यावर अत्यंत उच्च स्थानीं त्यांना ऋतंभराच्या उज्ज्वल पिसाऱ्यांतून गळालेलें एखादें पीस कालवशें हस्तगत झालेलें मी ऐकलेलें आहे. परंतु हीं रजताचीं पिसें पुरींशीं गोळा करून त्यांचा दोरा वळून त्यांचें जाळें बनविलें, तरच मात्र त्या जाळ्यांत ऋतंभर सुपर्ण पकडला जाईल असें भविष्य आहे. कारण सत्यानेंच सत्य आकळतां येतें हें आपण कधींही विसरूं नये.”

हें ऐकतांक्षणींच तो व्याध एकदम ताडकन् उठला व ‘ हा मी निघालोंच’ असें ह्मणून तडक पुढें चालूं लागला. तेव्हां विवेकानें त्याला थांबविलें, व आपलें भाषण पुढें चालविलें. तो ह्मणाला, “ अरे, असा उतावळा होऊं नकोस; हीं दऱ्याखोरीं सोडून जो कोणी बाहेर पडतो तो परत माघारा ह्मणून कदापि येत नाहीं. कितीही आक्रोश केला तरी तें त्याला अशक्य असतें. एकदां ही भूमि सोडली कीं ती कायमचीच समजावी. इतकेंच नव्हे तर ज्या मार्गानें तूं जाण्यासाठीं इतका अधीर झाला आहेस, तिकडे गेल्यानें कांहीं लाभ अगर फलप्राप्ति होते असेंही कोठेंच सांगितलेलें नाहीं. केवळ जाणाऱ्याच्या मनाचा ओढा ह्मणूनच तो केवळ ती तळमळ भागविण्यास तिकडे जात असतो. नाहीं ह्मणावयास कर्तव्य केल्याचें समाधान हा एक मात्र मानल्यास लाभ आहे.”

यावर “ मी तर जातोंच, पण पर्वतावर चढल्यावर मी कोणत्या मार्गानें जाऊं तें मला सांगा” असें व्याधानें विवेकास विचारलें. तेव्हां “विवेक” ह्मणाला, “ याबद्दल मी तुला कांहीं फारसें सांगूं शकणार नाहीं; कारण माझें भांडवल तरी केवळ युगानुयुगांचें सांठलेलें व एकवटलेलें ज्ञान. जेथें अनेक गेले, तेथेंच त्यांच्या मागून माझी गति. आधीं या पर्वतावर फारच थोडे लोक चढून गेले, आणि त्यांपैकीं प्रत्येकानें आपल्या सोयीचा मार्ग तयार केला. तिकडे जाण्यास जो उद्युक्त होतो, तो हें सर्व पूर्णपणें जाणूनच अशा अगर दुसऱ्या कोणत्याही अडचणीस न जुमानतां पुढें धकतो. तेथें माझ्या अकलेची तुटपुंजी शिधोरी त्याला बिलकुल निरुपयोगी ठरते. मी तरी त्यांचाच अनुगामी. ”

“ अगोदर ते व नंतर मी ” असें ह्मणत ह्मणत “विवेक”एकाएकीं अदृश्य झाला,व व्याधही माघारा परतला. घरीं आल्यावर त्यानें प्रथमतः पक्ष्यांचा लोखंडी पिंजरा मोडून तोडून दूर फेकून दिला. हा पिंजरा मोडीत असतांना त्याचे दोन्ही हात रक्तबंबाळ होऊन बरेच जाया झाले होते, व त्याच्या मनालाही पुष्कळ वाईट वाटत होतें. पण तिकडे लक्ष न देतां हें ध्वंसक काम त्यानें दृढनिश्चयानें पुरें केलें, व सुंदर पिसाऱ्यांचा एकेक पक्षी तो मोकळा सोडून देऊं लागला. परंतु काळ्या पिसाऱ्याचा व गहिऱ्या डोळ्यांचा पक्षी सोडण्यासाठीं ह्मणून हातीं धरून जेव्हां तो क्षणभर त्याच्याकडे प्रेमानें पाहूं लागला, तेव्हां त्याला मात्र सोडून देणें व्याधाच्या अगदीं जिवावर आलें. इतक्यांत त्या पक्ष्यानें आपला “ अमरत्व ” “ अमरत्व ” हा आलाप मंजुळ व

हृदयस्पर्शी अशा सुरांत काढणें सुरू केलें. त्यामुळें तर त्याचें मन विलक्षण द्विधा होऊन अखेरीस याला एकट्याला मात्र आपल्या बरोबर प्रवासांत नेण्याचें त्यानें ठरविलें. तो पक्षी अत्यंत हलका असून केवळ वायुभक्षण करणारा असल्यामुळें प्रवासांत त्याच्यामुळें अडचण उपस्थित होणें अशक्य होतें. आपल्या आंतल्या बंडीच्या पोटखिशांत त्याला छातीच्या आडोशानें ठेवून, वर दुसरें ऊबदार आवरण घालून, व्याधानें प्रवासास आरंभ केला.

परंतु थोड्याच अवकाशांत व्याधाला हा प्रवास फार कठीण व जड वाटावयास लागला. आपल्या हृदयाशीं दडवून ठेवलेला तो पक्षी एकाएकीं झपाट्यानें जड पडत चालला, व त्या व्याधाला आपल्या छातीवर असह्य दडपण पडल्याप्रमाणें होऊन पुढें त्याच्यानें पाऊलही टाकवेना, अगर उभें राहण्याची कुवतही राहीना ! सारांश, तो पक्षी बरोबर घेऊन त्याला तो प्रदेश उल्लंघून पुढें धकणें अशक्य झालें. तेव्हां निरुपायानें व्याधानें त्या पक्ष्यास बाहेर काढलें, व याचाही सहवास होणें नशीबीं नाहीं, तेव्हां ईश्वराची मर्जी, असें ह्मणून उदासपणानें त्यानें त्याला उडण्यासाठीं म्हणून तळहातावर उभें केलें. सोडतांना मात्र त्यानें म्हटलें, " लाडक्या ! त्वां माझ्याजवळ राहूं नयेस अशी परमेश्वराचीच इच्छा दिसते; तुझ्या आलापांतली एखादी दुसरी लकेर ऋतंभर सुपर्णाच्या मंजुळ कूजनाचें अनुकरण करणारी असेल, तेव्हां ती तरी मला मार्गदर्शक व्हावी आणि तुझ्या संगतींत प्रवासाची मजल हलकी भासावी असें मला वाटत होतें. पण तेंही ऐकणें माझ्या नशीबीं नाहीं, असेंच खरें !" असे उद्गार काढून त्यानें त्या पक्ष्यास सोडून दिलें.

नंतर व्याधानें आपली 'मनोरथ' नामक सूत्रवेष्टनी बाहेर काढून, त्यावर गुंडाळलेलीं वासनासूत्रें उलगडून तीं तेथेंच जमिनीवर टाकून दिलीं, आणि रिकामी सूत्रवेष्टनी पुन्हां परत आपल्या हृदयाजवळील चोरखिशांत ठेवली. ती मात्र त्यानें टाकून दिली नाहीं; कारण ती या दऱ्याखोऱ्यांत बनलेली वस्तु नसून ती ' अज्ञात ' प्रदेशांतल्या कारागिरीची चीज होती. संकल्पांचे व वासनांचे तंतु मात्र तेथील दऱ्याखोऱ्यांत उगवणाऱ्या कच्च्या मालापासून तयार झाले होते. आणि विवेकाच्या सांगण्याप्रमाणें ते त्याला आपल्या समागमें नेतां येईनात.

प्रवासाची अशी अखेरची तयारी करून तो व्याध पुन्हां मार्गास लागतो न लागतो इतक्यांत तेथें राहिवासी लोकांचा बराज मोठा जमाव त्याच्याभोंवतीं जमून त्यांनीं एकच गिल्ला आरंभिला. ते व्याधाला अनेक तऱ्हेच्या शिव्या देऊं लागले व पिंजरा मोडून ते सुंदर पक्षी त्यानें सोडून दिले याबद्दल ते व्याधाला अत्यंत कठोर शब्दांनीं दूषण देऊं लागले. कित्येकांनीं त्याला " उन्मत्त" ह्मणून हिणविलें, आणि कित्येक तर विकारवश होऊन " याला ही अवदसा कशी आठवली ! " असें म्हणत क्रोधानें त्याच्यावर दांतओंठ खाऊन चाल करूं लागले ! व्याधानें त्यांना शांत करून समजाविण्याचा यत्न करून पाहिला; पण ते अनावर झालेले लोक त्याला ब्रही काढूं देईनात !

" मोठा आला आहेस हंसाच्या गोष्टी सांगणारा ! मी म्हणे त्याच्या शोधांत आहें ! पण मूर्खाला कळेना कीं त्या ऋतंभरास आजपर्यंत कोणीही प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिलेलें नाहीं; फार तर काय, पण तो असतो कसा हेंही या लेंकाला माहीत नसेल ! उन्मत्त गद्धा कुठला ! आपल्या हाताशीं आलेले चांगले सुंदर चालते बोलते पक्षी मोकळे सोडून देणाऱ्या या मूढाला वरबुडव्याच म्हटलें पाहिजे; अथवा अशा माणसांनीं येथून काळें करावें हेंच ठीक आहे. नाहींतर हे उद्यां दुसऱ्यांचे पिंजरे मोडून त्यांचेही पक्षी मोकळे सोडून देतील !" असें ह्मणून त्या लोकांनीं व्याधाला जबर वाक्ताडन केलें. "काळें करतोस कीं नाहीं ?" असें म्हणून कित्येक दुसरे लोक धक्केबुक्के देऊन त्याला ढकलूं लागले, व थोड्याशा लोकांनीं तर धोंडे उचलून त्या व्याधाची रंगीत हकालपट्टी करण्याची तयारी केली ! सामोपचाराचे अभिमानी दुसरे लोक परत फिरल्यावर त्यांनीं व्याधाचा पाठलाग केला, व तो रानांत

आडोशाच्या जागीं दिसेनासा होईपर्यंत दगड मारीत मारीत त्याचा पिच्छा पुरविला.

कांहीं वेळानें संध्याकाळ झाली, व अंधार वाढत जाऊन पुढची वाट काढणें कठिण पडूं लागलें. तथापि तो व्याध तसाच तडक वाट काढीतच चालला होता. कांहींसा पुढें गेल्यावर जेथें अखंड रात्र असते असा प्रदेश लागला. त्या प्रांतांत शिरतांच व्याधाला जिकडे तिकडे अंधारांत, जणूं काय आपण एखाद्या काजळाच्या गाढ समुद्रांत बुडालों आहोंत असें होऊन, गुदमरल्याप्रमाणें झालें, व दिशाभूल होऊं नये म्हणून सावधपणानें तो वाट काढूं लागला. पण चमत्कार हा कीं त्याचा हात जवळच्या ज्या ज्या झाडाच्या फांदीस लागे ती ती त्या व्याधाचा स्पर्श होतांच सहज खुसखुशीतपणानें मोडून त्याचे कोळसे चारी बाजूंस उधळून जात, आणि पावलागणिक त्याचे पाय भुसभुशीत झालेल्या जमिनींत घुसून आंगावर व तोंडावर राखेचे लोट उधळूं लागले! तशांत चारी बाजूंस भयंकर काळाकुट्ट अंधार,-अशा चमत्कारिक स्थितींत तो व्याध हताशपणें एका दगडावर बसला, आणि त्या अत्यंताभावाच्या 'निरालंब' नामक प्रांतांत केव्हां पहांट होते याची वाट पहात तळहातावर गाल टेंकून बसला. ज्याप्रमाणें तो सारा प्रदेश बाहेर गाढ अंधारांत गुरफटून गेला होता, त्याचप्रमाणें त्या व्याधाचें हृदय देखील अत्यंत तिमिरव्याप्त झालें.

थोड्याच वेळांत व्याधाच्या दोन्ही बाजूंकडून अत्यंत थंड-अगदीं गारठवून सोडण्यासारखीं-धुकीं निघावयास लागून त्यांनीं तो सारा प्रांत व्यापून टाकून व्याधाला चारी बाजूंनीं घेरून टाकलें, आणि पावसाची झिम् झिम् सुरू होऊन सारीं वस्त्रें भिजून तो ओलावा त्याच्या हाडांत भिनून दाढीमिशा वितळावयास लागल्या. बिचाऱ्या हृदयाची क्रिया मंद पडावयास लागून साऱ्या गात्रांना एक तऱ्हेची ग्लानि व बधिरता यावयास लागली. अशा स्थितींत असतांना व्याधानें सहज वर पाहिलें तों त्याला समोरून दोन चंचल प्रकाशज्योति आपणाकडेस उडत बागडत येतांना दिसल्या. लवकरच त्या अगदीं व्याधाच्या जवळ आल्या. तेव्हां त्याला एका ज्योतीच्या प्रभावलयांत सुंदर केशकलापानें सुशोभित असें एका मंद स्मितोज्ज्वल स्त्रीचें मुखकमल दिसलें; आणि दुसऱ्या तेजोवलयाच्या मध्यभागीं कोणत्याशा चमकणाऱ्या रसाचे लहान लहान तरंगावलींनीं युक्त असे आवर्त आपणाभोंवतीं गिरक्या घेत घेर घालीत होते, असें त्यानें पाहिलें.

तमोव्याप्त अशा या भयाण जागीं चिंतेंत चूर असतांना माझ्याजवळ येणाऱ्या आपण कोण, असें त्यांना व्याधानें पुसलें. तेव्हां त्या ह्मणाल्या, "इहलोकीं वास्तव्य करणारा प्रख्यात जो "देहस्वभाव" त्याला "पराकाष्ठा" नामक स्त्रीच्या पोटीं आह्मी जुळ्या बहिणी जन्मास आलों आहोंत; आम्हांस "विषयासक्ति" असें म्हणतात. आम्हाला मृत्यूपासून अभय प्राप्त झालें असून आमची उत्पत्ति या सृष्टीबरोबरच झाली आहे." नंतर दोघींपैकीं एकजण पुढें होऊन व्याधाजवळ आली, आणि आपण भारी श्रांत होऊन थंडीनें पिडलेले दिसत आहांत, तेव्हां आपण माझ्या मृदु पण उबदार बाहुवेष्टनांत गुरफटून घ्याल तर आपली ही शीतभीति नाहींशी होईल, मनाला आराम वाटून नाड्यांतून सर्व शरीरभर ताजें उष्ण रक्त पुन्हां जोमानें खेळावयास लागेल, आणि आपल्या मुखावरची विषण्णपणाची छाया पार मावळून जाईल, असें आश्वासनपूर्वक चाचारण करूं लागली. इतक्यांत दुसरी पुढें सरसावली, व म्हणाली, "महाराज, मीही पण आपल्या सेवेस तयार आहें; माझ्या जवळचा "जीवनरस" आपण एकवार चाखला मात्र पाहिजे, म्हणजे मग आपल्या बुद्धीवर आलेलें जाड्य पार निवळून जाऊन सारीं इंद्रियें पुन्हां यथेच्छपणें व्यवहारक्षम होतील. तरी आपण या गोष्टीस अनुमति द्यावी." अशा तऱ्हेनें दोघीही त्या व्याधाजवळ सहवासाची याचना करूं लागल्या, व आपला मनोरथ पूर्ण व्हावा म्हणून अनेक मोहक भाषणें करूं लागल्या. पहिली म्हणाली, "बा व्याधा, तुझ्यासारखेच थोर थोर अनेक महात्मे आजपर्यंत या अत्यंत भयाण अशा प्रांतांत काळजींत चूर होऊन बसत असत; आणि अखेरीस आम्ही

आल्यानंतर उरलेला काळ ते मोठ्या आनंदानें चिरकाळ आमच्या सहवासांत कंठीत असत. त्यांनीं कधीं आमची उपेक्षा केली नाहीं, किंवा आह्मीही कधीं त्यांचा त्याग केला नाहीं." दुसरी ह्मणाली, "व्याधा, खरोखरीं याशिवाय बाकीचें सारें मिथ्या आहे. आह्मांकडेस पाहशील तर त्यांत मात्र तुला बिलकुल मायावीपणा दिसणार नाहीं. नाहीं तर बाकीच्या इतर गोष्टी पहा,—सत्य तरी काय आहे ? केवळ छाया ! हीं श्रद्धेच्या तृणधान्यानें गजगजलेलीं दऱ्याखोरीं तरी,—केवळ उपहास व थट्टा यांचा गाळीव मासला ! ही पृथ्वी तरी,—केवळ दग्धशेष भस्माचा उकिरडा ! आणि ही वृक्षमाला तरी,—केवळ सडकी कुजकी घाण आहे ! ह्मणूनच व्याधा ! आमचें ह्मणणें ऐक, आणि आह्मां दोघींत जो जिवंतपणा खेळत आहे त्याला पाठमोरा जाऊं नकोस !"

अशा तऱ्हेचीं विषगर्भ पण मधुर भाषणें करीत त्या दोघीजणी व्याधाजवळ लगट करूं लागल्या. आणि चमत्कार हा कीं, त्यांच्या केवळ जवळ येण्यानेंच व्याधाच्या कपाळावर थिजलेले घामाचे थेंब पुन्हां पाझरावयास लागले, आणि धमन्यांत गोठलेलें रक्त पुन्हां हळू हळू चलनवलन करूं लागलें ! त्यांच्या शरीरांतून निघणाऱ्या ज्योतीच्या प्रभेनें व्याधाचे डोळे दिपून जाऊन क्षणभर त्याच्या हृदयास मोह पडला. आपण तरी या अंधकारलिप्त प्रदेशांत कां ह्मणून उगी बळी पडावें, अशी शंका मनांत येऊन ज्यांच्या सान्निध्यानेंच इतकें सुख होऊन अंगांत उबारा व हुरूप आला आहे, त्या आयत्या चालून आलेल्या लक्ष्मीस विन्मुख करणें ठीक नाहीं, असें वाटून त्यांना उत्थापन देण्यासाठीं तो उभा राहूं लागला.

इतक्यांत आजपर्यंत ज्यासाठीं इतका आटोकाट यत्न केला, त्याचें प्रतिबिंब व्याधाच्या डोळ्यांपुढें क्षणमात्र चमकलें, आणि तत्काळ पायांतलें बळ समूळ गेल्यासारखें होऊन तो मटकन् खालीं बसला ! तेव्हां त्या ज्योतींच्या आव्हानाचा अनादर करून व्याध त्यांना ह्मणाला, "बायांनो ! माझ्या दृष्टीस दिपवून व शरीरांत ऊब आणून तुह्मी मला उत्तेजित कराल यांत शंका नाहीं; पण मला जें हवें तें तुमच्या सहवासानें प्राप्त होणें केवळ अशक्य आहे. ह्मणून आपण खुशाल दुसरीकडे वाटेल तिकडे जा. मी मात्र जीवांत जीव आहे तोंपर्यंत अवश्यंभावी अरुणोदयाची वाट पाहात येथेंच तिष्ठत बसण्याचा संकल्प केला आहे." इतकें बोलून व्याधानें दोन्ही हातानें आपलें तोंड झांकून व कानांत बोटें घालून त्यांचें बोलणें सुद्धां ऐकण्याचें नाकारलें ! थोड्याच वेळानें वर मान करून पाहतो तों त्या ज्योति लक् लक् करीत झपाट्यानें दूर दूर अस्पष्ट होत चालल्या होत्या, आणि अंधकारानें पुन्हां चहूंकडे आपलें अखंड साम्राज्य गाजविणें सुरू केलें होतें.

अंधश्रद्धेनें व्यापलेल्या दऱ्याखोरीं ओलांडून पुढें जाणाऱ्या सर्व लोकांना या व्याधाप्रमाणें त्या तिमिरग्रस्त प्रदेशांतून मार्ग कंठावा लागे; पण कित्येकांचा तो प्रवास थोडक्या अवकाशांत संपे तर कित्येकांना महिनोमहिने अगर वर्षानुवर्षे तेथेंच कुचंबत राहावें लागे, व कांहींजण तर तेथेंच खितपत कालानुवश होत! असो; थोडया अवकाशानें त्या व्याधाला क्षितिजापाशीं पाढुरकें वाटावयास लागलें, आणि त्या धोरणानें मार्ग काढीत त्यानें पुढचा प्रवास सुरू केला. लवकरच संधिप्रकाशाचा प्रदेश गांठून मग तो सूर्यप्रकाशांत येऊन पोंचला. चारी बाजूनें निरखून पाहातो तों व्याधाला आपल्या समोर नीरस भूतार्थांचे सुळके आकाशांत गेलेले यथार्थतेचे परमोन्नत व पार्थिव दृष्टीस भीषण वाटणारे पर्वत दत्त उभे असलेले दिसले ! सूर्यप्रकाशांत त्यांचें स्वरूप स्पष्टपणें गोचर होत असून त्यांचीं शिखरें दिङ्मंडळ भेदून आभाळांत ढगांमध्यें दिसेनातशीं झालीं होतीं. पायथ्याशीं अनेक पायवाटा उमटलेल्या दिसत होत्या; त्या पाहून व्याधाला फार आनंद झाला, व मोठ्या उत्सुकतेनें त्यांतली एक अत्यंत सरळ अशी वाट निवडून तिच्या अनुरोधानें तो उल्हासानें आत्मानंदांत गुंगत गुंगत पुढें चालला. या वेळेस त्याच्या अंगांत विलक्षण धमक दिसत होती, आणि निश्चयाचें बळ शिरल्यामुळें मोठ्या हिंमतीनें व उत्साहानें तो वाट काढीत झपाट्यानें चढण चढत होता. आत्मविश्वासाच्या आविर्भावामुळें पुढचा प्रवास त्याला फारच सुलभ वाटत होता, आणि हा फार अवघड अशी कोणीं तरी उगीच समजूत करून घेतली असें त्याला वाटूं लागलें. थोड्याच काळांत,—कांहीं दिवस अगर आठवडे, अगर फारच झाल्यास थोडेसे महिने गेले म्हणजे—

शिखरावर सहज जाऊन आपलें पुढचें काम फत्ते होणें कठीण नाहीं अशी त्याची खात्री झाली. तेव्हां आतां तर ऋतंभर हंसाच्या एखाद्या दुसऱ्या पिसानें तृप्त न होतां आजपर्यंत इतरांस उपलब्ध झालेलीं सारीं पिच्छें स्वाधीन करून आणि त्यांचें जाळें विणून प्रत्यक्ष ऋतंभराला हस्तगत करून हृदयाशीं धरणार अशी अशक्य महत्त्वाकांक्षा व्याधानें मनांत धरली ! तिच्या भरांत तो हर्षानें गाऊं हसूं लागला व आगामी यशाच्या आशेमुळें हुरूप चढून तो आपला मार्ग झपाट्यानें काढूं लागला. लवकरच बिकट चढणीस प्रारंभ झाला, आणि वर चढतांना व्याधाचा दम छाटला जाऊन त्याच्या गाण्याच्या लकेरी आपोआप बंद झाल्या. दोन्ही बाजूंस भले धिप्पाड रखरखीत कडे उभे असून त्यांच्यावर शेवाळही उगवलेलें नव्हतें. पायाखालीं असणाऱ्या दरड्यांमधून प्रचंड भगदाडें व चिरा पडल्या असून त्या ओलांडून जाणें दुर्घट होतें; आणि कित्येकांच्या उदरांत, खालीं डोकावून पाहिलें असतां, अर्धवट चुराडा झालेलीं व चुना बनत चाललेलीं हाडें मधून मधून चमकत होतीं !

कांहीं वेळानें व्याधानें पसंत केलेली वाट पुसट व्हावयास लागून पुढें पुढें तर ती एखाद्या दुसऱ्या पावलाच्या ठशावरूनच शोधून काढावी लागे; थोड्याच वेळांत तीही दिसेनाशी झाली ! व्याधानें मग निरुपायानें आपल्यास सुचेल त्या दिशेनें पुढचा मार्ग काढणें चालू ठेवलें; पण लवकरच तोही मार्ग बंद होऊन त्याच्या समोर चारी बाजूंनीं एकजात भक्कम कड्यांचा व सुळक्यांचा तटबंदी परीघ दिसूं लागला. याच्या भिंती गुळगुळीत असून त्या चढून वर जाण्यास कांहीं उपाय दिसेना. तेव्हां ही तटबंदी चढून वरचा प्रदेश गांठावयाचा असल्यास एखादा सोपानच रचला पाहिजे असें त्याच्या मनानें घेतलें, व त्याप्रमाणें व्याधानें पायऱ्या बांधण्याच्या तयारीस नेटानें व धैर्यानें सुरुवात केली ! जवळ असलेली मनोरथ नामक सूत्रवेष्टनी बाहेर काढून तिच्या साह्यानें तो दगडांचे चिरे काढूं लागला; परंतु त्यांपैकीं अर्धेअधिक चिरे त्याला बेकामाचे अगर बिजोड म्हणून टाकून द्यावे लागत. महिना अर्धा महिना जिवापाड श्रम करून त्यानें कांहीं पायऱ्या रचाव्यात, तोंच पायऱ्यांचे चिरे भक्कम नसल्यामुळें त्या साऱ्या एकदम कोसळून पडत. तथापि त्यामुळें व्याधाचा धीर खचला नाहीं; आणि एकदांचा हा घांट तयार झाला म्हणजे दुसऱ्या साऱ्या अडचणी आपोआप नाहींशा होतील व हें अखेरचें काम सिद्धीस गेलें म्हणजे भिंत चढून आपण उद्दिष्ट ठिकाणीं पोहोंचूं, आणि एकदां तें ठिकाण गांठल्यावर मग आपला कार्यभाग खास शेवटास जाणार,—अशी आशा धरून त्यानें आपली खटपट तिळमात्र देखील कमी होऊं दिली नाहीं.

अखेरीस त्यानें वरची डोंगरसपाटी तर गांठली आणि ती चढून तो सभोंवतालच्या प्रदेशाची टेहळणी करूं लागला. अंधश्रद्धेचीं दऱ्याखोरीं समोर त्याच्या पायाखालीं पांढऱ्या धुक्यांनीं आच्छादलेलीं असून पाठीशीं क्षितिजास भेदून अभ्रमंडळाच्या आड अदृश्य झालेलीं उन्नत पर्वतशिखरें उभीं होतीं. खालीं असणाऱ्यास हीं शिखरें दुरून बहुतेक दिसतच नसत, अगर थोडीं फार दिसल्यास तीं फारच ठेंगणीं भासत असत. पण आतां बारीक निरीक्षणानंतर तीं शिखरें किती भयंकर उंच, आणि त्यांच्या सभोंवतालीं तटबंदीसारखी वेटाळीं पसरलेली कड्यांची व सुळक्यांची सोपानपरंपरा किती दुर्लंघ्य आहे हें व्याधास उघड व्यक्त झालें. या प्रदेशावर सूर्यनारायणाची कृपा अक्षय्य असे. तेथें येतांच आश्चर्ययुक्त पूज्यभावानें स्तिमित होऊन व गहिंवरून व्याधानें साष्टांग प्रणिपात केला. त्या ठिकाणची हवा फारच पातळ असल्यामुळें दरीकंदरीं राहणाऱ्या लोकांस तेथें श्वासोच्छ्वास करणें देखील फार अवघड होई. व्याधाला त्यामुळें फार पीडा झाली, व प्रत्येक श्वासागणिक श्रम पडून हातापायांचीं बोटें उकलून त्यांतून रक्ताच्या चिळकांड्या उडूं लागल्या ! तरी देखील व्याधानें आपलें मार्गक्रमण न थांबवितां नैष्ठिक मौनी बनून तेथेंही पूर्वीप्रमाणेंच त्यानें पायऱ्या रचण्यास सुरुवात केली. या कड्याचे सुळके थेट उंच जाऊन ते वर किती उंचीवर आहेत हें देखील सांगतां येत नव्हतें; तरीही या बेअंदाज कामास कांहीं अनमान न करितां व्याधानें बेदिक्कत तोंड दिलें.

त्यानंतर लोखंडाप्रमाणें दुर्भेद्य अशा त्या कड्यावर व्याधाच्या सूत्रवेष्टनीच्या ठोक्यांचे आवाज अहोरात्र नेमके घुमूं लागून नेमानें एका मागून एक पायरी तयार होऊं लागली. अशा तऱ्हेनें अनेक वर्षें उलटलीं,

आणि व्याधाचा हा नित्यक्रम असाच अव्याहतपणें चालू राहिला; परंतु समोरचा कडा अद्यापि पहिल्यासारखाच उंच व आभाळांत गडप झालेला कायमच होता. अशा या निर्घृण एकांतांत डोळ्यास व जीवास आराम म्हणून या कड्यावर कोठें तरी एखादें लहानसें शेवाळ तरी उगवलेलें आढळावें, असें व्याधाला अनेक वेळां वाटे; आणि परमेश्वरानें इतकी तरी कृपा करावी अशी मनोभावानें तो देवापाशीं मागणी भाके, पण तेथें शेवाळ देखील उगवेना !

आणि वर्षें तर लागोपाठ जाऊं लागलीं, व त्यांची गणना आतांशा व्याधानें पायऱ्यांची जी थोडीबहुत भरती होई त्यावरून अजमावीत जावी. पहिल्या उत्साहाच्या भरांत उदय पावलेल्या त्याच्या मनाच्या उड्या केव्हांच पार मावळल्या होत्या; पण त्यामुळें मात्र व्याधानें आपल्या कामांत अगर प्रयत्नांत रतिभर देखील तूट होऊं दिली नव्हती. मनाला रिझविणाऱ्या त्या त्याच्या गाण्याच्या लकेरी केव्हांच शमल्या होत्या; आणि आतांशा व्याधाला तिन्हीसांजच्या वेळीं अंधार कायम होण्याच्या सुमारास आसपासच्या दऱ्याकपाटांतून लिकलिकणारी दरडीभगदाडें अनेक अमानुष चेहऱ्यांनीं गजबजलेलीं दिसत. त्या आकृति त्याला जवळ बोलावीत, आणि आमच्याशीं क्षणभरही बोलण्याची तुला फुरसत नाहीं काय, असें म्हणून हातीं असलेलें काम थांबविण्याचा व्याधास इशारा देत. व्याधानें आपलें काम करीत करीत त्यांना उत्तर द्यावें, " बाबांनो ! अव्याहतपणें काम करण्यांतच माझा मोक्ष आहे.तुमच्याशीं बोलण्यासाठीं म्हणून मीं क्षणभरही मान हालविली पुरे कीं लागलीच तुम्ही माझ्या मानगुटीशीं बसाल हेंही पण मी जाणून आहें !" हें ऐकतांच त्या आकृतींनीं आपल्या माना भगदाडांतून आणखी बाहेर काढल्या, व खालीं डोकावत त्या व्याधाला म्हणूं लागल्या, " तुझी मर्जी; पण जरासें आपल्या पायाखालच्या दरडींत काय आहे हें पाहिलेंस काय ? तीं पांढरीं चुनखडी बनलेलीं हाडें तुला दिसत असतीलच ! तुझ्या सारखाच हिंमतवान व धिप्पाड असा तो पुरुष याच कड्यावर चढून आला होता. त्यानेंही तुझ्या सारखीच नंतर टेहळणी केली, व याउप्पर खटपट करणें व्यर्थ अशी त्याची खात्री पटून सत्याची गांठ पडणें तर दूरच, पण त्याचा पत्ताही लागणें केवळ अशक्य असें त्याच्या मनानें घेतलें. तो आधींच फार थकून भागून गेला होता, आणि किंचित् विसांवा मिळावा म्हणून त्यानें तेथेंच थोडेंसें अंग टेकलें होतें; येथेंच तो कायमचा झोंपीं गेला. त्यानेंच झोंपेची याचना केली होती; कारण, झोंपेनें शांति मिळते आणि आपण एकटे आहोंत ही बुद्धि नाहींशी होऊन हातापायांची ठणक व हृदयाची तिडिक त्यामुळें बंद पडते. "

हें ऐकून तिरस्कारानें हंसून व्याध म्हणाला, "बाबानो! जें जें म्हणून मला अत्यंत प्रिय होतें तेथून आपलें मन निकरानें काढून घेऊन त्यामुळें होणाऱ्या हृदय-यातनेची मीं यत्किंचितही जी परवा केली नाहीं; या तिमिरलिप्त प्रांतांत बेधडक एकांतांत आजपर्यंत भटकत राहिलों; मोहपरंपरेच्या आकर्षणास मुळीं दाद दिली नाहीं; आणि जातभाईचा शब्दही जेथें ऐकूं येत नाहीं अशा या ठिकाणीं संतोषानें आपला देह झिजवीत आहें,--हें सारें काय अचानक मीं तुम्हां गिधाडांच्या तोंडांत बळी पडावें म्हणून, अशी तुमची समज आहे होय ? " असें त्या भरांत बोलून प्रतारणापूर्वक त्यांच्याकडे पाहून तो मोठ्यानें हंसला आणि त्या "विषादछाया" देखील क्षणांत अस्फुट होत होत दिसेनाशा झाल्या.

तरीही पण पुढें एखादे वेळीं त्या छाया व्याधाला त्रास देत असत.अशा वेळीं त्या म्हणत,"अरे व्याधा ! तुझे केंस पांढरे शुभ्र पडून विरळ व्हावयास लागले आहेत, हें तुला ठाऊक आहे काय ? तुझे हात एखाद्या भित्र्या तरुण पोरीप्रमाणें कसे थरथर कांपत आहेत, आणि ज्या शिथिल बोटांत सूत्रवेष्टनी पकडून तूं पायऱ्या तयार करीत आहेस तिचें कुशाग्र टोंक केव्हांच बोथटून जाऊन ती ठिकठिकाणीं अगदीं पिचून पोंचट पडली आहे हें तरी तूं आपल्या निस्तेज व मंद दृष्टीनें कधीं न्याहाळून पाहिलें आहेस काय ? चढलासच तर कसाबसा पायऱ्यांची ही चढण चढून वर जाशील, पण यानंतरची पुढची चढण गांठण्याची तरी तुला शाश्वती आहे काय ?" " हें मी सर्व पूर्णपणें जाणतों." इतकेंच त्यांना उत्तर देऊन व्याधानें आपला उद्योग मात्र पूर्वीप्रमाणेंच नेटानें चालू ठेवला.

तरी पण त्या ह्यातान्याच्या अंगांत आतां पूर्वीची धमक राहिली नव्हती त्याची धिप्पाड अंगकाठी हल्लीं पिळवटून नि:सत्त्व झाली होती; एकसारखी सूत्रवेष्टनी हातीं धरल्यामुळें बोटें वांकडीं होऊन आंखडून गेलीं होतीं व त्यामुळें सूत्रवेष्टनीवर पहिल्यासारखी पकड बसेनाशी झाली होती. म्हणून आतांशा पायऱ्यांचे चिरे पहिल्याप्रमाणें प्रमाणशुद्ध व ठाकठिकीचे तयार होत नसत, व पायऱ्यांची रचना कशी तरी होत होती. अखेरीस ती चढण एकदां संपून व्याधाची थकलीभागली वांकलेली मूर्ति दुसऱ्या चढणीच्या पायथ्याशीं येऊन तर भिडली; आणि ती नवी चढण कोठें संपते हें न्याहाळण्यासाठीं व्याधानें वर मान करून टेहळणी सुरू केली. पर्वतांचे सुळके व कडे पूर्वीप्रमाणेंच मेघमंडळ भेदून वर अदृश्य झालेले पाहून आपलें येथील जीवितकर्तव्य आतां येथेंच संपलें आहे अशी व्याधाची खात्री झाली.

आपली अखेरची वेळ जवळ आली असें वाटून ज्या कडयाच्या पायथ्याशीं इतकीं वर्षें कष्ट केले होते तेथेंच व्याधानें आपलें थकलें भागलें शरीर जरा टेकलें. खालीं पर्वताच्या पायथ्याशीं दाट धुकें पसरलें असून त्याच्या आड सुपीक दऱ्याखोरीं दडलेलीं होतीं. तिकडे व्याधाची दृष्टि असतांना किंचित्काळपर्यंत तो धुक्याचा पडदा दूर झाला, व वरून आपली लहानपणची जन्मभूमि त्याला स्पष्टपणें दिसूं लागली. त्याचा लय तिकडेसच लागला असतांना पाळलेल्या सुरेख पक्ष्यांची किलबिल, आणि जातभाईंच्या गाण्याबजावण्याचा हर्षध्वनि आपण ऐकतोंसें व्याधाला भासूं लागलें; इतकेंच नव्हे, तर लंगोटमित्रांचे आवाज स्पष्टपणें ऐकूं येत आहेत असेंही त्याला वाटलें. ती जन्मभूमि पाहून त्याचे डोळे भरून आले, आणि तेथें अंतकाळ आला असता तर असे एकटे पडलों नसतों असें मनांत येऊन त्याला वाईट वाटलें; पण तितक्यांत धुक्याचें आवरण पुन्हां त्या देखाव्यावर पडलें. व्याधानें देखील तिकडून आपलें तोंड फिरविलें, आणि स्वतःला उद्देशून म्हणूं लागला, "इतके दुर्घट प्रयत्न करून आज अनेक वर्षें मी ज्याच्या शोधांत आहें, व ज्या कार्यांत मुळींच विसांवा न घेतां अगर पश्चात्ताप भग्नमनोरथ न होतां मीं नेटानें पिच्छा पुरविला आहे, त्याचा शेवट कसा होणार हें कांहीं कळत नाहीं. आतां तर सर्व शक्ति क्षीण होऊन मी या शरपंजरीं पडलों आहें. तथापि येथेंच, याच माझ्या शरपंजरापाशीं ताज्या दमाची व निधड्या छातीची तरुण मंडळी खात्रीनें पुढें सरसावून म्यां तयार केलेल्या पायऱ्यांवरून अल्पायासानें वर चढून येतील यांत शंका नाहीं. या पायऱ्या ज्यानें घडल्या त्याचें नांवही बहुधा त्यांना माहीत असणार नाहीं; कदाचित् ते उलटी या ओबडधोबड कामाची थट्टाही करतील, आणि यांतील कांहीं दगड जर कोसळले तर न जाणों ते मला शिव्यांची लाखोलीही वाहतील! तरीही पण ते वर चढून येतील ते माझ्याच करामतीमुळें; आणि चढतील ते तरी माझ्या पायऱ्यांच्या साह्यानें; आणि उपासना करतील ते तरी माझ्याच दैवताची, यांत शंका नको. त्यांना जें ऋतंभर सुपर्णाचें दर्शन होईल तेंही माझ्याच मुळें. एकंदरींत एकट्या स्वतःसाठींच केवळ कोणीही जगत अगर मरत नाहीं हेंच खरें!"

असें म्हणत असतांना त्याचे डोळे पाण्यानें भरून आले, व त्यास कांहींएक दिसेनासें झालें. या वेळेस जर ऋतंभर हंसही वर आकाशांत आपले पिसारे पसरून त्याच्या मस्तकावर तरंगत असता, तरी व्याधाच्या दृष्टीस तो पडता किंवा कसें याची शंका आहे; कारण, यमराजानें त्याच्यावर कृपा करावयास सुरुवात केली असून दृष्टीवर मृत्युकाळची झांपड पडली होती.

"माझ्या अंतर्दृष्टीस ही पहा नव्या मंडळीची टोळी वर चढतांना दिसत आहे; ही मी खास त्यांचीच चाहूल ऐकत आहें! ते खरेंच अल्पायासानें वर चढून येतील यांत शंका नको." असें म्हणून त्यानें आपले निस्तेज व जीर्ण पंजे डोळ्यावर धरून कोण येतोसें पाहूं लागला. अशा शांत वेळीं त्या निर्मळ आकाशमंडळांतून कांहीं वस्तु हळू हळू खालीं येत होती. ती किंचित् हेलकावे आणि झोंके खात हळूच व्याधाच्या छातीवर येऊन पडली. त्यानें ती चापसून हातीं धरून काय म्हणून पाहण्यास डोळ्यापुढें धरली, आणि त्या क्षणींच व्याधाचा प्राण निघून गेला! ऋतंभर हंसाच्या पिसाऱ्यांतलें तें एक पीस होतें.

श्रीधरस्वामींचा मरणशक.

शा० वा० १६५१ नव्हे, १६५० असावा.

गेल्या वर्षाच्या ह्मणजे इ० स० १९१४ च्या विविधज्ञानविस्ताराच्या प्रथमांकांत "श्रीधर स्वामी पुन्हां एकदां" या हेडिंगाखालीं रा. ब. काशीनाथ नारायण साने, बी.ए., यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत त्यांणीं स्वामींचा मरणशक नवनीतादि ग्रंथांनुसार शा०वा० १६५० नसून १६५१ असल्याचें स्थापित केलें आहे. पण १६५० हाच शक खरा असावा, अशी माझी समजूत होत आहे, ती सकारण वाचकांपुढें सादर करितों.

रा. ब. साने यांणीं स्वमतपुष्ट्यर्थ स्वामींच्या समाधीवरील शिलालेख व 'टाकळी' हा गांव पेशवे सरकारांकडून इनाम मिळाला त्याजबद्दलच्या सनदा, हे दोन आधार दाखविले आहेत.

"शिलालेखाच्या शेवटीं शके १६५१ सौम्यनाम संवत्सरे असें लिहिलें आहे. यावरून श्रीधरांचें मृत्युवर्ष शके १६५० नसून शके १६५१ हें होय. सौम्य संवत्सर १६५१ मध्येंच येतो. नवनीतादि ग्रंथांत शके १६५० मृत्युवर्ष दिलें आहे तें बरोबर नाहीं." असें रा. ब. साने ह्मणतात. आणि राजपत्रां (सनदें) त "स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ५५ कीलक संवत्सरे माघ शुध्ध अष्टमी भानुवासर" असा स्पष्ट उल्लेख आहे. हे दोन आधार जमेस धरून "राज्याभिषेक शके ५५ मध्यें म्हणजे शा. श. १६५१ मध्यें म्हणजे श्रीधरांचे मरणवर्षी ही सनद त्यांस मिळाली" असें ठरविलें आहे. पण यांत शिलालेख आणि राजपत्र यांतील संवत्सराचे नांवांशीं स्पष्ट विरोध येतो. त्या संबंधानें रा. ब. साने म्हणतात कीं, "हा फरक माघ महिन्यांत कीलक संवत्सर व पुढील चैत्रापासून सौम्य संवत्सर अशामुळें पडला." हें रा. ब. साने यांणीं केलेलें समाधान निदान मला तरी समाधानकारक वाटत नाहीं.

श्रीधरांचे मरणसमयीं त्यांस सनद मिळाली, आणि त्याच वर्षी शिलालेख तयार झाला, असें जर आहे तर संवत्सराच्या नामनिर्देशांत फरक असूं नये, आणि तो जर स्पष्ट दिसत आहे तर मग असें कां व्हावें? हा प्रश्न दत्त ह्मणून पुढें उभा राहतो. याचें निराकारण झालें पाहिजे.

प्रथमतः शिलालेखाविषयीं विचार करूं. शिलालेख समग्र नसून खंडित आहे. त्याच्या ओळी १६ असून त्यांपैकीं "पहिला श्लोक संस्कृत असून बाकी मराठी असावे असें दिसतें" असें खुद्द रा. ब. साने सांगतात. अर्थात् त्या लेखाची भाषाही संशयितच. तसेंच विशेष महत्त्वाच्या श्लोकांतील जेवढा भाग लागला, तेवढ्याचाच ओळींच्या अनुक्रमानें जो उतारा प्रसिद्ध झाला आहे त्यांत शकसंख्येचा उल्लेख मुळींच नाहीं. तेव्हां खंडित, भ्रामक, अस्पष्ट अशा सदोष शिलालेखाचा पुरावा अर्थात् लंगडाच! ह्मणून त्यास बाजूस सारणेंच रास्त होय.

आतां सनदेकडे वळूं. त्यांत शक, संवत्सर, मास, पक्ष, तिथि आणि वार इतक्या गोष्टींचा

स्पष्ट उल्लेख आहे. पण हीं कालदर्शक अंगें यथार्थ आहेत किंवा चुकीचीं आहेत हें प्रथम पाहिलें पाहिजे. कारण ऐतिहासिक लेखांत क्वचितच तिथिवारांचा उल्लेख येतो. पण त्यांत कित्येक ठिकाणीं गणितरीत्या परस्परांशीं मेळ पडत नसल्याचा अनुभव असल्यानें वरील गमकें तपासून पाहणें ओघासच आलें. ह्मणून शक, संवत्सर, आणि तिथि, वार, ह्या युग्मद्वयाच्या तपासणीचें साधन उपलब्ध असल्यानें तद्द्वारा गणित करून पाहतां शके १६५१ च्या माघ शुक्ल अष्टमीस भानुवासर येत नसोन गुरुवार येतो, आणि शके १६५० च्या माघ शुक्ल अष्टमीस रविवार येतो, आणि संवत्सरही कीलकच येतो. ह्मणून सनदेंतील संवत्सर, तिथि, वार, यांची एकवाक्यता गणिताचे साक्षीनें १६५० ह्या शकास जुळत असल्यानें सनदेचा पुरावा याच शकातर्फे दृढतर असल्याचें स्पष्ट होत आहे. अर्थात् संवत्सराच्या नांवांत फरक येत असल्याचें कारण रा.ब. साने यांणीं दर्शविलें तें नसून यांत होत असलेली चूक "राज्याभिषेक शके ५५ म्हणजे शा. श. १६५१ मध्यें" ह्या रा. ब. सान्यांच्या विधानांत दडून बसलेली आहे. ती काढून टाकली ह्मणजे वर दर्शविलेल्या प्रश्नाचा सहज उलगडा होईल.

शा. श. १५९६ ह्या वर्षी राज्याभिषेक झालाना ? तर मग रा. भि. शक (१) म्हणजे शा. श. १५९६, रा. भि. श. (२) ह्मणजे शा. श. १५९७, ह्या सरणीनें मोजीत गेलें ह्मणजे रा. भि. श. ५५ ह्मणजे शा. श. १६५० येतो. अर्थात् रा. ब. साने यांच्या विधानांत दडून बसलेली चूक गणितरूपी प्रकाश–साधनानें अचूक बाहेर निघून आली. व या चुकीच्या पायावर रचलेली इमारत सपशेल ढासळून पडणें साहजिकच आहे.

शिलालेखाच्या शेवटीं "शके १६५१ सौम्यनाम संवत्सरे" लिहिलें आहे ह्मणून रा. ब. साने यांणीं जो आधार प्रदर्शित केला आहे, त्याचाही पण विचार करणें रास्त आहे.

शिलालेखांतील "पहिला संस्कृत श्लोक विशेष महत्त्वाचा आहे" असें रा. ब. साने खुद्द ह्मणतात. त्या अर्थी तदितर लेख महत्त्वहीन असल्याचें स्पष्ट होतच आहे. आणि वरील आधाराचा समावेश त्यांतच होत असल्यानें तो विशेष विश्वासार्ह नाहीं. तथापि तें कालदर्शक वाक्य कोणत्या ना कोणत्या तरी घटनेचें असलें पाहिजे असा तर्क धांवतो.

माझ्या मतें शिलालेखाच्या शेवटीं नमूद असलेला शक, संवत्सर, इनामपत्र म्हणजे सनद मिळाल्याचा नसून शिलालेख लिहिला गेला त्या कालाचा दर्शक असला पाहिजे. व सनद मिळाल्यानंतर बऱ्याच कालांतरानें ह्मणजे १६५१ शकाच्या आरंभानंतर शिलालेख तयार होणें हें संभवनीय दिसतें. कारण, सनद मिळाल्यानंतर पुढील शकसंवत्सरारंभास मध्यंतरीं काय तो पावणेदोन महिन्यांचा अवकाश होता. सनद मिळाली तेच दिवशीं स्वामींचें देहावसान झालें असें मानलें तरी त्यापुढें उत्तरकार्य होण्यापूर्वी एक पंधरवडा तरी व्यतीत होणें साहजिकच आहे. तदनंतर समाधी तयार होऊन त्याजवर शिलालेख जडला जाणेस सव्वा महिन्याचा अवकाश पुरेसा होईल असें वाटत नाहीं. ह्मणून सदरहू गोष्टी घडल्यानंतर पुढील शक संवत्सरांत (शा. श. १६५१ त)

शिलालेख तयार झाला व शिलालेख–घटनेचा शक शेवटीं नमूद केला गेला, असें मानलें ह्मणजे सर्व कांहीं सुसंगत जुळतें.

सारांश, श्रीधरस्वामींना 'टाकळी' गांवाची सनद मिळाली, त्याच वर्षी त्यांचें देहावसान झालें असेल तर तो शक शालिवाहन १६५१ नसून नवनीतादि ग्रंथकारांनीं ग्रहीत धरल्याप्रमाणें १६५० होय हें वरील विवेचनावरून स्पष्ट होत आहे.

मु० लष्कर ग्वाल्हेर, ता. १८।३।१५ } लक्ष्मण विसाजी वैद्य.

ताजा कलम–ऐतिहासिक लेखांतील तिथिवारांशीं मेळ पडत नसल्याचा अनुभव असल्याविषयीं वर एके ठिकाणीं उल्लेख केला आहे. त्याचें प्रत्यंतर हा लेख लिहून झाल्यावर उपरिनिर्दिष्ट वि. ज्ञा. वि. च्या अंकांतच पृष्ट ३० वर मिळालें. व त्याचा प्रस्तुत विषयाशीं संबंध पोंहोंचत असल्यानें त्याचें दिग्दर्शन येथें करणें अवश्य होय. " चिटणीस आपल्या सप्तप्रकरणात्मक शिवचरित्रांत लिहितात–"याप्रमाणें महाराज शालीवाहन शक १५९६ आनंदनाम संवत्सरे ज्येष्ठ शु ॥ १३ गुरुवासर सुमुहूर्ते छत्रसिंहासनाधीश्वर झाले " असा दाखला नमूद आहे. पण गणित करून पाहतां त्या दिवशीं गुरुवार येत नसून शनिवार येतो. यांत कांहीं तरी चूक आहे हें सांगणें नकोच. तिथिवारांत चूक असल्यास प्रस्तुत विषयांत कांहीं बाध येत नाहीं; पण शक हाच जर चुकीचा असेल तर मात्र तेरीबी चुप और मेरीबी चुप ! ! !* ल. वि. वै.

* १. राज्याभिषेक शक ज्येष्ठ शुद्ध १३० शके १५९६ मध्यें आनंद संवत्सरीं सुरू झाला.

२. राज्याभिषेक शक १ म्हणजे ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६ आनंद संवत्सरपासून ज्येष्ठ शुद्ध १२ शके १५९७ राक्षस संवत्सरपर्यंत, हें वर्ष होय. अशा प्रकारें राज्याभिषेक शकाचीं वर्षे मोजिलीं पाहिजेत. रा० वैद्य म्हणतात, शके १५९६–राज्याभिषेक शक वर्ष १; १५९७, २; १५९८, ३; तें बरोबर नाहीं.

३. यावरून प्रत्येक राज्याभिषेक शक वर्षांत शालिवाहन शकाच्या दोन वर्षांचे भाग येतात, व तसेच दोन संवत्सरही येतात.

४. वरील सरणीनें मोजिलें असता राज्याभिषेक शक ५५ म्हणजे ज्येष्ठ शुद्ध १३ शके १६५० कीलक संवत्सर या मितीपासून ज्येष्ठ शुद्ध १२ शके १६५१ सौम्य संवत्सर या मितीपर्यंत जें वर्ष तें होय.

५. शाहू महाराजांची सनद, टाकळी गांवाबद्दल, राज्याभिषेक शक ५५ माघ शुद्ध ८ भानुवासरीं मिळाली, ती शके १६५० कीलक संवत्सरीं माघांत मिळाली.

६. सनद मिळाल्यानंतर श्रीधरस्वामी शके १६५१ सौम्य संवत्सरीं मृत्यु पावले असें शिलालेखांत स्पष्ट आहे. म्हणजे ते १६५१ च्या चैत्र शुद्ध १ पासून फाल्गुन वद्य ३० पर्यंत केव्हां तरी मृत्यु पावले.

७. इनाम गांव मिळाल्यावर श्रीधर स्वामी सुमारें एक वर्ष जीवमान होते म्हणजे त्यांचा मृत्यु चैत्रशुद्ध १ व फाल्गुन वद्य ३० या दोन दिवसाच्या दरम्यान झाला. फार तर १ वर्ष १ महिना २२ दिवस ते सनद मिळाल्यावर हयात होते. महिना, तिथि शिलालेखांत स्पष्ट होत नाहींत, त्यामुळें अमुक दिवशीं वारले असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं, सबब 'सुमारें एक वर्ष' असें ह्मटलें आहे. कदाचित् ते शके १६५१ च्या चैत्रांतही वारले असतील किंवा ज्येष्ठांत, माघांत अगर फाल्गुनांतही वारले असतील.

८. रा.ब.साने आपल्या निबंधांत 'मरणवर्षीं' सनद मिळाली असें म्हणतात. रा. वैद्य म्हणतात त्याप्रमाणें 'मरणसमयीं' असें ते कोठेंच ह्मणत नाहींत.

९. शिलालेखांतील शक १६५१ सौम्य संवत्सर हा सनदेचा शक असें कोणीं ह्मटलें ? तो अर्थात् मृत्युशक होय. रा० वैद्य तो शक सनद मिळाल्याचा आहे असें कल्पून त्याचें निराकरण करितात, तें अर्थात् व्यर्थ आहे.

१०. सारांश, राज्याभिषेक शक ५५ कीलक संवत्सरीं माघशुद्ध ८ रोजीं शके १६५० मध्यें टाकळीची सनद मिळाली व शिलालेखांत शके १६५१ सौम्य संवत्सरीं श्रीधर स्वामी समाधिस्थ झाले असें नमूद केलें आहे ह्या दोन गोष्टींत विरोध बिलकूल नाहीं, आणि त्यांच्या मृत्यूचा शक १६५१ सौम्य संवत्सर असें शिलालेखांत खोदिलें आहे त्यास आक्षेप घेण्यास जागाही नाहीं. —संपादक.

मैत्रिणीस पत्र.

(साक्या)

माहेरा मी जातांना गे ! आलें तुज भेटाया ।
मोठ्या कष्टें सिद्धचि होसी निरोप मातें द्याया ॥ १
भेटीच्या तव पहिल्या समयीं प्रेमांकुर मनिं फुटला ।
सहवासानें पुढें तुझ्या तो वृद्धिंगत गे ! झाला ॥ २
भगिनीप्रेमहि ठाउक नव्हतें आजवरी मज झालें ।
तव सान्निध्यें पूर्णपणें तें आजि सखे ! अनुभविलें ॥ ३
एकांतामधिं सुखदुःखाच्या गोष्टी सांगुनि अपुलें ।
त्या योगानें क्षणभरि तरि तें हृदय मोकळें झालें ॥ ४
दुःखी मातें पाहुनि तूंही मत्सम तैसें व्हावें ।
सुखांत माझ्या सुख तुजलाही भगिनी गे ! वाटावें ॥ ५
जेव्हां जेव्हां व्याधिमुळें मम दुःखित मानस व्हावें ।
तेव्हां प्रेमें एकचि तूं तें अंतरिचें जाणावें ॥ ६
एकांतीं मज नेउनि सदये ! पुशिलें कारण मातें ।
होतें जें जें मनिं माझ्या तें कथिलें सर्वहि तूतें ॥ ७
कथितों तुजला दुःख दाटुनी नयनीं अश्रू आले ।
सदय होउनी सांत्वुनि मज ते पदरें आपुल्या पुशिले ॥ ८
केव्हां केव्हां थोर कवींच्या वाचुनियां काव्यांतें ।
दुःखें जें मन विकल जाहलें शांति आणिली त्यातें ॥ ९
रसिक गुणज्ञहि विद्याप्रिय तूं सुविचारीही म्हणुनी ।
प्रेमें तुजसह वाचिलिं काव्यें गृहकृत्यें आटपुनी ॥ १०
माहेरासी जातां मज गे ऐसें वाटत होतें ।
व्याधींतुनि या मुक्त होउनी केव्हां पाहिन तूतें ॥ ११
सर्व संकटें शुभ दैवानें आजि निवारिलिं असतां ।
बहु दिवसांनीं भेटीचा तव योगहि जमुनी येतां ॥ १२
येते थोड्या दिवशीं ऐशी ऐकुनि मम तूं वार्ता ।
भेटीलों तव उत्सुक जशि मी तैशी तूंही असतां ॥ १३
भगिनीच्या घरिं जावें ऐसा विचार तूं कां केला ।
अणखी इकडे पुन्हां न यावें ही इच्छा कां तुजला ॥ १४
सर्वहि माझ्या वरचें अथवा प्रेम कमी तव झालें ।
उघडपणें नच कथितां मातें वर्तन ऐसें केलें ॥ १५
अपराधी तव नकळत झाले शंका मजला येते ।
ऐसें सदये ! खचितचि असतां क्षमा मागतें तूतें ॥ १६
आजि तुझें तें पत्र पाहुनी झाली स्मृति गे मजला ।
अश्रू नयनीं सद्गद कंठहि क्षण तो ऐसा गेला ॥ १७
साध्वि ! सुशीले ! सदये ! रसिके ! ताई येतें आतां ।
निरोप तव हा घेतां मज गे वाटे खेदचि चित्ता ॥ १८
तव भगिनीवरि सुबोध सुंदर कविता ज्या तूं केल्या ।
पाठविं तूं मजसाठीं त्या, मी उत्सुक बहु बघण्याला ॥ १९
पूर्वीं होतें प्रेम मजवरी तैसें सतत रहावें ।
पत्रा धाडुनि कुशलवृत्त मज नियमानें कळवावें ॥ २०

“ शांता. ”

"भाषांतरित, रूपांतरित व स्वतंत्र ग्रंथ आणि ग्रंथकार."

१. "वैचित्र्य" हें या चित्रमय जगताचें विशिष्ट लक्षण असल्यानें त्यांतील अखिल वस्तुजातापैकीं कोणत्याही दोहोंत केवळ अभिन्नत्व असत नाहीं. मनुष्यप्राणी हा त्यांपैकींच एक असल्यानें त्यांतील व्यक्तींत अनेक प्रकारचें साम्य आहे, तरी "व्यक्ति तितक्या आकृति" व "मूर्ती तितक्या मति व प्रकृति" आढळतात. याच न्यायानें मोठमोठ्या विद्वानांचे मतांत भिन्नता, विचारांत वैचित्र्य, साध्य अगर साधनांत अनेकता व ज्ञानांत विविधता दिसते, यांत विलक्षण तें काय ? फार काय, ईश्वरानीश्वर, सत्यासत्य, सुख–दुःख, शीतोष्ण, लहानमोठे, पूर्वपश्चिम, वगैरे ज्या गोष्टी सामान्यजन प्रमाणभूत मानून त्यांविषयीं निःशंक असतो, त्याच गोष्टी साफ खोट्या, केवळ आभास किंवा त्यांतील भेद केवळ शाब्दिक, असें साधार प्रतिपादणारीं मतें त्यानें ऐकिलीं म्हणजे तो भांबावूनच जातो. कोणी ईश्वरवादी तर कोणी अनीश्वरवादी, कोणी सत्याचा वाली तर कोणी "सत्याची कांस न सोडल्यास प्रसंगीं अनर्थ होतो" असें प्रतिपादणारा, कोणी तर, सुख दुःख वगैरे द्वंद्वें म्हणजे केवळ सापेक्ष शब्द आहेत, खरें कांहींच नाहीं, अशीं सकृत्दर्शनीं विचित्र वाटणारीं स्वमतें प्रस्थापित करणारेही आढळतात. खरोखर, या जगास जें रमणीयत्व आहे तें त्यांतील वैचित्र्यामुळें होय. नानारंगांनीं मंडित झालेलें इंद्रधनुष्य, चित्रविचित्र लतापुष्पांनीं विनटलेली उपवनश्री, व सप्तसुरांच्या मिलाफानें वाद्यांतून निघणारा मधुर ध्वनि यांपासून जो आल्हाद होतो, तो त्यांतील वैचित्र्यामुळेंच नव्हे काय ? वैचित्र्याचे अभावीं हें जग कसें शून्य, शुष्क आणि नीरस झालें असतें ! जेथें मतैक्य आहे तेथें वादच संभवत नाहीं. वाद अगर ऊहापोह यांखेरीज तत्त्वबोध होत नाहीं. तात्पर्य काय कीं, मतवैचित्र्य असणें हें आश्चर्य नव्हे. जसें तें असणें अपरिहार्य, तसेंच तें असणें हेंही इष्ट आहे.

२. रा. रा. गोखले यांचा "भाषांतर, रूपांतर कीं स्वतंत्र" हा लेख व त्यावरील रा. रा. कुळकर्णी यांचें उत्तर वाचून वरील प्रास्ताविक विचार सुचले. रा. रा. गोखले यांनीं आपले लेखांत सदर विषयावरील प्रोफेसर भाटे, रा. भाटे व रा. बर्वे या तीन विद्वानांचीं भिन्न मतें ग्रथित करून बराच ऊहापोह केला आहे. व त्या विषयावर अधिकारयुक्त वाणीनें बोलता येणारे विद्वानांकडून याविषयीं जास्त ऊहापोह व्हावा अशी इच्छाही प्रदर्शित केली आहे ती योग्यच आहे. त्याप्रमाणें रा. रा. कुळकर्णी यांनीं प्रारंभ केला. ज्या विद्वान् पंचकाचीं भिन्न मतें वरील लेखद्वयांत आलीं आहेत, त्यांतील अमकीं बरोबर असें निश्चित मत देण्याचा प्रयत्नही करणें माझे शक्तीबाहेरचें आहे हें मी जाणतों. तथापि त्यांचीं मतें सर्वांशीं मला पटत नाहींत. तेव्हां माझे विचारांत चूक कोठें आहे हें समजावें या जिज्ञासेनें माझे सदर विषयावरील विचार विद्वानांपुढें मांडण्याचें योजिलें आहे. हे विचार म्हणजे लेखास 'उत्तर' नव्हे. कारण "आहूतेषु विहंगमेषु मशको नायान पुरोवार्यते" असें जाणून रा. रा. गोखले यांनीं तज्ज्ञाधिकारी यांजकडून "उत्तरा"ची अपेक्षा केली आहे. असो.

३. हल्लीं परभाषेंतील ग्रंथांचें भाषांतर किंवा रूपांतर करून अगर स्वतंत्र ग्रंथ–रचना करून मराठी वाङ्मय सर्वांगसुंदर व समृद्ध करण्याच्या स्तुत्य हेतूनें सरस्वतीभक्तांचे प्रयत्न सुरू आहेत. असें करतांना चांगलें अगर उत्तम वाङ्मयच निर्माण केलें जाईल अगर आणिलें जाईल असें नाहीं. तरी "Survival of the fittest" ह्या तत्त्वाप्रमाणें अशा ग्रंथांचें जीवित त्यांचे गुण-प्रमाणानें मर्यादित असतें. तथापि वरील तीन मार्गांनीं भरती करणारांपैकीं सर्वांत श्रेष्ठ कोण व त्या खालील दर्जा कोणाचा या विषयीं सर्वांचें एक मत नाहीं. स्वतंत्र ग्रंथ निर्माण करणारा सर्वांत श्रेष्ठ असें रा. गोखल्यांखेरीज इतरांचें मत आहे. रा. गोखले यांचे मतें त्यांत "केवढी तरी चूक" आहे. सबब वरील मतास निर्णयाचें रूप देण्यापूर्वी एक मोठी शर्त जोडावी अशी त्यांची आग्रहाची सूचना आहे. ती शर्त अशीः—

" स्वतंत्र ग्रंथ परभाषेंतल्या उत्तम ग्रंथांच्या तोडीचा पाहिजे." शिवाय या शर्तीस, "स्वतंत्र रचने" च्या व्याख्येची व स्पष्टीकरणाचे टीपेची जोडही दिली आहे.

जीं ग्रंथांचीं तींच ग्रंथकारांचीं, मतें अशी सामान्य समजूत असते, व ती स्वतंत्र रचना करणाराखेरीज इतर दोन मार्गांनीं ग्रंथ करणारांचे बाबतींत भ्रामक ठरते. यामुळें वादाचा मुद्दा डोळ्याआड झाल्यानें, अगर ग्रंथकाराची योग्यता ठरवितांना ग्रंथांचे गुण डोळ्यासमोर आल्यानें चूक होण्याचा संभव आहे. सबब ग्रंथाची योग्यता अगर दर्जा कसा लागतो अगर लावावा हें प्रथम ठरविण्याचा प्रयत्न केल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

ग्रंथांची योग्यता.

५. ग्रंथांची योग्यता ठरविण्याचे प्रश्नास, रा० गोखल्यांचेच भाषेनें उत्तर असें आहे कीं:-ग्रंथ "तीन मार्गांपैकीं कोणत्या मार्गानें मराठी भाषेंत आला याचें महत्त्व सरस्वतीचे साम्राज्यांत नाहीं."तेथें अस्सल-नक्कल, औरस-दत्तक, मालकीचे—उसने, स्वकीय-परकीय, आप-पर असा भेदभाव नाहीं. तेथें गुणांची चाड, व त्या मानानें त्याचें कौतुक असावें. तेथें व्यक्तीस मान नाहीं, गुणांस किंवा ग्रंथांतील सामग्रीस आहे.सामग्री व गुणांचा उत्कर्ष ज्या दर्जाचा असेल त्या मानानें ग्रंथास उच्च किंवा नीच स्थान मिळतें.परंतु ग्रंथकारांची योग्यता ठरवितांना नुसत्या ग्रंथांतील सामग्रीचा विचार करून भागत नाहीं,मार्गाचाही विचार लक्षांत घ्यावा लागतो. तें कसें हें एक दोन उदाहरणांनीं पाहूं:—समजा कीं, चित्ररेखेहून कुशल अशा एका स्त्रीनें परदेशीं लढाईवर गेलेल्या आपल्या प्रियतमाची तसबीर, आपले हृत्पटलावरील त्याची प्रतिमा मनांत आणून हुबेहुब रेखाटली. लढाईत त्यानें विलक्षण शौर्य दाखविलें म्हणून बादशहाकडून त्यास व्हिक्टोरिया क्रॉसचा बहुमान मिळाल्यावेळीं त्याचा फोटो घेतला, तोही बरोबर निघाला; व याच फोटोवरून रा० पिंपळखरे यांनीं एन्लार्ज केलेली ऑइलपेंटिंगची तसबीरही काढून त्यास देण्यांत आली. तीनही तसबिरींत रूपसादृश्य बिनचूक साधलें असल्यानें," तसबीर " या नात्यानें तिन्हीही उत्तम पहिल्या वर्गाच्या ठरतात. परंतु " कुशलतेच्या " दृष्टीनें तिन्हीही चित्रकारांचे अंगचें कौशल्य, बुद्धि व दर्जा सारखाच कां ? कीं त्यांत कांहीं उच्चनीचपणा आहे ? तसबिरी काढण्यास सर्वांसही आधारभूत असें कांहीं तरी थोडें फार आहेच. कारण ' नामूलं लिख्यते किंचित् ' म्हणून कुशलतेच्या दृष्टीनें वरील सर्व चित्रकारांची योग्यता समानच नाहीं ! आणखी एका उदाहरणानें पाहूं:-तिघांची दरमहाची प्राप्ति अनुक्रमें २५०-५००-१००० ची आहे. पहिल्याची त्याचे अंगीं असलेल्या विद्वत्तेबद्दल, दुसऱ्याची से०ब्यांकेंतील ठेवीच्या व्याजाची, (मात्र ठेवीची रक्कम स्वतः त्यानें कमावलेली नसून वारसाचे नात्यानें तो एका श्रीमान् लांबचे भाऊबंदास दत्तक गेल्यानें प्राप्त झालेली आहे.) तिसऱ्याचीही केवळ आप्त चालवणूक म्हणून नक्त नेमणूक आहे. (मोठ्या पोक्त जाहगीरदाराशीं त्याचा शरीरसंबंध जडल्यानें.) आतां प्राप्तीच्या दृष्टीनें यांचे जे नंबर लागतात, तेच नंबर कर्तबगारीच्या दृष्टीनें पाहतां लागतात काय? वरील विवेचनावरून असें लक्षांत येईल कीं, मराठी भाषेंत निर्माण केलेल्या व आणिलेल्या ग्रंथाचें महत्त्व त्यांतून येणारे सामग्रीचे दर्जावर आहे. परंतु ग्रंथकारांचें-(असें ह्मणण्यापेक्षां " लेखकाचें " ह्मणणें बरें) स्वतंत्र लेखकाचें, रूपांतरकाराचें व भाषांतरकाराचें महत्त्व-त्यांनीं लिहिलेले ग्रंथांत स्वतंत्र ग्रंथरचनेस अवश्य अशा आत्मगुणांचें प्रतिबिंब ज्या दर्जाचें व व ज्या मानाचें ग्रंथकारांनीं उमटविलेलें असेल त्यावर अवलंबून राहणार हें उघड आहे.

ग्रंथकारांची योग्यता.

६. आतां लेखकांचें तारतम्यभावानें उच्चनीचत्व ठरविण्यापूर्वी एका प्रश्नाचा विचार करणें अगत्याचें आहे. तो असाः-ज्या तीन मार्गांनीं वाङ्मयांत ग्रंथांची भरती लेखक करीत आहेत. त्या सर्वांचे अंगीं " ग्रंथकार " या दृष्टीनें एकाच जातीचे (degree-दर्जाचे नव्हे) गुणांची अपेक्षा असते काय ? किंवा असल्यास चालेल काय ? नसेल तर भिन्न जातीचे गुणांची अपेक्षा असते काय ? किंवा असल्यास चालेल काय ? नसेल तर भिन्न जातीचे गुणांची तुलना करणें बरोबर होईल काय ? साधर्म्याचे अभावीं तारतम्यभाव संभवतो काय ?

" स्वतंत्र ग्रंथकार " व " भाषांतरकार ":—स्पष्टीकरणार्थ वरील दोन शाखेचे आपलेंतील श्रेष्ठ लेखक म्हणजे रा.रा. हरिभाऊ आपटे व गुरुवर्य आगरकर हे घेऊं. " उषःकाल " सारख्या स्वतंत्र कादंबरीच्या रचनेस जितक्या इंग्रजी भाषाज्ञानाची अपेक्षा आहे, तितकेंच भाषाज्ञान गुरुवर्य आगरकरांस असतें तर " Hamlet " चें भाषांतर त्यांचे हातून झालें असतें काय ? उलटपक्षीं उषःकालचे रचनेंत, रा० हरीभाऊंचे अंगचे प्रतिभा, कल्पकता, रचनाचातुर्य, मनुष्यस्वभावाचें परिज्ञान वगैरे गुणांचें जें प्रतिबिंब उमटलेलें दिसतें, तसें गु. आगरकर यांचे अंगचे गुणांचें (शेक्स्पीअरच्या नव्हे) प्रतिबिंब "विकारविलसित" या भाषांतरांत दिसतें काय ? किंवा रा० हरिभाऊ यांना इंग्रजी भाषेचें जें ज्ञान आहे त्यापेक्षां कमी असतें अगर गु० आगरकरांचे अंगीं कल्पकता वगैरे गुणांचा अभाव असता, तरी त्यांच्या वरील कृति आहेत त्यापेक्षां कमी सरस झाल्या असत्या असें अनुमान करणें बरोबर होईल काय ? समान धर्म नसतां एकास उत्तम, व दुसऱ्यास कनिष्ठ वर्गांतील उत्तम ठरविणें चुकीचें होईल असें वाटतें. असें करणें म्हणजे शास्त्र्यांच्या सभेंत वैदिकांची व वैदिकांमध्यें शास्त्र्यांची परीक्षा घेऊन बक्षिसें देण्यासारखें आहे. ज्यांचें कार्यक्षेत्र भिन्न, त्यांचे गुण मोजण्याचें मापही भिन्नच असलें पाहिजे. येथवर वरील दोन जातींच्या लेखकांचा विचार झाला.

७. आतां

स्वतंत्र ग्रंथकार व रूपांतरकार

यांचेमधील श्रेष्ठत्वाबद्दल विचार करूं:—रूपांतर करणें म्हणजे मूळ ग्रंथांतील रहस्य न जाऊं देतां त्यांतील माहिती मराठी भाषेंत संक्षेपानें अगर विस्तारानें सुबोध रीतीनें आणणें, त्यांतील फोल भाग टाकणें, त्यांतील आचारविचार व प्रसंग यांत, मराठी वाचकांचे रुचीस परकीय न वाटावे म्हणून जरूर ते फेरफार करणें वगैरे. सारांश, एकादा पाहुणा आपले प्रेमळ व विनोदी गोड स्वभावानें व वर्तनानें थोड्याच वेळांत घरच्या माणसांस आपलेंसें करून सोडतो, त्याच-प्रमाणें रूपांतरकाराची कर्तबगारी असते. रूपांतरकार हा भाषांतरकार व स्वतंत्र लेखक यांतील मध्यवर्ती मानला जाण्यास हरकत नाहीं. कारण त्या उभयतां-तील गुण कमीअधिक मानानें याचे ठायीं असावे लागतात. भाषाज्ञानाचे पुरता याचा भाषांतरकाराशीं समानधर्म असतो, व भरतीस स्वतंत्र लेखकाचे अंगचे गुणांची थोडीफार जोडही लागते. परंतु ग्रंथकार या दृष्टीनें, तो स्वतंत्र लेखकाचा (akin) सजातीय मानावा लागेल. वरील तसबिरीचे उदाहरणांतील हा " फोटो एन्लारजर " अगर पेंटर होईल. रा. भाटे यांनीं रूपांतरास 'पांगुळगाड्यांची' उपमा दिली आहे तीही अयथार्थ नाहीं. कारण, याचे कृतीस मूळ-ग्रंथाचा आधार असतो. परंतु हा आधार म्हणजे भावी स्वतंत्र लेखक होण्याचें उत्तम साधन होय. स्वतंत्र ग्रंथरचनेस अवश्य असणाऱ्या परंतु लेखकाचे अंगीं बीजरूपानें असलेल्या अगर पूर्ण विकास न पावलेल्या गुणाचा (अभ्यासानें, अनुभवानें व सूक्ष्म निरीक्षणानें) पूर्ण उत्कर्ष किंवा विकास होण्याचें हें साधन आहे. व योग्य विकास होतांच म्हणजे अंगीं धमक येतांच तो रूपांतराचे—पांगुळगाड्याचे साहाय्याची अपेक्षा करीत नाहीं. आतां या उभयतां लेखकांवरील आक्षेपासंबंधीं विचार करूं.

आक्षेप.

८. रा. रा. गोखल्यांच्या मतें " पहिले वर्गांतील मध्यम लेखकापेक्षां दुसरे वर्गांतील उत्तम लेखक श्रेष्ठ" असा आहे. ग्रंथकारांचें महत्त्व ठरवितांना निवळ ग्रंथ-काराची कर्तबगारी विचारांत घेणेंची असतां, ग्रंथाचें महत्त्व लक्षांत घेतल्यानें(मूळ मुद्दा डोळ्या आड झाल्यानें) त्यांचें असें मत झालें असावें असें मला वाटतें. नाहीं-पेक्षां एक 'स्वतंत्र' व दुसरा सर्वथैव नसला तरी कांहीं अंशीं तरी ' परतंत्र ' किंवा "परोपजीवी" अतएव कमी महत्त्वाचा आहे हें त्यांचे लक्षांत आल्यावांचून राहतेंना. पहिला स्वबाहुबलानें पण दमानें सामान्य वेगानें निःसहाय पोहून नदीपार होणार; व दुसरा अधिक वेगानें व न दमतां पण (भोपळ्याचे) सहाय्यानें पैल तीर गांठणार.परंतु सहायाभावीं तो पाण्यांत पाऊलच टाकणार नाहीं, अगर टाकल्यास तीर न गांठतां तळ मात्र गांठणार. डोळसाचा हात धरून आंधळा आपल्या पायानें चालणाऱ्या लहान मुलापेक्षां किंवा अशक्त माणसापेक्षां अधिक मजल करितो. परंतु एकटा असेल तर घराभोंवतींच घिरट्या घालणार.

फलपतनावरून गुरुत्वाकर्षणाचा, व केटलीवरील तबकडीचे उडण्यावरून वाफेच्या शक्तीचा ज्या महात्म्यांनीं शोध लाविला त्यांचेपेक्षां वाफेचें एंजिन बांधणाराची अगर चालविणाराची योग्यता जास्त कशी मानावी? एकादे विषयावर स्वयंस्फूर्तीनें थोडें पण मुद्देसूद भाषण करणारा एक व मुद्दे सांगितल्यास त्यावर विस्तारानें विवेचन अगर भाषण करणारा दुसरा, या दोहोंत पहिल्यापेक्षां दुसरा कमी योग्यतेचा कां हें स्पष्ट करणेचें कारण नाहीं. वरील विवेचनानंतर रा. गोखले यांचे "शर्तीचा" निराळा विचार करणेचें कारण राहत नाहीं. त्यांची " स्वतंत्र ग्रंथाची " व्याख्या व तीस जोडलेली " टीप " मला संमत आहे असें खालील विवेचनावरून दिसेल.

९. यावर कोणी सवाल करील कीं मूळ ग्रंथाचें रूपांतर करण्यांत रूपांतरकारानें, अधम प्रतीच्या स्वतंत्र ग्रंथ रचणारापेक्षां श्रेष्ठ दर्जाची कल्पकता, प्रतिभा, रचनाचातुर्य दाखविल्यास ' रूपांतरकार ' म्हणून त्याची योग्यता कमी मानणें न्याय्य आहे काय? नाहीं ! खचित नाहीं !! पण मला वाटतें या शंकेस अवकाशच राहात नाहीं. कारण, रूपांतरकार जेव्हां आपल्या कर्तबगारीनें, कल्पकतेनें, प्रतिभेनें वगैरे मूळ ग्रंथकारास लोपवितो, व आपलें वर्चस्व स्थापितो, तेव्हां तो " रूपांतरकारांचे " वर्गांतून निघून "स्वतंत्राचे" वर्गांत पडतो. शिडीच्या अगर घोरपडीच्या साह्यानें गडावर चढतात. परंतु गड सर होण्यास तरवारच गाजवावी लागते, व जो ती गाजवून गड हस्तगत करितो त्याचेंच नांव होतें. नरकेसरी तान्हाजीनें गड घेतला असें लोक बोलतात, त्यानें टाकिलेल्या घोरपडीनें घेतला असें ह्मणत नाहींत. मूळग्रंथ, रूपांतरित ग्रंथाचा मुख्य भाग किंवा मुख्य आधार अगर जीवित बनून राहिलेला असतो. मूळग्रंथाचें अस्तित्व प्रमुखत्वानें वाचकाचे नजरेस येई तोंपर्यंत रूपांतरकारास पहिल्या (स्वतंत्र) वर्गांत बसण्याचा मान मिळणें शक्य नाहीं. मूळग्रंथाचा साधनाप्रमाणें अगर सहायकाप्रमाणें उपयोग करून मूळग्रंथाचें निराळें अस्तित्व न राहतां त्याचा नवीन ग्रंथांत एकीभाव होतो (incopora-tion) किंवा त्यास सरूपता प्राप्त होते, तेव्हां ग्रंथकार रूपांतरकाराचे कक्षेंतून वरील वर्गांत चढविला जाण्यास पात्र होतो.

१०. ' रूपांतरानें वाङ्मयांत कायमची भर पडत नाहीं, फक्त मुलांना करमणूक मात्र होते ' असा दुसरा आक्षेप रा. भाटे यांचा आहे. रूपांतर ह्मणजे मुळाचें भाषांतर अधिक मूळ कृति जास्त खुलविण्याकरितां घातलेला पदरचा मसाला, असें असतां भाषांतरानें कायमची भर पडावी व रूपांतरानें तद्विपरीत परिणाम घडावा हा खरोखर सृष्टींतील चमत्कार म्हणावा दुसरें काय ! कोरड्या भाकरीनें पोट भरावें, वर लोणी घातल्यास उपास वाटावा अशांतलच हा प्रकार दिसतो. विद्यार्थ्यांस शब्दांनीं किंवा लिहून शिकविलेल्या धड्याचें मर्म सुगम होण्यास सिनेमा, मॅजिक लॅण्टर्न, अगर वस्तुपाठ यांचे मदतीनें शिक्षण अधिक व्यावहारिक करण्याकरितां उपाय योजिले जात आहेत. या पद्धतीनें नुसती मुलांची करमणूक होऊन ज्ञानप्राप्ति होत नाहीं तर ज्ञानाबरोबर करमणूकही होते. तीच गोष्ट भाषांतरित व रूपांतरित ग्रंथांची आहे.

११. तिसरा आक्षेप रा. बर्वे यांचा आहे, तो असाः- रूपांतरकारास अप्रामाणिकपणाचा व अडाणीपणाचा दोष जडतो. ज्यास वरील दोन खोडींपैकीं पहिली असेल त्यास भाषांतर करण्याची शिफारस करून तरी काय उपयोग ? कारण ' ग्रंथकार ' म्हणवून घेण्याच्या हांवेपुढें वाङ्मयांतलि चोरी करणेचा दुर्लौकिक ज्यास दिसत नाहीं, त्यास त्यानें भाषांतर केलेला ग्रंथ स्वरचित ह्मणून आपलें नांवावर प्रसिद्ध करण्यास दिक्कत वाटेल असें नाहीं. परंतु सर्वत्र किंवा बहुतेक अप्रामाणिकपणा करतात असें नाहीं. शिवाय अशा लोकांची चोरी विद्वानांचे नजरेंतून निसटून जात नाहीं, व ती उघडकीस येतांच त्या नामधारी ग्रंथकारांचा निषेध व दुर्लौकिकही तीव्रतेनें होतो.

१२. दुसऱ्या दोषाबद्दल विचार करतां, "ज्यास रूपांतर साधत नाहीं त्यानें भाषांतराचा मार्ग स्वीकारावा" अशी जी रा. बर्वे व प्रोफेसर भाटे यांनीं शिफारस केली आहे ती मला मान्य आहे. कारण, विनायक बनविण्यास प्रारंभ करून त्याचें वानर बनविण्यासारखें रूपांतर न करणें बरें. मात्र अशा लोकांस भाषांतर तरी चांगलें साधलें पाहिजे.

१३. शेवटीं राहतां राहिलेला परंतु महत्त्वाचा आक्षेप म्हणजे रा. कुलकर्णी यांचाः—' रूपांतराचा मार्ग स्वीका-

रल्यानें, लेखक स्वतंत्र लेखनशक्तीला मुकतो.' मला वाटतें त्यांची विचारसरणी सदोष असल्यानें त्यांनीं 'अपवादास नियमाचें रूप दिलें असावें.' केव्हां केव्हां असें आढळतें कीं, बापानें धन सांठवून मुलाची स्वास्था केली ह्मणजे मुलगा आळशी, किंवा दुर्व्यसनी निघतो. परंतु जगांत पाहावें तर प्रत्येक बाप आपले शक्तीप्रमाणें मुलाची स्वास्था करून ठेवितोच. मुलगा आळशी अगर दुर्व्यसनी निपजेल या भीतीनें आजवर कोणींही मरते समयीं घरावर तुळशीपत्र ठेविल्याचें ऐकिवांत नाहीं. दुर्व्यसनाविषयीं विचार केल्यास असें आढळेल कीं, थोडी फार ज्यांची स्वास्था केलेली आहे अशांतील प्रमाणापेक्षां, स्वास्था केलेली नाहीं किंवा करणें शक्य झालेलें नाहीं अशांतील प्रमाण अधिक आहे. पाऊल पुढें टाकण्यास लहान मुलास पांगुळगाडा जसा " आधार, " तसाच तो चालतां येण्याचें एक " साधन " आहे. या साधनानें एकादें पंगु पोर चालूं लागल्याचा दाखला मिळेल. परंतु जात्या पंगु नसलेले लहान मुलास ' गाडा ' दिल्यानें तें ' पांगळें ' झाल्याचा दाखला मिळालाच तर तें एक नवल किंवा तो अपवाद. घोड्यास चाल शिकविण्यास अगर रूळण्यास (break) काढणीचा उपयोग करितात. परंतु पुढें हीं घोडीं काढणीशिवाय पाऊलच टाकीत नाहींत असें नाहीं. एकादा अडेल निघतो पण तो अपवाद. शब्दार्थ (Meanings), टीकेचीं बुकें (Notes), स्पष्टीकरणें (Solutions) हीं आयतीं तयार केलेलीं साधनें मुलांचे हातीं पडल्यानें मुलें आळशी, व कमी चौकस वगैरे होतात असा त्यांवर आरोप आहे; व तो कांहीं अंशीं खराही असेल. परंतु याच साधनांनीं विद्वान् झालेला माणूस तसले अगर दुसरे ग्रंथ निर्माण करण्याचे शक्तीस कायमचा मुकतो असा अनुभव नाहीं.

१४. येथवर वरील दोन जातींच्या लेखकांचे योग्यतेविषयीं झालें. यानंतर भाषांतरकार व रूपांतरकार या लेखकद्वयाविषयीं विचार करूं:—भाषांतरकार ज्या मूळ ग्रंथाचें भाषांतर करितो त्याचा तो कर्ता नव्हे. ग्रंथकर्तृत्वांत त्याचा शून्यांश असतो. सबब त्यास ' ग्रंथकार ' या नांवानें संबोधण्यापेक्षां ' भाषांतरकार ' म्हणणेंच जास्त सयुक्तिक ठरतें. भाषांतरकार म्हणजे भाषाऽज्ञानामुळें अंतरित (अगम्य) झालेला ग्रंथ सुलभ करून देणारा. लांब अंतरावरील गंगोदक तृषितांस सहज प्राप्त करून देण्यास जसा ' नळ ' किंवा दूरची वस्तु दृष्टीच्या कक्षेंत आणण्यास जसें दुर्बिणींतील भिंग, तसाच भाषांतरकार. नळ नादुरुस्त असेल तर पाणी गढूळ अगर दूषित होईल. काच स्वच्छ नसेल तर यथार्थ दर्शन होणार नाहीं. तीच गोष्ट भाषांतराची. रा. कुळकर्णी यांचें मत, मूळ ग्रंथकाराचा भाषांतरकार " मित्र " व रूपांतरकार " शत्रु " असें आहे. मला वाटतें उभयतां ' मित्र ' ही व 'शत्रु' ही. कारण, भाषांतरानें मुळांतील भाग जशाचा तसा वठला तर तो 'मित्र' तदभावीं, तद्विपरीत अगर त्याची हानि झाल्यास भाषांतरकार मित्र कीं शत्रु? He is no more चें भाषांतर " तो कोणी अधिक नाहीं, तो कांहीं अधिक नाहीं, " असें तो मित्र—भाषांतरकार करील तर तें पाहून मूळ ग्रंथकाराचे पोटांत कोणत्या विकाराचें भरतें येईल बरें? असलें भाषांतर वाचून मूळ ग्रंथकाराविषयीं योग्य तो (भाव) आदर उत्पन्न न होतां अनादर मात्र वाटावयाचा. वाचक मूळ ग्रंथ वाचण्याची मेहेरबानीनें तसदी घेईल, व भाषांतरकाराची त्यांत करामत किती हें त्यास समजेल तेव्हां मित्र—भाषांतरकाराचे उपकारांतून मूळ ग्रंथकाराची सुटका होणार!

१५. रूपांतरकार श्रेष्ठ दर्जाचा लेखक आहे. मूळ आहे तसें वठविलें म्हणजे भाषांतरकाराची इतिकर्तव्यता झाली. रूपांतरकार तेंच करील तर तो ' भाषांतरकारच ' मानावा लागेल. मूळग्रंथांतील रहस्यहानि-रसहानि न करतां वाचकाचे रुचीस व कल्पनेस पसंत असे फेरफार करून थोडें वेषांतर अगर रूपांतर करणेंचें त्याचें काम आहे. तृषितांस नळ "नुसतें पाणी" देतो; दुकानदार त्या पाण्यांत बर्फ व सरबत टाकून तें अधिक रुचिकर व आल्हादकारक करितो. सुतार लांकडाची सुंदर बाहुली बनवितो. निरनिराळ्या देशांतील मुली तिला आपापल्या चाली, रूढी व आवडीप्रमाणें नटवितात; पण बाहुलीचे व्यक्तित्वाचा—सुताराचे कृतीचा—लोप होत नाहीं. तसा रूपांतरकार मूळ ग्रंथकाराचे कृतीचा लोप करीत नाहीं. शक्य तितकी जनरुचीस आवडेल अशी नटवितो. त्याचा प्रभाव मूळ ग्रंथकारापेक्षां जास्त झाला म्हणजे तो स्वतंत्र झाला. मुलगा पांगुळगाड्याचे आधारानें पावलें टाकतां टाकतां

स्वतः पडूं लागला म्हणजे तो 'स्वतंत्र'—स्वयंसिद्ध—झाला असें उघडच होतें.

वरील सर्व लेखांचा समारोप करून हा लांबलेला लेख पुरा करीत आहें.

समारोपः—

(१) मतवैचित्र्य असणें अपरिहार्य पण इष्ट आहे.

(२) तीन मार्गांनीं भरती होणारे ग्रंथांची जी योग्यता तीच त्यांचे लेखकाची नव्हे. कारण, सरस्वतीचे साम्राज्यांत ग्रंथांची योग्यता त्यांतील सामग्रीचे दर्जावर अवलंबून असते.

(३) तीन प्रकारचे लेखकांचा दर्जा ठरविण्यापूर्वी तिघांत "ग्रंथकार" या दृष्टीनें साधर्म्य काय याचा विचार केला पाहिजे. कारण साधर्म्याचे अभावीं तारतम्यभाव संभवत नाहीं.

(४) स्वतंत्र ग्रंथकार व भाषांतरकार यांमध्यें तुलना संभवत नाहीं.

(५) पहिले वर्गांतील मध्यम किंबहुना कनिष्ठ लेखकापेक्षांही दुसरे वर्गांतील (रूपांतराचा) उत्तम लेखक कमी योग्यतेचा ठरतो; कारण पहिला स्वप्रकाशित व दुसरा परप्रकाशित असतो.

(६) रूपांतराचे केलेल्या व्याख्येवरून तो ग्रंथकार या दृष्टीनें स्वतंत्र लेखकाचा सजातीय मानावा लागतो.

(७) रूपांतरकार आपल्या तेजानें व कर्तृत्वानें मूळ ग्रंथकाराची कृति लोपवितो, तेव्हां तो पहिल्या वर्गाचे मानास पात्र होतो.

(८) भावी स्वतंत्र ग्रंथकार होण्याचें साधन म्हणून रूपांतराचा मार्ग अंगिकारल्यानें स्वतंत्र ग्रंथ निर्माण करण्याची शक्ति नष्ट होत नाहीं.

(९) रूपांतरानें वाङ्मयांत "भर" तर पडतेच, पण ती भर अधिक व्यावहारिक असल्यानें भाषांतरापेक्षां अधिक कायमची होते.

(१०) अप्रामाणिकपणाचा दोष अपवादात्मक आहे, सामान्य नियम नव्हे.

(११) अडाणीपणाचा दोष जसा भाषांतरकारास तसाच रूपांतरकारासही लागू आहे.

(१२) भाषांतरकारास भाषांतरित ग्रंथरचनेचें श्रेय नाहीं. कारण भाषाज्ञानापलीकडे ग्रंथरचनेंत त्याची कर्तबगारी शून्यांशाची असते.

(१३) भाषांतरकाराप्रमाणेंच रूपांतरकारही मूळग्रंथकाराचा "मित्र" व "शत्रु" असतो. कारण ग्रंथ एका भाषेंतून दुसरे भाषेंत आणितांना किंवा वेषांतर करतांना विनायक जशाचा तसा घड राहिला तर मित्र, वानर बनविला गेला तर शत्रु.

(१४) रूपांतरकार भाषांतरकारापेक्षां श्रेष्ठ दर्जाचा लेखक आहे. कारण, मूळग्रंथाचा बाह्यतः असणारा परकीयपणा घालवून तो जास्त मोहक व व्यावहारिक करण्याचें काम रूपांतरकाराचें आहे.

एका सरकारी कामगाराच्या रोजनिशींतील उतारे.

[३]

उद्धर्ता—' टोमदेव. '

१५ जानेवारी—नाताळची सुटी संपल्यावर कांहीं दिवस पुण्यासच कामांत गेले. नंतर ता० १५ रोजीं पुनः बाहेर पडून भोसरी, तालुका हवेली, येथें मुक्काम केला. तेथें गांवाबाहेर मोठमोठालीं दगडी कोंडाळीं केलेलीं आहेत. तीं बहुधा पुरलेल्या मृत माणसांचीं थडगीं असावीं.

१६ जानेवारी रोजीं इंद्रायणी नदीच्या काठीं आळंदी—क्षेत्रीं गेलों. इंद्रायणीस अरुंदसा पूल आहे त्यावरून गांवांत जावें लागतें. पुलावरून आळंदीच्या देवालयादिकांचा देखावा उत्तम दिसतो. येथें प्रसिद्ध साधु व वारकरी पंथाचे आद्य प्रवर्तक जे ज्ञानेश्वर किंवा ज्ञानदेव त्यांची समाधी आहे. जय! ज्ञानेश्वर महाराजकी जय!! समाधीची इमारत निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या सरदारांनीं वाढविलेली आहे. गायकवाडांनीं उत्तरेकडील भाग बांधिला; पूर्व दरवाजा शिंदे सरकारनें बांधून तेथेंच नगारखान्याकरितां माड्या उठविल्या; पश्चिमेकडील भिंत व ओहोऱ्या पेशव्यांनीं बांधिल्या; धारकर पवार यांनीं दरवाजे वगैरे चांदीनें मढवून काढिले. वाघोलीचे हैबतराव जाधव यांनीं ज्ञानोबाची भक्ति विशेष वृद्धिंगत केल्याचें कळतें. महाराष्ट्रांत पंढरपुराखालोखाल आळंदीक्षेत्राचेंच माहात्म्य विशेष आहे. येथें सिद्धेश्वराचें देवालय मुख्य होय. त्याच्या समोरच ज्ञानोबानें समाधी घेतली. समाधीपुढील सभामंडप संगीन चिरेबंदी मजबूद असा आहे.

'अजानवृक्ष' नांवाचें झाड मंडपाच्या बाजूस आहे. तें ज्ञानदेवाच्या काठीपासून उत्पन्न झालें असल्याचें सांगतात! ह्या वृक्षाच्या पानांनीं पुष्कळ रोग नाहींतसे होतात, त्यामुळें लोकांचा त्याविषयीं फार आदर आहे.

शेजारींच पिंपळाचा वृक्ष आहे. त्या भोंवतीं ज्ञानदेवाची आई, पति संन्यस्त झाल्यावर, अत्यंत निष्ठापूर्वक प्रदक्षिणा घालीत असतांना तिला " पुत्रवती भव " म्हणून एका साधूचा आशीर्वाद मिळाला व नंतर संन्यस्त झालेल्या पतीपासून निवृत्ति, ज्ञानदेवादि अपत्यें झालीं. *

थोड्या अंतरावर वाघावर बसून आलेल्या चांगदेवास, भिंतीवर आरूढ होऊन, ज्ञानदेव सामोरे गेले, ती भिंत व ज्या वडाखालीं दोघांची भेट झाली तो वटवृक्ष येथें दाखवितात.

---

* रामाश्रमी स्वामी श्रीपाद यांनीं रखुमाबाईस 'पुत्रवती भव' म्हणून आशीर्वाद दिला. तिचा पति विठोबा हा त्यांच्या अनुग्रहानेंच संन्यस्त झाला होता. पण श्रीपाद स्वामींनीं, विठोबानें मला स्त्री नाही असें सांगितल्यावरून त्यास संन्यासदीक्षा दिली होती. स्वामींस खरी स्थिति कळल्यावर त्यांनीं विठोबास पुनः गृहस्थाश्रमी केलें, असें भक्तिविजयांत महीपति सांगतो.

नदीतीराचा देखावा अत्यंत रम्य आहे. पुणेकर साखरे—बोवांची समाधी बेटांत[1] आहे. साखरेबोवा हे मूळचे जोशी आड-नांवाचे कोंकणस्थ ब्राह्मण, पुण्याचे रहिवासी. हे श्रीमंत होते. पण त्यांस गुरुकृपेनें विरक्ति उत्पन्न झाली व ते ज्ञानेश्वरीचे पाठ करूं लागले. पुढें त्यांनीं आपली सर्व संपत्ति ब्राम्हणभोजनें घालून खर्च करून टाकिली. साखरपोळीच्या जेवणावळी होतां होतां पुण्यांत साखर मिळे-नाशी झाली, इतकी साखर त्यांनीं खपविली ! त्यावरून जोशीबोवांस साखरेबोवा असें नांव पडलें. तें अद्याप त्यांच्या घराण्यांत चालू आहे.

येथें रामजीचें आणि लक्ष्मीनारायणाचें अशीं दोन देवालयें प्रशस्त व मजबूद अशीं बांधिलेलीं आहेत.तीं पांथस्थांस उतरण्यास उत्तम स्थळें होत. लक्ष्मीनारायणाच्या मूर्ती इतक्या प्रमाणशुद्ध आणि सुंदर आहेत कीं, त्यांजकडे टक लावून पाहात बसावेंसेंच वाटतें. त्या प्रसिद्ध भिवा सुतारांच्या[3] हातच्या आहेत ह्मणून समजतें. ज्ञानोबाच्या समाधीचें दर्शन झाल्या-नंतर सर्व स्त्रीपुरुषांनीं ह्या लक्ष्मीनारायणाच्या मूर्तींचें दर्शन अवश्य घ्यावें.

आषाढ वद्य व कार्तिक वद्य एकादशीस ज्ञानोबाची यात्रा भरते. यात्रेकरूंवर कर बस-विला आहे. त्या उत्पन्नावरच येथें म्युनिसि-पालिटी चालली आहे.

येथें स्वामी नृसिंहसरस्वती राहतात. त्यांचीं वेदांतादि विषयांवर व्याख्यानें नित्य होत अस-तात. पुरुष तेजस्वी आणि विद्वान् असून वाणी रसवती आणि अस्खलित आहे. स्वामींची कीर्ति आणि लोकप्रियता विशेष आहे, ती यथायोग्यच आहे.

आळंदीगांव ज्ञानोबास इनाम आहे. उत्पन्न सुमारें १२०० रुपयांचें.

१७ जानेवारी—चऱ्होली ता० हवेली. नदीच्या पलीकडे चऱ्होली. सुंदर गांव. सगळी-कडे बागाईत. त्यांत पानमळेच फार. पाणी इंद्रायणीचें व विहिरींचें. वस्ती सुमारें चार हजारांची.

दाभाडे घराण्याची एक शाखा येथें राहते. दाभाड्यांचे दोन मोठे वाडे येथें आहेत.

ताकपीर नांवाच्या मराठ्यांचा भरणा येथें फार. ताकपीर पेशव्यांच्या व गायकवाडांच्या लष्करांत असत म्हणून समजतें.

चऱ्होलीस पेशव्यांच्या फौजेचा तळ पडत असे ह्मणून सांगतात.

गांवाशेजारींच एका टेकाडावर व्याघ्रेश्वर ऊर्फ वाघेश्वर महादेवाचें देवालय आहे.

१८ जानेवारी—गोलेगांव ता० खेड.—या गांवाच्या तिन्ही बाजूंनीं इंद्रायणीचा वेढा आहे व एक टोंक नदीमध्यें घुसलें आहे, त्यामुळें गांवास द्वीपकल्पाचा आकार आला आहे. जवळच टेकडीवर कर्पूरेश्वराचें देवालय असून तेथून भोंवतालचा सुंदरसा देखावा दृष्टीस पडतो.

१. बेटांत म्हणजे इंद्रायणी व तिला मिळणारा एक ओढा यांच्यामधील चिमट्यांत. पुणें येथील 'बेटा-' वर म्हणजे मुठा व मुळा यांच्या चिमट्यांत इंग्रजांच्या रेसिडेंटाचा बंगला होता. तेथें हल्लीं जज्जसाहेब राहतात.

२ चिमाजी आपा पेशवे यांचे हे खासगी कार-भारी होते. आवटे यांची ज्ञानेश्वरी पाहावी.

३. भिवासुतार—ज्यानें औंध येथील रामपंचा-यतनाच्या मूर्ति निर्मिल्या.

मरकळ ता० खेड.—गांव भिकार. मारवाडी वाण्यांचें प्राबल्य मोठें.

१९ जानेवारी—मोशी.—हा गांव सर दिनकरराव राजे राजवाडे यांस इनाम आहे. चिखली—गांवाभोंवतीं मातीचें गांवकुसूं. ताकपीर हे येथील पाटील होते, त्यांचा मोडून पडलेला वाडा आहे. त्यास मजबूद तटबंदी व बुरूज असून दरवाजा शाबूत आहे. ताकपीर आतां नामशेष झाले आहेत. पाटीलकी त्यांचे आप्त मोरे यांजकडे गेली आहे. गांवाभोंवतीं बागाईत बरेंच आहे. हीं दोन्ही गांवें हवेली तालुक्यांत. सायंकाळीं मुक्कामास चाकण येथें गेलों.

२० जानेवारी—चाकण—हें पुण्यापासून सुमारें १८।१९ मैलांवर आहे. चाकणचौऱ्यांयशी ह्मणतात तें हेंच ठाणें. बहुधा चाकणाखालीं चौऱ्यांयशी गांव असावे, ह्मणून चाकणचौऱ्यांयशी असें नांव पडलें.

चाकण परगणा मालोजी भोंसले ह्यास जहागीर मिळाला. शाहाजीकडेही हा परगणा होताच.

चाकणचा भुईकोट किल्ला फार जुना. शाहाजीचा किल्लेदार फिरंगोजी यास शिवाजीनें आपणाकडे वळविलें आणि किल्ला घेतला. पुढें फिरंगोजीनें शाहिस्तेखानाशीं किल्ला मोठ्या शौर्यानें भांडविला. शेवटीं नाइलाज होऊन त्यास किल्ला स्वाधीन करावा लागला. शाहिस्तेखानानें आपणाकडे राहावें म्हणून फिरंगोजीची बहुत विनवणी केली, परंतु तो निधडा वीर त्यास वश न होतां शिवाजीकडे गेला. त्याची शिवाजीनें पुष्कळ तारीफ केली आणि त्यास दुसऱ्या एका किल्ल्यावर नेमिलें.[1] बंडाच्या सालीं किल्ला इंग्रज सरकारानें पाडून टाकिला.

येथें 'कदम' आडनांवाचे देशमुख आहेत; त्यांची स्थिति अगदीं हलाकीची आहे.

येथील देशपांडे यांजकडे जुन्या माहितीचे कागद असल्याचें समजलें. परंतु माझ्या मुक्कामाच्या वक्तीं ते गांवीं नसल्यामुळें कांहीं पाहावयास सांपडलें नाहीं.

२१ जानेवारी—काळूस—भीमा नदीच्या कांठीं. हा गांव अर्धा गायकवाडांकडे व अर्धा आंग्र्यांकडे पूर्वी होता. दोघांचेही तटबंदी वाडे येथें होते. गायकवाडांचा वाडा पुण्याचे विसोबा घरमोडे ह्यांनीं घेऊन मोडला. फक्त त्याचें जोतें व दरवाजा हीं राहिलीं आहेत. आंग्र्यांचा वाडा येथील कुळकर्णी यांनीं खरेदी केला. गांव खालसा झाल्यास बहुत दिवस झाले.

२२ जानेवारी—पिंपळगांव—भामा भीमा संगमाखालीं भीमाकांठीं वसलें आहे. संगमावर देवालय व घाट आहेत. घाट सुरेख बांधलेले आहेत. घाटाखालीं पाणी खोल आहे. भीमेचें पाणी फार जोरानें वाहात असावें; कारण जागोजाग खडकांमध्यें पाण्याच्या घर्षणानें मोठे मोठे खड्डे पडले आहेत. येथील कुळकर्णी यांचें घराणें श्रीमंत दिसतें. मोहिते हे येथील पाटील. त्यांच्या घराण्यांतील शिलेदार गायकवाडांच्या लष्करांत असत ह्मणून समजतें.

बहूळ,—भीमातीरींच वसलें आहे. ह्या गांवास हें नांव बहुला नामक गाईवरून पडलें. तिजविषयीं कथा समजली ती अशी. रानांत चरत असतां बहुलेची आणि एका वाघाची गांठ

१. भूपाळगड येथें.

फडून तो तिजला मारून खाणार, तों तिनें विनवणी केली कीं, घरीं वासरूं भुकेलें आहे त्यास पाजून येतें, मग तूं मला खुशाल खा. त्यावरून वाघानें तिला सोडलें. तीही वासरास पाजून त्यास बरोबर घेऊन आली. पण वासरूं ह्मणे "मला आधीं खा, मग माझ्या आईस खा! " बहुला ह्मणे "छे! तसें नाहीं. मला आधीं खाऊन मग हवें तर वासरास खा." ही त्यांची चढाओढ पाहून वाघास परम आश्चर्य वाटून तो कळवळला आणि गाईस किंवा वासरास खाण्याचें सोडून, तृषाक्रांत झालेला असल्यामुळें, मला फक्त पाणी पिण्यास दे, असें तो बहुलेस ह्मणाला. बहुलेनें लागलीच आपलीं शिंगें नजीकच्या टेकाडांत खुपसलीं, आणि शिंगांनीं केलेल्या बिळांतून स्वच्छ शीतल जळ वाहूं लागलें! वाघाची तृषा शांत होऊन तो त्या मायलेकरांस सोडून आपल्या मार्गानें चालता झाला! ! तेव्हांपासून हे झरे डोंगरींतून तसेच खळखळ वाहात आहेत. त्यांचें पाणी स्वच्छ तर आहेच, पण प्रकृतीसही उत्तम मानतें ह्मणून सांगतात. पाणी वाहात जाऊन भीमेस मिळतें. पूर्वी ह्या गांवाचें नांव 'चंपानगर' असें होतें, तें वरील गोष्ट घडल्यापासून बदलून 'बहूळ' असें झालें. बहुला आणि तिचें वासरूं ह्यांच्या मूर्ति येथून सुमारें तीन मैलांवर स्थापिलेल्या आढळतील.

बहूळच्या उत्तरेस बागाईत आहे, तें याच झऱ्यांच्या पाण्यावर होतें.

'बहूळ' मोरोबा दादा फडणिस यांस इनाम होतें. तें राव बाजीनें खालसा केलें ह्मणून समजतें. फडणिसांचा वाडा भीमाकांठीं होता तो मोडून पडला आहे. भीमेच्या पलीकडे म्हणजे दक्षिण तीरास त्रिंबकराव मामा पेठे यांचीं कुरणें असून त्यांत त्यांचा बंगलाही आहे. बंगल्यावरून भीमानदी वळण घेऊन ईशान्येस गेली आहे. तिचा देखावा चांगला दिसतो. कुरणें पेठ्यांकडे अद्याप आहेत. त्यांचे वंशज रा. अमृतराव पेठे विद्यमान आहेत.

२३ जानेवारी—शिक्रापूर ता. शिरूर. वेळनदीवर. येथें बागाईत बरेंच आहे. मांढरे व राणे हीं मराठ्यांचीं घराणीं. करंजे आडनांवाचे पाटील यांचा एक वाडा आहे. तो पडावयास झालेला आहे. दुसरा एक वाडा धायबर यांचा. तो मोडून पडला आहे. धायबर पूर्वी पेशव्यांच्या बावन पाग्यांपैकीं एक होते. हल्लीं ते ग्वालेरीस आहेत.

रांजणगांव गणपती ता. शिरूर.—गणपतीचें स्थान. अर्धा गांव या देवास इनाम आहे. खेरीज रोख वर्षासनही मिळतें. अष्ट विनायकांतील हा

१. शिवलीलामृतामध्यें शिवरात्रीस व्याधापुढें परत येण्याची भाक दिल्यावर हरिण, हरिणी व त्यांचीं पाडसें त्याजकडे आलीं. प्रत्येकानें माझा आधीं वध कर ह्मणून त्याची प्रार्थना केली, असें वर्णन आहे. तें असें. मृग पाडसांसहित सर्वही। व्याधापाशीं आलीं लवलाहीं। मृग म्हणे ते समयीं। आधीं मज वधीं पारधिया॥ मृगी म्हणती हा नव्हे विधी। आम्ही जाऊं पतीच्या आधीं। पाडसें म्हणती त्रिशुद्धी। आम्हांसि वधीं पारधिया॥ त्यांचीं वचनें ऐकतां ते क्षणीं। व्याध सद्गद झाला मनीं। अश्रुधारा लोटल्या नयनीं। लागे चरणीं तयांच्या॥ अ० २, ओ० ७५–७७.

तसेंच वरील प्रसंगीं थोडेसें झालें म्हणावयाचें.

१. बाकीचे सात विनायक पुढील गांवीं आहेत. मोरेश्वर, थेऊर, लेण्याद्री, ओझर (जिल्हा पुणें), पाली (सुधागड तालुका, पंतसचिव संस्थान), गढ

एक होय. गांवाची सनद थोरले माधवराव पेशवे यांनीं दिलेली आहे. चिंचवडकर देवांचें एक घराणें येथें राहतें. देवालय चिंतामण महाराज देव यांनीं सुमारें दोनशें वर्षांपूर्वी बांधिलें. गणेशचतुर्थीस येथें यात्रा भरते.

२४, २५ जानेवारी—घोडनदी ऊर्फ शिरूर. येथें लष्करची छावणी आहे. लष्करांत पूर्वी मराठे लोकांचा भरणा विशेष असे. हल्लीं सुमारें दोनशें मराठे लोक लष्करांत असतील. बाकीचे सर्व मुसलमान.

रात्रौ मलठण ता० शिरूर येथें मुक्कामास गेलों. मलठण हा पवारांचा गांव. हल्लींचे पवारांचें नांव संभाजीराव ऊर्फ आबासाहेब. आबासाहेबांची मातुश्री यमुनाबाई ह्याच घराण्याच्या मिळकतीची व्यवस्था पाहतात; कारण, आबासाहेबांची उमर सुमारें १८ वर्षांची असूनही त्यांचें तिकडे लक्ष नाहीं. बाईंचें वय सुमारें ४५ वर्षांचें असून मोठ्या चलाख दिसल्या. पडदा त्यांनीं सोडून दिला आहे. पवारांचा वाडा मजबूत बांधिलेला आहे. मलठणकर पवार हे धारकर, सुपेकर, अमदाबादकर पवारांचे संबंधीच आहेत. पवारांस राजारामाचे कारकीर्दीत "विश्वासराव" हा किताब मिळाला म्हणून कळतें.

२६ जानेवारी.—मलठणाहून चिंचवली म्हणून पश्चिमेस लहानसें खेडें आहे तेथें वस्तीस गेलों. येथील देशमूख ब्राह्मण असून वैष्णव आहेत. ब्राह्मणाचें घराणें एवढें एकच येथें आहे.

२७ जानेवारी—पाबळ ता० शिरूर. शिरूरच्या पश्चिमेस सुमारें २० मैलांवर. पूर्वी हें गांव ह्याच नांवाच्या तालुक्याचें ठाणें होतें.

येथें राजपाठक उपनांवाचीं ब्राम्हण घराणीं बरींच आहेत. त्यांमध्यें कान्हो राजपाठक हे मोठे साधु पुरुष होऊन गेले. ते आपल्या मुलांवर अत्यंत प्रेम करीत म्हणून त्यांस एकानें नांवें ठेविलीं. त्याबरोबर त्यांनी आपली मुलगी, बिलकुल विकारवश न होतां, येथें एक विहीर आहे तींत टाकिली! या प्रकारें त्या सत्पुरुषानें मुलें असणें आणि नसणें दोन्ही सारखींच हें निदर्शनास आणिलें!! ही विहीर अद्याप दाखवितात. कोणी म्हणतात कीं लोकांच्या आग्रहावरून त्या बुडालेल्या मुलीस हाक मारून कान्होबानें बाहेर सजीव आणिलें! एथील कीर्तनकार हरिदास घराणीं प्रसिद्ध आहेत.

बाजीराव बल्लाळ पेशवे ह्यांची रखेल जी खुबसुरत मस्तानी तिची कबर एथें गांवानजीकच आहे. पाबळ, केंदूर वगैरे गांवें मस्तानीकडे होतीं म्हणून कळतें. ती पुण्यास मरण पावली असतां एथें आणून पुरण्याचें कारण हेंच असावें.

(कर्जत ता० जिल्हा कुलाबा), आणि सिद्धटेक (श्रीगोंदें ता०, जिल्हा नगर). ह्या अष्टविनायकांचीं नांवें व स्थळें एका ओबडधोबड संस्कृत श्लोकांत दिलीं आहेत, तो श्लोक असा:—

स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं।
बल्लालो मुरुडं विनायक महं(ढं) चिंतामणिं स्थेवरे।
लेण्याद्रौ गिरिजात्मकं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरे।
ग्रामे रांजणसंस्थितो गणपतिः कुर्यात् सदा मंगलम्॥१॥

§ येथील रिसाल्यास 'घोरपडयांचा रिसाला' असें म्हणत.

१. कान्हो राजपाठक यांच्या नांवाचा उल्लेख भक्तविजयाच्या शेवटील अध्यायांत महीपतीनें केला आहे.

पावळ खोलगटांत असल्यामुळें हिंवाळ्यांत एथील हवा रोगट असते.

२९ जानेवारी—कण्हेरसर ता० खेड. वेळ नदीच्या कांठीं. हा गांव चंद्रचूड म्हणजे होळकरांचे दिवाण गंगोबा तात्या चंद्रचूड यांचे घराण्यास इनाम आहे. याच तालुक्यांत निंबगाव, जउळकें बुद्रुक, पूर आणि गोसासी हे दुसरे गांवही त्यांस इनाम आहेत. पाणी वेळ नदीचें मुबलक. बागाईतही बरेंच आहे.

३० जानेवारी—वाफगांव. वेळ नदी दक्षिणेस व एक ओढा पूर्वेस यांच्या कांठीं हें होळकरांचें गांव आहे. शिंद्याचें जसें जांबगांव (नगर) तसें होळकरांचें हें. आठदहा वर्षांपूर्वी इंग्रज सरकारनें माळव्यांत मोबदला गांव देऊन वाफगांव खालसा केलें म्हणून समजतें.

होळकरांचा तटबंदी व बुरूज असलेला वाडा आहे. तो पडका वाडा अद्याप होळकरांकडेच आहे. वाडयांतील कचेरीचा दिवाणखाना दुमजला असून शाबूद आहे. कचेरीची इमारत ऐसपैस असून छानदार बांधलेली आहे. तेथें गरुडावर स्वार झालेली श्रीविष्णूची संगमरवरी पाषाणाची मूर्ति स्थापलेली आहे. अशा प्रकारची मूर्ति सोनोरीस पाहिली होती. कचेरीचे बाजूसच श्रीविष्णूचें देवालय असून त्यांत गंडकी शिळेची मूर्ति आहे. होळकरांनीं एका रजपूत राजापासून खंडणींत ही मूर्ति घेतल्याचें सांगतात. खंडणीचे ऐवजास सवा-लक्षाचा तुटवडा आला, तेव्हां ही मूर्ति देऊन राजानें ऐवजाची पूर्तता केली !

होळकरांचा एथें एक बाग आहे. ईशान्य दिशेस एक टेकडी आहे. तिजवरून भोंवताल्च्या प्रदेशाचा व शेतवाडीचा देखावा उत्तम दिसतो. त्या टेकडीवर एक लहानसा तळाव असून तेथें होळकरांचे स्वार राहात असत म्हणून सांगतात.

३१ जानेवारी.—पारगांव. वाफगांवच्या वायव्येस. येथें निकम व धायबर आडनांवाचीं मराठयांचीं घराणीं आहेत. निकम आणि धायबर हे पेशव्यांच्या बावन पाग्यांपैकीं होत. येथील कुळकर्णी क्षीरसागर.

पेंठ हें गांवही वेळ नदीच्या कांठीं आहे. हें पुण्याचे नातू यांस इनाम असून श्री० बाबासाहेब नातूंकडे आहे. नातूंचें दुमजला घर आहे. त्यांतच आह्मी उतरलों. येथील पाटील शिंदे. कण्हेरखेड येथील नागोजी शिंदे यास येथील निमे पाटीलकी थोरले माधवरावाकडून मिळाली. दळवी व ढमाले यांचा पाटीलकीबद्दल तंटा पडून दोघांनीं आपल्या हिशाचा अर्धा वांटा पेशव्यांस देण्याचें कबूल केलें. अशामुळें तंटा तुटल्यावर पेशव्यांस अर्धा हिस्सा मिळाला. तो त्यांनीं नागोजी यानें काठेवाडांत कांहीं उत्तम कामगिरी बजाविल्यावरून त्यास बक्षीस दिला. नागोजी पुढें सातारा किल्ल्याचा सरनौबत होऊन तेथेंच वारला.

हल्लीं दुसरे हिशांतील पाटील गुंजाळ व ढमाले आहेत. दळव्यांचा निर्वंश झाल्यामुळें पाटीलकीच्या निमे हिशाचा एकतृतीयांश इंग्रज सरकाराकडे आहे.

१–२ फेब्रुआरी—अवसरी खुर्द. हें अत्यंत रम्य स्थळ आहे. झाडें झुडें आणि पाणी विपुल ! येथें जिकडे तिकडे मयूर पक्षी

दृष्टीस पडतात. हे कोणी पाळलेले आहेत असें नाहीं. पण त्यांस कोणी धक्का लावीत नाहीं.

अभ्यंकर आडनांवाचे कोंकणस्थ ब्राह्मण येथें एकदां सुभेदार होते.

जुनी मामलेदार कचेरी ही इमारत सुरेख आहे. तिजमध्यें हल्लीं सरकारी शाळा भरत असते. पुराणिक उपनांवाचे एक वृद्ध पुरुष येथें राहतात. त्यांनीं पुणें एथील पाठशाळेत अलंकारशास्त्राचा अभ्यास केला. ते वक्ते उत्तम, त्यांचें बोलणें गोड व मोहक. त्यांनीं बोलतां बोलतां जगन्नाथ पंडिताची एक गोष्ट सांगितली. पंडित हे अकबर बादशाहाचे आश्रित. त्यांस जयपूरचा राजा जयसिंग एकदां आपल्या दरबारीं राहावें म्हणून विनंती करूं लागला, व लागेल तितकें द्रव्य देऊन आपले मनोरथ पूर्ण करीन असें ह्मणाला. त्याजवर पंडितांनीं तात्काल उत्तर केलें, " आपण काय आमचे मनोरथ पूर्ण करणार? मनोरथ पूर्ण करणार एक दिल्लीश्वर किंवा जगदीश्वरच खरा!" हा भावार्थ पंडितांनीं ज्या श्लोकांत स्पष्ट केला तो असा:—

दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा ।
मनोरथान् पूरयितुं समर्थः ॥
अन्यैर्नृपालैः परिदीयमानं ।
शाकाय वा स्यात् लवणाय वा स्यात् ॥

इतकें प्रेम अकबरावर जगन्नाथपंडिताचें बसलें होतें! मात्र अकबराचे वेळीं जयसिंग कसा आला कोण जाणे!!

दुसरें एक पद्य एका यवनीसंबंधें जगन्नाथ-पंडिताच्या मुखांतून सहजगत्या निघालें तें पुराणिकांनीं म्हणून दाखविलें.

यवनी नवनीत-कोमलांगी
शयनीये यदि लभ्यते कदाचित् ।
अवनीतलमेव साधु मन्ये
न वनी[1] माघवनी[2] विलासहेतुः ॥

ही यवनी शेवटीं त्यांस लाभली. तिच्या संगतींत ते बहुत वर्षे राहून शेवटीं मरणसमयीं 'गंगा-लहरी' ह्मणून गंगेची स्तुति करून ते आपणास पूत करून घेते झाले. गंगेच्या घांटावर ते बसून स्तुति करीत असतां दर श्लोकास गंगेचें पाणी एक एक पायरी वर चढून शेवटीं पंडितांस घेऊन जाऊन त्यांस मुक्त करितें झालें! ही यवनी ह्मणजे अकबराची मुलगी ह्मणून सांगतात. पण या आख्यायिकेस तरी इतिहासाचा आधार कोठें आहे?

३ फेब्रुवारी—मंचर. हें जुन्नरच्या सडकेवरच वसलेलें मोठें गांव आहे. खेडाहून सुमारें १२ मैलांवर. वाफगांवाप्रमाणें मंचरही होळकरांकडे होतें. तें मोबदला होऊन सुमारें ८।१० वर्षांपूर्वी इंग्रजसरकाराकडे गेलें.

येथें एका दगडी विहिरीवर लेख आहे त्यांत ह्या गांवचें नांव 'मणिचर' असें खोदलें आहे.

ता० ४ फेब्रुवारी—वडगांव व चिंचोडी-वडगांवाजवळ एक टेकडी असून तिजवरून भोवतालचा देखावा उत्तम दिसतो. चिंचोडीच्या देशपांड्यांकडे वामनपंडिताच्या काव्यांची एक वही आहे. तींत दानाव्रत, जयद्रथवध, संकलित रामायण इत्यादि प्रकरणें आहेत.

---

१. वनी=उद्यान.
२. माघवनी—मघवा जो इंद्र त्याची.

ता० ५।६ **फेब्रुवारी**—**महाळुंगें पडवळ.** येथें पडवळ व औटी या आडनांवाचे पाटील आहेत. दुसरें महाळुंगें याच तालुक्यांत आहे, त्यास महाळुंगें इंगळे असें ह्मणतात. कारण तेथें इंगळे घराणें मुख्य असून त्यांस तो गांव इनाम आहे. एकाच नांवाचीं दोन दोन, तीन तीन गांवें असतात, तेव्हां त्यांतील भेद दाखविण्यासाठीं तेथील मुख्य घराण्याचें नांव त्या गांवच्या नांवास जोडण्याचा परिपाठ आहे. उदाहरणार्थः—**लोणी काळभोर.** येथें काळभोर हें मराठे घराणें मुख्य असून पाटीलही तेच आहेत. **लोणी भापकर** येथें भापकरांचें घराणें मुख्य होय. **लोणी कंद** या लोणीस कंद नांवाचें घराणें प्रमुख. **तळेगांव दाभाडे, तळेगांव ढमढेरे; पिंपळें जगताप, पिंपळें धुमाळ; उरळी देवाची,** देवांस इनाम म्हणून; **उरळी कांचन,** कांचन नांवाचे मराठे येथें मुख्य म्हणून, **आळंदी देवाची** (ज्ञानोबाच्या समाधीची); **आळंदी चोरांची** (चोर आडनांवाचें मराठे घराणें प्रमुख). कोठें कोठें भेद दर्शविण्यासाठीं शेजारचे गांवाचें नांवही लावलेलें असतें. उदाहरणार्थ **खेड शिवापूर, खेड कडूस. चास कमान** (कमान जवळचें चास), **चास नारोडी** (नारोडी जवळचें चास). **निंबगांव दावडी, निंबगांव केतकी** इत्यादि. बुद्रुक (जुनें), खुर्द (नवें) हीं विशेषणेंही देऊन हा भेद दर्शवितात. **कोडीत बुद्रुक, कोडीत खुर्द; चऱ्होली बुद्रुक, चऱ्होली खुर्द; कोंढवें बुद्रुक, कोंढवें खुर्द** इत्यादि.

ता. ७।८ **फेब्रुवारी—चास नारोडी.** हीं दोन्ही गांवें घोड नदीच्या तीरावर आहेत. नारोडी हें गांव रम्य आहे. तेथील देखावा दक्षिण कोंकणांतील देखाव्यासारखा दिसतो. चास येथें घोडनदींत पाण्याच्या जोरानें खडकाच्या पोटांत एक भलें मोठें खोल कुंड झालें आहे. बारीक सारीक खड्डे तर खडकांत पुष्कळ ठिकाणीं नजरेस येतात.

ता.९–११ **फेब्रुवारी—घोडें**—घोडनदीच्या कांठीं. अंबेगांव पेट्याची कचेरी येथें असते. वस्ती पांचसाडेपांच हजारांची असावी. येथें चांडोलीचे कुलकर्णी भेटले त्यांनीं जुन्नरचे देशमुख **हांडे** यांच्या नांवाची उत्पत्ति सांगितली. जुन्नरचे देशपांडे एकदां बादशाहाच्या छावणीस जात असतां रस्त्यावर टाकलेलें नुकतेंच उपजलेलें सुंदर मूल त्यांस आढळलें. मुलास त्यांनीं एका हांड्यांत घालून बादशाहापुढें नेऊन हजर केलें. बादशाहानें मुलाचा सांभाळ करण्याचा हुकूम करून त्याला जुन्नर परगण्याचा देशमुख केलें, व त्यास हांड्यांत घालून आपणापुढें आणिलें होतें ह्मणून '**हांडे**' हें उपनांव दिलें ! ह्या मुलाचे आईबाप कोणत्या जातीचे हें माहीत नसतां त्याच्या घराण्यास मराठे लोकांमध्यें गणूं लागले. सूर्यवंशी, गायकवाड इत्यादि मराठ्यांच्या घराण्यांमध्यें **हांडे** यांचें नांव आढळतें.

" ब्रिटिश साम्राज्याचा उदय."

प्रो० लट्ठे यांच्या आक्षेपास उत्तर.

वि. ज्ञा. विस्ताराच्या मार्च महिन्याच्या अंकांत प्रो. आण्णा बाबाजी लट्ठे यांनीं "ब्रिटिश साम्राज्याचा उदय" या पुस्तकावर मीं लहानसा अभिप्राय डिसेंबरच्या अंकांत लिहिला त्यांतील एक मुद्दा खोडून टाकण्याचा यत्न केला आहे.

त्यांचें उत्तर वाचल्यावर मला असें दिसून आलें कीं, त्यांची दृष्टि साम्राज्याच्या "तात्त्विक हक्कांवर" व माझी साम्राज्याच्या "व्यावहारिक धोरणावर" आहे. तात्त्विक हक्कांवर दृष्टि ठेविली तर पुष्कळ चांगल्या व वाईटही गोष्टी करितां येतील. गोष्टी चांगल्या असूनही त्या अमलांत आणाव्या कीं नाहीं हा प्रश्न वादग्रस्तच राहतो. या प्रश्नाचा खल करितांना तात्त्विक हक्कांवर दृष्टि देऊन चालत नाहीं. ज्या लोकांवर त्या गोष्टींची अंमलबजावणी करावयाची, त्या लोकांच्या मनःप्रवृत्ति, पूर्वग्रह, संस्कार, खऱ्या किंवा चुकीच्या समजुती यांवरही दृष्टी ठेवावी लागते. तात्त्विक हक्कांनीं लोकांत असंतोष उत्पन्न होईल, तर नयनिपुण मुत्सद्यांस तात्त्विक हक्कांवर पाणी सोडावें लागतें, किंवा त्यांस सौम्यरूप द्यावें लागतें. अमेरिकेंतील वसाहती इंग्लंडच्या कर बसविणाऱ्या तात्त्विक हक्कांचा निषेध करूं लागल्या, त्यावेळीं बर्कनें तात्त्विक हक्कांचा पक्ष सोडून प्रजासंतोषरूपी राजनीतीच्या धोरणाचें समर्थन केलें. त्याचीं या संबंधाचीं दोन भाषणें प्रसिद्ध आहेत. त्यांत व्यावहारिक राजनीतीचें सर्वस्व ओतलें आहे, असें मि. (आतां लॉर्ड) मोर्ले यांचें ह्मणणें आहे. याच धोरणाचें समर्थन लॉर्ड मेकॉलेनेंही केलें आहे व त्याचाच अंगीकार करून पुण्यश्लोका महाराणीनें विख्यात जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यास अशक्य क्षेत्रांत ढकलण्याचें धाष्टर्य एका वाक्शूर मुत्सद्यानें केलें, परंतु त्याचें ह्मणणें एकीकडे सारून महाराणी सरकारच्या शांतिप्रिय पुत्रानें, व लोकप्रिय नातवानें त्याला आपली संमति दिली व त्याप्रमाणें वर्तन ठेवूं असें अभिवचन दिलें. अशा वज्रलेपी जाहिरनाम्यांत अंगीकृत केलेल्या दत्तक प्रश्नाला वादक्षेत्रांत प्रो. लट्ठे यांनीं आणिलें ह्मणून मला नवल वाटलें. हा प्रश्न मिटला, असें मला वाटलें होतें, व वाटत आहे. हेंच धोरण आफ्रिकेंतील पराजित ट्रान्सव्हाल व ऑरेंज प्रजासत्ताक संस्थांना स्थानिक सरकारचे हक्क देतांना स्वीकारण्यांत आलें.

प्रो. लट्ठे डलहौसीच्या धोरणाचें समर्थन करितांना असें ह्मणतात कीं, डलहौसीनें जीं राज्यें खालसा केलीं त्यांत अत्यंत अव्यवस्था झाली होती, म्हणूनच तीं खालसा केलीं. तेथील राजांना संतति नव्हती हें राज्यें खालसा करण्याचें कारण नसून केवळ "निमित्त" मात्र होतें.

त्या राज्यांतील "अत्यंत अव्यवस्था" हेंच तीं राज्यें खालसा करण्याचें खरें कारण असतें

तर तीं राज्यें ज्या वेळीं खालसा करण्यांत आलीं, त्याच्या अगोदरच खालसा झालीं असतीं, व व्हावयास पाहिजे होतीं. त्या राज्यांचे राजे निपुत्रिक मरत तोंपर्यंत वाट पाहण्याचें कारण नव्हतें. ज्यावेळीं राज्यांत "अत्यंत अव्यवस्था" उत्पन्न झाली त्याच वेळीं तीं खालसा करणें "न्यायाचें" होतें, व झालें असतें. असें झालें नाहीं यावरून हें स्पष्ट होतें कीं, डलहौसीनें राज्यें खालसा केलीं त्याचें खरें कारण, त्या त्या राज्यांचे राजे निपुत्रिक मरण पावले हेंच होतें. त्या राज्यांत "अत्यंत अव्यवस्था" होती, हें खरें कारण नसून हें एक निमित्त आपल्या कृतीच्या समर्थनार्थ मात्र डलहौसीनें पुढें आणिलें.

शिपायांच्या बंडाच्या कारणांचा विचार येथें अप्रासंगिक होईल. त्या बंडाच्या मूळाशीं दत्तक घेण्याची मनाई व त्या मनाईनें सर्व राजे-रजवाड्यांत व त्यांच्या प्रजांत झालेला असंतोष नव्हता, असें प्रो. लट्टे ह्मणोत. पण सर्व गोष्टींचा विचार करितांना माझें मत सर्वमान्य ग्रंथकारांच्या मताप्रमाणेंच आहे.

वि. मो. महाजनि.

कविता व जीवनकलह.

(आर्या)

मित्रा क्षमस्व ! लिहिल्या अजुनि न कविता सुधारुनी सकल ।
जीवनकलहगता मज दुर्लभ अशि होय सरस कवनकला ॥ १ ॥
संस्कार तयां द्याया जातों, येतो तयांस जों रंग ।
तों जीवनकलहकली येति, करिति मम समाधिचा भंग ॥ २ ॥
प्रतिभा प्रियाहि रुसली, करितों बहु जरी तदीय मनधरणी ।
कीं दुर्लक्ष करीं मी कविता–तनयांचिया सुसंस्करणीं ॥ ३ ॥
तारा, उषा, तशाच प्रतिभाजन्या मदीय ह्या कन्या ।
सर्वांची सम चिंता वाटे, निपजोत ह्या जगीं धन्या ॥ ४ ॥
टोंचिति मज या विषयीं प्रेमें मन, आप्त मित्र मम सारे ।
नीरस परिस्थितीचा दोष असे कांहि आळसाचा रे ॥ ५ ॥
प्रतिभे देवि ! जवें ये कवितांच्या आजि संस्करणकार्या ।
तारा उषा सुतांच्या संस्कारीं मम झटे जशी भार्या ॥ ६ ॥
संस्कारहीन जगतीं राहोत न लेश आपुल्या दोषें ।
ना तरि गुणदोषांचे ज्ञाते देतील दूषणें रोषें ॥ ७ ॥
श्रमुनि दिवसभर होतों जीवनकलहांतुनी जरा मुक्त ।
पर्यंकीं पडुनि तुला स्मरें, न परि येसि हें न तुज युक्त ॥ ८ ॥
कवितासुता दिल्या ह्या तूंच विभो ! ही कृपा असामान्या ।
तूंच अतां मम हस्तें उजवुनि यांतें करीं रसिकमान्या ॥ ९ ॥

के. वि. फणसे.

श्री.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक १.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले.

नरपति हितकर्ता द्वेष्यताम् याति लोके । जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन
इति महति विरोधे विद्यमाने समाने । नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ १ ॥

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनानें हिंदुस्थानांतील एक अत्यंत देदीप्यमान हिरा नाहीसारखा झाला यांत शंका नाहीं. बादशहापासून तों अगदीं रंकापर्यंत प्रत्येक मनुष्यास या थोर पुरुषाच्या अकालें मृत्यूमुळें हळहळ वाटत आहे. हिंदुस्थानांत, किंबहुना जगाच्या पाठीवर ज्या ज्या ठिकाणीं म्हणून हिंदीसमाज आहेत त्यांनीं या खेदजनक प्रसंगाबद्दल विद्युत्संदेशानें, जाहीर सभांनीं, खाजगी पत्रांनीं, व वर्तमानपत्रांतील लेखांनीं, आपलें दुःख प्रदर्शित केलें आहे, व आपआपल्यापरी या महात्म्याबद्दल आपला पूज्यभाव व्यक्त केला आहे. अशा तऱ्हेचा, सत्ताधारीवर्ग व प्रजाजन यांच्यामधील निस्सीम एकवाक्यतेचा प्रसंग, हिंदुस्थानांत आजपर्यंत कधीं अनुभवास आला नाहीं. सर्व ब्रिटिश साम्राज्यामध्यें आपली यशोधवल कीर्ति मागें ठेवून व आदरणीय होऊन कोणीही हिंदी पुढारी आजपर्यंत गेला नाहीं. गोपाळरावांच्या मृत्यूसंबंधीं साम्राज्यांत प्रगट झालेले अनेक मुत्सद्यांचे व राजकार्यधुरंधर पुरुषांचे विचार लक्षांत घेतां, गोपाळराव नुसते पुण्याचे किंवा मुंबई इलाख्याचे किंवा सर्व हिंदुस्थानचेच मुत्सद्दी नसून सर्व साम्राज्यांतील मुत्सद्यांत त्यांची गणना होत होती. राजकीय बाबतींत गोपाळरावांशीं सदैव विरुद्ध असणाऱ्या व हिंदुस्थानच्या आकांक्षांबद्दल अनुदार वृत्ति बाळगणाऱ्या खुद्द लॉर्ड कर्झन साहेबांनीं गोपाळरावाबद्दल फार आदराचे उद्गार काढले असून*त्यांनीं असेंही सांगितलें कीं, जगांतील कोणत्याही प्रातिनिधिक संस्थेस गोपाळराव ललामभूत झाले असते; व खुद्द इंग्लंडच्या हॉउस ऑफ कॉमन्समध्येंही त्यांनीं उच्चप्रतीचा नांवलौकिक मिळविला असता. गोपाळरावांच्या योग्यतेबद्दल याहून बलवत्तर प्रमाणाची मुळींच जरूर नाहीं.

हिंदुस्थानांतील नागरिक या नात्यानें ब्रिटिश साम्राज्यांत सत्ताधारी वर्गानें आदरानें, पूज्यबुद्धीनें, सन्मानानें व बरोबरीनें जर कोणाचा गौरव केला असेल तर हिंदुस्थानच्या इतिहासांत गोपाळरावजींचाच होय. अशा तऱ्हेचा मान हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही पुरुषास आजपर्यंत कधीं मिळाला नाहीं. गोपाळरावांच्या चरित्राचें रहस्यही या एका विशेषांतच आहे. गोपाळरावांची योग्यता, त्यांची कामगिरी, त्यांना सोसाव्या लागलेल्या अडचणी, त्यांनीं संपादन केलेली यशःप्राप्ति; आपल्या हेतूंबद्दल इतरांचे ठिकाणीं त्यांनीं उत्पन्न केलेला पूज्यभाव, त्यांनीं घालून दिलेलें उदात्त ध्येय,

* "He had never met a man of any nationality more gifted with Parliamentary capacities. Mr. Gokhale would have obtained a position of distinction in any Parliament in the world, even in the British House of Commons."

या सर्वांचें सर्व दृष्टींनीं आकलन करण्यास गोपाळरावांचें सविस्तर चरित्र प्रसिद्ध झालेलें पाहिजे. तें होण्यास पुष्कळ अडचणीं आहेत. एकतर त्यांच्या बऱ्याच कामगिरीचें स्वरूप अद्याप प्रसिद्ध झालें नाहीं. वरिष्ट कायदे कौन्सिलांत आणीबाणीच्या प्रसंगीं व राजकीय अस्वस्थतेमुळें क्षुब्ध झालेल्या वातावरणांत कायद्याच्या प्रतिगामी स्वरूपास आळा घालण्याचे कामीं त्यांनीं जे अविश्रांत श्रम केले त्यांची माहिती फार थोड्या लोकांस आहे. पुष्कळ संस्था व पुष्कळ व्यक्ति यांचेवर अनपेक्षित कारणांनीं ओढवलेल्या संकटांचें निवारण करण्याचे कामीं गोपाळरावांची किती मदत झाली हें फार थोडया व्यक्तींस ठाऊक आहे. इंग्लंडांतील उदारचरित पुरुषांची सहानुभूति हिंदुस्थानच्या हिताबद्दल उत्पन्न करण्यासाठीं जो खटाटोप गोपाळरावांनीं केला त्याचा इतिहास अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं. जबाबदार मंत्रिमंडळापुढें हिंदुस्थानच्या गाऱ्हाण्यांबद्दल जी वकिली गोपाळरावजींनीं केली तिची जाणीव सामान्यजनसमूहास मुळींच नाहीं. साउथ आफ्रिकेसारख्या किंवा मुदतबंदीच्या मजुरांच्या नाजुक व बिकट प्रश्नासंबंधीं जी तडजोड, जी मुत्सद्देगिरी, जो चाणाक्षपणा गोपाळरावजींनीं दाखविला त्याचें यथार्थ ज्ञान अद्याप सर्व लोकांस झालेलें नाहीं. मिंटो, मोर्ले यांच्या सुधारणेच्या पूर्वस्वरूपांत गोपाळरावजींच्या प्रयत्नांचा किती वांटा आहे याचें रहस्य अद्याप कळावयाचें आहे. हिंदुस्थानांतील व इंग्लंडांतील पुष्कळ विद्वान व राजकरणी पुरुषांशीं त्यांचा झालेला पत्रव्यवहार अझून प्रसिद्ध व्हावयाचा आहे. ही सर्व सामुग्री उपलब्ध झाल्यानंतर गोपाळरावजींचें सर्वव्यापक व बहुमोल चरित्र लिहितां येईल. हा कालाचा प्रश्न आहे. पुष्कळ नामांकित इंग्रजी मुत्सद्द्यांनीं गोपाळरावजींस **हिंदुस्थानचे ग्लाडस्टन** अशी संज्ञा दिली आहे. अर्थात् गोपाळरावजींचा चरित्रनायक **मोर्ले** कोणीतरी उत्पन्न होईल. तथापि या भावी चरित्रनायकावर सर्व भिस्त सोंपवून स्वस्थ बसण्याचें कारण नाहीं. ग्लाडस्टन साहेब यांच्या चरित्राबद्दल लॉर्ड मोर्ले यांनीं काढलेले उद्गार अशा प्रसंगीं अगदीं मननीय आहेत. कोणत्याही मुत्सद्द्याचें चरित्र त्याच्या निधनाबरोबर लिहावयाचें म्हणजे मोठी अडचण असते. पुष्कळ वादग्रस्त गोष्टींची आठवण ताजी असते. यामुळें उत्पन्न झालेल्या क्षुब्ध मनोवृत्तींची तीव्रता कमी झालेली नसते. तुलनेनें, समवायानें, सादृश्यानें, परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करणें कठीण असतें. पुष्कळ अप्रसिद्ध गोष्टींच्या आविष्करणानें समकालीन पुरुषांस खेद वाटण्याचा संभव असतो. तथापि एकाद्या मुत्सद्द्याची योग्यता बरोबर जाणण्यास त्या पिढींतील लोकच जास्त योग्य असतात. कारण ते एकाच परिस्थितींत वाढलेले असतात. तत्कालीन महत्त्वाच्या प्रश्नांची त्यांस माहिती असते, अडचणींची जाणीव असते, साधनांचें स्वरूप अवगत असतें, व विरोध करणाऱ्या गोष्टींचें ह्रद्गत त्यांस आकलन करतां येतें. यासाठीं समकालीन लोकांनीं केलेली मुत्सद्द्याची परीक्षा जास्त आदरणीय होय. व याच दृष्टीनें आम्ही आमच्या अल्पबुद्धीनें गोपाळरावजींची खरी योग्यता वाचकांपुढें मांडण्याचा प्रयत्न करीत आहों.

जीवनवृत्त.

गोपाळरावजींचें चरित्र म्हणजे हिंदुस्थानचा हल्लींच्या ३० वर्षांचा साद्यंत इतिहास होय. व त्यांच्या आयुष्यांतील बहुतेक महत्त्वाचा भाग हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांशीं संलग्न झालेला आहे. इ. स. १८६६ सालीं चिपळूण तालुक्यांत ताम्हणमळा गांवीं गोपाळरावजींचा जन्म तारीख ९ मे रोजीं झाला. त्यांच्या कुटुंबाची स्थिति गरिबीची होती. त्यांचे वडील बंधु कोल्हापूरपैकीं कागल संस्थानांत नोकर होते. त्यांनींच गोपाळरावजींच्या शिक्षणास मदत केली. गोपाळरावजीही आपल्या वडील बंधूस आमरणान्त पितृतुल्य मानीत असत. कोल्हापूर येथील राजाराम हायस्कुलांत व कॉलेजांत मिळणारें शिक्षण संपादून ते मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजांत गेले, व वयाच्या १८ व्या वर्षीं म्हणजे इ. स. १८८४ सालीं त्यांनीं बी. ए. ची पदवी संपादन केली. यावेळींच कांहीं तरूण व उत्साही पदवीधरांनीं आपणास शिक्षणाच्या पवित्र कार्यास वाहून घेऊन आपल्या देशबांधवांमध्यें शिक्षणाचा प्रसार करण्याचा संकल्प केला होता. तदनुरोधानें **डेक्कन एज्युकेशन सोसायटी** ही संस्था स्थापन केली होती. गोपाळरावजींच्या तरुण व उत्साही मनांत

स्वदेशभक्तीची ज्योत प्रज्वलित होऊन, घरची गरिबी असतांही, स्वार्थत्याग करून देशसेवा करण्याचा त्यांनीं निश्चय केला. ते १८८४सालीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीस जाऊन मिळाले. १८८४ पासून १९०२ पर्यंत ते डे.ए. सोसायटीचे सभासद होते. १८८५ सालीं **फर्ग्युसन कॉलेज** स्थापन झाल्यानंतर, त्यांत ते इंग्रजीचे प्रोफसर झाले. इंग्लिश, गणित, इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचे ते अध्यापक होते. विशेषें-करून इतिहास व अर्थशास्त्र या विषयांवरील त्यांचीं व्याख्यानें अप्रतीम होतीं. हिंदुस्थानास लागू पडणारा अर्थशास्त्राच्या तत्त्वाचा अनुवाद ते फार मार्मिक व फार कुशाग्रबुद्धीनें करीत असत, हें त्यांच्या विद्यार्थ्यांस महशूर आहे. शिवाय सोसायटींत असतांना अनेक प्रकारच्या अडचणींस तोंड देऊन, सोसायटीची सांपत्तिक स्थिति सुधारण्याच्या कामीं व सोसायटीच्या वाढत्या संस्थांस स्थैर्य आणण्याचे कामीं त्यांनीं अतोनात प्रयत्न केले. तसेंच सोसायटींत असतांना व सोसायटीचा कायदेशीर संबंध संपून पेन्शन घेतल्यानंतर पुष्कळ आणीबाणीच्या व सोसायटीच्या घटनेंत क्रांति उत्पन्न करणाऱ्या संकटसमयीं आपल्या सल्ल्यानें, वजनानें, धोरणानें व मुत्सद्देगिरीनें त्यांनीं सोसायटीवर आलेल्या अरिष्टांचें निवारण केलें. अनन्यसदृश अशा योग्यतेस फर्ग्युसन कॉलेजास ज्या पुरुषांनीं आपल्या परिश्रमानें आजकाल आणलें आहे त्यांमध्यें गोपाळरावजींसच प्रमुख स्थान द्यावें लागेल. हिंदुस्थानांतील लोकांच्या कर्तबगारीबद्दल व स्वार्थत्यागाबद्दल अत्यंत उज्ज्वल असें उदाहरण म्हणजे डे. ए. सोसायटी हेंच होय. व हीच गोष्ट 'पब्लिक सर्व्हिस कमिशन'च्या नुकतीच निदर्शनास आली आहे. ना. परांजपे यांच्यासारख्या शिक्षणाच्या बाबतींत नैपुण्य संपादन केलेल्या गृहस्थास जें मत अधिकारानें देतां आलें,जो पुरावा कमिशनपुढें मांडतां आला, व जी ओजस्विता प्रकट करतां आली, त्या सर्वांचें रहस्यही कमिशनर गोपाळराव व साक्षीदार ना. परांजपे यांचेमधील गुरुशिष्यसंबंध हेंच होय.

१९०५ सालीं गोपाळरावजींनीं सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी ही संस्था स्थापन केली. उत्क्रांतीच्या दृष्टीनें ही संस्था डे. ए. सोसायटीचें परिणत फळ होय. वीस वर्षें अध्ययन व अध्यापन यांसारख्या पवित्र कार्यांत तावून सुलाखून निघाल्यानंतरच परिपक्व झालेल्या बुद्धीस देशकार्याच्या सर्वव्यापक व भारदस्त स्वरूपाची जबाबदारी घेण्यास निःसंशय पात्रता येते. विद्वत्ता व अनुभव यांच्या जोडीमुळें देशकार्य करण्याची कुवतही निर्विवाद वाढते. या दृष्टीनें विचार करतांही डे. ए. सोसायटी व सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी यांतील कार्यकारणसंबंध मननीय आहे, व गोपाळरावजींचें उदाहरण डे. ए. सोसायटींतील मंडळीकडून गिरविलें जाईल याबद्दल आम्हांस भरंवसा आहे.

१८८७ मध्यें गोपाळरावजी **सार्वजनिक सभेचे** सेक्रेटरी झाले. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचें संपादकत्वही त्यांस मिळालें. गोपाळरावांचें वय यावेळीं अवघें २१ वर्षांचें होतें. 'सार्वजनिक सभा' ही संस्था त्यावेळीं खऱ्या राजकीय ज्ञानाची अधिष्ठात्री होती. हिंदुस्थानांतील अत्यंत देदीप्यमान ज्ञानरवीच्या प्रकाशानें सार्वजनिक सभेचीं किरणें सर्व हिंदुस्थानास प्रकाशमान करीत असत. न्यायमूर्ति **रानडे** यांच्या प्रगल्भ, उदात्त व विशाल बुद्धिमत्तेमुळें व त्यांच्या नेतृत्वाखालीं सार्वजनिक सभेचा व तिच्या त्रैमासिकाचा सर्वत्र बोलबाला होता. प्रत्येक राजकीय प्रश्नाबद्दल साधकबाधक व सप्रमाण विचार करून तो राजकर्त्यांपुढें ठेवणें व लोकांमध्यें राजकीय जागृति उत्पन्न करणें, हा क्रम सार्वजनिक सभेनें चालविला होता. सार्वजनिक सभेच्या कोणत्याही म्हणण्यास त्या काळच्या परिस्थितींतही सत्ताधारी वर्ग फार मान देत असे. या कारणामुळेंच सार्वजनिक सभेच्या सेक्रेटरीचा मिळालेला मान गोपाळरावांच्या आयुष्यांत फार महत्त्वाचा होता.गोपाळरावांच्या भावी उत्कर्षाचा हा पायाच होय. या वेळेपासून न्यायमूर्तीच्या निधनापर्यंत, म्हणजे सुमारें १५ वर्षें, गोपाळरावजींनीं माधवरावांजवळ शिष्यवृत्तीनें राहून मिळालेल्या ज्ञानाचा संग्रह केला. त्यांची दुराराध्य मर्जी सुप्रसन्न करून घेण्याची अहर्निश खटपट केली. त्यांची खडतर, सेवावृत्ति ममत्वानें, भक्तीनें, उत्साहानें, झटून केली. शेंकडो मेमोरियलें, अर्ज व अर्जांचे मसुदे लिहून दाखविले. राजनीतिशास्त्रावरील पुष्कळ ग्रंथांचें परिशीलन केलें, सरकारी रिपोर्टांचें

रहस्य समजून घेतलें. हिंदुस्थानच्या उन्नतीच्या मार्गाचें खरें ज्ञान संपादन केलें. भावी उन्नतीच्या सर्व-व्यापक स्वरूपाची कल्पना करून घेतली. उद्योग-क्षमता, सहनशीलता, विनय व निस्सीम देशभक्ति यांचा कित्ता गिरविला. अशा तयारीनें व दीर्घपरि-श्रमानें व स्वतःच्या स्वार्थत्यागासारख्या अलौकिक गुणामुळें या सत्‌शिष्याची योग्यता या सद्‌गुरूहूनही वाढली यांत नवल तें काय ?

१८९० सालीं गोपाळराव सार्वजनिक कामांत पुढाकार घेऊं लागले. राष्ट्रीय सभा व प्रांतिक सभा यांमध्यें ते भारदस्त भाषण करूं लागले. चाणाक्ष लोकांनीं तेव्हांपासूनच ते फार थोर पुरुष होतील असा कयास केला. Rising Star of the Deccan असें त्यांस म्हणूं लागले.याच सुमारास त्यांनीं प्रि. आगरकर यांच्या समवेत'सुधारक' पत्राच्या इंग्रजी शाखेचें संपादकत्व स्वीकारलें. सुमारें ४ वर्षे मुंबईच्या प्रांतिक सभेचे ते सेक्रेटरी होते. १८९५ सालीं पुण्यास भरलेल्या **राष्ट्रीय सभे**चेही ते सेक्रेटरी होते. १८९७ सालीं वेल्बी कमिशनपुढें हिंदुस्थानच्या वतीनें गेलेल्या प्रतिनिधींपैकीं ते एक होते. त्यांची साक्ष हिंदुस्थानच्या वतीनें झालेल्या सर्व साक्षींत महत्त्वाची आहे. उलट तपासाचे वेळीं, कसोशीनें विचारलेल्या प्रश्नांस त्यांनीं जीं समयसूचक, मार्मिक व बाकबगार उत्तरें दिलीं त्यांवरून हिंदुस्थानच्या परिस्थितीचें त्यांचें अवलोकन किती सूक्ष्म, किती विशाल व किती बिनचूक होतें हें सर्वांच्या निदर्शनास आलें. या साक्षीच्या योगानें गोपाळरावांची बढती प्रांतिक पुढाऱ्यांतून राष्ट्रीय पुढाऱ्यांत झाली.

गोपाळराव यावेळीं इंग्लंडांत असतांना पुण्यास प्लेगचा आजार उत्पन्न झाला. प्लेगचें निर्मूलन करण्याकरितां सेग्रिगेशन, डिस्‌इन्फेक्शन वगैरे जे उपाय अमलांत आले व ते ज्या माणसांकडून करविले त्यांबद्दल—ह्मणजे सोल्जर लोकांबद्दल-फारच गवगवा झाला.पुष्कळ लोकांना त्रास सोसावा लागला.अनेक अनन्वित कृत्यांचे त्यांजवर आरोप करण्यांत आले. प्लेगनें त्रासलेलें लोकमत फारच प्रक्षुब्ध झालें. इकडे झालेल्या दुःखांची कहाणी पत्रद्वारें गोपाळरावांस कळविण्यांत आली होती. लोकांस झालेल्या दुःखाचें निवारण व्हावें या हेतूनें गोपाळरावांनीं ती हकीकत इंग्लंडांत प्रसिद्ध केली. या योगानें इंग्लंडांत चळवळ उडून गेली. इंग्लंडहून गोपाळराव स्वदेशांत पाय ठेवतात तोंच त्यांस या आरोपाचें समर्थन करण्याकरितां आव्हान करण्यांत आलें. परंतु हें समर्थन करणें अशक्य असें दिसून आल्यावरून गोपाळरावांनीं आपलीं विधानें मागें घेतलीं व झालेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली. पुष्कळ वर्तमानपत्रकारांनीं गोपाळरावांनीं मागितलेल्या माफीबद्दल तिरस्कारबुद्धीनें त्यांची हेटाळणी केली.या प्रसंगामुळें गोपाळरावांस अत्यंत दुःख झालें. कमिशनच्या उत्कृष्ट कामगिरीमुळें सर्वत्र जयजयकार होऊन उल्हासानें स्वदेशीं पाय ठेवतात तोंच या ओढवलेल्या अपमानास्पद प्रसंगामुळें गोपाळरावांचा फार तेजोभंग झाला.त्यांच्या सरळ, निष्कपट व कोमल अंतःकरणावर या गोष्टीमुळें इतका धक्का बसला कीं या प्रसंगाचें विस्मरण त्यांस आजन्म झालें नाहीं. आपल्यासंबंधीं झालेली टीका अगदीं अवास्तव व गैरशिस्त होती अशी त्यांची पूर्ण खात्री होती. या प्रसंगीं त्यांस भेटण्यास गेल्यावेळीं त्यांनीं एका प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्दयाची गोष्ट सांगितली. आपल्या स्वतःच्या देशबांधवांनीं अशाच एका प्रसंगीं असमंजसपणानें केलेल्या टीकेबद्दल या मुत्सद्दयानें 'Forgive I must, forget I cannot' असे उद्गार काढले होते. गोपाळरावांनींही याच मार्गाचें अवलंबन केलें. वस्तुतः गोपाळरावांनीं केलेले आरोप जर समर्थन करतां येण्यासारखे नव्हते तर ते परत घेण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नव्हता.ज्या लोकांविरुद्ध आरोप केले होते त्यांचीच माफी मागणें सर्वस्वीं न्याय्य व जरूर होतें. माफीच जर मागावयाची तर ती प्रामाणिकपणाची व संपूर्ण अशीच असली पाहिजे. त्यांत अंगचोरपणा करणें म्हणजे आपला हेतु प्रामाणिक नसून आपली इच्छाही माफी मागण्याची नाहीं असें स्पष्ट दर्शविणें होय. कोणाही सरळ मनाच्या मनुष्यास अर्धवट माफी मागणारा माणूस तिरस्करणीय वाटेल याबद्दल शंका नाहीं. कित्येक लोकांच्या मतें माफी मागावयाचीच तर ती शक्य तितक्या मतलबानें मागावी; व यालाच वस्तादगिरी म्हणण्याचा प्रघात आहे. परंतु स्पष्ट शब्दांनीं बोलावयाचें झाल्यास ही समजूत अगदीं कोडगेपणाचीच मानली पाहिजे. गोपा-

ळरावांवर निंद्य टीकेचा वर्षाव करणाऱ्या लोकांच्या मानापमानाच्या कल्पना अगदीं कोत्या होत्या असें म्हणावें लागतें. माफीची कल्पना इंग्लिश समाजांत अगदीं रूढ झालेली आहे. एकाद्या मनुष्याचा आपल्या हातून अपमान झाल्यास त्याची माफी मागणें हा इंग्लिश समाजांत अत्यंत शिष्ट सांप्रदाय मानला जातो. माफी मागण्यांत कोणताही कमीपणा नसून हें कृत्य अगदीं संभावितपणाचें आहे असें मानलें जातें. उलटपक्षीं आमच्या समाजांत ह्या कल्पना इतक्या अंगवळणीं पडलेल्या दिसत नाहींत. या प्रकरणामुळें अनेक फायदे झाले. गोपाळरावांची इभ्रत या कृत्यामुळें इंग्लिश समाजांत अतिशय वाढली. गोपाळरावांच्या शत्रूंनाहीं गोपाळराव हे उदारमनस्क प्रतिस्पर्धी आहेत असें वाटूं लागलें.

" Unpleasant as the episode was, it served to bring out the true gentle man in Mr. Gokhale and showed that in his hands the honour of his political opponents was as safe as his own. "

असें एका गृहस्थानें केलेलें विधान पूर्णपणें प्रत्ययास आलें. कोणतेंही विधान करतांना पुष्कळ सावधगिरी बाळगावी लागते, हा धडा गोपाळरावांस या प्रसंगानें मिळाला. गोपाळरावांस वकिलीच्या धंद्याचें ज्ञान नव्हतें. विशिष्ट शिक्षणामुळें व नित्यपरिपाठामुळें वकिलीच्या धंद्यांतील लोकांस आपल्या बाजूचें समर्थन व दुसऱ्यांचें दोषाविष्करण उत्तम प्रकारें करतां येतें व कोणतेंही विधान करतांना पुष्कळ मर्यादांनीं त्याची व्याप्ति संकुचित करण्याची संवय लागते. या धंद्याशीं अनभिज्ञ लोकांना आपल्या मतानें योग्य व सदसद्विवेकबुद्धीला संमत असलेली गोष्ट न्याय्य व सर्वसंमत होईल असें वाटत असतें.कायद्याचें अनुमान सकृद्दर्शनीं सात्विक प्रवृत्तीचें आहे. परंतु व्यवहारांतील अनुभव पदोपदीं याच्या अगदीं उलट येतो. मनुष्यस्वभावाच्या हीन परिस्थितीचा प्रत्यय नित्य पदोपदीं येत असल्यामुळें गोपाळरावांचेकडून झालेली चूक–ते वकील असते तर–त्यांचकडून कधींही झाली नसती, व त्यांना आपलीं विधानें परत घेण्याचा प्रसंग कधींही आला नसता. परंतु या प्रसंगानें गोपाळरावांच्या शिक्षणांत राहिलेली ही उणीव संपूर्णपणें भरून आली. गोपाळरावांचे हातून यानंतर अवास्तव किंवा बेजबाबदार विधान कधींही करण्यांत आलें नाहीं. इतकेंच नव्हे तर, त्यांनीं केलेल्या विधानाबद्दल त्यांच्या पुढील सर्व आयुष्यक्रमांत सत्ताधारी प्रतिपक्षांनीं सुद्धां कोणतीही शंका प्रकट केली नाहीं. तसेंच कोणत्याही बाबतींत टीका करतांना प्रतिपक्ष्याचे हेतु व प्रतिपक्ष्याच्या अडचणी यांची जाणीव ते सदैव आपल्या डोळ्यापुढें ठेवूं लागले. गोपाळरावांस जो लोकोत्तर मान यापुढें मिळाला त्याच्या रहस्यांपैकीं या प्रकरणाचा अनुभव हें एक महत्त्वाचें कारण होतें. एकाद्या सामान्य गोष्टीपासून थोर पुरुषांच्या आयुष्यक्रमास निराळें वळण लागतें असा सिद्धांत आहे. ह्याच अनुभव गोपाळरावांच्या संबंधानेंही या बाबतींत प्रत्ययास आला. आणखी एक लाभ या प्रकरणापासून जो झाला तो गोपाळरावांच्या मनाच्या थोरपणाच्या कसोटीचा होय. ज्या लोकांच्या पत्रांवरून गोपाळरावांस तोंडघशीं पडावें लागलें त्या लोकांवर कोणतीही जबाबदारी न ढकलतां सर्व दोषाचा भार गोपाळरावांनीं आपल्या एकट्यावरच घेतला. आपल्या उच्चारानें किंवा आचरणानें त्यांनीं या लोकांस तिळमात्रही दुखविलें नाहीं. १८९७ पासून १९०० पर्यंत गोपाळरावांनीं आपला काल, सार्वजनिकदृष्ट्या, अज्ञातवासांत घालविला. या प्रकरणामुळें त्यांच्या कोमल व अव्याजमनोहर स्वभावावर इतकी खिन्नता आली होती कीं, त्यांच्याबद्दल अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्यास पराकाष्ठेचा खेद होत असे. परंतु गोपाळरावांचें वर्तन उदात्त व सात्विक मनोवृत्तीनें प्रेरित झालें असल्यामुळें त्यांच्या पुढील आयुष्यक्रमांत या गोष्टीची आठवणही उरली नाहीं; व त्यांच्या उज्ज्वल कीर्तीस यामुळें यत्किंचितही कमीपणा आला नाहीं. व यावरूनच गोपाळराव व त्यांचे असमंजस टीकाकार यांपैकीं कोणाचें करणें योग्य व न्यायाचें होतें हें निश्चयानें ओळखतां येण्यासारखें आहे.

१९००सालीं गोपाळराव मुंबईच्या प्रांतिक कायदेकौंसिलाचे सभासद झाले. प्लेगसंबंधीं चवकशीकरितां नेमलेल्या कमिशनचे त्यांस सभासद नेमण्यांत आलें.

१९०२ सालीं त्यांना वरिष्ठ कायदे—कौन्सिलचे सभासद निवडण्यांतआलें. याच सालीं डे. ए.सोसायटींतील आपल्या नोकरीचीं वर्षें पुरीं करून त्यांनीं पेन्शन घेतलें. गोपाळरावजींचे गुरु कै. न्या. रानडे हे १९०१ सालीं निवर्तले. त्यांच्या स्मारकाबद्दलही चळवळ गोपाळरावांनीं फार आस्थेनें व कळकळीनें चालू केली. गोपाळरावजींच्या प्रयत्नास यश येऊन 'रानडे इकॉनामिकल इन्स्टिटयूट' ही संस्था गोपाळरावजींनीं अस्तित्वांत आणली. आपण स्थापलेल्या 'सर्व्हंट ऑफ् इंडिया सोसायटी'च्या अगदीं पुरोभागीं गोपाळरावजींच्या गुरूचें स्मारक प्रामुख्यानें झळकत आहे. पुणें येथील शहर मुनिसिपालिटीचे लोकनियुक्त अध्यक्ष ते सुमारें चार वर्षें होते. १९०२ सालापासून ते अगदीं निधनापर्यंत गोपाळराव वरिष्ट कायदे-कौन्सिलचे सभासद होते. वरिष्ट कायदेकौन्सिलांत त्यांचें पहिलें भाषण १९०२ च्या मार्चांत झालें. त्यावेळीं लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानचे व्हॉइसराय होते. हिंदुस्थानच्या सत्ताधारी वर्गांत आपण अल्पवयी म्हणजे अवघे ४३ वर्षांचे आहों, असा त्यांना अभिमान वाटत असे. परंतु लोकपक्षाच्या वतीनें कर्झन साहेबांशीं सामना करणारे गोपाळरावही अवघे ३६ वर्षांचे होते. अधिकारानें धुंद व प्रतिकूल टीका करणाराबद्दल अनुदार अशा लॉर्ड कर्झन साहेबांवर सुद्धां गोपाळरावांच्या विद्वत्तेची, विनयाची, वक्तृत्वाची, भारदस्तपणाची व मार्मिक टीकेची इतकी छाप पडली कीं १९०४ सालीं त्यांस सी. आय्. ई. हा बहुमानाचा किताब खुद्द कर्झन साहेबांनीं अर्पण केला. व याप्रसंगीं गुणग्राहक असें स्वदस्तुरचें पत्र लिहून त्यांनीं गोपाळरावांचें अभिनंदन केलें. १९०५ सालीं गोपाळरावांनीं सर्व्हंट ऑफ् इंडिया सोसायटी स्थापन केली. कर्झन साहेबांच्या बेपर्वाईच्या व दडपशाहीच्या धोरणामुळें लोकमत अत्यंत क्षुब्ध झालें होतें. बंगालच्या फाळणीमुळें व यासंबंधीं झालेल्या लोकमताच्या पायमल्लीमुळें हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणेची आवश्यकता तीव्रपणें भासूं लागली. हिंदुस्थानच्या लोकमताचा राज्यकारभारावर यत्किंचित्‌ही ताबा नाहीं व राजदरबारांत लोकमतास यत्किंचित्‌ही मान नाहीं अशी स्थिति पदोपदीं अनुभवास येऊं लागली. इंग्लंडच्या उदारमनस्क लोकमतापुढें ही स्थिती मांडून कांहीं तरी तरणोपाय काढावा या हेतूनें १९०५ सालीं गोपाळराव इंग्लंडास गेले. यावेळीं बालफर साहेबांच्या प्रधानमंडळाची सत्ता अगदीं संपुष्टांत आली होती. जनरल इलेक्शन होऊन लवकरच अधिकारक्रांति होईल असा संभव दिसत होता. हिंदुस्थानाबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्यांच्या साहाय्यानें सुमारें दोन महिने हिंदुस्थानचीं गाऱ्हाणीं ब्रिटिश प्रजाजनांपुढें मांडण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. यावेळीं लाला लजपतराय हेही गोपाळरावांचेबरोबर इंग्लंडांत गेले होते. स्वदेशीं परत आल्यावर इंग्लंडांतलि कामागिरीबद्दल गोपाळरावांचें फारच अभिनंदन करण्यांत आलें. पुण्यामध्यें प्रचंड जाहिरसभेच्या द्वारें डॉक्टर देशमुख यांचे अध्यक्षतेखालीं गोपाळरावांबद्दल आदर व्यक्त करण्यांत आला. याच सालीं हिंदुस्थानांतील पुढाऱ्यास मिळणारा अत्यंत श्रेष्ठ प्रतीचा मान-म्हणजे राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान-गोपाळरावांस देण्यांत आला.भागीरथीच्या पवित्र तीरावर, काशीसारख्या पुण्य क्षेत्रांत, गोपाळरावांसारख्या सात्विक व महान् देशभक्ताच्या अध्यक्षतेखालीं भरलेली **राष्ट्रीय सभे**ची बैठक फारच अवर्णनीय होती. राजकीय प्रगतीचें अंतिम साध्य याच बैठकींत स्पष्टपणें नमूद करण्यांत आलें. या वेळचें गोपाळरावांचें भाषण फारच जोरदार व उत्साहजनक असून कर्झन साहेबांच्या राज्यकारभाराचें दोषाविष्कारण त्यांत स्पष्टपणें केलें होतें.

१९०६ सालीं लॉर्ड मिंटो साहेबांची कारकीर्द चालू झाली. लॉर्ड मोर्ले साहेबांनीं हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें धारण केलीं. बंगालच्या फाळणीचे दुष्परिणाम फारच स्पष्टपणें भासूं लागले. सर ब्यांफील्ड फुलर यांनीं लोकमताचा उपमर्द करण्याचा कडेलोट केला. लिबरल-पक्ष अधिकारारूढ झाल्यामुळें १९०६ सालीं गोपाळरावांस पुनः इंग्लंडांत जावें लागलें. यावेळीं त्यांनीं सार्वजनिक भाषणें फारशीं न करतां मंत्रिमंडळाच्या मुलाखती घेतल्या. मोर्ले साहेबांची भेट घेतली. पुष्कळ मुत्सद्दी लोकांस हिंदुस्थानच्या परिस्थितीचें ज्ञान करून दिलें व कौन्सिलच्या सुधारणेची आवश्यकता स्पष्ट करून सांगितली. फुलर साहेबांच्या कृत्यांचा

ब्रिटिशजनतेपुढें त्यांनीं तीव्रपणें निषेध केला. फुलर साहेबांस स्वदेशीं जाणें भाग पडलें. गोपाळराव आपली कामगिरी संपवून १९०६ च्या अखेरीस परत स्वदेशीं आले. हिंदुस्थानांत परत आल्यानंतर फाळणीच्या नैराश्यामुळें सनदशीर चळवळींवरील लोकांचा विश्वास नाहींसा झाला होता. 'सेडिशस मीटिंग्स बिल'सारखे दडपशाहीचे कायदे प्रक्षुब्ध लोकमतास आळा घालण्याकरितां सत्ताधारी वर्ग करीत होते. दडपशाही व क्रांतिकारक चळवळ ही क्रिया व प्रतिक्रिया याप्रमाणें जोरानेंच वाढूं लागली. या वेळीं राजकीय परिस्थितीचें योग्य निदान करून शक्याशक्य साध्यसाधनांबद्दल लोकांत खऱ्या कल्पनांचा प्रसार करण्याकरितां उत्तरहिंदुस्थानांत व्याख्यानांची मोहीम गोपाळरावांनीं १९०७ सालीं सुरू केली. अलाहाबाद, लखनौ, दिल्ली, लाहोर, अमृतसर, अलीगड या प्रमुख शहरांत प्रचंड जाहीरसभा भरल्या. हत्तींवरून मिरवणुकी निघाल्या. अनभिषिक्त मान्यांना मिळणारा सर्व मान गोपाळरावजींस मिळाला. वरिष्ठ कायदेकौन्सिलांत गोपाळरावांनीं लॉर्ड मिंटो यांस लोकांचें सांत्वन करण्याबद्दल फार कळकळीची विनंती केली. दडपशाहीच्या धोरणामुळें राजकीय चळवळ करणाऱ्या देशांतील पुढाऱ्यांमध्यें तीव्र मतभेद उत्पन्न झाले. या पक्षभेदाची मजल इतकी दूरवर गेली कीं, सुरत येथें सर्व देशाला प्रिय झालेल्या राष्ट्रीय सभेचा विध्वंस झाला. लॉर्ड मोर्ले साहेबांनीं अधिकारसूत्रें धारण केल्यानंतर हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत लोकमताला अवसर द्यावा या हेतूनें सुधारणेची योजना तयार करण्यास सुरवात केली. राज्यव्यवस्थेंतील अगदीं पायाचे घटक म्हणजे म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें यांना स्वातंत्र्य देण्याकरितां एकतंत्री सत्ताधारी वर्गाची अधिकारविभागणी करण्याकरितां एक कमिशन (Decentralisation Commission) नेमलें. गोपाळरावांनीं या कमिशनपुढें दिलेला पुरावा अत्यंत महत्त्वाचा असून त्याचें स्वरूप अगदीं नवीन प्रकारचें आहे. हिंदुस्थानच्या प्रगतीचा काळजीपूर्वक विचार करणाऱ्या मनुष्यानें तो मनन करण्यासारखा आहे. सुधारणेच्या योजनेचा विचार लॉर्ड मोर्ले करीत होते. अशावेळीं हिंदुस्थानच्या लोकांची बाजू स्टेट सेक्रेटरीपुढें चांगल्या रीतीनें मांडली जावी व हें काम गोपाळरावजींखेरीज दुसऱ्या कोणाचेही हातून योग्य प्रकारें बजावलें जाणार नाहीं म्हणून त्यांस इंग्लंडास जाण्याबद्दल इंग्लंडांतील कांहीं हितचिंतक व खुद्द लॉर्ड मिंटो यांनीं आग्रह केला. इंग्लंडांत १९०८ सालीं जाऊन सुधारणेच्या योजनेबद्दल हिंदुस्थानची शक्य ती बाजू गोपाळरावांनीं लॉर्ड मोर्ले यांचेपुढें मांडली. १९०८ च्या अखेरीस ते इंग्लंडाहून परत आले. मोर्ले साहेबांच्या सुधारणाही याचवेळीं प्रसिद्ध झाल्या. १९०९ च्या प्रारंभीं त्यांस अमेरिकेमध्यें एका सर्वमान्य संस्थेकडून व्याख्यानें देण्याबद्दल आमंत्रण करण्यांत आलें होतें; परंतु सुधारणेच्या योजनेस अनुसरून कानू करण्याचें काम त्यावेळीं वरिष्ठ कायदेकौन्सिलपुढें यावयाचें असल्यामुळें त्यांना ही विनंती मान्य करतां आली नाहीं. १९०९ सालीं क्रांतिकारक चळवळीस फार भयंकर स्वरूप प्राप्त झालें. शांतता राखण्याचे कामीं सहकारितेनें सरकारास मदत करण्याचा गोपाळरावांनीं प्रयत्न केला. १९१० सालीं लोकांच्या अज्ञानाचा निरास करण्याकरितां प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व मोफत करावें अशी त्यांनीं चळवळ सुरू केली. याच वेळीं साउथ आफ्रिकेमध्यें येथील वसाहत करून राहणाऱ्या लोकांच्या विरुद्ध फार अन्यायाचे कायदे तेथील सरकारकडून होत असून त्यांची अम्मलबजावणीही फार कठोरपणानें होत होती. साउथ आफ्रिकेंतील सरकारच्या या धोरणास आळा घालण्याकरितां नाताळांत मुदतबंदीनें मजूर पाठविण्याचें बंद करावें असें त्यांनीं सरकारास सुचविलें, व हें त्यांचें म्हणणें सरकारानें मान्यही केलें. १९११ सालीं 'युनिव्हर्सल रेसिस कांग्रेस' या सभेपुढें गोपाळरावांचा एक निबंध वाचण्यांत आला. पूर्व व पाश्चात्य संस्कृति व तदनुरोधानें हल्लींच्या परिस्थितींत शिकण्यासारख्या गोष्टी यांचें विवेचन फार हृदयंगमपणें गोपाळरावांनीं या निबंधांत केलें आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याबद्दल त्यांनीं एक बिल १९११ सालीं वरिष्ठ कायदेकौन्सिलपुढें मांडलें, व मद्रास येथील लोकांनीं आग्रहानें विनंती केल्यावरून त्यांस तिकडे जावें लागलें. तरुण पिढीला उद्देशून त्यांनीं फार मुद्देसूद व्याख्यानें दिलीं. न्या. रानड्यांच्या स्मारकार्थ उभारलेल्या मैलापूर येथील लायब्ररीचा अनावरण समारंभ त्यांच्या हस्त झाला. व या

वर्षी त्यांनीं सर्व देशभर 'एज्युकेशन लीग्ज' स्थापण्याचे प्रयत्न केले. १९१२सालीं एज्युकेशन बिल वादविवादास येऊन तें नामंजूर करण्यांत आलें. याचवेळीं साउथ आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा प्रश्न दिवसेंदिवस कठीण होत चालला. तेथील स्थिति अत्यंत अपमानास्पद व असह्य होऊं लागली. या बाबतींत इंग्लंडांतील मुत्सद्यांशीं वाटाघाट करून कांहीं तरी तडजोड घडवून आणण्याच्या इच्छेनें गोपाळराव इंग्लंडास गेले, व साऊथ आफ्रिकेंत स्वतः जाण्याचें त्यांनीं ठरविलें. साऊथ आफ्रिकेंतील सरकारकडून इतर हिंदी लोकांप्रमाणें गोपाळरावजींचा अपमान होईल एवढ्यासाठीं त्यांस दक्षिण आफ्रिकेस न जाण्यासाठीं पुष्कळ सद्गृहस्थांनीं विनंती केली; त्यामध्यें लॉर्ड मिंटो हेही होते. परंतु गोपाळरावांचा निर्धार पाहून त्यांचा नाइलाज झाला. साउथ आफ्रिकेस जाण्याचा गोपाळरावांनीं निश्चय केल्यापासून त्यांना सन्मानानें वागविण्यांत यावें याबद्दल खुद्द हिंदुस्थान सरकारकडून व कलोनिअल ऑफिसकडून तजवीज करण्यांत आली होती. साउथ आफ्रिकेंत गोपाळरावांचा झालेला सन्मान अश्रुतपूर्व होता. हिंदुस्थानच्या बाहेर अशाप्रकारचा सन्मान आजपर्यंत साम्राज्यांत कोणालाही मिळालेला नाहीं. परमुलखांतील परराष्ट्राच्या एखाद्या वकीलाप्रमाणें (ambassador) किंवा प्रधानाप्रमाणें गोपाळरावांचा झालेला सत्कार वाचून साम्राज्यांतील प्रत्येक हिंदी मनुष्यास धन्यता वाटली. हिंदी नांवास साम्राज्यामध्यें जें अपमानास्पद स्वरूप आजपर्यंत मिळालें होतें तें या प्रसंगीं तरी नाहींसें झालें. स्वतंत्र राष्ट्रांच्या पुढाऱ्याप्रमाणें या दास्यत्वांतील राष्ट्रांतील एका प्रजाजनास समतेनें, आदरानें व प्रतिष्ठेनें वागविण्यांत आलें, याबद्दल हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्यास कौतुक वाटलें. राष्ट्रीय पुढाऱ्यांतून साम्राज्यांतील पुढाऱ्यांत गोपाळरावांची बढती झाली. हिंदी नांवाचा व मातृभूमीचा या प्रसंगानें उद्धार झाला. याच सालीं गोपाळरावजींची 'पब्लिक सर्व्हिस कमिशन'मध्यें नेमणूक करण्यांत आली.

१९१३ सालीं पब्लिक सर्व्हिस कमिशनचें काम चालू झालें. साऊथ आफ्रिकेंतील लढा अगदीं निकरास आला. सत्याग्रहाच्या चळवळीस पुन्हां प्रारंभ झाला. देशभक्त गांधी यांस मदत करण्याकरितां मोठा फंड उभारण्याचें गोपाळरावांनीं ठरविलें. पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामाचा बोजा गोपाळरावजींवर फारच पडला. कमिशन चालल्यावेळीं लेखी आलेलीं उत्तरें त्यांस साद्यंत वाचून पाहवीं लागत. साक्षीदारांकडून जी अनुकूल माहिती काढावयाची तिच्याबद्दल त्यांस पुष्कळ परिश्रम करावे लागत. युरोपियन व सरकारी नोकरींतील साक्षीदार विशिष्ट कलानेंच साक्षीस येत. त्यांच्यापासून अनुकूल उत्तरें काढणें हें किती त्रासाचें काम होतें हें साक्षीदारांच्या उलट तपासणीवरून सहज दिसून येणार आहे. कमिशनच्या रचनेमध्यें हिंदुस्थानच्या वतीचे तीनच सभासद आहेत, परंतु हिंदुस्थानची बाजू संभाळण्याचें काम कमिशनच्या सुरवातीस बरेच दिवस एकट्या गोपाळरावजींवरच पडलें होतें. कमिशनच्या प्रारंभींच्या बैठकीस एतद्देशीय सभासदांचा कल कसा होता व त्यांनीं विचारलेले प्रश्न कोणत्या स्वरुपाचे होते, यावरून आमच्या म्हणण्याची सत्यता दिसून येईल. कमिशनमध्यें काम करीत असतांना अवघी चार तास सुद्धां विश्रांति त्यांस मिळत नसे. पहांटे दोन वाजतां उठून दुसरे दिवशीं होणाऱ्या साक्षीदारांचा सर्व लेखी पुरावा त्यांस वाचावा लागे. सकाळीं आठ वाजेपर्यंत हें काम चाले. सुमारें साडेदाहा वाजतां कमिशनचे कामास सुरवात होई व तें पांच वाजेपर्यंत चाले. यानंतर प्रत्येक ठिकाणीं पुष्कळ लोक भेटावयास येत. रात्रीचे वेळीं बहुतेक युरोपियन किंवा नेटीव थोर गृहस्थांच्या घरीं मेजवानीस जावें लागे. हे प्रसंग टाळण्यासारखे नव्हते. कारण याप्रसंगीं पुष्कळ लोकांच्या मुलाखती खासगी स्वरूपानें होऊन कमिशनच्या कामाबद्दल वाटाघाट करण्यास व लोकमत समजून घेण्यास फार मदत होई. याप्रमाणें बहुतेक प्रत्येक दिवशीं रात्रीचे ११ वाजेपर्यंत त्यांचा कार्यक्रम होता. मधुमेहाच्या विकारानें आधींच निःशक्त झालेल्या शरीरावर या कामाचा फारच ताण पडला, व कमिशनाची बैठक दिल्लीस येईपावेतों ते अगदीं थकून गेले. कमिशन मद्रासेस असतांना सरकारी अधिकाऱ्यांची सामान्य विधानांच्या योगानें उलट तपासणींत फारच गाळण

उडाली. याचा प्रतिकार करण्याकरितां कलकत्त्यास अधिकारि–वर्गानें बरीच तयारी केली होती व एतद्देशीय लोकांच्या नालायकीचीं उदाहरणें गोळा करून आपली बाजू समर्थन करण्याचा त्यांनीं मोठा प्रयत्न केला होता. परंतु गोपाळरावजींनीं बंगाल्यांतील सर्व एतद्देशीय सिव्हिल सर्व्हिसमधील अधिकाऱ्यांचा इतिहास साग्र मिळविला होता; व प्रतिपक्षाचें कोणतेंही विधान खोडून काढण्याची त्यांनीं तयारी केली होती.

गोपाळरावजींस पुष्कळ परिश्रम करून माहिती मिळवावी लागली; व ती थोडक्या अवधींत मिळवावयाची असल्यामुळें त्यांस फार मानसिक श्रम पडले. कलकत्त्यास पहिली महत्त्वाची साक्ष जस्टिस कार्नेडुफ् यांची झाली, व त्यांच्या उलट-तपासांत सरकारची बाजू लंगडी आहे हें गोपाळरावजींनीं स्पष्टपणें व साधार निदर्शनास आणिलें. अशा रीतीनें गोपाळरावजींस फारच परिश्रम करावे लागत. या कामाच्या घाईंतच देशभक्त **गांधी** यांस मदत करण्याकरितां त्यांस हिंडावें लागे, वेळांत वेळ काढून वर्गणी जमविण्याकरितां पुष्कळ गृहस्थांच्या घरीं जावें लागे. या यातायातींतच ते १९१३ च्या फेब्रुवारीमध्यें लाहोरास गेले. वर्गणी जमविण्याकरितां दोन दिवस त्यांनीं अविश्रांत खटपट केली. दोन दिवसांत सुमारें २५ हजार रुपये गोळा केले. ते दिल्लीस परत आले व अजारी पडले. हृदयाचा अजार याच वेळीं त्यांस जडला, व शेवटीं त्यांतच त्यांचा अंत झाला. अजारी असतांनाच ते मे महिन्यामध्यें कमिशनच्या कामासाठीं विलायतेस गेले व ऑक्टोबरमध्यें परत आले. आल्यानंतर पुन्हां साउथ आफ्रिकेसंबंधीं लढा निकराला पोंचला. यावेळेपासून तों सालोमन–कमिशनचा निकाल होईपर्यंत गोपाळरावजींचा व लॉर्ड हार्डिंज यांचा एकसारखा पत्रव्यवहार चालू होता; कित्येक दिवस तर रोज तारायंत्रानें वाटाघाट चालू होती. ही कामगिरी फारच नाजुक व जबाबदारीची असल्यामुळें गोपाळरावांना मानसिक स्वास्थ्य न मिळतां त्यांची प्रकृति ढांसळली. १९१४ चा बहुतेक काळ पब्लिक सर्व्हिस कमिशनचे कामांतच गेला. या वर्षीही त्यांस विलायतेस जावें लागलें. नवंबरच्या अखेरीस ते हिंदुस्थानांत परत आले. त्यांची प्रकृति अगदींच खालावली. डॉक्टरांनीं त्यांस विश्रांति घेण्यास सक्तीनें भाग पाडलें. दिसेंबरपासून ते पुण्यासच राहिले. तथापि येथील राजकीय वादग्रस्त प्रश्नांनीं त्यांस विश्रांति ही मिळालीच नाहीं. मरणाच्यापूर्वी अगदीं तीन दिवस ते या देशाच्या भावी स्थितीबद्दल एक महत्त्वाचा मसुदा तयार करण्यांत गुंतले होते. अशा रीतीनें शारीरिक परिस्थितीची यत्किंचित्‌ही पर्वा न करितां परमेश्वराच्या सत्तेनें मिळालेल्या काळाचा त्यांनीं अखेरपर्यंत देशसेवेकरितां उपयोग केला, व शेवटीं शांतपणानें त्यांनीं इहलोकची यात्रा तारीख १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं संपविली.

वरीलप्रमाणें गोपाळरावजींचें त्रोटक चरित्र आम्हीं वाचकांकरितां दिलें आहे. गोपाळरावजींबद्दल आम्हांस जो अभिमान वाटत आहे तो त्यांच्या अलौकिक मुत्सद्देगिरीबद्दल, निस्सीम देशभक्तीबद्दल, उज्ज्वल स्वार्थत्यागाबद्दल, व्यापक व निर्दोष अशा परिस्थितीच्या अजमावाबद्दल होय. व याच गुणांसंबंधीं त्यांच्या चरित्रांतील ठळक गोष्टींचा आम्ही येथें सविस्तर विचार करणार आहों.

या देशाच्या पुढाऱ्यांमध्यें राजकारणी व मुत्सद्दी असे दोन वर्ग आहेत. देशाच्या स्थितीचा विचार करून हक्कांची जागृती लोकांत उत्पन्न करणें, अन्यायाचें आविष्करण करणें व स्वराज्याच्या हक्कांबद्दल चळवळ चालविणें हींच राजकारणी पुरुषांचीं कामें आहेत. मुत्सद्द्यांस हीं सर्व कामें करावीं लागून, राज्यकर्त्यांशीं सलोख्यानें व सहकारितेनें वागून, राजनीतीच्या सर्व साधनांनीं देशोन्नतीस मूर्त स्वरूप आणून द्यावयाचें असतें. अर्थात् ही कामगिरी अधिक जबाबदारीची, अधिक महत्त्वाची व अधिक उपयुक्ततेची आहे. उत्कृष्ट हिंदी मुत्सद्दी होण्यास अनेक गुण अंगीं असावे लागतात. त्यांपैकीं **पहिला गुण** म्हणजे देशाच्या स्थितीचें व राजनीतिशास्त्राचें यथार्थ ज्ञान होय. राजनीतिशास्त्र (Politics) हें इतर शास्त्रांप्रमाणें स्वतंत्र शास्त्र आहे; त्याची अभ्यासपरंपरा आहे; त्याकरितां विशिष्ट ज्ञान संपादन करणें जरूर आहे. ही कल्पना आपल्या समाजांत रूढ आहे असें दिसत नाहीं. विश्वविद्यालयांतूनही आंकडेशास्त्र (Statistics), जमाबंदी (Finance), राज्यव्यवस्था (Adminis-

tration) इत्यादि विषयांचा अमेरिकन युनिव्हर्सिट्यांप्रमाणें समावेश झालेला नाहीं. अलीकडील अभ्यासक्रमांत राज्यव्यवस्थेच्या संबंधीं एक त्रोटक पुस्तक नेमण्यांत आलें आहे. पाहिजे त्या मनुष्यास राजकारणांतील कोणत्याही प्रश्नाबद्दल मत देतां येतें अशी सामान्यपणें समजूत आहे. वकिली, वैद्यकी, इंजिनिअरिंग वगैरे धंद्यांस विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची जरूर लागते. परंतु पोलिटिशियन बनण्यास किंवा वतर्मानपत्राचे संपादक होण्यास कोणत्याही प्रकारच्या विशिष्ट ज्ञानाची किंवा तयारीची जरूरच भासत नाहीं. अर्थात् राजकारणांत मिरविणाऱ्या अशा लोकांच्या बोलण्यास किंवा लिहिण्यास मुळींच मान मिळत नाहीं यांत आश्चर्य कोणतें ? हिंदुस्थानासंबंधीं कोणत्याही एका विषयाचें अध्ययन करण्यासुद्धां पुष्कळ काळ लागेल. म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, प्रांतिक व वरिष्ठ कायदेकौन्सिलें—यांची उत्पत्ति, वाढ व स्वरूप, जमाखर्चाची पद्धति, finance, बजेटाची मांडणी, होम चार्जिस, सांपत्तिक ऱ्हास (Drain), राष्ट्रीय कर्ज, रेल्वे व पाटबंधारे, जमीनधाऱ्याच्या पद्धति, करांचा बोजा, नाणें व चलनपद्धति, शिक्षणाच्या बाबतींत होणारा खर्च, त्याची वाढ, त्याचें स्वरूप व त्याच्या सर्वांगांचा विचार, सरकारी नोकरींतील देशी व विदेशी लोकांचें प्रमाण, परदेशांतील वसाहतींसंबंधींच्या प्रश्नांची माहिती, शेतकी व शेतकरी वर्गाच्या सांपत्तिक स्थितीचा प्रश्न, मृत्युसंख्येची वाढ, दुष्काळ व त्यासंबंधीं उपाय, दारिद्र्य व सहकारितेची चळवळ,–हे व यांसारख्या राजनीतिशास्त्रांत समावेश होणाऱ्या विषयांचें अध्ययन करण्यास पुष्कळ वेळ खर्चून विशिष्ट ज्ञान संपादन करणें अत्यंत अवश्य आहे. परंतु अशा प्रकारचे लोक आपल्यामध्यें किती आहेत ? तत्त्वज्ञानाप्रमाणेंच हल्लींच्या आपल्या राजनीतिशास्त्राची स्थिति आहे. लक्षावधि लोकांमध्यें फार थोड्या लोकांना हें शास्त्र समजून घेण्याची व यांत सिद्धि मिळविण्याची इच्छा असते. अशा इच्छा असलेल्या मर्यादित लोकांमध्यें या शास्त्राचें रहस्य फारच थोड्या लोकांस कळतें. गोपाळरावांनीं न्या. रानड्यांच्या जवळ एक तपपर्यंत या शास्त्राचें सोपपत्तिक व आमूलाग्र अध्ययन केलें. त्यांनीं आपली पहिली परीक्षा वेल्बी कमिशनपुढें दिली. या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यानंतर पुढें एक तपपर्यंत त्यांनीं कायदेकौन्सिलांत याच शास्त्राचा व्यासंग ठेवला होता. गोपाळरावांच्या या तयारीमुळेंच वरिष्ठ कायदेकौन्सिलांत व इतर सर्वत्र त्यांचें तेज पडत गेलें. त्यांच्या माहितीबद्दल कोणासही एक शब्द काढण्याची छाती नव्हती. १९११ सालीं हिंदुस्थानांतील वाढत्या खर्चासंबंधानें त्यांनीं एक वरिष्ठ कायदेकौन्सिलांत ठराव आणला होता. सरकारच्या सर्व खात्यांतून उत्पन्नापेक्षां खर्चाचें मान वाढत आहे व त्यास आळा घालणें अवश्य आहे, असा त्यांच्या ठरावाचा आशय होता. तीस वर्षांतील वाढीचे सर्व आंकडे गोपाळरावांनीं तयार केले होते. या ठरावासंबंधीं व्हाइसरॉय साहेबांच्या कार्यकारी कौंसिलांत (Executive Council) बरीच वाटाघाट झाली. गोपाळरावांची माहिती किंवा त्यांनीं दिलेले आंकडे यासंबंधीं चौकशी करून ते बरोबर आहेत असें दिसल्यास मग या प्रश्नाचा विचार करतां येईल, या सबबीवर हा ठराव फेंटाळून लावावा असें एकानें सुचविलें. दुसऱ्या एका गृहस्थानेंही कांहीं तरी सबबीवर ठराव उपयुक्त नाहीं असें म्हणून त्यास धुडकून द्यावें असा सल्ला दिला. परंतु त्या वेळचे हिंदुस्थानचे मुख्य फडणवीस यांनीं असा स्पष्ट सल्ला दिला कीं गोपाळरावांच्या आंकड्यांबद्दल किंवा विधानांबद्दल कोणताही दोष काढतां येणार नाहीं, व आपण टाळाटाळीचीं उत्तरें देण्यास तयार नाहीं. फडणविसांच्या या उत्तरामुळें सरकारास हा ठराव कबूल करावा लागला व वाढत्या खर्चाची चौकशी करण्याचें सरकारनें आश्वासन दिलें. या एका उदाहरणावरून अधिकारयुक्त राजनीतिशास्त्रांतील टीकेचा किती उपयोग होतो व ती किती फलद्रूप होते हें स्पष्टपणें दिसून येईल. कौंसिलांतील टीका व वर्तमानपत्रांतील टीका यांत महदंतर आहे. कौन्सिलबाहेरील टीका बेजबाबदार रीतीनें केली असतां खपते. कायद्याची मर्यादा उल्लंघन न करतां अप्रयोजकपणानें किंवा अज्ञानानें केलेल्या टीकेकडे कोणीही लक्ष देत नाहीं. कौन्सिलांतील टीका प्रतिपक्षाच्या तोंडावर करावयाची असल्यामुळें ती सप्रमाणच असावी लागते. नाहींतर टीका करणारा मनुष्य उपहासास पात्र होतो. शिवाय ही टीका करतांना विशेष मानसिक धैर्य असावें लागतें. पांच हजार मैलांवर बसून सेक्रेटरी ऑफ स्टेट

यांस टोणगा ह्मणणें किंवा दूर अंतरावरून व्हाइसरॉय साहेबांस शिव्या देणें यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं. परंतु निर्भीडपणें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचेपुढें आपली बाजू समर्थन करणें किंवा कर्झन साहेबांसारख्या अधिकारानें धुंद झालेल्या सार्वभौम सत्तेच्या प्रतिनिधींसमोर त्यांच्या कृत्याचा जोरदारपणानें निषेध करणें हें फार धैर्याचें व आत्मविश्वासाचें काम आहे. अशा तऱ्हेची टीका करण्यास विषयाचें परिपूर्ण ज्ञान नसल्यास आपल्या बाजूचें समर्थन यत्किंचितही होत नाहीं. सुधारलेल्या कायदेकौन्सिलांत लोकहिताच्या प्रश्नांवर वादविवाद करण्याची मुभा हल्लींच्या कायद्यानें ठेविली आहे. परंतु प्रांतिक किंवा वरिष्ठ कायदेकौंसिलांत किती नामदार सभासदांकडून या हक्काचा खरा उपयोग होत आहे? या हक्काच्या मानानें व नामदारांच्या संख्येच्या मानानें फारच थोडे महत्त्वाचे ठराव कौन्सिलपुढें येतात. आपल्या अज्ञानाचें प्रदर्शन झांकण्याकरितां पुष्कळ नामदार सभासद कांहीं तरी सबबीवर कोणतें तरी समाधान दर्शवून ते मागें घेत असतात. गोपाळरावांनीं हा हक्क प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठ कायदेकौन्सिलांत जी कामगिरी बजावली त्याबद्दल खुद्द सर गाय विल्सन यांचेच शब्द बिनमोल आहेत. गोखल्यांच्या शिवाय हें कौंसिल म्हणजे हॅम्लेटच्या पात्राशिवाय हॅम्लेटच्या नाटकाइतकेंच नीरस आहे असें त्यांनीं कौन्सिलांत बोलून दाखविलें! आपल्या टीकेनें कौन्सिलास रसिकता व सजीवता आणण्याचें श्रेय गोपाळरावांस मिळालें तें केवळ त्यांच्या राजनीतिशास्त्राच्या दीर्घ व्यासंगानेंच होय व यापासून पुढारी होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्यांनीं बोध घेण्यासारखा आहे. सुधारणेच्या योजनेनें मिळालेल्या हक्काचा पूर्ण उपभोग घेण्यास या गुणाची फार आवश्यकता आहे. यासंबंधीं एका मासिकाचे खालील उद्गार मननीय आहेतः—

"But even for obtaining a dialectical victory over the officials a very careful and laborious study of politics, civics, economics, statistics and official publications of all sorts is absolutely necessary. The devotion of odd minutes or hours snatched from a busy professional life or from a life of pleasure-seeking can not serve the purpose. For the officials are paid to master their facts and have ready access to all sources of information. He who would meet and beat them on their own ground can do so only by superior mental calibre and greater mastery of facts, achieved by more careful and industrious study. Mr. Gokhale was the first Indian Member of Council to set an example in this direction. Success cannot be achieved in Indian politics unless his example is largly followed."

—*Modern Review.*

दुसरा गुण म्हणजे विषयाची व्यवस्थित मांडणी हा होय. कोणताही बिकट प्रश्न असला तरी तो इतक्या सुगम तऱ्हेनें मांडण्याची गोपाळरावांची शैली होती कीं, त्या योगानें ऐकणाऱ्याच्या चित्तवृत्ति अगदीं गुंग होऊन जात. कितीही नीरस व शुष्क आंकडे असले तथापि ते ऐकणारांस कर्णमधुर भासविण्याची गोपाळरावांची हातोटी होती. या बाबतींत सर जेम्स मेस्टन यांनीं त्यांची ग्लॅडस्टनबरोबर तुलना केली. एखादा विषय अगदीं नवीन असल्यास त्यांच्या प्रतिपादनपद्धतीनें श्रोत्यांस तो इतका अवगत होई कीं, त्यासंबंधीं त्यांचे ठिकाणीं आस्था व जिज्ञासा हीं तात्काळ उत्पन्न होत असत. "एखादा गारुडी ज्याप्रमाणें क्षणांत कोय दाखवितो, निमिषमात्रांत त्या कोयीस कोमल पालवी फुटलेली नजरेस येते, व थोड्याच काळांत हृदंयगम फळ त्या पालवीवर दिसूं लागतें, त्याचप्रमाणें गोपाळरावजींची आपल्या विषयाबद्दल चित्तवृत्ति एकाग्र करण्याची हातोटी आहे. एखादी सुधारणा त्यांनीं सुचविली, कीं लगेच तिला दृश्य स्वरूप येऊं लागतें. थोडासा काळ लोटतो न लोटतो तोंच ती शक्य कोटींतील भासूं लागते, व थोड्याशा अवधीनें ती घडवून आणण्याच्या प्रयत्नास सुरुवात करणें भाग पडतें." मेस्टन साहेबांचे हे शब्द किती यथार्थ आहेत हें कोणासही समजून येण्यासारखें आहे. प्राथ-

मिक शिक्षणाचा प्रश्न हेंच या अभिप्रायाचें उत्तम मूर्तिमंत उदाहरण आहे. प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न इतक्या बारकाईनें, इतक्या सप्रमाण रीतीनें आजपर्यंत कोणीही मांडलेला नव्हता. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याचा ठराव त्यांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत प्रथमतः १९१० सालीं आणला. याच वेळीं या प्रश्नास सरकारकडून पूर्ण सहानुभूति मिळाली. १९११ सालीं त्यांनीं शिक्षणाचें बिल कौन्सिलपुढें मांडलें, व सरकारकडून याचें दृश्य फल प्राथमिक शिक्षणाकरितां दिल्लीदरबारचे वेळीं दिलेल्या पन्नास लक्षांच्या देणगींत दिसून आलें. १९१२ सालीं खुद्द पार्लमेंटांत त्या वेळचे अंडर सेक्रेटरी मि. मांटेग यांनीं गोपाळरावजींचें अभिनंदन करून सरकारकडून या बाबतींत शक्य ते प्रयत्न करण्याचें आश्वासन दिलें. अस्तित्वांत असलेल्या प्राथमिक शिक्षणाची वाढ शेंकडा ७५ नीं करण्याचें व शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या दुप्पट करण्याचें सरकारकडून जाहीर करण्यांत आलें. या प्रश्नाला इतकें महत्त्व प्राप्त होण्याचें सर्व श्रेय गोपाळरावजींस आहे असें खुद्द सर गाय विल्सन यांनीं आपल्या बजेटांत निर्दिष्ट केलें आहे. पुष्कळ ज्ञान असून तें व्यवस्थित स्वरूपानें लोकांपुढें माडण्यांत न आल्यास प्रातिनिधिक संस्थांमध्यें अशा ज्ञानाचा यत्किंचितही उपयोग होत नाहीं. सबब व्यवस्थित विषयप्रतिपादन हा एक महत्त्वाचा गुण असून तो गोपाळरावजींच्या अंगीं पूर्णपणें बाणलेला होता. **तिसरा गुण** म्हणजे इंग्लिश भाषेसंबंधानें त्यांची अप्रतिम वाकबगारी हा होय. गोपाळरावजींच्या इतकी शुद्ध व मार्मिक भाषाशैली हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांमध्यें फारच थोड्या लोकांमध्यें वसत आहे. सुमारें वीस वर्षेपर्यंत त्यांनीं इंग्लिश भाषेच्या प्रोफेसराचें काम केलें होतें. कोणताही लेख लिहितांना, किंवा भाषण करतांना, किंवा एकादें सामान्य पत्र लिहितांना शब्दाची योजना अगदीं योग्य व्हावी याबद्दल ते अतिशय काळजी घेत; किंबहुना त्यांच्या मनास या प्रकारची दृढ संवयच लागली होती. इंग्लंडसारख्या इंग्रजी भाषेच्या माहेरघरांतसुद्धां गोपाळरावजींच्या इंग्लिश भाषेवरील स्वामित्वाबद्दल पुष्कळ इंग्लिश विद्वानांकडून तारीफ करण्यांत आली आहे. भाषेप्रमाणें त्यांचें वक्तृत्वही अमोघ होतें, हा त्यांचा **चवथा गुण** होय. शब्दांचें अवडंबर, द्विरावृत्ति व मेघनाद हे गुण अद्याप त्यांच्या वक्तृत्वांत नसले, तथापि श्रोतृवृंदावर त्यांच्या अस्खलित, रसाळ, गंभीर व अमोघ वक्तृत्वाचा नेहमीं परिणाम होत असे व चित्तवृत्ति आनंदानें तन्मय होत. एका मार्मिक इंग्लिश गृहस्थानें त्यांच्या वक्तृत्वाबद्दल व त्यांच्या इंग्लिश भाषेच्या ज्ञानाबद्दल दिलेला अभिप्राय प्रशंसनीय आहे. "That he was a great orator I can well believe, for his use of English was exact and brilliant and entirely free from the redundancy and magniloquence which is sometimes imputed to Indian eloquence."

याशिवाय नियमित वेळामध्यें आपले विचार नमूद करण्याची विलक्षण हातोटी हा त्यांचा **पांचवा गुण** होय. पाल्हाळिक वक्तृत्वानें किंवा विषयोपन्यासानें त्यांनीं श्रोत्यांस कधींच कंटाळा आणिला नाहीं. कौन्सिलासारख्या संस्थांमध्यें या गुणाची किती आवश्यकता आहे हें नेहमीं निदर्शनास येतें. अध्यक्षांकडून वरचेवर सूचना येऊन पुष्कळ नामदार सभासदांस आपलीं भाषणें मध्यंतरीं सोडून द्यावीं लागतात, व कौन्सिलावर त्यांचा यत्किंचितही परिणाम होत नाहीं, अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. आपल्या इलाख्यांतील यासंबंधीं अनुभव अगदीं नित्याचा आहे. प्राथमिक शिक्षणासारख्या ठरावावरील विस्तीर्ण भाषण गोपाळरावजींनीं अगदीं नियमित वेळांत संपविलें व तें संपविल्यावर कौन्सिलांतील सर्व सभासदांनीं त्यांच्या अमोघ वक्तृत्वाबद्दल त्यांची तारीफ केली. रिपोर्टरांना सुद्धां त्यांच्या भाषणाचा गोषवारा देणें फार मुष्किलीचें पडलें. नियमित वेळांत भाषण करणें हा गुण अत्यंत जरूर आहे हें गोपाळरावजी स्वतः आपल्या शिष्यवर्गास आग्रहानें सांगत असत. भाषणाचा हेतु ऐकणाराचे मनावर परिणाम करण्याचा आहे. नियमित वेळांत जर आपले विचार ऐकणारांपुढें साग्र मांडता आले नाहींत तर आपला हेतु विफल होतो, आपण घेतलेले श्रम व्यर्थ होतात, आपल्या विद्वत्तेची किंवा ज्ञानाची मुळींच चीज होत नाहीं, असें ते वारंवार सांगत; व अनुभवावरूनही त्यांचा उपदेश यथार्थ आहे हें कोणासही कबूल करावें लागेल. गोपाळरावजींच्या मुत्स-

ढीपणास अवश्य लागणारा **सहावा** गुण म्हणजे स्वाभिमान होय. कौन्सिलांत कोणत्याही वेळीं अपमानास्पद प्रसंग त्यांनीं सहन केले नाहींत. अशा प्रसंगीं आपला निषेध ते स्पष्टपणें प्रगट करीत असत. सिम्ला येथें एका वेळीं एतद्देशीय सभासदांबद्दल परलोकवासी जेंकिन्स यांनीं अपमानास्पद शब्द उच्चारले होते. गोपळरावजींनीं त्याच बैठकींत उघडपणें या कृत्याचा निषेध केला. यावेळीं कौन्सिलांतील युरोपियन सभासदांनीं गोपाळरावांची तारीफ केली. खुद्द लॉर्ड मिंटो यांनीं जेंकिन्ससाहेबांच्या कृत्याबद्दल नापसंती व्यक्त केली, व स्वतः जेंकिन्स साहेबांस पश्चाताप वाटून त्यांस गोपाळरावजींची माफी मागण्याचा प्रसंग आला. आपल्या योग्यतेचा निंद्य व स्वार्थपरायण असा उपयोग गोपाळरावजींनीं कधींही केला नाहीं व कोणतीही व्यक्तिविषयक याचना केली नाहीं. स्वाभिमानाचा योग्य अर्थ म्हणजे आपला मान ठेवणें व दुसऱ्याचा राखणें. आपल्या मानाइतकीच दुसऱ्याच्या मानाची काळजी बाळगिली म्हणजे अपमानाचे प्रसंग फारच थोड्या वेळीं येतात. कौन्सिलांतील सर्व लोकांशीं ते इभ्रतीनें वागत असत. त्यांच्या आचरणानें युरोपियन अधिकाऱ्यांमध्यें इतका आदर उत्पन्न झाला होता कीं, त्यांच्या भेटीबद्दल किंवा सहवासाबद्दल पुष्कळ मोठमोठ्या इंग्रजी अधिकाऱ्यांनीं सुद्धां फार कळकळीचा आग्रह अनेक वेळां प्रगट केला होता. **सातवा** एक गुण ह्मणजे टीका करतांना ते व्यक्तीवर कधींही तुटून पडत नसत किंवा अवास्तव हेतूचा प्रतिपक्षावर आरोप करीत नसत. यामुळें त्यांची टीका कधींही मर्मभेदक वाटली नाहीं. कित्येक लोकांचा प्रकार प्रतिपक्षाचा पाडाव करावयाचा म्हणजे त्याच्या व्यक्तीबद्दल भलते आरोप करावयाचे, किंवा त्याच्या हेतूबद्दल विपर्यास करावयाचा, असा असतो. Damn the man and you damn his principles या तत्वाचा अशा लोकांकडून नेहमीं अनुवाद केला जातो. गोपाळरावजींस हा प्रकार अगदीं असंमत होता. मद्रासच्या एक्झिक्युटिव कौन्सिलाचे सभासद सर हॅरोल्ड स्टुअर्ट यांनीं या बाबतींत दिलेला अभिप्राय लक्षांत ठेवण्यासारखा आहे. " Mr. Gokhale's sympathy and fairness were not created nor did they produce any flabbiness of conviction. His opinions were always strongly held but held without bitterness, and this spirit of fairness which was one of his marked characteristics produced one happy effect, viz: fairness in his opponents and in many debates in which he played so successful a part there was neither bitterness nor rancour."

आठवा गुण ह्मणजे जबाबदारीची तीव्र जाणीव ही होय. कोणत्याही प्रश्नाबद्दल टीका करतांना प्रतिपक्षाचे हेतु व प्रतिपक्षाच्या अडचणी या संपूर्ण लक्षांत घेऊन गोपाळराव टीका करीत असत. या योगानें प्रतिपक्षास निरुत्तर व्हावें लागे. हिंदुस्थानांतील राजकीय चळवळ करणाऱ्या वर्गास Opposition (विरुद्ध पक्ष) ह्मणण्याची चाल आहे. परंतु पार्लमेंटांतील आपोझिशन व हिंदुस्थानांतील आपोझिशन यांत महत्त्वाचा फरक आहे. पार्लमेंटांत आपोझिशन करणारा वर्ग निवडणुकीच्या हेलकाव्यामध्यें सत्ताधारी बनतो. केव्हां तरी आपल्यास सत्ता प्राप्त होणार आहे व अधिकारारूढ होऊन आपणही टीकेस पात्र होऊं ही जाणीव पार्लमेंटाच्या आपोझिशनच्या वर्गांत असते. या योगानें अशा वर्गाकडून होणारी कोणतीही टीका बेजबाबदारीची व निरंकुश होऊं शकत नाहीं. अर्थात् ती टीका योग्य मर्यादा सोडून कधींही जात नाहीं. हिंदुस्थानांतील प्रकार तसा नाहीं. कौन्सिलांत सरकारास विरोध करणारा वर्ग व सत्ताधारी वर्ग यांची अदलाबदल होण्याचा संभव मुळींच नाहीं. यामुळें सत्ताधारी वर्गाच्या अडचणी किंवा गैरसोई टीका करणाऱ्या वर्गाच्या मनांत नेहमीं जागरूक असतातच असा प्रकार होत नाहीं. या योगानें पुष्कळ वेळां शिस्तीची मर्यादा सोडून किंवा बेजबाबदारपणें टीका केली जाते. साधारण वर्तमानपत्राचें उदाहरण घेतल्यास ही गोष्ट कळून येईल. स्थानिक कलेक्टर किंवा पोलिस सुपरिंटेंडेंट किंवा इतर अधिकारी यांचेवर कोणत्याही वर्तमानपत्रांत निरंकुश टीका केली जात नाहीं. कारण, अशा टीकेनें तात्काळ कानउघाडणी होण्याचा

संभव असतो. परंतु हींच वर्तमानपत्रें व्हाइसरॉय, सेक्रेटरी ऑफ स्टेट किंवा प्रधानमंडळ यांचेवर पाहिजे तितकें तोंडसुख घेत असतात. कारण या अधिकाऱ्याची व संपादकांची आजन्मांत गांठ पडण्याचा संभव असत नाहीं. परंतु या कारणामुळेंच बेजबाबदार टीका केली जावी हें मात्र अत्यंत अश्लाघ्य आहे. गोपाळरावजींनीं इंग्रजी पार्लमेंटांतील शिष्टाचाराचे नियम कधींही उल्लंघन केले नाहींत, व त्यामुळें बेजबाबदारपणाचा दोषही त्यांचेवर कधीं आला नाहीं. जबाबदारीच्या टीकेपासून रागद्वेषादि विकारांनीं मनोवृत्ति क्षुब्ध न होतां टीकेकडे लक्ष देणें भाग पडतें, सात्विक मनोवृत्ति प्रज्ज्वलित होतात, सदसद्विवेकबुद्धि जागृत होते, व टीकेचा यथार्थ परिणाम होतो. गोपाळरावजींइतकी सरकारी अधिकाऱ्यांची त्यांचेसमोर कोणीही निर्भीडपणें टीका केली नाहीं. खुद्द लॉर्ड कर्झन साहेबांशीं त्यांस चार वर्षें झगडावें लागलें. परंतु केव्हांही त्यांची टीका बेजबाबदारपणाची आहे असें त्यांचेबद्दल कोणीं विधान केलें नाहीं. लॉर्ड मिंटो साहेबांनीं त्यांचेबद्दल फार आदराचे उद्गार काढले आहेत. ते ऐकून कौन्सिलांतील कामाबद्दल उत्कृष्ट पारितोषक समजून कोणत्याही मुत्सद्द्यास धन्यता वाटली पाहिजे.

वर निर्दिष्ट केलेल्या गुणसमुच्चयाची इमारत स्वार्थत्यागाच्या भक्कम पायावर उभारली होती व यामुळें गोपाळरावजींच्या शब्दास जें महत्त्व होतें किंवा जें तेज होतें तें कोणत्याही मुत्सद्द्याच्या शब्दास किंवा कृतीस प्राप्त झालें नाहीं. वकिलीसारख्या धंद्यांत यथेच्छ पैसे मिळवून फावल्या वेळीं देशहिताबद्दल आलेला उमाळा किती उपयोगी पडणार ? किंवा ऐश्वर्यांत, संपन्नतेंत लोळत असणाऱ्या पुरुषांकडून स्वतःच्या पदराला यत्किंचितही झीज न लागतां देशोन्नतीच्या कामीं केलेली विनंती किती फलद्रूप होणार ? उलटपक्षीं, असामान्य स्वार्थत्याग करून दारिद्र्याची कांस धरून देशाकरितां रात्रंदिवस तळमळणाऱ्या पुरुषाची विनंती निष्फल कशी होईल? स्वार्थत्यागाशिवाय देशभक्तीस सचेतनता प्राप्त होत नाहीं. व या दोन गुणांचा संयोग झाल्याखेरीज देशाचें पाऊल कधींही पुढें पडावयाचें नाहीं. स्वार्थत्याग हें गोपाळरावजींच्या आयुष्याचें ब्रीद होतें. व या गुणामुळेंच प्रांतिक पुढारी, राष्ट्रीय पुढारी व साम्राज्यांतील पुढारी, अशी त्यांची बढती होत गेली.

मुत्सद्दी होण्यास गोपाळरावजींच्या अंगीं कोणते गुण होते त्यांचें आम्हीं येथवर वर्णन केलें. आतां मुत्सद्दी या नात्यानें गोपाळरावजींनीं केलेल्या कामगिरीचा संक्षिप्तपणें निर्देश करणें अप्रस्तुत होणार नाहीं.

गोपाळरावजींची मुत्सद्देगिरी कायदेकौन्सिलांत, विलायतेंतील लोकमत जागृत करण्यांत, दक्षिण आफ्रिकेचा लढा मिटविण्यांत, हिंदु मुसलमानांचा सलोखा वाढविण्यांत, व असंतोषाची लाट देशांत पसरल्यावेळीं राजनिष्ठ तत्त्वांना स्थिरता आणण्यांत मुख्यत्वेंकरून दिसून आली. गोपाळरावांचे गुरु न्यायमूर्ति रानडे हे १९०१सालीं निवर्तले,व१९०२ सालीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत गोपाळरावांचा प्रवेश झाला. रुप्याच्या उतरत्या भावामुळें हुंडणावळींत फारच फरक पडत चालला होता व हिंदुस्थान सरकारला विलायतेस पाठवाव्या लागणाऱ्या पैशाचे बाबतींत पुष्कळ बचत होत होती. इकडे देशांत एकसारखे दुष्काळ पडत होते व दारिद्र्य वाढत होतें. परंतु हिंदुस्थान सरकारची गंगाजळी मात्र दिवसेंदिवस भरत होती. कार्यकारणांचा विचार न करतां अधिकारी वर्ग वाढत्या शिलकेवरून देशाची सांपत्तिक स्थिति सुधारत आहे असें म्हणत होते. या कोटिक्रमाचा पोकळपणा गोपाळरावजींनीं आपल्या पहिल्या भाषणांतच स्पष्टपणें करून दाखविला. शिलकेची मीमांसा बरोबर करून दरसाल पांच कोटी शिल्लक उरत असल्यामुळें, देशांतील गरीब लोकांवरील कर कमी करावा असें त्यांनीं आग्रहानें सुचविलें. या देशांतील करांपैकीं गरिबांवर पडणारे कर म्हणजे मिठावरील व प्राप्तीवरील कर हे होत. १९०३ सालीं मिठावरील कर दर मणीं २॥ रुपयांचा होता तो दोन रुपये करण्यांत आला. या वर्षींही सरकारची सांपत्तिक स्थिति चांगली असल्यामुळें हा कर आणखीही कमी करावा असें गोपाळरावजींनीं सुचविलें. प्राप्तीवरील कराची किमान मर्यादा (५००)पांचशेंची एक हजार (१०००)करण्यांत आली.प्राथमिक शिक्षणाबद्दल जास्त पैसे खर्च करावे व एतद्देशीय लोकांना हुद्द्यांच्या जागा द्याव्या अशी त्यांनीं कर्झन साहेबांस विनंती केली. १९०४ सालीं मिठावरील कर कमी करण्यासंबं-

धानें त्यांनीं पुनः आग्रहाची विनंती केली. १९०५ सालीं मिठावरील कर दरमणीं आठ आण्यांनीं कमी करण्यांत आला. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांची सांपत्तिक दैन्यावस्था त्यांनीं कौन्सिलच्या नजरेस आणिली. लॉर्ड कर्झन साहेबांनीं एतद्देशीय लोकांची वरिष्ठ प्रतीच्या जागा मिळण्याची ओरड निराधार आहे असें १९०४ सालीं सांगितलें होतें. कर्झन साहेबांच्या केटिक्रमांतील खोटसाळपणा गोपाळरावजींनीं सविस्तर आंकडे देऊन सर्वथैव निदर्शनास आणला. १९०६ सालीं मिठाचा कर दर मणीं एक रुपया असावा असें त्यांनीं सुचविलें. प्राथमिक शिक्षणाबद्दल जास्त खर्च करावा, शेतकीसंबंधीं सुधारणा कराव्यात, धंदेशिक्षणाबद्दल सोई वाढवाव्या व आरोग्यरक्षणाबद्दल जास्त मदत करावी, असें त्यांनीं सुचविलें. १९०७ सालीं मिठावरील कर दर मणीं एक रुपया करण्यांत आला; प्राथमिक शिक्षणावरील खर्च वाढविण्यांत आला; म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यास मदत करण्यांत आली. रेलवेच्या धोरणासंबंधीं व लष्करी खर्चाबद्दल त्यांनीं निषेध व्यक्त केला. सुधारणेच्या योजनेसंबंधीं मिंटो साहेबांस विनंती केली. १९१० सालीं नाताळांतील मुदतबंदीचा प्रकार बंद करण्याबद्दल त्यांनीं ठराव आणला, व तो मंजूर झाला. प्राथमिक शिक्षण मोफत करण्याबद्दल ठराव आणला, व त्यांतील तत्त्वांबद्दल सहानुभूति मिळाली. डिस्ट्रिक्ट कौन्सिल स्थापन करण्याबद्दल अगदीं नवीन योजना त्यांनीं कौन्सिलपुढें मांडली. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें याचे अधिकार वाढवून त्यांस सांपत्तिकदृष्ट्या मदत करण्याबद्दल त्यांनीं सरकारास सुचविलें. गोपाळरावजींच्या प्रोत्साहनानें शिक्षण व आरोग्य या खात्यावरील खर्च वुइल्सन साहेबांच्या कारकीर्दींत झाला, इतका आजपर्यंत कोणत्याही कारकीर्दींत झाला नाहीं. १९११ सालीं हिंदुस्थानच्या दरसाल वाढत्या खर्चास आळा घालण्याबद्दल गोपाळरावजींनीं एक ठराव कौन्सिलपुढें आणला होता. या बाबतींत चवकशी करण्याचें सरकारनें कबूल केलें. याच सालीं प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याबद्दल एक बिल त्यांनीं कौन्सिलपुढें सादर केलें. १९१२ सालीं या बिलाचें दुसरें वाचन होऊन तें मंजूर झालें नाहीं. तथापि या बिलांतील हेतूअन्वयें प्राथमिक शिक्षणाचा होईल तितका विस्तार करण्याचें अभिवचन खुद्द लॉर्ड हार्डिंज यांनीं दिलें आहे. याप्रमाणें सुमारें बारा वर्षें आपल्या अस्खलित वाणीनें व भारदस्त टीकेनें राज्यकारभाराचा कल लोकच्छंदानुवर्ती होईल असा प्रयत्न गोपाळरावजींनीं केला. त्यांनीं केलेल्या सुचनांपैकीं कांहीं प्रत्यक्ष अमलांत आल्या, कांहींची आवश्यकता कबूल करणें सरकारास भाग पडलें, व कांहींबद्दल सरकाराकडून चवकशी चालू आहे. कौन्सिलांतील कोणत्याही सभासदास आपल्या कामाचा इतका व्यापक, इतका किफायतशीर व इतका फलप्रद आढावा लोकांपुढें मांडतां येईल असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं. कौन्सिलांत असतांना अन्यायमूलक व जुलमाचे कायदे सरकार करीत असतांना, आपल्या निर्भीड टीकेनें व तडजोडीच्या उपायांनीं या कायद्याचें स्वरूप सौम्य करण्याचे कामीं गोपाळरावजींनीं किती खटपट केली हें कौन्सिलांतील सभासदांस पूर्णपणें माहीत आहे. सिडिशिस मीटिंग्स बिल, प्रेस ॲक्ट व हद्दपाऱ्या या बाबतींत लोकांच्या वतीनें गोपाळरावजींनीं किती प्रयत्न केले याची किंमत त्यावेळचे अधिकारी, व बाबु कृष्णकुमार मित्र यांसारखे हद्दपार केलेले गृहस्थ यांस पूर्णपणें कळलेली आहे. अशा रीतीनें मुत्सद्दी या नात्यानें आपल्यास प्राप्त झालेली थोर पदवी कोणताही व्यक्तिविषयक फायदा करून घेण्यांत उपयोगीं न आणतां, व्यक्तीचें, संस्थांचें व अखिल हिंदुस्थानांतील प्रजेचें हित करण्याकरितांच त्यांनीं तिचा उपयोग केला.

लॉर्ड कर्झनसाहेबांच्या दडपशाहीमुळें उत्पन्न झालेल्या असंतोषानें लॉर्ड मिंटो यांची कारकीर्द फारच अस्वस्थतेची होती. व या आणीबाणीच्या प्रसंगीं गोपाळरावजींनीं किती उत्कृष्ट कामगिरी केली याबद्दल लॉर्ड मिंटो यांचे उद्गार चिरस्मरणीय आहेत.

"I value immensely the words to which I have listened here and which have emanated on your behalf from the distinguished Indian statesman (Mr. Gokhale) with whom I have had the honour to serve during the years I have been in India, to whom I have

listened in the Imperial Legislative Council and to whom I am deeply indebted for the counsel and advise which he has so readily given and than whom no one was more capable of representing the interests of this country."

Lord Minto in Bombay.

कौन्सिलांतील कामगिरीबद्दल इतकी प्रशंसा आजपर्यंत कोणत्याही हिंदी मुत्सद्दयाची बादशहाच्या प्रतिनिधीकडून झालेली नाहीं.

मुत्सद्देगिरीची दुसरी बाबद ह्मणजे विलायतेंतील लोकमताबद्दलची चळवळ ही होय. हिंदुस्थानांतील प्रमुख राजसत्ता सिव्हिल सर्व्हिसचे हातीं आहे.सिव्हिल सर्व्हिस ही एक विशिष्ट जातच बनली आहे. हिंदुस्थानांतील लोकांना सुराज्याचे किंवा स्वराज्याचे हक्क देणें ह्मणजे आपले हक्क कमी करून घेणें अशी या वर्गाची ठाम समजूत आहे. विलायतेंतील सामान्य जनता (Democracy) किंवा लिबरल पक्षांतील पुढारी यांची अशी समजूत नाहीं. स्वराज्य देण्याबद्दल जरी आज पुष्कळ मतभेद असला तरी हिंदुस्थानांत सुराज्य असावें याबद्दल एक मत आहे. हिंदुस्थानांत अधिकारी वर्गानें अन्याय केल्यास इंग्लंडांतील समंजस लोकांस चीड येते. हिंदुस्थानच्या अवनतीचें चित्र त्यांचेपुढें मांडल्यास त्यांस शरम वाटते. हिंदुस्थानांतील लोकांस स्वराज्याचे हक्क हळूहळू देणें अवश्य असून हें इंग्लंडचें एक आद्य कर्तव्य आहे असें मानणाऱ्या कांहीं थोर मुत्सद्दयांचा तेथें एक वर्ग आहे. अशा सर्व लोकांची सहानुभूति हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेबद्दल मिळवावी व येथील सत्ताधारी वर्गावर या सहानुभूतीचें वजन आणून राज्यकारभाराचें धोरण शक्य तितकें प्रजेच्या हिताचें करावें असें मानणारा हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांत एक मोठा वर्ग आहे. इंग्लंडांत हिंदुस्थानच्या हिताबद्दल चळवळ करणें म्हणजे काळाचा, बुद्धिमत्तेचा व द्रव्याचा व्यय करण्यासारखें आहे, व वेशीवर आपलें दुःख टांगण्यासारखा हा प्रयत्न हास्यास्पद आहे, असें मानणारा दुसरा एक वर्ग आहे. गोपाळराव पहिल्या वर्गापैकीं होते. त्यांनीं इंग्लंडांतील चळवळीची उपयुक्तता आपल्या प्रयत्नांनीं प्रत्यक्षपणें सिद्ध केली आहे. इंग्लंडांत हिंदुस्थानाबद्दल अतिशय अज्ञान आहे, व याच साठीं तेथें एक ब्रिटिश कॉंग्रेस कमेटी स्थापन झाली असून तिच्या विद्यमानें इंडिया हें वर्तमानपत्र निघत असतें. हिंदुस्थानांतील प्रचलित विषयांची माहिती 'इंडिया' पत्रांत छापून तिचा प्रसार पार्लमेंटांतील सभासदांमध्यें करणें, सभांच्या व व्याख्यानांच्या द्वारें हिंदुस्थानांतील उणिवा ब्रिटिश जनतेस समजून देणें, व पार्लमेंटांतील उदारमनस्क प्रतिनिधींकडून हिंदुस्थानांतील अन्यायाबद्दल मंत्रिमंडळास प्रश्न विचारणें, याप्रमाणें बरींच कामें ब्रिटिश कॉंग्रेस कमेटी करीत असते. परंतु या चळवळीस पैशाचें मोठें साहाय्य लागतें; येथील लोकांनीं सढळ हातानें मदत केल्याखेरीज ही चळवळ यशस्वी होण्याचा बिलकूल संभव नाहीं. इंडिया पत्रास वर्गणीदार मिळण्याची मोठी मुष्किल पडते. आज सुमारें दहा वर्षे गोपाळरावजींनीं हें काम आपल्या अंगावर घेऊन इंडिया पत्रास वर्गणी जमविण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. गोपाळरावांच्या मदतीखेरीज हें पत्र केव्हांच बंद पडलें असतें. या पत्राच्या पुष्कळ प्रती पार्लमेंटाच्या सभासदांस मोफत वांटण्यांत येतात. या पत्रांत हिंदुस्थानसंबंधीं असलेली माहिती येथील लोकांस शिळी वाटते. इंग्लंडांतील बातमी दैनिक पत्रांतून पूर्वीच कळते,म्हणून वर्तमानपत्र या नात्यानें त्यास येथें कोणी वर्गणीदार मिळत नाहीत. परंतु ब्रीटिश कॉंग्रेस कमेटीला मदत करण्यासाठीं म्हणूनच प्रत्येक देशाभिमानी मनुष्यानें या पत्रास मदत करणें अवश्य आहे. इतकी कळकळ फारच थोड्या लोकांत जागृत आहे. याचसाठीं गोपाळरावजींस आपल्या सोसायटींतील मेंबर पाठवून हें पत्र जिवंत ठेवणें भाग पडलें. या कामगिरीचें महत्त्व इंग्लंडांतील चळवळीच्या पुरस्कर्त्यास सहज कळून येणार आहे. इंग्लंडांतील जनतेला इकडील लोकस्थिति निवेदन करण्याकरितां गोपाळराव १९०५ व १९०६ या दोन सालीं विलायतेला गेले होते. १९०५ सालची त्यांची मोहीम अत्यंत यशस्वी झाली व त्यांचें सर्वत्र अभिनंदन झालें. १९०६ सालींही लिबरल मुत्सद्दयांची व नामांकित राजकारणी पुरु-

यांची मुलाखत घेऊन कौंसिलची सुधारणा व राज्यव्यवस्थेंत लोकमतास अवसर मिळण्याची आवश्यकता त्यांनीं फार जोरदारपणें प्रतिपादन केली. १९०८ सालीं इंग्लंडांत जाऊन लॉर्ड मॉर्ले साहेबांच्या पुष्कळ मुलाखती घेऊन सुधारणेच्या योजनेच्या वेळीं येथील राज्यव्यवस्थेचें आकुंचित स्वरूप लॉर्ड मॉर्ले यांचेपुढें फार व्यवस्थितपणें त्यांनीं मांडलें. सुधारणांच्या योजनेमध्यें गोपाळरावजींचें कितपत साहाय्य होतें हें लॉर्ड मॉर्ले साहेबच सांगूं शकतील. या संबंधाचा इतिहास अद्याप गुप्त आहे. लार्ड रे साहेबांचे यासंबंधीं उद्गार फार महत्वाचे आहेतः—

"If Lord Morley were at that meeting he would testify as to the great assistance derived in elaborating his plans from the advice he obtained from Mr. Gokhale. And that advice was always given on practical lines."

खुद्द लार्ड हार्डिंज यांनींहीं असेच उद्गार काढले आहेत. पुष्कळ इंग्लिश पत्रांनींहीं गोपाळरावजींच्या या कामगिरीबद्दल फारच प्रशंसा केली होती. मॉर्ले साहेबांच्या सुधारणा म्हणजे भावी उन्नतीचा पाया आहे. राणी सरकारच्या जाहीरनाम्यास जर मूर्तिमंत स्वरूप अंशतः प्राप्त झालें असेल तर तें लॉर्ड मॉर्ले यांच्या एक्झिक्युटिव कौंसिलांतील व इंडिया कौंसिलांतील एतद्देशीयांच्या नेमणुकीनेंच होय. राजकीय प्रश्नाबद्दल वादविवाद करण्याची परवानगी व बजेटावरील व्यापक टीकेची मुभा या दोन सुधारणांनीं प्रजापक्षाचे हक्क फारच वाढले आहेत. या दोन्ही सुधारणांत गोपाळरावांचा हात स्पष्टपणें दिसत आहे. या सुधारणांच्या योगानें गुप्त चाललेला सत्ताधारी वर्गाचा (Beaurocracy) राज्यकारभार उघड दरबारांत येऊं लागला. याबद्दल चर्चा करण्यास सुरवात झाल्यानें आपल्या कृत्यांचें समर्थन करणें सत्ताधारी वर्गास भाग पडत आहे. अन्यायांच्या गोष्टींचें उघड समर्थन करतांना मनुष्य कितीही अधिकारांध असला तरी नैतिक ओशाळगत त्यास पदोपदीं वाटत असते; सदसद्विवेकबुद्धीची पुष्कळ जाचणी अंतःकरणास सोसावी लागते. याचा परिणाम अन्यायाकडील प्रवृत्ति नाहींशी करण्याकडेसच होतो. लोकपक्षाकडून कौंसिलपुढें येणारे ठराव नामंजूर करण्याचा अधिकार यद्यपि हल्लींच्या व्यवस्थेनें व्हाइसरॉयांस दिलेला आहे, तथापि हा अधिकार पदोपदीं चालविणें नैतिक दृष्टया अशक्य होईल. नवीन सुधारलेल्या कौंसिलांत लोकपक्षाच्या पुढाऱ्यास किती उपयुक्त कामगिरी करतां येते, समंजस गोष्टी करण्यास सरकारास कसें भाग पाडतां येतें याचा उत्तम अनुभव गोपाळरावजींच्या सुधारलेल्या कौंसिलांतील चार वर्षांच्या कामगिरीवरून मूर्तिमंतपणें दिसून येणार आहे. गोपाळरावांच्या अभावीं वरिष्ठ कायदेकौंसिलांत किंवा प्रांतिक कौंसिलांत सुधारणेच्या योजनेचें स्वरूप लोकांपुढें योग्य प्रकारें न आल्यास तो दोष नामदार सभासदांचा आहे. सुधारलेल्या कौंसिलाचा नाहीं. कित्येक अहंमन्य लोकांनीं या योजनेस टोणग्याचे अचळ अशी उपहासात्मक नांवें दिलीं. धार काढण्याची अक्कल नसलेल्या मनुष्यास कौन्सिलची धेनु टोणग्याप्रमाणेंच वाटणार, परंतु कुशल मनुष्यास ही कामधेनु नसली तरी इजपासून पुष्कळ दुग्धप्राप्ति होते असें स्पष्टपणें अनुभवास येत आहे. सुधारणेच्या योगानें लोकसत्ताक राज्यपद्धतीचें बीजारोपण झालें आहे; गोपाळरावजींची इंग्लंडांतील खटपट ही या महत्त्वाच्या सुधारणेस पुष्कळ अंशीं कारणीभूत झाली आहे. १९१२ सालीं गोपाळराव विलायतेस गेले होते, व त्यावेळीं प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत इंग्लंडांतील सत्ताधारी वर्गाची सहानुभूति त्यांनीं मिळविली व दक्षिण आफ्रिकेंतील प्रश्नाबद्दलही मंत्रिमंडळांतील प्रमुख मुत्सद्द्यांचें साह्य मिळविलें. कलोनियल ऑफिसच्या आग्रहावरूनच दक्षिण आफ्रिकेंत जाण्याचें त्यांनीं मुक्रर केलें. गोपाळरावजींस रॉयल कमिशनवर याच वेळीं नेमण्यांत आलें होतें. इतक्या वर्षांच्या इंग्लंडांतील चळवळीमुळें इंग्लंडांतील प्रमुख राजकारणी पुरुषांना, वर्तमानपत्रांच्या संपादकांना गोपाळरावजी चांगलेच परिचयाचे झाले होते. कांसरव्हेटिव पक्षांतील लोकसुद्धां त्यांची मुलाखत घेत. हिंदुस्थानविषयक प्रश्नाबद्दल त्यांचीं मतें कौतुकानें ऐकत. त्यांच्या शब्दास सर्वत्र अत्यंत मान मिळूं लागला. साम्राज्यांतील एक मुत्सद्दी या नात्यानें त्यांची गणना होऊं लागली. सन १९१३ व १९१४ या दोन्ही सालीं पब्लिक सर्व्हिसच्या

कामानिमित्त ते विलायतेस गेले होते व हिंदुस्थानच्या प्रश्नाबद्दल तेथील मुत्सद्द्यांना व अधिकारिवर्गाला वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान देण्याचा त्यांनीं क्रम चालू ठेविला होता. हिंदुस्थानांतील लोकमताला शक्य तितका पाठिंबा शक्य तितक्या प्रयत्नांनीं विलायतेंतील मुत्सद्द्यांकडून मिळविण्याचा गोपाळरावांनीं सतत प्रयत्न केला. सर वुइल्यम वेडर्नबर्नसारख्या हिंदुस्थानच्या निस्सीम व कळवळ्याच्या हितचिंतकास त्यांनीं पराकाष्ठेचें प्रोत्साहन दिलें. इंग्लंडांतील चळवळीची उपयुक्तता, टीकाकारांचीं तोंडें बंद करून, स्पष्टपणें लोकांच्या निदर्शनास आणिली. गोपाळरावांच्या अकालनिधनानें जो सर्वांत मोठा तोटा झाला आहे तो या चळवळीचा आधारस्तंभच नाहींसा झाला, हा होय.

हिंदुस्थानचे माजी अंडरसेक्रेटरी मि. मॉंटेग यांनीं गोपाळरावजींबद्दल काढलेले उद्गार त्यांच्या थोरवीची साक्ष पटवीत आहेत.

"That a man should interest himself in the complexities of Indian economics and finance is in itself a tribute to his powers of mind; that he should master them and should display his mastery at an age at which few people would care ever to study them cursorily was a sign of a ripening intellect and a serious endeavour which served to lay the sure foundations of Mr. Gokhale's work. And with all his comprehensiveness of judgment and mental clarity he never dropped into the academic fallacy of contempt. He impressed one as being among the most candid and unassuming of men and he was equally ready to give or to take advice where it seemed most serviceable. His mind possessed the qualities ascribed to statesmanship without ever losing the fire of its enthusiasm or its warm human interests. We feel that his loss touches deeply not only India but the empire and the whole world of men whose thoughts move in harmony, whether they know or not, with the spirit of the brotherhood of "the servants of India."

The Right Hon. Montague, M. P.

या चळवळीप्रीत्यर्थ हिंदुस्थानांतील प्रयत्न करणाऱ्या लोकांस गोपाळरावांइतकें कोणासच यश आलें नाहीं. निश्चयानें या बाबतींत कोणीं प्रयत्न केला नाही. ज्या आस्थेनें, श्रद्धेनें या चळवळीविषयीं खटपट करावयास पाहिजे होती, तशी कोणींच केली नाहीं याबद्दल दिलगिरी वाटते. ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीला दरसाल देऊं केलेली रक्कम कोणत्याही प्रांतांतून एक वर्षी सुद्धां संपूर्णपणें पोंचली नाहीं. या बाबतींतील ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीची कहाणी अत्यंत निराशाजनक आहे. अशा स्थितींत खऱ्या कळकळीचा पुरस्कर्ता गेल्यामुळें त्या संस्थेचें किती नुकसान झालें आहे हें पदोपदीं अनुभवास येणार आहे.

तिसरी मुत्सद्देगिरीची बाबत म्हणजे दक्षिण आफ्रिकेंतील लढा होय. दक्षिण आफ्रिकेंत गेलेल्या हिंदी मजुरांना व स्वतंत्र व्यापाऱ्यांना किती त्रास व किती अडचणी सोसाव्या लागल्या यासंबंधाची हकीकत पूर्वी प्रसिद्ध झाली आहे. तिचा विस्तार येथें करण्यास सवड नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांस शक्य त्या मार्गानें घालवून देण्याचें वसाहतींतील सरकारानें ठरविलें होतें. साम्राज्याचे आपण घटक असल्यामुळें वसाहतींत अनिरुद्ध प्रवेश करण्याचा आपला हक्क आहे असें हिंदी लोकांचें म्हणणें आहे. वसाहतींतील सरकारचें म्हणणें, पुष्कळ पैसा खर्च करून व माणसें खर्ची घालून वसाहतींत आपण राज्य स्थापन केलें आहे, अशा स्थितींत पाहिजे त्या मनुष्यास वसाहतींत येऊं दिल्यास मूळ संस्थापकांना निर्वाहाची पंचाईत पडेल. शिवाय हिंदी लोक मितव्ययानें राहून कामांत कुशल असल्यामुळें धंद्यांचे चढाओढींत त्यांस वर्चस्व मिळेल व आपल्या पोटा-

वर पाय येतील अशी त्यांस स्वाभाविक भीति वाटत आहे. उलटपक्षीं वसाहतींची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास मुदतबंदांच्या हिंदी मजुरांनीं मदत केल्यामुळें वसाहतीस महत्त्व प्राप्त झालें आहे, मुदतबंदीच्या कराराचे वेळेस कराराची मुदत संपल्यानंतर स्वतंत्र नागरिक या नात्यानें वसाहतींत राहण्याचा आपला हक्क आहे व या हक्कान्वयें आपल्या समाजाच्या प्रगतीकरितां अवश्य लागणारे लोक म्हणजे शिक्षक, वैद्य, धर्मोपदेशक, व्यापारी, वगैरेंची आपल्या समाजाचे अस्तित्वास जरूर आहे; अशा लोकांस वसाहतींत अवश्य येऊं दिलें पाहिजे, अशी हिंदी लोकांची बाजू आहे. देशभक्त गांधी यांणीं जी अवर्णनीय सत्याग्रहाची चळवळ लोकोत्तर स्वार्थत्यागानें यशस्वी केली, त्यांनींच बलाबलाचा विचार करून कांहीं तडजोड सुचविली होती. कायद्याच्या शब्दाप्रमाणें ब्रिटिश साम्राज्यांतील प्रजाजन या नात्यानें साम्राज्याखालील कोणत्याही भागांत प्रवेश करण्यास जरी मुभा असली तरी व्यवहारामध्यें या सवलतीचा उपयोग होत नाहीं.यासाठीं वसाहतींत अनिरुद्ध प्रवेश करण्याची हाव सोडून कांहीं मर्यादित लोकांना दरसाल वसाहतींत येऊं देण्याची परवानगी असावी, व जातिविशिष्ट कायदे स्वाभिमानास व साम्राज्याच्या इभ्रतीस अपमानकारक असल्यामुळें ते रद्द करावे, असें सुचविण्यांत आलें. गोपाळराव या वेळीं इंग्लंडांत होते. हारकोर्ट व लॉर्ड ग्लॅडस्टन यांच्या त्यांनीं मुलाखती घेतल्या. या सर्वांनीं गोपाळरावांस स्वतः दक्षिण आफ्रिकेंत जाऊन तेथील सरकारापुढें तडजोडीनें या प्रश्नाचा निकाल लावावा असें आग्रहानें सुचविलें. साउथ आफ्रिकेंतील सरकारनें आपल्यास शिष्टसंप्रदायाप्रमाणें वागविलें तर आपण तडजोडीची खटपट करूं. याप्रमाणें वाटाघाट होऊन गोपाळरावांनीं आफ्रिकेंत जाण्याचें ठरविलें. अगदीं निघण्यापासून त्यांस एकसारख्या अडचणी येऊं लागल्या. पहिली अडचण आगबोटीवरील तिकिटाची आली. विलायतेहून दक्षिण आफ्रिकेंत जाणाऱ्या बोटींवर सहसा एशिआटिक मनुष्यास घ्यावयाचें नाहीं, पहिल्या वर्गांतून तो प्रवास करतों म्हणालाच तर सुतक्याप्रमाणें त्यास एक खोली(cabin) देऊन तिचें संपूर्ण भाडें अशा एकट्या मनुष्याकडून घ्यावयाचें, अंत्यजाप्रमाणें त्यास अपमानानें वागवावयाचें, असा सरहा क्रम होता. यापूर्वीं तो पुष्कळ हिंदी लोकांना सोसावा लागला होता. गोपाळरावांनाही प्रथमतः याचप्रमाणें तिकिटाच्या बाबतींत कळविण्यांत आलें. फर्स्टक्लासचें एकच तिकीट घेऊन प्रवास करण्याचा आपला हक्क आहे व सबंध केबिनचें भाडें आपण देणार नाहीं, अशी त्यांनीं तक्रार केली. या बाबतींत दाद न लागल्यास बोटीच्या कंपनीविरुद्ध आपल्यास कायदेशीर दाद मागून घ्यावी लागेल असही त्यांनीं कळवलें. या चळवळीचा परिणाम एकाच तिकिटावर प्रवास करण्याची त्यांस परवानगी मिळाली. आगबोटींवर सुद्धां एतद्देशीय प्रवाशांना अंत्यजाप्रमाणें वागविलें जातें. बोटींवरील सर्व प्रवाशांच्या जेवणाच्या खेळण्याच्या वगैरे ज्या जागा आहेत त्यांत एशिआटिकांना जाण्याची परवानगी नसते. अगदीं अपंक्त मनुष्याप्रमाणें एका बाजूस बसवून त्यांस वाढण्यांत येतें,असा अनुभव दे.गांधी वगैरेंना पूर्वींच आला होता. गोपाळरावांनाही तीच स्थिति अनुभवावी लागणार असें वाटत होतें. जेवणाचे वेळीं त्यांनीं बोटीवरील वाढप्याला आपली जागा कोठें आहे असें विचारलें. व चौकशीअंतीं असें दिसून आलें कीं, गोपाळरावांची जागा सर्व प्रवाशांच्या मध्यभागीं कॅप्टनच्याजवळ राखून ठेविली आहे. कॅप्टनच्याजवळ जेवणास बसण्याचा मान सामान्य प्रवाशास सुद्धां मिळत नाहीं. अगदीं सन्माननीय पाहुण्याकरितांच हा मान राखून ठेवलेला असतो. अशा रीतीनें सुरवात झाल्यावर बोटीवर सर्व युरोपियन स्त्रीपुरुषांनीं त्यांचें कौतुकानें स्वागत केलें. त्यांचा प्रवास फार सुखकर झाला. बोटीवरून उतरण्याबरोबर आंगठा उठवून देण्याची व इंग्रजी भाषेची परीक्षा देण्याची अपमानास्पद पाळी येते कीं काय, ही भीतीही गोपाळरावांस वाटत होती. परंतु दक्षिण आफ्रिकेच्या किनाऱ्यास बोट लागतांच एक गृहस्थ पत्र घेऊन गोपाळरावांची चौकशी करीत आले. पत्र पाहतां युनिअन सरकारचे हे सेक्रेटरी असून प्रधानमंडळाच्या वतीनें गोपाळरावांचें स्वागत करण्याकरितां आले होते. प्रधानमंडळाकडून शक्य त्या तऱ्हेनें आदरातिथ्य करण्याचें त्या पत्रांत दर्शविलें होतें. दक्षिण आफ्रिकेंत उतरल्याबरोबर एकाद्या प्रधानाप्रमाणें गोपाळरावांचें स्वागत सुरू झालं. प्रधान-

मंडळाकरितां राखून ठेवलेला स्पेशल सलून, एक सेक्रेटरी, एक निष्णात स्वैपाकी, अशा जय्यत तयारीनें दक्षिण आफ्रिकेंतील प्रवासास आरंभ झाला. युरोपिअन लोकांनीं त्यांचें स्वागत केलें. एशिआटिक लोकांनीं तर गोपाळरावांचें आगमन सणाप्रमाणें पाळलें. प्रचंड सभा भरल्या, मौल्यवान् मानपत्रें अर्पण करण्यांत आलीं, साउथ आफ्रिकेच्या गव्हर्नर जनरलनीं सन्मान केला, प्रधानमंडळापुढें खुल्या दिलानें गोपाळरावांनीं आपलें म्हणणें मांडलें. राजकारणाची (Politics) व्याख्या लार्ड मोर्ले साहेबांनीं एके ठिकाणीं तडजोडीची परंपरा 'Politics is a series of compromises' अशी केली आहे; व ही अक्षरशः गोपाळरावांच्या प्रत्येक कृत्यास लागू पडते. तडजोड हेंच त्यांच्या मुत्सद्देगिरीचें रहस्य होतें. परिस्थिति, शक्यता, बलाबल या सर्वांचा विचार करून साध्य-शक्य-असेल तें पत्करावें, व दुस्साध्य गोष्टींबद्दल आग्रह सोडावा व शक्य त्या मार्गानें आपलें पाऊल पुढें टाकावें, हें गोपाळरावांचें व्रत होतें. लार्ड क्र्यू यांनीं गोपाळराव मोठे समयसाधक होते* असें त्यांचें यथार्थ वर्णन केलें आहे, व हें किती मार्मिक आहे हें कोणासही सहज दिसून येणार आहे. युनिअन सरकारच्या वाटाघाटींत तीन पौंडांची अत्यंत जुलुमाची डोईपट्टी बहुतेक नाहींशी करण्याचें गोपाळरावांस अभिवचन मिळालें,व हिंदी लोकांचा लढा शक्य त्या मार्गानीं संपविण्याचें गोपाळरावांस प्रधान मंडळानें आश्वासन दिलें. अशाप्रकारें सर्वत्र उत्सव होत असतांना सुमारें एक महिन्यापर्यंतचा हा काल गोपाळरावांस फारच कठिण गेला. गोपाळराव दक्षिण आफ्रिकेंत मुत्सद्दी या नात्यानें व्यावहारिक तडजोड करण्यासाठीं गेले होते. उभय पक्षांकडून, म्हणजे डच लोक व हिंदी लोक यांचेकडून, त्यांचें स्वागत होत होतें. अशा वेळीं कोणत्याही बाजूनें एकही अनुदार शब्द उच्चारणें म्हणजे एका बाजूची सर्वथैव नामर्जी संपादन करणें होतें; व अशा अप्रयोजक कृत्यानें या महोत्सवाचा रसभंग झाला असता. हिंदी लोकांची यत्किंचित्ही नाउमेद होऊं न देतां स्वाभिमानानें तरफदारी करणें व युनिअन सरकारपुढें व डच लोकांपुढें समतोलपणानें न्यायाची बाजू ठेवणें हें दुरापास्त काम होतें. गोपाळरावजींनींच या प्रसंगाचें वर्णन फार बहारीचें केलें आहे व तें चिंतनीय आहे. मुत्सद्देगिरीचा कस लागण्याचा यापेक्षां दुसरा प्रसंग कोणताच नव्हता. गोपाळरावांच्या मुत्सद्देगिरीची खरी परीक्षा याच वेळीं झाली.

"The first is about the extreme difficulty of my position in South Africa. Never before in all my life, I assure you, had I to walk on such difficult & delicate ground, nor did I ever feel so oppressed with a sense of responsibility as during my four weeks in South Africa. Even the special courtesy and consideration shown to me by the Union Government while it undoubtedly facilitated my work added in a way to my difficulties; for, while one section of the European community, the extreme anti-Indian section, was resentful that such consideration should have been shown to me, those who represented the better European mind, though satisfied at heart that the right thing had been done, were nervous as to whether undue advantage might not be taken of the position to put a forced interpretation on what had been done. On the Indian

* " In the good sense of the word Mr. Gokhale was an opportunist. No doubt he dreamed dreams and saw visions as most public men with high hopes and broad views did; but he was certainly one of those who knew how to take occasion by the hand and make the bounds of freedom wider yet. ".

side, on the other hand, the feeling in the matter was one of rather excessive jubilation. In such circumstances, a thoughtless act or even an unguarded expression, not only on my part but on the part of any one of our countrymen there—and they were meeting me daily in most enthusiastic demonstration—might have resulted in serions unpleasantness and embarrassment all round, inflicting an injury on the cause difficult soon to remedy.

"Throughout my four weeks, the dread of this possibility never left me for a moment and constantly weighed me down, and I thank God here to-day, speaking in your midst, as I did at Pretoria on the occasion of my last speech in South Africa, that no untoward incident marred the smooth progress of my visit and that even if no actual good results from my labours there, at any rate I am happy to feel that I have done no harm."

हिंदी लोकांनी मानपत्रें देऊन व युनिअन सरकारच्या प्रधानमंडळानें आनंद प्रदर्शित करून या गोष्टीस आपली कबूली दिली आहे. सर व्हॅलेंटाइन चिरोल यांचे यासंबंधीं उद्गार फार महत्त्वाचे आहेत:—

"I can testify from letters which I in turn received from my own friends out there how largely Mr. Gokhale contributed to remove many previous misconceptions by his unfailing tact and statesman-like moderation and to pave the way for the settlement which ultimately ensued though only after a further deplorable crisis that might have been altogether avoided had his wise counsels at once prevailed"

गोपाळराव स्वदेशीं परत आले. यानंतरही हिंदी लोकांच्या प्रश्नाबद्दल वसाहतींतील डच लोकमत फार प्रतिकूल होतें. प्रधानमंडळाच्या तडजोडीला सुद्धां भीक घालावयाची नाहीं अशी तेथील विरोधी पक्षाची चळवळ चालू झाली. दे. भ. गांधी यांना आपलें सत्याग्रहाचें व्रत जोरानें चालविणें भाग पडलें. साउथ आफ्रिकेंत पुनः एकच बखेडा माजून गेला. हजारों हिंदी स्त्रीपुरुष या चळवळीच्या पायीं आपल्या जिवाची सुद्धां आहुती देण्यास दे. भ. गांधी याच्या नेतृत्वाखालीं तयार झाली. अशा प्रचंड स्वार्थत्यागाच्या चळवळीस द्रव्यसाहाय्याची नड फारच भासूं लागली. गोपाळरावांनीं जरूर ते पैसे पुरविण्याचें दे. भ. गांधी यांस वचन दिलें. आपल्या लोकोत्तर वजनानें या फंडासाठीं पैसे मिळविण्याची त्यांनीं पराकाष्ठा केली. गांधी यांस दरमहा २००० पौंड म्हणजे ३०००० रुपये पाठविण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें. पहिल्या महिन्यास ३०००० रुपये वर्गणीचे रोख वसूल झाले नाहींत. ही रक्कम गोपाळरावांनीं आपल्या पदरची भरली व आपल्या बोलण्यांतील खरेपणा गांधी यांच्या प्रत्ययास आणून दिला. सतत परिश्रमानें सुमारें पांच लक्ष रुपये गोळा केले. त्याचप्रमाणें व्हाइसरॉय साहेबांची गांठ घेऊन त्यांची शक्य ती मदत गोपाळरावांनीं मिळविली. लॉर्ड हार्डिंज व गोपाळराव यांच्या दरम्यान या बाबतींत जो पत्रव्यवहार झाला आहे तो अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं. व्हाइसरॉय साहेबांस गोपाळरावजींची किती मदत झाली हें खुद्द लार्ड हार्डिंज यांनीं प्रांजल अंतःकरणानें व्यक्त केलें आहे.

"It was also right that on this occasion reference should be made to the important part taken by Mr. Gokhale in emigration questions and in particular that leading to Indian emigration to South Africa. In this

question, as in all other political questions, Mr. Gokhale strove ceaselessly for the amelioration of the conditions of Indians and for the promotion of their welfare. It was largely due to him and his tactful and statesmanlike attitude during his visit to South Africa that this thorny question has eventually received a satisfactory solution...... ....On more than one occasion he had given advice which he found to be both sound and useful, and he might mention that in the South African emigration question he rendered most loyal and helpful assistance."

गोपाळरावजींच्या मुत्सद्देगिरीबद्दल याहून दुसऱ्या पुराव्याची आवश्यकता नाहीं. साउथ आफ्रिकेच्या बाबतींत अंशतः तरी समाधानकारक निकाल गोपाळरावांचे ह्यातींत झाला ही आनंदाची गोष्ट आहे. या प्रश्नाचा खरा व चिरंतन असा निकाल गोपाळरावांनी म्हटल्याप्रमाणें या देशाच्या उन्नतीवरच अवलंबून आहे. हिंदुस्थानच्या ऊर्जित दशेबरोबरच वसाहतींतील लोकांना स्वाभिमानानें व साम्राज्याचे प्रजाजन या नात्यानें वसाहतींत राहतां येईल हेंही निर्विवाद आहे.

त्यांच्या मुत्सद्देगिरीची चवथी बाबत म्हणजे हिंदु-मुसलमानांचा प्रश्न ही होय. या बाबतींत गोपाळरावांचे विचार फार प्रगल्भ होते. आगगाड्या, तारायंत्रें, भाषा, राज्यव्यवस्था या योगानें एक झालेल्या हिंदुस्थानांतील तीस कोटी प्रजेमध्यें परस्परांतील यादवी ही परकीय राजसत्तेपेक्षां उन्नतीस जास्त विघातक आहे असें गोपाळरावांचें ठाम मत होतें. हिंदुस्थानच्या कोणत्याही प्रश्नाच्या बाबतींत प्रजाजनांनीं आपण आर्यमातेचे पुत्र आहोंत या भावनेस अग्रस्थान दिलें पाहिजे, जातिविषयक किंवा धर्मविषयक भेदास बिलकुल अवसर देतां कामा नये, असें त्यांचें ब्रीद होतें. अल्पसंख्याक दृष्टीनें कोणत्याही समाजास अवश्य त्या सवलती दिल्या पाहिजेत असें गोपाळराव नेहमीं म्हणत. परंतु जरी न्यायाच्या दृष्टीनें अशा सवलती अवश्य आहेत व व्यवहारांत उपयुक्त आहेत, तरी देशोन्नतीच्या दृष्टीनें अल्पसंख्याकांनीं सुद्धां आपल्या राजकीय आकांक्षांमध्यें आपण हिंदुस्थानचे रहिवाशी आहों ही जाणीव सदैव लक्षांत ठेविली पाहिजे असें ते आग्रहानें सांगत असत. या तत्त्वामुळेंच गोपाळराव हे मुसलमानसमाजास आदरणीय झाले होते. लखनौ, अलीगड यांसारख्या आदिपीठांचे ठिकाणीं त्यांचा मुसलमानवर्गाकडून जो सन्मान झाला, व त्यांच्या निधनानंतर निजाम हैदराबाद सारख्या मुसलमानी रियासतींतही त्यांच्या स्मारकाबद्दल जी चळवळ सुरू आहे, त्यावरून मुसलमान बंधूंना गोपाळरावांबद्दल किती आदर वाटत होता, हें स्पष्ट दिसून येणार आहे. हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांमध्यें हिंदु व मुसलमान या दोन्ही समाजांना सन्माननीय असा हिंदी पुढारी दुसरा कोणताही नव्हता असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या पुढाऱ्यांना राष्ट्रीय हें विशेषण वरील गुणाखेरीज लावतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. मॉस्लेम लीगच्या चळवळीस उत्तेजन देण्यामध्यें व अल्पसंख्याक या दृष्टीनें सरकारकडून दाखविण्यांत येणाऱ्या विषमतेची तीव्रता कमी करण्यामध्यें गोपाळरावांनीं शिकस्तीचे प्रयत्न केले. गोपाळरावांच्या योग्यतेचें यथार्थ व मार्मिक परीक्षण ना. आगाखान यांच्यासारखें दुसऱ्या कोणत्याही मुत्सद्द्याकडून आतांपर्यंत झालेलें नाहीं.

या देशाच्या रोगाचें गोपाळरावजींचें निदान फार यथार्थ होतें; व तदनुरोधानेंच उपाययोजनाही बिनचुक चालू होती. रोगाची चिकित्सा बरोबर नाहल्याखेरीज औषधाची योजनाही हितावह होत नाही हल्लीं आपल्या समाजांत राजकीय बाबतींत जे पक्षभेद उत्पन्न आहले आहेत त्यांचें मूळही ह्या निदानांतच आहे; व यासाठीं या निदानाचें स्वरूप स्पष्टपणें समजून घेतल्याखेरीज उपाययोजनेचें महत्त्व लक्षांत येणार नाहीं.

एका पक्षाचें म्हणणें असें आहे कीं, हल्लींच्या हीन स्थितीचें परकी सत्ता हेंच सर्वस्वी कारण आहे. स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज आपलें दैन्य नाहींसें होण्यास दुसरें

कोणतेंही साधन नाहीं. परकी सत्ता फार थोड्या लोकांच्या हातीं आहे. अवघ्या तीन लक्ष लोकांनीं तेहतीस कोट लोकांवर प्रभुत्व स्थापन केलें आहे. संख्येच्या दृष्टीनें ही स्थिति निमिषार्धांत नाहींशी होण्यासारखी आहे. प्रत्येक मनुष्यानें आपापल्यापरी उद्योग केल्यास स्वातंत्र्याचे दिवस हां हां म्हणतां प्राप्त होतील. स्वार्थत्याग केल्यास स्वतंत्रतादेवीची माळ या देशाच्या गळ्यांत पडेल अशी या लोकांची भावना आहे. पाहिजे त्या मार्गांनीं परकीयांचा नायनाट करणें हेंच आपलें ब्रीद आहे, असें हे लोक समजतात. हे लोक आपण ब्रिटिश राज्यसत्तेचे वैरी आहोंत असें उघडपणें प्रतिपादन करितात. परकीय राजसत्ता उलथून पाडणें आपलें कर्तव्य आहे असा त्यांचा समज आहे. गुप्त मंडळ्या, राजकीय खून, बॉंब, हीं त्यांचीं साधनें आहेत. आपल्या उद्दिष्टाच्या साधनाकरितां कोणताही स्वार्थत्याग करण्यास व आपले प्राण खर्ची घालण्यास हे लोक तयार आहेत. या पक्षांतील लोकांनीं कधींही आत्मनिरीक्षण केलें नाहीं. देशांतील लोक स्वातंत्र्याच्या हक्कास पूर्णपणें लायक आहेत अशी यांची ठाम समजूत आहे. राजकीय आकांक्षा तृप्त होण्यास फक्त परकी सत्तेची अडचण आहे असा यांना भ्रम आहे. आपल्याप्रमाणेंच आपले सर्व देशबांधव एकदिलानें, तत्परतेनें, व उत्साहानें पाहिजे तो स्वार्थत्याग करण्यास तयार आहेत असा यांच्या विचारसरणींतील हेत्वाभास आहे. ब्रिटिश सरकारच्या सत्तेमुळें या वर्गाचा बहुतेक नायनाट झाला आहे. तथापि त्याचें आस्तित्व या विचारपरंपरेंत लक्षांत ठेवणें अत्यंत जरूर आहे. या वर्गास सत्ताविध्वंसक (Anarchists) किंवा अत्याचारी असें नांव देतां येईल. दुसरा वर्ग क्रांतिकारक (revolutionary) लोकांचा आहे. पहिल्या वर्गाचे हे उत्पादक व गुरु आहेत. यांच्या अंगीं विद्वत्ता व धूर्तता असल्यामुळें ब्रिटिश राज्याचें शत्रुत्व ते उघडपणें प्रतिपादन करीत नाहींत. आपल्या लेखांनीं व भाषणांनीं तरुण उत्साही परंतु अप्रगल्भ अशा नवीन पिढीवर त्यांनीं छाप बसविली आहे. उपरोधानें, व्यंजनेनें, लक्षणेनें, सादृश्यानें, अनुमानानें ते क्रांतिकारक चळवळीस अप्रत्यक्षपणें साहाय्य करीत असतात. आपल्या भाषणास व लेखास गंभीर व तात्त्विक विचाराचा पेहराव देण्याची त्यांची हातोटी आहे. निर्भेळ स्वराज्य हेंच आपलें अंतिम ध्येय आहे असें त्यांनीं जाहीर केलें आहे. परकीय राजसत्ता हेंच आपल्या दुःखाचें कारण आहे असें हे समजतात. स्वराज्याच्या हक्कास आपण संपूर्णपणें पात्र आहों अशी यांची समजूत आहे. राष्ट्रीय (nationalist) हें नांव धारण करण्यास प्रथम सुरवात यांनींच केली. सनदशीर चळवळीस भिक्षांदेहि असें हे लोक मानतात. सरकाराशीं कोणत्याही प्रकारची सहकारिता देशद्रोहाची आहे असें यांचें ह्मणणें आहे. हिंदुस्थानांत प्रचलित असलेलें सरकार व त्याशीं संलग्न असणाऱ्या सर्व संस्था यांजवर संपूर्ण बहिष्कार घालावा असें ते सुचवतात. एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्रावर सत्ता निसर्गतः जुलमाची असून तिचे ठिकाणीं कोणतेंही सात्त्विक गुण असणें अशक्य आहे, असा त्यांचा सिद्धांत आहे. राज्यक्रांतीशिवाय देशोन्नति होत नाहीं अशी त्यांची दृढ समजूत आहे. परंतु पहिल्या वर्गाचा स्वार्थत्याग व देशाकरितां सर्वस्व खर्च करण्याची तयारी या दुसऱ्या वर्गांत नसल्यामुळें, व आत्मरक्षणाची इच्छा या वर्गांत प्रबळ असल्यानें, या वर्गाचे सर्व प्रयत्न गुप्त किंवा दर्शनीय राजनिष्ठ असे आहेत. परंतु यांची ओळख सार्वभौम सरकारास चांगली पटली असल्याकारणानें या वर्गाचाही बहुतेक बोंमोड झाला आहे. सरकारच्या रौद्र स्वरूपानें या लोकांनीं देशत्याग केला आहे व परकीय अमलाखालीं राहून त्यांनीं क्रांतिकारक चळवळी चालू ठेवल्या आहेत. सरकारची या लोकांवरील नजर फार तीक्ष्ण असल्यामुळें यांचे बाबतींतही फारसा विचार करण्याचें कारण राहिलें नाहीं.

तिसरा वर्ग जहाल किंवा असंतोषवादी यांचा आहे. यांच्या मतेंही राजकीय अवनतीचें संपूर्ण कारण परकीय राजसत्ता हेंच आहे. स्वराज्य प्राप्त झाल्याखेरीज देशाचें पाऊल कोणत्याही दृष्टीनें पुढें पडणार नाहीं असें यांचेंही निदान आहे. क्रांतिकारक पक्षाचे मार्ग शक्य नाहींत असें या पक्षास वाटतें. सरकारच्या दडपशाहीच्या धोरणानें ही जाणीव या पक्षांत तीव्रतर झाली आहे. परिस्थितीबद्दल या लोकांची भावना किंचित् निराशाजनक आहे. राजकर्त्यांशीं सदैव फटकून वागून शक्य त्या मार्गानें सरकारशीं विरोध

करावा व निरुपाय असेल त्या ठिकाणींच सरकारशीं सहकारितेनें वागावें असें यांचें म्हणणें आहे.—

(Opposition wherever possible, association wherever indispensible) अर्ज, विनंत्या, व डेप्युटेशनें हे मार्ग यांस भिक्षांदेहीचे वाटतात. दुष्काळ, प्लेग किंवा इतर आकस्मिक व संकटाचे प्रसंगीं सरकारास मदत करणें त्यांस स्वाभिमानशून्यतेचें दिसतें. म्युनिसिपालिटया, लोकलबोर्डें, प्रांतिक व वरिष्ठ कायदेकौन्सिलें हीं सर्व निर्जीव व स्वराज्याच्या दृष्टीनें तादृश उपयोगाचीं नाहींत असा यांचा अभिप्राय आहे. तरी पण त्यांच्या अस्तित्वाचा फायदा घेऊन त्याच्या द्वारें सरकारास शक्य तितका विरोध करावा असें यांचें मत आहे. शांततेपासून यत्किंचितही उपयोग न होतां देशांतील लोकांचा तेजोभंग होऊन ते दिवसेंदिवस मेषपात्र होत चालले आहेत, असें हे लोक मानतात. सुराज्यापासून स्वराजाची प्राप्ति न होतां आपलें उद्दिष्ट मार्गें राहून लोकांची फसवणूक होत आहे असा यांचा समज आहे. राजकीय उन्नतीखेरीज औद्योगिक, सामाजिक व नैतिक उन्नति होणें अशक्य आहे, असा यांचा सिद्धांत आहे. स्वावलंबनाचे मार्गास हल्लींच्या काळांत अवसर नाहीं; व यदाकदाचित् या मार्गाचें अवलंबन केलें तर सरकार तें हाणून पाडील असें यांचें प्रमेय आहे. " असंतोषः श्रियो मूलम् " हें यांचें सूत्र आहे. शक्य त्या उपायांनीं देशांत असंतोष पसरावा व अडवणुकीच्या मार्गानें राज्यकर्त्यांस 'सळो कीं पळो करून सोडावें' असा यांचा उद्देश आहे. सर्वत्र बखेडा व अनवस्था जाहल्यानंतर स्वराज्यप्राप्ति होईल, असा यांचा विश्वास आहे. अस्वस्थतेपासून किंवा घोटाळ्यापासून स्वराज्य कसें प्राप्त होईल याचा ते विचार करूं इच्छित नाहींत. किंबहुना या वादाघाटीची आजमितीस जरूरच नाहीं असें ते प्रतिपादन करतात. भावी स्वराज्य लोकसत्तात्मक होईल किंवा एकतंत्री होईल याची मीमांसा करणें त्यांस अप्रयोजक वाटतें. सारांश, असलेल्या परिस्थितीबद्दल सदैव खिन्नता बाळगून हरप्रयत्नानें असंतोष उत्पन्न करावा व यांतच देशाचा तरणोपाय आहे, असें या पक्षाचें धोरण आहे. या धोरणाप्रमाणेंच त्यांचें वर्तन आहे.

चवथा पक्ष नेमस्त लोकांचा किंवा प्रागतिकांचा आहे. तीन लक्ष लोकांनीं तेहतीस कोट लोकांवर राज्य स्थापन केलें याचें कारण या अल्पसंख्याक लोकांचें सामर्थ्य नसून आपल्या लोकांतील दुही व अज्ञान हेंच आहे, असें यांचें ठाम मत आहे. परकीय राजसत्तेच्या येथील प्रत्येक प्रतिनिधीचें सामर्थ्य तीन लक्षांचें आहे, व आपल्या कोणत्याही कृत्यास सार्वभौम सत्तेचा पाठिंबा आहे असा त्यांचा आत्मविश्वास असतो. परंतु प्रजाजनांपैकीं प्रत्येक व्यक्ति आपापल्यापरी एकटीच असून समवायानें कोणतीही संघशक्ति उत्पन्न करण्याचें सामर्थ्य तिच्यांत प्राप्त झालेलें नाहीं; व याच कारणामुळें जित व जेते यांचे मधील संख्येचें विषम प्रमाण मुळींच आश्चर्योत्पादक नाहीं. या अनुमानावरून परकीय राजसत्ता नाहींशी होऊन कार्यभाग होईल असें या पक्षास मुळींच वाटत नाहीं. एक सत्ता जाऊन दुसरी कोणती तरी स्थापन होईल व या देशाचे नशिबीं असलेलें दास्य केंव्हांही सुटणार नाहीं. यासाठीं हल्लींची हीन स्थिति घालविण्यास देशांतील अज्ञानाचा निरास करून संघशक्ति उत्पन्न केली पाहिजे, असें या पक्षाचें म्हणणें आहे. हें करण्यास देशांत शांतता असली पाहिजे व सुराज्यव्यवस्था (Good Government) असली पाहिजे. ब्रिटिश सरकारानें या देशांत शांतता स्थापन केली आहे व सुराज्याचा लाभही येथील लोकांस दिला आहे. या स्थितीचा फायदा घेऊन देशांत संघशक्ति वाढविणें organized life शक्य व अत्यंत सुलभ झालें आहे. असंतोष व अस्वास्थ्य उत्पन्न करण्यानें देशोन्नतीच्या या मार्गांत विघ्न येईल अशी या वर्गाची समजूत आहे. विश्वविद्यालयें व शिक्षणाचा प्रसार यांच्या योगानें देशांतील पुढारी वर्गांतील व्यक्तिविषयक उन्नति होण्यास पुष्कळ अवसर मिळाला आहे. शिक्षणानें व सवलतीनें राज्यकर्त्यांच्या बरोबरीनें योग्यता प्राप्त होण्यास हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत सुलभ झालें आहे. मुख्यत्वेंकरून उन्नतीच्या मार्गांतील अडचण म्हणजे सामान्य जनतेची (averages) आहे. यांच्यामध्यें निबिड अज्ञान वसत असून कोणतीही कार्यक्षमता दिसून येत नाहीं. यांच्या उन्नतीसाठीं आतांपर्यंत यत्किंचितही प्रयत्न झालेला नाहीं. हल्लींच्या राज्यांतील शांततेचा व सव-

लतीचा फायदा घेऊन, सर्वत्र ज्ञानप्रसार करून, सहकारी तत्त्वाचा (co-operation) विस्तार करून देशांत संघशक्ति (organised life) उत्पन्न करावी, अशी या वर्गाची समजूत आहे. या संघशक्तीच्या योगानें देशांतील लोकांस स्वराज्याची जबाबदारी अंगावर घेण्याचें सामर्थ्य येईल. यासाठीं प्रचलित राज्यव्यवस्थेस विरोध करणें आत्मघाताचें आहे, अशी या वर्गाची कल्पना आहे. ग्रामसंस्था, म्युनिसिपालिटया, लोकलबोर्डें, प्रांतिक व वरिष्ठ कायदेकौन्सिलें या सर्व स्वराज्याच्या शाळा आहेत. या सर्व संस्थांचा उपयोग करून व अनुभव संपादून सरकारशीं सहकारित्वानें वागल्यास या संस्थांचा विकास स्वराज्यांत होईल अशी या वर्गाची आशा आहे. सुराज्यापासून स्वराज्यप्राप्ति हा उत्क्रांतीचा नियम आहे, असा या वर्गाचा सिद्धांत आहे. हल्लींचें सरकार परकीय असलें तरी तें सर्वस्वी तमोगुणांनीं प्रेरित आहे असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. शिक्षणाचा प्रसार, दवाखाने, सांथीच्या रोगाचें निवारण, दुष्काळासारख्या आपत्तीची सदय व्यवस्था, आरोग्यरक्षण व शासनसंस्था या सर्वांवरून राज्यव्यवस्थेंतील सात्त्विक प्रवृत्तीचा अनुभव प्रत्ययास येतो. राज्यकर्तेही सुशिक्षित संस्कृतीमध्यें वाढले असल्यामुळें न्याय व सदसद्विवेकबुद्धिग्राह्य अशा सवलती त्यांजकडून मिळतील असें मानण्यास कोणतीच हरकत नाहीं. याच समजुतीनें, सरकारशीं शक्य त्या ठिकाणीं सहकारिता व अवश्य त्या ठिकाणीं विरोध, असें या वर्गाचें ब्रीद आहे. "Opposition wherever necessary, association wherever possible." अर्ज, विनंत्या व डेप्युटेशनें हेच योग्य मार्ग आहेत, यांचें अवलंबन करण्यांत या पक्षास कोणताही मानभंग वाटत नाहीं. प्लेग, दुष्काळ इत्यादि आपत्तींच्या वेळीं सरकारास मदत करून दुःख निवारण्याचें क्षेत्र शक्य तितकें विस्तृत करण्यांत आत्महितच आहे अशी या वर्गाची भावना आहे. स्वावलंबनाचा उपाय योजून शक्य त्या मार्गांनीं संघटित समाजव्यवस्था स्थापित करण्यास हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत पुष्कळ अवकाश आहे व याप्रमाणें प्रयत्न करून स्वराज्याची तयारी करणें हें आद्य कर्तव्य आहे, असें या लोकांस वाटतें. असंतोष उत्पन्न करण्यांत कांहीं पुरुषार्थ नसून सरकारशीं विरोधाचें तत्त्व अनवश्यक प्रसंगीं तात्त्विक दृष्ट्या चालू ठेवणें हें असमंजसपणाचें आहे, असा या वर्गाचा अनुभव आहे. सरकारशीं सहकारिता ठेवून, असलेल्या सवलतींचा फायदा घेऊन, आत्मोन्नति करावी असा त्यांचा मानस आहे. अस्वस्थतेपासून किंवा घोटाळ्यापासून स्वराज्यप्राप्ति होणें अगदीं अशक्य आहे, अशी या वर्गाची खात्री आहे. हिंदुस्थानचें ध्येय प्रजासत्तात्मक राज्य हें असून हल्लींच्या शासनसंस्थांचा विकास होण्यानें तें प्राप्त होईल असा यांचा दृढ विश्वास आहे. ग्रामपंचायतीपासून तों वरिष्ठ कायदेकौन्सिलपर्यंत सर्व संस्था त्यांस आदरणीय वाटतात. असंतोष उत्पन्न करण्यापासून आसुरी प्रवृत्ति उत्पन्न होईल, यासाठीं सनदशीर मार्गानें, सहकारितेनें, सलोख्यानें सात्विक गुणांचा विकास करून आत्मोन्नति प्राप्त करून घ्यावी हा या वर्गाचा संकल्प आहे. स्वावलंबनानें, आत्मतंत्रपणानें हें साध्य करून घ्यावयाचें असा या वर्गाचा कार्यक्रम आहे.

याप्रमाणें राजकीय बाबतींत पुढाकार घेणाऱ्या दोन वर्गांमध्यें निदानाबद्दल, उपायाबद्दल महदंतर आहे, व या वर्गांची एकवाक्यता होणें अगदीं अशक्य आहे. जहाल पक्षास सर्व अवनतीचें मूळ परकीय राजसत्ता असें वाटतें; नेमस्त पक्षास परकीय राजसत्ता ज्या योगानें येथें प्रस्थापित झाली ती आपसांतील दुही आपल्या दुःखाचें कारण आहे असें वाटतें. जहाल पक्षास आपल्या ठिकाणीं कोणतीही उणीव नसून स्वराज्याच्या हक्कास आपण लायक आहों असें वाटत आहे; नेमस्त पक्षास देशांतील अज्ञान व विस्खलित समाजव्यवस्था या योगानें स्वराज्याचा लाभ होण्यापूर्वी पुष्कळ पूर्व तयारी केली पाहिजे असें वाटत आहे. जहाल पक्षास हल्लींच्या राज्यव्यवस्थेनें आपला तेजोभंग होत असून आपल्यांतील कर्तबगारी व माणुसकी नाहींशी होत आहे असें वाटत आहे; नेमस्त पक्षास हल्लींच्या राज्यव्यवस्थेंतही कर्तबगारीस कांहीं जागा असून हल्लींच्या शासनसंस्था म्हणजे ग्रामसंस्था, म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, स्थानिक व वरिष्ठ कायदेकौन्सिलें या स्वराज्यमंदिराच्या पायऱ्या आहेत असें वाटत आहे. जहाल

पक्षास सुराज्य (good government) व शांतता हीं देशोन्नतीस विघातक वाटतात; नेमस्त पक्षास या दोन्हींच्या योगानें शिक्षणाचा व संघशक्तीचा विस्तार करून देशांत राजकीय चैतन्य (political consciousness) उत्पन्न करतां येईल असें वाटतें, व यामुळेंच शांतता व सुराज्य हीं त्यांस अत्यंत आवश्यक वाटत आहेत. जहाल पक्षास असंतोष उत्पन्न करणें राजकीय स्वास्थ्यास आवश्यक वाटत आहे; नेमस्त पक्षास असंतोषापासून अस्वस्थता व अस्वस्थतेपासून राजकीय अवनति अशी संकटपरंपरा मूर्तपणें दिसत आहे. जहाल पक्षाला इंग्लंडातील सामान्य जनतेंत न्याय व स्वातंत्र्यप्रियता आहे असें वाटत नाहीं. यासाठीं इंग्लंडांत राजकीय चळवळ करणें त्यास अप्रयोजक वाटतें. इंग्लंडांतील सामान्य जनतेची न्याय व स्वातंत्र्याची कल्पना उदारपणाची आहे, अशी नेमस्त पक्षाची समजूत आहे. त्या साठींच त्यांनीं इंग्लंडांत राजकीय चळवळ चालू ठेविली आहे. तिच्यासाठीं ते पदरचे पैसे खर्च करीत आहेत; व ती त्यांस अत्यंत अवश्य वाटत आहे. जहाल पक्षाचा अर्जे, डेप्युटेशनें व मुलाखती यांवर मुळींच विश्वास नाहीं; नेमस्त पक्षास अन्यायाचा प्रतीकार करण्यास हेच प्रशस्त मार्ग वाटत आहेत. अंत्यजांचा उद्धार, अशरणांचें संरक्षण व सहकारी चळवळ, यांवर जहाल पक्षाची भिस्त नाहीं; नेमस्तपक्षाचा यांवर संपूर्ण विश्वास असून देशामध्यें शिक्षणाचा प्रसार करून सहकारी तत्त्वानें संघशक्ति उत्पन्न केल्यास आत्मोन्नति खचित होईल असें त्यांस वाटत आहे. जहाल पक्षास हल्लींच्या शासनसंस्था लहान मुलांच्या खेळण्याप्रमाणें फसवेगिरीच्या वाटतात; नेमस्त पक्षास भावी उन्नतीचा पाया यांवरच अवलंबून आहे, असें वाटत आहे. जहाल पक्षास असंतोषापासून घोटाळा (chaos) उत्पन्न होईल व त्यांतून स्वराज्य प्राप्त होईल, असें वाटतें; नेमस्त पक्षास असंतोषापासून बेबंदशाही होईल, व एका परकीय सत्तेच्या ऐवजीं दुसरी स्थापन होऊन प्रजासत्तात्मक राज्याची आशा समूळ नष्ट होईल असें वाटत आहे. जहाल पक्षास हल्लींच्या अमदानींत कोणताही उत्साहजनक कार्यक्रम दिसून येत नाहीं, व सरकारच्या कृत्यांचा वेळीं अवेळीं निषेध करून अडवणुकीच्या मार्गानें असंतोष उत्पन्न करावा, एवढीच त्यांची कर्तव्यमर्यादा (gospel of discontent and despair) आहे. नेमस्त पक्षास आत्मोन्नतीचे, स्वावलंबनाचे पुष्कळ उपाय दिसत असून, मनुष्यबळाची वाण पदोपदीं भासत आहे. जहाल पक्ष रोगाचें जें कारण मानीत आहे, त्या कारणाचें आदिकारण नेमस्तपक्षास दिसत आहे. या एका महत्त्वाच्या फरकामुळेंच उपायाच्या प्रत्येक बाबतींत दोहों पक्षांत महत्त्वाचा मतभेद दिसत आहे. परकीय सत्ता हेंच कारण मानल्यास जहाल पक्षाची मीमांसा बरोबर होईल; देशांतील हीन स्थिति, विस्खलित समाजव्यवस्था व निबिड अज्ञान हेंच आदिकारण मानल्यास नेमस्त पक्षाची चिंतनिका सर्वस्वीं ग्राह्य वाटेल. शास्ते व शासित यांतील संख्येच्या विषमतेचा उलगडा नेमस्तांच्या अनुमानावरूनच स्पष्ट होत आहे. पक्षभेदाची मीमांसा गोपाळरावजींनीं फार बारकाईनें केली आहे. संकलित रीतीनें तिचें वर्णन करण्याचा वर प्रयत्न केला आहे. प्रागतिक पक्षाच्या तत्त्वांचा यावरून चांगला बोध होईल.

१९०५ सालीं कर्झनशाही संपल्यानंतर बेमुरवत राज्यकारभाराचे परिणाम स्पष्ट दिसूं लागले. फाळणीची खटपट सर्वस्वीं व्यर्थ झाल्यामुळें सनदशीर चळवळीवरील लोकांचा विश्वास उडाला. फुल्लरसाहेबांसारखे स्वैर वर्तनाचे अधिकारी निरंकुशपणें अंमल चालवूं लागले. त्रस्त व उद्विग्न झालेलें लोकमत प्रतीकार करण्याकरितां तत्पर होतें. याच संधीस क्रांतिकारक चळवळीस प्रारंभ झाला. वर्तमानपत्रांच्या द्वारें सनदशीर चळवळीचा फोलपणा भासविण्याची मोहीम सुरू झाली. क्रांतिकारक तत्त्वांचा अनुवाद सर्वत्र होऊं लागला. परवशतेची कहाणी केव्हांही कर्णमधुर व चित्तवृत्ति प्रक्षुब्ध करणारी असते. अशा स्थितींतही इतर मार्गांची निष्फलता नजरेपुढें येऊं लागली, म्हणजे उत्साही मनाचा कल क्रांतिकारक पक्षाकडे तत्काल वळतो. देशभक्तीनें प्रेरित झालेले पुष्कळ तरुण होतकरू लोक या नवीन चळवळीच्या जाळ्यांत सांपडले. गुप्त मंडळ्यांची सुरुवात झाली. बाँबचा प्रादुर्भाव झाला. राजकीय खुनासारखे अत्याचार होऊं लागले. व शेंकडो तरुणांची या ज्वालामुखींत आहुति पडूं लागली. विद्यार्थि-

वर्गाची मानसिक समता डळमळूं लागली. शिक्षकांस व पालकांस मोठी विवंचना पडली. देशांतील पुढारी म्हणविणारे लोक सुद्धां किंकर्तव्यतामूढ होऊन त्यांनीं तटस्थवृत्ति स्वीकारली. असंतोषाची लाट दडपून टाकण्याकरितां सरकारानें उग्र स्वरूप धारण केलें. सर्वत्र चिंता व भय उत्पन्न झालें. अशा वेळीं सरकारासही आपल्या सामर्थ्याचा दुरुपयोग न करतां लोकांचें सांत्वन करण्याकडे अमर्याद राजसत्तेचा उपयोग करावा, असें निस्पृहपणें सांगण्याची जरूर होती. लोकांसही क्रांतिकारक चळवळ परिणामीं आत्मघातक असून या बलाढ्य साम्राज्याच्या शक्तीपुढें तिची सर्वथैव धूळदाण होईल, यासाठीं तिजपासून परावृत्त होणें व राजनिष्ठ राहणें अत्यंत जरुरीचें असून यांतच देशहित आहे व आत्महित आहे, असें अधिकारानें सांगणारा पुढारीही यावेळीं पाहिजे होता. हीं दोन्हीं कामें गोपाळरावजींनीं फार उत्कृष्ट रीतीनें बजावलीं. १९०७ सालीं लॉर्ड मिंटो साहेबांस त्यांनीं लोकांचें सांत्वन करण्याचा फार कळकळीचा व फार मुत्सद्देगिरीचा उपदेश केला. याच वर्षी क्रांतिकारक तत्त्वांच्या प्रसारास विरोध करण्याकरितां त्यांनीं संयुक्त प्रांतांत प्रवास केला; व देशांतील राजकीय स्थितीचें साग्र विवेचन करून प्रागतिक पक्षाचीं तत्त्वें या देशाच्या उन्नतीस सर्वस्वीं कारणीभूत होतील व यांतच देशाचा तरणोपाय आहे, असें त्यांनीं प्रचंड जाहीरसभांतून उघडपणें बोलून दाखविलें. १९०८ साली सुधारणेच्या योजनेच्या वेळीं त्यांचें स्वरूप उपयुक्त व्हावें व त्यापासून देशाचें पाऊल पुढें पडावें, या दृष्टीनें त्यांनीं खटपट केली. सनदशीर चळवळीवरील लोकांचा उडालेला विश्वास, खरे व कल्याणकारक राजकीय हक्क देऊन पुनः स्थापित केला पाहिजे, असें त्यांनीं सरकारास सुचविलें.याप्रमाणें एका पक्षाकडून जें करणें शक्य होतें तें त्यांनीं असामान्य खटपटीनें घडवून आणिलें. तसेंच १९०९ सालीं असंतोषाच्या अगदीं आणीबाणीच्या वेळीं राजनिष्ठपणानें सरकारास साहाय्य करून देशांत शांतता राखण्याची किती आवश्यकता आहे हेंही त्यांनीं आपल्या भाषणांनीं व लेखांनीं जाहीर केलें. मुंबई व पुणें येथें या वेळीं त्यांनीं दिलेलीं व्याख्यानें त्यांच्या लोकोत्तर धैर्याची साक्ष देत आहेत. क्रांतिकारक चळवळ अगदीं विकोपास पोंचली असतां तिची यत्किंचित्‌ही परवा न करतां, सवंग लोकप्रीतीच्या आशेस न पडतां, लोकनिंदेचें भय न बाळगतां, प्रसिद्धपणानें, गोपाळरावजींनीं अप्रिय परंतु अत्यंत पथ्यकर उपदेश आपल्या देशबांधवांस केला.हिंदुस्थानच्या राजकर्त्यांनीं वेळोवेळीं "हिंदुस्थानचे लोकांस सुशिक्षित करून त्यांचे ठिकाणीं स्वराज्याच्या हक्कांची पात्रता आणून, साम्राज्यांत त्यांचा दर्जा इभ्रतीचा, लौकिकाचा व स्वतंत्रतेचा करावयाचा आहे.–" अशीं आश्वासनें दिलीं आहेत. राज्यकर्ते व प्रजाजन यांमधील कराराची ही एक बाजू आहे. कराराची दुसरी बाजूही प्रजेच्या बतीची असून त्यांनींही प्रस्थापित झालेल्या राज्यपद्धतीस राजनिष्ठ राहण्याचें अभिवचन दिलें आहे व त्याप्रमाणें प्रजेनें वागण्याचीही आवश्यकता आहे, असें गोपाळरावजींनीं आग्रहानें लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. पुष्कळ अविचारी लोकांकडून गोपाळरावजींस याबद्दल दोष देण्यांत आला. माथेफिरूंनीं त्यांस देशद्रोही ठरविलें. क्रांतिकारक चळवळींत त्यांच्या जिवाचीहि आहुति घेण्याचे प्रयत्न झाले होते. परंतु खऱ्या देशभक्तीनें प्रेरित होऊन अलौकिक मानसिक धैर्यानें गोपाळरावजींनीं आपलें कर्तव्य करण्यास कसूर केली नाहीं. या बाबतींत एका पत्रकारानें त्यांचेबद्दल काढलेले उद्गार फार मार्मिकपणाचे आहेत. "गोपाळरावजींमध्ये तात्त्विक शांतपणा व सात्त्विक उत्साह या दोहोंचें संमिश्रण झालें आहे. खरी राजनिष्ठा व निस्सीम देशाभिमान या दोहोंचाही संयोग गोपाळरावजींचे ठिकाणीं अपूर्वपणें दिसून येतो."*

*"Mr. Gokhale is perhaps the one leader in the country who satisfies Herbert Spencer's ideal of a public man in whom there is due commingling of philanthropic energy and philosophic calm. He typifies in his person the equal love of order and progress and shows how the truest loyalty and the most uncompromising patriotism can be combined."

"Leader."

गोपाळरावजींनीं याबेळीं दाखविलेली मुत्सद्देगिरी फार उच्च दर्जाची असून तिची थोरवी या बिकट प्रसंगीं संपूर्णपणें निदर्शनास आली. या कामगिरीचें वर्णन नामदार आगाखान यांनीं फार बहारीचें केलें आहे:-

"Ten years ago there were phenomena with infinitely more dangerous possibilities than we can now realise. It seemed to even those who by tradition, sentiment and interest were most attached to the British Raj that sooner or later they would have to choose between their loyalty to their Government or their duty to their country and race; and there was the distinct danger that a day might come when the two duties might become irreconcilable. If that was a nightmare to those who had a stake in the country, there were others with less responsibility who had hastily come to the conclusion that there was no possibility of development under the flag and that terrible as were the consequences yet chaos and destruction had to come before a new evolution could make a self-respecting position possible for their country. To these parties and schools of thought which practically monopolised the thinking and the patriotic in 1905-6, Gokhale showed that this very Government and this very empire had all the elements which were full of possibilities and was capable of assuring for their country a great and self-respecting future in the fulness of time; and that disruption and destruction were not only wicked but unnecessary, and that within the British empire and under the sovereign's crown and throne the noblest of India's aspirations could be in times satisfied. It was fortunate for the country and the empire that in those days of unrest, we did find a political leader of the capacity and character of Gokhale who by his wise attitude was able to take the wind out of the sails of the revolutionaries and at the same time both strengthen the Government and the sensible portion of the people."

येथपर्यंत गोपाळरावजींच्या मुत्सद्देगिरीचें आम्हीं शक्य तितक्या संक्षेपानें वर्णन केलें आहे. गोपाळरावजींच्या मुत्सद्देगिरीचा कळस पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामगिरीनें व लढाईनंतर मिळावयाच्या हक्कांच्या चळवळीमध्यें झाला असता. परंतु परमेश्वरी सूत्र कांहीं निराळें होतें. कमिशनच्या बाबतींत गोपाळरावजींनीं किती खटपट केली, हिंदुस्थानची बाजू समर्थन करण्याकरितां किती श्रम घेतले, आपल्या विद्वत्तेनें कमिशनमध्यें कसें वर्चस्व स्थापित केलें, आपल्या मुत्सद्देगिरीनें कमिशनमध्यें कांहीं बाबतींत एकवाक्यता उत्पन्न करण्याचा कसा प्रयत्न केला, व तडजोडीच्या योगानें दुष्प्राप्य असे हक्क सुद्धां मिळविण्याची किती अनुकूल परिस्थिति घडवून आणिली होती, या सर्वांचें वर्णन करणें गोपाळरावांच्या निधनानें अशक्य झालें आहे. कमिशनची कामगिरी पुरी व्हावयाची आहे. कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध व्हावयाचा आहे. कमिशनच्या सभासदांना आपला अनुभव सांगण्याची मुभा नाहीं. अशा स्थितींत या बाबतींत मुख्यपणाच स्वीकारणें भाग पडलें आहे. कमिशनमधील एतद्देशीय सभासदांचा गोपाळरावजींवर पूर्ण विश्वास होता. त्यांच्या नेतृत्वाखालीं कमिशनचें काम पुरें करण्यास ते तयारही होते. गोपाळरावजींचे हे थोर स्नेही गोपाळरावजींचे

हेतु लक्षांत ठेवून कमिशनच्या कामांत गोपाळराव-जींच्या आकांक्षांस मूर्त स्वरूप देतील अशी आम्हांस आशा आहे.

गोपाळरावांची देशभक्ति अत्यंत निस्सीम होती. वीस वर्षेपर्यंत डे. ए. सोसायटींत काम केल्यानंतर त्यांनीं विश्रांति घेतली असती, तर त्यांत कोणतेंही वावगें झालें नसतें. परंतु विश्रांतीची कल्पना बाजूस ठेवून त्यांनीं अधिक जबाबदारीच्या, अधिक त्रासाच्या व अधिक उपयुक्ततेच्या देशकार्यांत एक तपपर्यंत आयुष्य घालविलें. धार्मिक दृष्टीनें सुद्धां कोणत्याही भक्तीला आश्रयस्थान असावें लागतें. आराध्यदेवतेची कल्पना–मग ती सगुण असो किंवा निर्गुण असो–मूर्तपणें दृष्टीसमोर असल्याखेरीज भक्तीच्या ठिकाणीं दृढता येत नाहीं. देशाच्या उन्नतीचें स्वरूप गोपाळरावांच्यापुढें मूर्तिमंत असल्यामुळें त्यावरील त्यांची भक्ति, कितीही संकट-परंपरा आली तरी, यत्किंचितही ढळली नाहीं. कित्येकांस देशाच्या भावी उन्नतीची कल्पनाच नाहीं. त्यांची दृष्टि अगदीं अंध आहे. देशाच्या अज्ञेय, अमूर्त व अनिश्चित अशा भावी कल्पनेमुळें त्यांच्या देशभक्तीला सुद्धां स्थिरता प्राप्त झालेली नाहीं, व त्यांचे देशाच्या उन्नतीचे प्रयत्न आत्मविश्वासाचे होत नाहींत. अज्ञानामुळें त्यांच्या अंतःकरणप्रवृत्तींत चलबिचल होत असते. हिंदुस्थानांतील ब्रिटिश राजसत्ता ऊर्ध्वमूल अश्वत्थ वृक्षाप्रमाणें आहे. ती वरपासून खालीं पसरत चालली आहे. सेक्रेटरी ऑफ स्टेट, व्हाइसरॉय व प्रांतिक गव्हर्नर, यांच्या सत्तेस लोकमताचें नियंत्रण पाहिजे, असें सरकारास वाटून त्याप्रमाणें अंशतः तजवीज झाली आहे. स्टेट सेक्रेटरी, व्हाइसरॉय, प्रांतिक गव्हर्नर, यांचे कार्यकारी कौन्सिलांत हिंदी लोकांचा प्रवेश व कौन्सिलांतील प्रजेचे वाढलेले हक्क यांवरून वरील गोष्टीची सत्यता दिसून येत आहे. परंतु जिल्ह्याचे अधिकारी कलेक्टर यांच्यावर मात्र लोकमताचा ताबा असण्याची आजमितीस जरूर भासत नाहीं. लोकमत समजून घेण्याकरितां जिल्हा दरबारांचा प्रयोग मुंबई इलाख्यांत चालू आहे. इतर इलाख्यांतून याचा मागमूसही नाहीं. डिस्ट्रिक्ट कौन्सिलें स्थापून प्रांतिक कौन्सिलाप्रमाणें जिल्ह्याचे कलेक्टर यांच्या निरंकुश सत्तेस आळा घालावा असें गोपाळरावांनीं सुचविलें होतें. डिस्ट्रिक्ट बोर्डे व म्युनिसिपालिट्या या संपूर्णपणें लोकनियुक्त करून त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारावी असें गोपाळरावांचें मागणें होतें. लॉर्ड मोर्ले यांच्या वेळीं बसलेल्या अधिकार-विभागणी–कमिशनचाही हाच हेतु होता. त्याचप्रमाणें राजकीय घटनेचे आधारस्तंभ व आद्यघटक म्हणजे ग्रामसंस्था (village panchayats) अस्तित्वांत आणण्याचाही त्यावेळीं संकल्प होता. परंतु कमिशन-मधील लोकांच्यापासून लॉर्ड मोर्ले साहेबांस जी मदत व्हावयास पाहिजे होती ती झाली नाहीं. यामुळें त्यावेळीं पुष्कळ निराशा झाली. परंतु भावी स्थितीची वाढ कोणत्या दिशेनें व्हावयास पाहिजे, याचें रेषाचित्र मात्र काढलें गेलें. दीर्घ प्रयत्नांनीं सनदशीर चळवळींनीं काय संपादन करतां येईल, हें मात्र दृग्गोचर झालें आहे. प्राथमिक शिक्षण सर्वत्र सक्तीचें व मोफत झालें, सहकारी तत्त्वानें लोकांत कार्यक्षमता आली, ग्रामसंस्था ठिकठिकाणीं स्थापन झाल्या, म्हणजे सामान्यजनतेचा प्रश्न (Problem of averages) सुटल्यासारखा होईल. राज्यव्यवस्थेचा हाच पाया आहे. स्वराज्याची खंबीर इमारत या पायावर चिरस्थायी होण्यास कोणतीही अडचण पडणार नाहीं. प्रजासत्ताक राज्यांतील सर्व ठिकाणचा अनुभवही असाच आहे. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार हें सरकारचें आद्य कर्तव्य आहे, असें सर्व स्वतंत्र व सुधारलेल्या देशांत मानलें जातें. ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं ही गोष्ट कबूल केली आहे. प्रत्येक दहा मुलांपैकीं नऊ मुलांस निरक्षरपणें आयुष्य कंठणें भाग पडावें, दर पांच खेडयांत चार खेडयांस शिक्षणाची मुळींच सोय असूं नये, या स्थितीचें गोपाळरावजींचें सूत्रमय वर्णन ऐकून प्रत्येक इंग्लिश मनुष्यास शरम वाटत असे. या बाबतींत गोपाळरावजींसारखा मुत्सद्देगिरीनें प्रयत्न झाल्यास हा प्रश्न लौकरच सुटेल असें मानण्यास जागा आहे. सहकारी तत्त्वाची चळवळ ही सर्वस्वीं लोकांवर अवलंबून आहे. राजकारणांत स्वावलंबनाला जर कोठें अवकाश असेल तर तो याच ठिकाणीं संपूर्णपणें आहे. प्राथमिक शिक्षण व सहकारिता या जोडगोळीनें देशाच्या स्थितींत महत्त्वाची सुधारणा घडून येण्याचा संभव आहे. याप्रमाणें पायाची रचना झाल्यावर लोकनियुक्त डिस्ट्रिक्ट कौन्सिलें (District Councils) स्थापन करून जिल्ह्यांतील अधिका-

त्यांवर त्यांचें नियंत्रण स्थापन केलें पाहिजे. प्रांतिक कायदेकौन्सिलाची वाढ होऊन त्यांत प्रत्येक जिल्ह्यांतील डिस्ट्रिक्ट बोर्ड व म्युनिसिपालिटी यांच्या प्रतिनिधींचा प्रवेश झाला पाहिजे. अल्पसंख्याक वर्ग, व्यापारी मंडळें, विश्वविद्यालयें, व जमीनदार इत्यादि लोकांच्या प्रतिनिधींचाही त्यांत समावेश झाला पाहिजे. प्रांतिक कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें निःसंदेह मताधिक्य असलें पाहिजे. तसेंच कार्यकारी (executive) कौन्सिलाच्या सभासदांची निरनिराळ्या खातेवारीप्रमाणें संख्या वाढवून त्यांपैकीं निम्या तरी जागा हिंदी लोकांस हक्कानें मिळाल्या पाहिजेत, व हिंदी कौन्सिलराची नेमणूक प्रांतिक कायदेकौन्सिलांतील लोकनियुक्त सभासदांनींच केली पाहिजे. प्रांताच्या उत्पन्नावर प्रांतिक सरकारचें संपूर्ण स्वामित्व असलें पाहिजे. प्रांतिक करारांत (Provincial Contract) या दृष्टीनें फरक झाला पाहिजे. हिंदुस्थान सरकारकडून प्रांतिक सरकारास मदत मिळण्याऐवजीं प्रांतिक सरकाराकडून मदत (Grant) मिळाली पाहिजे. प्रांतिक बजेटावर लोकांचा ताबा राहून लोकनियुक्त सभासदांनीं कौन्सिलपुढें आणलेल्या व मंजूर झालेल्या ठरावांस कायद्याचें स्वरूप प्राप्त झालें पाहिजे. प्रांतिक स्वराज्य (Provincial Autonomy) म्हणून जें म्हणतात तें वरील प्रकारचेंच होय. दिल्ली दरबारच्या खलीत्यांतही प्रांतिक स्वराज्याचें ध्येय सरकारनें मान्य केलें आहे. हें घडवून आणण्यास राज्यक्रांतीची जरूर नाहीं, राजकीय उलथापालथीची आवश्यकता नाहीं व अनवस्था उत्पन्न करण्याचेंही प्रयोजन नाहीं;स्वावलंबनानें, स्वतःच्या लायकीनें, सहकारितेनें, स्वार्थत्यागानें, व दीर्घ परिश्रमानें हें प्राप्त होण्याजोगें आहे. प्लेटोच्या प्रजासत्ताक राज्याप्रमाणें हें काल्पनिक नाहीं. हें बुद्धिगम्य आहे, शक्य कोटींतील आहे व सुलभप्राप्य आहे. तसेंच जबाबदारीच्या जागा योग्य प्रमाणानें कमिशनसारख्या चळवळीनें येथील लोकांस मिळाल्यास व प्रस्तुतच्या अश्रुतपूर्व लढाईसारख्या संकटापासून बोध घेऊन राजकर्त्यांनीं येथील लोकांस लष्करी शिक्षणाचा लाभ दिल्यास, वसाहतीसारखें स्वराज्य येथें स्थापन होण्यास फार कालातिपात लागेल असें वाटत नाहीं. हल्लींच्या सर्वसंहारक अशा युद्धामुळें, राजकर्त्यांचेंही यांत पुष्कळ आत्महित आहे, अशी जाणीव उत्पन्न झालेली दिसते. शांततेनंतर उदारमतवादी मुत्सद्द्यांनीं शहाणपणाचा बोध घेतल्यास गोपाळरावजींनीं सुचविलेलें वसाहतींतील स्वराज्याचें ध्येय दृष्टिपथांत येईल.राजकीय वातावरणांत या दिशेनें वारा वाहूं लागला आहे.देशोन्नतीची अशी मूर्त व स्पष्ट कल्पना गोपाळरावजींच्या पुढें असल्यानें त्यांची देशभक्ति अनन्यशरण होती. आपल्या भक्तांची कसोटी लावण्याचा परमेश्वराचा सुद्धां उपक्रम आहे, व तोच अनुभव या आधिभौतिक आराध्यदेवतेच्या बाबतींतही गोपाळरावांस आला होता. अपमान, उपहास, हेतुविपर्यास या सर्व प्रकारचा छळ गोपाळरावजींनीं एकसारखा सोसला. त्यांच्या उन्नतीस प्रारंभ झाल्यापासून त्यांचा सदैव द्वेष करणारा एक वर्ग अस्तित्वांत होता. माफी प्रकरणांतही गोपाळरावांचा तिरस्कार याच वर्गानें केला होता. गोपाळराव लोकांस brute force म्हणतात असा कांगावा यांनींच केला. दीर्घोद्योगानें गोपाळरावांनीं कितीही उत्कृष्ट काम केलें तरी या घमेंडखोर लोकांनीं ' पोपटविद्या ' म्हणून त्यास नांवें ठेवण्यास कमी केलें नाहीं. कौन्सिलांतील व सुधारणेच्या बाबतींतील गोपाळरावांच्या कामगिरीस शक्य तितकें लघुत्व देण्याची यांनीं पराकाष्ठा केली. गोपाळरावांनीं सरकारशीं सहकारिता ठेवल्याबद्दल त्यांनीं गोपाळरावांस देशद्रोही ठरविलें. आपल्या दुष्कर्मांचीं फळें भोगीत असतांना गोपाळरावांवर अनन्वित आरोप केले. आपल्या शिष्यवर्गाकडून व अनुचरांकडून गोपाळरावांच्या नालस्तीचे पोवाडे ऐकण्यांत धन्यता मानली. मत्सरानें देशांतील तरुणांमध्यें वेळीं अवेळीं गोपाळरावांबद्दल बुद्धिपुरस्सर दुराग्रह उत्पन्न केला. कित्येक तरुण माथेफिरूंनीं या वेडांत गोपाळरावांचा जीव घेण्याचाही प्रयत्न केला होता. सारांश, शक्य त्या मार्गानें गोपाळरावांचा पाणउतारा करून त्यांचा तेजोभंग होईल अशी छळणूक त्यांचा पार्थिव देह ओंकारेश्वरावर जाईपर्यंत चालू होती. अशा स्थितींतही गोपाळरावांची देशभक्ति एक केंसभरही ढळली नाहीं, व त्यांनीं देशोन्नतीबद्दल चालविलेले प्रयत्न किंचितही शिथिल झाले नाहींत. एका मार्मिक लेखकानें गोपाळरावांबद्दल काढलेले पुढील उद्गार किती यथार्थ आहेत हें स्पष्ट दिसून येईल.

"But what he shared with fewer men was his superb courage in standing against his own people and bearing the brunt of their anger. His famous apology of 1897 and the way in which he faced the extreme storm are conclusive proofs of this. To oppose the Government even when you are sure of the applause of your own people is hard, but to oppose your own countrymen, to have your motives misjudged by those for whom you are toiling, to become the butt of the laughter of fools and mockery of the profane, to have the foul epithet of coward and traitor hurled at you at every turn, and still go on fighting with the Government with your right hand tied behind your back,–that is very much harder. But Mr. Gokhale did all this without flinching, though it entailed unutterable suffering on his proud and sensitive nature, and his countrymen today are all the more grateful to him for his having done it."

सर्व अडचणी व मानसिक त्रास सोसून देशभक्तीचें व्रत गोपाळरावांनीं आमरणान्त चालविलें. गोपाळराव गेलेच. त्यांच्या उज्ज्वल कीर्तीस त्यांच्या हितशत्रूंच्या अपकारानें यत्किंचितही कमीपणा आला नाहीं. आमची एवढीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे कीं, गोपाळरावांच्या शत्रूंस आपल्या कृत्यांचा आढावा देशापुढें इतक्या उत्कृष्टपणें मांडता येवो. 'घटं भिंद्यात् पटं छिंद्यात् कुर्याद्वा रासभस्वनं। येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत्॥' हा नेहमींचा अनुभव आहेच.

गोपाळरावांनीं नुसती आराध्यदेवता व तिची भक्ति एवढ्यांतच आपली इतिकर्तव्यता मानली नाहीं. मोक्षप्राप्ति होण्याकरितां पुष्कळ कर्म आचरण करावें लागतें; स्वार्थाचा संन्यास करावा लागतो; व आपल्यास सर्वस्वी वाहून घेऊन तदाकार वृत्ति व्हावी लागते. यासाठीं एक मठस्थापना गोपाळरावांनीं केली, व त्यांतील कर्ममार्गाचीही दिशा घालून दिली. संप्रदायाचे भाषेंत बोलावयाचें झाल्यास, देशाची भावी उन्नति हेंच ध्येय, किंवा आराध्य देवता; देशभक्ति हीच उपासना; निरपेक्षपणें निरनिराळ्या चळवळींत काम करणें हेंच कर्म; संपूर्ण स्वार्थत्याग हीच दृढ भक्ति. या कर्मयोगाचे सिद्धीकरितां "सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी" हाच मठ. व या संस्थेचे सभासद होणें हाच आत्मयज्ञ. याप्रमाणें आध्यात्मिक उन्नतीच्या परंपरेसारखी आधिभौतिक परंपराही गोपाळरावांनीं घालून दिली. आध्यात्मिक ध्येयाकरितां पुष्कळ लोक स्वार्थत्याग करण्यास तयार होतात, संन्यासवृत्ति स्वीकारतात, असा सर्वत्र अनुभव आहे. आधिभौतिक (Secular) ध्येयाकरितां अशा तऱ्हेचा स्वार्थत्याग करणारे लोक कितीसे तयार होतील व ही परंपरा कितपत चिरंतन होईल याबद्दल सर व्हॅलेंटाइन चिरोल यांनीं आपल्या एका मार्मिक लेखांत शंका प्रदर्शित केली आहे. व ती अवास्तव आहे असेंही म्हणतां येणार नाहीं. धार्मिक परंपरेमध्यें स्वार्थत्यागाची किंवा आत्मयज्ञाची जरी जरूर लागते, तरी त्यांतील प्रवर्तक हेतु स्वार्थपरायणतेचा असतो. भक्ताचें प्रेम कितीही निस्सीम असलें तरी त्यांतील अंतिम हेतु मोक्ष, सद्गति, सायुज्यता हाच असून तो व्यक्तिविषयक आत्मोन्नतीचाच होय. ह्या आधिभौतिक ध्येयामध्यें व्यक्तिविषयक उन्नतीस अवसरच नाहीं. देशाची उन्नति कधीं होईल याचा नेम नाहीं. आपण, आपलें कुटुंब, किंवा आपल्यावर अवलंबून असलेले लोक, यांस स्वराज्यसुखाचा लाभ मिळेलच असाही भरंवसा नाहीं. इमारतीच्या पायांतील दगडास ज्याप्रमाणें कोणतेंही दृश्य स्वरूप नाहीं त्याप्रमाणें अहंकाराचा सर्वत्याग करून, व्यक्तिविषयक कोणत्याही हेतूची इच्छा न धरतां निरपेक्षपणानें देशसेवेचें व्रत अंगीकारणें हें कोणत्याही आध्यात्मिक मार्गापेक्षां निःसंशय श्रेष्ठतर असून, विशेष उदात्त आहे. अशा तऱ्हेची महनीय परंपरा स्थापन करून आपल्या उदाहरणानें तिला मूर्त स्वरूप देण्याचा

गोपाळरावांनीं प्रयत्न केला आहे, व "सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी" हेंच याचें सप्रयोग उदाहरण आहे. 'सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी' स्थापन करण्यांत गोपाळरावजींचा हा हेतु होता कीं, देशांतील परिस्थितीवरून राजकीय चळवळींचें काम अव्याहतपणें चालू ठेवावें. प्रत्येक समंजस मनुष्यास ही स्थिति अपरिहार्यच वाटेल. राजकीय चळवळीचा इतिहास पाहिला तर एकोणिसाव्या शतकांतील पहिलीं पंचवीस वर्षें स्वराज्याचा ऱ्हास व परकीय राजसत्तेची स्थापना यांत गेलीं. दुसऱ्या पंचवीस वर्षांत परकीय राजसत्तेचा सर्वत्र विस्तार झाला व तिचीं मुळें खोल गेलीं. हिंदी कर्तृत्वाचा समूळ ऱ्हास या कालांत झाला, व लोक किंकर्तव्यतामूढ होऊन गेले. येथील प्रजेच्या दृष्टीनें एकोणिसाव्या शतकांतील दुसरा पाद म्हणजे अंधारयुग (Dark ages) असें त्यास म्हणतां येईल. तिसऱ्या पादाच्या अव्वलींतील पिढीला ब्रिटिश राज्यसत्तेचें नवीन तेज व परवशतेमुळें देशांतील हीन व उद्वेगजनक स्थिति यांतील विरोध तीव्र भासूं लागला. यामुळें परकीय सत्तेची थोरवी गाणारांचा वर्ग उत्पन्न झाला. इ. स. १८५७ सालीं विश्वविद्यालयाची स्थापना झाली. विश्वविद्यालयांतून ज्ञानसंपादन करून जी पिढी निर्माण झाली, तिला देशांतील वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान होऊं लागलें. परवशतेचें भेसुर स्वरूप स्पष्टपणें प्रत्ययास आलें. स्वकीय हक्काबद्दलची जागरूकता उत्पन्न झाली. वर्तमानपत्रांच्या व मासिकांच्या द्वारें, सार्वजनिक पुढाऱ्यांच्या लेखांतून व भाषणांतून, राजकीय चळवळीस प्रारंभ झाला. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटल्या पादाच्या मध्यभागीं राजकीय चळवळीस मूर्त स्वरूप प्राप्त झालें. सन १८८५ सालीं "राष्ट्रीय सभे"ची स्थापना झाली. थोडक्याच काळांत कौन्सिलाची सुधारणा होऊन लोकपक्षाचा राजदरबारांत प्रवेश झाला. वर्तमानपत्रें, कांहीं मासिकांतील लेख, मधून मधून भरणाऱ्या प्रांतिक सभा, बजेटाच्या वेळीं कौन्सिलांत होणारी चर्चा, व वर्षांतून तीन दिवस भरणारी "राष्ट्रीय सभा" हींच राजकीय चळवळीचीं आजपर्यंतचीं प्रधान अंगें मानलीं जात. अशा तऱ्हेनें अनियमित व अल्पकाळ चाललेल्या राजकीय चळवळीपासून कितपत उपयोग होणार? राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून बराच काळपर्यंतें तिचें लक्ष सुराज्याकडे लागलें होतें. स्वराज्याची मागणी १९०५ सालीं गोपाळरावजींचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेंत प्रथमतः स्पष्टपणें करण्यांत आली. दरसाल तीन दिवस याप्रमाणें राष्ट्रीय सभेचा आजपर्यंतचा हिशोब केल्यास अवघें तीन महिन्यांचें सुद्धां काज होत नाहीं. या कामाच्या मानानें देशांतील झालेली राजकीय प्रगति निःसंशय उत्साहजनक आहे व सनदशीर चळवळीस नांवें ठेवण्यास यत्किंचित्ही कारण नाहीं. ज्यां लोकांना राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेचें काम जत्रेंतील बाजाराप्रमाणें तीन दिवस पुरें करून समाधान वाटतें, प्रांतिक सभेची बैठक सुद्धां दरसाल भरविण्याची ज्यांस जबाबदारी वाटत नाहीं, राष्ट्रीय सभेचें कार्यालय किंवा तिच्या कामाची परंपरा वर्षभर चालू ठेवण्याची ज्यांस आवश्यकता वाटत नाहीं, स्वार्थत्याग करून रात्रंदिवस राजकीय चळवळीचा प्रसार करण्याकरितां जोंपर्यंत देशांतील तरुण उल्हासानें पुढें येत नाहींत, तोंपर्यंत राजकीय चळवळीस दोष देणें किंवा तिचा उपहास करणें कितपत योग्य आहे? सनदशीर मार्गाबद्दल निराशेचे उद्गार काढणारांनीं स्वतः या मार्गाबद्दल परिश्रम तरी किती केले आहेत? कोणच्याही उपायाबद्दल मनोभावेंकरून प्रयत्न न करतां त्याच्या फोलपणाबद्दल शोक करणें अत्यंत असमंजसपणाचें आहे. स्वार्थत्यागाची कमतरता व देशभक्तीचा अभाव हे दोन्हीही स्वतःच्या अंगचे गुण झांकण्याकरितां निराशेचा हा खोडसाळ आक्रोश आहे. आजपर्यंतचे झालेले प्रयत्न म्हणजे, एकाद्या जंगलांत भव्य इमारत बांधण्यापूर्वीं ज्याप्रमाणें कांटेरी झाडें व घनदाट वृक्ष तोडून जागा साफ करावी लागते, त्याप्रमाणेंच पूर्वतयारीचे होते. या तयार झालेल्या जागेवर देशोन्नतीची भव्य इमारत उठवण्यापूर्वीं पायांत पुष्कळ माल भरला पाहिजे, व तो पाया मजबूद केला पाहिजे. यासाठींच स्वार्थत्याग करून, अहंकार सोडून, कोणत्याही लौकिकाची किंवा फायद्याची हाव न धरतां, केवळ कर्तव्य म्हणून देशसेवा करणाऱ्या लोकांची जरूर हल्लींच्या पिढींत येऊन ठेपली आहे. या पायाच्या कामासाठीं जितका टिकाऊ माल देशांतील लोकांतून संपादन करतां येईल त्या मानानें देशोन्नतीची इमारत चिरंतन व रमणीय होणार आहे.

गोपाळरावजींनीं ही स्थिति लक्षांत आणून, देशांतील झालेल्या कार्याच्या व स्वार्थत्यागाच्या मानानें मिळालेली यशःप्राप्ति लक्षांत घेऊन, सनदशीर चळवळीची परंपरा कळकळीनें व उत्साहानें कायमपणें चालू ठेवण्यासाठींच **सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी** ही संस्था अस्तित्वांत आणिली.

देशकार्यांत मुख्यत्वेंकरून सर्व ठिकाणीं जी अडचण दिसत आहे, ती माणसांची होय. सार्वजनिक स्वरूपाचें कोणतेंही काम करण्यास तळमळीचीं व विशिष्टकार्यास वाहिलेलीं माणसें मिळत नाहींत. यामुळें कोणत्याही चळवळीस चांगलें स्वरूप प्राप्त होत नाहीं. " सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील त्याचें" ही समर्थांची उक्ति सदैव प्रत्ययास येते. याचसाठीं स्वार्थत्यागाचें व्रत स्वीकारून कळकळीनें काम करणारीं माणसें उत्पन्न करावीं, राजकीय शास्त्राचें सामान्य व विशिष्ट शिक्षण त्यांस द्यावें, व प्रत्येक व्यक्तीच्या कलाप्रमाणें व मगदुराप्रमाणें देशहिताच्या निरनिराळ्या कामांकडे त्यांस लावावें, हाच ही संस्था स्थापण्यांत गोपाळरावजींचा मुख्य उद्देश होता. देशोन्नतीची गोपाळरावजींची कल्पना फार व्यापक होती.या सर्वव्यापक चळवळीस मूर्त स्वरूप येण्यास निरनिराळ्या दिशांनीं काम करण्याची आवश्यकता आहे. सोसायटीच्या कामाचें स्वरूप साधारणपणें पांच प्रकारचें गोपाळरावजींनीं ठरविलें होतें:-(१) दुःखनिवारण, (२) समाजसेवा, (३) सहकारि-तत्त्वाचा प्रसार, (४) समाजशिक्षण, (५) राजकीय चळवळ. प्लेग, दुष्काळ, जलप्रलय किंवा साळुंख्यासारखे प्रसंग, अशा वेळीं शक्य ती मदत आपल्या देशबांधवांना करण्याचा उद्योग यांचा अंतर्भाव **दुःखनिवारण** या सदरांत होतो. अशा कष्टमय प्रसंगीं पुष्कळ परोपकारी लोक द्रव्यसाह्य करण्यास तयार असतात. परंतु हें साहाय्य गोळा करून त्याचा उपयोग दुःखी कष्टी झालेल्या लोकांस प्रत्यक्षपणें व्हावयास खटपट करणाऱ्या मध्यस्थाची जरुरी असते. तिकडील देशांतून समाजसेवेकरितां सर्वस्वी वाहून घेतलेले लोक पुष्कळ आहेत. मिशनरी लोकांकडूनही हें काम केलें जातें. आपल्या लोकांत परोपकारबुद्धीला किंवा भूतदयेला हें व्यावहारिक उपयुक्ततेचें वळण अद्याप लागलेलें नाहीं. हें वळण लावण्याचें काम करणारी एखादी संस्था असणें अवश्य आहे. या संस्थेचें बीं एकदा रुजल्यानंतर देशांत पुष्कळ संस्था अस्तित्वांत येतील. परंतु या बाबतींत पुढाकार कोणींच घेतला नाहीं. त्याचा उपक्रम 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी'नें केला आहे.**समाजसेवेच्या** सदराखालीं मद्यपानासारखी चळवळ, होलिकासंमेलनासारखे नैतिक उन्नतीचे प्रश्न, निकृष्ट वर्णांतील लोकांची आधिभौतिक व आध्यात्मिक उन्नति, अंत्यजांचा उद्धार, अशरणांचें रक्षण, कुंभमेळ्यासारख्या प्रसंगीं स्वयंसेवकवृत्तीनें समाजसेवा, कामकरी वर्गाची सुधारणा, स्त्रियांची उन्नति, स्त्रीशिक्षणाचा प्रसार, स्त्रियांचे ठिकाणीं असलेल्या अमोलिक गुणांचा विकास व त्यांचा लोककल्याणाच्या कामीं उपयोग,—या व अशा अनेक प्रकारच्या कामांचा यांत समावेश होतो. या समाजसेवेच्या कामास, 'सर्व्हंट्स् आफ इंडिया सोसायटी'च्या विद्यमानें मुंबई येथें अस्तित्वांत असलेल्या सोशल सर्व्हिस लीगनें, पुणें व मुंबई येथील सेवासदनांना मूर्त स्वरूप आणलें आहे. **सहकारि-तत्त्वाचा प्रसार** किती अवश्य आहे, याबद्दल विस्तार करण्याचें कारण नाहीं. ही चळवळ यशस्वी होण्यास मुख्य अडचण चिकाटीनें काम करणाऱ्या माणसांची उणीव ही आहे. ठिकठिकाणीं या विषयांत लक्ष घालणाऱ्या लोकांचा हाच अनुभव आहे. **समाजशिक्षण** या सदराखालीं प्राथमिक शिक्षण, त्याचा सर्वत्र प्रसार, देशांतील लोकांस वर्तमानपत्राच्या द्वारें, हस्तपत्रकांच्या द्वारें व व्याख्यानांच्या द्वारें आपल्या हक्कांची जाणीव उत्पन्न करण्याचा प्रयत्न, देशांतील राजकीय चैतन्य प्रज्वलित करून त्यास तेजस्विता आणण्याची खटपट, या कामांचा समावेश होतो. **राजकीय चळवळ** या सदराखालीं प्रांतिक व वरिष्ठ कायदेकौन्सिलांत महत्त्वाच्या राष्ट्रहिताच्या प्रत्येक प्रश्नासंबंधीं लोकमत जागृत करून, त्याला योग्य वळण देऊन, त्यास सजीवता आणणें व तें जोमाचें करणें याचा समावेश होतो. तसेंच **प्रांतिक** किंवा **राष्ट्रीय सभांची** तयारी, राजकीय बाबतींत खटपट करणाऱ्या संस्थांची स्थापना, इंग्लंडसारख्या ठिकाणीं देशोन्नतीकरितां चालविलेली चळवळ, या सर्वांचा अंतर्भाव होतो. राष्ट्रीयत्वाच्या उन्नतीची ही कल्पना किती व्यापक आहे व ती किती अनेकरूप आहे, हें विचारी

माणसास सांगावयास नको. देशोन्नतीचें काम नुसत्या राजकीय हक्कांच्या चळवळींतच गुरफटलेलें नसून त्याची व्याप्ति फार मोठी आहे. सर्व बाजूंनीं देशाची उन्नति झाल्याखेरीज स्वराज्याचा लाभ मिळणें ही गोष्ट अशक्य आहे. यक्षिणीच्या कांडीप्रमाणें नुसते स्वराज्याचे हक्क मिळून एकदम आत्मोन्नति होईल, हा निव्वळ भ्रम आहे. देशांत ज्ञानाचा विस्तार करून, संघटित शक्ति उत्पन्न करून, शासनसंस्थांमध्यें व राजकारणामध्यें लायक माणसांची परंपरा उत्पन्न करूनच देशोन्नति व्हावयाची आहे. यासाठीं राजकीय उन्नतीची व्याप्ति 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी'नें विस्तृत केली तीच सर्वांशीं ग्राह्य आहे. गोपाळरावजींच्या स्मारकाबद्दल हल्लीं सर्वत्र चळवळ चालू आहे. कित्येक पुढारी म्हणविणाऱ्या लोकांनीं या स्मारकाच्या स्वरूपाबद्दल अनेक सूचना केल्या आहेत. या सूचना करतांना 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी'च्या हल्लींच्या कार्यक्रमाबद्दल अप्रत्यक्षपणें नापसंती प्रदर्शित केली आहे. हें पाहून या लोकांच्या राजकीय उन्नतीच्या कल्पनांच्या संकुचितपणाबद्दल कींव येते. देशोन्नतीचें काम राजकीय चळवळीच्या एकाच मार्गानें चालणें अशक्य आहे व अनुपयुक्त आहे. सामाजिक दुःख निवारण्याचें काम देशोन्नतीचें नव्हे असें ह्मणतां येईल काय? प्लेग व दुष्काळ यांसारख्या आपत्ति, साळुंख्यासारखा हृदय विदारणारा प्रसंग, राष्ट्रीय संकटांपैकी नव्हे काय? सरकारकडून जरी दुःख निवारण्याचा प्रयत्न झाला, तथापि तो पुरेसा आहे असें म्हणतां येईल काय? अशा कळवळ्याच्या प्रसंगीं गांजलेल्या व विपद्ग्रस्त अशा आपल्या देशबांधवांना साहाय्य कोणीं करावयाचें? देशांत या बाबतींत पुढाकार घेणाऱ्या दुसऱ्या संस्था अस्तित्वांत आहेत काय? धर्मप्रसाराच्या बाबतींत खर्च होणाऱ्या अमोप वित्ताचा, शक्तीचा, बुद्धीचा, सामाजिक दुःख निवारण्याचे कामीं किती उपयोग होत आहे? विधर्मी मिशनरींखेरीज दुष्काळासारख्या आपत्तींत आपल्या देशबांधवांना मदत करणारी कोणती स्वधर्मीय किंवा स्वकीय संस्था आजपर्यंत अस्तित्वांत होती? अत्यंजांसारख्या ह्मकाऊ मानलेल्या देशबांधवांचा उद्धार करून स्वतंत्रतेच्या हक्कांस त्यास पात्र करावयाचा उद्योग कोणीं करावयाचा? विस्खलित झालेल्या समाजांतून—मग तो समाज स्त्रियांचा असो, पुरुषांचा असो, मागसलेल्यांचा असो किंवा अंत्यजांचा असो, श्रीमंतांचा असो अगर गरीबांचा असो—संघटित व्यवस्था (organised life) स्थापन करावयाची खटपट कोणीं करावयाची? हें देशोन्नतीचेंच कार्य नव्हे काय? मद्यपानासारखीं मनुष्यत्वाची हानि करणारीं व्यसनें, समाजांतील बीभत्स चाली, या सर्वांना आळा घालून समाजांतील चारित्र्य बनविणें हें काम देशोन्नतीच्या भागापैकीं नव्हे काय? राष्ट्रोन्नतीच्या बाबतींत या उद्योगाची जरूर नाहीं असें ह्मणतां येईल काय? सहकारितत्त्वाची चळवळ देशांत पसरण्याचे प्रयत्न कोणीं करावयाचे? यासाठीं निर्माण झालेल्या संस्था देशांत आहेत काय? प्राथमिक शिक्षणासाठीं लीग किंवा संघ स्थापन करून ही चळवळ विस्तीर्ण प्रमाणावर करणें अवश्य नाहीं काय? व हें काम कोणीं करावयाचें? या व अशा प्रकारच्या सर्व कामांचा अंतर्भाव 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी'नें आपल्या कार्यक्रमांत केला आहे व सोसायटीच्या उद्देशपत्रिकेंत नमूद केल्याप्रमाणेंच हें काम चालू आहे. याचा अर्थ राजकीय प्रश्नांचा खल करूं नये, असा मुळींच नव्हे, उलट या राजकीय प्रश्नांचा खल करणें हें सोसायटीचें प्रधान अंग आहे. गोपाळरावजी ह्यात असतांना याबद्दल मुळींच शंका नव्हती. त्यांनीं एकट्यांनीं केलेल्या राजकीय चर्चेचें महत्त्व, क्षेत्र व दानत हिंदुस्थानांतील सर्व राजकारणी पुरुषांनीं समवायानें केलेल्या चर्चेपेक्षांही अधिक होतें. हल्लीं सोसायटींत असलेल्या लोकांपैकीं ही राजकीय प्रश्नाचा ऊहापोह करण्याची पात्रता असलेले लोक हें काम करीत आहेत. या बाबतींत मुख्य अडचण लायक माणसांची आहे. 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी'त प्रवेश करण्याबरोबर राजकीय चळवळ करण्याची पात्रता अंगीं येते असें कोणी समजत असेल, तर तो निवळ भ्रम आहे. सोसायटीच्या नियमाप्रमाणें तिचे सभासद होण्यास सामान्यपणें मनुष्य पदवीधर असावा लागतो. विद्येची इतकी पूर्वतयारी व संस्कार, देशहिताची तळमळ व स्वार्थत्याग इतके गुण अंगीं असले, ह्मणजे सोसायटीच्या कार्यक्रमापैकीं पहिलीं चार कामें पुष्कळांस

करतां येतील व प्रत्येक व्यक्तीच्या कर्तबगारीच्या, उत्साहाच्या व श्रमाच्या मानानें या चार कामांत यशः- प्राप्ति मिळण्याचा पुष्कळ संभव आहे. परंतु सोसायटीच्या कार्यक्रमांतील पांचवें काम—म्हणजे राजकीय चळवळ ह्रिची गोष्ट फार निराळी आहे. विश्वविद्यालयांतील अगदीं वरिष्ठ प्रतीची पदवी मिळवून जरी कोणी या संस्थेचा सभासद झाला, तरी त्यास पुष्कळ दिवस शिष्यवृत्तीनें राहून अभ्यास केला पाहिजे. योग्य संधि मिळेपर्यंत त्यास उमेदवारी केली पाहिजे. दुसरी गोष्ट, या चळवळींत पडणाऱ्या मनुष्याच्या अंगीं उतावीळपणा बिलकूल कामाचा नाहीं. राजकीय चळवळींत काम करणाऱ्या मनुष्याला पुष्कळ कालपर्यंत आपल्या कामगिरीचें दृश्य स्वरूप दाखवितां येणार नाहीं. कित्येक प्रसंगीं स्वतः खटपट करून यशःप्राप्ति दुसऱ्याच लोकांना मिळण्याचा संभव असतो. स्वतःच्या श्रमाचें चीज होणेंही अशक्य असतें. कांहीं वेळ आपण मागें राहून आपल्या प्रयत्नांस अदृश्य स्वरूप द्यावें लागतें. लौकिकाची किंवा प्रतिष्ठेची यत्किंचितही हाव धरून चालत नाहीं. तिसरी गोष्ट, राजकीय चळवळ सदनशीर मार्गानें करावयाची असल्यामुळें, प्रागतिक पक्षाच्या तत्त्वांबद्दल दृढ विश्वास असावा लागतो. या आत्मविश्वासाशिवाय राजकीय चळवळीचें काम करण्यास केव्हांही हुरूप येणार नाहीं. सरकारच्या कृत्यांची वेळीं अवेळीं टीका करून किंवा उपहास करून सवंग लोकप्रियता मिळविण्याचा सुलभ उपाय आहे; परंतु सनदशीर चळवळीमध्यें या मार्गाचा तादृश उपयोग होत नाहीं. पुष्कळ प्रसंगीं आपल्या देशबांधवांकडून अपमान, उपहास, निंदा, त्रास सोसावा लागतो. देशद्रोही म्हणवून घेण्याची पाळी येते. अपयशानें, निराशेनें, मन उद्विग्न होतें. अशा स्थितींतही समतेनें, निश्चयानें, आत्मविश्वासानें व धिमेपणानें काम करण्याची कुवत अंगीं यावी लागते. या सर्व कारणांमुळें राजकीय चळवळीस वाहून घेणारीं योग्य माणसें मिळणें फार दुरापास्त आहे. या चळवळींत लौकिक संपादन करण्यास आम्हीं प्रारंभीं नमूद केलेले मुत्सद्द्याचे गुण अंगीं असावे लागतात. सुमारें पन्नास वर्षांच्या काळांत राजकीय चळवळींत अलौकिक योग्यतेस चढलेला गोपाळरावांसारखा एकच मनुष्य सर्व हिंदुस्थानांत झाला. भावी पिढींत तरी त्यांच्यासारखा दुसरा मनुष्य होईल किंवा नाहीं, याची शंकाच आहे. या सर्व गोष्टींचें मनन केलें असतां असें दिसून येईल कीं, राजकीय चळवळीचें सोसायटीचें काम नांवलौकिकास येण्यास उत्कृष्ट माणसांची आवश्यकता आहे. सोसायटी स्थापन झाल्यापासून आज दहा वर्षांत नांवाजण्यासारखीं माणसें मिळालीं नाहींत. माणसें मिळेपर्यंत वाट पाहणें हें केव्हांही शहाणपणाचें होणार नाहीं. याच हेतूनें मिळालेल्या माणसांच्या मगदुराप्रमाणें गोपाळरावांनीं त्यांस देशोन्नतीच्या निरनिराळ्या कामांस लावलें. सोसायटीसंबंधीं व्यंजनेनें किंवा उपरोधानें टीका करणारांनीं वरील गोष्ट लक्षांत ठेवणें अत्यंत अवश्य आहे. सोसायटीच्या स्थापनेपासून तों स्वतःच्या निधनापर्यंत देशांतील अनेक अडचणी व अनपेक्षित संकटें यांमुळें गोपाळरावजींना या दहा वर्षांच्या काळांत दहा महिनेसुद्धां सावधानपणानें सोसायटीच्या कामाकडे लक्ष देतां आलें नाहीं. सार्वजनिक कामाचा अहवाल पाहिला असतां, काम करणाऱ्या देशांतील एकाद दुसऱ्या तळमळीच्या मनुष्यावरच कामाचा सर्व बोजा पडतो. श्रमविभागाचें तत्त्व सार्वजनिक कामांत तरी आजमित्तीस मुळींच अस्तित्वांत नाहीं. कौन्सिलांत जीवापाड श्रम करून काम करणाऱ्या मनुष्यानेंच राष्ट्रीय सभेंत पुढाकार घेतला पाहिजे, इंग्लंडांतील चळवळीस गेलें पाहिजे; आणीबाणीच्या प्रत्येक प्रसंगीं अन्यायाचा प्रतीकार करण्याकरितां धडपड केली पाहिजे, व पडेल तें काम करण्यास तत्पर असलें पाहिजे, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. १९०५सालीं १२जूनला सोसायटी स्थापन करण्यांत आली. कर्झनशाहीच्या दडपशाही धोरणाबद्दल इंग्लंडांत लोकमत जागृत करण्याकरितां जाण्यासाठीं राष्ट्रीय सभेनें गोपाळरावांस हुकूम केला होता. ही कामगिरी संपते तोंच गोपाळरावजींस राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडलें. १९०६ सालीं फुल्लरशाहीच्या अतिरेकामुळें त्यांनीं विलायतेस जावें, असा येथील लोकांचा फार आग्रह पडला. याच कारणामुळें त्यांस विलायतेस जावें लागलें. हें सालही विलायतेच्या सफरींत गेलें. १९०७ सालीं असंतोष व क्रांतिकारक चळवळीचा झपाट्यानें देशांत फैलाव होत असल्यामुळें लोकमतास आळा घालण्याकरितां ठिकठिकाणीं

हिंडावें लागलें. जाहीर व्याख्यानें द्यावीं लागलीं. ही कामगिरी व कौन्सिलचें काम संभाळून या सालीं त्यांना फक्त दोन महिने सोसायटीच्या कामाकडे लक्ष देतां आलें.१९०८ सालीं कौन्सिलच्या योजनेचा प्रश्न लॉर्ड मोर्ले यांच्यापुढें असल्यामुळें, लोक-पक्षाची बाजू सेक्रेटरी ऑफ स्टेट यांजपुढें मांडण्या-करितां त्यांस विलायतेस जावें लागलें. हें सर्व वर्ष याच खटपटींत गेलें. १९०९ सालीं सुधारणेच्या योजनेस मूर्तस्वरूप देण्याचें काम चालू होतें व त्या वाटाघाटींतच गोपाळरावांचा बहुतेक काळ गेला. १९१० सालापासून दरसाल तीन महिने कौन्सिलच्या कामासाठीं त्यांस जावें लागे. याच सालीं प्राथमिक शिक्षणाच्या चळवळीस प्रारंभ झाला. या सालीं सुमारें तीन महिने गोपाळरावजींस सोसायटींतील लोकांस स्वतःचे नजरेखालीं कांहीं शिक्षण देतां आलें. १९११ सालीं प्राथमिक शिक्षणाचें बिल पुढें येऊन तें पास होण्यासाठीं लोकमताचा पाठिंबा मिळावा म्हणून गोपाळरावजींस सतत खटपट करावी लागली. हें सर्व साल याच उद्योगांत गेलें. १९१२ सालीं कौन्सिलचें काम संपल्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या प्रश्ना-संबंधानें त्यांस विलायतेस जावें लागलें. १९१२ सालच्या अखेरीस गोपाळराव दक्षिण-आफ्रिकेंतून परत आले. १९१३ व १९१४ हीं दोन संपूर्ण वर्षे पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामांत गेलीं. ह्या दोन सालीं सोसायटींतील लोकांस शिक्षण देण्यास मुळींच फावलें नाहीं. याप्रमाणें सुमारें दहा वर्षांच्या काळांत पांच महिन्यांपेक्षां जास्त फुरसत सोसायटीच्या कामा-कडे देण्यास अपरिहार्य अडचणींमुळें त्यांस अशक्य झालें. या काळांत ज्या दुसऱ्या देशकार्यांमध्यें गोपाळराव गुंतले होते, तींही अत्यंत महत्त्वाचीं होतीं असें प्रत्येक मनुष्यास कबूल करावें लागेल. या परिस्थितीचा विचार केला असतां, सोसायटीच्या कामगिरीबद्दल अप्रत्यक्षपणें नापसंती दर्शविणाऱ्या लोकांस किती सबल आधार आहे, याचा प्रत्येकानें प्रांजलपणें विचार करावा अशी आमची त्यांस आग्रहाची विनंती आहे.

सोसायटीचें काम त्यांतील व्यक्तींच्या विद्वत्तेवर, उत्साहावर, कर्तबगारीवर, व्यक्तिविषयक कलावर व श्रमसहिष्णुतेवर अवलंबून आहे. ज्या ज्या मानानें हे गुण विकास पावतील, त्या त्या मानानें सोसायटीची कीर्ति वाढणार आहे. परंतु सोसायटींत येणाऱ्या प्रत्येक मनुष्याचे ठिकाणीं देशाबद्दल तळमळ वाटली पाहिजे. धर्मश्रद्धेप्रमाणें देशभक्तीला उज्ज्वल स्वरूप प्राप्त झालें पाहिजे. आध्यात्मिक ध्येयाप्रमाणें हें आधिभौतिक ध्येयही पवित्र वाटलें पाहिजे. सार्वजनिक आयुष्यक्रम धर्मसंप्रदायाप्रमाणें पूज्य वाटला पाहिजे. कोणत्याही अपयशानें नाउमेद न होतां,कोणत्याही संकटास न जुमा-नतां, कोणत्याही मोहास बळी न पडतां, स्वार्थत्यागानें, आत्मतंत्रपणानें, दृढ विश्वासानें, मातृभूमीच्या सेवेंत जीविताचें साफल्य व्हावें, अशी दृढ भावना बाळगली पाहिजे. अशा श्रद्धेनें निष्काम देश-कार्य केल्यानंतर सद्गति प्राप्त होईल, अशी अंतःप्रवृत्ति झाली पाहिजे. तरच देशाची उन्नति होईल.गोपाळरावांनीं सोसायटीच्या उद्देशपत्रिकेंत या ध्येयाचें वर्णन फार उत्कृष्ट तऱ्हेनें केलें आहे."One essential condition of success is that a sufficient number of our countrymen must now come forward to devote themselves to the cause in the spirit in which the religious work is undertaken. Public life must be spiritualised. Love of country must so fill the heart that all else shall appear as of little moment by its side. A fervent patriotism which rejoices at every opportunity of sacrifice for the motherland, a dauntless heart which refuses to be turned back from its objects by difficulty or danger, a deep faith in the purpose of providence that nothing can shake, equipped with these the worker must start on his mission and reverently seek the joy which comes of spending oneself in the service of one's country." वरील उदात्त विचारांचें श्रवण,मनन व निदिध्यास प्रत्येक आर्यमातेच्या पुत्रानें करणें अत्यंत अवश्य आहे.

देशसेवेची ही उज्ज्वल कल्पना अंगीं बाणण्यास स्वार्थत्याग करून संन्यासवृत्ति स्वीकारली पाहिजे. ज्यांस हें शक्य नाहीं, त्यांनीं प्रापंचिक उदासीनता आपल्या आचरणांत धारण केली पाहिजे. निदान त्या दिशेनें प्रयत्न तरी केला पाहिजे. त्याशिवाय या आधिभौतिक ध्येयाची प्राप्ति होणें दुष्कर आहे. गोपाळरावांचें कुटुंब वारल्यानंतर ते जरी तरुण होते, तरी त्यांनीं अविवाहित राहण्याचा निश्चय केला. सोसायटी स्थापन झाल्यापासून ते आपल्या कुटुंबांतील माणसांपासून अगदीं अलग राहूं लागले. त्यांस दोन मुली आहेत व त्यांची आई नसल्यामुळें अशा स्थितींत कोणत्याही बापास मुलींचा लळा असणें अगदीं स्वाभाविक आहे. हे पाश गोपाळरावांनीं बुद्धिपुरस्सर कमी केले होते. कुटुंबांतील माणसांस ते केव्हां तरी अल्पकाळ भेटत असत. अगदीं आजारी असतांना किंवा शारीरिक त्रास होत असतांना कुटुंबांतील माणसें गोळा करून समाधान करून घेण्याचा त्यांनीं कधींही प्रयत्न केला नाहीं. देशाच्या विश्वप्रपंचांत पडल्यामुळें स्वतःच्या कुटुंबाबद्दल त्यांनीं अगदीं उदासीन वृत्ति अक्षरशः ठेविली होती. गोपाळरावांच्या खाजगी वर्तनाची ज्यांस माहिती आहे, त्यांस या विधानाची सत्यता सहज कळणार आहे. गोपाळरावांचा कित्ता सोसायटींतील सभासद आपल्यापुढें ठेवतील अशी आम्हांस पूर्ण आशा आहे.

ही सोसायटी अस्तित्वांत आल्यामुळें देशांतील विचारी लोकांस फार संतोष वाटला. अनिश्चित देशकार्याला व अदृश्य देशभक्तीला मूर्तस्वरूप प्राप्त झालें असें प्रत्येकास वाटलें. सर्वत्र गोपाळरावांचें अभिनंदन करण्यांत आलें. हिंदुस्थानचे माजी फडनवीस सर गाय फ्लीटवुड विल्सन यांचा व गोपाळरावांचा फार स्नेह होता. गोपाळरावांस पाहुणचारासाठीं आपल्या घरीं त्यांनीं सिमल्यास बोलावलें होतें. विल्सन साहेब पुण्यास आल्यावेळीं गोपाळरावांनीं त्यांस सोसायटींत एक मेजवानी दिली व सोसायटींतील सभासदांची ओळख करून दिली. त्यावेळीं सोसायटींतील सर्व सभासदांस उद्देशून सर गाय विल्सन म्हणाले कीं, "एका गोखल्यांना तोंड देणें आम्हांस दुष्कर झालें आहे. इतके गोखले जर तयार होणार असतील, तर या देशांतून आम्हांला लौकरच पाय काढिला पाहिजे!" विल्सन साहेबांचे उद्गार जरी विनोदाचे होते, तरी ते किती अर्थपूर्ण आहेत, हें समंजस मनुष्यांस सांगण्याचें कारण नाहीं. गोपाळराव हयात असेपर्यंत त्यांचे निकट स्नेही व त्यांच्याबद्दल पूज्य बुद्धि बाळगणारे परिचित गृहस्थ यांनीं या संस्थेस सढळ हातानें मदत केली. सुमारें ३ लक्ष रुपये खर्चून सोसायटीकरितां इमारती, सभासदांना राहण्याच्या जागा, ग्रंथसंग्रह, छापखाना व वर्तमानपत्रें एवढीं साधनें गोपाळरावांनीं अस्तित्वांत आणलीं आहेत, व वरील मोठ्या लोकांच्या उदार देणग्यांवरच दरसाल सुमारें तीस हजारांचा खर्च चालला होता. कौन्सिलांतील कामांतील व पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या कामांतील प्राप्तीही गोपाळरावांनीं सोसायटीस दिली होती. गोपाळरावजींच्या असामान्य योग्यतेमुळें सोसायटीचा योगक्षेम आजपर्यंत चांगला चालला व सोसायटीच्या मदतीसाठीं सार्वजनिक रीतीनें विनंती करण्याचें कारण पडलें नव्हतें. आतां तो प्रसंग येऊन ठेपला आहे. गोपाळरावांनीं घालून दिलेल्या या लोककल्याणाच्या मार्गाबद्दल ज्यांना ज्यांना म्हणून आदर वाटत असेल, त्यांनीं या संस्थेतील लोकांस मदत करून त्यांनीं सांपत्तिक विवंचनेपासून अलिप्त ठेवणें किती अवश्य आहे, हें सांगावयास नकोच. गोपाळरावांनीं आपल्या हयातींतच सोसायटीच्या रूपानें आपलें स्मारक करून ठेवलें आहे. त्यांच्या स्मारकास कोणतें स्वरूप द्यावें, याबद्दल वाटाघाट करण्याचें कारणच उरलेलें नाहीं. देशोन्नतीची गोपाळरावांची व्यापक कल्पना लक्षांत ठेवून ठिकठिकाणच्या स्मारक कमिटया सोसायटीस साहाय्य करतील, अशी आम्हांस आशा आहे. ज्या संस्थेबद्दल त्यांस आमरणान्त कळकळ वाटत असे, ती संस्था चिरंतन करण्यावांचून दुसऱ्या कोणत्या उपायानें त्यांच्या पवित्र आत्म्यास शांतता वाटेल?

येथपर्यंत गोपाळरावांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमांतील ठळक गोष्टींचा आम्ही निर्देश केला आहे. गोपाळरावांचा स्वभाव व खाजगी वर्तन यांबद्दल थोडासा उल्लेख करणें अप्रस्तुत होणार नाहीं. सत्यप्रियता हा गोपाळरावांच्या स्वभावांतील प्रधान गुण होता. जाणूनबुजून अवास्तव किंवा असत्य विधान त्यांनीं आजन्मांत केलें नाहीं. असत्याची त्यांस फार चीड होती. सत्यप्रियता हा शिष्टाचाराचा (Gentlemanliness)

पाया आहे असें ते नेहमीं सांगत. नित्याच्या व्यवहारांत अगदीं बारीक सारीक गोष्टींत सुद्धां बोलण्याप्रमाणें वागलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. अमुक वेळेस भेटतों म्हणून त्यांस कळविलें, किंवा एखादें काम अमक्या वेळीं करतों असें म्हटलें व हयगयीमुळें अगर सामान्य व्यवहारांतील चालढकलीमुळें वेळेवर भेटलें नाहीं किंवा काम झालें नाहीं, तर त्यांस फार खेद वाटत असे. त्यांचा स्वभाव फार प्रेमळ होता. परंतु त्याचा प्रत्यय स्वल्पपरिचयानें येत नसे. सकृद्दर्शनीं किंवा अल्पवेळ भेटणारास गोपाळरावांच्या अंतःकरणांतील कोमलपणा दिसून येत नसे. कित्येकांचा समज ते तुसडे आहेत असा होत असे. गोपाळरावांची तळमळ व कार्यव्यापृतता यांजकडे लक्ष दिलें असतां येईल जाईल त्या मनुष्यास पाहिजे त्यावेळीं भेटण्यास किंवा शुष्क गप्पागोष्टींत वेळ खर्च करण्यास त्यांस फुरसत नव्हती. कित्येक लोकाग्रणींना वेळेची फारशी किंमत वाटत नाहीं. जबाबदारीनें विधायक कार्यक्रमाची (constructive programme) ज्यांस आवश्यकता वाटत नाही, अशा पुढाऱ्यांना वेळेची अडचण कधींच येत नाहीं. चहाते व भक्त लोकांस आराध्य देवतेच्या सन्निध काल घालविण्याची नेहमीं संवय असते. आपल्या पूज्य पुढाऱ्याचा निष्कारण वेळ आपण घेतों, हें भक्तमंडळीस मुळींच कळत नाहीं. अशा सर्व भक्तमंडळीस संतुष्ट करणें, हें वेळेचा अपव्यय केल्याखेरीज शक्यच नाहीं. गोपाळरावांना वेळ इतका मुबलक मिळत नव्हता. प्राप्त झालेल्या अल्प काळाचा उपयोग देशकार्यांत करावा व शिष्यच्छंदानुवर्तनाच्या वायफळ कामांत तो घालवूं नये असा त्यांचा क्रम होता. तथापि जिज्ञासेनें, ज्ञानसंपादनाच्या हेतूनें व देशहिताच्या तळमळीनें, त्यांच्याकडे गेलेला प्रत्येक मनुष्य संतुष्ट होऊन परत येत असे. गोपाळरावजींशीं नित्य परिचय असलेल्या अनेक शिष्यवर्गास व इष्टमित्रांस त्यांच्याजवळ बसून जें ज्ञान वेळोवेळीं संकलित करतां आलें व त्यांच्या प्रेमळ स्वभावाचा जो सहवास घडला, तो काळ त्यांस आपल्या आयुष्यांतील अत्यंत संस्मरणीय वाटत आहे व त्यांची प्रशांत, गंभीर व प्रेमळ मूर्ति त्यांस सदैव नजरेपुढें दिसत आहे. साधेपणा हा त्यांच्या आयुष्यांतील तिसरा महत्त्वाचा गुण होता. इंग्लंडास जाईपर्यंत त्यांच्या नेहमींच्या पेहरावांत व वागण्यांत दिसून येणारी शालीनता सर्वांस मशहूर आहे. इंग्लंडांत अनेक वेळ जाण्याच्या योगानें शिष्टसंमत असा अवश्य फेरफार त्यांच्या वागण्यांत झाला होता. परंतु साधेपणाची वृत्ति मात्र यत्किंचितही कमी झाली नव्हती. व्हाइसरॉय साहेबांनीं गोपाळरावांच्या अलौकिक देशसेवेबद्दल बहुमानाची पदवी K. C. I. E. दिली असतांही ती त्यांनीं घेण्याचें नाकारलें. सार्वजनिक आयुष्यक्रमांत ग्लॅडस्टन साहेबांप्रमाणेंच त्यांनीं साधेपणाचें मोठें उदाहरण घालून दिलें आहे. मानाकरितां हापापलेल्या लोकांनीं गोपाळरावांचें उदाहरण नजरेपुढें ठेवण्यासारखें आहे. कित्येक लोक असा प्रश्न करतील कीं, C. I. E. हा किताब गोपाळरावांनीं कां स्वीकारला होता ? याचें उत्तर थोडक्यांत देण्यासारखें आहे. हा मान मिळविण्याचा गोपाळरावांनीं कधींच प्रयत्न केला नाहीं. कर्झन साहेबांसारखा सत्ताधारिवर्गाचा पुरस्कर्ता हिंदुस्थानांतील व्हाइसरॉयांत आजपर्यंत दुसरा कोणीही झाला नाहीं. कर्झन साहेबांची त्यांच्या तोंडासमोर निर्भीडपणानें व जोरदारपणें गोपाळरावांइतकी दुसरी कोणीही टीका केली नाहीं. गोपाळरावांस सी. आय्. ई. हा किताब देऊन कर्झन साहेबांनीं आपल्या बरोबरीच्या प्रतिस्पर्ध्याविषयीं गुणग्राहकताच व्यक्त केली. प्रतिपक्षीयाकडून अनपेक्षितपणें मिळालेला हा मान निःसंशयपणें महत्त्वाचा होता. कर्झन साहेबांच्या बंगालच्या फाळणीच्या स्वैर व उद्दाम वर्तनानें सर्व देशांत असंतोष पसरला होता. क्रांतिकारक चळवळ डोकावूं लागली होती. राज्यकर्ते व त्यांचे ज्ञातिबांधव यांस प्रत्येक एतद्देशीयाबद्दल अत्यंत अविश्वास वाटूं लागला होता. अशा वेळीं अन्यायाबद्दल दाद मागितल्यास ती ऐकून घेण्याचीसुद्धां मुश्कील होती. कर्झन साहेबांच्या या बहुमानानें गोपाळराव सरकारचे कितीही कडक टीकाकार असले, तरी ते राजद्रोही नाहींत किंवा ब्रिटिश राज्यपद्धति उलथून पाडणाऱ्या वर्गांपैकीं नाहींत असा त्यांच्यावर शिक्का बसला. राज्यकर्त्यांच्या विश्वासाच्या या खुणेमुळें गोपाळरावजींस फार उपयोग झाला. १९०४ च्या राष्ट्रीय सभेनें कर्झनशाहीच्या बेमुर्वत धोरणास इंग्लंडांतील लोकमत जागृत करून आळा घालण्याकरितां गोपाळरावांस विलायतेस प्रतिनिधि म्हणून पाठविण्याचें ठरविलें.

गोपाळराव १९०५ सालीं विलायतेस गेले व तेथें त्यांनीं पुष्कळ जाहीर व्याख्यानें दिलीं. या किताबाच्या योगानें, गोपाळराव हे सरकारच्या आदरास पात्र झालेले आहेत, सबब त्यांचें म्हणणें निर्विकारपणें ऐकून घ्यावें, अशी भावना तेथील जनतेमध्यें ठिकठिकाणीं दिसून आली, हिंदुस्थानांतून इंग्लंडांत राजकीय चळवळ करण्यास जाणाऱ्या मनुष्याची स्थिति वकीलाप्रमाणें असते. ब्रिटिश जनतेच्या न्यायासनासमोर हिंदुस्थानचीं गाऱ्हाणीं मांडावयाचीं असतात. न्यायकोर्टांत न्यायाधीशास जर वकिलाबद्दल अविश्वास, तिरस्कार किंवा तिटकारा वाटूं लागला, तर त्या वकिलाचें म्हणणें निष्पक्षपातबुद्धीनें ऐकलें जाण्याचा संभव असत नाहीं, पक्षकाराची बाजू या योगानें कोर्टापुढें योग्य रीतीनें मांडण्यास अवसर मिळत नाहीं, व न्यायासही मदत होत नाहीं. अशा वकिलास बहुधा आपला धंदा बंद करण्याचा प्रसंग येतो. हा अनुभव अगदीं नेहमींचा आहे. यासाठीं ज्यांच्यापुढें न्याय मागावयाचा त्यांस न्याय मागणाऱ्या मनुष्याबद्दल आदर वाटला पाहिजे; निदान तिरस्कार किंवा अविश्वास तरी वाटतां कामा नये. इंग्लंडसारख्या अपरिचित श्रोतृवृंदापुढें हिंदुस्थानच्या प्रजेचें गाऱ्हाणें मांडतांना या पदवीमुळेंच शांतपणें व आदरानें गोपाळरावांची सुनावणी ऐकण्यांत आली. याच कारणासाठीं तत्कालीन परिस्थितीचा विचार करून गोपाळरावांनीं १९०४ सालीं कर्झन साहेबांच्या विनंतीवरून ही पदवी स्वीकारली होती. दहा वर्षांच्या काळानंतर हार्डिंजसारख्या थोर मुत्सद्यांनीं के० सी० आय० ई० ही पदवी देऊन गोपाळरावांचा गौरव केला, त्यावेळीं १९०४ मधील स्थिति अस्तित्वांत नव्हती. प्रतिष्ठेपलीकडे या पदवीचा गोपाळरावांस तादृश उपयोग नव्हता. आपल्या नैसर्गिक साधेपणास या थोर पदवीनें व्यत्यय येईल, यासाठीं त्यांनीं या पदवीचा साभार प्रतिकार केला. जन्मादारभ्य असलेल्या नम्रस्थितींतच आपला आयुष्यक्रम कायम राहावा, या हेतूनें त्यांनीं हें मानाचें ओझें आपल्या शिरावर धारण करण्याचें नाकारलें. गोपाळरावांच्या अंगीं विलक्षण करारीपणा होता व तो अनेक प्रसंगीं दिसून आला होता. कौन्सिलामध्यें कर्झनसाहेबांशीं झगडतांना, जेंकिन्ससाहेबांशीं सामना करतांना, साउथ आफ्रिकेस जाण्याच्या वेळीं, निर्भीडपणें क्रांतिकारक पक्षाविरुद्ध मोहीम चालवितांना, हा त्यांचा गुण सर्वांच्या प्रत्ययास आला आहे. अगदीं शेवटीं पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या बाबतींतही त्यांनीं असाच बाणेदारपणा दाखविला. पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सभासद असतांना ते सरकारी नोकर आहेत, असा कांहीं कायदेपंडितांचा सल्ला पडला. यामुळें त्यांस वरिष्ठ कायदेकौन्सिलचे सभासद होतां येत नाहीं असा एक आक्षेप कांहीं लोकांनीं काढला. या सर्वांचा कटाक्ष, रॉयल कमिशनचे सभासद या नात्यानें मिळणारें सुमारें दोन हजारांचें दरमहाचें वेतन गोपाळरावांस घेतां येत नाहीं अशा प्रकारचा होता. परंतु गोपाळरावांनीं सरकारास असें साफ कळविलें कीं, वरिष्ठ कायदेकौन्सिलचा सभासद होण्यास जर रॉयल कमिशनर या नात्यानें मिळणाऱ्या वेतनाची हरकत येत असेल, तर आपण कोणत्याही प्रकारचा मुशाहिरा न घेतां रॉयल कमिशनचें काम करण्यास तयार आहों. याप्रमाणें सुमारें दरमहा दोनपासून अडीज हजारांची प्राप्ति सोडून देण्यास केवळ आपल्या करारी स्वभावामुळेंच गोपाळराव तयार झाले. पब्लिक सर्व्हिस कमिशनवर असतांनाही त्यांच्या करारी स्वभावामुळें कमिशनमधील सत्ताधारी वर्गाच्या Beaurocracy अभिमान्यांचा व त्यांचा पुष्कळ वेळ खटका उडत असे. कमिशनचा सायंत रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर हे प्रसंग सर्वांस कळण्यासारखे आहेत. असो. गोपाळरावांच्या प्रचंड विद्वत्तेबरोबर त्यांच्या ठिकाणीं अतिशय सरळपणा (simplicity) किंवा भोळसरपणा होता. व्यवहारांतलि सामान्य मनुष्यासही जे डावपेंच कळतात, ते त्यांच्या लक्षांत सकृद्दर्शनीं येत नसत. प्रत्येक मनुष्य आपल्या इतकाच सरळ व प्रामाणिक आहे असें समजून ते दुसऱ्याशीं वागत. जगांतील वाममार्गांत ते निसर्गतः अनभ्यस्त होते. यामुळें पैशाच्या किंवा व्यवहाराच्या बाबतींत त्यांस पुष्कळ वेळां नुकसान सोसावें लागे. निष्कपट व भिडस्त स्वभावामुळें त्यांस पुष्कळ त्रास भोगावा लागला. कोलरिजनें एके ठिकाणीं व्यक्त केलेले उद्गार त्यांचेसंबंधीं नेहमीं निदर्शनास येतः–

"It is a fine saying of Coleridge that in men of genius the matured judgment of the man is combined

with the delicacy of feeling and the susceptibility of impressions of the child and it needs but little acquaintance with biography to perceive that these last elements almost invariably entered into the composition of really great men. It is scarcely less true of the temple of genius than of the temple of Christianity that he who would enter in must become as a little child."

भिडस्तपणा, भोळसरपणा, जगांतील वस्तादागिरीचें अज्ञान, अकृत्रिम व अव्याजमनोहर स्वभाव, व विशाल बुद्धिमत्ता या परस्परविरोधी गुणांचा संयोग थोर व्यक्तींत नेहमीं आढळतो; व मोठेपणाचें हें एक लक्षणच आहे, असें मानण्यास हरकत नाहीं. गोपाळरावजींच्या मनाचा मोठेपणाही अवर्णनीय होता. प्रतिपक्षी असला, तरी अन्याय झाल्यास त्याबद्दल मनोभावेंकरून प्रतिकाराकरितां प्रयत्न करणें हें गोपाळराव आपलें कर्तव्य समजत. रा० नरसिंह चिंतामण केळकर व गोपाळराव यांचा राजकीय बाबतींत मतभेद असून ते उभयतां भिन्न पक्षांचे होते. परंतु रा० केळकर यांस सरकारनें कायदे कौन्सिलचे सभासदाकरितां निष्कारणपणें अपात्र ठरविल्यावेळीं गोपाळरावांनीं या कृत्याचा जाहीर रीतीनें निषेध केला. या एकाच उदाहरणावरून गोपाळरावजींच्या मनाचा थोरपणा दिसून येतो. गोपाळरावांच्या विरुद्ध पक्षांतील लोकांस प्रतिपक्षाविषयींच्या इतक्या उदार बुद्धीचें एकही उदाहरण दाखवितां येणार नाहीं. गोपाळरावांच्या विषयीं नालस्तीचे लेख किंवा बीभत्स कवित्व ज्या पक्षांत तयार झालें, ऐकलें, किंवा ऐकवलें, त्यांतील एकासही या अश्लील प्रकाराबद्दल नापसंती व्यक्त करण्याची जरूरी वाटली नाहीं किंवा इच्छा उत्पन्न झाली नाहीं. प्रतिपक्षाविषयीं याहून दुसरें अनुदारपणाचें (uncharitable) उदाहरण सांपडेल असें आम्हांस वाटत नाहीं.

दुसरी एक गोष्ट गोपाळरावांच्या मनाच्या थोरपणाची साक्ष पटवीत आहे. ना० गणेश व्यंकटेश जोशी यांचा व गोपाळरावांचा फार स्नेह होता. वेल्बी कमिशनची तयारी करतांना रावबहादुर जोशी यांच्याजवळ गोपाळराव कांहीं दिवस जाऊन राहिले होते. पेन्शन घेतल्यानंतर व सुरतेचे पक्षभेद झाल्यानंतर रावबहादुर जहाल पक्षांत सामील झाले. पक्षभेदामुळें गोपाळराव व ना० जोशी यांच्यामधील सलोखा कमी होत गेला. तथापि गोपाळरावांस रावबहादुर अत्यंत पूज्य वाटत. रा० ब० जोशी वारल्यानंतर त्यांचे राजनीतिशास्त्रावरील सर्व लेख संकलित करून छापावे व त्यांच्या विद्वत्तेचें स्मारक कायम ठेवावें, अशी कल्पना निघाली. ज्या पक्षानें रा०ब०जोशी यांस आत्मप्रतिष्ठेसाठीं जवळ केलें होतें व जिवंतपणीं जो त्यांचा जयजयकार करीत होता, त्यानें या कार्यांत मुळींच पुढाकार घेतला नाहीं. गोपाळरावांनीं स्वतःचे पैसे खर्च करून हा ग्रंथ छापण्याचें पत्करिलें व त्याप्रमाणें तो छापून प्रसिद्ध केला. रा० ब० जोशी यांच्याविषयीं आदर दाखविणाऱ्या कित्येक जहाल पुढाऱ्यांकडे या ग्रंथाची एकएक प्रत पाठविली असतां, ती विकत घेण्याचेंसुद्धां त्यांनीं साफ नाकारिलें. हा अनुभव पुष्कळ प्रकारें बोधपर आहे. गोपाळरावांच्या मनाचा थोरपणा मात्र यावरून निःसंशयपणें निदर्शनास येत आहे. गोपाळरावांच्या ठिकाणीं वैय्यक्तिक आकर्षणशक्ति (Personal Magnetism) फार होती. त्यांच्या सहवासांत असलेल्या मनुष्यावर त्यांच्या विद्वत्तेची व थोरपणाची छाप पडत असे. कोणताही दुराग्रह असला तरी तो नाहींसा होई व त्यांच्याबद्दल आदर उत्पन्न होत असे. गोपाळरावांनीं 'सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी' स्थापन केल्यानंतर जीं बरींच माणसें त्यांना मिळालीं तीं पूर्वाश्रमीं गोपाळरावांच्या पक्षांतील नव्हतीं. निदान त्यांपैकीं पुष्कळांचा ओढा विरुद्ध पक्षाकडेच वाहत होता. तथापि गोपाळरावांच्या उदार चारित्र्याचा सहवास घडल्यानंतर गोपाळरावांची योग्यता त्यांस समजून आली व आजन्म गोपाळरावांचें अनुकरण करण्याचा त्यांनीं निर्धार केला. तसेंच ज्या थोड्या लोकांनीं गोपाळरावजींस उदार ग्राह्य केलें, त्याचें रहस्यही वरील गुणांतच आहे. कित्येक लोकांनीं तर गोपाळरावांस कोरे चेक (Blank cheques)

दिले होते, व त्यांना वाटेल तेवढी रक्कम त्यांस जरूर असल्यावेळीं मिळत असे. निस्सीम पूज्यबुद्धीशिवाय इतका विश्वास असणें अशक्य आहे. इतकी प्रबळ श्रद्धा असण्यास त्या व्यक्तीच्या अंगांतील मोहक थोरपणा हेंच कारण होय. गोपाळरावांच्या सहवासांत आत्मोन्नतीचा प्रत्यय प्रत्येकास येत असे. ज्या पुरुषाच्या सहवासानें आत्मोन्नति झाल्यासारखी वाटते, ज्याच्या सान्निध्यानें चित्तवृत्ति उदात्त (elevating atmosphere) होतात, तोच थोर पुरुष होय, अशी एका ग्रंथकारानें व्याख्या केली आहे. गोपाळरावांच्या परिचयानें ह्या म्हणण्याचा प्रत्यय पदोपदीं येत असे. त्यांच्या कोणत्याही मुलाखतींत नवीन कल्पना, नवीन विचार, नवीन दृष्टि, नवीन ज्ञानसंचय, याचा लाभ झाला नाहीं असा एकही प्रसंग जात नसे. देशभक्ति, स्वार्थत्याग या कल्पना सर्वांसच बुद्धिग्राह्य होतात. गोपाळरावांच्या परिचयानें या शब्दांतील सचेतनता, यांतील जादू, यांतील दिव्य तेज, प्रत्येकाच्या अंतःकरणांत स्पष्टपणें प्रत्ययास आलें. कित्येक गोष्टी कळतात, पण त्या वळत नाहींत. गुरूपदिष्ट मार्गानें किंवा साक्षात्कारानें ज्ञानाचा प्रत्यय येतो असा सिद्धांत आहे. देशोन्नतीच्या या आधिभौतिक ध्येयाच्या बाबतींत व राष्ट्रीय धर्माच्या बाबतींत गोपाळरावांसारख्या उदात्त व सर्वतोपरी अधिकारसंपन्न पुरुषाच्या सहवासांतच जिवंत देशभक्ति व उज्ज्वल स्वार्थत्याग यांचा साक्षात्कार होत असे. या विश्वाच्या नियंत्यासंबंधीं गोपाळरावांचा दृढ विश्वास होता. त्यांची धर्मश्रद्धा जुन्या पद्धतीची नसली तथापि त्यांनीं स्थापन केलेल्या संप्रदायास अनुसरून तिचें स्वरूप व्यावहारिक असे. परमेश्वराच्या कृपेनें आपण निष्काम बुद्धीनें खटपट केल्यास या देशाचा उद्धार होईल, असा त्यांचा दृढ विश्वास होता. कोणीही कांहीं शंका काढली किंवा निराशेचें स्तोम (gospel of despair) माजविलें, तर "हें विश्व ज्या विभूतीनें निर्माण केलें आहे तिला या विश्वाच्या योगक्षेमाबद्दल काळजी आहे, निरपेक्षपणें आपलें कर्तव्य करणें एवढी जबाबदारी आपल्यावर आहे, बाकीची पंचाईत करण्याचें कारण नाहीं." असें ते नेहमीं म्हणत.

He that made the world shall guide it,
Learn to labour and to wait.

असा ते नेहमीं उपदेश करीत. गोपाळराव मोठे आशावादी (optimist) होते, व त्याचें कारणही परमेश्वरावरील त्यांची निष्ठा हेंच होय.

One adequate support
For the calamities of mortal life
Exists one only; an assured belief
That the procession of our fate however
Sad or disturbed is ordered by a Being
Of infinite benevolence and power.
Whose everlasting purposes embrace
All accidents converting them to good.

—*Wordsworth's Excursion.*

वरील कवीच्या उदात्त विचारांचें प्रतिबिंब गोपाळरावांच्या अंतःकरणांत उमटलेलें होतें. कितीही संकटें आलीं, कितीही निराशा वाटली, कितीही तेजोभंग झाला, तथापि आपल्या कर्तव्याबद्दल संपूर्ण आत्मविश्वास, परमेश्वराच्या हेतूबद्दल निश्चल श्रद्धा, या दोन गुणांमुळेंच आपली हिम्मत खचूं न देतां देशकार्याच्या दुस्तर कार्यांत अहर्निश उत्साहानें गोपाळराव काम करीत होते. देशाच्या परिस्थितींत अशा तऱ्हेची हुरूप परमेश्वरावरील दृढ भक्तीशिवाय चिरंतन राहणें अशक्य आहे.

राजकीय बाबतींत हिंदुस्थानची तुलना आयर्लंडशीं करतां येईल. दोन्ही देश आजमितीस स्वतंत्र नाहींत. दोन्ही देशांतील स्थिति सारखीच विपन्न आहे. दोघांनाही ब्रिटिश राज्यच्छत्राखालीं स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे. राजकीय चळवळीचा इतिहास पाहिला तर दोन्ही देशांतील स्थिति एकाच प्रकारची आहे. आयर्लंडची राजकीय चळवळ सव्वाशें वर्षांची जुनी आहे. हिंदुस्थानांतील चळवळ तीस वर्षांची आहे. तीव्रतेच्या व यशःप्राप्तीच्या मानानें दोहोंतील अंतर कालातिपाताचेंच आहे. इतिहासाची पुनरावृत्ति होत असते, असें आपण नेहमीं ऐकतों. आयर्लंडचा इतिहास वाचतांना त्याची पदोपदीं हिंदुस्थानांत पुनरावृत्ति होत आहे,असा अनुभव येतो. गुप्तमंडळ्या, क्रांतिकारक चळवळ, बहिष्कार, स्वदेशी, नेमस्त व जहाल पक्ष,अडवणुकीचे मार्ग, या सर्वांची या देशांत-

येथील परिस्थितीच्या मानानें—लोकमताच्या कमी अधिक तीव्रतेच्या दृष्टीनें पुनरावृत्ति घडत आहे. या अनुभवाप्रमाणें लोकनायकांच्याही प्रतिमा आयर्लंडाप्रमाणें येथेंही निर्माण होत आहेत. ओकॉनेलसारखे सुरेंद्रबाबू, पार्नेलसारखे अडवणुकीचे भक्त, या देशांत अस्तित्वांत आहेत. गोपाळरावांस आयर्लंडचे ग्रॅटन म्हणतां येईल. सिड्ने स्मिथ यांनीं ग्रॅटन साहेबांचें चित्र फार हृदयंगमपणें काढलें आहे. ' Great men hallow a whole people and lift up all who live in their time. What Irish man does not feel proud ,that he has lived in the days of Gratton? Who has not turned to him for comfort from the false friends and open enemies of Ireland ? Who did not remember him in the days of its burnings and wastings and murders? No Government ever dismayed him. The world could not bribe him. He thought only of Ireland, lived for no other object, dedicated to her his beautiful fancy, his elegant wit, his manly courage and the splendour of his astonishing eloquence. He was so born and so gifted that poetry, forensic skill, elegant literature and all the highest attainments of human genius were within his reach; but he thought the noblest occupation of a man was to make other men happy and free, and in that straight line he went on for fifty years without one side-look, without one yielding thought, without one motive in his heart, which he might not have made open to the view of God and man.' वरील अवतरणांत **ग्रॅटन व आयर्लंड** यां ऐवजीं **गोखले व हिंदुस्थान** हे शब्द घातले असतां वरील वर्णन गोपाळरावांबद्दल किती यथार्थ लागू पडतें, हें मार्मिक वाचकांस सांगावयास नकोच.

या देशांत सार्वजनिक कामांत पडणाऱ्या पुढाऱ्यांस फार नाजुक परिस्थितींत दिवस काढावे लागतात. सरकारची तरफदारी केल्यास देशद्रोही म्हणवून घेण्यापर्यंत मजल येते. लोकपक्षाची बाजू समर्थन केल्यास सरकारची इतराजी संपादन करावी लागते. या परस्परविरोधी स्थितींतून सरकारच्या थोर आदरास व लोकांच्या संपूर्ण विश्वासास पात्र होणारा मनुष्य लोकोत्तर होय. या दुर्लभ पदवीस गोपाळराव पोंचले होते. अशा असामान्य पुढाऱ्याचा लाभ या देशास जास्त काल झाला असता, तर देशाचें भाग्य उदयास आलें असतें. तथापि—

' सृजति तावदशेषगुणाकरम् ।
पुरुषरत्नमलंकरणं भुवः ॥
तदपि तत्क्षणभंगि करोति चेत् ।
अहह कष्टमपण्डितता विधेः ॥ '

हें परमेश्वरी सूत्र नित्याच्या अनुभवांतील आहे. कदाचित् येथल्याप्रमाणें परमेश्वराच्या दरबारांतही शेलक्या माणसांची उणीव असेल व यामुळेंच उत्कृष्ट माणसांस अकालींच बोलावण्यांत येत असावें.

वर गोपाळरावांच्या जीवनवृत्तांतील महत्त्वाच्या गोष्टींचा आम्हीं त्रोटकपणें निर्देश केला आहे. यापेक्षां विस्तारानें मासिक पुस्तकासारख्या मर्यादित जागेंत वर्णन करणें अशक्य आहे. हें काम चरित्रलेखकाचें आहे, व तें लौकरच होईल अशी आम्हांस आशा आहे. गोपाळरावांच्या चरित्राचें सार सांगावयाचें झाल्यास **देशसेवा व स्वार्थत्याग** या दोनच शब्दांत सांगतां येईल. तरुण व उत्साही पिढीनें हें रहस्य लक्षांत ठेवून गोपाळरावांच्या चरित्राचें अनुकरण केल्यास देशाचें पाऊल निःसंशय पुढें पडेल. होतकरू पिढींत या दोन गुणांची प्रेरणा परमेश्वरानें करावी अशी त्यास आमची नम्र प्रार्थना आहे.

ग. र. अभ्यंकर.

परलोकवासी
नामदार गोपाळराव गोखले.

१. [मंदाक्रांता.]

झाले, गेले, कितिक भुवनीं, नांव त्यांचें निवेना
वारीशच्या पुलिनिं सिकता-पुंजही मोजवेना।
जन्मा येती, जगति, मरती, कीर्ति मार्गे उरेना
कालाब्धीची प्रबल भरती-ओहटी ही सरेना ॥ १ ॥

ऐशी आहे स्थिति जरि खरी, त्यांतल्या त्यांत कोणी
स्वोद्योगानें उरविति जगीं जन्मल्याची निशाणी।
तो कालाब्धी जरि नवनवें रूप अत्युग्र दावी
त्यामध्येंही नरवर निज-स्मारकस्तंभ रोंवी ॥ २ ॥

ऐसे मोठे नर निपजती ईश्वराच्या प्रसादें
कालाब्धीचा परिघ भरिती आपुल्या धन्यवादें।
वीची त्याच्या जरि नरवरां दूर ओढूनि नेती
तत्पृष्ठींही चढुनि इतरां मार्ग ते दाखवीती ॥ ३ ॥

दीपस्तंभापरि चमकती रम्य त्यांचीं चरित्रें
कीं जावीं तत्पथ धरुनियां जीवरूपी वहित्रें *।
निष्कामत्वें उपकृति जनीं जे महात्मे करीती
त्यांचीं नांवें अमर इतरां पामरां धैर्य देती ॥ ४ ॥

तारा जाई तुटुनि परि त्यामागुती तत्प्रकाश
राहे कक्षेवरिल उजळी अंतरिक्ष-प्रदेश।
कोमेजूनी सुम उपवनीं जाय, राहे सुवास
थोरांचाही जनिं उरतसे मागुती कीर्तिशेष ॥ ५ ॥

कालाब्धीनें जरि हरियलें गोखल्यांतें तथापि-
गेले चिन्हें उमटवुनि ते तत्तटीं सुप्रतापी।
प्राग्जन्मींचें सुकृतफल वा ईश्वराची कृपा हे
द्याया स्फूर्ती प्रबल इतरां तत्कृती येथ राहे ॥ ६ ॥

शील, प्रज्ञा, अनुभव गुणीं युक्त ऐशा गुरूची
शिक्षा घेतां सहजचि घडे जोड शिष्या यशाची।
साऱ्या लोकीं "ऋषि" म्हणियले रानडे ते गुरूजी
ज्यांनीं केले,अपयश तयां कोठुनी देशकार्जीं ? ॥ ७ ॥

विद्याभ्यासी, विनययुत जो स्वोद्यमीं ठेवि निष्ठा
त्याच्या सिद्धी करगत तशी लोकिं लाभे प्रतिष्ठा।
ऐसा आहे नियमचि, तया गोखले नापवाद
घ्यावा त्याच्या विमलचरितापासुनी लोकिं बोध ॥ ८ ॥

इंग्लंदातें कितिक जन ते आजपर्यंत गेले
दादाभाईविण न इतरीं नांव आंग्लांत केलें।
गोपाळाच्या निधनसमयीं शोकसंदेश-मान
सम्राटानें उचित दिधला, कीर्ति हे काय सान ? ॥ ९ ॥

होतो आहे छळ बहुतसा आपुल्या बांधवांचा
ऐसा आर्तस्वर परिसुनी आफ्रिकावासियांचा।
कैवारी तो न गणुनि निजास्वास्थ्यही आफ्रिकेला
गेला वाली विषमसमयीं धावुनी धावण्याला ॥ १० ॥

त्यानें प्रेमें भरतवसुधा-मातृसेवा-तरूचा
रोपा केला,चरम गमतो लाभ हा तत्करींचा।
वाढो मोठा, भरततनयां तो सदा सौख्य द्याया
आशा पोटीं धरिलि हरिच्या मागतों हेंचि पायां ॥ ११ ॥

प्राची सारी भरुनि उरला गोड सत्कीर्तिनाद
शान्तिस्वास्थ्यें सुखित करिते आफ्रिका धन्यवाद।
वाक्चातुर्यें मुदित भरली ती प्रतीची स्तुतीनें
मन्दाक्रान्ता सकल पृथिवी गोखल्यांच्या यशानें ॥ १२

---

२. [हरिणी.]

हंसत मुख तें दोन्ही गालीं खळी बहु साजिरी
उपनयन तें नाकीं शोभे तशी पगडी शिरीं।
उपवसन तें कंठाभोंतीं सदैव लपेटलें
सकल दिसतें आतां डोळ्यापुढें जणुं रेखिलें ॥ १ ॥

---

* होड्या.

उचित गुरुला ऐशी विद्या अगोदर जोडिली,
विनय, शुचिता, शान्ति, क्षान्ती अनन्तर बाणली।
स्वजनहित तें साधायाचा मनोरथ बांधिला
करुनि अवघी तत्सामग्री यथामति साधिला ॥ २ ॥

वचनपटुता जीवात्माशी असे जननायका
कवण विसरे योद्धा न्याया रणीं निजसायका।
श्रवणमननें, नित्याभ्यासें, मनीं दृढ कांक्षिलें
अनुपम तुह्मी वाक्चातुर्य श्रमें बहु साधिलें ॥ ३ ॥

जनपदहितोत्कण्ठा बीजस्वरूप मनांतली
चतुर गुरुच्या शिक्षासेकें अपार फुलारली।
विपुलहि जलें बीजापोटीं फुटे न नवांकुर
अवनि फलिनी देई सस्या, कधीं नच ऊषरें[1] ॥ ४ ॥

विविध असती लोकांमध्यें अजाणपणीं भ्रम
निरसन घडो त्यांचें देशीं ह्मणोनि परिश्रम।
बहुविध तुह्मीं केले, सिद्धी दिली न परेश्वरें
तळमळ तुह्मां पोटीं होती न ती जन विस्मरे ॥ ५ ॥

प्रतिनिधि-सभेमध्यें केलीं अलौकिक भाषणें
गमति जणु तीं आर्ती चित्ता अमोघ रवायनें।
व्यवहृतिपदें सर्वांगांनीं यथार्थ परीक्षुनी
पटचि रचिला सोप्या शब्दीं मनोहर रेखुनी ॥ ६ ॥

अकपट मनोवृत्ती, उक्ती नितांत मनोहर
विनययुत ती भाषा--रीती, तसा मधुर स्वर।
सरळ जुळणी व्याख्यानाची, यथाक्रम मांडणी
गमलि विबुधा युष्मद्वाणी खरोखर मोहिनी ॥ ७ ॥

परमगुरु ते आधीं गेले कधींच तुह्मांपुढें
करित बसले चिन्ता स्वर्गीं अह्मांस्तव रानडे।
भरतजनता सौख्यें नांदो असा परमेश्वरा
वर उभयतां भावें मागा कृपा इतुकी करा ॥ ८ ॥

ग. ज. आगाशे.

१ क्षारमृत्तिका, खारठाण.

गोपाल-निधन.

जेव्हां हृत्कुसुमें विशीर्ण सगळीं शोकानळीं पोळलीं,
आशांची अमुच्या जयीं धडधडां होळी असे पेटली,
भासे भीषण जेधवां समय हा आर्यांस कल्पान्तसा,
झाला शून्य विचार तोहि, करणें उच्चार कोणीं कसा ! १

आहे स्वार्थ पदार्थ काय ?–नव्हतें ज्यातें कसें माहित,
देण्या वैभव मातृभूमिस मुदें दारिद्र्य जो भोगित,
व्हावें स्वीय जनांस सौख्य म्हणुनी जो नित्यही कष्टला,
तो हा प्राणसखा अजी हरपला, कालोदरीं नष्टला ! २

धायीं धायिं रडे, अडे, धडपडे, पाहे न कोणाकडे,
वेळोवेळिं पडे धरेवरि, तिला वाटे पिसें कीं जडे;
फोडी हंबरडा बळें, ढळढळा दाही दिशा क्रंदती,
कालव्याघ्र हरीत वत्स सतिचें, शोकीं बुडे भारती. ३

गेला कालमुखांत, तो परतुनी यावा कसा हो घरा ?
केल्या देउंहि मोहरा शत जरी, तो येइना मोहरा !
कैवारी असला फिरून मजला लाभेल कैसा अहा !–
हें आणूनि मनीं रडे ढळढळां ही आर्यमाता पहा ! ४

होता मंजुळ गीत गात बसुनी निःस्वार्थवृक्षावरी;
गाणें ऐकुनि तें मनोहर, तया आनंद ताला धरी.
काळाला खपलें न तें, खरशरीं त्यां आणिलें खालतें,
दोघेही मृत भूवरी पडियले आनंद गोपाळ ते. ५

जेवीं ऑक्सिय पार्लमेंट-गगनीं शोभे सुधांशूपरी,
लेजिस्लेटिव कौन्सिलांत झळके गोपाळही त्यापरी–
वाणी अस्खलित, प्रसन्न, मधुर, स्वच्छंद, ओजस्विनी
आतां ती फिरुनी मिळेल अपणा ऐकावया कोठुनी ? ६

येती जाति कितीक नश्वर जगीं या त्यांस नाहीं मिती;
किंचिल्लांच्छित होत कालसिकता तत्पादचिन्हीं न ती.
ध्वांतांतूनि निघूनियां रिघति ते ध्वांतांत मेल्यावरी,
जों आहेत इथें सजीव, वरिती ध्वांतासही तोंवरी. ७

स्वार्थाचा न विटाळ ज्यास, झिजवी जो देह अन्यांस्तव,
कर्तव्यीं सुख मानि जो, धरित ना इच्छा फळाची लव,
आहे धन्य खरोखरी नरमणी तो एक या भूवरी,
होती सर्व दुजे निरर्थकच त्या एरंडवृक्षापरी. ८

जी आह्मां कलहप्रियांस जुळवी वाग्मोहिनी ती कुठें ?
आंग्लार्योन्नति भेटती जिथ सुखें तो देह आतां कुठें ?
प्रेमें बोट धरूनियां हळुहळू जो भारतीयांस ने
वाटेनें प्रगतीचिया, हरपतां तो सर्व वाटे सुनें ! ९

आशेची कलिका प्रफुल्लित जया पाहूनियां जाहली,
गाढ ध्वांत हळूच भीत दुडकी अज्ञान-घूकावली.
दुर्भाग्यें अमुच्या अजी दिनमणी तो होय अस्तंगत :
अंधारीं घनघोर वावरतसूं सारे निराशाहत ! १०

लक्ष्मीला अवमानिलें सतत तूं आजन्म विद्यारत,
व्हावें राष्ट्र समस्त शिक्षित असें होतें तुझें बा ! व्रत.
कोणीं नायकिलें इथें म्हणुनियां **गोपाळकृष्णा** ! अतां
प्रार्थाया प्रभुला स्वबंधुंकरितां गेलास वाटे स्वतां ! ११

कोणी कांहिं म्हणो, सुखें चडफडो, नांवें तुझ्या ओरडो,
निंदेचा स्तुतिचा चहूंकडुनियां वर्षाव शीर्षीं घडो,
केव्हांही ढळली न चित्तसमता बा देशभक्ता ! तव.
कर्तव्यीं दृढ राहिलास, तुजला नाहीं विसावा लव. १२

होतों आम्हि यथार्थ सर्वच तुझीं हीं लाडकीं वासरें !
गोपाळा ! असहाय टाकुनि अम्हां गेलास कैसा बरें !
नैराश्यासुर हा नृशंस गिळण्या पाही, करी धांवणें !
स्वप्राणार्थ अम्ही सख्या ! तुजविणें कोणाकडे पाहणें? १३

होसी जेथ तिथेंच राहिं, तुज ना येथें जरी येववे;
गाऱ्हाणीं अमुचीं प्रभूस कळवीं, हेंचो जरी मानवे.
ठेवीं लोभ सदा अम्हांवरि मनीं तूं ना अबोला धरीं !
दुर्दैवेंहि अढी असेल पडली, सारीं तिला तूं दुरीं ! १४

होती निर्भय सोडिली अह्मि सख्या ! ही भाग्यनौका जळीं
आधारावर तूझिया, अजुनि ती गेली न इष्टस्थळीं,
तों तूं सोडिसि ऐन वेळीं सखया ! रोषें सुकाणूं कसा ?
दीपस्तंभहि ढांसळून पडला ! हो काय आतां दशा ! १५

विद्युत् भीषण नर्तना करितसे, काळोख मी मी म्हणे,
लाटा आदळती परस्परिं बळें, आकाश दुःखें कण्हे.
वायूलागिं चढे दुणें बळ, करी चीत्कार मेघावली,
गोपाळा ! करिं धांवणें ! बुडतसे ही जीर्णनौका जलीं ! १६

धीरोदात्त, विवेकशील, शिशुसी निर्दोष वृत्ती तव,
पाहोनी प्रणयें उचंबळत रे ! संसारचित्तार्णव.
तूतें पाहुनि धन्य मानि अपणा ही शारदा माउली.
झाली काय तिची स्थिती बघ अतां! शोकें असे कावली! १७

वैंचा नच पश्चिमेशिं घडणें कल्पांतिंही संगम,
ऱ्य नी म्हणती असें, घडविला त्वां तो परी शोभन.
दोघींतील दुराग्रह, स्व-परता, संदेह, वैषम्यता,
शास्ता-शासित-भाव सर्व धुवुनी त्वां टाकिला सुव्रता! १८

आर्यावर्तिं निवृत्तिशीं क्षणभरी भांडो प्रवृत्तीहि न,
लक्ष्मीचेंहि सरस्वतीसह घडो सप्रेम सम्मेलन.
जावो जात्यभिमान सर्व विलया देशाभिमानापुढें—
ही अत्युत्कट लालसा निशिदिनीं त्वन्मानसीं बा कढे! १९

दृष्टी सद्गुरु **रानड्यांसम** नंसे त्याची जरी व्यापक,
कार्यक्षेत्रहि हो जरी न तितुकें विस्तीर्ण सर्वात्मक,
कर्तव्यीं दृढभक्ति ती सम असे निर्व्याज दोघांचिही.
होती तीच समग्रता, कुशलता, एकाग्रता, रीतिही. २०

गेला तो जरि ठेविलें इह असे मार्गे तयें स्वव्रत,
त्यातें चालविणें अहर्निश असे कर्तव्य सर्वाप्रत.
केलें तें न जरी, कृतघ्न जगतीं नाहींच आम्हांसम !
भाळीं दुःख जरी सदैव लिहिलें, हो अन्यथा कोठुन ?! २१

यावज्जीवित जो गुणीं विलसला विख्यात भूमीवरी
होई पल्लविता जगीं अधिकची तत्कीर्ति मेल्यावरी.
ओझें टाकुनियां अनित्य तनुचें **गोपाळ कृष्णा** ! तव
जीवात्मा नित मार्ग दाविल अह्मां उद्दीप्त तेजें नव. २२

गोविंद पांडुरंग देवधर.

ध्वजारोपण.

सर्वांचीच दशा अशी, स्थिरपणा कोणा न या भूवर;
लाभेना कधिंही समान सकलां सत्संग लोकीं चिर.
पृथ्वी ही परिवर्तनाकुल सदा, हा क्षुद्र वा तो महा—
भेदाभेद न वागवी स्वहृदयीं, ही ज्ञात सर्वंसहा. १

उत्पत्ति-स्थिति—नाश भूतल-गतादृष्टांमधें लेखिले,
मिथ्या हा विधिलेख कोण ठरवी, सर्वां करी जो छुलें;
गेले वीर नृपाल देवसमही सौभाग्यशाली किती
भोगोनी विधि सर्व?काय जगतीं या पामराची गति ! २

कोठें ती सुखवैभवैकनिलया दिव्या अयोध्यापुरी ?
पूर्णब्रह्म रसात्मजारमण तो श्रीराम कोठें तरी ?
कोठें तो अजि जाय पांडवसखा ती द्वारका सोडुन ?
गेले ते विधिलेखना वश अहा ! सृष्टिक्रमें होउन ! ३

तोडाया विधिशृंखला क्षम नसे कोणी महात्मा जनीं,
येतें तें घडुनी सुयोग्य समयीं, जें लेखिलें प्राक्तनीं;
कालग्रासित वस्तु शोक करतां हातीं पुन्हां येत न !
कां घ्यावा मग ऊर हा बडवुनी साक्रोश रात्रंदिन ? ४

हेमंतीं गुरु कांपते वसुमती, हांसे वसंतागमें;
होतो दाह तिचा निदाघसमयीं, वर्षाजलीं तो शमे;
दैवेच्छा सगळ्या अनित्य असती, कोणास ना गोचर,
यद्वृत्ती विषमीं समीं अविचला ते धन्य लोकीं नर. ५

संसारार्णव हा तरूनि सकलां जाणें असे निश्चित,
घोरावर्त अनेक यांत भरले खायास जीवांप्रत;
सत्कृत्यादर वागवूनि करणें सयत्न धैर्ये सदा—
देवोनी व्यसनास तोंड;गति ना अन्या हितानंददा ! ६

दुर्दैवें जरि कर्मवीर विजयी झाले न लोकीं सदा,
राष्ट्रश्रीसुखवर्धनार्थ सहती सोत्साह घोरापदा;
केला उद्यम चंग बांधुनि तयां लाभे म्हणोनी यश,
व्हावें आपण कां हताश भिळतां कर्मीं पुरें दुर्यश ? ७

दुर्दैवें न मिळेल सयश परी व्हावें न धैर्यच्युत,
कोठें मी चुकतों, विचार करुनी व्हावें स्वकार्यी रत.
दैवा देउनि दोष वा रडुनिही लाभेल सत्सिद्धि न,
उद्योगीं रत व्हा, सदैव विजयी होईल कीं जीवन. ८

आहे जीवन हें अनित्य, भव हा स्वप्नापरी भंगुर,
ठेवोनी हृदिं भाव हा निशिदिनीं व्हावें न चिंतातुर;
'मी,''मी,'यासम नामघोष करिती; मी कोण या भूवरी ?
आहे आज परी उद्यां न तनु ही, त्या काल तो संहरी.९

साऱ्या नश्वर वस्तु या मग सदा कां गर्व चित्तीं वहा?
ठेवा सयश अल्प नित्य खपुनी मागें धरासंग्रहां;
येतां सुप्ति महा अशांत सहसा संपेल बाजार हा,
वायां सद्व्ययहीन आज दवडा गातींत कां देह हा?१०

गेला मातृवसुंधरातनय तो **गोपाल**[1] कालोदरीं !
आली गोष्ट घडोनि योग्य जगतीं सृष्टिक्रमाचे परी;
शोकानें अपुल्या अतां परत तो येईल ना खालतीं,
कां दावा मग शोक दीर्घ वरुनी अज्ञान या संकटीं ?११

केल्यानें नयनां सबाष्प, पिटितां वक्षास सार्तस्वर,
गातां तद्यश ना तदीयविषयीं होईल व्यक्तादर;
पूज्यव्यक्तिचरित्र पूर्ण हृदयीं बाणोनियां, त्यापरी—
कर्तें होउं, तदा म्हणूं मृतजनीं प्रेमा वसे अंतरीं. १२

राष्ट्रोत्कर्षतरूस चारु कुसुमें आलीं न तों अंतक—
माळी घेउनि जाय, हाय ! सुरला आतां तया पोषक !
तत्कर्में अपुरीं करूं सफल तीं सार्द्रतोयार्पणें[2]
प्रेमस्मारक हेंच मंगल अतां ! आक्रोश या सोडुन ! १३

झालें दग्ध हुताशनींत गत त्या अस्मन्मनोद्वैत तें,
सर्वैश्वर्यनियुक्त वत्सर नवें सानंद कीं हांसतें;
अद्वैतध्वज नीट हा फडकवूं मांगल्यकालीं अशा,
गोपालें पथ आंखिला क्रमुनि तो या मेळवूं सयशा!१४

होवोनी नतशीर्ष ईश्वरपदीं ऐशी करूं याचना,
"ये ब्रह्मांडपते ! दयार्द्र हृदयें दे धैर्य अस्मन्मना !
चिंतासंकुल जीव हा प्रतिदिनीं शांती वरो संकटीं !
भाग्याभाग्य विचार येउत न,दे कर्तव्यकर्मीं रति!"१५

जगन्नाथ वामन हर्षे.

१. ना. गोपाळ कृष्ण गोखले. २. स+अद्वैत+तोय+अर्पण.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले.

(मृ. १९-२-१५)

[शहरांत]

खळखळ जन अश्रू ढाळिती दीनवाणी ।
हळहळति उसासे टाकिती अन्य कोणी ॥
करिति बहु विलापा, कासया ? काय झालें ?
भरत-सुत-हितैषी **गोखले** आज गेले ॥ १ ॥

विनिमय नच चाले, शून्य या पण्यवीथी ।
शकट नगर-मार्गी आज ना जाति येती ॥
विविध नगरिं धंदे आज कां बंद झाले ?
भरत-सुत-हितैषी **गोखले** आज गेले ॥ २ ॥

नच उघडालें दारें आज शाळागृहांचीं ।
विरस दिसति चित्तें भेणत्याही शिशूंचीं ॥
विजन नगरे-सौस्थ्या-वेक्षणागार झालें ।
भरत-सुत-हितैषी **गोखले** आज गेले ॥ ३ ॥

दिसति नरपतींचीं शून्य धर्मासनें हीं ।
प्रतिदिनिं असणारी व्यापृती तेथ नाहीं ।
समय विषम ऐसा यावया काय झालें ?
भरत-सुत-हितैषी **गोखले** आज गेले ॥ ४ ॥

जनसमितिगृहें तीं आणखी ग्रन्थशाळा ॥
विसरति निजकर्मा, देति उद्विग्नतेला ।
सकल नगर ऐसें कां उदासीन झालें ?
भरत-सुत-हितैषी **गोखले** आज गेले ॥ ५ ॥

रडति करुण कोणी आश्रयस्थान गेलें ।
म्हणति इतर अस्मन्नायका हारियेलें ॥
सकल नगर शोकीं आज कां हें बुडालें।
भरत-सुत-हितैषी **गोखले** आज गेले ॥ ६ ॥

[घांटावर]

उभय तट नदीचे आज गेले फुलोनी ।
सकलहि पुरवासी लोटले या स्मशानीं ॥
नच पितृवन-यात्रा यापरी पाहियेली ।
कधिंहि न जनचित्तें यापरी आर्त झालीं ॥ ७ ॥

चरमविधि कराया काय नारायणाचा[1] ।
पुनरपि जन आला येथ साऱ्या पुण्याचा !
सकल विविधधर्मी लोक येथें मिळाले ।
शिशु-युव-युवतीही भेद सारे गळाले ॥ ८ ॥

[हिंद-मातेस उद्देशून]

रड ! रड ! रड ! माझे लाडके हिन्दमाते ।
हत विधि तुज हाणी दारुणें वज्रघातें ॥
विसरसि नच एका आपुल्या लाडक्याला ।
तंव अवचित नेई त्याजपाठीं दुज्याला ॥ ९ ॥

खचित तुजवरी गे कोपला श्रीहरी तो ।
म्हणुनि वरिवरी कीं आग ही पाखडीतो ॥
बसवुनि सुत अंकीं कौतुकें न्याहळीशी ।
मुख, तंव जणुं लागे दृष्ट त्या तान्हुल्याशी ॥१०॥

निपजति तुज पोटीं केवढाले सुपुत्र ।
परि बहुतहि जाती अल्पकाळीं परत्र ॥
विसकळित कुटुंबा लाविती हातभार ।
तंव निधन अकाळीं, राहि शोका न पार ॥ ११ ॥

विसरलिस अजूनी नाहिं गे **रान**ड्यांतें ।
गहिंवर तुज येई आठवूनी तयातें ॥
प्रियकर निज शिष्या ठेवुनी येथ गेले।
हर ! हर ! हतदैवें **गोखले** ते निमाले ॥ १२ ॥

अनुदिनिं तंव सेवा एकभावें कराया ।
शिकवुनि गुरु गेला ईश्वरा आळवाया ॥
परि अजुनि न झाला श्रीहरी तो प्रसन्न ।
म्हणवुनि तुज ठेवी नित्यशोकार्त दीन ॥ १३ ॥

प्रियभरतधरित्रीमातृसेवाव्रताचें ।
वळण गिरविलें तें शुद्ध ज्यांनीं गुरूचें ॥

---

1. Municipal Office.
2. Club Houses.

१. श्रीमंत नारायणराव पेशवे.

त्यजुनि तुजासि गेले तेहि **गोपाळराव** ।
बुडवुनि सुत-शोकीं ! क्रूर ऐसेंच दैव ।। १४ ।।

ह्मणति सुजन जो तो आवडे स्वर्गि देवां
ह्मणुनि हरुनि नेलें त्यांहिं **गोपाळरावा** ॥
अझुनि न पितरांचें पुण्य आलें फळाला ।
म्हणवुनि पडतो हा या जनीं थोर घाला ॥ १५ ॥

[गोपाळरावांस उद्देशून]

गुण-गण तव वानूं काय **गोपाळरावा** !
उपजवि जनचित्तीं तीव्र अत्यंत हेवा ॥
मधुर वचन, वृत्ती शांत, गोड स्वभाव ।
तव सुचरित गाती सर्वही रंक-राव ॥ १६ ॥

कठिण ह्मणति जी ती आंग्लभूपाल-बोली ।
तव जणुं रसनाग्रीं जन्मतः सिद्ध ठेली ॥
नवल न वचनौघें त्वां सुधासारवर्षे ।
तुकविलिं जनशीर्षें गाढ-हर्ष-प्रकर्षें ॥ १७ ॥

रसयुत तव वाणी राक्षसां मोहनीशी ।
भरतसुतविपक्षा भासली आंग्लदेशीं ॥
प्रतिनिधिजनचित्तीं युक्तिवादें प्रवेश ।
करुनि तिजवशें त्वां साधिला कार्यलेश ॥ १८ ॥

करुनि बहुत वर्षें श्रेष्ठ आचार्यकर्म ।
शिकुनि गुरुमुखीं त्वां देशसेवैकधर्म ॥
श्रमुनि अचुक नेमें विधिलें कार्य-मर्म ।
मज तव चरितांचें हें गमे एक वर्म ॥ १९ ॥

जनपदहितकार्या सिंधु उल्लंघियेले ।
अशनिं, शयनिं, पानीं कष्ट बा सोशियेले ।
कुजनकृत छळातें ना कधीं लेखियेलें ।
निजजनपद-दौत्या शीघ्र संपादियेलें ॥ २० ॥

बहुत सहन केलें दुःख तें काळिजाचें ।
परि न टळुं दिलें त्वां काज ह्या बान्धवांचें ॥
सकलहि सुखदुःखें अर्पिलीं स्वीय देशा ।
तव जनपदभक्ती पावु ती त्या परेशा ॥ २१ ॥

नरपतिहितकारी द्वेष्य वाटे प्रजेला ।
जनपदहितकारी नावडे तो नृपाला ॥
सुखवुनि उभयांतें धन्यता जोडियेली ।
विरळ तव गुणें ह्या कीर्ति सर्वत्र झाली ॥ २२ ॥

स्थल नच तव चित्तीं जाति-धर्मादि भेदा ।
स्तवुं किति तरि ऐशा त्वन्मनींच्या प्रबोधा ॥
सकल भरतभूतें वेढिलें प्रेमपाशीं ।
अनुपम करणी हे मान्य ईशा न कैशी ॥ २३ ॥

निजजनपदसेवा केलि बापा ! अमोल ।
कथितिल इतिहासीं धन्यवादीं रसाल ॥
चरितहि तव सारे बालगोपाल भावें ।
पढतिल बहु यत्नीं कीं न तें विस्मरावें ॥ २४ ॥

तव जनपदसेवा विश्वनाथासि पावो ।
प्रिय भरतसुतांची उन्नती येथ होवो ॥
गुरुसहित तुवांही ईश्वरा आळवावें ।
तुजसम सुत आर्यावर्ति निर्माण व्हावे ॥ २५ ॥*

२० फेब्रुवारी १९१५ } ग. ज. आगाशे.

* ही कविता Deccan College Quarterly-मधून घेतली आहे.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक ७.

सूर्यचंद्रवंशी क्षत्रियांचा वेदांतील माग.

[भारत–इतिहास–संशोधक मंडळाच्या तृतीय सम्मेलनापुढें २९ मे १९१५ रोजीं वाचलेला निबंध.]

मागील सम्मेलनाचे वेळीं मीं भागवतांतील व मत्स्यपुराणांतील एका वचनावरून असें दाखविलें होतें कीं, हिंदुस्थानास प्राचीनकाळीं भारतवर्ष किंवा भरतखण्ड असें जें नांव होतें तें चंद्रवंशी दौष्यन्ति भरतावरून नव्हे, तर स्वायंभुव मनूच्या भरत नांवाच्या एका प्रपौत्रावरून पडलें होतें. या गोष्टीचा माग पुराणाहून प्राचीन ग्रंथांत अर्थात् वैदिक वाङ्मयांत सांपडतो कीं काय, हें पाहण्याच्या इच्छेनें मीं त्या वाङ्मयाचें आलोचन केलें. त्यांत जी महत्त्वाची माहिती मला उपलब्ध झाली, ती मीं रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबईच्या शाखेपुढें विस्तारानें आक्टोबर सन १९१४ मध्यें एका लेखांत मांडली आहे. ती सारांशरूपानें आपल्यापुढेंही मांडण्याची मी परवानगी घेतों. कारण, ती माहिती मनोरंजक असून, तिच्याविषयीं आपल्यासारख्या विद्वानांसही विचार करावयास सांपडेल; आणि तिच्या संबंधानें योग्य ऊहापोह होऊन तिच्या सत्यासत्यतेविषयीं निर्णय होईल असें मला वाटतें.

प्रथम गोष्ट ही सांगितली पाहिजे कीं, वैदिक वाङ्मयाचें जें मीं परिशीलन केलें तें केवळ या बाबतीसंबंधानेंच केलें, व तें करतांना ‘वेदिक इंडेक्स’ या अत्यंत उपयुक्त इंग्रजी पुस्तकाची मदत घेतली. या सूचींत मॅकडोनलनें वैदिक वाङ्मयांत येणाऱ्या सर्व नांवांची माहिती देऊन त्या त्या शब्दांचे दाखले (References) दिले आहेत. त्या त्या दाखल्यांवरून मीं मूळ वचनें काढून पाहिलीं, एवढी मात्र मीं खबरदारी घेतली. कारण, कित्येक प्रसंगीं मॅकडोनल प्रभृति पाश्चात्य विद्वानांचे मूळचे गैरसमज असल्यानें चुकीचीं अनुमानें निघतात, ही गोष्ट माझ्या दृष्टोत्पत्तीस आली आहे. त्याचीं उदाहरणें पुढील विवेचनांत येतीलच. असो. प्राचीन वेदादि निरनिराळ्या ग्रंथांत विरुद्ध विधानें सांपडल्यास त्यांची गति कशी लावावी, याजविषयीं मीं एक ऐतिहासिक सिद्धांत बांधला आहे, तो असा:–प्राचीन ग्रंथांचा ऐतिहासिक क्रम येणेंप्रमाणें लावतां येईल.

(१) ऋग्वेद.
(२) यजुर्वेद. } (३६०० इ. स. पू.)

(३) ब्राह्मण ग्रंथ. त्यांत मुख्य शतपथ. (३०००—१५००).

(४) वेदांगज्योतिष वगैरे (१५००—१०००).

(५) धर्मसूत्रें. गृह्यसूत्रें वगैरे (१०००—५००).

(६) मेग्यास्थेनीस व एरायन प्रभृति ग्रीक इतिहासकार (इ. स. ५००—३००).

(७) महाभारत हल्लींचें. याचा काळ माझ्या मताप्रमाणें इ. स. पू. २५०.

(८) रामायण हल्लींचें. याचा काळ सुमारें १०० (इ. स. पू.).

(९) पुराणें हल्लींचीं (यांचा काळ इ. स. ३०० पासून ६०० किंवा ८०० पर्यंत).

या ग्रंथांचें पूर्वपूर्वप्रामाण्य मानलें पाहिजे, हें उघड आहे. म्हणजे पुराणांपेक्षां ग्रीक ग्रंथकारांस मान दिला पाहिजे. ग्रीकांपेक्षां पाणिनीस. पाणिनीपेक्षां ब्राह्मणांस आणि सर्वांत श्रेष्ठ प्रामाण्य ऋग्वेदास. शेवटीं शीर्षमापनशास्त्र व भाषाशास्त्र या नवीन शास्त्रांवरून जे सिद्धांन्त निघाले आहेत, तेही या चिकित्सेंत सामिल करण्यासारखे आहेत. एवढी प्रस्तावना करून मी आपल्या मुख्य विषयाकडे वळतों.

महाभारतापासून अलीकडच्या ग्रंथांत आर्यांचे दोन वर्ग मानले गेले आहेत, यावरून आर्यांच्या दोन टोळ्या दोन वेळीं हिंदुस्थानांत आल्या असाव्या, असें अनुमान सहज निघतें. शीर्षमापनशास्त्राचाही हाच सिद्धान्त आहे. पंजाबांत व राजपुतान्यांत बहुतेक शुद्ध आर्य म्हणजे लांब डोक्याचे व उंच नाकाचे लोक सांपडतात; आणि संयुक्त प्रांत व मुंबई इलाखा येथें मिश्र आर्य म्हणजे मध्यम डोक्याचे व मध्यम उंच नाकाचे लोक सांपडतात; असें १९०१च्या सेन्ससच्या वेळीं घेतलेल्या मापांवरून जाहिर झालें आहे. भाषाशास्त्रही ह्याच सिद्धान्तास दुजोरा देतें, तो असा. पंजाबी, राजस्तानी व पूर्वेकडील हिंदी—ह्मणजे अवध व मिथिल प्रांतांतील हिंदी—यांचा एक स्वतंत्र वर्ग पडतो, व मध्यदेशांतील भाषा ह्मणजे पश्चिमेकडील हिंदी—इचा स्वतंत्र वर्ग पडतो. डॉक्टर होर्नेल यांनीं हिंदी आर्यासंबंधें याजवरून जें अनुमान काढलें आहे व जें डॉक्टर ग्रीयरसन वगैरे भाषाकोविदांस पसंत पडलें आहे, व जें १९११ च्या सेन्सस रिपोर्टांत नमूद झालें आहे, त्यासंबधीं उतारा घेऊं:—These languages, according to Dr. Hornle were brought to India by two successive hordes of invaders. After the first horde had settled in the plains of Northern India a fresh horde came in and penetrated the original mass, like a wedge, blotting out the languages in the centre and extending from Ambala in the north to beyond Jubbulpore in the south and from Kathiawar in the south--west to Nepal in the north-east..." पृ. ३२५. प्रथम आलेल्या व बहुतेक गंगोत्तर उत्तर हिंदुस्थानांत पसरलेल्या आर्यांच्या वसाहतींत दुसरी आर्यांची टोळी मध्यें घुसली आणि अंबाल्यापासून दक्षिणेकडे काठेवाड—जबलपुरच्या रेषेपर्यंत पसरली; असें जें हिंदुस्थानांतील सध्यांच्या भाषांवरून अनुमान काढलें गेलें आहे व ज्यास शीर्षमापनशास्त्राप्रमाणें घेतलेल्या डोक्यांच्या व नाकांच्या मापांवरून बळकटी येते, तेंच अनुमान वैदिक वाङ्मयपरिशीलनानें दृढ होतें असें

माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें आहे. आर्यांच्या याच दोन टोळ्यांस भारतादि ग्रंथांपासून सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रिय ह्मणण्याचा प्रघात पडला. महाभारतांत सभापर्वांत जरासंधाला जिंकतां येईल कीं नाहीं, या युधिष्ठिराच्या प्रश्नाला उत्तर देतांना श्रीकृष्ण ह्मणतो, "सध्यां सूर्य व चंद्र यांजपासून उत्पन्न झालेल्या आर्यांचीं १०१ कुळें भरतखण्डांत आहेत व त्यांतल्या त्यांत भोजवंशांतील चंद्रवंशी क्षत्रिय बलिष्ठ असून त्यांनीं मध्यदेश व्यापला आहे;" या उताऱ्यांतील वर्णन वरील सिद्धांताशीं चांगलें जुळतें. आतां सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रियांचा माग वेदांत कसा लागतो व त्यांच्या पसरण्याचा वर दिलेला त्रोटक इतिहास वैदिक वाङ्मयावरून कसा दृढ होतो, हें या निबंधांत मी दाखवतों.

वेदिक इंडेक्स ग्रंथांत 'भरत' शब्दाखालीं माहिती दिली आहे ती अशी—" ऋग्वेदांत भरत हें नांव एका महत्त्वाच्या लोकांचें आहे. तें विशेषतः तिसऱ्या व सातव्या मण्डलांत त्रित्सु आणि सुदास या नांवांबरोबर वारंवार येतें, आणि सातव्या मंडलांत त्यांचा संबंध दिवोदासाशीं आढळतो." यापुढें मॅकडोनलनें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "या भरतांचें पुढें काय झालें हें समजत नाहीं. बहुधा ते कुरुलोकांत सामिल झाले असावे." माझ्या मतें भरत शब्दानें दौष्यन्ति भरताची जी एकदम कल्पना मनांत येते ती या गैरसमजाला कारण झाली आहे. ऋग्वेदांतील जे जे उल्लेख मॅकडोनलनें 'भरत' शब्दाखालीं दिले आहेत, ते सर्व मीं काढून पाहिले आणि माझा असा सिद्धांत झाला आहे कीं, ऋग्वेदांत ज्या भरतांचा वारंवार नामनिर्देश येतो, तेच पुढें सूर्यवंशी क्षत्रिय या नांवानें संबोधले गेले. या निरनिराळ्या उल्लेखांचा आपण सविस्तर विचार करूं. प्रथम सातव्या मंडळांत भरतांचा उल्लेख पुष्कळ येतो. हें मण्डल वसिष्ठ ऋषींनीं केलेल्या सूक्तांचें आहे. भरत म्हणजे वैदिक भाषेंत भरत राजा किंवा भरतवंशी लोक (भरताः) असा अर्थ होतो. या उल्लेखांवरून असें दिसतें कीं, या भरत लोकांचे पुरोहित वसिष्ठऋषि व तत्कुलोत्पन्न होते. भरत ह्मणजे सूर्यवंशी क्षत्रिय, अशा सिद्धान्ताचा हा पहिला व मजबूत पुरावा आहे. सातव्या मंडलांतील पहिलें महत्त्वाचें सूक्त ह्मणजे ३३ हें होय. ऋग्वेदांतील सूक्तें इंद्रादि देवतांच्या स्तुत्यर्थ आहेत हें प्रसिद्ध आहे. तीं कांहीं इतिहास म्हणून रचलेलीं नाहींत, परंतु त्या सूक्तांत ऐतिहासिक उल्लेख प्रसंगोपात्त आला आहे, तो फार महत्त्वाचा आणि बहुतेक प्रत्यक्ष असा पुरावा आहे. या तेहतिसाव्या सूक्तांत एका मोठ्या लढाईचा उल्लेख आहे. त्यास दाशराज्ञ असें म्हटलें आहे; म्हणजे दहा राजे या लढाईंत होते. या लढाईंत भरतांचा पराभव होण्याचा वेळ झाला होता; परंतु भरतांचा पुरोहित वासिष्ठ हा पुढें आला व त्यानें आपल्या स्तुतीनें इंद्रास तुष्ट करून भरतांचा जय करून दिला. " दण्डा इवेद्गोअजनास आसन् परिच्छिन्ना भरता अर्भकासः। अभवच्च पुरएता वासिष्ठ आदितृत्सूनां विशो अप्रथन्त (६)" सूक्तांचा अर्थ लावतांना आरनोल्डचें भाषान्तर मीं बहुधा घेतलें आहे. पण बहुतकरून इतर ग्रंथ—श्रुतिबोध वगैरे—जो अर्थ देतात त्याशीं विरोध येणार नाहीं असें वाटतें. असो. या लढाईविषयीं सवि-

स्तर मी पुढें सांगेन. दुसरें महत्त्वाचें सूक्त मण्डल ७, १८ हें होय. यांत भरत राजाचा उल्लेख असून त्याच्या अग्नीचें वर्णन आहे. "प्र प्रायमग्निर्भरतस्य शृण्वे अभियः पूरुं पृतनासु तस्थौ" आर्यांच्या पूर्वीचे येथील रहिवासी अग्न्युपासक नव्हते. आर्य अग्न्युपासक असून प्रसिद्ध राजांचे अग्नि त्यांच्या त्यांच्या नांवानें ऋग्वेदांत उल्लिखित आहेत, हें येथें सांगण्यासारखें आहे. या ऋचेंत भरतानें पूरूचा पराभव केला, असा उल्लेख आहे. हा पूरु कोण ? पूरु नांव ऐकल्याबरोबर ययाति-शर्मिष्ठांचा पुत्र पूरु याची स्मृति होते. परंतु जसा भरत नांवानें घोटाळा उत्पन्न केला आहे, तसा पूरु या नांवानेंही केला आहे. शतपथ ब्राह्मणांत एके ठिकाणीं या ऋचेंतील पूरु ह्मणजे एक असुर होय असें स्पष्ट ह्मटलें आहे. मॅकडोनलनें याजवर पूरु शब्दाखालीं अशी टीका केली आहे. "पूरु ह्मणजे ययातिपुत्र पूरु.पण शतपथ-काळीं या पूरूची आठवण इतकी बुजाली होती कीं, पूरु हा एक असुर मानला गेला." येथें मॅकडोनलची चूक झाली आहे, असें मला वाटतें. शतपथकाळीं ऋग्वेदकालीन पुरुषांची आठवण आमच्यापेक्षां पुष्कळच जास्त होती. भरताच्या वेळीं त्याशीं लढण्यास ययातिपुत्र पूरु येऊं शकत नाहीं, हें जाणून शतपथानें मुद्दाम हा इशारा देऊन ठेविला आहे. पूरु नामक एका असुराचा ह्मणजे आर्य-शत्रूचा भरतानें पराभव केला. हा पूरु ययातिपुत्र घेतला, तरी भरत हा दौष्यन्ति भरत नव्हे हें निश्चित आहे. कारण, दौष्यन्ति भरत पूरूचा किती तरी पुढील वंशज होय. माझ्या मतें हा भरत दौष्यन्ति भरत नव्हे आणि हा पूरु ययातिपुत्र पूरु नव्हे. असो.

भरतांच्या दुसऱ्या सुदास नांवाच्या राजाचा उल्लेख करणारीं आणखी वसिष्ठाचीं सूक्तें ह्मणजे मण्डळ ७, ८३ व ७, १८ हीं होत. यांत दाशराज्ञ युद्धाचा स्पष्ट उल्लेख आहे." यत्र राजभिर्दशभिर्निबाधितं प्र सुदासमावतं तृत्सुभिः सह" ७, ८३ (६-७)* तसेंच, "दाशराज्ञे परियत्ताय विश्वतः सुदास इंद्रावरुणावशिक्षतम्" ७, ८३ (८-७) याच मण्डळाच्या १८ व्या सूक्तांत या लढाईचें सविस्तर वर्णन आहे. त्याजविषयीं पुढें लिहीन.

आतां आपण मण्डल ३ कडे वळूं. मण्डल ७ हें जसें वसिष्ठाच्या सूक्तांचें आहे, तसें मण्डल ३ हें विश्वामित्राच्या सूक्तांचें आहे. विश्वामित्राचा संबंध सूर्यवंशी क्षत्रियांशीं वसिष्ठाइतकाच आहे असें ह्मटलें तरी चालेल. या विश्वामित्राच्या सूक्तांत भरतांचा पुष्कळ उल्लेख आहे. पहिलें सूक्त ३, २३ हें आहे; हें देवश्रवा व देववात या दोन भारत राजांनीं केलेलें आहे व तें विश्वामित्राच्या मण्डलांत दिलेलें आहे. "देवश्रवा व देववात या भरतांनीं दृशद्वती, आपयायव सरस्वती या नद्यांवर अग्नि प्रज्वलित केला," असा यांत उल्लेख आहे."अमन्थिष्टां भारता रेवदग्निं देवश्रवा देववातः सुदक्षम् ।" तसेंच "दृशद्वत्यां मानुष आपयायां सरस्वत्यां रेवदग्ने दिदीहि ।"(४).दुसरें महत्त्वाचें सूक्त ह्मणजे ३, ३३ हें होय. शतद्रु आणि विपाशा यांच्या संगमावर एके प्रसंगीं भरत आले असतां अतिशय पुरामुळें वाट मिळेना. तेव्हां विश्वामित्रानें भरतांकरितां या नद्यांची स्तुति केली असतां पाणी ओसरून

* मोठे आंकडे मण्डळांचे, लहान सूक्तांचे, व कौंसांतील ऋचांचे समजावे.

भरत पलीकडे गेले. त्यांच्या गाड्यांच्या आंसाला सुद्धां पाणी लागलें नाहीं. "अधोअक्षाः सिन्धवः स्रोत्याभिः।" भरत पलीकडे गेले ह्मणजे तुह्मी खुशाल वाढा अशी विश्वामित्रानें या नद्यांस प्रार्थना केली. "यदङ्ग त्वा भरता सन्तरेयुः" वगैरे. तिसरें आणखी महत्त्वाचें सूक्त ३, ५३ आहे. यांत विश्वामित्रानें सुदास राजाला मदत केली असें वर्णन आहे. हा सुदास राजा वसिष्ठाच्या दाशराज्ञ युद्धांतीलच असावा. त्याला अन्य प्रसंगीं विश्वामित्रानें मदत केली. "विश्वामित्रो यदवहत्सुदासमप्रियायत कुशिकेभिरिन्द्रः" या सूक्तांतील "विश्वामित्रस्य रक्षति ब्रह्मेदं भारतं जनम्" ही ऋचा फारच मजेची आहे. भारत जनांचें रक्षण विश्वामित्राचें हें ब्रह्म ह्मणजे स्तोत्र करीत आहे, या वाक्यांत भारतजन या शब्दांनीं भारतवर्षाचाच ध्वनि कानीं पडतो असें म्हटलें असतां चालेल. पौराणिक विश्वामित्राच्या कथेचीं बहुतेक बीजें या सूक्तांत आहेत. विश्वामित्र हा कुशिक वंशांतील आहे. तो मूळचा राजा होता किंवा नाहीं हें स्पष्ट नाहीं. भरत हे प्रबळ व सर्वत्र प्रसृत झाले असून त्यांचा राजा सुदास यास विश्वामित्रानें मदत केली. अर्थात् विश्वामित्र व वसिष्ठ यांची स्पर्धा उत्पन्न झाली असावी. रामायण उत्तरकाण्ड अ० ६५ यांत कल्माषपाद याची गोष्ट दिली आहे; तेथें तो सौदास होता असें ह्मटलें आहे. "युष्माकं पूर्वजो राजा सौदासस्तस्य भूपतेः" वगैरे कथा वाल्मीकीनें शत्रुघ्नाला सांगितली आहे. त्यांत वसिष्ठानें कल्माषपादाला (सौदासपुत्राला) सोडलें, तेव्हां विश्वामित्रानें त्यास मदत केली असें वर्णन आहे. असो. हरिश्चंद्राच्याही कथेंत शुनःशेपाला वांचविण्यास विश्वामित्र पुढें सरसावला, असें ब्राह्मणकथेंत वर्णन आहे. सारांश, विश्वामित्राचा सूर्यवंशाशीं संबंध पक्का आहे; आणि ऋग्वेदांतील हे भरत व सुदास सूर्यवंशी होते असें दिसतें.

आतां आपण सहाव्या मण्डलाकडे वळूं. हें मंडल भरद्वाजाच्या सूक्तांचें आहे. यांत भरत राजा, भारत लोक, भरताचा अग्नि, दिवोदास राजा, व खुद्द भरद्वाज यांचा उल्लेख विशेष आहे. सूक्त ६,१६ यांत खालील ऋचा आहेत. "त्वमिमा वार्या पुरु दिवोदासाय सुन्वते। भरद्वाजाय दाशुषे॥ अग्निरगामि भारतो वृत्रहा पुरुचेतनः। दिवोदासस्य सत्पतिः॥ प्र देवं देववीतये भरता वसुवित्तमम्। आ स्वे योनौ निषीदतु॥" दिवोदास हा ऋग्वेदांत सुदासाचा पिता होता, असें वर्णन येतें. त्याचा संबंध भरद्वाजाशीं कां? त्याच्या पुत्राचा संबंध वसिष्ठ-विश्वामित्राशीं येतो, अशी पाश्चात्य वैदिक पंडित शंका नमूद करतात. पण यांत आश्चर्य नाहीं. वसिष्ठ भरतांचा पुरोहित होता हें उघड आहे. पण यामुळें इतर ऋषींचा संबंध भरतांशीं किंवा त्यांच्या राजांशीं येऊं नये असें होत नाहीं. सूर्यकुलाशीं भरद्वाजाचा संबंध रामायणावरूनही दिसतो.

असो. वरील सूक्तांवरून ऋग्वेदांतील भरत ह्मणजे पौराणिक काळांतील सूर्यवंशी क्षत्रिय होत, हें उघड आहे. त्यांचे राजे भरत, सुदास, दिवोदास, पुरुकुत्स, त्रसदस्यु वगैरे दिसतात. रामायणांतील बा० कां० अ० ७० मधील सूर्यवंशाच्या वंशावळींत भरत आहे. त्यांत सुदास नाहीं, पण कल्माषपाद आहे व उत्तर कांडाच्या ६३ व्या अध्यायांत हा

कल्माषपाद सौदास म्हणून स्पष्ट सांगितलें आहे. इतर पुराणांतील वंशावळींत सुदास आहे, पुरुकुत्स आहे व त्रसदस्यु आहे.सारांश, पुराणांतील वंशावळी जरी छिन्नभिन्न झालेल्या व परस्परविरोधी आहेत, त्या ऋग्वेदांतील उल्लेखानें दुरुस्त करून घेतल्या पाहिजेत, ऋग्वेदाचें प्रामाण्य पुराणांपेक्षां जास्त आहे, हें पूर्वीच सांगितलें आहे; तरी कोणतीही वंशावळ घेतल्यास तींत भरत आणि सुदास हे आहेत. तेव्हां ऋग्वेदांतील भरत ह्मणजे पुराणांतील सूर्यवंशी क्षत्रिय होत. ब्राह्मणकाळीं सूर्यवंशी क्षत्रियांचीं राज्यें कोसल व विदेह हींच होतीं व पश्चिमेकडे कुरु प्रबळ होऊन त्यांनीं सर्व देश पादाक्रांत केला होता. यामुळें ब्राह्मणांत भरतांचा उलेख कमी येतो. तथापि भरत शब्दानें सामान्य क्षत्रिय वीर किंवा सामान्य ऋत्विज् असा अर्थ ब्राह्मणकाळीं समजला जात असे. याजवरून हिंदुस्थानांतील आर्यांचें सामान्य नाम भरत असें पडलें होतें असें दिसतें. तसेंच भारती याचा अर्थ निरुक्तकारानें "भरतः आदित्यस्तस्य इयं भाः भारती" असा दिला आहे. यावरून या भारतांना सूर्यवंशी क्षत्रिय असें नांव पुढें कसें पडलें असावें याचा बोध होतो. या क्षत्रियांचा मूळ पुरुष मनु होता, ही गोष्ट ऋग्वेदावरूनही दिसते. मनु हा सर्व मानवजातीचा मुख्य पिता ही कल्पना वेदांत आहे; आणि मनु हा सूर्याचा पुत्र हीही कल्पना ऋग्वेदांत आहे. असो. भरतें ह्मणजे सूर्यवंशी क्षत्रिय, त्यांचे पुरोहित वसिष्ठ व इतर ऋषि विश्वामित्र व भरद्वाज; हे भरत प्रथम हिंदुस्थानांत आल्यामुळेंच हिंदुस्थानास भारतवर्ष हें नांव पडलें; इत्यादि गोष्टी आपल्यास वरील विवेचनावरून दिसतील. आतां आपण चंद्रवंशी क्षत्रियांकडे वळूं.

चंद्रवंशी क्षत्रिय पूर्वींच्या क्षत्रियांप्रमाणेंच अग्न्युपासक आर्य होते; पण कांहीं बाबतींत ते भिन्न होते. ते मागाहून आले आणि प्रथम सरस्वतीतीरावर त्यांनीं वसति केली. तेथून ते दक्षिणेकडे व आग्नेयीकडे पसरले. त्यांनीं पूर्वेकडच्या पूर्वींच्या आर्यांस जिंकण्याचा प्रयत्न केला व पश्चिमेकडच्या ह्मणजे पंजाबांतील आर्यांस जिंकण्याचा प्रयत्न केला. दोन्हीकडे त्यांस प्रथम अपयश आलें. पण शेवटीं पंजाब देश त्यांनीं जिंकला; ह्मणजे तेथील नुसतें सार्वभौमत्व संपादिलें, पण तेथें वसाहत थोडी केली. यांची वसाहत मुख्यतः कुरुक्षेत्र, दुआब व काठेवाड पासून जबलपुरापर्यंत गंगेच्या दक्षिण भागांत झाली. या गोष्टी वैदिक वाङ्मयावरून अनुमानानें कशा निघतात हें मी आतां दाखवितों.

पहिला मुद्दा असा कीं, एका सूक्तांत यदु, तुर्वश, अनु, द्रुह्यु, आणि पूरु या पांचांचीं ह्मणजे या पांच लोकांचीं नांवें एके ठिकाणीं आलीं आहेत. हा उल्लेख एकत्र पाहून मला सानन्द आश्चर्य वाटलें, आणि पुराणांतील चंद्रवंशाच्या माहितीला वेदांत चांगला आधार आहे, असें दिसून आलें. ऋ. १,१०८ यांत ८ वी ऋचा अशी आहे-"यदिंद्राग्नी यदुषु तुर्वशेषु यद्द्रुह्युष्वनुषु पूरुषु स्थः। अतः परि वृषणावा हि यातमथा सोमस्य पिबतं सुतस्य ॥" हे इंद्राग्नींनो, तुह्मी जरी यदूंमध्यें व तुर्वशांमध्यें तसेंच द्रुह्यूंमध्यें, अनूंमध्यें व पूरूंमध्यें असाल, तरी येथें या आणि हा काढलेला सोमरस प्या." यावरून अनेक

अनुमानें निघतात. पहिलें, हे लोक पूर्वीच्या आर्यांप्रमाणेंच इंद्राचे व अग्नीचे उपासक होते. दुसरें, हे पांच लोक एका जातीचे असावेत. तिसरें, त्यांतल्या त्यांत यदु आणि तुर्वश एका गोत्राचे असावेत.यदु,तुर्वश,द्रुह्यु, अनु आणि पूरु हे प्रथम राजे असून त्यांचे वंशज त्याच अनेकवचनी नांवानें संबोधिले जात. सारांश, चंद्रवंशांतील ययातीच्या दोन बायकांपासून झालेल्या पांच पुत्रांची कथा येथें चांगली व्यक्त होते. या सूक्तांचा कर्ता कुत्स आंगिरस आहे,याचें महत्त्व मी पुढें सांगेन.

दुसरी गोष्ट अशी कीं, या मागून आलेल्या आर्यांचा भरतांशीं तंटा लागला व त्यांशीं लढाया झाल्या. हे लोक मागून आले, ही गोष्ट कित्येक सूक्तांत त्यांच्यावर ऋषींचा राग दिसतो, यावरून निष्पन्न होते. प्रथम तंटा दिवोदासाशीं लागला असें दिसतें. मंडळ ९,सू. ६१, ऋ.२ अशी आहे:—"पुरः सद्य इत्थाधिये दिवोदासाय शंबरम्। अध त्यं तुर्वशं यदुम्॥"दिवोदासाकरितां इंद्रानें शंबराला मारलें, तसेंच तुर्वश व यदु यांना मारलें. यदु-तुर्वशांच्या असा विरुद्ध उल्लेख पुष्कळ वेळां आलेला आहे. सरयू नदीवर भरत राजे अर्ण आणि चित्ररथ यदु—तुर्वशांच्या लढाईत मारले गेले; असें मण्डल ४,३०ऋचा १७।१८ त वर्णन आहे. "उत त्या तुर्वशायदू अस्नातारा शचीपतिः। इंद्रो विद्वाँ अपारयत् ॥ १७ ॥ उत त्या सद्य आर्या सरयोरिन्द्र पारतः। अर्णाचित्ररथावधीः ॥ १८ ॥ "असो. सर्वांत मोठें युद्ध म्हणजे दाशराज्ञ होय. याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. हें युद्ध वसिष्ठाच्या एका सूक्तांत (७, १८) विस्तारानें वर्णिलें आहे. हें युद्ध परुष्णी नदीच्या कांठीं म्हणजे पंजाबांतील हल्लींच्या रावी नदीच्या कांठीं झालें. एका पक्षास भरत, त्यांचा राजा सुदास व त्याचा पुरोहित वसिष्ठ आणि त्रित्सु होते. दुसऱ्या पक्षास पांच आर्यराजे म्हणजे यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु आणि पूरु व त्यांचे पांच अनार्य मित्रराजे पखत, भलान, भनन्तालि, विषाणि आणि शिव हे होते. यांपैकीं पखत म्हणजे हल्लींची पश्तु भाषा बोलणारे लोक असावेत. पश्तु याचा उच्चार कित्येक पठाण जातींत अद्यापही पखत असा करतात, असें डॉ. ग्रीयरसननें लिहिलें आहे. या लढाईत भरतांचा अगदीं मोड होणार होता व त्यांचें धन त्यांचे शत्रु लुटणार होते; परंतु जेव्हां वसिष्ठानें इंद्राची स्तुति केली, तेव्हां नदीचा पाट फोडून नेत असतां परशत्रूंचीं सैन्यें वाहून गेलीं आणि शेवटीं त्यांचेंच सामान भरतांनीं लुटून घेतलें. यांत सहा हजार अनु व द्रुह्यु गाईबैल हांकून नेत असतां रणावर पडले. वैदिक सूक्तांचा समग्र अर्थ समाधानकारक लागत नाहीं, हें कबूल केलें पाहिजे; तथापि या सूक्तांतील शब्दांवरून वरप्रमाणें गोळाबेरीज निघते. यांतील मुख्य मुख्य ऋचा खालीं देतों "अर्णांसि चित्प्रथाना सुदास इंद्रो गाधान्यकृणोत्सुपारा। पुरोळा इत्तुर्वशो यक्षुरासीद्राये मत्स्यासो निशिता अपीव। श्रुष्टिं चक्रुर्भृगवो द्रुह्यवश्च सखा सखायमतरद्विषूचोः। आ पक्थासो भलानसो भनन्तालिनासो विषाणिनः शिवासः॥ आ योऽनयत् सधमा आर्यस्य गव्या तृत्सुभ्यो अजगन्युधा नृन्॥ इयुरर्थं न न्यर्थं परुष्णीमाशुश्चनेदभिपित्वं जगाम। सुदास इंद्रः सुतुकाँ अमित्रानरन्धयन्मानुषे वध्रिवाचः॥५॥ नि गव्यवोऽनवो द्रुह्यवश्च

षष्टिः शता सुषुपुः षट् सहस्रा । " या सूक्तांत तुर्वश, द्रुह्यु, अनु आणि पूरु हीं चार नांवें आलीं आहेत; पण यदूचा अंतर्भाव तुर्वशांत करावयास ऋग्वेदांतील या नांवांच्या नेहमींच्या साहचर्यावरून हरकत नाहीं. मत्स्य हेंही नांव यांत आलेलें आहे. पूर्वोक्त मं. ७, सू. ८३ मधील उल्लेखांवरून या लढाईंत दहा राजे सुदासाच्या विरुद्ध होते, ही गोष्ट निश्चित आहे; आणि त्यांत आर्य आणि दास ह्मणजे अनार्य असे होते, हेंही स्पष्ट लिखित आहे. " राजभिर्दशभिर्निबाधितं प्र सुदासमावतं तृत्सुभिः सह " या पूर्वोक्त ऋचेशिवाय आणखी एक ऋचा या सूक्तांत "दासा च वृत्रा हतमार्याणि च सुदासमिन्द्रावरुणावसावतम् ॥" अशी स्पष्ट आहे. सारांश, पंजाबांतील प्रथम येऊन राहिलेल्या भरतांस व त्यांचा राजा सुदास यास जिंकण्याचा प्रयत्न नंतर आलेल्या यदु-तुर्वशादिकांनीं मूळच्या रहिवाशांच्या राजांसह केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. बहुधा ऋग्वेद-काळीं हा प्रयत्न विफल गेला असें दिसतें आणि हे आर्य दक्षिणेकडे पसरले असें वाटतें. ब्राह्मण-काळीं त्यांनीं पंजाब जिंकलें हें मी पुढें सांगेन. असो. आतां आपण हे दुसरे आर्य प्रथम सरस्वतीतीरावर आले आणि तेथून दक्षिणेकडे व आग्नेयीकडे पसरले, या अनुमानास बळकटी आणणाऱ्या वैदिक वचनांकडे वळूं.

दुसऱ्या आलेल्या चंद्रवंशी आर्यांत पूरूचें कुळ सर्वांत जास्त मोठें व प्रसिद्धीस आलें होतें. ययातीच्या पांच पुत्रांत पूरु हाच मुख्य राजा झाला व 'अपौरवा तु हि मही न कदाचिद्भविष्यति' असा त्यास बापाचा आशीर्वाद होता अशी पुराणकथा प्रसिद्ध आहे. पूरूच्या कुळांत दौष्यन्ति भरत आणि त्याच्या कुळांत पुढें कुरु आणि पांडव झाले. हे पूरु प्रथम सरस्वतीतीरावर येऊन राहिले, असा ऋग्वेदांत दाखला सांपडतो. पूर्वींचे आर्य पंजाबांत व गंगोत्तर पूर्वेकडील प्रदेशांत पसरले होते. मध्यें सरस्वतीतीरावर मोकळें रान पाहून पूरु घुसले असावे. तेथून थोडें दक्षिणेकडे कुरुक्षेत्र आहे, तेथें कुरु भरभराटीस आले; येथें आर्यांची संस्कृति अतिशय उन्नतीस गेली; तेथील भाषा अत्यंत संस्कृत असें लोक मानूं लागले (जशी महाराष्ट्रांत पुण्याची भाषा); इत्यादि ब्राह्मणांत आधार सांपडतो. असो. पूरूंचा ऋग्वेदांतील उल्लेख कसा आहे तो पाहूं. ते सरस्वतीच्या उभय तीरांवर वसले होते, हें मं. ७, सू. ९६ यांत वसिष्ठानें वर्णिलें आहे. " उभे यत्ते महिना शुभ्रे अन्धसी अधिक्षियन्ति पूरवः ।" असा या सरस्वतीच्या सूक्तांत उल्लेख आहे. सारांश, प्राचीन वसिष्ठाच्या काळीं पूरु सरस्वतीतीरावर वसले. सुदासावर त्यांनीं येथूनच पश्चिमेकडे दाशराज्ञ लढाईच्या वेळीं स्वारी केली असावी. पूरूला दस्यु म्हणजे मूळच्या रहिवाशांशींही पुष्कळ वेळां लढावें लागलें असें दिसतें. वसिष्ठाच्या दुसऱ्या एका सूक्तांत पूरु राजाचा असा उल्लेख आहे. मं. ७, सूक्त ९ यांत " त्वं धृष्णो धृषता वीतहव्यं प्रावो विश्वाभिरूतिभि सुदासम् । प्र पौरुकुत्सिं त्रसदस्युमावः क्षेत्रसाता वृत्रहत्येषु पूरुम् ॥" अशी ऋचा आहे. या ऋचेवरून पुरुकुत्स हा पूरु राजा होता, असा तर्क कित्येक वैदिक विद्वान् करितात. पण मला वाटतें, यांतील प्रत्येक राजा निराळा आहे. वसिष्ठ इन्द्राला निरनिराळीं उदाहरणें देऊन ह्मणतो, वृत्रहत्येषु म्हणजे दासांच्या लढाईंत तूं

वीतहव्याचें रक्षण केलेंस, तसेंच सुदासाचें केलेंस, तसेंच पुरुकुत्सपुत्र त्रसदस्यूचें केलेंस व पूरूचें केलेंस. या चारी व्यक्ति निरनिराळ्या आहेत. उलट शंका येईल ह्मणून ब्राम्हणांत एके ठिकाणीं हा पुरुकुत्स ऐक्ष्वाक होता असें स्पष्ट सांगितलें आहे, आणि ब्राह्मणाचें प्रामाण्य संहितेच्या खालोखाल आहे हें मीं सांगितलेंच आहे. पुराणांतही पुरुकुत्स आणि त्रसदस्यु हे राजे फक्त इक्ष्वाकु कुळांतच सांपडतात. असो. हें एक विषयान्तर-पण जरूरीचें विषयांतर आहे.या ऋचेवरून पूरूला दस्यूशीं अथवा आर्यशत्रूशीं लढावें लागलें असें स्पष्ट आहे. वृत्राशीं झालेल्या पूरूच्या युद्धाचा उल्लेख इतर सूक्तांतही आहे. मं. १, सू. ५९ "यं पूरवो वृत्रहणं सचन्ते." "वृत्रांस मारणाऱ्या ज्या अग्नीचें पूरु सेवन करतात;" मं. १-१३१."विदुष्टे अस्य वीर्यस्य पूरवः पुरो" "तुझ्या या सामर्थ्याचें पूरूंना पूर्वीं ज्ञान होतें." मं. ४, सू. २१ "हंता वृत्रं वरिवः पूरवे कः" "पूरूसाठीं वृत्राला कोणीं मारलें?" मं. ६,२०. "प्र पूरवः स्तवन्त एना यज्ञैः।" असो. पूरु पुढें इतके प्रबल व प्रसृत झाले कीं, पूरु शब्दानें सामान्यतः मनुष्य असा अर्थ घ्यावा, असें यास्कानें सुचविलें आहे. याचाच प्रतिध्वनि 'अपौरवा तु हि मही न कदाचिद्भविष्यति' या पुराणांतील वचनांत ऐकूं येतो. पूरूच्या प्रसृत झालेल्या कुळांत अजमीढ झाला, याचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. त्याच्या कुलांत पुढें भरत झाला, त्याचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं, तथापि ब्राम्हणांत आहे; पण तेथें दौष्यन्ति हें विशेषण नेहमीं दिलेलें असतें. त्याच्या वंशांत कुरु झाला त्याचाही उल्लेख ऋग्वेदांत नाहीं,पण ब्राह्मणांत पुष्कळ आहे. ऋग्वेदांत भरत व कुरु यांचा उल्लेख नसला, तरी ते ऋग्वेदसूक्तांच्या अखेरीपूर्वी झाले असा आपल्यासमोर पुरावा आहे. कारण, ऋग्वेदांतील शेवटशेवटच्या सूक्तांपैकीं देवापि आर्ष्टिषेणाच्या सूक्तांत शंतनूचा उल्लेख आहे. हा शन्तनु पौरव शंतनु होय, असें बृहत्सूक्त यांत स्पष्ट सांगितलें आहे. असो. तर याप्रमाणें या पूरुकुलाचा इतिहास ऋग्वेदाच्या अंतापर्यंत झाला. यानंतर ब्राह्मणांत जनमेजय पारीक्षिताचा उल्लेख वारंवार येतो आणि कुरु-पांचालांचाही येतो. हे पांचाल कोण, हें आतां पाहूं.

पुराणांतील वंशावळीवरून पांचाल ही पूरूच्याच कुलाची एक धाकटी शाखा होय. यांचा मूळ प्रसिद्ध पुरुष सृंजय.या सृंजयाचा ऋग्वेदांत उल्लेख आहे. या राजामुळें या कुलांतील लोकांना सृंजय असेंही ह्मणतात. त्याच्या वंशांत सहदेव, व त्याचा पुत्र सोमक झाला.याचाही उल्लेख ऋग्वेदांत आहे. या सोमकानें राजसूय यज्ञ पर्वत-नारदांच्या सल्ल्यानें अमुक तऱ्हेनें केला म्हणून तो मोठा चक्रवर्ती झाला, असा ब्राह्मणांत उल्लेख आहे. या राजावरून पांचालांना सोमकाः असेंही नांव होतें. सृंजय,सोमक आणि पांचाल हीं तीन्ही नांवें महाभारतांत उपयोगिलीं आहेत. पांचाल हें नांव पांच जाति किंवा कुळें एकत्र झाल्यावरून पडलें असावें. पांचाल ह्मणजेच क्रिवि (ऋग्वेदांतील एक नांव) असें ब्राम्हणांत म्हटलें आहे. मं. ६, सू. २७ यांत "स सृंजयाय तुर्वशं परादाद्वृचीवतो दैववाताय शिक्षन्" अशी ऋचा आहे. याजवरून तुर्वश सृंजयांत मिळाले, असें दिसतें. म.४, सू.१५ यांत सृंजय व सोमक या दोघांचा उल्लेख आहे."अयं यःसृंजये पुरो दैववाते

समिध्यतें॥"येथें सृंजयाच्या अग्नीचा उल्लेख आहे. यावरून सृंजय मोठा यज्ञकर्ता झाला असें दिसतें. या सूक्तांत शेवटीं सहदेवकुमार सोमक याला आशीर्वाद दिला आहे. "एवं वां देवावश्विना कुमारः साहदेव्यः दीर्घायुरस्तु सोमकः" यावरून हें सूक्त सोमकाच्या वेळीं झालें असावें. पुराण-वंशावळीवरून सोमकापासून द्रुपद चौथा पुरुष येतो. याजवरून भारतीय युद्ध या सूक्ता-नंतर सरासरी शंभर वर्षांनीं झालें असावें, असें अनुमान मीं अन्यत्र काढलें आहे. असो.

तुर्वश शेवटीं सृंजयांत मिळाले; पण यदु हे निराळे राहून त्यांनीं यमुनातीरीं वसाहत केली. या कुळांत पुढें श्रीकृष्ण झाल्यानें या कुलाचें नांव अजरामर झालें आहे. ऋग्वेदकाळीं यदु-तुर्वश एकत्र असावेत. त्यांचा एकत्र उल्लेख ऋग्वेदांत पुष्कळदां येतो. कांहीं ठिकाणीं शत्रूच्या नात्यानें येतो तर कांहीं ठिकाणीं प्रशंसापर येतो.प्राचीन सूक्तांच्या वेळीं ते हिंदुस्थानांत नुकतेच आले असावे व पुढच्या सूक्तांच्या वेळीं ते येथें कायमचे रहिवासी झाले असावे. ऋषींवरही हा फरक अवलंबून आहे. मं. ७, सूक्त १९ यांत वसिष्ठ म्हणतो, "नि तुर्वशं नि याद्वं शिशीह्यतिथिग्वाय शंस्यं करिष्यन्॥" अतिथिग्व हें नांव प्रसिद्ध दिवोदासाचें आहे. 'दिवोदासाकरितां तुर्वश आणि यदु यांना हे इंद्रा, तूं मार.'असो. मण्डल ८ हें काण्वऋषींचें आहे.त्यांतील पुष्कळ सूक्तांत यदु-तुर्वशांचा चांगला उल्लेख आहे.४।७।९।१०। ४५ इतक्या सूक्तांत हा उल्लेख आहे.४सूक्तांत देवातिथि काण्व ह्मणतो, "मीं ६००० गाई तुर्वशांपासून घेतल्या.";यांत तुर्वश-यदूंचा उल्लेख तीनदां आला आहे. " महत्ते वृष्णो अभिचक्ष्यं कृतं पश्येम तुर्वशं यदुम् " वगैरे तीन ठिकाणीं उल्लेख आहे.सूक्त ७ मध्यें पुनर्वत्स काण्व ह्मणतो, 'येनाव तुर्वशं यदुं येन कण्वं धनस्पृतम्।' 'ज्यानें हे मरुतांनो, तुह्मी यदु, तुर्वश व कण्व यांचें रक्षण केलें.' सूक्त ९ मध्यें शशकर्ण काण्व ह्मणतो,'इमे सोमासो अधि तुर्वशे यदाविमे कण्वेषु वामथ." सूक्त १० मध्यें प्रगाथ काण्व म्हणतो, 'यदद्रुह्यव्यनवि तुर्वशे यदौ हुवे वामथ मा गतम्॥' "हे आश्विनींनो तुह्मीं द्रु , अनु, तुर्वश आणि यदु यांजवर कृपा केलीत." आणि सूक्त ४५ मध्यें त्रिशोक काण्व ह्मणतो, " सत्यं त्तर्तुवशे यदौ विदानो अन्हवाय्यम्॥" या सर्व सूक्तांत काण्ववंशाचे ऋषि यदुतुर्वश व द्रुह्युअनु यांचें कल्याण इच्छितात.याचें इंगित असें दिसतें कीं कण्व हा चंद्रवंशांतला होता. पुराणांतील वंशावळीवरून कण्व पूरूच्या वंशांतला होता. त्याची उत्पत्ति मतिनारापासून झाली, असें वर्णन आहे. हा मतिनार भरताचा चौथा पूर्वज होय. दौष्यन्ति भरताचा व कण्वाचा संबंध याजवरून चांगला जुळून येतो व दुष्यंताच्या राज्यांत कण्वाचा आश्रम होता, यांत आश्चर्य वाटत नाहीं. ब्राह्मणांतही भरताचा पुरोहित कण्वच आहे.असो. चंद्रवंशाचे शुभेच्छु जसे कण्व होते, तसे आंगिरसही होते असें दिसतें. आङ्गिरसांच्या कित्येक सूक्तांत यदुतुर्वशांचा व कण्वाचा उलेख आहे. मं. १, सू. ३६ यांत घोर ऋषि म्हणतो, " अग्निर्वव्रे सुवीर्यमग्निः कण्वाय सौभगम् । अग्निना तुर्वशं यदुं परावत उग्रादेवं हवामहे ॥"हा घोर आंगिरस असावा. मं. १, सू. ५४ यांत सव्य आंगिरस म्हणतो, " त्वमाविथ नर्यं तुर्वशं यदुं त्वंतुर्वीतिं वय्यं

शतक्रतो।" शेवटचें मं. १, सू. १०८ प्रारंभीं सांगितलेलें होय.यांत कुत्स आंगिरस यदु, तुर्वश, द्रुह्यु, अनु आणि पूरु या पांचांचाही उल्लेख करतो. याचा ऋषि आंगिरस यांचें महत्त्व पुढें सांगेन असें मीं पूर्वीं म्हटलें तें सांगण्याचा प्रसंग येथें आहे. या तीन सूक्तांचे ऋषि आङ्गिरस आहेत, यावरून भरत किंवा सूर्यवंशी क्षत्रिय यांचे ऋषि जसे वसिष्ठ व विश्वामित्र होते, त्याप्रमाणें चंद्रवंशी क्षत्रियांचे काण्व व आङ्गिरस दिसतात. छांदोग्यांत कृष्ण देवकीपुत्राला घोर आङ्गिरसानें एका औपनिषद्विद्येचा उपदेश केला असें म्हटलें आहे.याची संगति वरील माहितीवरून चांगली बसते आणि हा कृष्ण यदुकुळांतीलच प्रसिद्ध श्रीकृष्ण होय असें अनुमान दृढ होतें. असो.यदुतुर्वशांचा आणखी दोन चार ठिकाणीं चांगल्या प्रकारचा उल्लेख आहे. मं. १, सू. १७४; मं. ४, सू. ३०; मं. ५, सू.३१; मं.६, सू.४९ आणि मं.१०; सू. ४९. शेवटच्या सूक्तांत इंद्र वैकुण्ठ म्हणतो, " अहं सप्तहा नहुषो नहुष्टरः प्राश्रावयं शवसा तुर्वशं यदुम्॥" या ऋचेंत नहुषाचाही आणखी उल्लेख आहे. या सर्व उल्लेखांवरून ऋग्वेदकाळीं यदुवंशाचा बराच बोलबाला असावा. तुर्वश पांचालांत मिळाले आणि यदु यमुनातीरींच राहिले.

आतां आपण अनु आणि द्रुह्यु या राहिलेल्या दोन शाखांचा विचार करूं. मं. ७, सू. १० यांत द्रुह्यूचा स्वतंत्र उल्लेख आहे तो इतरांबरोबर आहे. पण मं. ६, सू. ४६ त द्रुह्यूचा आणि पूरूचाच आहे. "यद्वा तृक्षौ मघवन्द्रुह्यावाजने यत्पूरौ कच्च वृष्ण्यम्।" पूरूंच्या धाकट्या शाखेंत म्हणजे पांचालांत हे लोक सामिल झाले असावे. पण पुराणकाराच्या मतानें द्रुह्यूचे वंशज म्हणजे गांधार होत. अनूच्या अग्नीचा स्वतंत्र उल्लेख मं. ८, सू. ७४ यांत आहे."आगन्म वृत्रहन्तमं ज्येष्ठमग्निमानवम्।" यावरून आनव राजेही मोठे यज्ञकर्ते होते. त्यांचें कुळ म्हणजे पंजाबांतील शिबि औशीनराचें कुळ होय, असें पुराणकार मानतात.

येथवर यदु, तुर्वश, अनु, द्रुह्यु आणि पूरु यांचा ऋग्वेदांतील इतिहास झाला. यांचे पूर्वज ययाति, नहुष, आयु आणि पुरूरवा पुराणमतानें होते.यांचाही उल्लेख ऋग्वेदांत आहे.एका सूक्तांत पुरूरवा व ययाति यांचा उल्लेख एकत्र आला असून, ययाति पुरूरव्याच्या वंशांत झाला कीं नाहीं अशी पाश्चात्य पंडितांची शंका नाहींशी होते असें मला वाटतें. मं.१, सू.३१ हें हिरण्यस्तूप आङ्गिरसाचें आहे. यांत प्रथम असें म्हटलें आहे कीं, हे अग्नि! तूं प्रथम आङ्गिरसाला माहित झालास, नंतर विवस्वानास, नंतर मनूला आणि पूरूरव्याला. " त्वमग्ने मनवे द्यामवाशयः पुरूरवसे सुकृते सुकृत्तरः" व सूक्ताच्या शेवटीं " मनुष्वदग्ने अङ्गिरस्वदङ्गिरो ययातिवत्सदने पूर्ववच्छुचे" अशी ऋचा आहे. अर्थात् पुरूरव्याच्या ठिकाणीं ययाति हें नांव आलें आहे, तें तत्स्थानापन्न स्पष्ट आहे; म्हणजे ययाति हा पुरूरव्याच्या वंशांतला होय हें उघड आहे.पुरूरवा प्रतिष्ठान अथवा अलाहाबाद येथें राज्य करीत होता व ययातीनें आपल्या पांच पुत्रांस भरतखण्ड तेथून वांटून दिलें.त्यांत पूरूस अलाहाबाद मिळालें ही पुराणांची कल्पना चुकीची व मागूनची आहे. वेदांवरून पुरूरवा हिमालयो-

त्तर होता असें दिसतें. आणि पूरूनें प्रथम वस्ती सरस्वतीतीरावर केली. तर मग प्रतिष्ठानांत पूरु कसा येईल? आतां पुरूरव्याची उत्पत्ति बुधापासून, बुध चंद्रापासून, वगैरे गोष्टींस ऋग्वेदांत आधार बहुधा नाहीं, असें वाटतें. निदान मला सांपडला नाहीं. या दुसऱ्या वंशाच्या लोकांस चंद्रवंश नांव महाभारतापासून पुढें कां पडलें, हा एक प्रश्न महत्त्वाचा आहे. पूर्वीच्या वंशास वैवस्वत मनूचा वंश ह्मणतात. भारत हें नांव त्यांचें होतें. यांतील भरत आदित्य अशी उपपत्ति लागली. अर्थात् तो सूर्यवंश झाला. तेव्हां दुसरा वंश उपमानानें चंद्रवंश ठरला.मानवी वंश चंद्रसूर्यापासून उत्पन्न होत नाहींत, हें खरें. तथापि आपल्या नामांकित पुरुषांची उत्पत्ति देवांपासून मानण्याचा प्रघात चोहोंकडे आहे. ग्रीक रोमन लोकांत देवापासून पूर्ववीरांची उत्पत्ति मानीत असत हें प्रसिद्ध आहे.इतकेंच नव्हे,अमेरिकेंत स्पानिश लोक गेले तेव्हां प्रसिद्ध स्पानिश वीरांना मेक्सिकोचे लोक सूर्यपुत्र मानीत. असो. तर याप्रमाणें ही कल्पना उत्पन्न झाली असावी. वसिष्ठाला मित्रावरुणाचा उर्वशीपासून झालेला पुत्र ऋग्वेदांतच मानला आहे त्याचप्रमाणें ही कल्पना प्रसृत झाली असावी; किंवा मागील निबंधांत मीं दाखविल्याप्रमाणें सूर्यवंशाचे आर्य सौरमानाचें वर्ष पाळीत व पांडवादि चंद्रवंशी चांद्र वर्ष पाळीत, याजवरून ही कल्पना प्रसृत झाली असावी. कांहीं असो. सूर्य-चंद्र-वंश हीं नांवें ऋग्वेदांत नाहींत. तथापि भरत व यदुतुर्वशद्रुह्युअनुपूरु यांचे वंशज ऋग्वेदांत प्रसिद्ध आहेत, आणि पहिल्यांचे ऋषि वसिष्ठ-विश्वामित्र असून दुसऱ्यांचे कण्व आङ्गिरस आहेत. याजवरून हेच सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रिय होत, असें अनुमान बहुतेक निश्चयानें करतां येतें. इति शम् ।

चिंतामण विनायक वैद्य.

करुण—गीत.

“ हिरा हरपला, हिरा !” अशी हे बुधशुक वदती गिरा ।
मागुती कविपिक धरिती सुरा ॥ ध्रु० ॥
नीतिविशारद रडति “ गोखले गेला अमुचा हिरा !”।
“ रत्न तो ” कवि आक्रोशिति “ मोगरा !”
छात्रवृंद आक्रंदति गेला “ आगाशे तरतरा।”
शोचिती शिक्षक “ भडकमकरा ।”
[चाल] प्रत्येक यांतला स्वस्वकुलीं मोहरा ।
चमकला स्वतेजें जातिवंत तो खरा ।
महाराष्ट्रवधुकंठमणी साजरा ।
असा न दुसरा तेजें गहिरा स्वोदरिं धरिते धरा
तयातें बुध हो ! स्वमनीं स्मरा ॥ १ ॥
प्रत्येकहि तो गेला पाडुनि खोल काळिजा घरा ।
करुनियां राष्ट्रजीव घाबरा ।
डोकें वरती काढुं नेदि हा सद्दीचा भोंवरा ।
फिरवितो आह्मांतें गरगरा ।
[चाल] राष्ट्रकुटुंबावरती प्रीती करा ।
द्वेषमत्सरादिक शत्रू आवरा ।
येइल करुणा मग त्या परमेश्वरा ।
सर्व जगाचा प्रभू आपुल्या सांभाळिल लेंकरा ।
स्मरा मनिं त्या करुणासागरा ! ॥ २ ॥

गिरिशिखराची भेट.

[श्री. सौ० कमळाबाईसाहेब किबे.]

कालपासून आह्मीं अगदीं निश्चय केला कीं, देवगुऱ्हाड्याला जावयाचें. दिवसभर राहून मग संध्याकाळीं परत फिरण्याचा आमचा बेत होता. पण रात्रीं पाहतों तों आकाश मेघांनीं भरलेलें, व पाऊस जोराचा येणार असें वाटलें. माणसांना बरोबर येण्याकरितां ताकीद दिली. जेवण तेथेंच व्हावयाचें असल्यानें कारकुनाला सामानसुमान नीट पाहून घ्या म्हणून बजाविलें. मीं मुलांना लवकर उठा ह्मणून निजावयाचे वेळेस सांगितलें. आपल्याला बरोबर नेणार, म्हणून आनंदांत तीं झोंपीं गेलीं. मी मात्र झोंप येईना ह्मणून अलाहाबादेस प्रसिद्ध होणारें वाचनीय हिंदी मासिक 'सरस्वती' हें वाचीत पडलें होतें. मराठींत इतकें सुंदर मासिक नसावें याबद्दल मला वाईट वाटलें. अशा विचारांत वाचतां वाचतां मला झोंप लागली तें समजलें देखील नाहीं. पाहांटे जाण्याच्या उत्सुकतेनें माझी झोंप रोजच्यापेक्षां अगोदरच उघडली.पाहतें तों बाहेर जोराचा पाऊस पडत आहे; व गारांचा आवाजही पत्र्यांवर ऐकूं येत होता. तो देखावा पाहून पूर्वरात्रींचा आमचा बेत रहित करावा लागतो कीं काय, याचा मला विचार पडला. पण मी निश्चयानें चारांनंतर उठलें व तोंड व अंग धुवून पोथीवाचन वगैरे माझा नित्यनियम आटोपून, जाण्याची तयारी झाली का?—म्हणून एका नोकराला विचारिलें. तयारी आहे ह्मणून त्यानें जबाब दिला.इतक्यांत मुलेंही स्नान करून कपडे घालून तयार झालीं. पण प्रकृतीनें आज आम्हांला जणूं काय भीति दाखविण्याकरितांच उदासीनता धारण केली होती. सकाळचे आठ वाजले तरी आकाश अद्यापही मेघांनीं पूर्ण व्याप्त होतें. मधून मधून पावसाच्या सरी जोरानें पडत होत्या. आम्हीं सर्वजण जावें न जावें या विचारांत मग्न झालों होतों. पण मग हे भित्रेपणाचे विचार सोडून कितीही पाऊस पडत असला तरी मुलांसह निघण्याचा विचार ठरविला व नोकरांची गाडी पुढें रवाना केली. आम्ही जरा थांबून निघतों ह्मणून त्यांना सांगितलें. नऊपर्यंत प्रकृतीची चलबिचल चालू होती; पण सवानवांला चांगलें सूर्यदर्शन झालें, व त्या वेळेस आम्हीं बगी जोडण्याकरितां सांगितलें. मग आह्मीं आनंदानें देवगुऱ्हाडयाच्या पाताळेश्वराचें दर्शन व पहाडावरील गंमत पाहण्याच्या उत्सुकतेनें बगीपेक्षांही जलद धावणाऱ्या मनोरूपी अश्वाला सभोंवतालचा देखावा पाहण्यास स्वैर सोडून दिलें. दहांच्या सुमारास आम्ही टेंकडीच्या पायथ्याशीं पोंचलों. नोकरांनीं सामान जमविलें. आम्ही टेंकडीवर चढण्याकरितां रस्ता पाहूं लागलों. पाऊसही आतां अगदीं बंद झाला होता. मनुष्यानें निश्चयीपणानें जर काम तडीस नेण्याचा निग्रह केला, तर त्या निश्चयाला देवाचें पाठबळ असतें हें खात्रीपूर्वक समजावें. आह्मीं जर पावसाच्या भीतीनें सकाळचा बेत रहित केला असता, तर पुढें आलेली मजा गमाविण्यास आमचा भित्रे-

पणाच कारण झाला असता. असो. आह्मांस संध्याकाळपर्यंत ऊन मिळालें, व तेथील आमचा वेळ आनंदांत गेला.

देवगुऱ्हाड्या हें ठिकाण इंदूरपासून पांच मैलांच्या अंतरावर आहे. येथें महाशिवरात्रीनिमित्त मोठा मेळा भरत असतो. इंदूरहून महाराज व इतर बडीबडी मंडळी मोठ्या भक्तीनें महादेवाच्या दर्शनास येतात. त्या दिवशीं येथें मोठी यात्रा भरते; व नानातऱ्हेचे पदार्थ विकत मिळतात. देवगुऱ्हाड्याचा पहाड अडीचशें तीनशें फूट उंच आहे. चढतांना त्याचे सौंदर्यानें थकवा नाहींसा होतो. सृष्टिसौंदर्याला मोहित होणारा महेश्वर किती रसिक व प्रेमळ असेल बरें ? गिरिशिखरावरील स्वच्छ हवा मुदित मनानें पथिकाच्या अंत:करणाला आनंदवीत होती. वर जातांना निरनिराळ्या आकृतींचे पाषाण, मधून मधून वाढलेलें गवत व पलाशवृक्षराजींच्या आश्रयाखालीं, मोठ्या आनंदानें विश्रांतिसुख भोगीत होते. ज्याप्रमाणें किल्ल्याला दोन तीन दरवाजे ओलांडून जावें लागतें, त्याप्रमाणें या डोंगरावर दोन तीन वळसे घेतल्यावर त्याच्या शिखरास यावयास सांपडलें. तेथें दोन तीन साधूंच्या झोंपड्या आहेत. त्यांपैकीं दोन बंद आहेत. एका झोंपडींत एक वैष्णव-पंथी बैरागी बसला होता. त्याला आह्मीं 'जय सीताराम' ह्मणून प्रणाम केला. पहाडावर चढतांना सागवानाचीं झाडें व रानवेली यांचे छायेमुळें आह्मांला कांहीं श्रम वाटले नाहींत. पहाडावरून इंदूर शहराचा देखावा फार प्रेक्षणीय दिसतो. देवगुऱ्हाड्याचा मुख्य महादेव गुप्तेश्वर आहे. येथें विशेष मनोवेधक स्थान ह्मणजे महादेवाच्या पिंडीपासून अर्ध्या हातावर वाहणारें पाण्याचें लहान लहान टाकें होय. तेथील पाणी फार थंड व पाचक आहे. पाताळेश्वराच्यासमोर दुसरें एक महादेवाचें मंदिर आहे. याच्या चहूंबाजूला चार जलाशय भरलेले आहेत; व दर्शन घ्यावयास जावयाचें झालें, तर पाण्यामधूनच चार रस्ते पक्क्या दगडांनीं बांधलेले आहेत. त्या रस्त्यांच्या दुतर्फा मजबूत लोखंडी गज लावलेले आहेत. गुप्तेश्वराच्या मंदिरांतून निघालें कीं दारापुढेंच एक पुन्हा पाण्याचें कुंड आहे. तेंही पण चहूंकडून लोखंडी गजांनीं बांधलेलें आहे. दुसऱ्या महादेवाचें मंदिर पाण्यांत आहे. याच्यापुढें एक रस्ता पश्चिमेकडून इंदूरकडे जातो. देवालयाच्या मागच्या बाजूला देवगुऱ्हाड्या हा प्रसिद्ध पहाड आहे. या पहाडावरून खालीं गालीच्याप्रमाणें पसरलेलीं हिरवीं गार शेतें सुंदर दिसतात. मोठमोठे वृक्ष लहान लहान कुंड्यांतील झाडांप्रमाणें वरून पाहणाराला भासतात. सूर्यास्ताच्या प्रशांत वेळीं पहाड आपली गंभीरता अधिकच धारण करतो. शेजारतीच्या वेळेस देवाचा जसा पडदा पडतो, तशी शिखर आड आल्यानें मावळत्या सूर्यनारायणाची शोभा दिसते.

मंदिराच्या पायथ्याशीं एक लहानशी धर्मशाळा आहे. तेथें मंदिराच्या महंताचें आणि कांहीं शेतकऱ्यांचीं घरें आहेत. पहाडावर जातांना आह्मीं बरोबर वाटाड्या घेतला नव्हता. त्यामुळें चुकून आह्मीं भलत्याच वाटेनें चढावयास सुरुवात केली. वर एक शेतकऱ्याची स्त्री जनावरांकरितां हिरवीं गार पानें गोळा करीत होती. तिनें आह्मांला ओरडून सांगितलें कीं, खालचा रस्ता मुख्य आहे. तुह्मी चुकून या रस्त्यानें जात आहांत. आणि खरोखरच तिनें सांगितल्याप्रमाणें आह्मांला चढण अतिशय वाटली व चढतांना थकवाही फार वाटला. मग आमच्या बरोबर असलेल्या मौजिलाल या नांवाच्या गृहस्थानें पहाडाच्या खालीं आनंदानें बागडत असलेल्या शेतकऱ्यांच्या लहान मुलांना हाक

मारली व त्यांना सांगितलें, " तुह्मी आह्मांला सोपा रस्ता कोणता आहे तो दाखवा. तुम्हाला चांगली मजुरी मिळेल. " हे शब्द ऐकतांच तीं मुलें पटापटा माकडांसारखीं चढून आमच्या-जवळ आलीं, व त्यांनीं दुसरा सोपा मार्ग आह्मांला दाखविला. त्या मुलांचीं नांवें इकडील माळ्यांच्या पद्धतीचींच होतीं. मुलें चार होतीं. त्यांची ती पहाड चढण्याची ढब पाहून मला मोठें कौतुक वाटलें. मीं त्यांपैकीं एका मुलाला विचारलें, " तुझें नांव काय रे ?" तो चट्दिशीं म्हणाला, "देवा माझ नांव आहे. " यावर मीं ह्मटलें, " या तिघांचीं काय रे ? " देवानें उत्तर दिलें, " त्याच नांव घिसा, याच नांव अनंत्या व तिसरा आहे त्याच नांव लाल्या." तीं चमत्कारिक नांवें ऐकून मला मोठी गंमत वाटली. कारण, दक्षिणेंतील नांवें निराळीं व इकडील खेडयांतील नांवें निराळीं. दक्षिणें-तील शेतकऱ्याला आपण शेतकरी याच नांवानें ओळखूं; पण इकडे माळ्यांत तो लागलीच किरसाण ह्मणून ओळखला जातो. निरनिराळीं ठिकाणें हिंडण्यांत जें वेगळें शिक्षण, माहिती, रीतरिवाज दृष्टीला पडतात, त्यांबद्दल शान्त चित्तानें विचार करूं लागल्यास मन गोंधळून जातें. विचारशक्ति मंद होते. तीं वाटाडीं मुलें पुढें व आम्ही मागें, केव्हां सरळ तर केव्हां चतुष्पाद जनावरांप्रमाणें हात टेंकीत, पहाड चढत होतों. वर गेल्यावर तेथून जो सृष्टीचा देखावा दिसला, तो किती मनोहर!-किती हृदय हालवून नाना मनोविकारांचें प्रदर्शन करणारा होता! हें सर्व या वीतभर हृदयांत सांठविण्याचें व उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्या दयामय परमेश्वराखेरीज कोणाचे अंगीं आहे? दृष्टीला दिसतें, कानांनीं त्याची किंमत समजते. सुविचार व प्रेमळ तरंग यांनीं भरलेलें जें हृदय त्यामार्फत परमेश्वर मानवांना आत्मविचार करा ह्मणून सुचवीत आहे. परंतु तें देवहृदय आह्मी आपल्याच हातांनीं, अपवित्र विचारांनीं व द्वेषमूलक कल्पनांनीं दूषित करतों. हृदयाचे ईश्वराकरितां पवित्र मनोमंदिर उभारण्याऐवजीं आह्मी कुविचारांनीं व कुवर्तनानीं एक क्षणभर तरी विश्रांति घेण्याला देखील ती हृदयरूपी जागा स्वच्छ ठेवीत नाहीं. हा अपराध तो ईश्वर किती निमूटपणानें सहन करतो! शिक्षा देतो ती अशा अपराधापुढें सौम्यच ह्मटली पाहिजे.

पहाड चढतांना मला जें काय वाटलें तें येथें लिहिणें शक्य नाहीं. पहाड चढत असतांना शीतल पवन आमच्या शरीराला आपला कोमल स्पर्श करून पुढें जात होता. त्याचा तो पवित्र स्पर्श एकाद्या मुनीच्या वरदहस्ताप्रमाणें आमच्या शरीरामध्यें नूतन उत्साह घालीत आहे असें वाटे. वर चढतांना गिरिशिखराची अवर्णनीय शोभा पाहून मला त्या शेतकऱ्यांच्या मुलांचा हेवा वाटला. त्यांना ज्या सुखाची कल्पना नाहीं तें सृष्टिसौंदर्य चोवीस तास त्यांच्या समोर असतें; व आमच्यासारखे दुर्दैवी प्राणी एकादे दिवशीं मुद्दाम तें उपभोगण्याकरितां जातात तेव्हां त्यांना तें कोठें प्राप्त होतें. अशा प्रसंगीं कायतें तें प्रकृतीचें नैसर्गिक सौंदर्य आह्मांला दिसणार! प्राचीन काळीं यात्रा करण्याची पद्धत होती, त्यामुळें प्रवाशाला भूगोलाची माहिती साहजिक मिळत असे. नकाशा पाहण्याची त्याला मग जरूरच लागत नसे. पण हल्लीं शरीर अशक्त, मन दुर्बळ, निश्चयाचा अभाव, धाडसाची कमतरता, इतके अवगुण आमच्या समाजाच्या अंगीं पूर्ण खिळल्यामुळें, कोणत्याही कामाला आह्मी नालायक ठरलों आहों हें ठीकच आहे.

चित्ररेखन-परीक्षा.

पुस्तकपरीक्षा हा वाङ्मयांतील प्रसिद्ध प्रकार सर्वांस ठाऊक आहे. पुस्तकांवर न्यायानें व निष्पक्षपातानें केलेल्या टीकेचा ग्रंथकार सुद्धां आदर करतात. माझा स्वतःचा मी अनुभव सांगतों. कोल्हापूरचे प्रो. बा. प्र. मोडक यांनीं ३०-३५ वर्षांपूर्वी रसायनशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला. त्याजवर विविधज्ञान-विस्तारांत टीका आली. ती पाहून प्रोफेसर मोडक इतके खूष झाले कीं त्यांनीं विस्ताराचे प्रकाशक कै. पुरुषोत्तम गोविंद नाडकर्णी यांस आभारप्रदर्शक पत्र लिहून सदर टीकाकाराची व आपली मुलाखत करून देण्याविषयीं विनंती केली. माझें नांव कळवूं नका असें मीं सांगितले होतें. सबब रा. पुरुषोत्तमपंतांचा निरुपाय झाला. अखेरीस प्रो. मोडक कांहीं कामाकरितां मुंबईंत आले होते. त्यावेळीं ते विस्तारकर्त्यांस भेटून त्यांनीं टीकाकाराचें नांव कळविण्याविषयीं गळ घातला. रा. नाडकर्णी माझ्या घरीं येऊन त्यांनीं मला आग्रहपूर्वक विनंती केली कीं, प्रो. मोडक यांस नांव कळवून त्यांची ओळख करून देण्याची परवानगी मिळालीच पाहिजे. मी शेवटीं कबूल झालों; पण विस्तार-कचेरींत भेटेन, घरीं नको, असें सांगितलें. मला भीति वाटत होती कीं, ग्रंथकार मला पाहतांच हा सगळा पोरवडा आहे (मी २३-२४ वर्षांचा) असें वाटून माझा अपमान करतील! मग निदान घरीं तरी गडबड नको! अशा समजुतीनें मी कचेरीच भेटीस योग्य जागा ठरविली. प्रोफेसरसोहब येतांच मी त्यांस भीत भीत नम्रपणें सामोरा गेलों, तों ते हास्यमुखानें माझ्या समोर उभे राहिले आणि मला मोठ्या आदरानें नमस्कार केला. मीं त्यांचे हात धरून असें न करण्याबद्दल त्यांची विनंती केली. खुर्च्यांवर बसतांच त्यांनीं पुस्तक काढून त्यांत मीं दाखविलेल्या चुका व त्यांची दुरुस्ती केलेलीं पानें उघडून एका मागून एक माझ्यापुढें ठेवलीं. असली प्रेमळ आणि कळकळीची टीका केल्याबद्दल त्यांनीं माझे आ ार मानले आणि दुसऱ्या आवृत्तीचीं प्रूफें मला पाहण्यास पाठविलीं! सांगणें काय कीं टीका पाहिजे आहे, मात्र ती मुद्दाम दुष्ट हेतूनें केलेली नसावी. इतका प्रस्ताव करण्याचें कारण पुढें जें मी लिहिणार आहें त्यासंबंधानें गैरसमज होऊं नये.

अलीकडे देशी चित्रकार तयार होत आहेत. त्यांचें काम नवीन फोटो-टाईप पद्धतीनें जगापुढें मासिक पुस्तकांतून बाहेर पडत आहे. पण हा नवीन प्रकार असल्यामुळें त्यांत नजरचुकीनें कमज्यास्त व्यंगें राहून जातात. तीं दाखवून दिल्यास चित्रकारांस मदत केल्यासारखें होईल, असें वाटल्यामुळें कलम हातीं घेत आहें.

चित्रपट-दर्शन.

उत्तररामचरित्रांतील एक देखावा-दर्शनी चित्र मासिक मनोरंजन-माहे जून १९१५-चित्रकार रा. जोगळेकर.

चेहरे सुरेख आहेत, पण काळाचा घोटाळा झाला आहे. सुरूचे खांब आणि खोंचदार कमानी, ही मुसलमानी तऱ्हा (Sarasenic Architecture) रामाच्या वेळीं नव्हती. रामाचा पोषाख बृहन्नडेच्या पोषाखासारखा बायकी तऱ्हेचा वठला आहे. चित्रपट, हा पट नसून चौकटींत बसविलेल्या तसबिरीचें अर्वाचीन प्रदर्शन आहे. चित्रपट पाहत असतांनाच सीतेला झोंप लागली असें मूळ ग्रंथांत वर्णन असून या स्थळीं ती चालत आहे असें दाखविलें आहे. चित्रपट पाहात असतांना लक्ष्मण जवळ नव्हता, पण येथें तो दाखविला गेला आहे.असो.इतकी टीका सध्यां पुरे आहे. कलकत्त्यास चित्रशाळामास्तरांनीं गोंधळ घातला आहे तसा मुंबईंत न व्हावा ही इच्छा. एका तालेवार शाळामास्तरानें कलकत्ता येथील उत्तम चित्रांचे नमुने लैलावांत फुंकून टाकले, आणि पौरस्त्य चित्रकलेचें पुनरुज्जीवनरूप पताका उभारली. परिणाम वाईट झाला. मास्तरसाहेब खुलले त्यावर जाऊं नये. रानटी लोकांच्या नग्न किंवा वल्कलवेष्टित पोरींच्या तसबिरी अथवा त्यांच्या गळ्यांतील कोल्ह्याकुत्र्यांच्या दातांच्या माळा पाश्चिमात्य लोक मुद्दाम खरीद करतात तशांतला प्रकार कलकत्त्यास होत आहे. उदाहरण—

॥ पुढें तयाच्या उभा राहुनी होई विपन्न फार ॥

हें कविलाघवाचें नैसर्गिक ध्यान मेघदूतांत दिलें आहे, तें दिलें सोडून; आणि आमचे वंगदेशीय बाबूमहाशय आपल्या चित्रांतील यक्षाला आसनावर बसवून, त्याच्या हातांत देतात तलवार! कशाला? लढाई कोणाशीं? पण याच तसबिरीच्या छापील प्रतींवर पौरस्त्यांच्या उड्या! कां?-ही एक चीज आहे म्हणून. बाकी ह्यांत चित्ररेखेचा खून झाला आहे हें सांगणें नलगे.

साष्टीकर.

दादोबांचें आत्मचरित्र व मराठी गद्यग्रंथांचा उदय.

प्रस्तावना.

दादोबा पांडुरंग यांचें नांव मराठींतले प्रख्यात व्याकरणकार व केकावलीवरील ' यशोदा पांडुरंगी ' नामक टीकेचे कर्ते ह्मणून महाराष्ट्रवाङ्मयांत प्रसिद्ध आहे. दादोबांचा जन्म इ. स. १८१४ मध्यें ह्म० बरोबर शंभर वर्षांपूर्वी झाला. त्यांनीं आपलें व्याकरण इ. स. १८३६ मध्यें लिहिलें व त्यांची यशोदा पांडुरंगी इ. स. १८६५ मध्यें छापून प्रसिद्ध झाली. ह्या दादोबा पांडुरंगांचें एक आत्मचरित्र सुमारें २० वर्षांपूर्वी मी कॉलेजमध्यें शिकत असतांना माझ्या पाहण्यांत आलें. तें अद्याप अप्रकाशितच आहे. पण त्याची मीं त्याचवेळीं नक्कल करून घेतली होती. दादोबांचें हें आत्मचरित्र मोठें मनोरंजक असून, मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनें बरेंच महत्त्वाचें आहे. इंग्रजी अमदानीच्या पाहिल्या पिढीचा इतिहास त्यांत आहे. इ. स. १८१४ ते १८३९ पर्यंतच्या पंचवीस वर्षांत मुंबईंत मराठी व इंग्रजी शिक्षणाच्या काय सोयी होत्या; इंग्रजी शिक्षण प्रथम कसें सुरू झालें; एज्युकेशन सोसायटीची शाळा कशी उत्पन्न झाली; त्या शाळेंत कसें शिकवीत, कोण शिकवीत; प्रथम कोणकोणाचीं कोणतीं पुस्तकें मराठींत छापून प्रसिद्ध झालीं; इत्यादि महत्त्वाच्या मुद्द्यांवर चांगला प्रकाश पडण्यासारखी बरीच उपयुक्त माहिती वरील हस्तलिखित प्रतींत पाहण्यास मिळते. ह्या काळ ह्मणजे मराठी गद्यग्रंथांचा उदयकाळ होय. बाळशास्त्री शुक्ल वैय्याकरणी व सदाशिव काशिनाथ छत्रे हे दादोबांना गुरुस्थानीं होते; व बाळशास्त्री हे तर त्यांचे गुरुच असून त्यांच्या शिक्षणामुळें दादोबांना आपलें व्याकरण लिहिण्याची स्फूर्ति झाली. दादोबांचे सहाध्यायी बाळशास्त्री जांभेकर (इ. स. १८१०-१८४६), नौरोजी फर्दुनजी, जनार्दन वासुदेवजी, नाना नारायण, वगैरे मंडळी होती. ह्यांपैकीं बाळशास्त्री जांभेकर हे महाराष्ट्रभाषेच्या दृष्टीनें फार मोठें प्रस्थ होते. डॉ. भाऊ दाजी, केरोपंत छत्रे, नाना मोरोजी व प्रख्यात दादाभाई नौरोजी हे बाळशास्त्री जांभेकरांचे शिष्य होत. सदाशिव काशिनाथ छत्रे, हरि केशवजी व बाळशास्त्री जांभेकर, हे ह्या मराठी गद्यरचनेच्या उदयकाळचे मराठी ग्रंथकार होत. ह्यांची स्वतंत्र ग्रंथरचना बहुतेक नाहीं, तरी तेव्हां इंग्रजी भाषेचा नुकताच आरंभ होत असल्यामुळें, इंग्रजी भाषेंतील कित्येक चांगल्या ग्रंथांचें विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठीं मराठींत भाषांतर होणें अवश्य होतें व तें काम यांनीं चांगल्या रीतीनें केलें होतें. सदाशिव काशिनाथ छत्रे यांचे 'इसापनीति' व 'बाळमित्र' हे ग्रंथ प्रसिद्धच आहेत. हरि केशवजी यांनीं ' सिद्धपदार्थविज्ञान ' व ' रसायनशास्त्र ' हे ग्रंथ लिहिले व बाळशास्त्री जांभेकरांनीं 'इंग्लंडचा इतिहास,' 'हिंदुस्थानचा प्राचीन (मुसलमानी अंमलाचा) इतिहास,' 'विद्येचे लाभ, उद्देश व संतोष' हे ग्रंथ व इतर कित्येक शालोपयोगी पुस्तकें लिहिलीं. मराठी भाषेंतलें पहिलें वर्तमानपत्र (अँग्लो-मराठी) ' दर्पण ' व पहिलें मासिक ' दिग्दर्शन ' यांचे संपादक बाळशास्त्रीच होते. जुने शिलालेख व ताम्रपट संशोधून प्रसिद्ध करण्याचें कामही आपल्याकडे प्रथम बाळशास्त्र्यांनींच केलें आहे. तेव्हां एकंदर विचार करितां सदाशिव काशिनाथ छत्रे, हरि केशवजी व बाळशास्त्री जांभेकर यांजकडेच गद्य ग्रंथांचें जनकत्व जातें. पूर्वीं मराठेशाहींत जुन्या पौराणिक कथा व बखरी मराठी गद्यांत लिहिलेल्या होत्या, पण त्यांचा सार्वत्रिक प्रसार नव्हता. वरील त्रयींचे ग्रंथ शिलाप्रेसवर छापले गेले, हें सांगणें नकोच. त्यांचे ग्रंथ आज प्रसिद्ध नसले तरी त्यांची कामगिरी मराठी भाषेच्या दृष्टीनें चिरस्मरणीय आहे यांत शंका नाहीं.

दादोबा हे त्यांचे समकालीन असल्यामुळें त्यांच्या आत्मचरित्रांत त्यांचा उल्लेख वारंवार आला आहे. शिवाय १८२०-३० च्या काळांत मुंबईंत विद्याभ्यासाची सोय कशी होत गेली, याचाही मनोरंजक इतिहास त्यांत सांपडतो. आपली कल्पना अशी होते कीं, इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर इंग्रजी विद्येचा प्रसार इकडे झाला असावा, व ही गोष्ट सामान्यतः खरीही आहे; तथापि मुंबईंत तरी इ. स. १७९० पासूनच व्यापाराच्या सोयीसाठीं कांहीं लोक थोडेंबहुत इंग्रजी

जाणत होते, असें दादोबांच्या आत्मचरित्रावरून दिसतें. दादोबांच्या इंग्रजी शिक्षणास इ.स. १८२५च्या सुमारास आरंभ झाला. तरी त्यांनीं एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, " माझ्या तीर्थरूपांच्या लहानपणीं गोविंदजी नानाचें मुंबईंत स्कूल होतें. गोविंदजी नानास मीं लहानपणीं चुटपुटें पाहिलेसारखें वाटतें. तेव्हां ते फार म्हातारे अशक्त होते. त्यांनीं मलबारांत इंग्रज सरकारची चाकरी केली होती. तेथें त्यांनीं इंग्रजी भाषा लिहावयास व वाचावयास शिकली असावी. मीं लहान होतों त्याकाळीं जे कोणी हुद्देदार आणि पैसेवाले शेणवी व परभु गृहस्थ होते, त्यांतून बहुतेक या गोविंदजी नानांचे शिष्य होते व त्यांस आठवणारे अद्याप (१८६८) थोडे म्हातारे आहेत ते त्यांची वरदहस्तीं मास्तर म्हणून अद्यापि तारीफ करितात." दादोबांच्या लहानपणीं कित्येक किरकोळ शाळा मुंबईंत होत्या त्यांचें पुढें एकीकरण एज्युकेशन सोसायटींत झालें, व त्यांचें पुढें एल्फिन्स्टन इन्स्टिटयूटमध्यें झालें. ह्याप्रमाणें मुंबईंत इंग्रजी विद्याभ्यासाचा रीतसर आरंभ झाल्यावर पुढें सुरत, नंतर पुणें, याप्रमाणें सर्व इलाखाभर इंग्रजी विद्येचें जाळें पसरलें गेलें. चिपळोणकर पिता–पुत्रांच्या वेळेपासून विद्येचें व ग्रंथरचनेचें केंद्रस्थान जरी पुणें झालें आहे, तरी इंग्रजीच्या पहिल्या अमदानींत तो मान मुंबई शहरास मिळाला होता ही गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे.

असो. सदर लेखांत तत्कालीन मुंबईंतील विद्याप्रसाराचें व ग्रंथकर्तृत्वाचें काम कसें झालें, एवढेंच पहावयाचें असल्यामुळें दादोबांच्या समग्र आत्मचरित्राचा गोषवारा देऊन मी आपला वेळ ज्यास्त घेऊं इच्छित नाहीं. हें मराठी सारस्वताचें वार्षिक संमेलन आहे, हें लक्ष्यांत घेऊन मराठी सारस्वताच्या प्रगतीच्या व विद्याप्रसाराच्या दृष्टीनें महत्त्वाचीं तेवढींच अवतरणें यांत घेतलीं आहेत. कोठें विषयपूर्ततेसाठीं टीपा दिल्या आहेत. बाळशास्त्रयांच्या संबंधानें हस्तलिखित: प्रतींत जागोजाग जे उल्लेख आढळले, ते एकत्र करून तो विषय पुरा केला आहे.

असो. सदर लेखांत सारा संबंध मुंबईचा असून, मुंबईची ८०।९० वर्षांपूर्वीची स्थिति त्यावरून कळून येणार आहे, व हा लेख मुंबई येथील संमेलनांतच वाचण्यांत येत आहे, हा योगायोग मौजेचा आहे.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

लेखनाचा हेतु.

बहुत दिवसांपासून माझ्या मनांत असें आलें आहे कीं, आपणांस जे जे विचार सुचतील ते ते टांचून ठेवावे म्हणजे कालांतरीं केव्हां तरी ते राहिले असतां आणि कोणी सुज्ञ व समर्थ पुरुषाच्या हातीं लागले असतां ते लोकहिताच्या कामास कांहीं तरी उपयोगी

पडतील. देहाची तर शाश्वती व भरंवसा नाहीं व आपल्या विचाराप्रमाणें कोणतीही गोष्ट करावयास आपल्या अंगीं सामर्थ्य नाहीं; सद्यः तर इतकीच शक्ति आहे कीं, आपणांस सुचतील ते विचार स्मरणार्थ टिपून ठेवावे. भगवान् या विश्वरूप कुटुंबाचा पिता व नियंता होय. त्यानें ज्यापेक्षां आपणांस जन्म दिला आहे, त्यापेक्षां प्राणिमात्रांचे क्लेशाचें निवारण, विशेषेंकरून त्रिविधतापाचें उपशमन होई अथवा होईल असें आपल्या बुद्धीनें दिसताहे असे विचार आपल्या मनाच्या ठायीं उद्भवले असतां ते जनांस न कळवितां तसेच मनांत लपवून ठेवणें व ते देहासारखे नाशिवंत नसतां त्यांसही त्याबरोबर नाशाप्रत पाठविणें हा चौर्यकर्माहून मोठा अपराध होय. हितकारक विचार सर्वदां लोकांस कळवीत असावे, हा मुख्य धर्म.

कुलकथा.

मुंबईत शेतवळींत माझा जन्म वैशाख वद्य ४ शके १७१६ (ता. ९ मे १८१४) इसवी या दिवशीं झाला. माझ्या तीर्थरूपांचें नामाभिधान पांडुरंग व मातुश्रीचें यशोदाबाई[1]. आमचें मूळचें राहणें वसईजवळ **तरखड** म्हणोन लहानसें खेडें आहे तिथलें. तेथें आमचे पणजे नारायणशेट राहत असत व त्यांचें दुकान होतें. पुढें आजे यशवंत यांचें लग्न जाहल्यावर ते सहकुटुंब मुंबईस रोजगारानिमित्तानें आले ते पुढें येथेंच वसले. आमचे तीर्थरूप एक वर्षाचे असतांना आमचे आजे निवर्तले. तेव्हां त्यांचा प्रतिपाळ आमची आजी उमाबाई व तिची धाकटी बहीण काशीबाई यांनीं केला. काशीबाई अकरा वर्षांची असतांच तिचा भ्रतार वारला. तेव्हांपासून ती बालविधवा असून, आपल्या वडील बहीणीकडेस असे. आमच्या तीर्थरूपांना लहानपणापासून काशीबाईची शिक्षा होती. हा मावशीचा उपकार आमचे तीर्थरूप नेहमीं आठवीत असत. तितक्या गरीबींत त्या दोघी बहिणींनीं त्यांची मुंज व लग्न केलें. आमची मातुश्री ही कृष्णाजीशेट यांची कन्या. त्या काळीं वसईत त्यांचा व्यापारधंदा फार चांगला चालत होता व ते घरचे सुखी होते. यांचें कुटुंबही फार मोठें असे. असें सांगतात कीं, या घरीं लहान मुलांकरितां सकाळीं न्याहारीस दोन पायल्यांचें आटवल म्ह० जाडीचें पेज लागत असे. त्या घरांत मूलबाळ नसल्यामुळें व तिघी म्हाताऱ्याच राहिल्यामुळें त्याचें थोड्याच दिवसांत निर्मूल होणार. असो. आमच्या वडिलांचा संसार फार गरीबीचा होता, पण पुढें त्यांनीं आपल्या उद्योगानें तो चांगल्या थाटास आणला. त्यांनीं शेतवळींत एक लहानसें घर विकत घेतलें. आमच्या आईस आम्ही भाऊ व बहिणी मिळून, सव्वा दीड वर्षांच्या अंतरानें पंधरा मुलें झालीं. सर्वांत ज्येष्ठ मी.

आईबापांचें वळण.

या देशाच्या सांप्रतच्या स्थितीप्रमाणें पाहिलें असतां आमच्या तीर्थरूप–मातुश्रींचा जोडा फार सुखी होता. परस्पर एक–विचारानें व एकमेकांवर मोठी प्रीति करून असत. आमच्या तीर्थरूपांची फार साधुवृत्ति होती. लहानपणापासून भगवद्भजन, कीर्तनश्रवण, याजवर त्यांची मोठी आवड असे. माझ्या जन्मापासून मी त्यांचा असा नियम पाहात आलों कीं, मोठ्या पहांटेस सर्व घरांतल्या माणसांच्या अगोदर उठावें; नंतर मुखमार्जन करून कांहीं भगवत्स्मरण करावें–म्हणजे अभंग भूपाळ्या इ. म्हणाव्या; नंतर प्रातःस्नान करून देवपूजा करावी. इतक्यांत एक दोन घडी दिवस चढे. मग देवदर्शनास जाऊन परत घरीं येतांना घरांत काय जे संसारोपयोगी पदार्थ लागतील ते स्वतः आणावे, नंतर भोजन उरकून आपल्या उद्योगावर जावें. तेथून संध्याकाळीं घरीं येतांना कोठें देवालयीं पुराण कीर्तन असेल तें ऐकून रात्रीस आठा तासांच्या सुमारास घरीं यावें. नंतर फराळ उरकून कांहीं लिहावयाचें काम असेल तें लिहून पुढें हरिविजय, भक्तिविजय, दासबोध इ. प्राकृत ग्रंथांचा एक अध्याय वाचावा व हातांत चिपळ्या घेऊन एक तासपर्यंत भजन करावें. मग निजावयास जावें. असा त्यांचा एकसारखा वीस वर्षेपर्यंत मीं नियम पाहिला. आम्ही लहान मुलें असतांना कधीं कधीं आम्हांसही त्यांनीं भजनास आपल्या बरोबर घ्यावें. त्यांचा हा असा नियमच आमच्या सुशिक्षेस मुळीं कारण झाला, असें म्हटल्यास चिंता नाहीं. त्यांची भक्ति पूर्वीपासून पंढरपुरसांप्रदायी वैष्णव-

---

१ दादोबांनीं आपल्या केकावलीवरील टीकाग्रंथास ' यशोदा–पांडुरंगी ' असें नांव दिलें आहे.

मार्गाकडेस विशेष असे. मी चार पांच वर्षांचा असेन तेव्हां आमची आत रेणुकाबाई (जिला आम्ही सारीं आक्रू ह्मणत असों) ती माहेरीं येई, तेव्हां मला जवळ घेऊन तिनें श्लोक बोलायास शिकवावें. मी सात वर्षांचा झालों तेव्हां आमची आई यशोदा हिनें फुरसतीच्या वेळीं आम्हां दोन तीन मुलांस जवळ बसवून कांहीं राजे, राण्या यांच्या कहाण्या सांगाव्या.मी तीस रिकामी पाहिली ह्मणजे म्हणावें, 'यशोदे! आह्मांस कांहीं कहाण्या सांग व गाणीं म्हणून दाखीव.' मग फुरसत पाहून तिनें कांहीं गाणीं म्हणावीं मला माझ्या आईचें दूध कधींच मिळालें नाहीं. मी जन्मलों, तेव्हांच माझ्या आईचें दूध उडालें, तें पुन्हां दुसरें मूल होईपर्यंत आलेंच नाहीं. यामुळें माझ्या आईस सासवा-नणंदांकडून फार जाच सोसावे लागले. मीं दुधासाठीं टाहे टाहे रडावें तेव्हां अमच्या आतेनें व आजीनें म्हणावें, " हे देवा, तूं चिडीमुंगी ह्यांस चारा देतोस आणि या तान्ह्या बाळाचा चारा कसा नेलास? " मग तेथें घांटी लोकांच्या झोंपडींत एक ऐली नांवाची बायको होती; तिचा एक मुलगा थानपिता होता, त्यास तिनें पाजल्यावर मला मोठ्या मित्रतेनें येऊन पाजावें. ह्या कुळवाडणी बाईच्या आर्जवानें मला माझ्या आईनें वाढविलें. तिनें तिला वस्त्रें चिरगुटें द्यावीं.

आईच्या तोंडचीं गाणीं.

आमच्या आईनें कांहीं गाणीं ह्मणावीं. त्यांत तिनें असें सांगितलें कीं माझ्या माऊसभावाच्या बायकोस फार वर्षे मूलबाळ होत नव्हतें त्यामुळें ती फार खंती असे. तिनें आम्हांसारख्या पोरींना घेऊन वांझ बायकोला किती दुःख असतें त्याचें वर्णन कोणी कवीनें फार सरस गाइलें आहे तें म्हणून आंसवें गाळावीं. तें कवन आमच्या आईनें आम्हांस सास्वा-नणंदेच्या भयानें एकीकडेस म्हणून दाखवावें. तिलाही तें थोडें

१ मला वाटतें, हें होनाजी बाळांचें कवन असावें. त्याचा पुष्कळ वर्षांपासून शोध करितों, परंतु त्या कवनाचा आतां कोठेंच थांग लागत नाहीं. असलीं कवनें मनुष्यस्वभाववर्णनपर असल्यानें फार गोड व सरस समजलीं पाहिजेत. तीं नाहींशीं होणें खेदाची गोष्ट आहे.

तेव्हां त्रुटकच येत होतें. त्यास आतां साठ वर्षे झालीं, मला सगळें कोठून आठवेल?

' सर्व गोष्टि अनुकूल कृपा परि पूर्ण ईश्वराची
नसे न्यूनता मला घरीं गे बाई कुण्या पदार्थाची.

* * *

कायावाचामनें भुकेली एका बाळकाची

* * *

आपआपल्या घरीं नारी मूल घेउनि कडे
राहताति उभ्या हंसुनी भ्रतारापुढें
बोलविती मुलापासूनि वेडेंवाकुडें
हंसविती पतीला एका बाळाकडुन
रिझवती पतीचें मन एका बाळावरुन
धिक् धिक् माझें जिणें ग बाई धिक् धिक् माझें जिणें
एका बाळकाविणें ग बाई एका बाळकाविणें
घर मंदिर दिसतें शुन ग,बाई घर मंदिर दिसतें सुणें.'

* * *

म्या पिंपळा प्रदक्षणा घातल्या किती

* * * *

अझूनि मजला प्रचीत कोणाची येईना संसारीं ॥ध्रु०॥
येईना संसारीं एक बाळक पोटीं नाहीं
धिक् माझें वांझपण कधीं फिटत बाई
कधीं फिटत बाई, एक बाळ पोटीं नाहीं ॥ ध्रु० ॥

कधीं तिणें मला मागें कांहीं वर्षांवर पंढरपुरीं भीमेस मोठा पूर आला होता, त्याचें वर्णन कोणी कवींनीं एका पवाड्यांत सरस वर्णिलें आहे, तो पवाडा ह्मणून दाखवावा. तोही आतां मला बराबर आठवत नाहीं, परंतु कांहीं त्रुटक आठवतो तो येथें लिहितों. कारण अशीं मनुष्यस्वभाववर्णनपर आणि ऐतिहासिक कांहीं अपूर्व गोष्टी घडतात त्यांच्या वर्णनाचीं कवनें आतां नष्ट होत चाललीं आहेत.

' शके सोळाशें पंचायशीं । शके सोळाशें पंचायशीं ।
' सुभानू नामसंवत्सरे आणि एकादशी, आषाढी शुद्ध एकादशी ।

* * * *

१ म्हणजे इ. स. १७६३, सोनपानपतची लढाई झाल्यावर दुसरे किंवा तिसरे वर्षी.

'अपार पडलें पाणी वेढा पंढरिला पडला ।
'भीमेला महापूर आला । चंद्रभागे महापूर आला
अपार॥ ध्रु० ॥

* * * *

दुकानदारांची मोठी अबदा ।
दुकानदारांची मोठी अबदा ।
पाय निसरुनि पडति बदबदां ।
म्हणती हात धाहो दादा ।
मिठाई मेवा । अरे हरी मिठाई मेवा ।
वाहुनियां गेला । नाश कितिकांचा झाला ॥

बाळपणच्या आठवणी.

मी दोन तीन वर्षांचा असेन, तेव्हां माझ्या बापानें मला मूळाक्षरें उच्चारायास शिकविण्याचा प्रारंभ केला. 'श्रीगणेशायनमः' 'ओनामासिधं' (ॐनमः सिद्धं) 'अआइई' असें उच्चारायास शिकवावें. त्या वेळेस हीं अक्षरें मला एकएक चित्र भिंतीवर लिहिल्यासारखें दिसे. अगदीं लहानपणीं म्हणजे सुमारें वर्षाच्या वयांत बाळकास सर्व काय ती आपली आई दिसूं लागत्ये, अथवा तिचा भास होतो. शब्दाचें ज्ञान कायनुबायनुच होतें. मला आठवतें कीं, रात्रीं फकीर भीक मागावयास येत आणि कांहीं गाऊन बोलत तें मला भासे कीं माझी आईच बोलत आहे. तेव्हां ज्यांत त्यांत आईच दिसत असत्ये. लहानपणीं मी जेव्हां जेवीत नसें किंवा कांहीं खोडी करीत असें तेव्हां वडिलांनीं मला एका लिंगणबावाचें भय दाखवून सांगावें कीं, 'जर तूं रडलास तर तो लिंगणबावा तुला आपल्या झोळींत घालून नेईल; त्याच्या झोळींत अशीं पुष्कळ पोरें घातलीं आहेत !' मग त्या वेळेस तो म्हातारा बावा भिक्षा मागावयास आलाच असला तर त्यानें आपले झोळीशीं तोंड नेऊन कांहीं गुडगुड शब्द करावे म्हणजे मला आंतलीं पोरें रडतात असा भास व्हावा. मला अगदीं खरें वाटत असे कीं तो म्हातारा बावा आपल्या झोळींत पोरें नेई. मग मीं त्याला भिऊन चूप राहावें. बाळपणीं एखादी नवी वस्तु, अथवा पांखरूं, कुत्र्याचें पोर, शाळुंकी आपलेंसें करण्याची फार हौस असते. मी पांच सहा वर्षांचा असतांना एका मुलाजवळ शाळुंकी होती, तेव्हां मीं त्याजवळ जाऊन बसावें, त्याची खुशामत करावी व ती शाळुंकी हातीं कशी येईल याच्या मसलती कराव्या. लहानपणीं शाळा व पंतोजी यांचें फार भय असतें. पांचांपासून आठांपर्यंत पंतोजी म्हटला म्हणजे मला मोठा भयंकर दिसे. त्याची ती मुद्रा, ती हातांतली छडी व दुसऱ्या पोरांस मारितांना पाहिलें म्हणजे तो लहान मुलांस काळासारखा दिसे. पंतोजीचे कोणी मित्र त्याला भेटावयास आले म्हणजे मुलांकडून हिसाबाची झडती घेण्याची त्यास हुक्की येत असे. एखाद्या मुलास हातांत धरून इकडे तिकडे फिरवी व २ आणि ५, ५ आणि ९,८ आणि १०, पांच दाही, सहा पंचे, सातीं-आटीं असें फटाफट विचारी आणि तें पोर चुकलें कीं त्याच्या पाठीवर छडी मारी ! मला वाटे जर मजवर पाळी आली तर मीं हिसाब कसा सांगावा ? म्हणून पंतोजींनें लहान मुलांस भय वाटेसें कांहीं करूं नये, भयानें मुलांच्या कोमल मनास व शरीरास इजा मात्र होते. त्यानें मुलांशीं ममतेनें बोलावें व खेळत खेळत शिकवावें म्हणजे त्यांस आनंद वाटतो व पंतोजीही आवडतो. सहा वर्षांच्या वयापर्यंत २।३ वर्षांत मला चार शाळा झाल्या. तीन वर्षांचा असतांना शेतवडींत कोंकणांतून आलेला एक शेणवी पंतोजी होता, त्याच्या शाळेंत प्रथम २।४ महिने गेलों. तेव्हां मी उगीच धुळपाटी घेऊन बसत होतों. नंतर काळबादेवीच्या रस्त्यावर पहिल्या हणमंतगल्लींत लिंगू नावांच्या पंतोजीनें मला १० अंक, मूळाक्षरें व एक बाराखडी शिकविली. तो बाराखड्या शिकवतांना मोठ्यानें म्हणे—

क काना दिला **का**, ऱ्हस्व्यान **कि**, दीर्घ्यान **की**, ऱ्हस्व्यान **कु**, दीर्घ्यान **कू**, एकमात्र **के**, दुमात्र **कै**, कानामात्र **को**, दुमात्रकाना **कौ**, माथा दिले **कं**, देवा दिले **कः** तें मीं तोंडपाठ म्हणे. पण मला यांत कांहींच समजत नसे. यापुढें मी गिरगांवांत जगन्नाथ टकल्याच्या वाडींत दामोदर पंतोजीच्या शाळेंत गेलों. तेथें सकाळ संध्याकाळ मी व माझा धाकटा भाऊ भास्कर गड्याच्या खांद्यावर बसून वर्ष दीडवर्ष जात असों. या शाळेंत मी सर्व धुळाक्षरें व फाडे सवायकीं, दीडकीं निमकीं पाऊणकीं शिकलों, व खरड्यावर आलों. तेव्हां माझ्या बापानें शाळेवर येऊन पंतोजीस कांहीं बक्षीस दिलें, आणि शाळेवर येणाऱ्या मुलांस मिठाई वांटली. पूर्वी या गांवठी शाळांवर अष्टमी पौर्णिमा आणि अमावास्या मिळून महिन्यांत चार सुट्या असत.

सुट्टीच्या आदल्या दिवशीं पंतोजींस टिपरीभर तांदूळ व एक पैसा दर मुलानें द्यावा अशी चाल होती; संध्याकाळीं खडूनें सर्वांनीं आपआपल्या पाट्या माजवाव्या म्हणजे लिंपाव्या. मग त्या वाळल्यावर त्यांजवर कोणी धूळ, गुलाल, कोणी धूळ घालून अशी सरस्वती काढावी.



आणि तिजवर गुलाल व फुलें घालून तिची पूजा करावी.मग परवाजा बोलून घरीं जावें. एका दिवसाचें मला स्मरण आहे कीं अशी सरस्वती काढून पूजा करीत असतां, आमच्या शाळेवर दोन इंग्रेज आले होते.त्यांस पंतोजी पाद्रीसाहेब म्हणूं लागले. त्यांणीं मुलांस विचारिलें कीं हें तुम्ही काय करितां ? मुलांनीं सांगितलें कीं,आम्ही सरस्वतीची पूजा करितों. मग ते साहेब दोघे एकमेकांशीं कांहीं बोलून हांसून निघून गेले.पुढें ते साहेब केव्हां केव्हां आमच्या शाळेवर येत असत. त्या पाद्र्यांनीं मला एक मराठी छापलेलें बुक दिलें. त्याचें नांव ‘ मात्थीउक्त. ’ तें पहिलेंच बुक माझ्याहातीं आलें तेव्हां मला जो काय आनंद झाला तो सांगतां येत नाहीं. घरीं आल्यावर मीं तें साऱ्या माणसांस दाखविलें आणि घडीघडी त्याच्यावरचें काळ्या रंगाचें पुष्टपत्र पाहावें व आंतील छापलेलीं अक्षरें पाहावीं. त्यावेळीं मला एकएक अक्षर मात्र ओळखत असे. आंतला विषय माहीतच नव्हता.

मीं पांच सहा वर्षांचा होतों तेव्हांपासून गरीब अनाथांविषयीं मला कळवळा होता. गरीब, भिकारी, बाई अथवा पोरगें दारापुढें आलें म्हणजे मला वाटे, ‘ देवा ! याला कां खायाला आणि पांघरायाला मिळत नाहीं ? ’ मीं मग माझ्या आई–आजीजवळ दीनवाणें तोंड करून कांहीं तरी मागावें व त्यांस पैसा, अन्न किंवा जुनें वस्त्र द्यावें. मला लिहायास लज्जा वाटते कीं, मी केव्हां केव्हां घरांत कोणास न कळवितां त्यांस जुनीं वस्त्रें द्यावीं.मग आईनें माझा वहीम घेऊन म्हणावें कीं, ‘ दाद्यानें भिकाऱ्यास दिलें असेल. ’ माझी मुंज सन १८२१ त झाली. गणेशभट कोनकर हा कऱ्हाडा ब्राम्हण आमचा उपाध्या होता. १८२२ त माझ्या बापानें कुंभारतुकड्यांत जागा घेऊन घर बांधलें; त्यांत वास्तुशांत करून आम्ही राहायास गेलों.

इंग्रजी अभ्यास.

माझ्या बापानें मला Vyee's Spelling Book आणून दिलें व ए. बी. सी. व दोन तीन अक्षरांचे शब्द वाचावयास त्यांनींच शिकविलें. मला लगेच वाट्किन् नामक म्हाताऱ्या इंग्रजी मास्तरच्या शाळेंत घातलें. १८२३ त ७।८ महिने मी या शाळेंत गेलों. त्या स्कुलांत जाण्याचे तीन वेळ असत. एकदा सहा वरापासून नऊ वरापर्यंत, पुढें दहा वरापासून १२ वरांपर्यंत, व एक वरापासून चार वरापर्यंत. मी सकाळीं व दोन प्रहरानंतर असा दोनदांच जात असें. बुधवारीं शनिवारीं अर्धा दिवस रजा असे आणि रविवारीं सारा दिवस. ही त्यावेळीं धर्माची शाळा असावी. कारण तो जीं बुकें शिकवी तीं त्यास देवळांतून येत असें मुलें सांगत. त्याची शिकविण्याची रीत चमत्कारिक असे. लहानशा

तबकड्या करून त्यांत ए. बी. सी. पासून शद्व छापलेलीं कार्डें काढाघालायचीं असत. जाड कागदाचें अरुंद चेपण असे तें वर खालीं खेळत असे. त्याजवर मुलानें आपलें बोट ठेवून शद्व व अक्षरवटिका करावी; ह्मणजे त्यायोगेंकरून धड्याची खूणही राहत असे आणि शद्वाची कार्डें मळत नसे. हीं कार्डें झालीं ह्मणजे मध्यें एक दोन लहान बुकें वाचायास देत असे व वरच्या वर्गास New Testament ‘नवा करार’ वाचायास देत असे. दोन प्रहर झाल्यानंतर काप्या ल्याहावयास सांगे. त्या सर्वांच्या काप्या ह्यातारा मास्तर स्वतः आंखून देत असे. डोळ्यांस चष्मा लावून एका जाड शिशाच्या पेनशिलीनें सर्व मुलांच्या वह्या आंखून ठेवी. नंतर तिसऱ्या प्रहरीं गणित शिकवी. सर्वांच्या स्लेटींवर मिळवण्या, वजाबाक्या, गुणाकार आणि भागाकार यांचीं उदाहरणें स्वतः लिहून ठेवी. नंतर तीं उदाहरणें मुलांनीं करावीं. तीं तो तपासित असे. असा शिकविण्याचा क्रम चालत असे. मी या शाळेंत बुकांवर आलों नव्हतों–म्हणजे माझी कार्डेंच चालत होतीं. या (वाट्कीन्) सारखा काबाडी इंग्लिश मास्तर मीं

कोठेंच पाहिला नाहीं. इतक्यांत तो Watkin (वाट्कीन्) मास्तर कोणीकडेस निघून गेला. ती School (शाळा) Mr. Fisher या नांवाच्या दुसऱ्या कोणी मास्तरानें घेतली. तोही बराच मेहनती माणूस होता. त्यास दर तीन चार मिन्युटांनीं तबकील ओढावी लागत असे ! कधीं कधीं तो आपल्या पदरचा रुपाया मोडून त्याचा खुर्दा आणून कोणी मुलांनीं चांगलें वाचलें अथवा शुद्ध रीतीनें शब्दाची अक्षरवटिका केली, म्हणजे त्यास एका आण्यापासून चार आणेपर्यंत बक्षीस देई ! एकदा मीं मोठ्या शद्बाची अक्षरवटिका शुद्ध केली तेव्हां मला त्याणें दोन आणे बक्षीस दिले. हें मला शाळेंत पहिलें बक्षीस मिळालें. पुढें तो Fisher मास्तर कोठें निघून गेल्यामुळें ती शाळा लवकरच मोडली. मग मी तातुशेठ्या ह्मणून एक वैश्य ज्ञातीचा त्या काळीं आपणास मोठा लॉयर म्हणविणारा गृहस्थ होता; तो सकाळ संध्याकाळीं आपल्या घरीं मुलांस कांहीं इंग्रजी शब्द व अर्थ शिकवीत असे, त्याचे शाळेंत दोन चार महिने गेलों.

सन १८२५ च्या दोनतीन वर्षांपूर्वी कापावर सोसायटीचें स्कूल बांधून तयार झालें. ती नवीनच सरकारी मोठी शाळा म्हणून जिकडे तिकडे गाजलें. त्या शाळेवर **जर्व्हिस** साहेब होते, व त्यांच्या मदतीस **सदाशिव काशीनाथ छत्रे** हे होते. त्यांस त्याकाळीं तीनशें रुपये दरमहा झाला होता. हा दरमहा त्या वेळेस सर्वांस मोठा वाटत असे. त्या वेळेस एकदोन वर्षेपर्यंत सर्व मुंबईंत लोक अशा कल्पना आपल्या मनांत करूं लागले कीं, "आमचे मुलांस शिकविण्याचें सरकारास इतकें काय अगत्य आहे? तेव्हां या धूर्त इंग्रजसरकारचा यांत कांहींतरी मतलब असावा.' आमच्या मुलांस हुशार करून त्यांस पुढें बाढवावें असा सर्वांचा तर्क घांवत होता, म्हणून ते आपलीं मुलें त्या मोठ्या शाळेंत पाठविण्यांत मोठा संशय घेत होते. मी त्यावेळेस लहान—सुमारें दहा अकरा वर्षांचा होतों. तरी त्या शाळेचा मोठेपणा व तेथील मोठमोठे ब्राह्मण शास्त्री पंतोजी पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. मोठी लांब शाळा. त्यांत आंथऱ्यांवर मुलांचे वर्ग एका हारीनें एकापुढें एक असे बसविलेले—व एक एका वर्गापुढें लांकडी घोडे उभे केलेले—व त्यांजवर खिळ्यांनीं पाट्या अडकविलेल्या—आणि त्या पाट्यांवर मोठीं छापील मूळाक्षरें, जोडाक्षरें, बाराखड्या व दोन—अक्षरी, तीन—अक्षरी चार—पांच—सहा—सात—अक्षरी शब्द मोठ्या अक्षरांनीं छापलेले कागद डसविलेले, व पंतोजी व शिक्षक जेथें तेथें वर्गापुढें उभे राहून त्या पाट्यांवरून मुलांस लिहावयास व शब्दवटिका करायास उच्च स्वरांनीं सांगत उभे राहिलेले—व वरच्या वर्गापुढें काळ्या रंगाचीं मोठीं चौरस फळीं तिपाईवर किंचित् पडतीं उभीं केलेलीं व त्यांजवर सफेद्यानीं हिसाब शिकवित होते. व जेथें तेथें भिंतीला चुका लावून त्यांवर 'हैंदशाळा, मुंबईची पुस्तक—मंडळी' असें मोठ्या अक्षरांनीं छापून कागद डसविलेले लहान लहान लांकडाचे तक्ते टांगलेले होते. मराठी शाळेचे पुढें तशीच डौलाची गुजराथी शाळा, त्यांत गुजराथ्यांचीं व पारशांचीं मुलें बसलेलीं, व त्यांपुढें गुजराथी मेहताजी शिकवित होते, व शेवटीं मुसलमानांचीं मुलें आपल्या समोर अर्धचंद्राकार हारीनें बसवून एक मुनशी त्यांस शिकवित होता. मराठी शाळेच्या माथ्यावर सुमारें अठरा वर्षांच्या वयापासून तर पंचविस वर्षांच्या वयापर्यंत असे ज्वान ज्वान ब्राम्हणांचे एका मोठ्या शास्त्र्यापुढें मराठी वाचीत होते. त्यांत ते वेळोवेळां प्रथमा, द्वितीया, तृतीया, पंचमी, षष्ठी, सप्तमी असें बोलत तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटे कीं हे लोक येथें तिथींचीं नांवें कशाकरितां घेतात ! मला त्यांचें वाचणें कांहींच समजत नसे. एकीकडेस वर चढण्याचा जिना टाकून दुसरी आडवी शाळा होती. तींत बसण्याच्या बाका व त्यापुढें तशींच अरुंद लिहिण्याचीं लांब लांब मेजें ठेवून त्या बाकांवर इंग्लिश शिकणारे हिंदु व पारशी यांचे मुलगे बसले होते. व एकीकडे इंग्लिश मास्तराकरितां एक मोठें हिरवी बनात जडलेलें मेज व जवळ एकदोन खुर्च्या अशा होत्या. त्या इंग्लिश मास्तराचें नांव Mr. Murphy असें होतें.

इंग्रेजी

मी सोसाईटीच्या मराठी शाळेंत सन १८२५ त गेलों. तेव्हां मला थोडथोडें इंग्लिश वाचायास व मोठ्या अक्षरांनीं कापी लिहायास येत होतें. परंतु इतकें येत असतां सोसाइटीच्या मराठी शाळेंत जेव्हां मी पहिल्यानें गेलों तेव्हां मला पंतोजीनें खालच्याच **शब्दवटिकेच्या वर्गांत**

बसविलें. भास्करही माझ्या खालच्या वर्गांत बसला. पुढें मी लौकरच **बोधवचना**च्या वर्गांत चढलों. त्या लहानशा पुस्तकांत लहान मुलांस नीतिपर लहान लहान वाक्यें लिहिलीं असत. त्याचा आरंभ असा होता. ' पहांटेस उठून ईश्वराचें स्मरण करावें.' 'पहांटेस उठून अभ्यास करावा म्हणजे विद्या लौकर येईल.' हीं वाक्यें शंभरांवर होतीं. तीं सारीं तोंडपाठ करावीं लागत.

बाबा मामा.

आमचे पंतोजी बाबा मामा हे सदाशिव छत्रे यांचे मामा होते. हा पुरुष शरिरानें जाडा व वयानें सुमारें चाळीस पंचेचाळीस वर्षांचा होता. तो फारसा विद्वान् नव्हता, म्हणून भाच्यानें त्यास या कामावर लाविलें असें मला वाटतें. परंतु जरी विद्वान् नव्हता तरी लहान मुलांस वाचणें लिहिणें आणि थोडें गणित शिकवून त्यांची वरच्या वर्गांत जाण्याची तयारी करण्यांत त्याजप्रमाणें मेहनती दुसरे थोडेच पंतोजी असतील. सकाळच्या दहा वरापासून संध्याकाळच्या ४ वरापर्यंत मामा एकसारखी मेहनत करित असे. सर्व मुलांची हाजरी ठेवण्याचें त्याचें काम. त्या हाजिरीचा रपोर्ट करणें त्याजकडेस. याशिवाय मुळाक्षरापासून बोधवचनापर्यंत वाचायास त्यानें शिकवावें. मुलांच्या वर्गापुढें उभें राहून शब्दांच्या अक्षरवटिका करायास मोठ्यानें त्याणें ते शब्द बोलावे. त्याच्या त्या स्वरांनीं ती सारी शाळा नादत असे. शब्दवटिका करण्याची रीत अशी होतीः–पंतोजीनें अथवा वर्गाच्या मालच्यानें हातांत पाटी घेऊन अथवा पुढें टांगलेल्या पाटीवर पाहून एक शब्द वाचावा—' नागर मोथा ' म्हणजे पहिल्या मुलानें नला काना **ना, ग**ला कांहीं नाहीं **ग, र**ला कांहीं नाहीं **र, म**ला काना मात्रा **मो, थ**ला काना **था**, ' नागर मोथा. ' अशा रितीनें शब्दवटिका कराव्या. दोन प्रहरीं अर्ध्या तासाची सुटी झाल्यावर मग पुनः त्यांची हाजिरी होऊन गणित शिकविण्याचें काम चालत असे.

मराठी पुस्तकें.

मी या शाळेंत जाण्याच्या अगोदर शब्दवाचन, बोधवाचन, पंचोपाख्यान, विदुरनीति, सिंहासनबत्तिशी इतकीं पुस्तकें छापून प्रसिद्ध होतीं. पुढें मी गेल्यावर लागलीच इसापनीति छापून तयार झाली. हें पुस्तक सदाशिव काशिनाथ छत्रे यांनीं इंग्रजीवरून मराठी केलें. पुढें त्यांनींच बाळमित्राचा पहिला भाग केला. हा भाग तयार होऊन त्याचीं पत्रें छापीत होते तेव्हां मी वरच्या वर्गांत गेलों होतों. जर्व्हिस साहेबांनीं १८२७ त Hatton's Course of Mathematics या पुस्तकाचा तर्जुमा करून छापला. त्याचे दोन भाग झाले. पूर्णांक व अपूर्णांकगणित हा एक भाग; व बीजगणित, भूमिती, त्रिकोणमिती, क्षेत्रफळ, घनफळ व लागर्थम हा दुसरा भाग. याशिवाय त्या साहेबानें कर्तव्यभूमिती नामक तिसरें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें.

बापुशास्त्री शुक्ल मायदेव.

सन १८२७ त मी वरच्या वर्गांत गेलों त्यावेळेस वरच्या दोनतीन वर्गांस वाचन, लेखन आणि व्याकरण शिकविण्याकरितां बापुशास्त्री मायदेव शुक्ल यांची नेमणूक झाली. हे शास्त्री संस्कृत व्याकरणांत मोठे प्रवीण होते. त्यांस मांसाहारी जातींच्या मुलांस व्याकरण शिकविणें फार हलकें काम वाटे. हे नवीनच गुरूजवळून अध्ययन करून पुण्यांत व इतर ठिकाणीं शास्त्र्यांच्या सभा पाहून आलेले होते. जर पेशवाई असती तर ते असें काम करण्यास १०० रुपये दरमहा घेऊन टिकतेना; मग ४० रुपयांस कोठून ? परंतु आपल्या विद्वत्तेचे भोक्ते कोणी राहिले नाहींत म्हणोन उदरनिर्वाहाकरितां त्यांस असा रोजगार पाहणें जरूर पडलें. हे बापुशास्त्री शुक्ल व जर्व्हिस साहेबांचे मुख्य पंडित जगन्नाथशास्त्री क्रमवंत हे उभयतां एकग्रामस्थ होते. बापूशास्त्री यांची आमचे शाळेंत नेमणूक होण्यापूर्वीं रामचंद्रशास्त्री व इतर एकदोन पंडित यांनीं प्रश्नोत्तररूपानें एक लहानसें मराठी व्याकरण रचलें होतें. व्याकरणवर्गांत व मराठी शाळेच्या पहिल्या दुसऱ्या वर्गांत या व्याकरणाच्या प्रती लिहून त्यावरून मुलें व्याकरण शिकत होतीं. पण बापूशास्त्री आल्यावर त्यांनीं त्या व्याकरणाची गरज न ठेवतां आपण तोंडानें मुलांकडून वाक्यें वाचवून त्याचें व्याकरण सांगूं लागले. ते आम्हांपाशीं म्हणत, ' असल्या भुसकट व्याकरणाची मला काय गरज आहे ? मी तुम्हांस

स्वतंत्र रीतीनेंच व्याकरण सांगेन.' मग ते तसेंच करूं लागले. ते पंचोपाख्यान, विदुरनीति, सिंहासनबत्तिशी, इसाबनीति व बाळमित्र हे ग्रंथ एकामागें एक आह्मांकडून वाचवून घेऊन आमच्या वर्णोच्चाराकडे लक्ष देऊन त्यांत जे कठीण शब्द येत त्यांचा अर्थही ते आम्हांस नीट स्पष्ट रीतीनें सांगत. त्यांची व्याकरण शिकविण्याची पद्धति इतकी उत्तम असे कीं, ते जें सांगत तें माझ्या मनांत तेव्हांच भरे. त्यांनीं एक दोन वाक्यें वाचवून त्यांचें शब्दशः आमच्याकडून व्याकरण करवावें. विभक्तींचे अर्थ सांगावे. कर्ता, कर्म, क्रियापद हें विचारावें. केव्हां लहर आली तर आर्या, श्लोक, यांचे अर्थ सांगावे व ते * आमच्याकडून शुद्ध लिहून घ्यावे व तपासावे. यांत माझा नंबर बहुधा पहिलाच पडत असे. त्यावरून शास्त्रीबावांची मजवर बरीच मर्जी बसत गेली. त्यांनीं नेहमीं लाडानें मला दाद्या ह्मणून हाक मारावी. केव्हां केव्हां मोरोपंताच्या आर्या व वामनाचे एक दोन श्लोकही ते मोठ्या प्रेमानें आम्हांस शुद्ध लिहितां यावयाकरितां ह्मणून दाखवीत. त्यांच्या जवळ पानसुपारीची चंची असे, ती उघडून पान सुपारी खात खात मोठ्या प्रेमानें त्यांनीं आम्हांस मोठ्या लाडकेपणानें शिकविलें. त्यांची प्रकृति थोडी विनोदी असे, ह्मणून आम्हांतून कोणी अशुद्ध शब्द ह्मटला, अथवा बत्तीस सिंहासनींत जागोजाग लिहिलेले संस्कृत श्लोक वाचले म्हणजे ते आमचा केव्हां केव्हां थोडा विनोदही करीत, आणि ह्मणत, 'तुह्मांला संस्कृत शब्दांचा उच्चार बरोबर येणार नाहीं. तुम्ही मासमासे खाणार लोक.' असें मोठ्यानें हंसून म्हणावें. परंतु त्यांच्या बोलण्याचा कधीं कोणास राग आला नाहीं. उलटीं आम्ही मुलें त्यांजकडून अशीं बोलणीं ऐकून घ्यावयास खुश असों; कारण ते पुरुष फार मोकळे मनाचे होते. आणि कोणी मोकळे मनानें विनोदांत विरोधिक बोलणें बोलले तथापि फारसा राग कोणी मानित नाहीं. मला मराठी भाषेविषयीं इतकी गोडी लागली यास मुख्य कारण आमचे तीर्थरूपांची दिनचर्या, आणि दुसरे हे बापूशास्त्री. म्हणून या शास्त्रीबावांचें स्मरण मी मोठ्या कृतज्ञतेनें करितों. हे बापूशास्त्री शुक्ल पुढें कांहीं दिवस पुण्यांत हवेलीचे मामलतदार झाले आणि पुष्कळ वर्षें अमदाबादच्या अदालतीचे शास्त्री होते. हे मला दोन तीन वर्षांवर मुंबईस भेटले होते (म्हणजे १८६८ च्या सुमारास). त्या काळीं ते म्हातारपणानें फार अशक्त झाले होते. तथापि त्यांची स्मरणशक्ति अशी विलक्षण पाहिली कीं, ज्या ज्या गोष्टी त्यांच्या कारकीर्दींत घडल्या त्यांचें सनतारीखवार त्यांचें स्मरण त्यांस होतें. हें पाहून मी फार विस्मित झालों. एकदा सुमारें पंचवीस वर्षांवर या शास्त्रीबावांची माझी सुरतेंत गांठ पडली. तेव्हां ते मला ह्मणाले—"दाद्या ! तुझें केलेलें व्याकरण मीं पाहिलें आणि मला फार संतोष झाला, तसें तुझे दुसरे गुण व विद्वत्तेचा स्तव ऐकून मला फार संतोष होतो. परंतु गड्या, तूं नास्तिक झालास रे ! तुझी आपल्या धर्मावर निष्ठा नाहीं, हें ऐकून मी दिलगीर आहें." म्या नम्रतेनें ह्मटलें, 'शास्त्रीबावा ! शिष्याच्या कीर्तीनें गुरूस आनंद व्हावा हें उचित आहे. परंतु धर्माविषयीं जो आपण मला ठपका दिला तो जर धर्म शब्दाचा यथायोग्य अर्थ समजून दिला असला तर तो मला लागत नाहीं; आणि सध्यांच्या लोकव्यवहाराप्रमाणें त्याचा अर्थ समजून मला दिला असला तर, तो घेणें मला प्राप्त आहे.' मग त्याजवर शास्त्रीबावा कांहींच फारसे बोलले नाहींत. आणि आपल्या गुरूबरोबर वाद करावा हेंही मला अगदीं आवडलें नाहीं. याच शास्त्रीबावांचे चिरंजीव त्र्यंबकराव बापूजी हल्लीं मुंबईच्या हैकोर्टांत इंटरप्रिटर व मुतरजिम आहेत.

पांडुरंग जोशी पांवसकर. हे जोशीबावा वरच्या वर्गास गणित शिकविण्याचे कामावर होते. यांनीं हिंदूंचें ज्योतिःशास्त्र म्हटलें होतें, म्हणजे भास्कराचार्यांचें बीज व लीलावती यांणीं म्हटली होती. म्हणून यांस इंग्लिश गणिताचे ग्रंथावरून—ज्यापठन जार्विस साहेबानें मराठींत तर्जुमे केलेल्या ग्रंथावरून—तो विषय मुलांस शिकवायास फारसा आयास लागत नसे. हे जोशीबावा सरळ, बारीक अंगाचे पुरुष होते आणि

* दादोबांनीं आपलें व्याकरण १८३६ त लिहिलें व पुढें गणपत कृष्णाजीच्या शिळाप्रेसावर छापलें.

फार बुद्धिमान होते. असें त्या वेळेस सर्व लोक ह्मणत असत. यांची बुद्धि फार चंचल होती. यांणीं मला पूर्णांक, अपूर्णांक, क्षेत्रफल, घनफल आणि वर्गसमीकरणपर्यंत बीज शिकविलें. त्या वेळेस येथपर्यंत गणीत मराठी शाळेंत शिकवीत. इंग्रजी शाळेंत तर मुळींच गणीत शिकविणें नसे.

बक्षीससमारंभ.

वार्षिक परीक्षेचा समारंभ.

सन १८२५ पासून १८२८ पर्यंत मला स्मरतें दोन मोठ्या वार्षिक परीक्षा या शाळेच्या झाल्या. एक सुमारें १८२६ साच्या समाप्तीस झाली तेव्हां मी खालच्या वर्गांत होतों. त्या काळीं मुलांस रेश्मी थैल्यांत भरून रुपये बक्षीस मिळाले होते; या परीक्षेंत मराठी शाळेंत वरल्या वर्गांत पहिला नंबर विठोबा गोडबोले याचा होता, आणि दुसरा नंबर बाळाजी सुंदरजी परभू याचा होता. यांत पहिल्यास ६० रुपये आणि दुसऱ्यास ४५ रुपये बक्षीस मिळाले, असें मला स्मरतें. याच सुमारास मला वाटतें मुंबईचे नामदार गवर्नर एल्फिन्स्टन् साहेब हे आपल्या देशास जाण्याच्या तयारींत होते. म्हणून त्या समारंभाकरितां दक्षिण देशांतून मोठमोठे सरदार त्यांस भेटण्याकरितां आले होते. त्यांमध्यें चिंतामणराव पटवर्धन सांगलीकर हे होते. ते गोरे, स्थूल शरीराचे, वृद्ध पुरुष होते, व त्यांच्या अंगांत इतका भारी शेला होता कीं त्याचा झोंक मागून उचलून धरायास एक खिसमतगार होता असें पाहिल्याचें मला स्मरण आहे !! हे सरदार लोक या शाळेच्या वार्षिक समारंभांत होते किंवा एल्फिन्स्टन् साहेब स्वदेशीं जाण्याचा निराळा समारंभ झाला असून त्याकरितां आले होते, याचें आतां मला पक्कें स्मरण होत नाहीं. परंतु आमची शाळा पाहण्याकरितां एकदां हे सारे सरदार लोक व मोठमोठे साहेब लोक व मुंबईचे मोठमोठे फ्रामजी कावसजी व जमशेटजी जीजीभाई व जगन्नाथ शंकर शेट आदिकरून शेट सावकार जमले होते हें मला पक्कें आठवतें. त्या वेळेस या सर्व लोकांनीं एल्फिन्स्टन् साहेबांचें या देशांत नांव राहावें म्हणून त्यांच्या नांवानें मोठें विद्यालय काढावें याकरितां एक मोठी टीप भरून तयार झाली होती. तींत सुमारें एकंदर तीन लक्ष रुपये भरलेले होते. वर नांव श्री. महाराज प्रतापसिंह राजे छत्रपति संस्थान सातारा यांचें होतें. यांणीं १७००० सतरा हजार रुपये भरलेले मला आठवतात.

माझें लग्न.

इ. स. १८२८ च्या माघमासीं माझ्या लग्नाच्या समारंभास आरंभ झाला. माझे सासरे जगन्नाथ पांडुरंग हे मुंबईचे मॅजिस्ट्रेट मि. ग्रे यांचे इंटरप्रिटर होते. कैदी सोडवण्यांत व बाहेरचे बाहेर अब्रूदार लोकांचे खटले चुकविण्यांत त्या काळीं त्यांचें जितकें चालत असे तितकें आतां खुद्द मॅजिस्ट्रेटाचें चालत नाहीं. त्या काळीं इंटरप्रिटर लोकांचा जो मान व प्रतिष्ठा होती ती आतां खुद्द मॅजिस्ट्रेटाची नाहीं. त्यांची एकुलती एक कन्या कृष्णाबाई इजशीं माझें लग्न मोठ्या थाटाचें झालें. आमच्या सासऱ्यांनीं नवसें–हजार रुपयांचा फकत मंडप घातला होता. मी त्या वेळेस १३ वर्षांचा होतों व नवरी आठ वर्षांची होती. तेव्हां माझे वडील फ्रामजी कावसजी यांचे हपिसांत इंग्रजी रैटर होते तेथून या वेळीं त्यांना जमशेटजी जिजीभाई यांणीं शंभर रुपये दरमहावर आपलेकडे मागून घेतलें होतें. फ्रामजी व जमशेटजी हे त्या काळीं मुंबईंत मोठे प्रसिद्ध व्यापारी होते. त्यांत जमशेटजींचा व्यापार वाढत चालला होता. चीन देशाशीं अफिणीच्या नव्या व्यापारांत हे गृहस्थ पहिल्या कोटीचे होते. माझ्या लग्नास जमशेटजीकडून आमच्या तीर्थरूपास मदत मिळाली. माझ्या वरातीबरोबर शेटजींचे वडील चिरंजीव खरशेटजी जे हल्लीं सर जमशेटजी ह्मणून प्रसिद्ध आहेत ते व इतर पारशी गुजराथी यांचा पुष्कळ थाट चालला होता. माझ्या लग्नाचा समारंभ चालला असतां सोसायटीच्या शाळेच्या तिसऱ्या वार्षिक परीक्षेचें काम चाललें होतें त्यावेळीं माझा वरच्या वर्गांत पहिला नंबर होता. मी परीक्षेस नव्हतों म्हणून मला बक्षीस मिळायचें नव्हतें. पण फ्रामजी शेटच्या चिट्ठीवरून माझें नांव इनामाच्या पटांत घातलें. ह्या समारंभास मुंबईचे नवे गव्हर्नर सर जॉन मालकम् साहेब हे मुख्यस्थानापन्न होते. मला तीन पुस्तकें चांगलीं सुंदर मढ-

वून सभोंवतीं सोनेरी वेल व वरच्या भागावर सोनेरी इंग्रजी अक्षरांनीं लिहिलेला दाखला अशीं पुस्तकें बक्षीस मिळालीं.

सर्व पुस्तकें गवर्नर साहेबांनीं स्वहस्तानें मुलांस बक्षीस दिलीं. तीं त्यांनीं 'प्रेसिडंट ऑफ धी बाँबे एज्युकेशन सोसायटी' या नात्यानें दिलीं. त्यास आज ४२ वर्षें झालीं.

सहाध्यायी.

मी इंग्रजी शाळेंत गेलों तेव्हां पहिल्या वर्गांत हरिश्चंद्र परभू, बाळ गंगाधर, मोरोबा कान्होबा, जनार्दन शास्त्री गाडगीळ, जनार्दन वासुदेव हे विद्यार्थी वरच्या वर्गांत होते.

* * *

वेस्ट स्कॉलरशिप–मुंबईच्या कोर्टाचे वेस्ट साहेब हे मुख्य जड्ज होते. ते एतद्देशीय लोकांचे पक्षपाती व कनवाळू होते. ते कंपनी सरकारास व त्यांच्या इंग्लिश कामगारांस अगदीं गय करीत नसत. ते उघड कोडतांत आपले अभिप्राय निःपक्षपातानें बोलून दाखवीत असत. ते बहुतेक कामगारांस दुःसह झाले होते. त्यांचें नांव येथें चिरकाल राहावें म्हणून लोकांनीं पैका जमा केला. त्यांच्या नावानें विद्यार्थ्यांस देण्यासाठीं वेस्ट स्कॉलरशिप स्थापन केली. ही पहिलीच स्कॉलरशिप स्थापित झाली. जनार्दन वासुदेव यास पहिली दरमहा १५ रुपयांची स्कॉलरशिप मिळाली, दुसरी १२ ची मला व तिसरी नौरोजी फर्दुनजी यास १० ची मिळाली. ही तीन वर्षें आम्हांस मिळत होती.

गरीब मास्तर.

आमच्या दैवानें आम्हांस कॅ. फ्रेजर हे मास्तर आले. हे फार गरीब, अपूर्व शांतीचे व साधुवृत्तीचे पुरुष होते. म्हणून हे लष्करचे कामास नालायक ठरून यांस बडतर्फी मिळाली होती. हे इतके गरीब कीं, बराकींतलीं कामाठ्यांचीं पोरें यांच्या केसांस हात लावीत, व मस्कऱ्या करीत व टोपीसुद्धां उडवीत. मग हे पोरांस दटावयाला जात व पोरें तेव्हां हंसत! त्यांस शिकवतांना कोश वगैरे पुस्तक लागलें तर ते स्वतः माडीवर जाऊन आणीत व पुन्हां परत नेऊन ठेवीत. असें वारंवार करीत. ते कालऱ्यानें वारले तेव्हां आम्ही सर्व फार हळहळलों.

हरि केशवजी.

याच सुमारास हरि केशवजी यांनीं एका इंग्रजी ग्रंथाचें 'सिद्धपदार्थविज्ञान' नामक पुस्तकरूपानें भाषांतर केलें व तें बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मंडळीनें त्यांस बक्षीस देऊन तें आपल्या खर्चानें शिळाप्रेसावर छापलें. हरि केशवजी यांची मराठी लिहिण्याची इतकी खुबी होती कीं, हा ग्रंथ इंग्लिश ग्रंथाचें भाषांतर असतांही तसें त्या वेळेस कोणास वाटलें नाहीं. मूळचाच मराठी ग्रंथ असावा असें बहुतांस वाटलें. त्या वेळेस 'विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष' व 'सिद्धपदार्थविज्ञान' हे मोठे व सरस ग्रंथ झाले. परंतु पुढें विद्याखात्यावरील अधिकारी इंग्लिश लोक व एतद्देशीय लोक यांची देशभाषेविषयीं इतकी रुचि कमी होत गेली कीं, हे ग्रंथ इतके सरस असतांही आतां त्यांविषयीं कोणास कांहींच माहिती नाहीं. हरि केशवजी हे पांचकळशी म्हणजे सुतार जातीचे गृहस्थ होते. हे आपणांस सोमवंशी क्षात्रिय म्हणवितात. हे लोक मुंबई, साष्टी, वसई, या प्रांतांत जुने राहणारे खरे असें दिसून येतें. हरि केशवजी यांनीं आपल्या श्रमानें विद्या व लौकिक मिळविला. इ. स. १८२० सालीं येथें रे० केनी म्हणून अमेरिकन मिशनरी गिरगांवांत राहत त्यांजकडे जाऊन हे इंग्रजी शिकले.[1] पेशवाई गेल्यावर मुंबई इलाख्यांत पहिले मिशनरी अमेरिकन आले असें दिसतें. त्यांणीं शाळा वगैरे घालून धर्मोपदेश करण्याचा प्रथम उद्योग आरंभिला. हरि केशवजींचा स्वभाव शांत व गरीब होता. ते कोणासही हवेसे वाटत. त्यांनीं त्या साहेबाच्याच साह्यानें मॅरेटबाईचा

---

१ हरि केशवजी हे इ. स. १८३५ मध्यें म्हणतात कीं, 'केनी साहेब यांनीं मला आपल्या आश्रयास निरवून १० वर्षें झालीं' म्ह.१८२५–१८३५ पर्यंत.केनीनंतर ते सर जेम्स् फेरिश Member of Council, Bombay, यांचे आश्रयास होते.

दुसरा ग्रंथ रसायनशास्त्रावर[1] लिहून तो इ. स. १८३६ मध्यें छापला. हे दोन ग्रंथ हरी केशवजी यांचे हातून फार सरस झाले असून आतां (१८७१) थोड्या लोकांस त्यांची माहिती क्वचितच असेल. चेंबर्स मॉरल क्लास बुकचेंही त्यांनीं भाषांतर करून छापलेलें माझ्या पाहण्यांत होतें. याशिवाय त्यांनीं मॅरेटबाईच्या अर्थशास्त्रावरील ग्रंथाचेंही मराठी भाषांतर केलें होतें, पण तें छापलें कीं नाहीं याची मला माहिती नाहीं. आणखी या गृहस्थानें मदिरापाननिषेधक एक लहानसें मौजेचें पुस्तक रचून छापलें होतें तेंही माझ्या वाचण्यांत आहे.[2] त्यांत मद्यपी लोकांस त्यांच्या मनावर ठसावयाजोगा उपदेश त्यांणीं केला होता. हरि केशवजी हे निरंतर पाद्री लोकांच्या मंडळींत जात तरी त्यांचा वेदांतशास्त्राकडेस कल असे. त्यांणीं तरुणपणीं शामराज ताल्या केसकर नांवाचे संत मुंबईंत आले होते त्यांचा अनुग्रह घेतला होता, यामुळें ते ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व विवेकसिंधु हे ग्रंथ चांगले समजत असत.

सदाशिव काशिनाथ छत्रे.

यांनीं १८२९ त पेन्शन घेतल्यावर त्यांच्या मनांत उपयोगी इंग्रजी ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें करून लोकोपकारार्थ आपल्या आयुष्याचा सद्व्यय करावा असें होतें. याकरितां त्यांणीं एकांतवासाकरितां वाळुकेश्वरीं एक स्वतःची धर्मशाळा घेतली व स्वतःचा एक छापखाना ठेवावा असा त्यांचा विचार होता. पण ते एक दीड वर्षांनींच निवर्तले व यांच्या लोकोपकाराविषयींच्या सर्व इच्छा त्यांच्या मनांत तशाच राहून गेल्या. आमचे लोक असे दैववान् कीं, त्यांचें कोणी कल्याण करण्याची इच्छा केली म्हणजे असें करणारावरच कांहीं संकट यायचें! यांनीं पूर्वी मी मराठी शाळेंत असतां Aesop's Fables '**इसापनीतिकथा**' आणि Berquin's Children's Friend या ग्रंथाचें '**बाळमित्र**' या नांवाचें भाषांतर केलें होतें. व ते त्यांचे ग्रंथ पुष्कळ वर्षेपर्यंत सर्व मराठी शाळांत चालू होते. हे दोन्ही ग्रंथ फार सुरस झाले होते. तीं भाषांतरें आहेत, असें त्या वेळेस कोणास वाटत नसे. मराठींत सरस रीतीनें फक्कींत लिहिणारे हेच पहिले. त्यांच्या मागून आह्मी सर्व लिहिणारे झालों. त्या वेळीं सदाशिव काशिनाथाप्रमाणें इंग्लिश भाषा जाणणारे या मुंबई इलाख्यांत एतद्देशीय लोकांमध्यें कोणीच नव्हते. यांहीं कोठून कसें या भाषेचें ज्ञान संपादन केलें हें बराबर समजत नाहीं. हे जातीचे कोंकणस्थ ब्राम्हण असून मुंबईचे राहणारे होते. या मुंबईत वाळुकेश्वरीं या छत्र्यांची कांहीं वृत्ति अद्यापि आहे. त्या कुळांतले हे गृहस्थ होते. पुढें येथें इंजनीयराच्या अफिसांत हे रैटर होते. परंतु ह्या काळीं अशा इतर जातींच्या इंग्लिश रैटरांनीं सारी मुंबई व सुरत भरली होती. व सदाशिवापेक्षां हे लोक इंग्लिशांच्या अमलांत मोठ्या बढत्या अवस्थेंत होते; तथापि त्यांतून एकानेंही इंग्लिश भाषेचें ज्ञान यांच्याप्रमाणें संपादन केलें नाहीं. म्हटलें असतां सदाशिवापेक्षां त्यांस ही भाषा शिकण्याच्या अधिक सोई होत्या. इतर ज्ञातींपेक्षां ब्राम्हण यांची बुद्धिमत्ता व उद्योगीपणा विशेष हें यांच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसून येतें. त्यांणीं या परदेशी भाषेचें इतकें सूक्ष्म व शुद्ध ज्ञान केवळ आपल्या बुद्धिकौशल्यानें व श्रमानेंच संपादन केलें. यांत अगदीं संशय नाहीं. म्हणून हे विशेषेंकरून आतां आपल्या स्तुतीस पात्र होत. मी इंग्लिश स्कुलांत असतां, हे गृहस्थ आमच्या वर्गांत केव्हां केव्हां स्वसं

---

१ हा ग्रंथ संवादरूपानें असून यांत २५ संवाद आहेत. याचीं पृष्ठें ४८० आहेत. 'रसायनशास्त्रविषयक संवाद' असें याचें नांव आहे. हा ग्रंथ मुंबई पुणें येथील ग्रंथसंग्रहालयांत आहे.

२ यांचा **देशव्यवहारव्यवस्था** म्हणून एक छोटासा निबंधही छापलेला आहे (१८५१). मार्सेट व मिल यांच्या ग्रंथाधारें हा अर्थशास्त्रविषयक ग्रंथ लिहिला आहे. हरि केशवजी यांनीं १८३८ मध्यें 'इग्लंडचा वृत्तांत' हा सोपा लहान ग्रंथ (पृ. सं. २८२) प्रसिद्ध केला. हा मुंबईचे गव्हर्नर Sir Robert Grant यांस अर्पण करतांना 'पूना कॉलेज'ला स्थिर पाया देऊन विद्येस उत्तेजन दिल्याबद्दल त्यांचें गौरव केलें आहे. १८४१ त Pilgrim's Progress ह्या ग्रंथाचें त्यांनीं 'यात्रिकक्रमण' नांवानें भाषांतर केलें आहे. त्यांत कित्येक कविताही आहेत. १८४६ मध्यें त्यांनीं Chamber's Moral Class Book याचें नीतिग्रंथ म्हणून भाषांतर केलें.

तोषानें येऊन, आम्हांस इंग्लिश पुस्तकांचा मराठींत अर्थ समजावून देत असत. पुढें यांहीं एक Wisdom is (in?) miniature या नांवाचें लहानसें इंग्लिश पुस्तक छापवून त्याचा अर्थ हे आह्मांस मोठ्या हौसेनें सांगूं लागले. **प्रसिद्ध बाळ गंगाधर शास्त्री हे यांचेच विद्यार्थी** मला पक्कें माहीत आहे कीं, बाळशास्त्री हे त्या काळीं अल्पवयी असतांही त्यांस त्यांचे विद्वत्तेवरून सर्व इतर लोक बाळशास्त्रीबावा म्हणोन हाका मारीत. आणि हे सदाशिव त्यांस बाळू असें एकेरी शब्दानें हाका मारीत असत. बाळशास्त्र्यांचे तीर्थरूप गंगाधरशास्त्री जांभेकर यांजकडेस आश्रितांप्रमाणें असत. त्यांहीं आपला मुलगा येथें आणिल्यावर बापू छत्र्ये (सदाशिवाचें घरगुती प्रसिद्ध नांव) यांनीं त्यांस आपल्या जवळ ठेवून त्यांजकडून इंग्लिश भाषेचा अभ्यास करविला.

नाना नारायण शेट.

त्या शाळेंत नाना नारायण हा मुलगा होता. हा नारायण शेट पिंगळे शिंपी जातीचे मोठे शेट होते त्यांचा नातू. याचा माझा चांगला स्नेह जमला. हा मोठा बुद्धिवान् व उद्योगी असे. एखादे विषयांत मन घातलें ह्मणजे खोंचून त्याचा विचार करण्याची याची बुद्धि असे. म्हणून गणितांत याचा नंबर वर असे. कठीण समीकरणाचीं उदाहरणें याणें केव्हां केव्हां आमच्या अगोदर चमत्कारिक रीतीनें सोडवावीं. याच्या बुद्धीची तेव्हां फार वाहवा होती. इंग्लिश भाषेंत प्रथम चांगला अभ्यास करून देण्यांत याणें मला फार मदत केली.

बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर.

हे त्या शाळेंत विद्यार्थ्यांच्या मंडळांत अग्रगण्य होते. हे मला आपल्या घरीं संध्याकाळीं बोलावून तेथें स्पेक्टेटर व रँबलर यांचे अर्थ सांगत. आमचे इंग्रजी शिक्षक मर्फे साहेब त्यांचे जागीं मेनवेअरिंग आले. मर्फे साहेब त्या वेळेस मराठी भाषेंत फार निपुण असत. त्यांस ही भाषा शिकण्याचें कांहीं साधन नसतां फकत आपल्या श्रमानें व बुद्धिकौशल्यानें त्यांणीं ही भाषा हस्तगत केली म्हणून त्यांचा मोठा चहा होऊन त्यांस मराठीचे मुतरजिम (Interpreter) नेमलें. पहिल्या वर्गांत हरिश्चंद्र हरिशंकर, बाळ गंगाधर शास्त्री, मोरोबा कान्होबा व जनार्दन आप्पाजी गाडगीळ हे असत. मीही लवकरच या वर्गांत आलों. १८२९।३० या सालीं या शाळेंत मोठा फेरफार झाला. सदाशिव काशिनाथ छत्रे यांनीं पेन्शन घेतलें व त्यांचे जागेवर बाळ गंगाधर शास्त्री यांची ५० रुपये दरमहावर नेमणूक झाली. तसेंच सोसायटीचे सेक्रेटरी जर्व्हिस साहेब हे पुण्यास गेले व त्यांचे जागीं रॉबर्ट कॉटन मर्नी हे आले. ह्यांची मुखचर्या कोमळ असे व नजर तोकडी असे म्हणून ते नेहमीं चष्मा घालीत. यांचे सांगण्यावरून इ.स. १८३१।३२मध्यें बाळ गंगाधर शास्त्री यांहीं History of Englandचें मराठींत 'इंग्लंडचा इतिहास'* म्हणून भाषांतर केलें. इ.स १८२९मध्यें जर्व्हिस साहेबांनीं बाळ गंगाधर शास्त्री, जगन्नाथशास्त्री क्रमवंत व बाळशास्त्री घगवे यांच्या साह्यानें ब्राउघ्याम (Brougham) चा जो ग्रंथ (A Treatise on the object, advantages and pleasures of knowledge) त्याचें मराठींत व पुढें गुजराथींत भाषांतर केलें व त्याचें नांव "**विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष**" असें ठेविलें. हा ग्रंथ साताऱ्याचे महाराज प्रतापसिंह राजे छत्रपति यांस आदरानें नजर केला होता. हा ग्रंथ मराठींत फारच प्रौढ व सुरस झाला होता असें असतां याची दुसरी आवृत्ति कधीं झालीच नाहीं! असे सरस प्रौढ ग्रंथ आज इतकी विद्या वाढली आहे तथापि फारसे पाहण्यांत येत नाहींत. असा मागल्या ग्रंथकाराचें नांव, त्याची कृति, यांस बुडवि-

*१. यांनीं लहान मुलांसाठीं बालव्याकरण, भूगोलविद्या, नीतिकथा व सारसंग्रह अशीं चार पुस्तकें लिहिलीं.

२ त्याचप्रमाणें 'हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास' अथवा मुसलमानी अंमल यावर शास्त्रीबोवांनीं लिहिलेलें पुस्तक कित्येक वर्षें शाळांतून शिकवीत असत. याची दुसरी आवृत्ति १८५५ मध्यें कँडी साहेबांनीं छापली.

३ History of British India (हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास) हा मराठी ग्रंथ बाळ शास्त्री यांनीं मराठी भाषेंत केला, त्याची दुसरी आवृत्ति १८५४ मध्यें मेजर कँडी (पाठशाळेचे सुपरिंटेंडेंट) यांनीं छापला.

ण्याच्या बुद्धीस इतक्यांतच आरंभ झाला ! तसेंच मोल्स्वर्थ व कँडी यांच्या हाताखालीं जे पंडित होते त्यांनीं दोन मोठ्या पुस्तकांत मराठी कोश तयार केला आणि तो सुंदर शिलाछापावर छापिला त्यावरून त्या साहेबांनीं मराठी कोश तयार केला तो प्रसिद्ध आहेच, परंतु पंडितांचा कोश कोठें दिसेनासा झाला ! ! हें मोठें अद्भुत कृत्य मराठी भाषेंत त्या वेळेस झालें ! परंतु अशा कृत्याचे गुणग्राहक पुढें कोणी झालेच नाहींत.

* * *

पुढें बाळशास्त्री यांनीं अक्कलकोटच्या दोन धाकट्या राजांस इंग्रजी शिकविण्याचें काम २०० रुपये पगारावर वर्ष दीड वर्ष केलें व १८३४ मध्यें एल्फिन्स्टन साहेबांच्या नांवानें तीन लाख रुपये जमवून जी मोठी विद्याशाला (Elphinstone College) उभी केली, तिच्यांत प्रो. मुलर व प्रो. हार्कनेस ह्या पहिल्या गुरूंच्या हाताखालीं उपगुरूचें काम करण्यास ते परत मुंबईत आले. सोसायटीची शाळा हें नांव बदलून त्यास एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन असें नांव देण्यांत आलें.

* * *

पुढें बाळशास्त्र्यांनीं Differential & Integral Calculus ह्मणजे 'शून्यलब्धि गणीत' मराठींत तयार केलें. हा त्यांचा शेवटचा ग्रंथ.

* * *

बाळशास्त्री हे मूळचे राजापूर प्रांतीं पोंबुर्ले गांव आहे तेथले राहणार. यांचे बाप चांगले व्युत्पन्न भिक्षुक असत. त्यांहीं आपल्या मुलास चांगली काव्यव्युत्पत्ति करून दिली होती. त्यांस सदाशिव काशिनाथ ऊर्फ बापू छत्रे फार मानीत असत. बापू छत्र्यांच्या सांगण्यावरून गंगाधर शास्त्री यांणीं आपला मुलगा बापूकडेस इंग्रजी शिकण्याकरितां ठेविला. त्यांहीं त्या मुलाची अल्पवयांत थोर बुद्धि पाहून त्यास सोसायटीच्या इंग्रजी शाळेंत अभ्यासाकरितां ठेविलें. दिवसास इंग्लिश शिकावें व संध्याकाळीं आमचे गुरु बापूशास्त्री शुक्ल यांच्या बिन्द्वाडीं कौमुदीची पोथी घेऊन तेथें पढावयास जावें. असा मी लहानपणीं त्यांचा क्रम पाहत असें. रॉबर्ट मनी साहेबांनीं बाळशास्त्र्यांकडून गोल्डस्मिथच्या इंग्लंडच्या इतिहासाचें मराठी भाषांतर करवून तें शिळाप्रेसवर छापलें.

* * *

बाळशास्त्री यांनीं इ. स. १८३४ मध्यें सहज बोलतांना आपल्या द्वितीय संबंधाची गोष्ट सांगितली. आपलें नवें कुटुंब प्रसिद्ध मोरोपंत कवि यांच्या आप्तवर्गांतलें आहे असें ते मोठ्या संतोषानें म्हणाले.

* * *

ते मुंबईस आल्यावर प्रो. आर्लिबार यांजपाशीं गणितशास्त्र शिकले. बाळशास्त्री यांची कुशाग्र बुद्धि पाहून प्रो. साहेब त्यांची फार तारीफ करून होते.

बाळशास्त्री यांणीं एक मोठें स्मरणीय काम केलें तें असें. त्या वेळेस मुंबईत मराठी व इंग्रजी भाषेंत नेटिव्ह लोकांनीं चालविलेलें असें एकही वर्तमानपत्र नव्हतें. तेव्हां एकदोन पैकेवाले गृहस्थ मिळून दर्पण या नांवाचें मराठींत व इंग्रेजींत वर्तमानपत्र काढण्याचें योजिलें व त्याचे बाळशास्त्री यांस एडिटर नेमिले. शास्त्रीबोवांनीं तें काम मोठया मनोत्साहानें कांहीं दरमहा न घेतां पत्करिलें. त्या वर्तमानपत्राने त्यांची मोठी कीर्ति वाढविली व त्या वेळचे गव्हर्नर सर जेम्स् कार्नाक यांहीं त्यांच्या लिहिण्यावरून खूष होऊन त्यांस 'जस्टिस् ऑफ धी पीस' ही पदवी दिली. ही पदवी तेव्हां थोडया पैकेवाल्या नेटिवांसच मिळत असे. आतां बाळशास्त्री यांची मुंबईतील बडे लोकांत गणना झाली. त्या काळीं जमशेटजी जिजीभाई, फ्रामजी कावसजी, जगन्नाथ शंकर शेट, देवीदास मनमोहनदास व बमनजी वाडिया एवढेच 'जे.पी.' होते व त्यांचा सरकार दरबारीं व इतर ठिकाणीं मोठा मान होता. आतांप्रमाणें (म्ह० सन १८७०) जो उठला तो आणि ज्याची सरकाराशीं थोडी शीग तो असे भाराभर जस्टिस तेव्हां होत नव्हते !

बाळशास्त्री हे काळे, ठेंगण्या बांध्याचे पुरुष होते. त्यांचे नेत्र विशाळ आणि चंचळ होते. ते गंभीरप-

१ याशिवाय 'दिग्दर्शन' नांवाचें एक मासिकही ते कांहीं वर्षे चालवीत होते.

णानें नेहमीं खालीं पहात असत. ते अल्पवयी असत तरी त्यांची चाल पोक्तपणाची होती.

बाळशास्त्री हे प्राचीन लेखांचा शोध लावण्याकरितां कणकेश्वरास गेले होते. तेथें त्यांस उष्णता लागून ताप आला व ते दुखणाईत झाले व त्यां दुखण्यांत इ. स. १८४६ च्या एप्रिलांत ते मुंबईत कोळभट वाडींतील आपल्या राहत्या घरांत निवर्तले.

* * *

यशोदेचा मृत्यु.

१८३४ च्या कार्तिक शु (॥ ११ स आमची अत्यंत प्रेमळ आई यशोदा १५ वें बाळंतपण मोठ्या कष्टानें होऊन ती परलोकास गेली. तेव्हां मी फार शोकविव्हळ झालों. सपिंडीकरण त्रयोदशाहपर्यंत सर्व विधि झाला. बाळशास्त्री माझ्या समाचारास आले. माझी आई मोठी साध्वी असून गुणांनीं फार चांगली होती आणि मनाची मोठी उदार होती. तिणें आपल्या शक्तीप्रमाणें आपल्या गरीब बहिणभावांचा व सोयऱ्याधायऱ्यांचा समाचार घ्यावा. सर्व पुरुषबायकांनीं आमच्या तीर्थरूपास व मातुश्रीस शिवपार्वतीचा जोडा असें ह्मणावें.

* * *

१ शास्त्रीबोवा मोठे शोधकही होते. ' बाँबे ब्रँच ऑफ धि रॉयल एशिआटिक सोसायटी ' व ' जिऑग्रॅफिकल सोसायटी ' या संस्थांचे सभासद म्हणून त्यांनीं कित्येक शोधही लावले होते. प्राचीन ताम्रपट, शिलालेख, भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र यांवर त्यांनीं कांहीं निबंध वरील मासिकांत छापले होते. (१) गिरनार व (२) खारेपाटण येथें सांपडलेल्या काळ्या दगडावरील शिलालेखांचीं इंग्रजी भाषांतरें; (३) नागपूर येथील शिलालेखाची नक्कल व भाषांतर; (४) मालवणच्या लोखंड सांपडणाऱ्या मातीची हकीकत; (५) सातारा व नांदगांव येथील दोन ताम्रपट; (६) कोल्हापूर येथें सांपडलेल्या शके ६७५ मधील ताम्रपटाचें भाषांतर व (७) कोल्हापूर येथील सात ताम्रपटांचीं भाषांतरें वगैरे निबंध शास्त्रीबोवांनीं बाँ. ब्रँ. रॉ. ए. सो.चे सभांतून वाचले होते.

घनश्यामबावा सोनगीरकर.

हे संत बावा आमच्या तीर्थरूपांचे गुरु होत. त्यांनीं यांचा अनुग्रह माझा जन्म होण्यापूर्वींच घेतला होता. यांची इ. स. १८३१ तली मुंबईची चवथी खेप असावी. हे सखाराम बावा अंमळनेरकरांचे शिष्य होते. यांची कीर्तनाची शैली फार मौजेची होती. हे उच्चस्वरानें गायन व कीर्तन करीत. श्रोत्यांच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न करण्याची हातवटी यांस चांगली साधून गेली होती. त्यांत आणखी हे औदिच जातीचे गुजराथी ब्राम्हण असल्यानें गुजराथी भाषेंतही कीर्तन करीत या कारणानें प्रेमळ गुजराथी वाणी लोक यांच्या कीर्तनास पुष्कळ येत असत. आणि ते लोक द्रव्यवान् असल्यानें यांस चांगली भरपूर बिदागी मिळत असे. हे गुजराथी ब्राम्हण होते, हें कोणास अगदीं समजत नसे. कारण, हे महाराष्ट्र भाषा देशस्थ ब्राह्मणाप्रमाणें शुद्ध बोलत असत व मी गुजराथी आहें असें ते कोणास भासूं देत नसत. घरांत बायकांचा वगैरे लिबासही महाराष्ट्र लोकांप्रमाणें असे. ह जवळची मंडळी सर्व देशस्थ ब्राह्मणासारखीच असे. सन १८२० त जेव्हां हे मुंबईत आले तेव्हां आमचे तीर्थरूप गरीब अवस्थेंत असतांही त्यांणीं त्यांच्या मागितल्यावरून एक भर्जरीचा आंगरखा त्यांस करून दिला होता, व त्यांतील थोडा कापडाचा तुकडा उरला होता त्याचा आमच्या तीर्थरूपांनीं मला लहानसा अंगरखा केला होता. तो पुढें मी पांच सहा वर्षें मोठ्या दसऱ्यादिवाळीसारख्या सणांत घालीत होतों. आमचे तीर्थरूप आम्हांस लहानपणीं सांगत होते कीं, जेव्हां तो माझा लहान अंगरखा तयार झाला तेव्हां घनश्यामबावानें तो आपल्या बसावयाच्या घोड्याच्या पाठीवर घालून मग प्रासादिक म्हणून तीर्थरूपास दिला. जेव्हां दुसऱ्या वर्षी माझी मुंज झाली आणि तो अंगरखा म्या घातला तेव्हां आमच्या घरांतलीं माणसें असें ह्मणूं लागलीं कीं हा घनश्यामबावाचा प्रसाद ह्मणून पुढल्याच वर्षी मला त्या अंगरख्यानें सोडमुंजीच्या वेळेस घोड्यावर बसविलें. त्या खेपेस हे बावा मुंबईत अगियारी रस्त्यावर रघुनाथ वालजीचा भाई या नांवाच्या एका परभाच्या घरीं माडीवर उतरले होते. हा परभु गृहस्थ–ज्यास भाई म्हणत–तो त्या बावाचा

मोठा शिष्य होता. म्हणजे मुंबईंत जी इतर मंडळी शिष्य असे त्यांत हे गृहस्थ त्या काळीं थोडे पैसेवाले असून त्यांनीं गुरूच्या सेवेंत आपलें पुष्कळ द्रव्य खर्चिलें, असें त्या वेळीं लोक ह्मणत होते. मी सात आठ वर्षांचा असतां मला माझे तीर्थरूप केव्हां केव्हां यांच्या घरीं नेत असत, तेव्हां मी त्यांस पाहिल्याचें आतां मला स्मरण आहे. ते पाताणे परभू असून वैष्णवांप्रमाणें कानसलावर मुद्रा लावीत असत व असें पाहीं कीं निरंतर यांच्या एथें प्राकृत पोथ्या लिहून घेण्याचा मोठा कारखाना असे. सतत एक दोन लेखक यांणीं कित्येक वर्षे ठेविले होते व त्यांच्या हातून पुष्कळ प्राकृत ग्रंथ सुंदर अक्षरांनीं सुंदर कागदावर लिहून मोठ्या फरम्याचे सांचे करून त्यास वरखालीं जरीच्या बुट्यांचीं पुष्टिपत्रें लावून वर लोखंडाच्या फळ्या त्याच सांच्याच्या ठेवून तीं रुमालांत लांब फितींनीं बांधून मोठ्या जतनेनें तयार करीत. हे गृहस्थ ग्रंथांचे फारच शोकी असत. स्वतः कागदाचे सांचे कापावे, देशिच्या फळ्यावर रेखाटावे, त्यांच्या समासावर वेलबुट्या काढाव्या इतकें काम हे स्वतः करीत असत. यांचा कित्ता घेऊन आमच्या तीर्थरूपांनींही आपल्या शक्तीप्रमाणें बराच प्राकृत ग्रंथांचा संग्रह केला होता. प्रसिद्ध हरिविजय, पंढरीमाहात्म्य, शिवलीलामृत हे ग्रंथ त्यांणीं माझ्या जाणतेपणाच्या अगोदर पूर्वींच लिहून ठेविलेले होते; व मी जेव्हां सुमारें दहा बारा वर्षांचा होतों तेव्हां त्यांणीं भक्तिविजय व दासबोध हे ग्रंथ लिहविले.

* * *

उपसंहार.

दादोबांच्या आत्मचरित्रांतील महाराष्ट्र वाङ्मयाच्या दृष्टीनें जेवढा महत्त्वाचा भाग मला आढळला तेवढा मी त्याचें मथन करून काढला व तो मराठी भाषाभिमान्यांपुढें ठेवला आहे. पुढील भागांत दादोबांचें खाजगी चरित्र आलें आहे. त्यांत त्यांच्या नैकरीची, प्रवाभाची व संसाराची हकीकत असून सार्वजनिक महत्त्व त्यांत फारसें नाहीं म्हणून ती लोकांपुढें ठेवण्याची मला तादृश आवश्यकता वाटत नाहीं. मराठी भाषेच्या गद्याच्या उत्पत्तीचा व वाढीचा इतिहास लिहिणारास या प्रकरणाचा बराच उपयोग होईल अशी मला उमेद आहे. मराठी गद्याच्या आरंभींच्या काळांत बाळशास्त्री जांभेकरांची कामगिरी विशेष महत्वाची आहे. मराठी गद्याच्या उदयकाळांत ग्रंथकाराचा बहुतेक भर इंग्रजी ग्रंथांचीं मराठी भाषांतरें करण्यावरच होता हें साहजिक आहे. स्वतंत्र ग्रंथांस निबंधमालेपासून आरंभ झाला असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

टीप—वरील लेख छापतांना चुकून जीं अशुद्धें राहून गेलीं त्यांची दुरुस्ती खालीलप्रमाणें करावी:—

पान	कॉलम	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२७३	१	२४	मिळत	मिळाली
,,	,,	३३	होते	होय
,,	२	३	नाहीं,	नाहींच,
,,	,,	२४	प्रसार नव्हता	प्रसार झाला नव्हता
,,	,,	२८	त्यांच्या	यांच्या
२७४	१	१७	पुढें एल्फि०	पुढें पर्यवसान एल्फि०
२७५	,,	,,	१७१६	१७३६
,,	२	११	झालीं	झालों
२७६	१	३३	त्याचा पुष्कळ	त्याचा मी पुष्कळ
,,	२	१५	शुन...... सुणें	सुन......सुन
,,	,,	२४	कवींनीं	कवीनें
२७८	१	५	गुलाल,कोणी धूळ घालून	गुलाल, घालून

महाराष्ट्र वाङ्मयाची अभिवृद्धि.

(लेखक–रा. दामोदर कृष्ण करंदीकर, बी. ए., एल् एल्. बी.)

महाराष्ट्र वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठीं हल्लीं बरेच प्रयत्न चालू आहेत. बरींच पुस्तकें, मासिक पुस्तकें, वगैरे प्रसिद्ध होत आहेत. एकंदरीनें ह्या बाबतींतली प्रगति बरीच समाधानकारक आहे. तरी ह्यासंबंधाच्या कांहीं सूचना संमेलनापुढें मांडाव्या असें वाटल्यामुळें तसें करीत आहें. त्यांचा विचार व्हावा.

मराठींतल्या वाङ्मयाची जोरानें, व्हावी तशी, वाढ न होण्याला, अनेक कारणें आहेतः–(१) मराठी ही राजभाषा नाहीं. त्यामुळें तिच्या अध्ययनाला असावा तितका मान नाहीं. (२) हिंदुस्थान एक राष्ट्र आहे, ही कल्पना जोरानें पसरत आहे; निरनिराळ्या प्रांतांतल्या लोकांत दळणवळण वाढत आहे; त्यामुळें सर्वांस समान अशा भाषेची आवश्यकता जास्त वाटत आहे. (३) उच्च शिक्षण घेणारांना तिसरी एक भाषा शिकावी लागते. (४) उच्च शिक्षण इंग्रजींतच दिलें जातें, व तें तसें देणें, शिक्षक व पुस्तकें ह्यासंबंधाच्या सोईमुळें, सोपें जातें. देशी भाषा अनेक, ही मोठी अडचण आहे. पुष्कळ उत्तमोत्तम ग्रंथ इंग्रजी भाषेंत—पुष्कळ उत्तम अध्यापक देशी भाषा न जाणणारे–हीही मोठी अडचण आहे. (५) पूर्वींच्या संस्कृत पंडितांप्रमाणें पुष्कळ नवीन विद्वानांची देशी भाषांविषयीं सामान्यतः अनास्थाच असते. आपसांत बोलतांना देखील इंग्रजीचा उपयोग करतात. पत्रव्यवहार देखील तींतच होतो ! इंग्रजीचा सराव वाढविण्यासाठीं तसें करणें एका दृष्टीनें जरूरही असतें ! (६) पुस्तकें तयार करण्यास योग्य उत्तेजन मिळत नाहीं. (७) तीं तयार केलीं तर छापण्यासंबंधानें व खपविण्यासंबंधानें मोठ्या अडचणी असतात. (८) कोणकोणतीं व कसकशीं पुस्तकें होणें इष्ट आहे ह्याचें पुष्कळांना नीट ज्ञान नसतें.

ह्यास्तव पुढील तजविजी जरूर वाटतात. (१) उच्च शिक्षण घेणारांना तिसरी भाषा आवश्यक नसावी. (२) उच्च शिक्षण देशी भाषांत देण्याची व्यवस्था व्हावी. इंग्रजीचा तेवढा अभ्यास इंग्रजींत व्हावा. (३) आपसांतला व्यवहार शक्य तितका मराठींतच करावा. (४) प्रत्येक सुशिक्षितानें एक तरी मराठी ग्रंथ तयार करण्याचा निर्धार करून तो तडीस न्यावा. फुरसत पुष्कळ असते. स्वतंत्र ग्रंथ तयार करवत नसेल तर भाषांतर करावें. पुष्कळ ग्रंथ त्या कामालायक आहेत. तेंही होत नसेल तर एखाद्या ग्रंथाचा संकलितपणें सारांश तरी काढावा.

नवे ग्रंथ तयार करण्याविषयीं व त्यांच्या प्रकाशनाविषयीं सूचना.

(१) साहित्य–परिषदेनें निरनिराळ्या विषयांत प्रवीण अशा गृहस्थांच्या कमिट्या नेमाव्या.(२) त्यांनीं आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचें निरीक्षण करून, यापुढें कोणकोणते ग्रंथ होणें जरूर आहे त्यांची यादी तयार करावी.कोणते स्वतंत्र विवेचनात्मक,कोणते भाषांतरात्मक,कोणते सारांशरूप,–अशा प्रकारच्या पोट-यादी कराव्या. (३)अल्प किमतीला प्रत्येक पुस्तक ज्यांपैकीं मिळेल, अशा निरनिराळ्या विषयांवरच्या माला नियमितपणें प्रसिद्ध होण्याची व्यवस्था व्हावी.(४) उपयुक्त ज्ञान अगर बोध प्राप्त करून देणें, हें त्यांसंबंधाचें मुख्य ध्येय आहे हें ध्यानांत ठेवावें. (५) सध्या चरित्रांची व वर्णनपर ग्रंथांची बरीच जरूर आहे. लोकांना कादंबऱ्या व नाटकें वाचण्याची विशेष गोडी असते, व ती तशी साहजिकपणें असणारच. सबब तीं लिहिण्याकडे जास्त प्रवृत्ति असते. त्या कामीं योग्य खबरदारी घेणें जरूर आहे. मनोरंजन करतांना,मनाचा बिघाड होण्याचा संभव आहे कीं काय, तें मुख्यत्वें पाहिलें पाहिजे. (६) पुष्कळदां उपयुक्त विषयावर एखादा लेख लिहिण्याची इच्छा होते. पण तो कोठें छापावयाचा ही मोठी पंचाईत पडते. वर्तमानपत्रांत स्थळ मिळूं शकतें. पण त्याला पाहिजे तितकें चिरस्थायित्व नसतें. मासिक पुस्तकांत ओळखीशिवाय स्थळ मिळत नाहीं, निदान फार अडचण तरी पडते, असा अनुभव आहे. (७) ज्या ज्या ग्रंथांची गरज भासेल त्यांची यादी दरसाल प्रसिद्ध करावी, व ते करून देण्याबद्दल योग्य बक्षिसें जाहीर करावीं. ते तयार

होऊन आल्यावर, तपासण्यासाठीं लायक गृहस्थांच्या कमिट्या नेमाव्या. पसंत झालेल्या ग्रंथांस बक्षिसें दिल्यावर, त्यांवर तयार करणारांची मालकी राहूं नये.

(८) प्रकाशनाच्या कामासाठीं एक समाईक भांडवलाची मोठी कंपनी स्थापन करावी. पुष्कळ ग्रंथकर्त्यांना व लेखकांना, ग्रंथ छापविण्याची व खपविण्याची खटपट होत नाहीं, व ऐपत नसते. त्यांना योग्य मोबदला मिळाला तर ते खुषीनें आपले ग्रंथांवरचे हक्क सोडून देतील. अशी व्यवस्था झाली तर इकडेही, युरोप-अमेरिकेंतल्याप्रमाणें, लेखन हा एक किफायतशीर स्वतंत्र धंदा होईल, व अनेक लहान मोठे उपयुक्त ग्रंथ दरसाल तयार होतील.

विशेष खुलासा.

(अ) माला प्रसिद्ध व्हाव्या त्या येणेंप्रमाणें:—

१ चरित्रमाला.
२ इतिहासमाला (नियमित काल अगर प्रसंग.)
३ शास्त्रीय ज्ञानमाला.
४ बोधपर गोष्टींची माला.
५ उत्तमोत्तम उताऱ्यांची माला (टिपांसह.)

(ब) मोठमोठे ग्रंथ तयार करवतांना, वाचकांच्या मनांत शोधकबुद्धि, सत्यप्रीति, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, सतत उद्योग, साहस, राजनिष्ठा, देशभक्ति, प्रवासप्रीति, सृष्टिसौंदर्य-दर्शन-लालसा, वगैरे उच्च गुणांचें बीजारोपण होऊन, त्यांचें नीट संगोपन होईल, असे उद्देश पुढें ठेवणें जरूर आहे.

(क) प्रकाशक मंडळी एक सुव्यवस्थित व नियमितपणें प्रसिद्ध होणारें मासिक पुस्तक प्रसिद्ध करील तर फार उत्तम होईल. त्यांत पाहिजे त्याला आपले लेख पाठवितां यावे, व ज्यांचे लेख प्रसिद्ध होतील त्यांना (ज्यांना अपेक्षा असेल त्यांस) योग्य द्रव्यरूप देणगी देण्याची व्यवस्था व्हावी. अशी व्यवस्था झाली तर पुष्कळांना उपयुक्त विषयांवर मराठींत लेख लिहिण्याला हुरूप येईल.

हल्लीं वाङ्मयवृद्धीसाठीं प्रयत्न चालू नाहींत असें नाहीं. पण ते असावे तितक्या मोठ्या प्रमाणावर व सुव्यवस्थित नाहींत. युरोप व अमेरिका ह्यांतला लेखकवर्ग केवढा आहे, त्याला प्राप्ति किती होते, तिकडे केवढाल्या प्रकाशक मंडळ्या आहेत तें पहा, व त्यांची इकडल्या स्थितीशीं तुलना करा, ह्मणजे मी म्हणतों त्याची सत्यता पटेल. आणखी एकच गोष्ट लिहून आपली रजा घेतों. ग्रंथांची योग्यता त्यांच्या आकारावर नसते-त्यांच्या गुणांवर असते. एकेकदां वाचून झाल्यावर टाकून देण्याच्याच लायकीचे ग्रंथ होऊन उपयोग नाहीं. केवळ मनोरंजक ग्रंथांचीच मुख्यत्वें अपेक्षा नाहीं. ज्या ग्रंथांनीं लोकांच्या ज्ञानांत भर पडेल, ज्यांनीं लोकांच्या विचारसरणीला योग्य व हितपरिणामी वळण लागेल, जे वारंवार वाचावे असें वाटेल, असेच सरळ व सोप्या भाषेंत लिहिलेले ग्रंथ पाहिजे आहेत, व ते माफक किमतीला लोकांना मिळणेंही अवश्य आहे. असे ग्रंथ तयार होण्याला योग्य उत्तेजन मिळून, प्रकाशनाच्या संबंधाच्या अडचणीही दूर झाल्या पाहिजेत.

नवीन ग्रंथकारांस उत्तेजन देण्याचे मार्ग.

(लेखक—रा. हणमंत बा. अत्रे, बी. ए.)

या विषयासंबंधानें सूचना करण्यापूर्वी मुंबई इलाख्यांतील मराठी वाङ्मयाची स्थिति काय आहे याचा थोडा विचार करूं. सुमारें ३० वर्षांपूर्वी जितकीं वर्तमानपत्रें, मासिकें, ग्रंथकार व ग्रंथप्रकाशक होते त्या मानानें सध्यां या बाबतींत पुष्कळच प्रगति झाली आहे, ही गोष्ट सकृद्दर्शनीं बहुतेक सर्वांस मान्य होण्यासारखी आहे. वर्तमानपत्रें, मासिकें, व ग्रंथकार वगैरे जर वाढत्या प्रमाणावर आहेत तर लोकांस या गोष्टींची अभिरुचि लागली आहे असें म्हणणें भाग आहे. आणि ही गोष्ट कबूल केली तर ग्रंथकारांस उत्तेजन देण्याचे मार्ग शोधून काढण्याची खरोखरीच आवश्यकता आहे कीं काय, हा प्रश्न पुढें उभा राहतो.

कोणताही पदार्थ पहिल्यापेक्षां जास्ती प्रमाणावर मिळूं लागला म्हणजे त्या पदार्थाची लोकांस अधिक गरज लागूं लागली आहे असें आपण साधारणतः समजतों. आणि या कसोटीनें या प्रश्नाचा विचार करूं लागलों तर लोकांमध्यें वाचनाची गोडी अधिक उत्पन्न झाली आहे व विद्येचा प्रसार दिवसेंदिवस अधिकाधिक होत चालला आहे असें आपणास म्हणावें लागतें. पण ही वरवर पाहणारांची व शहरांची स्थिति झाली. गेल्या खानेसुमारांच्या आंकड्यांवरून या बाबतींत कांहीं पुरावा मिळून या विधानाचें पुष्टीकरण होतें कीं काय तें पाहूं.

२. मराठी भाषा बोलणारांची विशेष संख्या कोंकणांत, दक्षिणेंत व कर्नाटकांत आहे. कोंकणांत कानडा, कुलाबा, रत्नागिरी व ठाणें यांचा समावेश होतो, व दक्षिणेंत अहमदनगर, खानदेश (पूर्व व पश्चिम), नाशिक, पुणें, सातारा व सोलापूर हे येतात. कर्नाटकांत बेळगांव, विजापूर व धारवाड हे येतात. १०,००० लोकसंख्येच्या मानानें पुणें, सातारा, कुलाबा, व रत्नागिरी या जिल्ह्यांत ९००० वर मराठी भाषा बोलणारांची वस्ती आहे. कर्नाटक खेरीज करून इतर ठिकाणीं मराठी बोलणारांची संख्या ८००० अथवा त्याहून कांहीं कमी अशी आहे. बेळगांव जिल्ह्यांत २४९१, विजापुर जिल्ह्यांत ३६५, व धारवाडांत ४०१ हें प्रमाण आहे. सर्व मुंबई इलाख्याची सुमारें २ कोटी ७० लक्ष वस्ती आहे; त्यांपैकीं सुमारें १ कोटी ७ लक्ष मराठी बोलणारांची संख्या आहे.

१९०१ च्या व १८९१ च्या खानेसुमारींत मराठी वर्तमानपत्रांची संख्या अनुक्रमें ६८ व ६७ होती, व गेल्या खानेसुमारींत इंग्रजी–मराठी वर्तमानपत्रांची संख्या ६ होती व निवळ मराठी पत्रांची ५४ याप्रमाणें एकूण ६० होती. या ६० पत्रांपैकीं फक्त चारच पत्रांचा खप २५०० प्रतींहून अधिक आहे.

गेल्या १० वर्षांत एकंदर १९८९ मराठी पुस्तकें प्रसिद्ध झालीं; त्याच्या मागच्या १० वर्षांत १८०२ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. गुजराथी पुस्तकांच्या मानानें हे दोन्हीही आंकडे कमी आहेत, कारण गेल्या व त्याच्या मागच्या खानेसुमारींत गुजराथी पुस्तकांची संख्या अनुक्रमें २९३७ व २५३९ अशी होती.

३. ही महाराष्ट्रभाषाप्रधान मुंबई इलाख्याची गोष्ट झाली. शिक्षणांत मागसलेल्या हैदराबाद संस्थानासारख्या प्रांताची स्थिति काय आहे ती आतां पाहूं. गेल्या १० वर्षांत एकंदर ९३३ पुस्तकें या राज्यांत प्रसिद्ध झालीं. पण त्यांपैकीं ८८३ उर्दू होतीं व तींही शेवटच्या तीन वर्षांत प्रसिद्ध झालीं होतीं. इतर देशी भाषांपैकीं तेलगूंत १४, मराठींत २, व कानडींत १, याप्रमाणें पुस्तकें प्रसिद्ध झालीं. १९०१ च्या खानेसुमारींत एकंदरींत १६९ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. पण त्यांत मराठी भाषेंत लिहिलेलें फक्त एकच पुस्तक होतें.

खुद्द हैदराबाद शहरीं मराठी भाषा बोलणारे लोक १६५८७ आहेत; पण १९०१ च्या खानेसुमारींत ते १८५६३ होते. म्हणजे त्यांची संख्या या खेपेला १९७६ नीं कमी झाली आहे. या राज्यांतील एकंदर १ कोटी ३३लक्ष प्रजेपैकीं ३४ लक्ष ९८ हजार ७ शें ५८ मराठी भाषा बोलणारे आहेत. पण त्यांतही १९०१-मध्यें दरहजारीं ‘ शिकलेल्यांचें ’ प्रमाण १.१३ होतें, व १९११ त १.५ होतें.

४. याप्रमाणें महाराष्ट्रभाषाप्रधान इलाखा, व विद्येंत मागसलेला हैदराबाद प्रांत यांच्या आंकड्यांवरून मराठी वाङ्मयाची स्थिति वरून दिसते त्याप्रमाणें समाधानकारक नाहीं, इतकेंच नव्हे, तर खरोखरी शोचनीय आहे, हें कोणीही कबूल करील. ग्वालेर, इंदूर, मध्यप्रांत, वऱ्हाड, दक्षिणेंतील तंजावर, कुंभकोण वगैरे प्रांत, कोल्हापुर वगैरे दक्षिण महाराष्ट्र देश, बडोदें व इतर महाराष्ट्र वस्तीचीं ठिकाणें यांचे आंकडे गोळा केले तर त्यांवरूनही साधारणतः मराठी भाषेची स्थिति वाईट आहे हें दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून राहणार नाहीं. मुंबई पुणें वगैरे ठिकाणीं जरी दरवर्षी पुष्कळ मराठी पुस्तकें प्रसिद्ध होतात तरी त्यांत चांगलीं पुस्तकें किती आहेत याचा विचार केला असतां भाषेची अभिवृद्धि समाधानकारक नाहीं असेंच म्हणावें लागतें. मला थोडे दिवसांपूर्वी मद्रास युनिव्हर्सिटीच्या पुस्तकालयाकरितां ५०० रुपयांच्या वाङ्मयात्मक मराठी पुस्तकांची यादी करण्याचा प्रसंग आला होता. त्या वेळीं चांगल्या पुस्तकांची यादी करण्यास मला व माझ्या जोडीदाराला बरेच प्रयास पडले. यावरूनही मराठींत चांगल्या वाङ्मयात्मक पुस्तकांचा भरणा फार कमी

आहे हीच गोष्ट प्रत्ययास आली. सारांश, खानेसुमारीच्या आंकड्यांचा व वर दिलेल्या इतर कारणांचा पुरावा निरुत्तर नसला तरी तो वस्तुस्थिति दाखविण्यास सध्यां पुरेसा आहे व मराठी भाषेची दैन्यावस्था डोळ्यापुढें मूर्तिमंत उभी करतो, यांत संशय नाहीं. ही शोचनीय स्थिति सुधारण्यास माझ्या मतें दोन गोष्टींची आवश्यकता आहे. एक तर विद्येचा आणखी प्रसार झाला पाहिजे व देशी भाषांना शाळांतून, युनिव्हर्सिटींतून, व सरकारदरबारांतून वगैरे चांगला राजाश्रय मिळाला पाहिजे. पण हा एक स्वतंत्र विषयच आहे, त्यासंबंधानें सध्या आपल्याला विचार कर्तव्य नाहीं.

५. नवीन ग्रंथकारांस उत्तेजन देण्यासंबंधानें मुख्य दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. एक, ग्रंथकारांस बक्षिस देण्याकरितां रकम गोळा करणें; आणि दुसरी, त्यांच्या पुस्तकांची योग्य परीक्षा करण्याकरितां लायक विद्वानांची निवड करणें. व त्यांजकडून तें काम वेळेवर करविणें. या दोन्ही गोष्टींसंबंधानें साहित्यपरिषदेनेंच आरंभीं खटपट केली पाहिजे. रकम गोळा करण्याचें काम सोपें नाहीं. कारण, निरनिराळ्या संस्थांकरितां वर्गणी मागणारे इतके लोक झाले आहेत कीं, या स्तुत्य कामाकरितां जरी वर्गणी मागितली तरी लोक नाक मुरडल्यांचून राहणार नाहींत. वर्गणी मागणाऱ्यांची वाढती संख्या, प्लेग व इतर रोगांच्या साथी, दिवसेंदिवस वाढणारी महर्घता, इत्यादि कारणांनीं लोकांची स्थिति फारच निकृष्ट होत चालली आहे. अशा स्थितींत साहित्यपरिषदेकरितां वर्गणी मागणें व ती गोळा करणें हें काम किती दुर्धर आहे याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. तरी या कामाचें महत्त्व व आवश्यकता हीं इतकीं जबरदस्त आहेत कीं, साहित्यपरिषदेच्या सभासदांनीं व महाराष्ट्र भाषेच्या इतर कैवाऱ्यांनीं अशा नाउमेदीच्या परिस्थितींतही खटपट करणें आपलें कर्तव्य आहे असें समजून—त्या खटपटींत यश येवो अथवा न येवो व ती सफल होण्यास कितीही दिवस लागोत—त्यांनीं या कार्यास हातभार लावला पाहिजे व कार्याचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पडेल असें केलें पाहिजे. साहित्यपरिषदेच्या सध्यांच्या सभासदांनीं आपले विद्यालयबंधु अथवा व्यवसायबंधु इतर ठिकाणीं असतील त्यांस विनंती केली पाहिजे, त्यांस साहित्यपरिषदेचे सभासद केलें पाहिजे, व त्यांच्याकडून व त्यांच्या इष्टमित्रांकडून पैशाची जितकी मदत या कृत्यास होईल तितकी करण्याबद्दल त्यांस आग्रह केला पाहिजे. हें ध्येय प्रत्येक सभासदानें आपलेपुढें ठेविलें व जे विद्वान् अथवा वजनदार गृहस्थ असतील त्यांनीं संस्थानिक, राजेरजवाडे, शेटसावकार व इतर धनिक गृहस्थ यांचें या कार्यास साहाय्य मिळण्याबद्दल मनापासून श्रम केले तर—उशिरानें कां होईना—या कार्यास द्रव्याची मदत झाल्याशिवाय खचित राहणार नाहीं. मात्र उद्योग तसाच नेटानें, उत्साहानें व कळकळीनें केला पाहिजे.

६. लायक परीक्षकांची निवड करणें हेंही साहित्यपरिषदेच्या सभासदांनींच सध्यां केलें पाहिजे. पुढील नंबर ७ च्या प्यान्यांत ज्या पुस्तकांचा उल्लेख केला आहे त्यांवर टीकात्मक अभिप्राय देण्याचें काम ५।६ सभासदांनीं वांटून घेतलें पाहिजे, व ही निवड कार्यकारी मंडळीकडून होण्यासारखी आहे. या कामीं विद्वान् सभासदांनीं आपल्या विद्वत्तेचा व वेळेचा उपयोग निरलस होऊन केल्याशिवाय हें साध्य होण्यासारखें नाहीं. केवळ राजाश्रयावर अथवा लोकाश्रयावर ग्रंथकारांस टाकून देणें सध्यांच्या स्थितींत अगदीं अयोग्य आहे. विद्वान् लोकांचे अभिप्राय मिळविण्यास किती वेळ लागतो व श्रम पडतात हें अनुभवसिद्ध आहे. तरी साहित्यपरिषदेच्या सभासदांनीं हें काम वेळच्या वेळेवर करून ग्रंथकारांस योग्य वळण लावून परिषदेला कृतार्थ केलें तर विद्वान् ग्रंथकारांस उमेद येईल व पुष्कळ ग्रंथ निर्माण होतील. साहित्यपरिषदेचे सभासद हें काम आनंदानें करतील असें परिषदेच्या ७ वर्षांच्या अनुभवावरून मानण्यास जागा आहे.

७. अशा रीतीनें पैशाची व योग्य गृहस्थांची योजना झाली तर नवीन ग्रंथकारांस उत्तेजन देण्यास खालीं दिलेल्या सूचना अमलांत आणतां येतील.

(अ) दरवर्षी जे ग्रंथ दक्षिणा—प्राइझ—कमिटी, डेक्कन व्हर्न्याक्यूलर ट्रान्स्लेशन सोसायटी, दाभोळकर, यंदे आणि कंपनी, मनोरंजन, वगैरेंकडून प्रसिद्ध करण्यांत येतील त्यांच्या कर्त्यांस साहित्यपरिषदेकडून त्यांच्या गुणाचें दर्शक म्हणून अल्प बक्षिस अथवा प्रशंसात्मक सर्टिफिकेट देण्याची तजवीज व्हावी. अशा

रीतीनें त्या त्या पुस्तकांची प्रसिद्धि होऊन त्यांच्या कर्त्यांस लोकाश्रय मिळेल.

(आ) मुंबई इलाख्यांत जीं पुस्तकें प्रसिद्ध होतील त्यांची यादी सरकारी रजिस्ट्रारच्या यादीवरून तयार करून परिषदेनें आपल्या वार्षिक बैठकींत प्रसिद्ध करावी, व त्यांतून जे विशेष चांगले ग्रंथ असतील त्यांच्या बद्दलचा आपला अभिप्राय थोडक्यांत देऊन तो प्रसिद्ध करावा. या योगानेंही चांगल्या ग्रंथकारांची लोकांस विशेष माहिती होऊन ते लोकाश्रयास पात्र होतील.

(इ) साहित्यपरिषदेनेंही स्वतंत्र अथवा भाषांतरात्मक एक दोन ग्रंथ तयार करण्याबद्दल वर्षाच्या आरंभीं जाहिरात द्यावी. विषयाची अथवा भाषांतराच्या पुस्तकांची निवड वार्षिक बैठकींत करण्यांत यावी, व पुस्तकें व त्यासंबंधाचा परिषदेच्या निवडक विद्वानांचा अभिप्राय पुढच्या बैठकींत परिषदेपुढें ठेवावा. जे ग्रंथ उत्तम ठरतील त्यांबद्दल ग्रंथकारांस ठरविलेलें बक्षिस देण्यांत यावें.

(ई) ग्रंथकार कधीं कधीं आपण होऊन ग्रंथ तयार करितात, पण त्यांची स्थिति इतकी गरीबीची असते कीं तो ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याची त्यांस ऐपत नसते. अशा ग्रंथकारांचे ग्रंथ चांगले दिसल्यास हप्तेबंदीनें साहित्यपत्रिकेंत, अथवा इतर प्रसिद्ध मासिकांत अथवा पत्रांत, ग्रंथकारांस थोडा मोबदला देऊन, छापविण्याची व्यवस्था परिषदेनें करावी. त्या ग्रंथावर अभिप्राय देऊन तो अभिप्राय प्रसिद्ध करावा, व लोकांस त्या ग्रंथाची विशेष माहिती करून द्यावी.

(उ) उत्तम ठरलेल्या नवीन पुस्तकांच्या कांहीं विवक्षित प्रती, पैशाच्या अनुकूलतेप्रमाणें, परिषदेनें खरेदी करून सवलतीच्या दरानें आपल्या वर्गणीदारांस द्याव्या, अथवा शाळेंतील विद्यार्थ्यांस इनाम म्हणून द्याव्या, व या रीतीनें ग्रंथांची व ग्रंथकारांची प्रसिद्धि करावी.

अलीकडील नाटकें.

(लेखक–रा. अनंत वामन बर्वे.)

"अलीकडील गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें वगैरे ग्रंथांत शृंगार अथवा इतर कोणत्याही रसाचा अश्लाघ्य अतिरेक होऊन लोकाभिरुचि बिघडते आहे काय?"—या प्रश्नाचा विचार मी केवळ नाटकांपुरताच करणार आहें. वाङ्मयाच्या इतर साहित्यांत त्याचें उत्तर काय आहे हें त्या भागाविषयीं माझा तितका परिचय नसल्याकारणानें मी सोडून देणार आहें.

'अलीकडील' नाटकांत शृंगार व हास्य या दोन रसांचा 'अतिरेक' ह्मणण्यासारखा प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो हें खरें; व त्यामुळें 'लोकाभिरुचि बिघडते आहे' असें ह्मणण्यालाही हरकत नाहीं.

हास्य व शृंगार हे दोन्ही रस स्वभावतःच लोकप्रिय आहेत. तेव्हां लोकाराधनप्रधान अशा नाटककादंबऱ्यांच्या रचनेंत त्यांचा विशेष अवलंब करण्याकडे लेखकांची प्रवृत्ति अधिक व्हावी हें स्वाभाविक आहे. पण या प्रवृत्तीच्या अतिरेकानें शृंगाराचें 'शुचिरुज्ज्वल' स्वरूप नाहींसें होऊन व हास्यांतही मार्मिकपणा व मर्यादा न राहून त्या उभयतांना ग्राम्य स्वरूप येऊं लागलें आहे व त्या कारणानें अर्थातच तें लोकरुचीला भलतेंच वळण देण्याला कारण होत आहे.

'अतिरेका'च्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे या दोन रसांशिवाय इतर रसांचा नाटककादंबऱ्यांत उपयोगच नाहीं अशी जणूं काय लेखकांची दृढ समजूत होऊन गेल्याप्रमाणें दिसतें. अलीकडे साधुसंतांच्या कथानकांचा आश्रय करून भक्ति किंवा 'शांत'रसाच नाट्यरचनेंत 'अतिरेका'नें अवलंब होऊं लागल्याचा एक भास उत्पन्न होतो खरा; पण तोही केवळ भासच होय. त्यांत भक्ति किंवा शांत रसापेक्षां शृंगार व हास्य यांचीच फाजील समृद्धि आढळून येते, आणि या दोन रसांच्या अतिरिक्त मिश्रणाच्या जीवावरच तसल्या नाट्यरचनांनीं लोकप्रियता संपादन केलेली दिसते.

सर्व रसांत शृंगार व हास्य हे दोन रस सहज विकृत होण्याला अधिक पात्र असल्याचें दिसून येतें. मग त्यांच्या स्वाभाविक विशेष गोडपणामुळेंच त्यांच्यांत ही दोषोत्पत्ति विशेष संभवनीय झाली असावी कीं काय नकळे! पण या कारणानेंच या दोन रसांचा उपयोग करतांना विशेष सावधपणा ठेवणें मात्र भाग आहे. पण ही सावधगिरी फारच थोडे लेखक ठेवतात. पुष्कळांना एखाद्या व्यसनाप्रमाणें या दोन रसांचा लोभ मर्यादेबाहेर मोहांत ढकलल्यावांचून सोडीत नाहीं. आणि हीच मोठी दिलगिरीची गोष्ट आहे.

काव्य, कथानकें आणि नाटकें हीं रंजनाच्या द्वारें लोकशिक्षणार्थच निर्माण व्हावयाचीं असतात, हें त्यांचें प्रयोजन केव्हांही विसरलें जातां कामा नये. रंजनैकहेतूनेंच त्यांची प्रतिष्ठा समजणें इष्ट नाहीं. "रंजन झालें म्हणजे झालें; शिक्षण मिळालेंच पाहिजे अशी कांहीं जबाबदारी नाहीं." अशा प्रकारचें विधान एखाद्या सुविद्य नाटककाराच्या प्रस्तावनेंत आढळणें हें दुर्दैव म्हटलें पाहिजे! खरें पाहतां, रंजन आणि शिक्षण हीं अनुक्रमें अनुपान आणि औषध याप्रमाणें आहेत. अनुपानें हीं औषधांच्या गुणाचीं व कार्याचीं साधक असलीं पाहिजेत, निदान प्रतिबंधक तरी नसलींच पाहिजेत. पण अनुपानांचाच अतिरेक झाला किंवा त्यांची तीव्रता वाढली, म्हणजे औषधांच्या गुणांचा लोप झाल्यास नवल नाहीं. तोच प्रकार 'लोकाभिरुची'च्या 'बिघडण्यांत' दिसून येत आहे. अलीकडे साहित्यसमृद्धीचा अभिमान बाळगणाऱ्यांनीं रास्त रीतीनें कुरकुरण्यासारखी नाटककादंबऱ्यांची वृद्धि असतां त्या वृद्धीपासून लोकांना कांहीं उच्च प्रतीच्या विचारांचें वळण मिळत असल्याचा जो भास होत नाहीं, आणि साहित्यसंग्रहांतही त्यांचा शोभेलसा अंतर्भाव करण्यासारखी योग्यता त्यांपैकीं फारच थोड्यांत असलेली दिसून येते, याचें कारण हेंच आहे.

विद्वान् लेखकांनीं या वस्तुस्थितीचा विचार केला पाहिजे. लेखक हे 'लोकरुची' चे खरे नायक आहेत. लेखकांची रचना 'लोकरुची' च्या धोरणानें वाहिली जातां कामा नये. पण मौज अशी कीं, लोकरुचीचें आपण खुशाल वाहन बनून कित्येक या गोष्टीचा डौलही मिरवतांना दिसतात! एका 'लोकप्रिय' गणल्या गेलेल्या 'भक्तिरसा' च्या नाट्यरचनेंत कवि मोठ्या दिमाखानें—

"लोकाभिरुचि आज कवण्या तऱ्हेची।
शोधोनियां होत रचना कृतीची॥
घेतील नृप भोज अवतार जेव्हां।
होतील कवि बाण भवभूति तेव्हां॥"

असें सांगतांना आढळले, म्हणजे लोकरुचिवश अशा या भाडोत्री, पोटभरू प्रयत्नांचा धिक्कार व्हावा तितका थोडाच म्हटला पाहिजे!

मराठी मासिकांतील गोष्टी व कादंबऱ्या.

(लेखकः—रा. ग. भा. गानू, बी. ए.)

"In a romance or novel, the first or main matter of interest for the critic is the scheme, the idea, the total meaning, the aim, the impression, the subject."

English Novelists.

आजकाल मराठी मासिकांतून व इतरत्र प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्या व स्फुट गोष्टी यांचें प्रमाण बरेंच वाढलें आहे ही फार समाधानाची गोष्ट आहे. गतकालाशीं तुलना करून पाहिलें असतां महाराष्ट्रानें १०।१५ मासिकांचें जीवित संभावित रीतीनें चालविण्यास समर्थ व्हावें, ही गोष्ट आमच्या शिक्षणविषयक प्रगतीची व त्याबरोबरच आमच्या वाचनाच्या अभिरुचीची निर्विवाद साक्ष होय. आज पाहावें तों वर्षामध्यें निदान २।४ नवीन मासिकें तरी जन्माला येतात, व त्यांचें सप्रेम स्वागत करावयासही वाचकवर्ग मोठ्या आनंदानें तयार असतो. अशा परिस्थितींत मासिकांची दिशा मात्र जितकी इष्ट असावयास पाहिजे आहे तितकी ती खास नाहीं असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. प्रस्तुत लेखांत फक्त मासिकांतून व इतरत्र येणाऱ्या गोष्टी आणि कादंबऱ्या यांच्या स्वरूपाच्या संबंधानें विचार करावयाचा आहे. म्हणजे त्यांत ज्या कांहीं सुधारणा होण्यासारख्या आहेत त्याही दाखविण्यास ठीक होईल.

हल्लीं प्रसिद्ध होणाऱ्या गोष्टींमध्यें मागसलेल्या जातींची उन्नति, प्रौढविवाह, सामाजिक दुष्ट चालीरीति, स्त्रीशिक्षण, मद्यपान वगैरे विषयच बहुतेक जागा अडवितात असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. परंतु गेलीं सुमारें २०।२५ वर्षें या विषयांचा इतक्या जोरानें खल होत आहे कीं व्याख्यानें, नाटकें व वर्तमानपत्रें यांचे हे कायमचे विषय होऊन बसले आहेत. आज, सर्व समाज सुशिक्षित असावा हें तत्त्व सरकार व लोकसमाज या दोहोंनाही पटून त्याप्रमाणें उभयतांकडून शिक्षणाचें काम शक्य तितक्या जोरानें चाललें आहे. समाजांत पूर्वी रूढ झालेल्या क्रूर चालीरीति यांच्यावरही निरनिराळ्या प्रकारें इतकी भयंकर टीका झाली आहे कीं,—शारदा नाटकासारख्या नाटकांचे प्रयोग करण्याचें आतां बहुतेक प्रयोजन नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

मद्यपानासंबंधानें अद्याप जरी पुष्कळ सुधारणा व्हावयाची आहे, तरी आजच्या गोष्टींमधून मद्यपानावर जी टीका येते ती बहुधा चांगल्या सुशिक्षित दिसणाऱ्या तरुणांना अनुलक्षून असते. अशा तऱ्हेचे मद्यपी आणि सुशिक्षित तरुण आजच्या काल्पनिक वाङ्मयामध्यें (Fiction) फार भेटतात व वाचकांना त्यांचा अगदीं कंटाळा येतो. शिवाय, खरें पाहूं गेलें असतां, " अव्वल इंग्रजींत " असले सुरादेवीचे भक्त जितके निपजत त्या मानानें आज सुशिक्षितांत हा वर्ग फारच लहान आहे यांत संशय नाहीं. आज सुशिक्षित म्हणविणाऱ्या बहुतेक तरुणांना आपली आर्य संस्कृति चांगली कळते व तिची थोरवी त्यांना उमजते. यामुळें असल्यां क्षुद्र व्यसनांच्या आधीन होण्याचे दिवस आतां बहुतेक राहिले नाहींत. मागेंच गेले. म्हणून मद्यपानाचा व सुशिक्षितांचा हा काल्पनिक संबंध आतां तोडून टाकल्यास बरें. मद्यपानाचें व्यसन अद्याप अगदीं खालच्या–अशिक्षित–लोकांमध्यें फार आहे खरें. पण त्याला उपाय म्हटला म्हणजे—वाङ्मयापुरता तरी—नाटकें अगर व्याख्यानें यांच्या साहाय्यानें त्या लोकांपुढें मद्यप्राशनाचे घोर परिणाम मांडावयाचे एवढाच.

प्रौढविवाह, प्रणयविवाह (love marriages) इत्यादि सामाजिक सुधारणेच्या मुद्यांसंबंधानें लिहितांना लेखकवर्गानें एका बाबतींत काळजी घ्यावी अशी विनंती आहे. ती एवढीच कीं अशिक्षित किंवा जुन्या पद्धतीच्या वृद्ध माणसांवर टीकेचा विशेष मारा नसावा. कां तर, असले लोक तुमच्या गोष्टी कधीं वाचीत नसल्यामुळें त्यांपासून कांहीं उपयोग होण्याचा संभव नाहीं. शिवाय त्यांना जगांत फार थोडे दिवस राहावयाचें आहे. जुन्या व ढगरलेल्या झाडाला खत घालून काय फायदा होणार ! यासाठीं सामाजिक सुधारणेच्या बहुतेक बाबी तरुणांसंबंधानें असाव्या. त्या ते वाचतात व त्यांजवर कांहीं तरी परिणाम होण्याची आशा असते.

आजच्या कादंबऱ्यांचा दुसरा एक विशेष हा कीं, त्यांत बहुतेक अंशीं फक्त शृंगार रसच आढळून येतो. असें कां व्हावें ? याचें एक कारण असें दिसतें कीं, मनुष्य स्वभावतःच प्रेमलुब्ध असतो. कार्लाइलनें म्हटलें आहे कीं, "प्रत्येक मनुष्य सामाजाशीं कांहीं विलक्षण बंधनांनीं बांधलेला आहे; मग हीं बंधनें प्रेमाचे पुष्पहार असोत अगर प्रकृतिपरवशतेचे लोखंडी सांखळदंड असोत." हें जर खरें असेल तर मनुष्यानें लोखंडी सांखळदंडापेक्षां प्रेमाचे पुष्पहार प्रिय मानावे यांत कांहीं आश्चर्य नाहीं. परंतु व्यवहारांत प्रत्यक्ष काय अनुभवास येतें हें पाहावयास नको काय ? प्रेमविषयक गोष्टींत अत्युच्च भराऱ्या मारणें कांहीं काळ गोड वाटतें हें खरें. परंतु त्यांत कांहीं टिकाऊपणा नाहीं हें प्रत्येक अनुभवी आणि पोक्त माणूस कबूल करील. म्हणून आपल्या वाचकांना प्रेमविषयक–भ्रामक–विषयांच्या वातावरणांत उड्डाण करावयास लावणें फारसें हिताचें नाहीं. उलट काल्पनिक प्रेमाला लुब्ध झालेल्या वाचकांची संसारांत निराशा होते व त्यांच्यावर केव्हां केव्हां अनिष्ट परिणाम झालेलेही दिसून येतात.

येथपर्यंत मराठी कादंबऱ्यांच्या विषय–क्षेत्रासंबंधानें झालें. आतां कादंबऱ्या अगर अद्भुत कथा (Novels and Romances) यांत गोंवण्याला अनुरूप असे कोणचे विषय आहेत व त्यांपैकीं कोणकोणचे अद्याप आमच्या वाङ्मयांत अभिषिक्त व्हावयाचे आहेत हें दाखवावयाचें राहिलें.

कवितेप्रमाणेंच कादंबऱ्या व नवलकथा यांची उभारणी मुख्यतः कल्पनाशक्तीच्या जोरावर झालेली असल्यामुळें काव्याप्रमाणें कादंबरींतही रसवैचित्र्य

आणि विविधविषयताही पाहिजे. कादंबऱ्यांना अगदीं योग्य आणि मनोरंजक विषय म्हटला म्हणजे विनोदात्मक गोष्टी (Comic narratives) ह्या होत. अशा तऱ्हेचें वाङ्मय मराठींत फारच थोडें निर्माण झालें आहे; किंबहुना कल्पित वाङ्मयाचा हा प्रदेश मराठी लेखकांच्या फारसा परिचयाचा झाला नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. सबब या मुद्द्याकडे थोडें जास्त लक्ष देणें अवश्य आहे.

कादंबऱ्यांचा अत्यंत रमणीय व महत्त्वाचा भाग म्हटला ह्मणजे ऐतिहासिक कादंबऱ्या ह्या होत. यांच्या वाचनानें विशिष्ट काळाच्या समाजस्थितीचें मूर्तिमंत स्वरूप आपल्या डोळ्यापुढें उभें राहतें व हजारों काव्यात्मक ग्रंथ अगर इतिहास वाचूनही मनावर जो ठसा उमटत नाहीं तो एका उत्कृष्ट ऐतिहासिक कादंबरीच्या वाचनानें उमटतो, अशी अनेक इतिहासकारांनीं साक्ष दिली आहे. (They would have been willing to exchange a whole library......for one good historical novel !) अशा स्थितींत आपल्याकडे ऐतिहासिक कादंबऱ्या फार क्वचित् लिहिल्या जातात ही दुःखाची गोष्ट आहे. तरी पण "उषःकाल" सारख्या हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतक्या कादंबऱ्यांनीं आपल्या आंगच्या संपूर्ण तेजाचें आणि शक्तीचें योग्य प्रत्यंतर महाराष्ट्र वाचकांना पूर्वींच आणून दिलें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ऐतिहासिक कादंबऱ्यांकडे हल्लीं लेखकवर्ग फारसें लक्ष देत नाहीं. ही शोचनीय स्थिति जाऊन सालोसाल प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्यांत ऐतिहासिक कादंबऱ्यांचाच नंबर—संख्येनें आणि गुणानें—वर लागला पाहिजे. सर्व समाजाला अत्यंत उपकारक असा कल्पित वाङ्मयाचा भाग हाच, ह्मणून त्याचा प्रसार जास्त जोरानें आणि कळकळीनें झाला पाहिजे.

कादंबऱ्यांचा तिसरा महत्त्वाचा उपयोग म्हटला म्हटजे समाजावर ज्या जबरदस्त आपत्ति (Social crisis) आल्या असतील अगर येण्याचा संभव असेल तन्निवारणार्थ गोष्टी आणि कादंबऱ्या यांच्या द्वारें लोकशिक्षण देणें हा होय. या दृष्टीनें पाहूं गेल्यास बहुतेक सामाजिक कादंबऱ्या या वर्गांत मोडतात, व त्यांच्या स्वरुपाच्या संबंधानें आरंभींच दिग्दर्शन झालें आहे.

आमच्या कादंबऱ्यांची रचना स्वतंत्र नाहीं ह्मणून केव्हां केव्हां मोठी ओरड ऐकूं येते. परंतु माझ्या मतें या मुद्द्याला फारसें महत्त्व देण्याचें कारण नाहीं. कारण स्वतंत्र कादंबरी, रूपांतर, किंवा भाषांतर, हीं जर पहिल्या प्रतीचीं असतील तर त्या सर्वांमध्यें सारखेंच कसब दिसून येतें. रूपांतर करणें किंवा भाषांतर करणें या गोष्टी दिसतात तितक्या सोप्या नाहींत. व शिवाय पुष्कळ वेळ स्वतंत्र लेखनाचा ओनामा रूपांतरासारख्या प्रयत्नापासूनच होत असतो. यासाठीं एकादी कादंबरी, ती रूपांतर आहे म्हणून त्याज्य मानण्याचें कारण नाहीं.मनुष्याची कुलापेक्षां गुणांवरून ज्याप्रमाणें आपण किंमत ठरवितों त्याप्रमाणेंच कादंबऱ्यांचीही गोष्ट असावयास पाहिजे.

उपसंहार:—कोणत्याही समाजाच्या उन्नतीला वाङ्मय फार उपयोगी पडतें. ह्मणून वाङ्मयाची अवहेलना होतां कामा नये किंवा त्याची वाढ खुंटतां कामा नये. समाज जर प्रगमनशील व्हावयास पाहिजे असेल तर वाङ्मयही—कल्पित वाङ्मयही—निरनिराळ्या दिशांनीं पुढें सरसावलें पाहिजे. केवळ शृंगार आणि ठराविक सामाजिक प्रश्न (उ. प्रौढविवाह, पुनर्विवाह, मद्यपान, जातीजातींचें ऐक्य इत्यादि) यांना आह्मी आपणाला वाहून घेतां कामा नये. आम्हांला अजून परदेशगमन करणें कसेंसेंच वाटतें ! नवीन प्रदेश शोधून काढावे व त्यांसाठीं साहसाचीं कृत्यें करावीं, उद्योगधंद्याच्या उन्नतीसाठीं व्यापारी संघ बनवावे, इत्यादि—एक ना दोन—हजारों गोष्टींसंबंधानें जिज्ञासा आणि अभिरुचि उत्पन्न व्हावयास पाहिजे आहे. यासाठीं आमच्या कल्पित वाङ्मयांत लांबचे प्रवास, नवीन प्रदेशांचे शोध, व्यापारी संघ इत्यादि राष्ट्रीयत्वाला गुणकारी अशा विषयांवर होईल तितका जोर द्यावयास पाहिजे. अशा दृष्टीनें लिहिलेल्या गोष्टी फार क्वचितच वाचावयास मिळतात. ह्मणून या बाबतींत सुधारणा होणें इष्ट आहे. तसेंच ऐतिहासिक कादंबऱ्या व विनोदात्मक गोष्टी ह्या महाराष्ट्र वाङ्मयामध्यें अति अल्प प्रमाणावर असल्यामुळें आपल्या कल्पित वाङ्मयाचे दोन महत्त्वाचे भाग आपल्याला कसे पारखे झालेले आहेत हेंही वर दाखविण्यांत आलें आहे.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक ८.

पुस्तकपरीक्षा.

श्रीकृष्ण-चरित्र.

हे अम्बुजाक्ष न लभेय भवत्प्रसादं । जह्यामसून् व्रतकृशांच्छतजन्मभिः स्यात् ॥

श्रीमद्भागवत, दशमस्कंध, उत्तरार्ध, अध्याय ५२.

१. ऋग्वेदादि ग्रंथ बहुशः परमेश्वराच्या स्तुतिपरच आहेत. त्यांत कोणत्याही एका देवाचें वर्णन म्हणून फार करून आढळणार नाहीं. ब्राम्हणादि ग्रंथांत कांहीं ऋषींचीं किंवा ब्राह्मणकर्त्यांचीं त्रोटक चरित्रें आहेत, परंतु तीं इतकीं लहान व म्हणूनच अपूर्ण आहेत कीं, त्यांस चरित्र असें म्हणण्याचें आजतागायत कोणींही धाडस केलेलें नाहीं. आणि म्हणूनच आद्यकवित्वाचा व आद्यचरित्रलेखकाचाही मान वाल्मीकि महर्षींसच दिला पाहिजे. रामायण हें काव्य आहे, इतिहास आहे, चरित्र आहे व भूगोलही आहे. महाभारत तेवढा इतिहास व रामायण इतिहास नव्हे अशी कित्येकांची निष्कारण समजूत झालेली आहे, व त्या समजुतीला, रामायणकालाचें अत्यन्त प्राचीनत्व व रामायणांतील भूगोलवर्णनाचें मिथ्यात्व आणि इतर अनेक माहितींचें असंभवनीयत्व हीं कारणीभूत अशीं पोषक कारणें झालेलीं आहेत. परंतु एकाद्या ग्रंथांतील स्थलकालादिकांचें वर्गीकरण व दृढीकरण करतां न येणें हें जर त्या ग्रन्थांतील वर्णनाच्या असत्यत्वाचें लक्षण मानिलें तर इतिहासपूर्वकालीन हकीकती निरनिराळ्या देशांच्या ग्रंथांत ज्या आढळतात त्या सर्वही कवडीमोल ठरूं लागतील. तात्पर्य, रामायण हें काव्यदृष्ट्या जेवढ्या उच्च दर्जाचें मानितां येईल तेवढ्याच उच्च दर्जाचें इतिहासदृष्ट्याही मानण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं अशी प्रस्तुत लेखकाची अल्प समजूत आहे.

२. महाभारताचा काल स्थूल दृष्टीनें आपणांस मुकर करतां येतो. आणि म्हणूनच बहुजनसमाज त्यास इतिहास ही संज्ञा देतो. रामायण ज्याप्रमाणें काव्यमय इतिहास होईल त्याचप्रमाणें महाभारतही इतिहासमय काव्य होईल. रामायणांत मुख्यतः एकाचेंच वर्णन सातही काण्डांत आहे, तर महाभारताच्या शेंकडो पर्वांत शेंकडो राजांचीं वर्णनें प्रसङ्गानुसार आलेलीं आहेत. मात्र रामायणाचा नायक जसा राम तसाच महाभारताचा नायक कृष्ण होईल कीं

नाहीं ही शङ्का आहे. कारण महाभारताच्या मुख्य अठरा पर्वांपैकीं फार तर चार पांच पर्वांचें सूत्रधारित्व–मानिलें तर–श्रीकृष्णाकडेस येतें. परंतु रामायणाचें तसें नव्हे. मात्र रामायणाची नायिका जशी सीता तशीच महाभारताची नायिका द्रौपदी होय. महाभारताचें जें भयङ्कर रणकन्दन झालें त्याला दुर्योधनाचा हट्ट, द्रौपदीचें रूप, कर्णाचें युद्धप्रियत्व, दुःशासनाचें उन्मत्तत्व, भीष्मांचें मौन, धृतराष्ट्राचा लोभ, शकुनीचें कैतव, धर्माचें द्यूतांतील अकुशलत्व, आणि श्रीकृष्णाची इच्छा,एवढ्या गोष्टी एकसमयावच्छेदें-करून जुळून कारणीभूत झालेल्या आहेत. आणि यालाच 'भविष्य' म्हणावयाचें. भारतीय युद्धाचें खापर एकाच्याच डोक्यावर फुटणार नाहीं. त्याला वर लिहिलेल्या व्यक्ति प्राधान्यें-करून कमीअधिक प्रमाणानें जबाबदार धराव्या लागतील. म्हणून त्यांचीं चरित्रें सूक्ष्मरीतीनें अवलोकन केलीं पाहिजेत. परंतु प्राचीन ग्रंथांत असें एका व्यक्तीचें एकत्र चरित्र सांपडणार नाहीं. इतस्ततः प्रसङ्गानुसार तें दिलेलें असतें; व अशा विखुरलेल्या चरित्राचें एकीकरण आज जर कोणी करून निरनिराळें असें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करील तर फार उपयोग होणार आहे. मात्र हें काम वाटतें तेवढें सोपें नाहीं. हे विचार आज सुचण्याचें कारण रा. ब. चिंतामणराव विनायक वैद्य यांचें **'श्रीकृष्ण-चरित्र'** हें पुस्तक होय.

३. रावबहादुरांचीं 'श्रीरामचरित्र' व 'श्रीकृष्णचरित्र' हीं पुस्तकें वाचण्याचा मनोदय बहुत दिवसांचा होता. परंतु नुकत्याच भरलेल्या महाराष्ट्र-साहित्य-संमेलनापर्यंत तो योग जुळून आला नाहीं. असो. श्रीकृष्णचरित्रासारखें रम्य चरित्र व रावबहादुरांसारखा पुराणेतिहासप्रिय न्यायाधीश लेखक अशी जोडी जमल्यामुळें प्रस्तुत ग्रन्थ सर्वाङ्गसुंदर झाला असला तर त्यांत कांहींच नवल नाहीं. रामायण-महाभारतावरील रा. ब. वैद्यांचे परिश्रम सर्वविश्रुत आहेत. "Maha-bharat–a Criticism" आणि "The Riddle of the Ramayana" हीं त्यांचीं पुस्तकें बरेच दिवसांपूर्वीं प्रसिद्ध झालेलीं आहेत. प्रस्तुत "श्रीकृष्णचरित्र" हें 'भागवत' 'महाभारत' आणि 'हरिवंश' या तीन रत्नसानूंच्या साहाय्यानें लिहिलेलें आहे. या तिघांच्या मदतीला आणखी एक 'जैमिनि-अश्वमेध' हा ग्रन्थ घेतला असता तर प्रस्तुत 'चरित्र' अधिक मनोरंजक झालें असतें. श्रीकृष्णाचें चरित्र श्रीरामचरित्राप्रमाणेंच शुद्ध व निष्कलङ्क आहे हें या पुस्तकानें उत्कृष्ट रीतीनें सिद्ध केलें आहे. यांतील भगवद्गीतापर्व तर गोड, सुसङ्गत आणि अध्ययनार्ह आहे. आणि उपसंहार विद्वत्ताप्रचुर, तौलनिक माहितीचा आणि 'राष्ट्रांचे उदयास्त' लिहिणाऱ्या लेखणीला सर्वथैव शोभण्यासारखा आहे. या पुस्तकाच्या चांगुलपणासंबंधानें स्थूलदृष्टीनें वर लिहिल्याप्रमाणें म्हणतां येईल.

४. श्रीकृष्ण हा परमेश्वरी अवतार होता ही गोष्ट गृहीत धरून हें चरित्र लिहिलें गेलें आहे;* आणि म्हणूनच तें भाविक व श्रद्धायुक्त

* १ "श्रीकृष्णाचें त्या (कालियामर्दनाच्या) वेळचें दिव्यरूप व सामर्थ्य पाहून हा प्रत्यक्ष स्वर्गींचा श्रीविष्णूच अवतार घेऊन आपल्यांत आला आहे असें त्यां–(नन्दयशोदादि गोपगोपीं) स वाटलें." पृ. २३

दृष्टीला फारच मोहक झालेलें आहे. परंतु तात्त्विक दृष्टीनें हें वैगुण्य होय. कारण, 'श्रीकृष्ण परमेश्वर होता ह्मणून त्यानें अमुक अमुक गोष्टी केल्या.-' या वाक्यापेक्षां 'श्रीकृष्णानें अमुक अमुक गोष्टी केल्या म्हणून तो परमेश्वर होता'-हें वाक्य अधिक परिणामकारक होईल. परमेश्वरास कांहींच कठीण नाहीं, व कृष्ण परमेश्वर मानिला म्हणजे त्यासही कांहीं कठीण नव्हतें, असें ओघानेंच ठरतें. व हें एकदां ठरलें म्हणजे एकंदर कृष्णलीलेमध्यें राहावी तितकी-अगर वाटावी तितकी-गोडी वाटत नाहीं. पृष्ठ ३१२ वर रा. ब. लिहितात:--

"...श्रीकृष्णानें आपल्या अवतारांत मानवी कृत्येंच करून दाखविलीं आहेत....ईश्वरी सामर्थ्य उपयोगांत आणिलें नाहीं."

[मागील पृष्ठावरील टीप पुढें चालू.]

२ "श्रीविष्णूचेच दोन अर्ध असल्यानें राम व कृष्ण युद्धांत अजेय होते." पृष्ठ. ७५.

३ "श्रीकृष्ण व रुक्मिणी हीं एकमेकांकरितांच निर्माण झालीं होतीं. शेंकडों अवतारांत लक्ष्मीनारायणाचें जोडपें हेंच होतें." पृष्ठ ७९.

४ "त्यांची (कृष्णार्जुनांची) जोडी म्हणजे नरनारायणाची जोडी होती." पृष्ठ ११०.

५ "केवळ लीलेनें नरदेह धारण केलेल्या त्या (श्रीकृष्ण) परमात्म्यानें गृहस्थाश्रम कसा चालवावा याचें जगतास उदाहरण घालून दिलें." पृष्ठ २७३.

६ "...श्रीकृष्णानें आपल्या अवतारांत मानवीं कृत्येंच करून दाखविलीं आहेत......ईश्वरी सामर्थ्य उपयोगांत आणिलें नाहीं." पृष्ठ ३१२.

ह्या उताऱ्यांवरून माझें वरील म्हणणें सहज सिद्ध होईल. वरील वाक्यें निरनिराळ्या प्रसंगीं घातलेलीं आहेत. तत्रापि त्या सर्वांचें तात्पर्य एकच असल्यानें आणि तें रा.ब.वैद्यांना मान्य असल्यानें तीं सर्व वाक्यें वर उद्धृत केलीं आहेत. प्रत्येक वाक्याच्या शेवटीं दिलेले पृष्ठांक 'श्रीकृष्णचरित्रां'तील आहेत.

आतां 'श्रीकृष्णचरित्रां'तून कांहीं कृत्यें खालीं देतों.:--

(अ) अहिवरलास्यपटुत्व. "...श्रीकृष्णानें त्या सापाची नरडी आपल्या सर्व सामर्थ्यानें दाबली....श्रीकृष्ण त्याच्या मधल्या मस्तकावर आरोहण करून नाचूं लागला." पृष्ठ २२.

(आ) गोवर्धनोद्धारण. "कृष्णानें त्यां (व्रजस्थां)स आश्वासन देऊन यत्किंचितही न घाबरतां त्यांस आपल्या गाईसह व चीजवस्तेसह गोवर्धन पर्वताला वर उचलून त्याखालीं पावसापासून वांचविलें." पृष्ठ २९.

(इ) विश्वरूपदर्शन. "...महायोगेश्वर हरीनें त्या (अर्जुना) स प्रथम दिव्य दृष्टि देऊन आपलें विश्वरूप दाखविलें." पृष्ठ १८७.

(ई) स्वर्गमन. "श्रीकृष्ण नरकासुरास मारून अदितीच्या कुण्डलांसह स्वर्गास गेला व तेथून पारिजात वृक्ष घेऊन आला." पृष्ठ १०३.

(उ) पुढें पृष्ठ १०४ वर पारिजात वृक्ष परत स्वर्गास पाठविल्याचेंही लिहिलें आहे.

(ऊ) पृष्ठ २६८ वर श्रीकृष्णप्रतिज्ञेनें अभिमन्युपुत्र जीवन्त झाल्याची हकीकत सविस्तर लिहिली आहे.

हीं वर लिहिलेलीं कृत्यें मानवी सामर्थ्याचीं आहेत असें रा. ब. म्हणतात हें आश्चर्य आहे.

५. या पुस्तकांत नमूद केलेल्या सर्व गोष्टी रा. ब. स सर्वस्वी मान्य आहेत, असें धरून चालण्यास कांहीं हरकत नाहीं. यापूर्वी प्रसिद्ध झालेला रा. ब. च्या पुस्तकांतील कांहीं तत्त्वांचा या पुस्तकांतील कांहीं तत्त्वांशीं विरोध आहे तो खालीं दर्शवितों.

(अ) पृष्ठ २२ वर कालिया सर्पास अनेक मुखें असल्याचें लिहिलें आहे. पूर्वी आर्यावर्तांत 'नाग' या नांवाची एक अनार्य जात होती. व त्या जातीपैकींच हा कालिया असावा असें आधुनिक विद्वानांच्या मतानें ठरणार व तें तूर्त अमान्य करण्याचें प्रस्तुत लेखकास कांहीं कारणही नाहीं. आतां प्रश्न एवढाच आहे कीं, "The Riddle of the Ramayana" या पुस्तकाच्या पृष्ठ १४८ वर राव-

णास दहा तोंडें असल्याचें रा. ब. नाकारितात, व ही गोष्ट अशक्य कोटींतील ह्मणून ठरवितात; आणि प्रस्तुत चरित्रांत कालियास अनेक तोंडें होतीं असें कबूल करितात. कालियास जर अनेक तोंडें होतीं तर रावणास तीं अनेक असण्यास काय अडचण येते हें कळत नाहीं.

(आ) श्रीकृष्णानें गोवर्धन उचलिला हें रा. ब. मान्य करितात. परन्तु हनुमानानें अनेकदां द्रोणागिरि उचलिला ही रामायणांतली गोष्ट ते आपल्या ' रामायणांतील कोड्यां'त अमान्य करितात.

(इ) "देव ह्मणजे दुसरें तिसरें कोणी नसून आर्यांचे पूर्वज होत. " असें " The Riddle of the Ramayana " या पुस्तकाच्या ७८ व्या पृष्ठावर रा. ब. नीं लिहिलें आहे. परन्तु या पुस्तकांत स्वर्ग, इंद्र, इतर देव, राक्षस हे सर्व मान्य केलेले आहेत.

(ई)"...शंभरांहून अधिक वयोमर्यादा कधींही नव्हती असें रामायणाच्या कोड्यांत ह्मटलें आहे; परन्तु या पुस्तकांत वयोमर्यादेविषयीं काय लिहिलें आहे तें पहा—

(क) "...एका मोठ्या गुहेंत राजर्षि मुचुकुंद त्रेतायुगापासून निजला होता. हा मुचुकुंद इक्ष्वाकु वंशांतील मांधात्याचा पुत्र असून त्यास देवांनीं असुरांविरुद्ध लढण्याकरितां आपल्या मदतीस घेतलें होतें. **शेंकडो वर्षें** युद्ध चालून मुचुकुन्दानें असुरांचा पराभव केला, तेव्हां देवांनीं संतुष्ट होऊन त्यास वर माग असें म्हटलें...तेव्हां त्या श्रांत...राजर्षीनें दीर्घ निद्राच मागितली.

पृष्ट ८३ पुढें मुचुकुंद जागा झाल्यावर श्रीकृष्णाची व त्याची भेट झाली, यावरून मुचुकुंद किती दीर्घ वयोमर्यादेचा होता तें पहा !

(ख) " या दारुण पापामुळें तूं (अश्वत्थामा) तीन हजार वर्षं या पृथ्वीवर एकटा फिरशील. " पृष्ठ २५५.

(ग) पृष्ठ ९८ वर जांबवानापासून श्रीकृष्णानें स्यमंतक मणि आणिल्याची हकीकत आहे. हा जांबवान रामावतारींचा होय असें मूळांत आहे.

(घ) प्रस्तुत चरित्राच्या पुरवणीच्या तिसऱ्या पृष्ठावर वसुदेव व वासुदेव यांची वयोमर्यादा अनुक्रमें १५९ आणि १०१ अशी दिलेली आहे.

याप्रमाणें मूळ ग्रंथांतील प्रमाणें असून पृष्ठ १२३ वर रा. ब.वैद्य स्वतःचा अभिप्राय व्यक्त करितात तो असाः—

" पूर्वकाळीं भरतखण्डांत आयुष्य दीर्घ असून शक्तिही प्रचण्ड होती, याची साक्ष शिकंदरच्या बरोबर आलेले अरायन प्रभृति ग्रंथकार देतात. त्यांनीं एकशेंवीस वर्षांचीं अनेक सशक्त माणसें त्यावेळीं हिंदुस्थानांत पाहिलीं होतीं. मग त्याच्याही **अडीच तीन हजार वर्षांपूर्वी** जरासंधासारखे ऐशींच्या वर्षींही मल्लयुद्ध खेळणारे आर्य हिंदुस्थानांत होते यांत नवल नाहीं."

रा. ब. ची ही टीप किंवा हें मत फार विचार करण्यासारखें आहे. यांतील मोठा टाईप मूळांत नाहीं. रा. ब. च्या या म्हणण्याचा अर्थ असा कीं, प्राचीनत्व हें आयुष्याच्या दीर्घत्वाचें लक्षण मानण्यास कांहीं हरकत नाहीं. व हें मत रा. ब. नीं एकदां मान्य केलें ह्मणजे मग हजारों वर्षांचें आयुष्यही नाकारितां येणार नाहीं. शिकंदराच्याही अडीच तीन हजार वर्षांपूर्वी जर जरासन्ध झाला असेल तर श्रीरामचंद्रादि व्यक्ति जरासंधाच्याही कित्येक हजार वर्षांपूर्वी झालेल्या आहेत. व जरासंधाच्या वेळीं जर १६० वर्षांचीं माणसें होतीं तर रामाच्या वेळीं हजार अकराशें वर्षांच्या वयाचीं माणसें असण्यास कांहीं बाध येईलसें दिसत नाहीं. रामाच्या पूर्वी विश्वामित्रप्रभृतींची साठ साठ हजार वर्षांची तपश्चर्याही मग प्रमाण मानण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. तात्पर्य, प्राचीन काळची वयोमर्यादा ठरविणें फार कठीण आहे.

हिंदुस्थानांत पूर्वी ज्या रानटी जाती होत्या त्यांसच राक्षस ह्मणत असत. त्यांच्या व इतर आर्यांच्या शरीररचनेंत किंवा शरीराच्या आकारांत कांहीं भेद नव्हता असें आधुनिक सुशिक्षितांचें मत आहे, व रा. ब. नींही हेंच अप्रत्यक्षपणें 'रामायणाच्या कोड्यां'त पृष्ठ१०३, भाग ६ मध्यें मान्य केलें आहे.परंतु या पुस्तकांत ते राक्षसाच्या शरीराविषयीं काय लिहितात:—

घटोत्कचाच्या प्रचंड देहाखालीं दोन्ही सैन्यांतील शेंकडो माणसें मरण पावलीं. " पृष्ठ २२७.

६. ज्या तीन ग्रन्थांच्या आधारानें रा. ब. वैद्यांनीं हें श्रीकृष्ण चरित्र लिहिलें आहे त्यांतील बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी त्यांनीं गाळिल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं देतों:—

(१) बलराम व रेवती यांच्या विवाहाची हकीकत मनोरंजक असून गाळिली आहे.

(२) कृष्णशिष्टाईंतील विराटस्वरूपदर्शन यांत दिलें नाहीं.

(३) भीष्मपर्वांत श्रीकृष्णानें तीन व नऊ अशा दोन दिवशीं शस्त्र धरिल्याचा मूळांत उल्लेख आहे. प्रस्तुत चरित्रांत तें एकदांच धरिलें असें लिहिलें आहे.

(४) भीष्मांना मृत्यु कसा येईल हें स्वतः पाण्डवांनींच भीष्मास जाऊन विचारिलें आहे. तो प्रसंग यांत नाहीं.

(५) जरासंधाचा पराभव रामकृष्णांनीं अठरा वेळां केला असें मूळांत असून येथें तो एकदांच वर्णिला आहे.

(६) दुर्योधनानें शेवटीं श्रीकृष्णाची निन्दा केली आहे तो प्रसंग यांत नाहीं.

(७) श्रीकृष्ण व कर्ण यांचा कर्णवधप्रसंगींचा संवाद या कृष्णचरित्रांत दिला नाहीं.

हे मुख्य प्रसङ्ग रा. ब. नीं कां गाळिले हें समजत नाहीं. जर हेतुपुरःसर गाळिले नसतील तर दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं यांचा अवश्य समावेश करावा अशी माझी त्यांस विनंती आहे.

७. प्रस्तुत पुस्तकांत कांहीं महत्त्वाच्या नजरचुका झालेल्या आहेत; त्या तशाच राहूं देणें इष्ट वाटत नाहीं म्हणून खालीं दर्शवितों.

(१) पृष्ठ २३४ वर 'सात्यकी हा अर्जुनाचा गुरुबन्धु ' होय ' असें म्हटलें आहे. परंतु तसें नसून तो अर्जुनाचा शिष्य होता.

(२) पृष्ठ २३० वर अश्वत्थामा नांवाचा हत्ती भीमानें मारिला तो शत्रुपक्षीय नव्हता असें ध्वनित केलें आहे. परंतु खरोखरी तो शत्रुपक्षीय असून पांडवांच्या सैन्यांत त्यांच्या नाशार्थ शिरला होता व म्हणून भीमानें त्याला मारिलें.

(३) पृष्ठ २५० वर असें लिहिलें आहे कीं, कृपहस्तें अश्वत्थाम्यास सैनापत्याचा अभिषेक केल्याबरोबर दुर्योधन राजा मृत्यु पावला. परंतु मूळांत तसें नाहीं. सौप्तिक पर्वांतील भयंकर कत्तल अश्वत्थाम्याच्या तोंडानें श्रवण करून दुर्योधनास परमानन्द झाला व त्यानें अश्वत्थाम्यास शाबासकी देऊन मग प्राण सोडिला असें मूळांत आहे.

(४) पृष्ठ २५३ वर अश्वत्थामा पाण्डवशिबिरांत एकदम शिरला असें लिहिलें आहे. परंतु तसें नसून त्याला एका समर्थ व प्रबळ योध्याशीं लढावें लागलें व त्याच्याच प्रसादानें त्याला एक खड्ग मिळून आंत जाण्यास मार्ग मोकळा झाला असें मूळांत आहे.

(५) पृष्ठ २५३ वरच अश्वत्थाम्यानें धृष्टद्युम्नास मारिल्यानन्तर त्याच्या बायकापोरांसही लागलीच मारिलें, असें लिहिलें आहे. परन्तु मूळांत तसें नाहीं. धृष्टद्युम्नास मारिल्यावर शिखंडीवगैरेंच्या शिबिरांत तो घुसला व अशा रीतीनें कत्तल करून शेवटीं त्यानें तें सर्व शिबिर पेटवून दिलें असें मूळांत आहे.

(६)पृष्ठ २४० वर असें लिहिलें आहे:—
"शेवटीं दुर्दैवानें कर्णाच्या रथाचें डावीकडचें

ल्याक एका भेगेंत खोल गेलें आणि रथ अड-कून कलथा झाला." ही हकीकत कुरुक्षेत्रांतील आहे. कुरुक्षेत्र म्हणजे प्रस्तुतचें पानिपतचें मैदान. हें मैदान घोडदळांच्या वगैरे त्वरित हालचालीला किती सोईस्कर व सपाट आहे याचें वर्णन रा. ब. नींच "दुर्दैवी रंगू अथवा पानिपतचा शेवटचा संग्राम" यांत उत्कृष्ट केलें आहे. अर्थात् इतकें तें सपाट मैदान असतां ही एवढी मोठी भेग कोठून आली ? कर्ण हा कौरवसेनेचा तिसरा सेनापति. याच्या पूर्वीच्या दोन सेनापतींनीं पंधरा दिवस युद्ध केलें होतें, तेव्हां ही भेग कोणासच कशी नडली नाहीं व दिसलीही नाहीं ? असले अनेक प्रश्न वाचकांच्या मनांत उद्भवतात. वस्तुतः खरा प्रकार असा आहे कीं, कर्णास अशा प्रकारचा एका ब्राह्मणाचा शाप होता. व त्यायोगेंच भूमीनें त्याचें रथचक्र गिळिलें. असल्या गोष्टींवर रा. ब. चा विश्वास नसेल हें श्रीकृष्णचरित्रावरून तरी ह्मणतां येणार नाहीं, व ह्मणूनच ही नजरचूक आहे असें मला वाटतें.

८. आतां सरते शेवटीं कांहीं मतभेदाचीं स्थळें दाखवून हें परीक्षण आटोपतें घेतों. श्रीकृष्ण भगवान् कपटी नव्हते हें सिद्ध करण्यासाठीं रा. ब. नीं उपसंहारामध्यें पृष्ठ ३१७ वर भारतांतील दोन सोइस्कर भाग निवडून दिलेले आहेत. या भागांवरील रा. ब. ची वकिली खरोखरी स्पृहणीय आहे. त्याप्रमाणेंच न्यायाधीश वकिली करूं लागले ह्मणजे कसे घसरतात, याचेही ते भाग उत्तम उदाहरणें होत.

अ. पहिलें उदाहरण द्रोणाचें. अस्त्रें न जाणणाऱ्यावरही द्रोण अस्त्रें टाकूं लागला. तेव्हां धर्माकरवीं मुद्दाम खोटें बोलवून द्रोणास स्तब्ध केलें व मग धृष्टद्युम्नाचे हस्तें त्याचें शिर कापविलें. हें कृष्णाचें करणें न्याय्य होतें, असें पृष्ठ ३१४–३१५ वर लिहिलें आहे. द्रोणाला अशा रीतीनें कापून टाकण्यांत मुख्य हेतु हा होता कीं, त्याच्या हातांत जोंपर्यंत शस्त्र होतें तोंपर्यंत त्याचा वध होणें मुळींच शक्य नव्हतें. ही गोष्ट ज्यास ठाऊक आहे त्यास रा. ब. ची वकिली कशी पटेल ? जर द्रोण खरोखरीच आततायी होता तर त्यास धर्मयुद्धांत अर्जुन, सात्यकी किंवा अशाच एकाद्याकडून कां मारविलें नाहीं ? द्रोणाच्या वधांत जर अधर्म नव्हता तर अश्वत्थाम्यानें जो प्रसुप्तांचा वध केला तो तरी अधर्म कसा झाला व श्रीकृष्णानें त्यास शाप कां दिला ? तात्पर्य, द्रोण अधर्म करीत होता ह्मणून त्यास खोटेंच सांगितलें व त्याचा नन्तर वध केला, हा मुद्दाच खरा नाहीं. धर्माकडून असत्य वदविण्यांत द्रोणाकडून शस्त्रसंन्यास करविणें एवढाच हेतु होता, व हें लक्षांत ठेविलें ह्मणजे द्रोणवध श्रीकृष्णाच्याच कपटानें कसा झाला हें तेव्हांच समजेल.

आ. दुसरें उदाहरण भीष्मवधाचें. पृष्ठ ३१७ वर रा. ब. लिहितात–

"तसेंच संकुल युद्धांत एका वीरावर अनेकांनीं चालून जाणें अधर्म नव्हे....सारांश, भीष्मवधाच्या प्रसंगीं जरी पांडवांनीं अधर्म केल्याचा भास होतो, तरी तेथें वास्तविक तो अधर्म नव्हता असेंच ह्मटलें पाहिजे."

भीष्माकडूनही द्रोणाप्रमाणेंच शस्त्रन्यास करावयाचा होता. रा. ब. नीं संकुल युद्धाचें एक कारण पुढें केलें आहे. परंतु तें जर खरें धरिलें तर अभिमन्यूचा वधही 'युद्धाच्या नीतीच्या दृष्टीस गैरवाजवी' नव्हता असें ठरूं लागेल. परंतु तो गैरवाजवी होता हें जोंपर्यंत स्वतः कृष्णही असकृत् ओरडून सांगतात तोंपर्यंत भीष्मवधही कपटानेंच झाला असेंच ठरणार.

९. आतां श्रीकृष्णानें भारतीय युद्धांत कोठें कोठें कपट केलें तें संक्षेपतः कथन करितों. हें कथन करण्यांत कलकत्त्यांतील माणिकतोळा बाम्बच्या खटल्यांतील आरोपीतर्फेचे प्रसिद्ध बॅरिस्टर नार्टनप्रमाणेंच प्रस्तुत लेखकाची स्थिति झालेली आहे. ह्मणून आरम्भींच हें सुचवून ठेवणें जरूरीचें आहे कीं, श्रीकृष्णाबद्दल त्याचा यत्किंचितही अनादर नाहीं. श्रीकृष्ण ईश्वरांश होता हेंही त्यास मान्य आहे. परंतु श्रीकृष्ण ईश्वरांश होता ह्मणून त्याची प्रत्येक कृति पूज्यच होती किंवा सत्यानुसारी होती हें मात्र त्यास कबूल नाहीं. मनुष्य या नात्यानें प्रत्येकाच्या हातून कांहींना कांहीं चुका होणें अपरिहार्य आहे. परन्तु तेवढ्यानें त्या व्यक्ति दूष्य आहेत असें मात्र त्यास वाटत नाहीं. ज्याप्रमाणें मिश्र सुवर्णांतून हीन धातु जाळून नाहींसा केल्या ह्मणजे शुद्ध सुवर्ण राहतें त्याचप्रमाणें मनुष्य-वेषधारी ईश्वराच्या विभूतींतही असे कांहीं अशुद्ध भाग असतात. त्यांस गाळून नाहींसे करणें व बाकीचे दग्धसुवर्णतुल्य राहिलेलें शुद्ध चरित्र प्रमाण धरून त्या विभूतीस पूज्य मानणें हें कोणालाही कमीपणा आणणारें नाहीं. रानडे —गोखले—टिळकांच्या चरित्रांतील आक्षेपक भागावर वेळीं अवेळीं तुटून पडणाऱ्या बांधवांनीं या गोष्टीचा पूर्ण विचार केलेला नसतो असें दिसतें. उतावीळपणानें महापुरुषांच्या दोषांकडेसच लक्ष देऊन त्यांचे सद्गुण डोळ्यांआड करणें हें स्वतःच्या अज्ञानाचें व व्यक्तिद्वेषाचें प्रदर्शन करण्यासारखें आहे. अस्तु. आतां श्रीकृष्णाच्या कपटी आचरणाचे मासले दाखवितों:

(१) भीष्मवध व द्रोणवध कसा कपटानें करविला, हें वर आलेंच आहे.

(२) भूरिश्रवा ह्मणून एक कौरवपक्षीय योद्धा होता. त्याचें व सात्यकीचें द्वन्द्व चाललें होतें. त्यांत त्यानें सात्यकीची शेंडी धरिली व त्याचें शिर कापण्यासाठीं तलवारीचा हात उगारिला. इतक्यांत हा प्रसङ्ग श्रीकृष्णास दुरून दिसला. तत्काल अर्जुनाकडून त्याचा तो हात बाणानें तोडविला. रा. ब. च्या मतानें देखील हा अन्याय होय. कारण पृष्ठ ३१७-वर ते लिहितात, "जेव्हां द्वंद्वयुद्ध होत असेल तेव्हांच (एकावर अनेकांनीं चालून जाणें अधर्म होय) हा नियम लागू पडेल, इतर प्रसङ्गीं तो लावितां येणार नाहीं." अर्थात् हें कूटयुद्ध झालें, व तें श्रीकृष्णाच्या शिकवणीनें झालें.

(३) भगदत्त म्हणून एक कौरवपक्षीय योद्धा होता. तो अत्यन्त वृद्ध होता. व म्हणून त्याच्या पापण्या इतक्या मोठ्या वाढल्या होत्या कीं, युद्ध-प्रसङ्गीं समोरचा योद्धा स्पष्ट दिसावा म्हणून त्या तो रेशिमानें आपल्या मुगुटास बांधून टाकीत असे. अर्जुनाच्या व त्याच्या द्वैरथ युद्धांत तो जेव्हां अर्जुनास आटोपेना, तेव्हां ते रेशमी दोरे कापून टाकण्यास कृष्णानें अर्जुनास सुचविलें. याप्रमाणें त्याला प्रथम अन्ध करून मग त्याचें शिर धडापासून वेगळें केलें. हें कृष्णाचें चवथें कूटयुद्ध होय.

(४) कर्ण रथचक्र उद्धरीत असतां, ह्मणजे तो शस्त्रहीन असतां, अर्जुनाकडून त्याचा वध श्रीकृष्णानें करविला, हें श्रीकृष्णाचें पांचवें कूट-युद्ध होय.

(५) दुर्योधन व भीम यांच्या गदायुद्धांत गदा-युद्धाचा नियम मोडून श्रीकृष्णानें भीमाकडून दुर्योधनाच्या मांडीवर गदाप्रहार करवून त्यास मारिलें, हें सहावें कूटयुद्ध होय.

असो. याप्रमाणें श्रीकृष्णाची युद्धनीति कुटिल असतांना तीच न्यायाची होती हें म्हणणें श्रीकृष्णविषयक अत्युत्कट भक्तीचें लक्षण होय.

१०. रा. ब. वैद्यांनीं २८७ पृष्ठावर—

"मुख्यतः एका स्त्रीनें एकाहून अधिक पति करण्याची चाल त्यांच्यांत (चंद्रवंशीय क्षत्रियांत) अद्याप अवशिष्ट होती... "

असें एक विधान केलें आहे. हें विधान करण्यापूर्वी द्रौपदीशिवाय इतर स्त्रियांचीं उदाहरणें देणें अवश्य होतें. परन्तु तसलें त्यांनीं एकही उदाहरण दिलेलें नाहीं. द्रौपदीसंबंधींची हकीकत पाण्डवकालीं किंवा फार तर त्यांच्या पुढच्या एकादोन पिढ्यांतच लिहिलेली असली पाहिजे. जर तत्कालीं बहुपतित्व हें रूढ असतें तर द्रौपदीच्या लग्नप्रसंगीं व्यासांना एवढा द्राविडी प्राणायाम करण्याची अगर महाभारतलेखकाला त्यांच्याकडून करविण्याची तरी काय आवश्यकता होती हें कळत नाहीं. जी गोष्ट रूढ असते तिच्याबद्दल सहसा वाद उपस्थितच होत नाहीं.ज्या अर्थी द्रौपदीविवाहप्रसंगीं अनेकपतित्वाचा प्रश्न उपस्थित झाला होता व लोकमत अनेकपतित्वाला प्रतिकूल होतें, त्या अर्थी द्रौपदीचें बहुपतित्व हा अपवाद होता हें निःसंशय ठरतें. या अपवादानें एकपतित्वाच्या नियमाला उलट बळकटीच येते.

११. प्रस्तुत टीकेच्या पांचव्या कलमांत असें लिहिलें आहे कीं, श्रीकृष्णचरित्रांत प्रतिपादिलेले प्रसंग रा. ब. स मान्य आहेत असें वाटतें. परंतु हें 'वाटणें' कितपत खरें असेल याचा प्रस्तुत लेखकासही संशयच आहे. कारण-

(१) कालियास अनेक मुखें होतीं,

(२) कृष्णानें गोवर्धन पर्वत उचलिला,

(३)घटोत्कचाच्या शरीराखालीं अनेक लोक चेंगरून मरण पावले,

(४) मुचुकुंद हजारों वर्षे जीवंत राहिला,

(५) श्रीकृष्णानें बाहुबलानें घोडा, बैल व हत्ती यांस ठार मारिलें,

(६) श्रीकृष्ण स्वर्गाला गेला व परतही आला,

(७) स्वर्गांतील वस्तूंची श्रीकृष्णानें नेआण केली,

(८)मृत बालक श्रीकृष्णानें पुण्याईनें उठविलें,

(९) श्रीकृष्णानें विराट्रूप दाखविलें,

या गोष्टी रा. ब. प्रमाण मानीत असतील असें मला तरी निदान वाटत नाहीं. कारण याहीपेक्षां कमी महत्त्वाच्या गोष्टी रा. ब. नीं सुधारून प्रस्तुत पुस्तकांत घातल्या आहेत त्याः—

(१) केशी दैत्य घोड्याचें रूप घेऊन कृष्णावर चालून आला असें मूळांत आहे. या पुस्तकांत तो घोड्यावर बसून आला असा फारच योग्य व सयुक्तिक फेरफार केला आहे.

(२) भीमानें जरासंधास वारंवार चिरावें व त्याच्या शरीराचे दोनही भाग फेंकून द्यावेत, पण ते पुनः जुळून जरासंधानें जीवन्त व्हावें व भीमाशीं युद्ध करावें, असा कथाभाग मूळांत आहे. पुढें श्रीकृष्णाच्या खुणेवरून ते दोनही अर्ध विरुद्ध दिशेला फेंकिले तेव्हां जरासन्ध मेला असें पुढें वर्णिलें आहे. परन्तु रा. ब. नीं ही गोष्ट अशक्य समजून जरासन्धास भीमाकरवीं एकदांच चिरविला आहे.

असे योग्य फेरफार बरेच केलेले आहेत. तरी या पुस्तकांत 'विवेचकता' व 'अन्धश्रद्धा' यांचें मिश्रण झालेलें आहे, असें कष्टानें ह्मणावें लागतें. विचारांच्या योग्य कसोटीला जेवढ्या गोष्टी उतरतील तेवढयाच त्यांनीं या पुस्तकांत द्यावयास पाहिजे होत्या. ज्या तशा उतरत नव्हत्या त्या खरोखरीं गाळावयास तरी पाहिजे होत्या, किंवा प्रस्तावनेंत अगर उपसंहारांत प्रस्तुत पुस्तकांतील गोष्टींच्या शक्याशक्यतेबद्दल विस्तृत विवेचन तरी यावयास पाहिजे होतें. प्रस्तुत पुस्तकाचा उपसंहार निवळ मराठी वाचकांना अपूर्व आहे. परन्तु त्यांतच वरील विवेचन विस्तारपूर्वक दिलें असतें तर फार बरें झालें असतें. श्रीकृष्णप्रसादानें या पुस्तकाच्या अनेक आवृत्ति निघतील असें वाटतें. तरी पुढच्याच आवृत्तीच्या वेळीं रा. ब. नीं या सूचनेचा अवश्य विचार करावा अशी त्यांस प्रेमपूर्वक विनंती करून हें परीक्षण संपवितों.

विनायक सदाशिव वाकसकर.

एका सरकारी कामगाराच्या रोजनिशींतील उतारे.

[मे महिन्याच्या अंकावरून पुढें चालू.]

[उद्धर्ता टोमदेव.]

ता० १२–१३ फेब्रुवारी–आंबेगांव.—घोड्याहून आंबेगांवपर्यंत जाण्यास घोडनदी ५।६ दां ओलांडावी लागते. इतकीं वळणें घेऊन ती तेथें वाहते. येथें पूर्वी पेश्वाची महालकचेरी होती. येथें आठवड्यास बाजार भरतो. तो सभोंवतालच्या पहाडी गांवांस उपयोगी पडतो. येथून भीमाशंकरापर्यंत डोंगरी गांवांत कोळी लोकांची वस्ती आहे. ह्या प्रदेशास कोळवन किंवा कोळठाण म्हटल्यास शोभेल. आंबेगांवच्या पश्चिमेस एक खडकाची निरुंद घळ असून तींतून घोडनदी आपला मार्ग जोरानें काढिते. ही घळ पाहण्याजोगती आहे.

आंबेगांवापासून पुढें बैलगाडी चालत नाहीं. सरकारी दप्तर व खासगी सामान डोकीवर न्यावयाचें! त्याबद्दल वहिवाट अशी आहे कीं, एका गांवच्या लोकांनीं पुढील गांवच्या पाटलाच्या स्वाधीन सामानाचे पेटारे वगैरे मोजून करावयाचे. त्या पाटलानें आपल्या गांवच्या लोकांबरोबर ते सर्व डाग पुढील गांवास पाठवावयाचे, असें मुक्कामास जाईपर्यंत चालावयाचें. हें सर्व काम ते लोक बिनबोभाट करितात. त्यास ठरावाप्रमाणें तनखा दिला म्हणजे ते खूष! येथून भीमाशंकरपावेतों बहुतेक सर्व वस्ती कोळी लोकांची. हे कोळी लोक शेती करून निर्वाह करितात. तथापि जात्या काटक व धाडशी असल्यामुळें कधीं कधीं दरोडे घालूं लागून बंड करितात. राघू भांगऱ्या, दादू, होन्या इत्यादिकांचीं बंडें प्रसिद्ध आहेत.

ता० १४ फेब्रुवारी–वजपें किंवा वचपें–ह्या कोळी गांवास आम्ही मुक्कामास गेलों. तेथें एका वृद्ध ब्राह्मण पंतोजीवरील कोळी लोकांचें अत्यंत प्रेम पाहून चमत्कार वाटला. पण कोळ्यांचें बंड झालें ह्मणजे मग त्यास ते त्या गांवांतून हलूं देत नाहींत; कारण कदाचित् त्यानें सरकारास बातमी फोडली तर? अशा वेळीं ते त्यास सांगतात, "बामणा, तुला जिन्नसपानस काय लागेल तें आम्ही तुला आंबेगांवाहून किंवा घोड्याहूनही आणून देत जाऊं; पण तूं येथून हालतां कामा नये! जर का तूं कांहीं हालचाल केलीस किंवा कांहीं बातमी दिलीस तर तुला कुऱ्हाडून टाकूं!!" असें बजाविल्यावर तो ब्राह्मण अशावेळीं तेथून हलतो कशाला?

कोळी लोकांचें नुकतेंच एक बंड होऊन गेलें असल्यामुळें या गांवास व इकडील दुसऱ्या सर्व गांवांस कोळी लोकांची रात्रीं नऊ वाजण्याचे सुमारास पाटील हजेरी घेतो.

येथून भीमाशंकरास जावयाचें ह्मणजे सात डोंगर चढावे लागतात. त्यांस समुच्चयानें सातमाळ म्हणतात. माळ अर्थात् सात डोंगरांची.

ता० १५ फेब्रुवारी.—जांबोरी–येथें आमचें बिऱ्हाड पाटलाच्या मांडवांतच लागलें होतें. मी येऊन पोंचल्यावर त्या वृद्ध पाटलानें रामराम केला. शिरस्तेदारांनीं ओळख करून देतांना सांगितलें कीं, हे होन्याचे बंधु. होन्याच्या दंग्यांत यांची पाटिलकी काढून यांच्या मुलास दिली. हे

ऐकून दोन कुशल प्रश्न त्या वृद्धास करून होन्याचें हल्लीं कोण आहे म्हणून विचारिलें. तों होन्याची बायको व अल्पवयस्क मुलगा तेथेंच शेजारीं निराळीं राहतात म्हणून कळलें. असो, अशा प्रकारें आम्हीं एका मोठ्या दरोडखोराच्या गांवींच नव्हे तर खुद्द त्याच्या घरींच जाऊन राहिलों ! पण कोळी लोकांचा पाहुणचार चांगला असतो; त्यांतून सरकारी कामगाराचा तर ते तो अधिक तत्परतेनें करितात.

कोळ्यांनीं कोणाकडे दूधभात खाल्ला कीं, मग त्या घराण्यास कोणत्याही कोळ्याकडून धका पोंचत नाहीं, अशी त्यांची नीति आहे म्हणून समजलें. ह्यास ते "त्याचा आमचा दूधभात झाला आहे" असें म्हणतात. ही एक प्रकारची शपथ आहे. पण तसला प्रसंग, म्हणेज दूधभात होण्याचा प्रसंग, ते बहुधा कोठें आणीत नाहींत !

दुसरे दिवशीं होन्याची बायको येऊन भेटली. तिचा अर्ज असा होता कीं, मी रांडमाणूस एकटी, माझ्या पोरास शाळेंतून सोडवाल, तर मला त्याची शेतकामांत मदत होईल ! हें ऐकून मला आश्चर्य वाटलें.–आणि तुझ्या मुलास शाळा सोडण्यास कोण नको म्हणतो ?–म्हणून तिला विचारतां, " घोड्याचा फौजदार " असा तिचा उद्गार निघाला.पुढें शाळामास्तर यांस विचारितां कळलें कीं, घोडें येथील फौजदार सहा सहा महिन्यांनीं इकडे येऊन, सरकारी शाळेंत जाणाऱ्या मुलांची याद करून, आईबापांस ताकीद देतात कीं, खबरदार कोणीं मुलगा शाळेंतून काढला तर ! ह्या ताकिदीवर इकडील कोळी लोकांच्या शाळा चालल्या आहेत ! इतके हे लोक भोळे आहेत म्हणा किंवा पोलिसांचा त्यांस इतका धाक आहे म्हणा. असो. " तूर्त तुझ्या मुलास शाळेंतून काढतां येणार नाहीं,जरा जाणता झाला म्हणजे तूं अर्ज कर, " असें सांगतां ती बिचारी मुकाट्यानें चालती झाली!

ता. १६।१७ फेब्रुवारी–राजपूर.–कोणी यास राजपुरी असेंही म्हणतात. शिरके आडनांवाच्या मराठे घराण्याची ही राजधानी. या शिरक्यास पुढें ' बाटेराव ' असें नांव पडलें.

शिरके राजास काळें कुष्ट उद्भवलें होतें, म्हणून तो भीमानदींत स्नान करण्यास जात असे. त्याचें कुष्ट कमी होऊं लागलें व त्याचा भाव अधिकाधिक वाढूं लागला.

भीमाशंकराविषयीं येथें दंतकथा प्रचलित आहे ती अशी:—भीमाशंकर किंवा भीमशंकर हा देव फक्त एका कोळ्यास मात्र माहीत होता. तो आपल्या दोन हातांनीं निर्गुडीचीं अथवा कारवीचीं पानें आणून व तोंडांत पाणी धरून दोनी हातांनीं तीं पत्रें व तोंडानें पाणी देवास भक्तीनें अर्पण करीत असे !

शिर्केराजास हा देव अर्थात् माहीत नव्हता. पण भीमास्नानास जातां येतां त्या कोळ्याच्या मुलीवर राजाचें प्रेम जडून त्यानें तिजशीं लग्न लाविलें. तेव्हां तिच्या बापानें देवाचें स्थान राजास दाखविलें. भक्तिपूर्वक शंकराची पूजा करतांच देवानें राजाच्या आंगावर हात फिरविला. तों त्याचें कुष्ट निःशेष नाहींसें झालें ! शिर्केराजास " बाटेराव " म्हणण्याचें कारण त्यानें कोळ्याच्या मुलीशीं विवाह केला हेंच असावें.

कुष्ट साफ नाहींसें झाल्यावर राजानें भीमाशंकराचें देवालय बांधिलें. तशींच आणखी १२ शिवमंदिरें व १२ तळीं त्यानें बांधिलीं. आणि राजपूर हीं आपली राजधानी केली. राजपूर असें ह्या गांवाचें नांव पडण्याचें कारण हेंच. राजपुरासही त्यानें मोठमोठे राजवाडे व देवालयें बांधिलीं. ह्या शिर्के घराण्याचा विश्वसनीय असा इतिहास मिळणें अशक्य दिसतें.

राजपूर एका प्रशस्त पठारावर वसलें असून स्थळ बहुत सुंदर दिसतें. गांवाजवळच एक तलाव व एक आंबराईही आहे. मोंगलांनीं शिरक्यांचे वाडे व देवालयें पाडून त्यांचे चिरे चाकणचा किल्ला बांधण्यास नेले म्हणतात! तलावाजवळच दोन चिरे पडले आहेत त्यांवर लेख आहेत, पण ते इतके झिजून गेले आहेत कीं ते वाचतां येत नाहींत. हल्लीं गांवकरी लोक ह्या तलावाचे चिरे काढून मारुतीचें देऊळ बांधीत आहेत. गांवानजीकच एक विहीर आहे, तीही ह्या तळ्याच्या चिऱ्यांनींच बांधिली असल्याचें दिसतें. हा तलाव भीमाशंकरच्या रस्त्यावरच आहे. त्या पलीकडे एक महादेवाचें देवालय मोडून पडलेलें आढळतें. जवळच कालिकेचेंही देवालय आहे. एकंदरींत राजपूर हें एक रम्य स्थळ असून सभोंवतीं निरंतर हिरवी गार राहणारी अशी झाडी लागून गेली आहे.

राजपूरचा पठार ऐसपैस असून त्याची उंची सुमारें ३५०० ते ४००० फूट असावी. ह्या पठारावर पाण्याची सोय होईल तर माथेरान, महाबळेश्वराप्रमाणें उन्हाळ्यांत हवा खाण्याचें हें एक उत्तम स्थळ होईल.

ता० १७ फेब्रुवारी—सकाळींच कूच करून आम्हीं भीमाशंकरास जावयास निघालों. वाटेंतच निडगळ (निगडळ ?) गांव लागतें. ह्या गांवास दोन विहिरींचें पाणी मिळतें. निडगळास एक पोलीस ठाणें कोळयांच्या बंदोबस्तासाठीं मुद्दाम ठेविलें आहे. भीमाशंकर हा निराळा गांव नसून निडगळच्या शिवेस लागून असणाऱ्या भोंवरगिरी नांवाच्या गांवच्या शिवेंत आहे. भीमाशंकर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक *होय. ह्यास भीमाशंकर म्हणण्याचें कारण असें कीं, त्रिपुरासुर राक्षसाचा वध करण्यासाठीं शंकरास अत्यंत उग्र, भयानक असें रूप घ्यावें लागलें. तें इतकें अवाढव्य होतें कीं, पृथ्वीचा रथ केला त्यावर पाय ठेवितांच पृथ्वी रसातळास जाऊं लागली! तेव्हां एक पाय त्या रथावर व एक पाय नंदीवर देऊन शंकर शरसंधान करण्यास उभे राहिले. सूर्य चंद्र हे त्या रथाचीं चक्रें झाले! ब्रह्मदेव त्यांचा सारथी, हिमालय पर्वत त्यांचें धनुष्य, वासुकी सर्प त्या धनुष्याची प्रत्यंचा, व प्रत्यक्ष भगवान् विष्णु त्यांचा बाण!! या प्रकारें सिद्धता झाल्यावर वर्षानुवर्ष युद्ध चालून शेवटीं त्रिपुरासुराचा वध त्यांनीं केला आणि जगत्त्रयाचा ताप त्यांनीं

---

* दुसरीं ११ ज्योतिर्लिंगें हीं:—सोमनाथ (सौराष्ट्रांत म्ह० काठेवाडांत); मल्लिकार्जुन (श्री शैलपर्वतीं);(३) महाकाल (उज्जनीस); (४) ओंकार (नर्मदातीरीं);(५।६।७) वैद्यनाथ, नागनाथ आणि घुसृणेश्वर (हैदराबाद संस्थानांत); (८)केदारनाथ (हिमालयांत);(९)त्र्यंबकेश्वर (गोदावरीच्या उगमीं); (१०) रामेश्वर (सेतुबंधीं); (११) विश्वनाथ (काशीक्षेत्रीं).

चुकविला.+ या युद्धाच्या श्रमानें जो शंकरास घर्म आला त्यांतून भीमानदी उत्पन्न झाली ! असो. अशा भीमस्वरूपामुळें ह्या ज्योतिर्लिंगास भीमशंकर असें नांव पडलें.

निडगळाहून भीमाशंकरास जातांना प्रथम कमळजादेवीचें मंदिर लागतें. मंदिराबाहेर देवीच्या समोरच जबडा पसरलेला, लाल जीभ बाहेर काढलेला, असा वाघ स्थापित केलेला आहे. जसा महादेवाचा नंदी, तसा देवीचा व्याघ्र हा वाहन होय. ह्या अरण्यमय प्रदेशांत वाघ वगैरे रानटी जनावरें वावरत असतात. त्यांपासून गाई, शेळ्या, मेंढया यांचें संरक्षण व्हावें म्हणून ह्या व्याघ्रदेवतेपुढें बकरीं वगैरेचे बळी कोळी लोक देतात. कमळजेचा पुजारी राजपूरच्या लोहकरे घराण्यापैकीं आहे. तो आपणास शिर्के ऊर्फ बाटेराव राजाचा वंशज म्हणवितो. लोहकरे किंवा लोंकरे असें आडनांव पडण्याचें कारण त्याच्या पूर्वजाच्या अंगावर लोंकरीसारखे केस होते.

भीमाशंकर महादेव बारा जोतिर्लिंगांपैकीं असून ऐन मराठी राज्याच्या मुलखांत त्याचें स्थान आहे. तथापि देवाचें मंदिर लहानसेंच आहे, हें जरा चमत्कारिक वाटतें. जुनें दगडी देऊळ अगदींच लहान होतें तें पडलेलें दिसतें. हल्लींचें देऊळ बांधण्यास नाना फडणिसांनीं आरंभ केला.पण तें त्यांच्या हातून पुरें झालें नव्हतें मंदिरावरील घुमट व्हावयाचा राहिला होता. पुढें अलीबागकर बिवलकर तो बांधूं लागले. परंतु त्यांस नानांच्या वंशजांनीं तसें करूं न देतां शेवटीं स्वतांच तें काम त्यांनीं पुरें केलें.

ह्या देवालयाभोंवतींच ५।७ ब्राह्मणांचीं घरें आहेत. ते देवाची पूजाअर्चा करितात. ते बहुतेक सर्व वाडें येथील राहणारे असून शुक्ल यजुर्वेदी आहेत. देवाच्या गुरवाची उत्पत्ती राजपूरचा लोहकरे याजपासून गुरविणीच्या पोटीं झाली म्हणून कळतें.

नंदीच्या पलीकडे देवळाच्या बाहेर दोन दगडी खांब बांधून त्यांवर घातलेल्या लोखंडी दांडीस एक भली मोठी ओतींव घांट टांगलेली आहे. तिजवर एक स्त्रीची मूर्ति, एक क्रूस व इ. स. १७२९, हीं उठावांत काढिलेलीं आहेत. ही स्त्री बहुधा येशू ख्रिस्ताची माता मेरी ही असावी. या सर्व चिन्हांवरून ही घांट साष्टींतील किंवा वसईतील एखाद्या ख्रिस्ती देवळांतील असून १७३९ मध्यें चिमाजी आपानें वसई सर केल्यानंतर भीमशंकरास अर्पण केलेली असावी.

येथें स्नानासाठीं वगैरे दोन तीन चिरेबंदी कुंडें आहेत. त्यांपैकीं भीमकुंड हें देवालयाजवळच असून लहानशा हौदासारखें दिसतें. भीमा नदी देवालयापलीकडे उत्पन्न होऊन या कुंडात प्रथम झिरपते म्हणून सांगतात. यांतच यात्रेकरू स्नान करून देवाची पूजा करितात.जवळच दुसरें एक कुंड विहिरीसारखें बांधिलेलें आहे, तें नादुरुस्त म्हणून त्याचें पाणी कोणी वापरीत नाहींत. तिसरें हनुमानकुंड, तें देवालयापासून चांगलें दोन अडीच

+ महिम्नस्तोत्रांत म्हटलें आहेः—
रथः क्षोणी यंता शतधृतिरगेन्द्रो धनुरथो
रथांगे चंद्रार्कौ रथचरणपाणिः शर इति ॥
दिधक्षोस्ते कोऽयं त्रिपुरतृणमाडंबरविधि–
र्विधेयैः क्रीडंत्यो न खलु परतंत्राः प्रभुधियः ॥

फलोंगांवर आहे. हें कुंड मोठें असून तें यात्रेच्या वेळीं फार उपयोगी पडतें.

कमळजा देवीच्या पाठीमागें **कोंकण**दरा म्हणून प्रचंड खोल दरा आहे. त्याच्या माथ्यावरून खालच्या **कोंकण** प्रदेशाचा लांबवर देखावा नजरेस येतो. **माथेरान**, **बावा मलंग**, **करनाळा** (आपटें नजीक)हे पहाड दृष्टीस पडतात.**कोंकण**-दऱ्याच्या खालच्या बाजूस **कमळजा** देवीची नहाणी म्हणून एक झरा आहे. ह्याच कड्याच्या पूर्वेस **नागफणी** नांवाचा दुसरा कडा आहे. 'नागफणी'म्हणण्याचें कारण, सुळका वर जाऊन तेथें नागाच्या फणीसारखा पसरलेला दिसतो. **नागफणी**वर जाण्यास फुरसूद झाली नाहीं.

भीमेच्या उगमाचें स्थान मुख्य देवालया-पासून फार लांब नाहीं. जाऊन पाहतां तें शुष्क दिसलें! **महाबळेश्वरीं कृष्णा**दि नद्यांच्या उगम-स्थानीं ५।७ झरे दिसतात, तशी येथें कांहीं साक्ष नाहीं. येथून **भीम**कुंडांत व त्या कुंडां-तून गुप्त होऊन पुढें बऱ्याच अंतरावर ओढ्याच्या रूपानें **भीमा**नदी दृश्य होते. पण ह्या ओढ्यां-तही ह्या वेळीं पाणी नाहींच! गोटे, दगड यांनीं भरलेलें असें कोरडें पात्र मात्र दिसतें! त्या ओढ्यापासून बऱ्याच अंतरावर **व्याघ्र**पाद मुनीच्या आश्रमाचें स्थान व गुप्त **भीमा**शंकर अशीं स्थळें आहेत.

ह्या देवस्थानाकडे आठनऊशें रुपयांची नक्त नेमणूक असून खेरीज कांहीं जमीनही इनाम आहे. व्यवस्था पंचांकडे आहे.

येथील यात्रा माघ वद्य चतुर्दशीस भरत असते. बाजार व यात्रेकरू मिळून सुमारें पंधरा सोळा हजार माणूस जमत असावें. यांस राहण्यासाठीं मंडप घालून वर रानपाल्याची छाया करितात. येथें बेलाचीं झाडें होत नाहींत. म्हणून निर्गुंडीच्या त्रिदळांवर बेलाची वाण भागवावी लागते! बेल पाहिजेच असेल तर खालून **खांडस*** येथून किंवा **वाडें** येथून आणावा तेव्हां! यात्रेंत येथें फार गर्दी असते, तेव्हां हें स्थल पाहण्यास अडचणी फार. आम्ही यात्रेच्या पूर्वी गेल्यानें सर्व गोष्टी नीटपणें पाहण्यास सांपडल्या. माझें मत असेंच आहे कीं कोणतेंही देवस्थान नीट पाहणें तर यात्रेच्या वेळीं तेथें जाणें सोईचें नाहीं. इतर वेळींच जाणें चांगलें.

येथील **विनायकभट्ट कोंडिलकर** नांवाचे वृद्ध ब्राह्मण भेटले. त्यांनीं माझ्या तीर्थरूपांचा व वडील बंधूंचाही परिचय असल्याचें सांगून आपले घरीं मला पानसुपारीस बलाविलें, व एकदां सहकुटुंब देवदर्शनास येऊन आमचे घरींच उतरावें म्हणून आग्रह केला. मीं बरें म्हटलें, पण सहकुटुंब तेथें जाण्याची पुढें संधीच आली नाहीं!

भीमाशंकराचें शिखर, भोंवतालची वनशोभा व तेथील देवस्थानें ह्यांवर कोणी एकादें महा-काव्य लिहील तर सृष्टिवैभव, इतिहास, पुराण-कथा, दंतकथा इ. इ. विषयांची सामग्री त्यास बहूत मिळेल. ह्या सामग्रीचें टाचण करण्यास त्यानें सुमारें एक आठवडा येथें घालविला पाहिजे.

ता. १९ फेब्रुवारी—**भीमा**शंकराहून **वाड्या**-कडे जाण्यास निघालों ते **भीमा**नदीच्या खोऱ्यां-

---

* **खांडस** **भीमा**शंकराखालीं कोंकणांत; **वाडें** **भों**वरागिरीखालीं.

तून चाललों. इकडे नदीच्या खोऱ्यास ' नहर ' ह्मणतात. म्हणजे घोडनहरांतून आम्ही चढलों व आतां भीमनहरांतून उतरूं लागलों.

भीमाशंकराहून वाड्याकडे जातांना उतार फारसा नाहीं; आणि भोंवरगिरीपर्यंतच पायीं किंवा घोड्यावर बसून जावें लागतें. भोंवरगिरीपासून चांगली सडक झाली आहे. आमच्या गाड्या वगैरे आम्हीं आंबेगांवीं सोडल्या होत्या त्या भोंवरगिरीस येऊन आमची वाट पाहातच होत्या. गाड्यांत सामानसुमान भरल्यावर सायंकाळीं आम्हीं वाड्यास मुक्काम केला. जसें घोडनहरांत मोठें गांव घोडें तसें भीमनहरांत वाडें. ह्या दोन गांवांची नांवें जोडीनें येतात. वाड्यास नदी भीमा. तिला चिरेबंदी घाट बांधिले आहेत, पण येथें पाणी चांगलें नाहीं.

ता० २० फेब्रुवारी—वाड्याहून बिबी व तेथून कडधें. बिबी भीमेच्या कांठींच आहे. तेथील महादेवाच्या देवालयांत मुंबईजवळील उरण येथील एक बैरागी आज ३०।३५ वर्षें राहात आहे. तो सांगतो कीं, उरण येथील द्रोणागिरीवर उरणावंती देवी होती. तिनें पोर्तुगीज लोकांनीं द्रोणागिरी घेतला तेव्हां उरण येथें जो मोठा तलाव आहे त्यांत उडी घेतली ! * द्रोणागिरीवर एक गुहा असून तेथून घारापुरी बेटांत जाण्यास एक भुयार असल्याचेंही तो † सांगतो ! ! उरणास मी असतांना ह्या गोष्टी माझ्या कानीं कधींही आल्या नाहींत. आतां त्याबद्दल शोध केला पाहिजे.

बिबी एथील लोक भीमेच्या पाण्याच्या कावडी श्रावण महिन्यांत नेऊन शंभुमहादेवास स्नान घालितात म्हणून समजतें. कावडे मुंगी घाटानें शंभुमहादेवास (जि० सातारा) जातात असेंही कळतें.

कडधें येथें मुकामास गेलों. एथील पाटील नाइकडे आडनांवाचे आहेत. हल्लींचे पाटील हुशार असून वजनदार आहेत. कडधें मागें रास्त्यांच्या जहागिरींत मोडत असे.

गांवापासून सुमारें अर्ध्या मैलावर खंडोबाचें देऊळ आहे. ह्या खंडोबाची जत्रा माघ शुद्ध १५ रोजीं भरते. जत्रेंत माघ वद्य १ रोजीं कुस्त्या होतात. गांवकरी लोक ह्या कुस्त्यांसाठीं वर्गणी जमा करून कुस्त्या करणारांस पागोटीं देतात. सुमारें १००।१२५ रुपये या कामीं खर्च होतात. सुमारें ३० पासून ४० पर्यंत दरसाल कुस्त्या होतात. लांबलांबून लोक त्या कुस्त्या पाहण्यास येतात. कुस्त्या करण्याकरितां उमेदवार जवानही निरनिराळ्या गांवांहून येतात. खेडचे फौजदार जत्रेंत बंदोबस्तास येतात, तेच कुस्त्यांच्या समारंभाचे अध्यक्ष असतात, व त्यांच्याच हातून कुस्तीगार यांस बक्षिसें देतात.

याप्रकारेंच मलठण येथें पोंवार सरदारांच्या आश्रयानें कुस्त्यांचा समारंभ होतो.

भीमाशंकरच्या जत्रेंतही कुस्त्या होतात.पण तेथें बक्षिसें वगैरे कांहीं नसतें म्हणून कळतें. तें नीट नाहीं. उत्तेजनार्थ तेथेंही वर्गणी करून बक्षिसें देणें मामलतदार, फौजदार वगैरे सर-

* काशीस औरंगजेब विश्वेश्वराच्या मंदिराचा विध्वंस करण्यास गेला, तेव्हां देवानें भागीरथींत उडी टाकिल्याचें सांगतात.

† याप्रमाणें पुण्यास शनवारचे वाड्यांतून पर्वतीवर जाण्यास भुयार असल्याचेंही आपण ऐकतों.

कारी कामगार बंदोबस्तास येतातच, त्यांस अशक्य होणार नाहीं.

कुस्त्यांचे समारंभ जागोजाग होतात, ही आपल्याकडे चांगली चाल आहे. तींत थोडी सुधारणा केल्यास उत्तेजनही अधिक येईल. प्राचीन ग्रीक लोकांत "ऑलिम्पिक गेम्स" नांवाचे समारंभ होत असत. त्यांसाठीं नाना कलांमध्यें व मर्दानी खेळांमध्यें कौशल्य दाखविण्यासाठीं सर्व ग्रीस देशांतून कारागीर, कवि, उमेदवार जवान असे येत असत. जिंकणारास बक्षीस काय? तर ऑलिव्ह वृक्षाच्या पानांचा मुकुट जेत्यास घालून त्याच्या नांवाचा जयघोष सर्व प्रेक्षक समुदायापुढें करावयाचा! पण एवढ्यानेंच उत्तेजन येऊन त्या समारंभांत जय मिळविण्यासाठीं किंवा प्रशंसा मिळविण्यासाठीं ग्रीक लोकांमध्यें मोठी धडपड सुरू असे.

आमच्याकडेही भीमाशंकर सारख्या ठिकाणीं द्रव्याचा अगदींच अभाव असेल तर अशोकपल्लवांचा अगर आम्रपल्लवांचा मुकुट जेत्याच्या डोक्यास घालून पिवळे रंगाची गांठी (साखरेच्या पदकांची माळ) त्याच्या गळ्यांत घालावी व नंतर त्याच्या गांवाचा व नांवाचा उच्चार करून मोठ्यानें जयघोष करावा! चित झालेल्याच्या गळ्यांत पांढरी गांठी मात्र अध्यक्षांनीं घालून त्यास दोन उत्तेजनपर शब्द बोलावे. द्रव्याची वाण जेथें नाहीं तेथें पागोटीं, उपरणीं वगैरे बक्षिसें आहेतच, पण तीं देतांना जेत्यांच्या गांवांचा व नांवांचा उच्चार व जयघोष करणें व वाद्यें वाजविणें अगदीं अवश्य आहे.

शिमग्यांत गांवोगांवीं हिडिस खेळ खेळतात त्याऐवजीं मर्दानी खेळांचा समारंभ करून त्यांत वर लिहिल्याप्रमाणें अशोकपल्लवांचा किंवा आम्रपल्लवांचा, गांठ्यांचा, व जयघोषाचा उपयोग केल्यास उत्तेजन येऊन चढाओढ सुरू होईल. खर्चही फार येणार नाहीं. आणि अमंगळ आचार आणि विचार यांचा बंदोबस्त* होईल. जेत्यांची व चित झालेल्यांची मिरवणूक काढून देवाच्या दर्शनास नेल्यास वाईट नाहीं. आपलेकडे धुळवडीच्या दिवशीं देवीच्या दर्शनास जाण्याची वहिवाट पुष्कळ ठिकाणीं आहेच.

कडध्याच्या समोरच भीमेच्या दक्षिणतीरावर वेताळें गांव आहे. येथें पूर्वीं महालाचें ठाणें होतें. महालकचेरीच्या इमारतींत हल्लीं सरकारी मराठी शाळा भरते.

सायगांव.—वेताळ्याच्या पूर्वेस भीमेच्या काठीं सायगांव आहे, तें पूर्वीं पुण्याचे सरदार पेंठे यांस जहागीर होतें ह्मणतात.

ता० २१ फेब्रुवारी.—चास (कमान) भीमेच्या उत्तर तीरावर. श्रीमंत रखमाबाई चासकर यांनीं भीमेस घांट उत्तम प्रकारचे बांधिले आहेत. घांटासन्निध श्री सोमेश्वराचें भव्य मंदिर नजरेस येतें. त्याची पोंवळीही सुरेख बांधिली असून तिच्या आंतील देवालयाभोंवतालचा प्रदेश विस्तीर्ण आहे. मंदिरासमोरच दीपमाळ आहे तिची बांधणी फारच सुंदर आहे. ह्या दीपमाळेची बरोबरी करणारी दुसरी दीपमाला काशीपासून रामेश्वरापर्यंत पाहण्यांत येत नाहीं ह्मणून सांगतात! कारागिरानें काम इतकें उत्तम केलें त्याबद्दल त्यास

* अलीकडे पुणें, मुंबई वगैरे शहरांत मर्दुमकीचे खेळ शिमग्याच्या सणांत करण्याचा प्रघात पडला आहे तो चांगला आहे, हें सांगणें नकोच.

बक्षीसही बाईंनीं मोठेंच दिलें; पण अशीच सुंदर दुसरी दीपमाला तो कोठें बांधील म्हणून त्याचा हात तोडून टाकिला म्हणून समजतें ! ! मंदिराच्या आवारांतील बकुलवृक्ष प्रचंड असून पल्लवांनीं आणि पुष्पगुच्छांनीं अत्यंत शोभिवंत असतात. एकंदरींत हें मंदिर व त्याचें आवार मनाला विश्रांति आणि शांति देणारें आहे खरें. स्नानसंध्या भजनपूजनादिकांमध्यें काल घालविण्यास हें उत्तम स्थान होय. यांत संशय नाहीं. सोमेश्वराचा उत्सव वैशाखांत होतो, तसाच कार्तिकांत त्रिपुरी पौर्णिमेसही होतो.

येथें चासकर जोशी हें कोंकणस्थ घराणें मुख्य. त्यांस मोंगलांकडून मनसब होती. हे पुढें पेशव्यांचे संबंधी +झाले. त्यांच्या अनुषंगानें येथें कोंकणस्थांचीं बरींच घराणीं येऊन राहिलीं. त्यांतून पाटणकरांनीं विष्णूचें देवालय बांधिलें आहे. तेथील मूर्ती फार सुरेख आहेत. प्रसिद्ध साधू चंडीरामबोवा हे ह्या देवालयाच्या बाजूसच मठ करून राहिले होते म्हणून सांगतात.

ता. २२ फेब्रुवारी—त्या दिवशीं कडूस येथें मुक्कामास गेलों. हा गांव पुण्याचे सरदार नातू यांस इनाम आहे. गांव फार मोठा. ब्राह्मणवस्तीही दांडगीच आहे. येथें देशस्थ ऋग्वेदी व यजुर्वेदी ब्राह्मणांचीं घराणीं बहुधा समसमान असून उभयतांचें द्वैत आहे. त्यामुळें तट व तंटेबखेडे त्यांच्यामध्यें नेहेमीं सुरू असतात. दोन्ही शाखांच्याही वैदिक शाळा येथें आहेत, आणि एथील वैदिकांचा मोठा लौकिक आहे. पण दोन्हींही पक्ष हट्टी व अभिमानी असल्यामुळें सरकारी दडपणाशिवाय त्यांचा कोणत्याही कामांत सलूख होत नसतो ही दुःखाची बाब होय.

येथें धायबर ह्यांचा जुना वाडा आहे. नातूंचाही आहे. धायबर हें मराठे घराणें पेशव्यांच्या ९२ पाग्यांपैकीं एक होय. हल्लीं धायबर बडोद्यास असतात. त्यांस तेथें गायकवाडांकडे असामी किंवा सरदारी आहे म्हणून कळतें. येथें वाड्यांत त्यांच्यापैकीं कोणी राहात नाहींत. वाड्यांत सरकारी मराठी शाळा भाडें देऊन ठेविली आहे.

ता० २४ फेब्रुवारी—खेड (कडूस) तालुक्याचें ठाणें, भीमेच्या कांठीं आहे. येथें पुण्याहून चाकणावरून जुन्नर—नासिकाकडे दक्षिणोत्तर जाणारा मोठा रस्ता व भोंवरगिरीहून पूर्वपश्चिम जाणारा रस्ता हे मिळतात. येथेंही ब्राह्मण—वस्ती बरीच मोठी आहे. श्रीचंडीरामबोवांचा मठ उत्तम प्रकारें प्रशस्त असा बांधिला आहे. तेथें आमच्यासारख्या पांथस्थांची उतरण्याची सोय उत्तम आहे. मात्र पाणी भीमेच्या खोल पात्रांतून आणावें लागतें !

शाहूमहाराज यांची व ताराबाईकडील प्रतिनिधि परशुराम त्रिंबक यांची लढाई खेडाजवळच झाली. तींत बाळाजी विश्वनाथाच्या मसलतीनें व धनाजी जाधवराव यांच्या साहाय्यानें प्रतिनिधींचा मोड झाला आणि ताराबाईचें पारडें खालावलें तें खालावलेंच. पुढें परशुराम त्रिंबकही शाहूस वश झाले.

खेडास रामचंद्र जनार्दन ऊर्फ भाऊसाहेब पळनिटकर ह्मणून एक मुनसफ होऊन गेले.

+ कृष्णराव चासकर यांची बहीण काशीबाई ही बाजीराव बल्लाळ यांची पत्नी.

त्यांची कर्मनिष्ठा, नियमितपणा व करारीपणा यांबद्दल मोठा लौकिक आहे. ते कचेरींत जाऊं लागले म्हणजे लोकांनीं आपलीं घड्याळें लावावीं! कारण ते बरोबर १० वाजतां कचेरींत पाय ठेवावयाचेच! त्यांची खेड येथील दिनचर्या एका माहितगारानें सांगितली ती अशी:—

(१) पाहांटेस २ वाजतां उठून सुमारें १॥ तास सरकारी कागदपत्रांचें अवलोकन करणें.

(२) साडेतीन वाजण्याच्या सुमारास शौच मुखमार्जन करून स्नानासाठीं भीमेवर जाणें. बरोबर कंदील घेऊन शिपाई जावयाचा; त्यानें भीमाकांठीं श्रीकेदारेश्वराचें देवालय आहे तेथें दिवा लावून परत घरीं जावें.

(३) स्नानानंतर प्रातःसंध्या आणि केदारेश्वरावर एकादशणी.

(४) नंतर घरीं येऊन घरच्या देवांची एकादशणीसह पूजा व सप्तशतीचा पाठ. इतक्या कृत्यास ७ वाजत.

(५) इंग्रजी अभ्यास ७ ते ८. शिकविण्यास मास्तर मुद्दाम ठेविला होता.

(६) मंडळी आली असेल त्यांबरोबर संभाषण, ८ ते ८॥.

(७) सुमारें तास ८॥–९॥. पुनः शौचविधि-भीमेचें स्नान-गवाळें स्वतः घेऊन जात असत–माध्यान्हसंध्या इ०. घरीं येऊन वैश्वदेव करून भोजन.

(८) वामकुक्षी ९॥ ते ९॥। व कोर्टांत जाण्याची तयारी.

(९) कोर्टांत किंवा कोठें जाणें तें झपझप चालत जावयाचें. त्यावरून त्यांस आगगाडीची उपमा देत; त्यांस 'आगगाडी मुनसफ' ह्मणत! बरोबर १० वाजतां कोडतांत.

(१०) कोर्टाचें काम १० ते १ वाजेपर्यंत.

(११) तास १ ते २ पर्यंत चंडीरामबोवांच्या समाधीचें दर्शन आणि वेदश्रवण.

(१२) तास २ ते २॥ अग्निहोत्राची कृति शिकणें.

(१३) तास २॥ ते ३ जानव्यांसाठीं सूत काढणें; कारण हातानें काढलेलींच यज्ञोपवीतें ते धारण करीत.

(१४) रुक्मिणीस्वयंवराची पोथी वाचणें, ३ ते ३॥.

(१५) मंडळी आली असेल त्यांशीं संभाषण, ३॥ ते ४।.

(१६) शौचविधि आणि स्नान यांकरितां भीमेवर. बरोबर ब्राह्मण परिचारक, केदारेश्वरावर एकादशणी. ४। ते ६.

(१७) घरच्या देवाची रुद्रावर्तनपूर्वक पूजा; गीतापाठ; भोजन. ६। ते ८

(१८) तास ८ ते ९ मंडळीशीं बोलणें चालणें, गृहकृत्यांची व्यवस्था वगैरे.

(१९) निद्रा ९ ते २ पर्यंत.

ही जी दिनचर्या दिली आहे तींत अतिशयोक्ति कदाचित् असेल.पण एकंदरींत ती मोठी रेखलेली आहे. जुनीं माणसें आपलें सरकारी काम दक्षपणानें करीत असतांही किती नियमितपणानें वागत, ह्याचा हा उत्तम मासला आहे. एकदां जज्जसाहेब सकाळींच कोर्टाचे तपासणीस आले असतां भाऊसाहेबांची माध्यान्हस्नानाची वेळ झाली. तेव्हां त्यांनीं जज्जसाहेबांकडे स्नानासाठीं नदीवर जाण्याची परवानगी मागितली. किती वेळ लागेल असें जज्जसाहेबांनीं विचारतांच १५।२० मिनिटांत येतों असें सांगितलें. जज्जसाहेबांनीं खुषीनें परवानगी दिली. असें ह्या करारी पुरुषाचें ओजस् होतें. असा नियमितपणा किंवा कर्मनिष्ठा अलीकडील मंडळींत कोठें दृष्टीस पडते? कालक्षेप फुकट करावयाचा नाहींच हा भाऊसाहबांचा पूर्ण निश्चय. याकरितांच त्यांचें चालणें झपझप होत असावें. असो. ही दिनचर्या किंवा अशी दिनचर्या अनुकरणीय आहे यांत संशय नाहीं.

ता० १ मार्च—दावडी.–हा गांव एकदां गायकवाडांकडे होता. त्यांचा वाडा येथें असून त्याच्यापुढें कारंजें आहे. त्याला पाणी येथील एका तळ्याचें पुरवीत असत. पण

त्याचे नळ आतां नादुरुस्त झाले असल्यामुळें कारंजें अर्थात् बंद आहे. गायकवाडांनीं हा गांव ढवळे सरदारांस इनाम दिला आहे. ढवळे हे गायकवाडांचे सेनापतीच्या हुद्द्यावर होते; कोणी ह्मणतात हुजरे होते. गांवाभोंवतीं बागाईत असून त्यास पाणी दुसऱ्या एका तळ्याचें मिळतें.

निंबगांव (दावडी) चंद्रचूड म्हणजे होळकरांचे दिवाण, यांस इनाम. त्यांचे येथें दोन वाडे आहेत. त्यांतील मोठा वाडा तटबंदी केलेला आहे. तो पाहण्यायोग्य आहे. तो भीमेच्या कांठींच आहे. भीमेचे तट येथें फार उंच तुटलेले असे नाहींत, सखल आहेत. चंद्रचूडांचे वृद्ध कारभारी रा० तांबोळी यांस मूळव्याधीनें ग्रासिलें आहे, तथापि त्यांनीं अगत्यपूर्वक हा सर्व वाडा आम्हांस दाखविला. हा वाडा फार शांत आणि थंड असा आहे. उन्हाळ्यांत येथें दिवस घालविणें सुखकर होईल. वाड्यांत श्रीविष्णूचें देवालय आहे. भीमेस घांट उत्तम बांधिले असून घाटावर दशभुज गणपतीची स्थापना केली आहे. दशभुज गणेश हा कृतयुगांतील अवतार. पुढील युगांत षड्भुज, चतुर्भुज आणि कलियुगांत द्विभुज अवतार व्हावयाचा आहे! ही दशभुज मूर्ति सुरेख असून सिंहावर आरूढ झालेली व मांडीवर सरस्वती घेतलेली अशी आहे. गणेशाची दशभुज मूर्ति माझ्या पाहाण्यांत नव्हती ती येथेंच प्रथम पाहिली.+ जय! मंगलमूर्तीकी जय.

चंद्रचूडांच्या वाड्यांत संस्कृत ग्रंथांचा संग्रह मोठा आहे. त्यांच्या यादी पुण्यास असल्याचें तांबोळी यांनीं सांगितलें; त्यामुळें कोणकोणते ग्रंथ आहेत तें पाहतां येईना. पूर्वीच्या कारकीर्दींतील कागदपत्रही पुष्कळ आहेत, पण पुण्यास आहेत म्हणून तांबोळी सांगतात!

गांवापासून सुमारें अर्ध्या मैलावर एक टेकडी आहे. तिजवर श्री खंडोबाचें देवालय आहे तें श्री० गोविंदराव गायकवाड यांनीं बांधिलें. त्यांनीं गादी मिळावी म्हणून खंडोबाची बरेच दिवस येथें सेवा केली. देवास देणगीही त्यांचीच आहे. देवालय तटबंदीचें आहे व देवालयास जाण्यास सोपें पडावें म्हणून पायऱ्या खालपासून वरपर्यंत सुरेख बांधिल्या आहेत. येथें टांकी नेहमी सुरू असते, म्हणजे पाथरवटांचें काम नेहमीं सुरू असतें. त्यांनीं दीपमाला दुरुस्त कराव्या अगर नवीन बांधाव्या, पायऱ्यांचे चिरे खराब झाले असतील ते काढून नवीन घालावे, देवालयापुढें फरशी करावी, अशा प्रकारच्या कामांवर टांकी नेहमी सुरू ठेवावी. दरमहा गायकवाडांचा तीनशें रुपयांचा येथें खर्च आहे म्हणून सांगतात.

ता० २ मार्च—महाळुंगें इंगळ्यांचें.—महाळुंगीं दोन आहेत. एक पडवळांचें व हें दुसरें इंगळ्यांचें. ग्वालेर संस्थानांत इंगळे हे सरदारी करितात. त्यांस हें महाळुंगें इनाम आहे. प्रसिद्ध सरदार अंबाजी इंगळे यांचे हे वंशज. इंगळ्यांपैकीं कांहीं होळकर सरकारच्या पदरींही आहेत म्हणून कळतें. महाळुंग्यांत त्यांचा एक नारळी बाग आहे. एथें पाणी जवळ लागतें, पण लोक खणण्याची मेहनत करीत नाहींत. येथील गांवकुसाचे मोठमोठे दरवाजे व बागा यामुळें गांवाचा देखावा मोठा रम्य दिसतो. येथें एक तलाव आहे, त्यांत कोंकणांतील तळ्यांत असतात तसल्या प्रकारचीं तांबडीं कमळें पाहून मला आश्चर्य आणि समाधानही वाटलें.

ता० ३ मार्च—खेड तालुक्यांतील आमचें काम आतां संपलें. आज दुसरे तालुक्यांत प्रवेश करीत आहों.

+ ध्यायेत्सिंहगतं विनायकममुं दिग्बाहुमाद्ये युगे
त्रेतायां तु मयूरवाहनममुं षड्बाहुकं सिद्धिदम् ।
द्वापारे तु गजाननं युगभुजं रक्तांगरागं विभुं
तुर्ये तु द्विभुजं सितांगरुचिरं सर्वार्थदं सर्वदा ॥१॥

मराठी मासिकें, त्यांचें स्वरूप व सुधारणेच्या दिशा.

[लेखक-रा. नारायण गोविंद चापेकर, बी. ए. एल् एल्. बी.]

माझ्या माहितीप्रमाणें मुंबई इलाख्यांत एकंदर मराठी भाषेंत प्रसिद्ध होणारीं ४४ मासिकें आहेत.

मासिक हा शब्द येथें लक्षणेनें वापरण्याचें प्रयोजन नाहीं. कारण ह्यांपैकीं प्रत्येक दर महिन्यास प्रसिद्ध व्हावयाचें असतें. मासिकांचीं नांवें येणेंप्रमाणें:-

(१) मधुकर; (२) मकरंद; (३) प्रेमोद्यान; (४) बालबोध; (५) भांडारी विहारी; (६) भगिनीसमाचार; (७) ज्ञानांजन; (८) आनंद; (९) क्षात्रदूत; (१०) मराठामित्र; (११) मराठी शालापत्रक; (१२) मराठी; शिक्षक (१६) नवयुग; (१४) नवें मन्वन्तर; (१५) प्रभात; (१६) विहार; (१७) इतिहाससंग्रह; (१८) मोदक; (१९) गोवर्धनमाला; (२०) भिषग्विलास; (२१) केरळकोकिळ; (२२) खेळगडी; (२३) चतुष्पाद आणि कृषिकर्म; (२४) उद्यान; (२५) चित्रमय जगत्; (२६) दैवज्ञमासिक; (२७) धर्मविचार; (२८) लोकमित्र; (२९) ज्योतिर्विजय; (३०) लोकशिक्षण; (३१) काव्यरत्नावलि; (३२) मनोरंजन; (३३) उषा; (३४) प्रभुमासिक; (३५) वैश्यमासिक; (३६) विविधज्ञानविस्तार; (३७) ब्रम्हविद्याग्रन्थरत्नमाला; (३८) विश्वब्रम्हवृत्त; (३९) धर्मजागृति; (४०) ज्योतिषरत्नभांडार; (४१) रंगभूमि; (४२) मराठा; (४३) संतांचे बोल; आणि (४४) शेती व शेतकरी.

ह्यांपैकीं पांच मासिकें म्हणजे प्रभुमासिक, वैश्यमासिक, दैवज्ञमासिक, क्षात्रदूत, आणि भांडारी विहारी हीं ज्ञातिविशिष्ट हितानहिताची चर्चा करणारीं आहेत.

निवळ काल्पनिक गोष्टींनीं क्षणभर चित्तरंजन करणारीं अशीं चार मासिकें आहेत. त्यांचीं नांवें-मधुकर, मकरंद, प्रेमोद्यान, व विहार.

एकाच विषयाला वाहिलेलीं अशीं १५ आहेत, तीं येणेंप्रमाणें:-(१) मराठी शालापत्रक, (२) मराठी शिक्षक, (३) गोवर्धनमाला, (४) इतिहाससंग्रह (५) भिषग्विलास (६) चतुष्पाद आणि कृषिकर्म, (७) ब्रम्हविद्याग्रंथरत्नमाला, (८) विश्वब्रम्हवृत्त, (९) धर्मजागृति, (१०) ज्योतिषरत्नभांडार, (११) धर्मविचार, (१२) रंगभूमि, (१३) शेती आणि शेतकरी, (१४) ज्योतिर्विजय, (१५) काव्यरत्नावलि.

बालबोध, आनंद, मोदक व खेळगडी हीं चार मासिकें मुलांकरितां अवतरलीं आहेत.

स्त्रियांच्या उन्नत्यर्थ म्हणून निघालेलें असें मासिक म्हटलें म्हणजे 'भगिनीसमाचार' हें होय.

मासिक मनोरंजन द्विविध प्रकृतीचें दिसतें. यांत गहन विषयांवर मनन करण्यासारखे क्वचित् लेख असतात, तर प्रेमविषयक गोष्टीही पुष्कळ असतात.

ज्यांमध्यें कादंबऱ्या मुळींच घेतल्या जात नाहींत व सर्व विषयांचा ऊहापोह केला जातो अशीं मासिकें चार आहेत. विविधज्ञानविस्तार, लोकशिक्षण, नवें मन्वन्तर, आणि उषा

चित्रमय जगत् नवयुग, लोकमित्र, मराठामित्र, प्रभात, उद्यान, ज्ञानांजन, हीं मिश्र मासिकें होत.

संतांचे बोल हें मासिक त्याच्या नांवावरून कोणत्या जातीचें आहे तें समजण्यासारखें आहे.

स. १९१२, १३ व १४ ह्या तीन सालांत प्रसिद्ध झालेले मासिकांचें अंक मीं विवेचनार्थ घेतले आहेत. मासिकांसंबंधानें एकंदर आढावा काढण्यास गेलीं तीन वर्षे पुरीं आहेत. ह्या कामीं अर्थातच एकदेशीय, ज्ञातिविशिष्ट, व कादंबऱ्या प्रसिद्ध करणारीं मासिकें निरुपयोगी होत. त्यांचेंही कार्य महत्त्वाचें आहे, पण तें स्वभावतःच मर्यादित असल्यामुळें त्यांचा विचार निराळा करण्यांत येईल. सर्व समाजास उपयुक्त व समाजाची सर्वांगपूर्ण सेवा करणारीं जीं मासिकें आहेत त्यांमध्यें गेल्या तीन वर्षांत कोणते विषय आले, ते कोणीं लिहिले व त्या विषयविवेचनाचें धोरण काय हें समजणें जरूर आहे. त्याशिवाय मासिकांनीं केलेल्या कामगिरीचें यथार्थ स्वरूप समजणार नाहीं. अशाप्रकारच्या चर्चेला साहाय्य करणारीं मासिकें

झटलीं झणजे उषा, प्रभात, कोकिळ, विस्तार, लोकशिक्षण, चित्रमय जगत्, ज्ञानांजन, लोकमित्र, मराठामित्र, नवें मन्वंतर, नवयुग व मनोरंजन हीं होत.परंतु नवें मन्वन्तर, नवयुग, उषा, प्रभात व कोकिळ हीं गेल्या सालींच आणि तींही अखेरीला प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें त्यांचा विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. ज्ञानांजनही १९१२ च्या आरंभीं निघालेलें नाहीं.

विस्तार, चित्रमय-जगत्, लोकशिक्षण, मनोरंजन, लोकमित्र व मराठामित्र इतकीं मासिकें पुरीं तीन वर्षें असल्यामुळें ह्यांपैकीं प्रत्येकाचे ३६ अंक प्रसिद्ध झाले आहेत. ह्या अंकांतून प्रसिद्ध झालेल्या निबंधांचा तक्ता विषयवारीप्रमाणें तयार करून सोबत जोडला आहे. त्यावरून असें दिसेल कीं, गेल्या ३ सालांत एकंदर चरित्रें ८३, ऐतिहासिक लेख ३९, धर्मपर लेख४४, तत्त्वज्ञानावर ३१, सामाजिक विषयांवर ५५, शिक्षणात्मक, ३१ आरोग्यावर २०, औद्योगिक २२, वाङ्मयात्मक ३२, राजकीय १५, शास्त्रीय २३, अर्थशास्त्रावर ३, मराठी भाषा ७, प्रवासवर्णनें १५, शेतीवर ९, आयुर्वेद ३, व्यापार २, ज्योतिष २, आणि रसायनशास्त्रावर १, ह्याप्रमाणें लेख आलेले आहेत.

चरित्रांचा भरणा बालबोध व चित्रमय-जगत् ह्यांत विशेष आहे. चित्रमय-जगतांत ३ वर्षांत ३९ चरित्रें आलीं आहेत. अर्थात् दरमहिन्यास एकाहून अधिक चरित्र पडलें आहे.त्याच्या खालोखाल बालबोध व लोकमित्र ह्यांचा नंबर येईल.लोकमित्रांत २३ चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. ऐतिहासिक विषयांवर विस्तारांत सर्वांत अधिक, म्हणजे २३ लेख आले आहेत.

सर्व मासिकें मिळून प्रसिद्ध झालेल्या३९ ऐतिहासिक लेखांपैकीं एकट्या विस्तारांत२३लेख आले आहेत ह्यावरून ह्या मासिकाचें विशिष्ट स्वरूप झणजे ऐतिहासिक विषय होय असें ठरतें. धर्मपर लेखांत चित्रमय-जगताचा नंबर पहिला लागून विस्ताराचा दुसरा लागतो. एकंदर ४४धर्मपर लेखांपैकीं अनुक्रमें १५ व १२ लेख सदर मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. तत्त्वज्ञानावर सर्वांत जास्त लेख-१२-लोकशिक्षणांत असून त्याच्या खालोखाल विस्तारांत व मनोरंजनांत आले आहेत.

सामाजिक विषयांची चर्चा करण्याचें पुष्कळसें श्रेय मनोरंजन, मराठामित्र व लोकशिक्षण यांजकडे आहे. ५५ सामाजिक लेखांपैकीं २७।१०।११ असे लेख ह्या मासिकांतून अनुक्रमें प्रसिद्ध झाले आहेत.

लोकशिक्षणानें आपल्या नांवाप्रमाणें २० लेख लिहून लोकांस शिक्षणामृत पाजिलें आहे. ३१ पैकीं २० लेख फक्त ह्या एका मासिकांत प्रसिद्धि पावल्यामुळें ह्या मासिकाचें विशिष्ट स्वरूप कोणतें, तें सहज समजण्यासारखें आहे. आरोग्यावर मनोरंजनांत ७ तर चित्रमयजगतांत ६ लेख आले आहेत. स्त्रीपुरुषांच्या आरोग्यवृद्धीबद्दल मनोरंजनाची कळकळ लक्षांत घेण्याजोगी आहे.

औद्योगिक विषयांवर १४ पैकीं ११ लेख एका लोकशिक्षणांत आले आहेत. ह्यावरून आपल्या लोकांची उद्योगधंद्यांत प्रगति व्हावी एतद्विषयक लोकशिक्षणकारांची उत्सुकता व्यक्त होते.

वाङ्मयचर्चेंत सगळ्यांच्या वर लोकशिक्षण असून त्याच्या खालीं विस्तार व चित्रमय-जगत् येतात.

राजकीय बाबतींत विस्ताराची मुग्धता सोडून चित्रमय-जगतानें तीन वर्षांत १२ झणजे दर वर्षास ४ लेख लिहिले आहेत. शास्त्रीय विषयांवरही चित्रमय-जगतानें सर्वांत अधिक लेख लिहिले आहेत.

प्रवास व स्थलवर्णनें चित्रमय-जगतांत १६ आलीं असून मनोरंजनांत ५ आलीं आहेत. रसायनशास्त्रासंबंधानें लोकशिक्षणांत काय तो एकच लेख प्रसिद्ध झालेला दिसतो. आयुर्वेद व व्यापार ह्यांवरसुद्धां शिक्षणकर्त्यांशिवाय दुसऱ्या कोणीं लेख लिहिला नाहीं. शेतीवर लोकशिक्षण आणि चित्रमय-जगत् ह्या दोघांनींच लेख लिहिले आहेत.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, प्रत्येक मासिकाचें कांहीं तरी विशिष्ट स्वरूप व धोरण आहे. हें धोरण मासिकांना त्या त्या संपादकांनीं दिलें आहे अगर तें त्यांतील लेखकांनीं लावलें हा प्रश्न मात्र वादग्रस्त होईल. विस्ताराचें विशिष्टत्व ऐतिहासिक लेखांत आहे, तर लोकशिक्षणाचें शिक्षणात्मक व औद्योगिक बाबतींत आहे. पुस्तकपरीक्षणाच्या कामांत तर विस्ताराची बरोबरी कोणीच करूं शकत नाहीं.

चित्रमय-जगताचें स्वरूप ह्या दोन्ही मासिकांहून भिन्न आहे. तत्त्वज्ञान, शिक्षण, उद्योगधंदे, अर्थशास्त्र

विषयांचें नांव	विविधज्ञानविस्तार	मनोरंजन	लोकशिक्षण	चित्रमयजगत्	मराठामित्र	लोकमित्र	एकूण
चरित्रें	९	३	१	३९	८	२३	८३
ऐतिहासीक	२३	१	४	६	१	४	३९
धार्मिक	१२	०	९	१५	४	४	४४
तत्त्वज्ञान	८	८	१२	०	३	०	३१
सामाजिक	४	२७	११	३	१०	०	५५
शिक्षणात्मक	३	१	२०	०	५	२	३१
आरोग्य	०	७	३	६	१	३	२०
औद्योगिक	२	२	१४	१	१	२	२२
वाङ्मयचर्चा	९	४	१०	७	०	२	३२
राजकीय	०	२	१	१२	०	०	१५
शास्त्रीय	२	२	१	१८	०	०	२३
अर्थशास्त्र	०	२	१	०	०	०	३
मराठी भाषा	६	१	०	०	०	०	७
प्रवासवर्णन	२	५	१	१६	१	०	२५
शेती	०	०	३	५	०	०	८
आयुर्वेद	१	०	२	०	०	०	३
व्यापार	०	०	२	०	०	०	२
ज्योतिष	०	१	१	०	०	०	२
रसायनशास्त्र	०	०	१	०	०	०	१
एकूण	८१	६६		१२८	३४	४०	४४६

वगैरे विषयांना साफ फांटा देऊन ह्या मासिककारांनीं धर्म, प्रवास, राजकारण, शास्त्रीय विषय, ह्यांवर लेख लिहून तद्वारा विशेषतः लोकशिक्षण व मनोरंजन करण्याचें योजिलें असावें असें दिसतें.

ह्याप्रमाणें प्रत्येक मासिकाला इतरांहून भिन्नत्व कशानें प्राप्त झालें आहे तें सांगितलें. आतां विषयांच्या संख्येकडे पाहिलें तर—सामाजिक विषय वर्जिले असतां-धर्मविषयक लेखांची संख्या सर्वांत अधिक. हा प्रकार आह्मां भारतीयांच्या पूर्वापार परंपरेला अनुरूप आहे ह्यांत शंका नाहीं.

सांप्रत इतिहासाविषयीं राष्ट्रांत कांहींशी जागृति उत्पन्न झाली आहे, तिचें प्रतिबिंब येथेंही पडलेलें आढळेल. कारण धर्मानंतर ह्याच विषयाला लेखकांनीं प्राधान्य दिलेलें दिसतें. सामाजिक विषयाची व्याप्ति-ही ऐतिहासिकादि विषयांहून अधिक आहे. ह्यावरून गतकालीन गोष्टींप्रमाणें सद्यःकालीन गोष्टींकडे लोकांचें लक्ष वेधलेलें पाहून कोणासही आनंदच होईल. ह्याच्या खालोखाल शिक्षणात्मक, औद्योगिक आणि राजकीय विषयांवरील लेखांनीं जागा व्यापिली आहे. बाकीच्या नानाविध विषयांवर कोणी फारसें लिहिलेलें दिसत नाहीं. ह्यावरून धर्म, इतिहास, शिक्षण ह्यांवाचून इतर विषयांचें अज्ञान लेखकवर्गांत तरी आहे, अगर असले विषय वाचकांस आवडत नाहींत असें तरी ह्मणावें लागतें.

कोणत्या विषयावर कोणत्या मासिकांत कोणते लेख आले हें दाखविणारा तक्ता सोबत जोडला आहे. ह्या लेखांच्या अंतरंगाचा विचार केला असतां काय निष्पन्न होतें हें पाहणें अवश्य आहे. प्रथम चरित्रें घेऊं. परकीयांच्या चरित्रांपेक्षां हिंदी लोकांचीं चरित्रें अधिक देण्याचा प्रघात अलीकडे बालबोधकारांनीं पाडला होता तोच प्रशस्त आहे.ह्याबद्दल मतभेद असणें शक्य नाहीं. बालबोधांतलीं चरित्रें अर्थातच लहान व अपुरीं; कारण तीं मुलांकरतां लिहिलेलीं असतात. ह्या बाबतींत चित्रमय-जगताचा प्रयत्न फारच प्रशंसनीय आहे.आमच्यांतीलच विद्यमान व मृत श्रेष्ठांच्या चरित्रांतील अनुकरणीय गोष्टी तरुणांपुढें ठेवल्यानें त्याचा परिणाम तरुण पिढीला नीतिमान्,उत्साही व कार्यक्षम करण्यांत होईल ह्यांत संदेह नाहीं. मोठ्या माणसांचे सद्गुण जगापुढें आल्यानें सद्गुणांचा ऱ्हास होत नाहीं. उलट त्यांना प्रसिद्धि मिळाली नाहीं तर ते त्या माणसांबरोबरच लय पावतात. कै. मण्डलिक, भाऊ दाजी, नाना शंकरशेट इ. जुन्या पिढींतील कित्येक माणसांच्या अंगीं कोणते विशिष्ट गुण होते ह्याची कल्पनाही नवीन मंडळीस नाहीं. अर्थात् ह्या श्रेष्ठ जनांचें त्या त्या बाबतींत अनुकरण नवीनांकडून कसें व्हावें ? दुसरें असें कीं, मोठें म्हटल्यानें मोठेपण उत्पन्न होतें. लोकांनीं आपल्या अंगीं एकादा गुण लावला म्हणजे त्या गुणाला अपकर्षक होईल अशी क्रिया आपल्या हातून घडणार नाहीं इतकी जबाबदारी आपणांस स्वाभाविकच घ्यावी लागते. ह्यावरून हीं चरित्रें गुणपोषक कशीं होतात तें दिसून येईल. विद्यमान स्त्री-पुरुषांचीं चरित्रें दिल्यानें हा लाभ विशेषच होईल. ज्या ज्या स्त्री-पुरुषांत विशेष अनुकरणीय असा कांहीं गुण असेल त्यांचीं चरित्रें देऊन त्या त्या गुणांचा विकास राष्ट्रामध्यें करण्याचें श्रेय चित्रमय-जगतकारांनीं अवश्य घ्यावें. चरित्र देण्याला मनुष्याच्या मरणाची वाट पाहण्याचें कारण नाहीं.

धर्मविषयाची चर्चा विविधज्ञानविस्तार व चित्रमय-जगतानें बरीच केली आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. धर्माचें महत्त्व फार आहे. निदान ह्या देशाची उन्नति धर्माच्या बाजूनेंच होणार असा कित्येकांचा समज आहे. त्यांतही सध्यां बाह्य धर्मांशीं आमचा निकट संबंध आल्यामुळें आमच्या धर्माचें निरीक्षण करण्याची वासना प्रत्येक सुशिक्षितांत उत्पन्न होत आहे. आमच्या धर्मानें आमच्या उद्दिष्ट भौतिक उन्नतीला विरोध येण्यासारखा आहे काय, हा प्रश्न सर्वांच्या पुढें उभा आहे. व त्यास उत्तर देण्याचा प्रयत्न समाजनेत्यांनीं करणें अवश्य आहे. म्हणून प्रथम आपल्या धर्माचें रहस्यस्वरूप अनावृत करून धर्माचरणानें आर्थिक व कामिक उन्नति संपादितां येते अशाबद्दल लोकांची खात्री करून दिली पाहिजे. अर्थात् हा हेतु साधण्यास इतर धर्माची माहिती आवश्यक आहेच. शिवाय आपल्या धर्मांत चांगलें असेल त्याचें समर्थन व धर्मावर अनिष्ट पटलें चढलीं असतील त्यांचें उद्वासन ह्या दोन्ही गोष्टी झाल्या पाहिजेत.ह्या दिशेनें थोडाबहुत प्रयत्न आमच्या

मासिकांनीं केला आहे, ही संतोषाची गोष्ट होय. ह्या बाबतींत लोकशिक्षणांत प्रसिद्ध झालेले लेख फार महत्त्वाचे व चिन्तनीय आहेत. उदाहरणार्थ "शास्त्राधारांचें महत्त्व" हाच लेख घेऊं. शास्त्राच्या पोथ्या म्हणजे कचऱ्याच्या पाटींत टाकून देण्याच्या लायकीच्या, असा जो कित्येकांच्या अज्ञानोत्पन्न व अविवेकजन्य समज आहे तो दूर करण्यास ह्या लेखाचा चांगला उपयोग होईल अशी आमची समजूत आहे. जुनीं शास्त्रें ह्मणजे अनेक पिढ्यांचा अनुभव हें ह्या विद्वान् लेखकाचें ह्मणणें आदरास पात्र आहे. ह्यामुळें ज्या ज्या वेळेस आपणांस एकादी नवीन गोष्ट प्रचारांत आणावयाची असेल त्या त्या वेळीं शास्त्र काय म्हणतें ह्याची चौकशी करणें अगदीं जरूर आहे. परंतु ह्यावर कोणी असें म्हणेल कीं शास्त्रांत कांहीं गोष्टींस आधार मिळणार नाहीं, व कांहीं इष्ट व शिष्टसमंत गोष्टींस प्रतिकूल आधार मिळेल; तेव्हां शास्त्रें निरुपयोगी होत. पण हा समज आमच्या इकडे शास्त्रीयरीत्या किंवा सूक्ष्मबुद्धीनें कोणी धर्मशास्त्राचें अध्ययन करीत नसल्यामुळें उत्पन्न झालेला आहे. वरील भ्रमाचें निरसन ह्याच लेखांत लेखकांनीं केलें आहे. त्यांनीं "अनाम्ना तेषु धर्मेषु कथं स्यादिति चेद्भवेत् । यं शिष्टा ब्राम्हणा ब्रूयुः सधर्मः स्यादशंकितः ।" हें शास्त्रवचन देऊन ज्याच्याविषयीं पूर्वी विचार झाला नाहीं अशा बाबतींत शिष्ट ब्राह्मण सांगतील तो धर्म निःशंकपणें मानावा असें प्रतिपादन केलें आहे. तसेंच इष्ट सुधारणेस शास्त्र प्रतिकूल असेल तर निराश होऊन बसण्याचें कारण नाहीं, असा अभिप्राय ह्या लेखांत व्यक्त केला आहे. "कालानुरोधानें फेरबदल करणें जरूर असेल तर तो करून घेतला पाहिजे." "सहवास आणि अनुकरण" ह्या निबंधांत लोकशिक्षणाच्या विद्वान् संपादकांनीं असाच अभिप्राय पुनरुक्त पण अधिक स्पष्ट दिला आहे. ते ह्मणतात, "हजारों वर्षांच्या चाली, रूढि व संस्था आमच्यांत आहेत त्या तशाच चालाव्यात असें कोण म्हणेल?......शतकेंच्या शतकें योग्य रीतीनें चालन न मिळालेल्या धर्मशास्त्रास शिरसावंद्य मानणाऱ्या समाजाची अवस्था शोचनीय होते हें आम्ही जाणून आहों." असो. ह्यावरून धर्मसमजुतींत नवीन पिढींत कसा फरक पडत चालला आहे हें दिसून येईल. जुन्या नव्याचा बिनडाग मिलाफ मोठ्या कुशलतेनें केला जात आहे.

लोकशिक्षणांतील दुसरा उत्कृष्ट लेख "चातुर्वर्ण्य" हा होय. ह्या लेखांत चातुर्वर्ण्याचें जें मार्मिक समर्थन केलें आहे तसें दुसरीकडे कोठें पहावयास मिळणार नाहीं. जुन्याचा अभिमान पुष्कळांस असतो, पण त्याचें समर्थन बिनतोड रीतीनें करणें सर्वांस साधत नाहीं. हा लेख वाचतांना बर्केच्या बुद्धिमत्तेची व पुराणप्रियतेची वाचकास आठवण होते.

रा. ओल्डमाने शास्त्री यांनीं लिहिलेल्या "हल्लींचे धर्माधिपति समाजनियमनाला पात्र आहेत काय?" ह्या लेखांत धर्माध्यक्षांना प्रतिकूल असाच अभिप्राय दिला आहे. शंकराचार्य हे जर, हल्लीं लौकिक समज आहे त्याप्रमाणें, खरोखर धर्माधिपति असतील तर त्यांच्या एका मुख्य कर्तव्याची आठवण त्यांस ह्या लेखांत करून द्यावयास पाहिजे होती. वर सांगितल्याप्रमाणें अडचणीच्या प्रसंगीं धर्म कोणता आणि अधर्म कोणता हें विद्वान् ब्राम्हणांच्या मताप्रमाणें ठरवावयाचें असेल तर शंकराचार्यांनीं लोकांच्या प्रतिनिधींचें एक मन्त्रिमंडळ नियतकालीं भरवून लोकांच्या वारंवार उपस्थित होणाऱ्या प्रश्नांसंबंधीं लोकमत काय आहे तें अजमावून त्याप्रमाणें आज्ञापत्रें काढणें जरूर आहे. ह्याबद्दल मासिकांतून विशेष चर्चा व्हावयास पाहिजे होती.

मूर्तिपूजेवर दोन लेख आले आहेत, त्यावरून हा विषय अद्यापि वादग्रस्त आहे असेंच दिसतें. "मूर्तिपूजा मण्डनीय नाहीं व खण्डनीय नाहीं" असें एक लेखक म्हणतात, तर ती सर्वस्वी त्याज्य आहे असें रा. सातवळेकर आपल्या विस्तारांतील लेखांत प्रतिपादतात. ते म्हणतात "मूर्तिपूजा हा ईश्वरभक्तीचा खरा मार्ग नाहीं." ह्या ह्मणण्यांत जरी फारसें गैरशिस्त नसलें तरी "मूर्तीला नैवेद्य अर्पण केला म्हणजे देव संतुष्ट होईल ही भावना मूर्तिपूजेच्या बुडाशीं आहे" हा त्यांचा सिद्धांत एखाद्या ख्रिस्ती मिशनऱ्याच्या तोंडांतच अधिक शोभला असता. आमच्या आचारांबद्दल आमचें किती अज्ञान आहे हें ह्यावरून दिसून येतें. रा. भाण्डारकर यांनीं "सामाजिक सुधारणेची खरी दिशा" ह्या लेखांत "मूर्तीची पूजा नको, खऱ्या ईश्वराची पाहिजे" असें आपलें मत दिलें आहे. ह्यावरून

शिकलेल्या माणसांत एकंदरींत मूर्तिपूजेविषयीं विरोध-भक्तिच दिसते.

प्रो. कानेटकर यांनीं "धार्मिक शिक्षण" ह्या लेखांत धार्मिक शिक्षणाची कॉलेजांत व कॉलेजाबाहेरही अनवश्यकता व निष्फलता प्रतिपादन केली आहे. त्यांच्या मतें धर्म हा तर्कांच्या, व युक्तीच्या कसोटीला उतरण्यासारखा नाहीं, ह्मणून तद्विषयक अज्ञानच बरें. कॉलेजच्या आवाराच्याबाहेर ह्या मताचें कोणी अनुवादी असतील असें मानण्यास फारशी जागा नाहीं. ह्या महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल अधिक ऊहापोह व्हावयास पाहिजे होता.

"महाराष्ट्रांतील धर्मवृत्तीचें स्थूल सिंहावलोकन" ह्या निबंधांत प्रो. भानु ह्यांनीं "ज्या धर्माचा पाया वैदिक सिद्धांतांवर उभारला नाहीं, ज्या धर्मांत मूर्तिपूजेचा किंवा वर्णाश्रमधर्माचा अन्तर्भाव होत नाहीं, त्या धर्माचें बीज येथें रुजावयाचें नाहीं" असा निष्कर्ष काढला आहे. ह्यावरून भानूंच्या मताप्रमाणें मूर्तिपूजा हीं आह्मांस सुटणार नाहीं व वैदिक धर्मावरील श्रद्धाही आमची ढळणार नाहीं. हें जर खरें असेल तर त्या धर्मांचें शिक्षण लोकांस मिळेल तर हितावहच होईल असा त्यांचा अभिप्रायं असावा असें वाटतें.

विश्वविद्यालयांत वैदिक धर्माला जागा नसल्यामुळें त्या धर्माचें अध्ययन चिकित्सापूर्वक होत नाहीं. तेव्हां ही कामगिरी मासिक पुस्तकांवर ह्या देशांत विशेषतः पडणार. 'महाराष्ट्रांतील संतांची राष्ट्रीय कामगिरी,' 'यज्ञसंस्था व त्यांचें महत्त्व,' 'पंढरपूरचा विठोबा आणि वारकरी पंथ' इत्यादि लेख ह्या दृष्टीनेंच लिहिलेले आहेत. "महादेवाचें स्वरूप," "वेदांतील रोगजन्तुशास्त्र" ह्या लेखांवरून आमच्यांत शोधक बुद्धि उद्भवत आहे ह्या म्हणण्याची साक्ष पटते.

"भारतवर्षाचें मूलभूत ऐक्य" ह्या निबंधांत आमच्या राष्ट्रैक्याला वैदिक धर्मापासून पोषणच मिळेल, विरोध होणार नाहीं, असें सिद्ध केलें आहे. धर्माचें साहाय्य राष्ट्रीय आकांक्षा सफल होण्यास अवश्य आहे असें लोकांस वाटत असावें असें दिसतें.

"पापमोचन" ह्या लेखांत पापमोचन हें तत्त्व खिस्ती धर्मांतून उसनें घेण्याचें कारण नाहीं, तें मूळचें आमचेंच आहे, असें अभिमानपूर्वक उत्तर खिस्त्यांना लेखकानें दिलेलें आहे.

एकंदरींत धर्मविषयक उत्कृष्ट लेख लिहून मासिकांनीं आपली कामगिरी बजावली आहे. तथापि त्यांतही लोकशिक्षणांतील लेख उत्तम वठले आहेत. चित्रमय जगतांत ह्या विषयावर आलेले लेख धर्माच्या बाबतींत लोकांस वळण लावण्याच्या कामीं उपयोगी पडतील असें वाटत नाहीं. ते ऐतिहासिक स्वरूपाचेच विशेष आहेत. तथापि सर्व मासिकांचा विचार करतां वैदिक धर्माबद्दल आदर बाळगणारे लेखक पुष्कळ दिसतात. त्या धर्माबद्दल अनादर उत्पन्न करणारीं मतें कोणीं प्रसृत केलेलीं नाहींत.

सामाजिक सुधारणेसंबंधानें अलीकडे सर्वांनीं मौन स्वीकारलेलें दिसतें. मासिक मनोरंजनांत आपाततः लहान लहान गोष्टींच्या रूपानें समाजांतील कांहीं चालींचें दोषाविष्करण केलें जातें हें खरें. पण शास्त्रशुद्ध व प्रगल्भ लेख फारच थोडे आले आहेत. आरंभीं जोडलेल्या तक्त्यावरून लोकशिक्षणानेंच ह्या बाबतींत पुढाकार घेतलेला दिसतो. "सामाजिक विचारांची दिशा" ह्या लेखांत लेखकानें शास्त्रीय तत्त्व गोवून ठेवलें आहे, तें सर्वांनीं ध्यानांत बाळगण्यालायक आहेत. ते लिहितात:-"संस्था व सांप्रदाय हे त्या त्या काळच्या लोकस्थितींचीं प्रतिबिंबें असतात. सबब त्या संस्थापकांना मूर्ख ह्मणणें युक्त नाहीं. आपल्या काळाला उचित सुधारणा पूर्वजांना मूर्ख न ह्मणतां करून घ्याव्या." परंतु दुसऱ्या एका लेखांत निकृष्टजनोद्धारण व पुनर्विवाह ह्या सुधारणा अनिष्ट म्हणून त्यांनीं जो अभिप्राय दिला आहे त्यावरून ह्या विद्वान् संपादकांच्या विद्वत्तेच्या जोडीला अद्यापि अनुभवाची जोड मिळाली पाहिजे असें वाटतें. ह्याच लेखांत स्त्रीपुरुषांचें एकत्र शिक्षण, स्त्रीपुरुषांचा मिश्रसमाज, स्त्रियांच्या शिक्षणांत फाजील पुस्तकी शिक्षण, इत्यादि महत्त्वाच्या विषयांचा नुसता नामनिर्देश केला आहे.पण ह्या विषयांचें विवेचन अधिक व्हावयास पाहिजे होतें.पण चमत्कार हा कीं कोणत्याही लेखकाचें लक्ष इकडे गेलें नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे

सामाजिक प्रश्नांची चर्चा कोणींच केलेली नाहीं. पूर्वीच्या चालीरीतींत हल्लीं किती व कसकसा बदल होत चालला आहे त्याच्या श्रेयाची वांटणी प्रवर्तकांचा निश्चय व बाह्य परिस्थितीचा जोर ह्यांत कशी करावी; इष्ट असोत वा अनिष्ट असोत ज्या गोष्टी घडून येणार अशा कोणत्या व समाजानें त्यांस मुद्दाम घडवून आणल्या पाहिजेत अशा कोणत्या, वगैरे गोष्टींचा ऊहापोह केलेला कोठेंही आढळणार नाहीं. श्रम, अनुभव, शोध व शांत आणि प्रगल्भ विचार जेथें अवश्य आहेत असे लेख फारसे प्रसिद्ध होत नाहींत. नुसत्या बुद्धीवर भागेल असेच लेख विशेषतः येत असतात. नगरसंवर्धन, खेळ व व्यवहार, गटारें, सुजननशास्त्र वगैरे प्रसिद्ध झालेल्या लेखांवरून सामाजिक सुधारणांची व्याप्ति दिवसेंदिवस अधिकाधिक होत चालली आहे असें अनुमित होतें.

मनोरंजनांत सामाजिक सुधारणेचें एक अंग—म्हणजे स्त्रीसुधारणा—त्यासंबंधीं बरेच स्त्रीपुरुषलेखकांचे लेख आले आहेत. मातृत्वाची थोरवी, गृहराज्य, गृहशिक्षण, स्त्रियांची उन्नति, आईचीं कर्तव्यें, सुगृहिणीवाद इ. स्त्रियांसंबंधीं विषयांवर बरेंच लिहिलें गेलें आहे. साम्राट् व साम्राज्ञी यांच्या छत्राखालीं व त्यांच्या आशीर्वादानें हिंदुस्थानची सामाजिक प्रगति होत चालली आहे ही गोष्ट सर नारायणराव चंदावरकर यांनीं व स्त्रियांच्या स्थितींत सुधारणा होत आहे ही गोष्ट रा. रामभाऊ जोशी यांनीं कबूल केली आहे. तथापि कांहीं गोष्टींसंबंधानें अद्यापि मतभेद आहे असें दिसतें. ह्याचें प्रत्यन्तर सुगृहिणीवाद वाचला म्हणजे समजण्यासारखें आहे. सौ. गिरिजाबाई केळकर यांनीं प्रौढविवाहांतील वास्तविक अडचणींचें नुसतें दिग्दर्शन केलें आहे. पण मनोरंजनकारांस तें देखील खपलें नाहीं. एकंदरींत सर्व लेख प्रौढविवाहाला अनुकूल आहेत. "विवाहासंबंधीं कांहीं विचार" ह्यांत गांधर्वविवाह सर्वांत प्रशस्त ठरवला आहे. "स्त्रियांची उन्नति" ह्या लेखांत सौ. सोकरीबाई मानकर यांनीं स्त्रियांच्या अंगचे दोष दाखविले आहेत तर सौ. राधाबाई भिडे यांनीं शिक्षणाचा अभाव ही सामाजिक सुधारणेंतील मोठी अडचण एका लेखांत दाखविली आहे. वैवाहिक नीति व दांपत्यसुख हा सौ. गोळे यांचा लेख वाचनीय आहे. कमळाबाई केळकर यांचा 'स्त्रियांचा पेहराव' हा लेख वाचला म्हणजे विकारवश न होतां एखाद्या बाबतींत आमच्या स्त्रिया अभिप्राय देण्यास कशा लायक होत आहेत तें समजतें. मनोरंजनकारांनीं जातिभेदावर थोर व प्रमुख गृहस्थांचे अभिप्राय मागवून प्रसिद्ध केले आहेत, त्यांवरून एकंदरींत जातिभेदाविरुद्ध मत बनत चाललें आहे हें कोणीही कबूल करील. पुनर्विवाह, प्रौढविवाह, हुंडा वगैरे विषयांवर असेच अभिप्राय घेऊन ते प्रसिद्ध केल्यानें त्या त्या विषयाला चालन दिल्यासारखें होऊन शिवाय लोकमताचा वारा कोणत्या दिशेनें वाहतो आहे हें समजेल. एकंदरींत सामाजिक बाबींची चर्चा जितक्या जोरानें व चिकित्सापूर्वक व्हावयास पाहिजे तितकी झालेली दिसत नाहीं.

मासिकमनोरंजनांतील फाजील प्रणयाला कंटाळलेल्या लोकांना भगिनीसमाचार मासिक पसंत पडण्यासारखें आहे. ह्या मासिकाचा विशेष हा आहे कीं ह्यांतील बरेच लेख स्त्रियांचे असतात. व त्यांपैकीं कांहीं प्रसंसापात्रही आहेत. उदा०, सौ. इंदुमतीबाई नाईक यांचा "खऱ्या गृहिणीचें कर्तव्य" हा लेख शोधकबुद्धीनें लिहिला आहे. पाश्चात्य संस्कृति जशीच्या तशीच न उचलतां आपल्यांतलें चांगलें कायम ठेवून जरूर तेथें नवीन अवश्य स्वीकारावें अशा मताचें पुरस्कर्तृत्व भगिनीसमाचाराकडे आहे. समाजांत नीति वाढवण्यास ह्या मासिकाचा चांगला उपयोग होईल.

अर्थशास्त्र.

आमच्या तरुणांना सद्यःस्थितीची यथार्थ कल्पना आणून देण्यास अर्थशास्त्राचीं तत्त्वें समजावून देणें भाग आहे. शिवाय अर्थशास्त्राचीं प्रमेयें देशकालापेक्ष असल्यामुळें आमच्या दृष्टीनेंच ह्या शास्त्राचें अध्ययन झालें पाहिजे. परंतु सध्यां कॉलेजांत शिकणाऱ्या मुलांना ही दृष्टि प्राप्त होत नाहीं व त्यामुळें पुढें उत्तरवयांत सार्वजनिक प्रश्नांची व्यवस्थित व योग्य चर्चा करण्यास ते अपात्र बनतात. ह्मणून हें काम मासिककारांनीं आपल्या अंगावर घ्यावयास पाहिजे होतें. पण दुर्दैवानें कोणत्याही मासिकानें ह्या विषयावर ह्मणण्यासारखें लिहिलें नाहीं. वरतीं दिलेल्या तक्त्याकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं या विषयावर मनोरंजनांत २ व लोकशि-

क्षणांत १ असे तीनच लेख उभ्या तीन वर्षांत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांपैकीं " ह्याला आळा बसेल काय ? " ह्या सदराखालीं लोकशिक्षणांत चैनीचे पदार्थ वर्ज करून दारिद्य घालविण्याचा कांहींसा तात्त्विक उपाय सुचविला आहे. रा. आपटे यांनीं 'हिंदुस्थानांतील नाणीं व शिक्के' हा अर्थशास्त्रांतील रुक्ष लेख मनाचें रंजन करणाऱ्या मासिकांत लिहिला आहे. ह्याच विषयावर ग्रन्थमालेंत पूर्वीं कांहीं लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची माहिती रा. आपट्यांस नाहीं असें त्यांच्या लेखावरून वाटतें. " अर्थशास्त्रांतील एक सत्याभास " हा एक लेख कोकिळेंत प्रसिद्ध झाला आहे. अशा प्रकारचे लेख पुष्कळच यावयास पाहिजे होते. हिंदुस्थान देश दरिद्री झाला आहे असें ज्यांस वाटतें त्यांस तें सिद्ध करून दाखवा म्हटलें तर साधत नाहीं. आगगाड्या-आगबोटींतून गर्दी,दारूचे पिठे भरलेले, इत्यादि गोष्टींवरून हिंदुस्थानाचीं सधनता स्थापित करण्याचा एका बाजूचा प्रयत्न असतो. तेव्हां त्यांत कितपत खरेपणा आहे हें आमच्या लोकांस कळलें पाहिजे. चैनीचे पदार्थांचा खपही वाढत आहे ह्यावरून काय ध्वनित होतें तें बरोबर समजलें पाहिजे. सरकारी बजेटांची माहिती करून दिली पाहिजे. कांहीं गांवांची आर्थिक पाहणी करून काय सिद्ध होतें तें पाहिलें पाहिजे. हल्लीं खेड्यांचा ऱ्हास होत आहे, हें आपणांस किती श्रेयस्कर आहे, पदार्थांच्या महागाईमुळें आपलें हित अगर अनहित होत आहे हें प्रत्येकास समजलें पाहिजे. पण ह्या विषयाकडे मुळींच कोणाचें लक्ष गेलेलें नाहीं.

राजकीय.

प्रचलित राजकीय विषयांवर लिहिणारीं मासिकें महाराष्ट्रांत मुळींच नाहींत असें म्हणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं. ह्याचें कारण काय असावें ह्याचा खल करण्याचें प्रस्तुत स्थळ नव्हे. तथापि आहे ही गोष्ट निदर्शनास आणणें भाग आहे. सरकारच्या रोषास पात्र न होतां सुद्धां राजकीय बाबतींत पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. कायदेकौन्सिलांची वाढ झाल्यामुळें तसेंच जिल्ह्याच्या ठिकाणाहूनसुद्धां सामान्य मनुष्यास कौन्सिलांत प्रवेश करून घेण्याची संधि प्राप्त झाल्यामुळें, राजकीय विषयांचें ज्ञान सामान्य मनुष्यापर्यंत पोंचणें अवश्य झालें आहे. हा ज्ञानप्रसार कसा करतां येईल ह्याचा विचार व ऊहापोह मासिकांतून होणें अपरिहार्य होतें. पण ह्याविषयीं कोणीही लिहिलेलें दिसत नाहीं. तसेंच कौन्सिलच्या घटनेंत काय दोष आहेत, त्यामुळें चांगले चांगले ठराव पास होण्यास कशा अडचणी येतात, वगैरे गोष्टींकडे मासिककर्त्यांची दृष्टि कां वळली नाहीं समजत नाहीं. देशी भाषेंतून शिक्षण देण्याचा ठराव वरिष्ठ कायदे कौन्सिलांत कसा नापास झाला हें ज्यानें विचारपूर्वक पाहिलें असेल त्यास आमच्या मासिककर्त्यांची मुग्धता अक्षम्यच वाटेल. तात्पर्य, राजकीय शिक्षण देण्याची जबाबदारी वृत्तपत्रकारांनींच उचललेली दिसते. चित्रमय-जगत्कारांनीं ह्या विषयावर १०।१५ लेख लिहिले आहेत खरे, पण ते ऐतिहासिक स्वरूपाचे व परराष्ट्रीय आहेत. उ. चिनांतील राज्यक्रांति, विमानांचें सामर्थ्य, आयर्लंडांतील स्वराज्याचा तंटा, पिंवळा बागुलबोवा इ. हल्लीं हिंदुस्थानांत **नेमस्त** व **जहाल** असे जे दोन पक्ष झाले आहेत त्यांच्यासंबंधीं कोणत्याही पक्षाचा एकही लेख लिहिला गेला नाहीं. हिंदुस्थानांतच फ्रेंच व पोर्तुगीज ह्यांच्या वसाहती आहेत तेथील राज्यव्यवस्थेची माहिती,तसेंच आमच्या संस्थानिकांचा साम्राज्यसरकारशीं संबंध कोणाचा कसा आहे व त्यांच्या राज्याची अन्तर्गत व्यवस्था कशी आहे, इ. माहिती वाचकांस कोणीं करून दिलेली नाहीं.

शिक्षणात्मक.

ह्या विषयावर **लोकशिक्षणांतच** पुष्कळ लेख आले आहेत. **विस्तारांतील** "स्त्रीशिक्षणाची दिशा " व मनोरंजनांतील " जपानांतील स्त्रीशिक्षण " एवढे खेरीज करून बाकी सर्व लेख **शिक्षणांत** प्रसिद्ध झाले आहेत."आज काय शिकावें-"" खरें शिक्षण"- " दुय्यम शिक्षण मातृभाषेच्या द्वारें देण्याची आवश्यकता "-" गुरु आणि शिष्य ह्यांच्या परस्परसंबंध " इत्यादि लेख प्रसिद्ध करून शिक्षणकारांनीं ह्या विषयाचा चोहों बाजूंनीं कसा विचार करावा हें आपल्या वाचकांस शिकविलें. ह्याशिवाय युरोप व अमेरिका ह्या दोन खंडांतील शिक्षणपद्धतींशींही त्यांनीं आपल्या वाचकांचा परिचय करून दिला आहे. ह्या सर्व लेखांचा रोंख, हिंदुस्थानांतील प्रचलित शिक्षणपद्धति सदोष आहे; तिच्या योगानें मुलांचा शारीरिक व बौद्धिकही ऱ्हास

होतो; व राष्ट्राचा दर्जा वाढविण्यास तें साहाय्यकारक होत नाहीं, असें प्रतिपादन करण्याकडे आहे. मनोरंजनकारांनीं जातिभेदावर जशीं कित्येक लोकांचीं मतें मागवून तीं प्रसिद्ध केलीं त्याप्रमाणें शिक्षणकारांनींही मातृभाषेंत शिक्षण देण्याच्या आवश्यकतेसंबंधानें विचारशील माणसांकडून अभिप्राय मागविले असते तर बरें होतें. निरनिराळ्या प्रचलित प्रमुख विषयांसंबंधीं सर्व प्रकारच्या लोकांचीं मतें मागविण्याची तऱ्हा प्रशंसनीय आहे व मनोरंजनाचें अनुकरण ह्या बाबतींत इतर मासिककार करतील तर त्यांच्या हातून मोठीच कामगिरी होईल. असो. मुलांच्या शिक्षणांतील दोषांचें जसें आविष्करण झालें तसें स्त्रीशिक्षणांतील दोषांसंबंधीं झालें नाहीं. मुलांमुलींना एकच प्रकारचें शिक्षण देणें इष्ट नाहीं असा एकंदर झोंक दिसतो खरा, पण त्याचे अनिष्ट परिणाम यावे तसे अद्यापि लोकांच्या लक्षांत आले नाहींत असें दिसतें. जपानांत स्त्रियांना कोणत्या तऱ्हेचें शिक्षण दिलें जातें हें सांगणाऱ्या लोकांचें लक्ष प्रो० कर्व्यांच्या आश्रमाकडे वळूं नये ह्याचें आश्चर्य वाटतें. कर्व्यांच्या आश्रमानें समाजांत बरेंच स्थित्यंतर होणार आहे, तेव्हां त्या आश्रमावर लोकांचें लक्ष वेधणें जरूर आहे. कर्व्यांच्या प्रसिद्ध झालेल्या व्याख्यानानें थोडेंबहुत कार्य होईल. पण लोकांनीं सहानुभूतिपूर्वक केलेल्या टीकेचा फायदा रा. कर्व्यांना मिळाल्याचें दिसत नाहीं. "आश्रमा" चीच एक स्वतन्त्र जंगी "अकॅडेमी" कशी बनवितां येईल हाही विचार करण्यासारखा एक प्रश्न होता.

मुलांच्या शिक्षणाची सोय स्वतन्त्र मासिकें त्यांच्याकरितां निघाल्यानें झाली आहे. त्याप्रमाणें स्त्रियांकरितां स्वतन्त्र मासिकें निघालीं नाहींत. मनोरंजन हें स्त्रियांचेंच मासिक मानलें जातें हें खरें; पण तें सर्वस्वी तसें नाहीं. तें एकाद्या स्त्रीसंपादकाकडे सोंपविलें गेलें व त्यांत स्त्रियांचेच लेख केवळ स्त्रियांच्याच हितानहिताविषयीं प्रायः येऊं लागले तर हल्लीं दिसून येणारी उणीव नाहींशी होईल; आणि भगिनीसमाचार व मनोरंजन हीं दोन मासिकें निरनिराळ्या दिशेनें स्त्रीसेवा करीत राहतील.

आरोग्य.

प्राचीन पिढींतील लोकांपेक्षां अर्वाचीन पिढींतील लोक कमकुवत आहेत ह्यांत संशय नाहीं. तेव्हां आरोग्य कसें ठेवतां येईल ह्या विषयावर पुष्कळांनीं लिहिणें स्वाभाविक आहे. चाहा, काफी व मद्यप्राशन यांचे दुष्परिणाम स्पष्ट सांगितले आहेत, तर आरोग्याचा व दुधाचा निकट संबंध किती आहे तेंही व्यक्त करून दाखविलें आहे. शारीरिक सामर्थ्यास मांसाशन जरूर आहे, ह्या भ्रमाचें निराकरण केलें आहे. फलाहार व प्राणायाम यांचें महत्त्व वर्णिलें आहे. वाहत्या पाण्याचे संस्कार लोकांस समजावून सांगितले आहेत. गरोदर व प्रसूत स्त्रियांची जोपासना कशी करावी यासंबंधाची उपयुक्त माहिती दिली आहे. सारांश, ह्या विषयासंबंधीं अवश्य गोष्टी लोकांस समजून सांगण्याविषयीं मासिककारांनीं खबरदारी घेतली आहे. ही त्यांची कळकळ फारच प्रशंसनीय आहे. ह्या बाबतींत केरळकोकिळकारांचें अग्रेसरत्व मान्य करणें जरूर आहे. कारण मनोरंजनांत ७ तर कोकिळांत १४ आरोग्यविषयक लेख आले आहेत.

तत्त्वज्ञान.

तात्त्विक ज्ञानरूपी सागरांत बुडी मारून तळाची माती काढणारे ह्मणून आमचा जो पूर्वापार लौकिक आहे तो आम्हीं घालविला नाहीं असें एतद्विषयक जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून उघड दिसतें. "ज्ञान हें कर्माकरितां का कर्म हें ज्ञानाकरितां?" "सत्य हें साधन का साध्य?" "निर्वीर्य ज्ञान आणि ज्ञानहीन कर्म," "कीर्तीच्या दोन बाजू" वगैरे लेख वाचण्यालायख आहेत. रा. वामन मल्हार जोशी हे एक ओजस्वी लेखक मराठींत होतील असें भाकित करण्यास आजच विपुल साधनें उपलब्ध आहेत. मनोरंजनांतील आत्मानात्मविचारांना कोणी उत्तर दिलें नाहीं, ह्यावरून, कोणी कांहींही देवो तें आम्ही अचिकित्सापूर्वक ग्रहण करतों कीं काय, असा संशय येतो. तथापि हा लेख काळजीपूर्वक वाचण्यासारखा आहे ह्यांत शंका नाहीं. कारण तो बराच विचार करून लिहिला आहे.

मासिकांसंबंधीं सामान्य विचार.

वर मासिकांचा नक्शा जोडला आहे, त्यावरून महाराष्ट्रांत एकंदर ४४ मासिकें प्रसिद्ध होतात असें

दिसतें. मराठी बोलणारांची संख्या मुंबई इलाख्यांत १०७४२००० आहे. अर्थात् अदमासें अडीच लाख लोकांना एक मासिक पडतें. एक कोटी लोकांत वाचतां येणारे किती हें समजण्यास मार्ग नाहीं; त्यामुळें, मराठी भाषा बोलणाऱ्या साक्षरांशीं मासिकांचें प्रमाण काढतां येणें शक्य नाहीं. तथापि आहेत हीं मासिकें पुष्कळ आहेत असें म्हणतां येत नाहीं. गुजराथी मासिकें एकंदर ३३ आहेत असें सरकारी रिपोर्टावरून दिसतें. संख्येच्या बाबतींत तरी मराठी मासिकें गुजराथीच्या पुढेंच आहेत. मराठी मासिकांत सर्वांत जास्त वर्गणी ह्मणजे दरसाल रु. ५ चित्रमय जगताची आहे. मनोरंजन आणि नवयुग ह्यांची त्याच्या खालीं ह्मणजे ४ रु. आहे. गुजराथींतील "फुरसुत" नांवाच्या एकाच मासिकाची ४ रु. वर्गणी आहे. बाकीच्या सर्व मासिकांची वार्षिक वर्गणी ह्याहून कमी आहे. वर्षाचे ५० रु. खर्च करणारास बहुतेक सर्व मासिकें घेतां येतील.

"त्रैमासिक ज्ञानदर्शन" काढून आमच्याकडे मासिकांचा अगर नियतकालिकांचा उपक्रम बाळ गंगाधर शास्त्री यांनीं केला असें म्हणतात. आजपर्यंत पुष्कळ मासिकें उदयास आलीं व लयही पावलीं. किती व कोणतीं हें कित्येकांस माहीतही नसेल; तथापि कोणासही निबंधमालेचा विसर पडणें शक्य नाहीं. मागच्या व चालू मासिकांत कोणाही वर वर पाहणारास सुद्धां प्रथम फरक हा दिसतो कीं, जुन्या मासिकांतील बहुतेक लेख संपादकाचे असत. परंतु अलीकडे पाहावें तों संपादकांना दौतींत टांक बुडविण्याचा प्रसंग क्वचितच येत असेल. ह्याचें कारण हल्लीं लेखकवर्ग वाढला आहे हें होय. पण ह्याचे कांहीं अनिष्ट अगर अनपेक्षित परिणामही दृष्टोत्पत्तीस येत आहेत. ज्या प्रकारच्या विशिष्ट मतांचा प्रसार करण्याच्या उद्देशानें मासिकाचा अवतार होतो तो उद्देश बाजूस राहून तें मासिक निरनिराळ्या मतांची खिचडी बनतें. अशा मासिकांच्या वाचनानें वाचाळपणा अथवा बहुश्रुतपणा वाढेल, पण मनावर कायमचा परिणाम करून शील बनविण्यास तीं अनुपयुक्त होतात. अर्थात् हा प्रकार तरुण मुलांसंबंधानें घडतो. पोक्त व अनुभवशीर माणसांच्या पुढें निरंनिराळीं मतें आल्यानें त्यांच्या मतांचा एकांगीपणा मात्र कमी होण्याचा संभव आहे. मालाकारांच्या जोरदार भाषेनें तरुण पिढीवर चांगला अगर वाईट पण कायमचा संस्कार झाला, ही गोष्ट बहुधा नाकबूल करतां येण्यासारखी नाहीं. परंतु मालाकारांनीं आपण पडद्याआड राहून निरनिराळ्या मतांच्या लेखकांना आपल्या मालेंत गोंवून घेतलें असतें तर हा परिणाम झाला असता कीं नाहीं ह्याचा वानवा आहे.

दुसरा भेद असा दिसतो कीं, पूर्वीं मासिकांचें चालकत्व विद्वान् माणसांनीं आपल्या हातीं घेतलें होतें. विद्यमान मासिकांपैकीं फारच थोड्यांचें संपादकत्व पदवीधरांकडे आहे. मतप्रसारापेक्षां निर्वाहाचें साधन म्हणूनच बरींचशीं मासिकें अस्तित्वांत येतात.

ही भिन्नता लक्षांत ठेवली म्हणजे वर्तमान मासिकांचें न्यूनत्व कोठें व कसें आहे तें दिसून येईल. आमच्यांतील सार्वजनिक गोष्टींचें मनन करणारीं अधिकारी माणसें प्रायः कोणीच मराठी मासिकांत लिहीत नाहींत. क्वचित् खास अंकांत त्यांचीं नांवें दृष्टीस पडतात. सध्यां दुय्यम प्रतीच्या माणसांवरच मासिकांतील लेख लिहिण्याचें काम पडलें आहे असें ह्मटलें तरी चालेल.

"मासिकांचा उद्देश बहुश्रुतपणा होय. ह्मणजे तीं वाचलीं असतां थोडया वेळांत सहज मौजेनें पुष्कळ ज्ञान नाना विषयांचें व्हावें" असें मालाकार म्हणतात. परंतु माझ्या मतें मासिकांचा उद्देश ह्याहून वेगळा आहे. विद्यार्थ्यांकरितां मासिकें काढावयाचीं असतील तर हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवणें वावगें होणार नाहीं. पण परिपक्व बुद्धीच्या व विचारशील माणसांनीं वाचावयाच्या मासिकांत विकारवश न होतां साधक बाधक प्रमाणें देऊन, प्रगल्भ भाषेंत लिहिलेले असे भारदस्त लेखच आले पाहिजेत. रा. चिपळूणकरांनीं 'निबंधमाला' काढली तो काल देशांत शिक्षणप्रसार झाला नसल्यामुळें निराळा होता; व म्हणून मौजेनें पुष्कळ ज्ञान प्राप्त करून देण्याची तेव्हां आवश्यकताही होती. पण हल्लीं तो मनु बदलला आहे. सरकारच्या कार्यकारी कौन्सिलमध्यें हिंदी लोकांचा प्रवेश अंशतः झाला आहे. तेव्हां कोणत्याही गोष्टीसंबंधानें सरकारचें धोरण असेल त्या धोरणाला हिंदी वळण लागण्याची शक्यता आहे. परंतु अगोदरपासून सार्वजनिक विषयांचें अध्ययन

नसल्यास हिंदी सभासदांची ही जबाबदारी त्यांस नीट बजावतां येणार नाहीं; व ती यावी म्हणून जनतेला तयार करण्याचें काम मासिककारांनीं पतकरलें पाहिजे. आंकड्यांनीं घोळलेले असले लेख रूक्ष असणार. आतां मराठी मासिकें इंग्रजी न शिकलेल्या लोकांकरितांच आहेत असें म्हटलें तर मात्र कें. चिपळूणकरांची उद्देशदिशा अद्यापि बदलण्याचें कारण नाहीं. पण इंग्रजीचा गंध नसलेले लोक मराठी मासिकांचे वाचकवर्गांत पुष्कळ सांपडतील असें वाटत नाहीं. इंग्रजी शिकलेल्यांचाच भरणा ह्या वर्गांत विशेष आहे. तथापि ही गोष्ट विसरतां कामा नये कीं मध्यम सुशिक्षित वर्गच मराठी मासिकांचा विशेषेंकरून आश्रयदाता होय. मराठी मासिकांच्या अभिवृद्धीस ही एक मोठी अडचण आणणारी बाब आहे. ही अडचण दूर होण्याचा सध्यां तरी संभव दिसत नाहीं. सार्वजनिक बाबींचा ज्यांनीं विचार केला आहे अशा विद्वान् व अनुभवशीर माणसांच्या हातांत मासिकें चालविण्याचें काम आल्याशिवाय मासिकांचें महत्त्व व त्यांचा अधिकार वाढणार नाहीं. परंतु अशा योग्यतेचे संपादक सध्यांच्या परिस्थितींत मराठी मासिकांना मिळतील अशी आशा करणें व्यर्थ होय. आमच्यांतील बुद्धिश्रेष्ठांची इच्छा अर्थातच इंग्रजींत लिहिण्याची असणार; आणि तसें करणें सकारणही आहे. तथापि केवळ महाराष्ट्रांतील समाजाचाच ज्यांशीं संबंध आहे असे विषय मराठी मासिकांत ह्यांच्या लेखणींतून उतरले तरी सुद्धां मराठी मासिकांचा दर्जा वाढल्याशिवाय राहणार नाहीं. पण ही बहुतेक असंभाव्य गोष्ट वगळली तर मध्यम सुशिक्षित वर्ग जसजसा योग्यतेनें वाढेल तसतशी मासिकांची अभिवृद्धि होत जाईल. कारण मासिकांतील लेखक व वाचक ह्याच वर्गांतील आहेत.

गेल्या तीन सालांत लोकशिक्षण, विस्तार व मनोरंजन ह्या तीनच मासिकांत सुमारें २१३ लेखकांचे लेख आले आहेत.ह्यावरून हल्लीं लेखकवर्ग वाढत आहे असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाहीं. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर ही वाढ कायम राहील. मासिकांच्या संपादकांनीं लेखकांच्या युनिव्हर्सिटीच्या पदव्या अवश्य द्याव्या. पण ह्या साध्या गोष्टीकडेही मासिकांचे संपादक दुर्लक्ष करतात. तथापि आमच्या माहितीप्रमाणें ह्या २१३ लेखकांपैकीं १३१ तरी निदान पदवीधर आहेत. अर्थात् युनिव्हर्सिटीचें शिक्षण मिळालेल्या लोकांची प्रवृत्ति आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा इतरांस देण्याकडे होत चालली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. त्याचप्रमाणें बिनपदवीधर असे ८२ लेखक सन्मान्य अशा मासिकांच्या लेखकवर्गांत मोडत असल्यामुळें, एकंदरींत विचारविनिमयाची इच्छा सर्वसाधारण होत चालली आहे असें दिसतें. विशेष आनंदाची गोष्ट ह्मणजे दिवसेंदिवस स्त्री-लेखकांची संख्या वाढत चाललेली असल्याचें स्पष्ट दिसतें. २१३ पैकीं सुमारें ९ स्त्रिया आहेत. त्याशिवाय लोकमित्रांत व मराठामित्रांतही कांहीं स्त्रियांचे लेख आले आहेत. स्त्रीलेखकांचा भरणा मनोरंजनांत जास्त असणें साहजिकच आहे. स्त्रीलेखकांत सौ. काशीबाई कानिटकर व पुरुषलेखकांत रा. ब. चिंतामणराव वैद्य यांचा प्रामुख्यानें नामनिर्देश करणें जरूर आहे. रा. ब. वैद्य यांचे लेख मार्मिक व विचारपरिप्लुत असतात.ह्यांच्या जोडीचे १० लेखक मराठी मासिकांच्या वांट्यास आल्यास ह्या मासिकांत स्थित्यन्तर झाल्याविना राहणार नाहीं. संशोधनात्मक लेखांच्या ऐवजीं राजकीय, सामाजिक, आर्थिक, शिक्षणात्मक वगैरे संबंधाच्या प्रचलित विषयांवर जर ग. ब. वैद्य लिहिण्याचा उपक्रम करतील तर त्यांचे महाराष्ट्रावर उपकार होतील.

एकाच मासिकानें सर्व वर्गांच्या वाचकांचें समाधान होणें शक्य नाहीं. म्हणून निरनिराळ्या वाचकांकरितां निरनिराळीं मासिकें असणें जरूर आहे. मुलांकरितां, साधारण शिकलेल्या स्त्रियांकरितां, इंग्रजी मुळींच न शिकलेल्या लोकांकरितां, सामान्य ग्याज्युएटांकरितां, राजकीय चळवळींत पडलेल्या लोकांकरितां, अशीं निरनिराळीं मासिकें अस्तित्वांत आलीं पाहिजेत. वाचकांच्या वर्गानुसार मासिकें निघतात तेव्हां वाचकांची सहज असणारी ज्ञानतृष्णा तृप्त करण्याकरितांच त्यांचा उद्भव होत असतो. हे मासिककार आपआपल्या वाचकांची मासिकद्वारा सेवा करीत असतात. कारण शिकलेल्या माणसांना वर्तमानपत्रांची त्याचप्रमाणें मासिकांची आवश्यकता भासत असते. गिऱ्हाईक असल्यावर त्यांस माल पुरविणारे व्यापारी निर्माण होणें स्वाभाविक आहे.

परंतु विषयानुसार जेव्हां मासिकांचें वर्गीकरण होतें तेव्हां मासिककारांचा उद्देश उदात्त असतो. अपरिचित विषयांत लोकांस अभ्यस्त करावें, त्या विषयाच्या ज्ञानाचा फैलाव समाजांत व्हावा, म्हणून असलीं मासिकें अवतरतात. पहिल्यांत, वाचकांच्या रुचीप्रमाणें लेख लिहावे लागतात; दुसऱ्यांत, वाचकांत त्या त्या विषयांची रुचि उत्पन्न करावयाची असते. ह्या मासिकांचें सामाजिक, राजकीय, आर्थिक, शिक्षणात्मक, वाङ्मयविषयक इ.वर्गीकरण करतां येईल. समाजशिक्षणाच्या प्रथमावस्थेंत प्रथम सांगितलेलीं मासिकें अस्तित्वांत येतात. एकंदर समाज सुशिक्षित झाला म्हणजे दुसऱ्या प्रकारचीं मासिकें विशेषेंकरून निघूं लागतात. असलीं मासिकें समाजाची चोहों बाजूंनीं उन्नति करण्यास कारणीभूत होत असतात. समाजाला तीं विशिष्ट वळण लावतात. ह्या दृष्टीनें विचार करून आपल्या इकडे सांप्रत प्रसिद्ध होत असलेलीं मासिकें कोणत्या वर्गांत मोडतील हें पाहूं लागलें तर, दुसऱ्या वर्गांत आमच्या मासिकांपैकीं एकही पडेल कीं नाहीं ह्याची शंकाच वाटते.

राजकीय विषयाला तर आमच्या इकडे जवळ जवळ बहिष्कार घातल्यासारखा आहे. त्याचीं कारणें कांहींही असोत. पण तिऱ्हाइताला ह्यामुळें आम्हांस ह्या बाबतींत कांहींच तक्रार करण्यासारखें नाहीं असें वाटण्याचा संभव आहे. युरोपमध्यें राजकीय परिस्थिति इष्ट व स्पृहणीय आहे. ह्यामुळें व[illegible] विचार करणारास, आमच्या इकडे राजकीय वि[illegible] जास्त लेख यावेत व इंग्लंडमधील मासिकांत ह्या विषयावर सर्वांनीं मौन स्वीकारलेलें असावें असें वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुस्थिति निराळी आहे. तिकडे राजकीय विषयांवरच फार लेख येतात यावरून स्वतंत्र राष्ट्रांत राजकीय विषयांस विशेष महत्त्व मिळतें असें दिसतें.

अंतरंग सोडून बाह्यांगाकडे आपण वळलों तर त्यांतही दिवसेंदिवस प्रगति होत आहे हें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. अंतरंगापूर्वी बहिरंगच दृष्टीसमोर प्रथम पडतें, ह्मणून बाह्य स्वरूप मनोहर असल्यानें अंतरंगाचें ज्ञान सर्वत्र पसरण्यास तें कारणीभूत होतें. नवयुग व प्रभात ह्यांनीं ह्या बाबतींत इष्ट सुधारणा केली आहे. नवयुगांतील चित्रें फार चांगलीं असतात. नवयुग व मनोरंजन ह्यांमध्यें बराच मजकूर असतो. सामान्यतः १।२ दिवसांत वाचून टाकतां येईल इतकाच व इतक्याच दर्ज्याचा मजकूर हल्लींच्या मासिकांत येतो. अर्थात् मासिकांत ह्यापेक्षां अधिक मजकूर पाहिजे. मासिकें महिन्यास निघतात, दररोज अगर आठवड्यास निघत नाहींत, हें संपादकांनीं विसरतां कामा नये. मनोरंजनार्थ ज्यांचा अवतार नाहीं अशा मासिकांच्या मलपृष्ठावर चित्र नसणें चांगलें. लेखकांचीं नांवें व विषय त्या स्थानीं असणें इष्ट आहे. कित्येक वेळां वर्तमानपत्रांत शोभण्यासारखे लेख—म्हणजे अचिरस्थायी—मासिकांतून प्रसिद्ध होतात हें चांगलें नाहीं. चिरस्थायी लेख वर्तमानपत्रांत येणें अपरिहार्य असल्यामुळें, वर्तमानपत्रें हीं मासिकांचीं प्रतिस्पर्धी ह्मणण्यास हरकत नाहीं.

आमचीं मासिकें अनियमितपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. बालबोधाचा नियमितपणा कै. विनायकराव ओक ह्यांच्याबरोबरच न जावो. अनियमितपणाच्या सबबी अवास्तव आहेत असा पुष्कळांचा समज आहे तो खरा दिसतो. नियमितपणानें काम करण्याची संवय कोणास नाहीं हेंच एक खरें कारण दिसतें. संपादकाजवळ वाटेल तेव्हां घालतां येतील असे २।३ लेख नेहमीं शिल्लक असले पाहिजेत. पुढें अडचणी येतील असें समजून ८ दिवस अगोदरच कामास लागलें तर नियमितपणा मोडण्याचा प्रसंग येणार नाहीं, व नियतकालिकांना अनियतकालीनत्वाचा दोष लागणार नाहीं. ह्या बाबतींत कै. रा. विनायक कोंडदेव ओक ह्यांचें अनुकरण इतरांनीं अवश्य करावें.

पाया आणि वरील इमारत ह्यांचा जो संबंध आहे तोच वर्तमानपत्रें आणि मासिकें ह्यांचा आहे. वर्तमानपत्रकार बहुजनसमूहास बहुश्रुत करून प्रगल्भ लेख समजण्यास तयार करतात. ह्मणून मासिकाचें कार्य वर्तमानपत्रानंतरचें आहे. खेड्यांत वर्तमानपत्र जातें तेथें मासिक जाईलच असा नियम नाहीं. मासिकें वाचीत असून वर्तमानपत्राला न शिवणारे लोक ज्यांत आहेत असें एकही खेडें आढळावयाचें नाहीं. ह्यावरून वर्तमानपत्रकाराचें कार्यक्षेत्र विस्तृत आहे हें उघड होतें. पण उलट मासिककाराचें काम शिक्षितांना सुशिक्षित करण्याचें आहे. अर्थात् तें अधिक थोर व जबाबदारीचें आहे.

मेहनत घेऊन आस्थापूर्वक ज्यांनीं लेख लिहिले असतील त्यांस कांहीं पारितोषिक देण्याचा क्रम संपादकांनीं सुरू करावा. बहुतेक चांगलीं मासिकें संपादकांनीं चालविल्यापेक्षां लेखकांनीं चालविलीं आहेत असें म्हणणारास कोणीं नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. अशा पद्धतीनें लेखकांस श्रम करण्यास उत्तेजन येईल व उत्कृष्ट लेख प्रसिद्ध होतील. परंतु लेखकांचे औपचारिक आभार मानण्याचें औपचारिक कृत्यही ज्यांच्या हातून होत नाहीं त्यांच्याकडून द्रव्यदानाची इतक्यांतच अपेक्षा करणें व्यर्थ दिसतें. कित्येक ठिकाणीं तर लेख प्रसिद्ध करितों हे त्या लेखकांवर आपण उपकारच करीत आहों असा समज दिसतो. मासिकांची योग्यता त्यांतील लेखांवर. पण लेखकांची योग्य किंमत जेथें होत नाहीं तेथें मालही हिणकस निघाला तर त्यांत नवल नाहीं.

ज्ञातिविशिष्ट मासिकें एकंदरींत अन्य ज्ञातींना न दुखवितां उत्तम प्रकारें चालविलीं जात आहेत हें त्यांस भूषणावह आहे. अशा प्रकारच्या मासिकांनीं ज्ञात्युन्नतीचा मार्ग लौकर आक्रमण केला जाईल असें वाटतें.

'शेती व शेतकरी' ह्या मासिकाची धेडगुजरी भाषा सुधारल्याविना तें लोकप्रिय अगर उपयुक्त होईल असें वाटत नाहीं. ह्यांतील भाषेचे मजेदार मासले एक दोन येथें देतों. "हँडल मधील लांकडी ठोकळा त्याच्या सॉकेट मधून सुमारें २ इंच बाहेर निघालेला." "फक्त बीमचे दोन बाजूंस क्लिप्स आहेत व त्याचीं दुसरीं शेवटें बोल्टनें बीम्समध्यें बसवलेलीं आहेत." इंग्रजी शब्दांबद्दल मराठी शब्द बनवण्याचा प्रयत्नही यशस्वी होत नाहीं हें, demonstration बद्दल "प्रात्यक्षिक" शब्द योजला आहे त्यावरून उघड होतें.

मराठींत 'राजश्रीच्या' ऐवजीं 'मिस्टर' वापरणें दोषास्पद आहे हें पुष्कळ लोक विसरतात.

एकंदरींत आमच्या मासिकांसंबंधीं अगदींच निराश होण्याचें कारण नाहीं. लेखकवर्ग वाढतो आहे. सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मात्र प्रचलित विषयांना अस्पृश्य वर्गाप्रमाणें टाळण्याची प्रवृत्ति हानिकारक आहे. ह्या गोष्टीकडे संपादकांनीं अधिक लक्ष देणें अवश्य आहे.

श्रीशारदावंदन.

(चाल—किती तरी पहाटेची वेळ०)

जयोऽस्तु ते विधिदुहिते ! कल्पलते !
सकलविबुध-संस्तुते ! ॥ ध्रु० ॥
श्रुतिमंगल मधुर मधुर । दिव्य तुझा वीणास्वर ।
खडबडवी जगदंतर । सुकवि-वृंद-पूजिते ॥ जयो० १ ॥
परिसितांच वीणारव । हृदय वरी मूकभाव ।
जाय लया सकल गर्व । भक्तभृंगगुंजिते ! ॥ जयो० २ ॥
मोहनिशा ती उडुनी । ज्ञानउषा ती फुटुनी ।
चित्ताची गांठ सुटुनि । प्रेम हृदयिं दाटतें ॥ जयो० ३ ॥
प्रेमभरें जें फुललें । हृदयकंज भक्तिबलें ।
तेंच तुला अर्पियलें । भरत-भुवन-भूषिते ! ॥ जयो० ४ ॥

याचना (कोरस)

पद (झंपा.)

करो अवन हो ! शारदा ज्ञानजननी ।
देउनी बलधना दुःख हरुनी ॥ ध्रु० ॥
दुष्ट मति वारुनी । आळस च्छेदुनी । ज्ञानधन वर्षुनी । सुमति देवो ।
ईशपददर्शिका । ज्ञानदकूपोषिका । होउ ती वीथिका । पापहरिणी ॥१॥

दत्तात्रय अनंत आपटे.

प्राचीन व अर्वाचीन कविता.

[लेखक–रा. नारायण महादेव भिडे, बी. ए.]

प्राचीन व अर्वाचीन कवितेसंबंधानें आजपर्यंत बराच ऊहापोह झालेला आहे. या ऊहापोहामध्यें दोन्ही दलांच्या रथी महारथींनीं आपापल्या बाजू मोठ्या शिताफीनें सजविल्या आहेत. मधून मधून 'त्यांतील एक पडतां उणा तिथें करितसे दुजा भरती' अशा रीतीनें शिताफीची भर शिव्याशापानेंही भरून काढली आहे. 'जुन्या कवींच्या अभिमान्यांस नव्या कवींबद्दल सहानुभूति वाटत नाहीं, हें विधान अगदीं खोटें आहे' अशी पुस्तकी विधानांतील सत्यता त्यांच्या कृतीमध्यें उतरत नाहीं. जी गोष्ट जुन्या कवींच्या अभिमान्यांसंबंधानें ह्मणतां येईल तीच थोडया फार प्रमाणानें नवकवींच्या अभिमान्यांसंबंधानेंही ह्मणतां येईल. निरभिमानानें केलेली टीका अर्थातच फारशी पाहण्यांत येत नाहीं. प्रथम प्राचीन कोण व अर्वाचीन कोण ही गोष्ट सिद्ध झाल्यावांचून त्या कवितांची तुलना करणें बरोबर नाहीं. कारण 'प्राचीन' व 'अर्वाचीन' हे शब्द सापेक्ष आहेत. आजचे अर्वाचीन उद्यां प्राचीनांच्या लांबलचक यादींत सामील होतात. तेव्हां आज ज्यांना अर्वाचीन म्हणून संबोधितां येतें, त्यांना उद्यां प्राचीन म्हणून म्हटलें पाहिजे. एक किंवा दीड शतकाच्या पाठीमागें गेलें तर ज्यांना आज प्राचीन म्हणून गणिलें जात आहे, ते अर्वाचीनांत मोडत होते. त्या काळांत अर्वाचीन म्हणून गणले गेलेले मोरोपंत, रामजोशी, फंदी, वगैरे कवि आज प्राचीन झाले आहेत. तसेंच सांप्रत अर्वाचीन म्हणून गणिला जाणारा कवि 'केशवसुत' उद्यां प्राचीनांत मोडेल. अशा रीतीनें प्रत्येकावरील अर्वाचीनत्वाचा छाप पुसून त्यावर प्राचीनाचा अढळ छाप बसत आहे. अर्वाचीनत्व अल्पकाल टिकणारें आहे तर प्राचीनत्व दीर्घकाल टिकणारें आहे. एक मर्यादित तर दुसरें अमर्याद. पहिलें सान्त तर दुसरें अनंत आहे. अशा या दोन कालांमध्यें किंवा त्यांत समाविष्ट झालेल्या वस्तूंमध्यें तुलना करणें चुकीचें नसलें, तरी तें सत्यनिदर्शक होणार नाहीं हें मात्र खास. तेव्हां अमर्याद प्राचीन कालाला बंधन घालून समर्याद केल्यावांचून त्याची मर्यादित अर्वाचीन कालाशीं बरोबर तुलना करतां येणार नाहीं. शिवाय प्राचीनत्वामध्यें असा एक विशिष्ट गुण आहे कीं आपल्या खाणींतील जेवढे ह्मणून चमकदार मणि आहेत तेवढेच दाखवावेत, बाकीच्या अंधुक किंवा मुळींच न चमकणाऱ्या मण्यांना अज्ञेयतेच्या अंधकारांत गुप्त ठेवावेत. अर्वाचीन कालास मात्र तसें करतां येत नाहीं. यामुळें त्यांतील सगळ्याच वस्तु प्रेक्षकांच्या समोर उभ्या राहतात. परंतु 'जें सारें जगतीं चकाकत असे तें सर्व सोनेंचि न !' एकाचें सर्वच सरस व दुसऱ्याचें मिसळ, असा दोघांत गुणभेद असल्यामुळें त्यांच्यामधील तुलना बिनचूक होणार नाहीं. तेव्हां तुलनेच्या पूर्वी प्राचीन कालाचे निरनिराळे भाग कल्पून, प्रत्येकाचा त्या त्या वेळच्या अर्वाचीन काळाशीं जशी जशी तुलना होईल तसा तसा त्यांत चुकीचा संभवही कमी प्रमाणांत दिसेल.

प्राचीनत्वाच्या अगाध सागरावर जहाज हाकारलें तर तें १३ व्या शतकाच्या प्रांतांत अखेर नांगरतां येतें. त्याच्या पुढें तें जाऊं शकत नाहीं. तेव्हां त्या काळासंबंधानें कांहीं सांगतां येणें आज तरी अशक्य आहे. ज्यांना मराठी भाषेचे आद्यकवि म्हणून संबोधितां येईल असे मुकुंदराज व ज्ञानेश्वर हे १३ व्या शतकांतच झाले. ज्ञानेश्वराच्या उज्ज्वल स्वयंप्रकाशित ताऱ्यानें तत्पूर्वींच्या सर्व लुकलुकणाऱ्या तारकांना आपल्या तेजांत लपवून टाकलें. त्याच्या पुढें ह्मणजे १७ व्या शतकांत तुकाराम, मुक्तेश्वर हे तारे चमकूं लागले. १३ व्या शतकानंतर सुमारें चार शतकें महाराष्ट्रास पहिल्याच अस्तंगत ताऱ्याच्या किरणाकडे पाहात बसावें लागलें ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. रामदासानें मात्र लवकरच अवतीर्ण होऊन कवींची मूळ परंपरा राखिली. श्रीधर, महिपति यांनीं ती परंपरा पुढें चालवून, शेवटीं मोरोपंत, रामजोशी यांच्यापर्यंत ती टिकली. अशा रीतीनें १३ व्या शतकापासून तों १८ व्या शतकाअखेर ज्या ज्या कवींचें नांव आज विशेष पुढें दिसत आहे ते हे होत. दासोपंत, जयराम, माधव, दयार्णव, देवनाथ वगैरे कवीही याच वेळीं उदयास आले होते. इतक्याच कविवर्गाला प्राचीन म्हणून लेखलें जात आहे. कित्ये-

कांचे मतें तर स्वराज्याच्या अंताबरोबर त्याच वेळीं अस्तंगत झालेल्या जोशी व फंदी यांच्या बरोबरच महाराष्ट्र कवींचीही परंपरा थांबली. अशा रीतीनें कवींची परंपरा खुंटली असें समजणारा बराचसा वर्ग आज महाराष्ट्रांत आहे. तसेंच ही कविपरंपरा चालण्यास सांप्रतचाही काळ थोडा फार अनुकूल आहे असें समजणारा जो थोडासा वर्ग आहे, त्यांतही कांहींजण अलीकडच्यांत ज्ञानेश्वर मोरोपंताप्रमाणें नांव घेण्यासारखा कोणीही कवि झाला नाहीं असें म्हणतात. जणूं काय ज्ञानेश्वरापासून तों मोरोपंतापर्यंत जो काळ लोटला तो अर्वाचीन काळाप्रमाणें अर्ध शतकाचा अगर पावशतकाचा होता.

असो. प्राचीन काळाचे स्थूलमानानें तरी भाग पाडल्याशिवाय त्यासंबंधाचें आपलें विवेचन तितकें पायाशुद्ध होणार नाहीं. मराठी कवितेमध्यें ज्या मानानें फेर पडत चालला होता त्यास अनुसरून आपण तिचे विभाग करूं. १३ व्या शतकापासून प्रारंभ केला असतां पहिला भाग ज्ञानेश्वराची कविता होय. त्यापुढें सोळाव्या शतकांत एकनाथाची होय. तिसरा भाग १७ शतकांतील मुक्तेश्वराची कविता होय. १८ व्या शतकांतील मोरोपंताची कविता हा चौथा भाग कल्पून शेवटचा रामजोशी कवितेचा होय. हे प्राचीन काळच्या कवितेचे भाग होत.याच्या पुढील भाग म्हणजे अर्वाचीन कवितेचा. त्यामध्यें अजून भाग पडतील असा फरक झालेला नाहीं. इंग्रेजी पद्धतीप्रमाणें प्रत्येक कालखंडास 'युग' म्हटलें तर मराठी कवितेला ज्ञानेश्वर-युगापासून प्रारंभ होतो. त्यावेळीं मराठी भाषा पाळण्यामध्येंच खेळत होती. तिची आई संस्कृत असून प्रौढ होती. मराठीचे जन्मापासूनचे दिवस असंस्कृत व अशिष्ट अशा लोकांमध्यें गेल्यामुळें तिच्याकडे शिष्टांचें दुर्लक्ष होणें साहजिक होतें. तथापि इतक्या प्रतिकूल स्थितींतही ज्ञानेश्वरीची जी इतकी ख्याती झाली ती केवळ तिच्या स्रष्ट्याच्या दिव्य प्रतिभेमुळें होय; एवढेंच नाहीं, तर मराठीला जें बाळसें लागलें तें सुद्धां तिची व ज्ञानेश्वरीची जोड जमली म्हणून होय. ज्ञानेश्वरासारखा उज्ज्वल मणि मराठी भाषेच्या पदरांत पडला नसता तर आज जी ती चहूंकडे नांदत आहे ती कदाचित् जास्तच कुरूप बनून लवकरच नामशेष झाली असती. ज्ञानेश्वरानें प्रथमतः तिला आपलीशी केली म्हणूनच आजचा दिवस तरी तिला पाहतां आला. ज्ञानेश्वरींचा विषय मूळपासूनच पारमार्थिक आहे. कवीनें व्यावहारिक दृष्टान्त देऊन विषय जरी सोपा केला आहे, तरी त्यांतील पारमार्थिक कठिणपणा पदोपदीं अनुभवास आल्यावांचून राहत नाहीं. कोणत्याही भाषेच्या पूर्णतावस्थेला तींत आध्यात्मिकता शिरत असते हा नियम इतर भाषांसंबंधीं जरी खरा असला तरी तो मराठीसंबंधानें तसा नाहीं. मराठींत जो नांवाजण्यासारखा पहिला ग्रंथ झाला तो आध्यात्मिकच होय. याचें कारण महाराष्ट्राची भावनाप्रधान प्रवृत्ति नसल्यामुळें तो मूळपासूनच काव्यविन्मुख आहे; अगर कदाचित् तो काळ संस्कृतांतसुद्धां आध्यात्मिक विचारांचा असल्यामुळें ज्ञानदेवाचीही त्याच विचारांत प्रगति होत गेली असावी. किंवा आपल्या ग्रंथास समाजांतील धर्मगुरु—कीं जे मराठीला अगदीं तुच्छ लेखीत असत—यांच्या मतें आपला ग्रंथ थोर ठरावा व संस्कृत भाषेंतील उत्तम ग्रंथाशीं मराठींतीलही ग्रंथ भिडवावा, या कारणामुळें मराठीला प्रारंभींच आध्यात्मिकतेचें वळण लागलें.प्राकृत भाषेची अत्यंत शुद्धता व तींतील कडक सोंवळेपणा पाहणें असेल तर आपले डोळे एकदम ज्ञानदेवीकडे वळतात. ज्ञानेश्वरी मराठी भाषेंतील एक कोहिनूर आहे. तिनें आपले पूर्वींचे जे थोडे फार ग्रंथ होते ते तर निर्माल्यवत् केलेच, पण पुढील ग्रंथांचाही मार्ग बिकट केला. ज्ञानेश्वरानंतर पुढें दोन तीन शतकांत प्रसिद्ध असा ग्रंथकार निपजला नाहीं याचें कारण ज्ञानेश्वरीची वाङ्मयक्षेत्रांतील अतिशय उंच उडी हें देतां येईल. १६ व्या शतकांत प्रसिद्धीस आलेला एकनाथ याचा 'एकनाथी भागवत' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वरी म्हणजे जशी गीतेवरील विवरणात्मक टीका होय,तशीच एकनाथी म्हणजे भागवतांतील दशम स्कंधावरील टीका होय.पहिल्यांत ज्ञानप्राधान्य तर दुसऱ्यांत भक्तिप्राधान्य दृष्टीस पडतें.अजूनपर्यंत मराठी ग्रंथगत भाषेस यावनी भाषेचा फारसा विटाळ झालेला दिसत नाहीं. तथापि ज्ञानेश्वरकालीन भाषेंत एकनाथकालीन भाषेंत बराच लक्षांत भरण्यासारखा फरक झालेला दिसतो.एकनाथाची भाषा सरळ

आहे, सुबोध आहे, तींत क्लिष्टतेचा आढळ होत नाहीं. त्याचप्रमाणें तींतील वर्णनाची पद्धतीही नांवाजण्यासारखी आहे. यानंतरचा काळ म्हणजे 'मुक्तेश्वराचें युग' होय. मुक्तेश्वरानें आपल्या अस्खलित वाणीनें जें भारत गाइलें आहे, त्यासंबंधाच्या आख्याइकेस-कीं हा ग्रंथ मूळ ग्रंथाला मागें टाकील ह्मणून त्यास जलसमाधि दिली-जरी फारसें महत्त्व दिलें नाहीं, तरी त्यावरून मुक्तेश्वरी भारत किती प्रिय झालें होतें याचें अनुमान करतां येतें. अगोदर मूळ भारत सर्वांनाच प्रिय. मुक्तेश्वरानें तें नव्या उमेदीनें स्वभाषेंत गाइलें असल्यामुळें विशेषच प्रिय व्हावें यांत नवल नाहीं. ज्ञानेश्वर शिष्ट अशा एकाच वर्गाला प्रिय, तर मुक्तेश्वर सर्वांनाच प्रिय होय. ज्ञानेश्वरी व मुक्तेश्वरी यांच्यामध्यें श्रेष्ठ कोण या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाहीं. दोन्ही काव्यें जरी सोप्या वृत्तांत आहेत, तरी एक आपल्या गहन विषयानें व अपरिचित परंतु ओजस्वी वाणीनें जितकें आदरणीय वाटतें, तितकेंच दुसरें व्यावहारिक म्हणून बालबोध विषयानें व साध्या म्हणून परिचित अशा गोड वाणीनें आपलेंसें वाटतें. एक गगनांतून भूवर उतरतें तर दुसरें भूवरून गगनांत चढतें. तेव्हां तिच्यासारखी तीच, व हिच्यासारखी हीच, अशा अनन्वय अलंकारानें दोन्हींही कवितांची वाट लावावी लागते. मोरोपंतानें दोघांना जीं विशेषणें लाविलीं आहेत, तीं फार समर्पक आहेत. ज्ञानराजाला ' भगवान् ' तर मुक्तेश्वराला ' कविवर ' असें संबोधिलें आहे. आधुनिकांत ज्ञानेश्वराप्रमाणें मुक्तेश्वरासही पहिल्या प्रतीचा मान मिळत आहे. मुक्तेश्वरींचीं पांच पर्वें वाचल्यावर ' मुक्तेश्वरी भारताचीं अठराही पर्वें ज्या दिवशीं हातांत पडतील तो दिवस माझ्या आयुष्यांतला परम धन्य असें मी मानीन ! ' या कविभक्त पांगारकरांच्या उद्गाराचा प्रतिध्वनि कोणाच्या हृदयांत उद्भवणार नाहीं !

याच युगांत वामनपंडित, तुकाराम व रामदास हेही कवि उदयास आले होते. वामनाचीं स्फुट प्रकरणें सोडून दिलीं तर, (कारण त्यांत मात्र त्याचा कवित्वगुण चांगलाच प्रत्ययास येतो) त्यास ' कवि ' म्हणणें म्हणजे ' कवि ' शब्दाची अति मोठी व्याप्ति करावी लागेल. त्याचे ' निगमसार ' व ' यथार्थदीपिका ' हे ग्रंथ वेदान्तपर असून केवळ टीकात्मक आहेत. त्यांत ज्ञानेश्वरींतील माधुर्यापेक्षां पंडितताच किंवा तार्किकपणाच प्रकर्षत्वानें दिसून येतो. रामदासाचा दासबोध ग्रंथ हा जरी राष्ट्रीय असला तरी त्यांतील बऱ्याच अध्यात्मपर प्रकरणांत कवित्वापेक्षां वरील गुणच अधिक दिसून येत असल्यामुळें त्यास काव्यापेक्षां 'प्रबंध' ह्मणणेंच सयुक्तिक होईल. एकट्या तुकारामांत मात्र निराळेपणा व म्हणून नावीन्य दृष्टीस पडतें. त्यास बऱ्याच अंशानें ' प्रादेशिक कवि ' म्हणून संबोधितां येईल. या कवीच्या पूर्वी व याच्या नंतरही जे कवि झाले, त्यांचें चरित्र व त्यांची कविता यांत फारसें साम्य नाहीं. ज्ञानदेव किंवा मुक्तेश्वर या व्यक्तींपासून त्यांची कविता निराळी होऊं शकेल; परंतु तुकारामांत तसें करतां येत नाहीं. तुकाराम ही व्यक्ति व त्याची कविता हीं दोन्हींही एकच होत. ' गाथा ' ग्रंथ तुकारामाची प्रतिमा आहे. त्यामध्यें स्वतः चितारलेली सर्वांगानें पूर्ण अशी तुकारामाची व्यक्ति आपणापुढें उभी राहते. काव्यालंकाराच्या दृष्टीनें व यमकप्रासादिगुणसाकल्यानें वामनाची कविता तुकारामाच्यापेक्षां जरी श्रेष्ठ ठरली, तरी वृत्ति उच्छृंखल बनून त्यांतून सहज स्फूर्तीचा ओघ जर वहात असेल तर तो तुकारामांतच होय. तेव्हां अलंकारविहीन, जाड्याभरड्या वस्त्रांनीं आच्छादित परंतु स्वतंत्र बाण्याची, व प्रबल मनोवृत्तीची, अशी तुकारामाची कविता कोणाचें मन आकर्षून घेणार नाहीं ? धन्य त्या तुकयाची, कीं ज्यानें आपल्या कवितेचे स्वैर विहार दाबून तिला अलंकाराच्या जड पाशांनीं बद्ध करून टाकिली नाहीं ! यमकाचा अलंकार चढवून संस्कृतापेक्षां मराठीस एका अधिक अलंकाराची जोड न देतां, उलट संस्कृतांतीलच अलंकारांस फाटा देऊनही आपल्या कवितेस जगाला मोहिनी पाडण्याचें सामर्थ्य आहे हें त्यानें सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें. तुकारामास या कृतीनें काव्यक्षेत्रांतील ' नवीन शककर्ता ' असें म्हणण्यास हरकत नाहीं. आम्हीं या काळास ' मुक्तेश्वरी युग ' ह्मटलें आहे, तें केवळ मागील व पुढील अनुरोधानें होय. ज्ञानेश्वरापासून तों तहत चार शतकेंपर्यंत मराठी काव्याचा जो ओघ वाहत होता तो तुकारामाच्या कवितेंत सर्वस्वी बद-

ला. हाच वळलेला ओघ जर पुढें फोफावला असता तर त्या काळास 'तुकारामाचें युग' असें म्हणतां आलें असतें. १७ व्या शतकांतील मराठा गद्यांतील स्वतंत्र बाणा त्याकाळच्या मराठी काव्याला मानवला नाहीं म्हणून म्हणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा एकवार तुकारामानें कवितेला दिलेली नवीन स्वतंत्र वृत्ति त्याच्याचबरोबर लयास गेली, व नंतरच्या काळांत पुन्हां तिचा पूर्वीचा क्रम सुरू झाला.

मुक्तेश्वराच्या युगानंतर मोरोपंताच्या युगास प्रारंभ होतो. मुक्तेश्वरकालीं 'संस्कृत काय देवें केली। प्राकृत काय चोरापासून आली। अशा रीतीनें प्राकृतभाषाभिमानी संस्कृत भाषेच्या कैवाऱ्यांपाशीं भांडून आपला बरोबरीचा हक्क साबीत करीत होते. परंतु पंडित लोक जात्याच हेकेखोर असल्यामुळें कांहीं केल्या प्राकृताचा जम बसेना. तिला असंस्कृत–शूद्राची भाषा–असें अजूनही लेखीत असत. मोरोपंत हा शास्त्री असल्यामुळें खरी गोष्ट उमगला व ही दुही मोडावी या सद्धेतूनें त्यानें दोहोंतील 'सुवर्णमय मध्याचा' अवलंब केला. त्याचा परिणामही जसा इष्ट व्हावयाचा तसाच झाला. त्यानें आपल्या कवितेचें वस्त्र संस्कृतप्राकृत धाग्यांनीं विणलें, यामुळें शास्त्र्यांना ती आपली भाषा असें वाटूं लागलें, इतकेंच नव्हे, तर प्राकृत जनही तिला आपलीशी मानूं लागले. आज एक दीड शतकपर्यंत शास्त्रिपुराणिकांनीं संस्कृत ग्रंथाप्रमाणें मराठींतील मोरोपंताचें अध्ययनही इतर कवींच्या मानानें जास्त चालविलें आहे, यांतील बीज तरी हेंच होय. थोडेंसें शिकलेल्या लोकांना सुद्धां इतरांपेक्षां मोरोपंताच्या कवितेंत मोहिनी आढळते. मोरोपंत हा सहज कळणारा कवि नव्हे. त्याचें मर्म जाणण्याकरितां अध्ययनाची व अध्यापकाचीही जरूरी आहे; व वरील लोकांना तर अर्थ काढण्यामध्येंच रस दिसतो. तेव्हां त्यांना इतर कवींपेक्षां मोरोपंत आवडावा यांत आश्चर्य नाहीं. मोरोपंताच्या कवितेमध्यें शब्दालंकार व अर्थालंकार यांची रेलचेल असल्यामुळें ती शास्त्री लोकांच्या जिभेला व मेंदूला योग्य अशी वाटली. परंतु इतकें करूनही शेवटीं आमच्या या कवीसुद्धां आपल्या कवितेला संस्कृत व प्राकृत या ठिगळांनीं शिवलेली कंथा म्हणून कोणी म्हणतील अशी सार्थ शंका आली. तथापि ज्या ज्या अलंकारांनीं देववाणी युक्त होती, ते ते सर्व अलंकार महाराष्ट्रकवितायुवतीवर त्यानें लेवविले. आतां संस्कृतांत असा कोणताही अलंकार नाहीं कीं जो महाराष्ट्रकवितासुंदरीवर तळपत नाहीं. संस्कृत कविवरांनीं आपल्या कविताकुलवधूच्या ज्या ज्या हौशी पुरविल्या, त्या त्या सगळ्या–दुसऱ्याच्या बघून कां होईना पण–या कविवरानें आपल्या कुलवधूच्या पुरविल्या. या एकाच परंतु अत्यंत श्लाघ्य अशा गुणामुळेंसुद्धां आमच्या या कविपुंगवाची धन्यता असो!

मोरोपंताच्या कवितेची त्याच्या पूर्वकालीन कवितेशीं तुलना करून पाहतां ती कांहीं बाबतींत कमी प्रतीची दिसेल, तर कांहींत दुसरीवर ताण करील. ज्ञानोबाची आंतर ओजस्विता मयूरांत नाहींच, पण तुकोबाच्या ऐकान्तिक भक्तीचाही आढळ तेथें होत नाहीं. रामदासाचा आत्मविश्वास व श्रीधराचा सरळपणा हे गुण तींत सांपडत नाहींत, किंवा वामनमुक्तेश्वराचीं सृष्टिवर्णनेंही तेथें दिसत नाहींत. तथापि भाषेची प्रौढता व शुद्धता जर कोणास पाहावयाची असेल तर ती मोरोपंताशिवाय इतरत्र सांपडणें नाहीं. मयूराचे एकेक भाषेसंबंधीचे खेळ पाहिले म्हणजे मन अगदीं थक्क होऊन जातें. त्याची कविता नाना अलंकारांनीं जड झाली असली, तरी एकाद्या महाराज्ञीप्रमाणें आपल्या वैभवानें प्रेक्षकांचे मनांत भीतियुक्त आदर उत्पन्न केल्याशिवाय राहत नाहीं. मुक्तेश्वराचें काव्यपुष्प आपल्या अतुल परिमलानें दाही दिशा दरवळून टाकितें, तर मोरोपंताचें आपल्या उज्ज्वल रंगानेंच प्रेक्षकाचे डोळे आकर्षून घेतें. दोन वस्तूंची तुलना करण्यास त्यांमध्यें जें कांहीं विशिष्ट प्रकारचें साधर्म्य असावें लागतें तें पंत आणि मुक्तेश्वर यांच्या कवितेंत आहे. त्यांच्या कवितेला आजपर्यंत जितक्या उपमा दिल्या आहेत तितक्या दुसऱ्या कोणत्याही कवितेला मिळाल्या नाहींत. एकजण मुक्तेश्वराचें काव्य द्राक्षापाकाच्या वर्गांत व पंतांचें काव्य नारिकेल फलाच्या वर्गांत (प्रो. परांजपे) घालतो, तर दुसरा मुक्तेश्वराच्या कवितेस श्रीमंत पाटलाच्या शहाण्या व भावार्थी बायकोची व मोरोपंताच्या कवितेस शहरांतल्या साधारण कारकुनाच्या हुशार आणि पक्क्या वस्ताद बायकोची (पांगारकर) उपमा देतो. मोरोपंताला वाग्देवीच्या प्रसादानें 'कोणत्याही विषयावर कोणत्याही वृत्तांत काव्य रचणें हें हत्तीनें आपल्या शुंडादंडावर माला

झेलण्याप्रमाणेंच ' सोपें वाटलें. मुक्तेश्वराच्या अंगीं या गुणांची वाण होती. तरी पंतांपेक्षां मुक्तेश्वर अधिक सात्त्विक व भावार्थी दिसतो.एकानें प्रतिकूल परिस्थितींत आपली भाषा साधी व रसाळ ठेविली, तर दुसऱ्यानें अनुकूळ परिस्थिति असतांना चित्रकाव्याच्या नादीं भरून आपल्या भाषेस क्लिष्टत्व आणिलें. कवितेच्या अपकर्षकाळीं चित्रकाव्यासारखी कविता निपजूं लागते, असा एक साधारण ठोकळ नियम आहे. इंग्रेजींतील कौले व संस्कृतांतील माघ वगैरे कवींचे ग्रंथ हाच नियम सिद्ध करीत आहेत. कवितेच्या उतार वयांत तिचें जीवन म्हणजे एक यंत्र बनतें. अमूक एक प्रकारचें खाद्य पेय वगैरे घातलें कीं तिचा जीव बचावला, अशी स्थिति होते. या दृष्टीनें पाहतां मोरोपंताच्या हातून चित्रकाव्याची रचना व्हावी हें तिच्या अपकर्षाचें किंवा वृद्धत्वाचें निदर्शक होय. कवीनें कविता करण्याचा एक साचा बनविला, त्यांत शब्द कोंबले कीं त्यांतून कवितेचे ठसे बाहेर पडले.–असें कूपरनें आंग्लकवि पोप याजविषयीं जें म्हटलें आहे, त्याचा अनुवाद थोड्या फार प्रमाणानें येथेंही करण्यास हरकत नाहीं. १८ व्या शतकांतील महाराष्ट्र रमणीप्रमाणें मराठी कवितेचें आन्तर गुणांकडे दुर्लक्ष होऊन डामडौल, नीटनेटकेपणा वगैरे बाह्य गोष्टींकडे जास्त लक्ष वेधूं लागलें. या दोषामुळें–वाटेल तर गुणामुळें म्हणा—कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारख्या रसिक विद्वानाचे मनांतून मोरोपंत उतरत चालला होता; तेंच मुक्तेश्वराच्या कवितेची दृष्टि अंतर्मुख असल्यामुळें बाह्य वेषांत जरी बेडौलपणाची न्यूनता आढळली तरी तिच्या संबंधानें वरील रसिकवर्यांची किती आदरबुद्धि होती हें मशहूर आहेच. मुक्तेश्वराची कविता मनांत प्रेम उत्पन्न करिते तर पंतांची कविता आदरबुद्धि उत्पन्न करिते.अशा रीतीनें पंत व मुक्तेश्वर या दोघांच्या तुलनेंत दुसरा जरी उच्च ठरला, तरी स्वतंत्रपणें दोघेही [illegible] र्वांच आहेत हें विसरतां कामा नये. दोघांनीं दोन [illegible] ळ्या दिशांनीं कवितेची आराधना चालविली होती. दोघांतील गुण एकत्र मिळून सर्वांगांनीं परिपूर्ण असें कवितेचें चित्र पाहावयास मिळतें. पंतांचा अलंकार लेवविण्याचा परिणाम महाराष्ट्र समाजावर इतका अढळ झाला आहे कीं, कवीस जाऊन एक अगर दीड शतक जरी लोटलें तरी त्यांतील एखादें लेणें कवितेच्या अंगावर घातलें नाहीं तर ती त्यांस बुची दिसूं लागते.

मोरोपंताचे जवळ जवळ समकालीन कवि ह्मणजे श्रीधर, महीपति, व रघुनाथ पंडित हे होत. या तिघांचीही कविता सर्वांस परिचित आहे. विशेषतः श्रीधर, महिपति यांची ओळख लहानपणापासूनचीच असते. महाराष्ट्रांत असें कोणतेंही कुटुंब सांपडावयाचें नाहीं कीं ज्यामध्यें श्रीधराचे रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप हे ग्रंथ ठाऊक नाहींत. शनिमाहात्म्य तर पुष्कळांना मुखोद्गत येत आहे. तें बाडही श्रीधराचेंच होय. हे ग्रंथ जितके रसाळ आहेत तितकेच सोपे व सरळ आहेत. महीपतीचे भक्तिविजयादि ग्रंथ चरित्रात्मक आहेत. त्यामुळें श्रीधराप्रमाणें त्याच्या स्वैरवृत्तीस जागाच नाहीं. तथापि हेही ग्रंथ सोपे असून विचारशुद्ध आहेत. श्रीधर व महीपति या कविद्वयाची कविता मोरोपंती युगामध्यें निपजली असतांही अत्यंत सुलभ आहे ही लक्षांत घेण्यासारखी गोष्ट होय. महीपतीची दृष्टान्त देण्याची ढब जवळजवळ ज्ञानेश्वराच्या वळणावर गेलेली आहे. श्रीधराचेही दृष्टान्त समर्पक आहेत. परंतु कित्येक ठिकाणीं त्यांची इतकी गर्दी उसळून गेली आहे कीं बालांनाच काय पण मोठ्यांसही ते पाल्हाळिक वाटतात. रघुनाथपंडिताचें नलदमयंतीस्वयंवराख्यान एकच पण हृदयंगम काव्यखंड आहे. कवीनें पंडितसंप्रदायानुरूप शब्दार्थालंकार घालून आपल्या कवितेला नटविली आहे. कित्येक ठिकाणीं श्लेषाचा हट्ट धरून तिला दुर्बोध केली आहे.

प्राचीन कालापैकीं शेवटच्या ह्मणजे 'रामजोशी युगा'स मोरोपंतानंतर प्रारंभ होतो. यावेळीं मराठी राज्याच्या निस्तेज स्थितीबरोबर मराठी कवितेचीही तीच गत झालेली दिसते. मुक्तेश्वराबरोबर कवितेची अंतर्मुख दृष्टि जी एकदां फिरली ती पुन्हां स्थिर होण्याचीं चिन्हें दिसेनात. बरें, बाह्य बडेजाव तरी राहावा, पण तोही पंतांबरोबरच लोपला. अशा अनुकंपनीय स्थितींत मराठी कविता पडली होती. रामजोशी, फंदी वगैरे कविजन आपल्या वक्तृत्वानें तिची दीन स्थिति लपवीत होते. परंतु या सर्व बाह्य उपायांचा विशेष उपयोग न होतां मराठी राज्याच्या अंताबरोबर तिची स्थिति जास्तच बापुडवाणी झाली. सुधारणेचा मार्ग कांहीं दिसेनासा झाला. परंतु केवळ तिचें

दैव थोर म्हणून अर्ध शतकानंतर कां होईना पण तिच्या सुधारणेच्या प्रभाताचीं सुचिन्हें दृग्गोचर होऊं लागलीं. सर्व गुणांनीं संपन्न अशा एका नवीन श्रीमंत भगिनीची गांठ पडल्यामुळें मराठी कवितेला नवकळा प्राप्त झाली असें वाटूं लागलें. तिला जी वार्द्धक्याची भावना जडली होती ती जाऊन एखाद्या नवकुमारिकेप्रमाणें ती पुन्हां दिसूं लागली. तिच्या श्रीमंत भगिनीनें प्रथम आपल्या जवळचें ऐन जिन्नस तिच्या स्वाधीन केले. नंतर कांहीं वेळ तिला आपल्या जवळची कच्ची सामुग्री पुरविली. पुढें तिच्यांत उत्तरोत्तर जशी जास्त सुधारणा होऊं लागली तशी दोघींच्या सामुग्रीचा मिलाफ होऊन तिचीं मराठीला आपलीं म्हणतां येतील अशीं रुचकर पक्वान्नें तयार होऊं लागलीं. रामजोशी-युगानंतर ज्याची सांप्रत आधुनिक काळांत गणना करतात अशा 'चिपळुणकरी युगा'स प्रारंभ होतो. थोरल्या चिपळूणकर शास्त्री बोवांची 'पद्यरत्नमाला' व विशेषतः त्यांतील सार्कीबद्ध 'मेघदूत' फारच गोड आहे. वृत्त गोड आहे, शब्द गोड आहेत व कथानक तर मूळांतल्याप्रमाणें स्वतंत्र भासत असून चटकदार आहे. परशुरामपंत तात्याचीं संस्कृत नाटकांचीं भाषांतरें याच काळांत जन्मास आलीं. इंग्रेजी कवितेचीं अव्वल भाषांतरें झालीं तींही याच काळांत होत. अशा रीतीनें या काळांत जरी एक दोन तारे चमकले तरी हें युग बहुतेक परपोषी होतें. याचें पुढील युग 'केशवसुतीय' युग होय. हा काळ मात्र बराच समाधानाचा होता. इंग्रजी व मराठी विचारांचा संयोग होऊन त्याचा प्रवाह गंगायमुनेच्या प्रवाहाप्रमाणें आनंददायक भासूं लागला. इंग्रजी कवितेशीं मराठीचा जसा जसा परिचय होऊं लागला, तशी तशी नुसत्या अलंकारांनीं आपणास मढवून काढण्याची हौस कमी होऊं लागली. आंग्ल समाजाच्या सहवासानें महाराष्ट्रसमाजांत साध्या वृत्तीची जी भावना वावरूं लागली, तीच भावना मराठी कवितेंतही दिसूं लागली. जी मोकळीक हिंदीस्त्रीसमाजास मिळाली तीच कवितेसही मिळणें अपरिहार्य होतें. ज्या क्षेत्रांत मराठी कविता आजपर्यंत वावरत होती, तें क्षेत्र आतां विस्तृत झालें. हा विस्तृतपणा कांहीं अचानक प्राप्त झालेला नव्हता. काव्यक्षेत्र ज्ञानेश्वरापासून हळूहळू वाढतच होतें. ज्ञानेश्वरी कवितेचा संचार जर आध्यात्मिक क्षेत्रापुरताच होता, तर मुक्तेश्वरी कवितेचा संचार लौकिक क्षेत्रावरही होऊं लागला. तुकारामीय कवितेला परशोधनेपेक्षां आत्मशोधनेंत जास्त आनंद वाटूं लागला. श्रीधर, महीपति यांची कविता लौकिक क्षेत्रांतच उभी राहून आध्यात्मिकतेचें कार्य करीत होती. रामजोशी व फंदी यांची कविता लहानपणीं अत्यंत हूड होती; त्यामुळें असा कोणताही ऐहिक विषय नाहीं कीं त्यांत तिचा संचार झाला नाहीं. परंतु तिच्या वाढीबरोबर या बेलगामी संचारास आळा पडत चालला. व त्या हूडपणाचें पुढें पारमार्थिकांत रूपांतर झालें. यापुढील काळ जरी भाषांतराचा होता तरी मराठी कवितेला संस्कृत काव्यांत व नाटकांत नवरसांनीं परिप्लुत असें जें अज्ञात क्षेत्र होतें, तें ज्ञात करून दिलें. इंग्रेजांच्या सहवासाबरोबर तर कनिष्ठ म्हणून म्हटलेल्या क्षेत्रावरसुद्धां तिचा संचार होऊं लागला. आतापर्यंत जो विषय गाण्यास नीरस असा समज होता त्यावरही तिचीं गाणीं सुरू झालीं. परंतु तिचें अव्यक्त गाणें टिपून घेणारे सर्वच लेखक फडे नव्हते. त्यामुळें मुळचे नीरस वाटणारे विषय अधिकच नीरस वाटूं लागले. उलट अशा प्रकारचीं गीतें प्रगटलीं, कीं त्यांतील विषय सामान्य असतांना सुद्धां लिहिणाराच्या हुषारीमुळें त्यांतील नीरसता लोपून गेली आहे. या आमच्या म्हणण्याची सत्यता पाहणें असल्यास वाचकांनीं केशवसुताचीं 'म्हातारी' 'फुलपाखरूं' 'रांगोळी घालतांना पाहून' वगैरे सामान्य म्हणून नीरस विषयांवरील काव्यें वाचावीत अशी आम्ही त्यांस नम्र सूचना करितों. वस्तु कोणत्याही रंगाची असो, बघणारा ज्या रंगीत भिंगांतून पाहत असेल तो रंग तिच्यावर दिसतो. कवितेचा विषय कितीही हलका अगर नीरस असो, त्यानें कांहीं आकस्मिक कारणानें कां होईना पण कवीच्या अंतःकरणाच्या आंतील पडद्यापर्यंत प्रवास करून त्यास जर उच्च भावनांची जाणीव करून दिली तर मूळ विषयाची नीरसता तात्काल नाहींशी झालीच म्हणून समजावें. रेव्ह. टिळकास 'वनवासी फुला'नें जर ख्रिस्ताचें अनुकरणीय चरित्र शिकविलें तर आंग्लकवि वर्डस्वर्थ यासही सर्वांनीं उपेक्षिलेल्या एका रानटी क्षुद्र फुलानें 'अमरत्वाचे विचार' सुचविले. म्हणून सांप्रत कविजनांचे विषय प्राचीनांप्रमाणें उच्च नसून

ऐहिक, क्षुद्र असतात अशा कुरकुर करण्यांत विशेषसें हांशील नाहीं कविता जर गचाळ निघत असेल तर तो दोष कवींचा होय. जो तो आपल्या मगदुराप्रमाणें विषयावर प्रकाश पाडीत असतो.

काव्याविषयासंबंधानें विचार करीत असतांना आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. ती ही कीं ज्ञानेश्वरापासून तों मोरोपंतापर्यंत कवितेनें जीं गाणीं गाइलीं आहेत त्यांतील सूर बहुतेक एकसारखेच आहेत. त्यांत विविधता नाहीं. हा वैचित्र्याभाव कांहींच्या मताप्रमाणें सर्वच कवींच्या ईश्वरैकचित्तवृत्तित्वामुळें दिसो किंवा कांहींच्या मताप्रमाणें कवितेच्या परोपजीवित्वामुळें दिसो,—कशानें कां दिसेना, पण काव्यांत तो आहे हें खास. स्वतंत्र बाण्याच्या तुकारामांत सुद्धां तो नव्हता असें म्हणवत नाहीं. परंतु हा दोष केवळ कवींच्यावर टाकून भागत नाहीं. त्यावेळच्या महाराष्ट्रसमाजाच्या भावना, वृत्ति व संस्कार यांचें जर बारकाईनें निरीक्षण केलें तर त्यांत स्वतंत्रत्वाची वृत्ति नव्हती असें दिसून येईल. कित्येक शतकें लोटलीं, राज्यक्रांत्या घडून आल्या, तरी महाराष्ट्रसमाजांत म्हणण्यासारखा फेरबदल झाला नाहीं. ज्ञानेश्वरकालीं जसा समाज होता तसाच तो मोरोपंताचे वेळींही होता. सामाजिक संस्कारही जसेच्या तसेच राहिले. १७ व्या शतकांत महाराष्ट्राचे दुर्दिन संपून जिकडे तिकडे स्वातंत्र्याचें वारें खेळूं लागलें, सामान्य जनांत सुद्धां नवजीवनाचा उदय झाला; तरी ज्यांच्या हातांत समाजाचीं सूत्रें होतीं त्यांच्यावर त्या वाऱ्याचा परिणाम कांहीं एक झाला नाहीं, तें राजकीय जीवन त्यांच्यांत संचरूं शकलें नाहीं. स्वातंत्र्याच्या भाल्याचें जें तीक्ष्ण पातें शत्रूच्या अंगांत घुसून रक्तप्राशन करीत होतें, तें इकडे समाजाच्या अभेद्य खडकावर निरुपयोगी ठरलें. त्यामुळें राजकीय जागृतीचा इष्ट परिणाम राष्ट्रावर सार्वत्रिक झाला नाहीं. जे मराठे वीर एका दिशेनें पुरोगामी होते तेच दुसऱ्या दिशेनें परागामी ठरले. राजकीय आणि सामाजिक संबंधांत जो मेळ असावा लागतो तो विस्कळित होऊन तुझा तूं व माझा मी अशी विभक्त स्थिति प्राप्त झाली. अशा प्रकारच्या या चतुरावेष्टित समाजांतील प्रत्येक व्यक्तीवरील संस्कार अविकृतच राहावेत हें साहजिक आहे. व पुढें भविष्यत्कालीं जन्मास येणाऱ्या व्यक्तींवरसुद्धां हा परंपरागत संस्कार तसाच चिरस्थायी राहावा यांतही मोठेंसें नवल नाहीं. ज्ञानेश्वरापासून आध्यात्मिक गंगेचा जो प्रवाह वाहूं लागला तो थेट १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत बहुतेक तसाच होता. त्यास दुसऱ्या नद्या मिळून नवीन पाण्याची भर पडत नव्हती. जी वाट अप्रगतिपर समाजाची तीच तसल्या कवितेचीही होते. काव्यांतून जो ध्वनि प्रारंभीं निघत होता तोच ध्वनि—निराळ्या प्रकारानें व थोड्याफार नव्या दमानें—पुढेंही निघूं लागला. अर्थात् तो एकट्यापुरता आनंददायक वाटला तरी सगळे सूर ऐकतांना त्यांत फारसें वैचित्र्य व स्वारस्य भासेनासें झालें. जिकडे तिकडे मोहरानें सुगंधित झालेली आंबराई व चित्रविचित्र फलांफुलांनीं दरवळलेली राई यांमध्यें फिरणाऱ्यांच्या आनंदांत जो फरक दिसतो, तो एकाच विषयावर निरनिराळ्या रीतीनें गाइलेलीं व निरनिराळा विषय घेऊन त्यावर रचलेलीं गाणीं ऐकण्यामध्यें आहे. जोंपर्यंत वर सांगितल्याप्रमाणें समाजबंधनें फाजील दृढ होतीं, जोंपर्यंत देशांतील वाङ्मय पुराणप्रिय अशा अप्रगतिपर माणसांच्या हातांत होतें, तोंपर्यंत कवितेचा संचार आहे त्याच उच्च परंतु संकुचित क्षेत्राबाहेर होत नव्हता. परंतु हीच स्थिति शेवटपर्यंत टिकावयाची नव्हती. ज्यावेळीं समाजाची पहिली आकुंचित दृष्टि अधिक विस्तृत होऊन तो प्रगतिपर बनला, ज्यावेळीं त्यामध्यें नवीन विचार व आचार प्रादुर्भूत होऊन तो जागा झाल्याप्रमाणें दिसूं लागला, त्यावेळीं प्रत्येक देशांतील स्थिति तेथील वाङ्मयास वळण लावणारी असल्यामुळें समाजोत्क्रान्तीबरोबर मराठी कवितेच्या प्रगतीस सुरवात झाली. एकमार्गी मराठी कवितेची सर्वांगांनीं पूर्ण अशा विदेशी आंग्ल कवितेशीं गांठ पडल्यावर आंग्ल कवितेचे गुण तिच्यांत उतरूं लागले. संस्कृत भाषा तिची जननी खरी.पण तिनें एकान्तिक भक्ति या गुणांत जरी आईवर चढ केली तरी मातेचे बाकीचे गुण आपणांत नाहींत याची ओळख मराठी कवितेला पटूं लागली आहे. तेव्हां संस्कृतांतील व इंग्रेजींतील गुण आपल्यांत उतरविण्याचा तिचा जारीनें प्रयत्न सुरू झाला आहे. व प्रयत्नाचें फल यश या न्यायानें मराठी कविता सर्वांगानें परिपूर्ण अशी लवकरच चमकूं लागेल अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत.

कवितेच्या अंतर्गुणामध्यें जसा फरक पडला तसा बहिरंगामध्यें मात्र पडला नाहीं. जो काय फरक दिसत आहे तो 'अभावस्वरूपी' होय. म्हणजे प्राचीन कवितेचें प्रारंभीं जें शुद्ध बाह्यांग होतें त्यामध्यें पुढें जास्त बडेजाव शिरूं लागला. ही प्राचीन काळांतील शेवटची स्थिति बदलून पुन्हां आधुनिक काळांत मूळच्याच शुद्ध परंतु जरा निराळ्या वेषांत कविता प्रकट होऊं लागली. हा जो सरळ सोप्या वृत्ताचा बदल झाला तो अशा रीतीनें भावस्वरूपी नसून अभावस्वरूपी होय. संस्कृतांतील अनुष्टुभ् छंद जितका सोपा, सरळ व अस्खलनशील आहे, तितकाच किंवा त्याहूनही जास्त सोपा, सरळ व अस्खलनशील असा मराठींतील ओवी छंद आहे. इतर वृत्तांच्या मानानें अनुष्टुभ् जर स्वच्छंदी म्हटला तर ओवीही जास्त स्वच्छंदी म्हटली पाहिजे. कारण पहिला गण व मात्रा यांची जरूरी न बाळगणारा असला, तथापि त्यास अक्षरसंख्येचें तरी बंधन आहे. परंतु आमच्या ओवीला तेंही बंधन दुस्साध्यच वाटलें. तिचा केवळ 'मुखसौकर्य' किंवा म्हणण्याची सोय हाच नियम झाला. मराठीच्या उत्कर्षाबरोबर तींतील इतक्या सुकर छंदाचा उद्भव करण्याचें श्रेय ज्ञानदेवाकडेच आहे. इतकें कीं, 'ओवी ज्ञानेशाची' अशा रीतीनें ज्ञानेश्वर व ओवी यांचें साहचर्य झालेलें आहे. हा ओवी छंद इतका सहज व सोइस्कर आहे कीं त्याचा अनुवाद पुढें बहुतेकांनीं केला आहे. वामन शास्त्रीपंडितांत मोडत असल्यामुळें वेदान्तविषयाचे वेळीं त्यानें जरी अनुष्टुभ् छंदाऐवजीं ओवीची कास धरली तरी त्याचीं इतर काव्यें श्लोकबद्ध आहेत. मोरोपंतानें आर्या हाताशीं धरली तर रघुनाथपंडितानें संस्कृत व प्राकृत छंदांची एकत्र भेसळ केली. तुकारामानें ओवीइतकाच सोपा व स्वतंत्र छंद सुरू केला. वेदान्ती कवींनीं ओवीची पैदास केली तर संताळ कवींनीं अभंगाची केली. आमच्या कवींनीं एकेका छंदांत इतकी चिरस्थायी प्रवीणता संपादन केली आहे कीं छंदावरून कवीची व कवीवरून छंदाची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. ज्ञानेश्वराची जशी ओवी, वामनाचा जसा सुश्लोक, मयूराची जशी आर्या, तशीच तुकयाची प्रसिद्ध अभंगवाणी होय. मोरोपंतानें एका आख्यानांत मात्र साकीचा नवीन प्राकृत छंद योजिला आहे. या छंदांतही कवीची शाब्दिक कठिनता वरचेवर नजरेस पडते. खरोखर पाहतां साकी किंवा त्यासारख्या केवळ मराठी छंदांना संस्कृतांतील प्रचंड सामासिक जडता झेपत नाहीं. व मोरोपंत तर या जडतेचे अत्यंत शोकी! तेव्हां त्यांच्यापुढें मार्दवपर साकीला 'दे माय धरणी ठाय' व्हावें यांत नवल नाहीं. जी स्थिति साकीची तीच स्थिति ओवीची. लहान मुलींसाठीं झोपाळ्यावर बसून म्हणण्याकरितां केलेलीं गीतें पाहिलीं म्हणजे मयूराच्या ओवीची कल्पना येते. फंदी व रामजोशी यांना बाळपणापासून तमाशाचें शिक्षण मिळाल्यामुळें त्यांनीं त्यांत प्रचलित असलेले छंदच—म्हणजे कटाव फटका, लावणी हे—सुरू केले. हे छंद मात्राबद्ध असल्यामुळें स्वच्छंदीच होत. प्राकृतांतील आणखी एक छंद म्हटला म्हणजे तो सामान्येंकरून 'पद' या नांवानें मोडतो. हा सुद्धां मात्राबद्धच आहे. तेव्हां एकंदरीनें अनुष्टुभ्वांचून इतर संस्कृत छंद गणयुक्त आहेत; व मराठी छंद गणयुक्त व मात्रायुक्त असून कांहीं तर अनियंत्रित वृत्तीचे आहेत. आधुनिकांनीं एके वेळीं मोरोपंतानें सुरुवात केलेल्या व शाब्दिक जड बंधनानें जेरीस आल्यामुळें टाकाऊ ठरलेल्या साकी छंदाचें पुनरुज्जीवन केलें. त्या छंदांतील मर्म ओळखल्यानें जो पूर्वी टाकाऊ होता तोच छंद सांप्रत अत्यंत गोड, सुकर व सर्वप्रिय होत आहे. शास्त्रीबोवांचें 'मेघदूत' याच वृत्तांत आहे. रे॑व्ह. टिळकांचीं 'बापाचे अश्रु,' 'वनवासी फूल' यांसारखीं वेधक खंडकाव्यें यांच वृत्तांत आहेत. रेंदाळकरांनीं आपल्या 'मोहिनी' काव्याला साकीचीच जोड दिली आहे. प्राचीनांत ओवी जितकी प्रिय होती तितकीच आधुनिकांत साकी प्रिय आहे. निरनिराळ्या रागांत गातां येईल अशी काव्यरचनाही आधुनिक काळांत बऱ्याच प्रमाणांत दृष्टीस पडते. या छंदास पदें म्हणतात; किंवा इंग्रेजी पद्धतीनें त्यास नांव द्यावयाचें म्हणजे 'वीणाकाव्य' हें शोभतें.

इतर कवितेच्या मानानें या वीणाकाव्याचा विशेष हा आहे कीं यांत कवीच्या आंतर भावना सहज रीतीनें स्फुट होतात. इतर कवितेला 'विचारप्रधान' म्हटलें तर या प्रकारास 'विकारप्रधान' अगर 'भावनाप्रधान' म्हटलें पाहिजे. या काव्यांत केवळ मनोवृत्तींशीं खेळ असल्यामुळें कवीची त्या वृत्तीशीं एकतानता झाल्या-

वांचून त्यांत रसाचा परिपोष दिसून येणार नाहीं. शिवाय वाङ्मयाच्या दृष्टीनें यांतील दुसरा एक मोठा गुण म्हटला म्हणजे आजपर्यंत बोलण्याची भाषा व लिखाणाची भाषा यांमध्यें जें खेदजनक अंतर होतें, जी अनुल्लंघनीय दरी होती, ती या वीणाकाव्यानें भरून काढली. वीणाकाव्यास कर्णमाधुर्याची आवश्यकता असल्यामुळें त्यांत बोजड भाषेचा उपयोग करणें युक्त नाहीं व कदाचित् शक्यही नाहीं. बोलण्यामध्यें जी सुबोध, सरळ व सहज उच्चारितां येणारी भाषा असते तीच वीणाकाव्यांत शोभते. प्रचलित भाषा कांहीं अंशानें वीणाकाव्याचें जीवन असल्यामुळें वाचणारास तें घरगुती ह्मणून प्रेमाचें वाटतें. आपण कांहीं तरी परकें पंडिती वाङ्मयांतील वाचीत नसून रोजच्या परिचयाच्या शब्दांत वाचीत आहोंत असें वाटतें. आर्थर बाल्फर साहेबांनीं स्कॉच कवि राबर्ट बर्न्स याच्या कवितेविषयीं जे उद्गार काढले आहेत ते वरील बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. " It is necessary in a poet who is to occupy the position which Burns occupied among his countrymen: it is necessary that every man should feel not that he is reading a mere literary construction but that the words which the poet uses are familiar words which he immediately understands and carry with them a wealth of association without which poetry is but a vague empty sound."

या उताऱ्यावरून आपलीं काव्यें सर्वतोमुखीं व्हावींत अशी आकांक्षा बाळगणाऱ्या कवीनें तीं व्यावहारिक भाषेंत लिहिणें किती आवश्यक आहे हें दिसून येईल. व्यावहारिक भाषेचा नियम स्फुट वीणाकाव्यांमधून पाळणें चांगलें. महाकाव्याचा विषय बाह्य वस्तूंचें यथावत् दर्शन असल्यामुळें त्यास ' परभावनाप्रधान ' कविता(objective poetry) ह्मणतात. त्यांतील भाषा प्रसंगानुरूप कधीं कोमल तर कधीं कठोर अशी अनेकविध योजावी लागते. परंतु वीणाकाव्यें हीं स्वतःच्या भावनेचीं चित्रें असल्यामुळें त्यांस ' आत्मभावनाप्रधान ' काव्यें म्हणतात. त्यांत वर्णनाला फारसा वाव नसतो. त्यांतील शब्द ' कोमल, ललित, प्रसन्न, मधुर व हृदयंगम ' असतात. प्रकृत्यनुरूप भावनांत वरचेवर बदल होत असल्यामुळें वीणाकाव्यांत वैचित्र्य उत्पन्न होतें. हीं वीणाकाव्यें प्राचीनांत जरी थोडीं फार सांपडलीं, तरी ते तिचा अर्वाचीनांप्रमाणें सार्वत्रिक उपयोग करीत नसत.

असो. आतां ज्या एका मुद्द्याबद्दल अजून निश्चितपणा आला नाहीं तो म्हटला म्हणजे निर्यमक कविता होय. प्राचीनांत व अर्वाचीनांत या संबंधींचा भेद अजूनही फारसा दिसून येत नाहीं. अर्वाचीनांत जर आज बोटावर मोजतां येण्यासारखी निर्यमक कविता आहे तर प्राचीनांतही ती तितकी दिसून येते. आज तशा प्रकारची कविता वाङ्मयांत सुरू करावी किंवा नाहीं हा काय तो विवादाचा प्रश्न आहे. वास्तविक ज्याला जो दागिना आवडेल तो तो आपल्या कवितेच्या अंगावर चढवील; तो दुसऱ्याच्या दृष्टीस कुरूप दिसतो कीं सुरूप दिसतो हें पाहणार नाहीं. येथें 'आवड' इचीच मोठी मातब्बरी आहे, व आवड तरी प्रत्येक ठिकाणीं भिन्न भिन्न आहे; तेव्हां एकाचें दुसऱ्याला आवडेलच असें म्हणणें संयुक्तिक नाहीं. परंतु आमच्या कवितेवरील अलंकारांची स्थिति हुबेहुब आर्यस्त्रीच्या अलंकारांप्रमाणें झाली आहे. जे अलंकार मूळ शोभा यावी म्हणून आले, त्यांचीच इतकी मगरमिठी बसली कीं तेंच आमचें सर्वस्व झालें. अशा बद्धस्थितींत आवडीची पायमल्ली व्हावी यांत नवल नाहीं. या ऐच्छिक गोष्टी आवश्यक झाल्यामुळें त्या कित्येकांना आवडेनाशा म्हणून जाचक होऊं लागल्या, तर त्यांत कांहीं नवल नाहीं. जो यमकालंकार एकेकाळीं केवळ ऐच्छिक होता तोच आतां आवश्यक होऊन बसला आहे. इतका कीं त्याच्यामुळें कवितेची किंमत चढत आहे, व त्यावांचून ती उतरत आहे.

आतां हें निर्यमकाचें आवाहन कोणा आधुनिकाचे—कीं ज्याला यमकें जुळवितां येत नाहींत अशाचे—हातून झालें असावें असा कोणाचा समज असल्यास तो चुकीचा आहे. हें आवाहन आधुनिकाचे हातून न होतां खुद्द प्राचीन व यमकप्रिय पंतांचे हातून प्रथमतः झालें आहे. यमकालंकाराचेंच जीवन बनणाऱ्या कवितेंत एके ठिकाणींच कां होईना पण आपल्या कवितेला निरलंकृत बावरूं द्यावी हें एक मोठें आश्चर्य होय. त्यानंतर निर्यमक कवितेची हाव फारशी कोणी धरली नाहीं. गेल्या १५।२० वर्षांत ही निर्यमकता केशवसुताचे कवितेंत पुन्हां दिसूं लागली. व सांप्रत कांहीं धृष्ट (?) कवी तर तिचा उपयोग बऱ्याच प्रमाणावर करूं लागले आहेत. सयमक कवितेंती-

ल लांबलचक यमकांनीं ज्यांचे कान भरून गेले आहेत त्यांना निर्यमक कविता रुचत नाहीं, एवढेंच नव्हे तर ते ही कविताच नव्हे असें प्रतिपादन करण्यास कमी करीत नाहींत. अशा लोकांचें समाधान कशानेंही होणार नाहीं. त्यांना ती 'नागडी' केल्याप्रमाणेंच भासणार. परंतु यमकासंबंधीं बराच खल करून शेवटीं 'अर्धं त्यजति पंडितः' याप्रमाणें थोडें तरी यमक असणें मराठी कवितेस जरूर आहे, असें म्हणणाऱ्या पंडितांचा अभिप्राय मात्र विचारार्ह आहे. "सयमक कवितेंत समवर्णांचा पुन्हां पुन्हां उच्चार होत असल्यामुळें त्यांत एकतानता उत्पन्न होते. व गाण्यास सुरेलपणा व स्निग्धता येते, नव्या नव्या कल्पना सुचतात, व वाचकप्रवाशी यमकाच्या धर्मशाळेंत मधून मधून विराम पावतो!" हे सयमक कवितेचे फायदे इतर ठिकाणीं कबूल केले तरी महाकाव्यांत यमकाची आकांक्षा बाळगून पुरःसर विचारांचा गतिनिरोध करून घ्यावा, ही कृति खात्रीनें फायद्याची नाहीं. वीणाकाव्यें हीं स्फुट व ललितस्वरूपी गानकाव्यें असल्यामुळें त्यांस सुरेलपणादि गुणांची आवश्यकता आहे. त्यामुळें त्यांत गतिनिरोधाची तितकी भीति नाहीं. परंतु उद्गारकाव्य "अंतःकरणाच्या खळाळीसरसें बाहेर पडणारें" असल्यामुळें त्यास वरील गुणांची आवश्यकता नाहीं. महाकाव्यांत विचाराचा ओघ एकसारखा पुढें पुढें वाहवा लागत असल्यामुळें त्यांत समवर्णांच्या आकांक्षेनें उत्पन्न होणारा गतिनिरोध खपत नाहीं. लांबचा प्रवास करणाऱ्यानें पदोपदीं विश्राम घेणें जसें खेदहारक नाहीं, तसेंच पदोपदीं यमकाचे पायीं गतिनिरोध करून घ्यावा हेंही उल्हासजनक नाहीं; ज्या अलंकारावांचून संस्कृत भाषेचें अडत नाहीं; इंग्रेजी, बंगाली, गुजराथी वगैरे काव्यांनाही ज्यावांचून शोभा येऊं शकते; तो यमकांचा अलंकार एकट्या मराठीलाच दूर न करतां यावा हें तिच्या फाजील हौसेचें किंवा पूर्वपरंपरेच्या दुरभिमानाचें लक्षण होय. इंग्रेजी कवितेंत उच्चारावर आघात पडतात, संस्कृत शब्द स्वरान्त असल्यामुळें त्यांत एक प्रकारचा समध्वनि असतो, म्हणून त्यांतील काव्यांना यमकाची आवश्यकता नाहीं, अशीं क्षुल्लक कारणें देऊन यमकाची थोरवी गाणें निरर्थक होय. वीणाकाव्यांत यमकें योजावीत; यांत मतभेद नाहीं. महाकाव्यासंबंधानें मात्र बंगालींतील निर्यमकतेचा नियम पाळण्यास हरकत नाहीं. इंग्रेजींत मिल्टनच्या पूर्वी व बंगालींत मधुसूदन दत्ताचे पूर्वीं कवितेची यमकासंबंधानें जी स्थिति होती तीच सांप्रत मराठी कवितेची आहे. त्या दोघां कविश्रेष्ठांनीं ज्या अर्थानें आपल्या भाषेतील कविता स्वतंत्र केली, त्याच अर्थानें निर्यमक मराठी कवितेलाही स्वतंत्र किंवा निर्मुक्त म्हणतां येईल. शिवाय समयक व निर्यमक या संबंधींचा वादविवाद करणें व्यर्थ होय. एकादा महाकवि जन्मून त्यानें एकादी विशिष्ट रचना सुरू करण्यांत तो परावलंबी नसतो. तर 'वाचमर्थोनुधावति' या वचनाप्रमाणें लोकांची रुचीच त्यासारखी बनते, व नवीन सुरू केलेली रचना प्रचलित होते. मिल्टननें आपले 'स्वर्गहानि' नामक निर्यमक महाकाव्य लिहिलें, तेव्हां 'त्याला यमकें साधतच नव्हतीं' अशा प्रकारची टीका त्यावर झालीच. पण सांप्रत तेंच काव्य इंग्रेजी वाङ्मयांत शिरोभूत बनलें आहे. मराठींतील एखादें भावि निर्यमक महाकाव्य तें निर्यमक म्हणून नावडतें न होतां शिरोभूत होणार नाहीं असें कोणाच्यानें सांगवेल?

नुसत्या निर्यमकतेचेचसें काय पण उद्यां सध्यां प्रचलित असलेल्या छंदांचें बंधनही प्रतिबंधक भासून एखादा सोपा नवीन छंद सुरू होणार नाहीं हें तरी आज कोणी सांगावें? नुकतीच एका आधुनिक मराठी कवीनें इंग्रेजी धर्तीवर आघातप्रचुर कविता लिहिलेली आमचे पाहण्यांत आली आहे. तीच पद्धत पुढें कधीं काळीं सुरू होणार नाहीं याची आज हमी देतां येणें कठीण आहे. जिवंत समाज व जिवंत भाषा यांचें प्रगति हें जर लक्षण आहे, तर ती होत असतांना जुनी चाल नष्ट होईल अशी त्याबद्दल हाकाटी करण्यांत अर्थ नाहीं.

असो. येथपर्यंत आम्ही कालानुक्रमें मराठी कवितेमध्यें काय काय बदल होत गेले हें सांगून, विसाव्या शतकांत इंग्रेजी सारस्वताच्या संगतीनें तिच्यांत नवीन नवीन ओघ मिळून मूळ प्रवाह कसा पोसला हें सांगितलें आहे. तसेंच प्राचीन व अर्वाचीन काळांत तिच्या अंतरंगांत व बाह्यांगांत काय फरक पडला हेंही सांगितलें आहे. त्यावरून मराठी कवितेचा मध्यंतरींचा दीर्घ आळस जाऊन तिला पुन्हां जागृतावस्था प्राप्त झाली हें दिसून येईल. जागृतावस्थेंतील तिचे नवे नवे विलास आज जरी थोडे दिसले तरी पुढील काळांत ते जास्त दृग्गोचर होत जातील यांत संदेह नाहीं.

वाङ्मयवृद्धीची उपाययोजना.

[लेखक–रा. नारायण हरि आपटे.]

परिषदेनें चर्चेकरितां घेतलेल्या विषयांची जी याद प्रसिद्ध झाली आहे, तीवरून विचार करीतां—इतर भाषांच्या तुलनेनें मराठी वाङ्मय बरेंच मागें आहे, त्याची सर्वांगानें सुधारणा होत नाहीं, आणि जी कांहीं होत आहे तींत बरेच दोष आहेत,—असें अनुमान सहज निघतें. आणि भाषेच्या ग्रंथसंग्रहाकडे नजर फेंकल्यास हें अनुमान भासमय नसून सत्य आहे, असें म्हणणें भाग येतें. इंग्रजीमध्यें कार्टून्स (Cartoons) काढण्याची जी एक पद्धत आहे, त्या पद्धतीनें महाराष्ट्र सरस्वतीच्या दरबाराचें जर एकादें व्यंगचित्र रेखाटलें तर तें बरेंच विषाद वाटण्यासारखें निघेल, असें वाटतें. कादंबऱ्या, नाटकें व काव्यें यांखेरिज मराठींत इतर विषयांवर ग्रंथ नाहींत, अगर नवीन होत नाहींत, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईल काय ? दुरभिमानाची दृष्टि सोडून हिंदुस्थानांतील बंगाली, हिंदी किंवा गुजराथी या भाषांच्या साहित्याकडे पहा आणि नंतर मराठीचा ग्रंथसंग्रह लक्षांत घ्या. आमच्या भाषेंत भावी पिढीला मार्ग दाखविणारीं थोर महात्म्यांचीं चरित्रें नाहींत; गतकालांत किंवा सद्यःकालांत वैभवशिखरावर असणाऱ्या राष्ट्रांचे इतिहास नाहींत; अर्थशास्त्रविषयक, साहित्यशास्त्रविषयक, भाषाशास्त्रविषयक वगैरे अत्यंत आवश्यक विषयांवर ग्रंथ नाहींत; समाजांत खळबळ उडवून देऊन समाजाला आपलें खरेंखुरें ध्येय दाखविणारे व उन्नतीच्या मार्गाला नेणारे उत्तमोत्तम नैबंधिक ग्रंथ नाहींत; आपल्या किंवा परक्या भाषेंतील उत्तमोत्तम व श्रेष्ठ अशा ग्रंथांवर तुलनात्मक लेख नाहींत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनोरंजक वाङ्मयाखेरीज आमच्या महाराष्ट्रसाहित्याचें उपवन इतर बाजूंनीं ओसाड आहे. बरें, मनोरंजक वाङ्मय तरी समाजाला तुष्टिपुष्टिकर आहे काय ? कांहीं ग्रंथ व अगदीं थोडे लेखक वगळतां जिकडे तिकडे बाष्कळ प्रेमविषयक कादंबऱ्यांना, नाटकांला किंवा काव्यांना नुसता ऊत आला आहे. एक दोन मासिकांखेरीज कोणत्याही मासिकाचें पृष्ठ उघडा,—कवि आपल्या प्रियेचे पोवाडे गात आहेत, गोष्टींचे लेखक युवयुवतींच्या स्वर्गीय प्रणयाचे घुटके आबालवृद्ध वाचकांना पाजण्याचा उपक्रम करीत आहेत, व कादंबरीकार 'नाजूक शृंगाराचें मनोहर ध्येय' समाजापुढें ठेवीत आहेत ! कोण ही शोचनीय स्थिति !! ही वाङ्मयाची सेवा म्हणावयाची कीं विटंबना म्हणावयाची? आम्हांला तर ही खास विटंबना वाटते.

अलीकडे अलीकडे या मासिकांच्या जन्मपर्वणींत तर जो कांहीं सांवळा गोंधळ आणि एककल्लीपणा आला आहे तो कांहीं अजबच. कोणतेंही लहान मोठें मासिक निघो–त्यांत 'चटकदार कादंबऱ्या, सुरस कविता व मनोरंजक गोष्टी' हीं सदरें असावयाचींच. 'उत्तम उत्तम निबंध येतील' असें अभिवचन दिलेलें असावयाचें, पण तें जन्मांत कधीं पार पडेल तर शपथ. आणि यदाकदाचित् कधीं पार पडलेंच, तर निबंधास घेतलेल्या विषयाची दुर्दशा अधिक कीं भाषेची दुर्दशा अधिक हें त्या 'उत्तम निबंधा' वरून हुडकून काढणेंच वाचकांचें मुख्य कार्य होऊन बसलेलें असायचें. मासिकांची ही वर्णन केलेली स्थिति अतिशयोक्तीची नाहीं, हें कोणीही निष्पक्षपाती मनुष्य कबूल करील. असो.

मागें एकदां "चित्रमयजगत्" मासिकांतील एक लेखक रा. सीताराम केशव दामले यांनीं 'महाराष्ट्रीयांस इशारा' दिला होता. त्याचीच पुनः आठवण देणें भाग आहे. महाराष्ट्र बुद्धिमत्तेच्या बाबतींत कोणत्याही दुसऱ्या देशाला हार जाणार नाहीं हें जरी खरें असलें, व कर्तबगारीबद्दलही तो जरी एका काळीं सर्वांच्या पुढें होता, तरी आजला तो सर्वच बाबतींत पुष्कळ मागें आहे, असें म्हणणें भाग आहे. कोणतेंही कार्य असो, आमचा मतभेद हटकून आड यावयाचाच. एकोपा ही काय वस्तु आहे हें आम्ही जवळ जवळ विसरलों आहोंत असें म्हटल्यास हरकत नाहीं. सध्यांच्या विषयाला अनुसरून आपण वाङ्मयाचीच गोष्ट घेऊं : जुन्या लोकांना इतिहास, चरित्रें वगैरे विषयांवर ग्रंथ लिहून ठेवण्याची अक्कल नसल्यामुळें मागील मराठी वाङ्मयाचें किंवा संस्कृत वाङ्मयाचें

नीट तारतम्यज्ञान होत नाहीं, असा कित्येकांचा जुन्या लोकांवर आक्षेप आहे; व तो खराही आहे. तरी आज आह्मीही तीच घोडचूक करीत आहोंत इकडे कोणाचें तरी लक्ष आहे का? जुन्या लोकांच्या ज्या चुका झाल्या, त्याबद्दल आतां वाद करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. राजवाडयांसारखे इतिहाससंशोधक आजवर घडून आलेल्या चुकांचें थोडें बहुत परिमार्जन करीत आहेत; परंतु आम्हीही कित्येक बाबतींत आपल्या पूर्वजांच्या पावलावर पाय देऊन चालत आहोंत, याची वाट काय ? इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यामुळें तरी आम्हांस या सर्व गोष्टी कळूं लागल्या, असें असूनही आह्मी नवज्ञानसंपन्न लोकही वाङ्मयाकडे फार थोडें लक्ष देत आहोंत. उदाहरणार्थ, आपण इंग्रजी विद्येमुळें मराठी वाङ्मयास निराळें वळण मिळाल्यापासूनचा काळ घेऊं. कमींत कमी हा काळ पन्नास वर्षांचा जरी धरिला, तरी एवढ्या अवधींत आमच्यामध्यें कर्तबगारीचीं किती तरी मनुष्यें निर्माण झालीं व त्यांनीं आपल्या सामर्थ्याप्रमाणें देशकार्य केलें. असें असून आज त्यांचा किंवा त्यांच्या कार्याचा संगतवार इतिहास जर आमच्या आजच्या तरुण पिढीनें विचारिला तर त्यांस आपण काय उत्तर देणार बरें ? कै. रानडयांसारख्या महात्म्याचें सविस्तर चरित्र अझून गर्भावस्थेंत आहे. कै. आगरकरांसारख्या बाणेदार समाजसुधारकाच्या चरित्राचा तर पत्ताच नाहीं, आणि तें कोणी लिहिणार असल्याचेंही प्रसिद्ध झाल्याचें दिसत नाहीं. त्याचप्रमाणें सरदार गोपाळराव देशमुख, कोशकार रा. आपटे, नाटककार गोडबोले, इत्यादि वाङ्मयसेवकांचीं व समाजधुरीणांचीं चरित्रें नाहींत, त्यांच्या कार्याचा संगतवार इतिहास नाहीं, कीं त्यांच्या कार्यानें देशाला व वाङ्मयाला कसकसें वळण मिळत गेलें याची हकीगत नाहीं. कै. विनायक कोंडदेव ओकांचें 'बालबोध' जर नसतें, तर मला असें निक्षून सांगतां येईल कीं 'बालबोधां'त प्रसिद्ध झालेलीं अल्पस्वल्प चरित्रेंही लोकांपुढें आलीं नसतीं; आणि इंग्रजी अमदानींत ज्या दोन कर्तबगारीच्या पिढ्या निर्माण झाल्या त्यांची ओळखही आम्ही विसरलों असतों. इंग्रजी वाङ्मयाचा कित्ता आमच्या डोळ्यांपुढें असून व त्या सर्वांगसुंदर भाषेचें शिक्षण आम्हांस सारखें मिळत असून आमची ही दशा, मग जुन्या लोकांना नांवें ठेवण्यांत तरी काय अर्थ ? तेव्हां सांगावयाचें तात्पर्य काय कीं आमच्यापुढें कित्ता चांगला असूनही आमच्या वाङ्मयाची दैनाच आहे. तिकडे आम्ही यापूर्वीच लक्ष द्यावयास पाहिजे होतें; अद्यापिही वेळ आहे. असो.

आतां वर सांगितलेली शोचनीय स्थिति प्राप्त होण्यास दुसरींही कांहीं कारणें आहेत, त्यांचाही येथें विचार केला पाहिजे.

वाङ्मयाच्या बाबतींतच नव्हे तर इतर कोणत्याही बाबतींत महाराष्ट्र जो जागचे जागीं कुचंबत आहे, याचें मुख्य कारण म्हणजे महाराष्ट्राचें दारिद्र्य होय. या दारिद्र्यामुळें महाराष्ट्र खरोखरीच अगदीं हातटेकीला आला आहे. दारिद्र्यामुळें व्यक्तिशः जे अनुभव येत असतात तेच मोठ्या प्रमाणांत देशाला किंवा समाजाला येत असतात. तेव्हां इतर वाङ्मयाची प्रगति पाहून आमच्यापैकीं पुष्कळांना रात्रंदिवस तळमळ लागली असेल यांत शंका नाहीं. पण करतात काय बिचारे ? 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः' या म्हणीप्रमाणें उदरनिर्वाहाची तडजोड करतां करतांच आमची सर्व हिंमत खर्च होते. नाहीं तर रा. राजवाडे, कै. त्र्यंबक गुरुनाथ काळे, भारतइतिहाससंशोधक मंडळ, चिपळुणकर आणि मंडळी, सत्कार्योत्तेजक सभा, वगैरे विद्वानांचे अथवा प्रकाशकांचे प्रयत्न असे कुचंबत कां पडते ? तेव्हां दारिद्र्यामुळें आज आमच्या वाङ्मयाचें कार्य पुष्कळच अडतें आहे. लोकांमध्यें स्वास्थ्य नसल्यामुळें त्यांना वाचनाची गोडी नाहीं, ज्यांना आहे त्यांना द्रव्यबल नाहीं, व ज्यांना द्रव्यबल आहे त्यांना कर्तव्याची ओळख नाहीं. या शोचनीय स्थितीला खात्रीचा उपाय काय सांगावा ? ईश्वरी इच्छेनेंच हें दारिद्र्य प्राप्त झालें आहे, तें त्याच्याच इच्छेनें जेव्हां दूर होईल तेव्हां खरें; तोंपर्यंत आहे त्या स्थितींतच विद्वानांनीं व भाषेच्या हितचिंतकांनीं शक्य तें कार्य केलें पाहिजे. श्रीमंत **गायकवाड सरकार** ज्याप्रमाणें ग्रंथप्रकाशनाला उत्तेजन देत आहेत, त्याचप्रमाणें इतर संस्थानिकांनीं मदत केल्यासही वाङ्मयप्रगतीचें कार्य बरेंच सुकर होईल. असो.

दुसरें कारण-'प्रेस ॲक्ट' होय. एका काळीं राजकीय परिस्थितिकरितां व लोकस्वास्थ्याकरितां हा कायदा करणें सरकारास योग्य वाटलें असेल; पण आतां त्याची तेवढी गरज नाहीं, असें वाटतें. तेव्हां आपण सर्वांनीं एक दिलानें आपल्या शिक्षण-प्रिय सरकारास या कायद्यांत शक्य तितकी दुरुस्ती करण्याविषयीं विनंती केली पाहिजे. आमचें राजकीय ज्ञान वाढण्याकरितां आम्हांला स्वतंत्र व निर्भीड इतिहासग्रंथ, अर्थशास्त्रविषयक ग्रंथ पाहिजे आहेत. तसे ग्रंथ निर्माण होण्यास आम्हांस सरकाराचीच मदत पाहिजे. सरकारानें तशी मदत केल्यास त्या मदतीचा दुरुपयोग न होतां, आह्मी सरकाराचे विशेष कृतज्ञ होऊं, असें आम्ही सरकारास अत्यंत राजनिष्ठापूर्वक कळवितों. परिषदेनें याबद्दल शक्य ती व योग्य तितकी खटपट करावी, अशी माझी विनंती आहे.

तिसरें कारण—विद्वान् व अधिकारी लेखकांनीं गौण विषयाकडे लक्ष देणें, हें होय. याबद्दल मला व्यक्तिशः बोलावयाचें नाहीं. परंतु मला वाटतें तें मी आपल्यास सादर करीत आहें. योग्य वाटल्यास स्वीकार करा, नाहीं तर सोडून द्या. परंतु मराठी वाङ्मयांत मनोरंजक ग्रंथांखेरीज इतर विषयांवर ग्रंथ होत नाहींत याचें कारण विद्वान् लेखकांची त्या बाबतीतील अनास्था हेंच होय. प्रेस ॲक्ट झाल्यामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा, दुय्यम प्रतीच्या लेखकांप्रमाणें उच्च दर्जाचे लेखकही कादंबऱ्या किंवा नाटकें, नाहीं तर काव्यें लिहूं लागले आहेत. यावरून कादंबऱ्या, नाटकें किंवा कविता यांना मी कमी दर्जाच्या समजतों, अथवा विद्वान् लेखकांनीं कादंबऱ्या नाटकें किंवा काव्यें, लिहूं नयेत, असा कोणीही आपला गैरसमज करून घेऊं नये. माझ्या सांगण्याचा मथितार्थ एवढाच कीं, विद्वान् लेखकांनीं आपली बुद्धिमत्ता उच्च दर्जाचे ग्रंथ निर्माण करण्याकडे विशेष लावावी. दुसरी गोष्ट ही कीं, विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिणारा लेखक कादंबऱ्या किंवा नाटकें उत्तम लिहूं शकेलच, असें कांहीं नाहीं. उलट पुष्कळ वेळां ही विद्वत्कृति 'अव्यापारेषु व्यापार' होण्याचाही संभव आहे. उदाहरणार्थ, आजकाल प्रसिद्ध झालेल्या नाटकांपैकीं कांहीं नाटकें किंवा कादंबऱ्या पहा. त्या पाहून त्यांच्या लेखकांनीं हा 'अव्यापारेषु व्यापार' केला नसता तरी पुरवतें, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. अशी स्थिति असूनही त्या लेखकांना मात्र त्या ग्रंथांच्या हीनत्वाची मुळींच खंत वाटत नाहीं. उलट वर्षांकांठीं तसे दहा पांच तरी ग्रंथ निर्माण करण्याचें उदक त्यांनीं सोडलें आहे! ही कृति कितपत श्लाघ्य आहे, याचा ज्याचा त्यानें विचार करावा. केवळ मानाकरितां, भिडेकरितां किंवा द्रव्यप्राप्तीकरितां वर्षांकांठीं भाराभर ग्रंथ लिहून काढण्यांत स्वतः पुरता फायदा असला तरी वाङ्मयाला त्यापासून कांहींही लाभ नाहीं, हें त्यांनीं लक्षांत बाळगावें. विद्वानांच्या असल्या कृतीमुळें वाङ्मयाचें हित होण्याऐवजीं अहित होतें व मागून येणाऱ्या लेखकांना चुकीचा मार्ग दाखविला जातो, यांत मुळींच शंका नाहीं. ज्ञान शिकविण्याचा मला मुळींच अधिकार नाहीं हें मी पुन्हां एकवार कबूल करितों; परंतु त्याबरोबरच पुन्हां ही विनंती करितों कीं विद्वानांनीं इकडे लक्ष द्यावें.

भाषेची सेवा करितांना त्यापासून द्रव्यप्राप्तीची इच्छा करूं नये असें माझें मत नाहीं. उलट सेवा म्हटली कीं त्यास वेतन पाहिजे, असेंच माझें मत आहे. मनोरंजक ग्रंथ लिहिणें सोपें असून त्यामुळें कीर्ति व द्रव्य ताबडतोब मिळण्याचा संभव आहे हें खरें. पण उच्च विषयांवर सुंदर ग्रंथ लिहून आपल्या भाषेचें वाङ्मय सुशोभित करणें हें विद्वानांस विशेष कीर्तिदायक आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं निबंधमाला लिहून मातृभाषेची जी बहुमोल सेवा केली आहे, ती लोकांचे स्मरणांतून केव्हांही जाणार नाहीं व मराठी भाषेचें अस्तित्व असेपर्यंत त्यांचें नांव व कीर्ति अशीच कायम राहणार. हेंच त्यांनीं नाटकें किंवा कादंबऱ्या लिहिल्या असत्या तर आजच्या मनोरंजक वाङ्मयाच्या भडक प्रकाशांत त्यांचें नांव व कीर्ति दोन्हीही लुप्तप्राय होऊन गेलीं असतीं. तेव्हां हें लक्षांत घेऊन अधिकारी लेखकांनीं अशी कांहीं भरीव भाषासेवा करावी. द्रव्यप्राप्तीकरितां त्यांनीं नाटकें लिहावीं पाहिजे तर, आमची ना नाहीं; परंतु वर्षा दोन वर्षां कांठीं एखादें महत्त्वाचें पुस्तकही त्यांचे हातून बाहेर पडावें. 'संस्कृत भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास,' 'युरोपिअन संस्कृतीचा इतिहास,' 'जगांतील धार्मिक उत्क्रांत्या,' 'भौतिक शास्त्राचा उगम, वाढ, व विकास व त्याचे भावी परिणाम,' 'शास्त्रीय प्रगति व वेदान्त यांचे परस्परांवर होणारे परिणाम,' 'पाश्चिमात्य संस्कृति व हिंदु संस्कृति यांच्या सम्मेलनाचे परिणाम' इत्यादि इत्यादि किती तरी असे विषय आहेत कीं, ज्यांच्यावर ग्रंथ होणें फार आवश्यक आहे. 'ग्रंथमाले'नें असा कांहीं प्रयत्न केला होता; परंतु आज तो लुप्त झाला आहे. त्यास नवीन वळण देऊन पुनः त्याचा जीर्णोद्धार केल्यास फार उपकार होणार आहेत. आणि हें काम विद्वानांचेंच आहे. असो.

चवथें कारण—चांगले ग्रंथ निर्माण होतांना विद्वान् लेखकवर्गांत एकोपा नसणें हें होय. कित्येकांना प्रथमदर्शनीं हें कारण काल्पनिक वाटेल, किंवा कित्येकांना माझ्या म्हणण्याचा प्रथमदर्शनीं उलगडाही होणार नाहीं. तरी वाङ्मयाच्या प्रगतीस जे मला अडथळे वाटतात, ते थोडक्यांत स्पष्टपणें सांगणें भाग आहे.

आपल्याला माहीत आहेच कीं, दारिद्र्यामुळें लोकांत ग्रंथांचा जसा खप व्हावा तसा होत नाहीं व त्यामुळें नवे नवे ग्रंथ निघण्यास अडचण पडते. ही अडचण दूर करण्याचे जे अनेक उपाय आहेत त्यांपैकीं, अल्प किंमतींत लोकांच्या हातांत चांगली पुस्तकें पडतील अशी व्यवस्था करणें—हाही एक चांगला उपाय होय. परंतु असें पुष्कळ वेळां होत नाहीं. अलीकडे तर असें झालें आहे कीं, एकच ग्रंथ अनेकांनीं अनेक तऱ्हांनीं छापून काढावयाचा. याचा परिणाम असा होतो कीं, वाचकांना चांगल्याची निवडणूक करितां न आल्यामुळें त्यांच्या हातांत गचाळ ग्रंथ पडतात व पुस्तकें घेण्याविषयीं त्यांचें मन विटतें. या बाबतींत इंग्लंडचा कित्ता आम्हांस पुढें ठेवितां येणार नाहीं. इंग्लंडांत एकाच

पुस्तकाच्या निरनिराळ्या तऱ्हेच्या निरनिराळ्याआवृत्त्या निघतात. व त्यांच्या किंमतीही लहान मोठ्या प्रमाणांत असतात. असें असूनही तितक्या सर्व प्रतींचे ग्रंथ तिकडे खपतात, याचें कारण असें आहे कीं, जगावर इंग्रजी भाषेचें क्षेत्र फार विस्तृत असून तिकडे धनही विपुल आहे. परंतु या दोन्ही बाबतींत आमची स्थिति वाईट आहे. तेव्हां आम्हांला आपल्या स्थितीचा विचार करूनच हातपाय पसरले पाहिजेत. नाहींतर एकानें इंग्रजी लहान संस्कृत कोश काढला, कीं दुसऱ्यानें तेंच काम करण्यास कंबर बांधलीच. एकानें जेन आस्टिनचें ‘ प्राइड अँड प्रेज्युडीस ’ हातीं घेतलें,कीं दुसऱ्या एकादोघांनीं त्याच्या भाषांतराला हात घातलाच. एकानें एखाद्या कथाभागावर नाटक लिहिलें, कीं दुसऱ्यानें रात्रींचा दिवस करून तें रंगभूमीवर आणून, पुस्तक छापून पार! अशा प्रकारें केवळ ईर्षेनें किंवा अनुकरणप्रियतेनें होणारें वाङ्मयकार्य कितपत चांगलें निपजत असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. याचेंच जास्त स्पष्टीकरण पाहिजे असल्यास धार्मिक ग्रंथ छापण्याची जी लाट महाराष्ट्रांत उसळली आहे, तिकडे लक्ष द्यावें. धार्मिक ग्रंथलेखकांची अथवा प्रकाशकांची धर्मबुद्धि कितपत प्रज्वलित झाली असेल याचा जरी विचार बाजूला ठेविला व वाचकवर्गांतही धार्मिक प्रेम कितपत उचंबळलें आहे याचा जरी विचार केला नाहीं, तरी धार्मिक ग्रंथप्रकाशनाची जी खळबळ उडाली आहे ती मात्र मौजेची आहे. अॅनी बिझांट बाईंचा हात जर भगवद्गीतेवर न पडता तर आणखी कित्येक वर्षे तरी त्या पुस्तकाकडे आम्ही कदाचित् ढुंकूनही पाहिलें नसतें. त्याचप्रमाणें स्वामी रामतीर्थ व स्वामी विवेकानंद यांची गोष्ट. हे महात्मे अमेरिकेला जाऊन न येते तर त्यांचें नांव कोठेंही ऐकूं येतें ना. परंतु आज त्यांच्या ग्रंथांचीं आपल्या भाषेंत भाषांतरें करण्याकरितां आमची कोण अहमहमिका सुरू आहे? असें कां असावें बरें? या योगानें एकाच कामाकरितां अनेकांचे श्रम व द्रव्य निष्कारण खर्च होत नाहीं काय? असे ग्रंथ निर्माण करणारांची हीच इच्छा आहेना, कीं ‘ आपल्या भाषेंत चांगले ग्रंथ निर्माण व्हावे? ’ मग त्याकरितां इतकी त्वरा, इतकी ईर्षा असण्याचें काय कारण? या निरनिराळ्या प्रयत्नकारांनीं एकजुटीनें काम करून आपला वेळ, पैसा व श्रम कां वाचवूं नयेत? एकोप्यानें तें काम विशेष सुंदर व व्यवस्थेशीर होणार नाहीं काय? कोणाचे विचार चांगले असतील, कोणाला ते सुव्यवस्थित मांडतां येत असतील व कोणाला ते उत्तम भाषेंत लिहितां येत असतील. तेव्हां अशा तिघांना तीन निरनिराळे मार्ग शोधण्यापेक्षां सर्वांनीं एकदिलानें काम करून कार्यफल विशेष उत्तम तऱ्हेनें कां पदरांत पाडून घेऊं नये? तेव्हां याचाही आमच्या विद्वानांनीं विचार करावा.

पांचवें कारण—स्वतंत्र ग्रंथ निर्माण करण्याची आवड नसणें, व परक्या भाषेंतील ग्रंथ निवडतांना त्यांची निवड चांगली न करणें, हें होय.

या दोन्ही कारणांबद्दल लेखकांनीं तर सांभाळलें पाहिजेच,पण प्रकाशकांनींही या बाबतींत जपलें पाहिजे.परंतु तसें होत नाहीं. आमचेकडील कांहीं प्रकाशक चांगल्या सुस्थितींत आहेत, परंतु प्रत्येकाचें धोरण एकः कादंबऱ्या प्रसिद्ध करावयाच्या. त्यांत रेनॉल्डवर प्रत्येकाचा भर फार. वास्तविक इंग्रजी भाषेंत रेनॉल्डपेक्षांही उत्तमोत्तम कादंबरीकार आहेत. परंतु आमच्या प्रकाशकांना वाचकवर्गास शृंगार रस अर्पण करावयाचा असतो,आणि तो रेनॉल्ड खेरीज कोठें सांपडणार? मी स्वतः रेनॉल्डला कमी प्रतीचा समजतों असें कोणींही समजूं नये; परंतु हा ग्रंथकार कित्ता घेण्याच्या योग्यतेचा नाहीं, एवढेंच माझें मत आहे. म्हणून निदान कादंबऱ्यांच्या बाबतींत तरी आम्ही स्वतःच्या पायावर उभें राहण्यास शिकावें हें बरें.

वर सांगितलेलीं व आणखीही किरकोळ कारणें आमच्या वाङ्मयाच्या वाढीआड येत आहेत. त्यांचा विचार करून जर आपण प्रयत्न केला तर आहे त्या स्थितींतही आम्ही उत्तम प्रकारचें वाङ्मयकार्य करूं. इतकें सांगून व माझ्या सांगण्याचा कोणींही विपर्यास न करितां त्याचा शांतपणें विचार करावा अशी विनंती करून आटोपतें घेतों.

युनिव्हर्सिटीच्या विद्याक्रमांत देशी भाषांचा समावेश.

(रा. रामचंद्र भिकाजी जोशी.)

आमच्या देशांतील निरनिराळ्या युनिव्हर्सिट्या आणि त्यांना जुळून असणारा विद्याक्रम प्रथमतः सन १८५४ सालीं सुरू झाला.त्यावेळीं विलायत सरकारानें जो ठराव प्रसिद्ध केला होता त्यामध्यें विद्याक्रमाचा मूळ उद्देश असा प्रदर्शित केला होता कीं इंग्रजी भाषा आणि देशी भाषा यांच्या द्वारें लोकांमध्यें पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार करावा. अर्थात् पाश्चात्य विद्या इंग्रजी भाषेच्या द्वारें शिकावयाच्या,आणि त्यांचें ज्ञान सुशिक्षितांनीं स्वभाषेच्या द्वारें सर्व लोकसमाजास द्यावयाचें. यासाठीं युनिव्हर्सिटींतून तयार होणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्वभाषेचा अभ्यासही इंग्रजी भाषेच्या अभ्यासाबरोबर झाला पाहिजे. एरव्हीं इंग्रजी भाषेच्या द्वारें शिक-

लेल्या पाश्चात्य विद्यांचा व्यवहार करण्यास देशी भाषा पात्र होणार नाहींत. परंतु दुःखाची गोष्ट अशी आहे कीं, हिंदुस्थानांतील विद्याक्रमाच्या 'स्थापनेची जी ही मूळची सनद, तिच्या उद्देशाप्रमाणें व्यवस्था झाली नाहीं. यामुळें देशांतील विद्याप्रसाराचें काम अर्धवट पडलें आहे. सुशिक्षितांचें विद्यार्जन इंग्रजींत होतें. त्यांना देशी भाषांचा अभ्यास नसतो. यामुळें पाश्चात्य विद्यांचा व्यवहार देशीभाषांच्या द्वारें चालेल अशा रीतीची त्यांची सुधारणा होत नाहीं; आणि ह्मणून त्यांच्या द्वारें लोकसमाजांत विद्याप्रसार करण्याचें जें युनिव्हर्सिट्या आणि विद्याखातें स्थापन करण्याचें उद्दिष्ट कार्य, तें तडीस गेलें नाहीं.

प्रथमारंभीं आमच्या युनिव्हर्सिटीच्या विद्याक्रमांत देशी भाषा होत्या. रानडे, मोडक, कुंटे, पाठक, वागळे वगैरे मंडळी मराठी भाषा घेऊनच पदवीधर झालेली आहे. डाक्टर सर रामकृष्णपंत भांडारकर यांनीं कॉलेजांत मराठी वाङ्मय शिकविलेलें आहे. पुढें देशी भाषांचें उच्च विद्याक्रमांतून उच्चाटन झालें. त्यांचा प्रवेश विद्याक्रमांत पुन्हा व्हावा म्हणून मोडक, रानडे यांनीं फार प्रयत्न केले. तेव्हां सन १८९८ सालीं त्यांना एम्. ए. च्या भाषाविषयांत स्थान मिळालें. यावेळीं एम्. ए. प्रमाणेंच बी. ए. च्या भाषाविषयांत देशी भाषांचा समावेश करून घ्यावा असा उद्देश होता. परंतु ती गोष्ट कांहीं दिवसांच्या अनुभवानंतर विचारांत घ्यावी असें ठरलें. या गोष्टीला आज १७।१८ वर्षे झालीं. त्या वेळीं युनिव्हर्सिटीस पाठविलेल्या पत्रावर रानडे यांच्या सहीखालीं सह्या करणारी प्रमुख मंडळी या संबंधाचा विचार सर्व विसरून गेली, आणि गेल्या पांच सात वर्षांत युनिव्हर्सिटीच्या विद्याक्रमांत इतके तऱ्हेतऱ्हेचे फेरबलल झाले असून त्यावेळीं या गोष्टीच्या संबंधानें कोणी चकार शब्दही काढला नाहीं ! नाहीं म्हणायला सन १९०७ सालापासून प्रवेशपरीक्षेमध्यें देशी भाषांस स्थान मिळालें होतें. परंतु गेल्या सालापासून तीही स्थिति युनिव्हर्सिटीनें पालटून टाकिली आहे !

यावरून दिसून येईल कीं देशांत देशी भाषांच्या द्वारें शिक्षणप्रसार करण्याचा मूळ उद्देश असून त्या देशी भाषांना उच्च विद्यापीठांच्या द्वारांत व द्वाराबाहेरही मज्जाव आहे. देशी भाषांच्या वाङ्मयाचें शिक्षण नाहींच, पण निरनिराळ्या विषयांचें शिक्षणही विद्यार्थ्यांना स्वभाषेंत मिळत नाहीं. त्यासाठीं प्रथमतः कठीण अशी परकी भाषा शिकावयाची, आणि ती धडपणें कळावयास लागल्ये न लागल्ये, तोंच तीमधून सर्व विषय शिकावयाचे ! इतकेंच नव्हे, तर आमचीच संस्कृत भाषा आणि देशी भाषा यांचें शिक्षण इंग्रजीमधूनच व्हावयाचें ! अशा प्रकारचा शिक्षणसंबंधीं द्राविडी प्राणायाम पृथ्वीच्या पाठीवरच्या दुसऱ्या कोणत्याही देशांतील विद्यार्थ्यांना करावा लागत असेल असें वाटत नाहीं. परंतु असा शिक्षणक्रम आज साठ वर्षे इकडे बिनतक्रार चालू आहे.

थोड्या दिवसांपूर्वी हिंदुस्थान सरकारच्या कौन्सिलांत मद्रास येथील एका सभासदानें अशी सूचना आणिली होती कीं मध्यम प्रतीचें म्हणजे हायस्कुलांतील शिक्षण देशी भाषांतून द्यावें. ती सूचना मान्य झाली नाहीं. परंतु त्यावेळीं हिंदुस्थानचे विद्याखात्याचे प्रधान नामदार बटलर यांनीं परकी भाषेंत सर्व शिक्षण देण्यापासून होणारी अडचण मान्य करून, याचा विचार योग्य वेळीं होईल असें आश्वासन दिलें. हें ठीक झालें. परंतु त्यावेळीं निरनिराळ्या प्रांतांतील आमच्याच पुढाऱ्यांचीं जीं विरुद्ध भाषणें झालीं, तीं मात्र अत्यंत आश्चर्य वाटण्यासारखीं आहेत. या संबंधानें आमच्या प्रांतांत नीट व्यवस्था झाली आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. आमच्या विद्याखात्यानें हायस्कुलांतून इंग्रजीशिवाय बाकीचे विषय स्वभाषेमधून शिकविण्याची पद्धत सुरू केली आहे. इतकेंच नाहीं, परंतु स्कूलफायनल ह्मणून मॅट्रिक्युलेशनच्या बरोबरीची जी नोकरीला लायक ठरविण्याची परीक्षा शाळाखात्यांत होत असते, तीमध्यें विद्यार्थ्यांनीं प्रश्नांचीं उत्तरें स्वभाषेंत लिहिलीं तरी चालेल असें ठरविण्यांत आलें आहे. तेव्हां या प्रश्नाची चर्चा आपणास करावयास नको. उलट अशी व्यवस्था केल्याबद्दल आपल्या शाळाखात्याचें आपण अभिनंदन केलें पाहिजे. या संबंधानें आमच्या युनिव्हर्सिटीनें कित्ता घ्यावयास पाहिजे. परंतु देशी भाषा केवळ **भाषा** ह्मणून शिकविण्याचे संबंधानेंही जेथें विटाळ आहे, तेथें अन्य विषय स्वभाषेच्या द्वारें शिकविण्याची पद्धत सुरू होण्याची आशाच नको ! निदान संस्कृत भाषा हा विषय स्वभाषेंत शिकविण्याची व्यवस्था अवश्य व्हावयास हवी आहे. 'संस्कृत इंग्रजींतून कां शिकवावयाचें ?' हा मोठा गूढ प्रश्न आहे. या संबंधानें येथें विशेष चर्चा न करितां एवढेंच सांगणें पुरे होईल कीं, प्रवेशपरीक्षेंत आणि पुढें उच्च परीक्षांत संस्कृताचा अभ्यास विद्यार्थ्यांनीं स्वभाषेच्या द्वारें केला असतां त्या भाषेचें वाचन हल्लीं होतें त्यापेक्षां निदान दुप्पट तरी खास होईल. शिवाय संस्कृत काव्यें, नाटकें, व अलंकार, व्याकरण, वेदान्त, न्याय, यांवरील ग्रंथ मराठी आणि गुजराथी या भाषांच्या साह्यानें शिकविले जाऊन त्यांची चर्चाही स्वभाषेंत झाली असतां त्या दोन्ही भाषांस फारच उपयोग होईल, हें कोणालाही सांगावयास नको. संस्कृतांतील जुन्या विद्या आमच्या उच्च विद्याक्रमांत आल्यापासून वास्तविक पाहिलें तर त्यांच्या सुव्यवस्थित अभ्यासाची पूर्वीपेक्षांही जास्त चांगली सोय झाली आहे. परंतु तो अभ्यास परकी

भाषेंत करावयाचा असतो, यामुळें उत्तम बुद्धिवान् विद्यार्थ्यांखेरीज दुसरे कोणी त्या अभ्यासाकडे वळत नाहींत; आणि याच कारणानें आमच्या बहुतेक पदवीधरांचें संस्कृताचें ज्ञान परीक्षा पास करून घेण्यापुरतेंच असतें.

देशीभाषांचा अभ्यास उच्च विद्याक्रमांत घालण्याचा विचार येथें जमलेल्या माझ्या मित्र मंडळींपैकीं कोणास अमान्य असेल असें मला वाटत नाहीं. तेव्हां तत्संबंधानें साधक बाधक विचार आतां नको आहे. हा प्रश्न एवढा महत्त्वाचा आणि अत्यंत जरूरीचा असतां तो मागें पडण्याचें कारण आमचा हलगर्जीपणा याशिवाय दुसरें नाहीं, असें मात्र मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागत आहे. याबद्दल माझी मित्रमंडळी माझ्यावर रागावणार नाहींच. आज फक्त यासंबंधानें युनिव्हर्सिटीस सूचना काय करावयाच्या हें आपणास सांगून, त्या सूचना अमलांत आणण्यास ज्या व्यावहारिक अडचणी म्हणून सांगण्यांत येतात त्यांचा मात्र विचार मला कर्तव्य आहे.

पहिली गोष्ट, युनिव्हर्सिटीनें प्रवेशपरीक्षेमधून देशीभाषेचा कागद काढून टाकिला, हें फार वाईट केलें.हा विषय नवीन घालून फक्त पांच वर्षें झालीं होतीं. या व्यवस्थेपासून पुष्कळ फायदा झाल्यासारखें दिसत होतें.परंतु आणखी अनुभव पाहाण्यास अवकाश होता. विद्यार्थी विद्याक्रमांतले उच्च विषय शिकण्यास योग्य आहे कीं नाहीं, हें पाहाण्यासाठीं प्रवेश परीक्षा घ्यावयाची. तीमध्यें त्याला एक तरी देशी भाषा चांगली येत्ये कीं नाहीं, हें जर युनिव्हर्सिटी पाहात नाहीं, तर सन १८५४ सालची जी विद्याक्रमाच्या स्थापनेची सनद तिला पूर्ण हरताळ लागतो, असें म्हणणें भाग आहे. देशी भाषा हा एक विषय प्रवेशपरीक्षेमध्यें असल्यापासून युनिव्हर्सिटीची यत्किंचित्‌हि अडचण होत नाहीं. या परिषदेंत जमलेल्या माझ्या मित्रमंडळीनें असें ठरवावें कीं प्रवेशपरीक्षेमध्यें देशीभाषा असल्याखेरीज ती परीक्षा अगदीं व्यर्थ आहे; या साठीं तो विषय युनिव्हर्सिटीनें ताबडतोब पुन्हां परीक्षेसाठीं नेमावा. दुसरी गोष्ट—बी. ए. च्या परीक्षेच्या ऐच्छिक भाषाविषयांत विद्यार्थ्यांस देशी भाषा घेतां यावी. यासंबंधानें एम्. ए. च्या परीक्षेंत जशी व्यवस्था आहे, तशीच तूर्त पुरे. कारण, हा अगोदरच नावडता विषय आहे, म्हणून गोष्ट तंट्याला आली असतां कांहींच साध्य होणार नाहीं. वास्तविक पाहिलें तर एवढ्याच व्यवस्थेला कोणालाही विरुद्ध जाण्याचें कारण नाहीं. परंतु आपल्या देशी भाषा आरंभापासूनच दुर्दैवाच्या फेऱ्यांत आहेत, यामुळें त्यांची सुव्यवस्था लावण्याचे प्रयत्न निष्फळ होतात; आणि रानडे, मोडकांसारख्यांच्या प्रयत्नांनाही मोठ्या मारामारीनें अगदीं थोडकें यश येतें. ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे.सन १८९८सालीं देशी भाषांचा एम्.ए.मध्यें प्रवेश झाला तेव्हांच बी. ए. मध्यें विषय घालण्याची सूचना होती.परंतु बरीच मंडळी विरुद्ध दिसल्यामुळें रानडे यांनीं ‘ तूर्त एवढेंच पुरे, पुढें पाहूं’ म्हणून कार्य साधून घेतलें. त्यावर इतकीं वर्षें गेलीं, पण पुढें कांहींच झालें नाहीं.

यासंबंधानें व्यावहारिक अडचणी म्हणून ज्या पुढें आणण्यांत येतात, त्यांपैकीं मी फक्त एका अडचणीचा येथें निर्देश करतों. तेवढ्यावरून त्यांचें महत्त्व कळून येईल. देशी भाषा हा विषय बी. ए. ला नेमला तर बी. ए. ची परीक्षा जी अगोदर सोपी झाली आहे, ती आणखी सोपी होऊन, मग त्या परीक्षेंत हवा तो पास होईल ! यावर एवढाच प्रश्न विचारावासा वाटतो कीं, परीक्षा **कठीणच** असली पाहिजे, असें कां ? परीक्षा घ्यावयाची ती विद्यार्थ्यांना नापास करून टाकण्याकरितां घ्यावयाची, कीं त्यांचा विद्याभ्यास कसा काय आहे हें पाहाण्यासाठीं घ्यावयाची ? तसेंच आजमित्तीस बी ए. परीक्षा (म्हणजे नुस्ती पास बी. ए.)सोपी झाली म्हणून कित्येकांना वाईट वाटत आहे. त्यांना मी असें विचारतों की, ती परीक्षा तुम्हीं इतकी सोपी केलीत, तेव्हां देशी भाषा आडव्या आल्या होत्या का ? तसें जर नाहीं, तर स्वभाषा शिकण्याचा प्रश्न आला कीं परीक्षा सोपी होईल ही भीति कां ? परीक्षा सोपी होईल, ही भीति देशीभाषांना मज्जाव करण्यापुरतीच पुढें आणावयाची कीं काय ? वास्तविक देशी भाषा हा विषय असला कीं परीक्षा सोपी होऊन जाईल हें म्हणणेंच मुळीं खोटें आहे. परीक्षा कठीण करावयाची असली तर ती परीक्षकाला विषय कोणताही असला तरी करतां येईल.

देशी भाषा विद्याक्रमांत घातल्यामुळें परीक्षा सोपी होईल, याचा अर्थ, देशी भाषा क्षुल्लक आहेत, त्यांत ग्रंथ वगैरे नाहींत, असा होतोसा दिसतो. त्यावर मीं एवढेंच विचारतों कीं, युनिव्हर्सिटीनें दुसऱ्या कित्येक भाषा विद्याक्रमांत घातल्या आहेत. त्यांचें वाङ्मय तर आमच्या मराठी, गुजराथी, या भाषांच्या शंभरांशानेंही नसेल. त्यांचा समावेश करितांना परीक्षा सोपी होईल असें कसें वाटलें नाहीं ? खरी गोष्ट अशी आहे कीं, युनिव्हर्सिटी ही संस्था आणि तिच्या विद्याक्रमाची व्यवस्था परीक्षा सोप्या किंवा कठीण करण्यासाठीं नाहीं; तर विद्यावृद्धीकरितां आहे. आपल्या देशी भाषा चांगल्या सुधारून, त्यांमध्यें आपणास इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, यांसारख्या पाश्चात्य भाषांतल्याप्रमाणें व्यवहार व्हावयास पाहिजे आहे. यासाठीं त्यांचा अभ्यास इंग्लिश वगैरे भाषांच्या अभ्यासाबरोबर

मुद्दाम झाला पाहिजे; आणि इंग्रजीच्या द्वारें जें जें आपण शिकूं, तें आपल्याला स्वभाषेंत आपलेंसें करतां आलें पाहिजे.

बी. ए. च्या भाषाविषयांत इंग्रजी भाषा, आणि तिच्या बरोबर दुसरी एक भाषा असते. ही दुसरी भाषा मराठी, गुजराथी, अशी देशी भाषा असल्यास, तिच्या संबंधाच्या अभ्यासाची व्यवस्था नुस्तें ग्रंथवाचन आणि शब्दार्थ एवढीच असूं नये. इंग्रजी या विषयांत नामांकित ग्रंथकारांचे उत्तम उत्तम ग्रंथ नेमलेले असतात. त्या ग्रंथांतून भाषांतर, रूपांतर, अशा द्वारें नेमलेल्या देशी भाषेंत विद्यार्थ्यांकडून उत्तरें घ्यावीं. तसेंच इंग्रजीमधील वाङ्मयविषयक चर्चा विद्यार्थ्यांनीं स्वभाषेंत करावी. अशा प्रकारें स्वभाषेंत उत्तम ग्रंथरचना करितां येणें ही गोष्ट साध्य होण्यासाठीं स्वभाषेचा अभ्यास आम्हांस पाहिजे आहे. अशा प्रकारचें स्वरूप या विषयास दिलें असतां विषय सोपा होण्याची भीति जी कित्येकांना वाटत आहे, ती जाईल. इतकेंच नव्हे, पण त्या योगानें देशी भाषांचें अत्यंत हित होईल.

युनिव्हर्सिटीला सुचविण्याची तिसरी गोष्ट अशी आहे कीं मॅट्रिक्युलेशनच्या नंतरच्या सर्व परीक्षांच्या विषयक्रमांत मुलींकरितां मराठी आणि गुजराथी या भाषा घालाव्या. आमच्या मुली कॉलेजांमधून शिकतात, त्या केवळ हौसेमुळें, शिकण्याची ऐपत असते आणि शिकण्यास फुरसत असते म्हणून शिकतात. पुरुषांप्रमाणें शिकून पुढें त्यांना नोकरी किंवा धंदे करावयाचे नसतात. कित्येक स्त्रियांना पुढें तसे उद्योग करावयाचे असतील; आणि तशा स्त्रिया समाजास पाहिजेतही. ज्यांना हौस आणि सामर्थ्य असेल, त्या तशा तयार होतील, आणि त्यांना हवे ते विषय घेतां येतील. त्यांच्या मार्गांत कोणी अडथळा आणणार नाहीं. स्त्रियांनीं दुसरी भाषा घेणें ती देशी चालू भाषांपैकींच असावी, असें कांहीं कोणी ठरवूं इच्छित नाहीं. परंतु आज उच्च स्त्रीशिक्षणाचा बराच प्रसार होऊन, प्रवेशपरीक्षांना जाणाऱ्या आणि पुढें कालेजांत शिकणाऱ्या मुलींची संख्या वाढत आहे. त्यांचा शिक्षणमार्ग उगीचच्या उगीच कठीण करून ठेवण्याचें कारण नाहीं. वास्तविक प्रवेशपरीक्षेंतही मुलींना संस्कृत कठीण जातें. पुष्कळ मुली फ्रेंच घेतात. कित्येक तर पाली, हीब्रू सुद्धां घेतात. आपल्या स्वतांच्या भाषा टाकून या घेण्यांत त्यांना पुढें उपयोग काय ? पाली ही संस्कृताच्या खालची आपलीच भाषा आहे. परंतु तिचा पुढें मुलींना उपयोग नाहींच. चांगल्या हुशार मुलीही फ्रेंच घेतात. कुमारी कृष्णाबाई ठाकूर एम्. ए. या दुसरी भाषा फ्रेंच घेऊन शिकल्या. डा० सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांची नात आणि संस्कृत पंडित श्रीधरराव भांडारकर यांची कन्या ही फ्रेंच घेऊन एम्. ए. झाली. असें होणें कांहीं चांगलें नाहीं. प्रवेशपरीक्षेच्या संबंधानें तूर्त तरी कोणी ऐकणार नाहींच, परंतु निदान उच्च परीक्षांमध्यें तरी मुलींना एवढी सवलत युनिव्हर्सिटीनें द्यावी. अशा प्रकारची व्यवस्था कलकत्ता युनिव्हर्सिटीमध्यें फार वर्षांपासून आहे. तीपासून कोणत्याही प्रकारची अडचण आल्याची किंवा नुकसान झाल्याचें ऐकिवांत नाहीं.

या संबंधानेंही अनेक आक्षेप घेण्यांत येतात. मुख्य आक्षेप असा घेण्यांत येतो कीं मुलींना जर पदव्या मिळवावयास पाहिजेत, तर मग त्यांचा मार्ग सोपा करावयास कां पाहिजे ? ‘ घणाचे घाव सोसल्याखेरीज देवपण येत नाहीं ! ’ असल्या आक्षेपांत कितपत जीव आहे, हें सांगावयास नको. मुलींना शिकण्याची हौस वाटत आहे; आईबापांना मुली कॉलेजांमध्येंही पाठवाव्याशा वाटतात; लग्न झाल्यावरही कांहीं सुशिक्षित तरुण पतींला आपली बायको बरीच शिकलेली असावी अशी इच्छा उत्पन्न होत असते; तर त्यांच्या मार्गांत जितक्या कमी अडचणी असतील तितकें चांगलें. आमचे पुरुष ग्रॅजुएटसुद्धां परीक्षेस संस्कृत घेऊन तें पुढें बहुतेक विसरून जातात. स्त्रिया तर केव्हांच विसरून जातील. परंतु ह्याच जर स्वभाषेच्या वाङ्मयाचा उच्च प्रतीचा अभ्यास झालेला असला, तर तो सर्व आयुष्यभर अनेक प्रकारें उपयोगी पडेल. आतां स्त्रियांना जेव्हां शाळांतून शिक्षक वगैरे नेमण्याची वेळ येईल, तेव्हां पाहिजे तर संस्कृत शिकून तयार झालेल्याच स्त्रिया नेमाव्या; त्यांना संस्कृत शिकण्याची कोणी बंदी केलेली नाहींच. तेव्हां ज्यांना शिक्षक व्हावयाचें असेल, किंवा ज्यांना जास्त हौस असेल त्या संस्कृत घेतीलच. परंतु साधारणतः स्त्रियांसाठीं वरीलप्रमाणें सोय असावी.

मीं ज्या सूचना पुढें आणल्या आहेत, त्यासंबंधानें येथें जमलेल्या मित्रमंडळींत मतभेद असण्याचा मुळींच संभव नाहीं.यासाठीं या विषयाची अधिक चर्चा करून वेळ घालविण्याची मला गरज दिसत नाहीं. माझी अखेरची विनंती अशी आहे कीं हा विषय आतां आळसाखालीं किंवा निष्काळजीपणाखालीं पडून ठेवूं नये. याची कांहीं तरी अखेर लागावी. अशा प्रकारचा सक्त प्रयत्न साहित्यपरिषदेकडून व्हावा. स्वभाषेच्या सुव्यवस्थेसाठीं आपल्याच प्रांताच्या आणि मुख्यत्वेंकरून आपल्याच लोकांनीं चालविलेल्या विद्यापीठामध्यें इतके प्रयत्न-आणि ते पुन्हा इतके दिवस करावे लागावे, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. तें दुर्दैव लौकर सरो, अशी माझी परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

विश्वगुणादर्श-परिशिष्ट.

कवि—'महाराष्ट्रिय.'

[संस्कृतांत विश्वगुणादर्श ह्मणून प्रसिद्ध चंपूकाव्य आहे, त्याचा कर्ता वेंकटाध्वरी हा मोठा विद्वान् पण्डित व रासिक होता. तो इ. सन १६५० च्या सुमारास झाला असावा. त्यानें विश्वगुणादर्शचम्पूत अशी कल्पना केली आहे कीं, विश्वावसु व कृशानु ह्या नांवांचे दोघे गंधर्व भुवनांतील पदार्थ पाहण्यासाठीं विमानांत बसून निघाले आहेत व त्यांच्यापैकीं विश्वावसु हा दृष्टिगोचर होणाऱ्या पदार्थांतील गुणांचें ग्रहण करून त्यांचेंच कौतुक करितो व कृशानु हा दोषैकदृष्टि असल्यामुळें त्याच पदार्थांतील दोष दाखवितो. ह्या ग्रंथांत प्रथम सूर्यापासून सुरवात करून शेवटीं दिव्यक्षेत्रांपर्यंत अनेक वस्तूंच्या, देशांच्या व लोकांच्या गुणदोषांचें फार मार्मिक व हृदयंगम विवेचन आहे. त्याच पद्धतीचें कवीनें पुढील काव्यांत अवलंबन करून महाराष्ट्र वाङ्मयाचें समालोचन गीति वृत्तांत केलें आहे.]

गंधर्व कृशानूतें वाटे यावें फिरोनियां धरणी ।
पुनरपि अवलोकावी प्राण्यांची एकदा स्वयें करणी. १
स्वर्गीं परतुनि झाला फिरोनियां आपणा बहुत वेळ ।
न कळे केले असती देवानें तोंवरी किती खेळ. २
ऐसें चित्तीं चिंतुनि विश्वावसुला पुसावया गेला ।
कीं जातां एकाकीं होइल तो निज मनांत रागेला. ३
अवलोकितां तयातें विश्वावसु बोलला "अगा ! आजी ।
आलासि बहुत दिवशीं मित्रवरा ! येथ कोणत्या काजीं? ४
कीं नवल पाहिलें त्वां ? अद्भुत वा श्रवण काय त्वां केलें?
परिसाया तें सारें कर्णांहुनि जाहलें मन भुकेलें. ५
रे ! बोल ! बोल आधीं ! मित्राचें पुरविं एवढें कोड ।
बहु काय वदों बा रे ! अमृताहुनि बोल वाटती गोड. ६
आम्हां व्योमचरांला गोचर तों सर्वदा सकल सृष्टि ।
परि ती पहावयाला फिरवाया पाहिजे स्वयें दृष्टि." ७
"वाग्वर्षाव असा हा" हांसुनि बोले कृशानु-"कां केला? ।
आतिथ्य दूर राहो, 'ओ'ही दिधला तुवां न हांकेला.८
नर्मोक्ति सर्व राहो आतिथ्यातेंहि वांछितें न मन ।
वाटे वसुधेवरती यावें संगें करोनियां भ्रमण. ९
परतुनि यावें पाहुनि बहु विविधचमत्कृति स्वनयनांहीं ।
कालक्रमण कराया हितकर तों मार्ग वेगळा नाहीं. १०
गुणदोषज्ञ सखा तूं; आलों यास्तव तुला पुसायास ।
स्वीकारिल या लोकीं प्रेमावांचोनि कोण आयास"?११
मंदस्मित करुनि ह्मणे विश्वावसु मित्रवचन-अवसानीं ।
"त्वत्सदृशसुहृत्संगतिपर्व असें प्राप्त होय नवसांनीं."१२
ऐसें बोलुनि दोघे बसुनि विमानांत उतरण्या निघती ।
अवलोकावी कोणीं यानांची तेधवां नभांत गती ! १३
यान उतरतां खालीं प्रथमचि तों पातलें भरतवर्ष ।
बघतां दुरुनि तयातें उभयांतें जाहला मनीं हर्ष. १४
उल्लंघोनि हिमालय वंदुनियां तेविं जन्हुकन्येला ।
यानाचा एकाकीं वेग तिहीं दक्षिणेकडे नेला. १५
पश्चिमसागरतीरीं अभिनव तों द्वीप दिसत नेत्राला ।
अवलोकितां तयातें विश्वावसु बोलला स्वमित्राला: १६
" अद्भुत हें काय दिसे ? अब्धींतुनि काय पातलें वरतीं?
अथवा वरुणपुरी ही नावेपरि जाहली असे तरती? १७
भूखंड हेंचि पूर्वीं अब्धीची खातसे सदा लाट ।
भाग्यें आज तयाचा वर्णायाला न ये मला थाट. १८
मेघोत्तुंग गृहांहीं सुरनगरीचीच पावली समता ।
हीतें पाहुनि मित्रा ! माझ्या तों उपजली मनीं ममता.१९
स्वर्लोकवासि असुनी अमुचाही हारिला हिनें गर्व ।
तरि बघुनि तिला आधीं अवलोकूं मग वसुंधरा सर्व."२०
विश्वावसु तो यापरि बोलुनियां गद्गदस्वरें डोले ।
उपहासाया त्यातें तन्मित्र कृशानु मग तया बोले: २१
" स्वोदरपूरणकार्यव्यग्रमनस्काय येथ जन सारे ।
यांतें पाहुनि मित्रा ! झाला तुज हर्ष हा बहु कसा रे ! २२
क्षुद्र पुरी ही कोठें ? दिव्या कोठें सुरेंद्रनगरी ती ? ।
अपुल्याहुनि अन्याचें वाटे बरवें अशीच जनरीती. २३
हा कीं कलियुगमहिमा स्वर्वास्तव्यांवरीहि घडला हो !
येथें उतरायाचा यास्तव कीं घेतला तुवां लाहो ? २४

७

दारिद्र्य आंत भरलें काय करावीं विशाल हीं सदनें !।
पुनरेकदा पहा कीं ! पांडुर तेजोविहीन जनवदनें. २५

तेथें काय पहावें वेमगृहोत्सृष्ट काय हा धूर ?
निःशब्द असुनि सुचवी मित्रा!आम्हांस काय'व्हा दूर'! ॥

या उदरार्थिजनांच्या संवादीं पूर्ण होय कर्णपथ ।
गायनमधुरालाप श्रवण कराया मिळेल तर शपथ. २७

आग्रह तुझा असे तरि उतरूं तव शब्द केविं मोडावा ?
सख्यासाठीं वाटें ओवाळुनि देह हाहि सोडावा ". २८

तन्मित्र तोंचि वदला"चल आधीं दावितों चमत्कृतिला।
उपहासिसि परि अंतीं देशिल तूं धन्यवाद मत्कृतिला.२९

गानक्षुधा कशी तुज ? ऐकसि तों नित्य अप्सरोगानें ।
केलें व्याप्त तुझें मन केवळ दोषैकदृष्टिरोगानें. ३०

गायन ऐकवितों तुज जरि तुजला गायनक्षुधातुरता ।
गायन दिगंबरांचें ऐकुनि होशील तृप्त तूं पुरता. ३१

प्राणी सजीव गाती; गाती निर्जीव येथ परि यंत्रें ।
अद्भुत सामर्थ्य असें लाभतसे त्यांस कोणत्या मंत्रें ?३२

नवल पहा हें तैसें उदधीवरि फिरति बाष्पनावा या ।
पवनासंगें त्यांतें बुद्धिबलें लावितात धांवाया. ३३

धांवति अग्निरथ तसे वाहन तों एक जोडिलें नाहीं ।
आजवरी त्वां यापरि ऐकियलें नवल काय कानांहीं?३४

हीं पंचमहाभूतें करावया लागलीं स्वयें सेवा ।
वाटे वाटेलहि त्या देवाला बुद्धिचा अशा हेवा." ३५

बोले कृशानु हांसुनि"शिव शिव ! वाखाणितोस कोणातें !
वैभव दिसतां प्राण्या पूर्वींचें नाठवे मनीं नातें. ३६

हे बुद्धि दिली कोणीं विसर तयाचा तुला कसा पडला?
दूरस्थ वैभवाचा तुजला तों लाभ कायसा घडला ?३७

हे शक्ति वस्तुमात्रीं त्या प्रभुनें ठेविली असे सकला ।
त्यांतील अल्प जाणुनि त्यावरि या चालतात सर्व कला.३८

अज्ञातशक्ति तों बहु सारें तें प्रभुवरेंच जाणावें ।
त्याला सांडुनि मित्रा! या जडजीवांस काय वानावें?"३९

विश्वावसु मग बोले"सखया ! हा वाद सर्वथा राहो ।
वाक्शल्यातें आतां ठेवावा अंतरीं न थारा हो. ४०

हा बघ समाज आधीं एकसरें ऐक वाजते टाळी ।
आनंदोत्सव वाटे पाहुनियां कोण जाणता टाळी. ४१

साहित्यसभा ही तों विद्वद्रत्नें अनेक हीं जमलीं ।
वाटे विद्यादेवी मूर्तपणें येथ ही असे रमली. ४२

क्षणभंगुर सर्व जरी लोकीं अक्षय्य हे रहायाचे ।
अंगीं तों बल नसतां अद्भुत सामर्थ्य हें पहा यांचें. ४३

पुण्यें आचरुनी बहु जोडियलें जरि कुणींहि यश धवल ।
यांच्या कृपेविणें तें सारें निष्फल जगीं असें नवल. ४४

गेले राम, युधिष्ठिर कृत्यें त्यांहीं अमोघ जरि केलीं ।
हे ग्रंथकार नसतां असती तीं स्मृतिपथांतुनी गेलीं. ४५

वर्षानुवर्ष त्यांच्या चरिताचें राहतें कुणा स्मरण ? ।
त्या आदर्शांवांचुनि करावया ये कसें सदाचरण ? ४६

सर्वां सत्कृत्यांचा जगतें स्वेच्छेंहि अंश यो द्यावा ।
कीं त्यांच्या सामर्थ्यें त्यांतें सन्मार्ग पूर्ण साधावा. ४७

भाषा असो कशी परि यत्नांहीं आणिती महत्त्व तिला।
लोकां दाविति तैसे भाषेसहि लावितात सद्गतिला. ४८

जी श्रेष्ठ देववाणी भारतवर्षीं तिच्याच कन्या या ।
स्पर्धिति परस्परांशीं उत्कर्षपथीं जनांस या न्याया. ४९

भाषा येथ मराठी मातेशीं पावली असे समता ।
ते ग्रंथकार यास्तव परि बहु असतील भागले श्रमतां ५०

वाल्मीकिव्यासांच्या अनुपद हे ठेविती पदन्यास ।
संतोषला असेलहि यांच्या कृतिंहीं सुरालयीं व्यास.५१

यांच्या प्रवर्तनानें धर्माला पावलें बहु त्राण ।
बहु काय वदों सखया ! त्याचा यांहींच राखिला प्राण ५२

कर्मपराङ्मुख लोकां प्रकाशुनी दाविला भला पंथ ।
ऐसे येथ जहाले जगतातें वंदनीयसे संत. ५३

त्यांहीं हीच मराठी बोलुनि उपदेश या जनां केला ।
जाणों अधर्म पाहुनि धर्माच्या थांबलेच हांकेला. ५४

ज्ञानेश्वरी प्रकटली उकलाया मोहजाल जीवांचा ।
सांगे अजुनि जनां ती 'वाचुनियां भवजलांत जी वांचा'!

भगवद्गीतोपनिषत्कारांचें हृदय करुनियां प्रकट ।
डोलवुनी पंडितजन उद्धरिलें त्यांसही जडांसकट. ५६

हा ग्रंथराज शोभे भाषेच्या मस्तकीं जसें रत्न ।
दुर्बोध असुनि करिते ना तरि जाणावयास कां यत्न?५७

ओंवाळावे इतर ग्रंथ तसे सर्व दासबोधाला ।
सुज्ञ असो वा जड वा वाचुनियां कोणता नसे धाला?५८

अज्ञानांध जनांचा बोधांजनिं याच उघडिला डोळा ।
मग कर्तव्य पुसाया भोंतीं जन सकल जाहले गोळा. ५९

या ग्रंथयुग्मसदृश ग्रंथ नसे भारतांत तिसरा हो ।
यांतें धरितां हृदयीं अवनतिचा पाठ सर्व विसरा हो ! ६०

राष्ट्रिय भाषा हिंदी परि हृदयीं अवनतींचिया भेणें ।
या ग्रंथांचें स्वशिरीं उसनें घेवोनि घातलें लेणें. ६१

धर्मग्लानि हरविली या ग्रंथें सर्व रामदासानें ।
भगवान् श्रीकृष्णाहुनि याचें यश केविं बोलिजे सानें? ॥

कवितादेवी आली वाटे अंगेंचि वामनापाशीं ।
कन्येपरि आदरिली जाणों तेणें स्वकीय भुजपाशीं. ६३

कवितादेवीवरती बहुविध येणेंचि चढविल्या भूषा ।
या वाङ्मयांगणीं तो शोभतसे ज्यापरी नभीं पूषा. ६४

विद्वज्जन एकसरें मोहुनि वाखाणिती मयूरासी ।
बहुविध अमूल्य कवितारत्नांच्या पाडिल्या तयें राशि. ॥

येथें जन्मुनि जेणें या मोराचा न ऐकिला टाहो ।
मेळविले लाभ तयें तरि त्याचा हा न काय तोटा हो? ॥

ग्रंथ प्रचंड भारत सारांशें हा जनांस ऐकविता ।
विविधत्वीं याच्याशीं कोणाची साम्य पावते कविता? ॥

अष्टोत्तरशत वेळां ऐकविलें रामचरित यानें तें ।
करुनी रसिकजनांचें रंजन त्यांतें सुरालया नेतें. ६८

केकावलि ऐकुनियां स्वर्गी संतोषला असेल हरी ।
असतील वाहियेल्या वात्सल्याच्या तदंतरीं लहरी. ६९

शब्दार्थालंकारीं विद्वत्परिषद् समग्र डोलविली ।
वाटे सरस्वतीनें कविता याच्या मुखेंच बोलविली. ७०

वाणी अभंग वदुनी अभंग यश जोडिलें तुकारामें ।
आपण तरोनि गेला तरती जडजीव त्याचिया नामें. ७१

भक्तिरसाची केवळ याच्या वाणींत जान्हवी वाहे ।
वाटे वाग्रूपानें अद्यापि सजीव राहिला आहे. ७२

झाले बहु होतिल बहु तोलावा संत कवण तो याशीं ।
तीर्थोदकें जगीं बहु नच होती तुल्य गांग-तोयाशीं. ७३

म्हणती सदेह गेला परि त्याची क्षितिवरी तनु अभंग ।
भाषा जों ही भूवरि तोंवरि पावे न देह हा भंग. ७४

वेदान्त श्रेष्ठ खरा अज्ञजनांला कसा परंतु कळे ?
परि तो याच्या वचनीं सर्वांला श्रम न लागतां उकले. ॥

शूद्रां अगम्य म्हणुनी वेदांतें खेद वाटला, वाटे ।
बोधावया जनांला पडले ते याचिया मुखावाटे. ७६

या संतमंडळामधिं नाथाची योग्यता न सामान्य ।
भागवताची टीका मूळापरि जाहली जगीं मान्य. ७७

श्रीरामचरित्राचा भावार्थ जनांस सर्व दाखविला ।
काव्यापरि विद्वत्तहि याच्यापरि साधलें कुणा कविला? ॥

वेदान्तरूपकांहीं केलें तें कठिन शास्त्र सुलभ जना ।
जन अज्ञ सुज्ञ सारे जाणुनियां लागले तया भजना. ॥

कोणा न साश्रु करितो म्हणतांच अभंग नामदेवाचा ।
भगवत्प्रेमकथांतें केवळ आमरण ती वदे वाचा. ८०

तत्पुत्रदासदासी कविता लिहिती तयापरी सारीं ।
जीं आपणासवें त्या पाहति जगदीश्वरास संसारीं. ८१

मुक्तेश्वरकवि वदला संक्षेपें भारतीकथाकथन ।
जाणों त्या उदधीचें केलें तेणें स्वबुद्धिनें मथन. ८२

गीर्वाणवाङ्निधींतुनि निवडुनियां श्रीधरें विविधरत्नें ।
लेवविलें स्वजनांतें भूषण त्यांचें करोनियां यत्नें. ८३

दासोपंतें केला गीतार्णव त्याजला तरायास ।
सामर्थ्य थोर लागे. कोणा होतील वाचनायास ? ८४

संतचरित्रें वर्णुनि महिपतिला कीर्ति लाभली जगतीं ।
तीं वाचुनियां घडते लोकांची सत्पथाकडेच गती. ८५

कविवर्णनप्रसंगीं कैसें विसरेन अमृतरायातें ।
साहाय्य करी लोकीं तत्काव्य भवाब्धिला तरायातें. ८६

ऐसे कवि बहु झाले गणना त्यांची किमर्थ ती करणें ।
भाषाललनेवरती सर्वांहीं घातलीं सुखाभरणें. ८७

नाना प्रबंध रचिले लोकांतें सत्पथास दावाया ।
दुर्मार्गी जन जाती ऐसे केले न यत्न ते वाया. ८८

सुखसंपदा मिळाया यश वा लोकांत वाढवायास ।
कविता रचावयाचे त्यांहीं तों घेतले न आयास. ८९

स्वोदरपूरणकामें या कविंहीं रंजिलें न कोणातें ।
केवळ जगदीशाशीं प्रेमाचें जोडिलें तिहीं नातें. ९०

मनुजस्तुति आचरुनी या कविंनीं भ्रंशिली न रसनाही ।
भगवत्प्रेमरसाविण यांतें तों ठाउकाचि रस नाहीं. ९१

धन्य महाराष्ट्रा तूं ! तुजला शतवार बोलतों धन्य ! ।
सद्भाग्याचें तुजपरि जगतीवरि राष्ट्र तों नसे अन्य. ९२

उत्तेजन या कवितें कोणाचेंही नसोनियां जगतीं ।
केली आत्मबळानें भाषेची या झटोनियां प्रगती. ९३

अत्यंत शुद्ध यापरि उत्पत्ति तशी परंपरा तीची ।
सद्वंशीं उद्भवतां उन्नति होई न का प्रसूतीची" ? ९४

ऐसें बोलुनि झाला स्तब्ध क्षण घ्यावयास विश्रांती ।
तोंवरि कृशानु बोले निज मित्राची हरावया भ्रांती. ९५

"भाषा ब्राम्ही कोठें ? परिमितजनभाषिनाच ही कोठें ?
साम्यें त्यांतें पाहसि हें मज वाटे मनीं नवल मोठें. ९६

हा जो समाज जमला यांची कृति काय ती प्रथम बोल ।
मग धन्यवाद त्यांतें देउनि शतवार तूं सुखें डोल. ९७
श्रेष्ठ कनिष्ठ असो वा वंश तशी होय केविं संततिही ।
उच्चत्व पद्दा यांचें जरि तें संपादिलें असेल तिहीं. ९८
रत्नाकरीं निपजुनी शंखाचें मोल वाढलें काय ? ।
श्रेष्ठत्व मिळायाला श्रमवाया लागतो स्वयें काय. ९९
गुणगण अंगीं असतां श्रेष्ठांशीं लाविण्या नको नातें ।
श्रेष्ठत्व पूर्वजांचें जगतीं कोणी पुसे न कोणातें. १००
वेदांऐसा यांचा ज्ञाननिधि ग्रंथ कोणता सांग ।
अज्ञान हरायातें जेथें ज्ञानचि निरूपिलें सांग. १
इतिहास भारतापरि निजभाषेमाजि कोणता यांचा ? ।
बाबा ! इतिहासाविण जगतीं उत्कर्ष तो न व्हायाचा.२
आख्यानें बहु लिहिलीं परि तें सारेंचि भारतोच्छिष्ठ ।
जाणोनि तत्त्व ऐसें त्यांतें मग कोण मानिती शिष्ट ? ३
त्या त्याचि कथा लिहितां पुनरपि रसिकांस त्या कशा रुचती ।
बुद्धिप्रागल्भ्याविण हृदयीं नव कल्पना न तों सुचती.४
भक्तिरसाविण म्हणसी यांतें रस तों नसे दुजा ठावा ।
ठावा असतां तोही विद्वत्तेविण कसा परि वठावा ? ५
काव्यें कितिशीं असती रसिकांतें जीं समर्थ रमवाया? ।
संख्या काय करावी? मज तों श्रम वाटती सकल वायां.६
वाखाणिसि सर्वांतें दोष कुणाचा तुला दिसेना कीं ।
दोषज्ञत्व तुझें का निघतां विसरोनि राहिलें नाकीं ? ७
शास्त्रग्रंथ विलोकुनि लिहिला सद्ग्रंथ यांत बा! कवणें? ।
अज्ञजनां डुलवाया केवळ होतीं समर्थ हीं कवनें. ८
न्यायव्याकरणादिक शास्त्रें येथें अनेक तों असती ।
तच्छ्रवणीं न श्रमतां आख्यानें हे लिहावया बसती. ९
दृष्टांत बहुत लिहिती उपमालंकार त्यांजला ठावे ।
सत्यज्ञानाभावीं ते रम्य बुधांस केविं वाटावे ? ११०
वेदान्तीं बहु लिहिलें परि करणग्रंथ कोणता केला ? ।
नामश्रवण कराया त्याचें मी जाहलों मनिं भुकेला. ११
काव्यें अनेक लिहिलीं झालीं निष्फल परंतु तीं सर्व ।
यास्तव किमर्थ धरणें त्यांविषयीं अंतरीं तरी गर्व?१२
ग्रंथ असे हे यांचे ताराया शकति केविं धर्मातें ।
धर्मार्थ देह दिधले नाठवसी त्यांस वाटतें मातें. १३
धर्मग्लानींत तया झाले होते निराश तों सारे ।
[illegible] तो मनिं कसा रे !

धर्मत्राण करूनियां अटकेवरि लाविला तिहीं झेंडा ।
प्राणहि अर्पुनि अपुले सर्वांचा राखिला शिरीं शेंडा.१५
वाखाणिसि तूं कवितें विसरुनि या केविं धर्मवीरांसी ?
त्यांच्या सत्कृत्यांच्या ग्रंथांहुनि जाहल्या अधिक राशी.॥
संग्राम घोर कोठें ? तोलाव्या त्यांसवें कशा कविता ।
मिळतां तारागण बहु तेणें निस्तेज होय का सविता?१७
त्या धर्मसंगरांचा लिहिला त्यांहीं न एक इतिहास ।
न कळे इतिहास जयां त्यांचा होई जगांत उपहास.१८
ऐशी परंपरा ही दृष्टीला स्पष्ट पाहतां वाटे ।
उत्कर्षाविण शब्दचि येईना तों तुझ्या मुखावाटे. १९
त्यांचा क्रम चालविला यांनींहि तसा पुनश्च अवलोकीं ।
दीर्घोद्योग न करितां कोणाची प्रगति होय या लोकीं?॥
भक्तिरसामधिं गेले ते कवि गुंगोनि सर्व एकसरें ।
पुण्यकथा त्या संपुनि संप्रति कविसंघ तोहि रस विसरे.॥
जगदीशातें सांडुनि पूजाव्या त्यांस वाटती रमणी ।
व्हावी कशी तयांला बुद्धि तशी शक्ति वा मनःशमनीं ॥
रमणीविलास चिंतुनि संप्रति कवि त्यांत जाहले दंग ।
यापरि कवितेवरती कविंनीं या चढविला नवा रंग.२३
शृंगार शुद्ध जाउनि केलें त्याचें स्वरूप अश्लील ।
झाले कवि हे केवळ तरुणजनांचें हरावया शील. २४
कामज्वलनावरती निज काव्याचें समर्पिती आज्य ।
व्हावा शांत कसा तो?तेणें मग वृद्धि पावतो प्राज्य.२५
जीचें सेवन करितां वाढे सच्छील तीच बा ! कविता ।
कविमंडलांत साऱ्या ऐसें सत्काव्य कोण ऐकविता?२६
कवि उच्छृंखल होतां विदग्ध वाङ्मय कसें उगें राहे ।
अनिरुद्धपणें तेंही शृंगारोदधिसवें स्वयें वाहे. २७
कविता तशा कथा या तरुणजनां ठाउकें नसे तिसरें ।
होवोनि राष्ट्र कामुक ज्ञानाची लालसा सकल विसरे.२८
शास्त्रग्रंथ न रुचती रोगयांतें नावडे जसें पथ्य ।
अपकर्ष स्पष्ट असे भाषेचा सांगतों तुला तथ्य. २९
परभाषेंतुनि आणिति कथानकें शोधुनी विलासाचीं ।
या सर्व लेखकांहीं रुचि केली भ्रष्ट यापरी साचीं.१३०
उत्कर्षकामराष्ट्रें इतिहास अनेक पाहणें नीट ।
इतिहास पहायाचा यांच्या तों उपजला मनीं वीट.३१
प्राचीन रोमहर्षण वीरकथा सारिल्या तिहीं दूर ।
प्रणयकथांचा केवळ राष्ट्रावर पातला महापूर. ३२

वृद्धीतें पावतसे शास्त्रांचें ज्ञान अनुदिनीं लोकीं ।
संपादाया त्यातें औत्सुक्यें यांत कोण अवलोकी ? ३३
या जीवनसंग्रामीं शास्त्रज्ञानाविणें उणें सर्व ।
लेखकगणींहि यास्तव साधावें झटुनि हें महापर्व. ३४
धर्माचें ज्ञान तसें तरुणजनां ठाउकें असे काय ? ।
योजुनि केला यांहीं आजवरी त्यास काय सदुपाय. ३५
उदरासाठीं करिती धर्मांतर, अन्नदान त्यां करणें ।
आशीर्वाद तयांचा यत्न करुनि सज्जनीं सदा वरणें. ३६
परि निजधर्मीं राहुनि धर्माचें त्राण कायसें केलें ?
धर्मान्तरकर्त्यांहुनि यांनीं तों बहुत यश लया नेलें. ३७
अन्नाच्या दानाहुनि ज्ञानाचें दान काय हें ऊन ।
परि धर्माच्या हांका घेईना कवण येथ ऐकून. ३८
राहोत अज्ञ जन परि धर्माचें तत्त्व शिक्षितां न कळे ।
मिरवोनि धर्मनिष्ठा शिक्षित इतरांहुनी पहा भकले ३९
त्या धर्मांतरकालीं निरुपायें सोडिती स्वधर्मातें ।
धर्मग्लानिस या तों हेतु न मोहाविणें दिसे मातें. १४०
धर्मज्ञान शिकवुनी वाढविलें शील जों न तरुणांचें ।
अनिरुद्धपणें तोंवरि ही येथ अधर्मराक्षसी नाचे. ४१
जों या वैगुण्याचा तीव्रत्वें भास लेखकां नाहीं ।
ऐकायाचा तोंवरि केवळ उत्कर्षशब्द कानांहीं.’ ४२
यापरि ऐकुनि लागे विश्वावसु उत्तरास बोलाया ।
लागावी जें परिसुनि विद्वत्परिषद् समग्र डोलाया. ४३
“ ब्राम्ही भाषा श्रेष्ठचि प्रमाणानिरपेक्ष तत्त्व हें लोकीं ।
तत्समपदस्थहि तशा भाषा जगतांत नीट अवलोकीं. ४४
भाषाप्रचार बघतां ब्राह्मीचाही प्रचार बहु कोठें ? ।
त्यां हें प्रमाण यावें याचें वाटे मनीं नवल मोठें. ४५
ही कन्यका तियेची मातेचें प्रेम तिजवरी फार ।
वृद्धा स्वस्थ जहाली कन्यांवरि ठेवुनी सकल भार. ४६
होतां स्वस्थ सुतेवरि विविधालंकार आपुले चढवी ।
जाणों तिला मिळावी त्यायोगें त्वरित आपुली पदवी ॥
हा मातेचा प्रेमा त्रिभुवन मूल्यें न लाभतो अन्या ।
तो लाभला जयांला भाषा त्या वाटती मला धन्या.॥
उच्छिष्ट भक्षितांना तें न अपत्यांस वाटतें उसनें ।
तें लाभाया केव्हां लागे मातेसवें तयां रुसणें. ४९
‘ उष्टें उष्टें ’ म्हणसी परि त्याचा गर्व वाटतो मातें ।
श्रेष्ठत्व मराठीचें साधाया तेंच येत कामातें. १५०

‘ व्यासोच्छिष्ट जगत्त्रय’ म्हणती मग काय वेगळें उरलें ।
व्यासवचन तों साऱ्या जगतातें सर्वथा असे पुरलें. ५१
त्या भारती कथेचा करिती अनुवाद येथ सर्व कवी ।
नवल नव्हे हें मित्रा! रसिकांतें अजुनि ती कथा चकवी. ॥
अधिक किमर्थ वदावें प्रतिवर्षीं ये वसंत तैसाच ।
आकांक्षी जन त्यातें हें काय तुला न ठाउकें साच? ५३
नाथ निशेचा उगवे पाहति जरि त्यास नित्य गगनांत ।
परि तद्दर्शनमात्रें बहु व्हावा हर्ष कां कविगणांत? ५४
सौंदर्य तेंचि जगतीं नवता येई प्रतिक्षणीं ज्यातें ।
भारतकथा तशी बा ! कवि झाले मुग्ध बघुनि तेजातें. ॥
पुनरपि पडतां श्रवणीं रुचती रसिकांस त्या म्हणुनि सुचिर।
केल्या कविवर्यांहीं रूपांतर कुशलतेकरुनि रुचिर. ५६
केवळ कथानकांचा घेउनि आधार काव्यरचनेला ।
अपुल्या कौशल्यें मग सर्वांहीं हेतु सिद्धिला नेला. ५७
केली व्यक्त तयांहीं प्राचीनकथांवरी अशी प्रीती ।
हा पाठ दिला सकलां थोरांची थोर ही जगीं रीती. ५८
ते आणिते मनीं तरि काव्यें निजबुद्धिनें सकल करिते ।
वाल्मीकिव्यासांपरि त्यायोगें श्रेष्ठता जगीं वरिते. ५९
वेदान्त ग्रंथांवरि लिहिल्या टीकाहि काय सामान्य ? ।
गीर्वाणग्रंथांपरि असती विद्वज्जनांस त्या मान्य. १६०
विस्तर पहा तयांचा मूळीं आधार त्या असे काय ?
न पटे हेंहि जयाला ब्रह्मा होईल तेथ निरुपाय. ६१
त्यांहीं निजकालाचा लिहिला नाहीं समग्र इतिहास ।
यास्तव तया कवींचा कोपुनि तूं करिसि तीव्र उपहास.॥
इतिहास बहुत लिहिती यांहीं इतिहास तों स्वयें केला ।
दीर्घश्रमें तयांच्या धर्माचा हेतु सिद्धिला गेला. ६३
त्या धर्मत्राणाचें यावें न श्रेय काय त्या कविंला ।
वीरकथांहीं ज्यांनीं सकल महाराष्ट्र पूर्ण जागविला. ६४
त्राता कुणी न दिसतां धर्म तदा हा पुरा पुरा थकला ।
हांक तदा धर्माची कविरायांनींच कळविली सकलां. ॥
त्यांचा दीर्घध्वनि तो नादित गिरि करुनि पातला रानीं ।
होउनि जागृत दिधले तेव्हां निजदेह धर्मवीरांनीं. ६६
व्यापार या कवींचा येता येथें जरी न उदयासी ।
होतें न राष्ट्र जागृत; लाभे मग केविं पूर्वपद त्यासी ? ६७
उभयाश्रित हीं कार्यें यास्तव एका बुधें न वानावें ।
करुनि न तुलना त्यांची सर्वांहीं त्यांस पूज्य मानावें.॥

उपहासिला तुवां तों बहुशब्देंकरुनि भक्तिरस त्यांचा ।
गुततां असत्यजालीं निर्णय तुजला कळे न सत्याचा.॥
रस सर्व त्यांस ठावे शास्त्रांचें द्वार सकळिकां उघडें ।
दीर्घप्रयत्न करितां ज्ञानाचा लाभ मानवांस घडे. १७०
रस इतर दूर करुनी मन त्यांचें भक्तिच्या रसीं रमलें ।
प्राशन नितांत करितां हृदयींचें दैन्य सर्वथा शमलें ॥
भाषामंदिर रचितां ठेवियली भक्ति घट्ट पायाशीं ।
काळें न जीर्ण होई यास्तव तिजला नको जपायासी ॥
राजाश्रयही नसतां तीचा उत्कर्ष होत मंदगती ।
सूक्ष्मावलोकनें बा ! कवणाहि दिसोन ये तिची प्रगती ॥
भाषोत्कर्ष कराया पालटुनी रूप पातले वेद ।
तत्तुल्य ग्रंथ नसे म्हणुनी वाटावया नको खेद. ७४
दुर्बोधत्वाचीं तीं वसनें टाकोनियां दिलीं सर्व ।
होउनि सुबोध सर्वां सांगति साधावयास हें पर्व. ७५
त्या श्रुतिबोधासंगें झाला हा उदित उपनिषत्तरणी ।
त्यांच्या योगें झाली सर्वहि जगतांत धन्य ही धरणी.७६
हा ज्ञानराज केवळ येथ जगन्मंगलार्थ अवतरला ।
साहाय्य तें मिळवुनी जन आयासाविणेंच भव तरला.७७
घेतां वस्त्र मराठी स्मृति कां होती न गम्य कोणातें?।
अर्थासाठीं आतां तज्ज्ञाशीं लाविण्या नको नातें. ७८
संक्षिप्त रामचरितें आजवरी तर्पिले जनीं श्रवण ।
पुण्यचरित तें आतां साकल्यें ये करावया श्रवण. ७९
त्या भारती कथेचें सामान्यजनां न तों घडे पान ।
परि तें करावयाला झाला हा सर्वगम्य सोपान. १८०
आरोहूनि तयावरि कवणेंहि यथेच्छ पान तें करणें ।
भय दुर्बोधत्वाचें सांडुनियां पूर्ण तृप्तिला वरणें. ८१
सौम्यस्वरूप झाला महर्षिवचनाब्धि यापरी साचा ।
भाषा सुवर्ण झाली घडुनि तिला स्पर्श या परीसाचा.८२
सर्व पुराणें यापरि परिचित साक्षर जनांस कीं केलीं ।
तेणें त्या ग्रंथांची संप्रति सर्वहि पुराणता गेली. ८३
वेदान्तयशोदुंदुभि अखंड वाजे त्रिखंडहि जगांत ।
सारें विद्वन्मंडल वेदान्तस्तोत्र राहिलें गात. ८४
स्वामि विवेकानंदें वक्तृत्वें साधिला पराक्रम तो ।
अवतारकार्य केवळ.कोण जगीं त्या यशास आक्रमतो?॥
तद्वक्तृत्व सुदुर्मिळ सर्व महाराष्ट्रबांधवां कळलें ।
अज्ञानमुग्ध तन्मन तेणें धर्माकडे पहा वळलें ! ८६

श्रीस्वामि रामतीर्थें वाढविली कीर्ति ते जगीं अमला ।
तद्वक्तृत्वें परजनशंकांचा क्षोभ सर्वथा शमला. ८७
भाषेसि भूषवाया घालिति वरि तद्वचःसुमनहार ।
भंगति मौतिकभूषा परि याचा करिल कोण अपहार?८८
धर्माध्यापन करितो नेमें आचार्य येथ प्रतिपक्षीं ।
प्रतिपादनकौशल्यें स्त्रीकारिति मुग्धताचि प्रतिपक्षी ८९
निजबंधुमोक्षहेतुचि प्रकटित केला मुमुक्षुनें सारा ।
धर्मग्लानिनिदर्शक नयनींचा जातसे तयें सारा. १९०
भगवद्गीतोपनिषद्रहस्य उदायाचलावरी आलें ।
उदयप्रेक्षणकामें उत्सुक जन हे पहा जमा झाले ! ९१
श्रीरामकृष्णवचनीं सकल महाराष्ट्र जाहला मुग्ध ।
मानवलीं सकलांतें मातेचें बालका जसें दुग्ध. ९२
शांताराम जहाला शांत परी लेख तों असे जागा ।
वाङ्मयशिखरावरती देईना कोण त्याजला जागा ? ९३
बहुविध शास्त्रपुराणें पढवुनि उत्तेजिलें स्वधर्मातें ।
तो धर्मकार वाटे विसरोनि विवाद वंद्यसा मातें. ९४
वेदान्तशास्त्रगूढोद्घाटन त्या भानुनें करुनि यत्नें ।
भाषाभूषांवरतीं ग्रंथांचीं जडविलीं विविध रत्नें. ९५
धर्मार्थ यत्न तैसा ठावा कोणा न विष्णुबोवाचा ।
या सागरास त्याच्या स्मरतहि असतील अंतरीं वाचा ॥
इतिहासाची तैशी भूवरि या होतसे पहा वृष्टी ।
संशोधकश्रमांहीं झाली निर्माण येथ नवसृष्टी. ९७
संशोधनेतिहासीं प्रथमचि हृदयांत विष्णु आठवला ।
कार्यें प्रारंभाया वाटे देवेंचि त्यास पाठवला. ९८
इतिहासशोधनें या लोकप्रिय जाहला पहा साने ।
वाटे ऐसा शोधक लाभे राष्ट्रास थोर नवसानें. ९९
इतिहासलेखनाचें शांतपणें कार्य हा करीत खरे ।
बहुविध निजकार्यांचे त्यातें दावावया नको नखरे.२००
वृत्तांत अप्रकाशित तैशीं चरितें अनेक पुरुषांचीं ।
लिहुनी दत्तात्रेयें वाङ्मयसेवाच साधिली साची. १
श्रम विश्वनाथ याचे पाहुनि तरुणें मनांत लाजावें ।
निजदेह न सांभाळी कीं वाटे कार्य सिद्धिला जावें. २
व्यासंग दीर्घ त्याचा सीमा त्या शोधना नसे कांहीं ।
तत्तुल्य कार्य यास्तव अशक्य तों मज गमे अनेकांहीं.३
सिद्धांतग्रथनीं तों त्याशीं बा ! पंडितांत कोण तुके ।
प्रतिपक्षीहि तयाचे डोलविती मान आपुली कुतुकें. ४

करिती इतिहासाची गोविंद तसाच देवही सेवा ।
हें सत्कार्योत्तेजन मान्य न होईल काय त्या देवा ? ५

वैदिकवाङ्मयशोधीं विदित न कोणास पावगी नाना।
तल्लेखनसाम्राज्यें डोलविल्या पंडितीं स्वयें माना. ६

काळे कालें नेला अल्पायुष्यांत शोध बहु केला ।
त्याच्या शोधासाठीं बुधगण होता मनीं बहु भुकेला.७

वैदिकवाङ्मयशोधीं तो ध्रुवसिद्धान्त तिलकसा गमला।
सर्व त्रिखंडपंडितगण त्याच्या वाचनीं असे रमला.८

तोही परिचित झाला ग्रंथ महाराष्ट्रबांधवां सारा ।
चषकीं तृष्णा शमतां धांवे पानार्थ कोण कासारा ? ९

ज्योतिःशास्त्रीं शोधक त्या दीक्षितसदृश ऐकिला नाहीं।
त्याच्यामागें तैसा ऐकाया शब्द ये न कानांहीं. २१०

वैद्यकशास्त्रीं झटले झटति तसे रानडे, पदे, कवडे ।
आयुष्क्रमण तयांचें केवळ शोधांत सारखें दवडे. ११

खेडकरातें स्मरतां आठवला एक गोखले मात्र।
आणिकही बहु असती;विस्मरणा काय मी नसें पात्र?॥

कल्पितकथाप्रसंगीं दिसताहे प्रथम आपटे हरि तो ।
गुणदोषदर्शि चित्रें बहुविध रेखोनि जनमनें हरितो.१३

मकरंद, मनोरंजन, नवयुग, उद्यान, चित्रमय जगतीं ।
बहुविध लेखक करिती या अंगाची झटोनियां प्रगती१४

त्या परशुरामपंतें नाट्यें गीर्वाण बहु निजजनांतें ।
देउनि या नाट्यांगीं जनकत्वाचेंचि जोडिलें नातें. १५

नाट्येतिहास बघतां बलवंत स्मरतसे मनीं मजला ।
नाट्योत्कर्षीं केवळ कायावाचामनेंकरुनि सजला. १६

इतिहास बोध तैसा नाट्यामिषें कृष्णराव तो शिकवी।
शिरवलकरेंहि केले परिचित लोकां अनेक संतकवी.१७

नरसोपंतें केली ऊर्जित बहु नाटकेंहि नाट्यकला ।
नाट्यें लिहितां लिहितां देवल तो आजला असे थकला.॥

दाभोळकरें बहुविध शास्त्रीयग्रंथकथन चालविलें ।
साहाय्य असें देउनि बहु लेखकचिंतनास घालविलें.१९

शास्त्रग्रंथ पहातां मोडक तो दिसतसे प्रथम बाळ ।
पंडित कोणी करिती या अंगाचा सुखेंहि सांभाळ.२२०

तो धन्य विष्णुशास्त्री झाला या वाङ्मयासि पालकसा।
लेखकवर्ग तयातें आराधी निजपित्यासि बालकसा.२१

तेणें निबंधमाला कौशल्यें गुंफिली असे पूर्वी ।
अजुनी नूतन भासे आमोदें भरितसे पहा उर्वी. २२

लेखनकौशल्यानें भाषेला ठेविलें नवे वळणीं ।
ज्ञानलवदुर्विदग्ध प्रतिपक्ष्यां प्राप्त जाहली पळणी. २३

निजकार्यपूरणार्थाचे मार्गें ठेवोनि केसरी गेला ।
गोपाळ,टिळक यांहीं आजवरी हेतु सिद्धिला नेला.२४

स्पष्टोक्तीनें केवळ पत्रीं तें पत्र मुख्यता पावे ।
बा! श्रेष्ठता मिळाया लागे तों दीर्घकाल तापावें. २५

ज्ञानेंदुच्या प्रकाशीं भाषेची नित्य होतसे प्रगती ।
लेखकगण बहु झटतां साधेना काय मानवां मग ती२६

भाषोत्कर्ष कराया झाला हा उदित येथ संदेश. ।
लेखनकौशल्यानें रंजवुनी बोधवी सकल देश. २७

विविधज्ञानें प्रकटुनि झाला विस्तार वृद्धसा मान्य।
वर्षें काय करावीं? त्याची तों योग्यता न सामान्य.२८

लेखक बहु मेळवुनी सद्ग्रंथांची विणोनियां माला ।
लेवविली स्वजनांतें नच तो गुरु विष्णु वंद्य कोणाला ?

या लोकशिक्षणाचा अवतार दिशा जनांस दावाया ।
राहुनि दक्ष न बोले अक्षर वा शब्द वा कदा वायां.॥

रिझवोनि मनोरंजन, नवयुग देती जनांस बोधसुधा ।
जगतें चित्रमयें या भूषविली ही निजागमें वसुधा.३१

निवटुनि मोहपटल तें नेत्रोन्मीलन करावया स्वकरीं ।
घेउनियां ज्ञानांजन येथ जगन्नाथ दीर्घ यत्न करी.३२

सानाथोरां बोधी थोरांचीं दाखवोनियां चरितें ।
हें बालबोध मासिक वाङ्मयसेवा अखंड आचरितें. ३३

योगरहस्य करितसे भाषेची दूर राहुनि सेवा ।
कवणा न श्रम पडतां मिळत महाराष्ट्रबांधवां ठेवा.३४

विविध प्रबंध लिहुनी परांजपे बोध बांधवां कळवी ।
भाषाशैली त्याची प्रतिपक्ष्यातेंहि हंसवुनी पळवी. ३५

हे वैद्य, दामले वा, कोल्हटकर वा,महाजनीहि तसा।
भांडारकरहि निरलस करिती सद्बोध अनुदिनीं हितसा.॥

या धर्मजागृति, उषा,मन्वंतर, लोकमित्र, आनंद ।
कोकिळ,खेळगडी हे भाषेची करिति उन्नति अमंद.३७

कविवर्य कृष्णशास्त्री, लेले, तैसाच गोडबोलेही ।
काव्यें अमर जहाले भूवरि असती अदृश्य जरि देहीं३८

श्रीमंत बापुरायें भाषेला भूषणें विविध केलीं ।
या चित्रमयूराची तेविं पहा! चालते रुचिर केली.३९

दोघेहि कृष्णशास्त्री, महाजनी, पारखी असे चवघे ।
त्यांच्या काव्यसुधेची जनता मोहुनि पुनःपुन्हां चव घे.

कविवर कानिटकर हा,कीर्तिकर,तसाच हा पहा! टिळक
कवितावधूललाटीं तत्कृतिचा शोभतो महातिलक. ४१
वामन ओक निमाला मोरापरि करुनियां जगीं टाहो।
परि बालकृष्ण काढी भरुनी बहुधा समग्र तोटा हो.४२
कवि पुरुषोत्तम जोशी, हा राधारमण, बेहरे तिसरा।
सांगति 'कविता वाचुनि मानव हो! निजमनोव्यथा विसरा'
कवि माधवानुज तसा, गोरे, तो मोगरे,सुमंत तसे।
रेंदाळकर, अगाशे काव्यीं झाले बुधांस संमतसे. ४४
कविवर लेखक यापरि झटतां उत्कर्ष कां न साधावा?।
करिती प्रयत्न जे कीं देवहि त्यांचाच ऐकती धांवा."४५
" उत्कर्षाख्यान तुझें" कृशानु बोले "न संपलें काय? ।
न लगे करावया कीं उन्नतिला यांस एकहि उपाय. ४६
उत्कर्ष हा म्हणों जरि अवनति बाती तरी असे कसली ?।
बहु राष्ट्रें अवलोकुनि आजचि मद्दृष्टि काय गा! फसली?
इतिहास थोर यांचा परि त्याचा काय यांस उपयोग ?
बाबा ! निजकर्मांचा भोगावा लागतो स्वयें भोग. ४८
इतिहासही स्वतांच्या अवनतिचा मात्र यांजला पाठ।
उत्कर्ष तों न कळतां सोडी अपकर्ष काय मग पाठ ?
स्वोत्कर्षवृत्त कवणें लिहुनी केलें न निजजना ठावें?।
व्हावा उत्कर्ष असें यांतें हृदयांत केविं वाटावें ? २५०
राष्ट्रें जगतीं जाती पुढती परि कोण त्यांकडे पाहे।
लेखकवर्ग सकल हा उदरानलचिंतनीं उगा राहे. ५१
राष्ट्रें उन्नत जगतीं सर्वांचें श्रेय याच वर्गातें।
वास्तव तद्यश निर्मल एकमतें नित्य सर्व जग गातें.५२
वृत्तांत मानवांचा अद्यापि सजीव ठेविला यांनीं।
तो आदर्श न दिसतां ये उन्नति कोणत्या उपायांनीं?५३
यांत कितीसे असती जे लिहिती ज्ञानदानकामानें।
उदरार्थ यत्न अवघा झाले तों इतर लिप्त अभिमानें.५४
यत्न स्वतंत्र नाहीं परभाषांवरिच ठेविती भार।
वास्तव निष्फल दिसतो ग्रंथांचा हा समग्र संभार. ५५
केवळ उदर भराया लिहिती हे ग्रंथ आपुले सारे।
सद्ग्रंथ राष्ट्रवर्धन येथें निपजेल तो मग कसा रे ?५६
मिळवुनि अर्थ कसाही स्वस्थपणें ग्रंथलेखना निघती।
वाल्मीकिव्यासांच्या पंक्तीला यावया कसे बघती ?५७
ज्ञानेशतुकारामीं अध्यात्मज्ञान पसरिलें अवघें ।
संप्रति लेखकगण हा वागमृताची न त्या कधीं चव घे.५८
कल्पित कथा लिहुनियां त्यांची लोकांस लाविती गोडी।
वाढविती ती अनुदिनिं; अवनति ही काय वाटते थोडी ?
शास्त्रें विविध जहालीं; कोणा यत्नाविणें सकळ कळती?
करिती प्रयत्न कैंचा यांच्या तों अंतरीं न कळकळ ती.
शास्त्रें ऊर्जित करिती राष्ट्रें उत्कर्षुनी तयें जगती।
शास्त्रज्ञानाभावीं कोणाची प्रगति होय या जगतीं? २६१
प्रस्तुत युद्ध पहा हें; हे शास्त्रांचेच वाजती धडके।
शास्त्रें करीं जयांच्या जगतीं त्यांची जयध्वजा फडके.६२
शास्त्रज्ञानाभावीं करणें मग इतर यत्न ते काय ?।
भाषेच्या, राष्ट्राच्या उत्कर्षी हाच एक सदुपाय. "६३
विश्वावसु हें परिसुनि बोले "हें मत न काय मान्य मज?
हेही तदर्थ जमले; माझा तों यापरी असे समज. ६४
तद्धेतु स्पष्ट दिसे कीं भाषा ही स्वकीय तारावी।
निजमार्गींचीं विघ्नें सहकारित्वें समग्र वारावीं. ६५
सहकारित्वें सहसा श्रम झाले विफल तों न कोणाचे।
दीर्घोद्योग विलोकुनि सिद्धि पुढें मूर्त येउनी नाचे. ६६
शास्त्रें विविध लिहुनियां आजवरी वाढलीं जशीं जगतीं।
निजभाषायानातें झडकरि देतील झटुनि शीघ्रगती.६७
इतिहास सर्व शोधुनि हरितिल त्याचा अपूर्णतादोष।
निश्चय पहा तयांचा नलगे त्यांवरि करावया रोष.६८
काव्यें निसर्गसुंदर तेविं दुजीं भूषणोत्तमीं खचित।
रमविति रसिकांस अशीं कविवृंद सृजील हा पहा खचित॥
भाषेचें राष्ट्राचें व्यंग असें एक तों न राहील।
येऊं पुनरपि तेव्हां उभयांची दृष्टि सर्व पाहील. २७०
भाषा श्रेष्ठ जगीं ज्या त्यांची देतील हे हिला पदवी।
मद्वाणी न वृथा ही केवळ जगदीश मन्मुखें वदवी.७१
हें थोर पर्व आजी हीच महाराष्ट्रवाङ्मयजयन्ती।
आम्हीहि म्हणों 'एते सत्कृतिनो लेखका भुवि जयन्ति.' "
यापरि आशीर्वचनें कृपामृताची करोनियां वृष्टी।
मार्ग क्रमावयाला पुढला मग फिरविली तिहीं दृष्टी.२७३

☞ या अंकांतील ३१३ पासून ३५२ पृष्ठांतील निबंध आणि कविता साहित्यसंमेलना- साठीं आलेल्यापैकीं होत.

विविधज्ञानविस्तारच्या जून महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झालेलें

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचें चरित्र. [किंमत ६ आणे.]

" देशी विदेशी वर्तमानपत्रांतून व मासिकांतून त्यांच्या जीवनक्रमाचें वर्णन देणारे लहान मोठे लेख आजपर्यंत अनेक प्रसिद्ध झाले.....त्या सर्वांत रा. गणपतराव अभ्यंकर यांनीं लिहिलेल्या या लेखास अग्रस्थान देणें जरूर आहे.....रा. अभ्यंकर यांचा हा चरित्रपर लेख प्रत्येकानें एकदां अवश्य वाचावा अशी आमची सर्वांना आग्रहाची सूचना आहे." —ज्ञानप्रकाश, ४-७-१५

* * *

"रा. रा. अभ्यंकर यांनीं हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीचें आणि गोपाळरावांच्या काम- गिरीचें फारच मार्मिकपणानें विवेचन केलें आहे. त्यांतील गोडी मधलींच तुटक वाक्यें देऊन कळणार नाहीं. त्याला तें सर्व जशाचें तसें वाचलें पाहिजे. कोणत्या बिकट परिस्थितींत गोपाळरावांना काम करावें लागलें याची कल्पना रा.रा. अभ्यंकरांच्या निबंधावरून चांगली येते."—इंदुप्रकाश ५-७-१५

* * *

"ना. गोखले यांचें जीवनचरित्र, 'सार्वजनिक व खासगी गुण, यांविषयीं माहिती देऊन रा. अभ्यंकर स्वस्थ राहिली असते तर बरें झालें असतें....रा.अभ्यंकर यांच्या मतानें हिंदुस्थानांत चार पक्ष आहेत:--१ सत्ताविध्वंसक, २ क्रांतिकारक, ३ जहाल व ४ नेमस्त. पहिल्या म्हणजे सत्ता- विध्वंसक पक्षासंबंधानें रा.अभ्यंकर स्वतःच सदर्हू निबंधांत ह्मणतात:—ब्रिटिशसरकारच्या सत्तेमुळें या वर्गाचा बहुतेक नायनाट झाला आहे. दुसऱ्या म्हणजे क्रांतिकारक वर्गासंबंधानें ते म्हणतात:— यांची ओळख सार्वभौम सरकारास चांगली असल्यामुळें या वर्गाचाही बहुतेक बींमोड झाला आहे.... रा.अभ्यंकर यांच्या मताप्रमाणें सत्ताविध्वंसक व क्रांतिकारक लोकांचा ब्रिटिशसरकारच्या सामर्थ्यानें 'बींमोड' व 'नायनाट' झाला आहे.मग सदर्हू लोकांच्या नामनिर्देश करण्याची काय जरूर होती?" —संदेश, ८-७-१५

* * *

....गोपाळरावांची वास्तविक योग्यता व त्यांनीं बजाविलेल्या देशसेवेचें स्वरूप योग्य रीतीनें लक्षांत यावयास हा लेख अत्यंत साहाय्यभूत होईल. ह्यांत लेखक विनाकारण कोठें जहाल झालेले नाहींत, किंवा गोपाळरावांवर कोरड्या स्तुतिस्तोत्रांचा त्यांनीं वर्षावही केलेला नाहीं. सर्व विवेचन त्या थोर विभूतीच्या देशसेवेस साजण्यासारख्या गांभीर्यानें केलें असून कोठेंही वस्तुस्थितीचा विपर्यास केलेला नाहीं....गोपाळरावांचा जिवंत जागृत देशाभिमान, त्यांचा स्वार्थत्याग, त्यांची देशहिताची तळमळ, त्यांची सत्यनिष्ठा, त्यांचें मनौदार्य, ह्या सर्वांची अत्युत्तम कल्पना हा लेख करून देतो."

-सुबोधपत्रिका, १८-७-१५

विविधज्ञानविस्तार आणि सरस्वती.

"विविधज्ञानविस्ताराच्या गेल्या महिन्याच्या अंकांत कित्येक चांगले लेख आले आहेत....सौ. कमळाबाईसाहेब आपल्या लेखनव्यवसायानें सर्व सुखवस्तु व सुशिक्षित स्त्रियांस चांगला धडा घालून देत आहेत. एकंदरींत विस्तार दिवसेंदिवस आपुल्या कीर्तींत भर घालीत आहे असें आह्मांस वाटतें. ह्मणून सौ. कमळाबाईंनीं याच अंकांत 'सरस्वती' मासिकाइतकें सुंदर मासिक मराठींत नाहीं याबद्दल प्रदर्शित केलेल्या दिलगिरीबद्दल थोडें आश्चर्य वाटतें. सरस्वती हें हिंदी मासिक चांगलें आहे खरें; परंतु त्यांतील लेख नेहमी उच्च प्रकारचे असतात असें आह्मांस वाटत नाहीं. त्यांत चांगलीं चित्रें येतात हें खरें आहे, तथापि विस्तारासारख्या मासिकांतील उच्च प्रकारच्या लेखांची तें मासिक बरोबरी करीत नाहीं असें आह्मांस वाटतें." —सुबोधपत्रिका, १५-८-१५.

आर्यमहौषधालय मु॰ पो॰ आजर्ले.

कोकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्धरामबाण औषधें.

पूर्ण रक्तशोधक, अत्यंत पौष्टिक, चित्तोत्साहक, बुद्धिकांतिवर्धक, सुवर्णमाक्षिक -मौक्तिक-कस्तुरी, प्रवालादिमिश्रत अपूर्व गुटिका.

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग. संधिबातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूल, इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग ताबडतोब दुरुस्त होऊन चित्तात्सोहबुद्धि आणि कीर्ति वाढते, अंगात परिपूर्ण शक्ति येते; शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्मान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिज्ञेचें औषध होय. यामुळें याचे लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून अधिक घेणारास टपालखर्च माफ. त्यांच्या आंत घेणारास ट.ख. वेगळा ४ आणेप डेल. ३२ गो॰ १ रु॰; ७० गो॰२ रु॰; १६० गो॰ ४ रु॰; २६० गो॰ ६ रु॰ आणि ५२० गो. १० रुपये.

थंडगार नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदुकाच वगैरे डोळ्यांचे एकंदर विकार ताबडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. डबीस १॥ रुपया.

कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल—यानें कानांचे सर्व प्रकारचे व्रण आणि तत्संबंधीं इतर विकार त्वरित बरे होतात. बाटलीस १ रुपया.

दंतरक्षक पूड—ही दांत व हिरडया यांचे सर्व विकार तत्काळ दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. डबी ६ आ.

गजकर्ण, खरूज, नायटे इ. विकार ३ दिवसांत बरे होतात ड. ६ आ.

विंचवाचें विष—हें औषध चोळतांच उतरतें. तें ४० मनुष्यांस पुरतें. ड. ८ आणे

हिमज्वरावर वस्ताद औषध—पाळीचे हट्टी ताप तीन दिवसांतच बरें करितें. डबीस १ रु.

पटकी व इतर जुलाब-दोन तीन गोळ्यांनीं अगदीं जलद बरें होतात. ड. १ रु.

सुरंगी, मालती, कल्हार, राजविलास, लक्ष्मीविलास, पुष्पराज इ॰ बादशाही अति उंची उत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरें सुगंधी अत्तरें आणि केशांस लावण्याची हरएक प्रकारचीं सुवासिक तैलें पूर्ण खात्रीचीं माफक दरानें मिळतील.

सूचनाः—वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्याचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला म्हणून त्याचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. ढोंगी लोकांच्या बनावट औषधाविक्रयीं ग्राहकांनीं फार सावध असावें. औषधें माहितीचे खर्चासह रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं, प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री विवलकर, वैद्य.

मु॰ पो॰ आंजर्ले, ता॰ दापोली, जि॰ रत्नागिरी.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक १.

श्रीकृष्णचरित्र आणि रा. वाकसकर.

माझ्या श्रीकृष्णचरित्रावर रा. विनायक सदाशिव वाकसकर यांनीं एक परीक्षणात्मक लेख आगष्ट १९१५ च्या विस्तारांत लिहिला आहे. त्यासंबंधानें कांहीं उत्तर मजकडून यावें असा पुष्कळांचा अभिप्राय दिसल्यावरून मी हें लहानसें उत्तर पाठवीत आहें. टीकात्मक लेखांत आलेली स्तुति तेवढी मान्य आणि निंदा अथवा आक्षेप तेवढा अमान्य, असा साधारण मनुष्यस्वभाव आहे, त्यास अनुसरून माझी मनःस्थिति झाली असल्यास नवल नाहीं. तथापि "प्रस्तुत ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे, यांतील भगवद्गीतापर्व गोड, सुसङ्गत आणि अध्ययनार्ह आहे आणि उपसंहार विद्वत्ताप्रचुर आणि तौलनिक पद्धतीचा आहे" हा अनुकूल अभिप्राय रा. वाकसकर यांनीं नमूद केल्याबद्दल त्यांचे आभार मानून, त्यांनीं जे आक्षेप आपल्या लेखांत घेतले आहेत त्यांजबद्दल थोडक्यांत माझें उत्तर मी पुढें देत आहें. आक्षेप व उत्तर वाचून निर्णय विस्ताराच्या वाचकांनीं करावयाचा आहे.

२. रा. वाकसकर लिहितात कीं, भारत, रामायण, आणि हरिवंश या तीन ग्रंथांच्या आधारें हें पुस्तक लिहिलें आहे, पण यांच्या मदतीला जैमिनी अश्वमेध हा ग्रंथ घेतला असता तर प्रस्तुत चरित्र अधिक मनोरंजक झालें असतें. पण जैमिनि अश्वमेधाची किंमत इतिहास अथवा आर्षकाव्य यांच्या दृष्टीनें अगदींच कमी आहे ही गोष्ट रा. वाकसकर विसरतात. भारत, भागवत, हरिवंश यांच्या शेजारीं बसण्यास हा ग्रंथ योग्य नाहीं. यांतील भाकडकथा नीतिदृष्टयाही महत्त्वाच्या नाहींत. श्रीकृष्णचरित्राविषयींच्या भ्रान्त आधुनिक कल्पनांनीं ग्रासलेल्या एखाद्या पुराणिकानें तो लिहिला आहे असें मी समजतों, सबब हा ग्रंथ मीं जमेस धरला नाहीं.

३. श्रीकृष्ण परमेश्वरी अवतार होता हें गृहीत धरून मीं हा ग्रंथ लिहिला आहे ही गोष्ट खरी आहे. पण श्रीकृष्णाचीं मानवी कृत्येंच आपल्यास उपदेशार्ह आहेत असें मीं स्पष्ट म्हटलें आहे, आणि जागजागीं चमत्कारात्मक भाग कमी केला आहे अथवा सरळ केला आहे. आतां प्रत्येक ठिकाणीं चमत्कारांचें ऐतिहासिक स्वरूप करून दाखविलें नाहीं. कारण, वाचकांस तें सहज करतां येण्यासारखें आहे, आणि त्याची दिशाही याच

ग्रंथांत दिसून येण्यासारखी आहे. रा. वाकसकर लिहितात (पा. ३०४) कीं, विवेचकता व अन्धश्रद्धा यांचें या ग्रंथांत मिश्रण झालें आहे. परंतु माझ्या मतें तसें झालें नसून विवेचकतेचाच या ग्रंथांत जास्त अवलंब केला गेला आहे. ही गोष्ट अनेक वाचकांसही मान्य झाली आहे. माझ्याकडे जे कित्येक अभिप्राय आले आहेत त्यांतील एक उतारा मी येथें देतों म्हणजे हें माझें म्हणणें वाचकांच्या प्रत्ययास येईल. प्रो. कुळकर्णी, एम्. ए. (ग्वालेर), हे लिहितात—" As a representative of modern intellectualism you have, in your rapid but dignified summary of the doings of the great Avatar, swept off your path, much of the miraculous which sounds ludicrous in our ears, making us more sceptical and weaning us further away from the uplifting influence of this gigantic personation of Truth and Destiny." प्रो. कुळकर्णी यांचा हा अभिप्राय मनन करण्यासारखा आहे. श्रीकृष्णाच्या चरित्राचें खरें रहस्य त्याचीं चमत्काररूपी कृत्यें नव्हत हें मीं ठिकठिकाणीं वाचकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला आहे; आणि यामुळेंच हा पूर्णपरमेश्वरी अवतार आपणांस अधिक प्रिय आणि पूज्य झाला आहे. आतां सर्वच चमत्कार पुस्तकांतून काढून टाकले असते किंवा सरळ करून दाखविले असते तर बरें झालें असतें असें कदाचित् रा. वाकसकर म्हणतील. पण ही गोष्ट वारंवार करून दाखविणें चरित्रात्मक लेखांत योग्य नाहीं. कारण त्यामुळें रसभंग होतो. असें करणें Riddle of the Ramayana सारख्या टीकात्मक ग्रंथांतच शक्य व क्षम्य आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. शिवाय भारत, भागवत, हरिवंश यांत जे चमत्कार वर्णिले आहेत त्यांतील ठळक ठळक गोष्टी गाळणें म्हणजे या ग्रंथांत श्रीकृष्णचरित्र कसें गाइलें आहे याची वाचकांस ओळख न करून देणें आहे. श्रीकृष्णाचें गोवर्धनधारी रूप किंवा कालियामर्दन करणारें रूप जर वाचकांस कधींच माहित झालें नाहीं तर तें चरित्र अपुरें आणि नीरस होईल. या चमत्कारांचा निर्गम कसा करावयाचा हें प्रत्येक सुजाण वाचकास शक्य आहे. चमत्कार कधीं होतच नाहींत असा माझा समज नाहीं. 'चमत्कारा'वरील माझा लेख विस्तारांतच* प्रसिद्ध झाला असून त्यांत मीं आपलीं मतें स्पष्टपणें मांडलीं आहेत. धार्मिक सिद्धांत मनावर ठसविण्याकरितां किंवा अन्य उत्कट कारणाकरितां चमत्कार क्वचित् प्रसंगीं घडतात असें माझें मत आहे. विश्वरूपदर्शन, किंवा द्रौपदीवस्त्रपरिधान, किंवा परीक्षितजीवन, असे कांहीं चमत्कार श्रीकृष्णानें केले असें मी मानतों. एरव्हीं वाशिंगटनप्रभृति नरशिरोमणि आणि श्रीकृष्ण यांत अंतर काय ? पण चमत्कार हें श्रीकृष्णचरित्राचें रहस्य नव्हे, हें श्रीकृष्णानेंच परीक्षितास जिवंत करतांना आपल्या अपूर्व प्रतिज्ञेनें सुचविलें आहे. 'जर मी कधींही असत्य बोललों नसेन, जर मी रणांगणांतून पळालों नसेन, जर मला धर्म आणि धर्मात्मे प्रिय असतील, तर त्या पुण्यानें (माझ्या ईश्वरी सामर्थ्यानें नव्हे) हा मृत बाल जिवंत होवो' अशी श्रीकृष्णानें शाश्वत नीतिविवर्धक अपूर्व शपथ यावेळीं केली हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

* पुस्तक ४४, अं. ६ । ७.

४. असो. या मुद्द्यासंबंधानें एवढें लिहिणें पुरे आहे. प्रत्येक आक्षिप्त चमत्काराबद्दल निरनिराळें लिहिण्याची जरूरी नाहीं. आतां दीर्घायुष्याबद्दल घेतलेल्या आक्षेपाकडे वळूं. रा. वाकसकर लिहितात, प्राचीनत्व हें आयुष्यदीर्घत्वाचें लक्षण मानण्यास हरकत नाहीं असा माझ्या म्हणण्याचा अर्थ आहे. शिकंदराच्या वेळीं जर १२० वर्षांच्या वयाचीं माणसें हिंदुस्थानांत दिसलीं तर त्याच्याही २॥ हजार वर्षांपूर्वी जरासंधासारखे ऐशींच्या वर्षीं मल्लयुद्ध खेळणारे, किंवा वसुदेवासारखीं १५० वर्षांचीं माणसें असणें शक्य आहे, असें मीं म्हटलें आहे. याजवर रा. वाकसकर म्हणतात, या गणितानें "हजारों वर्षांचें आयुष्य नाकारतां येणार नाहीं व रामाच्या पूर्वीं विश्वामित्राची साठ हजार वर्षांची तपश्चर्या प्रमाण मानण्यास हरकत नाहीं." ही जी कोटी रा. वाकसकर यांनीं केली आहे तिला उत्तर एवढेंच कीं, हा गणिताचा प्रश्न नसून इतिहासाचा आहे. माझ्या म्हणण्याचें तात्पर्य मुद्दाम वेडांत न शिरणाऱ्या वाचकांच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. साठ हजार वर्षांचें आयुष्य अनैतिहासिक आहे. वेदांतही, 'शतायुर्वै पुरुषः' म्हटलें आहे. साधारणतः मनुष्याची वयोमर्यादा १०० वर्षें आहे. पण स्वास्थ्य, निष्काळजीपणा, निरोगी हवा आणि सुबत्ता यामुळें आयुष्य वाढतें. हल्लीं हिंदुस्थानदेश पूर्ण व्यापलेला असून मनुष्यसंख्या अतिशय वाढली आहे. शिकंदराच्या वेळेस जमीन मुबलग असून मनुष्यसंख्याही कमी होती असें दिसतें. तेव्हां हल्लींसारखा जीवनकलह तीव्र नसून अन्नाची विवंचना कोणासच नव्हती. अशावेळीं १२० वर्षांचीं माणसें हिंदुस्थानांत दिसलीं. याहीपूर्वी २॥ हजार वर्षांच्या सुमारें, **आर्यलोक हिंदुस्थानांत प्रथम आले** तेव्हां, देश सुपीक व नवीन वसतीचा, हवापाणी चांगली, लोकांत जोम नवीनपणाचा, अशा अनेक अनुकूल कारणांनीं आर्यलोकांची येथें अत्यंत भरभराट झाली, ही गोष्ट उपसंहारांत मीं दाखविली आहे. अर्थात् श्रीकृष्णकाळीं ऐशींच्या वर्षीं मल्लयुद्ध खेळणारे किंवा १५० वर्षांचे म्हातारे हिंदुस्थानांत दिसले तर नवल नाहीं. ह्यापूर्वी **दहा हजार** वर्षें गेलीं म्हणजे चौपट आयुष्य, असा गणिताचा प्रश्न येथें उत्पन्न करून रा. वाकसकर वेड्यांत शिरतात किंवा मला घालूं पाहतात याचें आश्चर्य वाटतें.

५. कांहीं महत्त्वाच्या गोष्टी मीं गाळल्याबद्दल रा. वाकसकर लिहितात, व त्या हेतुपुरःसर गाळल्या नसल्यास दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं सामील करण्याची मला सूचना करतात. पण या गोष्टी मीं मुद्दाम गाळल्या आहेत, कारण त्यांचा संबंध या कथेशीं नाहीं, किंवा त्या भाकड आहेत. उदाहरण, बळरामरेवती-विवाहकथा भाकड आहे आणि श्रीकृष्णचरित्राशीं असंबद्ध आहे. हीच गोष्ट शिष्टाईच्या वेळच्या विश्वरूपदर्शनाविषयीं होय. भीष्मांनीं दोनदां शस्त्र धरलें किंवा जरासंधानें १८ वेळां पलायन केलें ह्या गोष्टी कोणासही अतिशयोक्तीच्या वाटतील. शिवाय खऱ्या धरल्या तरी एकदां सांगितल्या म्हणजे पुरे असें कोणीही कबूल करील. श्रीकृष्णाची दुर्योधनानें केलेली निंदा या ग्रंथांत मुद्दाम घेतली नाहीं. कारण हा विषय वादग्रस्त असून रसहानि करणारा आहे. सौतिकपर्वांतील कत्तल

झाल्यावर दुर्योधन ती ऐकून मेला ही भारतांतील कथा पूर्वकथेशीं विरोधी म्हणून सोडली आहे. अश्वत्थाम्यास एका भीषण योद्धयाशीं शिबिराच्या तोंडीं युद्ध करावें लागलें हीही कथा असंभाव्य व गाळण्यासारखी आहे. कर्णाचें रथचक्र ब्राह्मण-शापामुळें भेगेंत गेलें ही कथा भारतांत आहे, पण ती मीं घेतली नाहीं. कारण ती कथा भाकड-कथेसारखी आहे. सारांश, असंभाव्य कथा मीं किती गाळल्या आहेत आणि त्या गाळण्या-सारख्या मानल्या आहेत, ही गोष्ट रा. वाकसकर यांणींच यादीसह दिली आहे. याजवरून माझा कल सरळ संभाव्य गोष्ट देण्याकडे किती आहे हें त्यांनींच सिद्ध केलें असून अन्धश्रद्धेचा आरोप मात्र मजवर ठेवूं पाहतात आणि या गोष्टी चरित्रांत सामील करण्याचा आग्रह रा. वाकसकर करतात, तेव्हां आश्चर्य नव्हे काय? पानपतच्या मैदानांत भेग मुळींच दिसत नाहीं असें मीं 'दुर्दैवी रंगू' या कादंबरींत वर्णन केलें आहे त्याशीं विरोध येतो म्हणून ब्राह्मणशापानें भेग उत्पन्न झाली असा रा. वाकसकरांचा अभिप्राय दिसतो. पण एवढ्याचकरितां ब्राह्मणशापाची गोष्ट द्यावयास नको. पानपतचें मैदान खरो-खरच गर्तरहित आहे. पण दुर्दैवानें एखाद्या ठिकाणीं गवतानें आच्छादलेली भेग अपवादा-त्मक असणें अशक्य नाहीं; आणि म्हणूनच कर्णाचें दुर्दैव मानावयाचें. एरव्हीं शल्यासारखा कृष्णतुल्य कुशल सारथी भेग वांचवल्यावांचून राहताना. पण जेथें कधीं भेग यायचीच नाहीं अशी दृढ समजूत, अशा ठिकाणीं अदृष्ट भेग असून त्यांत रथचक्र अडकलें, ही कर्णाची मृत्युदशा म्हटली पाहिजे. त्याला ब्राह्मणशापाचें रूप दिलें आहे तें न घेतलें तरी चालेल, असें माझ्याप्रमाणें वाचकांसही वाटेल. सारांश, हा आक्षेपाचा भाग रा. वाकसकरांची उलट अंध-श्रद्धा दाखवतो. असो. सात्यकी हा अर्जुनाचा गुरुबंधु नसून शिष्य होता ही वाकसकरांनीं दाखविलेली माझी चूक मला मान्य आहे, व त्याजबद्दल मी त्यांचा आभारी आहें. भीमानें मारलेला अश्वत्थामा हत्ती पांडवांकडील सैन्यां-तीलच होता असें भारतांतील खालील श्लोका-वरून दिसतें:—

> ततो भीमो महाबाहुरनीके स्वे महागजम् ।
> जघान गदया राजन्नश्वत्थामानमित्युत ॥
> परप्रमथनं घोरं मालवस्येन्द्रवर्मणः ॥

परपक्षाकडील असला तरी ही महत्त्वाची बाब नव्हे.

६. असो. आतां शेवटील एका महत्त्वाच्या मुद्द्यासंबंधानें उत्तर देऊन हा विवादात्मक असल्यानें वाचकांस अर्थात् कंटाळवाणा वाटणारा विषय आटोपूं. हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा असून त्यासंबंधानें थोडें जास्त विवेचन करणें जरूर आहे. परंतु तेंही मी संक्षेपेतःच करतों. हा मुद्दा म्हणजे श्रीकृ-ष्णचरित्रावरील एक महत्त्वाचा आक्षेप होय. श्रीकृष्णाची नीति कुटिल होती असा पुष्क-ळांचा समज आहे. श्रीकृष्ण म्हटला म्हणजे गोपींशीं व्यभिचार करणारा किंवा भीष्मद्रोणा-दिकांस कपटानें मारणारा असा आपला गैर-समज फार प्राचीन कालापासून चालत आला आहे. पण हा समज भ्रान्त, चुकीचा व भारता-नंतरचा, असा माझा ठाम अभिप्राय असल्यानें मीं हें चरित्र मुद्दाम लिहून श्रीकृष्णाचें चरित्र श्रीरामचरित्राप्रमाणें उदात्त व अनुकरणीय आहे हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. तो कितपत

सिद्धीस गेला आहे हें रा.वाकसकरांनीं सांगितलें आहे. प्रारंभींच ते लिहितातः "श्रीकृष्णाचें चरित्र श्रीरामचरित्राप्रमाणेंच शुद्ध व निष्कलंक आहे हें या पुस्तकानें उत्कृष्ट रीतीनें सिद्ध केलें आहे." पण पूर्वोक्त जुन्या कल्पनेनें रा. वाकसकर अद्याप ग्रासलेले असल्यानें हें वाक्य ते पुढें विसरले आणि श्रीकृष्णाच्या कुटिल नीतीसंबधानें आक्षेप घेऊन घसरले. श्रीकृष्णाची प्रत्येक कृति पूज्य किंवा सत्यानुसारी होती हें त्यांस मान्य नाहीं. "ज्याप्रमाणें मिश्र सुवर्णांतून हीन धातु गाळणें (जरूर असतें) त्याप्रमाणें अशुद्ध भाग गाळून बाकीचें दग्धसुवर्णरूप चरित्र प्रमाण धरून त्या विभूतीस पूज्य मानणें कोणासही कमीपणा आणणारें नाहीं." असें लिहून भीष्म, द्रोण, भूरिश्रवा, भगदत्त, कर्ण, दुर्योधन हे सर्व कपटी युद्धानें श्रीकृष्णानें मारवले असें त्यांनीं म्हटलें आहे व शेवटीं " श्रीकृष्णाची युद्धनीति कुटिल असतांना तीच न्यायाची म्हणणें श्रीकृष्णविषयक अत्युत्कट भक्तीचें लक्षण होय" अशा शेरा मारला आहे. (पा. ३०३), मीं तर श्रीकृष्णचरित्र शुद्ध बावनकशी निष्कलंक सोनें म्हणून वाचकांपुढें ठेविलें आहे; आणि तें तसें शुद्ध व निष्कलंक **सिद्ध** झालें आहे असें रा. वाकसकरांनीं कबूल करून, पुढें हेंच सोनें गाळलें पाहिजे किंबहुना कित्येक कसानें बिघडलेलें आहे असें ते म्हणतात, याला काय ह्मणावें ? भीष्मद्रोणांच्या वधासंबंधीं माझें लिहिणें वकीली समजून न्यायाधीश वकीली करूं लागले म्हणजे कसे घसरतात याचें तें उदाहरण होय असें रा. वाकसकर म्हणतात. पण शब्दाला प्रतिशब्द या न्यायानें मीं जर येथें असें म्हटलें कीं, भलताच मनुष्य न्यायाधीशाचें काम करूं लागला म्हणजे तो कसा घसरतो याचें येथें उत्कृष्ट उदाहरण आहे तर तें वावगें होईल काय ? परीक्षणलेख म्हणजे एक फैसला अथवा निर्णयपत्र मानलें तर प्रारंभीं निर्णयांत श्रीकृष्णचरित्र शुद्ध व निष्कलंक आहे हें सिद्ध झालें आहे असें कबूल करून, शेवटीं अशुद्ध भाग—तोही बराच मोठा भाग—गाळून चरित्र शुद्ध करून घेतलें पाहिजे असें प्रतिपादन करणें म्हणजे न्यायाधीशाचें घसरणें नव्हे तर काय ?

असो. याचा दोष मुख्यतः रा.वाकसकरांचा नाहीं, हा आपल्या परम्परागत चालत आलेल्या दृढ समजुतीचा आहे. या समजुती जातां जातां जातील. श्रीकृष्णानें गोपींशीं अश्लाघ्य वर्तन केलें नाहीं असें मीं आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे, व तेथें व इतरत्र याचीं कारणेंही सविस्तर दिलीं आहेत. तथापि ही समजूत जातां जातां जाईल. त्याचप्रमाणें श्रीकृष्णानें भीष्मद्रोणादिकांशीं जें कूटयुद्ध केलें असें वाटतें तें कपटयुद्ध नव्हे, तें नीतिदृष्ट्या गर्ह्य नव्हे, हेंही मीं या पुस्तकांत बरेंच विस्तारानें दाखविलें आहे. द्रोणवधाच्या प्रसंगीं धर्मराज खोटें बोलला, पण हें खोटें बोलणें केबेकच्या लढाईच्या वेळीं इंग्रज कॅप्टन खोटें बोलल्याप्रमाणेंच क्षम्य व न्याय्य होतें, ही गोष्ट मीं विस्तरतः दाखविली आहे. ही माझी वकीली आहे असें रा वाकसकरांस वाटतें. पण या गोष्टीचा सूक्ष्म विचार केला पाहिजे. सत्य बोलण्याच्या सामान्य नियमास कांहीं अपवाद आहेत असें सर्व नीतिशास्त्र—'पाश्चात्य व पौर्वात्य'—सांगतें. चोराशीं सुद्धां खरें बोलावें असें कोणीही प्रतिपादन करणार नाहीं. जर्मन पाणबुड्या बोटी ज्याप्रमाणें हल्लीं अन्यायानें पाहिजे त्या गलबतास—मग त्याजवर निरपराध निःशस्त्र माणसें का असेनात—खुशाल टार्पिडोनें बुडवीत आहेत, त्याचप्रमाणें अनस्त्रविदांस अस्त्रानें मारणाऱ्या अधर्मप्रवृत्त द्रोणाशींही खरेंच बोललें पाहिजे असें नीतिशास्त्र सांगणार नाहीं. हा विषय

अतिसूक्ष्म आहे. अशा अपवादक प्रसंगीं धर्माधर्मनिर्णय करणें फार कठिण आहे. आणि श्रीकृष्णचरित्राचें काठिण्य याच कारणानें वाढलें आहे. श्रीरामचंद्रासमोर अपवादक प्रसंग फारच थोडे आले, पण श्रीकृष्णचरित्रांत अशा अपवादक परिस्थितीचे प्रसंग पुष्कळदां आले असल्यानें अनीतीचा व कपटाचा तेथें भास होतो; व भ्रान्त कवींनीं व नकली हरदासांनीं श्रीकृष्णाच्या चरित्रांत उघड उघड खोटे कपटी वर्तनाचे प्रसंग अनेक कल्पून लोकांच्या गैरसमजुतींत भर घातली आहे. 'अहिंसा सत्यमस्तेयं' इत्यादि परमधर्मास कांहीं अपवादक स्थळें आहेत, ही गोष्ट सर्व देशांत व सर्व लोकांत–किंबहुना कायद्यांतही–मान्य आहे. खुनाला इंडियन पीनल कोडमध्यें जे अपवादक प्रसंग सांगितले आहेत तेच या सिद्धान्ताचीं उत्कृष्ट उदाहरणें होत. मनुष्यास स्वसंरक्षणाचा अधिकार आहे, व त्याकरितां तो दुसऱ्याचा खूनही करूं शकतो. पण अपवादाच्या मर्यादा कडकडीत पाळल्या पाहिजेत, ह्या गोष्टीकडे पुष्कळदां दुर्लक्ष होतें. स्वतःच्या जिवावर बेतली असतां स्वरक्षणार्थ मनुष्य खून करूं शकतो; पण तो हक्क जोंपर्यंत जिवावर बेतली आहे तोंपर्यंतच असतो, तसेंच गुन्हा करणारांस नसतो, इत्यादि गोष्टी येथें लक्षांत ठेविल्या पाहिजेत. सारांश, अपवादाच्या मर्यादा लक्षांत न राहिल्यानें पुष्कळांनीं भाकडकथा रचून श्रीकृष्णानें ज्या अपवादक प्रसंगानें अहिंसादि मुख्य नियमांस सोडलें आहे त्याचा विचार न करतां भलत्या भलत्या गोष्टी कित्येक ग्रंथांतरीं वर्णिल्या आहेत, त्यांचा येथें निषेध करणें योग्य दिसतें. असो. हा विषय जास्त लांबवण्यांत तात्पर्य नाहीं. श्रीकृष्णचरित्रांत जें विवरण आहे त्यानें ज्याचें समाधान झालें नाहीं त्याचें समाधान होणें शक्य नाहीं. भीष्म व द्रोण या दोघांच्या प्रसंगाचें मी विवेचन केलें आहे; भूरिश्रवादिकांचे मरणप्रसंगीं विस्तरभयास्तव तें केलें नाहीं. तथापि भूरिश्रव्याचा, निःशस्त्र झालेल्या सात्यकीस ठार मारण्याकरितां उगारलेला, सशस्त्र हात अर्जुनानें दुरून बाणानें तोडला, तेव्हां भूरिश्रव्यानें व कौरवपक्षीय मंडळीनें अर्जुनाची निंदा केली; त्यावेळीं अर्जुनानें जो जबाब दिल्याचें वर्णन भारतांत आहे तो जबाब जशाचा तसा मी येथें देतों, म्हणजे व्यासाचें म्हणणें वाचकांच्या समोर आल्यानें यथायोग्य निर्णय करण्यास वाचकांस सोईवार पडेल.

एवं रथगजाकीर्णे हयपत्तिसमाकुले ।
स्वैः परैश्च समेतेभ्यः सात्वतेन च संगमे ।
एकस्यैकेन हि कथं संग्रामः संभविष्यति ॥
यो यस्य युज्यतेर्थेषु स वै रक्ष्यो नराधिप ।
मम सर्वेपि राजानो जानंत्येव महाव्रतम् ।
न शक्यो मामको हन्तुं यो मे स्याद्बाणगोचरे ॥
आत्तशस्त्रस्य हि रणे वृष्णिवीरं जिघांसतः ।
यदहं बाहुमच्छेत्सं न स धर्मो विगर्हितः ॥
न्यस्तशस्त्रस्य बालस्य विरथस्य विवर्मणः ।
अभिमन्योर्वधं तात धार्मिकः को न पूजयेत् ।
एतत्पार्थस्य तु वचः ततः श्रुत्वा महाद्युतिः ।
यूपकेतुर्महाराज तूष्णीमासीदवाङ्मुखः ॥

व्यासानें दिलेलें हें प्रतिपादन आहे, माझें नव्हे. तें मननीय आहे, आणि एकंदरींत श्रीकृष्णचरित्राचें रहस्य व धर्माधर्मनिर्णय अपवादक प्रसंगीं कसा होत असतो याचा सूक्ष्म विचार जगतासमोर मांडणारे महर्षि व्यास ज्यांना पूज्य आहेत त्यांस श्रीकृष्णाचें चरित्र याही बाबतींत शुद्ध व निष्कलंक आहे असें वाटेल. असो. विस्ताराच्या वाचकांस तसदी दिल्याबद्दल माफी मागून व या बाबतींत शेवटीं वाचकांवर निर्णय सोपवून हें उत्तर पुरें करतों.

चिंतामण विनायक वैद्य.

कै० गंगाधर रामचंद्र मोगरे.

[पृथ्वीवृत्त.]

जना सुखवि देउनी परिमला सदा मोगरा
सुकाव्य-सुमगंध दे सतत हा तसा **मोगरा** ।
स्त्रिया कुतुहलें शिरीं सुमन-माळ ती घालिती
तसा कुसुमहार हा रुचिर काव्यदेवीप्रती ॥ १ ॥

कवित्वरचना बहू सुगम गोड शब्दावली
वहात सरिता जणूं सहज शांत ती चालली ।
प्रसाद–प्रतिभायुता दिसत ही कवीची सुता
विवाहसमयीं जशी धनिकजाच सालंकृता ॥ २ ॥

नवीं अमित भूषणें करित कौतुका घालुनी
तिच्याविण न विश्रमा स्थल जयास रात्रंदिनीं ।
पिता त्यजुनि आज तो अहह जाइ स्वर्गाप्रती
म्हणूनि कविता रडे दिसत खिन्न बाला अती ॥ ३ ॥

विहार करि वाङ्मयीं निशिदिनीं सुकाव्यांतरीं
सुपद्यसुम अर्पुनी रसिक तोषवी अंतरीं ।
अहा प्रभुवरा तया हरिसि कां अकालीं त्वरें ?
सुविद्य गुणि मानवा नवल आयु नोहे पुरें ॥ ४ ॥

फुलें मधुर गुंफुनी **विविधज्ञानविस्तार** हा
सुशोभित करावया बहुत यत्न यांचा पहा ।
रचीत कविता बहू सुरस काव्य **वृंदे**परी
तशी **अभिनवा** दुजी मधुर रम्य **कादंबरी** ॥ ५ ॥

सुशिक्षित गुणी खरे तिळ नसे अहंता मनीं
जनोद्धृति-परिश्रमीं असति गुंग रात्रंदिनीं ।
कुणीहि लघुकाव्य त्यां रचुनियां जरी दाविती
करीत अति गौरवा कधिं न त्यास धिक्कारिती ॥ ६ ॥

[शार्दूलविक्रीडित.]

जासी सोडुनि आज तूं विधिबलें आप्तांस बंधूप्रती
झाल्या शून्य दिशा तशी भ्रमित हो ही खिन्न माझी मती ।
द्यावें **राम**-सुता अतां सुगतिला ही प्रार्थना ईश्वरा
स्वर्गीं सौख्य घडो चिरंतन विभो सन्मान्य **गंगाधरा** ॥ ७ ॥

सौ. लक्ष्मीतनया.

" प्रेमाचें अद्वैत. "

बोल ऐकतां प्रेमाचे ॥
तत्त्व कळे अद्वैताचें ! ॥

उमजविण्या जें तत्त्व जनीं ॥
तत्त्वज्ञहि गेले थकुनी ! ॥
दिव्य शारदा विविध गुणीं ॥
झटे विशद करण्या अजुनी ! ॥
पटल भ्रमाचें जननयनीं ॥
कां दिसतें तरिही अजुनी ? ॥
विविधवृत्तिचे लोक जनीं ॥
विविध मतें त्यांचीं म्हणुनी. ॥

ॐ ॐ ॐ

मनोवृत्तिंच्या आवर्ती ॥
सुखदुःखाच्या वा गर्ती ॥
स्वर्गधरेचा भिन्नपणा ॥
सहज विशद हो अज्ञमना. ॥
सुखासनीं बसतां कोणी ॥
सौख्यपूर्ण मानी अवनी ॥
परंपरा दुर्दैवाची ॥
कवटाळी ज्यातें त्याची ॥
मती त्याच अवनीविषयीं ॥
" दुःखपूर्ण " ऐशी होई ! ॥

परिस्थितीचा भिन्नपणा ॥
सुलभ करितसे द्वैत जना ॥

ॐ ॐ ॐ

विकट अशा मार्गामधुनी ॥
अद्वैताचें तत्त्व जनीं ॥
समजावुनि सर्वां देणें ॥
न प्रेमाविण कुणि जाणे ! ॥
जनीं विजनिं वा राजगृहीं ॥
असो मनुज कोठें कुणिही ॥
प्रीतीच्या साम्राज्याचा ॥
नागरीक असतो साचा ! ॥

प्रेमाच्या तालावरती ॥
सर्व जीव नर्तन करिती ! ॥

ॐ ॐ ॐ

हिंस्रपणाच्या विशद गुणे ॥
हिंस्रकोटि जनता जाणें ॥
त्रिगुणान्वित मानवकोटी ॥
सहज दूर त्यातें लोटी ! ॥

हा नैसर्गिक भिन्नपणा ॥
सहज शिकवितो द्वैत जना ॥

परि वात्सल्यें हीं दोन्ही ॥
एकरूप जाती बनुनी ! ॥
प्रेमाच्या साम्राज्याचे ॥
भक्त असति दोघे साचे ! ॥

प्रेमकिरण हृदयीं शिरुनी ॥
द्वैततमा टाकी हरुनी ! ॥

ॐ ॐ ॐ

सिंहासनिं प्रेमाभावीं ॥
औदासीन्य कुणी दावी ॥
भयद विपत्तीच्या गर्ती ॥
कुणि प्रेमपूजा करिती ! ॥
सुखासनीं कंटक रुतती ॥
दुखःकर्दमीं सौख्य अती ॥
गमे कुणा; कारण याचें ॥
प्रेम एक जगतीं साचें ! ॥
प्रेम-हेतु रविच्या भंवतीं ॥
फिरे निरंतर सृष्टि सती ! ॥
तोल तिचा सांभाळोनी ॥
तोहि तिला घे वागवुनी ॥
अनंत हे ग्रह गोल कसे ॥
पहा जाहले प्रेम-पिसे ! ॥
एक रवीविण अन्य कुणी ॥
जाणति ते लवही न मनीं ॥
अद्वैताचा हा बाणा ॥
सहज लाजवी मनुजांना ॥

ममत्व जातां विलयाला ॥
दिव्यपणा ये प्रेमाला ॥

ॐ ॐ ॐ

मानवतेचा पूर्णपणा ॥
असेल दाखविणें कोणा ॥
प्रेमरूप त्यानें व्हावें ॥
अद्वैता उमजुनि घ्यावें ॥

के. मा. सोनाळकर.

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक १०

पुस्तकपरीक्षा.

" परमार्थ विचारमाला. "

परमार्थविचारमालेंतील प्रस्तुतचा ग्रंथ 'गोविंदसुत' यांनीं लिहून राजश्री दत्तात्रय परशुराम चिंचाळकर वकील, अंमळनेर, यांनीं प्रसिद्ध केला आहे. ही लेखमाला पूर्वी 'मुमुक्षु' वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली असून, तींतील पुष्पें एकत्र गुंफून ग्रंथरूपानें आतां तीं वाचकांपुढें आलीं आहेत. वर्तमानपत्रांतील लेख लेखकाच्या हौशीखातर पुन्हां छापून ग्रंथद्वारा आपल्या वाचकांना अर्पण करण्याची पद्धति वाचकांचे दृष्टीनें फारशी हितावह होते, असें वाटत नाहीं. याचें कारण उघड आहे कीं, क्षणैक परिणाम करणारे, घाईघाईनें व विस्कळित तऱ्हेनें लिहिलेले वर्तमानपत्रांतील लेख चिरकालीन वाङ्मयांत राहण्यास सर्वस्वी अयोग्य असतात. कांहीं थोडेसे लेख त्या त्या विषयांचा विचार करून लिहिलेले असतात, हें खरें; परंतु ते लिहितांनाच पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा लेखकांचा विचार असतो. असे अपवादात्मक लेख वगळले, तर बाकीच्या बहुतेक लेखांबद्दल उपरिनिर्दिष्ट सामान्य नियम खरा ठरतो. आमच्या मतें रा० चिंचाळकर यांनीं 'गोविंदसुता'चे लेख पुन्हा छापण्याची निष्कारण तसदी घेतली. वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होण्याच्या लायकीचे सुद्धां सदरहू लेख आहेत, असें आम्हांस वाटत नाहीं. लेखांत प्रतिपादन केलेल्या विषयाबद्दल लेखकांचा व वाचकांचा मतभेद होणें असंभवनीय नाहीं, व प्रत्येक माणसाला आपणास वाटतील तीं मतें प्रतिपादन करण्याचा पूर्ण हक्क आहे, अशी आमची समजूत आहे. परंतु लोकांनीं आपले लेख वाचावे अशी जर लेखकांची इच्छा असेल, तर लेखकांवरही एक मोठी जबाबदारी असते; ती त्यांनीं विसरतां कामा नये. लिहिण्यांत संगति पाहिजे; शब्दांचे अर्थ ठरले पाहिजेत; आपण जें कांहीं म्हणतों तें दुसऱ्याला स्पष्ट समजलें पाहिजे; आणि इतकेंही करून विषयांतर किंवा पाल्हाळ या दोषाचा स्पर्श लेखांस होऊं देतां कामा नये. इतकें ज्यांचे हातून होण्यासारखें नसेल, त्यांनीं लेखनाच्या भानगडींत पडूं नये असें आम्हांस वाटतें. 'गोविंदसुतां'च्या लेखांत वर सांगितलेले सर्व दोष पूर्णपणें वसत असून,गुण पाहतां अल्पही मिळेल

किंवा नाहीं, ह्याबद्दल आम्हांस वानवाच आहे. आम्ही म्हणतों याचा प्रत्यय ज्यांनीं मननपूर्वक हा ग्रंथ वाचण्याचा प्रयत्न केला असेल, त्यांस पावलोपावलीं आल्यावांचून राहिला नसेल. कांहीं अर्थ नसतांना पुष्कळसे शब्द वापरून भराभर लेख रेखाटण्यांत कांहीं गुण असेल, तर मात्र तो 'गोविंदसुतां'त आहे, असें म्हणावें लागेल. अशा रीतीनें लिहिलेल्या शून्यार्थ लेखांनीं परमार्थप्राप्ति कशी व्हावी, हें एक गूढ आहे. मग सद्गुरुकृपेनें हीही असंभवनीय गोष्ट घडून येत असल्यास.नकळे.

या लेखमालेचा प्रतिपाद्य विषय म्हटला म्हणजे सद्गुरुबोधावांचून आत्मज्ञान कदापि होणार नाहीं; व शमदमादि सर्व साधनांची याता-यात करणें ती ज्ञानोत्तर केली पाहिजे. हे दोन सिद्धांत प्रतिपादन करण्याकरितांच 'गोविंद-सुतां'नीं हातांत लेखणी धरली आहे. ह्या दोन्ही कल्पना परमार्थज्ञानप्राप्तीविषयीं आज-पर्यंत जी लोकांची समजूत आहे, त्या समजुतीशीं विसंगत आहेत हें जरी खरें असलें, तरी त्याबद्दल 'गोविंदसुत' यांस आम्ही फारसा दोष देत नाहीं. कारण, मागें सांगि-तल्याप्रमाणें, कोणासही आपलीं मतें आपल्या मनांतच विरघळूं न देतां तीं जगापुढें मांड-ण्याचा पूर्ण अधिकार आहे. तथापि वाचकांची अशी अपेक्षा असते कीं, लेखकांनीं आपल्या विशिष्ट मताच्या समर्थनार्थ योग्य प्रमाणें देऊन त्या मतांच्या बद्दल वाचकांची खात्री पटवावी. परंतु असा कांहींएक प्रकार 'गोविंदसुतां'नीं केलेला नाहीं. दासबोधांतील कांहीं वचनांचा उल्लेख केला आहे हें खरें; पण पाठीमागील व पुढील उतारे न दिल्यामुळें व त्या आधारांचा स्वतंत्र व सर्वांगपूर्ण विचार कोठेंच न केल्या-मुळें वरील आक्षेपाचें महत्त्व यत्किंचितही कमी होत नाहीं. सद्गुरूची व्याख्या केलेली नाहीं, व सद्गुरुबोध म्हणजे काय, हेंही सांगित-लेलें नाहीं. पण गुरूच्या हाताची व शिष्याच्या मस्तकाची गांठ पडणें, आणि गुरूनें शिष्याचे कान फुंकून कायनू बायनू हितगुजाची गोष्ट सांगणें, (पान १६४ व १८२) ह्यापलीकडे सद्गुरुबोधाची कल्पना 'गोविंदसुतां'नीं आपल्या वाचकांस करून दिलेली नाहीं. शिवाय तेंही कायनू बायनू "गुह्यात् गुह्य" असल्या-मुळें सांगणें शक्य नाहीं. मग त्याचें परीक्षण कोण कसें करणार? तसेंच मुख्य विषय आनु-षंगिकरीत्या मांडला आहे; व कर्म, आचार, प्रारब्ध इ. आनुषंगिक विषयांचें पाल्हाळानें वर्णन केलें आहे. पण शास्त्रोक्त विवेचन कर-ण्याच्या मार्गाचें अवलंबन जेथें केलें नाहीं, तेथें अशा प्रकारचे दोष राहणें अगदीं स्वाभा-विक आहे. "सद्गुरुबोधानें परमार्थप्राप्ति" ह्या दोन शब्दांतच या मालेचें सार आहे. (उपो-द्घात पा. २२ पहा) व ह्याच गोष्टीची पुन-रुक्ति ग्रन्थकर्त्यांनीं ठिकठिकाणीं केली आहे. (पा. ११,१५,१६७). सद्गुरुबोधानें आत्म-ज्ञान झाल्यानंतर मनुष्यानें कर्म,उपासना, इत्या-दिकांच्या नादीं लागावें, असें 'गोविंदसुतां'चें आग्रहाचें म्हणणें आहे. पण ज्ञान झाल्यानंतर— म्हणजे अद्वैताचा साक्षात् अनुभव आल्यावर— पूजा, अर्चा, भक्ति, उपासना, कोणीं कोणाची करावी, हें समजणें कठीण आहे. परंतु 'गोविं-दसुत' ज्ञान कशाला म्हणतात आणि ज्ञानी

कोणाला समजतात, हें जोंपर्यंत स्पष्ट सांगत नाहींत, तोंपर्यंत त्यांच्या मतांचें खंडन करण्याचा प्रयत्न व्यर्थ होय. इतकें सामान्यतः सांगून ह्या ग्रन्थांतील दोषांचें आविष्करण जास्त विस्तृत रीतीनें करणें अवश्य आहे.

आपण मागें काय लिहिलें आहे ह्याची ग्रंथकाराला विस्मृति वारंवार होत असल्यामुळें, हा ग्रंथ म्हणजे विसंगत उक्तींचें एक आगरच होऊन बसला आहे. "हा बोध अतींद्रिय, गुप्त, गुह्य असला तरी तो बुद्धिग्राह्य आहे" (प्र.पा.२३). आतां बुद्धि हें इंद्रिय नव्हे काय? इंद्रियांमध्यें बुद्धीची गणना आम्हीं करीत नाहीं, असा खुलासाही 'गोविंदसुतां'नीं केलेला नाहीं. उलट ५ व्या पानावर 'मनबुद्धि अगोचर। न चले तर्काचा विचार ॥' हें जें श्रीसमर्थांचें वाक्य दिलें आहे, त्यावरून हें ज्ञानें बुद्धिग्राह्य नाहीं, असें त्यांसही वाटत असावें. तर मग हें अतींद्रियज्ञान बुद्धिग्राह्य आहे, ह्या म्हणण्याला कांहीं अर्थच नाहीं. 'कारण बुद्धीच्याही पलीकडचा तो विचार आहे,' असें स्पष्ट सांगून [पा. ११२), शिवाय आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ "यो बुद्धेः परतस्तु सः" ह्याही वैदिक वाणीचा ग्रंथकर्त्यांनीं आश्रय केला आहे. (पा. ११५).

२५ व्या पानांत कर्मावर लिहीत असतां, श्रद्धा डोळस असते, प्रेम अंध असतें, (श्रद्धा अंध नसते) असें विधान ग्रंथकर्त्यांनीं केलें आहे. पण पुढें पा. २४७ वर श्रद्धा दोन प्रकारची असते—एक अन्ध व दुसरी डोळस—असें त्यांनींच श्रद्धेचें वर्गीकरण केलें आहे.

त्याचप्रमाणें २१४ पृष्ठावर, कर्म झालें कीं फल बोकांडीं बसलेंच, असा अपवादरहित सिद्धांत ठोकून दिला असून, २१२ पानावर करणीय कर्मानें कर्माची निवृत्ति होऊन निष्कामता होते, असेंही सर्वांशीं विसंगत विधान केलें आहे.

लिहिण्याच्या ओघांत, पूर्वी काय लिहिलें ह्याचें विस्मरण झाल्यानें अशा चुका होतात, हें म्हणणें अंशतः खरें आहे. मुख्य कारण लेखकाचे विचार मूळांतच अस्पष्ट अथवा गढूळ असतात, हें होय. ह्याचा परिणाम असा होतो कीं, लिहिणारा आपणही गोंधळतो व वाचकांसही बुचकळ्यांत पाडतो. असलीं असंख्य उदाहरणें ह्या पुस्तकांतून काढून देतां येतील.

पहिल्याच पानावर पहिल्याच वाक्यांत ग्रन्थलेखकानें सर्व गोंधळ उडवून दिला आहे. "सत्कार्यारंभीं कर्मांगरूपी देवतांना स्मरणपूर्वक वंदन करण्याचा शिष्टसांप्रदाय आहे. यास्तव मी प्रथमतः मातापितरांना वंदन करतों." ह्या वाक्यांत ग्रन्थकर्त्यांनीं कार्यकारणभाव कसा जोडून दिला आहे, ह्याचा ब्रह्मदेवालाही उलगडा होणार नाहीं. आईबाप ह्या कर्मांगरूपी देवता आहेत असें 'गोविंदसुतां'चें म्हणणें असेल, असें आम्हांस वाटत नाहीं. कार्यारंभीं आईबापांना व घरांतील इतर वडील माणसांना नमस्कार करतात तो कर्मांगरूपी देवता म्हणून करीत नसून, वडिलांचा आशीर्वाद मिळून कार्यसिद्धि व्हावी, ह्या हेतूनें करतात.

वस्तुप्राप्तीनंतर साधनांची आवश्यकता असतेच, ह्या आपल्या म्हणण्याला आधार म्हणून 'गोविंदसुतां'नीं समर्थांचें वचन दिलें आहे. परंतु समर्थ साधकाचीं लक्षणें सांगत आहेत, ज्ञान्याचीं सांगत नाहींत, इतकी

साधी गोष्ट 'गोविंदसुतां'च्या लक्षांत आली नाहीं. "उपदेशिलें आत्मज्ञान। तुटलें संसार-बंधन ॥ दृढतेकारणें करी साधन। या नांव साधक ॥" (पा. १५). साधकाला साधनांची जरूरी आहे, एवढेंच जर लेखकाचें म्हणणें असतें, तर त्याबद्दल वादच नव्हता. परंतु साधकाप्रमाणें सिद्धालाही साधनांची गरज आहे, असा ग्रन्थकर्त्यांचा सिद्धांत आहे.(पा.२०६)

अस्ताव्यस्त विचार करण्याची दुष्ट खोड ही लेखकापेक्षांही वाचकांना विशेष नडते. प्रारब्ध व प्रयत्न ह्यांचा विचार करीत असतां दुसऱ्याच्या कृतीनें आणि ईश्वरी अगर सृष्टिप्रकोपानें आपणांस दुःख भोगावें लागतें, ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे; व हें दुःख भोगणें मनुष्याचें कर्तव्य आहे असें ग्रन्थकर्ते सांगतात. पण वाचक यावेळीं अशी पृच्छा करतो कीं, स्वाभाविक आहे वगैरे सर्व गोष्टी ठीक आहेत; पण त्याचा प्रारब्धाशीं कांहीं संबंध आहे काय? व असेल तर तो कसा आणि किती? वस्तुतः हाच प्रस्तुत विषय असून, दुसऱ्याकडून आपणांस दुःख भोगावें लागतें तें स्वाभाविक आहे अगर अस्वाभाविक आहे, हें सांगणें अप्रासंगिक आहे. सारांश, 'गोविंदसुतां'ना शास्त्रीय दृष्टीच कमी आहे असा आम्हांस संशय येतो. आणि प्रारब्धालाच संचित म्हणून जें त्यांनीं म्हटलें आहे त्यावरून हा संशय अधिकच दृढ होतो.

'संत व त्यांचे ग्रंथ'ह्या प्रकरणांत हृदयस्थ परमात्म्याला शरण गेलें असतां देवाच्या कृपेनें आपणांस ज्ञानाची नवी विरूढी फुटून आपण देवरूपच होऊं, असें एक विधान केलेलें आहे. पण येथें अशी शंका येते कीं, ज्या सद्गुरूचें प्रस्थ 'गोविंदसुतां'नीं ह्या ग्रन्थांत माजविलें आहे, त्या गुरूच्या साहाय्यावांचून देवाच्या कृपेनें ज्ञानप्राप्ति होईल असें त्यांचें म्हणणें आहे काय? कीं अगोदर देवकृपा आणि मागून सद्गुरुकृपा असा ते क्रम लावतात? अथवा देवकृपा आणि सद्गुरुकृपा एकच आहे असें ते मानतात? देवालाच ते गुरु समजतात, असें त्यांच्या ह्याच कलमांतील शेवटच्या वाक्यांवरून दिसतें; आणि हें जर खरें असेल, तर परमेश्वराच्या कृपेवांचून आत्मज्ञान होणार नाहीं असें त्यांनीं स्पष्ट कां म्हणूं नये? शिवाय दुसरी एक शंका अशी उद्भवते कीं, शरीरधारी गुरूची कृपा अपेक्षित असेल, तर संसाराला कंटाळून विरक्त झालेल्या माणसाची व सद्गुरूची जर भेट झाली नाहीं तर त्या माणसाला आत्मज्ञान होण्याला कांहीं उपाय नाहींच काय? अथवा उत्कटता असली कीं गुरुप्राप्ति व्हावयाचीच? पण ह्या प्रश्नांचीं उत्तरें 'गोविंदसुतां'नीं कोठें दिलेलीं नाहींत.

ग्रन्थकर्तृत्व म्हणजे सवंग सौदा, परसांतील भाजी का आहे?--असा एक प्रश्न गोविंदसुतांनीं ह्या मालेंत केला आहे. तोच प्रश्न उलट आम्ही 'गोविंदसुतां'स करण्याचें धाष्ट्यं करतों. ग्रन्थ लिहिणाराचा विचारप्रवाह **गढूळ** असतां कामा नये. परंतु तो तसा असेल तर नुसत्या शब्दसंग्रहानें वाचकाला अर्थबोध न होतां उलट मस्तकशूल होण्याचा संभव असतो.

वरील म्हणण्याच्या स्पष्टीकरणार्थ याच प्रकरणांतून आणखी एक उतारा घेऊं. 'संतांचे ग्रन्थ हे शब्दांनीं गुंफलेले दिसतात. परंतु ते शब्द नसून सर्व खुणा आहेत.' (पान १२७).

आतां ह्या वाक्याचा सरळ अर्थ म्हणजे, संतांच्या ग्रन्थांत सांकेतिक भाषा वापरलेली असते; म्हणजे जो शब्दांचा लौकिक अर्थ असतो, त्याहून भिन्न अर्थ संतांनीं वापरलेल्या शब्दांत असतो. अर्थात् संतांच्या ग्रन्थांत कोड-टेलिग्रामासारखीच भाषा असते म्हणावयाची! परंतु हें विधान वस्तुस्थितिदर्शक तर नव्हेच, पण स्वतः लेखकालाही तो अभिप्राय संमत असेल असें वाटत नाहीं. सांकेतिक किंवा खुणेचे शब्द असतात, म्हणजे त्या शब्दांत महत्त्वाचा अर्थ असतो, एवढेंच सांगण्याचा ग्रंन्थकर्त्याचा आशय असावा असें दिसतें. " भक्त ऐसे जाण, जे देहीं उदास। गेले आशापाश तुटोनियां" ह्या भक्ति शब्दाचें ह्रद्गत किंवा रहस्य समजलें पाहिजे असें 'गोविंदसुतां'चें म्हणणें आहे, व हें आम्हांलाही मान्य आहे.परंतु ह्रद्गतें किंवा रहस्य म्हणजे चिन्ह अथवा संकेत नव्हे. त्याचप्रमाणें "पुढें सद्गुरूच्या मेखा ठोकलेल्या असतात त्या गुरुअंजनाशिवाय दिसत नाहींत" (पा. १२९) असें सांगून आपण लगेच त्या मेखांचें उद्घाटन करून वाचकांस दाखवितात. 'देवाचिया द्वारीं उभा क्षणभरी,' 'रूप पाहतां लोचनीं' ह्यांतील अनुक्रमें 'देव' आणि 'रूप' हे शब्द म्हणजे महावाक्यच होत, असें म्हणणें म्हणजे संतांच्या शब्दांचा एक निराळाच कोश असतो,व तो संतांनीं आपल्याचजवळ गुप्तपणें ठेविला आहे असेंच म्हणणें नव्हे काय? ह्याप्रमाणें गढूळ विचारसरणी ह्या ग्रन्थांत पदोपदीं अनुभवास येते. तसेंच ह्या संतांच्या ग्रन्थांची मोड समजली, तरी आत्मज्ञानाला सद्गुरूची आवश्यकता आहे कीं नाहीं, याचाही खुलासा ग्रन्थकर्त्यांनीं कोठें केलेला नाहीं.

दुसरें उदाहरण '**सदाचार**' प्रकरणांतलें घेऊं. "नित्यनियमानें स्नानसंध्यादि सत्कर्में करीत असल्यानें शारीरिक तेज वाढतें, चित्तशुद्धि होते.........पण त्याच कर्मांत जर स्वात्मानुभूतीचा प्रबोध असेल, तर किती मौज होईल बरें? म्हणून सत्कर्मीं रत झालें पाहिजे, म्हणजे कर्माभिमान जडणार नाहीं." (पा. २२५।२२६) ह्या वाक्यांत 'स्वात्मानुभव' अगर 'ज्ञान' ह्याऐवजीं 'सत्कर्म' शब्द वापरलेला दिसतो. अथवा ज्ञानावांचून केवळ सत्कर्म करण्यानें परमलाभ होत नाहीं, असें सांगण्याचा हेतु असतांही अखेरीस सत्कर्मीं रत झालें पाहिजे म्हणून ग्रंथकार लिहितात. ह्याला काय म्हणावें हेंच आम्हांस समजत नाहीं. शिवाय सत्कर्मीं रत झाल्यानें कर्माभिमान कसा सुटणार? ज्ञानपूर्वक कर्म केल्यानेंच तो सुटण्याचा संभव असतो. "अन्तःस्नानविहीनस्य बहिःस्नानेन किं फलम्। अन्तर्बहिश्च शुद्ध्यर्थं ज्ञानस्नानं तु मोक्षदम्।" हें जें प्रमाण ग्रंथकारांनीं दिलें आहे, तेंही सत्कर्मीं रत होण्याच्या उपयोगीं पडण्याजोगें नाहीं.

असल्या असंबद्ध विचारांचे व भाषेचे मासले एक का दोन किती सांगावे? निवड कशी करावी हेंच मोठें कोडें आहे. आम्ही म्हणतों त्याची प्रतीति वाचकांना प्रायः प्रत्येक पृष्ठावर येईल. वाक्याचा आरंभ एका कल्पनेंत होतो तर अन्त दुसऱ्याच कल्पनेंत जातो. ह्यामुळें वाचकांचा विरस होतो; व एकेक वाक्य पुनः पुनः वाचूनही शेवटीं समज पडत नाहीं तो नाहींच. दृष्टांत चुकीचे, अनुमानें चुकीचीं, व कार्यकारणभावही चुकीचा. पान

२३२ पहा. त्यांत खालील वाक्य आढळून येईल. "पदाच्या अर्थाच्या शब्दानें जर पदार्थाचा बोध होतो, तर भगवंताच्या अर्थाच्या नामानें भगवंताचा बोध होईल, यांत नवल काय ?" मनुष्याला शब्दोच्चाराबरोबर पदार्थाचा बोध होतो, ही गोष्ट खरी. परंतु त्याला शब्द कळण्याच्याही अगोदर पदार्थाची ओळख झालेली असते. शब्दाचा आणि पदार्थाचा संबंध त्याला मागून समजतो. म्हणून भगवन्नामासंबंधानें हा दृष्टांत कसा लागू पडावा ? परमेश्वराची ओळख माणसाला झालेली नसते, यास्तव इतर पदार्थांचा तद्वाचक शब्दानें अर्थबोध झाला, तरी ईश्वराचा यथार्थ बोध केवळ नामोच्चारानें होईल असें आम्हांस वाटत नाहीं. आतां, ग्रंथकारांनीं दुसऱ्या ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें, ज्याला आत्मप्रतीति झाली नाहीं, तो भगवन्नाम कसें घेणार ? ह्या म्हणण्यांत जरी तथ्य नसलें, तरी तें निदान समजण्याजोगें आहे. आत्मज्ञानाव्यतिरिक्त नुसत्या नामसंकीर्तनानें शेंकडो लोक तरून गेल्याचीं उदाहरणें पुराणांतरीं आहेत; म्हणून आत्मप्रतीतीशिवाय भगवन्नाम निष्फळ असें केवळ म्हणतां येणार नाहीं. शिवाय ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, परमेश्वराला एक कायमचा आकार नसल्यामुळें, आपआपल्या कल्पनेनुसार व आवडीप्रमाणें त्याला निरनिराळे आकार देऊन व त्या आकृतीचें चित्र आपल्या डोळ्यांसमोर ठेवून तदनुरूप शब्दांनीं ईश्वराला त्याच्या भक्तांनीं आळविला आहे; व त्या त्या रूपांनीं तो आपल्या भक्तांना प्रसन्नही झाला आहे. म्हणून भगवन्नामोच्चार फलदायी होण्यापूर्वी भगवंताचा बोध झालाच पाहिजे असें आम्हांस वाटत नाहीं.

प्रस्तुतचा ग्रन्थ वाचण्याच्या लायकीचा नाहीं हें आमचें म्हणणें अत्याग्रहाचें अगर अतिशयोक्तीचें कोणीं समजूं नये, म्हणून आणखी थोडींशीं मासलेवाईक उदाहरणें देऊन वाचकांना त्रास देणें भाग पडत आहे. **विवेकविचार** प्रकरणांत ग्रन्थकारांनीं खालील उद्गार काढले आहेत. "कित्येकांची अशी समजूत आहे कीं, ज्ञानी झाला म्हणजे तो व्यवहाराच्या कामाला निरुपयोगी होतो." हा समज समर्थांच्या वाणीनें खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. "प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण। प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थीं खोटा ॥" आतां प्रपंचांत जो प्रामाणिक व दक्ष असेल तोच परमार्थाला टिकेल, ह्या समर्थांच्या उक्तीवरून त्याच्या उलट सिद्धांत—म्हणजे परमार्थ ज्यानें आपलासा केला, त्याला प्रपंच चांगला साधलाच पाहिजे—बांधतां येणें शक्य नाहीं, ही गोष्ट शाळेंत जाणाऱ्या लहान मुलासही समजली पाहिजे. असें असून तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयावर दुसऱ्यास उपदेश करूं पाहणारांच्या ती लक्षांत येऊं नये हें आश्चर्य नव्हे काय ? अशा रीतीनें हवा तो सिद्धांत हवा त्याला सिद्ध करतां येईल. ज्ञानी मनुष्य प्रपंचाला निरुपयोगी होतो कीं नाहीं, हा मोठा वादग्रस्त प्रश्न असून, ह्या एकाच प्रश्नाचें विवेचन ग्रंथकारांनीं साधकबाधक प्रमाणें देऊन केलें असतें, तरी तेवढ्यामुळें सुद्धां हा ग्रंथ वाचनीय झाला असता.

'**देवाचा शोध**' या प्रकरणांत 'देवाला आवाहन करून त्याची जड-चंचल-निश्चलात्मक मूर्तींत स्थापना करावयाची, ती खरी स्थापना प्रथम आपल्या हृदयांतच करावयाची असून बाहेर मूर्ति

पुढें ठेवणें, हें केवळ निमित्तमात्र आहे" असें एक वाक्य आहे (पा. ३०३।३०४). यांत निश्चलात्मक मूर्ति याची स्पष्ट कल्पना ग्रंथकर्त्यालाच नीटशी नाहीं असें दिसतें. निश्चल म्हणजे निर्गुण असें त्यांनींच पृष्ठ २ मध्यें म्हटलें आहे; व पान ३०८ वर "निश्चल देव तो निराकार" हें श्रीसमर्थांचें वाक्य दिलें आहे. तेव्हां मूर्ति आणि ती निराकार हें व्हावें कसें? यावरून "गोविंदसुत" यांना दासबोध अगर ज्ञानेश्वरी हे ग्रंथ समजले नाहींत असें म्हणणें प्राप्त येतें. निश्चल ह्याचा स्पष्ट अर्थ समर्थांनीं दिला असून सुद्धां ज्यांना तो समजत नाहीं, त्यांनीं संतांच्या ग्रंथांतील सांकेतिक शब्दांचा स्फोट करण्याचें साहस करावें, हें जरा चमत्कारिक नव्हे काय? असो.

वरील उदाहरणांवरून शास्त्रीय विषयाचा शास्त्रीय पद्धतीनें ऊहापोह करण्याची पात्रता ग्रन्थकर्त्यांत कितपत आहे, हें वाचकांनींच ठरवावें. विचारदोषांप्रमाणें भाषादोषही ह्या ग्रन्थांत सांपडावयाचे नाहींत, असें नाहीं. पहिल्याच पानावरील दुसरें वाक्य पहा. "देवतावन्दनानें तें सत्कर्म निर्विघ्नपणें परिसमाप्तीस जाऊन त्याला प्रोत्साहन मिळतें व तें कल्याणप्रद होतें." हें वाक्य वस्तुत: "देवतावन्दनानें सत्कर्मास प्रोत्साहन मिळून तें निर्विघ्नपणें परिसमाप्तीस जातें व कल्याणप्रद होतें" असें असावयास पाहिजे होतें. कारण परिसमाप्तीनंतर प्रोत्साहन कशाला मिळणार?

१६१ पृष्ठावर खालील वाक्य आढळतें:-

"संतकृपेचा उदय अन्त:करणांत होऊन हृदयस्थ प्रकट झाल्याशिवाय सर्व खटपटी व्यर्थ आहेत." ह्यांत संतकृपेचा उदय कोणाच्या अन्त:करणांत व्हावयाचा? गुरूच्या कीं शिष्याच्या? हें कळत नाहीं. संतकृपेचा प्रकाश अन्त:करणांत पडून हृदयस्थ प्रकट झाल्याशिवाय सर्व व्यर्थ आहे,-असें म्हणण्याचा तर ग्रन्थकाराचा हेतु नसेलना?

"देवाला देव मानून व मायेला मिथ्या कल्पून देवाप्रीत्यर्थ म्हणून जीं कर्में करतों तीं पारमार्थिक होत." असें एक वाक्य पा. २१७ मध्यें आहे. ह्यांत मायेला मिथ्या कल्पून ह्याचा अर्थ काय करावयाचा? "संसार मिथ्या कल्पून" असें म्हटलें असतें, तर वाचकांला कांहीं बोध झाला असता. अशा भाषादोषांचा प्रभाव सदोष विचारसरणीपासूनच आहे असें आम्हांस वाटतें.

शब्दश्लेषाची अगर शब्दांशीं खेळण्याची ग्रन्थकाराला मोठी हौस असल्याचें दिसतें, व शब्दांबरोबर वाहात जाऊन अर्थहानि करण्यासही ते मागेंपुढें पाहत नाहींत. एक दोन उदाहरणांनीं ही गोष्ट व्यक्त करतां येईल. प्रस्तावनेच्या पृष्ठ ९ मध्यें "मानवदेहांतील पुरुष ज्याला क्षेत्रज्ञ म्हणजे शेतकरी म्हणतात" व "पंचभूतात्मक पिण्डब्रह्मांडरचना हा एक पांच काण्ड्यांचा 'प्रपंचरूप ऊंसच होय." झालें, ऊंस आणि शेतकरी ह्या दोन शब्दांवरून 'गोविंदसुत' कोठें वाहात गेले हें पाहणें मोठें मजेचें आहे, म्हणून पुढील वाक्यें आम्ही खालीं देतों:-

"उत्तम शेती, मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ नोकरी, हा न्याय जसा व्यवहारांत तसाच परमार्थांतही लागू आहे. कर्म-उपासना-ज्ञानानें कसून मेहनत करून परमात्मतत्त्वसार संपादन करणें ती उत्तम शेती; नुसतीच देवाची करुणा भाकून लागलीच प्रसन्नता मागणें, म्हणजे देवाण घेवाण करणें, हा मध्यम व्यापार

होय; आणि उठला सुटला आपली सेवा करावयाची, मग होईल तें होवो, याशिवाय विचार नाहीं, ती कनिष्ठ नोकरी होय."

देवाशीं कोणत्याही प्रकारचा मोबदला न मागतां कांहीं झालें तरी त्याची सेवा करीत राहणें ह्यास कनिष्ठ नोकरी कसें म्हणतां येईल, हें आम्हांस समजत नाहीं. परंतु फायद्याकरतां देवाची स्तुति करणें ह्याचें पडलें व्यापाराशीं साम्य; वरील म्हणींत तर व्यापार मध्यम ठरविलेला; तेव्हां ग्रन्थकारांनींही देवाची निरपेक्ष बुद्धीनें सेवा करणें ही कनिष्ठ नोकरी ठरविली!

दुसरा एक नमुना आम्ही देतों, त्यावरूनही आमच्या म्हणण्याला बळकटीच येईल.

"बोधाशिवाय परमात्मदर्शन नाहीं आणि खरा बोध तर मिळेना. मग संतांचीं कांहीं वचनें पाठ होतीं, त्यांचा **आठव्यांत** केला **आठव**! आणि त्या **आठवांतच आठव्या** अवताराच्या स्वरूपाचीं लक्षणें बळेंच घेतलीं अंगावर आणि घेतली बोधाची दीक्षा! मग काय! खाड्दिशीं भवभ्रम दूर होऊन जागृति आली आणि आंतील बाहेरील केर फिटून काय काय मौज झाली त्याची विस्मृति होऊं नये म्हणून ती **आठवण आठव्यांत** लिहून ठेविली आहे, भगवंतांनीं तरी अर्जुनाला **आठव्यांतच** उपदेश केला आहे." पृ. १६

ह्या प्याराग्राफमध्यें 'आठव्या' शब्दाबरोबर ग्रंथकाराची कुस्ती मोठी मनोवेधक आहे. हाच प्रकार पुढील उताऱ्यांतही दिसून येईल.

"अशा रीतीनें ह्या **छत्तीस** तत्वांच्या **छत्तिशींतील बत्तिशींत** बसत असलेल्या सोळा स्वरांनीं सुशोभित अशा व्यंजनांच्या **छत्तिशीनें** आत्मसाक्षात्कारापर्यंत तर मजल नेली, तरी शेवटीं श्रुति सुद्धां जेथें 'नेति नेति' म्हणून स्तब्ध झाल्या, तेथें आपला कोटश्वकीटायतेचा पाड काय? म्हणून हात टेकून अखेर **सतराव्यांत** उपसंहार केला." पृष्ठ २०.

भारदस्त ग्रन्थांत अशा तऱ्हेची भाषा योजणें आमच्या मतें आक्षेपार्ह आहे. तत्त्वज्ञानावरील अगर शास्त्रीय विषयावरील ग्रन्थांत आलंकारिक भाषेचा उपयोग अप्रशस्त व अप्रयोजक होय. परंतु प्रस्तुत ग्रन्थांत अशा प्रकारची कादंबरींत साजण्याजोगी भाषा ग्रन्थकारांनीं वारंवार उपयोगांत आणिली आहे. खालीं दिलेले उतारे वाचून पहावे.

"उत्तम क्षेत्रज्ञ शेतकरी काय करतो? तर प्रथम चिपाडें आदि करून जड भाग हा कर्मकचाटीच्या चरकांतून सत्कर्मांच्या कर्ममार्गानें वेगळा करून चिद्रस तेवढा वेगळा काढतो, मग रसांतही जी नीरसपणाची पापपुण्याची मळी असते, त्याला विवेकाग्नीची आंच देऊन उपासनामार्गानें तीही काढून टाकतो, मग तो अहंसोहंरूप गूळ बनतो, त्यांतही गूढ रूपानें अहंत्वाची मळी असते ती ज्ञानाच्या उलथ्यानें काढून त्यापासून सत्पदाची साखर आणि साखरेचीही स्वात्मानुभवाची खडीसाखर खडखडीत स्वच्छ काढतो." (पा. ९).

"मायेच्या क्षेत्रांत प्रवृत्ति आणि निवृत्ति अशा दोन रमणीय बागा आहेत. प्रवृत्तीला आसुरी संपत्तीचें व निवृत्तीला दैवी संपत्तीचें खत घालून त्रिगुणांचीं आळीं केलीं आहेत. प्रवृत्तीच्या बागेंत जन्ममृत्यूंचे मधून मधून खंदक केले असून, दरम्यान पुण्यपापात्मक सुखदुःखांचा मिश्रमेवा पसरला आहे! निवृत्तीच्या बागेंत तर सगळा आनंदी आनंद! अशा चित्रविचित्र बागांची रमणीयता पाहून आम्ही सर्व त्या ठिकाणीं लुब्ध होऊन जातों. या मायेच्या क्षेत्रांत शिरलें म्हणजे प्रथम प्रवृत्तीचा बाग लागतो. त्यांत शिरण्याचा मार्ग अधोमुखी आहे. तेथें प्रारब्धसंचितक्रियमाणानुरूप सुख अनुभविण्यास मिळतें. तेथील सुखामृताचे भोक्ते कोणी संपत्तिवान् तर कोणी संततिवान्, कोणी शक्तिवान् तर कोणी सत्तावान्, कोणी श्रीमान् तर कोणी विद्वान्, कोणी प्रतिइंद्र तर कोणी प्रतिचंद्र, कोणी बृहस्पति तर कोणी सृष्टिकर्ते, कोणी तपोसिद्ध तर कोणी वाचासिद्ध, इत्यादि थाटानें सुशोभित दिसतात! ऋद्धिसिद्धिप्राप्ति, इत्यादि इंद्रपदापर्यंत या सुखाची व्याप्ति आहे. [पा. ११४.]

कर्म शब्दावर ग्रन्थकारांनीं केलेलें भाष्य वाचकांच्या बुद्धीला झिजविण्यासारखें असलें

तरी त्यांच्या मनाचें क्षणभर रंजन करील, म्हणून येथें उतरून घेण्याचें आम्ही धाडस करतों. "कर्म हा शब्द तरी मोठा मौजेचा आहे! कागदोपत्रीं ज्याप्रमाणें आपल्या नांवापुढें वडिलांचें नांव लावून आपण नामांकित होतों, तद्वतच 'कर्म' हा शब्द आहे. 'म'कारांतून जें कर्तृत्वाला येतें तेंच मुळीं कर्म. कर्तृत्व हा मकाराचा जणूं काय मुलगाच होय. मकार म्हणजे कारणदेहाची मातृका होय. कारण म्हणजे अज्ञान. एवंच अज्ञानांतून उत्पन्न झालेल्या पिंडब्रह्माण्डात्मक कर्माचा व त्याच्या पलीकडील परमात्मतत्त्वाचा विचार अज्ञानांत राहून न करतां...." [पा. ११.]

खालील वाक्यांला कांहीं अर्थ असेल तर तो कितीजणांना समजेल, हें आम्ही सांगूं शकत नाहीं. "पण अग्निदेवतेच्या योगानें त्यांच्या तेजस्वी बुद्धीनें केलेला परमात्मस्वरूपासंबंधी निश्चयत्वाचा बोध, वायुतत्त्वाच्या योगानें त्यांच्या वायुरूप मनाची स्वरूपासंबंधीं निश्चलता व दृढता, आकाशतत्त्वाच्या जाणिवेच्या अनुकूलतेनें त्यांच्यांत भरलेली स्वरूपाची व्यापकता, इत्यादि या तीन तत्त्वांच्या गुणांची जणूं काय त्यांनीं (संतांनीं) केलेले ग्रन्थ ही मूर्तीच ओतली आहे कीं काय असें त्यांचे ते ग्रन्थ पाहिले म्हणजे आपल्यास वाटतें!" [पा. १२१.]

कांहीं वकिलांना आपण होऊनच आपल्या विरुद्ध असलेले आधार कोर्टापुढें मांडण्याची खोड असते असें आम्ही ऐकत होतों, पण तो अनुभव आम्हांस ह्याच ग्रंथांत प्रथम आला. ब्रह्मज्ञान झाल्यावर सदाचार हें मनुष्याचें कर्तव्य होऊन बसतें. सर्व ऋणें फेडण्याची जबाबदारी तेव्हांच येते, इ० विपरीत सिद्धांत (पा. १९९) ज्या ग्रंथांत प्रतिपादले जातात, त्याच ग्रंथांत 'ज्ञानामृतेन तृप्तस्य कृतकृत्यस्य योगिनः। न चास्ति किंचित् कर्तव्यमस्ति चेन्न स तत्त्ववित्॥' हा श्लोक काय सिद्ध करण्याकरतां यावा हें समजणें सामान्य बुद्धीच्या आटोक्याबाहेर दिसतें. सिद्धांत एक व त्याला आधार दुसराच अशीं उदाहरणें आम्हीं मागें दिलींच आहेत. त्यांत आणखी खालील उदाहरणाची भर घालतां येईल. "नामस्मरणभक्तीचें सुख स्वात्मानुभवी पुरुषाशिवाय दुसऱ्याला काय कळणार आहे?" [पा २४०] ही गोष्ट सिद्ध करण्याला तुकारामाचा खालील अभंग देण्यांत आला आहे.

भक्तिप्रेमसुख नेणवे आणीकां।
पण्डितवाचकां ज्ञानियासि।
आत्मनिष्ठ जरी झाले जीवन्मुक्त।
तरी भक्तिसुख दुर्लभ त्यां॥

ह्या अभंगावरून ग्रंथकर्त्यांचें प्रमेय कसें सिद्ध होतें, ह्याचा वाचकांनींच विचार करावा.

पण आम्हांला येथेंच थांबलें पाहिजे. अशा रीतीनें दोषांचा पाढा असाच पुढें वाचीत राहिलों, तर पांचशें पानांच्या ग्रंथावर पंधराशें पानांची टीका व्हावयाची! म्हणून फक्त या ग्रंथांत ठिकठिकाणीं आढळणाऱ्या अपसिद्धांतांचा निर्देश करून हें परीक्षण पुरें करावें हें बरें.

(१) "अव्यभिचारी ज्ञानोत्तर भक्तींत भक्ताला कांहीं कर्तव्य राहिलेलें नसतें. तथापि एक इच्छा राहतेच कीं, ज्या सगुणभक्तीनें आपल्यास सर्वोत्तम पद मिळालें त्या भक्तींतच आपला शेवट व्हावा" (पा. १९.)

(२) जे मूर्तीची उपासना न करतां नुसत्या विचाराच्या हवेंतच ब्रह्मस्वरूपाची इमारत बनवीत असतील, त्यांची ती इमारत बिनआधारी असल्यामुळें ढासळलीच पाहिजे. (पा. ३०३).

(३) "शास्त्रें म्हणे कालानुरूप बदलतात. पण वास्तविक जें बदलणारें तें मुळीं शास्त्रच नव्हे. कालानुरूप शास्त्र बदलतें हें म्हणणें चुकीचें होय." (पा. २८६). कलियुगांत अमुक धर्म वर्ज्य आहेत, असे शास्त्रकारांनींच घालून दिलेले निर्बंध "गोविंदसुतां"च्या कानावरून गेले आहेत कीं नाहींत हें आम्हांस माहीत नाहीं.

(४) "ही दृश्यभासात्मक अखिल सृष्टि ज्या विश्वकर्म्याच्या मूळ कल्पनेंत उत्पन्न झाली, त्या विश्वकर्म्याच्या कल्पनेचाच आमची कल्पना अंश असल्यामुळें, विश्वकर्म्याच्या कल्पनेचे अनंतत्वादि सर्व गुणधर्म आमच्या कल्पनेंत उतरले आहेत." ह्यांत अनंत हा शब्द अमर्यादित, अफाट ह्या अर्थी जर वापरला नसेल, तर विश्वकर्म्याची कल्पना म्हणजे जिला माया म्हणतात ती अनादि असली, तरी अनंत नाहीं.

(५) "अक्षरामध्यें कानामात्रा वेलांटीनें दृग्गोचर होणारा स्वर काढून घेतला कीं, त्या अक्षराचे व्यंजनरूपांत पाय मोडलेच. असें कर्मउपासनेंतून ज्ञान निघालें म्हणजे संपलेंच समजा." (पा. २१०.) कर्मउपासनेव्यतिरिक्त ज्ञान लंगडें पडतें, असें म्हणणें म्हणजे ज्ञानाचा अर्थच बरोबर समजला नाहीं असें मानावें लागतें. ज्ञानोत्तर उलट कर्मउपासना आपोआपच लंगडी पडते. कारण समर्थांनींच म्हटल्याप्रमाणें चंचलावरच गोडी अगर भक्ति दृढ असेल तर निश्चलाकडील मार्ग त्या भक्ताला कधींच सांपडावयाचा नाहीं.

(६) 'सारांश मुमुक्षु, साधक व सिद्ध (ज्ञानी) ही मंडळी केव्हांही पाहिली तरी साधनमार्गांत असते.' (पा. २०६.) निष्काम कर्म करणें म्हणजे साधनमार्ग नव्हे, ही गोष्ट 'गोविंदसुतां'च्या लक्षांत यावयास पाहिजे होती. तसेंच "आपणही सिद्धपणाच्या घमेंडींत राहून साधकपण सोडून दिलें तर हातचें सिद्धपण गमावून बसावें लागेल. म्हणून आपण नेहमीं साधनांतच राहिलें पाहिजे." (पा. २००.)

"पोट दुखूं नये म्हणून उपाय करावयाचा आहे, हें लक्षांत ठेवून आपण कायावाचा-मनोभावानें साधनांतच राहिलें पाहिजे." (पा. २०१.)

आत्मसाक्षात्कार होऊन जो एकदां स्थितप्रज्ञ बनला त्याला या नश्वर विषयांची पुन्हां गोडी लागेल हें म्हणणें जरा धाडसाचें दिसतें. शिडीवरून चढून एकदां माडी गांठली म्हणजे पुन्हां खालीं यावयाचें नसेल तर, ज्या शिडीनें उच्चस्थान प्राप्त करून दिलें, त्या शिडीचें विसर्जनच केलें पाहिजे.

(७) "प्रयत्नानें इतर सर्व गोष्टी मिळतील, पण आत्मलाभाला केवळ दैवी कृपाच पाहिजे. हा लाभ प्रयत्नानें होणारा नाहीं." [पान १९०.] मनुष्याला जर कशांत कांहीं स्वातंत्र्य असेल, तर तें आत्मलाभापुरतेंच आहे. बाकीच्या या प्रकृतीच्या राज्यांतील गोष्टी सर्व कालाधीन अगर प्रारब्धाधीन होत.

(८) "संतांनीं आपल्या ग्रंथांत नानातऱ्हेच्या मौजामौजा केल्या आहेत. फावल्या त्या चेष्टा केल्या आहेत." [पा. १३२-१३३] आमच्या मतें संतांच्या ग्रंथांचें हें वर्णन

जर त्या परलोकस्थ संतांच्या नजरेस पडलें, तर, 'परमेश्वरा! असल्या चेल्यांपासून आमचें संरक्षण कर!' असेंच म्हणण्याची त्यांस पाळी येईल. निरनिराळया प्रसंगांना अनुरूप काढलेल्या उद्गारांत बाह्यत: विसंगतता दिसली, तरी फावल्यावेळीं केवळ आपल्या वाचकांच्या गमतीखातर संतांनीं असे उद्गार काढले हें म्हणणें अवास्तव होय.

याप्रमाणें या पुस्तकांत अपसिद्धांतांचें वैपुल्य आहे. ह्या सिद्धांतांना दोष देणाऱ्यावर ते कसे सदोष आहेत हें दाखविण्याची जबाबदारी आहे खरी; परंतु त्यांच्या युक्ततेबद्दल ग्रंथकाराकडूनच योग्य प्रमाणें जर आलीं नाहींत तर हे सिद्धांत खोडून टाकण्याचा व्यर्थ शीण घेण्याची इच्छा कोणाला होणार नाहीं. एकंदरींत ह्या लेखमालेबद्दल आम्हांला फारसा अनुकूल अभिप्राय देतां येत नाहीं. उलट हा ग्रंथ वाचतांना कालाचा जो अपव्यय झाला, व मन जसें त्रस्त झालें तसा मानसिक त्रास व कालापव्यय इतरांचा तरी इत:पर होऊं नये अशीच आमची इच्छा आहे.

ना. गो. चाफेकर.

ईश-कुतूहल.

(नवयुग.)

विविध कल्पना नव्या नव्या
येती ज्या ज्या दिनिं उदया
त्याच दिनांला नवें युग
म्हणती किंवा नवें जग
परंपरेनें
तेंच युग जुनें
जगहि पुराणें
केवळ शब्दच 'नवा' 'जुना'
ओळख पटवी जगन्मना. १

सतार असते तीच जुनी
तीच तिची 'दिड-दा' वाणी
प्रतिदिनिं परि वाजविणारा
नवीच म्हणतो ती मधुरा
मोद नवा तो
तयास गमतो
नित्य, भोगितो
तन्मयतेचा मधुपवन
व्यापी भंवतींचें भुवन. २

वृद्धपणा ये जिवाप्रती
उषाच नवयुग बाहे ती
ते दिन भोगाया पुढतीं
बालरूप तो घे जगतीं
सकल महीवर
पूर्वि अगोचर
वस्तु मनोहर
अधिकाधिक त्या त्या दिसती
होतो दिनिं दिनिं मोद अती. ३

विश्वोत्पत्तीपासून
पाहतसे क्षिति निरखून
भूपतिंची करितां गणती
अजवरि झाले नष्ट किती!
प्रत्येकातें
सुंदर दिसते
प्रिय ती गमते
वृद्धा म्हणुनी परि कोणी
नुपेक्षितो तिजला अजुनी! ४

साधुचरित रघुनाथाचें
लीलाकौतुक जगताचें
दिसतें ज्या ज्या तें दिवशीं
नवेंच वाटे जगतासी
दिन मावळला
पुन्हां उगवला
भेद राहिला
नवा जुना हा जगतातें
ईशकुतूहल हें गमतें. ५

आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

प्राचीन व अर्वाचीन मराठ्यांचें स्वभावैक्य.

महाराष्ट्रांत इसवी सनाच्या आरंभीं शालिवाहन वंशाचे राजे झाले, तेव्हांपासून तेराव्या शतकाचे अखेरीस यादवांचे कारकीर्दीपर्यंत हा प्रांत एतद्देशीय राजांच्या ताब्यांत होता. या सर्व राजवंशांचा कल उत्तरोत्तर मराठेमय होण्याकडे दिसून येतो. म्हणजे आधुनिक मराठे हे त्या सर्वांचें पूर्ण विकसित स्वरूप होत. हें स्वरूप उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाऊन यादवांचे वेळेस पूर्ण विकास पावलें, आणि मध्यंतरीं तीनशें वर्षांच्या मुसलमानी अमलांत दबून राहून पुनः शिवाजीच्या वेळेस प्रादुर्भूत झालें. मुसलमानी अमलांत तें स्वरूप विशेष विकृत झालें नाहीं. कौटुंबिक कलह, विसकळीत उद्योग,उत्कर्षाची व स्वतंत्रतेची हांव, दुसऱ्यांस न जुमानतां स्वतःच कोठें तरी दूर जाऊन नशीब काढण्याची प्रवृत्ति, अनिवार अडचणींतही अंगचा पीळ न गमावणें, इत्यादि बाबतींत मराठ्यांचें स्वभाववैचित्र्य जसें शिवाजीच्या वेळेस किंवा पेशवाईंत दिसून येत होतें,तसेंच तें पूर्वीच्या चालुक्यांत, राष्ट्रकूटांत किंवा यादवांत, अथवा मावळांतील देशमुखांत दिसून येतें. पूर्वीच्यांचे स्वभावगुण व स्वभावदोष उत्तरकालीन मराठ्यांत उतरलेले दिसतात. प्राचीन राजवंशांच्या हकीकती सूक्ष्मदृष्टीनें वाचून पाहिल्या म्हणजे या गोष्टी स्पष्ट कळूं लागतात.

विद्या, कला,भाषा, ग्रंथसंग्रह, धर्म, व्यापार, इत्यादि बाबतींत महाराष्ट्रसमाजाची हजार वर्षें उत्तरोत्तर उत्क्रांति होत गेली. या उत्क्रांतीचें रम्य स्वरूप यादवांचे वेळेस दृष्टीस पडतें. राज्यव्यवहारशास्त्राचे बाबतींत मात्र ही उत्क्रांति दिसून येत नाहीं. युरोपियन इतिहास व आपला इतिहास यांजमध्यें हा मोठा फरक दिसून येतो. परकीय हल्ल्यांपासून राज्याचा बचाव करण्यास काय उपाय करावे आणि समाजाचें सुख व शांति हीं कशीं साधावीं याचा विचार प्राचीन ग्रीक व रोमन राष्ट्रांनीं, तसेंच आधुनिक युरोपियन राष्ट्रांनीं करून एकप्रकारची राष्ट्रसंघपद्धति निर्माण केली. युरोपांत निरनिराळ्या लहान मोठ्या राष्ट्रांच्या बचावासाठीं त्यांचा समतोलपणा राखण्याचें तत्त्व (ज्यास balance of power म्हणतात तें) हळू हळू अमलांत आलें; आणि राष्ट्रांचे अन्योन्यव्यवहार नियमन करणारा कायदा (ज्यास International law म्हणतात तो) तयार झाला. या उपायांचा नेहेमीच उपयोग झाला असें नाहीं, तरी त्यायोगें राज्यव्यवहारशास्त्राची उत्क्रांति होत असून सर्व युरोपियन समाजास अद्यापपर्यंत त्याचा मोठा फायदा मिळत आहे. हल्लींच्या युद्धाचा अखेर हेतुही त्याच प्रकारचा आहे. या बाबतींत हिंदुस्थान व युरोप यांची स्थिति आरंभीं जवळ जवळ एक होती. युरोपप्रमाणेंच हिंदुस्थानांत अनेक लहान व मोठीं राज्यें असून त्यांचे निरंतर झगडे चालू असत. एकादा पराक्रमी राजा आला म्हणजे इतरांवर तो आपला दाब बसवी. तेणेंकरून कांहीं काळ पावेतों शांतता व लोकव्यवहार सुरळीत चालत. परंतु असा कर्तृत्ववान् पुरुष नाहींसा

झाल्याबरोबर पुनः सर्व प्रकार पूर्वस्थितीवर येत. पुलकेशी, हर्ष, भोज, विक्रमादित्य, सिंघण यादव, इत्यादि राजे महापराक्रमी झाले. त्यांच्या वेळेस विद्याकलांची भरभराट चांगली झाली. परंतु भिन्न भिन्न राज्यांच्या परस्परव्यवहारांस नियमित वळण लावून देण्याची कल्पनाच कोणाचे मनांत आलेली दिसत नाहीं. ज्या हेमाद्रीनें 'चतुर्वर्गचिंतामणि' हा धर्मसंबंधी प्रचंड ग्रंथ तयार केला त्यास राजनीतीसंबंधानें तसाच प्रयत्न करणें अशक्य नव्हतें. राजे आणि त्यांचे सल्लागार यांनीं असा प्रयत्न केला असता तर परचक्राचे वेळीं त्याचा कांहीं तरी उपयोग झाला असता. उत्तरमराठशाहीच्या वेळेसही हाच प्रकार दिसून येतो.

चार वर्णांचीं कर्में वांटलीं गेलीं, हें राजनीतिशास्त्राचा इकडे उद्भव न होण्याचें एक कारण आहे. क्षत्रियांना वाटे, लढणें व प्रजापालन करणें हेंच आपलें कर्तव्य. ज्यानें लढून पराक्रम केला नाहीं, त्याला आपलें जिणें व्यर्थ वाटे. असा समज सार्वत्रिक असल्यामुळें पुष्कळ राजे कारण नसतां, केवळ विजयलालसेनें युद्धप्रसंग सुरू करीत. 'अमोघवर्ष,' 'जगत्तुंग,' 'निरुपम,' 'प्रतापचक्रवर्ती' इत्यादि प्रचंड नांवें त्यांनीं धारण केलीं. यावरून वरील विधान खरें ठरतें. मोठें नांव मिळवायचें म्हणजे अश्वमेधयज्ञ करून. सारांश, पूर्वकालीन जे जे पराक्रमी म्हणून राजे होऊन गेले, त्यांनीं कितीही लोकोपयोगी कृत्यें केलीं असलीं, तरी दुसऱ्या राजांस आपले मांडलिक बनविण्यांत त्यांना मोठें भूषण वाटे. राज्यव्यवहारशास्त्र निर्माण करून आपली कर्तव्यमर्यादा आपण होऊन संकुचित करणें कोणासही आवडत नसे. याचा परिणाम असा झाला कीं, आपापसांत संघशक्ति उत्पन्न झाली नाहीं; आणि शिकंदर, महंमद घोरी किंवा अल्लाउद्दीन खिलजी यांचेपुढें आमचे राजे पराक्रमी असूनही हार गेले. हा प्रकार पुढील मराठशाहींतही दिसून येतो.

इ. स. ७११ त महंमद कासीमनें सिंधप्रांत जिंकिला, तेव्हां कनोज व भिनमाळ येथील गुर्जररजपूतराजांनीं ऐक्य करून मुसलमानांस सिंधप्रांतांतून हाकलून देण्याचा शेंपन्नास वर्षें सारखा प्रयत्न चालविला. पण या प्रयत्नांस दक्षिणच्या राष्ट्रकूटांनीं साह्य केलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांनीं आरबमुसलमानांशीं दोस्तीचे संबंध ठेविले. (Vincent Smith, p. 430.) आरब व्यापारी व प्रवासी सारखे शेंपन्नास वर्षें राष्ट्रकूटांचे राज्यांत येत होते. त्यांनीं त्या राज्याचीं वर्णनें लिहून ठेविलेलीं आहेत, त्यावरून राष्ट्रकूटांचें राज्य अत्यंत भरभराटींत होतें असें दिसतें. आरब लोक या राज्यास 'वल्लभ' या संज्ञेवरून 'बल्हारा' असें म्हणत.

संघशक्तीचा मुद्दा सोडून दिला म्हणजे व्यक्तिशः बहुतेक सर्व राजांस लोकप्रियतेची व कीर्तीची हौस असून, शास्त्रानें सांगितलेलीं राजांचीं कर्तव्यें तडीस नेण्यास ते सदैव तत्पर असत. लोककल्याणासाठीं आपलें जिणें आहे, आपला पराक्रम व आपली संपत्ति लोककल्याणार्थच खर्चिली पाहिजे, अशी त्यांची भावना होती. ते मोठे उदार व धार्मिक होते. 'सत्याश्रय,' 'पृथ्वीवल्लभ,' 'प्रभूतवर्ष,' 'समस्तभुवनाश्रय,' वगैरे त्यांनीं धारण केलेलीं उपपदें त्यांच्या

कर्तव्यपरायणतेचीं निदर्शक आहेत. ब्राह्मणांस व देवस्थानांस दिलेल्या असंख्य देणग्यांचे ताम्रलेख उपलब्ध आहेतच. शिवाय मंदिरें, लेणीं, किल्ले, तलाव इत्यादि त्यांचीं अनेक उपयुक्त कामें अद्यापि जिवंत आहेत. बिल्हणाचें विक्रमांकदेवचरित, विज्ञानेश्वराची मिताक्षरा, ज्ञानदेवाची ज्ञानेश्वरी, इत्यादिकांवरून त्या राजांचा विद्येस मोठा आश्रय होता असें दिसतें. अनेक राजांस संस्कृत भाषा चांगली येत असे. ब्राह्मण बहुधा यज्ञयागांत व ग्रंथलेखनांत निमग्न असत. उत्तरोत्तर ते राजकारणांत, युद्धांत व इतर धंद्यांत पडूं लागले. गांव-पचायतीची व्यवस्था सर्व ठिकाणीं चालू होती, आणि परचक्र आलें किंवा अन्य कारणानें देशांत युद्धप्रसंग माजले, तरी या गांवपचायतींमुळें समाजाचे व्यवहार व्यवस्थित चालत. पुढील मराठशाहीच्या स्थितीशीं हे प्रकार ताडून पाहतां येतील.

दोनही ठिकाणीं महाराष्ट्रांतील लोकांचा स्वभाव चांगले प्रकारें व्यक्त होतो. हिंदी लोकांची व विशेषतः मराठ्यांची आपल्या वतनांवर म्हणजे मालकीच्या जमिनीवर अत्यंत आसक्ति आहे. मराठे लोक दुसऱ्या वाटेल त्या गोष्टीचा त्याग करतील, परंतु वडिलोपार्जित मालकीच्या जमिनीचा ते प्राण गेला तरी त्याग करणार नाहींत. या स्वभावगुणाचा राज्यकर्त्यांस विचार करावा लागत असे. औरंगजेब जेव्हां मराठ्यांच्या या गुणाचा फायदा घेऊन लोकांस भराभर वतनें देऊं लागला, तेव्हां राजारामास व त्याच्या कारभाऱ्यांसही तोच मार्ग स्वीकारावा लागला. त्याशिवाय बादशहाशीं लढण्यास कोणीच पुढें येईना. शिवाजीनें जहागिरी कोणासही द्यावयाच्या नाहींत, असा सक्त निर्बंध ठेविला होता. पण हा निर्बंध पुढील संकटकाळीं मुळींच चालेना. बादशहा स्वतः लाखों फौज घेऊन महाराष्ट्रांत तळ देऊन बसला, तेव्हां त्याजबरोबर लढण्यास फौज पाहिजे होती. ती निर्माण करण्यासाठीं वतनांचीं व जहागिरीची लालूच दाखविणें अत्यंत जरूर पडलें. औरंगजेबही हीच लालूच दाखवीत होता, म्हणून तर मराठमंडळास त्या पद्धतीचा अवश्य स्वीकार करावा लागला. शिवाजीनें घातलेली चांगली पद्धत लयास गेली, आणि महाराष्ट्रांत लहान मोठे जहागिरदार निर्माण होऊन तेच पुढें प्रसंगानुसार स्वतंत्र होऊं लागले. अर्थात् संघशक्ति किंवा राष्ट्रीय भावना मराठमंडळांत उत्पन्न झाली नाहीं.

मराठ्यांच्या त्यावेळच्या देशभक्तीचें रसभरित वर्णन अनेकांनीं केलेलें आहे. औरंगजेबासारख्या पराक्रमी बादशहाशीं तीस वर्षे झगडून मराठ्यांनीं आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें, हा त्यांचा प्रभाव नाटककारांस व कादंबरीकारांस उत्कृष्ट विषय झालेला आहे. परंतु त्यावेळीं खरी अंतःस्थिति तत्कालीन कागदपत्रांवरून तपासून पाहिली, म्हणजे मराठ्यांचा आरंभीं सांगितलेला फाटाफुटीचा स्वभाव उत्कृष्ट नजरेस येतो. वतनाचें, लुटीचें, किफायतशीर उद्योगाचें असें कांहीं तरी आमिष असल्याशिवाय संकटांत उडी घालण्यास ते कधीं तयार होत नसत. राष्ट्राकरितां संतोषानें मृत्यु पत्करणाऱ्या हल्लींच्या पाश्चात्य वीरांशीं मराठ्यांची तुलना करतां येणार नाहीं. हा केवळच राष्ट्रप्रेमाचा परिणाम नव्हे; व्यवस्थित राज्यपद्धतीचा व

योग्य कायद्यांचाही तो परिणाम आहे. अर्थात् राजनीतिशास्त्राचा उद्गम युरोपांत झाला; उत्तरोत्तर तें शास्त्र तेथें विकास पावलें; आणि त्यायोगें युरोपीय राष्ट्रांस एक प्रकारचें स्थायिक स्वरूप प्राप्त होऊन त्यामुळें लोकांना आपली अनेक दिशांनीं उन्नति करून घेतां आली. तसा प्रकार प्राचीन किंवा अर्वाचीन काळीं हिंदुस्थानांत झाला नाहीं, हें अनेक पुराव्यांनीं ज्यानें त्यानें तपासून पाहणें जरूर आहे, एवढेंच सांगण्याचा येथें उद्देश आहे.

गोविंद सखाराम सरदेसाई.

मानवी दीर्घायुष्य.

श्रीकृष्णचरित्राचे परीक्षणांत रा. रा. वाकसकर यांनीं पूर्वकालीन मानवी दीर्घायुष्याबद्दल शंका प्रदर्शित केली आहे. नंतर सपटेंबरचे अंकांत खुद्द रा. ब. वैद्य यांनीं दीर्घायुष्याचें, म्हणजे १५० वर्षे वांचणाऱ्या वसुदेवासारखें, ऐतिहासिक प्रमाण दाखवून समर्थन केलें आहे. 'शतायुर्वै पुरुषः' ही श्रुति देऊन साधारण आयुर्मान १०० शंभर वर्षांचें असतें असेंही लिहिलें आहे. परंतु या उभयतांच्या लेखांत दीर्घायुष्याबद्दल पूर्ण व मूलतः विचार कोणींही केलेला नाहीं असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. या विषयासंबंधानें माझा अधिकार उभयतांच्या मानानें थोडाच असल्यामुळें लिहिण्यास मन कचरतें, परंतु अल्पस्वल्प माहितीही जगापुढें मांडणें हें प्रत्येक वाचकाचें कर्तव्य असल्यामुळें मी लिहिण्याचें धाष्टर्य करीत आहें, याची माफी असावी.

मनुस्मृतींत मनुष्याचें सृष्टीच्या प्रारंभींचें आयुष्य वर्णिलें आहे.

अरोगाः सर्वसिद्धार्थाश्चतुर्वर्षशतायुषः ॥
कृते त्रेतादिषु ह्येषामायुर्ह्रसति पादशः ॥

म. अ. १, श्लो. ८३.

कृतयुगीं (अधर्म नसल्यामुळें सर्व मनुष्यें) अरोग (रोगरहित), मनांतील सर्व इच्छा (संकल्पांची) सिद्धि पावणारे, चारशें (४००) वर्षे वांचणारे असें असतात. त्रेतादिक तीन युगांमध्यें मनुष्याचें आयुष्य क्रमेंकरून एकेक पादानें हीन होतें. म्हणजे त्रेतायुगांत ३०० वर्षे, द्वापरांत २०० वर्षे व कलियुगांत १०० वर्षे मनुष्याचें आयुष्य असतें. यावरून मनुष्योत्पत्ति झाली त्याकाळीं ४०० चारशें वर्षे वांचणारे असे मानवप्राणी उत्पन्न झाले यांत संशय नाहीं. 'अरोग' व 'सिद्धार्थ' ही स्थिति ज्या ज्या वेळीं पृथ्वीवरील मानवप्राण्यांस प्राप्त होईल त्या त्या वेळीं चारशें वर्षे सहजरीतीनें आयुष्य धारण करणारे दीर्घायुषी लोक होतील हें ही सिद्ध होतें. सध्यांची आशिया व इतर खंडांतील मानवांची आयुर्मर्यादा अगदींच कमी आहे हें सर्वश्रुत आहे. परंतु यावरून प्राचीन कालींही अशीच अल्पायु प्रजा होती असें अनुमान करणें चुकीचें होईल. श्रीकृष्णाचा 'पूर्णावतार' म्हणून सर्व पुराणें व भारतभागवत उल्लेख करितात; त्याअर्थी मानवी पूर्णायुष्य म्हणजे ४०० वर्षे उपभोग घेणारा देह धारण करण्यासारखें त्यांचें अवतारकृत्य सर्वश्रेष्ठ होतें असेंच म्हणावें लागेल.

भारतीय योद्धा द्रोणाचार्य यांच्या युद्धकौशल्याबद्दल व्यास म्हणतातः—

आकर्णपलितश्यामो वयसाऽशीतिपंचकः ॥
रणे पर्यचरद्द्रोणो वृद्धः षोडशवर्षवत् ॥

द्रोणपर्व, अ. ११५, श्लोक ७३.

यांतील 'अशीतिपंचक' याबद्दल मतभेद आहे. कै० जनार्दन बाळाजी मोडक यांच्या 'महाभारता'

वरील व्याख्यानांत द्रोणाचार्यांचें वय ८५ वर्षांचें होतें असें सांगितलें आहे. परंतु नीलकंठ टीकाकार ८५×४=४०० वर्षांचें होतें असें लिहितात.

महाभारत—वनपर्व यांत सावित्रीसत्यवानाचें चरित्र वर्णन केलें आहे. त्यांत यमधर्मानें सावित्रीस चार वर देऊन शेवटीं सांगितलें कीं,:—

यम उवाचः—

एष भद्रे मया मुक्तो भर्ता ते कुलनंदिनी ॥
अरोगस्तवनेयश्च सिद्धार्थः स भविष्यति ॥ १ ॥
चतुर्वर्षशतायुश्च त्वया सार्धमवाप्स्यति ॥
त्वयि पुत्रशतं चैव सत्यवान् जनयिष्यति ॥ २ ॥

रा. ब. वैद्यकृत संक्षिप्तमहाभारत, पृष्ठ १७५.

यावरून मनुस्मृतींतील ‘ अरोग ’ आणि ‘सिद्धार्थ’ हीं पदें व्यासांच्या अंतःकरणांत पक्कीं बिंबलीं होतीं असेंही दिसून येतें. ४०० वर्षांचें आयुष्य पूर्णायुष्य म्हणूनच वररूपानें दिलें.

पुराणांतील पुष्कळ राजांना शंभर पुत्र होते असें वर्णन आढळतें. सत्यनारायणकथेंतील ‘अंगध्वज’ राजासही शंभरपुत्र होते असें सांगितलें आहे. यावरून त्या त्या राजांचीं आयुष्यें मनूच्या वाक्याप्रमाणें ‘ चारशें वर्षें ’ प्रमाणाचीं असावींत असें दिसतें.

आणखी एक प्रमाण फलज्योतिषांतील आहे. ताजिक किंवा दिनवर्ष पद्धति (सेकंडरी डायरेक्शन्स्) ही पाश्चिमात्य राष्ट्रांत चालू आहे. जन्मकालीन पहिल्या दिवशीं जी ग्रहस्थिति असेल तिचीं फलें पहिल्या वर्षी अनुभवास येतील, दुसऱ्या दिवशींचीं किंवा २४ तासांनंतरचीं दुसऱ्या वर्षी, याप्रमाणें सौर मानानें ३६५ दिवस एक वर्षाचे येतात. तेव्हां निदान ३६५ वर्षें तरी परमायुष्य असावें असें सिद्ध होतें. (जातकनिधि, भाग ८ वा.)

याप्रमाणें माझ्या अल्पावलोकनांत आलेलीं प्रमाणें विद्वज्जनांपुढें मांडिलीं आहेत. त्याचा स्वीकार व्हावा. भर्तृहरीच्या वैराग्यशतकांतही ‘ आयुर्वर्षशतं नृणां परिमितम् ’ असाच उल्लेख आहे. फलज्योतिषांत १०८ अष्टोत्तरी व १२० विंशोत्तरी वर्षें असें आयुर्मान धरलें आहे. मुख्य आधार—

‘शतायुर्वै पुरुषः’

या श्रुतीचा आहे. त्याचा अर्थ एकशत, द्विशत, त्रिशत आणि चतुःशत असा करावा, असें मला वाटतें.

आजपर्यंत ‘मानवी दीर्घायुष्य’या विषयाकडे कोणाही विद्वानानें लक्ष दिलेलें नाहीं. ‘ शतायुर्वै पुरुषः ’ या श्रुतिवाक्यानें व सद्यःस्थितीच्या अवलोकनानें घोटाळा झाला आहे. मला या विषयाची प्रेरणा बडोदा येथील सुप्रसिद्ध लेखक प्रोफेसर माणिकराव यांच्या लेखावरून झाली (लोकमित्र, १९१३ डिसेंबर)याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. मी मुमुक्षूंत दोन पत्रें (१३ मे व १ जुलै १९१५) लिहिलीं आहेत. त्याबद्दल प्रो. माणिकराव लिहितात:—“पूर्वजांच्या आयुष्याच्या अवधीचा निर्णय आपण म्हटल्याप्रमाणें बऱ्याच ऊहापोहानंतर पुष्कळांस पटेल यांत शंका नाहीं. आपला गतकालीन वैभवाबद्दलचा अभिप्राय प्रशंसनीय आहे, व हीं मतें प्रतिपादून आपण पुढील पिढीस आजन्म ऋणी करून ठेविलें आहे. ” गुरुवर्य डॉक्टर भांडारकर यांचें प्राचीन संस्कृतग्रंथावलोकन किती तरी विस्तृत आहे. त्यांचे विचार समजण्याची माझी उत्कट इच्छा आहे. आपल्या देशांतील सर्व विद्वान् लोकांनीं पूर्वकालीन मानवांचें पूर्णायुष्य किती असावें याबद्दल आपलीं मतें ‘ विस्तारां’तून प्रसिद्ध करावीं अशी सविनय प्रार्थना आहे. अतिशयोक्ति नको. आरोग्य व संकल्पपूर्ति हें प्राप्त झाल्यास आतांही ४०० चारशें वर्षें विद्यमान राहणारी अशी मानवी प्रजा निर्माण होईल. ध्येय या दृष्टीनेंच या विषयाचा विचार व्हावा. ‘ दीर्घायुष्या ’ वरील सर्व लेखांस विस्तारांत स्थळ मिळावें अशी विनंती करून रजा घेतों.

वासुदेव दत्तात्रय गुळवणी, सोळांकुर.

गेल्या २५ वर्षांतील नाटकें, त्यांचे गुणदोष व त्यांच्या प्रगतीचे उपाय.

(अ) साधीं, ऐतिहासिक, व सामाजिक; (ब) स्वकपोलकल्पित, भाषांतररूप व रूपांतरस्वरूप.

[लेखक—रा. वाग्भट नारायण देशपांडे, बी. ए.]

[१] उपोद्घात—नाटकाचे हेतु—चित्तरंजन—लोकशिक्षण—नाटक हें जगाचें छायाचित्र आहे. [२] नाटकांच्या चांगलेपणाची पहिली परीक्षा, मनुष्यस्वभावाचें चित्र यथार्थ उतरलें आहे कीं नाहीं—अद्भुत नाटकांस ही परीक्षा लागू नाहीं—हल्लींचीं मराठीं नाटकें या परीक्षेला किती उतरतात—कांचनगडची मोहना, मतिविकार, तोतयाचें बंड प्रेमसंन्यास व शारदा—अत्यंत उदात्त पात्रें रेखाटल्यानें नाटकाचें वस्तुस्थितित्व जातें कीं काय ? [३] ऐतिहासिक व सामाजिक नाटकांत त्याकाळची समाजस्थितीबरोबर उतरली पाहिजे—रोमांटिक नाटकें: पुरुषांचें बंड, वधूपरीक्षा, शारदा, मतिविकार व प्रेमसंन्यास यांवर टीका—सामाजिक सुधारणेविरुद्ध असणाऱ्या नाटकांत करण्यांत येणारी अतिशयोक्ति—ऐतिहासिक नाटकांची समाजस्थितिदर्शक या दृष्टीनें उपयुक्तता. [४] नाटकांत अनीतीचें चित्र अस्पष्ट उठलें पाहिजे—इंग्लंडांतील अठराव्या शतकांतील नाटकें व त्यांचा समाजावर झालेला परिणाम—नाटकांत शृंगाराला कोठपर्यंत स्थान असावें याबद्दल वाद—व्यंग शृंगाराचीं कांहीं उदाहरणें. [५] अद्भुताविरुद्ध येणारा आक्षेप—त्याला उत्तर—वस्तुस्थितिदर्शक नाटकांना हेतूची आवश्यकता—राजकीय नाटकें—सामाजिक नाटकें—शारदा, मतिविकार, प्रेमसंन्यास यांबद्दल विवेचन--ऐतिहासिक नाटकें--धार्मिक नाटकें--त्यांविरुद्ध येणारा एक आक्षेप--त्याला उत्तर. (६) विनोद व श्लेष--कथानकाशी असंबद्ध विनोद--मतिविकार, चंद्रगुप्त, कृष्णार्जुनयुद्ध, वधूपरीक्षा यांतील विनोद--कृत्रिम व अस्वाभाविक विनोद-शोकपर्यवसायि नाटकांत विनोदाची आवश्यकता. [७] गेल्या २५ वर्षांतील शोकपर्यवसायि नाटकें. [८] प्रस्तुत निबंधांत गेल्या १०।१२ वर्षांतील नाटकांवरच विशेष जोर कां दिला आहे त्याचें कारण. [९] स्वतंत्र, रूपांतर, भाषांतर वाद—नाटकांचे बाबतींत भाषांतराची अशक्यता—मध्यम स्वतंत्रापेक्षां उत्तम रूपांतराचें श्रेष्ठत्व—रूपांतराविरुद्ध येणाऱ्या आक्षेपांस उत्तरें—रूपांतराचीं उपयुक्तता—कांहीं उत्तम रूपांतरें. [१०] उपसंहार.

---

१. मम्मटानें काव्याचे हेतु काय आहेत हें सांगतांना "कांतासंमिततयोपदेशयुजे"—म्हणजे कांतेप्रमाणें प्रेमानें उपदेश करणें—असा एक हेतु सांगितला आहे. उपदेश करण्याच्या तऱ्हा तीन आहेत, त्या:—एक प्रभुसंमित म्हणजे प्रभूप्रमाणें अधिकारयुक्त; दुसरी मित्रसंमित, म्हणजे बरोबरीच्या नात्यानें वाईट व चांगलें याचें विवेचन करून व वादविवाद करून उपदेश करणें; व तिसरी कांतासंमित म्हणजे ज्याप्रमाणें पत्नी मृदु व प्रेमळ भाषणानें विनंती करिते त्याप्रमाणें. एकाद्यानें अधिकार घेऊन "अमूक करच" असें सांगणें मनुष्याला सहसा आवडत नाहीं. सन्मित्राचा उपदेश कडू लागत असल्याबद्दल तर मनुष्यस्वभावाची ख्याति आहेच. परंतु जें काम प्रभु किंवा मित्र कोणीही करूं शकत नाहीं, तें प्रेमळ पत्नी करूं शकते. मनुष्याच्या हृदयांत अशा कांहीं वृत्ति असतात कीं, त्यांना योग्य माणसाकडून योग्य रीतीनें स्पर्श झाला असतां, हजार उपदेशांनींही जें कार्य होणार नाहीं, तें एका क्षणांत एका शब्दानें होऊं शकतें. काव्याचा मनुष्याच्या मनावर किती लवकर परिणाम होतो याला मम्मटानें रामायणाचें उदाहरण दिलें आहे. परदारा-

भिलाषापासून किती भयंकर तोटा होतो याबद्दल केवढें जरी व्याख्यान दिलें, तरी मनुष्याच्या मनावर तें लवकर बिंबणार नाहीं. परंतु तेंच रामायणासारख्या सुंदर व मनोहारि कथेनें तें तत्काळ पटतें. रावणाचें राज्य, अधिकार, व वैभव केवढें होतें; तेहेतीस कोटी देव त्याला कांपत असत असें त्याचें बलसामर्थ्य; इंद्रादि देव त्याच्या घरीं कामाला राबत, एवढा त्याचा दरारा; परंतु पापाकडे त्याची दृष्टि वळतांच त्याचें राज्य, वैभव, बल, व जीवितसुद्धां निमिषार्धांत लयास गेलें. या गोष्टीचा आपल्या मनावर जितका चटकन् परिणाम होईल तितका एकाद्या तात्त्विक, परंतु नीरस व्याख्यानाचा होणार नाहीं. म्हणूनच काव्याला पत्नीप्रमाणें उपदेश करणारें असें म्हटलें आहे.आणि अशी ज्यांची उपयुक्तता आहे, त्या काव्यांत "नाटकं रम्यं" असें मानलें आहे. यावरून नाटकाचें साहित्यशास्त्रांत केवढें महत्त्व आहे, व त्याचा दर्जा किती उच्च आहे हें तेव्हांच लक्षांत येईल. श्राव्यकाव्यानें फक्त कर्णद्वारेंच आपल्या मनोवृत्तींवर काय परिणाम होईल तो होईल. परंतु दृश्यकाव्यानें यापेक्षां अधिक कार्य होतें. आपण जगांत जरी नित्य वावरतों,तरी जगांतील अनेक गोष्टींचें आपणांस एकदम ज्ञान होत नाहीं. एकाद्या समारंभांत काम करणाऱ्याला ज्याप्रमाणें त्या समारंभाची मौज अनुभवावयाला सांपडत नाहीं, किंवा, नाटकांत काम करणाऱ्या पात्राला ज्याप्रमाणें नाटक पाहण्यापासून प्रेक्षकांना होणारा आनंद अनुभवावयास मिळत नाहीं, त्याचप्रमाणें परमेश्वररूपी सूत्रधाराकडून चाललेल्या या विश्वाच्या प्रचंड नाटकांत आपण पात्रें असल्यामुळें, आपणांस–सामान्य मनुष्यांस–आपल्याला नेमून दिलेल्या कामापलीकडे या जगाच्या घडामोडींची व चमत्काराची फारशी माहिती होत नाहीं. परंतु आपल्यापेक्षां बुद्धि, अनुभव, ज्ञान व अवलोकन यांनीं श्रेष्ठ असा कोणीतरी मनुष्य उत्पन्न होऊन, तो जगाची व मनुष्यस्वभावाची माहिती करून घेऊन, मोठ्या जगाची एक लहान प्रतिकृति करून, त्यांत खऱ्या जगांत ठिकठिकाणीं ज्या प्रकारचीं मनुष्यें पाहावयाला सांपडतात त्याप्रकारचीं काल्पनिक पात्रें निर्माण करून, त्यांना आपल्या छोट्या जगांत नाचावयाला लावतो; आणि अशा रीतीनें ज्या मोठ्या घडामोडींत आपण स्वतःच काम करणारे असल्यामुळें जिचें संपूर्ण स्वरूप आपल्या लक्षांत येत नाहीं, त्या घडामोडींचेंच प्रतिबिंब, आपल्याला त्यांत भाग न घेतां, तटस्थ राहून पाहतां येतें. आणि यालाच नाटक म्हणतात. म्हणजे नाटक हें एके प्रकारें जगाचें छायाचित्रच (photo) आहे असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. आपल्यापैकीं प्रत्येकाला अँटोनियोसारख्याच्या मैत्रीचा लाभ मिळत नसेल; आयागोसारखे नीच व उलट्या काळजाचे पुरुष आपणा प्रत्येकाला भेटत नसतील; मॅक्बेथसारखी घोर महत्त्वाकांक्षा प्रत्येक ठिकाणीं पाहावयाला कदाचित् मिळणार नाहीं; हॅम्लेट किंवा ब्रूटससारखे विचारमूढ रोजच्या व्यवहारांत दिसत नसतील; पोर्शिआ, डेस्डिमोना, किंवा जूलियेट यांसारख्या समयसूचक, निश्चयी किंवा प्रेमळ स्त्रिया हरएकाला मिळत नसतील; परंतु जगाची प्रतिकृति अशा या नाट्यसाहित्याकडे पाहिलें असतां, मैत्री, प्रेम, महत्त्वाकांक्षा, नीचपणा, कापट्य या चांगल्या व वाईट दोन्ही गुणांची परमावधि कोठपर्यंत होऊं शकते, हें चांगलें समजून येतें. स्वतःला जरी लोभी मित्र किंवा वाईट पत्नी मिळाली असली, तरी निःस्वार्थी मैत्री व शुद्ध प्रेम जगांत असूं शकतें, हें जसें आपल्याला या साधनानें कळतें, तसेंच, आपलें आयुष्य शुद्ध, सदाचारी, व सुखाच्या वातावरणांत जरी जात असलें, तरी दुराचार, दुःख, कपट आणि दारिद्र्य यांचें जगांत अस्तित्व आहे, हीही गोष्ट आपणास यामुळें समजते. सारांश काय, कीं आपलें जगाविषयींचें अपूर्ण ज्ञान पूर्ण करावयाला सुद्धां नाटकाची फार मोठी मदत होत असते. अशा रीतीनें नाटकाची मोठी योग्यता आहे. त्याचप्रमाणें चांगल्याचा परिणाम—कालांतरानें कां होईना पण–नेहमी चांगला होतो, व वाईटाचा परिणाम–आरंभीं चांगला दिसला तरी शेवटीं वाईटच होतो, ही गोष्ट नाटकाचे द्वारानेंच आपल्यास लोकांचे मनावर ठसवितां येते. पोपनें आपल्या 'Essay on Man' या काव्याचा हेतु 'To vindicate the ways of God to Man' आहे असें जें म्हटलें आहे, तें नाटकाच्या बाबतींत अक्षरशः लावतां येतें.

याप्रमाणें कोणत्याही भाषेच्या वाङ्मयांत नाटकाचा दर्जा कसा उच्च आहे, व नाटक हें वाङ्मयाचें किती प्रमुख अंग आहे हें पाहिल्यावर, मराठी वाङ्मयाकडे व त्यांतील नाटकांकडे आपली दृष्टि वळणें साहाजिक आहे. मराठी नाट्यसाहित्याचा उगम कसा व केव्हां झाला, याचा विचार करण्याचें हें स्थळ नव्हे, व काळही नव्हे. परंतु गेल्या २५ वर्षांत नाट्यसाहित्यानें किती मार्ग आक्रमण केला आहे, व त्यामुळें वाङ्मयांत कोणत्या प्रकारची भर पडली आहे, त्यांत दोष असतील तर ते दूर करण्यास कोणते उपाय योजिले पाहिजेत, व कशा प्रकारें आपल्या वाङ्मयाचें हें अंग सर्वांगसुंदर होईल, याचा विचार प्रस्तुत प्रसंगीं करावयाचा आहे. गेल्या २५ वर्षांत वाङ्मयांत भर पुष्कळच पडली आहे. वेळेच्या व स्थलाच्या अल्पत्वामुळें प्रत्येक नाटकाचा पृथक्शः उल्लेख करून त्याचें परीक्षण करतां येणें शक्य नाहीं, व प्रस्तुतसारख्या प्रसंगीं तें अनुचितही होणार आहे. उपरिनिर्दिष्ट अवधींत विद्वान् व अविद्वान् नाटककारांनीं जीं थोडीं फार नाटकें लिहिलीं आहेत, त्यांचें सर्वांचें विहंगमदृष्ट्या पर्यालोचन करून, उत्तम नाट्यसाहित्याला काय काय गुण अवश्य आहेत याचें थोडें दिग्दर्शन करून, त्या कसोटीला या अवधींत प्रसिद्ध झालेलीं नाटकें कितपत उतरतात याचा विचार करून, मग प्रगतीचे कांहीं उपाय सुचवावे असा आमचा मनोदय आहे.

२. नाटकाचें मुख्य स्वरूप काय?—याविषयीं निबंधाच्या आरंभीं जो अल्प विचार करण्यांत आला आहे त्यावरून, मनुष्यस्वभावाचें यथातथ चित्र उतरणें हा नाटकाचा प्रमुख गुण आहे, हें सहजीं लक्षांत येईलच. एकाद्या नाटकांत जर सर्व उदात्तच पात्रें रेखाटलीं तर त्या नाटकाला संसाराचें चित्र असें म्हणतां येणार नाहीं. अशीं नाटकें आपल्याला संस्कृतांत कांहीं आढळतात. अशा ठिकाणीं कवि आपली स्वतःचीच सृष्टि उत्पन्न करून त्यांत सर्व सद्गुणसंपन्न अशीं पात्रें घालतो. असें नाटक पाहतांना किंवा वाचतांना आपण रोजच्या व्यवहारांत वावरत नसून, दुसऱ्या एकाद्या जगांत—जेथें दुर्गुणाचा गंधही नाहीं अशा सृष्टींत—गेलों आहोंत कीं काय असें वाटतें. या सृष्टींतील सर्व लोकांचें प्रेम हेंच जीवन असतें; व त्यांना संकटाच्या प्रसंगीं पुष्कळदां देवांचें अगर देवतांचें साह्य मिळतें. प्रियकरानें धिक्कारल्यामुळें जीवाला कंटाळलेल्या एकाद्या तरुणीला एकादी अप्सरा अगर देवता अंतरिक्षांत उचलून नेते; पुढें तोच प्रियकर पश्चात्तापानें तप्त होऊन त्या तरुणीच्या नांवानें शोक करून टाहो फोडूं लागला असतां, संरक्षक देवतेच्या अगर अप्सरेच्या साहाय्यानें त्या तरुणीला अदृश्य राहतां येऊन, प्रियकराचा शोक पाहून स्वतःच्या नेत्रांचें पारणें फेडून घेतां येतें; किंवा, एकादी तरुणी आपल्या विरहदुःखानें मेलेल्या प्रियकराच्या शवासह सती जाण्याची तयारी करीत असतां, एकदम आकाशवाणी होऊन सती न जातां शवाचें रक्षण करीत काळ कंठण्याची तिला आज्ञा होते; आणि पुढें कांहीं काळानंतर तें शव सजीव होऊन तिचा पति तिला फिरून मिळतो! (आपल्या सृष्टींत अशा गोष्टी घडतील तर किती मौज होईल!—विधवाविवाहाचा प्रश्नच नाहींसा होईल!) या सृष्टींत प्रेम नेहमीं प्रथमदर्शनींच उत्पन्न होतें, व तें भूमितिश्रेढीनें वाढत जातें; आणि त्याची अवध्या २४ तासांत इतकी तीव्रता होते कीं, स्त्रीपुरुषांचा जरा अधिक विरह होतांच, दोघांपैकीं एक मृत्यु तरी पावतो, किंवा त्यास वेड तरी लागतें. येथल्या आपत्ति आपल्या सृष्टींतल्याप्रमाणें दुराचारजनित किंवा दारिद्र्यजनित नसून नेहेमी विरहमूलकच असतात. आपल्याप्रमाणें या लोकांना गुरुत्वाकर्षणाचे नियम लागू असतात असें दिसत नाहीं. कारण, क्वचित् प्रसंगीं नायकाचा मित्र आकाशांत उडून जातांना दिसतो! अशा प्रकारचीं नाटकें समाजाचीं चित्रें आहेत असें कधींही म्हणतां येणार नाहीं; आणि अर्थातच त्यांत आढळणारीं पात्रें आपणास रोजच्या व्यवहारांतही कधीं दिसून येत नाहींत. यांत दिसून येणाऱ्या कवीच्या कल्पना जरी पुष्कळदां अत्यंत मनोहर असतात, आणि कल्पिलेल्या प्रसंगांवरून कवीची उच्च आणि प्रगल्भ (bold) कल्पनाशक्ति जरी दिसून आली, तरी अशा नाटकांपासून मनाचें क्षणभर रंजन होण्यापलीकडे फारसा फायदा होत नाहीं. शाकुंतल, शापसंभ्रम वगैरे संस्कृतांतून जीं मराठींत रूपांतरें केलीं गेलीं आहेत, किंवा

मंजुघोषा, सौभद्र यांसारखीं अद्भुतप्रधान (romantic) जीं नाटकें आहेत,त्यांवरून ही गोष्ट चांगली सिद्ध होते. या नाटकांतून दाखविलेलीं मनुष्यें केवळ कविकल्पनेंतल्या सृष्टींतच आढळणारीं आहेत, हें आपल्यास ठाऊक असतें. म्हणून मनुष्यस्वभावाचें वर्णन सत्याला कितपत धरून आहे, ही कसोटी असल्या नाटकांना कधींही लावतां येणार नाहीं.

परंतु आपल्यासभोंवतीं नेहमीं घडणाऱ्या गोष्टी ज्यांत वर्णिलेल्या आहे, व तदनुसारच ज्यांत पात्रें योजिलीं आहेत, त्या नाटकांना ही कसोटी लाविली पाहिजे. आपण राज्यक्रांत्या होतांना पाहतों; चालू राज्याविरुद्ध अनेकदां कटही होतात; चोर, ठक, विषयासक्त पुरुष यांचा समाजांत तर सुकाळ असतोच; पण त्याबरोबरच वाळूंत चमकणाऱ्या शिंपांप्रमाणें सद्गुणी व सदाचारी स्त्रीपुरुषही दिसतात. आणि अशा एकाद्या प्रसंगावर किंवा मनुष्यावर जेव्हां एकादें कथानक बसविलेलें असतें, तेव्हां त्या नाटकाला वस्तुस्थितीचा पुष्कळसा आधार असतो. चारुदत्ताप्रमाणें दानशूर पुरुष, नेहेमी जरी नाहीं तरी, कांहीं वेळां पाहावयास सांपडतात; शकारासारखे लोक तर श्रीमंतवर्गांत आणि राजघराण्यांत नेहमीं आढळून येतात; विटासारखे दरबारी लोक (courtiers) संस्थानांतून खूपच असतात. म्हणून मृच्छकटिकासारख्या नाटकांत मात्र मनुष्यस्वभावाचें यथातथ चित्र काढण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मराठी नाट्यसाहित्याच्या अगदीं आरंभाच्या काळांत संस्कृत वाङ्मयाचें विशेष प्राबल्य असल्यामुळें आरंभींचीं मराठी नाटकें बहुतेक अद्भुत–व शृंगाररसप्रधान झालीं; परंतु यानंतर इंग्रजी वाङ्मयाचा जों जों विस्तार होऊं लागला, तों तों लेखकांचें लक्ष काल्पनिक गोष्टींपेक्षां वस्तुस्थितीकडे अधिक वळूं लागलें; आणि महाश्वेता व पुंडलीक यांसारख्या अद्भुत पात्रांचें वर्णन करणें सोडून देऊन भूलोकींच्याच मनुष्यांचें वर्णन करण्याचा ते प्रयत्न करूं लागले. याला उत्तम उदाहरण रा. देवलांचें होय. ज्या नाटककारानें शापसंभ्रमासारखीं अद्भुतरसप्रधान नाटकें लिहिलीं, त्याच्याच हातून पुढें झुंजारराव, दुर्गा यांसारखीं सुंदर रूपांतरें, व शारदेसारखीं स्वतंत्र सामाजिक नाटकें निर्माण झालीं.

इंग्रजींतून मराठींत जीं रूपांतरें झालीं आहेत तीं सोडून देऊन स्वतंत्ररीतीनें जीं नाटकें झालीं आहेत त्यांबद्दल विचार केला असतां, मनुष्यस्वभाववर्णनाच्या कौशल्यांत आपले नाटककार बरेच मागें दिसतात. सर्व नायक व नायिका बहुतेक एकाच ठशाच्या दिसतात. शेक्सपियरच्या किंवा त्याहून कमी दर्जाच्या पाश्चात्य नाटककारांच्या अनेक कृतींतून मनुष्यस्वभावाच्या सूक्ष्म प्रकृति जितक्या कौशल्यानें रेखाटलेल्या दिसतात, तितक्या त्या आपल्या इकडे दिसत नाहींत. हॅम्लेटचें अनुकरण करण्याचा रा. खाडिलकरांनीं प्रयत्न केला आहे. परंतु हॅम्लेटच्या मानानें त्यांची कृति अगदींच हीणकस आहे. हॅम्लेटप्रमाणेंच सवाईमाधवराव विचारमूढ झालेला दाखविला आहे; परंतु त्याच्यांत हॅम्लेटची विद्वत्ता, मार्मिकपणा, व सहृदयता यांचा पूर्ण अभाव आहे. हॅम्लेटवर हेराचें काम करावयास त्याचे जे दोन मित्र ठेविले होते, त्यांच्याशीं हॅम्लेट किती खुबीनें व मुत्सद्देगिरीनें वागत होता हें पाहिलें म्हणजे मन आश्चर्यानें चकित होऊन जातें. तसेंच प्रसंगोपात्त त्याच्या तोंडून जे तात्त्विक विचार बाहेर पडले आहेत तेही अत्यंत मननीय आहेत. आयागोशीं स्पर्धा करणारीं अशीं, आपल्याकडे, रा. खाडिलकरांचा केशवशास्त्री व रा. गडकऱ्यांचा कमलाकर, अशीं दोनच पात्रें प्रमुखतेनें पुढें दिसतात. केशवशास्त्री आणि कमलाकर यांच्यांत तुलना करणें जरा अवघड आहे. परंतु दोघांची आयागोशीं तुलना केली असतां, आयागोचें पात्र रेखाटतांना कवीचें जें कौशल्य दृष्टीस पडतें, तें इकडे दिसत नाहीं. तसेंच, शेक्सपियरनें आपल्या निरनिराळ्या नायिकांच्या द्वारें, स्त्रियांच्या अनेक नाजुक व उदात्त नैसर्गिक मनोवृत्तींचें जें सूक्ष्मपणानें व कौशल्यानें वर्णन केलें आहे तसा प्रकार आपल्याकडे एकाही नाटकांत दिसत नाहीं. तथापि आहे त्या स्थितींत पाहतां, रा. कोल्हटकर, रा. खाडिलकर, व रा. केळकर या तिघांनींही मनुष्यस्वभावाचें विशेष कौशल्यानें वर्णन केलें आहे यांत शंका नाहीं. रा. खाडिलकरांची कांचनगडची मोहना, रा. कोल्हटकरांच्या 'मतिविकारां'तील आनंदराव, रा.केळकरांच्या 'तोतयाच्या बंडां'तील पार्वतीबाई, अमला, व बगं-

भट, रा. गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यासां'तील लीला व कमलाकर, हीं पात्रें फारच उत्तम साधलीं आहेत. पार्वतीबाईप्रमाणें पतिनिष्ठ व धर्मपरायण विधवा, आणि त्यांच्या अंधश्रद्धेचा नीचपणानें फायदा घेणारे बगंभट आपल्या समाजांत किती आहेत, याचा प्रत्येकाला अनुभव आहेच. पतीची ओळख होण्यापूर्वींच वैधव्यदशा प्राप्त झाली असतां, समाजांत वागतांना साहाजिक प्राप्त होणारीं सुखें मिळालीं असतां, प्रेमळ आणि सन्मार्गगामी बालविधवेची कशी दारुण स्थिति होते, याचें रा. गडकरी यांनीं फारच हृदयद्रावक चित्र काढलें आहे. तसेंच अशा दुर्दैवी स्त्रीला फशीं पाडण्याकरितां नीच पुरुष कसे टपलेले असतात याचींही 'प्रेमसंन्यासांतील' कमलाकर, व 'मतिविकारांतील' हरिहरशास्त्री या दोन पात्रांवरून चांगली कल्पना येते. रा. देवलांच्या 'शारदे-'चाही या ठिकाणीं उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. जुन्या मताच्या परिस्थितींत वाढलेल्या मुलीची लग्नाबद्दल किती साहाजिक उत्सुकता असते; कांहीं कारणास्तव लग्न लांबलें, तर तिची किती विलक्षण स्थिति होते; लग्न हीच स्त्रियांची इतिकर्तव्यता, ही समजूत जुन्या मंडळीच्या कशी हाडींमासीं खिळून गेलेली असते; आणि मुलीचें लग्न लांबतांच जुन्या मताची मंडळी तिला कशी बोंचून टाकतात; या सर्वांचें रा. देवलांनीं इतक्या कुशलतेनें वर्णन केलें आहे कीं, त्याचें कौतुक करावें तितकें थोडेंच आहे. गेल्या दहा वर्षांत जीं नाटकें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांतून मनुष्यस्वभावाचें बरोबर वर्णन करण्याची कला विशेष रीतीनें दृष्टोत्पत्तीस येत आहे; आणि अलीकडे विद्वान् माणसांचें नाट्यसाहित्याकडे उत्तरोत्तर विशेष लक्ष लागत चालल्यामुळें, या बाबतींत अधिक आशा करण्यास बरीच जागा आहे.

दीडवर्षापूर्वी प्रसिद्ध झालेल्या'राक्षसी महत्वाकांक्षा' या नाटकावरील एक अभिप्राय नुकताच आमच्या वाचण्यांत आला. अभिप्राय देणारांचें मत असें होतें कीं, प्रस्तुत नाटकांत, "खच्चून उदात्त" अशीं पात्रें रेखाटलीं आहेत, आणि अशीं पात्रें आपल्याला ज्या अर्थी जगांत पाहावयाला मिळत नाहींत, त्या अर्थी तीं नाटकांत आणणेंही इष्ट नाहीं. आपल्याला रोजच्या व्यवहारांत ज्या प्रकारचीं माणसें भेटतात, त्याप्रकारचींच माणसें नाटकांत पाहिजेत. कांहीं तरी अवास्तव ध्येय घेऊन तें लोकांपुढें ठेविल्यानें, नाटकाचें "वस्तुस्थितित्व" (Realism) नाहींसें होतें. हल्लीं या मताचा (Realistic) एक स्वतंत्र पंथच युरोपांत निघाला आहे. त्याचा विचार पुढें होणारच आहे. परंतु जातां जातां येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, लोकांच्या पुढें जर एकादें ध्येय ठेवावयाचें असेल, तर तें अतिशय उच्चच ठेविलें पाहिजे. तरच लोकांच्या आचरणांत त्याचें कांहीं तरी अनुकरण उत्पन्न होईल. कोणचाही नैतिक नियम घालून द्यावयाचा म्हटला म्हणजे तो अगदीं अनपवादात्मकच (absolute) घातला पाहिजे, तरच लोक कांहीं तरी त्याप्रमाणें वागतील. "प्राण गेला तरी असत्य बोलूं नये" असें सांगितलें म्हणजे मनुष्य होतां होईल तितकें सत्य बोलतो; त्याप्रमाणेंच हा प्रकार आहे. आतां हें मात्र खरें कीं, नाटकांत जर सारींच पात्रें अशीं उदात्त घातलीं, तर मग तें नाटक अद्भुतरसप्रधान होऊन, संसाराचें चित्र ही भावना प्रेक्षकांचे मनांतून निघून जाईल, आणि असें होणें, नाटकाचे योगानें शिक्षण देण्याच्या हेतूला विघातक आहे.

३. नाटकाच्या चांगलेपणाचें दुसरें लक्षण म्हटलें म्हणजे नाटक ज्या काळाला अनुलक्षून आहे, त्या काळची परिस्थिति त्यांत बरोबर उतरणें. या परीक्षेला आपलीं नाटकें किती उतरतात हें आतां पाहावयाचें आहे. ही गोष्ट आपल्या सकृद्दर्शनींच लक्षांत येईल कीं, जीं निवळ रोमांटिक नाटकें आहेत, त्यांना ही परीक्षा लागू होणार नाहीं. उदाहरणार्थ, शापसंभ्रम वगैरे. कारण, या ठिकाणीं कवि वेगळीच सृष्टि उत्पन्न करितो; आणि या सृष्टीला आपल्या सृष्टीचे फार थोडे नियम लागू पडतात. परंतु दुसरीं जीं ऐतिहासिक व सामाजिक नाटकें असतात, त्यांना ही अट पूर्णपणें पाळावी लागते. किंबहुना यावरतीच त्यांच्या उत्तमपणाचा पुष्कळसा भाग अवलंबून असतो, असें म्हणावयास हरकत नाहीं. आपल्याकडे निवळ ऐतिहासिक तशींच सामाजिक नाटकें फारच थोडीं झालीं आहेत. पुष्कळ नाटकांच्या कथानकाचे काळ ठरविणेंच फार कठीण जातें. कारण, पुष्कळांचीं कथानकें काल्पनिक किंवा रूपांतरित अस-

त्यामुळें त्यांना इतिहासाचा आधार मुळींच नसतो. केवळ पात्रांच्या शूरसेन, वीरसेन अशा नांवावरूनच कथानकाचा काळ रजपूत अमदानींतला केव्हांचा तरी आहे, असें अनुमान करावें लागतें. आणि जेथें सारा अनुमानाचाच कारभार आहे, तेथें मग कोणत्याही सामाजिक चालीरीति घुसडून दिल्या तरी त्याबद्दल कोणाला फारशी हरकत घेतां येत नाहीं. वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, प्रेमध्वज, मानापमान वगैरे नाटकें याच प्रकारचीं होत. या नाटकांचीं कथानकें कोणत्या काळांत घडतांना कल्पिलेलीं आहेत, हें प्रत्यक्ष त्यांच्या कर्त्यांनासुद्धां निश्चितपणें सांगतां येईल कीं नाहीं कोण जाणे! मग अशी स्थिति असतांना, मूकनायकांतील राजाचा दरबार स्त्रीपुरुषमिश्रित दाखविला, किंवा मानापमानांतील लक्ष्मीधराच्या तोंडून आधुनिक पुरुषांचा तिरपा भांग व बायकांची नथ यांचा परस्परसंबंध वदविला, किंवा शुक्राचार्यांच्या वेळीं चेरीब्लॉसम्, नेकटाय कॉलर असून त्यांचा फक्त दारू पिणारेच उपयोग करीत असें जरी दर्शविलें, तरी त्याबद्दल कोणास हरकत आणतां येणार नाहीं. कारण, एकादा टीकाकार तर्कानें काल ठरवून इतिहासाच्या आधारानें कथानकांत दाखविलेल्या चालीरीतींची मीमांसा करूं लागला, किंवा anachronims दाखवूं लागला, कीं त्या नाटकाला चहूंदिशीं "रोमान्टिक" या सदराखालीं ढकलून ग्रंथकर्त्याला मोकळें होतां येतें; आणि एकादा अपराधी, परकी राज्याच्या हद्दींत शिरतांच ब्रिटिश मुलखांतील कायद्याचें त्यावरील बंधन ज्याप्रमाणें एकदम नाहींसें होतें, त्याप्रमाणें "रोमांटिक" या सदराखालीं त्या नाटकाची गणना होते. मग त्याच्या कथानकाचा काळ कोणता, त्या काळच्या चालीरीति काय, आणि त्या त्यांत योग्यरीतीनें दाखविल्या गेल्या आहेत कीं नाहीं, हें कलम टीकाकाराला त्या नाटकावर लागू करतां येत नाहीं. "पुरुषांचें बंड" या नाटकांत अशीच गंमत झाली आहे. कथानकांत दर्शविलेली राज्यव्यवस्था पाहतां, किंवा पुरुषपात्रांचीं कित्येक नांवें पाहतां कथानकाचा काल असाच रजपूत अमदानींतला असावा असें वाटतें. परंतु लागलींच पाहावें तों मुंबईचें मेडिकल कॉलेज, पुण्याची डोलकर आळी, मोटार गाडीचा अपघात, अमेरिकेहून M. D. होऊन आलेली डाक्तरीण, हीं दिसूं लागतात! यामुळें कथानक वर्तमान काळांतील असावें असें दिसतें. बरें, प्रस्तुतकाळाचें कथानक आहे असें मानावें तर, संस्थानच्या चीफनें, प्रजाजनांनीं आपल्या बायका नगराबाहेर सोडून याव्या, व त्यांच्याशीं कोणत्याही प्रकारें संबंध ठेवूं नये असा हुकूम करणें, व या असल्या विचित्र हुकमाचें उल्लंघन करणाराला गुन्हेगार समजणें, ही अरेरावी हल्लींच्या काळांत निजामशाहींत तरी चालेल कीं नाहीं याची शंका आहे! रा. कोल्हटकरांच्या 'वधूपरीक्षे'त ही असाच प्रकार झाला आहे. कथानकाचा काळ हल्लींचा आहे. कारण, संस्थानचा तरुण राजा विलायतेस अध्ययन संपवून नुकताच घरीं परत आलेला दाखविला आहे. परंतु पुढें स्त्रीपुरुषांच्या मिश्रसमाजाचें जें चित्र काढलें आहे, त्यावरून असा समाज मुंबईसारख्या सुधारलेल्या शहरांत सुद्धां पाहावयास मिळेल, असें वाटत नाहीं. एकंदरींत हें नाटक पाहतांना, हिंदुसमाजाचें (सुधारक समाजाचें कां असेना?) चित्र आपण पाहात आहों असें वाटत नाहीं. 'शारदा' नाटक या दृष्टीनें सुद्धां फार चांगलें साधलें आहे. सामाजिक कादंबऱ्यांत ज्याप्रमाणें "पण लक्षांत कोण घेतो?" ही कांदबरी, त्याप्रमाणें सामाजिक नाटकांत देवलांची 'शारदा' आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. 'मतिविकार' व 'प्रेमसंन्यास' हीं नाटकेंसुद्धां या दृष्टीनें बरीं आहेत. आनंदराव व सरस्वती यांसारखीं जोडपीं हल्लीं आहेत; त्याचप्रमाणें जयंत व मनोरमा अशींही जोडपीं क्वचित् आढळतात. तथापि या दोन्ही नाटकांतही आपल्या समाजाशीं विसंगत अशा एकदोन गोष्टी आहेत. उदाहरणार्थ, मनोहरपंताच्या आश्रमांत शिकवितांना, विहाराचें कल्याणीशीं असलेलें वर्तन. विहाराचा कल्याणीबद्दलचा उल्लूपणा इतका स्पष्ट दिसतो कीं, आश्रमांतील लहान मुलींच्या सुद्धां ती गोष्ट लक्षांत येते. तरी पण आश्रमाचे चालक तिकडे अगदींच लक्ष देत नाहींत. कथानकाच्या सोयीला हें सर्व ठीक जुळत असेल, पण प्रस्तुत समाजाचें हें सत्य चित्र नाहीं, एवढेंच दाखविण्याचा आमचा उद्देश आहे.

सामाजिक सुधारणेविरुद्ध जीं नाटकें होतात त्यांत सुधारकांची फजिती उडविण्यासाठीं जी भलतीच अतिशयोक्ति करण्यांत येते, तिचा उल्लेख येथें केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. सुधारकांची निंदा करण्यासाठीं त्यांच्या अंगीं नसत्या चाली चिकटवून त्यांना प्रेक्षकांच्या तिरस्काराला व हास्यास्पदतेला पात्र करण्याचा हा प्रकार अत्यंत निंद्य आहे. असल्या प्रकारचीं 'तरुणीशिक्षण नाटिका,' 'दंडधारी'अशीं कांहीं नाटकें आहेत. पहिल्या नाटिकेंत इंग्रजींचें अध्ययन करणारी एक मुलगी आपल्या नवऱ्याची निर्भर्त्सना करून त्यास अभ्यासाच्या खोलींतून बाहेर घालवून देत आहे; त्यांतच पुढें इंग्रजी नाचाचाही प्रवेश आणला आहे; अशी नानाप्रकारांनीं अतिशयोक्ति केलेली आहे. असल्या प्रकारच्या भिकार नाटकांना आमच्या समाजाची चालू स्थिति दाखविणारीं नाटकें असें आम्ही कधींही म्हणणार नाहीं. कारण, त्यांत वर्णिलेली स्थिति आमच्या समाजांत पूर्वीं कधींही नव्हती, आणि हल्लींही नाहीं.

वरील विवेचन ऐतिहासिक नाटकांसही पूर्णपणें लागू पडतें हें सांगावयास नकोच. सवाई माधवरावाचा मृत्यु, भाऊबंदकी, तोतयाचें बंड, वगैरे नाटकें या दृष्टीनें चांगलीं झालीं आहेत. ऐतिहासिक नाटकांचे बाबतींत दुसरा प्रश्न असा उद्भवतो कीं, नाटककारास इतिहासांत घडलेली गोष्ट किती अंशांपर्यंत फेरफार करून घेतां येते. हाच प्रश्न पौराणिक नाटकांसंबंधानेंही उद्भवतो. रा. खाडिलकरांच्या "सवाईमाधवरावाचा मृत्यु" व "विद्याहरण" या दोन्ही नाटकांचे वेळीं याबद्दल बराच वाद झाला होता. तो सर्व वाद येथें पुनः उपस्थित करण्याचें कारण नाहीं. परंतु थोडक्यांत असा सर्वसाधारण नियम सांगतां येईल कीं, मूळ गोष्टींत जीं पात्रें आहेत, त्यांचे स्वभाव असतील त्यापेक्षां नाटकांत वाईट न दिसतील अशा रीतीनें योग्य तो फेरफार करावा. वाईट स्वभाव चांगला करतां आला तर बरेंच. तसेंच त्याकाळीं असंभवनीय अशा गोष्टी कथानकांत आणूं नयेत. "सवाईमाधवरावाच्या मृत्यू"त नाना फडनविसांचा स्वभाव फारच वाईट रीतीनें रंगविला गेला आहे. भाऊबंदकींत राघोबादादाचा स्वभाव होता त्यापेक्षां अधिक स्त्रीलंपट व वाईट दाखविला आहे. तोतयाच्या बंडांतसुद्धां अमलेच्या पात्रामुळें तोतयाची लुच्चेगिरी शोधून काढण्यांत नानांचें कांहींच विशेष चातुर्य दिसून येत नाहीं. शुक्राचार्य मद्य पीत होते या एकट्याच आधारावर विद्याहरणांत त्यांना अस्सल दारुडे बनविलें आहे; आणि एकादी संस्था उघडण्याचा ज्याप्रमाणें हल्लीं समारंभ होतो व भाषणें होतात, त्याप्रमाणें त्या नाटकांत दारुपोईचा अनावरणसमारंभ व त्या प्रसंगीं शिष्यवराचें भाषण वगैरे प्रसंग शुक्राचार्यांच्या काळीं बिनधोक दडपून दिले आहेत. मत्स्यगंधेंत गौरीचें पात्र निर्माण करून भीष्माच्या गळ्यांत प्रेमपाश अडकविण्यांत रा. टिपणीसांनीं बरेंच धाडस दाखविलें आहे. या महत्त्वाच्या फेरफाराबद्दल कांहीं टीकाकारांनीं बरीच टीका केली आहे. परंतु गौरीच्या पात्रामुळें भीष्मांच्या गुणांना कोणतेही प्रकारें कमीपणा येत नसून, इतकें प्रेम असतांनाही त्यांनीं एवढा स्वार्थत्याग केला, यामुळें त्यांच्या स्वार्थत्यागाला विशेष महत्त्व येत आहे. आणि म्हणून त्यांचें स्वभाववर्णन (Character-painting) अधिक उदात्त झालें आहे. या कारणास्तव हा महत्त्वाचा फेरफारसुद्धां क्षम्य आहे असें आम्हांस वाटतें.

स्कॉटनें ज्या अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत, त्यांचा मुख्य गुण असा आहे कीं, ज्या काळचें कथानक त्यानें हातांत घेतलें, त्या काळच्या चालीरीतींचें, समाजस्थितीचें त्याचें ज्ञान इतकें बिनचूक आहे कीं, व तें त्यानें इतक्या हुबेहुब रीतीनें ग्रंथांतून वाचकांसमोर मांडिलें आहे कीं, त्याची कादंबरी वाचीत असतांना आपण त्या काळांतच आहोंत कीं काय, असा वाचकांस भास होतो. ज्या काळांतलें कथानक आपण घेतों, त्या काळाशीं एकरूप होण्याची आवश्यकता व उत्सुकता इकडील नाटककारांस किंवा कादंबरीकारांस इतकी दिसत नाहीं. परंतु या बाबतींत आमच्या ग्रंथकारांनीं अधिक लक्ष द्यावें अशी आमची त्यांस विनंती आहे. बेकननें आपल्या एका निबंधांत पुस्तकांना "काळाच्या समुद्रांतील जहाजें" असें म्हटलें आहे. ज्याप्रमाणें जहाजें एका ठिकाणचा माल दुसऱ्या ठिकाणीं घेऊन

जातात, त्याचप्रमाणें पुस्तकेंही या काळातल ज्ञान पुढील काळापर्यंत सुरक्षितपणें संरक्षण करून नेतात. पुस्तकांच्या अभावीं किती तरी ज्ञान कालसागरांत बुडून गेलें असतें. ही उपमा ऐतिहासिक नाटकांना तर फारच यथार्थपणें लागू पडते असें आम्हांस वाटतें. शिवकालीन समाजाच्या चालीरीति, व्यवहार, आचारविचार, वगैरेंचें अगदीं उत्तमरीतीनें अध्ययन करून त्याप्रमाणें जर त्या कालाला अनुलक्षून एकादें नाटक रचिलें, आणि तें तत्कालीन वेष घेऊनच जर रंगभूमीवर प्रयोगरूपानें आणलें, तर त्या काळाची आपल्याला बरोबर कल्पना आणून देण्याला यापेक्षां इतर दुसरें कोणतें साधन आहे ? तसेंच हल्लींच्या सामाजिक चालीरीति, ज्ञानाच्या प्रगतीबरोबर बदलत जाणारे तरुण पिढीचे विचार, त्यामुळें जुन्या नव्या पिढींत वारंवार उत्पन्न होणारा मतभेद, वगैरे गोष्टी यथातथ दर्शविणारीं नाटकें जर पुढें आलीं, तर पुढील लोकांना आपल्या काळाबद्दल जितकी चांगली माहिती होईल, तितकी हल्लींच्या काळांत प्रसिद्ध झालेलें सर्व वाङ्मय वाचून सुद्धां होणार नाहीं.

४. नाटक हें ज्याअर्थीं समाजाचें किंवा मानवी स्वभावाचें चित्र आहे, त्याअर्थीं चांगल्याबरोबर वाईटाचें, सद्गुणाबरोबर दुर्गुणाचें, सदाचाराबरोबर दुराचाराचें चित्र उमटणारच. आणि नाटकाचा हेतु जर चांगल्याचा परिणाम चांगला व वाईटाचा परिणाम वाईट दाखवावयाचा आहे, तर चांगल्याबरोबर वाईट दाखविणें अवश्यच आहे. परंतु याबद्दल खबरदारी एवढीच घेतली पाहिजे कीं, त्याचा प्रेक्षकांच्या मनावर अनिष्ट परिणाम न होतां इष्ट तोच परिणाम होईल. वैद्यकामध्यें विषारी पदार्थांचा प्रसंगीं फार उपयोग असतो. परंतु या विषांच्या प्रमाणांची जशी फार काळजीपूर्वक योजना करावी लागते, तद्वतच समाजाच्या अगर मानवी स्वभावाच्या वाईट भागाचें वर्णन करण्याचें आहे. तसेंच काळ्या पृष्ठभागावर शुभ्रवर्ण ज्याप्रमाणें खुलून दिसतो त्याप्रमाणें सद्गुणाचें तेज फांकण्यालाही दुर्गुणाची मदत होते. इंग्लंडांत प्रसिद्ध झालेल्या सतराव्या शतकांतील नाट्यवाङ्मयाकडे पाहिलें असतां आपल्यास या गोष्टीचें महत्त्व समजून येतें. या सुमारास जीं नाटकें इंग्लिश रंगभूमीवर आलीं, त्यांत विनोद जरी बऱ्याच ठिकाणीं चांगल्या प्रकारचा आहे, तरी त्यांत जें नैतिकवर्तनाचें आणि विवाहबंधनाचें शैथिल्य दर्शविलें आहे, तें कोणाही माणसाच्या अंगावर शहारे उत्पन्न करण्यासारखें आहे.

या सर्वांचा त्या वेळच्या लोकांवर कोणत्या प्रकारचा परिणाम झाला असेल याची क्षणभरसुद्धां विचार न करितां आपल्यास कल्पना करीतां येईल. नैतिक शैथिल्य दर्शविणाऱ्या नायकाच्या प्रत्येक कृत्याबरोबर आनंदाच्या गुदगुल्या होऊन ज्या प्रेक्षकांकडून टाळ्या पडत, त्या प्रेक्षकांची नीति किती नीच दशेला पोंचली असेल याचा विचारसुद्धां करितां येत नाहीं. हें येथें सांगावयाचें कारण इतकेंच कीं, हल्लीं आपल्याकडेही कित्येक नाटकांतून हीच स्थिति होऊं पाहत आहे. समाजांत जर अनीति आहे, व तिचे दुष्परिणाम जर लोकांच्या मनावर बिंबवावयाचे आहेत, तर नाटकांत अनीतीचेंही चित्र आलें पाहिजे, हें आमचें मत आम्हीं आरंभींच सांगितलें आहे. परंतु हें चित्र अगदीं अस्पष्ट उठलें पाहिजे. या अनीतीच्या भागाचें केवळ दिग्दर्शन झालें पाहिजे. एका नाटकांत जबरी-संभोग व प्रत्यक्ष बालहत्या दाखविली आहे ! एकांत एका राजपुत्राचा व त्याच्या मित्राचा एका अविवाहित मुलीशीं वाईट संबंध दाखवून, त्या मित्रानें त्या कुमारिकेशीं लग्न लाविलें असतां, त्या लग्नाच्या आच्छादनाखालीं राजपुत्राला त्या मुलीशीं उघडपणें अनाचार चालू ठेवणें किती सुलभ होईल याबद्दल विवेचन केलें आहे ! विद्वान् नाटककार जर असें करूं लागले, तर मग पाटणकरी, नेवाळकरी नाटकांची गोष्ट विचारूंच नका. आमच्या मतें हा सर्व प्रकार अत्यंत गर्हणीय होय. रा. केळकर यांनीं "तोतयाच्या बंडां"त बगंभट व विठी यांचें दुर्वर्तन फारच खुबीनें दर्शविलें आहे. एकाद्या मनुष्याचे सद्गुण दाखविणाऱ्या गोष्टीपेक्षां त्याच्या दुर्वर्तनाच्या अफवांवर ज्याप्रमाणें समाजाचा लवकर विश्वास बसतो, त्याचप्रमाणें समाजाची नीतिदर्शक व अनीतिदर्शक अशीं दोन चित्रें जर सारख्याच स्पष्टतेनें लोकांसमोर मांडिलीं, तर दुसऱ्या चित्राचा त्यांच्यावर अधिक लवकर परिणाम होण्याचा संभव असतो.

येथें दुसरा प्रश्न साहजिक असा उद्भवतो कीं, नाटकांत मग शृंगाराला कोठपर्यंत अथवा किती स्थान असावें ? या प्रश्नाला हल्लीं बरेंच महत्त्व आलें आहे. अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें यांत शृंगाराला अवास्तव महत्त्व मिळून लोकांच्या सदभिरुचीला अनिष्ट वळण लागत चाललें आहे अशी हल्लीं एक तक्रार आहे. यांत जरी कांहीं अतिशयोक्ति असली तरी कांहीं तथ्यही आहे, ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. कित्येक कादंबऱ्या, नाटकें, व गोष्टी यांत शृंगार उत्तानरीतीनें दर्शविलेला असतो, आणि त्यामुळें लहान मुलांमुलींच्या मनावर वाईट परिणाम होऊन प्रेमाबद्दल त्यांच्या विचित्र कल्पना (ज्याला इंग्रजींत maudlin sentimentalism म्हणतात) होण्याचा संभव आहे. याबद्दल एकदां एका गृहस्थाशीं बोलत असतां, त्यांनीं "The virtue that requires to be guarded is not worth the sentinal" या म्हणीचा आश्रय करून प्रस्तुत स्थितीचें समर्थन केलें. त्यांच्या म्हणण्याचा इत्यर्थ असा कीं, हल्लींच्या वाङ्मयांत शृंगाराला विशेष प्राधान्य मिळाल्यामुळें मुलांमुलींना अल्पवयांत स्त्रीपुरुषसंबंधाबद्दल (relation of the sexes) योग्य कालापूर्वी ज्ञान होण्याचें जें भय आहे, त्यांत विशेष अर्थ नाहीं.कारण शृंगाराला वाङ्मयांतून फांटा दिला तरी, आपल्या कित्येक सामाजिक चालीरीतींमुळें हें ज्ञान मुलांना अल्पवयांत झाल्याशिवाय राहत नाहीं. शिवाय दुसऱ्यांच्या नैतिक वर्तनाबद्दल आपण घरांतून पुष्कळदां इतक्या उघडपणें चर्चा करितों कीं, तीं मुलांच्या कानीं जाऊन त्याचा व्हावयाचा तो अयोग्य परिणाम होतोच. यावरून मुलांना असली माहिती अल्पवयांत होण्याचा आणि शृंगारिक वाङ्मयाचा जर मुळींच कार्यकारणभाव नाहीं, तर शृंगारानें कथात्मक वाङ्मयाला (fiction) जी गोडी येते तिला आपण कां मुकावें ? शिवाय, जर आमची नीति इतकी नाजूक झाली असेल, कीं वाङ्मयांतील शृंगाररसाच्या अल्पदर्शनानें ती डळमळूं लागते, किंवा समाजांतील अनीतीच्या यथातथ काढलेल्या चित्रानें तिला धक्का बसून तिचा पाया अजीबात ढांसळून जातो, तर असली तकलादी नीति असण्यापेक्षां ती नसलेली पुरवली. कारण, असल्या नीतीच्या संरक्षणार्थ इतके श्रम व काळजी करण्याइतकी तिची योग्यताच नाहीं. ज्या ठिकाणीं स्त्रियांचें नांवसुद्धां ऐकूं येत नाहीं त्या ठिकाणीं ब्रम्हचर्य पाळल्याची प्रौढी मारणें ज्याप्रमाणें व्यर्थ होय, त्याप्रमाणेंच कुमार्गांतील आमिषें मोह घालीत असतां ज्याची नीति तावून सुलाखून निघाली नाहीं, त्यानें आपल्या नीतीबद्दल प्रौढी मारणें व्यर्थ आहे; म्हणून हल्लींच्या वाङ्मयांत शृंगाराचा प्रवेश होत असल्यामुळें आमची नीति बिघडत आहे अशी ओरड करणें म्हणजे आपल्या नीतिमत्तेच्या ठिसूळपणाबद्दल अप्रत्यक्ष कबुली देण्यासारखेंच आहे.

मुलांना जी माहिती होणें इष्ट नाहीं, ती केवळ शृंगारिक वाङ्मयामुळें न होतां, सामाजिक चालीरीतींमुळेंही होते, ही गोष्ट जरी मान्य केली, तरी ती माहिती एकदां झाल्यावर शृंगारिक वाङ्मयाचा किंवा नाटकांतील शृंगारिक देखाव्यांचा या लोकांच्या मनावर कांहींच परिणाम होत नसेल असें आम्हांस वाटत नाहीं. उलट, झालाच तर अनिष्टच परिणाम होत असला पाहिजे. सौभद्रांतील कृष्ण व रुक्मिणी यांचा प्रवेश, पाटणकरी झगडे, किंवा शारदामंडन नाटकांतील कामशास्त्राची मीमांसा, यांचा मनावर अल्पही परिणाम होऊं देण्याइतकी आमच्या मुलांचीं, स्त्रियांचीं व समाजांतील खालच्या दर्जाच्या लोकांचीं (mob) मनें बळकट आहेत असें मानण्याइतके आम्ही आशावादी नाहीं. सुशिक्षित आणि प्रौढ प्रेक्षक कदाचित् या गोष्टीकडे लक्ष देणार नाहींत; परंतु सर्वच प्रेक्षकाची अभिरुचि इतकी सुसंस्कृत असेल असें मानणें चुकीचें आहे.

नाटक लिहितांना जी गोष्ट लक्षांत ठेवण्याबद्दल आमची नाटककारांना विनंती आहे, ती गोष्ट ही कीं, प्रेक्षकवर्ग हा स्त्रिया, पुरुष व मुलें या तिघांचा मिळून बनलेला असतो. प्रेक्षकवर्ग जर केवळ प्रौढ व सुशिक्षित पुरुषांचाच असता, तर संभोगशृंगाराचें वर्णन कितीही उत्तान व स्पष्ट केलें असतें तरी हरकत नव्हती. पण प्रेक्षकवर्ग ज्या अर्थी स्त्रीपुरुषमिश्रित आहे, त्या अर्थी शृंगारिक प्रवेश लिहितांना स्त्रीप्रेक्षकांच्या विनयशील व लज्जाशील नाजूक मनोवृत्तीला धक्का न बसेल

अशी नाटककारांनीं खबरदारी घेतली पाहिजे. सौभद्रांतील कृष्णरुक्मिणीचा प्रवेश कोणच्या कुलीन स्त्रीला धीटपणें मान वर करून पाहवेल ? भाऊबंदकींत राघोबादादा व आनंदीबाई यांच्या प्रवेशांत सुद्धां शृंगार जरा जास्ती झाला आहे.' प्रेमबंधनां'त बाजीराव आपल्या सुशील विवाहित पत्नीचा त्याग करून बाळगिलेल्या स्त्रीबरोबर विलास करीत आहे हें रंगभूमीवर दाखविणें तर अगदींच अनुचित होय.याप्रमाणें अनेक नाटकांतले फाजील शृंगाराचे प्रवेश दाखवितां येतील, परंतु विस्तारभयास्तव एवढेंच पुरे. ज्या मुद्द्यावर आम्हांला विशेष जोर द्यावयाचा आहे तो हाच कीं, पतिपत्नींच्या एकांतांतील जे प्रसंग अत्यंत पवित्र मानले गेले आहेत, ते रंगभूमीवर आणूं नयेत. असले प्रवेश पाहणें पुरुषांना किती जरी आवडलें तरी मिश्रसमाजांत स्त्रियांच्या मनोवृत्तींना यामुळें मोठा धक्का बसतो; आणि प्रेक्षकांपैकीं कोणाचीही चित्तवृत्ति अशा रीतीनें गोंधळून टाकण्याचा नाटककारास केव्हांही हक्क नाहीं. पुनः दुसरें असें कीं, सुदैवानें आमच्या समाजांत हल्लीं प्रौढ कुमारिकांचा वर्ग वाढत आहे, आणि त्यांच्या मनावर अयोग्य संस्कार होणार नाहींत याबद्दल प्रौढ विद्यार्थ्यांपेक्षांही अधिक काळजी घेतली पाहिजे. असें असतांना त्यांच्यासमोर 'विद्याहरणां'तील श्रीमती कुमारी रसिकादेवीसारखीं पात्रें ठेवणें इष्ट आहे कीं अनिष्ट आहे, याचा सुज्ञांनीं विचार करावा.

वरील सर्व विवेचनावरून नाटकांत शृंगाररस आणण्याच्या आम्हीं अगदीं विरुद्ध आहोंत असें समजण्याचें कारण नाहीं. नवरसांपैकीं शृंगार हा एक प्रधान रस आहे, आणि तो नाटकांत असल्यानें नाटकाला माधुर्य येतें असेंही आमचें मत आहे. शृंगाररसाचा पूर्ण अभाव असूनही चित्ताकर्षक अशीं कांहीं नाटकें, मुद्राराक्षस, किंवा मराठींतील 'तोतयाचें बंड' यांसारखीं आहेत; पण तीं फारच थोडीं. शिवाय शृंगाररसाला काव्यनाटकांतून छाट मिळणें रसिकतेच्या दृष्टीनेंही फार हानिकारक आहे. शृंगाररसाची मौज अशी आहे कीं, तो उत्तान केला असतां जितका खुलतो, त्यापेक्षां तो व्यंग्य असतां कितीतरी अधिक त्याची माधुरी वाढते. तसेंच व्यंग्य शृंगारामध्यें एक प्रकारचा उदात्तपणाही असतो.

अशा व्यंग्य शृंगाराचीं मराठी नाटकांत कांहीं चांगलीं उदाहरणें आहेत. 'मूकनायकां'त विक्रांत आणि सरोजिनी यांचा बागेंतल्या भेटीचा प्रवेश या दृष्टीनें उत्तम वठला आहे. 'मतिविकारां'तसुद्धां, मनोहर व सरस्वती यांच्या एका प्रवेशांत कवीनें एक अवघड कामगिरी मोठ्या खुबीनें व कुशलतेनें उरकून टाकिली आहे. 'मानापमानां'तील धैर्यधर व भामिनी यांचा चौथ्या अंकांतील प्रवेश फारच नामी साधला आहे. या ठिकाणीं व्यंग्य शृंगाराची गोडी काय आहे ही अगदीं स्पष्ट दिसून येते. त्याच नाटकांतील आधींच्या एका अंकांतील भामिनी व कुसुम यांचा प्रवेशसुद्धां चांगला साधला आहे; पण तेथें विप्रलंभ शृंगार आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या चंद्रगुप्त नाटकांत चंद्रगुप्त व तारिणी याचे एक दोन प्रवेशही या दृष्टीनें वाचनीय आणि प्रेक्षणीय आहेत. त्यांतील शृंगाराच्या व्यंग्यत्वामुळें तारिणीसारख्या कुमारिकेचें शालीनत्व व उदात्तपणा फारच खुलून दिसतो. अशा रीतीनें नाटकांत शृंगाररस घालतेवेळीं तो शक्य तितका व्यंग्य घालण्याबद्दल आमची नाटककारांस विनंती आहे. त्यामुळें नाट्यसाहित्यास एक प्रकारचें गंभीर परंतु मोहक स्वरूप येऊन प्रेक्षकांच्या सदभिरुचीला कोणच्याही प्रकारचा धक्का बसणार नाहीं.

नाटक एकाद्या ध्येयाला धरून असावें कीं काय, हा प्रश्न येथें विचार करण्यासारखा आहे. पुष्कळांचें मत असें आहे कीं, नाटकाचा हेतु लोकांना शिक्षण देणें हाच पाहिजे. कोणतेंना कोणतें तरी नैतिक किंवा सामाजिक ध्येय नाटककर्त्यानें लोकांसमोर ठेवण्याचा यत्न केला पाहिजे; आणि जें नाटक या हेतूनें लिहिलें गेलें नसेल, किंवा ज्या नाटकांत असें कांहीं तरी ध्येय लोकांपुढें ठेवण्यांत आलें नसेल, तें खरें नाटकच नव्हे. किंबहुना, कांहीं तरी romantic किंवा काल्पनिक पात्रें निर्माण करून, केवळ लोकांच्या चित्तरंजनार्थ नाटक लिहिणें म्हणजे नाटककर्त्यानें आपल्या लेखनशक्तीचा अपव्यय करणें होय. नाटक हें ज्या अर्थी समाजाचें चित्र किंवा सृष्टीचा आरसा आहे, त्या अर्थी ज्या गोष्टी आपण पाहतों त्याच नाटकांत आल्या पाहिजेत. या लेखाच्या आरंभीं ज्या काल्पनिक सृष्टीचें वर्णन करण्यांत आलें आहे, अशी काल्पनिक सृष्टि कवीनें निर्माण करणें यांच्या मतें अयोग्य होय.

वास्तविक पाहतां प्रत्येक नाटकाचा कांहीं तरी नैतिक हेतु असला पाहिजे असा आग्रह धरणें चुकीचें आहे असें आम्हांस वाटतें. ज्याप्रमाणें पाण्याच्या प्रवाहाचा गिरणी चालविण्यासारख्या एकाद्या उपयुक्त गोष्टीकडे आपण उपयोग करून घेतों, त्याप्रमाणें मनुष्यस्वभावाची करमणुकीकडे (recreation) साहाजिक जी प्रवृत्ति आहे, तिचा नाटकाच्या द्वारें चांगल्या प्रकारें उपयोग करून घेतां येतो एवढेंच. नाटकाचे योगानें नीतितत्त्वें अगर दुसरीं कोणतीं तरी मतें लोकांच्या मनावर ठसवितां आलीं तर उत्तमच; पण या हेतुव्यतिरिक्त नाटकच असूं नये असें म्हणणें दुराग्रहाचें आहे असें आम्हांस वाटतें. नाटकाचा प्रधान हेतु चित्तरंजन हा आहे व शिक्षणाचा हेतु गौण आहे. नाटकाची जी व्याख्या "नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्" अशी केली आहे ती अगदीं योग्य आहे असें आम्हांस वाटतें. त्यांत खबरदारी एवढीच घ्यावयाची कीं, हें समाराधन अयोग्य मार्गानें न व्हावें. शिक्षणहेतु हेंच लक्षण लावून आपण जर नाट्यसाहित्याचें परीक्षण करूं लागलों तर शाकुंतल, उत्तररामचरित्र, मालतीमाधव, अशा किती तरी सुंदर कृतींना आपल्याला मुकावें लागेल. जर नाटक ही ललितकलांपैकीं एक कला आहे, तर त्याला अशा एकाद्या विशिष्ट शिक्षणहेतूची काय आवश्यकता आहे ? एकादा सुंदर पुतळा, किंवा एकादें सुंदरसें चित्र, यांचा हेतु काय असतो ? एकादा मूर्तिकार अगर चित्रकार, मूर्ति कोरतांना किंवा चित्र काढतांना, कोणचा नैतिक हेतु मनांत धरून मूर्ति अगर चित्र तयार करितो ? केवळ लोकांचें चित्तरंजन व्हावें, ललितकलेची वाढ व्हावी, हाच त्याचा हेतु असतो. आतां मूर्तिकार अगर चित्रकार यांना एकादी देवाची मूर्ति किंवा एकाद्या उत्तम प्रसंगाचें चित्र काढून चित्तरंजनाबरोबर लोकांना शिक्षण देतां येणें शक्य आहे ही गोष्ट खरी; परंतु रोम येथील जगप्रसिद्ध व्हीनसच्या पुतळ्याचें सौंदर्य आणि महत्त्व, तो पुतळा एकाद्या देवाचा किंवा देवतेचा नाहीं म्हणून जसें नाहींसें होत नाहीं, किंवा पारिसच्या "ला जीओकांडी" या जगद्विख्यात् चित्राची महती किंवा उपयुक्तता तें चित्र एकाद्या साधारण स्त्रीचें असून उदात्त प्रसंगाचें नाहीं म्हणून कमी होत नाहीं, त्याप्रमाणेंच नाटकांचेंही कां असूं नये? म्हणून, शाकुंतल वगैरेसारख्या सर्वांगसुंदर नाटकांची परीक्षा, त्यांतील नैतिक ध्येय काय आहे, त्यांतील प्रसंग किंवा पात्रें वस्तुस्थितीला किती धरून आहेत या लक्षणांनीं न करतां, केवळ ललितकलेंतील एक कृति (piece of art) या दृष्टीनें केली पाहिजे. जे लोक अद्भुताच्या विरुद्ध आहेत त्यांना आमचें हेंच म्हणणें आहे. अद्भुत केवळ कविकल्पना आहे, जगांत कधींही दृष्टीस न पडणारें आहे, म्हणून अद्भुताविरुद्ध ओरड करण्याचें कारण नाहीं. शाकुंतल, शापसंभ्रम वगैरे नाटकें पाहतांना तीं अद्भुत आहेत म्हणून आपल्याला कधीं कंटाळा येत नाहीं. उलट व्यवहारांत न आढळणारी अशी पूर्णता (perfection) अद्भुतांत आपल्याला पाहावयास सांपडते; व यामुळेंच अद्भुतावर आपलें प्रेम बसतें. कीट्सनें म्हटलें आहे कीं, "a thing of beauty is a joy for ever." हें अगदीं खरें आहे, आणि याची प्रतीति अद्भुतापासून आपल्याला आनंद होतो यावरूनच दिसून येते. शिवाय अद्भुतरसप्रधान नाटकांनीं आपल्याला शिक्षण मिळत नाहीं हें म्हणणेंही वाजवी नाहीं. सुंदर कारागिरीच्या वस्तु आणि चित्रें यांनीं आपल्या रुचीला ज्याप्रमाणें एक प्रकारची संस्कृति (refinement) येते, त्याप्रमाणेंच असल्या नाटकांनींही येते; आणखी पुनः, अद्भुतांत आपण अत्यंत शुद्ध वातावरणांत हिंडत असल्यामुळें, आपल्या मनावर त्यामुळें शुद्ध व पवित्र संस्कारही अधिक लवकर होतात.

आतां नाटकाचें ध्येय काय असावें हा प्रश्न प्रत्येक नाटककाराच्या इच्छेवर आहे. राजकीय व्यवस्थेनें नाखुष झालेला, किंवा मनुष्याच्या तात्त्विक हक्कांची बजावणी व्यवहारांत बरोबर होत नाहीं म्हणून असंतुष्ट झालेला नाटककार, नाटकाच्या रूपानें आपलीं मतें लोकांसमोर मांडील. अशीं नाटकें आपल्याकडे होणें प्रस्तुत परिस्थितींत शक्य नाहीं. कै. शंकर मोरो रानडे यांनीं आपल्या नाट्यकथार्णवांत अशीं कांहीं लहान नाटकें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत. कांहीं वर्षांपूर्वी स्वदेशीचा उपदेश करणारें एक नाटक

रंगभूमीवर आलें होतें. परंतु तें एकंदर परिस्थितीमुळें तितकेंच राहिलें. इंग्रजी लेखक ॲडिसन् याचें केटो हें राजकीय नाटकाचें उत्तम उदाहरण आहे. सामाजिक नाटकांस मात्र आपल्याकडे पुष्कळ वाव आहे. समाजाला रूढीचें पडलेलें दृढ बंधन, बालविवाहानें होणारी तरुण पिढीची पिच्छेहाट, विधवाविवाहप्रतिबंधामुळें समाजांत वाढणारी अनीति, शिक्षणाचा व्हावा तसा प्रसार होत नसल्यामुळें बहुजनसमाजाचें कायम असलेलें गाढ अज्ञान, पाश्चात्य शिक्षण मिळाल्यानें तरुण पिढीच्या वाढणाऱ्या आकांक्षा, व त्याला जुन्या पिढीकडून होणारा विरोध, या सर्व गोष्टी नाटकांतून दर्शविल्यानें लोकांच्या मनावर जितका लवकर परिणाम होईल, तितका शेंकडो व्याख्यानांनीं किंवा लेखांनीं होणार नाहीं. प्रतिभाशाली नाटककारांनीं इकडे हल्लींपेक्षां अधिक लक्ष द्यावें अशी आमची आग्रहाची विनंती आहे. सामाजिक नाटकांचा परिणाम समाजावर किती लवकर व पुष्कळ वेळ टिकणारा होतो, हें शारदा नाटकामुळें जिकडे तिकडे कांहीं काळपर्यंत कशी खळबळ उडून गेली होती हें पाहिलें असतां समजणार आहे.

आजपर्यंत जीं कांहीं थोडींबहुत सामाजिक नाटकें रंगभूमीवर आलीं आहेत,त्यांत **शारदा** पहिल्या नंबरचें आहे असें आम्हांस वाटतें. शारदेंत बालावृद्धविवाहावर जरी मुख्य रोंख आहे, तरी नाटककर्त्यांनीं त्यांत इतर दोन सुधारणांचेंही "सूत उवाच" करून ठेविलें आहे. त्या सुधारणा म्हणजे ऋतुप्राप्तीनंतर लग्न, व देशस्थ-कोंकणस्थ-विवाह. शारदेंत आम्हांस जो एक दोष दिसतो तो ऐवढाच कीं, तें नाटक आनंदपर्यवसायी न होतां शोकपर्यवसायी व्हावयास हवें होतें. म्हणजे प्रेक्षकांच्या मनावर त्याचा अधिक जोराचा परिणाम झाला असता. पुनः दुसरें असें कीं, शेवटीं नायकाचेंच शारदेशीं लग्न लागल्यामुळें नायकावर स्वार्थपरायणतेचा दोष येऊन त्याच्या उदात्तपणाला जरा कमीपणा येतो. शारदा नदीवर पहांटे जीव देण्यास जात असतां कोदंड येऊन तिला आत्महत्येपासून परावृत्त करितो, हा प्रवेश फारच हृदयद्रावक व चटकदार झाला आहे. परंतु कोदंड शारदेच्या विनवणीस न द्रवतां अविवाहित राहून धर्मप्रसाराचें कार्य करण्याचा आपला निश्चय कायम ठेवितो, आणि शारदा 'लग्न करीन तर कोदंडाशींच करीन' असा आपला निश्चय सांगून कोदंड ज्या अर्थी लग्न करीत नाहीं त्या अर्थी 'मीही कुमारिकाच राहून स्त्रियांच्या उद्धारार्थ आयुष्य वेंचीन' असा पण करते; किंवा यापेक्षांही, शारदेचें लग्न श्रीमंताशींच लागून, तिला लवकरच वैधव्य प्राप्त होतें, व तिची दशा पाहून आधींच विद्धहृदय झालेल्या कोदंडाला आपलें कर्तव्य करण्याला अधिकच जोर येतो; असें शेवटीं दाखविलें असतें, तर शारदा नाटक आहे याहूनही अधिक गोड व फारच परिणामकारक झालें असतें असें आम्हांस वाटतें. विशेषतः दुसऱ्या प्रकारचाच शेवट अधिक चटकदार झाला असता. कारण, त्यानें समाजांत हमेश घडणाऱ्या गोष्टी, बालावृद्धविवाह व बालवैधव्य, या दोन्ही रंगभूमीवर आणतां आल्या असत्या; शिवाय भटाची मुलगी आजन्म अविवाहित राहते हें वस्तुस्थितीला विरुद्ध आहे, असाही पहिल्या प्रकारच्या शेवटावर आक्षेप येण्याचा संभव आहे.

सामाजिक नाटकांत नांव घेण्यासारखीं दुसरीं दोन नाटकें मतिविकार व कांहीं अंशीं प्रेमसंन्यास हीं होत; आणि हीं दोन्हीही चांगल्यापैकीं नाटकें आहेत. मतिविकार नाटक लोकप्रिय होण्यास हरएक प्रकारें पात्र असून, तें तसें कां होऊं नये याचें आम्हांस फार आश्चर्य वाटतें. 'मतिविकारा'चा विधवाविवाहनिषेधावर विशेष रोंख असून त्याबरोबर स्त्रीशिक्षण, व जरठकुमारीविवाहाची हास्यास्पदता व दुष्परिणाम फारच कुशलतेनें व मार्मिकतेनें दाखविले आहेत. प्रेमसंन्यासाचाही मुख्य हेतु विधवाविवाहच असून, त्याबरोबर स्त्रीशिक्षण, मिश्रसमाजपद्धति, बालविवाहांत विषमस्वभावांच्या वधूवरांचा होणारा संयोग, यांचा संबंध आणला आहे. प्रेमसंन्यासामध्यें आमच्या मतें मुख्य दोन चुका झाल्या आहेत. पहिली चूक अशी कीं, लीलेच्या जोडीला सुशीलेचें पात्र ठेविल्यामुळें प्रेक्षकांच्या मनावर विधवाविवाहाबद्दल जितका अनुकूल परिणाम व्हावयास पाहिजे तितका होत नाहीं. प्रेमसंन्यास नाटक प्रसिद्ध झाल्यावर तें विधवाविवाहाला अनुकूल आहे कीं प्रतिकूल आहे याबद्दलच पुष्कळ वादविवाद चालला होता

असें आम्हांस स्मरतें; दुसरी चूक अशी कीं प्रस्तुत नाटक वास्तविक आनंदपर्यवसायी व्हावयास हवें होतें. लीलेचा पुनर्विवाह शेवटीं न लागल्यामुळें विधवाविवाहाबद्दल प्रेक्षकांचें अनुकूल मत न होण्याला आणखी भर पडते. या नाटकाची स्थिति रा. कोल्हटकरांच्या वीरतनयाच्या अगदीं उलट झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. म्हणजे वीरतनय वास्तविक शोकपर्यवसायी व्हावयास हवें असून आनंदपर्यवसायी झाल्यामुळें त्यांची गोडी जशी कमी झाली आहे, तशीच, हें नाटक वास्तविक आनंदपर्यवसायी हवें असतांना ओढून ताणून शोकपर्यवसायी केल्यामुळें, या नाटकाची सुद्धां गोडी जरा कमी झाली आहे. तसेंच यांतील कित्येक प्रवेश काव्य या दृष्टीनें यद्यपि फारच हृदयंगम झाले आहेत, तथापि संविधानक असावें तितकें व्यवस्थित नाहीं. आगगाडीचा प्रवेश व तसलेच दुसरेही कांहीं प्रवेश घातले नसते तरीही चाललें असतें.दुसरा एक दोष लांब आत्मगत भाषणांचा.हीं भाषणें इतकीं लांबलचक आहेत कीं, तीं बहुतेक सर्वत्र,काव्य व भाषा या दोन्ही बाजूंनीं सुंदर असतांही, नाटकाच्या दृष्टीनें कंटाळवाणीं होतात. जयंत निष्कारण आपल्या पत्नीचा द्वेष करितांना दाखविला आहे,यामुळें नायकाच्या पात्राला बराच कमीपणा येत आहे; व मनोरमेच्या मृत्यूची बातमी ऐकून कांहींच दुःख न होतां, उलट लीलेशीं लग्न करण्याला आतां अडथळा उरला नाहीं या विचारानें त्याला अत्यानंद होतो, हें लौकिकदृष्ट्या कसेंसेंच वाटतें.

कांहीं ऐतिहासिक नाटकेंही आपल्याकडे चांगलीं आहेत. ऐतिहासिक नाटकांचें ध्येय आपल्या गतकालीन इतिहासाबद्दल अभिमान उत्पन्न करणें हें आहे. विविधज्ञानविस्तारांतील एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें, ऐतिहासिक नाटकांतून " आपल्या पूर्वजांनीं केलेलीं पराक्रमाचीं चित्रें हुबेहूब वठविलेलीं पाहून प्रेक्षकांस गत कालाबद्दल अभिमान आणि भविष्यकालासंबंधानें उत्साह वाटूं लागतो. " कांचनगडची मोहना, भाऊबंदकी, तोतयाचें बंड, अशीं कांहीं ऐतिहासिक नाटकें फारच चांगलीं वठलीं आहेत. ऐतिहासिक नाटकांबद्दल वर एके ठिकाणीं विवेचन झालेंच आहे, तेव्हां त्याबद्दल येथें पुनः विचार करण्याचें कारण नाहीं.

गेल्या पंचवीस वर्षांत आपल्या नाट्यसाहित्यांत कांहीं धार्मिक व पौराणिक नाटकांचीही भर पडली आहे. त्यांपैकीं तुकाराम, संत सखूबाई, नामदेव हीं चांगल्यांपैकीं आहेत. धार्मिक नाटकांचा उद्देश, संतांचीं किंवा देवांचीं चरित्रें प्रेक्षकांसमोर आणून, तद्द्वारें प्रेक्षकांची धर्मजिज्ञासा जागृत करावी हा असतो. तुकाराम व सखूबाई हीं दोन्ही पात्रें पाहिलीं असतां "क्षमाशस्त्रं करे यस्य दुर्जनः किं करिष्यति" या कव्युक्तीची चांगली साक्ष पटते. या धार्मिक नाटकांचे विरुद्ध कांहीं मंडळींचें मत आहे; त्यांच्या मतें साधुसंत व स्वर्गलोकींचे देव यांना पृथ्वीवर, आणि तेंही रंगभूमीवर, अशा रीतीनें खेंचून आणणें बरोबर नाहीं. १९०६ सालीं एका टीकाकारानें विविधज्ञानविस्तारांत " पुंडलीक" व "दामाजी " या नाटकांचें परीक्षण करितांना याबद्दल पुढीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत: " संतांचे उपदेश ज्याप्रमाणें पवित्र, तसेच त्यांचे देहही पवित्र होत. अपात्र माणसांच्या हातीं त्यांचे उपदेश जसे मातीच्या मोलाचे होतात, तसेच नाटक्यांचे अंतर्बाह्य अपवित्र देहांचे ठिकाणीं संतांच्या देहांचा अधिवास कल्पिणें म्हणजे पवित्रास बुध्या अपवित्र बनविणें नव्हे काय ?......भक्तिरसाचा आस्वाद महाराष्ट्रीयांस सुलभ करून देण्याची अमूप साधनें खुद्द भक्तमंडळानेंच सुलभ करून ठेविलीं आहेत. ग्रंथरूपानें तुमच्या सेवेस मूर्तिमंत व कायम हजर असतांना पुनः त्या प्रेमळ व मंगलधाम विभूतींस अस्पृहणीय अशा परिस्थितींत आणून सोडण्यापासून विशेष लाभ तो काय?" याप्रमाणें धार्मिक नाटकांविरुद्ध दोनच आक्षेप दिसतात. पहिला, पवित्र संतांचीं कामें अपवित्र व हलकट नटांनीं करणें; आणि दुसरा, वरील साधुसंतांचे ग्रंथ आज आहेत, त्यांच्यावरून लोकांना भक्तिरस प्रत्यक्ष चाखण्यास मिळणें शक्य असतां नाटकाची आवश्यकता नाहीं. नाटकांचे योगानें लोकांना शिक्षण देणें सुलभ जातें, ही गोष्ट मान्य केली असतां हे दोन्ही आक्षेप फोल ठरतात. पवित्र माणसांच्या भूमिका (parts) अपवित्र नटांनीं घेऊं नयेत असा निर्बंध करूं म्हटलें तर, धार्मिकच काय परंतु ऐतिहासिक व सामाजिक सारींच नाटकें रंगभूमीवर येण्यास अयोग्य ठरतील. तुकारामाची भूमिका जशी अपवित्र नटानें

घेणें योग्य नाहीं, तशी शूर शिवाजीचीही भूमिका स्वप्नांत सुद्धां युद्ध न पाहिलेल्या नटानें घेऊं नये, किंवा मतिविकारांतील इंद्रियनिग्रही मनोहरपंताची भूमिका वेश्यासक्त नटानें घेऊं नये, हें सहजच सिद्ध होतें; आणि असें म्हणूं लागलें तर उद्यां एकही नाटक रंगभूमीवर येऊं शकणार नाहीं. नटांचें नैतिक वर्तन वाईट असतें म्हणून त्यांचे हातीं चांगलीं नाटकें देऊं नयेत असें म्हणण्यापेक्षां, चांगलीं उदात्त नाटकें रंगभूमीवर आणवून प्रेक्षकांची व तशीच नटांचीही उन्नति करण्याचा प्रयत्न करणें अधिक चांगलें नाहीं काय ? शिवाय प्रेक्षक नाटक पाहतांना नटाचें खाजगी वर्तन कसें आहे याचा विचार करितात असें आम्हांस वाटत नाहीं. नाटकाचा प्रयोग पाहतांना प्रेक्षकांवर त्याचा परिणाम होणें हें सर्वस्वीं नटाच्या अभिनयकौशल्यावर अवलंबून आहे. दुसऱ्या आक्षेपाला उत्तर असें कीं, केवळ भक्तिरसाचे किंवा धार्मिक ग्रंथ वाचूनच जर लोकांवर भक्तीचें माहात्म्य आणि धर्माचीं तत्त्वें बिंबण्याचा संभव आहे, तर मग मराठ्यांच्या इतिहासाचे ग्रंथ वाचून लोकांस गतकालाबद्दल व पूर्वजांबद्दल अभिमान वाटण्याचा तितकाच संभव आहे; किंवा आगरकरांसारख्यांच्या तेजस्वी लेखकाचे सामाजिक सुधारणेवरचे जोरदार निबंध वाचून सामाजिक सुधारणेचीं तत्त्वें पटण्याचा, किंवा डा० भांडारकरांसारख्यांचीं नैतिक व्याख्यानें ऐकून नीतितत्त्वें मनावर ठसण्याचाही तोच संभव आहे. मग ऐतिहासिक, सामाजिक आणि नैतिक नाटकें तरी कशाला पाहिजेत ? सारांश काय कीं, ऐतिहासिक, सामाजिक, आणि नैतिक नाटकांनीं प्रेक्षकांच्या मनावर इष्ट तो परिणाम होतो हें कबूल करून जर त्यांची उपयुक्तता मान्य केली, तर धार्मिक नाटकांचाच मात्र तसा परिणाम कां होऊं नये हें कळणें अवघड आहे. आमचें मत असें आहे कीं, ज्याप्रमाणें ऐतिहासिक आणि सामाजिक नाटकांची आवश्यकता आहे, त्याप्रमाणेंच धार्मिक नाटकांचीही आवश्यकता आहे. हीं नाटकें अधिकारी नाटककारांकडूनच लिहिलेलीं असावींत. "पुंडलीक" अगर "दामाजी" यांसारखीं नसावींत ही गोष्ट निर्विवाद आहे.

६. यापुढें नाट्यसाहित्याच्या दुसऱ्या महत्त्वाच्या अंगाकडे आम्ही वळणार आहों. हा भाग म्हणजे विनोद व श्लेष (Humour and wit). प्रारंभींच विनोद व श्लेष यांच्या भिन्नत्वाबद्दल आमचें काय मत आहे हें सांगितलें पाहिजे. या दोहोंचीही बरोबर व्याख्या सांगतां येणें कठीण आहे, तथापि साधारणपणें असें म्हणतां येईल कीं, एकाच शब्दाच्या भिन्न अर्थामुळें वाक्यार्थाची चमत्कृति म्हणजे श्लेष; आणि पात्रांच्या (characters) स्वतःच्या किंवा परस्परांच्या संबंधांत उत्पन्न होणारें प्रसंगाचें वैलक्षण्य, कीं ज्यामुळें मनाला चमत्कृति वाटते, तो विनोद. पात्रांची ही स्थिति विरोधात्मक पाहिजे; आणि हा विरोध असा सहज आला पाहिजे, कीं त्यामुळें मनुष्यस्वभावाचें वैलक्षण्य किंवा चांचल्य दिसून आलें पाहिजे. विनोदाचें हें जें स्वरूप सांगितलें आहे, तें आतां जीं कांहीं विनोदाचीं उदाहरणें आम्ही पुढें सांगणार आहों त्यावरून स्पष्ट होईल.

श्लेष व विनोद या दोन्ही अलंकारांनीं आमचें नाट्यसाहित्य रा. कोल्हटकर, केळकर, खाडिलकर, गडकरी, या चौघांनीं चांगल्या प्रकारें नटविलें आहे. रा. कोल्हटकर यांचें श्लेष आणि विनोद या दोहोंवरील स्वामित्व सर्वमान्यच आहे. रा. गडकऱ्यांची श्लेष साधण्याची हातोटी जरी चांगली व कुशल आहे, तरी त्यांच्यापेक्षां रा. केळकर यांना विनोद–व तोहि मार्मिक–अधिक चांगला साधतां येतो, हें दोघांच्या कृतींची तुलना करितां स्पष्ट दिसून येतें.

या गेल्या आठ दहा वर्षांत प्रसिद्ध झालेल्या नाटकांकडे पाहतां श्लेष व विनोद या दोहोंचीही आवड विशेष वाढत चालली आहे असें दिसून येतें. आलीकडे तर असा समज झालेला दिसतो कीं, प्रत्येक नाटकांत विनोद हा अवश्य आलाच पाहिजे. म्हणून पुष्कळदां कथानकाशीं अर्थाअर्थी संबंध नसतां, केवळ हास्यरस उत्पन्न करण्यासाठीं एकादें विनोदी पात्र घालण्यांत येतें. प्रेमसंन्यासांतील गोकुळ हें याचें उत्तम उदाहरण आहे. वैय्यक्तिक दृष्ट्या जरी गोकुळ हें विनोदी पात्र अप्रतिम साधलें आहे, आणि त्याचा श्लेष अतिशयच कल्पक (original) आहे–कांहीं ठिकाणीं तर रा. कोल्हटकरांच्यापेक्षांही सरस साधला

आहे— तरी त्या पात्राचा कथानकाशीं कांहींच संबंध दिसत नाहीं; आणि आपल्या भोळसरपणानें वारंवार हास्यरस उत्पन्न करण्यापलीकडे गोकुळाकडे कथानकांत फारशी मोठी कामगिरीही दिसत नाहीं.

पात्रांच्या आपोआप उत्पन्न होणाऱ्या विरोधात्मक स्थितीनें जो विनोद उत्पन्न होतो त्याची गोडी विशेष आहे. 'मतिविकार' नाटकांतील आनंदरावाचें पात्र या दृष्टीनें फारच उत्तम साधलें आहे. आनंदराव हे एक बोलक्या सुधारकांपैकीं असून वृद्धपणीं एका तरुण व सुंदर अल्पवयी मुलीशीं त्यांनीं विवाह केला आहे. पहिल्या अंकांतील आरंभींच्या प्रवेशांत या विजोड पतिपत्नींमधील दागिन्यांसंबंधींच्या संवादावरून वृद्ध पति व तरुण पत्नी यांच्या रुचीमधील साहाजिक वैचित्र्य दिसून येतें. पुढें चकोर जपानहून परत आलेला कळतांच, त्याच्या स्वागतार्थ सभा भरविण्याची आनंदरावांची उत्सुकता, तो पुनर्विवाह करावयास कचरतो हें ऐकतांच त्याची टर उडविण्याची त्यांची तत्परता, स्वतः पुनर्विवाह न करतां अल्पवयस्क मुलीशीं लग्न कां केलें म्हणून विचारितांच त्यांनीं दिलेलें उडवाउडवीचें उत्तर, व लागलीच स्वतःच्या गतभर्तृका मुलीच्या पुनर्विवाहासंबंधीं प्रश्न काढतांच केलेली टाळाटाळ, या सर्वांत फारच चांगला विनोद साधला आहे; व तो अगदीं स्वाभाविक आहे. तसेंच पुढें सरस्वती व चंद्रिका यांमध्यें भांडण झालें असतां आनंदरावाची स्थिति कशी कैचींत सांपडल्यासारखी झाली आहे तेंही पाहण्यासारखें आहे. या प्रसंगांचे वास्तविक उतारेच द्यावयास पाहिजेत; परंतु तसें करावयाचें म्हटलें तर सबंध प्रवेशच उतरून द्यावे लागतील. विहाराच्या पात्राचाही विनोद फार चांगला उतरला आहे. त्याचा धर्माभिमान, हरिहरशास्त्र्यासमोर पत्नीवर आणलेला खोटा राग, तरंगिणीच्या मृत्यूची बातमी आल्यानंतर धारण केलेला संन्यास, आणि शेवटीं मनोहरपंताच्या ज्या आश्रमाला तो पूर्वी नांवें ठेवीत असे, त्याच आश्रमांत जाऊन शिकविणें, या सर्व ठिकाणचा विनोद असाच मौजेचा साधला आहे. सर्व चराचर जग स्त्रीपुरुषमय कसें आहे, याचें विहारानें केलेलें वर्णन ऐकून कवीच्या मार्मिकतेचें व विनोदकुशलतेचें कौतुक करावें तितकें थोडें आहे असें वाटतें. मतिविकारांतील या दोन पात्रांच्या उदाहरणावरून विनोदाच्या स्वरूपाची साधारण कल्पना होईल अशी आशा आहे. रा. कोल्हटकरांच्या नाटकांतून इतर अनेक स्थळें अशा रीतीचीं दाखवितां येतील; परंतु स्थलसंकोचास्तव एवढ्यावरच भागविलें पाहिजे.

यापेक्षां जरा गंभीर विनोद पाहावयाचा असल्यास रा. केळकर यांच्या चंद्रगुप्त नाटकांत आढळतो. हरनंद चाणक्याच्या तावडींतून सुटून चंदनदासाच्या घरीं स्त्रीवेषानें राहत असतां स्त्रीवेष त्याला कसा असह्य होतो; पुढें, बागेंत एकटाच असतांना किंचित् कालपर्यंत स्त्रीवेष दूर केला असतां कांतिवर्म्यानें त्याला पाहणें; तारिणीच्या सहवासांत स्त्रीवेषधारी पुरुष आहे एवढयाच गोष्टीचा फायदा घेऊन कांतिवर्म्यानें त्याचा चंद्रगुप्ताजवळ केलेला विपर्यास; त्यामुळें लागलीच चंद्रगुप्त व हरनंद यांचें झालेले युद्ध; तारिणीचें मध्यें पडणें, व उदार हेतूनें प्रेरित होऊन हरनंदानें आपलें खरें नांव कबूल करणें; या सर्व ठिकाणीं चांगला विनोद साधला आहे. परंतु हा विनोद रा. कोल्हटकरांप्रमाणें उत्तान नसून सूक्ष्म व गंभीर आहे हें वर सांगितलेंच आहे. याच नाटककाराच्या कृष्णार्जुनयुद्ध या नाटकांतील विनोद इतक्या गंभीर स्वरूपाचा नाहीं, तरी पण अधिक कौशल्याचा आहे. नारदाचें पात्र पहिल्यापासून शेवटपर्यंत सारखें असून त्याचा विनोद चांगल्याप्रकारें टिकला आहे. कृष्ण व अर्जुन जे " देह भिन्न, जीव एक परि " असे मित्र त्यांच्यामध्येंही ज्या बहाद्दरानें युद्ध घडवून आणलें, आणि अर्जुनावरचें आपलें प्रेम अगदीं निःस्वार्थी आहे अशी कृष्णाची घमेंड होती ती खोटी ठरवून "आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति" या वचनाचा त्याला ज्यानें प्रत्यय आणून दिला, त्या नारदाची करामत खरोखरीच अपूर्व होय.

वधूपरीक्षेचा विनोदांत पहिला नंबर लागेल असें आम्हांस वाटतें. पात्रांच्या विरोधात्मक स्थितीमुळें उत्पन्न होणारा विनोद तर यांत चांगला आहेच; परंतु या नाटकाच्या विनोदाची खुबी किंवा माधुर्य, नाटककर्त्यानें मूळ कथानकांत जें उपकथानक मोठ्या चातुर्यानें गोंविलें आहे, त्यांत आहे. गंगूच्या स्वभावाचा उथळपणा, चंचलता व तिची राज्य-

लक्ष्मीची हांव हीं चांगल्या तऱ्हेनें दिसतात. ज्या धुरंधराला तिनें कधींही पाहिलें नव्हतें त्याजवरील तिचें अलोट (?) प्रेम, त्याचा खून झाला अशी बातमी ऐकतांच तिच्या आईनें "गंगू, तुझ्यावर तर बाई आकाशच कोसळलं!" म्हणून केलेलं शोक, शोक करितांनाच धुरंधराच्या राज्याचा वारस पार्थिव याचें गंगूनें केलेलें अभिनंदन, व पूर्वी त्याला झिटकारिलें असतांही तो राज्याचा वारस झाला म्हणून त्याच्या प्रेमाचा पुनः केलेला स्वीकार, या गोष्टींमुळें प्रेक्षकांच्या मनाला फार मौज वाटते; आणि शेवटीं जेव्हां धुरंधरानें आपल्या आईच्या संमतीनें उभारलेलें "तोतयाचें बंड" त्याच्याच गळ्यांत येऊन त्याच्यावर जेव्हां स्वतःचाच खून केल्याचा आरोप येऊन त्याची न्यायासनासमोर चौकशी होते,तेव्हां तर विनोद अगदी कळसाला पोंचतो. धुरंधर "मीच धुरंधर महाराज आहें" असें जीव तोडून सांगत असतां तें खरें न वाटून त्रिवेणीलाही त्याला वेड लागल्याची शंका येते, तेथें विनोदावर करुणारसाची जी छटा आली आहे ती अपूर्व आहे. यांतील जस्ती ताइतासंबंधाचें उपकथानक ज्या कौशल्यानें मूळ कथानकांत गोंविलें आहे, तें कौशल्य पाहून आम्हांस शेक्सपियरच्या Twelfth Night या नाटकाची आठवण होते. कथानक आणि उपकथानक यांचा इतक्या बेमालूम रीतीनें घडाव करून पुनः विनोदालाही न्यून न पडूं दिल्याचें मराठी नाट्यसाहित्यांत हें पहिलेंच उदाहरण आहे. त्रिवेणीचा जस्ती ताईत म्हाळसा मोलकरणीच्या गळ्यांत जाऊन ती प्रयागपंडिताची मुलगी समजली जाते, व तिला सर्व श्रीमंती ऐषआराम मिळतात, इतकेंच नव्हे, तर भार्गवही तिला आपली बहीण समजून धुरंधर महाराजांनीं तिला पत्नी करावी म्हणून तिला त्यांच्या भेटीला नेतो, येथें तर विनोदाची अगदीं परमावधि होते.

विनोदाचीं उदाहरणें दाखवितांना बराच विस्तार झाला, परंतु विनोदाबद्दलची आमची कल्पना विशद करून दाखविण्यासाठीं तो करणें अवश्य झालें. रा. खाडिलकरांच्या भाऊबंदकी, प्रेमध्वज, व मानापमान या नाटकांतसुद्धां कांहीं ठिकाणीं चांगला विनोद साधला आहे. कित्येक नाटककारांची अशी कल्पना दिसते कीं विनोद प्रेक्षकांना पटल्याची खूण त्यांच्या अट्टहासांतच आहे. म्हणून पुष्कळदां केवळ प्रेक्षकांनीं हंसावें एवढ्यासाठींच अगदीं ग्राम्य प्रकारचे उपाय योजण्यांत येतात. या ठिकाणीं खरा विनोद तर नसतोच, परंतु प्रेक्षकांनीं कसें तरी हंसावें एवढ्याच कारणास्तव कोणी ओढूनताणून विचित्र पात्रांची योजना करितात. मत्स्यगंधा नाटकांत अशाचसाठीं एका ऋषीच्या पात्राची योजना केली आहे. प्रथम प्रथम या पात्राच्या विचित्र भाषणाची थोडीशी मौज वाटते; पण पुढें तर तें अगदीं कंटाळवाणें होतें. खऱ्या विनोदाची खूण अशी आहे कीं त्याचा कधींही कंटाळा येत नाहीं. एका नाटकांत तर रंगभूमीवर केरसुण्यांची मारामारी आणली आहे! एका नाटकांत एक मद्यपि व एक दुराचारी स्त्री यांचा अश्लील वाद प्रेक्षकांना ऐकविला आहे! एका नाटकांत एका बायकी पुरुषाचा रंगभूमीवर नाच करविला आहे. अशा रीतीनें प्रेक्षकांना निवळ हंसविण्यासाठीं जे कित्येक प्रकार विनोद या नांवाखालीं दडपून दिले जातात, त्यामुळें खऱ्या विनोदाला कमीपणा येऊन लोकाभिरुचि बिघडण्याचा मात्र संभव असतो; म्हणून असले प्रकार सर्वथा असभ्य होत असें आमचें मत आहे.

विनोदाची जर विशेष जरूरी असेल तर ती शोकपर्यवसायी नाटकांत आहे. कारण तेथें मनावर जे एकसारखे दुःखदायक संस्कार होत असतात, त्यांपासून मनाला जरा विश्रांति देऊन, पुढील शोकरसयुक्त कथानकाला पुनः तें तयार करण्यास्तव विनोदाचा फार उपयोग होतो. आरंभापासून शेवटपर्यंत एकसारखें जर एकाच रसाचा परिपोष करीत गेलें तर मनाचा उल्हसितपणा निघून जाऊन, संस्कार चतुर्दिशीं ग्रहण करण्याची मनाची शक्ति कमी होते. प्रेमसंन्यासांतील गोकुळ हें पात्र जरी कथानकाशीं असंबद्ध आहे, तरी एकंदर नाटकांत करुण व शोक या दोन्हीं रसांनीं युक्त असें एक प्रकारचें अद्भुतत्व असल्यामुळें, या विनोदानें चित्ताला मधून मधून वैचित्र्य मिळतें; म्हणून तो इतका विसंगत वाटत नाहीं. तेंच 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' नाटक पाहिलें तर तेथें सर्वत्र शोकरसपूर्ण उदात्त अद्भुताचें साम्राज्य असून विनोदाला कांहींच अवकाश दिलेला नाहीं. त्यामुळें

ज्याप्रमाणें पक्ष्याला आकाशांत खूप उंचीवर एकाच ठिकाणीं पुष्कळ वेळ स्थिर राहतां येत नाहीं, त्याप्रमाणेंच आपल्या मनालाही परमावधीच्या शोक किंवा करुण रसांत फार वेळ दम धरवत नाहीं. या प्रसंगीं आपल्या मनोवृत्ति इतक्या ताणल्या जातात कीं, त्यांना जरा सैल सोडून विसांवा देण्यासाठीं विनोदाची फार जरूर असते. शेक्स्पिअरचें हॅम्लेट् पाहिलें असतां याची प्रतीति येते. तेथें शोकरसाची जरी अगदीं परमावधि झाली आहे, तरी हॅम्लेटच्या स्वभाववर्णनांत आरंभापासून शेवटपर्यंत विनोदाची जी सूक्ष्म छटा आहे, तीमुळें चित्ताला तीव्र शोकरस सहन करण्याची शक्ति येते.

७. आपल्याकडे आतांपर्यंत जीं नाटकें प्रसिद्ध झालीं आहेत तीं पाहतां, त्यांत शोकपर्यवसायी नाटकें फारच थोडीं आहेत. आणि जीं कांहीं थोडींशीं आहेत तीं या गेल्या दहा वर्षांतलींच आहेत. नाटकाचा शेवट नेहेमी आनंददायकच असावयास पाहिजे असा एक संस्कृत नाट्यशास्त्राचा नियम आहे; आणि त्यामुळें इतक्या संस्कृत नाटकांतील एकही नाटक शोकपर्यवसायी नाहीं. उत्तररामचरितासारखें नाटकही भवभूतीला आनंदपर्यवसायी करावें लागलें; व प्रारंभींच्या मराठी नाटककारांवर संस्कृत नाट्यशास्त्राचें विशेष प्राबल्य असल्यामुळें प्रारंभीं शोकपर्यवसायी नाटकें झालीं नसावीं. अशा नाटकांविरुद्ध नाट्यशास्त्राचा रोंख कां असावा याचें कारण समजणें अवघड आहे. शोकपर्यवसायी नाटकांमुळें प्रेक्षकांच्या वृत्ति क्षुब्ध होतात ही गोष्ट खरी आहे; परंतु यामुळेंच नाटकानें उत्पन्न होणारे परिणाम त्यांच्या मनावर अधिक कालपर्यंत टिकतात; आणि म्हणून ज्या ठिकाणीं एकाद्या विशिष्ट नैतिक किंवा सामाजिक तत्त्वाचें लोकांस शिक्षण द्यावयाचें असेल, तेथें नाटक शोकपर्यवसायीच पाहिजे; म्हणजे अमुक एक गोष्ट प्रचारांत नाहीं यास्तव असे दुष्परिणाम होतात असें दाखवून प्रेक्षकांच्या मनावर त्याचा अधिक परिणाम करतां येतो. या दृष्टीनें सामाजिक नाटकें शोकपर्यवसायीच असावींत. रा. गडकरी यांनीं प्रेमसंन्यास यासाठींच शोकपर्यवसायी केलें आहे; परंतु त्यांतील कथानकाचें एकंदर स्वरूप पाहतां तें आनंदपर्यवसायी झालें असतें तर अधिक बरें दिसलें असतें. शोकपर्यवसायी नाटकांचा प्रेक्षकांवर विशेष परिणाम होण्याचें दुसरें कारण असें कीं दुःखी प्राणी पाहतांच आपल्या मनांत साहजिकपणें भूतदया उत्पन्न होऊन त्या प्राण्याबद्दल जी सहानुभूति उत्पन्न होते, ती सहानुभूति या नाटकांनींहि उत्पन्न होते. शोकपर्यवसायी नाटकांचें असें महत्त्व असूनही संस्कृत नाट्यशास्त्राला तीं मान्य नाहींत यास्तव मराठी प्रेक्षकांचीही त्यांबद्दल कशी आवड नाहीं, हें रा. कोल्हटकर यांना आपलें वीरतनय नाटक पूर्वीं शोकपर्यवसायी केलें असतांही त्याचा शेवट आनंदाचा करून त्याचें स्वारस्य घालवावें लागलें, यावरून चांगलें दिसून येतें. तथापि आलीकडे इंग्रजींतील उत्तम " ट्रॅजेडीज् "ची चव बहुजनसमाजानें चाखल्यापासून, शोकपर्यवसायी नाटकांबद्दलची नावड उत्तरोत्तर कमी होत आहे; आणि याचें प्रत्यंतर हें कीं, कांचनगडची मोहना, सवाई माधवरावाचा मृत्यु, तोतयाचें बंड, प्रेमसंन्यास, राक्षसी महत्त्वाकांक्षा यांसारखीं शोकपर्यवसायी नाटकें आलीकडे रंगभूमीवर लोकप्रिय होऊं लागलीं आहेत.

८. येथपर्यंत गेल्या पंचवीस वर्षांत आपल्या नाट्यसाहित्यांत जी भर पडली आहे, तिचें विहंगमदृष्ट्या पर्यालोचन करून, उत्तम नाटकांना जे गुण अवश्य आहेत ते आपल्या नाटकांत कितपत आहेत याचें परीक्षण केलें. आपल्या नाटकांत दोष काय आहेत, हें एथवर केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. तथापि या सर्व दोषांचें एकत्र कथन लेखाच्या शेवटीं करण्याचा विचार आहे. एवढा वेळ जें लिहिलें त्यावर एकच आक्षेप येण्याचा संभव आहे; तो हा कीं, या सर्व लेखांत ज्या नाटकांचा उल्लेख आणि परीक्षण करण्यांत आलें आहे त्यांपैकीं बहुतेक गेल्या आठदहा वर्षांतलींच आहेत. हा आरोप खरा आहे हें आम्ही कबूल करितों; परंतु याचें कारण एवढेंच आहे कीं, आमच्या नाट्यसाहित्याला चांगल्या प्रकारचें वळण गेल्या दहा वर्षांतच लागलें, आणि त्यापूर्वींच्या नाटकग्रंथांत, रा. किर्लोसकर व रा. देवल यांच्या कृती सोडून दिल्या असतां, नांव घेण्यासारखी एकही कृति नाहीं. कित्येक नाटकें तर नाट्यसाहित्याला कमीपणाच आणतात, यास्तव त्यांचा विचार करण्याची

आम्हांस आवश्यकताच वाटली नाहीं. रा. कोल्हटकर व रा.खाडिलकर नाटकें लिहूं लागल्यापासून आमच्या नाट्यसाहित्याला एक प्रकारचें महत्त्व व गांभीर्य येऊं लागलें आहे; आणि आलीकडे रा. केळकर, खरे शास्त्री यांसारख्या विद्वानांचें इकडे लक्ष लागत चाललें असल्यामुळें दिवसेंदिवस आमच्या भाषेंत चांगल्या नाटकांची भर पडत आहे. नाट्यकलेला आलीकडे मान मिळूं लागला आहे याचें कारणही विद्वान् लेखकांचें इकडे लक्ष लागत चाललें आहे हेंच होय. रा. कोल्हटकर, खाडिलकर, केळकर, खरेशास्त्री अशा सारख्यांचीं नाटकें प्रसिद्ध झाल्यानेंच नाट्यसाहित्याला वाङ्मयांत त्याचा योग्य दर्जा मिळूं लागला आहे; विक्रमशशिकला, सत्यविजय, पुंडलीक, यांसारखीं शेंकडो नाटकें आहेत.परंतु त्यांची उच्चप्रतीच्या वाङ्मयांत कोणी गणना करीत नाहीं.यास्तव, या निबंधांत पंचवीस वर्षांतील सर्व नाटकांचा उल्लेख न करतां कांहीं विशिष्ट नाटककर्त्यांच्या कृतींच्या परीक्षणावरच भिस्त कां ठेविली आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल.

९. प्रस्तुत निबंधाचा समारोप करण्यापूर्वी एकाच महत्त्वाच्या मुद्द्याचा विचार करावयाचा राहिला आहे. गेल्या वर्षांतच या प्रश्नाला विशेष महत्त्व आलें आहे. हा प्रश्न असा कीं, आपल्या वाङ्मयांत जी भर पडत आहे ती स्वतंत्र, रूपांतर आणि भाषांतर या तीन मार्गांपैकीं कोणत्या मार्गानें पडणें अधिक इष्ट आहे. या प्रश्नावर आमचें म्हणणें काय आहे हें सांगण्याचे पूर्वी एक गोष्ट आम्हांस सांगावयाची आहे. ती ही: स्वतंत्र, रूपांतर कीं भाषांतर या वादाचा नाट्यसाहित्याच्या दृष्टीनें विचार करतांना, स्वतंत्र आणि रूपांतर या दोन मार्गांनींच नाट्यसाहित्यांत भर पडणें शक्य आणि युक्त आहे, असें आम्हांस वाटतें. परभाषेंतील नाटकें स्वच्छ भाषांतर करून इकडे आणिलीं, तर तीं रंगभूमीवर येणें संभवनीय नाहीं. पहिलें कारण असें कीं, इंग्रजी पोषाख करून व इंग्रजी नांवें धारण करून पात्रांनीं मराठी बोलणें कसेंसेंच दिसेल. यावर असें म्हणतां येईल कीं इंग्लंड किंवा फ्रान्स या देशांत शाकुंतलासारखीं नाटकें क्वचित् प्रसंगीं करितात कीं नाहीं ? मग तसें आपल्याकडेही कां संभवनीय होऊं नये ? इंग्लंडांत असें होतें म्हणून आपल्याकडेही तशीं नाटकें करण्यांत यावीं असेंच म्हणणें असेल, तर त्याप्रमाणें करण्यास आमची मुळींच हरकत नाहीं. परंतु अशीं नाटकें प्रेक्षकांना कितपत रुचतील, व किती लोकप्रिय होतील याबद्दल आम्हांस शंका आहे. दुसरें असें कीं, पौर्वात्य आणि पाश्चात्य चालीरीतींत एवढें मोठें अंतर आहे कीं, इंग्रजी नाटकांचे मराठी रंगभूमीवर प्रयोग करणें नटांच्या दृष्टीनें सुद्धां फार अवघड आहे. तेव्हां नाटकांच्याबद्दल जो विचार करावयाचा तो स्वतंत्र नाटकें चांगलीं कीं रूपांतरित चांगलीं याबद्दलच करावयाचा.

आपल्या वाङ्मयांत स्वतंत्र ग्रंथांची भर पडत नाहीं ही जी एक तक्रार आहे ती पुष्कळ अंशीं खरी आहे. परंतु त्याबद्दल कित्येक लोक अगदीं निराश होऊन जातात, तें मात्र चांगलें नाहीं. स्वतंत्र नाटकें झालीं तर तीं उत्तमच; आणि तीं कोणास नको आहेत ? परंतु चांगल्या प्रकारचीं जर स्वतंत्र नाटकें होत नसतील तर उत्तम प्रतीचीं रूपांतरें होणेंच आम्हांस श्रेयस्कर वाटतें. पहिल्या वर्गाच्या रूपांतरापेक्षां पहिल्या वर्गाच्या स्वतंत्र नाटकाचा दर्जा केव्हांही वर आहे ही गोष्ट निर्विवाद आहे; परंतु कितीही गचाळ नाटक असलें तरी तें स्वतंत्र म्हणून त्याचा नंबर उत्तम रूपांतराच्यावर लावावयाचा हें आम्हांस साफ कबूल नाहीं. रा. कृ. के. गोखले यांनीं म्हटल्याप्रमाणें " स्वदेशी चाकू विलायती रॉजर्सच्या चाकूपेक्षां कितीही वाईट असला तरी केवळ स्वदेशीच्या तत्त्वावर त्याला आश्रय देणें युक्त आहे, त्याचप्रमाणें हें स्वदेशीचें तत्त्व वाङ्मयांतही लागू करावयाचें किंवा काय ? " सरस्वतीच्या राज्यांत हा आपपर भाव असूं नये असें आम्हांस वाटतें. नाटकांचा दर्जा ठरविणें तो तीं स्वतंत्र आहेत कीं रूपांतरित आहेत यावरून न ठरवितां, त्यांच्या अंगच्या गुणांवरून ठरविला जाणें इष्ट आहे. स्वतंत्र हेंच जर नाटकांच्या परीक्षणाचें लिंग ठरविलें तर शशिकला, सत्यविजय, दामाजी, दंडधारी, तरुणीशिक्षणनाटिका यांसारखीं गचाळ नाटकें एकदम पहिल्या वर्गांत बसून, मोहविलसित, नाटिका यांसारख्या सर्वांगसुंदर नाटकांना तीं केवळ रूपांतरित म्हणून खालच्या दर्जावर ढकलून द्यावें लागेल, आणि

वाङ्‌मयाच्या खऱ्या भोक्त्याला किंवा चिकित्सकाला ही गोष्ट केव्हांही मान्य होणार नाहीं.

रूपांतरापेक्षां स्वतंत्र केव्हांही श्रेष्ठ आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न करितांना एका लेखकांनीं "स्वतंत्र निर्झर लहान असतो व मोटेची सोंड मोठी असते, म्हणून तिला त्या मोठेपणामुळें त्या निर्झरापेक्षां अधिक मान देतां येत नाहीं" अशा तऱ्हेचा कोटिक्रम लढविला आहे. आम्हीं या लेखकांना एवढेंच विचारतों कीं निर्झराचें घाणेरडें पाणी आणि मोटेचें स्वच्छ पाणी यांपैकीं ते कोणतें स्वीकारतील ? झऱ्याचें पाणी कितीही घाणेरडें असलें तरी तें केवळ झऱ्याचें म्हणून ते प्यावयास घेतील काय ? हीच गोष्ट वाङ्मयाची आहे. रूपांतराविरुद्ध असलेले लोक वाङ्‌मयाच्या बाल्यस्थितींत रूपांतरानें फायदा होतो ही गोष्ट मान्य करितात. परंतु त्यांचें म्हणणें असें आहे कीं, रूपांतरें करणें हें फार सोपें असल्यामुळें तरुण मंडळींना लेखक म्हणवून घेण्याची हांव फार लवकर पुरी करून घेतां येते; आणि एकदां लेखक रूपांतराच्या मागें लागला कीं तो आपली कल्पकता गमावून बसतो, व त्याला स्वतंत्र लेखन मुळींच करतां येत नाहीं. हें म्हणणें आम्हांस पंसत नाहीं. आधीं रूपांतर करणें सोपें आहे असें समजणेंच चुकीचें आहे. ज्या लोकांचे आचारविचार आपल्याशीं मुळींच जुळत नाहींत, ज्यांच्या व आपल्या समाजस्थितींत महदंतर आहे, अशा लोकांच्या भाषेंतील सुंदर नाटकें घेऊन तीं आपल्या समाजस्थितीला आणि आचारविचारांना जुळतीं करून घेण्याला कौशल्य कमी लागतें असें नाहीं; त्राटिका, चंद्रगुप्त, बायकांचें बंड, तारा, मोहविलसित वगैरे रूपांतरित नाटकें या आमच्या म्हणण्याची उत्तम साक्ष पटवितील. त्राटिका नाटक हें Taming of the Shrewचें रूपांतर आहे, बायकांच्या बंडाला Princess चा आधार आहे, आणि चंद्रगुप्ताच्या ऐतिहासिक कथेवर Woodstock च्या कथानकाचें कलम करून त्याचें सुंदर फळ "चंद्रगुप्त" हें नाटक आहे, या गोष्टी सांगितल्याशिवाय खऱ्या वाटत नाहींत; या सर्व नाटकांमुळें आमच्या नाटयसाहित्यांत चांगल्या प्रकारची भर पडली नाहीं असें कोण म्हणेल ?

रा. भाटे यांनीं रूपांतराबद्दल "लहान मुलांना जसा पांगुळगाडा, तसें भावी लेखकांसाठीं रूपांतर आहे; चालतां येऊं लागलें कीं जसा पांगुळगाडा कोपऱ्यांत पडतो, त्याप्रमाणें लेखक कसला कीं रूपांतर मागें पडतें" असें आपलें मत दिलें आहे; आणि तें आम्हांस बऱ्याच अंशीं मान्य आहे. रूपांतर करणाऱ्याच्या मनांत सुद्धां आपल्या हातून स्वतंत्र ग्रंथरचना व्हावी अशी महत्त्वाकांक्षा असते, आणि आपल्या भाषेंत कोणच्या ग्रंथाचें रूपांतर केलें असतां तें चांगलें दिसेल या विचारानें परभाषेचें वाङ्मय धुंडाळीत असतां, त्याच वेळीं स्वतंत्र लेखनाचीही तो नकळत तयारी करीत असतो; व चांगल्या स्वतंत्र रचनेला अवश्य इतकें वाचन, भाषेवर स्वामित्व, पैदा झालें कीं तो लागलीच स्वतंत्ररचनेकडे वळतो. रा. आपटे, केळकर, खाडिलकर यांसारख्या उच्चप्रतीच्या व प्रतिभाशाली स्वतंत्र लेखकांनीं सुद्धां रूपांतराचा आश्रय केला आहे, यावरून रूपांतरानें लेखकाची स्वतंत्रलेखनाची शक्ति नाहींशी होते, हें म्हणणें सर्वस्वीं खरें नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं.

आमच्याकडील उत्तम नाटकांची याद केली तर कांहीं स्वतंत्र नाटकें सोडून बाकीचीं सर्व रूपांतरेंच आहेत. शाकुंतल हें संस्कृताचें भाषांतर आहे; झुंजारराव, मानाजीराव, त्राटिका, दुर्गा, तारा, मोहविलसित, विकारविलसित, हीं सर्व इंग्रजी नाटकांचीं रूपांतरें आहेत; कमला, प्रेमध्वज, चंद्रगुप्त, बायकांचें बंड, हीं अनुक्रमें Thelma, Talisman, Woodstock, Princess यांचीं रूपांतरें आहेत. मोलिएरच्या प्रहसनांचींही रा. आपटे व तालचेरकर यांनीं सुंदर रूपांतरें केलीं आहेत. प्रयोगाचे दृष्टीनें हीं नाटकें लहान असल्यामुळें कदाचित् यांचे प्रयोग होत नसतील असें वाटतें. शेक्सपिअरच्या Merry Wives of Windsor याचेंही "चतुरगडच्या विनोदी स्त्रिया" म्हणून एक चटकदार रूपांतर झालें आहे. अशा रीतीनें रूपांतराचे योगानें आपल्या नाट्यसाहित्यांत उत्तम तऱ्हेची भर पडली असतां रूपांतराविरुद्ध ओरड करणें कृतघ्नतेचें आहे असें आम्हांस वाटतें. रूपांतरें चांगलीं असें म्हटलें असतां, स्वतंत्र वाईट असा अर्थ होत नाहीं. आमचें म्हणणें एवढेंच कीं जशी इंग्लंडच्या एका राजाला "माझें या असल्या मित्रांपासून संरक्षण कर" अशी ईश्वराची प्रार्थना

करावी लागली, त्याप्रमाणें "असल्या स्वतंत्र लेखकांपासून माझें संरक्षण कर" असें म्हणण्याचा आमच्या वाङ्मयाला हल्लींप्रमाणें प्रसंग येऊं नये.

कित्येक रूपांतरकार कोणाच्या ग्रंथाचें रूपांतर आपण केलें आहे हें प्रामाणिकपणें न सांगतां, आपल्या स्वतंत्र कल्पनाशक्तींचेंच तें कार्य आहे असें लोकांस भासविण्याचा प्रयत्न करितात, असा एक रूपांतराविरुद्ध आक्षेप आहे. परंतु लेखकांच्या या अप्रामाणिकपणाबद्दल रूपांतराला दोष देऊन त्यापासून होणाऱ्या फायद्यांना भाषेला मुकविणें योग्य नाहीं. लेखकांच्या या कृत्याबद्दल समाजाला त्यांना शासन करतां येण्यासारखें आहे; आणि अशा गोष्टी जर खरोखरीच घडत असतील तर तें अत्यंत निंद्य होय. अशा वाङ्मयतस्करांचा समाजानें जोरानें निषेध केला पाहिजे.

१०. गेल्या पंचवीस वर्षांतील नाटकांच्या गुणदोषांचें येथवर आम्हीं यथामति विवेचन केलें; आणि वास्तविक पाहतां येथेंच आमचें कार्य संपलें. परंतु मराठी नाटकांतून विशेष प्रामुख्यानें कोणचे दोष आढळतात, आणि ते दूर करून आपलें नाट्यसाहित्य सर्वांगसुंदर होण्यास काय उपाय योजिले पाहिजेत, याविषयीं जरा विचार करून मग लेखणी खालीं ठेवण्याचा विचार आहे. कांहीं थोडीं नाटकें खेरीज करून, मनुष्यस्वभावाचें यथातथ चित्र आमच्या नाटकांतून दिसून येत नाहीं, हा पहिला दोष आम्हांस आपल्या नाट्यवाङ्मयांत दिसतो. दुसरा दोष असा कीं, आपल्याकडील नाटकांतून समाजस्थितीचें असावें तसें बरोबर चित्र उठलेलें दिसत नाहीं. पुष्कळ नाटकांच्या कथानकाचे काळ न ठरवितां येण्याजोगे असतात; एकादा परका माणूस जर केवळ आपल्या नाट्यवाङ्मयावरून आपल्या समाजस्थितीची कल्पना करूं म्हणेल तर तें त्याला अशक्य आहे. तिसरा दोष हा कीं, आपल्याकडे लोकांना एकाद्या निश्चित ध्येयाचा उपदेश करावयाचा अशा हेतूनें लिहिलीं गेलेलीं फारच थोडीं नाटकें आहेत. प्रस्तुत काळीं आम्हांस शारदेसारख्या सामाजिक नाटकांची फार आवश्यकता आहे. चौथा दोष हा कीं, नाटकांतील विनोदाला दिवसेंदिवस अस्वाभाविकता व कृत्रिमता येऊं पाहात आहे. कित्येक ठिकाणीं विनोदाची अतिशयोक्ति होते, तर कित्येक ठिकाणीं अगदीं ओढून ताणून विनोदाची योजना करण्यांत येते. पांचवा दोष असा कीं, बरेच वेळां शृंगारांत आणि विनोदांत योग्य मर्यादेचें उल्लंघन होतें; हें होऊं न देण्याबद्दल नाटककर्त्यांनीं विशेष काळजी घ्यावी. मुख्यतः आम्हांला हेच दोष आढळतात. दुसरेही कित्येक बारीक सारीक आहेत, परंतु ते क्षुल्लक आणि त्यांपैकीं बहुतेक वैय्यक्तिक असल्यामुळें त्यांचा येथें उल्लेख करण्याचें कारण नाहीं.

वरील दोष आमच्या नाटककारांनीं मनांत आणल्यास तेव्हांच दूर करतां येतील. परभाषेतील उत्तम नाटकांचें नाट्यशास्त्रदृष्ट्या अध्ययन केल्यानें फार फायदा होण्यासारखा आहे, आणि स्वतंत्र नाटकें लिहूं लागण्यापूर्वी त्यांचीं रूपांतरें करण्यानेंही, मनुष्यस्वभावाचें यथातथ वर्णन कसें करावें, वगैरे गोष्टी नवीन नाटककारांना शिकतां येणार आहेत, व त्याबरोबर आपल्या नाट्यसाहित्यांत चांगली भरही पडणार आहे. विरुद्ध मताच्या लोकांवर कित्येक नाटकांतून वक्रोक्तीनें कुत्सितपणाची टीका केलेली आढळते. हा प्रकार अगदीं अयोग्य होय. प्रतिपक्ष्यावर जी टीका करावयाची असेल, ती अशी आडून न करतां स्पष्टपणें व उघड करावी. नाटककारानें आपलें मन आकुंचित व कुत्सित न ठेवितां, उदार आणि समतोल ठेविलें पाहिजे. या सर्व गोष्टी अगदीं उघड व प्रत्येकाला माहित असणाऱ्या अशा आहेत, आणि या सांगण्यांत आम्ही कांहीं नवीन उपाय सुचवीत आहोंत असें नाहीं. कित्येक नाटककारांचें याकडे दुर्लक्ष झालें आहे असें दिसतें; म्हणून त्यांना इकडे लक्ष देण्याबद्दल आमची नम्र विनंती आहे. आपल्या नाट्यसाहित्याला मध्यंतरीं जी अवनत दशा प्राप्त झाली होती, ती संपून जाऊन हल्लीं त्याला चांगलें वळण लागलें आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. विद्वान् लेखक आलीकडे नाटकें लिहूं लागल्यापासून चांगलीं नाटकें रंगभूमीवर येऊं लागलीं आहेत. या लोकांचें इकडील लक्ष उत्तरोत्तर वाढत जाईल अशीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत; आणि यावरून आमचें नाट्यसाहित्य सर्वांगसुंदर होऊन तें वाङ्मयाचा लवक-

त्व एक अत्यंत मनोहर भाग होऊन बसेल असें निश्चयेंकरून वाटतें. हा दिवस लवकर येवो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

"गेल्या पंचवीस वर्षांतील नाटकें" हा विषय वास्तविक फार व्यापक आहे. या अवधींत पुष्कळ नाटकें झालीं, त्या सर्वांचा विचार व्हावयास हवा होता; त्याप्रमाणेंच नाट्यसाहित्याच्या संगीत व प्रोज या या दोन्ही अंगांबद्दल विवेचन व्हावयाला पाहिजे होतें; आणि नाटक हें ज्या अर्थी दृश्य काव्य आहे त्या अर्थी नट व सीनसीनरी यांचेबद्दलही प्रस्तुत निबंधांत उल्लेख होणें अवश्य होतें; असे आक्षेप या विवेचनावर येण्याचा संभव आहे. गेल्या पंचवीस वर्षांत झालेल्या सर्व नाटकांपैकीं कांहीं विवक्षित नाटकांचेंच परीक्षण कां केलें आहे हें वर सांगितलेंच आहे. ज्या नाटकांचा उल्लेख केला आहे त्यांबद्दल व त्यांच्या सापेक्ष संबंधाबद्दल आणखीही बरेंच लिहितां येण्यासारखें आहे. परंतु स्थलसंकोचास्तव त्रोटक लिहिलें आहे. त्यापेक्षां अधिक विस्तार करतां येणें शक्य नाहीं. आतां संगीत व प्रोज असे दोन विभाग न करण्याचें कारण असें कीं, सदहू निबंधांत नाटक हें श्राव्यकाव्य, म्हणजे साहित्यशास्त्राचें एक अंग, या दृष्टीनेंच या विषयाचा विचार करण्यांत आला आहे. म्हणून साहित्यशास्त्रांना संगीत व प्रोज असे नाटकांचे दोन विभाग पाडण्याचें कांहीं कारण नाहीं असें आम्हांस वाटतें. काव्य म्हणजे साहित्यशास्त्रदृष्ट्या केवळ पद्यच असलें पाहिजे असें नाहीं, तर रसयुक्त गद्यसुद्धां काव्यांत मोडूं शकतें. म्हणून अशा ठिकाणीं संगीत व प्रोज असे विभाग अनवश्यक आहेत. तसेंच नट व सीनसीनरी या गोष्टींचा संबंध नाटक हें दृश्यकाव्य या दृष्टीनें केला असतां येऊं शकतो, म्हणून संगीत व प्रोज, नट व सीनसीनरी, हे विषय साहित्यसंमेलनापेक्षां नाट्यसंमेलनाचे असल्यामुळें आम्हीं त्याबद्दल येथें विचार केला नाहीं. जेथें एकाद्या नाटकाचा साहित्यशास्त्रांत दर्जा काय आहे, व त्यामुळें वाङ्मयांत कोणच्या प्रकारची भर पडली, अगर वाङ्मयाला कोणच्या प्रकारचें वळण लागलें, हा विचार करावयाचा असतो, तेथें तें नाटक संगीत आहे कीं प्रोज आहे, त्या नाटकाची रंगभूमीवर सीनसीनरी कशी काय आहे, वगैरे गोष्टींचा कांहीं संबंध येत नाहीं; या कारणास्तव या निबंधांतील सर्व विवेचन जरा एकांगी झालें आहे. परंतु वाङ्मयदृष्ट्या (Literary point of view)तें तसें न होणें अपरिहार्य आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

कविता.

स्वागतम् !

(चाल—नका करूं अविचार)

स्वस्ति असो सकलांस । तुम्हां हो । स्वस्ति० ।
कष्ट सोसुनी येउनि येथें कृतार्थ केलें खचित
अम्हांस ॥ ध्रु. ॥
करूं निकृंतन आलस्याचें ।
स्वत्व ओळखूं अम्ही अमुचें ।
ऐसें वाङ्मय परम सुखाचें ।
देउनि केला बुद्धि-विकास ॥ १ ॥ स्वस्ति० ॥
नाना काव्यें श्रवणमनोहर ।
ललित कथा नव नाट्यें सुंदर ।
निबंधरचना तात्विक सुखकर ।
रचुनी हरिलें बुद्धिमलास ॥ २ ॥ स्वस्ति० ॥

द. अ. आपटे.

श्रीशारदावंदन.

(चाल–अभिनवमधुलोलुप—)

वंदन तव पदकमला देवि शारदे ! ॥
स्वजनवृंदकल्पलते विबुधसंपदे ॥ ध्रु० ॥
मुक्तामणिमुकुट रुचिर । स्कंधिं रुळे चिकुरनिकुर ॥
कर खेळे विणेवर । वदन दिसे परम मधुर ॥
भुलवि चित्त डुलवि हृदय अतुलसौख्यदे ॥ १ ॥
वाग्देवी ज्ञानखनी । तूंचि जगत्त्रयजननी ॥
म्हणुनी तुज दिनरजनी । आराधिति सुरवर मुनि ॥
कोण क्षम तुज गाया सांग कामदे ! ॥ २ ॥
अष्टम हें संमेलन । होवो जनसुखभाजन ॥
निजभाषासंवर्धन । धरुनि करो स्वाभिमान ॥
त्वदनुग्रह जरि वरदे हेंचि होऊं दे ॥ ३ ॥

विष्णु बा. कुळकर्णी.

सरस्वतीभक्तांस-

(चंद्रकांत राजाची कन्या०—या चालीवर)

परम मंगला सरस्वतीच्या रुचिर मंदिरांत
तुम्हां पाहुनी हृदय रमे हें प्रेमानंदांत ॥ ध्रु० ॥
अवलोकुनि एकट्या इन्दुला सागरास चित्तीं
आनंदाच्या सुखदाशेच्या प्रेमोर्मी येती
या समयीं मग अमित चंद्र हे समोर असतांना
मम हृत्सागरिं कां न उठाव्या हर्ष-वीचि नाना ?

(२)

नयनरम्य वाटिका मला ही गमे शारदेची
तुम्ही त्यांत जणुं मधुर मनोहर पुष्पें बहुपरिचीं
जगदुपवन भारुनी टाकिलें आत्म-सौरभानें
रसिक मधुप त्या भुलुनि सौरभा नाचति मोदानें.

(३)

दिव्यरूपिणी सरस्वतीच्या कंठांतिल रत्नें
तुम्ही शोभतां विराजतां कीं लोकीं आत्म-गुणें
अनंत कालावधी लोटिला युगें युगें जरिही
ज्या रत्नांची प्रभा निरंतर परमोज्ज्वल राही.

(४)

ठायिं ठायिंच्या पवित्र गंगा एकठायिं मिळुनी
निरुपम पावन संगम होई हा, वाटे बघुनी
अज्ञानाच्या तमीं पहुडले ऐशा पथिकांतें
स्वयंप्रकाशित दीपच जणुं तुम्हि मार्ग दाविण्यातें.

(५)

प्रेमपुरस्सर करांत कर घालुनी काय आलां
सरस्वतीच्या तीरीं तुम्हि ह्या मंगल स्नानाला
व्यास, वाल्मिकी, कालिदास, भवभूति, बाण, भास
मयूर, वामन, कबीर, तुलसी, ज्ञान, तुका, दास,
नाथादिक ह्या महा विभूती परम पूज्य महिला
जेथें मज्जुनि पावन झाल्या, वरिलें कीर्तीला.

(६)

महाराष्ट्र-भाषारूपी जणुं ललना मोदें ही
इतर रमणिगणिं स्वप्रभाव कीं दावाया जाई
वस्त्राभरणें करुनि अलंकृत सर्वांगें तिजला
शोभविणारे तिचे प्रिय सखे तुम्हि, गमतें मजला
शब्दार्णविं जीं अमोल रत्नें, वेंचुनि अचुक तयां
तिला नटवितां कुतूहलानें तुम्ही जणुं स्थलिं या
आर्यजननिच्या सत्पुत्रांनो ! थोर चरित तुमचें
यदुपरि गाया समर्थ नच हा जडमति कवि वाचे.

आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

महाकाव्य.

(चाल—कर्नाटकी.)

महाकाव्य आहे ।
तेंचि एक पाहें ॥
महामोद जेथें ।
महारसहि तेथें ॥
अशा रसाची ।
वाणी साची ।
ज्यांत नित्य राहे ! ॥
तेंचि एक पाहें ।
महाकाव्य आहे ॥

* * *

कल्पनेस नाहीं ।
जिथें ठाव कांहीं ॥
तो मोदाचा ।
सागर, ज्याचा ।—
अमित रस, न वाहे ! ॥
तेंचि एक पाहें ।
महाकाव्य आहे ॥

* * *

अमितरसोत्पादिनी ।
गिराही अवादिनी ! ॥
तदीय लीला ।
रुचे सुधीला ।
परी क्वचित् लाहे ! ॥
तेंचि एक पाहें ।
महाकाव्य आहे ! ॥

* * *

दीर्घ शब्दमाला ।
अल्प दे रसाला ॥
अशा रसाचा ।
मोद कशाचा ? ।
क्षुद्र गिरा बा हे ! ॥
तेंचि एक पाहें ।
महाकाव्य आहे ॥

सुमंत.

सध्यांचीं मासिक पुस्तकें, त्यांचें स्वरूप व सुधारणेच्या दिशा.

[लेखक रा. अनंत नारायण पंडित, फलटण.]

राष्ट्राचा आत्मा वाङ्मय हें होय. हें सात्त्विक, सबल व शुद्ध असण्यावर राष्ट्राचें चिरंतन जीवन अवलंबून आहे, याची साक्ष आपणांस आर्यवाङ्मयावरून पटते. आर्यसंस्कृतीचें श्रेष्ठत्व पाश्चात्य पंडित देखील निरभिमानतया कबूल करतात. त्या आर्यभाषेची आपली महाराष्ट्रभाषा नात होय. तिच्या साहित्यवृद्धीचा प्रस्तुत विचार करावयाचा आहे. भाषावृद्धीचे प्राचीन मार्ग-ग्रंथ, पुराण, कथा कीर्तन, आणि पूर्व व उत्तर पक्ष हे होत. आतां मुद्रणकलेमुळें वृत्तपत्रें व मासिकें हीं नवीन साधनें झालीं आहेत; पूर्वपक्ष व उत्तरपक्ष यांचें रूपांतर व्याख्यानांत झालें आहे. वर्तमानपत्रांतील महत्त्वाचे लेख पुस्तकरूपानें बाहेर पडतात.मासिकांतील लेख मात्र सदैव विचारार्ह असतात.त्यासंबंधींच आपणास येथें विचार कर्तव्य आहे.

२.इंग्रजी अंमल सुरू झाल्यापासून आजपर्यंत निघालेल्या मासिकांचें वर्गवार केलेलें स्थूल टिप्पण या लगत जोडलें आहे. हें अर्थात् पूर्ण नसून योग्य साधनांच्या अभावीं स्मरणशक्तीनें तयार केलेलें असल्याकारणानें त्यांत अपुरेपणा राहाणारच, त्याबद्दल माझे विद्वान्, बहुश्रुत व सहृदय बंधु मजवर रागावणार नाहींत अशी आशा आहे. यांपैकीं कांहींतील लेखनधोरणाचें विवेचन मी पुढें करणार आहे. तुलनात्मक दृष्टीनें त्याचें महत्त्व वाचकांच्या लक्षांत येईल. जीं मासिकें बंद पडलीं आहेत (म्हणजे ज्यांची पोंच प्रसिद्ध वर्तमानपत्रांत अगर मासिकांत येत नाहीं) त्यांच्या नावांपुढें + अशी खूण केली आहे.

आजपर्यंत सुमारें १२५ मासिकें निघालीं आहेत; वेद, वेदान्त, धर्म व तत्त्वज्ञान (१९); कविता (९); इतिहास (३); नाटक व कादंबरी (८); ज्योतिष (८); वैद्यक (८); शिक्षण (९); शेतकी (४); वाङ्मय (४१); किरकोळ (१४); याप्रमाणें स्थूलमानानें त्यांचें वर्गीकरण करण्यांत आलें आहे. त्यांपैकीं चालू असलेल्या मासिकांचा वर्गवार तपशील खालीलप्रमाणें आहे.

वर्ग १.	वर्ग २.	वर्ग ३.	वर्ग ४.	वर्ग ५.
५	१	१	२	१

वर्ग ६.	वर्ग ७.	वर्ग ८.	वर्ग ९.	वर्ग १०.
४	७	३	२०	९

(१) ' षड्दर्शन-चिंतनिका ' हें मासिक गुरुवर्य कैलासवासी महादेवराव कुंटे हे दोन भाषेंत (इंग्रजी व मराठी) काढीत असत. यांत षड्दर्शनांची मीमांसा केली होती. हें युरोप व अमेरिका खंडांतही विद्वान् लोक घेत असत. यांनींच 'The Vicissitudes of the Aryan Civilization ' नामक गद्य ग्रंथ व ' The Rishi ' नामक पद्य ग्रंथ असे दोन (इंग्रजींत) तयार केले आहेत. पहिल्याबद्दल त्यांस जर्मनी येथें भरलेल्या विद्वान् परिषदेकडून बक्षिस मिळालें असून दुसऱ्याबद्दल Dr. Fraser नामक विद्वान् आंग्ल गृहस्थांकडून त्यांस'निसर्गसिद्ध कवि'असें म्हणण्यांत आलें आहे. यावरून त्यांचा जबर विद्याव्यासंग व दांडगी विद्वत्ता सिद्ध होते. 'राजा शिवाजी' व 'मन' हे त्यांचे दोन मराठी काव्यग्रंथ प्रसिद्ध आहेत.

धर्ममार्तंड लेले शास्त्री (वांईकर) यांनीं 'ऋग्वेद' (सायणभाष्य व ऋग्विधान यांसह) समाषांतर काढण्यास सुरवात केली होती. तें चालू असतें तर श्रद्धाळू व आस्तिक ब्राह्मणांस अतिशय फायदा झाला असता. परंतु दैवदुर्विलासानें तें थोडेच महिन्यांत बंद पडलें. तीच अवस्था 'धर्म' व 'आर्यधर्मदर्पण' यांची झाली. ' धर्म-जागृति हा ' Theosophy in India चा मराठी अवतार होय. यांत योगविद्या, तत्त्वज्ञान वगैरेचा विचार करण्यांत येत असून वेदान्तमार्तंड भानु व राजश्री छापखाने प्रभृति विद्वान् लेखकांचे लेख येत असल्यामुळें आणि Theosophy चे मराठी भोक्ते बरेच असल्यामुळें हें मासिक चांगलें चालेल असा संभव आहे. पूर्वी कै. शंकरराव केळकर यांचें ' तत्त्वविवेचक' नामक मासिक याच मासल्याचें निघत होतें. परंतु तें फार दिवस टिकलें नाहीं. प्रो. भानु यांच्या संपादकत्वाखालीं 'उपनिषत्प्रकाश' निघत असून मुंबई येथें ' श्रुतिबोध' रा. पटवर्धन वगैरे तीन उपपदधारी काढीत आहेत. कैलासवासी देसाई हे ' विद्यार्थी ' चालवीत होते; व रा. विश्वनाथपंत राजवाडे ' भाषां-

(मासिकांचें स्थूल टांचण.)

१ वेद, वेदान्त, धर्म व तत्त्वज्ञान.

१ ऋग्वेद +
२ ऋग्वेदाचें भाषांतर + (नागपुर)
३ श्रुतिबोध
४ वेदार्थयत्न +
५ षट्दर्शन-चिंतनिका +
६ ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला
७ उपनिषत्प्रकाश
८ धर्म +
९ आर्यधर्म +
१० भारतधर्म +
११ धर्मजागृति
१२ आर्यधर्मदर्पण +
१३ धर्मविचार
१४ अध्यात्मज्ञानरत्नावली+
१५ सद्धर्मदीप +
१६ विद्यार्थी +
१७ भाषांतर +
१८ तत्त्वविवेचक +
१९ भगवद्गीता +

२ कविता.

(जुने कवि)

१ काव्येतिहाससंग्रह +
२ महाराष्ट्र कवि +
३ महाराष्ट्र सारस्वत +
४ महाराष्ट्रवाङ्मय +
५ काव्यसंग्रह +
६ मयूर +
७ सन्मणिरत्नमाला +

(नवे कवि.)

१ काव्यकुसुमांजली +
२ काव्यरत्नावली

३ इतिहास.

१ ऐतिहासिक लेखसंग्रह +
२ प्रभात +
३ इतिहाससंग्रह

४ नाटक व कादंबरी.

१ नाट्यकथाणर्व +
२ नाट्यकला +
३ नाट्यमाला +
४ कादंबरीकलाप +
५ मकरंद
६ भगवा झेंडा +
७ रंगभूमि
८ घटकाभर करमणूक +

५ ज्योतिष.

१ ज्योतिर्विलास +
२ अ ज्योतिर्माला +
३ ज्योतिर्विजय
४ व्यवहारज्योतिष+
५ कुंडालिविज्ञान +
६ पत्रिका
७समुद्र +
८ ज्योतिर्माला.

६ वैद्यक.

१ आर्यभिषक् +
२ भिषग्विलास
३ पथ्यबोध +
४ आयुर्वेद
५ वैद्यकपूनापंच +
६ वैद्यकपत्रिका
७ आरोग्य
८ राजवैद्य +

७ शिक्षण.

१ लोकशिक्षण
२ बालबोध
३ आनंद
४ खेळगडी +
५ शालापत्रक
६ मराठी शिक्षक
(अ) शालापत्रक +
७ वऱ्हाड शालापत्रक
८ बालमित्र +
९ मोदक.

८ शेतकी.

१ शेतकरी +
२ शेत, शेतकी व शेतकरी
३ किरसानि समाचार
४ चतुष्पाद व कृषिकर्म

९ वाङ्मय.

१ चंद्रिका +
२ विविधज्ञानविस्तार
३ साहित्यपत्रिका
४ ज्ञानसिंधू +
५ भगिनीसमाचार
६ मनोरंजन
७ आर्यमित्र +
८ लोकमित्र
९ मराठामित्र
१० चित्रमयजगत्
११ ज्ञानमित्र
१२ दंभहारक +
१३ नवयुग
१४ नवें मन्वंतर +
१५ केरळकोकिळ +
१६ महाराष्ट्र कोकिळ +
१७ उद्यान
१८ प्रेमोद्यान +
१९ सत्संग +
२० कुमुदिनी +
२१ केरळकोकिळ आणि नवें मन्वंतर
२२ नीरजोल्हास +
२३ सुधाकर ‡
२४ प्रभात
२५ प्राचीप्रभा
२६ भारतलक्ष्मी
२७ निबंधमाला +
२८ निबंधचंद्रिका +
२९ ग्रंथमाला +
३० विश्ववृत्त +
३१ सरस्वतीमंदिर +
३२ ज्ञानांजन
३३ संतांचे बोल
३४ वैदिकमासिक व महात्म्यांचे बोल
३५ विहार
३६ नानालहरी +
३७ खरा प्रकार +
३८ विद्याविनोद +
३९ मराठा
४० समालोचक +

१० किरकोळ.

१ राष्ट्रोदय +
२ कलाशिक्षण +
३ हास्यविनोद
४ वैश्य
५ वंदेजिनवरम्
६ ब्रह्मनाद
७ समाजादर्श
८ विश्वब्रह्मवृत्त
९ The Library Miscellany.*
१० The Deccau College quarterly.*
११ Fergusson * College Magazine
१२ पैसाफंड +
१३ बालबोधमेवा +
१४ योगरहस्य +

याशिवाय गायन व वादन या विषयांवर रा. अण्णा धारपुरे हे एक मासिक काढीत असत; व गांधर्वविद्यालयाचे तर्फेही एक मासिक निघत असल्याचें स्मरतें.

* त्रैमासिक. ‡ आतां पाक्षिक.

तर' काढीत असत. पहिल्यांत प्राच्य तत्त्वज्ञानाचा विचार तौलनिक पद्धतीनें होत असून दुसऱ्यांत पाश्चात्य तत्त्वज्ञान वाचकांस कळविण्याचा प्रयत्न होत होता.

(२) मराठी आद्य कवि मुकुंदराजापासून टेंभे स्वामींपर्यंत सर्व कवि संत आहेत, हा मराठी काव्याचा विशेष लक्षांत ठेवण्यासारिखा आहे. ' मुकुंदराज व ज्ञानेश्वर आणि तत्कालीन संत' या लेखांत या कवींचीं काव्यें प्रथमतः प्रकाशित करावींत अशी सूचना मीं काव्यसुधार्णवकर्त्यांस केली आहे, त्यांत ज्ञानेश्वराच्या कालावर प्रकाश पाडणाऱ्या जुन्या ग्रंथांचा किती शोध झाला पाहिजे हेंही दर्शित केलें आहे (ज्ञानप्रकाश ता० ८।१।१५चा पहा.) ही संतांची कामगिरी (म्हणजे ज्ञान व भक्ति यांचा प्रसार) आधुनिक कवींनें कधींही विसरतां कामा नये. या संबंधीं निराळा लेख साहित्यपत्रिकेकडे पाठवावयाचा आहे, म्हणून येथें अधिक विस्तार करीत नाहीं.

गुरुवर्य रा० ब० साने यांनीं कै० मोडक यांच्या साहाय्यानें काव्येतिहाससंग्रहापैकीं बराच भाग लोकांपुढें आणिला. मोरोपंतांचीं कांहीं प्रकरणें (प्रल्हादविजय वगैरे), मुक्तेश्वरांचीं भारताचीं चार पर्वें आणि इतर कविता हीं त्यांपैकीं कांहीं होत. रा. जळगांवकर फडणीस यांनीं आधुनिक कवींस आपल्या निःस्वार्थ बुद्धीनें व उदार कृतीनें कायमचें ऋणी करून ठेविलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

(३) काव्येतिहाससंग्रहापैकीं इतिहासाचा भाग प्रसिद्ध करण्याचें काम एक तपपर्यंत रा. ब. साने यांनीं शिक्षक व परीक्षक यांचीं कामें चोख बजावून दक्षतेनें चालविलें व आतां (पेन्शन घेतल्यावर) ही भारतेतिहाससंशोधक मंडळीस ते आपल्या अनुभवाचा फायदा देण्यास तयार आहेत, हें स्वकार्यभरनिर्वाहकतेचें दर्शक नाहीं काय ? *

वे. शा. सं. रा. रा. वासुदेव शास्त्री खरे यांनीं अश्रांत श्रमानें व गाजावाजा न करतां मिरज येथें पटवर्धन दप्तराचें शोधन करून ती माहिती इतिहासप्रिय वाचकांस मिळवून दिली ही लहानसहान कामगिरी नव्हे.

*पेशव्यांची बखर, नागपूरकर भोसल्यांचे संबंधाचे कागदपत्र व पत्रें यादी वगैरे आणि पुरुषोत्तमपंडितविरचित " शिवकाव्य " व राजव्यहारकोश हे ग्रंथ यांनीं प्रकाशित केले आहेत.

रा. ब. पारसनीस हे इतिहाससंग्रहांत महेश्वर दरबारचीं पत्रें व अवांतर माहिती प्रकट करीत आहेत व यांस शेट मावजी यांचें उत्तम साहाय्य आहे, हें सर्वश्रुतच आहे. रा. चांदोरकर यांनीं प्रभातांत शिलालेख, ताम्रपट वगैरे लोकांपुढें आणण्याचें काम चालविलें होतें.

(४) कै. शंकरराव रानडे यांनीं नाट्यकथार्णवांतून इंग्रजी व संस्कृत नाटकांचीं रूपांतरें प्रसिद्ध केलीं. मकरंदांत वंग, गुजराथी व इंग्रजी कादंबऱ्या वगैरेचीं रूपांतरें येत आहेत. रा. शंकरराव मुजुमदार यांनीं लंडनरहस्य मराठी वाचकांपुढें आणून आतां ते नाट्यशास्त्रावर अभियुक्त लेख रंगभूमींतून आपल्या नाट्यप्रिय लेखकवर्गाच्या मदतीनें प्रसिद्ध करीत आहेत.

(५) कै. चिटणीस यांनीं ज्योतिर्माला सुमारें तीन वर्षें चालवून तींतून प्राच्य व पाश्चात्य ज्योतिषाची माहिती मार्मिकरीतीनें लिहिली. सर्वार्थचिंतामणि याचेंही भाषांतर त्यांनीं दिलें आहे. राजश्री नवाथे यांनीं कुंडलीविज्ञानांत कुंडल्यांचा संग्रह दिला असून कांहीं कुंडल्यांचीं फलें वर्णन करून त्यांचा कुंडली लिहिलेल्या मनुष्यांच्या आयुष्याशीं मेळ बसविला आहे. रा. कुबल ज्योतिषी यांनीं समुद्रांत आरंभीं जलधितनया लक्ष्मी इचीं दोन [संस्कृत] स्तोत्रें भाषांतरासह दिलीं असून ज्योतिषाची परिभाषा छंदांत बांधिली आहे. भगवान् श्रीकृष्णाच्या जन्मकुंडलीवर एक लहानसें सप्रमाण व चटकदार पुस्तक लिहिलें असून रामाच्या कुंडलीवर कुंडलीविज्ञानांत एक मार्मिक लेख प्रसिद्ध केला आहे.

(६) कै० पदे शास्त्री यांनीं राजवैद्य व आर्यभिषक् या दोन मासिकांतून आर्यवैद्यकाची माहिती उत्तम रीतीनें दिली. वनस्पतींचे गुणधर्म व कांहीं वैद्यकीय निघंटू प्रकाशांत आणिले. डॉक्टर रानडे (सोलापूर) यांनीं सुप्रजानिर्माणशास्त्राची मीमांसा आपल्या भिषग्विलासांतून केली आहे.

(७) बालशिक्षणाचें काम 'आनंद' व आबालवृद्धांस शिक्षणामृत पाजण्याचें पवित्र कर्तव्य ' बालबोध' व 'लोकशिक्षण' उत्साहानें, सरळपणानें व सभ्यतेनें बजावीत आहेत, हें त्यांस भूषणावह नाहीं असें कोण म्हणेल ? मराठी शिक्षक व वऱ्हाड शाळापत्रक

हीं सरकारी मासिकें शिक्षकांत ज्ञानप्रसार करीत असून शाळापत्रकही तें काम खाजगी तऱ्हेनें करीत आहे. माजी शालापत्रकानें हें काम कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या नेतृत्वाखालीं आरंभीं उत्कृष्ट रीतीनें चालविलें होतें.

(८) कै० घोटवडेकर हे आरंभीं 'शेतकरी'काढीत असत. कांहीं दिवस कै० धनुर्धारी टिकेकर 'शेत, शेतकी व शेतकरी' चालवीत असून आतां तें डॉ० मॅन् साहेब यांच्या देखरेखीखालीं चालत असून त्याचा शेतकऱ्यांस व शेतकीकडे लक्ष देणाऱ्या इतर गृहस्थांस चांगला उपयोग होत असला पाहिजे.

(९) कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं सात वर्षेपर्यंत निबंधमालेच्या द्वारें पाश्चात्य विद्या-वारुणीनें धुंद झालेले तरुण उपपदधारी यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलें; स्वधर्म, स्वभाषा व स्वदेश यांविषयीं जागृती उत्पन्न केली; पाश्चात्य विद्वानांच्या अप्रयोजक कोट्या, शुष्क तर्क व अनुदार समजुती यांचें आविष्करण केलें; मोरोपंत कवीविषयीं भ्रामक मतें खोडून काढिलीं; लोकहितवादीचा योग्य परामर्ष घेतला; वक्तृत्व, इतिहास, लोकभ्रम, गर्व, इंग्रजी भाषा, डॉ. जॉनसनचें चरित्र, वगैरे विषयांवर निबंध लिहिले; संस्कृत सुभाषितें, विनोदी चुटके आणि अर्थसादृश्य वगैरे नवीन बाबी लोकांपुढें मांडिल्या आणि केसरी, मराठा, चित्रशाळा व किताबखाना या नवीन संस्था स्थापन करून मालेचा समारोप केला. मालेंतील निबंधांच्या आवृत्ति दोन प्रकाशकांनीं काढलेल्या आहेत. असा असामान्य मान किती मासिकांच्या संपादकांनीं मिळविला आहे ?

कै.वामनशास्त्री केमकर यांनीं भारवि,माघ,भर्तृहरि, जयदेव आणि जगन्नाथराय पंडित यांवर निबंध; सामाजिक, नैतिक व धार्मिक विषयांवर चर्चा; अलंकार-विकाश (कुवलयानंदावर टीका), वृत्तमणिमाला, बिल्वमंगलचरित्र (काव्य), वगैरे प्रकरणें आर्यमित्रांतून प्रसिद्ध केलीं. हे कवि, वक्ते, पुराणिक, हरिदास, वेदांती व शिक्षक या नात्यानें उच्च कोटींतील असून यांचा स्वभाव विनोदी होता. हे विनयसंपन्न व निगर्वी असून यांनीं भागवतधर्मप्रसारार्थ हरिकीर्तनोत्तेजक सभा स्थापन केली होती. तिचें आतां सोमेश्वराच्या देवालयांत नवीन शास्त्री मंडळीनीं पुनरुज्जीवन केलें आहे. नूतन कवींस अलंकारांची माहिती अलंकारविकाशावरून उत्तम मिळून वृत्तमणिमालेवरून सुमारें तीनशेंहून अधिक वृत्तांशीं त्यांचा दाट परिचय होईल. या ग्रंथाचा हा विशेष आहे कीं प्रत्येक वृत्ताच्या उदाहरणांत वृत्तनाम (सार्थ) आणिलें असून एकंदर ग्रंथांत कृष्णकथा वर्णिली आहे. हे दोन्ही ग्रंथ होतकरू कवींस मार्गदर्शक आहेत.

प्रो० विष्णुपंत विजापूरकर यांनीं कोल्हापूर प्रांतांत आपल्या साक्षर मित्रांच्या साहाय्यानें उत्कृष्ट वाङ्मयसेवा केली आहे. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २, ३, ५ व ८; महाराष्ट्राचा इतिहास; मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष; कीटकसृष्टि; वाचन; रासायनिक परीक्षण; न्याय; वैद्यक; प्रकाशलेखन; महाराष्ट्र सारस्वत; महाराष्ट्र भाषेचें स्वरूप; संस्कृत व प्राकृत भाषांची विचिकित्सा; अशोक, कार्लाइल, डॅनिअल् ओकॉनेल यांचीं चरित्रें; दत्तदासतत्त्वोक्तिसंग्रह ; धम्मपद वगैरे उपयुक्त प्रकरणें त्यांनीं वाचकांच्या पुढें मांडून त्यांच्या ज्ञानांत भर घातली आहे. विश्ववृत्तांतूनही याप्रमाणेंच गहन व गंभीर विषयांची चर्चा करण्यांत येत होती.

कै. त्र्यंबकपंत काळे यांनीं समालोचकांतून धर्म, उपासना, प्राच्य राजशासनपद्धति, ग्रंथपरीक्षण व वाङ्मय वगैरे विषयांवर मार्मिक लेख प्रसिद्ध केले आहेत.

रा. कृष्णाजीपंत आठल्ये यांनीं माजी केरळ-कोकिळांतून लोकोत्तर चमत्कार; श्रीमदाद्यशंकराचार्य, विठोबा आण्णा कऱ्हाडकर वगैरेंचीं चरित्रें; विद्युन्मानसशास्त्र; ग्रंथपरीक्षण, इत्यादि विविध विषयांवर लेख लिहिले आहेत.

(१०) श्रीमंत गायकवाड सरकार यांच्या आश्रयाखालीं The Library Miscellany नामक त्रैमासिक इंग्रजी, मराठी व गुजराथी भाषांत निघत आहे. यांतून पुस्तकालयें कशीं असावीं, पुस्तकांचें वर्गीकरण कोणत्या तत्त्वावर करावें, लोकांचें वाचनाकडे लक्ष आकर्षण करण्याकरितां कोणते उपाय योजावे, पुस्तकांच्या यादी कशा रीतीनें तयार कराव्या,

वगैरे बाबींचा साकल्यानें व शास्त्रीय पद्धतीनें विचार केलेला असतो. नियतकालिकांत हें त्रैमासिक नांवाजण्यासारखें निघूं लागलें आहे.

३. रा. कृष्णाजी रामचंद्र पटवर्धन हे महाराष्ट्रांतील मासिकें व माला यांसंबंधीं लिहितांना म्हणतात, "महाराष्ट्रीय मासिककर्त्यांचें उच्च ध्येय म्हणजे विषयी प्रेमाच्या गोष्टी हेंच होय. ह्याची सुरवात वीस वर्षांपूर्वी 'मनोरंजना'नें केलीच आहे विषयी प्रेमविषयक मासिकांचा फैलाव जारीनें होत आहे, हें पाहून ४–६ महिन्यांत प्रेमी-मालांचा जो सुळसुळाट झाला आहे तो सांगतां येत नाहीं...वाङ्मयाची मनोभावें सेवा करावी या हेतूनें आज मासिक-माला निघत नाहींत.तर अशीं चटोर मासिकें काढून पैसे कमविण्याचा हा एक धंदाच निघाला आहे...सर्व मासिकांनीं इत-उत्तर तरी डोक्यांतील विषयी प्रेमाचें वेड काढून टाकून ज्ञान प्राप्त करून देऊन मनोरंजनास साजेल अशा प्रकारचे लेख, गोष्टी प्रसिद्ध केल्यास महाराष्ट्रावर मोठेच उपकार होतील." रा.सदा-राम-साई हे 'आधुनिक कवि व त्यांचे लेख' या सदराखालीं लिहितात "सर्व लेखकांची जर सरसहा खानेसुमारी केली तर त्यांत शेंकडा साठ प्रणयपरिलुप्त कथांना वाहिलेले निघतील...हल्लींचे प्रकाशक वाचकांचा कल ओळखून प्रणयकहाण्यांचा जणूं काय वर्षावच करीत आहेत; त्यामुळेंही कित्येक गरीब लेखक पैशाच्या आशेनें प्रणयाकडे वळत आहेत. ही शोचनीय स्थिति केव्हां सुधारेल ती सुधारो, पण आज मात्र ती वाङ्मयाच्या प्रकाशांत काळोख पसरवीत आहे एवढें खरें....हिडिस गोष्टी व कविता सोडून दिल्या सर निबंधात्मक व चरित्रात्मक लेख लिहिणारे लेखक फारच थोडे आढळतील......लेखकांनीं ध्यानांत ठेवावें कीं, आपल्या बंधूंना वासनाविषयक प्रेमकूजनानें आत्मवंचक करण्यापेक्षां आध्यात्मिक किंवा भौतिक वाचनानें सन्मार्गावलंबी करण्याचें श्रेय घ्यावें...कित्येक प्रकाशक सज्जन व खऱ्याची पारख करणारे आहेत, त्यांनीं जर कसोशीनें वाङ्मयपरीक्षण करून प्रकाशनास आरंभ केला तर साहित्यक्षेत्राच्या उन्नतीची भरभराट केल्याचें पुण्य त्यांच्या पदरीं पडेल...मराठींत श्रेष्ठ प्रतीचें म्हणून समजलें जाणारें मासिकपुस्तक आणि बंगालींत उच्च दर्जाचें म्हणून समजलें जाणारें मासिकपुस्तक–प्रवासी–यांचा तुलना करून पाहिली असतां, लेखकांची विवेचनपद्धति कशी असावी लागते व लेखक साहित्यशास्त्रांत किती तरबेज असावा लागतो, याची कल्पना होईल. मराठींतून इतर भाषांत भाषांतरें करण्यासारखे फारच थोडे ग्रंथ आढळतील...हल्लीं मासिकपुस्तकें व माला यांना ऊत आल्यापासून छोट्या गोष्टींनाही भरती आल्याचें दिसत आहे. पण सगळ्यांची दिशा एक. त्यांत भिन्नत्व मुळींच नाहीं, व त्यामुळें लेखकांनाही आपला ध्रुव सोडावासा वाटत नाहीं." (केसरी–पुरवणी ता. १९ व ता. २६ मे १९१४ इसवी अनुक्रमें पाहा).

यांपैकीं पहिलें मत एका महाराष्ट्रीयाचें असून दुसरें बंगवासीयाचें आहे. दोघेही मार्मिक वाङ्मय-भोक्ते आहेत असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. हीं मतें विशेषेंकरून वाङ्मयमासिकांसच लागू पडतात. इंदुप्रकाशकार व विविज्ञानविस्तारकार यांचेही मत असेंच आहे. महाराष्ट्रसाहित्यसहकारतरूवर प्रणयकथारूपी बांडगूळ जोरानें फोंफावत चाललें आहे, त्याचा आतां प्रतीकार करणें अति इष्ट आहे हें आतां सर्वानुमतें ठरत नाहीं काय ? सर्व मासिकांचा पाया वाङ्मयमासिकें होत. त्यांची जोपासना योग्य रीतीनें झाली पाहिजे. लेखकास हा विषय सोपा वाटतो; परंतु हें एक शास्त्र आहे याची फार थोड्यांस जाणीव असते. सुप्रजानिर्माणशास्त्रासारखें सद्ग्रंथनिर्माणशास्त्र व्हावयास पाहिजे.तें कधींकाळीं होईल तें होवो. पण तें जितक्या लवकर होईल तितक्या लवकर व्हावयास पाहिजे. कै. न्यायमूर्ति रानडे यांच्याविषयीं लिहितांना प्रोफेसर काळे यांनीं एके ठिकाणीं असा उल्लेख केल्याचें स्मरतें कीं, कोणत्याही विषयावर लिहिण्याचे पूर्वी त्यावर चालू तारखेपर्यंत किती ग्रंथ झाले याचा काळजीपूर्वक तपास करून, ते ग्रंथ विकत आणून, त्यांचें मार्मिक अध्ययन करून, नंतर ते आपला लेख लिहीत असत; यामुळें त्यांच्या लेखांस फार महत्त्व मिळत असे व आहे. इंग्रजी व मराठी वाङ्मयाचा व्यासंगही त्यांचा जबर होता. Uripides नामक ग्रीक नाटककार याचें एकदा दुसऱ्या एका साधारण नाटककाराशीं झालेलें भाषण या प्रसंगीं समर्पक वाटल्यावरून तें नवीन लेखकांच्या

दृष्टीसमोर आणीत आहें. साधारण नाटककार म्हणाला, " मी पुष्कळ नाटकें रचिलीं आहेत व तुमचीं तर थोडींच दिसतात. " यास Uripides यानें उत्तर दिलें, " माझीं नाटकें पुष्कळ वर्षेपर्यंत टिकतील पण तुमचीं तितके दिवस तरी टिकतील कीं नाहींत याची वानवा आहे. " याच संबंधांत इसापनीतींतील सिंहीण व कुत्री यांचा संवाद होतकरू लेखकांनीं सतत दृष्टीपुढें ठेवावा. सिंहिणीचा एकच बच्चा मृगराज बनतो, परंतु कुत्रीच्या अनेक पिल्लांकडे कोणी ढुंकूनही पाहात नाहीं. लेखनकलेची हौस व लेखनचातुर्य ह्यांत महदंतर आहे. इच्छेनें वाडे बांधले जात नसतात; त्यांस आगाऊ तयारी करून ठेवावी लागते. तसेंच प्राचीन अभियुक्त ग्रंथकार यांच्याशीं निकट परिचय ठेवल्याशिवाय लेखनांत शिरण्याचें साहस कोणीही करूं नये.

४: हल्लीचीं मासिकें सुधारण्याचा प्रश्न साहित्यपरिषदेचा असल्यामुळें तिच्या कार्यक्रमांत त्याचा समावेश होणें साहजिक आहे. या कामीं खालील उपाय बराच हितवर्यवसायी होईल असें वाटतें.

• प्रख्यात व कल्पक मासिकसंपादकाग्रणी ख्रिस्तवासी William Stead यांच्या " Review of Reviews " नामक मासिकाचे धरतीवर ' महाराष्ट्र-साहित्य-समालोचक ' नामक मासिक काढावें. त्याचीं पानें सुमारें १०० असून किंमत ४–५ रुपये पर्यंत टपालहांशीलसह असावी याचे शेवटीं प्रचलित मासिकांतील विषयांची सूची देऊन आरंभीं विषयांचें सार द्यावें तें देतांना दसऱ्याचें सोनें, संक्रांतीचा तिळगुळ, किंवा अहोरूपमहोध्वनिः या मासल्याची टीका न येतां निर्भीड, निःपक्षपाती व निःस्पृह संघटनात्मक टीका असावी. मासिक परिक्षणाकरितां वाङ्मयभक्त रा० ब० महाजनि, वैद्य, प्रो० विजापूरकर, लिमये, जोशी व परांजपे, रा. कोल्हटकर, केळकर, भाटे, पावगी, ध. मा. लेलेशास्त्री, डॉ गर्दे व वेदांतमार्तंड भानुप्रभृति यांचें मंडळ बनवावें. सदर समालोचक साहित्यपरिषदेच्या छत्राखालीं निघणार असल्यामुळें त्याचा प्रवेश सर्व पुस्तकालयांतून व्हावा. या मार्गानें पुस्तकालयाच्या व्यवस्थापकांस मासिकांची व पुस्तकांची निवड करण्यास सुलभ होईल व तद्द्वारें वाचकांची अभिरुचि सुधारेल. आपल्या देशांत वाचनाचीच नव्हे तर लेखनाचीही अभिरुचि सार्वत्रिक उत्पन्न झाली आहे, व हा परिणाम प्रणयकथा विशेषतः येत असल्यामुळेंच झाला. वाईटांतून चांगलें कसें निघतें त्याचें हें ठळक उदाहरण आहे. आतां फक्त अभिरुचीला सन्मार्गाकडे लावण्याचेंच काम राहिलें आहे व तें वर सुचविलेल्या उपायानें सिद्धीस जाईल अशी मला उमेद आहे.

५. राहतांपैकीं प्रश्न मासिकें कशीं टिकतील हा राहिला. त्या कामीं खालील योजना करावी. एकेकाळीं या भारतवर्षाला सुवर्णभूमि म्हणत असत. पण आतां ती स्थिति राहिलेली नाहीं. दुष्काळ व दारिद्र्य या दुकलीचा फैलाव, प्लेगाचा प्रभाव व सदभिरुचीचा अभाव ही कारणत्रयी मासिकाच्या अस्तित्वास आड येते. मुंबई इलाख्यांतील मराठी बोलणाऱ्या प्रत्येक तालुक्यांत एक एक पुस्तकालय असतें. शिवाय आलीकडे सरकारांतही पुस्तकालयांची नोंद ठेविण्यांत आली आहे. त्या ठिकाणीं सदर साहित्यसमालोचक व इतर उत्तम मासिकें यांचा समावेश होण्यास हरकत नाहीं. " Southern Maratha Country " तील संस्थानें व जहागिरी, निजाम, होळकर, शिंदे यांचीं राज्यें, यांतही मासिकांना आश्रय मिळण्याचा संभव आहे. मात्र साहित्यपरिषदेच्या चिटणीसांनीं सदर संस्थानिकांच्या भेटीं घेतल्या पाहिजेत. ही सूचना करण्यापेक्षां या बाबतींत मी अधिक लिहूं इच्छीत नाहीं.

६. वाङ्मयवृक्षावरील प्रणयकथारूपी बांडगूळ आतां छाटून न टाकिल्यास मूळ वृक्ष सरस, निकोप व सदृढ वाढणार नाहीं. ज्या वाङ्मयानें स्वधर्मानुष्ठान, स्वदेशप्रेम (म्हणजे परदेशद्रोह नव्हे !) व स्वभाषोपासना वृद्धिंगत होतील; उद्योगसंमुखता, आलस्यविमुखता, ज्ञानप्रवणता, कलालोलुपता, परोत्कर्षसहिष्णुता व परोपकारनिरतता यांचें बीजारोपण समाजांत उत्तम तऱ्हेनें होईल; आणि साधी राहणी व उच्च विचारसरणी (Plain Living and High Thinking) कडे बहुजनसमाजाची प्रवृत्ति वळेल; असें वाङ्मय तयार करण्याची जबाबदारी साहित्यपरिषदेवर आहे. ती पूर्णपणें पार पडल्याशिवाय मराठी वाङ्मय सुधारणेच्या पंथास लागेल असें म्हणणें व्यर्थ होय.

या कामीं वंगसाहित्यपरिषद्, नागरीप्रचारिणी सभा आणि गुर्जरसाहित्यपरिषद् यांच्या उपायांचाही जरूर तो फेरफार करून अवलंब करण्यांत यावा.

मला सुचलेले उपाय मीं आपल्या विद्वान् साहित्यमंडळीकडे सादर केले आहेत. त्यांचा ते यथायोग्य विचार करतील अशी आशा बाळगून हा लेख पुरा करितों

आधुनिक साहित्यरुक्कुठार.

द्वैत-निरुत्साह-घनीं वाङ्मयपरिषद् विलुप्तशी होती,
मुम्बादेवि करी परि मुक्त तिला, स्थान देइ हृत्प्रांतीं.
साहित्यभक्तसेवकमंडळ शुभ समय पाहुनी घालें;
नवचंद्रिकाप्रकाश प्रेक्षुनि जन कोण ना सुखी झाले ?
जमला शुभप्रसंगीं प्रेमें मद्बंधुभगिनिवृंद महा;
उडुगण ये जणुं खालीं, बघुनि मना होय मोद फार अहा!
वाङ्मयचर्चेसाठीं जमलों आहोंत आज या ठायीं,
सद्युक्तिवाद करुनी वाङ्मय अपुलें करूं चिरस्थायी !
कार्यारंभीं ध्याऊं अखिल चराचरनिवासपदकमलां;–
ज्ञानेशादि कवींना विजयप्रद पूर्ण एक जो ठरला. ५
प्रथम स्थापिति गणपति मंगल कार्यीं समस्त हे आर्य;
गणपतिहीन अम्हीं कां आरंभावें बळेंच शुभ कार्य ?
स्थापूं उच्चस्थानीं विद्वद्वर पूर्ण अनुभवी व्यक्ति;
उद्दिष्ट-कार्य-कंटक नाशूं योजूनि अभिनवा युक्ति.
या सर्व येथ बैसा ! अटक न कवणास शारदाभुवनीं;
परवानगी कशाला व्हावी यायास आपुल्या सदनीं ?
वाङ्मयचर्चाविषयीं तीव्रपणें उद्भवेल मतभेद;
परि अंतरीं ठसूं द्या, तत्त्वें निघतात खेळतां वाद.
सुविचारपूर्ण वचनें कठोर, परि दोष अंतिं हरितात;
जात्या कटु गुळवेली तापनिवारक तदीय गुण ख्यात. १०
शब्द प्रिय निघतील न, वश व्हा द्वैता न बनुनि हटवादी;
संस्थाहानि द्वैतीं होते संतत, करा विचार हृदीं;
सन्मार्गातें वरुनी सजवूं साहित्य निज सदाभरणीं,
श्रेयस्कर ना होई वाया फोलांस नित्य पाखडुनी.

साहित्य-स्थिति.

पश्चिमदेशनिवासी वाग्देवी वैभवाचलीं गेली,
कां हो ! आज मराठी लोळे पंकीं अशी इथें खालीं ?
नानालंकारांहीं परदेशी ती मनोरमा झाली;
विचरे नेसुनि रकटें देवी अमुची किमर्थ या कालीं ?
असतां सख्ख्या बहिणी, एकीला मिळत अन्न सुग्रास;
अन्यांकडे पहावें कां दुसरीनें करूनि उपवास ? १५
माता तुमची ना ही ? किमर्थ मग लोटितां तिला दूर ?
मात्रुत्कर्षप्रेम न ज्या, ते सुत कंवि ? वनपशू क्रूर !
मात्रुत्कर्षा शिवबा मिळवी गड घालवोनि नरसिंह
अस्मन्मातृसुखास्तव करणें नलगे विनष्ट निज देह.
बांधा कंबर आतां, गेले दिन आळसांत जावोत;
मंगल दिन निज यत्नें अस्मद्देवीस पूर्ण लाभोत !
उन्नतिकालमहानद हा ये पीयूष दिव्य घेवून !
वाङ्मयसेवकजन हो ! तिमिरावृतचित्त यांत घ्या धुउन !
इष्ट लतेला अंकुर अभिनव सुंदर अतांच फुटतील;
गाइल पिक न वसंतीं तरि भावि ऋतूंत रडत बैसेल! २०
वाङ्मय दिव्य करूं या एकमनें संकटा निवारून;
देवकळा न च येते टांकीचे घाय सोसल्यावीण.
गेला वंग पुढें तो, गुर्जर, हिंदी पहा तया मिळती;
राहुनि आपण मागें कां करुनी घ्या हंसें महा जगतीं ?
अज्ञानमेघ वितळुनि खुले महाराष्ट्रवाग्उषःसमय,
ज्ञानार्कोदय सपदी वाटे खुलवील शारदाहृदय.
आदर्शरूप वाङ्मय खास करूं, दृढ धरा अशी आस;
अप्राप्य मोक्ष लाभे, मिळवुं न कां येथ सान गोष्टीस ?
परकीय वाङ्मयापरि वदती अमुचेंहि होतसे पुष्ट;
उत्तर त्यांस असें कीं, नदापुढें स्रोत, हें दिसे स्पष्ट ! २५
घनमेघमुक्त भानुप्रकाश-सरसीं समोद ते क्रीडे,
धूमावृतप्रदीपाभवतीं अमुचें सदैव चांचपडे.
मारित उंच भराऱ्या चाले तें स्वैरसें अहो ! गगनीं;
त्यातें अनुसरतां हें पडत फशीं, घेतसे हंसें करुनी.
दुर्बल कशांत आहे, विचार याचा करा तुम्ही आतां !
चालविणें उचित दिसे विद्यावंतें धरूनि शिशुहाता.
राजाश्रय ना त्याला म्हणूनि हें जाहलें असे दुबळें;
लोकाश्रयागदें त्या करुं या रोगांमधूनि पूर्ण खुलें !
अभिनवविचारभूषित वाङ्मय सुस्थान चिर जनीं घेई,
पायाशुद्ध सुमंदिर होईल न तें कसें चिरस्थायी ? ३०

वाङ्मय-महती.

दुर्बल-वाङ्मयवाहक देश पुढें ना कधींहि येणार;
दिन मेघावृतरविधर कैसा उत्साह-वृद्धि करणार ?

वाङ्मय बहु प्रतापी, नाहीं तत्तुल्य अन्य या लोकीं;
केवळ कल्पतरू तो स्वर्गी उतरोनि येइ भूलोकीं;
वाङ्मय साध्य कराया शुक्राचार्यालयांत कच शिरला,
जाय स्वर्गी साधुनि, कळेल यावरुनि मोल तत् सकलां.

रंजविते जनचित्ता धार्मिक तात्त्विक विनोदमय गोष्टी
सांगोनियां निरंतर, जादू आहे तयांत बहु मोठी !
केलें जें न सुरांनीं, आणी तें घडवुनीहि हें लोकां,
अज्ञानसागरीं रत समाज निमिषीं करी सुसंस्कृत कीं. ३५

लोकीं अमर असे हें, राष्ट्रा करि तेंवि अमृत सिंचून,
नसती अशी जर स्थिति येते श्रवणीं न रामकृष्णगुण.
फिरतें त्रिकालदेशीं पुराण, इतिहास खाय सेवून;
भोक्ता मिळेल तैसा स्वांगावरि वेष देह चढवून .

व्यापार चालती लव हृदयाचे याविणें न सुरळीत;
विलया प्रकाश जातां काय करी दृष्टि असुनि शाबूत ?
उपयुक्त सर्व विषयीं म्हणोनि साहित्य नाम त्या देती,
माळि जलाकडुनि जसा योजक त्याकडुनि फायदा घेती.

व्यवहारीं हें आम्हां वंद्य सदा पूज्य सद्गुरुस्थानीं;
दुर्बल गुरुच्या सन्निध कैसे व्हावेत छात्र सज्ञानी ? ४०
अवलोकुनी दशा ही खडतर विद्वान होउनी जागे,
उत्कर्षार्थ तयाच्या झटति अहा ! श्रम करुनियां स्वांगें.

वाङ्मयमरुप्रदेशीं येई हा प्रेमघन सुदैवानें,
यत्नांबु-वृष्टि होतां तरुवर कां नच फुटेल जोरानें ?
तद्वर्धनार्थ पाहूं संक्षेपें काय चालले यत्न,
असतील दोषमय जर योजुं विचारें उपाय ते नूत्न.

असती साहित्याचीं मुख्यांगें गद्य पद्य हीं दोन;
आपापल्या परी तीं विश्वाला टाकितात मोहून.
वितरी ज्ञान जगाला गद्य स्वांगास पूर्ण विस्तरुन,
पद्यहि कार्य करी तें मित शब्दीं सूत्रबद्ध होऊन. ४५

व्यवहार होत गद्यें म्हणुनी त्याचा विचार करुं पहिला;
शांतिप्रद पद्य असे कोलाहल हरुनि घेउं मग त्याला.
गद्याचीं शस्त्रास्त्रें 'कल्पित-कादंबरी-कथा-गोष्ट —
नाटक-निबंध' यांहीं वळण समाजास लागतें इष्ट.

कादंबऱ्या.

कादंबरिचा हेतू बोधानें रंजवूनि लोकांना,
राष्ट्रा मुक्त करावें पादीं तुडवूनि निंद्य रूढींना.
संसारशब्दचित्रें हृदयीं नाना प्रसंग त्या घेतां,
दुर्गुण निंदुनि सद्गुण कौशल्यें विजययुक्त दाखविती.

ऐसा प्रकार वाचुनि वाचक गुण तेवढाच घेतात,
दर्पण बघतां सुधरी वेष गबाळा जसा जन त्वरित. ५०
धरुनी या नियमाला देशीं कादंबऱ्या किती असती ?
उत्तर दुर्दैवानें याला येणार कीं नकारार्थी !

केवळ विषयाचा या रंजन हा मुख्य हेतु हो रूढ,
वस्तुस्थितिचा होई खून असे त्यांत एवढें गूढ.
गुंतुनि रंजन-जालीं प्रेम विदेशीं कुणी पुढें करितां,
निंदुनि समाज अपुला अन्याचें स्तोम मात्र माजविती.

कांहीं तरी विसंगत लिहुनी लेखक पुढें सदा येतां;
पडुनि बळी कीर्तीच्या करुनि हंसें मात्र आपुलें घेती.
काल असे प्रगतीचा, राष्ट्रोन्नति पाहिजे असेल जर,
कादंबऱ्या सुधारा ध्वंसुनि आधीं प्रकार हानिकर. ५५

धरुनी वस्तुस्थितिला यथार्थ चित्रें सुरेख यावीत,
शृंगार हीन निंदुनि नीतीला स्थान लाभुं द्या श्रेष्ठ.
असतील निंद्य रूढी राष्ट्रीं त्या तुलुनि अन्य देशांशीं,
श्रेयस्कर प्रचारीं आणाव्या विजय देउनी त्यांशी.

होवोनि चित्तरंजन राष्ट्राला सहज बोध लाभावा,
दो काज एक पंथ, प्रामुख्यें हेतु हृदयीं ठेवावा.
धान्य गळे कोठारें फुटतां कादंबऱ्या तशा पडती,
उत्तम निवड करोनी घ्याया त्यांतून चालते न गति.

निघतील जर विसंगत शृंगारी अतिशयोक्तिपरिपूर्ण
कां न विचित्रपुरीसम कथांस द्यावा तसा अम्हीं मान? ६०
आदर्शवत् बघोनी लेखक हे 'आजकालच्या गोष्टी'
लिहितील लेख तैसे, इष्ट क्रांती घडेल निजराष्ट्रीं.

इतिहासविषयभागीं पाहूं जातां दिसे सुसंगति न;
असतात त्यांत पात्रें इतिहासांतिल म्हणोनि त्या मान.
विषयाकडे अशा या गेलें लक्ष न अजूनि कवणाचें;
म्हणुनि दिसे त्यांमध्यें गेलें पसरूनी जाल दोषांचें.

इतिहास करुनि देतो परिचय लोकांस भूतकालाचा,
सांगे स्पष्ट दिन-क्रम शब्दीं त्या कालच्या समाजाचा.
गाढाज्ञानतमोरतराष्ट्रोद्धारक सदैव इतिहास;
कर्तव्यक्षमकारी औषध जणुं रामबाण रोग्यास. ६५

स्फूर्तिप्रद या विषयीं दक्षपणें लक्ष घालतील जन,
कादंबऱ्या सुसंगत इष्टद येतील कां पुढें द्रुत न ?
अननुभवी नव लेखक गोष्टी कांहीं तरी अशा विषयीं
करिती प्रसिद्ध लोकीं विचार केल्याशिवाय लव हृदयीं.

व्याख्यानकार अभिनव निजराज्यस्थापका कुणी बनवी,
पाश्चात्यप्रणयाब्धीं केलि करायास त्या कुणी शिकवी.

पुनरुद्वाहा त्याला सिद्ध करी कुणि सुधारणामित्र;
वनितास्वातंत्र्याचें कोणी रेखाटिती नवें चित्र.

कोणी मवाळ शिवबा, कोणी करिती जहाल शंभूस,
कोणी प्रतिप्रसंगीं ठेवी असिहीनसा हमीरास.

लेखक हे नव देती रूप स्वमतानुकूल इतिहासा;
श्रीकृष्णमूर्ति घडतां मर्कट विकाळ होतसे सहसा !

इतिहासाचें कवणा पूर्ण ज्ञान न म्हणोनि होत हंसें,
पडुनी स्वैरपणाला बंधन, निपजोत ग्रंथ सत्य असे.

अभिनव समाजचित्रें मतें अम्हांला नकोत इतिहासीं;
स्थान मिळो प्रामुख्यें संतत विषयानुरूप तत्त्वांसी.

कादंबऱ्यांत देणें स्थान तसें उचितही पुराणांस;
धजती कसें न लेखक अजुनी स्पर्शावया बरें त्यास ?

खर्चे करावी त्यांहीं कल्पकता निज विकार नाशून;
ठेवावें हृदिं, शोभे शालीला ठिगळ कांबळ्याचें न

लहान गोष्टी.

सामाजिकशा गोष्टी अनेक दिसतात मासिकांतून,
दिसतो त्यांत भयंकर विरोध, असतात नाल्पसे सुगुण.

गोष्टी सान अशा या कादंबरिचीं लहान भावंडें,
संसाराचे विविध प्रसंग घेवोनि खेळतात पुढें.

हीं बालकें विदेशी प्रेमाचे खेळतील जर खेळ,
होतील तरुण वेडे प्रेमानें, राष्ट्र शीर्ष नुचलील,

सांप्रतच्या गोष्टींचें ठरलें आहे सुधारकी वळण,
दिसते न विविधता लव, बघतां उपदेश लाभतो लव न.

मुम्बापुरस्थ लेखक वर्णिति तेथील राहणी सतत,
करिती कानाडोळा इतर प्रांतांमधील गोष्टींत.

मुम्बापुरींत दिसतें, आहे सर्वत्र तें तया वाटे;
औदुंबरफलवासी कृमीस जग तेंच, अन्य ना दिसतें.

नानासमाज-गोष्टी रंजक बोधक अनेक येवोत,
वाटे बदल करावा प्रत्येकाला स्वभोजनीं सतत.

येती कधीं तरी नव गोष्टी कांहीं प्रसंग बदलून,
परि त्यांत राम नसतो कुत्सितपण मात्र येतसे दिसुन.

वाचा कर्णांद्रिलेखा, मद्वाक्याचा कळेल भावार्थ;
संक्षेपानें देतों कोडें उकलावयास तो येथ.

फिरतो एक कुणी कवि निजकाव्यस्तुति करीत सर्वत्र;
भोक्ता त्यास मिळेना, अरसिक परि सर्व भेटले मात्र !

काव्यें नाना त्यानें पाठविलीं मासिकांत छापाया,
परि ना यश त्या येई, गेले तद्यत्न सर्वही वाया !

देती संपादक हे केराच्या टोपलींत टाकून
निज हृदयंगम कविता, कळतां तो जाय पूर्ण तापून.

संपादकास एका नंतर वश करुनि घेतलें त्यानें,
केलीं मुद्रित अपुलीं काव्यें त्यांतून फार तोऱ्यानें.

कविदिग्गज मग पदवी काव्यगुणावरुनि लाभली त्यास,
निर्झर-नामें मग तो मुद्रित करि निज समस्त काव्यास.

काव्यग्रंथा त्याच्या पुशिलें कोणीं न मान देऊन,
परि मोद हो कवीला विकसित निज काव्यपुष्प पाहून.

काव्यामोद न घेती कोणी हें बघुनि कोपला भारी;
दिसलीं केवळ त्यातें अरसिक येथील माणसें सारीं.

इतुक्यांत त्या कळे कीं बक्षिस मोठें मिळे रवींद्रास
काव्यगुणा परदेशीं; मिळवावें तें असें गमे त्यास.

करुनी निज काव्याचें भाषांतर पाठवूनि तो देई
परदेशीं; जलदाची चातक सोत्कंठ वाट जणुं पाही.

कालांतरें कळे त्या अपुल्या काव्यास येइ बक्षीस;
प्रमुदित तो बहु झाला, स्वर्ग करीं येइ वाटलें त्यास.

मोदप्रदर्शनास्तव भरवि सभा द्रव्य फार वेंचून,
तद्धनपुष्टसुहृद्गण यावा सजले तयास बहु मान.

इतुक्यांत एक वात्रट उठला निंदा करीत काव्याची,
बोले अंतीं बक्षिस यावा योग्या नसे कृती याची.

गेलें नव्हतें याचें काव्य मुळीं बक्षिसार्थ परदेशीं,
बक्षिस मिळे असें म्यां लिहिलें तन्मौर्य मात्र बघण्यासी.

---

१ 'लांछितचंद्रमा' कादंबरी वाचल्यास वरील बरेच दोष त्यांत दिसून येतील, याशिवाय दुसरीं पुष्कळ नांवें देतां येतील पण स्थलसंकोचामुळें दिलीं नाहींत. वरील दोष ज्यांच्या कृतींत असतील त्या लेखकांनीं पुढें सुधारणा करावी.

१ मतिविकार, तारेचें हास्य (मनोरंजन वर्ष २०, उत्तरार्ध, भाग २ व ५) असल्या अतिशयोक्तिपूर्ण गोष्टी येणें श्रेयस्कर नाहीं. यांत घडलेले प्रसंग आधुनिक समाजांत कधींही दिसणार नाहींत. असें असतां या गोष्टींना विनाकारण कां महत्त्व येतें कोण जाणें !

२ गेल्या सालीं मनोरंजनांत ही गोष्ट आली आहे.

युक्त प्रमाण दावुनि केली निंदा तदीय अत्यंत,
उधळुनि सभा, कपींद्रा दिधलें ढकलुनि मूर्खपंक्तींत !
देवोनि गोष्ट ऐशी प्रामुख्यानें सचित्र काय मिळे ?
रंजन बोध न होई, तल्लेखक मूर्ख मात्र हें ठरलें !
करि निजकाव्यस्तुति कवि म्हणुनी हो काय हानि राष्ट्राची
लाभालाभ न जेथें किमर्थ निंदा हवी वृथा त्याची?
नाना व्यक्ति कपींद्रासम जर असतील विविध या राष्ट्रीं,
येणें इष्ट अशा नव सन्मार्गप्रद अनेकशा गोष्टी.
संपादकास पुसतों, मूर्ख असे कवि किती तयांजवळ ?
नाहीं एक असें हें उत्तर यावरति सहज येईल;.
वस्तुस्थिति जर ऐशी,किमर्थ गोष्टी अशा पुढें येती ?
कांहीं तरी लिहोनी मिळते लोकांत अल्प ना कीर्ति.
प्रखरास्त्र फेंकिलें हें एका व्यक्तीवरीच दिसताहे,
अव्यापारीं करणें व्यापारा उचित मार्ग हा नोहे.
तेंसें ‘धपद्धमारा’ महत्त्व आलें न अल्प लोकांत;
होतें चित्र जयाचें,सलील बुडवीहि तो गटारांत!
जन्मस्वभाव ज्याचा राष्ट्रा जो लवहि हानिकर नाहीं,
जावें किमर्थ त्याच्या वाटेला सरसरूनि सुज्ञांहीं ?
मूर्खचरित्रें वर्णन करि जो सद्बोधहीन भक्तोनें,
तत्पंक्तिमाजि बसतो तोही जाऊनि सहज उघडपणें.
ऐशा हजार गोष्टी गचाळ जरि मासिकांत दिसतील,
वाङ्मयदेशीं त्यांतें स्थायिक ना स्थान कधिंहि लाभेल.

नाटकें.

कादंबरिचा अग्रज ऐसें नाटक म्हणे स्वतांस जनीं,
सामर्थ्यें प्रबल महा किमया करुनी करी जगा सुगुणी.
वैभवगिरिशिखरीं हा भारत जें वरुनि शांतता बसला.
भवचित्तरंजनास्तव नाटक ये स्मित करीत उदयाला.
रंजन-मय तारुण्यीं, प्रौढावस्थेंत बोधकर बनला,
मार्मिक वेष धरोनी राष्ट्रोद्धारार्थ वीर हा सजला.
पश्चिम देशीं यानें आणियली क्रांति इष्ट घडवून,
येई सांप्रत इकडे रूपांतरें आपुलें अहा ! करुन.
भारत समस्त भुलले वेष मनोहर तदीय पाहून,
उत्कर्षार्थ तयाच्या खपती विद्वान चंग बांधून.
प्रतिवर्षीं या राष्ट्रीं अभिनव निघतात नाटकें नाना,
साक्ष तदोत्कर्षाची तज्जननें पटत आज लोकांना.
हें विश्व ईश्वराचें, नाटक कविचें तसें मनोजात,
नाना प्रसंगमय हें आकर्षी सहज मानवां चित्त.
कळतें यदा तयाला झाला आहे समाज बेताल,
परिणामयुक्त मार्मिक नव वेषें भंगितो तमोजाल.
आहे विक्रम याचा फार भयंकर, तयास उपमा न;
पाहूं विचार करुनी कैसा लोकां करी दिनाक्रमण.
एके काळीं, याला सभ्य तमाशा मिळे अशी संज्ञा;
दामाजी-पुंडलिका बघतां येईल कळुनि हें सुज्ञां.
नित्य कृतिच्या माळा प्रेमें घालोनि नाट्यदेवीस,
स्वैरपणें धिंगाणा घालाया स्फूर्ति येइ कांहींस.
बघुनि प्रकार ऐसा झाले प्रेक्षक समस्त बेताल,
सुंदरमाधव-पठणीं चित्र खरें दिसुनि सहज येईल.
राष्ट्रीं जर हा ऐसा प्रकार अनिरुद्ध नित्य चालेल,
पंडितवर्गा वाटे राष्ट्राची सहज हानि होईल.
नाट्यकला सुधराया सरसावुनि ते पुढें तदा आले,
सरस कृती निज त्यांहीं दाखवुनी नित्य वेड मोडियलें.
सोडोनि नित्य लेखक नाट्यकला ये सुशिक्षितागारीं,
वस्तुस्थितिप्रदर्शक चढवुनि नव वेष होइ सामोरी.
चेतोहर रूप तिचें पाहुनि सर्वांस हो समाधान,
वाटे नित्य तमाशे काळें करणार धैर्य सोडून.
इतुकी सुधारणा ही इष्ट अशी परि न जाहली अजुनी,
पाश्चात्य ग्रंथांतें बघतां येईल तें खरें कळुनी.
वस्तुस्थितिला धरुनी रेखाटिति चित्र पाश्चिमात्य जन,
तो दोष एक मोठा स्पष्टपणें येतसे इथें दिसुन.
सांपडुनी विद्वद्वर कोणी मानापमान-वीचींत,
प्रमुख ध्येया विसरे, संचरतो स्वैर उच्च गगनांत.

१गेल्या सालीं मनोरंजनांतून ही गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. २ जुने दशावतारी खेळ याच धोरणानें होत. ३ चालू नाटकें. ४ हॅम्लेटसारखीं पाश्चिमात्य नाटकें पाहूनच मराठी नाटकें लिहावयास इकडील लेखकांनीं सुरवात केली.

१ रा. पाटणकर, धामणस्कर, राणे, नेवाळकर, आगटे इत्यादि लेखकांस. २ हें नाटक मनोरंजनकारांनीं प्रसिद्ध केलें आहे. त्याचे लेखक ‘किरात’ आहेत. तमाशेवजा नाटकें पाहून स्त्रियांच्या व तरुणांच्या मनावर भयंकर परिणाम होऊन तों अल्लड मंडळी अश्लील नाटकाचे प्रयोग घरीं करूं लागली, व हळूहळू नीतिभ्रष्ट होऊन जगाच्या निंदेस कशी पात्र झाली हें त्यांत उत्तम तऱ्हेनें दाखविलें आहे.

कसला समाज आहे पुढें न याचें तया मुळीं भान,
विविध प्रसंग निर्मी देउनि हृदिं अतिशयोक्तिला मान.
गर्दभराज असा तो लक्ष्मीधर पाहुनी हंसें लोटे,
वास्तव्यानें त्याच्या हास्याव्यतिरिक्त काय घ्यावें तें ?
हास्यरसोत्पादक नर शकार हा एक मृच्छकटिकांत,
व्यक्त करी 'राजाश्रित बुद्धीचा दुरुपयोग करितात.'
गुंतुनि विद्याहरणीं पुराणविषयीं करी विपर्यास.
मद्यप्रस्थ हरी जो, पूर्ण सुरासक्त बनवितो त्यास !
मद्यागार विनिर्मी तुडवुनि पायीं सरस्वतीसदन,
शिष्यवरास विसंगत परदेशी वेष करितसे दान.
सद्गुरुभक्तपरायण कच असतां स्वार्थसाधु त्या बनवी;
अज्ञान निजपुराणीं उघडपणें आपुलें जगीं ठरवी.
हा राक्षसीमहत्त्वाकांक्षी उन्मत्तसा पुरा बनुनी,
अत्याचार किति करी व्याघ्रासम गर्जना महा करुनी.
हा नाटकी खरोखर दिसतो तत्स्वामिभक्त विक्रांत,
चंदनदास[1] मनानें याच्या सन्मुख ठरे अति श्रेष्ठ.
करुणरसाची सरिता मृणालिनी नायकीं करी प्रेम,
परि तें प्रेम झुगारुनि नायक करि विफल पूर्ण तज्जन्म !
म्हणती भीष्में केली घोर प्रतिज्ञा म्हणूनि राष्ट्राला–
आपलें न मिळालीं तेजस्वी, हीन वीर्य ये त्यालां[2].
श्रेष्ठ जरी नायक–कृति,या न्यायें फोल पूर्ण ती झाली;
वीराभावीं रडणें येई राष्ट्रास शेवटीं भाळीं !
देशप्रीतिपुढें निज त्यजुनि पती तिलक हाय ! ती पुसते !
ठरती श्रेष्ठ सरोजिनि जर पतिला पक्षि ओढिलें असतें.
वेश्यासम कृति करिते मदालसा इष्ट राजकरणींत,
राजकु-ोत्पन्नेला वर्तन हें इष्ट ना दिसे स्पष्ट.
कोणी सुहास्यवदनें सरस फुलें घेउनी पुढें येई,
प्राकृत लोकां त्यांचा लाभे सुस्वाद लव न लवलाही.
कुठल्या देशींचीं हीं याची मोठी पडे जनां भ्रांति
योग्य प्रतीति येइल, बघतां त्या मूकनायकादि कृती.
कटुकर्तव्यें लोकां सांगत येतो जगापुढें कोणी,
बोले पाश्चात्यासम गेला अमुचा समाज होवोनी.

१ रा. केळकरकृत चंद्रगुप्त नाटकांतील. २ गेल्या सालच्या मनोरंजनाच्या वसंत अंकांतील रा. दिवेकर यांचा ' भीष्माची भूल !' हा लेख पाहावा.

योजी अचाट युक्ती ताळ्यावर आणण्यास दुष्कृत्या,
पतिच्या उलट उरावर बसते बेताल होउनी कृत्या.
साधु विवेकानंदा स्वर्गी म्यां आणिला म्हणे कोणी,
दुर्यश येई पदरीं, हास्यास्पद होइ मात्र तत्करणीं.
साधु-प्रवचन पुनरपि मिळेल हा हेतु धरुनि जन येती,
श्रवणीं प्रेमकथा तीं पडुनी होतात सर्व हिरमुष्टी.
स्त्री[1] नर नेर हो वनिता, विचित्र चाळे जगापुढें येती,
विद्याभूषित नर तो आंग्लस्त्री प्रेमदग्ध हो अंतीं !
साधु-चरित्रीं ऐशा अशुद्ध गोष्टी अनेक लेखून,
त्या कालाच्या स्थितिचा केला केवळ धटिंगणें खून !
काव्यामृतांत मज्जन करुनि कुणी घेइ प्रेमसंन्यास,
सदसत् पुनरुद्धाहीं सिद्ध कराया धृती न हो त्यास !
विद्याहरणीं नरवर एकाकी हीनतेज जो झाला,
सत्त्वपरीक्षानिकषीं बावनकशि हेमगर्भ तो ठरला.
राष्ट्रस्थितिप्रदर्शक बोधक रंजक सु-नाटकें नाना
निघतां वाङ्मय-देशीं कैसें लाभेल उच्च पद चिर ना?

प्रबंध.

जनक प्रतापशाली प्रबंध हा गद्यपद्यरत्नांचा,
उज्ज्वल वाङ्मय करणें धर्म असे मुख्य हा जगीं त्याचा.
अटक न याला कोठें विहार अनिरुद्ध हा करी सतत,
गंभीर स्मितवदनें विद्वत्ताप्रचुर सर्व विषयांत.
राष्ट्रेतिहास सांगे पुराणतत्त्वें करी कधीं प्रकट;
शास्त्रकला शिकवी,करि बनुनि विनोदी जनां सुमार्गरत.
विस्तार,लोकशिक्षण,नवयुग,नव चित्रमयजगत् हातीं
अनुरूप रेखिती या प्रबंध-रूपा धरुनि रति चित्तीं.
परि तें स्वरूप मोहक अद्यापि न वाटतें जगद्हृदया,
करिती काना डोळा प्राकृत जन, यत्न चालले वायां !
चित्रित रूपीं असती काय उणे रंग पाहणें इष्ट,
पाश्चात्य रूप बघतां व्यंगें येतील दिसुनि तीं स्पष्ट.

१ असूया. २ मत्सर. ३ या नाटकांत कालस्थितीचे भयंकर खून झाले आहेत. त्या दृष्टीनें नाटक गौणच आहे. विद्याहरणाप्रमाणें मुख्य पुराणपुरुषांचे स्वभाव पुराणास सोडून नाहींत, सबब सत्त्वपरीक्षा नाटक चांगलें आहे असें म्हणण्याचें धाडस केलें आहे.

पाश्चात्यवाङ्मयेक्षण करुनि पुढें ये सुवीर बंगाली,
सुविचारान्वित बनुनी विजयी निज लेखणी तयें केली.
ते भारती प्रवासी अव्याहत यत्न दीर्घसे करिती,
एकाग्रांतःकरणें वाङ्मयसेवेंत देह झिजवीती.
पाश्चात्य गुरु तयानें केला, परि शिष्य सबळ हो आज;
शिष्यकृती गुरु देशीं घेती सन्मान बनुनि सुखभाज.
अमुचे प्रबंध येथें अप्रिय, त्या कुठुनि मान परराष्ट्रीं ?
सद्गुणरहित प्रेमादर मिळवी लोकिं नाल्प ही रीती.
वस्त्राभरणीं करिती सुधारणा नव परांस पाहून;
विद्यावतें वाङ्मय ठेवावें मग किमर्थ मलपूर्ण ?
सर्वस्वीं अनुकरणीं रमणें केव्हां न इष्ट होईल;
निजकल्पनातरंगक्रीडाभावीं न कीर्ति लाभेल.
धरुनी दुसऱ्याचा कर उभे रहावें तरी किती दिवस ?
सोडुनि आश्रय टाका पाउल पुढती, पडाल ना खास.
कळुनी चुकलें आहे रूप असावें कसें प्रबंधाचें,
बिनमोल स्थायिकसें वाङ्मयनिधि हेंच या जगीं साचें.
नाना प्रबंध पडती प्रतिमासीं वाङ्मयांत येऊन,
शास्त्रकलाविषयीं मन होतें अत्यंत परि उदासीन.
शास्त्रकलाविषयावर लेख न येती म्हणूनि एकानें
स्वैंपाकाच्या गोष्टी चालू केल्या अनेक तोऱ्यानें.
वनिता-समाज अपुला सुधरे, म्हणती सुधारक श्रेष्ठ;
ऐसा प्रकार पाहुनि खालावे मात्र, हें दिसे स्पष्ट !
भात न उकडाया जी क्षम, कैशी निज सुतांस पोशील?
परिवार सर्व तीचा वैभवशिखरीं कधीं न जाईल.
सर्वारंभा तांदुळ मूळ, तसें पाकशास्त्र वनितेला,
शास्त्राभावीं तीची विद्वत्ता नाल्प येइ कामाला.
असतील पाकशास्त्रीं दुबळ्या जर त्या सुधारकी ललना
स्थापूनि पाकशाळा धाडा त्यांमाजि सक्तिनें त्यांना.
येईल न कामाला केव्हांही त्यांस पुस्तकी ज्ञान,
तिखट-मिठाच्या गोष्टी घेतील न वाङ्मयीं चिरस्थान.

विनोदी वाङ्मय.

नाना पक्वान्नांनीं विटल्या लोकांस शाक सुखकारी,
आहे विनोद तैसा विद्वत्ताप्रचुर लेखनागारीं.
हानि विनोदें केव्हां होत न, रस उद्भवे तयासंगें;
सत्यप्रिय तो हंसवी, सर्वांतें सत्यनीतिला सांगे.
शुद्ध विनोद कुळाचा[1] 'सत्य' असे मूळ पुरुष विख्यात;
तत्पुत्र शोभनार्थी सुत 'कोटी' नामधारि हो प्राप्त.
सुविचारहृदय ' कोटी' नंतर सप्रेम वरि सदानंदी,
उभयांपासुनि आलें रत्न पुढें नव ' विनोद ' आनंदी.
भिन्नस्वभाव जायापतिगर्भीं बाल हें जगीं येई;
म्हणुनी गभीर चंचल विलासरत तें कधीं कधीं होई.
यास लळा मातेचा, स्वभाव तीचा म्हणोनि तें घेई,
भिन्न-प्रकृति जनांला केव्हांही बाळ हें गुणी हंसवी.
ऐसें विक्रमशाली बाल विनोदी कशी करी क्रीडा,
वाङ्मयदेशीं अपुल्या विचार याचा करूं इथें थोडा.
दिसुनी येतो पुष्कळ विनोद सर्वांस नाटकांतून,
परि तो स्वतंत्र रूपें आला अद्यापि फार कोठें न.
ओढा कवणाचा नच तिकडे म्हणुनी विनोद होइ खुला,
सांप्रत वाङ्मय-देशीं इष्ट असे स्थान लाभणें त्याला.
प्रतिभावान् नर कांहीं प्रेमें त्या घालुनी पुढें आले,
परि त्याविषयीं त्यांचे उद्यम ना फारसे विजयि झाले.
आहेत नाटक्याचे तारे, पोहे दुजे सुदाम्याचे;
तन्नाम घ्यावयाला अंगीं दिसतात फार गुण साचे.
ऐकुनि पूर्ण कहाणी सुविचारें या विनोदजन्माची,
लेख सुदामा लेखिल जर, संपादील प्रीति सर्वांची.
'भद्रंभद्र' विनोदी, परि बाष्कळ त्या न मोल कवडीचें;
कौतुक कोण करी जन मोदें नाचूनि लंबकर्णाचें?
वाचुनि रिकामपणच्या[2] कामगिऱ्या होइ नाल्प आनंद;
बालिश लीलामय त्या, दिसे तमाशांत त्यांत ना भेद.
व्यक्ति खुळी निवडुनि ती खुपशी कविच्याच कारखान्यांत,
कुत्सित नीरस टीका करणें त्या कवि वाटलें इष्ट ?
प्रेमें झट्पट् काढुनि दुसरी आवृत्ति ही कपींद्रा[3]ची—
हातीं दिली खुळ्याच्या वाटे ही प्रखर कोलती साची!
मर्कट जर वाटे तो, किमर्थ मग त्यास व्यर्थ खिजवावें ?
सुज्ञें मूर्खासन्मुख मौनपणें संकटांस टाळावें.

१ ॲडिसनच्या Six papers on wit या लेखांतील एका उताऱ्याचें भाषांतर दिलें आहे. हें रा. केळकरकृत ' सुभाषित आणि विनोद ' यांतून घेतलें आहे. २ ' रिकामपणची कामगिरी ' ही मनोरंजनमधील लेखमाला. ३ या मालेंतील 'कवींचा कारखाना ' हा लेख पाहवा.

सामाजिक विविधपथां सोडुनि यानें बळें गटारांत–
टाकुनि धोंडे केलें फुकट पहा स्वांग किल्मिषग्रस्त १९०
लावी म्हाविं रिकामा तुमड्या गुढघ्यास,यासमान कृतीं
बालकरामें सोडुनि यावी, ही आमुची तया विनती.
बाष्कळ अध्यायाची करुनि समाप्ती समाजविषयांत,
निज लेखनी विनोदी चालवुनी तो करी जनां तुष्ट.
पोहे सुदामजींचे ठेवुनि आदर्शवत् पुढें नित्य,
यत्न करील कुणी जर मिळेल जय वाङ्मयांतरीं श्रेष्ठ.
रवथ करी पशु, नरमन ताज्या ग्रासावरी सदैव जडे;
नेपथ्य-पाठ-लेखक विचार करुनी लिहील काय पुढें?
कुत्सितविचारपूरित व्यक्तिद्वेषैकमूल रसहीन
बाष्कळकोटिक्रमरत विनोद यावा कधींहि सन्मुख न.

काव्यें.

जात्या वनिता कविता साहित्याकाशचंद्रिका विमला,
विकसन घेत जिथें ही शांति-स्फूर्ति-प्रदायिनी सकलां.
भव-कोलाहल-तप्तां रंजविते विविध करुनियां क्रीडा,
अवनत-राष्ट्रोद्धारा करिते सकल प्रनष्टुनी पीडा.
रूप अगोचर होवें, सत्परिणामक रसाळ तद्वाणी;
श्रुति-हृदयंगम-तांडव वज्रमना सोडिते क्षणीं पाणी.
विद्युल्लसत्प्रभा ही मधुरामृतपूर्णशारदादुहिता,
जननीसह वीणेवरि गाइ सदा विधिपुढें सुसंगीता.
संगीतामृतसरिता सहसा भेदूनि ये नभाखालीं;
सुस्नात देवि सृष्टी झाली, झळके सुहास्य तद्गालीं.२००
रमलें मंगल गानीं अनंत हें विश्व एकचित्तानें,
मंगल मंगल झालें प्रतिस्थलीं दिव्यगानरस-पानें.
मंगल-गान-ध्वनि हा येतो कोठून, ना कळे कवणा;
गानाकर मूर्त जनीं आणावा हें गमे समस्त जनां.
आराधुनि तैं प्रेमें अमृतमय देविला महर्षीनीं—
भूमाजि आणिलें मग भूषविलें रुचिर अंशुकाभरणीं.
वेदादि दिव्य सूत्रें, विविध पुराणें,रसाळ स्मृति नाना,
हृदयंगम नव काव्यें येती मारीत गोडशा ताना.
मंगल-काव्यमया हो अशेष मधुरा वसुंधरा सहज;
स्वानंदामृत-पानीं रंगुनि गेले अहो! तदा मनुज.२०५
सोडुनि गद्यनरातें किमर्थ सन्मान काव्यदेवीस
देती प्रेमें भूसुर? उद्भवतो प्रश्न एक सर्वांस.
जात्या स्त्री मृदुहृदया, मनोहरा, प्रेमला, न नर तैसा;
मकरंदपूर्ण कुसुमा प्रेमें होईल वश न अलि कैसा?
परिवार जनक पोषी जननी बाला करी सदाचारी,
ऐशा स्नेहमयीचा हस्त प्रेमें न कोण सपदि धरी?
केलीं जननीनें या राष्ट्रोद्धारार्थ मांगलिक कृत्यें;
काव्यें जुनीं पहातां कळतें कैशीं पुरातनापत्यें.
विस्तृत तनु गद्याची, हृदयीं होतो न तत्समावेश;
मृदुनाद काव्य काढी, जिव्हाग्रीं बैसते अनायास २१०
म्हणुनी आद्य कवींनीं कवितेला घेतलें प्रचारांत,
नाना परिणामप्रद विषयांनीं तीस बनविलें युक्त.
सत्कवि-मनःप्रसूता कविता होई अनेककंठगता,
नंतर मननें तीच्या प्रेमसदाचार लागले जगता.
ऐशी महत्कृती या काव्याची लाविते जगा गोडी,
नाहीं तदन्य सद्गुरु, कोणी तिजला न दूर लाथाडी.
काव्यांत काय नाहीं? आहे भरला समूळ संसार;
रामायण, भारत तें पटविति हृदयास साक्ष साचार.
ना एक विषय ठरला लोकीं या सर्व सिद्ध कवितेचा[1];
सर्वज्ञ वीर्यवान् कवि रमवी प्रतिविषयिं धरुनि हात तिचा.
बोधाया जन येतो प्रेमें कवि धरुनि नव्य कवितेस;
ज्ञानेशादि कवींनीं केल्या कृति धरुनि याच तत्त्वास.
आदर्शवत् तयांची सर्व कृती ठेवुनी पुढें सतत,
करिती प्रयत्न नाना सांप्रत कवि बनुनि पूर्ण काव्यरत.

---

१ करमणुकीमध्यें येत असलेल्या पाठांचे लेखक रा. खंडो रामचंद्र कुळकर्णी.

१ कित्येक म्हणतात, कवितेचा विषय ठरलेला असावा. आधुनिक कवि चिमणी, कावळा, बेडूक, कुत्रें असल्या घाणेरड्या विषयांवर कविता लिहितात हें बरें नाहीं. हें म्हणणेंच मुळीं चुकीचें आहे. खऱ्या कवीला असल्या विषयांत सुद्धां आपलें काव्यचातुर्य दाखवितां येतें. यःकश्चित् कुत्रें किंवा घोडा यांच्यांत जी खरी स्वामिभक्ति दिसून येते, ती बुद्धिमान् मनुष्यांत दिसून येत नाहीं. ती कुत्र्यामांजरांवरून सिद्ध करून मनुष्याच्या डोळ्यांत बोटें खुपसलीं तर श्रेयस्कर कां होणार नाहीं? कवीला विषयाचें बंधन मुळींच नको. इसापनीतींत किंवा हितोपदेशांत कुत्र्या-मांजरांच्या गोष्टी आहेत ना? त्यांतून जग आज उपदेश घेत आहेच. त्याला वाईट म्हणण्याचें कोणींच धाडस केलें नाहीं, व कोणी करणारही नाहीं.

अधिकारपूर्ण वाणी निघते ना अल्प आधुनिक कविंची,
अनिरुद्ध मात्र चाले निंदा संतत पुराणकवितेची.
वात्रट एक म्हणे कीं, पुराणकविताभिमानि ते सुतकी,[1]
रसिक नव्यांचे भोक्ते निःसंशय सोयरे[1] सदा लोकीं.
उद्गारुनियां पंक्ती पुराणभक्तांस टोमणा देई,
सुविचार करुनि बघतां त्यामाजी तत्त्व ना दिसे कांहीं.
श्रेयस्करा निरंतर कविता प्राचीन सर्व गोष्टींनीं,
सत्परिणामकविषयस्तुति न करावी किमर्थ सुज्ञांनीं ?
असतील दोष नाना परि आतां कधिंहि ते न निघतील,
अभिनव शुद्ध कृती निज दोष तयाचे समस्त उडवील.
जोंवर अशुद्ध आम्ही, प्रेमानें घेउं म्हणुनियां सुतकी,
सुतकांत भक्तियोगें काव्यें निघतील शुद्धशीं लोकीं.
हे सोयरे नव्याचे यांची बुद्धी कपर्दिकामोल,
सद्सद्विचार त्यांना नाहीं, ते पूर्ण जाहले बैल.
अभिमानपूर्ण असणें नव गोष्टींचा, गणी न निंद्य कुणी;
पायाशुद्ध नव्याला मान मिळे, धरिति तत्त्व हें न मनीं.
नवमग्न सोयरे हे अभिनव कविला स्वमस्तकीं घेती,
निंदुनि पुराणकविता दंगा उसळूनि वाङ्मयीं देती.
शेफारुनि कवि कांहीं छचोर करिती स्वकाव्यदेवीस,
पाहोनि सोयरे ही निंद्य कृती सेविती प्रमोदास.
प्राचीन देविसन्मुख अभिनव कवितेस ना मिळे मान,
अल्लड पोर दिसे ही, तात्त्विकता अल्प दाखवी ही न !
प्रौढत्व टाकुनी ही वारस्त्रीसम करी वृथा नखरा,
बाजारी प्रेमानें कैसा लाभेल शुद्ध मोद खरा ?
'पाश्चात्यासम सहृदय कवि न मयूरादि, कल्पनाहीन,
आपुल्या बिळांत बसले[2] नागोबा हे प्रमत्त होऊन.
चर्वितचर्वण करुनी कविवर घेती म्हणूनि अपुल्याला;
प्रतिभायुत पाश्चात्यांसन्मुख तत्कीर्तिचंद्र मावळला.
करणें रंवथ नको हें अभिनव तत्त्वान्न इष्ट आम्हांला,
म्हणुनी पाश्चात्यांचें वळण दिलें गोड आज काव्याला.'
ऐसें वदती स्वमुखें, परि पुढती येत नाल्प सरस कृती;
इकडे धड ना तिकडे मधेंच वाघूळ होउनी बसती.
पठणीं ज्याच्या हृदयीं उसळे आनंदवीचि सहजपणें,
सद्बोधलाभ होतो, त्यास म्हणावें सुकाव्य उघडपणें.

१ 'रिकामपणची कामगिरी' यांतील कवींचा कारखाना पाहावा. २ मोरोपंतांनीं रामायण महाभारत यांचें केवळ मराठी भाषांतर केलें, स्वतःचा भाग कांहीं घातला नाहीं, असा कोणी आक्षेप आणतात.

अभिनव नाना काव्यीं मिळतो आनंद निर्विवाद जनां,
होई खाजवितांही कंडू, त्यांमाजि मात्र तद्गुणना.
नूतन कवि हे गणिती कवितेला क्षुद्र बाहुली हृदयीं,
ओढाताण तिची बहु होताहे मात्र प्रागतिक समयीं.
कोणी म्हणे दिसे ना निसर्गवर्णन पुराणकवितेंत,
निज काव्यमंजुषीं तें प्रेमानें यापरी करी व्यक्तः
'आला रवि आकाशीं, फुलली पुष्पें तरूंवरी सुबक,
झुळुझुळु तटिनी वाहे, तत्तीरीं बैसले अनेक बक.'
तात्त्विक निसर्गवर्णन याला बोलेल कोणता रसिक ?
रूपकहीन कृती बहु, नच होती जनमनास सद्गुणक.
म्हणती पुराणकविता प्रेमाभावीं सदा उदासीन,
प्रेममयी तिज करिती कोणी सखिविरहदग्ध होऊन.
असणार दूर कविची सखि, तो संतत तदर्थ रडणार !
तत्कृति बघुनि जनांहीं काय करावा तसाच व्यवहार ?
सत्पथदर्शक कविसम कांताविरहीं रडेल जर भुवन-
विरहाश्रुसागरीं तें बुडुनी जाणार लागतां क्षण न.
दैवबळें जर ऐशी स्थिति आली व्याधि सर्व लोपेल,
कविला दूषण याया कोणीही या जगीं न राहील.
शृंगार पूर्ण सेवी देहीं जन नित्य हें जरी ज्ञात,
मंचककृत्यें सूत्रीं प्रामुख्यानें किमर्थ यावींत ?
काढुनि छाती कोणी येतो सस्मित मृदुस्वरीं गात;
काय म्हणे तो न कळे, म्हणुनि कुणी मान त्या न देतात.
वेदान्त सुलभ दिसतो यत्नें, परि चालते न यांत गति;
पुसतां कवीस, 'गूढ न कळेल कवणास-' उत्तरें मिळती
'काव्यांत गूढ असणें कविचें श्रेष्ठत्व पूर्ण दाखविती-'
पश्चिम देशीं ऐशीं काव्यें बहु, हें आम्हां सदा कथिती.
गोष्ट असेल खरी ती, परि येथें कोण जाणतो गूढ ?
टाकुनि भलतीं सलतीं कोडीं, कविनें बनूं नये मूढ !
हें प्रस्थ माजल्यानें गूढाचें, वर्तती कवि स्वैर,
देतां दूषण म्हणती 'रसिक न ही अवनि, होय बाजार !'
बाजारीं ज्या वस्तू सहसा आकर्षितील जन-चित्त,
टाकूनि त्या दुज्यांला स्थल देणें किमपि होत ना इष्ट !
जात्यावरचीं गाणीं ऐकुनि ज्या अर्थबोध ना होई,
यावें किमर्थ त्यानें गूढालंकार घालुनी पायीं ?
नेसुनि हिरवी साडी, आलिंगी तरुसि ही लतायुवती,
मत्सन्निध 'ती' नाहीं म्हणुनी त्याला न येतसे महती.
गूढ म्हणोनी ऐशीं काव्यें कवि नित्य दडपुनी देती,
बिनमोल गूढ ठेवा काय असे जो स्वकाव्यजालीं 'ती'.

नुसत्या ती शब्दानें होतो आनंद नाल्प कवणाला,
होई उलट कवी तो सर्वांच्या मात्र पात्र निंदेला.

वंगीं रवींद्रकविच्या प्रतिभापरिपूर्ण गूढ काव्यार्शीं
तुलना करितां अपुली प्रियावृता घेत हीन तेजार्शीं.५५

कविता नीरस म्हणती ज्यांत दिसेना कवि-प्रियावास,
घेती प्रथम कवी हे म्हणुनी शृंगार-युक्त विषयास.

कविमौक्तिक, कविभूषण कळप असे दोन वाङ्मयप्रांतीं,
आपापल्या परी ते कवितादेवी करूनि वश घेती.

कविमौक्तिक शाखाही ज्ञानरसें नाल्प जाहली पुष्ट,
विद्यानुग्रह घ्याया यत्न व करितात लव, दिसे स्पष्ट.

मुक्ता अनेक घेउनि अर्पण करितात काव्यदेवीला,
विद्वत्तेजोहीना, गमे मना, जणुं कपर्दिका-माला.

काव्यें हीन अनेक स्थानीं येतां कवी न जन होई;
डुकरें अनेक पिलें वितात, परि मान कोण त्या देई ?

कविभूषणादि[1] बघतां विद्वद्वर ते दिसून येतात,
परि ते सद्बुद्धीचा प्रतिविषयीं दुरुपयोग करितात. ६०

पर्वा त्यां न जुन्याची, अभिनव होवो जगत् तयां वाटे,
तिसराच मार्ग धरिती होवोनी वश सदैव गर्वातें.

करिती न युक्तिवादा, पुराण रूढीस तुडविती पार्दीं,
सदसद्विचारविन्मुख होउनि घेतात चाल नव सपदी.

सर्वांगांनीं करिती मनोहरा काव्यदेवि तेजाळ,
यमकें खुपती त्यांना दायादां वाटते जसें जाल.

नानालंकारांसम यमकहि बिनमोल खुलवि बहु तीस,
सुज्ञें विकारपीडित बनुनि करावा किमर्थ तन्नाश ? ६५

आहे श्रीमंती बहु, सुवर्णपात्रें अनेक गेहांत,
देणें उचित असे कां मृत्पात्रामधुनि केशरीभात ?

यमकें बंधन होतें असह्य कविच्या विचारलहरीला,
सहन करी विविध दुजीं,हेंच कसें सहन होत ना त्याला?

‘ बंधन नको कवीला, स्वैरपणें ते करीति व्यवहार,
जग बंधनीं बुडालें.’ अव्याहत चालती तदुद्गार.

गर्भी बालक येतें बंधनरहितं प्रसिद्ध ही गोष्ट,
कां मग वस्त्राभरणीं जखडावें त्यास धरुनियां हट्ट ?

उडतील बंधनें जर वस्त्रांचीं सर्व आज या जगतीं,
जळुनी एक उपाधी वर्धित होईल राष्ट्र-संपत्ती. ७०

बंधन[1] आहे म्हणुनी पृथ्वी फिरते सदैव सुरळीत,
विनयाभावीं होतें पतिपत्नी-प्रेम शुद्धही लुप्त.

अभिनवकविताविषयीं विचार करितां कळोनि हें येई,
विद्वत्तापरिपूर्णा तात्त्विक बोधक मनोहरा नाहीं.

वाचुनि पुराणकविता होतें हृदया खरें समाधान,
अभिनव काव्यें करिती शांति विनष्टूनि चित्त उद्विग्न.

करुनी नव्याजुन्यांचा विचार हृदयीं सदैव या कविंनीं
अनुकरण चांगल्याचें करुनि करावें पुढें स्वकाव्य गुणी.

पाश्चात्यासम मोहक शब्दीं निपजे तदीय काव्यकृती,
विद्वत्तागुणहीना म्हणुनी श्रेष्ठत्व ना मिळे जगतीं. २७५

खुलवुनि काव्यलतेला गेला तो हाय! मोगरा नाकीं !
सद्गुणपरिमलयोगें होय चिरंजीव तो परी लोकीं.

---

१ यांत विवक्षित व्यक्ति येत नसून त्या मार्गानें जाणारे सर्व कवि येतात.

१.निर्यमक आणि सयमक वाद करणें निर्यमक म्हणजे निरर्थक आहे. ‘ येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ।’ या मार्गाचें अवलंबन करून, लोकाचाराविरुद्ध कांहीं तरी गोष्ट करून आपलें नांव सर्वतोमुखीं करावें, या उद्देशानेंच केवळ हा वाद उपस्थित झाला आहे. एक दीर्घ शहाणे कवि (!) म्हणतात: ‘कविता आतां प्रौढ झाली आहे. तिला आतां यमकादि अलंकार नकोत. तिला साधा वेष पाहिजे ’—असें सांगून ते समाजांतलि सौभाग्यवती स्त्रियांचे कुंकुम-तिलक पुसावयास व त्यांच्या बांगड्या फोडावयास तयार झाले आहेत. काय हा अव्यपारेषु व्यापार ! स्त्रियांचें कुंकूं पुसण्यास व बांगड्या फोडण्यास आम्हां पुरुषांस जसा मुळींच अधिकार नाहीं, त्यांना त्या स्थितींत ठेवणें हें जसें आमचें कर्तव्यकर्म आहे,तसाच प्रकार कवितेचा. तिचे अलंकार आम्हीं कां उडवावेत ? स्त्री आणि पुरुष ओळखण्यास निसर्गानें जसे त्यांच्यांत कांहीं भेद ठेविले आहेत, तसेच गद्य आणि पद्य यांतही आहेत. स्त्रियांचे जसे मृदु अवयव, बांगड्या व कुंकूं, तसेंच कवितेचे गण, मात्रा व यमकें. समान हक्कांकरितां स्त्रीपुरुषांनीं कितीही ओरड केली तरी निसर्गानें ठरलेले हक्क कधींही उडणार नाहींत. तोच नियम काव्यदेवीसही लागतो. ती केव्हांही तरुण आहे. तिला गोटपाटल्यासारखे अनुप्रासादि अलंकार चढवूं नका, पण तिचा कुंकुमरूपी यमकालांकर केव्हांही काढूं नका.

अनुसरतां त्याला वा विनायका,माधवानुजा, टिळका,
दिव्यत्व कां न येइल सहसा निजकाव्यवाङ्मयालोका ?
मारिति उंच भराऱ्या अनेक विषयीं परी न इतिहासीं
प्रेमें कवी पहाती; उलट बळें तुच्छितात ते त्यासी !
मुक्तेश, पंत, पंडित, चित्रित करिती पुराणकाव्यांत,
अर्वाचीन कवींनीं घ्यावा इतिहास तेंवि हातांत.
अविरत ओरड चाले, क्षम न महाकाव्यगुंफना कोणी;
अर्वाचीन कवी हे काय न हीं मिटवितील रडगाणीं ?
इतिहास उच्चतत्त्वज्ञानसुधा काव्य ही त्रयीं ज्यांत,
तीच कृती हृदयंगम. उतरो हें तत्त्व नव्य काव्यांत !

भाषांतर.

रूपांतर-भाषांतरविषयीं कोठें दिसे न एक मत,
अव्याहत प्रचारीं येणें तीं इष्ट वाटते गोष्ट.
भाषांतरीं जगाला कळतो व्यापार अन्य देशांचा
सुविचाराचा संग्रह होतो साहित्य-सागरीं साचा.
परभाषेंतिल तात्त्विक बोधपर ग्रंथ विविध निवडावे,
भाषांतरित करोनी साहित्यांगास पुष्ट बनवावे.
सामाजिकशा गोष्टी आत्मसमाजानुरूप होतील–
ऐसें तद्रूपांतर व्हावें, तेणें स्वराष्ट्र सुधरेल.
दुःखा अंतीं सुख वा प्रेमध्वज, चंद्रगुप्त घ्या ध्यानीं,
किंचिद्दोषान्वित परि रूपांतर त्या म्हणेल ना कोणी.

उपसंहार.

एके काळीं वाङ्मय होय कटू भोपळ्यापरी त्याज्य,
अमुच्या दैवबलानें दुःस्थिति ती राहिली नसे आज.
श्रीशारदावनीं नव माळी किति लावितात नव वृक्ष,
रसिकजनांचें त्यांहीं सपदी सप्रेम वेधिलें लक्ष.
विविध लतावृक्षांनीं आली शोभा सरस्वतीसदना,
बघतां पूर्णविचारें सुमफलयुत एक ना दिसे नयना.
कारण याचें त्यांना खत न मिळे प्रगतिकार या काळीं,
विद्यावंत न बघती करिती जोपासना कशी माळी.
याचा अर्थ असा कीं,अभिनव लेखक अनेक हीन कृती
देतात लोक–हस्तीं; विद्वद्वर तत्प्रशंसना करिती.
निषेध ज्याचा होणें इष्ट, असें तें जगापुढें येतें;
प्रस्तावना लिहोनी विद्वद्वर हे प्रशंसिती त्यातें.
लेखक खुषामतीनें विद्यावंता करोनि वश घेती,
तेही दुर्गुण झांकुनि सहज अभिप्राय चांगला देती.
प्रस्तावना स्तुतीनें भरल्या ऐसा पुढें न येवोत,
दोषादोषविवेचनपरिपूर्णा सर्वकाल चमकोत.
एकव्यक्तिसुखास्तव दुर्गुण कां झांकितात विद्वान ?
कांट्यानें हा कांटा काढावा योग्य काल आणून.
वाङ्मय सुधरायाला सरसावुनि हे अनेक जन येती,
सन्मार्ग टाकुनी ते अविचारानें कुमार्गरत होती.
मासिकमुद्रक याचा विचार करितील काय शुद्धमनें ?
ग्रंथप्रकाशकांला करितों मी प्रश्न हाच विनयानें.
सदसद् वाङ्मय होणें प्रामुख्यानें असे तदीय करीं;
विद्यावंत विचारें सद्ग्रंथा आणितील का दारीं ?
श्रेष्ठ कृती नांवासम करणें, याला असे जगीं मान;
अंजनरंजनचालक[1] विचार करितील काय याचा न ?
नांवें सोनूबाई, धरिते वाळा करांत कथिलाचा !
दिसुनि प्रकार येतो मासिकदेहीं अनेक गोष्टींचा.
साहित्योत्तेजक ही परिषद् याचा विचार करुनि पुरा,
सद्ग्रंथ प्रसवाया आतां योजील का उपाय बरा ?
अर्वाचीन प्रणयग्रंथांनीं खूळ लागलें जगता,
तात्त्विकविचाररत त्या करणें हें इष्ट वाटतें आतां.
विद्वद्वर अनुभविक व्यक्ती निवडूनि सर्वसंमतिनें,
स्थापावी एक सभा ‘ ग्रंथपरीक्षक ’ जगांत नांवानें.
अभिनव नाना लेखकलेखां पाहूनि दोष नासावे,
संमतिवांचुनि त्यांच्या कर्त्यानें ग्रंथ कधिं न छापावे.
या एक युक्तिनें नव उत्तमसे ग्रंथ बहुत निघतील;
दोषान्वित कृति साऱ्या लोपुनि साहित्यवृद्धि होईल.
केलें आज परीक्षण साहित्याचें विहंगदृष्टीनें;
पुष्ट न तें, परि दिसतें केवळ हो लठ्ठ वातरोगानें.
बनवुनि विचारपूर्वक कुठारमात्रा तुम्हांपुढें ठेवीं;
साहित्यवातरोगा नाशाया ही उगाळुनी द्यावी.
ही अल्प औषधी मम ठरेल जर रामबाण या समयीं,
आनंद कां न होइल मज वा साहित्यसेवकां हृदयीं ?
काव्य म्हणोनि न ठेवीं, आनंद न यांत अल्प होणार;
गुणदायक तें आगद रुचकर ऐसें कधीं न मिळणार !
लागू कुठारमात्रा पडुनि हटो रोग वाङ्मयांगाचा,
अखिलचराचर-नाथा मागुनि हें, बंद ठेवितों वाचा.
दीर्घप्रयत्न करुनी सुस्थिति देऊं स्ववाङ्मयागारा;
बोला, बोला-‘होवो सरस्वतीचा सदैव विजय पुरा !’

जगन्नाथ वामन हर्णे.

१ ज्ञानांजन व मनोरंजन.

नवीन होतकरू लेखकांना उत्तेजन देण्याचे मार्ग.

[लेखक–रा. विठ्ठल वामन हडप.]

वाङ्मयाला नवें नवें अन्न मिळणार, तें नवीन होतकरू लेखकांकडूनच होय. त्यांना लेखनांत ज्याप्रकारें उत्साह वाटेल असे उपयाय योजणें अवश्य आहे. जे पहिल्यानेंच वाङ्मयदेवतेची वेडीवांकडी सेवा करणार, त्यांचें पहिलें धुम्याचें फूलच कां होईना, पण जर तें वाङ्मयदेवतेपर्यंत गेलें नाहीं, किंवा तिनें जर त्याचा तिरस्कार केला, तर त्याला नवीन वाङ्मय निर्माण करण्याला उत्साह यावा कसा ? हा एक मोठाच प्रश्न समाजचालकांसमोर आहे. आणि त्याचा विचार होणेंही अत्यंत आवश्यक आहे. कारण, जर होतकरू लेखकांची पाठ–गुणांकडे पाहून नाहीं, तरी पहिल्या प्रयत्नांकडे पाहून–समाजानें थोपटली नाहीं, तर त्याला हुरूप यावी कशी, आणि वाङ्मयांत भर पडावी कशी ?

तेव्हां होतकरू लेखकांनीं आपल्या मतें उत्तम म्हणून हुरुपानें लिहिलेलें वाङ्मय प्रसिद्ध झालें नाहीं, तर त्यांनीं कोणत्या आनंदावर सरस वाङ्मय निर्माण करावें ? यासाठीं त्यांचें वाङ्मय प्रसिद्ध होऊन त्यांना नवीन ग्रंथरचना करण्याला उत्तेजन येईल, असे कांहीं उपाय योजणें आवश्यक आहे.

१. एक " वाङ्मयोत्तेजक मंडळ " विद्वान् साहित्यसेवकांनीं स्थापन करावें. त्यानें होतकरू लेखकांना उत्तेजन मिळण्यासाठीं योग्य उपाय योजण्याचें काम करावें. विद्वान् साहित्यसेवकांच्या नेतृत्वाखालींच मात्र हें मंडळ चाललें पाहिजे.

२. या मंडळानें होतकरू लेखकांना उत्तेजन देण्यासाठीं म्हणून दरसाल कांहीं ठराविक विषयांची नोंद प्रसिद्ध करावी, व त्या विषयांवर उत्तम पुस्तकें लिहिणाऱ्या " नवीन होतकरू " लेखकांना उत्तेजनार्थ मोबदला द्यावा.

३. हा मोबदला देतां येण्यासाठीं अर्थात् द्रव्यबल पाहिजे. तें मिळविण्यासाठीं "साहित्य-फंड" नांवाचा फंड काढावा, व त्याची उभारणी कांहींशी पैसाफंडाच्या धर्तीवर करावी.

४. या फंडांतून उत्तम पुस्तकें लिहिणारांना बक्षिसें द्यावीं, व कोणास बक्षिस देतां आलें नाहीं तरी त्यांचीं पुस्तकें उत्तम असल्यास त्यांजपासून तीं मोफत घेऊन छापवावीं व त्यांच्या विक्रीच्या रकमेपैकीं कांहीं ठराविक भाग त्या लेखकांना द्यावा.

५. होतकरू लेखकांची प्रथम प्रथम आपलीं पुस्तकें (किंवा लेख) प्रसिद्ध व्हावे, एवढीच बहुधा इच्छा असते. ती पुरविण्यासाठीं जीं पुस्तकें छापावीं लागतील, त्या–व होतकरू लेखकांच्या सर्वच–पुस्तकांची किंमत शक्य तितकी माफक ठेवावी. उद्देश इतकाच कीं, पुस्तकांची विक्री होऊन होतकरू लेखकांना उत्तेजन मिळावें.

६. " साहित्य-मंडळा " तर्फें एक " साहित्य–चिकित्सक सभा " स्थापन व्हावी, अगर " साहित्य–चिकित्सा " नांवाचें मासिक काढावें, व त्यांत प्रत्येक महिन्यांत प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांचें सौम्य–लेखकांच्या जीवाला न लागेल असें–परीक्षण करावें.

७. लेखकांना स्फुट लेख लिहिण्यास उत्तेजन यावें यास्तव, विषय ठरवून त्या विषयांवर उत्तम लेख लिहिणारांना बक्षिसें लावावीं.

८."साहित्य-फंडा "ला कोणासही सामर्थ्यानुरूप मदत करतां यावी यासाठीं त्याच्या वर्गणीस मर्यादा ठेवूं नये. अशा रीतीनें अगदीं गरीब-श्रीमंताला सुद्धां १पैशापासून पाहिजे तितकी मदत करतां येईल.

अशा रीतीनें प्रयत्न केला, तर प्रत्येक नवीन लेखकाला दिवसेंदिवस उत्तेजन मिळत जाईल, व अशा रीतीनें सरस वाङ्मय निर्माण होत जाईल, अशी फार फार अपेक्षा आहे. तरी साहित्यसेवकांनी या गोष्टीकडे नजर देणें अवश्य आहे.

कविता.

शारदास्तवन.

वाग्वा इदं सर्वं भूतं गायति च त्रायते च।

छांदो. ३-१२-१

वाग्देवी विलसे सदा कवि-हृदीं, सृष्टीस जी शोभवी,
शास्त्रें काव्य-कला अनेक धरिते रूपें पहा शांभवी;
आकाशीं रवि-तारका-ग्रह-शशी तेजोनिधी गोल हे,
उद्यानीं सुमनें, सरोरुह-वनें, हीं शारदा विग्रहें. १

रत्नें, पाच, मणी, सुवर्ण चमके तेजें शिरोभूषणीं;
मुक्ताहार तसे प्रवाल-पदकें भूपाल-कंठांतुनी;
बाजूबंद कडीं अलंकृत नृपा, शस्त्रास्त्र नानापरी;
आहे हा सगळा विलास नटते ही शारदा सुंदरी ! २

पक्षी मंजुळ गोड शब्द करिती, गाती मुदें नाचती;
प्रेमालिंगन देउनी विहरती, चित्तास आकर्षिती;
दंपत्यें रमती, पिलां रमविती सौख्यें जगीं नांदती;
स्वर्गाचा सगळा विलास जणुं हा, ही शारदा सत्कृती !३

पुष्पाचा सुटतो सुवास, रमवी भृंगास जें अंतरीं;
टेवी प्रेम-मधास निर्मल मनें पोटांत, यावें तरी;
येतें मेप्र फुलांस पाहुनि जना, हो वीतरागी जरी,
स्वर्गीचा सगळा विलास करिते ही शारदा-सुंदरी ! ४

सिंहाचा रव ऐकुनी भिउनियां हत्ती वनीं धावती !
जाळ्याभीतरिं गुंतल्या हरिणि ज्या दीनस्वरें भाकिती !
मुंग्या वारुळ बांधुनी रमति सत्कार्यीं सदा रंगती;
सृष्टीचा क्रम चालवी नियत हा, श्रीशारदा माय ती! ५

मेघाचें गगनांत रूप धरुनी चांचल्य दावी जनां;
पर्जन्यें पडुनी धरेस पिकवी दे स्फूर्ति ही सज्जनां;
नानारूप वसुंधरा धरितसे तमाम सार्थक्य हो;
लीला या सगळ्या करीत असते ही शारदा माय हो !६

ऐशी ही प्रतिमा जगांत नटली, काव्यांतरीं वाढली;
जन्मा ये कविच्या मनांत, रसिकीं जी अंतरीं पोषिली;
आली आज तुम्हांसमोर नटली, ही शब्दरूपें पहा;
सेवावी रसिकें अशीच दुहिता, वंदी तुम्हां दास हा. ७

गजानन गोपाळ जोशी.

महाराष्ट्र-वाग्देवतार्पित पुष्पांजलि.

निस्यंदित आर्यमुखें झाली गीर्वाण जी गिरा लोकीं,
जननी इची असे ती जन्मस्थल भरतभू प्रथित जे कीं १

होती तपस्विनी श्रीज्ञानेश-मुकुंदराज-कुटिकेंत,
मुक्तेश भक्तजनवर वाखाणियला तिचा स्वदेशांत. २

साधुजनीं संवर्धित केली निवृत्तिपर गुणान्वितशी–
झाली तत्संसर्गें, हरि भवदुःखांचिया अमित राशी. ३

जन-राहटी कळाया निजहस्तीं धरुनियां समर्थ तिला,
दाविति जनवसतीं मग सामान्यहि लागले भजायाला.

तुकयासंगें बनली संतीण धुवावयास पापमल,
मग पंडितें सजविली श्रीमयुरें लेववोनियां शाल. ५

ओवी अभंग नानावृत्तीं ही खेळ खेळली अमित,
रसभक्त तोषवियले पाहून सुखावले बहुत संत. ६

छंद-क्रीडांगण हें झालें अपुरेंच ईस विहराया,
गद्योद्यानीं मम ये निजभक्तमनोरथास पुरवाया.

जनकालस्थिति ज्यापरि त्यापरि बाह्यस्वरूप होत असे,
अंतर विशुद्ध सुंदर सन्मानस परि तयास मोहतसे. ८

आजवरी सद्गुरुपरि विविधज्ञानामृतें भरुनि पेले,
लावियले जनवदनीं, तृप्तिसुखोद्गारहां बहुत वरिले. ९

परत्र इह सौख्याचे केले दुर्गम असेहि पथ सुगम
राशी उपकाराच्या फेडाया पाहिजेत शत जन्म. १०

झाले आराधक जे देवींचे भारतीं महाराष्ट्रीं,
तद्गुणगौरवलेखन सांग-करायास लेखनी अपुरी. ११

स्वर्गीं सरस्वतीनें स्वकरें हेमाक्षरीं लिहायाचे,
ते गुण मम दुर्बलशा लेखनिला काय आवरायाचे! १२

लेखकवर विष्णूसम अत्यल्पचि आज खास असतील,
लोकीं तत्कृतियश तें चिरकाल विशालसेंच राहील.१३

हिंदी बंगाली वा इतरहि ज्या भारतांतरीं वसती
त्या भगिनींहून इला उणें नसावें असेल जर चित्तीं.१४

तरि आपुल्याच हातीं सर्वहि ते यांत अल्प शंका न
गत भाषाभक्तांनी स्वर्गीं असतील लाविले नयन. १५

महादेव भिकाजी कुळकर्णी.

आर्यमहौषधालय मु० पो० आजर्ले.

कोकणप्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्धरामबाण औषधें.

पूर्ण रक्तशोधक, अत्यंत पौष्टिक, चित्तोत्साहक, बुद्धिकांतिवर्धक, सुवर्णमाक्षिक -मौक्तिक-कस्तुरी, प्रवालादिमिश्रत अपूर्व गुटिका.

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग. संधिवातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूल, इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविध रोग ताबडतोब दुरुस्त होऊन चित्तात्सोहबुद्धि आणि कीर्ति वाढते, अंगात परिपूर्ण शक्ति येते; शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्मान् होण्यास या गुटिका हेंच अगदीं प्रतिज्ञेचें औषध होय. यामुळें याचे लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून अधिक घेणारास टपालखर्च माफ. त्यांच्या आंत घेणारास ट.ख. वेगळा ४ आणेप डेल. ३२ गो० १ रु०; ७० गो०२ रु०; १६० गो० ४ रु०; २६० गो० ६ रु० आणि ५२० गो. १० रुपये.

थंडगार नेत्रांजन—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदुकाच वगैरे डोळ्यांचे एकंदर विकार ताबडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार होते. डबीस १॥ रुपया.

कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल—यानें कानांचे सर्व प्रकारचे व्रण आणि तत्संबंधीं इतर विकार त्वरित बरे होतात. बाटलीस १ रुपया.

दंतरक्षक पूड—ही दांत व हिरड्या यांचे सर्व विकार तत्काळ दुरुस्त करून दांत स्वच्छ व मजबूत करण्यांत प्रतिज्ञेची आहे. डबी ६ आ.

गजकर्ण, खरूज, नायटे इ. विकार ३ दिवसांत बरे होतात ड. ६ आ.

विंचवाचें विष—हें औषध चोळतांच उतरतें. तें ४० मनुष्यांस पुरतें. ड. ८ आणे

हिमज्वरावर वस्ताद औषध—पाळीचे हट्टी ताप तीन दिवसांतच बरे करितें. डबीस १ रु.

पटकी व इतर जुलाब-दोन तीन गोळ्यांनीं अगदीं जलद बरे होतात. ड. १ रु.

मुरंगी, मालती, कल्हार, राजविलास, लक्ष्मीविलास, पुष्पराज इ० बादशाही अति उंची उत्तरें व त्याचप्रमाणें गुलाब, हिना, केवडा, चमेली, जाई वगैरें सुगंधी अत्तरें आणि केशांस लावण्याचीं हरएक प्रकारचीं सुवासिक तेलें पूर्ण खात्रीचीं माफक दरानें मिळतील.

सूचना:-वरील औषधें पूर्ण खात्रीचीं असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्याचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला म्हणून त्याचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. ढोंगी लोकांच्या बनावट औषधाविषयीं ग्राहकांनीं फार सावध असावें. औषधें माहितीचे खर्च्यासह रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं, प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक फुकट देऊं. आमचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री चिवलकर, वैद्य.

मु० पो० आंजर्ले, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

ॐ नमः श्रीगणेशाय.

आर्यवनौषधालय मुर्डी.

मदनामृतसंजीवनी

अत्यंत पौष्टिक, मनोल्हादक, कान्तिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक-

कस्तुरिप्रवालादि अनेक वनस्पतिमिश्र अद्भुत गुटिका.

शारिरिक सौख्याचा खरा लाभ करून घेणें असेल तर, या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं. यांच्या सेवनानें कडकी, जीर्णज्वर, अशक्तता, मानसिकदुर्बलता, अनेक वातरोग, प्रदररोग, बाळंतरोग मूळव्याध, नेत्रविकार, कटिशूल, इ. इ. अनेक विकार या गुटिकांपासून त्वरित बरे होतात. कांति व बुद्धि वाढून अंगांत भरपूर शक्ति येते. शरिरांतील रक्त व धातूची वृद्धि होऊन सर्व प्रकारें संसारसुखाचा खरा लाभ होतो. वरील सर्व विकार जाऊन शरीर जोमदार होण्याला या गुटिकांसारखें अन्य औषधच नाहीं, गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांचे वर घेणारास सर्व पोष्ट खर्च माफ. त्याचे आंत घेणारास निराळा पोष्ट खर्च पडेल.

दर—३५ गोळ्यांस १ रु. ७५ गो. २ रु., १६५ गो. ४ रु., २७५ गो. ६ रु., ५५० गो. १० रु.

अपूर्व नेत्रांजन.

यानें सारा, फुलें, वडस, खुपऱ्या, कांचबिंदु, इ. इ. नेत्रसंबंध सर्व विकार फार त्वरित जाऊन दृष्टि तीव्र होते. डबीस १ रुपया.

उष्णवात.

मलबद्धता, ढेंकरा येणें, पोटांत केव्हां आग अथवा थंडी होणें, चमका मारणें, कधीं छातींत धडधडण अपचन, पोट फुगणें, कधीं अन्न थोडें व कधीं जास्त खपणें, केव्हां ग्लानि व केव्हां थोडी हुषारी वाटणें लघवी कढत अथवा पिंवळी अगर तांबडी असणें, अगर कधीं थोडी व कधीं जास्त होणें, मधून मधून मस्तक तापणें दुखणें, तसेंच कधीं निद्रा साफ न येणें तर कधीं जास्त असणें, क्वचित भोंवळ उद्भवणें, डोळे त्रासून तापणें व कधीं जड होणें, कधीं हात व पाय यांस नमता किंवा सर्दी होणें, हें सर्व किंवा यांतील कांहीं विकार उष्णवातानें उद्भवतात. ते आमच्या गोळ्या व तेल यांनीं अगदीं जलद बरे होतात. ४० गोळ्यांचे डबीस २ रु., व तेलाची बाटली १ रु. एकूण किं ३ रु.

औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीचीं असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिट आहेत. यांशिवाय मोटमोठ्या रोगांवर अनेक औषधें, ग्रंथोक्त रसायनें, भस्में, पाक, गुटिका, आसवें, तेलें आणि सुगंधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनुपानखर्डा सोबत. टपाल खर्च वेगळा पडेल. माल रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य,

पत्ता—मु० मुर्डी, पोष्ट हर्णै, जि० रत्नागिरी.

आश्चर्यकारक ! कधींही न आलेली संधि !

अत्युत्कृष्ट ज्ञानभांडार संग्रहास ठेवा !

नांवें नोंदवा ! नांवें नोंदवा !

श्रीशंकराचार्यांचे सर्व ग्रंथ.

किंमत फक्त तीन रुपये !

कागद चांगला परंतु पातळ व बांधणी सामान्य.

लायब्ररी एडिशन—कागद उत्तम, जाड व बांधणी लो. टिळकांच्या गीतेप्रमाणें सोनेरी व मजबूत. **किं. फक्त ४ रुपये.**

नारायणात्परोऽव्यक्तादण्डमव्यक्तसंभवम् ।
अण्डस्यान्तास्त्विमे लोकाः सप्तद्वीपा च मेदिनी ॥
(ह्या श्लोकाक्षराप्रमाणें अक्षर)

धर्ममार्तंड दीक्षित काशिनाथ वामन लेले सोमयाजी ह्यांनीं काळजी घेऊन प्रत शुद्ध केलेली आहे.

ग्रंथः—१ ब्रह्मसूत्रांसह शारीरभाष्य, २ भगवद्गीतेसह शांकरभाष्य; ३ उपनिषदांसह दशोपनिषद्भाष्य; ४ श्वेताश्वतर सभाष्य; ५ सनत्सुजात सभाष्य; ६ विष्णुसहस्रनाम सभाष्य; ७ शतश्लोकी; ८ उपदेशसाहस्री; ९ विवेकचूडामणिप्रभृति प्रकरणग्रंथ व १० आचार्यकृत स्तोत्रें वगैरे. असे सर्व ग्रंथ—

श्रीशंकराचार्यकृत रुद्रभाष्य.

किंमत व्ही. पी. सह) **आजपर्यंत कोठेंहि न छापिलेलें**) फक्त १ रु. ८५.
विकत घेणारासच ४ अथवा ३ रुपये किंमतीस मिळतील. ट. हं. सुमारें ८८ वेगळें पडेल.

रुद्रभाष्य आक्टोबर १९१५ अखेर ग्राहकांकडे जाऊं लागेल व नोवेंबर अखेरपर्यंत १। रुपया रुद्रभाष्याकरितां पाठविणारास किंवा १८५ च्या व्ही. पी. नें मागविणारासच ४ अथवा ३ रुपये किंमतीची सवलत आहे. मागाहून किंमत रुपये अनुक्रमें १५ व २० पडेल.

हा प्रचंड ग्रंथसमुदाय फेब्रुवारी १९१६ मध्यें प्रसिद्ध होईल; तरी शंकरभक्तांनीं ही संधि अवश्य साधावी.

महादेव मखाराम दाते वैद्य, शनवार पेठ, पुणें शहर.

३॥ रुपयांत १३ औषधें.

अं	नांव	तो.	किं.	अं.	नांव	तो.	किं.
१	लोहभस्म	१०	५	८	मंडूरभस्म ...	१०	३८१२
२	प्रवाळभस्म (सूर्यपुटी)	१०	२८८	९	लघुमालिनीवसंत	१०	३८२
३	प्रवाळभस्म (चंद्रपुटी)	१०	२८८	१०	आनंदभैरव ...	१०	१८८
४	प्रवाळभस्म (अग्निपुटी)	१०	१८८	११	त्रिभुवनकीर्ति ...	१०	३८१२
५	शंखभस्म	१०	१	१२	मर्मारिपन्नग (खल्वी)	१०	३८१२
६	कपर्दिकाभस्म ...	१०	१८४	१३	महाज्वरांकुश ...	१०	३८२
७	शौक्तिकभस्म ...	१०	१		येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.		

पांच तोळ्यांपेक्षां कोणतेंहि औषध कमी मिळणार नाहीं. पुष्कळांच्या सूचनेवरून केवळ वैद्य व डॉक्टर यांकरतां अशी योजना केली आहे कीं, जे सर्व औषधें प्रत्येकीं एक तोळा घेतील त्यांना ३॥ रुपयांस प्रत्येकीं एक तोळा याप्रमाणें तेरा औषधें देऊं.

पत्ता—**खेडकर वैद्य अॅण्ड सन्स, पुणें शहर.**

जाहिरात.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें मुंबई इलाख्याचे डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांनीं बक्षिसांसाठीं आणि शाळा-लायब्ऱ्यांसाठीं मंजूर केलीं आहेत.

गीतार्थसार.—या पुस्तकांत (कै.) रा. रा. वामन आबाजी मोडक, बी. ए. यांनीं भगवद्गीतेच्या १८ अध्यायांचें सुरस भाषेमध्यें सार काढिलें आहे, आणि विशेष स्पष्टीकरणार्थ टीका लिहिली आहे. किं. ४ आणे.

श्रीमन्महाबळेश्वरवर्णन. — महाबळेश्वराचें धार्मिकदृष्ट्या आणि ऐतिहासिकदृष्ट्या यांत सुरेख वर्णन दिलें आहे. स्थलवर्णनात्मक यासारखें दुसरें पुस्तक मराठींत क्वचित् आढळेल. ग्रंथकार (कै.) रा. रा. यशवंतराव आनंदराव उदास, बी. ए. किं. ८ आणे.

भ्रांतिकृत चमत्कार.—शेक्सपियर कवीच्या Comedy of Errors या नाटकाच्या आधारें हें नाटक (कै.) रा. ब. श्रीराम भिकाजी जठार बी. ए. आणि रा. सा. बजाबा रामचंद्र प्रधान यांनीं रचिलें. अत्यंत सुरस आणि मनोरंजक आहे. किंमत ६ आणे.

बालशिक्षण.—रा. रा. गणेश जनार्दन आगाशे, बी. ए., यांनीं इंग्रजी ग्रंथाच्या आधारानें रचिलें. 'किंडर गार्टन' शिक्षणपद्धतीबद्दल यांत सुरेख माहिती दिली आहे. किं. ३ आणे.

सुंदरेची संक्रांत.—वरील ग्रंथकारानेंच रचिलेली, एक सुबोध आणि सुरस गोष्ट. किं. दीड आणा.

व्हिक्टोरिया महाराणीचें चरित्र.—(कै.) रा. रा. गणेश भिकाजी गुंजीकर बी. ए. यांनीं लिहिलें. महाराणीच्या जन्मापासून तिच्या राज्यारोहणापर्यंत यांत सुरस कथा सांगितली आहे. किं. ३ आणे.

दानत.—स्माइल्स साहेबांच्या Character या सुंदर पुस्तकाच्या प्रथम भागाच्या आधारें वरील ग्रंथकारानेंच रचिलें. किं. दीड आणा.

स्वपराक्रम.-स्माइल्स साहेबांच्या Self-help या पुस्तकाच्या पहिल्या भागाचें रूपांतर रा. रा. गणेश भिकाजी गुंजीकर यांनीं केलें. स्वतःच्या कर्तबगारीनें मनुष्यास काय काय साध्य करून घेतां येतें, हें यांत सुबोध रीतीनें सांगितलें आहे. किं. ४ आणे.

कुटुंबवत्सल-ही बोधपर गोष्ट इंग्रजीच्या आधारें वरील ग्रंथकारानेंच लिहिली आहे. एका कुटुंबवत्सल माणसाच्या जन्माची कहाणी यांत चटकदार रीतीनें सांगितली आहे. किं. २ आणे.

मोचनगड.—मराठींतील ही उत्तम कादंबरी कै. रा. रा. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांनीं लिहिली. मुळांतला थोडा भाग मुंबई शाळाखात्याच्या सूचनेप्रमाणें कमी करून पुस्तकाची किंमत १२ आण्यांऐवजीं १० आणे केली आहे.

ब्रिटिश राज्यव्यवस्था.—इंग्लिशांच्या राज्यव्यवस्थेचें स्वरूप यांत थोडक्यांत पण सुरेख रीतीनें सांगितलें आहे. ग्रंथकार रा. सा. शिवराम सिताराम वागळे, बी. ए. एल्. एल्. बी. आ. दुसरी, किं. ८ आणे.

बेकनचे निबंध.—सुधारलेली दुसरी आवृत्ति. वरील ग्रंथकारानेंच मुळाबरहुकूम हें भाषांतर केलें आहे. विद्यार्थ्यांस आणि इतरांसही यांचें वाचन फार फायदेशीर होईल. किं. १२ आणे.

सिसरोकृत नीतिविषयक चार निबंध.—रा. सा. वागळे यांनीं हे चार निबंध इंग्रजींतून मराठींत सुबोध भाषेंत उतरले आहेत. किंमत ४ आणे.

स्वतःचा प्रयत्न.—रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि एम्. ए. यांनीं स्माइल्सच्या Self-help या ग्रंथाच्या प्रथम भागाचा आधार घेऊन हें सुंदर पुस्तक लिहिलें आहे. किं. ३ आणे.

कुसुमांजलि.—इंग्रजी कवींच्या काव्यांतील सुरस चुटक्यांचें हें सुरस मराठी रूपांतर रा. ब. महाजनि यांनीं केलें आहे. संग्रह फार नामी आहे. किं. ४ आणे.

अभिनव कादंबरी.—बाणाच्या कादंबरीची कथा या काव्यामध्यें रा. रा. गंगाधर रामचंद्र मोगरे यांनीं थोडक्यांत आणि चटकदार रीतीनें दिलेली आहे. ती कथा जाणण्यास या काव्याचा जसा उपयोग होईल तसा दुसऱ्या पुस्तकाचा होणार नाहीं. उत्तम मराठी कवितेचा ज्यांस नमुना पाहावयाचा असेल त्यांनीं या अभिनव कादंबरीचा अवश्य संग्रह करावा. किं. ४ आणे.

पद्यात्मक लघुहितोपदेश.—(कै.) रा. रा. विनायक यशवंत बेडे यांनीं रचिलेल्या नीतिपर कविता मुलांच्या हातीं देण्यास अगदीं योग्य पुस्तक. किं. २ आणे.

श्री शिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र-(मल्हार रामराव चिटणीसकृत.) शिवाजी महाराजांची यांत इत्थंभूत हकीकत दिली आहे. आवृत्ति दुसरी. किं. १ रु.

सार्वजनिक आरोग्य.—डा. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांनीं मूळ इंग्रजीवरून केलें. किं. १२ आणे

☞ हीं पुस्तकें "**विविधज्ञानविस्तारचे** म्यानेजर, फणसवाडी, अग्निहोत्र्याच्या वाड्यासमोर, मुंबई." या पत्त्यावर मागवावीं.

॥ श्री ॥

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक ११

पुस्तकपरीक्षा.

" यूरोपमध्यें कार्यकारणवादाचा उदय व प्रभाव."

प्रस्तुत पुस्तक विख्यात इतिहासकार व तत्त्वज्ञ लेकी यांच्या Rationalism in Europe या पुस्तकाचें भाषांतर आहे; व तें डे. व्हृ. ट्रा. सोसायटीनें रा. ह. ब. परचुरे यांजकडून तयार करविलें आहे. लेकीसाहेबांची कीर्ति इतिहासकार या नात्यानें फारच उज्ज्वल आहे. इतिहासकाराला आपल्या वर्ण्य विषयाचा फारच व्यापक व खोल विचार करावा लागतो; व त्याची दृष्टि अत्यंत निःपक्षपाती असावी लागते. हे गुण लेकीसाहेबांत फारच उत्कर्षानें वसत होते. व याशिवाय फारच रसाळ व जोरदार भाषा, तीव्र कल्पनाशक्ति, व निरुत्तरकोटिक्रम यांनीं त्यांच्या ग्रंथाला फारच मनोहारित्व आलेलें आहे. त्यांचा " अठराव्या शतकांतील इंग्लंडचा इतिहास " हा इतिहास या दृष्टीनें तर बिनमोल आहेच; पण सामान्य वाचकांसही तो एखाद्या कादंबरीसारखा मनोरंजक वाटतो. यूरोपखंडांत प्राचीनकाळापासून चालत आलेल्या व मध्यंतरींच्या काळांत नवीनही उद्भवलेल्या कित्येक वेडगळ समजुती शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीनें हळूहळू कशा नाहींशा झाल्या; सृष्ट चमत्कार हे कोणीं सुस्वभावी अगर दुष्ट अशा देवतांनीं किंवा पिशाचांनीं केलेले खेळ नसून, त्यांत कार्यकारणांचा संबंध निर्बाधपणें कसा दिसून येतो, हें समजूं लागल्यानें समाजांत कित्येक शतकेंपर्यंत चालत आलेले अनर्थकारक प्रकार कसे बंद झाले; केवळ श्रद्धामूलक विश्वास जाऊन प्रत्येक गोष्टीबद्दल निर्भीडपणानें चर्चा करावयाची, व " असें कां ? " या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळाल्याशिवाय थांबावयाचें नाहीं अशी प्रवृत्ति कशी निर्माण झाली;—याचा इतिहास प्रस्तुत पुस्तकांत लेकीसाहेबांनीं फारच उत्कृष्ट रीतीनें दिला आहे. यूरोपखंडांत अठराव्या शतकापूर्वीं सामान्य जनतेची धार्मिक बाबतींत जशी स्थिति होती तशीच कांहीं अंशीं आजमितीस हिंदुस्थानांतील साधारण सुशिक्षित म्हणविल्या जाणाऱ्या समाजाचीही आहे. त्यामुळें अशा तऱ्हेच्या पुस्तकानें फारच सुपरिणाम होण्याचा संभव आहे. दुसऱ्यांच्या

समजुतींचा वेडगळपणा आपणास जितका जलद पटतो तितका आपल्या समजुतींचा पटत नाहीं, असा अनुभव आहे. येशू ख्रिस्तानें मृत माणसांस उठविलें. किंवा कित्येक ख्रिस्ती साधुसंतांनीं अद्भुत चमत्कार केले, हें आपणास सहसा खरें वाटत नाहीं. पण अशा सर्व चमत्कारांस भाकडकथा म्हणणाऱ्या लोकांना मात्र श्रीकृष्णाचें विश्वरूपदर्शन, द्रौपदीवस्त्रपरिधान, ज्ञानेश्वरांनीं रेड्याकडून केलेलें वेदपठन वगैरे गोष्टींत कांहींच चमत्कारिक वाटूं नये, हा चमत्कार नव्हे काय? पण हा मनुष्यस्वभाव आहे. तथापि दुसऱ्यांच्या का होईना, कांहीं समजुती वेडगळपणाच्या होत्या किंवा आहेत असें एकदां आपणास वाटूं लागलें, कीं विचाराला जें चालन मिळतें तें मात्र तेथेंच थांबत नाहीं. दुसऱ्यांच्या चमत्कारांना भाकडकथा समजणाराचें मन पुढें त्याचें त्यालाच खाऊं लागतें. आपल्याही विचारसरणींत कांहींतरी चुकत तर नसेलना, अशी अंधुकशी शंका डोकावूं लागते; व ही शंकाच पुढें स्वतःच्या वेडगळ समजुतीच्या नाशास कारणीभूत होते. लेकीसाहेबांच्या पुस्तकासारख्या पुस्तकानें मोठा फायदा होण्याचा संभव आहे तो हाच. आपल्या डोळ्यांतील मुसळ दिसण्यापूर्वी लोकांच्या डोळ्यांतील कुसळ दिसावें लागतें; व तें दाखविण्याचें काम अशीं पुस्तकें फार छान करितात. म्हणून त्यांचा लाभ महाराष्ट्र वाचकांस कोणी तरी करून द्यावा अशी आमची फार दिवसांची इच्छा होती. ती पूर्ण होणार अशी या पुस्तकाच्या जाहिरातीनें आम्हांस फार आशा उत्पन्न झाली. पण सांगण्यास फार खेद होतो कीं, पुस्तक प्रत्यक्ष पाहून या बाबतींत आमची बरीच निराशा झाली. ह्या निराशेचीं कारणें सविस्तर सांगण्यापूर्वीं एक मात्र आम्हांस सांगावयाचें आहे; तें हें कीं, **ही चर्चा केवळ भाषांतराविषयींची आहे.** मूळ पुस्तकाच्या बरेवाईटपणाविषयीं आम्हांस कांहीं लिहावयाचें नाहीं, व तसें करण्याची आमची योग्यताही नाहीं.

मुख्य मुद्दयासंबंधीं बोलण्यापूर्वीं एका क्षुल्लक--पण या पुस्तकांत फारच नजरेस येणाऱ्या-मुद्दयाविषयीं दोन शब्द लिहिले पाहिजेत. या पुस्तकांत अशुद्धें इतकीं आहेत कीं, कांहीं सुमार नाहीं. शुद्धिपत्रापूर्वीं दिलेल्या टिपेंत प्रकाशकांनीं सुद्धां ही गोष्ट प्रांजलपणें कबूल केलेली आहे.

"हें शुद्धिपत्र न लांबावें म्हणून पुष्कळ अशुद्धें शुद्ध केलीं नाहींत. पण तीं सहज समजतील अशीं आहेत. तथापि अशुद्धें इतकीं आहेत कीं, कित्येक नजर चुकवून राहिलीं असतील."

इतका सपशेल कबूलीजबाब असल्यावर जास्त लिहिणें मुळींच जरूर नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण असें कबूल करण्याचा प्रसंग येणें ही गोष्ट मात्र शेट दामोदर सावळाराम आणि मंडळीसारख्या मुरलेल्या प्रकाशकांस लाजिरवाणी आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. छपाईच्या चुका कांहीं एका अवधीपर्यंतच क्षम्य होत, त्यापुढें नाहींत. पण बहुतेक प्रत्येक वाक्यांत—ओळींत—चूक, म्हणजे काय? विरामचिन्हांच्या चुकांनीं तर, आधींचे बोजड व क्लिष्ट झालेलीं वाक्यें जास्त दुर्बोध होतात; व अशीं स्थळें या पुस्तकांत शेकड्यांनीं मोजतां येतील! प्रस्तुत लेखकास असें वाटतें कीं, छापण्याच्या अशा तऱ्हेच्या चुका आलीकडे वाढत्या प्रमाणावर

नजरेस येतात. मग याचीं कारणें काय असतील तीं असोत. साधारणपणें मराठी पुस्तकांच्या ज्या किंमती असतात त्या मानानें प्रस्तुत पुस्तकाची किंमत फार थोडी–एक रुपया–आहे. ही सवंगाई तर या मुद्रणदोषांच्या मुळाशीं नसेलना ?

आतां मुख्य विषयाकडे वळण्यापूर्वी एका मुद्द्याची चर्चा प्रथम केली पाहिजे. तो हा कीं, प्रस्तुत पुस्तकासारखीं पुस्तकें **कोणाकरितां** लिहिलेलीं असतात ? प्रस्तुत पुस्तक भाषांतरात्मक असून गंभीर विषयावर लिहिलेलें आहे. उच्च शिक्षण मिळालेल्या पदवीधरांत अशा पुस्तकांस फार थोडे वाचक मिळणार. लेकीसोहबांच्या ग्रंथाचा स्वाद मूळांतूनच ज्यांना घेतां येईल ते भाषांतराकडे फारसे वळणार नाहींत; व वळलेच तर मूळ व भाषांतर ताडून पाहून गुणदोषविवेचनाच्या दृष्टीनें वळणार. पण अशा लोकांची संख्या इतकी लहान असणार कीं, भाषांतरकार केवळ त्यांच्याकरितां इतके श्रम घेण्यास तयार होईल हें शक्य नाहीं. अगदींच तुटपुंज्या शिक्षणाच्या लोकांना हे ग्रंथ मुळींच उपयोगी नाहींत. राहतां राहिला मध्यमशिक्षित लोकांचा वर्ग. यांत कॉलेजांत एकाददुसरें वर्ष घालविलेल्या लोकांपासून तों केवळ मराठींतच कां होईना, पण थोडें बहुत उदार शिक्षण ज्यांना मिळालेलें असेल, अशा सर्व लोकांचा समावेश होतो; बहुतेक सुशिक्षित स्त्रिया याच वर्गांत मोडतात. हा वर्ग कांहीं लहान नाहीं. पण अशा गंभीर पुस्तकाला त्यांतून कितीसे वाचक मिळतील याचा विचार केला म्हणजे मन बरेंच निराश होतें. कारण यांपैकीं बरेच लोक डोक्याला यत्किंचितही त्रास न देतां, केवळ करमणुकीखातर, आरामखुर्चीवर किंवा बिछान्यावर पडल्या पडल्या पुस्तक हातीं धरणारेच असतात. ज्ञानांजनाची गोडी अशी यांना बेताचीच असते. अर्थात् केवळ नाटकें कादंबऱ्या (व त्याही अगदीं गचाळ प्रतीच्या) व तात्कालिक मनोरंजन करणारे वर्तमानपत्रांतील लेख यापलीकडे त्यांची मजल गेलेली नसते. असे केवळ मनोरंजनाखातर पुस्तक हातीं धरणारे लोक वजा केले म्हणजे जो थोडासा आस्थेवाईक व समजदार लोकांचा वर्ग राहतो त्यांतच अशा पुस्तकांचे वाचक सांपडणार. या लोकांच्या संख्येंत, क्रमानें कां होईना, थोडी भर टाकून एकंदर वाचकवर्गाची अभिरुचि सुधरावयाची, व उच्च प्रतीच्या वाङ्मयाची त्यांना गोडी लावावयाची, असा कोणाही गंभीर विषयावर (स्वतंत्र किंवा भाषांतरात्मक) ग्रंथ लिहिणाराचा हेतु असणार. हा हेतु हल्लीं चांगल्या रीतीनें सफल होत नाहीं, असें याविषयीं जी साधारणतः ओरड ऐकूं येते तीवरून आम्हांस वाटतें. नाटकांनीं व कादंबऱ्यांनीं लोकांची अभिरुचि इतकी बिघडवून टाकिली आहे कीं गंभीर विषयांवरील ग्रंथांस वाचक मिळणेंच मुष्कीलीचें झालें ' आहे असें नेहमीं ऐकण्यांत येतें. कादंबऱ्या, गोष्टी, नाटकें वगैरे प्रसिद्ध करणाऱ्या मालांच्या सुळसुळाटावरून या म्हणण्यांत कांहीं तथ्य आहे असेंही दिसतें. तथापि आम्हांस वाटतें कीं, यांत कांहीं दोष सोन्याचा आहे, तर कांहीं सोनाराचा आहे. वाचक आळशी व केवळ मनोरंजनाचे भुकेले आहेत हें कांहीं खोटें नाहीं. पण लेखकांनीं

आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावलें आहे अशी खातरी देतां येईल काय ? किंबहुना वाचकांच्या आजमितीच्या स्थितींत, गंभीर विषयांवर सोपे व मनोरंजक ग्रंथ लिहून वाचकांच्या अभिरुचीस योग्य वळण देणें ही गोष्ट विशेष अगत्याची नाहीं काय ? व असा प्रयत्न आपण केला असून आपल्यास यश आलें नाहीं असें छातीला हात लावून किती लेखक सांगूं शकतील? क्लिष्ट, मूळापेक्षांही समजण्यास कठिण, व अत्यंत नीरस असें एखाद्या प्रसिद्ध इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर करून मराठीग्रंथसंग्रहांत आपण महत्त्वाची भर टाकली असें समजणें वेडेपणाचें आहे. ज्यांच्या ग्रंथांचीं भाषांतरें आपण करीत आहों त्या लोकांपेक्षां आपले लोक संस्कृतीनें, विद्येनें, अभिरुचीनें अद्यापि किती मागें आहेत, व मूळ ग्रंथकार ज्या कित्येक गोष्टी आपल्या वाचकांना अत्यंत परिचित आहेत असें धरून चालतो, त्यांपैकीं बहुतेक सर्व आपल्यापैकीं विद्वान् म्हणविल्या जाणाऱ्या पदवीधरांसही कशा अज्ञात असतात, ही गोष्ट भाषांतरकार विसरतात असें दिसतें. कारण त्याशिवाय माजी "ग्रंथमाले" तील कित्येक भाषांतरें व दाभोलकरांच्या मालेमधील कित्येक ग्रंथ हल्लींप्रमाणें रुक्ष, कंटाळवाणे व म्हणूनच केवळ लायब्ऱ्यांतील कपाटांची शोभा बनून राहिले नसते. लोकांच्या गचाळ अभिरुचीला खाद्य पुरविणें हें जरी गैर असलें, तरी लोकांना मुळींच आवडूं शकणार नाहींत असे ग्रंथ लिहून ते अनादृत राहिल्याबद्दलचें सर्व खापर लोकांच्या घाणेरड्या अभिरुचीवर फोडणें हेंही तितकेंच गैर होय. अद्यापि आपला वाचकसमाज (म्हणजे अर्थातच गंभीर विषयांवरील ग्रंथांपुरता) बाल्यावस्थेंतच आहे. लहान मुलाला जसें अन्न भरवावें लागतें, व त्याला पचेल असेच पदार्थ द्यावे लागतात, तसेंच बाल्यावस्थेंतील समाजाला गहन विषय सोपे व मनोरंजक करून त्या विषयांची गोडी उत्पन्न करावयाची असते. तसें करण्याची कांहीं एक खटपट न करतां, घे पुस्तक कीं कर त्याचें भाषांतर, (व तेंही **शब्दशः** भाषांतर) असें केल्यास केलेले श्रम व्यर्थ जाऊन वाचकांना दोष देत बसण्याची पाळी आल्यास कांहीं नवल नाहीं.

वरील सर्व विस्तार करण्याचें कारण, प्रस्तुत पुस्तकही अशाच **शब्दशः** केलेल्या व म्हणूनच मूळापेक्षांही कठीण, नीरस, व कंटाळवाणें झालेल्या अशा भाषांतराचा एक नमुना आहे असें आम्हांस वाटतें, हें होय. शब्दशः भाषांतर करणें कांहीं ठिकाणीं जरूर असेल; पण त्यांपैकीं प्रस्तुत स्थळ आहे असें म्हणतां येत नाहीं. यूरोपांतील विचारक्रांतीचा हा इतिहास आहे. ती विचारक्रांति कसकशी झाली याचें मूळांत जें वर्णन आहे त्यापैकीं कोणताही ठळक मुद्दा न सोडतां **स्वतःच्या भाषेंत** जर अनुवादकानें त्याचा मतलब दिला असता तर काम भागलें असतें;व त्यामुळें ग्रंथ सुलभ झाला असता, आटोपसर झाला असता, व लोकप्रियही झाला असता. पण मूळापैकीं प्रत्येक अक्षर इतकें महत्त्वाचें आहे कीं, तें सोडलें तर ग्रंथाचा रसभंग होतो, लेकीसाहेबांचा मतलब स्वतःच्या शब्दांनीं सांगण्यापेक्षां लेकीसाहेबांच्या शब्दांनींच सांगणें अधिक श्रेयस्कर होईल, असें जर भाषां-

तरकाराचें (किंवा डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन् सोसायटीचें) मत असेल, तर त्यासही आमची हरकत नाहीं. पण मूळ ग्रंथकाराचा प्रत्येक शब्द आपल्या वाचकांस कळेल याबद्दल भाषांतरकारानें कांहीं खबरदारी घ्यावयास नको काय ? भाषांतराचा मुख्य उद्देश असा आहे कीं, मूळ ग्रंथ वाचल्यानें जो अर्थ मनांत भरतो, किंवा ज्या कल्पना मनांत उद्भूत होतात, तो अर्थ व त्या कल्पना भाषांतर वाचणाराच्या मनांत उतरल्या पाहिजेत. परंतु शब्दशः भाषांतर केल्यानें हा उद्देश पुष्कळ वेळां साधत नाहीं. कारण, एकतर मूळांत ज्या गोष्टी आपल्या वाचकांना अत्यंत परिचयाच्या आहेत असें समजून ग्रंथकार केवळ त्यांच्या नामनिर्देशावर काम भागवितो त्या भाषांतर-वाचकांस मुळींच माहीत नसतात, किंवा त्याबद्दलचें त्यांचें ज्ञान बेताचेंच असतें. उदाहरणार्थ Reformation, Renaissance, Scholasticism, Apocalypse, Paganism, Eternal Punishment, Catacomb, Theology, Special Inspiration वगैरे शब्द घ्या. प्रस्तुत पुस्तकांत "धर्मसुधारणा," "वाङ्मयोद्धार," "पंडितंमन्य पंथ," "भविष्यकथन," "पेगन धर्म," "चिरकालिक दंड," "शववापी," "धर्मज्ञान," "विशेष प्रतिभा," असे शब्द इंग्रजी शब्दांबद्दल अनुक्रमें योजून काम भागविलेलें आहे. यांतील कांहीं शब्दांचें भाषांतर चुकलेलेंही आहे. पण तो मुद्दा तूर्त राहूं द्या. पण वरील इंग्रजी शब्द उच्चारल्याबरोबर ज्या कल्पना मनांत उत्पन्न होतात त्या त्यांच्या प्रतिशब्दांनीं उत्पन्न होतात काय ? Reformation म्हणजे वाटेल ती धर्मसुधारणा नसून, यूरोपमध्यें सोळाव्या शतकांत कांहीं ख्रिस्ती लोकांनीं पोपचा अधिकार झुगारून दिला त्या वेळची धर्मसुधारणा होय. यूरोपच्या इतिहासाचें विस्तरशः ज्यानें अध्ययन केलेलें नसेल त्याला या काळीं लोकांच्या विचारांत जी खळबळ उडून गेली होती तिची कल्पना बेताचीच असणार. यास्तव आपण कोणत्या धर्मसुधारणेविषयीं बोलत आहों व त्या काळची सामान्य स्थिति कशी होती याविषयीं कांहीं एक माहिती न देतां, एकदम-"धर्मसुधारणेच्या वेळीं व पाठीमागून कांहीं काळपर्यंत धर्मज्ञानसंबंधीं भयंकर (!) वादविवाद चालू होते."- अशी सुरवात केल्यानें वाचकांच्या मनांत कितीसा प्रकाश पडेल ? अशा ठिकाणीं पुढील मजकुरासाठीं आगाऊ तयारीदाखल कांहीं विस्तार केला पाहिजे, निदान स्पष्टीकरणार्थ एकादी टीप जोडली पाहिजे, असें आम्हांस वाटतें. पण मूळ ग्रंथाकाराच्या सर्व टीपांचें साद्यंत भाषांतर करणारांना स्वतःची अशी एकही टीप देण्याची आवश्यकता वाटूं नये हें आश्चर्य आहे! Theology या शब्दाची कल्पना "धर्मज्ञान" या शब्दानें येतच नाहीं. Special Inspiration म्हणजे "विशेष प्रतिभा" नव्हे. मूळाशीं ताडून पाहीपर्यंत या शब्दांचा अर्थ आम्हांस कळला नाहीं हें आम्ही कबूल करितों. कालिदासासारख्या कवीस विशेष प्रतिभा होती असें जरी म्हटलें तरी त्याला Special Inspiration झाली होती असें मात्र म्हणतां येणार नाहीं. आपल्या "ईश्वरी प्रेरणा किंवा साक्षात्कार" शब्दानें जो अर्थ ध्वनित होतो तोच वरील शब्दानें होतो. "वाङ्मयोद्धार,"

"पेगन धर्म," "चिरकालिक दंड" वगैरे कल्पना जर विस्तरशः स्पष्ट केल्या तर बरें, नाहीं तर त्यांचे प्रतिशब्द देऊन न देऊन सारखेंच. तसेंच Fathers=धर्मपिते; Puritanism=शुद्धमताभिमानी पंथ; the first of the Hermits=वैखानसांतील पहिला संत; Virgin=कुमारिका; Holy relics=पवित्र अवशेष; Indulgences–अनुग्रहपत्रें; Purgatory–रेचनभूमि; Pantheism विराट मतवाद; gnosticism–ज्ञेयवाद, इत्यादि शब्दांची गति तीच झाली आहे. आतां अशा तऱ्हेनें सर्व शब्दांचें स्पष्टीकरण करीत बसलें तर ग्रंथविस्तार फार होईल हें खरें; पण ग्रंथकाराचा प्रत्येक शब्द भाषांतरांत आलाच पाहिजे अशी हिंमत बाळगणारांनीं एकतर हा विस्तर केला पाहिजे; किंवा आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें, शब्दशः भाषांतराच्या नादीं न लागतां मुळाचा मतलब थोडक्यांत आणण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे जरूर असेल तेथें विस्तार करण्यास पुष्कळ सवड राहील. असें कांहीं न करतां मूळांत जें असेल त्याचें केवळ शब्दशः भाषांतर करण्याचा प्रयत्न केल्यामुळें, कांहीं ठिकाणीं मूळाचा अर्थ मुळींच ध्यानांत न येण्यासारखें कठिण, कांहीं ठिकाणीं धेडगुजरी, कांहीं ठिकाणीं चुकीचें असें भाषांतर झालेलें आहे. विस्तारभयास्तव मधून मधून कांहीं नमुने मात्र दाखविणें शक्य आहे, व यामुळें मागचा पुढचा संदर्भ न दाखवितां मधूनच वाक्यें घेऊन अर्थविपर्यास केल्याचा आरोप आमच्यावर येण्याचा संभव आहे. पण त्यास आमचा नाइलाज आहे. प्रामाणिकपणें आम्हांस जें वाटलें तें लिहिलें आहे.

मूळ ग्रंथकाराच्या (लेकीसाहेबांच्या) प्रस्तावनेंतील पहिलाच पारिग्राफ पहा.

"धर्मसुधारणेच्या वेळीं व पाठीमागून कांहीं काळपर्यंत धर्मज्ञानसंबंधीं भयंकर वादविवाद चालू होते; पण निःपक्षपात न्यायबुद्धि अजून जागृत झालेली नव्हती, व निर्मळ घातक प्रमादाहून साफ भिन्न जें अबाधित व आवश्यक सत्य त्याचा प्रतिनिधी मी, अशी हरएक पक्षाची कल्पना होती; व श्रद्धेत होणारा चढउतार हा केवळ अद्भुत चमत्कारांमुळें होतो, असें बहुधा लोक मानीत असत; त्यामुळें धर्मज्ञानांतल्या पालटांचीं सर्व कारणें त्या वेळीं धर्मज्ञानाच्या कक्षेंतच केवळ शोधिलीं जावीं, हें साहजीकच."

या वाक्यांतील धर्मज्ञान, धर्मसुधारणा या शब्दांनीं मुळांतील पूर्ण अर्थ मनांत भरत नाहीं हें वर सांगितलेंच आहे. या ठिकाणीं ऐतिहासिक माहिती देणारी टीप पाहिजे होती. 'भयंकर वादविवाद' हें fierce controversy याचें भाषांतर आहे. पण हें चुकीचें आहे. या ठिकाणीं "कडाक्याचे" "जोराचे" असे शब्द शोभले असते. आम्हीं खालीं रेघ मारलेलें वाक्य वाचून तर आम्हांस कोडेंच पडलें. खरें पाहिलें तर एका "आवश्यक" शब्दाखेरीज चुकीचें असें त्यांत कांहीं नाहीं. पण इंग्रजी वाक्याशीं ताडून पाहिल्याखेरीज त्याचा अर्थ नीटपणें मनांत उतरत नाहीं असें आम्ही स्वानुभवावरून सांगूं शकतों. Necessary truth याबद्दल "आवश्यक सत्य" असे शब्द योजिले आहेत. पण हें अगदीं चूक आहे. जें सत्य दुसऱ्या कशावरही अवलंबून असत नाहीं, व ज्याला देशकालाच्या उपाधीनें बाधा पोंचत नाहीं तें Absolute and necessary truth होय. व म्हणून Absolute=केवळ, अनन्यसंबद्ध व necessary=नित्य, अबाधित,

असें भाषांतर पाहिजे, "धर्मज्ञानांतला पालट" या शब्दांनीं लोकांच्या धार्मिक विचारांतील किंवा मतांतील पालट असा अर्थ इष्ट असूनही तसा तो सूचित होत नाहीं; पण Theological Changes या शब्दांचें हें अर्थात् शब्दशः भाषांतर आहे.

त्याच पानावर पुढें-

"पण अठराव्या शतकाच्या अखेरीस **धर्मज्ञानांच्या उत्कटवृत्तींचा** ऱ्हास झाल्यामुळें जेव्हां असल्या गोष्टींचा अधिक शांत मनानें खल करण्याचें लोकांस सामर्थ्य आलें, व जेव्हां ज्ञानाच्या वाढीनें उदारकक्ष विचार उत्पन्न झाले तेव्हां इतिहासाचें आलोकस्थान पालटलें."

" धर्मज्ञानांच्या उत्कटवृत्ति" शब्दांनीं कोणालाही **धर्मज्ञान मिळविण्याची उत्कट इच्छा** असा या शब्दांचा अर्थ असावा, असें वाटेल. पण नाहीं. "धर्माच्या बाबतींतील दुराग्रहाच्या कल्पना" असा मूळग्रंथकाराचा आशय आहे. पण तो मूळांतील "Theological passions" हे शब्द पाही तोंपर्यंत लक्षांत येत नाहीं. Theology किंवा तद्भव शब्द आला कीं, भाषांतरांत त्याबद्दल **धर्मज्ञान** असा शब्द योजलेला दृष्टीस पडेल. पण वास्तविकपणें त्याचें भाषांतर भिन्न ठिकाणीं भिन्न शब्दांनीं केलें पाहिजे. "उदारकक्ष" शब्द बरोबर अर्थ देऊं शकेल; पण याच अर्थाचा " व्यापक " शब्द जवळ असतां हा बोजड व फाजील विद्वत्तादर्शक (Pedantic) शब्द वापरण्याची काय आवश्यकता होती कोण जाणे ! " इतिहासाचें आलोकस्थान " या शब्दाची वाट तीच. इतिहासाकडे पाहण्याची दृष्टि पालटली असें साध्या व्यावहारिक मराठींत हें व्यक्त करतां आलें असतें.

आणखी कांहीं ओळी पुढें गेल्यानंतर "पंडितमन्य पंथाविरुद्ध प्रत्याघात" असे शब्द आपणास आढळतात (Reaction against the Schoolmen). मूळ न पाहातां या शब्दांचा अर्थ ताबडतोब ज्याला सांगतां येईल त्याला आम्ही खरोखरच धन्य समजूं ! कारण एकतर पंडितमन्य या शब्दानें Schoolmen या शब्दाचें भाषांतर होऊंच शकत नाहीं. यूरोपखंडांत मध्ययुग किंवा तपोयुग (Dark Ages) असें ज्यास इतिहासांत नांव मिळालें आहे त्या, म्हणजे सरासरी इ. स. ४००-१४०० पर्यंतच्या, काळांत कांहीं थोडीं ठिकाणें खेरीज करून जिकडे तिकडे अज्ञानाचें साम्राज्य पसरलें होतें. त्यावेळचे विद्वान् लोक म्हणजे काय ते खिस्ती धर्मगुरु हे होते. त्यांची धर्मश्रद्धा इतकी बळकट होती कीं, ज्या गोष्टीला बायबलाचा आधार नाहीं ती सर्वस्वीं खोटी असें ते मानीत. यांची वादविवादपद्धति ॲरिस्टाटलच्या न्यायशास्त्रावर बसविलेली असून आपल्या हिंदुस्थानांतील नैयायिकांप्रमाणेंच अत्यंत कुशाग्रतेची पण सत्यान्वेषणाच्या दृष्टीनें निरुपयोगी अशी होती. कारण ज्या प्रमेयांवर ते आपली इमारत रचीत तीं बायबलमधून किंवा तत्सदृश खिस्ती साधुसंतांच्या ग्रंथांवरून घेतलेलीं असत; व त्यांवर जरी त्यांनीं कितीही पांडित्य लढविलें तरी त्यापासून ज्ञानांत नवी भर पडणें शक्य नव्हतें. नवीन ज्ञानसंपादनास सृष्टीचें प्रत्यक्ष अवलोकन केलें पाहिजे, केवळ ग्रंथांतील वचनांचे आधार घेऊन त्यावर काथ्याकूट करणें कांहीं उपयोगी नाहीं, हें त्यांच्या लक्षांत येत नसे. तथापि जेथें अशा चर्चेचाही कांहीं उपयोग आहे अशा शास्त्रांत, उदाहरणार्थ निगमनात्मक न्यायशास्त्रांत (Deductive

Logic) किंवा तत्त्वज्ञानसंबंधी कांहीं प्रश्नांत त्यांनीं स्थापिलेले कित्येक सिद्धांत फार महत्त्वाचे आहेत. या ख्रिस्ती धर्मगुरूंच्या पंडित-वर्गांत सुमारें नवव्या शतकापासून तेराव्या शतका-अखेर जे जाडे पंडित होऊन गेले त्या सर्वांस समुच्चयानें Schoolmen असें नांव आहे. प्रत्यक्ष अनुभवाला कांहींच किंमत न देतां केवळ पांडित्यप्रचुर वादविवाद करणें हा यांचा विशेष होता; व यांच्या विरुद्ध प्रथम बंड **रोजर बेकन** नांवाच्या एका धर्मगुरूनेंच केलें, व पुढें **फ्रॅन्सिस् बेकननें** विस्तृतपणें यांच्या विवादसरणींतील दोष दाखवून दिले. या लोकांचा एक **स्वतंत्र पंथ होता हें म्हणणें चुकीचें आहे.** त्यावेळची साधारण विचार-सरणी कशी होती हें Scholasticism हा शब्द दाखवितो. या लोकांना **पंडितंमन्य** असें भाषांतरांत नांव मिळालें आहे. "पंडितंमन्य" शब्दांतून एक अहंमन्यतेचा ध्वनि उमटतो. परंतु सरसकट एका पंथाचे लोक अहंमन्य होते असें म्हणण्यास कांहीं आधार आहेसें वाटत नाहीं. आम्हांस वाटतें, हा शब्द योजल्यानें असा निष्कारण निंदाव्यंजक ध्वनि उमटेल अशी भाषांतरकारास बहुधा शंका आली नसावी. नाहींतर त्यांनीं तो योजला नसता.*

*असाच निंदाव्यंजक ध्वनि "ऋणं कृत्वा घृतं पिब पंथ" या Epicureanism बद्दल योजलेल्या प्रतिशब्दांतून उमटतो. एपिक्यूरियन पंथाचें ध्येय जरी भौतिक सुख हें होतें तरी तें कुमार्गानें मिळवावें असें त्या पंथापैकीं कोणींही सांगितलें नाहीं; उलट त्या पंथापैकीं कित्येक लोकांचें आचरण अत्यंत शुद्ध व परोपकारी होतें. वरील भाषांतरानें त्या पंथावर निष्कारण शितोडा उडविला आहे.

असो. "प्रत्याघात" म्हणजे Reaction हें खरें. पण या शब्दानें सामान्य वाचकांच्या मनांत हीच कल्पना एकदम उभी राहील काय? कदाचित् मागचा पुढचा संदर्भ मदतीला असता तर आली असती, पण या ठिकाणीं तीही सोय नाहीं. नवीन विचारसरणीचीं कारणें सांगतांना एका वाक्यांत ओघानें नुसते "Reaction against Schoolmen" एवढेच शब्द मूळांत आलेले आहेत. अशा ठिकाणीं निव्वळ शब्दास शब्द ठेवल्यानें भागत नाहीं हें यावरून स्पष्ट होईल.

पान १८. यांत ख्रिस्ती लोकांच्या कल्पनां-विषयीं बोलत असतां पुढील वाक्य आलें आहे:— "स्वतःच्या रक्तपातानेंही आपल्या धार्मिक उत्साहाची ते **औदार्यानें** परमावधि करीत." यांतील "औदार्यानें" शब्द मूळांतील "Nobly" शब्दाबद्दल आला आहे. हें भाषांतर कसेंसेंच लागतें. "चिरकालिक दंडाची भयंकर कल्पना **केवळ मूर्तस्वरूपानें** त्यांच्या मनांत तीव्रतेनें उद्दीपित झालेली होती." (The fearful conception of eternal punishment, *adopted in its most material form,* had flashed with its full intensity upon their minds.) चिरकालिक दंडाची केवळ ख्रिस्ती कल्पना आपल्या मराठी वाचकवर्गाच्या सोईसाठीं अमळ स्पष्ट केली असती तर बरें झालें असतें. पण ठळक ठशांत दिलेल्या शब्दांनीं मुळांतील अर्थ मनांत उतरतो कीं नाहीं हें सांगण्याचें काम आम्ही वाचकांवरच सोंपवितों.

पान १२१ प्यारा १ मध्यें एक वाक्य असें आहे:—"तसेंच या बाबतींतला (अद्भुत चम-

त्कारांच्या बाबतींतला) ऱ्हासही चेटकाच्या बाबतींतल्या इतका **मर्यादा न सोडतां** झालेला नाहीं." [Nor has the decay (of the belief in the miraculous) been so strictly *normal*]. वरील "मर्यादा न सोडतां " या शब्दांनीं उद्दिष्ट अर्थापेक्षां भलताच अर्थ ध्यानांत येतो हें सांगणें नकोच.

तिसऱ्या प्रकरणांतील एक दोन नमुने घेऊं. " यूरोपांतील वाङ्मयोद्धाराच्या वेळची स्थिति" वर्णितांना (पृ. २०२-२०३) ग्रीक भाषेच्या व कलेच्या अध्ययनानें झालेल्या परिणामांचें असें वर्णन आलें आहे:-

" ग्रीक वाङ्मयांतला प्राणाधार जो विषयप्रत्याहाराकडील, निर्भय टीकेकडील व उच्चतत्त्वविवेकाकडील कल, त्यांत मुरून जाण्यापूर्वी त्या वाङ्मयांतल्या पवित्र सौंदर्यानें लोक आनंदातिरेकांत तल्लीन होऊन गेले होते. (Men were entranced with the chaste beauty of Greek literature before they were imbued with the spirit of abstraction of free criticism and of elevated philosophy, which it breathes.)"

यांतील विषयप्रत्याहार हा शब्द ठीक आहे. पण त्यांतील कल्पना इतकी नवीन व सामान्य वाचकांच्या आटोक्याबाहेरची आहे कीं, एकतर तिचें सविस्तर विवरण केलें पाहिजे, किंवा ती मुळींच गाळली पाहिजे. नाहींतर कांहीं वाचकांना घाबरवून सोडण्यापलीकडे तिचा कांहीं उपयोग नाहीं. 'टीका' शब्दानें मराठींत गुणदोषविवेचनाच्या प्रत्यक्ष **क्रियेचा** बोध होतो; पण तसें गुणदोषपरीक्षण करण्याच्या **मनःप्रवृत्तीचा** बोध मात्र त्यानें होत नाहीं. तो Criticism शब्दानें होतो. म्हणून 'निर्भय टीकेकडील कल' या शब्दांनीं "The spirit of free criticism" चा अर्थ येत नाहीं असें आम्हांस वाटतें. त्याच पारिग्राफांत पुढें "मूर्तिकरणात्मक धर्म" हे शब्द Anthropomorphic faith याबद्दल आले आहेत. आपल्या स्वतःच्या आकृतीवरून व मनोवृत्तीवरून परमेश्वराची आकृति व मनोवृत्तीही तशाच (फक्त अधिक सुंदर व विस्तृत) असतील अशी जी मनुष्यांची समजूत होते तिचा उल्लेख वरील इंग्रजी शब्दानें होतो. आपल्याला खावयाला पाहिजे म्हणून देवाला नैवेद्य पाहिजेसें वाटणें, आपल्याला राग येतो तसा देवालाही येतो असें वाटून त्याच्या निवारणार्थ त्याला प्रसन्न करण्याचे उपाय जरूर वाटणें, आपल्याला जीं सुखें आवडतात तीं देवालाही आवडतात असें समजून षोडशोपचारानें त्याची पूजा करणें, इत्यादि प्रकार या तऱ्हेच्या धर्मकल्पनांचे परिणाम होत. अर्थात् मनुष्याकृति मूर्ति करणें व त्यांची पूजा करणें हें या धर्माचें जरी आवश्यक अंग आहे तरी त्यांत व्यक्त होणारी मनोवृत्ति " मूर्तिकरणात्मक धर्म " या एका शब्दानें व्यक्त होत नाहीं हें उघड आहे.

पान २७०, दुसरा प्यारा पहा:-

"तथापि स्कोतस **स्वकालीन** नव्हता; (म्हणजे त्याचीं मतें वगैरे त्याच्या काळाच्या फार पुढें होतीं.)+ मध्ययुगांतल्या **जड कल्पनांचा व जड मतांचा** मिलाफ वाखाणण्याजोगा झाला; व बाराव्या शतकांपुढच्या धार्मिक भयानकतेनंतर तें मत (म्हणजे नरकांतील अग्नीसंबंधाचें मत) पूर्ण विस्तृत झालें. [Scotus however was not of his age. The material conceptions of medievalism harmonised admirably with the material doctrine; after the religious terrorism that followed the 12th century, that doctrine attained its full elaboration.]"

"स्वकालीन नव्हता" हें भाषांतर अगदींच दुर्बोध होईल अशी येथें खुद्द ग्रंथकारासही शंका आलीसें दिसतें; कारण त्यानें लगेच त्याचा अर्थही सांगितला आहे. " जड कल्प-

+हा कंस आम्हीं केला आहे, मूळ भाषांतरांत नाहीं.

नां"चा अर्थही मूळ पाहिल्याशिवाय कळत नाहीं. पण येथें किंवा पूर्वी (कारण हा शब्द पूर्वींही येऊन गेलेला आहे.) तो कोठेंच देण्यांत आलेला नाहीं. "जड मतांचा" हे शब्द अर्थातच The material doctrine याबद्दल आले आहेत; व या शब्दांचा अर्थ या ठिकाणीं **'नरकांतील अग्नीविषयींचें मत'** असा आहे. म्हणजे या शब्दांनीं एका **विशिष्ट जडमताचा** उल्लेख होतो, सर्व जड मताचा नव्हे. पण भाषांतरानें तसा समज उत्पन्न होतो. *Terrorism* चें भाषांतर सर्व ठिकाणीं "भयानकता" असें केलें आहे. वस्तुतः भयानकता म्हणजे भयंकरपणा Terribleness; व Terrorism म्हणजे भयंकर क्रौर्यानें व धाकदपटशानें केलेला अंमल अथवा जुलूम.

आणखी एक मसाला (पान २७२):—

"तो काळ म्हणजे किळसवाण्या कल्पना सुबक करण्याचा अगर टाळण्याचा सध्यांसारखा काळ नव्हता; त्या काळांत विचारशक्ति पंगु असल्यामुळें कल्पनाशक्ति उत्तेजित करण्याकडेच सर्व प्रयत्न असे." [They were ages, too, when the modern tendency to soften or to avoid repulsive images was altogether unknown and when in the general paralysis of the reason, every influence was exerted to stimulate imagination.]

सुदैवानें हें भाषांतर फारसें शब्दशः नाहीं. यांत फक्त to soften च्या ऐवजीं "सुबक करणें" हे शब्द घातले आहेत त्याविरुद्ध आमचा कटाक्ष आहे. हें चुकीचें व भलतीच कल्पना देणारें भाषांतर आहे. किळसवाण्या गोष्टींचें स्वरूप फार तर अमळ **सौम्य** करणें शक्य आहे. पण त्यांना **सुबक** करणें शक्यही नाहीं व इष्टही नाहीं.

मूळांत केवळ अर्थसौंदर्याकरितां जेथें आलंकारिक भाषेचा उपयोग केला असेल त्या ठिकाणीं तर शब्दशः भाषांतरानें फारच रसभंग होतो. उ. A general *florescence* of the beautiful=सौंदर्याला जिकडे तिकडे आलेलीं **फुलें**; The Inferno of Dante had opened a *new abyss of terrors* to the imagination of the artists=दांतीच्या इन्फर्नो काव्यानें कारागिरांच्या कल्पक बुद्धीला एक नवीनच **भयाची निस्तळ गर्ता** उघडी करून दाखविली; The dark recesses of their own imaginations=मनांतल्या गुप्त गुहांतल्या कल्पना; Faithful representative of his age=आपल्या काळाचा **इमानी प्रतिनिधि**; *Severe* reasoner=**निघृण** विवेचक; इत्यादि. कधीं कधीं मूळांतील रूपक मराठींत आणतांना घोटाळा झाला आहे. जसें—: The *spirit* of ancient Greece had arisen from the *tomb*, and the fabric of superstition crumbled and tottered at her touch= "प्राचीन ग्रीसांतल्या अस्तमित **मनूचा** पुनः उदय झाला होता व त्याच्या किरणस्पर्शानें भोळसटपणाची इमारत डळमळून ढासळली." मूळांत थडग्यांतून बाहेर पडलेल्या आत्म्याची कल्पना घेऊन तीवर रूपक रचलें आहे. तिच्या ऐवजीं भाषांतरांत पुनः उदय पावलेल्या सूर्यप्रकाशाची कल्पना घेतली आहे. पण तिला जुळेल अशी अंधाराची वगैरे कल्पना न घेतां हस्तस्पर्शानें इमारत ढासळण्याची मूळांतील (पहिल्या रूपकाशीं जुळणारी) कल्पना मात्र कायम ठेविली आहे!

कांहीं ठिकाणीं वाक्यरचना थेट इंग्रजी धर्तीवर जाऊन तिला मिशनरी मराठीचें स्वरूप आलें आहे. उ० It is imposible to lay down a railway without creating an intellectual influence= "अनुकूल बौद्धिक प्रभाव उत्पन्न न करतां लोखंडी सडका करणें अशक्य आहे." "नागरीय व वाणिज्य **उत्साह**"

(Commercial and Municipal spirit); नियमबद्धतेचा आटोका (Range of law); " श्रद्धेची इयत्ता" (Standard of belief); " अटळ आणीबाणीची वेळ " (the inevitable crisis;)"जोरदार व सरळ कल"= (direct and powerful tendency); वगैरे सारख्या वाक्यखंडांत फाजील इंग्रजी तऱ्हेची रचना असून शिवाय चुकीच्या भाषांतराचीही भर पडली आहे. याविषयीं नमुनेदार म्हणून एकच (जरा लांबसा) उतारा देऊन हे मासले पुरे करितों.

"आतां जगांत आजपर्यंत ज्या धर्मसंस्था निर्माण झाल्या त्यांपैकीं प्राचीन ग्रीक व रोमन तत्त्वज्ञान सद्गुणाच्या जाणीवेकडे शरण गेलें व ख्रिस्तीधर्माचें तत्त्वज्ञान पापाच्या जाणीवेकडे गेलें पहिल्याचें ध्येय स्वावलंबी मानवप्रभुता, दुसऱ्याचें ध्येय परमेश्वराचे ठायीं मानवतेचा लय. उच्चतमत्वाच्या कल्पनेंत अभिमानाचें मिश्रण किती पूर्णपणें झालें आहे हें लक्षांत आल्यावांचून प्लूटार्कचें एक पानही वाचणें अगर कोणत्याही ग्रीक पुतळ्याचें भीमकांत सौंदर्य पाहणें अशक्य होय; तसेंच आत्मसामर्थ्याविषयीं अप्रत्यय व आत्मविलय या कल्पना प्रमुखतेनें मनांत आल्यावांचून कोणत्याही ख्रिस्ती संताचें चरित्र वाचणें अगर ख्रिस्तीधर्मांतल्या आरंभींच्या विषयांचें काढलेलें चित्र पाहणें अशक्य होय. ख्रिस्ती धर्माच्या अगदीं आरंभींच्या व पवित्रतम दिवसांत या कल्पना तेव्हां नित्य आढळणाच्या भक्तिपूर्ण मनोरचनेंत, व तदनुषंगिक उच्चतर व कोमलतर नैतिक आकलनांत मुख्यत्वें दिसत."

(Now of all systems the world has ever seen the philosophies of ancient Greece and Rome appealed most strongly to the sense of virtue, and Christianity to the sense of sin. The ideal of the first was the majesty of self-relying humanity, the ideal of the other was the absorption of the manhood into God. It is impossible to look upon the awful beauty of a Greek statue, or to read a page of Plutarch without perceiving how completely the idea of excellence was blended with that of pride. It is equally impossible to examine the life of a Christian saint or the painting of an early Christian artist without perceiving that the dominant conception was self-abnegation and slf-distrust. In the earliest and purest days of the Church this was chiefly manifested in the devotional frame of mind which was habitual and in the higher and more delicate moral perception that accompanied it.)

यांतील इंग्रजी सोपें कीं मराठी सोपें हें इंग्रजी जाणत्या वाचकांनींच ठरवावें.

येथवर दिलेल्या मासल्यांवरून शब्दशः भाषांतर करण्याचें ध्येय कसें चुकीचें आहे याची वाचकांना कल्पना येईल असें वाटतें. प्रत्येक भाषेची मोडणी भिन्न असते; मग मराठी व इंग्रजी यांसारख्या अत्यंत दूरच्या व परस्परांशीं कांहींच नातें नसलेल्या भाषांची गोष्ट तर बोलावयासच नको. अशा स्थितींत एका भाषेंतील कल्पना दुसऱ्या भाषेंत व्यक्त करतांना, केवळ मतलबाकडे लक्ष देऊन स्वतःच्या भाषेंत त्या कल्पना व्यक्त करणें हाच प्रशस्त मार्ग होय. या मार्गाचें अवलंबन केलें नाहीं तर आम्हीं वर ज्याला 'मिशनरी मराठी' म्हटलें आहे त्याचा मासला पाहावयास मिळतो. दुसरें असें कीं, शब्दाच्या वाच्य अथवा सरळ अर्थापेक्षां लक्षणेनें किंवा व्यंजनेनें जे निराळे अर्थ त्यांतून निघतात त्यांतच भाषेची काय ती मौज असते. हे सूचित किंवा ध्वनित अर्थ अन्य भाषेंतल्या प्रतिशब्दानें बहुधा सूचित होत नाहींत; व यामुळें फार रसभंग होतो. उ. Chivalry हा एकच इंग्रजी शब्द घ्या. हा शब्द उच्चारल्याबरोबर मनांत किती तरी कल्पना उभ्या राहतात; व कोणत्याही एका मराठी शब्दानें त्या सर्व कल्पना आणून देणें शक्य नाहीं. तीच स्थिति Vergin, Holy orders,

Purgatory, Indulgences सारख्या शब्दांची आहे. अशा ठिकाणीं एक तर संदर्भाप्रमाणें भिन्न शब्द योजावे लागतात, किंवा थोडाबहुत विस्तार करून त्या कल्पना स्पष्ट कराव्या लागतात. या दोन्हींपैकीं एकाही प्रकाराची योजना प्रस्तुत पुस्तकांत न झाल्यामुळें त्यास फार क्लिष्टपणा आला आहे, व अर्थातच ज्या मध्यम-शिक्षित वाचकांसाठीं अशा तऱ्हेचे ग्रंथ लिहिणें इष्ट असतें त्यांपैकीं बहुतेकांना हें पुस्तक फार कठीण, नीरस व कंटाळवाणें वाटेल अशी आम्हांस भीति वाटते. अनुभव याच्या उलट आला तर आम्हांस फार आनंदच होईल.

यावरून प्रस्तुत पुस्तकांतील भाषा येथून तेथून गचाळ व मिशनरी थाटाची असून भाषांतरकार अशा कामास अगदीं अपात्र आहेत असें आमचें मत आहे असें मात्र कोणीं समजूं नये. शब्दशः भाषांतर करण्याचें चुकीचें ध्येय जर त्यानें सोडून दिलें, व स्वतःची भाषा चालण्याची पद्धति जर त्यानें अंगिकारिली, तर त्याच्या हातून सुरस ग्रंथरचना होणें शक्य आहे असें आम्हांस वाटतें. कारण, ज्या ठिकाणीं त्यानें आपल्या लेखणीस थोडें न कळत कां होईना स्वातंत्र्य दिलें आहे, त्या ठिकाणीं भाषांतर कानास वाईट लागत नाहीं. उदाहरणार्थ पान २७२, प्यारा २—"नेहमीं कानावर काय पडे?" या मथळ्याखालील मजकूर पहा. हीच प्रवृत्ति जर कायम राहिली असती व शिक्षित महाराष्ट्र-वाचकवर्गास आपलें पुस्तक समजलें पाहिजे हें ध्यानांत ठेवून जर ग्रंथ लिहिण्यांत आला असता तर तो असा क्लिष्ट झाला नसता.

शेवटीं प्रस्तुत ग्रंथासारख्या गहन, अनेक ऐतिहासिक, नैतिक, धार्मिक व तत्त्वज्ञानपर ग्रंथांतील मतांच्या उल्लेखांनीं खचून भरलेल्या ग्रंथाचा अनुवाद करणारांनीं जी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे असें आम्हांस वाटतें ती ही. अशा ग्रंथांचें साद्यंत भाषांतर होण्यापासून आमच्या वाचकवर्गास तादृश लाभ नाहीं. मूळांतील मजकुराचा थोडक्यांत सोप्या व मनोरंजक भाषेंत गोषवारा देणें हें केवळ भाषासौष्ठवाच्या दृष्टीनेंच नव्हे, तर वाचकांच्या ग्रहणशक्तीच्या दृष्टीनेंही इष्ट आहे. उदाहरणार्थ, प्रस्तुत पुस्तकांत आलेल्या सर्व उल्लेखांचें स्पष्टीकरण करण्याच्या नादीं जर भाषांतरकार लागला, तर ग्रंथ याच्या चौपटीपेक्षां मोठा होईल; व एवढें अवजड पुस्तक आमच्या वाचकांस झेंपेल कीं नाहीं याचा संशय आहे. ते उल्लेख नुसते प्रतिशब्द ठेवून सोडून दिले, तर प्रकाशापेक्षां अंधार मात्र जास्त पडतो हें आपण प्रस्तुत भाषांतरांत पाहतोंच आहों. बरें, सामान्य मराठी वाचकांस यूरोपांतील विचारविकसनाची ढोबळ कल्पना येण्यास सर्व बारीकसारीक तपशिलाची कांहीं जरूर आहे असेंही नाहीं. मग विनाकारण सर्व ग्रंथाचें शब्दशः भाषांतर करण्याचे विफळ श्रम घेण्यांत काय मतलब आहे? ज्याला मूळांतील प्रत्येक शब्दाचें व उल्लेखाचें महत्त्व वाटेल तो मूळ पाहण्याची तसदी घेईलच. म्हणून मूळांतील मतलब थोडक्यांत आणण्याची खटपट करावी; म्हणजे ज्या थोड्या गोष्टींचा उल्लेख अवश्य करावा लागेल त्यांबद्दल विस्तारपूर्वक विवरण करावयास जागा राहील. **कांहीं ठिकाणीं संक्षेप तर कांहीं ठिकाणीं विस्तार** असे दोन्ही प्रकार करून एकंदरीनें नवीन कल्पना महाराष्ट्रवाचकांस शक्य तितक्या मोहक स्वरूपांत अर्पण करणें हें आपलें कर्तव्य आहे, ही गोष्ट गहन विषयांवर मराठी भाषेंत ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत अशा सदिच्छेनें ग्रंथरचना करण्यास प्रवृत्त होणारांनीं विसरतां कामा नये. नाहीं तर गहन विषयांविषयीं आधींच पराङ्मुख असलेल्या आमच्या वाचकवर्गाकडून त्यांच्या ग्रंथाची संभावना होणें फारसें शक्य दिसत नाहीं.

"उच्चतर देशाभिमान पाहिजे !"

(डॉक्टर जे. सी बोस यांच्या लेखाच्या आधारानें.)

१. आपले प्रसिद्ध वंगदेशीय बंधु डॉ. जे. सी. बोस हे कांहीं दिवसांपूर्वी आपला पाश्चात्य देशांतील प्रवास पुरा करून इकडे परत आले हें सर्वविश्रुत आहे. सदरील गृहस्थ म्हणजे एक पहिल्या नंबरचे शास्त्रज्ञ पंडित असून त्यांनीं लावलेल्या "प्राणिगुणधर्मशास्त्र-" विषयक (Physiological) शोधांनीं पाश्चात्य देशांतील शास्त्रज्ञमंडळांत मोठी विचारक्रांति घडवून आणली आहे. त्याच शास्त्रीय शोधांचें दृढीकरण करण्याकरितां किंवा तद्विषयक ज्ञानाचा तत्रत्य शास्त्रज्ञमंडळांत प्रसार करण्याकरितां म्हणून डॉ.बोस यांना आपलें हिंदुस्थान-सरकार वरचेवर बहुमानानें व आपल्या खर्चानें पाश्चात्य देशांत पाठवीत असतें. अशा प्रकारची डॉ. बोस यांची परवां पाश्चात्य देशांत झालेली सफर चौथी होय. या सफरींत डॉ. बोस यांना जें यश आलें—अर्थात् पाश्चात्य पंडितांनीं जो त्यांचा गौरव केला, तो केवळ आपल्या अटकळीच्या बाहेर होता असे त्यांनीं उद्गार काढले आहेत. कारण व्हिएन्ना, पॅरिस, ऑक्सफर्ड, केंब्रिज, लंडन, हार्वर्ड, वॉशिंग्टन, शिकागो, कोलंबिया, टोकियो वगैरे ज्या ज्या ठिकाणीं म्हणून डॉ. बोस गेले त्या त्या ठिकाणच्या पंडितांनीं त्यांच्या शोधांसंबंधानें प्रशंसाच केलेली आहे. वस्तुतः डॉ. बोस यांच्या नवीन शोधांच्या योगानें पाश्चात्य शास्त्रज्ञमंडळींच्या कित्येक आजपर्यंत ठाम होऊन बसलेल्या कल्पना डळमळल्यासारख्या झाल्या आहेत, हें खरें. तरी त्यांनीं लावलेल्या शोधांच्या महत्त्वासंबंधानें सदरील तज्ज्ञ लोकांनीं मानाच डोलवल्या आहेत! डॉ. बोस यांनीं लावलेले नवीन शोध अगर स्थापित केलेले सिद्धांत म्हणजे "पदार्थविज्ञान" (Physics) आणि "प्राणिगुणधर्मज्ञान" (Physiology) या दोन मुख्य शास्त्रांमध्यें मेळ घालणारे दुवे होत, अशी पाश्चात्य पंडितांची खात्री झाल्याकारणानें, त्यांस सदरील शास्त्रीय शोधांच्या कामीं हिंदुस्थानानें यूरोपच्याही पुढें पुष्कळच आघाडी मारली आहे ही गोष्ट आतां चांगली पटली असून, यापुढें आपल्याला शास्त्रीय शोधांचे कामीं माहिती अगर स्फूर्ति मिळविण्याकरितां हिंदुस्थानाकडेच वळलें पाहिजे असें ते (पाश्चात्य पंडित) उघड उघड म्हणत आहेत! शास्त्रीय प्रयोग (Ex eriments) चालवितांना पंडितलोक बहुधा दोन रीतींचा अवलंब करीत असतात. एकीस "पृथक्करणरीति" (Analytical process) म्हणतात व दुसरीस "एकीकरणरीति" (Synthetical process) म्हणतात. पाश्चात्य लोक सामान्यतः पहिलीचा उपयोग करतात व पौरस्त्य लोक दुसरीचा उपयोग करतात. या दोन्ही रीतींचा सहकारित्वाच्या तत्त्वावर उपयोग केल्यास आधिभौतिक शास्त्राचें पाऊल निःसंशय पुढें पडून अशेष जगाचा फायदा

झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा पाश्चात्य शास्त्रज्ञमंडळीचा आतां पक्का ग्रह झाला आहे. व त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, आधुनिक काळांतील विद्याकलादिकांचें केवळ माहेरघर म्हणून मानलेलीं जीं यूरोपखंड व अमेरिकाखंड, तिकडील मुख्य मुख्य विश्वविद्यालयांतील (Universities) अधिकाऱ्यांकडून, आपल्या उत्तमोत्तम पदवीधरांना "तुम्ही आपल्या प्रयोगशाळेंत (Laboratory) घेऊन त्यांना तुमच्या नवीन शास्त्रीय पद्धतीच्या (Methods) शिक्षणाचा कृपा करून लाभ घेऊं द्या," असे डॉ. बोस यांजकडे अर्ज आलेलें आहेत!! यापेक्षां डॉ. बोस यांच्या सिद्धांतांच्या महत्त्वासंबंधानें दुसरें प्रमाण नको.

२. वरील हकीकत वाचून आपल्यामधील शास्त्रीय विषयांत मन घालणाऱ्या लोकांस (असे लोक वास्तवीक अगदींच थोडे आहेत! असो. पण असतील त्यांस) उत्तेजन व अशेष हिंदुस्थानवासीय लोकांस आनंद व अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाहीं. सर्व मानवजातीची बौद्धिक प्रगति हिंदुस्थानकडून कांहीं तरी विशेष प्रकारें हातभार लागल्याशिवाय पुरी होणें शक्य नाहीं, असाच पाश्चात्य पंडितांच्या दृष्टीनें वरील हकीकतीचा मथितार्थ निघतो. तो सर्वतोपरी हिंदुस्थानदेशास श्रेयस्कर व अभिमानास्पद आहे यांत शंका नाहीं. पण हा सर्व मान हिंदुस्थानाला अशेष जगांतील विद्वन्मंडळामध्यें फक्त एकट्या डॉ. बोस यांच्या बुद्धिसामर्थ्यानें मिळत आहे व त्यांची जागा घेणारा अगर त्यांचें अंशतः तरी अनुकरण करणारा अद्याप सबंध देशांत दुसरा कोणी दिसत नाहीं, या गोष्टी नजरेसमोर आल्या म्हणजे मात्र मन खिन्न होतें! असो. डॉ. बोस यांच्या मतें परस्परसंबंध नसलेल्या गोष्टींच्या अवलोकनानें तत्त्वशोधन करण्यास जरूर लागणाऱ्या तीव्र बुद्धीचें आपल्या लोकांत क्वचित् वास्तव्य आहे व त्यास आपल्यांमधील चित्त एकाग्र करण्याला साधनीभूत होणाऱ्या ध्यानमननादि सवयींचाही उपयोग होण्यासारखा आहे. परवां पाश्चात्य देशांतील प्रवास संपवून इकडे परत आल्यावर डॉ. बोस यांनीं तक्षशिला, नलंद व कांजीवेरम् येथील प्राचीन विद्यापीठांची स्थिति स्वतः जाऊन पाहिली, त्यावरून आपल्या देशाच्या प्राचीन वैभवशाली काळांतील विद्याकलादिकांचें परमेश्वरकृपेनें लवकरच पुनरुज्जीवन होईल असा त्यांना पक्का भरंवसा वाटत आहे. थोड्याच दिवसांत इकडे अशा प्रकारचें एक सरस्वतीमंदिर अगर प्रयोगशाळा तयार होईल, कीं ज्यांत शिक्षक लोक आपल्या शिष्यांसह लोकांच्या गडबडींपासून लांब एकांतांत राहून केवळ सत्यशोधनार्थ आपला स्तुत्य उद्योग चालवितील, व आपलें कर्तव्य करीत असतांनाच कदाचित् त्यांचा अंतकाल प्राप्त झाला तरी आपली शिष्यपरंपरा कायम ठेवण्याकरितां ते शिक्षक आपल्या किल्ल्या (आपलें गूढ ज्ञान) आपल्या शिष्यांच्या हस्तगत करून जातील! याप्रमाणें आपल्या पवित्र उद्योगांत शिक्षकांचीं एकदां मनें रंगलीं म्हणजे त्यांना कठीण असें कांहींच उरणार नाहीं. त्यांची दृष्टि आपल्या ध्येयापासून ढळणार नाहीं; व त्यांचीं मनें इतर कोणत्याही ऐहिक मोहास बळी पडणार नाहींत! यालाच

संन्यासवृत्ति म्हणतात; व ती केवळ आपल्या हिंदुस्थानांतच शक्य आहे. साऱ्या जगांत हिंदुस्थान हाच एक असा देश आहे कीं, ज्यांत (आधिभौतिक) शास्त्र व धर्म यांजमध्यें विरोध दृष्टीस पडत नाहीं. किंबहुना ज्ञानप्राप्तीलाच या देशांत धर्माचे ठिकाणीं मानतात ! यामुळें पाश्चात्य देशांत केव्हां केव्हां ज्या प्रकारें शास्त्रीय ज्ञानाचा दुरुपयोग केलेला आढळतो तसा दुरुपयोग हिंदुस्थानदेशांत होणें शक्य नाहीं ! इकडील लोकांची धार्मिक दृष्टि इतकी प्रबळ आहे कीं, आलीकडे यूरोपखंडांत जे आकाशयानाचे वगैरे शोध लागले ते जर या हिंदुस्थानांत लागते तर परमेश्वरानें आपला दैविक अंश या रीतीनें मनुष्यांत प्रकट केल्याबद्दल हिंदुलोक पहिल्यानें आपल्या देवळांत जाते आणि तेथील देवाची भक्तिभावानें पूजा करून त्याचे आभार मानते !

३. पण डॉ. बोस यांनीं परवां जी बहुतेक पृथ्वीप्रदक्षिणा केली त्यांत जो कांहीं त्याचा काल जपानदेशांत गेला तो अत्यंत महत्त्वाचा होता. कारण त्या अवधींत त्यांना त्या चिमुकल्या राष्ट्राच्या आपल्या भावी कालासंबंधानें एकंदरींत काय आकांक्षा आहेत व तत्प्रीत्यर्थ त्यांच्या काय खटपटी चालल्या आहेत ह्याची ओळख करून घेण्याची अनायासें संधी मिळाली. त्यावरून डॉ. बोस यांचें असें म्हणणें आहे कीं, त्या चिमुकल्या राष्ट्रानें आजवर जी कामगिरी केली आहे तिजबद्दल कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रानें त्याची तारीफच केली पाहिजे. आधिभौतिक शास्त्रांचा अभ्यास व त्यांचा व्यवहारांत उपयोग करण्याची करामत या गोष्टीच आजकाल वस्तुतः अत्युच्च सुधारणेच्या निदर्शक मानलेल्या आहेत. पण त्याच बाबतींत जपानी लोकांनीं आपले गुरु जे जर्मन लोक त्यांजवरही ताण केली आहे ! उदाहरणार्थ, कांहीं दशकांपूर्वीं जपानदेशांत उद्योगधंदे अगर परकीय देशांशीं (त्याचा) व्यापार म्हणण्यासारखा असा मुळींच नव्हता. पण त्यांच्या (जपानी लोकांच्या) आगबोटींनीं प्रस्तुत पासिफिक महासागर इतका आक्रांत करून सोडलेला आहे कीं, त्या समुद्रांतील दळणवळणाच्या कामीं जपानी लोकच आजकाल केवळ वतनदार होऊन बसलेले असून अमेरिकन कंपन्यांना—कीं ज्यांच्या आगबोटींनींच आजपर्यंत त्या समुद्रांतील दळणवळण चालू ठेविलें होतें !—आपल्या आगबोटी थोड्याच दिवसांत बंद कराव्या लागतील ! आणि ही इतकी प्रगति जपानी लोकांनीं केवळ पांचपन्नास वर्षांत केली आहे !! त्याचप्रमाणें त्यांच्या निरनिराळ्या प्रकारच्या धंद्यांची—सरकारी साहाय्यानें व इतर प्रकारें यादृच्छिक रीतीनें मिळालेल्या साहाय्यानें—इतकी वाढ झाली आहे कीं, त्यांनीं परकीय देशांतील बाजार सुद्धां एकामागून एक असे प्रस्तुत आपल्या हस्तगत करून घेण्यास सुरवात केली आहे. पण याहीपेक्षां गमतीची किंबहुना कौतुक करण्यासारखी जपानी लोकांची जी प्रवृत्ति दिसून येते ती निराळीच आहे. आपल्या देशाचा व्यापार सुयंत्रितपणें चालावा एतदर्थ सर्व राष्ट्रांशीं आपले संबंध नेहमीं सलोख्याचे व गोडीगुलाबीचे राहिले पाहिजेत हें तत्त्व जपानी लोकांच्या पक्कें लक्षांत बिंबलें आहे. त्यामुळें ते कोणत्याही देशाच्या

संबंधांत आपल्याकडून कसलीही भानगड उपस्थित न होऊं देण्याबद्दल फार जपत असतात. तसेंच त्यांना हेंही पक्कें ठाऊक आहे कीं, आपल्या देशांतील व्यापारांत अगर धंद्यांत कोणत्याही परकीय राष्ट्रास चंचुप्रवेश करण्यास संधी दिली तर दोन्ही राष्ट्रांत—जपानदेश व तें परकीय राष्ट्र यांत—गैरसमज व चुरस उत्पन्न झाल्याशिवाय राहाणार नाहींत. यास्तव त्यांनीं परक्या देशांत तयार झालेल्या मालाची, जबर जकात बसवून, आपल्या देशांत होणारी आयातच जवळ जवळ बंद केली आहे !

४. आपल्या हिंदुस्थानदेशांतील सर्व बाजार परकीय लोकांच्या हातांत गेल्यानें इकडचे आजवर कसेबसे जीव धरून राहिलेले धंदे साफ बसून जाणार आहेत ही गोष्ट आमच्या लोकांच्या अद्याप लक्षांत आली नाहीं काय ? आपण,

'उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत् ।'

या भगवंताच्या उक्तीप्रमाणें आपल्या धंद्याच्या संरक्षणार्थ कांहीं एक न करतां स्वस्थ बसणें म्हणजे परकीय राष्ट्रांना—उदाहरणार्थ, जपानला—" तुम्ही आमच्या देशांत येऊन पाहिजे तें करा " असेंच सांगणें नव्हे काय ? चीनदेशांत परवां परवां घडलेल्या प्रकारानें देखील अद्याप आमचे डोळे उघडले नाहींत काय ? वास्तविक पाहिल्यास आम्हीं आतां स्वस्थ बसण्यांत अर्थच नाहीं. एक क्षण देखील आज अत्यंत महत्त्वाचा आहे. आपले लोक व सरकार या उभयपक्षांनीं आपल्या उद्योगधंद्यांच्या पुनरुज्जीवनार्थ आतां कंबरा बांधल्याच पाहिजेत. आजपर्यंत या बाबतींत लोकांकडून अगर सरकारकडून जे प्रयत्न झालेले आहेत ते एकंदरींत धरसोडीचे किंवा परस्परविरुद्ध दिशेनें झालेले आहेत. म्हणजे एका पक्षानें या दिशेनें जा म्हणून सुचवावें व दुसऱ्यानें उलट दिशेनें जावें, असें अनेकदां घडलेलें आहे. आणि परिणामाकडे पाहतां, घेतलेले श्रम व खर्चलेले पैसे फुकट जाऊन आरंभिलेलें कार्य तसेंच पडून राहिलें आहे. पण आतां तसा प्रकार उपयोगी नाहीं. प्रथम सरकारानें एक एतद्देशीय धंदेवाल्या लोकांची कमिटी नेमावी. आणि प्रस्तुत प्रकरणीं हरएक प्रसंगीं सरकाराला सल्ला देण्याचेंच तेवढें काम त्या कमिटीकडे सोंपवावें. दुसरी गोष्ट; परकीय देशांत धंदे-शिक्षणासाठीं पाठविले जाणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करण्याबाबतचे जे नियम आहेत त्यांतही थोडासा फरक केला पाहिजे. विद्यार्थ्यांना परकीय देशांत—अमेरिका, इंग्लंड, जपान वगैरे देशांत—जो धंदा शिकण्याकरितां पाठविण्याचें ठरलें असेल त्या धंद्याची इकडील (हिंदुस्थानांतील) काय स्थिति व अडचणी आहेत याची त्या विद्यार्थ्यांनीं प्रथम माहिती करून घेतली पाहिजे. म्हणजे त्या दृष्टीनें परकीय देशांत तो धंदा शिकण्यास ठीक पडेल. आणखी एक योजना अमलांत आली पाहिजे. विद्यार्थी पाठवावयाचे ते एक एक धंदा शिकण्यास तीन तीन विद्यार्थी पाठविण्याची तजवीज झाली पाहिजे. त्यांपैकीं दोघांनीं आपल्या धंद्याचा-धंदा चालवावा कसा (industrial side) या दृष्टीनें अभ्यास करावा; व तिसऱ्यानें त्याचा व्यापारी दृष्टीनें (commercial side) अभ्यास करावा. शिवाय तिघांही विद्यार्थ्यांनीं एकमेकांशीं सहकारित्वानें वागावें. असो. आतां

इतक्यानेंच आपलें सर्व कांहीं काम भागेल असें नाहीं. परकीय देशांत मिळविलेल्या ज्ञानाचा, इकडील धंद्याच्या स्थितीकडे पाहून, उपयोग करण्याच्या कामीं अडचणी या येणारच. पण मागें एकवार सांगितलेल्या व इकडे निघणाऱ्या भावी प्रयोगशाळेंत (Laboratory=सरस्वती-मंदिरात) जे बुद्धिमान् व कल्पक असे लोक काम करीत राहतील त्यांच्या उद्योगानें व श्रमानें त्या (पूर्वोक्त) अडचणी परमेश्वरकृपेनें दूर होतील. असो. आतां सरकारकडून आणखी कोणती महत्त्वाची व प्रत्यक्ष मदत सहज होऊं शकेल हें पाहूं. ती मदत सरकारला तीन प्रकारांनीं देतां येईल; (१) नवीन निघणाऱ्या धंद्यास जरूर तो कच्चा माल पुरविण्याच्या कामीं सवलत देणें; (२) सरकारच्या आश्रयाखालील तज्ज्ञ लोकांकडून (Experts) त्या धंद्याचे कामीं लागेल ती सल्ला मिळेल अशी तजवीज करणें; आणि (३) लोकांना मार्ग दाखविण्यासाठीं प्रयोग-वजा लहान प्रमाणावर नवीन धंदे चालविणें. या कामीं—उद्योगधंद्यांचे पुनरुज्जीवनार्थ—सरकारचें ध्येय तेंच लोकांचें व लोकांचें ध्येय तेंच सरकारचें, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. जें संकट—आपल्या बाजारांत परकीय मालाचा प्रवेश व आपल्या धंद्यांचा समूळ नाश या रूपानें येणारें संकट—येऊं पाहत आहे, तें एका पक्षावरच (लोकांवर) येत आहे व दुसरा पक्ष (सरकार) त्याच्या परिणामापासून केवळ अलिप्त राहील असें मुळींच नाहीं. अर्थात् येणाऱ्या संकटास दोन्ही पक्षांनीं मिळूनच तोंड दिलें पाहिजे. व ही एक गोष्ट लक्षांत ठेवून आम्ही सर्व खटपटीस लागलों तर एकमेकांमध्यें एकमेकांबद्दलचें ज्ञान व आदरभाव यांची वृद्धि झाल्याशिवाय राहणार नाहीं. प्रस्तुत सर्व जगावर जें एक मोठें संकट (युरोपीय महायुद्धाच्या रूपानें) ओढवलें आहे, त्यांतही कदाचित् परमेश्वराचा असा हेतु असेल कीं, हिंदुस्थानांतील सरकार व प्रजा यांजमध्यें परस्परहितसंबंध एकच आहेत अशी सहज स्फूर्तीनें जाणीव उत्पन्न व्हावी, व एकंदरींत हिंदुस्थानदेशाचें हित व्हावें !

५. पण त्यांतही हिंदी लोकांना उद्देशून चार शब्द सांगणें इष्ट दिसतें. हिंदुस्थानदेशाच्या प्रगतीस वर सांगितल्याप्रमाणें जबरदस्त विरोध करणारें असें एक मोठें संकट आम्हांवर येऊं पाहत आहे यांत शंका नाहीं; आणि तें संकट टाळण्याकरितां आपल्याला शिकस्तीचे प्रयत्न केले पाहिजेत हेंही निर्विवाद आहे. येणारें संकट आमच्या सांपत्तिक स्थितीलाच केवळ अपायकारक होणारें आहे असें नसून आपल्या प्राचीन आर्य संस्कृतीनें मनुष्यजन्माचीं म्हणून जीं अत्युच्च ध्येयें ठरविलेलीं आहेत त्यांनाही ह्या संकटापासून बाधा झाल्याशिवाय राहाणार नाहीं. पण असा अनिष्ट प्रकार मात्र कांहींही झालें तरी आपण होऊं देतां कामा नये. आपली प्राचीन संस्कृति व तन्निर्णीत ध्येयें हीं आपल्याला कायमचीं हवींच आहेत. त्यांचें संरक्षण करण्याचे कामीं आपल्याला कितीही खटपट व स्वार्थत्याग करावा लागला तरी हरकत नाहीं. वस्तुतः कोणतीही चांगली वस्तु प्रयत्नाशिवाय व स्वार्थत्यागाशिवाय राखली जाणें शक्य नाहीं. साधारणतः मनुष्यापुढें नेहमीं दोन मार्ग खुले असतात; प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग. ज्याला

जो मार्ग आवडतो तो तो मार्ग अनुसरतो; तें ठीक आहे. पण केव्हां केव्हां कोणत्याही मार्गाचा अतिरेक होण्याचा संभव असतो, हेंही विसरतां कामा नये. कोणत्याही गोष्टीचा काय, अतिरेक हा अपायकारकच व्हावयाचा. अतएव अतिरेक हा नेहमीं त्याज्यच होय. प्रवृत्तिमार्गाचे निस्सीम भक्त असतात ते "आधिभौतिक उन्नति" हेंच आपलें इहलोकचें अंतिम ध्येय मानून केव्हां केव्हां (उ. जर्मनलोकांसारखे) अत्यंत बेहोष होतात व मनुष्यप्राण्यांचे ठिकाणीं नेहमीं वसत असणाऱ्या उच्चतर मनोविकारांचा परिपोष करण्याच्याऐवजीं आपलें ध्येय गांठण्यासाठीं अनन्वित कृत्यें देखील करण्यास प्रवृत्त होतात. हा एक प्रकारचा अतिरेक झाला. त्याचें गीतेच्या सोळाव्या अध्यायांत सुंदर वर्णन आलेलें आहे, तें असें:—

> असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।
> अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥
>
> \+ + +
>
> आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।
> ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥
> इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।
> इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥
> असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।
> ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी ॥
> आढयोऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।
> यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥

या वर्णनाशीं अलीकडे प्रसिद्धीस आलेली जर्मन कैसरची मनोवृत्ति व वर्तन यांचा किती मेळ बसतो हें वाचकांनींच ताडून पाहावें. असो. दुसऱ्या प्रकारचा अतिरेक म्हणजे निवृत्तिमार्गाचा. तोही अतिरेक घडूं दिल्यानें जगाचें अहितच होणार आहे. निवृत्तिमार्गाचें पहिलें लक्षण म्हणजे उद्योगशीलतेपासून पराङ्मुख होणें. मनुष्यास श्रमाशिवाय अगर अल्पश्रमानें सुख मिळाल्यास तें हवेंच असतें. अर्थात् शक्य तर श्रम टाळण्याकडेच त्याची प्रवृत्ति असते. पण हेंच बहुधा निवृत्तिमार्गाच्या उपासकांचें मुख्य ब्रीद आहे. तशांतून "ब्रह्म सत्यं, जगन्मिथ्या" या शंकराचार्यांच्या प्रसिद्ध वचनाचा आधार मिळाल्यावर आणखी काय पाहिजे? वस्तुतः आचार्यांची वरील उक्ति तात्त्विक दृष्टीनें घ्यावयाची असते हें निवृत्तिमार्गाचे भक्त बहुधा विसरतात, आणि "जग मिथ्या आहे," "कोण कोणाचें आहे?" "बायको पोरें कोणाचीं?" वगैरे निरर्थक शाब्दिक चर्पटपंजरी चालवितात! धर्मसंस्थापक जे असतात ते नेहमीं जगांत राहणाऱ्यांकरितांच व त्यांनीं तेथें राहूनच सदाचरणानें वागून कसें मोक्षसाधन करावें हें दाखविण्याकरितांच धर्मप्रतिपादन करीत असतात. आचार्यांनींही तसेंच केलें आहे. सर्वांनींच जग सोडून किंवा सर्वसंगपरित्याग करून अरण्यवास पतकरावा असें त्यांनीं कोठेंच सांगितलें नाहीं. तसा त्यांचा जर आशय असता तर त्यांनीं व्यवहारास योग्य अशीं कर्तव्यें मनुष्यास लावून दिलीं नसतीं. तात्पर्य, जगांत राहून अगदींच निवृत्तकर्म असणें, किंवा निवृत्तकर्म व्हावें असें सांगणें, म्हणजे मनुष्यानें केवळ परावलंबी पशुवृत्ति स्वीकारावी असेंच प्रतिपादन करण्यासारखें आहे. म्हणजे हा निवृत्तिमार्गाचा अतिरेक झाला; व तो सर्वथैव त्याज्यच आहे. वास्तवीक आपल्याला (हिंदुस्थानवासीयांस) पाश्चात्य राष्ट्रांतल्यासारखा

प्रवृत्तीमार्गाचाही अतिरेक नको आहे व आपल्याकडील (कांहीं लोक वेळीं अवेळीं प्रतिपादितात तो) निवृत्तिमार्गाचाही अतिरेक नको आहे. तर आपल्यास दोन्हीं टोकांच्या मधील मध्यवर्ती सत्यमार्ग हवा आहे. त्यालाच " प्रवृत्तिपर निवृत्ति " मार्ग म्हणतां येईल. मनुष्याला व्यवहारांत राहिलेंच पाहिजे, अर्थात् त्यानें आपलीं कर्तव्यें केलींच पाहिजेत. मात्र तीं अहेतुकपणें मनोनिग्रहपूर्वक आणि परमेश्वरास अर्पण म्हणून केलीं पाहिजेत. म्हणूनच याला " प्रवृत्तिपर निवृत्तिमार्ग " असें म्हटलें आहे. व गीतेचा हाच संदेश आहेः—

> कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
> मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥

असो. आम्ही (हिंदुस्थानवासी लोक) श्रीकृष्णाच्या वरील उपदेशाप्रमाणें प्रस्तुत वागत आहों किंवा नाहीं हा तूर्त प्रश्न नाहीं. पण प्राचीन आर्य संस्कृतीनें आम्हांस लावून दिलेलीं व गीतेसारख्या जगन्मान्य ग्रंथांत ग्रथित असलेलीं अत्युच्च ध्येयें मात्र आम्ही सोडण्यास केव्हांही तयार होणार नाहीं ! अर्थात् या कलमाच्या आरंभास निर्दिष्ट केलेलें महासंकट आपल्या देशावर आल्यास—तें अर्धेमुर्धे आलेंच आहे !—त्याचा परिणाम आमच्या केवळ सांपत्तिक स्थितीवरच होणार आहे असें नसून त्याची आमच्या आर्य संस्कृतीला व तिनें घालून दिलेल्या ध्येयांस देखील बाधा पोंचणार आहे. यास्तव त्या संकटापासून आपली प्राचीन संस्कृति व आपलीं उच्च ध्येयें यांचें संरक्षण करण्याचे कामीं आमच्यांत उच्चतर देशाभिमान जागृत झाला पाहिजे व त्याच्या प्रेरणेनेंच आपल्याला पुढील कार्यास लागलें पाहिजे. असो. कै. ना. गोखल्यांचा व डॉ. बोस यांचा आलीकडे आलीकडे पुष्कळच स्नेह जमला होता व दोघेही एकमेकांची योग्यता पूर्ण ओळखीत होते. अर्थात् डॉ. बोस यांस ना. गोखल्यांच्या निःस्वार्थ देशाभिमानाबद्दल व त्यांनीं हिंदमातेची जी खऱ्या सत्पुत्राप्रमाणें सेवा केली तिजबद्दल अत्यंत आदर वाटावा यांत नवल नाहीं. डॉ. बोस म्हणतात कीं, जोंपर्यंत हिंदमातेच्या पोटीं " गोपाळ कृष्ण गोखल्यां " सारखे उच्चप्रकारच्या देशाभिमानानें प्रेरित होऊन तिची सेवा करणारे सपुत्र उत्पन्न होत आहेत, तोंपर्यंत तिला आपल्या भविष्यत्कालासंबंधानें निराश होण्याचें कारण नाहीं."

" श्रीनिवास. "

' प्रवासी ' काव्य वाचल्यानंतर—

[आंग्लकवि आलिव्हर गोल्डस्मिथ याचें 'प्रवासी' काव्य इंग्रजी वाङ्मयांत प्रसिद्ध आहे. तें काव्य वाचून जें काय वाटलें तें खालीं ग्रथित केलें आहे. हा उतारा त्याच 'प्रवासी' काव्याच्या स्वकृत भाषांतरांतील आहे.]

काव्य ' समाजानिरीक्षण' पाश्चात्य स्फूर्तिदायि सत्कवितें
भारतिच्या हें होओ प्राच्य-समाजेक्षणार्थ गे ! कविते !
नानाविध—सौंदर्यें प्रथितयशा या महीतलावरती
' हिंदी भू' नामा जीवरि दावी सृष्टि निज विशेष रति.
नाना समाज, नाना रीती, धर्महि अनेक, पंथ तसे,
भाषावेषविविधता इतुकी कोठें दुजी न नांदतसे. २

१ ' प्रवासी ' काव्यालाच ' समाजनिरीक्षण ' असें दुसरें नांव आहे.

क्व्यादें कृतभीषण परिसर घनगर्जितें कुहरभाजें
भारतजलधीमाजी[1] विशाल जो मंथदंडसा साजे. ४
‘ विंध्याद्री ’ वरुनि अशा निज दृष्टि क्षेपतां, बहु परिचीं
दिसतिल विचित्र रूपें कविसी येथिल निसर्गरमणीचीं. ५
प्राच्य दिशेतें वळतां ज्यावर रुळते पवित्र नदि–माला
ऐश्वर्याचें धाम प्रतिभाशाली सुविद्य ‘ बंगाला; ’ ६
तेथुनि सुपीक जात्या बसला जो सुरसरित्तटाकीस
परि रुधिरप्रिय कडवा ‘रोहिलखंड’ हि पडेल दृष्टीस; ७
नानकपंथी, भू यन्नामोच्चारें सदैव कांपेल,
ऐसा स्वधर्मवेडा उदिचीं ‘ पंजाब ’ देश शोभेल; ८
धारातीर्थं जयांची क्रीडनभूमि प्रसिद्ध ‘रजपूत’,
नोहे, साहस साक्षात् वसे, असा देश पश्चिमीं पूत; ९
विलसेल देश मग तो निर्जल परि वैश्यवृत्ति ‘गुजराथ,’
काढी प्रखरपणा निज संपत्सौख्यें भरून दिनरात; १०
वदते ज्यास वनश्री प्रीतीचें हेंचि माझिया धाम
दक्षिणादक्प्रांतातें नाम ‘महाराष्ट्र’ वीर्यविश्राम ! ११
वळतांचि, स्थित होई शतकद्वय लोचनांपुढें ख्यात
राष्ट्रखनींतुनि जेव्हां भटहीरक चमकले असंख्यात. १२
शतकें दोनच परि तैं तयें स्वदेश-स्वधर्म-सर्वस्वें[2]
निजनाम साच सार्थक केलें अतुलप्रतापवर्चस्वें. १३
स्मृतिगज परि सारें जें परिवर्तन होय कालचक्राचें,
पूर्वजगुणगणगानीं केवल हा देश संप्रती नाचे. १४
व्यवसायान्तरदर्शित विराग कालानुवर्तिताभावें
कर्तव्यमूढ होउनि हताश मृगसा इतस्ततां धावे. १५
परि एकदा तयाच्या पटतां सम्यक् सशंक बुद्धीस,
तें वज्रलेप होई, सोडीना निज कधीं चिकाटीस. १६
अंगीं दोष तुझ्या हे असोत कितिही, तरी तुझ्यावरती
निरतिशया मद्देशा! पुत्राची या असो तुझ्याच रति.१७
आसोचि हा कसाही, देशा निज सोडुनी अशा सुभग
कष्टें पूर्वदिशेतें अंतीं वळतांचि हा मनोविहग, १८
शस्त्रास्त्रव्यापारानभिज्ञ परि शास्त्रविद् दिसे ‘मद्र’
विस्तृतपूर्वांबुनिधिप्रक्षालितपाद देश तो भद्र. १९
दिसती बहुविध ऐशीं अंगें एकाचि राजतंत्रानें
बद्ध जरी राष्ट्राचीं, होय जसा मणिसमूह सूत्रानें. २०

१ भारतरूपी समुद्रांत. २ स्वदेश व स्वधर्म हेंच ज्यांचें सर्वस्व होतें.

बनतें विविध फुलांहीं जेंवी सौंदर्यपूर्ण उद्यान,
हा देश तेंवि अंगें एकत्वाचा जरी वरी मान; २१
जाज्वल्यता दिली निज रजपूतें या विशाल देशातें
मानापमान याचा पाठ दिला मोगलें तया हातें, २२
गिळुनी द्वेष सुदीर्घ, स्नेहें कवळी परस्परां जनता
जीनें, आंग्लजनें ती दिधली राष्ट्रैकचित्तगुणपरता; २३
सोशिकपण, कंटकपण अर्पियले या गुणां मराठ्यांहीं
भूषविले पारसिकें साहस कालानुवर्तिता यांहीं; २४
सुब्राह्मणें तयाला दिधली निज सूक्ष्मतैल बुद्धिमता,
ऐशा अंगांगांनीं आली राष्ट्रैक्यतेस दृढबलता; २५
स्वाभाविक,सामाजिक,बौद्धिक, धार्मिक,अनेक भेद तरी
वसती इथें,निरीक्षण सुखद ययाचें मनास बोध करी.२६
बुद्धिप्रधान दिसतो एक, दुजा भाग भावनायुक्त;
कां भिन्नता असे ही येथ ? तयाची विचारणा युक्त. २७
ज्या गूढशक्तिसंहतियोगें मनुजस्वभाव घटताहे,
त्या कोठें किति दिसती येथें आल्हाद होय बघतां हें.२८
कोण्या स्थलीं निसर्गें केलीं सुखसाधनेंहि अनुकूळ,
करितो समाज कोठें निजपुत्रां बंधनीं समाकूळ[1], २९
धरुनी उदारता बहु ईप्सित वितरी[2] सुखें कुठें शर्म[3],
उग्र स्वरूप दावी भीषणकर्मा श्रमें कुठें धर्म, ३०
असती इथें तिथें, तीं अंगें जुळवोनि राजपृथुयंत्र
चालायास सुयंत्रित अमोघ हो कोणतें महातंत्र ? ३१
दुःखैकव्याकुलता नांदे वा येथ सौख्य एकान्त,
दिसतो सुखासुखाचा[4] किंवा कविचा खराच सिद्धान्त;३२
स्थित्यंतरें, इथें जीं कोलाहल उग्र जाहलीं करतीं
परिणामक किति झालीं जनतेच्या तीं सुखासुखावरती !
ऐशा अनेक तात्त्विक माळ गुणीं गुंफिली विचारांची,
भूषा तीच मराठी[5]-काव्यवधूलागिं कां न व्हायाची ? ३४

नारायण महादेव भिडे, बी. ए.

१ व्याकूळ, दुःखित. २ देई (याचा ‘ धर्म ’ हा कर्ता). ३ सुख. ४ गोल्डस्मिथ कवीचा. राष्ट्रांतील शासनपद्धति चांगली असो अगर वाईट असो, तीवर व्यक्तीचें सुखदुःख किमपि अवलंबून नसतें. तें तिच्या स्वतःच्याच हातांत असतें. हा सिद्धान्त कवीनें मूळ काव्यांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. ५ हा दुष्ट समास अपरिहार्य आहे.

सर विल्यम जोन्स आणि त्यांची ह्या देशांतील कामगिरी.

[रा. दामोदर कृष्ण करंदीकर, बी. ए. ,एल् एल्.बी.]

आमच्या देशांत येऊन ज्या इंग्रज गृहस्थांनीं आपलें नांव अमर करून ठेवलें आहे, त्यांत सर विल्यम जोन्स यांची गणना करण्यास हरकत नाहीं. ते अठराव्या शतकांत होऊन गेलेल्या विभूतींपैकीं एक होते. त्यांनीं तरवार गाजवून राज्य संपादण्याला मदत केली नाहीं; पण संस्कृतभाषेचें ज्ञान संपादन करणाऱ्या यूरोपियनांत पहिला नंबर मिळवून प्राच्य-विषयांच्या त्यांच्या हल्लीं होत असलेल्या अभ्यासाचा व शोधांचा पाया घातला. ते एतद्देशीयांशीं मोठ्या प्रेमानें वागत; व त्यांच्या-बद्दल, व त्यांच्या भाषा व साहित्य यांजबद्दल त्यांच्या मनांत फार आदर वसत असे. ह्या कारणांस्तव ते आपणांस वंद्य झाले आहेत.

ते वेल्समध्यें १७४६ सालीं जन्मले. त्यांचें पूर्वचरित्र देण्याचें विशेष कारण नाहीं. ते उदार-मतवादी होते.ते एकदां आक्सफर्ड तर्फे पार्लमेंटांत येण्यासाठीं प्रयत्न करीत होते; पण त्यांना त्यांत यश मिळालें नाहीं. त्यांना पक्षमूलक कलहांचा तिटकारा होता, व त्यामुळें त्यांतून बाहेर पडून कोठें तरी लांब नोकरीवर जाण्याच्या उद्योगास ते लागले. एका वजनदार स्नेह्याच्या साह्यानें त्यांना कलकत्त्याच्या सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधी-शाची जागा १७८३ सालीं मिळाली. तेव्हांच्या परिपाठाप्रमाणें त्यांना लगेच **सर** हा किताबही मिळाला. पुढें त्यांनीं आपला विवाह केला, व ते हिंदुस्थानाला येण्याला निघाले. त्यांना अनेक भाषा येत होत्या. त्यांनीं आपल्या जागेच्या कामाला सुरवात केली तेव्हां त्यांची प्रामाणिकपणा, औदार्य व सतत उद्योग ह्यांबद्दल मोठी ख्याती होती.

लगेच त्यांनीं आपलेसारखे उद्योगी—म्हणजे आपणांस प्रिय असणाऱ्या विषयांत मन घालणारे—लोक शोधून काढले; व त्यांचें एक मंडळ,एशियाखंडाचा इतिहास, कला, शास्त्रें, व भाषा ह्यांचा अभ्यास करण्यासाठीं, स्थापिलें.ह्याचें नांव 'बंगाल मंडळाची एशियाटिक सोसायटी' असें होतें; व हल्लींही ती अस्तित्वांत असून आपलें काम नेटानें चालवीत आहे. तिचे उद्देश येणेंप्रमाणें जाहीर करण्यांत आले:—

"The bounds of its investigation will be the geographical limits of Asia; and within these limits, its inquiries will be extended to whatever is performed by man or produced by nature."

हे सर विल्यमचेच शब्द आहेत. एशियाखंडा-च्या हद्दीपर्यंत तिच्या परिश्रमांची व्याप्ती असून जें जें मानवनिर्मित अथवा सृष्टिनिर्मित असेल त्याचा यांत समावेश व्हावयाचा होता. तेच ह्या विद्वत्सभेचे पहिले अध्यक्ष निवडले गेले. नंतर चार वर्षांनीं, म्हणजे १७८८ सालीं, तिच्या कामगिरीचें पहिलें पुस्तक Asiatic Researches ह्या नांवानें प्रसिद्ध झालें. ह्या पुस्तकमालेमुळें यूरोपियनांस हिंदुलोकांचा धर्म व प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास ह्यांचें ज्ञान मिळूं लागलें. स्वत: अध्यक्ष ह्यांनीं ह्या विषयांवर यांत जे लेख प्रसिद्ध केले ते फार महत्वाचे होते.

हें झाल्यानंतर सर साहेबांनीं आपलें लक्ष संस्कृतभाषेच्या अभ्यासाकडे वळविलें. तें त्यावेळीं मोठेंच काम झालें, व त्याचा परिणामही फार महत्त्वाचा झाला. ह्या देशांतील न्यायाधीशांना हिंदु व मुसलमान पक्षकारांच्या कांहीं बाबतींत हिंदुधर्मशास्त्र व मुसलमानी धर्मशास्त्र यांजप्रमाणें निकाल द्यावयाचा असतो. मुसलमानी शास्त्रग्रंथ आरबी भाषेंत आहेत. ते सरसाहेबांना अवगत होते. हिंदूंचे धर्मग्रंथ संस्कृतांत आहेत, ते त्यांना किंवा दुसऱ्या कोणा न्यायाधीशाला अगर दुसऱ्या कोणा यूरोपियनाला तेव्हां बिलकुल अवगत नव्हते. इंग्रजींत त्या विषयावर तेव्हां ग्रंथही नव्हते. प्रत्येक कोर्टांत शास्त्री व मौलवी नेमलेले असत. त्यांचें मत न्यायाधीश घेत व त्याप्रमाणें निकाल देत. त्यांना इंग्रजी येत नसे. उभयतांना पर्शियन किंवा उर्दू येई. अभिप्रायाच्या कामांत घोटाळा होऊं लागला. लांचलुचपतीचेही प्रकार होऊं लागले. ही अनिष्ट स्थिति सुधारण्यासाठीं सर साहेब संस्कृत शिकूं लागले. त्यांनीं एक पंडित पगार देऊन ठेवला. त्याच्या धर्मसमजुतीस न दुखावतां—त्याला न शिवतां—ते संस्कृत शिकले. शिकण्याचें काम ऊर्दूंत चाले.

सर साहेबांनीं सरकारच्यापुढें हिंदु व मुसलमानी कायद्यांचे प्रमाणभूत ग्रंथ तयार करण्याची योजना मांडली, व सरकारानें ती लगेच मंजूर केली. ग्रंथ तयार करून त्यांचे इंग्रजी तरजुमे करावयाचें ठरलें, व ते त्या तयारीला लागले.

हिंदुधर्मशास्त्राच्या ग्रंथाला मूळ आधार मनुस्मृतीचा धरण्यांत आला. १७९४ सालीं सर साहेबांनीं त्या स्मृतीचें इंग्रजींत भाषांतर केलें. हातीं घेतलेला ग्रंथ पुरा होई तों ते जगले नाहींत. तें काम मि० एच्. टी. कोलब्रूक—दुसरे एक मोठे संस्कृताचे आंग्लदेशीय भक्त—ह्यांनीं तडीस नेलें. सदर ग्रंथ १८०० सालीं प्रसिद्ध झाला.

सर साहेबांनीं कालिदासकृत शाकुंतल नाटकाचें, नारायणकृत हितोपदेशाचें, व वेदांच्या कांहीं भागांचें, इंग्रजींत भाषांतर केलें.

त्यांचा मुख्य व्यवसाय न्यायाधीशाचा होता. तो त्यांनीं मेहेनतीनें व नेकीनें चालविला होता. त्यांच्या ह्या गुणांनीं ते यूरोपियन व हिंदवासी यांस सारखेच वंद्य झाले. त्यांच्या मेहेनतीनें त्यांची प्रकृति बिघडली. त्यांनीं विलायतेस परत जाण्याची तयारी केली. पण मध्येंच एकाएकीं कांहीं दुखणें आलें. त्याची पहिल्यानें हयगय झाली. त्यामुळें तें विकोपास जाऊन ते २७ एप्रिल १७९४ रोजीं कलकत्ता येथें वारले. तेव्हां त्यांचें वय ४८ वर्षांचें होतें.

ते जिवापाड श्रमांना बळी पडले. ते आपल्या वेळाची—२४ तासांची—वांटणी करून त्याबरहुकूम वागत. त्यांना कविता करण्याचा नाद होता. ते म्हणतः—

"Seven hours to law, to soothing slumber seven,
Ten to the world allot, & all to heaven."

'कायद्याच्या कामाला ७, झोंपेला ७, जगाला १०, व सारे ईश्वराला द्या.'

त्यांची उद्योग करण्याची शैली व शिकण्याची हौस हीं अनुपमेय होतीं. ते " नवीन शोधक " असा मान मिळण्याला पात्र नव्हते, पण ते

पाहिजे तो विषय झटकन शिकूं शकत. त्यांना ल्याटिन, ग्रीक, इटॅलियन, फ्रेंच, स्पॅनिश, पोर्टुगीज व जर्मन ह्या यूरोपियन; व संस्कृत, अरेबिक, पर्शियन, हिंदी, तुर्की व चिनी ह्या एशियाटिक भाषा थोड्याबहुत येत होत्या. त्यांची गणित, रसायनशास्त्र, व वनस्पतिशास्त्र यांतही बरीच गति होती.

जें दुसऱ्याला प्राप्त झालें, तें आपल्यालाही साध्य करून घेतां येईल, असें ते म्हणत. त्यांनीं ज्ञान मिळविण्याची कोणतीही संधि बिलकूल फुकट दवडली नाहीं. सूर्योदयाबरोबर त्यांच्या उद्योगाला सुरवात होई, व तो सारा दिवस चाले. वाचलेल्याचें किंवा शिकलेल्याचें ते चांगलें चिंतन करीत.

त्यांचे अनेक लेख व ग्रंथ पाहिले म्हणजे मोठें कौतुक वाटून ते इतक्या अल्प वयांत वारल्याबद्दल मोठें दुःख होतें. एकंदरीनें त्यांचें कौतुक करावें तितकें थोडेंच. न्यायाधीश, पंडित, नागरिक व स्नेही ह्या नात्यांनीं त्यांच्याइतकी कामगिरी फारच थोड्या इंग्रजांनीं केली असेल.

त्यांनीं घालून दिलेला कित्ता कोलब्रुक, विल्सन, म्याक्समुलर, वेबर, हौ, बुल्हर, कीलहार्न, थीबो, बर्नेल, मोनियर विल्यम, मॅक्डॉनेल, पीटरसन प्रभृतींनीं गिरवून आमच्या संस्कृत भाषेविषयीं व साहित्याविषयीं—तसेंच हिंदुलोकांविषयीं-पाश्चिमात्य देशांत आदर वाढविला; व आमचे विचार त्यांना समजावून देण्याला मदत करून राज्यकारभाराचें काम सोपें केलें. हिंदूंच्या उच्च व सात्त्विक संस्कृतीचा सुपरिणाम पाश्चिमात्य संस्कृतीवर थोडाथोडका झाला आहे असें नाहीं.

ताईस—!

ताई, तुझें मी आतां कोणत्या शब्दांनीं शांतवन करूं? स्वतंत्र संसारसुखाचा लेशही न मिळाल्यामुळें आधींच करपलेल्या तुझ्या जीवास, कपाळभर सौभाग्याचें आश्रयस्थानही दुर्दैवानें राहूं दिलें नाहीं, म्हणून तुझ्या मनाला होणारी तळमळ नुसत्या शब्दांनीं कशी शांत होणार? तुम्हां तरुण मुलींची स्वतंत्र संसारसुखाची जी नैसर्गिक हौस ती कधींही न भागल्यामुळें जागच्याजागीं पोळलेल्या तुझ्या जीवाला, समाधानाला सौभाग्याचा जो एक अक्षय विसांवा होता, तोही नाहींसा झाल्यावर आतां तुझें शांतवन कशानें होणार? हौशी मुलींना आपलें शहाणपण, आपलें चातुर्य, आपली करामत दाखवायला योग्य स्थळ जो संसार, त्याचा मूळ आधारच भक्कम नसल्यामुळें पुढच्या आशेवर देवाची करुणा भाकीत स्वस्थ राहून काळ कंठण्याचा सुलभ मार्गही तुला खुंटल्यामुळें तुझ्या चित्ताला आतां शांति ती कशी मिळणार? अनेक दिव्य चमत्कारांनीं शृंगारलेल्या नंदनवनांत प्रत्यक्ष राहूनही तुम्हांला जो आनंद होत नाहीं, ज्या तुमच्या गूढ वृत्ति तुमच्या मुखावर चमकविण्याची ज्याच्या सप्रेम नेत्रकटाक्षांत शक्ति आहे, तो तुमचा नवरा निर्धन, कुरूप, कठोर, निर्गुण, निर्विद्य, कसाही असला तरी, तो सुखांत असलेला पाहून आपल्या अप्रतिम मनोधैर्यानें, अनन्य पतिनिष्ठेनें, साऱ्या जगाला थक्क करून, आपल्या निष्कलंक शीलानें त्याला भारून टाकून व स्वतांचे गोडवे गाण्यांत गुंग करून, इहपरलोकीं धन्यता मिळविण्याचें तुम्हां स्त्रियांचें पवित्र साधन जें सौभाग्य, त्यालाच मुकल्यावर दुःख, निराशा, निरानंद यांनीं होरपळणाऱ्या तुमच्या कोमल अंतःकरणाला विसांवा कसा लाभणार? अशा स्थितींत, ताई, तुला सारें जग शून्य वाटूं लागलें,

भाऊ, बहीण वगैरे आप्त मंडळी परकी वाटूं लागली, जिकडे तिकडे तुला भयाण अरण्याप्रमाणें दिसूं लागलें, तर त्यांत तुझा तरी काय दोष ?

ताई, लहानपणीं तूं किती गोंडस, किती सुंदर दिसत होतीस ! तेव्हां तूं सर्वांची किती लाडकी होतीस ! त्यावेळीं तुझी सर्वांना किती मौज वाटे ! घरांतली मंडळी तुझें किती कौतुक करीत ! मोठे आईचा तर तूं केवळ प्राणच होतीस ! नाहीं का ? बरें झालें बिचाऱ्या म्हातारीचें केव्हांच सोनें झालें म्हणून ! नाही तर आज तुला अशी पाहून तिची काय अवस्था झाली असती ! ज्यांनीं तुला हाता-खांद्यावर खेळवलें, ज्यांनीं तुझें निरनिराळ्या प्रकारें कोड पुरवलें, त्यांना आतां तुझा असा फिकट, फटफटीत चेहरा पाहून काय बरें वाटत असेल? त्यांच्या जिवाची कशी कालवाकालव होत असेल याची, ताई, तूंच आतां कल्पना कर. तुझा त्यावेळचा तो साधा स्वभाव, तुझें तें मोहक सौंदर्य, तुझा लडिवाळ-पणा, तुझा मानीपणा यांचा आतां काय उपयोग ? तुझ्याविषयींचे वडील मंडळीचे ते मनोरथ, त्यांचीं तीं सुखस्वप्नें, त्या सर्वांचा, काळानें मूळावरच घाव घालून, ताई, पूर्ण उच्छेद केला ना ? आतां आशेला-सुद्धां जागा राहिली नाहीं ना? तसेंच ज्यांना तूं 'बाळ,' 'बेटा,' ह्मणून चुचकारीत होतीस, रुसून बसलें असतां ज्यांना तूं गोड गोड बोलून कुरवाळीत होतीस, हट्ट धरला असतां ज्यांना तूं वेळोवेळीं समजावीत होतीस, त्या तुझ्या धाकट्या भावंडांना आतां तुझें चुचकारणें, तुझें कुरवाळणें, तुझें समजावणें, कसें वाटेल? आतां तीं पहिल्यासारखींच तुझ्याजवळ मोकळ्या मनानें येतील काय ? उलट आपलें दुःख गिळून तुझें शांतवन करायला, तुला दुःखाचा विसर पाडायला, त्यांना जवळ येतांना पाहून तुझ्या मनाची तरी काय बरें स्थिति होईल ?

ताई, या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; पण त्यांचें आतां काय ? होणाऱ्या गोष्टी कांहीं कुणाला चुक-वितां येत नाहींत. दुःख हें मनुष्यमात्राला लागू आहे; आणि तें टाळणें जरी मनुष्याच्या हातीं नसलें, तरी त्याचें स्वरूप सौम्य करणें, त्याची आठवण बुजवून टाकणें मात्र प्रत्येकाच्या ताब्यांत आहे. पवित्र प्रेमानें बद्ध झालेल्या प्रत्येक पतिपत्नीचें आयुष्य म्हणजे एक नव रसांनीं ओथंबलेलें काव्य आहे. हरएक पति-पत्नीच्या आयुष्यांत असा निदान एक तरी प्रसंग असतो कीं, ज्याची आठवण सदैव कायम राहते, ज्याचें स्मरण झालें कीं आपल्या सर्व वृत्ति क्षणभर तन्मय होतात, आणि त्या सुखस्वप्नामध्यें सारखें निमग्न होऊन राहवेंसें वाटतें. जिचें आपल्यावर पराकाष्ठेचें प्रेम असतें, त्या स्त्रीच्या आयुष्यांत तर असले प्रसंग किती तरी असतात; आणि ते सर्व प्रसंग ज्याला ज्याला म्हणून हृदय आहे त्याला त्याला आल्हादकारक व सुखदायक वाटतात. प्रेमकहाणीनें कुणाला नवीन जीवन, नवीन उत्साह व नवीन आशा येत नाहीं. ताई,—राव केवळ शरीर सोडून गेले आहेत. असल्या अनेक प्रसंगांचें चित्र जें तुझ्या हृत्पटलावर कोरलेलें आहे, तें कांहीं त्यांनीं नेलेलें नाहीं. तर, ताई, तूंही, प्रत्यक्ष ईश्वर भेटत नाहीं म्हणून ज्याप्रमाणें आपण त्याची मूर्तीच मांडून तिची पूजा करतों; जणूं काय तो प्रेममय परमेश्वर आपल्या समोर मूर्तीरूपानेंच आपणावर अनुग्रह करण्यासाठीं अवतरला आहे असें मानून आपण आपल्या मनाचें समाधान करतों; त्याप्रमाणें आपल्या ह्या हृदयस्थ परमेश्वराची, जेव्हां जेव्हां रिकामा वेळ सांपडेल, जेव्हां तुझ्या मनाला त्यांचा विरह दुःसह होईल, तेव्हां पूजा करीत जा. म्हणजे कांहीं दिवसांनीं तुला आतांच्या-सारखा त्यांचा शारीरिक वियोग दुःसह वाटणार नाहीं. कारण, तुला ठाऊकच आहे कीं, मोठमोठ्या साधुसंतांना जर त्यांचा देव अशा मानसिक स्वरूपांत येऊन भेटून त्यांचें पूर्ण समाधान करतो, तर मग तुझाच देव—ज्यानें तुला आजपर्यंत उराशीं घट्ट बाळगून धरलें तो—तुला कसें अंतर देईल ?

तुझा आवडता भाऊ-शालीन.

॥ श्री ॥

विविधज्ञानविस्तार

पु० ४६. अंक १२

राष्ट्रीय सभा.

तिची उत्पत्ति व वाढ.

For freedom's battle once begun
Though baffled oft is ever won.

राष्ट्रीय सभा अस्तित्वांत येऊन आज तीस वर्षें झालीं. सामान्यपणें तीस वर्षांचा काल म्हणजे एक पिढीचा काल समजतात. ज्या कर्तृत्ववान् पुरुषांनीं राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आणिली व तिला जोमाचें स्वरूप दिलें त्यांतील फारच थोडे आज मितीस हयात आहेत. १८८५ सालीं या मुंबई शहरांतच राष्ट्रीय सभा स्थापन झाली, व फिरून तीस वर्षांनीं तिचें चौथ्यांदा या शहरीं आगमन होत आहे. अशा मंगल प्रसंगीं या संस्थेची उत्पत्ति व वाढ कशी होत गेली याचा इतिहास मनोरंजक होईल असें जाणून तो आम्ही देण्याचा प्रयत्न करीत आहों.

हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें ईस्ट इंडिया कंपनीच्या हातीं असतांना येथील लोकांच्या उन्नतीबद्दल ब्रिटिश मुत्सद्द्यांचें व राजकारणी पुरुषांचें धोरण फार उदारपणाचें होतें. याचें मुख्य कारण ईस्ट इंडिया कंपनीच्या उत्कर्षाबद्दल असहिष्णुता हेंच होय. ईस्ट इंडिया कंपनीचे येथील नोकर अपरिमित संपत्ति मिळवून स्वदेशीं जात व तेथें नबाबाप्रमाणें ऐषआरामांत राहत असत. यामुळें पुष्कळांना हेवा उत्पन्न होत असे. तसेंच कंपनीचे अनेक भागीदार व डायरेक्टर्स धनाढ्य होऊन प्रबल झाले होते. पैशाच्या जोरावर पार्लमेंटांतही त्यांचें वजन होतें. कंपनीस अनेक सवलती ते पार्लमेंटाकडून मिळवून देत असत. या सर्व कारणांमुळें बऱ्याच इंग्रजी मुत्सद्द्यांना कंपनीच्या वर्चस्वाबद्दल असूया वाटत होती. दर तीस वर्षांनीं कंपनीला हिंदुस्थानच्या व्यवस्थेबद्दल सनद मिळत असे; व ती देतांना हिंदुस्थानांतील लोकांच्या उन्नतीबद्दल कंपनीनें केलेल्या कामगिरीची पार्लमेंटची कमेटी नेमून करून चवकशी होत असे, अनेक दृष्टीनें हिंदुस्थानच्या उन्नतीच्या प्रश्नाबद्दल ऊहापोह होत असे, व या चवकशीच्या मुळेंच हिंदुस्थानांतील कंपनीच्या राज्यकारभारावर पार्लमेंटचा मोठा वचक होता. कंपनीचें धोरण वेळोवेळीं उदारपणाचें होत गेलें याचें सर्व श्रेय पार्लमेंटच्या चवकशीकडे आहे. सामान्यपणें खालीं लिहिलेले सहा सिद्धांत त्यावेळीं ग्राह्य मानिले होते.

१ हिंदुस्थानांतील लोकांचें कल्याण व सौख्य शक्य त्या योगानें वाढविणें हें इंग्लंडचें आद्य कर्तव्य आहे.

२ इंग्लंडची हिंदुस्थानावरील सत्ता कायम ठेवण्यास हिंदुस्थानांतील लोकांस अज्ञानदशेंत ठेवण्याचें मुळींच कारण नाहीं.

३ हिंदुस्थानांतील लोकांस शिक्षण देण्यांत यावें. तें इंग्रजी भाषेच्या द्वारें देण्यांत यावें व इंग्रजी कल्पनांचा सर्वत्र फैलाव करण्यांत यावा.

४ राज्यकारभारामध्यें एतद्देशीय लोकांचा समावेश करावा व प्रामाणिकपणानें व स्वाभिमानानें त्यांना उदरनिर्वाहाचे मार्ग दाखवून द्यावे.

५ सरकारी नोकरींत शिरण्यासंबंधीं एतद्देशीय लोकांच्या मार्गांतील सर्व अडचणी दूर कराव्यात.

६ ब्रिटिश राज्याचें हिंदुस्थानासंबंधीं धोरण सर्वस्वीं न्यायाचें, प्रामाणिकपणाचें व येथील लोकांच्या उन्नतीस साहाय्य करणारें असेंच असावें.

वरील उदात्त तत्त्वांचा अनुवाद सर जॉन शोअर, सर चार्लस ग्रँट, लॉर्ड मोईरा, लॉर्ड हेस्टिंग्स्, माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन, सर जॉन मालकम, लॉर्ड मेकॉले यांच्या वेळोवेळीं झालेल्या भाषणांतून, कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स् यांच्या खलित्यांतून व सन १८१३ व १८३३ या वर्षीं पास झालेल्या कायद्यांवरून स्पष्टपणें दिसून येत आहे.

या धोरणाप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांच्या उन्नतीकरितां अमलांत आलेली पहिली सुधारणा म्हणजे येथील लोकांस इंग्रजी भाषेच्या द्वारें विद्यादान देणें ही होय. इंग्रजी विद्येला कैलासवासी शास्त्रीबोवा यांनीं वाघिणीचें दूध अशी अन्वर्थक उपमा दिली आहे. या दुग्धामृताचें प्राशन केल्यानंतर येथील लोकांत नवा उत्साह, नवीन तेज, नवीन स्फूर्ति उत्पन्न झाल्यास त्यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

इंग्रजी विद्येच्या अध्ययनानें व पाश्चिमात्य इतिहासाच्या परिशीलनानें हिंदुस्थानांतील तरुणांस राजा व प्रजा यांचे हक्क समजूं लागले. अनियंत्रित राजसत्तेचे तोटे त्यांचे नजरेस आले. स्वतंत्रेच्या कल्पना स्पष्टपणें कळूं लागल्या. स्वातंत्र्याकरितां ब्रिटिश जनतेनें चालविलेला झगडा त्यांच्या निदर्शनास आला. व्यक्तिस्वातंत्र्याचें हृद्गत उमजूं लागलें. राजकीय उन्नतीची परमावधी त्यांना दिसूं लागली. सापेक्षत्वानें व तुलनेनें येथील स्थितीचें त्यांस आकलन करतां येऊं लागलें. देशाच्या अधोगतीचें चित्र हृत्पटलावर प्रतिबिंबित झालें. कर्तव्याची अंतःस्फूर्ति उत्पन्न झाली. उन्नतीची महत्त्वाकांक्षा उद्भवूं लागली. स्वाभिमानाचें नवीन वारें संचार करूं लागलें. सारांश, राष्ट्रोन्नतीच्या कल्पना मूर्तिमंत डोळ्यापुढें उभ्या राहूं लागल्या. इंग्रजी शिक्षणाचा हा परिणाम देशांतील तरुणांवर होईल, हें भाकीत त्यावेळच्या चाणाक्ष इंग्रजी मुत्सद्द्यानीं केलें होतें. साठ वर्षांपूर्वीं इंग्रजी शिक्षणास सुरवात करतांना किती उदार बुद्धीनें या प्रश्नाकडे इंग्रज लोक पाहात असत हें मनन करण्यासारखें आहे. ना. गोखले यांस मि. हागसन प्याट यानीं लिहिलेल्या एका पत्रांत खालीं लिहिलेले उद्गार काढले आहेत.

Indian youths would be brought up to admire our doctrines of political liberty, popular rights and national independence. Nor could it ever have been supposed that these lessons would fall upon deaf ears and cold hearts On the contrary the inevitable result of such teaching was clearly perceived by the Government of those days and was regarded in a generous spirit. In support of this assertion I may mention that at the time of the inauguration of these measures I accompanied the then Lieut.-Governor of Bengal Sir Frederic Haliday on one of his winter tours through the province. Naturally he called the attention of those, who attended the public meetings held by him, to the new education policy and he always took occasion to declare that the schools would promote one of the leading purposes of the British rule which was to

prepare the people for Self Government. It certainly was not supposed that at any subsequent time a policy would be adopted which would disappoint the legitimate hopes thus created.

इंग्रजी शिक्षणानें येथील लोकांस स्वराज्यास लायक करावयाचें आहे हा त्यावेळचा हेतु व या हेतुविरुद्ध कोणतेंही कृत्य पुढें केलें जाणार नाहीं ही त्या वेळची भावना साठ वर्षांनंतर अँग्लो-इंडियन मुत्सद्द्यांचे कडून कितपत यथार्थपणें पाळली जात आहे याचा प्रत्येकानें आपल्या मनाशीं विचार करावा. इ. सन १८५८ सालीं सर्वत्र शांतता स्थापित झाल्यानंतर कंपनीचा राज्यकारभार राणी सरकारांनीं आपल्या ताब्यांत घेतला. आपल्या जाहिरनाम्यानें पूर्वी दिलेलीं सर्व अभिवचनें कायम ठेवून हिंदुस्थानच्या लोकांना समतेनें वागविण्याचें आश्वासन दिलें. विश्वविद्यालयांची स्थापना झाली. उच्च शिक्षणाचा फैलाव झाला. वरिष्ठ प्रतीच्या नोकऱ्यांवर सुशिक्षित लोकांची नेमणूक होऊं लागली. संख्येच्या मानानें अल्प असल्यामुळें सुशिक्षित लोकांचें कौतुक व गौरव होऊं लागलें, व पश्चात्य संस्कृतीचा लखलखाट पाहून सुशिक्षित वर्गाच्या पहिल्या पिढीचे डोळे दिपून गेले. याप्रमाणें १८७५ चे सुमारास स्थिति होती.

पूर्व तयारी.

या संधीस लार्ड लिटन यांची कारकीर्द सुरू झाली. लिटन साहेबांचें धोरण हिंदुस्थानांतील लोकांच्या उन्नतीच्या विरुद्ध होतें. जात्या कान्सरवेटिव असून ब्रिटिश राज्यसत्ता केवळ इंग्लडांतील लोकांच्या उन्नतीसाठींच अस्तित्वांत आली आहे असें प्रतिपादणाऱ्या स्वार्थपरायण इंग्रजी मुत्सद्द्यांच्या (Imperialists) सहवासांतच ते वाढले होते. हिंदुस्थानांतील लोकांस उदार मनानें वागवून सहानुभूतीनें त्यांची उन्नति करावी ही कल्पना लिटनसाहेबांच्या कधीं स्वप्नींही आली नाहीं. त्यांच्या अमदानींत व्हर्न्याक्युलर प्रेस अॅक्टाच्या योगानें एतद्देशीय वर्तमानपत्रांचें तोंड बंद झालें. हत्याराच्या कायद्यानें गरीब प्रजेस निःशस्त्र करण्यांत आलें. हिंस्र श्वापदांपासून सुद्धां आपले प्राण किंवा आपली मालमत्ता यांचें संरक्षण करतां येईना. १८३३ किंवा १८७० या सालीं पास झालेल्या कायद्यास बाजूला ठेवून इंग्लडांतील सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेस एतद्देशीय लोकांना बसूं देऊं नये अशी लिटन साहेबांनीं शिफारस केली. पार्लमेंटनें ती मंजूर केली नाहीं; परंतु त्याचा परिणाम सिव्हिल सर्व्हिसच्या परिक्षेचें वय एकोणीसांवर येऊन बसलें व त्यामुळें एतद्देशीय लोकांस त्या परीक्षेस जाणें अशक्य झालें. Statutory Service या नांवाचा सिव्हिल सर्व्हिसपेक्षां कमी दर्जाचा 'नोकरांचा वर्ग' तयार करण्यांत आला. वरिष्ठ शिक्षणाबद्दल लिटन साहेबांनीं आपलें धोरण उघडपणें विरोधाचें स्वीकारलें. दिल्ली कॉलेज व बनारस इंग्लिश कॉलेज हीं बंद करण्यांत आलीं. सरहद्दीवर अफगाणिस्थानशीं निष्कारण लढाई सुरू केली. हजारों रुपये या कामीं खर्च केले. मिठावरील कर वाढविला. १८७७ सालीं सर्व देशभर भयंकर दुष्काळ पडला. हजारों लोक मृत्युमुखीं पडले. दुष्काळाची व्यवस्था अत्यंत निर्घृणपणें करण्यांत आली; सारांश सर्व लोक गांजून गेले. १८८० सालीं लिटन साहेब स्वदेशीं परत गेल्यानंतर इंग्लंडांत निवडणूकीची धामधूम चालू झाली. लॉर्ड बीकन्सफील्ड यांची कारकीर्द संपून लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला व ग्लॅडस्टन साहेबांचें मंत्रिमंडल अस्तित्वांत आलें. यावेळीं पार्लमेंटापुढें आपलीं सर्व गाऱ्हाणीं मांडण्याकरितां पुणें येथील नागरिकांनीं सार्वजनिक सभेच्या विद्यमानें पार्लमेंटास एक अर्ज सादर केला. त्या अर्जांत हिंदुस्थानांतील तत्कालीन स्थितीचें अत्यंत मुद्देसूद वर्णन केलें आहे व त्यावरूनच १८८० सालच्या देशांतील स्थितीचें बरोबर आकलन करतां येतें. त्या अर्जाचा सारांश

खालीं दिल्याप्रमाणें आहे. " १८३५ सालीं दिलेला मुद्रणस्वातंत्र्याचा हक्क लिटनशाहींत एका दिवसांत नाहकपणें काढून घेण्यांत आला आहे. हत्यारांच्या कायद्यामुळें लोकांस निःशस्त्र केलें आहे. सिव्हिल सर्व्हिसची वयोमर्यादा कमी करून हिंदुस्थानांतील लोकांना या परीक्षेस बसणें अशक्य केलें आहे, व एतद्देशीय लोकांकरितां कमी दर्जाचा नोकरीचा वर्ग काढला आहे. हिंदुस्थानच्या उत्पन्नाचा गैरशिस्त कारणाकडे उपयोग करून देशांतील कर्जाचें ओझें सुमारें तीन कोटींनीं वाढविलें आहे. पार्लमेंटच्या आश्वासनास बाजूस ठेवून करांचें ओझें वाढविण्यांत आलें आहे. दुष्काळानें लोकांची उपासमार होत असतांना मिठावरील कर शेकडा ४० टक्क्यांनीं वाढविला आहे. बंगालखेरीज इतर प्रांतांतून कायम धाऱ्याची पद्धत अमलांत आणण्याचीं आश्वासनें दिलीं असून त्याबद्दल यत्किंचितही तजवीज झालेली दिसत नाहीं. देशांत भयंकर दुष्काळ पडला असून साऱ्याची तहकूबी किंवा माफी मुळींच देण्यांत आलेली नाहीं, व साऱ्याची बाकी सक्तीनें वसूल करण्यांत आलेली आहे. दुष्काळनिवारणाकरितां म्हणून नित्राण झालेल्या लोकांवर नवीन करांचें ओझें लादण्यांत आलेलें आहे. अशा रितीनें उभारलेल्या फंडाचा विनियोग दुष्काळ निवारण्याकडे न करतां अफगाणिस्थानच्या लढाईमुळें आलेली तूट भरून काढण्यांत केला आहे. भ्रामक आंकडे देऊन जमाखर्चाची स्थिति समाधानकारक आहे असें दाखविण्याचा खोडसाळ प्रयत्न केला आहे. हिंदुस्थानच्या हिताशीं यत्किंचितही संबंध नसलेल्या सरहद्दीवरील लढाया व आगगाड्या यांजवर गरीब रयतेचे पैसे कर वाढवून खर्च करण्यांत आले आहेत, व उपयुक्त सुधारणा या सबबीवर मागें टाकण्यांत आलेल्या आहेत. साम्राज्याच्या हिताकरितां केलेल्या लढाईचा खर्च एकट्या हिंदुस्थानावर लादला आहे. लोकांचे पुढारी दाद मागण्याकरितां गेले असतां व्हाइसरॉयांनीं त्यांस उद्दामपणानें वागवून त्यांची गांठही घेतलेली नाहीं. व असें करून प्रजेस दाद मागण्याचा राजमान्य मार्गही (Right of petition)नाहींसा केला आहे. एतद्देशीय संस्थानांवर करांचें ओझें लादण्यांत आलें आहे व त्यांचें सैन्य साम्राज्यास अपायकारक आहे या सबबीवर कमी करण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचें धोरण दिवसेंदिवस बेपर्वाईचें व स्वैरवृत्तीचें होत चाललें आहे. कायदेकौंसिलांतून होणाऱ्या नेमणुका नालायख लोकांस देऊन कौंसिलाचें स्वातंत्र्य कमी करण्याचा प्रयत्न होत आहे, व महत्त्वाचे प्रश्न लोकांना विचार करण्यास यत्किंचितही अवसर न देतां घाईनें निकाल करण्यांत येत आहेत. न्यायाच्या कोर्टाचें स्वातंत्र्य कमी होत असून अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांचें स्तोम वाढत आहे. वरिष्ठ शिक्षणास यत्किंचितही उत्तेजन मिळत नसून खुद्द व्हाइसरॉयसाहेबांनीं वरिष्ठ शिक्षणाचे विरुद्ध आपण आहों असें जाहीर केलें आहे. जमिनीवरील सारा रिव्हिजन सर्वेमध्यें गैरशिस्त रीतीनें वाढविण्यांत आला आहे. दुष्काळाच्या वेळीं सारा सक्तीनें वसूल करण्यांत आला व स्थानिक अधिकाऱ्यांनीं पसंत केलें असूनही साऱ्याच्या सुटीचें मागणें वरिष्ठ सरकारनें नामंजूर केलें आहे. जंगलखात्याच्या वाढीमुळें हजारों गुरांचीं गायरानें नाहींशीं होऊन शेतकऱ्यांना फार अडचणी सोसाव्या लागत आहेत. तीन वर्षांच्या दुष्काळामुळें देशाची स्थिति फार नित्राण झाली आहे. सरकारी किंवा बिनसरकारी लोकांनीं दिलेल्या प्रजेच्या हिताबद्दलचा सल्ला वरिष्ठ सरकारकडून सर्वस्वीं फेटाळण्यांत येत आहे. "

अर्जांतील वरील हकीकतीवरून देशांत लिटनसाहेबांच्या कारकीर्दीमुळें किती अस्वस्थता उत्पन्न झाली होती याची स्पष्ट कल्पना वाचकांस येईल. त्यावेळीं पार्लमेंटांत प्रो. फॉसेट हे हिंदुस्थानचे वाली म्हणून नामांकित होते व त्यांशिवाय मि. ल्यॅंग, सर जॉर्ज बालफर, जेम्स स्टेन्सफील्ड, ओडोनेल, बॅक्स्टर, रीड, इत्यादि हिंदुस्थानचे हितचिंतक पार्ले

मेंटांत असल्यामुळें त्यांनाही या अर्जाबद्दल दाद मागण्यासाठीं विनंती करण्यांत आलेली होती.

या अर्जावरून हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोकमत कसें होतें हें दिसून येईल. त्याबरोबरच हिंदुस्थानांतील इतर जनतेमध्यें असंतोष उत्पन्न झाला होता. १८६४ च्या सुमारास अमेरिकेंतील लढाईमुळें शेंकडो व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघालीं होतीं. कापसाच्या सट्ट्यानें हजारों लोक निर्धन झाले. व्यापारास जबरदस्त धक्का बसला. १८७९ च्या सुमारास स्कॉटलंडांतील सिटी ऑफ् ग्लॅसगो या नामांकित पेढीनें दिवाळें काढलें व त्याचा परिणाम सर्वत्र होऊन शेंकडो ठेवीवाल्यांचें नुकसान झालें. १९१४ सालच्या बँकांच्या दिवाळखोरपणासारखाच प्रकार ७९ सालीं मुंबईंत दिसून आला. नरसी केशवजी यासारख्या पुष्कळ प्रसिद्ध पेढ्या मुंबईंत बंद झाल्या व त्याचा परिणाम देशांतील व्यापारधंद्यावर स्पष्टपणें दिसून आला. पतीवरील देवघेव मर्यादित झाली. पैशाची टंचाई सर्वत्र भासूं लागली. शेतकीशिवाय लोकांत तरणोपाय उरला नाहीं. रोखीनें सरकारी सारा देण्याची पद्धत अगदीं नवीन असून ती शेतकऱ्यांच्या अंगवळणीं पडली नव्हती. नियमितपणें सरकारी सारा भागविणें अगदीं दुरापास्त होई. जमीनमहसूलाच्या कायद्यामुळें नियमित वेळीं सारा देणें शेतकरीवर्गास फार जाचूं लागलें. सावकाराच्या दारांत गेल्याशिवाय त्यास गत्यंतर उरलें नाहीं; व सावकार मागेल तें व्याज देणें त्यास भाग पडे. सरकारी कोर्टें व अंमलबजावणीचे कायदेही त्यावेळीं फार कडक होते. शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्याबद्दल ज्या अनेक सवलती हल्लींच्या कायद्यांतून दिसून येतात त्या त्यावेळीं अस्तित्वांत नव्हत्या व त्यामुळें शेतकऱ्यांची फार हलाखी होती. आगगाड्या वगैरे प्रवासाच्या साधनांमुळें दाणागोट्याचा संचय नाहींसा होऊं लागला व विशेषेंकरून १८७८ च्या सुमारास जो भयंकर दुष्काळ सर्वत्र पसरला त्या योगानें शेतकरी वर्ग अगदींच थकून गेला. बंड करण्यापर्यंत त्यांची मजल येऊन ठेपली. महाराष्ट्रांत कांहीं ठिकाणीं स्वस्थतेचाही भंग झाला. दुष्काळनिवारणार्थ उपाय व ऋणविमोचनाची योजना अमलांत आणणाऱ्याची आवश्यकता भासूं लागली. याप्रमाणें देशांतील आधारस्तंभ म्हणजे शेतकरी वर्ग व सामान्य जनता यांचेमध्यें तीव्र असमाधान उत्पन्न झालें होतें. १८८० सालीं हिंदुस्थानांतील सांपत्तिक स्थिति कशी होती याचें त्यावेळीं एका मार्मिक लेखकानें केलेलें वर्णन विचार करण्यासारखें आहे. " गेल्या दहा वर्षांत ५० लक्ष लोक दुष्काळ व उपासमारामुळें मृत्यु पावले. परकीय व्यापारामुळें उद्योगधंदे बंद होऊन परकीय देशास कच्चा माल पुरविण्याचें काम आपल्याकडे राहिलें आहे. जमिनीची किंमत कमी होत असून तिचें उत्पन्नही खालावत आहे. जीवनार्थ कलह फार तीव्र भासत असून लक्षावधि लोकांस मोठ्या कष्टानें चरितार्थ चालवितां येतो. देशांत साक्षरतेचें प्रमाण अगदींच कमी आहे. ललितकला, वाङ्मय यांची वाढ मुळींच होत नाहीं. देशांतील लोकांना मुलांसारखें समजून त्यांचा कोणत्याही बाबतींत सल्ला घेतला जात नाहीं. सत्ताधारी लोक प्रजेपासून शक्य तितके फटकून वागतात. वर्तमानपत्रें बंद केलीं आहेत. लोकांस निःशस्त्र केले आहेत व स्थानिक आरोग्याच्या बाबतींतसुद्धां त्यांना कोणत्याही प्रकारचें स्वातंत्र्य नाहीं. आयात व निर्गत व्यापार, दलालीचा धंदा, बँका, परकीयांच्या हातीं असून सरकारास उपयोगी पडणारा माल सर्व परदेशांतून येतो. देशांतील लोक नित्राण झाले आहेत व पदोपदीं तेजोभंग होत असल्यामुळें त्यांच्यांत कोणतीच महत्त्वाकांक्षा उरली नाहीं. व देशाच्या उन्नतीचा प्रश्न फार भेसुर दिसत आहे. "

व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या आयुष्यक्रमांत फरक पडण्यास कांहीं अननुभूत प्रसंग यावे लागतात. अशाच प्रकारचा अनुभव १८७५ पासून १८७९ पर्यंत लॉर्ड लिटनसाहेबांच्या उद्दाम व बेपर्वाईच्या

वर्तनामुळें येथील लोकांस प्राप्त झाला. सर्व राष्ट्राचा संतोष संपादन करण्याचें पुण्य ज्याप्रमाणें लॉर्ड रिपन किंवा लॉर्ड हार्डिंज यांसारख्या असामान्य व लोकोत्तर महाभागास संपादन करतां येतें, त्याप्रमाणें सर्व राष्ट्राचा क्षोभ उत्पन्न करण्याचें अपेशही मनुष्यकोटींतील लॉर्ड कर्झन किंवा लॉर्ड लिटन यांसारख्या अद्वितीय प्राण्यासच मिळवितां येतें. लॉर्ड कर्झनसाहेबांच्या कारकीर्दीनें जो असंतोष उत्पन्न केला व ज्याचीं कटु फळें आपण अद्यापि अनुभवीत आहों, अशाच प्रकारचा असंतोष सर्व देशभर लॉर्ड लिटनसाहेबांच्या कारकीर्दीमुळेंच पसरून गेला. दोघांच्याही कारकीर्दीत अविश्वासाचें एकच प्रतिगामी धोरण होतें. लिटनसाहेबांनीं उच्च शिक्षणाची हेटाळणी केली व विश्वविद्यालयास नांवें ठेविलीं; व सर्व विद्यासंस्था Educational hotbeds and forcing houses असे कुत्सितपणाचे आरोप केले. कर्झनसाहेबांनीं विश्वविद्यालयाचे हक्क मर्यादित करून त्यांस सरकाराच्या ताटाखालील मांजरें करण्याचा प्रयत्न केला. लिटनसाहेबांनीं मुद्रणस्वातंत्र्यावर गदा घालून एतद्देशीय वर्तमानपत्रांची मुस्कुटदाबी केली. लॉर्ड कर्झनसाहेबांनीं राजद्रोहाच्या नांवाखालीं अनेक वर्तमानपत्रकारांस अडचणींत आणलें. लिटनसाहेबांनीं राणीच्या जाहिरनाम्यास बाजूस ठेवून व १८३३ च्या कायद्यास झुगारून देऊन एतद्देशीय लोकांकरितां कमी दर्जाची व कमी योग्यतेची Statutory Service उत्पन्न केली. कर्झनसाहेबांनीं राणीचा जाहिरनामा म्हणजे एक अशक्य सनद आहे असें उद्दामपणें जाहीर केलें. लिटनसाहेबांनीं अफगाणिस्थानसारख्या हिंदुस्थानाशीं संबंध नसलेल्या राजकारणांत पडून हिंदुस्थानचा पैसा व सैन्य निष्कारण खर्ची घातलें. कर्झनसाहेबांनींही तिबेटच्या मोहिमेंत हिंदुस्थानच्या पैशाचा चुराडा केला व हिंदुस्थानचें सैन्य "शांततेच्या मिशन" कडे योजलें. सर्वत्र दुष्काळ पडला असतां व अन्नान्न करून लोक मरत असतांना लिटनसाहेबांनीं दिल्लीस केवळ आपली बडीजाव करण्याकरितां दरबार भरविला व रयतेचे पैसे नाहक खर्च केले. कर्झनसाहेबांनींही दुष्काळामुळें सर्वत्र विपन्न अवस्था दिसत असूनही हिंदुस्थानांतील गरीब रयतेच्या पैशानें दिल्लीस दरबार भरवून आपली हत्तीवरून मिरवणूक काढली. लिटनसाहेबांनीं हिंदुस्थानांतील प्रजेस निःशस्त्र करण्याचा कायदा करून येथील लोकांबद्दल संपूर्ण अविश्वास व्यक्त केला. कर्झनसाहेबांनींही या अविश्वासाच्या धोरणामुळें लोकांच्या हक्कास आळा घातला. लिटनसाहेबांनीं सुशिक्षित लोकांचा अपमान करून त्यांची भेट घेण्याची किंवा त्यांच्या द्वारें लोकांची दुःखें समजावून घेण्याची पर्वा केली नाहीं. तितक्याच अरेरावीपणानें कर्झनसाहेबांनींही राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांची मुलाखत घेतली नाहीं. प्रजेस नाउमेद करण्याचा, लोकांचे हक्क मर्यादित करण्याचा, अविश्वासामुळें जनतेशीं बेपरवाईनें वागण्याचा व हिंदुस्थानांतील लोकांचा तेजोभंग करण्याचा लिटनसाहेबांचा कित्ता कर्झनसाहेबांनीं हुबेहूब गिरविला. लिटनसाहेबांच्या कारकिर्दीपासून जो राष्ट्रक्षोभ उत्पन्न झाला, तेंच राष्ट्रीय सभेचें बीजारोपण होय. या क्षोभामुळें राष्ट्रीय चैतन्य प्रज्वलित झालें व राष्ट्रीय सभेच्या द्वारें तें दृश्यमान झालें.

लॉर्ड लिटनसाहेबांस कदाचित् या घोर निद्रेंत पडलेल्या देशास प्रबुद्ध करण्याकरितांच ईश्वरी संकेतानें येथें पाठविण्यांत आलें असेल. पुष्कळ वेळां महान् संकटांतून किंवा अनर्थापासून अमोप कल्याण घडून येतें. या प्रसंगीं कांहीं अंशीं असाच प्रकार घडून आला. समान दुःखामुळें, किंवा समान जाचामुळें सचेतन समाजांत जीवाची एकरूपता होते. विद्युत्संदेशाप्रमाणें सर्वत्र एकतानता दृष्टीस पडते. लिटनसाहेबांच्या सर्वव्यापी दडपशाहीच्या धोरणामुळें सर्वत्र उद्वेग, संताप व अस्वस्थपणा उत्पन्न झाला व त्यापासूनच एकराष्ट्रीयत्वाची कल्पना मूर्तपणें प्रादु-

भूत झाली. उत्क्रांतीच्या दृष्टीनें कोणताही परिणाम घडून येण्यास कारणांचा समुच्चय असावा लागतो. राष्ट्रीय सभेसारखी संस्था एखाद्या व्यक्तीच्या कल्पना-तरंगापासून उद्भवली नाहीं किंवा यदृच्छेनें ती निर्माण झाली नाहीं. अशा तऱ्हेची अत्यंत महत्त्वाची संस्था जिला " राष्ट्रजननी " असें अन्वर्थ नामाभिधान दिलें आहे, ती अस्तित्वांत येण्यास कोणती कारणपरंपरा देशांत प्रचलित होती याचा येथपर्यंत विस्तार केला आहे.

लिटनसाहेब गेल्यानंतर लॉर्ड रिपन हिंदुस्थानचे व्हाइसरॉय झाले व नवीन मनूस प्रारंभ झाला. रिपनसाहेबांनीं अफगाणिस्थानची लढाई संपवून टाकिली, यासंबंधीं हिंदुस्थानास योग्य मदत साम्राज्य सरकाराकडून देवविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. वर्तमानपत्रांचा कायदा रद्द केला. मिठावरील कर कमी केला. साऱ्याच्या तहकुबीबद्दल व माफीबद्दल पुष्कळ सवलती दिल्या. वरिष्ठ शिक्षणाला उत्तेजन दिलें. एज्युकेशन कमिशन नेमून प्राथमिक व उच्च प्रकारचें शिक्षण वाढविण्याची खटपट केली. खासगी शिक्षणसंस्थांना उत्तेजन देण्याचा क्रम सुरू झाला. स्थानिक स्वराज्य अस्तित्वांत आणून म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें स्थापन केलीं. निर्भीड व स्वतंत्र विचारांच्या लोकांच्या पुढाऱ्यांस कायदेकौन्सिलांत नेमण्याचा परिपाठ घातला. वरिष्ठ प्रतीच्या जागांवर एतद्देशीय लोकांस नेमण्यास सुरवात झाली. बंगालच्या चीफ जस्टिसच्या जागीं तात्पुरती कां होईना प्रथमतः हिंदी गृहस्थाची नेमणूक करण्यांत आली. देशांत तयार होणारा माल सरकारी कारखान्यांस लागल्यास अवश्य विकत घेण्यांत यावा असा ठराव करण्यांत आला. व्हिक्टोरिया स्कॉलरशिपाच्या रूपानें शिष्यवृत्ती देऊन हिंदी लोकांस वाकबगार करण्याचे प्रयत्न सुरू झाले. प्रांतिक करारास व्यवस्थित स्वरूप देऊन जमाबंदीची योग्य शिस्त लाविली. शेतकीच्या खात्याचें पुनरुज्जीवन केलें. शेतकऱ्यांच्या ऋणविमोचनाकरितां कायदा अस्तित्वांत आणिला. दुष्काळाचे वेळीं साऱ्याच्या तहकुबीचे व माफीचे नियम केले. ज्यूरीच्या पद्धतीचा फैलाव केला. दुष्काळनिवारणार्थ उभारलेल्या फंडाची व्यवस्था केली. याप्रमाणें अनेक लोकहिताच्या प्रश्नांत लक्ष घालून उदारबुद्धीनें व सहनुभूतीनें त्यांनीं लोकांचें सांत्वन केलें. राणीसरकारच्या जाहिरनाम्यावरील लोकांचा विश्वास दृढतर केला. दीर्घकाल अवर्षणानंतर मेघवृष्टि झाली असतां ज्याप्रमाणें सर्वत्र प्रसन्नता उत्पन्न होते, त्याचप्रमाणें लिटनशाहीच्या संतापामुळें त्रस्त झालेले लोक रिपनसाहेबांच्या उदार व प्रेमळ कारकीर्दीनें संतुष्ट झाले. सर्वत्र शांतता दिसूं लागली. रिपन साहेबांच्या कारकीर्दींत इंग्रजी व हिंदी मॅजिस्ट्रेटास कोणत्याही गुन्हेगाराची चवकशी करण्याचा अधिकार देण्याबद्दल एक बिल कौंसिलांत आलें होतें. या बिलाच्या योगानें युरोपियन ब्रिटिश प्रजाजनांची चवकशी करण्याचा अधिकार क्रिमिनल प्रोसीजर कोड प्रमाणें हिंदी व युरोपियन मॅजिस्ट्रेटास सारखाच देण्यांत आला होता. हें बिल इल्बर्ट साहेबांनीं कौंसिलापुढें मांडिलें, या योगानें अँग्लो-इंडियन व युरोपियन अधिकारी वर्गांत एकच खळबळ उडून गेली. बिलाचा निषेध करण्याकरितां जोराची चळवळ चालू झाली. वर्तमानपत्रांतून, सभांतून व अर्जीच्या द्वारें अँग्लो-इंडियन लोकांनीं हें बिल हाणून पाडण्याकरितां भगीरथ प्रयत्न केले; लार्ड रिपनसाहेबांस लाखोली वाहण्यास सुरवात झाली. त्यांना देशद्रोही म्हणण्यांत आलें. या बिलाच्या योगानें सर्व ब्रिटिश राजसत्ता उलथून पडणार असा बाष्कळ कोटिक्रम अँग्लो-इंडियन लोकांनीं व युरोपियन सत्ताधारी वर्गानें सुरू केला. अँग्लो-इंडियन लोकांचे इंग्लंडांतील सर्व हितचिंतकांनींही विलायतेंतील लोकमत प्रक्षुब्ध केलें. ब्रिटिश राजसत्तेवर या बिलानें मोठें संकट ओढवणार आहे असा सर्वत्र पुकारा झाला व जिकडेतिकडे या बिलाची

चर्चा होऊं लागली. कांहीं काळपर्यंत या बिलाशिवाय दुसरा विचाराचा विषयच नाहीं असें होऊन गेलें. हिंदुस्थानांतील सर्व युरोपियन सत्ताधारी वर्ग या बिलास विरोध करीत होता. अर्थात् इतक्या प्रचंड चळवळीमुळें हें बिल मंजूर झालें नाहीं. युरोपियन ब्रिटिश प्रजाजनांची चवकशी करण्याचा अधिकार फक्त हिंदी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व सेशन जज यांनाच देण्यांत आला व इतरांना तो हक्क देण्यांत आला नाहीं. कायद्यांतील या संबंधाची उद्वेगजनक विषमता क्रिमिनल प्रोसीजर कोडचीं ४४३।४६३ कलमें वाचलीं असतां कोणासही दिसून येणार आहेत. पार्लमेंटाचे कायदे व राणीसरकारचा जाहिरनामा यांच्या स्पष्ट शब्दांचा निषेध करून, जातिविशिष्ट असमता, ॲंग्लो-इंडियन सत्ताधारी वर्गानें आपल्या हिताकरितां कशी घडवून आणिली हें मनन करण्यासारखें आहे. वस्तुतः या बिलामध्यें राणीच्या जाहिरनाम्यास धरूनच हिंदी व युरोपियन मॅजिस्ट्रेटास समसमान हक्क दिले होते, परंतु गुन्हेगार युरोपियन असला तरी त्याची कायद्याप्रमाणें चवकशी करण्याचा अधिकार शासित वर्गापैकीं कितीही इभ्रतीचा मॅजिस्ट्रेट असला तरी त्यास असूं नये असा ॲंग्लो-इंडियन लोकांचा हट्ट होता. व या हट्टाच्या बुडाशीं जित व जेते यांचेमधील संबंधाची भावनाच अत्यंत प्रबळ होती. आपण राज्यकर्त्यांच्या जातीचे आहोंत व आपला दर्जा अत्यंत श्रेष्ठ आहे ही अहंकारवृत्ति ॲंग्लो-इंडियन समाजानें अत्यंत उद्दामपणानें या प्रसंगीं प्रगट केली. या चळवळीमुळें राष्ट्रोन्नतीच्या कार्यांत एक महत्त्वाचा लाभ एतद्देशीय लोकांस झाला हिंदुस्थानांतील सर्व राजसत्ता ॲंग्लो-इंडियन लोकांच्या हातीं आहे, हिंदुस्थानांतील लोकांना कोणताही फायद्याचा किंवा मानाचा राज्यकारभारांतील वांटा देणें म्हणजे ॲंग्लो-इंडियन लोकांचें तितक्या अंशानें नुकसान करणेंच होय, हिंदुस्थानांतील लोकांचा स्वातंत्र्याचा खरा झगडा ॲंग्लो-इंडियन सत्ताधारी वर्गाबरोबरच (Bureaucracy) आहे, व हा सत्ताधारी वर्ग पदोपदीं निकराचा विरोध केल्याशिवाय आपल्या हातांतील सत्ता सोडण्यास कधींही तयार होणार नाहीं ही जाणीव इल्बर्ट बिलाचे चळवळीमुळें, हिंदुस्थानांतील लोकांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली. आपल्या उन्नतीच्या मार्गांतील बलवत्तर अडचण त्यांचे नजरेस आली. लिटनशाहीमुळें देशांत राष्ट्रीय चैतन्य उत्पन्न झालें. एकराष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली. इल्बर्ट बिलाच्या योगानें आत्मप्रत्ययाची जोड राष्ट्रीय चैतन्यास मिळाली. बाह्य उपाधींची शक्ति व व्यापकपणा यांचें यथार्थ आकलन करतां आलें. व आत्मोन्नतीच्या कामांत योग्य दिशेनें हिमतीनें व आत्मविश्वासानें कर्तव्य करण्याची बुद्धि निर्माण झाली. अशा रीतीनें प्रज्वलित झालेलें राष्ट्रीय तेज 'सहस्रशीर्षा पुरुषाः सहस्राक्षः सहस्रपाद्' अशा व्यापक स्वरूपानें राष्ट्रीय सभेच्या द्वारें मूर्तिमंतपणें उदयास आलें. राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीची वरीलप्रमाणें मीमांसा आहे.

इल्बर्ट बिलामुळें लार्ड रिपन साहेबांबद्दल जितकी अप्रीति युरोपियन लोकांनीं दाखविली त्यापेक्षां कित्येकपटीनें निःसीम कृतज्ञताबुद्धि हिंदी लोकांनीं प्रदर्शित केली. हिंदुस्थानचा खरा वाली व हितकर्ता हा थोर पुरुष आहे असे उद्गार सर्व आबालवृद्धांच्या तोंडून निघाले. आपली कारकीर्द संपवून लार्ड रिपन जेव्हां स्वदेशीं परत जाण्यास निघाले तेव्हां सर्व हिंदी प्रजेस फार हळहळ वाटली. आपल्या जिव्हाळ्याचा पुरस्कर्ता आपल्यास सोडून दूर जात आहे या विचारानें मन उद्विग्न झालें. ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं मुंबईस येऊन रिपनसाहेबांचा निरोप घेतला. हजारों मानपत्रें सादर केलीं. नुसत्या महाराष्ट्रांतून दीडलक्ष लोकांनीं सह्या केलेलीं मानपत्रांचीं नऊ प्रचंड पुस्तकें सार्वजनिक सभेच्या मार्फत रिपन साहेबांस अर्पण करण्यांत आलीं होतीं. ता. १७ डिसेंबर १८८४ रोजीं रिपनसाहेब मुंबईहून विलायतेस गेले.

या प्रसंगानिमित्त देशांतील ठिकठिकाणचे पुढारी मानपत्रें अर्पण करण्याकरितां एकत्र झाले होते. सर्वांच्या भेटी झाल्या. सर्वांचें हृद्गत एकच असल्यामुळें अशा तऱ्हेचे भेटीचे प्रसंग वरचेवर यावे याबद्दल वाटाघाट झाली. हिंदुस्थानांतील सुशिक्षित जनतेचे पुढारी निरनिराळ्या ठिकाणांहून राजकीय बाबतींसंबंधीं आजपर्यंत कधींही एकत्र जमले नव्हते. या अपूर्व प्रसंगामुळें व त्यापासून उत्पन्न झालेल्या स्फूर्तीमुळें राष्ट्रांतील पुढाऱ्यांस, एकत्र जमून विचारांची अदलाबदल करण्याची उपयुक्तता स्पष्टपणें कळून आली. **राष्ट्रीय सभेच्या प्रथम अधिवेशनाचें हेंच पुण्याहवाचन होय.**

राजकीय चळवळीचा प्रारंभ.

बंगाल्यांत प्रथमतः राजा राममोहनराय यांनीं केला. १८३२ सालीं राममोहनराय विलायतेस गेले होते व त्यांनीं हॅाउस ऑफ कॉमन्सच्या कमेटीपुढें हिंदुस्थानच्या स्थितीबद्दल साक्ष दिली होती. राजकीय चळवळ करण्याकरितां १८५१ सालीं बंगाल्यांत ब्रिटिश इंडियन असोशिएशन स्थापन करण्यांत आली. मुंबई इलाख्यांत बाँबे असोशियशन अस्तित्वांत आली. बंगालच्या संस्थेचे प्रसन्नकुमार टागोर, डा. राजेंद्रलाल मित्र व क्रिस्टोदास पाल हेच पुढारी होते. मुंबईच्या संस्थेचे दादाभाई नवरोजी, सर मंगळदास नथुभाई, जगन्नाथ शंकरशेट व नवरोजी फरदुनजी हेच चालक होते. याशिवाय देशामध्यें राजकीय चळवळ वर्तमानपत्रांच्या द्वारें सुरू होती. १८७५ चे सुमारास सुमारें ४७८ वर्तमानपत्रें अस्तित्वांत होतीं व देशांतील सर्व भाषांतून तीं निघत होतीं. १८७६ चे सुमारास बंगाल्यांत इंडियन असोशिएशन Indian Association नांवाची संस्था स्थापण्यांत आली. ब्रिटिश इंडियन असोसिएशन ही जमीनदार व श्रीमान् गृहस्थांनीं चालविली होती. ही नवीन संस्था सुशिक्षित व उत्साही तरुणांनीं पुढाकार घेऊन अस्तित्वांत आणिली. सुरेंद्रनाथ बानर्जी व आनंदमोहन बोस हेच तिचे आधारस्तंभ होते. १८७९चे सुमारास मुंबई इलाख्यांत सार्वजनिक सभेची संस्था स्थापन होऊन तिच्या मासिकाच्या द्वारें देशांतील सर्व राजकीय प्रश्नांचा खल फार व्यापकपणानें, मुद्देसूदपणानें व भारदस्तपणानें होऊं लागला. रावबहादूर रानडे, सितारामपंत चिपळूणकर, रावबहादूर नूलकर हेच या संस्थेचे प्रमुख चालक होते. सार्वजनिक सभा आपल्या अलौकिक तेजानें फार थोड्या काळांत सरकारच्या आदरास पात्र झाली. खऱ्या राजकीय शिक्षणाचा शास्त्रोक्त रीतीनें प्रसार या सभेनें केला. मद्रासेस १८७८ सालीं आनंदाचार्लू, वीरराघवाचार्य, जी. सुब्रह्मण्य आयर व रंगया नायडू यांनीं सुप्रसिद्ध हिंदू पत्र सुरू केलें. व १८८४ चे सुमारास मद्रास महाजनसभा स्थापन केली. बंगाल, मुंबई व मद्रास या ठिकाणीं याप्रमाणें राजकीय उन्नतीच्या प्रश्नांची चर्चा होण्यास प्रारंभ झाला. परंतु हे सर्व प्रयत्न व्यक्तिशः निरनिराळे असून त्यांच्यांत कोणतीही एकवाक्यता नव्हती. लोकमत जागृत करण्याचा क्रम प्रथमतः बंगाल्यांत सुरू झाला. १८७७ सालीं लिटनशाहींत सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेचें वय कमी झालें. वयोमर्यादेची वाढ व समकालीन परीक्षेची आवश्यकता देशांतील लोकांस भासवावी या हेतूनें सर्व देशभर व्याख्यानांची मोहीम सुरू करण्याचें कलकत्त्यास ठरलें. कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्यें एक जंगी जाहीर सभा भरली होती. त्या सभेनें बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांस या प्रश्नाबद्दल लोकमत सुशिक्षित करण्याकरितां पाठवून दिलें. सुरेंद्र बाबूंनीं उत्तरहिंदुस्थानांत बनारसेपासून रावळपिंडीपर्यंत व्याख्यानें दिलीं. आपल्या अलौकिक वक्तृत्वानें या सुधारणेबद्दल लोकांमध्यें कळकळ उत्पन्न केली. तसेंच सन १८७८ सालीं पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांत सुरेंद्र बाबूंनीं प्रवास केला. मुंबई, सुरत, अहमदाबाद, पुणें व मद्रास या ठिकाणीं जाहीर व्याख्यानें दिलीं. राजकीय प्रश्नांबद्दल ठिकठिकाणचें लोकमत जागृत करण्याचा व त्यांत ऐक्य-

भाव उत्पन्न करण्याचा हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासांत हा पहिलाच प्रयत्न म्हणण्यास हरकत नाहीं. एकराष्ट्रत्वाची भावना अद्याप या देशांत उत्पन्न झाली नव्हती. परंतु ती उत्पन्न करण्याचा प्रयत्न मात्र या वेळीं सुरू झाला. लिटनशाहीमध्यें दिल्लीस दरबार भरला होता. देशांतील निरनिराळ्या प्रांतांतून पुष्कळ पुढारी एकत्र जमले होते. हाही एकत्र जमण्याचा प्रसंग अगदीं अपूर्व होता. यावेळीं जरी सरकारच्या कृपाछत्रांतीलच पुष्कळ थोर लोक एकवटले होते. तथापि स्थानमाहात्म्यानें, पूर्ववैभवाच्या संस्मरणानें, इतिहासाच्या आठवणीनें, लिटन साहेबांच्या अप्रयोजकपणामुळें व रयतेच्या पैशाच्या होत असलेल्या अपव्ययामुळें जमलेल्या लोकांपैकी रावसाहेब मंडलीक, नवरोजी फरदुनजी, सर मंगळदास नथुबाई, अशा बाणेदार पुरुषांस उद्वेग वाटला. लिटनसाहेबांसारख्या अनुदार व्हाइसरॉयसाहेबांस लब्धप्रतिष्ठेकरितां हिंदुस्थानांतील संपन्न लोकांस जर एकत्र गोळा करतां येतें, तर हिंदुस्थानांतील प्रजेसही आपल्या सुखदुःखांचा विचार करण्याकरितां एकत्र कां जमतां येऊं नये, या कल्पनेचा अंकुर उत्पन्न झाला. ठिकठिकाणचे पुढाऱ्यांचे विचारांस या दृष्टीनें चालन मिळालें. समवायानें व एकत्र जमण्यानें पुष्कळ वेळां विचारांची अदलाबदल करण्यास मदत होते. १८८४ सालीं कलकत्यास ग्रेट इंटरनॅशनल एक्झिबिशन या नांवाचें एक प्रदर्शन भरलें होतें. हें प्रदर्शन पाहण्याकरितां पुष्कळ लोक जमले होते. या प्रसंगाचे वेळींच राष्ट्रीय सभेची कल्पना अस्तित्वांत आली असें मि. मरडॉक यांनीं विधान केलें आहे. चैनीनें व जिवाची करमणूक करण्याकरितां गोळा झालेल्या लोकांत उत्सवाच्या व मुक्तोपभोगाच्या प्रसंगीं राष्ट्रीय सभेसारख्या गंभीर प्रश्नाची कल्पना उत्पन्न झाली असेल हें संभवत नाहीं. १८८३ सालीं Indian Association (इंडियन असोशिएशन)च्या मार्फत नॅशनल कॉन्फरन्स म्हणून एक सभा भरली होती. या सभेस बंगाल्यांतील पुष्कळ सुशिक्षित लोक आले होते. सभेच्या सुरवातीस दिल्ली येथील समारंभास उद्देशून देशांतील तरुण व उत्साही लोकांस एकत्र जमवून आपल्या हितानहिताच्या प्रश्नांबद्दल विचार करण्याची सुरेंद्र बाबूंनीं विनंती केली. होतकरू तरुण लोकांत फार उत्साह उत्पन्न झाला. देशाच्या परिस्थितीचें ते मनन करूं लागले. एकत्र जमून देशोन्नतीच्या कार्यास प्रारंभ करावा असें त्यांस वाटूं लागलें. १८८४ सालीं बंगाल्यांत नॅशनल लीग या नांवाची संस्था अस्तित्वांत आली. सर जितेंद्रमोहन टागोर हे तिचे उत्पादक होते. १८८४ च्या सुमारास बंगाल्यांत राजकीय सुधारणेबद्दल विचार करणाऱ्या तीन संस्था अस्तित्वांत होत्या. ब्रिटिश इंडियन ॲसोसिएशन, इंडियन ॲसोसिएशन, व नॅशनल लीग. १८८३ प्रमाणेंच १८८५ सालीं नॅशनल कॉन्फरन्सची दुसरी बैठक बोलावण्याचें या तिन्ही संस्थांच्या पुढाऱ्यांनीं ठरविलें. परंतु ही परिषद् सर्व राष्ट्राची नसून एका प्रांताची होती.

लिटन साहेबांच्या कारकीर्दीत सर्वत्र उत्पन्न झालेल्या उद्विग्नतेमुळें एकराष्ट्रीयत्वाचा उदय कसा झाला होता हें वर निर्दिष्ट केलेंच आहे. व राष्ट्रीय सभेची कल्पना अधुंकपणें कांहीं थोड्या लोकांस लिटनशाहींत कशी भासूं लागली हेंही वर नमूद केलें आहे. रिपन साहेबांस निरोप देतांना या कल्पनेला कसें निश्चित स्वरूप प्राप्त झालें याचेंही वर्णन आम्हीं पूर्वी केलें आहे. परंतु वर्तमानपत्रांतून, सभांतून, ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांच्या विचारांतूनही जी ऐक्याची भावना दिसत होती, तिचा अजमाव घेऊन तिला मूर्तस्वरूप देण्याचें मुख्य श्रेय मि. ह्यूम यांचेकडेच आहे. मि. ह्यूम हे सरकारी नोकरींत असतांना त्यांची न्यायप्रियता, उदार बुद्धि, प्रजावात्सल्य व हिंदी लोकांबद्दल निःसीम प्रेम हें सर्वविश्रुत होतें. ह्यूमसाहेब हिंदुस्थान सरकारचे अंतर्गत राज्यव्यवस्था खात्याचे मुख्य सेक्रेटरी (Home Secretary) होते. येथील लोकांविषयींच्या सहा-

नुभूतीमुळेंच त्यांना याहून बढतीची जागा मिळाली नाहीं. १८८२ सालीं त्यांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. त्यांनीं सिमल्यासच कायम राहून आपलें आयुष्य हिंदुस्थानच्या उन्नतीकरितांच खर्च करण्याचें ठरविलें. ह्या उद्देशानेंच त्यांनीं १८८३ मार्चच्या पहिल्या तारखेस कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या ग्रॅजुएटांस एक अनावृत पत्र लिहिलें आहे. त्यांत देशांतील सर्व तरुणांस त्यांनीं फार कळवळ्याची विनंती केली आहे. परकीय लोकांना या देशाबद्दल कितीही प्रेम वाटलें, त्यांनीं कितीही पैसे खर्च केले, कितीही श्रम केले, कितीही झीज सोशिली, तरी परकीपणामुळें देशोन्नतीच्या कार्यास यावें तसें यश येणार नाहीं. या कामीं देशांतील तरुणांनींच पुढाकार घेतला पाहिजे असे त्यांनीं स्पष्ट उद्गार काढले आहेत.

"In vain may aliens like myself love India and her children as well as the most loving of these; in vain may they for her and their good give time and trouble, money and thought; in vain may they struggle and sacrifice; they may assist with advice and suggestions. They may place their experience, abilities and knowledge at the disposal of the workers, but they lack the essential of nationality and the real work must ever be done by the people of the country themselves."

यासाठीं देशांतील सुशिक्षितांनीं देशोन्नतीचें कार्य आपल्या शिरावर घेतलें पाहिजे व हें काम एका दोघा व्यक्तींचें किंवा निरनिराळ्या व्यक्तींनीं आपापल्या कलाप्रमाणें व सोईप्रमाणें करण्याचें नसून समवायानें, एकोप्यानें, शिस्तीनें व ठराविक मार्गानेंच केलें पाहिजे. या कामीं स्वार्थत्यागाची जरूर आहे. एकाच उदात्त भावनेनें जरी ५० लोक या कार्यास वाहून घेतील तरी या कार्याची मजल पुष्कळ पुढें जाईल. अशा कामीं पुढाकार घेणारे लोकांचे अंगीं शुद्ध चारित्र्य, देशोन्नतीबद्दल निस्सीम तळमळ, प्रगल्भ बुद्धि, उदार शिक्षण, योग्य संस्कार, स्वार्थत्यागाची तत्परता, शील, धैर्य व विचाराची समता हे गुण असले पाहिजेत. अशा तऱ्हेचे सुशिक्षित लोक या कामीं पुढें यावेत अशी त्यांनीं आग्रहाची विनंती केली. ठिकाठिकाणच्या लोकांस ह्यूमसाहेबांनीं पत्रें लिहिलीं. राष्ट्रजागृतीच्या कामास कांहीं तरी वळण लागावें या हेतूनें एकत्र जमण्याची आवश्यकता त्यांनीं जोरानें प्रतिपादन केली. कराची, अहमदाबाद, सुरत, मुंबई, पुणें, मद्रास, कलकत्ता, बनारस, अलाहाबाद, लखनौ, आणि लाहोर या ठिकाणीं राजकीय प्रश्नांचा विचार करणाऱ्या संस्था होत्या, त्या सर्वांबरोबर त्यांनीं पत्रव्यवहार केला. एकादी सर्व राष्ट्रांतील पुढाऱ्यांची परिषद् बोलाविल्यास आपण प्रतिनिधि पाठवूं असें त्यांनीं कबूल केलें. लॉर्ड रिपनसाहेबांस मानपत्र अर्पण करण्याकरितां मुंबईस ठिकठिकाणचे पुढारी जमल्या वेळीं या कल्पनेस निश्चित स्वरूप प्राप्त झालें. १८८४ च्या अखेरिस इंडियन नॅशनल यूनियन (Indian National Union) या नांवाची संस्था ह्यूम साहेबांच्या चालकत्वाखालीं निर्माण झाली व १८८५ च्या मार्चमध्यें देशांतील सर्व प्रतिनिधींची सभा डिसेंबर मध्यें पुण्यास भरविण्याचें मुक्रर ठरलें. याच वर्षाच्या प्रारंभीं ह्यूमसाहेबांनीं सिमल्यास त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन यांची मुलाखत घेतली. राष्ट्रीय सभा प्रथमतः भरविण्यांत ह्यूमसाहेबांचा विचार मुख्यत्वें करून निरनिराळ्या ठिकाणच्या पुढाऱ्यांस एकत्र करून सामाजिक विषयांची चर्चा करावी व परस्परांत स्नेहभाव वृद्धिंगत करावा हा होता. लॉर्ड डफरिन यांच्या मुलाखतींत त्यांनीं यासंबंधीं आपली नापसंती व्यक्त केली. निरनिराळे धर्म, निरनिराळ्या जाती, निरनिराळ्या रूढी व निरनिराळे रिवाज यांकडे लक्ष दिलें असतां येथील पुढाऱ्यांत सामाजिक

बाबतींत एकवाक्यता होणें डफरिनसाहेबांस अशक्य वाटलें व त्यांनीं राजकीय प्रश्नांची चर्चा करण्याबद्दल ह्यूमसाहेबांस सुचविलें. इग्लंडांतील राजकारणांत पक्षभेद असतात. अधिकारारूढ पक्षाला देशांतील लोकमत विरुद्ध बाजूकडून (opposition) उघडपणें समजत असतें. हिंदुस्थानांत अशा तऱ्हेची संस्था नाहीं व राज्यकर्त्यांना येथील लोकांचें मत समजण्यास कोणतेंही साधन नाहीं. वर्तमानपत्रांवरून लोकमत निदर्शनास येतें; परंतु इंग्रजी भाषेंत चालू असलेल्या व राज्यकर्त्यांना समजणाऱ्या वर्तमानपत्रांची संख्या फार मर्यादित आहे व त्यांपैकीं फारच थोडीं जबाबदारीनें चालविलेलीं असतात. यासाठीं देशांतील विद्वान् लोकांनीं एकत्र जमून राजकीय गोष्टींचा खल केला व समवायानें निरनिराळ्या राजकीय प्रश्नांबद्दल लोकमत सरकारच्या नजरेस आणिलें, राज्यव्यवस्थेंतील उणिवा व राज्यकारभारासंबंधीं सुधारणा सरकारपुढें ठेवल्या, तर सरकारास फार मदत होईल असें डफरिन साहेबांनीं सुचविलें. तसेंच अशा सभेचें अध्यक्षस्थान गव्हर्नरासारख्या इलाख्याच्या अधिपतीस देऊं नये असेंही डफरिन साहेबांचें मत होतें. दिसेंबरांतील सभेचें अध्यक्षस्थान मुंबई इलाख्याचे लोकप्रिय गव्हर्नर लॉर्ड रे यांस देणेबद्दल कित्येकांचा सल्ला होता. गव्हर्नरसारखा मोठा अधिकारी अध्यक्ष असतांना लोकांस आपले विचार मोकळ्या मनानें बोलून दाखवितां येणार नाहींत असेंही लॉर्ड डफरिन यांनीं सांगितलें. डफरिनसाहेबांचा भारदस्त उपदेश सर्वांस पसंत पडला व डिसेंबरांत भरणाऱ्या सभेंत राजकीय विषयांची वाटाघाट करण्याचें ठरलें. इतकी तयारी झाल्यानंतर ह्यूमसाहेब इंग्लंडास गेले. त्याचप्रमाणें त्यांनीं तेथील हिंदुस्थानच्या हितचिंतकांचा सल्ला घेतला. सर जेम्स केअर्ड, जॉन ब्राईट, लॉर्ड रिपन, बॅक्सटर, आर. टी. रीड (लॉर्ड लोरबर्न) हे हिंदुस्थानचे त्यावेळीं पार्लमेंटांतील पुरस्कर्ते होते, त्यांनींही प्रोत्साहन दिल्यानंतर ह्यूमसाहेब हिंदुस्थानांत परत आले.

पहिली बैठक.

इंडियन नॅशनल यूनियन या नांवाऐवजीं इंडियन नॅशनल कॉंग्रेस हें नांव सभेस देणेचें ठरलें. डिसेंबर महिना जवळ आला. पुणें येथील सार्वजनिक सभेनें पुढाकार घेऊन सभेची बैठक भरविण्याचें पत्करिलें होतें. वर्तमानपत्रांच्या द्वारें व खासगी पत्रांनीं ठिकठिकाणच्या लोकांस आमंत्रण केलें. सभेनें सर्व तयारी केली. पर्वतीजवळील सुप्रसिद्ध पेशव्यांच्या हिराबागेंतील दिवाणखान्याची जागा मुक्रर करण्यांत आली. प्रतिनिधींच्या स्वागताची सर्व व्यवस्था झाली. इतक्यांत पुण्यास कॉलरा सुरू झाला व बाहेरगांवाहून येणाऱ्या पाहुण्यांस कदाचित् या साथीमुळें अपाय होईल असें समजून पुण्यांतील बैठकीचा बेत रहित झाला. या संबंधीं चित्रमय जगतांतील एका लेखकानें पुण्याहून राष्ट्रीय सभेचें अधिवेशन अधिकाऱ्यांच्या वक्र दृष्टीमुळें मुंबईस गेलें असें ध्वनित केलें आहे. परंतु ही व्यंजना अगदीं खोडसाळपणाची आहे. पुण्यास अधिकाऱ्यांची वक्रदृष्टि झाली तर ती मुंबईस होणार नव्हती अशी थोडीच कोणीं हमी दिली होती? खुद्द व्हाइसरॉयांनीं राष्ट्रीय सभेची कल्पना सुचविली होती. या पहिल्या सभेचें अध्यक्षस्थान मुंबईचे त्यावेळचे गव्हनर लॉर्ड रे यांना देण्याबद्दल वाटाघाट चालू होती. व ना. वेडरबर्न, जार्डिनसारखे अधिकारी राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींस भेटण्यास आले होते. यावरून वरील तर्क किती निराधार आहे तें दिसून येईल.

अगदीं थोडा अवकाश असतांही मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोसिएशननें पुढाकार घेऊन सभेची बैठक मुंबईस भरविण्याचें ठरविलें; व सर्व तजवीज करण्याची जोखीम अंगावर घेतली. २८ दिसेंबर १८८५ रोजीं राष्ट्रीय सभेच्या बैठकीस मुंबईस गवाळी तळ्यावर गोकुळदास तेजपाळ यांच्या संस्कृत कॉलेजाच्या पवित्र जागेंत प्रारंभ झाला. या सभेमध्यें पुष्कळ सरकारी अधिकाऱ्यांनीं हजर राहून

व वादविवादांत प्रत्यक्ष भाग घेऊन आपली सहानुभूती प्रदर्शित केली. ना. सर व्युइल्यम वेडर्नबर्न, न्या. जार्डिन, कर्नल फेल्यस, प्रो. वर्डस्वर्थ, यांसारखे सरकारी बडे अधिकारी सभेस येऊन प्रतिनिधींशीं वाटाघाट करीत होते व त्यांचें अभिनंदन करीत होते. त्याचप्रमाणें डि. एस्. व्हाईट मद्रासचे कलेक्टर, दि० ब० ना. रघुनाथराव, राव. ब. महादेव गोविंद रानडे, आग्र्याचे प्रो. लाला बैजनाथ, अहमदाबादचे प्रो. काथवटे, अरकाटचे प्रो. कादंबी सुरस रामन्, तिरुवेल्लूरचे नरसिंह अयर व पुण्याचे डॉ. भांडारकर हे सरकारी अधिकारीही सभेकरितां मुद्दाम बाहेरगांवाहून आले होते. बारा वाजतां सभेच्या कामास सुरवात झाली. सभेचे अध्यक्ष उमेशचंद्र बानर्जी हे अध्यक्षस्थानीं विराजमान होतांच टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत मोठ्या उल्हासानें त्यांचें स्वागत करण्यांत आलें. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून भिन्न भिन्न जातींचे, चित्रविचित्र पेहेरावाचे, निरनिराळ्या ठेवणीचे उत्साहपूर्ण व राष्ट्रीय प्रेमानें प्रफुल्लित झालेले हिंदमातेचे अनेक पुत्र पाहून परकीय लाकोंनासुद्धां फार कौतुक व आनंद वाटला. हिंदुस्थानच्या खऱ्या हितचिंतकांना तर हा दिवस सोन्याचा भासला. राष्ट्रीय चैतन्याची ही मूर्तिमंत प्रतिमा पाहून कोणत्याही सहृदय मनुष्यास आल्हाद वाटणें अगदीं नैसर्गिक होतें. कराची, विरमगाव, सुरत, पुणें, कलकत्ता, आग्रा, बनारस, सिमला, अलाहाबाद, लाहोर, अंबाला, अहमदाबाद, मुंबई, मद्रास, बेहरामपूर, मच्छलीपट्टण, चिंगलपेट, तंजावर, कुंभकोणम्, मथुरा, तिनवेली, कोइमतूर, सालेम, कडपा, अनंतपूर व बल्लारी या सर्व ठिकाणांहून सुमारें ७२ प्रतिनिधि या सभेस आले होते. पुण्याहून राव ब. नूलकर, गंगाराम भाऊ म्हसके, ज्ञानप्रकाशचे संपादक रामभाऊ साने, सार्वजनिक सभेच्या मासिकाचे संपादक सितारामपंत चिपळूणकर व सेक्रेटरी शिवरामपंत साठे, डॉ. पांडुरंग गोपाळ, प्रो. वामनराव आपटे, रामभाऊ लिमये, केसरी व मराठ्याचे संपादक प्रो. आगरकर असे प्रतिनिधि होते. यांपैकीं आजमितीस रामभाऊ साने हे एकटेच हयात आहेत. मुंबईच्या १८ प्रतिनिधींपैकीं दादाभाई नौरोजी, दिनशा वाछा व सर नारायणराव चंदावरकर येवढेच आजमितीस काळाच्या तडाक्यांतून सार्वजनिक आयुष्यक्रमांत खटपट करीत आहेत. या सभेचें काम ३ दिवस मोठ्या उत्साहानें चाललें. प्रत्येक प्रश्नावर वादविवाद होऊन सभेचें मत निश्चित झालें; व कलकत्यास पुढील सभा भरण्याचें ठरवून सभेचें अधिवेशन पार पडलें. सभेच्या कामांत अध्यक्ष, मद्रासचे ना. सुब्रह्मण्य आयर, मुंबईचे फेरोजशहा मेथा, नरेंद्रनाथ सेन, दयाराम जेठमल, जव्हेरीलाल याज्ञिक, ना. तेलंग, रा. ब. नूलकर, मि. वाछा, मि. मुदलियार, मि. घोसाळ, मि. ह्यूम, मि. पिले, ना. दादाभाई नवरोजी, रा. सितारामपंत चिपळूणकर, मि. आनंदाचार्लू, मि. सयानी, मि. सुब्रायडू, लाला मुरलीधर, राव. ब. रानडे, दिवाण ब. रघुनाथराव, मि. सुंदरराव, मि. चंदावरकर, मि. वीरराघवाचार्य, मि. व्हाइट, मि. मुकरजी, मि. मोदी, मि. स्वामिनाथ आयर, मि. पंतलु, प्रो. रामन्, मि. ध्रुव, मि. अग्निहोत्री या लोकांनीं वादविवादामध्यें व भाषणामध्यें प्रमुखत्वानें भाग घेतला होता. (१) हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेबद्दल रॉयल कमिशन नेमून चवकशी व्हावी. (२) सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचें कौंसिल बंद करण्यांत यावें. (३) वरिष्ठ व प्रांतिक कौंसिलांचे हक्क वाढविण्यांत यावे; व त्यांत लोकनियुक्त सभासदांचें बरेंच प्रमाण असावें. सर्व बजेटें या कौंसिलांनीं मंजूर करावीं, राज्यव्यवस्थेबद्दल सरकारास प्रश्न विचारण्याचा सभासदांना अधिकार असावा, पंजाब व वायव्यप्रांतांत कौंसिलें स्थापन व्हावीं व हाउस कॉमन्सची एक कायमची कमेटी नेमून कौंसिलांतून बहुमतानें एकादी तक्रार सरकार विरुद्ध करण्यांत आल्यास तिचा तिनें विचार करावा. (४) वरिष्ठ प्रतीच्या

नोकरीकरितां इंग्लंडांत व येथें समकालीन परीक्षा घेण्यांत याव्या. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेचें वय तेवीस वर्षांचें असावें व सिव्हिल सर्व्हिसकरितां राखून ठेवलेल्या जागांखेरीज इतर जागा हिंदुस्थानांतच परीक्षा घेऊन भरण्यांत याव्या. (५) लष्करी खर्च कमी करण्यांत यावा. (६) आयात मालावर जकात बसवून व मोठ्या पगाराच्या सरकारी नोकरांवर प्राप्तीचा कर बसवून लष्करी खर्चाची तोंडमिळवणी करण्यांत यावी. (७) उत्तर ब्रह्मदेश खालसा करूं नये व केलाच तर त्याची स्वतंत्र कॉलनी करावी व ती हिंदुस्थानास जोडूं नये. याप्रमाणें पहिल्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींत पुष्कळ वादविवाद व वरील सात महत्त्वाच्या विषयांचा खल होऊन सभेचें मत निश्चित झालें. ही बैठक सर्वतऱ्हेनें यशस्वी झाली असें त्यावेळच्या प्रसिद्ध झालेल्या वर्तमानपत्रांतील अभिप्रायावरून स्पष्टपणें दिसून येत आहे.

१८८५ च्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीच्या वेळींच बंगल्यांतील नॅशनल कॉन्फरन्स National Conference ची दुसरी बैठक भरविण्यांत आली. या बैठकीस बंगल्यांतील सर्व प्रमुख लोक आले होते. सुमारे २०० प्रतिनिधि जमले होते. मि. कॉटन व मि. अमीर अली हेही या बैठकीस हजर होते. रावसाहेब मंडलीक, दरभंग्याचे महाराज, डॉ. गुरुदास बानर्जी, प्यारी मोहन मुकरजी, कालीचंद्र बानर्जी, त्रैलोक्यनाथ मित्र, जयकृष्ण मुकरजी इत्यादि प्रसिद्ध गृहस्थ या समारंभास आले होते. या परिषदेंत ६ ठराव मंजूर झाले.

१ कायदे कौंसिलाची सुधारणा.
२ हत्याराच्या कायद्याची दुरुस्ती.
३ खर्चाच्या बाबतींत काटकसर.
४ समकालीन परीक्षा.
५ न्याय व अमलबजावणी खात्यांची फारकत.
६ पोलिसची सुधारणा.

याप्रमाणें राष्ट्रीय सभा व प्रांतिक सभा या राष्ट्रीय चळवळीच्या दोन अंगांची उत्पत्ति समकालीन झालेली आहे. कांहीं अंशानें वरील हकीकतीवरून प्रांतिक सभेचें अधिवेशन थोडें पूर्वीचें आहे तथापि बंगाल्यांतील लोकांनीं स्थानिक अभिमान बाजूस ठेवून राष्ट्रीय सभेसच अग्रस्थान देऊन तिच्या उत्कर्षासच मनोभावानें मदत केली. एकराष्ट्रीयत्वाची ही भावना बंगाल्यांत प्रथम सुरू झाली हें उत्क्रांतीच्या नियमास अनुसरूनच होतें. ईस्ट इंडिया कंपनीचा अमल बंगल्यांतच प्रथमतः जोरानें सुरू झाला. इंग्रजी शिक्षणाचा व संस्काराचा फायदा बंगाली लोकांसच प्रथम मिळाला. राजकीय चळवळीचा प्रारंभ त्यांनींच केला. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून आजपर्यंत प्रत्येक बैठकीस हजर राहून आपल्या अलौकिक वक्तृत्वानें, विद्वत्तेनें व इंग्रजी भाषेच्या नैपुण्यानें राष्ट्रीय सभेस त्यांनींच उज्ज्वल स्वरूप दिलें आहे. स्वावलंबनाच्या तत्त्वाचा उदय बंगाल्यांतच झाला. देशांतील तेजस्वीपणाचें पुष्कळ श्रेय बंगाल्यांतील राजकीय चळवळीसच आहे. या दृष्टीनें विचार करतां पहिल्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानाचा मान बंगाली गृहस्थास मिळाला हें सर्वतोपरी अनुरूपच झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आक्षेप व त्यांचें निरसन.

राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यानंतर हिंदुस्थानच्या हितशत्रूंकडून तिच्याबद्दल पुष्कळ आक्षेप घेण्यांत आले. युरोपियन वर्तमानपत्रें व युरोपियन सत्ताधारी वर्ग यांचा कटाक्ष या संस्थेवर फार जोराचा होता. त्यांनीं नानाप्रकारचे आरोप करून ही संस्था निर्मूल करण्याचे प्रयत्न केले. सर ऑक्लंड कॉल्व्हिन यांनीं वर्तमानपत्रांत लेख लिहून राष्ट्रीय सभेबद्दल आपला विरोध व्यक्त केला. या सर्व आक्षेपकांचें मुख्य म्हणणें असें कीं, (१) राष्ट्रीय सभा हें नांवच भ्रामक आहे. हिंदुस्थानास एक राष्ट्रच म्हणतां येणार नाहीं. (२) या सभेंतील प्रतिनिधींस

राष्ट्राचे प्रतिनिधि असें नांव धारण करण्याचा अधिकार नाहीं. (३) ही सभा मूठभर सुशिक्षितांची आहे व ते राष्ट्राचे खरे पुढारी किंवा हितचिंतक नव्हत. (४) हिंदुस्थानांतील असंख्य प्रजेस राष्ट्रीय सभेच्या मागण्यांची आवश्यकता वाटत नाहीं. (५) या सभेचें मागणें अशक्य कोटींतील आहे. त्याबद्दलची पात्रता येथील लोकांत मुळींच आलेली नाहीं. (६) या सभेस हिंदुस्थानांतील प्रमुख जातींनीं संमति दिली नाहीं व त्यांनीं या सभेंत पुढाकार घेतलेला नाहीं. (७) ही सभा असंतुष्ट अशा हिंदी सुशिक्षितांची असून ती राजद्रोही आहे. या आक्षेपांचें निरसन राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांनीं व तींतील वक्त्यांनीं अनेक वेळां केलें आहे. या आक्षेपांत आतां कोणताच अर्थ उरला नाहीं; तथापि ऐतिहासिक दृष्ट्या विचार करतांना त्याचा उल्लेख करणें अप्रासंगिक होणार नाहीं. हिंदुस्थानांत अनेक जाति, अनेक धर्म, अनेक भाषा, अनेक पंथ व अनेक समाज आहेत. या सर्वांस एक राष्ट्र म्हणतां येणार नाहीं, असा एक कोटिक्रम आहे. राष्ट्रांतील घटकावयवांना नियमन करणारी शक्ति म्हणजे सरकारच होय. एकाच सरकारच्या राज्यछत्राखालीं असणारे सर्व नागरिक, एकाच कायद्यानें बांधले गेलेले सर्व प्रजाजन, एकाच शासनपद्धतीखालीं सुखदुःख अनुभवणारा जन-समूह, समान हक्क, समान जबाबदारी असलेले सर्व लोक, या सर्वांस एक राष्ट्राचे घटकावयव म्हणतां येईल. अशा तऱ्हेनें एकराज्यछत्राखालीं असलेल्या लोकांत सामाजिक दृष्टीनें कितीही भेद असले तरी राजकीय दृष्ट्या ते एकाच राज्याचे घटक आहेत, असेंच मानावें लागेल व हीच व्याख्या नॅशनल रिव्ह्यूमधील एका विद्वान् लेखकानें केली आहे. Citizens of one country subordinate to one power, subject to one supreme Legislature, taxed by one authority, influenced for weal or woe by one system of administration, urged by like impulses to secure like rights and to be relieved of like burdens. हिंदुस्थानास ही व्याख्या लाविली असतां, येथील सर्व लोक, मग ते कोणत्याही धर्माचे, कोणत्याही जातीचे, कोणत्याही भाषेचे, कोणत्याही वर्णाचे, कोणत्याही समाजाचे असोत—एकाच राजाची प्रजा आहेत, एकाच अमलाखालीं ते राहात आहेत, एकाच कायद्यानें बांधले गेले आहेत, एकाच सत्तेस त्यांजवर कर बसवितां येतो. त्यांचीं सुखदुःखें एकाच प्रकारचीं आहेत. त्यांचे हक्क व जबाबदाऱ्या एकाच स्वरूपाच्या आहेत व उन्नतिबद्दलच्या त्यांच्या मनोवृत्ति एकाच भावनेच्या आहेत. अशा स्थितींत ‘ एक राष्ट्र ’ ही संज्ञा हिंदुस्थानास लावण्यास कोणतीही हरकत नाहीं, असें दिसून येईल. दुसरा एक कोटिक्रम असा आहे कीं, सुशिक्षित लोक हे हिंदुस्थानांतील जनतेचे प्रतिनिधि या शब्दानें म्युनिसिपालिटींतील विशिष्ट वर्णाच्या मतदारानें निवडून दिलेला किंवा विशिष्ट हक्काच्या मनुष्यानें पार्लमेंटांत निवडून दिलेला प्रतिनिधि, असा संकुचित अर्थ करावयाचा असल्यास कायद्याच्या (technical) संज्ञेप्रमाणें सुशिक्षित लोकांस हिंदुस्थानांतील प्रजेचे प्रतिनिधि (representative) असें कदाचित् म्हणतां येणार नाहीं. परंतु प्रतिनिधि म्हणजे पुढारी असा अर्थ केल्यास सुशिक्षित लोक हे हिंदुस्थानांतील लोकांचे पुढारी आहेत, याबद्दल यत्किंचितही शंका बाळगण्याचें कारण नाहीं. हीच कल्पना कोणत्याही सुधारलेल्या देशांत सर्वसंमत झालेली दिसते; सुधारणेचा इतिहास पाहिला असतां, जरी त्या लोकांच्या हिताकरितां असतात तरी त्यांना आपलें हित त्या सुधारणांत आहे असें प्रथम समजत नाहीं; सुशिक्षित लोकांनीं चळवळ करून लोकमत जागृत केलें म्हणजे त्या सुधारणा आपल्या हिताच्या आहेत, असें लोकांस वाटूं लागतें व त्यांना त्यांची आवश्यकता भासूं लागते. सुशिक्षित लोक हे शिक्षणानें व संस्कारानें अधिकारसंपन्न असल्यामुळें वऱ्यावाईटाचें

ज्ञान त्यांस तात्काळ होतें. अज्ञ समाजाला आपलें हितानहित कळण्यास पुष्कळ काळ लागतो. व यासाठींच सुशिक्षित समाज हा देशांतील जनतेचा नैसर्गिक पुढारी आहे. आंधळ्या मनुष्यास किंवा मुक्या मनुष्यास ज्याप्रमाणें डोळस किंवा वाचा-संपन्न माणसाचें साहाय्य लागतें, त्याचप्रमाणें अज्ञा-नांधकारांत असणाऱ्या लोकांची स्थिति आहे. हिंदुस्थानांत साक्षरतेचें प्रमाण जगांतील कोणत्याही सुशिक्षित देशापेक्षां अत्यंत गौण प्रकारचें आहे. ज्या देशांत दर दहा मुलांपैकीं नऊ मुलें अज्ञानांध-कारांत चांचपडत आहेत व दर पांच गांवांपैकीं चार गांवांत शिक्षणाची मुळींच सोय नाहीं, अशा देशांतील लोकांत आत्मस्थितीबद्दल निबिड अज्ञान असल्यास आश्चर्य कोणतें ? व याचसाठीं सुशिक्षित लोकांनीं आपल्या अज्ञ देशबांधवांकरितां पुढाकार घेणें अत्यंत अवश्य आहे.

तिसरा आक्षेप ही सभा मूठभर सुशिक्षितांची असून ते देशाचे खरे पुढारी नव्हेत, असा आहे. इंग्रजी इतिहासाचें अध्ययन करणारास हा आक्षेप नित्य परिचयांतील आहे. इंग्लंडांतील कोणत्याही सुधारणेचा इतिहास पाहिला असतां सुधारणा घड-वून आणणारे लोकांस अशींच नांवें ठेवण्यांत आलीं होतीं. परंतु दूरदर्शी पुढाऱ्यांनीं अशा आक्षेपांकडे यत्किंचितही लक्ष न देतां आपले प्रयत्न अव्याहत-पणें चालू ठेविले व दीर्घ परिश्रमानें त्यास यशःप्राप्ति झाली. पार्लमेंटच्या निवडणूकीच्या हक्काची सुधारणा (Reform Bill), कॅथॉलिक लोकांची राजकीय हक्कप्राप्ति (Catholic Imancipation Bill), गुलामांची मुक्तता (Anti-slavery agitation), ॲण्टी—कॉर्न लॉ लीग, वगैरे इंग्लंडांतील नामांकित चळवळींपासून हाच बोध घेण्यासारखा आहे. या सर्व सुशिक्षित पुढाऱ्यांनींच आपल्या अज्ञ देशबांधवां-करितां सुरू केल्या होत्या.

रिफार्म बिल.

१८३१ पर्यंत हॉउस ऑफ कॉमन्सच्या निवड-णुकीची पद्धत अगदीं असमाधानकारक होती, कॉमन्स सभेंतील पुष्कळ सभासद इंग्लंडचे राजे व लॉर्डस् यांचे हस्तक होते, त्यायोगानें कॉमन्स सभेंतील मता-धिक्य पैशाच्या लांचलुचपतीच्या व इतर अत्यंत निंद्य मार्गांनीं घडवून आणतां येत असे. कित्येक गांवांतून दहा पांच लोकांसच प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क असे. खुद्द राजघराण्यास कित्येक प्रतिनिधि पाठ-वितां येत असत. इंग्लंडांतील लीडस्, बर्मिंगहॅम, मॅन्चेस्टर अशा महत्त्वाच्या शहरांस प्रतिनिधि पाठ-विण्याचा मुळींच हक्क नव्हता. सुमारें ३५ गांवांस मतदारांची संख्या मुळींच नसतांना ७० प्रतिनिधि पार्लमेंटास पाठविण्याचा हक्क होता, व हे ७० प्रतिनिधि या गांवच्या जमीनदारांच्या हातां-तील बाहुलींच होतीं म्हणण्यास हरकत नाहीं. एडिंबरो, ग्लासगो अशा प्रसिद्ध शहरांतून सुद्धां २५।३० लोकांपेक्षां जास्त लोकांस मत देण्याचा अधिकार नव्हता; व सर्व स्कॉटलंड देशांत चार हजारांपेक्षां जास्ती मतदारांची संख्या नव्हती. आयर्लंडामध्यें याहूनही वाईट स्थिति होती. कोण-त्याही प्रकारची स्थावर मिळकत नसतांना मत देण्याचा अधिकार कित्येक लोकांस दिला होता व असे लोक ज्या ठिकाणीं राहात त्यांनीं त्या गांवच्या जमीनदारास मतें दिलीं पाहिजेत अशी वहिवाट होती. या योगानें थोड्याशा श्रीमान् जमीनदार लॉर्डांना आयर्लंडच्या वतीनें असलेल्या प्रतिनिधींपैकीं दोन तृतीयांश प्रतिनिधि निवडण्याचा हक्क मिळालेला होता. सामान्यपणें धनिक, संपन्न व जमीनदार अशा थोड्या सरदार लोकांच्या हातांत पार्लमेंटचे प्रति-निधि पाठविण्याचा हक्क असे; व त्या योगानें त्यांचें वजनही राज्यकारभारांत फार होतें. पार्लमेंटांत पाठ-विलेल्या एका अर्जांत असें नमूद केलें होतें कीं, अवघ्या ८४ लोकांना १५७ प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार होता, व ७० वजनदार लोकांना १५० प्रतिनिधींना आपल्या हुकमतींत ठेवितां येत असे. याप्रमाणें पार्लमेंटचे निम्याहून अधिक सभासद पार्लमेंटांत पाठविण्याची शक्ति अवघ्या दीडशें

लोकांच्या हातीं होती. ही स्थिति सुधारण्याकरितां Society of the friends of the people या नांवाची एक संस्था १७९० चे सुमारास स्थापन करण्यांत आली व तिच्या मार्फत निवडणुकीच्या हक्काच्या अनिष्ट स्थितीबद्दल पार्लमेंटास अर्ज करण्यास सुरवात झाली. सनदशीर चळवळीस प्रारंभ झाला. या पूर्वी लॉर्ड चॅथॅम यांनीं निवडणूकीच्या या नादान पद्धतीची(rotten part of the constitution) दुरुस्ती करण्याबद्दल पार्लमेंटास सुचविलें होतें. इ. १७७६ सालीं विल्कीस यांणीं अशीच सूचना आणिली. १७८० सालीं ड्यूक ऑफ रिचमंड यांनींही प्रयत्न केला. १७९० सालींही मि. फ्लुड यांनीं सुधारणेची योजना पार्लमेंट पुढें मांडली होती. परंतु पार्लमेंटांत कोणाचीच डाळ शिजली नाहीं. Friends of People सोसायीटीचे ग्रे (Lord Grey) व आर्स्किन असे पुढारी होते. ग्रेसाहेबांनीं पार्लमेंटांत १७९२ व १७९७ सालीं निवडणुकीच्या सुधारणेबद्दल ठराव आणिले; परंतु पार्लमेंटांतील बहुमत याच्या अगदीं विरुद्ध होतें, व त्यांचे ठराव नामंजूर झाले. १८१८ सालीं बर्डेटसाहेबांनीं फिरून त्याच सूचना पार्लमेंटपुढें मांडिल्या; परंतु सहाशें प्रतिनिधींपैकीं अवघ्या एकानें त्यांच्या म्हणण्यास पुष्टी दिली. १८२२ व २३ सालीं लार्ड जॉन रसेल यांनीं हाच प्रश्न हातीं घेतला, व १७ हजार सह्यांचा एक अर्ज पार्लमेंटास सादर केला. परंतु तोही फेटाळण्यांत आला. १८२६ व १८३० या सालीं पार्लमेंटांत फिरून चळवळ करण्यांत आली. व त्या वेळचे मुख्य प्रधान सर रॉबर्ट पील व ड्यूक ऑफ वेलिंगटन यांनीं प्रचलित असलेली पद्धत समाधानकारक आहे व त्यांत सुधारणा करण्याचें कांहीं कारण नाहीं, असें जाहीर केलें. पार्लमेंटांत एकसारखा अपजय येत असतांही सोसाइटीच्या चालकांनीं यत्किंचितही धीर सोडला नाहीं. पराजयानें पुनः-पुन्हां प्रतिहत होऊनही, नव्या उत्साहानें सोसायटीनें चळवळ करण्याचें काम चालू ठेविलें. वर्तमानपत्रांतून व जाहीरसभांतून लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न सुरू होता. सोसायटीच्या अनेक शाखा पुष्कळ ठिकाणीं स्थापन करण्यांत आल्या होत्या. खुद्द इंग्लंडचे राजे, हाउस ऑफ लॉर्डस् व कॉमन्स सभेंतील बहुतेक सभासद हे सुधारणेच्या योजनेच्या विरुद्ध असल्यामुळें यशःप्राप्तीचा संभव फारच कमी होता. परंतु पार्लमेंटाबाहेर Friends of People या सोसायटीच्या चळवळीमुळें सुमारें ४० वर्षांच्या कालांत लोकमत जागृत झालें. १८३१ सालीं लॉर्ड जॉन रसेल यांनीं पार्लमेंटच्या निवडणूकीच्या सुधारणेचें बिल कॉमन्स सभेमध्यें आणलें व तें एकमताधिक्यानें मंजूर झालें. मंत्रिमंडळाचा पाडाव झाला. देशांत चळवळ उडून गेली. फिरून निवडणूक झाली. फिरून कामन्स सभेंत बिल मंजूर झालें. परंतु लॉर्डांच्या सभेनें तें नामंजूर केलें. पुन्हां तें बिल १८३२ च्या मार्चांत कॉमन्स सभेनें मंजूर केलें, व लॉर्डांकडे पाठविलें. फिरून तें लॉर्डांच्या सभेनें नामंजूर केलें. मंत्रिमंडळानें लॉर्डांची संख्या वाढवून बिल मंजूर करण्याबद्दल राजेसाहेबांस सल्ला दिला, तो राजेसाहेबांनीं ऐकला नाहीं. लॉर्ड ग्रे यांनीं प्रधानाच्या जागेचा राजीनामा दिला. देशांतील चळवळ अगदीं विकोपास गेली. लोकमत प्रक्षुब्ध झालें व शांततेचा भंग होईल असें दिसूं लागलें. देशावर अनर्थ ओढवणार असें वाटून राजेसाहेबांनीं ग्रे साहेबांस फिरून प्रधान होण्याबद्दल आग्रह केला. लॉर्डांचा विरोध नाहींसा झाला; व १८३२ सालीं रिफॉर्म बिल मंजूर झालें. या बिलाच्या योगानें सुमारें ७५ लक्ष लोकांस पार्लमेंटास प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क आजमित्तीस इंग्लंडांतील लोकांस मिळाला आहे. सनदशीर रीतीनें चालविलेल्या खटपटीस ४० वर्षांनीं यशःप्राप्ति झाली. या चळवळीपासून अनेक बोध घेण्यासारखे आहेत. सत्ताधारी लोकांस आपली सत्ता यत्किंचितही कमी झाली असतां अत्यंत दुःसह होतें, व आपल्या हातून शक्य तीं विघ्नें प्रतिपक्षाच्या मार्गांत आणण्यास ते कमी

करीत नाहींत; तसेंच ज्या लोकांच्या कल्याणासाठीं सुधारणेचे प्रयत्न चालले होते, ते प्रथमतः प्रतिकूल होते, पुढें उदासीन होते व त्यांच्यांत आपल्या हक्काची जाणीव उत्पन्न होण्यास सुमारें अर्धा शतकपर्यंत इग्लंडसारख्या लहान देशांत अहर्निश खटपट करावी लागली. तिसरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, न्यायाची कोणतीही चळवळ चालू केली असतां प्रामाणिकपणानें, निरपेक्षपणानें व सात्त्विक बुद्धीनें प्रयत्न केले असतां कितीही अडचणी आल्या, कितीही संकटें सोसावीं लागलीं, कितीही अपमान झाला, कितीही नाउमेद झाली, तरी यशःप्राप्ति ही शेवटीं प्राप्त होत असते. चवथी एक गोष्ट मनन करण्यासारखी आहे. ती ही कीं, अज्ञानांत असलेला लोकसमाज एकदां जागृत झाला, आपल्या हक्काची जाणीव त्याचे ठिकाणीं उत्पन्न झाली, आपल्याला होत असलेल्या अन्यायाबद्दल त्याच्यांत तळमळ वाटू लागली म्हणजे संघशक्तीच्या योगानें प्रक्षुब्ध जनतेचा जोर राजसत्तेवर आपोआपच होतो; व राजनीतीला योग्य वळण लागतें. समंजस सत्ताधारी वर्ग असला म्हणजे लोकमताचा बरोबर अजमाव करून प्रजेस संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. लोकमत तयार करण्याचा हा मार्ग धिम्मेपणाचा व कालावधीचा आहे. व तो सुशिक्षितांनींच स्वीकारला पाहिजे. हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीच्या दृष्टीनें विचार केला असतां येथील सुधारणेचें काम फारच दुष्कर आहे. Reform बिलाचे वेळीं खटपट करणाऱ्या लोकांस स्वकीय सत्ताधारी लोकांचेंच मन वळवावयाचें होतें. तशी परिस्थिति येथें नाहीं. इंग्लंडांत चळवळ करणारे सुशिक्षित लोक व सत्ताधारी वर्ग यांचे हितसंबंध खरोखर पाहतां विरोधाचे नव्हते. स्वार्थपरायणतेनें, अज्ञानानें, जुन्या परंपरेच्या अभिमानानें सत्ताधारी लोकांकडून विरोध केला जात असे. या बाबतींतही हिंदुस्थानांतील परिस्थितींत फारच तफावत आहे. सत्ताधारी वर्ग व सनदशीर चळवळ करणारे लोक यांचे हितसंबंध परस्परविरुद्ध आहेत. इंग्लंडांतील जनता व हिंदुस्थानांतील अफाट समाज यांमध्यें शिक्षणाच्या, संस्काराच्या व संख्येच्या बाबतींत महदंतर आहे. अर्थात् अशा स्थितींत सनदशीर चळवळीस यशःप्राप्ति होण्यास पुष्कळ कालातिपात लागेल. तथापि रिफॉर्म बिलाच्या चळवळीपासून येथील पुढाऱ्यांनीं बोध घेण्यासारखा आहे तो हा कीं, दोहोंचा हेतु उदात्त व सात्त्विक मनोवृत्तीचा होता. दोघांचेही प्रयत्न न्याय व समतेबद्दलच चालले होते. व याच कारणामुळें जरी थोडासा अधिक काळ येथील लोकांस स्वातंत्र्यप्राप्तीकरितां खर्च करावा लागला, तथापि यशःप्राप्ति होईल ही आशा मात्र या उदाहरणावरून बलवत्तर आहे.

रिफॉर्म बिलाच्या चळवळीच्या वेळीं लोकपक्षाला सोसावा लागलेला त्रास व आपत्ति व चळवळीची गति कुंठित करण्याकरितां सत्ताधारी वर्गानें भाषण, लेखन व संमेलन यांजवर घातलेले निर्बंध या सर्वांचा इतिहास फार बोधप्रद आहे. व इतिहासाची पुनरावृत्ति वेळोवेळीं कशी होत असते याचेंही उदाहरण पाहण्यासारखें आहे. रिफॉर्म बिलासंबंधीं चळवळ चालू झाली त्या वेळीं तिच्या पुरस्कर्त्यांस सत्ताधारी वर्गानें अडचणींत आणण्याचा प्रयत्न केला. थॉमस मूरसारख्या कित्येक पुढारी लोकांस राजद्रोहाच्या आरोपावर शिक्षा करण्यांत आल्या. जस्टिस् ऑफ धी पीसला चळवळ करणाऱ्या मनुष्यांकडून जामीन घेण्याचा अधिकार देण्यांत आला. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस संशयावरून एखाद्या व्यक्तीस तुरुंगांत ठेवण्याचा अधिकार मिळाला. १८१९ सालीं कोणत्याही राजकीय चळवळीबद्दल सभा भरविणें राजद्रोहाचें समजून बंद करण्यांत आलें होतें. मॅन्चेस्टरमध्यें सुमारें ४० हजार लोकांची सभा भरली होती, परंतु पोलिसांनीं ती सभा उधळून लाविली. या दंग्यांत पुष्कळांना दुखापती झाल्या. सुमारें ४०० लोक जखमी झाले व कांहीं थोडे मरण पावले.

यासंबंधीं उघड चवकशी करण्यांत यावी व गुन्हेगार पोलिसांना शासन व्हावें याजबद्दल पुष्कळ आक्रोश पार्लमेंटांत करण्यांत आला, परंतु तो निष्फळ झाला. उलट पार्लमेंटनें सक्तीचे कायदे केले. या कायद्यांना सहा कायदे (six acts) असें नांव आहे. एकानें स्वस्थतेसंबंधीं झालेल्या गुन्ह्यांत आरोपीचा पुरावा देण्याचा हक्क मर्यादित केला. दुसऱ्याच्या योगानें राजद्रोहासंबंधीं शिक्षा झाली असतां आरोपीनें प्रसिद्ध केलेलीं व आक्षेपार्ह ठरलेलीं सर्व पुस्तकें जप्त करण्याचा अधिकार कोर्टास देण्यांत आला; व राजद्रोहाबद्दल दोन वेळ खटला होऊन गुन्हा शाबीत झाल्यास कैद, हद्दपारी किंवा जन्मठेपेची शिक्षा लागू केली. तिसऱ्या कायद्यानें राजकीय प्रश्नासंबंधीं प्रसिद्ध झालेल्या सर्व पुस्तकांवर व हस्तपत्रकांवर कर बसविण्यांत आला. चवथ्या कायद्यानें कोणत्याही गांवांत सहा दिवसांची लेखी नोटीस सात घरवाल्यांनीं स्थानिक मॅजिस्ट्रेटांस सभेबद्दल दिल्याखेरीज सभा भरवितां येणार नाहीं असें ठरविण्यांत आलें व या सभांस पन्नासांहून अधिक लोकांनीं जाऊं नये असेंही फरमावण्यांत आलें. व अधिक लोक गेल्यास त्यांना दंड व शिक्षा होईल असेंही जाहीर करण्यांत आलें. कोणतेंही व्याख्यान किंवा वादविवाद होण्याच्या जागेस परवाना घेतला पाहिजे व अशा जागेची वाटेल तेव्हां तपासणी केली जाईल असें ठरलें. पांचव्या कायद्यानें हत्यारांच्या शिक्षणाची मनाई केली व साहाव्या कायद्यानें अस्वस्थतेच्या भागांत स्थानिक मॅजिस्ट्रेटास कोणत्याही घराची झडती घेण्याचा अधिकार देण्यांत आला. वरील प्रकारच्या सर्व कायद्यांच्या कैचींतून व अधिकारी वर्गाच्या जुलमांतून निभावून अनेक आपत्ति सोसून रिफॉर्म बिलाची चळवळ यशस्वी झाली. कर्झनसाहेबांच्या फाळणीनंतर जी अस्वस्थता उत्पन्न झाली व सरकारनें जें उग्र स्वरूप धारण केलें तो सर्व प्रकार रिफॉर्म बिलाच्या काळांतील सत्ताधारी वर्गाच्या जुलमी कृत्यांचें अनुकरण होय. बारीसाल येथील उधळून दिलेली प्रांतिक सभा, गुरखे लोकांचें व लष्करी शिपायांचें मेमनसिंग, डाक्का वगैरे येथील ठाणें व त्यांचें उद्दाम वर्तन, ऑफिशियल सीक्रेटस् बिल, विद्यार्थ्यांच्यासंबंधीं सक्तीचे नियम, राष्ट्रीय गीत म्हटल्यावरून त्यांची हकालपट्टी व त्यांजवरील फुल्लरशाहींतील खटले, सभाबंदीचा कायदा, मुद्रणसंस्थांच्या व वर्तमानपत्रांच्या जामिनकीचा कायदा, समिती व संस्था बंद करण्याचा कायदा, झटपट चौकशीबद्दल स्पेशल ट्रायब्यूनलची स्थापना वगैरे सर्व कायदे हें सत्ताधारी वर्गाच्या सर्वत्र आढळणाऱ्या औद्धत्याचें प्रदर्शन होय; परंतु अशा भयानक स्वरूपानें सात्त्विक बुद्धीनें चालविलेली चळवळ यत्किंचितही कमी न होतां जोरानें फोफावत जाते, असेंच रिफॉर्म बिलाच्या चळवळीवरून दिसून येणार आहे.

रिफॉर्म बिलाप्रमाणेंच कॅथॉलिक इमॅन्सिपेशन बिलाचा इतिहासही मननीय आहे. १८०९ सालीं ओकोनेल यांनीं प्रथमतः कॅथॉलिक लोकांच्या राजकीय अडचणी दूर करण्याबद्दल एक संस्था स्थापन केली व या संस्थेमार्फत सभा भरविणें, अर्ज पाठविणें, लोकमत जागृत करणें हे प्रयत्न सुरू झाले. पुष्कळ दिवसपर्यंत या संस्थेकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. १८२३ मध्यें या संस्थेमध्यें पुष्कळ सभासदांची भरती करण्यांत आली व डब्लिनमध्यें राष्ट्रीय सभेसारखी एक प्रचंड सभा भरविण्यांत आली. ओकोनेल व शील यांसारख्या प्रसिद्ध वक्त्यांनीं भाषणें केलीं. वर्तमानपत्रांतून व हस्तपत्रकांतून सभेच्या हकीकतीचा प्रसार करण्यांत आला. ही संस्था जास्त जोराची व जास्त वजनदार होत आहे, हें पाहून अशा संस्था बंद करण्याची व त्यांना द्रव्यद्वारा साहाय्य करण्याची मनाई करण्याचा कायदा सरकारानें केला. दडपशाहीच्या सरकारी धोरणामुळ जरी उघड रीतीनें अशा संस्था बंद करण्यांत आल्या; तथापि कॅथॉलिक लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याबद्दल प्रयत्न सुरू होते. इंग्लंडमध्येंही याबद्दल

लोकमत जागृत करण्यांत आलें. वर्तमानपत्रांतील लेखांनीं, जाहीरपत्रकांनीं व हस्तपत्रकांनीं सर्व देश दुमदुमून गेला;व शेवटीं कॅथॉलिक लोकांच्या दुःखाची दाद लागून त्यांच्या अडचणी नाहींशा करण्यांत आल्या. कॅथॉलिक इमॅन्सिपेशन बिल मंजूर झालें.

गुलामांची मुक्तता, ॲन्टी-कॉर्न लॉ लीग वगैरे चळवळींचा इतिहासही इतकाच मननीय आहे; परंतु विस्तारभयास्तव त्याचा आम्हांस उल्लेख करतां येत नाहीं. रिफॉर्म बिल व कॅथॉलिक लोकांची राजकीय हक्कप्राप्ति यांच्या वर दिलेल्या हकीगती- वरून असें दिसून येईल कीं, या सुधारणा ज्या लोकांचे कल्याणाकरितां अवश्य आहेत म्हणून चळवळ चालू होती, त्या लोकांना त्याबद्दल प्रारंभीं मुळींच ज्ञान नव्हतें; समाजांतील सुशिक्षित लोकांनीं पुढाकार घेऊन लोकांत हक्काची जागृति उत्पन्न केली. या हक्काचें रहस्य कळल्याबरोबर समाजांत चैतन्य उत्पन्न झालें; हक्काबद्दल जोराची मागणी सुरू झाली व सुशिक्षित पुढाऱ्यांस शक्य तितक्या उत्साहानें लोकांनीं पाठिंबा दिला. समाजोन्नतीचें काम फलद्रूप झालें. हें कार्य स्वस्थतेचा भंग न करतां, अत्याचार न करतां,सनदशीर मार्गानें घडवून आणतां आलें. हिंदुस्थानांतही हीच स्थिति आहे.ज्या सुधारणांबद्दल राष्ट्रीय सभा सालदरसाल मागणें करीत आहे, त्या लोकांचे उन्नतीकरितांच आहेत. लोकांना त्याबद्दल मात्र अज्ञानदशेमुळें असावी तितकी आस्था अद्याप वाटत नाहीं. तथापि राष्ट्रीय सभेनें चालविलेल्या ज्ञानसत्रामुळें लोकांत जागृति होऊनच आपल्या हक्काबद्दल निःसीम तळमळ वाटूं लागेल व सुशिक्षित पुढाऱ्यांच्या चळवळीची आवश्यकता व यथार्थता इतर देशांप्रमाणें येथेंही सर्वांचे प्रत्ययांस येईल. हा फक्त कालाचा प्रश्न आहे. सनदशीर चळवळ कशी यशस्वी होते याचें एका इंग्रजी इतिहासकारानें फार मार्मिकपणानें वर्णन केलें आहे. Political agitation to be successful must be based on a real grievance, adequately represented in Parliament and in the Press, and supported by the rational approval of enlightened men. राष्ट्रीय सभेनें दाखविलेल्या अडचणी व दुःखें अगदीं खरीं आहेत. त्याबद्दल सरकारचें लक्ष शक्य त्या मार्गानें वेधलें जात आहे. वर्तमानपत्रांत त्याबद्दल खल होत आहे व देशांतील सर्व समंजस लोकांनीं आपली संमति राष्ट्रीय सभेस दिली आहे. अर्थात् ही यशस्वी होईल याबद्दल कोणचीही शंका नाहीं.

चौथा एक कोटिक्रम असा आहे कीं, राष्ट्रीय सभेच्या मागण्यांची हिंदुस्थानांतील असंख्य प्रजेस जरूर वाटत नाहीं. याचा अर्थ हिंदुस्थानांतील प्रजेनें आपलें गाऱ्हाणें राष्ट्रीय सभेच्या शब्दांत केलें नाहीं, एवढेंच असेल तर, या अपवादाबद्दल कांहींच म्हणावयाचें नाहीं. परंतु राष्ट्रीय सभा ज्या गैरसोईबद्दल तक्रार करीत आहे, त्या गैरसोई लोकांस भासत नाहींत असें या आक्षेपकांचें म्हणणें असल्यास तें सर्वथैव निराधार आहे. या बाबतींत फरक असल्यास भाषेच्या प्रकारांत आहे. सुशिक्षितांच्या मागणीची भाषा व अशिक्षितांची भाषा यामध्यें संस्कारभेदाप्रमाणें तफावत आहे. परंतु वस्तुतः ती एकच आहे. शेतकरी वर्गास विचारलें असतां ते आपल्या गरजा अशा सांगतातः—" जमीनीवरील सारा वाढवूं नये, मीठभाकर सुखानें खातां यावी, कर्जवाम सोईनें मिळावें, अन्नानें तें फेडतां यावें, दुष्काळांत सरकारांनीं साऱ्याची सूट द्यावी, कांहीं प्रसंगीं तहकूबी द्यावी, आपल्याला वागवून घ्यावें, आपल्या धान्यांस योग्य किंमत यावी, आपल्या पोराबाळांस उदरनिर्वाहाचीं साधनें असावींत व वाढत्या प्रपंचाचा भार सर्वस्वीं शेतकीवर पडूं नये." हेंच मागणें राष्ट्रीय सभा आपल्या पारिभाषिक शब्दांनीं खालीलप्रमाणें निवेदन करितेः—" कायम धाऱ्याची पद्धति सर्व देशांत चालू करून शेतकीस उत्तेजन द्यावें; मिठावरील कर कमी करून गरीब रयतेवरील

ओझें कमी करावें; जीविताला अवश्य लागणाऱ्या या साधनांचा त्यांस जास्त उपयोग करितां येईल अशी तरतूद करावी; शेतकऱ्यांच्या ब्यांका व पतपेढ्या काढून केतकऱ्यांस कर्ज मिळणेचीं साधनें उत्पन्न करावीं; शेतकऱ्यांच्या स्थितीकडे लक्ष देऊन सवलतीनें पैसे फेडण्याची मुभा ठेवावी; फॅमिन कोड करून साऱ्याचे तहकुबीचे, माफीचे व मदतीचे नियम उदार व सढळ प्रमाणावर करणेंत यावेत; रुपयाचा भाव कृत्रिमपणानें वाढवून शेतकरी वर्गाचा तोटा करूं नये व चलनपद्धतीच्या योगानें त्यांचा माल विकतांना नुकसान होऊं नये; शेतकीचें शिक्षण वाढवून एका धाटाच्या ठिकाणीं दोन धाटें उत्पन्न होतील असें ज्ञान शेतकरी वर्गास देऊन त्याची स्थिति सुधारण्यांत यावी; प्राथमिक शिक्षणाचा सर्वत्र फैलाव करून शेतकरी वर्गाची मानसिक व आध्यात्मिक उन्नति करावी; उद्योगधंद्यांची वाढ करून व उदरनिर्वाहाचीं साधनें वाढवून शेतकीवर पडणारा बोजा अंशतः कमी करावा.'' राष्ट्रीय सभेच्या वर नमूद केलेल्या मागण्या व शेतकरी वर्गाचे कळवळ्याचे बोल यांत काय अंतर आहे हें प्रत्येक विचारी मनुष्यानें ताडून पाहावें म्हणजे या कोटिक्रमांतील फोलपणा स्पष्ट दिसून येईल. अशिक्षित शेतकरी वर्गाप्रमाणेंच इतर वर्गांचीं दुःखेंही राष्ट्रीय सभा आपल्या मार्फत सरकारापुढें मांडीत आहे. फरक असल्यास शब्दाचा आहे; वस्तुस्थितीचा किंवा अर्थाचा मुळींच नाहीं. हा आक्षेप मुख्यत्वेंकरून युरोपियन सत्ताधारी वर्गाकडून काढला जातो. प्रजेचें खरें हृद्‌गत त्यांस मुळींच कळत नाहीं. ते लोकांत मुळींच मिसळत नाहींत. लोकांच्या भाषेचें ज्ञान त्यांस मुळींच असत नाहीं. अधिकाराच्या व सत्तेच्या दर्पामुळें आपलें मनोगत त्यांस सांगण्यास कोणी धजत नाहीं व यामुळेंच लोकांस काय पाहिजे आहे याबद्दलच्या त्यांच्या कल्पना अगदीं भ्रामकपणाच्या आहेत. "But leave the service, become a nobody, mix freely with the people, hear what they have to say when not afraid to speak their minds, study the reverse of the shield, and knowing you, as I do, I know well that you would wholly change your views. The only way of learning the truth is to mix freely with the people–the people of all classes from the highest to the lowest; prove to them that you are trustworthy and they will trust you and tell you all the truth. This is not only the best way but *the only way.*" संयुक्त प्रांताचे लेफ्टनेंट गव्हर्नर सर ऑक्लंड कॉल्व्हिन यांस पाठविलेल्या उत्तरांत ह्यूमसाहेबांनीं काढलेलें वरील उद्गार युरोपियन सत्ताधारी वर्गापैकीं प्रत्येकानें विचार करण्यासारखे आहेत.

पांचवा आक्षेप असा आहे कीं, राष्ट्रीय सभा जे हक्क मागत आहे त्यांस येथील लोक लायख झाले नाहींत. हा आक्षेप ब्युरॉक्रसीनें (युरोपियन सत्ताधारी वर्गानें) च काढला आहे. राष्ट्रीय सभेनें चालविलेलें हक्काचें भांडण मुख्यतः याच वर्गाविरुद्ध आहे. वादामध्यें एका पक्षानें दुसऱ्या विरुद्ध केलेले आरोप जितके स्वार्थमूलक व निराधार असतात, वितकाच हा आक्षेप निरर्थक आहे. कोणतेही हक्क देतांना ते न देण्याची सबब नालायखीच्या कारणावरच पुढें आणण्यांत येते याबद्दल ग्लयाडस्टनसाहेबांनीं काढलेले उद्गार नेहमीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

"It is liberty alone which fits men for liberty. This proposition like every other in politics has its bounds; but it is far safer than the counter doctrine 'wait till they are fit.'"

स्वतंत्रतेचा उपभोग घेण्यास लोकांस पात्र करण्याचा खरा मार्ग म्हणजे, स्वातंत्र्य देणें हाच होय. पिंजऱ्यांत कोंडून ठेवलेला राघू उंच भराऱ्या

मारीत नाहीं, म्हणून आक्रोश करणें जितकें हास्यास्पद आहे, तितकाच वरील कोटिक्रम निरर्गल आहे. पिंजऱ्यांतील राघूंच्या जातीचे स्वतंत्र राघू जर स्वेच्छेनें वाटेल तितका उत्तुंग विहार करूं शकतात, तर बंदिवासांत असलेला राघू स्वतंत्र झाल्यावर पाहिजे तिकडे उड्डाण करणार नाहीं काय? हिंदुस्थानांतील अनुभवही हेंच तत्त्व जोरानें प्रतिपादित आहे. वरिष्ठ प्रतीच्या जबाबदारीच्या जागांस येथील लोक लायक नाहींत असा ब्युरॉक्रसीचा पुष्कळ वर्षांचा आरोप होता. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या कौन्सिलांत, वरिष्ठ व प्रांतिक सरकारच्या कार्यकारी कौन्सिलांत, एतद्देशीय लोकांस जागा देण्याबरोबर ते हीं जबाबदारीचीं कामें करण्यास सर्वतोपरी लायख आहेत असाच अनुभव आलेला आहे. सर कृष्ण गुप्त व नामदार सिंह यांजबद्दल सेक्रेटरी ऑफ स्टेट व व्हाइसरॉय यांनीं काढलेले उद्गार व लॉर्ड हार्डिंज यांनीं नामदार अली इमाम यांचेबद्दल केलेली अत्यंत थोर प्रशंसा—यावरून हेंच सत्य स्थापित होत आहे. राष्ट्रीय सभा मागत असलेले हक्क येथील लोकांस देण्यास येथील लोक पात्र नाहींत ही सबब अगदीं पोरकटपणाची आहे.

सहावा आक्षेप असा आहे कीं, निरनिराळ्या जातींची सहानुभूति व सहकारिता राष्ट्रीय सभेस नाहीं. हिंदुस्थानांतील प्रमुख जातींपैकीं पार्शी लोकांबद्दल विचार केला असतां या जातीचे अत्यंत सन्माननीय पुढारी म्हणजे दादाभाई नवरोजी, परलोकवासी सर फीरोजशहा मेथा, नामदार मी. वाच्छा या लोकांनीं राष्ट्रीय सभेस सर्वस्वीं वाहून घेतलें आहे. यांच्यापेक्षां अधिक लोकोत्तर पुढारी सर्व पारशी जातींत आहेत, असें कोणासही म्हणतां येणार नाहीं. पारशी जातींतील उदार महात्मे मरहूम टाटा यांचीही राष्ट्रीय सभेस पुर्ण सहानभूती होती. ज्या अर्थीं राष्ट्रीय सभा ही देशांतील पुढाऱ्यांचीच आहे. जोंपर्यंत पारशी जातींतील सर्व मान्य पुढारी राष्ट्रीय सभेकरितां तन मन धन खर्च करीत आहेत, तोंपर्यंत या जातीबद्दल तरी वरील आक्षेप लागू पडत नाहीं. हिंदुस्थानांतील प्रमुख जात म्हणजे मुसलमानांची होय. नामदार बद्रुद्दीन तय्यबजी, रहिमतउल्ला सयानी, नबाब सय्यद महमद, नामदार मझरुल हक्क, नामदार जिना—यांसारख्या वजनदार व थोर पुढाऱ्यांनीं राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान व राष्ट्रीय सभेचें अधिवेशन अलंकृत केलें आहे. परंतु मुसलमान लोकांतील बरेच पुढारी राष्ट्रीय सभेपासून आजपर्यंत अलग होते, हेंही खरें आहे. मुसलमान लोकांच्या आक्षेपाचें निरसन नामदार सयानी यांनीं राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष या नात्यानें सन १८९६ सालीं फार विस्तारानें व मार्मिकपणानें केलें आहे. त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. मुसलमान लोकांचा विरोध मुख्यत्वेंकरून सर सयद अहमद व त्यांचे अनुयायी यांचा होता. या विरोधास ब्युरॉक्रसीनें उत्तेजन दिलें होतें. सरकारच्या भयामुळें, सरकारी अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करण्याच्या बुद्धीनें, पोकळ पदव्या व राजदरबारची प्रतिष्ठा यांच्या हांवेमुळें, धर्मवेडाच्या खुळामुळें, पूर्वसंस्काराच्या भ्रामक अभिमानामुळें व शिक्षणाच्या अभावामुळें, मुसलमानांतील कित्येक लोक राष्ट्रीय सभेस प्रतिकूल होते. परंतु उच्च शिक्षणाचा ज्या मानानें या समाजांत फैलाव होऊं लागला, अलिगड व तेथील उदात्त संस्कार यांची जसजशी व्याप्ति वाढूं लागली, तुर्कस्थानच्या उत्साहजनक इतिहासाचा जसजसा प्रकाश त्यांच्या अंतःकरणांत पडूं लागला, सापेक्षत्वानें आत्मप्रत्ययाची वाढ जसजशी होत गेली व हिंदुस्थानांतील एकराष्ट्रीयत्वाची भावना जसजशी विकास पावूं लागली, त्या मानानें मुसलमानांतील राष्ट्रीय सभेबद्दलचा विरोध कमी होत गेला, त्यांची सहानुभूति वृद्धिंगत होत गेली. मुसलमानांतील सुशिक्षित पुढाऱ्यांनीं आपल्या समाजाच्या उन्नतीकरितां स्थापन केलेल्या मॉस्लेम लीगनेंही राष्ट्रीय सभेप्रमाणें आपलें अंतिम ध्येय स्वराज्य हेंच आहे असें जाहीर केलें

आहे. आजमितीस तरी हिंदु व मुसलमान यांतील सुशिक्षित पुढाऱ्यांच्या उन्नतीच्या कल्पना, महत्त्वाकांक्षा व भविष्यकाळाची भावना, एकच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ब्युरॉक्रसीनेंही, भेदवृत्तीच्या राजनीतीचें अवलंबन करून, हिंदु लोकांचा पाडाव करण्याकरितां मुसलमानांस जवळ करण्याचा जो डाव चालविला होता, त्यांतही कानपूरच्या मशिदीच्या प्रकरणामुळें त्यांस सर्वस्वीं अपयश आलें आहे. मुसलमान समाजांतील जागृत झालेल्या तेजाची साक्ष त्यांस पटली आहे. आवडत्या व नावडत्या बायकोचें खूळ, यापुढें तरी ब्युरॉक्रसीमध्यें माजेल असें दिसत नाहीं. यंदांच्या वर्षी मुसलमानांतील सुशिक्षित पुढाऱ्यांची व राष्ट्रीय सभेच्या चालकांची मॉस्लेम लीग व राष्ट्रीय सभा यांच्या अधिवेशनानें मुंबईंतच एकसमयावच्छेदेंकरून गांठ पडण्याचा सुयोग आला आहे. हल्लींच्या अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगीं हें संमेलन राष्ट्राची प्रगति होण्यास पुष्कळ अंशीं कारणीभूत होईल अशी आमची आशा आहे. नामदार आगाखान यांनीं मॉस्लेम लीगच्या अधिवेशनास संमति दिल्याचें नुकतेंच जाहीर झालें आहे. ही बातमी अत्यंत समाधानकारक आहे. वरील विवेचनावरून मुसलमानांच्या बद्दलही घेण्यांत आलेला आक्षेप सयुक्तिक नाहीं, असें दिसून येईल. बाकीच्या इतर जाती संख्येच्या मानानें अगदींच अल्प आहेत व त्यांचेकडून आजपर्यंत कोणतेही आक्षेप घेण्यांत आलेले नाहींत.

सातवा आक्षेप असा आहे कीं, राष्ट्रीय सभा ही असंतुष्ट सुशिक्षितांची असून ती राजनिष्ठ नाहीं. हाही आक्षेप ब्युरॉक्रसीचाच आहे. राष्ट्रीय सभा उत्पन्न झाल्यापासून तिची भिस्त ब्रिटिश राज्यसत्तेच्या उदार नीतीवरच सर्वस्वीं अवलंबून आहे. ब्रिटिश राज्यसत्तेनें उदात्त बुद्धीनें दिलेल्या शिक्षणाचें राष्ट्रीय सभा हें फळ आहे. पाश्चिमात्य शिक्षण व संस्कृति यांबद्दल सुशिक्षितांस आदर वाटत आहे. या शिक्षणाचा व संस्काराचा लाभ राज्यकर्त्यांनीं आपल्यास दिल्याबद्दल सुशिक्षित लोकांत कृतज्ञताबुद्धि वसत आहे. अशा स्थितींत राष्ट्रीय सभेस अराजनिष्ठ म्हणणें बाष्कळपणाचें आहे. या बाबतींत सर वुइल्यम हंटर यांनीं काढलेले उद्गार फार महत्त्वाचे आहेत.

They are the men who form the natural interpreters of our rule to the masses of the people. To speak of such men when their activity takes a political direction as disaffected would be equaly unjust and untrue. For they are the men, who of all our Indian fellow subjects, realise that their interests, present and future, are identified with the permanence of British rule.

वस्तुतः पाहिलें असतां, सुशिक्षित लोकांनीं देशोन्नतीच्या कामीं महत्त्वाची कामगिरी केली आहे. सुशिक्षित पुढाऱ्यांनीं पुढाकार घेतला नसता तर परिस्थितीमुळें उत्पन्न झालेल्या व होत असलेल्या असंतोषास भलतेंच स्वरूप प्राप्त झालें असतें. व त्यास आळा घालणेंही फार दुष्कर झालें असतें. अज्ञानी लोक, असंतुष्ट व किंकर्तव्यतामूढ झाले म्हणजे कोणच्या थरास जातील याचा नेम नाहीं, असा इतिहास सांगतो. सुशिक्षित लोकांनीं या ऐतिहासिक सिद्धांताचा विचार करून लोकांतील चळवळीस योग्य वळण लावलें आहे. राज्यकर्त्यांचा हेतु प्रजाजनास समजवून सांगणेचा प्रयत्न चालू ठेवला आहे; व ब्रिटिश राज्यसत्तेमध्यें स्वातंत्र्य, समता व न्यायबुद्धि यांजबद्दल जी उच्च मनोवृत्ति पदोपदीं आढळून येते, तिच्यावर विश्वास ठेवून सात्त्विक बुद्धीनें व प्रामाणिक हेतूंनीं सनदशीर चळवळ करण्याचें वळण राष्ट्रोन्नतीस दिलें आहे. या योगानें जित व जेते यांमधील संबंध प्रेमाचे व सलोख्याचे होणें संभवनीय आहे, अशी स्थिति या देशांत प्राप्त झाली आहे. अशा स्थितींत

या चळवळीस राजद्रोही म्हणणें कृतघ्नपणाचें होईल. पंडित बिशन नारायण धार यांनीं आपल्या एका विद्वत्ताप्रचुर लेखांत नमूद केलेले विचार संस्मरणीय आहेत.

It is a matter not of reproach nor of lamentation,but of congratulation and even jubilation, that the happy thought of subduing and organising forces, which were begining to run into dangerous courses, first occured to some of our most enlightend contrymen; and that when the foundation of the great movement thus laid upon knowledge, culture and partiotism, it was very easy to enlarge the circle of its adherents and sympathisers by popularising its teachings among the masses and by persuading them to see that a great cause,espoused and advocated by the cultivated intelligence of their country,wished for their support and encouragement. Whatever taunts the unfairness of political rancour may hurl at them, the founders of the Congress have yet the satisfaction of thinking–which is indeed their chief reward–that at a time when the ruled and the rulers are divided by the impassable gulf of civilisation, of manners, of religon and of nationality, when millions of Indians cannot appreciate the usefulness of those great boons,which entitle the British rule to our highest esteem and regard, when the memory of the past rule is still cherished by the people, when for obvious reasons the Government and the subject race are apt to misconstrue each other's motives and actions, they have organised an institution, which acts as an interpreter of the people's wants to the Government and of the just but so often misjudged actions of the Government to the people, and which, under the present circumstances, possesses the chief condition of a safe and reliable guide to both.

खुद्द सरकारचें राष्ट्रीय सभेबद्दल धोरण पाहिलें असतां, हा अपवाद निरर्थक आहे असें दिसून येईल. लॉर्ड डफरिन यांनीं राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आणण्यांत कोणती खटपट केली हें पूर्वी नमूद केलें आहे. लॉर्डडफरिन यांनीं सन १८८६ सालीं कलकत्ता येथें राष्ट्रीय सभेंतीलनामांकित पुढाऱ्यांस सन्माननीय पाहुणे म्हणून गार्डनपार्टीस बोलाविलें होतें. सन १८८७ सालीं लॉर्ड कॉनेमेरा यांनीं मद्रासेस याचप्रमाणें राष्ट्रीय सभेंतील कांहीं सभासदांचा सन्मान केला. लॉर्ड रन्डॉल्फ चर्चिल यांनीं राष्ट्रीय सभेचा विजय झाल्यास आपाल्यास अत्यंत आनंद होईल, असे उद्गार काढले. इंग्लंडांतील प्रसिद्ध मुत्सद्दी ग्लॅडस्टन यांनीं राष्ट्रीय सभेस थोर जनसमूह (This great people) असें नांव देऊन त्यांच्या मागण्यांचा अनादर करणें गैरशिस्त आहे, असा इशारा दिला. सर चार्लस इलियट यांनीं सन १८९० सालीं कलकत्त्यास लेफ्टेनन्ट गव्हर्नर असतांना राष्ट्रीय सभेस विरोध करण्याचा प्रयत्न केला होता. प्रेक्षक या नात्यानें पुष्कळ सरकारी अधिकाऱ्यांकडे पाठविलेलीं तिकिटें परत करण्यांत आलीं. सर चार्लस इलियट यांनीं असेंही प्रसिद्ध केलें कीं, हिंदुस्थानसरकारच्या हुकुमामुळें कोणत्याही सरकारी अंमलदारांस प्रेक्षक या नात्यानें सुद्धां राष्ट्रीय सभेच्या बैठकीस हजर राहणें अयोग्य आहे. इलियटसाहेबांच्या या हुकुमानें त्यावेळीं बरीच चळवळ झाली. हिंदुस्थान सरकारचे या बाबतींतील काय हुकुम

आहेत, याचा एकवार खुलासा करावा असा ठराव राष्ट्रीय सभेनें मंजूर केला. या ठरावान्वयें वरिष्ठ सरकाराशीं पत्रव्यवहार करणेंत आला व लॉर्ड लॅंडस्डौन साहेबांनीं केलेला खुलासा फार महत्त्वाचा आहे. या खुलाशांत असें म्हटलें आहे कीं, राष्ट्रीय सभेची चळवळ सर्वस्वीं कायदेशीर आहे. खाजगी लोकांनीं तिच्याशीं संबंध ठेवण्यास कोणचीही हरकत नाहीं. परंतु सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांत प्रत्यक्षपणें कोणताही भाग घेणें बरें नव्हे. राष्ट्रीय सभा ही युरोपांतील प्रगमनशील लिबरल पक्षाप्रमाणें आहे. परंतु त्याबरोबरच देशांत एक कॉन्सरवेटिव्ह पक्षही आहे. या दोहों पक्षांशीं तटस्थ राहणें सरकारास इष्ट वाटत आहे व याचसाठीं सरकारी अधिकाऱ्यांनीं राष्ट्रीय सभेच्या कामांत प्रत्यक्ष पुढारीपणा (Active participation) घेऊं नये असें सरकारचें मत आहे. परंतु हा नियम प्रत्यक्ष सरकारचे नोकरींत असलेल्या लोकांसच लागू आहे. पेन्शन घेतलेल्या किंवा सरकारी नोकरींतून बाहेर पडलेल्या लोकांस हा नियम लागू नाहीं. या ठरावाच्या योगानें प्रेक्षक या नात्यानें सरकारी नोकरांना हजर रहाण्यास सरकारी मनाई आहे असें आढळून आलें नाहीं. सन १८९१ सालीं लॉर्ड मॅकडोनल्ड हे नागपुरास चीफ कमिशनर असतांना त्यांनीं असें जाहीर केलें कीं, कोणीही मनुष्य राष्ट्रीय सभेस गेला किंवा न गेला तर सरकार त्याबद्दल चौकशी करणार नाहीं. सन १८९३ च्या लाहोरच्या वेळींही पंजाबचे लेफ्टेनंट गव्हर्नर सर डेनिस फिट्जपॅट्रिक यांनीं असेंच धोरण स्वीकारलें होतें व लॉर्ड मॅकडोनल्ड हे संयुक्त प्रांतांत गव्हर्नर असतांना सन १८९४ सालीं राष्ट्रीय सभेबद्दल त्यांनीं सहानुभूति प्रगट केली. सन १९०८ सालीं सर ऑर्थर लाले यांनीं राष्ट्रीय सभेच्या पुष्कळ सभासदांस आमंत्रण करून त्यांचें स्वागत केलें होतें.

हल्लींचे उदार व थोर व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज व सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड क्र्यू यांनीं राष्ट्रीय सभेच्या डेप्युटेशनची आदरानें मुलाखत घेतली. सर जेम्स मेस्टन, सर च्यार्लस बेले यांनीं प्रांतिक कॉंग्रेस कमेटीनें दिलेलीं मानपत्रें स्विकारलीं आहेत. गेल्या वर्षी मद्रासेस लॉर्ड पेंटलंड यांनीं व पुढें येथें १५ वे प्रांतिक परिषदेच्या वेळीं मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनीं राष्ट्रीय व प्रांतिक सभेंत स्वतः हजर राहून आपल्या कृतीनें व भाषणांनीं राष्ट्रीय सभेच्या हेतूबद्दल उघडपणें सहानुभूती प्रगट केली आहे. लॉर्ड विलिंग्डन व पेंटलंड यांनीं घालून दिलेल्या महनीय उदाहरणावरून ॲंग्लो-इंडियन लोकांचीं तोंडें सर्वस्वीं बंद झालीं आहेत. राष्ट्रीय सभेस किंवा तिच्या संस्थांस अराजनिष्ठेच्या आपेक्षाबद्दल कोणतेंही भय बाळगण्याचें कारण उरलें नाहीं. याप्रमाणें राष्ट्रीय सभेबद्दल काढलेल्या आक्षेपांचें व कुतर्कांचें निरसन या तीस वर्षांचे कालांत सर्वांशीं झालें आहे.

राष्ट्रीय सभेची घटना.

कोणतीही संस्था चिरंतन होण्याला व ती नियमित चालण्याला कायद्याची किंवा घटनेची आवश्यकता आहे. आतां हे कायदे कित्येक प्रसंगीं संस्थेच्या जन्माबरोबरच अस्तित्वांत येतात; कित्येक प्रसंगीं मागील उदाहरणांवरून पुढील वहिवाट, (broadening from precedent to precedent) वहिवाटीवरून रूढि—या परंपरेनें पुष्कळ संस्थांचें नियमन होतें. रूढि जसजशी जुनी होत जाईल, तसतसें तिला गंभीर स्वरूप प्राप्त होतें व ती कायद्याच्या योग्यतेस येऊन बसते. राष्ट्रीय सभेच्या उत्क्रांतीमध्येंही हाच अनुभव दिसून आला आहे. राष्ट्रीय सभा उत्पन्न झाली त्यावेळीं कोणतीही नियमावलि किंवा घटना अस्तित्वांत नव्हती. १८८५ सालीं सेक्रेटरीची मुद्धां निवडणूक रीतसर झाली नाहीं. ह्यूमसाहेब हें काम करीत होते, व १८८८ सालीं राष्ट्रीय सभेचा या नेमणुकीवर मोर्तब झाला. १८८५ सालीं पहिल्या बैठकीचे वेळीं सभेच्या कामाची परंपरा चालू ठेवण्यासाठीं येवढें सुव्यव-

ण्यांत आलें होतें कीं, देशांत असलेल्या राजकीय संस्थांकडे सभेंत पास झालेले ठराव पाठविण्यांत यावेत व त्यांनीं आपापल्या प्रांतांत असतील त्या संस्थांची मदत घेऊन राष्ट्रीय सभेंत खल झालेल्या प्रश्नांचा लोकांत प्रसार करावा व त्याबद्दल लोकमत जागृत करावें. १८८६ सालीं निरनिराळ्या प्रांतांतून स्टँडिंग कॉंग्रेस कमिट्या स्थापन कराव्या असें ठरविण्यांत आलें. १८८७ सालीं राष्ट्रीय सभेच्या घटनेबद्दल कमिटी नेमण्यांत आली. या कमिटींत रा. नामजोशी, चंदावरकर, हुमायून बहादूर, अबदूल बादशहासाहेब, हाजी महमद, सुब्रह्मण्य अयर, गॅंटझ, रंगया नायडू, सुरेंद्रनाथ बानर्जी, त्रैलोक्यनाथ मित्र, कालीचरण बानर्जी, रुगुप्रसाद सेन, शालिग्रामसिंग, रामकाली चौधरी, हाफीज रहीम, रामपालसिंग, पंडित मदनमोहन, बाबू गंगाप्रसाद, बिशन नारायण धार, हमीद अली, लाला मुरलीधर, अग्निहोत्री, ध्रुव, उमेशचंद्र बानर्जी, नरेंद्रनाथ सेन, मि. नॉर्टन, जयगोविंद, ईश्वरी सरकार, जी. सुब्रह्मण्य आयर, दाजीसाहेब खरे, एस्. आयर, सभापति मुदलियार, मि. ह्यूम, विजयराघवाचार्य आयर, गोविंदबक्ष आणि करंदीकर असे गृहस्थ होते. या कमिटीनें कांहीं नियम केले, त्याचा विचार पुढील वर्षापर्यंत तहकूब ठेवण्यांत आला. १८८८ सालीं घटनेचा विचार झालाच नाहीं; त्या सालीं विषयनिर्णयाबद्दल एक नियम करण्यांत आला व तो फार महत्त्वाचा होता. राष्ट्रीय सभेपुढें विचाराकरितां येणाऱ्या कोणत्याही प्रश्नाबद्दल हिंदु किंवा मुसलमान प्रतिनिधींची एकविचारानें, सर्वांशीं किंवा बऱ्याच अंशीं, हरकत असेल तर विषयनिर्णायक कमिटीनें (Subjects Committee) तो सुचवूं नये, किंवा अध्यक्षांनीं सभेपुढें तो येऊं देऊं नये, व एखादा प्रश्न विचाराकरितां आलाच व वादविवादाअंतीं हिंदु किंवा मुसलमान प्रतिनिधींचा बहुमतानें तीव्र मतभेद दिसून आल्यास तोही वगळण्यांत यावा, व हा नियम पुढील बैठकांस लागू करण्यांत यावा असें ठरलें. १८८९ सालीं राष्ट्रीय सभेस १८८९ च प्रतिनिधि हजर होते. हा योगायोग अगदीं अपूर्व होता, व प्रतिनिधींची एवढी संख्या राष्ट्रीय सभेस कधींही नव्हती; या संख्येमुळेंच प्रतिनिधींच्या भरतीस कांहीं तरी मर्यादा घालावी या हेतूनें राष्ट्रीय सभेनें एक ठराव मंजूर केला. त्याचा आशय असा होता कीं, दर १० लक्ष लोकांस पांच प्रतिनिधि या मानानें प्रत्येक स्टँडिंग कॉंग्रेस कमिटीनें प्रतिनिधींची संख्या ठरवून आपापल्या भागांत त्यांची वांटणी करावी.

याच वर्षी पंडित अयोध्यानाथ यांस जॉइंट जनरल सेक्रेटरी नेमण्यांत आलें, व सेक्रेटरींच्या ऑफिसच्या खर्चाकरितां म्हणून पांच हजार रुपये मंजूर करण्यांत आले; तसेंच १८८० सालीं घटनेबद्दल नेमलेल्या कमिटीनें केलेल्या नियमांचा विचार स्टँडिंग कॉंग्रेस कमिट्यांनीं करावा व पुढील वर्षी तो राष्ट्रीय सभेपुढें मांडण्यांत यावा असें ठरलें. मि. बॉनर्जी, मि. मेथा व मि. आनंदा चार्लू यांस अनुक्रमें बंगाल, मुंबई व मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या सेक्रेटरींचे कायदेशीर सल्लागार नेमण्यांत आले. इंग्लंडांत स्थापन झालेल्या नॅशनल कॉंग्रेस एजन्सी या संस्थेचें नियमन करण्याकरितां कमिटी नेमण्यांत आली. राष्ट्रीय सभेचा हेतु इंग्लंडांतील लोकांस समजून देण्याकरितां एक डेप्युटेशन पाठवून देण्याचें ठरलें, व राष्ट्रीय सभेच्या येथील व इंग्लंडांतील कामासाठीं ४५ हजार रुपये मंजूर करण्यांत आले. राष्ट्रीय सभेसाठीं कायम फंड उभारण्यांत यावा असें ठरविण्यांत आलें व पूर्वींच्या वर्षाप्रमाणेंच खर्चाकरितां ४० हजार रुपये मंजूर करण्यांत आले. १८९१ सालीं राष्ट्रीय सभेची बैठक सालदरसाल भरविण्यांत यावी किंवा नाहीं व प्रतिनिधींची संख्या व सभेची जागा वगैरे प्रश्नांबद्दल एक कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीनें असें ठरविलें कीं, राष्ट्रीय सभेची बैठक सालदरसाल भरविण्यांत यावी; त्यांत खंड पडूं देऊं नये व पूर्वींच्या नियमाप्रमाणेंच ती भरविण्यांत यावी.

राष्ट्रीय सभेनें बहुमतानें हाच ठराव मंजूर केला व खर्चाबद्दलची दरसालप्रमाणें मंजुरी देण्यांत आली. खर्चासंबंधीं राष्ट्रीय सभेंतील ठराव पाहून कोणासही हसूं आल्यावांचून राहणार नाहीं. पार्लमेंट ज्याप्रमाणें दरसाल राज्यकारभाराचा खर्च मंजूर करतें, त्याप्रमाणें दरसाल ४० हजार रुपये मंजूर करण्याचा प्रघात पडलेला दिसतो. पार्लमेंटची मंजुरी मिळतांच प्रधानमंडळास इंग्लंडच्या तिजोरींतून पैसे मिळण्यास कधींच अडचण पडत नाहीं, परंतु कॉंग्रेसच्या सेक्रेटरीस मंजुरीप्रमाणें कोठल्याही तिजोरींतून रक्कम यावयाची नसल्यामुळें भिक्षांदेहीनेंच ती वसूल करावी लागते. राष्ट्रीय सभेचें येथील कायमचें ऑफिस किंवा कायमचा नोकरवर्ग—आजपर्यंत अस्तित्वांत आला नाहीं याचें मुख्य कारण हेंच आहे. इंग्लंडांतील ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीचें काम चालविण्यासाठीं जी विवंचना जनरल सेक्रेटरीस दरसाल पडत आहे तिची हकीकत अत्यंत उद्वेगजनक आहे. सनदशीर चळवळीची पात्रता किंवा कळकळ आपल्या लोकांत कितपत आहे याची साक्ष राष्ट्रीय सभेंत दरसाल मंजूर होणाऱ्या व दरसाल प्रत्यक्ष वसूल होणाऱ्या रकमेवरूनच कोणासही पटणार आहे. १८९२ सालीं राष्ट्रीय सभेकरितां जो कायक निधि स्थापन केला होता, तो पांच हजार रुपयांचा होता व न्यू ओरिएंटल ब्यॅंक कॉरपोरेशन यांमध्यें ठेवलेला होता. त्या ब्यॅंकेचें दिवाळें निघाल्यामुळें तो बहुतेक नाहींसा झाला. पंडित अयोध्यानाथ यांच्या मृत्यूमुळें रिकाम्या झालेल्या जॉइंट सेक्रेटरीच्या जागीं रायबहादूर आनंदाचार्लू यांची नेमणूक करण्यांत आली. १८९३ सालचे अखेरीस मि. ह्यूम यांसच जनरल सेक्रेटरी नेमण्यांत आलें. १८९४ च्या बैठकींत घटनेचा प्रश्न फिरून विचाराकरितां आला व १८९५ सालीं पुण्यास राष्ट्रीय सभा भरावयाची असल्यामुळें पुण्याच्या स्टॅंडिंग कॉंग्रेस कमिटीनें या बाबतींत नियम करून ते पुढील बैठकीचे वेळीं सभेपुढें मांडण्यांत यावेत असें ठरलें. १८९५ सालीं हे नियम पुण्याच्या कमिटीनें राष्ट्रीय सभेपुढें मांडले व राष्ट्रीय सभेनें ते नियम सर्व स्टॅंडिंग कॉंग्रेस कमिट्यांकडे पाठवावे व त्यांनीं आपले अभिप्राय जनरल सेक्रेटरी यांस १८९६ च्या सभेच्या पूर्वी निदान तीन महिने कळवावे असें मुक्रर करण्यांत आलें. या सालीं मि. वाच्छा यांस जॉइंट सेक्रेटरी नेमण्यांत आलें. १८९६ व ९७ सालीं घटनेचा प्रश्न तसाच पडून राहिला, १८९८ सालीं खालील ठराव मंजूर करण्यांत आला. "सर्व ठिकाणच्या स्टॅंडिंग कॉंग्रेस कमिट्यांनीं ठिकठिकाणीं मध्यवर्ती संस्था स्थापून राष्ट्रीय सभेच्या उद्देशाचा प्रसार करावा व आपल्या कामाचा रिपोर्ट दरसाल राष्ट्रीय सभेकडे पाठवावा व अध्यक्ष व माजी सर्व अध्यक्ष व यंदाचे वर्षी नेमलेले नऊ गृहस्थ यांनीं कॉंग्रेसची घटना तयार करावी व तिचा विचार पुढील राष्ट्रीय सभेंत प्रामुख्यानें करावा." १८९९ सालीं राष्ट्रीय सभेनें घटनेबद्दल १० नियम मंजूर केले:—

१ राष्ट्रीय सभेचा हेतु हिंदुस्थानांतील लोकांची उन्नति सनदशीर मार्गांनीं करावी असा आहे.

२ आदल्या वर्षीच्या सभेंत ठरलेल्या ठिकाणीं व वेळीं राष्ट्रीय सभा भरविण्यांत यावी.

३ इंडियन कॉंग्रेस कमिटीस राष्ट्रीय सभेच्या बैठकीची वेळ व ठिकाण जरूर त्या प्रसंगीं बदलतां येईल. सभेच्या बैठकी एकाहूनही अधिक बोलाविण्याचा अधिकार इंडियन कॉंग्रेस कमिटीस आहे.

४ राजकीय संस्थांनीं किंवा सार्वजनिक सभांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचा या सभेंत समावेश होईल. राष्ट्रीय सभेच्या कामाची व्यवस्था इंडियन कॉंग्रेस कमिटी या संस्थेकडून होईल. इच्यामध्यें ४५ सभासद असावे व ते राष्ट्रीय सभेनें दरसाल निवडावे; त्यांपैकीं निदान ४० निरनिराळ्या कॉंग्रेस कमिट्यांनीं किंवा राष्ट्रीय सभेस हजर असलेल्या निरनिराळ्या प्रांतांतील प्रतिनिधींनीं निवडलेले असावे.

५ इंडियन कॉंग्रेस कमिटीच्या बैठकी दर सालां-तून निदान तीन व्हाव्यात. राष्ट्रीय सभेच्या सेक्रे-टरीनेंच या कमिटीचें काम करावें. शिवाय पगारी असिस्टंट सेक्रेटरी व कारकून वगैरे नेमण्यांत यावे.

६ प्रत्येक प्रांतांत प्रांतिक कॉंग्रेस कमिटी स्थापन करण्यांत यावी व त्यांनीं देशांत राजकीय ज्ञानाचा फैलाव करावा. प्रांतिक परिषदा भरवाव्या व आपल्या कामाचा रिपोर्ट दरसाल इंडियन कॉंग्रेस कमिटीकडे पाठवावा.

७ अध्यक्ष नेमणें, ठरावांचा मसुदा करणें, प्रति-निधींच्या निवडणुकीबद्दल नियम करणें, वक्त्यांची निवड करणें व सभेचा कार्यक्रम ठरविणें, हीं सर्व कामें इंडियन कॉंग्रेस कमिटीनें करावीं.

८ प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनींही असेच नियम करून ते इंडियन कॉंग्रेस कमिटीकडून मंजूर करून घ्यावेत.

९ इंग्लंडमध्यें राष्ट्रीय सभेचा हेतु सिद्धीस नेण्या-करितां ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी या नांवाची संस्था स्थापन करण्यांत यावी व तिला लागणारी पैशाची मदत प्रांतिक कमिट्यांकडून मिळवून द्यावी.

१० इंडियन कॉंग्रेस कमिटीनें कायमचा कॉंग्रेस फंड उभारण्याची खटपट करावी.

१९०० सालीं इंडियन कॉंग्रेस कमिटींत एक्स-ऑफिशिओ म्हणून राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष, माजी सर्व अध्यक्ष, सभेचे सेक्रेटरी व असिस्टंट सेक्रेटरी, स्वागत कमिटीचे चेअरमन व सेक्रेटरी यांचाही समावेश करण्यांत आला.

१९०१ सालीं **इंडिया** पत्रही राष्ट्रीय सभेच्या विद्यमानेंच चालविण्यांत येऊन त्याच्या प्रती निर-निराळ्या प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनीं खपविण्याची तजवीज करावी असें ठरलें. या व्यवस्थेचाही उप-योग कांहीं न होतां, **इंडिया** पत्रास वर्गणीदार मिळण्याची मुष्कील पडून तें बंद पडण्याची वेळ आली व शेवटीं नामदार गोखले यांस हें काम अंगावर घेऊन **इंडिया** पत्र जिवंत ठेवण्याची तज-वीज करावी लागली. १९०२।०३ सालीं **इंडिया** पत्र खपविण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं राष्ट्रीय सभेच्या वतीनें सेक्रेटरी नेमण्यांत आले. व त्याच सालीं नामदार गोखले यांस वाच्छा यांचे बरोबर जॉइंट सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

१९०४ सालीं घटनेचा प्रश्न पुन्हां राष्ट्रीय सभे-पुढें आला व ६ प्रांतांतील २० लोकांची कमिटी नेमून तिजकडे तो सोंपविण्यांत आला.

१९०५ सालीं राष्ट्रीय सभेची एक स्टॅंडिंग कमिटी नेमण्यांत आली. तींत १५ सभासद असून २ जॉइंट सेक्रेटरीही त्यांतच होते, व त्यांनीं राष्ट्रीय सभेच्या ठरावांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करावा असें ठरविण्यांत आलें. १९०६ सालीं पूर्वींच्या वर्षी नेमलेल्या स्टॅंडिंग कॉंग्रेस कमिटीनें केलेल्या सूचना अमलांत आणाव्यात असा ठराव मंजूर करण्यांत आला. या नियमाप्रमाणें (१) प्रत्येक प्रांतांत एक प्रांतिक कॉंग्रेस कमिटी असावी. (२) प्रत्येक प्रांतिक कमिटीनें जिल्हा-सभा स्थापन कराव्यात. (३) राष्ट्रीय सभेची व्यवस्था करण्याकरितां एक सेंट्रल स्टॅंडिंग कमिटी निवडण्यांत यावी ह्याच्यामध्यें ५० सभासद असून शिवाय अध्यक्ष व जनरल सेक्रे-टरी हे एक्स–ऑफिशिओ सभासद असावेत. (४) अध्यक्षाच्या निवडणुकीबद्दल असें ठरविण्यांत आलें कीं, ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरावयाची असेल तिनें एक स्वागत मंडळी स्थापन करावी व इतर प्रांतांतील प्रांतिक कमिट्यांचें मत घेऊन स्वागत कमिटीच्या $\frac{२}{३}$ सभासदांनीं अध्यक्षाची निवडणूक करावी. स्वागत कमिटींत जर $\frac{२}{३}$ मतें अध्यक्षाच्या निवडणुकीस मिळणार नाहींत तर अध्यक्षाच्या निवडणुकीचा प्रश्न सेंट्रल स्टॅंडिग कॉंग्रेस कमिटीकडे सोंपवावा व तिचा निर्णय अखेरचा मानण्यांत यावा. विषयनिर्णायक कमिटींतील संख्याही प्रांतवारीनें करून ती ८५ ठरविण्यांत आली व ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरेल त्या प्रांतानें १० सभासद नेमावेत; शिवाय अध्यक्ष, कमिटीचे चेअरमन, माजी सर्व अध्यक्ष, माजी

सर्व चेअरमन, जनरल सेक्रेटरी व स्थानिक सेक्रेटरीज यांचाही सबजेक्ट कमिटींत समावेश करण्यांत आला. १९०६ च्या घटनेनें पूर्वींच्या घटनेपेक्षां अध्यक्ष निवडण्याचा हक्क व सबजेक्ट कमिटीचे मेंबर निवडण्याचा हक्क नियमित करण्यांत आला. १९०४ सालापासून राष्ट्रीय सभेंत एक नवीन पक्ष उत्पन्न झाला होता. या पक्षाचीं मतें राष्ट्रीय सभेच्या पूर्वपरंपरेस सुटून होतीं. अमक्या मताचाच अध्यक्ष राष्ट्रीय सभेस असावा अशी या पक्षास आवश्यकता वाटूं लागली. सभेपुढें येणारे विषय आपल्या मताचे व आपल्या पक्षाचे असावेत, असा त्याचा प्रयत्न होता. सबजेक्ट कमिटींत आपल्या सहानुभूतीचे लोक असल्यानें आपल्या पक्षास यश येईल, असें या पक्षास वाटूं लागलें. व याच कारणामुळें अध्यक्षाची निवडणूक व सबजेक्ट कमिटीची संख्या निश्चित करण्याचा प्रसंग आला. १९०६ सालीं कलकत्ता येथील सबजेक्ट कमिटींतील पुष्कळ लोकमान्य पुढाऱ्यांनीं आपल्या सौजन्याचें केलेलें प्रदर्शन, बिपिनचंद्र पाल व अश्विनीकुमार दत्त यांनीं दादाभाईसारख्या परमपूज्य व्यक्तीस दिलेल्या शिव्या, या सर्वांचा विचार करतां वरील नियमांची किती आवश्यकता होती हें सहज दिसून येईल. सुरत येथें १९०७ सालीं बखेडा होऊन राष्ट्रीय सभा समूळ नाहींशी झाली परंतु बाबू सुरेंद्रनाथ यांनीं म्हटल्याप्रमाणें "The Congress is dead. Long live the Congress !"

सुरतेच्या प्रसंगानंतरही राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आहे व हेंच तिच्या चिरंतनपणाचें खरें दर्शक आहे.

सुरतेच्या तंट्यामुळें दोन गोष्टींची तरतूद करणें भाग पडलें. १९०५ सालापासून निर्भेळ स्वराज्यवाल्यांचा एक पक्ष अस्तित्वांत आला होता; व तो दिवसेंदिवस बळावत होता. बहिष्कार हेंच या पक्षाचें मुख्य शरसंधान होतें. अर्ज, विनंत्या, मुलाखती वगैरे रूढ मार्गांची हेटाळणी करणें हें या पक्षाचें ब्रीद होतें; व प्रतिनिधींच्या संख्येवर आपल्या पक्षाची सरशी करण्याचा यांचा मानस होता. प्रतिनिधींच्या संख्येस आळा घालण्याची आवश्यकता जरी १८८९ पासून भासत होती, तरी सुरतेच्या प्रकरणामुळेंच या अडचणीचा निकाल करणें भाग आलें. ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरते, तेथें सोईमुळें व सांनिध्यामुळें स्थानिक प्रतिनिधींची संख्या फार असते, असा नेहमींचा अनुभव आहे. यामुळेंच नुसत्या प्रतिनिधींच्या संख्येवरून राष्ट्रीय सभेचें मत निश्चित करावयाचें असेल तर, ज्या प्रांतांत राष्ट्रीय सभा भरते तेथील प्रतिनिधिंसच सर्व राष्ट्राचें मत नियमन करण्याची सत्ता प्राप्त होईल. ही स्थिति समाधानकारक आहे असें कोणीही म्हणणार नाहीं. व याच कारणाकरितां सभेंतील मत निश्चित करण्याचे नियम करणें अपरिहार्य झालें. तसेंच राष्ट्रीय सभेंत जे प्रतिनिधि येतात, त्यांच्या लायखीबद्दल व जबाबदारीबद्दल कांहीं निर्बंध घालून देणेंही अवश्य वाटूं लागलें. निर्भेळ स्वराज्य व बहिष्कार, त्यांतून उत्पन्न होणारा अनर्थ, आजपर्यंतचें राष्ट्रीय सभेचें धोरण, लोकमताची राजकीय हक्काची पात्रता, स्वार्थत्यागाची तत्परता इत्यादि बिकट प्रश्नांचा विचार करून राष्ट्रीय सभेचें सुकाणूं हाकतां येईल किंवा तिच्या कसलेल्या नावाड्यांस आपल्या समंजस विचारांनीं प्रोत्साहन देतां येईल, अशाच प्रतिनिधींचा समावेश या सभेंत होईल अशी परिस्थिति प्राप्त झाली. यापूर्वी आलेल्या अडचणी व सुरतेच्या कलहानें उत्पन्न झालेल्या नवीन अडचणी या सर्वांचा विचार करूनच राष्ट्रीय सभेस कायमची घटना करण्याचें काम अवश्य येऊन ठेपलें. राष्ट्रीय सभा उत्पन्न झाल्यापासून भिजत पडलेल्या या प्रश्नाचा या प्रसंगानें एकदांचा निकाल लागला.

सुरतेस राष्ट्रीय सभा मोडल्यानंतर सुमारें ८०० प्रतिनिधींनीं इतिहासांतील दाखल्यास अनुसरून राष्ट्रीय सभेची परंपरा कायम ठेवण्यासाठीं कन्व्हेन्शनची परिषद् २८ डिसेंबर १९०७ रोजीं राष्ट्रीय सभेच्या सभामंडपांतच भरविली. आदले दिवशींच्या

अनिष्ट प्रकाराची पुनरावृत्ति होऊं नये, म्हणून राष्ट्रीय सभेचें कामकाज चालविण्यासाठीं नियम करण्याकरितां शंभर लोकांची कमिटी नेमण्यांत आली. या कमिटीनें ता. १८ व १९ एप्रिल १९०८ रोजीं अलाहाबाद येथें राष्ट्रीय सभेची घटना निश्चित केली व तिला मूर्त स्वरूप दिलें. या घटनेस अनुसरून राष्ट्रीय सभेच्या आजपर्यंतच्या सात बैठकी भरविण्यांत आल्या आहेत. या घटनेंत कांहीं दुरुस्ती करण्याकरितां १९१० सालीं बंगालच्या प्रांतिक कमिटीनें सूचना केल्या होत्या व त्यांचा विचार करण्यासाठीं अलाहाबाद येथें १९१० सालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेनें एक कमिटी नेमिली तिनें १९११ सालीं या बाबतींत आपला अभिप्राय कळवावा असें ठरलें. १९११ सालीं कलकत्त्यास पुन्हां तोच प्रश्न ऑल इंडिया कमिटीकडे सोंपविण्यांत आला. १९१२ च्या राष्ट्रीय सभेनें याचा निकाल करावा असें ठरलें. १९१२ सालीं बंकीपूर येथें वाटाघाट होऊन १९०८ सालीं मंजूर झालेल्या घटनेंत प्रतिनिधि निवडण्याच्या बाबतींत फरक करण्यांत आला. या दुरुस्तीनें कॉंग्रेस कमिट्यांना किंवा कॉंग्रेसशीं संलग्न असलेल्या इतर संस्थांना जाहीर सभा भरवून प्रतिनिधि निवडण्याचा हक्क देण्यांत आला व पूर्वीप्रमाणेंच जाहीर सभांतूनही प्रतिनिधि निवडण्याची मुभा या सवलतीनें ठेवण्यांत आली. फक्त या सभा बोलावण्याची परवानगी मात्र जबाबदार संस्थांकडे सोपविण्यांत आली आहे. यांत अपवाद घेण्यासारखें कांहींच उरलें नाहीं. आपल्यावरील जबाबदारी सभोंवतालची स्थिति ओळखून अशा संस्थांस चांगल्याप्रकारें पार पाडतां येईल व त्या योगानें राष्ट्रीय सभेचा भारदस्तपणाही आपोआपच वाढेल हें निर्विवादच आहे. या दुरुस्तीच्या योगानें घटनेबद्दल कांहीं विशिष्ट लोकांखेरीज इतरांचें समाधान झालें आहे. तसेंच या वर्षी राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधींची फी विसांची दहा करण्यांत आली. याप्रमाणें घटनेची हल्लींची स्थिति आहे. गेल्या वर्षी मद्रासेस कांहीं दुरुस्ती सुचविण्यांत आली होती. त्याबद्दल राष्ट्रीय सभन अद्याप निश्चित मत दिलें नाहीं. व आजच्या स्थितींत तरी १९१२ सालीं झालेल्या दुरुस्तीसह १९०८ सालीं मंजूर झालेली घटना कायम आहे. येथपर्यंत आम्हीं घटनेचा जो २५ वर्षांचा इतिहास दिला आहे, त्यावरून या प्रश्नाचें महत्त्व किती आहे हें आढळून येईल. दर दोन तीन वर्षांनीं कोणत्या तरी स्वरूपानें राष्ट्रीय सभेपुढें हा प्रश्न येत होता. त्याची वाटाघाट झालेली आहे. पुष्कळ कमिट्या नेमिल्या आहेत. जरूर त्या प्रसंगीं नियमही केले आहेत. परंतु बऱ्याच वेळां कायमचा निकाल लावण्याचें काम कोणत्या तरी सबबींवर मागें टाकिलें आहे. मद्रास व पंजाब येथील प्रतिनिधींमध्यें घटनेबद्दल अत्यंत आतुरता नेहमीं दिसून आली आहे. प्रथम हा प्रश्न १८८७ सालीं मद्रास येथें काढण्यांत आली. १९०३ सालीं मद्रासेस सबजेक्ट कमिटीमध्यें याबद्दल मोठा कडाक्याचा वाद झाला. घटना अस्तित्वांत आलीच पाहिजे, असा मद्रासच्या प्रतिनिधींचा आग्रह होता. प० सर फेरोजशहा हे त्यावेळीं मद्रासेस आले होते, व त्यांनीं आपल्या अलौकिक वक्तृत्वानें व भारदस्त कोटिक्रमानें घटनेबद्दल उतावीळपणा करूं नये, असा उपदेश केला व तो सर्वांस पसंत पडला. राष्ट्रीय सभा ही वाढती संस्था आहे व तिला नियमांनीं जखडून टाकूं नये असें त्यांचें म्हणणें होतें. अनुभवाप्रमाणें, गरजांप्रमाणें, उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीप्रमाणें तात्पुरते नियम करावेत, मागील वहिवाटीस मान द्यावा व आपलें काम चालवावें. पुष्कळ प्रजासत्ताक राज्यांतील घटना सुद्धां एकदम अस्तित्वांत आलेल्या नाहींत. हा कालाचा प्रश्न आहे. आपले उद्देश, आपली महत्त्वाकांक्षा ज्याप्रमाणें वयपरत्वें वाढत आहे, त्याप्रमाणें आपलें नियमनहि स्थित्यनुसार असलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. यामुळेंच १९०७

पर्यंत हा प्रश्न भिजत पडला होता. सुरतेच्या बिनतोड प्रसंगामुळें घटना अस्तित्वांत आली. आवश्यकता (Necessity) पुष्कळ वेळेस सत्कार्य घडवून आणिते व अडचणींतून मार्ग दाखविते. तोच प्रकार सुरतेच्या बखेड्यामुळें अनुभवास आला. घटना अस्तित्वांत आली. या वेळीं तयार केलेल्या घटनेचें स्वरूप वेळोवेळीं मंजूर झालेल्या राष्ट्रीय सभेच्या ठरावांत दृग्गोचर होत आहे. संकलित रीतीनें तें अलाहाबादेस मांडण्यांत आलें.

सुरतेस राष्ट्रीय सभेंतून बाहेर पडलेले कांहीं लोक घटनेच्या सबबीवर राष्ट्रीय सभेंत सामील होण्यास कबूल नाहींत. वस्तुतः राष्ट्रीय सभेच्या खऱ्या अभिमान्यांनीं असलेली घटना मान्य करून आंत येऊन शक्य ती सुधारणा करून घेतली पाहिजे. तसें करण्यास प्रत्येकास मुभा आहे. १९१२ सालच्या दुरुस्तीवरून हाच योग्य मार्ग आहे हें कोणासही दिसून येईल. कोणत्याही संस्थेची दुरुस्ती करावयाची असल्यास रुसून बाहेर राहून ती होत नाहीं. दुसरी गोष्ट १९०७ पर्यंत राष्ट्रीय सभेच्या कामांत पुढाकार घेणाऱ्या बहुतेक लोकांस ती पसंत आहे. व ती त्यांनीं अंगीकारली आहे. तिसरी गोष्ट १९०७ पूर्वीच्या राष्ट्रीय सभेंतील प्रमुख पुढाऱ्यांपैकीं घटनेच्या विरुद्ध असलेले लोक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके सुद्धां नाहींत. चौथी गोष्ट या घटनेंत निसर्गतः कांहीं दोष आहेत असें आजपर्यंत दाखविण्यांत आलें नाहीं. पांचवी गोष्ट या घटनेपेक्षां एखादी सरस घटना या ८ वर्षांच्या कालांत या लोकांनीं सुचविली नाहीं. सहावी गोष्ट जहाल पक्षांतील बॅरिस्टर रसूल, नामदार उपासनी, दादासाहेब करंदीकर यांसारख्या लोकमान्य पुढाऱ्यांसही राष्ट्रीय सभेस सामील होण्यास घटनेची अडचण आजपर्यंत वाटली नाहीं.

नेमस्त पक्षाबद्दल यत्किंचितही सहानुभूति नसणाऱ्या जहाल पक्षांतील एका पुढाऱ्यानें त्याच पक्षाच्या एका मासिकांत घटनेच्या आवश्यकतेची कबूली दिली आहे. देशहिताबद्दल कळकळ वाटणाऱ्या प्रत्येक राष्ट्रीयभक्तास राष्ट्रीय सभेंत सामील न होण्यास घटनेची सबब निरर्थक आहे. देशाची गति प्रगमनशील आहे व सुरतेनंतरही आज ८ वर्षें राष्ट्रीय सभा आपला मार्ग आक्रमण करीत आहे. घटनेकरितां अडून बाटेल त्यानें खुशाल घरीं बसावें. देश त्यांचेकरितां वाट पाहण्यास तयार नाहीं. या बाबतींत बाबू अंबिकाचरण मुजुमदार यांणीं काढलेले विचार मननीय आहेत.

" If the separatists at Surat had, instead of attempting to wreck the Congress, started a counter organisation with a definite policy and programme, they might well have established their position either as progressives or conservatives in Indian Politics; and if, even after the regrettable incident, they had openly and earnestly pressed a legitimate scheme before the country instead of sulkily retiring to their tents and dissociating themselves from all practical politics, they would not have been charged with committing political suicide, and they could have, in all probability, gained and not lost by their opposition."

राष्ट्रीय सभेचें ध्येय.

मि. ह्यूम यांस राष्ट्रीय सभेचे जनक असें म्हणण्याचा परिपाठ आहे. राष्ट्रीय सभेचें ध्येय कोणतें, ती कोणत्या उद्देशानें स्थापन केली, तिचा विकास कोणत्या क्रमानें व्हावयाचा आहे, व तिचें परिणत स्वरूप कोणतें होईल याची कल्पना मि. ह्यूम यांस स्पष्टपणें होती. १८८८ सालीं केलेल्या एका भाषणांत त्यांनीं यासंबंधीं फार बहारीचें वर्णन केलें आहे.

The Congress was intended to foster a wider altruism and a more

genuine public spirit by concentrating the most strenuous efforts on great national problems and diminishing the absorption in local or purely selfish interests; to educate all, who took part in it, not merely in the art of public speaking and debate, developing the faculties of thinking out clearly opinions and expressing them lucidly to others, not merely in habits of accuracy and research but also in the practice of self-control, moderation and willingness to give and take; to educate them in fact into what has been described as a genuine Parliamentary frame of mind, to familiarise the country with the methods and working of representative institutions on a large scale, and thus, as this familiarity grew, to demonstrate to the Government and people of England that India was already ripe for some measure of those institutions to which the entire intelligence of the country so earnestly aspires.

वरील अवतरणांत भविष्य केल्याप्रमाणें राष्ट्रीय सभेनें देशांत एकराष्ट्रीयत्वाची उदात्त भावना जागृत करण्याचा प्रयत्न केला. महत्त्वाच्या प्रश्नांबद्दल लोकमत जागृत केलें. जाहीर व्याख्यानें व भारदस्त कोटिक्रम यांची कला लोकांस शिकविली. आपलें म्हणणें मुद्देसूद रीतीनें, बिनचूक व्यवस्थित रीतीनें व नेमस्तपणानें अधिकाऱ्यांपुढें कसें ठेवावें याचें शिक्षण येथील लोकांस दिलें. प्रातिनिधिक संस्थांमध्यें कसें वागावें, कोणत्या तऱ्हेनें आपली बाजू समर्थन करावी व आत्मोन्नतीच्या कामीं या संस्थांचा कसा उपयोग करावा हें धोरणही लोकांस घालून दिलें. लोकांत स्वराज्याचा हक्क मागण्याची पात्रता उत्पन्न केली. ह्यूम साहेबांनीं वर्णन केलेला हा विकास प्रत्यक्ष राष्ट्रीय सभेच्या बैठकींत अध्यक्षांच्या भाषणावरून व मंजूर झालेल्या ठरावांवरून कसकसा होत गेला व ध्येयाची उन्नति, अनुभवाच्या, पात्रतेच्या व आत्मविश्वासाच्या यत्नानें कसकशी होत गेली हा इतिहास फार मनोरंजक आहे. सभेच्या पहिल्या वर्षी राष्ट्रीय सभेचे हेतु खालील नमूद केले आहेत.

१ देशांतील निरनिराळ्या भागांत राष्ट्रोन्नतीकरितां तळमळीनें काम करणाऱ्या लोकांमध्यें स्नेह व प्रेम वृद्धिंगत करावें.

२ निकट सहवासानें निरनिराळ्या देशभक्तांमधील जात, धर्म, पंथ व स्थानिक गैरसमज दूर करून सर्वांमध्यें ऐक्यभाव उत्पन्न करावा व लॉर्ड रिपन यांच्या संस्मरणीय कारकीर्दीनें उत्पन्न झालेली एक राष्ट्रीयत्वाची भावना दृढतर करावी.

३ देशांतील सामाजिक प्रश्नांबद्दल वादविवादानें सुशिक्षित लोकांमध्यें निश्चित मतें तयार करावींत व तीं सर्व एकत्र संकलित करावींत.

४ पुढील वर्षांत देशोन्नतीच्या कामीं राष्ट्रभक्तांनीं कोणतें काम करावें याची दिशा मुक्रर करावी.

मि. उमेशचंद्र बानर्जी यांनीं आपली आकांक्षा एवढीच आहे कीं, राजसत्तेचा पाया विस्तीर्ण देऊन येथील लोकांचाही त्यांत समावेश व्हावा, राज्यकारभाराचा योग्य वांटा त्यांस देण्यांत यावा व हा प्रश्न कालावर व आपल्या पात्रतेवर अवलंबून आहे— असें त्यांनीं सांगितलें. पुढें चार वर्षांनीं राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष कलकत्त्यांतील प्रसिद्ध व्यापारी जार्ज यूल यांनीं असें सांगितलें कीं, कौंसिलांत निम्मे लोकनियुक्त सभासद निवडले असतां व प्रश्न विचारण्याचा हक्क दिला असतां प्रस्तुतच्या स्थितींत आपलें समाधान होईल. याच गोष्टीचा अनुवाद मि.उमेशचंद्र बानर्जी यांनीं १८९२ सालीं दुसऱ्यांदां अध्यक्ष असतांना केला. आपल्यास कोणते हक्क पाहिजे आहेत, आपल्या महत्त्वाकांक्षेची भरारी कोठपर्यंत आहे, ही कल्पना जोरदारपणें प्रथमतः नामदार शंकर नायर यांनीं १८९७ सालीं राष्ट्रीय सभेपुढें मांडिली.

It is the hope that one day we may be admitted as equal sharers in this great inheritance, that we shall have all the civil rights associated with the English Government, that we shall be admitted as freely as Englishmen themselves in this temple of freedom; it is this hope that keeps India and will keep her always attached to the British. On this race question, no concession is possible. No compromise can be accepted as far as it lies in us. We must insist on perfect equality. Inequality means race inferiority. Acquisition therefore of all civil rights conferred on Englishmen, removal of all disabilities on Indians as such, these must be our aim.

वरील उद्गार किती बाणेदार आहेत हें सहज दिसून येणार आहे. अपूर्व योगानें नामदार शंकर नायर यांस हिंदुस्थान सरकारच्या शिक्षणखात्याचे प्रधान नेमण्यांत आलें आहे. १८९७ सालीं काढलेल्या उद्गारांचें स्मरण ठेवून नायर हे आपल्या कारकीर्दीत आपल्या म्हणण्याची प्रचीति लोकांस आणून देतील अशी आम्हांस उमेद आहे.

१८९८ सालीं बाबू आनंदमोहन घोस यांनीं एतद्देशीय लोकांचा सरकारच्या कार्यकारी कौंसिलांत प्रवेश होणें अवश्य आहे असें प्रतिपादन केलें.

स्वराज्य.

१८९९ सालीं स्वराज्यस्थापनेशिवाय देशाची उन्नति होणार नाहीं असें प्रथमतः स्पष्ट शब्दांनीं बाबू रमेशचंद्र दत्त यांनीं अध्यक्ष या नात्यानें प्रतिपादन केलें. रमेशचंद्र दत्त यांस राज्यव्यवस्थेचें इत्थंभूत संपूर्ण कळलें होतें. त्यावेळीं शक्य असलेली सर्वांत मोठी हुद्द्याची जागा त्यांस मिळाली होती व लोकांच्या उन्नतीस खरा उपाय कोणता याचा, नोकरींतलि पुष्कळ वर्षांच्या अनुभवाप्रमाणें, विचार करण्याची त्यांचे ठिकाणीं सर्वस्वीं पात्रता होती. सरकारचा जुना व विश्वासू नोकर या नात्यानेंही राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून त्यांनीं सरकारास निग्रहाची विनंती केली आहे.

It is possible to prevent distress and deaths from famine, to spread prosperity and contentment, and to evoke the zealous and loyal support of a grateful nation only by conceding to the people, in so far as is safely possible, *the blessings of self-government.* It is not possible without this concession, without admitting the people to a real share in the control of their concerns, to save India from distress and discontent and deaths from famine.

१९०३ सालीं लालमोहन घोस यांनीं देशोन्नति होण्याकरितां मोफत प्राथमिक शिक्षणाचा सर्वत्र प्रसार झाला पाहिजे व तो सक्तीनेंही झाला पाहिजे असें सुचविलें.

१९०४ सालीं स्वराज्याच्या कल्पनेचा विस्तार सर हेनरी कॉटन यांनीं आपल्या भाषणांत केला. या देशांत ग्रेट ब्रिटनच्या छत्राखालीं अमेरिकेप्रमाणें स्वतंत्र व संयुक्त राज्यव्यवस्था अस्तित्वांत यावी अशी आर्यमातेच्या पुत्रांची महत्त्वाकांक्षा आहे. हा सुदिन केव्हां येईल तो येवो; परंतु ही महत्त्वाकांक्षा तृप्त करून घेण्यासाठीं खटपट करणें हें येथील लोक आपलें कर्तव्य समजत आहेत.

The ideal of an Indian Patriot is the establishment of a federation of free and separate states-the United States of India-placed on a fraternal footing, with the self governing colonies, each with its local autonomy, cemented together under the aegis

of Great Britain; that is a forecast of a future dim and distant though it be, the gradual realisation of which it is the previlege of Government to regulate and the aim and hope and aspiration of the Indian people to attain.

मि. नायर, रमेशचंद्र दत्त, सर हेनरी कॉटन यांनीं स्वराज्याबद्दल काढलेलें चित्र भविष्यकालीन होतें. हिंदुस्थानांतील सुशिक्षितांच्या महत्त्वाकांक्षेची अंतिम सीमा म्हणून या कल्पनेचा त्यांनीं निर्देश केला होता. परंतु हिंदुस्थानांतील प्रचलित स्थितींत स्वराज्याची आवश्यकता आहे व हें ध्येय काल्पनिक नसून राष्ट्रीय सभेच्या इतर मागण्यांप्रमाणें अगदीं व्यवहार्य आहे व देशांत पसरलेल्या भयंकर असंतोषास आळा घालण्याकरितां या कल्पनेस मूर्त स्वरूप दिलें पाहिजे असें प्रथमतः नामदार गोखले यांनीं विलायतेंस आपल्या भाषणांत १९०५ सालीं न्यू रिफार्म क्लबांत त्यांस दिलेल्या मेजवानीचे वेळीं सांगितलें.

The only solution that is possible,-a solution demanded alike by our interest and by your interest as also by your national honour-is the steady introduction of Self-Government in India, substituting the Indian for the English agency, expanding and reforming the Legislative Councils till they become in reality true controlling bodies, and letting the people generally to manage their own affairs.

१९०५ सालीं बनारस येथील राष्ट्रीय सभेंत त्यांनीं हाच उपदेश केला. कल्पनेच्या अज्ञेय जगांतून व्यावहारिक दृश्य जगांत त्यांनीं हें ध्येय राष्ट्रापुढें ठेविलें व राष्ट्रीय सभेनें या ध्येयाचा अनुवाद करावा अशी त्यांनीं देशास विनंती केली. राष्ट्रीय सभेनें मूर्तपणें व स्पष्ट शब्दांनीं स्वराज्याच्या ध्येयाचा या वेळीं अंगीकार केला व या वेळेपासून देशांतील लोकांच्या स्वराज्याच्या कल्पनेस जोरानें प्रोत्साहन मिळालें.

The goal of Congress is that India should be governed in the interests of the Indians themselves and that in course of time a form of Government should be attained in this country similar to what exists in the self governing colonies of the British Empire

वसाहतींप्रमाणें हिंदुस्थानांत स्वराज्य असावें हें ध्येय उघडपणें निर्दिष्ट करण्यांत आलें. १९०६ सालीं दादाभाई नवरोजी यांनीं कलकत्त्यास याच ध्येयाचा अनुवाद करून **स्वराज्य** या एका शब्दांत त्याचा निर्देश केला.

We want only justice. Instead of going into any further divisions or details of our rights as British citizens, the whole matter can be summarised in one word " Self-Government " or **स्वराज्य** like that of the United Kingdom or the colonies.

स्वराज्य या शब्दांत जी जादू आहे तिनें सर्व श्रोते अगदीं भारून गेले. सर्व देशभर हा शब्द दुमदुमून गेला व प्रत्येक विचारी मनुष्यास याचा निदिध्यास लागला आहे. दादाभाईनीं आपल्या कल्पनेंत संयुक्त राज्यांतील स्वराज्याप्रमाणें किंवा कॉलनीप्रमाणें आपल्यास स्वराज्य मिळावें असें मागणें केलें आहे. बाबू भूपेंद्र बसू यांनीं कॉलनीच्या स्वराज्यापेक्षां येथें अमेरिकेप्रमाणें संयुक्त स्वराज्य असावें व तें इंग्लंडच्या साम्राज्यछत्राखालीं असावें व भागीदाराप्रमाणें इंग्लंड व हिंदुस्थान यांचा बरोबरीचा संबंध असावा असें प्रतिपादन केलें आहे.

The idea that must be pursued and which the Congress has set before itself was that of co-ordination and comradeship of a joint partnership on equal terms.

येथपर्यंत काँग्रेसच्या ध्येयाची मजल कसकशी वाढत गेली व स्वराज्याच्या कल्पनेचा विकास कसकसा होत गेला हें आम्हीं दाखविलेंच आहे. पुष्कळ दिवसपर्यंत हें ध्येय काल्पनिक मानलें जात होतें. पुढें तें व्यवहार्य ठरलें व हल्लीं या कल्पनेच्या निरनिराळ्या स्वरूपांबद्दल देशांत वाटाघाट सुरू आहे. मिसेस बिझांट यांनीं होम रूल लीगबद्दल जे प्रयत्न चालविले आहेत त्या योगानें हा प्रश्न सर्व देशापुढें सर्व बाजूंनीं मांडण्यांत येत आहे. स्वराज्याचा कोणता प्रकार येथें आज अमलांत यावा किंवा आजमितीस स्वराज्याच्या हक्काचा विस्तार किती मर्यादेपर्यंत होणें शक्य आहे, याबद्दल पुष्कळ मतभेद आहे, व तोही प्रामाणिकपणाचा आहे. या वादग्रस्त प्रश्नाचा ऊहापोह करण्याचें हें स्थळ नव्हे. खुद्द सरकारास सुद्धां येथें स्वराज्याचा प्रारंभ करणें अवश्य वाटत आहे; व दिल्ली दरबाराच्या वेळच्या खलीत्यांत प्रांतिक स्वराज्याची कल्पना अमलांत आणणें अगत्याचें आहे असें नमूद केलें आहे.

Yet the country will have to be satisfied, and the question will be how this devolution of power can be conceded without impairing the supreme authority of the Governor-General in Council. The only possible solution of the difficulty would appear to be gradually to give the provinces a large measure of Self-Government, until at last India would consist of a number of administrations autonomous in all provincial affairs with the Government of India above them, and possessing power to interfere in case of mis-government Cut ordinarily restricting the functions to matters of Imperial concerns.

सरकारच्या या खलित्यावरून स्वराज्याची ही कल्पना शक्य कोटींतील आहे व लॉर्ड हार्डिंजसारख्या उदार व दूरदर्शी मुत्सद्द्यांना ती आदरणीय वाटत आहे येवढें निर्विवाद आहे. कॉलनीसारखें स्वराज्य किंवा इंग्लंडच्या साम्राज्यछत्राखालीं अमेरिकेप्रमाणें संयुक्त स्वराज्य किंवा सरकारनें म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या सत्तेखालीं असलेलें प्रांतिक स्वराज्य, या तिन्ही कल्पनांत फरक असल्यास आजमितीस तरी तो तात्त्विक स्वरूपाचा आहे. देशांतील निरनिराळे हितसंबंध, अडचणी, पक्षभेद, समाजरचना, संस्कार इत्यादि अनेक गोष्टींचा विचार करतां स्वराज्याची कोणतीही कल्पना निर्दोष ठरेल किंवा सर्वसंमत होईल असें म्हणणें धाडसाचें आहे.

शक्याशक्यतेचा विचार करून आजच्या स्थितींत खरें स्वराज्य प्रांतिक स्वराज्याच्या स्वरूपाचें मिळालें तरी त्यापासून देशांतील अस्वस्थतेस निःसंशय आळा पडेल. विचारी लोकांचें समाधान होईल. व्यावहारिक दृष्टीनें पाहणारा कोणीही मनुष्य एक दिवसांत येथील सर्व स्थिति पालटून स्वराज्य अस्तित्वांत आणावें असें म्हणत नाहीं. ज्या प्रकारचें स्वातंत्र्य हल्लींच्या परिस्थितींत इष्ट आहे व ज्याची पात्रता येथील लोकांनीं स्पष्टपणें स्थापित केली आहे, तें कायदेशीर व न्याय्य स्वातंत्र्य अथवा स्वराज्य बिलकूल विलंब न लागतां हिंदुस्थानांतील लोकांस मिळावें व तें अकृत्रिमपणानें देण्यांत यावें, हें सर्व समंजस लोकांचें मागणें आहे. साम्राज्यावर ओढवलेलें हल्लींचें संकट दूर होऊन सर्वत्र शांतता झाल्यानंतर हिंदुस्थानांतील लोकांनीं साम्राज्याच्या इभ्रतीकरितां, लौकिकाकरितां व रक्षणाकरितां जें साहाय्य स्वेच्छेनें, उल्हासानें व स्वयंस्फूर्तीनें केलें आहे त्याचें चीज होईल याबद्दल सर्वांस उमेद आहे.

कलोनियल स्वराज्याच्या कल्पनेंत, किंवा संयुक्त स्वराज्याच्या कल्पनेंत, किंवा फेडरेशनच्या कल्पनेंत किंवा भूपेंद्र बसूंनीं सुचविलेल्या बरोबरीच्या भागीदारीच्या कल्पनेंत इंग्लंडचा संबंध मूर्तिमंतपणें ग्रहीत धरलेला आहे. इंग्लंडचा संबंध झुगारून देऊन किंवा इंग्लंडशीं फटकून वागून निर्भेळ स्वराज्याची कल्पना राष्ट्रीय सभेनें आजपर्यंत कधींही पसंत केली नाहीं किंवा या कल्पनेस राष्ट्रीय सभेंतील विचारी लोकांनीं कधींही थारा दिला नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांस कोणतेही हक्क देऊं नयेत, त्यांना सदैव दास्यत्वांत ठेवावें असें म्हणणारा एक अँग्लो-इंडियन आततायी पक्ष जसा अस्तित्वांत आहे, त्याप्रमाणेंच इंग्लंडशीं यत्किंचितही संबंध न ठेवितां स्वातंत्र्य संपादन करण्याची हांव धरणारा निर्भेळ–स्वराज्य–वाल्यांचा दुसरा एक आततायी वर्ग आहे, असें जें भूपेंद्र बसू यांनीं या दोहों वर्गांचें वर्णन केलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. इंग्लंडचा संबंध चिरंतन राहावा व इंग्लंडच्या आश्रयानें, मदतीनें, प्रोत्साहनानें येथील लोकांस स्वराज्य मिळावें ही कल्पना राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वापासून तिच्या नजरेसमोर आहे. राष्ट्रीय सभेच्या पूर्वी अस्तित्वांत आलेल्या नॅशनल यूनियननें आपले हेतु असे जाहीर केले होते कीं, ब्रिटिश राज्याबद्दल स्वामिभक्ति हें आपलें ब्रीद आहे व सनदशीर मार्गांनीं कित्येक प्रश्नांबद्दल कितीही विरोध केला तथापि इंग्लंड व हिंदुस्थान यांच्यामधील सलोखा आपल्या उन्नतीस अत्यंत अवश्य आहे. व तो संबंध अव्याहतपणें सुरक्षित ठेवणें देशाच्या उन्नतीस अवश्य आहे.

The Union appears to be absolutely unanimous in insisting that unswerving loyalty to the British Crown shall be the key-note of the institution. The Union is prepared, when necessary, to oppose by all constitutional methods all authorities, high or low, here or in England, whose acts or omissions are opposed to those principles of the Government of India laid down from time to time by the British Parliament and endorsed by the British Sovereign. But it holds the continuous affiliation of India to Great Britain, at any rate for a period far exceeding the range of any practical political forecast, to be absolutely essential to the interests of our own national developement.

वरील तत्त्वांचा अंगीकार केलेल्या यूनियननेंच पाहिली राष्ट्रीय सभा बोलाविली व ती अस्तित्वांत आणिली. राष्ट्रीय सभेनें प्रांजलपणानें या तत्त्वांचा संपूर्ण आश्रय केला आहे, राष्ट्रीय सभेच्या आजपर्यंतच्या इतिहासांत याचा प्रत्यय पदोपदीं आढळून येणार आहे. सरकारनेंही याबद्दल आपली संमति लार्ड लॅन्सडाउन यांचे वेळीं प्रदर्शित केली आहे. १९०६ सालचे सुमारास निर्भेळ स्वराज्यवाल्यांचा पक्ष अस्तित्वांत आला व राष्ट्रीय सभेमध्येंही या पक्षाचे कित्येक अनुयायी दिसूं लागले. सुरतेस जो तंटा विकोपास गेला त्याच्या मुळाशीं याच तत्त्वाचा भेद होता. निर्भेळ स्वराज्यवाल्यांचा व राष्ट्रीय सभेंतील पुरस्कर्त्यांचा या बाबतींत समेट होणें अशक्य होतें. या पक्षापासून व्यतिरेकानें आपलें मत स्पष्टपणें निर्दिष्ट करण्याकरितां घटनेचें पहिलें कलम अस्तित्वांत आणावें लागलें. साम्राज्याच्या छत्राखालीं कॉलनीसारखें स्वराज्य संपादन करणें राष्ट्रीय सभेनें आपलें ध्येय निश्चित केलें आहे. अर्थात् निर्भेळ स्वराज्यवादी लोकांस घटनेच्या या पहिल्या कलमास संमति देणें अशक्य आहे व ते राष्ट्रीय सभेंत येणें किंवा त्यांची राष्ट्रीय सभेच्या चालकांशीं एकवाक्यता होणें अगदींच असंभवनीय आहे.

सुरतेनंतर राष्ट्रीय सभेपासून अलग राहिलेला दुसरा एक मोठा वर्ग आहे. या वर्गातील लोकांस

घटनेचें पहिलें कलम मान्य आहे. हें क्रीड मान्य झाल्यानंतर या पक्षांतील लोकांस राष्ट्रीय सभेंत सामील होण्यास कोणतीच हरकत नाहीं. राष्ट्रीय सभेंत सामील झालेल्या लोकांस मवाळ असें म्हणण्यांत येतें व वर नमूद केलेल्या पक्षास जहाल पक्ष म्हणतात. दोन्ही विशेषणें दोषदर्शक आहेत; तथापि पक्षभेदाची मर्यादा बरोबर समजण्यास या विशेषणांची आजमितीस जरूर आहे. जहाल पक्षाची व्याख्या त्यांतील लोकमान्य पुढाऱ्यांनीं आपल्या पत्रांत नुकतीच केली आहे. या व्याख्येप्रमाणें जहाल व मवाळ या पक्षांत तत्त्वाचा कोणताच भेद नाहीं. भेद फक्त काम करण्याच्या पद्धतींत आहे. जोंपर्यंत समाजांत स्वभाववैचित्र्य आहे, तोंपर्यंत हा भेद कधींही नाहींसा होणार नाहीं. किंवा या भेदामुळें कोणासही वाईट वाटणार नाहीं किंवा एकत्र जमून काम करण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं. ही व्याख्या जर या पक्षांतील लोकांस मान्य असेल व ती प्रामाणिक बुद्धीनें केली असेल, तर जहाल पक्षांतील लोक राष्ट्रीय सभेच्या बाहेर राहण्याचा कां आग्रह धरीत आहेत हें समजणें अशक्य आहे. तत्त्वाचा भेद नाहींसा झाल्यानंतर नुसत्या रुचिवैचित्र्याकरितां किंवा स्वभावभेदाकरितां दुही चालू ठेवणें श्रेयस्कर नाहीं हें कोणासही दिसून येणार आहे. “ विक्रीते करिणि किमङ्कुशे विवाद:” हा अनुभव सर्वमान्य आहे.

सुराज्य.

प्रारंभीं राष्ट्रीय सभेचे उद्देश काय होते ते वर नमूद केले आहेत. थोड्याच कालांत निरनिराळ्या प्रांतांतील पुढाऱ्यांमध्यें स्नेहभाव व बंधुप्रेम वाढत गेलें. राष्ट्रीय सभेंत येणाऱ्या प्रतिनिधींमध्यें जाति, धर्म, पंथ, पूर्वसंस्कार व दुराग्रह यांची तेढ मुळींच नाहीं असें आढळून आलें व इसवी सन १८९९ चे सुमारास राष्ट्रीय सभेचा हेतु शक्य त्या मार्गानीं देशांतील लोकांची उन्नति करण्याचा आहे, असें निर्दिष्ट करण्यांत आलें. दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या कलकत्ता येथील भाषणांत राष्ट्रीय सभेच्या कामाचें पृथक्करण उत्तम तऱ्हेनें केलें आहे. राज्यसत्तेचें स्वरूप कोणच्या प्रकारचें असावें व राज्यकारभाराचीं तत्त्वें कोणतीं अमलांत यावद्दल ऊहापोह करून, देशांत उच्च मनोवृत्ति जागृत करणें, लोकांच्या महत्त्वाकांक्षेस योग्य वळण लावणें व अंतिम ध्येयाची कल्पना निश्चित करणें हें राष्ट्रीय सभेचें आद्य कर्तव्य होय. राज्यव्यवस्थेचें निरीक्षण करून निरनिराळ्या खात्यांतून दिसून येणाऱ्या सुधारणा व गरजा सरकारपुढें मांडाव्यात; अन्याय, असमता किंवा प्रजेच्या हक्कांची पायमल्ली झाली असतां ती सरकारच्या नजरेस आणावी; सरकारनें दिलेल्या आश्वासनाप्रमाणें प्रजेच्या हक्कांचें समर्थन करावें; राज्यव्यवस्थेचें धोरण अपमानाचें, जुलमाचें, त्रासाचें, झाल्यास त्याचा निषेध करावा; सहकारितेनें वागून राज्यकारभार लोकहिताचा होईल अशा सूचना वेळोवेळीं कराव्यात. सारांश, हिंदुस्थानास स्वराज्यप्राप्ति होईल अशा दृष्टीनें प्रजेच्या वतीनें खटपट करावी हें राष्ट्रीय सभेचें दुसरें कर्तव्य आहे. आज तीस वर्षें या दुसऱ्या हेतूबद्दल राष्ट्रीय सभेनें एकसारखी चळवळ चालू केली आहे. दरसालच्या या सभेच्या कामाचा रिपोर्ट वाचला असतां, राज्यव्यवस्थेच्या सुधारणेबद्दल कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत हें दिसून येणार आहे. पहिल्या वर्षीच्या राष्ट्रीय सभेंतील प्रश्नांचा निर्देश पूर्वी केलाच आहे. या पुढील कालांत राष्ट्रीय सभेपुढें स्वराज्यासंबंधीं आलेल्या प्रश्नांचा नुसता निर्देश करणेंसुद्धां स्थलसंकोचास्तव अशक्य आहे. राष्ट्रीय सभेच्या रिपोर्टांतून ही माहिती संकलित झालेली आहे.

राष्ट्रीय सभेच्या सर्वच बैठकींबद्दल सारखाच उत्साह दिसून येत होता, हें म्हणणें चुकीचें होईल. संसारामध्यें प्रत्येक दिवस हौसेचा, सणाचा किंवा विशेष महत्त्वाचा असतो असा मुळींच अनुभव नाहीं. सन्माननीय पाहुणे आले, साधु संत घरीं आले, तर तो दिवस सणासारखा आपण साजरा करतों. घरांत मंगलकार्य असलें,

मोठा लाभ झाला, यशःप्राप्ति झाली, तर त्या प्रसंगीं मोठा उत्साह दिसून येतो. कुटुंबावर संकट ओढवलें, तर अस्वस्थता दिसून येते; कुटुंबांत भांडणें सुरू झालीं, वांटणीची वाटाघाट चालू झाली, म्हणजे अंतःकलह व चळवळ उत्पन्न होते. एरवीं-च्या सर्व प्रसंगीं प्रपंचाचा गाडा धोपट मार्गानें चालला असतो; व त्यांत कांहीं कुतूहलही असत नाहीं. राष्ट्रीय सभेसारख्या विश्वप्रपंचाची हीच तऱ्हा आहे. पहिलीं चार वर्षे स्थिरस्थावर करण्यांत व जम बसविण्यांत गेलीं. १८८९ सालीं ब्रॅडलॉसाहेबांच्या आगमनानें अपूर्व उत्साह दिसून आला. १८९० सालीं सरकारी नोकरांनीं राष्ट्रीय सभेस जाण्यासंबंधीं चाललेल्या वाटाघाटीमुळें सभेच्या बैठकीस कलकत्त्यास मेथासाहेब अध्यक्ष असतांना फार महत्त्व आलें होतें. १८९३ सालीं लाहोरास दादाभाई नौरोजी अध्यक्ष होते. पार्लमेंटांतील निवडणूकींत त्यांस यशःप्राप्ति झाली होती. त्यांचें अभिनंदन करण्याकरितां पुष्कळ लोक जमले होते व त्यामुळें ही सभा फार थाटाची झाली. १८९५ सालीं सामाजिक परिषदेमुळें उत्पन्न झालेल्या बखेड्यानें राष्ट्रीय सभेबद्दल देशांत चर्चा झाली होती. बैठकीबद्दल सर्वत्र काळजी उत्पन्न झाली होती. परंतु न्यायमूर्ति रानड्यांच्या मुत्सद्देगिरीमुळें शेवट गोड झाला. या सभेचें अधिवेशन सर्वांगसुंदर झालें. १९०५ सालीं फाळणीमुळें देशांत अस्वस्थता उत्पन्न झाली होती. फुल्लरशाहींतील जुलमाचा प्रतिकार करण्याकरितां ना. गोखले राष्ट्रीय सभेच्या वतीनें विलायतेस गेले होते. त्यांची कामगिरी फार यशस्वी झाली होती व त्यांचें प्रोत्साहन करण्याकरितां व गुणग्राहकता व्यक्त करण्याकरितां पुष्कळ लोक मोठ्या उल्हासानें या सभेस आले होते. भागीरथीच्या पवित्र तीरावर काशीक्षेत्रांत गोपाळरावांसारख्या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं भरलेल्या सभेची शोभा फार अपूर्व होती. १९०६ सालीं कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेची बैठक उत्पन्न झालेल्या पक्षभेदामुळें फार चळवळीची होती. देशांतील अंतःकलहास प्रारंभ झाला असल्यामुळें, चिंता, काळजी, उताविळपणा या योगानें ही बैठकही संस्मरणीय झाली.

यशःप्राप्ति.

कोणतीही संस्था अस्तित्वांत आली म्हणजे तिची संभावना, उपहास, निंदा, विरोध या प्रकारांनीं केली जाते. या नूतन संस्थेस स्थैर्य आलें म्हणजे बराच काळपर्यंत तिजबद्दल उदासीनता आढळून येते. अशा संस्थेंत कर्तृत्वशक्ति जसजशी वाढत जाते, तसतशी सहानुभूति पुढें उत्पन्न होत जाऊन तिला प्रतिष्ठा व मान्यता प्राप्त होण्यास सुरवात होते. राष्ट्रीय सभेसही याच स्थित्यंतरांतून जावें लागलें आहे. प्रथमतः ही सभा क्षणभंगुर आहे असा उपहास करण्यांत आला. ही अराजनिष्ठ आहे असे भलतेच आरोप तिजवर करण्यांत आले. सर ऑकलंड कॉलव्हिनसारख्या अंमलदाराच्या दुराग्रहामुळें राष्ट्रीय सभेच्या मंडपास जागा मिळण्याची सुद्धां एक वेळ अलाहाबादेस पंचाईत पडली होती व दरभंग्याच्या देशाभिमानी महाराजांनीं यासाठीं मुद्दाम इमारत खरेदी करून ही अडचण दूर केली. राष्ट्रीय सभेस उत्क्रांतीच्या पहिल्या स्थितींतून पार पडण्यास पांच वर्षे लागलीं. लॉर्ड लॅन्सडौन यांनीं राष्ट्रीय सभा ही कायदेशीर संस्था आहे असें जाहीर केल्यापासून सुमारें १५ वर्षांचा काल औदासीन्यांत गेला. १९०५ नंतरचा काल कर्तबगारीचा व उत्साहाचा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९०६ सालीं लिबरल प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें. हिंदुस्थानच्या पुष्कळ आकांक्षा सफळ होतील अशी आशा दिसूं लागली आहे. मनुष्याच्या नैसर्गिक वाढीमध्यें ज्याप्रमाणें रोग, आपत्ति, सांथी यांच्या अडचणी सोसाव्या लागतात, तसेंच राष्ट्राच्या या वाढींत अत्याचारासारख्या अरिष्टापासूनही दुःख सोसावें लागत आहे. सुखदुःखांचें हे संमिश्रण सृष्टिनियमाला अनुसरूनच आहे. परंतु १९०५ नंतर स्वराज्यासंबंधीं चालू झालेल्या चळवळीपासून देशाची झालेली प्रगति

पाहतां कोणासही भविष्यकालाबद्दल आशा व उमेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. राष्ट्रीय सभेस या ३० वर्षांच्या कालांत किती यशःप्राप्ति संपादन करतां आली व तिनें कोणतें कार्य घडवून आणलें हें मनन करण्यासारखें आहे. बंगालचे चीफ जस्टिस सर रिचर्ड गार्थ यांसारख्या त्रयस्थ व कॉन्झरव्हेटिव पक्षाच्या गृहस्थांनीं दिलेला अभिप्राय खरोखर आदरणीय आहे.

I will tell you what they (Congress) have done. They have dared to think for themselves; and not only for themselves but for millions of poor ignorant people, who compose our Indian Empire. They have been content to sacrifice their own interests and to brave the displeasure of Government in order to lend a helping hand to those poor people. They have had the courage and the patriotism to denounce abuses, which have disgraced our Indian rule for years past, which have been condemned in India and in England, and to which the Indian Government appears to cling with a tenacity, which seems utterly inexplicable. They have dared to propose reforms, which, despite the resistance of the Government, have been approved by Parliament, and to endeavour to stay that fearful amount of extravagance, which has been going on in India for years past and has been the means, as some of our wisest councillors consider, of bringing our Eastern Empire to the verge of bankruptcy.

राष्ट्रीय सभेच्या योगानें सुशिक्षित लोकांस आत्मज्ञान झालें. आपल्या लक्षावधि देशबांधवांकरितां विचार करण्याची पात्रता त्यांचे अंगीं आली सरकारच्या अवकृपेस न भितां स्वतःचें नुकसान सोसून गरीबांस ते मदत करूं लागले. राज्यकारभारांतील अन्यायाचा ते धैर्यानें व देशभक्तीनें निषेध करूं लागले. सरकारच्या इच्छेविरुद्धही राज्यव्यवस्थेंतील सुधारणेचें त्यांनीं जोरानें प्रतिपादन केलें आहे. हिंदुस्थानसरकारास भिकेस लावणाऱ्या अवाढव्य खर्चास आळा घालण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे. वरील विचार किती समर्पक आहेत हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. सुराज्याबद्दल व स्वराज्याबद्दल राष्ट्रीय सभेनें शेंकडो मागण्या आजपर्यंत केल्या व त्यांच्यापैकीं कित्येक महत्त्वाच्या सरकारांनीं मान्य केल्या आहेत. त्यांपैकीं कांहीं प्रमुख मागण्यांचा निर्देश करणें अवश्य आहे.

(१) राष्ट्रीय सभेच्या मागणीप्रमाणें संयुक्त प्रांत, पंजाब, आसाम व मध्यप्रांत या ठिकाणीं कायदेकौन्सिलें अस्तित्वांत आणिलीं आहेत.

(२) वरिष्ठ कायदेकौन्सिलांत बिनसरकारी व लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढविण्यांत आली आहे.

(३) बंगलच्या कौन्सिलांत लोकनियुक्त सभासदांचें मताधिक्य स्थापन केलें आहे.

(४) इतर प्रांतांतून बिनसरकारी सभासदांची संख्या सरकारी सभासदांपेक्षां अधिक करण्यांत आली आहे.

(५) उपप्रश्न (Supplementary questions) विचारण्याची सवलत ठेवण्यांत आली आहे.

(६) लोकहिताच्या प्रश्नांची चर्चा कौन्सिलांत करण्याची मुभा मिळाली आहे.

(७) बजेटाच्या बाबतींत मतभेद निश्चित करण्याचा (dividing on financial matters) कौन्सिलांतील सभासदांस हक्क प्राप्त झाला आहे.

(८) हिंदुस्थानसरकारच्या व मुंबई, मद्रास, बंगाल व बहार येथील कार्यकारी कौन्सिलांत एतद्देशीय सभासद नेमण्याचा आरंभ झाला आहे.

(९) सेक्रेटरी ऑफ स्टेट यांचे कौन्सिलांत दोन हिंदी गृहस्थांस नेमण्यांत आलें आहे.

(१०) हे सभासद निवडणुकीच्या तत्त्वानें पसंत करण्यांत यावेत हें मागणें लॉर्ड क्र्यू यांच्या बिलानें मान्य केलें आहे.

(११) संयुक्त प्रांतास कार्यकारी कौन्सिल देण्याची सूचना वरिष्ठ सरकार व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस पसंत आहे.

(१२) प्रीव्ही कौन्सिलांत हिंदी न्यायाधीशाची निवडणूक झाली आहे.

(१३) वज्रलेप झालेली फाळणी रद्द करून सर्व बंगाली लोकांचा एकाच अमलाखालीं समावेश करण्यांत आला आहे.

(१४) वसाहातीसंबंधीं व विशेषतः दक्षिण आफ्रिकेंतील मुदतबंदीच्या मजुरांच्या संबंधीं व वसाहतींत स्थाईक झालेल्या हिंदी लोकांच्यासंबंधीं वसाहतींतील सरकारनें केलेल्या कायद्याची निर्घृणता सौम्य झाली आहे. व देशत्याग करून पोटाच्या विवंचनेसाठीं परदेशीं गेलेल्या हिंदी लोकांना स्वाभिमानानें चरितार्थ चालवितां येईल अशी परिस्थिति घडवून आणणाऱ्या स्वावलंबनाच्या प्रयत्नास सरकारानें संपूर्णपणें साहाय्य केलें आहे.

(१५) मुदतबंदीची पद्धत अत्यंत निंद्य व गुलामगिरीच्या स्वरूपाची असल्यामुळें ती सर्वस्वीं बंद करण्यांत यावी ही राष्ट्रीय सभेची मागणी हिंदुस्थान सरकारानें मान्य केली आहे.

(१६) शिक्षणाच्या बाबतींत सरकाराचें धोरण उदार बुद्धीचें दिसून आलें आहे.

(१७) प्राथमिक शिक्षण मोफत करण्याचा क्रम सुरू झाला आहे.

(१८) दिल्ली दरबारच्या वेळच्या दरसालच्या ५० लक्षांच्या देणगीनें वरिष्ठ शिक्षणास उत्तेजन मिळालें आहे.

(१९) विश्वविद्यालयांनीं नुसत्या परीक्षेचेंच काम न करतां शिकविण्यास किंवा विद्यादान करण्यास प्रारंभ केला आहे; डाका व नागपूर येथें शिकविणारीं विश्वविद्यालयें स्थापण्याचा सरकारचा निश्चय झाला आहे.

(२०) धंदेशिक्षणाकरितां १० शिष्यवृत्ति निर्माण करण्यांत आल्या आहेत.

(२१) अधिकारविभागणीचें कमिशन नेमून लोकलबोर्ड व म्युनिसिपालिट्या यांचे अधिकार वाढविण्याचे प्रयत्नास आरंभ झाला आहे. म्युनिसिपालिट्यांतून लोकनियुक्त अध्यक्ष नेमण्यांत येत आहेत. डिस्ट्रिक्टबोर्डांचे अध्यक्ष लोकनियुक्त नेमण्याचा उपक्रम सुरू झाला आहे.

(२२) जिल्हाधिकाऱ्यांना सल्ला देणारी मंडळी अस्तित्वांत आणण्याचें तत्त्व मान्य होऊन मुंबई इलाख्यांत जिल्हादरबारची संस्था स्थापन झाली आहे.

(२३) आरोग्य व इतर बाबतींसंबंधीं सरकारकडून स्थानिक संस्थांना मोठ्या प्रमाणांवर मदत मिळूं लागली आहे.

(२४) अबकारीच्यासंबंधीं मादक पदार्थांवर कर वाढवून दारूच्या व्यसनास आळा घालण्याचा व दारूचे गुत्ते बंद करण्याचा व स्थानिक मतास (Local option) मान देऊन या गुत्त्यांचें नियंत्रण करण्याचा प्रारंभ झाला आहे.

(२५) जंगलसंबंधीं लोकांच्या पुष्कळ तक्रारी विचारांत घेऊन सवलती देण्यांत आल्या आहेत.

(२६) मिठावरील कर कमी केला आहे.

(२७) प्राप्तीवरील कराची किमान मर्यादा एक हजार ठरविण्यांत आली आहे.

(२८) तारांचें हंशील कमी झालें आहे.

(२९) रुप्याच्या आयातीवरील जकात उठविण्यांत आली आहे.

(३०) सरकारच्या संमतीनें लष्करांत चालू असलेल्या अनीतीच्या संस्था बंद करण्यांत आल्या आहेत.

(३१) इंग्लंड व हिंदुस्थान यांमधील खर्चाच्या गैरशिस्त विभागणीसंबंधीं वेल्बी कमिशन नेमण्यांत येऊन कांहीं बाबतींत हिंदुस्थानावरील खर्चाचें ओझें कमी करण्यांत आलें आहे.

(३२) दुय्यम प्रतीच्या पोलीस खात्यांतील जागांसंबंधीं राष्ट्रीय सभेच्या मागणीप्रमाणें सुधारणा करण्यांत आली आहे.

(३३) लष्करी खात्यांतील कमिशनें एतद्देशीय लोकांस देण्यास प्रारंभ झाला आहे.

(३४) बहादुरीबद्दल व्हिक्टोरिया क्रॉसचीं बहुमानाचीं पदकें एतद्देशिय शिपायांस देण्यांत येत आहेत.

(३५) वाक्फचा कायदा अमलांत आला आहे.

(३६) महर्घतेच्या कारणांचा विचार करण्याकरितां कमिशन नेमण्यांत आलें आहे.

(३७) दुष्काळाच्या वेळीं सरकारचें धोरण औदार्याचें दिसून आलें आहे.

(३८) दुष्काळनिवारणार्थ फंडाची ट्रस्टी नेमून योग्य व्यवस्था झाली आहे.

(३९) शेतकी खात्याची सुधारणा, पतपेढ्या, शेतकीच्या बँका व सहकारी चळवळ यांस जोराचें प्रोत्साहन सरकारनें दिलें आहे.

(४०) वरिष्ठ प्रतीच्या नौकऱ्यांसंबंधीं एतद्देशीय लोकांचा अशा नौकऱ्यांत अधिक प्रवेश व्हावा या हेतूनें पब्लिक सर्व्हिस कमिशन नेमण्यांत आलें आहे.

(४१) सिव्हिल सर्व्हिसचे परीक्षेची वयोमर्यादा १९ ची तेवीस केली आहे.

वरील सर्व मागण्या राष्ट्रीय सभेनें वेळोवेळीं केल्या होत्या व त्या सरकारनें योग्य समजून दिल्या आहेत; त्याचप्रमाणें कित्येक प्रश्नांबद्दल सरकारचें धोरण राष्ट्रीय सभेच्या मागणीस अनुसरूनच अंगीकारलें जात आहे. न्याय व अंमलबजावणी खातीं निरनिराळीं करण्याचें तत्त्व निर्विवादपणें कबूल होऊन खर्चाच्या सबबीवर मागें पडलें आहे. प्राथमिक शिक्षणाचें तत्त्वही सरकारनें अंगिकारलें आहे. लष्करी खर्चाच्या बाबतींतील धोरणही मान्य झालें आहे व वैद्यकी खात्यासंबंधीं राष्ट्रीय सभेचे मागणीप्रमाणें लॉर्ड मोर्ले यांनीं आपल्या खलित्यांत सुधारणा सुचविली आहे. लॉर्ड हार्डिंज यांनीं आपल्या थोर व उदार स्वभावास अनुसरून प्रांतिक स्वराज्याचें ध्येय व्यवहार्य आहे असें प्रतिपादन केलें आहे. ब्युरॉक्रसींतील लोकांनीं प्रजा आपली नोकर नसून आपण प्रजेचे नोकर आहों ही नामाभिधानाप्रमाणें (public servants) अन्वर्थक भावना सदैव लक्षांत ठेवावी असा इषारा व्हाइसरॉयांनीं दिला आहे.

राष्ट्रीय सभेचें सर्वच मागणें आजमितीस मान्य आहे असें कोणीच म्हणणार नाहीं. राष्ट्रीय सभेसंबंधीं लोकांनीं केलेल्या प्रयत्नाच्या, स्वार्थत्यागाच्या, चळवळीच्या व्यापकतेच्या, उत्साहाच्या व खऱ्या तळमळीच्या मानानें यशःप्राप्ति झाली आहे कीं नाहीं, एवढेंच निर्विकारपणें कोणीही पाहिल्यास सनदशीर चळवळीबद्दल निराशा होण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. लोकसंख्येच्या, नफानुकसानीच्या, विरोधाच्या व प्रतिपक्षाच्या सामर्थ्याच्या मानानें तीस वर्षांचा काळ देशोन्नतीच्या कामीं म्हणण्यासारखा आहे किंवा भविष्यकाळाबद्दल विषण्णमनस्क होण्याचें कारण आहे असें कोणत्याही समंजस मनुष्यास म्हणतां येणार नाहीं. दरसाल तीन दिवसांप्रमाणें राष्ट्रीय सभेचा आजपर्यंतचा हिशेब केल्यास अवघे तीन महिन्यांचें सुद्धां काम होत नाहीं. या कामाच्या मानानें देशांतील झालेली राजकीय प्रगति निःसंशय उत्साहजनक आहे व सनदशीर चळवळीस नांवें ठेवण्यास यत्किंचितही कारण नाहीं. जोंपर्यंत लोकांना राष्ट्रीय सभेसारख्या संस्थेचें काम जत्रेंतील बाजाराप्रमाणें तीन दिवस पुरें करून समाधान वाटतें; जोंपर्यंत प्रांतिक सभेची बैठकसुद्धां दरसाल भरविण्याची जबाबदारी वाटत नाहीं; जोंपर्यंत राष्ट्रीय सभेचें कार्यालय किंवा तिच्या कामाची परंपरा वर्षभर चालू ठेवण्याची आवश्यकता भासत नाहीं; जोंपर्यंत स्वार्थत्याग करून

रात्रंदिवस राजकीय चळवळीचा प्रसार करण्याकरितां देशांतील तरुण उल्हासानें पुढें येत नाहींत; जोंपर्यंत देशांतील बुद्धिमान् लोक आयुष्याचा उत्कृष्ट भाग द्रव्यार्जनाकरितां खर्च करून फुरसतीचे वेळीं राजकारणांत मन घालीत आहेत; तोंपर्यंत राजकीय चळवळीस दोष देणें किंवा 'भिक्षांदेहि' म्हणून तिचा उपहास करणें कितपत शहाणपणाचें आहे ?

कंठाळी ठराव.

राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वापासून कांहीं मागण्या इतक्या निश्चित स्वरूपाच्या व इतक्या जरूरीच्या होत्या कीं, साल दरसालच्या बैठकींत त्यांचा ऊहापोह होत असे, व दरवर्षी कंठाळी स्वरूपाच्या ठरावानें त्या राष्ट्रीय सभेपुढें मांडल्या जात. या ३० वर्षांच्या कालांत या सदराखालीं येणाऱ्या ३ प्रकारच्या मागण्यांबद्दल राष्ट्रीय सभेची आजपर्यंतची चळवळ अरण्यरुदितामाणें निष्फळ झाली आहे. [१] समकालीन परीक्षा या देशांत सुरू व्हावी; सिव्हिल सर्व्हिस खेरीज वरिष्ठ प्रतीच्या जागा या देशांत परीक्षा घेऊन भरण्यांत याव्या; सारांश, अधिकाराचा मक्ता अँग्लो-इंडियन लोकांचे हातीं आहे, तो नाहींसा होऊन कोणताही निर्बंध न ठेवितां लायकीच्या तत्त्वावर या जागा भरण्यांत याव्या; या प्रश्नास तादृश यश आजपर्यंत आलें नाहीं, याचें कारण ब्यूरॉक्रसीचा विरोध हें होय. अँग्लो-इंडियन लोकांच्या पोटापाण्याचा हा प्रश्न आहे, व शक्य तितका अडथळा या मागणीस ते करीत आहेत. [२] दुसरा प्रश्न औद्यौगिक उन्नतीसंबंधीं आहे. देशांतील लक्षावधि लोकांची उपासमार होत असतांना, व कोट्यावधि रुपयांचा कच्चा माल येथून परदेशांत जात असतांना, उद्योगधंद्याची वाण या देशांतील लोकांस पडावी हें लांछनास्पद आहे. उद्योगधंद्याचें व कलाकौशल्याचें ज्ञान येथील लोकांस देऊन हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारणें सरकारास मुळींच अशक्य नाहीं. यांत इंग्लंडच्याही नफानुकसानीचा प्रश्न नाहीं. चालू महायुद्धामुळें हिंदुस्थानचें औद्योगिक पारतंत्र्य किती आहे, व इंग्लंडखेरीज युरोपांतील इतर राष्ट्रांवर आयात व निर्गत मालासाठीं या देशास पराधीनपणामुळें किती अवलंबून रहावें लागत आहे, याचा स्पष्ट अनुभव आला आहे. या अनुभवाचा फायदा घेऊन शांतता स्थापन झाल्यानंतर या बाबतींत सुधारणा होईल व साम्राज्य सरकार मनोभावानें प्रयत्न करील अशी आम्हांस उमेद आहे. [३] तिसरा प्रश्न हत्याराच्या परवानगीचा, लष्करी शिक्षणाचा लष्करांतील हुद्द्यांच्या जागांचा व स्वयंसैनिक होण्याच्या बाबतींचा आहे. हिंदुस्थानांतील लोकांस लष्करी शिक्षण दिलें, स्वयंसैनिक होण्याची परवानगी दिली, हत्यारें वापरण्याची मुभा ठेविली, तर परचक्राच्या संकटाचे वेळीं साम्राज्यास हिंदुस्थानापासून फार मदत होईल अशी विनंती तीस वर्षांपूर्वी राष्ट्रीय सभेनें कंठरवानें केली होती. विश्वासाचें धोरण ठेवून मुत्सद्देगिरीनें, शहाणपणानें, व दूरदर्शीपणानें या बाबतींत वर्तन ठेविलें असतें व हल्लींच्या प्रचंड युद्धांत एकाच जर्मनीस काय परंतु असल्या दहा बलाढ्य राष्ट्रांसही ब्रिटिश सरकारास हिंमतीनें तोंड देतां आलें असतें, व कोणत्याही प्रकारची काळजी बाळगण्याचें प्रयोजन उरलें नसतें. हिंदी शिपायांचें शौर्य, कर्तबगारी व साहस यांची साक्ष चालू युद्धांत सरकारास पटली आहे. महायुद्धापासून सरकारनें योग्य बोध घेतल्यास कंठाळी ठरावांतून वरील दोन ठराव वगळण्याचा राष्ट्रीय सभेस सुदिन येवो असें आम्ही मनापासून इच्छितों.

राष्ट्रीय सभेपासून फायदे

कोणकोणते झाले हेंही नमूद करणें अवश्य आहे. देशांत राजकिय चैतन्य कसें उत्पन्न झालें व एकराष्ट्रीयत्वाची भावना कशी प्रादुर्भूत झाली हें आम्हीं विस्तारानें राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीची मीमांसा करतांना दाखविलें आहे. राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आल्यानें कोणते फायदे झाले याची बरोबर कल्पना अभावानें किंवा राष्ट्रीय सभा अस्तित्वांत नसती तर

कोणची स्थिति दिसून आली असती या कल्पनेनें स्पष्टपणें दिसून येणार आहे. राजकारणांत पडणारा एक पुढारी वर्ग अस्तित्वांत आला आहे. निरनिराळ्या प्रांतांतून सार्वजनिक आयुष्यक्रमांत काम करणाऱ्या लोकांबद्दल पुढारी या नात्यानें सर्व देशास आदर, प्रेम व अभिमान वाटत आहे. निरनिराळ्या राजकीय प्रश्नांबद्दल साधकबाधक प्रमाणांची सर्व माहिती फार व्यापक स्वरूपानें गोळा झाली आहे. ब्रिटिश राज्याच्या धोरणाबद्दल आश्वासनें व अभिवचनें सप्रमाण रीतीनें एकत्र केलीं आहेत. वादविवाद, वक्तृत्व, स्वमतस्थापन यांमध्यें पुष्कळांस प्रावीण्य संपादन करतां आलें आहे. डेप्युटेशनें, मुलाखती वगैरेच्या प्रसंगानें, अध्यक्ष किंवा राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधि या नात्यानें उत्पन्न होणाऱ्या जबाबदारीमुळें हिंदी मुत्सद्देगिरीचा विकास होण्यास पुष्कळ अवसर मिळालेला आहे. पुष्कळ पुढारी सरकारच्या आदरास व कृपेस प्राप्त झाले आहेत. परिस्थितीचें ज्ञान व हक्कांची जाणीव यामुळें स्वाभिमानाची वाढ झाली आहे. उदात्त ध्येयामुळें देशाभिमानाची वाढ होऊन त्यास उज्ज्वल स्वरूप प्राप्त झालें आहे. पुष्कळ मानधन पुढारी निर्माण होऊन करारानें, धैर्यानें व निस्पृहपणानें अन्यायाचा निषेध व आपल्या हक्कांचें समर्थन राजमान्यपणानें करीत आहेत. राष्ट्रीय सभेमुळें ही जी देशांतील दानत वाढली आहे, ती देशांतील उन्नतीच्या कामीं अपूर्वच लाभ समजला पाहिजे. एकाद्या जुलमी संस्थानांत प्रजेच्या ठिकाणीं किती दुबळेपणा, अन्यायाच्या प्रतिकाराबद्दल हताशपणा, मानसिक दौर्बल्य, नैतिक अवनति दिसून येते, याचा विचार केला असतां साम्राज्य सरकारच्या प्रतिनिधीसमोर मुद्दां—तो कितीही अरेराव किंवा बलाढ्य असला, तरी—अन्यायाचा निषेध करण्याचे कामीं उघड दरबारांत ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोक कसे कचरत नाहींत, या गोष्टीवरूनच या गुणांची थोरवी लक्षांत येईल. अन्यायाबद्दल जुलमी संस्थानांत प्रजेस ब्र काढण्याचीसुद्धां प्राज्ञा नसते. हक्काचा उल्लेख करणें तर अशक्यच असतें. राष्ट्रीय सभा नसती तर अनियंत्रित सत्तेपासून उत्पन्न होणाऱ्या अधोगतीमुळें ब्रिटिश इंडियांत हीच स्थिति आढळून आली असती. परंतु संवयीच्या, समवायाच्या, शिक्षणाच्या योगानें व राष्ट्रीय सभेच्या परंपरेपासून वृद्धिंगत होणाऱ्या सामर्थ्यामुळें, देशांतील लोकांत धैर्य, करारीपणा व तेजस्वीपणा उत्पन्न झाला आहे. राष्ट्रोन्नतीच्या कामीं हे गुण किती बिनमोल आहेत, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. तसेंच राजकीय चळवळीपासूनच स्वार्थत्यागाची तयारी व स्वावलंबनाची स्फूर्ति उत्पन्न झाली आहे. मि. ह्यूम यांनीं एके ठिकाणीं खालीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत.

You have heard it said, that
They would be free
Themselves must strike the blow.
But I say to you,
They would be free
Must first deserve to be so.

Deserve to be so हें तत्त्व या बाबतींत निरंतर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. शिक्षणाच्या योगानें व्यक्तिविषयक गुणाच्या उन्नतीची सीमा इतर कोणत्याही राष्ट्रांतील सीमेबरोबर पोंचली आहे. शिक्षणाच्या संस्कारामुळें व उपलब्ध असलेल्या सवलतीच्या योगानें प्रामाणिकपणा, कर्तबगारी, श्रमसहिष्णुता, स्वाभिमान, सचोटी या वैय्यक्तिक गुणांचा आपल्या देशांत पुष्कळ विकास झाला आहे. परंतु सार्वजनिक आयुष्यक्रमांत (public life) आपला काळ फार थोडा गेला असल्यामुळें सार्वजनिक कर्तव्याची जबाबदारी व्हावी तितकी जागृत झालेली नाहीं. अद्याप आपल्यामध्यें सहनशीलता, दीर्घ प्रयत्नांची इच्छा, चिकाटी, चिवटपणा, प्रसंगानुसार लवचिकपणा, अडचणी व संकटामुळें हताश न होण्याची संवय, दुसऱ्याचे हेतु व अडचणी यांचें योग्य आकलन, परमतसहिष्णुता हे गुण यावयाचे आहेत. हेवा व असूया या दोषामुळें सार्वजनिक चारित्र्याची शुद्धि झालेली नाहीं. या बाबतींत एका गृहस्थानें काढलेले उद्गार नित्यप्रत्ययाचे आहेत.

In a western country when a man shows signs of any extraordinary talent in any distinction the whole community rushes in to push him up. But in India the general tendency is to pull him down.

सार्वजनिक आयुष्यक्रमाची जसजशी वाढ होईल, जबाबदारीची व कर्तव्याची भावना जसजशी तीव्र होईल, त्याप्रमाणें सार्वजनिक आयुष्यक्रमही अभिमानास्पद होईल अशी आम्हांस उमेद आहे.

सामाजिक सुधारणा.

राष्ट्रीय सभेच्या निमित्तानें जमलेल्या सर्व पुढाऱ्यांनीं सामाजिक विषयाबद्दलही वाटघाट करण्यास सुरवात केली. सामाजिक सुधारणेच्या प्रश्नाबद्दल विचार करण्याकरितां राष्ट्रीय सभेबरोबरच सामाजिक परिषदेचीं अधिवेशनें होऊं लागलीं. सामाजिक व नैतिक सुधारणेस यामुळें फार प्रोत्साहन मिळालें. देशांतील ऐक्यभाव वाढण्यास व निरनिराळ्या पुढाऱ्यांमध्यें बंधुप्रेम उत्पन्न होण्यास या संस्थेचा उपयोग झाला. राष्ट्रीय सभेच्या या भावंडामुळें सरकारी व बिनसरकारी हिंदुस्थानच्या हितचिंतकांस एकत्र जमण्याची संधि मिळाली. राज्यकारभाराचा आपला अनुभव आपल्या इतर देशबांधवांस या प्रसंगानें निवेदन करण्यास साहाय्य झालें. या कामीं कै० न्यायमूर्ति माधवरावजी रानडे यांचे देशावर महत् उपकार झाले आहेत. राष्ट्रीय सभेच्या बैठकीमुळेंच औद्योगिक उन्नतिबद्दलही एकत्र विचार करण्याची संधि देशांतील पुढाऱ्यांस मिळाली. उद्योगधंद्यांची वाढ, त्यांच्या अडचणी, सांपत्तिक स्थिति, चलनपद्धति, धंदेशिक्षण, त्यांच्या सोयी व त्या उत्पन्न करण्याची आवश्यकता इत्यादि देशाच्या उत्कर्षास अवश्य असणाऱ्या प्रश्नांचा खल **औद्योगिक परिषदेंत** होऊं लागला. नामदार मुधोळकर यांच्या परिश्रमानें हें राष्ट्रीय सभेचें तिसरें भावंड सुदृढ व चिरायु होत आहे. याप्रमाणें धार्मिक प्रश्नांचीही चर्चा राष्ट्रीय सभेच्या बैठकीचा फायदा घेऊन समवायानें करण्याचा प्रघात सुरू झाला आहे. देशांतील पुढाऱ्यांमध्यें, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक व आध्यात्मिक बाबतींत व्यक्तिविषयक जसजशी स्फूर्ति असेल, तसतशी एकवाक्यता होत आहे व एकराष्ट्रीयत्वाच्या व बंधुप्रेमाच्या कल्पना या सर्व संमेलनांनीं व अधिवेशनांनीं वृद्धिंगत होत आहेत. राष्ट्रीय सभेचेच हे सर्व आनुषंगिक फायदे आहेत. राजकीय चळवळीच्या मुशींतूनच **स्वदेशीची** कल्पना तावून निघाली आहे. राजकीय चळवळीच्या अनुभवानेंच **स्वावलंबनाची** स्फूर्ती उत्पन्न झाली आहे व तिचाच विकास **राष्ट्रीय शिक्षण** व **सहकारी चळवळ** या कल्पनांत दिसून येत आहे. याप्रमाणें राष्ट्रीय सभेमुळें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पुष्कळ फायदे नमूद करण्यासारखे आहेत, परंतु स्थलसंकोचास्तव आम्हांस त्याचा विस्तार करतां येत नाहीं. राष्ट्रीय सभा उत्पन्न झाल्यापासून तिच्या बैठकीच्या वेळीं तरुण व उत्साही लोक स्वयंसैनिकाचें (volunteers) काम आजपर्यंत करीत आले व राष्ट्रीय सभेची बैठक व्यवस्थेनें पार पाडण्याचें व प्रतिनिधींचें योग्य प्रकारें आदरातिथ्य करण्याचें पुष्कळ श्रेय त्यांचेकडेसच आहे. देशाकरितां थोडीशी झीज सोसण्याचें किंवा सेवा करण्याचें हें व्रत–पुष्कळ तरुणांनीं–दरसाल तीन दिवस कां होईना–करण्याचा उपक्रम चालू ठेविला आहे. ह्यूमसाहेबांनीं राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीपूर्वींच देशांतील सर्व तरुणांस देशकार्याकरितां अहर्निश वाहून घेण्याबद्दल फार कळकळीची विनंती केली होती. परंतु या विनंतीस देशांतील तरुण व होतकरू लोकांनीं इतक्या काळांतही द्यावा तसा मान दिला नाहीं, ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. ह्यूमसाहेबांच्या बोधामृताप्रमाणें देशकार्यास सर्वस्वीं वाहून घेण्याचा निश्चय सर्व हिंदुस्थानांत, कायावाचामनें करून, एकट्या गोपाळरावजी गोखल्यांनींच केला व या उद्देशाच्या सिद्धीकरितांच **भारतसेवकसमाज** (Servants of India Society) अस्तित्वांत

आणिला. या संस्थेससुद्धां ह्यूमसाहेबांनीं सुचविल्याप्रमाणें अद्यापि ५० ही गृहस्थ मिळाले नाहींत. देशोन्नतीची कळकळ, आस्था व स्वार्थत्यागाची तत्परता या राष्ट्रीय गुणांचा अजमाव या एका गोष्टीवरूनच होणार आहे. ३० कोट लोकांच्या उन्नतीकरितां नुसत्या ५० सच काय परंतु ५० लक्ष लोकांची जरूर आहे. या कामीं स्वार्थत्याग करणारी व देशकार्याकरितां आपल्यास सर्वस्वीं वाहून घेणारीं माणसें जसजशीं निर्माण होतील, त्या मानानें देशाचा हा प्रपंच स्वास्थ्याचा, आनंदाचा व अभ्युदयाचा होणार आहे, हें कोणासही सांगावयास नको.

राष्ट्रीय सभेची आवश्यकता.

सुधारलेलीं कौन्सिलें अस्तित्वांत आल्यापासून लोकहिताच्या प्रश्नांची चर्चा कौन्सिलांत करतां येते. सबब राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वाची आतां जरूर नाहीं अशी एक सूचना सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनीं धूर्तपणानें केली आहे. सुशिक्षित वर्गाबद्दल चिरोल यांची कितपत सहानुभूति आहे हें सर्वविश्रुत आहे. त्याचप्रमाणें ही सूचनाही खोडसाळपणाची आहे. सुधारलेल्या कौन्सिलांतूनसुद्धां कित्येक प्रश्न वादविवादाकरितां आणतां येत नाहींत. परराष्ट्राशीं असलेलें राजकारण, लष्करी हालचाली, किंवा सार्वजनिक हितास अपाय होईल या सबबीवर दुसरे कोणतेही प्रश्न कौन्सिलांत आणण्याची मनाई आहे. परंतु राष्ट्रीय सभेस या प्रश्नांचा विचार करण्यास कोणतीही आडकाठी नाहीं. परराष्ट्रांच्या खलबतानें हिंदुस्थानचें नुकसान होण्यासारखें असल्यास राष्ट्रीय सभेस आपलें मत जोरानें प्रतिपादण्याचा अधिकार आहे. हिंदुस्थानचा पैसा मुलुखगिरीमध्यें निष्कारण खर्च होत असेल तर तो होऊं नये असें म्हणण्याचा, किंवा युद्धाचा प्रसंग सरकारानें आणूं नये असें सांगण्याचा राष्ट्रीय सभेस हक्क आहे. ज्या बाबतींच्या चर्चेनें सार्वजनिक हितास धक्का बसेल असें सरकारास वाटेल, त्याच बाबतींसंबंधानें उघडपणें वाटाघाट केली असतां सार्वजनिक हित होईल असाही मतभेद सरकार व प्रजा यांच्या दरम्यान होण्याचा संभव आहे. अशा प्रसंगीं लोकपक्षाची बाजू राष्ट्रीय सभेशिवाय सरकारपुढें ठेवण्यास दुसरा मार्ग नाहीं. कौन्सिलानें हें काम भागण्यासारखें नाहीं. कौन्सिलांतही ज्या ज्या प्रश्नांबद्दल लोकमताचा पराजय होईल किंवा दाद मिळणार नाहीं, अशा सर्व प्रश्नांबद्दल दाद मागण्यास राष्ट्रीय सभा हेंच मुख्य साधन आहे. पुष्कळ आणीबाणीच्या प्रसंगीं व बिकट परिस्थितींत राष्ट्रीय सभेसच महत्त्वाच्या राजकीय प्रश्नांबद्दल निश्चित मत देतां येईल. त्याचाच उपभोग कौन्सिलांत करतां येईल. सार्वजनिक प्रश्नांबद्दल साधक बाधक रीतीनें लोकमत तयार करण्यास राष्ट्रीय सभेशिवाय दुसरी जागा नाहीं. कोणत्याही प्रश्नाबद्दल राष्ट्रीय सभेमध्यें चर्चा होऊन लोकमत निश्चित झालें म्हणजे कौन्सिलांतील सभासदांसही आपल्या बाजूचें समर्थन करण्यास लोकमताच्या पाठिंब्यानें फार प्रोत्साहन मिळेल. तसेंच सर्व राजकीय प्रश्नांबद्दल व्यापकपणानें चर्चा करण्यास व तीही सर्व प्रांतांतील लोकांस मिळून करण्यास राष्ट्रीय सभेखेरीज दुसरें ठिकाण नाहीं. याच कारणाकरितां सुधारलेल्या कौन्सिलांतील लोकांच्या प्रतिनिधींचें काम यशस्वी होण्यास राष्ट्रीय सभेची आवश्यकता आहे. एतद्देशीय संस्थानांसंबंधीं कांहीं प्रश्नांची चर्चा रा ्रीय सभेनें केली आहे. संस्थानांतील मुद्रणस्वातंत्र्य मर्यादित करणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या ठरावाबद्दल राष्ट्रीय सभेनें निषेध प्रदर्शित केला आहे व कोणत्याही संस्थानिकास जुलमी राज्यकारभाराबद्दल गादीवरून काढावयाचें झाल्यास त्याबद्दल सरकार व संस्थानिक या उभयतांच्या आदरास पात्र झालेल्या अशा न्यायाच्या कोर्टांत चवकशी होऊन अपराध स्थापन झाल्यानंतर काढण्यांत यावें असें राष्ट्रीय सभेनें सुचविलें आहे. अशा तऱ्हेची सूचना कौन्सिलांतून करतां येणें अगदीं अशक्य आहे व ती करण्यास राष्ट्रीय सभेशिवाय दुसरें गत्यंतर नाहीं. वरील सर्व कारणाकरितां राष्ट्रीय सभेच्या अस्तित्वाची अत्यंत जरूरी आहे व चिरोलसाहेबांचा मानभावी उपदेश फलद्रूप होण्याचा मुळींच संभव नाहीं.

विलायतेंतील काम.

राष्ट्रीय सभेच्या कामाची दिशा दोन प्रकारची आहे. एक इंग्लंडांत लोकमत जागृत करणें. दुसरी हिंदुस्थानांत राजकीय चळवळीचा फैलाव करणें ही होय. इंग्लंडांतील चळवळ तेथील कित्येक निरपेक्ष व वसुधैवकुटुंबक या वृत्तीच्या लोकांनीं चालविलेली आहे. या कार्यास प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्दी एड्मंड बर्क यांच्या नंतर जॉन ब्राइट यांनीं १८४७ पासून १८८० पर्यंत पुष्कळ स्वरूप आणिलें. सर चार्लस वुड यांच्या इंडिया बिलास त्यांनीं जोराचा विरोध केला. हिंदुस्थानांतील बेजबाबदार राज्यव्यवस्थेबद्दल ते नेहमीं टीका करीत असत. येथील लोकांचें दारिद्र्य निवारण्याबद्दल, त्यांचेवरील करांचें ओझें कमी करण्याबद्दल, त्यांस हुद्द्याच्या जागीं नेमण्याबद्दल ब्राइटसाहेबांनीं पार्लमेंटचें लक्ष वेधलें होतें. जास्ती मुलूख संपादन करण्याची हांव न धरितां असलेल्या राज्याची उत्तम प्रकारानें, न्यायानें व्यवस्था करून प्रजेस संतुष्ट ठेवणें, हेंच इंग्लंडचें कर्तव्य आहे असें ते म्हणत. राणीसरकारनीं प्रसिद्ध केलेला जाहिरनामा त्यांच्या सूचनेवरूनच लॉर्ड डर्बी यांनीं तयार केला. हिंदुस्थानच्या लोकांबद्दल कोणींही नालस्ती केल्यास ती आपणास यत्किंचितही खपणार नाहीं असें त्यांनीं बजावून सांगितलें होतें. हिंदुस्थानांतील असंख्यात व अशरण अशा विपन्न लोकांची आध्यात्मिक व नैतिक उन्नति करण्याबद्दल व त्यांस न्यायदृष्टीनें वागविण्याबद्द त्यांनीं आपल्या देशबांधवांस उपदेश केला आहे. ब्राइटसाहेबानंतर प्रो. फॉसेट हेच हिंदुस्थानचे वाली होते, व हिंदुस्थानचे प्रतिनिधि (Member for India) असें त्यांस म्हणत असत. हिंदुस्थानांत समकालीन परीक्षा होण्याबद्दल त्यांनीं १८६८ मध्यें हॉउस ऑफ कॉमन्सपुढें ठराव आणला. १८७० मध्यें हिंदुस्थानच्या बजेटाची चर्चा अगदीं शेवटीं रिकाम्या कॉमन्ससभेपुढें करण्याच्या फार्साचा त्यांनीं निषेध केला. त्यांच्या चळवळीमुळेंच १८७१ सालीं हिंदुस्थानच्या जमाखर्चाची तपासणी करण्याकरितां एक पार्लमेंटची कमेटी नेमण्यांत आली होती. १८७४ सालीं पार्लमेंटच्या निवडणूकींत फॉसेट साहेबांचा पराजय झाला. या कामीं त्यांना साहाय्य करण्यासाठीं, सुमारें ८००० रुपये या देशांतून पाठविण्यांत आले होते. १८७५ सालीं हिंदुस्थानच्या खर्चानें टर्कीच्या सुलतानला लॉर्ड सॉलिसबरी यांनीं दिलेल्या मजलसीबद्दल यांनीं जोराचा विरोध केला. तसेंच ड्यूक ऑफ एडिंबरो यांनीं हिंदी राजेरजवाडे यांस दिलेल्या देणग्यांचा खर्च हिंदुस्थानावर लादण्याचे बाबतींत त्यांनीं हरकत घेतली. त्यांच्या वजनामुळेंच ॲबिसीनियन लढाईचा खर्च व प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या सफरीचा बोजा हिंदुस्थानावर कमी पडला; हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेची चवकशी करण्याबद्दल पार्लमेंटची कमेटी नेमण्याची सूचना १८७९ सालीं त्यांनीं केली होती.

हिंदुस्थानच्या प्रश्नाकडे कॉमन्स सभेच्या सभासदांचें लक्ष वेधण्याकरितां एखादी संस्था स्थापून तिच्या विद्यमानेंही प्रयत्न झाले आहेत. १८५३ सालीं जॉन डिकिन्सन यांनीं **इंडियन रिफॉर्म सोसायटी** या नांवाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेमार्फतच पुष्कळ माहिती गोळा करून ती पार्लमेंटच्या सभासदांस वांटण्यांत आली होती. याच सुमारास ईस्ट इंडिया कंपनीच्या सनदेची मुदत भरली असून नवीन सनद देण्याचा प्रसंग आला होता. नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें कंपनीच्या राज्यकारभारासंबंधीं पार्लमेंटची कमेटी नेमून, चवकशी व्हावी अशी या संस्थेची खटपट होती. परंतु तो योग आला नाहीं, कंपनीचा कारभार संपून राणीसरकारकडे १८५८ सालीं हिंदुस्थानची राज्यव्यवस्था आली. १८८३ सालीं जॉन ब्राइट यांनीं पार्लमेंटच्या सभासदांस हिंदुस्थानसंबंधीं माहिती पुरविण्यासाठीं एक कमेटी अस्तित्वांत आणिली. या कमेटीचे ब्राइट हेच अध्यक्ष होते. या कमेटीच्या प्रोत्साहनानें मि. जॉन स्लॅग यांनीं हिंदुस्थानच्या

राज्यकारभाराची पार्लमेंटकडून चवकशी व्हावी म्हणून १८८५ सालीं कॉमन्स सभेंत एक सूचना आणिली. व लॉर्ड रँडॉल्फ चर्चीहिल यांनीं तिला अनुमोदन दिलें होतें. इतक्यांत लिबरल पक्ष अधिकारभ्रष्ट झाला व या सूचनेचा कांहीं उपयोग झाला नाहीं. १८८७ सालीं दादाभाई नवरोजी विलायतेस राहात होते. उमेशचंद्र बानर्जी व मि. नॉर्टन यांच्या साहाय्यानें त्यांनीं ब्रॅडलॉ साहेबांची सहानुभूति संपादन केली. ब्रॅडलॉ साहेब यांचें पार्लमेंटांत फार वजन होतें. व हिंदुस्थानचा पक्ष अशा लोकनायकाकडून समर्थन झाल्यास देशाचें फार कल्याण होईल, अशी दादाभाईंची खात्री होती. त्याचप्रमाणें **इंडियन एजन्सी** म्हणून एक संस्था स्थापण्यांत आली. मि. डिग्बी हे या संस्थेचे सेक्रेटरी होते. तिसऱ्या राष्ट्रीय सभेच्या रिपोर्टाच्या दहा हजार प्रति इंग्लंडांत वाटण्यांत आल्या. बानर्जी, नॉर्टन आणि ब्रॅडलॉ यांनीं शेंकडो व्याख्यानें दिलीं. वर्तमानपत्रांतून लेख प्रसिद्ध होऊं लागले. पार्लमेंटच्या सभासदांच्या मुलाखती घेतल्या. ग्लॅडस्टन साहेबांची डिग्बी यांनीं भेट घेतली. ब्रॅडलासाहेबांनीं कायदे कौन्सिलाची सुधारणा करण्याबद्दल एक मसुदा पार्लमेंट सभेंत सादर केला. सरकारास या प्रश्नाकडे लक्ष देणें भाग पडलें व त्याचेंच फळ १८९२ चा कौन्सिलच्या दुरुस्तीचा कायदा होय. इंडियन एजन्सी या संस्थेसच शेवटीं ब्रिटिश कमेटी ऑफ धि इंडियन नॅशनल कॉंग्रेस हें नांव देण्यांत आलें. या कमेटीचे सर वुइल्यम वेडर्बर्न हे अध्यक्ष होते व मि. केन, दादाभाई नवरोजी, मॅक्लेटन्, मि. एलिस, यूल, श्वान, हरबर्ट रॉबर्टस, डॉ. क्लार्क व मार्टिन वुड हे सभासद होते. या कमेटीचा उद्देश राष्ट्रीय सभेच्या हेतूंचा प्रसार सर्व देशभर करावा, व पार्लमेंटच्या सभासदांस हिंदुस्थानच्या संबंधीं माहिती पुरवावी, प्रधानमंडळास पक्ष विचारावे, शक्य त्या मार्गानें कॉमन्स सभेचें लक्ष हिंदुस्थानच्या स्थितीकडे वेधावें, हा होता. परंतु पार्लमेंटच्या बाहेर राहून हे हेतु सिद्धीस जाणें फार कठीण वाटूं लागलें. खुद्द पार्लमेंटच्या सभासदांमध्यें या बाबतींत जागृति उत्पन्न केल्याखेरीज व त्यांनींच पुढाकार घेतल्याखेरीज कार्यभाग होणार नाहीं असें ब्रिटिश कॉंग्रेस कमेटीच्या चालकांस आढळून आलें. १८९३ सालीं वेडर्बर्न व केन यांनीं पुढाकार घेऊन एक **इंडियन पार्लमेंटरी कमेटी** स्थापन केली. पार्लमेंटचे १५४ सभासद या कमेटींत सामील झाले. खुद्द पार्लमेंटांत इतके सभासद हिंदुस्थानच्या हिताकडे लक्ष देणारे मिळाल्यामुळें हिंदुस्थानसंबंधीं चालविलेली चळवळ यशस्वी होईल असें वाटूं लागलें. या देशाबद्दल सहानुभूति असलेले कॉमन्स सभेंत पुष्कळ सभासद होते, त्यांच्या मदतीनेंच २ जून १८९३ रोजीं समकालीन परीक्षेबद्दलचा ठराव कॉमन्स सभेंत मंजूर झाला. या पार्लमेंटरी कमेटीच्या वजनामुळेंच सर हेनरी फौलर ह्यांनीं वेलबी कमिशन नेमण्याचें १८९४ सालीं कबूल केलें. या कमेटीस मदत करण्याच्या हेतूनेंच **इंडिया** वर्तमानपत्र सुरू करण्यांत आलें. हिंदुस्थानची बाजू ब्रिटिश जनतेपुढें मांडण्याचा प्रयत्न सुरू झाला. प्रथमतः हें मासिक होतें. १८९८ पासून हें दर आठवड्यास निघत आहे. पार्लमेंटच्या सभासदांस, इंग्लंडांतील प्रमुख राजकीय संस्थांस या पत्राच्याच प्रति मोफत वांटण्यांत येतात. येथील सर्व प्रश्नांची बाजू शक्य त्या मार्गानें ब्रिटिश जनतेपुढें मांडण्याचा प्रयत्न चालू आहे. ब्रिटिश जनतेमध्यें येथील परिस्थितीबद्दल ज्ञान पसरण्याकरितां, वेळोवेळीं येथून व्याख्यानें देण्याकरितां, प्रतिनिधि पाठविण्यांत आले आहेत. राजा राममोहन राय यांचे नंतर १८८५ मध्यें मनमोहन घोस, चंदावरकर, व रामस्वामी मुदालियार हे गेले होते. १८८९ सालीं याच उद्देशानें राष्ट्रीय सभेनें मि. मेथा, मनमोहन घोस, शरफुद्दीन, सुरेंद्रनाथ बानर्जी, उमेशचंद्र बानर्जी यांस प्रतिनिधि म्हणून पाठवून दिलें. त्यानंतर १८९० सालीं फिरून मेथा, बानर्जी, घोस, ह्यूम, कालीचंद्र बानर्जी व नौरोजी यांस विलायतेंतील चळवळीकरितां निवडलें होतें. १८९६ सालीं मि. वाच्छा,

गोखले व बानर्जी यांनीं राष्ट्रीय सभेच्या वतीनें वेल्बी कमिशनपुढें साक्ष दिली. १९०४ सालीं फाळणीमुळें उत्पन्न झालेली अस्वस्थता व फुल्लरशाहीचा जुलूम याचें यथार्थ ज्ञान इंग्लंडांतील लोकांस समजावून देऊन कांहीं तरी प्रतिकार व्हावा या हेतूनें नामदार गोखले व लाला लजपतराय विलायतेंत गेले होते. या मोहिमेपासून फुल्लर साहेबांस स्वदेशीं परत बोलावण्यांत आलें. पूर्वबंगाल्यांतील अरेरावीस आळा पडला. १९०६ सालींही नामदार गोखले राष्ट्रीय सभेच्या वतीनें विलायतेस गेले होते. हिंदुस्थानांतील अस्वस्थता कमी करण्यास प्रजेस हक्क देऊन संतुष्ट केलें पाहिजे असें त्यांनीं प्रतिपादन केलें. कॉमन्स सभेच्या पुष्कळ सभासदांच्या मुलाखती घेतल्या. जबाबदार प्रधानमंडळीच्या भेटी घेतल्या. हिंदुस्थानच्या परिस्थितीचें चित्र त्यांजपुढें स्पष्ट रीतीनें मांडण्यांत आलें. व याचाच परिणाम १९०९ सालच्या कौन्सिलच्या सुधारणेंत दिसून आला. १९१३ सालींही मि. बसू, जिना, समर्थ, सिंह, शर्मा व मझरुल हक्क यांचें एक डेप्युटेशन सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्या कौन्सिलच्या सुधारणेसंबंधीं इंग्लंडांतील लोकमत सुशिक्षित करण्यासाठीं पाठविण्यांत आलें होतें. परंतु आयर्लंडांतील होमरूल बिलाच्या अवस्थेमुळें या प्रयत्नास फारसें यश आलें नाहीं. लालमोहन घोस, सुरेंद्रनाथ बानर्जी, यांच्या अमोघ वक्तृत्वानें, नामदार गोखले यांच्या मुद्देसूद कोटिक्रमानें, रसाळ वाणीनें व कर्णमधुर वाक्प्रवाहानें ब्रिटिश श्रोतृवृंद तल्लीन झाल्याचा पुष्कळ वेळां अनुभव आलेला आहे. अशा व्याख्यानांपासून इष्ट फलप्राप्ति झाली आहे. इंग्लंडांतील राजकारणी पुरुषांस अधिकारी वर्गाकडून व वर्तमानपत्रांतून देशाच्या स्थितीची एकदेशीय बाजू माहीत असते. दुसरी बाजू—लोकपक्षाचें म्हणणें—त्यांचे समोर जात नाहीं. याच कारणामुळें ब्रिटिश मुत्सद्यांची, राजकारणी पुरुषांची, प्रधानमंडळाची, मुलाखत घेऊन येथील वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान त्यांस दिलें असतां, वादविवादानें, कोटिक्रमानें, यथार्थ माहितीनें त्यांच्याशीं ऊहापोह केला असतां, पुष्कळ वेळां त्यांची सहानुभूति मिळवितां येते व त्यांच्या अनुकूलतेचा, प्रोत्साहनाचा व वजनाचा पुष्कळ उपयोग होतो. इंग्लंडांतील पार्लमेंटांत दादाभाईसारखा एखादा प्रतिनिधि असला तरी त्याला महत्तम कार्य घडवून आणता येतें. कोणत्याही प्रश्नाबद्दल जबाबदारीनें आपली बाजू समर्थन करतां येतें.

दादाभाई हे जरी एकटे पार्लमेंटांत होते तथापि देशाबद्दलची त्यांची कळकळ निस्सीम असल्यामुळें त्यांना पुष्कळ काम करतां आलें. स्वकीयांची तळमळ व आतड्यांचा पीळ यांचा जोर कांहीं निराळा आहे. १८९२ पासून १९०६ पर्यंत दादाभाईंनीं इंग्लंडांत वास्तव्य केलें होतें. हिंदुस्थानच्या हिताकडे त्यांचें रात्रंदिवस लक्ष होतें. त्यांच्या उद्योगाचा परिणाम इतरांवरही होऊन इंग्लंडांत हिंदुस्थानचे पुष्कळ हितचिंतक उत्पन्न झाले होते. दादाभाई स्वदेशीं परत आल्यानंतर हें काम मि. ह्यूम, सर हेन्री कॉटन व सर वुइल्यम वेडर्बर्न या तीन लोकांवरच पडलें. या तिन्ही थोर पुरुषांनीं निरपेक्षपणानें, आपल्या जातिबांधवांची निंदा सोसूनही हें कार्य चालविलें आहे. काळाच्या तडाख्यांतून आजमितीस फक्त वेडर्बर्न हेच हयात आहेत. त्यांचा स्वार्थत्याग, इतक्या उतार वयांतही ते करीत असलेले परिश्रम व तरुणाहूनही अत्यंत उल्हासजनक वृत्ति हें सर्व पाहून प्रत्येक मनुष्यास त्यांच्याबद्दल कृतज्ञताबुद्धीनें गौरव वाटत आहे. तथापि काल हा सर्वांचे पाठीमागें आहेच. यासाठीं इंग्लंडांतील चळवळीचा प्रश्न अत्यंत काळजीचा वाटत आहे. एकतर या चळवळीस मोठें द्रव्यसाहाय्य लागतें. काम करणारीं माणसें लागतात. हिंदुस्थानच्या परिस्थितीचा अनुभव असलेलीं आज तीस वर्षांच्या कालांत वर नमूद केलेलीं तीनच माणसें हिंदुस्थानास लाभलीं व तींही प्रारंभींच मिळालीं. परंतु या तीस वर्षांत त्यांच्याइतका स्वार्थत्याग करण्यासही सिव्हिल सर्व्हिसमधील पेनशनरांपैकीं एकही मनुष्य पुढें आला नाहीं व यापासून घेण्यासारखा बोध येवढाच आहे कीं, देशांतील लोकांनींच या कामीं पुढाकार घेतला पाहिजे. इंग्लंडांत जाऊन कायमचें वास्तव्य केलें पाहिजे. हिंदुस्थानांतील लोकांनीं उदारबुद्धीनें या कार्यास पैशाचें साहाय्य केलें पाहिजे. लालमोहन घोस, सुरेंद्रनाथ बानर्जी, आनंदमोहन घोस यांसारखे वाग्देवीच्या गळ्यांतील ताईत इंग्लंडांत जाऊन आपल्या अलौकिक वक्तृत्वानें, विशाल विद्वत्तेनें व जीवंत तळमळीनें इंग्लंडांतील लोकांचीं अंतःकरणें हालवून सोडणार नाहीत

काय? दादाभाईसारख्या निरलस व निरपेक्ष साधुवृत्तीच्या हिंदी मनुष्यास इंग्लंडच्या लोकांच्या विश्वासास पात्र करून घेण्यास हल्लीं तरी कोणती अडचण आहे? इंग्रजी भाषेमध्यें नैपुण्य संपादन केलेल्या व इंग्रजी भाषेत वाखाणण्यासारखीं वर्तमानपत्रें किफायतीनें या देशांत चालविणाऱ्या आर्यमातेच्या पुत्रांस इंग्लंडांत जाऊन हा धंदा यशस्वीपणानें करतां येणार नाहीं काय? राष्ट्रीय सभेनें चालविलेल्या 'इंडिया' पत्रांत सचेतनता, भारदस्तपणा, मनोरंजकपणा उत्पन्न करतां येणार नाहीं काय? उपयुक्त आणि विविध माहितीचा समावेश करतां येणार नाहीं काय? येथील कायदेकौन्सिलांत नांवलौकिकास आलेल्या कांहीं थोड्या गृहस्थांनीं स्वार्थत्याग केल्यास ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी किंवा इंडियन पार्लमेंटरी कमिटी यांमधील सभासदांच्या संख्येची वाढ करून त्या संस्थांस वजनदार करतां येणार नाहीं काय? नामदार गोखल्यांसारख्या हिंदुस्थानांतील जबाबदार मुत्सद्द्यांस पैशाची हांव सोडून विलायतेस जाऊन प्रधानमंडळाची, अधिकारी वर्गाची, राजकारणी पुरुषांची, थोर मुत्सद्द्यांची मनवळवणी करतां येणार नाहीं काय? या देशांत राजकारणांत चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांस निरपेक्षपणानें तेच प्रयत्न विलायतेंत केल्यास यशःप्राप्ति येणार नाहीं काय? या सर्व प्रश्नांचीं उत्तरें अस्तिपक्षीं देतां येतील. परंतु त्या सर्वांस मुख्य जरूर एकाच गोष्टीची आहे. ती तळमळीच्या व स्वार्थत्याग करणाऱ्या माणसांची होय.

हिंदुस्थान व इंग्लंड यांचा संबंध, व्यवहार्य दृष्टीनें विचार करणारांस कल्पनेची मजल जाईपर्यंत अस्तित्वांत राहणार आहे असें स्पष्ट दिसत आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवून दाद मिळविण्याची मुख्य जागा विलायतेस आहे. येथील सत्ताधारी वर्गावरून तेथील स्थितीचें अनुमान करणें चुकीचें आहे. ब्रिटिश जनतेच्या सामान्य कल्पना ब्युरॉक्रसी इतक्या अनुदार नाहींत. तेथील अधिकारी वर्गांतही पुष्कळ उदारमतवादी सात्त्विक बुद्धीचे गृहस्थ आहेत. येथील अन्यायाच्या आविष्करणानें अशा गृहस्थांस चीड येते. या देशांतील अज्ञान व विपन्न अवस्था ऐकून पुष्कळांस शरम वाटते. १०० वर्षांच्या सुधारलेल्या राज्यव्यवस्थेखालींही येथील लोकांस प्रातिनिधिक संस्थांचे अद्याप खरे हक्क दिले नाहींत हें पाहून पुष्कळ लोक खालीं मान घालतात. विश्वबंधुत्वाच्या भावनेनें प्रेरित झालेले पुष्कळ सद्गृहस्थ हिंदुस्थानच्या वतीनें झगडण्यास तयार होतात. सारांश, सत्ताधारी वर्गाचें किंवा एकतंत्री अधिकाराचें बंड नाहींसें करण्याचे बाबतींत इंग्लंडांतील सात्त्विक बुद्धीच्या लोकांची मदत झाली आहे व होत आहे व म्हणूनच शक्य त्या मार्गानें या लोकांची सहानुभूती संपादन करणें येथील चळवळीच्या पुरस्कर्त्यांस अवश्य वाटत आहे. व यासाठीं दीर्घोद्योगानें ही सहानुभूति, हें साहाय्य–मिळविलें पाहिजे, रक्षण केलें पाहिजे, व तें आपल्याच लोकांनीं केल्याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं, हें वर निर्दिष्ट केलें आहे. वेडर्बर्न साहेबांनीं हीच विनंती केली आहे. What the Indian people have to realise is that action in favour of Indian aspirations does not spring spontaneously from the ordinary operation of British institutions, but has ever been the result of persistent and laborious personal effort on the part of out-side reformers working both in India and England.

येथील काम.

राष्ट्रीय सभेच्या कामाबद्दलही पुष्कळ सूचना करण्यांत आल्या आहेत. हल्लींच्या तरुण पिढीस आजपर्यंत चाललेलें काम नापसंत असून ते उतावीळ झालेले दिसतात. परंतु राष्ट्रीय सभा अस्तित्वांत आणून तिनें आजपर्यंत आक्रमण केलेला मार्ग गांठण्याकरितां ज्या अडचणी पडल्या, जीं संकटें सोसावीं लागलीं, ज्या दुस्तर परिस्थितींतून जावें लागलें, त्यांची या मंडळीस बरोबर कल्पना नाहीं. उपहास, निंदा, विरोध व औदासीन्य यांचा जो अनुभव तत्कालीन पिढीस सोसावा लागला, त्याची अटकळ हल्लींच्या पिढीस असणें अशक्य आहे. प्रवासाचीं साधनें हल्लींसारखीं उपलब्ध नसतांना कुटुंबांतील माणसांस घेऊन रात्रीच्या वेळीं प्रवास करणाऱ्या वडीलधाऱ्या माणसांस काळोखांतून रस्ता शोधण्यास जे श्रम पडले, हिंस्र श्वापदांची व लुटारूंची जी भीति वाटली, सूर्योदयाची आतुरतेनें वाट पाहात जी जागरूकता ठेवावी लागली, त्याची कल्पना सूर्योदया-

नंतर रुळलेल्या मार्गावरून प्रवास करणाऱ्या, सृष्टि-सौंदर्याचें कुतूहलानें निरीक्षण करणाऱ्या व पाथेयाचा स्वेच्छेनें उपभोग घेणाऱ्या बालगोपालांस काय येणार आहे ! ही स्थिति कांहीं अंशीं हल्लींच्या तरुण पिढीची आहे. राष्ट्रीय सभेच्या येथील कामाबद्दल कोणी म्हणतात कीं, तिचें क्षेत्र वाढवून घटनेस मूर्त स्वरूप देऊन, खेड्यापाड्यांतून तिच्या शाखा स्थापन कराव्या; राष्ट्रीय सभेचें कार्यालय स्थापावें; राष्ट्रीय सभेची शाखा म्हणजे बिनसरकारी सक्रेटरी-एट्र बनवावें. कित्येक म्हणतात कीं, कांहीं विवक्षित प्रश्न हातीं घेऊन त्याबद्दलच सर्व देशभर प्रचंड चळवळ चालू करावी. कित्येकांच्या मतें अर्ज, डेप्युटेशनें, हस्तपत्रकें, जाहिर सभा, व्याख्यानें यांनीं सर्व देश दणाणून सोडावा. कित्येकांच्या मतें स्वराज्याच्या एकच कल्पनेनें सर्व राष्ट्रांत एकच चळवळ करावी; याप्रमाणें अनेक सूचना करण्यांत येत आहेत. ह्या सर्व प्रामाणिक बुद्धीनें केल्या जात आहेत. या सर्वांचा निष्कर्ष एका शब्दांत सांगतां येईल म्हणजे काम—काम—काम. परंतु हें झालें तरी माणसांनींच करावयाचें आहे. एखाद्या यंत्राचा शोध लागून त्या योगानें हें घडवून येईल असा संभव नाहीं. अर्थात् निरपेक्षपणानें व स्वार्थत्यागानें काम करणाऱ्या माणसांवरच देशाची सर्व भिस्त पडत आहे. राष्ट्रीय सभेच्या उत्पत्तीपूर्वी ह्यूमसाहेबांनीं हेंच सांगितलें होतें. या तत्त्वाची खरी उमज देशांतील एका पुरुषासच झाली. स्वानुभवानें व स्वतःच्या उदाहरणानें नामदार गोखले यांनीं यासंबंधीं जो उपदेश केला आहे तो निरंतर संस्मरणीय आहे.

" How soon or how late the ideal (Colonial Self-Government) is realised depends really upon ourselves. Our numbers are so great that no power on Earth can bear our weight for any length of time, if only we are true to ourselves. But much work has to be done and enormous sacrifices will have to be made before any real advance in this direction is secured. What we need today above every thing else is a band of workers, who will give up their all for their country and spread the gospel of unity and patriotism far and wide throughout the land. The curse of a tendency towards disintegration, which still rests upon us, must be lifted. Our love of the motherland must grow so fervent and passionate that it will turn all sacrifice for India into a pure joy and the workers must maintain resolute discipline in their ranks. What the situation requires is not new ideas but sacrifice, not talk but work—work early and work late, work when it is dawn and work when it is dark. We are entitled to do such work for our country and it is entirely in accord with the declared object of British Rule in India. We are anxious to do this work without disturbing the harmonious relations, that have hither-to existed between Indians and Englishmen, and if those who wield power at present in our country, choose to turn their backs on solemn promises given in the name of England and merely make a continuance of harmonious relations impossible; the responsibility for disturbing these relations will lie on them and not on us. No one knows what the future has in store for us or how much fulfilment our own eyes may witness before they close. But one thing is quite clear. There is nothing in this world of ours which may not be achieved by men whose lives are inspired by patriotism, sustained by faith and ennobled by sacrifice. India expects that such men shall now come forward in sufficient numbers in her service. If this expectation is realised all else will be well.

गोपाळरावजींचा हा उपदेश मनावर ठसला व तो हल्लींच्या तरुण पिढींत कृतींत उतरला तर या उदयोन्मुख राष्ट्राचा भविष्यकाळ निःसंशय आनंद-दायक होईल, याबद्द यत्किंचितही संशय नाहीं.

राष्ट्रीय सभा आणि स्वराज्य.

हिंदुस्थानच्या इतिहासांत सध्यांचा काल चिरस्मरणीय असा होईल अशी प्रत्येकाची मनोदेवता सांगत आहे. चालू युद्धानें अदृश्य गोष्टी दृश्य केल्या आहेत व दृश्य गोष्टींस नवीन स्वरूप दिलें आहे. त्यानें कल्पनातीत असे प्रश्न उत्पन्न केले असून आशा व चिंता ह्या सारख्याच पसरून टाकल्या आहेत. ह्या देशासंबंधानें विचार करतां, युद्धानें त्याचें हृद्गत उघड करून दाखविलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानाच्या बाबतींत ग्रेट ब्रिटन व स्वयंसत्ताक वसाहती ह्यांमध्यें अज्ञान पसरलेलें होतें—तें अजून सर्वस्वीं नष्ट झालेलें नाहीं—व ह्या देशाविषयीं त्यांची साशंक वृत्ति होती. वास्तविक पाहतां, असल्या साशंक वृत्तीस मुळींच जागा नव्हती; परंतु कांहीं अनुदार वृत्तीच्या लोकांनीं हिंदी सुशिक्षितांविषयीं काढलेल्या उद्गारांवर भिस्त ठेवून पुष्कळांनीं आपलें मत बनविलें होतें. ग्रेट ब्रिटन आणि हिंदुस्थान ह्यांचा इतकीं वर्षें निकट संबंध असतां, ब्रिटिश जनतेमध्यें ह्या देशाविषयीं विलक्षण अज्ञान आणि गैरसमज पसरलेले असावे ह्याचें कोणासही आश्चर्य वाटेल. परंतु येथें राज्यकारभार करणाऱ्या आपल्या देशबांधवांनीं दिलेल्या आलबेलीवर न विश्वसून स्वत: प्रत्यक्ष चौकशी करण्याची तसदी घ्यावी असें ब्रिटिश जनतेपैकीं थोड्याच व्यक्तींस वाटतें. असल्या अल्पसंख्याक उदारधी व्यक्तींनीं हिंदुस्थानाची खरी स्थिति, त्याचीं गाऱ्हाणीं आणि त्याच्या योग्य मागण्या ह्यांची हकीकत स्वदेशबंधूंच्या कानांवर घालण्याचे स्तुत्य पण निष्फळ यत्न केले आहेत. चालू महायुद्धानें, ब्रिटिश जनतेच्या डोळ्यांवरील अज्ञानाचें व गैरसमजाचें पटल बाजूस सारण्यास थोडेंसें तरी साहाय्य केलें आहे. हिंदुस्थान हा जित म्हणून असंतुष्ट देश असला पाहिजे ही कल्पना पार नाहींशी झाली आहे. सदरहू भ्रामक समजूत किती दृढ होती व तिचा फैलाव किती झाला होता ह्याचें उत्कृष्ट निदर्शक म्हणजे कायझरची युद्ध सुरू होतांच हिंदुस्थानांत असंतोषजन्य बंडाळी माजण्याविषयींची आशा हें होय. कायझरची निराशा हीच हिंदी लोकांची सबळ आशा होय.

युद्ध सुरू झालें तेव्हां आमच्या सुदैवानें हिंदी राज्यकारभाराचीं सूत्रें लॉर्ड हार्डिंज सारख्या उदारधी, सहानुभूतिप्रेरित व मर्मज्ञ मुत्सद्याच्या हातीं होतीं. त्यांस हिंदी लोकांची अचळ आणि निर्हेतुक राजनिष्ठा पूर्णपणें माहीत होती. साम्राज्याच्या संरक्षणासाठीं तेथील गोरी व काळी फौज समरांगणावर पाठविण्याचा त्यांनीं तात्काळ निश्चय केला व ब्रिटिश साम्राज्याच्या दुसऱ्या फौजा रणभूमीवर दाखल होण्यापूर्वीं ऐन प्रसंगीं ती बादशाहांच्या सेवेस योग्य ठिकाणीं सादर झाली. हिंदुस्थानानें आपलें कसलेलें सैन्य युरोपच्या अपरिचित युद्धभूमीवर पाठवून ग्रेट ब्रिटनला केलेल्या साहाय्याची किंमत करतां येणें शक्य नव्हतें. त्याचा ब्रिटिश जनतेवर आणि स्वयंसत्ताक वसाहतींतील लोकांवर विलक्षण परिणाम झाला. आपल्या खांद्यास खांदा लावून शत्रूंशीं लढण्यास हजारों मैलांवरून आलेल्या हिंदी वीरांच्या पात्रतेबद्दल आपण इतका कालपर्यंत साशंक राहिलों ह्याची त्यांस लाज वाटली असली पाहिजे. साम्राज्याकरितां तन, मन, धन अर्पण करणाऱ्या हिंदी लोकांस आपण स्वत:पेक्षां कमी लेखलें ह्याबद्दल त्यांस वाईट वाटलें असलें पाहिजे. वर्तमानपत्रांतून आणि भाषणांतून सर्व साम्राज्यभर निघालेल्या कृतज्ञतापूर्ण उद्गारांवरून वरील विधानाची सत्यता सिद्ध होते. जॉर्ज बादशाहांपासून तों तहत अगदी क्षुल्लक माणसापर्यंत सर्वांनीं असले उद्गार काढले आहेत ह्यावरून ब्रिटिश जनतेचा 'दृष्टिकोण' हिंदुस्थानास अनुकूल झाला आहे असें अनुमान काढण्यास मुळींच हरकत दिसत नाहीं. हिंदी लोकांनीं साम्राज्यास जें साहाय्य

केलें आहे व जें साहाय्य ते करतील तें सर्वस्वीं निरपेक्ष आहे, ही गोष्टही स्पष्ट झालेली आहे. युद्धामुळें हिंदुस्थानानें आपलें धोरण बदललें अशांतला मुळींच प्रकार नाहीं, हें ह्या देशाची ज्यास खरी माहिती आहे त्या प्रत्येकास अवगत आहे.

हिंदी लोकांमध्यें जी नवीन आशा उत्पन्न झाली आहे, ती युद्ध संपल्यावर आपण साम्राज्यास नडीच्या प्रसंगीं केलेल्या मदतीचा मोबदला ब्रिटिश जनतेकडून मागण्यास संधि सांपडेल म्हणून झालेली नाहीं हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. मग, ही आशा काय आहे व ती कशी उत्पन्न झाली आहे? याचें उत्तर असें आहे कीं, हिंदी लोकांच्या स्वाभाविक आणि योग्य आकांक्षा तृप्त होण्याच्या मार्गांत ब्रिटिश जनतेच्या अज्ञानाची जी मोठी अडचण होती ती आतां बऱ्याच अंशानें दूर झाली आहे, ही त्यांची समजूत होय. सदरहू समजूत सर्वस्वीं चुकली आहे असें म्हणण्याचें धाष्ट्यं कोणी करील असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदी लोकांच्या मागण्या अयोग्य व अप्रयोजक आहेत असें कांहीं हरीचे लाल म्हणण्यास चुकावयाचे नाहींत, व त्यांस ताबडतोब मान्यता मिळेल असाही प्रकार मुळींच नाहीं. हिंदुस्थानास जास्त राजकीय हक्क देणें हिंदी जनतेच्या हिताच्या दृष्टीनें अनिष्ट आहे अशी समजूत ह्या देशांतच कांहीं लोकांची आहे, परंतु तिल फारसें महत्त्व देण्याचें प्रयोजन आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कोणते हक्क हिंदुस्थानास द्यावे व कोणते देऊं नयेत, ह्याविषयीं मतभेद होणें साहजिक आहे. परंतु राजकीय प्रगतीच्या मार्गांत ह्या देशाचें पाऊल जोरानें पुढें पडलें पाहिजे ह्याविषयीं बहुतेक मतैक्यच आहे, ह्यांत शंका वाटत नाहीं. अज्ञानमूलक व स्वार्थबुद्धिप्रेरित विरोध केव्हांही रहाणारच; तथापि त्याचीही तीव्रता आतां पुष्कळ कमी झाल्यावांचून राहावयाची नाहीं. अनुकूल परिस्थितीचा योग्य उपयोग करून घेणें हिंदी पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे, त्यांचा दूरदर्शीपणा आणि मुत्सद्देगिरी हीं कसास लागण्याची वेळ आली आहे. देशाभिमान आणि धूर्तता ह्यांची फारकत, ह्या देशांत पुष्कळ वेळां झालेली दिसून येते व नामदार गोखले आणि सर फेरोजशहा मेथा असल्या धुरीणांच्या अभावीं राष्ट्राचें तारूं भलतीकडे वाहवेल कीं काय अशी धास्ती वाटते. तथापि, समंजसपणा आणि व्यवहारज्ञता ह्यांचा देशांत समूळ लोप झालेला नाहीं, असें मानण्यास एकंदरीनें हरकत दिसत नाहीं.

तीस वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत राजकीय चळवळ सुरू झाली तिला, हिंदी लोकांस मिळविलेल्या पाश्चात्य शिक्षणाची स्फूर्ति कारण झाली. ग्रेट ब्रिटनमध्यें प्रजेनें राज्यकर्त्यांकडून वर्षानुवर्ष नेटानें चळवळ करून जसे राजकीय हक्क संपादन केले, त्या प्रकारचे हक्क ह्या देशांतही, लोकांस सदरहू मार्गानें खटपट केल्यास मिळाले पाहिजेत, हा राष्ट्रीय सभेच्या उत्पादकांचा दृढ विश्वास होता. प्रजेस योग्य हक्क मिळण्याचें व तिची हुकुमत राज्यकारभारावर चालण्याचें महत्त्व ब्रिटिश लोकांस पूर्णपणें माहीत असल्याकारणानें त्यांच्यापुढें हिंदुस्थानची परिस्थिति आणि आकांक्षा मांडल्या असतां त्यांचा अनुकूल रीतीनें विचार झाल्यावांचून राहावयाचा नाहीं ही प्रत्येकाची खात्री होती. केवळ हिंदी लोकांच्या हिताच्या दृष्टीनें येथील राज्यकारभार चालला पाहिजे व राज्यसत्तेचा मोठा वांटा त्यांस मिळाला पाहिजे ह्या मागण्या इतक्या सरळ व सयुक्तिक होत्या कीं, पार्लमेंटच्या मनावर त्या बरोबर ठसल्या असतां त्यांचा अव्हेर होणें अशक्य आहे अशी सार्वत्रिक भावना होती. अर्ज, ठराव, भाषणें, वर्तमानपत्रांतील लेख, डेप्युटेशनें वगैरेंच्या द्वारानें ठराविक मर्यादेचें अतिक्रमण न करतां आपली राजकीय चळवळ चालू ठेवावयाची असा राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांचा निर्धार होता. १८३३ च्या सारख्या कायद्यांत व १८५८ च्या सारख्या जाहीरनाम्यांत नमूद केलेल्या राज्यकारभाराच्या तत्त्वांची अंमलबजावणी व्हावी आणि हिंदी प्रजेस वेळो-

वेळीं मिळालेलीं वचनें पाळण्यांत यावीं हा हिंदी राजकीय चळवळीचा पाया होता. इंग्लंडमध्यें मॅग्नाचार्टा सारख्या सनदांचा आधार घेऊन लोकांनीं ज्याप्रमाणें राजकीय हक्क प्राप्त करून घेतले, त्याप्रमाणेंच येथेंही आपल्या सनदांच्या जोरावर हक्क संपादन करावे असा कार्यक्रम होता. ही चळवळ इतकी राजनिष्ठ, पायाशुद्ध व योग्य होती तरी अधिकारी वर्गास व ॲंग्लो-इंडियन लेखकांस ती पसंत नव्हती. मूठभर स्वार्थसाधु लोकांनीं चालविलेली ही गडबड आहे, सामान्य हिंदी जनतेचा तिच्याशीं संबंध किंवा सहानुभूती नाहीं व सरकारनें तिकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं असें म्हणण्याचा त्यांनीं क्रम चालविला. राष्ट्रीय सभेशीं संबंध असलेल्या लोकांच्या शहाणपणाविषयींच नव्हे तर राजनिष्ठेविषयीं देखील कित्येकांनीं उघड रीतीनें शंका प्रदर्शित केली. त्यांच्या भाषेंत 'कॉंग्रेसवाला' हा निंदाबोधक शब्द होऊन बसला व राष्ट्रीय सभेवर सरकारी अधिकाऱ्यांची करडी नजर होऊं लागली. परंतु निंदा, उपहास व अधिकारी वर्गाची अवकृपा ह्यांस न जुमानतां सभेच्या पुढाऱ्यांनीं आपला क्रम चालविला. त्यांच्या मागण्यांपैकीं कित्येकांची अजूनही दाद लागली नाहीं, तथापि कांहीं सरकारानें मान्य केल्या आहेत. हिंदुस्थानामध्यें परिस्थितीच अशी कांहीं होती कीं, येथील राजकीय चळवळ अपेक्षेप्रमाणें फलद्रूप होऊं शकली नाहीं. तरी देखील राष्ट्रीय सभेच्या निंदकांसही तिनें केलेली कामगिरी नाकबूल करतां येत नाहीं.

दहा वर्षांपूर्वी, बंगालच्या फाळणीनें देशामध्यें अस्वस्थता उत्पन्न केली व लोकमतास आणि सार्वजनिक चळवळीस मुळींच मान मिळत नाहीं असें दिसतांच कित्येकांचा राष्ट्रीय सभेच्या चळवळीवरचा विश्वास अजीबात उडून गेला. सनदशीर चळवळ म्हणजे 'भिक्षांदेहि' आहे व तिचा कांहीं एक उपयोग होणें शक्य नाहीं, असा ते उपदेश करूं लागले. थोड्याशा व्यक्तींचीं डोकीं फिरून जाऊन अराजकतेचा ह्या देशांत प्रादुर्भाव झाला. सरकारजवळ मागून कांहीं मिळवावयाचें नाहीं, स्वावलंबनाचा मार्ग लोकांनीं स्वीकारला पाहिजे आणि राजकर्त्यांशीं 'फटकून वागलें पाहिजे' असें म्हणणारांचा एक वर्ग उत्पन्न झाला. मि. दादाभाई नौरोजींच्या स्वराज्याचा भलताच अर्थ करून निर्भेळ स्वराज्य आणि बहिष्कार ह्या विषयांच्या आपल्या कल्पना राष्ट्रीय सभेवर लादण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला. ह्या गडबडीचें पर्यवसान सुरतेच्या दंगलींत झालें आणि राष्ट्रीय सभेच्या सुज्ञ व जबाबदार पुढाऱ्यांस घटना आणि नियम करावे लागले. त्यांनीं राष्ट्रीय सभेचें धेय निश्चित करून टाकलें व निर्भेळ स्वराज्य, बहिष्कार, भिक्षांदेहि इत्यादि बडबड बंद पाडून टाकली. पुढें कांहीं वर्षें तें रडगाणें चालू होतेंच, परंतु आतां त्याचा सूर राष्ट्रीय सभेच्या बाहेर राहिलेल्या लोकांनीं सभेच्या सुराशीं बहुतेक मिळता करून घेतल्यासारखें आहे. सभेच्या घटनेंत दुरुस्ती, 'समेट' वगैरे विषयांची चर्चा आम्हांस येथें करावयाची नाहीं. ब्रिटिश नागरिकांचे हक्क हिंदी लोकांस मिळावे हें हिंदी राजकीय चळवळीचें प्रथम पासून ध्येय होतें व तेंच १९०८ मध्यें स्पष्ट शब्दांनीं 'वसाहतींचें स्वराज्य' म्हणून नमूद करण्यांत आलें. दादाभाईच्या स्वराज्याचा व निर्भेळ स्वराज्याचा मध्यंतरीं कित्येकांनीं गडबडगुंडा केला, पण तेही आतां बेतावर आले असून, सात वर्षांपूर्वी राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं केलेल्या योजनेस कबूल झाले आहेत असें दिसत आहे. वसाहतींचें स्वराज्य पल्ल्यापल्ल्यानें गांठावयाचें व तें 'सनदशीर'पद्धतीनें प्राप्त करून घ्यावयाचें हीं राष्ट्रीय सभेचीं मुख्य तत्त्वें आहेत.

युद्ध चालू असतांना, ज्या योगें सरकार व प्रजा ह्यांच्या चित्तास व्यग्रता प्राप्त होईल, अशा प्रकारची कोणतीही चळवळ करावयाची नाहीं ह्या गोष्टीविषयीं सर्वत्र एकवाक्यता आहे असें आम्हांस वाटतें. सध्यांच्या प्रसंगीं, शत्रूचा पराभव करणें एवढीच

एक महत्त्वाची गोष्ट साम्राज्याच्या दृष्टीसमोर असतां, हिंदुस्थानानें राजकीय हक्कांची मागणी करणें गैर-शिस्त होईल व असें करण्याची कल्पना देखील कोणाचे मनांत येईल असें आम्हांस वाटत नाहीं. साम्राज्याचें शक्तिसर्वस्व तूर्त युद्धांत खर्ची पडणें अगत्याचें आहे. असें आहे तरी राष्ट्रीय सभेसारख्या संस्थांच्या वार्षिक सभांचे वेळीं राष्ट्राच्या राजकीय भवितव्यतेचा प्रश्न विचारासाठीं पुढें येणें अपरिहार्य आहे. युद्धानंतर बदललेल्या परिस्थितींत हिंदुस्थानानें कोणत्या प्रकारची मागणी करावी ह्याचा लोकांच्या पुढाऱ्यांनीं शांत मनानें विचार केला पाहिजे. हा प्रश्न कांहीं चटदिशीं सुटण्यासारखा नाहीं. हिंदुस्थानची परंपरा, सद्यःस्थिति, मार्गांतील अडचणी वगैरे गोष्टींची दूरदर्शीपणानें चर्चा करून पुढाऱ्यांनीं आपला मार्ग निश्चित करावयाचा आहे. कांहींच्या मतें, वसाहतींमध्यें ज्या प्रकारची राज्यव्यवस्था अस्तित्वांत आहे, त्या प्रकारची व्यवस्था हिंदुस्थानांत तावडतोब अमलांत आली पाहिजे असा लोकांनीं आग्रह धरावा; कारण अशी ठोक मागणी केली नाहीं तर आपल्या पदरांत कांहींच पडावयाचें नाहीं. ह्या लोकांस, राष्ट्रीय सभेची आतांपर्यंतची चळवळ पटली असली तरी, ह्यापुढें ती पुरेशी व्हावयाची नाहीं असें त्यांचें मत आहे. बारीक बारीक सुधारणा न मागतां ‘स्वराज्या’ ची एकदम मागणी करावी असें ते प्रतिपादन करीत आहेत. राष्ट्रीय सभा आज तीस वर्षें किरकोळ सुधारणांविषयीं चळवळ करीत आली म्हणून तिला यश आलें नाहीं व आतां स्वराज्याची ठोक मागणी केली असतां ती लागलीच मान्य होईल असें समजणें चुकीचें आहे. राष्ट्रीय सभेच्या चळवळीवर आज टीका करणें फार सोपें आहे. हातांत कांहीं सत्ता नसलेल्या व एका काळीं भिकार सुधारणांवर खुष होणाऱ्या ब्रिटिश पार्लमेंटास देखील त्याप्रमाणें हांसतां आलें असतें. कायदेकौंसिलांची वाढ, करांचा बोजा कमी करण्याची आवश्यकता, इंडिया कौंसिलाची सुधारणा, हिंदी लोकांच्या जबाबदारीच्या जागांवर नेमणुका वगैरे गोष्टींविषयीं चळवळ न करतां ‘आम्हांस स्वराज्य द्या’ असें राष्ट्रीय सभेनें दहा वर्षांपूर्वी म्हटलें असतें तर तें केव्हांच मिळालें असतें असें वाटण्याइतका भोळसरपणा समंजस हिंदी लोकांत असेल असें अम्हांस वाटत नाहीं. प्रचलित राज्यपद्धतीचीच उत्क्रांति आपल्या स्वराज्याच्या ध्येयांत करून घेणें हाच मार्ग सरळ, सयुक्तिक व श्रेयस्कर आहे. चालू हिंदी राज्यपद्धति व वसाहतींचें स्वराज्य ह्यांस जोडणाऱ्या सांखळीचे दुवे तयार करावयाचे आहेत व युद्धसमाप्तीनंतर ह्या दोन तीन दुव्यांपैकीं पहिला तावडतोब घडला जावा अशी हिंदी लोकांनीं मागणी करणेंच योग्य आहे. हिंदुस्थानांत स्वराज्य स्थापन व्हावयाचें म्हणजे अनेक भानगडींचा आणि नाजूक प्रश्नांचा निकाल करावा लागेल हें पुष्कळ लोक विसरतात.

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतींचें स्वराज्य हें राष्ट्रीय सभेचें ध्येय असावें ह्या तत्त्वासंबंधानें देखील एकवाक्यता होण्यास किती तरी वर्षें लोटावीं लागलीं व बराच गैरसमज, वस्तुविपर्यास व वितंडवाद होऊन शेवटीं निर्भेळ स्वराज्याच्या पुरस्कर्त्यांस देखील त्यास उघडपणें मान्यता देणें शहाणपणाचें वाटूं लागलें आहे. दादाभाईंनीं निर्भेळ स्वराज्यच प्रतिपादन केलें हें सिद्ध करण्यासाठीं कितीही अट्टाहास केला तरी दोहोंचे चार होत नाहींत व वसाहतींचें स्वराज्य हें ध्येय निश्चित करणारांचा पक्ष खोटा करणें शक्य नाहीं. खुद्द दादाभाईंनींच कलकत्त्यास जें भाषण केलें त्यामध्यें आपलें वसाहतींचें स्वराज्य मिळविण्यासाटीं प्रथम कोणत्या मागण्या केल्या पाहिजेत व कोणत्या पायऱ्यांनीं वर चढून गेलें पाहिजे ह्याचें स्पष्ट विवेचन केलें आहे. त्यांनींच घालून दिलेला मार्ग आम्हांस आज स्वीकारावयाचा आहे. मॉर्लेमिंटो ह्यांच्या सुधारणा सुरू होऊन आज सात वर्षें झालीं असून नवीन मिळालेल्या हक्कांचा उपभोग घेण्याची पात्रता हिंदी लोकांनीं सिद्ध करून दाख-

विली आहे. युद्धामुळें परिस्थिति अनुकूल झाली असतां, आम्हांस आणखी दोन पाहिऱ्या वर जाण्याची परवानगी द्या म्हणजे पुढें शेवटचा पल्ला लवकरच गांठतां येईल असें हिंदी जनतेनें आतां मागणें करावयाचें आहे. आम्हांस एकदम स्वराज्य द्यावें आहे असा आग्रह धरला असतां तें लागलीच मिळतें अशांतला जर प्रकार नाहीं, तर 'होम रूल' ठोक मागणी करण्यापासून काय फायदा आहे हें आम्हांस समजत नाहीं. वस्तुतः ज्यांच्या योगानें लोकसत्ता मुळींच वाढण्याचा संभव नाहीं असल्या शुष्क सुधारणांनीं तृप्त होणें केव्हांहीं योग्य नाहीं; म्हणूनच, हिंदी लोकांस खरीखुरी सत्ता प्राप्त होईल अशाच सुधारणांची मागणी करणें आवश्यक आहे.

कोणतीहि मागणी करतांना, प्रतिपक्षाचा विरोध, शक्याशक्यता, वगैरे गोष्टींचा पूर्ण विचार करून पुढें पाऊल टाकावें लागतें. सर वुइल्यम वेडरबर्न व सर कृष्ण गुप्त ह्यांनीं सुधारणेची जी योजना तयार केली आहे ती ह्याच तत्त्वावर केलेली आहे. तिच्यामध्यें कमीजास्त करणें आवश्यक होईल, परंतु सदरहू प्रकारची मागणी करणें हें भित्रेपणाचें लक्षण आहे असें भासविणें म्हणजे आपला स्वतः-चा अदूरदर्शीपणा व मुत्सद्दीपणाचा अभाव ह्यांचें प्रदर्शन करण्यासारखें आहे. निर्भेळ स्वराज्या-विषयींची ओरड मूठभर लोकांनीं दहा वर्षांपूर्वी चालविली होती त्यावेळीं, भित्रेपणा व धीटपणा, स्व-देशाभिमान व त्याचा अभाव असली तफावत दाखविण्यांत येत होती. त्या देशभक्तीचा व धिटा-ईचा काय निकाल लागला आहे हें आतां सर्वांस विदित झालें आहे. तोच प्रकार ठोक स्वराज्यासंबं-धानें होणार आहे हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. राजकीय बाबतींत व्यावहारिक ज्ञान, देवाण घेवाण व मुत्सद्देगिरी ह्यांची फार जरूर असते व त्यांची जागा नुसत्या आवेशानें आणि धिटाईच्या देखाव्यानें भरून निघत नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आमचें आणखी असें म्हणणें आहे कीं, राष्ट्रीय सभेस आप-ल्या घटनेचें पहिलें कलम बदलल्यावांचून स्वरा-ज्याची ठोक मागणीच मुळीं करतां येत नाहीं. स्वराज्याचा पल्ला क्रमाक्रमानें व सध्यांच्या राज्य-कारभारव्यवस्थेंत सुधारणा घडवून आणून गांठा-वयाचा असें त्यामध्यें स्पष्ट म्हटलें असून 'होम रूल'ची ठोक मागणी त्याच्याशीं अगदीं विरुद्ध आहे. सदरहू कलम वज्रलेप असून तें केव्हांच बदलतां येणार नाहीं असें नाहीं, परंतु राष्ट्रीय सभेची गाडी सध्यांच्या रुळांवरून काढून दुसऱ्या रुळांवर नेऊन ठेवावी लागेल ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. राष्ट्रीय सभेच्या घटनेच्या पहिल्या कलमास धरून चळवळ करावयाची असें एका बाजूस म्हणा-वयाचें व होम रूलची मागणी एकदम केली पाहिजे असें दुसऱ्या बाजूस प्रतिपादन करावयाचें ह्या दोहोंचा मेळ बसत नाहीं. अशा स्थितींत पुढें पाऊल टाक-ण्यापूर्वीं राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांस आपल्या ध्येयाचा, मार्गाचा व कार्यक्रमाचा दूरवर विचार केला पाहिजे व आपलें धोरण ठरविलें पाहिजे हें उघड आहे.

होम रूलची ठोक मागणी केली असतां हें सर्व नवीन प्रकरण आहे असें म्हणून तें धुडकावून देण्यास, हिंदुस्थानच्या हितशत्रूंस चांगली संधि मिळेल. परंतु हिंदी लोक ज्या राजकीय सुधारणा व्हाव्या म्हणून चळवळ करीत आहेत, त्या पूर्वपरं-परेस धरून आहेत आणि केवळ उत्क्रांतिस्वरूपाच्या आहेत असें सिद्ध झालें असतां त्यांस होणाऱ्या विरो-धाची तीव्रता पुष्कळ कमी होईल. आपणांस येणाऱ्या अडचणी हिशेबांत धरून वागणें हा कांहीं भित्रेपणा नव्हे. हिंदी लोकांमध्यें जसजशी जास्त पात्रता येईल, तसतसे त्यांस अधिक जबाबदारीचे हक्क देण्यांत यावे आणि येतील हें ब्रिटिश राज्याचें धोरण अनेकवेळां व्यक्त करण्यांत आलेलें आहे. त्याच पायावर आम्हीं आपल्या स्वराज्याच्या मागणीची उभारणी केली तर ती विशेष बळकट होणार आहे. सहा वर्षांपूर्वीं कौंसि

लांच्या वगैरे ज्या सुधारणा झाल्या त्या हिंदी लोकांच्या चांगल्या पचनीं पडलेल्या असून त्यांच्या पुढच्या पाहिऱ्या गांठण्याची त्यांची पूर्ण तयारी आहे हें सिद्ध करून दाखविण्यास फारसे श्रम नकोत. आम्हीं नवीन कांहीं मागत नाहीं, आमच्या जुन्याच मागण्या आहेत व त्यांची पूर्तता करण्याची आतां वेळ आली आहे असें हिंदी लोकांनीं जोरानें म्हटल्यास त्यांस होणारा नेहमींचा विरोध लटपटलाच पाहिजे. क्रमाक्रमानें आणि पाहिरीपाहिरीनें पुढें जावयाचें, एकदम उडी मारण्याचा व पाय मोडून घेण्याचा यत्न करावयाचा नाहीं ह्या ब्रिटिश राजकीय धोरणाचाच हिंदुस्थानांत अवलंब होत आहे, ही गोष्ट ब्रिटिश जनतेच्या मनावर ठसली असतां आमचा मार्ग सुलभ होण्याचा संभव आहे. स्वराज्याची ठोक मागणी करावयाची ती तरी लोकमत तयार करून व नेहमींच्या सर्वमान्य सनदशीर रीतीनें करावयाची असें जर आहे, तर आपल्या चळवळीस सर्वांत कमी विरोध कसा येईल ह्या गोष्टीचा विचार होणें अगत्याचें नाहीं काय ? आपणांस अनुकूल असलेल्या लोकांचें काम कसें सुकर होईल व आपणांस प्रतिकूल असलेल्या मंडळींचे प्रयत्न कसे विफल होतील ह्याचा हिशेब करून आपला कार्यक्रम ठरविणें हेंच मुत्सद्दीपणाचें लक्षण आहे; आणि हा मुत्सद्दीपणा राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांच्या धोरणांत व्यक्त होईल असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे.

ह्याबरोबरच विचार करण्यासारखा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे आमच्या मुसलमान बंधूंच्या सहकारितेसंबंधाचा आहे. राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीग ह्यांचीं, आजपर्यंत भिन्न दिशेस तोंडें होतीं व त्यांची पूर्णपणानें एकवाक्यता होण्यास अजून बराच काळ लोटावा लागेल. तथापि आतां सदरहू दोन संस्था सहकारितेनें वागूं लागण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. आमच्या मुसलमान बंधूंस स्वतंत्र प्रतिनिधित्वाचे हक्क मिळाले आहेत, ते एकराष्ट्रीयत्वास विघातक असल्याचें पुष्कळांचें मत आहे. परंतु राष्ट्रीय सभा स्वराज्याची मागणी करणार ती मुस्लिम लीगला बाजूस सारून करणें बरोबर होईल किंवा काय, ह्या प्रश्नाचा विचार होणें अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय सभेनें केलेल्या मागणीस मुसलमान समाजानें विरोध केल्यास तिला किती यश येणार आहे, हें सांगावयास नको. टोरी मताच्या लोकांस व अधिकारी वर्गास अगोदरच ह्या कामांत मोठा उल्हास व त्यांतून राष्ट्रीय सभा आणि मुस्लिम लीग ह्यांमध्यें तीव्र मतभेद मग काय विचारावें ? मुस्लिम लीगनेंही आपल्या पुढें स्वराज्याचें ध्येय ठेविलें आहे, तेव्हां ह्या दोन राजकीय चळवळ करणाऱ्या संस्थांचें सहकारित्व झाल्यास मोठा कार्यभाग होणार आहे. राष्ट्रीय सभा आणि मुस्लिम लीग ह्या दोहोंच्याही बैठकी मुंबईत एकाच वेळीं व्हावयाच्या असल्यामुळें सहकारिता आणि एकी ह्यांची सोन्यासारखी संधी प्राप्त झालेली आहे. तिचा योग्य उपयोग करून घेणें पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे. राष्ट्रीय सभा आणि मुस्लिम लीग ह्यांच्या पुढाऱ्यांनीं एकत्र विचार करून जर कार्यक्रम ठरविला तर त्यांच्या मागणीचा अव्हेर करणें राज्यकर्त्यांस जड जाईल. ह्या दोन संस्थांच्या पुढाऱ्यांची एक कमीटी नेमली जाऊन तिच्याकडे स्वराज्याची योजना तयार करण्याचा प्रश्न सोंपवावा व पुढें ह्यासंबंधानें हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें जी कांहीं चळवळ व्हावयाची ती राष्ट्रीय सभा मुस्लिम लीग ह्यांच्या विद्यमानें व्हावी अशी एक सूचना पुढें आली आहे ती अत्यंत महत्त्वाची आहे असें आम्हांस वाटतें. हिंदुस्थानास वसाहतींच्या सारखें स्वराज्य मिळावें कीं नाहीं ह्याविषयीं आतां मतभेद नाहीं व हिंदी लोक स्वराज्यास अपात्र आहेत ह्या मुद्द्यांतही जीव राहिलेला नाहीं. परंतु स्वराज्यासंबंधानें चळवळ करावयाची तिच्या संबंधाचें धोरण आणि कार्यक्रम उतावीळपणानें न ठरवितां आपल्या अडचणींचा दूरवर विचार करून तो सुकर करावा असें आमचें म्हणणें आहे. उतावीळपणा आणि अविचार म्हणजे देशाभिमान नव्हे आणि दूरदर्शीपणा व मुत्सद्दीपणा म्हणजे भित्रेपणा नव्हे, हें सर्वांनीं लक्षांत वागविलें पाहिजे.

SOCIETY

वामन गोविंद काळे.

00196992

Digitized with financial assistance from
Shri Brihad Bhartiya Samaj
on 11 March, 2020